# श्री बाळकृष्ण नरहर भावे (बाळकोबा भावे) यांचे समग्र वाङ्मय

## खंड १ - गीता तत्त्वबोध : कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग


लेखक : श्री. बाळकोबा (बाळकृष्ण) भावे
अनुवाद व संपादन : प्राचार्य डॉ. विश्वास पाटील



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

*श्री बाळकोबा नरहर भावे (बाळकोबा भावे) यांचे समग्र वाङ्‌मय*

**खंड पहिला**



# गीता तत्व बोध (तीन भाग)
# कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग

*श्री बाळकोबा (बाळकृष्ण) भावे*

**अनुवाद व संपादन (मूळ हिंदी)**

प्राचार्य डॉ. विश्वास पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई - 400 025

एच-३३४

➢ **पुस्तकाचे नाव** : श्री. बाळकोबा नरहर भावे (बाळकोबा भावे) यांचे समग्र वाङ;मय (खंड पहिला) गीता तत्व बोध (तीन भाग) : कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग

➢ **लेखक** : श्री. बाळकोबा (बाळकृष्ण) भावे

➢ **अनुवाद व संपादन** : प्राचार्य डॉ. विश्वास पाटील

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-४६-९

➢ **प्रथमावृत्ती** : २०२३

➢ **प्रकाशक** : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.

➢ © **प्रकाशकाधीन** :

➢ **मुद्रक** : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजीक, पुणे - ४११००१.

➢ **किंमत** : रु. ४७७/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय निवेदन

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील साहित्याचा विचार करू जाता मराठी साहित्य वैशिष्ट्यपूर्ण ठरते कारण एक तर हे साहित्य एका तपसाधनेचा वैविध्यपूर्ण आढावा घेणारे आहे. दुसरे याची साहित्यिक मूल्यवत्ता रसिक, अभ्यासक व संशोधकांना आकृष्ट करणारी आहे.

याच क्रमात आचार्य विनोबांचे मधले बंधु श्री बाळकृष्ण उपाख्य बाळकोबा यांचे साहित्य अनेकश: अलक्षित असे आहे. मूळात हिंदी व गुजराती भाषेत लिहिलेल्या या साहित्याच्या संपादन व अनुवादाचे कार्य प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांनी केले आहे. यात ब्रह्मसूत्र, उपनिषदे, गीता व पातंजल योगदर्शन या सोबतच गांधीजींच्या मौलिक साहित्यावरील भाष्य ग्रंथांचाही समावेश आहे. ही सारी ग्रंथसंपदा प्रथमच मराठी वाचकांसमोर सादर होत आहे.

या साहित्याचा परिचय करून देण्याची संधी या संशोधन प्रकल्पाच्या निमित्ताने प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांनी उपलब्ध करून दिली आहे. या दुर्मिळ साहित्य प्रवाहाची नव्याने करून दिलेली ही ओळख मराठी साहित्य आणि संस्कृतीला समृद्ध करण्याकामी उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.


**- सदानंद मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई

# अनुक्रमणिका


| क्र | अनुक्रमणिका | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| 1 | गीता कर्मयोग | 1-360 |
| 2 | गीता भक्तियोग | 361-660 |
| 3 | गीता ज्ञानयोग | 661-942 |
| 4 | बाळकोबा यांची छायाचित्रे | 943-954 |

# अर्पण

त्याग वृत्तीने स्वधर्माचरण करणे म्हणजे यज्ञ
अशा प्रकारचे यज्ञमय जीवन घालवलेले
माझे कर्मयोगी वारकरी वडिल श्री किसनराव
यांच्या यज्ञीय उपकारक स्मृतींना
श्रध्दापूर्वक, कृतज्ञ बुध्दीने कर्मयोगाची ही
ओंजळ समर्पण
विश्वास

प्रथम खंड कर्मयोग

# अनुक्रमणिका


| क्र | अनुक्रमणिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | तीर्थोटली: कर्मयोगाचा महिमा | 11 |
| 2 | अध्याय पहिला : अर्जुन विषाद योग | 14 |
| 3 | अध्याय दुसरा : सांख्य योग | 45 |
| 4 | अध्याय तिसरा : कर्मयोग | 114 |
| 5 | अध्याय चौथा : ज्ञानकर्मसंन्यास योग | 179 |
| 6 | अध्याय पाचवा : कर्मसंन्यास योग | 247 |
| 7 | अध्याय सहावा : आत्मसंयम योग | 289 |

# तीर्थोटली कर्मयोगाचा महिमा

काम, कर्म आणि लीला असे तीन शब्द येतात. आपण जे काम करतो त्याला अधिक रसप्रद बनविण्यासाठी या पायऱ्या आहेत. माणसाचे काम, साधकाचे कर्म आणि भगवंताची लीला. एक माणूस मजूर आहे. एक कारागीर आहे. एक कलावंत आहे. तिन्ही माणसे काम करताहेत. मजूराचे काम रुक्ष स्वरुपाचे आहे. कारागीरांचे काम कलाकुसरीचे आहे. कलावंताचे काम हृदय ओतून केलेले आहे. काम करताना तन-मन एकत्रित करुन काम केले तर ते अधिक सुंदर आणि प्रत्ययकारी होते.

कर्मयोग हा फार अवघड शब्द आहे ही गोष्ट खरीच पण तो समजला तर आपण अधिक जीवनसन्मुख बनू शकू. कर्मकांड आपल्याला माहीत आहे. कर्मकांडमुक्त कर्मव्यवस्था म्हणजे कर्मयोगाची सुरुवात असे काहीसे म्हणता येईल. आपल्या कामाला ढोंग आणि देखावा यातून मुक्त करता यायला हवे. असे करता आले तर मग आपण कर्मयोगाची वाट चालू शकू. आपण कर्माचे मर्म समजून घेतले तर जीवनाचा आनंद कंद आपल्या हाती लागू शकेल. कर्म करत रहाणे हा फार मोठा यज्ञीय भाग आणि भाव आहे हे कळेल तो सुदिन होय.

योगेश्वर श्रीकृष्ण हे श्रेष्ठ कर्मयोगी आहेत. त्याना स्वत:ला कुठलेही काम करायची आवश्यकता नाही तरी ते अखंड कर्मरत राहिले. त्यानी खरकट्या पत्रावळी उचलल्या, घोड्यांचा खरारा केला, शल्ये काढली. पीतांबरात चंदी भरुन घोड्याना खाऊ घातली. आळशी आणि परावलंबी व्यवस्थेतली इंद्रपूजा थांबवली. देवेंद्राची मस्ती जिरवली. पशुधनाला उपयुक्त असा गोवर्धन पर्वत डोक्यावर घेतला. पेंद्या, बोबड्या, वाकड्या, सुदामा याना सोबत घेतले. त्यांचे महात्म्य वाढवले. माणसातला आत्मविश्वास जागवला. सर्वसामान्याना असामान्यत्व बहाल केले. स्वत: सारे काही करुन नामानिराळे राहिले. हे आत्मविलोपन कर्मात फार मोलाचे असते.

योगेश्वराने कर्मयोगाचे उपनिषद लिहिले. पांडवांच्या राजसूय यज्ञात विद्वानांच्या पूजेचे काम हाती घेतले. असा कर्मयोगी विरळ! कर्मयोगाचा विचार हा जळत्या चंदनवृक्षासारखा आहे. यात अग्नी आणि सुगंध याचा सुंदर मिलाफ झालेला आहे. ज्या कर्माला तेजस्विता आणि सुवास येईल ते कर्म प्रभुप्रिय होईल. आपण कर्मयोगाचे मर्म कसे जाणून घेणार? अस्तित्वाच्या लढ्यापासून अभिव्यक्तिचा लढाही ज्या सुजनाना लढावा लागतो त्याना कर्मयोगाचा अर्थ कळलेला असतो. आपल्या कामातून ईशपूजन करता येते. ईश्वराची पूजा आपण स्वकर्म पुष्पानी करु शकतो. आपल्या उत्तमोत्तम कर्मांची माळ आपण परमेश्वराला अर्पित करायची. 'इदं न मम्' एवढेच बोलून भागणार नाही तर 'कृष्णार्पणमस्तु' असे म्हणून जीवनातला कर्मयोग समजून घेता येतो.

श्री बाळकोबा विनोबांचे मधले बंधु. बाळपणापासुन त्यांचा अध्यात्माकडे ओढा होता. विज्ञाननिष्ठ पिता आणि भक्तीपरायण माता. त्यांना प्रतिभासंपन्न थोरला भाऊ लाभला होता. त्यांच्या आध्यात्मिक संगतीत त्यांनी वाटचाल केली. संस्कृत, मराठी, गुजराती, हिंदी यासोबत इंग्रजी भाषेवर त्यांचा अधिकार होता. संगीताचे ते ज्ञाते होते. भजनानंद त्यांच्या केवळ कंठाचा विषय नव्हता. त्यांच्या अंत:करणातून स्त्रवणारे ते अमृत होते.

श्री छगनलाल जोशी 'श्री बाळकोबांचे जीवन आणि कार्य' शीर्षकाने लिहिलेल्या लेखात म्हणतात "श्री बाळकोबा गीतेचा अभ्यास करायला लागले होते. मला आठवते त्यानुसार सायंकालीन प्रार्थनेसाठी घंटा वाजवायच्या आधी आणि प्रात:कालीन प्रार्थनेनंतर 'नंदिनी' च्या ओट्यावर फिरत असतांना मी त्यांना गीता मुखोद्गत करतांना अनेकदा बघितले आहे. गीतेच्या अध्ययनामुळे त्यांचा निश्चय झाला होता की विकारांचे शमन तर केवळ प्रभु दर्शनानेच होऊ शकते. यामुळे 1925 साली आमच्यापैकी कुणालाही न कळवताच आश्रम सोडून ते एकांतवासात निघून गेले होते. हे कळल्यावर गांधीजींनी त्याना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले.

"तुमच्या जाण्याचे मला दु:ख झाले. दु:खाचे कारण असे की मी हा आश्रम आत्मदर्शानासाठीच निर्मिला आहे. याचे बाह्य अंग सेवा आहे. व्रत-परिपालन याचे अंतरंग आहे. आश्रमाचा मूळ हेतु हरी दर्शनाचाच आहे. असे असतांना हरीदर्शनाच्या लालसेने तुम्ही बाहेर का निघून गेलात? हे लक्षात आले नाही."

एकांत - साधनेसाठी बाळकोबा गागोदा येथे गेले होते. कुलाबा जिल्ह्यातील त्यांचे हे मूळ गाव पूजनीय विनोबांचे जन्मस्थान आहे. तिथे गीतेचा अभ्यास पूर्ण करुन ते आश्रमात परतले तेव्हा प्रात:कालीन प्रार्थनेनंतर त्यांनी सांगितले.

"एकांतवासात गीतेचा अभ्यास करताना मला पुढील तीन श्लोकांमुळे शांतता लाभली.''

***यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।***
***स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानव: ॥***

अर्थात् ज्या परमेश्वरापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे आणि ज्याने हे सर्व जग व्यापले आहे, त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांनी पूजा करतो तो पुरुष परम सिध्दी मिळवतो. (गीता.18/46)

***ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।***
***भ्रामन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया ॥***

अर्थात् - हे अर्जुना! अंतर्यामी परमेश्वर आपल्या मायेने शरीररुपी चक्रावर (यंत्रावर) आरुढ झालेल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या कर्मानुसार फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयात राहिला आहे. (गीता. 18/61)

***सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।***
***अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच: ॥***

अर्थात् तू केवळ शक्तीमान सर्वाधार अशा मला (परमेश्वरालाच) शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू शोक करु नकोस. (गीता 18/66)

या तीन श्लोकांचा भावार्थ असा आहे की जगात जे काही चालले आहे ते त्याच्या अनंत शक्तीचा प्रभावच आहे. परमेश्वराच्या लीलेत मनुष्य तर केवळ प्यादा आहे. यामुळे जगाच्या दुसऱ्या मायेला सोडून त्याचे शरण ग्रहण केले तर सर्व पापांपासून मुक्ती मिळून जाईल आणि या शरणागतीतच जीवनाचे सार-सर्वस्व सामावलेले आहे."

श्री बाळकोबा यांनी श्री कौशिकभाई लायजावाला यांना गुजराती भाषेत लिहिलेल्या पत्रांचे संकलन 'हितैषीना पत्रो' या शीर्षकाने प्रकाशित झाले आहे. यातील भूमिकेच्या आधारे असे सांगता येईल की विनोबांकडे जाऊन गीता शिकता यावी अशी बाळकोबा यांना तीव्र इच्छा होती पण हा योग काही लाभला नाही. पुढे आत्मबळानेच त्यांनी गीतेचे अध्ययन केले पण गीता वाचतांना ज्या ज्या शंका त्यांच्या मनात उभ्या राहिल्यात त्यांचे निरसन त्यांना ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात करुन घेता आले. त्यानंतरही या भाष्यातल्या कित्येक भागांच्या वाचनादरम्यान त्यांना भावावस्थेचा अनुभव आला म्हणजे समस्त चराचर सृष्टीत ईश्वर दर्शनाचा अनुभव व्हायला लागला.

बाळकोबा यांच्या या ग्रंथाच्या लेखनाविषयी पद्मा आपल्या नोव्हेंबर 1981 सालच्या 'मैत्री' अंकातील 'नम्रतेची मूर्ती' शीर्षकाच्या लेखात म्हणतात " 1953 साल होते ते. त्या काळात तिथल्या सामुदायिक प्रार्थनेत मुख्यत: तात्याजीच (बाळकोबा हेच) प्रार्थना गायचे. एके दिवशी सायंकालीन प्रार्थना आटोपून आम्ही मंडळी आपापल्या खोल्यांकडे वळत होतो. मी तात्याजींच्या सोबत होते. आश्रम बघायला, दर्शन करायला आलेली काही मंडळीही आमच्या मागे-मागे येत होती. आपल्या स्वभावानुसार तात्याजींनी त्यांना विचारले 'कसे येताहात? काही हवे का तुम्हाला? 'त्यांच्यातली एक भगिनी बोलली 'मला आपल्याकडून गीता शिकायची आहे.' भगिनी नुकत्याच पुण्याहून आल्या होत्या. पहिल्यांदाच तात्याजींचे दर्शन घेत होत्या. तात्याजींनी त्यांची चौकशी केली आणि विनम्रपणे म्हणाले 'इथे गीताई शिकवायची योग्यता असलेले काही लोक आहेत, त्यांना भेटा. मी काही विद्वान व्यक्ती नाही.' भगिनी मात्र आपल्या निर्णयावर ठाम होत्या आणि सारखे एकच वाक्य म्हणत होत्या 'मला आपल्याकडूनच शिकायचे आहे. 'तात्याजी नम्रतापूर्वक नकार देत होते पण अखेर त्या भगिनीच्या वात्सल्याचा विजय झाला आणि त्यांना शिकवायला तात्याजी तयार झाले पण याच काळात पूजनीय बाबांचा आदेश आला की ब्रह्मविद्या मंदिरातील भगिनींना ब्रह्मसूत्र शिकवायला तात्याजींनी तिकडे यावे. तो क्रम सुरु झाला पण त्या सावित्रीबेन टाटिया यांना दिलेल्या शब्दाचे त्यांना विस्मरण झाले नाही. प्रत्यक्ष समोरासमोर बसवून त्यांना शिकवण्याची सोय नव्हती अनुकूलता नव्हती यामुळे गीतेच्या एकेका श्लोकावर लिहिले आणि नंतर त्याचा ग्रंथ सिध्द झाला 'गीता तत्वबोध'.

गीता समत्वयोगाचा अद्वितीय ग्रंथ आहे. गांधीजी आणि विनोबाजींनी गीतेच्या या वैशिष्ट्याला अनेकदा अनेक रुपात प्रकट केले आहे. बाळकोबाजींनी आपल्या या भाष्य ग्रंथात या दोघांच्या विचारधारेला विषद केले आहे. या भाष्यामधून बाळकोबांनी सर्वोदय विचाराची सर्वांगपूर्ण प्राण प्रतिष्ठा केली आहे असे एक प्रकारे सांगता येईल. जन सेवा, कर्म-सातत्य, जीवन व्यवहारात अनासक्ती, याच देहात मुक्तीचा अनुभव सर्वत्र हरीदर्शनाचे तत्त्वज्ञान तर युगानुकूल आहेच पण ते जीवनाला उत्प्रेरित करणारेही आहे. या विवेचनात स्पष्टीकरणार्थ उपनिषदांचा आधार घेतला आहे या सोबतच शंकराचार्य, तुलसीदासजी यांचाही आधार घेतला आहे.

या ग्रंथासंबंधी खुद्द बाळकोबाजी म्हणतात: "हिंदूंचे तीन प्रमाणभूत तीन ग्रंथ मानले जातात. उपनिषद, ब्रह्मसूत्र आणि गीता. प्राचीन काळापासून वेद प्रमाणग्रंथ मानले गेलेत. वेदांचे दोन भाग आहेत-कर्मकांड आणि ज्ञानकांड. ज्ञानकांड म्हणजे उपनिषदे. उपनिषदे सामान्य माणसाला कळायला अवघड आहेत. उपनिषदात आढळणाऱ्या परस्पर विरुध्द वचनांच्या एकवाक्यतेसाठी ब्रह्मसूत्राची रचना झाली आहे. ब्रह्मसूत्र देखिल सामान्य वाचकांच्या लक्षात न येणारा ग्रंथ आहे. गीतेची रचना सामान्य व्यक्तीच्या लक्षात सहज येण्यासारखी आहे. गीतेत अनेक आध्यात्मिक विषयांचे विवेचन केले गेले आहे. त्यांच्या अर्थांच्या बाबतीत मतभेदाला वाव असल्यामुळे शंकराचार्यांनी आपल्या गीता भाष्यात सुरुवातीला लिहिले आहे **"तत् इदं गीताशास्त्रं समस्तवेदार्थसारसंग्रहभूतं दुर्विज्ञार्थम्।"** हे गीताशास्त्र समस्त वेदांचा सारांश आहे पण याचा अर्थ अवघड होऊन गेला आहे. "

आतापर्यंत प्रादेशिक भाषांमध्ये गीतेच्या संदर्भात जे काही ग्रंथ लेखन झाले आहे त्यात विनोबाजींच्या 'गीता प्रवचने' या ग्रंथात संन्यास, कर्मयोग, सगुण-निर्गुण भक्त वगैरे विषयांवर जसे स्पष्टीकरण आले आहे तसे अन्यत्र क्वचित्‌च बघायला मिळेल. यामुळे 'गीता प्रवचने' हा सर्वमान्य ग्रंथ झाला आहे पण या ग्रंथात प्रत्येक अध्यायावर विवेचन आहे तरी प्रत्येक श्लोकावर विवेचन नाही. प्रत्येक श्लोकावर लिहिले गेलेले ग्रंथही मोठ्या प्रमाणावर आढळतात पण त्यांच्यात एकेका श्लोकातल्या समस्त मुद्यांवर सविस्तर विवेचन केलेले आढळत नाही. या ग्रंथात हा प्रयत्न आहे. या सोबतच सामान्य जनांच्या ध्यानात येईल अशा सुबोध भाषेत विवेचन करायचा प्रयत्न केला गेला आहे. या ग्रंथातून सामान्य जनांच्या जीवनोत्थानात काही सहाय्य लाभले तर हे ग्रंथ लेखन सफळ झाले असे मानीन."

बाळकोबाजींची मातृभाषा मराठी आहे. आपण काही हिंदी भाषेचे प्रकांड पंडित, भाषाशास्त्रज्ञ वा लेखक नाहीत, असे त्यांचे म्हणणे होते. आपले म्हणणे कमालीच्या साध्या सोप्या भाषेत ते मांडत गेले. तरीही या भाषेचे एक माधुर्य आहे, प्रासादिकता आहे. ही सहजता भक्तांना आणि जिज्ञासु जनांना सारखीच आकृष्ट करणारी अशी आहे. ते शास्त्री पंडित नव्हते, ते होते अनुभवसंपन्न साधक. त्यानी आपल्या आयुष्यात जे काही अनुभवले, जसे जगले त्या जगण्यालाच सरळ-सुबोध भाषेत त्यांनी मांडले. यामुळे अशा भाष्य ग्रंथाचे मोल शास्त्रीयता आणि विद्वत्‌जन मान्य ग्रंथांहून मोठे आहे.

बाळकोबाजींचे हे गीताभाष्य अत्यंत सरळ भाषेत उदाहरण आणि दृष्टांतांनी समृध्द असे आहे. गीतेसारख्या गूढ, तत्त्वज्ञानपर ग्रंथाचे चिंतन बाळकोबांनी मोठ्या परिश्रमाने आणि एकात्मतेने बृहद भाष्यरुपात प्रस्तुत केले आहे. त्यांचा हा बहुमूल्य प्रसाद आहे. बाळकोबांनी गीतेचा परिचय करुन दिला आहे. साध्या-सोप्या दृष्टांतांनी अध्यात्मविषय सुगम करुन निरुपण करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. हे सर्वसामान्य वाचकांसाठी, जिज्ञासु जनांसाठी, भक्तांसाठी आणि मुमुक्षुंसाठी सारखेच उपयोगी आहे. बाळकोबांच्या लेखनात माधुर्य आणि प्रासदिकतेचा अनोखा आविष्कार आहे. यातुन शास्त्रचर्चेऐवजी अनुभव कथनाला प्राधान्य दिले गेले आहे.

या ग्रंथाच्या विवेचनासाठी आपण गीताप्रेस गोरखपुर यांनी केलेल्या मराठी अनुवादाचाही आधार घेतला आहे. प्रत्येक श्लोकासोबत अभ्यासुना सोईचे व्हावे म्हणून गीताईतील श्लोकांचा संदर्भ दिला आहे. संपूर्ण विवेचनात गीताईच्या जानेवारी 2011 च्या आवृत्तीचा उपयोग केला गेला आहे. मूळच्या विवेचनाला अधिक सुगम आणि सुसंगत करायचा प्रयत्न केला आहे. श्री बाळकोबा यानी मूळ लेखनात श्लोकांचा अर्थ सांगितलेला नाही. तो आपण दिला आहे. लांब-पल्लेदार वाक्याना छोट्या आकाराचा घाट दिला आहे. अन्वय आणि अर्थाचे निरुपण करताना गीताप्रेस गोरखपुरच्या प्रतीचा आधार घेतला आहे. विवेचनाच्या दृष्टीने अधिक संदर्भयुक्त वाटल्यामुळे अनेक ठिकाणी तुकोबांच्या अभंगांचा उल्लेख केला आहे.

**- प्राचार्य डॉ. विश्वास पाटील**

15 नोव्हेंबर 2020, विनोबा पुण्यतिथी



## पहिला खंड - पहिला भाग - कर्मयोग
## पहिला अध्याय
# अर्जुन विषाद योग

गीता हा हिंदूंचा सर्वमान्य ग्रंथ आहे. प्रथम अध्यायाला 'अर्जुन विषाद योग' म्हटले गेले आहे. यात अर्जुनाच्या विषादाचे वर्णन आहे. तरीही या प्रसंगाचे वर्णन करणे हा काही या ग्रंथाचा मुख्य उद्देश वा विषय नाही. मुख्य उद्देश तर अर्जुनाला शोक, मोह, दु:ख कुठल्या प्रसंगामुळे, कसे आणि का झाले हे सांगणे आहे.

: 1 :

**धृतराष्ट्र उवाच**

***धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सव: ।***
***मामका: पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **संजय:** हे संजया
- **धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे:** धर्मयुक्त, पावन कुरुक्षेत्रात
- **समवेता युयुत्सव:** एकत्र आलेले, युध्दाचे इच्छुक असे
- **मामका: च पांडवा:** एव: माझा पुत्र दुर्योधन वगैरे आणि पांडूचे पुत्र अर्जुन वगैरेंनी
- **किं अकुर्वत्?:** काय केले?

**अर्थ**

धृतराष्ट्र म्हणाला, हे संजया धर्मभूमी असलेल्या कुरुक्षेत्रात युध्दाच्या इच्छेने एकत्र जमलेल्या माझ्या आणि पांडूच्या मुलांनी काय केले?

**धृतराष्ट्र म्हणाला**

***त्या पवित्र कुरु-क्षेत्रीं पांडूचे आणि आमुचे***
***युध्दार्थ जमले तेव्हां वर्तलें काय संजया ॥***

**विषय:** धृतराष्ट्राच्या प्रश्नापासून गीतेची सुरुवात आहे. एका अंध राजाने विचारलेला हा प्रश्न आहे.

**स्पष्टीकरण**

धृतराष्ट्राने संजयाला विचारले. धृतराष्ट्र कुरु वंशाचे राजे आहेत. कौरवांचे पिता आहेत. त्यांच्या वडिलांचे नाव विचित्रवीर्य आणि आईचे नाव आहे अंबिका. ते जन्मांध होते पण त्याना 'प्रज्ञाचक्षु' असेही म्हणत असत. प्रज्ञाचक्षु शब्दाचा स्थूल अर्थ जन्मांध असा होतो. सूक्ष्म अर्थ 'विवेकी' असा होतो. ते काही ज्ञानवंताप्रमाणे पुत्रमोह वगैरेपासून मुक्त नव्हते. भावार्थ असा की जन्मांध असूनही त्यांच्याठायी सारासार विवेक बुध्दी होती.

विनोबांनी इथे धृतराष्ट्राला कौरवांचे पिता, राष्ट्राभिमानी सांगून मानसिक वृत्तीच्या दृष्टीने धृतराष्ट्र शब्दाचा अर्थ मोह वृत्ती असा केला आहे.

संजय हे धृतराष्ट्राचे सचिव होते. ते नेहमी सत्य, न्याय आणि धर्माचा उपदेश देत. युध्द टाळण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. ते जितेंद्रिय होते. भगवान व्यासांच्या कृपेने त्याना दिव्य दृष्टी लाभली होती. यामुळे एका ठिकाणी बसून ते समस्त घटना बघू शकत असत. आरंभिक दहा दिवसांच्या युध्दाचे वर्णन त्यानी धृतराष्ट्रापुढे केले. दहाव्या दिवशी भीष्म पितामह धारातीर्थी पडले. ही महत्वाची बातमी सांगायला म्हणून ते धृतराष्ट्राकडे गेले. भीष्म पितामहांना वीरमरण प्राप्त झाल्याचे ऐकून धृतराष्ट्र दु:खी झाले. त्यांनी युध्द कथा विस्तारपूर्वक ऐकण्याची इच्छा संजयाला सांगितली.

या श्लोकात धृतराष्ट्राचा प्रश्न आहे. यात दोन गोष्टी आहेत.

1) **संजय, धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे** - हे संजया, धर्मयुक्त पवित्र कुरुक्षेत्रात. इथे 'धर्मक्षेत्र' शब्द आला आहे.

पहिल्या अध्यायात युध्द वर्णन येते. गांधीजी या वर्णनाला रुपकात्मक मानतात. आपले मनच धर्मक्षेत्र असून ते कुरुक्षेत्रही बनून जाते. कुरुक्षेत्र म्हणजे युध्दमैदान - रणमैदान. सद्‌वृत्ती पांडव पक्ष आणि असद्‌वृत्ती कौरवपक्ष होय.

विनोबाजींनी 'गीताई चिंतनिका' मधून हाच विचार मांडला आहे. तेराव्या अध्यायात शरीराला 'क्षेत्र' मानले. या शरीरात अखंडपणे देवासुर संग्राम चालतो. असे वर्णन उपनिषदातूनही येते. याच संदर्भात गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी व आसुरी संपत्तीची लक्षणे वर्णन केली आहेत. कौरव म्हणजे कर्मासक्त, मूढ, राजस, तामसवृत्तीचे.

लोकमान्य टिळकांच्या मते कुरुक्षेत्र हा हस्तिनापुरच्या आसपासचा प्रदेश. तिथे दिल्ली शहर वसले आहे. कौरव पांडवांचे पूर्वज कुरु नामक याच भूमीवर नांगर हाकलत असत. यामुळे या भूमीला 'क्षेत्र' म्हणजे शेत असे म्हटले आहे. इंद्राने कुरुला वरदान दिले होते की या क्षेत्री जो तपश्चर्या करील त्याला स्वर्ग प्राप्ती होईल. यामुळे हे क्षेत्र धर्मक्षेत्रही बनून गेले.

2) **समवेता युयुत्सव: मामका: च पांडवा: एव किं अकुर्वत?** युध्दाच्या इच्छेने एकत्र जमलेले माझे पुत्र दुर्योधन वगैरे आणि पांडूची मुले अर्जुन वगैरेंनी काय केले?

धृतराष्ट्राने मोठ्या आतुरतेने संजयाला हे विचारले की आमने-सामने उभ्या ठाकलेल्या दोन्ही सैन्यदळाने कशाप्रकारे युध्द सुरु केले? दोघांची युध्दाची तयारी कशी होती वगैरे.

: 2 :

**संजय उवाच**

*दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा।*
*आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत॥*

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **तदा तु:** कौरव पांडव यांची सैन्यदळे युध्दार्थ सिध्द होऊन गेली होती त्या वेळी तर
- **राजा दुर्योधन:** राजा दुर्योधनाने
- **पांडवानीकम्:** पांडवांच्या सैन्य दळाला
- **व्यूढं दृष्ट्वा:** व्यूह रचनापूर्वक सज्ज बघून
- **आचार्य उपसंगम्य:** द्रोणाचार्यांनजिक जाऊन
- **(इदं) वचनं अब्रवीत्:** असे वचन म्हटले, असे बोलला

**अर्थ**

संजय म्हणाला, तेव्हा राजा दुर्योधनाने व्यूहरचना केलेले पांडवांचे सैन्य पाहिले आणि द्रोणाचार्यांजवळ जाऊन तो म्हणाला, संजय म्हणाला.

*पाहिली पांडव सेना सज्जदुर्योधनें तिथें*
*मग गेला गुरुपाशीं त्यांस हे वाक्य बोलिला।*

**विषय:** या श्लोकात संजय धृतराष्ट्राला माहिती पुरवत आहे.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात दोन गोष्टी आहेत.

1) संजय सांगताहेत: **तदा तु राजा दुर्योधन: पांडवानीकं व्यूढं दृष्ट्वा** त्यावेळी म्हणजे जेव्हा कौरव आणि पांडव यांच्या सेना झुंजायला सिध्द झाल्या तेव्हा राजा दुर्योधनाने पांडवांच्या सैन्य दळाला व्यूह रचनापूर्वक सज्ज बघून.

धृतराष्ट्र आणि गांधारीचा मोठा मुलगा दुर्योधन. हा महारथी होता. पराक्रमी होता. गदायुध्दात निपुण होता, पण पांडवांशी अकारण द्वेष करायचा.

विनोबांनी दुर्योधन शब्दाचा दुराग्रह असा सूक्ष्म अर्थ केला. सोळाव्या अध्यायाच्या दहाव्या श्लोकात असुरांचे वर्णन येते. हे दंभ, मान, मदभरले असतात. यांच्या ठायी प्रबळ कामवासना असते. त्यांचे निश्चय अशुभ असतात.

आपल्या अशुभ निश्चयांना जगभर प्रसारीत करण्याचा ते अखंड प्रयत्न करतात. नित्य अपवित्र असतात. दुर्योधनही अशा असुर वृत्तीने युक्त होता.

दुर्योधनाने बघितले की व्यूह रचनेने सज्ज अशी पांडव सेना झुंजायला सिध्द आहे. अशा प्रकारची सज्ज सेना बघून

**2) आचार्य उपसंगम्य इदं वचनं अब्रवीत:** द्रोणाचार्यांपाशी जाऊन असे वचन बोलला. इथे 'आचार्य' हे विशेषण द्रोणाचार्यासाठी आहे. ते कौरव सेन्यदळाचे सेनापती होते. त्यांनी कौरव पांडवांना धनुर्विद्येचे पाठ दिले होते. त्यांचे वडिल महर्षी भरद्वाज. माता अप्सरा देवकन्या घृताची. द्रोणाचार्य वेद-वेदांग विद्येतही पारंगत होते. पराक्रमी होते. यज्ञकलशातून जन्माला आल्यामुळे त्यांना 'द्रोण' असे म्हणत. पांडवांचा पक्ष न्यायाचा असल्याचे त्यांना मान्य होते. तरी ते कौरवांच्या सैन्यदळात राहिले, कौरवांच्या सेनापतीच्या रुपाने लढत राहिले.

दुर्योधन पराक्रमी होता. तरीही पांडवांची सज्ज सेना बघून थोडा भ्याला. यामुळे द्रोणाचार्यांजवळ जाऊन सांगू लागला.

: 3 :

*पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम्।*
*व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता॥*

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **आचार्य:** हे द्रोणाचार्या
- **तव:** आपल्या
- **शिष्येण:** शिष्य
- **द्रपदपुत्रेण:** राजा द्रुपदांच्या पुत्र अशा धृष्टद्युम्नाने
- **धीमता:** खूप बुध्दिमान
- **व्यूढां:** ज्या सैन्यदळाची चांगली व्यूह रचना केली आहे
- **पांडुपुत्राणाम्:** अशा पांडवांच्या
- **एतां महतीं चमूम्:** या प्रचंड सैन्य दळाला
- **पश्य:** बघा

**अर्थ**

अहो आचार्य, तुमच्या बुध्दिमान शिष्याने द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाने व्यूहरचना करुन उभी केलेली ही पांडुपुत्रांची प्रचंड सेना पहा.

*गुरुजी तुमचा शिष्य शाहणा द्रुपदात्मज*
*विशाळ रचिलें त्यानें पहा पांडव सैन्य-हें।*

**विषय:** दुर्योधन द्रोणाचार्यांना सावध करत आहे.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**1) आचार्य तव धीमता शिष्येण द्रुपदपुत्रेण:** दुर्योधन द्रोणाचार्यांना सावधान करत म्हणतो-'आपला शिष्य धृष्टद्युम्न. हा बुध्दिमान शिष्य द्रुपदाचा पुत्र आहे. आपणच त्याला घडवले आहे.' द्रोणाचार्य पांडवांच्या पक्षाला सत्पक्ष मानत होते यामुळे आपल्या शिष्याला समोर बघून द्रोणाचार्यांना अनुत्साह न वाटो ही दुयोर्धनाला काळजी लागून राहिली आहे. तो म्हणतो 'बघा गुरुजी, आपला शिष्य द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न कसा आहे? आपण त्याला विद्या प्रदान करुन घडवले आहे.' यात दोन गोष्टी आहेत. एक तर तो आपला शिष्य आहे. यामुळे कदाचित आपण त्याच्यासमोर उत्साहपूर्वक झुंजू शकणार नाहीत. दुसरी गोष्ट अशी आहे की आपणच धृष्टद्युम्नाला असा काही तरबेज केला आहे की तो युध्द विद्येत खूपच प्रवीण बनून गेला आहे. धृष्टद्युम्न हा पांचाल देशीच्या राजा द्रुपदाचा पुत्र होता. तो यज्ञ प्रज्वलित करताना अग्निपासून उत्पन्न झाला. त्यामुळे त्याला अग्नीचा अंश मानले जात होते. या नावात दोन शब्द येतात 'धृष्ट' म्हणजे शत्रुच्या पराक्रमाला सहन न करणारा. 'द्युम्न' म्हणजे अग्नीसारखा तेजस्वी.

**2) व्यूढां पांडुपुत्राणां एतां महतीं चमूं पश्य:** अतिशय उत्तम प्रकारे सज्ज अशा या पांडवांच्या सैन्य दळाला आपण बघावे.

युध्दाच्या पहिल्या दिवशी पांडव दळाचा सेनापती होता भीम. युध्दशास्त्रानुसार त्याने 'वज्र' नावाचा व्यूह तयार केला होता, यामुळे सेनापती या नात्याने भीमाचे नाव प्रसिध्दीला आले. खरे तर पांडव सैन्याचा सेनापती धृष्टद्युम्नच होता. पांडवांची सेना होती सात अक्षौहिणी. ही संख्या कमी होती. कौरवांची अकरा अक्षौहिणी म्हणजे

पांडव सैन्य दळाच्या दीडपट होती. एक अक्षौहिणी म्हणजे 12,870 रथ, 21871 हत्ती, 65,610 अश्व आणि 1,09,350 पायदळ. यामुळे या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करत - संकेत करत दुर्यांधन द्रोणाचार्यांना सांगत होता की पांडव सेनेची व्यूह रचना किती भक्कम झाली आहे, हे बघावे. आपली सेना दीडपट असल्यामुळे आपण कुठल्याही गफलतीत रहाता कामा नये. व्यूह रचनेच्या भक्कमपणाकडे लक्ष आकृष्ट करण्याच्या दृष्टीने दुर्योधनाने प्रचंड मोठी अशी पांडव सेना असा शब्द प्रयोग केला आहे. केवळ संख्येच्या दृष्टीने ती नाही.

:4-5-6:

*अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।*
*युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथ: ॥*
*धृष्टकेतुश्चेकितान: काशिराजश्च वीर्यवान् ।*
*पुरुजित् कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगव: ॥*
*युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् ।*
*सौभद्रौ द्रोपदेयाश्च सर्व एव महारथा: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **अत्र:** इथे पांडवांच्या सैन्यदळात
- **शूरा:** महेष्वासा: युधि भीमार्जुन
- **समा:** शूर, मोठमोठे धनुर्धारी, युध्द कलेत भीम आणि  अर्जुनासमान योध्दे आहेत
- **युयुधान:** (उदाहरणार्थ) युयुधान म्हणजे सात्यकि
- **च विराट:** आणि राजा विराट
- **च महारथ:** द्रुपद: आणि महारथी द्रपद
- **धृष्टकेतु:** धृष्टकेतु
- **चेकितान:** चेकितान
- **च वीर्यवान् काशिराज:** आणि पराक्रमी काशिराज
- **पुरुजित्:** पुरुजित्
- **च कुंतिभोज:** आणि कुंतिभोज
- **च नरपुंगव:** शैब्य: आणि नरश्रेष्ठ शैब्य
- **च विक्रान्त:** युधामन्यु: तसेच पराक्रमी युधामन्यु
- **च वीर्यवान् उत्तमौजा:** आणि पराक्रमी उत्तमौजा
- **सौभद्र:** सुभद्रा पुत्र अभिमन्यु
- **च द्रौपदेया:** आणि द्रौपदीचे पाचही पुत्र
- **सर्वे एव महारथा:** हे सारे महारथी आहेत

**अर्थ**

या सैन्यात मोठमोठे धनुष्य घेतलेले भीम, अर्जुन यांच्यासारखे शूरवीर, सात्यकी, विराट, महारथी द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, बलवान काशिराज, पुरुजित, कुंतिभोज, नरश्रेष्ठ शैब्य, पराक्रमी अभिमन्यू, शक्तिमान उत्तमौजा, सुभद्रापुत्र अभिमन्यू आणि द्रौपदीचे पाच पुत्र हे सर्वच महारथी आहेत.

***ह्यांत शूर धनुर्धारी युध्दीं भीमार्जुनांसम***
***महा-रथी तो द्रुपद विराट-नृप सात्यकि ।***
***धृष्टकेतु तसा शूर काश्य तो चेकितान हि***
***पुरुजित कुंतिभोजीय आणि शैब्य नरोत्तम ।***
***उत्तमौजा हि तो वीर युधामन्यु हि विक्रमी***
***सौभद्र आणि ते पुत्र द्रौपदीचे महा-रथी ।***

**विषय:** या श्लोकांमधून पांडव सैन्यदळातील काही महारथींचा उल्लेख आला आहे.

**स्पष्टीकरण**

या 4 ते 6 अशा तीन श्लोकांमधुन पांडव सैन्यदळाच्या महारथींचा परिचय करुन दिला गेला आहे.

1) **भीम:** हा पांडुचा द्वितीय पुत्र. वायुदेवाच्या अनुग्रहाने कुंतीने याला जन्म दिला. हा गदायुध्दात निपुण आणि अतुलित पराक्रमी होता.

2) **अर्जुन:** अर्जुन पांडूचा तिसरा पुत्र. इंद्राच्या कृपेने कुंतीने याला जन्म दिला. द्रोणाचार्यांचा हा पट्टशिष्य. डाव्या आणि उजव्या दोन्ही हातांनी शस्त्र चालवता येत असल्यामुळे याला 'सव्यसाची' म्हणत.

3) **युयुधान:** युयुधान सात्यकी नावाने प्रसिध्द होता. हा वृष्णिवंशातल्या सत्यकाचा पुत्र. मरुत् देवतेच्या अंशाने उत्पन्न झाला. हा अर्जुनाचा पट्टशिष्य होता. युयुधान म्हणजे असामान्य योध्दा.

4) **विराट:** विराट हा मत्स्यदेशीचा पराक्रमी राजा. पांडव अज्ञातवासात असताना याच्याकडे आश्रयार्थ होते. हा अभिमन्युचा सासरा होय.

5) **धृष्टकेतु:** धृष्टकेतु हा चेदि देशीचा राजा. हा शिशुपालचा पुत्र होय.

6) **चेकितान:** चेकितान हा महारथी होता. व्यासांनी आवाहन केल्यावर हा गंगेतून प्रकटला होता.

**7) काशिराज:** काशिराज हा युधिष्ठिराचा मित्र असून मोठा पराक्रमी होता.

**8) पुरुजित:** पुरुजित हा कुंतिभोजाचा पुत्र. कुंतीचा बंधु.

**9) कुंतिभोज:** कुंतिभोज हे पुरुजित आणि कुंतीचे वडिल होत.

**10) शैब्य:** शैब्य हा शिबिदेशीचा राजा. युधिष्ठिराचा सासरा.

**11) युधामन्यु:** युधामन्यू हा पांचाल देशीचा राजकुमार.

**12) उत्तमौजा:** उत्तमौजा हा पांचाल देशीचा योध्दा. पांडवांचा नातलग. एक पराक्रमी पुरुष.

**13) सौभद्र:** सौभद्र हा अर्जुन-सुभद्रेचा पुत्र अभिमन्यू. याने वयाच्या सोळाव्या वर्षी चक्रव्यूहाचे भेदन केले आणि या प्रयत्नातच वीरगतीला प्राप्त झाला.

**14) द्रौपदेय:** द्रौपदेय हे द्रौपदीचे पाच पांडवांपासून उत्पन्न झालेले पाच पुत्र. युधिष्ठिराचा प्रतिविंध्य. भीमाचा सुतसोम. अर्जुनाचा श्रृतकीर्ती. नकुलाचा शतानीक आणि सहदेवाचा श्रुतकर्मा.

अखेर म्हटले आहे की हे सारे महारथी आहेत. सातव्या श्लोकात दुर्योधनाने आपल्या सैन्याची प्रस्तावना मांडलीय. आठव्या श्लोकात आपल्या योध्दयांचा नावानिशी परिचय करुन दिलाय.

: 7 - 8 :

***अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम।***
***नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते॥***
***भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजय:।***
***अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **द्विजोत्तम:** हे ब्राह्मणांमध्ये श्रेष्ठ अशा द्रोणाचार्या
- **अस्माकं ये विशिष्टा:** आता आमच्या पक्षातले जे विशिष्ट योध्दा आहेत
- **तु मम सैन्यस्य नायका:** आणि माझ्या सेनेतील जे सेनापती आहेत
- **तान् निबोध:** त्यांच्या बाबतीत आपण समजून घ्यावे, ऐकावे
- **ते संज्ञार्थम्:** आपल्या माहितीसाठी
- **तान् ब्रवीमि:** मी त्यांची नावे सांगत आहे
- **भवान्:** आपण स्वत: जे सर्वांचे गुरु आहात
- **च भीष्म:** आणि भीष्म जे आमचे अतिपूजनीय पितामह आहेत
- **च कर्ण:** आणि हा शूरवीर कर्ण
- **च समितिंजय: कृप:** युध्दात विजय संपादन करणारे कृपाचार्य
- **अश्वत्थामा:** आपले चिरंजीव अश्वत्थामा
- **च विकर्ण:** आणि माझा बंधु विकर्ण
- **च तथा एव सौमदत्ति:** त्याचप्रमाणे सौमदत्ति (याला भूरिश्रवा असेही म्हणत असत)

### अर्थ

अहो ब्राह्मणश्रेष्ठ, आपल्यातील जे महत्वाचे आहेत ते जाणून घ्या. आपल्या माहितीसाठी माझ्या सैन्याचे जे सेनापती आहेत ते मी आपल्याला सांगतो.

आपण: द्रोणाचार्य, पितामह भीष्म, कर्ण, युध्दात विजयी होणारे कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण तसेच सोमदत्ताचा मुलगा भूरिश्रवा.

***आतां जे आमुच्यांतील सैन्याचे मुख्य नायक***
***सांगतों जाणण्यासाठी घ्यावे लक्षांत आपण।***
***स्वतां आपण हे भीष्म यशस्वी कृप कर्ण तो***
***अश्वत्थामा सौमदत्ति जयद्रथ विकर्ण हि।***

**विषय:** इथे एकाच श्लोकात आपल्या सैन्यदळातील प्रमुख योध्दयांचा नामनिर्देश केला आहे.

### स्पष्टीकरण

यावर विनोबांचे निवेदन मोठे मार्मिक आहे. सोळाव्या अध्यायात दैवी गुणसंपदेचे वर्णन तीन श्लोकात येते. आसुरी संपदेचे वर्णन मात्र अवघ्या एका श्लोकात आहे. दैवीगुणयुक्त पांडवांसाठी तीन श्लोक. आसुरी कौरवांसाठी एक श्लोक गीताकाराने खर्ची घातला आहे.

सातव्या श्लोकात दुयोंधनाकडून संयोजक या नात्याने सारी जबाबदारी द्रोणाचार्य यांना देण्याचे संकेत आहेत.

तसे तर द्रोणाचार्य सेनापती असल्यामुळे त्याना तर सारे काही ज्ञात होतेच.

आठव्या श्लोकात नावांसकट उल्लेख झाला आहे. या श्लोकाच्या अखेरच्या चरणात **सौमदत्तिस्तथैव च** या ऐवजी काही ठिकाणी **सौमदत्तिर्जयद्रथः** असाही पाठभेद आढळतो. जयद्रथ हा मोठा योध्दा होता. यामुळे त्याचे नाव सुटून जायला नको असे विनोबांचे मत आहे. यामुळे 'गीताई' मध्ये **तथैव च** च्या ऐवजी **जयद्रथ** असे नाव ठेवले आहे. अशाप्रकारे जयद्रथाचे नाव घेतले तर दुर्योधनाने आपल्या पक्षातील सर्वच युध्दवीरांचा उल्लेख केला आहे. पांडवांच्या वीरांचा उल्लेख चार ते सहा या श्लोकांमधून आला आहे. धृष्टद्युम्नाचा उल्लेख आधीच्या तिसऱ्या श्लोकातच येऊन गेला आहे.

1) **द्रोणाचार्य:** कौरव पांडवांचे अस्त्रविद्येचे गुरु. हे द्रोणाचार्य अश्वत्थाम्याचे पिता आहेत. सर्वश्रेष्ठ असल्यामुळे त्यांच्या नावाचा प्रथम उल्लेख केला आहे.

2) **भीष्माचार्य:** भीष्माचार्य हे महाराज शांतनुचे पुत्र आहेत. आठव्या वसुच्या अंशापासुन गंगेपासून यांचा जन्म झाला. वडिलांच्या मनोरथांच्या पूर्ततेसाठी यांनी आजन्म ब्रह्मचर्याचे व्रत घेतले. हे कौरवांचे मुख्य सेनापती. ते महापराक्रमी तर होतेच पण थोर ज्ञानवंत आणि महात्मे होते.

3) **कर्ण:** कर्णाचा जन्म कुंतीच्या गर्भातून सूर्याच्या अंशापासून झाला. त्याला जन्मत:च कवच कुंडले लाभली होती. हा अतिपराक्रमी आणि दानशूर होता. अधीरथ सारथी आणि त्यांची पत्नी राधा यानी त्याचे पुत्रवत पालनपोषण केले. दुर्योधनाने त्याला अंग देशाचा राजा बनवले. हा कौरव सैन्य दळातील मुख्य सेनापतींपैकी एक होता.

4) **कृपाचार्य:** कृपाचार्य शरद्वान या ऋषीचे पुत्र. रुद्रगणांचे अंशावतार. धनुर्विद्येचे आचार्य, अद्वितीय योध्दे.

5) **अश्वत्थामा:** अश्वत्थामा द्रोणाचार्याचा पुत्र.

6) **विकर्ण:** विकर्ण दुर्योधनाचा बंधु. न्यायी व महारथी, द्रौपदीच्या अवमानाचा कट्टर विरोधक.

7) **सौमदत्ति:** सौमदत्ति हा सोमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा.

: 9 :

***अन्ये च बहव: शूरा मदर्थे त्यक्तजीविता: ।***
***नानाशस्त्रप्रहरणा: सर्वे युध्दविशारदा: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **च अन्ये:** आणि इतर, दुसरे
- **बहव:** शूरा: बरेचसे पराक्रमी योध्दे
- **मदर्थे त्यक्तजीविता:** माझ्यासाठी ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य होमून दिले आहे, आपल्या प्राणांची आशा सोडून दिली आहे असे
- **नाना शस्त्र प्रहरणा:** विविध प्रकारच्या शस्त्रांनी सज्ज होऊन शत्रुवर प्रहार करण्यासाठी सिध्द आहेत
- **सर्वे युध्द विशारदा:** हे सारे युध्दकलेत प्रवीण आहेत

**अर्थ**

इतरही माझ्यासाठी जिवावर उदार झालेले पुष्कळ शूरवीर आहेत. ते सर्वजण निरनिराळ्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असून युध्दात पारंगत आहेत.

***अनेक दुसरे वीर माझ्यासाठीं मरावया***
***सजले सर्व शस्त्रांनी झुंजणारे प्रवीण जे***

**विषय:** या श्लोकात दुर्योधनाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **च अन्ये बहव: शूरा: मदर्थे त्यक्त जीविता:** आणि इतर खूप पराक्रमी योध्दे जे माझ्यासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करायला सिध्द आहेत. 'मीच सारे काही आणि माझ्यासाठीच सारे काही' ही दुर्योधनाची भाषा विनोबांना साम्राज्यवादाची भाषा वाटते.

2) **नाना शस्त्र प्रहरणा: सर्वे युध्दविशारदा:** नाना प्रकारच्या शस्त्रांनी युक्त असून हे सारेच्या सारे शत्रुवर प्रहार करण्यासाठी सज्ज आहेत. हे सारे युध्द कलेत प्रवीण आहेत. याचा अर्थ असा की दुर्योधन आपल्या सैन्य दळातील योध्दयांना सामान्य मानत नाही. हे सारे भरपूर तयारी करुन शत्रु सैन्यदळाचा संहार करण्याच्या संकल्पाने नाना प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्जित होऊन युध्दाला तयार आहेत. हे काही सामान्य योध्दे नाहीहेत. उपरोक्त आठ योध्दयांप्रमाणे अनेक योध्दे आपल्या

सोबत असल्याचे त्याचे मत आहे. पांडवांच्या सुसज्ज अशा व्यूहरचनेप्रमाणेच आपलीही व्यूहरचना व्हावी अशी इच्छा तो व्यक्त करत आहे. आपला मुद्दा योग्य प्रकारे लक्षात आणून देण्यासाठी तो द्रोणाचार्यांच्या समक्ष आपल्या पक्षातील आणि पांडवांच्या पक्षातील योध्द्यांचे वर्णन करत आहे.

:10:

*अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।*
*पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भीष्माभिरक्षितम्:** भीष्माचार्यांच्या द्वारे ज्या सेनेचे रक्षण सर्व प्रकारे केले गेले आहे
- **तद अस्माकं बलं:** ती आपली सेना
- **अपर्याप्तं:** अमर्यादित अशी आहे
- **तु भीमाभिरक्षितम्:** आणि भीमाने ज्या सेनेचे रक्षण केले आहे
- **इदं एतेषां बलम्:** ती पांडवांची सेना
- **पर्याप्तम्:** मर्यादित आहे

**अर्थ**

भीष्मपितामहांनी रक्षण केलेले आमचे हे सैन्य सर्व दृष्टींनी अजिंक्य आहे, तर भीमाने रक्षण केलेले यांचे सैन्य जिंकायला सोपे आहे

*अफाट आमुचें सैन्य भीष्मांनी रक्षिलें असे*
*मोजकें पांडवांचें हें भीमाने रक्षिलें असे ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) दुर्योधन सांगत आहे की **भीष्माभिरक्षितं तद् अस्माकं बलं अपर्याप्तम्** भीष्माचार्यांनी आपल्या सेनेचे रक्षण केले आहे. आपली सेना अमर्यादित आहे. इथे ‘बल’ या शब्दाचा अर्थ ‘सेना’ आहे. या श्लोकात ‘पर्याप्त’ आणि ‘अपर्याप्त’ असे दोन शब्द आले आहेत. ज्ञानेश्वर महाराज, लोकमान्य टिळक, गांधीजी, विनोबा यांनी उपर्युक्त अर्थ घेतला नाही. या सर्वांनी ‘पर्याप्त’ म्हणजे पूर्ण आणि ‘अपर्याप्त’ म्हणजे अपूर्ण असे अर्थ केलेले आहेत. बाळकोबा ‘अपर्याप्त’ चा अर्थ ‘अमर्यादित’ असा करतात. दुर्योधन भयापोटी असे सांगत आहे की आपली सेना जरी संख्येने मोठी असली तरी ताकदीच्या दृष्टीने अपूर्ण आहे, अशक्त आहे. पांडवांची सेना संख्येने कमी असूनही ती बलवान आणि परिपूर्ण आहे. असा अर्थ घेणे अवघड आहे. दुर्योधनाचा आशय असाच असू शकतो की आपली सेना कमी बलशाली नाही, यामुळे अपर्याप्त या शब्दाचा अर्थ परिपूर्ण असाच घ्यायला हवा. दुर्योधनाने उद्योगपर्वातही धृतराष्ट्राला आपली सेना मोठी बलशाली असल्यामुळे विजय आपलाच असल्याचे सांगितले आहे.

2) **तु भीमाभिरक्षितम् इदं एतेषां बलं पर्याप्तम्:** ण भीमाने ज्या सेनेचे रक्षण केले आहे ती पांडवसेना मर्यादित आहे. विनोबा म्हणतात की अमर्यादित असणे हा जसा गुण आहे तसा ती सेना काबूत राहिली नाही तर तिचे अमर्यादित असणे कमकुवत मानले जाईल. त्याचप्रमाणे पांडवांची सेना मर्यादित होती. तसे तर मर्यादित सेना ही अमर्याद सेनेच्या तुलनेने कमकुवत मानली जाईल पण मर्यादित सेना जर निवडक योध्द्यांची असली तर ती अमर्यादित सेनेच्या तुलनेने बलवान ठरेल. अमर्यादित सेना काही निवडक सैन्यदळाची असणे शक्य नाही. कौरवांची सेना अकरा अक्षौहिणी होती. तर पांडवांची सात अक्षौहिणी.

:11:

*अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।*
*भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** परंतु
- **भवन्तः सर्व एवः** आपण (आम्ही) सारे
- **सर्वेषु च अयनेषु:** आपापल्या सर्व नियोजित स्थानांवर
- **यथाभागं अवस्थिता:** यथावत् स्थित राहून
- **भीष्मं एव अभिरक्षन्तु:** भीष्माचार्यांचेच सर्वांनी (सर्व बाजुंनी) रक्षण करावे

**अर्थ**

म्हणून सर्व व्यूहांच्या प्रवेशद्वारात आपापल्या जागेवर राहून आपण सर्वांनीच नि:संदेह भीष्म-पितामहांचेच सर्व बाजुंनी रक्षण करावे.

*राहूनि आपुल्या स्थानीं जेथें ज्यास नियोजिलें*
*चहूकडूनि भीष्मांस रक्षाल सगळे जण ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **हि भवन्त: सर्वे एव सर्वेषु च अयनेषु:** पण आपण सारे (आम्ही) आपापल्या नियोजित नियत स्थानावर आहोत या मुद्याकडे दुर्योधन लक्ष वेधून घेतो, हे फार मोलाचे आहे. आपल्याला सोपवलेल्या स्थानावर उभे ठाकणे गरजेचे आहे. स्थिरपद होणे महत्वाचे आहे. आधी साधना ठरवावी. त्यावर दृढ रहावे. हे महत्वाचे आहे. यातून ध्येयप्राप्ती संभव आहे. साधना असो वा युध्द असो. योजना आणि दृढनिश्चय नसेल तर यश लांबच रहाते. जीवनातही आत आणि बाहेर सतत युध्द सुरुच असते. यामुळे नियोजित स्थान ही फार मोलाची गोष्ट आहे. यातून चित्ताचे चांचल्य दूर होईल. भीष्म सैन्याचे प्रमुख आहेत. त्यांचेच सर्वांनी रक्षण करावे. आपापल्या स्थानावर दृढपणे झुंजत राहिलो तर भीष्माचे रक्षण होईल. साधना वा कर्तव्याची वाट चालणाऱ्यांनी अंतिम लक्ष्याचे रक्षण करावे. साधनेत तन्मय व्हावे. लक्ष्यावर दृष्टी स्थिर ठेवावी. परमात्मानुभव प्राप्त करण्याच्या दिशेने साधकाने गतिमान असावे.

2) **यथाभागं अवस्थिता:** जे ज्याला सोपवले असेल त्याच स्थानावर एकाग्रतेने रहावे आपल्या स्थानापासून विचलित होऊ नये. आधी साधनेचे स्वरुप ठरवावे मग त्यात स्थिरता हवी. साधनेत तत्पर असणे फार मोलाचे आहे. साधना वा कर्तव्य जर ठरवलेच नाही तर मग विकारांचा सामना करुन त्याना नामोहरम करणे कसे बरे शक्य होईल. साधना निश्चित केल्यावरही त्यात एकाग्रता साधता येणे महत्वाचे आहे. यामुळे साधना आणि कर्तव्य निश्चित झाल्यावरही त्यात दीर्घकाळपर्यंत स्थिरता असणे फार गरजेचे आहे. विचलित अवस्था असली तर मग ध्येय प्राप्ती होणार नाही. कित्येक साधक असे असतात की ते साधना वा कर्तव्य एकदा निश्चित केल्यावर त्यापासून विचलित होत नाहीत. यामुळेच त्यांच्या चित्ताची एकाग्रता साधली जाते आणि ते विकारांना हटवण्यात यशस्वी होतात.

3) **भीष्मं एव अभिरक्षन्तु:** सर्वांनी भीष्माचेच रक्षण करावे. भीष्म आपल्या सैन्यदळाचे सेनापती आहेत. त्यांचे रक्षण करणे खूपच अगत्याचे आहे. युध्दासाठी जी काही व्यूह रचना निश्चित होईल त्याप्रमाणे आपल्याला ठरवून दिलेल्या स्थानावर आपण भक्कमपणे उभे ठाकलो तर भीष्मांचे रक्षण होऊ शकेल.

साधना आणि कर्तव्य निश्चित करणाऱ्या साधकाना आपल्या अंतिम लक्ष्याचे रक्षण करणे आवश्यक आहे. याचा एक आध्यात्मिक अर्थ आहे तो असा की साधनेत तन्मय व्हावे आणि जे प्राप्त करुन घ्यायचे आहे जो काही परमात्म्याचा अनुभव प्राप्त करुन घ्यायचा आहे त्या दिशेने आपण गतिमान आहोत की नाही.

:12:

*तस्य संजनयन् हर्षं कुरुवृध्द: पितामह: ।*
*सिंहनादं विनद्योच्चै: शंखं दध्मौ प्रतापवान् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्य हर्षं संजनयन्:** दुर्योधनाला हर्ष उत्पन्न करण्यासाठी
- **प्रतापवान् कुरुवृध्द: पितामह:** प्रतापी कुरुवंशाच्या सर्वात वृध्द पितामहांनी
- **उच्चै: सिंहनादं विनद्य:** उच्च घोषात सिंह गर्जना करत
- **शंखं दध्मौ:** शंख फुंकला

**अर्थ**

कौरवातील वृध्द, महापराक्रमी, पितामह भीष्मांनी त्या दुर्योधनाच्या अंत:करणात आनंद निर्माण करीत मोठ्याने सिंहासारखी गर्जना करुन शंख वाजवला.

*हर्षवीत चि तों त्यास सिंह-नाद करुनियां*
*प्रतापी वृध्द भीष्मांनी मोठ्यानें शंख फुंकिला ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) तस्य हर्षं संजयनयन:** दुर्योधनाच्या मनात हर्ष उत्पन्न करण्यासाठी भीष्माचार्यांनी शंखनाद केला. संजय धृतराष्ट्राला सांगताहेत की दुर्योधनाच्या मनी आपल्या पक्ष अथवा भीष्म द्रोणाचार्य यांच्या विषयी कुठलीही शंका राहू नये म्हणून भीष्माचार्यांनी उत्साहपूर्वक उंच घोषाने शंखनाद केला.

**2) प्रतापवान कुरुवृध्द: पितामह:** भीष्म प्रतापी आहेत. कुरुवंशात सर्वात वयोवृध्द आहेत. कौरव पांडवांचे पितामह आहेत. इथे भीष्माचार्यांच्या विषयी गौरवास्पद शब्दांचा प्रयोग केला आहे. एक तर भीष्माचार्य प्रतापी आहेत. दुसरी गोष्ट अशी की सर्वांपेक्षा वृध्द अर्थात् अनुभवी आहेत. तिसरी गोष्ट अशी की ते आजोबांच्या स्थानी आहेत पूजनीय आहेत. दुसऱ्या अध्यायाच्या चौथ्या श्लोकात अर्जुनाने द्रोणाचार्य आणि भीष्माचार्यांना 'पूजार्हो' म्हणजे पूजनीय म्हटले आहे.

**3) उच्चै: सिंहनादं विनद्य शंखं दध्मौ:** उच्च आवाजाने सिंह गर्जना करुन भीष्माने शंखनाद केला. शंखनाद हा युध्दारंभीचा निदर्शक असतो. इथे दुर्योधनाचा उत्साह वाढविणे मुख्यत्वेकरुन अभिप्रेत आहे.

:13:

*तत: शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखा: ।*
*सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत:** त्या नंतर (भीष्माचार्यांच्या शंखनादानंतर)
- **शंखा:** बरेचसे शंख
- **च भेर्य:** आणि नगारे
- **च पणव:** आणि ढोल
- **आनक:** खंजीर
- **गोमुखा:** मृदंग वगैरे रणवाद्ये
- **सहसा एव:** एक साथ, सोबतच
- **अभ्यहन्यन्त:** वाजू लागलेत
- **स: शब्द:** त्या रणवाद्यांचा तो घोष, तो आवाज
- **तुमुल: अभवत्:** भयानक होऊ लागला

**अर्थ**

त्यानंतर शंख, नगारे, ढोल, मृदंग, शिंगे वगैरे वाद्ये एकदम वाजू लागली. त्यांचा प्रचंड आवाज झाला.

*तत्क्षणी शंखभेर्यादि रण-वाद्ये विचित्र चि*
*अेकत्र झडली तेव्हां झाला शब्द भयंकर ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) तत: शंखा: च भेर्य: च पणवानकगोमुखा: सहसा एव अभ्यहन्यन्त** - भीष्माचार्यांनी शंखनाद केला. त्यानंतर अगणित शंख, नगारे, ढोल यासारखी रणवाद्ये एक साथ वाजु लागलीत. भीष्माचार्य प्रमुख सेनापती होते. त्यांच्या शंखनाद करण्याआधी दुसरा कुणीही शंखनाद करु शकत नव्हता.

**2) स: शब्द: तुमुल: अभवत्:** विभिन्न रणवाद्यांचा नाद प्रचंड होऊ लागला. नादाच्या प्रचंडतेचा अर्थ असा की कौरव सैन्यदळाचे बळ या वाद्यांच्या गजराने बाहेर प्रकट होऊ लागले. नैतिक दृष्ट्या कौरव पक्षाकडे न्याय नव्हता. हे तर सारेच जाणत होते. संजय आणि धृतराष्ट्र हेही जाणत होते. यामुळे कौरवाना विजय मिळणार नाही हेच सर्वांना ठामपणे वाटू शकत होते. यामुळे संजय धृतराष्ट्राला सांगत आहे की कौरव-सैन्यदळ इतके बलशाली होते आणि त्यांच्या रणवाद्यांचा नाद इतका काही भयंकर होता की यातून कौरवांच्या विजयावर जणु शिक्कामोर्तब होत होता.

:14:

*तत: श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।*
*माधव: पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतु: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत:** त्या नंतर
- **श्वेतै: हयै: युक्ते:** श्वेत अश्वांनी युक्त रथात म्हणजे पांढऱ्या घोड्यांच्या रथात
- **महति स्यन्दने:** मोठ्या (उत्तम) रथावर
- **स्थितौ:** बसलेल्या
- **माधव: च पांडव: एव:** श्री कृष्ण आणि अर्जुन दोघांनीही
- **दिव्यौ शंखौ प्रदध्मतु:** दिव्य शंखांचा घोष केला

**अर्थ**

त्यानंतर पांढरे घोडे जोडलेल्या उत्तम रथात बसलेल्या श्री कृष्णांनी आणि अर्जुनानेही दिव्य शंख वाजवले.

***इकडे शुभ्र घोड्यांच्या मोठ्या भव्य रथांतुनी***
***माधवें अर्जुनें दिव्य फुंकिले शंख आपुले।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **ततः श्वेतैः हयैः युक्ते:** त्यानंतर शुभ्र घोड्यांनी युक्त. त्यानंतर म्हणजे कौरव पक्षांच्या शंख आणि अन्य वाद्ये वाजवल्यानंतर आता संजय पांडवांच्या पक्षाचे वर्णन करताहेत. पांडवांच्या पक्षात मुख्य पात्र दोनच आहेत श्रीकृष्ण आणि अर्जुन. सेनापती धृष्टद्युम्न आहेत. अधिकारी पुरुष मात्र कृष्ण आणि अर्जुनच. पांडव सैन्य दळातर्फे कृष्णाने आधी आणि मग अर्जुनाने शंखनाद केला. ज्या पक्षात स्वत: श्रीकृष्ण आहेत त्या सैन्यदळाचे गौरवाने वर्णन करणे संजयासाठी अगदी स्वाभाविक असेच होते. धृतराष्ट्राच्या मनातही भगवान श्रीकृष्णांच्या बाबतीत आदर भाव होताच. यामुळे असे गौरवपूर्ण वर्णन ऐकल्यावरही धृतराष्ट्राच्या मनात क्षोभ उत्पन्न होण्याची शक्यता नव्हती. आधी भगवान ज्या रथात विराजमान आहेत त्या रथाचे वर्णन केले आहे. त्या रथाचे अश्व पांढरे शुभ्र होते. भगवान सारथी इंद्रियरुपी अश्व. मनरुपी लगाम. असा रथ शुभ मार्गावरच धावणार. सन्मार्गावरच चालणारा असला पाहिजे.

2) **महति स्यन्दने स्थितौ:** अर्जुनाचा रथ मोठा आहे. भगवान ज्या रथाचे सारथी आहेत तो रथ मोठा असायलाच हवा. त्यावर ब्रह्मांडाचे नायक भगवान स्वार झाले आहेत. त्यांची दृष्टी व्यापक आहे. साधक अर्जुन भगवंतांच्या समवेत रथात बसला आहे. साधकाचीही दृष्टी संकुचित असू शकत नाही. साधकाची दृष्टी संकुचित असेल तर साधना होईल तरी कशी? यामुळे अर्जुनही या मोठ्या रथावर बसलेले आहेत.

3) **माधवः च पांडवः एव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः** श्रीकृष्ण आणि अर्जुन दोघांनीही दिव्य शंखनाद केला. अलौकिक शंख फुंकले. भगवान अलौकिक. साधक असल्यामुळे अर्जुनही अलौकिक. दोघे अलौकिक. दोघांचे शंख अलौकिक.

या श्लोकाचे विवरण करताना विनोबा म्हणतात 'न धरी शस्त्र करी मी!' असे प्रतिज्ञा वचन कृष्णाने उच्चारले होते. ते पांडवांचे सारथी बनले. सर्वप्रथम शंखनाद केला. ते निष्पक्ष पक्षपाती आहेतच. पुढे विनोबाजी लिहितात की कठोपनिषदात एक रुपक येते. आत्मा रथी आणि बुध्दी सारथी. गीतेत अर्जुन म्हणजे आत्मा रथी आणि परमात्मा श्रीकृष्ण सारथी. पहिली भूमिका गीतेला मान्य आहे. गीता अध्याय दोन श्लोक संख्या 41 आणि अध्याय अठरा श्लोक संख्या 63 पण दुसरी भूमिका गीतेची विशिष्ट भूमिका आहे. गीता अध्याय अध्याय सात श्लोक संख्या 1 आणि अध्याय अठरा श्लोक संख्या 66 खरे तर कृष्णाने सर्वप्रथम शंख फुंकायला नको होता. तसे तर शंखनाद करायलाच नको होता. ते केवळ अर्जुनाचे सारथी होते पण पांडवांचा सत्पक्ष होता. यामुळे उत्साहात त्यांनी आधीच शंखनाद केला. एका प्रकारे युध्दाची सुरुवात कृष्णापासूनच झाली. ईश्वरी प्रेरणेनेच तर मनुष्य सत्कर्म करतो. ईश्वरी प्रेरणा नेहमी सत्‌च्या दिशेने सक्रिय असते. कौरव म्हणजे काम-क्रोध वगैरे विकार. त्यांच्यावर विजय मिळवण्यासाठी ईश्वरी प्रेरणा असायला हवी. ईश्वरी प्रेरणेशिवाय किंवा कृपेशिवाय विकारांवर विजय संभवत नाही. याद्दष्टीने कृष्णाचे सर्वप्रथम शंखनाद करणे उचितच होते.

: 15:

***पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजय:।***
***पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदर:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हृषीकेश: पांचजन्यं:** हृषीकेश अर्थात् इंद्रियांचे स्वामी श्रीकृष्णाने पांचजन्य नामक शंख फुंकला
- **धनंजय: देवदत्तं:** अर्जुनाने देवदत्त नामक शंखनाद केला
- **भीमकर्मा वृकोदर:** पौंड्रं महाशंखं दध्मौ ज्याची कर्मे भयंकर आहेत अशा भीमाने पौंड्र नामक महाशंख फुंकला

## अर्थ

श्री कृष्णांनी पांचजन्य नावाचा, अर्जुनाने देवदत्त नावाचा आणि भयानक कृत्ये करणाऱ्या भीमाने पौंड्र नावाचा मोठा शंख फुंकला.

*पांच-जन्य हृषीकेशें देव-दत्त धनंजयें*
*पौंड्र तो फुंकिला भीमें महा-शंख महा-बळें।*

## विषय:

या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत

## स्पष्टीकरण

1) **हृषीकेश: पांचजन्यम्** - हृषीकेश अर्थात् भगवान श्रीकृष्ण. हृषीकेश शब्दात दोन पदे आहेत 'हृषीक' म्हणजे इंद्रिये आणि 'ईश' म्हणजे स्वामी. भगवान श्रीकृष्ण हे इंद्रियांचे स्वामी आहेत कारण की ते सिध्द ज्ञानी आहेत. हृषीकेश आहेत. दुसरा अर्थ असा आहे 'हृषी' म्हणजे हर्ष किंवा आनंद दाता. 'केश' म्हणजे किरण. सूर्य आणि चंद्राच्या किरणांच्या माध्यमातून ईश्वर संपूर्ण जगताला आनंद देतो. हृषीकेश म्हणजे सुंदर-प्रशस्त केसांचा. श्रीकृष्णाने पांचजन्य नावाचा शंख फुंकला.

2) **धनंजय: देवदत्तं:** धनंजयाने अर्जुनाने देवदत्त नामक शंख फुंकला विनोबांनी कृष्णाच्या 'पांचजन्य' आणि अर्जुनाच्या 'देवदत्त' या शंखांच्या नावाचा मोठा मार्मिक अर्थ केलाय. पांचजन्य म्हणजे पंच मंडळ, सारे जन. सर्वांच्या कल्याणासाठी ईश्वराचा आवाज असतो. पांचजन्य शंख सर्वांच्या कल्याणासाठी असतो. देवदत्त म्हणजे भक्ताला लाभलेला परमेश्वराचा प्रसाद.

अर्जुन भक्त आहे. त्याने देवदत्त शंखाचा नाद केला. भक्ताचा आवाज त्याचा स्वत:चा नसतो. तो भगवंताचा प्रसाद असतो. ती प्रसाद वाणी असते. ती देवदत्त असते.

3) **भीमकर्मा वृकोदर: पौंड्रं महाशंखं दध्मौ:** भीम भयंकर धर्माचा धनी आहे. त्यांने पौंड्र नामक महाशंख वाजवला. भीम भीमकर्मा म्हणजे असामान्य पराक्रमी आहे. पौंड्र शंख महाशंख होता. भीम असामान्य शक्तिशाली होते. असामान्य कर्मे करणारे होते. यामुळे त्यांच्या शंखाची बरोबरी कोण बरे करु शकणार होते?

:16-17-18:

*अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिर:।*
*नकुल: सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ॥*
*काश्यश्च परमेष्वास: शिखंडी च महारथ:।*
*धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजित:॥*
*द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वश: पृथिवीपते।*
*सौभद्रश्च महाबाहु: शंखान्दध्मु: पृथक् पृथक्॥*

## अन्वय आणि शब्दार्थ

- **पृथिवीपते:** हे पृथ्वीच्या राजा धृतराष्ट्रा
- **कुंतीपुत्र: राजा युधिष्ठिर:** कुंतीपुत्र राजा युधिष्ठिराने (धर्मराजाने)
- **अनंत-विजयम्:** अनंत विजय नामक शंख फुंकला
- **नकुल: च सहदेव:** नकुल आणि सहदेवाने
- **सुघोष मणिपुष्पकौ:** सुघोष आणि मणिपुष्पक नामक शंखनाद केला
- **च परमेष्वास: काश्य:** आणि ज्यांच्या हाती मोठमोठी धनुष्ये होती अशा महाधनुर्धर काशिराज
- **च महारथ: शिखंडी:** आणि महारथी शिखंडी
- **धृष्टद्युम्न: च विराट:** धृष्टद्युम्न आणि विराट
- **च अपराजित: सात्यकि:** ज्याचा कदापि पराभव होऊ शकत नाही असा सात्यकी
- **द्रुपद:** राजा द्रुपद
- **च द्रौपदेया:** आणि द्रौपदीची पाचही मुले
- **च महाबाहु: सौभद्र:** ज्याचे बाहु म्हणजे भुजा खूप मजबूत आहेत असा सुभद्रा पुत्र अभिमन्यु
- **सर्वश:** या सर्वांनी चहुकडून, चारी बाजुंनी
- **पृथक् - पृथक्:** आपापल्या वेगवेगळ्या
- **शंखान् दध्मु:** शंखांचा नाद केला

## अर्थ

कुंतीपुत्र राजा युधिष्ठिराने अनंतविजय नावाचा आणि नकुल व सहदेव यांनी सुघोष व मणिपुष्पक नावाचे शंख वाजवले.

श्रेष्ठ धनुष्य असलेला काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, राजा विराट, अजिंक्य सात्यकी, राजा द्रुपद, द्रौपदीचे पाचही पुत्र, महाबाहु सुभद्रापुत्रअभिमन्यू, या सर्वांनी हे राजा, सर्व बाजुंनी वेगवेगळे शंख वाजविले.

*तेव्हां अनंत-विजय धर्मराज युधिष्ठिरें*
*नकुळें सहदेवें हि सुघोष मणि-पुष्पक ।*
*मग काश्य धनुर्धारी शिखंडी हि महा-रथी*
*विराट आणि सेनानी तसा अजित सात्यकि ।*
*राजा द्रुपद सौभद्र द्रौपदीचे हि पुत्र ते*
*सर्वांनी फुंकिले शंख आपुले वेगवेगळे ।*

**विषय:** या तीन श्लोकांमधुन उर्वरित पांडव आणि त्यांच्या सैन्यदळातील प्रमुख योध्दयांच्या शंख नादाचे वर्णन आले आहे.

### स्पष्टीकरण

सोळाव्या श्लोकात धर्मराज युधिष्ठिर, नकुल आणि सहदेव यांची नावे आली आहेत. धर्मराज सत्यनिष्ठ आहेत. ते जणू काही धर्माची सगुण साकार मूर्तीच आहेत. त्यांनी अनंतविजय नामक शंखाचा नाद केला. अनंतविजय म्हणजे चिरकाल विजय प्राप्त करुन देणारा.

नकुलाने सुघोष नावाचा शंख वाजवला. सुघोष म्हणजे मधुर आवाजाचा.

सहदेवाचा शंख मणिपुष्पक. मण्यासारख्या आकाराचा. पुष्पासारख्या कोमल ध्वनीचा शंख.

सतराव्या श्लोकात काशिराज वगैरे पाच योध्दयांचा उल्लेख आहे. काशिराज यांचा उल्लेख पाचव्या श्लोकातही आला आहे. काशिराज युधिष्ठिराचे मित्र आहेत. हे मोठे पराक्रमी आहेत. यामुळे त्यांना **'परमेष्वास:'** म्हटलेय. इष्वास म्हणजे धनुष्य. परमेष्वास म्हणजे मोठ्या धनुष्याचे धनी.

महारथी शिखंडी आधी द्रुपदाची कन्या होते. स्थूणाकर्ण यक्षाने तिला पुरुष बनवले. भीष्माचार्यांना पराभूत करण्यासाठी युध्दात त्याची योजना केली होती. अशी कथा येते.

धृष्टद्युम्न यांचा उल्लेख तिसऱ्या श्लोकातही आहे. हे पांडव सैन्यदळाचे प्रमुख सेनापती होते.

विराट यांचा उल्लेख चौथ्या श्लोकातही आला आहे. ते मत्स्यदेशीचे पराक्रमी राजे होते.

सात्यकी अपराजित होते त्यांचा उल्लेख चौथ्या श्लोकात 'युयुधान' या नावाने आला. ते असामान्य योध्दे होते. यामुळे त्यांना 'अपराजित' असे म्हटले आहे.

अठराव्या श्लोकात राजा द्रुपद, द्रौपदीचे पाच पुत्र आणि अभिमन्यु सौभद्र असा उल्लेख आला आहे.

द्रुपद पांचाल देशीचे राजे होते. त्यांचा उल्लेख चौथ्या श्लोकात आला आहे. द्रौपदेय म्हणजे द्रौपदीची पाचही मुले. पांडवांच्या या पाच पुत्रांनी आपापले शंख फुंकले.

**महाबाहु: सौभद्र:** ज्याच्या भुजा कमालीच्या पराक्रमी आहेत असा सुभद्रापुत्र अभिमन्यु. त्यानेही आपला शंखनाद केला. हा सोळा वर्षे जगला. याचा आणि उर्वरित पांडव पुत्रांचा उल्लेख सहाव्या श्लोकातही आला आहे.

अखेरीस सांगितले आहे की **सर्वश: पृथक् पृथक् शंखान् दध्मु:** अर्थात् अशा प्रकारे या सर्व महानुभवांनी आपापले शंख वाजवले.

संजयाने कौरव पक्षातल्या केवळ भीष्माचार्यांचाच उल्लेख केला. अन्य सेनापतींनीही शंखनाद केला. त्यांच्या नावांचा उल्लेख नाही. त्यांच्या शंखांची चर्चा नाही. पांडवांची चर्चा मात्र तपशिलवार आहे. श्रीकृष्ण, अर्जुन, धर्मराज, भीम, नकुल आणि सहदेव या साहींच्या शंखांची नावेही सांगितली आहेत. यासोबतच काश्य, शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट्, सात्यकि, द्रुपद, द्रौपदीची पाची मुले, अभिमन्यु अशा बारा सेनापतींची नावे येतात. अशा प्रकारे बारा योध्दे, पाच पांडव आणि कृष्ण असे सारे अठरा. याचे मूळ कारण पांडवांचा पक्ष सत्पक्ष. यामुळे सर्वांची सहानुभूती त्यांच्या पक्षाकडेच वळलेली आहे.

***:19 :***

*स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।*
*नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **नभ: च पृथिवीं च एव:** आकाश आणि पृथ्वी दोघांनाही
- **व्यनुनादयन्:** व्याप्त करत, दणाणून सोडत
- **स: तुमुल: घोष:** शंखांच्या त्या भयंकर नादाने, तुंबळ ध्वनीने
- **धार्तराष्ट्राणाम्:** धृतराष्ट्राच्या पुत्रांच्या कौरवांच्या
- **व्यदारयत्:** विदीर्ण केले, भय उत्पन्न केले

### अर्थ

आणि त्या भयानक आवाजाने आकाश व पृथ्वीला दुमदुमून टाकीत कौरवांची अर्थात् आपल्या पक्षातील लोकांची छाती दडपून गेली.

*त्या घोषें कौरवांची तों हृदयें चि विदारिलीं*
*भरुनि भूमि आकाश गाजला तो भयंकर।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **नभ: च पृथिवीं च एव व्यनुनादयन् स: तुमुल: घोष:** शंखांचा नाद भयानक होता. आकाश आणि धरणी दोघांना व्यापून घेणारा हा नाद होता. पांडवांच्या वतीने एकूण अठरा महारथींनी शंखनाद केला. त्याचा नाद इतका भयंकर होता की आकाश आणि धरणी भयकंपित झाली. त्या निनादाने व्याप्त झाली. दुर्योधन पक्षातल्या शंखनादाचा आवाज भयंकर होता एवढेच वर्णन येते. त्या नादाने धरणी आणि आकाश व्यापले असे मात्र काही म्हटलेले नाही. विनोबा म्हणतात पांडव दळ संख्येने कमी पण त्यांच्या ठायी नैतिक बळ होते. कौरव दळ संख्येने मोठे पण त्यांच्या ठायी नैतिक बळ नव्हते.

2) **धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्:** शंखनादाने धृतराष्ट्र पुत्र कौरवांची हृदये विदीर्ण झालीत, म्हणजे त्यांच्या मनी भय निर्माण झाले. कौरवांची सेना पांडवांच्या तुलनेने मोठी होती. यामुळे दुर्योधनाला एक प्रकारे खात्री होती की विजय त्याचाच होईल पण पांडवांच्या बाजूने जेव्हा अनेक सेनापतींनी शंखनाद केला तेव्हा कौरवांच्या छातीत धडकी भरली. मनात भय जागले. संख्याबळामुळे आपण जिंकू असे त्याना वाटत होते पण हा अंदाज चुकीचा सिध्द होऊ शकतो अशी शंका कौरवांच्या मनी जागली. हा पांडव पक्षातील शंखनादाच्या प्रचंड ध्वनी कल्लोळाचा परिणाम होता.

:20:

*अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वज:।*
*प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडव: ॥*
*हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महीपते:** हे महाराज
- **अथ:** या नंतर अर्थात् उभय सैन्यदळांकडून शंखनाद झाल्यानंतर
- **कपिध्वज: पांडव:** ज्या ध्वजावर हनुमंताचे चिह्न आहे अशा पांडुपुत्र अर्जुनाने
- **धार्तराष्ट्रान् व्यवस्थितान् दृष्ट्वा** धृतराष्ट्र पुत्र (दुर्योधन वगैरे) व्यवस्थितपणे (युध्दाला सिध्द झालेले आहेत हे) बघून
- **तदा शस्त्रसंपाते प्रवृत्ते (सति):** आणि शस्त्र चालवण्याची वेळ आल्यावर
- **धनु: उद्यम्य:** आपल्या गांडीव धनुष्याला हातात उंचावून (उचलून)
- **हृषीकेशं इदं वाक्यं आह:** हृषीकेशाने हे वचन सांगितले

**अर्थ**

महाराज, त्यानंतर ध्वजावर हनुमान असणाऱ्या अर्जुनाने युध्दाच्या तयारीने उभ्या असलेल्या कौरवांना पाहून, शस्त्रांचा वर्षाव होण्याची वेळ आली तेव्हा धनुष्य उचलून तो हृषीकेश श्रीकृष्णांना असे म्हणाला. मग नीट उभे सारे पुन्हां कौरव राहिले

*चालणार पुढें शस्त्रें इतुक्यांत कपि-ध्वज*
*हातीं धनुष्य घेऊनि बोले कृष्णास वाक्य हें ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **कपिध्वज: पांडव:** अर्जुनाच्या ध्वजावर हनुमंताचे चिह्न होते. साक्षात् हनुमान विराजित होते.

सारथी कृष्ण म्हणजे भगवान मार्गदर्शक. जीवन साफल्यासाठी हनुमान सहायक. जिथे हनुमान आहेत तिथे धर्म असेल, विजयही असेल. ईश्वराचे मार्गदर्शन जीवाला सदैव धर्मपथावरच अग्रेसर राखील. भगवंतासमोर आपण सदा विनम्र रहावे म्हणजे तो सारथी बनतो. हनुमान आदर्श ब्रह्मचारी आहेत. ब्रह्मचर्यामुळे म्हणजे सर्वेंद्रियांचा संयम साधल्यामुळे ऊर्ध्वमुखी होण्यास मदत लाभते. अठराव्या अध्यायातील अठ्ठ्याहत्तराव्या श्लोकात सांगितले आहे की जिथे भगवान सारथी आणि अर्जुनासारखा साधक मुमुक्षु असेल तिथे विजय अवश्य आहे.

2) **तदा धार्तराष्ट्रान् व्यवस्थितान् दृष्ट्वा शस्त्रसंपाते प्रवृत्ते (सति):** मग अर्जुनाने धृतराष्ट्र पुत्र दुर्योधनादी योध्दयांना व्यवस्थितरित्या युध्दसज्ज बघितले. समोरचे

सैन्यदळ व्यवस्थितपणे सज्ज आहे. यातून अर्जुनाला प्रेरणा मिळाली. कशी प्रेरणा लाभली याचे वर्णन पुढील श्लोकात आले आहे. कौरव सैन्यदळ जोवर युध्द करायच्या मनस्थितीत नव्हते तोवर अर्जुनाच्या मनात कुठलाही विचार नव्हता. तो स्थिर होता. ही जीवाची स्थिती आहे. विकार जोवर युध्दसज्ज होऊन समोर उभे ठाकत नाहीत तोवर जीव स्थिर असतो. विकार उपस्थित झाले की जीव विचार करायला लागतो.

3) **हृषीकेशं इदं वाक्यं आह:** अर्जुनाने श्रीकृष्णाला सांगितले. जीवावर जेव्हा विकारांच्या आक्रमणाची तयारी होते तेव्हा जीव ईश्वरासमोर जाऊन उभा राहतो. प्रेरणा मिळवण्याचा प्रयत्न करतो. युध्दाचे ढग घनदाट बघितले. अर्जुनाने ईश्वराची प्रार्थना केली.

(सामान्यपणे एका श्लोकात चार चरण असतात पण विशेष रुपाने दोन चरणांचे आणि सहा चरणांचेही श्लोक आढळतात. या अध्यायात 21 आणि 30 तसेच 20 आणि 26 क्रमश: अशा प्रकारचे श्लोक आहेत.)

:21-22:

**अर्जुन उवाच**

*सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ।*
*यावदेतान्निरीक्षेऽहं योध्दुकामानवस्थितान् ॥*
*कैर्मया सह योध्दव्यमस्मिन् रणसमुद्यमे ।*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अच्युत:** हे श्रीकृष्णा
- **मे रथं:** माझा रथ
- **उभयो: सेनयो: मध्ये:** दोन्ही सैन्य दळांच्या मध्ये
- **स्थापय:** उभा करावा
- **यावत्:** ज्यामुळे (तेवढ्या वेळेत)
- **योध्दुकामान् अवस्थितान्:** युध्दाच्या इच्छेने (प्रस्तुत) सज्ज असलेले
- **एतान्:** या योध्दयांना
- **अहं निरीक्षे:** मी योग्य प्रकारे बघू शकू
- **अस्मिन् रणसमुद्यमे:** ज्यामुळे या रण संग्रामात
- **कै: सह:** कुणा-कुणाच्या सोबत
- **मया योध्दव्यम्:** मला झुंजायचे आहे हे धडपणे (चांगल्या प्रकारे) समजून घेता यावे (लक्षात यावे)

**अर्थ**

हे अच्युता, माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी उभा करा. मी रणभूमीवर युध्दाच्या इच्छेने सज्ज झालेल्या या शत्रुपक्षाकडील योद्ध्यांना जोवर नीट पाहून घेईन की मला या युद्धात कोणाकोणापाशी लढणे योग्य आहे, तोवर रथ उभा करा.

**अर्जुन म्हणाला,**

*दोन्ही सैन्यांमधें कृष्णा माझा रथ उभा करीं*
*म्हणजे कोण पाहीन राखिती युध्द-कामना*
*आज या रण-संग्रामीं कोणाशीं झुंजणें मज*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) अर्जुन भगवान श्रीकृष्णाला सांगत आहेत की, **अच्युत, मे रथं उभयो: सेनयो: मध्ये स्थापय:** हे अच्युता! दोन सैन्यदळाच्या मध्यभागी माझा रथ स्थापन करा.'

श्रीकृष्ण ज्ञानी होते. ज्ञानी विनम्र असतात, अहंकारी नसतात. त्यांच्या नम्र आचरणात केवळ कर्तव्यदृष्टी असते. सामान्य माणसाला मानापमान असतो. यामुळे भगवंताची भूमिका सारथ्याची होती तर अर्जुनाने हुकूम केला तो त्याचे पालन करतील.

इथे अर्जुनाने भगवंतासाठी 'अच्युत' हे संबोधन वापरले आहे. अच्युत म्हणजे न हटणारा, भ्रष्ट न होणारा, आपल्या स्वरुपाठायी स्थिर. हे ज्ञानवंताचे लक्षण आहे.

2) **यावत् योध्दुकामान् अवस्थितान् एतान् अहं निरीक्षे:** अर्जुन म्हणाला 'हे अच्युता! रथाला मध्यभागी उभे करा. मला युध्दाची इच्छा करणाऱ्या दुर्योधनाचे सैन्य नीट बघायचे आहे.' इथे अर्जुनाने दोन सैन्य दळांच्या मध्यभागी रथ उभा करायला सांगितले आहे. अर्जुनाला कौरवांच्या विरोधात झुंजायचे होते. यामुळे दुर्योधनाच्या सैन्यदळात कोण कोण आहेत? ते कशा प्रकारे शस्त्र सज्ज होऊन आलेहेत. हे जाणून घ्यायची अर्जुनाची मुख्यत्वेकरुन दृष्टी आहे. ही गोष्ट पुढील श्लोकातून अधिक स्पष्ट होऊन जाईल.

3) अर्जुनापुढे युध्द येऊन उभे ठाकले होते. कर्तव्यबुध्दीने अर्जुन युध्दाला सिध्द झाला होता ही आपापसातली लढाई होती. अर्जुनाच्या मनात यामुळे खूप उत्साह होता असे नाही. धर्म पालनासाठी युध्द गरजेचे

होते. अर्जुनापुढे दोन दिशा होत्या. एक तर हिंसा कमीत कमी व्हावी आणि दुसरी युध्दात विजयप्राप्ती. यामुळे अर्जुन शत्रु पक्षाला काळजीपूर्वक न्याहाळू इच्छितोय. यामुळे अर्जुन शत्रु सैन्याला काळजीपूर्वक बघू इच्छितोय.

: 23 :

*योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागता: ।*
*धार्तराष्ट्रस्य दुबुध्देर्युध्दे प्रियचिकीर्षव: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **युध्दे:** युध्दात म्हणजे युध्द करतांना
- **दुर्बुध्दे: धार्तराष्ट्रस्य:** अधर्मनिष्ठ बुध्दी असलेल्या दुष्ट दुर्योधनाचे
- **प्रियचिकीर्षव:** प्रिय चाहणारे, कल्याण इच्छिणारे
- **ये एते:** हे जे सारे राजेलोक
- **अत्र समागता:** इथे एकत्रित झालेले
- **(तान्) योत्स्यमानान्:** (त्या) सर्व झुंजणाऱ्यांना
- **अहं अवेक्षे:** मी बघावे, बघून घ्यावे

**अर्थ**

दुष्टबुध्दी दुर्योधनाचे युध्दात प्रिय करु इच्छिणारे जे जे हे राजे या सैन्यात आले आहेत, त्या योद्ध्यांना मी पाहतो.

*झुंजते वीर ते सारे घेतों पाहूनि येथ मी*
*युध्दी या हत-बुध्दीचें जे करुं पाहती प्रिय*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **दुर्बुध्दे: धार्तराष्ट्रस्य: अधर्मनिष्ठ** बुध्दी असलेल्या दुष्ट दुर्योधनाला असे वाटते. दुर्योधनाला अर्जुनाने विशेषण जोडले. **'दुर्बुध्दे:'** म्हणजे अधर्मनिष्ठ बुध्दीचा. माणसाच्या ठायी सद्‌वृत्ती आणि असद्‌वृत्ती नांदते. दुर्योधन असत्‌वृत्तीचे उदाहरण आहे. असत्‌वृत्ती केंद्रस्थानी वसते. तिच्या भोवती असत् भाव वसतो. इथे केंद्रस्थानी दुर्योधन आहे. विनोबांनी दुर्योधनाचा अर्थ दुराग्रह असा केला आहे. सत्‌बुध्दी सत्‌चा निर्णय देते. दुर्बुध्दी चुकीचा निर्णय देते. संत तुकाराम देवाजवळ मागणी मागतात- **'दुर्बुध्दी ते मना, कदा नुपजो नारायणा।'** हे नारायणा, मनात कदापि दुर्बुध्दी न उपजो! दुर्बुध्दी माणसाचा विनाश करते. सज्जनांच्या ठायीही कधी-कधी दुर्बुध्दी जागते. यामुळे सदैव जागृती हवी.

**2) युध्दे प्रियचिकीर्षव: ये एते अत्र समागता (तान्) योत्स्यमानान् अहं अवेक्षे** युध्द करताना प्रिय चाहणारे जे आहेत त्यांना अर्जुन बघु इच्छितो. दुर्योधनाचा पक्ष अधर्माचा आहे. हे माहित असुनही त्याच्या बाजूने झुंजणारे एकत्रित आहेत. ही सारी अधर्माची सेना आहे. दुर्योधन तर स्वार्थात अंध आहे. मदांध आहे पण दुर्योधनाच्या बाजूने झुंजणाऱ्यांचा तर वैयक्तिक कुठलाही स्वार्थ नाही. दुर्योधनाला युध्दापासुन परावृत्त करण्याऐवजी हे सारे त्याच्या मदतीला आले आहेत. हे आश्चर्यकारक आहे. हा आशय अर्जुनाच्या मनात आहे. यामुळे त्याला आश्चर्य वाटत आहे. यामुळे दुर्योधनाच्या बाजूने झुंजणाऱ्याना तो एकदा बघू इच्छित आहे.

:24 - 25:

**संजय उवाच**

*एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।*
*सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥*
*भीष्मद्रोणप्रमुखत: सर्वेषां च महीक्षिताम् ।*
*उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान् कुरुनिति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे महाराज, धुतराष्ट्र
- **गुडाकेशेन:** अर्जुनाला
- **एवं उक्त: हृषीकेश:** अशा प्रकारे सांगितल्या गेलेल्या हृषीकेशाने
- **उभयो: सेनयो: मध्ये:** दोन्ही सैन्य दळांच्या मध्यभागी
- **भीष्म-द्रोण-प्रमुखत:** भीष्म, द्रोण यांच्या समोर
- **च सर्वेषां महीक्षितां (प्रमुखत:):** आणि सर्व राजांच्या समोर
- **रथोत्तमं स्थापयित्वा:** (अर्जुनाच्या) उत्तम रथाला उभा करुन
- **पार्थ:** हे अर्जुना
- **एतान् समवेतान् कुरुन् पश्य:** या एकत्रित झालेल्या कौरवांना बघून घे
- **इति उवाच:** असे म्हटले

**अर्थ**

संजय म्हणाला, धृतराष्ट्र महाराज, अर्जुनाने असे सांगितल्यावर श्रीकृष्णांनी दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी भीष्म आणि द्रोणाचार्य व इतर सर्व राजांसमोर उत्तम रथ करुन म्हटले हे पार्था, युध्दासाठी आलेल्या या कौरवांना पहा.

**संजय म्हणाला**

***अर्जुनाचें असें वाक्य कृष्णें ऐकूनि शीघ्र चि***
***दोन्ही सैन्यांमधें केला उभा उत्तम तो रथ***
***मग लक्षूनियां नीट भीष्म-द्रोण-नृपांस तो***
***म्हणे हे जमले पार्था पहा कौरव सर्व तूं***

**विषय:** चोविसाव्या श्लोकात एक आणि पंचविसाव्या श्लोकात दुसरा मुद्दा आला आहे.

**स्पष्टीकरण**

चोविसाव्या श्लोकात असे म्हटले आहे की अर्जुनाने सांगितले आणि भगवंताने दोन सैन्य दळांच्या मध्ये रथाला स्थापित केले. या शब्दात अर्जुनाच्या रथामागे 'उत्तम' शब्द जोडला गेला आहे. हा रथ सामान्य नाही.

विनोबांनी या श्लोकाचे मराठी भाषांतर करताना मूळ पाठात नसलेला एक शब्द जोडला तो म्हणजे शीघ्र. यातून कृष्णाची दक्षता दिसते. तत्परता आढळते. नम्रता झळकते. निरहंकारिता प्रकटते. 'दोन सैन्यदळांसमोर रथ उभा करावा.' असे अर्जुन बोलला. कृष्णाने भीष्म-द्रोणांच्या समोर रथ उभा केला. सर्व प्रमुख राजांसमोर रथ उभा केला. सेवक कसा असावा ? याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. सेवकाच्या ठायी विवेक असावा. तो सदैव जागृत, सतर्क असला पाहिजे. कुठलेही सेवेचे काम असो वा जीवनाची कुठलीही क्रिया असो त्यात विवेक जपता आला पाहिजे. हा बोध भगवंताच्या या कार्यातून मिळतो.

इथे भगवान श्रीकृष्णासाठी शब्द प्रयुक्त झाला 'हृषीकेश'. 'हृषीक' म्हणजे इंद्रिये आणि 'ईश' म्हणजे स्वामी. भगवान इंद्रियांचे स्वामी आहेत. यामुळे त्याना हृषीकेश असे म्हटले आहे. याचा आणखी एक अर्थ आहे. हृषीकेश म्हणजे ज्याचे डोक्यावरील केस सुंदर आहेत, प्रशस्त आहेत तो.

अर्जुन 'गुडाकेश' आहे. या शब्दाचेही दोन अर्थ आहेत. 'गुडाका' म्हणजे निद्रा. निद्रेचा स्वामी म्हणजे निद्रेवर विजय संपादन करणारा गुडाकेश. दुसरा अर्थ आहे 'गुडा' म्हणजे गूढ वा घनदाट. ज्याचे केस घनदाट आहेत असा अर्जुन.

पंचविसाव्या श्लोकात सांगितले आहे की रथ भीष्म, द्रोण आणि प्रमुख राजांच्या समोर उभा करुन स्वत: भगवंतांनी सांगितले की तुझ्या सुचनेनुसार मी रथ दोन्ही सैन्य दळाच्या मध्यभागी उभा केला आहे. एवढेच नव्हे पण अशा ठिकाणी रथ उभा केला आहे की तू भीष्म, द्रोण आणि प्रमुख राजांना आणि संपूर्ण सैन्याला बघू शकतोस.

:26-27:

***तत्रापश्यत् स्थितान् पार्थ: पितृनथ पितामहान्।***
***आचार्यान्मातुलान्भ्रातृन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा।***
***श्वशुरान् सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि॥***
***तान् समीक्ष्य स कौन्तेय: सर्वान् बंधूनवस्थितान्।***
***कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत्र उभयो: अपि सेनयो:** अशा प्रकारे श्रीकृष्णाच्या सांगितल्यानंतर तिथे दोन्ही सैन्य दळाच्या मध्ये
- **स्थितान्:** उभ्या असलेल्या
- **पितृन्:** (भूरिश्रवा) वगैरे काकांना
- **अथ पितामहान्:** आणि (भीष्म वगैरे) आजोबांना, पितामहांना
- **आचार्यान्:** (द्रोण वगैरे) आचार्यांना
- **मातुलान्:** (शल्य वगैरे) मामांना
- **भ्रातृन्:** (दुर्योधन वगैरे बंधुंना )
- **पुत्रान्:** (अभिमन्यु, लक्ष्मण वगैरे ) पुत्रांना
- **पौत्रान्:** (त्या) पुत्रांच्या पुत्रांना म्हणजे नातवांना
- **तथा सखीन्:** त्याचप्रमाणे (अश्वत्थामा वगैरे मित्रांना)
- **श्वशुरान्:** (द्रुपद वगैरे) सासऱ्यांना
- **च एव सुहृद:** आणि त्याचप्रमाणे (कृतवर्मा, भगदत्त वगैरे) निरपेक्ष भावनेने उपकार करणाऱ्या स्नेही जनांना
- **पार्थ: अपश्यत्:** अर्जुनाने बघितले
- **तान् सर्वान् अवस्थितान् बंधून् समीक्ष्य:** त्या तमाम नातलगांना, मित्रांना आणि स्नेही जनांना बघून
- **परया कृपया आविष्ट:** अत्यंत करुणेने ग्रस्त

- **सः कौन्तेयः** तो अर्जुन
- **विषीदन्:** विषाद (दुःख, शोक) करता झाला
- **इदं अब्रवीत्:** असे बोलला

### अर्थ

त्यानंतर कुंतीपुत्र अर्जुनाने त्या दोन्ही सैन्यांमध्ये असलेल्या काका, आजे-पणजे, गुरु, मामा, भाऊ, मुलगे, नातू, मित्र, सासरे आणि हितचिंतक याना पाहिले

तेथे असलेल्या त्या सर्व बांधवांना पाहून अत्यंत करुणेने व्याप्त झालेल्या कुंतीपुत्र अर्जुन शोकाकूल होऊन असे म्हणाला.

***तेथ अर्जुन तो पाहे उभे सारे व्यवस्थित***
***आजे काके तसे मामे सासरे सोयरे सखे***
***गुरु बंधु मुलें नातू दोन्ही सैन्यांत सारखे***
***असे पाहूनि तो सारे सज्ज बांधव आपुले***
***अत्यंत करुणा-ग्रस्त विषादें वाक्य बोलिला ॥***

**विषयः** सव्वीसाव्या श्लोकात सहा चरण आहेत. या दोन श्लोकांधून हे सांगितले गेले आहे की अर्जुनाने शत्रुच्या सैन्यदळात कुणा-कुणाला बघितले? त्याची त्याच्या मनावर कोणती प्रतिक्रिया जागली?

### स्पष्टीकरण

गुरु, आजोबा, काका, मामा, भाऊ, पुत्र, नातु, मित्र, स्नेही, श्वसुर ही दहा नाती सांगितली आहेत. अर्जुनाने या सर्वांना बघितले. त्याच्या चित्तात या सर्वांबद्दल प्रचंड मोह उत्पन्न झाला. इथे 'करुणा' वाचक 'कृपा' शब्द आला आहे. ज्ञानी पुरुषांच्या ठायी करुणा जागते, तो मोह नसतो. त्यात जगत् विषयक परमात्मदृष्टी असते. सर्व प्राणिमात्राच्या ठायी ज्ञानीपुरुष ईश्वराचे दर्शन करतो. अतिदीन, दुःखी, गरीबांप्रती त्यांच्या मनात सहानुभूती उपजते. त्यांचे दुःख दूर करण्यासाठी ज्ञानी पुरुष सदैव प्रयत्नशील असतो. अर्जुनाच्या मनात करुणा उपजली. खरा तर तो मोह होता. याचा त्याच्या तना-मनावर परिणाम झाला. या अवस्थेचे वर्णन पुढील श्लोकात आले आहे.

:28 - 29 - 30:

### अर्जुन उवाच

***दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।***
***सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ॥***
***वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।***
***गांडीवं स्रंसते हस्तात् त्वक्चैव परिदह्यते ॥***
***न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ।***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **कृष्णः** हे कृष्ण
- **युयुत्सुम्:** युध्दासाठी इच्छुक
- **समुपस्थितम्:** (रणभूमीवर) उपस्थित झालेल्या
- **इमं स्वजनं दृष्ट्वाः** या स्वजनांना बघून
- **मम गात्राणि:** माझ्या शरीराचे सारे अवयव, माझी गात्रे
- **सीदन्तिः** सुस्त पडत आहेत, ढीली पडत आहेत, शिथिल पडू लागली आहेत
- **च मुखं परिशुष्यतिः** आणि तोंडाला कोरड पडत चालली आहे
- **च मे शरीरे वेपथुः** आणि माझ्या शरीरात कंपन (होत आहे, थरथर होत आहे)
- **च रोमहर्षः जायतेः** आणि शरीरावर रोमांच उभे रहाताहेत
- **हस्तात् गांडीवं स्रंसतेः** हातून गांडीव (धनुष्य) खाली गळू लागले आहे
- **च त्वक् एव परिदह्यतेः** आणि शरीराची त्वचाही दग्ध होत आहे, जळत आहे
- **च (अहं) अवस्थातुं न शक्नोमिः** आणि (मी) उभा रहायला समर्थ नाही, मी उभा राहू शकत नाही, माझे पाय लटपट करताहेत
- **च मे मनः भ्रमति इवः** आणि माझे मन भ्रमल्यासारखे झाले आहे

### अर्थ

अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, युद्धाच्या इच्छेने रणांगणावर उभ्या असलेल्या या स्वजनाना पाहून माझे अवयव गळून जात आहेत. घशाला कोरड पडली आहे. शरीराला कंप सुटला आहे. अंगावर रोमांच उभे रहात आहेत.

हातून गांडीव धनुष्य गळून पडत आहे. अंगाचा दाह होत आहे. तसेच माझे मन भ्रमिष्टासारखे झाले आहे. त्यामुळे मी उभादेखिल राहू शकत नाही.

**अर्जुन म्हणाला**

***कृष्णा स्व-जन हे सारे युध्दीं उत्सुक पाहूनी***
***गात्रें चि गळती माझीं होतसे तोंड कोरडें***
***शरीरी सुटतो कंप उभे रोमांच राहती***
***गांडीव न टिके हातीं सगळी जळते त्वचा***
***न शकें चि उभा राहू मन हें भ्रमलें जसें***

**विषय:** या श्लोकांमध्ये अर्जुन नातलगाना बघितल्यावर झालेल्या आपल्या तनाची आणि मनाची अवस्था वर्णन करत आहे.

**स्पष्टीकरण**

तो असे म्हणत आहे की त्याची सर्व अवयवे शिथील झालीत. तोंड कोरडे पडले आहे. शरीराचा थरकाप झाला आहे. काया थरथरु लागली आहे. हातून गांडीव गळून पडत आहे. त्याची त्वचा जळत आहे. अशा प्रकारे त्याच्या शरीराची एकूणच अशी अवस्था होऊन गेली आहे की त्याला धडपणे उभे रहाणेही अवघड वाटू लागले. त्याचे पाय लटपटताहेत. ही बाह्य लक्षणे होती. त्याचे मन भ्रमित झाले.

दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाचे वर्णन येते. त्यात येते की चित्तात मोह जागला की बुध्दी म्हणजे विवेकशक्ती भ्रमित होते. उचित निर्णय घेता येत नाही. शंकराचार्य म्हणतात की जोवर माणसाच्या ठायी 'सत्-असत्' निर्णय घेण्याची क्षमता आहे तोवर त्याला मनुष्य मानावे, अन्यथा तो मनुष्यत्वाला पारखा झाला असे समजावे.

सर्वसामान्य माणूस एकाच बिंदूवर खूप दुबळा ठरतो. तिथे त्याची कर्तव्यनिष्ठा डळमळते. सिध्दांतनिष्ठा कापायला लागते. अर्जुनाच्या उदाहरणाने त्या बिंदूची चर्चा इथे आली. सैन्यदळांच्या मधोमध रथ स्थापन केला गेला नव्हता, तेव्हा पार्थाची मनःस्थिती अगदी स्थिर होती. त्याचा युध्दाचा निश्चय कायम होता. आपल्या देवदत्त नावाच्या शंखाचा नादही त्याने केला होता.

दोन्ही सैन्य दळाच्या मध्यभागी आपल्या रथाला उभा करुन युध्दासाठी सज्ज अशा योध्दयांनाही त्याने बघितले होते. आपल्याशी झुंजण्याऱ्यांना बघितले होते. त्याच्या ठायी दडून असलेला प्रापंचिक मोह उसळून वर आला. मन मोहग्रस्त झाले की चित्त अस्थिर बनते. या मोहाचे स्वरुप या अध्यायात पुढील श्लोकांमधून आले आहे. पुत्र, माता-पिता यांच्या प्रती प्रेम जागणे ही एक गोष्ट झाली पण त्यांच्याविषयी आसक्ती जागणे मात्र वेगळी गोष्ट झाली. प्रेमाचा निषेध नाही. प्रेम तर हवेच हवे. आसक्ती आणि मोह त्याज्य आहेत. यातुन कर्तव्य भ्रष्टता जागते. या अध्यायाच्या अखेरपर्यंत अर्जुनाच्या कर्तव्यभ्रष्टतेची चर्चा आली आहे. त्याने दुष्टांचा सामना करणे एक पवित्र कर्तव्य मानले होते पण आता तो त्या पवित्र कर्तव्यापासून पळ काढू बघत आहे. मोहाने घेरला गेलेला अर्जुन आता कर्तव्यापासून पळ काढण्यासाठी नाना तर्क देत आहे. याला मोह वाणीच म्हणावे लागेल.

: 31 :

***निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव***
***न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **केशव:** हे कृष्णा
- **च विपरीतानि निमित्तानि:** आणि सारी लक्षणे विपरीत, सारी अशुभसुचक लक्षणे
- **पश्यामि:** बघत आहे
- **च आहवे:** आणि या युध्दात
- **स्वजनं हत्वा:** स्वजनांना ठार मारुन, स्वजनांचा वध करुन
- **श्रेय: न अनुपश्यामि:** (मला) कल्याण भले काही दिसत नाही

**अर्थ**

हे केशवा, मला विपरीत चिह्ने दिसत आहेत. युध्दात आप्तांना मारुन कल्याण होईल असे मला वाटत नाही.

***कृष्णा मी पाहतों सारीं विपरीत चि लक्षणें***
***कल्याण न दिसे युध्दीं स्व-जनांस वधूनियां।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) अर्जुन सांगत आहे: **च विपरीतानि निमित्तानि पश्यामि** - अर्जुन म्हणतो की मला सारी विपरीत लक्षणे

दिसत आहेत. अशुभ सूचक लक्षणे दिसत आहेत. युध्दाचा चांगला परिणाम होणार नाही, असे मला वाटते.

माणसाच्या कर्माची प्रेरणा शुभ असते. कर्म करताना प्रत्येकाचे लक्ष परिणामाकडे असते. गांधीजींनी संपूर्ण गीतेचा सारांश 'फलासक्तीचा त्याग' असल्याचे म्हटले आहे. या युध्दाच्या परिणामांविषयी अर्जुनाने आधी विचार केला नव्हता, असे नव्हे. युध्दात उभयपक्षातील प्रियजन मरतील हे तर स्पष्टच होते. प्रत्यक्ष युध्दाची वेळ आली तर स्वजनांबद्दल आसक्ती जागली. युध्द करायचे कर्तव्य सोडून देण्याचे अर्जुनाच्या मनात आले. तो स्वधर्माचा त्याग करायला तयार झाला. स्वजनांसाठी माणूस स्वकर्तव्य सोडायला तयार होतो. स्वधर्म टाळायला प्रवृत्त होतो हे या अध्यायातून सांगितले गेले आहे. चित्ताच्या ठायी मोह जागला की स्वधर्म हा अधर्म वाटू लागतो. जो स्वधर्म नाही तो स्वधर्म वाटू लागतो, हे मोहाचे स्वरुप आहे. मोहात सारेच उलटे-उलटे दिसते. मोह म्हणजे भ्रांती. मोहामुळे चित्त भ्रांत होते. नेत्रात तिमिर रोग झाला तर मग एकच चंद्र अनेक दिसू लागतात किंवा मनात सर्पाच्या भयामुळे दोरीतही सर्प दिसू लागतो. त्याचप्रमाणे मोह उपजताच चित्तात भ्रांतीचा प्रभाव सुरु होतो. यातून सत्य निर्णयाची शक्ती नष्ट होऊन जाते.

2) **च आहवे स्वजनं हत्वा श्रेय: न अनुपश्यामि** - आणि या युध्दात स्वजनांना, नातलगाना मारण्यात अर्जुनाला काही कल्याण दिसत नाही.

हे युध्द जर स्वजनांच्या विरोधात, नातलगांच्या विरोधात, मित्रांच्या विरोधात नसते तर अर्जुन युध्दाला तयारच होता. याचे कारण असे की आपल्या जीवनात शत्रुच्या समोर, अन्यायीच्या समोर युध्द करणे हे त्याने आपले कर्तव्यच मानले होते. या कर्तव्याचे सुयोग्यपणे त्याने पालनही केले होते. यामुळे स्वजनांच्या विरोधात, नातलगांच्या विरोधात न झुंजायचा विचार काही त्याच्या आयुष्याशी समांतर चालताना दिसत नाही. यामुळे युध्द करण्यात, अन्यायाचा सामना करण्यात सर्वांचे कल्याण आहे असे समजून जेव्हा अन्यायाचा प्रतिकार करायचा निर्णय सर्वसंमतीने घेतला गेला तेव्हा आता त्याला स्वजनांच्या विरुध्द मोहामुळे कसे काय बदलता येईल? इथे मुख्य मुद्दा शस्त्रांनी झुंजायचा नाही, मुख्य मुद्दा तर अन्यायाचा मुकाबला करायचा आहे आणि हे बघायचे आहे की हा भाग कर्तव्यात मोडतो की नाही.

: 32 :

***न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च***
***किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्ण:** हे कृष्णा
- **विजयं न कांक्षे:** मला विजय प्राप्तीची इच्छा नाही
- **न राज्यं न (कांक्षे):** आणि राज्य (उपभोगायचीही) इच्छा नाही
- **च सुखानि ( न कांक्षे):** आणि सुखाचीही इच्छा नाही
- **गोविंद:** हे गोविंद
- **न: राज्येन किम्:** मला राज्याशी काय देणे-घेणे
- **भोगै: किम्:** मला या भोगांशीही काय बरे देणे-घेणे
- **वा जीवितेन (किम्):** अथवा जिवंत रहाण्यातही काय बरे अर्थ आहे ?

**अर्थ**

हे कृष्णा, मला तर विजयाची इच्छा नाही, राज्याची नाही की सुखाचीही नाही, हे गोविंदा, आम्हाला असे राज्य काय करायचे ? अशा भोगांनी आणि जगण्याने तरी काय लाभ होणार आहे ?

***नको जय नको राज्य नकोत मज तीं सुखें***
***राज्यें भोगें मिळे काय किंवा काय जगूनि हि ।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **कृष्ण, विजयं न कांक्षे:** हे कृष्णा, मला विजयाची इच्छा नाही.

अर्जुन प्रापंचिकच होता. त्याला काही वैराग्य उपजले नव्हते. त्याला मोह झाला होता. यामुळे तो कर्तव्य टाळत होता. बैराग्यासारखा बोलत होता. 'मला विजयाची इच्छा नाही' असे अर्जुन बोलला. स्वार्थ नको. स्वार्थाने का कधी कुणाचे कल्याण झाले? काहीही झाले तरी कौरव आपले बांधवच ना? असे अर्जुन बोलायला लागला.

2) **न राज्यं न (कांक्षे):** आपल्या मनात राज्याचीही आकांक्षा नसल्याचे अर्जुन बोलायला लागला. विजय

प्राप्त केल्यावर राज्यच तर मिळेल ना ? आपलेच राज्य हवे, आपल्याच हाती सत्ता हवी असे कशासाठी?

कौरवांच्या राज्यात जनकल्याण नसेल. यामुळे या जनकल्याणासाठी पांडवांचे राज्य हवे होते पण चित्तात मोह जागला आणि परिणामी ही गोष्ट अर्जुनाच्या ध्यानी आली नाही. मोहामुळे सत्यावर आवरण पडते, हे खरे.

3) **च सुखानि (न कांक्षे):** अर्जुन म्हणाला- 'मला सुखांचा उपभोग नको.' राज्यप्राप्ती होईल. सुख होईल. ते का कायमचे सुख असेल? मला नको ते तात्पुरते सुख. शाश्वत सुखासाठी ऐहिक सुखोपभोगांचा त्याग करायला हवा. कामनेच्या भोगातून काम शांत होत नाही. त्यागातून होतो. राजा ययातिने हा सिध्दांत ठरवला. अनेक वर्षे कामनांचा भोग घेतल्यावर न जातु काम: कामानामुपभोगेन शाम्यति म्हणजे कामाचे शमन, कामाची तृप्ती ही काही कामोपभोगाने शांत होत नाही. ती तर त्याच्या त्यागानेच प्राप्त होऊ शकते. यामुळे या राज्योपभोगाचे सुख त्याज्य आहे.

4) **गोविंद, न: राज्येन किं भोगै: किम्:** अर्जुन म्हणाला- हे कृष्णा, आम्हाला राज्य मिळाले तर काय? भोग प्राप्त झाले तर काय? वैभव मिळाले तर काय? साधने मिळालीत तर काय? संपत्ती मिळाली तर काय? राजप्रासाद मिळालेत तर काय? नोकर-चाकर दिमतीला असले तर काय? सारे आज्ञेचे पालन करतील. चहुकडे आमची कीर्ती गाजेल पण या साऱ्या वैभवाचे आम्ही करु काय? यमराज तर मस्तकी थयथयाट करत आहे? हे क्षणिक आहे. यातून अखंड सुख लाभेल काय?

श्रीकृणासाठी 'गोविंद' शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. 'गो' म्हणजे गाय आणि दुसरा अर्थ आहे इंद्रिय. यांचे स्वामी गोविंद. इंद्राने ही पदवी दिली आहे.

5) **वा जीवितेन (किम्)** अर्जुन म्हणाला, "आम्ही दीर्घकाळ हयात राहिलो तरी काय ? त्यामुळे काय साधेल? मानवी आयुष्य कशासाठी मिळाले आहे? मानव जन्म कशासाठी प्राप्त झाला आहे याचा विचार करायला हवा. दीर्घकाळपर्यंत भोग भोगत रहाणे मानवी जीवनाची इतिकर्तव्यता कशी बरे असू शकेल? कारण भोग भोगणे तर पशु-पक्ष्यांचे जीवन आहे. पशु-पक्ष्यांच्या ठायी ईश्वराचे ज्ञान प्राप्त करुन घ्यायचे साधन नाही. ईश्वराने माणसाला एवढी बुध्दी दिली आहे की तो ईश्वराला ओळखू शकतो. यामुळे ही विजयश्री संपादन करुन राज्य वैभव प्राप्त करुन, भोगांमध्ये जीवन घालवण्यात काय बरे लाभ?" अशा प्रकारे नाना प्रकारचे तर्क मांडून अर्जुन ऐहिक सुखाला त्याज्य मानत आहे. हे वाचल्यावर तर वर वर अर्जुनाचे म्हणणे खरे वाटते पण ही वैराग्य वाणी नव्हे. ही मोह वाणी असल्यामुळे ही खरी नाही.

: 33 :

***येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगा: सुखानि च ।***
***त इमेऽवस्थिता युध्दे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **येषां अर्थे:** ज्यांच्यासाठी
- **न: राज्यं कांक्षितम्:** आम्हाला राज्याची अपेक्षा आहे.
- **भोगा: (कांक्षिता:):** आणि भोगही (आम्ही ज्यांच्यासाठी चाहत आहोत)
- **च सुखानि (कांक्षितानि):** आणि सुखही (ज्यांच्यासाठी आम्ही चाहत आहोत)
- **ते इमे:** ते सारे (कौरव आणि पांडव)
- **प्राणान् च धनानि त्यक्त्वा:** प्राण आणि धन दोघांचा त्याग करुन
- **युध्दे अवस्थिता:** युध्दासाठी समोर उभे ठाकले आहेत

**अर्थ**

आम्हाला ज्यांच्यासाठी राज्य, भोग आणि सुख वगैरे अपेक्षित आहेत तेच हे सर्वजण धनाची आणि जीविताची आशा सोडून युध्दात उभे ठाकले आहेत.

***ज्यांच्यासाठीं अपेक्षावीं राज्य भोग सुखें हि तीं***
***सजले ते चि युध्दास धना-प्राणांस सोडुनी ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **येषां अर्थे न: राज्यं कांक्षितं, भोगा: (कांक्षिता:) च सुखानि (कांक्षितानि):** अर्जुन म्हणाला-'आम्हाला राज्य हवे. भोग हवेत. सुख हवे पण कुणासाठी हवे हे सारे? 'पहिली गोष्ट राज्य. भांडणाचे मूळ. राज्य हे जनकल्याणासाठी हवे. प्रजा कुणाच्या राजवटीत सुखी-

समाधानी राहील? कौरवांच्या की पांडवांच्या राज्यात? हा मुख्य प्रश्न होता. पांडवांना हे सहजपणे वाटत होते की आपली वृत्ती सदाचरणाकडे असल्यामुळे आपल्या राज्यात प्रजा सुखी राहील. जनतेचे अधिक कल्याण होईल. कौरवाना आपल्या दुष्ट वृत्तीचे तर भान नव्हतेच नव्हते. यामुळे राज्य आपल्याकडेच असावे असे त्याना वाटायचे. आपल्याला राज्यावर बसायचा अधिक अधिकार आहे आणि आपण जनतेचे अधिक कल्याण करु असे त्यांचे मत होते. राज्य काही केवळ राज्यासाठीच नसते ते असते जनतेच्या कल्याणासाठी.

दुसरी गोष्ट आहे भोग. राज्य व्यवस्था सुयोग्य असावी. यातून भोगाची साधने सर्वांना समान रुपात उपलब्ध करुन देता येतात. सर्वसामान्य जनता काही वैराग्यप्रधान नसते. कायदे कानून नियम आणि सारी व्यवस्था कुणावरही अन्याय होऊ नये यासाठी असते. राज्य व्यवस्था सुयोग्य राहिली तर सारे काही सुयोग्य असते. अन्यथा विषमता वाढते.

खरे तर सर्वांना विकासाची समान संधी हवी. गांधीजींची सर्वोदय समाजाची कल्पना क्रांतिकारी आणि आदर्श आहे. विनोबांनी याचा विकास केला. यातून भूदान आले. संपत्तीदान आले. ग्रामदान आले.

तिसरी गोष्ट आहे सुख. जनतेला पूर्ण सुखाची प्राप्ती व्हावी हाच भोगाची साधने उपलब्ध करुन देण्याचा उद्देश असला पाहिजे. केवळ भौतिक स्वरुपाचे सुख प्राप्त करुन देणे काही कल्याणकारी नसते. सुखाचे दोन प्रकार भौतिक आणि आत्मिक. दोघांनी विरोधात उभे ठाकू नये. दोन्ही सुखे परस्परपूरक ठरावीत. अंतिम ध्येय आत्मिक सुख असावे. यासाठी गरजेचे तेवढे भौतिक सुख राज्यव्यवस्थेने मिळवून द्यावे.

2) **ते इमे प्राणान् च धनानि त्यक्त्वा युध्दे अवस्थिता:** कौरव आणि पांडव युध्दासाठी उभे ठाकले आहेत. प्राणांच्या मोहाचा त्याग केला आहे. धनाचा त्याग केला आहे. अर्जुन म्हणतो- "आम्ही जनकल्याणकारी राज्य चाहतो यामुळे जनतेचे अधिकात अधिक हित होईल. याचा अर्थ असा की भोगाची साधने समानपणे आम्ही उपलब्ध करुन देऊ. यातुन सर्वांना भौतिक आणि आत्मिक सुख लाभेल. हे खरे आहे पण ते कुणासाठी चाहतो आहोत? ज्यांच्यासाठी चाहतो आहोत ते कौरव. तेच आमच्या विरोधात उभे ठाकलेत. तेच प्राणांची पर्वा करत नाहीत. तेच धनाचा त्याग करायला तत्पर आहेत."

अर्जुनाचा हा तर्क अप्रतीम आहे. अर्थात् याला मोहाचा वेढा आहे. मोहवश होऊन का होईना पण अर्जुनाने मांडलेला तर्क आहे मोठा अनोखा हे मात्र खरे.

: 34 :

*आचार्या:  पितर: पुत्रास्तथैव च पितामहा: ।*
*मातुला: श्वशुरा: पौत्रा: श्याला: संबंधिनस्तथा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आचार्या:** (भीष्म, द्रोण, कृप वगैरे) आचार्य
- **च तथा एव पितामहा:** आणि तसेच दादा (आजोबा)
- **पितर:** वडिल, काका (चुलते)
- **पुत्रा:** पुत्र, पुतणे, भाचे
- **पौत्रा:** नातू (मुलांची मुले)
- **मातुला:** श्वशुरा: मामा, सासरे
- **श्याला:** शालक
- **तथा संबंधिन:** आणि इतर नातलग

**अर्थ**

गुरुजन, काका, मुलगे, आजे, मामा, सासरे, नातू, मेहुणे, त्याचप्रमाणे इतर आप्त आहेत.

***आजे बाप मुलें नातू आमुचे दिसती इथें***
***सासरे मेहुणे मामे संबंधी आणि हे गुरु ।***

**स्पष्टीकरण**

या श्लोकात सर्व नातलगांचा निर्देश आहे. ज्यांच्याविरुध्द लढायचे ते का शत्रु आहेत? सारेच तर नातलग आहेत. आधी आचार्यांचा निर्देश केला. पांडव आणि कौरव यांच्यावर सर्वात मोठे उपकार तर द्रोणाचार्य, कृपाचार्य यांचे होते. कुणी आचार्य आहेत. कुणी आजोबा आहेत. कुणी बाबा आहेत. कुणी काका आहेत. कुणी मुले आहेत. मामा, सासरे, नातू, शालक आहेत. असे सगे सोयरे आहेत सारे. याच नातलगांचा उल्लेख यापूर्वी या अध्यायात 26 व्या श्लोकात केला आहे. तिथे 'आचार्य' असा उल्लेख नसून 'गुरु' असा उल्लेख आहे.

:35 :

***एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन।***
***अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मधुसूदनः** हे कृष्णा
- **त्रैलोक्य राज्यस्य हेतोः** अपि: तिन्ही लोकांच्या राज्याला प्राप्त करण्यासाठीही
- **घ्नतः अपिः** (किंवा) मी (कौरवांच्या हातून) मारला गेलो तरीही
- **एतान् हन्तुं न इच्छामिः** या सर्वांना मी (दुर्योधन वगैरे नातलगांना) मारु इच्छित नाही
- **महीकृते किं नुः** मग या पृथ्वीचे राज्य प्राप्त करण्यासाठी तर मी कसे मारु ?

**अर्थ**

हे मधुसूदना, हे मला मारण्यास तयार झाले तरी किंवा त्रैलोक्याच्या राज्यासाठीही मी या सर्वांना मारु इच्छित नाही. मग पृथ्वीची काय कथा?

***न मारुं इच्छितों ह्यांस मारितील जरी मज***
***विश्व-साम्राज्य सोडीन पृथ्वीचा पाड तो किती।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) मधुसूदन, त्रैलोक्य-राज्यस्य हेतोः अपि घ्नतः अपि एतान् हन्तुं न इच्छामि** अर्जुन म्हणाला- 'हे कृष्णा-मधुसुदना! मला तिन्ही लोकांचे राज्य मिळणार असेल तरी यांच्याशी युध्द नको. मी यांच्याकडून मारलो गेलो तरी मी याना मारु इच्छित नाही.'

इथे कृष्णासाठी मधुसूदन या शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. मधु, राक्षसाला मारणारा तो मधुसूदन.

एका प्रकारे अर्जुनाची भूमिका गांधीजींच्या सत्याग्रहासारखी वाटते. अर्जुनाचा निर्णय योग्यही वाटतो पण हा 'अहिंसक सत्याग्रह' नाही. अहिंसक सत्याग्रहात हिंसेचा सामना अहिंसेने केला जातो पण अन्याय झेलणे, दबून जाणे हा अहिंसक प्रतिकार नाही. हा भित्रेपणा आहे. हिंसेविरुध्द भित्रेपणा नको. मोहामुळे अर्जुन थबकला आहे. मोहाने घेरला गेला आहे. मोहक तर्क करत आहे. मोह नसता तर अर्जुन झुंजायला सिध्द होता. त्याने आपला रथही दोन सैन्यदळाच्या मध्यभागी उभा करायची विनंती केली होती. ते ही कुणा-कुणाशी झुंजायचे आहे हे बघण्यासाठी होते. युध्द योग्य प्रकारे समजून घेण्यासाठी होते. जेव्हा हा संहार आपल्या सर्व नातलगांच्या विरोधात आहे हे त्याला कळले तेव्हा तो मोहाने ग्रासला गेला आणि तर्क करु लागला होता.

**2) महीकृते किं नु** - अर्जुन म्हणतो, 'हस्तिनापुरचे राज्य सोडाच पण पृथ्वीच्या राज्यासाठीही मी कौरवांची हत्या करणार नाही. त्रिभुवनाचे राज्य लाभले तरीही नाही.' पृथ्वीचे राज्य याचा अर्थ आहे हस्तिनापुरचे राज्य.

:36:

***निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन।***
***पापमेवाश्रयेदस्मान्  हत्वैतानाततायिनः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दनः** हे वासुदेवा
- **धार्तराष्ट्रान् निहत्यः** धृतराष्ट्राच्या पुत्रांना (कौरवांना) मारुन (ही)
- **नः का प्रीतिः स्यात्ः** आमचे काय बरे हित होणार आहे? भले होणार आहे?
- **एतान् आततायिनः** या आततायींना (सहा प्रकारचे दोष करणाऱ्या या पातक्यांना)
- **हत्वाः** मारुन
- **अस्मान् पापं एव आश्रयेत्ः** आम्हाला पापच लागेल, आम्ही पापातच पडणार

**अर्थ**

हे जनार्दना, धृतराष्ट्राच्या मुलांना मारुन आम्हाला कोणते सुख मिळणार? या आततायींना मारुन आम्हाला पापच लागणार.

***ह्या कौरवांस मारुनि कायसें आमुचें प्रिय***
***अत्याचारी जरी झाले ह्यांस मारुनि पाप चि।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) अर्जुन म्हणतो **जनार्दन, धार्तराष्ट्रान् निहत्य नः का प्रीतिः स्यात्"** हे वासुदेवा! धृतराष्ट्राचे पुत्र कौरवांना मारुन आमचे काय बरे भले होईल? सारे कौरव संपले तर आमचा लाभ काय? सारे जीवंत राहिलेत आणि आपसात प्रेमाने राहिलेत तर सर्वांचा फायदा. जनतेच्या ठायी प्रेमाचे वातावरण जागेल. हिंसेने शांतता प्रस्थापित केली तर ती टिकेल का? यातून तर पराभूतांच्या मनात वैरभावना जागेल. संधी मिळताच ही भावना वर उफाळून येईल, उसळेल. युध्दे भडकतील. सारी संपत्ती नष्ट होईल. याचा परिणामकाय होईल? युध्दाने का प्रश्न सुटतील?"

खरे तर हा तर्क सुंदर आहे पण अर्जुनाकडून हा काही स्वतंत्रपणे प्रस्तुत केला जात नाही. याच्या मागे मोह आहे यामुळे या तर्काचे मोल शून्य आहे.

**2) एतान् आततायिनः हत्वा अस्मान् पापं एव आश्रयेत्:** 'या आततायींना मारुन आम्हाला तर पापच लागेल ना?' असे अर्जुन बोलला. आततायी म्हणजे काय? आततायी सहा प्रकारची पापे करतो. ती अशी घरे जाळणारा, शस्त्र हाती धरुन लोकांवर तुटून पडणारा, धनाची चोरी करणारा, विष देणारा, शेत लुटणारा आणि स्त्रियांना पळवणारा यांना आततायी म्हणतात. यांना पापी जाणावे. अर्जुन म्हणाला- 'कौरव पापी आहेत. दुष्ट आहेत. आततायी आहेत, म्हणून काय आम्हीही तसे व्हावे?' संस्कृत नीती वचन आहे **न पापे प्रतिपापः स्यात्** पापाचा बदला पापाने घेता येत नाही. पुण्यानेच घेता येतो.

:37:

*तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान्।*
*स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **माधवः** हे माधवा
- **तस्मात्:** यामुळे, यासाठी
- **वयम्:** आम्ही
- **स्वबांधवान् धार्तराष्ट्रान्:** आपल्या बंधुंना, धृतराष्ट्राच्या पुत्रांना, कौरवांना
- **हन्तुं न अर्हाः** मारणे योग्य नाही (त्यांना मारणे उचित नाही)
- **हि स्वजनं हत्वा:** कारण की आपल्याच नातलगांना मारुन
- **सुखिनः कथं स्यामः** आम्ही सुखी कसे काय होऊ शकतो?

**अर्थ**

म्हणूनच हे माधवा, आपल्या बांधवांना धृतराष्ट्राच्या पुत्रांना आम्ही मारणे योग्य नव्हे कारण आपल्याच कुटुंबियांना मारुन आम्ही कसे काय सुखी होणार?

*म्हणूनि घात बंधूंचा आम्हां योग्य नव्हे चि तो*
*आम्हीं स्व-जन मारुनि सुखी व्हावें कसें बरें।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) अर्जुन म्हणतो: **माधव, तस्मात् वयं स्वबांधवान् धार्तराष्ट्रान् हन्तुं न अर्हाः** अर्जुन म्हणतो 'यामुळे हे माधवा, आम्ही कौरवांना मारणे उचित नाही.' कौरव जरी आततायी दुष्ट झाले तरीही आम्हाला तसे नाही होता येणार. आम्हाला तर धर्मपालनाची दृष्टी राखायला हवी. धर्म पालन दृष्टी पाळणाऱ्यांकडून स्वजनांना मारणे कसे काय धर्मसंमत होऊ शकेल बरे? आम्ही जर अधर्माचे पालन केले तर पापच लागेल.

**2) हि स्वजनं हत्वा कथं सुखिनः** स्याम पुढे अर्जुन म्हणतो "यांना मारणे योग्य नव्हे. आपल्याच नातलगांना मारुन आम्ही सुखी कसे होऊ शकतो बरे? हा प्रश्न फार मोलाचा आहे. आपण जर कुटुंबातच लढू लागलो तर उभ्या जगाशी भांडायला तयार होऊन जाऊ. कुटुंबात तर प्रेम पाळायला हवे. सहिष्णुता जोपासायला हवी. प्रेमाचा उत्कर्ष तर कुटुंबातच होईल ना? नंतर गृहस्थाश्रम पूर्ण होईल, मग वानप्रस्थ सुरु होईल. तेव्हा जगाची सेवा करत सर्वांशी प्रेमाने वागू शकतो. यासाठी कुटुंबसंस्थेत तर संघर्ष टाळला पाहिजे. आपण जर कुटुंबसंस्थेत प्रेमाने राहू शकलो नाही तर मग सुखी कसे काय राहू शकू?"

हा तर्क चांगला आहे पण यामागे मोहाची छाया आहे, हाच मोठा दोष आहे.

इथे कृष्णासाठी माधव शब्दाचा प्रयोग केला आहे. माधव म्हणजे मौन ध्यान योगाने लाभणारा बोध वा साक्षात्कार होय.

: 38 :

*यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।*
*कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यद्यपिः** यद्यपि, जरी
- **लोभोपहत-चेतसः** लोभवृत्तीमुळे ज्यांची बुध्दी विवेकशून्य होऊन गेली आहे
- **एतेः** (असे) हे (कौरव)
- **कुलक्षय-कृतं दोषंः** कुळाचा नाश झाल्यावर जो दोष उत्पन्न होतो
- **च मित्रद्रोहे पातकम्ः** आणि असेच मित्रद्रोह केल्याने पाप लागते त्याला
- **न पश्यन्तिः** बघू शकत नाहीत

**अर्थ**

जरी लोभामुळे बुध्दी भ्रष्ट झालेल्या याना कुळाचा नाश झाल्यामुळे उत्पन्न होणारा दोष आणि मित्रांशी वैर करण्याचे पातक दिसत नसले तरी हे जनार्दना.

*लोभानें नासली बुध्दि त्यामुळें हे न पाहती ।*
*मित्र-द्रोहीं कसें पाप काय दोष कुल-क्षयीं ॥*

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **यद्यपि लोभोपहत-चेतसः** एते अर्जुन म्हणतो 'कौरव विवेकशून्य आहेत. लोभवृत्तीमुळे त्यांची बुध्दी अशी झाली आहे.'

काम, क्रोध आणि लोभ ही नरकाची महाद्वारे होत. हा विचार सोळाव्या अध्यायातील एकविसाव्या श्लोकात येतो. नरकाची द्वारे मूढता उत्पन्न करतात. हे आत्म्याचा नाश करतात. याचा अर्थ असा की विवेक संपवून टाकतात. आत्मतत्वाची ओळख विवेकामुळे होते. अविवेकाचे आवरण पडले की आत्म्याची ओळख उरत नाही. विकार प्रेरित कार्य चुकीचे आहे. निर्णय चुकीचा आहे. हे जाणून घ्यायला हवे.

2) **कुलक्षयकृतं दोषं न पश्यन्तिः** अर्जुन म्हणतो 'कौरव लाभामुळे युध्दाला तयार झालेत. यामुळे संपूर्ण कुळाचा नाश होईल.' हा प्रापंचिक तर्क आहे. ही मूढता आहे. यात स्वार्थ असल्यामुळे संकुचित भाव आहे. जनतेचे अकल्याण होईल हा व्यापक तर्क आहे. कुळाचा संहार होईल हा संकुचित तर्क आहे. विचाराची शैली व्यापक असली पाहिजे. त्यातूनच जनकल्याण साधेल. अर्जुनाची स्थिती मोहग्रस्ततेमुळे दयनीय झाली आहे. यामुळे त्याची स्थिती नेहमीसारखी नाही.

3) **च मित्रद्रोहे पातकं न पश्यन्तिः** यामुळे मित्राचा द्रोह करणे हे पाप आहे याचे भान कौरवांना नाही. ते हे पातक बघू शकत नाहीत.

अनेक मित्र या युध्दात सामिल आहेत. कुणी कौरव पक्षात तर कुणी पांडव पक्षात आहेत. योगसूत्र म्हणते की मैत्रीभावना विकसित करायला हवी. हीच मानवता आहे. मित्रांविरुध्द युध्द तर विश्वासघात ठरेल. याहून मोठे का दुसरे पातक असेल बरे ? कौरवांची बुध्दी मोहग्रस्त आहे. विवेकशून्य आहे. यामुळे त्यांना हे महापाप दिसत नाही.

: 39 :

*कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।*
*कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दनः** हे जनार्दना
- **कुलक्षय-कृतं दोषम्ः** कुलक्षयाने होणाऱ्या दोषांना
- **प्रपश्यद्भिः अस्माभिः** बघणाऱ्या-जाणणाऱ्या आम्हाला
- **अस्मात् पापात् निवर्तितुम्ः** यापापातून मुक्त होण्यासाठी
- **कथं न ज्ञेयम्ः** का समजून घ्यायला नको?

**अर्थ**

कुळाच्या दोषाने उत्पन्न होणारा दोष स्पष्ट दिसत असतानाही आम्ही या पापापासून परावृत्त होण्याचा विचार का बरे करु नये?

*परी हें पाप टाळावें आम्हा कां समजूं नये*
*कुल-क्षयीं महा-दोष कृष्णा उघड पाहतां ।*

**अर्थ**

या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) जनार्दन, कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिः अस्माभिः** अर्जुन म्हणतो ‘‘कौरवांचे जाऊ द्या. आपल्याला तर हे पाप दिसते आहे ना? आपल्याला तर हे पाप आहे असे कळते ना? या युध्दामुळे सर्वांचा संहार होईल. कुणाचेच कल्याण होणार नाही. पाप्याला मारल्यावर तो का पापापासून मुक्त होईल? पाप्याला पापांपासून वाचवायला हवे. यासाठी त्यालाही वाचवावे लागेल. पाप्याला मारुन त्याचा पापाचा संस्कार संपवता येणार नाही. पुढील जन्मी तो पुनरपि जागृत होईल. तो पापकर्मात प्रवृत्त होईल. यामुळे तर कौरवांची बुध्दी भ्रष्ट झाली पण आपण तर समजूतदार आहोत ना?’’

**2) अस्मात् पापात् निवर्तितुं कथं न ज्ञेयम्:** ‘‘मग या पापापासून मुक्त व्हायचा विचार आपण का करु नये? युध्द न करुन आपण कौरवांची मने जिंकून घ्यायला हवीत. यातून कौरवांचे हृदयपरिवर्तन होईल. हृदय परिवर्तनाचा उपाय का युध्द आहे?’’ आपण युध्द न करता सारे काही सहन करत राहिलोत तर उद्या याचे चांगले परिणाम समोर येतील. हृदयपरिवर्तन हाच मुख्य मुद्दा आहे. आणि याचा उपाय युध्द कदापि असू शकत नाही एवढे निश्चित.

अर्जुनाचा हा तर्क खूप सुंदर आहे पण याच्या मूळाशी अहिंसा नसून मोह आहे.

:40:

*कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः*
*धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मोऽभिभवत्युत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कुलक्षये:** कुळाचा क्षय होण्यात, कुळाचा नाश झाला असता
- **सनातनाः** कुलधर्माः प्रणश्यन्तिः परंपरेने चालत आलेले सारेच कुळधर्म नष्ट होऊन जातील
- **धर्मे नष्टे:** धर्म नष्ट झाल्यावर
- **अधर्मः** अधर्मांचा
- **कृत्स्नं उत कुलं अभिभवतिः** संपूर्ण कुळालाच व्याप्त करतो, कुळावर पगडा बसतो

**अर्थ**

कुळाचा नाश झाला असता परंपरागत कुळधर्म नाहीसे होतात. कुळधर्म नाहीसे झाले असता त्या कुळात मोठ्या प्रमाणात पाप फैलावते.

*कुल-क्षयें लया जाती कुल-धर्म सनातन ।*
*धर्म-नाशें कुळीं सर्व अधर्म पसरे मग ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) कुलक्षये सनातनाः कुलधर्माः प्रणश्यन्ति** अर्जुन म्हणतो ‘‘कुळाचा क्षय होईल. परंपरेने चालत येणारे कुळधर्म नष्ट होतील. युध्दात नीतीपालन नसते. यामुळे धर्म भ्रष्ट होतो. उन्माद जागतो. धर्म पालनाच्या ठायी शिथिलता जागते. कुळात अधर्म पसरतो.’’ अर्जुनाचा तर्क चांगला आहे पण याच्या मूळाशी मोहाचे सिंचन आहे. इथे अर्जुनाने युध्द प्रवृत्तीवरच प्रहार केला आहे.

**2) धर्मे नष्टे अधर्मः कृत्स्नं उत कुलं अभिभवति** कुळात अधर्म पसरेल. एकदा का धर्म पालनात शिथिलता जागली ना तर मग अधर्म पसरायला वेळ तो किती लागायचा बरे? आपण रोज प्रात:काळी चार वाजता उठून प्रार्थना करतो पण काही कारणास्तव जाग नाही आली तर मग शिथिलता जागते. इंद्रियांचा स्वभाव अधोगामी असतो. यामुळे मनाच्या उन्नयनासाठी धर्म पालन आवश्यक आहे. नीती आणि नियमांच्या पालनात शिथिलता यायला नको.

मोहवाणी असूनही अर्जुनाने तर्कांची मांडणी चांगली केली आहे. एकदा का कुळात अधर्माचे आचरण सुरु झाले की मग संपूर्ण कुळात ते सारे पसरतील.

: 41 :

*अधर्माभिभवात् कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।*
*स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्णः** हे श्रीकृष्णा
- **अधर्माभिभवात्:** कुळात अधर्म पसरल्याने
- **कुलस्त्रियः प्रदुष्यन्तिः** कुलीन स्त्रिया भ्रष्ट होऊ लागतील

- **वार्ष्णेय:** हे वृष्णी कुलोत्पन्न श्रीकृष्णा
- **स्त्रीषु दुष्टासु:** स्त्रिया भ्रष्ट झाल्यावर
- **वर्णसंकर: जायते:** वर्णसंकर होईल म्हणजे ब्राह्मण वगैरे वर्णांचे परस्पर मिश्रण होऊन जाते

**अर्थ**

हे कृष्णा, पाप अधिक वाढल्याने कुळातील स्त्रिया अतिशय बिघडतात आणि हे वार्ष्णेया, स्त्रिया बिघडल्या असता वर्णव्यवस्थेचा नाश होतो.

***अधर्म माजतो तेव्हां भ्रष्ट होती कुल-स्त्रिया ।***
***स्त्रिया बिघडतां कृष्णा घडतो वर्ण-संकर ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **कृष्ण, अधर्माभिभवात् कुलस्त्रिय:** प्रदुष्यन्ति कुलीन स्त्रिया भ्रष्ट होतील.

मागील श्लोकाच्या अखेरीस सांगितले होते की अधर्माचे आचरण एकदा का सुरु झाले ना तर ते संपूर्ण कुळाला व्यापून टाकते. याचा काय परिणाम होतो त्याची या श्लोकात चर्चा आली आहे. एकदा का कुळात अधर्म शिरला की मग कुलस्त्रिया भ्रष्ट होऊ लागतात. युध्दाचा एक परिणाम असा होतो की युध्दानंतर पुरुष वर्गाचा संहार झाल्यावर स्त्रियांची मती बिघडते विशेष करुन तरुण स्त्रियांची तर बिघडतेच बिघडते. ज्यांचे पती धारातीर्थी पडतात त्यांची पावले वाकडी पडू लागतात. अशाप्रकारे युध्दाचा परिणाम अनैतिकता आहे आणि ती कुटुंबालाही स्पर्श करेल.

इथे अर्जुनाने युध्दावरच प्रहार केला आहे. युध्दातल्या नरसंहारातून होणाऱ्या भयंकर परिणामावर बोट ठेवले आहे. अर्जुनाने इथे केवळ महिलांचा विचार केला आहे याचा अर्थ पुरुषांचे आचरण बिघडत नाही असे नाही. तेही बिगडू लागतात पण महिलांवर संपूर्ण कुटुंबाचा आधार आहे. प्रजेचे कल्याण अवलंबून आहे. जोवर स्त्रिया नैतिक दृष्ट्या सुरक्षित असतात तोवर सारा समाज सुरक्षित असतो. स्त्रियांचा प्रभाव कुटुंबावर सर्वाधिक असतो. हिंदुस्तानात आपल्या संस्कृतिला धर्मनिष्ठ, नीतीसंपन्न राखण्यात महिलांचा मुख्य वाटा आहे. यामुळे स्त्रियांमध्ये अनीतीचा प्रादुर्भाव होणार नाही, अधर्म पसरणार नाही याविषयी विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. तसा अर्जुन धर्मनिष्ठ पुरुष होताच. यामुळे मोह असला तरी त्याचे तर्क मूलगामी स्वरुपाचे आहेत.

2) **वार्ष्णेय स्त्रीषु दुष्टासु वर्णसंकर: जायते** हे वृष्णि कुलोत्पन्न श्रीकृष्णा, यातून वर्णसंकर उपजेल. यामुळे अटळपणे कुळाचा नाश उद्भवेल. कुळही बुडेल. प्राचीन काळी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा प्रकारे चार वर्ण होते. या चारी वर्णांची कर्मेही ठरली होती. याच्या मुळाशी समाजव्यवस्थेच्या सुसुत्रीकरणाचा हेतु होता. यात नंतर उच्च-निम्न अशी कल्पना शिरली. हे चारी वर्ण शुध्द स्थितीत रहावेत याविषयीचा आग्रह सुरु झाला होता. यामुळे बेटी व्यवहार होत नव्हते. यातून वर्ण संकर उद्भवला असता अशी ही चर्चा आहे. यामुळे अर्जुन युध्दाचा निषेध करतोय.

: 42 :

***संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।***
***पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रिया: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **(च ) संकर:** (आणि) वर्णसंकर
- **कुलघ्नानां च कुलस्य:** कुळाचा नाश करणारे आणि कुळ दोघांसाठी
- **नरकाय एव:** नरकाचे कारण बनून जाईल (म्हणजे नरकात ओढून नेईल)
- **हि एषां पितर:** कारण की यांचे पितर
- **लुप्त-पिंडोदक-क्रिया:** पिंडदान, तर्पण वगैरे म्हणजे पुढे श्राध्द वगैरे क्रिया लुप्त, झाल्यामुळे म्हणजे क्रिया करण्यासाठी कुणी शुध्द पुत्र न उरल्यामुळे
- **पतन्ति:** (नरकात) जातील, पडतील

**अर्थ**

वर्णसंकर हा कुळाचा नाश करणाऱ्याना आणि कुळाला नरकालाच नेतो कारण श्राध्द, जल तर्पण वगैरेना मुकलेले यांचे पितर अधोगतीला जातात.

***संकरें नरका जाय कुलघ्नांसह तें कुळ ।***
***पितरांचा अध:पात होतसे श्राध्द लोपुनी ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत

**स्पष्टीकरण**

**1) (च) संकरः कुलघ्नानां च कुलस्य नरकाय एव** आणि थोडक्यात काय तर वर्णसंकर हा कुळाचा नाश करणारा ठरेल. कुळ सारेच नरकात जाईल. या श्लोकात अर्जुन मागील श्लोकाच्या संदर्भातच आपले मत व्यक्त करत आहे. तिथे असे सांगितले होते की स्त्रियांच्या मध्ये जर अधर्म जागला म्हणजे अनीती पसरली तर वर्णसंकर होईल. आता इथे वर्णसंकर झाला तर काय काय होईल त्याविषयक चर्चा सुरु आहे. चांगली कर्मे करणाऱ्याना स्वर्ग आणि वाईट कर्मे करणाऱ्याना नरक हा ठरलेलाच आहे. स्वर्ग म्हणजे श्रेष्ठ गती. तिथे केवळ सुखच सुख आहे. भूलोकी सुख आणि दुःख दोघांचा अनुभव येतो पण स्वर्गात केवळ सुखाचाच अनुभव येतो. याउलट नरकातही केवळ दुःखाचाच अनुभव येतो. स्त्रियांमध्ये अनीती जागली तर संतान शुध्द उरत नाही. संपूर्ण कुळाचा विध्वंस होतो. असे घडले याला तर जबाबदार असणारे सारेच्या सारेच नरकात जातील. यासाठी युध्दात सहभागी सारेच दोषी मानले जातील. भावार्थ हा की युध्द टाळावे. युध्दाचा हा अती भयंकर परिणाम उभ्या जगाला सहन करावा लागेल. संपूर्ण समाजच जर अधोगतीला जाणार असेल तर मग कुणाचेही कल्याण व्हायची शक्यता नाही. हे तर अगदी स्पष्ट आहे.

**2) हि एषां पितरः लुप्त-पिंडोदक-क्रियाः पतन्ति** कारण की कुळाचा नाश करणाऱ्यांचे पितर नरकात जातील. इथे अर्जुनाने नरकात जायचे दुसरे कारण सांगितले आहे. पितरांचे श्राध्द करायला पुत्र नसतील. अधर्मरत स्त्रियांची संतती ही शुध्द नसेल. प्राचीन काळी ही कल्पना रुढ होऊन गेली होती की पितरांचे श्राध्द जर केले नाही तर त्यांना सुगती लाभणार नाही. श्राध्दविधी शास्त्रीय परंपरेनुसार केले जात होते.

विनोबांनी श्राध्दाचा अभिनव अर्थ सांगितला आहे. श्राध्द म्हणजे मृत व्यक्तीचे स्मरण होय. त्या प्रीत्यर्थ दान वगैरे काही सेवाकार्य करणे होय. मृत व्यक्तींच्या अपूर्ण कार्यांना गती देणे होय. आत्मतत्वासंबंधी महापुरुषांच्या वचनांचे पठण-श्रवण-मनन-चिंतन करणे होय. अर्जुनाचा तर्क प्राचीन काळी जी श्राध्दविषयक परंपरा होती त्यानुसार आहे. आज तर जमाना बदलला आहे. काळ बदलला आहे. काळानुरुप शब्दांचे अर्थही बदलतात. विनोबाजींनी लावलेला अर्थ हा कालसंमत आहे.

: 43 :

***दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः।***
***उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कुलघ्नानाम्:** कुळाचा घात करणाऱ्या पातकी लोकांचे
- **एतैः वर्णसंकर-कारकैः दोषैः** या वर्णांचा संकर करणाऱ्या दोषांनी
- **शाश्वताः जातिधर्माः च कुलधर्माः** नेहमीसाठी जाती धर्म आणि कुळाचे धर्म
- **उत्साद्यन्ते:** नष्ट होऊन जातात

**अर्थ**

या वर्णसंकर करणाऱ्या दोषांमुळे परंपरागत जातिधर्म आणि कुळधर्म उध्वस्त होतात.

***ह्या दोषांनीं कुलघ्नांच्या होउनी वर्ण-संकर।***
***जातीचे बुडती धर्म कुळाचे हि सनातन।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) कुलघ्नानां एतैः वर्णसंकर-कारकैः दोषैः कुलधर्माः उत्साद्यन्तेः** या प्रकारे अर्जुन म्हणतो "कुलधर्म आणि जातीधर्म नष्ट होतील. चारी वर्णात अनीती पसरेल. कुळाची शुध्दता उरणार नाही. सारे धर्म व्यवस्थापन गडबडून जाईल."

**2) शाश्वताः जातिधर्माः च (उत्साद्यन्ते):** यामुळे समाजव्यवस्था कायमसाठी दुभंगून जाईल. वर्णसंकराचा पहिला परिणाम तर हा सांगितला की कुळ धर्म नष्ट होऊन जातील. दुसरा परिणाम हा की चारी वर्णांचे जातीधर्म संपून जातील. समाजाची नीतीमत्ता ही व्यक्तिच्या नीतीमत्तेवर आधारित असते.

धर्माचे पालन सदैव स्त्रियांवर अवलंबून असते. आर्य संस्कृती स्त्रियांमुळेच टिकुन आहे. यामुळे त्यांच्या ठायी नीती आणि धर्माची पराकाष्ठा असणे खूप गरजेचे आहे.

गांधीजी आणि विनोबाजींनी नारी शक्तीच्या विकासाला खूप महत्व दिले. त्यांनी आत्मशक्ती वाढवून त्यातून असाधारण अशा वैराग्य संपन्न विभूती उत्पन्न व्हायला हव्यात.

:44:

*उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।*
*नरकेऽनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दन:** हे जनार्दना
- **उत्सन्न-कुलधर्माणां मनुष्याणाम्:** ज्यांचे कुळधर्म नष्ट झाले आहेत अशा मनुष्यांना
- **नरके नियतं वास: भवति:** अनंत काळापर्यंत निश्चितच नरकवास होतो.
- **इति अनुशुश्रुम:** असे आम्ही (शास्त्रांमधून) ऐकले आहे

**अर्थ**

हे जनार्दना, ज्यांचे कुळधर्म नाहीसे झाले आहेत अशा माणसाना अनिश्चित काळापर्यंत नरकात पडावे लागते असे आम्ही ऐकत आलो आहोत.

*ज्यांनीं बुडविले धर्म कुळाचे त्यांस निश्चित ।*
*नरकीं रहाणें लागे आलो ऐकत हें असें ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **जनार्दन उत्सन्न-कुलधर्माणां मनुष्याणां नरके नियतं वास: भवति** हे कृष्णा, ज्यांचे कुळधर्म नष्ट झाले आहेत अशा लोकाना निश्चितपणे नरकवास घडतोच.

त्याना नरकवास अटळपणे घडेल. हे मी शास्त्रकारांकडून ऐकले आहे. शास्त्रकारांनी स्वर्ग आणि नरक अशी कल्पना केली आहे. समाज धर्म परायण रहावा, सारे नीतीनिष्ठ रहावेत, धर्मनिष्ठ रहावेत ही काळजी आहे. यातूनच समाजात सुख शांती नांदेल. भौतिक साधने कितीही वाढवून घ्या. त्यातुन काही अंशी सुख समाधान लाभेल पण जर मानसिक शांतता लाभली नाही तर मग भौतिक साधनांनी उत्पन्न केलेले सुख टिकणार नाही. धनिकांपाशी भौतिक सुख साधनांची रेलचेल असते. तरीही ते सुखी आढळून येत नाहीत. याउलट भौतिक साधने नसतानाही किंवा मर्यादित असतानाही धर्माचरणातून आणि नीतीने जगण्यातून लाभणारे सुख स्थायी असू शकते.

2) **इति अनुशुश्रुम:** असे आम्ही ऐकले आहे. शास्त्रातुन ऐकले आहे. अर्जुन आपल्या तर्काला शास्त्राचा आधार देतो. प्राचीन काळी शास्त्राचे प्राबल्य होते. समाज जीवन पापभीरु आणि शास्त्रभीरु होते. आजकाल शास्त्राची पर्वा न करण्याचा विचार सुशिक्षित समाजात मूळ धरु लागला आहे. शास्त्र प्रमाण मानायला हवे असा त्याचा तर्क आहे. हे सारे गीतेच्या सोळाव्या अध्यायातील चोविसाव्या श्लोकात येते. शास्त्र मानायला हवे असे साक्षात् भगवंत सांगताहेत. तसे तर शास्रात सांगितलेले मूलभूत सिध्दांत हे त्रिकालाबाधित असतात. उदाहरणार्थ सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, अस्तेय हे सिध्दांत त्रिकालाबाधित आहेत. देशकालानुसार याचे स्वरुप भले बदलेल पण या सिध्दांतांचे मूळ स्वरुप मात्र अबाधित रहाते. त्यांच्या अर्थाचा विस्तार होत राहील. आचार धर्मात युगानुकूल परिवर्तने होतील. यामुळे त्या सिध्दांतांची शुध्दता अक्षुण्ण राहील. शास्त्रांची रचना अनुभवसंपन्न पुरुषांनी केलेली असते. यामुळे त्या आधारे वर्तावे. त्यांना प्रमाण मानून चालावे. जीवनातल्या कोड्यांची उकल करताना, प्रश्न सोडवताना त्याचे निराकरण शास्त्राच्या आधारे करत जाणे फारच गरजेचे असते.

: 45 :

*अहो बत महत् पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।*
*यद् राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहो बत:** अरे, आम्हाला खेद वाटतो की
- **वयं यत् राज्यसुखलोभेन:** आपण (ज्ञाते असूनही) जे राज्यसुखाच्या लोभाने
- **स्वजनं हन्तुं उद्यता:** आपल्या बंधु बांधवांना मारण्यासाठी उद्युक्त: झालो आहोत

- **(तत् एतत्) महत् पापं कर्तुं व्यवसिता:** आपण जे करायला तयार झालो आहोत ते मोठे पातक आहे.

**अर्थ**

अरेरे, किती खेदाची गोष्ट आहे आम्ही बुध्दिमान असून राज्य आणि सुख यांच्या लोभाने कुटुंबियाना ठार मारायला तयार झालो हे केवढे मोठे पाप करायला उद्युक्त झालो बरे.

*अरेरे केवढें पाप आम्हीं आरंभिलें असें।*
*लोभें राज्य-सुखासाठीं मारावें स्व-जनांस जें ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) **अहो बत, वयं यत् राज्यसुखलोभेन स्वजनं हन्तुं उद्यता:** अर्जुन म्हणतो "राज्यसुखाच्या लोभाने आपण पापाचरणाला तयार झालोत का? आपण सख्ख्या भावंडांशी झुंजायला तयार झालोत? प्रिय जनांचा संहार करायला सिध्द झालो आहोत. हे आश्चर्य आहे! ऐहिक सुखासाठी हे सारे? वैभव तर सर्वांनाच हवे आणि ते मिळावे म्हणून प्रयत्नही सारेच करतात. गरीब लोक लाचारीने गरीबीत रहातात. गरीबी दूर होणे गरजेचे आहे पण एवढ्याने गरीबाना संपूर्ण समाधान लाभेल असे काही सांगता येत नाही. गरीबी टळावी आणि वैभवाची प्राप्ती व्हावी असे घडले तर गरीबानाही खूप आनंद होईल. ज्या दिवशी वैभव आणि सुख संपदा लाभेल तो दिवस सुखाचा समजावा. धन्यतेचा समजावा. अर्जुन म्हणतो की आपणही प्राणीमात्राच्या या सर्वसामान्य इच्छेला वश होऊन सुख मिळावे म्हणून, ऐहिक सुखे अधिकात अधिक लाभावीत म्हणून राज्य प्राप्त करण्याच्या इच्छेला वश होऊन त्यातून सुख लाभावे म्हणून न करण्यायोग्य (अकरणीय) कामे करायला प्रवृत्त झालो आहोत. आमची बुध्दी भ्रष्ट झाली आहे. हे महापाप आहे. कौरवांना राजी करुन जर आपण सिंहासनावर बसलो तर समजून घेण्यासारखी गोष्ट आहे पण कौरवांचा आणि अगणित मित्रांचा संहार करुन राज्याच्या इच्छेचा लोभ बाळगणे कुठवर योग्य आहे बरे ?

2) **(तत् एतत्) महत् पापं कर्तुं व्यवसिता:** हे सारे पाप करायला आपण तयार झालोत.

अर्जुनाने इथे महत् पापं शब्दाचा प्रयोग केला आहे. राज्य सुखाच्या प्राप्तीच्या लोभासाठी स्वजन आणि मित्रांचा संहार करायला उद्युक्त होणे हे सामान्य नसून महापाप आहे. महापाप केल्यावर आम्ही तर कायमचेच नरकात राहू. आम्ही मूर्ख नाहीहोत. हे युध्द टाळायला हवे. युध्दामुळे पुण्यफळे नाही मिळायचीत.

विनोबांनी या श्लोकावर भाष्य करताना म्हटले आहे की अर्जुनाच्या मनात स्वजनांप्रती मोह जागला. स्वधर्म निष्ठा लोपली. स्वधर्मनिष्ठा मोह घालवू शकते. स्वकर्तव्यनिष्ठा मोह दूर सारु शकते. दुसरे असे की सुखासाठी ते राज्यपद प्राप्त करायला निघाले आहेत हे मानणे चुकीचे आहे. याचा अर्थ असा की त्याने कर्मयोगाला योग्यप्रकारे जाणून घेतलेले नाही. कर्मयोगात सुखाच्या प्राप्तीसाठी कर्मे करायची नसतात. कर्मयोगात सुख लाभणार नाही असे नाही पण सुखाची प्राप्ती हा काही कर्मयोगाचा हेतु नाही. कर्मयोगात फळनिरपेक्ष होऊन कर्तव्य बुध्दीने स्वधर्म पालनाचा प्रयत्न करायचा असतो. आणखी एक मुद्दा असा की 'मी मारणारा आहे' असे जे अर्जुनाला वाटते ते चुकीचे आहे. अर्जुन स्वत:ला कर्ता समजतो. ही भ्रांती आहे. हे आत्म्याविषयक अज्ञानाचे द्योतक आहे. या उणिवा दूर करण्यासाठी भगवंतांनी दुसऱ्या अध्यायात 11 ते 30 श्लोकांपर्यंत सांख्य बुध्दी, 31 ते 38 श्लोकांपर्यंत स्वधर्म निष्ठा आणि 39 ते 53 श्लोकांपर्यंत योग बुध्दीची चर्चा केली आहे.

: 46 :

*यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणय: ।*
*धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदि:** जर
- **अप्रतीकारं अशस्त्रम्:** कौरवांचा प्रतिकार न करणाऱ्या आणि (हाती) शस्त्र न घेणाऱ्या
- **माम्:** मला
- **शस्त्रपाणय: धार्तराष्ट्रा:** ज्यांच्या हाती शस्त्र आहेत असे धृतराष्ट्राचे पुत्र वगैरे
- **रणे हन्यु:** युध्दात मारतील (तर)
- **तत् मे क्षेमतरं भवेत्:** ते माझ्यासाठी अधिक कल्याणकारी (सिध्द होईल)

**अर्थ**

शस्त्ररहित व प्रतिकार न करणाऱ्या मला हातात शस्त्र घेतलेल्या धृतराष्ट्रपुत्रांनी जरी ठार मारले तरी ते मला अधिक कल्याणकारक ठरेल.

***त्याहूनि शस्त्र सोडूनि उगा राहीन तें बरें।***
***मारोत मग हे युध्दीं शस्त्रांनी मज कौरव॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

**1) यदि अप्रतीकारं अशस्त्रं माम्:** अर्जुन म्हणतो 'मी प्रतिवाद करणार नाही. हाती शस्त्र धारण करणार नाही. धारण केलेले शस्त्र त्यजून देईन.' या गांधी युगात अर्जुनाची ही भाषा अहिंसक प्रतिकाराची प्रतीक वाटते खरी पण हा अहिंसक प्रतिकार नाही. गांधीजींच्या सत्याग्रहात सत्याचा आग्रह आणि अन्याय करणाऱ्याचा प्रतिकार करायचा विचार आहे. त्यात भिलेपणा नाही. वीर वृत्ती आहे. तो अहिंसक अप्रतिकार आहे. सत्याग्रहात वीर वृत्ती येते. भीरुता नव्हे. दुसऱ्याला न मारता स्व बलिदानाची सिध्दता. स्वत: कष्ट झेलून वा मरुन शुभ वृत्ती जागवण्याचा संकल्प म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे सत्य विचार जागृत करण्याचा संकल्प होय. कौरवांच्या हाती शस्त्रास्त्र आहेत. त्यांनी मला मारावे ते अधिक कल्याणकारी ठरेल ही अर्जुनाची भाषा मोहवाणी आहे.

युध्द केल्याने आपण ज्यांच्याशी युध्द करु त्यांच्या बुध्दीत आपण काही परिवर्तन आणू इच्छित नाहीहोत. आपण काही शुभ वृत्ती, शुभ विचार, सत्य विचार जागृत करु इच्छित नाहीहोत. यामुळे स्वजन वा परजन वा कुणीही असो शस्त्रांनी मारणे हे कल्याणकारी नाही. त्यातून समाजाची उन्नती होणार नाही. यामुळे कौरवांचा दुष्ट वृत्तींचा प्रतिकार, अशुभ वृत्तींचा प्रतीकार आपण अहिंसेने म्हणजे रित्या हातून, हाती शस्त्र न घेता पण स्वत: बलिदान करुन  करु ही भाषा अर्जुनाची  नाही. अर्जुनाची भाषा स्वजनासक्तीची भाषा आहे.

**2) शस्त्र-पाणय: धार्तराष्ट्रा: रणे हन्यु: तत् मे क्षेमतरं भवेत्** ज्यांच्या हाती शस्त्रे आहेत ते धृतराष्ट्राचे पुत्र मला मारतील तर ते मजसाठी अधिक कल्याणकारी सिध्द होईल. मी त्याना मारणार नाही पण ते मला मारतील तर मला चालेल असे अर्जुन बोलत आहे. असे सांगायचा हेतु हा आहे की नातलग हयात असले तर कल्याण होईल. कुठल्या ना कुठल्या प्रकारे पण आपले नातलग हयात रहावे हा मोह अर्जुनाच्या मनी आहे. दुर्योधन वगैरे अन्याय करताहेत त्यांची वृत्ती शुभ नाही. कौरवांच्या ठायी दुष्ट वृत्तीचा विकास झाला आहे. त्या वृत्तीने प्रेरित होऊनच ते युध्दाला सिध्द झाले आहेत. यामुळे समाजाचे अहित करणारी कौरवांची दुष्ट वृत्ती कशी घालवली जाईल याविषयीचे चिंतन काही अर्जुनाच्या मनात आहे असे नाही. कौरवांना न मारणे वा अर्जुनाचे स्वत: भीतीपोटी मरुन जाणे हा संकल्पहीन त्याग आहे, यात दुष्ट वृत्ती वा असत् वृत्ती क्षीण होण्याची शक्यता नाही. त्यागाचा अर्थच मुळी समाजातून असत् वृत्ती, अशुभ वृत्ती, दुष्ट वृत्तीचा नायनाट करायचा दृढ संकल्प होय. जर असा दृढ संकल्प वा शुभ संकल्प नसेल तर मग आपल्या मरायला सिध्द असण्यातून कुठलाही शुभ परिणाम प्रकट होणे शक्य नाही. यामुळे अर्जुनाची ही भाषा मोहवाणीच आहे.

: 47 :

**संजय उवाच**

***एवमुक्त्वाऽर्जुन: संख्ये रथोपस्थ उपाविशत्।***
***विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानस:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन:** अर्जुन
- **एवं उक्त्वा:** असे म्हणून
- **संख्ये:** युध्दात, रणभूमीवर
- **सशरं चापं विसृज्य:** बाणासोबत धनुष्याचा त्याग करुन
- **शोकसंविग्नमानस:** शोकाकुल अति व्याकुळ मनाच्या अवस्थेत
- **रथोपस्थे:** रथाच्या मध्यभागी, मागील भागात जाऊन
- **उपाविशत्:** बसून गेला

**अर्थ**

संजय म्हणाला, रणांगणावर दु:खाने उद्विग्न मन झालेला अर्जुन एवढे बोलून बाणासह धनुष्य टाकून रथाच्या मागील भागात जाऊन बसला.

**संजय म्हणाला,**

*असें रणांत बोलूनि शोकावेगांत अर्जुन।*
*धनुष्य-बाण टाकूनि रथीं बैसूनि राहिला॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन: एवं उक्त्वा संख्ये सशरं चापं विसृज्य** अशा प्रकारे बोलून अर्जुन बाणासकट धनुष्याचा त्याग करुन संजय धृतराष्ट्राला ही सारी युध्दकथा ऐकवत आहे. अर्जुनाने युध्द न करण्यासाठी जेवढे तर्क प्रस्तुत करणे आवश्यक होते तेवढे करुन अखेर धनुष्य बाणाचा त्याग केला. तो मोहग्रस्त होता. त्याला काही सुचत नव्हते. तो किंकर्तव्यमूढ होता. आपल्या कर्तव्याचा नेमका निर्णय त्याला करता येत नव्हता. आपल्या सर्व नातलगांचा युध्दात संहार होईल हा विचार मनी येताच तो इतका अस्वस्थ झाला की युध्द करणे त्याच्यासाठी अशक्य होऊन गेले पण वेळ तर युध्दाची येऊन ठेपली होती. संपूर्ण सैन्य दळ 'मारु किंवा मरु' या निश्चयाने एकत्रित आले होते. अशा समयी तो एकदम युध्द न करण्याचाही निर्णय कसा घेऊ शकत होता? आणि समजा युध्द जर झालेच तर सर्वसंहारामुळे त्याला काही कल्याणकारकही दिसत नव्हते. अशा प्रकारे त्याचे मन दुविधेत पडले होते. अशा समयी त्याने धनुष्य बाण हाती धरु म्हटले असते तरी त्याचे शरीर इतके शिथिल पडले होते की धनुष्य बाण त्याच्या हातून गळून पडले असते.

2) **शोकसंविग्न मानस: रथोपस्थे उपाविशत्:** शोकामुळे त्याचे चित्त अस्वस्थ होते. अशा अवस्थेत तो रथाच्या मधल्या भागात (मागील भागात) जाऊन बसला.

आपले सारे तर्क संपवून मग अर्जुनाने हातचे धनुष्यबाण सोडून दिले आणि रथात जाऊन बसला. तो इतका अस्वस्थ झाला होता की गुपचूप बसून रहाण्याशिवाय त्याच्यापाशी दुसरा कुठलाही उपायच नव्हता. जीवनाच्या भल्या-बुऱ्या, लहान-मोठ्या घटना केवळ स्वस्थ अशा मन:स्थितीतच घडू शकतात. त्याचे चित्त स्वस्थ नव्हते. यामुळे असत् क्रिया घडत नाही पण सत् क्रियाही घडत नाही किंवा काहीही घडत नाही हे ध्यानी घ्यायला हवे. अर्जुन निष्क्रिय होऊन रथाच्या मध्यभागी जाऊन बसला. अर्जुनासमोर भगवंत बसले होते यामुळे तो वेड्याच्या भूमिकेत गेला नाही. तो क्रियाहीन झाला. निष्क्रिय झाला. त्याचे मन शोकाने व्याकूळ आहे. झुंजण्याऐवजी शस्त्रसंन्यास घेऊन तो बसून गेला आहे. असे संजयाने धृतराष्ट्राला सांगितले.

• • • *पहिला अध्याय संपूर्ण* • • •



## दुसरा अध्याय

# सांख्ययोग

(अर्जुनाच्या मनात स्वजनांबाबत आसक्ती जागली. मोह निर्माण झाला. शोक जागला. याचा त्याच्या चित्तावर दाट परिणाम झाला. चित्त कमालीचे व्याकुळ झाले. याचे वर्णन पहिल्या अध्यायात आले आहे. याचा प्रभाव त्याच्या चित्तावर कसकसा झाला आणि त्याची स्थिती कशी दयनीय बनली हे वर्णन या अध्यायाच्या पहिल्या दहा श्लोकांमधून आले आहे. अर्जुनाची स्थिती मोठी दयनीय झाली आहे.)

: 1 :

**संजय उवाच**

***तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।***
***विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तथा:** पहिल्या अध्यायानुसार
- **कृपया:** कृपेने, करुणेने म्हणजे खोट्या दयेने
- **आविष्टम्:** युक्त
- **अश्रुपूर्णाकुलेक्षणम्:** आणि ज्याचे डोळे अश्रुंनी भरले असल्यामुळे डोळ्यात करुणा दाटलेली दिसते आहे म्हणजे व्याकुळ डोळे आहेत असा
- **विषीदन्तम्:** आणि यामुळे मनात जो काही दु:खाचा अनुभव करत आहे त्या विषादयुक्त (अर्जुनाला)
- **तम्:** त्या अर्जुनाला
- **मधुसूदन:** कृष्ण भगवान
- **इदम्:** हे, असे
- **वाक्यम्:** वचन
- **उवाच:** बोलले

**अर्थ**

संजय म्हणाला अशा प्रकारे करुणेने व्याप्त ज्याचे डोळे आसवानी भरलेले व व्याकुळ दिसत आहेत अशा शोक करणाऱ्या अर्जुनाला भगवान मधुसूदन असे म्हणाले

**संजय म्हणाला,**

***असा तो करुणा-ग्रस्त घाबरा अश्रु गाळित ।***
***करीत असतां खेद त्यास हें कृष्ण बोलिला ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) स्वजनासक्ती जागल्यामुळे अर्जुनाच्या चित्तात करुणा उपजली. करुणा म्हणजे खोटी दया होय. तुलसीदासांनी **दयेला धर्माचे मूळ** मानले आहे. ही खरी दया आहे. खरी करुणा आहे. अर्जुनाच्या चित्तात जी दया उपजली आहे ती मात्र खोटी दया आहे, खरी नव्हे! खऱ्या दयाभावनेने चित्त व्याकुळ कसे होईल? अशांत का होईल? दु:खी कसे बनेल? चित्ताची प्रसन्नता आणि शांतता तर कायम राहील ना? खरी दया तर विवेक जागवील. अलिप्त भाव विकसित करील. निष्काम भावनेला वाढीस लावेल. निर्विकारता निर्माण करील. खोटी दया हे सारे नाही करणार. ती तर अविवेक, आसक्ती, सकामता आणि काम-क्रोध वगैरे विकाराना उत्पन्न करील. चित्ताला व्याकुळ करील.

2) अर्जुनाचे डोळे अश्रुंनी भरलेत. दोन कारणांमुळे डोळयात अश्रु येतात. दोघांचे परिणाम भिन्न-भिन्न असतात. ईश्वराच्या स्मरणाने डोळे भरुन येतात. संत वचन आणि गुण आठवून डोळे ओले होतात. हे आनंदाचे अश्रु असतात. यामुळे चित्ताला आनंदलाभ होतो. असे अश्रु सतत येत रहावेत असे वाटते पण ममतेमुळे अश्रु येतात.

मुले-पत्नी यांच्या वियोगामुळे अश्रु येतात. आसक्तीमुळे अश्रु येतात. हे दु:खाचे अश्रु असतात. यामुळे चित्त व्याकुळ बनते. अर्जुनाचे अश्रुही मोहामुळे आहेत. युध्दात नातलगांचा संहार होईल मग त्यांचा वियोग झेलावा लागेल यासाठी अर्जुन व्याकुळ झाला आहे.

3) अर्जुनाचे चित्त व्याकूळ झाले आहे. यामुळे खूप विषाद आहे. अर्जुन आपल्या कर्तव्याचा त्याग करायला तयार झाला. अतिदु:खामुळे चित्त विचलित होते. योग्य काय आणि अयोग्य काय याचा निर्णय घेता येत नाही. कार्य काय आणि अकार्य काय याचा बोध मनाला रहात नाही. धर्म काय आणि अधर्म काय याचे भान उरत नाही. नीती काय आणि अनिती काय हे पारखता येत नाही. अर्जुन वीर होता. मोहामुळे तो हतवीर्य बनला.

: 2 :

**श्री भगवान उवाच**

*कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।*
*अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन:** हे अर्जुना
- **इदं कश्मलम्:** हे पापाचे, मलिनतेचे, अज्ञानाचे विचार
- **अनार्यजुष्टम्:** याला श्रेष्ठ पुरुषांनी कदापि स्वीकारलेले नाही
- **अस्वर्ग्यम्:** हे काही स्वर्गाचा लाभ करवुन देणारे नाही
- **अकीर्तिकरम्:** अपकीर्ती करवणारे आहे
- **त्वा:** हे तुम्हाला (तुमच्या मनात)
- **विषमे:** या विषम प्रसंगात, कठिण प्रसंगात
- **कुत:** कसे काय? कुठून?
- **समुपस्थितम्:** उपस्थित झाले

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे अर्जुना, या भलत्याच वेळी हा मोह तुला कशामुळे उत्पन्न झाला ? कारण हा थोरांनी न आचरलेला, स्वर्ग मिळवून न देणारा आणि कीर्तीकारकही नाही.

**श्री भगवान म्हणाले**

*कोठूनि भलत्या वेळीं सुचलें पाप हें तुज ।*
*असें रुचे न थोरांस ह्यानें दुष्कीर्ति दुर्गति ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) अर्जुनाच्या मनात मोहामुळे जी खोटी करुणा वा दया उत्पन्न झाली होती यामुळे त्याचे डोळे डबडबून आले होते. चित्तातल्या व्याकुळ अवस्थेला कृष्ण स्वीकारत नाही. अश्रुभरल्या डोळयांना बघून प्रसन्न होत नाही. उलट या अवस्थेला पापरुप मानतो. ही मनाची मलिनता असल्याचे सांगतो. याला पाप का म्हटले असावे? स्वजनासक्तीमुळे म्हटले आहे. यामुळे माणूस अवनत होतो. शांतता नष्ट होते. पापकार्य सदा अवनत बनवते. पापामुळे स्वर्गलाभ नाही. पाप्याची गती शुभ होत नाही. पुण्य कार्यामुळे उन्नत जीवन लाभते.

2) हे पाप माणसाला कर्तव्यविमुख करते. पाप कर्मामुळे स्वर्ग प्राप्ती वा शुभ गती मिळत नाही. नवा जन्म देखिल उच्च कुळात लाभत नाही. निकृष्ट कुळात जन्म मिळतो.

3) स्वजनांविषयी आसक्ती हे पातक आहे. हे माणसाला कर्तव्यापासून दूर करते. प्राप्त प्रतिष्ठेला खंडित करते. स्वजनांबाबतची कर्तव्ये तर अवश्य पार पाडावीत. जो स्वधर्म आहे तो तर चांगल्या प्रकारे आचरला पाहिजे. त्यातून उन्नती होईल पण त्या कर्मात सुध्दा आसक्ती जागायला नको. तो अवनतीचा मार्ग आहे. असत्य आचरण करायला नको. त्याचा विरोध करायला हवा. अर्जुन आयुष्यभर अन्यायाच्या विरोधात झुंजला. स्वजनांसाठी मात्र कर्तव्य विसरला. अर्जुनाची समाजात मोठी प्रतिष्ठा होती. ती यामुळे कमी होणे स्वाभाविक होते. अपकीर्ती जागणे शक्य होते. ही मलीनता आहे. वर्षभर उत्तम अभ्यास केलेला विद्यार्थी अनुत्तीर्ण होऊन जातो तर त्याची अपकीर्ती होते. वेळेवर माणसाचा कस लागतो. यामुळे भगवान अर्जुनाला सांगताहेत की स्वकर्तव्यापासून हटलास तर तुझी आजवरची प्रतिष्ठा मलीन होईल. इथे अर्जुनाला भगवान टोमणा मारताहेत. श्रेष्ठ जनांनी याचा

स्वीकार केला नाही. हा विचार अर्जुनाच्या मनी जागलाच कसा? असे कृष्ण विचारत आहे.

धर्मपालनासाठी स्वजनांच्या प्रतिकाराच्या प्रसंगाला विषम प्रसंगच म्हणावे लागेल. कुटुंबसंस्थेचे हे वैशिष्ट्य आहे की तिथे प्रेमसंबंध कायम रहातात. सार्वजनिक संस्था दुभंगून जातात. कुटुंबसंस्था मात्र अभंग आहे. इथे कधी गंभीर स्वरुपाचे मतभेद होतात. एक दुसऱ्याला विरोध करावा लागतो. स्नेहसंबंध कायमचे दुरावतात. हा विषम प्रसंग बनतो पण अशाच प्रसंगी कसोटी लागते. धर्मपालन कळते. सत्य पालन ध्यानी येते. अशा प्रसंगी कर्तव्याची कास सोडता येत नाही. असा मलीन विचार करता येत नाही. सार्वजनिक संस्था फार फार तर पंचवीस तीस वर्षे चालतात. हळूहळू मतभेद जागतात पुढे ते वाढत जातात. अहंकार वाढू लागतो आणि बघता बघता संस्था मोडकळीस येऊन भंगून जातात. संस्था अल्पजीवी ठरतात. कुटुंब संस्था मात्र अगदी अनादी काळापासून चालत आलेली आहे आणि पुढेही अशीच चालत राहील. अशा कुटुंबसंस्थेत जेव्हा गंभीरपणे काही मतभेद जागतात. प्रतिकाराची वेळ येऊन ठेपते. स्नेहसंबंध कायमसाठी तोडून टाकायचे निर्णय होतात. त्यावेळी विषम प्रसंग येऊन उभा रहातो पण अशा प्रसंगीच कस लागतो. धर्मपालनाचा कस लागतो. सत्यपालनाचा कस लागतो. यामुळे अशा प्रसंगाला विषम प्रसंग असे सांगून भगवान अर्जुनाला सांगताहेत की कर्तव्य पालनाची ही महत्वाची घडी समोर येऊन उभी ठाकली आहे अशा प्रसंगी कर्तव्य पालन न करण्याचे कर्तव्य सोडून देण्याचे विचार तुझ्या मनी कसे काय जागले आहेत? श्रेष्ठ लोकांनी तर ही जीवन रीत स्वीकारलेली नाही. पुढचा श्लोकही याच संदर्भात आहे. यासाठी अर्जुनाला टोमणा मारत भगवान सांगताहेत.

: 3 :

***क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।***
***क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **पार्थः** हे अर्जुना
- **क्लैब्यंः** क्लीबतेला, दुबळेपणाला
- **मा स्म गमः** प्राप्त होऊ नकोस
- **एतत्ः** ही मानसिक दुर्बलता, दुबळेपणा
- **त्वयिः** तुमच्यासाठी
- **न उपपद्यतेः** योग्य नाही, उचित नाही
- **परंतपः** दुसऱ्यांना तापदायक ठरणाऱ्या, अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या हे अर्जुना
- **क्षुद्रंः** तुच्छ, निरर्थक
- **हृदय-दौर्बल्यंः** मनाच्या दुर्बळतेचा
- **त्यक्त्वाः** त्याग करुन
- **उत्तिष्ठः** उठून उभा रहा, सज्ज हो

### अर्थ

म्हणून हे पार्था, निर्वीर्यपणा पत्करु नकोस. हे तुला शोभत नाही. हे परंतपा, अंत:करणाचा तुच्छ दुबळेपणा सोडून देऊन युध्दाला उभा रहा.

***निर्वीर्य तूं नको होऊं न शोभे हें मुळीं तुज ।***
***भिकार दुबळी वृत्ति सोडुनी ऊठ तूं कसा ।***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत

### स्पष्टीकरण

1) देहाधीन माणूस भित्रा बनतो. अर्जुन शूर वीर होता. क्षत्रिय होता. तो काही भित्रा नव्हता. त्याने आयुष्यभर क्षत्रिय धर्माचे पालन केले होते. तो अन्यायाच्या विरोधात झुंजत राहिला होता. या प्रसंगी मात्र त्याच्या मनी ममता जागली. अर्जुन मूर्च्छित झाला. दीन बनला. भीरु बनला. आत्मतत्वाचे भान त्याला उरले नाही. कृष्ण त्याची समजूत घालताहेत. अर्जुना देहाची मूर्च्छा सोड. भीरुतेचा त्याग कर.

2) 'अर्जुना तुला भित्रेपणा शोभून दिसत नाही कारण तो तुझ्या स्वभावात नाही.' असे कृष्ण समजावतो. खरे तर वीरता त्याचा स्वभाव होता पण पाण्यावर ज्या प्रमाणे लाटा उसळतात त्याप्रमाणे त्याच्या आत्म्यावर ममतेच्या लाटा उसळत होत्या. या अज्ञानामुळे उठणाऱ्या लाटा होत्या. त्या प्रचंड सामर्थ्यशाली होत्या. पट्टीचा पोहणारा देखिल यात बुडू शकतो. अर्जुन खरा वीर. या ममता सागरात तो गटांगळ्या खाऊ लागला. दीन बनला.

3) मनाचा दुबळेपणा झटकून द्यायला हवा. देह काही आत्मस्वरुप नाही. मन आत्मस्वरुप नाही. हे अधोगतीचे

विषय आहेत. यातून अवनती होईल. मनाने आत्मस्वरुपी रमावे. ईश्वररंगी रंगून जावे. यातून बळ वाढेल. देहाच्या अधीन होऊ नये. देहासक्ती जागू देऊ नये. अर्जुनाचे मनोबळ खूपच क्षीण होऊन गेले होते. यामुळे भगवंत त्याला मार्ग दाखवताहेत. अर्जुनाला मनाची दुर्बळता सोडायला सांगताहेत.

4) कुठल्याही परिस्थितीत स्वधर्माचा त्याग करता कामा नये. कर्तव्य कर्माला तयार हो. अर्जुन आपले कर्तव्य सोडून द्यायला तयार होऊन गेला होता. अन्यायाच्या प्रतिकाराचा स्वधर्म तर त्याने यापूर्वीच ठरवलेला होता. मग धर्म समजून जे काही कर्तव्य आपण ठरवतो ते मोहामुळे कसे काय सोडून देतो ? यामुळे भगवान अर्जुनाला स्वकर्तव्याचे भान करवून देताहेत.

: 4 :

**अर्जुन उवाच**

***कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन।***
***इषुभि: प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं:** मी
- **संख्ये:** रणभूमीत
- **भीष्मं:** भीष्म पितामह
- **च:** आणि
- **द्रोणं:** द्रोणाचार्य गुरु
- **इषुभि:** या दोघांशी, बाणांनी
- **कथं:** कशा प्रकारे, कसा काय
- **प्रतियोत्स्यामि:** लढू, कारण की
- **तौ:** हे दोघे
- **अरिसूदन:** शत्रुचा नाश करणाऱ्या हे श्री कृष्णा
- **पूजार्हौ:** पूजनीय आहेत

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे मधुसूदना, युध्दात मी भीष्म पितामहांच्या आणि द्रोणाचार्यांच्या विरोधात बाणांनी कसा लढू? कारण हे अरिसूदना, ते दोघेही पूज्य आहेत.

**अर्जुन म्हणाला**

***कसा रणांगणी झुंजूं भीष्म-द्रोणांविरुध्द मी।***
***ह्यांस बाण कसे मारुं आम्हां हे पूजनीय कीं॥***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी सांगितलेल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) सारे ऐकून घेत भगवतांपुढे अर्जुन आपली अडचण सांगत आहे. भीष्म-द्रोण हे पूज्य महात्मे आहेत. यांच्यासमोर कसा लढू? पहिल्या अध्यायातही हा पेच अर्जुनाने भगवंतापुढे मांडला होता. त्याचे सारे तर्क नातलगांना डोळ्यापुढे ठेऊनच होते. इथे अर्जुन मुख्यत: भीष्म आणि द्रोणाचार्यांचा विचार मांडत आहे.

2) भीष्म पितामह अत्यंत पूजनीय होते. द्रोणाचार्य तर प्रत्यक्ष धनुर्विद्येचे गुरुच होते. यामुळे ते पूजनीय होते. आता त्यांच्या विरोधातच लढायचा प्रसंग येऊन ठेपला. या अध्यायाच्या 18 व्या श्लोकात युध्दाच्या खऱ्या अर्थाचे स्पष्टीकरण आले आहे. युध्दाचे खरे प्रयोजन तर अन्यायाचा प्रतिकार करणेच आहे. त्या काळी अन्यायाचा प्रतिकार शस्त्रबळानेच होऊ शकायचा. अन्यायाचा प्रतिकार शस्त्रबळाशिवायही होऊ शकतो हे आजच्या काळात गांधीजींनी दाखवून दिले आहे. सत्याच्या पालनासाठी प्रह्लादाने पित्याचा विरोध केला. वडिलांनी दिलेल्या साऱ्या यातना साहिल्यात. हा अहिंसक प्रतिकार होता. हिंसक प्रतिकार दोन्ही पक्ष शस्त्रबळाने झुंजतात. दोन्ही मार खातात. मार खाता-खाता एक पक्ष विजयी होतो. अहिंसक प्रतिकारी सहन करतो. त्याची देहबुध्दी क्षीण होते. आत्मबुध्दी प्रकट होते. अर्जुनाच्या काळात अहिंसक प्रतिकार नव्हता. यामुळे शस्त्र युध्दाचे वर्णन येते. युध्दाचा खरा हेतु तर अन्यायाचा प्रतिकार करणे हाच आहे. कौरव अन्याय करत होते. पांडवांनी किमान मागितले पण कौरवांनी ती मागणी देखिल धुडकावून लावली. या अन्यायाचा प्रतिकार करणे हा पांडवांचा धर्म ठरला. भीष्म, द्रोण सर्वांना पूजनीय होते. ते दुर्याधनाच्या पक्षात होते. असत्य पक्ष असतानाही ऐन वेळी कौरवांचा पक्ष सोडणे त्याना अधर्मकारक वाटत होते. अर्जुनासमोर ही एक बिकट समस्या होती. यामुळे तो असे म्हणत होता की हे भीष्म आणि द्रोणाचार्य मला पूजनीय आहेत मी यांच्याविरोधात कसा काय झुंजू?

: 5 :

*गुरुनहत्वा हि महानुभावान्।*
*श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके॥*
*हत्वाऽर्थकामांस्तु गुरुनिहैव*
*भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** कारण की
- **इह लोके:** या लोकात
- **महानुभावान्:** प्रभावशाली महात्मा, परमपूजनीय
- **गुरुन्:** गुरुजनांना
- **अहत्वा:** न मारुन
- **भैक्ष्यं:** भीक मागून
- **अपि:** सुध्दा
- **भोक्तुं:** खाणे, जगणे
- **श्रेय:** अधिक श्रेयस्कर आहे
- **तु:** पण, परंतु
- **गुरुन्:** गुरुजनांना, पूजनीय पुरुषांना
- **हत्वा:** मारुन
- **इह:** या लोकात, या लोकी
- **रुधिरप्रदिग्धान्:** रक्त रंजित, रक्ताने माखलेले
- **अर्थ-कामान्:** अर्थ म्हणजे संपत्ती, वैभव आणि कामरुप
- **भोगान्:** भोगांना
- **एव:** सुध्दा
- **भुंजीय:** भोगेन, भोगायचे?

**अर्थ**

म्हणून या महानुभाव गुरुजनांना न मारता मी या जगात भिक्षा मागून खाणेही कल्याणकारक समजतो कारण गुरुंना मारुनही या लोकात रक्ताने माखलेले अर्थ व कामरुप भोगच ना भोगावयाचे?

*न मारितां थोर गुरुंस येथें*
*भिक्षा हि मागूनि भलें जगावें*
*हितेच्छु हे ह्यांस वधूनि भोग*
*भोगूं कसे भंगुर रक्त-मिश्र*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) अर्जुन विविध तर्क मांडतो. मी गुरुजनांच्या विरोधात मुळी लढूच कसा? त्याऐवजी मी भिक्षा मागून जगेन. ते अधिक कल्याणकारी ठरावे. हा संन्याश्याचा धर्म आहे. विनोबांनी भिक्षा शब्दाचा नवा अर्थ केला. समाजाची सेवा करायची. अधिकात अधिक सेवा करायची. निर्वाहासाठी कमीत कमी घ्यायचे, ही झाली भिक्षा. त्या काळी खरे संन्यासी होते. त्यामुळे या धर्माचे पालन सर्वत्र दिसत होते. अर्जुन मोहामुळे व्याकुळ बनला. त्याला संन्याशाचा भिक्षा मागायचा धर्म आता श्रेष्ठ वाटायला लागला. यापूर्वी तो भीष्म-द्रोण यांच्याविरोधात लढला होता, नाही असे नाही पण हा अखेरचा मुकाबला होता. इथे जगण्या वा मरण्याचा सवाल होता. हा अखेरचा समर प्रसंग आहे. यामुळे अर्जुनाचे चित्त व्याकुळ झाले. गुरुजनांनी केलेले अनंत उपकार त्याला आठवतात. गुरुजनांचे खूप उपकार आहेत. आज जरी ते विरोधात उभे ठाकले असले तरी त्यांचा प्रतिकार करण्याऐवजी संन्यास घेणे सोईचे असे त्याला वाटू लागले होते. अर्जुनाला ही आत्मकल्याणाची वाट दिसते. यामुळे त्याला संन्यास घ्यावासा वाटतो. भिक्षा मागून जगावेसे वाटते.

2) गुरुजनांच्या रक्ताने रंजित भोग भोगायला अर्जुनाचे मन तयार नाही. गुरुजनांना मारुन मोक्ष मिळणार नाही. फळ तर अगदी क्षुद्र असेल ना? अशा प्रकारे अर्जुन वैराग्याच्या बाता मारतो. अर्जुनाला संन्यास घेता येणार नाही, कारण तो त्याचा स्वभाव नाही. ते एक ढोंग ठरेल. मिथ्याचरण ठरेल.

: 6 :

*न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो।*
*यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः॥*
*यानेव हत्वा न जिजीविषाम -*
*स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् वा:** किंवा
- **जयेम:** आमच्या विजयामुळे सर्वांचे कल्याण होत असेल
- **यदि वा:** अथवा
- **न:** आम्हाला
- **जयेयु:** कौरवांच्या विजयात सर्वांचे कल्याण होईल

- **नः** उपर्युक्त दोघांपैकी आमच्या साठी
- **कतरत्:** कोणते
- **गरीयः** श्रेष्ठ वा श्रेयस्कर ठरेल
- **एतत्:** याला
- **न विद्मः** आम्ही जाणत नाहीत
- **यान् एवः** ज्या दुर्योधन वगैरे बंधुंनाच
- **हत्वाः** मारुन
- **न जिजीविषामः** आम्ही जगू शकत नाहीहोत, आम्हाला जगावेसेही वाटणार नाही असे
- **तेः** ते
- **धार्तराष्ट्राः** धृतराष्ट्राचे पुत्र, नातलग जन
- **प्रमुखेः** आमच्या समोर
- **अवस्थिताः** उभे आहेत

### अर्थ

युध्द करणे वा न करणे या दोहोंपैकी आम्हाला काय श्रेष्ठ आहे, हे कळत नाही किंवा आम्ही त्याना जिंकू की ते आम्हाला जिंकतील, हेही आम्हाला माहीत नाही आणि ज्याना मारुन आम्हाला जगण्याचीही इच्छा नाही तेच आमचे बांधव-धृतराष्ट्रपुत्र आमच्या विरुध्द उभे आहेत.

*ह्यांचा चि व्हावा जय आमुचा कीं*
*कशांत कल्याण असे न जाणों*
*मारुनि ज्यांतें जगणे न इच्छूं*
*झुंजावया ते चि उभे समोर।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टींचा उल्लेख आहे

### स्पष्टीकरण

1) आपल्या विजयामुळे आम जनतेचे कल्याण होईल. हे समजून युध्दाची तयारी झाली होती. रथ दोन सैन्यदळांमध्ये उभा करायची सूचना तर अर्जुनाचीच होती. तोवर युध्द मनात होते मग मोह जागला. चित्त व्याकुळ झाले. कर्तव्यापासून अर्जुन दूर पळू लागला. वेगवेगळे तर्क मांडू लागला. आपण जिंकलो तर जनकल्याण होईल. कौरव जिंकले तर असे होऊ शकेल ना? अर्जुनाचे चित्त डळमळीत झाले. यात मोह असला तरी काही अंशी तथ्यही आहे. दोघांपैकी एकाचा विजय आणि दुसऱ्याचा पराजय हे तर ठरलेलेच आहे. अर्जुनाला जरी असे वाटत असले की आपला पक्ष सज्जनांचा, सत्याचा आहे. भगवान श्रीकृष्ण आपले सारथी आहेत तरी सज्जनही अधिकार मिळाल्यावर दुर्जन होतात अशी उदाहरणे आहेत. तुलसीदासजी म्हणतात

*नहिं कोऊ अस जनमा जग माहीं।*
*प्रभुता पाइ जाहि मद नाहीं॥*

म्हणजे असा कुणी जगात अजुन जन्माला आलेला नाही की प्रभुता म्हणजे मोठेपण किंवा सत्ता-मत्ताप्राप्त झाल्यावरही ज्याच्या मनात अहंकार आला नाही. अधिकार प्राप्त झाल्यावरसुध्दा ज्यांच्या मनात मद म्हणजे अहंभाव येत नाही असे लोक विरळ असतात. कधी दुर्जन समजले जाणारे लोकही सज्जन होऊ शकतात. यामुळे अर्जुनाच्या मनात शंका जागते की आपण जिंकल्यावर जगाचे कल्याण होईलच असे आपण कसे बरे मानावे?

ज्या स्वजनांना मारुन आपण विजय मिळवू इच्छित नाहीहोत, जगू इच्छित नाहीहोत तेच धृतराष्ट्राचे पुत्र वगैरे सारेच स्वजन समोर युध्दार्थ उभे ठाकले आहेत.

: 7 :

*कार्पण्य-दोषोपहत-स्वभावः*
*पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः।*
*यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे*
*शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

**कार्पण्यदोष उपहतस्वभावः** कृपणतेच्या दोषाने म्हणजे स्वजनविषयक आसक्तीच्या मोहाने वृत्तीत भिलेपणा आला, त्या दोषाने, ज्याचा स्वभाव नष्ट होऊन गेला, आपले मूळ रुप झाकले गेले

**धर्मसंमूढचेताः** आणि ज्याचे चित्त धर्म - अधर्म, कर्तव्य - अकर्तव्य या विषयक निर्णय घेण्याकामी मूढ बनून गेले, गोंधळात पडून गेले

- **अहंः** असा मी
- **त्वांः** तुम्हाला
- **पृच्छामिः** विचारत आहे की
- **यत्:** ज्या द्वारे, ज्यातून
- **निश्चितंः** खात्रीपूर्वक, निश्चितपणे
- **श्रेयः स्यात्:** कल्याण होईल

- **तत्:** ते (च)
- **मे:** मला
- **ब्रूहि:** सांगावे
- **अहं:** मी
- **ते:** आपला
- **शिष्य:** शिष्य आहे
- **त्वां:** तुम्हाला
- **प्रपन्नं:** शरणी आलेल्या, शरणागताला
- **मां:** मला, माझे
- **शाधि:** योग्य ते, खरे खरे मार्गदर्शन करा

**अर्थ**

करुणाव्याप्त दैन्यामुळे ज्याचा मूळ स्वभाव नाहीसा झाला आहे आणि धर्माधर्माचा निर्णय करण्याविषयी ज्याची बुध्दी असमर्थ आहे, असा मी तुम्हाला विचारतो आहे की जे साधन खात्रीने कल्याणकारक आहे ते मला सांगा कारण मी तुमचा शिष्य आहे म्हणून तुम्हाला शरण आलेल्या मला उपदेश करा.

***दैन्यानें ती मारिली वृत्ति माझी***
***धर्माचें तों नाशिलें ज्ञान मोहें।***
***कैसें माझें श्रेय होईल सांगा***
***पायांपाशीं पातलों शिष्य-भावें॥***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **कार्पण्यदोषोपहत-स्वभाव:** कृपणता शब्दाचा अर्थ भगवंतांनी याच अध्यायाच्या 49 व्या श्लोकात दिला आहे. **कृपणा: फलहेतव:** अर्थात् फळाची आसक्ती राखणारा कृपण म्हणजे दीन आहे. अनेक प्रकारचे तर्क केल्यावर या श्लोकात अर्जुनाला आपल्या वास्तव स्थितीचे भान आले आहे. त्याला कृपणतेचा दोष आला. अर्जुनाच्या स्वभावात भित्रेपणा जागला. फळाची आसक्ती ठेवणारे कृपण होत. दीन होत. अर्जुनाला आता खऱ्या स्थितीचे आकलन होते. माझा स्वभाव नष्ट झाला असे तो म्हणतो. आठव्या अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकात चर्चा येते की **स्वभावोऽध्यात्ममुच्यते** स्वभाव म्हणजे अध्यात्म होय. अध्यात्म म्हणजे प्रत्येक देहात विराजित परमात्मतत्व होय. त्यालाच 'प्रत्यगात्मा' असेही म्हणतात. आपला सर्वांचा मूळ स्वभाव परमात्मा आहे. देहात तो निवास करतो. परमात्मा देहापासून भिन्न आहे. आत्मतत्व परमात्म्याहून वेगळे नाही. आपल्याला वाटते की देह म्हणजे आपला स्वभाव. मन म्हणजे स्वभाव. बुध्दी म्हणजे आपला स्वभाव. इंद्रिये म्हणजे आपला स्वभाव. पण ते काही खरे नाही. असे का वाटते? आपल्याला खऱ्या स्वरुपाची ओळख नसल्यामुळे असे वाटते. हे आश्चर्य आहे. देह जड आहे. स्थूल आहे. आत्मस्वरुप सूक्ष्म आहे. सूक्ष्म असल्यामुळे आपण त्याला बघू शकत नाही. देहाला आपले स्वरुप मानणे म्हणजे अज्ञान होय. ही मूढता अनादि काळापासून आहे. हे अज्ञान अनादि काळापासून कायम आहे. अर्जुनाच्या ते आता लक्षात आले आहे. परमात्मस्वरुप झाकले गेले आहे. नष्ट झाले आहे. असे त्याला वाटते. चित्तात मोह उपजला नाही तरच आपल्या स्वरुपाची ओळख पटते. परमात्म तत्व आकळते. आपण या लाभापासून वंचित झालो आहोत असे अर्जुनाला वाटते.

2) **धर्मसंमूढचेता:** 'माझ्या चित्तात मोह जागला आहे. चित्त धर्मसंमूढ झाले आहे.' मोह जागला आणि अर्जुनाने आपली निर्णयक्षमता गमावली. अर्जुन नम्र बनला. कृष्णाला तो प्रश्न विचारत आहे. त्याच्या मनी जिज्ञासा जागली आहे. धर्म काय? अधर्म काय? नीती काय? अनीती काय? करणीय काय? अकरणीय काय? योग्य काय? अयोग्य काय? कुठला धर्म आहे? बुध्दी जेव्हा मोहापासून दूर होते तेव्हा तिच्या ठायी योग्य निर्णयाची क्षमता जागते. आपण शक्ती गमावून बसलो आहोत असा अर्जुनाला अनुभव आला आहे.

3) तो विनम्रतेने भगवंताला विचारत आहे. अनुभवी पुरुषाकडून ज्ञान मिळते. गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या चौतिसाव्या श्लोकातूनही हा विचार आला आहे. **तद्विध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया** ज्ञान मिळवण्याचे तीन उपाय सांगितले आहेत. (1) प्रणिपात म्हणजे साष्टांग नमस्कार करुन, अत्यंत नम्रतापूर्वक. (2) पूर्ण समाधान होईपर्यंत अनुभवी जनांना विचारत रहाणे आणि (3) ज्ञान देणाऱ्या अनुभवी जनांच्या कृपेच्या प्राप्तीसाठी सेवा करावी. अर्जुनाचे चित्त व्याकुळ झाले आणि त्याच्या मनात प्रश्न विचारायची इच्छा निर्माण झाली.

4) अर्जुन कृष्णाला म्हणतो की माझे कल्याण होईल असे कृपा करुन मला सांग. कठोपनिषदात एक श्लोक येतो.

***श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ संपरीत्य विविनक्ति धीर:***
***श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते प्रेयो***
***मन्दो योगक्षेमाद् वृणीते ॥ (1-2-2)***

माणसापुढे दोन दिशा आहेत. एक आहे प्रेयाची आणि दुसरी आहे श्रेयाची. प्रेयाची आणि श्रेयस्कारी अशी दिशा. एक प्रिय म्हणजे आवडणारे दुसरे लाभकारी. माणसाला भावते ते प्रेयस. माणसाला जे उपयुक्त आहे ते आहे श्रेयस. माणसाला भौतिक सुखे आवडतात पण त्यातून सुख लाभत नाही. पदोपदी दु:ख वाटयाला येते. पावलोपावली दु:खाचा अनुभव येतो. व्याकुळता जागते मग त्याला भौतिक सुखांचा तिटकारा वाटू लागतो. आता माणूस कल्याणमार्गाची वाट धरतो. आता अर्जुनाची अवस्था अशीच झाली आहे. तो आता कल्याण मार्गाकडे वळू बघत आहे.

5) अर्जुनाच्या चित्तात व्याकुळता साठली. अर्जुन नम्र झाला. तो कृष्णाला म्हणाला. 'मी आपला शिष्य आहे.' तुलसीदास म्हणतात.

***गूढउ सत्य न साधु दुरावहिं।***
***आरत अधिकारी जहँ पावहिं॥***

अर्थात् आर्त म्हणजे अतिदु:खी आणि अधिकारी म्हणजे साधक, मुमुक्षु भेटला की साधु पुरुष काही लपवत नाहीत. अध्यात्मातील गूढ संकेतस्थळे उकलून दाखवतात. आर्त हा महादु:खी असतो. अधिकारी हा साधक मुमुक्षु असतो. मोक्षाची इच्छा करणारा असतो.

6) अर्जुन आपल्याविषयी सांगत आहे की हे भगवंता मी आपला शिष्य आहे. आपल्या शरणी आलो आहे. कृष्ण अनुभवी होते. विनम्र होते. अर्जुन अधिकारी होता. आता दु:ख व्याकुळ झाला होता. उपदेश ग्रहण करायला संपूर्ण योग्य बनला होता.

: 8 :

***न हि प्रपश्यामि ममापनुद्यात्***
***यच्छोक-मुच्छोषणमिन्द्रियाणाम्।***
***अवाप्य भूमावसपत्नमृध्दं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भूमौ:** या मर्त्य लोकात
- **असपत्नं:** शत्रु रहित, निष्कंटक (आणि)
- **ऋध्दं:** धनधान्य संपन्न
- **राज्यं:** राज्याला
- **च:** आणि
- **सुराणां:** देवतांच्या
- **आधिपत्यं:** राज्याला, आधिपत्याला
- **अवाप्य:** प्राप्त करुन
- **अपि:** ही, सुध्दा
- **यत्:** जो
- **मम:** माझ्या
- **इन्द्रियाणां:** इंद्रियांना
- **उच्छोषणं:** सुकविणारे
- **शोकं:** शोक
- **अपनुद्यात्:** दूर करु शकेल
- **न हि प्रपश्यामि:** असा दुसरा कुठला उपाय मला दिसत नाही

**अर्थ**

कारण पृथ्वीचे निष्कंटक, शत्रुरहित आणि धन-धान्य संपन्न राज्य मिळाले किंवा देवतांचे स्वामित्व जरी मिळाले तरी माझ्या इंद्रियांना शोषून टाकणारा हा शोक जो दूर करु शकेल असा उपाय मला दिसत नाही.

***मिळेल निष्कंटक राज्य येथें लाभेल इंद्रासन देव-लोकीं***
***शमेल त्यानें न तथापि शोक जो इंद्रियांतें सुकवीत माझ्या।***

**विषय:** हा अर्जुनाचा अखेरचा श्लोक आहे. तो एकच गोष्ट सांगतो.

**स्पष्टीकरण**

अर्जुन म्हणतो मला शोकाने मोहाने घेरुन घेतले. माझी शांतता भंगली. शोक आणि मोहाने माझ्या इंद्रियांचे शोषण केले. ज्ञानेंद्रिये थकून गेलीत. कर्मेंद्रिये थबकून गेलीत. मला कल्याणाचा मार्ग दाखवा.

'या वेळी कौरव आणि त्यांचे सारे नातलग, मित्रगण, जे माझ्या समोर युध्दार्थ उभे ठाकले आहेत ते युध्द करणे टाळून जर असे म्हणत असतील की आम्ही सारे दूर होतो तुम्ही आणि युधिष्ठिर वगैरे सारे पांडव राज्य सांभाळा किंवा इंद्राने येऊन असे सांगितले की मी माझे स्वर्गाचे राज्यही तुम्हाला अर्पायला तयार आहे. तरीही माझ्या चित्तात शिरलेला शोक-मोहरुपी शत्रु या राज्य प्राप्तीने का हटणार आहे? एवढी एकच गोष्ट तो सांगतो. यामुळे शांतता लोप पावते. तमाम इंद्रियांचे शोषण होते. शोक-मोहरुपी शत्रु जणू अर्जुनाच्या चित्तात घुसला आहे. राज्यप्राप्ती झाल्यावर का तो दूर होणार आहे? अर्जुनाच्या या प्रश्नाचा काय बरे अर्थ होतो? राज्य याचा अर्थ बाह्य सुखोपभोग, सुखोपभोगाची साधने. यामुळे जर शोक, मोह, अभिमान, काम, क्रोध आदी विकार नष्ट होत असतील तर काम सोपे आहे मग आत्मज्ञानाची काय गरज? तत्वज्ञानाची काय आवश्यकता? भक्ती कशासाठी करायला हवी? वैराग्याचा मार्ग आक्रमायची काही गरजच नाही ना मग! सुखाच्या साधनांनी विकारांना घालवता येत नाही हा अनादि काळाचा अनुभव आहे. आत्मज्ञानाने, भक्तीने आणि विरागी भावनेने त्यांना दूर घालवता येते. ईशावास्योपनिषद सांगते

*यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः।*
*तत्र का मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः॥*

अर्थात् प्रत्येकजण बाह्य सुखाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो. या प्रयत्नात त्याला सुखाची प्राप्तीही होते पण जीवनात विषम आणि विपरित प्रसंग येतात आणि शांततेचा भंग होतो. बाह्य सुखाची साधने वाढवता येतात. त्याना आधार मात्र अंत:करणाचा द्यावा लागतो. आंतरिक शांतता नष्ट झाली म्हणजे अपार दु:खाला सामोरे जावे लागते. अशा वेळी बाह्य वैभव काही उपयोगी पडत नाही मग माणूस सत्संगतीचा शोध घेऊ लागतो. महद्भाग्याने संत भेटतो. त्याची कृपा होते. साधना कळते. शांतता लाभते. शोक मोह वगैरे विकारांना घालवण्याची युक्ती कळते. अर्जुनाची स्थिती अशी झाली आहे. तो शांतीसाठी तडफडतो. देवाला प्रार्थना करतो. मला शोक-मोह यापासून वाचायचा मार्ग दाखवा असा त्याचा धावा आहे. मी आपला शिष्य आहे असे तो सांगत आहे. मी आपल्या शरणी आलो आहे असे तो म्हणतो.

: 9 :

**संजय उवाच**

*एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप।*
*न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतपः** शत्रुला ताप देणाऱ्या म्हणजे शूरवीरा, आणि
- **गुडाकेशः** निद्रा-जयी अर्जुनाने
- **हृषीकेशं:** भगवान श्रीकृष्णाला
- **एवं:** अशा प्रकारे
- **उक्त्वाः** सांगून
- **च:** आणि
- **न योत्स्ये:** मी झुंजणार नाही, लढणार नाही
- **इति:** असे
- **गोविन्दं:** कृष्ण भगवंताला
- **उक्त्वाः** सांगून
- **तूष्णीं:** स्तब्ध
- **बभूव ह:** होऊन गेला

**अर्थ**

संजय म्हणाला हे राजा, निद्रेवर ताबा असलेल्या अर्जुनाने अंतर्यामी श्रीकृष्णाला एवढे बोलून 'मी युध्द करणार नाही' असे स्पष्टपणे सांगितले आणि तो गप्प झाला.

**संजय म्हणाला**

***असें अर्जुन तो वीर हृषीकेशास बोलुनी।***
***शेंवटीं मीं न झुंजें चि ह्या शब्दें स्तब्ध राहिला॥***

**विषय:** या श्लोकात संजयाने धृतराष्ट्राला अर्जुनाच्या संदर्भात तीन गोष्टी सांगितलेल्या आहेत.

1) एक म्हणजे अर्जुनाने भगवंताला आपल्या मानसिक परिस्थितीची पुरेपूर कल्पना दिली आहे.

2) दुसरी गोष्ट म्हणजे अर्जुनाने युध्द न करण्याचा निर्णय घोषित केला आहे. कौरवांच्या अन्यायाचा प्रतिकार न करण्याची त्याची भूमिका आहे. स्व-धर्म वा स्व-कर्तव्याचे पालन त्याला करायचे नाही.

3) तिसरी गोष्ट म्हणजे एवढे बोलून अर्जुन गप्प बसला आहे.

### स्पष्टीकरण

खरे म्हणजे अर्जुन केवळ निमित्त आहे. असे प्रसंग आपल्या सारख्या प्रापंचिक जीवावर येतात अशा विषम प्रसंगांमुळे चित्ताची शांती ढळते. ती परत कशी मिळवता येईल हा प्रश्न महत्वाचा आहे. याचा काही उपाय तर असला पाहिजे. गीता सांगून आपल्या सर्वांसाठी कृष्णाने याचे उपाय सांगितलेले आहेत. हे उपाय बाह्य आहेत. आंतरिकही आहेत. गांधीजींच्या मते गीता 'धर्मकोश' आहे. आपण कठिण शब्दांचे अर्थ अडले की कोशात बघतो. जीवनात विषम प्रसंग आले वा आपली शांतता भंग पावली तर गीतेच्या मदतीने आपण खरी शांतता प्राप्त करु शकू. आपल्या स्वधर्मात आणि स्वकर्मात मग्न राहू शकू.

या श्लोकात 'परंतप' हा शब्द आला आहे. हा अर्जुनासाठी आहे की धृतराष्ट्रासाठी या विषयी मतभेद आहेत. लोकमान्य टिळक आणि गांधीजींच्या मते हा शब्द अर्जुनासाठी प्रयुक्त केला गेला आहे. बाळकोबांचे हेच मत आहे. गुडाकेश शब्दही अर्जुनासाठी आला. गुडाकेश शब्दाचे दोन अर्थ आहेत. बाळकोबाजींनी इथे निद्रेचा स्वामी असा अर्थ घेतला. 'परंतप' शब्दाचा अर्थ शत्रुला त्रास देणारा असा आहे. विनोबा या शब्दाचा अर्थ शूर वीर असा करतात. अर्जुनाचा अर्थ ऋजु म्हणजे सरळ बुध्दीचा, निष्कपट बुध्दीचा असा आहे. सरळ चित्ताच्या व्यक्तीला परमात्म ज्ञान शीघ्र लाभते.

: 10 :

***तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।***
***सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **भारतः** हे भरतवंशी धृतराष्ट्र महाराजा
- **हृषीकेशः** अंतर्यामी श्री कृष्ण भगवान
- **उभयो:** दोन्ही
- **सेनयो:** सैन्य दळांच्या
- **मध्ये:** मध्यभागी
- **विषीदन्तं:** शोक करत असलेल्या
- **तं:** अर्जुनाला
- **प्रहसन इव:** स्मित करत
- **इदं:** हे, असे
- **वच:** वचन, शब्द
- **उवाच:** बोलले

### अर्थ

हे भरतवंशी धृतराष्ट्र महाराजा,अंतर्यामी भगवान श्रीकृष्ण दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी शोक करणाऱ्या त्या अर्जुनाला स्मित करुन असे म्हणाले

***मग त्यास हृषीकेश जणू हंसत बोलिला ।***
***करीत असतां शोक दोन्ही सैन्यांत तो तसा ॥***

**विषय:** या श्लोकात तशी तर एकच गोष्ट आली आहे पण तीन गोष्टी सांगितल्या आहेत असेही सांगता येऊ शकते.

### स्पष्टीकरण

1) अर्जुन शोक करत होता. त्याचा उल्लेख आला आहे. त्यात हेच दर्शवले गेले आहे की अकराव्या श्लोकापासून भगवंत उपदेश देणे सुरु करणार आहेत ते ऐकण्यासाठी अर्जुनाची भूमिका कशा प्रकारे योग्य होती. हीच गोष्ट आठव्या श्लोकातही आली आहे. इथे ती पुनश्च सांगितली गेली आहे. अर्जुनाला निमित्त करुन भगवान व्यास म्हणताहेत की 'चित्तात जर व्याकुळता उत्पन्न झाली नसेल तर अकराव्या श्लोकापासून देव जो उपदेश देताहेत तो हृदयात सामावणार नाही कारण की जेव्हा अपार दु:ख होते, अतिव्याकुळता जागते तेव्हा उपदेश ऐकायची उत्सुकता, जागृती, एकाग्रता आणि जिज्ञासा चित्तात उपजतात.'

2) अर्जुनाची स्थिती दयनीय आहे आणि कृष्णाच्या चेहऱ्यावर स्मित झळकत आहे. हे रहस्यमय आहे. या स्मिताचा अर्थ खोल आहे. अर्जुनाच्या मनाची स्थिती बघून हे स्मित आहे. ही स्थिती आकुळ-व्याकुळ आहे. आता अर्जुनाच्या मनाची भूमिका तयार आहे. परमात्मतत्वाच्या परिचयासाठीची ही सिध्दता आहे. या आनंदामुळे कृष्णाच्या मुखावर स्मित झळकत आहे. दुसरा अर्थ असा की कृष्ण ज्ञानी आहे. नम्रता आणि निरहंकारी भाव तर त्याच्या ठायी आहेच पण आत्मविश्वास देखिल आहे. अर्जुनाचा शोक-

मोह सहज घालवता येईल हा आत्मविश्वास त्याच्या ठायी आहे. त्याच्या स्मिताचे हेही एक कारण आहे. गीतेच्या समारोपात आपला शोक संपला, मोह दूर झाला ही कबूली अर्जुनाने दिली आहे.

3) कृष्णाच्या स्मिताचा अर्थ गहन-गंभीर आहे. या अकराव्या श्लोकापासूनच दु:ख निवृत्तिचा उपाय सांगितला गेला आहे. शोक आणि मोहाच्या निवृत्तीचा उपाय सांगितला गेला आहे.

शंकराचार्यांनी गीतेवर भाष्य लिहिले आहे. यात पहिल्या अध्यायाचा विचार केला नाही. दुस-या अध्यायातील सुरुवातीच्या दहा श्लोकांचा विचार मांडला नाही. पहिला अध्याय आणि दुस-या अध्यायातील सुरुवातीच्या दहा श्लोकांचा अर्थ सारांशरुपाने मांडला आहे. मार्मिक शैलीत समजाऊन सांगितला आहे. ती मोठी मनोरम शैली आहे.

लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला आहे. त्यांनी शंकराचार्यांच्या संन्यासधर्माचे खंडन केले आहे. शंकराचार्यांना त्यांनी अलौकिक ज्ञानी पुरुष मानले आहे. ही मोठी मौज आहे.

शंकराचार्य अलौकिक ज्ञानी तर होतेच पण ते अलौकिक वैराग्यसंपन्न पुरुषही होते. या वैराग्यामुळे त्यानी गीतेसारख्या पूजनीय ग्रंथावर भाष्य लिहित असताना पहिला अध्याय पूर्णपणे सोडून दिला आणि दुसऱ्या अध्यायातील दहा श्लोकही सोडून दिलेहेत. साररुप प्रस्तावना लिहिली. त्यानी मोठे मार्मिक विश्लेषण केले आहे.

काय म्हटले बरे शंकराचार्यांनी? शंकराचार्य म्हणतात की पहिल्या अध्यायाच्या दुस-या श्लोकापासून दुस-या अध्यायाच्या दहाव्या श्लोकापर्यंत एक विचार मांडला गेला आहे. प्राणिमात्र कसा फसतो? शोक-मोह हे दोषांचे बीज आहे. यामुळे माणूस गुरफटतो. हे दोष कशाप्रकारे उत्पन्न होतात? ममत्व हे मूळ कारण. ममत्वामुळे कौरव पक्षाबद्दल अर्जुनाच्या मनात प्रेम जागते. अर्जुन संन्यासी बनू बघतो हा काही त्याचा स्व-धर्म नाही. तो स्व-धर्माचा त्याग करु बघत आहे. आपल्या कर्तव्यकर्माला सोडून देऊ बघत आहे. संन्यासासाठी वैराग्य भाव हवा. तो तर काही अर्जुनाच्या ठायी नाही. भाषा मात्र तो संन्याश्याची बोलत आहे.

शंकराचार्य म्हणतात की ही काही केवळ अर्जुनाचीच स्थिती आहे असे समजण्याचे काही एक कारण नाही. सारेच प्राणिमात्र असे करतात. स्व-कर्तव्याचा त्याग करतात. निषिध्द धर्माचे पालन करतात. निषिध्द कर्माचे आचरण करतात पण काही मात्र वेगळे असतात. अशा अवस्थेतही आपले कर्तव्य वा स्वधर्म काही सोडत नाहीत. स्व-कर्तव्याचरणात रत असतात. तरीही त्यांच्या कायिक-वाचिक-मानसिक प्रवृत्ती अहंकारी असतात. ते फळाच्या आसक्तीने भारलेले असतात. त्यांना नातलगांविषयी मोह नसतो पण देहाबद्दल असतो. इंद्रियांवर प्रेम असते. मन आणि बुध्दीबाबत ममता असते. 'मी' पणा असतो. या अज्ञानाच्या भ्रांतीपासून ते मुक्त नसतात. त्यांना आपल्या स्वरुपाची कल्पना नसते. आत्मतत्वाची ओळख नसते. परमात्म्याची ओळख तर मग लांबच राहो.

यामुळे शंकराचार्य पुढे म्हणतात की अशाप्रकारे पाप-पुण्य वाढतात. धर्म-अधर्म बळावतो. यातून कोणीही मुक्त दिसत नाही. या वृध्दीमुळेच इष्ट उपजते. अनिष्ट जन्माला येते. सुख-दु:खाचा अखंड अनुभव घडवणाऱ्या संसाराचे रहाट-गाडगे सुरुच असते. त्याला निवृत्ती मिळत नाही. भगवंताला मोठी काळजी लागून राहिलेली असते. अर्जुनासारखे असे अनेक जीव आहेत. त्यांना मुक्ती कशी लाभेल? यासाठी भक्ती हवी. वैराग्य हवे. नित्य-अनित्याचा विवेक हवा. सत्वगुणांचा उत्कर्ष हवा. शंकराचार्य म्हणतात की या अज्ञानापासून जर मुक्ती मिळवायची असेल तर उपाय एकच एक. तो म्हणजे परमतत्वाच्या संदर्भात ज्ञान उत्पन्न व्हायला हवे. यासाठी भक्ती, वैराग्य, नित्यानित्य विवेक, सत्वगुणांचा उत्कर्ष वगैरे गुणांची साधना करायला हवी.

शंकराचार्य म्हणतात "परमात्म ज्ञानाशिवाय दुसऱ्या कुठल्याही उपायाने शोक-मोहरुपी अज्ञानापासून सोडवणूक करुन घेणे शक्य नाही. यामुळे परमात्म ज्ञानाचा उपदेश देण्यासाठी उत्सुक अशा भगवंताने अर्जुनाचे निमित्त केले. अखिल मानवजातीला उपदेश केला."

अकराव्या श्लोकाची प्रस्तावना लिहिताना शंकराचार्य म्हणतात की अर्जुनाच्या मनात शोक उपजला. यामुळे कर्तव्य काय? आणि अकर्तव्य काय? याचा नेमका विवेक उरला नाही. भगवंताने विचार केला की परमात्म ज्ञानाशिवाय दुसऱ्या कुठल्याही उपायाने अर्जुन शोक-मोह मुक्त होऊ शकणार नाही. यामुळे अर्जुनाला आत्मज्ञानाशी प्रवृत्त करताना भगवंताची गीता उपदेश धारा गीतेच्या अकराव्या श्लोकापासून सुरु होते.

: 11 :

**श्री भगवान उवाच**

*अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।*
*गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वं:** तुम्ही
- **अशोच्यान्:** शोक न करण्यायोग्य आत्म्याच्या विषयी
- **अन्वशोच:** शोक केला
- **च:** आणि
- **प्रज्ञावादान्:** ज्ञान्यांप्रमाणे पांडित्याच्या गोष्टी
- **भाषसे:** मला ऐकवता आहात
- **पंडिता:** पण आत्मज्ञानी पुरुष
- **गतासून्:** ज्यांचे प्राण निघून गेले आहेत अशा
- **च:** आणि
- **अगतासून्:** ज्यांचे प्राण गेलेले नाहीहेत (त्यांच्या विषयी)
- **न अनुशोचन्ति:** शोक करत नाहीत

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे अर्जुना, तू ज्यांचा शोक करु नये, अशा माणसांसाठी शोक करतोस आणि विद्वानांसारखा युक्तिवाद करतोस पण ज्यांचे प्राण गेले आहेत त्यांच्यासाठी आणि ज्यांचे प्राण गेले नाहीत त्यांच्यासाठीही विद्वान माणसे शोक करत नाहीत.

**श्री भगवान म्हणाले**

*करिसी भलता शोक वरी ज्ञान हि सांगसी।*
*मेल्याजित्याविषीं शोक ज्ञानवंत न जाणती ॥*

**विषय:**

या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) **अशोच्यान्:** अर्जुनाच्या मनात शोक भीष्म आणि द्रोणाचार्य यांच्याविषयीचा आहे. याच अध्यायाच्या चौथ्या आणि पाचव्या श्लोकात तो म्हणतो की भीष्म, द्रोण यांच्यासारख्या पूजनीय गुरुजनांशी मी कशा प्रकारे युध्द करु? यापेक्षा तर भिक्षा मागून जगणे भले. भगवंतानी त्याला समजावून सांगितले आहे की खरे तर त्यांच्यासाठी शोक करायला नको कारण ते आत्मस्वरुपी आहेत. आत्मस्वरुपी याचा अर्थ चैतन्यवान असणे होय! हे काही जड नव्हते. देहाच्या ठायी चैतन्य वसते. चैतन्याशिवायचे शरीर प्रेत मानायला हवे. चैतन्याला आपण वेगवेगळ्या नावांनी ओळखतो. चैतन्य नष्ट होत नाही. भीष्म-द्रोणाचार्य चैतन्याचे पुतळे आहेत. ते नष्ट होणार नाहीत. अशी ही तर्क मांडणी आहे. जे नष्ट होणारे नाही त्यासाठी शोक करणे हे व्यर्थ आहे. साधा मुद्दा असा आहे. भीष्माचार्य-द्रोणाचार्य हे सदाचरणी आहेत. मृत्युनंतर त्याना शुभ गती लाभणार आहे. यामुळे त्यांच्यासाठी शोक करायचे काही एक कारण नाही. हे शोक न करण्यायोग्य म्हणजे '**अशोच्य**' आहेत.

2) **प्रज्ञावादान्:** भगवान अर्जुनाला टोमणा मारताहेत की तू एकीकडे शोक न करण्यायोग्य वस्तुसाठी शोक करतोहेस आणि दुसरीकडे ज्ञानी पुरुषांसारखा ज्ञानाच्या बाता करतोहेस. म्हणजे एकीकडे ज्ञानवानासारखा वागतोहेस तर दुसरीकडे मूढासारखे वर्तन करतोहेस. अर्थात मूर्खता आणि पांडित्य दोन्ही गोष्टी एकसाथ करतोहेस. यावरुन हे सिध्द होते की तुझी गत वेड्यासारखी झाली बघ. माणूस एकदा का शोक-मोहात बुडाला ना तर मग त्याची गत बेशुध्दासारखी होते. अर्जुनाची अवस्था अशी होऊन गेली.

3) **पंडिता:** पंडित कुणाला म्हणावे? सामान्यपणे शास्त्र जाणणाऱ्याला पंडित समजले जाते. आचरणरहित शास्त्रज्ञात्या विद्वानाला पंडित म्हटले जाते. शंकराचार्य लिहितात **आत्मविषया** आत्मविषयक म्हणजे आत्मनिष्ठ. **बुध्दि: येषाम्** ज्यांची बुध्दी आहे, **ते हि** तेच **पंडिता:** पंडित मानले जातात. उपनिषद म्हणते **क्रियावानेष ब्रह्मविदो वरिष्ठ:। ब्रह्मविदाम्** ब्रह्मवेत्त्यांमध्ये **एष** हा **क्रियावान्** जो क्रियावान आहे म्हणजे जो पुरुष आपले ज्ञान क्रियांमध्ये सक्रियपणे उतरवतो आचरणात आणतो. तो वरिष्ठ म्हणजे श्रेष्ठ आहे. दुसरे वचन आहे **य:** क्रियावान् स पंडित:। **य: क्रियावान्** जो क्रियावान आहे म्हणजे ज्ञानाला क्रियेत उतरवतो म्हणजे ज्ञानाला आचरणात आणतो. **स:** तोच **पंडित:** पंडित आहे. शंकराचार्य मात्र आत्मनिष्ठ बुध्दीसंपन्न व्यक्तीला पंडित म्हणतात. उपनिषद क्रियावान व्यक्तीला

वरीष्ठ म्हणजे श्रेष्ठ मानतात. ज्ञानाला क्रियेत रुपांतरित करणारा म्हणजे आचरणात आणणारा श्रेष्ठ पुरुष होय. त्याला पंडित म्हणावे.

4) **गतासून् अगतासून्:** माणसाचे निधन झाल्यावर शोक केला जातो. हयात व्यक्तीबद्दल काही कोणी शोक करत नाही. मग गीता असे काय म्हणते आहे? ज्ञानी पुरुष हयात व्यक्तीबद्दल तटस्थ रहातात. याचे स्पष्टीकरण असे की सदाचारी आणि पुण्यकर्म करणाऱ्या व्यक्तींसाठी कुणी शोक करत नाही पण दुराचारी आणि पातकींसाठी मात्र शोक जागतोच. गांधीजींचा थोरला मुलगा दारुड्या आणि दुराचारी होता. त्याच्या बाबतीत गांधीजी तटस्थ रहात. त्याना दु:ख नाही व्हायचे पण कस्तुरबांना मात्र दु:ख व्हायचे. याचा दुसरा अर्थ असा की हयात व्यक्तिंविषयी ज्ञानी पुरुष तटस्थ रहातात कारण की प्रत्येक व्यक्तीला जन्म-मरण आहेच. हे सृष्टीचे सहज स्वरुप आहे. हे प्रवाही स्वरुप आहे. यामुळे जन्म-मरण हा काही शोकाचा विषय नाही.

: 12 :

*न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपा: ।*
*न चैव न भविष्याम: सर्वे वयमत: परम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु:** पण, परंतु
- **अहं:** मी
- **जातु:** कधीही
- **न आहं:** नव्हतो
- **इति न एव:** असे नाही
- **त्वं जातु न आसी:** तू कदापि नव्हतास
- **इति न एव:** असे नाही
- **इमे जनाधिपा:** हे राजा
- **न आसन्:** कधी नव्हते
- **इति न एव:** असेही नाही
- **च:** आणि
- **वयं सर्वे:** आम्ही सारे
- **अत: परं:** यापुढे (शरीर गतप्राण झाल्यावर)
- **न भविष्याम:** रहाणार नाहीत
- **इति न एव:** असेही नाही

**अर्थ**

मी कोणत्याही काळी नव्हतो तू नव्हतास किंवा हे राजे नव्हते असेही नाही आणि यापुढे आम्ही सर्वजण असणार नाही, असेही नाही.

*मी तूं आणिक हे राजे न मागें नव्हतों कधीं ।*
*तसें चि सगळे आम्ही न पुढें हि नसूं कधीं ॥*

**विषय:** या श्लोकात आत्म्याच्या नित्यत्वाचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

इथे सांगितले आहे की मी, तू, आपण हे सारे राजे-महाराजे हे काल होते. आज आहेत. उद्याही रहातील. तिन्ही काळात यांचे वास्तव्य आहे. देह नष्ट होईल. चैतन्य मात्र नष्ट होणार नाही. देह हे घर. चैतन्य हा पाहुणा. चैतन्य देहाघरचा पाहुणा असतो हे जाणून घ्यावे. हा नित्य आहे. शाश्वत आहे. अविनाशी आहे. यासाठी का शोक करायचा? आपला या नित्यत्वाशी परिचय नाही. हे दु:खाचे मूळ आहे.

: 13 :

*देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।*
*तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा:** ज्याप्रमाणे, जसे
- **अस्मिन् देहे:** या देहात
- **कौमारं:** कुमारावस्था
- **यौवनं:** युवावस्था, तरुणाई, तरुणपणा
- **जरा:** वृध्दावस्था
- **देहिन: अस्ति:** देहधाऱ्याला, आत्म्याची प्राप्ती होते
- **तथा:** तशीच, त्याचप्रकारे
- **देहांतरप्राप्ति:** एक शरीर गळून पडल्यावर दुसऱ्याची प्राप्ती होते
- **तत्र:** यामुळे त्याच्याविषयी
- **धीर:** धैर्यवान पुरुष
- **न मुह्यति:** मोहित होत नाहीत

**अर्थ**

ज्या प्रमाणे जीवात्म्याला या देहात बालपण, तारुण्य आणि वार्धक्य येते त्याचप्रमाणे दुसरे शरीर मिळते याविषयी धीर पुरुषांना मोह उत्पन्न होत नाही.

*ह्या देहीं बाल्य तारुण्य जरा वा लाभते जशी।*
*तसा लाभे नवा देह न डगे धीर तो तिथें।*

**विषय:** हा श्लोक देहाची नश्वरता सांगतो. आत्म्याची नित्यता समजावतो. शरीराच्या तीन प्रमुख अवस्था आहेत. बाळपण, युवावस्था आणि वृध्दत्व.

**स्पष्टीकरण**

या श्लोकातून देहाची अनित्यता दर्शवून आत्म्याची नित्यता सिध्द केली आहे. भगवंत म्हणताहेत की आपण आपल्या हयातीत तीन प्रकारच्या अवस्थांमधून जातो. तशी तर देहाची चार प्रकारची अवस्था असू शकते पण भगवंतांनी तीनच अवस्थांचाच विचार मांडला आहे आणि जनलोकातही तीन अवस्थाच प्रचलित आहेत. बाल्यावस्था, तारुण्यावस्था आणि वृध्दावस्था. युवावस्थेनंतर जर प्रौढावस्था मानली तर आणखी एक अवस्था असू शकते. या तीन वा चार अवस्थांसंबंधी जर आपण विचार करु लागलो तर बाल्यावस्थेतले छोटे शरीर मोठे झाल्यावर खूप बदलून जाते. हा बदल इतका विलक्षण असतो की ओळखू येणे अवघड होऊन बसावे.

भावार्थ हा की एक अवस्था संपून देह दुसऱ्या अवस्थेत प्रवेश करतो. मग वृध्दावस्थाही संपून जाते. दुसरे नवे शरीर लाभते. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत प्रवेश करताना का कुणी शोक करतो? मग देहांतरण झाल्यावर का शोक करावा बरे? आत्मा नित्य असल्यामुळेही शोक करु नये. दोन्हीही परिस्थितीत शोक करणे व्यर्थ आहे एवढे मात्र खरे!

या जगात काही केवळ आपला देहच नाही. त्रिगुणात्मक सृष्टी आहे. सत्व, रज आणि तमोयुक्त जगत आहे. या जगात अनंत पदार्थ आहेत. त्यांच्याशी आपला संबंध येतो. त्यातून सुखाचा अनुभव येतो. दु:खाचाही अनुभव येतो. याला टाळता येईल काय? या प्रश्नाचा विचार चौदाव्या श्लोकातून केला गेला आहे.

: 14 :

*मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदु:खदा:।*
*आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **तु:** पण, परंतु
- **मात्रास्पर्शा:** मात्रा म्हणजे पंच ज्ञानेंद्रिये आणि शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हा पंचविषयांशी संबंध
- **शीतोष्ण-सुख-दु:खदा:** शीत, उष्ण आणि सुख-दु:ख देणारा आहे
- **आगमापायिन:** हे उत्पत्ती-विनाशशील म्हणजे येणारे आणि जाणारे, क्षणभंगुर आहेत
- **अनित्या:** आणि अनित्य आहेत
- **अत:** यामुळे
- **तान्:** इंद्रिय आणि त्यांच्या विषयी संबंधांना
- **भारत:** हे भारत (अर्जुना)
- **तितिक्षस्व:** सहन करत रहा, सहन करत जा

**अर्थ**

हे कुंतीपुत्रा अर्जुना, इंद्रियांचे विषयांशी संयोग हे थंडी-उष्णता आणि सुख-दु:ख देणारे आहेत. ते उत्पन्न होतात आणि नाहीसे होतात म्हणून ते अनित्य आहेत, क्षणभंगुर आहेत तेव्हा हे भारता तू हे सहन कर.

*शीतोष्ण विषय-स्पर्श सुख-दु:खांत घालिती।*
*करीं सहन तूं सारे येती जाती अनित्य ते॥*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी सांगितल्या आहेत

**स्पष्टीकरण**

**1) मात्रास्पर्शा:** पाच ज्ञानेंद्रिये आहेत. डोळे, जीभ, नाक, त्वचा आणि कान. या ज्ञानेंद्रियांमुळे रुप, रस, गंध, स्पर्श आणि शब्द या पाच विषयांचे ज्ञान लाभते.

**2) शीतोष्ण-सुख-दु:खदा:** यामुळे चित्तात कधी अनुकूल वारे वहातात तर कधी प्रतिकूल संवेदना जागतात. अनुकूल भावनेमुळे सुख लाभते तर प्रतिकूल भावनेमुळे दु:खाचा अनुभव येतो. हे शीत उष्ण आहे. खरे तर हे सापेक्ष आहे. हिवाळ्यात ऊबदार सुखकारक वाटते. उन्हाळ्यात तेच त्रासदायक ठरते पण हे काही सुख आणि

दु:खाबाबत बोलता येत नाही. सुख हे नेहमीसाठी सुखच असते तर दु:ख हे सदा न कदा दु:खरुपच असते.

3) **आगमापायिन:** शीत-ऊष्ण काय आणि सुख-दु:ख काय हे काही कायमस्वरुपाचे नाहीत. यांचे आवागमन सुरुच असते. ते येतात आणि जातात. यांची उत्पत्ती होते. यांचा विनाश होतो. हिवाळ्यात थंडी असते. हिवाळा संपला की उन्हाळा येतो. उन्हाळाही काही कायम टिकणारा नाही. सुख आणि दु:खांचेही असेच तर आहे.

4) **अनित्या:** अशा प्रकारे शीत-उष्ण किंवा सुख-दु:ख अनित्य आहेत.

5) **तान् तितिक्षस्व:** हे नित्य नाहीत. यामुळे याना महत्व न देता सहन करत रहायचे. यांच्या अधीन काही होऊ नये हे मात्र निश्चित! या प्रयोगातूनच यांच्या प्रभावातून मुक्त होता येईल. यांच्यावर विजय प्राप्त करुन घ्यायचा हाच एकमेव मार्ग होय!

: 15 :

***यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।***
***समदु:खसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पुरुषर्षभ:** हे पुरुषांमध्ये श्रेष्ठ अर्जुना
- **हि:** पण, परंतु, कारण
- **समदु:खसुखं:** सुख-दु:खाला समान मानणारे
- **यं:** ज्या
- **धीरं:** बुध्दीमान, धैर्यशाली
- **पुरुषं:** पुरुषाला
- **एते:** हे शीत-उष्ण, सुख-दु:ख
- **न:** नाही
- **व्यथयन्ति:** विचलित करत, व्याकुळ करत
- **स:** तो पुरुष
- **अमृतत्वाय:** अमर, मुक्त होण्यासाठी, मोक्षासाठी
- **कल्पते:** समर्थ होतो, योग्य ठरतो

**अर्थ**

कारण हे श्रेष्ठ पुरुषा, सुख-दु:ख समान मानणाऱ्या ज्या धैर्यशाली पुरुषाला हे इंद्रियांचे विषयांशी संयोग व्याकुळ करीत नाहीत, तो मोक्षाला योग्य असतो.

***ह्यांची मात्रा न चाले चि ज्या धीर पुरुषावरी***
***सम देखे सुखें दु:खें मोक्ष-लाभास योग्य तो ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत

**स्पष्टीकरण**

1) सुख असो वा दु:ख. अनुकूल परिस्थिती असो वा प्रतिकूल. न व्यथयन्ति म्हणजे याचा चित्तावर परिणाम होऊ देऊ नये.

2) समदु:खसुखं: सुख-दु:खात चित्ताची समता कायम ठेवावी.

3) हे साधले की झाले. अमृत-त्वाय**:** पुरुष मग मोक्षाला योग्य. आत्म स्वरुपाची ओळख करुन घ्यायला समर्थ ठरतो. मग मोक्षप्राप्ती, म्हणजे अखंड शांतता. परम शांतता.

: 16 :

***नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत: ।***
***उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभि: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **असत:** जी वस्तु अस्तित्वात नाही, परिवर्तित होत जाणारी आहे
- **भाव:** त्या वस्तुचे अस्तित्व
- **न:** नाही
- **विद्यते:** रहातो
- **सत:** आणि जी वस्तु अस्तित्वात आहे, परिवर्तित होत नाही, बदलत नाही
- **अभाव:** त्या वस्तुचा अभाव कधी
- **न:** नाही
- **विद्यते:** होतो
- **अनयो:** या
- **उभयो:** दोन वस्तुंचा म्हणजे सत् आणि असत् या दोन वस्तुंचा
- **अपि:** ही
- **अन्त:** निर्णय, तत्त्व
- **तत्त्वदर्शिभि:** ज्ञानी पुरुषांनी
- **दृष्ट:** अनुभव घेतला

**अर्थ**

असत् वस्तुला अस्तित्व नाही आणि सत् वस्तुचा अभाव नसतो. अशा रीतीने या दोहोंचेही सत्य स्वरुप तत्त्वज्ञानी पुरुषानी पाहिले आहे.

*नसे मिथ्यास अस्तित्व नसे सत्यास नाश हि।*
*निवाडा देखिला संतीं ह्या दोहींचा अशापरी॥*

**स्पष्टीकरण**

**असतः भावः न विद्यते, सतः अभावः न विद्यते** - या श्लोकात भगवंतांनी संपूर्ण जगाची तपासणी केली आहे. शोध घेतला आहे. हे जगत विराट आहे. व्यापक आहे. याची रचना आश्चर्यकारक आहे. हे कुणी बनवले? याचा कुणी कर्ता-निर्माता असू शकतो की नाही? हे आपोआप तर बनले नसेल ना? हे जगत रोज बदलणारे आहे. हे बदलणारे कुणा न बदलणाऱ्याच्या आधारेच टिकू शकते, नाही? उदाहरणार्थ कुंभाराने मातीचे हजारो घट बनवले. प्रत्येक घट दुसऱ्याहून वेगळा आहे, पण माती तीच. ती सर्वांमध्ये सारखीच आहे. घट मात्र वेगळे-वेगळे. जे बदलत नाही ते 'सत्'. जे बदलते ते 'असत्'. सत् हे कारण. असत् हे कार्य. कारणामुळे वस्तु बनते. अखेर कारणात विलीन होऊन जाते. माती हे कारण. घट हे कार्य.

भगवान म्हणतात की असत् वस्तु 'सत्य' वाटू लागते. ती सदा बदलती असते. यामुळे तिचे अस्तित्व नसते. ही गोष्ट घटावर लागू होते. जगावरही लागू होते. जगदेखिल कार्य आहे. बदलते आहे. त्याचे काहीतरी कारण असले पाहिजे. कारण न बदलणारे असले पाहिजे. दिसणारे सारेच पदार्थ 'कार्य' आहेत. विनाशी आहेत.

दुसरी गोष्ट अशी की कार्य कारणाहून विलग राहू शकत नाही. कार्य कारणरुप असते. घट म्हणजे मातीच. घटाच्या अणु-रेणूत मातीच तर सामावलेली आहे. दुसरे-तिसरे काहीही नाही. जगत हे कार्य आहे. ते आपल्या कारणाहून वेगळे राहू शकत नाही.

काय असावे बरे जगाचे कारण? काहीही असो. ते जर सगुण असेल तर विनाशी असेल. इंद्रियगम्य असेल तर विनाशी असेल. जगाची प्रत्येक वस्तु विनाशी आहे. परिवर्तनशील आहे. यामुळे जगाचे कारण सगुण नसेल. इंद्रियगम्य नसेल. ते निर्गुण असेल. इंद्रियांनी त्याला ओळखता येणार नाही. जगाचे कारण निराकार असेल. निर्विकार असेल. निरवयव म्हणजे अवयवरहित असेल. या सत् रुपालाच 'परमात्मा' म्हणतात, 'ब्रह्म' म्हणतात.

सत् शब्दाचा अर्थ आहे असणे-होणे. असत् कधी अस्तित्वात नसते. सत् स्वरुपी परमात्मा चैतन्यमय आहे. जड वस्तु जडाला निर्माण करु शकत नाही. चैतन्यशाली कुंभार जड घटाला बनवतो. चैतन्यमय परमात्मा या जड जगताची निर्मिती करतो. परमात्म्याचे स्वरुप सत् आहे, तसेच चित् आहे. आनंद आहे म्हणून परमात्मा सत्-चित्-आनंद म्हणजे सच्चिदानंद आहे.

**तत्त्वदर्शिभिः** जगाचे मूळ कारण सत् स्वरुप परमात्मा. ते तत्व. याचा अनुभव ज्यांनी घेतला ते धन्य. ते सत् आणि असत् या दोन्ही रुपांचा निर्णय घेऊ शकतात. अनुभवी पुरुषांचे वचन प्रमाण असते. अखेर त्यांच्या वचनाचीच तर शास्त्रे बनतात. तर्क मांडले जातात. यामुळे भगवान ज्ञानी पुरुषांचा हवाला देतात.

: 17 :

*अविनाशि तु तद्विध्दि येन सर्वमिदं ततम्।*
*विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तुः** पण, परंतु
- **येनः** ज्या तत्त्वाने
- **इदंः** हे
- **सर्वंः** संपूर्ण जगत
- **ततंः** व्याप्त आहे
- **तत्ः** त्याला म्हणजे सत्ला
- **अविनाशिः** अविनाशी
- **विध्दिः** समजा
- **अस्यः** या
- **अव्ययस्यः** अव्यय म्हणजे अविनाशी तत्त्वाचा, परमात्म्याचा
- **विनाशंः** विनाश
- **कर्तुम्ः** करण्याला
- **कश्चित्ः** कुणीही
- **नः** नाही
- **अर्हतिः** समर्थ होतो

**अर्थ**

ज्याने हे सर्व जग दिसणाऱ्या सर्व वस्तु व्यापल्या आहेत, त्याचा नाश नाही, हे तू लक्षात ठेव. त्या अविनाशीचा नाश कोणीही करु शकत नाही.

***ज्यानें हें व्यापिले सर्व तें जाण अविनाश तूं***
***नाश त्या नित्य-तत्त्वाचा कोणी हि न करुं शके ।***

**विषय:** इथे भगवंतांनी चार गोष्टी सांगितल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) मागील श्लोकात ज्या परमात्याचे सत् म्हणून वर्णन केले होते त्याला इथे तत् म्हटले आहे. सतराव्या अध्यायाच्या अखेरीस 'ॐ तत् सत्' असे वर्णन येते. 'तत्' म्हणजे अलिप्तता. परमात्मा अलिप्त आहे.

2) हा अलिप्त असल्यामुळे सर्वत्र व्याप्त आहे

3) हा सत् आणि तत् स्वरुपी परमात्मा अविनाशी आहे. तो सत् म्हणजे सर्वत्र सतत विद्यमान असल्यामुळे आणि तत् म्हणजे अलिप्त असल्यामुळे सर्वत्र असल्यामुळे ती नष्ट होण्यासारखी वस्तु नाही.

4) अशा प्रकारे परमात्मा अविनाशी आहे. त्याचा कुणीही नाश करु शकत नाही. जी वस्तु क्षीण असते तिचा नाश केला जाऊ शकतो पण परमात्मा कधीही क्षीण होत नसल्यामुळे त्याचा कदापि नाश संभवत नाही. तो सतत विद्यमान आहे. ती नष्ट होण्यासारखी वस्तु नाही. त्याचा नाश करायला कुणीही समर्थ नाही. निष्कर्ष असा आहे की 1) परमात्मा सर्वांचे कारणरुप आहे. 2)परमात्म्याचे काही कारण नाही. 3) जगातले तमाम पदार्थ भगवंताची कार्ये आहेत आणि 4) परमात्मा कुणाचे कार्य नाही म्हणजे परमात्म्याला कुणी बनवले नाही.

: 18 :

***अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिण: ।***
***अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद् युध्यस्व भारत ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **नित्यस्य:** नित्य
- **अनाशिन:** अविनाशी
- **अप्रमेयस्य:** प्रमाणांचा विषय कदापि बनू शकत (शकणार) नाही असा स्वयंसिध्द
- **शरीरिण:** देहात रहाणाऱ्या आत्म्याचे
- **इमे:** या
- **देहा:** सर्व देह म्हणजे बाह्य पदार्थ
- **अन्तवन्त:** उक्ता: नष्ट होणारे आहेत, असे ज्ञानवंतांनी सांगितले आहे
- **तस्मात्:** त्यामुळे
- **भारत:** हे अर्जुना
- **युध्यस्व:** तू युध्द कर, तू जे तुझे कर्तव्य निश्चित केले आहे त्याचे पालन करत रहा

**अर्थ**

या नाशरहित, मोजता न येणाऱ्या, नित्यस्वरुप जीवात्म्याची ही शरीरे नाशवंत आहेत, असे म्हटले गेले आहे, म्हणून हे भरतवंशी अर्जुना, तू युध्द कर.

***विनाशी देह हे सारे बोलिले त्यांत शाश्वत ।***
***नित्य नि:सीम तो आत्मा अर्जुना झुंज ह्यास्तव ॥***

**स्पष्टीकरण**

जगाचे भाग दोन. पिंड आणि ब्रह्मांड. पिंड म्हणजे आपले शरीर. ब्रह्मांड म्हणजे शरीराव्यतिरिक्तचे जगातले शेष सारे पदार्थ. परमात्मा दोन्ही ठिकाणी वसतो. पिंडाच्या ठायी वसतो. ब्रह्मांडाच्या ठायीही वसतो. पिंडाच्या ठायी वसतो **आत्मा** आणि ब्रह्मांडाच्या ठायी वसतो **परमात्मा** वा **ईश्वर**. पिंड नाशवान आहे. ब्रह्मांडातील सारे पदार्थही नाशवान आहेत.

**अप्रमेयस्य:** मागील श्लोकात परमात्म्याला नित्य आणि अविनाशी म्हटले आहे. परमात्मा अप्रमेय आहे. म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या प्रमाणांनी जाणता येणार नाही असा आहे. ज्ञानाच्या साधनांनी कळू शकणार नाही असा आहे. ज्ञान प्राप्त करुन घ्यायची साधने दोन. बाह्य साधन आणि आंतरिक साधन. पंच ज्ञानेंद्रिये ही ज्ञान प्राप्तीची बाह्य साधने होत. मन आणि बुध्दी ज्ञान प्राप्त करुन घेण्याची आंतरिक साधने म्हटली जातात. बाह्य साधनांनी म्हणजे पंच ज्ञानेंद्रियांनी स्थूल वस्तुचे दर्शन होते. आंतरिक साधनांनी म्हणजे मन-बुध्दीने सूक्ष्म वस्तुचे आकलन होते. परमात्मा अतिसूक्ष्म आहे. उपनिषद म्हणते **'यतो वाचो**

**निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह**' मनासोबत परमात्मतत्वापर्यंत पोहोचता येत नाही यामुळे वाणी परमात्म्यापासून निवृत्त होते. परत येते. पोहोचू शकत नाही.

मन काय आणि बुध्दी काय, केवळ चिंतन करुन परमात्म्याप्रत पोचता येत नाही हेच खरे. मन आणि बुध्दीच्या ठायी काम-क्रोध आदि विकार आहेत. त्यांना क्षीण करावे लागेल. यामुळे मन अतिशुध्द बनेल. मग परमात्म्याचा अनुभव घेता येईल. शंकराचार्य म्हणतात- **शास्त्राचार्योपदेश-शमदमादिषु संस्कृतं मन आत्मदर्शने कारणम्।** अर्थात् शास्त्र ज्ञान मिळवावे. अनुभवी आचार्यांचा उपदेश ग्रहण करावा. यामुळे मन शांत होईल. चित्त निर्मळ बनेल. मग ते आत्मदर्शनाचे साधन बनू शकेल.

शंकराचार्यांनी सहा उपाय सांगितले. 'साधन षट्क' सांगितले आहे. **शम. दम. उपरति** म्हणजे वैराग्य. **तितिक्षा** म्हणजे सहिष्णुता. **समाधान. श्रध्दा** म्हणजे ईश्वर आहे हा विश्वास. श्रध्दा म्हणजे आस्तिक बुध्दी. अशा प्रकारे शम, दम, उपरति, तितिक्षा, समाधान, श्रध्दा हे सहा उपाय 'साधन षट्क' सांगितले आहेत.

**उक्ता:** इथे भगवंतांनी विवेकी पुरुषांचा म्हणजे ज्ञानवंतांचा म्हणजे शास्त्रांचा हवाला दिला आहे. अखेर ज्ञानी पुरुषांच्या वचनानी तर शास्त्र बनते आणि तेच सर्वांसाठी प्रमाण आहे.

**युध्यस्व** अठराव्या श्लोकात शब्द आला **'युध्यस्व'** म्हणजे युध्द कर. याचा अर्थ काय? परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाले. माणूस ज्ञानी बनला, मग काय युध्द करायचे? या संबंधी विद्वानांचे एकमत नाही. शंकराचार्य म्हणतात **नहि अत्र युध्दकर्तव्यता विधीयते। युध्दे प्रवृत्त एव हि असौ शोकमोहप्रतिबध्द: तूष्णीम् आस्ते तस्य कर्तव्यप्रतिबंधापनयनमात्रं भगवता क्रियते। तस्मात् 'युध्यस्व' इति अनुवादमात्रं न विधि:।** अर्थात् इथे युध्द करा असे विधान केले गेलेले नाही कारण की अर्जुन तर आधीपासूनच युध्दप्रवृत्त आहे पण तो शोक आणि मोहाच्या प्रभावामुळे गुपचुप बसला आहे. यामुळे अर्जुनाच्या कर्तव्य-अकर्तव्य प्रतिबंधाला भगवान केवळ दूर करताहेत. यामुळे 'युध्द कर' हा आपला संकल्प कृष्णाने पुनश्च उच्चारला.

प्राचीन काळी युध्द करणे क्षात्र-धर्म होता. त्याकाळी युध्द शस्त्रास्त्राने होत असत. युध्द म्हणजे अन्यायाचा प्रतिकार. युध्द म्हणजे अधर्माचा प्रतिकार. युध्द म्हणजे अनीतीचा प्रतिकार. गीता काही युध्दशास्त्राचा ग्रंथ नाही. युध्द म्हणजे स्वकर्तव्य! शंकराचार्य म्हणतात **शोक मोहादिसंसारकारणनिवृत्त्यर्थं, गीताशास्त्रम्, न प्रवर्तकम्।** म्हणजे गीता शोक-मोह घालविण्यासाठी आहे. जगाच्या मूळ कारणांना दूर करण्यासाठी आहे. जगाच्या निमित्त कारणाना घालवण्यासाठी आहे. युध्दात प्रवृत्त करण्यासाठी नव्हे! गीता कर्तव्य तत्परता शिकवणारा ग्रंथ आहे युध्द करायला भाग पाडणारा ग्रंथ नव्हे.

: 19 :

***य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम्।***
***उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य:** जो काही
- **एनं:** या परमात्म्याला
- **हंतारं:** हनन करणारा
- **वेत्ति:** मानतो
- **च:** आणि
- **य:** जे
- **एनं:** या आत्म्याला
- **हतं:** मेलेला
- **मन्यते:** मानतो
- **तौ:** ते
- **उभौ:** दोघे पुरुष
- **न:** काही नाही
- **विजानीत:** जाणत
- **अयं:** हा आत्मा
- **न हंति:** मारत नाही म्हणजे तो कुठल्याही क्रियेचा कर्ता नाही
- **न हन्यते:** आणि मरत सुध्दा नाही, तो कुठल्या क्रियेला वश होत नाही

## अर्थ

जो या आत्म्याला मारणारा असे समजतो तसेच जो 'हा (आत्मा) मेला' असे मानतो ते दोघेही अज्ञानी आहेत कारण हा आत्मा वास्तविक पाहता कोणाला मारत नाही आणि कोणाकडून मारला जात नाही.

*जो म्हणे मारितो आत्मा आणि जो मरतो म्हणे।*
*दोघे न जाणती कांही न मारी न मरे चि हा ॥*

## स्पष्टीकरण

एकोणिसावा श्लोक अद्भुत आहे. यात आधी आत्म्याचे आणि परमात्म्याचे अकर्तेपण येते. आपण नाना कर्मे करतो. स्वत:ला कर्ता मानतो. खरे तर आत्मा कर्ता नाही. परमात्माही कर्ता नाही. खरे तर सारे परमात्मरुप. अज्ञानामुळे आपण देहाला आत्मस्वरुप मानतो. कुणाला मन आत्मस्वरुपी वाटते. कुणी बुध्दीला आत्मरुपी मानतात. अग्नीचे स्वरुप उष्णता आणि प्रकाश. तसे आपले स्वरुप काय? कुठलाही पदार्थ आपल्या स्वरुपाशिवाय नसतो. देहाला आपले स्वरुप मानणे अज्ञान आहे पण यामुळे काही आपले मूळचे स्वरुप लोप पावत नाही. ते देह वगैरेंपासून वेगळे आहे. आपण अकर्ते आहोत ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी.

दुसरी गोष्ट ही की आपण कुठल्याही गोष्टीचे कर्ते नाहीहोत. यामुळे कुठल्याही कर्माच्या अधीन नाहीहोत. आपण कर्ता नाहीहोत. आपण कुणाकडून काही कर्मही करवून घेत नाहीहोत. स्वत: करणे ही वेगळी गोष्ट. कुणापासून करवून घेणे ही वेगळी गोष्ट. आपण कुणाकडून काही करवून घेतो आणि स्वत:ला कर्ता मानतो. कर्माच्या अधीन मानतो. असा पुरुष अज्ञानी होय. या दोन गोष्टी या श्लोकात येतात. या बाबतीतली तिसरी गोष्ट भगवंतांनी एकविसाव्या श्लोकात सांगायचे ठरवले आहे. आपण सर्व क्रियांचे ज्ञानी असू शकतो, कर्ते नव्हेत. आपण जर कर्ता बनलो तर मग आपल्याला सुख-दु:खाचा भोक्ताही बनावे लागेल पण आपण कर्ता नाहीहोत हे खरे. आपण भोक्ता नाहीत हे खरे. हे कळले तर मग आपण ज्ञाता ठरु. अकर्ता मानणे हेही एक प्रकारचे भान आहे. हे नको.

: 20 :

*न जायते म्रियते वा कदाचिन्ना यं भूत्वा भविता वा न भूय:।*
*अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥*

## अन्वय आणि शब्दार्थ

- **अयं:** हा आत्मा
- **कदाचित्:** कधी कधी,अधुन मधून, केव्हाही
- **न जायते:** उत्पन्न होत नाही
- **वा:** किंवा, अथवा
- **कदाचित्:** कधीही
- **न म्रियते:** मरत नाही
- **अयं:** हा आत्मा
- **भूत्वा:** भूतकाळी उत्पन्न होऊन
- **भूय:** फिरुन, पुनश्च
- **भविता:** भविष्यकाळात उत्पन्न होणारा
- **न:** नाही
- **अयं:** हा आत्मा
- **अज:** कधी जन्म न घेणारा
- **नित्य:** यामुळे कायम रहाणारा
- **शाश्वत:** अक्षय आहे
- **पुराण:** अनादी काळापासून चालत आला आहे
- **शरीरे:** देहात
- **हन्यमाने:** परिवर्तन (नाश) झाल्यावर
- **अपि:** ही
- **न हन्यते:** आत्म्याच्या ठायी परिवर्तन होत नाही

## अर्थ

हा आत्मा कधीही जन्मत नाही आणि मरतही नाही, तसेच हा एकदा उत्पन्न झाल्यावर पुन्हा उत्पन्न होणारा नाही, कारण हा जन्म नसलेला, नित्य, सनातन आणि प्राचीन आहे. शरीर मारले गेले तरी हा मारला जात नाही.

*न जन्म पावे न कदापि मृत्यु*
*होऊनि मागें न पुढें न होय*
*आला न गेला स्थिर हा पुराण*
*मारोत देहास परी मरे ना।*

### स्पष्टीकरण

परमात्मा निर्गुण, निराकार, निरवयव, निर्विकार आहे. त्याचे शब्दात वर्णन करणे खूपच अवघड आहे. तरीही भगवंतानी विविध शब्दात वर्णन केले आहे.

सृष्टीच्या सर्व पदार्थांमध्ये सहा विकार आहेत. 1) **जायते:** म्हणजे पदार्थाची निर्मिती होणे. 2) **अस्ति:** म्हणजे नष्ट होईपर्यत पदार्थात वृध्दी होत रहाणे. 3) **वर्धन:** म्हणजे पदार्थात वृध्दी होत रहाणे. 4) **विपरिणमते:** म्हणजे वस्तुत परिवर्तन होत रहाणे. 5) **अपक्षीयते:** म्हणजे पदार्थाचे क्षीण होणे आणि 6) **नश्यति:** म्हणजे पदार्थाचे नष्ट होणे. हे सहा विकार परमात्म्याच्या ठायी नसतात.

: 21 :

*वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।*
*कथं स पुरुष: पार्थ कं घातयति हंति कम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **पार्थ:** हे अर्जुना
- **य:** जो, पुरुष
- **एनं:** परमात्म्याला
- **अविनाशिनं:** अविनाशी
- **नित्यं:** नित्य
- **अजं:** अजन्मा
- **अव्ययं:** अक्षीण
- **वेद:** अनुभव घेतो
- **स:** तो
- **पुरुष:** पुरुष
- **कं:** कुणाला
- **कथं:** कसे
- **हंति:** मारेल? म्हणजे क्रियेचा कर्ता कसा काय बनेल?
- **कं:** कुणाला
- **कथं:** कशा प्रकारे
- **घातयति:** हत्या करवेल, म्हणजे कुणाकडून क्रिया कशी काय करवुन घेईल?

### अर्थ

हे पार्था, जो पुरुष, 'हा आत्मा नाशरहित, नित्य, न जन्मणारा व न बदलणारा आहे' असे जाणतो, तो कोणाला कसा ठार करवील किंवा कोणाला कसा ठार करील?

*निर्विकार चि हा नित्य जन्म-मृत्यूंहुनी पर ।*
*जाणे हें तत्त्व तो कैसा मारी वा मारवी कुणा ।*

### स्पष्टीकरण

19 व्या श्लोकात सांगितले आहे की आत्मा काय आणि परमात्मा काय दोघेही कुठल्याही क्रियेचे कर्ते नसल्यामुळे ते कुठल्याही कर्माच्या अधीन नाही. आत्म्याच्या ठायी जसे अकर्तेपण आहे तसेच अकर्मपणही आहे. या श्लोकात एक तिसरी विशेषता सांगितली आहे की आत्मतत्व अकर्ता आहे. तो कुणाकडूनही काहीही करवून घेत नाही.

घटाच्या ठायी आकाश असते. ते घटाएवढे छोटे दिसते. घटाबाहेर मात्र आकाश व्यापक असते. या दोन्ही आकाशात काहीही अंतर नसते तसेच शरीरातल्या चैतन्याला आपण आत्मा म्हणतो. बाहेरच्या चैतन्याला परमात्मा म्हणतो. याला कुणी ईश्वर तर कुणी ब्रह्म म्हणतात.

परमात्म्याच्या ठायी दोन प्रकारच्या शक्ती असतात. एक चैतन्यशक्ती. या शक्तीला ज्ञानशक्ती म्हणतात. चैतन्यशक्ती ही परमात्मा. दुसरी असते क्रियाशक्ती. क्रियाशक्ती ही माया किंवा प्रकृती. चैतन्य शक्ती चुंबकासारखी असते. क्रियाशक्ती म्हणजे जगत् निर्माण करण्याची शक्ती होय. ही लोखंडासारखी असते. चुंबकाला काही करावे लागत नाही. त्याच्या केवळ अस्तित्वामुळे लोखंडाच्या ठायी क्रियाशक्ती जागते. चलन-वलन जागते. क्रियाशक्ती म्हणजे जगताचा भास घडवून आणण्याची शक्ती. ही क्रियाशक्ती चैतन्यशक्तीच्या नियंत्रणाखाली कार्यरत असते. अशा प्रकारे जगाच्या तमाम क्रियांचे कर्तेपण मायेच्या ठायी एकवटते. परमात्म्याच्या चैतन्यशक्तीला काहीही करावे लागत नाही. यामुळे परमात्म्याला अकर्ता म्हणायचे. मायेमुळे शरीराचा भास होतो. मायेच्या प्रभावामुळे मन आणि बुध्दीचा भास होतो. मायेच्या शक्तीमुळे इंद्रियांचा भास होतो. यामुळे शरीरातला आत्मा या सर्वांच्या क्रियांचा कर्ता नसतो. म्हणून आत्माही अकर्ता. म्हणजे परमात्मा व आत्मा दोघे अकर्ता. या सर्वांच्या क्रियांची कर्ती कोण? तर या प्रश्नाचे

उत्तर आहे माया किंवा प्रकृती. यामुळे आत्मा अकर्ता आहे. तो ना काही करत ना कुणाकडून काही करवून घेत. तो कर्माला वश होत नाही. शरीर करते. मन करते. इंद्रिये करतात. हे मायाप्रेरित आहेत. करणे-करवणे मायेमुळे घडते. कर्माच्या अधीन होणे मायेमुळे घडते.

: 22 :

*वासांसि जीर्णानि यथा विहाय*
*नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।*
*तथा शरीराणि विहाय जीर्णा-*
*न्यन्यानि संयाति नवानि देही ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा:** ज्या प्रकारे, जसे
- **नर:** पुरुष
- **जीर्णानि:** फाटक्या, जुन्या, जीर्ण झालेल्या
- **वासांसि:** वस्त्रांना, कपड्यांना
- **विहाय:** सोडून देऊन
- **अपराणि:** दुसऱ्या
- **नवानि:** नव्या वस्त्रांना
- **गृह्णाति:** धारण करतो
- **तथा:** तसेच, त्या प्रकारे
- **देही:** आत्मा
- **जीर्णानि:** जीर्ण
- **शरीराणि:** देहांना, शरीरांना
- **विहाय:** सोडून देऊन
- **अन्यानि:** दुसऱ्या, अन्य
- **नवानि:** नव्या देहांना, नव्या शरीरांना
- **संयाति:** धारण करतो

**अर्थ**

ज्याप्रमाणे माणूस जुनी वस्त्रे टाकून देऊन दुसरी नवी वस्त्रे घेतो, त्याचप्रमाणे जीवात्मा जुनी शरीरे टाकून दुसऱ्या नव्या शरीरात जातो.

*सांडूनियां जर्जर जीर्ण वस्त्रें*
*मनुष्य घेतो दुसरीं नवीन*
*तशीं चि टाकूनि जुनीं शरीरें*
*आत्मा हि घेतो दुसरीं निराळीं*

**स्पष्टीकरण**

आपण जुनी वस्त्रे टाकून देतो. आपण कायम असतो. वस्त्रे बदलतात. अशा प्रकारे आपला देह बदलत असतो. या श्लोकात देहासाठी बहुवचनी प्रयोग केला गेला आहे. अनेक देहात वसणारा देहधारी आत्मा. सृष्टीत जेवढे म्हणून काही पदार्थ आहेत. ते सारे परमात्म्याचे शरीर होत. देह नष्ट होतात. आतला आत्मा कायम असतो. नट बदलत नसतो. भूमिका बदलतात. न बदलणाऱ्या वस्तुच्या आधारेच बदलणारी वस्तु टिकू शकते. बदलणारी वस्तु नेहमी बदलतच राहील कारण बदलणे हा तिचा स्वभाव आहे. तसेच परमात्मा कधीच बदलत नसतो. देहरुपी भूमिका बदलतात, नष्ट होतात.

: 23 :

*नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: ।*
*न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुत: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एनं:** या आत्म्याला, परमात्म्याला
- **शस्त्राणि:** शस्त्र
- **न:** नाही
- **छिन्दन्ति:** छेदू शकत, तोडू शकत
- **एनं:** याला
- **पावक:** अग्नी
- **न:** नाही
- **दहति:** जाळू शकत
- **एनं:** याला
- **आप:** पाणी
- **न:** नाही
- **क्लेदयन्ति:** भिजवू शकत
- **च:** आणि
- **मारुत:** वायु
- **न:** नाही
- **शोषयति:** सुकवू शकत, वाळवू शकत

**अर्थ**

या आत्म्याला शस्त्रे कापू शकत नाहीत, विस्तव जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वारा वाळवू शकत नाही.

*शस्त्रें न चिरिती ह्यास ह्यास अग्नि न जाळितो*
*पाणी न भिजवी ह्यास ह्यास वारा न वाळवी ॥*

**स्पष्टीकरण**

ही चार महाभूते एकमेकांचे सखे आहेत, मित्र आहेत, शत्रु नव्हेत. पाण्याला वारा सुकवून टाकील. अग्नी नष्ट करुन टाकील. पाणी अग्नीला विझवून टाकील. पृथ्वी वाऱ्याला हरवून टाकील. हवा वृक्षाना उखडून टाकील. स्वतंत्रपणे ही चार महाभूते एकमेकांना मदतरुप ठरत नाहीत पण आपल्या देहात ईश्वर प्रकटला आहे यामुळे देहात ही चारी एकमेकाना संपूर्ण सहाय्य करतात. आपापल्या मर्यादेत रहातात. परमात्मा निर्विकार असतो. यामुळे या चारी महाभूतांचा त्यावर काहीही परिणाम होत नाही. शरीर स्वस्थ रहाते. निरोगी रहाते.

: 24 :

*अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।*
*नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयं:** हा परमात्मा
- **अच्छेद्य:** शस्त्रांनी छेदन न करता येण्याजोगा आहे
- **अयं:** हा
- **अदाह्य:** आगीत न जळण्यायोग्य आहे
- **च:** आणि हा
- **अक्लेद्य:** पाण्याने ओला होण्याजोगा नाही
- **अशोष्य:** एव: हवेने सुकू शकेल असा नाही
- **अयं:** हा
- **नित्य:** नित्य आहे
- **सर्वगत:** सर्वव्यापक, सर्वत्र भरलेला
- **स्थाणु:** स्थिर
- **अचल:** अचल, न हलणारा
- **सनातन:** अखंड रहाणारा आहे

**अर्थ**

कारण हा आत्मा कापता न येणारा, जाळता न येणारा, भिजवता न येणारा आणि नि:संशय वाळवता न येणारा आहे. तसेच हा आत्मा नित्य,सर्वव्यापी, अचल, स्थिर रहाणारा आणि सनातन आहे.

*चिरवे जाळवे ना हा भिजवे वाळवे हि ना ।*
*स्थिर निश्चळ हा नित्य सर्व-व्यापी सनातन ॥*

**स्पष्टीकरण**

मागील श्लोकातला विचारच या श्लोकाच्या पहिल्या चरणात सांगितला गेला आहे. गीतेत एक विषय वेगवेगळ्या शैलीत सांगायची पध्दत दिसून येते. याचे स्पष्टीकरण शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात मोठ्या मार्मिक शैलीत केले आहे. ते म्हणतात **दुर्बोधत्वादात्मवस्तुनः पुनः पुनः प्रसंगमापाद्य शब्दान्तरेण तदेव वस्तु निरुपयति भगवान वासुदेवः । कथं तु नाम संसारिणामव्यक्तं तत्त्वं बुध्दिगोचरतामापन्नं सत्संसार-निवृत्तये स्यादिति ।** अर्थात् आत्मवस्तुचे ज्ञान प्राप्त करणे खूप अवघड असल्यामुळे भगवान वासुदेव प्रापंचिक जीवांना परमात्मतत्त्व बुध्दिगोचर होऊन (बुध्दीला परमात्मस्वरुपाची ओळख होऊन) कशा प्रकारे समस्त जीवांची प्रापंचिक निवृत्ती होईल या विचाराने पुनः पुनः प्रसंग उपस्थित करुन खरी वस्तु वेगवेगळ्या शब्दात समजावून सांगताहेत.

मागील श्लोकात परमात्म्याला नित्य हे विशेषण जोडले होते. इथे सांगताहेत की परमात्मा नित्य असल्यामुळे सर्वगत म्हणजे सर्वत्र म्हणजे अणु परमाणूत व्याप्त आहे. परमात्मा नित्य आहे. अणु-अणुच्या ठायी व्याप्त आहे. जी वस्तु नित्य असते, ती व्यापक असतेच असते. सर्वव्यापक असल्यामुळे स्थाणु आहे म्हणजे स्थिर आहे. अचल आहे. सनातन आहे म्हणजे कुणापासून ते उत्पन्न झालेले नाही. परमात्मा अनादि काळापासून आहे. खंड आहे.

: 25 :

*अव्यक्तोऽयमचित्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।*
*तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयं:** हा परमात्मा
- **अव्यक्त:** अव्यक्त, प्रत्यक्ष दिसून न येणारा, इंद्रियांना अगोचर असा
- **अयं:** हा परमात्मा

- **अचिन्त्य:** मनाचा अविषय
- **अयं:** हा परमात्मा
- **अविकार्य:** निर्विकार
- **उच्यते:** म्हटले गेला आहे, वर्णिला गेला आहे
- **तस्मात्:** त्यामुळेच
- **एनं:** याला
- **एवं:** अव्यक्त, अचिन्त्य आणि निर्विकार
- **विदित्वा:** जाणून, समजून
- **अनुशोचितुं:** शोक करणे
- **न अर्हसि:** तुझ्यासाठी योग्य नाही

**अर्थ**

हा आत्मा अव्यक्त आहे, अचिंत्य आहे आणि विकाररहित आहे, असे म्हटले जाते म्हणून हे अर्जुना, हा आत्मा वर सांगितल्याप्रमाणे आहे, हे लक्षात घेऊन तू शोक करणे योग्य नाही.

***न देखूं ये न चिंतूं ये बोलिला निर्विकार हा।***
***जाणूनि ह्यापरी आत्मा शोक योग्य नसे तुज ॥***

**विषय:** या श्लोकात परमात्म्याला अजून तीन विशेषणे जोडली आहेत. तो 'अव्यक्त', 'अचिंत्य' आणि 'अविकार्य' आहे.

**स्पष्टीकरण**

**अव्यक्त:** परमात्मा अव्यक्त आहे. दिसत नाही. परमात्मा पंचेंद्रियांचा साक्षी आहे. इंद्रियांचा ज्ञाता आहे. त्याला इंद्रियांच्या आधारे जाणून घेता येणार नाही. जो सर्व इंद्रियांचा साक्षी आहे, सर्व इंद्रियांचा ज्ञाता आहे त्याला इंद्रिये कसे काय जाणू शकतील? आपण चैतन्य स्वरुपी आहोत. सृष्टीच्या तमाम पदार्थांना जाणतोहोत. आपण देहाला जाणतो. देह आपल्याला जाणत नाही. आपण सूर्याला जाणतो. सूर्य काही आपल्याला जाणत नाही. आपण इंद्रियाना जाणतो. इंद्रिये का आपल्याला जाणतात? यामुळे परमात्म्याचे स्वरुप अव्यक्त आहे.

**अचिंत्य:** परमात्मा अचिंत्य आहे. इंद्रियांमुळे विषयाचे ज्ञान होते. मनाच्या मदतीमुळे हे ज्ञान होते. विषयाच्या ज्ञानाशिवाय का चिंतन करता येईल? कसे करता येईल? परमात्मा इंद्रियातीत आहे. त्यांचे चिंतन कसे बरे करता येईल? मन शुध्द झाले तर परमात्म्याचा अनुभव घेता येईल. यामुळे परमात्मा अनुभवगम्य आहे. निर्गुण परमात्मा चिंतनाच्या पल्याड आहे. सगुण परमात्मा उपासनेचा विषय बनतो. भक्तीसाठी चिंतनाचा विषय बनतो.

**अविकार्य:** परमात्मा अविकारी आहे. कुणाचा तो विकार नाही. तो निरवयव आहे. सावयव वस्तु विकारी बनते. तिच्या ठायी परिवर्तन होते. कापुस सावयव आहे. त्याचे सूत बनते. सूत सावयव आहे. त्याचे कापड बनते. परमात्मा निरवयव आहे. निर्विकारी आहे.

: 26 :

***अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्।***
***तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अथ च:** आता जर
- **त्वं:** तू
- **एनं:** परमात्म्याला
- **नित्यजातं:** नित्य उत्पन्न होणारे
- **वा:** किंवा, अथवा
- **नित्यं मृतं:** सदा नष्ट होणारे
- **मन्यसे:** मानले
- **तथापि:** तरीसुध्दा
- **महाबाहो:** हे अर्जुना
- **एवं:** अशा प्रकारे
- **शोचितुं:** शोक करणे
- **न अर्हसि:** तुझ्यासाठी योग्य नाही

**अर्थ**

परंतु जर तू आत्मा नेहमी जन्मणारा आणि नेहमी मरणारा आहे, असे मानत असशील तरीसुध्दा हे महाबाहो, तू अशा रीतीने शोक करणे योग्य नाही.

***अथवा पाहसी तूं हा मरे जन्मे प्रति-क्षणीं।***
***तरी तुज कुठें येथें नसे शोकास कारण ॥***

**स्पष्टीकरण**

बौध्द तत्वज्ञान आत्म्याला परिवर्तनशील मानते. नदीच्या प्रवाहात निरंतर नवीन पाणी येते पण प्रवाहरुप

पाणी मात्र नित्य असते. पाणी बदलते. प्रवाह कायम रहातो. तसेच आत्मा वा परमात्मा प्रतिक्षणी जन्माला येतो. हरघडी मरतो. असे मानून घेतले तर नित्य जन्म घेणे व नित्य मरणे हा आत्म्याचा स्वभाव ठरेल. यासाठी शोक करणे हा मूर्खपणाच ठरेल ना?

प्राचीन काळी जगाचा कर्ता कोण? तो जड आहे वा चेतन? जीवात्मा आणि परमात्मा यांचा संबंध कसा आहे? दोघे एक आहेत वा भिन्न-भिन्न? अशा प्रकारचे चिंतन खूप चालायचे. त्यात देहालाच आत्मा मानणाऱ्या चार्वाक मताने हे प्रस्थापित केले की आत्मा देहासोबत जन्माला येतो. देह नष्ट होताच आत्माही नष्ट होतो. बौध्द तत्वज्ञान आत्म्याला परिवर्तनशील मानते. कुणाचेही मत स्वीकारले तरी जन्म घेणे आणि मरणे आत्म्याचा स्वाभाविक धर्म आहे हेच ध्यानी येते. म्हणून त्याच्यासाठी शोक व्यक्तवणे व्यर्थ आहे.

: 27 :

*जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।*
*तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** कारण की
- **जातस्य:** ज्या वस्तुचा जन्म झाला
- **मृत्यु:** त्या वस्तुचे मरण
- **ध्रुव:** अटळ आहे
- **च:** आणि
- **मृतस्य:** जी वस्तु मेली आहे, तिचा परत जन्म
- **ध्रुव:** निश्चित आहे
- **तस्मात्:** यामुळे
- **अपरिहार्ये:** न टाळण्यायोग्य
- **अर्थे:** या विषयी, या विषयात
- **त्वं:** तुझे
- **शोचितुं:** शोक करणे
- **न अर्हसि:** उचित नाही, योग्य नाही

**अर्थ**

कारण असे मानल्यास त्यानुसार जन्मास आलेल्याला मृत्यु निश्चित आहे आणि मेलेल्याला जन्म मिळणे निश्चित आहे म्हणून या उपाय नसलेल्या गोष्टीविषयीही तू शोक करणे योग्य नाही.

*जन्मतां निश्चयें मृत्यु मरतां जन्म निश्चयें ।*
*म्हणूनि न टळे त्याचा व्यर्थ शोक करुं नको ॥*

**स्पष्टीकरण**

इथे मागील श्लोकातीलच विषय भगवान सांगताहेत. एखादी वस्तु जन्माला येते. तिचे मरण टाळता येत नाही. देह जन्माला येतो. नष्ट होतो. बीजापासून वृक्ष बनतो. वृक्ष जीर्ण होऊन नष्ट होतो. अशाप्रकारे जन्म-मरणाचे अनेक पदार्थ नष्ट होतात. नाना माणसे मरतात. त्या सर्वांचा का आपण शोक करतो? सर्वांसाठी का आपण अश्रु ढाळतो? नाही ना? पण या श्लोकात भगवान ममता सोडून शोक न करण्याविषयी सांगत नाहीत. ज्यांच्या बाबतीत आपल्या मनात ममता असते त्यांच्यासाठी आपण रडतो. ममता सुटली की शोक टळू शकतो. तसेच वस्तुचे मूळ रुप नष्ट होणारेच आहे. हे कळले तरी शोक टळू शकतो. देहाप्रमाणेच आत्म्यालाही नाशवान मानले तर दु:ख होणार नाही.

: 28 :

*अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।*
*अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **भूतानि:** भूतमात्र (सर्व प्राणीमात्र)
- **अव्यक्तादीनि:** उत्पत्तीच्या पूर्वी अव्यक्त रहातात
- **व्यक्तमध्यानि:** उत्पत्तीच्या नंतर मृत्यु येईपर्यंत मध्ये व्यक्त रहातात
- **अव्यक्तनिधनानि एव:** भूतमात्र वा पदार्थ नष्ट झाल्यावर पुनश्च अदृश्य होऊन जातात
- **तत्र:** अशी वस्तुस्थिती असल्यामुळे या बाबतीत
- **का:** कशासाठी?
- **परिदेवना:** शोक केला जावा? चिंता केली जावी?

**अर्थ**

हे अर्जुना, सर्व प्राणी जन्मापूर्वी अप्रगट असतात आणि मेल्यानंतरही अप्रगट होणार असतात फक्त मध्ये प्रगट असतात मग अशा स्थितीत शोक कसला करायचा ?

***भूतांचें मूळ अव्यक्ती मध्य तो व्यक्त भासतो***
***पुन्हां शेंवट अव्यक्ती त्यामधें शोक कायसा।***

**स्पष्टीकरण**

आपले शरीर जन्माला येण्यापूर्वी कुठे होते ? अव्यक्त होते. जन्मल्यावर दिसले मग बालपण, तारुण्य, वृध्दत्व आले मग शरीर नष्ट झाले. नष्ट झाल्यावर ते अव्यक्त झाले. जन्माआधी अव्यक्त. मरणानंतरही अव्यक्तच. जीवनकाळात थोडा वेळ व्यक्त. त्यासाठी शोक करणे व्यर्थ होय.

थोडा काळ जरी शरीर असले तरी शोक होणे स्वाभाविकच नाही का? असे कुणाला वाटेल याचे उत्तर शंकराचार्यांचे गुरु गौडपादाचार्य देतात. 'मांडुक्योपनिषदा' च्या कारिकेत ते म्हणतात की **आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा** अर्थात् उत्पत्तीपूर्वी आणि विनाशानंतर जो पदार्थ अव्यक्त असतो-नसतो-तो पदार्थ वर्तमानकाळातही अस्तित्वात नसतो. त्यांनी यासाठी मृगजळाचे उदाहरण दिले आहे. मृगजळ भासते. असत नाही. जन्मापूर्वी जळ नसते. नष्ट झाल्यावरही जळ नसते यामुळे दिसते तेव्हाही जळ नसतेच.

खरे तर देहासकट ब्रह्मांडातील तमाम पदार्थांचे अस्तित्व नाहीच मुळी. अन्यथा भूत, वर्तमान, भविष्य या तिन्ही काळात ते दिसले असते. त्यांचे वर्तमानकाळात थोड्या काळासाठी जे अस्तित्व दिसते-जाणवते-ते मिथ्या मानले जायला हवे. मध्येच या वस्तुचे अस्तित्व दिसणे माया आहे. प्रकृतीचे कार्य आहे. मायेचे कार्यच भासमान करणे आहे. वस्तु सत्यरुपी नसतानाही जर सत्य वाटत असेल तर हे आपले अज्ञानच मानले जायला हवे.

: 29 :

***आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनम्आ***
***श्चर्यवद् वदति तथैव चान्य:।***
***आश्चर्यवद् चैनमन्य: श्रुणोति***
***श्रुत्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कश्चित्:** कुणी विरळ
- **आश्चर्यवत्:** आश्चर्याप्रमाणे
- **एनं:** परमात्म्याला
- **पश्यति:** बघतो
- **च तथा एव:** आणि तसेच
- **अन्य:** कुणी दुसरा
- **आश्चर्यवत्:** आश्चर्याप्रमाणे
- **वदति:** परमात्म्याविषयी समजावतो, सांगतो
- **च:** आणि
- **अन्य:** कुणी तिसरा
- **एनं:** या परमात्म्याला
- **आश्चर्यवत्:** आश्चर्य वाटावे असे
- **श्रुणोति:** ऐकतो आहे
- **च:** पण
- **एनं:** परमात्म्याविषयी
- **श्रुत्वा:** ऐकल्यावर
- **अपि:** ही
- **कश्चित्:** कुणी
- **न वेद एव:** याला जाणतच नाही

**अर्थ**

एखादा महापुरुषच या आत्म्याला आश्चर्याप्रमाणे पाहतो आणि तसाच दुसरा एखादा महापुरुष या तत्त्वाचे आश्चर्याप्रमाणे वर्णन करतो. तसेच आणखी एखादा अधिकारी पुरुषच याच्याविषयी आश्चर्याप्रमाणे ऐकतो आणि कोणी कोणी तर ऐकूनही याला जाणत नाहीत.

***आश्चर्य जो साच चि ह्यास देखे***
***आश्चर्य जो देखत ह्यास वर्णी***
***आश्चर्य जो वर्णन तें हि ऐके***
***ऐके तरी शून्य चि जाणण्याचें।***

**स्पष्टीकरण**

**आश्चर्यवत् एनं पश्यति** एकोणतिसावा श्लोक विशेष आहे. परमात्म्याला आश्चर्यकारकरित्या बघतो. या वाक्यात 'बघतो' हे क्रियापद आहे. याचा अर्थ ' दर्शन करतो' असा नसून परमात्म्याकडे वळतो असा आहे. जग जोवर सुखमय वाटते. दु:खरुप भासत नाही तोवर कोण बरे परमात्म्याकडे

वळेल? जगात माणसाच्या तीन एषणा असतात. एषणा म्हणजे इच्छा. एक पुत्रैषणा पुत्राची इच्छा. दुसरी वित्तैषणा धनाची इच्छा. तिसरी लोकैषणा मानाची इच्छा. पुत्र वा धनाची ज्यांना इच्छा नसते ते जनसेवेत रत होतात. त्यांना मग कीर्तीची इच्छा घेरुन घेते. निष्कामभावनेने सेवा कार्य करणारे कमी या वासना टाळून ईश्वराकडे वळणारे विरळ.

**आश्चर्यवत् एनं वदति:** परमात्म्याकडे वृत्ती झाली तरी ते तत्व जाणून घेणारे खूप कमी असतात. परमात्मा अतिसूक्ष्म आहे. अतींद्रिय आहे. जग जड आहे. परमात्मा चैतन्यमय आहे. जड वस्तुच जडाला जन्म देईल. चैतन्यापासून जड कसे जन्माला येईल? जीव आणि परमात्मा यांच्या ठायी भेद आहे की अभेद? भेद असेल तर त्याचे स्वरुप काय? असे नाना प्रश्न आहेत. याबाबत अनेक आचार्यांची वेगवेगळी मते आहेत. त्यांच्यात मतभेद आहेत. याबाबतीत शंकांचे निरसन व्हायला हवे. खरे ज्ञान प्राप्त व्हायला हवे पण ते सोपे नाही. याबाबत योग्य प्रकारे समजाऊन सांगणारेही विरळ आहेत असे खुद्द गीताकाराचेच मत आहे.

**आश्चर्यवत् एनं श्रुणोति:** बरे, खरे ज्ञान सांगणारा एकवेळ भेटेलही, हे ऐकून घ्यायची इच्छा असणारा भेटणे आणखीच कठीण आहे. जोवर जगापासून चित्त दूर होत नाही तोवर परमात्म्याकडे वृत्ती वळणार नाही. जोवर वृत्ती वळणार नाही तोवर त्याबाबतीत काही ऐकून घ्यायला कुणी कसा काय तयार होईल? शंकराचार्य म्हणतात **विरक्तस्य हि संसारात् भगवत्तत्त्वज्ञाने अधिकारो नान्यस्येति**। अर्थात् जगापासून जे विरक्त असतात असे लोकच परमात्मविषयक ज्ञानाचे अधिकारी असतात.

कठोपनिषदातून हा विचार (अध्याय 1/2/7) मांडला गेला आहे. उपनिषदे ही गीतेपेक्षा पुरातन आहेत. यामुळे हा श्लोक उपनिषदातूनच घेतला गेला आहे असे वाटते.

या श्लोकाचा आणखी एका प्रकारे अर्थ करता येईल. काही लोक परमात्म्याला अद्भुत दृष्टीने बघतात. ते जे काही बघतात त्या ठायी त्याना परमात्मतत्वाचे दर्शन होते. त्याची ब्रह्मांडरचना बघून ते आश्चर्यचकित होतात. स्थिर असलेली पृथ्वी गतिमान दिसते. आकाशात अगणित तारे दिसतात. काही तारे तर सूर्याहून मोठे आहेत. सूर्याच्या प्रचंड शक्तीमुळे सूर्याच्या उपासनेचा मोठा महिमा शास्त्रकारांनी वर्णिला आहे. आपल्या देहालाच बघू या. केवढे अद्भुत यंत्र आहे हे. यातले छोटेसे असणारे हृदय बघा, ते आमरण कार्यरत असते. अशी ही सृष्टी विविध रुपात्मक आहे. माणूस हे सारे बघून आश्यर्चचकित होतो. काही साधक याचे सविस्तारपणे वर्णन करतात. गोस्वामी तुलसीदास म्हणतात की

*असि सब भाँति अलौकिक करनी।*
*महिमा तासु जाइ नहिं बरनी॥*

परमात्म्याचे कर्तृत्व अलौकिक आहे. त्याचे वर्णन करता येत नाही. काही साधक परमात्म्याचे वर्णन गाताना तृप्त होत नाहीत. हे ऐकून त्यांचे चित्त आश्चर्याने भारले जाते म्हणून हे गुण वर्णन ऐकायलाही त्यांच्या मनी उत्कंठा कायम टिकून रहाते. खरे तर परमात्म्याचे तत्त्व इतके अद्भुत आहे की त्याचा अनुभव लाखातल्या केवळ एखाद्यालाच होऊ शकतो.

परमात्मा आणि आत्मा अमर आहेत आणि त्यांच्या आधारे असलेले संपूर्ण ब्रह्मांडातले देह विनाशी आहेत, क्षणभंगुर आहेत. असे पुढल्या श्लोकात सांगून या प्रकरणाचा समारोप करताहेत.

: 30 :

*देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत।*
*तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **अयं:** हे
- **देही:** देहधारी आत्मा
- **सर्वस्य:** सर्वांच्या
- **देहे:** देहात
- **नित्यं:** सदैव
- **अवध्य:** अवध्य म्हणजे अमर आहेत
- **तस्मात्:** यामुळे
- **त्वं:** तुझे
- **सर्वाणि:** सर्व
- **भूतानि:** प्राणीमात्रांसाठी
- **शोचितुं:** शोक करणे

- **अर्हसि:** उचित नाही

**अर्थ**

हे अर्जुना, हा आत्मा सर्वांच्या देहात नेहमीच अवध्य असतो म्हणून सर्व प्राण्यांच्या बाबतीत ते शोक करणे योग्य नाही.

***वसे देहांत सर्वांच्या आत्मा अमर नित्य हा***
***म्हणूनि भूत-मात्रीं तूं नको शोक करुं कधीं।***

**स्पष्टीकरण**

सजीव देह वेगळा, निर्जीव वेगळा. सजीव देहात चैतन्य वसते. चैतन्याच्या अस्तित्वामुळे सकल जगताचे ज्ञान होते. सजीव देहात जड देहही वसतो. यात तो चैतन्यमय परमात्मा नांदतो. सर्व ब्रह्मांडात परमात्मा गुप्त रुपाने वसतो. यामुळे आपण त्याला 'जड' म्हणतो. जिथे तो प्रकट होतो त्याला आपण 'चैतन्य' असे म्हणतो. मन आणि बुध्दी या साधनांमुळे परमात्मा प्रकट होतो. मृत देहात परमात्मा प्रकट होत नाही. त्या निर्जीव देहात मन नसते. मनासोबत ज्ञानेंद्रियांचे आणि कर्मेंद्रियांचे संस्कार वसतात. त्याना 'लिंग देह' व 'सूक्ष्म देह' असे म्हटले जाते. लिंग देह निघून गेल्यावर उरतो तो मृत देह असतो, परमात्मा त्या मृत देहातही विद्यमान असतो कारण तो अणु-रेणूत सामावलेला असतो. व्याप्त असतो. सजीव देहात दोन तत्वे आपल्याला दिसत नाहीत त्यामुळे सजीव आणि निर्जीव देहातला फरक आपल्या ध्यानात येत नाही. गीता सांगते की सजीव देहात एक अमर आत्मा असतो आणि दुसरे विनाशी शरीर असते. चैतन्य रुपी आत्मा अमर आहे म्हणून शोक करु नये. शरीर मर्त्य म्हणजे विनाशी आहे, म्हणून शोक करु नये.

: 31 :

***स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि।***
***धर्म्याद्धि युध्दाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च:** या शिवाय
- **स्वधर्मं:** स्वधर्माला
- **अवेक्ष्य:** बघू जाता
- **अपि:** ही
- **विकंपितुं:** त्यापासून विचलित होणे
- **न अर्हसि:** तुझ्यासाठी योग्य नाही
- **हि:** कारण की
- **क्षत्रियस्य:** क्षत्रियासाठी
- **धर्म्यात्:** धर्मयुक्त, स्वधर्मोचित
- **युध्दात्:** युध्दाशिवाय
- **अन्यत्:** अन्य कुठली गोष्ट, अन्य कुठला विषय
- **श्रेय:** श्रेयस्कर
- **न विद्यते:** नाही

**अर्थ**

तसेच स्वत:चा धर्म लक्षात घेऊनही तू भिता कामा नये कारण क्षत्रियाला, धर्माला अनुसरुन असलेल्या युध्दाहून दुसरे कोणतेही कल्याणकारक कर्तव्य नाही.

***स्वधर्म तो हि पाहूनि न योग्य डगणें तुज।***
***धर्म-युध्दाहुनी कांहीं क्षत्रियास नसे भलें॥***

**स्पष्टीकरण**

आत्मा अमर आणि अविनाशी असतो. देह मर्त्य आणि विनाशी असतो ही गोष्ट ध्यानात यायला हवी. यात बाह्य क्रिया वा आचरण यांचा काहीही संबंध नाही. हे आंतरिक सत्य आहे. या सिध्दांतांचे पालन करण्यासाठी क्रियारुप स्वधर्माचे पालन करणे गरजेचे आहे. हा स्वधर्म म्हणजे स्वकर्तव्य काय? याची चर्चा या श्लोकापासून आरंभ होते. या आठ श्लोकांना 'स्वधर्म-प्रकरण 'असे म्हणता येईल.

अर्जुन स्वधर्माचा त्याग करायला तयार झाला होता. नातलगांबाबत त्याच्या चित्तात मोह जागला. या आसक्तीमुळे स्वधर्माचरणापासून तो ढळला. नातलगांसाठी माणूस आपल्या प्रिय सिध्दांतांनाही मुरड घालायला तयार होतो. विनोबांच्या गीता प्रवचनांमधून याविषयीचे सुंदर विवेचन आले आहे.

स्वधर्म आपोआप ठरतो. त्यासाठी नव्याने काही विचार करावा लागत नाही. खूप विचार करावा लागला म्हणजे अहंकार आणि वासना जागली असे समजावे. ईश्वरी प्रेरणेने जीवन घालवले तर स्वधर्म ठरवायला खूप विचार नाही करावा लागत. मग मोहामुळे स्वधर्माचा त्याग नाही करावा लागत. गीतेने यासाठी 'प्रवाह-पतित कर्म', 'स्वभावनियत कर्म' किंवा 'सहज कर्म' अशी नावे दिली आहेत.

परमात्म्याची ओळख करुन घ्यायची असेल तर कुठल्याही परिस्थितीत स्वकर्तव्याचा त्याग करणे योग्य नव्हे, हे गीतेचे म्हणणे आहे. स्वकर्तव्य हे नेहमी धर्मरुप असते.

युध्द शब्दाच्या अर्थाचे स्पष्टीकरण याच अध्यायातील अठराव्या श्लोकात आले आहे.

: 32 :

*यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।*
*सुखिन: क्षत्रिया: पार्थ लभन्ते युध्दमीदृशम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **च:** आणि
- **पार्थ:** हे अर्जुना
- **यदृच्छया:** न मागता, सहजच, आपोआप
- **उपपन्नं:** प्राप्त झाले आहे
- **स्वर्गद्वारं:** स्वर्गाचे दार
- **अपावृतं:** जणु उघडून गेले आहे
- **ईदृशं:** असे
- **युध्दं:** स्वधर्मरुप युध्द
- **सुखिन:** सुखी, भाग्यवान
- **क्षत्रिया:** क्षत्रियांना
- **लभन्ते:** प्राप्त होते

### अर्थ

हे पार्था, आपोआप समोर आलेले, उघडलेले स्वर्गाचे दारच असे हे युध्द भाग्यवान क्षत्रियानाच लाभते.

*प्राप्त झालें अनायासें स्वर्गाचें द्वार मोकळें*
*क्षत्रियास महा-भाग्यें लाभतें युध्द हें असें ।*

### स्पष्टीकरण

स्वर्गात सुखच सुख असते अशी शास्त्रकारांची कल्पना आहे. स्वधर्मरुप कर्म सुखद असते. याचे कारण ते अहंकार प्रेरित नसते. स्वधर्म अहंप्रेरित नसावा. त्याचे पालनही अहंप्रेरित नसावे. स्वधर्म हा महत्वाकांक्षायुक्त नसावा. इच्छा वा वासनांनी बरबटलेला नसावा मग तो स्वधर्म स्वर्गाचे द्वार न रहाता दु:खाचे वा नरकाचे द्वार बनेल. जसा स्वधर्म हा अहंप्रेरित नसावा तसाच त्याचे पालनही अहंप्रेरित नसावे. स्वधर्म पालनात जेवढी निरहंकारिता, निष्कामता असेल तेवढा तो सुखदायी ठरतो. स्वधर्माचे पालन केले नाही तर स्वधर्म संपून जातो. सामाजिक प्रतिष्ठाही नष्ट होते. माणूस त्रिशंकुसारखा होतो. समाजातच व्यक्तिच्या ठायी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होतो. तो पापांपासून वाचतो. न करण्यायोग्य कामांपासून वाचतो. सत्कर्म करता-करता तो आपला स्वभाव बनून जातो.

: 33 :

*अथ चेत्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।*
*तत: स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अथ:** आता
- **त्वं:** तू
- **इमं:** या
- **धर्म्यं:** धर्मरुप
- **संग्रामं:** युध्दाला
- **न करिष्यसि चेत्:** जर करणार नाहीस
- **तत:** मग, तर
- **स्वधर्मं:** स्वधर्म
- **च:** आणि
- **कीर्तिम्:** कीर्ती
- **हित्वा:** दोघांना सोडून
- **पापं:** पातकाला, पापाला
- **अवाप्स्यसि:** प्राप्त होशील

### अर्थ

परंतु तू जर हे धर्मयुक्त युध्द केले नाहीस तर स्वधर्म आणि कीर्ती गमावून पापाला जवळ करशील.

*हें धर्म-युध्द टाळूनि पापांत पडशील तूं*
*स्वधर्मासह कीर्तीस दूर सारुनियां स्वयें*

### स्पष्टीकरण

स्वधर्माचे पालन केले नाही तर लौकिक फळ काय मिळेल त्याची इथे चर्चा आली आहे.

भगवान म्हणताहेत की स्वधर्म पालन न केल्यामुळे स्वधर्म तर बुडतोच पण सामाजिक प्रतिष्ठाही ढासळते. माणूस त्रिशंकू सारखा होऊन जातो. व्यक्ती समाजाचे अंग असल्यामुळे तिला नेहमी सामाजिक संदर्भातच विचार करावा लागतो. सामाजिक मूल्यांचे रक्षण करण्यात आणि त्यांची निगा राखण्यातच माणसाचे कल्याण आहे. व्यक्ति आणि समाज यांच्या हिताच्या कल्पना समांतर चालणाऱ्या आहेत त्या काही परस्परविरोधी नाहीत. स्वार्थाकामी विरोध होऊ शकतो. माणूस एकटा असला तर त्याचा विकास वा कल्याण होणे शक्य नाही. समाजात राहिल्यामुळे त्याच्यातील सुप्त गुण विकसू लागतात. अनेक पापकर्मांपासून तो वाचू शकतो. अकार्यमुक्त होऊ शकतो. कित्येक लोक सुरुवातीला समाजात आपली कीर्ती आणि प्रतिष्ठा वाढावी यासाठी सत्कार्यांमध्ये लागून रहातात. दीर्घकाळपर्यंत सत्कर्मात रत असल्यामुळे त्यांची निष्ठा दृढ होते. पुढे पुढे तो सत्कर्म त्यांचा स्वभाव बनून जातो.

स्वधर्म आणि किर्ती नष्ट झाली तर पाप पदरी येते. अधर्माचरण घडते. स्वधर्म पालन केला तर परधर्म टळतो. अधर्मही हातून घडत नाही. स्वधर्माचे पालन केल्याने ना अधर्म घडत ना परधर्म दोन्हीही टळू शकतात.

: 34 :

***अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।***
***संभावितस्य चाकीर्तिमरणादतिरिच्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च:** आणि
- **भूतानि:** सर्व लोक
- **ते:** तुमची
- **अव्ययां:** सदा न कदा, हमेशा
- **अकीर्तिं:** अपकीर्ती
- **अपि:** सुध्दा
- **कथयिष्यन्ति:** बोलत रहातील
- **च:** आणि
- **संभावितस्य:** प्रतिष्ठित पुरुषासाठी
- **अकीर्ति:** अपकीर्ती
- **मरणात्:** मरणापेक्षाही, मरणापेक्षा सुध्दा
- **अतिरिच्यते:** वाईट ठरेल, अधिक ठरेल

**अर्थ**

तसेच सर्व लोक तुझी चिरकाळ अपकीर्ती सांगत रहातील आणि सन्माननीय पुरुषाला अपकीर्ती मरणाहून दु:सह वाटते.

***अखंड लोक गातील दुष्कीर्ति जगतीं तुझीं ।***
***मानवंतास दुष्कीर्ति मरणाहूनि आगळी ॥***

**स्पष्टीकरण**

प्राप्त कीर्तीचे नष्ट होणे हा एक विषय आहे आणि अपकीर्तीचे पसरणे हा दुसरा विषय आहे. अहिंसेचा अर्थ काही केवळ हिंसा करु नये असा नाही. अहिंसेचा अर्थ सर्वांवर प्रेम करावे असाही आहे. दोघांच्या सोबत अहिंसेच्या अर्थाला पूर्णता येते. तसेच स्वधर्माचा त्याग केल्याने प्रतिष्ठा जाईल हा एक अर्थ मागील श्लोकात सांगितला आता दुसरा अर्थ सांगितला जात आहे की केवळ प्रतिष्ठा घालवली जाईल एवढेच नव्हे पण अपकीर्ती पसरेल. अपकीर्ती सोबत जगण्याऐवजी मरण पत्करलेले भले.

: 35 :

***भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथा: ।***
***येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महारथा:** दुर्योधन, कर्ण वगैरे महारथी
- **त्वां:** तुला
- **रणात्:** युध्दातून
- **भयात्:** भयामुळे
- **उपरतं:** मागे हटलेला
- **मंस्यन्ते:** असे मानतील
- **च:** आणि
- **येषां:** ज्या भीष्म आणि द्रोण वगैरे महानुभावांसाठी
- **त्वं:** तू
- **बहुमत: भूत्वा:** बहुमान्य झाला होता (क्षत्रिय म्हणून)
- **लाघवं:** त्यांच्यासाठी लघुतेला वा तुच्छतेला
- **यास्यसि:** प्राप्त होशील

### अर्थ

शिवाय ज्यांच्या दृष्टीने तू आधी अतिशय आदरणीय होतास, त्यांच्या दृष्टीने आता तुच्छ ठरशील. ते महारथी तुला 'भिऊन युध्दातून पाय काढला' असे मानतील.

*भिऊनि टाळिलें युध्द मानितील महा-रथी ।*
*असून मान्य तूं ह्यांस तुच्छता पावशील की ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत.

### स्पष्टीकरण

अठराव्या अध्यायातल्या 43 व्या श्लोकात क्षत्रियाचे गुण वर्णन येते. त्यात मुख्य गुण आहे की तो युध्दापासून पलायन करत नाही.

गांधीजींनी एका बंधुला लिहिले मनात काम विकार येत असतील तर त्यांच्याशी झुंजावे, त्यांच्याशी युध्द करावे, त्याना मनापासून हटविण्याचे प्रयत्न करावेत, त्यांच्या पुढे पराजय स्वीकारु नये कारण की क्षत्रियाचा गुण युध्दातून पळ न काढणे आहे कदापि हार न मानणे आहे. क्षत्रियाचा गुण जिंकणे नाही काही."

सामान्यपणे युध्दाचा अर्थ शस्त्रांनी युध्द करणे मानले जाते पण त्याचा एवढा संकुचित अर्थ न घेता व्यापक अर्थ मानायला हवा. गीतेत युध्द शब्दाचा अर्थ स्वकर्म असा आहे. स्वधर्म असा आहे. हे 18 व्या श्लोकात स्पष्ट केले गेले आहे. स्वधर्मापासून हटणे तर पलायन करणेच आहे.

स्वधर्मापासून हटायला नको. आपण जर स्वकर्तव्यापासून हटलो तर गुरुजनांच्या मनात आपल्याविषयी स्नेह भाव कमी होऊन जाईल म्हणजे आपण गुरुजनांचे कृपापात्र रहाणार नाहीत. ज्याना ईश्वराचा कृपापात्र व्हायचा आहे त्याना आधी गुरुंचा कृपापात्र व्हावे लागेल. आपल्या कामात सदैव गुरुजनांचे आशीर्वाद असावेत अशी दृष्टी राखावी लागेल. गुरुजनांची पर्वा न करण्याची सवय लागणे बरे नव्हे. यामुळे कल्याण नाही होणार. यामुळे भगवान अर्जुनाला सांगताहेत की तुझ्या पलायनामुळे ज्यांचा तू कृपापात्र होतास त्यांच्या मनात तुझ्याविषयी जी श्रेष्ठ भावना होती ती लयाला जाईल. प्राप्त कीर्तीचे नष्ट होणे एक दु:ख. अपकीर्ती पसरणे आणखी मोठे दु:ख. अहिंसेचा अर्थ 'कुणाची हिंसा करु नये 'हा तर आहेच पण' सर्वांवर प्रेम करा हाही आहे. दोघांच्या पूर्णत्वाने अहिंसेचा अर्थ पूर्ण होतो.

युध्दाचा अर्थ शत्रुंशी झुंजणे हा आहे. गांधीजी मनोविकारांशी झुंजायला युध्द मानतात. स्वधर्म सोडायला नको. स्वकर्तव्यापासून हटायला नको. स्वकर्तव्यापासून आपण चळलो-ढळलो तर गुरुजनांचे कृपापात्र ठरत नाहीत. ज्यांना ईश्वराचे कृपापात्र बनायचे आहे त्यांना आधी गुरुजनांचे कृपापात्र बनावे लागेल. स्वकर्तव्यापासून जो विचलित होईल त्याचे काही खरे नाही. त्याबाबत वाईट चिंतिणारे त्याला तुच्छ समजतील. अयोग्य गोष्टी पसरवतील. श्रेष्ठ पुरुषांचे आचरण समाज करतो. यामुळे त्यांचे आचरण योग्य असावे. व्यक्ती स्वधर्मापासून ढळला तर त्याची निंदा मोठमोठे लोकही करतात. यापेक्षा दु:खदायक आणखी काय असेल बरे?

: 36 :

*अवाच्यवादांश्च बहून् वदिष्यन्ति तवाहिता: ।*
*निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दु:खतरं नु किम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **च:** आणि
- **तव:** तुमच्या
- **सामर्थ्यं:** सामर्थ्याची
- **निन्दन्त:** निंदा करणारे
- **तव:** तुमचे
- **अहिता:** अकल्याण चाहणारे
- **बहून्:** अनेक प्रकारची
- **अवाच्यवादान्:** न सांगण्यासारखी वचने, न बोलण्यासारखी वचने
- **वदिष्यन्ति:** सांगत फिरतील
- **तत:** त्याहून
- **दु:खतरं:** अधिक दु:खद, अधिक दु:खदायक
- **किं नु:** आणखी काय बरे असेल?

### अर्थ

तुझे शत्रु तुझ्या सामर्थ्याची निंदा करत तुला पुष्कळसे नको नको ते बोलतील याहून अधिक दु:खदायक काय असणार आहे?

*बोलितील तुझे शत्रु भलतें भलतें बहु ।*
*निंदितील तुझें शौर्य काय त्याहूनि दु:खद ॥*

**स्पष्टीकरण**

मागील श्लोकात भगवंतांनी सांगितले की शत्रु पक्षातील कर्ण, दुर्योधन यासारखे महारथी आणि स्वपक्षातील भीष्म, द्रोण वगैरे गुरुजन तुला स्वधर्मापासून हटलेले बघून तुला तुच्छ समजू लागतील. आता या श्लोकात सांगताहेत की अर्जुना तुझे अहित चिंतणारे केवळ तुला तुच्छच समजतील असे नव्हे तर तुझी निंदाही करतील. एवढेच नव्हे तर न उच्चारण्यायोग्य शब्दही तुझ्यासाठी उच्चारतील. इथे प्रश्न केवळ अर्जुनाचा नाही अर्जुन हा त्याकाळातील एक श्रेष्ठ पुरुष होता. श्रेष्ठ पुरुषांचे आचरण असे असावे की समाजातील अन्य लोकांनी त्यांचे अनुसरण करावे, त्यातून समाजाची हानी होता कामा नये. सामान्य जन त्यानाच आदर्श मानून चालतात ही गोष्ट भगवंतांनी गीतेच्या तिसऱ्या अध्यायातल्या 21 व्या श्लोकातही सांगितली आहे म्हणून अर्जुनाने मोहामुळे स्वधर्माचा त्याग केला तर समाजापुढे एक चुकीचे उदाहरण प्रस्तुत केले जाईल आणि समाजाचे अकल्याण होईल. स्वधर्मच्युतीची निंदा मोठे लोक करु लागतील तर यापेक्षा वाईट दुसरे काय बरे असेल?

: 37 :

***हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।***
***तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युध्दाय कृतनिश्चय: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वा:** जर (तू)
- **हत:** शत्रुद्वारे या युध्दात मारला गेलास तर
- **स्वर्गं:** स्वर्ग म्हणजे श्रेष्ठ गती
- **प्राप्स्यसि:** प्राप्त करशील
- **वा:** आणि जर
- **जित्वा:** जिंकलास, शत्रुला जिंकून घेतलेस
- **महीं:** पृथ्वीचे राज्य
- **भोक्ष्यसे:** भोगशील (म्हणजे जगाची सेवा करायची संधी लाभेल)
- **तस्मात्:** त्यामुळे, त्यासाठी
- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **कृतनिश्चय:** स्वधर्म पालनाचा निश्चय करुन
- **युध्दाय:** युध्दासाठी म्हणजे स्वधर्म पालनासाठी
- **उत्तिष्ठ:** उठून उभा रहा

**अर्थ**

युध्दात तू मारला गेलास तर स्वर्गाला जाशील अथवा युध्दात जिंकलास तर पृथ्वीचे राज्य भोगशील म्हणून हे अर्जुना, तू युध्दाचा निश्चय करुन उभा रहा.

***मेल्यानें भोगिसी स्वर्ग जिंकिल्यानें मही-तळ***
***म्हणूनि अर्जुना उठ युध्दास दृढ-निश्चयें।***

**विषय:** या श्लोकात स्वधर्मपालनापासून लाभणाऱ्या दोन फळांची चर्चा येते.

**स्पष्टीकरण**

1) स्वधर्म पालन करत असताना मरण आले तर स्वर्ग लाभेल. उत्तम गती लाभेल. मरण आले याचा अर्थ समजून घ्यावा लागेल. मरण आले म्हणजे स्वधर्म पालन अधूरे राहिले. फळ मिळायच्या आतच मरण आले तरी श्रेष्ठ गती लाभेल.

2) स्वधर्माचरण करताना जर मरण आले नाही तर पृथ्वीचे साम्राज्य भोगता येईल. स्वधर्म पालनातून अखंडपणे जनसेवा सुरु राहील. 'भोगणे' हे क्रियापद फलप्राप्ती होणे असे आहे. हा अर्थ गीतेच्या उपदेशाच्या विपरीत आहे. स्वधर्म पालनातून अखंडपणे जनसेवा चालेल. कुटुंबाची सेवा ही जनसेवेच्या विरोधात नाही. कुटुंब सेवा ही सुध्दा जनसेवाच आहे. कुटुंबाच्या उत्कर्षातूनच समाजाचा विकास होईल.

: 38 :

***सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।***
***ततो युध्दाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सुखदु:खे:** सुख आणि दु:ख दोघांना
- **समे:** समान
- **कृत्वा:** मानून, समजून
- **च:** आणि

- **लाभालाभौ:** लाभ आणि नुकसान (तथा)
- **जयाजयौ:** जय पराजय
- **समे:** समान
- **कृत्वा:** समजून, मानून
- **तत:** मग
- **युध्दाय:** युध्द म्हणजे स्वधर्म पालनासाठी
- **युज्यस्व:** तयार होऊन जा
- **एवं:** अशा प्रकारे
- **पापं:** पातक
- **न अवाप्स्यसि:** लागणार नाही

### अर्थ

जय-पराजय, लाभ-हानी आणि सुख-दु:ख समान मानून युध्दाला तयार हो. अशा रीतीने युध्द केलेस तर तुला पाप नाही लागणार.

***हानि लाभ सुखें दु:खें हार जीत करीं सम।***
***मग युध्दास हो सिध्द न लागे पाप तें तुज॥***

### स्पष्टीकरण

सुख-दु:ख, लाभ-हानी, जय-पराजय यांच्या ठायी शोक आणि मोहाचा समावेश आहे. सृष्टी समोर आहे. तिच्याशी नित्याचा संबंध येतो. सृष्टीत शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध या पाच विषयांचा समावेश होतो. हे आपल्या चित्तात द्वंद्व जागवतात. आपण यांच्यापासून वेगळे होऊ शकत नाहीत परिणामी आपण पापात रुतून बसतो. यापासून बाहेर पडायचा काही मार्ग असेल तर तो आहे फळाची आसक्ती सोडून कर्म करणे. हा योग आहे. या योगाचे प्रकरण पुढील श्लोकापासून सुरु होत आहे.

: 39 :

***एषा तेऽभिहिता सांख्ये बुध्दिर्योगे त्विमां श्रुणु।***
***बुध्द्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **ते:** तुला
- **एषा:** हा
- **सांख्ये बुध्दि:** सांख्य बुध्दी म्हणजे जीवनविषयक सिध्दांतांचे ज्ञान, ज्ञानयोगाविषयीचे ज्ञान
- **अभिहिता:** सांगितलेला
- **तु:** पण, परंतु
- **इमां:** या
- **योगे बुध्दि:** जीवनविषयक सिध्दांतांना आचरणात आणण्याची जी युक्ती आहे. पध्दत वा शैली आहे त्या योगबुध्दीचे ज्ञान, निष्काम कर्मयोगाविषयीचे ज्ञान
- **श्रुणु:** ऐक
- **पार्थ:** हे अर्जुना
- **यया:** ज्या
- **बुध्द्या:** योगबुध्दीने
- **युक्त:** युक्त होऊन तू
- **कर्मबंध:** कर्माच्या बंधनांना
- **प्रहास्यसि:** सोडून देशील (कर्मबंधनांचा नाश करशील)

### अर्थ

हे पार्था, हा विचार तुला ज्ञानयोगाच्या संदर्भात सांगितला आणि आता कर्मयोगाविषयी ऐक. ज्या बुध्दीने युक्त झाला असता तू कर्माचे बंधन चांगल्या प्रकारे तोडून टाकशील.

***सांख्य-बुध्दि अशी जाण ऐक ती योग-बुध्दि तूं***
***तोडिशील जिनें सारीं कर्माचीं बंधनें जगीं।***

### स्पष्टीकरण

**सांख्ये बुध्दि:** विनोबाजींच्या अनुसार जीवन विषयक सिध्दांतांचे ज्ञान आहे. अकरा ते अडतिसाव्या श्लोकातून गीतेने जीवनविषयक तीन महा सिध्दांतांचा परिचय करुन दिला आहे.

एक-आत्म्याची अमरता, अकर्तेपणा, अकर्मपणा, अप्रेरकता आणि अखंडता दोन- देहाची क्षुद्रता, क्षणिकता आणि विनाशित्व.

तीन-स्वधर्माची आवश्यकता: अनिवार्यता. अर्थात् कुठल्याही परिस्थितीत स्वधर्माला न टाळणे

**योगे बुध्दि:** या तीन सिध्दांतांना आचरणात आणायच्या प्रक्रियेला ‘योग‘ म्हणतात. पुढचे प्रकरण एकोणचाळीस ते त्रेपन्न श्लोकांचे आहे. एकोणचाळिसाव्या

श्लोकात या विषयाची प्रस्तावना आहे. यापुढील चौदा श्लोकांमधून योग विद्येचे स्पष्टीकरण आले आहे. या सिध्दांतांना अमलात आणण्यासाठी स्वधर्म पालन करायला हवे. शंकराचार्य या श्लोकाचा पुढीलप्रमाणे अर्थ सांगतात **सांख्ये परमार्थवस्तुविवेकविषये, बुध्दिः साक्षात् शोक-मोहादिसंसारहेतु-दोषनिवृत्तिकारणम्।** अर्थात् हे ज्ञान परमात्म्याच्या ओळखीच्या संदर्भात सांगितले गेले. शोक-मोह या दोषांमुळेच तर माणूस प्रपंचात गुरफटतो. या ज्ञानामुळे या दोषांपासून निवृत्ती लाभते.

योगे **निःसंगतया द्वंद्वप्रहाणपूर्वकम् ईश्वराराधनार्थे कर्मयोगे कर्मानुष्ठाने समाधियोगे बुध्दिं श्रुणु।** अर्थात् योगाची प्राप्ती कशी होईल? म्हणजे फलाकांक्षा सोडून सुख-दुःख या द्वंद्वांना बाजूला सारुन ईश्वराची आराधना कशी करता येईल? कर्माचे अनुष्ठान कसे साधता येईल? परमात्म समाधी कशी प्राप्त करुन घेता येईल? या विषयीच्या ज्ञानाची चर्चा आता आरंभ होत आहे.

: 40 :

*नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।*
*स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इहः** या निष्काम कर्मयोगात
- **अभिक्रमनाशः** आरंभ केलेल्या कर्माचा नाश
- **न अस्तिः** कदापि होत नाही
- **प्रत्यवायः** तसेच या निष्काम कर्मयोगात कुठला दोष
- **न विद्यतेः** लागत नाही
- **अस्यः** या
- **धर्मस्यः** धर्माचे, निष्कामतेचे
- **स्वल्पं अपिः** थोडेसेही अनुष्ठान
- **महतः** मोठ्या
- **भयात्ः** बंधनांपासून, भयापासून
- **त्रायतेः** वाचवून घेते

**अर्थ**

या कर्मयोगात आरंभाचा अर्थात् बीजाचा नाश नाही आणि उलट फळरुप दोषही नाही, इतकेच नव्हे पण या कर्मयोगरुप धर्माचे थोडेसेही साधन जन्ममृत्युरुप मोठ्या भयापासून रक्षण करते.

*न बुडे येथ आरंभ न घडे विपरीत हि।*
*जोडा स्वल्प हि हा धर्म तारी मोठ्या भयांतुनी।*

**विषयः** या श्लोकातून तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अभिक्रमनाशः न अस्ति** - पहिली गोष्ट म्हणजे आत्मा अमर आहे. देह नश्वर आहे. स्वधर्म अबाध्य आहे. यासाठी हवी निष्कामता, निर्विकारिता, अनासक्ती. याचा अभ्यास व्हायला हवा. हाच योगाभ्यास होय. चांगले संस्कार विकसित करावेत. सत्संगतीमुळे चांगले संस्कार विकसित होतात. कुसंगती वाईट संस्कारांचे पोषण करते.

गोस्वामी तुलसीदास म्हणतात की **को न कुसंगति पाइ नसाई** म्हणजे कुसंगतीमुळे नाश झाला नाही असा कोण आहे? एके ठिकाणी ते लिहितात

*सुमति कुमति सबके उर रहहीं।*
*नाथ पुरान निगम अस कहहीं॥*
*जहाँ सुमति तहँ संपति नाना।*
*जहाँ कुमति तहँ बिपति निदाना॥*

अर्थात् सुमती आणि कुमती सर्वांच्याच अंतःकरणात निवास करते. जिथे सुमती आहे तिथे नाना प्रकारच्या संपदा वसतील आणि जिथे कुमती आहे ते नाना प्रकारच्या विपत्तींचे निधान असेल.

तुकोबा म्हणतात ‘ढेकणाच्या संगे हिरा तो भंगला, कुसंगे नाडिला साधु तैसा।‘ वाईट संस्कार काही काळपर्यंत चांगल्या संस्कारांना दडपून टाकतील. कायमचे नष्ट मात्र करु शकत नाहीत. चांगले संस्कार मात्र वाईट संस्कारांचा कायम स्वरुपी बीमोड करु शकतात.

2) **प्रत्यवायो न विद्यते** - दुसरी गोष्ट म्हणजे निष्कामता म्हणजे योगाचा अभ्यास. यामुळे कदापि विपरीत म्हणजे उलटा परिणाम होत नाही. शंकराचार्य म्हणतात की शेती आणि व्यापार यातून लाभच होईल असे काही सांगता येत नाही. उपचारामुळे आजारावर नियंत्रण करता येईलच असे काही सांगता येत नाही. अशा प्रकारे बाह्य वस्तुचा परिणाम विपरीत परिणाम होत नाही. निष्कामतेचे फळ शांती आहे. निष्कामता वा अनासक्ती यामुळे अशांती कदापि उद्भवणार नाही. मनात काम-क्रोध

आदि विकार उदयाला आले तर त्याचा विपरीत परिणाम लगेच अनुभवायला मिळतो. सकामता-विकार भावना यांचे विपरीत परिणाम बघता येतातच. विकारांपासून मुक्त झाल्यावर अद्वैताचा अनुभव येतो. परम शांततेचा अनुभव येतो. हे निष्कामता वा निर्विकारितेचे केवढे मोठे फळ आहे.

3) **स्वल्पं अपि अस्य धर्मस्य:** तिसरी गोष्ट अशी. योगाचे किंचित्‌ही आचरण घडले तरी माणूस जगाच्या महाभयांपासून वाचू शकतो. सुख-दु:खांपासून वाचू शकतो, माणुस जोवर कामनेच्या अधीन आहे, इच्छेने ग्रासलेला आहे, महत्वाकांक्षेने भडकलेला आहे तोवर शाश्वत सुखाची प्राप्ती कदापि होऊ शकणार नाही. याचे कारण असे की इच्छा आणि कामना या कदापि तृप्त होत नसतात. सारख्या वाढतच असतात. कामना जर अतृप्त राहिल्यात तर शांती कुठली? यासाठी निष्काम भावनेने थोडे तरी आचरण व्हावे.

: 41 :

*व्यवसायात्मिका बुध्दिरेकेह कुरुनंदन ।*
*बहुशाखा ह्यनन्ताश्च बुध्द्योऽव्यवसायिनाम्‌ ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कुरुनंदन:** हे अर्जुना
- **इह:** या निष्काम कर्मयोग मार्गात (कल्याण मार्गात)
- **बुध्दि:** अंत:करण, चित्त
- **व्यवसायात्मिका:** दृढ
- **एका:** एकाग्र रहाते
- **च:** आणि
- **अव्यवसायिनाम्‌:** ज्यांच्या बुध्दीची चंचलता नष्ट झाली नाही त्यांच्या, अज्ञानी सकामी पुरुषांच्या
- **बुध्दय:** इच्छा
- **बहुशाखा:** अनेक प्रकारांकडे (आणि), पुष्कळ फाटे फुटल्यासारख्या
- **अनंता:** अनंत असतात

**अर्थ**

हे अर्जुना, या कर्मयोगात निश्चयात्मक बुध्दी एकच असते परंतु अस्थिर विचार असणाऱ्या, अविचारी, कामनायुक्त माणसांच्या बुध्दी खात्रीने पुष्कळ फाटे फुटलेल्या आणि असंख्य असतात.

***ह्यांत निश्चय लाभूनि बुध्दि एकाग्र राहते ।***
***निश्चयाविण बुध्दीचे फाटे ते संपती चिना ॥***

**विषय:** या श्लोकाद्वारे विशेषत: कर्मयोगाचे फळ वर्णिले आहे.

**स्पष्टीकरण**

निष्कामतेमुळे बुध्दी स्थिर होते. एकमार्गी होते. या बुध्दीला ईश्वराशिवाय दुसरे काहीही भावत नाही. बाहेरुन स्वधर्माचे आचरण असावे. अंत:प्रवाह ईश्वराधीन असावा. यामुळे बुध्दी स्थिर होईल. चित्तात नाना प्रकारच्या वासना नांदतात. जीवन त्यांच्या अधीन असते. यामुळे चित्त अशांत बनते. चंचळ बनते. आपल्या चित्तात-बुध्दीत आणि मनात परमात्मरुप प्रकाश वसतो. हा स्वयंप्रकाश अखंड असतो. परमात्म्याच्या ठायी भौतिक वा ऐहिक इच्छा-वासना नसतात. यामुळे तिथली शांती वा आनंद कदापि भंग पावत नाहीत. या प्रकाशापुढे वासनेचा अंधकार टिकू शकत नाही. पाप अंधकार, पुण्य प्रकाश, पापी सुध्दा अखेरीस पुण्याकडेच झुकतो. आपण कधी खोटे बोलतो. कधी असत्याचरण करतो. यावेळी आतील परमात्मा आपल्याला धक्का मारतो. कधी आतला धक्का असह्य होतो. ईश्वरी प्रेरणा प्रबळ ठरते. यावेळी माणूस असत्य वा असत्याचरणाचा त्याग करतो.

निष्कामतेमुळे बुध्दी शांत होते. स्थिर होते. वासनेमुळे चित्त अशांत रहाते. अस्थिर रहाते. अनिश्चयी रहाते. यामुळे वासना अनंत रुप धारण करते. नाना प्रकारच्या वासना जाळात बुध्दी फसते. यामुळे प्रपंचाची बंधने अधिक मजबूत होतात.

: 42-43-44 :

***यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चित: ।***
***वेदवादरता: पार्थ नान्यदस्तीति वादिन: ॥***
***कामात्मान: स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम्‌ ।***
***क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥***
***भोगैश्वर्यप्रसक्तानां तयाऽपहृतचेतसाम्‌ ।***
***व्यवसायात्मिका बुध्दि: समाधौ न विधीयते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **वेदवादरता:** वेदाच्या म्हणजे कर्मकांडातल्या यज्ञ-याग वगैरे वचनात जे आसक्त आहेत (आणि)
- **अन्यत्:** या यज्ञ याग वगैरे कर्मांहून श्रेष्ठ आणखी काही श्रेष्ठ कर्मे
- **न अस्ति:** नाहीत
- **इति:** असे
- **वादिन:** करणारे
- **कामात्मन:** आणि विषयासक्त
- **स्वर्गपरा:** स्वर्गालाच श्रेष्ठ पुरुषार्थ मानणारे
- **अविपश्चित:** अविवेकी जन
- **यां:** जे
- **इमां:** या
- **पुष्पितां:** रमणीय वाटणारी, लोभस वाटणारी, दिखाऊ शोभायुक्त
- **जन्मकर्मफलप्रदां:** कर्माचे फळ जन्मच आहे असे सांगणारी
- **भोगैश्वर्यगतिं प्रति:** (आणि) भोग आणि ऐश्वर्याच्या प्राप्तीसाठी
- **क्रियाविशेषबहुलां:** अनेक प्रकारचे, विशेष कर्म सांगितले गेले आहेत असे सांगणारी
- **वाचं:** वाणी
- **प्रवदन्ति:** बोलतात
- **तया:** त्या वाणीने
- **अपहृतचेतसां:** ज्यांचे चित्त आकृष्ट झालेले आहे
- **भोगैश्वर्यप्रसक्तानां:** अशा भोग आणि ऐश्वर्यात आसक्त
- **तेषां:** त्या अविवेकी पुरुषांची
- **बुध्दि:** बुध्दी
- **व्यवसायात्मिका:** निश्चयात्मक
- **समाधौ:** समाधीत, परमात्म्याच्या ठायी, अंत:करणात
- **न:** नाही
- **विधीयते:** स्थिर झाली असती

**अर्थ**

हे अर्जुना, जे भोगात रमलेले असतात, कर्मफळाची स्तुती करणाऱ्या वेदवाक्यांची ज्याना आवड आहे, ज्यांच्या मते स्वर्ग हीच श्रेष्ठ मिळवण्याजोगी वस्तु आहे, स्वर्गाहून श्रेष्ठ दुसरी कोणतीही गोष्ट नाही, असे जे सांगतात, ते अविवेकी लोक अशा प्रकारची जी पुष्पित म्हणजे दिखाऊ शोभायुक्त भाषा बोलत असतात, त्यांची ही भाषा जन्मरुप कर्मफळ देणारी तसेच भोग व ऐश्वर्य मिळण्यासाठी अनेक प्रकारच्या क्रियांचे वर्णन करणारी असते. या भाषेने ज्यांचे अंत:करण आकृष्ट करुन घेतले आहे, जे भोग व ऐश्वर्यात अत्यंत आसक्त आहेत, अशा पुरुषांची परमात्म्याविषयी निश्चयी बुध्दी असत नाही.

***अविवेकी वृथा वाणी बोलती फुलवूनियां***
***वेदाचे घालिती वाद म्हणती दुसरें नसे ।***
***जन्मूनियां करा कर्मे मिळवा भोग-वैभव***
***भोगा कर्म-फळें गोड सांगती स्वर्ग-कामुक ।***
***त्यामुळें भुलली बुध्दि गुंतली भोग-वैभवीं***
***ती निश्चय न लाभूनि समाधींत नव्हे स्थिर ।***

**स्पष्टीकरण**

प्रपंचात फसलेल्या लोकांचे वर्णन तीन श्लोकांमधून करण्यात आलेले आहे. प्रपंचातल्या आसक्तीमुळे चित्त अस्थिर रहाते. अलिप्त राहून कर्म करायची चावी गीतेत आहे. अनेक लोकांच्या हाती ही चावी नाही. त्या प्रापंचिक लोकांचे वर्णन या तीन श्लोकांमधून आले आहे.

प्रपंचात आसक्त असलेल्या लोकांचे अनेक विशेषणांनी वर्णन केले गेले आहे. प्रपंचात बुडालेले हे जन जी भाषा बोलतात, तिचे थोडे वर्णन आले आहे. या प्रापंचिक आसक्तीच्या फळाचे वर्णन आले आहे.

**अविपश्चित:** विपश्चित म्हणजे ज्ञानी, विवेकी. अविपश्चित म्हणजे अज्ञानी, अविवेकी. ज्यांना नित्य आणि अनित्य वस्तुंचा विवेक नसतो ते अज्ञानी होत. जगत अनित्य आहे हे ज्याना कळते तरी त्याची असारता ज्यांना हृदगत होत नाही असे लोक अज्ञानी जन होत.

**वेदवादरता:** वेदवादरत. वेदाच्या वचनांमध्ये रत म्हणजे रममाण असे लोक. वेद चार आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. वेदाचे दोन विभाग. एक कर्मकांड दुसरा ज्ञानकांड. कर्मकांडात यज्ञ कर्मे, श्राध्द कर्मे कशी करावीत? याची चर्चा येते, प्रापंचिक सुखाच्या प्राप्तीसाठीचे सारे उपाय, विधि आणि निषेध यांचे वर्णन यातून येते. ज्ञानकांड म्हणजे उपनिषदे. अनेक उपनिषदे आहेत. प्रमुख उपनिषदे तेरा मानली जातात. यात अनुभवी

ऋषी-मुनींची वचने आहेत. प्रपंचाची आसक्ती कशी दूर करावी? मोक्ष कसा प्राप्त करुन घ्यावा? परमात्म्याला कसे ओळखावे? या प्रश्नांची चर्चा यातून येते. याचे विवेचन येते. विश्लेषण येते.

प्राचीन काळी कर्मकांडाचा प्रभाव मोठा होता. ते ज्ञानकांडालाही कर्मकांडाचाच एक भाग मानत असत. अर्थात् त्यांची ही समजूत चुकीची असल्याचे शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रात सविस्तरपणे समजाऊन सांगितले आहे.

**अन्यत् न अस्ति इति वादिनः** वेदाच्या या कर्मकांडी भागापेक्षा इतर कुठलीही वस्तु जगात नाही असे मानणारे, अशी श्रध्दा बाळगणारे लोक.

**कामात्मानः** विषयासक्त. नाना प्रकारच्या वासना-विकारांनी ग्रस्त आहेत. कामभोगात अनुरक्त आहेत.

**स्वर्गपराः** हे स्वर्गालाच श्रेष्ठ मानतात. कर्मकांडांचे योग्य पालन करणारा स्वर्गाप्रत जातो. अधर्माचरण करणाऱ्याला नरकाची प्राप्ती होते. समाजात धर्मपालनाचा विचार टिकून रहावा म्हणून स्वर्ग आणि नरकाची कल्पना केली गेली आहे. विनोबांनी नवव्या अध्यायाच्या वीस आणि एकविसाव्या श्लोकाचा विचार मांडताना स्वर्ग, नरक, ब्रह्मलोक या संकल्पनांचा सुरेख अर्थ मांडल आहे.

**भोगैश्वर्यप्रसक्तानाम्:** भोग आणि ऐश्वर्यात आसक्त सकाम पुरुष असतात. ते कर्मजड असतात. कर्मठ असतात. त्यांची वाणी मनोहर असते. कुणालाही मोहित करुन घेणारी असते. हे यज्ञयागादी धर्माचा प्रचार करतात. हे समाधीत लीन होऊ शकत नाहीत. परमात्म्याच्या ठायी लीन होऊ शकत नाहीत.

**पुष्पितां जन्मकर्मफलप्रदां, क्रियाविशेष-बहुलां वाचं प्रवदन्तिः** मनोहर वाणी कुणालाही मोहित करणारी वाणी बोलणारे असतात. हे सकामी पुरुष होत. हे स्वर्ग सुखाच्या प्राप्तीसाठी नाना प्रकारची यज्ञ याग वगैरे कर्मे करत रहातात. याचे फळ स्वर्ग म्हणजे विशेष मिळायला हवे.

**अपहृतचेतसाम्:** अशा मोहक वाणीने ज्यांचे चित्त आकृष्ट झाले आहेत असे लोक

**समाधौ न विधीयते:** समाधीत अर्थात् परमात्म्याच्या ठायी लीन होऊ शकत नाही. ज्ञानेश्वर माऊली म्हणते की असे लोक भोग व ऐश्वर्याच्या वासनेने प्रेरित होतात. धर्माचे अनुष्ठान करतात. शास्त्रीय नाना विधी आचरतात. विशिष्ट कर्मांचे अनुष्ठान करतात. त्यांच्या ठायी एकच दोष नांदतो. हे सारे ते स्वर्ग-सुखाच्या कामनेने करतात. यामुळे त्यांना शाश्वत सुखरुपी फळ प्राप्त होऊ शकत नाही. कापूर सुगंधित असतो. अग्नीत जाळुन टाकला की त्याचा सुगंध संपुन जातो. त्याचप्रकारे परमात्म्याच्या भक्तीने खरे तर अखंड सुखाचा लाभ होऊ शकतो पण प्रापंचिक सुख प्राप्तीची वासना धरली जाते. अशा कारणासाठी पुण्यकर्म करणे अविवेकी ठरते.

: 45 :

*त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।*
*निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुनः** हे अर्जुना
- **वेदाः** वेदाच्या कर्मकांडवाल्या विभागाचा
- **त्रैगुण्यविषयाः** विषय, त्रिगुणात्मक प्रपंचच आहे, म्हणून
- **त्वंः** तू
- **निस्त्रैगुण्यः** त्रिगुणात्मक प्रपंचापासून अलिप्त, निष्काम
- **भवः** व्हायचा प्रयत्न कर
- **निर्द्वन्द्वः** द्वंद्वरहित आणि
- **नित्यसत्वस्थः** नित्य सत्वगुणांचा आश्रय घेणारा, सत्यनिष्ठ
- **निर्योगः** क्षेमः निर्योग क्षेम म्हणजे अन्न-वस्त्राच्या चिंतेपासून मुक्त, योग व क्षेमची चिंता न करणारा
- **भवः** होऊन जा आणि
- **आत्मवान्:** आत्मनिष्ठ, आत्मपरायण
- **भवः** होण्याचा प्रयत्न कर

**अर्थ**

हे अर्जुना, वेद वर सांगितल्याप्रमाणे तिन्ही गुणांची कार्ये असणारे सर्व भोग आणि त्यांची साधने सांगणारे आहेत म्हणून तू ते भोग आणि त्यांच्या साधनांच्या बाबतीत आसक्ती बाळगू नकोस. तसेच सुख-दुःख वगैरे द्वंद्वांनी रहित, नित्यवस्तु असणाऱ्या परमात्म्यात स्थित, योगक्षेमाची (अप्राप्त वस्तुची प्राप्ती म्हणजे 'योग' आणि प्राप्त वस्तुंचे रक्षण म्हणजे 'क्षेम' होय) इच्छा न बाळगणारा आणि अंत:करणाला ताब्यात ठेवणारा हो.

*तिन्ही गुण वदे वेद त्यांत राहें अलिप्त तू*
*सत्त्व सोडूं नको सोशी द्वंद्वें निश्चिंत सावध ।*

**स्पष्टीकरण**

**त्रैगुण्यविषया वेदाः** त्रैगुण्य म्हणजे त्रिगुणात्मक प्रपंच. प्रपंचात राहूनही अलिप्त कसे रहाता येईल हे गीता सांगते. हा प्रपंच त्रिगुणात्मक आहे. हाच तर वैदिक कर्मकांडाचा विषय आहे. याचीच चर्चा वैदिक कर्मकांडातून येते. मोक्ष मिळवणे काही याचे लक्ष्य नाही. ज्ञानकांडाचे लक्ष्य मोक्ष आहे, म्हणजे आत्यंतिक अखंड सुख-प्राप्ती आहे. गीतेला हेच अभिप्रेत आहे. कर्मकांडात ज्ञानाची चर्चा कशी असेल बरे? अर्जुन शोकाने-मोहाने घेरला गेला आहे. त्याला प्रपंचापासून मुक्ती हवी. यासाठी तो देवाला प्रार्थना करत आहे. शोक मोहापासून दूर व्हायचे असेल तर सकामता सोडावी लागेल. निष्कामतेची कास धरावी लागेल.

यासाठी ते सांगताहेत की, **निस्त्रैगुण्यो भव तू** त्रिगुणात्मक प्रपंचात राहूनही त्यापासून वेगळा होऊन जा. निष्काम बन. निष्काम भाव जागण्यासाठी गीतेने चार गोष्टी सांगितल्या आहेत.

1) **निर्द्वन्द्वो भवः** एक म्हणजे द्वंद्वापासून मुक्त हो! द्वंद्व म्हणजे सुख-दु:खाचे निमित्तरुप परस्पविरोधी विचार वा पदार्थ ! शीत-उष्ण, हानी-लाभ, जय-पराजय, यश-अपयश ही द्वंद्व व्यवस्था आहे. पंच तन्मात्रा हानी-लाभ पोहोचवतात. शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध हे पाच विषय. या पंच तन्मात्रा. लाभप्रद गोष्टींमुळे सुख वा आनंद लाभतो. हानीप्रद गोष्टींमुळे दु:ख होते. या सुख-दु:खमूलक द्वंद्वातून मुक्त व्हायचा संदेश गीता देते. या अध्यायाच्या चौदाव्या श्लोकात या द्वंद्वाला अनित्य मानून सहन करण्याचा मुद्दा आला आहे. शंकराचार्य म्हणतात -

***त्वयि मयि चान्यत्रैको विष्णुर्व्यर्थं कुप्यसि सर्वसहिष्णुः ।***
***सवस्मिन्नपि पश्यात्मानं सर्वत्रोत्सृज भेदाज्ञानम् ॥***

अर्थात् तुझ्या-माझ्या आणि सर्वांच्या ठायी एक विष्णुतत्व नांदते. परमात्मा वसतो. माणूस विनाकारण क्रुध्द होतो. सृष्टीतल्या द्वंद्वाला सहन करत रहावे. सर्वच प्राणीमात्रांच्या ठायी आत्मतत्वाचे दर्शन कर. सर्वत्र भेदरुपी अज्ञानाचा त्याग कर.

या श्लोकात शंकराचार्यांनी द्वंद्वापासून मुक्त होण्याचे दोन उपाय सांगितले आहेत. एक म्हणजे सर्वांच्या ठायी परमात्मतत्वाच्या दर्शनाचा अभ्यास करणे. दुसरे म्हणजे द्वंद्वाला शांतपणे सहन करणे. कुठलीही प्रतिक्रिया न व्यक्तवणे.

2) **नित्यसत्वस्थः भव** दुसरा मुद्दा म्हणजे नित्य सत्वस्थ बन. सृष्टीच्या ठायी तीन गुण आहेत. सत्व, रज आणि तम. यांच्याशी आपला सदा संबंध येतो. यांना कुणी टाळू शकत नाही. यातला सत्वगुण उन्नतीची वाट दाखवतो. रज व तमोगुण अध:पतनाचा मार्ग दाखवतात. यामुळे सत्वगुणाची कास धरावी. सात्विक बोलावे. सात्विक आहार असावा. कर्मे सात्विक असावीत. सत्संग करावा. सद्ग्रंथांचे वाचन करावे. यज्ञ, दान, तप करावा. सात्विक कर्ता बनावे.

3) **निर्योगक्षेमः** भव तिसरा मुद्दा आहे 'नियोंगक्षेम' बन. योगक्षेम म्हणजे अन्न-वस्त्राची चिंता. आहे त्यात समाधान. योगसाधनेत अन्न-वस्त्राची चिंता मोठीच बाधा बनून जाते. माणूस परिवारात रहातो. सर्वात मोठी आसक्ती परिवाराचीच असते. यामुळे गीतेच्या पहिल्या अध्यायात अर्जुनासाठी पारिवारिक मोहाचा प्रसंग उभा केला. यामुळे **यदृच्छालाभसंतुष्टः** (गीता अध्याय 4 श्लोक 22) ही वृत्ती राखायला हवी. तुलसीदासांनी नवधा भक्तीचा अभिनव विचार मांडला आहे. त्यांच्या मते आठवी भक्ती आहे यथालाभ संतोष. म्हणजे आहे त्यात संतोष. तुकारामांनी सांगितले **'ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असो द्यावे समाधान'** विनोबा म्हणतात की घोड्यावर बसल्यावर गाठोडे घोड्यावरच ठेवावे. ते काही डोक्यावर ठेऊ नये. योग म्हणजे अप्राप्त वस्तुची प्राप्ती. क्षेम म्हणजे प्राप्त वस्तुचे रक्षण. सारे काही ईश्वरावर सोपवावे. निश्चिंत व्हावे.

निर्योगक्षेमचा दुसरा अर्थही आहे. योगक्षेम हे दोन शब्द आहेत, योग आणि क्षेम. योग म्हणजे 'अप्राप्त वस्तु प्राप्त करणे' आणि क्षेम म्हणजे 'प्राप्त वस्तुचे रक्षण करणे' होय. योगसाधकाचे लक्ष्य मोक्ष प्राप्ती असते. मोक्ष अप्राप्य वस्तु आहे. योगभूमिकेत निष्कामता टिकवून ठेवावी लागते. यामुळे भगवान सांगताहेत की योगसाधकाने सारी चिंता ईश्वराला सोपवून निश्चिंत व्हायला हवे.

4) **आत्मवान भवः** चौथा मुद्दा आहे आत्मवान बन. आत्मवान म्हणजे आत्मनिष्ठ. वृत्तींचा प्रवाह देहनिष्ठ असतो. तो आत्मनिष्ठ व्हावा. देहासक्ती टळावी. आत्मभान जागावे. सातव्या अध्यायातील पहिल्या श्लोकात **'मय्यासक्त'** शब्द आला आहे. ईश्वराच्या ठायी आसक्त. देहाच्या ठायी आसक्ती नको. नातलगांच्या

ठायी नको. मित्रांच्या ठायी नको. आसक्ती सोडणे याचा अर्थ कर्तव्याचा त्याग करणे नव्हे.

आत्मवान म्हणजे सावधान वा जागृत. विषयासक्त अनेक प्रकारच्या कामना करतो. यामुळे निद्रेत असतो. सावधान नसतो. यासंबंधी आचार्य गौडपाद म्हणतात की

*अनादिमायया सुप्तो यदा जीव: प्रबुद्ध्यते।*
*अजन्मनिद्रमस्वप्रमद्वैतं बुद्ध्यते तदा ॥*

माया अनादि काळापासून कार्यरत आहे. तिच्या प्रभावाने जीव निद्रिस्त असतो. तो जागावा. या जागृतीमुळे अद्वैताचे ज्ञान होते. परमात्म्याची ओळख होते.

एकदा का निष्काम योग साधला की मग सकाम कर्मे निरर्थक ठरतात. हे विवेचन पुढील श्लोकातून येते.

: 46 :

*यावानर्थ उदपाने सर्वत: संप्लुतोदके।*
*तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानत: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वत:** सगळीकडे, सर्वत्र
- **संप्लुतोदके:** पाणीच पाणी होऊन गेल्यावर (भरलेला जलाशय)
- **उदपाने:** विहीरीचे
- **यावान्:** जेवढे
- **अर्थ:** उपयोग होतो, त्याचे काही प्रयोजन उरत नाही
- **तावान्:** तसेच, तेवढेच
- **विजानत:** ज्ञानी म्हणजे परमात्म्याचे ज्याने ज्ञान प्राप्त करुन घेतले आहेत असे
- **ब्राह्मणस्य:** अशा ब्राह्मणाला
- **सर्वेषु:** सर्व
- **वेदेषु:** वेदांचे म्हणजे सकाम कर्मांचे
- **अर्थ:** काहीही प्रयोजन उरणार नाही

**अर्थ**

चोहोबाजुंनी भरलेला मोठा जलाशय मिळाल्यावर लहान जलाशयाची मनुष्याला जेवढी गरज असते तेवढीच चांगल्याप्रकारे ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणाला वेदांची गरज उरते.

*सर्वत्र भरलें पाणी तेव्हां आडांत अर्थ जो।*
*विज्ञानी ब्रह्म-वेत्त्यास सर्व वेदांत अर्थ तो ॥*

**स्पष्टीकरण**

जगात दोन प्रकारची कर्मे केली जातात. सकाम आणि निष्काम. सकाम कर्माचे फळ अत्यल्प मिळते. निष्काम कर्माचे फळ बहुताधिक असते. सकाम कर्मे बांधून ठेवतात. जखडून ठेवतात. निष्काम कर्मामुळे आपण बंधनातून मुक्त होऊ शकतो. अशाप्रकारे सकाम आणि निष्काम कर्मांची फळे परस्पर विरुध्द आहेत. सर्वत्र पाणीच पाणी असेल तर विहीरीचा उपयोग कुणी का बरे करील? चहुबाजुला झरे वहाताहेत. नदी वहाती आहे. तलावातून शुध्द पाणी साठवलेले आहे. अशावेळी विहीरीचा उपयोग कुणी कशासाठी करेल? त्याच प्रमाणे ज्यांनी सकामता सोडली. ज्यांनी निष्कामता धरली. ज्यांनी परम तत्वाचा अनुभव घेतला. ते कर्मकांडाला निरर्थक मानतील. निरुपयोगी समजतील. ज्ञानी पुरुष कर्मकांडात गुरफटून रहाणार नाहीत. ज्ञानी पुरुषांना या कर्माचा काही उपयोग नाही. या श्लोकात ब्राह्मण शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. परमात्म्याचा परिचय करुन देणारे, त्याविषयी प्रयत्न करणारे ब्राह्मण म्हणवले जात. सकाम कर्मवाला प्रपंचात अडकतो पण निष्काम कर्मे आचरणारे प्रपंचाचा त्याग करुन देतात असे नव्हे काही. आपल्या परिवाराबाबत ज्ञानी माणूस कर्तव्यबुध्दी पार पाडतो. मोहासक्त होत नाही. तो ब्रह्मचर्याचे पालन करतो. जनसेवा करतो. आपल्या कुटुंबापुरताच विचार करत नसतो. यम-नियमांचे पालन करतो. सत्याचे पालन करतो. अहिंसक वर्तन आचरतो. मनी लोभ धरत नाही. परिग्रह करत नाही म्हणजे अनावश्यक संग्रह करत नाही. वानप्रस्थ आचरतो. वय झाले म्हणजे जनसेवापरायण बनतो. तो भक्त असतो. विरागी बनतो. निष्काम होतो. मृत्युसमयी देहाची वेदना त्याला स्पर्श करत नाही. परमात्मस्मरण करतो. विचलित न होता देह ठेवतो.

: 47 :

*कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्।*
*मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तेः** तुझा
- **कर्माणिः** स्वधर्मरुप कर्तव्यात, कर्तव्याच्या ठायी
- **एवः** सुध्दा
- **अधिकारः** अधिकार आहे
- **फलेषुः** फळात
- **कदाचनः** कधीही
- **माः** न होवो या साठी
- **कर्मफलहेतुः** कर्मफळाची इच्छा करणारा, राखणारा
- **मा भूः** तू बनू नकोस
- **अकर्माणिः** आणि अकर्मात, अकर्माच्या ठायी, कर्म न करण्याविषयी
- **तेः** तुझी
- **संगः** आसक्ती
- **मा अस्तुः** न राहो, नसो

**अर्थ**

तुला कर्म करण्याचाच अधिकार आहे. त्याच्या फळाविषयी कधीही नाही म्हणून तू कर्माच्या फळांची इच्छा करणारा होऊ नकोस. तसेच कर्म न करण्याचाही आग्रह धरु नकोस.

*कर्मांत चि तुझा भाग तो फळांत नसो कधीं।*
*नको कर्म-फळीं हेतु अकर्मीं वासना नको॥*

**स्पष्टीकरण**

पुढील श्लोकात योगाच्या चतु:सूत्रीचे वर्णन आले आहे. प्रत्येक व्यक्तीने कुठल्याही परिस्थितीत स्वधर्माचे पालन करायलाच हवे. कर्तव्याच्या पालनातूनच सर्वांना शांततेचा अनुभव घेता येतो. स्वकर्तव्यपालन बंधन वाटता कामा नये. स्वधर्माचे पालन करताना विकार उत्पन्न होतात. यामुळे शांतता ढळते.

या श्लोकातून जीवन जगण्याच्या कलेचे रहस्य समजाऊन सांगण्यात आले आहे. स्वधर्म पालन कर्तव्यरुप आहे. स्वधर्म पालन म्हणजे स्वधर्म-पालनाचे प्रयत्न. परिपूर्णरित्या स्वधर्माचे पालन करणे शक्य नाही. त्यात न्यून नको. अधुरेपणा नको. उणिवा नकोत. यासाठी खूप प्रयत्न करायला हवेत यात शंका नाही. चांगल्या प्रकारे प्रयत्न करुनही ज्यावेळी दोष राहून जातात त्यावेळी मनात अशांती आणि दु:ख निर्माण होण्याची शक्यता असते. या श्लोकात स्वकर्तव्याचे पालन करत असताना अखंड शांतता कशा प्रकारे हस्तगत करता येईल हे समजावून सांगितले आहे. या श्लोकात जीवन जगायची कला उकलून दाखवली आहे.

1) **कर्मणि एव ते अधिकारः** 2) **फलेषु कदाचन माः** या श्लोकातल्या पहिल्या चरणात दोन सिध्दांत सांगितले आहेत. तुमचा अधिकार स्वधर्म पालनापुरता आहे आणि तेच तुमचे कर्तव्य आहे. स्वधर्म पालन म्हणजे स्वधर्म पालनाचा प्रयत्न. या कामी संपूर्ण कौशल्याने कर्म आचरणे महत्वाचे आहे.

खूप प्रयत्न केल्यावरही यात दोष राहूनच जातात. त्यावेळी मनात अशांतता, दु:ख निर्माण व्हायची शक्यता असते. हे सारे टाळण्यासाठी काय करावे हे दुसऱ्या सिध्दांताद्वारे समजाऊन सांगण्यात आले आहे. कर्माच्या फळात आसक्त होऊ नये. कर्माच्या परिणामाची आसक्ती ठेवू नये कारण आपल्या हाती काही इच्छित फल प्राप्ती नाही. आपल्या हाती केवळ कर्म करणे हेच आहे. कर्माचे फळ प्राप्त करुन घेणे आपल्या प्रयत्नांच्या अधीन असतेच असे नव्हे! अनेक बाबी अनुकुल असल्या तर मनोवांछित फल लाभते. बाळकोबांनी पोळ्या करायचे उदाहरण दिले आहे. पीठ बारीक असायला हवे, पीठ आधी मळून ठेवावे लागेल, नीट गाळलेले नसेल तर अडचण येते, लाटणे बरोबर असले पाहिजे, ओली लाकडे असली तर पोळी कशी व्हायची? कोळसे धड पेटणारे हवेत ना, हवा अनुकूल असायला हवी, सारी साधने बरोबर असल्यावर मग पोळ्या करायचा अनुभवच नसेल तर सारेच आटोपले की. पोळ्या करण्यासारख्या साध्या-सोप्या वाटणाऱ्या कामासाठी किती तत्परता हवी. केवढी अनुकूलता हवी. यामुळे फळाविषयी तटस्थ वा अनासक्त असणे गरजेचे आहे. इच्छित फळप्राप्ती न झाल्यास दु:ख वा अशांती वाट्याला येते. केवळ प्रयत्न करावेत. फळ वा परिणामविषयी तटस्थ रहावे वा अनासक्त रहावे. असे साधले की दु:ख टाळता येते. कर्माच्या फळाच्या त्यागालाच स्वधर्म म्हटले जाते. गांधीजींनी 'अनासक्तियोग' या नावाने गीतेवर भाष्य

लिहिले आहे. याच्या प्रस्तावानेत ते कर्मफलासक्तीच्या त्यागालाच गीतेचा सारांश म्हणतात.

आता यातूनच सहज निष्पन्न होणारा तिसरा सिध्दांत सांगताहेत. **मा कर्मफलहेतुः भूः** केवळ स्वधर्माचे पालन करणे हेच आपल्या अधीन आहे. स्वधर्माच्या पालनासाठी प्रयत्न करणे हेच आपल्या अधीन आहे. आपला अधिकार काय तो एवढाच! फळावर आपला अधिकार नाही. फळ आपल्या अधीन नाही. फळ ईश्वराधीन आहे. यामुळे कर्माच्या फळात आसक्ती ठेऊ नये. नातलगांबाबतची आसक्ती ईश्वराला मान्य नाही. कर्मफळाबाबतची आसक्तीही ईश्वराला मान्य नाही. केवळ ईश्वरासक्ती हवी. माणसाच्या ठायी सत्व, रज आणि तम हे गुण असतात. रजोगुणाचे म्हणणे असे की मी कर्म करतो तर मी फळ घेईनच. म्हणजे फळाची आसक्ती राखेनच. तमोगुणाचे म्हणणे असे की फळाची आसक्ती जर सोडायची असेल तर मग मी कर्मच सोडून देईन. रजोगुण कर्माच्या ठायी प्रवृत्तही होतो आणि फलासक्तीही निर्माण करतो. तमोगुण कर्माचा त्याग करायला लावतो. रजोगुण आणि तमोगुणाचा त्याग करुन आपल्या ठायी सत्वगुणाला स्थिर करणे गरजेचे आहे. सत्वगुण स्थिर झाला म्हणजे अहंकार क्षीण होतो. अहंकार क्षीण झाला म्हणजे फळाची आसक्ती उरत नाही. आपण कर्मफळाच्या आसक्तीचे निमित्त बनू नये. याचा अर्थ फळाची आसक्ती मनात धरु नये.

**अकर्मणि ते संगः मा अस्तुः** अकर्म दशा प्राप्त करुन घेण्यासाठी आसक्ती नसावी. अकर्तेपणा म्हणजे मोक्ष कधी लाभेल अशी आसक्ती नसावी. मोक्षाची साधना आरंभ केली म्हणजे मोक्षरुप फळाच्या प्राप्तीसाठी मन अधीर होईल. आपल्या जीवनात आपण स्वधर्मरुपी बाह्य कर्मे करतो. त्या कर्मफळांची आसक्ती सोडावी असे गीताकाराचे म्हणणे आहे. हा नियम जीवनाच्या तमाम क्रियांबाबत लागू करावा लागेल. हा सिध्दांत आध्यात्मिक साधनेवरही लागू होतो. वैराग्य, ज्ञान, भक्ती, ध्यान धारणा यासारख्या साधना आपण मोक्षरुपी फळाच्या प्राप्तीसाठीच करतो.

शंकराचार्य म्हणतात की **मोक्षेऽपि फले संगं त्यक्त्वा** अर्थात् मोक्षरुपी फळातलीही आसक्ती सोडावी. परमात्म्याच्या अनुभवासाठी साधना तीव्र करावी पण आसक्तीमुळे साधनाही मंदावेल. तटस्थ भावनेमुळे साधना सुयोग्य प्रकारे वाढेल. त्यात रोज तीव्रता वाढेल. शिथिलता येणार नाही.

'अकर्मात तुझी आसक्ती नसावी.' असे या श्लोकाचे अखेरचे वचन आहे. ज्ञानेश्वर, शंकराचार्य, गांधीजी तिघांनी हाच अर्थ केला आहे. विनोबा मात्र अकर्म म्हणजे मोक्षदशा असा अर्थ करतात. अकर्तेपणाचा अनुभव असा अर्थ करतात. पुढील श्लोकातून योगाचे स्पष्टीकरण येते.

: 48 :

***योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय।***
***सिध्द्यसिध्द्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धनंजयः** हे अर्जुना
- **संगंः** आसक्ती
- **त्यक्त्वाः** त्यागून, त्याग करुन
- **सिध्यसिध्दयोः** सिध्दी आणि असिध्दीच्या बाबतीत म्हणजे स्वधर्माचरणरुप कर्म आणि मोक्षरुपी साधनेच्या सफलते - असफलतेविषयी
- **समः** अनासक्त, सम
- **भूत्वाः** होऊन
- **कर्माणिः** स्वधर्माचरणरुप बाह्य कर्म, मोक्षरुप साधनेची आंतरिक कर्मे आणि जीवनातील सारी कर्मे
- **कुरुः** करत रहा (कारण की)
- **समत्वंः** अनासक्त रहायलाच, जे काही कर्म केले जाईल ते पूर्ण होणे किंवा अर्धवट राहणे या विषयी व त्याच्या फळाविषयी समभाव ठेवणे याचे नाव समत्व भाव आहे.
- **योगः** योग
- **उच्यतेः** सांगितले आहे

**अर्थ**

हे धनंजया, तू आसक्ती सोडून तसेच सिध्दी आणि असिध्दीमध्ये समान भाव ठेवून योगात स्थिर होऊन कर्तव्य कर्मे कर समत्वालाच योग म्हटले आहे.

***फळ लाभो न लाभो तूं निःसंग सम होउनी।***
***योग-युक्त करीं कर्मे योग सार समत्व चि॥***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **योगस्थ: कर्माणि कुरु:** योगाच्या ठायी स्थित होऊन कर्म करायचा सल्ला दिला गेला आहे. योगाच्या ठायी स्थित होऊन कर्म कर. योग म्हणजे चित्ताची समता. ही व्याख्या या श्लोकाच्या समापनात केली गेली आहे. भगवान सांगताहेत की जीवनातील सारी कामे योगस्थ होऊन म्हणजे चित्ताची समता राखून करा.

2) **संगं त्यक्त्वा:** चित्ताची समता कशी साधता येईल? संग सोडून कर्म करुन, म्हणजे फलासक्ती सोडून कर्म करुन चित्ताची समता साधता येईल. फलासक्तीमुळे माणसाचे चित्त अस्थिर होते, डावाडोल होते. ज्ञानेश्वर म्हणतात की आपण आरंभिलेले कर्म सफल झाले तर खूप प्रसन्न व्हायला नको. खूप संतुष्ट व्हायला नको. कर्म सफल झाले नाही तर दु:ख करायला नको. खिन्न व्हायला नको. कर्माचरण करताना साफल्य लाभले तर उत्तमच पण साफल्य लाभले नाही तर ते अपूर्ण राहिले असे मानावे. संपूर्णपणे ईश्वरार्पण केलेले कर्म परिपूर्ण मानावे. अशा प्रकारे कर्माच्या सिध्दीत वा असिध्दीतही चित्तवृत्ती सम असावी. या योगमय स्थितीची प्रशंसा श्रेष्ठजन करतात.

3) **सिध्द्यसिध्द्यो: समो भूत्वा:** कर्म सफल असो वा निष्फल. सम चित्तवृत्ती ठेवावी. कर्माच्या सफलतेसाठी काही योजना करावी की करु नये? कर्म चांगले व्हावे यासाठी आग्रह धरावा काय? की मग जमेल तसे कर्म केले तरी चालेल?

खरे तर फळाच्या आकांक्षेमुळेच माणूस चांगली कर्मे करायला प्रवृत्त होतो. यंदा पाऊस चांगला नाही असे कळले तर शेतकरी शेतीची मशागत करणारच नाहीत. अनुभव असा आहे की कर्मफळाच्या इच्छेमुळेच तर माणूस कर्म करायला वा कर्माला चांगले करायला प्रवृत्त होतो. इथे गीता फळाचा त्याग करायला सांगत नाही, हे ध्यानी घ्यायला हवे. गीताकाराचा आग्रह फळाची आसक्ती धरु नये हा आहे. फळाची आसक्ती दु:खकारक असते म्हणून सोडायची पण आसक्तीतून जर आनंदलाभ होत असेल तर आसक्ती धरावी. आपला अनुभव मात्र असे सांगतो की आसक्ती सदा दु:ख देते. यामुळे कर्म व्यवस्थित व्हावे यासाठी त्याचे अपेक्षित फळ उत्तम असावे ही योजना सुव्यवस्थितपणे आधीपासून आखावी लागेल. अपेक्षित फलप्राप्तीचा आग्रहही धरावा लागेल पण यासोबत अनाग्रहीसुध्दा रहावे लागेल. दोन्ही एकापाठीमागे एक सोबत चालतात. आग्रहामुळे योजना बनेल. योजनेमुळे कर्मात दक्षता येईल. दक्षतेमुळे जागृती येईल. बेपर्वाई नको. अनाग्रह असावा. फळाच्या प्राप्तीविषयी तटस्थता असावी. यामुळे दु:खाचा अनुभव होणार नाही. कर्म करत रहाण्यातून अखंड शांतता लाभेल. या संदर्भात विनोबा म्हणतात की (1) कर्मफळाचा आग्रह मनी धरुन खूप निपुणतेने कर्मे करायला हवीत पण (2) अपेक्षित फळ मिळाले नाही तर मनाची समता ढळू देऊ नये. (3) अपेक्षित फळ मिळाले तर त्यापासून स्वत:ला वेगळे करुन घ्यावे. कर्माचे कर्तेपण स्वीकारु नये. कर्मफळ ईश्वर समर्पित करावे. स्वत: वेगळे रहावे.

1) अखेर भगवंतांनी अत्यंत थोडक्यात योगाची व्याख्या करताना सांगितले की **समत्वं योग उच्यते** फळाविषयी चित्त सम राखणे योग. अनासक्त, तटस्थ, निरहंकारी, चित्त राखणे हा योग. शास्त्र या वृत्तीलाच योग असे म्हणते.

: 49 :

***दूरेण ह्यवरं कर्म बुध्दियोगाध्दनंजय।***
***बुध्दौ शरणमन्विच्छ कृपणा: फलहेतव: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धनंजय:** हे अर्जुना, धनंजया
- **बुध्दियोगात्:** बुध्दियोगाने म्हणजे समत्व-बुध्दियोगाने केल्या गेलेल्या कर्मापेक्षा
- **कर्म:** सकाम कर्म
- **दूरेण हि:** अत्यंत
- **अवरं:** निकृष्ट, तुच्छ
- **अत:** यामुळे
- **बुध्दौ:** निष्कामबुध्दीला, समत्वबुध्दी योगाचा
- **शरणं:** शरण, आश्रय
- **अन्विच्छ:** ये, निष्काम बनण्याचा प्रयत्न कर, ग्रहण कर
- **फलहेतव:** फलासक्ती राखणारा कर्मठ पुरुष
- **कृपणा:** कृपण म्हणजे कंजूष आहे असे समज

**अर्थ**

या समत्वरुप बुध्दीयोगापेक्षा सकाम कर्म अत्यंत तुच्छ आहे. म्हणून हे धनंजया, तू समत्वबुध्दीतच रक्षणाचा उपाय शोध म्हणजे बुध्दीयोगाचाच आश्रय घे कारण फळाची इच्छा बाळगणारे अत्यंत दीन होत.

*समत्व-बुध्दि ही थोर कर्म तीहूनि हीन चि।*
*बुध्दीचा आसरा घे तूं मागती फळ दीन ते॥*

**विषय:** या श्लोकातून तीन मुद्यांची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

उपनिषदात म्हटले आहे

*आत्मानं रथिनं विध्दि शरीरं रथमेव तु।*
*बुध्दिं तु सारथिं विध्दि मन: प्रग्रहमेव च॥*
*इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान्।*
*आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिण:॥*

अर्थात् या श्लोकात सकामतेहून निष्कामता श्रेष्ठ असल्याचा संदेश दिला गेला आहे. उपनिषदात चर्चा येते की शरीर रथ आहे. इंद्रिय घोडे आहेत. विषय हे त्या अश्वांच्या चालण्याचा मार्ग आहे. मन लगाम आहे. बुध्दी सारथी आहे. रथाचा मालक आत्मा-परमात्मा आहे.

हा रथ सुयोग्यरित्या धावायला हवा. यासाठी बुध्दीरुपी सारथी आत्मा वा परमात्मारुपी मालकाच्या स्वाधीन हवा. पमात्म्याच्या प्रेरणेने बुध्दीने चालावे. निर्णय घ्यावा. असे व्हायला हवे. क्रम असा की परमात्म्याच्या अधीन बुध्दी. बुध्दीच्या अधीन मन. मनाच्या अधीन इंद्रियसमूह. बुध्दी निर्णय घ्यायचे कार्य करील. मन ते अमलात आणील. बुध्दी विचारात्मक आहे. मन आहे भावनात्मक आणि विकारात्मक. बुध्दी जर आत्मनिष्ठ वा परमात्मनिष्ठ असेल तर निर्णय योग्य ठरतील पण आपली बुध्दी आत्मनिष्ठ वा परमात्मनिष्ठ नसते. तसे घडले तरी मन बुध्दीच्या अधीन व्हायला तयार नसते. इथेच सारा गाडा अडतो. बुध्दीच्या निर्णयानुसार चालण्याची मनाला सवय नसते कारण मन इंद्रियांच्या अधीन असते. यामुळे बुध्दीचे निर्णय अमलात घेत नाही.

आज उपवास करु या असा निर्णय बुध्दी घेते. तो सायंकाळपर्यंतही टिकत नाही. बुध्दीचा हा निर्णय कोण भंग करते? मन आहे ना अडथळा उभा करायला. इंद्रिय समूह मनाला मोहवत असतात. मन इंद्रियाधीन होते. विकाराधीन होते. यामुळे त्यावर बुध्दीचा अंकुश रहात नाही.

समत्व बुध्दीची चर्चा करताना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की चित्ताची समता साधणे हा योगाचा सारांश होय. रहस्य होय. मन-बुध्दीने एक व्हावे म्हणजे संघर्ष मिटावा. चित्ताची निष्काम अवस्था जागली की मन बुध्दीच्या अधीन होते. यामुळे चित्ताला योगस्थिती प्राप्त होते. या स्थितीत जर लहान मोठी सारी कार्ये घडलीत, साऱ्या क्रिया घडल्यात तर सकाम कर्मे निकृष्ट मानली जातील.

या श्लोकातून तीन मुद्दे आले आहेत. 1) एक म्हणजे निष्काम कर्मरुप योगस्थिती म्हणजे योगबुध्दीच्या तुलनेने सकाम कर्मे खूप निकृष्ट आहेत. 2) दोन यामुळे तू योगबुध्दीला शरण जा. म्हणजे निष्कामतेची पराकाष्ठारुप अशी जी योगस्थिती आहे ती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न कर. 3) तीन कारण की फळाची आसक्ती मनी धरुन कर्मे करणारे कृपण आहेत म्हणजे दीन वा भिकारी आहेत. निष्कामतेच्या ठायी अखंड सुख आहे. परम शांती आहे. याचा अनुभव जर नाही आला तर मग सुखाच्या संदर्भात आपण भिकारी ठरतो. भिकारी कसा दारोदार सुखासाठी भटकतो तसेच आपणही सुखासाठी नाना कामनांच्या मागे-मागे फिरतो. एका कामनेतुन परिपूर्ण सुख प्राप्ती होत नाही, मग आपण अनेक कामनांच्या माध्यमातून सुख प्राप्त करुन घेण्यासाठी धडपडतो. भोजनातून थोडे सुख मिळवतो. थोडे मनोरंजनातून मिळवतो. थोडे खेळातून मिळवू बघतो. थोडे मित्रांशी गप्पा-टप्पा करुन मिळवायचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे नाना कामनांच्या मागे हिंडूनसुध्दा आपल्याला पुरते सुख लाभत नाही. निष्काम भावनेतुन लाभणाऱ्या अखंड सुखाचा अनुभव आपल्याला मिळत नाही यामुळे दुसरा कुठला मार्ग आपल्यासमोर उरत नाही. नाना प्रकारच्या इच्छा मनी जागवत आपण सुख मिळावे म्हणून धडपड करतो. अशा लोकांना गीता दीन वा कृपण म्हणते.

योगस्थितीत निवास करणाऱ्यांना पाप-पुण्याचे बंधन उरत नाही हा मुद्दा पन्नासाव्या श्लोकात येतो. कृपण शब्दाचा उपनिषदात पुढीलप्रमाणे अर्थ दिला आहे. या अक्षर-अविनाशी ईश्वराला न जाणता जो देह सोडून या लोकातून कूच करुन जातो तो कृपण होय.

: 50 :

*बुध्दियुक्तो जहातीह उभे सुकृत-दुष्कृते ।*
*तस्माद्योगाय युज्यस्व योग: कर्मसु कौशलम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **बुध्दियुक्त:** समत्व-बुध्दीने युक्त पुरुष
- **इह:** या लोकी
- **सुकृत-दुष्कृते:** पुण्य आणि पाप
- **उभे:** दोघे, दोन्ही
- **जहाति:** सोडून देतो, त्यात लिप्त होत नाही
- **तस्मात्:** यामुळे, म्हणून
- **योगाय:** योगस्थिती प्राप्त करण्यासाठी
- **युज्यस्व:** प्रयत्न कर
- **योग:** हा समतारुपी योगच
- **कर्मसु:** कर्मात, जीवनाच्या तमाम क्रियांमध्ये
- **कौशलम्:** कौशल्य आहे, यातच कर्मबंधनातून सुटण्याचा उपाय आहे, सारी कुशलता निहित आहे

**अर्थ**

समबुध्दीचा पुरुष पुण्य व पाप या दोहींचाही याच जगात त्याग करतो अर्थात् त्यापासून मुक्त असतो म्हणून तू समत्वरुप योगाला चिकटून रहा. हा समत्वरुप योगच कर्मातील दक्षता आहे म्हणजेच कर्मबंधनातून सुटण्याचा उपाय आहे.

*येथें समत्व-बुध्दीनें टळे सुकृत-दुष्कृत ।*
*समत्व जोड ह्यासाठीं तें चि कर्मांत कौशल ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

मागील श्लोकात कृपण शब्द आला आहे. उपनिषदात कृपण शब्दाचा मोठा छान अर्थ सांगितलाय. **यो वा एतदक्षरं गार्ग्यविदित्वाऽस्माल्लोकात् प्रैति स कृपण:।** अर्थात् हे गार्गी, जो खरोखर या अविनाशी ईश्वराला न जाणता देह सोडून या लोकातून निघून जातो तो कृपण आहे.

1) एक म्हणजे निष्कामतारुपी योगस्थिती ज्यांनी प्राप्त करुन घेतली आहे ते पाप-पुण्याच्या बंधनापासून मुक्त रहातात. परमात्म तत्वाला जे प्राप्त झाले आहेत त्यांच्या हातून पापकर्मे होऊच शकत नाहीत. पाप कर्मे करुन अलिप्त रहाणे असा काही याचा अर्थ होत नाही. ढोंगी साधु-संन्याशांनी वेदांताचा असा दुरुपयोग केला आहे. काम क्रोध वगैरे विकारांपासून जो मुक्त झाला त्याहातून पापकर्मे होणार नाहीत ही गोष्ट सहजच ध्यानात येण्यासारखी आहे.

ज्ञानी वा निष्काम पुरुषाच्या हातून पापकर्मे होणार नाहीत हे निश्चितपणे ठरले आहे. काही लोकाना असे वाटते की ज्याप्रमाणे ज्ञानी माणूस पापकर्मे करणार नाही त्याप्रमाणे पुण्य कर्मेही करणार नाही तो निष्क्रीय राहील पण ही कल्पना चुकीची आहे. पाप कर्मे न करता आणि पुण्यकर्मांची कास न सोडता अखंडपणे पुण्य कर्म करत असता ज्यांनी निष्काम बनायची वा ज्ञान प्राप्तीची साधना केली आहे ते निष्कामता आणि ज्ञान प्राप्तीनंतर पुण्य कर्मांचा त्याग कसा बरे करतील?

विनोबा म्हणतात की पुण्यकर्मे ही ज्ञानासाठी मातृरुपी आहेत. ज्ञानी माणूस पुण्यकर्मे कसा बरे सोडून देईल? निष्कामता म्हणजे ज्ञानप्राप्ती झाली म्हणजे पुण्यकर्मे अनायास घडतील असेच मानायला हवे. साधकावस्थेत पुण्यकर्माचे थोडे ओझे वाटायचा संभव आहे कारण ती सहज नसतात पण पुण्यकर्मे करत-करत-सात्विक कर्मे अखंडपणे करत-करत जेव्हा ज्ञानप्राप्ती होते म्हणजे निष्कामता लाभते त्यावेळेला पुण्य कर्माचे ओझे वाटत नाही. श्वासोच्छवासासारखी ती सहज बनून जातात. त्यांचा यत्किंचितही भार मनावर वा बुध्दीवर उरत नाही. अशाच प्रकारे सात्विक कर्मे लोकसेवेची कर्मे - ज्ञानी पुरुषांचा स्वभाव बनून जातात.

सारांश, निष्काम पुरुष पापकर्मे कदापि करणार नाही आणि पुण्य कर्मांचा कदापि त्याग करणार नाही. तो परमात्म्याच्या अनुभवामुळे संपन्न झाल्यामुळे तो पुण्यकर्मातही गुरफटून रहात नाही. पुण्य कर्मांच्या बंधनातूनही मुक्त असतो.

2) दुसरी गोष्ट अशी की सात्विक कर्मे करता करता जर पुण्यकर्माच्या बंधनापासून मुक्त व्हायचे असेल तर निष्कामता, निर्विकारता, समतारुपी योगस्थिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. गीतेने अर्जुनाला निमित्त केले आहे. उपदेश मात्र आपणा सर्वांसाठी आहे की योगासाठी प्रयत्न करा.

3) तिसरी गोष्ट अशी की योगसाधना कर्मासाठी करायला हवी. जीवित्वाचे सारे लक्ष्य योग प्राप्तीसाठीचे प्रयत्न असावेत. तीच साधना असावी. स्वकर्तव्य म्हणजे स्वधर्माचे यथायोग्य पालन करावे. फळाविषयी अनासक्त भाव मनी बाळगावा. हे जीवनध्येय असावे. यातून जीवन कौशल्य साधले जाते. योग प्राप्त करुन घेणे हीच कुशलता होय. हेच जीवनाचे सार होय.

गांधीजी म्हणतात की आपण जर आतून निष्काम-निर्विकार झालोत आणि चित्तशुध्दीच्या पराकाष्ठेपर्यत पोहोचलोत तर आपली तमाम कर्मे सुंदर होतील मग ती स्थूल असोत वा सूक्ष्म. कायिक, वाचिक आणि मानसिक सारीच कर्मे सुंदर होतील. आत यौगिक कौशल्य साधले तर बाह्य स्वधर्मरुपी कार्ये उत्कृष्ट होतील. त्यात काही उणीव उरणार नाही. सिध्द पुरुषाचे प्रापंचिक काम कौशल्याने युक्त नसते वा गृहस्थाप्रमाणे अनासक्ताच्या कामात दक्षता नसते, असे जे साधारणपणे बोलले जाते या मताला गांधीजींनी बदलून टाकले. ते आतून हरिभक्तीत रंगून गेले होते, हरिस्मरणात तल्लीन होते यासोबतच कार्यकुशल व दक्षही होते. त्यांची बरोबरी करणे कुणाला शक्य नव्हते. यामुळे गांधीजींनी योगाचे दुहेरी स्पष्टीकरण दिले. 1) एक म्हणजे चित्तात समता व 2) दुसरे म्हणजे त्यातून उद्भवणाऱ्या बाह्य कर्मात कुशलता. दोघांच्या समन्वयातून पूर्णयोग साधेल.

विनोबांनी गीता प्रवचनात हेच सांगितले. ते म्हणतात की सकाम पुरुषाच्या तुलनेने निष्काम पुरुषाचे कर्म अधिक सुंदर आणि उत्कृष्ट असायला हवे. फलासक्त पुरुषाची थोडी शक्ती आसक्तीत खर्ची पडते. अनासक्त पुरुषाची सारी शक्ती कार्य सिध्दीतच खर्ची पडते शिवाय सकाम पुरुषच कर्माला स्वार्थी दृष्टीने बघतो. फळ न मिळाल्यावर त्याचे कर्म शिथिल होते पण अनासक्त साधक फळ मिळाले नाही तरी अधिक उत्साहाने अनेक पटीने अधिक चांगले कर्म करतो.

शंकराचार्यांनी कौशल्याचे स्वरुप समजाऊन सांगितले आहे. ते म्हणतात **तध्दि कौशलं यद्बन्धनस्वभावान्यपिकर्माणि समत्वबुध्द्या स्वभावान्निवर्तन्ते।** अर्थात् बंधनात न टाकणे हा कुशलतेचा स्वभाव असतो. अशी प्रापंचिक स्वकर्तव्यरुप कर्मेदेखिल अनासक्त बुध्दीने केली गेल्यावर बंधनात टाकायचा आपला स्वभाव विसरुन जातात.

: 51 :

***कर्मजं बुध्दियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिण:।***
***जन्मबन्धविनिर्मुक्ता: पदं गच्छन्त्यनामयम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **बुध्दियुक्ता:** निष्काम बुध्दीने युक्त विवेकी पुरुष
- **कर्मजं:** कर्माने उत्पन्न होणारे
- **फलं:** सुख-दु:खरुपी फळाला
- **त्यक्त्वा:** त्यागून, त्याग करुन
- **हि:** फलासक्तीच्या त्यागामुळे
- **मनीषिण:** मनाचे स्वामी बनून आणि
- **जन्मबन्धविनिर्मुक्ता:** जन्म आणि बंधनातून सुटून, मुक्त होऊन
- **अनामयं:** उपद्रवरहित, उपद्रवशून्य, सुख-दु:ख रहित, निर्दोष अर्थात् अमृतमय
- **पदं:** परमात्मरुप, मोक्षरुप स्थानाला
- **गच्छन्ति:** प्राप्त करुन घेतो

**अर्थ**

कारण समबुध्दीने युक्त असलेले ज्ञानी लोक कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या फळाचा त्याग करुन जन्मरुप बंधनापासून मुक्त होऊन निर्विकार परमपदाला प्राप्त होतात.

***ज्ञानी समत्व-बुध्दीनें कर्माचें फळ सोडुनी।***
***जन्माचे तोडिती बंध पावती पद अच्युत॥***

**विषय:** या श्लोकातून चार गोष्टींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात समत्व बुध्दीद्वारा मिळणाऱ्या महत् फळाची चर्चा येते.

1) एक म्हणजे समत्वबुध्दीयुक्त जन म्हणजे ज्यांनी निष्कामता प्राप्त केली आहे असे जन. हे जन कर्मजन्य सुख-दु:खरुपी फळांचा सहज त्याग करतात. कर्माची फळे दोन-सफळता आणि निष्फळता. कर्म सफळ व्हावे

यासाठी सर्वांचे प्रयत्न असतात. कर्माच्या सफळतेत जर आपण आसक्त झालो तर सफळ झाल्यावर आपण सुखी होतो, सफळ न झाल्यावर दु:खी होतो. हे सारे ईश्वराधीन आहे. आपल्या अधीन केवळ कर्म करत रहाणे आहे. जे आपल्या अधीन नाही, त्याबद्दल तटस्थ रहावे किंवा अनासक्त रहावे. असे झाल्यावर सुख टळते, दु:खही टळते.

2) दुसरी गोष्ट अशी की तटस्थ बनून सुख न मानणे वा दु:ख न करणे हे साधता येते. यामुळे आपण **मनीषिण:** म्हणजे मनाचे मालक बनतो. इंद्रियांनी मनाची सत्ता मानावी. मनाला चळवू नये. मनाने बुध्दीच्या अधीन रहावे. फाजिलपणा करु नये. बुध्दीने परमात्म्याच्या अधीन रहावे. तर्ककर्कश बनू नये. असे साधता यावे. मग शून्यता येते. जीवन श्रीहरीचरणी समर्पित होते. चित्ताच्या ठायी मग फळाची आसक्ती उरत नाही. साधक मनाचा मालक बनतो.

3) तिसरी गोष्ट अशी की मनाचे मालक बनल्यावर माणूस मनीषी बनतो. मनीषी म्हणजे जन्म-मरणरुप प्रपंचातून मुक्त असाही एक अर्थ केला जातो. जन्म काही बंधनात अडकवत नाही. देवता नाही का अवतार घेत? जन्म प्राप्त झाल्यावर आपण अज्ञानग्रस्त होतो. ईश्वराला ओळखत नाही. यामुळे जन्म बंधनरुप ठरतो. ईश्वराची ओळख करता आली तर जन्म आनंदाचे साधन बनू शकते. जन्मापासून मुक्त होणे याचा अर्थ बंधनापासून मुक्त होणे असा असतो. जन्माच्या बंधनातून मुक्ती हे एक फळ झाले. मनाचा मालक बनल्यावर हे फळ लाभते.

4) मनीषी बनल्यावर **अनामय** जीवन लाभते. अनामय म्हणजे यातना रहित जीवन, दु:ख मुक्तीचा आत्यंतिक अनुभव देणारे जीवन. सुख व आनंदमय स्थिती म्हणजे मोक्ष. हे याच जन्मी अनुभवता येते. आमय म्हणजे आजार, रोग. निरामय म्हणजे निरोगी अवस्था. परमात्मस्वरुपी लीन असणे म्हणजे निरामय अवस्था होय. परमात्मतत्वाचा त्याग करुन शरीर, इंद्रिय, मन वा बुध्दीच्या अधीन होणे म्हणजे रोगी अवस्था. सत्संगतीमुळे परमात्मतत्वाची ओळख होते. परमभक्तीमुळे आपण निरोगी बनतो. हाच मोक्ष होय.

मोहाचा त्याग केल्यावर कुठली स्थिती उत्पन्न होते हे पुढील श्लोकात येते.

: 52 :

***यदा ते मोहकलिलं बुध्दिर्व्यतितरिष्यति।***
***तदा गन्ताऽसि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदा ते बुध्दि:** जेव्हा तुमची बुध्दी
- **मोहकलिलं:** मोहरुपी मळाला, चिखलाला
- **व्यतितरिष्यति:** पूर्णपणे पार करुन जाईल, ओलांडून जाईल
- **तदा श्रोतव्यस्य:** तेव्हा ऐकण्यायोग्य शास्त्र वचने
- **च श्रुतस्य:** आणि ऐकलेली शास्त्र वचने, या दोघांच्या बाबतीत
- **निर्वेदं:** तुमच्या मनी वैराग्य जागेल, दोघेही तुमच्यासाठी निष्फळ सिध्द होतील

**अर्थ**

जेव्हा तुझी बुध्दी मोहरुपी चिखलाला पूर्णपणे पार करुन जाईल, तेव्हा तू ऐकलेल्या व ऐकण्यासारख्या इह-परलोकातील सर्व भोगांपासून मुक्त होशील.

***लंघूनि बुध्दि जाईल जेव्हां हा मोह-कर्दम।***
***आलें येईल जें कानीं तेव्हां जिरविशील तूं॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या आहेत

**स्पष्टीकरण**

(1) मोहरुपी दलदल पार करुन जेव्हा आपली बुध्दी जाईल आणि मोहमुक्त होईल तेव्हा (2) एथवर ऐकलेल्या आणि भविष्यात ऐकाव्या लागणाऱ्या शास्त्रवचनांबाबत वैराग्य उपजेल. बुध्दी त्या जंजाळात अडकणार नाही.

आपण प्रपंचात रहातो. अनुकूल-प्रतिकूल नाना प्रकारच्या घटना घडतात. बुध्दी तटस्थ राहू शकत नाही. ममतेमुळे आघात होतात. दु:ख होते. सत्संग लाभला तर मोहाच्या दलदलीतून बाहेर पडता येते. मोह म्हणजे मूढता. मोह म्हणजे मूर्च्छा. ममतेमुळे चित्त डावाडोल होते. चिंता जागते. भगवंतांनी काळजीपूर्वक चिखल या शब्दाचा प्रयोग केला आहे कारण की चिखलात अडकल्यावर माणूस ताबडतोब बाहेर पडू शकत नाही पण ईश्वरी कृपेने सत्संग लाभला तर मोहरुपी चिखलातून बाहेर पडता येते. सत्संगतीमुळे शास्त्रवचने गोंधळात टाकत नाही. त्यांच्या

आकलनाविषयीचा विवेकभाव जागतो. शास्त्रवचने कधी-कधी परस्पर विरोधीही असतात. बुध्दी मोहग्रस्त नको. अहंकारी नको. यामुळे सरळही वाकडे वाटू लागते. सज्जनांकडून शास्त्रवचने जाणून घ्यावीत. ज्यांचा अहंकार निर्मूल झाला आहे. जे काम-क्रोध वगैरे विकारांपासून मुक्त झाले आहेत, ज्यांचे जीवन ब्रह्मचर्यसंपन्न आहे. आधीचे गृहस्थाश्रमी असतील पण सध्या वानप्रस्थाश्रमी असतील ज्यांचे चित्त सरळ आहे, अशा पुरुषांकडून शास्त्र जाणून घेतले तर त्याचा उपयोग मोह घालवण्यासाठी होईल. यातून मोह दूर होईल. मोह गेला की शास्त्रवचनांचीही काही गरज वाटत नाही.

: 53 :

*श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।*
*समाधावचला बुध्दिस्तदा योगमवाप्स्यसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **श्रुतिविप्रतिपन्ना:** शास्त्रवचने खूप मोठ्या प्रमाणावर ऐकल्यामुळे गोंधळात पडलेली (बुध्दी)
- **ते बुध्दि: यदा:** तुमची बुध्दी जेव्हा
- **निश्चला अचला:** निश्चल, स्थिर होऊन, संकल्प-विकल्प रहित (होऊन)
- **समाधौ:** समाधीत, परमात्म्याच्या स्वरुपात
- **स्थास्यति:** स्थिर होऊन जाईल, टिकून राहील
- **तदा योगम्:** तेव्हा समत्वरुप योगाला
- **अवाप्स्यसि:** प्राप्त करशील, प्राप्त करुन घेशील

**अर्थ**

वेगवेगळ्या प्रकारची वचने ऐकून विचलित झालेली तुझी बुध्दी जेव्हा परमात्म्यात अचलपणे स्थिर राहील तेव्हा तू योगाला प्राप्त होशील म्हणजेच तुझा परमात्म्याशी नित्यसंयोग होईल.

*श्रवणें भ्रमली बुध्दि तुझी लाभूनि निश्चय ।*
*स्थिरावेल समाधींत तेव्हां भेटेल योग तो ॥*

विषय: या श्लोकात तीन मुद्दे आले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) सर्वसामान्य प्रापंचिक माणसाची स्थिती कधी-कधी खूप दयनीय होऊन जाते. काही लोक प्रपंच दलदलीत असे काही फसतात-गुंतून पडतात की त्यातून बाहेर पडायची इच्छासुध्दा त्याना होत नाही. काही लोक प्रपंचात राहूनही अलिप्त कसे रहाता येईल याविषयीची चिंता वहातात. तसे काही ते प्रपंचाचा त्याग करत नाहीत पण त्या जंजाळातून सुटण्याची मात्र त्याना अदम्य लालसा असते. चित्त मोहग्रस्त असते. स्वतंत्ररित्या शास्त्राध्ययनाची योग्यता काही त्यांच्या ठायी नसते. अनेकांची बुध्दी शास्त्रविचार जाणून घेण्याइतपत विकसित नसते पण परमात्म्याविषयीची जिज्ञासा मात्र त्यांच्या ठायी असते. अशा प्रापंचिक जीवांची समस्या मोठी अवघड होऊन जाते.

तुलसीदास म्हणतात की रामकृपेमुळेच संत समागम घडतो. ते म्हणतात.

*संतु बिसुध्द मिलहिं परि तेही ।*
*चितवहिं रामकृपा करि जेही ॥*

अर्थात् ज्यांच्यावर रामरायाची कृपा होते त्याना विशुध्द संतांचा समागम प्राप्त होतो. संतालाही ते ‘विशुध्द‘ असे विशेषण लावतात. संतांच्या रुपात वेषात असंतही भेटतात यामुळे तुलसीदासजी विशुध्द हे विशेषण जोडतात. अर्जुनाला शास्त्र वचने ऐकून माहित होती. यामुळे काही चुकीच्या कल्पनाही त्याच्या चित्तात ठाण मांडून बसल्या होत्या. त्याला मोहाने घेरले. तो स्वधर्म म्हणजे स्वकर्तव्य सोडायाला तयार झाला. श्रीकृष्णापुढे आपले म्हणणे समर्थपणे मांडण्यासाठी त्याने ऐकीव शास्त्र वचनांचा आधार घेतला.

अर्जुनाच्या काळात कर्मकांडाचा खूप बोलबाला होता. याच अध्यातील 42, 43 आणि 44 व्या श्लोकातून कर्मकांडी जनांचे वर्णन आले आहे. गीतेच्या पहिल्या अध्यायाच्या 40 ते 44 श्लोकांमधून अर्जुनाने कर्मकांडी जनांचीच तर्क मीमांसा वापरली आहे. त्याने शास्त्राध्ययन तर काही केले नव्हते पण शास्त्राच्या अनेक गोष्टी जाणत असल्यामुळे त्याची बुध्दी भ्रमित झाली होती. योग्य निर्णयाप्रत तो पोहोचू शकत नव्हता. यामुळे श्रीकृष्ण म्हणाले की खूप ऐकून-ऐकून तुझी बुध्दी भ्रमित झाली आहे. यातून आधी तुला मुक्त व्हावे लागेल. बुध्दी स्थिर होईल. विक्षेपरहित होईल. कृत-निश्चयी बनेल. तरच परमात्म्याकडे वळेल.

एक प्रोफेसर सांगू लागले की कुठलाही धार्मिक ग्रंथ वाचला तर तो खराच वाटायला लागतो. गांधी, विनोबा वाचले तर ते खरे वाटतात मग अरविंद, कृष्णमूर्ती वाचले तर त्यांचेच म्हणणे खरे वाटायला लागते. बुध्दी जोवर मोहग्रस्त असते तोवर प्रोफेसर वा अर्जुना सारखी अवस्था होऊन जाते. हीच सर्वांची स्थिती होते. यामुळे भगवंतानी दिलेला टोमणा बरोबरच आहे की बुध्दीच्या ठायी जोवर स्थिरता येत नाही, मन नि:शंक होत नाही तोवर तो ईश्वराच्या ठायी लीन होत नाही.

2) दुसरा मुद्दा असा की बुध्दीचा भ्रम दूर झाला तर ती ईश्वराच्या ठायी स्थिर होईल. तल्लीन होईल.

3) तिसरा मुद्दा असा की बुध्दी परमात्म्याच्या ठायी लीन झाली तर साम्यावस्था वा निष्काम अशी अखेरची अवस्था प्राप्त होईल. 'समाधी' शब्द ऐकून अर्जुनाला काही विचारावेसे वाटतेय.

: 54 :

**अर्जुन उवाच**

***स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।***
***स्थितधी: किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **केशव:** हे केशवा
- **समाधिस्थस्य स्थितप्रज्ञस्य:** समाधीत स्थित स्थितप्रज्ञ पुरुषाची
- **का भाषा?:** काय लक्षणे आहेत?
- **स्थितधी:** स्थित धी म्हणजे स्थितप्रज्ञ पुरुष
- **किं प्रभाषेत:** कसे बोलतो?
- **किं आसीत:** कसे रहातो?
- **किं व्रजेत:** कसे चालतो?

**अर्थ**

अर्जुनाने विचारले हे केशवा, जो समाधीत परमात्म्याला प्राप्त झाला आहे अशा स्थिरबुध्दी पुरुषाचे लक्षण काय? तो स्थिरबुध्दी कसा बोलतो? कसा बसतो? आणि कसा चालतो?

**अर्जुन म्हणाला,**

***स्थिरावला समाधींत स्थित-प्रज्ञ कसा असे।***
***कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा॥***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाचा प्रश्न आहे. इथून पुढे अध्याय पूर्ण होईपर्यत स्थितप्रज्ञ चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

स्थितप्रज्ञ स्थितप्रज्ञ हा गीतेचा आपला स्वत:चा शब्द आहे. मौलिक शब्द आहे. गीतेपूर्वी वेद वा उपनिषदे किंवा अन्य धार्मिक साहित्यात कुठेही हा शब्द आलेला नाही. स्थितप्रज्ञ म्हणजे स्थिर बुध्दीचा पण बुध्दी तर कुठल्याही विषयात स्थिर होऊ शकते म्हणून काही प्रत्येक व्यक्ती स्थितप्रज्ञ बनू शकत नाही. गीतेने स्थितप्रज्ञासोबत समाधिस्थ हे विशेषण जोडले आहे. समाधीत जो स्थिरावला तो स्थितप्रज्ञ. समाधी दोन प्रकारे साधता येते. एक पातंजल समाधी. महर्षि पतंजलींनी योग सूत्रांची रचना केली. यात ध्यानजन्य समाधीचा उल्लेख येतो. एका आसनावर स्थिर बसावे. डोळे मिटावेत. एकाग्रतेने ईश्वराचे ध्यान करावे. चित्त परमात्म्याच्या ठायी तल्लीन होईल. देह आणि इंद्रियांचे भान उरणार नाही. अशी स्थिती काही काळ टिकते. या अवस्थेला लय किंवा वृत्ती असे म्हणतात. निद्रा लय वा वृत्ती आहे. निद्रेसाठी प्रयत्न नाही करावे लागत. निद्रावस्थेच्या लयाला **'सबीज लय'** असे म्हणतात. या लयीत अज्ञानाचे बीज असते. परमात्मरुपी ज्ञानाग्नीनेच अज्ञानरुपी बीज जळून जाते. समाधीतही अज्ञान नष्ट होत नाही. समाधी सुध्दा एक प्रकारची लय आहे. गहिरी लय आहे एवढेच काय ते!

समाधी प्राप्त झाल्यावर विकार नष्ट होतील असे नव्हे. विकारांचे बीज समाधीत यथावत रहाते. समाधीतून सिध्दी लाभ होतो. साधक या जाळात गुंतून पडतो. स्थितप्रज्ञाची समाधी मात्र वेगळी असते. विनोबा म्हणतात की ती 'लय' नसून 'स्थिती' असते. स्थिती म्हणजे स्थिर रहाणारी अवस्था होय. अर्जुनाचा प्रश्न ध्यानजन्य समाधीबाबत नाही कारण ती लय आहे, स्थिती नव्हे. त्याचा प्रश्न सहजावस्थेबाबतचा आहे. ही अवस्था जागृतीत असते. ईश्वराशी अखंड संबंध राखणारी असते. अकर्तेपणाचा अनुभव घडवणारी असते. या अवस्थेत विकारांचे बीज दग्ध होते. अर्जुन या सहजावस्थेबाबत प्रश्न विचारत आहे. ही सहजावस्था प्राप्त करुन घेणारा स्थितप्रज्ञ होय. ही जागृतीतली समाधी

होय. ध्यानजन्य समाधी तर या समाधीचा एक उपाय आहे केवळ, अधिक काही नाही.

या अध्यायात सांख्यबुध्दीची चर्चा आली आहे. सांख्यबुध्दी म्हणजे जीवनाची तीन तत्वे सांगितली आहेत. 1) एक आत्म्याची अमरता. 2) दोन देहाची नश्वरता आणि 3) तीन स्वधर्माची अटळता-अबाध्यता. या सिध्दांतांना आचरणात आणण्यासाठी योगबुध्दी हवी. समता हवी. निष्कामता हवी. ही लक्षणे जो आचरणात आणतो तो पूर्णपुरुष होय. आता पूर्णपुरुषाची लक्षणे सांगितली जाताहेत. या लक्षणातून सर्वसाधारण माणसाला मार्गदर्शन होईल. सिध्दपुरुष मुक्कामी पोहोचलेला असतो तर साधक प्रवासात असतो.

शंकराचार्य म्हणतात की **सर्वत्रैव ह्यध्यात्मशास्त्रे कृतार्थलक्षणानि यानि तान्येव साधनान्युपदिश्यन्ते यत्नसाध्यत्वात्। यानि यत्नसाध्यानि साधनानि लक्षणानि च भवन्ति तानि।** साधकासाठी प्रयत्नांती साध्य होते ते सिध्दपुरुषाचे लक्षण असते.

स्थितप्रज्ञ शब्दात 'प्रज्ञा' शब्द आहे. प्रज्ञा म्हणजे शुध्द बुध्दी. विकारशून्य बुध्दी. प्रज्ञा म्हणजे सर्वसामान्य बुध्दी नव्हे. प्रज्ञा रात्रंदिवस ईशतत्वाच्या अनुसंधानात असते. प्रज्ञा ईश्वरचरणी स्थिरावते. यामुळे सर्व क्रिया परमात्म्याच्या अखंड भक्तीत सामावतात. अर्जुन विचारतो की अशा आदर्श पुरुषाची लक्षणे सांगा. तो रहातो कसा? बोलतो कसा? चालतो कसा?

: 55 :

**श्री भगवान उवाच**

*प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्।*
*आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ यदा:** हे पार्था, जेव्हा
- **मनोगतान्:** मनात राहिलेल्या
- **सर्वान् कामान्:** सर्व कामनांना
- **प्रजहाति:** त्याग करुन देतो (आणि)
- **आत्मनि:** परमात्म्याच्या ठायी
- **आत्मना एव:** स्वत:च
- **तुष्टः:** संतुष्ट असतो
- **तदा स्थितप्रज्ञः:** तेव्हा तो पुरुष स्थितप्रज्ञ
- **उच्यते:** म्हटला जातो

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे अर्जुना, ज्या वेळी हा पुरुष मनातील सर्व कामना पूर्णपणे टाकतो आणि आत्म्यानेच आत्म्याच्या ठिकाणी संतुष्ट रहातो, त्यावेळी त्याला स्थितप्रज्ञ म्हटले जाते.

**श्री भगवान म्हणाले**

*कामना अंतरांतील सर्व सोडूनि जो स्वयें*
*आत्म्यांत चि असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला।*

**विषय:** या श्लोकात स्थितप्रज्ञाची दोन लक्षणे सांगितली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) एक म्हणजे तो मनातल्या तमाम वासना आणि कामनांचा सर्व प्रकारे त्याग करत असतो. 2) दुसरे म्हणजे तो ईश्वराच्या ठायीच संतुष्ट असतो.

2) प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या इच्छेने युक्त असतो. इच्छा आणि वासना दोन प्रकारच्या असतात. एक शुध्द वर्ग दुसरा अशुध्द वर्ग. या दोन्ही वर्गात परत सत्व, रज आणि तम असे तीन भाग असतात. सत्य शुध्द वर्गात येतो. रज व तम अशुध्द वर्गात मोडतात. रजोगुणी आणि तमोगणी वासनांचा त्याग करावा लागतो. या अधोगतीला नेतात. यासाठी आरंभी सात्विक वासना धरावी लागते.

गीतेच्या चौदाव्या अध्यायातील 17 व 18 व्या श्लोकात सात्विक, राजसी, तामसी गुणांचे चांगले विश्लेषण आले आहे. सतराव्या व अठराव्या अध्यायातही आहार, यज्ञ, आणि कर्त्याच्या सात्विक, राजसिक, तामसी लक्षणांची चर्चा आलीय. काय ग्रहण करावे? कशाचा त्याग करावा? याचे नेमके ज्ञान होऊ शकते. एकदा सात्विक वासना मनी धरुन राजसी-तामसी वासनांचा त्याग करायला शिकलो की मग सात्विक वासना-त्यागाचाही सराव करावा लागतो, करता येतो. यासाठी ईश्वरार्पण बुध्दी असायला हवी. तरच हे करता येणे शक्य होते. यामुळे ईशभक्तीची चर्चा याच प्रकरणात एकसष्ठाव्या श्लोकात आली आहे. स्थितप्रज्ञ पुरुष परमेश्वराच्या ठायी बुडून गेलेला असतो यामुळे त्याच्या मनी कामनांचा लवलेश नसतो. त्याला सहजपणे

कामना त्याग करणे शक्य होते. त्याच्या तमाम क्रिया ईशप्रेरित असतात. तो स्वत:ला शून्य बनऊन ईश्वराच्या ठायी विलीन करुन देत असतो. या श्लोकाच्या उत्तराध्र्दात हाच मुद्दा आला आहे. 'कामना त्याग' हे स्थितप्रज्ञाचे एक लक्षण होय!

3) दुसरी गोष्ट अशी की परमेश्वर आनंदमय आहे. सत्-चित्-आनंदरुपी आहे. यात स्थितप्रज्ञाचे चित्त बुडून जाते. यामुळे त्याला कामना आनंदित करु शकत नाहीत. परमात्म्याच्या ठायी बुडून जाण्यापूर्वी त्याला वासनांमुळे आनंद मिळायचा. प्रत्येक जण वासनेच्या माध्यमातूनच आनंद मिळवत असतो. वेगवेगळ्या प्रकारच्या इच्छा उत्पन्न होतात. त्यांना तृप्त केल्यावर थोडे सुख लाभते पण वासना कदापि तृप्त होत नाहीत यामुळे त्यांच्या पूर्तीतून संपूर्ण सुख लाभू शकत नसते. वासना तृप्त होत नाही यामुळे दु:खाचा अनुभवही येतो. खरा आणि अखंड आनंद तर वासना-त्यागातून लाभतो. वासनांचा त्याग करणे ईश्वरभक्तीतूनच शक्य होत असते.

शंकराचार्य म्हणतात की, **सर्वकामपरित्यागे तुष्टिकारणाभावात् शरीरधारण-निमित्तशेषे च सत्युन्मत्त-प्रमत्तस्येव प्रवृत्ति: प्राप्ता इत्यत उच्यते आत्मन्येव। प्रत्यगात्म-स्वरुपे एव। आत्मना स्वेनैव बाह्यलाभनिरपेक्षस्तुष्ट परमार्थ-दर्शनामृतरसलाभेनान्यस्माद् अलंप्रत्ययवान् स्थितप्रज्ञ:।** याचा अर्थ थोडक्यात असा की स्थितप्रज्ञाचे पहिले लक्षण असे की तो तमाम कामना वा इच्छांचा त्याग करतो. खरे तर कामनांमुळेच माणसाला संतोष लाभतो मग अशावेळी स्थितप्रज्ञाला आनंद कशामुळे मिळतो? हा एक प्रश्न आहे. कामना सुटल्या तरी शरीर सुटले असे होत नाही कारण देह प्रारब्ध कर्माच्या अधीन असते. बरे, ज्ञान प्राप्ती झाल्यावर स्थितप्रज्ञ काही लागलीच देह सोडत नाही. देह सुटेपर्यंत त्याला वाट बघावी लागते. ज्या प्रारब्ध कर्मामुळे त्याला देह लाभतो ते जोवर क्षीण होऊन जात नाही तोवर त्याला देह धारण करावा लागतो. स्थितप्रज्ञाला देह असेपर्यंत कुठल्याही प्रकारे संतोष लाभत नाही, आनंद मिळत नाही. ईश्वरार्पण बुध्दीमुळे त्याला आनंदलाभ होतो. त्याला सारे पदार्थ तुच्छ वाटू लागतात. सारे विषय क्षुद्र वाटू लागतात. त्याचा ओढा विषयांकडे वळत नाही.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की प्रत्येकाच्या मनातील इच्छा, कामना वा वासना आत्मसुखप्राप्तीतला सर्वात मोठा अडसर आहे. कामना निमाली. मन ईश्वराठायी रमले म्हणजे स्थितप्रज्ञ झाला.

: 56 :

*दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह:।*
*वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दु:खेषु:** दु:ख प्राप्त झाल्यावर
- **अनुद्विग्नमना:** ज्याचे मन दु:खी, उद्विग्न होत नाही
- **सुखेषु:** (आणि) सुख प्राप्त झाल्यावर (ज्याला)
- **विगतस्पृह:** (स्पृहा म्हणजे इच्छा) सुखाची इच्छा नसते
- **वीतरागभयक्रोध:** (आणि) ज्याचा राग, भय आणि क्रोध नष्ट झाला आहे
- **स्थितधी:** (तो) स्थितप्रज्ञ
- **मुनि: उच्यते:** मुनी म्हटला जातो

**अर्थ**

दु:खदायक प्रसंगी ज्याच्या मनाला खेद वाटत नाही, सुखांच्या प्राप्तीविषयी ज्याला मुळीच इच्छा नाही, तसेच ज्याचे प्रीती, भय व क्रोध नाहीसे झाले आहेत, असा मुनी स्थितप्रज्ञ म्हटला जातो.

***नसे दु:खांत उद्वेग सुखाची लालसा नसे***
***नसे तृष्णा भय क्रोध तो स्थित-प्रज्ञ संयमी।***

**विषय:** या श्लोकात स्थितप्रज्ञाची आणखी दोन लक्षणे सांगितली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) नाना प्रकारची दु:खे आली असतानाही तो उद्विग्न होत नाही. व्याकुळ होत नाही. उदास होत नाही. दु:खात पराभूत होत नाही. सुख लाभले की सुख कायम राहो, सुखात वृध्दी होवो, सदा सुखाचीच परिस्थिती राहो, अशी लालसा त्याच्या मनी नसते.

2) दुसरे लक्षण असे की त्याचे सारे विकार नष्ट होऊन जातात.

प्रत्येकाला सुख हवे. दु:ख कुणालाच नको. स्पेन देशात अब्दुर्रहमान नावाचे एक न्यायी आणि पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांनी आपल्या डायरीत लिहिले आहे की पन्नास वर्षांच्या आयुष्यात संपूर्ण सुखाचे केवळ चौदा दिवस व्यतीत झाले. जगात सुखाहून दु:ख अधिक आहे. दु:खाचे मुख्य कारण अहंकार आहे. तुकोबा म्हणतात **'सुख पहाता जवापाडे। दु:ख पर्वता एवढे'**

एक श्रीमंत गृहस्थ म्हणायचेत की माझ्याजवळ धन आहे पण सुख नाही. याचे काय कारण असे त्याना विचारले असता ते म्हणाले "माझी बायको आणि मुले माझ्या इच्छेनुसार वागत नाहीत. माझे ना घरात चालत ना दुकानात. मुले लहान होते तोवर माझे ऐकायचे आता ते मोठे झालेत आता ते माझे ऐकत नाहीत." आता दु:ख कसे संपावे ते तरी सांगा कुणी. विचार करु जाता हे ध्यानात येते की या दु:खाचे मूळ कारण त्यांचा आग्रही स्वभाव. सिध्दांतविषक आग्रह आपण समजू शकतो पण प्रत्येक बाबतीत आग्रह कसा चालेल?

दु:खाचे तीन मुख्य प्रकार संभवतात. (1) अधिभौतिक म्हणजे जगात दिसणारी दु:खे- शब्द, स्पर्श, रस, रुप आणि गंध, या पाच तत्मात्रांशी आपला नित्याचा संबंध येतो. यामुळे उत्पन्न होणारे दु:ख अधिभौतिक होय. भूकंप, महापुर, अवर्षण या नैसर्गिक आपदा असतात. यांना आधिदैविक दु:खे असे म्हणतात. याशिवायची अनुभवपर दु:खे आध्यात्मिक दु:खे होत.

दु:ख टाळायचा स्थूल उपाय म्हणजे आपल्या गरजा कमी करणे होय. साधनांमुळे सुख लाभत नाही. साधने सर्वसुलभ असावीत. दु:खे मानसिक असतात. ती बाहेरुन येत नसतात. अलिप्तता साधली की वैभवशाली साधने असलीत तरी दु:खे टाळता येतात. अशी अलिप्तता साधणे दुर्लभ आहे. यासाठी बाह्य साधने कमी करावीत. अपरिग्रही रहावे. साधेपणाने रहावे. यामुळे दु:खाची निमित्ते-कारणे टाळता येतात.

एका श्रीमंत माणसाने सांगितले की आम्ही सारे कुटुंबातले लोक काश्मिरला यात्रेनिमित्त गेलो आणि तिथे खूप महागड्या वस्तुंची खरेदी केली. एकूण वीस दिवसांची यात्रा होती ती. या वीस दिवसात आम्ही वीस हजार रुपये खर्च केले. आता त्यांनी ही सारी खरेदी करुन काय साधले ? समाजाचे धन बरबाद झाले. त्यांचे व्यक्तिगत नुकसानही झाले. सदैव सुखी रहाता येईल अशा सवयी लाऊन घ्याव्यात. साधने अशी असावीत साधी सोपी खूप महागडी नसावीत. ती सर्वसुलभ असावीत. दु:ख बाहेर कुठे नसून ते तर मानसिक आहे. यामुळे आतून जर अलिप्तता साधता आली तर मग वैभवशाली साधने हाताशी असतानाही दु:खे टाळता येतील. यासाठी साधेपणा हवा. संग्रह कमी असावा.

दु:खे मुख्यत्वेकरुन आधिभौतिकच असतात. आधिदैविक दु:खे आकस्मिक येऊन पडतात. भूकंप, अनावृष्टी, अतिवृष्टी काही सारखी येत नसतात. यामुळे माणूस त्यांना झेलू शकतो. आध्यात्मिक दु:खे मुख्यत्वेकरुन आध्यात्मिक साधनाकाळात येतात. आध्यात्मिक साधना करताना ज्ञान अधुरे असल्यामुळे साधना योग्य प्रकारे होऊ शकत नाही. एका साधकाने आत्मदर्शन न झाल्यामुळे विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली. त्यांनी साधनेसाठी अपार धडपड केली. गांधीजींच्या आश्रमातही राहिलेत पण त्यांच्या मनात का कोण जाणे कुठून आत्मदर्शनाची विचित्र कल्पना शिरली होती. आपल्या कल्पनेनुसार आत्मदर्शन न घडल्यामुळे त्यांनी आत्महत्या केली. ते निराश झाले होते.

सुखेही अशीच तीन प्रकारची असतात. माणूस दु:खे टाळू बघतो. सुखे मिळवू इच्छितो. अंतिम सुख भक्तीतून-वैराग्यातून लाभते. आत्मानुभवातून येते अंतिम सुख पण हे मिळत नाही तोवर सात्विक सुखांसाठी प्रयत्न करत रहावेत. या तीन प्रकारच्या सुखांची चर्चा अठराव्या अध्यायात आली आहे. तुलसीदासजी म्हणतात की

***रामकथा के तेइ अधिकारी।***
***जिन्ह के सत-संगति अति प्यारी॥***

अर्थात् ज्याना सत्संग विशेष प्रिय आहे तेच राम कथेचे अधिकारीजन होत. संतसंगतीतूनच त्याना भक्तीचा लाभ होऊ शकेल. दुसऱ्या एका ठिकाणी तुलसीदासजी लिहितात की **संत चरन पंकज अति प्रेमा।** संतचरणी ज्यांची आत्यंतिक प्रीती आहे तेच शाश्वत सुखाची प्राप्ती करुन घेऊ शकतात. संत संगती सोबत सद्ग्रंथांचे पठण असावे. स्वाध्याय असावा. सत्कर्मे आचरावीत. सात्विक तप वरावे. सात्विक दाने करावीत. सात्विक आहार घ्यावा. व्यवहारात, बोलण्या-चालण्यात सात्विकता पाळावी. अशाप्रकारे सात्विकतेमुळे आत्मिक सुख लाभेल.

या श्लोकाच्या पूर्वार्ध्दात सुख-दु:खाविषयी स्थितप्रज्ञाची स्थिती वा भूमिका काय याचे निरुपण आले

आहे. परमात्म सुखाचा अनुभव आल्यावर स्थितप्रज्ञ पुरुष हा बाह्य सुख-दु:खात तटस्थ रहातो. सामान्य माणसाच्या मनात सुखाची परिस्थिती कायम रहावी अशी कामना असते. एवढेच नव्हे तर यात वृध्दी होत रहावी असेही त्याला वाटते. स्थितप्रज्ञ कामनारहित असतो. त्याच्या ठायी सुखाची लालसा नसते. दु:खाचा दाह नसतो. तो तटस्थ असतो. अशा प्रकारे सुख-दु:ख समतेचे लक्षण पूर्वार्ध्दात सांगितले आहे.

उत्तरार्ध्दात दुसरे लक्षण येते की तो निर्विकार असतो. विनोबा म्हणतात की कामनेचे प्रकार दोन. शुभ आणि अशुभ किंवा शुध्द आणि अशुध्द. यांचे तीन परिणाम संभवतात. एक राग म्हणजे आसक्ती किंवा तृष्णा. दोन क्रोध आणि तीन भय. हे तिन्ही परिणाम दोन प्रकारच्या कामनांनी संभवतात. अनुकूल परिस्थिती तृष्णा उत्पन्न करते. प्रतिकूल परिस्थितीमुळे क्रोध उफाळतो. भय देखिल उपजते. कामना शुध्द असो वा अशुध्द, शुभ असो वा अशुभ, हे परिणाम उद्भवतातच उद्भवतात. शुभ आणि शुध्द वा अशुभ आणि अशुध्द कामनांमधूनही तृष्णा उत्पन्न होते. या कामना तृप्त झाल्यात तर आसक्ती वा तृष्णा उत्पन्न होते, तृप्त न झाल्यात तर क्रोध वा भय उपजते.

जीवनविषयक तृष्णेमुळेच मृत्युचे भय जागते. कंसाला मरणाचे भय सतावते. रावणाला मरणाचे भय थकवते. राक्षस मरणामुळे भयभीत असतात. अर्थात् मृत्यु समयी सिध्दपुरुषही मूर्च्छित झाले असल्याची अनेक उदाहरणे देता येतील. स्थितप्रज्ञ कामनेचा त्याग करतो. यामुळे तृष्णा, भय आणि क्रोध यापासून मुक्त असतो.

स्थितप्रज्ञासाठी गीतेने 'मुनी' शब्दाचा उपयोग केला आहे. या मुनीचा बाह्य वेष वा परिधानाशी काहीही संबंध नाही. स्थितप्रज्ञ लक्षणांनी युक्त व्यक्तीला मुनी म्हणावे. ती एक आंतरिक सिध्दी आहे. सामान्य जन बाह्य वेषावरच मोहित होऊन जातात. गीतेने स्वच्छ शब्दात सांगितले आहे की मुनीचा बाह्य वेषाशी कुठल्याही प्रकारचा संबध नाही. तुकोबा म्हणतात **'अंतरी निर्मळ वाणीचा रसाळ त्याच्या गळा माळ असो नसो.'**

: 57 :

***य: सर्वत्रानभिस्नेहस् तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।***
***नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: सर्वत्र:** जो पुरुष सर्व ठिकाणी, सर्व जागी
- **अनभिस्नेह:** विशेष स्नेहरहित आहे (आणि)
- **तत् तत् शुभ-अशुभम्:** त्या त्या शुभ आणि अशुभाला
- **प्राप्य न अभिनन्दति:** प्राप्त झाल्यावर न तर हर्षित होतो
- **न द्वेष्टि:** (आणि) न द्वेष करतो
- **तस्य प्रज्ञा:** त्याची प्रज्ञा
- **प्रतिष्ठिता:** परमात्म्याच्या ठायी स्थिरावली, स्थिर होऊन गेली

**अर्थ**

जो पुरुष सर्व बाबतीत स्नेहशून्य असून त्या त्या शुभ किंवा अशुभ गोष्टी घडल्या असता प्रसन्नही होत नाही किंवा त्यांचा द्वेषही करत नाही, त्याची बुध्दी स्थिर झाली.

***सर्वत्र जो अनासक्त बरें वाईट लाभतां***
***न उल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली ।***

**विषय:** या श्लोकात स्थितप्रज्ञाची आणखी दोन लक्षणे सांगितलेली आहेत. 1) एक अनासक्त. 2) दुसरे तटस्थ. तमाम प्रसंग वा क्रियेत अनासक्त. शुभ-अशुभ, प्रिय-अप्रिय लाभले तरी तटस्थ.

**स्पष्टीकरण**

1) खरे तर आसक्ती हा मनाचा गुण आहे. विवेकाच्या अभावी योग्य त्या वस्तुबद्दल आसक्ती दर्शवली जात नाही. चुकीच्या वस्तुबद्दल आसक्ती जागल्यामुळे दु:ख उत्पन्न होते. नातलग वा मित्रांच्या ठायी सहजपणे आसक्ती जागते. मित्र वा नातलगांच्या ठायी आसक्ती नाही जागली तर सार्वजनिक सेवेच्या क्षेत्रात ती जागते. कुठे शिष्य गुरुच्या ठायी तर कुठे गुरु शिष्याच्या ठायी आसक्त असतो. आसक्ती कुठल्याही विषयी वा कुठल्याही प्रकारची का असेना दु:ख उत्पन्न होईलच होईल. हे दु:ख टाळण्याचा एकमात्र उपाय म्हणजे आसक्ती भगवंताच्या

ठायी जागावी. गीतेच्या सातव्या अध्यायातल्या पहिल्या श्लोकात '**मय्यासक्तमना:**' येते. अर्थात् आपल्या मनात जागलेली जगत्‌विषयक आसक्ती ईश्वराच्या ठायी जागावी. याशिवाय जगाविषयीची आसक्ती दूर करता येणार नाही.

इथे असा प्रश्न निर्माण होतो की जगाविषयी आसक्ती जागली तर दु:ख उपजते ना मग ईश्वराविषयी आसक्ती जागली तर दु:ख का निर्माण होत नाही? याचे कारण असे की जगाचे पदार्थ सत्य नाहीत. सारे नातलग नश्वर आहेत. नश्वर वस्तु शाश्वत आनंद कशा देतील? त्यातून दु:खच निर्माण होईल ना? ईश्वर क्षणिक वा अनित्य नाही. तो सत्, चित् आनंदरुपी आहे. यासाठी आधी बुध्दीपूर्वक ईश्वराला वरायला हवे. कुणा अधिकारी पुरुषाशी चर्चा करुन शंकांचे निरसन करुन घ्यायला हवे. संपूर्ण जगत् परमात्म्याचे आभासरुपी आहे. घडा ज्याप्रमाणे मातीचा आभास आहे. परमात्मा सत्य आहे. संपूर्ण जगत त्याचा आभास आहे. यामुळे मिथ्या आहे. मिथ्या वस्तु अखंड वा शाश्वत आनंद कसा बरे देईल? स्थितप्रज्ञ पुरुषाला ईश्वराची ओळख झाली आहे. त्यामुळे तो तर ईश्वराच्या ठायीच अनुरक्त असतो. जगाच्या ठायी आसक्त रहात नाही.

2) जगाची खरी सत्ता ईश्वराधीन आहे हे तो जाणतो. जीवाच्या हाती असलेली सत्ता खूपच मर्यादित आहे. यामुळे ईश्वराशी अनुकूल असणे हेच यथार्थ कर्तव्य होय. जगात नाना प्राणी आहेत. शुभ-अशुभ, प्रिय-अप्रिय, अनुकूल-प्रतिकूल प्राप्त होणे काही आपल्या एकट्याच्या अधीन नाही. अनिच्छेने अनेक प्रतिकूल घटना घडतात. त्या घटनांचे परिणामही झेलावे लागतात. यामुळे अनुकूल वातावरणात स्थितप्रज्ञ हर्षित होत नाही. प्रतिकूल वातावरणात द्वेष करत नाहीत. युक्तीपूर्वक प्रश्न सोडवतो. चित्तवृत्ती प्रक्षुब्ध होऊ देत नाही. विचलित होऊ देत नाही. महाभारतात एक श्लोक येतो तो असा

***सुखं वा यदि वा दु:खं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।***
***प्राप्तं प्राप्तमुपासीत् हृदयेनापराजित: ॥***
(शांतीपर्व अध्याय 25 श्लोक 26)

अर्थात् सुख असो वा दु:ख, प्रिय असो वा अप्रिय, अनुकूल असो वा प्रतिकूल जे ज्या वेळी प्राप्त होईल, त्यावेळी पराभूत न होता हृदयपूर्वक त्याचे सेवन करायला हवे.

चित्तावर सुख-दु:ख वा प्रिय-अप्रिय घटनांचा सुख-दु:खात्मक परिणाम होऊ नये, याचा विचार करावा. माणूस चैतन्यशक्ती आहे. समस्त सृष्टी जगत जड आहे. खरे पाहू गेल्यास चैतन्याची जडावर सत्ता असावी. स्वामित्व हवे. यामुळे त्याचा सुख-दु:खात्मक परिणाम चित्तावर होऊ नये. अशी स्थिती जागायला हवी. स्थितप्रज्ञ पुरुषाने अशी स्थिती प्राप्त करुन घेतलेली असते.

: 58 :

***यदा संहरते चायं कूर्मोड्.गानीव सर्वश: ।***
***इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च:** आणि
- **अयं यदा:** हा पुरुष जेव्हा
- **इन्द्रियाणि इन्द्रियार्थेभ्य:** अंतर्बाह्य सर्व इंद्रियांना आपापल्या विषयांपासून
- **कूर्म: अंगानि इव:** कासव ज्याप्रमाणे आपल्या सर्व अंगांना
- **सर्वश: संहरते:** (तसेच)चहुकडून ओढून घेतो (तेव्हा)
- **तस्य प्रज्ञा:** त्याची बुध्दी
- **प्रतिष्ठिता:** परमात्म्याच्या ठायी स्थिर झाली, होऊन गेली

**अर्थ**

कासव सर्व बाजुंनी आपले अवयव जसे आत ओढून धरतो, त्याचप्रमाणे जेव्हा हा पुरुष इंद्रियांच्या विषयांपासून इंद्रियांना सर्व प्रकारे आवरुन घेतो, तेव्हा त्याची बुध्दी स्थिर झाली, असे समजावे.

***घेई ओढूनि संपूर्ण विषयांतूनि इंद्रियें***
***जसा कासव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ।***

**विषय:** या श्लोकातून स्थितप्रज्ञाचे एक लक्षण सांगितले आहे. सर्व इंद्रियांचा, सगळीकडून तमाम विषयातून काढून निग्रह वा संयम करावा.

**स्पष्टीकरण**

मन आणि बुध्दी ही आंतरिक इंद्रिये होत. बुध्दीला मनाचेच अंग मानले तर मन हेच एक इंद्रिय मानणे हे अधिक शास्त्रसुसंगत आहे. निश्चय करणाऱ्या मनाच्या भागाला बुध्दी म्हणतात. तेराव्या अध्यायातील पाचव्या श्लोकात **इंद्रियाणि दशैकं च** असे म्हटले आहे. ज्ञानेंद्रिये पाच, कर्मेंद्रिये पाच, मन एक अशी एकादश इंद्रिये मानली आहेत. यावर स्थितप्रज्ञ पुरुष अधिकार मिळवतो. यापैकी पाच ज्ञानेंद्रिये बलवान आहेत. मन अति बलवान आहे. डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये होत. रुप, शब्द, गंध, रस आणि स्पर्श या इंद्रियांचे विषय होत. ज्ञानेंद्रियांना या पाच विषयांचेच ज्ञान होते. मनाशिवाय ही ज्ञानेंद्रिये व्यर्थ होत.

यामुळे तिसऱ्या अध्यायाच्या बेचाळिसाव्या श्लोकात म्हटले आहे की विषयांपेक्षा इंद्रिये श्रेष्ठ होत. ज्ञानेंद्रियांच्या अभावी विषयांचे ज्ञान कसे होईल? पंच ज्ञानेंद्रियांच्या अभावी विषयांचे ज्ञान कसे होईल? पंच ज्ञानेंद्रियांहून मन श्रेष्ठ. मनाहून बुध्दी श्रेष्ठ. बुध्दी निश्चय करते. मन अमलात आणते. आधी बुध्दीला पदार्थाचे ज्ञान होते. मन सारासार विवेक करते. निर्णयाप्रत पोहोचते. बुध्दीच्या निर्णयाला अमलात आणण्यासाठी मन काही बुध्दीला साथ देत नाही. सहकार्य करत नाही. अशा प्रकारे मन आणि बुध्दीच्या संघर्षात माणसाचे जीवन चालते. स्थितप्रज्ञ माणसाने सर्व इंद्रियांवर विजय संपादन केलेला असतो. यामुळे हा संघर्ष त्याच्या ठायी नसतो.

पाच ज्ञानेंद्रियांमध्ये डोळे सर्वात प्रबळ आहेत. त्याच्याशी खूप काळजीपूर्वक संबंध राखायचा असतो. डोळ्यांचा विषय रुप आहे. रुपे दोन प्रकारची असतात. सुस्वरुप आणि कुरुप. सुंदर रुपाचे आकर्षण वाटते. कुरुप वस्तुबद्दल घृणा वाटते. सुंदराचे आकर्षण वाटते मग आसक्ती जागते.

कानाचा विषय शब्द आहे. हेही प्रबळ इंद्रिय आहे. काय ऐकावे आणि काय ऐकू नये याचा विवेक पाळायला हवा. व्यर्थ ऐकण्यात, निंदा-स्तुती ऐकण्यात मौज वाटते. यामुळे सावधपणा हवा.

नाकाचा विषय गंध आहे. सुगंधी अत्तर, तेल, फुलांचे अनेकांना आकर्षण जागते.

जीभेचा विषय रस आहे. यामुळे जीभेला रसनेंद्रिय वा स्वादेंद्रियही म्हणतात. हेही प्रबळ इंद्रिय आहे. भोजनातला संयम खूप विरळपणे दिसून येतो. स्वयंपाकाची सारी भिस्त चवीवरच अवलंबून असते. आरोग्य विचार ध्यानी घेऊन स्वयंपाक केला जात नाही. यासाठी उपवास सांगितला गेला आहे. एकादशीचा उपवास हवा.

त्वचेचा विषय स्पर्श आहे. स्पर्शाचे आकर्षण अनिवार असते. बालकांमध्येसुध्दा यामुळे चुकीच्या सवयी लागतात.

कानाचा विषय शब्द आहे. हा वाणीद्वारे प्रकट होतो. वाणीवरही आपले नियंत्रण नसते. आपण एका मर्यादेहून अधिक बोलतो.

अशा प्रकारे आपले मन तमाम इंद्रियांच्या अधीन असते. इंद्रियाधीन झाल्यावर मन बुध्दीच्या नियंत्रणात रहात नाही. विकाराधीन होते. मन जर विचार वा विवेकाधारित झाले तर मग इंद्रियांवर पूर्ण अधिकार मिळवता येतो. स्थितप्रज्ञ इंद्रियांवर काबू मिळवून घेतो. यामुळे त्याचे मन सदैव विवेकाधीन असते.

पंचावन्न ते अठ्ठावन्न या चार श्लोकांमधून अशा प्रकारे स्थितप्रज्ञाची पुढील सात लक्षणे वर्णिली आहेत. 1) सर्व कामनांचा त्याग 2) परमात्म्याच्या ठायी संतुष्टी 3) सुख-दुःखात समता 4) तृष्णा-क्रोध-भयापासून मुक्ती 5) सर्वत्र अनासक्त भाव 6) शुभ वा अशुभाच्या ठायी समान दृष्टी आणि 7) इंद्रियांचा संपूर्णपणे निग्रह.

59 ते 68 व्या श्लोकातून पुढे साधकाने स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचे कशा प्रकारे आचरण करावे? यात कुठल्या अडचणी येतात? त्या दूर कशा कराव्यात? याबाबत चर्चा आली आहे.

: 59 :

*विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।*
*रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **निराहारस्य:** निराहारी, उपवास करणारे, इंद्रियांनी विषयांचे सेवन न करणारे
- **देहिनः** देहधारींचे
- **विषया:** पाच विषय
- **विनिवर्तन्ते:** (बाहेरुन) अवश्य सुटून जातात
- **रसवर्जम्:** पण विषयांची वासना सुटत नाही (पण)
- **अस्य रस:** अपि: या पुरुषाचा रसही
- **परं दृष्ट्वा:** परमात्म्याच्या दर्शनाने, साक्षात्काराने
- **निवर्तते:** निवृत्त होऊन जातो

### अर्थ

इंद्रियांनी विषयांचे सेवन न करणाऱ्या पुरुषाचेही केवळ विषयच दूर होतात पण त्यांच्याविषयीची आवड नाहीशी होत नाही. या स्थितप्रज्ञ पुरुषाची तर आसक्तीही परमात्म्याच्या साक्षात्काराने नाहीशी होते.

*निराहार-बळें बाह्य सोडी विषय साधक*
*आंतील न सुटे गोडी ती जळे आत्म-दर्शने ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा करण्यात आली आहे. 1) निराहारी बनून म्हणजे बाह्य विषयांचा त्याग करुन विषय सुटू शकतात पण 2) मनाच्या ठायी त्या-त्या विषयांना भोगण्याची असलेली वासना काही सुटत नाही 3) ती केवळ ईश्वर-दर्शनामुळेच सुटते.

### स्पष्टीकरण

उपवास केल्यामुळे इंद्रिये दुबळी होतील. विषयांना आपोआपच सोडून देतील असा एक मार्ग साधकाला दिसतो. तो तसे करुन बघतो. साधक आणखी एक उपाय करुन बघतो, तो म्हणजे प्रत्येक इंद्रियांचा विषय सोडू बघतो. विषय सोडून दिल्यामुळे इंद्रियांना तो-तो विषय सोडून द्यायचा अभ्यास होतो. हा अभ्यास आपोआप होतो आणि अशा प्रकारे इंद्रिये ताब्यात येतात. हे कार्य सुगम-सोपे आहे. याचा अर्थ असा की डोळ्यांनी बघायचा, कानांनी ऐकायचा, नाकाने गंधाचा, जीभेने स्वादाचा, त्वचेने स्पर्शाचा विषय सोडून द्यावा. अशा प्रकारे इंद्रियांचा निग्रह साधून अनेक साधक सारी कामे सोडून देतात. समाजाचा त्याग करतात. साधनेसाठी एकांतात जातात. समाजात राहिले तर परस्पर संबंध हा येणारच. समाजाचे काही तरी कामही करावे लागेल. यामुळे क्रोध जागणार. अहंकार दाटून येणार. विकार जन्माला येणार. स्त्री-पुरुषांचा परस्पर संबंध आला म्हणजे विकार जागे होणार. या विकारांवर विजय कसा प्राप्त करुन घ्यायचा हे न कळल्यामुळे साधक सारे काही सोडून देतात. एकांतस्थळी जायला प्रवृत्त होतात. अर्जुनाचीही अशीच स्थिती झाली आहे. मनात मोह, शोक वगैरे विकार जागलेत. त्यांना बाहेर कसे घालवायचे ते त्याला सुचत नव्हते. यामुळे सारे काही सोडून देऊन संन्यासी बनायची भाषा तो बोलायला लागला.

समाजात राहिल्यामुळे विकार उत्पन्न होतात हे खरे आहे, पण असे असल्यामुळे आपण कर्तव्याचा त्याग करुन जंगलाची वाट धरु नये. जंगलात गेल्यावर काही विकार उपजणे थांबणार नाही. एकांतात गेल्यावर सुध्दा काही विकार नष्ट होणार नाहीत. एकांतात गेल्यावर विकारांना संधी मिळणार नाही हे खरे. यामुळे ते प्रकट होणार नाहीत, पण ते नष्ट मात्र होणार नाहीत. परत जर आपण समाजात आलो तर विकार येतीलच.

विकारांच्या अधीन न होण्याचा उपाय अवघड आहे. विषय आणि इंद्रिये यांचा संबंध येऊ दिला नाही तरी त्या त्या इंद्रियांवर स्वामित्व मिळवण्यासाठी म्हणजे आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहाराचा त्याग करणे चुकीचे होय. अनेक साधक खूप उपवास करतात. त्यांचा चित्तावर ताबा उरत नाही. त्यांची अवस्था वेडी-पिशी होते. यामुळे बाह्यत: विषयांचा त्याग करता येतो. तो आतून करायचा असतो. हे अवघड आहे. याउलट बाहेरुन विषय त्यागाचा जेवढा अधिक प्रयत्न केला जातो तेवढा विषय अधिक प्रबळपणे चिकटून बसतो. याऐवजी संयम पाळावा. विषयांचे यथावश्यक सेवन करावे. आत्मदर्शनाचा-परमात्मदर्शनाचा प्रयत्न करावा. परमात्मतत्वाचा एकदा का अनुभव झाला की मग वासना आतून गळून पडते. इंद्रियांवर संपूर्णपणे विजय संपादित करता येतो. परमात्म्याचा अनुभव घेण्याचा साधा व श्रेष्ठ उपाय भक्ती आहे.

: 60 :

***यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चित: ।***
***इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मन: ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **हि कौन्तेय:** कारण की हे कुंतीपुत्रा अर्जुना
- **यतत:** प्रयत्नपूर्वक रहाणारे, प्रयत्न करणारे
- **विपश्चित:** पुरुषस्य अपि: विचारवंत पुरुषालाही
- **प्रमाथीनि इन्द्रियाणि:** व्याकुळ करणारी, क्षोभ करायला भाग पाडणारी बलवान इंद्रिये
- **मन: प्रसभं हरन्ति:** चित्ताला बलपूर्वक हरण करुन नेतात

### अर्थ

हे अर्जुना, आसक्ती नाहीशी न झाल्यामुळे ही क्षोभ उत्पन्न करणारी इंद्रिये प्रयत्न करत असलेल्या बुध्दीमान पुरुषाच्या मनालाही जबरदस्तीने आपल्याकडे ओढून नेतात.

*करीत असतां यत्न ज्ञात्याच्या हि मनास हीं*
*नेती खेंचूनि वेगानें इंद्रियें दांडगीं चि कीं।*

विषय: या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. (1) प्रयत्न केल्यावरही (2) विचारवंत पुरुष असल्यावरही (3) इंद्रिये एवढी बलवान आहेत की ती मनाला विषयांकडे खेचून नेतात

**स्पष्टीकरण**

परमात्म्याच्या अनुभवाचा सोपा मार्ग भक्ती कसा? याचे विवेचन साठाव्या श्लोकात येते. माणूस खूप विचार करतो. माणूस विचारवंत असतो. इंद्रिये बलवान असतात त्यामुळे मनाला विषयांकडे आकृष्ट करतात. मनाचा स्वभाव न ऐकण्याचा आहे. उत्कटपणे वागण्याचा आहे. 'करु नको' म्हटले ते अवश्य करील. त्याच्या या स्वभावाला मुरड घालावी लागते. हे काही सोपे काम नाही. मनावर जोर जबरदस्ती नाही करता येत. मन लहान मुलाप्रमाणे हट्टी आहे. काळजीपूर्वक समजावले तर ते ऐकते. आध्यात्मिक साधना करतानाही मनावर जबरदस्ती करुन चालत नाही. बळजबरी करता येत नाही. साधनेचा वेग एकवेळ मंदावला तरी चालेल पण जबरदस्ती करु नये. यामुळे मनावरचा ताबा उडून जातो. विक्षिप्तपणा जागतो. साबरमती आश्रमात एक बंधु होते. थंडीच्या दिवसातही ते उघड्या शरीराने रहायचे. थंडी काही सहन व्हायची नाही पण हट्ट कायम होता. अखेर परिणाम असा झाला की थंडी सहन करण्यासाठी म्हणून ते कुणाला न सांगताच शेर शेर गुळ खाऊन जात. मनुस्मृती (2/215) म्हणते की **बलवानिन्द्रिय-ग्रामो विद्वांसमपि कर्षति** अर्थात् हा इंद्रियांचा समुदाय खूप बलवान आहे. यामुळे विद्वानही विषयजाळात फसतात.

संत तुलसीदासजींनी मोठी रोचक कथा सांगितली आहे की नारदांना काम-मोहाने कसे सतावले? कसे हरवले? नारद तर देवाचे भक्त होते. कामदेव त्याना पराभूत करायला आला. नारदांवर त्याची मात्रा चालली नाही. कामदेव पराभूत झाले आणि माघारी वळले. यामुळे नारदांच्या मनात अहंकार उपजला. **जिता काम अहमिति मन माहीं** आपण कामदेवाला पराभूत केले असे त्याना वाटू लागले. हे सारे भगवत् कृपेमुळे घडले याचे त्याना विस्मरण झाले. भगवंतानी हे बघितले की नारदाच्या मनात गर्वरुपी वृक्षाचे बीज अंकुरित झाले आहे. **उर अंकुरेउ गरब तरु भारी** भगवान काही भक्ताचा अहंकार टिकू देत नाहीत. यामुळे त्यांनी अशी काही रचना केली की नारद आपली सारी साधना विसरुन गेले. मनावरला अधिकार गमावून बसले. कामाच्या पकडीतून सुटू शकले नाहीत. आता नारद सांगू लागले

*जप तप कछु न होइ तेहि काला।*
*हे विधि मिलइ कवन विधि बाला॥*
*अति प्रचंड रघुपति कै माया।*
*जेहि न मोह अस को जग जाया॥*

अर्थात् रघुनाथाची माया अती प्रचंड आहे. मायेने ज्याला मोहित केले नाही, पराभूत केले नाही असा जगात आहे तरी कोण? भगवंताचे असे म्हणणे आहे की हा इंद्रिय समुदाय खूपच बलदंड आहे. विवेकी पुरुष असो वा विद्वान असो, अतिबुध्दिमान असो वा इंद्रियांच्या अधीन न होऊन त्यांच्यावर विजय मिळवण्याचा सतत प्रयत्न करणारा का असेना तरीही इंद्रिये त्याच्या मनाला पराभूत करुन टाकतात.

: 61 :

*तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।*
*वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तानि सर्वाणि संयम्यः** त्या सर्व इंद्रियांना संयमात राखून
- **युक्तः** युक्त होऊन, चित्ताचा भगवंताशी योग करुन
- **मत्परः आसीत** (आणि) माझ्याठायी परायण होऊन रहायला हवे
- **हि यस्य इंद्रियाणि वशेः** आणि अशाप्रकारे ज्यांची इंद्रिये ताब्यात येऊन गेली
- **तस्य प्रज्ञाः** त्याची प्रज्ञा
- **प्रतिष्ठिताः** स्थिर झाली, स्थिरावली

**अर्थ**

म्हणून साधकाने त्या सर्व इंद्रियांना ताब्यात ठेऊन, चित्त स्थिर करुन, मनाला माझाच आधार देऊन ध्यानात बसावे कारण इंद्रिये ज्या पुरुषाच्या ताब्यात असतात, त्याची बुध्दी स्थिर होते.

*त्यांस रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण*
*इंद्रियें जिंकिलीं ज्यानें त्याची प्रज्ञा स्थिरावली।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितलेल्या आहेत. (1) इंद्रिय संयम (2) चित्ताचे विवेकी व अनासक्त असणे (3) भगवत्परायण होणे वा हरिभक्तीपरायण होणे (4) या तीन साधनांनी इंद्रियांना वश करुन बुध्दीला मूळ स्वरुपात स्थिर करणे.

**स्पष्टीकरण**

59 व्या श्लोकात सांगितले आहे की इंद्रियाना ताब्यात घेण्यासाठी संपूर्ण विषयांचा त्याग करणे काही पुरेसे नाही. विषय त्यागाने विषयांच्या आत असलेला रस काही नष्ट होत नाही. तो ईश्वराच्या अनुभवानेच नष्ट होतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की आपण बाह्य विषयांचा तर त्याग केला पण मनातून जर विषयांचा त्याग झाला नाही तर तर जग जसेच्या तसेच राहील. विषाचा एक थेंबही संपूर्ण आयुष्य उध्वस्त करु शकेल. त्याच प्रमाणे मनात जर विषयांविषयी यत्किंचितही आसक्ती उरली तरी विवेक संपवून टाकते.

अशा प्रकारे या दोन श्लोकांमधून भगवंतांनी सांगितले आहे की विषयांचा केवळ बाह्य त्याग नको. इंद्रियांना विषयांशी संबध्द राखले तर वासना पूर्ण होईल. संपूर्ण त्याग नको. संपूर्ण भोग नको. मधला मार्ग संयमाचा आहे. इंद्रियांच्या विषयात सात्विकता असावी. संयम पाळावा. विकारांना क्षीण करायचे प्रयत्न करता येतील, ते करावेत. चित्ताला सम ठेवावे. अलिप्त ठेवावे. अनासक्त बनावे. अशाप्रकारे बाहेरुन संयम साधावा. आतून निर्लिप्त व्हावे. तरी काही इंद्रियांवर पूर्णपणे ताबा मिळवता येणार नाही. खूप प्रयत्न केलेत. प्रयत्नांची पराकाष्ठा केली. यश लाभले नाही. अशावेळी माणूस देवापुढे झुकतो. शरणागती पत्करतो. भक्ती करतो. हीच भगवत्परायणता होय.

गीतेच्या प्रत्येक अध्यायातून भक्तीचा प्रवाह नांदतो. भक्ती सोपे साधन आहे. सुलभता हीच त्याची श्रेष्ठता होय. तुलसीदासजी म्हणतात की,

*खल कामादि निकट नहिं जाहीं।*
*बसइ भगति जाके उर माहीं॥*
*गरल सुधासम अरि हित होई।*
*तेहि मनि बिनु सुख पाव न कोई॥*

अर्थात् ज्यांच्या हृदयात भक्ती विराजमान आहे त्यांच्या समीप काम, क्रोध वगैरे विकार येत नाहीत. त्यांच्यासाठी विषाचे अमृत होते. शत्रु मित्र होतात. भक्तिरुपी मण्याशिवाय कुणालाच सच्चे सुख लाभत नसते.

भक्तीच्या आधाराशिवाय इंद्रियांना पूर्णपणे वश करता येत नाही हे पारखून घ्यावे. नीट जाणून घ्यावे. आतून चित्ताला योगयुक्त करावे. साधना करावी. यामुळे प्रज्ञा ईश्वराच्या ठायी स्थिर होऊन जाईल.

: 62-63 :

*ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते।*
*संगात्संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते॥*
*क्रोधाद् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः।*
*स्मृतिभ्रंशाद् बुध्दिनाशो बुध्दिनाशात् प्रणश्यति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विषयान्:** विषयांचे
- **ध्यायत:** ध्यान धरणारे, चिंतन करणारे
- **पुंस:** तेषु: पुरुषांना त्यात, त्या विषयात
- **संग:** आसक्ती
- **उपजायते:** उत्पन्न होते
- **संगात्:** आसक्तीमुळे
- **काम: संजायते:** इच्छा उत्पन्न होते
- **कामात्:** इच्छेमुळे
- **क्रोध:** क्रोध, राग, क्षोभ
- **अभिजायते:** उत्पन्न होतात
- **क्रोधाद् संमोह: भवति:** क्रोधामुळे मूढता उपजते अर्थात् अविवेक उपजतो
- **संमोहात्:** मूढता वा अविवेकाने
- **स्मृतिविभ्रम:** आत्मस्मृती नष्ट होते, स्मरणशक्ती भ्रष्ट होते
- **स्मृतिभ्रंशाद्:** आत्मस्मृती नष्ट झाल्यावर
- **बुध्दिनाश:** बुध्दीचा नाश होतो
- **बुध्दिनाशात्:** बुध्दी नष्ट झाल्यावर
- **प्रणश्यति:** मनुष्यत्व नष्ट होते, आपल्या ध्येय साधनांपासून ढळतो

### अर्थ

विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाची त्या विषयात आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीमुळे त्या विषयांची कामना उत्पन्न होते. कामना पूर्ण झाल्या नाहीत की राग येतो.

रागामुळे अत्यंत मूढता अर्थात् अविचार उत्पन्न होतो. मूढतेमुळे स्मरणशक्ती भ्रष्ट होते. स्मरणशक्ती भ्रष्ट झाली की बुध्दीचा नाश म्हणजे ज्ञानशक्तीचा नाश होतो आणि बुध्दीचा नाश झाल्यामुळे माणसाचा अध:पात होतो.

***विषयांचें करी ध्यान त्यास तो संग लागला***
***संगांतूनि फुटे काम क्रोध कामांत ठेविला।***
***क्रोधांतूनि जडे मोह मोहानें स्मृति लोपली***
***स्मृति-लोपें बुध्दि-नाश म्हणजे आत्म-नाश चि।***

### विषय

या श्लोकातून अध:पतनाची शिडी वर्णिली आहे. 1) विषयांचे ध्यान 2) यामुळे विषयांबाबत आसक्ती 3) या विषयांची इच्छा म्हणजे काम 4) काम संतुष्ट झाला नाही तर येतो क्रोध 5) क्रोधामुळे जागते मूढता वा अविवेक 6) अविवेकामुळे आत्मविस्मृती म्हणजे 'मी कोण आहे?' याचे भान उरत नाही. 7) आत्मविस्मृती होताच विवेक नष्ट होतो म्हणजे बुध्दीनाश होतो म्हणजे काय करावे? आणि काय करु नये? हा विवेक हरवतो 8) बुध्दीनाशामुळे आत्मनाश होतो आणि मनुष्यत्वाचा नाश होतो.

### स्पष्टीकरण

विनोबांनी सहा पायऱ्या मानल्यात. कामाच्या ठायीच त्यांनी क्रोधाचा अंतर्भाव केला. अखेरीस बुध्दीनाश म्हणजे आत्मनाश यांना एकच मानले. अखेर बुध्दीनाश म्हणजे आत्मनाश होय. अशा प्रकारे बुध्दीनाश आणि आत्मनाश यांना स्वतंत्र न मानता एकच मानले आहे. पुढील दोन श्लोकात हे सांगितले आहे की या पतनापासून कसे वाचले पाहिजे? कसे जपले पाहिजे ?

### अध:पतनाच्या आठ पायऱ्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) विषयांच्या ध्यानामुळे पतनाला आरंभ होतो. पाच विषयांशी आपला नित्य संबंध येतो. यांचे चांगले व वाईट असे दोन भाग आहेत. सत्व-रज-तम असे तीन प्रकार आहेत. चांगल्यात सत्वाचा समावेश होतो. वाईटात रज आणि तमाचा समावेश होतो. पूर्वजन्मीच्या संस्कारांमुळे शुभ वा अशुभ विषयांप्रती मनी आकर्षण जागते. आपल्या मनात सर्वात आधी विषयांचे ध्यान सुरु होते. विषय वाईट असला पण मनाला भावला की मग त्याचे चिंतन-मनन सुरु होते. मनाच्या या स्वभावाची ज्यांना ओळख झाली आहे असे साधक अध:पतन करणाऱ्या या विषयांचे ध्यान वा चिंतन करत नाहीत. ते चांगल्याचेच ध्यान करतात, चिंतन करतात. विषयाशी संबंध येतो. त्याबद्दल मनात आकर्षण जागते. मनात त्याचे ध्यान वा चिंतन सुरु होते. ही झाली अध:पतनाची पहिली पायरी.

2) विषयाचे ध्यान वा चिंतन-मनन मनात चालते. त्याबद्दल प्रेम, अनुरक्ती वा आसक्ती जागते. ही अध:पतनाची दुसरी पायरी होय.

3) ज्या विषयाची अनुरक्ती जागते तो प्राप्त करुन घेण्याची इच्छा जागते. त्या दिशेने माणसाचे प्रयत्न सुरु होतात. ही तिसरी पायरी.

4) विषय प्राप्त न झाला तर वा प्राप्त होण्याकामी काही अडथळा निर्माण झाला तर क्रोध उपजतो. ही चौथी पायरी होय.

5) विषय प्राप्त करुन घेताना कुठलीही अडचण आली नाही आणि भोगवस्तु मिळाली तर त्याबद्दल लोभ उत्पन्न होतो. अतृप्ती झाली तर क्रोध जागतो आणि तृप्ती झाली तर लोभ निर्माण होतो. या दोन गोष्टी काम-इच्छेमुळे उत्पन्न होतात. काम-इच्छा कदापि तृप्त होत नाहीत. त्या सदा अतृप्तच रहातात. यामुळे काम-इच्छेमुळे क्रोध आणि तृष्णा हे दोन परिणाम संभवतातच. यामुळे चित्त डावाडोल होते. चंचल होते. चित्ताच्या ठायी मोह म्हणजे मूढता उत्पन्न होते. चित्त अस्वस्थ होते. शांती भंग पावते. चित्त व्यग्र होते. ही पाचवी पायरी होय.

6) या मोहमयी स्थितीमुळे विस्मृती जागते. आत्मविस्मृती होते.' मी कोण? 'याचे स्मरण उरत नाही. अशा अवस्थेत माणूस करायला नको ते करुन बसतो. न बोलण्यायोग्य बोलतो. बोलण्यात वा करण्यात काही भाव शिल्लक रहात नाही. सावधानपणा रहात नाही. ही झाली सहावी पायरी.

7) अशी परिस्थिती दीर्घकाळ राहिल्यामुळे बुध्दीनाश होतो. बुध्दीची शक्ती नष्ट होते. योग्य काय? आणि अयोग्य काय? नीती काय? आणि अनीती काय? धर्म काय? आणि अधर्म काय? पाप काय? आणि पुण्य

काय? याचा विवेक उरत नाही. कार्य आणि अकार्याचा समुचित निर्णय म्हणजे योग्य निर्णय घेता येत नाही. ही सातवी पायरी होय.

8) एकदा का कार्य काय? आणि अकार्य काय? हे पारखण्याची बुध्दीची शक्ती नष्ट झाली की माणूसपण संपले म्हणून समजा. **आहार-निद्रा-भय-मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।** आहार, झोप, भय आणि संभोग हे माणूस आणि पशु यांच्या ठायी समान रुपात आढळतात. माणसाचा मग पशु होतो. विवेक शक्तीमुळे माणूस धर्माचे पालन करतो. विकारांना नष्ट करुन वा क्षीण करुन ईश्वराच्या स्वरुपाला ओळखू शकतो. या माणूसपण हरवून बसायच्या आठ पायऱ्या आहेत.

एक उदाहरण घ्या. 20 ते 25 वर्षांची एक कन्या आहे. तिला 25 ते 30 वर्षे वयाचा एक युवक बघतो. त्या कन्येप्रती त्याच्या मनी आकर्षण जागते. 1) आकर्षण जागल्यावर मनात त्या कन्येविषयी ध्यान, चिंतन वा स्मरण सुरु होऊन जाते. 2) तिच्या विषयी प्रेम, वासना, आसक्ती उत्पन्न होते. 3) आसक्ती उपजल्यामुळे सहवासाची इच्छा जागते. त्या सहवासासाठी त्या कन्येची संमती नसेल, तिच्या माता-पित्यांची संमती नसेल तर 4) क्रोध जागतो. ज्यावेळी इच्छापूर्तीकामी अडथळा उत्पन्न होतो तर क्रोध जागतो. श्री शंकराचार्य म्हणतात **क्रुध्दो हि संमूढः सन् गुरुमप्याक्रोशति** अर्थात् क्रोधी पुरुष मूढ बनून विवेकशून्य बनून आपल्या गुरुलाही शिवीगाळ करतो. 5) क्रोधाने तो अविवेकी वा मूढ बनतो मग तो युवक त्या युवतीला वा तिच्या माता-पित्याना वाटेल ते ऐकवायला प्रवृत्त होतो. याचे कारण असे की त्याच्या चित्तात विवेक उरत नाही. जेव्हा चित्ताची अशी अवस्था होऊन जाते तेव्हा त्याचे 6) आत्मभान हरपते. त्याला आत्मविस्मृती होते. श्री शंकराचार्य म्हणतात **शाखाचार्यो-पदेशाहितसंस्कारजनिताया: स्मृते: स्याद्विभ्रमो भ्रंश: स्मृत्युत्पत्तिनिमित्तप्राप्तावनुत्पत्ति:।** अर्थात् शास्त्र आणि आचार्य यांच्या उपदेशामुळे मनात वसणाऱ्या संस्कार आणि त्या संस्कारातून उत्पन्न झालेल्या स्मृतीचे नष्ट होणे यालाच स्मृतीविभ्रम असे म्हणतात. अशा प्रकारे आत्मज्ञान विस्मृत झाल्यामुळे 7) बुध्दीनाश होतो म्हणजे कार्याकार्य, उचितानुचित, धर्माधर्म वगैरेतला फरक न पारखण्याची बुध्दी नाश पावते मग तो न करण्यायोग्य करतो म्हणजे त्या कन्येची वा तिच्या माता-पित्याची हत्या करायलासुध्दा मागेपुढे पहात नाही. जिच्यावर तो महित झाला होता, जिच्याप्रती त्याच्या मनी अपार प्रीत जागली होती तिचीच हत्या करण्यासाठी तो प्रवृत्त होऊन जातो. श्री शंकराचार्य बुध्दिनाश म्हणजे काय याचा खुलासा करताना म्हणतात **कार्याकार्यविषयविवेकायोग्यताऽन्त करणस्य बुध्देर्नाश उच्यते।** अर्थात् अंत:करणाची कार्य अकार्य ओळखण्याविषयी विवेकाची न्यूनता, अयोग्यता व अपात्रता हाच तर बुध्दीनाश होय. बुध्दीनाशा नंतर 8) मनुष्यत्वाचा नाश होतो. श्री शंकराचार्य म्हणतात **तावदेव हि पुरुषो यावदन्त:करणं तदीयं कार्याकार्यविषय-विवेकयोग्यं तदयोग्यत्वे नष्ट एव पुरुषो भवति।** अर्थात् जोवर माणसाचे अंत:करण कार्याकार्य विवेक करण्यायोग्य म्हणजे ते पारखून घेण्यायोग्य असते तोवरच ती व्यक्ती माणूस म्हणवली जाण्यायोग्य असते पण जेव्हा कार्याकार्य विवेक शक्ती नष्ट होऊन जाते तेव्हा माणूसपण संपून जाते.

आणखी एक उदाहरण घेऊ या. कुणा एका सात्विक भगिनीला कुणी एक संत पुरुष भेटला. तिच्या मनी त्या संतपुरुषाविषयी आकर्षण उत्पन्न झाले. या आकर्षणामुळे 1) त्या संताविषयी नित्य ध्यान-स्मरण होऊ लागले. 2) अनुराग, प्रेम, भक्ती उपजली. त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरु झाला मग त्या भगिनीच्या मनात त्या पुरुषासोबत 3) राहण्याची कामना जागली. ती भगिनी गृहस्थाश्रमी असल्यामुळे तिच्या माता-पित्यांना व तिच्या नवऱ्यालाही हे काही आवडले नाही. आता त्या भगिनीच्या मनात आपल्या इच्छेत अडथळा उभा राहिल्यामुळे 4) क्षोभ वा राग उपजला. चित्त क्षुब्ध राहिल्यामुळे तिचे कुठल्याही कामात चित्त लागेना. 5) तिच्या मनात मूढतेचे साम्राज्य जागले. ती गोंधळात पडली. आता काय करायला हवे हे काही तिला सुचेना. मूढतेमुळे 6) ती भान विसरली. तिची आत्मस्मृती हरपली. त्या संताशी झालेल्या पत्रव्यवहारातून तिला जे काही थोडेफार ज्ञान मिळाले होते तेही ती पार विसरली. त्या ज्ञानाचा काहीही उपयोग उरला नाही. त्यांच्याशी पत्रव्यवहार जारी राखण्याचे भानही तिला उरले नाही. तिला सतत आपल्या बेशुध्द चित्ताचाच त्रास होऊ लागला. या नंतर 7) तिने विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली.

काम अतृप्त राहिल्यामुळे क्रोध उत्पन्न होतो. हा अर्थ सर्वच भाष्यकारांनी केला आहे. विनोबांनी लावलेला अर्थ मात्र वेगळा आहे. ते काम आणि क्रोध या दोन गोष्टी मुळी वेगवेगळ्या मानतच नाहीत. क्रोध म्हणजे राग नव्हे तर अप्रसन्नता होय. अशांतता होय. तिसऱ्या अध्यायाच्या सदतिसाव्या श्लोकात **काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव:**

हा काम रजोगुणातून उद्भवला आहे आणि हाच क्रोध होय असे सांगितले आहे.

हा क्रोधच काम होय. यामुळे गीताईतून विनोबा म्हणतात ‘क्रोध कामात ठेवला’. क्रोध कामात ठेवलेलाच आहे म्हणजे तो तिथे आहेच आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ‘जेथ कामु उपजला, तेथ क्रोध आधीच आला’ अर्थात् जिथे काम उत्पन्न झाला तिथे क्रोध आधीच हजर असतो. यामुळे ‘कामनांचा संपूर्ण त्याग’ हे स्थितप्रज्ञाचे पहिले लक्षण पंचावन्नाव्या श्लोकातून वर्णिले आहे.

अशाच प्रकारे विनोबा बुध्दीनाश आणि आत्मनाश या दोन प्रक्रियाना एकच मानतात. ते म्हणतात की कामातून क्रोध उपजतो असे मानले तर असा प्रश्न उत्पन्न होतो की जेव्हा कामना अतृप्त असतात, इच्छेच्या अनुसार कामे जेव्हा घडत नाही तेव्हा क्रोध जागणे ठीक आहे पण कामना तृप्त झाल्यात, इच्छेच्या अनुसार सारे काही घडले मग तर क्रोध उपजायला नको मग भगवंतांनी सांगितलेले कामातून क्रोध उपजतो हे वचन तर मिथ्या सिध्द होईल. क्रोधाने मूढता, मूढतेने आत्मविस्मृती, आत्मविस्मृतीने बुध्दीनाश आणि बुध्दीनाशाने आत्मनाश ही जी अनर्थ परंपरा दिली आहे ती खरी ठरणार नाही कारण की क्रोध थांबवला तर मूढता, आत्मविस्मृती वगैरे परिणाम उत्पन्न होणार नाहीत. यावर विनोबा म्हणतात की कामातून क्रोध आपोआप नाही उत्पन्न होत. इच्छा पूर्ण झाली नाही तर क्रोध उपजतो पण इच्छा पूर्ण झाल्यावर तर त्यातून क्रोधाऐवजी लोभ उपजतो आणि मग लोभातून मूढता वगैरे पुढच्या पायऱ्या उपजू शकतात. विनोबा परत विचारतात की काम तृप्त झाला आणि जर लोभ उपजला नाही तर पुढचे दुष्परिणामच टळून जातील. यातून मार्ग असा निघाला की काम कधीही तृप्त होत नाही तो तर सदैव अतृप्तच असतो. यामुळे काम जसा क्रोधाला उत्पन्न करील तसाच तो लोभालाही उत्पन्न करील.

विनोबा म्हणतात की कामात क्रोध समाविष्ट आहे असा अर्थ घेतल्यावर गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील 37 व्या श्लोकात म्हटल्यानुसार कामच क्रोध आहे या वचनाशी मेळ बसतो. तिथे काम व क्रोध याना वेगवेगळे मानलेले नाही. यामुळे या दोघांना वेगवेगळा न मानणे हेच उचित होय.

मग अंतत: बुध्दीनाश म्हणजे आत्मनाश अर्थ घेणेच अधिक समुचित होय. बुध्दीनाश म्हणजे विवेकशक्तीचा नाश झाल्यावर माणूस आणि पशु यात फरक तो काय राहिला? याप्रकारे त्यांनी अध:पतनाच्या सहाच पायऱ्या मानल्या आहेत. चौसष्ठ आणि पासष्ठाव्या श्लोकातून उन्नतीच्या सहा पायऱ्या वर्णिल्या आहेत. हा विचार करु जाताही विनोबांचे अध:पतनाच्या सहा पायऱ्या मानणे अधिक तार्किक वाटते. गणिती पध्दतीने समान व समांतर वाटते.

: 64-65 :

*रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।*
*आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति॥*
*प्रसादे सर्वदु:खानां हानिरस्योपजायते।*
*प्रसन्नचेतसो ह्याशु बुध्दि: पर्यवतिष्ठते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु:** पण, परंतु
- **रागद्वेषवियुक्तै:** रागद्वेष रहित
- **आत्मवश्यै:** (आणि) ताब्यात घेतलेली
- **इन्द्रियै:** इंद्रियांनी
- **विषयान् चरन्:** विषयांचा अनुभव घेणारा, करणारा
- **विधेयात्मा:** इंद्रियांचे स्वामी, स्वाधीन अंत:करणाचा पुरुष
- **प्रसादं अधिगच्छति:** प्रसन्नता म्हणजे शुध्दता प्राप्त करतो
- **प्रसादे:** प्रसन्नता प्राप्त झाल्यावर
- **अस्य:** या पुरुषाच्या
- **सर्वदु:खानां हानि:** सर्व प्रकारच्या दु:खांचा नाश
- **उपजायते, हि:** होऊनच जातो, (आणि) यातूनच
- **प्रसन्नचेतस:** ज्याचे चित्त प्रसन्नतेला प्राप्त झाले आहे, त्याची
- **बुध्दि:** बुध्दी
- **आशु:** लगेच, शीघ्रच
- **पर्यवतिष्ठते:** परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊन जाते

**अर्थ**

परंतु अंत:करण ताब्यात ठेवलेला साधक आपल्या ताब्यात ठेवलेल्या राग-द्वेष-रहित इंद्रियानी विषयांचा उपभोग घेत असूनही अंत:करणाची प्रसन्नता प्राप्त करुन घेतो.

अंत:करण प्रसन्न असल्यामुळे त्याची सर्व दु:खे नाहीशी होतात आणि त्या चित्त प्रसन्न असलेल्या

कर्मयोग्याची बुध्दी तत्काळ सर्व गोष्टींपासून निवृत्त होऊन एका परमात्म्याच्याच ठायी उत्तम प्रकारे स्थिर होते.

*राग-द्वेष परी जातां आलीं हातात इंद्रियें*
*स्वामित्वें विषयीं वर्ते त्यास लाभे प्रसन्नता।*
*प्रसन्नतेपुढें सर्व दु:खें जाती झडूनियां*
*प्रसन्नतेनें बुध्दिची स्थिरता शीघ्र होतसे।*

**विषय:** या दोन श्लोकात गीतेने उन्नतीच्या सहा पायऱ्या सहा सांगितल्या आहेत. 1) विषयांचे ध्यान आणि चिंतन करु नये. वशीभूत इंद्रियांच्या आधारे विषयांचे बाह्य सेवन करावे. 2) व 3) आसक्ती आणि काम-क्रोध नको. राग-द्वेष रहित असावे म्हणजे काम-क्रोध रहित असावे. 4) मूढता धरु नये. मनावर संपूर्ण ताबा मिळवावा. संपूर्ण स्वाधीनता प्राप्त करुन घ्यावी. 5) आत्मविस्मृती धरु नये, आत्मस्मृती बाळगावी. आत्मस्मृती म्हणजे प्रसन्नता होय. तमाम दु:खांचा नाश होय. 6) बुध्दीनाश होऊ देऊ नये. परमात्म्याच्या ठायी बुध्दी स्थिर करावी. मनुष्यतेचे माणूसपणाचे रक्षण करावे.

### स्पष्टीकरण

विनोबांनी अध:पतन आणि उन्नतीची वाट सांगणाऱ्या या चार श्लोकांचे सार पुढीलप्रमाणे मांडले आहे. अध:पतनाच्या पायऱ्या चार. 1) विषयचिंतन हे **बीज**. 2) यातून अप्रसन्नता, इच्छा, चित्ताची चंचलता ही **शक्ती**. 3) या शक्तीतून बुध्दीनाश हे **फळ**. हा पतनाचा मार्ग.

उत्कर्षाच्या पायऱ्या चार. 1) विषय सेवन करताना राग, द्वेष उत्पन्न न होऊ देणे हे **बीज**. 2) त्यातून उपजणारी प्रसन्नता ही **शक्ती**. 3) त्यातून उत्पन्न होणारी बुध्दीची स्थिरता हे **फळ**. हा मोक्ष मार्ग.

विषयांच्या ध्यानामुळे आणि चिंतनामुळे बुध्दीनाशापर्यंत जे पतन होते त्यासाठी नुकतीच आपण दोन उदाहरणे बघितली. आता बुध्दीनाशाऐवजी बुध्दी परमात्म्याच्या ठायी कशा प्रकारे स्थिर होऊ शकेल ही गोष्ट त्याच उदाहरणाने इथे सांगितली जात आहे.

1) कुणा युवतीला बघून एका युवकाच्या मनी आकर्षण जागले.

2,3) आकर्षण झाल्यावर त्याच्या मनात त्या कन्येविषयी मोह वा आसक्ती जागण्याऐवजी पावन भाव उठला.

4) तिच्या परिचयामुळे त्याच्या मनात राग-द्वेष उत्पन्न झाले नाहीत. तिच्या सहवासात रहायची कामनाच नसल्यामुळे कामनेत अडथळा आला आणि क्रोध उपजला मूढता उत्पन्न झाली ती झाली नाही. म्हणजे त्या भगिनीच्या संपर्कात आल्यावर त्या युवकाच्या मनावर संपूर्णपणे ताबा होता.

5) मनावर संपूर्ण ताबा असल्यामुळे त्या युवतीच्या सहवासात वा तिच्या परिचयामुळे वा तिच्या स्मरणामुळे चित्तात प्रसन्नतेचाच अनुभव आला. ती कन्या आत्मस्वरुप आहे अशी अत्यंत पावन भावना मनात उपजल्यामुळे प्रसन्नतेचा अनुभव होऊन सारे दु:ख दूर होऊन गेले.

6) अखेरचा परिणाम असा झाला की बुध्दी परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊ शकेल.

### दुसरे उदाहरण

1) कुण्या सात्विक भगिनीच्या मनात एका सत्पुरुषाविषयी आकर्षण उत्पन्न झाले. आणि त्याचे सतत ध्यान तिला होऊ लागले.

2) संताच्या स्मरणामुळे त्याच्या प्रती आसक्ती जागण्याऐवजी त्या संताविषयी भक्ती उपजली.

3) भक्तीत ती वाहवून जात नाही. भक्ती तिच्या ताब्यात असल्यामुळे तिचे चित्त त्या संताविषयी राग-द्वेष रहित रहाते.

4) संतांच्या स्मरणमात्रेण तिच्या मनात भक्तीचा भाव जागल्यामुळे त्या संतांच्या सहवासात रहायची आसक्ती उपजत नाही. कामना नसल्यामुळे अडथळा करणारे क्रोध वगैरे येत नाही. क्रोधरुपी मूढता न उपजल्यामुळे इंद्रियांवर, मनावर त्या भगिनीचा संपूर्ण ताबा राहिला.

5) मनावर संपूर्ण ताबा असल्यामुळे संताशी पत्रव्यवहार करुन वा त्याच्या स्मरणाने तिला प्रसन्नताच अनुभवायला येईल. संत परमेश्वराचेच स्वरुप असल्याचा विश्वास तिच्या मनी दृढ झाल्यामुळे मन प्रसन्न होऊन तिचे सारे प्रापंचिक दु:ख दूर होतील. अखेर

6) तिची बुध्दी त्या संताप्रती भक्तीमुळे ईश्वराप्रती स्थिर होऊ शकेल.

: 66 :

*नास्तिबुध्दिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना।*
*न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम्॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अयुक्तस्य:** ज्याचे चित्त चंचल आहे त्याच्या ठायी, साधनरहित पुरुषाच्या अंत:करणात
- **बुध्दि:** न अस्ति: श्रेष्ठ बुध्दी रहात नाही
- **च:** आणि
- **अयुक्तस्य:** अशा चंचल पुरुषाला
- **भावना:** आस्तिक भावना
- **न अस्ति:** प्राप्त होत नाही
- **च:** आणि
- **अभावयत:** ज्याच्या ठायी भक्ती नसते त्याला
- **शांति:** न अस्ति: शांतता प्राप्त होत नाही
- **अशान्तस्य:** (आणि) जो अशांत आहे त्याला
- **सुखं कुत:** सुख कुठून मिळेल?

### अर्थ

मन आणि इंद्रिये न जिंकणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणी निश्चयात्मक बुध्दी नसते आणि अशा अयुक्त पुरुषाच्या अंत:करणात आस्तिक भावही नसतो. तसेच भावशून्य माणसाला शांती लाभत नाही मग शांती नसलेल्या माणसाला सुख कोठून लाभणार?

*अयुक्तास नसे बुध्दि त्यामुळें भावना नसे*
*म्हणूनि न मिळे शांति शांतीविण कसें सुख।*

### विषय

या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत. 1) ज्याचे चित्त चंचल आहे, इंद्रियांवर ताबा नाही अशा व्यक्तीची बुध्दी स्थिर होत नाही. 2) ज्याची बुध्दी ईश्वराठायी स्थिर होत नाही त्याला भक्ती प्राप्त होत नाही. 3) ज्याला परमात्म्याची भक्ती प्राप्त झाली नाही त्याला शांती लाभू शकत नाही. 4) जिथे शांती नसेल तिथे सुख कसे बरे नांदावे?

### स्पष्टीकरण

1) प्रत्येक व्यक्ती सुखाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असते. कुणी मोटार घेऊन सुख मिळवतो. कुणी मोटारीचा त्याग करुन सुख मिळवतो. कुणाला वैभवात सुख दिसते. कुणाला वैभवाच्या त्यागात म्हणजे वैराग्यात सुख आकळते. भोगी माणसाला भोगात सुख वाटते. त्यागी साधकाला त्यागात सुखाची प्राप्ती होते. बाह्य वस्तुंच्या उपभोगामुळे मिळणारे सुख अखंड नसते. बाह्य वस्तुंच्या त्यागामुळे लाभणारे सुख नित्य नसते. हे एकदा का ध्यानात आले की मग माणूस अखंड असणाऱ्या सुखाच्या शोधात लागतो. जोवर अखंड सुख लाभत नाही तोवर त्याचा शोध सुरु रहातो. भोगी माणसाच्या मनात विकार जागतात. बाह्य भोगांपासून मिळणारा आनंद टिकत नाही. त्यागी माणसाला विकार सतावतात. बाह्य त्यागापासून लाभणारा आनंद टिकत नाही.

विकार माणसाला व्याकुळ बनवतात. हे टळल्याशिवाय अखंड शांतता नाही. ही गोष्ट माणसाच्या चांगल्या प्रकारे ध्यानी येते मग माणूस सत्संग करु लागतो. आत्मस्वरुपाच्या ठायी अखंड सुख आणि अखंड आनंद आहे. हे मग सत्संगतीमुळे त्याला कळू लागते. आत्मस्वरुप हे परमात्मरुप आहे हे त्याच्या ध्यानी येते. ते अखंड आहे. शांत आहे. आनंदरुप आहे पण माणूस त्याला ओळखू शकत नाही. का ओळखू शकत नाही? याचे कारण स्पष्ट आहे. माणसाचे आपल्या मनावर, बुध्दीवर आणि इंद्रियांवर काबू नसल्यामुळे हे असे घडते. जो अयुक्त आहे म्हणजे चित्त व इंद्रिये ज्याच्या अधीन नाहीत तो परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊ शकत नाही. जो विकारांच्या अधीन आहे तो परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊ शकत नाही. त्याची बुध्दी परमात्म्याच्या ठायी एकरुप होऊ शकत नाही.

2) जो परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊ शकत नाही त्याला भावना म्हणजे भक्ती कदापि प्राप्त होऊ शकणार नाही. भक्तीशिवाय इंद्रियांवर संपूर्ण ताबा मिळवता येणार नाही. हा मुद्दा एकसष्ठाव्या श्लोकातून मांडलेला आहे. हीच गोष्ट परत सांगितली जात आहे.

3) जोवर परमात्म्याची भक्ती प्राप्त होत नाही तोवर खरी आणि अखंड शांती प्राप्त होऊ शकणार नाही. आपले स्वरुप हेच परमात्मरुप आहे हे एकदा कळले

की मग त्याचेच नित्य स्मरण करावे. त्याचाच अखंड आधार मानावा. त्याचीच मनात आसक्ती ठेवावी. हे सारे सहजपणे घडावे. यातून शांतता लाभू शकेल.

4) शांती शिवाय सुख प्राप्ती होऊ शकणार नाही. चित्त अशांत असले की माणूस बेचैन होतो. काहीही सुचत नाही. याचा अर्थ असा की सुख हे शांतीशी निगडित आहे. त्यांचा अविभाज्य असा संबंध आहे. ज्ञानेश्वर म्हणतात की ज्याप्रमाणे भाजलेले बीज अंकुरत नाही त्याप्रमाणे अशांत व्यक्तीला सुखाची प्राप्ती होऊ शकत नाही. शंकराचार्य असे म्हणतात की **इन्द्रियाणां हि विषयसेवातृष्णातो निवृत्तिर्या तत् सुखं, न विषयविषया तृष्णा, दुःखमेव हि सा, न तृष्णायां सत्यां सुखस्य गन्धमात्रमप्युपपद्यते इत्यर्थः।** अर्थात् विषयोपभोग करण्याची इंद्रियांची जी वासना मनात असते तिच्या निवृत्तीचेच नाव सुख होय. विषयांविषयीची तृष्णा वा आसक्ती हे काही सुख नव्हे! ते तर दु:खच आहे कारण की जोवर वासना - तृष्णा विद्यमान आहेत तोवर यत्किंचितही सुख लाभू शकणार नाही.

: 67 :

***इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते।***
***तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** कारण की
- **चरताम्:** आपापल्या विषयात प्रवृत्त होणाऱ्या
- **इन्द्रियाणाम्:** इंद्रियांच्या
- **यत् मन:** अनुविधीयते: मागे जे मन धावत रहाते
- **तत्:** ते
- **अस्य प्रज्ञाम्:** या पुरुषाच्या प्रज्ञेला
- **अम्भसि वायु:** नावं इव: वारा ज्याप्रमाणे पाण्यात नावेला ओढून घेऊन जातो त्याप्रमाणे
- **हरति:** ओढून घेऊन जातो

**अर्थ**

कारण ज्याप्रमाणे पाण्यात चालणाऱ्या नावेला वारा वाहून नेतो. त्याचप्रमाणे विषयात वावरणाऱ्या इंद्रियांपैकी मन ज्या इंद्रियाबरोबर राहते ते एकच इंद्रिय या अयुक्त पुरुषाची बुध्दी हिरावून नेते.

***इंद्रियें वर्ततां स्वैर त्यामागें मन जाय जें***
***त्यानें प्रज्ञा जशी नौका वाऱ्यानें खेंचली जळीं।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) इंद्रिये विषय सेवन करतात.2)त्यावेळी मन त्यांच्या मागे धावते. 3)मनाच्या मागे बुध्दी धावते. नावेला वायुवेगाने पाण्यात खेचून न्यावे तसे मन बुध्दीला खेचून नेते.

**स्पष्टीकरण**

विषयांचे सेवन हा इंद्रियांचा स्वभाव आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की इंद्रियांना विषयोपभोगाशिवाय विषयांशिवाय दुसरे काहीही सुंदर वाटत नाही आणि विषय कसे ? तर मृगजळासारखे असतात. मृगजळासारखे मिथ्या असतात. स्वप्नातल्या हत्तीसारखे. विषयांचे दोन प्रकार चांगले व वाईट आणि सत्व, रज, तम असे आणखी तीन प्रकार आहेत. सत्व चांगल्या पक्षात रहातो तर रज व तम वाईट पक्षाकडे वळतात. हा विषय 55 व्या श्लोकात आला आहे. विषय इंद्रियांना आपल्याकडे आकृष्ट करतात. नंतर इंद्रिये मनाला ओढतात. मन मग इंद्रियांच्या सोबतच लागून रहाते.

मन विषयांकडे धाव घेते. ते ईश्वराकडे वळवणे एकाएकी साधणारे कार्य नव्हे! यासाठी आधी मनाचे वळण चांगल्या कामांकडे करावे लागेल. चांगल्याबद्दलचे आकर्षण जागावे. ते अखेर ईश्वराप्रत नेईल. पोहोचवील. कारण परमात्मा सत् स्वरुपी आहे. परमेश्वराची माया असत् रुपी आहे. यामुळे असत्चे आकर्षण मायेकडे ओढून नेईल. सुंदरावर मोहित व्हावे. कुरुपाचा द्वेष करावा. हे ठरलेले आहे. हीच माया आहे. यामुळेच मन विषयांकडे आकृष्ट होते. याच्या मुळाशी असते अज्ञान! मूळवस्तु सत्य आहे. ईश्वर आहे. ब्रह्म आहे. या मूळ कारणामुळेच सृष्टीतील तमाम विषय दिसतात. तमाम पदार्थ दिसतात. मनाला एकदा का जर हे ज्ञान झाले ना तर मग विषयांबाबतचे आकर्षण उरणार नाही. वैराग्य भाव उपजेल, मन विषयांच्या पाठीमागे मग धावणार नाही. हे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठीच विषय ग्रहण करताना सात्विक भाव ठेवावा. तुलसीदासजी दृष्टांत देतात की,

***झूठेउ सत्य जाहि बिनु जानें। जिमि भुजंग बिनु रजु***
***पहिचानें॥ जेहि जानें जग जाइ हेराई।***
***जागें जथा सपन भ्रम जाई॥***

अर्थात् दोरीची ओळख न पटल्यामुळे ती सर्पासारखी भासमान होते. त्याप्रमाणे ईश्वराची ओळख न झाल्यामुळे हे असत्य जगही सत्य भासमान होते. जाग आली की स्वप्न भ्रमरुप ठरते. खोटे ठरते. मिथ्या वाटते. तसेच ईश्वराची ओळख झाली म्हणजे जगाचे स्वरुप लक्षात येते.

जोवर विषय सत्य वाटतात तोवर चित्त त्यांच्याकडे धाव घेईलच. एकदा का मन इंद्रियांच्या स्वाधीन झाले तर मग बुध्दीचाही काही वश चालत नाही, अधिकार चालत नाही. एकटी बुध्दी थकून जाते. विषय नि:सार आहेत. हे बुध्दीला कळून चुकले तरी मनापुढे तिचे काही एक चालत नाही. वायु वेगाने नाव ओढली. ढकलली जाते. त्याचप्रमाणे मनाच्या वेगामुळे बुध्दी लाचार होऊन तसेच वागू लागते. खरे तर बुध्दीने आत्म्याच्या अधीन असावे. मनाने बुध्दीच्या ताब्यात असावे. इंद्रियांनी मनाच्या स्वाधीन असावे पण आपली परिस्थिती या उलट आहे. इंद्रियांच्या अधीन राहिल्यावर पतन अटळ आहे पण तेच ईश्वराच्या अधीन राहिले तर उन्नती होते.

: 68 :

*तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वश: ।*
*इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्य: तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात्:** म्हणून
- **महाबाहो:** हे अर्जुना
- **यस्य इन्द्रियाणि:** ज्याची इंद्रिये
- **इन्द्रियार्थेभ्य:** इंद्रियांच्या विषयांपासून
- **सर्वश:** निगृहीतानि: सर्व प्रकारे ताब्यात घेतली गेली आहेत
- **तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता:** त्याची बुध्दी परमात्म्याच्या ठायी स्थिर झाली

*म्हणूनि इंद्रियें ज्यानें विषयांतूनि सर्वथा*
*ओढूनि घेतलीं आंत त्याची प्रज्ञा स्थिरावली ।*

**स्पष्टीकरण**

या श्लोकात अट्ठावन्नाव्याचा मुद्दा परत चर्चिला गेला आहे. इंद्रियांवर स्वामित्व मिळवणे हे स्थितप्रज्ञ लक्षणांचे सार- सर्वस्व आहे. इंद्रिये विषयाधीन होणे हा ईश्वर प्राप्तीच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. कठोपनिषदातला मंत्र आहे.

***परांचि खानि व्यतृणत् स्वयंभूस्तस्मात् पराङ्.पश्यति नान्तरात्मन् । कश्चिध्दीर: प्रत्यगात्मानमैक्षदावृत्तचक्षुरमृ तत्वमिच्छन् ॥ (कठोनिषद 2/1/1)***

स्वयंभू परमेश्वराने छिद्र म्हणजे इंद्रियांना बर्हिमुख बनवले. यामुळे इंद्रिये बाह्य विषयांचे ग्रहण करतात. आतल्या ईश्वर तत्वाला बघत नाहीत पण इंद्रियांवर संयम साधणारा साधक, इंद्रिय निग्रह करणारा धैर्यशाली पुरुष मोक्षाकांक्षी असतो. तो इंद्रियांना विषयांपासून हटवतो. देहात विराजमान परमात्म्याचे दर्शन करुन घेतो.

ईश्वर स्वयंभू आहे. ईश्वराने इंद्रियांना अंतर्मुखी न करता बहिर्मुखी बनवले आहे. यामुळे या क्षणिक व विनाशी जगाच्या बंधनात माणूस अडकून पडतो. एवढे करुनही माणसाला सुख लाभत नाही. थोड्या सुखासोबत अपार दु:ख असतेच. जगात विरक्त पुरुष विरळ असतात. त्यांना मोक्षाची जिज्ञासा असते. ते इंद्रियांना विषयचिंतनापासून दूर ठेवतात. आतल्या ईश्वराचे दर्शन करुन घेतात. अशाप्रकारे जो साधक किंवा मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा करणारा इंद्रियांवर विजय संपादन करतो त्याची बुध्दी आणि मन ईश्वराच्या ठायी स्थिर होते.

पुढच्या चार श्लोकांमधून स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचा विचार पुनरपि सुरु होत आहे.

: 69 :

*या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।*
*यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुने: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वभूतानाम्:** सर्व भूतांसाठी, सर्व प्राणीमात्रांसाठी
- **या निशा:** जी रात्र असते
- **तस्याम्:** त्या नित्य शुध्द बोधस्वरुप परमानंदाच्या ठिकाणी (भगवंताला प्राप्त झालेला )
- **संयमी:** संयमी
- **जागर्ति:** जागृत रहातो, झोपत नाही
- **यस्यां भूतानि जाग्रति:** (आणि) ज्या नाशवंत क्षणभंगुर प्रापंचिक सुखाच्या ठिकाणी
- **सा:** त्या

- **पश्यत:** मुने: ज्ञानी, मुनींची
- **निशा:** रात्र असते

**अर्थ**

सर्व प्राण्यांच्या दृष्टीने जी रात्रीसारखी असते, अशा नित्य ज्ञानस्वरुप परमानंदाच्या प्राप्तीत स्थितप्रज्ञ योगी जागतो आणि ज्या नाशवंत प्रापंचिक सुखाच्या प्राप्तीत सर्व प्राणी जागतात, ती परमात्मतत्त्व जाणणाऱ्या मुनीला रात्रीसारखी असते.

***सर्व भूतांस जी रात्र जागतो संयमी तिथें***
***सर्व भूतें जिथें जागीं ज्ञानी योग्यास रात्र ती ।***

**विषय:** या श्लोकात स्थितप्रज्ञाच्या दोन लक्षणांचा परिचय करुन देण्यात आला आहे. (1) ज्याकाळी सर्व प्राणिमात्र झोपलेले असतात त्याकाळी संयमी, ज्ञानी पुरुष जागृत असतो. (2) ज्याकाळी प्राणिमात्र जागृत असतात त्यावेळी संयमी, ज्ञानी, मुनी निद्रिस्त होतो.

**स्पष्टीकरण**

गांधीजींनी या श्लोकाचा अक्षरार्थ अभिधार्थ सांगूनही मौज उडवून दिली आहे. ते म्हणतात की भोगीजन रात्री उशिरापर्यंत जागतात. दिवसा झोपतात. पहाटेस लवकर उठतात. सूक्ष्म अर्थ असा की भोगी प्रपंचाचा व्याप वाढवतात. ईश्वराला विसरुन जातात. संयमी प्रपंपापासून अलिप्त रहातात. ईश्वराचा साक्षात्कार करुन घेतात.

1) ज्या विषयाबाबत लोक झोपून रहातात याचा अर्थ ईश्वराबाबत बेपर्वा असतात. म्हणजे निष्कामतेचा विचार करत नाहीत. फलासक्ती सोडून देत नाही. अनासक्त भाव धरत नाही. वैराग्यशील बनत नाहीत. सात्विकतेच्या उत्कर्षाबाबत गाफिल रहातात. स्थितप्रज्ञ याबाबत जागृत असतो. सारे काही भक्ती करत नाहीत. ईश्वराचे स्मरण करत नाहीत, ध्यान-धारणा करत नाहीत पण संयमी हे सारे करतो. स्थितप्रज्ञ ईश्वर स्मरण करतो. भक्तीच्या ठायी तल्लीन रहातो. निष्काम भावनेने जगतो. सर्वसाधारणजन फळाच्या बाबतीत अनासक्त राहू शकत नाहीत. स्थितप्रज्ञ जगाविषयी अनासक्त रहातो. जगातल्या तमाम व्यवहारांविषयी अनासक्त रहातो. सर्वसामान्यजन सात्विकता वाढावी याबाबत शिथिल असतात. स्थितप्रज्ञ प्रत्येक कार्यात सात्विकता जागावी याबाबत दक्ष रहातात.

2) ज्या विषयाच्या बाबतीत सारेच जागृत असतात. प्रपंचाबाबत जागृत असतात, आसक्त असतात त्याबाबतीत स्थितप्रज्ञ झोपी गेलेला असतो. प्रपंचाबाबत सारे जागृत तर स्थितप्रज्ञ अलिप्त रहातो. लोक नाना प्रकारच्या कामना करतात. स्थितप्रज्ञाच्या मनात जगातल्या कुठल्याही विषयाविषयी कामना जागत नसते. त्याच्या मनी केवळ एकच कामना असते की कुठल्याही परिस्थितीत आपण ईश्वरापासून विलग राहू नये. अलग राहू नये. सारेच कर्माच्या फळावर डोळा ठेऊनच कर्म करतात. आसक्त होऊनच कर्मे आचरतात. फळाची आसक्ती सोडायची असेल तर मी कर्मे मुळी आचरुच कशाला? या परिस्थितीत तर कर्मे करणे सोडूनच देणे योग्य ठरावे अशी त्यांची भूमिका असते. सर्वसामान्य लोक विशुध्द दृष्टीने कर्मे आचरत असतात. स्थितप्रज्ञ विशुध्द दृष्टीनेच कर्तव्याचरण करत असतो. कर्तव्यभावनेनेच करतो. ईश्वरीय प्रेरणेनेच कर्मे करतो. त्याचा इष्ट परिणाम साधला नाही गेला तरी तटस्थ रहातो. तो कदापि कर्तव्य कर्माला सोडत नसतो. स्वधर्माचा त्याग करत नसतो. असे म्हटले गेले आहे की,

***विपदौ नैव विपद: सम्पदो नेव सम्पद: ।***
***विपद्विस्मरणं विष्णो: सम्पन्नारायण-स्मृति: ॥***

स्थितप्रज्ञासाठी विपत्ती वा संकटे काही विपत्ती वा संकटे नसतात. लोकांच्या दृष्टीकोणातून जी संपत्ती असते - अनुकूल परिस्थिती असते ती त्याच्यासाठी संपत्ती नसते. विष्णुचे विस्मरण हीच काय ती विपत्ती. व्यापक परमात्म तत्वाचे विस्मरण हीच काय ती विपत्ती. हेच काय ते संकट. परमात्म्याचे अखंड स्मरण हीच संपत्ती. हीच खरी अनुकूलता होय.

: 70 :

***आपूर्णमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमाप: प्रविशन्ति यद्वत् ।***
***तदत् कामा यं प्रविशन्ति,***
***सर्वे स शान्तिमाप्रोति न कामकामी ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यद्वत्:** ज्या प्रकारे
- **आपूर्यमाणम्:** चहुकडून येऊन भरल्या जाणाऱ्या पाण्याने

- **अचलप्रतिष्ठम्:** ज्याची मर्यादा यत्किंचितही कमी वा अधिक होत नाही
- **समुद्रं आप:** समुद्रात, पाणी म्हणजे नद्या (ज्या प्रमाणे)
- **प्रविशन्ति:** प्रवेश करतात
- **तद्वत्:** त्या प्रकारे
- **सर्वे कामा:** सर्व प्रकारची कामे
- **यम्:** ज्यात
- **प्रविशन्ति:** निर्विकारता कायम राखून प्रवेश करतात
- **स:** तो स्थितप्रज्ञ पुरुष
- **शान्तिं आप्नोति:** परम शांततेला उपलब्ध होतो
- **कामकामी न:** पण विषयात आसक्त पुरुष शांती प्राप्त करु शकत नाही

**अर्थ**

ज्या प्रमाणे निरनिराळ्या नद्यांचे पाणी, सर्व बाजुंनी भरलेल्या आणि स्थिर असलेल्या समुद्रात त्याला विचलित न करताही सामावून जाते, त्याचप्रमाणे सर्व भोग ज्या स्थितप्रज्ञ पुरुषामध्ये कोणत्याही प्रकारचा विकार उत्पन्न न करताच सामावून जातात, तोच पुरुष परम शांतीला प्राप्त होतो. भोगांची इच्छा करणारा नव्हे.

***न भंग पावे भरतां हि नित्य समुद्र घेतो जिरवूंनि पाणी***
***जाती तसे ज्यांत जिरुनि भोग***
***तो पावला शांति न भोग-लुब्ध ।***

**विषय:** या श्लोकातून चार मुद्दे येतात. 1) एक, म्हणजे लहान-मोठ्या नाना नद्यांचे पाणी सागराला मिळते तरी समुद्र वाढत नाही वा सुकून जात नाही. 2) दोन, अशाच प्रकारे तमाम विषयोपभोग स्थितप्रज्ञ पुरुषाच्या ठायी समाविष्ट होतात. त्यांचे रुप हरपून जाते. स्थितप्रज्ञाच्या परमात्माविषयक समाधीला ते काही विचलित करु शकत नाहीत. 3) तीन, ज्यांची अशी स्थिती आहे तेच परम शांती प्राप्त करु शकतात. 4) चार, पण भोगात आसक्त जन काही परम शांती प्राप्त करुन घेऊ शकत नाही.

**स्पष्टीकरण**

1) स्थितप्रज्ञाची आंतरिक स्थिती किती उच्च दर्जाची असते ते सांगण्यासाठी समुद्राचे उदाहरण दिले आहे. समुद्रात कितीही नद्यांचे पाणी सामावून जावो त्यात काहीही फरक पडत नाही तो ना वाढत वा ना घटत.

2) विषयोपभोगांचा स्थितप्रज्ञावर काही परिणाम होत नाही. याचे कारण असे की तो विषयांना मुळी विषय मानतच नाही. तो विषयांनाही परमात्म्याच्या रुपातच बघतो. शंकराचार्य असे म्हणतात:

***विषयसन्निधावपि, सर्वत: इच्छाविशेषा यं पुरुषं***
***समुद्रमिवाप: अविकुर्वन्त: प्रविशन्ति सर्वे आत्मन्यैव***
***प्रलीयन्ते न स्वात्मवशं कुर्वन्ति ।***

अर्थात् विविध विषय वा विकार स्थितप्रज्ञाच्या ठायी म्हणजे परमात्म्याच्या ठायी विलीन होऊन जातात. त्या कामना, ते विषय वा विकार स्थितप्रज्ञ पुरुषाला आपल्या वशात करुन घेऊ शकत नाहीत, करत नाहीत.

विषयाशी संबंध आला म्हणजे मानवी चित्तावर परिणाम होतोच. कधी राग-द्वेषात्मक परिणाम होतो. कधी काम-क्रोधात्मक परिणाम होतो. याला कसे टाळता येईल? माणसाच्या ठायी जोवर आसक्तीमूलक आग्रह आहे तोवर मनात राग-द्वेषाच्या लहरी उठत रहणार. या तरंगांना थोपवता येणार नाही. जोवर राग-द्वेष शांत होत नाहीत तोवर शांतता लाभू शकत नाही. स्थितप्रज्ञाची स्थिती समुद्रासारखी असते. स्थितप्रज्ञ ज्ञानी असतो. स्वत:साठी त्याला काहीही करणे उरलेल नसते मग तो समाजसेवेसाठी जीवन जगतो. समाजसेवा करताना अनुकूल-प्रतिकूल भाव-भावना तर जागतीलच पण या पुरुषाने परमात्मतत्वाशी परिचय करुन घेतलेला असतो. निजस्वरुपाचा अनुभव घेतलेला असतो. यामुळे तो समुद्रासारखा अविचल रहातो. परिस्थितीने दबून जात नाही. परिस्थितीवर सदैव विजय मिळवतो.

श्री गौडपादाचार्य मांडुक्योपनिषदावरील आपल्या भाष्यात लिहितात:

***अनादिमायया सुप्तो यदा जीव: प्रबुध्द्‌यते ।***
***अजमनिद्रमस्वप्रमद्वैतं बुध्द्‌यते तदा ।***

अर्थात् अनादी माया जीवाला झोपवून ठेवते. यातून जीव जागतो. अद्वैत परमात्म्याला जाणून घेतो. हे परमात्मतत्व विलक्षण आहे. त्याला कधीही जन्म नसतो. तो कदापि झोपत नसतो. त्याला कदापि स्वप्न पडत नसते.

स्थितप्रज्ञ पुरुष संपूर्णपणे जागृत असतो. त्याला परमात्म्याची ओळख झालेली असते. सृष्टीमालाशी बऱ्यापैकी परिचय झालेला असतो. या दोघांची ओळख ही फार मोठी गोष्ट आहे. यामुळे तो विषम प्रसंग आला तरी डगमगत नसतो कारण त्याला अद्वैताचा अनुभव असतो. द्वैतभावनेमुळेच सदा न् कदा त्रास होत असतो. सृष्टीतला भेद सत्य वाटला की द्वैत भावना संपवता येत नसते पण भेद सत्य नसल्याचा एकदा का अनुभव आला - प्रतीती आली - की मग अभेद जागते. अद्वैत उपजते. अद्वैतसत्य सूर्याचा उदय होतो. मग भेदाभेदातून होणाऱ्या अडी-अडीचणींचा अनुभव येत नाही. जाणवत नाही.

**तुलसीदास म्हणतात**

***काल सुभाउ करम बरिआई। भलेउ प्रकृतिबस चुकइ भलाई॥ सो सुधारि हरिजन जिमि लेहीं।***
***दलि दुख दोष बिमल जसु देहीं॥***

तीन कारणांमुळे भक्त माणसेही सज्जनपणा सोडून देतात. एक तर काळ म्हणजे परिस्थिती. दुसरे कारण स्वभाव म्हणजे प्रत्येकाची प्रकृती. तिसरे कारण कर्म म्हणजे शुभाशुभ कर्मांचे संस्कार पण हरीभक्त सावधान असतात. कुशल व्यवहार करतात. दु:ख आणि दोषांना दूर ठेवतात. जगात शुध्द यशाचा प्रचार करतात.

1) स्थितप्रज्ञाला परमात्म तत्वाचा अनुभव होतो. सृष्टीमालाचे मिथ्यात्व ध्यानी येते. जगाची नश्वरता समजते. यामुळे त्याच्या चित्तावर कुठलाही परिणाम होत नाही. यामुळे विनासायास त्याला शांती लाभते. तो समुद्रासारखा बनतो. विकार त्याच्या शांतीला विचलित करत नाहीत.

2) विषयासक्त माणसाला अशा प्रकारची शांतता लाभू शकत नाही. मृगजळाने तहान भागत नाही. विषय मिथ्या आहेत. सत्यरुप असते तर शांतता अवश्यमेव लाभली असती. परमात्मा सत्य आहे. जगत आणि विषय असद्रुप आहेत. असत् विषयांच्या ठायी आसक्त होणाऱ्यांना शांततेचा लाभ होऊ शकत नाही.

: 71 :

***विहाय कामान् य: सर्वान् पुमांश्चरति नि:स्पृह।***
***निर्ममो निरहंकार: स शान्तिमधिगच्छति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य:** पुमान् सर्वान् कामान्: जो पुरुष सर्व प्रकारच्या कामनांना
- **विहाय:** त्याग करुन
- **नि:स्पृह:** स्पृहारहित
- **निर्मम:** ममतारहित
- **निरहंकार:** अहंकाररहित होऊन
- **चरति:** विचरण करतो, वावरतो
- **स:** तो
- **शांतिम् अधिगच्छति:** शांततेला प्राप्त करतो, शांती पावतो

**अर्थ**

जो पुरुष सर्व कामनांचा त्याग करुन, ममता, अहंकार आणि इच्छा टाकून राहात असतो, त्यालाच शांती मिळते.

***सोडूनि कामना सर्व फिरे होऊनि नि:स्पृह***
***अहंता ममता गेली झाला तो शांति-रुप चि।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत (1) कामना वासनेचा त्याग (2) नि:स्पृह, निर्मम, निरहंकारी रहाणे (3) यातून शांतता प्राप्त करणे

**स्पष्टीकरण**

55 व्या श्लोकात स्थितप्रज्ञाच्या लक्षणांची सुरुवात करुन पूर्वार्धात सर्व कामना आणि वासनांच्या त्यागाला पहिले लक्षण सांगितले गेले होते. या श्लोकात तेच लक्षण पुनश्च सांगितलेले आहे.

1) पूर्वी शांतता प्राप्त करुन घेण्याचा उपाय सांगितलेला आहे. निर्मम रहावे. निरहंकारी भावनेने वर्तावे. नि:स्पृहपणे जगावे. हे साधले की शांतता लाभेल. हा उपाय म्हणजे मनातील कामना-वासनेचा त्याग करावा. हे एकदम करता येत नाही. हळूहळू - क्रमाक्रमाने हे करावे लागेल. सर्वात प्रथम वाईट वासना सोडायचे प्रयत्न करावे लागतील. ज्यांच्या मनात कादंबरी, कथा-

कहाण्या वाचायची वासना आहे त्यांच्याकडून गीता वा ब्रह्मसूत्र वाचायची अपेक्षा करणे शक्य नाही. आधी त्याना सत्पुरुषांची पुण्य-चरित्रे वाचायला सांगावी लागतील. यातून जुन्या सवयी जाऊन तत्संबंधी वासना क्षीण होऊ लागतील. वासना सोडायचा अर्थ वाईट वासना सोडून चांगल्या कामना मनी धराव्या लागतील. चांगल्या कामना दीर्घकाळपर्यंत मनात वसवाव्यात. हळूहळू त्यांचाही त्याग करायचा आहे. प्रत्येक क्रिया केवळ कर्तव्यरुप समजून करायची दृष्टी जागावी. यामुळे वासनेवर नियंत्रण करता येईल. कठोपनिषदात मंत्र येतो.

*यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः।*
*अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥*

अर्थात् माणसाच्या हृदयात ज्या वासना आहेत त्या मनातल्या तमाम वासना सुटून जातात. त्यावेळी मनुष्य मुक्त होतो. याच जन्मी ब्रह्मतत्वाला प्राप्त करुन घेतो. शांती मिळवतो.

2) दुसरे लक्षण निःस्पृहता आहे. विनोबाजींनी स्पृहा शब्दाचा अर्थ 'जगण्याची इच्छा' असा केला आहे. जगायची इच्छा प्रबळ असते. या अहंतेमुळेच जगण्याची इच्छा होते. जगणे आणि मरणे या दोघांचे समान होणे अवघड असते. परमात्म्याच्या भक्तीच्या मस्तीत जे जगतात ते मरण जिंकून घेतात. मृत्युच्या छाताडावर पाय रोवतात. हे भक्तीमुळेच संभवते. भक्तीत जगणे याचा अर्थ अहंकार नष्ट करणे. अहंकारमुक्त जीवनयात्रा. अहंकार मुक्ती म्हणजे मरणावर विजय मिळवणे. निःस्पृहतेसोबत निर्ममता आणि निरहंकार या दोन गोष्टी स्थितप्रज्ञाच्या ठायी नसतात. 'मी' आणि 'माझे' हे बंधनरुप आहे. विनोबा म्हणतात की बकरी जोवर जिवंत असते तोवर मै मै करते मेल्यावर तिच्या कातड्याची तात बनवली जाते आणि त्याद्वारे कापूस पिंजला जातो तेव्हा ती तूं तूं असे म्हणायला लागते. माणसाची अवस्था अशीच आहे. जोवर तो परमात्म भक्ती करत नाही तोवर त्याचे सारे जीवन मी आणि माझे यातच अडकून पडते पण भक्ती प्राप्त होताच मग त्यातून तू तू हा शब्द ऐकायला मिळतो. यातून मुक्त होणे म्हणजे परमात्म तत्वाची उपलब्धी करुन घेणे होय. परम शांती प्राप्त करुन घेणे होय. ही ब्राह्मी स्थिती होय. स्थितप्रज्ञ ब्रह्म निर्वाणावस्थेला पोहोचतो.

3) स्थितप्रज्ञाची स्थिती ब्राह्मी स्थिती होय. ही स्थिती प्राप्त झाल्यावर माणूस कधी मोहात पडत नाही. ही स्थिती अंतकाळापर्यंत रहाते. यानंतर ब्रह्मनिर्वाणाची प्राप्ती होते.

: 72 :

*एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।*
*स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ एषा:** हे अर्जुना, ही
- **ब्राह्मी स्थितिः** ब्रह्मप्राप्ती झालेल्या पुरुषाची ब्राह्मी स्थिती आहे
- **एनाम् प्राप्य:** हिला प्राप्त करुन घेऊन
- **न विमुह्यतिः** कदापि मोहित होत नाही
- **अस्याम्:** या स्थितीत
- **अन्तकाले अपि स्थित्वा:** मृत्युच्या समयीही स्थित होऊन
- **ब्रह्मनिर्वाणं ऋच्छति:** ब्रह्म निर्वाणाला, ब्रह्मानंदाला प्राप्त करुन घेतो

**अर्थ**

हे अर्जुना, ब्रह्माला प्राप्त झालेल्या पुरुषाची ही स्थिती आहे. ही प्राप्त झाल्यावर योगी कधी मोहित होत नाही आणि अंतकाळीही या ब्राह्मी स्थितीत स्थिर होऊन ब्रह्मानंद मिळवतो.

*अर्जुना स्थिति ही ब्राह्मी पावतां न चळे पुन्हां*
*टिकूनि अंत-काळीं हि ब्रह्म-निर्वाण मेळवी।*

**विषय:** इथे चार गोष्टी सांगितलेल्या आहेत. 1) स्थितप्रज्ञाची स्थिती ही ब्राह्मी स्थिती आहे. 2) ही प्राप्त झाल्यावर मनुष्य कदापि मोहात पडत नाही. 3) ही स्थिती अंतकाळापर्यंत कायम असते. 4) या नंतर ब्रह्मनिर्वाण प्राप्त होते.

**स्पष्टीकरण**

स्थितप्रज्ञ वर्णनातल्या 54 ते 72 या 19 श्लोकांमधला पहिला श्लोक अर्जुनाच्या प्रश्नाचा आहे. 55 ते 58 पर्यंत

चार श्लोक स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगणारी आहेत. 68 पर्यंतचे दहा श्लोक मुमुक्षु वा साधकासाठी आहेत. 69 ते 72 हे चार श्लोक परत स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगतात यातून वर्णन आले आहे की स्थितप्रज्ञाला काय फळ लाभते.

1) **लक्षणांच्या** आधारे स्थितप्रज्ञाची जी स्थिती वर्णिली आहे ती ब्राह्मी स्थिती होय. हा फार अद्भुत अनुभव आहे. या स्थितीत माणूस अखंड ब्रह्मतत्वात लीन रहातो. परमात्म्यात लीन रहातो. त्याला इंद्रियांचे विषय ही परमात्मरुपीच दिसतात. तुकोबा म्हणतात 'विषय तो त्यांचा झाला नारायण! ' जग काय आणि जगातले पदार्थ काय सारे प्रत्यक्षपणे दिसतात. आपल्याला त्यांचे ज्ञान होते पण ज्याच्यापासून हे जगत निर्मिले गेले तो मूळ पुरुष-पदार्थ-परमात्मा-ब्रह्म त्याचे दर्शन होत नाही कारण परमात्मा स्थूल नसल्यामुळे त्याचे स्थूल दर्शन होत नाही. ते सूक्ष्म तत्व आहे. यामुळे पदार्थांचे ज्ञान होते पण त्यांचे मूळ कारण अशा परमात्म्याचे काही ज्ञान होत नाही. हा अनुभव येत नाही. यामुळेच आपण पदार्थांच्या ठायी आसक्त होऊन बसतो. स्थितप्रज्ञ मात्र परमात्म्याला ओळखतो. त्याने विषयांचे आदि कारण परमात्मा असल्याचे जाणून घेतले आहे. यामुळे त्याला विषयांच्या ठायी ही परमात्माच दिसतो. सातव्या अध्यायाच्या एकोणीसाव्या श्लोकात येते **वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः** अर्थात् ज्याच्यासाठी सारे काही वासुदेवरुपच बनून गेले आहे, असे महात्मा दुर्लभ होत!

2) अशी ब्राह्मी स्थिती प्राप्त झाल्यावर स्थितप्रज्ञ कदापि मोहात फसत नाही, मूर्च्छित होत नाही. ईशावास्योपनिषदाचा मंत्र सांगतो

***यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः।***
***तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः॥***

अर्थात् एक अशी स्थिती जागते. अशी एक ज्ञानावस्था उत्पन्न होते. ज्ञानी पुरुषाला सारी भूते परमात्मरुपच वाटतात. ती एक परमात्म अवस्था असते. ज्ञानावस्था असते. ज्ञानी पुरुष सर्वत्र एकमेव ईश्वराचेच दर्शन करतो. अशा अवस्थेत कसला मोह ? कुठला शोक ?

एकदा का ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली की माणूस मोहित होत नाही. डगमगत नाही. अज्ञानावस्थेमुळे मोह जागतो. त्याचा अनुभव देहावस्थेत होतो. जो देहापासून विलग झाला ज्याचे आसन परमात्म्याच्या ठायी एकरुप झाले तो कदापि मूर्च्छित होत नाही. ज्या अवस्थेपासून कदापि विचलित होत नाही. ज्या अवस्थेपासून कदापि स्खलन नसते - पतन नसते - अशा अवस्थेला ब्राह्मी स्थिती म्हणतात.

3) ब्राह्मी स्थितीचा महिमा मोठा. ही स्थिती अंतकाळापर्यत टिकते. ही अवस्था मृत्युसमयीही टिकून असते. मृत्युची घडी महत्वाची आहे. परीक्षेत पास होण्यासाठी विद्यार्थी वर्षभर सतत अभ्यास करतो. तसेच आपण जीवन जगतो. मरणाला जिंकून घेता यावे इतकी तयारी झाली असली पाहिजे. मरण समयी परीक्षा असते. त्यावेळी हरिस्मरण व्हावे. अन्यथा मृत्युवेळच्या अपार वेदनेने माणूस मूर्च्छित होईल. मृत्युच्या वेदनेला सहन करता येणार नाही. आठव्या अध्यायात पाच ते दहा या श्लोकांमधून या विषयाची चर्चा आली आहे. मृत्युसमयी ईश्वराचे अखंड स्मरण असावे. ईश्वराचे स्मरण सबंध आयुष्यभर अखंडपणे असेल तरच अंत्यसमयी ते स्मरण होईल. अशा व्यक्तीला काय फळ मिळेल ? अंतकाळीचे महत्व फार. याच काळी पुढील जन्माचे रुप ठरते.

मृत्युसमयी यातना अपार असतात. अशावेळी ईश्वर स्मरणासोबत काया सुटू शकते. पूर्वजन्मीचे सुकृत जागू शकते. पुण्यकर्माच्या उपभोगण्याचा काळ अंतिम काळी सुरु होत असेल किंवा साधनेची परमोच्च स्थिती जागली तर ब्राह्मी स्थितीचा अनुभव येऊ शकतो. तो मुक्त होऊ शकतो. अर्थात् अशा प्रकारे अंतिम समयी ब्राह्मी स्थितीचा अनुभव येणे वा प्राप्त होणे असंभवनीय घटना आहे. तरी सुध्दा अंतिम काळी अशी ब्राह्मी स्थिती साधली जाण्याची घटना घडू शकते, नाही असे नाही. सर्वसामान्य नियम मात्र असाच आहे की जन्मभरच्या साधनेचा परिपाक वा परिणाम अंतिम काळी ब्राह्मी स्थिती आकाराला येण्यात वा प्राप्त होण्यात होऊ शकतो.

4) ब्राह्मी स्थितीचा अनुभव आला. देहपतन झाले. लगेच ब्रह्म निर्वाण वा मोक्ष प्राप्ती होते. यानंतर दुसरा जन्म नसतो. देहात असताना मोक्षाचा हा अनुभव का कुणाला घेता येणार नाही ? या प्रश्नाचे उत्तर आहे. 'होय' घेता येईल ! पण मोक्षाचा अनुभव घेत असताना सुध्दा देहाची उपाधी प्रारब्ध कर्म क्षीण होईपर्यंत असतेच असते कारण मोक्षाचा अनुभव आला म्हणजे ब्राह्मी स्थिती जागली म्हणून काही

ताबडतोब देह पतन होत नाही. देहपतन प्रारब्ध कर्माच्या अधीन आहे.

विनोबांनी ब्राह्मी स्थिती आणि ब्रह्म निर्वाण या वेगवेगळ्या संकल्पना मानल्या आहेत. ब्राह्मीस्थिती म्हणजे जिथून अध:पतन संभवत नाही. ब्रह्मनिर्वाण म्हणजे जिथून पुढे जाणे संभवत नाही. याचा अर्थ असा की देह असताना ब्राह्मी स्थितीचा आनंदानुभव घेता येतो. त्या अनुभवानंतरही ब्रह्मनिर्वाण साधेपर्यंत साधना सुरुच असते. यातून ब्राह्मी-स्थितीचाही उत्कर्ष साधता येईल. ब्राह्मी स्थिती अधिक सूक्ष्म होईल. देह असेल तोवर विकासाची प्रक्रिया जारी असते. विकास थांबत नसतो. सूर्योदयापूर्वीही प्रकाश बराचसा असतो. सूर्योदयासोबत प्रकाश पूर्णपणे प्रकट होतो. तसेच ब्राह्मी स्थिती जागल्यावर मृत्युपर्यंत या स्थितीतील अनुभवात वृध्दी होत राहील. ब्रह्म निर्वाण साधले. देहाचे पतन झाले. म्हणजे मोक्षरुपी पूर्ण सूर्योदय होईल.

• • • *दुसरा अध्याय संपूर्ण* • • •



तिसरा अध्याय

# कर्मयोग

पहिल्याच श्लोकात अर्जुनाने प्रश्न विचारला आहे कर्माहून निष्काम बुध्दी जर श्रेष्ठ असेल तर मग या घोर कर्मात आपण मला का लोटत आहात? का प्रवृत्त करत आहात?

: 1 :

**अर्जुन उवाच**

***ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुध्दिर्जनार्दन।***
***तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दन:** हे जनार्दना, श्री कृष्णा
- **चेत् कर्मण:** जर बाह्य कर्मांनी
- **बुध्दि: ज्यायसी:** निष्काम बुध्दी श्रेष्ठ आहे (असे)
- **ते मता:** तुमचे मत आहे
- **तत् केशव:** तर मग हे केशवा
- **घोरे कर्माणि:** त्या घोर कर्मांमध्ये
- **मां:** मला
- **किं नियोजयसि:** का बरे नियोजित करीत आहात?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे जनार्दना जर तुम्हाला कर्माहून ज्ञान श्रेष्ठ वाटते तर मग हे केशवा, मला भयंकर कर्म करण्यास का प्रवृत्त करीत आहात?

**अर्जुन म्हणाला,**

***बुध्दि कर्माहुनि थोर मानिसी तूं जनार्दना***
***मग कमांर्त कां घोर घालिसी मज केशवा।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन मुद्दे मांडले आहेत. 1) कर्माहून म्हणजे बाह्य कर्माहून जर आंतरिक समत्व बुध्दी श्रेष्ठ असेल तर मग 2) मला युध्दासारख्या घोर कर्मात आपण का प्रवृत्त करताहात?

**स्पष्टीकरण**

1) भगवंताने गीतेच्या दुसऱ्या अध्यायातल्या 49 व्या श्लोकात म्हटले आहे की आंतरिक निष्कामता, निर्विकारता, समत्व बुध्दी म्हणजे समत्व बुध्दीला शरण जा. कर्म करत असताना फळाची आसक्ती मनात धरणारे जन दीन होत. हा मुद्दा ध्यानी घेऊन अर्जुन भगवंताला विचारत आहे की बाह्य कर्मापेक्षा आंतरिक निष्कामता जर श्रेष्ठ असेल तर युध्द करायची प्रेरणा का देताहात आपण? घोर कर्मजाळात का फसवताहात मला?

सीतेला रावणाने अशोक वाटिकेत ठेवले होते. सीतेचा शोध घेत असताना हनुमान अशोक वाटिकेत गेले. त्या नयन मनोहर उद्यानात पांढरी फुले हसत होती. हनुमंताच्या डोळ्यात क्रोधाचा अंगार फुलला होता. त्याना ती तांबडीभडक भासली. अर्जुनाची स्थिती त्या हनुमंतासारखी झाली. फरक एवढाच की हनुमंताला क्रोध आला होता. अर्जुनाच्या मनी मोह दाटला होता. विकार जागला होता. अर्जुनापुढे सारे नातेवाईक युध्द करायला उभे ठाकले होते. संत तुलसीदासांनी नारदाच्या मनी जागलेल्या अशाच मोहग्रस्त प्रसंगाचे सुरेख वर्णन केले आहे.

***माया बिबस भये मुनि मूढा।***
***समुझी नहिं हरि गिरा निगूढा॥***

विश्वमोहिनीच्या रुपावर नारद भाळले. ब्रह्मचारी नारदाचा स्वयंवराच्या मंडपाकडे निघायचा मानस होता.

आधी देवाला भेटले. मायेने विवश मुनिवर देवापुढे उभे होते. 'नारदा, तुझे कल्याण होईल असेच मी करीन.' असे देवाने आश्वासन दिले पण **मुनि अति बिकल मोहँ मति नाठी** नारदाची बुध्दी मोहग्रस्त झाली होती. नष्ट झाली होती. नारद व्याकुळ बनले. थेट तशीच अर्जुनाचीही अवस्था झाली. यामुळे स्वधर्मदेखिल अर्जुनाला घोर कर्म वाटू लागले होते. भगवंतांनी अकराव्या श्लोकापासून अर्जुनाची समजूत काढायला सुरुवात केली होती. हे सारे अर्जुनाने एकाग्रतेने ऐकले. 49 व्या श्लोकात त्यानी स्पष्टपणे सांगितले की कर्माहून निष्काम बुध्दी श्रेष्ठ आहे. याच निष्काम बुध्दीचा म्हणजे समत्व बुध्दीचा परिचय भगवंतांनी करुन दिला आहे. अखेरीस स्थितप्रज्ञ लक्षणांचा परिचय करुन दिला. या लक्षणांचा परिचय करुन देताना भगवंतांनी कुठेही असे सांगितले नाही की तो जनसेवा करत जीवनयापन करतो. स्थितप्रज्ञाच्या तमाम आंतरिक गुणांचीच चर्चा केली. हे सारे विवेचन अर्जुनाने ऐकले. या चर्चेने दुसऱ्या अध्यायाचा समारोप झाला. तिथे कुठेही भगवंताने कर्म करायची चर्चा केली नाही. विचार मांडला नाही. असे असताना एकदम भगवंताने 'युध्द कर' असा आदेश कसा काय दिला? ही शंका अर्जुनाच्या मनी आहे. खरे तर 'अर्जुना, तू स्थितप्रज्ञाच्या गुणाना अंत:करणात स्थान दे. या गुणांचे आचरण कर.' असे भगवंताने सांगायला हवे होते असे अर्जुनाला वाटले आणि ते तसे वाटणे स्वाभाविकच होते म्हणा! 'समता, निष्कामता, निर्विकारता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील अस.' असा आदेश द्यायला हवा होता. यामुळे अर्जुनाने हा प्रश्न विचारला. भगवंताचे म्हणणे कदाचित धडपणे आपल्या लक्षात आले नसावे या शंकेने त्याच्या मनाला ग्रासले. आपल्या समजूतीत काही गफलत राहिली असेल. यामुळे त्याने पुढील श्लोकात परत प्रश्न विचारला "आपले निवेदन परस्पर मिश्रित वाटते. काहीसे बुचकळ्यात टाकणारे वाटते. माझी बुध्दी त्यामुळे मोहित झाली आहे. मी दुविधेत पडलो आहे. नेमके काय ते मला कळत नाही. कळले नाही, कृपा करावी. मजसाठी जे कल्याणकारी असेल ते मला नेमकेपणाने सांगावे."

: 2 :

***व्यामिश्रेणेव वाक्येन बुध्दिं मोहयसीव मे।***
***तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **व्यामिश्रेण इव वाक्येन मे बुध्दिं:** जणू काही गोंधळात टाकणाऱ्या वचनांनी माझ्या बुध्दीला
- **मोहयसि इव:** जणू काही गोंधळात टाकत आहात
- **तत् येन अहं:** यामुळे ज्या प्रकारे मी
- **श्रेय: आप्नुयाम्:** कल्याण प्राप्त करेन
- **तत् एकं निश्चित्य वद:** ते एक नेमके निश्चितपणे सांगा

**अर्थ**

तुम्ही मिश्रितशा भाषणाने माझ्या बुध्दीला जणू मोहित करीत आहात म्हणून अशी एकच गोष्ट निश्चित करुन मला सांगा की ज्यामुळे माझे कल्याण होईल.

***मिश्र बोलूनि बुध्दीस जणू मोहांत टाकिसी***
***ज्यानें मी श्रेय पावेन सांग तें एक निश्चित।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. (1)भगवंताचे निवेदन दुविधेत टाकणारे आहे. (2) माझे कल्याण होईल असे मला नेमकेपणाने सांगण्यात यावे.

**स्पष्टीकरण**

अर्जुनाला शोक अन् मोहापासून दूर घालवण्यासाठी भगवंताने दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकापासून प्रयत्न केलेत. तत्वज्ञान समजाऊन सांगितले. अध्यायाच्या समापनापर्यंत तत्वज्ञानातल्या स्थूल-सूक्ष्म तत्वांची चर्चा केली. सारे-सारे समजाऊन सांगितले. तत्वज्ञानातील गूढ रम्य स्थळे उकलवून दाखवणे सोपे नाही. नाना शंका जागतात. शंकांचे निवारण झाल्यावर यथार्थ ज्ञान प्राप्त होते. खरे ज्ञान कळते. कांदा सोलावा तसे एका शंकेतून दुसरी, दुसरीतून तिसरी अशा शंका येत रहातात. शंकांचे असे चक्र सुरु असते. समाधान काही होत नाही. प्रश्न काही सुटत नाही.

या संदर्भात बाळकोबांनी आपले स्वत:चे उदाहरण दिलेय. ते सांगतात - "सर्वप्रथम 1924 साली मी गीता वाचली. गीतेवर माझी श्रध्दाही बसली मग पुढे ज्ञानेश्वरी वाचली. शांकरभाष्याचा अभ्यास केला. उपनिषदांचा

स्वाध्याय केला. परमात्मा या जगात कशाप्रकारे राहतो? त्याचा आपला संबंध काय? आपण परमेश्वरापासून भिन्न आहोत की अभिन्न? भिन्न असलोत तर कसे? अभिन्न असू तर कसे? या शंका सलत राहिल्यात. माया किंवा प्रकृतीचे स्वरुप कसे आहे? मायेचा ईश्वराशी संबंध काय? मोक्ष म्हणजे काय? जगत् मिथ्या आहे म्हणजे नेमके काय? सगुणाचे स्वरुप कसे? निर्गुण म्हणजे नेमके काय? उपर्युक्त ग्रंथ वाचूनही या प्रश्नांचे नेमके निराकरण होत नव्हते. नाना अडचणी येत. एक तर मूळ ग्रंथ संस्कृत भाषेतले आणि शंकराचार्यांची शैली संक्षिप्तीकरणाची आहे. यामुळे त्यांचे ग्रंथ समजून घ्यायला कैक वर्षे अभ्यास करावा लागला. अखेरीस यश लाभले. या ग्रंथाचे एक वैशिष्ट्य आहे. खरे तर ही या ग्रंथाची अपूर्वता म्हणावी लागेल. या ग्रंथातले विवेचन पूर्वपक्ष-उत्तरपक्ष या शैलीतले आहे. पूर्वपक्षात शंका उपस्थित केली गेली आहे. पुढे उत्तर पक्षात शंकानिरसन केले गेले. संन्यास आणि कर्मयोग, सगुण आणि निर्गुण याबाबतीत मात्र ब्रह्मसूत्र-शांकरभाष्य वाचून मनाचे जे समाधान झाले नाही ते विनोबांचे स्पष्टीकरण वाचून झाले.''

अर्जुनाच्या मनातली शंका या श्लोकातून प्रकट झाली आहे. खरे तर ही शंका आपल्या प्रत्येकाच्या मनात जागते. अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर भगवंताने या अध्यायातून देण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे चौथ्या अध्यायातूनही हाच विषय समजाऊन सांगितला आहे. अर्जुनाने परत हीच शंका पाचव्या अध्यायातही विचारली आहे.

1) अर्जुनाचे भगवंताला सांगणे आहे की आपले निवेदन मला बुचकळ्यात टाकणारे आहे. मी दुविधेत पडलो आहे. याचा अर्थ असा की भगवंताने तर आपला मुद्दा कळेल या पध्दतीनेच मांडला असावा पण अर्जुनाच्याच ध्यानी ते धडपणे आले नसावे. यामुळे अर्जुन म्हणतो की आपले निवेदन बुचकळ्यात टाकणारे आहे.

2) अर्जुन अखेरीस हे सांगून टाकतो की माझे ज्यामुळे कल्याण होईल असे जे काही असेल ते मला निश्चितपणे सांगावे. अर्जुनाने प्रत्येक अध्यायात काही-ना-काही तरी विचारलेले आहे. शंका उपस्थित केली आहे. अगदी अखरेच्या अठराव्या अध्यायातसुध्दा प्रश्न विचारलेला आहे. प्रश्न विचारल्यामुळे अर्जुनाच्या जिज्ञासेची तीव्रता ध्यानी येते. अर्जुन मोहग्रस्त झाला यामुळेच तर अगदी आध्यात्मिक स्वरुपाची जिज्ञासा त्याच्या मनी जागली आहे. जीवनात अत्यंत दु:खाचे प्रसंग येतात. बाह्य साधनांनी दु:ख दूर करता येत नाही. अशावेळी आध्यात्मिक जिज्ञासा जागते. माणूस ती जिज्ञासा पूर्ण करायचा प्रयत्न करु लागतो. पुढच्या श्लोकापासून भगवंताने हे समजाऊन सांगायला सुरुवात केली आहे.

: 3 :

**श्री भगवान उवाच**

*लोके ऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।*
*ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनघः** हे निष्पाप अर्जुना
- **अस्मिन् लोके मयाः** या लोकी माझ्याद्वारे
- **पुराः** प्राचीन काळी
- **द्विविधा निष्ठाः** दोन मार्गांनी निष्ठा म्हणजे मोक्ष
- **प्रोक्ताः** प्राप्त होतो, असे सांगितले गेले आहे
- **सांख्यानाम्ः** सांख्य म्हणजे ज्ञानाची इच्छा राखणारे ज्ञानेच्छु
- **ज्ञानयोगेनः** ज्ञानमार्गाने मोक्ष प्राप्त करतात
- **योगिनाम्ः** (आणि) योगी, मोक्षाभिलाषी
- **कर्मयोगेन्ः** कर्मयोग मार्गाने मोक्ष प्राप्त करतात

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे निष्पाप अर्जुना, या जगात दोन प्रकारची निष्ठा माझ्याकडून पूर्वी सांगितली गेली आहे. त्यातील सांख्ययोग्यांची निष्ठा ज्ञानयोगाने आणि योग्यांची निष्ठा कर्मयोगाने होते.

**श्री भगवान म्हणाले**

*दुहेरी ह्या जगीं निष्ठा पूर्वी मी बोलिलों असें*
*ज्ञानानें सांख्य जी पावे योगी कर्म करुनियां ।*

**स्पष्टीकरण**

भगवंताने अर्जुनाला सांगितले - 'हे अनघा! अघ म्हणजे पाप. अनघ म्हणजे निष्पाप. हे निष्पाप अर्जुना, प्राचीन काळी मी मोक्ष प्राप्तीचे दोन मार्ग सांगितले होते. या श्लोकात 'निष्ठा' आणि 'पुरा' असे दोन शब्द आलेत.

निष्ठा याचा अर्थ मोक्ष. पुरा याचा अर्थ प्राचीन काळ. लोकमान्य टिळकानी 'पुरा' शब्दाचा वेगळा अर्थ केला. 'पुरा' म्हणजे आधीचा अध्याय. यापूर्वी सांगितलेला अर्थ. शंकराचार्यांनी अर्थ केला 'प्राचीन काळी' गांधीजींनी 'पुरा' या शब्दाचा अर्थ नाही दिला. विनोबांनीही या शब्दाचा अर्थ कुठे स्पष्ट केला नाही. बाळकोबाना शंकराचार्यांनी सांगितलेला अर्थ भावल्यामुळे त्यानी प्राचीन काळ हा अर्थ दिला. प्राचीन काळापासून आजवर मोक्षप्राप्तीचे दोन मार्ग-दोन उपाय-चालत आलेले आहेत. एक ज्ञानमार्ग आणि दुसरा कर्ममार्ग-कर्मयोग मार्ग. एक सांख्यांचा मार्ग आहे म्हणजे ज्ञानवंतांचा मार्ग आहे. साधना करुन या मार्गाने ज्ञानी पुरुष मोक्षप्राप्ती करुन घेतो. दुसरा योगीजनांचा मार्ग आहे. या मार्गाने साधना करुन योगी मोक्ष प्राप्त करुन घेतात. संत तुलसीदासांनी म्हटले आहे,

**ग्यानपंथ कृपान कै धारा। परत खगेस होइ नहिं बारा॥**
**जो निरबिघ्न पंथ निरबहई। सो कैवल्य परम-पद लहई॥**

अर्थात् ज्ञानमार्ग हा जणू खड्गाची धार आहे. तलवारीचे चमचमते पाते आहे. यावर चालणे अवघड. पाय घसरला तर मोठे कठिण काम पण या मार्गाने निर्विघ्नपणे पार पडता आले ना तर मग कैवल्य प्राप्ती म्हणजे मोक्ष प्राप्ती.

ज्ञानमार्ग अवघड आहे. यात घसरायचे भय अधिक. यात ध्यान, धारणा, समाधी, अभ्यास, मौन, तप वगैरे कर्मविहीन साधनेचा समावेश होतो. ध्यानात भक्त निर्गुणाचे ध्यान धरतो. याशिवाय यात शारीरिक तपही मुख्यत्वेकरुन असते. अपरिग्रह व्रत असते. एकांतस्थळी वास असतो. जंगलात तरुतळी निवास असतो. भिक्षा मागून निर्वाह करावा लागतो. यामुळे या मार्गावर वाटचाल करण्यासाठी आत्मबळ हवे. पाचव्या अध्यायात या मार्गाला 'न्यास मार्ग ' म्हटले गेले आहे. याचा महत्वाचा भाग ब्रह्मचर्य होय. यात जनसंपर्क टाळत रहावे लागते.

ज्ञानेश्वर महाराजांनी या मार्गाला 'विहंगम मार्ग' म्हटले आहे. विहंगम म्हणजे पक्षी. या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर माऊली म्हणते की पक्षी उडून लगेच फळाप्रत पोहोचतो तसे का माणसाला करता येईल? माणूस तर एकेक फांदीवर चढत-चढत फळाप्रत पोहोचेल ना? त्याला का पक्ष्यासारखे उडता येईल?

ज्ञानमार्ग अरण्याचा पंथ आहे. अरण्यपंथ काही तयार नसतो. हिंस्त्र श्वापदांचे साम्राज्य तिथे नांदते. शंकराचार्यांनी या मार्गाचे मोठे मनोरम वर्णन केले आहे: **सांख्यानां आत्मानात्म विषयक विवेकज्ञानवतां ब्रह्मचर्याश्रमादेव कृतसंन्यासानां वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थानां परमहंस-परिव्राजकानां ब्रह्मणि एव अवस्थितानां निष्ठा प्रोक्ता।** अर्थात् सांख्यांना आणि ज्ञान्यांना आत्मा आणि अनात्मा, चेतन आणि अचेतन (जड) म्हणजे सत्य आणि असत्य या विषयी विवेकी पुरुष आणि ब्रह्मचर्याश्रमातच ज्यांनी संन्यास घेऊन वेदान्त ज्ञानाद्वारे परमात्म तत्वाला निश्चितपणे जाणून घेतले आहे आणि जे परमहंस संन्यासी बनून ब्रह्माच्या ठायीच स्थित होऊन गेले आहेत असे ज्ञानी पुरुष त्यांची निष्ठा (स्थिती) म्हणजे ते कोणत्या प्रकारे ज्ञानमार्गाने मोक्ष प्राप्त करुन घेतात हे मी सांगितले.

शंकराचार्य स्वत: ब्रह्मचारी होते. बाळपणीच संन्यास घेतला होता. त्यांची योग्यता असाधारण अशी होती संन्यास म्हणजे ज्ञानमार्ग. त्याच्या आधारे त्यानी मोक्ष प्राप्त करुन घेतला. ज्ञानमार्ग अवघड आहे. सारेच काही या मार्गाचा अवलंब करु शकत नाहीत. ज्ञानमार्गासाठी योग्यता लागते. ती सर्वांना नाही लाभत. एखादा साधक ज्ञानमार्गाने मोक्षप्राप्ति करुन घेऊ शकतो. असे साधक विरळ असतात. अधिक नसतात. ज्ञानमार्गाची साधना करणारे पडतात. सर्वसाधारण व्यक्तिसाठी जंगलाचा मार्ग सोईचा नसतो तो बिकट असतो. अवघड असतो. कठिण असतो. साधारण व्यक्तिसाठी साधा सरळ आपला राजमार्ग सोईचा. भगवान म्हणतात की योगीजनांसाठी सोईचा असा जो राजमार्ग आहे तो आहे कर्मयोग मार्ग ! त्याचेही ज्ञानमार्गाशी अनुसंधान आहे. मोक्षप्राप्तीचा एक नव्हे दोन मार्ग आहेत. एक अवघड आहे, तो निवडक लोकांसाठीचा. दुसरा साधा-सरळ-सुगम. तो सर्वांसाठी सोईचा. या श्लोकातून भगवंताने केवळ दोनच मार्गांचा परिचय करुन दिला. उल्लेख केला. एक साधा-सरळ तर दुसरा थोडा खडतर-अवघड. हे निरुपण काही इथेच आले आहे, असे नाही. पाचव्या अध्यायात अर्जुनाने परत हाच प्रश्न विचारला आहे. तिथे भगवंताने उत्तर दिले आहे की मोक्षप्राप्तीसाठी दोन्ही समान आहेत. ज्ञानमार्गाहून कर्मयोग मार्ग सरळ आहे.

कर्मयोगमार्गात भक्ती हेच प्रमुख साधन होय. गीतेत प्रमुख साधन म्हणून भक्तीचाच विचार मांडला गेला आहे. तुलसीदास म्हणतात :

***राम भजत सोइ मुक्ति गोसाई।***
***अनइच्छित आवइ बरिआई॥***

अर्थात् राम भक्ती करणाऱ्याला तोच मोक्ष इच्छा न करताही आपसूक अगदी सहजच प्राप्त होतो. भक्तीच्या सोबत सेवेचे कर्मही करावे. ते स्वकर्तव्य होय. स्वधर्म होय. यासाठी इंद्रियनिग्रहाचा सरावही सहजच होऊन जातो. सर्वांशी सततचा संपर्क आल्यामुळे काम, क्रोध, अहंकार वगैरे विकारांना क्षीण करायची संधी लाभते. विकारांना घालवून दिल्याशिवाय का परस्पर व्यवहार शांततापूर्वक करता येतील? कर्मयोगाची ही सुगम वाट आहे.

पुढच्या श्लोकात सांगितले गेले की कर्म प्रारंभ न केल्यामुळे काही निष्कामता प्राप्त करुन घेता नाही येणार. आरंभ केलेल्या कामांचा त्याग करुनही मोक्ष प्राप्ती होऊ शकणार नाही.

: 4 :

*न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।*
*न च संन्यासनादेव सिध्दिं समधिगच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कर्मणां अनारम्भात्:** चित्तशुध्दी करणाऱ्या कर्मांची सुरुवात केल्याशिवाय
- **पुरुष:** नैष्कर्म्यं न अश्नुते: माणूस निष्कामतेला प्राप्त होत नाही
- **संन्यसनात् एव:** त्याचप्रकारे चालू कर्मांना सोडल्यानेच
- **सिध्दिं न समधिगच्छति:** मोक्षाला (दु:ख मुक्तीला) प्राप्त होत नाही

**अर्थ**

मनुष्य कर्मे केल्याशिवाय निष्कर्मतेला म्हणजेच योगनिष्ठेला प्राप्त होत नाही आणि कर्मांचा फक्त त्याग केल्याने सिध्दीला म्हणजेच सांख्य-निष्ठेला प्राप्त होत नाही.

*न कर्मारंभ टाळूनि लाभे नैष्कर्म्य तें कधीं*
*संन्यासाच्या क्रियेनें चि कोणी सिध्दि न मेळवी ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. (1) कर्म सुरुच केले नाही तर काही आतली निष्कामता, निरहंकारिता, अकर्तेपणा अनुभवता येणार नाही. (2) जी कर्मे आचरली जात आहेत त्यांना सोडून दिले तरी सिध्दी वा मोक्ष प्राप्त करुन घेता येणार नाही.

**स्पष्टीकरण**

पुढच्या श्लोकात भगवंताने सांगितले आहे की कर्म केल्याशिवाय कुणीही माणूस क्षणभरही राहू शकत नाही. आपण जर कर्म न करता राहूच शकणार नसू तर मग कर्म न करण्याचा आग्रह धरणे वृथा होय. कर्म न करण्याचा आपण आग्रह धरला ना तर आपण ढोंगी ठरु. मिथ्याचारी बनू. दंभी म्हणून आपली गणना होईल. आपली अवनती निश्चितपणे होईल. ही सारी चर्चा पुढील श्लोकात आली आहे. दुसऱ्या अध्यायात 59 व्या श्लोकात सांगितले आहे की आपण पंचज्ञानेंद्रियांच्या पंचविषयांचा त्याग नाही करु शकत. तो प्रयत्न वाया जाईल. याचे कारण असे की विषयांमधली आसक्ती नाही सुटत. रस नाही सुकत. एवढेच नव्हे पण आपण बाह्यत: विषयांचा त्याग जरी करु गेलो ना तरी आतून विषयांप्रती वासना वाढून जाईल. यामुळे इथे मध्यम मार्गाची चर्चा आली आहे. म्हणजे संयमपूर्वक मर्यादित-आवश्यक तेवढ्याच विषयसेवनाची चर्चा आली आहे. परमात्म्याची भक्ती करावी. मध्यम मार्ग धरावा. आतली विषय वासना क्षीण होईल. इथेही भगवंत हाच मुद्दा मांडताहेत. 59 व्या श्लोकात प्रामुख्याने पंचज्ञानेद्रियांच्या विषयांचा त्याग करायचा मुद्दा होता. इथे कर्मेंदियांनी कर्म सोडण्याची चर्चा आली आहे. हाच दोघांमधला फरक होय.

भगवंताचे म्हणणे असे आहे की आपण कर्माची सुरुवातच नाही केली तर मनातल्या विषयवासना, नाना प्रकारच्या इच्छा, महत्वाकांक्षा कदापि सुटू शकणार नाहीत. यांचा त्याग करायचा असेल तर आपल्याला रात्रंदिवस कर्मातच लागून रहावे लागेल. कर्मे तीन प्रकारची असतात. सात्विक, राजस आणि तामस. या विषयी स्पष्टीकरण गीतेच्या अठराव्या अध्यायातील 23 ते 25 या श्लोकातून आले आहे. राजस आणि तामस कर्मांचा त्याग करावा लागतो. यातून आंतरिक निष्कामता साधता येत नाही. अकर्तेपण विकसित होत नाही. ही कर्मे सकामता वाढवतात. अहंकार पुष्ट करतात. सात्विक कर्मे केली तर अकर्तेपणाचा अनुभव येतो. निष्कामतेची प्रचिती येते. हीच कर्मे आत्मज्ञान प्राप्त करुन देण्यासाठी मदतरुप ठरतात.

कर्मे करण्याचा वा न करण्याचा, त्यांना सोडून देण्याचा भाव मनात येतो. या कल्पनेचे मूळ कारण काय? हा प्रश्न उभा ठाकतो. चिकित्सा करु जाता यातून असे निदर्शनाला येते की देह, इंद्रिये, मन, बुध्दी इत्यादींचा समुदाय म्हणजे माणूस नव्हे. यांचा संघात म्हणजे आपण

नव्हे. देह, इंद्रिये, मन, बुध्दी इत्यादी म्हणजे काही आपले स्वरुप नव्हे, कारण आपल्याला आपल्या खऱ्या स्वरुपाची ओळख नाही. ज्याला आपण आपले स्वरुप समजतो. सारा व्यवहार करतो. तो संघात परिवर्तनशील आहे. तो काही नित्य पदार्थ नाही. काही समजून न घेताच आपण त्यातून बाहेर पडू बघतो. तशी धडपड करतो पण देह वगैरेतून बाहेर कसे पडायचे ते आपल्याला ठाऊक नसते. शास्त्राचे वचन आहे की आपण म्हणजे काही देह नाही. आपण देहस्वरुप नाहीहोत. आपण ज्ञाते आहोत. आपण अकर्तारुप आहोत. आपण ज्ञानस्वरुप आहोत. अकर्ता कसे बनता येईल? हे धडपणे लक्षात येत नाही. यामुळे आतली वासना अधिक प्रबळ होते. हे लक्षात न आल्यामुळे साधक-मुमुक्षु चुकीच्या मार्गाने चालायला लागतात.

शंकराचार्यांचे एक स्तोत्र आहे. चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या संन्यासी जनांचे त्यातून वर्णन आले आहे:

*अग्रे वह्निः पृष्ठे भानू रात्रौ चिबुकसमपिर्तजानुः।*
*करतल-भिक्षा तरुतल-वासस्तदपि न मुंचति*
*आशापाशः॥*

अर्थात् "समोर जळती आग आहे. पाठी मागे सूर्य तापलेला आहे. थंडी कडाक्याची आहे. दाढी गुढग्यावर टेकवून रात्र घालवतात. करतळी भिक्षा घेतात. तरुतळी वास करतात. एवढे करुन सुध्दा मनातले आशेचे बंधन शिथिल होत नाही.

कर्माचा आरंभ न करणे ही झाली एक गोष्ट तद्वतच चालू कर्म वा स्वकर्तव्याचा त्याग करणे ही दुसरी गोष्ट आहे. दोन्ही मार्गांनी आंतरिक निष्कामता लाभणार नाही. चित्तशुध्दीही साधता येणार नाही. एवढेच नव्हे तर चित्ताचे पतन होण्याची शक्यता असते. यामुळे बाहेरुन कर्मरत असणे चित्ताच्या विकासाच्या दृष्टीनेही अत्यंत गरजेचे आहे.

ज्ञानेश्वर माऊली विचारते: "नदीच्या पैलतटावर जायची इच्छा असेल तर नावेचा त्याग करुन देऊन कसे बरे चालेल? किंवा भूक लागली असेल तर स्वयंपाक न करुन कसे भागेल? किंवा स्वयंपाक करुनही भोजन न करता कसे चालेल?'' पुढे म्हणतात की याचा अर्थ असा की जोवर आतून निष्कामता प्राप्त होत नाही तोवर निष्कामता प्राप्तीसाठी स्वधर्मरुप कर्म आचरत रहायला हवे. बाहेरुन कर्मांचा त्याग केला तर आतून विकारांचे बळ वाढेल. निष्कामतेच्या प्राप्तीसाठी आपण कर्मांचा त्याग करतो पण कर्मांचा त्याग करुन निष्कामता कधीच प्राप्त होणार नाही. सारांश असा की स्वधर्मरुप कर्मे करत-करत निष्कामता प्राप्त होईल आणि निष्कामता प्राप्त झाली म्हणजे चित्ताची शुध्दी होईल. चित्त शुध्द झाले की मोक्ष प्राप्ती होईल म्हणजे भगवंताची ओळख होईल.

: 5 :

*न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।*
*कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि कश्चित्:** कारण की कुणीही माणूस
- **क्षणं अपि अकर्मकृत्:** एका क्षणभरासाठीही कर्म केल्याशिवाय
- **जातु न तिष्ठति:** कदापि असे रहाणार नाही
- **हि सर्व:** कारण की प्राणीमात्र
- **अवशः** एवः निसर्गाच्या अधीन होऊन
- **प्रकृतिजैः गुणैः** निसर्गाच्या तीन गुणांच्या अनुसार, प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या गुणांनुसार
- **कर्म कार्यते:** कर्म करत रहातात

**अर्थ**

निःसंशयपणे कुणीही मनुष्य कोणत्याही वेळी क्षणभरही काम न करता राहात नाही, कारण सर्व मनुष्य समुदाय प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या गुणांमुळे पराधीन असल्यामुळे कर्म करायला भाग पाडला जातो.

*कर्माविण कधीं कोणी न राहे क्षण-मात्र हि*
*प्रकृतीच्या गुणीं सारे बांधिले करितात चि।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. (1) कुणीही कर्म न करता क्षणभर देखिल राहू शकत नाही आणि (2) त्रिगुणात्मक प्रकृतीच्या अधीन होऊनच त्याला कर्मे करावी लागतात. तीन गुण म्हणजे सत्व, रज आणि तम.

**स्पष्टीकरण**

कपिल महामुनिंनी सांख्यशास्त्राची रचना केली. त्यांनी दोन तत्वांचा विचार मांडला. एक पुरुष किंवा आत्मा. दोन प्रकृती-पुरुष चैतन्य स्वरुप म्हणजे ज्ञान स्वरुप आहे. प्रकृती जड आहे. पुरुष अगणित तर प्रकृती

एक. प्रकृतीच्या ठायी सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. या गुणांच्या मदतीने प्रकृती जगाच्या अनंत पदार्थांना निर्माण करते. पदार्थ कुठलाही का असेना, मग तो जड असो वा चैतन्य. त्याच्या ठायी हे तीन गुण असतातच. शरीर काय अन् बाह्य-आंतरिक इंद्रिये काय-सारे प्रकृतीच्या या तीन गुणांनीच बनले आहेत. अशाप्रकारे प्रत्येक पदार्थात हे तीन गुण असतात तरी देखिल ते समान रुपाने नसतात. तिघांपैकी एक अधिक प्रमाणात असेल तर इतर दोन कमी. ज्या पदार्थात जो गुण अधिक प्रमाणात असेल त्या पदार्थाला ते नाव द्यावे लागेल. सत्व गुणाचे अधिक्य असेल तर सात्विक, रजोगुणाचा प्रभाव असेल तर राजसी आणि तमोगुणाचे अधिक्य असेल तर तामसी या नावाने ओळखले जाते. झाडं-झुडुपं, लता-वेली-पानं-फुलं तमोगुण प्रधान, पशु-पक्ष्यांची जीवसृष्टी रजोगुण प्रधान तर मानव जगत सत्वगुणप्रधान होय. हे ढोबळ वर्गीकरण झाले. माणसांच्या ठायीसुध्दा सात्विक, राजसी आणि तामसी गुणधर्म आढळतो. सात्विक प्रकृतीची माणसे अल्पसंख्येने असतात तर रजोगुणी-तमोगुणी व्यक्तींची संख्या अधिक असते.

सांख्याच्या मते 'त्रिगुणात्मक जड प्रकृती' असते. वेदान्ताच्या भाषेत ही माया होय. सांख्य तत्वज्ञान प्रकृतीला स्वतंत्र मानते. वेदांत मायेला स्वतंत्र पदार्थ मानत नाही. परमात्म्याच्या सर्ग शक्तीला माया असे म्हणतात. सर्ग शक्ती म्हणजे सृष्टी निर्माण करण्याची शक्ती. परमात्म्याच्या ठायी दोन प्रकारच्या शक्ती आहेत. 1) एक चैतन्य शक्ती वा ज्ञान शक्ती आणि 2) दुसरी सर्ग शक्ती वा सृष्टी उत्पन्न करण्याची शक्ती वा माया. माया तीन गुणांनी युक्त आहे. माया त्रिगुणात्मिका आहे. चैतन्य स्वरुप स्थिर असते. त्यात चलन वलन होत नाही. हालचाल नाही, माया म्हणजे सृष्टीचा भास. या मायेत चलन वलन असते.

1) या मायेनेच आपल्या पंचमहाभूतात्मक शरीराची निर्मिती केली आहे. यामुळे शरीराच्या ठायीही चलन वलन होते. झोपेत सुध्दा शरीरातील क्रिया सुरु राहतात. मृत्युच्या क्षणापर्यंत शारीरिक क्रिया सुरु असतात. संपूर्ण शरीर कर्मरत असते. सर्व इंद्रिये आपली कामे अविरत करत असतात. अशा परिस्थितीत कर्मे सोडून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. नित्याची कामे तर करावीच लागतात. खाणे-पिणे, झोपणे-स्नान करणे यासारखी कामे का सोडता येतात? लहान लेकरे सदा न् कदा उल्हसित असतात. भगवंताने एक गोष्ट अशी सांगितली की माणूस प्रत्येक क्षणी काही ना काही क्रिया करतच असतो.

2) दुसरा मुद्दा असा की शरीराच्या समस्त क्रिया मायाधीन आहेत. त्रिगुणात्मक प्रकृतीच्या अधीन आहेत. बघणे, सांगणे, ऐकणे, खाणे, हुंगणे, चालणे, बोलणे, उठणे, बसणे वगैरे सर्व क्रिया सहजीच होत राहतात. सर्व इंद्रिये आपापली कामे करतात. त्यांचा सर्वथा त्याग कुठल्याही परिस्थितीत करता येत नसतो. त्यावर नियंत्रण ठेवता येते आणि हो ते ठेवावेही लागते. तमाम क्रियांमध्ये संयम हा असायलाच हवा. ज्ञानेश्वर माऊली म्हणते - ''आपण रथावर बसतो. निश्चल होऊन बसतो पण परतंत्र असतो यामुळे हलत-डुलत असतो. वाळकी पाने स्वत: हलत-डोलत नाहीत पण वाऱ्याचा वेगवान झोत येतो आणि पानेही लाचारीने इतस्तत: उडू लागतात." हे शरीर जोवर आहे तोवर काही ना काही कर्म चालतच रहाणार आहे.

या सिध्दांताला ध्यानी घ्यायला हवे. हट्टाने कुणी जर बाह्य कर्मांचा त्याग करायचा प्रयत्न करील तर आतल्या आत विषयाचे ध्यान वाढते राहील. त्याचे नुकसान होईल. तो मिथ्याचारी बनेल. खोटारडा बनेल. हे सारे पुढील श्लोकात येते.

: 6 :

***कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।***
***इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यः विमूढात्माः** जो मिथ्याचारी, दंभी वा अज्ञानी जीव
- **कर्मेन्द्रियाणि संयम्यः** पंच कर्मेन्द्रियांना रोखून, ताब्यात ठेवून
- **इन्द्रियार्थान्ः** पंच ज्ञानेन्द्रियांच्या विषयांना
- **मनसा स्मरन् आस्तेः** मनाने स्मरण करत रहातो
- **सः मिथ्याचारः उच्यतेः** तो 'मिथ्याचारी दंभी' म्हणवला जातो

### अर्थ

जो मूर्ख मनुष्य सर्व इंद्रिये बळेच वरवर आवरुन मनाने त्या इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करत रहातो तो मिथ्याचारी म्हणजे दांभिक म्हटला जातो.

***इंद्रियें करिती कर्म मूढ त्यांस चि रोधुनी***
***राहतो भोग चिंतूनि तो मिथ्याचार बोलिला।***

### स्पष्टीकरण

परमात्म स्वरुपाची ओळख कशी करुन घ्यावी ? किंवा दु:ख मुक्तीची साधना काय ? कर्म आचरत राहून हे साधता येईल की कर्मांचा त्याग करुन ? हा प्रश्न आहे. भगवंताने यापूर्वी चौथ्या श्लोकात हे सांगितलेले आहे की कर्तव्यकर्माचा आरंभ न करता वा वर्तमान कर्मे सोडून निष्कामता साधता येणार नाही. याचे कारण स्पष्ट आहे की बाहेरची कर्मे सोडून दिल्यावर आत विषयांचे चिंतन वाढेल. मनात जर अखंडपणे विषयाचे चिंतन जारी राहिले तर आपण निष्काम वा निर्विकार कसे राहू शकू बरे? बाहेरुन आपण सत्कर्मे आचरु लागलो तर आपले मनही सत्कर्मरत राहील. मनाला विषयाचे चिंतन करायला वेळ मिळेलच कसा आणि कुठे?

बाळकोबा आपली आठवण सांगतात: "1924 साल होते. गांधीजींना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्यांच्यासोबत आणखी एकाला शिक्षा झाली होती. दोघे एकाच कैदेत पण वेगवेगळ्या खोल्यात होते. दुसरे गृहस्थ एकटे एका वेगळ्या कोठडीत राहत. दोनच दिवसात त्या भल्या गृहस्थाच्या ध्यानात आले की एकांतस्थळी निष्क्रिय बनून राहणे त्याना शक्य नाही. तशी त्यांची योग्यता नाही. आपल्या मनात वाईट विचार कदापि येत नाहीत असे त्याना वाटायचे पण त्यांच्या मनी वाईट विचार येऊ लागले आणि त्यांना छळू लागले. त्यांनी कारावासाच्या अधिक्षकांना पत्र लिहिले. पत्रात मजकूर असा होता की त्यांना जर गांधीजींच्या सोबत ठेवले गेले नाही तर ते दोन दिवसात वेडे होऊन जातील. त्याना ताबडतोब गांधीजींच्या सोबत ठेवले गेले. ते एकदम व्यवस्थित झालेत. आता एकांत नव्हता. निष्क्रियता नव्हती. त्यांच्या मनातील वाईट विचारांचा आरोह-अवरोह थांबला होता. या उदाहरणाने हे ध्यानी येते की निष्काम आणि निर्विकार बनण्यासाठी कर्मे किती मदतरुप ठरतात. बाह्य कर्मांचा त्याग केला तर आत मनात विषय चिंतन वाढू लागले आणि तरी कर्मे सोडण्याचा आग्रह धरुन निष्क्रिय बनू म्हटले तर मग मिथ्याचारी तर बनूच बनू.

कर्मांचा त्याग करायचा विचार प्राचीन काळी प्रकर्षाने चालला. त्याकाळी पतंजलिचा 'अष्टांग योग' प्रमुख साधनरुप होते. परमात्म तत्वाला जाणून घेण्यासाठी ध्यान, धारणा, ब्रह्मचिंतन, समाधी या साधनांवर भर दिला जात होता. ध्यान-समाधीसाठी बाह्यत: कर्माचा त्याग करायलाच हवा. या मार्गाने साधक परमात्म तत्वाचा अनुभव करुन घेत. त्यात बुडून जात. यामुळे ते सहजच निष्क्रिय बनत. ज्ञानी पुरुषांच्या मनीही सहज निष्क्रियतेबद्दल आकर्षण वाढले. याचा परिणाम असा झाला की कुठलीही क्रिया न करणारा, भगवी वस्त्रे लेऊन भटकंती करणारा, दाढी-केस-नखे वाढवणारा, साधू-संन्यासी मानला गेला. यामुळेच आपले अध:पतन झाले. अशाच नामधारी साधु-संन्याश्यांना गीतेने ' मिथ्याचारी ' म्हटले आहे.

### संत तुलसीदासजींनाही सांगावे लागले

***संत बिसुध्द मिलहिं परि तेहीं।***
***चितवहिं राम कृपा करि जेहीं॥***

अर्थात् ज्यावर रामकृपा होते त्याची शुध्द संताशी भेट होते. तुलसीदासजींना संतासाठी 'शुध्द' हे विशेषण वापरावे लागले. अन्यत्र तुलसीदासजी लिहितात - **बिगरत मन संन्यास लेत जल नावत आम घरोसो।**

कच्च्या घटात खूप वेळ पाणी साठवून ठेवता येत नाही. अशाच प्रकारे अपरिपक्वावस्थेत संन्यास घेऊन निष्क्रिय बनले तर मन बिघडून जाईल. जर सिध्द दशा असेल तर सहज निष्क्रियता येईल, ज्ञानप्राप्ती होईल. ही चांगली प्रक्रिया आहे. परमात्म्याचा अनुभव झाल्यावर उपजलेल्या निष्क्रियतेच्या ठायी सर्वांना प्रेरणा प्रदान करण्याची प्रचंड शक्ती जागते. साधक दशेत कर्मेंद्रियांनी कर्मे न करणारे मिथ्याचारी ठरतील. ढोंगी ठरतील. दंभी मानले जातील. पुढील श्लोकात सांगताहेत की मिथ्याचारापासून बचाव करुन घेण्यासाठी काय करायला हवे?

: 7 :

***यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।***
***कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुनः** हे अर्जुना
- **तु यः इन्द्रियाणि:** पण जे पुरुष ज्ञानेंद्रिये, मन आणि बुध्दीला
- **मनसा नियम्यः** मन म्हणजे विवेकाने संयमात राखून
- **असक्तः** अनासक्त बनून
- **कर्मेन्द्रियैः कर्मयोगं आरभतेः** कर्मेंद्रियांनी कर्मयोग आरंभ करतात
- **सः विंशिष्यतेः** ते (पुरुष) श्रेष्ठ होय

**अर्थ**

परंतु हे अर्जुना, जो मनुष्य मनाने इंद्रियांना ताब्यात ठेऊन आसक्त न होता सर्व इंद्रियांच्या द्वारे कर्मयोगाचे आचरण करतो तो श्रेष्ठ होय.

***जो इंद्रियें मनानें तीं नेमुनी त्यांस राबवी***
***कर्म-योगांत निःसंग तो विशेष चि मानिला ।***

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) एक, ज्ञानेंद्रिये, मन यासारख्या सर्व इंद्रियांना आंतरिक साधना आणि विवेकाच्या आधारे नियंत्रणात ठेवावे. 2) दोन, फलासक्तीचा त्याग करुन अनासक्त बनावे. 3) तीन, कर्मेंद्रियांनी निष्काम कर्मयोगाचे आचरण करावे. या तीन गोष्टींच्या आधारे परमात्म्याचा अनुभव घेण्याला पात्र ठरता येईल. उन्नतीचा हा त्रिविध कार्यक्रम आहे.

**स्पष्टीकरण**

1) पंच ज्ञानेंद्रिये आहेत. यात डोळे, कान आणि जीभ हे बलशाली आहेत. याना सदा सन्मार्गावर आरुढ करावे. प्रयत्नपूर्वक आकर्षक वा मोहक वस्तुंना-पदार्थांना बघण्या-ऐकण्याचे, स्वाद घेणे वा गंधाचा आनंद लुटण्याचे मोह थांबवायला हवेत.

उपनिषदात देहाला रथाची उपमा दिली आहे. आत्मा देहाचा स्वामी आहे. बुध्दी सारथी आहे. मन लगाम आहे. इंद्रिये अश्व आहेत. रथ सुयोग्य चालण्यासाठी कुशल सारथी हवा. सारथ्याने लगाम काबूत ठेवला तर इंद्रियरुपी घोडे ताब्यात राहतील. रथ सुयोग्य प्रकारे सन्मार्गावर धावू लागेल. सारथी कुशल नसला तर रथ घोड्यांच्या ताब्यात जाईल. खड्ड्यात पडेल. बुध्दीरुपी सारथी जागृत व विवेकी हवा. यामुळे मन आणि इंद्रियांवर त्याचा काबू राहील. मनात विवेक आणि अविवेक या दोन शक्ती वसतात. विवेकामुळे मन, बुध्दी आणि पंचज्ञानेंद्रियांवर नियंत्रण साधता येते. विवेक आणि वैराग्य या साधनांमुळे स्वरुपाची ओळख होते. आपण देह, मन, बुध्दी, इंद्रिये यांच्यापासून भिन्न आहोत याचा अनुभव येऊ लागतो. ही विवेकदशा होय. याउलटची दशा अविवेकाची होय. स्वस्वरुपाची ओळख होत नाही. दुःखाचाच अनुभव पदरी पडतो.

2) संगरहित होणे म्हणजे काय? मनात फलासक्ती ठेऊ नये. निष्काम, निर्विकार बनावे. आसक्ती सोडावी.

3) कर्मयोगाचा आरंभ करणे म्हणजे योगयुक्त बनून कर्मे करणे. कर्मे तर सारेच करतात. योगयुक्त बनून म्हणजे चित्तात समता वागवून ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करणारे विरळ. योगयुक्त होऊन कर्मे आचरलीत तर दुःखमुक्त होता येते. बंधनातून सुटका करुन घेता येते. सहाव्या श्लोकातली चर्चा मिथ्याचारासंबंधी आहे. सातव्या श्लोकात श्रेष्ठ आचाराची चर्चा येते. मिथ्याचारी माणूस कर्मेंद्रियाना निष्क्रिय बनवतो. मनात विषयांचे चिंतन करतो. श्रेष्ठ आचारात कर्मेंद्रिये निष्क्रिय नसतात. कर्मयोग साधला जातो म्हणजे योगयुक्त कर्मे आचरली जातात. कर्मेंद्रियांवर अंकुश ठेवला जातो. विषय चिंतनाऐवजी परमात्म्याचे चिंतन केले जाते. विवेक राखला जातो. मन, बुध्दी आणि पंचेंद्रियांवर काबू मिळवला जातो. साधक निःसंग बनतो. बुध्दी परमेश्वराला अर्पेण करतो. आपले जीवन व्यतीत करतो.

कर्मेंद्रिये कार्यशील बनली की चित्ताची एकाग्रता वाढते. यामुळे विषयाचे चिंतन टळते. हे कर्मेंद्रियांचे केवढे बरे उपकार? चित्त चंचल बनले की विषय चिंतन सुरु होते. या निमित्त बाळकोबांनी आपला अनुभव सांगितला आहे. "1948 सालची घटना आहे. मी सौराष्ट्रात गाई घेण्यासाठी गेलो होतो. परतताना रेल्वेत तूफान गर्दी होती. मला बसायला जागा नाही मिळाली. चार तासांचा प्रवास मला उभ्यानेच करावा लागला होता. तेव्हा मी उभ्या उभ्यानेच टकळीवर सूत कातू लागलो. अगदी चार

तास सूत कातत्तच राहिलो. सूतकताईत सहज एकाग्रता साधली. आपण सलगपणे चार तास उभे राहिलो होतो याचे थोडे सुध्दा भान मला नव्हते. कर्मेंद्रियांना कार्यरत राखण्यातून कार्यसिध्दी होते. असे परमात्म्याच्या ध्यानाच्या अभ्यासानेही साधले जाते पण ईश्वराचे ध्यान का सर्वांना साधू शकेल? यामुळे कर्मेंद्रियांना कार्यरत ठेवणे हाच विषयचिंतना पासून वाचायचा साधा-सोपा उपाय आहे.''

तमाम क्रिया योगयुक्त होतील असे पहावे. नि:संग होऊन फलासक्तीचा त्याग करावा. निर्विकार बुध्दीने क्रिया कराव्या. हा विषयचिंतना पासून बचावाचा दुसरा उपाय आहे.

: 8 :

*नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण: ।*
*शरीरयात्रापि च ते न प्रसिध्द्येदकर्मण: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वं नियतं कर्म कुरु:** तू नियत कर्मे कर म्हणजे शास्त्रविधीने नेमलेली म्हणजे प्रवाहपतीत कर्मे कर
- **हि अकर्मण:** कारण की कर्म न केल्याने
- **कर्म ज्याय:** कर्म करणे खूप श्रेष्ठ आहे
- **ते शरीरयात्रा:** तुमची शरीर यात्रा
- **अकर्मण: न प्रसिध्द्येत:** कर्मे न करण्याने सिध्द होणार नाही

**अर्थ**

तू शास्त्रविहित कर्तव्यकर्मे कर कारण कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे श्रेष्ठ आहे. तसेच कर्म न करण्याने तुझे शरीरव्यवहारही चालणार नाहीत.

*नेमिलें तूं करीं कर्म करणें हें चि थोर कीं*
*तुझी शरीर-यात्रा हि कर्माविण घडे चि ना ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. (1) एक, नियत कर्म कर म्हणजे प्रवाहपतीत कर्मे कर. (2) दोन, कर्मे न करण्यापेक्षा कर्मे आचरणे श्रेष्ठ, (3) तीन, कर्मे न केल्यामुळे जीविका धडपणे साधत नाही. शरीर यात्रा चालत नाही. उदरभरणाचे कार्य प्रामणिकपणे होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) 'नियत कर्म' म्हणजे काय? याच्या अर्थाविषयी मतभेद आहेत. गांधीजी म्हणतात की इंद्रियांना संयमित ठेऊन केलेले कर्म. हा काही स्पष्ट अर्थ नाही. विनोबा म्हणतात जे कदापि टाळता येत नाही ते कर्म. म्हणजे प्रवाहपतीत कर्म किंवा स्वधर्म किंवा स्वकर्तव्य. स्वधर्म टाळता न येणारे कर्म आहे.

अठराव्या अध्यायातल्या 7 व्या श्लोकात येते **नियतस्य तु संन्यास: कर्मणो नोपपद्यते** म्हणजे नियत कर्माचा त्याग करता येत नाही. त्यापासून संन्यास नाही घेता येत. मोहाने प्रभावित होऊन जर नियत कर्माचा त्याग केला तर ते तामसी ठरेल पुढे 9 व्या श्लोकात म्हटले की कर्तव्य बुध्दीने आसक्ती आणि फळाचा त्याग करुन केलेले नियत कर्म सात्विक ठरते. 23 व्या श्लोकात म्हटले की आसक्ती, फलाकांक्षा आणि राग-द्वेष रहित बुध्दीने आचरलेले कर्म सात्विक होय. 45 व्या श्लोकात म्हटले की आपापल्या कर्मात रत राहून माणूस मोक्ष प्राप्त करुन घेऊ शकतो. 46 व्या श्लोकात म्हटले की परमात्मा तमाम भूतमात्रांचा प्रेरक आहे हे विश्व ज्या परमात्म्याचा विस्तार आहे त्या परमात्म्याला स्वकर्म म्हणजे स्वकर्तव्यरुपी फळ अर्पण करावे. असे फळ अर्पण करुन परमात्म्याचे पूजन केले म्हणजे मोक्ष प्राप्त होऊ शकतो. 47 व्या श्लोकात म्हटले की परधर्मापेक्षा स्वधर्म श्रेष्ठ होय. स्वभाव नियत कर्मे म्हणजे प्रवाहपतीत कर्मे केल्याने पाप लागत नाही. 48 व्या श्लोकात म्हटले की सहज कर्माच्या ठायी थोडा दोष जरी दिसून येत असला तरी त्याचा त्याग करता येत नाही. धुराशिवाय का कधी अग्नीचे अस्तित्व असते? नसते ना! तसेच काहीतरी दोष वा न्यून सर्व कर्तव्य कर्मांमध्ये असतातच.

भगवंताची ही विविध वचने. यांचा अभ्यास करु जाता एक गोष्ट लक्षात येते. हे सारे शब्द समान अर्थी आहेत. नियत कर्म, स्वधर्म, स्वकर्तव्य, आपापले कर्म, सहज कर्म, स्वभाव नियत कर्म, प्रवाहपतीत कर्म, सहज कर्म या शब्दांचा अर्थ एकच होतो. थोडक्यात म्हणजे जीवनाच्या प्रवाहात जी काही सहज कर्तव्यकर्मे येतात ती टाळता येत नाही, ती करावीच लागतात. प्रवाहाविरुध्द पोहणे हेच कष्टप्रद ठरते. प्रवाहपतीत कर्माचा अर्थ आपल्याला एका पत्रातून गांधीजींनी पुढीलप्रमाणे कळवला होता

असे म्हणत बाळकोबा गांधीजींचे पत्र उध्दृत करतात: 'कुठल्याही प्रकारचा शोध न घेता स्वत:हून आपल्यापर्यंत चालत आलेले यज्ञकर्म म्हणजे सात्विक कर्म, नि:स्वार्थी कर्म होय.' प्रत्येकाचा आपला असा एक विशिष्ट जीवनप्रवाह असतो. या प्रवाहात नाना कर्मे येतात. नाना कर्तव्य येतात. आई-बाबांची सेवा सहज प्राप्त कर्म आहे. त्याला काही शोधावे नाही लागत. पती आणि पत्नीची एकमेकांबद्दल काही कर्तव्य कर्मे असतात. लेकरांबद्दल माता-पित्याची काही कर्तव्ये असतात. कुणाबद्दल आपल्या मनात आध्यात्मिक श्रध्दा जागली तर त्यांच्या प्रतीही आपले काही कर्तव्य असते. त्याचे पालन करायला हवे. अशाप्रकारे 'नियत' शब्दात नाना प्रकारच्या कर्तव्यांचा समावेश होतो. नाना प्रकारची कर्तव्ये शोधू गेलो तर त्याना नियत कर्म नाही म्हणता येणार. स्वाभाविक रुपाने प्रवाहपतीत न्यायाने येणारे आणि टाळता न येणारे कर्म 'नियत' म्हटले जाते. ही नियत कर्मे सात्विक असायला हवीत, सत्कर्मे असायला हवीत. प्रवाहात असत्कर्मे येत असतील तर त्याना काही स्वकर्तव्य मानता येणार नाही. असत्कर्म कदापि स्वकर्तव्य नाही होऊ शकत. अशा प्रकारे भगवान सांगताहेत की तू आपले नियत कर्म, प्रवाह पतीत कर्म, सहज कर्म वा स्वधर्म अजिबात सोडू नकोस. निरंतर करत रहा.

2) स्वधर्माचे पालन करणे त्याचे पालन न करण्यापेक्षा श्रेष्ठ होय. स्वधर्माचा त्याग केल्याने विषयाचे चिंतन घडते. यामुळे काम, क्रोध वगैरे विकार वाढतात. अवनती होते. विषयाचे चिंतन कमी झाले तर चित्त निर्विकार बनते. निष्काम बनते. यामुळे चित्ताच्या ठायी शांतता उत्पन्न होते.

3) कर्म अजिबातच केले नाही तर परिणाम काय होईल? परिणाम असा होईल की आपली उपजीविका प्रामाणिकपणे सिध्द नाही होणार. आपण जीवंत तर असू पण दुसऱ्याच्या खांद्यावर भार बनून राहू. जेवणाचेच बघा ना, भोजन तर सर्वांनाच हवे पण त्यासाठी परिश्रम घ्यायला कोणी तयार नाही. जमिनीची मशागत करावी लागते. धान्य पेरावे लागते. कापावे लागते. खळ्यात न्यावे लागते. स्वच्छ करावे लागते. दळावे लागते. भाकरी थापावी लागते. शेतकरी ते गृहिणी यांना एक का काम करावे लागते? पन्नास गोष्टी कराव्या लागतात, तेव्हा कुठे जेवायला मिळते पण आज परिस्थिती उलटी आहे. मेहनत करणाऱ्याला पुरेसा मेहनताना मिळत नाही. एवढेच काय धडपणे पोट भरण्याइतकेसुध्दा मिळत नाही. याचे कारण एकच. सारे लोक समानपणे परिश्रम नाही घेत. कमीत कमी श्रमात अधिकात अधिक हवे. याच काळजीत सारे आहेत. दाम घेतो एवढेही काम करायला आपण तयार नाहीहोत. यामुळे परिश्रम टाळण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. काहीही न करता निष्क्रिय राहून जीविका मिळवता आली तर त्यात आनंद मानण्याची वृत्ती वाढली आहे. मजूर वा शेतकरीही मारुन मुटकून दहा-बारा तास परिश्रम करतात. यामुळे तर समाजाचे पतनच होईल. यामुळे विनोबांनी भिक्षा, उद्योग आणि चोरी असे तीन प्रकार केले आहेत. समाजाची अधिकात अधिक सेवा करुन समाजाकडून कमीत कमी पत्करणे ही झाली भिक्षा. प्राचीन काळी संन्यासीजन या वृत्तीने भ्रमण करीत असत. जिथे जिथे कुठे जात तिथे तिथे समाजाची भरपूर सेवा करत. अल्पस्वल्प स्वीकारत. ही भिक्षा वृत्ती होती. जे भिक्षा वृत्तीने जगतात ते समाजाचे उत्थापन करतात. उद्योग म्हणजे समाजाची जेवढी सेवा केली त्या प्रमाणात आजीविका मिळवणे होय. समाजाची कमीत कमी सेवा करुन अधिकात अधिक मोबदला मिळवणे ही चोरीची वृत्ती झाली. समाजात कधी-कधी कर्म न करायची वृत्ती जागते. कधी अजिबात निष्क्रिय बनून जगण्याची वृत्ती जागते. अशा वेळी काम करायला हवे त्याची चर्चा या श्लोकातून आली आहे. काम न करता आपल्या अन्न, वस्त्र वगैरेंची सोय प्रामाणिकपणे होऊ शकत नाही. परिश्रम न करता मिळवलेल्या अन्नोदकाला आपण स्पर्श करणार नाही अशी भूमिका आणि भावना जागावी. मेहनत केल्याशिवाय खाणार नाही असा मूलभूत विचार सर्वांच्या पसंतीस उतरला तर समाजातल्या गरीब व श्रीमंत या वर्गात संतुलन साधले जाऊ शकते. गांधीजींनी परिश्रम करुन जगण्याच्या विचाराला खूप महत्व दिले. खूप उत्तेजन दिले.

(पुढील श्लोकापासून यज्ञ प्रकरणाला सुरुवात होत आहे. यज्ञार्थ भाव म्हणजे परोपकाराचा विचार. हा भाव त्यजून जर स्वार्थी भावनेने जीवनाची घडी बसवली, जीवन जगायचे ठरवले तर लोक कर्मबंधनात अडकतात. यामुळे कर्मबंधनातून सुटायचा मार्ग यज्ञ भावना आहे. ईश्वरार्पण बुध्दीने आसक्ती सोडून कर्मे करायला हवीत.)

: 9 :

*यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।*
*तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयं लोकः** हा लोक, सृष्टीतील सारे लोक
- **यज्ञार्थात्कर्मणः** यज्ञ म्हणजे परोपकारासाठी कर्म करायचे आहे (या भावनेला सोडून)
- **अन्यत्रः** स्वार्थी भावनेने कर्म केल्यामुळे
- **कर्मबन्धनः** कर्मबंधनात फसले आहेत
- **कौन्तेय मुक्तसंगः** यामुळे हे अर्जुना, आसक्ती सोडून
- **तदर्थं कर्म समाचरः** परमात्मार्पण बुध्दीने कर्म कर

**अर्थ**

यज्ञानिमित्त केल्या जाणाऱ्या कर्मांशिवाय दुसऱ्या कर्मात गुंतलेला हा मनुष्य समुदाय कर्मांनी बांधला जातो म्हणून हे अर्जुना, तू आसक्ती सोडून यज्ञासाठी उत्तम प्रकारे कर्तव्य कर्मे कर.

*यज्ञार्थ कर्म सोडूनि लोक हा बांधिला असे*
*यज्ञार्थ आचरीं कर्म अर्जुना मुक्त-संग तूं।*

**विषयः** या श्लोकात चार मुद्यांची चर्चा आली आहे. 1) एक, कर्मे परोपकारार्थ करणे. 2) दोन, केवळ स्वार्थासाठी कर्मे केलीत तर कर्म बंधनात अडकून पडावे लागते. 3) तीन, यासाठी परोपकार भावनेने ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करावीत. 4) चार, कर्म करताना आसक्ती सोडावी.

**स्पष्टीकरण**

1) सुरुवातीला भगवंताने यज्ञार्थ कर्म करायचा विचार मांडला आहे. यज्ञ म्हणजे काय? यज्ञ म्हणजे त्याग, उपकार. हा सनातन अर्थ आहे. सामाजिक परिस्थिती बदलली की यज्ञाचे बाह्य स्वरुप बदलते.

प्राचीन काळी अरण्ये मोठ्या प्रमाणात होती. त्या काळी लाकडांची आहुती दिली जायची. लाकडे जाळायला यज्ञाचे स्वरुप आले. त्याकाळी हे गरजेचे होते. जुन्या काळी उत्तम वंशाच्या गाई होत्या. दूध भरपूर व्हायचे. तूपही मोठ्या प्रमाणावर होते. यज्ञात तूपाची आहुती देणे सुरु झाले. समाज जीवनात ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास हे चार आश्रम होते. ही सामाजिक प्रतिष्ठा असल्यामुळे गृहस्थाश्रम खूप मर्यादित स्वरुपाचा होता. आजकाल वयाची सत्तरी गाठली तरी अनेकांचा गृहस्थाश्रम सुरुच राहतो तशी काही पुरातन काळी परिस्थिती नव्हती. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तीन आश्रमांना खूप प्रतिष्ठा लाभलेली होती. यामुळे सहाजिकच लोकसंख्या नियंत्रणात होती. संतान मर्यादा होती. आज स्थिती वेगळी आहे. जंगले कापली जाताहेत. झाडे कमी होत चालली आहेत. यामुळे आज वृक्षारोपण-वृक्षसंवर्धन करुन अरण्ये वाढवणे हे यज्ञकर्म ठरेल. आज गोवंश अडचणीत आला आहे. समाजात म्हैस प्रविष्ट झाली आहे. दूधासाठी म्हैस. बैलांसाठी गाय. हा हिशेब शेतकरी करताहेत. दोन पशुंचे पालन करणे शेतकऱ्यांच्या कुवतीबाहेरचे काम आहे. यामुळे दोघींपैकी एकीची उपेक्षा होणे सहाजिक आहे. म्हशीची उपेक्षा करणे अवघड कारण ती भरपूर दूध देते. गाईची उपेक्षा झाली. गोवंश अडचणीत आला. दूध घटले. तूपाचा अभाव दिसू लागला. अशा परिस्थितीत आज तूपाच्या आहुती देणे तर अधार्मिक कार्य ठरावे. आज तर जो गोपालन करतो तो मोठा. गोवंश सुधारुन दूध वाढवणारा यज्ञ करतो असे म्हणावे लागेल. गांधीजींनी सूत कातायला यज्ञ मानले. सूत्रयज्ञाचा विचार मांडला. प्राचीन काळी सारेच सूत कातत. खेड्यातला समाज वस्त्रांच्या बाबतीत स्वावलंबी होता. स्वयंपूर्ण होता. यामुळे खेडी समृध्द होती. खेड्यातली श्रीमंती खेड्यातच रहायची-यंत्रांचा प्रचार-प्रसार नव्हता. खेड्यात सारे उद्योग चालत. आज यंत्रयुग अवतरले आहे. खेड्यातल्या संपत्तीचा ओघ शहरांकडे चालला आहे. खेडी शहरांवर अवलंबून आहेत. ग्रामोद्योग नष्टभ्रष्ट झालेत. ग्रामीण जनावरांवर बेकारीचे संकट आले. भारत खेड्यांचा देश आहे. शेकडा नव्वद टक्के लोक खेड्यात राहतात. यामुळे कल्याणकर जे असेल ते यज्ञरुप ठरेल. यज्ञाचे स्वरुप समाजरक्षक असेल. जे उन्नतिकारक असेल ते यज्ञरुप असेल. एवढ्यासाठी रोज कातल्याशिवाय गांधीजी झोपत नसत. सूत कातायला त्यांनी सूत्रयज्ञ नाव दिले.

2) केवळ आपल्या स्वार्थ साधनेत रत लोक सुख-दुःखाच्या बंधनात अडकतात. लोककल्याणाची चिंता न करणाऱ्यांच्या वाट्याला सुख-दुःखे येतात. सर्वांच्या हितात आपले हित न मानणारे अखेरीस दुःखी होतात. स्वार्थपूर्ण जीवन जगणाऱ्यांना शांती नाही लाभत. आत्मप्रेरणेच्या ठायीच लोककल्याणार्थ काही-ना-काही करण्याची

भावना नांदते. केवळ स्वार्थ प्रेरणा ही दैहिक प्रेरणा होय, देह प्रेरणा होय. देह नित्य नाही, अनित्य आहे. देहाच्या प्रेरणेने कार्य करणारा माणूस अत्यंत संकुचित परिघात राहतो. तो व्यापक नाही बनू शकत. चैतन्यस्वरुपी आत्म्याची प्रेरणा मात्र व्यापक असते. स्वार्थ प्रेरणेमुळे माणूस बंधनात अडकतो.

3) तिसरा मुद्दा असा की आपली कर्मे यज्ञार्थ असावीत. आपण यज्ञमय जीवन घालवावे. परोपकारमय जीवन घालवावे. स्वार्थ बंधनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी परोपकारमय जीवनाची खूप आवश्यकता आहे. अर्थात् परोपकारमय जीवन हे पहिले पाऊल असेल. परोपकार दृष्टी ठेवली तर आवश्यक स्वार्थ साधला जातोच. सर्वांच्या हितात आपले हित सामावलेले आहे अशी भावना ठेवली तर आपल्या स्वार्थाला परार्थाचा सुगंध येतो. स्वार्थ परमार्थाच्या नियंत्रणात राहतो. स्वार्थ बंधनकारक उरत नाही. स्वार्थाचा परमार्थ होतो.

4) चौथा मुद्दा यज्ञीय दृष्टिकोण राखण्याचा आहे. यज्ञमय म्हणजे परोपकारमय जीवन जगत असतानादेखिल जर त्यात काम क्रोध, आसक्ती, अहंकार यासारखे विकार नसले तर बंधनाचे धागे तुटू शकणार नाहीत. एखाद्या सार्वजनिक संस्थेत लोक जनसेवेच्या दृष्टीने एकत्र येतात. उद्देश सेवेचा असतो. आदर्श उच्च असतो पण आपापसात ईर्ष्या, द्वेष, मत्सर यासारख्या दोषांचा प्रादुर्भाव होऊ लागतो. परस्पर संघर्षामुळे सारे जेरीस येतात. कधी-कधी संस्था विसर्जित कराव्या लागतात. सिध्दांत उच्च असेल पण जर चित्त शुध्दीचे ध्येय नसेल तर मग बंधनातून मुक्त नाही होता येत. यज्ञ याचा अर्थ परोपकार. यज्ञ म्हणजे स्वार्थरहित दृष्टिकोण. यज्ञ म्हणजे निकोप मन. यज्ञ म्हणजे सर्वांच्या हितात आपल्या हिताची भावना.

: 10 :

***सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।***
***अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **प्रजापतिः पुरा:** प्रजापती ब्रह्मदेवाने सृष्टीच्या आरंभी
- **प्रजा: सहयज्ञा:** प्रजेला यज्ञाच्या सोबत
- **सृष्ट्वा उवाच:** उत्पन्न करुन सांगितले की
- **अनेन प्रसविष्यध्वं:** या यज्ञाने आपला उत्कर्ष करा
- **एष: व:** हे तुमच्यासाठी
- **इष्टकामधुक् अस्तु:** इच्छित फळ प्रदान करणारे सिध्द होवो

### अर्थ

प्रजापती ब्रह्मदेवाने कल्पारंभी यज्ञासह प्रजा उत्पन्न करुन त्याना सांगितले की तुम्ही या यज्ञाच्या द्वारे उत्कर्ष करुन घ्या आणि हा यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा होवो.

***पूर्वी प्रजेसवें ब्रह्मा यज्ञ निर्मूनि बोलिला***
***पावा उत्कर्ष यज्ञानें हा तुम्हां काम-धेनु चि।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) एक, सृष्टीच्या आरंभी प्रजापतीने प्राणिमात्राची उत्पत्ती केली. याचा हेतु यज्ञ म्हणजे परोपकार वृत्ती होता. 2) दोन, या परोपकार वृत्तीने आपला उत्कर्ष साधावा. 3) तीन, हे सर्वांना इच्छित फळ देणारे ठरेल.

### स्पष्टीकरण

1) प्रजापती म्हणजे ब्रह्मदेव. प्राचीन काळी पुराणकारांनी देवदेवतांची कल्पना करुन ठेवली आहे. या देवमंडळात सृष्टीची उत्पत्ती करणारे ब्रह्मदेव. पोषण करणारे विष्णु. संहार करणारे शिव मानले जातात. या मुख्य देवता होत. खरे तर सृष्टीची उत्पत्ती, पोषण, संहार हे सारे भासच होत. हे परमात्माच करवतो. सृष्टी काही सत्य पदार्थ नाही. घट हा मातीचा भास. वस्त्र हा सूताचा भास. तशीच सृष्टी ही परमात्म्याचा भास होय. सृष्टी काही परमात्म्याहून स्वतंत्र नाही. भिन्न नाही. परमात्म्याच्या अनंत शक्ती आहेत. परमात्मा अनंत शक्तीसंपन्न आहे. काही शक्तींना देवत्व लाभले. परोपकाराची प्रेरणा अखिल प्राणीमात्राच्या ठायी विद्यमान आहे. वासरासाठी गाय प्राण द्यायला सिध्द होते. कुत्रीच्या नुकत्याच जन्माला आलेल्या पिलांना जरा उचलून तर बघा. कुत्री वसकन अंगावर चाल करुन येईल. कुत्री स्वत: खाणार नाही पण आपल्या पिलांना भरवेल. स्वत: पोळी खाणार नाही. पिलांसाठी आणून देईल. संस्कृत भाषेत एक सूक्ती प्रसिध्द आहे. **आहार-निद्रा-भय-मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।**

आहार, निद्रा, भय आणि जीवन व्यवहार या चार गोष्टी माणूस आणि पशु या दोघांच्याही जीवनात सारख्याच आहेत. माणसाच्या ठायी बुध्दी-शक्तीचा विकास अधिक आहे. पशु उन्नत होऊ शकत नाही. अवनत होऊ शकत नाही. माणूस आपल्या शक्तीचा सदुपयोग करु शकतो. दुरुपयोगही करुन घेऊ शकतो. माणसापाशी बुध्दी शक्ती आहे. यामुळे तो परोपकार वृत्तीचा विकास करुन घेऊ शकतो. आपले संपूर्ण आयुष्य परोपकारात घालवू शकतो. उत्कृष्टपणे ब्रह्मचर्याचे पालन करु शकतो. विशुध्द जीवन जगू शकतो. कामक्रोधरहित जीवनधारा विकसित करु शकतो. माणूस परमात्मशक्तीचे स्वरुप जाणू शकतो. सर्वांच्या ठायी परमात्म तत्वाचे दर्शन करुन घेऊ शकतो. अभेद दृष्टीचा विकास करुन घेऊ शकतो. भगवंताने प्रत्येकाला जन्मासोबत यज्ञीय वृत्ती दिली आहे. या यज्ञीय भावनेचा विकास करुन माणसाने जीवन घालवायला हवे. संत तुलसीदास म्हणतात :

***परहित बस जिन्ह के मन माँहीं।***
***तिन्ह कहँ जग दुर्लभ कछु नाहीं॥***
***परहित सरिस धरमु नहिं भाई।***
***परपीडा सम नहिं अधमाई॥ नर शरीर धरि जे परपीरा।***
***करहिं ते सहहिं महा भवभीरा॥***

अर्थात् ज्यांच्या अंत:करणात परहिताचा भाव असतो त्याना जगात अशक्य वा दुर्लभ असे काय असेल बरे ? परहितासारखा दुसरा धर्म नाही. इतरांना पीडा देण्यासारखे दुसरे पाप नाही. नर देह धारण करुन इतराना पीडादायक ठरू नये. अशा व्यक्तीला भयंकर अशा भव पीडा सहाव्या लागतात.

2) परोपकार वृत्तीने आपला उत्कर्ष साधून घ्यावा. देह बुध्दी असणाऱ्यांची अवनती होते. ज्या प्रमाणात देह बुध्दी वाढत जाईल तसतशी संकुचितताही वाढत जाईल. संकुचितता जेवढी म्हणून वाढेल तेवढे असमाधान जागेल. व्यापक भाव मनी वसला की माणूस समाधानी राहतो. हा अनुभवसिध्द सिध्दांत आहे.

विनोबांनी गीता प्रवचनात म्हटले आहे: आपण भोजन घ्यायच्या तयारीत असतो एवढ्यात एक अतिथी येतो. अतिथी खूप दिवसांपासून उपाशी आहे. अशावेळी आपण आपल्या ताटातला घास जर अतिथीला दिला तर आपल्याला केवढा आनंद होतो. त्या दिवशी आपल्या मनाला अपार आनंद होतो. परोपकार वृत्तीने जगण्याचा अर्थ भोगबुध्दीने न जगता त्यागवृत्तीने जगावे हा आहे. मानवी जीवन भोग भोगण्यासाठी नाही. माणसाला भोग भोगायची शक्ती मिळाली ना तशीच त्याग करायची शक्तीही प्रचंड प्रमाणात लाभली आहे. भोग भोगायच्या शक्तीचा दुरुपयोग केला तर अखेर महादु:खाला सामोरे जावे लागेल. भोग भोगायच्या शक्तीचा सदुपयोग व्हायला हवा, म्हणजे काय? देहधारणेसाठी गरजेपुरते भोजन करावे. निद्रा घ्यावी. आवश्यक ते भोग भोगावे. भूक लागल्यावर भोजन केले तर आनंद मिळतोच. देहाच्या या आवश्यक क्रियांमध्ये आनंदद्दष्टी नसते. या क्रिया आनंदासाठी नाही केल्या जात. यासाठी त्यागशक्तीचा विकास करुनच जगायला हवे. ज्या प्रमाणात त्यागशक्ती वाढेल त्या प्रमाणात आनंद वाढेल. भोगाच्या पाठीमागे लागून शरीर व मनाची शक्ती क्षीण होते. त्यागामुळे ती वाढते. त्यागात अखंड आनंद आहे. भोगात आरंभी आनंद वाटतो खरा पण तो काही टिकत नाही यासाठी तो वारंवार भोगावा लागतो. शंकराचार्य आपल्या 'भज गोविंदम्' स्तोत्रात म्हणतात :

***सुखत: क्रियते रामाभोग: पश्चाध्दन्त शरीरे रोग:।***
***यद्यपि लोके मरणं शरणं तदपि न मुंचति पापाचरणम्॥***

अर्थात् माणूस मोठ्या आनंदाने जीवनाचे विविध भोग भोगतो पण अखेरीस शरीर रोगग्रस्त होऊन जाते. अशाप्रकारे प्राणीमात्र मरण पत्करतात पण पापाचरणाचा त्याग नाही करत.

खरे सुख यज्ञात आहे. परोपकार वृत्तीत आहे. त्याग भावनेत आहे. ईशावास्योपनिषदाचा श्लोक आहे :

***ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।***
***तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृध: कस्य स्विध्दनम्॥***

अर्थात् या दुनियेतील तमाम पदार्थ ईश्वराने व्याप्त केलेले आहे. यामुळे ईश्वराच्या नावाने त्याग करुन तू आवश्यक ते भोग भोगत जा. कुठल्याही विषयाची तहान धरू नकोस कारण की धन कुणाचे? उत्तर आहे ना धन कुणाचे ना साधनांवर अधिकार कुणाचा. सारेच पदार्थ

ईश्वराने व्याप्त केलेले आहे. ते सारे ईश्वराला अर्पण करु या. त्यागभावनेने जीवन जगू या.

3) यज्ञ म्हणजे परोपकार वृत्ती. ही वृत्ती कामधेनुसारखी आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात. ज्याने सातत्याने परोपकारच केला. यामुळे सर्वजनप्रिय ठरला. त्यासाठी का कधी कुठल्या गोष्टीची उणीव बरे राहील?

गांधीजी दक्षिण आफ्रिकेत वकीली करत होते. तिथे न्यायालयात एक प्रकरण प्रदीर्घ काळापासून प्रलंबित होते. गांधीजींच्या परोपकार वृत्तीने तिथे आपला प्रभाव दाखवला. गांधीजी विचार करु लागले की कोर्टात जाण्यामुळे दोन्ही पक्षांचा खर्च फार वाढला आहे. आपसात तडजोड झाली तर मोठा खर्च वाचू शकेल. आपली संपूर्ण शक्ती खर्च करुन त्यांनी दोन्ही पक्षांची समजूत घातली. अखेर यशस्वी झाले. त्यावेळी गांधीजींचे वय अवघे 21-22 वर्षांचे होते. एवढ्या कमी वयात सात लाख पौंडांचा दावा असा परस्पर तडजोड करुन त्यांनी मिटवला. ही काही सामान्य गोष्ट नव्हती. गीतेच्या भाषेत हे कार्य कामधेनु सारखे झाले.

: 11 :

*देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।*
*परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अनेनः** या यज्ञाने, परोपकाराच्या कार्याने
- **देवान् भावयतः** देवांचा म्हणजे गरीब म्हणजे सर्वसामान्य जनांचा उत्कर्ष करा
- **ते देवाः** (त्याच्या ऐवजी) ते देव
- **वः भावयन्तुः** तुमचा उत्कर्ष करतील
- **परस्परं भावयन्तः** एकमेकांचा उत्कर्ष करत
- **परं श्रेयः अवाप्स्यथः** परम कल्याणाप्रत पोहोचाल, परम कल्याणाला प्राप्त व्हाल

### अर्थ :

तुम्ही या यज्ञाने देवतांची पुष्टी करा आणि त्या देवतांनी तुम्हाला पुष्ट करावे. अशा प्रकारे नि:स्वार्थीपणाने एकमेकांची उन्नती करत तुम्ही परम कल्याणाला प्राप्त व्हाल.

*रक्षा देवांस यज्ञानें तुम्हां रक्षोत देव ते*
*एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि ।*

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. (1) एक, देवांची सेवा करुन त्यांचा उत्कर्ष साधा. इथे देव म्हणजे सर्वसामान्य जन, गरीब लोक होत. (2) दोन, यामुळे ते देखिल आपली सेवा करुन आपल्याला उत्कर्षाप्रत पोहोचवतील. (3) तीन, या प्रकारे दोघेही एकमेकांची सेवा करुन उत्कर्ष साधतील. कल्याण प्राप्त करुन घेतील.

### स्पष्टीकरण

1) प्राचीन काळी जनता खूप सहकार्याने वागायची. भारत खेड्यांमध्ये वसला आहे. इथे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात रहात आहे. शेतकऱ्यांना गांधीजी जगताचे पिता मानत-म्हणत. पिता कुटुंबाचे भरण पोषण करतो. हिंदुस्तानच्या विशाल कुटुंबाचे भरण पोषणही पिता शेतकरीच करतो पण जगताच्या या पित्याची मोठी हेळसांड होते. उपेक्षा होते. शेतकरी परिश्रमपूर्वक आपली भाकरी मिळवतो. लहान बालक वगळता त्याच्या कुटुंबातले सारेच परिश्रम करतात. त्याच्या घरातल्या साऱ्याच महिला म्हणजे त्याची पत्नी, मुलगी, बहिण, सून, भावजय सारेच शेतात राबतात. याउलट मध्यम आणि श्रीमंत कुटुंबातले लोक परिश्रम नाही करत. शेतकरी-कामकऱ्यांनी उत्पन्न केलेले अन्न आरामशीरपणे खातात. शेतकऱ्यांपेक्षा अधिक सुख सोईंचा उपभोग घेतात.

गांधीजींचे संपूर्ण जीवन या श्लोकाधारे चालले. त्यांनी शेतकऱ्यांप्रमाणे जगायचा प्रयत्न केला. सर्वसामान्य गरीब जनतेच्या उत्थानाची सतत काळजी वाहिली. हे चिंतन केले. त्यांच्या सेवाकार्यात आपले उभे आयुष्य घालवले. आपल्या कुटुंबालाही सेवेचा हा वसा दिला. आपल्या मुलांना त्यांनी शेतीत राबायला सांगितले. संडास सफाई करवली. कष्टाची कामे करवून घेतलीत. बाळकोबांनी सुध्दा शेतकरी जीवनाशी एकरुप होण्याचा प्रयत्न केला पण त्याना यश लाभले नाही. आपण सारेच मनुष्य आहोत. कुणी गरीब असेल, कुणी मध्यमवर्गीय तर कुणी श्रीमंत. आपल्या ठायी समानता का बरे नांदत नाही? हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. प्रयत्न करुनही या तिन्ही वर्गात समानता येत नाही. उलटपक्षी अंतर वाढते आहे.

हे भयावह आहे. चिंतनीय आहे. यामुळेच समाज दु:खी बनला. यामुळे कलहही निर्माण होतो.

या तिन्ही वर्गाशी गांधीजींचा संबंध आला. यांच्या ठायी समता कशी नांदेल याचा त्यांनी सतत विचार केला. या कामी विश्वस्त बनून रहावे असे त्यांचे सांगणे होते. आपल्या कमाईतला एक वाटा पगार म्हणून घ्यावा आणि संयमपूर्वक जगायचा अभ्यास करावा असे त्यांचे म्हणणे होते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी हळूहळू कमी व्हायला हवी. जीवनासाठी आवश्यक त्या सुखसोई सर्वांना योग्य प्रमाणात लाभाव्यात असे त्याना वाटायचे. हा प्रयत्न श्रीमंतांनी करायला हवा. गरीबांचे केवल वेतनमान वाढवून हे साधता येणार नाही. त्यांच्यातल्या वाईट सवयी घालवाव्या लागतील. व्यसन मुक्त समाज उभा करावा लागेल. गरीबांसाठी शिक्षण, अन्न-वस्त्र-निवारा यासारख्या योग्य सोई उपलब्ध करुन देणे हे श्रीमंत वर्गाचे कर्तव्य आहे.

प्रत्येकाला परोपकार वृत्ती लाभली आहे. त्याचा उपयोग झाला पाहिजे हे या श्लोकात सांगितले गेले आहे. ज्यांच्यापाशी संपत्ती आहे, जे जन साधनसंपन्न आहेत त्यांनी विपन्न जनांची सेवा करावी. त्यांच्या उत्कर्षाचा विचार करावा, हे त्यांचे कर्तव्य आहे.

2) दुसरा मुद्दा महत्वाचा आहे. देव म्हणजे गरीब व सर्वसामान्य जन, त्यानीही आपली सेवा करणाऱ्यांची सेवा करावी. त्यांच्या उत्कर्षासाठी प्रयत्न करावे. यातून एक दुसऱ्याची सेवा घडेल. गरीब वर्गाच्या ठायी सेवाभाव, परोपकारवृत्ती फार मोठ्या प्रमाणात आढळते. त्यांच्या ठायी ईश्वरश्रध्दाही मोठ्या प्रमाणात असते. त्यांच्या ठायी जेवढा अतिथी सत्कारभाव वसतो तेवढा अन्यत्र कुठे क्वचित्‌च बघायला मिळतो. एवढे खरे आहे की आपण त्यांची जेवढी सेवा करु तेवढेच ते आपली सेवा करायला तत्पर राहतील.

3) अशा प्रकारे तिन्ही वर्गानी परस्पर सहकार्य करावे. एक दुसऱ्याच्या सेवेचे लक्ष्य मनी वागवावे. यामुळे तिन्ही वर्गांचे कल्याण होईल. संघर्ष मिटेल. तिघांच्या उन्नतीचा पथ प्रशस्त होईल. माणसाच्या ठायी निहित विवेक शक्ती, विचार शक्ती यांचा तर यथायोग्य उपयोग केला तर तिन्ही वर्गात समानता जागून प्रेम वृध्दिंगत होईल.

: 12 :

***इष्टान् भोगान् हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविता: ।***
***तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सा ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **हि यज्ञभाविता: देवा:** आणि यज्ञामुळे संतुष्ट देव म्हणजे सामान्य जन
- **इष्टान् भोगान् व: दास्यन्ते:** आवश्यक ते भोग आपणास देतील
- **तै: दत्तान्:** देवतांद्वारे दिल्या गेलेल्या भोगांना
- **एभ्य: अप्रदाय भुंक्ते:** त्या गरीबांची सेवा न करता जो भोगतो
- **स: स्तेन: एव:** तो चोरच आहे

### अर्थ

यज्ञाने पुष्ट झालेल्या देवता तुम्हाला न मागताही इच्छित भोग खात्रीने देत रहातील. अशा रीतीने त्या देवतांनी दिलेले भोग त्याना अर्पण न करता जो पुरुष स्वत: खातो, तो चोरच होय.

***यज्ञ-तुष्ट तुम्हां देव भोग देतील वांछित***
***त्यांचें त्यांस न देतां जो खाय तो एक चोर चि ।***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्यांची चर्चा आली आहे. (1) एक, गरीब व श्रमसाधकांनी जनतेची सेवा केली तर जनता संतुष्ट होईल आणि संतुष्ट जनता श्रमसाधकांनाही योग्य तो मोबदला देईल. (2) दोन, त्यांचे ऋण न चुकवता म्हणजे त्यांची सेवा न करता काही करता येणार नाही. सेवा न करता खाणारा चोर ठरेल. अपराधी ठरेल.

### स्पष्टीकरण

1) अन्न-वस्त्र-निवारा आवश्यक. याशिवाय समाजाचे काम कसे चालावे? यामुळे या गरजा भागवल्या जायला हव्यात. यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाने काम करायला हवे. यासाठी प्रत्येकाला 'शेतकरी' आणि 'विणकर' व्हावे लागेल. शहरांऐवजी खेड्यात वस्ती करावी लागेल. सारेच हे काम करु लागले तर अन्य गरजेच्या पूर्ततेसाठीही प्रयत्न करावे लागतील. उदाहरणार्थ घर बांधायला गवंडी हवा. सुतार हवा. माठासाठी कुंभार

हवा. हजामतीसाठी न्हावी हवा. रक्षणासाठी रक्षक हवा. चोरा-चिलटांपासून संरक्षण हवे. पोलिस हवेत. शांति सैनिक हवेत. समाजाच्या सुव्यवस्थापनासाठी शासक हवेत. सरकार हवे. या प्रकारे समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा असतात. यांच्या ठायी मतभेद नसावेत. समानता हवी. सहकार हवा. ना कुणी श्रीमंत ना गरीब. हे ध्येय आरंभी होते. पुढे बदल होत गेले. गरीब, मध्यम, श्रीमंत असे वर्ग उभे राहिलेत.

आरंभी न्हावी, धोबी, सुतार, लोहार, कुंभार सर्वानाच सेवेच्या मोबदल्यात उन्न-वस्त्र हेच मिळायचे. पैश्यांचा व्यवहार नव्हता. आता मात्र सारा पैश्यांचा व्यवहार. यातून विषमता आली. पैसा कमवणे हेच जीवनध्येय बनले. यामळे परस्पर सहकार्याची भावना कमी होत गेली. स्वार्थ वाढत गेला. यज्ञवृत्ती लोप पावत गेली म्हणजे परोपकारवृत्तीचा अपकर्ष झाला. पैश्याचे प्राबल्य वाढले. समाज आणि राष्ट्रात उत्पादक घटले. अनुत्पादकांचे अनेक वर्ग उभे राहिलेत. एकीकडे त्यांची प्रतिष्ठा वाढली, दुसरीकडे उत्पादकांचे बळ घटले. श्रमिकांचे महत्व कमी झाले. श्रमाची प्रतिष्ठा ओसरली. विषमतेचे हेच मूळ कारण आहे. अनुत्पादक वर्गाच्या ठायी नम्रता हवी. उत्पादक वर्गाची सेवा करायचा भाव हवा. गरीबांसाठी आपल्या उत्पन्नाचा काही वाटा काढून ठेवायला हवा. गरीब गरजू मुलांसाठी उत्तम शिक्षण व आरोग्याची सोय लावायला हवी. यामुळे सर्वांच्या ठायी सामंजस्य वाढेल. संवाद जागेल. परस्परांची सोय बघितली जाईल. यातून विषमता दूर होण्याकामी मदत होईल.

2) गरीब वर्गाला मदत पोहोचायला हवी. ते अन्न-वस्त्र तयार करतात. स्वत: कष्ट उपसतात. सर्वांच्या गरजा भागवतात. त्यांच्या अमूल्य सेवेचे ऋण अदा केले जायला हवे. यासाठी त्यांच्या सेवेचे लक्ष्य ठेवावे लागेल. त्यांना साऱ्या सुख सोयींची पूर्तता करावी लागेल. असे जर आपण केले नाही तर अनुत्पादक वर्ग चोर ठरेल. चोरीची भाकरी खाऊन जगतो असेच मानावे लागेल. इथे भगवंताने 'चोर' शब्द खूपच कडकपणे वापरला आहे.

: 13 :

***यज्ञशिष्टाशिन: सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै: ।***
***भुंजते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यज्ञशिष्टाशिन: सन्त:** यज्ञ शेषावरच निर्वाह करणारे भक्त वा सज्जन लोक
- **सर्वकिल्बिषै: मुच्यन्ते:** सर्व पापांपासून मुक्त होतात
- **तु ये:** पण जे लोक
- **आत्मकारणात् पचन्ति:** केवळ आपल्यासाठीच, स्वयंपाक करतात आणि खातात
- **ते पापा: अघं भुंजते:** ते पापी केवळ पापच भक्षण करतात

**अर्थ**

यज्ञ करुन शिल्लक राहिलेले अन्न खाणारे श्रेष्ठ पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतात पण जे पापी लोक स्वत:च्या शरीर पोषणासाठी अन्न शिजवतात ते तर पापच खातात.

***यज्ञांत उरलें खाती संत ते दोष जाळिती***
***रांधिती आपुल्यासाठीं पापी ते पाप भक्षिती ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. (1) एक, यज्ञमय जीवन जगणारे संत वा सज्जन सर्व दोषांपासून मुक्त होतात. परोपकाररत जनांना दोष लागत नाही. (2) दोन, केवळ स्वत:साठीच जगणारे पातकी ठरतात. ते केवळ पापाचेच भक्षण करतात.

**स्पष्टीकरण**

यज्ञ करुन जे उरते त्यावर निर्वाह करावा. समाजाची सेवा करुन जे शेष राहते त्या भिक्षेवर जगावे. भिक्षा म्हणजे काय ? समाजाची अधिकात अधिक सेवा करायची आणि समाजाकडून कमीत कमी घ्यायचे. भिक्षा वृत्ती म्हणजे भीक माणून खाणे नव्हे. दीन-हीन वृत्तीने जगणे नव्हे. कष्ट उपसावेत. समाजाचे जास्तीत जास्त भले करावे. आपल्या गरजेनुसार निर्वाहाइतकेच घ्यावे, ही खरी भिक्षावृत्ती होय. हीच अपरिग्रह वृत्ती पण आजकाल तर सुखाच्या कल्पनाच बदलून गेल्यात. अधिकात अधिक परिग्रहातच सुख मानले जात आहे.

खरे तर परिग्रह वाढला की दु:ख वाढते. बाह्य साधने वाढली तर मन कमकुवत बनेल. आजच्या शिक्षणव्यवस्थेचा हा सर्वात मोठा दोष आहे. बौध्दिक ज्ञान मिळते. मनोनिग्रहाचे ज्ञान लाभत नाही. मनाची शक्ती वाढवायचे ज्ञान प्राप्त होत नाही. बौध्दिक ज्ञानाने शांती लाभत नाही. प्राचीन काळी मनाला बलशाली बनवण्यावर भर दिला जायचा. मन निग्रही बनावे. मन निर्विकारी बनावे, या दिशेने प्रयत्न केले जात. समाजाची सध्याची स्थिती भयंकर आहे. चारित्र्यवान बनावे लागेल. मनोनिग्रह साधावा लागेल. परोपकाररत जीवन जगावे लागेल. यातून बळ लाभेल.

यामुळे शिक्षणाने यज्ञमय जीवनाची मुहूर्तमेढ रोवावी. परोपकाररत रहावे. भगवंताने यज्ञमय जीवन जगणाऱ्या साधकाला 'संत' म्हटले आहे. तुलसीदासांच्या शब्दात **हेतुरहित परहितरत सीला** असे संतजन 'हेतुरहित परहितरत' असतात. निष्काम भावाने परहित साधणे हेच त्यांचे शील म्हणजे स्वभाव होय. तुलसीदासजी संतांच्या या गुणांची प्रशंसा करताना लिहितात:

***पर उपकार बचन मन काया। संत सहज सुभाव खगराया॥ संत सहहिं दुख पर-हित लागी। पर-दुख हेतु असंत अभागी॥ भूरज तरु सम संत कृपाला। पर-हित नित सह बिपति बिसाला॥***

अर्थात् मनाने-शरीराने-वाणीने परोपकारमय जगणे संतांचा स्वभाव असतो. ते त्यांचे सहज वळण असते. इतरांच्या कल्याणासाठी ते दु:ख झेलतात पण असंत म्हणजे दुर्जन इतरांच्या अकल्याणासाठी, इतराना नुकसान पोहोचावे म्हणून दु:ख झेलतात म्हणजे जीवन जगतात. कृपाळू संतजन भोज-भुर्ज-वृक्षाप्रमाणे इतरांच्या कल्याणासाठी दु:ख वेचतात. अशाप्रकारे परोपकारी जीवन जगणारे तमाम दोषांपासून मुक्त होतात. खरे तर देहविषयक आसक्तीमुळे दु:खे उत्पन्न होतात. नाना दोष उपजतात. आसक्ती वा ममता क्षीण झाली तर दोष दूर होतात. गुण वाढतात.

जे परोपकाराचा उत्कर्ष न करता देहबुध्दी जोपासतात. स्वार्थी जीवन जगतात. पापकर्मे आचरतात. पापमय जीवन जगतात. अशा प्रकारे कठोर शब्दात भगवंताने त्यांची संभावना केली आहे. स्वार्थी जनांचा धि:क्कार केला. निषेध केला. माणसाने पशुसारखे जगता कामा नये. परार्थासाठी जगावे. परमार्थ साधावा. माणसाचा अजून विकास व्हायला हवा. त्याच्या ठायी अजून पशुभाव आहे. खरे तर परोपकारी जीवन प्रभु कृपेला पात्र ठरते.

: 14-15 :

***अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभव:।***
***यज्ञाद् भवति पर्जन्यो यज्ञ: कर्मसमुद्भव:॥***
***कर्म ब्रह्मोद्भवं विध्दि ब्रह्माक्षरसमुद्भवम्।***
***तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भूतानि अन्नात् भवन्ति:** भूतमात्रांची उत्पत्ती अन्नामुळे होते
- **पर्जन्यात् अन्नसंभव:** पावसामुळे अन्न उत्पन्न होते
- **यज्ञात् पर्जन्य: भवति:** यज्ञामुळे पाऊस पडतो
- **यज्ञ: कर्मसमुद्भव:** कर्मातून यज्ञ उत्पन्न होतात
- **कर्म ब्रह्मोद्भवं विध्दि:** ब्रह्म म्हणजे प्रकृतीपासून कर्म उत्पन्न होतात
- **तस्मात् सर्वगतं ब्रह्म:** यामुळे सर्वत्र व्याप्त परमात्मा
- **नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्:** नित्य यज्ञमय जीवनाने ओतप्रोत आहे

**अर्थ**

सर्व प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात. अन्न निर्मिती पावसापासून होते. पाऊस यज्ञामुळे पडतो आणि यज्ञ विहित कर्मामुळे घडतो.

कर्म समुदाय वेदांपासून आणि वेद अविनाशी परमात्म्यापासून उत्पन्न झालेले आहेत, असे समज. यावरुन हेच सिध्द होते की सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा नेहमीच यज्ञात प्रतिष्ठित असतो.

***अन्नापासूनि हीं भूतें पर्जन्यांतूनि अन्न तें***
***यज्ञें पर्जन्य तो होय यज्ञ कर्मामुळें घडे।***
***प्रकृतीपासुनी कर्म ब्रह्मीं प्रकृति राहिली***
***ऐसें व्यापक तें ब्रह्म यज्ञांत भरलें सदा।***

**विषय:** चौदाव्या श्लोकात चार मुद्दे आहेत. 1) एक, सर्व प्राणीमात्रांची उत्पत्ती अन्नामुळे होते. 2) दोन, पावसामुळे अन्न निर्माण होते. 3) तीन, यज्ञामुळे पाऊस पडतो. 4) चार, कर्मातून यज्ञ घडतो.

पंधराव्या श्लोकात तीन मुद्दे आहेत. (1) वेदांपासून कर्मसमुदाय उत्पन्न होतात. (2) वेदांचा निर्माता अविनाशी परमात्मा आहे. (3) परमात्मा नेहमीच यज्ञात प्रतिष्ठित असतो

**स्पष्टीकरण**

1) अन्नातून सर्वांची उत्पत्ती होते. भोजनामुळे रक्त बनते. वीर्य उत्पन्न होते. वीर्य संपूर्ण शरीराचे लोणी आहे. त्यातूनच प्रजेची उत्पत्ती होते. वीर्य सुखप्राप्तीसाठी नसून प्रजोत्पत्तीसाठी आहे. यासाठी आचरण पवित्र अन् संयमी असावे.

2) पावसामुळे शेती पिकते. पावसाच्या अभावी जीवन संकटमय होईल. पावसामुळे लाकूड मिळेल. शेती फुलेल. पावसाचे उपकार अनंत. पाऊस देवता. पर्जन्य देवता. पर्जन्य देवता प्रसन्न असली तरच दरवर्षी अन्न-धान्य मिळेल. तरच प्यायला पाणी मिळेल.

3) यज्ञामुळे पाऊस पडतो. यज्ञाचा अर्थ समजून घ्यायला हवा. जुन्या काळी प्रचंड अरण्ये होती. लोक एकत्र जमत. लाकडे जाळत. जनता धर्मनिष्ठ होती. यातून यज्ञाचे स्वरुप बनले. समिधा, आहुती असे शब्द आलेत. मंत्र ठरवले गेलेत. या कामाला धर्माचे रुप दिले गेले. यज्ञाचा अर्थ हवन असा झाला. वानप्रस्थ ग्रहण केलेले लोक दोन यज्ञकुंड करत. त्यात चोवीस तास अग्नी जळता ठेवत. त्या अग्नीकुंडांना रोज दोन ते तीन तास प्रदक्षिणा घालत. ते अग्नीचे मंत्र म्हणत. उपासना करत. अग्नीत समिधा टाकत. तूपाची आहुती देत. ही आहुती सूर्याला पोहोचायची. या यज्ञामुळे म्हणजे सूर्यामुळे पाऊस पडायचा. पावसाने शेती पिकायची. शेतीने प्रजा उत्पन्न व्हायची. परिस्थिती बदलली की शब्दांचे अर्थ बदलतात. आज जंगले नाहीत. आज झाडे वाढवणे - जगवणे हाच यज्ञ आहे.

यज्ञ शब्दाचा मूळ अर्थ सृष्टीच्या कल्याणासाठी केले गेलेले कर्म असा आहे, यज्ञाचा अर्थ परोपकार मानला तर 'यज्ञामुळे पाऊस पडतो' या वाक्याची अर्थसंगती कशी लावायची? पाऊस सूर्यामुळे पडतो. सूर्य नसेल तर पाऊस पडणार नाही. सूर्याच्या तापामुळे वाफ. वाफेमुळे ढग बनतात. ढगांमुळे पाऊस बरसतो. जगायला लागते उष्णता. ती सूर्यापासून लाभते. आवश्यक ती उष्णता नाही मिळाली म्हणजे माणूस जीवंत राहू शकणार नाही. सूर्य कमालीचा वक्तशीर आहे. त्याच्या गतीत यत्किंचितही फरक पडत नाही. आपण भोजन करतो. भाज्या खातो. सर्व वनस्पतींच्या ठायी सूर्याकिरणांमुळे जीवनसत्वे निर्माण होतात. सूर्य पृथ्वीला आकृष्ट करतो. सूर्यामुळेच पृथ्वी अवकाशात तरंगती आहे. सूर्य मोठा परोपकारी. असा दुसरा परोपकारी कुणी नाही. उपनिषद म्हणते: **सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षुः** सूर्य सर्वांचे नेत्र. एकटा सूर्यच नव्हे, पण समस्त जड सृष्टी आपल्यावर उपकार करते. आंब्याचे झाड आंबे देते. पान असो वा फूल, फळ असो वा डहाळी, गवत असो वा वृक्ष, माती असो वा दगड सर्वांचाच आपल्याला काही ना काही उपयोग होतो. अशाप्रकारे सारी सृष्टी यज्ञ करत आहे. आपल्यालाही नि:स्वार्थी बनावे लागेल. यज्ञमय जीवनाचा आदर्श मनाशी बाळगावा लागेल. नव्याने वाटचाल करावी लागेल.

4) यज्ञ कर्मातून संभवतो. या अध्यायाच्या सुरुवातीला अर्जुनाचा प्रश्न होता. कर्मापेक्षा निष्कामता, निर्विकारता, समता जर श्रेष्ठ असेल तर मग भगवंता, मला या भयंकर कर्मात का जोडताहात? का प्रवृत्त करताहात? याचे इथे सविस्तर उत्तर दिले गेले आहे. एक-एक कारण भगवंत सांगताहेत. यज्ञ समजून घेऊन कर्म करावे. यज्ञ म्हणजे परोपकार वृत्ती. काहीतरी भरीव कार्य करुन जीवन घालवावे. निष्क्रिय बनून काही न करणे ही तमोगुणी वृत्ती आहे. परोपकार म्हणजे सत्वगुणाचा विकास. स्वार्थी जीवन नसावे. पुरुषार्थाने वा सक्रियतेने समाजाचे भले होणार असते. कर्म म्हणजे यज्ञकर्म. हा परम पुरुषार्थ. श्रेष्ठ पुरुषार्थ. हे सात्विक कर्म. हे सामान्य कर्म नव्हे.

यज्ञाची उत्पत्ती सात्विक कर्माने होते हे मागील श्लोकात सांगितले गेले आहे. हे कर्म कसे उपजते? त्याची इथे चर्चा आली आहे.

5) ब्रह्म हे कर्माचे आदिकारण. ब्रह्म मुळे कर्म उत्पन्न होते. 'ब्रह्म' म्हणजे काय? ब्रह्म म्हणजे ना परमात्मा वा ना सारी सृष्टीचे मूळकारण- ब्रह्म अक्षरातून जन्माला येते. ब्रह्म जन्माला येत असेल तर ते मूळ कारण कसे बरे होईल? आदि कारण कसे बरे ठरेल? कार्याचे कारण कसे उत्पन्न होईल? आदि अनित्य असते. यामुळे इथे ब्रह्म शब्दाचा अर्थ प्रकृती वा परमात्म्याची माया असा घेतला पाहिजे.

चौदाव्या अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकात भगवंताने असे सांगितले आहे:

*मम योनिर्महद् ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम्।*
*संभव: सर्वभूतानां ततौ भवति भारत॥*

अर्थात् "माझी योनी म्हणजे प्रकृती वा माया शक्ती फार मोठी आहे. यात अभिन्नता आहे. याला ब्रह्म म्हणतात. त्याठायी मी सर्व भूतमात्रांचे बीज रोपतो. या बीजातून तमाम भूतमात्रांची उत्पत्ती होते." इथे ब्रह्म शब्दाचा अर्थ प्रकृती वा माया शक्ती आहे. प्रकृती वा माया मूळ ब्रह्मापासून स्वतंत्र नाही. सांख्य प्रकृतीला स्वतंत्र वा माया शक्तीला स्वतंत्र मानते, जडही मानते. गीतेचे म्हणणे असे नाही. गीता प्रकृती वा माया शक्तीला स्वतंत्र मानत नाही. परमात्म्याच्या ठायी निवास करते. परमात्म्याशी एकाकार आहे. एकरुप आहे. भगवंताच्या ठायी दोन शक्ती वसतात. 1) चैतन्य शक्ती म्हणजे ज्ञानशक्ती आणि 2) सर्ग शक्ती म्हणजे निर्मिती करणारी शक्ती. भास करणाऱ्या शक्तीला प्रकृती किंवा माया म्हटले जाते. या मायेच्या वा प्रकृतीच्या ठायी तीन गुण वसतात. सत्व, रज आणि तम. यामुळे ही त्रिगुणात्मिका प्रकृती वा माया ठरते. या त्रिगुणात्मक प्रकृतीमुळे सात्विक, राजसिक आणि तामसी तीन प्रकारची कर्मे उत्पन्न होतात. इथे ज्या यज्ञकर्माचा उल्लेख आहे ते सात्विक यज्ञकर्म होय. अशाप्रकारे प्रत्येक कर्म वा क्रियेचा आधार त्रिगुणात्मक प्रकृती आहे. त्रिगुणात्मिका प्रकृती तीन प्रकारच्या कर्मांना निर्माण करते.

6) हे ब्रह्म म्हणजे भगवंताची प्रकृती वा मायाही अक्षरापासून जन्माला आले आहेत. परमात्मा अक्षर आहे. अक्षीण आहे. शाश्वत आहे. अपरिवर्तनीय आहे. स्थिर आहे. अविनाशी आहे. प्रकृती वा माया स्वतंत्र नाही. परमेश्वराच्या अंतर्गत आहे. भगवंताच्या अधीन आहे. या मायेवर भगवंताच्या चैतन्य शक्तीचे पूरेपूर नियंत्रण आहे. प्रकृती वा मायेचा सारा पसारा ईश्वराधीन आहे. भगवंताच्या आज्ञेनुसार मायेचे कार्य सुयोग्य रुपात अखंडपणे चालत राहते.

7) प्रकृतीचे म्हणजे संपूर्ण जगताचे मूळ कारण म्हणजे मूळ आधार ब्रह्म आहे. परमात्मा आहे. यज्ञालाही याच भगवंताचा नित्य आधार असतो. यज्ञाच्या ठायी हे परमात्मतत्व नित्य प्रतिष्ठित असते. सदा विराजमान असते. ब्रह्म व परमात्म्याचे स्वरुप कसे? तो कुठे निवास करतो? परमात्मा सर्वगत असतो हे या प्रश्नाचे उत्तर होय. **सबमें रम रहा प्रभु एकाकी।** 'सर्वांठायी रमणारा प्रभु एकाकी' ते एकटे परमात्मा तत्व सर्वांच्या ठायी रमते पण ते निर्गुण आहे, निराकार आहे, निर्विकार आहे. अगदी नजिक असले तरी आपल्याला त्याचा पत्ता लागत नाही. तरी भगवंत आपल्याला भान घडवून देतो की तो आपल्या इतक्या नजिक आहे की जणू आपले स्वरुपच आहे. आपण भगवंताहून मूळीच भिन्न नाहीत. असा अखंडपणे अनुभव यायला हवा. यामुळे आपल्या यज्ञमय जीवनात परमात्म्याच्या कृपेचा अनुभव घेता येईल. आपले संपूर्ण जीवन प्रभुमय करता येईल. यज्ञमय करता येईल.

यज्ञ प्रकरणाचा अखेरचा श्लोक सोळावा. निर्माण करणारे यज्ञचक्र आहे. यात सहभागी न होणारे पापीजन. यज्ञचक्राचे अनुसरण न करणारे पातकी होत. इंद्रियांच्या ठायी आराम करणाऱ्याचे जीवन व्यर्थ होय.

: 16 :

*एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह य:।*
*अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **एवं प्रवर्तितं चक्रं:** अशा प्रकारे चालणारे हे यज्ञ चक्र, सृष्टी चक्र
- **इह:** या लोकात, या लोकी
- **य:** जो पुरुष
- **न अनुवर्तयति:** पुढे चालवत नाही, अनुसरुन वागत नाही, म्हणजे शास्त्रानुसार कर्मे करीत नाही
- **स:** तो
- **अघायु:** पापी आहे
- **इन्द्रियाराम:** तो इंद्रियांच्या विषयात फसलेला आहे, इंद्रिय सुखात निमग्न आहे
- **मोघं जीवति:** तो व्यर्थच जगत आहे

**अर्थ**

हे पार्था, जो पुरुष या जगात अशा प्रकारे परंपरेने चालू असलेल्या सृष्टी चक्राला अनुसरुन वागत नाही, म्हणजेच आपल्या कर्तव्याचे पालन करीत नाही तो इंद्रियांच्या द्वारे

भोगात रमणारा पातकी आयुष्य असलेला पुरुष व्यर्थच जगतो.

***प्रेरिलें हें असें चक्र ह्या लोकीं जो न चालवी***
***इंद्रियासक्त तो पापी व्यर्थ जीवन घालवी।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा येते. एक, सृष्टीत परोपकार वृत्तीचा उत्कर्ष करुन जो सृष्टीचक्राला गतिमान करत नाही तो माणूस पापी होय. दोन, जो इंद्रियांच्या विषयोपभोगात निमग्न झाला त्याचे जीवन व्यर्थ जाणावे.

**स्पष्टीकरण**

1) सृष्टीच्या जड चेतन पदार्थांच्या ठायी काय आहे? सूक्ष्म अभ्यास केला तर एक गोष्ट ध्यानात येते. सर्व पदार्थांमध्ये यज्ञीय वृत्ती आढळते. परोपकार वृत्ती आढळते. या अभावी सृष्टीचा क्रम चालूच शकणार नाही. ही वृत्ती स्वार्थी व्यक्तीच्या ठायीही आढळते. पराकोटीचा स्वार्थी माणूस असू देत बुडणाऱ्याला बघून मदतीला धावून जाईल, किमान प्रयत्न करील. प्रत्येकाच्या ठायी भगवंताने परोपकार वृत्तीची पेरणी केली आहे. माणूस परोपकाराला प्रवृत्त होतो. माणूस एकटा नाही राहू शकत. तो समाजप्रिय आहे. समाजात राहतो. तो समाजप्रिय-सामाजिक प्राणी आहे. पशुदेखिल कळपाने राहतात. गाईला कळपातून वेगळी काढली तर ती घाबरुन जाईल. कळपाने राहण्याची तिला आंतरिक प्रेरणा लाभते. संकटकाळ आला तर सामुहिक बळ अवतरते. अगदी हिंसक पशुशी मुकाबला सामुदायिक बळाने केला जातो. पती-पत्नी सुध्दा एकमेकाना पत्करतात. खूप सहन करतात. त्याग करतात. संयमाने राहतात. हा प्रेम शक्तीचा चमत्कार आहे. ही कुटुंबियांपर्यत मर्यादित नको. सीमित प्रेमशक्ती दूषित होते. कुंठित होते.

जड सृष्टीतही परोपकार वृत्ती निहित असते. तिची ओळख आपल्याला नसते. सृष्टी आपल्याला सारे काही देते. स्वत:पाशी काही ठेवत नाही. अशा प्रकारे जड चेतन सृष्टीत परोपकार वृत्ती स्वाभाविकपणे असल्याचे ध्यानात येते. परोपकाराचा भाव व्यापक करण्याचा प्रयत्न केला जायला हवा. परोपकार संकुचित नको. मर्यादित नको. अन्यथा दु:ख कसे दूर लोटता येईल? दु:ख कमी कसे करता येईल?

2) केवळ स्वार्थी माणूस पापी मानावा. पाप कर्मे करणारा तर पापी आहेच पण परोपकार वृत्तीचा उत्कर्ष न करता केवळ स्वार्थी जीवन जगणाराही पापी आहे. परोपकार वृत्तीचा उत्कर्ष व्हावा. त्याशिवाय समाज टिकणार नाही. तो छिन्न-भिन्न होईल. द्वादशपंजरिका स्तोत्रात शंकराचार्य म्हणतात

***मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु सद्बुध्दिं मनसि***
***वितृष्णाम्। यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं***
***तेन विनोदय चित्तम्। अर्थमनर्थं भावय नित्यं***
***नास्ति तत: सुखेलेश: सत्यम्।***
***पुत्रादपि धनभाजां भीति: सर्वत्रैषा विहिता नीति:।***

अर्थात् हे माणसा, धनाने प्राप्त तृष्णेचा त्याग कर. सद्बुध्दीचा आश्रय घे. कर्माने धन मिळव. मनाला संतुष्ट ठेव. धनाच्या वैभवाला अनर्थकारी मान. अशी सतत भावना बाळग. धनवैभवात किंचितही सुख नाही. श्रीमंतांना आपल्या पुत्राचेही भय वाटते. हा प्रकार सर्वत्र दिसून येतो.

3) स्वार्थी जीवन विषयासक्त असते. परोपकार वृत्तीने स्वार्थवृत्ती हळूहळू क्षीण होईल. जीवन संयमी बनेल. संयमामुळे विषयांचे आकर्षण कमी होईल. मनावर नियंत्रण साधेल. बुध्दी विवेकसंपन्न होईल. अशा प्रकारे परोपकाररत जीवन ऊर्ध्वगामी बनेल.

4) केवळ स्वार्थाधारित जीवन जगणाऱ्याला व्यर्थ मानायला हवे. आपणा सर्वांना जागृत करण्यासाठी भगवंताने खूप कठोर शब्दांचा प्रयोग केला आहे.

: 17-18 :

***यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव:।***
***आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥***
***नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन्।***
***न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रय:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु य: मानव:** पण जो पुरुष
- **आत्मरति: एव:** परमात्म्याच्याच ठायी रत असतो
- **च आत्मतृप्त:** आणि आत्म्यात तृप्त रहातो

- **च आत्मनि एव संतुष्टः** आणि आत्म्यातच संतुष्ट असतो
- **तस्य कार्यं न विद्यते:** त्याच्यासाठी काहीही करायला शिल्लक उरत नाही
- **इह तस्य कृतेन:** या लोकी परमात्मरत पुरुषासाठी केलेल्या कर्मांचे
- **अर्थ न एव अस्ति:** काही प्रयोजन रहात नाही
- **अकृतेन कश्चन:** कर्मांना न करण्याचाही काही अर्थ
- **अर्थ न एव अस्ति:** काही प्रयोजन रहात नाही
- **अस्य सर्वभूतेषु:** यासाठी (आत्मज्ञानी पुरुषासाठी) सर्व भूतमात्रांच्या ठायी, भूतमात्रात
- **अर्थव्यपाश्रय:** आपल्या स्वार्थाचे
- **कश्चित् न अस्ति:** काहीही प्रयोजन उरत नाही

**अर्थ**

परंतु जो मनुष्य आत्म्यातच रमणारा, आत्म्यातच तृप्त आणि आत्म्यातच संतुष्ट असतो, त्याला कोणतेच कर्तव्य उरत नाही.

त्या महापुरुषाला या विश्वात कर्मे करण्याचे काही प्रयोजन असत नाही. तसेच कर्मे न करण्याचेही काही प्रयोजन असत नाही. तसेच सर्व प्राणीमात्रातही त्याचा थोडाही स्वार्थाचा संबंध असत नाही.

***परी आत्म्यांत जो खेळे आत्मा भोगूंनि तृप्त जो***
***आत्म्यामध्यें चि संतुष्ट त्याचें कर्तव्य संपलें।***
***केल्यानें वा न केल्यानें त्यास भावार्थ सारखा***
***कोणामधें कुठें त्याचा न कांही लोभ गुंतला।***

**विषय:** हे दोन श्लोक महत्वाचे आहेत. ज्यांनी भगवंताचा अनुभव घेतला आहे अशा पुरुषाचे यातून वर्णन आले आहे. सतराव्या श्लोकात त्याची चार लक्षणे सांगितली आहेत. (1) एक, म्हणजे जो परमात्म्याशी रत असतो. (2) दोन, परमात्म्याच्या ठायी तृप्त असतो. (3) तीन, परमात्म्यातच तृप्त असतो आणि (4) चार, या कारणामुळेच त्याला आपल्या स्वत:साठी काही करावे लागत नाही.

अठराव्या श्लोकात सांगितले आहे (1) महापुरुषाला जगात काहीही करायचे काहीही कारण नसते (2) कर्मे न करण्याचेही काही कारण नसते (3) सर्व प्राणीमात्रांशी त्याचा काहीही संबंध नसतो.

**स्पष्टीकरण**

या दोन श्लोकात ज्ञानी पुरुषाची लक्षणे सांगितली गेली आहेत, ती एवढ्यासाठी की यामुळे ज्ञानी पुरुषाची स्थिती पूर्णपणे कळू शकेल. कुठलीही शंका राहणार नाही. गैरसमज उरणार नाही. शंका अशी की ज्ञानी पुरुषासाठी कर्म करायची मूल्यवत्ता किती असते? खरोखरच तो कर्म करील की नाही? कर्म करील तर त्याचे स्वरुप काय असेल? किंवा मग कर्म का नाही करणार? तो स्वत:साठी कर्म करील वा दुसऱ्यासाठी? हे सारे धडपणे जाणून घेतले तर मनात शंका उरणार नाही. साधकावस्थेतली स्थिती प्रयत्नसाध्य असते. सिध्दावस्थेत म्हणजे ज्ञानावस्थेत ही लक्षणे सहज होतात, स्वाभाविक होतात. ज्ञानी पुरुष जर कर्म करीत नसेल तर मग साधकावस्थेत कर्म का करायला हवे? याचे उत्तर संपूर्ण अध्यायात देण्यात आले आहे पण कर्म करणे वा न करणे याबाबत ज्ञानी पुरुषाची स्थिती काय असते? हे स्पष्ट व्हायला हवे. हे समजाऊन सांगण्यासाठी हे दोन श्लोक.

1) पहिले लक्षण असे की ज्ञानी पुरुष परमात्म्याच्या ठायीच रत असतो. इथे शंका जागते की अज्ञानी का रत होत नाही आणि ज्ञानीच का रत असतो ? याचे उत्तर असे की ज्ञानी पुरुषाने परमात्म तत्व जाणून घेतले असते. मनात एक शंका येते. परमात्मा आहे याला पुरावा काय? सर्वात मोठा पुरावा तर आपण स्वत:च आहोत. आपण कोण आहोत याचा विचार करु या. आपण म्हणजे देह नाही. इंद्रिये नाहीत. ना मन ना बुध्दी, अहंकारही नाहीहोत आपण कारण या सर्वांचे आपल्याला ज्ञान होते. हे आपल्यापासून भिन्न असतात म्हणून तर यांचे आपल्याला ज्ञान होते ना? या बाबींचे आपल्याला ज्ञान होते याचा अर्थ आपण त्यांच्यापासून वेगळे आहोत हे स्पष्टच आहे. आपण बोलचालच्या भाषेत असे म्हणतो की आजकाल माझे मन अस्वस्थ आहे, माझी बुध्दी मंद आहे. ज्ञानस्वरुप असतानाही, आपले स्वरुप सर्वांहून वेगळे असतानाही आपण मिथ्या कल्पना करतो. देह, मन, इंद्रिये, बुध्दी यांनाच आपले स्वरुप समजून बसतो. असे आपण जोवर करत राहू तोवर आपण अटळपणे विषयातच रत राहू. संतांच्या संगतीमुळे जेव्हा हे लक्षात येईल की आपले स्वरुप परमात्म्याचे आहे. तेव्हा विषयासक्ती दूर हटेल आणि आपण विषयात रत न होता परमात्म्याच्या ठायी रत होऊ.

2) दुसरे लक्षण असे की ज्ञानी आत्मतृप्त असतो. माणसाला रसभरित भोजनात खूप आसक्ती असते. भोजनाने तृप्ती लाभते. उपवास करणे अवघड वाटते. आजारपणातही जेवण सोडावेसे वाटत नाही तरी आजार जावा असे वाटते. एलोपॅथी तर औषध व अन्न सोबत घ्यायला परवानगी देते. यामुळे लोक नाइलाजाने निसर्गोपचाराकडे वळतात. लोकांना जिव्हातृप्तीचा आनंद मिळतो. आत्मज्ञानी आत्मतृप्त असतो. आनंदरुपी ईश्वराच्या अनुभवाने सुखाचा अनुभव घेतो.

3) सारे पंचविषयातून आनंद मिळवतात. आत्मज्ञानी आत्मसंतुष्ट असतो. शंकराचार्य म्हणतात: **संतोषो हि सर्वस्य बाह्यार्थलाभे भवति।** अर्थात् बाह्य विषयांच्या प्राप्तीमुळे संतोषलाभ होतो. पुढे ते म्हणतात: **अयं तु बाह्यलाभनिरपेक्षतुष्टः।** असे ज्ञानी पुरुष बाह्य विषयांच्या लाभाची अपेक्षा न ठेऊन संतुष्ट असतो.

विषय संयोगात सुख आणि विषय वियोगात दु:ख नांदते. हे सुख दु:ख काही नातलग वा मित्रांपुरतेच मर्यादित नसते. संतांच्या संगतीत आनंद मिळतो, वियोगात व्याकुळता जागते. गोस्वामी तुलसीदास संत आणि दुर्जन दोघांना चरणस्पर्शपूर्वक प्रणाम करतात. ते म्हणतात:

***बंदउँ संत असज्जन चरना। दुख्रद उभय बीच कछु बरना॥ बिछुरत एक प्रान हर लेहीं। मिलत एक दारुन दुख देहीं॥***

अर्थात् दोघांच्या ठायी एक गुण समान आहे. कोणता? तर म्हणतात की दु:ख देण्याचा समान गुण आहे. संतांच्या वियोगात दु:ख तर दुर्जनांच्या भेटीत दु:ख.

एक चांगले भजन ऐकले. त्यातून आनंद लाभला पण तेवढ्यानेच काही तृप्ती झाली नाही. मग ते भजन पुन्हा पुन्हा ऐकायची इच्छा जागली. रोज ऐकायची इच्छा जागली. ज्यांच्याकडे रोजचे टपाल येते ना त्याना एखाद्या दिवशी जर काही टपाल आले नाही ना तरी बेचैनी वाटू लागते. ज्याना चांगल्या पुष्पांची वा सुगंधाची आवड असते ना ते एक दिवस सुध्दा त्या अभावी राहू शकत नाहीत. अशा प्रकारे विषयांच्या संयोगाने सुख, संतोष आणि विषयांच्या वियोगाने दु:ख आणि असंतोष हे चक्र सुरु असते.

हे चक्र परमात्मानुभवाचा आनंद सागर जेव्हा हाती लागतो तेव्हाच थांबते. परमात्मा निजस्वरुपी असतो. त्यापासून आपला वियोग क्षणभरही होऊ शकत नाही पण आपण परमात्म्याशी एकाकार असतानासुध्दा कल्पनेने त्यापासून वेगळे होतो आणि आपल्या मूळ स्वरुपाचा अनुभव म्हणजे परमात्म्याचा अनुभव गमावून बसतो. जोवर आपण या काल्पनिक स्वरुपाचा त्याग करतो आणि परमात्मभक्तीचा अनुभव घेतो तेव्हा प्राप्त होणारा आनंद हा अखंड स्वरुपाचा असतो. देहालाच आत्मतत्व मानले तर सारी अडचण उभी रहाते. मूळ स्वरुपाला ईश्वराचा अनुभव नाही होऊ शकत. परमात्म्याच्या अनुभवाने अपार आनंद लाभतो. अखंड सुख लाभते. कुठल्याही क्षणी परमेश्वराचा वियोग नसल्यामुळे आपल्याला दु:खाचा अनुभव येत नाही.

4) आत्मज्ञानी पुरुषाला आपल्या स्वत:साठी काही करावे लागत नाही. त्याची साधना पूर्णत्वाला पोहोचलेली असते. तो मुक्कामी पोहोचलेला असतो. भगवान म्हणतात: **तस्य कार्यं न विद्यते** त्याला स्वत:साठी काही करायला उरत नाही.

याचा अर्थ असाही केला जातो की आत्मज्ञानी पुरुष कुठलेच कर्म करत नसतो पण हा काही खरा अर्थ नव्हे. स्वत:साठी काही करायला उरत नाही हे मान्य पण इतरांसाठीही काही करायला उरलेले नसते हे मात्र खरे नव्हे. देह आहे तोवर कर्म अटळ आहे. आधी तो स्वत:साठी जगत होता आता इतरांसाठी जगत आहे. त्याची सारी शक्ती इतरांचे दु:ख हरण करण्यासाठी कामी येत आहे. संत तुलसीदासजी म्हणतात: **परदुख दुख, सुख सुख देखे पर** संत दुसऱ्यांच्या दु:खाने दु:खी व दुसऱ्यांच्या सुखामुळे सुखी होतो. तुलसीदासजींनी भगवंताविषयी लिहिले आहे:

***गिरा अरथ जल बीच सम, कहियत भिन्न न भिन्न। बंदउँ सीताराम पद, जिन्हहिं परमप्रिय खिन्न॥***

अर्थात् शब्द आणि अर्थ का भिन्न? जळ आणि लाटा का भिन्न आहेत? सांगायला दोघे भिन्न आहेत पण खरे पाहू जाता अभिन्न आहेत. जीव आणि शिवाचे तसेच तर आहे. अशा परमात्म्याला दीन दु:खी जन खूप प्रिय आहेत त्याना

मी प्रणाम करतो. तुलसीदासांच्या या म्हणण्याप्रमाणेच मुंडकोपनिषदात एक श्लोक येतो.

*प्राणो ह्येष य: सर्वभूतैर्विभाति विजानन् विद्वान् भवते नातिवादी आत्मक्रीड आत्मरति:*
*क्रिया वा नेष ब्रह्मविदां वरिष्ठ: ॥ (3/1/4)*

अर्थात् परमात्मा सर्व भूतमात्रांद्वारा प्रकाशमान होतो. ज्ञानी त्याला जाणतो. ज्ञानी खूप वादविवाद नाही करत. तो आत्म्याच्या ठायी क्रीडा करतो. आत्म्याच्या ठायी रत असतो. इतरांसाठी सतत कर्मशील असतो. परोपकाररत असतो. ज्ञानी पुरुष ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ असतो.

या श्लोकात स्पष्टपणे सांगितले गेले आहे की ज्ञानी पुरुष दुसऱ्यांसाठी जागतो. सेवापरायण असतो. सर्वश्रेष्ठ असतो. ज्ञानी पुरुष सदा भगवद्लीलागान करतो. श्रवण करतो. दुसऱ्यांच्या कल्याणाचा विचार करतो. लोक नावासाठी दान करतात. ज्ञानीच्या दानात मात्र अहंभाव नसतो.

अठराव्या श्लोकात ज्या तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत त्यांचा मेळ मागल्या श्लोकाशी आहे. सतराव्या श्लोकात ज्या ज्ञानी पुरुषाचे वर्णन आले आहे तेच वर्णन या श्लोकात आहे.

1) पहिली गोष्ट ही आहे की ज्ञानी पुरुष जी काही क्रिया करेल ती स्वत:साठी नसेल. मागील श्लोकातील दुसऱ्या चरणात जे लक्षण सांगितले आहे तेच परत सांगितले गेले आहे. ज्ञानी पुरुषाचा अहंभाव किंवा जीवभाव इतका क्षीण झालेला असतो की तो प्रत्येक क्रियेत शून्यतेचा अनुभव करतो. जो परमात्मस्वरुपात डुंबून गेला असेल त्याची यापरती वेगळी काय अवस्था होईल? तुलसीदासजी म्हणतात:

*गावहिं सुनहिं सदा मम लीला।*
*हेतु-रहित परहित-रत सीला ॥*

अर्थात् तो सदैव परमात्म्याच्या लीलांचे गान करत असतो. श्रवण करतो आणि निष्काम भावनेने इतरांच्या कल्याणात रत असतो. तसे तर सामान्य माणसाच्या ठायीही परमेश्वराने परोपकार वृत्ती राखली आहे. हे आपण मागील यज्ञ प्रकरणात वाचले आहे. ज्ञानवंताच्या ठायी परोपकार वृत्तीची पराकाष्ठा दिसून येते, परिपूर्णता दिसून येते.

परोपकार वृत्तीतही सामान्य माणसाच्या ठायी स्वार्थ वृत्ती असतेच. सामान्य माणूस परोपकार करतानाही सकाम भावनेने करेल. काही लोक आपले, पत्नीचे, आई-वडिलांचे नाव देण्याची अट घालून दान देतात. काही कीर्तीच्या इच्छेने दान देतात. काही लोक प्रपंचात अडचणी येऊ नयेत, प्रपंच सुरळीतपणे चालावा यासाठी, व्यापारात नुकसान होऊ नये यासाठी दान देतात. सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्येही अशा प्रकारच्या भावना असतात. आपण परोपकाररत आहोत, आपले संपूर्ण जीवन सेवामय बनून गेले आहे अशी सर्वांनी प्रशंसा करावी या भावनेने ते काम करतात. काही प्रापंचिक लोक असोत वा सेवाभावी लोक असोत ते काही वासनेने मुक्त नसतात. जे मोक्षाची साधना करत असतात, साधक असतात त्यांच्या मनातही मला लोकांनी संन्यासी म्हणावे, वैराग्यवान म्हणावे अशी भावना असते, वासना असते पण ज्ञानवंतांच्या क्रियेत वा सेवाकार्यात मात्र यत्किंचितही मी वा माझेपणा नसतो.

2) दुसरी गोष्ट महत्वाची. ती अशी की ज्ञानी पुरुषाच्या अक्रिय अवस्थेतसुध्दा त्याचा वैयक्तिक स्वार्थ नसतो, काही प्रयोजन नसते. कर्म करणे ही जशी एक क्रिया तशी कर्म न करणे हीही एक क्रिया असते. कर्म केले तर काही कार्ये सफळ होतात. आईचे प्रेम बोलून प्रकट होते तसे न बोलताही स्पष्ट होते. क्रोधाचेही असेच तर आहे. बोलता व न बोलताही तो प्रकट होतो. जीवनात कर्म करणे आणि कर्म न करणे दोघांची गरज असते. ज्ञानी पुरुषाच्या ठायी या दोन्ही गोष्टी आढळतात. ज्ञानी आणि अज्ञानी, सेवक आणि साधक हे वेगवेगळे आहेत. ज्ञानी पुरुषाच्या कर्म करण्यात व कर्म न करण्यात कुठल्याही प्रकारे स्वार्थ, वासना नसते, ना इच्छा असते ना अहंभाव. अज्ञानीच्या ठायी मात्र इच्छा, वासना, अहंकार, स्वार्थ सारेच कमी-अधिक प्रमाणात असतातच.

3) ज्ञानी पुरुष प्राणिमात्रांच्या संदर्भातही नि:स्वार्थी असतो. नातलगांच्या संदर्भात आपल्या मनी स्वार्थ वा ममतेची भावना असते हे तर उघडच आहे. गुरु शिष्यांच्या संबंधात हे ममत्व आढळते. मित्र-मित्रांमध्ये आढळते. एखाद्या स्थानाबद्दल, वास्तुबद्दलही ममत्व जागते. मुंडकोपनिषदात ज्ञानी पुरुषाचे वर्णन असे येते:

**संप्राप्यैनमृषयो ज्ञानतृप्ता: कृतात्मानो वीतरागा: प्रशान्ता:। ते सर्वगं सर्वत: प्राप्य धीरा युक्तात्मान: सर्वमेवाविशन्ति ॥** (3/2/5)

अर्थात् ऋषी आणि ज्ञानी परमात्मज्ञानाने तृप्त होतात. परमात्म्याला प्राप्त करुन घेतात. यामुळे त्यांना कृतकृत्य

भाव वरतो. ते वीतरागी बनतात. प्रशांत होतात. धैर्यवान पुरुष बनतात. सर्वत्र व्याप्त परमात्म्याला सर्व प्रकारे प्राप्त करुन घेतात. निर्विकार चित्ताने परिपूर्ण बनतात. परमात्म्याच्या ठायी विलीन होऊन जातात.

या दोन श्लोकात ज्ञानी पुरुषाची स्थिती सांगितली आहे. पुढच्या श्लोकात भगवान अर्जुनाला सांगताहेत की ज्ञानी बनायचे असेल तर अनासक्त भावनेने प्राप्त असलेली कर्तव्यकर्मे कर. यामुळे मोक्ष मिळू शकेल.

: 19 :

*तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर।*
*असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुष: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात्:** यामुळे
- **असक्त:** अनासक्त बनून तू
- **कार्यं कर्म समाचर:** प्राप्त कर्मे चांगल्या प्रकारे कर
- **हि सततं:** कारण की सतत, नेहमी
- **असक्त: कर्म आचरन्:** अनासक्त बनून प्राप्त कर्तव्ये करत राहिल्याने
- **पूरुष:** मनुष्य
- **परं आप्नोति:** मोक्ष प्राप्त करतो

**अर्थ**

म्हणून तू नेहमी आसक्त न होता कर्तव्यकर्मे नीट करीत रहा कारण आसक्ती सोडून कर्मे करणारा मनुष्य परमात्म्याला जाऊन मिळतो.

*म्हणूनि नित्य नि:संग करीं कर्तव्य कर्म तूं*
*नि:संग करितां कर्म कैवल्य-पद पावतो।*

**विषय:** या श्लोकात मुख्यत्वेकरुन दोन गोष्टींची चर्चा आली आहे. (1) प्राप्त कर्तव्य अनासक्त बुध्दीने करत रहायला हवीत आणि (2) अनासक्त बनून सतत कर्तव्य कर्मे केल्याने माणूस मोक्ष प्राप्त करुन घेतो. हा मोक्षमार्ग आहे.

**स्पष्टीकरण**

या श्लोकातल्या काही शब्दांचा विचार करायला हवा. श्लोकाच्या आरंभी शब्द आला आहे **'तस्मात्'** म्हणजे यासाठी, या कारणामुळे. ज्ञानी पुरुषाचे बाह्य अनुकरण करुन काही कुणाला ज्ञानी बनता यायचे नाही. अर्जुनाचा मूळ प्रश्न असा होता की आंतरिक निष्कामता, निर्विकारता, चित्ताची समता, आत्मज्ञान ही तत्वे श्रेष्ठ असतील तर मग मला या घोर-कठीण-अवघड अशा कर्मात का प्रवृत्त करताहात? भगवंतांनी कर्मे करण्याविषयी अनेक कारणे सांगितली. अखेरीस यज्ञीय वृत्तीने कर्मे करावीत असे म्हणाले. अखेरीस कोणती स्थिती प्राप्त करुन घ्यायची आहे हेही सांगितले. यामुळे निष्कामता, निर्विकारिता, चित्ताची समता आणि आत्मज्ञान सर्वश्रेष्ठ आहे यात अजिबात शंका नाही. अंतिम ज्ञानमय स्थिती प्राप्त करणे सोपे जाईल. आत्मज्ञान सर्वश्रेष्ठ आहे, हे खरे पण ते प्राप्त कसे करुन घेता येईल? भोजनापासून तृप्ती मिळवायची आहे अशी कल्पना केली तर आधी भोजन तयार करावे लागेल. मोठ्या परिश्रमाने ते तयार केले तर मग ते खावे लागेल. अन्न योग्यप्रकारे चावून-चावून खावे लागेल मग कुठे तृप्तीचा अनुभव येईल. तर भगवान सांगताहेत की कर्माहून ज्ञान खचितच श्रेष्ठ आहे पण कर्तव्य कर्माचरण केल्याशिवाय ज्ञान मिळणार नाही. साधनेशिवाय ज्ञानप्राप्ती होणार नाही हेही खरेच आहे.  आत्मज्ञानासाठी साधना हवी. कर्तव्य भावना हवी. यासाठी '**कार्य कर्म**' प्राप्त कर्तव्य करत जा. सातव्या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर माऊली म्हणते की ज्ञानी पुरुष उचित प्राप्त कर्तव्याचा कदापि त्याग करत नाही. मग अज्ञानी पुरुषाने तर प्राप्त कर्तव्याचा त्याग कदापि करायला नको, हे का नव्याने सांगायला हवे? प्राप्त कर्तव्य सहज प्रवाहात लाभते. त्यासाठी प्रयत्न नाही करावे लागत यामुळे या कर्मांना ईश्वर प्रेरित समजायला हवे. ईश्वरप्रेरित कर्म सत्यरुप असते, धर्मरुप असते. सत्वस्वरुपी ईश्वर धर्मस्वरुपी असते. परिणामी ईश्वरप्रेरित कर्म कदापि असत्य वा अधर्मरुपी असू शकत नाही. ईश्वराची ओळख करुन घ्यायची असेल तर सारी कार्ये ईश्वरप्रेरित असावीत. ईश्वराला आवडणारी कर्मे जर आपण केली नाहीत तर ईश्वराची कृपा कशी बरे लाभेल? ईश्वर कृपेशिवाय ईश्वरी स्वरुपाचे ज्ञान तरी मग कसे होईल?

पुढे भगवान सांगतात: प्राप्त कर्तव्ये पार पाड पण **असक्त:** अनासक्त बन, निर्विकार बनून कर्मे कर. आपले तमाम व्यवहार काम-क्रोध वगैरे विकारांच्या अधीन राहून का चालतात? याचे दुहेरी कारण आहे एक म्हणजे सृष्टीचे-जगताचे-मिथ्या रुप आपल्या ध्यानी येत नाही. जगत आणि जगतातले सारे पदार्थ आपण सत्य समजून चालतो. दुसरे म्हणजे आपण आपल्या परमात्मस्वरुपाला विसरुन जातो. देह, मन, बुध्दी इंद्रियाना आत्मस्वरुपी

मानतो. सारे व्यवहार करतो. यामुळे चित्ताच्या ठायी काम-क्रोध यासारखे विकार उपजतात. विकारांमुळे चित्तात क्षोभ जागतो, खळबळ माजते, दु:ख उपजते. या दु:खानुभवासोबत आपण सारे आयुष्य घालवतो. आतली प्रेरणा तर अखंड सुख-शांतीसाठी असते, नशिबी मात्र दु:ख येते.

दुसरा मुद्दा सांगताहेत की: **असक्त: सततं कार्यम् कर्म आचरन्** अशा प्रकारे निर्विकार भावनेने सतत कर्माचरण केले तर मोक्ष लाभतो. इथे सतत हा शब्द महत्वाचा आहे. वीज कडाडते, आकाशात मोठ्याने पण असते मात्र ती क्षणभरासाठीच. तिचा प्रकाश मोठा असतो पण तो काही काळच टिकतो. यामुळे सूर्य, चंद्र, कंदिल यांचा प्रकाश स्थिर असल्यामुळे ज्याप्रमाणे उपयोगाचा ठरतो तसा आकाशातील विजेचा प्रकाश व्यवहारात उपयोगाचा ठरत नाही. तशाच प्रकारे कर्तव्य कर्म आचरले नाही तर त्यातून मोक्षलाभही होणार नाही. यामुळे प्राप्त कर्तव्य निष्कामभावनेने सातत्याने करत रहायला हवे. प्राप्त कर्तव्य अनासक्त भावनेने नित्य करत राहिल्याने चित्तशुध्दी होऊन मोक्ष म्हणजे स्व-स्वरुपाची ओळख होऊ शकेल. हे कर्माचरण सततचे हवे, क्षणिक नको. साधना अखंड असावी, तीत खळ नको. माया आपल्यापुढे उभी ठाकली आहे. आपल्याला बंधनात अडकवायला ती सदा तत्पर आहे. मायेचा सामना करुन तीवर विजय प्राप्त करायचा आहे, यासाठी अखंड साधना हवी.

: 20 :

*कर्मणैव हि संसिध्दिमास्थिता जनकादय: ।*
*लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि जनकादय:** कारण की जनक वगैरे ज्ञानी पुरुषांनी
- **कर्मणा एव:** कर्माच्या अनुष्ठानानेच
- **संसिध्दिं आस्थिता:** मोक्ष प्राप्त करुन घेतला आहे
- **लोकसंग्रहं एव अपि संपश्यन्:** लोकसंग्रहाकडे बघत असूनही
- **कर्तुं अर्हसि:** तुमच्यासाठी कर्तव्यकर्मे करणे उचित आहे

**अर्थ**

जनक वगैरे ज्ञानी लोकही आसक्तीरहित कर्मानेच परम सिध्दीला प्राप्त झाले होते म्हणून तसेच लोकसंग्रहाकडे दृष्टी ठेऊन देखील तू कर्मे करणेच योग्य आहे.

*कर्म-द्वारा चि सिध्दीस पावले जनकादिक*
*करीं तूं कर्म लक्षूनि लोक-संग्रह-धर्म हि ।*

**विषय:** या श्लोकात मुख्यत: दोन बाबींची चर्चा आली आहे. (1) एक, जनक, व्यास यासारखे ज्ञानीपुरुष देखील कर्तव्य कर्मे आचरत मोक्षाला प्राप्त झालेत. (2) दोन, लोकसंग्रहाचा विचार करु जाता कर्मे आचरणे सर्वांसाठी योग्य आहे.

**स्पष्टीकरण**

यातून अर्जुनाच्या मूळ प्रश्नाला उत्तर दिले जात आहे. कर्म करायचे आणखी एक कारण भगवंताने सांगितले आणि उदाहरणदेखिल दिले. पहिल्या चरणात उत्तर दिले आणि दुसऱ्या चरणात एक मोठे कारण देऊन कर्म करायचे महत्व समजावले आहे.

1) कर्मे आचरत असताना मोक्ष प्राप्त करता येईल यासाठी जनक राजाचे उदाहरण दिले आहे. महाराज जनकांना सर्वसामान्यजनही जाणत होते. यामुळे त्यांचे उदाहरण दिले. अशा व्यक्तीचे उदाहरण दिले ना तर लवकर ध्यानात येते. संपूर्णपणे मुद्दा लक्षात येतो. जनक राजा होते. ते ज्ञानी होते. राज्यपदावर आरुढ होऊन आत्मज्ञानाची प्राप्ती करुन घेणे दुर्लभ गोष्ट आहे. त्यांच्या बाबतीत एक वचन सुप्रसिध्द आहे : **मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन ।** अर्थात् आपली मिथिला नगरी जळत असतानाही आपले काहीच जळत नाही अशी त्यांची भावना होती.

जनक होते कर्मयोगी. त्यांचे गुरु याज्ञवल्क्य संन्यासी होते. संन्याची गुरुच्या चरणी बसून जनकाने आत्म ज्ञानाची प्राप्ती करुन घेतली. आत्म ज्ञान मिळवून ते जनसेवेला लागले. डोळस माणूसच अंधांना मार्ग दाखवू शकतो. सारा समाज अज्ञानी म्हणजे अंध असतो. यामुळे ज्ञानी पुरुषांवर समाजाला मार्गदर्शन करायची जबाबदारी येते. अलिप्त राहून राज्याचा गाडा हाकता येतो हे जनकाने आपल्या उदाहरणाने दाखवून दिले. जनक असे अलिप्त होते. याज्ञवल्क्याचा पुत्र शुकदेव. त्याला प्रमाणपत्र घ्यायला

याज्ञवल्क्याने राजा जनकाकडे पाठवले. शुकदेव संन्यासी होते. अलिप्ततेची, निष्कामतेची, निर्विकारतेची कसोटी तर प्रवृत्तीमार्गात लागते. प्रवृत्ती करुन अलिप्त रहाणारा संन्याश्यापेक्षा थोर होय.

व्यास, वसिष्ठ, अश्वपती आपल्या काळातली प्रवृत्तीमार्गो ज्ञानी होते. स्वत: श्रीकृष्ण प्रवृत्तीमार्गो ज्ञानी होते. या अध्यायातील 22 ते 24 या श्लोकांमधून कृष्णाने आपले स्वत:चे उदाहरण दिले आहे.

गांधीजींचे उदाहरण आपल्या समोर आहे. गांधीजींना श्री राजचंद्रजींच्या सहवासामुळे खूप लाभ झाला. श्री राजचंद्रजी हिऱ्या-मोत्यांचे व्यापारी असूनही आत्मज्ञानी होते. लाखोंचा व्यापार होता. व्यापार थांबला की लगेच ते आपल्या आध्यात्मिक पोथीत गूढ विचार लिहायला बसत असत. अशा व्यक्तीची जातकुळी व्यापाऱ्याची नसून ज्ञान्याची मानली जायला हवी. अशा काही महापुरुषांना भगवंताचे अवतार कार्य साधायचे असते. यामुळे त्या त्या काळात त्याना अवतारी पुरुष मानायचे. राम, कृष्ण, बुध्द, महावीर हे सारे अवतारी पुरुष होत. अशा अवतारी पुरुषांचे कार्य अतिव्यापक असते. काही ज्ञानी पुरुषांना आपले कार्य गुप्तपणे करायला आवडते. असे असले तरी त्यांच्या ज्ञानाचा सुवास लांब-लांबवर दरवळतो.

विनोबा वर्धा आश्रमात उत्तरेकडच्या ओट्यावर झोपत. कुणीतरी याचे कारण विचारले. विनोबा उत्तरले की हिमालय उत्तरेकडे आहे. हिमालयाच्या गुहेत समाधिरत साधुजन ईश्वराच्या ध्यानात तल्लीन आहेत. उत्तरेकडच्या वाऱ्यासमवेत साधु महात्म्यांचा सुवास येतो. त्यामुळे पावित्र्य वाढते. असे गुप्त महात्मा जरी प्रत्यक्षपणे समाजसेवा करताना दिसत नसले तरीदेखिल त्यांची सेवा अनुपमेय आहे. असे महात्मा गुप्तपणे सेवाकार्य बजावतात. अशा अव्यक्त महात्म्यांच्या दर्शनाने स्फूर्ती लाभते.

आध्यात्मिक साधना करणारे सिध्द होतात. त्यांच्यावर लोकसंग्रहाची मोठी जबाबदारी असते. अशा लोकसंग्रहावर लक्ष केंद्रित करुन कार्य करायला हवे हा विचार भगवंत अर्जुनाला समजाऊन सांगताहेत.

2) लोकसंग्रहाचा हा मुद्दा महत्वाचा आहे. श्रेष्ठ पुरुषांवर ही जबाबदारी अधिक असते. अर्जुन तत्कालीन श्रेष्ठ पुरुष होता. यामुळे लोकसंग्रहाचा विचार करुन चालायची जबाबदारी त्यावर होती. ही जबाबदारी तो टाळू शकत नव्हता. या अध्यायात लोकसंग्रह शब्द दोनदा आला आहे. इतरत्र कुठेही नाही. शंकराचार्यांनी लोकसंग्रहाचा अर्थ केलाय: **लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रहः।** अर्थात् लोकाना उन्मार्गापासून निवृत्त करणे म्हणजे पतनाच्या प्रवृत्तीपासून वाचवणे हा लोकसंग्रह होय.

लोकसंग्रह म्हणजे लोकांचा समुदाय एकत्रित करणे नव्हे. शंकराचार्यांचा अर्थच खरा आहे. लोकांची प्रवृत्ती सामान्यपणे पतनाची असते. विषय समोर उभे ठाकलेले असतात, यामुळे इंद्रियांना विषयांचे आकर्षण असते. विषयात चित्त गुंतून पडते मग संयम पाळणे अवघड होते. यमाच्या अभावी मानवी मन पतनाकडे वळते. हे थांबवण्यासाठी सत्संगती हवी. तुलसीदासजी म्हणतात

***राम कथा के ते अधिकारी।***
***जिन्हके सतसंगति अति प्यारी॥***

अर्थात् ज्यांना सत्संग अत्यंत प्रिय असतो ते रामकथेचे अधिकारी ठरतात.

***बडे भाग पाइय सतसंगा।***
***बिनहिं प्रयास होहिं भव-भंगा॥***

अर्थात् मोठ्या भाग्याने सत्संग लाभतो. यामुळे आसक्ती नष्ट होते. सर्वाचे अंतिम फळ सुंदर हरीभक्ती सांगितली आहे. सत्संगाशिवाय हरिकथेचा लाभ नाही होत.

पुढे लिहितात:

***सब कर फल हरि-भगति सुहाई।***
***सो बिनु संत न काहू पाइ॥***

अर्थात् सर्वांचे फळ सुंदर अशी हरी भक्ती आहे पण ती काही सत संगतीशिवाय लाभत नाही.

पुढे लिहितात:

***बिनु सतसंग न हरिकथा, तेहि बिनु मोह न भाग।***
***मोह गए बिनु रामपद, होइ न दृढ अनुराग॥***

अर्थात् हरिकथेच्या श्रवणाशिवाय मोह नाही घालवता येणार. मोह संपल्याशिवाय हरीचरणी दृढ अनुराग नाही उत्पन्न नाही.

पुढे लिहितात:

***सतसंगति दुरलभ संसारा।***
***निमिष दंडभरि एकहि बारा॥***

अर्थात् या जगात सर्वात दुर्लभ गोष्ट सत्संगती आहे. एकदा व अल्पकाळापर्यतही सत्संग अवघड आहे.

पुढे लिहितात :

***बिनु सतसंग बिबेक न होई। रामकृपा बिनु सुलभ न सोई॥ सतसंगति मुदमंगल मूला।***
***सोइ फल सिधि सब साधन फूला॥***

अर्थात् सत्संगाशिवाय विवेक जागत नाही. रामकृपेविना सत्संग सुलभतेने साधता येत नाही. आनंद आणि कल्याणरुपी वृक्षाचे मूळ म्हणजे सत्संग होय. सारी साधनसंपदा या वृक्षाची पुष्पे असून सिध्दी म्हणजे मोक्ष फळ आहे.

पतनासाठी का कुणाला प्रयत्न करावे लागतात? मनात पवित्र विचार नांदतात, मन ऊर्ध्वगामी झाले असे आतून वाटायला लागले की पुढे समोरची नोटांची आपली नसलेली गड्डी दिसली की मनाता विचार येतो हे घेतले तर माझे दारिद्य मिटेल. दारिद्याने तर थकून गेलेलो आहेच आहे. देवाने ही चांगली संधी दिली आहे. तो त्या पैशाना उचलून घेतो. आतला आवाज दटावतो. 'हे तू चांगले करत नाहीस!' असे बजावतो पण आतल्या आत्मिक आवाजाकडे माणूस दुर्लक्ष करतो. मनात चांगले विचार असतानाही प्रलोभनाच्या प्रसंगी माणूस पडतो.

एक तपस्वी साधू होता. पहाडावर एका देवळात रहायचा. एकटा होता. जनलोकात त्याला प्रतिष्ठा लाभली होती. लोक त्याची पूजा करत. भिक्षेसाठी तो शहरात जायचा. लोक मोठ्या भक्तीभावाने त्याला भिक्षा वाढत. एका भगिनीची साधुवर श्रध्दा होती. दुर्दैवाने प्लेगचा घाला आला. भगिनीच्या परिवारातील सर्वांचे निधन झाले. ती एकटी राहिली. साधुसंगतीत रहायचा विचार तिच्या मनी जागला. एकांतात राहून साधना घडेल असे तिला वाटले. तिने आपला विचार साधुंना सांगितला. सुरुवातीला साधुने या प्रस्तावाला नकार दिला. खूप आग्रह झाल्यावर संमती दिली. ती साधूची शिष्यीण बनली. या घटनेला काही दिवस लोटले असतील नसतील तो साधूचे पतन झाले.

भगवंताने इंद्रियांचे मुख विषयांकडे वळवून ठेवले आहे. विषयसन्मुखच ठेवले आहे. यामुळे विषय समोर येताच पतन व्हायला उशीर लागत नाही. या स्थितीतून वाचण्यासाठी दीर्घकालीन सत्संग हवा असे तुलसीदासांचे मत आहे. सर्व शास्त्रांचे निरुपण आहे. यामुळे संयमी व निग्रही पुरुष परमात्म्याचा अनुभव घ्यायला तत्पर असतात. अशा श्रेष्ठ साधकांवरच समाजाला मार्गदर्शन करायची जबाबदारी असते. त्यांना ती जपावी लागते. सिध्द पुरुषांवर तर ही जबाबदारी असतेच असते पण श्रेष्ठ जनांवरही लोकसंग्रहाची जबाबदारी असते. सिध्द पुरुष, श्रेष्ठ साधक किंवा नेता कुणी का असेना केवळ उपदेश करुन लोकसंग्रह साधू शकत नाहीत. त्यांचे आचरणच समाज जीवनात परिवर्तन घडवते. गांधीजी तर असे म्हणत की प्रचाराचे सर्वोत्तम साधन आचरण होय.

आजच्या वैज्ञानिक काळात बौध्दिक ज्ञानी खूप आहेत. आचरणशील साधकच समाजाला पतनापासून वाचवू शकतात. समाजात अनुकरण प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसते. वाईट संगतीचे अनुकरण ताबडतोब केले जाते.

: 21 :

***यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:।***
***स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **श्रेष्ठ:** श्रेष्ठ पुरुष
- **यत् तत् आचरति:** ज्याचे ज्याचे जे जे आचरण करतात
- **तत् तत् एव:** त्याचे
- **इतर: जन:** आचरति: इतर लोक, म्हणजे सारे लोक अनुकरण करतात
- **स:** ते श्रेष्ठ पुरुष
- **यत् प्रमाणं कुरुते:** ज्याला प्रमाण समजून वर्तन करतात
- **लोक: तत् अनुवर्तते:** सारे लोक त्यालाच प्रमाण मानून वर्तन करतात

**अर्थ**

श्रेष्ठ पुरुष जे जे आचरण करतो त्या त्या प्रमाणेच इतर लोकही आचरण करतात (इथे क्रियापद एकवचनी आहे पण 'जन' शब्द समुदायवाचक असल्यामुळे भाषांतर

करताना बहुवचनी क्रियापद घेतले आहे.) तो जे काही प्रमाण म्हणून सांगतो त्याप्रमाणेच सारा मनुष्य समुदाय वागू लागतो.

*जें जें आचरितो श्रेष्ठ तें तें चि दुसरे जन*
*तो मान्य करितो जें जें लोक चालवितात तें।*

**विषय:** या श्लोकात दोन मुद्यांची चर्चा येते. (1) श्रेष्ठ जनांचे जसे आचरण असते अन्य सारे जन त्याप्रमाणे चालायचा प्रयत्न करतात. (2) श्रेष्ठ जन ज्या विचारांना-आचार धर्माला मान्यता देतात त्याचेच अनुसरण इतर लोक करतात.

**स्पष्टीकरण**

1) लेकरासाठी आई-बाबाच सर्व काही असतात. सर्वात आधी लेकरांचा संबंध आईशीच येतो. आई लेकरासाठी जे काही करते त्याचे शब्दातून वर्णन करणे अवघड आहे. प्राचीन काळी गुरुगृहाचा निरोप घेताना गुरु उपदेश करत- **'मातृ देवो भव',आईला** देव समजून चला. **'पितृ देवो भव',** बाबांना देव समजून चला. **'आचार्य देवो भव',** आचार्यांना म्हणजे गुरु जनांना देव समजून चला. **'अतिथि देवो भव'**. अतिथीला देव समजून चला. अशाप्रकारे लेकराचा सृष्टीशी परिचय करुन देत. जीवनाचा संस्कार घडवत. संस्कार-संपन्न माता-पिता लाभणे मोठ्या भाग्याची गोष्ट. लेकरांचे सारे लक्ष माता-पित्याकडे असते. लेकरे अनुकरणशील असतात.

जगभरच्या महापुरुषांच्या, तपस्वी जनांच्या, श्रेष्ठ जनांच्या विकासात आणि जडणघडणीत माता-पित्याची तपश्चर्या, सहिष्णुता आणि दूरदृष्टी उपयोगी ठरते. गांधी-विनोबा ही तर प्रत्यक्ष उदाहरणे होत. अशाप्रकारे आई-बाबा, थोरले भाऊ-बहिण, शिक्षक, मित्र सर्वांवर उत्तम आचरण व श्रेष्ठ विचारांची जबाबदारी असते. त्यांच्या आचार-विचारांचे अनुकरण परिवार व शेजारी-पाजारी करतात.

2) श्रेष्ठ पुरुषांनी प्रमाण मानलेले विचार सारे मान्य. प्राचीन काळी विद्यार्थी बारा वर्षांपर्यत गुरुगृही रहायचे. गुरु त्यांना निरोप देताना उपदेश देत: **अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात्। ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः। युक्ता अयुक्ताः। अलूक्षाः धर्मकामाः स्युः। यथा ते तत्र वर्तेरन्। तथा तत्र वर्तेथाः।** अर्थात् तुमच्या मनी कर्तव्य आणि विचारांच्या बाबतीत काही दुविधा उत्पन्न झाली, निर्णय घेता नाही आला तर ईश्वरपरायण, विवेकसंपन्न आणि निष्कामी जनांचे अनुसरण करा. असे लोक स्नेहशील आणि धर्मनीतीपरायण असतात.

भारत भूमीत खूप प्राचीन काळापासून श्रेष्ठ संत-सत्पुरुष होऊन गेले. महापुरुषांचे जीवन सिध्दांतनिष्ठ असते. सामान्य माणसांचा कुठलाही सिध्दांत नसतो. त्यांच्या आचार-विचारात स्थैर्य नसते. गांधीजींनी समाजापुढे दृढतापूर्वक काही सिध्दांत मांडले. ते असे म्हणाले की साधक किंवा मुमुक्षुसाठी आवश्यक असणारे सिध्दांत सर्वसामान्य लोकांनाही आचरणात आणता येतील. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य जनही आचरणात आणू शकतील असे ते सिध्दांत आहेत - सत्य, अहिंसा ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह या व्रतांच्या संदर्भात गांधीजींनी 'मंगल प्रभात' नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

गांधीजींचे हे ठाम निवेदन होते की विचार वा सिध्दांताच्या प्रचारासाठी आचरण हवे. आचरणाशिवाय बौध्दिक प्रचार व्यर्थ होय. श्रेष्ठ जनांच्या विचारांनी समाजाचे उत्थान होते. यामुळे श्रेष्ठ जनांवर आपल्या आचरणातून समाजोत्थानाची मोठी जबाबदारी आहे असते. श्रेष्ठ जनांचे अनुकरण सारेजण सामान्य लोकही करतात. श्रेष्ठ जनांनी निष्क्रिय राहून सत्कर्माची उपेक्षा करता कामा नये.

: 22 :

***न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन।***
***नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थः** हे अर्जुना
- **मे त्रिषु लोकेषुः** माझ्या साठी तिन्ही लोकात
- **किंचन कर्तव्यं न अस्तिः** काहीही कर्तव्य उरत नाही
- **अनवाप्तं अवाप्तव्यं न अस्तिः** प्राप्त झाले नाही, प्राप्त करायचे आहे असे काहीही उरत नाही
- **कर्मणि वर्त एवः** तरीही कर्मात रत रहात असतो

### अर्थ

हे अर्जुना, मला या तिन्ही लोकात काहीही कर्तव्य नाही आणि मिळवण्याजोगी कोणतीही वस्तु मिळाली नाही, असे नाही तरीही मी कर्म करीतच असतो.

*करावें मिळवावें सें नसें कांहीं जरी मज तिन्ही लोकीं*
*तरी पार्था कर्मीं मी वागतों चि कीं।*

**विषय:** या श्लोकात भगवंत म्हणतात की (1) त्यांना आता काहीही करायचे असे शिल्लक उरले नाही. काहीही मिळवायचे असे बाकी राहिले नाही तरी (2) ते अखंड कर्मरत असतात.

### स्पष्टीकरण

1) या श्लोकात श्रीकृष्ण आपले स्वत:चेच उदाहरण देताहेत. ते महाज्ञानी होते. अर्जुनाचे गुरु होते. अर्जुनाला सातशे श्लोकांचा उपदेश करुन त्यानी जगावर मोठे उपकार करुन ठेवले आहेत. ते अर्जुनाचे सारथी बनले. भक्त गोपींमध्ये ते अलिप्त भावनेने वावरले. गोप बालकांमध्ये मिळून-मिसळून त्यांनी गो धन सांभाळले. गाईंची दुग्धधार काढली. समाजात हीन दर्जाची मानली गेलेली कामे केली. हीन म्हणवल्या जाणाऱ्या कामांची प्रतिष्ठा वाढवली.

गांधीजींचेही जीवन अशाच प्रकारचे आहे. 1915 साली अहमदाबादनजिक त्यांनी कोचरब आश्रमाची स्थाना केली. हा सत्याग्रहाश्रम होता. आश्रमात ते मजूरासारखे राबले. सकाळी तासभर चक्कीवर दळण दळत. पंधरा मिनिटे ते हात बदलत नसत-त्यांचे शरीर इतके बळकट होते. त्यानी हर प्रकारची कष्टसाध्य कामे केली. कामांची प्रतिष्ठा वाढवली. संडास सफाई केली. ते श्रीकृष्णाप्रमाणे कर्मयोगी होते. आयुष्याच्या संध्याकाळपर्यत त्यानी कर्मयोगाचे आचरण केले.

विनोबाजी म्हणत की सर्व अवतारांमध्ये श्रीकृष्णावतार अत्यंत विनम्र. त्यांच्या जीवनात अमानित्वाचा परमोत्कर्ष दिसतो, तसा अन्यत्र दुर्लभ. गांधीजींचेही असेच होते. त्यांच्यात मोठेपणाची भावना अजिबातच नव्हती.

ज्ञानी पुरुषांच्या ठायी समान्यपणे नम्रता असतेच कारण अहंकार नष्ट झाल्याचा सहज परिणाम माणसाच्या वर्तनात येतोच आणि तो नम्रतेत दिसतो. तरीही काही ज्ञानवंतांमध्ये नम्रतेची, अमानित्वाची पराकाष्ठा दिसून येते. ज्ञानाचे एक महत्वाचे लक्षणच मुळी नम्रता आहे. दुसरे लक्षण आहे सर्वभूतहितरत भावना कारण की साधकावस्थेत त्याला स्वत:साठी असे काहीही करायचे उरत नसते पण सिध्द वा ज्ञानी झाल्यावरसुध्दा काहीही करणे वा प्राप्त करुन घेणे उरले नसले तरी ते सर्वभूतमात्रांसाठी, सेवेत मग्न असतात.

2) ज्याप्रमाणे श्वासोच्छवासाशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही त्याचप्रमाणे ज्ञानी माणूसही सेवेशिवाय राहू शकत नाही. ही गोष्ट या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात सांगितली गेली आहे. भगवान असे म्हणतात की मला आता काहीही मिळवायचे शिल्लक उरलेले नाही. आता मी काहीही कर्मे आचरली नाहीत तरी चालण्यासारखे आहे तरीही मी तसे करत नाही कारण की सेवा हा माझा स्वभाव बनून गेला आहे. जोवर देह आहे तोवर मी सेवेशिवाय नाही जगू शकत. सेवा आता माझ्यासाठी सहज बनून गेली आहे. स्वभाव बनून गेली आहे. सेवा न करणे ज्ञानवंताला खूप जिकीरीचे जाईल. यामुळे भगवान म्हणताहेत की सेवा म्हणजे कर्म करण्याकामीच मी एकाग्र आहे.

: 23 :

*यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः।*
*मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **हि यदि अहं:** कारण की जर मी
- **अतन्द्रितः कर्मणि:** आळस सोडून सावधपणे, कर्मात
- **जातु न वर्तेयं:** कदापि वर्तन करणार नाही
- **पार्थ:** तर हे अर्जुना
- **मनुष्याः सर्वशः** माणूस सर्व प्रकारे
- **मम वर्त्म अनुवर्तन्ते:** माझ्या मार्गाचे अनुकरण करतील

### अर्थ

कारण हे पार्था, जर का मी सावध राहून कर्मे केली नाहीत तर मोठे नुकसान होईल कारण मनुष्य सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात.

*मी चि कर्मीं न वागेन जरी आळस झाडुनी*
*सर्वथा लोक घेतील माझें वर्तन तें मग।*

**विषय:** या श्लोकात भगवंत सांगतात की (1) त्यांनी आळस झटकून कर्मे केली नाहीत तर (2) जग त्यांचेच अनुकरण करील.

### स्पष्टीकरण

1) पहिला मुद्दा आळस झटकायचा आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी तमोगुण आणि रजोगुणाची प्रबळता असते. तमोगुणामुळे माणूस निष्क्रिय बनतो. माणसाला फळ तर हवेच. कर्मफळावर त्याची दृष्टी एकाग्र असते. कर्म न करताच फळ मिळाले तर अधिकच चांगले. कर्म केल्याशिवाय फळ मिळणार नाही हे ध्यानात आले तर मग माणूस कर्माला प्रवृत्त होतो पण कर्म न करण्याच्या त्याच्या आंतरिक वृत्तीत मात्र काहीही फरक पडत नाही. खरे तर याउलट घडायला हवे. फळ मिळो वा ना मिळो, ध्येय समोर राखून त्यासाठी न थकता कर्मे करायला हवीत. एक भगिनी आजारी पडली. खूप प्रयत्न केले तरी तिला काही बरे वाटेना. तिच्या चित्तात नैराश्य दाटून यायचे. अशामुळे आपली तब्येत बरी होणार नाही हे काही तिच्या ध्यानातच येईना. तब्येत सुधारणे वा न सुधारणे काही कुणाच्या हातची गोष्ट नाही. आपल्या हाती केवळ योग्य प्रयत्न करणे आहे. आवश्यक ते ज्ञान संपादन करणे आहे. एवढे केले तरी आपले कर्तव्य पूर्ण झाले पण माणसाचे लक्ष सतत फळाकडे असते. फळ लाभणार नाही असे कळले तर मग निराशा जागते. प्रयत्नात ढीलेपणा येतो. हा तमोगुणामुळे जागतो. फलासक्ती रजोगुणाचे कार्य आहे. तमोगुण व रजोगुण दोघाना टाळायचे आहे. सत्वगुणाला शरण जायचे आहे. सत्वगुणाची कास धरायची आहे. सत्वगुणामुळे फलासक्ती उरणार नाही. अखंड कर्मयोग साधता येईल. भगवंत आपल्या देहात अखंडपणे कर्मशील रहातो. गर्भ धारणेपासून तर थेट बालकाचा जन्म होईपर्यंत देव काम करतो मग कुठे एका साजऱ्या बालकाचा जन्म होतो.

उपनिषदात एक कथा येते. एकदा इंद्रियांमध्ये अशी स्पर्धा जागली की आपल्या मध्ये श्रेष्ठ कोण? या प्रश्नाचा निकाल लावायला सारे प्रजापतीकडे पोहोचले. प्रजापती म्हणाला ज्याच्या अभावी शरीराचे कार्य अजिबात थंडावेल तो श्रेष्ठ. एका वर्षासाठी वाणीने निरोप घेतला. शरीराचे कार्य मुक्याप्रमाणे चालले. वर्षभर डोळे निघून गेलेत. शरीराचे कार्य आंधळ्या व्यक्तीप्रमाणे चालले. कानाशिवायही शरीराचे कार्य थांबले नाही. हा अनुभव तमाम इंद्रियांच्या बाबतीत आला. अखेरीस प्राणाने शरीराचा निरोप घ्यायचे ठरवले तेव्हा सारी इंद्रिये हात जोडून उभी ठाकलीत. ‘आपण सर्वश्रेष्ठ आहात. आपल्याशिवाय आमचे अस्तित्व नाही. ‘भगवान प्राणरुपी. त्यामुळे शरीर टिकून आहे. तरीही लोक आळस सोडायला तयार नाहीत.

2) दुसऱ्या चरणात हे सांगितले गेले आहे की भगवंत अखंड कर्मशील आहे तरी लोक आळस झटकायला तयार नाहीत. भगवंताने कर्मयोग सोडला तर जनता त्याचे अनुकरण करील. तमोगुणी बनेल. श्रीकृष्ण व्यापक आहेत. सर्वांच्या ठायी वसलेले आहेत. कृष्णाने तथाकथित हीन कर्मांचा स्वीकार केला. हलक्या वाटणाऱ्या कामांना प्रतिष्ठा मिळवून दिली. आपल्या आचरणाने श्रमाचा महिमा वाढवला. आधुनिक युगात गांधीजींनी हेच कार्य केले ही जबाबदारी महात्म्यांवर असतेच असते.

: 24 :

*उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्।*
*संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **चेत् अहं कर्म:** जर मी कर्म
- **न कुर्यां:** केले नाही तर
- **इमे लोका:** हे सारे लोक
- **उत्सीदेयुः** नष्ट होऊन जातील, भ्रष्ट होऊन जातील
- **च:** आणि
- **संकरस्य कर्ता स्याम्:** समाजात अव्यवस्था पसरेल आणि या अव्यवस्थेचा कर्ता मीच बनून जाईल
- **इमाः प्रजाः** ही सारी प्रजा
- **उपहन्याम्:** मीच नष्ट करीन, मी घात करणारा बनेन

### अर्थ

म्हणून जर मी कर्म केले नाही तर ही सर्व माणसे नष्ट-भ्रष्ट होतील आणि मी संकरतेचे कारण होईन. तसेच या सर्व प्रजेचा घात करणारा होईन.

***सोडीन मी जरी कर्म नष्ट होतील लोक हे***
***होईन संकर-द्वारा मी चि घातास कारण।***

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी तीन मुद्दे मांडले आहेत. (1) मी कर्म केले नाही तर सारे नष्ट होऊन जातील, आळशी बनतील. (2) लोक आळशी बनले तर सगळीकडे अराजक माजेल, अव्यवस्था उपजेल. ताळतंत्र उरणार नाही. या अवस्थेला मीच जबाबदार असेन. (3) जणू मीच साऱ्या प्रजेचा नाश केला असे होईल.

### स्पष्टीकरण

1) प्रभु सर्वत्र व्याप्त आहे. अखंड जाग्रत आहे. आपण सारे झोपी जातो तेव्हा प्रभु आपल्या देहात जागतो. अवघ्या ब्रह्मांडात जागत असतो. भगवंताच्या ठायी दोन शक्ती आहेत. एक चैतन्यशक्ती दुसरी मायाशक्ती. दोन्ही अखंडपणे क्रियाशील आहेत. ज्ञानशक्ती सारे कळवून देते. क्रियाशक्तीमुळे देहात अखंडपणे क्रिया जारी रहाते. ही झाली पिंडाची अवस्था, ब्रह्मांडात म्हणजे जड सृष्टीत अखंडपणे क्रिया सुरु असते. जड सृष्टी देखिल भगवंताचे एक शरीर होय.

मुंडकोपनिषदात वर्णन येते:

***अग्निर्मूर्धा  चक्षुषी चंद्रसूर्यौ दिश: श्रोत्रे वाग्विवृताश्च***
***वेदा:। वायु: प्राणो हृदयं विश्वमस्य पद्भ्यां***
***पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा॥ (2/1/14)***

अर्थात् परमात्मा सर्व भूत-मात्रांचा अंतरात्मा होय. अग्नी त्याचे मस्तक आहे. चंद्र-सूर्य नेत्र आहेत. दशदिशा कान आहेत. चार वेद वाणी आहेत. वायु प्राण आहे. संपूर्ण ब्रह्मांड हृदय आहे. चरणापासून धरणी उद्भवली आहे. हे भगवंताचे शरीर आहे. अखंड कार्यशील आहे.

कठोपनिषदात वर्णन आहे:

***भयादस्याग्निस्तपति। भयात् तपति सूर्य:।***
***भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पंचम:॥*** (2/3/3)

अर्थात् भगवंताच्या भीतीमुळे अग्नी तापतो. सूर्य तापतो. इंद्र, वायु आणि मृत्यु आपापली कार्ये करतात.

जडसृष्टीच्या ठायी सारे कार्य अत्यंत नियमितपणे चालताना दिसून येते. उपनिषदातला ऋषी म्हणतो. सूर्य-चंद्र पर्जन्य देवता, इंद्र आणि मृत्यु सारे अखंडपणे धावताहेत. हे सारे आपापली कामे चोखपणे कशामुळे बजावताहेत? उत्तर आहे 'भगवंताच्या भयामुळे.' ज्या परमेश्वराने त्यांची निर्मिती केली आहे त्याचे स्मरण ते अहोरात्र करतात. परमेश्वराच्या आज्ञेने आपले कार्य दक्षतेने करतात. अशाप्रकारे सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्या रुपाने परमात्मशक्ती अखंडपणे कार्यशील आहे पण परमेश्वराने आपले कार्य करणे सोडून दिले तर परिणाम काय होईल बरे?

2) परिणाम असा होईल की लोक व्यवस्थितपणे चालणार नाहीत. सृष्टीच्या नियमितपणाकडे बघून लोकही नियमितपणे चालायचा प्रयत्न करतात. महा आळशी देखिल सूर्योदयानंतर अधिक काळपर्यत अंथरुणात पडून नाही रहाणार.

मागील श्लोकात सांगितले आहे की मी आळस सोडून जर कर्मे करायला लागणार नाही तर सारे लोक माझे अनुकरण करतील पण इथे एक गोष्ट सांगितली जात आहे की भगवंत जर अखंडपणे नियमित रुपाने कर्मे नाही आचरणार तर समाजात अव्यवस्था माजेल. नैतिक मर्यादा उरणार नाही. सारे स्वच्छंदी बनतील. भगवान सूर्य, चंद्र, इंद्र, हवा, पाणी, अग्नी या प्रकारे विविध रुपात कार्यरत आहे. याचा अर्थ असा की ते नैतिकतेचे पालन करताहेत. सूर्य सतत प्रकाश देतो. केळीच्या झाडावर केळीच लागतात. आंब्याच्या झाडातून आंबेच मिळतात. सर्व पदार्थांचे असे स्वरुप आहे. सृष्टीचे पदार्थ जर स्वच्छंदी होतील ना तर मग माणूसही स्वच्छंदी बनेल आणि मग सबंध सृष्टीत अव्यवस्था माजेल.

उपनिषदात भगवंताचे वर्णन असे येते: **स वा एष महानज आत्मा। योऽयं विज्ञानमय: प्राणेषु। य एषोऽन्तर्हृदय आकाशस्तस्मिन् शेते। सर्वस्य वशी, सर्वस्य ईशान: सर्वस्य अधिपति:। एष सर्वेश्वर:। एष भूताधिपति:। एष भूतपाल:। एष सेतुर्विधरणे एषां लोकानां संभेदाय।**

अर्थात् तो महान आहे. अज परमात्मा आहे. चैतन्यमय आहे. ज्ञानस्वरुपी आहे. हृदयाकाशात वसतो. सर्वांचा ईश्वर

आहे, स्वामी आहे. पतनापासून तारण्यासाठी सेतुरुप आहे. अखंड कर्मरत भगवंत मर्यादापालक आहे. स्वच्छंदी नाही. कर्मरत माणूसही स्वच्छंदी बनणार नाही. निष्क्रियतेमुळे शिथिलता जागते. पतन होते. नाव संन्यासाचे घ्यायचे, भगवे नेसायचे आणि निष्क्रिय भटकायचे, यातून अनाचार वाढतो. व्यसने बळावतात. कर्मांचा हा मोठा उपकार आहे की त्यामुळे माणूस नैतिकदृष्ट्या अध:पतीत होत नाही. स्वच्छंदतेमुळे अंततोगत्वा समाजाचा ह्रास होतो. भगवंतच समाजाच्या नाशाला वा अव्यवस्थेला जबाबदार आहेत.

3) स्वच्छंदतेने अशी हानी होईल की अंततोगत्वा समाजाचा नाश होईल. श्रीकृष्ण जबाबदार आहेत. ते नैतिक आचरणाचे धनी आहेत. आदर्शसंपन्न आहेत. मर्यादित जीवनचर्या आहे त्यांची. ते गोपींमध्ये रमतात. अति अलिप्त आहेत. त्यांची प्रत्येक क्रिया आदर्श आहे. त्यांचा समकालीन समाज सुव्यवस्थित आहे. धार्मिक व नैतिक दृष्टीने उच्च श्रेणीचा आहे.

: 25 :

*सक्ता: कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत।*
*कुर्याद् विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **कर्मणि सक्ता:** जे कर्मात आसक्त आहेत
- **अविद्वांस:** असे अज्ञानी पुरुष
- **यथा:** ज्या प्रकारे
- **कुर्वन्ति:** (कर्मे) करतात
- **तथा:** त्या प्रकारे
- **लोकसंग्रहं चिकीर्षु:** लोकसंग्रहाचे इच्छुक
- **विद्वान् असक्त: कुर्यात्:** ज्ञानी पुरुषाला अनासक्त राहूनच कर्मे करायला हवीत

**अर्थ**

हे भारता, कर्मात आसक्त असलेले अज्ञानी लोक ज्या रीतीने कर्मे करतात त्याच रीतीने आसक्ती नसलेल्या विद्वानानेही लोकसंग्रह करण्याच्या इच्छेने कर्मे करावीत.

*गुंतूनि करिती अज्ञ ज्ञात्यानें मोकळेपणें*
*करावें कर्म तैसें चि इच्छुनी लोक-संग्रह।*

**विषय:** या श्लोकात दोन बाबी येतात. (1) अज्ञानीजन कर्मासक्त होऊन कर्मे करतात. (2) ज्ञानी पुरुषाला अनासक्त भावनेने लोकसंग्रह साधायच्या दृष्टीने कर्मे आचरायला हवीत.

**स्पष्टीकरण**

1) आसक्ती दोन प्रकारची असते. देह, इंद्रिये, मन, बुध्दी आदि स्वदेहासंबंधीची आसक्ती. दुसरी जगताशी संबंधित. ही आसक्ती सर्वाच्या ठायी असते. याचे मूळ कारण अध्यास आहे. अध्यास म्हणजे काय? शंकराचार्यानी 'ब्रह्मसूत्र-भाष्य' ग्रंथाच्या आरंभी याचे सुरेख स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणतात: अध्यासो नाम अतस्मिंस्तद्बुध्दि-रित्यवोचाम्। अर्थात् जे नाही त्याच्या ठायी आहे अशी बुध्दी वागवणे म्हणजे अध्यास होय. दोरीत सर्प नसतानाही दोरीत सर्प आहे अशी बुध्दी करणे. याला उदाहरण देऊन ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात:

**तद्यथा पुत्रभार्यादिषु विकलेषु सकलेषु वा अहमेव विकल: सकलो इति बाह्यधर्मान् आत्मनि अध्यस्यति। तथा देहधर्मान् स्थूलोऽहं, कृशोऽहं, गौरोऽहं, तिष्ठामि, गच्छामि, लंघयामि च इति। तथा इंद्रियधर्मान् मूक:, काण:, क्लीब:, बधिर:, अंध:, अहमिति। तथा अंत:करणधर्मान् काम-संकल्प-विचिकित्साऽध्यवसायादीन्।** अर्थात् परिवाराच्या दु:खात स्वत:ला दु:खी मानणे. बाह्य धर्माचे स्वत:वर आरोपण करणे म्हणजे अध्यास करणे. स्वत:ला लठ्ठ वा कृश मानणे, स्थूल वा सूक्ष्म मानणे अशाप्रकारे देहधर्माचा स्वत:च्या ठायी अध्यास करणे. स्वत:ला आंधळा, बहिरा, मुका अशाप्रकारे इंद्रियांच्या धर्माचा अध्यास करणे. त्याचप्रमाणे इच्छा, नाना प्रकारचे संकल्प, नाना प्रकारच्या शंका-कुशंका, निश्चय वगैरे मानसिक धर्मांचा आपल्या ठायी अध्यास करतात.

श्री शंकराचार्य पुढे लिहितात: **एवं अहंप्रत्ययिनं अशेषस्वप्रकाशसाक्षिणि प्रत्यगात्मनि अध्यस्य तं च प्रत्यगात्मानं सर्वसाक्षिणं तद्विपर्ययेण अंत:करणादिषु अध्यस्यति।एवंअनादिरनन्त:नैसर्गिक:अध्यास:मिथ्या-प्रत्ययरुप: कर्तृत्व-भोक्तृत्वप्रवर्तक: सर्वलोकप्रत्यक्ष:। अस्य अनर्थहेतो: प्रहाणाय आत्मैकत्वविद्याप्रतिपत्तये सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते। तथा च अयं अर्थ सर्वेषां वेदान्तानां तथा वयं अस्यां शारीरिकमीमांसायां प्रदर्शयिष्याम:।**

अर्थात् अशाप्रकारे ‘मी’ पणाचा जिथे अनुभव येतो त्या मनाला, जीवाला त्या सर्व मनोवृत्तींचा साक्षीभूत प्रत्यगात्मा म्हणजे परमेश्वर आहे त्यात अध्यास म्हणजे आरोपणकरुन त्या परमेश्वराहून विपरीत आहे मन त्यावर आणि बुध्दी, इंद्रिये वगैरेंवर अध्यास करतो. याप्रमाणे अनर्थाचे कारण असे जे अध्यास आहे ते नष्ट करण्यासाठी वेदांताचा म्हणजे उपनिषदांचा आरंभ झाला आहे. सर्व उपनिषदात हे रहस्य उद्घाटित केले गेले आहे. त्या प्रकारे तसाच अभिप्राय आम्ही शारीरक म्हणजे शरीरस्थित आत्म्याची मीमांसा करत आहोत. यासाठी ब्रह्मसूत्राचा शोध घेणारे भाष्य लिहित आहोत.

शंकराचार्यांच्या मतानुसार संपूर्ण लोकात दोन प्रकारचा अध्यास सुरु आहे. (1) एक, बाह्य जगताच्या संदर्भात (2) दुसरा, आपल्या देहाच्या बाबतीत. या दोन अध्यासांबद्दल मनात आसक्ती जागते. जगाचे दोन भाग आहेत एक पिंड दुसरा ब्रह्मांड. पिंड म्हणजे शरीर वा देह. शरीरदेखिल ब्रह्मांडाचाच एक भाग होय. ब्रह्मांडात पाच भौतिक पदार्थ आढळतात. शरीरसुध्दा पंचमहाभूतांनी बनलेले आहे. शरीरात चैतन्यरुपी परमात्मा नांदतो. परमात्मस्वरुप तत्व पशु-पक्षी, प्राणिमात्र, कीडा मुंगीत नांदते. यांना वगळून अन्य पदार्थात चैतन्य नांदते ते गुप्त रुपात. तमाम पदार्थांच्या ठायी अग्नी कसा गुप्तरुपाने नांदतो तसा, तर कुठे अप्रकट स्वरुपात चैतन्य नांदते म्हणजे पिंड आणि ब्रह्मांडात एकच परमात्मा कधी प्रकट तर कधी अप्रकटपणे वसतो. तरी आपल्याला त्याचे भान नसते. जाणून घेतल्यावरही वारंवार आपण विसरुन जातो. पिंड-ब्रह्मांडरुपी जगालाच सत्य मानून बसतो. शंकराचार्यांच्या मते या दोन प्रकारच्या अध्यासामुळे पिंड-ब्रह्मांडाविषयी आपल्या मनी आसक्ती रहाते.

2) विनोबा म्हणतात की आंतरिक शुध्दी करणारे विकर्म आणि बाहेरुन स्वकर्तव्यरुपी कर्म दोघांच्या आचरणातून आसक्ती सुटेल पण हा विचार अज्ञानी जनांना कुणी बरे समजाऊन सांगावा? ज्ञानवंत जनच अज्ञानी जनांना समजाऊन सांगू शकतात. अर्थात् त्यांनाही कर्माचरण करुनच हे समजाऊन सांगावे लागेल. यामुळे असे सांगतात की अज्ञानी जन आसक्तीमुळे कर्मे करतात. ज्ञानी जन लोकसंग्रहार्थ कर्मे करतात. लोककल्याणाची दृष्टी मनी राखूनच कर्मे आचरत रहायला हवीत. ज्ञानीजन निष्क्रिय राहू लागले तर मग अज्ञानी लोकांची आसक्ती कुणी दूर सारावी? अध्यास दूर करुन आसक्ती मिटवण्याचा उपाय त्यांनी सुचवायला हवा. कर्मरत राहून ज्ञानीजन जगाच्या जटिल प्रश्नांची प्रत्यक्ष उकल समजाऊन सांगू शकतील पण तेच जर व्यवहार विन्मुख रहातील तर हे काम कोण करील? व्यवहारासक्त जनांचा निर्णय प्रत्येक क्षणी खरा असेलच असे नाही सांगता येणार. यामुळे ज्ञानीजन अज्ञान, आसक्ती, दुर्गुण, दोष, उणिवा दूर करु शकतात. यामुळे ज्ञानी जनांनी लोकसंग्रहाची दृष्टी बाळगून खऱ्या मार्गदर्शनासाठी कर्म-रत रहायलाच हवे.

लोकसंग्रह शब्द विसाव्या श्लोकात आणि या पंचविसाव्या श्लोकात आला आहे. संपूर्ण गीतेत हा शब्द या दोन ठिकाणी आला आहे. लोकसंग्रहाची सर्वात अधिक जबाबदारी ज्ञानवंताची असते. त्याला परमात्म ज्ञानाची प्राप्ती झालेली असते.

लोकसंग्रहाची जबाबदारी ज्ञानी पुरुषांची असते तशीच अज्ञानी जनांचा बुध्दीभेद होऊ नये हीही जबाबदारी असते. ज्ञानी पुरुष हे सारे बघतो. यानुसार चालतो.

: 26 :

*न बुध्दिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्।*
*जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान युक्त: समाचरन्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कर्मसंगिनां अज्ञानाम्:** कर्मात आसक्त अज्ञानी पुरुषांचा
- **विद्वान बुध्दिभेदं न जनयेत्:** ज्ञानी पुरुषाने बुध्दीभेद करु नये
- **विद्वान युक्त:** ज्ञानी पुरुषांना निष्काम बनून
- **समाचरन् सर्वकर्माणि जोषयेत्:** अज्ञानी जनांकडून सर्व प्रकारची कर्मे करवून घ्यायला हवीत

**अर्थ**

परमात्मरुपात स्थिर असलेल्या ज्ञानी पुरुषाने शास्त्रविहित कर्मात आसक्ती असलेल्या अज्ञानी लोकांच्या बुध्दीत भ्रम म्हणजेच कर्माविषयी अश्रध्दा निर्माण करु नये. या उलट स्वत: शास्त्रविहित सर्व कर्मे उत्तम प्रकारे करीत त्यांच्याकडूनही तशीच करुन घ्यावी.

*नेणत्या कर्म-निष्ठांचा बुध्दि-भेद करुं नये*
*गोडी कर्मांत लावावी समत्वें आचरुनि तीं।*

**विषय:** या श्लोकात दोन मुद्दे येतात. (1) कर्मात फसलेल्या अज्ञानी जनांचा बुध्दीभेद करायला नको. (2) ज्ञानवंतांनी सत्कर्मे स्वत: आचरणात आणावीत आणि अज्ञानी जनांकडून सत्कर्मे करवून घ्यावीत.

**स्पष्टीकरण**

1) स्थितप्रज्ञ शब्दाप्रमाणे लोकसंग्रह हा शब्दही गीतेशिवाय अन्यत्र नाही, उपनिषदातही नाही. लोकसंग्रह शब्द आज समाजात खूप प्रचलित झाला आहे. अशाच प्रकारे बुध्दीभेद शब्दही उपनिषदात नाही. गीतेत तो एकदाच आला आहे.

सामान्य माणसाच्या ठायी अज्ञान आणि असंयमाच्या आचार-विचारात परस्पर विरोध दिसतो. कधी कधी वा बहुधा आचार विचारात परस्पर विरोध दिसतो. आचार-विचारात काही अंतर तर असेलच पण फार असू नये. आचार-विचारातले अंतर वा विरोध कमी कसे होऊ शकेल? ज्ञानी पुरुष आचार विचारात योग्य तो मेळ साधतात. त्यांच्या आचरणातून अज्ञजनांच्या आचार-विचारातले अंतर कमी केले जावे. केवळ उपदेशाद्वारे हे अंतर कमी नाही करता येणार!

ज्ञानी पुरुषांच्या आचार-विचारात जेव्हा तफावत असते तेव्हा समाजात बुध्दीभेद उपजतो. बुध्दीभेद म्हणजे बुध्दीच्या ठायी असामंजस्य जागणे. बुध्दी विचलित होणे. गोंधळ उत्पन्न होणे. प्रचंड उग्र तपाचरणाने परमात्म्याची अनुभूती जागते. ज्ञान प्राप्त होते. ज्ञानी जन तपाचरणहीन बनले तर अज्ञ समाजाच्या ठायी बुध्दीभेद जागेलच. महापुरुषांची प्रत्येक कृती आचरणयोग्य असावी, अनुकरणीय असावी. महापुरुषांचे भोजन साधे-सात्विकच असायला हवे.

2) यामुळे भगवंताचे असे म्हणणे आहे की महापुरुषांचे आचरण निरपवादपणे श्रेष्ठ असावे तरच ते तसा समाज घडवू शकतील. समाजाचा बुध्दीभेद होऊ नये यासाठी गांधीजी कमालीचे दक्ष होते. ते नित्याने डायरी लिहित व अखंडपणे प्रात:कालीन व सायंकालीन प्रार्थनेला हजर रहात. आश्रमातील सर्वांनीच डायरी लिहावी आणि प्रार्थनेत सहभागी व्हावे असे त्याना वाटत असे.

: 27 :

***प्रकृते: क्रियमाणानि गुणै: कर्माणि सर्वश: ।***
***अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- प्रकृते: गुणै: प्रकृतीचे गुण म्हणजे शरीर आणि दशेंद्रियांनी
- **सर्वश: क्रियमाणानि:** सर्व प्रकारे केल्या जाणाऱ्या
- **कर्माणि अहं कर्ता:** कर्मांचा कर्ता मीच आहे
- **इति अहंकारविमूढात्मा:** अशाप्रकारे अहंकाराने देह, इंद्रियांच्या अभिमानाने ज्यांचे चित्त विमूढ वा मोहित होऊन गेले आहेत
- **मन्यते:** मानतात

**अर्थ**

वास्तविक सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीच्या गुणांमार्फत केली जातात तरीही ज्याचे अंत:करण अहंकाराने मोहित झालेले आहे असा अज्ञानी पुरुष 'मी कर्ता आहे' असे मानतो.

***कर्में होतात हीं सारीं प्रकृतीच्या गुणांमुळें***
***अहंकार-बळें मूढ कर्ता मी हें चि घेतसे ।***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्यांची चर्चा येते. (1) निसर्गनिर्मित देह आणि दहा इंद्रियांच्या माध्यमातूनच सर्व क्रिया सर्व प्रकारे घडतात. (2) अज्ञानी देह इंद्रियांच्या ठायी आसक्त असतो. स्वत:लाच तमाम क्रियांचा कर्ता मानतो.

**स्पष्टीकरण**

इथे 'निसर्ग' शब्द प्रयुक्त झाला आहे. मूळ गीतेतला 'प्रकृती' हा शब्द आहे. कपिल महामुनि आपल्या सांख्यशास्त्रात निसर्गाला सृष्टीकर्ता मानतात. जड असतानाही निसर्गाच्या ठायी सत्व-रज-तम हे त्रिगुण वसतात. या त्रिगुणांच्या मदतीनेच ते जगाला उत्पन्न करतात. गीतेच्या चौदाव्या अध्यायात या त्रिगुणांच्या कार्य आणि लक्षणांचे तपशिलवारपणे वर्णन येते. शरीर-इंद्रिये देखिल निसर्ग निर्मितच आहेत. गीता निसर्गाला स्वतंत्र नाही मानत. निसर्ग जड असल्यामुळे चैतन्य वा चैतन्यस्वरुपी परमेश्वराच्या अभावी जगताची निर्मिती नाही करु शकत.

यामुळे सांख्य या तत्वाला 'प्रकृती' म्हणते पण या तत्वाला गीता 'माया' म्हणते. माया परमेश्वराची अलौकिक अशी शक्ती आहे. मायेला सर्गशक्ती किंवा क्रियाशक्ती असेही म्हणता येईल. सर्गशक्ती म्हणजे जगाला उत्पन्न करणारी आणि त्याचा भास करवणारी शक्ती होय. ही शक्ती परमेश्वराहून स्वतंत्र असते. परमेश्वराधीन असते. परमेश्वर चैतन्यस्वरुपी असतो. ज्ञानस्वरुपी असतो. अशाप्रकारे परमेश्वराच्या ठायी दोन शक्ती वसतात. एक ज्ञानशक्ती म्हणजे चैतन्यशक्ती आणि सर्ग शक्ती म्हणजे मायाशक्ती-मायेवर चैतन्याचे नियंत्रण असते. मायाशक्ती जगताची निर्मिती करते. ही शक्ती देह, इंद्रियांना जन्म देते. यामुळे शरीर वा इंद्रियांच्या माध्यमातून जेवढ्या काही म्हणून क्रिया घडतात त्यांचे कर्तेपण प्रकृतीकडेच जाते.

या श्लोकात 'प्रकृतीचे गुण' असा शब्दप्रयोग आला आहे. इथे गुण म्हणजे सत्व-रज-तम हे तीन गुण होत. पुढे अठ्ठाविसाव्या श्लोकात आलेल्या 'गुण' शब्दाचा अर्थ आहे इंद्रिये. इंद्रिये म्हणजे दहा इंद्रिये आणि शरीर. त्रिगुणात्मक प्रकृतीने देह आणि इंद्रियांना जन्म दिला आहे. त्यांच्या माध्यमातून सर्व क्रिया घडतात, सारी कर्मे घडतात.

कर्म वा क्रिया देह आणि इंद्रियांच्या द्वारे घडतात पण देह व इंद्रियांचा संचालक-देहात वसणारा कुणी आहे की नाही? याचे उत्तर आहे. आहे तर! देहस्थित आत्मा वा परमात्मा संचालक आहे. तो देह आणि इंद्रियांचा ज्ञाता आहे, कर्ता नव्हे. त्याचे दुसरे नाव आहे 'मी'. हा 'मी' कोण? तर मी म्हणजे ज्ञाता वा आत्मा वा परमात्मा होय. पण ज्ञातेपणाचा अनुभव नसल्यामुळे 'मी' आपले ज्ञातेपणाचे रुप विसरुन जातो. शरीर व इंद्रियांच्या समुदायालाच आत्मस्वरुपी मानू लागतो. देह आणि इंद्रियांची सारी कर्मे स्वत:वर पांघरुन घेतो आणि कर्माचा ज्ञाता बनून बसतो. या तमाम क्रियांमध्ये 'मी केवळ ज्ञाता आहे' ही ज्ञातेपणाची भूमिका उरत नाही." हीच गोष्ट या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात सांगितली गेली आहे.

यासाठी शब्द आला आहे 'अहंकार विमूढात्मा' ज्ञातेपणाच्या स्वरुपाला विसरुन जायचे स्वत:ला कर्ता मानायचे हा झाला अहंकार. अशा अहंकाराने मूर्च्छित आत्म्याला 'विमूढात्मा' असे म्हणतात. भ्रम वा भ्रांती म्हणजे मूढता. मूढपणा म्हणजे मूर्च्छा. या मूढतेलाच अज्ञानी अवस्था असे म्हणतात.

: 28 :

*तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयो: ।*
*गुणा गुणेषु वर्तन्ते इति मत्त्वा न सज्जते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु महाबाहो:** पण हे महापराक्रमी अर्जुना
- **गुणकर्मविभागयो:** गुण आणि इंद्रिये म्हणजे कर्म म्हणजे इंद्रियांची कर्मे, दोन्ही माझ्यापेक्षा भिन्न आहे, अशा विभागाला
- **तत्त्वविद्:** ओळखणारा ज्ञानवंत
- **गुणा: गुणेषु वर्तन्ते:** दहा इंद्रिये आपापल्या विषयात प्रवृत्त होत असतात
- **इति मत्त्वा न सज्जते:** असे समजून (त्याठायी) आसक्त होत नाही

**अर्थ**

पण हे महाबाहो, गुणविभाग आणि कर्मविभाग (त्रिगुणात्मक मायेची कार्यरुप पाच महाभूते, मन, बुध्दी, अहंकार, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे पाच विषय या सर्वांच्या समुदायाला 'गुणविभाग' असे नाव आहे आणि यांच्या परस्परांशी होणाऱ्या क्रियांना 'कर्मविभाग' असे नाव आहे.) यांचे तत्त्व जाणणारा (गुणविभाग आणि कर्मविभागाहून आत्मा निराळा असून तो निर्लेप आहे असे जाणणे हेच माझे तत्त्व जाणणे आहे.) ज्ञानयोगी सर्व गुणच गुणात वावरत असतात हे लक्षात घेऊन त्यामध्ये आसक्त होत नाही.

*गुण हे आणि हीं कर्मे ह्यांहुनी वेगळा चि मी*
*जाणे तत्त्व-ज्ञ गुंते ना गुणांत गुण वागतां ।*

विषय: या श्लोकात ज्ञानी माणसाची लक्षणे सांगितली गेली आहेत. ज्ञानी माणूस कसे वर्तन करतो ते सांगितले गेले आहे. या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. (1) इंद्रिये व त्यांच्या कर्मापासून ज्ञानी आपल्या स्वरुपाला वेगळे समजतो. (2) इंद्रिये आपापल्या विषयात प्रवृत्त होतात असे मानतो. (3) यामुळे इंद्रिये, त्यांची कर्मे आणि इंद्रियांच्या विषयात ज्ञानी आसक्त होत नाही. ज्ञानी पुरुषाचे असे हे त्रिविध स्वरुप आहे.

**स्पष्टीकरण**

1) गुणकर्मविभागयो: **तत्त्वविद्** गुण म्हणजे दहा इंद्रिये होत. कर्म म्हणजे दहा इंद्रियांची कर्मे. अज्ञानावस्थेत दहा इंद्रिये आणि त्यांच्या कार्याशी आपण स्वत:ला नेहमी एकरुप अनुभवतो. या इंद्रियांपासून वा त्यांच्या कार्यापासून आपण सर्वथा भिन्न असल्याचा अनुभव आपल्याला कदापि येत नाही. इंद्रियांच्या कार्याचे आपण स्वत:लाच कर्ता मानतो. मन-बुध्दीच्या कार्यासाठीही स्वत:लाच कर्ता समजतो. या श्लोकातून ज्ञानदशेचे वर्णन आले आहे. इंद्रिये आणि त्यांच्या कार्यापासून मी सर्वथा वेगळा आहे. मी कर्ता नाही. मी ज्ञाता आहे. असा विवेक करणारा, वेगळेपण अनुभवणारा तत्वचिंतक, तत्वज्ञ काय अनुभव घेतो त्याची इथे चर्चा केली गेली आहे.

**2) गुणा: गुणेषु वर्तन्ते:** 'गुणा:' म्हणजे गुण म्हणजे सर्व अंतर्बाह्य इंद्रिये. 'गुणेषु' म्हणजे आपापल्या विषयांमध्ये. 'वर्तन्ते' म्हणजे वर्तन करतात. हा अनुभव ज्ञात्याला होतो. पूर्वेकडे एक गाव वसला आहे. त्या गावाकडे आपल्याला जायचे आहे पण पूर्व दिशेचे ज्ञान जर नसेल तर आपण पश्चिमेकडे चालायला लागू. या चालण्यातून का पूर्वेकडचा गाव गाठता येईल ? हे झाले अज्ञान पण यामुळे पूर्व वा पश्चिम दिशेत काही फरक पडत नाही. पूर्व दिशेला पूर्व मानून चालत राहिलो तरी चालावे लागलेच असते. पूर्वेला पश्चिम समजून चालत राहिलो तरीही चालावे लागले असते पण पूर्वेला पूर्व मानून चालत राहिलो असतो तर गाव गाठता आले असते. चालणे सफल झाले असते. पश्चिमेला पूर्व मानून चालत राहिलो आणि आपले चालण्याचे श्रम वाया गेले. आनंदलाभ झाला नाही. उलटपक्षी दु:ख अनुभवावे लागले. अशा प्रकारे देहाला वा इंद्रियांना आत्मस्वरुपी समजणे म्हणजे पश्चिमेला पूर्व मानून चालण्यासारखे झाले. बंधनापासून मुक्ती म्हणजे मोक्षाच्या ठिकाणी आपल्याला पोहोचायचे आहे. तिथे आपण पोहोचू शकत नाही यामुळे दु:ख उत्पन्न होते.

पूर्व आणि पश्चिम दिशा स्वस्थानी रहातात ना तसेच देह आणि आत्म्याचेही आहे. मी चैतन्यस्वरुपी आहे. देह जडरुपी आहे. मी चैतन्यस्वरुपी असल्यामुळे देह, मन, बुध्दी, इंद्रिये सर्वांना जाणतो. जगातल्या तमाम पदार्थांना जाणतो. मी ज्ञाता आहे. मी कर्ता नाही. देह ज्ञाता नाही. देहाला कुणी जाणू शकतो. जाणणे आणि जाणण्याचा विषय असणे हे दोन विषय आहे. देह, इंद्रिये मन जाणून घेता येतात. आपण त्यांना जाणतो. आपण ज्ञाता. देह, इंद्रिये, मन जाणून घेण्याचे विषय म्हणजे ज्ञेय होत.

यामुळे तत्वज्ञाच्या मनाशी एक खुणगाठ पक्की असते की **गुणा गुणेषु वर्तन्ते** इंद्रिये आपापल्या विषयात व्यवहार करतात. व्यवहार करणे इंद्रियांचा स्वभाव आहे. डोळे बघतात. कान ऐकतात. नाक सुगंध घेतात. जीभ रसज्ञान करवते. मन चिंतन करते. या स्वभावांना इंद्रिये सोडू शकत नाहीत. सोडायची काही गरजही नाही. आपला संबंध ना इंद्रियांशी ना त्यांच्या कर्माशी. आपण यापासून भिन्न आहोत हे कळायला हवे. ज्ञानी पुरुषाची अशी ओळख असते, असा परिचय असतो.

3) ज्ञानी पुरुष ना इंद्रियांनी वेढले जात वा ना त्यांच्या विषयात फसत. यात आसक्त होत नाहीत. देहापासून स्वत:ला वेगळे समजत असल्यामुळे ते देहात आसक्त होत नाहीत. कठोपनिषदात एक श्लोक येतो:

*अंगुष्ठमात्र: पुरुषोऽन्तरात्मा*
*सदा जनानां हृदये संनिविष्ट: । तं स्वाच्छरीरात्प्र*
*वृहेन्मुंजादिवेषीकां धैर्येण तं विद्याच्छुक्रममृतं तं*
*विद्याच्छुक्रममृतमिति ॥ (2/3/17)*

अर्थात् हा पुरुष म्हणजे ईश्वर अंगठ्याएवढा आहे. मानवी हृदयात विराजमान आहे. शरीरापासून आत्मतत्वाला धैर्यपूर्वक वेगळे करायला हवे. आत्मा आणि परमात्मा विशुध्द आणि अमर जाणायला हवेत. या श्लोकातून उपनिषदाचा ऋषी बोलला की परमात्मा हृदयमंदिरात प्रवेश करतो. देहरुपी घरात वेगळा रहातो पण तसे काही आपल्याला वाटत नाही.

: 29 :

*प्रकृतेर्गुणसंमूढा: सज्जन्ते गुणकर्मसु ।*
*तानकृत्स्नविदो मन्दान् कृत्स्नविन्न विचालयेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रकृते: गुणसंमूढा:** निसर्गद्वारा निर्मित इंद्रियांनी जे मोहित होऊन गेलेत ते
- **गुणकर्मसु सज्जन्ते:** इंद्रिये आणि त्यांच्या कार्यात आसक्त होतात

- **तान् अकृत्स्नविदः मंदान्:** अशा अज्ञानी, मंद, मोहित पुरुषांना
- **कृत्स्नवित् न विचालयेत्:** सर्वज्ञ ज्ञानीपुरुषाने विचलित करु नये

### अर्थ

प्रकृतीच्या गुणांनी अत्यंत मोहित झालेली माणसे गुणात आणि कर्मात आसक्त होतात. त्या चांगल्या रीतीने न जाणणाऱ्या मंदबुध्दीच्या अज्ञान्यांचा पूर्ण ज्ञान असणाऱ्या ज्ञानवंताने बुध्दीभेद करु नये.

*गुंतले गुण-कर्मी जे भुलले प्रकृती-गुणें*
*त्या अल्प जाणणारांस सर्वज्ञें चाळवूं नये।*

**विषय:** या श्लोकातून तीन गोष्टींची चर्चा येते. (1) प्रकृती वा मायेने इंद्रिये आणि शरीराची निर्मिती झाली. यात जे मोहित झालेले आहेत (2) आणि यामुळेच इंद्रिये त्यांचे विषय आणि कारणांच्या ठायी जे आसक्त होतात (3) त्या अज्ञानी आणि मोहित पुरुषांना सर्वज्ञ लोकांनी म्हणजे आत्मज्ञानी पुरुषानी विचलित करु नये.

### स्पष्टीकरण

**1) प्रकृतेः गुणसंमूढाः** कपिल महामुनींनी सांख्यशास्त्र रचले. त्यांच्या मते प्रकृतिने साऱ्या जगाची निर्मिती केली आहे. गीता या प्रकृतीला माया असेही म्हणते. सांख्यशास्त्राच्या मते प्रकृती स्वतंत्र आणि जडतत्व आहे. गीता मायेला स्वतंत्र तत्व मानत नाही. परमेश्वराचीच अलौकिक शक्ती मानते. माया परमेश्वराच्या अधीन राहून कार्य करते. या मायेने गुण निर्माण केलेत म्हणजे देह, इंद्रियांचा समुदाय आणि पंचविषय निर्माण केलेत. माणूस स्व स्वरुपाला ओळखत नाही. मायेद्वारा निर्मित देह आणि इंद्रियसमूहाने मोहित होतो. सुखाऐवजी त्याला दुःख होते. या मोहजाळातून बाहेर पडण्यासाठी धडपड करतो. तहानलेली व्यक्तीच पाण्याचा शोध घेते. खूप तहान लागली असते तरच पाणी पिण्याचा आनंद. भगवंताने इंद्रियांचे जाळे आणि विषयांचे स्वरुप असे बनवले गेले आहे की सारेच मोहित होतात. इंद्रियांना जर विषयांचे आकर्षण नसले तर विषयांच्या त्यागात जो आनंद मिळतो तो कदापि मिळू शकणार नाही. आपण जेव्हा विषयासक्त बनतो तेव्हा आसक्ती सोडून अनासक्तीचा आनंद लुटू शकतो. इंद्रियांसाठी विषयांचे आकर्षण स्वाभाविक असेच आहे.

**2) यामुळे सज्जन्ते गुणकर्मसु:** इंद्रियांमध्ये आणि त्यांच्या चालणाऱ्या तमाम व्यापारांमध्ये माणसे गुरुफटून जातात. कुठल्याही बऱ्या-वाईट गोष्टींच्या आकर्षणात लोक अडकतात. यामुळे तात्कालिक स्वरुपाचा आनंद लाभतो, तो काही दीर्घकालीन आनंद असू शकत नाही. प्रतिकूल परिस्थितीमुळेही त्यात अडचण येते. मग कुठे त्या आनंदाचे क्षणिकत्व ध्यानी येते. यातून विषयासक्ती कमी करण्याकडे माणसाचे लक्ष जाते. मग सत्संग, शास्त्राभ्यास यासारख्या गोष्टींकडे त्याचे लक्ष जाते.

3) मग भगवंत असे म्हणतात की **तान् अकृत्स्न-विदः मंदान् अज्ञानी** जन मंद वा मूढ असतात. विषयाने मोहित असतात. त्याना **कृत्स्नवित् न विचालयेत्** -- सर्वज्ञ वा ज्ञानी पुरुषांनी त्यांची कर्मविषयक श्रध्दा विचलित करु नये. कठोपनिषदातून मंद म्हणजे मूढ बनण्याच्या कारणांची चर्चा येते :

***श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ संपरीत्य विविनक्ति धीरः।***
***श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते प्रेयो***
***मन्दो योगक्षेमाद् वृणीते॥ (1/2/2)***

अर्थात् माणसाला श्रेय आणि प्रेयाची नेहमी प्राप्ती होत असते. धीर म्हणजे विवेकी वा ज्ञानी पुरुष दोघांचे विश्लेषण करतो. दोघांना पृथक्-पृथक् करतो. प्रेय ऐवजी श्रेयाची निवड करतो पण मंद, मूढ वा अज्ञानी जन इंद्रियांच्या योगक्षेमाचा विचार करतात. विषयोपभोगाचा विचार करतात. प्रेय म्हणजे प्रिय वस्तुनाच पसंत करतात.

आपल्या समोर इंद्रिये आहेत आणि विषय आहेत. परमात्मा मात्र पाठीमागे उभा ठाकला आहे. इंद्रियांची प्रेरणा प्रेम बघते. भोगांकडे वळते. आत्मतत्वाची प्रेरणा श्रेयाकडे बघते. कल्याणाकडे वळते. श्रेय करायचा आपण निश्चय करु या मग ते प्रेय नसले तरी चालेल. यात अडचणी खूप येतील मग मार्ग हा सत्याचा असेल. मार्ग हा सुरक्षित असेल. परमात्म्याच्या प्रेरणेने परमात्म्याच्या अधीन बनून चालू लागलो तर आपले जीवन कल्याणमय होईल पण परमेश्वराच्या प्रेरणेची पर्वा न करता जो इंद्रियांच्या अधीन असेल आणि इंद्रियांच्या प्रेरणेनेच चालत राहील त्याचे जीवन असुरक्षित राहील. अखेरीस दुःखद ठरेल.

ज्ञानी पुरुष कदापि इंद्रियांच्या अधीन होत नाही. अशा ज्ञानीजनांनी अज्ञानी जनांशी कसे वागावे-वर्तावे हा महत्वाचा प्रश्न आहे. भगवंत म्हणतात की अज्ञानी जनांना इंद्रियांपासून परावृत्त करुन ईश्वराभिमुख कसे करायचे हा प्रश्न आहे. हे काम हळूहळू करावे लागेल. त्यांच्या श्रध्देला धक्का न लावताच हे करावे लागेल. ज्ञानी पुरुषांच्या प्रवचनाने नव्हे तर आचरणाने अज्ञानी प्रभावित होतील. यामुळे अज्ञानी जनाना प्रभावित करण्यासाठी ज्ञानी जनांच्या आचरणात परिवर्तन झाले पाहिजे हे भगवंत म्हणतात. या आचरणावर भगवंताचा खूप भर आहे.

लोकसंग्रहाचे हे प्रकरण विसाव्या श्लोकापासून सुरु झाले आहे. आपले स्वत:चे व जनक राजाचे उदाहरण भगवंताने दिले. ज्ञानवंताचे आचरण अति आदर्शमय असावे, ‘आपल्याला आता आत्मज्ञान झाले, आचरणात ढील दिली तरी चालेल’ असे ज्ञानीजन जर म्हणू लागले तर हे बरे नव्हे. यामुळे समाजाची बुध्दी विचलित होईल. बुध्दीभेद होईल. अज्ञानी जनांचे यामुळे अकल्याण होईल. यासाठी ज्ञानवंताने स्वत:ला अपवादभूत मानू नये. विशेषत: कर्माचरणाच्या बाबतीत तर त्याने मुळीच सवलत मागू नये. कमालीचे सावध असावे. त्याच्या अकर्मण्यतेमुळे समाजाचे मोठे नुकसान होईल. त्याच्या अखंड कर्मशीलतेचा प्रत्यय अज्ञानीजनांना यावा. अज्ञानावस्थेत आळस म्हणजे तमोगुण तर असतोच. यामुळे अज्ञानी काम कमी करतील हे समजून घेता येईल पण ज्ञानावस्थेत ना तमोगुण ना आळस असत. सत्वगुणाच्या उत्कर्षासोबतच ज्ञानप्राप्ती होते यामुळे ज्ञानवंताचे काम अधिक हवे. अधिक सुंदरही हवे.

ज्ञानी म्हटला म्हणजे निवृत्तीपरायणच असतो अशी समाजमनाची विचित्र धारणा झाली आहे. लोकांच्या उध्दारासाठी अहोरात्र कर्म करणाऱ्या पुरुषाला पूर्णरुपाने ज्ञानी समजण्याची प्रवृत्ती समाजाच्या ठायी नाहीच. याचा अर्थ असा झाला की कर्म मजबूरीने करत रहावे. एक तर आत्मज्ञान नसते, म्हणजे अज्ञान असते अशावेळी कर्म केल्याशिवाय का कुठला उपाय उरतो ? यामुळे कर्म करणे ही गौरवाची बाब नव्हे या चुकीच्या मनोधारणेचे कारण आपले पूर्वजच होत. प्राचीन काळी संन्यास धर्म श्रेष्ठ मानला गेला. संन्यास शब्दाचा अर्थ ‘नाना प्रकारच्या संकल्पांचा संन्यास‘ असा असायला हवा पण तो तसा न होता ‘कर्म करु नये‘ असा चुकीचा अर्थ रुढ झाला. मोजकेच कर्मपरायण ज्ञानी बनून गेले पण मुख्यत्वेकरुन निवृत्तीपरायण ज्ञानी पुरुषांचाच प्रवाह वहाता राहिला. या अकर्मण्यतेमुळे खोट्या संन्याश्यांचीही चलती झाली. संन्यास संस्था मूळात खूप श्रेष्ठ कोटीची होती. अत्यंत पवित्र होती. या संस्थेचे पतन झाले. संस्था अपवित्र बनली. संन्यासी घसरले तरी समाज मनात संन्याश्याविषयी आदरभाव विद्यमान आहे. संन्यास या संस्थेविषयी श्रध्दाभाव मनी वसतो आहे.

लोकमान्य टिळकांनी ‘गीता रहस्य ‘ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या अखेरीस त्यांनी मार्मिक निवेदन केले आहे. ते म्हणतात की ज्या काळी या भारत भूमीत सर्वभूतमात्रांच्या हितासाठी अखंड कर्माचरण करणारे महात्मा पुरुष होते त्या काळी हा देश ईशकृपापात्र होता. ज्ञानाच्या नव्हे तर वैभवाच्याही शिखरावर होता. या धर्माचे विस्मरण झाले आणि या देशाला हीनतर अवस्था प्राप्त झाली. यासाठी भक्ती आणि ब्रह्मज्ञान यांच्या सोबत कर्माचा संबंध जोडणाऱ्या धर्माची चर्चा गीता करते. या धर्मानुसार ईश्वराचे भजन-पूजन करणारे महात्मा जन या भारतभूमीत पुनश्च उत्पन्न होवोत अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांनी आपल्या ‘गीतारहस्य’ ग्रंथाचे विवेचन पूर्ण केले आहे.

प्रत्येकाचा स्वधर्म ओळखून ज्ञानीपुरुष त्याला आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतात. स्मशान वैराग्य अनेकांना येते. सर्वस्व त्याग करुन देण्याची भावना मनी जागते. ज्ञानी पुरुष त्याच्या त्यागभावनेचे पोषण करतो पण त्याला स्वकर्म सोडू नये असेही बजावतो. ज्ञानी पुरुषांवर अनेकांची श्रध्दा जागते. स्वधर्म सोडून सत्संग करण्याकडेही अनेकांचा कल असतो पण भगवंताने अर्जुनाला स्वधर्माचे भान करवले. आत्मज्ञानाचा मार्ग दाखवला. त्याला स्वधर्मापासून विचलित होऊ दिले नाही. आत्मज्ञानाची वाटेल तेवढी इच्छा असेल पण केवळ इच्छामात्रेण तर काही आत्मज्ञान होणार नाही, होऊ शकणार नाही. आत्मज्ञान तर योग्यतेनुसार लाभेल. योग्यता नसेल तर ती वाढवण्यासाठी काही एक काळ तर जावा लागेलच. यामुळे प्रत्येकाच्या योग्यतेनुसार त्याची स्वधर्म वा स्वकर्तव्यासंबंधीची श्रध्दा ढळू-चळू न देता ज्ञानी पुरुषांनी सर्वांना मार्गदर्शन करावे, हा मुद्दा चर्चिला गेला आहे.

: 30 :

*मयि सर्वाणि  कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा।*
*निराशीनिर्ममो भूत्वा युध्द्यस्व विगतज्वर:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वाणि कर्माणि:** सर्व कर्मांना
- **अध्यात्मचेतसा:** अध्यात्म चित्ताने म्हणजे विवेकबुध्दीने म्हणजे ज्ञानपूर्वक, ध्याननिष्ठ चित्ताने
- **मयि संन्यस्य:** मला अर्पण करुन
- **निराशी: निर्ममो भूत्वा:** अपेक्षारहित आणि ममतारहित बनून
- **विगतज्वर: युध्द्यस्व:** शोक संतापरहित होऊन, युध्द कर, स्वधर्माचे पालन कर

**अर्थ**

अंतर्यामी मज परमात्म्यामध्ये गुंतलेल्या चित्ताने सर्व कर्मे मला समर्पण करुन आशा, ममता आणि संतापरहित होऊन तू युध्द कर.

*मज अध्यात्म-वृत्तीनें सर्व कर्में समर्पुनी*
*फलाशा ममता सर्व सोडुनी झुंज तूं  सुखें।*

**विषय:** या श्लोकात चर्चेत तर आहेत दोनच गोष्टी पण त्यात चार गोष्टी सामावलेल्या आहेत. (1) मनात विवेकबुध्दी वसावी. (2) या बुध्दीने जीवनातील सारी कर्मे ईश्वरार्पण करावीत. (3) आशा-अपेक्षा, शोक-मोह आणि ममता-अहंतारहित जीवन असावे. (4) स्वधर्माचे पालन करावे.

**स्पष्टीकरण**

1) या श्लोकात एक विशिष्ट शब्द आला आहे **अध्यात्मचेतसा अध्यात्म चित्त**. शंकराचार्य या शब्दाचा अर्थ असा करतात: **अध्यात्म-चेतसा-विवेकबुध्द्या अहं कर्ता ईश्वराय भृत्यवत्करोमि इति अनया बुध्द्या अर्थात्**  विवेकबुध्दीने कर्मे आचरणे आणि ईश्वरार्पण बुध्दीने नोकरासारखे कर्मे करणे म्हणजे अध्यात्म चित्त अवस्था होय.

गांधीजींनी हाच अर्थ मान्य केला. विनोबांचा अर्थ मात्र वेगळा आहे. अध्यात्मचित्त म्हजणे आत्मनिष्ठ निरहंकार वृत्तीने, कर्मे प्रकृतीची आहेत, मी त्याहून भिन्न आहे या ज्ञानभावनेने म्हणजे अध्यात्मचित्ताने. ज्ञानेश्वरांनीही असाच अर्थ केला. ते म्हणतात की ही माझी विहित कर्मे आहेत आणि मी त्यांचा कर्ता आहे. यामुळे या बाबत कर्तेपणाचा अभिमान चित्तात ठेऊ नकोस. दुसऱ्या शब्दात असे की स्वत: कर्ता बनू नकोस. सारी कर्मे अकर्तेपणाच्या भावनेने ईश्वरार्पण बुध्दीने कर.

शंकराचार्य आणि गांधीजी यांनी लावलेला अर्थ सोपा-सुगम आणि मुख्य म्हणजे आचरणयोग्य आहे. शंकराचार्य अद्वैतवादी आहेत. आत्म्याला अकर्ताच मानतात. ही ज्ञानवंताची भूमिका आहे. मी देह, इंद्रिये, मन, बुध्दी याहून वेगळा आहे. माझा त्यांच्याशी संबंध नाही यामुळे त्यांच्या तमाम कर्माचा मी साक्षीदार आहे, ज्ञाता आहे, कर्ता मात्र नाही, ही झाली ज्ञानवंताची भूमिका. याचा उल्लेख अट्ठाविसाव्या श्लोकातही आला आहे.

पण या श्लोकात सारी कर्मे ईश्वरार्पण बुध्दीने करावीत असे म्हटले आहे. अर्थात् या श्लोकात भक्तीची भूमिका आहे. भक्तीचा आश्रय घ्यावा. सारी कर्मे ईश्वरार्पण करावीत, असे सांगितले गेले आहे. यामुळे मी कर्ता आणि ईश्वर माझे स्वरुप म्हणजे स्वामी. यामुळे कर्मे ईश्वराला अर्पण करायचीत. भक्ताच्या भावनेने आणि भूमिकेतून कर्मे आचरायचीत.

शंकराचार्य महान अद्वैतवादी होते, तरी आपल्या षट्पदी स्तोत्रात म्हणतात:

*सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्*
*सामुद्रो हि तरंग: क्वचन समुद्रो न तारंग:।*

अर्थात् हे नाथा, माझ्या व आपल्या ठायी कुठलाही भेद नसतानाही मी आपला आहे. आपण माझे नाहीत कारण लाटा सागराच्या असतात पण लाटांचा सागर नसतो म्हणजे सागरामुळे लाटा आहेत, लाटांमुळे सागर नाही बनत.

‘अमृतानुभव‘ ग्रंथात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की डोंगर पोखरुन मंदिर घडवले जाते. त्यात दगडाचाच देव असतो. देवाचा परिवार सारा दगडाचाच. कासव, नंदी सारे डोंगरातल्या दगडाचेच तर, पूजारीही डोंगरातल्या दगडाचाच असा सारा मामला. सारी काही दगडाचीच.

भक्तीसाठी हा भेद व्यवहार सुयोग्य ठरतो. जीवात्मा आणि परमात्मा असेच एकात्म, तरी परमात्मा उपास्य-जीवात्मा उपासक. असा भेद व्यवहार भक्तीच्या ठायी नांदतो.

या भक्तीमुळे अद्वैतात कुठलीही अडचण उभी राहत नाही. शंकराचायांर्नी अद्वैत ज्ञानाला अंतिम भूमिका मानली आहे. मी देहाहून वेगळा आहे हे झाले ज्ञान पण या श्लोकात भक्तीची चर्चा आली आहे. भक्तीच्या ठिकाणी देह बुध्दी येतेच. यामुळे ते म्हणतात, मी सेवक आहे या भावनेने मी कर्ता व ईश्वर स्वामी. सेवकाने मालकासाठी कामे करावीत तशी कामे मी करतो.

विनोबांनी ज्ञान, भक्ती, कर्म तिघांना एक मानले. अंतिम अवस्थेत तिन्ही एकरुप होतात. मी परमात्मरुप आहे याचाच अर्थ मी देह, मन, इंद्रिये, बुध्दी यांच्यापासून वेगळा आहे असा होतो. या ज्ञानामुळेच परमात्म स्वरुपाची भक्ती होते. मी कर्ता आहे याचा अर्थ मी देह आहे असा होतो. मी परमात्मा आहे अशी ओळख होताच परमात्म स्वरुपाच्या बाबतीत प्रेम जागते. आतापर्यत देहासक्ती होती ती परमात्मासक्ती झाली. देहाहून वेगळा होईपर्यत खरी भक्ती संभवत नाही. विनोबा म्हणतात की साखर जीभेवर ठेवताच आधी ज्ञान होईल आणि तोंडाला पाणी सुटेल. म्हणजे साखरेचे ज्ञान होताच त्याच्याठायी ज्ञान उत्पन्न होऊन स्नेह म्हणजे भक्ती उत्पन्न होईल. यामुळे ज्ञानोबा व विनोबा यांनी लावलेला अर्थच यथार्थ आहे.

2) **मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य ।** अर्थात् अध्यात्म चित्ताने सर्व क्रिया ईश्वरार्पण कराव्यात. देह, मन, बुध्दी, इंद्रिय हा परिवार भगवंताने निर्मिला. तो त्यांच्या ठायी वसतो. देहाच्या सर्व क्रिया त्याच्याच प्रेरणेने होतात. त्याच्या द्वारेच होतात. परमात्मा देहापासून वेगळा झाला की देहाचे प्रेत बनते मग तो देह महापुरुषांचा का असेना प्रेत म्हणून जाळावाच लागतो. देहाधीन क्रिया भगवंत करीत असेल तर मग मी कर्ता कसे बरे असू शकतो? स्वत:ला कर्ता मानणे तर असत्याचरणच ठरेल ना? यासाठी ईश्वराचे म्हणणे असे की सत्यवादी बना, कर्मे करीत रहा. कर्ताभाव मनाशी पाळू नका. यामुळे सत्यपालनासाठीच भगवंत सांगताहेत की सारी कर्मे परमात्म्याच्या शक्तीनेच संपन्न होताहेत असा मनात दृढ निश्चय करुन संपूर्ण जीवन परमात्म्याच्या चरणी समर्पित करुन घालवायला हवे.

3) निर्मम बनून जगायला शिका. आपल्या तमाम क्रिया कुठल्या-ना-कुठल्या आशा-आकांक्षेमुळे घडतात. त्यांच्या मूळाशी ममता वसते वा महत्वाकांक्षा नांदते. ममत्वाने त्या प्रेरित असतात. येशु ख्रिस्त नेहमी म्हणायचे 'ज्यांच्या मनी कुठलीही अपेक्षा, वासना वा इच्छा नसते ते जन धन्य होत !' ज्ञानेश्वर महाराजही म्हणतात की अशा पुरुषांच्या जीवनात आंतरिक आनंद वसतो. हा आनंद वाढता रहातो.

4) **युध्यस्व विगतज्वर:** भगवान म्हणताहेत 'अर्जुना, ज्वर सोडून युध्दाला तयार हो!' ज्वर म्हणजे शोक-मोहरुपी ताप. हा सोड आणि युध्द कर, म्हणजे कर्तव्य कर. अर्जुना, शोक-मोहरुपी ताप आहे. हा सोड आणि युध्द कर, म्हणजे कर्तव्य कर. अर्जुन शोक-मोहाच्या सागरात गटांगळ्या खात होता. शोक-मोह जागले की शारीरिक-मानसिक शांतता भंग पावते. स्वास्थ्य नष्ट होते. युध्द म्हणजे स्वधर्म आणि स्वधर्म म्हणजे स्वकर्तव्य होय. दुसऱ्या अध्यायाच्या 18 व्या श्लोकात शंकराचार्यांनी युध्द शब्दाच्या अर्थाचे स्पष्टीकरण दिले आहे. या श्लोकात कर्मे ईश्वरार्पण करायची चर्चा आहे. हीच ईश्वर भक्ती होय. दुसऱ्या अध्यायाच्या 16 व्या श्लोकात भगवत्परायण होण्याची चर्चा आहे. गीतेत भक्तीलाच मोक्षाचा सुलभ उपाय मानले आहे. यामुळे प्रत्येक अध्यायात भक्तीविचार हाच मुद्दा कठोपनिषदाच्या या मंत्रातूनही येतो:

***तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणम् ।***
***अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा***
***धीरो हर्षशोकौ जहाति ॥***

अर्थात् परमात्मतत्व अतिशय सूक्ष्म स्वरुपाचे आहे. त्याचा अनुभव घेणे कठीण. गुप्त स्थानात हे तत्व वसते. काम-क्रोध वगैरे विकारांनी झाकले गेले आहे. बुध्दीरुपी गुहेत ते विद्यमान आहे. विषम प्रदेशात म्हणजे मर्त्य देहात ते वसते. अनादि-अनंत काळापासून ते चालत आलेले आहे. अध्यात्म योगाने त्या परम तत्वाला जाणून घेता येते. आपण देहापासून वेगळे आहोत हा विचार मनात जागावा. या विवेकी दृष्टीने परम तत्व जाणून घेता येईल. परमात्म तत्वाचा अनुभव करुन घेण्यासाठी विवेकी पुरुषाने हर्ष आणि शोकाला तिलांजली द्यायला हवी.

या मंत्रात परमात्म तत्वाच्या चार विशेषणांची चर्चा आली आहे. (1) परमात्म तत्व अतिशय सूक्ष्म आहे.

(2) ते काम-क्रोध वगैरे विकारांनी झाकले गेले आहे. (3) बुध्दीरुपी गुहेत गुप्त रुपाने वसते. (4) शरीरात ते ओतप्रोत आहे. यासाठी अध्यात्म योग हवा. भक्तीची आवश्यकता आहे. याच उपनिषदातला आणखी एक श्लोक बघावा:

***अशरीरं शरीरेषु अनवस्थेष्ववस्थितम् ।***
***महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥***

अर्थात् नाना प्रकारच्या माणसांच्या आणि पशु वगैरेंच्या शरीरातही अशरीरी परमात्मा वसतो. अनित्य पदार्थांच्या ठायी नित्य-निर्विकार, महान आणि व्यापक परमात्मा वसतो. त्याचा अनुभव करुन घेऊन ज्ञानी पुरुष शोकग्रस्त होत नाहीत.

: 31 :

***ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवा: ।***
***श्रध्दावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभि: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये श्रध्दावन्त:** जे श्रध्दावंत
- **अनसूयन्त: मानवा:** ईर्ष्यामुक्त मानव आहेत
- **इदं मे मतं:** या माझ्या मताचे
- **नित्यं अनुतिष्ठन्ति:** नित्य अनुष्ठान करतात
- **ते अपि कर्मभि: मुच्यन्ते:** ते कर्म बंधनातून सुटून जातात

**अर्थ**

जे कोणी मानव दोष दृष्टी टाकून श्रध्दायुक्त अंत:करणाने माझ्या या मताचे नेहमी अनुसरण करतात तेही सर्व कर्मांपासून मुक्त होतात.

***माझें शासन हें नित्य जे निर्मत्सर पाळिती***
***श्रध्देनें नेणते ते हि तोडिती कर्म-बंधनें।***

**विषय:** या श्लोकात चार बाबी आल्या आहेत. (1) श्रध्दासंपन्न ठरावे. (2) ईर्ष्या-मत्सर वगैरे दोषांपासून मुक्त व्हावे. (3) माझ्या (ईश्वरी) मतानुसार आचरण करावे. (4) कर्म बंधनातून मुक्त होऊन जावे.

**स्पष्टीकरण**

1) श्रध्दावंत: जे श्रध्दासंपन्न आहेत ते भगवंताच्या सांगण्यानुसार आचरण करतात तर त्याना केवढा थोर लाभ होतो. माणसापाशी ज्ञान आणि कर्म इंद्रियांप्रमाणे बुध्दी आणि मनही आहे. बुध्दीने ज्ञान लाभते. मनाने ते कार्यान्वित होते. मनाशिवाय ज्ञान आचरणात येऊ शकत नाही. षड्रिपु मनाच्या वृत्ती आहेत. मन जोवर बुध्दीच्या अधीन होत नाही तोवर ते शुध्द होत नाही. श्रध्दा हा मनाचा गुण वा वृत्ती होय. काही लोक बुध्दीप्रधान असतात तर काही श्रध्दाप्रधान. ज्ञानशिवाय श्रध्दा आंधळी. श्रध्दोशिवाय ज्ञान पांगळे. ज्ञान आणि श्रध्दा, बुध्दी आणि मन दोघांचे संपूर्ण सहकार्य हवे. श्रध्दा आणि ज्ञान एकमेकांना पूरक आहेत पण कुणा एकाचीच निवड करायची असेल तर श्रध्देची करावी. मोठ्या संख्येने अधिकांश लोक श्रध्दावान असतात. श्रध्देच्या अभावी ज्ञान क्रियान्वित होऊ शकत नाही. श्रध्दा आंधळी नसावी, हे मात्र बघायला हवे. याचा साधा उपाय आहे आणि तो म्हणजे आपण विवेकी पुरुषांवर श्रध्दा ठेवावी. प्रत्येकाच्या ठायी थोड्या फार प्रमाणात श्रध्दा ही असतेच, हाच विषय सतराव्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात आला आहे. सतराव्या श्लोकाची थोडी चर्चा इथेही करु या. पहिल्या श्लोकात अर्जुनाचा प्रश्न आहे शास्त्र मार्ग सोडून देऊन जे जन श्रध्दापूर्वक भजन-पूजन करतात त्यांच्या श्रध्देचे स्वरुप कसे मानावे? सात्विक, राजसी वा तामसी? दुसऱ्या श्लोकात भगवंताचे उत्तर आहे की या तीन प्रकारच्या श्रध्दा जीवाला जन्मासोबतच प्राप्त झाल्या आहेत. ज्याचा जसा स्वभाव तशी त्याची श्रध्दा. जीव श्रध्देनेच बनला आहे. गोस्वामी तुलसीदास म्हणतात:

***जे श्रध्दा संबल-रहित, नहिं संतन्ह कर साथ।***
***तिन्हकहं मानस अगम अति, जिनहिं न प्रिय रघुनाथ ॥***

अर्थात् रामचरितमानस एक सरोवर आहे. श्रध्दाविहीन, संतसंगती रहित आणि ज्यांना परमात्मा प्रिय नाही असे लोक या सरोवरापर्यंत पोहोचणे अतिशय कठिण आहे. या प्रसंगी तुलसीदासजी यानी सर्वप्रथम श्रध्देचा उल्लेख केला आहे. अन्यत्र ते लिहितात :

***बिनु बिस्वास भगति-नहिं, तेहि बिनु द्रवहिं न राम।***
***रामकृपा बिनु सपनेहुं , जीव न लह विश्राम ॥***

अर्थात् विश्वास म्हणजे श्रध्देशिवाय भक्ती असू शकत नाही. भक्तीविना चित्त द्रवणशील होणार नाही. भगवंताच्या कृपेशिवाय जीवाला स्वप्नातसुध्दा सुख-शांती लाभू शकणार नाही.

गांधीजींच्या आत्मचरित्रात एक प्रसंग येतो. बालपणी लाधाराम नामक साधु पुरुषाकडून ते तुलसी रामायण ऐकत असत. या श्रवणातून त्यांना मोठा आनंद लाभायचा, महाराज कोढी होते. त्यांची देवश्रध्दा गहन होती. रामाचे स्मरण करत ते बिल्वपत्र अंगावर घासत. या उपायामुळे ते कोढमुक्त झालेत. हा श्रध्देचा चमत्कार म्हणावा लागेल.

एक महाराज होते. रोज सायंकाळी गीता वा रामायण या ग्रंथावर प्रवचन देत. श्रोत्यांमध्ये काही मजूरही होते. नदीच्या दुसऱ्या काठावरली ही मंडळी नावेने प्रवास करुन प्रवचन ऐकायला यायची. दिवसभर मजूरी करावी. सायंकाळी प्रवचन ऐकावे. नावेने पल्याड निघून जावे. असा त्यांचा दिनक्रम होता. एके दिवशी महाराजांनी आपल्या प्रवचनात सांगितले- 'ईश्वर नाम स्मरणाने भवसागरही सहजपणे पार करता येतो.' हे निरुपण ऐकून मजूर आनंदले. त्यांनी विचार केला - हे सोपे झाले. आता नौका प्रवासाची कटकट नको. देवाच्या नामस्मरणाने भवसागर पार करता येतो. ही तर आपली छोटीशी नदी. नदी खचितच पार करता येईल. 'त्यांच्या या श्रध्देमुळे चमत्कार घडला. आता ते नाव वापरत नसत. देवाचे नाव घेत पायीच नदी पार करत. एके दिवशी त्या प्रवचनकाराला नदी पार करायचा प्रसंग आला. प्रवचन आटोपून ते नदीकाठावर आले. नावेची वाट बघू लागले. या दरम्यान ते मजूरही काठावर येऊन पोहोचले. महाराजांना नावेची वाट बघतांना बघून त्यांना खूप आश्चर्य वाटले. अखेर न राहवून त्यांनी प्रवचनकाराला विचारुनच घेतले की महाराज ईश्वर नामस्मरणाने साक्षात भवसागर पार करता येतो असे आपण म्हणता ही तर एक छोटीशी नदी आहे महाराज मग आपण विचार कसला करताहात आणि नावेची वाट तरी कशासाठी बघताहात? महाराज ओशाळले. आपणही मजुरांप्रमाणे प्रयोग करायचे त्यांनी ठरवले पण ते नदीत पडले. त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी प्रवचन दिले पण त्यांची श्रध्दा नव्हती. मजुरांनी प्रवचन ऐकले. मनापासून श्रध्दा ठेवली.

श्रध्दा मोठी अद्भुत वस्तु आहे. चौथ्या अध्यायातील 39 व्या श्लोकात तर भगवान म्हणतात की श्रध्देमुळे ज्ञानप्राप्ती होते. उपनिषदात श्वेतकेतुची कथा येते. त्याचे वडिल त्याला एका उदाहरणाने ज्ञान देतात:

***न्यग्रोधफलमत आहरेति। इदं भगव इति।***
***भिन्ध्दीति। भिन्नं भगव इति। किमन्न पश्यसीति।***
***न किंचन भगव इति। (4/39)***

अर्थात् श्वेतकेतुच्या पित्याने आपल्या पुत्राला वडाच्या झाडाचे एक फळ आणायला सांगितले. श्वेतकेतुने फळ आणले. पित्याच्या सांगण्यावरुन त्याने त्या फळाचे तुकडे-तुकडे केले. त्याच्या बीजाचेही तुकडे केले. अखेर बाबानी विचारले की हे तो काय करत आहे? यावर श्वेतकेतु उत्तरला 'आत काहीच दिसत नाही.' यावर पित्याने सांगितले:

***यं वै सौम्यं एतमणिमानं न निभालय से***
***एतस्य वै सौम्य एष: अणिम्न: महान्***
***न्यग्रोध: तिष्ठति। श्रध्दस्व सौम्य इसि।***

अर्थात् "ही अतिसूक्ष्म वस्तु आहे. तू बघू शकत नाहीस. बघण्याचें सामर्थ्य तुझ्या ठायी नाही. या अतिसूक्ष्म वस्तुमुळे वा परमात्म्यामुळे या विराट वटवृक्षाची निर्मिती झाली आहे. पुत्रा, माझ्या या वचनावर विश्वास ठेव. श्रध्दा राख."

श्वेतकेतुच्या पित्याने परमात्म्याच्या अतिसूक्ष्म रुपाचे नाव आपल्या पुत्राला अशाप्रकारे एका उदाहरणाच्या माध्यमातून करवून दिले. जे दृश्यमान आहे-दिसते-त्यावर विश्वास ठेवायचा तर काही प्रश्नच उद्भवत नाही पण बीजाचे तुकडे केल्यानंतरही जेव्हा काहीही दिसत नाही तेव्हा वृक्ष उभा असल्याचे बघताहेत तर बीजाचे तुकडे तुकडे केल्यावर जे दिसत नाही त्या अव्यक्त तत्वातून म्हणजे परमात्म्यातूनच हे मोठे झाड उत्पन्न झाले. असे मानावे लागते. अखेरीस ऋषी म्हणतात की यावर श्रध्दा ठेव.

1) **अनसूयन्त:** श्रध्दावंताच्या ठायी द्वेष-असूया-मत्सर-हेवा टिकत नाही. द्वेष-मत्सर या आसुरी वृत्ती होत. सोळाव्या अध्यायात आसुरी वृत्तीचे सविस्तर वर्णन येते. साधक आणि मुमुक्षुला यापासून लांब रहायला हवे. ही अभिमानाचीच रुपे होत.

2) **ये मे इदं मतं अनुतिष्ठन्ति:** श्रध्दावान पुरुष ईश्वरी अभिप्रायानुसार अनुष्ठान करतात.

3) यामुळे कर्मबंधनापासून त्यांना मुक्ती लाभते. श्रध्दावंताला ज्ञानवंताप्रमाणे मोक्षफळाचा अधिकारी होता येते. ज्ञानी पुरुष ज्ञानाद्वारे जी तत्त्वे आचरणात आणतात, श्रध्दाळू जन श्रध्देद्वारे तीच तत्त्वे अमलात आणून ज्ञानी पुरुषांप्रमाणे मोक्षरुपी फळाची प्राप्ती करुन घेतात.

: 32 :

*ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।*
*सर्वज्ञानविमूढांस्तान् विध्दि नष्टानचेतस : ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु ये अभ्यसूयन्त:** पण जे ईर्ष्या, मत्सर करणारे पुरुष आहेत
- **एतत् मे मतं न अनुतिष्ठन्ति:** ते माझ्या या मताला आचरणात आणत नाहीत
- **तान् सर्वज्ञानविमूढान्:** सर्व प्रकारच्या ज्ञानाला मुकल्यामुळे मूढासारखे बनलेले ते
- **अचेतस: नष्टान् विध्दि:** अविवेकी आहेत आणि जणू काही नष्ट होऊन गेले आहेत

**अर्थ**

पण जे मानव माझ्यावर दोषारोप करुन माझ्या या मतानुसार वागत नाहीत, त्या मूर्खांना ते सर्व ज्ञानांना मुकलेले आणि नष्ट झालेलेच समज.

*परी मत्सर-बुध्दीने जे हे शासन मोडिती*
*ज्ञान-शून्य चि ते मूढ पावले नाश जाण तू ।*

**विषय:** या श्लोकात पाच बाबींची चर्चा येते. (1) जे जन ईर्ष्या-मत्सर युक्त आहेत. (2) यामुळे ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करायचे ईश्वरी मत पाळत नाहीत. (3) असे पुरुष ज्ञानी असूनही मूढ होत. (4)ते अविवेकी होत. (5) त्याना नष्ट झालेलेच मानायला हवे.

**स्पष्टीकरण**

**1) ये अभ्यसूयन्त:** ईर्ष्या-मत्सर युक्त अश्रध्दावान असतात. क्रोधी असतात. क्रोध प्रबळ झाला की अहंभाव फणा काढतो. अशा प्रकारे जेव्हा मूळात अभिमान, क्रोध प्रबळ होतात तेव्हा ईर्ष्या आणि मत्सर वृत्ती उत्पन्न होते आणि प्रबळपणे दावा करते.

विनोबांनी गीता प्रवचनात एक गोष्ट सांगितली आहे. दोन साधू होते. ते आपसात कधीच भेटले नाहीत. दोघांच्या मनात एकमेकांबद्दल द्वेषभाव वस्तीला होता. एका गुरुचे पाच-दहा शिष्य असतील तर त्यांच्याही मनी असा भाव वसतो.

एक श्रीमंत माणूस होता. मोठ्या आलिशान बंगल्यात रहायचा. दिवसभर ना काम ना धाम. तब्येत चांगली कशी रहावी? सुखाची सारी साधने हात जोडून दिमतीला उभी ठाकली होती. तरी तो अशांत, असंतुष्ट आणि दु:खी होता, तो रोज पालखीत बसून फिरायला जायचा. रस्त्यात एक टोपली विणणाऱ्याची झोपडी होती. हा माणूस भजने गात टोपली विणत असायचा. श्रमनिष्ठ होता. त्याची तब्येत उत्तम होती. तो छान आनंदात रहायचा. तो समाधानी होता. त्याला बघुन श्रीमंत माणसाच्या मनात त्याच्याबद्दल ईर्ष्या-मत्सर जागली.

ही ईर्ष्या एवढी वाढली की त्या श्रीमंत माणसाने गरीबाच्या झोपडीला आग लाऊन दिली. त्या गरीब श्रमिकाने त्या श्रीमंत व्यक्तीचे काहीही बिघडवले नव्हते तरी त्याची कुटी जाळून टाकली. त्याच्या उपजीविकेचे साधनही जळून खाक झाले. रडत-कळकळत गरीब माणसाने न्यायालयाचे महाद्वार गाठले. आपली कर्मकहाणी ऐकवली. न्यायाधिशाने त्या श्रीमंत माणसाला पोलिसांकरवी पकडून आणले. घडल्या घटनेबद्दल विचारणा केली. श्रीमंताने सारे खरे-खरे काय ते सांगितले. न्यायाधिश न्याय देताना म्हणाले- "तुम्हाला काही शिकायला हवे या भावनेने कारावासात न पाठवता मी तुम्हा दोघांना एका टापूत पाठवून देत आहे. तिथे दोघांनी श्रम करुन गुजराण करावी. एवढी शिक्षा पुरेशी आहे." दोघांना लांबवर सोडून देण्यात आले. तिथली भाषा ते जाणत नव्हते. टोपली विणणारा हिंमतवान होता. त्याने त्या अरण्यवासी जनांचा अभ्यास केला. त्यांना काय-काय आवडते? त्यांच्या गरजेच्या वस्तु कोणत्या? सारे-सारे काही जाणून घेतले. तो फुलं वेचायला लागला. तो माळा गुंफायचा. अरण्यवासी जन यामुळे खुश झाले. त्याच्या भोजनाची त्यांनी सोय करुन दिली. श्रीमंत व्यक्तीची परिस्थिती मात्र फार हलाखीची झाली. दयनीय झाली. त्याला श्रमाची सवय नव्हती. त्याला विचारशक्ती नव्हती. उपाशी मरायची वेळ आली. दोघांची अशी परिस्थिती झाली.

पण टोपली विणणाऱ्याला त्या श्रीमंत माणसाची दया आली. त्याने त्या श्रीमंताला सांगितले - "घाबरु नकोस. चल माझ्यासोबत. फुलं गोळा करायला येत चल. मी तुला माळा गुंफायला शिकवीन. अशाप्रकारे काही दिवसात त्या श्रीमंताला सारे काम यायला लागले. तो मेहनतीने भाकरी मिळवू लागला. त्याला मानसिक शांतता लाभली. श्रम भरपूर होत. त्यामुळे त्याची तब्येत उत्तम झाली. अखंड

कर्मरत असले तर तन-मन स्वस्थ रहातात, हे त्याच्या लक्षात आले.

परतल्यावर दोघे न्यायाधिशांना भेटले. श्रीमंताने मान्य केले की त्याला जगायचा खरा मार्ग कळला. त्याने न्यायाधिशांचे मोठे उपकार मानले. त्याने गरीबाला कुटी उभारुन दिली. ईर्ष्या-द्वेष-मत्सर मुक्त झाला. जीवनभर अखंडपणे कार्यरत बनला.

सारांश काय? तर काम-क्रोध वगैरे विकार आत्मज्ञानाला झाकून ठेवतात. घातक विकार ईर्ष्या-मत्सर आहेत. सोळाव्या अध्यायातील 18 व्या श्लोकात येते की अहंकार, दर्प, काम क्रोध या विकारांनी युक्त लोक आपल्या व इतरांच्याही देहात वसणाऱ्या ईश्वराचा द्वेषच करतात. ईशावास्य उपनिषदात याला आत्म्याचे हनन करणारी वृत्ती मानले गेले आहे.

2) लोक विकारांमुळे ईश्वरी उपदेशाकडे दुर्लक्ष करतात. ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करत नाहीत. ईश्वरी आज्ञेची अवहेलना करतात. उपेक्षा करतात. गांधीजी म्हणतात की परमात्म्याचे स्मरण करुन आणि ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे आचरणे हा आत्म्याचा सहज स्वाभाविक धर्म ठरावा. ईर्ष्या आणि मत्सर अशा भयंकर आसूरी वृत्ती आहेत की त्या परमात्म्याशी एकरुप झाल्यावरसुध्दा आपल्याला परमेश्वरापासून भिन्न बनवून टाकतात.

3) **सर्वज्ञानविमूढान्:** विकारी माणूस ज्ञानी असला तरी मूढ होय. धन, कीर्ती मिळवण्यासाठी ज्ञान हवे. विकार आत्मज्ञानाला बाधक ठरतात. दूध उत्तम खरे पण विषाचा थेंब पडला तर घातक होते. विकारांमुळे शास्त्रांचे ज्ञान आत्मज्ञानाला निरुपयोगी ठरते. माणसाला मूढ बनवते.

4) भगवंत अशा लोकांसाठी **अचेतस:** म्हणजे अविवेकी या शब्दाचा उपयोग करतात. भगवान म्हणतात की विकारी जन भलेही विद्वान, भक्त, ज्ञानयोगी, ध्यानयोगी वा कर्मयोगी का असेनात ते अविवेकी होत. स्वत:ला देहापासून मुक्त मानणे हा झाला, विवेक आणि देहाशी एकरुप मानणे हा झाला अविवेक. ब्रह्मसूत्राच्या भाष्यात शंकराचार्य म्हणतात: **विवेकाविवेकमात्रेण एव आत्मन: अशरीरत्वं सशरीरत्वं च।** अर्थात् विवेकामुळे आत्मा अशरीरी ठरतो तर अविवेकामुळे सशरीरी. चित्ताच्या ठायी नित्य-अनित्य हा विवेक हवा. आत्मा-अनात्मा हा विवेक हवा. यामुळे जड व अनित्य देहापासून आपण वेगळे आहोत हा अनुभव येईल. स्वत:ला देह मानण्यापासून विकार माजतात. माणूस अविवेकी ठरतो.

5) ईर्ष्या आणि मत्सर यांनी युक्त झाल्यामुळे अविवेकी नष्ट होतात असे निश्चयपूर्वक जाणावे. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाच्या लक्षणांची चर्चा आली आहे. 63 व्या श्लोकात येते **बुध्दिनाशात् प्रणश्यति** म्हणजे बुध्दीनाश म्हणजे विवेकनाश होय. माणूसपणाचा नाश होय. जोवर माणसाच्या ठायी नित्य-अनित्य, कार्य-अकार्य, नीती-अनीती जाणून घेण्याचा विवेक आणि तदनुसार आचरण करण्याची शक्ती असते तोवर तो मनुष्य ठरतो. तोवरच मनुष्य ठरतो. तोवरच मानवता असते. असे नसले तर जीवंत असतानासुध्दा माणूस **'विध्दि नष्टान्'** म्हणजे मृतवत जाणा हे भगवंताचे म्हणणे आहे.

: 33 :

***सदृशं चेष्टते स्वस्या: प्रकृतेर्ज्ञानवानपि।***
***प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रह: किं करिष्यति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ज्ञानवान् अपि स्वस्या:** ज्ञानी पुरुष ही आपल्या
- **प्रकृते: सदृशं चेष्टते:** निसर्गाच्या अनुसार व्यवहार करतो
- **भूतानि प्रकृतिं यान्ति:** प्राणीमात्र म्हणजे अज्ञानी जन आपापल्या प्रकृतीनुसार व्यवहार करतात, वर्तन करतात
- **निग्रह: किं करिष्यति:** त्यात का निग्रह म्हणजे जोर जबरदस्ती करता येते बरे?

**अर्थ**

सर्व प्राणी प्रकृतीच्या वळणावर जातात म्हणजेच आपल्या स्वभावाच्या अधीन होऊन कर्मे करतात. ज्ञानी जन सुध्दा आपल्या स्वभावानुसारच व्यवहार करतात मग या विषयात कोणाचाही हट्टीपणा काय करील?

***ज्ञानी हि वागतो त्याच्या स्वभावास धरुनियां***
***स्वभाव-वश हीं भूतें बलात्कार निरर्थक।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी येतात. (1) ज्ञानी पुरुष देखिल आपल्या ज्ञानी स्वभावानुसार आचरण करतो.

(2) अज्ञानी जन अज्ञानी स्वभावानुसार आचरण करतात. (3) यामुळे अज्ञानी लोकांचा स्वभाव ज्ञानी जनांच्या स्वभावानुसार करायची जबरदस्ती करता येत नाही.

**स्पष्टीकरण**

1) ज्ञानी पुरुषही आपल्या स्वभावानुसार चालतो. या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात शब्द आला आहे 'प्रकृती'. प्रकृती म्हणजे काय? शंकराचार्य म्हणतात: **प्रकृतिर्नाम पूर्वकृत-धर्माधर्मादि-संस्कारोवर्तमानजन्मादौ अभिव्यक्तः, सा प्रकृतिः, तस्याः सदृशमेव सर्वो जन्तुः ज्ञानवानपि, किं पुनः मूर्खः।** अर्थात् पूर्वजन्मी माणूस काही धर्म करतो, काही अधर्म करतो. त्या आचरणाचे संस्कार या जन्माच्या आरंभी प्रकट होतात. त्याला म्हणायचे प्रकृती, प्राणीमात्र त्या आधारे वर्तन करतात. हा नियम चक्र ज्ञानवंतासाठीही लागू होतो मग अज्ञानी जनांविषयी काय बोलावे?

पूर्वजन्मीच्या धर्म वा अधर्माच्या आचरणाने काही संस्कार तयार होतात. ते या जन्मी जसेच्या तसे प्रकट होतात. या संस्कारांनाच आपण प्रकृती किंवा स्वभाव असे म्हणतो सारेच प्राणीमात्र या प्रकृती वा स्वभावानुसार आचरण करतात. ज्ञानी पुरुष आधी अज्ञानीच तर असतो. या जन्मी त्याने ज्ञान मिळवलेले असते पण ज्ञान प्राप्तीनंतरही जर अज्ञानाचे ते संस्कार कायम रहाणार असतील तर ज्ञानप्राप्तीला कुठलाही अर्थ उरत नाही. चौथ्या अध्यायातील 37 व्या श्लोकात वर्णन येते की ज्याप्रमाणे ज्ञानरुपी अग्नी समस्त कर्मांना जाळून टाकतो. ज्ञानी पुरुषाचा स्वभाव बदलतो, आधीसारखा नाही राहत. तुलसीदास रामायणाच्या उत्तरकांडात लिहितात :

***उत्तर प्रतिउत्तर मैं कीन्हा।***
***मुनि तन भये क्रोध के चीन्हा॥***
***सुनु प्रभु बहुत अवग्या कीये।***
***उपज क्रोध ग्यानिहु के हीये॥***
***अति संघरषन जौं कर कोई।***
***अनल प्रगट चन्दन तें होई॥***

अर्थात् "मी उत्तर-प्रत्युत्तर करु लागलो तर मुनीच्या चेहऱ्यावर क्रोधाची लक्षणे दिसू लागतील. ऐकावे स्वामी महाराज, आत्यंतिक अवज्ञेमुळे ज्ञानवंताच्या अंत:करणातही क्रोध प्रकट होऊ लागतो. अतिघर्षणामुळे चंदन काष्ठातही अग्नी प्रकटतो. शंकराचार्य आणि तुलसीदासांचे हे मत सारखेच आहे. याचा अर्थ एवढाच की ज्ञानप्राप्तीनंतरही काम-क्रोध यासारखे विकार प्रकटतात. दुर्वासा ऋषी ज्ञानी होते पण शीघ्रकोपिष्ट अशी त्यांची ख्याती होती.

ज्ञान प्राप्त झाल्यावर ज्ञानवंताला देहधारणा करावी लागते. ज्ञान लाभताच काही त्याची काया गळून पडत नाही. प्रारब्ध कर्मावर ज्ञानाची काही सत्ता चालत नाही. प्रारब्ध कर्म पूर्ण होईपर्यंत वा नष्ट होईपर्यंत ज्ञानी पुरुषाला देखिल वाट बघावी लागते. याच्या आधी म्हणजे प्रारब्ध भोगण्याच्या आधी त्याला देहाची चादर नाही झुगारुन देता येत. प्रारब्ध कर्मामुळे देह लाभतो तसेच प्रारब्ध कर्मामुळे पूर्वजन्मीची पातकेही भोगावी लागतात. यामुळे ज्ञानप्राप्तीनंतर देखिल हातून पातके घडतात. अलिप्त राहिल्यामुळे ज्ञान्याला पापकर्माचा लेप होत नाही.

यामुळे ज्ञानी पुरुषाचे अखेरचे लक्षण सांगितले आहे. ज्ञानी पुरुष **सर्वथा वर्तमानः अपि** कसा का वागेना तो **सः योगी मयि वर्तते** योगी भगवंताच्या ठायीच वसतो. (गीता अध्याय 6 श्लोक 31) **सर्वथा वर्तमानः अपि न सः भूयः अभिजायते ज्ञानी** पुरुषाचे कसे का आचरण असेना त्याला दुसरा जन्म नाही, त्याला मोक्षलाभ होतो. (गीता अध्याय 13 श्लोक 23) ज्ञानी पुरुषाचे हे लक्षण. याचा जर का आपण शाब्दिक अथे केला तर अर्थाचा अनर्थ होईल. ज्ञानी पाप कर्माचे आचरण करत असेल तर मग ज्ञानाचा उपयोग तरी काय ? म्हणजे हे ज्ञानाच्या प्रशंसेत उच्चारलेले वचन मानावे, याचा भावार्थ ध्यानी घ्यावा, शब्दार्थ मनात आणू नये. यामुळे **सर्वथा वर्तमानः अपि** या वाक्यांशाला केवळ ज्ञानाची प्रशंसा करणारे जाणावे.

गांधीजी सत्यनिष्ठ होते त्यांचा गौरव करायचा झाल्यास असे म्हणता येईल की 'ते स्वप्नातही असत्य बोलत नसायचे.'

यामुळे **सर्वथा वर्तमानः अपि** याचा अर्थ समजून घ्यावा लागेल की ज्ञानी पुरुषाच्या हातून चूक नाही व्हायची. परमात्म ज्ञानामुळे त्याचे वर्तन अलौकिक होते. असामान्य होते. यामुळे ज्ञानी पुरुषही आपल्या पूर्व स्वभावानुसार आचरण करतो हे मानणे काही उचित नाही.

तरी प्रश्न शिल्लकच राहतो? असे जर असेल तर मग शंकराचार्यांसारख्या ज्ञानवंताने 'ज्ञानी पुरुष आपल्या स्वभावधर्मानुसार चालू शकतो. 'असे का म्हणावे? याचा अर्थ एवढाच की ज्ञान प्राप्तीनंतरही ज्ञानी पुरुषाच्या स्वभाव वैशिष्ट्यात फार फरक नाही पडत. उदाहरणार्थ ज्ञानी पुरुषही बालपणी राग करणारा असेल पण हळूहळू

अधिक क्रोध दूर होईल कदाचित क्रोधही दूर होईल. त्याच्या ठायी प्रेम आणि कोमलता आविष्कृत होईल पण एखाद्या प्रसंगी तो रागवेलही आणि नेमके हेच समोरच्याला खटकेल.

विनोबांचेच बघा. बालपणी ते रागीट होते. आज त्यांच्या ठायी कोमलता आणि प्रेमाचा उत्कर्ष दिसून येतो. तरी विशिष्ट प्रसंगी ते कठोर होतात. नि:स्पृह होतात. अज्ञ समाजाला शिकवण देण्यासाठी अधूनमधून अशी कठोरता गरजेची आहे असेही कुणी म्हणू शकेल. तरी सुध्दा त्यांच्या ठायी बालपणी क्रोधवृत्ती नसती तर ठरवूनही त्याना कठोर होता आले नसते. त्यांच्या ठायी बाळपणी प्रेम धर्माचाच उत्कर्ष होता. जीवनातल्या सिध्दांत निष्ठेमुळे त्यांच्या ठायी कठोरता होती पण प्रेमाचा उत्कर्ष असल्यामुळे कुणा प्रसंगी ते ठरवूनही कठोर होऊ शकत नव्हते.

याचा अर्थ असा की ज्ञानप्राप्ती झाल्यानंतरही ज्ञानी पुरुषाचे-त्याच्या स्वभावाचे जे वैशिष्ट्य असते ते काही समूळ नष्ट होत नाही पण याचा अर्थ असा नव्हे की ज्ञानप्राप्तीनंतर आपल्या पूर्वजन्मीच्या स्वभावानुसार तो पापाचरण वा अनुचित कर्मे आचरील. पापाचरण करणे ज्ञानी पुरुषाला शक्य नाही.

विनोबा या श्लोकाच्या पूर्वार्ध्दाचा अर्थ असा करतात की ज्ञानी पुरुषाची प्रकृती वा स्वभाव ज्ञानाच्या प्रभावामुळे ज्ञानमय बनतो. ज्ञानापूर्वी त्याचा स्वभाव अज्ञानी होता. यामुळे त्याच्या कार्यातून ज्ञान प्रकटेल. यामुळे विनोबा म्हणतात अज्ञानी जसा आपल्या अज्ञानी स्वभावाप्रमाणे वागतो ना तसाच ज्ञानीदेखिल आपल्या ज्ञानमय स्वभावानुसार आचरण करतो.

ज्ञानेश्वरांनीही हाच अर्थ केला आहे ते म्हणतात की ज्ञानी पुरुषानेही आपल्या ज्ञानाच्या बळाने इंद्रियांचे लालन-पालन करायला नको. सर्पाशी का कुणी खेळतो? वाघाची का कुणी संगत धरतो? विषाला का कुणी पचवतो? गमतीखातर जरी आग लावली तरी प्रकोप वाढेलच ना? विनोदा खातर-थट्टा-मस्करी करताना देखिल जर इंद्रियांचे चोचले पुरवले आणि ज्ञानाचा अभिमान मनी धरला तर इंद्रिये आपल्याला भुईसपाट करतील. यातून आपले भले नाही होऊ शकणार. यामुळे ज्ञानी पुरुष आपल्या स्वभावधर्मानुसार चालतो.

याचा अर्थ असा की ज्ञानी पुरुष आपल्या ज्ञान-स्वभावानुसार जीवन घालवील. त्याच्या मूळच्या स्वभावातील वैशिष्ट्ये यदा-कदा कुठल्या ना-कुठल्या रुपात प्रकट होत राहतील. या गोष्टी त्याच्या ज्ञानाच्या विरोधी नसतील. त्याचे आचरण अज्ञान्यांना आदर्श असेल यामुळे त्याची कुठलीही क्रिया अज्ञानमूलक नसेल त्याचे आचरण सर्वांसाठी अनुकरणीय असेल. असे जर नसेल तर तो ज्ञानी पूर्ण ज्ञानी नाही, असे खुशाल समजावे. ज्ञानी पुरुषाचे वर्तन अनैतिक असेल तर तो दंभी जाणावा. विनोबा म्हणतात की ज्ञानमय वृत्तीमुळे ज्ञानवंताची सर्व क्रियाकर्मे सहज-स्वाभाविक असतात.

2) 'सारे आपापल्या स्वभावानुसार वागतात' **प्रकृतिं यान्ति भूतानि।** हे गीतेचे वचन आहे. स्वभाव म्हणजे काय? शंकराचार्य म्हणतात की पूर्वजन्मी केलेल्या धर्म वा अधर्माचे या जन्मी प्रकट होणारे संस्कार म्हणजे प्रकृती वा स्वभाव होय. यानुसार प्राणीमात्र वर्तन करतात.

माणसाला आपला स्वभाव वा प्रकृती बदलायचे स्वातंत्र्य आहे की नाही? तो का संस्कारांच्या गुलामीतच जगत राहील? स्वभावात काही परिवर्तन होईल की नाही याची काही उकल होत नाही यामुळे जबरदस्तीपूर्वक काही कुणाचा स्वभाव बदलू शकणार नाही.

3) **निग्रहः किं करिष्यति:** कुणावरही जबरदस्ती तर नाही करता येत. म्हणजे कुणाच्या स्वभावात बदल तर नाही घडवून आणता येणार. यात प्रयत्नाची जर शक्यता नसेल तर मग हा दैववाद नाही का होणार? यात प्रयत्नांना कुठे स्थान उरले आहे? यामुळे भगवंतांचे म्हणणे काळजीपूर्वक तपासून घ्यावे लागेल.

अठराव्या अध्यायातील 60 व्या श्लोकाच्या आधारे हा विचार समजून घेऊ या. अर्जुन आपल्या स्वभावानुसार स्वाभाविक कर्मांनी बांधला गेला आहे. आज मोहवश बनून तो जे करु इच्छित नाही ते स्वभाववश होऊन अवश्य करील असे म्हणून भगवंताने स्वभावाचे प्राबल्य समजाऊन सांगितले आहे. परमेश्वराची माया शक्ती वा प्रकृत त्रिगुणात्मिका आहे. सबंध सृष्टीजगत तीन गुणांनी निर्मित आहे. काही सत्यप्रधान, काही रजप्रधान तर काही तमप्रधान. आपण आपापल्या जीवनात ज्या गुणाचा उत्कर्ष करतो त्यावर आपला स्वभाव अवलंबून असतो. आपल्या स्वभावात बदल घडवून आणू शकतो अर्थात ही मंद गतीची प्रक्रिया आहे.

गीतेने इथे 'निग्रह' शब्दाचा प्रयोग केला आहे. याचा दुहेरी अर्थ आहे. एक म्हणजे समजून उमजून संयमाचे पालन दुसरा म्हणजे एखादी गोष्ट नाही भावली तरी लाचारीने पालन. ' निग्रह ' शब्दात संयमाचा निषेध नाही पण निग्रह वा संयम ज्ञानपूर्वक असेल. समजून-

उमजून असेल, जबरदस्तीपूर्वक नसेल. यामुळे हळूहळू परिवर्तन होईल. जबरदस्तीने काही करु गेले तर मग चांगली प्रतिक्रिया नसेल. काही काळ दबून तो आपल्या सूचनेनुसार वागेल पण मग विपरीत वागू लागेल यामुळे परिवर्तन हे समजून-उमजून करवून घ्यावे लागेल.

**तुलसीदास म्हणतात:**

*सठ सुधरहिं सतसंगति पाई।*
*पारस परसि कुधातु सुहाई॥*
*बिधिबस सुजन कुसंगति परहीं।*
*फनि-मनि सम निज गुन अनुसरहीं॥*

अर्थात् सत्संगतीमुळे शठ सुधारतो. परीसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते. सज्जन कुसंगतीत पडतो तरी आपला स्वभाव नाही सोडत. मणी सर्पाच्या माथ्यावर असतो पण विषाचा प्रभाव कमी करायचा आपला गुण सोडत नाही.

इंद्रियांवर ताबा मिळवण्याचे दोन मार्ग आहेत - संयम आणि निग्रह. यावर ‘ स्थितप्रज्ञ दर्शन ‘ ग्रंथात विनोबांनी सुरेख समजावून सांगितले आहे. संयम कायमस्वरुपी असतो. तो जीवनाचे अंग - अविभाज्य घटक बनतो. कुणाला गोड आवडते. काही काळ गोड खाणे सोडून देणे हा झाला निग्रह. यातून पाठ असा मिळतो की गोड पदार्थ खाताना संयम पाळला जातो. पूर्वीचा असंयम दूर झाला. कुणाला बोलायची सवय असते. संयमपूर्वक काही काळ मौन पाळले जाते. यातून वाणीच्या निग्रहाचा सराव होतो. हळूहळू बोलण्यावर नियंत्रण येते. निग्रहाच्या सरावामुळे वाणीचा संयम साधता येतो. वाणीचा संयम मग नित्याचीच बाब होऊन बसते.

या श्लोकातला ‘निग्रह’ शब्द बलात्कार या अर्थाने प्रयुक्त झाला आहे. अशा प्रकारच्या जबरदस्तीमुळे विकास खंडित होतो. निग्रहामुळे लाभ होतो. यातून संयम जागतो. निग्रहाची जर जबरदस्ती झाली तर करणाऱ्याचे व ज्यावर केले जाते त्या दोघांवर विपरित परिणाम होतो.

एक गृहस्थ होते. ते नोकरी करत. थोडे फार सेवाकार्यही करत पण या अल्पशा सेवाकार्याने त्यांचे काही समाधान होईना. अधिक सेवा करायची त्यांची इच्छा होती. यासाठी नोकरी सोडणे गरजेचे होते आणि नोकरी सोडणे काही त्याना शक्य नव्हते. अखेर नोकरीचा त्याग करुन पत्नीसोबत ते आश्रमात येऊन दाखल झालेत. आश्रमात दोन चार दिवस राहिलेत. नोकरी सोडून एकदम आश्रमात दाखल होण्यात आपले चुकले असल्याचे त्यांच्या ध्यानी आले. आश्रमात रहायची पात्रता अजून आपल्या ठायी आली नसल्याचेही त्यांच्या लक्षात आले. त्याना खूप पश्चात्ताप झाला परत नोकरी धरली. सुदैवाने त्यांना नोकरी मिळाली. नोकरी सोडायचे साहस बलात्कार म्हणजे जबरदस्ती होती.

या घटनेला काही वर्षे लोटली. आता आपण नोकरी सोडून कायमस्वरुपी सेवाकार्यात दाखल होऊ शकतो असे त्याना वाटले. नोकरीच्या कार्यकाळात ते तयारी करत राहिलेत. आपली त्यागशक्ती वाढवत राहिले त्यामुळे नोकरी सोडून सेवाकार्यात आले तर स्थिर झाले मग हे क्षेत्र सोडून परत नोकरीकडे बघण्याची त्याना गरज उरली नाही.

साबरमती आश्रमाची स्थापना करुन गांधीजींनी जनतेसमोर मोठे उदाहरण प्रस्थापित केले. इंग्रजी अमदानीत यम-नियम पालनाचा कुणाला पत्ता नव्हता. या व्रतांच्या साधनेसाठी गांधीजींनी आश्रमाची स्थापना केली. आश्रमात गृहस्थही यायचेत. त्यांची लेकरे-बाळेही असायचीत. बालकांच्या ठायी यम नियमांची सवय होण्यासाठी प्रयत्न केले गेलेत पण त्यांच्या ठायी ते बिंबवता आले नाहीत असे निदर्शनास आले. त्यांच्या जीवनावर यम नियमांचा काही प्रभाव नाही पडला. त्यांच्यातला कुणी ब्रह्मचारी नाही बनला. जनसेवेच्या क्षेत्रात उतरला. पैसा कमवण्याच्या कामाला लागला. आश्रमातले ब्रह्मचारी जन सारे बाहेरुन आलेले होते. त्यांना आश्रमात ब्रह्मचर्याची प्रेरणा नाही मिळाली, मदत मिळाली, पोषण मिळाले.

रात्रंदिवस आश्रमात रहाण्याऱ्या - शुध्द वातावरणातल्या बालकांवर आश्रमीय सिध्दांतांचा प्रभाव का नाही पडला? याचा विचार करु जाता दोन गोष्टी आढळतात. एक म्हणजे बालकांचे संस्कार त्यागाकडे जेवढे हवेत तेवढे नव्हते आणि दुसरे या कामी समजावून सांगायचा अभाव होता.

वर्धा येथे विनोबांचा सत्याग्रहाश्रमाचा प्रयोग जारी होता. तिथलेही निरीक्षण हेच सांगते. या प्रयोगाचा अपेक्षित परिणाम काही दिसून आला नाही. याचा मथितार्थ हाच की माणसाच्या जीवनात निग्रहाला मोठे मानाचे स्थान आहे. निग्रहाशिवाय जीवन नाही. निग्रहाच्या सरावामुळेच जीवनात नित्य संयम दाखल होऊ शकतो. दाखल होण्याची शक्यता असते. सात्विक जीवन जगण्यासाठी रजोगुणांना व तमोगुणांना निग्रहाने दूर सारावेच लागेल पण निग्रह जबरदस्तीपूर्वक नको. निग्रहाचा सराव ज्ञानपूर्वक करायला

हवा. मनाची समजूत घालून नेहमी कार्य करायची प्रेरणा द्यायला हवी. सवय लावायला हवी. आश्रमीय जीवन सदा न् कदा यम-नियमांनी जखडलेले असते. ते तसे असावेही! पण यम-नियमांचे यंत्रवत पालन करुन मनाला आवश्यक तो बोध नाही देता येत. बोधाअभावी यमनियमांचे पालन कायमस्वरुपी नाही होऊ शकत. संयमामुळे निग्रह सुरक्षित राहील. जबरदस्तीमुळे मात्र घातक ठरेल.

या श्लोकावर टिप्पणी करताना गांधीजी लिहितात- "दुसऱ्या अध्यायातील 61 ते 68 या श्लोकांमधली चर्चा या श्लोकातही आली आहे. इंद्रियांच्या निग्रहार्थ प्राण समर्पित करायला हवेत हे खरे पण यात यश मिळाले नाही तर जबर्दस्ती करु नये हेही खरे. हा श्लोक निग्रहवृत्तीची निंदा करत नाही. प्रकृती म्हणजे स्वभावाची प्रबळता दर्शवतो. आपल्या सवयी म्हणजे काही आपला स्वभाव नव्हे. मन अध:पतीत होत असेल तर त्याचा मुकाबला करावा कारण की आत्म्याचा स्वभाव ऊर्ध्वगमनाचा आहे, पतनाचा नव्हे !

: 34 :

*इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।*
*तयोर्न वशमागच्छेत् तौ ह्यस्य परिपन्थिनौ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इन्द्रियस्य इन्द्रियस्य अर्थे:** प्रत्येक इंद्रियांच्या प्रत्येक विषयात
- **रागद्वेषौ व्यवस्थितौ:** राग-द्वेष, काम-क्रोध अवश्य उत्पन्न होतील
- **तयो: वशं:** त्या राग-द्वेषांच्या, काम-क्रोधांच्या वश
- **न आगच्छेत्:** व्हायला नको
- **तौ अस्य:** कारण की राग-द्वेष या माणसाच्या
- **परिपन्थिनौ:** कल्याण मार्गात अडथळे आणणारे चोर-डाकू आहेत

**अर्थ**

प्रत्येक इंद्रियाचे इंद्रियाच्या विषयात राग व द्वेष लपलेले असतात. माणसाने त्या दोहोंच्या आहारी जाता कामा नये कारण ते दोन्हीही त्याच्या कल्याणमार्गात विघ्न करणारे मोठे शत्रु आहेत.

*इंद्रियीं सेवितां अर्थ राग-द्वेष उभे तिथें*
*वश होऊं नये त्यांस ते मार्गातील चोर चि।*

**विषय:** या श्लोकातून तीन मुद्यांची चर्चा आली आहे. (1) प्रत्येक इंद्रियाच्या विषयात रागद्वेष स्वभावत:च दडलेले आहेत. विषय सेवनात विषय सेवना प्रसंगी रागद्वेष प्रकटतात. (2) यामुळे राग-द्वेष, काम-क्रोध वगैरेंच्या अधीन होऊ नये (3) कारण की ते मानवी कल्याणमार्गातील चोर डाकूच आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **इन्द्रियस्य इन्द्रियस्य अर्थे राग-द्वेषौ व्यवस्थितौ:** शंकराचार्य म्हणताहेत की मागल्या श्लोकात कुणावर जबरदस्ती करणे अशक्य असल्याची चर्चा आली आहे. हा तर दैववाद झाला मग मानवी प्रयत्नवादाला काहीच संधी नाही की काय? यामुळे या श्लोकात सांगितले गेले की इंद्रियांचा विषयांशी संबंध आला म्हणजे द्वंद्व ठरलेलेच. राग द्वेष, काम-क्रोध, प्रीती-अप्रीती यासारख्या द्वंद्वात्मक बाबी उद्भवणारच. त्याना कुणी टाळू शकणार नाही. डोळ्यांचा विषय रुप आहे. रुप बघताच मनी दोन भाव उठतील. सुंदर रुप बघितले तर प्रेमभाव, कुरुप रुप बघितले तर तिरस्कारभाव. ही क्रिया इतक्या झपाट्याने होते की आपण ती थांबवू शकत नाही. फूला-फळाबाबतही अशीच प्रतिक्रिया होते. शब्द संगीताने मनावर प्रभाव पडेल. प्रेम जागेल. आकर्षण उत्पन्न होईल. सुरविरहीत संगीताचा तिरस्कार होईल. जीभेचा विषय रस. रुचिकर आवडते. अरुचिकर नाही आवडत.

अशा प्रकारे पंच इंद्रियांचे पाच विषय आहेत. त्यांच्याठायी रागद्वेष उत्पन्न करण्याची शक्ती भगवंताने स्वाभाविकपणे राखली आहे. विषय लोहचुंबकासारखे असतात. यामुळे उपनिषद म्हणते: **इन्द्रियेभ्य: परा हि अर्था:।** म्हणजे इंद्रियांहून विषय श्रेष्ठ आहे.

गीता तिसऱ्या अध्यायातील 42 व्या श्लोकात म्हणते की **इन्द्रियाणि पराणि आहु:।** विषयांपेक्षा इंद्रिय श्रेष्ठ आहेत. इंद्रियांशिवाय विषयांचा काय उपयोग? उपनिषदकाराचे निवेदन सत्य आहे. दुसऱ्या शब्दात असेही सांगता येईल की या इंद्रियांशिवाय विषयांचा काय बरे उपयोग?

उपनिषदांचे म्हणणे सत्य आहे की इंद्रियांपेक्षा विषय श्रेष्ठ आहेत. विषय लोहचुंबकासारखे आहेत. विषय

इंद्रियांना आकर्षित करत रहातात. आपल्या समोर विषय येताच त्याविषी राग-द्वेष उत्पन्न होऊन तदनुसार आपण अनुकूल वा प्रतिकूल व्यवहारही करु लागतो. उदाहरणार्थ आपण एखाद्या गहन विषयासंबंधी चिंतन करतोहोत आणि एक फळ विक्रेता समोर येऊन उभा ठाकला तर त्याच्यापाशी विविध फळे बघून मन लालचावते. काही चांगली फळे आपण विकत घेतो आणि मग भूक असो वा नसो काही चांगली फळे मुखात टाकली जातातच. याच्या आधी खरे पाहू गेल्यास न तर फळे खायची इच्छा होती ना कल्पना पण आपण त्या विषयाच्या अधीन झालो आणि परिणामी फळे खाल्लीत.

**तुलसीदासजी म्हणतात:**

***सोहमस्मि इति वृत्ति अखंडा। दीप-सिखा सोइ परम प्रचंडा॥***

अर्थात् ''तो परमात्मा मी आहे म्हणजे परमात्मा माझे स्वरुप आहे. हा अनुभव आणि ही वृत्ती अखंड असावी. जणू काही दीपकाची परम तेजस्वी ज्योतीच तेवते आहे.'' पण लागलीच पुढे लिहितात:

***इंद्रिय द्वार झरोखा नाना। तहँ तहँ सुर बैठे करि धाना॥***
***आवत देखहिं विषय बयारी।***
***ते हठि देहिं कपाट उघारी॥***

अर्थात् इंद्रियांच्या दाराशी जणू अनेक झरोके आहेत. त्या त्या दरवाजांवर देवता आपापल्या स्थानी स्थानापन्न झाले आहेत. विषयरुपी वाऱ्याला वहाताना बघून त्या देवता इंद्रियांची द्वारे उघडून देतात. पुढे लिहितात :

***जब सो प्रभंजन उर गृह जाई। तबहिं दीप बिग्यान***
***बुझाई॥ ग्रंथिन छूटि मिटा सो प्रकासा।***
***बुध्दि बिकल भइ बिषय बतासा॥***

अर्थात् हा विषयरुपी वारा हृदयरुपी भवनात शिरतो तेव्हा ताबडतोब मानवाचा विज्ञानरुपी दीप विझवून टाकतो. अंतरातल्या अज्ञानरुपी ग्रंथीचे द्वार तर उघडले नाही एवढ्यात विषयरुपी हवेने त्याच्या परमात्मस्वरुपी प्रकाशाला विझवून टाकले. आता त्या दिव्याला परत कसे प्रज्वलित करता येईल? बुध्दी पराभूत होऊन जाते. तुलसीदासजी म्हणतात:

***इन्द्रिय सुरन्ह न ग्यान सुहाई।***
***बिषय-भोग पर प्रीति सुहाई॥***

अर्थात् इंद्रियांच्या देवताना ज्ञान कदापि भावत नाही. हे देवता नेहमी विषयोपभोगांवर मुग्ध असतात, मोहित असतात. तुलसीदासजी म्हणतात:

***बिषय समीर बुध्दिकृत भोरी।***
***तेहि बिधि दीप की बार बहोरी॥***

अर्थात् विषयरुपी वायुने जेव्हा आपली बुध्दी पराभूत होते तेव्हा ज्ञानरुपी दीप कुणी पाजळावा? भगवान म्हणतात की विषय इद्रियांना आकृष्ट करतात. इंद्रियांवर विषयांचे स्वामित्व स्थापित होते. या विषयांमुळे आत्मज्ञान सदैव झाकलेले राहते.

2) मग म्हणतात की **तयोर्न वशमागच्छेत्:** ज्याना आपले कल्याण साधून घ्यायचे आहे त्यानी विषयाधीन न होण्याचा निश्चय करावा कारण की

3) हे विषय **तौ ह्यस्य परिपन्थिनौ:** कल्याणमार्गाने वाटचाल करणाऱ्या पथिकासाठी हे विषय 'परिपंथी' म्हणजे चोर-डाकू आहेत. चोर-डाकू आधी मैत्रीचा व्यवहार करतात. गावाची वेस ओलांडली की आपले खरे रुप दर्शवतात. विषयांचेही असेच आहे. या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य लिहितात:

***शास्त्रार्थे प्रवृत्त: पूर्वमेव रागद्वेषयो: वशं न आगच्छेत्।***
***या हि पुरुषस्य प्रकृति: सा रागद्वेषपुरस्सरैव स्वकार्ये***
***पुरुषं प्रवर्तयति तदा स्वधर्मपरित्याग: परधर्मानुष्ठानं च***
***भवति। यदा पुन: रागद्वेषौ तत्प्रतिपक्षेण नियमयति तदा***
***शास्त्रदृष्टिरेव पुरुषो भवति, न प्रकृतिवश:।***
***तस्मात्तयो: रागद्वेषयो: वशं न आगच्छेत्।***

अर्थात् ''शास्त्राधारे जो चालतो त्याने सुरुवातीपासूनच रागद्वेषाच्या अधीन होऊ नये कारण प्रकृती रागद्वेषयुक्त पुरुषाला आपल्या कार्यात प्रवृत्त करते. अशा वेळी स्वधर्म सुटून परधर्म आचरला जातो. रागद्वेषाचे विवेकाने नियमन केल्यावर शास्त्राज्ञेनुसार पुरुष वर्तणारा ठरतो. असा पुरुष प्रकृतीला वश होत नाही.''

शंकराचार्य म्हणताहेत की ज्याच्या जीवनाचा आधार शास्त्रवचने आणि संतांची आज्ञा आहे अशा लोकाना कदापि राग-द्वेष, काम आणि क्रोध याना बळी पडायला नको. एक नियम असा सांगताहेत की माणसाचा स्वभाव त्याला राग-द्वेषाच्या अधीन करुनच कार्याला प्रवृत्त करतो. याचा हा अर्थ होतो की आपण त्या कार्यात अखंडपणे

प्रवृत्त असू असे काही सांगता येत नाही. जिथे राग-द्वेष आहे तिथे फळाची आसक्ती आहेच. फळ इच्छेनुसार जर लाभत नसेल तर मग माणूस कार्य त्याग करायला प्रवृत्त होईलच होईल. त्या वेळी तो आपले स्वकर्म स्वधर्म सोडायला तयार होऊन जाईल. यामुळे आचार्य स्वधर्म न सोडायची चावी सांगताहेत की राग-द्वेष घालवण्यासाठी त्याच्या विरुध्द भावना करायला हवी.

योगसूत्रात (1) मैत्री, (2) करुणा, (3) मुदिता, (4) उपेक्षा या चार प्रतिपक्ष भावनांचे वर्णन येते. साऱ्या विश्वाप्रती मैत्रभाव जोपासला तर मानापमानामुळे उद्भवणारे दु:ख सहज टाळता येते. करुणावृत्तीचा विकास साधला तर क्रोध नाही उपजणार. मुदिता म्हणजे आनंदाच्या सरावामुळे गुणदृष्टीचा विकास होईल, दोषदृष्टी टळेल. गुण बघून मग मनी आनंदकल्लोळ उसळतील. उपेक्षाभाव म्हणजे तटस्थभाव अंगी बाणवावा. यामुळे पापाचरण आणि अन्याय बघूनही आपण निराश न होता तटस्थ बनू. या भावनांचा सराव करता आला तर रागद्वेषापासून बचाव करता येईल. रागद्वेष जर उत्पन्न नाही झाले तर आपण अनायासेच शास्त्राच्या शिकवणुकीनुसार वागू. संतांच्या उपदेशानुसार आचरण करु. रागद्वेषाच्या अधीन होणे म्हणजे अविवेकाने वागणे होय. यामुळे आपली प्रकृती मलीन होते. चित्त विशुध्द नाही रहात. चित्त विशुध्द बनले तर मोक्ष मार्गीची वाट झळकते, हे परमशांती प्राप्त करुन घेण्याचे साधन आहे. यामुळे भगवंत सांगताहेत की आपण रागद्वेषाच्या अधीन होता कामा नये-ते सन्मार्गावर वाटमारी करणारे चोर-डाकू आहेत.

: 35 :

*श्रेयान् स्वधर्मो विगुण: परधर्मात् स्वनुष्ठितात् ।*
*स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **स्वनुष्ठितात् परधर्मात्:** सर्वगुणसंपन्न परधर्माहून
- **विगुण: स्वधर्म: श्रेयान्:** गुणरहित स्वधर्म हा श्रेष्ठ होय
- **स्वधर्मे निधनं श्रेय:** स्वधर्माचे आचरण करत असतांना मरण आले तरी ते श्रेयस्कर होय
- **परधर्म: भयावह:** (पण) परधर्म भयावह आहे

**अर्थ**

चांगल्या प्रकारे आचरणात आणलेल्या दुसऱ्याच्या धर्माहून गुणरहित असला तरी आपला धर्म अतिशय उत्तम आहे. आपल्या धर्मात तर मरणेही कल्याणकारक आहे पण दुसऱ्याचा धर्म भय देणारा आहे.

***उणा हि आपुला धर्म पर-धर्माहुनी बरा***
***स्व-धर्मात भला मृत्यु पर-धर्म भयंकर ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी येतात. (1) स्वधर्म गुणहीन वाटेल आणि परधर्म सर्वगुणसंपन्न वाटेल तरी स्वधर्मच श्रेयस्कर आहे. (2) स्वधर्माचे पालन करताना मृत्यु आला तरीही स्वधर्म कल्याणकारी आहे असे समजावे. (3) परधर्म कितीही गुणसंपन्न आणि पालन करण्यात सुगम-सोपा असला तरी तो अहितकर, अवनतीकडे नेणारा आहे.

**स्पष्टीकरण**

1) **श्रेयान् स्वधर्मो विगुण: परधर्मात् स्वनुष्ठितात्:** या श्लोकाचा सर्व टीकाकारांनी जो अर्थ केला आहे आणि जो सामान्यपणे केला जातो त्यापेक्षा विनोबांनी केलेला अर्थ वेगळा आहे. (अध्याय 18 श्लोक 47) यातही हे वचन आले आहे. विनोबा म्हणतात की सामाजिक धर्म म्हणजे आपला स्वभावानुसार वर्तन. हा व्यक्तिगत आंतरिक स्वधर्म झाला. या अध्यायाच्या 17 व्या आणि 18 व्या श्लोकात येते की ज्ञानी पुरुष आत्मसंतुष्ट - आत्मतृप्त असल्यामुळे तो कर्माचरण करो वा न करो त्याच्यासाठी त्याचा काहीही उपयोग नाही. त्याला स्वत:साठी जे काही मिळवायचे होते ते त्याने प्राप्त करुन घेतलेले असते. तो मुक्कामी पोहोचलेला असतो. त्याला आता करण्यासारखे काहीही उरलेले नसते. तो जनतेसाठी अवश्य कर्मे आचरील पण सारे नि:स्वार्थ बुध्दीने करेल.

पण जो ज्ञानी नाही-अज्ञानी आहे, साधक वा मुमुक्षु आहे त्याला अज्ञान निवृत्तीसाठी बाह्य आणि आंतरिक कर्मांची साधना करावी लागेल. त्या साधकाने ज्ञानी पुरुषाचे अनुकरण करणे अयोग्य ठरेल. यामुळे त्याला आपली साधना अधूरी वाटली तरी तीच त्याच्यासाठी श्रेयस्कर आहे. तोच त्याचा स्वधर्म आहे. ज्ञानी पुरुषाचा धर्म अज्ञानीसाठी अजून ‘ परधर्म ‘ आहे. ज्ञानी बनल्यावर त्याच्यासाठीही तो स्वधर्म ठरेल. त्याने आपल्या स्वधर्मातच रत रहावे. आपला अधुरा वाटणारा धर्म त्याच्यासाठी

स्वधर्म आहे. हा त्याच्यासाठी कल्याणप्रद. भावार्थ असा की अज्ञानी जनाने कुठल्याही परिस्थितीत ज्ञान्याचे बाह्य अनुकरण करु नये.

विनोबांचा हा अर्थ अतिशय उत्तम आहे. शंकराचार्य, लोकमान्य आणि गांधीजी यांनी ‘ आपापले कर्तव्य ‘ असा सामान्य अर्थ केला तोही ठीक आहे.

स्वधर्म ठरवण्याची काही एक कसोटी तर असायलाच हवी.

विनोबांनी एका पत्रातून याबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

**‘कोऽहम्?’** हा प्रश्न आहे. याचे उत्तर काय? यावर ‘ स्वकर्तव्य ‘ अवलंबून आहे. रामायणात सौमित्राने हा प्रश्न स्वत:ला विचारला होता. उत्तर मिळाले होते **‘राम बंधु: अहं’** मी रामाचा बंधु आहे. खरे तर तो दशरथ - सुमित्रेचा पुत्र होता. ऊर्मिलेचा पती होता. अनेकांचा अनेक होता पण त्याचे आंतरिक उत्तर होते ‘मी रामाचा भाऊ आहे. ‘ तो जर दशरथाचा पुत्र असता तर रामासोबत वनगमन केले नसते. भरताला विरोध करण्याचा प्रश्नच नव्हता. आपल्या अंत:करणाचे उत्तर सदोष असले तरी त्याचे अनुसरण करावे. **सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ‘सर्व** धर्मांचा त्याग कर आणि एक मला शरण ये ‘हे गीतेचे वचन आहे. याचा हाच अर्थ करतो. मी आपल्या अंतरात्म्याला विचारीन ‘मी कोण आहे?’ याचे जे सहज उत्तर मिळेल मग ते सदोष का असेना. शेष सारे धर्म त्यात अंतर्भूत होतात. मला असे वाटते आणि समजा सारे धर्म यात सामावत नसतील तरीही अशी वृत्ती बाळगीन. अशी वृत्ती नाही ठेवली ना तर विचारशाखा संपणार नाहीत. नाना कर्तव्यांमध्ये घोटाळा होईल. एकही गोष्ट पूर्ण करता येणार नाही. जीवनात चंचलता राहील. कुठलेच ध्येय गाठता येणार नाही.“

समजा, एक गृहस्थ आहे. त्याला एक बायको आणि चार मुलं आहेत. तो सरकारी नोकरीत आहे. दोनशे रुपये त्याचा पगार आहे. त्याच्या विचारात परिवर्तन झाले आणि तो नोकरी सोडून विनोबांच्या भूदान चळवळीत सामिल झाला. भूदानसमिती त्याला 150 रुपये पगार द्यायची. काही कारणांमुळे 150 रुपयांचे हे सहाय्यही थांबले. आता त्याचा स्वधर्म काय असेल? आता त्याने भूदान कार्य सोडून पुनरपि नोकरी धरावी का? तो आपल्या कुटुंबाची उपेक्षा नाही करु शकत. नोकरी करत असताना कुटुंबाचे भरण-पोषण हाच त्याचा स्वधर्म होता. त्याच्या ठायी विचारपरिवर्तन जागले. सरकारी नोकरी त्याने सोडून दिली. आता कुटुंबाचे भरण - पोषण त्याचा गौण धर्म झाला. भूदानकार्य स्वधर्म बनले. दिडशे रुपयांचा ओघ आटला. आता भूदान कार्य थांबवून तर त्याचा मुकाबला नाही ना करता येणार? आता काही मित्रांना विनंती करुन सहाय्य प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न त्याला करावा लागेल. पत्नीनेही काही काम करुन स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करावा. मुलगा मोठा असेल तर त्यानेही परिश्रमपूर्वक काही कमवून बघावे. ब्रह्मचर्याचे व्रत घेऊन कुटुंबाचा विस्तार थांबवावा. काही खर्चांना काट मारुन जीवन साधेपणाचे आणि अपरिग्रही बनवावे. भूदान वा सार्वजनिक सेवेचे कार्यच जर कुणी स्वधर्म मानून घेतले तर पदोपदी अडचणी या येतीलच. स्वधर्म पालनात दृढ राहून अधिक बळ मिळवण्यासाठी त्याने ईश्वराला प्रार्थना करावी. कुटुंबपोषणाचा भार त्याचा आता गौण धर्म ठरला तो ईश्वरावर सोपवून निश्चिंत असावे. ‘ ईश्वराने आजपर्यंत अनेकांना सहाय्य केले आहे तो मलाही अवश्यमेव मदत करील ‘ हा विश्वास त्याच्या ठायी विद्यमान हवा.

2) **स्वधर्मे निधनं श्रेय:** स्वधर्म वा स्वकर्तव्य ही अत्यंत श्रेष्ठ वस्तु आहे. याच्या पालनाकामी मृत्यु आला तरी बेहत्तर! त्याचाही सानंदे स्वीकार. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की दुसऱ्याचे चांगले घर बघून आपण आपली कुटी विस्कटून टाकली तर कसे बरे चालेल? पत्नी भोंगळ आहे तरी तिच्यासोबतच जीवन कंठून कितीही अवघड वाटले तरी त्याच्या पालनामुळेच अखेर सुख लाभेल. यामुळे वाटेल तेवढ्या अडचणी आल्या आणि स्वधर्माचे आचरण कितीही अवघड वाटत असले तरी त्याच्या पालनातून अखेरीस सुखाची प्राप्ती होईल.

3) **परधर्मो भयावह:** स्वधर्म सोडून परधर्माचे पालन करणे हानिकारक आहे. स्वधर्मपालनात इच्छा-वासनांचा क्षय व्हायची शक्यता आहे. परधर्मात अशी शक्यता नाही कारण की स्वधर्म प्रवाहपतीत असतो. त्यात आपल्या इच्छे-अनिच्छेचा काही प्रश्नच उरत नाही. आपल्या इच्छेने जेव्हा आपण एखाद्या विषयाची निवड करतो. विषय पसंत करतो. ग्रहण करतो. त्यावेळी त्याने प्रेरित होऊनच आपण आपले कर्म आरंभ केले असे मानावे पण स्वधर्मात निवडीला वाव नसतो. तो आधी पासून स्वत:हूनच प्राप्त असतो. त्याचे पालन करणे सोपे वा अवघड हा प्रश्न नसतोच तो सोपा वा गुणवान मानून आपण त्याची निवड करतो. तो सत् असतो, असत् नसतो. सत् असल्यामुळे तो सात्विक ठरतो. यामुळे चित्तातल्या इच्छा-वासना, अहंकार,

महत्त्वाकांक्षा यासारख्या विकारांना क्षीण करायला त्याची मोठी मदत मिळते. या परधर्माचे पालन करत असताना हे स्पष्ट आहे की आपण स्वत:हूनच एखाद्या गोष्टीची निवड करतोहोत. तिला पसंत करतोहोत. स्वेच्छेने प्रेरित होऊन परधर्माचे पालन करु इच्छित आहोत. कर्माच्या आरंभीच जर अशा प्रकारे इच्छेचे बीज रोपले गेले तर तिथे इच्छेचीच पिके डुलतील. इच्छारुपी बीजाला नित्य पोषण मिळत राहील. त्या आपल्या आवडीच्या कामात मन आसक्त होईल. आपण अनासक्त-निरीच्छ बनण्याऐवजी इच्छालोलुप, संसारासक्त, महत्वाकांक्षी आणि अहंकारी बनत जातो. अशाप्रकारे परधर्माच्या पालनाने पतन होईल आणि होतच राहील. इच्छेच्या अधीन बनून आपण कर्म निवडले. स्वधर्माचा त्याग केला. तिथे आपण निवडलेल्या दुसऱ्या कर्मात तरी आपण स्थिर राहू हे कुणी सांगावे? तसे होत नाही. इच्छा सतत ठगत रहाते. नेहमी बदलत आणि वाढत रहाणे हे इच्छेचे स्वरुप आहे. इच्छेच्या अधीन राहून आपण जोपर्यत कर्माची निवड करतो तोपर्यत तिथे स्थिरपद राहू शकत नाहीत. कारण इच्छेचा स्वभावच अस्थिर असणे आहे. अमलात आले की इच्छा तृप्त होते मग पुन्हा त्या कर्माचा त्याग म्हणजे पर्यायाने स्वधर्माचा त्याग. अन्य कर्म करायची इच्छा जागणे हा इच्छेचा धर्म आहे.

इच्छा कदापि स्थिर असत नाही. अस्थिर असणे हा इच्छेचा मोठा अवगुण होय. तुलसीदासजी एका भजनातून म्हणतात :

***जे लोलुप भये दास आस के, ते सबहीं के चेरे।***
***प्रभु बिस्वास आस जीति जिन्ह, ते सेवक हरि केरे॥***

अर्थात् 'जे जन विषय लोलुप बनून, मुग्ध भावनेने, आसक्त बनून आशा वा इच्छेचे दास बनतात ते सर्वांचे दास होत पण ईश्वरी श्रध्देने ज्यांनी आशेला जिंकून घेतले ते हरीचे सेवक होत.' इच्छेमुळेच माणूस परधर्माला वरतो. यामुळे ज्याला स्वधर्मरत रहायचे असेल त्याने नित्य इच्छारहित, निरिच्छ बनून स्वधर्म पालनाचे लक्ष्य बाळगायला हवे. तरच त्याला यश लाभेल. परधर्म पालन भयावह आहे. दुग्धशर्करा मधुर खरी पण ज्याच्या पोटात कृमी असतील त्याच्यासाठी व्यर्थ !

: 36 :

**अर्जुन उवाच**

***अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुष:।***
***अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजित:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वार्ष्णेय:** हे कृष्णा (वृष्णि कुळात जन्माला आलेल्या)
- **अथ केन प्रयुक्त:** आता कुणाने प्रेरित होऊन
- **अयं पूरुष: अनिच्छन् अपि:** हा माणूस इच्छा न करत असतांनाही
- **बलात्:** लाचार होऊन, जबरदस्तीपूर्वक
- **नियोजित: इव:** जणू काही नियुक्त केलेला आहे
- **पापं चरति:** पाप कर्मे करत असतो?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे कृष्णा, तर मग हा मनुष्य स्वत:ची इच्छा नसतानाही जबरदस्तीने करावयास लावल्याप्रमाणे कोणाच्या प्रेरणेने पापाचे आचरण करतो?

**अर्जुन म्हणाला**

***मनुष्य करितो पाप कोणाच्या प्रेरणेमुळें***
***आपुली नसतां इच्छा वेठीस धरिला जसा ।***

**विषय:** अर्जुनाने या श्लोकात एक प्रश्न विचारला आहे पण त्यात चार मुद्दे येतात. (1) कुणाच्या प्रेरणेने? म्हणजे कुणाच्या प्रेरणेमुळे? (2) इच्छा नसतानाही लाचारीनेच जणू काही नियुक्त केले गेले असावे असे पापकर्म घडते. हा कोण आहे? (3) दुसऱ्या शब्दात न चाहतानाही माणूस पापकर्म आचरतो. (4) हे पापकर्म करवणारा कोण आहे? याला जबाबदार कोण?

**स्पष्टीकरण**

1) **अथ केन प्रयुक्त: अयं पुरुष:** इच्छा नसतानाही पापाचरण घडते याचे काय कारण? जणू आतून कुणी धक्का देत आहे. आतून प्रेरित करत आहे. आतून दबाव वाढत आहे. असे का होते?

2) **अनिच्छन्नपि:** इच्छा नसतानाही. हा मुख्य विषय आहे. माणूस आपल्या इच्छेने जेव्हा पापकर्मे आचरतो, कुकर्मे करतो ते वेगळे कारण की पाप करायच्या इच्छेने

इराद्याने माणूस पाप करतो तेच निमित्त ठरते पण इच्छा अजिबात नाही, तरीही माणूस पाप कर्मे करतो, पापाचरण करतो. याचे काय कारण? हा प्रश्न सहजच माणसाच्या मनात जागतो.

3) **बलात् नियोजित:** इव आतून जणू काही कुणी धक्के देऊन कुणी दबाव टाकून माणसाला नियुक्त केल्यासारखा माणूस पापकर्मे करतो.

4) **पापं चरति:** मनुष्य पाप करुन बसतो. अर्जुनाचा हा प्रश्न आपल्या सर्वानाच अनेकदा कमी-अधिक प्रमाणात पडत असतो. ज्ञानेश्वर महाराज लिहितात की जे सर्वज्ञ आहेत आणि उपायही जाणतात तरीही ते परधर्मात कसे फसतात? परधर्माचे आचरण का करतात? आंधळ्याला धान्य आणि कोंडा यातला फरक कळू नये हे ठीक पण डोळसालाही कळू नये, म्हणजे काय? एवढेच नव्हे विषयसंगाचा ज्यांनी परित्याग केला आहे अशांनीही विषयसंग करण्यात तृप्ती मानावी? अरण्यवासींना पुनरपि जनलोकात येऊन वसावे असे का वाटते? पापकर्मापासून वाचतात तरी त्यातच कसे फसून जातात बरे? हे कसे होते? हे कृपा करुन सांगावे ही प्रार्थना अर्जुनाने भगवंताना केली आहे.

: 37 :

**श्री भगवान उवाच**

*काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव ।*
*महाशनो महापाप्मा विध्द्येनमिह वैरिणम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एष: काम:** हाच काम म्हणजे इच्छा आहे आणि
- **एष: क्रोध:** हाच क्रोध आहे
- **रजोगुणसमुद्भव:** रजोगुणाने उत्पन्न झालेला
- **महाशन: महापाप्मा:** खूप खाणारा, भोगांनी तृप्त न होणारा आहे, महापापी आहे
- **इह:** या प्रपंचात
- **एनम्:** या काम, क्रोधाला
- **वैरिणं विध्दि:** मोक्ष मार्गाचा शत्रु समज

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले रजोगुणापासून उत्पन्न झालेला हा कामच क्रोध आहे. हा खूप खादाड अर्थात् भोगांनी कधीही तृप्त न होणारा आणि मोठा पापी आहे. हाच या विषयातील वैरी आहे, असे तू समज.

*काम हा आणि हा क्रोध घडिला जो रजोगुणें*
*मोठा खादाड पापिष्ठ तो वैरी जाण तूं इथें।*

**विषय:** या श्लोकात पाच बाबी येतात. (1) एक, इच्छा नसतानाही माणूस पापकर्म आचरतो असे जे आपण म्हणतो ते नसे नसून ती इच्छा आणि क्रोधच असतो. (2) दोन, हा रजोगुणामुळे उत्पन्न होतो. (3) तीन, हा मोठा खादाड आहे. (4) चार, हा महापापी आहे आणि (5) पाच, मोक्षप्राप्तीत हा शत्रुप्रमाणे बाधक आहे.

**स्पष्टीकरण**

1) **काम एष: क्रोध एष:** भगवंत म्हणाले की आपण अनिच्छेने म्हणजे इच्छा नसतानाही पापकर्मात ओढले गेलोत हे चुकीचे आहे. आपल्या मनात शब्द, स्पर्श, रस, गंध, रुप या पंचतन्मात्रा आहेत. पंचविषय भोगण्याच्या सूक्ष्म इच्छा आहेत. त्याच आपल्याकडून अयोग्य कर्मे करवून घेतात. इच्छोशिवाय अयोग्य कार्य कुणी करुच शकत नाही. नाना प्रकारच्या इच्छाच वेळोवेळी छळतात आणि पापकर्मे करवतात.

काम आणि क्रोधाला भगवंत दोन वा वेगवेगळे मानत नाहीत, हे ध्यानात घेण्यासारखे आहे. भगवंत म्हणतात की जो काम आहे तोच क्रोध आहे. दुसऱ्या अध्यायातील 62 व्या श्लोकात सांगितले आहे की विषयांचे ध्यान करत राहिल्यामुळे त्यांच्याप्रती आसक्ती निर्माण होते. विषयप्राप्तीची इच्छा जागते. कामामुळे क्रोध उपजतो.

कामाच्या ठायीच क्रोध सामावलेला असतो हा अर्थ विनोबांनी केला आहे. कामासाठी राग आणि क्रोधासाठी द्वेष शब्द वापरतात किंवा इच्छा व द्वेष असे शब्द वापरतात. गीतेतही हे शब्द प्रयुक्त आहेत. सातव्या अध्यायाच्या 27 व्या श्लोकात **इच्छा-द्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत** आणि तेराव्या अध्यायाच्या 6 व्या श्लोकात **इच्छा द्वेष: सुखं दु:खं संघातश्चेतना धृति:** यांचा उल्लेख आला आहे. इच्छा आणि द्वेष शब्द काम आणि क्रोध यासाठी आले आहेत.

शंकराचार्य लिहितात: **कामः एषः सर्वलोकशत्रुः यन्निमित्ता सर्वानर्थप्राप्तिः प्राणिनां सः एषः कामः प्रतिहतः केनचित् क्रोधत्वेन परिणमते। अतः क्रोधः अपि एषः एव।** अर्थात् काम सर्वांचा शत्रु आहे यामुळे अनर्थ होतो. काम काही कारणांमुळे बाधित झाला की क्रोध उपजतो. यामुळे क्रोध ही कामच-कामाचेच रुप होय.

याचा अर्थ असा होतो की काम आणि क्रोध हे वेगवेगळे नाहीत. काम अतृप्त राहिला की तृष्णा उपजेल. कामपूर्तीत वा कामतृप्तीत अडथळा निर्माण झाला तर क्रोध जागेल. काम तृप्त झाला वा काम पूर्ती झाली तर लोभ वृत्ती वाढीस लागेल. कामामुळे लोभही वाढेल. मूळवृत्ती एकच एक हीच **कामवृत्ती**.

'स्थितप्रज्ञ दर्शन' या आपल्या ग्रंथातून विनोबानी या मुद्याला स्पष्ट केले आहे. काम म्हणजे चित्तात उपजणारा क्षोभ, खळबळ, हा क्षोभ का उपजतो? विनोबा म्हणतात की परिपूर्ण परमात्मा हेच आपले स्वरुप आहे पण आपण देह, इंद्रिये, मन, बुध्दीला आपले स्वरुप मानून पूर्ण असूनही स्वत:ला अपूर्ण मानतो. या अपूर्णतेचे भान असल्यामुळे नेहमी चित्तात क्षोभ, खळबळ आणि अशांतता असते. 'महत्वाकांक्षा' शब्दाचा अर्थ सांगताना विनोबा म्हणतात की महत्‌ची आकांक्षा म्हणजे महत्वाकांक्षा होय. आपण आपल्या महान रुपाला ओळखत नाही. स्वत:ला छोटा मानून मोठा बनण्याची आकांक्षा बाळगतो. मोठे बनण्याच्या आपल्या या इच्छेत अडथळा निर्माण होतो तर क्रोध जागतो. विनोबा म्हणतात की इच्छा निर्माण होताच निर्माण होणारा क्षोभ हा क्रोध आहे. सौम्य क्षोभ अंतरी वसतो, बाहेर प्रकट झाला त्याला **क्रोध** म्हणायचे.

पतंजलिंनी 'योगसूत्र' ग्रंथाच्या साधनपादाच्या तिसऱ्या सूत्रात क्लेशाचे पाच प्रकार वर्णिले आहेत. 1) अविद्या 2) अस्मिता 3) राग 4) द्वेष आणि 5) अभिनिवेश. हे पाचही क्लेश दु:खद आहेत. यात राग आणि द्वेष भिन्न आहेत. गीतेत राग आणि द्वेषाला एकच वृत्ती मानले आहे. काम, कोध वा राग, द्वेष यांचा अर्थ स्पष्ट करुन समजाऊन सांगताना दोघांमधले अंतर सांगावे लागते. राग, द्वेष, काम, क्रोध यांच्या उत्पन्न होण्याचे मुळ कारण आहे अविद्या, देहाला आत्मा समजणे ही अविद्या. हे मूळ अज्ञान होय. यातून 'अस्मिता' म्हणजे अहंकाराचा प्रवाह सुरु होऊन जातो. अविद्येला नदीचे उद्गमस्थान मानले तर अस्मितेला नदीचा प्रचंड प्रवाह मानता येईल. या प्रवाहात राग, द्वेष, काम, क्रोध या लाटा उसळतात. अहंकाररुपी प्रवाहात अभिनिवेशरुपी भोवरा असतो. त्यात जीव फसून जातो. अभिनिवेश म्हणजे जगण्याची आसक्ती होय.

अशा प्रकारे अज्ञानातून सुरु झालेला अभिमान वा अहंकाराच्या सततच्या प्रवाहात राग-द्वेषाच्या लाटा उसळताना दिसतात. योगसूत्रकार म्हणतो **सुखानुशयी रागः** सुखकारक पदार्थांमधली कामाची आसक्ती म्हणजे 'राग' वा 'काम' होय. दु:खकारक पदार्थांमधली क्रोधाची आसक्ती म्हणजे 'द्वेष' वा 'क्रोध' होय. दु:खकारक पदार्थांमधली क्रोधाची आसक्ती म्हणजे 'द्वेष' वा 'क्रोध' होत. स्तुती माणसाला भावते पण निंदा वा अपमान ऐकून मात्र क्रोध उसळतो. यातून ईर्ष्या, द्वेष, मत्सर उत्पन्न होतात. अनुकूल परिस्थितीत वृत्ती तृष्णासक्ती सोडत नाही, प्रतिकूल परिस्थितीत वृत्ती क्रोधासक्तीला सोडत नाही.

**रजोगुणसमुद्भवः** हा दुसरा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. याचा एक अर्थ हा आहे की काम हा रजोगुणातून उत्पन्न होतो आणि दुसरा अर्थ हा आहे की काम रजोगुणाला उत्पन्न करतो. दोन्ही अर्थ बरोबर आहेत. स्वभावात सत्व, रज आणि तम हे गुण विद्यमान असतात. या तीन गुणांचे दोन वर्ग करु शकतो. एक केवळ सत्वगुण आणि दुसरा रज आणि तम गुण. रज आणि तम गुण असे आहेत की यांच्याशी जोवर संबंध कायम राहील तोवर कामाचा क्षय होणे शक्यच नाही. दोघे कामाला पोषक आहेत.

शरीराची उत्पत्ती कामामुळे संभवते. यामुळे शरीर, मन, इंद्रिये यांच्याठायी काम बाल्यावस्थेपासूनच असतो. अर्थात् बाळपणी सुप्त असतो, युवावस्थेत प्रकटतो. ज्यांचे पूर्वजन्मीचे संयमाचे संस्कार प्रबळ असतात ते ब्रह्मचर्य पाळतात पण त्यांच्या ठायीही कामविकार तर प्रकट होतोच. अर्थात् प्रबळ संयम संस्कारांमुळे इतरांप्रमाणे त्यांचे पतन होत नाही तरी कामविकारांचा स्पर्श त्यांना झाल्याशिवाय रहात नाही. त्याना त्यातून पसार व्हावेच लागते. कामविकारांशी झुंज घेऊन ते विजयश्रीला वरतात.

कामामुळे म्हणजे रजोगुणी संस्कारांमुळे उत्पन्न होणाऱ्या संततीच्या ठायी कामविकाराचे बीजवपन होईलच. याचा अर्थ असा झाला की माता-पित्याच्या रजोगुणामुळे कामविकार उपजतो. काम आणि रजोगुण एकमेकातून मग उद्भवत रहातात. अशाप्रकारे चक्र सुरु

रहाते. तमाम इच्छा वासनांमध्ये काम म्हणजे वासनाभाव प्रबळ असतो. प्रजोत्पत्तीची क्रिया अत्यंत महत्वाची असल्यामुळे भगवंताने अधिक आकर्षण ठेवले हे योग्यच आहे पण या क्रियेला लोकांनी भोगाचे सुखाचे साधन बनऊन टाकले. हा प्रजोत्पत्तीच्या क्रियेचा दुरुपयोग होय. यामुळे शारीरिक-मानसिक हानी होते.

**महाशनः** काम हा मोठा खादाड आहे. त्याचे थोडक्यात समाधान नाही होत. त्याच्या अधीन होण्याचा अर्थ स्वत:ला संपवून टाकणे होय. कामाच्या अधीन झाले तर तो छातीवर चढून बसतो. नाचवत रहातो. भक्तीचे स्थान देहविषयक आसक्ती घेते. तुलसीदासजी म्हणतात:

***खल कामादि निकट नहिं जाहीं।***
***बसइ भगति जाके उर माहीं॥***
***गरल सुधा सम अरि हित होई।***
***तेहि मनि बिनु सुख पाव न कोई॥***

अर्थात् ज्यांच्या अंत:करणात परमात्माविषयक भक्ती आहे त्यांच्यापाशी काम वगैरे दुष्ट विकार येत नाहीत. त्यांच्यासाठी तर विष अमृतासमान आणि शत्रु मित्रासारखे कल्याणकारी होतात. रामभक्तिरुपी चिंतामणी हाती लागल्याशिवाय कुणी अखंड सुख प्राप्ती करु शकत नाही.

महापाप्मा: हा काम महापापी आहे कारण हा सर्वांचे पतन करतो.

यामुळे कामाला वैरी म्हणजे शत्रु माना. वेदान्ताचा हा महत्वाचा नियम आहे की मोक्ष प्राप्त करुन घेण्याची वस्तु नाही. मोक्ष तर प्राप्त आहेच. आपले स्वरुपच आहे. अन्यथा त्याला बंधनच मानावे लागेल. जे विनाशधर्मी आहे ते स्वरुप होऊ नाही शकत. बंधन दु:खरुपी असते परिणामी त्याला नष्ट करण्यासाठीच सारी साधना आहे. आपले अखंड स्वरुप मोक्ष हे आहे.

या ठिकाणी असा प्रश्न उद्भवतो की मोक्ष हेच जर आपले स्वरुप असेल तर मग त्याचा अनुभव आपल्याला का नाही होत? स्फटिक मण्यानजिक लाल फूल ठेवले तर ते अतिनिर्मळ स्वच्छ स्फटिकही तांबडे दिसू लागेल. अशाप्रकारे देह, मन, बुध्दी, इंद्रिये यांच्या सोबत आपण असल्यामुळे तेच आपले स्वरुप आहे असे वाटायला लागते. आपण परमात्मस्वरुप असल्याचे ज्ञान व भान उरत नाही. देह वगैरे स्वरुपालाच आपण आपले स्वरुप समजतो. देहोत्पन्न विकार आपल्याला घेरुन घेतात. यामुळे आपल्याला आपल्या स्वरुपाची धड ओळख होत नाही. मुक्त असूनही आपल्याला आपल्या मुक्ततेचा अनुभव नाही होत. कामशक्ती आणि तिचा क्रोध, लोभ, तृष्णा, मोह, आसक्ती वगैरे परिवार मुक्तीला झाकून टाकतात. यामुळे मोक्ष म्हणजे आत्मस्वरुपाचा शत्रु काम आहे असे जाणून या विकारांच्या जाळ्यात कदापि सापडू नये असे भगवंत सांगताहेत.

: 38 :

***धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च।***
***यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा धूमेन:** ज्याप्रमाणे धूराने
- **वह्निः आव्रियते:** अग्नी झाकला जातो
- **च यथा:** आणि ज्या प्रमाणे
- **मलेन आदर्श: आव्रियते:** धूळीने आरसा आच्छादित होतो
- **यथा उल्बेन गर्भ: आवृत:** आणि ज्याप्रमाणे वारेने गर्भ वेष्टित असतो
- **तथा तेन:** त्याच प्रमाणे क्रोध वर्गरे विकारांनी
- **इदं आवृतं:** हे आत्मज्ञान (मोक्ष) झाकलेले आहे

**अर्थ**

ज्या प्रमाणे धुराने अग्नी, धुळीने आरसा आणि वारेने गर्भ झाकला जातो त्याचप्रमाणे त्या कामामुळे हे ज्ञान आच्छादित रहाते.

***धुरानें झाकिला अग्नि धुळीनें आरसा जसा***
***वारेनें वेष्टिला गर्भ कामानें ज्ञान हें तसें।***

**विषय:** या श्लोकात भगवंताने एकच गोष्ट मांडली आहे की ज्ञान अंतस्थ आहे. कामाने झाकलेला असल्यामुळे त्याला अनुभवता येत नाही. यासाठी तीन उदाहरणे दिलेली आहेत. (1) धुराने अग्नी झाकलेला असतो. (2) धुळीने दर्पण झाकलेला असतो. (3) वारेने गर्भ झाकलेला असतो. अशाप्रकारे मोक्ष वा आत्मज्ञान काम वगैरेने झाकलेले असते.

**स्पष्टीकरण**

1) ज्ञानाला काम कसा काय झाकून टाकू शकतो? **धूमेन आव्रियते वह्निः।** धुर काही अग्नीला संपूर्णपणे झाकू शकत नाही. धुरासोबत अग्नीची ज्वाळाही दिसून येते. अग्निवर धुराचे दाट आवरण नसते तशाचप्रकारे सात्विक पुरुषाच्या ठायी विकार दुबळे असतात. धुराला हटवायला फार परिश्रम नाही घ्यावे लागत, अल्पशा परिश्रमाने धूर हटवता येतो. सत्वगुण कामाचा सहयोगी नसून विरोधी गुण आहे. चित्ताच्या ठायी सूक्ष्मरुपाने उपस्थित असलेल्या कामाला देखिल सहन न करणे हे सात्विक पुरुषाचे लक्षण आहे. स्त्रीविषक विकारांचे स्वरुप तर स्थूल आहे. नाना प्रकारच्या इच्छासुध्दा ज्ञानाला झाकून ठेवतात. सार्वजनिक सेवारत कार्यकर्त्याच्या ठायीही कीर्ती आणि प्रतिष्ठेची लालसा असते. कुठल्याही प्रकारची लालसा, इच्छा वा वासना मोक्षविरोधी आहे. ज्याला आत्मानुभव प्राप्त करुन घ्यायचा आहे त्याने इच्छेचा त्याग करायला हवा, ईश्वरी इच्छेच्या आधारे वर्तन करणे हाच इच्छा मुक्तीचा मार्ग आहे. हेच साधन आहे. अशा सात्विक पुरुषाच्या ठायी काम अग्नीतल्या धुरासारखा वसतो.

2) दुसरे उदाहरण दर्पणाचे आहे. **यथा आदर्शः मलेनः** दर्पणावरची धूळ हटवायला उशीर लागतो. धूळ चिकटली असेल तर दर्पणाला घासून स्वच्छ करावे लागेल. ही रजोगुणीच्या ठायी वसणाऱ्या कामाची स्थिती आहे. काम धूळ हटवायला उशीर लागेल आणि मेहनतही घ्यावी लागेल. रजोगुणीचे चित्त सदा चंचळ असते. अशा चित्तात इच्छा-वासना तीव्रतेने उपजतात आणि वाढतात. रजोगुणाचा स्वभाव आहे धावपळ. तीव्र इच्छांमुळे माणूस नाना अडचणीत सापडतो. त्यातून लोभ उपजतो.

एक व्यापारी सांगत होते की व्यापाराला सुरुवात करताना मनात कल्पना होती की पन्नास हजार रुपये मिळाले की पुरे मग मात्र ही इच्छा वाढती राहिली. लाख, दहा लाख, कोटी, दहा कोटी, अमर्याद रुपये. अशा प्रकारे इच्छा माणसावर गारुड करते आणि आपल्या तालावर नाचवत रहाते. रजोगुणी पुरुषाच्या ठायी नारी विषयक कामही खूप प्रबळ असतो. जेव्हा कुठल्याही प्रकारे स्त्रीविषयक कामना कमी होत नाही तेव्हा माणूस जेरीला येतो. थकून जातो. लेकरं वाढायला लागतात मग कृत्रिम संतती नियमनाच्या साधनांचा आश्रय घेतो पण वासना वाढतच रहाते. अशाप्रकारे रजोगुणी पुरुष कामाच्या अधीन होतो. आपले जीवन बरबाद करुन टाकतो.

3) तिसरे उदाहरण आहे वारेने झाकल्या गेलेल्या गर्भाचे. **उल्बेन गर्भः आवृतः** वारेचे आवरण खूप मजबूत असते. हे तमोगुणीचे लक्षण आहे. ज्ञान दृढपणे झाकलेले असते. रजोगुण आणि तमोगुण एकाच वर्गाचे आहेत पण दोघांमध्ये थोडे अंतर आहे. तमोगुणाच्या ठायी जडता असते. रजोगुणी पुरुष कामाधीन झाला तर अशांतता जागते. तमोगुणी पुरुष कामाधीन झाला तर अशांत नाही होत. वाईट काम करताना कुणाला अशांत वाटत नसेल तर तो त्या कचाट्यातून सुटायचा प्रयत्नही नाही करत. तमोगुण माणसाला सुस्त ठेवतो. यामुळे काम विकाराच्या अधीन झाल्यावरही तो त्यातून सुटकेचा प्रयत्न करत नाही. तमोगुणी आत्मज्ञानाला सर्वथा झाकून टाकतो. तमोगुणीला उत्तम सत्संग दीर्घकाळ लाभला तर तो जागृत होऊन कामापासून वाचण्याचा प्रयत्न करेल आणि वाचूही शकेल. रजोगुणीच्या ठायी परिवर्तनाची प्रक्रिया जलद नसेल पण जागृती आली तर त्वरित परिवर्तन संभवते. तरी तमोगुणीच्या ठायी जागृती अवघड आहे. यामुळे वारेने झाकलेल्या गर्भाची उपमा गीतेने दिली. हे तमोगुणीचे लक्षण आहे.

: 39 :

***आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।***
***कामरुपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय ज्ञानिनः** हे अर्जुना, ज्ञानी पुरुषाचा
- **नित्य वैरिणाः** नित्य शत्रु
- **च दुष्पूरेणः** आणि महाकष्टाने, महात्रासाने पूर्ण होणारा
- **अनलेनः** आणि ज्याची तृप्ती कदापि होऊ शकत नाही
- **एतेन कामरुपेणः** अशा कामरुपी शत्रुने
- **ज्ञानं आवृतंः** आत्मज्ञान झाकले गेले आहे

**अर्थ**

आणि हे अर्जुना, कधीही तृप्त न होणारा हा कामरुप अग्नी ज्ञानी माणसाचा कायमचा शत्रू आहे त्याने माणसांचे ज्ञान झाकले आहे.

*काम-रुप महा-अग्नि नव्हे तृप्त कधीं चि जो*
*जाणत्याचा सदा वैरी त्यानें हें ज्ञान झांकिलें।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. (1) हा काम ज्ञानी पुरुषांचा नित्य शत्रु आहे. (2) महाकष्टाने पूर्ण होणारा म्हणजे सदा अपूर्ण रहाणारा आहे. (3) यामुळे भोगांनी हा कदापि तृप्त होत नाही. (4) आत्मज्ञानाला या कामाने झाकून ठेवले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **ज्ञानिनो नित्यवैरिणा: तसे** पाहिले तर काम सर्वाचा शत्रु आहे मग तो ज्ञानी पुरुषांचा नित्य शत्रु आहे असे म्हणण्याचा काय अर्थ? काम तर सर्वांचाच शत्रु आहे ना? मग ज्ञानवंताबाबत असे काय विशेष आहे? शंकराचार्यांनी याचे मोठे मार्मिक उत्तर दिले आहे. ते म्हणतात:

**ज्ञानी हि जानाति अनेन अहं अनर्थे प्रयुक्त: पूर्वमेव इति। दु:खी च भवति नित्यमेव। अत: असौ ज्ञानिन: नित्यवैरी, न तु मूर्खस्य। स: हि कामं तृष्णाकाले मित्रं इव पश्यन् तत्कार्ये दु:खे प्राप्ते जानाति तृष्णया अहं दु:खित्वम् आपादित: इति न पूर्वमेव। अत: ज्ञानिन: एव नित्यवैरी।** अर्थात् कामाने मला नेहमी अनर्थात-दु:खात लोटून दिले आहे. ही गोष्ट आधीपासूनच जाणत असल्यामुळे ज्ञानी नित्य सावधान असतो. ज्ञानी सुरुवातीपासून कामाचा तिरस्कार करतो यामुळे काम ज्ञान्याचा नित्यवैरी आहे पण काम मूर्ख वा अज्ञानी जनांचा शत्रु नाही कारण मूर्ख इच्छावृध्दी झाल्यावर कामाला आपला मित्र मानतो. अंती दु:खाला प्राप्त होतो पण 'तृष्णेमुळे मी दु:खाला प्राप्त झालो ' असे मानतो. आधीपासूनच काही तो कामाला वैरी मानत नाही.

शंकराचार्य म्हणतात- काम सर्वांचा शत्रू नाही, कारण सर्व लोक त्याला शत्रु मानत नाहीत. अज्ञानामुळे इच्छा काळात म्हणजे इच्छेने तृष्णेचे रुप घेतल्यावर काम मित्रच वाटायला लागतो. इच्छा इतकी वाढून जाते की लोक त्यात फसून जातात तेव्हा कुठलेही भान उरत नाही. तृष्णेचा अनुभव दु:खरुप असतो. तृष्णेचा परिणाम भोगल्यावर जागृती येते मग तो पुरुष कामाचा शत्रु बनतो पण अज्ञानावस्थेच्या काळातली ही जागृती तात्कालिक स्वरुपाची असते. तृष्णेने दु:ख मिळते हे अनुभवूनही माणूस सतत काम वा तृष्णेच्या अधीन होतो. यामुळे अज्ञानीचा काम कायमचा शत्रु नसतो. काम सामान्यांचा मित्र, ज्ञानवंतांचा शत्रु असतो. तो म्हणजे ज्ञानी कामापासून लांब रहातो. कामोद्भव दु:खाचे त्याला कधीही विस्मरण होत नाही. तो जागृत असतो.

विनोबा म्हणतात- "काम कधीही आणि कुठल्याही रुपात शत्रुच आहे हे विवेकी पुरुष म्हणजे ज्ञानी पुरुष ओळखून असतो. यामुळे काम ज्ञानवंतांचा कायमचा शत्रु असतो. काम शत्रु आहे हे जाणून घेणे फार मोठी गोष्ट आहे. कामाला जाणणारा निश्चितपणे कामावर विजय मिळवू शकतो. यामुळे 37 व्या श्लोकात कामाला वैरीच मानावे ही विधी साधकासाठी सांगितली गेली आहे.

2) **कामरुपेण:** कामाचे रुप कसे आहे? कामाचे रुप काम आहे. इच्छाच कामाचे रुप होय. काम बहुरुपी आहे. इच्छा अनंतरुपिणी असते. अनेक निमित्ताने उत्पन्न होते. आपण एखादे काही ठरवतो. कुणी बदलायची इच्छा केली तरी बदलत नाही. आपण ते बदलू देणार नाही. आपण जे ठरवले त्याचा आग्रह मन धरते. दुसऱ्याचे भावले तरी नाही सोडणार पण आपली इच्छा झाली तर क्षणार्धात बदलून टाकू. बदलायला काही  विशेष कारण नाही लागत. आपण खूप विचारपूर्वक ठरवलेले असते असेही नाही. आपले बहुसंख्य निर्णय आपल्या काम-इच्छा-वासनेच्या अधीन असतात. यामुळे काही विशिष्ट सिध्दांतामुळे आपण निर्णय घेतो असेही नसते पण इच्छेनुसार निर्णय बदलत रहातात.

प्रापंचिकांच्या निर्णयाचा आधार इच्छा-वासना असते. आपण पावलोपावली भांडतो कारण मनी इच्छा उत्पन्न होते आपण मग आग्रह धरतो. ईश्वरी इच्छेने चालायचा आपला निश्चय जोवर होत नाही तोवर इच्छेमुळे उत्पन्न होणाऱ्या संघर्ष आणि दु:खाला कुणी टाळू शकत नाही. ईष्वरी इच्छेने चालायचा अर्थ संतांच्या इच्छेने चालणे होय. तुलसी-रामायणात एक प्रसंग येतो. तुलसीदासजी म्हणतात **मोते संत अधिक करि लेखा।** राम प्रभु शबरीला नवविधा भक्तीचे स्वरुप समजाऊन सांगत आहेत. सातवी भक्ती आहे सर्वत्र परमात्मरुपाचे

दर्शन आणि परमात्म्याहून संताला श्रेष्ठ मानणे. ज्ञानेश्वरी माऊलीही म्हणते **'संत हे माझे रुपडी'** होत. संत माझेच स्वरुप आहेत. तसे तर भगवंत प्रत्येक वस्तुमात्रात आहेत पण सर्वांच्या ठायी नव्हे तर संतांच्या ठायी पूर्णत्वाने प्रकट होत असतात. ईश्वरेच्छेचे इंगित संतसंगतीत कळते.

3) कामाच्या संदर्भात आणखी दोन गोष्टी अशा **दुष्पूरेण अनलेन च।** कामाची तृप्ती कदापि होत नाही. तो नित्य अतृप्त-अपूर्ण रहातो. ना त्याची तृप्ती होत ना पूर्ती. तो अग्नीसारखा अतृप्त असतो. ययाति राजाने हजार वर्षे कामोपभोग झेलला. आपले म्हातारपण देऊन मुलांचे तारुण्य मागितले. अखेर त्याला म्हणावे लागले की विषयोपभोगाने काम कदापि तृप्त वा शांत होत नाही. आहुती आर्पिल्यामुळे जसा अग्नी वाढतो तसेच कामाचे आहे.

***न जातु काम: कामानामुपभोगेन शाम्यति।***
***हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते॥***

अर्थात् विषयोपभोगाने काम कदापि शांत होत नाही. आहुती टाकल्यावर ज्याप्रमाणे अग्नी वाढतो त्याचप्रमाणे काम वाढत जातो.

कामाची तृप्ती कामाच्या त्याग-संयमामुळेच होऊ शकते. सोळाव्या अध्यायात आसुरी संपत्तीचे वर्णन येते. हा बहुरुपी-अनेकरुपी काम आहे. याचे विस्ताराने वर्णन आले आहे. कामाने ज्ञानाला झाकून टाकले आहे.

: 40 :

***इन्द्रियाणि मनो बुध्दिरस्याधिष्ठानमुच्यते।***
***एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इन्द्रियाणि:** दहा इंद्रिये
- **मन:** संकल्प-विकल्पात्मक मन
- **बुध्दि:** सारासार विचार करणारी बुध्दी
- **अस्य अधिष्ठानं उच्यते:** या कामाची आश्रयस्थाने म्हणवली गेली आहेत
- **एष: एतै:** हा काम मन, बुध्दी आणि या इंद्रियांच्या मदतीने
- **ज्ञानं आवृत्य:** ज्ञानाला झाकून,आच्छादित करुन
- **देहिनं विमोहयति:** देहीला म्हणजे जीवात्म्याला मोहित करतो

**अर्थ**

इंद्रिये, मन आणि बुध्दी ही याचे निवासस्थान म्हटली जातात. हा काम या मन, बुध्दी आणि इंद्रियांच्या द्वारे ज्ञानाला आच्छादित करुन जीवात्म्याला मोहित करतो.

***घेऊनि आसऱ्यासाठीं इंद्रियें मन बुध्दि तो***
***मोह पाडी मनुष्यातें त्याच्या ज्ञानास गुंडुनी।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. (1) इंद्रिये, मन आणि बुध्दी ही कामाची अधिष्ठाने होत. (2) या स्थानांवर राहून तो ज्ञानाला झाकून ठेवतो. (3) ज्ञानाला झाकून माणसाला मोहित करतो आणि फसवतो.

**स्पष्टीकरण**

1) **इन्द्रियाणि मनो बुध्दि: अस्य अधिष्ठानं उच्यते: पाच** ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये कामाचे पहिले स्थान आहे. ही दहा इंद्रिये बाहेर रहातात. शत्रुला नष्ट करायला बाहेरुनच आक्रमण करायला हवे. बाहेरुनच आत प्रवेश करता येतो. इंद्रियांच्या ठायी वसणाऱ्या कामाला वेसण बसली की इंद्रिये व मनात वसणाऱ्या कामाला वश करता येते. इंद्रिये आणि विषय दोघे मिळूनच मनात काम उत्पन्न करतात. इंद्रियांशी विषयांचा संबंध आल्यामुळे मनात राग-द्वेषाच्या लाटा उसळतात. याचे कारण इंद्रियांमध्ये काम वसलेला असतो हेच आहे. प्रत्येक इंद्रियात हा काम आहे.

याला वश करावयाचे असेल तर इंद्रिय आणि विषयांच्या संबंधात संयम पाळायला हवा. पंच तन्मात्रांविषयी म्हणजे बघणे, ऐकणे, हुंगणे, खाणे, स्पर्श करणे याविषयी कल्याण होईल एवढाच संबंध या विषयांशी साधावा. इंद्रियांमुळेच मनाच्या ठायी कामवृत्ती उपजते वा पुष्ट होते. इंद्रिये आणि विषय नसतील तर मनाच्या ठायी काम उद्भवू शकणार नाही. चित्रपटाची घाणेरडी पोस्टर्स लाऊ नये असे विनोबा म्हणतात कारण नजरेसमोर चित्रे असल्यावर चित्त निर्विकार राहू शकत नाही. महात्मा गांधी वा विनोबांच्या चित्राचे दर्शन घेतले तर मनाच्या ठायी इतका पवित्र भाव जागतो की नेत्रातून

अश्रुधारा वाहू लागतात. त्यांच्या सहवासात मनात वाईट विचार उठणारच नाहीत.

अनेक विचारवंतांच्या मनात समस्या असतात. या दूर करण्यासाठी ते पाच-सात दिवसांचा उपवास करतात यामुळे रक्त शुध्दीची त्यांची भावना असते. मेंदुला शुध्द रक्ताचा पुरवठा झाला ना तर समस्या सुटतात. अनिर्णित प्रश्न आणि न सुटलेली कोडी आपोआप विनासायास सुटून जातात मनावर परिणाम होतो. अधिक जेवल्याने जडता उपजते. रात्री अधिक भोजन घेतले तर कामविकार बळावतो. यामुळे संयमाचा बांध फुटतो. निश्चय व्यर्थ ठरतो. स्त्रीपुरुषांच्या संबंधात स्पर्शाची मर्यादा न राखली गेली तरी पतन होऊन जाते.

याचा अर्थ एवढाच की सर्व इंद्रियांमध्ये, मनाच्या ठायी कामवृत्ती उत्पन्न करण्याची जी शक्ती, प्रेरणा शक्ती आहे तिचा विचार करु जाता माणसाने सर्व इंद्रियांवर पहारा देऊन नेहमी अतिसंयमपूर्वक रहायचा प्रयत्न करायला हवा.

2) **एषः एतैः ज्ञानम् आवृत्यः** हा काम ज्ञानाला झाकून ठेवतो ज्ञानाला म्हणजे मोक्षाला. मोक्ष काही मिळवायची-प्राप्त करुन घ्यायची वस्तु नाही. मोक्ष आपले अखंड स्वरुप असतानाही आपणास मोक्षाचा अनुभव होत नाही, हे एक आश्चर्यच आहे. आपण परमात्मस्वरुप म्हणजे मोक्षस्वरुपी असूनही परमात्म स्वरुपाचा क्षणभरही आपल्याला अनुभव होत नाही. याउलट देह, मन, इंद्रिये, बुध्दी हेच आपले स्वरुप आहे असा रात्रंदिन अनुभव येतो. आपल्या सत्य स्वरुपाला झाकून ठेवण्याचे काम इंद्रिये, मन, बुध्दी यांच्याठायी विद्यमान काम करतो. आपण सदैव त्यात रंगून गेलेलो असतो. त्याच्या प्रेरणेनेच आपल्या तमाम क्रिया संचलित असतात.

3) **देहिनं विमोहयतिः** काम देह, मन, इंद्रिये, बुध्दी यांच्याद्वारे आत्मस्वरुपाच्या ज्ञानाला झाकून ठेवतो आणि मोहात फसवतो. एक आई असते. तिचे लेकरु चुकीच्या मार्गाने जाते. विडी पीते. चोरी करते. शाळेत मुलांशी मारामारी करते. घरात धाकट्या बहिणीला पिटते. यामुळे आई वैतागून जाते. पण 'बऱ्या पध्दतीने रहायचे असेल तर रहा नाही तर चालू लाग!' असे सांगायची हिंमत काही तिला होत नाही. आईच्या चित्तात-इंद्रियांच्या ठायी लेकराबद्दल ममत्व आहे. ममत्व कामाचेच रुप होय. पुत्र सहवासाचे ममत्व आहे. दुःखद सहवास असला तरी हवाहवासा वाटतो.

स्थूल रुपाने इंद्रियांच्या ठायी वसणाऱ्या या कामाचे खरे स्थान मन आणि बुध्दी आहे. इंद्रियांनी आपण जो व्यवहार करतो त्याचा संस्कार मनावर होतो. इंद्रिये या संस्कारांना पुष्ट करतात. हे पुष्ट संस्कारच संपूर्ण आयुष्याची पूंजी आहे - धन आहे - भांडवल आहे. या संस्कारांना लिंगदेह वा सूक्ष्मदेह असे म्हणतात. एक देह गळून पडल्यावर हा सूक्ष्मदेह दुसरा देह धारण करतो. या संस्कारांना इंद्रिये सींचित करतात. यामुळे आधी इंद्रियांवर ताबा मिळवायचा असतो.

: 41 :

*तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।*
*पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतर्षभः** हे अर्जुना
- **तस्मात् त्वंः** त्यामुळे तू
- **आदौः** प्रथम
- **इन्द्रियाणि नियम्यः** आपल्या आंतर्बाह्य इंद्रियांना काबूत राखून
- **ज्ञानविज्ञाननाशनंः** ज्ञान आणि विज्ञानाला म्हणजे अनुभवाला नष्ट करणाऱ्या
- **एनं पाप्मानं प्रजहिः** या पापी कामाचा निश्चयपूर्वक त्याग करुन दे, नष्ट करुन दे

**अर्थ**

म्हणून हे अर्जुना, तू प्रथम इंद्रियांवर ताबा ठेऊन या ज्ञान आणि विज्ञान यांचा  नाश करणाऱ्या, मोठ्या पापी कामालाअवश्य बळेच मारुन टाक.

*म्हणूनि पहिला थारा इंद्रियें तीं चि जिंकुनी*
*टाळीं पाप्यास जो नाशी ज्ञान विज्ञान सर्व हि।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी येतात. (1) सर्वप्रथम इंद्रियांवर ताबा मिळव. (2) ज्ञान आणि विज्ञान म्हणजे आत्मानुभवाला नष्ट करणाऱ्या या कामरुपी पाप्याला नष्ट कर.

**स्पष्टीकरण**

1) **त्वं आदौ इन्द्रियाणि नियम्य: कामाचे** आश्रयस्थान इंद्रिये आहेत. इंद्रियांवर काबू मिळवला तर मनात निहित कामाला नष्ट करणे सोपे आहे. मनातच कामाचे बीज आहे. आधी त्या बीजाला मिळणारे पोषण बंद झाले पाहिजे. बीजरुपी कामाला नष्ट करणे गरजेचे आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. आपण फांद्या छाटल्या, पानं खुडली पण मूळाशी जळाचे सिंचन करत राहिलो तर वृक्ष नष्ट कसा होईल? कामाला मूळापासून संपवायचे असेल तर आधी इंद्रियांचे पहारेकरी बनावे लागेल. तमाम इंद्रियांना अशा प्रकारे नियंत्रणात ठेवायचे की मनातला काम क्षीण होत जावा. माणूस ब्रह्मचर्य व्रतपालनात प्राय: दुबळा असतो. ब्रह्मचर्य साधण्यासाठी आधी बाह्यनियंत्रण पाळले जाणे गरजेचे असते.

गांधीजींनाही ब्रह्मचर्य व्रतपालनासाठी अवघड प्रसंगांचा सामना करावा लागला पण त्यांनी आधी बाह्य साधनेला सुरुवात केली. रात्रीच्या भोजनावर टाच आणली, नियंत्रण ठेवले. दिवसभर परिश्रम करुन झोपायचे ठरवले. शरीर थकले की पडल्याबरोबर झोप येते मग झोपतांना मनात विकार उत्पन्न होत नाहीत. रात्री झोपतांना उशीखाली जपमाळा आणि गीतेची प्रत ठेवायला लागले. जपमाळा करुन झोपायचा नियम केला. या बाह्य नियमांच्या पालनामुळे गांधीजींना ब्रह्मचर्य व्रतपालनात बळ मिळाले.

बाह्य नियंत्रणाच्या बळाने आतल्या विकारांना घालवून देण्याकामी खूप मदत मिळते. विषयांच्या उपभोगामुळे मनाला पोषण मिळणे थांबले की हळूहळू काम क्षीण होऊन जातो. काम म्हणजे कामजन्य सारे विकार. हे विकारच अखंड सुख आणि शांततेला रोखतात.

2) **पाप्मानं प्रजहि:** या पापी कामाला सोडून देऊ या. 37 व्या श्लोकात कामाला महापापी म्हटले आहे. या श्लोकातही तेच विशेषण वापरले आहे. हा शब्द जरा कठोर वाटतो पण कामच सदैव अध:पतीत करतो. त्याची चालही सरळ नसते. काम मोठा कपटी असतो. क्रोध-लोभ आदी विकाराना कामच निर्माण करतो. काम हा मोक्षाचा शत्रु असल्यामुळे पापी हे विशेषण अगदी योग्य आहे.

काम क्रोधाच्या ठायी करुणेचा लेशमात्र अंश नसल्याचे ज्ञानेश्वर सांगतात. कामक्रोधांना साक्षात् यमाच्या स्थानी जाणावे. हे ज्ञान निधीवर बसलेले महासर्प आहेत. विषयरुपी गुहेत वसणारे व्याघ्र आहेत. ईश्वर भक्तिच्या मार्गात प्राणघातक हल्ला करणारे वाटमारे आहेत. शरीररुपी किल्ल्याचे दगड आहेत. इंद्रियरुपी वस्तीची तटबंदी आहे. यांचा अविवेकरुपी अत्याचार संपूर्ण जगावर प्रभाव टाकून आहे. हे रजोगुणापासून बनलेले आहेत. मूळात हे आसुरी संपत्तीचे आहेत. हे अज्ञानामुळे पुष्ट होतात. तमोगुणांना हे फार प्रिय आहेत. यामुळे तमोगुणांनी आपली प्रमाद आणि मोहरुपी राजगादी याना देऊन ठेवली आहे. मृत्युनगरीत हे सुप्रतिष्ठित आहेत. हे सर्वप्राणहारक आहेत. एकदा का यांची भूक सुरु झाली ना की संपूर्ण विश्वही त्यांना घासभर आहे.

यांचा हात जसजसा चालतो तसतशी यांची आशाही वाढत जाते. अशाच प्रकारे आशेची धाकटी बहीण भ्रांतीही यांना खूप प्रिय आहे. भ्रांती सर्वांना कह्यात घेते मग चौदा भुवनांचाही सहजच पत्ता लागत नाही. ही भ्रांती विलक्षण आहे. तिन्ही लोकाना सहज पचवू शकते. या भ्रांतीच्या सेवा-चाकरीच्या बळावरच तृष्णेचे जीवन अवलंबून असते. मोह नेहमी भ्रांतीचा सन्मान करतो.

संपूर्ण जगाला नाचवणारा अहंकार काम-क्रोधाच्या देवाण-घेवाणीचा व्यवहार करतो. काम क्रोधाने दंभ-ढोंगाला प्रसिध्दी मिळवून दिली. त्यांनीच पवित्र शांतीला लुटले. वस्त्रहीन केले. या मायारुपी भिकारणीचा शृंगार केला. साधु वृंदाला भ्रष्ट केले. या काम क्रोधानेच विवेकाचे आश्रयस्थान उजाड केले. वैराग्याची चामडी लोळवली. हयातीतच निग्रहाचा गळा आवळला. संतोषरुपी वन ओसाड केले. धैर्याची तटबंदी उध्वस्त केली. आनंदाचे रोपटे उपटून फेकले. बोधाच्या वृक्षाला छाटून टाकले. सुखाची अक्षरे पुसून टाकलीत. सर्वांच्या अंत:करणात ताप जागवला हे शरीरासोबतच जन्माला आलेहेत. हे अंत:करणाशी संलग्न आहेत. ब्रह्मदेव वगैरैनाही शोधूनही सापडलेले नाहीत. चैतन्य तत्वाच्या नजिक हे काम-क्रोध ज्ञानाच्या पंक्तीत जाऊन बसतात. एकदा का आपले कार्य यांनी आरंभिले की थांबवता येत नाही. हे बिना पाण्याने बुडवू शकतात, बिना आगीने जाळू शकतात. न बोलताच प्राण्यांना घेरुन घेतात. पैजा लाऊन ज्ञान्यांचा वध करुन टाकतात. खूप खोलवर प्रविष्ट असल्यामुळे कुणाच्या हाती नाही लागत.

सारांश म्हणजे काम-क्रोधच बंधनात अडकवतात. यांच्यापासून खूप सावध असायला हवे. विनोबा म्हणतात की बाह्य इंद्रियांवर विजय मिळवणे काम विजयाची आरंभयात्रा आहे.

: 42 :

***इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्य: परं मन: ।***
***मनसस्तु परा बुध्दिर्यो बुध्दे: परतस्तु स: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इन्द्रियाणि:** पंच ज्ञानेंद्रिये (स्थूल शरीराच्या अपेक्षा)
- **पराणि आहु:** श्रेष्ठ आहेत असे ज्ञानवंतांनी सांगितले आहे
- **इन्द्रियेभ्य: मन:** परं: पंच इंद्रियांपेक्षा मन श्रेष्ठ आहे
- **तु मनस: बुध्दि: परा:** आणि मनाहून बुध्दी श्रेष्ठ आहे
- **तु य:** पण जो
- **बुध्दे: परत: स:** बुध्दीहून अतीत आहे, पर आहे, तो परमात्मा आहे

**अर्थ**

इंद्रियांना स्थूल शरीराहून पर म्हणजे श्रेष्ठ, बलवान आणि सूक्ष्म म्हटले जाते. या इंद्रियांहून पर मन आहे. मनाहून बुध्दी श्रेष्ठ आहे आणि जो बुध्दीहूनही अत्यंत पर आहे, तो आत्मा होय.

***इंद्रियें बोलिलीं थोर मन त्यांहूनि थोर तें***
***बुध्दि थोर मनाहूनि थोर तीहूनि तो प्रभु ।***

**स्पष्टीकरण**

या श्लोकात शरीर-इंद्रिये-मन-बुध्दी आणि आत्मा-परमात्मा हा क्रम सांगितला आहे. शरीर अगदी स्थूल आहे. शरीराच्या तुलनेने पंच ज्ञानेंद्रिये सूक्ष्म आहेत त्यामुळे ते श्रेष्ठ होत. यांची शक्ती सूक्ष्म आहे आणि ते आत आहेत. हे एकाहून एक श्रेष्ठ आहेत. या इंद्रियांची बाहेरही शरीरात स्थाने आहेत. पाच इंद्रियांच्या स्थानी राहून शब्द, स्पर्श, रस, गंध, रुप या पंचविषयांची प्रतीती येते.

ज्ञानेंद्रियांशी मन जोडले जाते आणि मग पंच विषयांचे ज्ञान होते. यामुळे मन हे इंद्रियांपेक्षा श्रेष्ठ. मनाहून बुध्दी श्रेष्ठ. बुध्दी मनाचाच एक भाग होय. चिंतन करणे, विचार करणे, बुध्दीचे कार्य आहे. सात्विक-शुध्द बुध्दी असली तर निर्णय योग्य अन्यथा चुकीचा. मन बुध्दीच्या निर्णयानुसार चालेलच असे होत नाही. यासाठी मनाचा अभ्यास घडायला हवा. शुध्द मन-काम-क्रोधरहित मन बुध्दीच्या अधीन बनू शकते.

मन उभयविध मानले गेले आहे. (1) ज्ञानेंद्रियांशी सहकार्य करुन पंचविषयांचे ग्रहण करणे आणि (2) बुध्दीच्या निर्णयाला अंमलात आणणे. निर्णय देणे हेच बुध्दीचे एकमेव कार्य आहे. तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. विषयांचे ग्रहण करणे, निर्णय घेणे आणि निर्णयाला अंमलात आणणे. यापैकी दोन गोष्टी मनाच्या एक बुध्दीची. अशा प्रकारे मनाचे वेगवेगळ्या कामांमुळे दोन इंद्रिये बनलीत. विषयांचे ग्रहण केल्यानंतर मग चिंतन, मनन करण्यासाठी आणि मग निर्णय घेण्यासाठी ही कामे असल्यामुळे बुध्दी श्रेष्ठ ठरते. ग्रहण केल्यानंतर चिंतन, मनन होऊ शकते.

बुध्दीपेक्षा श्रेष्ठ आहे आत्मतत्व. याला ज्ञाता वा प्रत्यगात्मा असेही म्हणतात. पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेंद्रिये मन, बुध्दी हे कुणाच्या अधीन आहेत? यांचा मालक कोण? याना प्रेरणा कोण देते? शरीरातील सर्व इंद्रियांवर ताबा राखणारी जर कुठली वस्तु नसेल ना तर मग हे सारे व्यापार एका सूत्रात नाही चालू शकणार. मण्यांचीच माळा झाली तर मणी एकत्र राहातील आणि त्यांचा योग्य तो उपयोग होऊ शकेल. आपण व्यवहारात माझे मन, माझी बुध्दी, माझे शरीर, माझा कान असे म्हणतो. याचा अर्थ असा की शरीर, मन, बुध्दी यापेक्षा मी काही तरी वेगळा आहे. असे अनुभवायला येते मग या मी चे अद्भुतपण ते काय उरते? लक्षाधीशाने जर अज्ञानामुळे स्वत:ला भिकारी मानले तर त्याच्या जवळच्या अपार धनवैभवाचा उपयोग काय? आत्मतत्व-परमात्मतत्व हेच आपले स्वरुप आहे. याची उत्तम प्रकारे ओळख करुन घ्यायला हवी.

'मी' ज्याप्रमाणे देहाला जाणून घेतो, मन, बुध्दी आणि बाह्य जगातील सर्व पदार्थांना जाणतो त्याचप्रमाणे माझे ज्ञान जड पदार्थाला होत नाही म्हणजे देह, मन, बुध्दी, इंद्रिये मला जाणत नाहीत. सूर्यासारखा अद्भुत पदार्थही मला जाणत नाही. एवढा अद्भुत असूनही मी अज्ञानामुळे

देह, इंद्रिये, मन, बुध्दी यांनाच स्वस्वरुप समजायला लागतो तर मग माझ्या अद्भुत असण्याचा उपयोगच काय? एखादा लक्षाधीश माणूस जर स्वत:ला भिकारी समजू लागला तर त्याच्या धन संपत्तीचा काय उपयोग? मी देहाला सार सर्वस्व मानून बसतो आणि आपले अद्भुत रुप गमावून बसतो. यामुळे काम, क्रोध वगैरे विकारही त्रास देतात यामुळे हे निश्चितपणे जाणून घेतले पाहिजे की बुध्दीच्या अतीत असा जो परमात्मा आहे तेच आपले स्वरुप आहे.

परमात्म तत्वाला जाणून घेतल्यावरच आपण कामाला परिपूर्णपणे जिंकू शकतो हा विचार पुढच्या श्लोकात आला आहे. या श्लोकातल्या क्रमाहून भिन्न प्रकारचा क्रम कठोपनिषदात सांगितला गेला आहे:

*इंद्रियेभ्य: परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मन: ।*
*मनसस्तु परा बुध्दिर्बुध्देरात्मा महान् पर: ॥*
(1/3/10)

अर्थात् इंद्रियांहून पंचविषय श्रेष्ठ. विषयांहून मन श्रेष्ठ. मनाहून बुध्दी श्रेष्ठ. बुध्दीहून जीवात्मा महान आणि श्रेष्ठ आहे.

गीतेपेक्षा हे वेगळे मत आहे. गीता पंचविषयांपेक्षा इंद्रियांना श्रेष्ठ मानते तर कठोपनिषद इंद्रियांपेक्षा पंचविषयांना श्रेष्ठ मानतात. विषयांच्या अभावी ज्ञान होणार नाही. असा विचार केला तर विषय इंद्रियांहून श्रेष्ठ ठरतात. बरे पंचविषयांचे अस्तित्व असताना देखिल त्याना जाणण्याची इंद्रिये नसली तर या विषयांचे ज्ञान नाही होणार. असा विचार केला तर विषयांहून इंद्रिये श्रेष्ठ ठरतात. वेगवेगळ्या दृष्टीकोणातून विचार केला तर दोन्ही श्रेष्ठ ठरतात. याच उपनिषदात पुढे असे वर्णन येते :

*महत: परमव्यक्तमव्यक्तात् पुरुष: पर: ।*
*पुरुषान्न परं किंचित् सा काष्ठा सा परा गति: ॥*
(1/3/11)

अर्थात् महत् म्हणजे महान जीवात्म्यापेक्षा अव्यक्त म्हणजे माया श्रेष्ठ होय. मायेहून पुरुष म्हणजे ईश्वर श्रेष्ठ होय. पुरुष म्हणजे परमात्म्याहून श्रेष्ठ दुसरे काही नाही. परमात्मा हीच परम म्हणजे श्रेष्ठ गती होय.

या श्लोकात जीवात्म्याहून परमेश्वराच्या मायेला श्रेष्ठ म्हटले गेले आहे कारण परमेश्वराची अलौकिक माया फसवते. यामुळे माया जीवात्म्याहून श्रेष्ठ सिध्द होते. माया पुरुष म्हणजे परमात्म्याच्या अधीन आहे यामुळे मायेहून परमात्मा अखेरची मर्यादा आणि अखेरची गती परमात्मा होय.

मनाला का मानावे? ब्रह्मसूत्र भाष्यात हे अनेक तर्कांनी शंकराचार्यांनी समजाऊन सांगितले आहे. ते म्हणतात- अडचण अशी आहे की मन नसले तर हमेशा ज्ञान होईल वा होणार नाही. ज्ञाता म्हणजे आत्मा आणि ज्ञानप्राप्तीची साधनरुप पंच ज्ञानेंद्रिये अशी ज्ञानाची साधने अखंड हजर असताना हमेशा ज्ञान होत रहायला हवे. वस्तु समोर असतानाही आपल्याला कधी वस्तुचे ज्ञान होते तर कधी होत नाही. असे व्हायला नको. याचा का असा अर्थ मानावा की ज्ञाता म्हणजे आत्मा आणि ज्ञानाची साधनरुपी इंद्रिये अखंड विद्यमान असतानाही - ज्ञान होतच नाही पण कधी ज्ञान होते तर कधी होत नाही.

आत्म्याच्या अखंड कार्यरत ज्ञानशक्तीच्या ठिकाणी काही अडथळा निर्माण झाला असेही मानता येत नाही. इंद्रियांचीही जी अखंड ज्ञानशक्ती चालली आहे, तिच्या ठायीही अचानक अडथळा आला असेही मानायचे काही कारण नाही. हवे तेव्हा आपण पंचविषयांचा आस्वाद घेऊ शकतो. बघू शकतो. ऐकू शकतो. हुंगु शकतो. स्वाद घेऊ शकतो. स्पर्शसुख मिळवू शकतो.

एक संस्कृत वचन आहे **चक्षु: पश्यति रुपाणि मनसा तु चक्षुषा ।** म्हणजे **डोळे मनाने** रुपाला बघू शकतात फक्त **डोळ्यांनी** रुपाला बघता येत नसते.

यामुळे आचार्यांनी मनाची व्याख्या अशी केली: **यस्यावधानानवधा - नाभ्यामुपलब्ध्यनुपलब्धौ भवतस्तन्मन: ।** अर्थात् ज्याच्या लक्ष दिल्यामुळे पदार्थाचे ज्ञान होते आणि ज्याच्या लक्ष न दिल्यामुळे पदार्थाचे ज्ञान होत नाही, ते **मन** असते.

: 43 :

*एवं बुध्दे: परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।*
*जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो एवं बुध्दे: परं:** हे अर्जुना, अशा प्रकारे बुध्दीहून अतीत
- **आत्मानं बुद्ध्वा:** आत्म्याला (परमात्म्याला) जाणून

- **आत्मना संस्तभ्य:** शुध्द मनाने आपल्यावर ताबा मिळवून
- **(एनं) कामरुपं:** (या) कामरुप
- **दुरासदं शत्रुं जहि:** दुर्जय शत्रुला नष्ट कर

**अर्थ**

अशाप्रकारे बुध्दीहून पर अर्थात् सूक्ष्म, बलवान आणि अत्यंत श्रेष्ठ असा आत्मा आहे, हे जाणून आणि बुध्दीच्या द्वारे मनाला स्वाधीन करुन हे महाबाहो, तू या कामरुप अजिंक्य शत्रूला मारुन टाक.

*असा तो प्रभु जाणूनि आवरीं आप आपणा*
*संहारीं काम हा वैरी तूं गांठूनि परोपरी।*

**विषय:** या श्लोकात तीन मुद्दे आलेत. (1) बुध्दिहून पलिकडे असलेल्या परमतत्वाला ओळखा. (2) मनाला निर्विकार करायचा प्रयत्न करुन स्वत:ला ताब्यात ठेवा आणि (3) या कामरुपी दुर्जय शत्रुला नष्ट करा.

**स्पष्टीकरण**

इंद्रियांपासून थेट बुध्दीपर्यत व्याप्त असलेल्या कामाला हरवून बुध्दीच्या पलिकडे असणाऱ्या परमतत्वाला देहात विराजित असल्याची ओळख करुन घ्या हा विचार मागील श्लोकात समजाऊन सांगितला.

1) पहिला मुद्दा असा की बुध्दीच्या पलिकडे असणाऱ्या परमात्म तत्वाची ओळख करुन घेणे. आपल्या देहांतरी एक अद्भुत वस्तु निवास करते हे प्राणीमात्र अजिबात जाणत नाही. पाच ज्ञानेद्रिये, मन, बुध्दी, अहंकार या सर्व तत्वांना आपण जाणतो. या इंद्रियांना वश होऊन आपण सुख-दु:खाचा अनुभव घेतो पण आपण परमात्म स्वरुप आहोत याचा काही आपल्याला शोध नसतो. देहाला आणि इंद्रिय समूहाला आपण जोवर आत्म-स्वरुप समजतो तोवर आपण परमात्मस्वरुप आहोत हे काही आपल्या ध्यानी येत नाही. हे आधी बुध्दीला पटायला हवे. केवळ श्रध्देने ग्रहण करण्याऐवजी तर्काने जर बुध्दीला हे पटवून सांगता आले तर परमात्म स्वरुपाचा बोध होणे सोपे ठरेल. बुध्दी नि:शंक झाली तर प्रयत्न करणे सोपे. यामुळे गीता सांगते की बुध्दीच्या पलिकडे असलेल्या परमात्म तत्वाला ओळखा.

2) बुध्दीने ओळखल्यावर मनाला निर्विकार बनवण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु करायला हवेत. मनातल्या नाना बऱ्या-वाईट वृत्तींना घालवणार नाही तोवर चांगल्या वृत्तींचा विकास नाही होणार. वाईट वृत्ती-भावना वा विकारांना ताब्यात घेतल्यावर मनावर काबू मिळवता येईल. मनावर काबू मिळवण्यासाठी मन निर्विकार करावे लागेल. यातून मनातून कामाला हटवता येईल.

3) मोक्षविरोधी शक्तीच्या रुपाने काम-क्रोध उभे ठाकलेहेत. माणसाच्या देहात एकीकडे देह, इंद्रिये, मन आणि बुध्दी हा संघात आहे तर दुसरीकडे आत्मतत्व म्हणजे परमात्म तत्व आहे. परमात्म्याची प्रेरणा मोक्षासाठी, परमात्म्याच्या परिचयासाठी आणि निर्विकारतेसाठी आहे. देह, इंद्रिये, मन, बुध्दी यांच्याकडून भोगांची-नाना कामनांची प्रेरणा असते. मोक्ष आणि काम या दोन प्रेरणांच्यामधे जीवन आहे. दोघांच्या संघर्षात माणसाला जीवन घालवावे लागते. दोघांमध्ये संघर्ष जागू नये यासाठी शास्त्रकारांनी मोक्षाच्या वतीने धर्म आणि काम संवेदनेच्या वतीने अर्थ यांना प्रतिनिधी म्हणून स्वीकारले आहे. अंतिम विजय तर मोक्षाचाच.

जीवनाचा आरंभ कामापासून होतो, मोक्ष त्याचे मुक्कामीचे स्थळ आहे, यामुळे काम ते मोक्ष असा एक मार्ग तयार करावा लागतो. अर्थ आणि धर्माचे शरण स्वीकारुन हळूहळू मोक्षाच्या दिशेने वाटचाल करावी लागते. मोक्षाची प्रेरणा असंग्रहाची आहे. मोक्षाचे तर म्हणणे असे की देहरुपी परिग्रहाचाही त्याग करा. ब्रह्मचर्याशिवाय मोक्ष अशक्य आहे. यामुळे कुणाला प्रपंचात फसता कामा नये. इच्छा-वासनेचा संपूर्ण त्याग करा. यांच्या अधीन झालो तर बंधन कायमचे जखडून ठेवील. याच्या जाळ्यात गुरफटून राहिलो तर बंधनातून कदापि मुक्तता लाभायची नाही. कामिनी आणि कांचन दोन्हीही मोक्षविरोधी, यामुळे यांचा तर त्यागच करायला हवा. रात्रंदिवस आपण कर्मरत असतो. या कर्मामुळेच मनाच्या ठायी काम-क्रोध या सारखे विकार उपजतात. यामुळे समस्त कर्माचा हर प्रकारे त्याग करायला हवा. माणूस समाजात रहातो. नाना प्रसंग झेलतो. विविध प्रकारच्या समस्या उभ्या ठाकतात. यामुळे विकार उपजतात. दु:ख वाट्याला येते. यामुळे मोक्षार्थीने प्रपंचाचा त्याग करुन वनवासाची वाट धरायला हवी. मोक्षाची अशी एकांगी प्रेरणा जागते ना तेव्हा मोक्षाची साधना अवघड होऊन बसते.

मोक्षाप्रमाणेच कामप्रेरणाही एकांगी आहे. हे कामाचे निवेदन असते. काम म्हणजे जीवनाची बर्बादी- सत्यानाश असे मोक्षाचे म्हणणे असते. सर्वाना वैराग्य लाभले असते तर एथवर सर्वांना मोक्ष प्राप्ती झाली असती आणि ही दुनिया कधीची संपून गेली असती. सर्वच ब्रह्मचर्य पाळतील तर सृष्टीचक्र कसे चालावे? सृष्टीचे अनंत पदार्थ आणि शरीर भोग भोगण्यासाठी नसेल तर मग ही सृष्टी तरी भगवंताने का निर्मिली असावी बरे? मोक्ष म्हणजे सुख. तपाचरण करुन, कष्ट उपसून मोक्ष मिळवण्याऐवजी इंद्रियांनी विषयोपभोग भोगून सहजतेने, सोप्या शैलीत जर सुख प्राप्ती होत असेल तर मग तपाचरण आणि त्यागाची गरज काय? मुख्य सुखच तर आहे ना?

अशा प्रकारे काम आणि मोक्ष परस्परविरुध्द अशी दोन टोके आहेत. माणसाला संघर्ष नको. यामुळे सामंजस्य जागावे म्हणून शास्त्रकारांनी मोक्षाच्या वतीने धर्म आणि कामाच्या वतीने अर्थाला प्रतिनिधित्व दिले आहे. कामाच्यासाठी धर्म म्हणतो की कामनांचा संपूर्णपणे त्याग करायची काही गरज नाही. संपूर्ण त्याग करणे शक्यही नाही म्हणा. यामुळे चांगल्या कामनांचे सेवन करुन वाईट कामनांचा त्याग करा. अर्थात् कामनांचीही आसक्ती उरली नाही तर मोक्षप्राप्तीत काही अडचण निर्माण होणार नाही. तशाच प्रकारे ब्रह्मचर्याच्या संदर्भात धर्माचे निवेदन असे की सर्वाना ब्रह्मचर्य पाळणे शक्य नाही तशी गरजही नाही पण गृहस्थाश्रमात संयम पाळा. मर्यादित भोग भोगा. संतोनोत्पत्तीतही मर्यादा पाळा. परोपकार करा. संपत्तीचे दान करा. पंचवीस-तीस वर्षांच्या गृहस्थ जीवनानंतर वानप्रस्थाचा अंगिकार करा. जगला-वाचलात तर संन्यासाचाही स्वीकार करा, या अखेरीस मोक्षाचे आत्यंतिक सुख प्राप्त करुन घेणे सोपे जाईल.

कामाच्या वतीने अर्थाचे निवेदन असे की धर्माची ही योजना आम्हाला मान्य आहे. आता काम आणि मोक्ष यांच्यात काही भानगडीचे कारण उरत नाही, पण अर्थसंचयाबाबतही काही समझौता व्हायला हवा. काम खूप धन जोडायला शिकवतो. अर्थ म्हणतो की पैसा कमवण्यात काही दोष नाही पण गरीब अधिक गरीब होईल. विषमता वाढीस लागेल. पाच बोटांइतकी विषमता मान्य पण याहून अधिक असली तर समाजात शांतता नाही उरणार. गरीबांना दु:खमुक्त करायचा उपाय शोधावा लागेल. त्यांच्यासाठी अन्न-वस्त्र-निवारा उभारावा लागेल. यासाठी धन कमवल्यावर गांधीजींची विश्वस्त कल्पना प्रत्यक्षात आणावी लागेल. अशाप्रकारे मोक्षाचा त्याग हा सिध्दांत जीवनात अंगी बाणण्याचा प्रयत्न करावा. मर्यादित साधनांनी बाह्य विषयसुख प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न आचरावेत. अर्थाचे हे म्हणणे मान्य करुन धर्म समाजात प्रगतीची वाट रुजवतो.

चारही पुरुषार्थात समन्वय स्थापित करुन कामविजय संपादित करुन मानवी जीवनाची अंतिम सिध्दी मोक्षप्राप्ती करता येते. तुलसीदासजी म्हणतात :

*काम क्रोध मद लोभ रत, गृहासक्त दुखरुप।*
*ते किमि जानहि रघुपतिहि, मूढ परे तम कूप॥*

अर्थात् काम, क्रोध वगैरे विचारांच्या ठायी रत जीव परमात्म्याला कसा काय ओळखू शकतो ? कारण ते मूढ जन तम म्हणजे अज्ञानरुपी विहीरीत पडलेले आहेत. अंतिम लक्ष्य तर परमात्म्याला ओळखण्याचे आहे. संत तुलसीदासजी अन्यत्र लिहितात:

*हरि माया कृत दोषगुन, बिनु हरि भजन न जाहिं।*
*भजिय राम सब काम तजि, अस बिचारि मन माँहीं॥*

अर्थात् हरी निर्मित मायेचे गुणदोष भजनाशिवाय म्हणजे परमात्म भक्तीशिवाय नाही जाणार. नष्ट नाही होणार. यामुळे तमाम बऱ्या-वाईट कामना त्यजून भगवद्भक्ती करा.

*बिनु संतोष न काम नसाहीं।*
*काम अछत सुख सपनेहुँ नाहीं॥*
*राम-भजन बिनु मिटहिं कि कामा।*
*थल बिहीन तरु कबहुँ कि जामा॥*

अर्थात् संतोष-समाधानाशिवाय काम नाही नष्ट होणार. मनाच्या ठायी काम वसत असेल तर स्वप्नातही सुख लाभणार नाही. राम-भजन म्हणजे रामभक्तीशिवाय काम कसा बरे नष्ट होईल ?

तुलसीदासांच्या या निवेदनाचा सारांश असा की कामावर विजय संपादन करुन घ्यायचा श्रेष्ठ आणि सोपा उपाय ईश्वरभक्तीच आहे. परमात्म तत्वाची ओळख करुन घ्या कामाचा त्याग करा. कामाला संपवून टाका. हाच तर इत्यर्थ होय.

• • • *तिसरा अध्याय संपूर्ण* • • •



चौथा अध्याय

# ज्ञानकर्मसंन्यास योग

या अध्यायातील आरंभिक दोन श्लोकामधून योगविद्येच्या ऐतिहासिक परंपरेचा आलेख आला आहे.

: 1 :

**श्री भगवान उवाच**

***इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।***
***विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं इमं अव्ययं योगं:** मी हा अव्यय, अविनाशी योग
- **विवस्वते:** सूर्याला
- **प्रोक्तवान्:** सर्वप्रथम म्हणजे कल्पाच्या आरंभी सांगितला
- **विवस्वान् मनवे प्राह:** सूर्याने आपल्या पुत्राला मनुला सांगितला
- **मनुः इक्ष्वाकवे अब्रवीत्:** मनुने आपल्या पुत्राला इक्ष्वाकुला सांगितला

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले, मी हा अविनाशी योग सूर्याला सांगितला होता. सूर्याने आपला पुत्र मनू याला सांगितला आणि मनूने आपल्या पुत्राला इक्ष्वाकूला सांगितला.

**श्री भगवान म्हणाले**

***योग हा अविनाशी मी स्वयें सूर्यास बोलिलों***
***मनूस बोलिला सूर्य तो इक्ष्वाकूस त्यापरी ।***

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी योगाची परंपरा समजावून सांगितली आहे. 1) सर्वारंभी भगवंताने योग सूर्याप्रती निवेदन केला. 2) सूर्याने मनूला म्हणजे मनन करणाऱ्या ऋषी-मुनीना सांगितला आणि त्यानी 3) इक्ष्वाकुला म्हणजे श्रेष्ठ साधक वा मुमुक्षुला शिकवला.

**स्पष्टीकरण**

1) **इमं योगं विवस्वते प्रोक्तवान्:** भगवंत म्हणताहेत की सर्वप्रथम हा योग मी सूर्यनारायणाला शिकवला. त्यानी याचे सुयोग्यप्रकारे पालन केले. सृष्टीच्या निर्मितीला अदमासे दोनशे कोटी वर्षे लोटलीत. एवढाच काळ पुढे सृष्टी राहील असे म्हटले जाते. त्यानंतर प्रलय काळ येईपर्यंत सूर्य सक्रियपणे आपली भूमिका बजावणार आहे. सूर्याला जड मानल्यामुळे आपल्याला त्याच्या अलौकिक शक्तीचे भान नाही. पाश्चिमात्य देशात विज्ञानाचा जो विकास झाला आहे केवळ त्या आधारे सूर्य, पृथ्वी वगैरे अलौकिक वस्तु बघण्यात येतात त्यांचे महत्व आपल्याला वाटत नाही. सूर्य काय आणि धरणी काय या अलौकिक गोष्टी आहेत. याना जड मानणारी आपली बुध्दीच खरे तर जड मानली जायला हवी. खरे म्हणजे सूर्य अलौकिक शक्ती आहे. सूर्याशिवाय का जीवन संभवेल? त्या शिवाय का पृथ्वी आणि प्राणिमात्रांचे अस्तित्व राहील? सूर्यापासून आपल्याला उष्णता व ऊर्जा मिळते. सूर्याचा ताप कमी झाला तर धरती थंडावेल. जीवन संपून जाईल. सूर्याचे जगावर अनंत उपकार आहेत. सूर्याच्या आकर्षणामुळे पृथ्वी अवकाशत कुठल्याही आधाराशिवाय स्थिर आहे. सूर्य पृथ्वीला आकर्षित करत असतो. वृक्ष-वनस्पती वा अन्न पदार्थामधील जीवनसत्वे सूर्यामुळेच तर आहेत. प्राचीन काळी सूर्योपासनेचे मोठे महत्व होते. ज्ञानवंतांचा मुख्य असा गायत्री मंत्र सूर्योपासनेचाच मंत्र आहे. तो आहे:

***भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।***
***धियो यो नः प्रचोदयात् ॥***

अर्थात्- सूर्यनारायणाच्या श्रेष्ठ तेजाला आम्ही धारण करतो आणि हे तेज आमच्या बुध्दीला सतत सन्मार्गावर प्रेरित करत राहो !

रोज सूर्योदय समयी भक्तीभावनेने सूर्य महिमेचा अभ्यास करावा. यामुळे श्रेष्ठ अशी परमात्मशक्ती प्राप्त होऊ शकेल.

उपनिषदात सूर्याबाबत असे म्हटले गेले आहे-

***सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षुर्न लिप्यते चाक्षुषैर्बाह्यदोषैः ।***
***एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा***
***न लिप्यते लोकदुःखेन बाह्यः ॥***

अर्थात्- ज्याप्रकारे सूर्य लोकांचा नेत्र असूनही नेत्रांच्या बाह्य दोषानी लिप्त होत नसतो तद्वत्च सर्व भूतमात्रांच्या ठायी व्याप्त एक परमात्मतत्व लोकांच्या दुःखाने लिप्त होत नसते.

दुःखाचे मूळ अज्ञान आहे. ज्ञानस्वरुप असल्यामुळे परमात्म्याला दुःख न होणे स्वाभाविक आहे. परमात्म्याची ही अलिप्तता समजून सांगण्यासाठी उपनिषदाच्या ऋषीने सूर्याचे उदाहरण दिलेले आहे. अशाप्रकारे भगवंताने सूर्याला निर्माण केले आणि त्याला अलिप्ततेचा योग शिकवला. तेव्हापासून सूर्य अखंडपणे त्या योगाचे निरंतर पालन करत आहे.

2) **विवस्वान् मनवे प्राहः** सूर्याने योगाचा विषय मनु म्हणजे ऋषी-मुनींना सांगितला. याचा अर्थ असा की ऋषी-मुनींनी सूर्याला नजरेसमोर ठेऊन त्याच्यापासून प्रेरणा ग्रहण केली. स्वतः साधना केली. परमात्म तत्वाचा अनुभव करुन घेतला. यासाठी सूर्यनारायणाची गुरुमूर्ती नजरेसमोर ठेवली. भगवंताने जेव्हा आरंभी सृष्टी जगताची निर्मिती केली त्यावेळी माणसाला परमात्मस्वरुपाची ओळख कशी झाली? परिचय कसा झाला? कारण की त्याकाळी गुरुपरंपरा तर नव्हतीच ना? अनुभवी ज्ञात्यांचे शास्त्र सुध्दा लिहिले गेले नव्हते ना? त्याकाळी माणसाने परमात्म विषयक जे ज्ञान मिळवले ते स्वप्रयत्नांनीच. त्याकाळी ज्यांची मने निर्मळ होती त्याना सृष्टीच्या अवलोकनाने परमात्म ज्ञान झाले. सृष्टीच्या अवलोकनाच्या क्रमात सूर्यनारायणाचे उदाहरण परमात्म ज्ञान करवून देण्यासाठीचे प्रेरक असे श्रेष्ठ उदाहरण म्हणावे लागेल.

इथे एक प्रश्न उपस्थित होतो. आरंभी सृष्टी कशी उत्पन्न झाली असेल? प्रलयकाळानंतर उत्पन्न होणारी सृष्टी समान स्वरुपाची असायला हवी? यावर शांकरभाष्य- ब्रह्मसूत्रात उत्तर आहे की सृष्टी अनादी आहे. यामुळे सृष्टीची उत्पती आणि प्रलय अनादिकाळापासून सुरु आहेत. सृष्टीचा प्रलय निर्बीज नसतो. सृष्टीचे नाना प्रकारचे भेद असतात. प्रलयकाळात ते बीजरुपाने परमात्म्याच्या ठायी आणि अव्यक्त रुपात विद्यमान असतात. सृष्टीच्या उत्पत्तीचा आधार जर आपण परमात्म्याला मानले तर मग प्रलयाचा आधार ही तोच चैतन्यघन परमेश्वर ठरतो. असे जर मानले नाही तर प्रलयकाळी तमाम अज्ञानी जीव आपोआप मुक्त होतील असे मानावे लागेल. अज्ञान घालविण्यासाठी परमात्म ज्ञानाची आवश्यकता आहे, हा सिध्दांत मिथ्या ठरेल मग तर प्रलयकाळानंतर जेव्हा सृष्टीचा आरंभ होईल तेव्हा ज्ञानी-मुक्त पुरुष पुनरपि उत्पन्न होतील. भेदाचे बीज जर अव्यक्तरुपाने प्रलयकाळात विद्यमान नसेल तर मग भेदयुक्त सृष्टी उत्पन्न होऊ शकणार नाही. एखाद्या कारणाने जर कुठले कार्य निष्पन्न होत असेल तर कारणाशी एकरुप असूनसुध्दा कारण आणि कार्य यात विभेद उरतोच. कार्यकारणात जर भेद उरला नाही तर मग कार्यकारण संबंधाला अर्थ तो काय उरला? मातीने घट बनतो तो मातीशी एकरुप असला तरी काही माती आणि घट याना समान मानता येत नाही.

विनोबा मार्मिक शैलीत सांगतात-च् कार्य हे कारणापासून भिन्न म्हणजे घट हा मातीपासून भिन्न आहे असे म्हणत असाल ना तर माती राहू द्या आपल्याकडे आणि न्या की तुमचा घट तुम्ही! घटाला का मातीपासून विलग करता येते बरे? पण माती आणि घट एकरुप आहे, त्यांच्यात यत्किंचितही भिन्नता नाही असे म्हणत असाल तर घट बनवण्याची गरजच काय होती? मग तर आनंदाने मातीतच पाणी भरता आले असते ना, घटाची गरजच काय होती? पण माती आणि घट पूर्णांशाने एक आहे असे मानून देखिल आपण मातीत पाणी नाही भरु शकत. त्यासाठी घटाची गरज भासते.

थोडक्यात असे की कार्य कारणा पासून एक असले तरी दोघांमध्ये थोडे अंतर असते आणि हे अंतर अनिर्वचनीय असते. मातीच्या ठायी अगणित घट लपलेले असतात. कुंभकाराचा स्पर्श होताच ते प्रकट होतात. तशाप्रकारे परमेश्वराच्या ठायी अनंत पदार्थ बीज रुपात लपलेले असतात. अव्यक्त रुपाने लपलेले असतात. सृष्टीच्या निर्मिती प्रसंगी ते सारे आपोआप प्रकट होऊ लागतात. अशा प्रकारे जगताचे उत्पत्ती-प्रलय-चक्र अनादी काळापासूनच अखंडपणे सुरु आहे आणि यापुढेही

अशा प्रकारे अखंडपणे चालत राहील. हेच सृष्टीचे स्वरुप आहे.

मनूला सूर्यनारायणाने हे ज्ञान दिले. मनूने इक्ष्वाकूला म्हणजे श्रेष्ठ अधिकारी साधक वा मुमुक्षुला दिले. ज्ञानप्राप्तीसाठी श्रेष्ठ साधक हवा, परमात्मज्ञान मिळवण्यासाठी परम पुरुषार्थ हवा. यामुळे पात्र आणि अधिकारी जनांच्या ठायी परमात्मविषयक ज्ञान प्राप्त करुन घेण्याची तीव्र जिज्ञासा निर्माण होते. असे श्रेष्ठ साधकच परमतत्वाला प्राप्त करुन घेऊ शकतात.

ईक्ष शब्दाचा डोळा असा अर्थ घेतला तर साधक वा मुमुक्षु सदा जागृत असतात असे मानावे लागेल. अजागृतावस्था वा मोहरुपी निद्रा त्याना घेरत नाही. अखंड जागृती आणि सावधपण ही मुमुक्षुची निशाणी आहे. यामुळे श्रेष्ठ ऋषी-मुनींनी साधकांना वा मुमुक्षुंना ज्ञान दिले. मुमुक्षुंनी ज्ञान प्राप्त केले.

: 2 :

*एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।*
*स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **एवं परंपराप्राप्तं:** अशा प्रकारे परंपरेने प्राप्त
- **इमं राजर्षयः विदुः** याला (योगाला) राजर्षींनी जाणले, प्राप्त करुन घेतले
- **परंतप:** हे अर्जुना
- **महता कालेन:** या घटनेला (योगाच्या अनुष्ठानाशिवायच) मध्ये खूपच काळ लोटला म्हणून
- **सः योगः** तो योग
- **इह नष्टः** सध्या इथे खंडित झाला आहे

### अर्थ

हे परंतप अर्जुना,अशा प्रकारे परंपरेने आलेला हा योग राजर्षींनी जाणला पण त्यानंतर पुष्कळ काळापासून हा योग या पृथ्वीवर लुप्तप्राय झाला.

*अशा परंपरेंतूनि हा राजर्षींस लाभला*
*पुढें काळ-बळानें तो ह्या लोकीं योग लोपला ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्यात. (1) मागील श्लोकात जी परंपरा सांगितली त्यानुसार श्रेष्ठ मुमुक्षु जनांमार्फत राजर्षींनी या योगविद्येची संपादणी केली. (2) दरम्यान एका प्रदीर्घ काळात या योगविद्येचे अनुष्ठान करणारे नव्हते. (3) परिणामी सध्या ही योगविद्या नष्टप्राय आहे.

### स्पष्टीकरण

(1) **एवं परंपराप्राप्तं इमं योगं राजर्षयः विदुः।** **रा**जर्षींनी ही योगविद्या मिळवली. राजे-शास्ते वा विद्येचे अधिकारी बनले.

प्राचीन काळी राजांचे जीवन पवित्र होते. वैराग्यसंपन्न होते. जनक राजाचे उदाहरण प्रसिध्दच आहे. त्यांचे बाह्य जीवन वैभवयुक्त होते. अंतर्यामी ते अलिप्त होते. हे त्यांचे वैशिष्ट्य मानावे लागेल. ऋषी-मुनी आणि ज्ञानवंतांवर त्यांची श्रध्दा होती. त्यांचा राज्य कारभार नीतीयुक्त होता. धर्मसंमत होता. प्रजाही नीतीपरायण होती, धर्मनिष्ठ होती. अपार सुखी होती. **यथा राजा तथा प्रजा** या न्यायाने प्रजा राजाप्रमाणेच संयमी होती. योगी वा ज्ञान्यांच्या ठायी राजसत्तेच्या मनी आदरभाव वसत होता, यामुळे या महापुरुषांच्या मार्गदर्शनाने राजे राज्यशकट हाकलत. अशाप्रकारे राजांचे जीवन योगयुक्त होते.

इथे राजा शब्दाऐवजी राजर्षी शब्दाचा उपयोग केला गेला आहे. राजा जणू ऋषीच की दुसरा. नवव्या अध्यायातील 33 व्या श्लोकातही **राजर्षी** हा शब्द आला आहे.

शिवाजी राजे रामदास स्वामींना गुरुस्थानी मानत. शिवाजी राजांचे जीवन पवित्र होते. शिवाजी राजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा सन्मान केला. तिला अपवित्र करु इच्छिणाऱ्यांचा अवमान केला. शिवाजी राजे आपले राज्यवैभव तुकारामांच्या चरणी वहायला सिध्द झाले होते. तुकाराम महाराजांनी त्यांची समजूत घातल्यावर कुठे ते राजी झाले.

2) मधल्या प्रदीर्घ काळात योगविद्येचे अनुष्ठान काही होऊ शकले नाही. राजा आणि प्रजा भोगात आकंठ बुडाले. साधारण माणसांची प्रवृत्ती पतनाकडे असते. त्याला रोखण्यासाठी नीती आणि धर्म कार्यशील असतात. यासाठीच पंच महाव्रतांचे पालन आवश्यक आहे. धर्म, नीती आणि व्रतपालनामुळे माणूस संयम मार्गावर

स्थिरावतो. जनतेने धर्मनिष्ठ, व्रतनिष्ठ आणि नीतीनिष्ठ रहावे यासाठी देवही अवतार घेतो.

3) मधल्या काळात योगविद्येची परंपरा नष्ट झाली. योगाचे अनुष्ठान करणारे वा आचरण करणारेच उरले नाहीत तर योगविद्येची परंपरा संपुष्टात येणे स्वाभाविकच होते.

ज्ञानेश्वर म्हणतात- राजर्षींनी या योगविद्येला जाणून घेतले त्यानंतर कुणापर्यंत हा निष्काम कर्मयोगाचा विचार पोहोचला नाही. याचे कारण विषयभोगसुखात अडकून पडलेले जनलोक. सारे देहासक्त बनले परिणामी आत्मविस्मरण झाले. परमात्म ज्ञान किंवा आत्मबोध आटला. बुध्दीने चुकीची वाट धरली. जनलोक विषयसुखाला परमसुख मानू लागले. देह वगैरे गोष्टी प्राणप्रिय वाटू लागल्या. दिगंबर म्हणजे नग्न साधु जनांच्या संघात उंची वस्त्रांचे काय मोल? जन्मांधांसाठी सूर्याचा काय उपयोग? बहिऱ्यांच्या सभेत संगीताचा काय उपयोग? अशा प्रकारे वैराग्य नगराच्या शिवेचा ज्यांनी स्पर्श केला नाही त्याना विवेकाची काय मात? ते मूर्ख पुरुष परम तत्वाकडे कसे आकृष्ट होतील?

: 3 :

*स एवायं मया तेऽद्य योग: प्रोक्त: पुरातन: ।*
*भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **स: एव अयं पुरातन: योग:** तोच हा प्राचीन समतेचा निष्काम कर्मयोग होय
- **मया ते अद्य प्रोक्त:** मी आज तुला सांगितला
- **मे भक्त: असि च सखा असि इति:** कारण की तू माझा भक्त आणि सखा आहेस म्हणून सांगितला
- **हि एतत् उत्तमं रहस्यं:** कारण की हे जीवनातील उत्तमातील उत्तम रहस्य आहे

**अर्थ**

तू माझा भक्त आणि प्रिय सखा आहेस म्हणून तोच हा पुरातन योग आज मी तुला सांगितला आहे कारण हा अतिशय उत्तम आणि रहस्यमय आहे.अर्थात् गुप्त ठेवण्याजोगा आहे.

***तो चि हा बोलिलों आज तुज योग पुरातन***
***जीवींचें गूज हें थोर तूं हि भक्त सखा तसा ।***

**विषय:** या श्लोकात तीन मुद्दे येतात. (1) प्राचीन काळापासून रुढ अशा मध्येच खंडित परंपरा झालेल्या योगाचा भगवंताने आज परिचय करुन दिला. (2) याचे कारण अर्जुन त्याचा सखा व भक्त आहे. (3) हे जीवनातले उत्तमातले उत्तम रहस्य वा सार यामुळे सांगितले.

**स्पष्टीकरण**

1) **स एव अयं मया ते अद्य पुरातन: योग: प्रोक्त: ।** योगाची परंपरा प्राचीन आहे. हा काही नवीन विषय नाही. हिंदुस्तानची नाना वैशिष्ट्ये आहेत. चार आश्रम, चार पुरुषार्थ समाज कल्याणासाठी उपयुक्त गोष्टी आहेत. तशाच प्रकारे गुरु परंपरा आणि ज्ञान परंपरांच्या विशिष्ट पध्दती समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी गरजेच्या आहेत. गुरुप्रमाणे मार्गदर्शक आहेत. आधीच्या ऋषी-मुनींसमोर जळत्या-तळपत्या सूर्याचे उदाहरण होते. त्यांनी अपार कष्ट झेलले. आपल्या सोबतच्या आणि नंतर येणाऱ्या साधकांचा मार्ग सुगम व्हावा या करुणाबुध्दीमुळे त्यांनी शास्त्रे रचलीत. ज्ञानपरंपरांचे संवर्ध्दन केले.

ऋषी-मुनींनी उपनिषदांची रचना केली. गुरुगृही बाळपणीच छात्र दाखल होत. एक तप म्हणजे बारा वर्षे स्वाध्याय करत. यामुळे ज्ञान परंपरा टिकून राहिली. गुरु आणि ज्ञान हे परस्परपूरक घटक बनले.

शंकराचार्यांनाही सद्गुरुंपासून ज्ञानलाभ झाला. ज्ञानेश्वर महाराजांसारख्या अलौकिक योग्यालाही आपले थोरले बंधु निवृत्तीनाथ यांच्यापासूनच ज्ञान प्राप्त झाले. गुरुमुखातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा सर्वात मोठा लाभ असा होतो की ज्ञानाचा अभिमान नाही वाटत. मोक्ष म्हणजे परमशून्यता होय. अधिकारी गुरुमुळे चित्ताच्या ठायी परमशून्यता उपजते. गुरु म्हणजे समर्पण. ‟सर्व क्रिया परमेश्वराप्रत समर्पण करा" हा गीतेचा संदेश आहे पण परमात्मा तर निर्गुण-निराकार आहे. अव्यक्त आहे. कर्मे अव्यक्त रुपाला कशी समर्पित करायचीत? हे अवघड काम आहे. गुरु प्रत्यक्ष समोर असतो. त्याला सारे समर्पण करणे सोपे.

तुलसीदास म्हणतात: **मो ते संत अधिक करि लेखा** ईश्वराहून संताला अधिक माना. ज्ञानेश्वर म्हणतात **संत**

**हे माझी रुपडी** संत ही ईश्वराचीच रुपे. गांधीजींना हिंदू धर्माबाबत शंका वाटली. त्यांनी श्रीमद्‌राजचंद्र यांच्याशी चर्चा केली. गीतेत संतांची लक्षणे वर्णिली आहेत. तुलसीदासांनीही संत लक्षणे सांगितली आहेत. या लक्षणानी युक्त पुरुषाचे मार्गदर्शन घेता येते. अशा प्रकारे प्राचीन काळी ज्ञानपरंपरेचा आधार गुरु परंपरा होती.

2) अर्जुन सखा व भक्त आहे. भगवंताच्या निकटचा आहे. ज्ञानाचा अधिकारी आहे. भगवंताने त्या प्राचीन योग-विद्येची त्याच्याशी चर्चा केली.

अर्जुनाला निमित्त बनवून भगवंतानी हे आध्यात्मिक नियम निरुपित केलेत. परमेश्वरार्पण बुध्दीचा हा योग कुणाप्रती निवेदन करावा? गीतेचे उत्तर स्पष्ट आहे. यासाठी परमात्म श्रध्दा आवश्यक आहे. परम तत्वाशी मैत्र हवे. परमात्म तत्व जगतात व्याप्त आहे. यामुळे भक्त जगावर प्रीत करतो. मैत्र भाव जोपासतो. ते जन परमेश्वरार्पण बुध्दीचा हा योग जाणून घ्यायला पात्र आहेत. जगाबद्दलचा मैत्र भाव म्हणजे काय ? याचे उत्तर आहे जगत् व्यवहारात षड्रिपुंचा अभाव. हा योग ऐकण्यासाठी गीतेच्या दोन अटी आहेत. एक ईश्वराप्रती श्रध्दाभाव. दोन जगातल्या तमाम प्राणिमात्रांबद्दलचा मैत्रभाव. या दोन अटींचे पालन करणाऱ्याला गीतारुपी अमृत निरुपित करायला हरकत नाही.

3) हा योग रहस्यभरला आहे, रहस्यमय आहे. सर्वात रहस्यमय-गूढ-गुप्त आहे. रहस्य म्हणजे गूढ वा गुप्त आणि रहस्य म्हणजे सारांश वा सारभूत तत्व. जीवनातला सारांश आहे योग. योग संकटांपासून वाचवतो. तमाम बंधनांपासून मुक्त करतो. परमात्म तत्वाचा अनुभव घडवतो. मोक्ष म्हणजे अखंड सुखाची बरसात करतो. योग काही स्थूल तत्व नाही. या योगाचे निवासस्थान मन आहे. अनुभवगम्य आहे. बुध्दीला या योगाची केवळ कल्पनामात्र करता येते. योग अनुभव कक्षेत आला तर त्याचा उपयोग होय. हे सूक्ष्म आहे. गूढ आहे. गुप्त आहे. योग वाटेल तिथे नाही रमायचा. तुलसीदास म्हणतात:

*रामकथा के ते अधिकारी। जिन्हके सतसंगति अति प्यारी॥*

अर्थात् ज्यांना सत्संगती अत्यंत प्रिय आहे तेच राम कथा श्रवणाचे अधिकारी आहेत. अठराव्या अध्यायातील 67 ते 71 या श्लोकांमधून हा विषय पुन्हा चर्चेला घेतला गेला आहे.

: 4 :

**अर्जुन उवाच**

*अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः।*
*कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भवतः जन्म अपरं:** आपला जन्म तर अर्वाचीन अर्थात् हल्लीच झालेला आहे
- **विवस्वतः जन्म परं:** सूर्याचा जन्म तर सृष्टीच्या आरंभकाळापासूनच आहे
- **त्वं आदौ प्रोक्तवान्:** यामुळे आपण सृष्टीच्या आरंभी हे सूर्याप्रती सांगितले
- **इति एतत् कथं विजानीयां:** अशा प्रकारच्या कथनाला सत्य कसे समजावे ?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला आपला जन्म तर अलिकडचा आणि सूर्याचा जन्म फार पूर्वीचा अर्थात् कल्पारंभी झालेला होता तर मग आपणच कल्पारंभी सूर्याला हा योग सांगितला होता असे कसे समजू?

**अर्जुन म्हणाला**

*ह्या काळाचा तुझा जन्म सूर्याचा तो पुरातन*
*तू बोलिलास आरंभी हें मी जाणूं कसें बरें।*

**विषय:** या श्लोकात अर्जुनाच्या मनात काही शंका जागल्या. त्याने तीन गोष्टी विचारल्यात. (1) श्रीकृष्ण तर अर्वाचीन. (2) सूर्याचा जन्म सृष्टीच्या आरंभीचा. (3) मग श्रीकृष्णाने सूर्याला योगविद्येचे निरुपण केले हे कसे काय?

**स्पष्टीकरण**

1) **अपरं भवतः जन्मः** अर्जुनाला कृष्ण देहधारी वाटतो. हा प्रश्न यामुळेच उद्भवला आहे. कृष्ण साधारण नाही हे खरे पण ते का साक्षात् ईश्वररुप आहेत ? हे त्याला ध्यानात आले नाही. परमात्म्याला अवतार घेण्यासाठी देह तर धारण करावा लागेल. देहाशिवाय परमात्मतत्व कसे प्रकट होईल ? कृष्णावताराचे हे वैशिष्ट्य आहे की अलौकिक असूनही कुणालाच ते अलौकिक वाटत

नाही. यामुळे अर्जुनाचा गोंधळ उडला आहे. अकराव्या अध्यायात विश्वरुप दर्शन घडल्यावर अर्जुनाला कृष्णाच्या परमात्म रुपाचे आकलन झाले. साक्षात्कार झाला.

अनेक ज्ञानी पुरुष साधे-सरळ असतात. त्यांच्या बाह्य रुपांवरुन अगदी निकटवर्तियांनाही त्यांच्या अलौकिक महत्तेचे ज्ञान धडपणे होत नाही. यामुळे निकटवर्तियांचा फायदा होत नाही. ते जेवढे नजिक असतात तेवढेच भगवंतापासून लांब असतात. **निअरर द चर्च फर्दर फ्रॉम दि गॉड** संस्कृतचे वचन सुपरिचित आहे **अतिपरिचयात् अवज्ञा** अतिपरिचयामुळे महापुरुषांच्या ठायीही अनेक दोष दिसू लागतात. त्यांची आज्ञा मोडायलाही संकोच वाटत नाही. यामुळे निकटवर्तियाना सावध रहावे लागते. आदरभाव कमी व्हायला नको आणि दोषदृष्टी उत्पन्न व्हायला नको. अशाप्रकारे सावधपणे जे महापुरुषांच्या निकट रहातात. त्याना फार लाभ होतो. महापुरुषांचे आचरण दिव्य असते. प्रत्येक कामात बारकावे असतात. निकटवर्तियाना हे कळते. ते यामुळे प्रभावित होतात. प्राचीन ग्रंथांमध्ये भगवंताचे ऐतिहासिक वर्णन येते. यामुळे आपण ईश्वराला देहधारी समजतो. अवतार लीलेचे रहस्य कळून येत नाही.

तुलसी रामायण एक अद्भुत ग्रंथ आहे. यात एक मनोरम प्रसंग आहे. रावणाने सीता हरण केले. राम सीता विरहाने व्यथित झाले. जगदंबेच्या मनी शंका उपजली. असा काय राम? असा कसा राम? खरे तर राम जड-चेतनाच्या ठायी निवास करतो. त्यानी लिहिलेही आहे:

***जड चेतन जग जीव जत, सकल राममय जानि।***
***बंदउँ सबके पद-कमल, सदा जोरि जुग पानि॥***

अर्थात् जगात जेवढे म्हणून काही जड आणि चेतन पदार्थ आहेत ते सारे राममय समजून ते त्यांच्या चरण कमलांना दोन्ही हात जोडून प्रणाम करताहेत. पुढे लिहितात:

***सीय राममय सब जग जानी।***
***करउँ प्रनाम जोरि जुग पानी॥***
***जानि कृपाकर किंकर मोहू।***
***सब मिलि करहु छाँडि छल छोहू॥***

अर्थात् तुलसीदास जगताला सीताराममय मानतात. दोन्ही हात जोडून नमस्कार करतात. कृपायाचना करतात. सर्वांनी आपल्यावर निष्कपटपणे प्रेम करावे, असे मागणे मागतात. जगताप्रती तुलसीदासांच्या मनी परमात्मदृष्टी आहे. राम सर्वघटव्यापी भगवान आहेत. ते अयोध्यानिवासी आहेत. मनात व्यापक परब्रह्माचे स्मरण ठेवून बाह्यत : श्री रामचंद्रांचे चरित्र चित्रण केले आहे.

2) अर्जुनाच्या मनात शंका उपजली की सूर्य सृष्टीच्या आरंभी होता.

3) त्याला श्रीकृष्ण निष्काम कर्मयोग कसा बरे शिकवील?

विनोबा म्हणतात की गीतेत युध्दाची व्याख्या दिली आहे. त्याचा आध्यात्मिक अर्थ तिसऱ्या अध्यायातील अखेरच्या प्रकरणातील आठ श्लोकामधून समजावून सांगितला आहे. मनातल्या विकारांविरुध्द युध्द हा आहे आध्यात्मिक अर्थ. त्यांच्याशी झुंजायचे आहे. विजय मिळवायचा आहे. विनोबा म्हणतात की गीता उपदेशाची सुरुवात दुसऱ्या अध्यायाच्या 11 व्या श्लोकापासून म्हणजे आत्मज्ञान निरुपणापासून होते. तिसऱ्या अध्यायात **काम हनन** प्रसंगात समाप्ती होते. सूत्ररुपात गीता तिसऱ्या अध्यायासोबत संपून जाते. चौथ्या अध्यायातील आरंभिक तीन श्लोक ज्ञानाची परंपरा सांगतात. विकाराना शत्रु मानून त्यांचा त्याग करा या वचनासोबत तिसरा अध्याय संपून जातो. अशाप्रकारे दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या अध्यायातील सुरुवातीचे तीन असे 108 श्लोक गीतेचे बीज श्लोक आहेत. याचा विस्तार अठराव्या अध्यायाच्या अखेरपर्यत झाला आहे.

: 5 :

**श्री भगवान उवाच**

***बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।***
***तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन मे च तव:** हे अर्जुना, माझे आणि तुझे
- **बहूनि जन्मानि व्यतीतानि:** अनेक जन्म झालेले आहेत, होऊन गेले आहेत

- **अहं तानि सर्वाणि:** मी त्या सर्व जन्मांना
- **वेद:** जाणतो
- **परंतप न त्वं वेत्थ:** तू मात्र ते जाणत नाहीस

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे परंतप अर्जुना, माझे आणि तुझे अनेक जन्म झालेले आहेत. ते सर्व तुला माहीत नाहीत पण मला माहीत आहेत.

**श्री भगवान म्हणाले**

***माझे अनेक ह्यापूर्वी झाले जन्म तसे तुझे***
***जाणतों सगळे मी ते अर्जुना तूं न जाणसी।***

**विषय:** या श्लोकात तीन मुद्दे येतात. (1) माझे आणि तुझे अनेक जन्म झाले आहेत. (2) मला त्या तमाम जन्मांची आठवण आहे. (3) तुला स्वत:च्या वा माझ्या जन्मांच्या बाबतीत काहीही माहिती नाही.

**स्पष्टीकरण**

1) **बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव च।** अर्जुनाच्या मनातला प्रश्न खरे तर सर्वांच्याच मनातला आहे. अर्जुनाला आपला प्रतिनिधी मानायला हवे. अज्ञ जीवांच्या मनात उभे ठाकणारे प्रश्नच अर्जुन विचारतो. तो खुद्द अज्ञानावस्थेत आहे. यामुळे असे प्रश्न जागतात. आज पुनर्जन्मावर लोकांचा विश्वास नाही. सर्वसामान्य लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात.

पुनर्जन्मासंबंधी मी 1931 साली गांधीजींना विचारले होते. उत्तरादाखल ते म्हणाले होते-पुनर्जन्म सिध्द करायला एकच कारण पुरेसे आहे. ते दुसऱ्या अध्यायात येते. शरीराच्या उत्पत्तीच्या आधी आत्मा होता आणि देह पतनानंतरही आत्मतत्व उरणारच आहे. असे जर मानले नाही तर देहालाच आत्मतत्व मानावे लागेल. या मूळ कारणाशी इतर कारणांची सांगड घालू शकता.

पुनर्जन्म न मानला तर आपले सारे श्रेय फुकट जातील. प्रत्येकाच्या ठायी वेगवेगळे संकल्प जागतात. त्या संकल्पाना साकार करण्याचा तो प्रयत्न करतो. संकल्प सारेच एकाच जन्मात पूर्ण होतील असे काही दिसत नाही. त्या संकल्पांच्या परिपूर्तीसाठी एका देहाचे पतन झाल्यावर दुसरा देह लाभणे स्वाभाविक आहे. असे नाही मानले ना तर संकल्प व्यर्थ होऊन जातील कारण की संकल्पांच्या मागे संकल्प पूर्ण करायची कामना असते. संकल्प अधुरा रहावा यासाठी का कुणी संकल्प करतो ? संकल्प पूर्ण करायचीच कल्पना प्रत्येकाच्या मनी वसते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा प्रवाह हा नदीच्या प्रवाहासारखा अविच्छिन्न असतो. हा प्रवाह अनेक जन्मांपर्यत तसाच अखंडपणे चालत रहातो. सागरात विलीन झाल्यावर नदीचा प्रवाह थांबतो. तशाच प्रकारे आपला जन्म अधुराच वाटतो. हा अधूरेपणा घालवण्यासाठी आपले सारे प्रयत्न असतात.

तत्वज्ञान असे सांगते की आपण देहाला आत्मा मानतो हे झाले अज्ञान. या अज्ञानामुळे देहासक्ती जागते. ही आसक्ती जगण्याची प्रबळ वासना निर्माण करते. मरण कुणालाच नको. सर्वाना दीर्घकाळ जगावेसे वाटते. एवढी प्रबळ देहासक्ती असल्यावर एकानंतर एक जन्म घ्यावा लागेलच.

हे जन्मचक्र कुठवर चालेल? अर्थात्‌च जोवर देहासक्ती कायम आहे तोवर जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सुटका होणे अशक्य. देहाचे कारण आसक्ती आहे त्यामुळे आसक्ती सुटल्याशिवाय जन्म-मरणाच्या फेऱ्यातुन सुटका नाही होऊ शकणार. आपण वर्तमान काळात जगतो तर भूतकाळ आणि भविष्यकाळ मानावाच लागेल. वर्तमानकाळ भूतकाळात विलीन होतो आणि भविष्यकाळ वर्तमानकाळात दाखल होतो. अशा प्रकारे तिन्ही काळांचे कालचक्र अखंडपणे जारी रहाते. यामुळे देहाच्या उत्पत्तीला आकस्मिक नाही मानता येत. आपला देह काल होता, आज आहे, उद्याही रहील. परमात्म स्वरुपाचे ज्ञान जोवर होत नाही तोवर जन्म-मरणाचा फेरा असाच जारी राहील. एकाच माता-पित्याच्या लेकरांच्या स्वभावात फरक का आढळतो ?

2) **तान्यहं वेद सर्वाणि।** मी माझ्या अन्‌ तुझ्या तमाम पूर्वजन्माना जाणतो.

3) तू जाणत नाहीस, मी जाणतो. तू का जाणत नाहीस याबद्दल शंकराचार्य आपल्या गीता भाष्यात म्हणतात:

***न त्वं वेत्थ जानीषे, धर्माधर्मादिप्रतिबध्दज्ञानशक्तित्वात्‌। अहं पुन: नित्य-शुध्द-बुध्द-मुक्तस्वभावत्वात्‌ अनावरणज्ञानशक्तिरिति वेद अहं हे परंतप।***

अर्थात् धर्म-अधर्म वगैरेंच्या आचरणामुळे तुझी पूर्वजन्म विषयक ज्ञान जाणून घेण्याची बुध्दी म्हणजे ज्ञानशक्ती झाकली गेली आहे. मी नित्य शुध्द स्वभावाचा, ज्ञानी स्वभावाचा आणि मुक्त स्वभावाचा असल्यामुळे पूर्वजन्म जाणून घेण्याची माझी शक्ती आवरणरहीत आहे. यामुळे मी पूर्वजन्माना जाणतो आणि तू जाणत नाहीस.

भगवंत आपल्या जन्माना जाणतो कारण त्याची ज्ञानशक्ती झाकली गेलेली नाही. त्यावर कुठलेही आवरण नाही कारण की भगवंत अतिशुध्द स्वभावयुक्त आणि ज्ञानस्वभाव युक्त आहे. निर्विकार आहे. बुध्द आहे. अखंड ज्ञानस्वभाव युक्त आहे. आपण सारे जीव पापाचरण करतो. धर्म-अधर्माशी संबध्द आहोत. त्यांच्या संस्कारांचा थर साचतो. आपण काम-क्रोध वगैरे विकारांच्या अधीन रहातो. अहंकाराने युक्त तर असतोच असतो. यामुळे आपली ज्ञानशक्ती प्रतिबध्द होते. पूर्वजन्माचे ज्ञान आपल्याला होत नाही पण पूर्वजन्माचे ज्याना स्मरण असते असे जे लोक असतात त्याना **जातिस्मरण** अशी संज्ञा आहे.

विनोबांनी आपला पूर्वजन्माविषयीचा एक अनुभव असा सांगितला आहे. "पाच वर्षे वयाचा बालक असेन मी. आईच्या सोबत आजोळी जायला निघालो होतो. फ्लॅटफॉर्मवर बसून आम्ही गाडीची वाट बघत होतो. अचानक माझ्या नजरेसमोर एक दृश्य तरळले. मला एक घर दिसले. घराला भला मोठा दरवाजा आहे. अंगणात बाग आहे. उजव्या हाताला शिडी आहे. यापूर्वी असले घर मी कधीच पाहिले नव्हते पण नंतर जेव्हा मी मामांकडे पोहोचलो तर मला खूप नवल वाटले. मामांचे घर मी नुकत्याच बघितलेल्या घरासारखेच तर होते मग मी आईशी या घटनेबद्दल बोललो असता आई म्हणाली होती की पूर्वजन्मीचे काही ऋणानुबंध असतील. आजपर्यत मी ते दृश्य विसरु शकत नाही."

ज्यांची बुध्दी विशुध्द आहे त्यांना पूर्वजन्मीचे स्मरण होऊ शकते. एकदा विनोबाजींशी पूर्वजन्मासंबंधी बोलत असताना त्यानी उत्तर दिले होते "मी सर्व कामांमधून मुक्त होऊन ध्यानमग्न बनलो तर माझ्या पूर्वजन्माविषयी नेमकेपणाने सांगू शकेन" क्षणभर थांबून म्हणाले "मी पूर्वजन्मी कदाचित बंगाली असेन." याचे कारण देताना म्हणाले- "प्रथमच बंगाली ग्रंथ हाती घेतला तर मला वाटले की आपल्याला तर ही भाषा येते. रामकृष्ण परमहंस यांच्या बाबतीतल्या आकर्षण वगैरे कारणांमुळेही माझे हेच अनुमान आहे."

: 6 :

*अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।*
*प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अहं अजः अपि सन्:** मी जन्मरहित असूनही (आणि)
- **अव्ययात्मा अपि सन्:** माझे ज्ञानशक्तीस्वरुप कदापि क्षीण न होणारे असतानादेखिल (आणि)
- **भूतानां ईश्वरः** अपि सन्: सर्व भूतमात्रांचा ईश्वर म्हणजे नियमन करणारा असूनही
- **स्वां प्रकृतिं अधिष्ठाय:** आपल्या अचिंत्य माया नामक प्रकृतीच्या अधिष्ठित होऊन म्हणजे तिला काबूत ठेवून
- **आत्ममायया संभवामि:** आपल्या अचिंत्य सामर्थ्याने, योगमायेने मी जन्म घेतो

### अर्थ

मी जन्मरहित आणि अविनाशी असूनही तसेच सर्व प्राण्यांचा ईश्वर असूनही आपल्या प्रकृतीला स्वाधीन करुन आपल्या योग मायेने प्रकट होत असतो.

*असूनि हि अजन्मा मी निर्विकार जगत्-प्रभु*
*माझी प्रकृति वेढूनि मायेनें जन्मतों जणू।*

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी येतात. (1) मी अज, अव्यय आणि तमाम भूतमात्रांचा ईश्वर म्हणजे नियमन करणारा असूनसूध्दा (2) माया नामक अलौकिक शक्तीच्या अधिष्ठित होऊन (3) आपल्या अचिंत्य सामर्थ्याने जन्म घेतो.

### स्पष्टीकरण

1) **अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्-** - परमात्मा अज म्हणजे अजन्मा आहे. परमात्मा अव्ययही आहे. परमात्म्याच्या ठायी सृष्टी निर्माण करण्याची शक्ती आहे असे मानले तर त्याच्या ठायी चैतन्य शक्ती, ज्ञान शक्तीही आहे असे मानावे लागेल कारण की ज्ञान शक्तीच्या अभावी सृष्टीतल्या विविध प्रकारच्या पदार्थाना

उत्पन्न करणे अशक्य आहे. ही ज्ञान शक्ती अखंड आहे, क्षीण नाही. जीव देह , इंद्रिये, मन आणि बुध्दीच्या अधीन असतात त्यामुळे त्यांची ज्ञानशक्ती क्षीण होत जाते. आपण देह वगैरेमध्ये आसक्त होऊन बांधले जातो. परमात्मा आसक्त नसतो परिणामी तो काही बांधला जात नाही. यामुळे परमात्म्याची ज्ञानशक्ती अकुंठित, अक्षीण आणि अखंड असते. यामुळे परमात्मतत्व साऱ्या जगताचे नियंत्रण करते. ज्यांचे चित्त विशुध्द झाले आहे, ज्याना अखंड निर्विकारता साधलेली आहे त्यांची ज्ञानशक्ती अबाधित होते. त्यांची समाज जीवनावर अधिसत्ता नांदते. संतांच्या नियंत्रणामुळे समाजाचा लाभ होतो.

सृष्टीत अनंत पदार्थ उत्पन्न होतात. काही काळ रहातात मग त्यांचा विनाश होतो. अशा प्रकारे उत्पत्ती, स्थिती आणि लय या गोष्टी आढळतात. याचा कुणीतरी नियंता अवश्य असला पाहिजे. नियंत्रक शक्तीच्या ठायी ज्ञान आणि क्रियाशक्ती दोन्ही हव्यात. काही काळ स्थिती यामुळेच राहील. अशा प्रकारे परमात्मा ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती या दोन तत्वानी सजला आहे. क्रियाशक्ती निर्माणशक्ती आहे. सर्गशक्ती आहे. या दोन्ही शक्ती परमात्म्याच्या ठायी अखंड वसतात म्हणूनच ती नियंत्रक शक्ती आहे.

2) **प्रकृतिं स्वामधिष्ठाय:** शक्ती प्रकृतीच्या ठायी अधिष्ठित असते. प्रकृतीवर परमात्म्याचे नियंत्रण असते. सर्गशक्ती वा निर्माणशक्ती मुळे निर्मिती होते. केवळ ज्ञानशक्ती नव्हे. कुठलेही छोटे वा मोठे कार्य करण्यासाठी ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती हवी. केवळ एकट्या शक्तीने काम नाही भागायचे.

ईश्वर दोन्ही शक्तींनी युक्त आहे. आपल्या ठायीही दोन्ही शक्ती वसलेल्या असतात. आपल्या देहातील पाच ज्ञानेंद्रिये मन आणि बुध्दी ज्ञानशक्तीची साधने होत. पंचमहाभूतांनी बनलेला देह आणि कर्मेंद्रिये क्रियाशक्तीची साधने होत. या दोन्ही शक्तींचा विकास समानपणे घडला तर मानवी जीवन पूर्णपणे विकसित होते. क्रियाशक्तीच्या अभावी ज्ञानशक्ती पंगु आहे आणि ज्ञानशक्तीच्या अभावी क्रियाशक्ती अधूरी आहे. यामुळे दोन्ही शक्तींचा पूर्ण विकास साधता यायला हवा.

3) **आत्ममायया संभवामि:** आपल्या मायेमुळे ईश्वर जन्म घेतो. अचिंत्य सामर्थ्यामुळे देह धारण करतो. अलौकिक सामर्थ्यामुळे अवतार ग्रहण करतो. आपल्याप्रमाणे ईश्वर देहात आसक्त नसतो यामुळे अलिप्ततापूर्वक जगदोध्दाराचे पवित्र कार्य सुरु असते. सर्वशक्तिमान ईश्वराला जगात अशक्य असे काहीही नाही. शंकराचार्य आपल्या ब्रह्मसूत्र भाष्यात लिहितात :

***एवं प्रवृत्तिरहित: अपि ईश्वर: सर्वगत: सर्वात्मा सर्वज्ञ:***
***सर्वशक्ति: च सन् सर्वं प्रवर्तयेत् इति उपपन्नम्।***

अर्थात् ईश्वर प्रवृत्तीरहित असतानाही सर्वत्र व्याप्त असतो. सर्वाचे स्वरुप असतो. सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान असल्यामुळे काहीही करु शकतो.

: 7 :

*यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।*
*अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **यदा यदा हि धर्मस्य ग्लानि:** ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी
- **च अधर्मस्य अभ्युत्थानं:** आणि अधर्म वाढतो
- **तदा अहं आत्मानं:** तेव्हा मी स्वत:ला
- **सृजामि:** उत्पन्न करतो

**अर्थ**

हे भारता, जेव्हा जेव्हा धर्माचा ह्यास आणि अधर्माची वाढ होत असते तेव्हा तेव्हाच मी आपले रुप रचतो म्हणजेच आकार घेऊन लोकांसमोर प्रकट होतो.

***गळूनि जातसे धर्म ज्या ज्या वेळेस अर्जुना***
***अधर्म उठतो भारी तेव्हां मी जन्म घेतसें।***

**विषय:** या श्लोकात तीन मुद्यांची चर्चा आली आहे. (1) जेव्हा कुठे धर्महानी झाली, धर्मक्षय झाला तर (2) अधर्म पसरतो. (3) तेव्हा ईश्वर अवतार घेतो म्हणजे देह धारण करतो.

**स्पष्टीकरण**

1) **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिः भवतिः** या त्रिगुणात्मक जगात सत्व-रज आणि तम या तीन गुणांचा आपसात संघर्ष जारी असतो. एकीकडे सत्वगुण तर दुसरीकडे रजोगुण व तमोगुण असे विभाजन असते. सत्वगुणाच्या उत्कर्ष आणि वृध्दीच्या समवेत धर्म आणि नीतीचा उत्कर्ष होतो. रजोगुण आणि तमोगुणांच्या वाढीच्या सोबत सत्वगुण क्षीण होतो. सत्वगुणाचा उत्कर्ष करणाऱ्या जनांच्यामुळे सत्वगुणी वाढतात. अशावेळी ईश्वराला अवतार घ्यायचे कारण उरत नाही पण सत्वगुणीजनांची संख्या घटते आणि रजोगुणी-तमोगुणीजन वाढतात तेव्हा ईश्वराला अवतार घ्यावा लागतो.

2) धर्माचा नाश म्हणजेच अधर्माचा उत्कर्ष ना ? मग तरी या दोन कारणांची चर्चा कशासाठी ? अहिंसा शब्दाचा अर्थ केवळ हिंसा न करणे एवढाच मर्यादित स्वरुपाचा नसून प्रेम करणे असाही दुहेरी अर्थ आहे. 'खरे बोला' हे विधी तर 'खोटे बोलू नका' हे निषेध वाक्य शास्त्रात विधिनिषेध युक्त असते. शास्त्र विधी निषेध युक्त असते.

3) मी त्या धर्माच्या स्थापनेसाठी जन्म धारण करतो. गीताभाष्याच्या उपोद्घातात शंकराचार्य म्हणतात:

***द्विविधो हि वेदोक्तो धर्मः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च। जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षात् अभ्युदयानिःश्रेयसहेतुः यः स धर्मो ब्राह्मणाद्यैर्वर्णिभिराश् रमिभिश्च श्रेयोर्थिभिरनुष्ठीयमानः।***

अर्थात् वेदोक्त धर्म दोन प्रकारचा आहे. प्रवृत्तीरुप आणि निवृत्तीरुप. जगताची स्थिती, प्राणीमात्रांची उन्नती मोक्षाचे साक्षात् म्हणजे प्रत्यक्ष कारण म्हणजे धर्म होय. धर्माचे आचरण चारही आश्रमातले लोक करतात.

वेद अतिप्राचीन प्रमाण ग्रंथ आहे. वेद काही ऋषी मुनीनी रचलेले ग्रंथ नाहीत. प्राचीन काळापासून अशी मान्यता रुढ आहे की वेद ईश्वराची निःश्वसने होत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत. वेदाने प्रवृत्ती धर्म आणि निवृत्ती धर्म या दोन धर्मांची चर्चा केली आहे. बाह्यरुपाने आचरणात आणला जाणारा स्वधर्म हा प्रवृत्तीधर्म आहे तर ज्ञान, भक्ती, वैराग्य, योगाचा आंतरिक अभ्यास निवृत्तीधर्म होय. बाहेर आढळणारी स्वधर्माचरण प्रवृत्ती तर आत नांदणारी अनासक्ती होय. निवृत्ती स्वधर्माच्या आचरणामुळे अभ्युदय म्हणजे बाह्य उत्कर्ष होतो तर आंतरिक अनासक्तीमुळे निःश्रेयस म्हणजे मोक्षलाभ होतो. अशाप्रकारे दोन्ही मिळून परिपूर्ण जीवन आकाराला येते. हा दोन प्रकारचा धर्म आहे. हा सर्वांनी आचरणात आणावा. सर्व प्रकारच्या आश्रमवासियांनी आचरणात आणावा असे वेदाचे निवेदन आहे.

शंकराचार्य लिहितात:

**दीर्घेण कालेन अनुष्ठातृणां कामोद्भवात् हीयमानविवेक-विज्ञानहेतुकेन अधर्मेण अभिभूयमाने धर्मे प्रवर्धमाने च अधर्मे, जगतः स्थितिं परिपिपालयिषुः स आदिकर्ता नारायणाख्यः विष्णुः भौमस्य ब्रह्मणः ब्राह्मणत्वस्य रक्षणार्थं देवक्यां वसुदेवात् अंशेन कृष्णः किल संबभूव। ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिकः धर्मः तदधीनत्वात् वर्णाश्रमभेदानाम्।**

अर्थात् ज्ञ् च् मधल्या प्रदीर्घ काळात अनुष्ठान करणाऱ्यांच्या ठायी विषय वासना वाढते. विवेक व विज्ञान नष्ट होतात. अधर्म धर्माला पराभूत करतो. अधर्माचे पोषण होते. कृष्ण अवतरित होतो. वैदिक धर्माला सुरक्षित ठेवतो. प्राचीन काळी ब्रह्मवृंदाना मोठी प्रतिष्ठा लाभली होती. ज्ञानसंपन्न वर्ग तेजःपुंज आणि त्यांचे चित्त शुध्दीसंपन्न होते. अशा ब्रह्मवृंदाच्या रक्षणार्थ वसुदेव देवकीच्या उदरी आपल्या अंशाची स्थापना करुन श्री कृष्णाने अवतार ग्रहण केला. यामुळे वैदिक धर्माचे रक्षण होणार होते.

प्राचीन काळी ब्राह्मण समाजाला खूप प्रतिष्ठा होती. सारा समाज त्यांच्या अधीन होता. त्यांच्या धामिर्क आणि नैतिक शक्तीच्या आधारे आश्रमव्यवस्था टिकून होती.

शंकराचार्य पुढे लिहितात:

**स च भगवान् ज्ञानैश्वर्य-शक्ति-बलवीर्य-तेजोभिः सदा संपन्नः त्रिगुणात्मिकां वैष्णवीं स्वां मायां मूलप्रकृतिं वशीकृत्य अजः अव्ययः भूतानां ईश्वरः नित्यशुध्द-बुध्द-मुक्तस्वभावः अपि सन् स्वमायया देहवान् इव जात इव च लोकानुग्रहं कुर्वन् इव लक्ष्यते।**

अर्थात् भगवान ज्ञान, ऐश्वर्य शक्ती, बल, वीर्य, तेज संपन्न असतो. त्रिगुणात्मिका मायेला ताब्यात ठेवतो. स्वतः अज, अव्यय आणि तमाम भूतमात्रांचा ईश्वर म्हणजे नियंत्रक आणि नित्य शुध्द-बुध्द-मुक्त स्वभावाचा असूनही जणू लोकांसाठी ईश्वर मानवी देह धारण करतो.

जनांवर अनुग्रह करतो. शंकराचार्यांचे दादा गुरु आचार्य गौडपाद लिहितात:

***सतो हि मायया जन्म युज्यते न तु तत्त्वत: ।***
***तत्त्वतो जायते यस्य जातं तस्य हि जायते ॥***

अर्थात् "जे सत् आहे म्हणजे विद्यमान ते मायेमुळे कसे जन्माला येईल? पण खऱ्या अर्थाने हा जन्म कदापि होऊ शकत नाही. ज्यांच्या मतानुसार खरा जन्म खऱ्या प्रकारे जन्म विद्यमान वस्तुचा होतो. त्यांच्या मते जे तत्व आधीपासूनच अस्तित्वात आहे ते पुनश्च अस्तित्वात येते."

गौडपादाचायांर्चे म्हणजे असे आहे की जी परमात्म सत्ता अनादिकाळापासून अखंडपणे चालत आलेली आहे, निरंतर विद्यमान आहे ती पुनश्च जन्म कशी काय घेऊ शकेल? पण ती जन्म घेत आहे असे वाटते. अशा जन्माला मायिक वा भासमानच मानायला हवे पण सदा विद्यमान वस्तु जर खरोखरच जन्माला येत असेल तर जे आधीपासून होते ते पुनश्च जन्माला आले असते पण असे मानणे चुकीचे ठरेल. विद्यमान नसणारी वस्तु असते पण असे मानणे चुकीचे ठरेल. विद्यमान नसणारी वस्तु जन्माला येते असेच सारे मानतात. विद्यमान असलेले तर जन्म घेऊनच चुकले आहे. त्याची पुन्हा निर्मिती कशी? यामुळे ईश्वर आपल्या अलौकिक माया शक्तीने उभ्या जगाचा भास निर्माण करतो. मायेमुळे देह धारण करुन अवतार घेण्याचा भास जागवतो. जगत् किंवा अवतार भासमान असतानाही जोवर आपल्याला सत्यरुपी वाटतात तोवर ईश्वराचे अवतार कार्य सत्यरुप आहे.

शंकराचार्य म्हणतात:

**स्वप्रयोजनाभावे अपि भूतानुजिघृक्षया वैदिकं हि धर्मद्वयं अर्जुनाय शोक-मोहमहोदधौ निमग्नाय उपदिदेश, गुणाधिकै: हि गृहीत: अनुष्ठीयमान: च धर्म: प्रचयं गमिष्यति इति। तं धर्मं भगवता यथोपदिष्टं वेदव्यास: सर्वज्ञ: भगवान् गीताख्यै: सप्तभि: श्लोकशतै: उपनिबंध।**

अर्थात् "आपले कुठल्याही प्रकारचे प्रयोजन नसताना प्राणिमात्रांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेतून प्रवृत्ती व निवृत्तीरुपी वैदिक धर्माचा उपदेश शोक-मोहरुपी महासागरात बुडालेल्या अर्जुनाला भगवंताने केला. गुणसंपन्न जनांनी स्वीकारलेला आणि आचरणात आणलेला धर्म प्रसार पावतो. त्याचा विकास होतो. वृध्दी होते. हा भाव मनी राखून भगवंताने उपदेश केला. त्या धर्माला सर्वज्ञ आणि पूजनीय वेद व्यासानी गीतेच्या रुपात सातशे श्लोकांमधून प्रतिपादित केले."

: 8 :

***परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।***
***धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **साधूनां परित्राणाय:** साधुजनांच्या रक्षणार्थ, उध्दार करण्यासाठी
- **च दुष्कृतां विनाशाय:** आणि पाप्यांचा नाश करण्यासाठी
- **धर्मसंस्थापनार्थाय:** धर्माची संस्थापना, धर्माला समाजात प्रतिष्ठा प्राप्त करवून देण्यासाठी
- **युगे युगे संभवामि:** प्रत्येक युगात मी अवतार ग्रहण करतो

**अर्थ**

सज्जनांच्या उध्दारासाठी, पापकर्मे करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची उत्तम प्रकारे स्थापना करण्यासाठी मी युगायुगात प्रकट होतो.

***राखावया जगीं संतां दुष्टां दूर करावया***
***स्थापावया पुन्हां धर्म जन्मतों मी युगीं युगीं।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. (1) साधु जनांचे उत्तम प्रकारे रक्षण, (2) पापी जनांचा विनाश, (3) धर्माची स्थापना (4) या कार्यांसाठी प्रत्येक युगात वेळोवेळी भगवंत अवतार घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **परित्राणाय साधूनाम्:** भगवंत अवतार कसे घेतात हे सहाव्या श्लोकात आले आहे. अवतार केव्हा घेतात ही चर्चा सातव्या श्लोकात आहे. कुणा कार्यासाठी अवतार घेतात याचे विवेचन या श्लोकात आले आहे. सन्मार्गात स्थित सज्जन वृंदांच्या रक्षणासाठी भगवंत अवतार घेतात, हा झाला एक हेतु. इथे एक प्रश्न उभा

रहातो की साधुजनाना मुळी रक्षणाची गरजच काय? साधु जर आपले रक्षण करु शकत नसतील तर असे दुबळे - असहाय्य साधुत्व काय बरे कामाचे? साधु जन आपल्या आत्म बळाने स्वसंरक्षण तर करुच शकतात. स्वार्पण करुनही साधुमंडळी आपले रक्षण करु शकते. इथे साधुचा अर्थ महात्मा असा न करता सज्जन असा करावा. सज्जनांचे प्रयत्न सज्जनपणाच्या प्रचाराचे असतात. हा सज्जनांचा स्वभावच आहे पण जेव्हा सज्जन शक्तीचे बळ ऊणे पडते, दुर्जनांचे वाढते तेव्हा सज्जनांच्या रक्षणार्थ नव्हे तर सज्जनतेच्या रक्षणासाठी म्हणजे धर्मरक्षणासाठी भगवंत अवतार घेतात असा अर्थ आहे. महापुरुष आपल्या बळाने स्वत:च आपल्या सज्जनतेचे रक्षण करुन घेतात. ते समाजजीवनात सज्जनतेचा प्रचार-प्रसारही करतात. सामान्य पुष्पात तीव्र गंध नसल्यामुळे खूप सुगंध नाही प्रकट होत, पण गुलाब पुष्पाचा सुगंध आपोआप दरवळतो. अशाच प्रकारे सज्जनांचे सज्जनपण काही दुर्जनांची दांडगाई रोखू-रोधू शकत नाही. त्याचा सामना करु शकत नाही. महापुरुषच दुर्जनतेचा सामना करु शकतात. यामुळे जेव्हा सज्जनतेवर दुर्जनतेचे आक्रमण होते तेव्हा दुर्जनता पसरण्याची शक्यता अधिक असते. दुर्जनतेच्या प्रचारामुळे समाज भंगतो. सुव्यवस्थित समाज जीवनासाठी दुर्जनता वाढीस लागता कामा नये. सज्जनतेचे यथोचित प्रमाण राहिले तर समाजात शांती नांदते अन्यथा समाजात गोंधळ, अराजक माजून समाज छिन्न-भिन्न होऊन जाईल. यामुळे "सज्जनतेचे बळ वाढावे" हा ईश्वरी अवतार ग्रहण करण्याचा पहिला हेतु मानला आहे.

2) **विनाशाय च दुष्कृताम्:** "दुर्जनांचा नाश" याचाही अर्थ "दुर्जनतेचा नाश" असाच घ्यायला हवा. विनाश करणारा भगवंत हिंसक नाही. यातून समाजाचे कल्याण नाही होणार. हिंसा वृत्ती समाजात संघर्ष जागवील, समाजाचे अध:पतन करवील. यामुळे समाजापुढे हिंसेचा आदर्श कदापि ठेवता कामा नये. आदर्श तर अहिंसेचाच मांडता येईल. हिंसा वृत्तीचा क्षय करण्यातच समाजाचे कल्याण वा उत्कर्ष आहे. अहिंसा वृत्तीच्या विकासातच विकास आहे. रामाने रावणाचा संहार केला असे मानण्याऐवजी समाज जीवनातील असुरभाव म्हणजे रावणत्व रामचंद्राने आपल्या आत्मिक बळाने परास्त केले असे मानणे उचित होईल. दुर्जनतेचा विशान हाच अवताराचा हेतु होय.

स्वामी विवेकानंद गाझीपुरच्या पवहारी बाबांच्या निकट सत्संगासाठी गेले होते. रात्री एक व्यक्ती चोरीच्या इराद्याने तिथे आली. पवहारी बाबांपाशीं एक गाठोडी पेक्षा अधिक काही सामान-सुमान नव्हते. चोराने गाठोडी उचलली असता पवहारी बाबांना जाग आली. ते चोराच्या मागे-मागे जाऊ लागले. ही बाब चोराच्या ध्यानात आली. गाठोडी तशीच रस्त्यावर टाकून चोर पळू लागला. पवहारी बाबा गाठोडी उचलून चोराचा पाठलाग करु लागले. त्याला हाक मारुन म्हणाले **'बाबा रे, ही तुझी गाठोडी आहे. जा घेऊन.'** बाबांचे म्हणणे चोराला काही पटेना, तो अधिक वेगाने धावतच सुटला. बाबाजी बळकट होते. अधिक वेगाने धावत जाऊन त्यांनी चोराला गाठले. म्हणाले, 'बाबा रे, घे ना. घे हे तुझे गाठोडे घेऊन जा. हे तुझेच आहे, असे समज कारण तुला गरज होती म्हणूनच तर तू ते घ्यायला आलास ना? घे बाबा, आनंदाने हे गाठोडे घेऊन जा.' बाबाजींच्या या अहिंसक वचनांचा चोरावर एवढा विलक्षण प्रभाव पडला की तो त्यांच्या चरणावर उभा कोसळला. बाबाजींचा शिष्य बनला. त्याने चौर्यकर्म सोडून दिले. भगवंत अशाच प्रकारे अवतार घेऊन लोकांच्या विचारात परिवर्तन करायचे कार्य करतो.

3) **धर्मसंस्थापनार्थाय:** ईश्वर धर्म संस्थापनेसाठी म्हणजे समाजात धर्माची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी अवतार ग्रहण करतो. अवतार धारण केला तो धर्माची प्रतिष्ठा वाढवण्याठी. भगवंत या कारणासाठी अवतार ग्रहण करतो. **धारणात् धर्मं इति आहु:।** धारण केला जातो तो धर्म. याचा अर्थ असा की ज्याच्या आधारे आपण जगतो तो धर्म. समाजान सज्जनता लोप पाऊन दुर्जनता वाढते तेव्हा धर्माची प्रतिष्ठा घटते. धर्माला कोणी मान देत नाही. लोकांच्या विचारात क्रांती आली तर सज्जनता वाढीस लागते. सज्जनता वाढीस लागली तर धर्माची प्रतिष्ठा वृध्दिंगत होते.

एका मराठी कविने धर्माची व्याख्या अशाप्रकारे केली आहे. **'सत्यापरता नाही धर्म। सत्य तेचि परब्रह्म।'** जो समाज सत्याला सर्वश्रेष्ठ धर्म मानतो त्या समाजाच्या उन्नतीला वेळ लागत नाही. गांधीजींच्या आयुष्यात सत्यधर्म सर्वोपरी होता. सत्यधर्माचे पालन करुनच त्यांनी

वकीली केली ही एक सत्य कहाणी आहे. सत्याचे पालन करुन वकीली करणे अशक्य अशी जवळपास सर्वच वकीलांची ठाम समजूत आहे पण या अवघड धर्माचे पालन केल्यामुळे गांधीजींची प्रतिष्ठा खूप वृध्दींगत झाली. जेव्हा सत्यपालनाचेच ध्येय नजरेसमोर असेल तेव्हा धर्म संस्थापना झाली असे खुशाल समजावे.

4) **संभवामि युगे युगे:** युगा युगात म्हणजे योग्य वेळी ईश्वर अवतार घेतो. समाजात जेव्हा गरज असेल तेव्हा भगवंताला येऊन मानवी देह धारण करावा लागतो. तुलसीदासजी अवतारांच्या संदर्भात म्हणतात :

*जब जब होइ धरम कै हानी ।*
*बाढहिं असुर अधम अभिमानी ॥*
*करहिं अनीति जाइ नहिं बरनी ।*
*सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी ॥*
*तब तब प्रभु धरि विविध सरीरा ।*
*हरहिं कृपानिधि सज्जन-पीरा ॥*

अर्थात् जेव्हा - जेव्हा धर्म क्षीण होतो आणि दुष्ट व अभिमानी जन म्हणजे उन्मत्त असूर वृत्ती बळावते. समाजात अनीतीचे आचरण सुरु होते. त्या वेळी विद्वान, गाई, देव आणि पृथ्वी नानाविध देह धारण करुन सज्जन वृंदांच्या दु:खाचे निवारण करतात.

*नाना भाँति राम अवतारा । रामायन सतकोटि अपारा ॥*
*कलप भेद हरिचरित सुहाये ।*
*भाँति अनेक मुनीसन्ह गाये ॥*

अर्थात् रामरायाचे नाना प्रकारचे अवतार आहेत. रामायणे शतकोटी आहेत. त्यांना ना अंत ना पार. युगायुगात ऋषी-मुनींनी श्रीहरीची सुंदर चरित्र कथा नाना प्रकारे गाईली आहे.

*राम अनंत अनंत गुनानी ।*
*जनम कर्म अनंत नामानी ॥*
*जल-सीकर महि-रज गनि जाहीं ।*
*रघुपति चरित न बरनि सिराहीं ॥*

अर्थात् राम अनंत. राम अनंत गुणराशी. रामाचे जन्म अनंत. कर्मे अनंत. नावेही अगणित. सागराचे थेंब मोजता येतील. पृथ्वीच्या रज:कणांची मोजदाद करता येईल पण रघुरायाचे समग्र चरित्र वर्णन कुणी करावे ?

: 9 :

*जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वत: ।*
*त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **य: मे एवं दिव्यं:** जो पुरुष माझ्या अशा दिव्य म्हणजे अलौकिक
- **जन्म च कर्म तत्त्वत: वेत्ति:** जन्म आणि कर्म यांना यथार्थपणे जाणतो
- **देहं त्यक्त्वा:** तो देह सुटल्यावर
- **पुनर्जन्म न एति:** त्याला पुनर्जन्म मिळत नाही
- **अर्जुन स: मां एति:** हे अर्जुना, तो मलाच प्राप्त होतो

### अर्थ

हे अर्जुना माझे जन्म आणि कर्म दिव्य अर्थात् निर्मळ आणि अलौकिक आहेत असे जो मनुष्य तत्त्वत: (सर्वशक्तिमान, सच्चिदानंदघन परमात्मा अज, अविनाशी आणि सर्व भूतांची परम गती व परम आश्रय आहे. तो केवळ धर्माची स्थापना आणि जगाचा उध्दार करण्यासाठीच आपल्या योगमायेने सगुण रुप धारण करुन प्रकट होत असतो म्हणून परमेश्वरासारखा सुहृद, प्रेमी आणि पतीतपावन असा दुसरा कोणीही नाही, असे समजून जो पुरुष परमेश्वराचे अनन्य प्रेमाने निरंतर चिंतन करीत आसक्ती सोडून संसारात वागतो तोच त्याला "त्वत:" जाणतो.) जाणतो तो शरीराचा त्याग केल्यानंतर परत जन्माला येत नाही, तर मलाच येऊन मिळतो.

*जन्म-कर्मे अशीं दिव्य जो माझीं नीट ओळखे*
*देह गेल्या पुन्हां जन्म न पावे भेटुनी मज ।*

**विषय:** या श्लोकात तीन मुद्दे येतात. (1) माझ्या दिव्य जन्म आणि कर्मांना वास्तविक रुपात जाणून घेणे. (2) हे जाणणाऱ्याला वर्तमान देह सोडल्यावर पुनर्जन्म नसतो.(3) तो पुरुष मला पावतो.

### स्पष्टीकरण

1) **य: मे एवं दिव्यं जन्म च कर्म तत्त्वत: वेत्ति: या** अध्यायाच्या सहाव्या श्लोकात भगवंत दिव्य जन्म

कशा प्रकारे घेतात हे सांगितले गेले आहे आणि आठव्या श्लोकात भगवंताच्या दिव्य म्हणजे अलौकिक कर्माची चर्चा आली आहे.

या श्लोकाच्या आरंभी भगवंताच्या दिव्य जन्म व दिव्य कर्माचे वर्णन येते. दिव्यत्वाचा आरंभ तर ज्ञानावस्थेतच होतो पण दिव्य जन्माचा आरंभ देह धारण करताच होऊन जातो. देह धारणेसोबत आरंभी अज्ञानावस्थेचा आविष्कार घडतो मग क्रमाक्रमाने ज्ञानावस्था उदयाला येते. एका देहात जेव्हा दोन - दोन रुपांचे दर्शन होते ते दिव्य म्हणजे अलौकिकच म्हणायला हवे ना? भगवंताच्या दोन अवतार कार्यांपैकी दिव्य कर्माचा संबंध तर अज्ञानावस्थेशी नाही जोडता येणार ना? कारण की अज्ञानावस्थेत दिव्य वा अलौकिक रुपाचे दर्शन कसे बरे होईल? अलौकिक कर्म म्हणजे धर्माची स्थापना, साधुतेचे रक्षण आणि दुष्टतेचा विनाश होय. ही तीन प्रकारची कार्ये ज्ञानावस्थेतच संभवतात. अवतारांच्या माध्यमातून विशेष विचार लाभतो. या श्लोकारंभी या अर्थाने दिव्य म्हणजे अलौकिक जन्माची चर्चा आली आहे.

2) **त्यक्त्वा देहं पुनर्जन्म न एति:** देह सुटल्यावर पुनरपि दुसरा देह नाही घ्यायला लागत. भगवंताच्या अलौकिक जन्म आणि दिव्य कर्मरहस्याला बुध्दीने जाणून घेता काही लाभ नाही होणार, कुठलेही फळ नाही मिळणार! तसे तर आधी बुध्दीनेच जाणून घ्यायला हवे कारण ज्ञानाचे साधन तर बुध्दीच आहे पण जाणून घेणे पुरेसे नाही. ते दिव्य ज्ञान आचरणात उतरवणे महत्वाचे आहे.

अलिप्त असूनही ईश्वर अवतार कसा ग्रहण करतो हे जाणून घेणे मोलाचे आहे. इथे एक प्रश्न उभा ठाकतो की आपला देह, इंद्रिये, मन, बुध्दी यासारखी स्थूल इंद्रिये बंधनकारक ठरतात की वासना, इच्छा, महत्वाकांक्षा, काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार यासारखे आंतरिक विकार बंधनकारक आहेत? परमात्म स्वरुपाचे ज्ञान होताक्षणीच तर काही देह लागलीच गळून पडत नाही. प्रारब्ध कर्माचे भोग पूर्णपणे भोगल्यावर ज्ञान प्राप्तीनंतर ज्ञानी पुरुषाना देखिल देह गळून पडेपर्यंत देहातच रहावे लागते. अशा प्रकारे ज्ञानप्राप्ती होईपर्यंत वर्तमान देह धारण करणे जर ज्ञानी पुरुषाला बंधनकारक नसेल तर मग नवा देह धारण करणे कसे बरे बंधनकारक असू शकते? बंधन तर वासना-विकार यांचे असते ना! संपूर्ण निर्विकार बनल्यावर आणि परमात्म स्वरुपाची ओळख झाल्यावर देह बंधनकारक न रहाता अखंड सेवेचे साधन बनू शकतो. दिव्य जन्म आणि दिव्य कर्माचे स्वरुप जाणून घेतल्यावर देह घ्यावा लागत नाही, असे गीता का सांगते ?

भक्तांनी तर भक्तीसाठी वारंवार मनुष्य जन्म मागितला असल्याचे आपल्या निदर्शनाला येते. गुजरातचे संत नरसी मेहता म्हणतात 'ईश्वराची भक्ती आणि जनसेवेचा संकल्प मनी असेल तर वारंवार जन्म घ्यावाच लागेल पण परमात्म स्वरुपाचे ज्ञान झाल्यावर देहधारणेची गरज उरत नाही.' खरे तर वासना, विकार बंधनरुप असतात. जन्म काही बंधनकारक नाही, तरी देखिल नवा जन्म लाभणे हे अज्ञानरुप आणि पुनर्जन्म न लाभणे ज्ञान रुप असल्यामुळे परमात्म स्वरुपाची ओळख झाल्यावर पुनर्जन्म लाभत नाही, हे सत्य आहे. ज्ञानी पुरुषाची हीच स्थिती होऊन जाते. अज्ञानी जनांना नाना जन्म घ्यावे लागतात.

तुकोबा म्हणतात 'तुका म्हणे गर्भवासी, सुखे घालावे आम्हासी' त्यांची वाणी उच्चारते 'न लगे मुक्ती धन संपदा, संतसंग देई सदा' शंकराचार्य म्हणाले **'न मे मोक्षस्याकांक्षा'** मला मोक्षाची आकांक्षा नाही.

3) **मां एति:** ज्ञानीजन भगवंताच्या ठायी विलीन होऊन जातात. भगवंताला प्राप्त होतात. ते भगवंताशी एकाकार होतात. एकरुप होतात. अज्ञानावस्थेत आपण भगवंतापासून वेगळे-विलग असतो म्हणून आपण 'जीव' म्हणवले जातो. ज्ञानावस्थेत आपण देहापासून वेगळे-विलग होऊन परमतत्वाशी एकरुप होऊन जातो. गंगा जोवर सागराला मिळत नाही तोवर वेगळी अशी गंगारुपी असते पण सागरात मिळताच ती सागररुप बनते, सागरच बनते. ज्ञानी पुरुषाची स्थिती अगदी अशीच असते यामुळे शंकराचार्य ब्रह्मसूत्र भाष्यात लिहितात 'ज्ञानी पुरुष परमात्म्याशी एकरुप होऊन जातात त्यांचे ना संचित कर्म उरत ना प्रारब्ध शिल्लक रहात.'

परमतत्वाशी एकरुप झाल्यावर त्यांच्यासाठी एक कार्य उरते ते म्हणजे परमात्म्याच्या आज्ञेने लोकोध्दारार्थ अवतार घेणे. परमात्मा अकर्ता असल्यामुळे तो जगदुध्दाराचे कार्य ज्ञानी पुरुषाकरवी करवून घेतो. परमतत्वाचीही आज्ञा होताच ज्ञानीजनांना अवतार ग्रहण करावा लागतो.

ज्ञानी जन ईशतत्वाशी एकरुप होतात. त्यांचे मुळी स्वतंत्र अस्तित्वच नसते मग ते देह कसा धारण करतील बरे? याचे उत्तर असे की ज्ञानी जनांची सारी कर्मे जळून खाक होतात, तरी देखिल लोकसंग्रह म्हणजे लोकोध्दार-लोकोन्नयनाची जबाबदारी त्यांची असतेच. जगदोध्दाराचे एकमेव कर्म शिल्लक उरते. हे कर्मही काही तो स्वयंप्रेरणेने नाही करत. ती परमेश्वरी आज्ञा असते. जो परमतत्वाशी एकरुप झाला त्यावर भगवंताचा अधिकार असतो ईश्वर त्याला आज्ञा करु शकतात. शंकराचार्य यासाठी सूर्याचा दृष्टांत देतात. सूर्यनारायण भगवंताचा एक अवतार आहे. सर्वांना प्रकाश आणि उष्णता अर्पिण्याचे कार्य त्यावर सोपवले आहे. ते कार्य सूर्य करतो. नंतर तो मुक्त होईल. अशा प्रकारे सारे ज्ञानी पुरुष भगवंताच्या आज्ञेने एक-एक अवतार घेऊन अंती मुक्त होतात. मुक्तीला पावतात.

: 10 :

*वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिता: ।*
*बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वीतरागभयक्रोधा:** आसक्ती, भय आणि क्रोध ज्यांच्या चित्तातून नष्ट झाले आहेत
- **मन्मया:** जे माझ्यातच विलीन झालेहेत
- **मां उपाश्रिता:** ज्यांनी माझाच आश्रय घेतला आहे
- **बहव:** असे अनेक साधक
- **ज्ञानतपसा पूता:** ईश्वराच्या ज्ञानरुपी तपश्चर्येने पवित्र झालेले
- **मद्भावं आगता:** माझ्या स्वरुपाला प्राप्त झाले आहेत

**अर्थ**

पूर्वीसुध्दा ज्यांचे आसक्ती, भय आणि क्रोध पूर्णपणे नाहीसे झाले होते आणि जे माझ्यात अनन्य प्रेमपूर्वक स्थिर राहात होते, असे माझा आश्रय घेतलेले पुष्कळसे भक्त वर सांगितलेल्या ज्ञानरुप तपाने पवित्र होऊन माझ्या स्वरुपाला प्राप्त झालेले आहेत.

***नाहीं तृष्णा भय क्रोध माझ्या सेवेंत तन्मय***
***झाले ज्ञान-तपें चोख अनेक मज पावले ।***

**विषय:** या श्लोकात चार मुद्दे आहेत. (1) ज्यांची आसक्ती, भय, क्रोध आदि विकार लोप पावले आहेत. (2) माझ्या ठायी विलीन झाले आहेत, माझाच आश्रय घेतला आहे. (3) ज्ञानरुपी तपाने जे विशुध्द बनले आहेत (4) अशा माझ्या स्वरुपाला अनेक जण पावलेले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **वीतरागभयक्रोधा:** दुसऱ्या अध्यायातल्या 56 व्या श्लोकात हे विधान एकवचनी रुपात आले असून इथे बहुवचनाचा प्रयोग केला गेला आहे. राग म्हणजे आसक्ती. आपल्या मनात विषयांच्या बाबतीत आसक्ती असते. आपल्या अवतीभवती समाज आणि सृष्टी जगताची विविध रुपे व पदार्थ नांदतात. यात समाज चैतन्यस्वरुपी असून शेष जडरुपी आहेत. जड चेतनाशी आपला नित्य संबंध येतो. यामुळे तीन लाटा उत्पन्न होतात. पहिली लाट राग म्हणजे प्रिय वाटण्याची. चेतन काय अन् जड काय, आसक्तीमुळे उत्पन्न होणारी अनुराग वृत्ती कमी करायची असेल तर पदार्थाच्या ठायी वसणारी अपवित्र रागवृत्ती क्षीण करायला हवी. दूर करायचा प्रयत्न करायला हवा. पवित्र आकर्षण मनात असावे. परमात्म्याविषयक आकर्षण असावे. परमात्म्याशी आसक्ती जागली तर पवित्र वस्तुंशी संबंध नष्ट नाही होणार.

बतीत भीती आणि क्रोधाची लाट जागते. भक्ती आणि क्रोध एकाच प्रकारच्या लाटा आहेत. राग अनुकूल भावामुळे उपजतो. कुणाच्या याबतीत पूज्य भाव असेल पण ते जर आपल्याला अनुकूल नसतील तर त्यांच्या बाबतीत क्रोध उत्पन्न होतो. ज्याला आपण कधी भीत नव्हतो, निर्भीडपणे त्यांच्यापाशी जाऊन पोहोचत होतो, त्यांच्याविषयी भय, संकोच उत्पन्न होतो. जड पदार्थांच्या बाबतीतही असे घडते.

थोडक्यात असे की अनुकूलतेमुळे प्रेम आणि प्रतिकुलतेमुळे भय व क्रोध अशा तीन लाटा मनी उसळतात. या लाटा क्षोभ उपजवतात. चांचल्य-अस्थिरतेचे वातावरण जागवतात. या लाटा जोवर मनात जागतात तोवर मनाच्या पाठीमागे वसणाऱ्या आत्मस्वरुपाचा-परमात्म-स्वरुपाचा अनुभव नाही घेता येत. जोवर परमात्म स्वरुपाच्या ठायी मन डुंबत नाही तोवर अखंड शांततेचा अनुभव नाही होत.

2) **मन्मया मामुपाश्रिता:** माझ्या ठायी विलीन झालेले आणि माझ्या आश्रयार्थ रहाणारे. एकीकडे प्रेम, क्रोध आणि भयाच्या लाटांपासून सोडवणूक करण्यासाठी

धडपडणे आणि दुसरीकडे परमात्मस्वरुपाच्या ठायी बुडून जाण्याचा प्रयत्न करणे, अशा दुहेरी प्रयत्नांमुळे प्रेम, भय, क्रोध क्षीण होऊन आपल्याला परमात्म स्वरुपात बुडून रहाता येते. हे आपले अंतिम ध्येय असायला हवे. अहंभाव इतका लोप पावावा की प्रेम, भय, क्रोध या लाटा मुळी मनात उठूच नयेत आणि संपूर्ण आयुष्य अखेरच्या श्वासापर्यत परमात्म तत्वाच्या आधारे आणि त्या तत्वाच्या आश्रयाने जगत रहाण्याचा अनुभव घेता यावा.

3) **बहव: ज्ञानतपसा पूता:** अनेक साधक-मुमुक्षु तपसाधनेने पावन होऊन गेलेत. इथे भगवंताने इतिहासाचा हवाला दिला आहे. ज्ञान, तप या शब्दाचा अर्थ ज्ञान व तप असा नसून ज्ञानमय तप असा आहे. ज्ञानरुपी तप असा आहे. ज्ञानेश्वरानी ज्ञान व तप असा अर्थ केला. टिळक, गांधीजी आणि विनोबानी मात्र ज्ञानरुपी तप असा अर्थ सांगितला आहे, मुंडकोपनिषदात आले आहे **य:** सर्वज्ञ: सर्वविद् यस्य ज्ञानमयं तप: (1/1/9) ज्ञानमय तप असा शब्द आला आहे. परमात्मा सामान्यत: सारे काही जाणतो यामुळे त्याला सर्वज्ञ म्हणायचे. सारे काही विशेष रुपाने जाणत असल्यामुळे त्याला सर्ववेत्ता म्हणायचे. त्या परम तत्वाचे ज्ञानमय तप आहे. याकडे निर्देश करुन विनोबानी "ज्ञानमय तप" हा अर्थ मानला आहे म्हणजे ज्ञानरुप तपाने जे अत्यंत पवित्र झाले म्हणजे परमात्मतत्वाचा अनुभव घेतल्यामुळे ज्यांचे मनोविकार नष्ट होऊन जे अतिपवित्र झालेत ते साधक होत.

4) परमात्मस्वरुपी लीन होतात याचा अर्थ मोक्षाला पावतात. चित्तातले नाना प्रकारचे विकारच परमात्मस्वरुपाला जाणून घेत असताना अडथळे ठरतात. हे अडथळे ज्यानी ज्ञानमय तपाने ज्ञानरुप तपाने म्हणजे विवेकरुप अभ्यासाने दूर हटवले असे अनेक मुमुक्षु प्राचीन काळी परमात्मस्वरुप मोक्षाला पावले आहेत. ज्ञानरुपी तप या संज्ञेचे दोन अर्थ संभवतात. आरंभी म्हणजे साधक काळात विवेकरुपी अभ्यासाने अखंडपणे कर्मरत असणे हा झाला एक अर्थ आणि दुसरा अर्थ आहे विवेकाचा अभ्यास सहजपणे झाल्यामुळे परमात्मस्वरुपाची ओळख होणे म्हणजे परिपूर्ण ज्ञान. यामुळे मोक्ष लाभ होतो.

या श्लोकावर भाष्य करताना विनोबा म्हणतात 'ज्ञान म्हणजे ईश्वराच्या दिव्य जन्माची ओळख. ज्ञान तप म्हणजे ज्ञानच. तप आणि ज्ञानच शुध्दीची साधना होय. श्लोकाच्या चार चरणात अनुक्रमे साधना, ईश्वरभक्ती, ज्ञान आणि ईश्वर प्राप्ती वर्णिली आहे.'

प्रेम, क्रोध, भयापासून मुक्त होणे ही साधना होय. विकार हटविण्यासाठी सत्संग, सद्ग्रंथ पठण, सत्कर्म या सर्वांचा आश्रय घ्यावा लागतो. यांच्या मदतीने विकाराना हटविण्यात जे समर्थ होतात त्याना परमेश्वराची भक्ती प्राप्त होते. विकार हटले की भक्ती प्राप्त होते. हीच गोष्ट **मन्मया मामुपाश्रिता:** यात आहे. मग ज्ञानतपसा पूता: सांगितले आहे. भक्तीनंतर ज्ञानरुप तप साधते. ज्ञानाने **मद्भावं आगता:** मला प्राप्त करतात. म्हणजे ज्ञानरुपी तपाने अखेरीस मोक्ष लाभ होतो. विनोबांनी हा क्रम सांगितला आहे.

ज्ञानेश्वर महाराज भाष्य करतात- च् स्वत:साठी वा दुसऱ्या कुणासाठीही हे कदापि शोक करत नाहीत. क्रोधाच्या मार्गाने तर कधीच वाटचाल करत नाहीत. ते सदा ईश्वरी भावनेने संपृक्त आणि संपन्न असतात. त्यांचे जीवन ईश्वरी सेवेसाठीच असते. ते आत्मज्ञानाने संतुष्ट असतात. विषयांच्या बद्दल वैराग्ययुक्त असतात. तप:पुंज असतात, ज्ञानाचे वसतीस्थान असतात. तीर्थाला पावित्र्य अर्पिणारे हे जन साक्षात् तीर्थरुप असतात. ते सहजच ईश्वरी रुपाच्या ठायी लीन होतात. त्यांच्यात वा ईश्वरात कुठलाही भेदाभेद उरत नाही.

: 11 :

*ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।*
*मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये मां यथा प्रपद्यन्ते:** जे लोक मला ज्या प्रयोजनाने भजतात
- **तान् तथा एव अहं भजामि:** त्यांना मी त्याच प्रकारची फळे देतो
- **पार्थ मनुष्या:** हे अर्जुना, सारे लोक
- **सर्वश: मम वर्त्म:** सर्व प्रकारे माझ्या मार्गाचेच
- **अनुवर्तन्ते:** अनुसरण करतात

**अर्थ**

हे अर्जुना जे भक्त मला जसे भजतात, मीही त्याना तसेच भजतो कारण सर्वच मानव सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात.

*भजती मज जे जैसे भजें तैसा चि त्यांस मी*
*माझ्या मार्गास हे येती लोक कोणीकडूनि हि।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) जे मला ज्या प्रकारे भजतात 2) त्याना मी त्याच प्रकारची फळे अर्पितो. 3) काही का असेना अखेरीस सारे माझ्याच मार्गाचे अनुकरण करत माझ्या निकटच पोह्रोचतात.

**स्पष्टीकरण**

1) **ये यथा माम् प्रपद्यन्ते:** ईश्वरी दिव्य जन्म आणि कर्माचे आकलन सर्वाना नाही करुन घेता येत. ईश्वर सर्वत्र व्याप्त आहे. अणु अणुत ते चैतन्य वसते पण लोकांच्या ध्यानात येत नाही. **सबमें रम रहिया प्रभु एकाकी** सर्वत्र रमणाऱ्या ईश्वराचे ग्रहण सर्वाना नाही करुन घेता येत. व्यापक परमात्म्यावर सर्वाची श्रध्दा नाही बसत. शास्त्रात विविध देवी-देवतांचे वर्णन येते. विषयांच्या मागे वेडावून धावणाऱ्याना ना सुख लाभत ना शांती मिळत. असा अनुभव येताच माणूस विषयांपासून दूर जातो खऱ्या सुखा समाधानाचा शोध घेतो. ईश्वरतत्व निर्गुण-निराकार असल्यामुळे त्याचे ग्रहण तर नाही करता येत. भक्तीची रीत ठाऊक नसते आणि ठाऊक असली तरी भक्ती साधत नाही. सर्वसाधारण जनांची सामान्य श्रध्दा ईश्वरावर असते पण सुख-शांती-समाधानासाठी विशेष प्रकारची श्रध्दा हवी. निर्गुण-निराकाराच्या उपासनेसाठी वैराग्यभाव हवा. शंकराचार्य लिहितात. 'वैराग्यवंतालाच भक्ती प्राप्त होते. प्रपंचाच्या ठायी आसक्ती ममत्व असते. आसक्ती दु:खदायक वाटू लागली की मग मनोमंथन जागते. आसक्तीपासून सोडवणूक करुन घेण्यासाठी उपाय शोधणे सुरु होते.'

भगवंताने सांगितले आहे: **श्रध्दामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः** (गीता अध्याय 17 श्लोक 3) घ्माणूस श्रध्दामय आहे, जशी श्रध्दा तसाच तो बनून जातो. माणसाच्या ठायी श्रध्दा आहे. बालपणी माता-पित्याच्या ठायी श्रध्दा असते. विवाहानंतर पत्नी-पुत्र-परिवार आदि ठिकाणी श्रध्दा सामावून जाते. आसक्तीमुळे जेव्हा दु:खानुभव व्हायला लागतो ना तेव्हा मग ही श्रध्दा कुणा संत-सत्पुरुषावर बसते. सर्वानाच काही संतपुरुष लाभत नाहीत. व्यापक परमात्म्याच्या भक्तीचा मार्ग ठाऊक नसतो, श्रध्दा बाळगून भक्ती करण्याची पध्दत ठाऊक नसते, अशावेळी काय करावे? शास्त्राने एक मार्ग सांगितला आहे. शास्त्राने नाना देवी, देवतांची निर्मिती केली आहे. शंकर, विष्णु, काली, दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, गणपती वगैरे. त्यांचे स्वभाव आणि चरित्राचे वर्णन शास्त्रातून येते. सूर्य, अग्नी, इंद्र, वरुण वगैरेंच्या रुपात मानवी आकार वा विविध गुणांची कल्पना करुन देवतांच्या मूर्तीची कल्पना केली गेली आहे. मंदिरे उभारली गेलीत. आपापल्या उद्दिष्टांच्या वा कामनांच्या पूर्ततेसाठी यांची उपासना केली जाते. काही साधक निर्गुण-निराकार परमतत्वाचे ध्यान-करतात. परमात्मा तर सर्वत्र व्याप्त आहे. त्याची उपासना कुठल्याही रुपाने करता येते. आसक्ती आटल्याशिवाय ईश्वर फळ देत नाही.

2) **तान् तथैव भजामि अहम्:** जशी भावना तसे फळ. पुत्र मिळेल. धन लाभेल. सिध्दी मिळतील. चमत्कार घडतील. मोक्षलाभही करुन घेता येईल. गीतेच्या सातव्या अध्यायातील 20 ते 23 आणि नवव्या अध्यायातील 23 ते 25 श्लोकांमधून या विषयाचे वर्णन आले आहे.

3) **मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्या:** पार्थ सर्वश: विविध कामनांनी ईश्वरानुसंधान करणारे भक्तजन कधीतरी वैराग्याला पावतील. ईश्वराचे दर्शन करु शकतील. ईश्वरी सत्यस्वरुपाला प्राप्त होतील. याकामी कदाचित चार-दोन जन्म लागतील पण हे अवश्य साधेल.

सारे सगुणोपासक कामना क्षीण झाल्यावर ईश्वराला पावतील हा झाला एक सामान्य अर्थ. या वचनाचा व्यापक अर्थ असा की मानवी देह उत्तम योनी आहे. इथे वाईट कर्मे आचरलीत तर पशु-पक्षी वगैरे योनी लाभेल पण अखेरीस मानवी योनी लाभेल. मानवी देहात आरंभी प्रपंचाच्या जाळ्यात अडकले तरी हळूहळू यातून मोकळे होऊन ईश्वराकडे आकृष्ट होता येईलच. मानवी जीवनाचे हेच वैशिष्ट्य आणि हेच ध्येय होय. पशु देहात योग्य-अयोग्य काही कळत नाही, कार्य-अकार्य उमजत नाही. नीती-अनीती जाणता येत नाही, धर्म-अधर्म समजून घेता येत नाही. मनाच्या तळाशी अशांती वसते. बंधनातून त्वरित मोकळे नाही होता येत. मनाच्या तळाशी अशांती वसते. व्यक्ती महात्म्याच्या संगतीत आली तर परिवर्तन संभवते. या श्लोकावर भाष्य करताना शंकराचायांर्नी मर्मिक निवेदन केले आहे. ते म्हणतात:

***न हि एकस्य मुमुक्षुत्वं फलार्थित्वं च युगपत् संभवति।***
***अत: ये फलार्थिन: तान् फलप्रदानेन।***
***ये यथोक्तकारिण: तु अफलार्थिन: मुमुक्षुव:***
***च तान् ज्ञानप्रदानेन।***

अर्थात् 'एकाच व्यक्तीला एकाच वेळी मोक्ष आणि कर्मफळ प्राप्त करुन घ्यायची इच्छा उत्पन्न होत नाही. यामुळे फळाची आकांक्षा करणाऱ्यांना फळे मिळतात पण शास्त्र कथनानुसार कर्मे आचरणाऱ्यांना आणि फलाकांक्षारहित मोक्षाची इच्छा करणाऱ्यांना ज्ञान लाभते.'

शंकराचार्यांनी दोन स्पष्ट वर्ग केले आहेत. (1) एक फळाची इच्छा राखणारे आणि (2) दोन फलाकांक्षाविरहित मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा बाळगणारे.

: 12 :

***कांक्षन्त: कर्मणां सिध्दिं यजन्त इह देवता:।***
***क्षिप्रं हि मानुषे लोके सिध्दिर्भवति कर्मजा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कर्मणां सिध्दिं कांक्षन्त:** कर्माची सिध्दी म्हणजे फळाची इच्छा राखणारे पुरुष
- **इह देवता: यजन्ते:** या मृत्युलोकी सूर्य, अग्नी वगैरे देवतांची उपासना करतात
- **हि मानुषे लोके:** कारण की मनुष्य लोकी
- **कर्मजा सिध्दि:** कर्मातून निष्पन्न सिध्दी
- **क्षिप्रं भवति:** खूपच शीघ्र प्राप्त होते

**अर्थ**

या मनुष्य लोकात कर्मांच्या फळांची इच्छा करणारे लोक देवतांची पूजा करतात कारण त्याना कर्मांपासून उत्पन्न होणारी सिध्दी लौकरच मिळते.

***जे कर्म-सिध्दि वांछूनि यजिती येथ दैवतें***
***मनुष्य-लोकीं कर्माचें पावती फळ शीघ्र ते।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. (1) काही लोक कर्मफळाची इच्छा मनी धरतात. (2) ते या मनुष्यलोकात देवी-देवतांच्या उपासनेत मश्गुल असतात. (3) याचे कारण असे की मनुष्यलोकी कर्माची सिध्दी म्हणजे फळ तत्काळ लाभते.

**स्पष्टीकरण**

1) पहिली गोष्ट आहे कांक्षन्त: **कर्मणां सिध्दिम्: प्रत्येक** माणूस फळाच्या प्राप्तीसाठीच तर कर्मे आचरतो.

2) फळप्राप्तीची शक्यता नसेल तर माणूस कर्म करण्यापासूनही निवृत्त होतो. खूप परिश्रम करुनही धनप्राप्ती नाही झाली तर मग मनुष्य 'देवदेव' करायला लागतो. **यजन्त इह देवता: परमेश्वर** व्यापक आहे आणि निर्गुण-निराकार आहे त्याच्या उपासनेचे नेमके आकलन न झाल्यामुळे माणूस सगुण-साकार देवाची उपासना करायला लागतो. वेगवेगळ्या मूर्तींच्या उपासनेचे वेगवेगळे नियम आहेत. विष्णुच्या मूर्तीची उपासना करायची असेल तर अमुक एक मंत्र आणि त्याचे अमुक एक फळ आहे. कुठल्या मंत्राने पूजा करावी, प्रदक्षिणा किती घालाव्यात याचे एक शास्त्र आहे. शंकर पूजनाला बिल्वपत्र हवे. शंकराच्या पूजा-उपासनेचेही काही मंत्र-तंत्र-शास्त्र आहे.

मुंबईत एक जैन मिल मालक गृहस्थ आहेत. मी त्यांच्याकडे मुक्कामी होतो. त्यांच्या घरातच वरच्या मजल्यावर त्यानी मंदिर बांधले होते. चैत्यालय होते. प्रात:काळीच सारे प्रात:र्विधी आटोपून ते पूजेला निघून जात असत. तिथे बसून दोन तास ते ध्यान-जप वगैरे करत. त्यांची पत्नीही सोबत असायची. मला आनंद तर वाटला पण आश्चर्यही वाटले. घ् आपण धनिक असूनही एवढा काळ पूजा-ध्यान-आराधनेत घालवता याचा मला आनंद झाला घ् माझ्या या प्रतिक्रियेबाबत ते म्हणाले 'ही पूजा काही निष्काम भावनेने आम्ही उभयता करत नाहीहोत. आमची रेशम मिल आहे. ती तोट्याविना सुयोग्य पध्दतीने चालत रहावी, कायम नफा मिळावा या कामनेने आम्ही पूजापाठ करतो. यात कदापि खंड पडू देत नाहीत.' पूजापाठ आटोपल्यावर लगेचच त्यानी हुक्का घेतला आणि हुक्का ओढत-ओढत माझ्याशी गप्पा मारु लागले.

जैन धर्म ईश्वराला जगत् कर्ता मानत नाही. ऋषभदेव, महावीर स्वामी यासारख्या तीर्थकरानाच देव मानतो आणि त्यांचीच उपासना करायचा उपदेश करतो. त्यांच्या कमालीच्या स्पष्ट कथनामुळे मला आनंद वाटला. त्यांच्या नित्याच्या उपासनेत स्थूल कामना आहे यामुळे त्यांना लाभणारे फळही अशाश्वत मानायला हवे. तरी प्रपंचातून मन काढून दोन तास पूजा-उपासना करणे काही सामान्य गोष्ट नाही. यामुळे भगवंतही निष्ठेने केलेल्या उपासनेचे फळ कामनेनुसार अर्पण करतात.

आणखी एक उदाहरण देतो. 1940 साली मी पाचगणीला होतो. तिथे एक शिवभक्त रहात. ते मला भेटत असत. तिथे कुणा राजाच्या लहान मुलाचे अध्यापन चाले. ते त्यांचे संरक्षक या नात्याने तिथेच रहात. रोज महादेवाची पूजा-उपासना नेमाने करत. वर्षानुवर्षे हा क्रम अबाधित होता. पुजेच्या दरम्यान नैवेद्यासाठी दहा तोळे दूध ठेवत. एके दिवशी प्रदक्षिणेनंतर दूध संपून गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी शोध घेतला. मांजर वा कुत्रा कुणीही तर आले नव्हते. देऊळ खुले होते. यामुळे प्रदाक्षिणे दरम्यान तिथले सारे काही दिसू शकायचे.

मी जवळच रहायचो. ते धावतच मला भेटले आणि घडला प्रकार सांगितला. 'चला, स्वत: येऊन मी मंदिर बघतो. महादेव दूध प्राशन करुन गेले हे माझ्या ध्यानात आले. ते त्याना समजावले.' प्रदीर्घ काळापासून आपल्या भक्तीमुळे प्रसन्न होऊन साक्षात् शिवशंकराने आपला प्रसाद ग्रहण केला. रोज असाच प्रसाद ग्रहण करतील असे काही सांगता यायचे नाही पण आज मात्र आपल्यावर प्रसन्न होऊन शंकराने आपला प्रसाद ग्रहण केला एवढे मात्र खरे?

ही एक प्रकारची सिध्दी वा चमत्कारच मानला जायला हवा पण अशा प्रकारची सिध्दी उपासनेने प्राप्त झाल्यावर हे फळ काही मोक्षासारखे शाश्वत वा चिरकालिक स्वरुपाचे नाही म्हणता येणार. शंकरजींचे एवढे निस्सीम भक्त असूनही ते ब्रह्मचर्याचे पालन करु शकत नव्हते. मला नेहमी विचारत की काहीही कारण नसताना ते खोटे बोलतात यासाठी काय करावे ? अशाप्रकारे अनेक लोक फळाच्या आशेने देवी-देवतांची उपासना करतात. याचे कारण पुढे बघू या.

3) **क्षिप्रं हि मानुषे लोके सिध्दिर्भवति कर्मजा:** मनुष्यलोकी कर्माचे त्वरित प्राप्त होणारे फळ हे देव देवतांच्या उपासनेचे कारण आहे. उपरोक्त दोन उदाहरणावरुनही कर्माचे फळ त्वरित प्राप्त होते हेच निदर्शनाला येते. पशु-पक्षी वगैरे योनींमधला जीवन व्यवहार नीती-अनीतीच्या आधारे चालत नसल्यामुळे त्याना कर्माचा अधिकारही प्राप्त होत नाही. मानवाच्या ठायी धर्म-अधर्म, नीती -अनीती यातील अंतर समजून घेण्याची शक्ती असल्यामुळे त्याला कर्माचे - शास्त्रविहित कर्माचे अधिकार प्राप्त होतात. नियमांचे पालन करुन माणूस कर्माची साधना करु शकतो. त्याचे फळ याच जन्मी प्राप्त करुन घेऊ शकतो. अर्थात् कामनांमुळे लाभणारे फळ या जन्मी मिळणारे जरी असले तरी त्याचे स्वरुप क्षणजीवी असते.

स्वर्गप्राप्तीसाठी जी कर्मे आचरली जातात त्यांचे फळ अर्थात् या जन्मात न मिळता मृत्योपरांत देह त्यागून दिल्यावरच मिळते. मोक्षरुपी फळाच्या प्राप्तीसाठी तर प्रखर साधना करावी लागते. ते फळ याच जन्मी न लाभता अनेक जन्मांच्या साधने नंतरच प्राप्त होते. खरे तर मोक्ष म्हणजे ईश्वर वा आत्मतत्वाची ओळख होय. ती एका जन्मातही होऊ शकते पण देह बुध्दी इतकी जड झाली आहे की ही ओळख करुन घ्यायला कित्येक जन्म घालावे लागतात, एवढाच याचा अर्थ आहे. ज्ञानेश्वरांचा दृष्टांत आहे की शेतात पेराल तेच उगवते, दर्पणासमोर येणारेच दर्पणात दिसते, पर्वतासमोर केलेला ध्वनीच तर प्रतिध्वनी बनून ऐकायला मिळतो तसेच मी तर केवळ साक्षीरुप असतो.

सारांश असा की देवी- देवतांची उपासना करणाऱ्याना 'जशी भावना तसे फळ' मिळते. देवी-देवतांच्या उपासनेचे प्रकरण या दोन श्लोकात संपते.

: 13 :

*चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागश: ।*
*तस्य कर्तारमपि मां विध्द्यकर्तारमव्ययम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मया:** मी
- **गुणकर्मविभागश:** तीन गुण आणि त्यानुसार कर्मे, या दोन विभागानुसार
- **चातुर्वण्यं सृष्टं:** चार वर्ण उत्पन्न केलेत
- **तस्य कर्तारं अपि:** त्यांचा मी कर्ता असल्यावरही
- **मां अकर्तारं अव्ययं विध्दि:** मला त्यांचा अकर्ता, अविनाशी मान

**अर्थ**

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांचा समूह गुण आणि कर्म यांच्या विभागाने मी निर्माण केला

आहे. अशा रीतीने त्या सृष्टीरचना वगैरे कर्मांचा मी कर्ता असूनही मला अविनाशी परमात्म्याला तू वास्तविक अकर्ताच समज.

*निर्मिले वर्ण मीं चारी गुण-कर्मे विभागुनी*
*करुनि सर्व हें जाण अकर्ता निर्विकार मी।*

**विषय:** या श्लोकात वर्णन येते की 1) त्रिगुणानुसार कर्मे आचरली जातात आणि या दोन विभागानुसार मी चार वर्ण निर्माण केलेत. 2) या वर्णाचा मी कर्ता आहे 3) तरी अलिप्त असल्यामुळे मला त्यांचा अविनाशी, अकर्ता मान.

**स्पष्टीकरण**

1) **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागश:** समाजव्यवस्थेच्या मूळ आधारानुसार चार वर्ण आहेत. हे मी स्थापन केले आहेत. सत्व-रज-तम या तीन गुणांच्या आणि त्यानुसार विविध कर्माच्या अनुसार हे आहे. चार वर्ण व चार आश्रम ही समाजव्यवस्थेची मूलभूत तत्वे आहेत.

इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या अमदानीत आपली वर्णव्यवस्था आणि आश्रमव्यवस्था कमालीचीविस्कळित झाली. इंग्रज येण्यापूर्वी खेडी भारताच्या केंद्रस्थानी होती. त्याकाळी शहरी जीवन खेड्यांवर अवलंबित होते. शहरे समृध्द होत गेली तशी खेडी बकाल झालीत. खेड्यांबद्दल उपेक्षाभाव जागला. इंग्रजानी साऱ्या सुखसोयी शहरांमध्ये केंद्रित केल्या. शहरात सुखसुविधा म्हणजे श्रीमंतांसाठी सुखसोई हेच लक्ष्य होते. श्रीमंतांच्या सहानुभूतीवरच आंग्ल सत्ता इथे राहू-नांदू शकत होती.

त्यांच्या शासन काळात हरिजन आणि श्रमिकांच्या सुखसोईचा मुळीच विचार करण्यात आला नाही. त्यांचा समावेश उपेक्षित वर्गात करण्यात आला. श्रमिकांच्या श्रमाशिवाय वस्त्र वगैरे वस्तु तयार होऊ शकत नव्हत्या पण त्याना श्रम अधिक व मेहनताना कमी अशी परिस्थिती होती. ना निवासाची धड सोय ना पाण्याची व्यवस्था. हीच परिस्थिती शहरातल्या सफाई कामगारांची होती.

स्वराज्य प्राप्तीनंतर समाजातल्या या दोन उपेक्षित वर्गांच्या सुविधेकडे लक्ष दिले गेले. या उपेक्षित वर्गाकडे सर्वप्रथम महात्मा गांधीजींनी आपले लक्ष आकृष्ट केले. अहमदाबादच्या गिरणी कामगाराना न्याय मिळवून देण्यासाठी त्यानी हरताळ केला. मजुराना साथ दिली. खेड्यात शहरांच्या तुलनेने उलटे चित्र बघायला मिळते. तिथे अभावग्रस्तता, घाणीचे साम्राज्य, दैन्य, कुसंस्कार यांचा बोलबाला आहे. हो, खेड्यात एक नैसर्गिक सुविधा मात्र आहे आणि ती म्हणजे भरपूर शुध्द हवा.

हिंदुस्तान शहरात नव्हे, खेड्यांमध्ये वसला आहे. खेडी उन्नतीच्या शिखरावर असावीत अशी समाजरचना व्हायला हवी. या दृष्टीने बघू जाता प्राचीन काळी खेड्यांचा विचार करुन आणि जनसामान्यांना प्राधान्य देत चार आश्रम व चार वर्णांची व्यवस्था केली गेली होती.

यामुळे या श्लोकाच्या आरंभी भगवंताने आम जनतेच्या कल्याणासाठी चार वर्णांची गुण व कर्मानुसार रचना केल्याचे सांगितले आहे. प्राचीन काळात होऊन गेलेल्या भगवंताच्या कुठल्याशा अवताराने हे निर्मिले. समाजाने सतत ज्ञानभूमिकेवर आरुढ रहावे आणि यासाठी सत्वगुणप्रधान शम, दम, तप, शौच म्हणजे पावित्र्य, शांती, सरळपणा या आंतरिक गुण वा विकर्म आणि ज्ञानरुपी दान म्हणजे समाजाला ज्ञान देणे यासारख्या बाह्य कर्मे करणाऱ्यांचा एक वर्ग निर्माण करुन त्याना 'ब्राह्मण' हे नाव दिले गेले. अशाच प्रकारे रजोगुणप्रधान शौर्य, तेज, धैर्य, दक्षता वगैरे गुण आणि युध्दातून कदापि पलायन न करता शत्रुचे आक्रमण आणि चोर-डाकूंपासून समाजाचे रक्षणरुपी कर्म ज्यांच्या ठायी विकसित झाले आहे अशा दुसऱ्या वर्गाची निर्मिती करुन त्याना 'क्षत्रिय' संबोधले गेले. रजोगुण प्रधान वृत्तींनी युक्त एक तिसरा वर्ग निर्माण केला गेला. यांचे बाह्य कर्म कृषी व वाणिज्य होते. हे ठरले **'वैश्य'.** याचप्रकारे रजोगुण प्रधान वृत्तीने युक्त चौथा वर्ग 'शूद्र' ठरला. याची बाह्य कर्मे सेवामय ठरली. सहजपणे विकसित होऊ शकणाऱ्या ब्राह्मण वा क्षत्रियांच्या आंतरिक गुणांची अपेक्षा शूद्र वर्गाकडूनही केली गेली. अशा प्रकारे चार वर्णांची रचना भगवान अवतार म्हणजे ऋषीमुनींनी केली. ब्राह्मणानी समाजाला ज्ञान द्यावे, क्षत्रियानी समाजाचे रक्षण करावे, वैश्यानी कृषी-गोरक्षा आणि वाणिज्य-व्यापार करुन समाजाच्या बाह्य आवश्यकतांची पूर्तता करावी. शूद्रानी सेवाकार्य करावे. अशा प्रकारे चार वर्णावर समाजभवन उभे ठाकले होते.

या चार वर्णाच्या ठायी उच्च-नीच भेद तर नव्हताच. यामुळे समाजात संतुलन म्हणजे साम्यावस्था नांदती

होती. सर्वाना सुखाचाच अनुभव होत राहिला. त्याकाळी आजच्या तुलनेने कित्येक पटीने परस्पर ऐक्यभावना होती. कुठलीही योजना आरंभकाळी ठोस स्वरुपाची असते. काही काळानंतर समाजात शैथिल्य यायला लागते आणि योजना ठिसूळ होऊन अंतकाळी विरुन जाते. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव समाजावर वाढला आणि आपली पारंपारिक वर्णप्रधान समाजव्यवस्था मोडून पडली.

2) **तस्य कर्तारं अपि माम्:** चार वर्णांचा कर्ता म्हणजे स्थापना करणारा मी आहे. कुणा ऋषीला म्हणजे कुणा अवताराला चार वर्णांची ही कल्पना सुचली आणि त्याच्या प्रभावामुळे समाजजीवनात रुढ झाली. आद्य शंकराचार्यानी संन्यास संस्थेचा पुनरुध्दार केला. चार आश्रमांची कल्पना जुनीच आहे पण शंकराचार्यांनी संन्यासाश्रमाचा विकास केला. सच्चे संन्यासी तयार केलेत. त्या काळात त्या खऱ्या संन्याश्यांनी 'एक परमात्मा सत्य असून शेष सारी दृश्य सृष्टी मिथ्या आहे.' हा शंकराचार्यांचा विचार जनतेमध्ये प्रविष्ट केला. नंतरच्या काळात संन्याश्यांमध्ये शिथिलता आली आणि आज तर हा वर्ग इतका भ्रष्ट झाला आहे की आजचे संन्यासी म्हणवणारे 'वाट चुकलेले फकीर' समाज जीवनाला भाररुप ठरताहेत. खूपच कमी संन्यासी आज खरे संन्यासी म्हणण्यायोग्य आहेत.

शंकराचार्यानी ज्याप्रमाणे संन्यास व्यवस्थेला बळकटी दिली तशाच प्रकारे गांधीजींनी अनेक नवे विचार दिलेत. 'अहिंसेने अन्यायाचा प्रतिकार करता येईल.' हा मौलिक विचार हिंदुस्तानात प्रचारित-प्रसारित केला. वानप्रस्थ विचाराला पुष्टी दिली. श्रमप्रतिष्ठा वाढवली. उच्च-नीच वा भेदाभेद विचाराला क्षीण बनवले. त्यांच्यानंतर विनोबानी समाजात भूदानाचा मूलभूत विचार प्रविष्ट केला. असे नवीन विचार भगवंताच्या अवतारांच्या माध्यमातून प्रसारित होत असतात.

3) **विध्दि अकर्तारं अव्ययम्:** 'मी चार वर्णांचा कर्ता असूनही त्यांचा अकर्ता आहे.' भगवान म्हणजे त्याचे अवतार जे काही नवनवे विचार समाजात प्रविष्ट करतात त्यापासून अलिप्त रहातात. त्यांची अलिप्तता, अकर्तेपणा, अनासक्ती सारे काही जसेच्या तसेच उरते. त्यात काहीही फरक दिसून येत नाही. सर्व काही करत असूनही काहीच न करणे अवताराचे कार्य आहे. सर्वसाधारण माणूस देखिल कधी-कधी एखाद्या नव्या कल्पनेचा आविष्कार घडवतो. या काळातल्या वैज्ञानिक नवनव्या प्रयोगांच्या खुणा या नवनव्या कल्पनांच्या मांडणाऱ्याना आणि नवनवे आविष्कार करणाऱ्यांना आपापल्या शोधांचा म्हणजे निर्मितीचा म्हणजे आविष्काराचा म्हणजे कर्तेपणाचा बोध असतो. कर्तेपणाचे भान हे अज्ञानाचे कार्य होय कारण कल्पनेचा आविष्कार वा नवनव्या शोधांचा संबंध बुध्दीशी आहे. बुध्दी या नवनव्या शोधांची जननी आहे. त्यांचा आत्म्याशी सुतराम संबंध नाही. आपण ज्याला "मी" म्हणतो तो आत्मा ज्ञाता, साक्षी आणि अकर्ता आहे पण सर्वसाधारण जनांना आत्म्याच्या या अकर्तेपणाचे ज्ञान नसल्यामुळे ते आपल्या बुध्दीला तमाम कर्मांचा कर्ता मानून बघतात पण भगवंताचे अवताररुपी ज्ञानी पुरुष जे नवनवे आविष्कार करतात ते स्वत:ला कर्ता न मानता बुध्दीला मानतात आणि यामुळे अकर्तेपणाचा अनुभव घेतात. यामुळे ते नित्यानंदात वसतात. कर्तेपणाची सुरुवात झाली म्हणजे दु:खाचे बीजवपन होते.

या अकर्तेपणाचे फळ आहे बंधनांपासून मुक्तता. हाच मुद्दा पुढील श्लोकात येतो.

: 14 :

***न मां कर्माणि लिंपन्ति न मे कर्मफले स्पृहा।***
***इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मां कर्माणि न लिंपन्ति:** मला कर्मांचे लेपन होत नाही
- **कर्मफले मे स्पृहा न:** कारण की मला कर्मफळात आसक्ती नाही
- **इति य: मां:** अशा प्रकारे मला जो पुरुष
- **अभिजानाति:** यथार्थपणे म्हणजे तत्त्वत: जाणतो
- **स: कर्मभि:** न बध्यते: तो कर्मांमध्ये लिप्त होत नाही, बध्द होत नाही

**अर्थ**

कर्मांच्या फळांची मला इच्छा नाही. त्यामुळे कर्मांचे मला बंधन होत नाही. अशा प्रकारे जो मला तत्त्वत: जाणतो, त्यालाही कर्मांचे बंधन होत नाही.

***कर्मे न बांधिती मातें फळीं इच्छा नसे मज***
***माझें स्वरुप हें जाणे तो कर्मांत हि मोकळा।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) माझ्या कर्मांचे मजवर लेपन होत नाही (2) याचे कारण असे की त्या कर्मांच्या बाबतीत माझ्या मनी स्पृहा म्हणजे आसक्ती नसते. (3) अशाप्रकारे जो पुरुष मला यथार्थपणे जाणून घेतो (4) तो अलिप्त राहूनही कर्मांच्या बंधनात बांधला जात नाही.

**स्पष्टीकरण**

1) **न मां कर्माणि लिंपन्ति:** भगवान म्हणतात की त्याना त्यांची माझी कर्मे लिंपित होत नाहीत, चिकटत नाहीत. भगवंताने अवतार घेतला म्हणजे देह धारण केला असा अर्थ कल्पून या श्लोकाचा अर्थ लावता येतो आणि सृष्टीच्या तमाम पदार्थांच्या ठायी ईश्वर व्याप्त आहे अशी धारणा मनी धरुन तो लावता येतो. भगवान अवतार कशाप्रकारे घेतात हे सहाव्या, केव्हा घेतात हे सातव्या आणि कशासाठी घेतात हे आठव्या श्लोकात यापूर्वीच वर्णिले गेले आहे. भगवंताला आपल्या अवतार कार्यादरम्यान देह धारण करावाच लागतो. देह धारण करुन नाना प्रकारची कर्मेही करावी लागतात.

सर्वसाधारण माणूसही रात्रंदिवस कर्मे करतो. यामुळे त्याच्या व भगवंताच्या कर्माचे स्वरुप समजून घ्यायला हवे. साधारण मनुष्य नेहमी सात्विक कर्मेच करील असे काही सांगता येणार नाही या उलट राजसी-तामसी कर्मांकडेच त्याचे वळण झुकते असते. त्याच्या कर्मात फलासक्ती असते. यामुळे या कर्माच्या बाबतीत राग-द्वेष भाव उपजतो. राग-द्वेषामुळे दु:ख, ग्लानी यांचा अनुभव येतो. कुठलेही कर्म कुठल्या ना कुठल्या तरी उद्देशाने तर करावेच लागते. भल्या कामांसाठी काही ध्येय, सिध्दांतांचा आधार घ्यावा लागतो. काही योजना घडवाव्या लागतात. कर्मे आचरताना हेतु साधला जातो की नाही यावरही लक्ष केंद्रित करावे लागते. कर्माप्रती जेव्हा आसक्ती जागते तेव्हा संघर्ष उभा ठाकतो आणि संघर्षामुळे दु:ख उत्पन्न होते.

ही गोष्ट केवळ राजसी-तामसी कर्मांनाच नव्हे तर सात्विक कर्मांनाही लागू पडते म्हणजे सात्विक कर्मांच्या संदर्भातही आसक्तीभाव जागू शकतो. मोक्षाच्या साधनेतही आसक्ती जागली तर दु:खाचा अनुभव होतो. शंकराचार्य म्हणतात: **मोक्षे अपि फले संगं त्यक्त्वा** अर्थात् मोक्षरुपी फळातही आसक्तीचा त्याग करुन, निराकांक्ष मनाने रहावे.

2) **न मे कर्मफले स्पृहा:** मला त्या कर्मांची फलासक्ती नसते. भगवंताला कर्माची फलासक्ती स्पर्श करत नाही, हा फार महत्वाचा सिध्दांत आहे.

गीतेचा मुख्य सारांश फलासक्तीचा त्याग आहे असे गांधीजी म्हणतात. गीतेत ज्ञान, कर्म, भक्ती, ध्यान, गुणोत्कर्ष इत्यादी वर्णन येते तरी गीतेचा मुख्य विषय कर्मफलत्याग हा आहे. आपल्या गीताभाष्याला गांधीजींनी "अनासक्ती योग" म्हणजे आसक्तीचा त्याग हे नाव दिले म्हणजे आसक्तीचा अभाव. खऱ्या अर्थाने कर्मफळाचा त्याग करणाऱ्याला हजारपटीने फळप्राप्ती होते. गीतेच्या फलत्याग संकल्पनेत अतूट श्रध्देची कसोटी लागते. केवळ परिणामाबाबतची अधीरता आल्यामुळे तो क्रोधाला वश होतो. न करण्यायोग्य कामे करायला लागतो. एका कर्मातून दुसऱ्यात, दुसऱ्यातून तिसऱ्यात असा त्याचा प्रवास सुरु होतो. परिणामाचे चिंतन करणाऱ्यांची स्थिती विषयांधासारखी होते. अखेरीस तो विषयासक्ताप्रमाणे सार-असार काय आणि नीती-अनीती काय यासंबंधीचा विवेक हरवून बसतो. फळाच्या प्राप्तीसाठी अगदी वाट्टेल त्या साधनाचा उपयोग करु लागतो. त्यालाच धर्म मानून बसतो.

यानंतर गांधीजी एक मार्मिक वाक्य लिहितात की कर्माचा त्याग करणारा पडतो कर्मफळाचा त्याग करणारा चढतो. साधनेच्या पराकाष्ठेला मोक्ष वा परम शांती म्हणता येईल. ज्ञान आणि भक्तीलाही कर्मफळाच्या कसोटीवर चढावे लागते.

ईश्वररुप झाल्याशिवाय माणसाला शांती-सुख नाही लाभत. ईश्वररुप होण्याचे प्रयत्न हाच खरा पुरुषार्थ आणि हेच खरे आत्मदर्शन होय. हे आत्मदर्शन तमाम धर्मग्रंथांचे प्रतिपाद्य आहे तसेच गीतेचेही आहे पण या विषयाचे प्रतिपादन करण्यासाठी काही गीतेचे लेखन झाले नाही. आत्मार्थी मुमुक्षु वा साधकाला अद्वितीय उपाय दाखवणे हाच गीतेचा आशय आहे. हा अद्वितीय उपाय आहे कर्मफलत्याग.

पुढे गांधीजी लिहितात की कर्म करत असताना माणूस बंधनांपासून मुक्त कसा काय राहू शकतो? या प्रश्नाची सोडवणूक जशी गीतेने केली आहे तशी अन्य कुठल्याही ग्रंथाने केलेली नाही. गीता म्हणते 'फळाची आसक्ती सोडा, कर्मे करा.' निष्काम भावनेने कर्मे करा. गीतेचा हा संदेश कदापि विसरता न येण्यासाखा आहे. सत्य-अहिंसेच्या संपूर्ण पालनाशिवाय कर्मफळाचा त्याग करणे शक्य नाही. गीता विधि-निषेध सांगणारा ग्रंथ नाही कारण की एकासाठी जे विहीत आहे ते दुसऱ्यासाठी अविहित म्हणजे निषिध्द असू शकते. एका विशिष्ट काळात वा देशात विहीत असणारे कर्म अन्य देशात वा काळात निषिध्द ठरु शकते. फळाची आसक्ती ही एकमेव निषिध्द बाब आहे. विहित आहे अनासक्ती वा कर्मफळत्याग.

आपणास कर्मे लिंपित करत नाहीत कारण की आपण फलासक्तीरहित आहोत असे भगवंताचे निवेदन आहे. भगवान अवतार ग्रहण करतात हे वर सांगितलेले आहेच आता त्याच्या सर्वव्यापक रुपाचा विचार करु या.

सर्वव्यापक परमात्मा गुप्त आहे-असतो. तो अवतार धारण केल्यावर प्रकट होतो. तमाम जड पदार्थांर्च्या ठायी परमात्मा गुप्त रुपाने वसतो तरी त्याचे कर्म तर अखंडपणे सुरुच असते. सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वीच्या रुपात आणि वृक्ष-वनस्पती, नाना प्रकारच्या पदार्थांर्च्या रुपात परमात्मा प्रकट होत रहातो. ही सृष्टी अखंड कर्मरत आहे. फुलाच्या एका रोपाला घ्या. किती फुलं देते हे रोप ! देतच रहाते. ही अखंड चालणारी क्रिया-प्रकिया आहे. अशा प्रकारे सृष्टीच्या प्रत्येक पदार्थामध्ये अखंड चालणारी क्रिया भगवंतच करतो आहे. तरी देखिल भगवंतावर या कर्माचा काहीएक परिणाम होत नाही. तो संपूर्णपणे अपरिणामशील रहातो.

3) अशा प्रकारे जो भगवंताच्या कर्माना अचुकपणे जाणतो म्हणजे जाणून त्यावर अमल करतो.

4) तो कर्मबंधनात फसत नाही. भगवंताच्या कमांर्ना जाणणारे अनेक लोक आढळतील. शास्त्री-पंडित मंडळी तर यावर प्रवचने झोडतील पण भगवंताच्या अलिप्त कर्मांना जाणून घेऊन त्यावर अमल करणे अवघड आहे. अलिप्तता प्राप्त करुन घेणारे जन विरळ असतात. शास्त्री-पंडित देखिल काम-क्रोधाच्या अधीन असतात. यामुळे अलिप्त राहून कर्मे आचरणारे या भवजाळापासून अलिप्त रहातात. मुक्त रहातात. पुनरपि जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडत नाहीत.

या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य लिहितात: **अहंकाराभावात्** अहंकाराच्या अभावामुळे भगवंताला आपल्या कर्माचे लेपन होत नाही. गृहस्थ वा शास्त्री- पंडित अहंकारामुळे प्रेरित होऊन कर्मे आचरतात. अहंकार जेवढा अधिक तेवढे अधिक राग-द्वेष चित्तात उपजतात. कर्माचे बंधनही अधिक मजबूत होते. अहंकारामुळे राग-द्वेष बळावतात हे एकदा का ध्यानी आले तर मग राग-द्वेष यांना क्षीण करण्याच्या दिशेने आपण प्रयत्नशील बनू. परमेश्वराचे जेवढे सपाटून स्मरण असेल त्याप्रमाणात अहंभाव क्षीण होईल आणि यामुळे राग-द्वेष यासारखे विकार क्षीण होऊ लागतील.

: 15 :

*एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।*
*कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पूर्वैः अपि मुमुक्षुभिः** प्राचीन काळातल्याही मुमुक्षु जनांनी
- **एवं ज्ञात्वा कर्म कृतं:** असे जाणून कर्मे केली आहेत
- **तस्मात् त्वं:** यामुळे तू सुध्दा
- **पूर्वै पूर्वतरं कृतं:** आधी जन्माला आलेल्या मुमुक्षु जनांच्या द्वारे सदापासून केल्या गेलेल्या
- **कर्म एव कुरु:** कर्मांनाच कर

**अर्थ**

पूर्वीच्या मुमुक्षूंनीसुध्दा असे जाणूनच कर्मे केली आहेत म्हणून तू ही पूर्वजाकडून नेहमीच केली जाणारी कर्मेच कर.

*केलीं कर्मे मुमुक्षूंनी पूर्वी हें तत्त्व जाणुनी*
*तैसी तूं हि करीं कर्मे त्यांचा घेऊनि तो धडा।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) प्राचीन काळी होऊन गेलेल्या मुमुक्षु-साधकानी भगवंताच्या अलिप्त कर्मांना जाणून कर्मे आचरलीत. (2) यासाठी 'तू देखिल मुमुक्षु जनांप्रमाणे अलिप्त राहून कर्मे कर' असे भगवंताचे म्हणणे आहे.

### स्पष्टीकरण

1) **एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः** या श्लोकात प्राचीनकाळच्या साधक-मुमुक्षु जनांची उदाहरणे भगवंताने दिली आहे. वंशपरंपरेप्रमाणे ज्ञानपरंपराही चाले. नदीच्या प्रवाहाप्रमाणे ज्ञानप्रवाहही प्राचीन काळापासून अखंडपणे वाहतो आहे. परंपरेने मिळणारे ज्ञान अनुभवसंपन्न असते. प्राचीन काळापासून गुरु-शिष्य परंपरा अबाधितपणे सुरु आहे. संगीत असो वा चित्रकला, पदार्थ विज्ञान असो वा यंत्रविज्ञान यासारख्या अनेक विद्यादेखिल माणूस गुरुशिवाय प्राप्त करुन घेऊ शकत नाही मग परमात्म ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी तर गुरुची आवश्यकता असतेच हे नव्याने सांगायला नको. स्थूल विद्येची प्राप्ती करताना आचरणाचा विशेष संबंध येत नाही. म्हणजे एखादा व्यसनी संगीत शिक्षकही संगीत विद्या शिकवू शकतो पण परमात्म ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी मात्र विकारांना क्षीण करणे ही पहिली अट आहे. व्यसनाधीन, इंद्रियांची गुलाम, चारित्र्यहीन, असंयमी व्यक्ती परमात्म ज्ञान प्राप्त नाही करुन घेऊ शकत. परमात्म ज्ञानाची प्राप्ती अतिदुर्लभ आहे.

2) प्राचीनकाळी मुमुक्षुजन ज्याप्रकारे अलिप्त राहून अखंडपणे कर्मे आचरित होते ते योग्यप्रकारे जाणून घेऊन त्याप्रमाणे सत्कर्माचे आचरण करायला हवे. अर्जुन स्वधर्माचा त्याग करायला सिध्द झाला होता. संन्यासाची भाषाही बोलू लागला होता. त्याला विविध प्रकारे ज्ञान देऊन भगवंत स्वकर्मात प्रवृत्त करताहेत. स्वधर्माचा त्याग करुन काही परमात्म ज्ञानाची प्राप्ती करुन नाही घेता येणार. ज्ञानप्राप्त झाल्यावर सहज कर्मावस्था कुणाच्या निदर्शनास येत असेल तर त्या अकर्म दर्शनात अगणित कर्मे लपलेली दिसतील. अशा पुरुषाच्या दर्शनमात्रेण अनंत प्रेरणा लाभू शकतात पण अज्ञानावस्थेत स्वकर्माचा त्याग करुन ज्ञ् स्वधर्माचा त्याग करुन परमात्म ज्ञान प्राप्ती केवळ अशक्य आहे.

: 16 :

***किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिता: ।***
***तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **कर्म किं:** कर्म म्हणजे काय?
- **अकर्म किं:** अकर्म म्हणजे काय?
- **इति अत्र कवय: अपि:** या बाबतीत मोठमोठे बुध्दीमान लोक सुध्दा
- **मोहिता:** मूढ बनून गेले आहेत
- **तत् ते कर्म:** यामुळे तुला कर्म म्हणजे काय? आणि अकर्म म्हणजे काय ?
- **प्रवक्ष्यामि:** (ते) समजावून सांगतो
- **यत् ज्ञात्वा:** ज्या जाणून घेतल्यामुळे
- **अशुभात् मोक्ष्यसे:** अशुभापासून मुक्त होऊन जाशील, संसार बंधनापासून सुटून जाशील

### अर्थ

कर्म काय आणि अकर्म काय याचा निर्णय करण्याच्या बाबतीत बुध्दीमान पुरुषही संभ्रमात पडतात म्हणून ते कर्माचे तत्त्व मी तुला नीट समजावून सांगेन. ते कळले की तू अशुभापासून म्हणजेच कर्मबंधनातून सुटशील, मुक्त होशील,

***नेणती जाणते ते हि काय कर्म अकर्म हें***
***तुज तें सांगतो कर्म जाणूनि सुटशील जें ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे: (1) कर्म म्हणजे काय आणि अकर्म कशाला म्हणावे याचे नेमके स्वरुप बड्या-बड्या विद्वानानाही योग्य रीतीने कळू शकत नाही. ते मूढ ठरतात. (2) यामुळे भगवंत कर्म आणि अकर्माचे स्वरुप समजाऊन सांगताहेत. (3) यामुळे या अशुभापासून म्हणजे प्रापंचिक बंधनापासून मुक्त होता येईल.

### स्पष्टीकरण

1) **किं कर्म किं अकर्म इति कवय: अपि मोहिता:** कर्म आणि अकर्म या शब्दांचा गीतेने विशिष्ट पध्दतीने प्रयोग केला आहे. पुढच्या श्लोकात विकर्म शब्द आला आहे. विकर्म शब्दाचा विशेष अर्थच ग्रहण केला जायला

हवा. या तीन शब्दांच्या संदर्भात कमी लोक नेमकेपणाने जाणतात. कर्म शब्दाचा सर्वसामान्य अर्थ-काया-वाचेने जागृती काळात अनेक क्रिया करणे असाच होतो पण काहीही न करणे, म्हणजे गुपचुच बसणे, आराम करणे, झोपणे यालाही विचारवंतांनी कर्म मानले आहे. न करण्यालाही जेव्हा कर्म मानले जाते तेव्हा मात्र कर्म शब्दाच्या नेमक्या अर्थाबाबत अडचण निर्माण होते. गुपचुप बसणे, आराम करणे वा झोपणे यासारख्या क्रियाना सर्वसाधारण लोक "अकर्म'' म्हणतात. ते "कर्म" म्हणजे क्रिया आणि "अकर्म" म्हणजे अक्रिया असे समजतात. कायिक - वाचिक कामाना कर्म मानणारे सामान्य जन मानसिक कर्माना क्रिया मानत नाहीत, कर्म मानत नाहीत.

भगवंताचे निवेदन असे आहे की कर्म आणि अकर्म या बाबतीत बुध्दीमान, ज्ञानी, विद्वान लोकांच्याही ठायी मूढता दिसून येते. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, अरविंद, टिळक, गांधीजी यांचे कर्म-अकर्म यासंबंधी एकमत नाही. हे तर ठीक पण कुणाचेच स्पष्टीकरण समाधानकारक नाही. श्री किशोरलालभाई मश्रुवाला यांनी घ्गीता मंथनङ ग्रंथ लिहिला आहे पण त्या माध्यमातून या संज्ञांचा अर्थ स्पष्ट नाही होत. विनोबांनी आपल्या गीता प्रवचनांच्या माध्यमातून या संज्ञांवर अपूर्व प्रकाशझोत टाकला आहे.

विनोबांचे निवेदन असे आहे घ्कर्मङ म्हणजे स्वधर्मरुप कर्म म्हणजे स्वकर्तव्य. यात निवडीचा प्रश्न नसतो. यामुळे याला स्वर्धरुप कर्म वा प्रवाहपतीत सात्विक कर्म म्हणू या! कर्माच्या पालनाने मनुष्य निष्काम बनू शकत नाही कारण आरंभापासून त्याची कर्मे इच्छा-वासनेने प्रेरित होऊनच कार्यरत असतात. इच्छा वासनेच्या प्रेरणेने आरंभ झालेल्या कर्माचे आचरण करत असताना इच्छा-वासनेचा त्याग करता येत नाही, कारण कर्माच्या आरंभीच इच्छा-वासनेचे बीजारोपण झालेले आहे. यामुळे ज्याला निष्कामतेचे मोल वाटत असेल त्याने कर्माच्या सुरुवातीलाच निष्काम भावनेने वागायला हवे.

आपल्याला भावणारे कर्म निवडून आपण निष्कामतेचा अभ्यास करु शकू असे म्हणणे एक भ्रांती आहे, भ्रम आहे. स्वकर्मात आवड-निवड नसते. स्वकर्म ईश्वर-प्रेरित वा प्रवाहपतीत असते तरी प्रवाहात जे काही आणि जसे काही येईल त्याचा काही आपण स्वीकार करत नसतो. यामुळे निवडीचा अर्थ एवढाच आहे की आपले कर्म सात्विक असावे. सात्विक कर्मामुळेच ज्ञानप्राप्ती संभवते, निष्काम भाव विकसित होतो. राजसी आणि तामसी कर्माचे आचरण केले तर निष्काम भाव कसा साधेल ? या कर्माच्या द्वारे चित्तशुध्दी अशक्य आहे.

सात्विक कर्मे करताना आपण काही निवड करायची नसते. निवडीचा संदर्भ अहंकारप्रेरित असतो, निवड करणे हा अहंकाराचा भाव असतो आणि अहंभाव संपवणे हाच तर मुख्य हेतु आहे. निवड रहितता आणि अहंकारमुक्ती या दोन बाबी ज्या कर्मामध्ये सक्रिय असतील तीच कर्मे अखेरीस माणसाला-साधकाला संपूर्णपणे निष्काम बनवतील आणि परमात्म स्वरुपाची ओळख करुन देतील. या अभावी कर्मे निष्काम भाव जागवू शकणार नाही. जी कर्मे निष्काम भाव जागवू शकत नाहीत अशा कर्माना गीता घ्स्वधर्मङ म्हणत नाही. निष्कामतेकडे वळणारी आणि निष्कामता प्राप्तीसाठी ईश्वरप्रेरित कर्मे आचरायला हवीत. हे जाणून घेतले तर कर्माचे स्वरुप नेमकेपणाने कळेल. अशा प्रकारच्या निष्काम भावनेने आचरलेल्या सात्विक कर्माला 'कर्म' म्हटले जाते. कर्म म्हणजे स्वधर्मरुपी स्वकर्तव्य होय.

आता "अकर्म" चा विचार करु या. निष्काम कर्मामुळे अकर्म-दशा लाभते. स्वत: कर्ता नसून संपूर्णपणे अकर्ता आणि अभोक्ता बनून केवळ ज्ञाता बनून रहायचा अनुभव "अकर्म" होय. हा अर्थ शंकराचार्य, ज्ञानेश्वर, गांधीजी यांना मान्य आहे. ज्ञानेश्वरानी या श्लोकात न सांगता 18 व्या श्लोकात अकर्म दशेचे वर्णन केले आहे. भगवंताच्या दिव्य कर्मे आणि दिव्य जन्म यांची चर्चा या अकर्तेपणाच्या भूमिकेतून मांडली गेली आहे. अकर्ता बनणे हे जीवनाचे सार होय. अकर्ता बनल्यावर सहजपणे अभोक्ता बनता येते. त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. अकर्ता बनण्यासाठीच तर ध्यान, भक्ती, वैराग्य वगैरे साधना आहेत. याचा अर्थ काही नवीन मिळवायचे नाही. अकर्तेपण आत्मस्वरुपी आहे.

2) गीता कर्म आणि अकर्म याबाबत समजावते. कर्माच्या ठायी अकर्मा म्हणजे अकर्ता कसा वसतो हे गीतेने 18 ते 24 या सात श्लोकांच्या माध्यमातून सांगितले आहे.

3) कर्म आणि अकर्म यांचे स्वरुप जाणून घेऊन त्यांना आचरणात आणल्यावर अशुभापासून म्हणजे प्रापंचिक-

बंधनातून मुक्तीलाभ होऊ शकतो. कर्ता बनले की बंधने आलीत. कर्ता बनलो की नाना प्रकारच्या इच्छा-वासना वाढू लागतात. त्यांच्या अधीन झाल्यामुळे स्वधर्माचीही ओळख होत नसते. स्वधर्माचा त्याग करायला नको. अकर्ता बनण्यासाठी स्वधर्म वा स्वकर्तव्याचे पालन करणे परमावश्यक आहे. अकर्ता म्हणजे निष्काम व शून्य बनणे होय. कामनेला वश होऊनच माणूस स्वकर्तव्याचा त्याग करतो. गोंधळात पडतो. यामुळे प्रवाहपतीत कर्मे आचरणे ही पहिली गोष्ट. प्रवाहपतीत कर्मे आचरत असतानाही अकर्ता बनून रहाणे ही दुसरी गोष्ट. या दोन गोष्टींचे पालन केले तर कर्मबंधनातून मुक्त होता येऊ शकते.

: 17 :

***कर्मणो ह्यपि बोध्दव्यं बोध्दव्यं च विकर्मण: ।***
***अकर्मणश्च बोध्दव्यं गहना कर्मणो गति: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि कर्मण: अपि बोध्दव्यं:** कारण की कर्माचे स्वरुपही जाणून घ्यायला हवे
- **च विकर्मण: बोध्दव्यं:** आणि विकर्मही जाणून घ्यायला हवे
- **च अकर्मण: बोध्दव्यं:** आणि अकर्मसुध्दा जाणून घ्यायला हवे
- **कर्मण: गति: गहना:** कर्माचे यथार्थ स्वरुप समजून घेणे खूप अवघड आहे

**अर्थ**

कर्माचे स्वरुपही जाणले पाहिजे आणि अकर्माचे स्वरुपही जाणले पाहिजे तसेच विकर्माचे स्वरुपही जाणले पाहिजे कारण कर्माचे तात्त्विक स्वरुप समजून घेणे कठीण आहे.

***सामान्य कर्म जाणावें विकर्म हि विशेष जें***
***अकर्म तें हि जाणावें कर्माचें तत्त्व खोल हें।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) कर्म, अकर्म आणि विकर्म यांचे स्वरुप नीट समजून घ्यायला हवे (2) कारण त्याचे यथार्थ स्वरुप समजून घेणे सोपे नाही.

**स्पष्टीकरण**

1) **कर्मणो ह्यपि बोध्दव्यं बोध्दव्यं च विकर्मण: अकर्मणश्च बोध्दव्यम्:** या श्लोकात ‘विकर्म’ हे नवीन तत्व आले आहे. ‘कर्म’ आणि ‘अकर्म’ हे धडपणे जाणून घ्यायला हवे यासोबतच ‘विकर्म’ ही जाणून घेणे गरजेचे असल्याचे इथे सांगितले आहे. कर्म आणि अकर्म याचा अर्थ नुकताच आपण बघितला. आता ‘विकर्म’ म्हणजे काय ते जाणून घेऊ या. अनेक भाष्यकारांनी ‘विकर्म’ चा अर्थ विपरीत वा निषिध्द कर्म असा केला आहे. विशेष कर्म हा अर्थ विनोबांनीच केला आहे. या अध्यायात हा शब्द इथे एकदाच आला आहे, पुढे नाही. या तिघांच्या स्वरुपाला निश्चितपणे समजून घ्यायला हवे. स्वधर्माच्या संदर्भात तर गीतेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायात चर्चा आली आहे. अकर्म विषयक स्पष्टीकरण या अध्यायाच्या 19 ते 24 अशा सहा श्लोकांमधून आले आहे. 25 ते 32 या श्लोकांमधून विकर्म प्रकरण आहे.

तिसऱ्या अध्यायात स्वधर्मरुप यज्ञाचे विस्तृत स्पष्टीकरण आले आहे. त्याच यज्ञाविषयी पुढे विविध प्रकारच्या यज्ञाच्या निमित्ताने 25 ते 32 श्लोकामधून चर्चा आली आहे असे नाही म्हणू शकत. विकर्माच्या संदर्भात विनोबा म्हणतात- च् विकर्म म्हणजे आंतरिक चित्तशुध्दीकरणारे सूक्ष्म कर्म होय. परमात्मस्वरुपाची ओळख करुन घेत असताना विघ्नरुप काम, क्रोध, अभिमान यासारख्या आंतरिक विकारांना नष्ट करुन देणाऱ्या सूक्ष्म कर्मांना ‘विकर्म’ असे म्हणतात. गीतेच्या विविध अध्यायामधून वर्णित दम, उपरति, तितिक्षा, समाधान, श्रध्दा, ध्यान, भक्ती, आत्मानात्मविवेक यासारखी सारी साधने विकर्मच होत. बाहेरुन स्वधर्मरुपी कर्मे आणि आतून चित्तशुध्दी करणाऱ्या-भक्ती वैराग्य वगैरे आंतरिक कर्मांना ‘विकर्म’ म्हणतात. ही विकर्मे जेव्हा स्वधर्मरुप कर्मात मिसळून जातात तेव्हा त्यातून अकर्म म्हणजे अकर्तेपणाचा बोध होतो. हाच मोक्ष होय.

गीता प्रवचनातल्या चौथ्या अध्यायातून विनोबांनी या विषयाला उत्तम प्रकारे समजाऊन सांगितले आहे. ते लिहितात- की कर्माशी विकर्माचे मीलन आवश्यक आहे. या मिलनालाच गीता ‘विकर्म’ म्हणते. बाहेरचे स्वधर्मरुप सामान्य कर्म आणि हे आंतरिक विशेष कर्म. हे विशेष कर्म आपापल्या मानसिक गरजेनुसार भिन्न-भिन्न प्रकारचे

असते. नमुन्यादाखल विकर्माचे असे नाना प्रकार चौथ्या अध्यायात दर्शवले आहेत. त्याचा विस्तार पुढे सहाव्या अध्यायात आला आहे. या विशेष कर्माची - या मानसिक अनुसंधानाची जेव्हा आपण बेरीज करु लागू ना तेव्हाच त्यात निष्कामतेची ज्योती जागेल. कर्माशी विकर्म सांधले जाते तेव्हा निष्कामता हळूहळू आपल्या ठायी प्रविष्ट होत जाते. शरीर आणि मन जर भिन्न-भिन्न आहेत तर मग साधनेही दोघांसाठी भिन्न-भिन्नच ठरतील. या दोघाची सांगड घातली गेली तर आपल्या मुठीत साध्य असेल. बाह्य कर्मात जर हृदयाची आर्द्रता नसली तर स्वधर्माचरण कोरडे-शुष्क म्हणजे रुखे-सूखे राहील. त्यात निष्कामतेरुपी मूळ फळ नाही लागू शकणार. आपण कुणा रोग्याची सेवा-सुश्रुषा सुरु केली पण त्या सेवाकार्यासोबत जर आपल्या मनी कोमल दयाभाव नसला तर रुग्ण सेवा नीरस होईल आणि आपले मन कंटाळून जाईल. त्या सेवेचे ओझे होईल. रोग्यालाही आपण केलेली सेवा ओझ्यासारखी वाटेल. या सेवेत मानसिक सहभाग नसला तर ही सेवा अहंकाराला जन्म देईल. आज मी त्याच्या मदतीला आलो तर उद्या त्यानेही मला मदत करायला हवी, जनलोकात मला प्रतिष्ठा मिळायला हवी. यासारख्या अपेक्षा माझ्या मनात उपजतील किंवा मग आपण त्रस्त होऊन सांगू लागू की आपण इतकी सेवा करतो तरी हा आपला बडबडच करत रहातो. आजारी व्यक्ती एरवीही चिडचिड करत असतेच. त्याच्या अशा स्वभावामुळे ज्याच्या मनी सेव्य-सेवाभाव वसत नाही असा सेवक कंटाळून जाईल.

कर्माशी जेव्हा आंतरिक भाव मिसळून जातो तेव्हा ते कर्म अगदी निराळेच ठरते. तेल आणि वातीशी जेव्हा ज्योतीचे मिलन होते तेव्हा प्रकाश उत्पन्न होतो. कर्माशी विकर्माचा संबंध आला की निष्कामता जागते. सुरुंगाच्या दारुत ठिणगी पडली की स्फोट होतो. त्या दारुत एक प्रकारची शक्ती उत्पन्न होते. कर्म ही सुरुंगाची दारु समजा. विकर्माची सोबत लाभत नाही तोवर ते कर्म जड आहे. त्यात चैतन्य नाही. एकदा का विकर्माची ठिणगी त्यावर पडली की त्याचे बळ अवर्णनीय ठरते. चिमुटभर दारु. खिशात पडून राहील पण ठिणगीचा स्पर्श होताच देहाच्या चिंधड्या-चिंधड्या होऊन जातील. अशाच प्रकारे स्वधर्माचरणाचे अनंत सामर्थ्य गुप्त रुपाने निवास करते. त्यात विकर्म मिसळताच काय-काय घडते-बिघडते हे आजमावून बघता येते. त्याच्या स्फोटातून अहंकार, काम, क्रोध यांचे प्राणहरण होईल आणि त्यातून परम ज्ञानाची निष्पत्ती होईल.

कर्माशी विकर्माचा मेळ झाला तर रात्री स्फोट होतो आणि अकर्माचा जन्म होतो. लाकूड जळले म्हणजे राख होते. आधीचा एवढा मोठा ओंडका जळल्यावर उरते ती चिमुटभर राख. आनंदाने उचला ती आणि अंगभर लेपन करुन घ्या. अशाच प्रकारे कर्मात विकर्माची ज्योत जाळली की अंतत: अकर्म घडते. कर्मात विकर्म ओतल्यावर अकर्म होते. याचा काय बरे अर्थ? याचा अर्थ असा की कर्म करुनही आपण काही केले असे वाटत नाही. अकर्माचे ओझे वाटत नाही. कर्म करुनही अकर्ता रहाता येते.

2) दुसरे असे की **गहना कर्मणो गति: कर्माची** गती अत्यंत गहन आहे, म्हणजे कर्माचे स्वरुप कमालीचे गहन आहे. संस्कृत वचन आहे **सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य धर्माचे** स्वरुप सूक्ष्म आहे आणि एक संस्कृत वचन आहे: **धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्** अर्थात् धर्माचे तत्व गूढ आहे, लपलेले आहे. ते उकलता उकलत नाही.

: 18 :

***कर्मण्यकर्म य: पश्येदकर्मणि च कर्म य: ।***
***स बुध्दिमान् मनुष्येषु स युक्त: कृत्स्नकर्मकृत् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: कर्मणि:** जर विवेकी पुरुष कर्मे करत असतांना
- **अकर्म पश्येत्:** अकर्तेपणाचा अनुभव घेतो
- **च य:** आणि जो विवेकी पुरुष
- **अकर्मणि कर्म पश्येत्:** अकर्मातही कर्म बघतो, केलेल्या सर्व क्रियांना त्यागरुपात बघतो
- **स: मनुष्येषु बुध्दिमान्:** तो मनुष्यांमध्ये मोठा बुध्दिमान आहे
- **स: युक्त: स: कृत्स्नकृत्:** तोच योगी आहे, तोच कृतकृत्य आहे, तोच सर्व कर्मे करणारा आहे

**अर्थ**

जो पुरुष कर्मामध्ये अकर्म पाहील आणि अकर्मामध्ये कर्म पाहील तो मनुष्यामध्ये बुध्दीमान होय आाणि तो योगी सर्व कर्मे करणारा आहे.

*कर्मीं अकर्म जो पाहे अकर्मीं कर्म जो तसें*
*तो बुध्दिमंत लोकांत तो योगी कृत-कृत्य तो।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टींची चर्चा आली आहे (1) कर्म करताना जो अकर्म बघतो (2) अकर्माच्या ठायी जो कर्म बघतो (3) तो पुरुष मनुष्यमात्रात बुध्दीमान आहे. (4) तो योगी आहे. (5) तोच कृतकृत्य पुरुष होय.

**स्पष्टीकरण**

1) **कर्मण्यकर्म य: पश्येत्:** कर्म करताना अकर्म बघणारा म्हणजे स्वत:ला अकर्ता मानणारा परमात्म स्वरुपाला जाणून घेणारा ठरतो. परमात्मा अकर्ता असल्याचा मुद्दा याच अध्यायच्या 13 व्या श्लोकात स्पष्टपणे "अकर्ता" या शब्दाने समजाऊन सांगितला गेला आहे. 'मीच काय तो अकर्ता आहे.' असे भगवंताचे वचन नसून 'मी सर्व जगताचा कर्ता असूनही अकर्ता आहे.' असे वचन आहे. म्हणजे सारी शुभ कर्मे करुनही मी काहीही करत नाही एवढ्या अलिप्ततेचा अनुभव तो घेतो. 14 व्या श्लोकात तर हेही सांगून टाकले गेले आहे की कर्मफळाची आसक्ती नसल्यामुळे मी कर्मात लिप्त होत नाही म्हणजे मी अलिप्त रहातो. हेही सांगितले आहे की अशाप्रकारे कर्माचे जो आचरण करील तोही कर्मात बांधला जाणार नाही. याचा अर्थ असा की अकर्ता बनणे म्हणजे देह-मनाद्वारे कुठलेही कर्म न आचरणे हा चुकीचा समज आहे. कर्म न करताना अकर्तेपणाच्या अनुभवाला काहीही अर्थ नाही. कसोटीवर खरा सिध्द होणारा अनुभवच खरा म्हणायला हवा. सत्कर्मे आचरताना जेव्हा मी 'सारे कर्तृत्व प्रभुचेच आहे' असे मानीन तेव्हाच माझे अकर्तेपण सिध्द होईल. संपूर्ण अकर्तेपणाच्या अनुभवाविना परमात्म्याची ओळख करुन घेणे साधकाला दुरापास्त ठरते. कर्मे आचरत असताना सतत अकर्तेपणाचा अभ्यास साधकाला करावा लागतो. प्रयत्नाच्या पराकाष्ठेतच अकर्तेपणाचा पूर्ण अनुभव घेता येतो.

इथे पूर्णपुरुषाचे वर्णन केले गेले आहे. अशाप्रकारे बाहेरुन स्वधर्माचे पालन आणि मनात नाना प्रकारे भक्ती, वैराग्य, फलाशा-त्याग यासारख्या सात्विक भावांचा विकास करत विकर्माचा अभ्यास करत असतानाच साधकाला अकर्तेपणाचा परिपूर्ण अनुभव होऊ शकतो.

2) आता दुसरा मुद्दा असा **अकर्मणि च कर्म** कर्मे आचरताना अकर्तेपणाचा जो अनुभव येतो त्यातच सारे कर्म भरलेले असते. साधक आणि सिध्द पुरुषाच्या दृष्टीकोणातून याचे दोन अर्थ संभवतात. साधकाच्या दृष्टिकोणातून कर्मे म्हणजे सत्कर्मे स्वधर्मरुप कर्मे आचरत असताना अकर्तेपणाचा अनुभव घेण्याचे सतत लक्ष्य ठेवायला हवे. हे प्रतीत व्हायला हवे की अकर्तेपणाचा अनुभवच सर्वश्रेष्ठ अनुभव आहे, तेच जीवनाचे सारभूत तत्व होय.

सिध्द पुरुषाच्या दृष्टिकोणातून असा अर्थ होतो की अकर्तेपणाचा जेव्हा परिपूर्ण अनुभव येतो आपण कर्माचे कर्ता असल्याची भ्रांती स्वप्नातही जागत नाही अशा अकर्म दशेचा जो नित्य अनुभव घेतो त्याच्या या अलौकिक अनुभवामुळे उभ्या जगतासाठी सत्कर्मे आचरण्याची, अकर्तेपणाच्या अनुभवाची प्रचंड प्रेरणा मिळत रहाते. म्हणजे ज्या प्रकारे कर्मे आचरत असतानाही कर्मे न करण्याचा एक प्रकारचा अनुभव घेता येतो तसाच 'काहीही न करत असताना सारे काही करत आहे' असा अनुभव घेणे सिध्द पुरुषाचे लक्षण होय. कर्मे करत असतानाही काहीही न करणे या अकर्तेपणाचा अनुभव घेणाऱ्याला 'कर्मयोगी' म्हटले जाते आणि काहीही न करता सारे काही करणे - अकर्मदशेत प्रचंड कर्मे करीत रहाण्याचा अनुभव घेणाऱ्याला 'संन्यासी' म्हटले जाते. अशा योगी अन् संन्यासीचे वर्णन पाचव्या अध्यायात आले आहे. साधक मार्गात असतो त्याला मुक्कामी पोहोचायचे असते तर सिध्द पुरुष मुक्कामी पोहोचलेला असतो.

3) **स: बुध्दिमान् मनुष्येषु:** कर्मात अकर्माचा आणि अकर्मात कर्माचे दर्शन घेणारा-अनुभव घेणारा मनुष्यमात्रात बुध्दीमान असतो.

आपण बुध्दीमानाची व्याख्या वेगळी करतो. पंडित आणि शास्त्रीचीही वेगळी करतो. दुसऱ्या अध्यातल्या 11 व्या श्लोकात गीतेने पंडिताची व्याख्या केली आहे. या श्लोकाच्या भाष्यात शंकराचार्य म्हणतात की ज्याची बुध्दी परमात्मनिष्ठ आहे तो पंडित होय. याच श्लोकात गीता म्हणते की पंडितजन शोक करत नाहीत. स्वधर्मरुपी कर्माचे आचरण करत असताना अकर्तेपणाचा अनुभव घेणारे आणि अशा प्रकारे अकर्तेपणाच्या अनुभवात प्रचंड कर्माचा अनुभव घेणारे बुध्दीमान होत.

4) आणि तेच **युक्त** म्हणजे योगी आहेत. दुसऱ्या अध्यायाच्या 48 व्या श्लोकात चित्ताची समता म्हणजे

योग अशी व्याख्या केली गेली आहे. या व्याख्येत वृध्दी करत इथे म्हटले गेले आहे की कर्मात अकर्म आणि अकर्मात कर्म बघणारे योगी होत.

5) आणि ते **कृत्स्नकर्मकृत्: सारे** काही, सर्व काही करणारे आहेत. जीवनात जे काही मिळवायचे होते ते प्राप्त करुन घेतले, आता काहीही मिळवायचे उरले नाही. थोडक्यात म्हणजे ते कृतकृत्य आहेत. गीतेच्या पंधराव्या अध्यायातल्या 20 व्या श्लोकात घ् कृतकृत्य घ् हा शब्द आला. हाच शब्द **कृत्स्नकर्मकृत्** या शब्दाद्वारे सांगितला गेला आहे. यात वर्णन येते की पंधराव्या अध्यायात जे काही ज्ञान वर्णिले आहे ते ज्यानी प्राप्त करुन घेतले आहे, त्याना आता प्राप्त करुन घेण्यासारखे काहीही उरले नाही ते कृतकृत्य झालेत. मुंडकोषनिषदात 'कृतात्मा' हा शब्द आला आहे. मूळचा श्लोक असा आहे :

*सम्प्राप्यैनमृषयोज्ञानतृप्ताः कृतात्मानो वीतरागाः प्रशान्ताः । ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीरा युक्तात्मानः सर्वमेवाविशन्ति ॥ (3/2/5)*

अर्थात् परमात्म तत्वाला यथार्थ रुपाने जाणून घेऊन जे परमात्म ज्ञानाने तृप्त झालेत, कृतकृत्य, वीतराग झालेत, अत्यंत शांत बनून गेलेत ते सर्वव्यापी अशा ब्रह्मतत्वाला प्राप्त होऊन धैर्यशील आणि महान योगी बनून सर्वत्र व्याप्त परिपूर्ण ब्रह्याच्या ठायी जीवंत रहातात आणि देह विलय प्रसंगी त्यातच विलीन होतात.

'गीताई चिंतनिका' मधून विनोबा लिहितात की हा श्लोक संपूर्ण गीतेची किल्ली आहे. ज्ञानी पुरुष करत असूनही काही करत नाही आणि काही न करताही सर्वकाही करत असतो. एकाच पुरुषाला हा दुहेरी अनुभव घेता येऊ शकतो पण कुणाच्या आयुष्यात मुख्यपणे कर्मे करुनही अकर्तेपणाचा खेळ दिसतो तर काहींच्या जीवनात न करतानाही कर्मरत असण्याचा खेळ दिसतो. पहिला 'योगी' दुसरा 'संन्यासी'. वस्तुतः दोघे एकच होत देहधारी पुरुषाला संन्यासमार्ग ग्रहण करणे अवघड आहे. (गीता अध्याय 12 श्लोक 5 आणि अध्याय 18 श्लोक 11) यामुळे गीतेने साधकासाठी कर्मयोगाची शिफारस केली आहे. वस्तुतः दोघाना समान मानणे, असा अनुभव घेणे हेच मुख्य सार रुप आहे.

: 19 :

*यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।*
*ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यस्य सर्वे समारंभाः** ज्या ज्ञानी पुरुषाचे सारे चांगले आरंभ
- **कामसंकल्पवर्जिताः** काम आणि संकल्पांनी रहित असतात
- **ज्ञानाग्निदग्धकर्माणं:** ज्ञानरुपी अग्नीने (ज्याची) सारी कर्मे दग्ध झालीत अशा
- **तं बुधाः पंडितं आहुः** त्या ज्ञानीजनांना पंडित असे म्हणतात

**अर्थ**

ज्याची सर्व शास्त्रसंमत कर्मे कामनारहित आणि संकल्परहित होत असतात, तसेच ज्याची सर्व कर्मे ज्ञानरुप अग्नीने जळून गेली आहेत, त्या महापुरुषाला ज्ञानी लोकही घ्पंडितङ म्हणतात.

*उद्योग करितो सारे काम-संकल्प सोडुनी*
*ज्ञानानें जाळिलीं कर्मे म्हणती त्यास पंडित ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत: (1) ज्या ज्ञानी पुरुषाचे सारे आरंभ सत्कर्मरुपी असतात. (2) काम आणि संकल्पानी विरहित असतात. (3) ज्या पुरुषाची सारी कर्मे ज्ञानरुपी अग्नीने दग्ध झालीत. (4) अशा पुरुषाला ज्ञानीजन घ् पंडित घ् म्हणून संबोधन करतात.

**स्पष्टीकरण**

1) **यस्य सर्वे समारंभाः** कर्मासाठी गीतेने शब्द वापरला आहे 'समारंभ'. आपण सारेच कर्मे करतो पण सारी कर्मे 'समारंभ' शब्दाला योग्य ठरणारी नसतात. 'स' म्हणजे उत्तम आणि 'आरंभ' म्हणजे सुरुवात होय. समारंभ म्हणजे उत्तम सुरुवात. सम शब्दाचा अर्थ संपूर्ण असाही होतो. उत्तम सुरुवात कशाची? तर कर्माची. कर्म उत्तम म्हणजे सत् वा सात्विक असावे, परिपूर्णही असावे म्हणजे सात्विक कर्मे परिपूर्णतेने करावीत. सात्विक कर्मे अशी-तशीही करता येतात आणि परिपूर्णतेनेही करणे शक्य होते. इथे दोन्ही अर्थ घ्यायचेत, उत्तम व परिपूर्ण. सात्विक आणि परिपूर्ण कर्म म्हणजे समारंभ होय.

सर्वारंभपरित्यागी हे भक्ताचे लक्षण बाराव्या अध्यायातल्या 16 व्या श्लोकात येते. चौदाव्या अध्यायातल्या 25 व्या श्लोकात **सर्वारंभत्यागी** हे विशेषण त्रिगुणातीत पुरुषाचे आहे. इथे भक्ताचे विशेषण असल्यामुळे कदाचित कुणाला विरोधाभासी विशेषण वाटू शकेल. याच अध्यायात 'सर्वारंभ' शब्दही आला आहे. यावरुन असाही अर्थ लावता येऊ शकतो की भक्त वा त्रिगुणातीत पुरुष आरंभत्यागी म्हणजे सामान्य वा राजसी कर्माचा त्याग करणारा असतो पण या श्लोकात समारंभ म्हणजे चांगली कर्मे करण्यासाठी प्रयुक्त केला आहे. ही कर्मे भक्त वा त्रिगुणातीत पुरुष सोडत नाही केवळ राजसी आणि तामसी कर्मांचा त्याग करतो. सात्विक कर्मे तर तो करतोच, त्याचा निषेध कुणी करु शकत नाही. अशाप्रकारे आरंभ आणि समारंभ या दोन शब्दांमधील अर्थाच्या भिन्न छटा ध्यानी घेऊन वरील प्रमाणे वेगवेगळे अर्थ करता येतात.

याचा दुसरा अर्थ असा की भक्त वा ज्ञानी पुरुष वा त्रिगुणातीत आपल्या वतीने कुठल्याही कर्माचा आरंभ करत नाही. हे स्वत: शून्य असल्यामुळे यांची कामे ईश्वरप्रेरित असतात. ईश्वरप्रेरित कर्मे ज्ञानावस्थेचे लक्षण आहे. अहंकारप्रेरित म्हणजे स्वयंप्रेरित कर्मे अज्ञानावस्थेचे लक्षण आहे. कर्मे करत असतानाही अकर्तेपणाचा अनुभव घेणारे ज्ञानावस्थेत कर्मरत असतात. ही सारी कर्मे ईश्वरप्रेरित म्हणजे प्रवाहपतीत कर्मे असतील. याच कर्मांना सहज कर्म, स्वभावनियत कर्म, नियत कर्म, स्वधर्म, यज्ञकर्म यासारख्या वेगवेगळ्या नावानी ओळखले जाते. यामुळे बाराव्या अध्यायात भक्तासाठी आणि चौदाव्या अध्यायात त्रिगुणातीतासाठी सुयोग्य प्रकारे 'सर्वारंभत्यागी' शब्दाचा प्रयोग केला गेला आहे.

2) **कामसंकल्पवर्जिता:** ईश्वरप्रेरित कर्मे-सत्कर्मे ही कामसंकल्पवर्जित कर्मे असतात. तशी ती असायलाही हवीत कारण अहंकारामुळे संकल्पाचा विकार उपजतो. संकल्पामुळे नाना इच्छा-वासना निर्माण होतात. **संकल्पप्रभवान् कामान् त्यक्त्वा सर्वान् अशेषत:** सहाव्या अध्यायाच्या 24 व्या श्लोकात असे स्पष्टपणे सांगितले गेले आहे की संकल्पातून उद्भवणाऱ्या समस्त कामना, इच्छा आणि वासनांना नि:शेष करुन चालावे. इच्छा आणि वासनांचे मूळ संकल्पात आहे. या सृष्टीच्या निर्मितीच्या आरंभी ईश्वरानेही संकल्प केला होता की आता आपण सृष्टी निर्मितीचे काम आरंभ करु या. संकल्पानंतर कार्य सुरु होते तर इच्छा-वासना उद्भवतातच. माणसाने ईश्वर प्रेरित होऊन संकल्प करावा आणि ईश्वर प्रेरणेशीच पूर्ण करावा. संकल्पाच्या मागे-पुढे ईश्वरी प्रेरणा असली ना तर मध्यभागी असेलच म्हणजे ईश्वरी प्रेरणा नित्यच राहील. ईश्वरी प्रेरणेने कार्ये चालत राहिलीत तर मग वासना-इच्छा उपजणारच नाहीत.

संकल्पाच्या पाठीमागे ईश्वरी प्रेरणा नसली तर इच्छा-वासना उत्पन्न होणारच, मग तो शुभ संकल्प का असेना ! ईश्वर प्रेरित शुभ संकल्प असतानाही सावधपण बाळगले नाही तर इच्छा-वासना उपजतील-चांगले कार्य करत असतानाही 'या कार्याची प्रशंसा व्हावी' अशी प्रबळ वासना जन्माला येते व ती वाढत रहाते. यामुळे शुभ संकल्प जर ईश्वर प्रेरित असला आणि त्याच्याच प्रेरणेने कार्यप्रवण राहिला तर इच्छा-वासना बळावत नाहीत. यामुळे गीता म्हणते की ज्ञानी पुरुषाची शुभ कर्मे ही काम-संकल्प-वर्जित असतात.

3) **ज्ञानाग्निदग्धकर्माणम्:** ज्ञानी पुरुषाची सारी कर्मे ज्ञानरुपी अग्नीने जळून जातात म्हणजे शुभ कर्मे ज्ञानवंताला बंधनात अडकवत नाहीत. अकर्तेपणाचा अनुभव आहे ज्ञान आणि कर्तेपणाचा अनुभव आहे अज्ञान. अज्ञानी पुरुष स्वत:ला कर्माचा कर्ता मानतो. कर्तेपणामुळे बंधनरुपी बीज जळून न जाता कायमच रहाते. कर्तेपणाचा अनुभव जोवर कायम असतो तोवर जन्म-मरणाचे चक्र अखंडपणे जारी रहाते. मृत्युपर्यंत जर अकर्तेपणाचा अनुभव अबाधित राहिला तर ज्ञानरुपी अग्नी प्रकट झाला आहे असे समजावे. अग्नी प्रकट झाल्यामुळे कर्तेपणाचे बंधन आगीत जळून खाक होते.

या अध्यायाच्या 37 व्या श्लोकात ज्ञानरुपी अग्नी समस्त कर्मांना जाळून टाकते असे वर्णन आले आहे. इथेही हेच निवेदन आहे. यात काही फरक आहे का, असा सवाल जागतो.

विनोबांनी या प्रश्नाला सुरेख उत्तर दिले आहे. ते म्हणतात की ज्ञानाने तमाम कर्मे दग्ध झालीत याचा अर्थ बाहेरुन स्वधर्मरुपी कर्मे करत असतानाही ज्ञानाने त्याना निरुपद्रवी कर्मे बनवून काही न करण्याचा - अकर्तेपणाचा - अनुभव म्हणजे ज्ञान होय. इथे ज्ञानाचे हे स्वरुप वर्णिले आहे पण 37 व्या श्लोकात ज्ञानरुपी अग्नीने कर्मे दग्ध होण्याचे जे वर्णन आले आहे ते ज्ञानाच्या फळाला ध्यानी घेऊन आहे.

या श्लोकात ज्ञानाचे स्वरुप समजाऊन सांगितले आहे आणि 37 व्या श्लोकात ज्ञानाचे फळ. अशाप्रकारे 19 व्या आणि 37 व्या श्लोकात शब्द सारखाच असला तरी अर्थात थोडी भिन्नता आहे.

4) वरील तीन लक्षणे ज्याच्या ठायी दिसतील त्याला पंडित म्हणता येईल. आजकाल शास्त्राच्या ज्ञात्याला - प्रवचन करु शकणाऱ्याला स्पष्टीकरण करु शकणाऱ्याला पंडित मानले जाते. आचरणाचा विद्वत्तेशी अनिवार्य संबंध नाही मानला जात पण विद्वत्तेसोबत आचरणाचे सामंजस्य नसेल तर त्या विद्वत्तेचा समाजाच्या कल्याणासाठी वा उत्थानासाठी फारसा उपयोग नसतो. प्राचीनकाळी प्रचाराचे प्रमुख साधन आचरणच मानले जात होते. गुरुची व्याख्या **'शाब्दे परे च निष्णातम्'** अशी केली गेली जात होती. 'शाब्दे' म्हणजे शब्द ज्ञानात, समजावून सांगण्याच्या शक्तीत आणि 'परे' म्हणजे तो परमात्म्याच्या अनुभवात निष्णात असायला हवा. दोन्ही विद्यांमध्ये निष्णात असणाराच गुरु, पात्र वा अधिकारी मानला जात होता पण हळूहळू ही मान्यता बदलत गेली. प्राचीन काळी 'पंडित' शब्दाच्या व्याख्येत समजाऊन सांगण्याच्या शैली - शक्तीपेक्षा परमात्मविषयक अनुभवाला अधिक मोल होते. तेच उपदेश करण्याला अधिकारी होते. त्यानाच 'पंडित' वा 'शास्त्री' म्हटले जायचे. गीतेची ही हीच व्याख्या आहे **'तमाहु: पंडितं बुधा:'** या श्लोकातील लक्षणे ज्याच्या ठायी विद्यमान असतील त्या पुरुषाला ज्ञानी लोक 'पंडित' असे संबोधतात.

: 20 :

*त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रय: ।*
*कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति स: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: कर्मफलासंगं त्यक्त्वा:** जो (ज्ञानी पुरुष) कर्मफळांच्या आसक्तीचा त्याग करुन
- **नित्यतृप्त:** सदैव संतुष्ट, सदा परमात्म्यातच तृप्त असलेला आणि
- **निराश्रय:** सांसारिक आश्रय रहित रहातो
- **स: कर्मणि:** तो स्वधर्मरुपी कर्मात
- **अभिप्रवृत्त:** अपि: चांगल्या प्रकारे प्रवृत्त असूनही
- **किंचित् न करोति एव:** किंचितही काही करत नाही म्हणजे अकर्ता आहे.

**अर्थ**

जो पुरुष सर्व कर्मांमध्ये आणि त्यांच्या फळांमध्ये आसक्ती पूर्णपणे टाकून तसेच सांसारिक आश्रय सोडून देऊन परमात्म्यात नित्य तृप्त असतो तो कर्मांमध्ये उत्तम प्रकारे वावरत असूनसुध्दा वास्तविक काहीच करत नाही.

*नित्य-तृप्त निराधार न राखे फल-वासना*
*गेला गढूनि कर्मांत तरी कांही करी चि ना ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) ज्ञानीपुरुष कर्मफळाची आसक्ती सोडतो. (2) तो नित्य तृप्त व संतुष्ट रहातो. (3) तो आश्रयरहित असतो. (4) असा पुरुष कर्मात प्रवृत्त असतानाही अकर्ता असतो.

**स्पष्टीकरण**

1) **त्यक्त्वा कर्मफलासंगं:** कर्मफळाच्या आसक्तीचा त्याग ज्ञानी पुरुषाचे लक्षण होय. अकर्तेपणाच्या अनुभवाचे हे सहज लक्षण आहे की कर्मे आचरत असतानाही मनात कर्मफळाची वासना शिल्लक रहात नाही. अशी वासना बाळगणे अशक्य होऊन बसते. एकदा का अहंकार नष्ट झाला ना की मग अहंकाराने प्रेरित संकल्प, इच्छा-आकांक्षा, वासना-विकार हे नष्ट होणे अत्यंत स्वाभाविक आहे. अज्ञानी पुरुष स्वत:ला तमाम कर्माचा कर्ता मानतो यामुळे त्याच्या मनात स्वाभाविकपणेच कर्मफळाची इच्छा वासना रुपाने मूळ धरुन असते. यामुळेच अज्ञानीजन उत्साहाने आणि आनंदाने कर्मप्रेरित झालेले दिसतात. जोवर त्याला आत्मतत्वाचा स्पर्श होत नाही तोवर तो कर्मफळप्राप्तीच्या आनंदाला सोडू शकत नाही. कर्मफळाची वासना बाळगतो आणि कर्म करण्याच्या उत्साह आणि आनंदालाही तो सोडत नसतो. याउलट ज्ञानी पुरुषाला ईश्वरी स्पर्शातून लाभणाऱ्या आनंदाचा स्पर्श झाला असल्यामुळे तो क्षणिक आनंदाला नाकारतो. फळाची वासना आणि फळ-प्राप्तीतून लाभणारा आनंद क्षणिक असतो. आपण स्वेच्छेने कर्मे करु लागलो तर आनंद लाभ होतो, पण कर्म आचरताना अडी-अडचणी आल्यात तर आरंभीचा उत्साह आणि आनंद काही टिकत नाही. कर्म करताना आनंदाचे सतत साहचर्य हवे

असेल तर इच्छा-वासनेचा त्याग करुन कर्म करायला हवे. इच्छा-वासनेमुळे सुरुवातीला आनंद लाभेल पण तो नष्ट होऊ लागतो. इच्छा-वासनेचा त्याग करताना सुरुवातीला थोडा त्रास सहन करावा लागतो पण अखेरीस आनंदच आनंद उरतो. यामुळे कर्मफळाची वासना मनी बाळगून कर्म केल्यावर जो थोडा आनंदलाभ होईल त्यापेक्षा कर्मफळत्याग करुन कर्म केल्यावर तो कैक पटीने वाढलेला असेल हे अनुभवसिध्द सत्य आहे. बाराव्या अध्यायातील 12 व्या श्लोकात म्हटले आहे की **त्यागात् शांतिरनंतरम्** कर्मफळत्यागामुळे त्वरितच शांती लाभ होतो असे वर्णिले गेले आहे.

2) **नित्यतृप्त:** नित्य तृप्त असणे हे ज्ञानवंताचे लक्षण आहे. आनंदस्वरुप परमात्म्याचा अनुभव झाल्यामुळे तो अखंड आनंदात विहार करणे स्वाभाविक आहे कारण की त्याने फळाच्या आसक्तीचा त्याग केला आहे. एकीकडे परमात्म-अनुभवाचा आनंद आणि दुसरीकडे कर्मफळाच्या वासना-त्यागाचा आनंद. अशाप्रकारे होणाऱ्या दुहेरी आनंदलाभामुळे तो नित्यतृप्त असतो.

3) **निराश्रय:** ज्ञानी आश्रयरहित असतो. अज्ञान्याला नेहमी कुणाच्या-ना-कुणाच्या आधाराची-आश्रयाची गरज भासते. बाळपणी माता-पिता तर मोठा झाल्यावर मित्रांचा आधार लागतो. अनेकांना विद्याप्राप्तीचा आधार असतो. विवाह झाल्यावर नवरा-बायकोला एकमेकांचा आधार तर मुलं झाल्यावर त्यांचा आधार. धन मिळाल्यावर धनाचा आधार, पुढे वैभवाचा आधार. या तमाम गोष्टींमुळे कधीतरी वैराग्य जागते मग सद्ग्रंथांचा आधार. भाग्योदयाने संत लाभले तर सत्संती. यातून परमात्म-अनुभूती जागली तर मग ईश्वराचा आधार.

ईश्वराचा आधार अंतिम आधार होय. हा अतूट असतो. यातून अखंड शांतीचा लाभ होतो. बाकीचे सारे आधार क्षणिक होत. त्यातून ना शांतता लाभत ना अखंड आनंदाचा लाभ होत. यामुळे हे आधार एक-एक करुन सुटत जातात. ज्याला साक्षात् ईश्वराचाच आधार लाभला त्याला ग्निराश्रयीङ असे म्हणतात. याचा एक अर्थ असाही लावता येईल की ज्ञानवंताला ग्निश्चित आश्रयङ म्हणजे कायमचा - शाश्वत आश्रय लाभतो.

4) **कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित् करोति स:** कर्माच्या ठायी अभिप्रवृत्त झाल्यावर म्हणजे तल्लीन झाल्यावरही तो काही करत नाही. अकर्तेपणाचा सराव वा अनुभव त्याच्याठायी मुरुन इतका सहज स्वाभाविक बनून जातो की रात्रंदिन लोकसेवारत राहूनही त्याच्या चित्तावर कर्माचा कुठलाच परिणाम होत नाही. साधारण माणूस इंद्रियांच्या अधीन असल्यामुळे त्याचे चित्त परिणामशील असते. कुणी स्तुती-निंदा केली की झाला लागलीच परिणाम. निंदा ऐकून दु:ख तर स्तुती ऐकून सुख मिळेल. रस्त्यात एखादी दुर्घटना बघितली तर चित्तावर परिणाम झालाच म्हणून समजा. दिवसभर चित्तावर एकसारखा सुख-दु:खाचा भला-बुरा परिणाम होतच रहातो. रात्री झोपतानाही चित्तात स्वस्थता नसते कारण की दिवसभरची एखादी घटना चित्तावर सुख-दु:खात्मक परिणामाचा ठसा उमटवतेच. त्यासोबतच आपण झोपी जातो. गाढ निद्रेत मात्र सुख-दु:खाचा ठसा नसतो कारण त्या अवस्थेत आपण ईश्वराशी एकरुप होऊन जातो. स्वप्नात मात्र सुख-दु:खाचा परिणाम होतो, चित्त त्यातून मुक्त होऊ शकत नाही. जाग आल्यावर तर मात्र पुनरपि तेच चक्र भिरभिरत रहाते. अशाप्रकारे आमरण चित्त परिणामशील असते. अज्ञान दशेत यापासून मुक्त झाल्याचा अनुभव आपल्याला येत नसतो.

परमात्म्याचा अनुभव होताच चित्त अपरिणामशील बनते. ज्ञानी पुरुषाला परमात्म्याचा अनुभव असतो. परमात्म्याच्या ठायी आसनमांडी ठोकून तो शरीराने कर्मे आचरत असतो. यामुळे त्यावर कर्माचा बोजा पडत नाही. आपण सर्वजण कर्माचा बोजा अनुभवतो पण ज्ञानी पुरुषाला मात्र ते श्वासोच्छवासासारखे अखंड आणि विनासायास होत रहाते. तो मग त्याचा स्वभाव बनून जातो. त्याशिवाय त्याला जिवंत रहाणेही शक्य नसते.

'गीताई चिंतनिका' मधून विनोबा या श्लोकाबाबत लिहितात. (1) कर्म आरंभ करण्यासाठी कर्तेपणाची आकांक्षा मनात असते म्हणजे 'मी कर्माचा कर्ता आहे' असा संकल्प मनी असतो. (2) कर्मे करण्यासाठी साधनांचा आधार घ्यावा लागतो. (3) कर्माच्या साफल्यासाठी फळाच्या वासनेचीही गरज भासते. ज्ञानी पुरुषाच्या ठायी या तिन्ही बाबींचा अभाव असतो. या तीन बाबींचा अभाव म्हणून तो नित्यतृप्त असतो, निराश्रय असतो आणि मुख्य म्हणजे कर्म फलाच्या आसक्तीचा त्याग केलेला असतो.

पण या तीन बाबींचा अभाव असला तर ज्ञानी पुरुष कर्माच्या ठायी तल्लीन होऊन जातो हे या श्लोकात वर्णिले आहे, ते कसे? याचे उत्तर पुढील तीन श्लोकांमधून येते.

: 21 :

*निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।*
*शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **निराशी:** जे तृष्णा, आशा आणि वासनारहित होऊन गेले आहेत
- **यत-चित्तात्मा:** ज्यांनी आपल्या चित्तावर आणि इंद्रियांवर ताबा मिळवला आहे असे
- **त्यक्तसर्वपरिग्रहः** ज्यांनी (व्यर्थ असलेले भोगाचे संदर्भ) सारे परिग्रह सोडून दिले आहेत असे
- **केवलं शारीरं कर्म कुर्वन् अपि:** केवळ शरीरानेच अखंडपणे सत्कर्मे आचरुनही
- **किल्बिषं न आप्नोति:** कर्म-बंधनरुपी दोष (त्या ज्ञानी पुरुषाला) लागत नाहीत

**अर्थ**

ज्याने अंत:करण व इंद्रियांसह शरीर जिंकले आहे आणि सर्व भोग सामग्रीचा त्याग केला आहे असा आशा नसलेला मनुष्य केवळ शरीरासंबंधीचे कर्म करत राहूनही पापी होत नाही.

***संयमी सोडुनी सर्व इच्छेसह परिग्रह***
***शरीरें चि करी कर्म दोष त्यास न लागतो ।***

**विषय:** या श्लोकात ज्ञानी पुरुषाची पाच लक्षणे सांगितली गेली आहेत. (1) तो निराशी म्हणजे आशारहित असतो. (2) चित्त आणि तमाम इंद्रिये त्याच्या ताब्यात असतात. (3) तो सर्व प्रकारच्या अनावश्यक परिग्रहापासून मुक्त असतो. (4) स्वयं अकर्ता राहून देहानेच सत्कर्मे आचरतो आणि (5) त्याला कर्मबंधनाचा दोष लागत नाही.

**स्पष्टीकरण**

1) पहिले लक्षण **निराशी**: तो आशारहित असतो. आपण सारे आशा-अपेक्षानी युक्त असतो. आपण इतरापासून अपेक्षा करतो, एवढेच नव्हे तर आपल्या स्वत:पासूनही अपेक्षा असतात. कुटुंबातील सर्वाच्याच एकमेकापासून काही-ना-काही अपेक्षा या असतातच. संस्थात्मक जीवनातही संचालक आणि कर्मचारी परस्पर अपेक्षानी बांधील असतात. मालक-नोकर असो वा स्वामी-सेवक, पिता-पुत्र असो वा गुरु-शिष्य सारेच जण एकमेकापासून काही-ना-काही, कुठली-ना-कुठली अपेक्षा बाळगूनच असतात. आता योग्य अपेक्षा बाळगायला काही हरकत नाही. सेवाकार्यात मग्न ज्ञानीपुरुष देखिल अपेक्षा बाळगतात आणि ते काही वावगे नव्हे, त्या बाळगायलाच हव्यात पण अपेक्षाभावासोबत अपेक्षित आणि आवश्यक तटस्थभाव वा अनासक्ती राहिली नाही तर परिस्थिती नासून जाते. आसक्ती जागली की अशांतता आणि दु:ख जागलेच म्हणून समजा. आसक्तीमुळे इतराशी धडपणे व्यवहार करता येत नाही. आसक्ती षड् विकाराना उत्तेजित करते. आसक्तीचा प्रभाव समोरच्यावरही पडतो आणि उभयपक्षी षड् विकाराचे थैमान माजते. वातावरणात विकारांचा शिरकाव होतो आणि कुटुंब असो वा संस्था कलुषित होतात. यामुळे अपेक्षांवर अनासक्तीचा अंकुश हवा, नियंत्रण हवे. अपेक्षा तटस्थ वृत्तीच्या अधीन रहायला हवी. अनासक्ती आणि तटस्थ वृत्तीच्या प्रभावामुळे भोवतालचा परिसर शुध्द राहून चौफेर सुवास दरवळतो. यामुळे अपेक्षारहित असणे हे ज्ञानी पुरुषाचे लक्षण मानले गेले आहे.

2) दुसरे लक्षण आहे **यतचित्तात्मा**: चित्त म्हणजे मन. मन, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये अशी सारी मिळून अकरा होतात. आपले शरीर रथ. बुध्दी सारथी. लगाम मन. मालक आपण. रथात जुंपलेले घोडे म्हणजे इंद्रिय-समूह. घोड्याविना का रथ धावेल? इंद्रियरुपी घोडे धावतात पण उचित मार्गावरुनच धावतील हे काही सांगता येत नाही. ते कधी अडून थांबतील तर कधी रथ उलथा-पालथा करतील. यामुळे सारथी हवा आणि सारथ्याच्या हाती लगामही हवाच. अकरा इंद्रिये आणि बारावी बुध्दी. बुध्दीरुपी सारथ्याच्या ठायी निग्रहशक्ती आणि निर्विकार भाव म्हणजे विकार रहितता हवी, तेव्हा इंद्रियरुपी अश्वांवर काबू मिळवता येईल. बुध्दीने परमात्म्याच्या अधीन असावे. मनाने बुध्दीच्या अधीन असावे. इंद्रियानी मनाच्या अधीन असावे. अशाप्रकारे रथ धावला तर खचितच मोक्षाप्रत पोहोचेल. याउलट परिस्थितीत रथ खड्डयात जाऊन पडायचा.

3) तिसरे लक्षण आहे **त्यक्तसर्वपरिग्रहः** ज्ञानी सारे परिग्रह म्हणजे अनावश्यक परिग्रह त्यागून देतो.

भविष्यदर्शी दृष्टीमुळे माणूस परिग्रह वाढवत रहातो. भविष्यकाळी-वृध्दापकाळी निश्चिंतता असावी असे सर्वांनाच वाटते. लेकरांनाही उद्याचे जीवन सुकर व्हावे अशी काळजी सारेच घेतात. अशा प्रकारच्या परिग्रहात म्हणजे संग्रही वृत्तीत विषयोपभोगाची भावना वसते. समाजात शरीर श्रम टाळायची जी प्रवृत्ती जागली आहे ना ती संग्रहवृत्तीच्या मूळाशी आहे.

असंग्रहासोबत विनोबा परिश्रम वृत्तीलाही जोडतात. अनेक त्यागी जन असंग्रही असतात- अपरिग्रही असतात पण ते शरीर परिश्रमाचे व्रत घेतातच असे दिसून येत नाही. एवढेच नव्हे पण शरीर श्रम न करण्याला आपला हक्क मानतात. आपण प्रापंचिक नाहीहोत असेही त्यांचे म्हणणे असते. शरीर परिश्रम करणे हे तर प्रापंचिकाचे काम होय अशी त्यांची भावना आणि भूमिका असते. शेतकरी-मजूर कुठल्याही परिस्थितीत शारीरिक परिश्रमाचा त्याग करु शकत नाहीत. त्यानी त्याग करायलाही नको पण त्यागी असल्यामुळे ते प्रापंचिकांप्रमाणे शरीर परिश्रम न करता केवळ उपदेशच देत रहातील तर त्यांचे हे काम मिथ्या आहे.

गांधी-विनोबांनी प्रत्यक्ष आपल्या आचरणाद्वारे या खोट्या मान्यतेत बदल करण्याचे प्रयत्न केलेत. विनोबा म्हणतात की कर्म करण्यासाठी साधारणजन संग्रह करणे आवश्यक मानतात. एवढेच नव्हे पण संग्रह वृत्तीशिवाय कार्याचा विस्तार होणार नाही असे सार्वजनिक कार्यकर्त्यांचेही मत झाले आहे पण ज्ञानी पुरुष कर्मरत असतानाही आपल्या शक्तीनुसारच कर्माचा विस्तार करतो. साधनांचा कमीत कमी आणि गरजेइतकाच वापर करायचा तो प्रयत्न करतो.

4) चौथे लक्षण **शारीरं केवलं कर्म कुर्वन्:** असे की तो देहानेच सत्कर्मे करायचे ठरवतो. याचा अर्थ असा की अकर्ता बनून कर्मे करतो. देहाने कर्मे तर अज्ञानी जनही करतात. ज्ञानीमात्र शरीररुप बनून कर्मे करत नाही. देहाद्वारे कर्मे घटित होतात, सेवा घडते पण हे करत असताना कर्तेपणाचा भाव त्याच्या ठायी नसतो. चित्तात अकर्ताभाव असतो.

केवळ देहानेच कर्मे करतो याचा अर्थ संन्यासपरही लावला जातो. अर्थात् ज्ञानी पुरुष केवळ देहधारणेसाठी कर्मे आचरतो-शौच -स्नान - भोजन वगैरे करतो. ही कर्मे सुध्दा प्रारब्ध कर्मे क्षीण होईपर्यंत देहधारणेसाठी करावी लागतात. जीवंत रहाण्यासाठी लोकसेवेच्या कर्माची गरज नसते, आवश्यकता नसते. ज्ञान प्राप्त झाल्यावर कुठलेही कर्म करायची गरज उरत नाही. प्रारब्ध कर्मे त्यजून देऊन दुसरी कर्मे करायला लागला तर ती भोगायला त्याला पुनरपि दुसरा देह धारण करावा लागेल.

पण हा विचार चुकीचा आहे. शौच-स्नान-भोजन या कामांसारखेच लोकसेवेचे कामही त्याला अलिप्ततापूर्वक करता येईल. करणे शक्य होऊ शकेल. प्राप्त झाल्यावर अलिप्तता सर्वगामी, व्यापक स्वरुपाचीच उरते. तिथे कुठल्याही प्रकारचे भय उरत नाही. पोहणाऱ्याने जर कमरेइतक्याच पाण्यात पोहत राहिले आणि गहिऱ्या पाण्यात सुर मारला नाही तर त्याला धडपणे पोहता येत नाही असेच मानले जाईल ना ? ज्ञानी पुरुषच जर निष्क्रिय बनून जगत राहिले तर मग अज्ञानी जनांना अलिप्ततापूर्वक कर्मे करायचा पाठ कसा शिकवायचा ? अज्ञानी पुरुषांची आसक्ती, अज्ञान इत्यादी दोष दूर करण्याची जबाबदारी ज्ञानीजनांची लोकांची आहे. परिणामी ज्ञानी पुरुष निष्क्रिय नाही राहू शकत.

5) पाचवे लक्षण आहे **न आप्नोति किल्बिषं:** ज्ञानी पुरुष लोकसेवेचे कर्म अखंडपणे करतो तरी त्याला बंधनात फसावे लागत नाही. बंधन म्हणजे पाप. अर्थात् ज्ञानी पुरुषाला पाप लागत नाही असा काही अर्थ इथे नाही घ्यायचा, कारण पुण्यकर्माच्या उदयाने पाप कर्मे नष्ट होतात त्यासाठी आत्मज्ञानाची गरज नाही पण पुण्यकर्मेही आसक्तीच्या भावनेने केलीत तर ती बंधनकारी ठरतात ज्ञानी पुरुष तर पुण्यकर्मेच आचरतो, तो त्याचा स्वभावच असतो. त्याची अलिप्तता इतकी प्रखर असते की त्याला कर्मबंधने स्पर्श करत नाहीत.

: 22 :

*यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सर: ।*
*सम: सिध्दावसिध्दौ च कृत्वाऽपि न निबध्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदृच्छालाभसंतुष्ट:** जे सहज प्राप्त होणाऱ्या वस्तुत वा परिस्थितीत संतुष्ट रहातात

- **द्वंद्वातीतः** शीत-उष्ण, सुख-दुःख वगैरे द्वंद्वांचा ज्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही
- **विमत्सरः** जे ईर्ष्या - मत्सर रहित आहेत
- **सिध्दौ असिध्दौ समः** कर्म सफळ होवो वा निष्फळ, दोन्ही अवस्थेत जे समान असतात
- **कृत्वा अपिः** असे ज्ञानी पुरुष सत्कर्मे आचरतानासुध्दा
- **न निबध्यतेः** बंधनात फसत नाहीत

**अर्थ**

जे इच्छेशिवाय आपोआपच मिळालेल्या पदार्थात नेहमी संतुष्ट असतात, ज्याना मत्सर मुळीच वाटत नाही, जे सुख-दुःख इत्यादी द्वंद्वांच्या पूर्णपणे पार गेलेले आहेत, असे सिध्दीत आणि असिध्दीत समभाव राखणारे कर्मयोगी कर्मे करीत असून त्यानी बांधले जात नाहीत.

*मिळे तें चि करी गोड न जाणे द्वंद्व मत्सर*
*फळो जळो जया एक करुनि हि न बांधिला।*

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टींची चर्चा आली आहे. (1) सहज-विनासायास-आपोआप प्राप्त होणाऱ्या वस्तु वा परिस्थितीत जो संतुष्ट रहातो. (2) शीत-उष्ण, सुख-दुःख यासारख्या द्वंद्वांचा-विपरीत परिस्थितीचा-ज्यावर कुठलाही परिणाम होत नाही.(3) जो ईर्ष्या-मत्सर भावनेपासून मुक्त आहे. (4) जो कर्माचे फळ मिळो वा न मिळो ड्ढ सफल होवो वा असफल - दोन्ही स्थितीत समभावाने वर्ततो म्हणजे तटस्थ रहातो. (5) असा पुरुष सत्कर्मे करुनही कर्मबंधनात अडकत नाही - फसत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **यदृच्छालाभसंतुष्टः** ज्ञानी जनाच्या अकर्तेपणाच्या स्थितीचे हे वर्णन सुरु आहे. तो जी वस्तु वा जी परिस्थिति प्राप्त होईल त्यात संतुष्ट रहातो. कर्म करण्यासाठी तीन गोष्टी लागतात त्याचे जे विश्लेषण विनोबानी विसाव्या श्लोकात केले आहे ते आपण वाचले आहे.

या श्लोकासंबंधी विनोबांचे विवेचन असे आहे की सर्वसामान्य माणसाच्या मनात फळाची वासना असते, किंबहुना यामुळेच तो कर्माला प्रवृत्त होतो पण ज्ञानी पुरुषाला कर्मप्रेरणा काही फलासक्तीतुन लाभत नाही. फळाच्या वासनेसाठी रत कर्तेपणाची भावना असावी लागते आणि ती काही ज्ञानीजनांच्या ठायी असत नाही. देहरुपी देवळात विराजमान आणि देहात व्याप्त अशा परमात्म्याच्या ठायी ज्ञानी माणसाचा अहंभाव विलीन होऊन गेल्यामुळे ज्ञानी अकर्ता असतो आणि यामुळेच त्याच्या मनी कर्म करण्यासाठी फळाची वासना हे प्रेरक उरत नाही. ज्ञानी अंतर्यामी वसणाऱ्या ईश्वरी प्रेरणेने कर्मे आचरतो परिणामी फळाच्या वासनेच्या अभावी **यदृच्छालाभसंतुष्टः** आहे त्या स्थितीत संतुष्ट रहाण्याचा त्याचा सहज स्वभाव बनून जातो. यासाठी त्याला काही विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत, आहे त्यातच तो संतुष्ट रहातो.

प्रतिकुल परिस्थितीतच माणसाचा कस लागतो. अशा वेळी माणूस दबून जातो, हताश होतो. ईश्वराला शरण गेल्यावर परिस्थितीवर मात करणे शक्य होते. ईश्वरभक्त प्रतिकुल परिस्थितीतही दबत नाही, हरत नाही, निराश होत नाही, हताश होत नाही. प्रतिकूल परिस्थितीतही काही-ना-काही परिवर्तनासाठी प्रयत्नरत राहीलच. प्राप्त परिस्थितीला परमात्म-प्रेरित मानून संतुष्ट राहील. त्याचे मन अशांत वा व्याकु ळ होणार नाही.

2) दुसरे लक्षण आहे **द्वंद्वातीत**: ज्ञानी द्वंद्वांपासून मुक्त असतो. शीत-उष्ण, सुख-दुःख यासारख्या द्वंद्वांपासून मुक्त असतो. निसर्गात द्वंद्वे आहेतच पण यातही परमात्मा निवास करतो असे कळल्यावर ज्ञानी चित्त विचलित होऊ देत नाही. शांती कायम राखतो.

3) तिसरे लक्षण आहे **विमत्सर**: ज्ञानी मत्सरशून्य असतो म्हणजे ईर्ष्या-रहित असतो. ईर्ष्यावृत्ती शांततेला संपवून टाकते. ईर्ष्या रक्त जाळणारी असल्यामुळे भयंकर आहे. धोकेदायक आहे. ईर्ष्येला तर अजिबातच चित्तात स्थान देऊ नये. आपण कुणा-ना-कुणाशी मुकाबला करत असतो. मुकाबला कुणाशी? आपल्यापेक्षा अधिक सुयोग्य लोक असतात, त्यांच्याशी मुकाबला करुन काही उपयोग नाही कारण आपली शक्ती क्षीण आहे. यामुळे आपली योग्यता वाढवायला हवी. यात ईर्ष्या नसते. कमी योग्यतेच्या लोकांनी आपल्या पुढे जाता कामा नये या भावनेमुळेच ईर्ष्याभाव जागतो. या ऐवजी आपण दोघे विकास करु या अशी भावना जागली तर ईर्ष्या जागणारच नाही. कमी योग्यता असलेल्यानेही आपला विकास का करुन घेऊ नये? यामुळे 'मी पुढे जावे इतरानी कुणी पुढे जाऊ नये' ही संकुचित वृत्ती झाली. संकुचित वृत्ती देहबुध्दी झाली. व्यापक वृत्ती झाली आत्मबुध्दी. संकुचित वृत्तीमुळे ईर्ष्यावृत्ती पोसली जाते. त्यातून दुःख उपजते.

व्यापक बुध्दीने ईर्ष्यामुक्त झाल्यावर आनंद लाभ होतो. संतांचे वर्णन करताना तुलसीदासजी म्हणतात:

*निजगुन स्रवन सुनत सकुचाहीं।*
*परगुन सुनत अधिक हरषाहीं॥*

अर्थात् आपले गुण ऐकून खूप संकोच होणे व इतरांची गुणप्रशंसा ऐकून खूप हर्षित होणे हा गुण आणि ही वृत्ती चित्ताच्या ठायी विकसित केली तर ईर्ष्याभाव कदापि मनात उभा राहणार नाही.

4) चौथे लक्षण आहे **समः सिध्दौ, असिध्दौ चः** सिध्दी असो वा असिध्दी ज्ञानवंताची बुध्दी तटस्थ असते. सिध्दी म्हणजे कर्मफळ प्राप्ती आणि असिध्दी म्हणजे कर्माचे निष्फळ होणे. कर्म करायची दोन प्रेरक बळे असतात. एक म्हणजे मी कर्म करतो आणि दुसरे म्हणजे मी खूप कुशलतापूर्वक कर्म करतो. कुशलतेने कर्म करण्यात जेवढा आनंद मिळतो त्याहून कितीतरी पटीने अधिक आनंद 'मी केवढ्या कुशलतेने कर्म करतो' या कल्पनेने लाभतो. मला गाता येत असेल आणि मी माझ्या खोलीत बसून गात असेल तर मला आनंद मिळतो. ऐकणाऱ्यालाही आनंद मिळतो पण याहूनही 'आपण किती सुरेख गातो' या भावनेने अधिक आनंद मिळतो. मैफिलीत गायला मिळाले तर आपले गाणे सर्वांना ऐकता आले या कल्पनेने आनंद मिळतोच पण 'मी किती सुरेख गातो', 'मला कसं सुरेल गाता येते' या भावनेने कल्पनेनेही आनंद मिळतो. भगवंताची ही केवढी माया आहे. 'देव जर देहात नसेल म्हणजे प्रकट होणार नसतील तर देहाचे अस्तित्व उरणार नाही' हे काही संगीतज्ञाच्या ध्यानी येत नाही. भगवंतच नऊ महिन्यात **ठोक-ठाककर बीनी चदरिया** देहाची चादर विणतो आणि आयुष्यभर देहात वसतो यामुळेच आपण जगत असतो. शिव देहातून गेले की उरते ते शव. त्याला लगेचच जाळा वा पुरुन टाका. मृत देह काही संगीत गात नाही. यामुळे हे सुंदर गाणे मी गात नसून कंठात भगवंत बसून गातो यामुळे सुमधुर संगीत प्रकटते हा अनुभव यायला हवा पण जोवर सर्व कर्मे ईश्वरार्पण बुध्दीने करायचा सराव होत नाही तोवर परमेश्वरच सुरेल गातो हा विचार काही मनात टिकायचा नाही.

यामुळे आपण चांगले कर्म करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यातही अहं म्हणजे 'मी' पणाचीच प्रेरणा असते - ईश्वरी प्रेरणा नसते.

कर्म करण्यात जशी अहं प्रेरणा नांदते तशीच ती कर्माचे इच्छित फळ मला मिळायलाच हवे या आग्रहामागेही असते. संगीत शिकणे खूप कष्टसाध्य आहे. फळप्राप्तीसाठी आपण एवढे परिश्रम घेतो. संगीताच्या परीक्षेत केवळ उत्तीर्ण होण्यासाठी नव्हे तर प्रथम क्रमांक मिळवण्याचा आग्रह मनात वसतो. परीक्षा झालो की आनंद मिळतो. पहिला नंबर आला नाही याचे दुःख होते. आघात पोहोचतो. प्रयत्नापेक्षा फळ प्राप्तीचा आनंद मोठा असतो. परीक्षा उत्तीर्ण होणे वा पहिला क्रमांक पटकावणे यासारख्या ध्येयाने प्रेरित होऊन काम करण्यात काही वावगे नाही. असे उच्च ध्येय मनाशी ठेऊन संगीताचा अभ्यास करणे कर्तव्यही आहे पण फलप्राप्तीनंतर लाभणाऱ्या आनंदापेक्षा फळप्राप्तीसाठी तीव्रतेने केलेल्या कामात-प्रयत्नात आपल्याला अधिक आनंदलाभ व्हायला हवा.

वर्षभर सतत गाण्याचा सराव करावा. त्यातूनच आनंदलाभ करुन घ्यायचा. लक्ष देऊन आपण संगीताचा सराव केला तर यश लाभेलच. पास होऊच. पहिला क्रमांक मिळवूच पण उत्तीर्ण व्हायचे वा पहिला क्रमांक पटकावण्याचे ध्येय मनाशी असतानाही - बाळगतानाही संगीताच्या रोजच्या सरावातच अधिक आनंद मिळायला हवा. फळाबाबत नेहमी तटस्थ, समचित्त वा अनासक्तच रहायला हवे. असे झाले नाही तर दुःख उद्भवेल कारण कर्माचे फळ काही आपल्या इच्छेच्या अधीन नाही. फलप्राप्ती अनेक कारणांवर अवलंबित असते. कर्म करणे एवढेच आपल्या हाती असून फळ ईश्वराधीन आहे हा सिध्दांत ज्ञानी पुरुषाने आत्मसात केला आहे. यामुळे कर्म सफल होवो वा निष्फळ ज्ञानी याबाबत सम, तटस्थ वा अनासक्त असतो.

5) पाचवे लक्षण **कृत्वा अपि न निबध्यते**: अखंड कर्मरत राहूनही अकर्तेपण अनुभवताना कुठलेही बंधन ज्ञानी पुरुषाला नसते. कर्मे करत असतानाही तो कर्मात लिप्त होत नाही. आपल्या मनी कर्मफळाची आसक्ती नित्य वसल्यामुळे आपण कर्मात लिप्त होतो. यामुळे कर्मे आपल्याला बंधनात अडकवतात. अज्ञानी जनांच्या कर्म आचरण्याकामी ज्या तीन प्रेरणा कार्यरत असतात त्यापैकी तिसरी प्रेरणा आहे कर्मफळाच्या वासनेची. ज्ञानी पुरुषाच्या चित्तात फळाची वासना नसल्यामुळे तो अकर्ता बनतो. कर्मापासून अलिप्त रहातो.

:23 :

*गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतस: ।*
*यज्ञायाचरत: कर्म समग्रं प्रविलीयते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **गतसंगस्य:** ज्यांची कर्मफळांची आसक्ती नष्ट होऊन गेली आहे असे
- **मुक्तस्य:** जे कर्मांच्या बंधनातून मुक्त झाले आहेत असे
- **ज्ञानावस्थितचेतस:** ज्यांचे चित्त स्वरुपी स्थिर झाले आहे
- **यज्ञाय कर्म आचरत:** केवळ यज्ञासाठीच म्हणजे लोकसंग्रहासाठीच कर्मे करत असतानासुध्दा
- **समग्रं प्रविलीयते:** त्यांचे संपूर्ण कर्म पूर्णपणे ज्ञानाच्या ठायीच विलीन होऊन जाते, कर्म अकर्म बनून जाते

**अर्थ**

ज्याची आसक्ती पूर्णपणे नाहीशी झाली आहे, जो देहाभिमान आणि ममत्व यानी रहित आहे, ज्याचे चित्त नेहमी परमात्म्याच्या ज्ञानात स्थिर आहे, अशा केवळ यज्ञासाठी कर्मे करणाऱ्या माणसाची संपूर्ण कर्मे पूर्णपणे नाहीशी होतात.

*ज्ञानांत बैसली वृत्ति संग सोडूनि मोकळा*
*यज्ञार्थ करितो कर्म जाय सर्व जिरुनि तें ।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत (1) ज्याची कर्मफळासक्ती संपून गेली आहे. (2) जो कर्मबंधनानी पूर्णपणे मुक्त झाला. (3) ज्याचे चित्त स्वरुपात म्हणजे ज्ञानात स्थिर झाले. (4) जो यज्ञ म्हणजे परोपकारासाठी कर्मे आचरतो. (5) त्या ज्ञानी पुरुषाचे कर्म पूर्णपणे ज्ञानाच्या ठायीच एकरुप होऊन जाते. त्याला पुनर्जन्म नसतो.

**स्पष्टीकरण**

1) **गतसंगस्य:** ज्ञानी पुरुषाच्या तमाम आसक्ती नष्ट होऊन जातात मग ती फळासक्ती असो वा देहासक्ती, कुटुंबासक्ती असो वा सेवासक्ती का असेना.

एक त्यागी साधक होते पण त्यांची आसक्ती त्यांच्या लंगोटीतच होती. ते खूप काळापासून गांधीजींच्या समवेत रहात असत. आध्यात्मिक जिज्ञासेपोटी त्यानी 55 दिवसाचा उपवासदेखिल केला होता. अति उपवासामुळे त्यांचे बौध्दिक संतुलन डळमळीत झाले होते. याच काळात केवळ लंगोटी लाऊन ते हिमालय भ्रमणासाठी निघाले. चांगले वर्षभर हिंडून पुनरपि गांधीजींपाशी आले. एक वर्षभर त्यांचा आहार पीठ आणि कडू निंबाची पाने असा होता. ते भिक्षा मागून पीठ मिळवत. काही काळ त्यांनी आपले ओठ तांब्यांच्या तारेने शिवून घेतले होते. ते पीठ पाण्यात घोळून नरसाळ्याने नाकातून सेवन करत असत. अशाप्रकारे ते अन्न पोटात पोहोचवायचे.

वर्ध्याला येऊन गांधीजींची भेट घेईपर्यत त्यांचे बौध्दिक-मानसिक संतुलन डळमळीतच होते. गांधीजींनी त्याना खूप दूध पाजले. दूधामुळे बौध्दिक संतुलन कमावण्याकामी लाभ झाला. त्याकाळात ते लंगोटीच वापरत असत. सेवाग्राम आश्रमातल्या एकाच घरात गांधीजींसमवेत सर्व बंधु-भगिनींचा परिवार होता. रात्री अनेकदा लंगोटी विस्कटून जायची. मोठी चमत्कारिक अवस्था व्हायची. गांधीजींनी त्याना लंगोटीचा त्याग करायला सुचवले पण त्यांची लंगोटीत कमालीची आसक्ती होती.

एके दिवशी गांधीजींनी काही चर्चेसाठी विनोबांना बोलावले. भगिनींनी विनोबांना आग्रहपूर्वक सांगितले की या लंगोटीवाल्या बाबांना लुंगी गुंडाळायला सांगितले तर खूप बरे होईल. विनोबांनी त्यांची समजूत घातली पण ते बधले नाहीत हे गांधीजींना कळले. त्यांनी या सद्गृहस्थांना बोलावून सांगितले की त्यांचे व विनोबांचे एकमत आहे, त्यामुळे त्यांनी आपला हट्ट सोडावा. आता ते अडचणीत आले-आता त्यांना हा प्रस्ताव मानावाच लागला. त्या दिवसापासून त्यांनी लुंगी वापरायला सुरुवात केली खरी पण त्यांची लंगोटी बद्दलची आसक्ती मात्र दूर नाही झाली. आसक्तीचा परिणाम असा झाला की रात्री त्यांना सडकून ताप आला. ताप दोन-एक दिवस कायम राहिला. चित्त स्थिर झाले. तेव्हा कुठे ताप उतरला. आसक्ती कशी असते हे या उदाहरणावरुन ध्यानात यावे.

दुसरे एक गृहस्थ उरळीकांचन येथे राहत. ते केस वाढवत. दाढी मिशा राखत. ब्रह्मचारी होते पण केसात मोठी आसक्ती होती. एकदा मी त्याना बोललो' एखाद्या रात्री झोपेत असतानाच तुमचे केस कापून टाकले आणि दाढी मिशी छाटून टाकली तर तुम्ही काय कराल? 'ते म्हणाले की लागलीच दुसऱ्या दिवशी उरळीकांचन आश्रम सोडून मी निघून जाईन.

यावरुन हे ध्यानी यावे की आसक्ती काही फक्त पत्नी-मुले-घरदार यातच नसते तर ती कधी- कधी लंगोटी, दाढी-जटा यासारख्या विषयातही वसते पण ज्याची आसक्ती सर्वथा संपून गेली त्याला ज्ञानी म्हणावे.

2) यातून **ज्ञानी मुक्तस्यः** ज्ञानी हा बंधनमुक्त असतो. मनात वसणारी आसक्तीच बंधनरुप ठरते. ही आसक्ती मनातून सर्वथा दूर झाली तर मग माणूस मोक्षाचाच अनुभव घेऊ शकेल. आपले चित्त कुठे-ना-कुठे गुंतून असते. एकातून मन मुक्त झाले तर अन्यत्र गुंतून पडते कारण मनाला कुठला-ना-कुठला तरी आधार हवा. अज्ञानावस्थेत बाह्य वस्तुंचा आधार मनाला असतो. परमात्म्याचा आधार मिळाला तर मन बाह्य आधाराचा त्याग करील.

3) **ज्ञानावस्थितचेतसः** ज्ञानी पुरुषाला परमात्मज्ञानाचा आधार मिळून जातो. त्याचे चित्त ज्ञानाच्या म्हणजे परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊन जाते. ज्ञानेश्वर माऊली म्हणते की जीव आणि शिव दोघे एकाच स्थानावर वसले आहेत. म्हणजे आता दोघात कुठलाच भेद उरला नाही. जीवाने आपला जीवपणा सोडून देऊन शिवपणाचा स्वीकार केला आहे. परमात्मा तर आनंद सागर आहे. हा सागर हाती लागताच ज्ञानी पुरुष विषयांमध्ये गुंतुन पडत नाही. मनातल्या समस्त वृत्ती ईश्वराच्या ठायीच सामावून जातात, नद्या नाही का सागरात सामावत, अगदी तसेच.

4) चौथे लक्षण आहे **यज्ञायाचरतः कर्म-ज्ञानी** पुरुषाला आपल्या मोक्षाची तर काळजी उरलेलीच नसते पण चौफेर अज्ञान, दु:खात खितपत असणाऱ्या लोकांना बघून ज्ञान्याला आपल्या मुक्तीच्या आनंदात मस्त रहाता येते असे नाही घडत. तो जर आपल्या आनंदात मग्न झाला तर मग आनंदात आसक्त झाला असे म्हणावे लागेल. आपल्या प्रमाणेच सर्वानी दु:ख मुक्त व्हावे आणि बंधनमुक्तीचा आनंद प्राप्त करुन घ्यावा असेच ज्ञानीला वाटते. ज्याला दु:खातून मुक्त होण्याचा मार्ग लाभला त्याने तो सर्वांना दाखवावा.

5) पाचवी गोष्ट आहे **समग्रं प्रविलीयते:** ज्ञानी पुरुष कुठलेही कर्म करत नाही. त्याचे जीवन आणि जगणे सर्वासाठी असते. याचे कारण आहे प्रारब्ध कर्म. प्रारब्ध कर्म संपेपर्यत जगावे लागते. ज्ञानाच्या अग्नीने जेव्हा अज्ञान बीज जळून जाते मग जीवंत रहायचे कुठलेही कारण उरत नाही पण प्रारब्ध कर्मावर मात्र ज्ञानाची सत्ता वा नियंत्रण नसते कारण ज्ञान उपजण्यापूर्वीच्या या स्थिती होत. प्रारब्ध कर्माची चर्चा या अध्यायाच्या 37 व्या श्लोकात येईल.

ज्ञानीचे प्रारब्ध कर्म लोकांसाठीच शेष रहाते. ज्ञान प्राप्त झाल्यावर जर प्रारब्ध कर्म नसेल तर ज्ञानी जगू शकणार नाही आणि अज्ञानी जनांसाठी ज्ञान प्राप्तीचे द्वारच बंद होऊन जाईल. यामुळे ज्ञान प्राप्तीनंतर ज्ञानी पुरुषाच्या प्रारब्ध कर्माचे शिल्लक रहाणे सर्वासाठी उपकारकच आहे. तो लोकांसाठी अखंड कर्म करतो. ज्याचे कर्म ज्ञानातच विलीन होऊन जाते कारण की तो अकर्तावस्थेतच आरुढ होऊन जातो. अकर्मावस्था, अकर्तेवस्था ही ज्ञानावस्था आहे. या ज्ञानावस्थेत त्याची सारी सत्कर्मे, लोकसंग्रहाच्या कर्मातच समाप्त होऊन जातात म्हणून ती कर्मे ज्ञानी पुरुषाला बंधनकारक ठरत नाहीत. बंधनात अडकवत नाहीत.

विनोबांचे निवेदन असे की अज्ञानी पुरुषांच्या कर्म करण्यामागे तीन प्रेरणा कार्यरत असतात. कर्म करताना कर्तेपणाची आकांक्षा म्हणजे 'मी कर्म करीन' या कर्तेपणाच्या संकल्पासोबत त्याचे कर्म सुरु होते. कर्तेपणाची ही भावना ज्ञानीच्या कर्मात नसते हा मुद्दा या श्लोकातून चर्चिला गेला आहे. अज्ञानी माणसाला कर्म करण्यासाठी नाना प्रकारच्या साधनांचा आश्रय घ्यावा लागतो. त्याला साधनांचा मोह असतो. कर्मासाठी आवश्यक साधने तर ज्ञानी पुरुषालाही गोळा करावी लागतात पण अज्ञानी पुरुषाला मात्र नाना प्रकारची अनावश्यक साधनेही गोळा करावी लागतात. याचे कारण त्याच्या ठायी वसणारी रजोगुणाची प्रबळता. रजोगुणाचा स्वभाव नित्य घायाळ करण्याचा असतो. तो शक्तीपेक्षा अधिक कार्य करायला प्रवृत्त होतो. निरनिराळ्या प्रकारच्या अनावश्यक साधनानाही गोळा करण्याकामी तो प्रवृत्त होतो. ज्ञानी पुरुष निराश्रय असतो म्हणजे शक्तीनुसार तो आवश्यक साधनांचाच आश्रय घेतो. आपल्याकडून होईल तेवढे परिपूर्णरित्या करतो. कार्य वाढवण्याचा मोह त्याच्या चित्तात नसतो. ज्ञानी पुरुषाच्या या स्थितीचे वर्णन 21 व्या श्लोकात 'निराश्रय' या शब्दाने व्यक्त केले गेले आहे. कर्मे आचरत असताना अज्ञानी पुरुषाच्या मनात फळाची वासना असते. ज्ञानी पुरुष फळ-वासना-रहित असतो. ही स्थिती 22 व्या श्लोकात घ्यथा लाभ संतुष्ट:ङ या शब्दाद्वारे वर्णिली आहे. या प्रेरणा अज्ञानी पुरुषाच्या कर्मात असतात, ज्ञानी पुरुषाच्या नव्हे.

: 24 :

***ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।***
***ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्पणं ब्रह्म:** अग्नीत काष्ठ पात्रांनी वगैरे आहुती दिली जाते, ते साधन वगैरे ब्रह्म होय
- **हवि: ब्रह्म:** ज्या पदार्थांची आहुती दिली जाते ते तूप, दूध वगैरे ब्रह्म आहे
- **ब्रह्माग्नौ:** ज्यात आहुती अर्पिली जाते , तो अग्नीसुध्दा ब्रह्म आहे
- **ब्रह्मणा हुतं:** आहुती अर्पिणारा यजमानसुध्दा ब्रह्म आहे
- **ब्रह्मकर्मसमाधिना तेन:** अशा प्रकारे ब्रह्मरुप कर्मात ज्याची समाधी लागली आहे असा पुरुष
- **ब्रह्म एव गंतव्यं:** ब्रह्मरुपी फळच प्राप्त करतो

**अर्थ**

ज्या यज्ञात अर्पण म्हणजे आहुती दिली जाणारी काष्ठपात्रे वगैरेही ब्रह्म आहे आणि हवन करण्याजोगे द्रव्य सुध्दा ब्रह्म आहे, तसेच ब्रह्मरुप कर्त्याच्या द्वारे ब्रह्मरुप अग्नीमध्ये आहुती देण्याची क्रियाही ब्रह्म आहे, त्या ब्रह्म कर्मात स्थित असणाऱ्या योग्याला मिळण्याजोगे फळसुध्दा ब्रह्मच आहे.

***ब्रह्मांत होमिले ब्रह्म ब्रह्मानें ब्रह्म लक्षुनी***
***ब्रह्मीं मिसळलें कर्म तेव्हां ब्रह्म चि पावला ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत. (1) यज्ञाची साधने म्हणजे काष्ठपात्रे म्हणजे पळी आणि आहुती, अग्नी या तिन्ही गोष्टी ज्या पुरुषासाठी ब्रह्मरुप बनून गेल्यात, (2) यज्ञ करणारा यजमानही ब्रह्मरुप बनला. (3) अशा ब्रह्मरुप कर्मातच ज्याची समाधी लागली. (4) त्याला ब्रह्मरुपी फळच प्राप्त होते.

**स्पष्टीकरण**

1) **ब्रह्मार्पणं ब्रह्महवि: ब्रह्माग्नौ:** या तीन वस्तु असतात. ज्ञानी पुरुषाची अशी दृष्टी असते की यज्ञात प्रयुक्त पळी वगैरे साधनेसुध्दा ब्रह्मच आहेत. त्याच्या अंतिम स्थितीत सारे काही परमात्ममयच होऊन जाते. यामुळे यज्ञाच्या साधनानाही तो ब्रह्ममयच बघतो. आहुतीसुध्दा त्याला ब्रह्मच वाटते. ज्या अग्नीत आहुती अर्पायची तो अग्नीसुध्दा ब्रह्मरुपच दिसतो. यज्ञातल्या तमाम उपकरणामध्ये त्याला अशा प्रकारे ब्रह्म दर्शन होते.

ज्ञानी पुरुषासाठी सारेच ज्ञानमय, यज्ञमय, ईश्वरमय होऊन जाते. यामुळे यज्ञाची उपकरणे म्हणजे साधनेसुध्दा त्याला यज्ञरुपच वाटतात.

परोपकाराचे सारे कार्य हे परमात्ममय आहे अशी दृष्टी राखायला हवी. ज्ञानात म्हणजे अकर्तेपणात कर्म विलीन होऊन जाते याचा अर्थ या श्लोकातून सांगितला गेला आहे. गीताकालीन रुढ अशा यज्ञ संज्ञेच्या संदर्भातच गीतेचे स्पष्टीकरण आहे.

परोपकाराचे समस्त कार्य परमात्ममय असल्याची दृष्टी बाळगायला हवी. आपणही हळूहळू त्या स्थितीला प्राप्त व्हावे या भावनेनेच ज्ञानी पुरुषाच्या स्थितीचे वर्णन केले गेले आहे. ज्ञानी पुरुषाची सहज-स्वाभाविक अशी जी लक्षणे आहेत ती साधकाला म्हणजे मुमुक्षुला प्रयत्नपूर्वक मिळवावी लागतात - प्राप्त करुन घ्यावी लागतात. यत्नपूर्वक आत्मसात केलेली लक्षणे मग सहज-स्वाभाविक बनून जातात.

यज्ञाचा अर्थ आहे परोपकार. यज्ञाचा अर्थ प्राचीन काळी अग्नीत आहुती देणे असा होता. त्याकाळी आहुती देणे-लाकडे जाळणे परोपकाररुप होते म्हणजे यज्ञाचा परोपकार हा अर्थ प्राचीन काळीसुध्दा होताच, तरीही त्याची एक खूण म्हणून समिधा अर्पिल्या जात. गांधीजीनी सूत कताईला सूत्रयज्ञ म्हटले. विनोबांचा ‘सूत पंचविशी’ नावाचा निबंध आहे. यात सूत कातायच्या पंचवीस कारणांचा विचार केला आहे. जीवनाच्या अन्न आणि वस्त्र या दोनच मुख्य गरजा आहेत. अन्नाबाबत आपला समाज सदैव स्वावलंबी राहिला. सध्या जनसंख्येच्या विस्फोटामुळे अन्नधान्याची आयात करावी लागते, हा भाग वेगळा पण गांधीजींच्या काळात आपण स्वावलंबी होतो. वस्त्राबाबत ग्रामीण जनता पूर्णत: परावलंबी आहे. यांना स्वावलंबी बनवण्यासाठी गांधीजीनी सूत्रयज्ञाचा विचार मांडला. स्वत: गांधीजी नित्यनियमाने सूत्रयज्ञ करत.

या दृष्टीने या श्लोकाचा अर्थ असा होईल - अर्पण म्हणजे चरखा वगैरे साधने, हवी म्हणजे पेळू वगैरे,

परोपकार म्हणजे ग्रामीण जनाना स्वावलंबी बनवणे, गावाच्या सुखा व हितासाठी सतत त्यागासाठी सिध्द असणे हा जो परोपकार आहे तोच यज्ञीय अग्नी.

2) **ब्रह्मणा हुतम्:** हवन करणारा यजमानही ब्रह्मरुपच आहे. ज्ञानी पुरुषाची हीच भावना असते. अर्पण ब्रह्म म्हणजे चरखा यासारखी साधनेही त्याला ब्रह्मरुपच वाटतात. परोपकाररुपी अग्नी ब्रह्मस्वरुपच आहे. अशाप्रकारे या तीन साधनाबाबत ज्ञानी पुरुषाची ब्रह्मभावना म्हणजे परमात्म दृष्टी असते. पेळू, चरखा या खरे तर जड वस्तु आहेत पण ज्ञानी पुरुष त्यांच्या मूळाधाराला जाणतो आणि म्हणून तो जड वस्तुंमध्येही चैतन्यमय अशा परमात्म दृष्टीचेच दर्शन करतो. चैतन्यस्वरुप परमात्मा वा ब्रह्म हेच आकाश वगैरे समस्त वस्तुंचा मूलाधार आहे. अणु-रेणुत व्याप्त आहे. हा अनुभव ज्ञानी पुरुषाला झाला असल्यामुळे त्याला तमाम पदार्थ परमात्ममय म्हणजे ब्रह्ममयच वाटतात. परोपकार रुपी अग्नीच्या ठायी आपले उभे आयुष्य होमून देणारा यजमानही ब्रह्मरुपच आहे.

3) सर्वत्र परमात्म दर्शनाची दृष्टी विकसित झाल्यावर ब्रह्मरुप फळप्राप्ती होते. संपूर्ण जीवन ब्रह्ममय बनून गेल्यावर जीवनाचे अंतिम फळ ब्रह्मप्राप्तीच असू शकेल ना ?

4) चौथी गोष्ट आहे ब्रह्मरुप फळ प्राप्त करुन घ्यायचे कारण जाणून घ्यायला हवे. **ब्रह्मकर्मसमाधिन:** ज्याची ब्रह्मरुप कर्मातच समाधी लागून गेली ना त्याला ब्रह्मच प्राप्त होऊन जाते. सतत ब्रह्माचे स्मरण करणाऱ्याला ब्रह्मच प्राप्त होईल ना? समाधी दोन प्रकारची असते. एक पातंजल योगसमाधी. ही ठायीच बसून साधता येते. यात जगाचे भान उरत नाही. ही काही अंतिम समाधी नव्हे. विनोबांच्या भाषेत ही वृत्ती आहे, लय आहे, ही काही स्थिती नव्हे. स्थिती सदा कायम रहाते वृत्ती बदलती असते. काही दिवसासाठी वा काळासाठीच समाधी लावता येऊ शकते.

पण या श्लोकात घअखंडङ समाधीचे वर्णन आले आहे. ही कदापि खंडित होत नाही. हिला ना आरंभ ना शेवट. हिचा संबंध अनुभवाशी आहे. हिला इथे ब्रह्मकर्म समाधी असे म्हटले आहे. पातंजल समाधीसाठी तमाम क्रियांचा त्याग करावा लागतो. ही समाधी सर्व कार्य करत असताना अनुभवता येते.

दुसऱ्या अध्यायातल्या स्थितप्रज्ञ वर्णनाशी ही समाधी सुसंगत-समांतर आहे. दुसऱ्या अध्यायातील 54 व्या श्लोकात अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नात समाधी शब्द आला आहे. समाधिस्थ स्थितप्रज्ञाची लक्षणे काय? स्थितप्रज्ञाची लक्षणे ब्रह्मकर्म समाधीरत साधकाची आहेत. भेद दृष्टीमुळे कर्माचे बंधन येते. अभेद दृष्टी जागली की ब्रह्मदृष्टीचा अनुभव येतो. हा अनुभव आला की कर्माचे बंधन उरत नाही. 23 व्या श्लोकानुसार ज्ञानी पुरुषाचे कर्म ज्ञान स्थितीत म्हणजे ब्रह्ममय स्थितीत विलीन होऊन जाते अशाप्रकारे ब्रह्मकर्मात ज्याची समाधी लागून गेली म्हणजे कर्म करतानाही जो ब्रह्माच्या ठायी रममाण झाला त्याची सारी कर्मे ब्रह्मयज्ञरुप बनतात. पारमार्थिक सेवेची सारी कर्मे ब्रह्ममय बनून जातात.

: 25 :

***दैवमेवापरे यज्ञं योगिन: पर्युपासते।***
***ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अपरे योगिन:** काही दुसरे योगी
- **दैवं एव यज्ञं पर्युपासते:** परमात्म समर्पणयुक्त यज्ञाचीच उपासना करतात
- **अपरे:** आणि इतर, दुसरे (योगी)
- **ब्रह्माग्नौ:** ब्रह्मनिदिध्यासनरुप अग्नीत
- **यज्ञेन एव:** साधनेत सतत रममाण होऊनच
- **यज्ञं उपजुह्वति:** त्याचे साधनपण नष्ट करुन टाकते म्हणजे ब्रह्म निदिध्यासनाने साधनेला सहज बनवून टाकतात

**अर्थ**

दुसरे काही योगी देवपूजारुप यज्ञाचे उत्तम प्रकारे अनुष्ठान करतात, तर इतर योगी परब्रह्म परमात्मारुपी अग्नीत अभेददर्शनरुपी यज्ञाच्या द्वारेच आत्मारुप यज्ञाने हवन करतात. (परब्रह्म परमात्म्याच्या ठायी ज्ञानाद्वारे ऐक्यभावाने स्थित होणे, हेच घब्रह्मरुप अग्नीत यज्ञद्वारे यज्ञाचे हवन करणेङ होय.)

*देवताराधनें यज्ञ योगी कोणी अनुष्ठिती*
*ब्रह्माग्नींत तसे कोणी यज्ञें यज्ञत्व जाळिती ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे (1) काही योगीजन परमात्म्याप्रती आपले सबंध आयुष्य होमून देऊन परम तत्वाची उपासना करतात. (2) ब्रह्माच्या निदिध्यासनरुपी अग्नीत ब्रह्माचा निदिध्यास करतात. साधनाभाव आचरतात. साधनेच्या साधनपणाला होमून देतात म्हणजे आपल्या साधनेला सहज बनऊन टाकतात.

**स्पष्टीकरण**

24 व्या श्लोकात ज्ञानीच्या ब्रह्ममयतेचे - ब्रह्म - कर्म - कर्म समाधीचे वर्णन येते. तिथे ज्ञानी पुरुष लक्षण प्रकरण समाप्त होते. या श्लोकापासून एका नव्या प्रकरणाची सुरुवात होते. या प्रकरणाला 'विकर्म' वा 'यज्ञ' प्रकरण म्हणू या. 17 व्या श्लोकात गीता सांगते की कर्म, विकर्म आणि अकर्म याना जाणून घ्यायला हवे. कर्म म्हणजे स्वधर्मरुप बाह्य कर्म. तिसऱ्या अध्यायातून याची विस्तारपूर्वक चर्चा केली गेली आहे. या अध्यायात विकर्म आणि अकर्म यांच्या स्वरुपाचे वर्णन येते. या अध्यायाच्या सुरुवातीला भगवंताच्या दिव्य जन्म आणि कर्माची चर्चा येते. 18 ते 24 या सात श्लोकामधून कर्म करुनही अकर्मदशा म्हणजे अकर्तेपणाच्या अनुभव आणि लक्षणांचे वर्णन आले आहे.

25 व्या श्लोकात विकर्म म्हणजे विशेष कर्म म्हणजे आंतरिक चित्तशुध्दी साधणाऱ्या नाना प्रकारच्या साधनाविषयक कर्माचे निरुपण केले गेले आहे. या विकर्माला यज्ञ म्हटले गेले आहे. अशा प्रकारे नाना प्रकारच्या विकर्माचे म्हणजे यज्ञांचे वर्णन 25 ते 32 या आठ श्लोकामधून आले आहे. गीतेवर आजवर प्रकाशित कुठल्याही टीकाभाष्यातून हे खरे तर विकर्म प्रकरण असल्याचा पुसटसा उल्लेखही नाही. विनोबानी विकर्म या संज्ञेचा अर्थ "विशेष कर्म "म्हणजे आंतरिक चित्तशुध्दीकारक कर्म असा केला आहे. हा अत्यंत मौलिक अन् मार्मिक असा अर्थ आहे. 25 व्या श्लोकातून दोन प्रकारच्या यज्ञांचे वर्णन येते.

1) **दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासतेः विनोबा** म्हणतात की या श्लोकाच्या पहिल्या चरणात "समर्पण" यज्ञाची चर्चा येते. नवव्या अध्यायातील 26 व्या श्लोकात पुढे याच विषयाची चर्चा आहे. 26 व्या श्लोकातले विवेचन आहे की पत्र, पुष्प, फळ, जळ जे काही मला भक्तीपूर्वक अर्पित केले जाते, भक्तीने अर्पण केलेले ते मी स्वीकारतो. इथे याच समर्पण यज्ञाची चर्चा आहे. तसे पाहू गेल्यास समर्पण म्हणजे भक्तीविचार हाच गीतेचा सारांश आहे. भक्ती सुलभ उपाय असून संपूर्ण फळ देणारी आहे यामुळे आध्यात्मिक दृष्टीने बघू जाता भक्तीचे महत्व अनन्य आहे. भक्तीची तुलना इतर कुठल्याही आध्यात्मिक साधनाशी करता येत नाही. संत तुलसीदासजींनी भक्ती विचारालाच मुख्य मानत सांगितले आहे :

*तुलसीदास व्रत दान ग्यान तप सुध्दि हेतु श्रुति गावें।*
*रामचरन अनुराग नीर बिनु मल अति नास न पावें॥*

अर्थात् चित्तशुध्दीसाठी नाना प्रकारची व्रते, दाने, तपे, यज्ञे करावीत अशी श्रुतीची आज्ञा आहे पण रामचरणारविंदी अनुरागाशिवाय चित्ताची संपूर्ण शुध्दता होऊ शकत नाही. भगवंताला संपूर्ण क्रिया समर्पित करण्याचा जो भक्तियोग आहे तोच यज्ञ काही योगीजन करतात.

2) **ब्रह्माग्नौ अपरे यज्ञं यज्ञेन उपजुह्वति:** परमात्म तत्वाचेच निदिध्यासन करणे ब्रह्मरुपी अग्नी आहे. त्या अग्नीच्या ठायी ब्रह्मतत्वाचा निदिध्यास-त्याचे अखंड चिंतन जणू काही यज्ञ आहे. या यज्ञाने यज्ञाचा यज्ञभाव-यज्ञपणा-नष्ट करुन ब्रह्मचिंतन, ब्रह्म निदिध्यासरुपी आपल्या साधनेला सहज करुन घ्यायचे आहे. हीच ब्रह्म निदिध्यासनरुपी साधना या अग्नीत होमून द्यावयाची आहे.

याचा अर्थ सहज साधना करणे होय. संपूर्ण साधना आत्मसात करणे याचा अर्थ साधनेच्या साधनापणाला मिटवून टाकणे आहे. हेच या यज्ञाचे स्वरुप झाले. हा यज्ञ निर्गुण भक्तीचा आहे. विनोबानी गीतेच्या अध्यायांची संगती निश्चित केली आहे. अध्यायांची नावेही दिलीत. 6 ते 8 अध्याय निर्गुण भक्तीचे 9 ते 12 हे चार अध्याय सगुण भक्तीचे निदर्शक होत.

समर्पण यज्ञ सगुण भक्ती स्वरुप यज्ञ असून ब्रह्मचिंतनरुप यज्ञ निर्गुण भक्ती स्वरुप आहे. याला "सातत्य-योग" असे म्हणतात. या श्लोकात दोन यज्ञ म्हणजे दोन विकर्माची चर्चा आली आहे. सर्व क्रिया परमेश्वर चरणी समर्पित करुन देणे हे झाले पहिले विकर्म आणि ब्रह्माच्या निर्गुण-निराकार रुपाचे ध्यान करत साधनेचे भान विसरुन जाईपर्यत साधना करणे हे झाले

दुसरे विकर्म. ब्रह्मतत्वाचे असे काही ध्यान करणे की शेष सारे विचार गौण ठरावेत आणि ब्रह्मचिंतन-ब्रह्मतत्वाचे ध्यान हाच स्वभाव बनून जावा. या श्लोकाचा हा झाला एक अर्थ.

या श्लोकाचा दुसराही एक अर्थ आहे तो असा की पहिल्या चरणात निर्गुण भक्तीची चर्चा येते कारण त्यात देवता म्हणजे, परमात्म देवतेची उपासना सांगितली गेली आहे. परमात्म देवतेच्या ध्यानात काही योगी संपूर्णपणे निमग्न होऊन जातात असा अर्थ केला तर ते ध्यान योगी म्हणजे निर्गुण भक्त बनून गेले. पूर्वाध्र्दात निर्गुण भक्ती तत्वाचा विचार आला आहे. उत्तराध्र्दात सत्कर्मे आचरुन सारी सत्कर्मे ब्रह्मरुप अग्नीत समर्पण करणे म्हणजे ब्रह्मतत्वाला अर्पण करणे होय. विनोबांनी पूर्वाध्र्दात समर्पण यज्ञ व उत्तरार्धात निर्गुण भक्तीरुप अर्थ सांगितला आहे. अर्थात यात अर्थातला फरक नसून केवळ क्रमातला फरक आहे हे ध्यानी घ्यावे.

: 26 :

***श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।***
***शब्दादीन् विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अन्ये:** आणि दुसरे साधक, योगी वा मुमुक्षु जन
- **श्रोत्रादीनि इन्द्रियाणि:** कान, डोळे, नाक, जीभ, त्वचा या पंचेंद्रियांना
- **संयमाग्निषु:** संयम म्हणजे स्वाधीनतारुपी, निग्रहरुपी अग्नीत
- **जुह्वति:** होमून देतात, विषयांपासून परावृत्त करुन आपल्या वश करुन घेतात
- **अन्ये:** दुसरे साधक वा मुमुक्षु जन
- **शब्दादीन् विषयान्:** शब्द, रुप, रस, गंध, स्पर्श या पाच विषयांना
- **इन्द्रियाग्निषु जुह्वति:** इंद्रियरुपी अग्नीत होमून देतात

**अर्थ**

इतर काही योगी घ्कानङ इत्यादी इंद्रियांचे संयमरुप अग्नीत हवन करतात तर इतर योगी शब्द इत्यादी सर्व विषयांचे इंद्रियरुप अग्नीत हवन करतात.

***श्रोत्रादि इंद्रियें कोणी संयमाग्नींत होमिती***
***कोणी विषय शब्दादि इंद्रियाग्नींत अर्पिती ।***

**विषय:** या श्लोकात दोन विकर्मांची चर्चा येते. (1) काही साधक वा मुमुक्षु पंच ज्ञानेंद्रियांवर संयमाचा अंकुश ठेवून म्हणजे निग्रहरुपी अग्नीच्या ठायी समर्पण करुन रहातात. (2) अन्य साधक पंचविषयांना पंच ज्ञानेंद्रियांच्या ठायी समर्पित करुन रहातात.

**स्पष्टीकरण**

1) **श्रोत्रादीनीन्द्रियाणि अन्ये संयमाग्निषु जुह्वति:** काही साधक पंच ज्ञानेंद्रियांना सतत निग्रहात राखण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या अध्यायातील 59 व्या श्लोकात वर्णन येते की इंद्रियांवर संपूर्ण ताबा मिळवण्यासाठी काही साधक विषयांचा संपूर्णपणे त्याग करतात तरी विषयांच्या संदर्भातला रस आटत नाही. जोवर विषयाबाबतची वासना, अनुराग आणि आकर्षण कायम आहे तोवर विषयांचा त्याग झाला असे कसे मानता येईल?

याच अध्यायातल्या 60 व्या श्लोकात येते की इंद्रिये एवढी प्रबळ आहेत की थोडीशी शिथिलता असली तरी ज्ञानवंतांनाही त्वरित आपल्याकडे आकृष्ट करुन घेतात. यामुळे 61 व्या श्लोकात गीता उपाय सुचवते इंद्रियांचा संपूर्ण त्याग करण्याऐवजी त्यांचा संयमाने उपयोग करुन भक्तीचा आश्रय ग्रहण केला जावा. अशा प्रकारे बाहेरुन इंद्रियांवरील संयम आणि आतून ईश्वर भक्ती या दोन्ही उपायांनी इंद्रियांवर विजय संपादित करता येऊ शकतो.

2) दुसरे विकर्म आहे: **शब्दादीन् विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति** काही साधक पंच तन्मात्रांचा संपूर्णपणे त्याग करण्याऐवजी मर्यादित उपयोग करुन विषय वासनांवर विजय मिळवण्याचे प्रयत्न करतात. आत्मज्ञानाची प्राप्ती झाल्याशिवाय विषय वासनेचा क्षय होत नाही, हे आपण बघितले. विषयांच्या बाह्यत: त्यागातूनही विषयवासना क्षीण होत नाही, किंबहुना कधी-कधी वाढतेही. या विवेचनाचे सार असे की वासना क्षीण करण्यासाठी मर्यादित विषय-सेवनाचा मार्ग उपयुक्त आहे. विषयांच्या मर्यादित सेवनासाठी घ् संयम घ् या शब्दाचा वापर केला जातो. संयमासाठी पहिल्या चरणात विषय त्यागाच्या विकर्मासाठी घ् निग्रह घ् शब्दाचा उपयोग केला गेला आहे. निग्रह आणि संयम या दोन विकर्मांसोबत

ईश्वर भक्तीच्या विकर्माचा संयोग झाला तर निग्रह, संयम आणि भक्ती तिन्ही साधनांनी - तिन्ही विकर्मांनी विषय वासना क्षीण होऊ शकते.

: 27 :

*सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।*
*आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अपरे:** दुसरे साधक, योगी वा मुमुक्षु जन
- **सर्वाणि इन्द्रियकर्माणि:** सर्व इंद्रियांच्या कर्मांना
- **च प्राणकर्माणि:** आणि प्राण, अपान वगैरे वायुंच्या कर्मांना वा व्यापार म्हणजे व्यवहारांना
- **ज्ञानदीपिते:** विवेकरुपी ज्ञानाने प्रदीप्त म्हणजे प्रकाशित
- **आत्मसंयमयोगाग्नौ:** आत्मसंयमरुपी योगाच्या अग्नीत
- **जुह्वति:** होमून देतात, हवन करतात

**अर्थ**

अन्य योगी इंद्रियांच्या सर्व क्रिया आणि प्राणांच्या सर्व क्रिया यांचे ज्ञानाने प्रकाशित जो आत्मसंयमयोगरुप अग्नी त्यात हवन करतात. (सच्चिदानंदघन परमात्म्याशिवाय इतर कोणाचेही चिंतन न करणे, हेच त्या सर्वांचे हवन करणे होय.)

*प्राणेंद्रिय-क्रिया कोणी सर्व होमूनि टाकिती*
*चिंतनानें समाधींस अंतरीं चेतवूनियां ।*

**विषय:** 25 व्या श्लोकात दोन आणि 26 व्या श्लोकात दोन विकर्माची चर्चा आली आहे. या श्लोकात एकाच विकर्माचा उल्लेख आला आहे. समस्त इंद्रियांची कर्मे आणि प्राण, अपान वगैरे वायुंच्या व्यापाराना रोखून विवेकरुपी ज्ञानाने प्रज्वलित आत्मसंयमरुपी योगाग्नीत होमून देणे या विकर्माचे स्वरुप आहे. हे विकर्म समाधीरुप आहे. समाधीच्या विकर्मात चार गोष्टींचा अंतर्भाव होतो.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वाणि इन्द्रियकर्माणि:** सर्व इंद्रियांच्या कर्माना रोखणे. एका आसनावर स्थिर होऊन लावलेली समाधी योग दर्शनाची समाधी आहे. यात इंद्रियांच्या समस्त व्यापाराना रोखायचा अभ्यास करावा लागतो. दुसऱ्या अध्यायात वर्णित स्थितप्रज्ञाची समाधीवस्था तमाम क्रिया करुनही परमात्म्याच्या ठायी बुडून जायची-शून्य बनायची समाधी आहे. पतंजलीची समाधी स्थितप्रज्ञाच्या समाधीचा एक भाग-एक अंश-एक साधन आहे. ही समाधी प्राप्त करुन घेण्यासाठी काही पूर्वतयारी ही करावीच लागते. त्या पूर्वतयारीसाठीच पातंजल समाधीच्या यम-नियम यासारख्या आठ अंगांची चर्चा येते. यामुळे या समाधीला अष्टांगयोग समाधी म्हटले जाते. सहाव्या अध्यायात ही चर्चा येते. तो ध्यानसमाधीचा अध्याय आहे.

(या समाधीची आठ अंगे म्हणजे- यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी. यम पाच आहेत ते म्हणजे सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय आणि अपरिग्रह. याना पंच महाव्रतेही म्हणतात. आपल्या घ् मंगल प्रभात घ् ग्रंथातून गांधीजींनी याविषयी सुंदर विवेचन केले आहे. पतंजली योगसूत्रात या यमांची सविस्तर चर्चा सहाव्या अध्यायात आहे.

पतंजलींनी पाच नियमांची चर्चा केली आहे ती अशी- शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्रणिधान. यमासोबत हे नियमही गरजेचे आहेत. याविषयीचे स्पष्टीकरणही सहाव्या अध्यायात येते. तिसरे अंग आहे आसन आणि चौथे प्राणायाम. पाचवे अंग आहे प्रत्याहार. प्रत्याहार म्हणजे बघूनही न बघणे, ऐकूनही न ऐकणे, शीत-उष्ण स्पर्श झाल्यावरही काही विशेष न वाटणे.

या पाचांचा एक विभाग बनतो. उरलेली धारणा, ध्यान आणि समाधी मिळून दुसरा विभाग बनतो. दोन्ही मिळून अष्टांग-आठ अंगे. धारणा म्हणजे मनाला ईश्वर-चिंतनात निमग्न करुन देणे होय. ईश्वर विषयक चिंतनामुळे मनातले प्रापंचिक विचार थांबून जातात. ईश्वराच्या चिंतनात निमग्न व्हायचा अभ्यास झाला तर मग ईश्वर स्वरुपात निमग्न-होण्याची मनोभूमिका तयार होऊन जाते. तसे तर ईश्वरी चिंतनात निमग्न होणे आणि ईश्वर स्वरुपात निमग्न होणे या दोघांमध्ये अंतर आहे. ईश्वर चिंतनात निमग्न होण्याचा अर्थ आहे ईश्वरविषयक विचारांच्या चिंतनात लीन होणे होय. ईश्वर स्वरुपात निमग्न होणे म्हणजे ईश्वर स्वरुपाच्या अनुभवायला मिळणाऱ्या शांत-प्रत्ययात चित्ताला निमग्न करणे होय, ईश्वरस्वरुपाच्या एका शांत प्रत्ययात निमग्न

होण्याला "ध्यान" असे म्हणतात. ध्यानानंतर जागते समाधी. समाधी अवस्थेत ईश्वर स्वरुपात तल्लीन होण्याचा असा गहिरा अनुभव जागतो की देहाचे भान उरत नाही. देहाच्या एखाद्या अवयवाला कापून काढले तरी पत्ता लागत नाही. समाधी-अवस्थेतून पुनश्च जागृत अवस्थेत आल्यावर देहाचे भान येते.

धारणा, ध्यान आणि समाधी या तीन अंगांना पतंजलीने घ् संयम घ् असे म्हटले आहे. यम-नियमानी साधना करुन तमाम इंद्रियांच्या व्यापारांना थांबवले जाते.)

2) दुसरा मुद्दा प्राणाच्या व्यापारांना बंद करुन देण्याचा आहे. समाधीसाठी इंद्रिय व प्राणांच्या व्यापारांना बंद करुन द्यावे लागते. सहाव्या अध्यायात आसन कसे लावावे? त्यावर कसे बसावे? हे सांगितले गेले आहे. तिथे प्राण-व्यापार बंद करण्याविषयी चर्चा आलेली नाही. या श्लोकात या मुद्द्याचा ऊहापोह आला आहे. यासाठी प्राणायामाचा अभ्यास लागतो. कित्येक साधक प्राणायाम-परायणच असतात. ते यापुढच्या कक्षेत नाही पोहोचू शकत. त्यांची चर्चा या अध्यायातील 29 व्या श्लोकात आली आहे. या श्लोकात समाधीच्या विकर्माची चर्चा असल्यामुळे प्राणायाम साधुन प्राणांच्या तमाम व्यवहाराना बंद करुन देण्याची चर्चा आली आहे.

3) तिसरा मुद्दा आहे इंद्रिये आणि प्राणांच्या तमाम व्यापारांना रोखून **आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति** आत्मसंयमरुपी अग्नीच्या ठायी त्या इंद्रिय आणि प्राणांच्या व्यापाराना होमून देणे. आत्मसंयम म्हणजे पतंजलीच्या मते धारणा, ध्यान आणि समाधी. या तिघाच्या एकीकरणासाठी 'संयम' शब्द येतो. इथे गीतेने संयमापूर्वी आत्म आणि अखेरीस योग शब्द जोडून 'आत्मसंयमयोग' असा अभिनव शब्द तयार केला आहे.

4) मग या पातंजल समाधीच्या मागे गीतेने 'ज्ञानदीपिते' शब्दही जोडला. पातंजल समाधी काही पूर्णावस्था नाही त्यासोबत ज्ञानरुप दीपही हवा. ज्ञान म्हणजे व्यापक परमात्म स्वरुपाचे ज्ञान होय. हे ज्ञान जागृत अवस्थेतच होऊ शकते आणि अखंड टिकणारे असते पण पातंजल समाधी मात्र अखंड टिकणारी नसते. काही काळासाठी आत्म्याच्या ठायी निमग्न होण्याची ती स्थिती आहे. समाधीसोबत ज्ञान जोडले की समाधीची अपूर्णता संपून जाते. यामुळे हा झाला योग.

अशाप्रकारे **ज्ञानदीपिते आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति** याचा अर्थ ज्ञानाने प्रकाशित आत्मसंयम आणि समाधीसोबतच्या ज्ञानामुळे-ज्ञानरुपी प्रकाशामुळे साधला जातो तो योग. काही लोक या ज्ञानाने प्रकाशित झालेल्या समाधी योगरुपी अग्नीच्या ठायी आपली इंद्रिये आणि तमाम प्राणांना क्रियांना होमून देण्याचा प्रयत्न समाधी लावण्याचे प्रयत्न करतात. समाधी लागल्यावर काही काळ समाधी अवस्थेत रहायचा अभ्यास करतात. हे झाले विकर्माचे वर्णन.

: 28 :

*द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे।*
*स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतय: संशितव्रता: ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **द्रव्ययज्ञा:** काही साधक ईश्वरार्पण बुध्दीने लोकसेवेत द्रव्यखर्च करणारे (यज्ञ) करतात
- **तपोयज्ञा:** काही साधक तपोयज्ञ करतात
- **तथा अपरे:** तर काही साधक
- **योगयज्ञा:** योग यज्ञ करतात
- **च स्वाध्यायज्ञानयज्ञा:** आणि काही साधक स्वाध्याय आणि ज्ञान-यज्ञ करतात
- **संशितव्रता: यतय:** हे सारे यज्ञ करणारे तीव्र व्रतधारी, संन्यासी वा संयमशील वा याज्ञिक आहेत असे जाण

### अर्थ

काही पुरुष द्रव्यविषयक यज्ञ करणारे असतात. काहीजण तपश्चर्यारुप यज्ञ करणारे असतात, तसेच दुसरे काहीजण योगरुप यज्ञ करणारे असतात, कितीतरी जण अहिंसा इत्यादी कडक व्रते पाळणारे यत्नशील पुरुष स्वाध्यायरुप ज्ञानयज्ञ करणारे असतात.

*द्रव्यें जपें तपें योगें चिंतनें वा अशापरी*
*संयमी यजिती यज्ञ व्रतें प्रखर राखुनी।*

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत 1) द्रव्य यज्ञ, 2) तपोयज्ञ, 3) योगयज्ञ, 4) स्वाध्याय यज्ञ, 5) ज्ञानयज्ञ आणि 6) या पंच यज्ञरुपी विकर्माची साधना करणाऱ्या तीव्र व्रतधारींचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **द्रव्य यज्ञः** द्रव्य यज्ञ हे विकर्माचे प्रकरण आहे. या विकर्मात येणाऱ्या विविध प्रकारच्या साधनाना यज्ञ म्हटले जाते. हे अनेक प्रकारचे यज्ञ वा चित्तशुध्दीकारक विकर्मच आहेत, असे समजायला हवे.

विनोबांनी या श्लोकाचा अर्थ असा केला आहे की 25 ते 27 या श्लोकात चित्रित केलेले पाच प्रकारचे यज्ञच इथे वेगळ्या नावानी चित्रित केलेत. द्रव्ययज्ञ म्हणजे 25 व्या श्लोकातील देवताराधनरुप यज्ञ होय. जीवनरुपी द्रव्याने परमेश्वराची पूजा करणे हा द्रव्ययज्ञ होय. व्यापक भाषेत हा ईश्वर समर्पण योग होय. नवव्या अध्यायातील 26 व्या श्लोकात हाच मुद्दा येतो. पत्र, पुष्प, फळ, जळ जे काही मला भक्तीभावाने अर्पण केले जाते ते मी आनंदपूर्वक ग्रहण करतो असे यात वर्णन येते.

विनोबांनी आठव्या अध्यायाला 'सातत्य योग' हे नाव दिले आहे. आधी ईश्वराचे सतत स्मरण करत रहायला हवे त्यानंतर कर्म समर्पणाचा 'समर्पण योग' साधला जातो. नववा अध्याय 'समर्पण योग' आहे. द्रव्ययज्ञ म्हणजे धनसंपत्ती वगैरे नसून जीवनद्रव्य म्हणजे क्रिया समर्पणाचा यज्ञ होय.

2) दुसरा यज्ञ **"तपोयज्ञ".** काही साधक तपरुपी यज्ञ करतात. या संबंधी विनोबा म्हणतात की इंद्रियांचा विषयांशी होणारा संबंध त्यजून संयमरुपी अग्नीच्या ठायी इंद्रियांचा होम करुन त्याना शुध्द करुन इंद्रियविजय मिळवणे आवश्यक आहे. सहाव्या अध्यायात याचे स्पष्टीकरण आले असून याला ब्रह्मचर्य व्रत असे म्हटले गेले आहे. इंद्रियांवर विजय मिळवण्यासाठी संयम हवा. इंद्रियांना ताब्यात ठेवण्यासाठी हवा निग्रह. निग्रह नित्याची वस्तु नसून नित्याची वस्तु आहे संयम. अर्थात संयम नित्याची वस्तु बनावा यासाठी काही निग्रहाचा अभ्यास करणे म्हणजे निग्रहात सातत्य ठेवणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ कताई शिकण्यासाठी आरंभी रोज सात-आठ तास अभ्यास करावा लागतो. त्रासही होतो. हा निग्रहाचा अभ्यास होय. अशाप्रकारे विषयांचा इंद्रियांशी असलेला संबंध सोडण्याचा अभ्यास निग्रह आहे. यामुळे संयम जागतो. संयमामुळे इंद्रिये शुध्द होतात. त्यांच्यावर विजय मिळतो. याला तपोयज्ञ असे म्हणतात.

3) तिसरा यज्ञ **योगयज्ञः** विनोबा म्हणतात की इंद्रिये विशुध्द बनल्यावर आणि त्यांच्यावर विजय प्राप्त केल्यावर त्यांचा पारमार्थिक सेवेसाठी उपयोग करुन घेणे म्हणजे योगयज्ञ होय. पारमार्थिक सेवा करणाऱ्याने इंद्रियांवर विजय संपादन करणे आवश्यक आहे. या अभावी परमार्थ सेवा घडत नाही. विनोबा याला 'ब्रह्मचर्याची साधना' म्हणतात. पारमार्थिक सेवा आणि ब्रह्मचर्य साधना यांचा घनिष्ठ संबंध आहे, हाच तपोयज्ञ होय. तपोयज्ञ म्हणजे ब्रह्मचर्याची साधना न करणाऱ्यांचे प्रापंचिक जीवनावरही नियंत्रण रहात नाही. संतानांवर मर्यादा घालता न आल्यामुळे त्यांचे प्रापंचिक जीवन त्याना गिळून टाकते. प्रपंचात फसून ते सेवेत अयशस्वी बनतात. यामुळे तपोयज्ञानंतर पारमार्थिक सेवेच्या या 'योगयज्ञा' ची चर्चा केली गेली आहे. चित्ताच्या समतेला, निर्विकारितेला गीतेने योग म्हटले आहे पण चित्ताची समता आणि निर्विकारिता इंद्रिय निग्रह वा ब्रह्मचर्य साधनेविना साधू शकणे अशक्य आहे. अशाप्रकारे ब्रह्मचर्याची साधना आणि त्या माध्यमातून पारमार्थिक सेवाकार्याला योगयज्ञ म्हटले आहे.

4) चौथा आहे **स्वाध्याय- यज्ञ** 25 व्या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात याचा उल्लेख आला आहे. स्वाध्याय यज्ञाला जप-यज्ञ असेही म्हटले जाते. विनोबा म्हणतात- स्वाध्याय यज्ञ म्हणजे **जप यज्ञ** म्हणजे मनात साधनेचे निरंतर ध्यान असणे, एकच लय लागणे. याचा बाह्य परिणाम असा होतो की वाणीच्या माध्यमातूनही नाम जप जारी राहील, मनात तर तो अखंडपणे चालू राहीलच. मनात अखंड नामजप असणे हा मुख्य भाग आहे. आत जर नामजप सुरु असेल तर वाणीने नामजप करायची गरज उरत नाही. आत अखंड नामजप सुरु असेल तर बाहेर आपोआप भजन, प्रार्थना व्हायला लागते. गीता, ब्रह्मसूत्र, ज्ञानेश्वरी, रामायण यासारख्या आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यासही होऊ लागतो. या आध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनाने आंतरिक विचाराना स्पष्टता लाभते. सगुण, निर्गुण, ब्रह्म, माया, वैराग्य, योग, तप, ज्ञान कर्मफळांचा त्याग, अभ्यास यासारख्या अनेक शब्दांचा-संज्ञांचा- नेमका अर्थ उकलू लागतो. साधनेचे स्वरुपही ध्यानात येते.

5) पाचवा यज्ञ **ज्ञानयज्ञ** होय. विनोबांच्या मते याचे वर्णन 27 व्या श्लोकात येते. याला विनोबा चिंतन यज्ञ असेही म्हणतात. यात आतून आपण स्वत: अकर्ते असल्याचा अखंड अनुभव येतो पण अशा अनुभवाच्या प्राप्तीसाठी ब्रह्मतत्वाचे चिंतनरुप ध्यान गरजेचे आहे. ब्रह्मतत्वाच्या ध्यानाने समाधी लाभ होऊ शकतो. तशी पातंजल समाधीची गरज नाही पण प्रयत्न केल्याने या ज्ञान यज्ञाच्या माध्यमातून तीही प्राप्त होऊ शकते पण ज्ञान प्राप्तीचा उद्देश गौण मानून काही सांगता येत नाही. पातंजल समाधीमुळे सिध्दी प्राप्त होऊ शकतात आणि साधक पथभ्रष्टही होऊ शकतो. सिध्दींच्या जंजाळात फसल्यावर वैभव, कीर्ती वगैरे मिळू शकेल. त्याच्या ठायी चित्त आसक्त झाले तर परमात्म तत्वाचे ज्ञान लाभू शकणार नाही. यामुळे 27 व्या श्लोकात 'ज्ञानदीपिते' या शब्दाचा उपयोग केला जाणे फार गरजेचे होते. अर्थात् त्याचा अर्थ 'परिपूर्ण ज्ञानावस्था' असा नसून 'परिपूर्ण ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ज्ञान वा विवेक याचा अभ्यास' असा आहे.

पाच यज्ञांचा वेगळा अर्थ असा आहे.

1) **द्रव्ययज्ञ:** आपल्यापाशी धनसंपदा असेल तर तिचा वापर जनसेवेसाठी करणे द्रव्ययज्ञ होय. अधिकाधिक संपत्तीदान करावे. प्राचीन काळी दानाचा महिमा फार मोठा होता. दान प्रक्रियेत गुप्त दानाला श्रेष्ठ दान मानले जाई. दानाचा हा पुरातन संस्कार आजदेखिल कायम आहे. ज्यांच्या ठायी या दानवृत्तीचा आत्यंतिक उत्कर्ष दिसून येतो त्यांच्या ठायी "दानाचा विकर्म "चित्तशुध्दीचे साधन बनू शकतो. यातून हळूहळू स्वार्थवृत्ती क्षीण झाल्यावर ममत्व आणि अहंकार रहीत बनता येऊ शकते.

2) **तपोयज्ञ:** सतराव्या अध्यायात कायिक, वाचिक आणि मानसिक तपांची चर्चा येते. कायिक म्हणजे शारीरिक तप. देव म्हणजे भक्त, द्विज म्हणजे सज्जन, गुरु म्हणजे मार्गदर्शक. प्राज्ञ म्हणजे संत - यांची सेवा, शारीरिक-मानसिक शुध्दी. ऋजुता म्हणजे सरळता, ब्रह्मचर्य पालन. अहिंसा म्हणजे कुणाला शारीरिक त्रास न देणे, हे शारीरिक तप आहे. दुसऱ्यांना दु:ख होईल अशी भाषा न बोलणे, सत्य, प्रिय व दुसऱ्यांसाठी कल्याणकारी भाषा वापरणे आणि धार्मिक ग्रंथांचे अध्ययन हे झाले वाचिक तप. मनाची प्रसन्नता नित्य कायम ठेवणे, मनात सौम्य म्हणजे मृदु कोमल भाववृत्तींची जोपासना, कठोरभाव नसणे म्हणजे कदापि उत्तेजित न होणे, मौन पाळणे म्हणजे परमेश्वर-चरणी लीन होणे, मनात निग्रही, विशुध्द आणि निर्मळ भावना जोपासणे मानसिक तप. अशाप्रकारे तीन प्रकारचे तप करणारे साधक तपाच्या विकर्माचा जीवनात दाखल करुन चित्त शुध्द करुन घेतात.

3) **योगयज्ञ:** योग म्हणजे चित्ताची समता, निर्विकारिता होय. स्वधर्माचे पालन करतानासुध्दा काम वगैरे विकारांमुळे दु:ख सोसावे लागते. या विकारांमुळेच स्वस्वरुप म्हणजे ईश्वरस्वरुपाचा अनुभव होत नाही आणि जोवर ही अनुभूती होत नाही तोवर बंधनातून मुक्तीही लाभत नाही. यामुळे कित्येक साधक 'योग साधनेचे विकर्म' साधण्याचा प्रयत्न करतात.

4) **स्वाध्याय यज्ञ:** बंधनातून मुक्ती मिळवण्यासाठी व परमात्म स्वरुपाची ओळख पटवून घेण्यासाठी नित्य स्वाध्याय करायला हवा. शारीरिक स्नानाप्रमाणे मानसिक स्नानही गरजेचे आहे. शरीरावर मळ साचतो तसा मनावरही विकारांचा मळ साचतो. सृष्टीशी आपला नित्याचा संबंध आहे. आपण काही-ना-काही कार्य करतच असतो. लोकांशी कार्याच्या दृष्टीनेही आपला संबंध येतो. मनावर काम-क्रोधाच्या लाटा उसळत रहातात. मनावर साचणाऱ्या मळाची पुटे नित्य काढून टाकलीत तर तो घट्टपणे बिलगून रहात नाही. यासाठी स्वाध्याय अत्यंत गरजेचा आहे. स्वाध्यायासोबत प्रार्थना, भजने यांचा भक्तीभाव वृध्दींगत करायच्या दृष्टीने खूप लाभ होऊ शकतो.

5) **ज्ञान यज्ञ:** ज्ञान म्हणजे अंतिम ज्ञान नव्हे. ज्ञान म्हणजे 'आत्म व अनात्म विवेक' ज्ञान शब्दात परमात्म-चिंतनाचाही समावेश आहे. देह आणि आत्म्याचे भिन्नत्व आधी नीटपणे समजून घ्यायला हवे मग देहातले आत्मतत्व आणि ब्रह्मांडातील परमात्म तत्वाचा परस्पर संबंध, त्यांचे ऐक्य योग्य प्रकारे जाणून घ्यायला हवे. ब्रह्म, माया, प्रकृती, सगुण, निर्गुण या सवांची नेमकी उकल झाल्यावर मग आत्म-अनात्म-विवेकाचा जागर होऊ शकतो. यासाठी वैराग्याचा अभ्यास आवश्यक आहे. याशिवाय देहाला आत्म्यापेक्षा भिन्न समजण्याचा अभ्यास होऊ शकत नाही. चित्तशुध्दीसाठी ज्ञानाचा अभ्यास आवश्यक असल्यामुळे त्याला विकर्म म्हटले गेले आहे.

6) हे सारे विकर्मरुपी वेगवेगळे आंतरिक यज्ञ करणारे तीव्र व्रतधारी होत. त्यागी जीवन घालवणारे असल्यामुळे याना 'याज्ञिक' ही म्हटले जाते. हे संन्यासीजन होत. विकर्माची साधना करणाऱ्या या साधकांना गीता 'यती' म्हणते.

: 29 :

***अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे।***
***प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अपरे:** काही अन्य साधक वा मुमुक्षु जन
- **अपाने:** अपान वायुत (जो श्वास आत घेतो त्यात)
- **प्राणं:** प्राण वायुचा (जो श्वास सोडतो त्याचा)
- **जुह्वति:** होम करतात म्हणजे पूरक नावाचा प्राणायाम करतात
- **तथा प्राणे अपानं:** तसेच प्राणवायुत अपान वायुचा
- **(जुह्वति):** होम करतात म्हणजे रेचक नावाचा प्राणायाम करतात
- **प्राणापानगती रुद्ध्वा:** प्राण आणि अपान वायुची गती रोखून काही साधक वा मुमुक्षु जन
- **प्राणायामपरायणा:** प्राणायामात परायण असतात

**अर्थ**

अन्य काही योगीजन अपानवायुमध्ये प्राणवायुचे हवन करतात. तसेच दुसरे योगी प्राणवायुमध्ये अपानवायुचे हवन करतात.

***होमिती एकमेकांत कोणी प्राण-अपान तें***
***रोधूनि गति दोहोंची प्राणायामास साधिती।***

**स्पष्टीकरण**

या श्लोकात प्राणायाम या एकाच विकर्माचे वर्णन आले आहे. प्राणायाम तीन प्रकारचे असतात. पतंजलीच्या अष्टांगयोगात यम, नियम, आसन आणि प्राणायाम असा क्रम येतो. समाधीत प्राणायामाला फार महत्व आहे. समाधी काळात प्राण आणि अपान म्हणजे श्वास आणि उच्छवास इतके शांत होऊन जातात की नाडी हाती लागत नाही. हृदय गतीही शांत होऊन जाते. शरीर मृतवत् होऊन जाते. तरी देखिल श्वासोच्छवासाचा सूक्ष्म व्यापार देहांतर्गत सुरुच असतो. शरीर प्रेतासारखे गार होत नाही. समाधी काळात देहात कमीत कमी घर्षण होत असल्यामुळे तीन दिवसांच्या वा चाळीस दिवसांच्या समाधी काळातही अन्न-पाण्याची गरज नसते. समाधी अवस्थेत एकाग्रतेची पराकाष्ठा असते. एखाद्या विषयात चित्त एकाग्र झाले तर श्वासोच्छवास खूप धीमे होतात.

परमात्मा अतिशय सूक्ष्म आहे. आपल्या सभोवार पसरलेल्या सृष्टी जगतात आढळणाऱ्या स्थूल-सूक्ष्म पदार्थांच्या तुलनेने आकाश अत्यंत सूक्ष्म आहे पण परमात्मा आकाशाहूनही सूक्ष्म आहे. कबीर म्हणतो की पुष्पाच्या सुगंधाहूनही तो पातळ-सूक्ष्म आहे. या अतिसूक्ष्म परम तत्वाच्या ठायी चित्ताला अति एकाग्र करुन द्यायचे आहे. निमग्न करुन द्यायचे आहे. श्वासोच्छवासाच्या गतीवर नियंत्रण राखल्यावर हळूहळू समाधी अवस्था प्राप्त होऊ शकते. तुलसीदास म्हणतात :

***सुमिरत हरिहिं साँस गति बाधी।***
***सहज विमल मन लागि समाधी॥***

अर्थात् हरिचे स्मरण करताच श्वासाची गती शांत झाली आणि मन आत्यंतिक शुध्द झाल्यामुळे सहजच विनासायासाने समाधी लागली.

अशाप्रकारे श्वासोच्छवासाचा संबंध समाधीशी असल्यामुळे प्राणायामाचा अभ्यास गरजेचा होऊन बसतो.

प्राणायामाचा अभ्यास काही फार सोपा नाही. यात अडचणीही आहेत. कुणी चुकीच्या पध्दतीने प्राणायाम करायचे ठरवले आणि दम्याला बळी पडलेत. यामुळे प्राणायामाचा अभ्यास कुणा कुशल आणि अनुभवी मार्गदर्शकाच्या सल्ल्यानुसारच केलेला बरा.

पूरक, रेचक, कुंभक या प्राणायामच्या तीन क्रिया आहेत. या श्लोकात आधी पूरक प्राणायामाची चर्चा आली आहे. आत घेतल्या गेलेल्या श्वासाला 'अपान' म्हणतात. उच्छवासाला 'प्राण' म्हणायचे. अपानवायुत प्राणवायुचे होम करणे पूरक होय. आत घेतलेल्या श्वासाला बाहेर न सोडणे म्हणजे आतल्या आत होमून देणे. या प्रक्रियेत खूप मंदपणे श्वास घ्यायचा असतो. एकाग्रतेच्या

समयी श्वसनाची गती मंद होत असल्याचे आपण आता बघितलेच आहे.

मंद गतीने श्वास घ्यायचा सराव करायला हवा. अशाच प्रकारे बाहेर सोडल्या जाणाऱ्या बायुला मंद गतीने सोडायचा सराव केला तर प्राणवायुत अपानवायुचा होम होतो. याला 'रेचक' म्हणतात. अशा प्रकारे या श्लोकाच्या पहिल्या चरणात पूरक आणि रेचक असे दोन प्रकारचे प्राणायाम सांगितले गेले आहेत. दुसऱ्या चरणात चर्चा येते 'कुंभक' ची. प्राण आणि अपान या दोघांची गती रोखण्याला रेचक असा प्राणायामाचा क्रम आहे.

या तिघात कुंभक अवघड. त्याला किती काळ रोखून ठेवायचे हे योग्य प्रकारे ठरवले जायला हवे. न कळून घेता प्राणायाम करणे जोखिमीचे आहे. एकाग्रतेतही विक्षेप येण्याची शक्यता आहे. प्राणवायुचे एकूण प्रकार पाच. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान. प्राण म्हणजे उच्छवास, श्वास बाहेर सोडणे. अपान म्हणजे श्वास-वायु आत घेणे. शारीरिक परिश्रम करताना काही काळ श्वास रोखून धरावा लागतो ते व्यान. मृत्युसमयी देहातून निघून जाणारा प्राण उदान होय. शरीरात अन्नरसाला समानपणे पोहोचवणाऱ्या प्राणवायुला समान म्हणायचे.

: 30 :

*अपरे नियताहारा: प्राणान् प्राणेषु जुह्वति ।*
*सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषा: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अपरे:** आणि काही अन्य साधक वा मुमुक्षु जन
- **नियताहारा:** आहारविषयक नियमन करुन वा उपवास करुन
- **प्राणान् प्राणेषु:** सर्व इंद्रियांना इंद्रियरुपी अग्नीत
- **जुह्वति:** होमून देतात
- **एते सर्वे अपि:** हे सारे साधक वा मुमुक्षु जनही
- **यज्ञविद:** यज्ञाला योग्य प्रकारे जाणणारे
- **यज्ञक्षपितकल्मषा:** आणि या विकर्मरुपी यज्ञांनी ज्यांची पातके क्षीण झाली आहेत असे आहेत

**अर्थ**

त्याचप्रमाणे इतर कितीतरी नियमित आहार घेणारे प्राणायामाविषयी तत्पर पुरुष प्राण व अपानाची गती थांबवून प्राणांचे प्राणातच हवन करतात. हे सर्व साधक यज्ञांच्या द्वारे पापांचा नाश करणारे व यज्ञ जाणणारे आहेत.

***प्राणांत होमिती प्राण कोणी आहार तोडुनी***
***यज्ञ-वेत्ते चि हे सारे यज्ञानें दोष जाळिती ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत (1) काही साधक आहार विषयक नियमन करतात म्हणजे अन्नसेवन खूप अल्प प्रमाणात करतात वा दीर्घ उपवास करतात. (2) इंद्रियाना इंद्रियांच्या ठायी होमून देतात म्हणजे इंद्रियांकडून जर काही पापकर्म झाले तर प्रायश्चित घेऊन ते पापकर्म जाळून टाकतात.(3) या विकर्मरुपी यज्ञांना करणारे यज्ञाला जाणतात आणि (4) या विकर्मरुपी विविध यज्ञांच्या माध्यमातून आपल्या दोषांना-पापांना क्षीण करुन टाकतात.

**स्पष्टीकरण**

1) या श्लोकात **अपरे नियताहारा:** आहार नियमन म्हणजे उपवासाचे वर्णन आले आहे. या श्लोकाचा शंकराचार्य, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक आणि गांधीजी या चौघांनी केलेला अर्थ समाधानकारक नाही, केवळ विनोबानी लावलेला अर्थ समाधानकारक आहे. अनेक साधक आपल्या आयुष्यात काही गंभीर-नैतिक स्वरुपाची चूक करुन बसतात. लहान-मोठे दोष तर जीवनात घडतच असतात. त्याना क्षीण करायचे प्रयत्न नेहमी करायला हवेत पण नैतिक दृष्ट्या अध:पतन झाले तर साधनेत मोठा अडथळा येतो. अशा नैतिक गंभीर दोषांसाठी प्रायश्चित्त हाच एक उपाय आहे.

सर्वात मोठा नैतिक दोष तर स्त्री सहवास आहे. ब्रह्मसूत्रात चर्चा उपस्थित केली गेली आहे की नैष्ठिक ब्रह्मचारीने स्त्री-सहवासाचे पातक केले तर त्याला प्रायश्चित्त घेता येते की नाही? याबाबतीतला पूर्वपक्ष असे म्हणतो की नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याने जर स्त्री-सहवास केला तर त्याच्यासाठी केवळ देहान्त प्रायश्चित्त हेच एकमेव प्रायश्चित्त आहे. घ् उपकुर्वाण ब्रह्मचारी घ् जर असेल

म्हणजे गुरुगृही राहून जो ब्रह्मचर्याचे पालन करत असेल त्याच्या हातून स्त्री-सहवासाचे पातक झाले तर तो नैष्ठिक ब्रह्मचारी नसल्यामुळे त्याच्यासाठी गृहस्थाश्रमाचा स्वीकार करु शकतो पण ज्याने आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा घेतली आहे अशा नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याला मात्र प्रायश्चित्त केवळ एकच आणि ते म्हणजे देहान्त शासन.

पण या तर्काच्या संदर्भात उत्तरपक्षाचे निवेदन असे आहे की नाही, नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यासाठीही प्रायश्चित्त हे आहेच. स्मृतीत असे सांगितले आहे की त्याने तीन दिवस एकदा भोजन, तीन दिवस पाण्याचा उपवास, तीन दिवस भिक्षान्न ग्रहण अशाप्रकारे दर महिन्यातले बारा दिवस हा क्रम वर्षभर आचरावा, हे प्रायश्चित्त आहे.

दुसरे प्रायश्चित्त आहे चांद्रायण व्रताचे. पौर्णिमेच्या दिवशी फक्त पंधरा घास मग कृष्णपक्षात चंद्राच्या घटत्या कलेनुसार रोज एक-एक घास कमी करत जायचा मग शुक्लपक्षात पौर्णिमेपर्यंत एक-एक घास वाढवत जायचा. हा उपवास महिनाभर वा कितीही महिने करावा. हे प्रायश्चित्त थोड्या अवघड उपवासासारखेच आहे.

आपल्या दोषांसाठी जसे प्रायश्चित्त घेतले जाते तसे इतरांच्या दोषांबाबतही प्रायश्चित्त घेता येते. आपल्या निकटवर्ती कुणाचे नैतिक अध:पतन झाले तर तो आपला दोष मानायचा. आपली अपूर्णता मानायचे. आपल्या चित्तशुध्दीत उणीव असल्यामुळे निकटवर्तियाकडून अपराध घडला असे मानून काही दिवस उपवास करावा. या काळात ईश्वर स्मरण वाढवून वृत्तींना अंतर्मुखी करुन विकारांपासून वाचण्याचा-दूर रहाण्याचा-प्रयत्न करायचा. अशा प्रायश्चित्तामुळे आपली स्वत:ची, निकटवर्ती व्यक्तीची आणि पर्यायाने समाजाची उन्नती होईल.

गांधीजीनी आपल्या आणि समाजाच्या चित्तशुध्दीसाठी प्रायश्चित विचाराला खूप महत्व दिले. उदाहरणार्थ कुणा दांपत्याने वानप्रस्थाश्रमात प्रविष्ट होऊन ब्रह्मचर्य जीवनाला आरंभ केला. परस्पर बंधु-भगिनीच्या नात्याने राहू लागले. चार-पाच वर्षे हे नाते टिकले. पुढे ब्रह्मचर्य भंग पावले. या दोषाच्या प्रायश्चित्ताप्रीत्यर्थ उपवास वा अल्पाहाराचे व्रत असू शकेल.

याचा अर्थ असा की लहान-मोठ्या नैतिक अध:पतनाच्या निमित्ताने प्रायश्चित्त घेण्याचे शास्त्राने घालून दिलेले नियम समाजोन्नतीसाठी अत्यंत उपकारक आहेत. या श्लोकात सांगितले आहे की काही साधक नैतिक स्खलनाच्या दोषाच्या वेळी आहारावर नियंत्रण ठेवतात- काही काळ आहार सेवन करत नाहीत किंवा काही दिवस वा काही महिन्यापर्यंत अल्प आहाराचे सेवन करतात. हाही या श्लोकातील आहार नियमन वा उपवासाचा अर्थ होतो.

2) अशा प्रकारे आहारावर नियंत्रण ठेऊन **प्राणान् प्राणेषु जुह्वति:** तमाम इंद्रियांना इंद्रियांच्या ठायी होमून देतात म्हणजे तमाम इंद्रियाना संपूर्णपणे काबूत राखून प्रायश्चित्तद्वारा आपल्या नैतिक दोषाना दग्ध करुन टाकतात.

एकदा झालेले दोष पुनरपि न करण्याचा निश्चय झाला तर मग प्रायश्चित्त घ्यायची गरज उरत नाही, असेही काही लोकांचे म्हणणे आहे. दोष पुन्हा होऊ नयेत यासाठीच तर प्रायश्चित्त घ्यायचे असते ना ? हा त्यांचा तर्क आहे. हा विचार अगदीच निरर्थक आहे असे नाही पण प्रायश्चित्तात पश्चात्तापही आला. आपल्या दोषांबाबत ज्यांच्या मनात तीव्र पश्चात्ताप जागतो तेच स्वत:ला काही शिक्षा करुन घ्यायला तयार होतात. भविष्यात दोष घटित होऊ नये हा निश्चय आणि कृतदोषांसाठी ज्ञ् घडून गेलेल्या दोषांसाठी - थोडी शिक्षा - असा दुहेरी हेतु प्रायश्चित्त घेण्यामागे असतो. यामुळे छोट्या-मोठ्या नैतिक दोषांसाठी छोटे-मोठे प्रायश्चित्त घेण्याचे शास्त्र-विधान स्वीकारण्यायोग्य आहे.

3) तिसरा मुद्दा असा की या तमाम विकर्माची साधना करणारे साधकही यज्ञ स्वरुपाला जाणणारेच समजायला हवेत. यज्ञाचे स्वरुप जाणणारे म्हणजे काही केवळ यज्ञाचे ज्ञान असणारेच नव्हेत. इथे असा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे की यज्ञ म्हणजे काय? यज्ञाचे स्वरुप कसे? छोटे मोठे आंतरिक विकर्म यज्ञरुपी त्या विकर्मांना अमलात आणण्याचा संपूर्ण प्रयत्न करणे ज्ञ् हे सारे यात येतात.

4) चौथा मुद्दा आहे **यज्ञक्षपितकल्मषा:** याज्ञिक कुणाला म्हणावे? हा आहे. या प्रश्नाचे उत्तर असे की यज्ञामुळे म्हणजे आंतरिक चित्तशुध्दी करणाऱ्या अनेक विकर्मामुळे - ज्यांचे दोष क्षीण झालेत ते सारे याज्ञिक होत. 25 ते 30 या सहा श्लोकात विनोबांच्या मते सात विकर्माची चर्चा येते. 28 व्या श्लोकातल्या पाच विकर्मांना स्वतंत्र मानले तर ही संख्या बारा होते. 25 व्या श्लोकात 1) निर्गुण भक्ती 2) सगुण भक्ती, 26 व्या श्लोकात 3) इंद्रिय निग्रह 4) इंद्रियांचा संयम, 27 व्या श्लोकात 5) ज्ञान-चिंतनयुक्त पातंजली समाधी, 28 व्या श्लोकात

6) संपत्ती दान 7) कायिक-वाचिक आणि मानसिक असे तीन प्रकारचे तप. 8) चित्ताची समता, निर्विकारतारुपी योग, 9) स्वाध्याय, 10) आत्मानात्मविवेकरुप ज्ञान, 29 व्या श्लोकात 11) प्राणायाम, 30 व्या श्लोकात 12) नैतिक दोषांना उपवास वा प्रायश्चित्ताच्या माध्यमातून क्षीण करणे. अशाप्रकारे बारा विकर्मांची साधना करुन चित्ताच्या मळाला स्वच्छ करणारे सारे साधक यज्ञाला जाणणारे मानले जातील. यज्ञामुळे त्यांच्या चित्ताचे मळ धुतले जातात.

: 31 :

*यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।*
*नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्य: कुरुसत्तम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यज्ञशिष्टामृतभुज:** अनेक प्रकारचे विकर्मरुपी यज्ञ करुन जे काही शेष उरते म्हणजे चित्तशुध्दी होते आणि त्यातून जे आत्मज्ञान प्राप्त होते त्याला भोगणारे पुरुष
- **सनातनं ब्रह्म:** सनातन ब्रह्माला म्हणजे मोक्षाला
- **यान्ति:** प्राप्त करुन घेतात
- **कुरुसत्तम:** हे कौरवांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना
- **अयज्ञस्य:** जे विकर्मरुपी यज्ञ करत नाहीत त्या पुरुषांना
- **अयं लोक:** न अस्ति: इहलोकी सुख-शांतता लाभू शकत नाही
- **कुत: अन्य:** मग अन्यत्र म्हणजे परलोकी शांतता कशी बरे लाभू शकेल ?

**अर्थ**

हे कुरुश्रेष्ठ अर्जुना, यज्ञातून शिल्लक राहिलेल्या अमृताचा अनुभव घेणारे योगी सनातन परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात. यज्ञ न करणाऱ्या पुरुषाला हा मनुष्यलोक सुध्दा सुखदायक होत नाही, तर परलोक कसा सुखदायक होईल?

*यज्ञ-शेषामृतें धाले पावले ब्रह्म शाश्वत*
*न यज्ञाविण हा लोक कोठूनि पर-लोक तो ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) विकर्मरुपी चित्तशुध्दीकारक यज्ञ नाना प्रकारचे आहेत. त्याना आचरुन ज्यांनी आपली चित्तशुध्दी पूर्णपणे साधून घेतली आहे आणि आत्मज्ञान प्राप्त झाल्यामुळे तृप्त झाले आहेत. 2) ते सनातन ब्रह्मतत्वाला म्हणजे मोक्षाला प्राप्त होतात. 3) चित्तशुध्द करणाऱ्या विकर्मांचे आचरण न करणाऱ्याना या लोकी शांतता लाभत नाही. 4) अशांना मग परलोकात शांतता कशी बरे लाभेल?

**स्पष्टीकरण**

1) **यज्ञशिष्टामृतभुज:** तिसऱ्या अध्यायाच्या 13 व्या श्लोकात **यज्ञशिष्टाशिन: संतो** शब्द आला आणि पुढे **मुच्यन्ते सर्वकिल्बिषै:** 'यज्ञ' शब्द आला. हा शब्द नवव्या श्लोकात आरंभी येणाऱ्या स्वधर्मरुप त्यागमय यज्ञ प्रकरणाच्या संदर्भात आला. इथे त्यागवृत्तीने स्वधर्माचरण करण्याला यज्ञ म्हटले आहे. अशाप्रकारचे यज्ञमय जीवन घालवणारे समाजासाठी आदर्शरुप ठरतात आणि अनेक पातकांपासून मुक्त होतात पण इथे यज्ञ संज्ञेचा अर्थ वेगळा आहे. आंतरिक चित्त शुध्दीकारक अनेक प्रकारच्या विकर्मांना इथे यज्ञ म्हटले गेले आहे. याचे वर्णन 25 ते 30 या श्लोकात आले आहे. थोडक्यात म्हणजे तिसऱ्या अध्यायात 13 व्या श्लोकात प्रयुक्त 'यज्ञ' बाह्यस्वधर्मस्वरुपी आहे तर या श्लोकात प्रयुक्त 'यज्ञ' आंतरिक चित्तशुध्दीकारक आहे. मोक्ष प्राप्तीसाठी जे साधक या विकर्मरुपी यज्ञाचे अनुष्ठान करतात त्यांची चित्ते विशुध्द होतात आणि त्याना ज्ञानरुपी अमृत प्राप्त होते. विकर्मरुपी यज्ञाचे शेष म्हणजे चित्तशुध्दी साधते आत्मज्ञानरुपी अमृताचा लाभ होतो. या अमृताला भोगून ते तृप्त संतुष्ट होतात.

या **यज्ञशिष्टामृतभुज:** शब्दातून तीन गोष्टी सांगितल्या आहेत. (1) विकर्मरुपी यज्ञाने शेष म्हणजे चित्तशुध्दी होते-साधते (2) यातून आत्मज्ञानरुपी अमृत-लाभ होतो (3) या आत्मज्ञानरुपी अमृत-लाभाला भोगून ते संतुष्ट होऊन जातात.

2) दुसरा मुद्दा असा की ज्ञानरुपी अमृतामुळे जन्मतृप्तीचे फळ लाभते. **यान्ति ब्रह्म सनातनम्** आत्मज्ञानाने तृप्त असे हे तृप्त पुरुष सनातन ब्रह्मतत्वाला उपलब्ध होतात. शंकराचार्यानी गीताभाष्याच्या आरंभी मोक्ष प्राप्तीचा एक क्रम सांगितला आहे. 1) ईश्वरार्पण

बुध्दी आणि फळाच्या आशेचा त्याग करुन सात्विक कर्म आचरणे. 2) अशाप्रकारे सात्विक कर्मे आचरण्यातून चित्त शुध्दी 3) या चित्तशुध्दीमुळे ज्ञान प्राप्त करायची योग्यता मिळवणे. 4) मग ज्ञान प्राप्ती 5) ज्ञान प्राप्तीद्वारे मोक्ष लाभ.

इथे हीच चर्चा आली आहे. 1) विकर्मरुपी यज्ञाद्वारे चित्तशुध्दी 2) चित्तशुध्दीच्या माध्यमातून ज्ञानप्राप्ती 3) ज्ञानप्राप्तीमुळे अखंड तृप्ती - शांतीच्या आनंदाचा अनुभव 4) ज्ञानामृताने प्राप्त अखंड शांतीच्या माध्यमातून ब्रह्म वा मोक्षप्राप्ती.

(3-4) तिसरा-चौथा मुद्दा असा आहे की जे चित्तशुध्दिकारक आंतरिक विकर्माची साधना करत नाही ते **नायं लोकोऽस्ति अयज्ञस्य** यज्ञहीन वा अयाज्ञिक होय. अशाना या लोकात राहूनही जीवंत रहाण्याचा आनंद नाही उपभोगता येत कारण चित्तात जर विकार असतील तर शांततेचा लाभ होणार नाही आणि अशांत व्यक्तीला सुख कुठले? यज्ञहीन पुरुषाला यालोकीच जर शांती-सुख नसले तर परलोकात वा पुढल्या जन्मी शांती-सुख कसे काय लाभेल?

: 32 :

***एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।***
***कर्मजान् विध्दि तान् सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एवं बहुविधा: यज्ञा:** अशा प्रकारचे विकर्मरुपी यज्ञ
- **ब्रह्मण: मुखे:** ब्रह्म मुखात, वेद शास्त्रात
- **वितता:** सविस्तरपणे वर्णित आहेत
- **तान् सर्वान्:** त्या तमाम यज्ञांना
- **कर्मजान् विध्दि:** कायिक, वाचिक आणि मानसिक कर्मांनी उत्पन्न झाले आहेत असे जाण
- **एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे:** असे समजून तू संसार बंधनातून मुक्त होऊ शकशील

**अर्थ**

अशा प्रकारे इतरही पुष्कळ प्रकारचे यज्ञ वेदवाणीत विस्तारपूर्वक सांगितले गेले आहेत. ते सर्व तू मन, इंद्रिये आणि शरीर यांच्या क्रियांनी उत्पन्न होणारे आहेत असे समज. अशा प्रकारे तत्त्वत: जाणून त्यांचे अनुष्ठान केल्याने तू कर्मबंधनापासून सर्वस्वी मुक्त होशील.

***विशेष बोलिले वेदें असे यज्ञ अनेक हे***
***कर्मानें घडिले जाण जाणूनि सुटशील तूं।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1)अशा प्रकारच्या नाना विकर्मरुपी यज्ञांचे वर्णन (2) वेदशास्त्रात आढळते. (3) हे सारे यज्ञ कायिक, वाचिक, मानसिक कमांर्मधून उत्पन्न झाले आहेत असे जाण. (4) अशा पध्दतीने जाणून प्रपंचाच्या बंधनातून मुक्त होता येईल.

**स्पष्टीकरण**

1) **एवं बहुविधा यज्ञा:** या श्लोकासोबत विकर्मरुप यज्ञाचे प्रकरण पूर्ण होते. 25 ते 32 या आठ श्लोकामधून विकर्मरुप यज्ञाच्या झालेल्या चर्चेला उदाहरणरुप मानायला हवे. ज्या कायिक, वाचिक आणि मानसिक कर्मांनी चित्तशुध्दी होते त्या तमाम कर्मांना यज्ञ मानले जायला हवे. मानसिक निर्विकारतेपर्यंतचा प्रवास घडवू शकणारे असे नाना विकर्मरुपी यज्ञ आहेत. या बारा यज्ञात जप-यज्ञाचा काही समावेश नाही. अर्थात् स्वाध्याय यज्ञाचा उल्लेख असल्यामुळे त्यात जप-यज्ञाचा अंतर्भाव करता येतो पण काही लोक स्वाध्यायाऐवजी जप-यज्ञात अधिक रुची दर्शवतात. अनेकांना नाम स्मरणात गोडी वाटते. काहींना सत्संगतीत चित्तशुध्दीचा अनुभव येतो तर काहींना सत्कर्म करण्यात चित्तशुध्दीचा अनुभव घेता येतो. अर्थात् मनाच्या भूमिकेनुसार यात तर-तम भाव येतो. आज चित्तशुध्दीला सहायक वाटणारे विकर्म काही काळानंतर सहज-सोपे वाटायला लागतील, मग पुन्हा वेगळ्या विकमांर्चा शोध घ्यावा लागेल. असे अनेकदा घडते की एखाद्या सत्पुरुषाच्या ठायी श्रध्दा उपजते मग संपर्कामुळे त्या सत्पुरुषात काही उणिवा वा दोष दिसू लागतात मग मन अन्यत्र धाव घेते. त्याच्या सहवासात चित्त शुध्दीचा भाव फुलारुन आल्यासारखा वाटतो. अशाप्रकारे चित्त शुध्दीसाठी जो कुणी सत्पुरुष, जो कुठला सद् विचार उपयोगी ठरेल त्या सर्वांचा विकर्मांच्या ठायी समावेश होतो, यामुळे गीतेने इथे विकर्माचा व्यापक अर्थ मांडला आहे.

2) दुसरा मुद्दा आहे **वितता ब्रह्मणो मुखे:** वेदात नाना विकर्मरुपी यज्ञांचा उल्लेख येतो. **ब्रह्मण: मुखे** 'ब्रह्म मुख' या संज्ञेचा (वेद) अनेकानी आपापल्या परीने अर्थ सांगितला आहे, शंकराचार्य, गांधीजी व विनोबा ब्रह्म मुख चा अर्थ 'वेद शास्त्र' असा करतात. टिळक याचा अर्थ करणे सोडून देतात. वेद ऋषीप्रणीत आहेत. ब्रह्माच्या नि:श्वसनातून प्रकटले आहेत. यामुळे वेदाना परिपूर्ण मानले जाते.

खरे तर 'ब्रह्म मुख' चा अर्थ 'वेद' मानणे संकुचितपणाचे अन् सांप्रदायिक ठरेल. गीतेचा असा सांप्रदायिक अर्थ लावणे योग्य ठरणार नाही. यामुळे **ब्रह्मण: मुखे** याचा 'वेद' ऐवजी 'शास्त्र' असा अर्थ करु या. या व्यापक भूमिकेमुळे अर्थाला कुठलीही बाधा पोहोचत नाही. यामुळे जैन धर्मात वर्णित चित्त शुध्दीच्या उपायांचा समावेश होऊ शकतो याशिवाय अन्यान्य धर्म-मतांचाही विचार करता येतो.

ब्रह्मण: **मुखे 'ब्रह्म मुख'** संज्ञेचा आणखी व्यापक अर्थ 'ईश्वराच्या मुखात' म्हणजे 'ईश्वराच्या सृष्टीत' असा होऊ शकतो. परमेश्वराच्या सृष्टीत चित्तशुध्दी साधणारे अनेक 'विकर्म' जारी आहेत असा अर्थ होईल. जारी आहेत वा सांगितले गेले आहेत. असाही मूळच्या **'वितता:'** संज्ञेचा अर्थ सांगता येईल. म्हणजे ब्रह्म तत्वाच्या सृष्टीत नाना प्रकारची विकर्मे आहेत.

3) तिसरा मुद्दा असा आहे **कर्मजान् विध्दि तान् सर्वान्** सारे विकर्म कर्मातून जन्माला आलेले आहेत. निष्क्रियतेतून यांचा जन्म झालेला नाही. या तमाम विकर्मांचा प्रयत्नाशी संबंध येतो. प्राचीन अध्यात्म साधनेत निष्क्रियतेला मानाचे स्थान होते. आजही हा संस्कार जनमनात दृढ झालेला आहे. समाजसेवक वा चरखा चालवणाऱ्याला कुणी 'साधु' नाही म्हणत. 'साधुच्या लक्षणांनी युक्त तो साधु' ही व्याख्या आजही समाजात रुढ नाही. आजही ही कल्पना बाह्य वेषावर आधारित आहे. दाढी जटा वाढवलेला, लुंगी गुंडाळलेला, भगवी कफनी घातलेला, मौन-व्रती, निष्क्रिय, गीता, उपनिषद वा एखाद्या धार्मिक ग्रंथावर प्रवचन करु शकण्याची योग्यता असलेला आजच्या समाजाला साधु-सिध्द वाटतो. यामुळे गीतेने या श्लोकात अन् ठायी-ठायी प्रवृत्तीमार्गावर भर दिलेला आहे.

विनोबा लिहितात की विकर्मेही कर्माचाच एक प्रकार आहे असे समजून स्वधर्माचरणरुप मूळ कर्माचा त्याग करुन त्या ऐवजी विकर्माचे आचरण करु नये. ही विकर्मे स्वधर्माचरणाची पूर्ती करणारी आहेत. स्वधर्मपालन करत असतानाच विकर्माचे पालन करावे. ती आचरणात आणावीत. यासोबत या श्लोकात या मुद्याचाही संकेत आहे की केवळ स्थूल स्वधर्मालाच सर्वस्व मानून कवटाळून बसणाऱ्यांना हेही ध्यानात घ्यायला हवे की विकर्मेसुध्दा आवश्यक कर्मे आहेत. त्या विकर्मासाठी केले जाणारे प्रयत्न स्वधर्माचरणासाठी खूप उपयोगी आहेत.

4) **एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे** सारे विकर्म कायिक, वाचिक आणि मानसिक कर्मामधून उत्पन्न झाले आहेत पण 'मी या विकर्माहून अगदी वेगळा आहे, या विकर्माचाही मी कर्ता नाही, मी अकर्ता, ज्ञाता-आत्मा आहे.' अशाप्रकारे अकर्तेपणाच्या अनुभवावर आधारित स्वधर्माचरणरुप कर्मांच्या सोबत विकर्मांची साधना केली गेली तर हे अनुभवस्वरुप अकर्तेपण मोक्ष प्राप्ती करुन देण्यात समर्थ आहे. स्वधर्माचरण करत असताना ज्या प्रकारे फलाकांक्षेचा त्याग करुन अनासक्त रहायचा अभ्यास करावा लागतो तसाच आंतरिक चित्तशुध्दीसाठी विकर्माच्या साधनेतही अकर्तेपणाचा अनुभव घेणे आवश्यक आहे. असे केल्याने मोक्ष प्राप्ती संभवेल.

: 33 :

***श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञ: परंतप।***
***सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप:** हे अर्जुना
- **द्रव्यमयात् यज्ञात्:** द्रव्यमय विकर्मरुपी यज्ञांपेक्षा, वस्तुंनी सिध्द होणाऱ्या यज्ञांपेक्षा
- **ज्ञानयज्ञ:** परमात्म स्वरुप ज्ञानयज्ञ
- **श्रेयान्:** अधिक श्रेयस्कर आहे
- **पार्थ सर्वं अखिलं कर्म:** हे अर्जुना, सर्वांची सर्व कर्मे
- **ज्ञाने परिसमाप्यते:** मोक्षसाधनरुपी ज्ञानात, परमात्म ज्ञानात समाप्त (अंतर्भूत) होऊन जातात

**अर्थ**

हे परंतप अर्जुना, द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ अत्यंत श्रेष्ठ आहे. तसेच यच्चयावत् सर्व कर्मे ज्ञानात समाप्त होतात.

*द्रव्य-यज्ञादिकांहूनि ज्ञान-यज्ञ चि थोर तो*
*पावती सगळीं कर्मे अंतीं ज्ञानांत पूर्णता।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) द्रव्यमय यज्ञाहून ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ होय. (2) तमाम कर्माचे अंतिम फळ परमात्म स्वरुपाचे ज्ञान होय.

**स्पष्टीकरण**

1) **श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञ: परंतप:** 28 व्या श्लोकातला 'द्रव्य' शब्द इथे 'द्रव्यमय' अशा स्वरुपात आला आहे. ज्यात फळाची आशा-आसक्ती असते ते द्रव्यमय. 25 ते 30 पयंर्तच्या श्लोकात वर्णिलेले विकर्मरुपी यज्ञ फलासक्तीयुक्त बनून आणि फलासक्ती रहित बनूनही करता येतात. फलासक्तीमुळे मोक्ष लाभ होणार नाही कारण चित्तशुध्दी होणार नाही. यामुळे गीतेने असा इशारा दिला आहे की विकर्मरुपी यज्ञाने चित्तशुध्दी जरुर होईल पण फलाकांक्षेमुळे चित्तशुध्दीत उणेपणा येईल. दूध सर्वोत्तम असेल तरी तापवताना आंबट मिसळले गेले तर दूध फाटून जाईल. तसेच विकर्मे आचरताना अहंभाव जागला तर फलासक्ती राहीलच राहील. यामुळे विकर्माची साधना करताना अहंकाराला क्षीण करण्याचे लक्ष्य ठेवावे लागेल.

परमेश्वरार्पण बुध्दीचे विकर्म अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे असले तरी त्यातही अहंभाव असू शकतो. परमेश्वरार्पण बुध्दीने सर्व कर्मे करण्याचा अभ्यास श्रेष्ठ साधना असली तरी त्यात अहंभाव असू शकतो. समाधीसारख्या उदात्त भूमिकेचा अहंकार असू शकतो. अहंकार म्हणजे जीवभाव. हा अतिप्रबळ आहे. याला क्षीण करण्यात यश लाभले तर बेडा पार. यामुळे अहंभावयुक्त विकर्माऐवजी निरहंकारी फलासक्तीचा त्याग करुन केलेली विकर्मे सर्वश्रेष्ठ होय.

2) आपल्या तमाम लहान-मोठ्या कर्माचे अंतिम पर्यवसान परमात्म ज्ञानात व्हायला हवे. जीवनाचा अंतिम हेतु परमात्मविषयक ज्ञान असायला हवे. पशु आणि मानवात हाच तर फरक आहे. पशु-पक्षी योनी 'मूढ योनी' आहेत. नरदेहाच्या ठायी ईश्वर प्राप्तीचे ज्ञान प्राप्त करुन घेण्याची शक्ती आहे. परमेश्वराने आपल्या माया शक्तीने या सृष्टीच्या विविध पदार्थांचे विश्लेषण करुन माणूस अतिसूक्ष्म ज्ञान प्राप्त करुन घेऊ शकतो असे सांगितले आहे. सृष्टीच्या ठायी अनंत शक्ती आहे आणि कदाचित म्हणूनच या ज्ञानाचा कुणी दुरुपयोगही करुन घेऊ शकतो. आजचे विज्ञान सृष्टीच्या पदार्थाचा शोध लाऊन-घेऊन त्यांचे विश्लेषण करुन विनाशकारी शक्तीचे ज्ञान मिळवत आहे. विनाशाकडे आपण प्रवृत्तही होतोहोत. नरदेहाच्या ठायी ज्ञान प्राप्त करुन घेण्याची अपरिमित शक्ती आहे. त्या शक्तीचा हा आत्यंतिक दुरुपयोग आहे. पारस्परिक प्रेमभावात वृध्दी करण्याकडे विज्ञानाचा वापर करवून घेतला तर तो विज्ञानाचा सदुपयोग मानता येईल. नरदेहात वसणाऱ्या ज्ञानशक्तीचा उपयोग जर चित्तशुध्दीपूर्वक आत्मज्ञान प्राप्तीसाठी करुन घेतला तरच हे संभवेल. समाजासमोर परमात्मज्ञान प्राप्तीचे अंतिम ध्येय असायला हवे.

केनोपनिषदात ही गोष्ट मोठ्या मार्मिक शैलीत सांगितली गेली आहे ती अशी:

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति न चेदिहावेदीन्महती विनष्टि:। भूतेषु भूतेषु विचित्य धीरा: प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति॥ (2/5)

अर्थात् परमात्मज्ञान प्राप्त करुन घेणे हाच नरदेहाचा सदुपयोग होय. 'सत्यं अस्ति' म्हणजे सत्याचे पालन करणे यातून नरदेह प्राप्ती धन्य होते, अन्यथा जीवन व्यर्थ ठरते. सृष्टीच्या प्रत्येक पदार्थात - कणा - कणात परमात्मतत्वाचे दर्शन करुन, साक्षात अनुभव घेऊन या लोकाचा निरोप घेताना नरदेहाचा त्याग केल्यावर असे साधक मोक्ष प्राप्ती करुन घेतात.

: 34 :

*तद्विध्दि प्रणिपातेन् परिप्रश्नेन् सेवया ।*
*उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत्:** ते परमात्म ज्ञान

- **प्रणिपातेन्:** साष्टांग नमस्कार करुन म्हणजे अत्यंत विनम्र होऊन
- **परिप्रश्नेन्:** बंध-मोक्ष, ज्ञान-अज्ञान, भक्ती, वैराग्य, योग वगैरे विषयींचे नाना प्रश्न निष्कपट भावनेने विचारुन
- **सेवया विध्दि:** गुरुजनांची सेवा करुन ज्ञान प्राप्त करुन घ्या
- **तत्त्वदर्शिन:** ज्यांनी परमात्म्याचा अनुभव प्राप्त करुन घेतला आहे असे तत्त्वज्ञानी पुरुष
- **ते ज्ञानं:** तुम्हाला परमात्म ज्ञानाचा
- **उपदेक्ष्यन्ति:** उपदेश देतील

**अर्थ**

ते ज्ञान तू तत्त्व साक्षात्कारी ज्ञानी लोकांच्याकडे जाऊन समजून घे. त्याना साष्टांग नमस्कार केल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि निष्कपटपणे सरळ मनाने त्याना प्रश्न विचारल्याने, परमात्मतत्त्व उत्तम रीतीने जाणणारे ते ज्ञानी महात्मे तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील.

***सेवा करुनि तें जाण नम्र-भावें पुसूनियां***
***ज्ञानोपदेश देतील ज्ञानी अनुभवी तुज।***

**विषय:** हा श्लोक फार महत्वाचा आहे. यात चार गोष्टी आल्या आहेत. (1) आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी हवी कमालीची विनम्रता. (2) या विषयी जिज्ञासापूर्वक बंध, मोक्ष यासंबंधी प्रश्न विचारा. (3) ज्या आत्मानुभवसंपन्न सत्पुरुषाबाबत मनी श्रध्दा वसत असेल त्यांची सेवा करा. (4) सेवेने प्रसन्न होऊन आत्मानुभवसंपन्न पुरुष परमात्मविषयक ज्ञानोपदेश करतील.

**स्पष्टीकरण**

1) **तद्विध्दि प्रणिपातेन्:** परमात्म स्वरुपाच्या ज्ञानातच तमाम कर्मांचे अंतिम पर्यवसान होते हे नुकतेच आपण वाचले. या श्लोकात परमात्म ज्ञानप्राप्तीचा मार्ग सांगितला गेला आहे. पहिला उपाय विनयसंपन्न होणे हा आहे. ज्ञानाच्या किंचितशा स्पर्शाने अस्तित्वाने नम्रता संपून जाईल. अभिमान्याचे विनीत बनणे अवघड आहे.

विनम्रता म्हणजे निरभिमानता होय. परमात्म ज्ञानाच्या प्राप्तीसोबत अहंकार गळून व्यक्ती शून्यरुप बनते. यामुळे परमशून्यतेच्या मुक्कामी पोहोचायचे असेल तर सुरुवात शून्यवृत्तीपासून करणे सोईचे व्हावे. दुसऱ्या अध्यायाच्या 7 व्या श्लोकात अर्जुन म्हणतो की तो शरण आला आहे. योगेश्वराचा शिष्य आहे. शोक-मोह दूर व्हावा अशा आत्मज्ञानाची मागणी अर्जुन करतो. नम्रतेमुळेच ज्ञान ग्रहण करण्याची पात्रता अंगी येते. विनयामुळे पात्रता येते. अज्ञानाचे भान जागले की चित्तवृत्ती निर्मळ होतात. शोक मोहग्रस्त अर्जुनाच्या ठायी विनम्रता जागते. जीवनात विपरीत प्रसंग घटला, चित्ताची व्याकुळता वाढली की माणूस परमात्मज्ञानप्राप्तीकडे वळतो. नेतृत्व स्वीकारणारे बुध्दीमान जनदेखिल अडचणीच्या प्रसंगी, प्रतिष्ठा पणाला लागते तेव्हा कमालीचे व्याकुळ बनतात. त्याची शांती लयाला जाते. अशा प्रसंगी परमात्म ज्ञानाची जिज्ञासा उत्पन्न होते आणि व्याकुळतेमुळे विनम्रता जागते. अशा प्रसंगी आपली विद्वत्ता विसरुन माणसे आपल्याहून कमी योग्यतेच्या पण मुमुक्षु दशेतल्या साधकांच्या चरणाशी बसून ज्ञान मिळवण्याचा उपाय शोधतात. अर्थात् परमात्म्ज्ञान प्राप्तीसाठी आवश्यक अशी विनम्रता त्यांच्या ठायी जागते. नम्रतेचे बाह्य लक्षण साष्टांग दंडवत प्रणाम वा चरणस्पर्श आहे. या कारणाने गीतेने हा स्थूल मुद्दा मांडला आहे.

2) **परिप्रश्नेन:** नम्रतेप्रमाणेच तत्त्वज्ञानाच्या संदर्भातही अनेक प्रश्न विचारले जायला हवेत. साधक वा मुमुक्षुची भूमिका लक्षात घेऊन अधिकारी पुरुष उपदेश करतात. 'अधिकार तैसा करु उपदेश' ही त्यांची भूमिका असते. त्याच्या प्रश्न वा जिज्ञासेतून साधकाची भूमिका व योग्यता कळते. परमात्मज्ञान ज्याला प्राप्त करुन घ्यावयाचे आहे त्याला नम्रता, जिज्ञासा व सेवाभाव हवा. यासोबत श्रध्दा, तत्परता आणि इंद्रियसंयम हवा. ही चर्चा या अध्यायाच्या 40 व्या श्लोकात आली आहे. ब्रह्मसूत्र शांकरभाष्याच्या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादाच्या पहिल्या सूत्रात घ् ब्रह्म जिज्ञासे घ् साठी सहा साधन संपत्तींचा उल्लेख येतो. तशाच प्रकारे 40 व्या आणि या श्लोकात सहा प्रकारच्या साधन-संपत्तीचा निर्देश आला आहे.

या श्लोकात दुसरी गोष्ट सांगितली गेली आहे जिज्ञासा. परमात्मज्ञान मिळवण्यासाठी आपण ज्यांच्यापाशी पोहोचतो त्यांच्या विषयी मनी श्रध्दाभाव नसेल तर संपूर्ण

लाभ होत नाही. श्रध्दा अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. महत्वाचा मुद्दा आहे. श्रध्देने विनम्र बनून गेल्यावर जे प्रश्न विचारले जातील ते खऱ्या जिज्ञासेचे द्योतक ठरतील. यामुळे नम्रता आणि जिज्ञासेच्या मूळाशी श्रध्दा हवी.

संपूर्णपणे अज्ञानी बनून गुरुपाशी जायला हवे. आपणास काही ज्ञान आहे याचे यत्किंचितही भान नको. भरद्वाज मुनींच्या आश्रमात याज्ञवल्क्य ऋषी गेले होते. भरद्वाजांनी उत्थापन देऊन त्यांचा आदर-सत्कार केला. विनम्रतापूर्वक रामचंद्राविषयी मोठ्या जिज्ञासेने विचारले. त्याचे वर्णन तुलसीदास करतात:

***जागबलिक बोले मुसुकाई। तुम्हहि बिदित रघुपति प्रभुताई॥ रामभगत तुम्ह मन क्रम बानी। चतुराई तुम्हारि मैं जानी॥***

अर्थात् भरद्वाज ऋषींचे प्रश्न ऐकून याज्ञवल्क्य हसून बोलले की रघुपतीच्या प्रभविष्णुतेला आणि चरित्राला आपणही जाणता कारण आपण काया-वाचा-मनाने रामभक्त आहात पण प्रश्न विचारल्यामुळे आपले चातुर्य मी जाणून घेतले.

***चाहहु सुनै राम गुन गूढा।***
***कीन्हिहु प्रस्न मनहुँ अति मूढा॥***

अर्थात् आपले चातुर्य असे आहे की रामाचे गूढ गुण श्रवण करायची आपली प्रबळ इच्छा असल्यामुळे आपण अज्ञानी बनून मला प्रश्न विचारताहात.

यासंबंधी एक गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे की प्रश्न विचारल्यावर जर त्यासमयी समाधान झाले नाही तर काही काळानंतर परत तोच प्रश्न विचारताना संकोच करता कामा नये. गांधीजीनी एकदा एका पत्रात लिहिले होते की वारंवार प्रश्न विचारायचा जो संकोच करील तो गमावून बसेल. गांधीजी नेहमी म्हणत असत की त्याना प्रत्येक क्षणी ईश्वराचे स्मरण असायचे. माझ्या काही हे ध्यानात येईना म्हणून मी त्याना पुन:पुन्हा विचारले आणि त्यानी वारंवार या प्रश्नाचे उत्तरही दिले पण माझे काही पूर्ण समाधान झाले नाही. 1932 साली गांधीजी येरवड्याच्या कारावासात असताना मी पुनश्च हाच प्रश्न विचारला होता त्यावेळी त्यानी दिलेल्या उत्तरामुळे मात्र माझे पूरेपूर समाधान झाले. नंतर मग मी हा प्रश्न कदापि विचारला नाही. यामुळे माझा अनुभव सांगतो की अधिकारी पुरुषाला वारंवार प्रश्न विचारण्यात मुळीच संकोच करु नये. समाधान होईपर्यत नि:संकोचपणे एकच प्रश्न विचारत रहावा तुलसीदासांच्या रामचरितमानस ग्रंथातील भरद्वाज मुनी म्हणतात:

***संत कहहिं असि नीति प्रभु, श्रुति पुरान मुनि गाव।***
***होइ न बिमल बिबेक उर, गुरुसन किए दुराव॥***

अर्थात् गुरुपासून काहीही लपवून-दडवून ठेवले तर अंत:करणात शुध्द विवेक प्रकट होत नाही असे संतवचन आहे. श्रृती, पुराणे आणि मुनीजनही या मुद्यालाच पुष्टी देतात.

3) **सेवया:** पुढचा मुद्दा सेवेचा आहे. ज्याबाबत आपल्या मनात श्रध्दा वसते त्याच्या बाह्य सेवेकडे मनाचे धावणे स्वाभाविक आहे. दुबळ्या देहामुळे जर प्रत्यक्ष सेवा करणे शक्य होणार नसेल तर मग द्रव्य वगैरे अर्पण करुन आपला सेवाभाव प्रकट करायची इच्छा होते. ज्या पुरुषाबाबत आपल्या मनात श्रध्दा उत्पन्न होते त्यांच्या सांगण्यानुसार वाटचाल करणे, आज्ञापालन करणे, त्यांच्या निर्देशानुसार जीवन घालवणे, त्या विचार सिध्दांतासाठी जीवन समर्पित करणे ही श्रध्देची स्वाभाविक परिणती होय. आत्मज्ञान म्हणजे अहंकार शून्यावस्था होय. बाह्य सेवेमुळेही शून्यभाव साधता येतो. अशी कल्पना करा की एखाद्या सत्पुरुषावर दहा लोकांची श्रध्दा आहे आता सारेच साधक काही त्या सत्पुरुषाची सेवा करु शकत नाही. देहाची सेवा तर एखादा दुसराच साधक करु शकेल. अशा स्थितीत जर साधक जागृत नसेल तर भक्तीचे रुपांतरण आसक्तीत होईल. संत पुरुषाच्या भक्तीमुळे मोक्षलाभ होईल पण आसक्तीमुळे तर दु:ख, ईर्ष्या, मत्सर यासारखे विकारच उद्भवतील.

मग गुरुदेवांचे अन्य दुसऱ्या शिष्यावर अधिक प्रेम आहे अशी वृत्तीही शिष्याच्या ठायी जन्माला येईल. अशा प्रकारे गुरुकडून ज्ञानाऐवजी अज्ञान वितरित करायला शिष्य नकळतपणे गुरुला भाग पाडतात. असे शिष्य आपले आध्यात्मिक दृष्ट्या नुकसान करुन घेतात. यामुळे संताच्या वैयक्तिक सेवेचा आग्रह न धरता परमात्म ज्ञान प्राप्तीवर सारे लक्ष केंद्रित करायला हवे. शिष्यानी अनाग्रही व तटस्थ वृत्ती बाळगायला हवी. गुरु सेवा घेवो वा न घेवो. संत सर्व

साधकांमार्फत आळीपाळीने वैयक्तिक सेवा करवून घेईल किवा मग वैयक्तिक सेवा करवून घेण्याऐवजी त्याना सार्वजनिक सेवाकार्यात नियुक्त करेल. काही का असेना पण संतपुरुषाची भक्ती आसक्ती ठरु नये अशी दक्षता घेऊन साधकाची वाटचाल असावी हे मात्र महत्वाचे सूत्र आहे.

प्राचीन काळी गुरुसेवेचे अपरंपार महत्व होते. मुंडकोपनिषदात वर्णन येते:

**परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन। तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्**
**समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्॥ (1/2/12)**

अर्थात् नाना कर्मांच्या ठायी आसक्त लोकांना बघून वा धर्म-अधर्माच्या पालनामुळे प्राप्त होणाऱ्या स्वर्ग वगैरे लोकांचे परीक्षण करुन साधक मुमुक्षुजनांनी वैराग्य प्राप्त करायला हवे. स्वर्ग वगैरे प्राप्ती वा आसक्तीभरली कर्मे आचरुन मोक्षप्राप्ती अशक्य आहे. परमात्म ज्ञानाच्या प्राप्तीसाठी साधकाने हाती समिधा घेऊन शमदम आदी गुणांनी संपन्न अशा ब्रह्मनिष्ठ गुरुंच्या चरणी बसायला हवे.

या श्लोकातल्या घ् समिधा घ् या संज्ञेचा अर्थ जाणून घ्यावा. समिधा म्हणजे सेवा व नम्रतेची बाह्य निशाणी. गुरुगृही राहून साधक नम्रतापूर्वक गुरुसेवा करुन ज्ञानप्राप्तीचे प्रयत्न करायचेत.

4) **उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनः तत्त्वदर्शिनः** ज्ञानी जन अधिकारी पुरुषापाशी ज्ञानार्जन करायला जातात. ते तत्वदर्शी ज्ञानी परमात्मज्ञान प्राप्त करवून देतात. या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य लिहितात : **ये सम्यग्दर्शिनः तैः उपदिष्टं ज्ञानं कार्यक्षमं भवति, न इतरत् इति भगवतः मतम्**- अर्थात्-जे सम्यक्‌दर्शी आहेत अर्थात् ज्यानी परमात्मस्वरुपाचा अनुभव प्राप्त करुन घेतला आहे त्यांच्याद्वारे उपदिशेलेले ज्ञानच कार्यक्षम ठरते - परिणामकारक ठरते. इतरांकरवी लाभलेले उपदिष्ट म्हणजे उपदिशेलेले ज्ञान कार्यक्षम ठरत नाही म्हणजे आचरणात उतरत नाही.

वर्तमान वैज्ञानिक युगात हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे, हे ध्यानी घ्यावे. आज आचरणशून्य विद्वानालाही मान मिळतो. गांजा ओढणारे सत्पुरुष मानले जातात. त्यांचा एक शिष्य समुदायही असतो. एकदा एक विद्वान गृहस्थ मला सांगायला लागले- ‘मी कुणालाही आत्मज्ञान घडवू शकतो, तुम्हालाही.’ मी म्हणालो ’ बराय तर, घडवा मला आत्मज्ञान.’ त्यांनी काही तत्वज्ञानाची चर्चा केली, ती तर मला ठाऊकच होती. पंधरा-एक मिनिटे अशी गेली असतील मग थोडे थांबून सांगू लागले ‘भावे साहेब, क्षमा असावी. मला सिगरेट ओढायची इच्छा झाली. मी लगेचच ओढून परत येतो.’ मी म्हणालो ‘या की ओढून’ सिगरेट ओढून परतल्यावर त्यानी परत तत्वज्ञानाच्या गप्पा मारायला सुरुवात केली. त्यांचे विवेचन आटोपल्यावर मी त्याना हळूच विचारले ‘आपण सर्वांना आत्मज्ञानाचा परिचय करुन देता तर ब्रह्मचर्याचे तर अवश्यमेव पालन करत असाल.’ ते उत्तरले ‘नाही बुवा, ब्रह्मचर्य पालन का सोपे आहे?’ त्यांच्या पत्नी त्यांच्या सोबतच होत्या. त्यांच्याकडे निर्देश करत ते म्हणाले की ब्रह्मचर्य पालन किती अवघड आहे हे यांनाच पुसा.

शंकराचार्यानी स्पष्टपणे खुलासा केला आहे की ज्यांनी परमात्मस्वरुपाचा अनुभव प्राप्त करुन घेतला आहे असे अधिकारी जनच आत्मज्ञानाचा उपदेश करायला समर्थ आहेत. विद्वान वा तत्वज्ञानाचे पंडित असा उपदेश करु शकत नाहीत. समजा अशा पोथीपंडितांचे प्रवचन बुध्दीला स्पर्श करील पण हृदयवीणेच्या तारा झंकृत करु शकणार नाही परिणामी आचरणात आणता येणार नाही. वैराग्यसंपन्न, अंत:करणात परमात्मशक्ती वागवणारे, इंद्रियविजयी, विनयी पुरुष विद्वान नसले तरी आत्मज्ञानाचा उपदेश करणारे अधिकारी मानले जायला हवेत. अर्जुनाला निमित्त करुन योगेश्वर ही विचार मांडणी करताहेत.

: 35 :

*यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव।*
*येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पांडव यत् ज्ञात्वा:** हे अर्जुना, ज्या परमात्म स्वरुपाला जाणून घेतल्याने
- **पुनः एवं मोहः** पुनश्च अशा मोहात
- **न यास्यसि:** तू फसणार नाहीस

- **येन:** ज्या परमात्म स्वरुपाच्या ज्ञानाने
- **अशेषेण भूतानि:** नि:शेष म्हणजे सारे भूतमात्र
- **आत्मनि:** प्रत्यगात्म्याच्या ठायी म्हणजे आपल्या ठायी
- **द्रक्ष्यसि:** तू बघशील
- **अथो मयि:** मग माझ्या ठायी सर्व भूतमात्रांना तू (बघशील)

**अर्थ**

जे जाणल्याने पुन्हा तू अशा प्रकारच्या मोहात पडणार नाहीस, तसेच हे अर्जुना, ज्या ज्ञानामुळे तू सर्व प्राणीमात्र पूर्णपणे प्रथम आपल्यात आणि नंतर मज सच्चिदानंदघन परमात्म्यात पाहशील.

***ज्या ज्ञानानें असा मोह न पुन्हां पावशील तूं***
***आत्म्यांत आणि माझ्यांत भूतें नि:शेष देखुनी।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) आता उपजलेल्या मोहाप्रमाणे मोह परमात्म स्वरुपाच्या ज्ञानामुळे पुनरपि जागणार नाही. (2) या ज्ञानामुळे आपल्या शरीरात वसणाऱ्या प्रत्यगात्म्याच्या ठायी म्हणजे "स्व" च्या ठायी तमाम प्राणीमात्रांना तू पाहू शकशील. (3) या ज्ञानामुळे परमात्म्याच्या ठायी तमाम भूतमात्रांचे - प्राणीमात्रांचे दर्शन करुन घेऊ शकशील, म्हणजे स्वत:च्या ठायी वा परमात्म्याच्या ठायी तमाम प्राणीमात्रांचे दर्शन करता येईल असे गीतेतले योगेश्वर अर्जुनास निवेदन करताहेत.

**स्पष्टीकरण**

1) गुरुचरणी विसावल्यावर परमात्मस्वरुपाचे ज्ञान प्राप्त झाल्यावर **यज्ज्ञात्वा न पुन: मोहं एवं यास्यसि पांडव** पुनरपि मोह जागणार नाही. मोहाचा प्रसंग पहिल्या अध्यायात वर्णिलेला आहे. आपला मोह नष्ट झाल्याची ग्वाही अर्जुनाने गीतेच्या अखेरीस अठराव्या अध्यायातील 73 व्या श्लोकात दिली आहे.

अकराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकात अर्जुनाने 'आपल्या आत्मज्ञान देण्यामुळे माझा मोह नष्ट झाला' असे म्हटले आहे. याचा अर्थ मोह सदासाठी गेला वा निर्मूल किंवा निर्बीज झाला असे मात्र नव्हे. अर्जुनाला ज्या मोहाने ग्रस्त केले होते तो मूळापासून नष्ट झाला नव्हता. तो जर मूळापासून नष्ट झाला असता ना तर अकराव्या अध्यायासोबतच गीता समाप्त झाली असती पण अठराव्या अध्यायापर्यंत योगेश्वराला उपदेश करावा लागतो कारण अकराव्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकात आपला मोह समूळ गेल्याचे न सांगता अर्जुन मोह तात्कालिक रुपात गेला असे म्हणत आहे. याचा अर्थ असा की दहाव्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकापर्यंतच्या योगेश्वराच्या उपदेशाचा परिणाम असा झाला की अर्जुनाच्या मोहाच्या प्रचंड वावटळीचा वेग आटला. अठराव्या अध्यायाच्या अखेरीस मोह नष्ट झाला. परमात्म स्वरुपाच्या ज्ञानाशिवाय मोह नष्ट होऊ शकत नाही हे ध्यानी घेऊन योगेश्वराने अर्जुनाला तत्वज्ञानाच्या प्रत्येक पैलुची यथायोग्य माहिती करुन दिली आणि परमात्म स्वरुपाची ओळख करुन दिली. यामुळे अर्जुनाचा मोह समूळ नष्ट झाला. या अभिप्रायामुळेच योगेश्वर सांगताहेत की गुरुकडून प्राप्त झालेल्या परमात्म स्वरुपविषयक ज्ञानामुळे मोह पुनरपि उत्पन्न होणार नाही.

**ईशावास्योपनिषद म्हणते :**

***यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानत:।***
***तत्र को मोह: क: शोक एकत्वमनुपश्यत: ॥***

( 7 )

अर्थात् ज्या ज्ञानावस्थेत ज्ञानी पुरुषाला तमाम प्राणीमात्र परमात्मरुप वाटू लागतात अशा अवस्थेत एकत्वाचे दर्शन करणाऱ्या म्हणजे केवळ परमात्मतत्वाचेच दर्शन करणाऱ्या पुरुषाला कुठला आलाय शोक आणि कसला आलाय मोह?

2) **येन अशेषेण भूतानि आत्मनि द्रक्ष्यसि:** अर्थात् परमात्मस्वरुप ज्ञानामुळे प्राणिमात्रांना प्रत्यगात्म्यात म्हणजे स्वत:च्या ठायी बघू शकता येते. जो परमात्मा देहात वसतो तो प्रत्यगात्मा. बाहेरच्या सर्व विश्वात तर तो व्याप्त असतोच. प्रत्यगात्म्याच्या ठायी म्हणजे देहांतर्गत वसणाऱ्या परमात्म्याच्या ठायी तमाम प्राणिमात्रांचे दर्शन करणे याचा काय अर्थ होतो? देहात वसणारे आत्मतत्व चैतन्यस्वरुपी म्हणजे ज्ञानरुपी आहे हे मत जैन आणि सांख्य या उभय तत्वज्ञानांचे आहे. गीतेलाही हे मान्य आहे. प्रत्यगात्म्याला ओळखून त्याच्या ठायी लीन होऊन जाणे म्हणजे आत्मदर्शन होय. या आत्मदर्शनाच्या भूमिकेत

जड सृष्टीला वगळता मनुष्य, पशु-पक्षी, कीडा-मुंगी वगैरे सारे सचेतन जीन चैतन्यमय आत्मा आहेत असा अनुभव येतो. पतंजलीच्या योगशास्त्राच्या भाषेत याला घ् संप्रज्ञात भूमिका घ् म्हणतात.

श्रीमद्‌राजचंद्र भाई म्हणतात की आत्मदर्शी पुरुषाला एकव्याने स्मशानात, पहाडात, वनात फिरतानाही सिंह-व्याघ्र वगैरे पशुंच्या ठायीही आत्मतत्वाचे दर्शन होते. शरीरात दोन तत्वे वसतात- शरीर, दहा इंद्रिये, मन-बुध्दी हे जडतत्व आणि ज्ञानस्वरुपी चैतन्यमय आत्मतत्व. देहांतर्गत आत्मतत्वाचा जोवर अनुभव येत नाही तोवर सचेतन प्राण्यांच्या ठायी वसणाऱ्या आत्म्याचे दर्शन होऊ शकत नाही. कुठल्याही सचेतन प्राणीमात्राला बघू जाता देह आणि आत्मतत्व अशा दोन तत्वांचे दर्शन न होता केवळ स्थूल देह वा इंद्रियसमूहच दिसतो पण देहस्थित आत्मतत्वाला ओळखणाऱ्याला आत्मतत्वाचे दर्शन होते. श्रीमद्‌राजचंद्रांच्या मतानुसार आत्मदर्शी पुरुष अकंप असतो. निर्भय असतो. क्षुब्ध वा भयग्रस्त होत नाही. आत्मदर्शनाची ही सर्वोच्च भूमिका आहे. त्याचा व्यवहार अहिंसक होतो.

3) आता तिसरा मुद्दा म्हणजे परमात्म दर्शनरुप भूमिका. सांख्य आणि जैन आत्मतत्वाला चैतन्यरुपी मानून अनंत म्हणून स्वीकारतात. सृष्टी जड प्रकृतीने बनली आहे हा सांख्यांचा आणखी एक सिध्दांत. जैन तत्वज्ञान्यांच्या मते सृष्टी सहा द्रव्यमय असून अनादि आहे. सांख्य आणि जैन ही दोन्ही तत्वज्ञाने जडचैतन्यवादी आणि द्वैतवादी आहेत. जे तत्वचिंतन जगाचे मूळ तत्व जड असल्याचे मानतात त्याना जड जगताला बघून-अनुभवून ईश्वर भाव वा भक्तीभाव उत्पन्न होण्याची शक्यता उरत नाही. जड सृष्टीला सोडून म्हणजे चैतन्यस्वरुपी आत्म्याचे ज्या ठायी वास्तव्य आहे अशा जीवसृष्टीला बघून-अनुभवून भक्तीभाव, आत्मभाव वा आत्मस्मरण जागण्याची शक्यता असते पण वेदान्त वा गीतेचे मत असे आहे की विभिन्न देहांमध्ये वसणारे आत्मतत्व म्हणजे प्रत्यगात्मा तमाम जड चेतन सृष्टीमात्रात-अणु-अणुत व्याप्त आहे त्याला ईश्वर म्हटले जाते.

खरे पाहू गेल्यास विविध शरीरामध्ये म्हणजे पिंडात आणि बाहेर ब्रह्मांडात एकच परमात्मतत्व निवास करते. परमात्म तत्वाच्या दोन शक्ती मानल्या गेल्या आहेत एक चैतन्य शक्ती दुसरी माया शक्ती. एखाद्या जादुगाराप्रमाणे परमात्मा मायाशक्तीच्या आधारे संपूर्ण जगताचा आभास करवतो. तोच परमात्मा आपल्या चैतन्य शक्तीच्या आधारे संपूर्ण जगावर नियंत्रण राखतो. अशा प्रकारे चैतन्य रुपी जीवाच्या रुपात परमात्मा प्रकट होत असतो आणि जड जगत रुपात परमात्म्याचे चैतन्यतत्व गुप्तरुपाने वसते. जीवाच्या ठायी परमात्मा दिसून येतो जगताच्या ठायी नव्हे. अशा प्रकारे परमात्मा सर्वत्र नांदत असला तरी त्याच्या रुपाच्या आविष्कारात फरक आढळतो. कधी तो मनुष्यरुपाने तर कधी पशु पक्षी वगैरे रुपात ठळकपणे दिसतो. विविध जड पदार्थात गुप्त रुपात वसत असल्यामुळे प्रकटपणे दिसत नाही. आपण झोपी जातो त्यावेळी जागृत अवस्थेतला प्रकट परमात्मा निद्रावस्थेत अप्रकट होऊन जातो. अशा प्रकारे त्याच्या प्रकट होण्यात व अप्रकट रहाण्यात अंतर दिसून येते.

या श्लोकात गीता एक तिसरा मुद्दा उपस्थित करते आहे की संपूर्ण सृष्टीमात्रात परमात्मा व्याप्त आहे असे ज्ञानी पुरुषाला दर्शन होते. जडसृष्टीच्या ठायीदेखिल परमात्म्याचे सगुण साकार स्वरुप दिसत असल्यामुळे त्याच्या मनी जडसृष्टीच्या बाबतीतही भक्तीभाव उपजतो. जड चेतन सृष्टी परमात्ममय दिसत असल्यामुळे ज्ञानवंताच्या ठायी अखंड भक्तीभाव जागृत असतो. दिवसेंदिवस या भक्ती भावनेचा उत्कर्ष होतो.

सांख्य आणि जैन तत्वज्ञाने आत्मदर्शनाच्या भूमिकेच्या पुढे जात नाहीत, पण गीता एक पाऊल पुढे जाते. आपल्या तत्वज्ञान्याच्या माध्यमातून ती साधकाला आत्मदर्शन आणि परमात्मदर्शन अशा दोन्ही भूमिकांचा आनंद सोहळा उपलब्ध करुन देते. या दोन्ही भूमिका ज्ञानी पुरुष एकत्वाच्या ज्ञानामुळे उपलब्ध करु शकतो.

: 36 :

*अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।*
*सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वेभ्यः पापेभ्यः** सर्व पातक्यांमध्ये
- **पापकृत्तमः अपिः** अति पाप करणारा
- **असि चेत्:** तू जर असशील
- **ज्ञानप्लवेन एवः** तरीही या ज्ञानरुपी नौकेने

- **सर्वं वृजिनं संतरिष्यसि:** सर्व प्रकारच्या पातकांना चांगल्या प्रकारे पार करु शकशील

**अर्थ**

जरी तू इतर सर्व पाप्यांहूनही अधिक पाप करणारा असलास, तरीही तू ज्ञानरुप नौकेने खात्रीने संपूर्ण पाप समुद्रातून चांगल्या प्रकारे तरुन जाशील.

***जरी पाप्यांमधें पापी असशील शिरो-मणि***
***तरी ह्या ज्ञान-नौकेनें पाप तें तरशील तूं।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत: (1) तू जरी सर्व पाप्यांमध्ये अत्यंत पापी असशील (2) तरीही या ज्ञानरुपी नौकेने पापांपासून मुक्त होऊन सर्व पापांपासून मुक्त होऊन जाशील

**स्पष्टीकरण**

1) पापकर्मे आचरणाऱ्यांना मोक्षलाभ होतो की नाही हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पापकर्माचे आचरण सुरु असेल त्या काळात तर मोक्षद्वार बंदच राहील पण याबाबत पश्चात्ताप करुन कायमसाठी पापकर्मे सोडायचा संकल्प करणाऱ्याना या श्लोकात संपूर्ण आश्वासन लाभते की परमात्म स्वरुपाच्या ज्ञानामुळे, परमात्म्याच्या भक्तीचा म्हणजे मोक्षाचा लाभ होऊ शकतो.

चोरी, व्यभिचार, असत्याचरण, खून वगैरे पापकर्मे असल्याचे सारेच जाणतात पण पापकर्माची व्याख्या याहून सूक्ष्म आहे. तुलसीदासजी म्हणतात:

***दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान।***

म्हणजे धर्माचे मूळ दया म्हणजे अहिंसा होय आणि पापाचे मूळ आहे अभिमान वा अहंकार.

अहिंसेच्या ठायी सत्यपालनाचा समावेश होऊनच जातो कारण सत्य-अहिंसा एकमेकात सामावलेले आहेत, ओतप्रोत आहेत. पापाचे मूळ अभिमान आहे. तुलसीदास पापाचरणाचा आधार अभिमान मानतात. ज्यांच्या मनी देहाभिमान वसतो ते देहासक्त होऊन पापाचरण करतात. तसे पाहू गेल्यास पुण्याचा आधार देखिल अभिमानच आहे. आरंभी देहविषयक अभिमानामुळेच व्यक्ती धर्माचरणाला प्रवृत्त होते. मनात पापकर्मे करायची इच्छा असतानादेखिल आई, बाबा, नातलग, मित्र-परिवार, समाज या भयामुळे माणूस पापभीरु बनतो. पापाचरणापासून दूर रहातो. धर्माचरणामुळे प्रतिष्ठा वाढते, कीर्तीलाभ होतो, मान-सन्मान मिळतो यामुळेही अनेकांच्या मनी धर्माचरणविषयक निष्ठा बळावते, पण याच्या मूळाशी देहासक्तीच आहे, देहासक्तीच्या प्रभावामुळे का होईना मनात पापभीरुता जागून धर्माचरण निष्ठा जागते तर हे प्रशंसनीयच मानले जायला हवे. बालपणी चोरी, असत्य यासारख्या पापापासून आई-बाबांच्या भयामुळेच वाचता येते, असे नैतिक भय सुरुवातीला गरजेचेही असते.

धर्माचरण आणि नीतीचा आरंभ देहाभिमान असला तरी देहाचा अभिमान सोडून अनासक्तीपूर्वक धर्माचरण करता येते. आसक्ती वा अभिमान सोडून पापाचरण करता येणार नाही. प्रकाशासमोर ज्याप्रमाणे अंध:कार टिकणार नाही तसेच निरभिमानता आणि अनासक्तीसमोर पापाचरण टिकू शकणार नाही. अनासक्तीपूर्वक का कधी पापकर्मे संभवतील? पण धर्माचरण मात्र देहाभिमान वा अभिमानपूर्वक करता येईल. पापकर्मे करुनही व्यक्ति अलिप्त राहू शकते असा विचार प्राचीनकाळी रुढ होता. एवढेच नव्हे तर ही अलिप्ततेची कसोटीही मानली जात होती. पापकर्मे करुनही जर अलिप्तता साधता आली नाही तर ती कच्ची समजावी पण ही विचारसरणी चुकीची आहे. अलिप्तता आणि पापकर्मे यांच्यात आत्यंतिक विरोध आहे. प्रकाश आणि अंध:कार जसे सोबत नांदू शकणार नाही तसेच अलिप्तता आणि पापकर्मे सोबत नांदू शकणार नाहीत. यामुळे गीता सांगते की अतिपापी बनूनही पाप न करण्याचा निश्चयपूर्वक संकल्प केला गेला तर ज्ञानरुपी नौकेत बसून पापरुपी सागराला पार करता येईल. परमात्मज्ञान प्राप्ती झाल्यावर सारी पापकर्मे धुतली जातात. पाप्याला परमात्मज्ञान प्राप्तीची तीव्र जिज्ञासाही होऊ शकते. एकदा पापपंकात रुतल्यावर त्यातून बाहेर पडणे खूप अवघड होऊन बसते. यासाठी प्रथम सत्संगतीचा आश्रय घ्यावा लागतो. पापाचरणाच्या पश्चात्तापातून सत्संगतीची भूक तीव्र होते. तेव्हाच सत्संगाचा खरा लाभ मिळतो. परमात्मज्ञान प्राप्तीने पापापासून सर्वथा मुक्त होण्याचा उपाय सापडतो.

2) **सर्वं ज्ञानप्लेवेनैव वृजिनं संतरिष्यसि:** ज्ञानरुपी नौकेत बसून पापरुपी सागरातून पार करु शकशील. परमात्म ज्ञान झाले की सर्व पापांपासून मुक्त

होऊन जाशील. पातक्याला परमात्म ज्ञान प्राप्त करुन घ्यायची तीव्र जिज्ञासाही असू शकते. एकदा पापरुपी चिखलात अडकल्यावर त्यातून बाहेर पडणे सोपे नाही. यासाठी सर्वात आधी तर सत्संगतीचाच आश्रय घ्यावा लागतो. सत्संगतीची तीव्र भूक तेव्हाच लागते जेव्हा पापाचरणाबद्दल आपल्याला पश्चात्ताप होतो. तेव्हाच सत्संगतीचा खरा लाभ मिळतो. पापापासून सर्वथा मुक्त होण्याचा उपाय परमात्म ज्ञान प्राप्त करुन घेणे हाच आहे.

या श्लोकावर टिप्पणी करताना विनोबा म्हणतात: "परमात्मज्ञानामुळे पापातून मुक्तता लाभते हा ज्ञानमहिमा निर्विवाद आहे पण पापी पुरुषाला तत्काळ आश्वासन मिळू शकत नाही कारण याच अध्यायातील 38 व्या श्लोकात असे म्हटले आहे की योगयुक्ताला यथायोग्य समयी परमात्मज्ञान लाभेल. हा तर प्रदीर्घ काळाचा कार्यक्रम आहे. पापी पुरुषाला तत्काळ आश्वासन तर फक्त परमात्म्याच्या भक्तीचेच आहे. हा मुद्दा नवव्या अध्यायातील 30 व्या श्लोकात आला आहे. याच अध्यायातील 34 व्या श्लोकात या भक्तीचा उपाय म्हणून सत्संगतीचा उल्लेख येतो. अर्थात् पापनिस्तार करणाऱ्या ज्ञानप्राप्तीसाठी सत्संगतीचा आश्रय घेतला जायला हवा, हा झाला तात्पर्यार्थ !"

नवव्या अध्यायातील 30 व्या श्लोकात हे सांगितले गेले आहे की मोठा दुराचारी सुध्दा जर माझी भक्ती करीत असेल तर पापातून मुक्त होऊन धर्मात्मा बनू शकतो. भक्तीच्या ठायी दुहेरी सामर्थ्य आहे. एकीकडे भक्ती पापाचरणातून सोडवते तर दुसरीकडे परमात्मज्ञान घडवते. तुलसीदासजी म्हणतात:

***भगति तात अनुपम सुखमूला।***
***मिलहिं जो संत होहिं अनुकूला॥***

अर्थात् परमात्म भक्ती अनुपमेय असून आत्यंतिक सुख देणारी आहे. भक्ती सुखाचे मूळ आहे पण सत्संगतीच्या अनुकूलतेतून वा अनुग्रहाद्वारे ती प्राप्त होते. यामुळे परमात्मज्ञानाची प्राप्ती करुन घेण्यासाठी भक्तीचा आश्रय घेणे गरजेचे आहे. भक्ती सुलभ उपाय तर आहेच शिवाय ती परिपूर्ण फळ देणारी आहे. परमात्मज्ञानाच्या आधारे पापसागर तरुन जायचा अर्थ भक्ती प्राप्त करणे होय.

: 37 :

***यथैधांसि समिध्दोऽग्निर्भस्मसात् कुरुतेऽर्जुन।***
***ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन यथा:** हे अर्जुना, ज्या प्रकारे
- **समिध्द: अग्नि:** प्रज्वलित अग्नी
- **एधांसि भस्मसात् कुरुते:** लाकडाला भस्म करुन टाकते
- **तथा ज्ञानाग्नि:** त्याच प्रकारे ज्ञानरुपी अग्नी
- **सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते:** सर्व कर्मांना भस्म करुन टाकते

**अर्थ**

कारण हे अर्जुना, ज्याप्रमाणे पेटलेला अग्नी इंधनाची राख करतो तसाच ज्ञानरुप अग्नी सर्व कर्मांची राखरांगोळी करतो.

***संपूर्ण पेटला अग्नि काष्ठें जाळूनि टाकितो***
***तसा ज्ञानाग्नि तो सर्व कर्मे जाळूनि टाकितो।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) प्रज्वलित आग ज्याप्रमाणे लाकडाला जाळून भस्म करते तसेच (2) ज्ञानरुपी आगीने सारी कर्मे भस्मसात होतात.

**स्पष्टीकरण**

1) यथा एधांसि समिध्द: अग्नि: भस्मसात् कुरुते: आगीच्या स्पर्शाने लाकूड जळते. प्रज्वलित लाकूड जळून राख होते. त्याचे मूळचे रुप उरत नाही. इथे लोखंडाचा दृष्टांत लागू पडत नाही कारण लोखंड तापेल, लाल होईल पण राख होणार नाही. मातीची वीट घडवली जाते. आगीच्या स्पर्शाने मातीची राख न होता माती अधिक मजबूत बनते. याचा अर्थ असा की आगीच्या स्पर्शाने राख बनून जाणारी एकच वस्तु आहे आणि ती म्हणजे लाकूड. मोक्षप्राप्तीचा अर्थ आहे सर्व बंधनांपासून मुक्त होणे. सर्व बंधने नष्ट होणे. देह नष्ट झाल्यावरच मोक्ष लाभतो. देह असेपर्यंत देह धारणेसाठी थोडा तरी अहंकार शिल्लकच उरतो. अहंकार वा जीवभाव नष्ट झाल्यावर देह तत्काळ पडेल. प्रारब्ध कर्मे शिल्लक असेपर्यंत देहपात होत नाही.

ना संपूर्ण अहंभाव लयाला जात, ना जीवभाव नष्ट होत! अहंकार वा जीवभाव नष्ट झाल्याशिवाय मोक्ष प्राप्ती होत नाही. देह असताना परमात्म स्वरुपाचे ज्ञान प्राप्त झाले तरी सारी बंधने गळून पडत नाहीत. प्रारब्ध कर्मे भोगण्यासाठी जोवर देह जीवंत आहे तोवर परमात्मज्ञानाच्या प्राप्तीमुळे कर्मे तर सारी जळून जातात पण त्यांची संपूर्ण राख होत नाही. काठी जळून गेल्यावर काठीची आकृती दिसते एकदम राख काही होत नाही. नंतर राख होते तशीच देह हयात असताना परमात्म ज्ञान झाल्यावर कर्म बंधने जळून जातील पण जळत्या काठीसारखी आकृती दिसेल, एकदम राख काही होणार नाही. जळत्या काठीची आकृती नष्ट झाल्यावरच ज्याप्रमाणे राख होते तशीच देह गळून गेल्यावरच मोक्षप्राप्ती होईल. अशाप्रकारे काठीच्या उदाहरणात दोन गोष्टी सामावलेल्या आहेत. देह असताना संपूर्णपणे मोक्ष प्राप्ती न होणे म्हणजे काठीची आकृती दिसणे, संपूर्ण राख न होणे आणि देहाच्या अंतासोबत संपूर्ण मोक्ष लाभ होणे म्हणजे काठीची जळकी आकृती न उरता राख उरणे.

2) अग्नी ज्याप्रमाणे काठीला भस्म करुन टाकतो, तसेच परमात्मज्ञानरुपी अग्नी कर्मबंधनरुपी काठीला भस्म करतो. कर्माचे दोन प्रकार प्रारब्ध आणि संचित. ही सृष्टी अनादीकाळापासून आहे. त्याच्या आदी वा अंताचा पत्ता नाही. जीव देखिल असाच अनादी आहे. जीव अनादीकाळापासून बंधनात आहे, हे कर्मामुळे होते. प्रत्येक जीवाला देह आणि इंद्रिये प्राप्त झाली आहेत. यांच्या माध्यमातून जीव अनेक कर्मे आचरतो. कर्माचे फळ नियमानुसार भोगावेच लागते. जीव जी कर्मे आचरतो त्यांचा संचय होतो. त्याना संचित कर्मे असे म्हणतात. ही सारी एकाच प्रकारची नसतात, काही शुभ असतात तर काही अशुभ. दोघांची फळेही परस्परविरुध्द असतात. एकाच जन्मी परस्परविरुध्द अशा सर्वच कर्माचे भोगणे शक्य होत नाही, यामुळे काही कर्माचे भोगणे बाकी राहिल्यामुळे त्याना भोगण्यासाठी नवा देह मिळतो. या कर्मांना प्रारब्ध कर्मे म्हणतात. संचित कर्मे कमी होण्याची शक्यता नसते. इच्छा असो वा नसो संचित कर्मामधून प्रारब्ध व प्रारब्ध कर्मामधून संचित कर्मे या प्रकारे जन्म-मृत्युचे चक्र अविरतपणे सुरुच असते. यातून मुक्ती मिळवण्यासाठी परमात्मज्ञान प्राप्त करुन घेणे गरजेचे असते. परमात्म ज्ञानामुळे देहविषयक आसक्ती सुटून जाते. यामुळे देह-इंद्रियांचा अहंकार वा जीवभाव नष्ट होऊन जातो.

जीवभाव वा अहंकार हेच जन्माचे कारण आणि बीज होय. ज्ञानरुपी अग्नीमुळे हे बीज काठीसारखे जळून जाते. अहंकाररुपी बीज दग्ध झाल्यावर - जळून गेल्यावर - जन्मरुपी अंकुर प्रकटत नाही पण परमात्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावर शुध्द प्रारब्ध कर्मे संपल्याशिवाय ज्ञानी पुरुषाला देह त्याग करता येत नाही कारण प्रारब्धकर्मामुळेच देह प्राप्त झालेला असतो. जाणीवपूर्वक देहत्यागाचा प्रयत्न करणे अहंकार होय आणि अहंकाराने प्रेरित कुठल्याही कर्माचे फळ भोगण्यासाठी पुन: जन्म घ्यावा लागतो. अर्थात् प्रारब्ध कर्मावर ज्ञानाचीही सत्ता चालत नाही परमात्म ज्ञानाच्या प्रभावाने संचित कर्मे दग्ध होतात कारण त्यांचे फळ भोगण्याची सुरुवात झालेली नाही पण त्याप्रमाणे संचित कमांर्पैकी ज्या कर्मांच्या फळांचा उपभोग घ्यायला सुरुवात झालेली असते ती कर्मे संपेपर्यत मध्येच ज्ञानी पुरुष त्याना थांबवू शकत नाही. प्रारब्ध कर्मे संपताच देह गळून पडतो आणि जळक्या कर्माची राख होऊन जाते.

विनोबा म्हणतात: 35 व्या श्लोकात मोह नाशाची चर्चा येते, 36 व्या श्लोकात पाप निस्तार म्हणजे पापमुक्ती आणि या 37 व्या श्लोकात कर्मदाह म्हणजे कर्माचे जळून जाणे वर्णिले आहे. अशाप्रकारे परमात्म ज्ञानाच्या तीन परिणामांची चर्चा आली आहे - मोह नाश, पापमुक्ती आणि कर्मदाह. पुढे लिहितात- 19 व्या श्लोकात ज्ञानाने कर्मे जळून जातात कर्मदाह हा जो उल्लेख आला आहे तो या कर्मदाहाहून थोडा वेगळा आहे. 19 व्या श्लोकात आले आहे की बाह्य कर्माचे आचरण करत असताना परमात्म ज्ञानामुळे न करण्याच्या दर्जापर्यत पोहोचवणे म्हणजे बाह्य कर्म करत असतानाही त्यांचा लेप न लागू देणे- त्यात लिंपित न होणे म्हणजे कर्मे आचरुनही आतून सर्वथा अलिप्त असणे हे परमात्मज्ञानाचे स्वरुप आहे. या श्लोकातून मनात परमात्मज्ञानाचे स्वरुप संपूर्ण अलिप्तपणे व अनासक्तीपूर्वक असावे हा विचार आला आहे. 35 ते 37 श्लोकांमधून परमात्म ज्ञानाच्या फळाची चर्चा केली गेली आहे.

: 38 :

***न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रमिह विद्यते।***
***तत्स्वयं योगसंसिध्द: कालेनात्मनि विंदति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि ज्ञानेन् सदृशं:** कारण की ज्ञानासारखे, ज्ञानाच्या समान
- **इह पवित्रं न विद्यते:** या लोकी सुसंस्कृत विशुध्द पुरुषाला
- **कालेन स्वयं आत्मनि विंदति:** काही काळानंतर आपोआप आपल्या आत प्राप्त होईल म्हणजे अनुभवाला येईल

**अर्थ**

या जगात ज्ञानासारखे पवित्र करणारे खात्रीने दुसरे काहीही नाही. ते ज्ञान कितीतरी काळाने कर्मयोगाने अंत:करण शुध्द झालेला माणूस आपोआपच आपल्या आत्म्यात प्राप्त करुन घेतो.

***ज्ञानासम नसे कांही पवित्र दुसरें जगीं***
***योग-युक्त यथा-काळीं तें पावे अंतरीं स्वयें।***

**स्पष्टीकरण**

1) **न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रमिह विद्यते:** ज्ञान वेगवेगळ्या प्रकारचे आहे. ज्ञानाला विज्ञानही म्हटले जाते. अध्यात्म शास्त्रात विज्ञान शब्दाचा अर्थ अनुभव असा होतो. जनलोकात विज्ञान शब्दाचा अर्थ विद्या ज्ञान असा आहे. ही विविध प्रकारची ज्ञाने वा विज्ञाने बुध्दीपर्यंतच पोहोचतात. यांना प्राप्त करुन माणसाला पैसा कमवण्याची साधनेही प्राप्त होतात. आजकालच्या शिक्षणाचा हेतुही पैसा कमवणे हाच आहे. अधिक शिकलेल्याला अधिक कमवण्याची अधिकात अधिक संधी उपलब्ध होते. मन-इंद्रियांवर निग्रह, संयम आणि गुणोत्कर्षासाठी या ज्ञानाचा काही विशेष उपयोग नाही. काम-क्रोध यासारख्या विकाराना क्षीण करण्यासाठीही हे ज्ञान उपयोगी ठरत नाही. विकार क्षीण झाल्याशिवाय का परमात्म ज्ञान लाभेल? परमात्म ज्ञानाची प्राप्ती हेच मानवतेचे परम ध्येय होय. मोहनाश, पापनिवृत्ती आणि कर्माची बंधने समाप्त होणे वा जळून जाणे ही तीन फळे परमात्मज्ञानातून लाभतात. त्यांच्या पावित्र्य आणि महनीयतेविषयी काय बोलावे? यामुळेच गीता सांगते की या परमात्मज्ञानाहून ना कुठली पवित्र वस्तु ना कुठले पावन ज्ञान.

2) **तत्स्वयं:** हे ज्ञान स्वयमेव उपजते. या ज्ञानाखेरीजची अन्य सारी ज्ञाने म्हणजे इतिहास, भूगोल, पदार्थ विज्ञान, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र प्रयत्नपूर्वक प्राप्त करुन घ्यावी लागतात. या ज्ञानप्राप्तीसाठी मात्र मुळीच श्रम घ्यावे लागत नाहीत कारण इतर विषय भिन्न आहेत, परमात्मा मात्र भिन्न नाही. देह, इंद्रिये, मन, बुध्दी ही सारीच भिन्न आहेत. यामुळे यासंदर्भात ज्ञान मिळवण्यासाठीही प्रयत्न करावेच लागतात.

या संदर्भात एक प्रश्न मनात जागणे अगदी स्वाभाविक आहे की परमात्मा भिन्न नाही, हे मान्य. परमात्म ज्ञान सहज-स्वाभाविक असल्यामुळे त्यासाठी प्रयत्न करावे लागत नाही हा निष्कर्षही मान्य, पण असे जर असेल तर हे साधे-सोपे-सहज प्राप्त होणारे ज्ञान सर्वांना का मिळत नाही? यासाठी साधना का करावी लागते? याचे उत्तर असे की हे खरे आहे की परमात्मा भिन्न नसल्यामुळे त्यासाठी प्रयत्न करायची गरज नाही पण देह, इंद्रिये, मन यांची आपल्याशी अत्यंत निकटता आहे यामुळेच आपण आपले स्वरुप समजतो. आपली ओळख जाणतो. हा भ्रम आपण जोपासतो. पांढऱ्या काचेपाशी तांबडे फळ धरले तर काच तांबडी दिसू लागते. आपण परमतत्वाहून भिन्न नाहीहोत- एकरुप आहोत. उलट देहापासून भिन्न आहोत मनापासून, इंद्रियांपासून भिन्न आहोत पण स्वत:ला देहरुपच मानतो म्हणजे देहापासून भिन्न मानतोहोत. या भ्रांतीमुळेच ईश्वराची ओळख होत नाही, हा भ्रम वा भ्रांती घालवण्यासाठीच साधना करावी लागते. या भ्रांतीमुळेच वासना-विकार उपजतात. परमात्मज्ञानात मोठी बाधा उत्पन होते. याना घालवण्यासाठी गीतेत योगसाधनेची चर्चा आली आहे. योगसाधनेमुळे स्वरुपविषयक अज्ञान दूर होईल आणि परमात्मज्ञान आपोआप साधेल.

3) **योगसंसिध्द:** योगसाधनेद्वारा चित्तातील विकार घालवता येतात. योग म्हणजे चित्ताची समता. पण इथे योग म्हणजे सर्व प्रकारची साधना. भक्ती, नित्य अनित्य विषयक विवेक, आत्मा अनात्मा विषयक विचार, वैराग्य, ध्यान, तप, सेवा, ज्ञान-या तमाम साधनांचा समावेश

योग या शब्दात होतो. या योगसाधनेने चित्त शुध्द करता येते. चित्तशुध्दी झाल्यावर भ्रांती दूर होते. निजस्वरुपाची ओळख पटते मग परमात्म स्वरुपाचे ज्ञान आपोआप होते.

या संदर्भात उपनिषदातील दोन श्लोकात वर्णन येते:

*यदा पंचावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह ।*
*बुध्दिश्च न विचेष्टति तामाहु: परमां गतिम् ॥*
*तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् ।*
*अप्रमत्तस्तदा भवति योगो हि प्रभवाप्ययौ ॥*

अर्थात् "पंच ज्ञानेंद्रिये जेव्हा मनासह परमात्म्याच्या ठायी स्थिर होऊन जातात आणि बुध्दी देखिल कुठलाही व्यापर करत नाही, विचलित होत नाही या स्थितीला "परम गती" म्हणतात. इंद्रियांच्या या स्थिर स्थितीला "योग" असे म्हणतात. या अवस्थेत साधक प्रभावरहित असतो. योग हेच जीवनाचे आदि मूळ आहे आणि हो अंतिम स्थितीही आहे !"

या प्रकारची योग स्थिती ज्यांना प्राप्त करुन घेता आली अशा साधकांची देहविषयक भ्रांती नष्ट होते. त्याना परमात्म स्वरुपाची ओळख आपोआप होते. योगसाधना करताना ईश्वरी स्वरुपाची ओळख केव्हा होते? याला किती काळ लागतो? याचे उत्तर गीतेने दिले आहे ते असे 'कालेन' काळानंतर म्हणजे काही काळानंतर. योग-साधनेमुळे विकार लगेच थांबतात असे नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अनेक जन्मांचे विकार साचलेले असतात, संचित असतात. जन्मापासून मरणापर्यंत हा अखंड सराव असतो. विकारांमध्येच संपूर्ण जीवन संपून जाते. अशा प्रकारे अनेक जन्मांपासूनच्या संचित संस्कारांना उपटून फेकून देणे का सोपे आहे? यामुळे 'काही काळानंतर' अशी मर्यादा गीतेने आखून दिलेली आहे.

4) **कालेन:** या चर्चेत काळाची धड कल्पना येत नाही यामुळे शंकराचार्य म्हणतात **'महता कालेन'** प्रदीर्घ काळानंतर. अगदी थोड्या थोडक्या वेळात काही योगसाधना फलद्रुप होत नाही. साधना करताना 'फळाची आशा सोडावी' हा सिध्दांत मानावाच लागतो. साधनाकाळातही मानावा लागाते. यामुळे तन्मयतेने साधना करत रहाणे हे माणसाचे कर्तव्य ठरते. साधनेचे अंतिम फळ आहे परमात्मज्ञानाची प्राप्ती. ही प्राप्ती केव्हा होईल याची मुळीच चिंता न करता तटस्थतापूर्वक साधनारत रहावे, हा गीतेचा महत्वाचा सिध्दांत आहे. या सिध्दांताची ओळख करुन देण्यासाठी शंकराचार्यांनी 'महता कालेन' असा शब्दप्रयोग केला आहे.

5) **आत्मनि विन्दति:** परमात्म ज्ञान आपल्या आतून प्राप्त होते - अनुभवायला मिळते. ते कशा प्रकारे लाभते? यासाठी साधना काय करावी लागते? हे ज्ञान केव्हा मिळेल? कुठे मिळेल? हे चार प्रश्न उपजतात. कशाप्रकारे? याचे उत्तर आहे आपोआप. साधना कुठली करायची? याचे उत्तर आहे योगसाधना. केव्हा? याचे उत्तर आहे दीर्घकाळाच्या साधनेनंतर आणि कुठे? याचे उत्तर आहे आत म्हणजे चित्ताच्या ठायी. चित्त हा आरसा आहे. स्वच्छ आरशातच प्रतिबिंब दिसेल. त्याचप्रकारे परमात्मा आत आहे त्याला बघण्याचे साधन आहे चित्त. विकारयुक्त चित्त मलीन होते. विकारमुक्त चित्त निर्मळ होते. निर्मळ चित्ताच्या ठायी आत्मस्वरुपी ईश्वराचे दर्शन होते, ज्ञानप्राप्ती होते.

: 39 :

*श्रध्दावाँल्लभते ज्ञानं तत्पर: संयतेन्द्रिय: ।*
*ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **श्रध्दावान्:** श्रध्दाळू पुरुषाला
- **तत्पर:** तत्पर आणि श्रध्दाळू पुरुषाला
- **संयतेन्द्रिय:** संयमी, जितेंद्रिय पुरुषाला
- **ज्ञानं लभते:** परमात्म ज्ञान प्राप्त होते
- **ज्ञानं लब्ध्वा:** ज्ञान प्राप्त होताच
- **परां शांतिं:** (तो) परमशांतीला
- **अचिरेण अधिगच्छति:** लगेचच प्राप्त होतो

**अर्थ**

जितेंद्रिय, साधनतत्पर, श्रध्दाळू माणूस ज्ञान मिळवतो आणि ज्ञान झाल्यावर तो तत्काळ भगवत्प्राप्तिरुप परम शांततेला प्राप्त होतो.

*श्रध्देनें मेळवी ज्ञान संयमी नित्य-सावध*
*ज्ञानानें शीघ्र तो पावे शांति शेंवटची मग ।*

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत (1) जे श्रध्दाळू आहेत. (2) जे तत्पर-जागरुक-साधनेत एकाग्र आहेत.

(3) इंद्रियांवर विजय मिळवणारे पुरुष (4) परमात्म ज्ञानाचे अधिकारी होत. (5) परमात्म ज्ञान झाले की शांती लाभते. (6) त्याना त्वरित शांतीलाभ होतो.

**स्पष्टीकरण**

1) श्रध्दावान्: 34 व्या श्लोकात परमात्मज्ञान प्राप्तीसाठी तीन बाह्य साधनांची चर्चा आली आहे. ज्यांच्यापासून ज्ञान संपादन करुन घ्यावयाचे आहे त्याना विनयपूर्वक साष्टांग प्रणाम करावे, जिज्ञासेने प्रश्न विचारावेत आणि सेवा करावी. या श्लोकात परमात्म ज्ञानासाठी तीन अंतरंग साधनांची चर्चा येते. बहिरंग वा बाह्य आणि अंतरंग वा आत्मिक साधनांमुळे परमात्मज्ञानाची प्रक्रिया पूर्णत्वास येते.

या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात: **प्रणिपातादि: तु बाह्य: अनैकान्तिक: अपि भवति मायावित्वादिसंभवात्, न तु तत् श्रध्दावत्त्वादौ, इति एकान्तत: ज्ञानलब्ध्युपाय:।** अर्थात् पण साष्टांग दंडवत प्रणामासारख्या बाह्य साधनांचा आधार कपटी व्यक्तीही घेऊ शकते. यामुळे अशी साधने ज्ञानप्राप्तीरुप फळासाठी अनिश्चित समजावीत पण अंतरंग साधनामध्ये कपट वा ढोंग चालणार नाही. यामुळे ही साधने श्रध्दाळूपणासारखी साधने हमखासपणे ज्ञानप्राप्ती करवतील.

पहिला उपाय आहे श्रध्दा. ईश्वर, संत वा गीता-ब्रह्मसूत्र यासारख्या ग्रंथावर श्रध्दा जागली तर चित्ताची चंचळता दूर करायला - घालवायला खूप मदत मिळते. परमात्म स्वरुपाचे ज्ञान होईपर्यत चित्त चंचल रहाते. नाना प्रकारच्या परस्पर विरुध्द भाव भावना, नाना विचार उत्पन्न होऊन चित्त अस्थिर, अस्वस्थ बनते. व्याकुळ होते. अशांत होते. संतांवरली श्रध्दा चित्ताला मोठा आधार देते. प्राचीन संतांवर श्रध्दा ठेवली ना तरीही बळ लाभते जर साक्षात् ईश्वरावरच श्रध्दा जागली तर मग प्रश्नच उरत नाही ना? ईश्वर श्रध्देमुळे चित्तात खूप लवकर स्थैर्य येते. ईश्वरावरली श्रध्दा लेचीपेची नको, दृढ हवी. यामुळे संतांवर श्रध्दा राखणे हा सुगम उपाय आहे. तुलसीदासजी म्हणतात: **मोंते संत अधिक करि लेखा।** ते ईश्वराहून अधिक श्रध्दा संत-सत्पुरुषांवर ठेवायचा संकेत देतात.

2) **तत्पर:** साधनेत तन्मयता हवी. तन्मयते अभावी प्रयत्न मंदावतात. यातून साधनेत अरुची आणि अश्रध्दा जागते. यासाठी तन्मयता व तत्परता हवी. तन्मयता नसेल तर प्रयत्नात मंदता येईल. साधनेत तीव्रता यावी म्हणून तन्मयतेची गरज आहे. तन्मयतेच्या अभावी कधी-कधी साधनेत अरुची आणि अश्रध्दाही जागू शकते. यामुळे साधनेत तन्मयता, तत्परता आवश्यक आहे.

3) **संयतेन्द्रिय:** इंद्रियांवर ताबा हवा. विशेषत: आहाराबाबत सावधपण असावे. भोजनात संयम नसेल तर जडता येईल. जडता म्हणजे तमोगुण. तमोगुण आणि रजोगुण क्षीण झाल्यावर सत्वगुणाचा उत्कर्ष झाला की ज्ञानप्राप्ती होते. यामुळे इंद्रियाना निष्क्रिय न राखता संयमात राखून त्यांच्यावर ताबा मिळवण्याचा सराव करायला हवा. दुसऱ्या अध्यायात वर्णित स्थितप्रज्ञ लक्षणात इंद्रिय निग्रहाला फार महत्वाचे लक्षण मानले गेले आहे.

4) **ज्ञानं लब्ध्वा:** या आंतर्बाह्य सहा साधनानी परमात्म ज्ञानाची प्राप्ती होते.

5) **परां शांतिं:** 'परां शांति' शांतीसोबत शब्द जोडला घ्पराङ. परमात्म ज्ञानामुळे परम शांतीचा लाभ होतो. परा शांती म्हणजे अखंड शांती. वाटेल तशा प्रतिकूल परिस्थितीतही ही शांती भंग पावत नाही. परम म्हणजे अखंड शांती हेच आपले स्वरुप आहे. परमात्म ज्ञानामुळे परम शांत स्वरुपाचा अखंड अनुभव येऊ लागतो.

6) **नचिरेण:** परमात्म स्वरुपाचे ज्ञान होताच त्वरित परम शांती लाभते. दोराचे ज्ञान होताच सर्पाची भ्रांती दूर होते, सर्पाचे भय दूर होते, अशांती संपून जाते. आरशात बघताच मुखाचे ज्ञान होते. त्याचप्रकारे परमात्म ज्ञान झाले म्हणजे त्याचे फलरुपी परम शांती त्वरित लाभते.

ज्ञानेश्वरांचे भाष्य मोठे सुरेख आहे. 'आत्मसुख' म्हणजे परमात्मसुखाच्या माधुर्याचे रसपान केल्यावर पंच विषयांचे आकर्षण संपून जाते. विषयांप्रती तिटकारा उत्पन्न होतो. इंद्रियाबाबत मानाची भावना उरत नाही. इच्छा संपून जाते. शरीराने संपादित होणाऱ्या कर्माबद्दलचे कर्तृत्व उरत नाही. श्रध्देशी मैत्र जोडल्यामुळे साधक सुखी होतो. त्याच्यापाशी अपार शांतीयुक्त ज्ञान स्वत:हून चालत येते. या ज्ञानातुन शांतीचा अंकुर फुटतो. पुढे त्याचा प्रचंड विस्तार होतो. असा पुरुष जिकडे बघतो तिकडे शांतताच शांतता बघतो. त्या अपार शांततेला कुठलाही किनारा नसतो.

: 40 :

***अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।***
***नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मन: ।***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अज्ञ:** ज्यांना आत्मानात्म विवेक नाही आहे असे, भगवत् विषय न जाणणारे
- **च अश्रद्दधान:** आणि जे श्रध्दाळू नाहीहेत
- **च संशयात्मा:** आणि संशयी आहेत
- **विनश्यति:** (असे पुरुष) विनाशाला पावतात, परमार्थापासून भ्रष्ट होतात
- **संशयात्मन:** अशा अविवेकी, अश्रध्दाळू आणि संशयी
- **अयं लोक:** न अस्ति: लोकांसाठी इहलोकाचा काही उपयोग नाही
- **न पर: (अस्ति):** आणि परलोकाचाही काही उपयोग नाही
- **न सुखं (अस्ति):** त्यांना इहलोकी वा परलोकी सुख शांतता लाभू शकत नाही

**अर्थ**

अविवेकी आणि श्रध्दा नसलेला संशयी मनुष्य परमार्थापासून खालीने भ्रष्ट होतो, संशयी माणसाला ना हा लोक, ना परलोक आणि ना सुख.

***नसे ज्ञान नसे श्रध्दा संशयी नासला पुरा***
***न हा लोक न तो लोक न पावे सुख संशयी ।***

**विषय:** या श्लोकात सात गोष्टी आहेत 1) जो अज्ञानी आहे. 2) जो अश्रध्दावान-श्रध्देत बळ नसलेला आहे. 3) जो प्रत्येक विषयाबाबत संशय घेणारा आहे. 4) या तिघांचे जीवन व्यर्थ होय. 5) या लोकीच त्यांची उन्नती होत नाही 6) मग परलोकाची बातच कशाला? 7) संशयी व्यक्तीला कदापि सुख लाभत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **अज्ञश्च:** अज्ञानी शब्दात “अज्ञ” शब्द येतो. अज्ञ म्हणजे ज्ञानरहित, बुध्दी वा विवेक शक्ती रहित. बुध्दीच्या ठायी शक्ती नांदते. प्रपंचात रहाताना काम, विषय आणि मोह याबाबत आसक्ती जागल्यामुळे विवेक शक्ती नष्टप्राय होते. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातल्या 62 व 63 व्या श्लोकातून अध:पतनाचा क्रम वर्णिला आहे. विषयांच्या ध्यानामुळे आसक्ती, आसक्तीमुळे काम, कामामुळे म्हणजे कामाच्या अतृप्तीमुळे क्रोध, क्रोधामुळे मोह म्हणजे मूढता, मोहामुळे विस्मरण, विस्मरणामुळे बुध्दी व विवेक नाश अशी ही अध:पतनाची प्रक्रिया आहे, क्रम आहे. सत्य-असत्य, नीती-अनीती, कार्य-अकार्य जोवर पारखता येते तोवर मनुष्यत्व! अन्यथा मनुष्यत्व संपले असे समजून घ्यायला हवे.

2) **अश्रद्दधानश्च:** ईश्वर, संत वा धार्मिक सद्ग्रंथावर श्रध्दा असेल तर माणसाचा उत्कर्ष व विकास होतो ज्ञ् होऊ शकतो पण बुध्दी-विवेकाअभावी अन् श्रध्दा नसताना उन्नतीचा काय बरे उपाय ? बुध्दी विचार प्रधान तर मन भावनाप्रधान असते. चांगल्या भावनांचा करण्यातून उत्कर्ष साधता येतो. श्रध्दा खूप समर्थ अशी भावना आहे. श्रध्देमुळेच तमाम चांगल्या भावनांचा उत्कर्ष होतो. श्रध्दे अभावी चांगल्या भावनांचा धडपणे उत्कर्ष होत नाही. यामुळे ज्यांच्यापाशी बुध्दी नाही आणि श्रध्दाही नाही त्यांचा उन्नतीमार्ग बंद झाला, असे खुशाल समजावे.

3) **संशयात्मा विनश्यति:** बुध्दी व श्रध्देच्या अभावी अखेर संशयाचीच स्थिती उत्पन्न होईल. बुध्दी वा विवेकामुळे अनेक शंकांचे निरसन होते, निराकरण होते. बुध्दी नसेल पण श्रध्दा असेल तर शंका जागणारच नाही. श्रध्देमुळे ही स्थिती जागते पण श्रध्देच्या अभावी शंका उपजल्या तर बुध्दीने निराकरण होऊ शकते, पण श्रध्दा ही नाही आणि बुध्दीही नाही अशा अवस्थेत मात्र शंकारुपी भूत जीवन संपवून टाकील.

4) **विनश्यति:** संशय अतिशय भयानक. पती-पत्नीच्या संबंधात संशय जागला तर गरम दूधात लिंबूचा रस पडल्यासारखे सारे संबंध फाटून जातील. शंकेमुळे बुध्दी कुतर्कात पडते. तुलसीदास म्हणतात की **नदी कुतर्क भयंकर नाना** कुतर्कांची नदी मोठी भयंकर. त्यात पोहणे अशक्य. शंकराचार्य लिहितात: **संशयात्मा तु सर्वेषां पापिष्ठ:** संशयात्मा सर्वात मोठा पापी होय.

5) **न अयं लोक: अस्ति:** संशयात्म्याला या जन्मी स्थान नाही. आपला संपूर्ण व्यवहार श्रध्देच्या आधारे चालतो. श्रध्देसोबत विवेक हवा. अविवेकी श्रध्दा आंधळी असते. त्यापासून फायदा होण्याऐवजी तोटा होण्याचीच

शक्यता अधिक असते. अतिविश्वास जेवढा वाईट तेवढाच अविश्वासही वाईट. **अती तिथे माती. 'अति सर्वत्र वर्जयेत्।'** सर्वच बाबतीत टोकाची भूमिका टाळून मध्यममार्ग पत्करलेला बरा. ज्याच्या चित्तात संशयच संशय असतो. त्याच्यासाठी ईहलोकही अवघड आहे आणि त्याला परलोकातही स्थान नाही.

6) **न परः अस्तिः** परलोक म्हणजे पुढचा जन्म, दुसरा जन्म. परलोक या शब्दाचा अर्थ स्वर्ग असाही लावता येतो, पण तो दिसत नाही यामुळे स्वर्ग, नरक, ब्रह्मलोक याविषयी काही सांगणे अवघड आहे. या लोकी ज्याला उत्कर्ष साधता येत नाही त्याला परलोकात स्थान कसे बरे मिळेल? हा इत्यर्थ.

7) **न सुखं संशयात्मनः** संशयीला सुख नाही. संशयात्मा विनाश पावतो. श्रध्दा सर्वाधिक सुख देणारे तत्व आहे. श्रध्दासंपन्न जीवनात संशयाला स्थान उरत नाही. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की श्रध्देचे भोजन करणाऱ्याला तृप्ती लाभते. श्रध्देच्या अभावी संशयाची स्थिती जागते.

कित्येक श्रीमंत वृध्द वय झाल्यावरही मुलांना किल्ली द्यायला तयार नसतात. सारे धन हे स्वतःच्या नावावर तर करुन घेणार नाहीत ना अशी शंका त्यांना असते. शंकराचार्य लिहितात **पुत्रादपि धनभाजां भीतिः।** की श्रीमंतांना मुलांबाबतही भीती वाटते वा शंका असते. साध्या व्यवहारात देखिल अशा प्रकारे शंकाशील वृत्तीमुळे अपार दुःख सहन करावे लागते. अशात साक्षात् ईश्वराबाबतच जर शंका जागली तर समाधानाचा फार मोठा आधार ओढून घेतला जातो. ईश्वराच्या अस्तित्वात श्रध्दा जागली आणि मनी कुठल्याही प्रकारचा किंतु-परंतु उरला नाही तर जीवनात सौख्याचा मळा फुलतो. ज्याच्या मनात धर्म आणि नीतीविषयी शंका जागते त्याचाही सुखाचा आधार निखळून पडतो. नीती धर्माची कल्पना एवढी उदात्त आहे की त्या आधारे चालणारे जीवन सुखी ठरते पण संत वा सत्पुरुष, धर्म वा नीती, ईश्वर वा सिध्दांत पालन यापैकी कशा कशाचाही आधार नसेल तर माणूस निराधार होईल. निराधाराला सुख लाभणे अशक्य आहे. यामुळे संशयी व्यक्तीला सुखलाभ होत नाही हे गीतेचे निवेदन आहे.

: 41 :

***योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम्।***
***आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **धनंजयः** हे अर्जुना
- **योगसंन्यस्तकर्माणंः** ज्यांनी साम्यबुध्दीरुप योग साधनेने कर्मांचा त्याग केलेला आहे, ईश्वरार्पण केले आहे
- **ज्ञानसंछिन्नसंशयंः** ज्यांनी ज्ञानाने सर्व संशयांना कापून काढले आहे
- **आत्मवन्तंः** आणि जे आत्मवंत म्हणजे परमात्म परायण आहेत
- **कर्माणि न निबध्नन्तिः** अशा पुरुषांना कर्मे बंधनात अडकवत नाहीत

### अर्थ

हे धनंजया, ज्याने कर्मयोगाच्या विधीने सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण केली आहेत आणि ज्याने विवेकाने सर्व संशयांचा नाश केलेला आहे, अशा अंतःकरण स्वाधीन असलेल्या पुरुषाला कर्मे बंधनकारक होत नाहीत.

***योगानें झाडिली कर्में ज्ञानें संशय तोडिले***
***जो सावधान आत्म्यांत कर्में त्यास न बांधिती।***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) योग साधनेने कर्मफळांचा त्याग करणाऱ्याना, (2) परमात्म ज्ञानाने संशय ग्रंथी संशयाचे जाळे छेदून टाकणाऱ्याना, (3) आत्म्याच्या ठायी नित्य सावध, जागृत आणि संतुष्ट रहाणाऱ्याना (4) कर्म बंधनकारक ठरत नाहीत, बंधनात अडकवू शकत नाहीत.

### स्पष्टीकरण

1) **योगसंन्यस्तकर्माणंः** योगसाधनेद्वारे ज्यांनी कर्माचा म्हणजे कर्मफळाचा त्याग केलेला आहे असे साधक ठरतात. हे काळजीपूर्वक ध्यानात घ्यायला हवे की साधकाला कर्माचा त्याग करायचा नाही कर्मफळांचा त्याग करायचा आहे. त्याच्यासाठी कर्माची आसक्ती नव्हे तर कर्मफळांची आसक्ती बंधनकारक आहे. योग साधनेच्या अंतर्गत नाना तत्वांचा समावेश होतो पण ही साधना

करत असताना कर्मफळत्यागाचे जर विस्मरण झाले ना तर साधनेत कितीही तीव्रता, तन्मयता साधली गेली तरी साधना सफळ होणार नाही कारण की फलासक्तीच्या त्यागाशिवाय सूक्ष्म अहंभाव क्षीण होणार नाही आणि अहंभाव क्षीण झाल्याशिवाय जीवभाव संपणार नाही. जीवभाव संपेपर्यत परमात्म्याशी एकरुपता साधता येणार नाही. परमात्म्याशी एकरुपता साधल्याशिवाय, शून्य बनल्याशिवाय कर्मबंधनातून मुक्त होता येणार नाही. यासाठी योगसाधनेचे सारे हार्द्र कर्मफळत्यागात साठवले आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

योगसाधनेत भक्ती, ध्यान, विवेक, वैराग्य, स्वधर्म-पालन, परोपकार, सेवा, ईश्वरपरायणता यासारख्या अनेक बाबी येत असल्यात तरी मुख्यत्वेकरुन दोन गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत एक म्हणजे (बाहेरुन) स्वधर्माचे पालन आणि दोन (आतून) चित्तशुध्दीकारक भक्ती, ध्यान वगैरेंची विकर्मे. कर्मयोग या शब्दात कर्म आणि योग हे दोन शब्द येतात. 'कर्म' म्हणजे (बाहेरुन) स्वधर्मरुपी सेवा आणि 'योग' म्हणजे (आतून) आंतरिक विकर्म किंवा फलाशेचा त्याग. कर्म अधिक विकर्म बरोबर कर्मयोग (कर्म + विकर्म = कर्मयोग)

2) **ज्ञानसंछिन्नसंशयम्:** परमात्मज्ञानाचे संशय छेदुन टाकता येतात. परमात्म ज्ञानामुळे शंकानिवृत्त होता येते. उपनिषद म्हणते :

*भिद्यते हृदयग्रंथि: छिद्यन्ते सर्वसंशया: ।*
*क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥*

अर्थात् त्या परमश्रेष्ठ ब्रह्मतत्वाला जाणल्यावर हृदयस्थ तमाम प्रकारच्या अज्ञान ग्रंथी छिन्न-विच्छिन्न होऊन जातात. सारे संशय नष्ट होतात आणि अशा पुरुषाची सारी संचित कर्मे क्षीण होऊन जातात.

3) **आत्मवन्तं:** आत्मवान म्हणजे अत्यंत सावधान, अतिजागृत. गीतेच्या दुसचा अध्यायाच्या 45 व्या श्लोकातही 'आत्मवान' शब्द आला आहे.

गांधीजींच्या प्रत्येक क्रियेत जागृती असायची. एखादा कागदाचा कपटा उचलताना वा पेन्सिल उचलतांनाही या जागृतीची छाप बघणाऱ्यांवर पडायची.

ज्यांचे आयुष्य ईश्वराच्या अखंड अनुसंधानात व्यतीत होत असते त्यांच्या प्रत्येक हालचालीत सावधानतेची छाप पडायलाच हवी. बोलणे-चालणे, खाणे-पिणे या सारख्या तमाम व्यवहारातही निर्मळ विवेक असेल तर कमालीच्या जागृतीचे दर्शन घडते. यामुळेच दुसऱ्या अध्यायाच्या 54 व्या श्लोकात स्थितप्रज्ञाच्या संदर्भात अर्जुनाने प्रश्न विचारला आहे की त्याचे बोलणे-चालणे कसे असते? या प्रश्नाच्या उत्तरादाखल गीतेने स्थितप्रज्ञाच्या आंतरिक स्थितीचे वर्णन केले आहे. त्याच्या आंतरिक उच्च स्थितीचा परिणाम बाह्य क्रियेवर काय पडतो याची इथे चर्चा आली नाही.

ज्ञानवंताच्या प्रत्येक हालचालीत कमालीचे सावधपण वसते. ते तोलून-मापून बोलतात. त्यांच्या आचरणावर चित्ताच्या शांततेची छाप झळकते. आंतरिक शांतता जागल्यामुळे प्रत्येक बाह्य क्रियेतून प्रेम प्रकटते. गांधीजींची प्रत्येक हालचाल अत्यंत सावधानतेची असल्यामुळे ती आत्यंतिक सुंदर असायची. सौंदर्यपूर्वक कर्मे करण्याकडे ज्या लोकांचे लक्ष नसते अशांच्या ठायी कर्मविषयक जागृती दिसून येत नाही.

4) **न कर्माणि निबध्नन्ति:** कर्मफळांचा त्याग करणारे साधक संशय ग्रंथी छेदून टाकतात. कमालीच्या जागरुकपणे कर्मयोगाची साधना करतात. त्यांच्यासाठी कर्मे बंधनकारक ठरत नाहीत.

: 42 :

*तस्माद्ज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मन: ।*
*छित्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात् अज्ञानसंभूतं:** यामुळे अज्ञानाने म्हणजे अविवेकाने उत्पन्न झालेले
- **हृत्स्थं आत्मन:** आणि हृदयात स्थित या आत्म्याच्या संदर्भात
- **एनं संशयं:** जे संशय आहेत त्यांना
- **ज्ञानासिना:** (शोक, मोह वगैरे दोषांना दूर करणाऱ्या) ज्ञानरुपी तलवारीने
- **छित्वा:** छिन्न-विच्छिन्न करुन
- **योगं आतिष्ठ:** योगाचे अनुष्ठान करुन
- भारत: हे भरतवंशी अर्जुना
- **उत्तिष्ठ:** उठ, उभा रहा, कर्तव्य करायला सज्ज होऊन जा

### अर्थ

म्हणून हे भरतवंशी अर्जुना, तू हृदयात असलेल्या या अज्ञानाने उत्पन्न झालेल्या संशयाचा विवेकज्ञानरुप तलवारीने  नाश करुन समत्वरुप कर्मयोगात स्थिर रहा आणि युध्दाला उभा रहा.

***म्हणूनि अंतरांतील अज्ञान-कृत संशय***
***तोडुनी ज्ञान-खड्गानें ऊठ तूं  योग साधुनी।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) अज्ञानाने उत्पन्न झालेला आणि हृदयात स्थित जो आत्मा आहे त्याविषयी जे संशय आहेत त्याना (2) ज्ञानरुपी तलवारीने छेदून, छिन्न-विच्छिन्न करुन (3) योगसाधना कर आणि (4) आपल्या कर्तव्य पालनासाठी सज्ज होऊन जा.

### स्पष्टीकरण

1) **तस्मात्:** त्यामुळे अर्थात् मागील श्लोकाला लक्षात घेऊन. परमात्म ज्ञानाने सारे संशय दूर होतात. यामुळे **अज्ञानसंभूतं** अज्ञान म्हणजे अविवेकाने निर्मित आणि **हृत्स्थं** म्हणजे हृदयात असलेले असे जे संशय आहेत. **आत्मन:** परमात्म्याच्या विषयी **संशयं** जे संशय आहेत. त्याला या ज्ञानरुपी तलवारीने छिन्न-विच्छिन्न करुन टाक आणि योगसाधनेने आपल्या कर्तव्यपालनासाठी सिध्द हो.

40 व्या श्लोकात संशयी व्यक्तीची स्थिती आणि त्याला मिळणाऱ्या फळाविषयी चर्चा करुन 41 व्या श्लोकात ज्ञानाच्या खड्गामुळे संशयग्रंथींचे छेदन करता येते असा उपाय सांगितला गेला आहे.

संशयाच्या बाबतीत दोन मुद्यांची चर्चा आली आहे.

(अ) एक म्हणजे संशय कुठे उपजतो? संशय कशातून जन्माला येतो? याचे उत्तर आहे संशय अज्ञान वा अविवेकामुळे जन्माला येतो. समोर पडलेल्या दोरीबद्दल नीट ज्ञान नसेल तर दोरी सर्पासारखी दिसते आणि मनात त्या दोरीबाबत शंका उत्पन्न व्हायला लागते. ही संशयाची स्थिती आहे. संशय अज्ञानामुळे उत्पन्न होतो. अर्थात् अज्ञान भ्रांती वा विपरीत ज्ञान उपजवतो. दोरी बघून - बघितल्यावर शंका उत्पन्न होईल - कधी दोरी तर कधी सर्प वाटेल याला संशय म्हणतात. दोरीच्या बाबतीत हा सर्प आहे असेही वाटत नाही म्हणजे भ्रांती - ज्ञान उत्पन्न होत नाही आणि शंका उपजते असेही होत नाही यामुळे संशयाची स्थितीही नाही म्हणजे दोरीविषयी काही ग्रहणच होत नाही, अग्रहणाच्या स्थितीचा अनुभव येतो. या तिन्ही स्थिती संशय, शंका आणि अज्ञानामुळे उपजतात.

अशाप्रकारच्या भ्रांती वा अग्रहणाची स्थिती गीता वर्णित नाही पण संशय स्थितीची चर्चा येथे आहे. एका दृष्टीने बघू जाता भ्रांती, संशय आणि अग्रहण वा सर्व स्थिती अज्ञानजन्य असल्या तरीही संशयाची स्थिती अधिक भयंकर - भयावह आहे. भ्रांती म्हणजे वस्तुच्या बाबतीत विपरीत ग्रहण ही एक प्रकारची स्थिर स्थिती आहे. यात चित्त अस्थिर होण्याची प्रक्रिया नसते तसेच वस्तुच्या बाबतीत काही ग्रहणच नाही झाले म्हणजे ज्ञानच नाही झाले तर हीही एक प्रकारे स्थिर स्थितीच होय पण वस्तुबाबत संशय उत्पन्न व्हायला लागेल तर ती स्थिर स्थिती नसून अस्थिर स्थिती मानली जायला हवी. या स्थितीला गीता घ् भयानक स्थिती घ् म्हणते, यामुळे संशयाला एवढे महत्व दिले जात आहे.

(आ) दुसरा मुद्दा असा की संशय कुठे उपजतो? संशय ‘हृत्स्थं’ म्हणजे हृदयात, बुध्दीच्या ठायी, मनाच्या ठायी असतो. मनाची निश्चय शक्ती बुध्दी आहे आणि बुध्दीचा निश्चय अमलात येतो तेव्हा तो हृदयगत झाला असे मानले जाते ञ् समजले जाते पण बुध्दी काय अन् हृदय काय सारे मनच आहे. हे तिन्ही अभिन्न आहेत. मनात निश्चय झाला ती बुध्दी, निश्चय अमलात आला ते हृदय. संशयाचे नाना विषय आहेत. इथे ज्या संशयाची चर्चा आहे तो आहे परमात्मा बद्दल परम तत्वाबद्दलचा संशय. हा जोवर मनात आहे तोवर यथार्थ ज्ञान-खरेखुरे ज्ञान संभवणार नाही. एवढेच नव्हे तर तोवर श्रध्दाही जागणार नाही आणि परमात्म्याच्या बाबतीत जोपर्यत श्रध्दा-भक्ती उत्पन्न होणार नाही तोवर परमात्मज्ञान जागणे शक्य नाही.

2) परमात्मविषयक उत्पन्न होणाऱ्या संशयाचे छेदन करण्यासाठीचे उपाय गीतेने सुचवले आहेत. ज्ञानासिना छित्त्वा ज्ञानरुपी खड्गाने शंकांचे खंडन करावे छेदन करावे. शंका छिन्न-विच्छिन्न करण्यासाठी ज्ञानरुपी उपाय सांगितले गेले आहेत. कुठल्याही वस्तुबाबत जेव्हा संशय उत्पन्न होतो तेव्हा खरेखुरे ज्ञान प्राप्त करण्यासाठी वस्तुच्या खऱ्याखुऱ्या रुपाला-स्वरुपाला जाणून घ्यायचे प्रयत्न केले जातात. वस्तुचे खरेखुरे रुप जाणून घेतल्याशिवाय शंका दूर होणार नाहीत. शंका दूर करण्यासाठी ज्ञानाच्या शरणी जायला हवे. परमात्मा, आत्मा, माया, प्रकृती वगैरेंच्या

संदर्भात शंका जागली असता ज्ञानाचाच आश्रय घ्यावा लागतो. कठोपनिषदात सांगितले आहे:

*येयं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीति चैके।*
*एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं वराणामेष वरस्तृतीय:॥*
(1/1/20)

अर्थात् नचिकेता मृत्युपाशी जातो असा प्रसंग आहे. मृत्यु त्याला तीन वरदान मागून घ्यायला सांगतो. नचिकेत्याने मागितलेला तिसरा वर आत्म्याच्या संदर्भातला आहे. तो असे म्हणतो 'माणसाच्या मृत्युनंतर आत्मा जीवंत असतो वा जीवंत नसतो म्हणजे मृत असतो याबाबत आपल्यासारख्या अधिकारी पुरुषाकडून मी जाणून घेऊ इच्छितो.' हे तिसरे वरदान आहे.

नचिकेत्याच्या काळात मृत्युनंतर आत्मा जीवंत असतो वा मरतो याबाबत शंका होती. यावर ऊहापोह झाला असता कुणी म्हणायचे की मृत्युनंतर जीवात्मा जीवंत असतो. गीतेचे म्हणणे असे आहे की वस्तुस्वरुपाचे ज्ञान मिळवून शंका घालवा पण शंका घालवण्यासाठी आवश्यक ज्ञान कसे प्राप्त करुन घेता येईल हे जाणून घेणेही गरजेचे आहे.

3) आता तिसरा मुद्दा **योगं आतिष्ठ:** शंका घालवण्यासाठी परमात्म विषयक ज्ञान हवे. या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी योगविद्येचा आश्रय घ्यायला हवा. फळाच्या आशेचा त्याग करायला हवा. त्यागपूर्वक निष्काम कर्मयोग साधता आला तर कर्मयोग साधता येईल. कर्मयोगाच्या ठायी स्वधर्माचरणाच्या सोबतच चित्त शुध्द करणारी भक्ती, ध्यान, कर्मफळाचा त्याग, वैराग्य, आत्म-अनात्म विषयक विवेक यासारख्या तत्वांचा समावेश होतो.

4) अखेरचा मुद्दा **उत्तिष्ठ:** गीतेने प्रतिपादित केलेला आहे की योगाचा आश्रय घेऊन स्वधर्मपालनासाठी सिध्द व्हा. अर्जुनाला मोहाने घेरुन घेतले होते यामुळे स्वकर्तव्याचा त्याग करुन अर्जुन गुपचुप रथाच्या मागल्या भागात जाऊन बसला होता. योगेश्वर अर्जुनाला स्वकर्तव्यात प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करताहेत. अर्जुनाचा मोह एवढा गहन-खोल आणि व्याकुळता इतकी तीव्र होती की यामुळे त्याच्या ठायी तत्वज्ञान विषयक जिज्ञासा देखिल तीव्र रुपात उपजली यासाठी गीतेने विविध प्रकारे अर्जुनाला समजाऊन सांगितले आहे.

• • • *चौथा अध्याय संपूर्ण* • • •



## पाचवा अध्याय

# कर्म संन्यासयोग

: 1 :

**अर्जुन उवाच**

*संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि।*
*यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्ण:** हे कृष्णा
- **कर्मणां संन्यासं:** (कधी) कर्मांच्या संन्यासाची
- **च पुन:** योगं शंससि: आणि मग (कधी) निष्काम कर्मयोगाची प्रशंसा करतोस
- **एतयो:** यत् एकं **श्रेय:** या दोघांपैकी जे एक अगदी निश्चितपणे कल्याणप्रद म्हणजे श्रेयस्कर असेल
- **तत् मे सुनिश्चितं ब्रूहि:** तेच मला नक्की ठरवून सांग

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे कृष्णा, तुम्ही कर्मे टाकण्याची आणि फिरुन कर्मयोगाची प्रशंसा करता, तेव्हा या दोहोंपैकी माझ्यासाठी अगदी निश्चित कल्याणकारक जे एक साधन असेल ते सांगा.

**अर्जुन म्हणाला**

***कृष्णा संन्यास कर्मांचा तसा योग हि सांगसी***
***दोहोंत जें बरें एक सांग ते मज निश्चित।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने भगवंताला तीन गोष्टी विचारल्या आहेत 1) अर्जुन भगवंताला विचारत आहे की कधी आपण कर्म संन्यासाची प्रशंसा करता तर कधी कर्मयोगाचा महिमा गाता यामुळे मी गोंधळात पडून जातो. यामुळे 2) माझ्या दृष्टीने कल्याणकारी असे जे काही असेल 3) ते एक काहीतरी मला निश्चयपूर्वक सांगावे.

**स्पष्टीकरण**

1) **संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि:** तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकातही अर्जुनाने असाच प्रश्न केला होता. अर्थात् हा प्रश्न गीतेच्या दुसऱ्या अध्यायातल्या 49 ते 51 या श्लोकात योगेश्वराने मांडलेल्या विचारांच्या संदर्भात होता. 49 व्या श्लोकात योगेश्वराने सांगितले होते की कर्माहून समत्व बुध्दी श्रेष्ठ असल्यामुळे तू समत्वबुध्दीला शरण जा. पन्नासाव्या श्लोकात म्हटले की समत्वबुध्दीने पाप-पुण्य दोघे बंधनरुप ठरत नाहीत म्हणून तिचा आश्रय घ्यावा. समतेच्या ठायीच कर्मकुशलता नांदते. एकावन्नाव्या श्लोकात सांगितले की ज्ञानी पुरुष कर्मफळाचा त्याग करुन अच्युत पद पावतात. या तिन्ही श्लोकांमधून बाह्य कर्मापेक्षा आंतरिक समता, निष्कामता, निर्विकारतेला श्रेष्ठ मानले गेले. दुसऱ्या अध्यायात कर्तव्य कमांर्वर खूप भर दिला गेला असल्याकारणाने अर्जुन परत बुचकळ्यात पडला. त्याला आठ श्लोकांचे स्वधर्म प्रकरण ऐकवले गेले. अशाप्रकारे गीतेत परस्परविरुध्द चर्चा आल्यासारखे अर्जुनाला वाटते. तिसऱ्या अध्यायातील पहिल्या श्लोकात अर्जुनाने टोमणा मारला आहे की एकदा कर्माला आणि दुसऱ्यांदा ज्ञानाला श्रेष्ठ मानणे हे काही समजत नाही. तिसऱ्या अध्यायात कर्माची आवश्यकता प्रतिपादन करत असताना 18 व्या श्लोकात म्हटले गेले की जो कर्मात अकर्म आणि अकर्मात कर्म बघतो तो मोठा बुध्दीमान, योगी आणि तमाम कर्मे करणारा आहे. असे जर असेल तर मग कर्मे आचरत असतानासुध्दा ज्ञानी पुरुष अकर्तेपण कसे अनुभवतो हा प्रश्न उपजतो. या प्रश्नाचे उत्तर गीतेने दिले आहे. सात श्लोकामधून अकर्तेपणाचा अनुभव आणि अकर्तेपणा अनुभवणाऱ्या साधकाची लक्षणे सांगितली आहेत मग विकर्म प्रकरण सुरु झाले. हे प्रकरण संपताच 33 व्या श्लोकात सागितले गेले की तमाम विकर्मांमध्ये म्हणजे यज्ञांमध्ये ज्ञान श्रेष्ठ आहे आणि तमाम कर्मे अखेरीस ज्ञानातच विलीन होतात. इथे ज्ञानाचे श्रेष्ठत्व वर्णिले गेले आहे. ज्ञानाच्या तुलनेने कर्म गौण ठरले. यानंतर गीतेने ज्ञानप्राप्तीचा उपाय सांगितला आहे. ज्ञानामुळे लाभणाऱ्या श्रेष्ठ फळाची चर्चा केली आहे.

ज्ञानामुळे सर्व प्रकारचे मोह नष्ट होतात हेही सांगितले. भयंकर पापीही ज्ञानरुपी नौकेने तरुन जाऊ शकतो. ज्ञानरुपी अग्नी तमाम कमांर्ना जाळून टाकतो. ज्ञान प्राप्तीसाठी योगाचा आश्रय घ्यावा हे समजावताना सांगितले आहे. "ज्ञान प्राप्त करायचे असेल तर परमात्म्याच्या बाबतीतल्या सर्व शंका दूर सार आणि योगविद्येला शरण जा. कर्तव्यपालन करण्यासाठी सिध्द हो."

अशाप्रकारे एकीकडे कर्मावर म्हणजे कर्मयोगावर भर देताहेत तर दुसरीकडे अकर्म म्हणजे अकर्तेपणावर भर देऊन परमात्मज्ञानाची प्राप्ती करणे हा श्रेष्ठ मार्ग असल्याचेही योगेश्वर सांगत आहेत. अर्जुनाला योगेश्वराचे हे निवेदन परस्परविरुध्द वाटत आहे. आपले कल्याण कशात आहे हे काही अर्जुनाला स्पष्ट होत नाही कारण की गीता कर्मावर-स्वधर्मावर भर देते - त्याचे महत्व प्रतिपादित करते. तसेच आंतरिक निर्विकारता, समता, निष्कामता, अनासक्ती, फलत्याग, यासारख्या विषयांवरही भर देत आहे. या विकर्मांचे महत्वही सांगत आहे. स्वधर्मरुप बाह्य कर्मे काय आणि चित्तशुध्दि करणारे आंतरिक विकर्म काय या दोघांचेही आपापले स्थान आहे आणि यातून उपजणारी कर्मदशा म्हणजे ज्ञानस्थितीचे स्वतंत्र स्थान व महत्व आहे. या तिघांमध्ये ज्ञानस्थिती अखेरचे फळ आहे. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या साधनेची दोन अंगे होत. एक बाह्य स्वधर्माचरण आणि दुसरे - चित्त शुध्दिकारी विकर्म! खरे तर या दोघाची तुलना करायची काही गरज नाही पण तुलना करु म्हटलेच तर स्वधर्माच्या आचरणापेक्षा विकर्म श्रेष्ठ मानावे लागेल पण बाह्य स्वधर्माचरणाशिवाय का विकर्म साधू शकेल? एकट्या विकर्माच्या बळावरही अंतिम ज्ञानावस्था प्राप्त करुन घेता येणार नाही. मोह असताना हे सारे यथायोग्य पध्दतीने समजून घेणे सोपे नाही. अर्जुनाची अशीच दशा झाली आहे. त्याला मोहाने घेरुन घेतले असल्यामुळे तो प्रेमाने देवालाच टोमणा मारत आहे.

2) यत् **श्रेय:** एतयो: दोघापैकी श्रेयस्कर काय हे अर्जुनाच्या ध्यानात येत नाही. दुसऱ्या अध्यायातल्या 7 व्या श्लोकात अर्जुन सांगतो की धर्म-अधर्म, नीती-अनीती, कार्य-अकार्य या बाबतीत मोहामुळे त्याला काही निर्णय

घेता येत नाही. त्याचे ज्ञान नष्ट झाले. तो निर्णयशक्ती हरवून बसला आहे. शोक-मोहाच्या वृत्तीमुळे त्याच्या वृत्तीत हीनता उत्पन्न झाली असल्यामुळे त्याचे मन स्थिर होत नाही. चित्त अस्थिर आहे. तो भगवंतापाशी शिष्य भावनेने पोहोचतोय. तो भगवंताला आपल्या हिताचा-कल्याणाचा मार्ग विचारत आहे.

तिसऱ्या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकातही ज्याने माझे कल्याण होईल ते मला सांगावे असे अर्जुनाने सांगितलेले आहे. ज्याच्या मनात व्याकुळता उत्पन्न होते तोच अध्यात्म ज्ञानाचा अधिकारी होय. अर्जुनाच्या मनात आपल्या कल्याणाची आतुरता आहे. ज्ञानप्राप्तीसाठी ही चांगली भूमिका होय.

3) तिसरी गोष्ट अर्जुन अशी विचारत आहे की एकं तत् मे ब्रूहि सुनिश्चितम्: अर्जुनाचे म्हणणे असे की जे काही निश्चितरुपाने कल्याणप्रद असेल ते एकच काय ते अर्जुनाला सांगितले जावे कारण नक्की अशा दोन गोष्टीही सांगता येतात ना म्हणून अर्जुन म्हणतो की मला नक्की एकच काय ते सांगा.

: 2 :

**श्री भगवान् उवाच**

*संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।*
*तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **संन्यासः च कर्मयोगः** कर्माचा संन्यास (मन, इंद्रिये आणि शरीराद्वारे होणाऱ्या सर्व कर्मांच्या कर्तेपणाचा त्याग करणे )आणि निष्काम कर्मयोग (समत्वबुध्दीने भगवर्द्‌थ कर्मे करणे)
- **उभौ निःश्रेयस्करौ:** दोघेही परम कल्याणकारी आहेत
- **तु तयोः कर्मसंन्यासात्:** पण दोघांमध्ये कर्म-संन्यासाच्या तुलनेने
- **कर्मयोगः विशिष्यते:** निष्काम कर्मयोग श्रेष्ठ आहे

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले कर्मसंन्यास आणि निष्काम कर्मयोग हे दोन्हीही परम कल्याण करणारेच आहेत पण त्या दोहोतही संन्यासाहून कर्मयोग साधण्यास सोपा असल्यामुळे श्रेष्ठ आहे.

**श्री भगवान म्हणाले**

***योग संन्यास हे दोन्ही मोक्ष-साधक सारखे***
***विशेष चि परी योग संन्यासाहूनि मानिला ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. (1) संन्यास आणि कर्मयोग दोघे कल्याणकारी आहेत (2) पण कर्मसंन्यासाहून कर्मयोग श्रेष्ठ आहे.

**स्पष्टीकरण**

1) **संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ:** तिसऱ्या अध्यायात अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नाचे हे उत्तर आहे की मोक्ष प्राप्त करण्यासाठी वा परमात्मज्ञान मिळवण्यासाठी दोन मार्ग आहेत- एक तर सांख्ययोग्यांचा म्हणजे ज्ञानवंतांचा ज्ञानमार्ग आणि दुसरा म्हणजे योग्यांचा कर्मयोग. या अध्यायाच्या 4 थ्या श्लोकात 'सांख्य' आणि 'योग' या शब्दांचा प्रयोग झाला पण या श्लोकात मात्र 'संन्यास' आणि 'कर्मयोग' या शब्दांचा प्रयोग आहे. अर्जुनाच्या प्रश्नात हे दोन शब्द असल्यामुळे योगेश्वराने या दोन शब्दांचाच वापर केला. संन्यास शब्दात बाह्यकर्मांचा त्याग दिसून येतो तरीही हा कर्मत्याग सहजावस्थेचा कर्मत्याग आहे म्हणजे यात कर्मत्यागाचा काही इरादा नाही. जो आंतरिक ज्ञानावस्थेत रंगून गेला आहे. त्याच्या जीवनात बाह्यत: कर्मत्याग दिसत असला तरी ज्ञानावस्था हीच तर मुळी महान कर्म आहे. यामुळे तिच्यापुढे बाह्य कर्माची किंमत नगण्य ठरावी अशी आहे.

या परिपूर्ण ज्ञानावस्थेचे नावच तर संन्यास होय. शंकराचार्य याला 'विद्वत् संन्यास' असे म्हणतात परिपूर्ण ज्ञानावस्था आणि परिपूर्ण योगावस्था या दोघांची स्थिती सारखीच. तरीही योगावस्थेत बाहेरुन कर्मत्याग दिसून येत नाही म्हणजे श्वासोच्छवासाप्रमाणे योगावस्थेतही बाहेरुन सेवाकर्मे अखंडपणे सुरुच असतात. ना सेवाकार्यात खंड पडत ना कर्मात! यामुळेच याला कर्मयोग म्हटले जाते. ज्ञानावस्थेतला संन्यास 'विद्वत् संन्यास' तसा अज्ञानावस्थेतला संन्यास **'अविद्वत् संन्यास'** म्हणायचा. अशाप्रकारे संन्यासाचे दोन प्रकार संभवतात. कर्मयोगाच्या बाबतीतही असेच ज्ञानावस्थेतला कर्मयोग आणि

अज्ञानावस्थेतला कर्मयोग असे दोन प्रकार होऊ शकतात. अज्ञानावस्था म्हणजे साधकावस्था वा मुमुक्षु अवस्था होय. ज्ञानावस्था आणि अज्ञानावस्था याशिवाय प्रपंचात कर्म करणाऱ्या अन्य जनांना 'कर्मयोगी' नाही म्हणता येत. तिथे 'योगी' शब्दाऐवजी आपण 'कर्मनिष्ठ' हा शब्द वापरु शकतो. 'कर्मयोग' शब्दात 'योग' शब्द महत्वाचा आहे. योगयुक्त होऊन कर्मे करणे म्हणजे निष्काम भावनेने कर्मे करणे - परमेश्वरार्पण बुध्दीने कर्मे करणे होय आणि 'योग' शब्दात हा अर्थ सामावलेला आहे.

पण सकाम भावनेने, आसक्ती वा ममत्व बुध्दीने केल्या जाणाऱ्या कर्मासाठी 'योग' शब्दाचा प्रयोग नाही करता येत. सिध्दावस्थेत संन्यास आणि योग एकरुप आहेत. नावे वेगवेगळी आहेत कारण संन्यासात ज्ञानासोबत बाहेरुन कर्मत्याग येतो तर योगात बाहेरुन कर्म येते. संन्यास आणि कर्मयोग दोघेही सिध्दावस्थेत एक असल्यामुळे समानरुपाने मोक्षद म्हणजे मोक्ष देणारे आहेत.

संन्यास आणि योग सिध्दावस्थेत एक असतानाही वृत्तीभेदामुळे दोघांच्या ठायी अंतर पडते. कुणाची वृत्ती बुध्दीप्रधान म्हणजे ज्ञानप्रधान तर कुणाची भावनाप्रधान असते. बुध्दिप्रधान वृत्तीसंपन्न साधक ज्ञानमार्गाने परमात्म ज्ञान प्राप्त करुन घेण्यात यशस्वी झाले तर त्यांची वृत्ती अनायासेच कर्मत्यागाकडे वळते. भावनाप्रधान वृत्तीसंपन्न साधक परमेश्वरार्पण बुध्दीच्या मार्गाने परमात्म ज्ञान प्राप्त करतात. यामुळे परमेश्वरार्पण बुध्दीचा बाह्य परिणाम सेवा-जनसेवा यात दिसून येतो. याचा अर्थ ते कर्मत्यागाकडे न वळता कर्मयोगाकडे वळतात. भावनाप्रधान वृत्तीसंपन्न साधक परमेश्वरार्पण बुध्दीच्या मार्गाने परमात्मज्ञान प्राप्त करतात. यामुळे परमेश्वरार्पण बुध्दीचा बाह्य परिणाम सेवा-जनसेवा यात दिसून येतो याचा अर्थ ते कर्मत्यागाकडे न वळता कर्मयोगाकडे वळतात. अनेकांच्या ठायी दोघांचे मिश्रण दिसून येते. ज्यांच्या ठायी ज्ञान आणि भक्ती ही दोन्ही तत्वे असतात ते बाहेरुन जनसेवेत तल्लीन दिसून येतात, म्हणजे त्यांच्या ठायी ज्ञान कर्म आणि भक्तीचा त्रिवेणी संगम दिसून येतो. ही मोठी भाग्याची गोष्ट होय अशाप्रकारे गीता सांगते की सांख्य आणि योग दोघे सिध्दावस्थेत श्रेयस्कर आणि समान रुपाने मोक्षदायक आहेत.

2) **तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते:** कर्मसंन्यासाहून कर्मयोग श्रेष्ठ आहे, कल्याणप्रद आहे. कर्मत्यागाचा अधिकार सिध्ददशेतच असतो, साधकदशेत नव्हे. तिसऱ्या अध्यायातल्या 6 व्या श्लोकात येते की साधक दशेत कर्मत्याग केल्यामुळे मिथ्याचारी बनायचा पूर्ण धोका आहे. सिध्ददशेत कर्मत्याग सहजपणे होतो. ही भूमिका अतिशय उच्च दर्जाची आहे. या स्थितीवर जे आरुढ आहेत ते बाहेरुन काहीही करत नसले तरी त्यांच्या ठायी प्रचंड कर्मप्रेरणेची शक्ती वसते. विनोबा याला 'काहीही न करता सारे काही करणे' असे म्हणतात.

सर्वांना जीवन परिवर्तनाची प्रेरणा ज्यातून लाभते असा सिध्दावस्थेतला कर्मत्याग अलौकिक असतो. अशा कर्मत्यागाचे बाह्य अनुकरण साधकावस्थेत कुणी करु म्हटले तरी ते शक्य नाही. जोवर वृत्तीच्या ठायी निर्विकारता जागत नाही, परमात्म स्वरुपाची ओळख होत नाही, निष्कामभाव उभा रहात नाही, चित्तवृत्ती अहंकारशून्य बनत नाही तोवर बाहेरुन कर्मत्याग करणे भयंकर ठरते. बाह्यत: कर्मत्यागाच्या प्रयत्नात आतील काम-क्रोध वगैरे विकार वाढू लागतात. त्याना क्षीण करण्यासाठी कर्माचा-सत्कर्माचा आश्रय घ्यायला हवा, अन्यथा विकार बळावतील. माणूस अनाचाराच्या खाईत ढकलला जाईल. सिध्दावस्थेत 'काहीही न करता सारे काही करणे' म्हणजे संन्यास तर 'सारे काही करुनही काहीही न करणे' म्हणजे योग होय. दोघात अकर्मदशा जागते म्हणजे अकर्तेपणाची दशा जागते. हे परिपूर्णरित्या साधते.

अकर्मदशा वा अकर्तेपणाची स्थिती प्राप्त झाल्यावर बाह्यत: कर्माचे होणे वा न होणे दोन्ही बाबी आंतरिक दृष्ट्या गौण बनून जातात पण ही अकर्मदशा प्राप्त करुन घेण्यासाठी अज्ञानदशेत म्हणजे साधकदशेत कर्मत्याग करण्याऐवजी कर्मे आचरणे श्रेष्ठ व कल्याणप्रद होय. तुलसीदासजी म्हणतात :

***ज्ञान पंथ कृपान कै धारा। परत खगेस होइ नहिं बारा॥***

अर्थात् ज्ञानाचा पंथ तलवारीच्या धारेसारखा आहे. या पंथाने साधना करताना पडायला वेळ नाही लागत. कर्मयोगी राजमार्ग आहे. या पंथावर डोळे मिटून चालले तरी मुक्कामी पोहोचता येते. ज्ञानेश्वर माऊली म्हणते - "ज्ञानी असो वा अज्ञानी उभयतांसाठी कर्मयोग नौकेसारखा

सरळ-सुगम आहे. नौकेत बसल्यावर बुडायची भीती नसते. तसेच कर्मयोगमार्गाने साधना करण्यात काही भय नाही-धोका नाही. संन्यास हा अरण्यपंथ आहे. घनदाट अरण्यात वाघ-सिंह यासारखे हिंस्र पशु रहातात. अरण्यात काही तयार केलेला मार्ग नसतो. यामुळे साधकदशेत कर्मत्यागाच्या पथावर वाटचाल करणे घातक असते-यात पडायची शक्यता अधिक असते.'' यामुळे गीतेने या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात कर्म संन्यासापेक्षा कर्मयोगाला श्रेष्ठ मानले आहे.

: 3 :

*ज्ञेय: स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति।*
*निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात् प्रमुच्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: न द्वेष्टि न कांक्षति:** जो द्वेष करत नाही, (जो) आकांक्षा राखत नाही
- **स: नित्यसंन्यासी ज्ञेय:** तो नित्य संन्यासी आहे असे माना
- **हि महाबाहो:** कारण की हे अर्जुना
- **निर्द्वंद्व:** जो द्वंद्व रहित होऊन गेला आहे
- **बंधात् सुखं प्रमुच्यते:** तो कर्मबंधनातून सहजतेने मुक्त होऊन जाईल

**अर्थ**

हे अर्जुना जो पुरुष कुणाचा द्वेष करत नाही आणि कशाची अपेक्षा करत नाही, तो कर्मयोगी नेहमीच संन्यासी समजावा कारण राग-द्वेष इत्यादी द्वंद्वांनी रहित असलेला पुरुष सुखाने संसारबंधनातून मुक्त होतो.

***तो जाण नित्य-संन्यासी राग-द्वेष नसे जया***
***जो द्वंद्वावेगळा झाला सुखें बंधांतुनी सुटे।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी सांगितल्या आहेत (1) जो कुणाचा द्वेष करत नाही. (2) जो निराकांक्ष म्हणजे आकांक्षारहित आहे. (3) असा साधक नित्य संन्यासी असतो. (4) जो सुखदु:ख वगेरे द्वंद्वांपासून मुक्त आहे (5) तो अत्यंत सहजतेने (6) कर्माच्या बंधनांमधून मुक्त होतो.

**स्पष्टीकरण**

1) **य: न द्वेष्टि:** या श्लोकात संन्याश्याच्या आंतरिक गुणाचे वर्णन येते. समाजात संन्यासविषयक चुकीच्या मान्यता आणि गुणांचे वर्णन येते. समाजात संन्यास विषयक चुकीच्या मान्यता घर करुन आहेत. भगवे धारण करणारा, सेवाकार्य न करणारा, तत्वज्ञानाचा पाढा वाचणारा, जनतेच्या बाह्य दु:खांना दूर करण्याचे प्रयत्न न करणारा आज संन्यासी मानला जातो. प्रापंचिक जनांच्या नाना समस्यांमध्ये न पडणारा, कुठलीही सामाजिक सेवा न करताही भोजन करताना ज्याला यत्किंचितही क्षोभ होत नाही अशाला संन्यासी मानले जाते. गीतेने संन्याश्याची जी व्याख्या केली आहे तिचा बाह्याचरणाशी सुतराम संबंध नाही. संन्यासीचे पहिले लक्षण आहे की तो कुणाचाही द्वेष करत नाही. हे आंतरिक लक्षण आहे. द्वेष उत्पन्न होण्याची नाना कारणे आहेत. द्वेषापासून तर साधकालाही मुक्तता नाही. दोन साधक वा मुमुक्षु साधना करत असतील तर एक दुसऱ्याची कीर्ती ऐकून त्यांच्या मनात विखार जागतो, द्वेष उभा ठाकतो. प्रापंचिक, जनसेवक आणि मुमुक्षु वगैरे तर अपूर्ण आहेतच यामुळे त्यांच्यातील द्वेषभाव उणावला नाही, याचे काही आश्चर्य वाटायचे कारण नाही. तुलसीदास म्हणतात:

*उमा जे रामचरण रत, बिगत काम मद क्रोध।*
*निज प्रभुमय देखहिं जगत, केहिसन करइँ बिरोध॥*

अर्थात् "जे रामचरणी लीन झाले आहेत, ज्यांचे काम-क्रोध वगैरे विकार नष्ट झाले आहेत, जे जगाला प्रभुमय रुपातच बघतात असे पुरुष का कधी कुणाचा द्वेष करतील?'' या दोह्यातून द्वेषरहित जीवनाचे मर्म सांगितले गेले आहे. गीतेच्या बाराव्या अध्यायात भक्तीची लक्षणे वर्णन करताना सर्वप्रथम अद्वेष्टा सर्वभूतानाम्' भक्त कुणाचाही द्वेष करत नाही' हे लक्षण आले आहे. संन्याचीसेही हेच लक्षण आहे.

2) **न कांक्षति:** तो कुठल्याही प्रकारची आकांक्षा मनी धरत नाही. आकांक्षा म्हणजे इच्छा वा कामना. मानवी मनात नाना प्रकारच्या इच्छा-आकांक्षा घर करुन असतात. जर्मनीची हुकूमत जगावर असावी अशी आकांक्षा हिटलरच्या मनात होती. या महत्वाकांक्षेमुळे जर्मनीचा सर्वनाश झाला. ज्ञानेश्वर माऊली म्हणते -

'ज्यांच्या मनी आकांक्षा कधीही प्रवेश करत नाही त्यांचे आंतरिक सुख वृध्दिंगत होते.' अशुभ आकांक्षा मूळ धरु नयेत यासाठी शुभ आकांक्षा कराव्यात. अशुभ आकांक्षा दूर होताच शुभ आकांक्षा स्थिरावतील. शुभ आकांक्षा म्हणजे मोक्षाची आकांक्षा होय. वैराग्य, भक्ती वगैरे प्राप्त करायची इच्छा होय. गीतेच्या सोळाव्या अध्यायाच्या आरंभिक तीन श्लोकामधून आलेल्या दैवी गुणांच्या विकसनाची इच्छा बाळगायला हवी. एकदा का शुभ इच्छेचा उदय आणि विकास झाला की मग त्याबाबतीत उदासीन भाव उत्पन्न करायचे प्रयत्न करावेत. हे संन्यासीचे लक्षण होय. त्याला नित्य संन्यासी मानावे.

3) **नित्य-संन्यासी:** संन्यासी द्वंद्वातीत असतो. हे आंतरिक लक्षण होय. सहाव्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकात आणखी एका आंतरिक लक्षणाची चर्चा करुन त्यासोबत बाह्य लक्षणांचीही चर्चा आली. गीता म्हणते - 'कर्मफळाची आसक्ती सोडून कर्तव्य आचरणारा संन्यासी होय. निर्यज्ञ म्हणजे यज्ञ न करणारा आणि निष्क्रिय काही संन्यासी नव्हे.' कर्मरत असणे बाह्य लक्षण तर कर्मफळाची आसक्ती सोडणे हे आंतरिक लक्षण होय. अशाप्रकारे अंतर्बाह्य लक्षणयुक्त नित्य संन्यासी ठरतो.

4) **निर्द्वंद्वः** द्वंद्वातीत होता यावे. बाह्य शीतोष्ण व आंतरिक सुखदु:ख यांचा द्वंद्वात समावेश होतो. आत्यंतिक उष्णता वा कमालीचा गारठा सहन होत नाही. अतिवर्षाही असह्य असते. सृष्टीचा अर्थच मुळी द्वंद्व म्हणजे द्वैत होय. दोन म्हणजे विपरीत---अनुकूल, प्रिय आणि प्रतिकुल, अप्रिय. जो यांच्यापासून मुक्त झाला त्याला संन्यासी म्हणावे.

5) या लक्षणांनी युक्त संन्यासी सहजच प्रापंचिक बंधनामधून मुक्त होतो. सहजपणे म्हणजे विनासायास, परिश्रम न करता हा इथे आशय आहे. अद्वेषभाव, निराकांक्ष स्थिती, द्वंद्वातीत होणे ही लक्षणे साधणे काही सोपे नाही. या लक्षणाना प्राप्त करुन घेण्यासाठी खूप प्रयत्नाची आवश्यकता आहे. ही लक्षणे प्राप्त झाली की प्रापंचिक बंधनांपासून मुक्त व्हायला नाही उशीर लागत.

6) **बंधात् प्रमुच्यते:** प्रापंचिक बंधने म्हणजे कर्मबंधने होत. ज्ञानेश्वर माऊली म्हणते- ''जो भूतकाळाला स्मरत नाही, कुठलीही वस्तु मिळाली तरी तिची अभिलाषा मनी धरत नाही, मेरु पर्वतासारखे ज्याचे मन निश्च्छल म्हणजे स्थिर आहे, ज्याचे अंत:करण 'मी' आणि 'माझे' या दोघापासून अलग होऊन उन्नत बनले आहे, त्याला अखंड संन्यासीच जाणावे. ज्याच्या मनाची अशी तयारी होते, त्याच्यापासून आसक्ती लांबवर निघून जाते. यामुळे अनायासेच त्याला अखंड सुख लाभते. आता त्याला काही घरादाराचा त्याग करावा लागत नाही कारण घरादारात आसक्त असलेले मन नि:संग बनून जाते. अग्नी विझून त्याची राख झाली ना की तो कापसातही ठेवता येतो. तशाच प्रकारे प्रपंचाच्या नाना उपाधींमध्ये राहूनही ज्याची बुध्दी संकल्प विकल्परहित बनली असा पुरुष कदापि कर्मबंधनात अडकून पडत नाही. यामुळे मनातून कल्पना दूर झाली. हटवली गेली की संन्यास प्राप्त होतो, म्हणून कर्मसंन्यास आणि कर्मयोग दोघांना समान योग्यतेचे - सारख्या श्रेणीचे मानायला हवे.''

: 4 :

***सांख्ययोगौ पृथग्बाला: प्रवदन्ति न पंडिता: ।***
***एकमप्यास्थित: सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **बाला:** अज्ञानी जन
- **सांख्ययोगौ:** सांख्य आणि योग, निष्काम कर्मयोग
- **पृथक् प्रवदन्ति:** वेगवेगळे (एकमेकांपासून विपरीत फळ देणारे) सांगितलेले आहेत
- **पंडिता: न:** पण पंडितगण असे नाही (म्हणत)
- **एकं अपि:** (दोघांपैकी कुठल्या ) एकाचेही
- **सम्यक् आस्थित:** सम्यक रित्या, योग्य प्रकारे आचरण करणारा
- **उभयो: फलं:** दोघांच्या फळाला (मोक्षाला)
- **विन्दते:** प्राप्त करतो

**अर्थ**

वर सांगितलेले संन्यास आणि कर्मयोग वेगवेगळी फळे देणारे आहेत असे मूर्ख लोक म्हणतात, पंडित नव्हेत कारण दोहोंपैकी एकाचे ठिकाणी सुध्दा उत्तम प्रकारे स्थित असलेला पुरुष दोहींचे फलस्वरुप असलेल्या परमात्म्याला प्राप्त होतो.

*म्हणती सांख्य-योगांतें भिन्न मूढ न जाणते*
*बाणो एक हि ती निष्ठा दोहींचें फळ देतसे।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत (1) कर्मसंन्यास आणि कर्मयोगाला भिन्न वा परस्पर विरोधी फळे देणारी आहेत असे मानणारे अज्ञानी जन होत. (2) पण ज्ञानी जन मात्र असे मानत नाहीत. (3) या दोघापैकी एकाचेही परिपूर्ण - योग्यरित्या आचरण केले तर (4) दोघांची फळे लाभतात.

**स्पष्टीकरण**

1) **सांख्ययोगौ पृथक् बाला: प्रवदन्ति:** सांख्य आणि योग म्हणजे संन्यास आणि कर्मयोग दोघे भिन्न फळे देणारे आहेत असे अज्ञानी लोक समजतात. दोघाचे स्वरुप गहन आहे, सूक्ष्म आहे. या सूक्ष्मतेची कल्पना करणे सोपे नाही.

विनोबांनी गीता प्रवचनांमधून हा मुद्दा अत्यंत उत्तम प्रकारे हाताळला आहे-सामान्यपणे असे मानले जाते की कर्म संन्यास म्हणजे कर्म त्याग आणि कर्मयोग म्हणजे कर्म करणे पण हा स्थूल अर्थ झाला. तिसऱ्या अध्यायातील 5 व्या श्लोकात म्हटले आहे की कुठलीही व्यक्ती क्षणभरही कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही. आता कर्म जर सुटतच नसेल तर कर्मसंन्यासाचा कर्म सोडणे असा स्थूल अर्थ तरी कोण करु शकेल? पण अज्ञानी जन असा अर्थ करतात. यामुळेच बाह्यत: कर्माचा त्याग करणारा, भगवा वस्त्रधारी, काही धार्मिक चर्चा करायची योग्यता असणाऱ्याला जनलोक संन्यासी मानून बसतात. मागील श्लोकातून संन्याश्याच्या आंतरिक लक्षणांची चर्चा आली आहे. बाह्यत: कर्मत्याग जसा कर्मसंन्यास नाही तसाच बाह्यत: कर्मे आचरणेही कर्मयोग नव्हे ! अर्थात् रात्रंदिवस कर्मे करणाऱ्याला अज्ञानी माणूस कर्मयोगी मानून बसतो.

काही लोक रात्रंदिवस समाजसेवेत तल्लीन असतात. बाह्यत: तर समाजाला त्यांची चांगली सेवा लाभते पण ते ना संयमी असत ना ब्रह्मचारी! ते निर्व्यसनी असतात असेही नाही. 'समाज सेवेचा जीवनाशी अविभाज्य संबंध आहे. असेही समाज सेवकांना वाटत नाही. जीवन सत्य-अहिंसा या व्रतांवर स्थिरपद असावे, जीवन जसजसे व्रतस्थ, निष्काम, निर्विकारी, संयमी बनत जाईल ज्या प्रमाणात आपण समाजसेवेला योग्य बनू शकतो. अशीही कल्पना सर्वच समाज सेवकांना नसते. अज्ञ समाजाची तर अशी कल्पना नसतेच नसते. काही सेवक बाह्यत: खूप त्यागी असतात, अपरिग्रही असतात. त्यांच्या ठायी श्रमनिष्ठा नांदते. ते ब्रह्मचारीही असतात पण त्यांचा अहंकार क्षीण नसतो. काही त्यागी सेवकांच्या ठायी क्रोध व अहंकार खूप असतो. अशा प्रकारे बाह्यत: खूप सेवा करण्याला वा खूप कर्मे करण्याला काही कर्मयोग म्हणता येणार नाही.

2) **न पंडिता:** पंडित, ज्ञानी, विवेकीजन कर्मसंन्यास आणि कर्मयोग यात भेद मानत नाहीत. अकर्तेपणाची स्थिती, काम-क्रोध रहित अवस्था यासारख्या आंतरिक ज्ञानदशा, कमालीची आत्यंतिक अलिप्तता वा अनासक्ती हाच तर संन्यास होय, हे ज्ञानीजन उत्तम प्रकारे जाणतात. अशी अकर्तेपणाची अवस्था जागली की बाह्य कर्मे न करण्यासारखीच स्थिती जागते. आंतरिक अलौकिक अवस्थेचा प्रकाश असा फाकतो की बाह्य कर्मात प्रवृत्त होण्याची आणि जीवन परिवर्तनाची प्रेरणा जागते यामुळेच तर आतून ज्ञानस्थितीचा अनुभव प्राप्त करुन घेतलेला पुरुष बाहेरुन कर्मे न आचरताही कर्मात प्रवृत्त आहे असे मानले जाईल पण बाहेरुन तो कर्मे न आचरणारा दिसत असल्यामुळे त्याला संन्यासी म्हणता येईल, दुसरीकडे आतुन परमात्म स्वरुपाचा अनुभव करणारा ज्ञानीपुरुष निरहंकारी असल्यामुळे त्याला अकर्तेपणाची दशा प्राप्त झालेली दिसते. तो बाह्यत: कर्मे आचरत असताही काहीही करत नाही असा अनुभव घेत राहील. आतून अकर्तेपण साकारल्यामुळे त्याचे कर्म अकर्म ठरते, शून्य बनून जाते. कर्मे आचरत असतानाही त्याच्यापाशी कर्माची कुठलीही किंमत नसते. अशाप्रकारे काही न करता सर्व काही करणाऱ्याला संन्यासी म्हणायचे आणि सारे काही करुनही काहीही न करणाऱ्याला योगी म्हणायचे. दोघाच्या आंतरिक भूमिकेत अंतर नसल्यामुळे पंडित वा ज्ञानीजन कर्मसंन्यास आणि कर्मयोग या समान अवस्था मानतात.

3) **एकं अपि आस्थित: सम्यक्:** कर्मसंन्यास वा कर्मयोग योग यापैकी फळ असलेल्या कुठल्याही एकाचे सुयोग्य आचरण करता आल्यास

4) **उभयोर्विन्दते फलं:** कर्मसंन्यास अथवा कर्मयोग दोघांचे फळ असलेला मोक्ष प्राप्त होतो - अर्थात् यापैकी एकाचे आचरण सुयोग्य पध्दतीने व्हायला हवे ही अट आहे तसे तर साधकावस्थेत कर्मसंन्यासाच्या तुलनेने कर्मयोग श्रेष्ठ आणि सोईचा असतो तरी पण साधक

यापैकी कुठलाही एक मार्ग निवडायला स्वतंत्र आहे. वरवर दोन वाटणारे आणि क्वचित् परस्परविरोधी वाटणारे हे मार्ग खरे तर एकच आहेत हे ज्ञानवंताला वा पंडिताला वा विवेकी पुरुषाला कळते.

: 5 :

*यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते।*
*एकं सांख्यं च योगं च य: पश्यति स पश्यति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् स्थानं:** जे मोक्षरुपी स्थान
- **सांख्यै:** संन्यासी जनांना
- **प्राप्यते:** प्राप्त होते
- **तत् योगै: अपि:** तेच (स्थान) कर्मयोगी ज्ञानवंतांनाही
- **गम्यते:** प्राप्त होते
- **य:** (म्हणून) जे
- **सांख्यं च योगं च:** संन्यास आणि कर्मयोगाला
- **एकं पश्यति:** एक बघतात
- **स: पश्यति:** तेच (खऱ्या अर्थाने) बघतात

**अर्थ**

ज्ञानयोग्याना जे परम पद म्हणजे धाम प्राप्त होते तेच कर्मयोग्यानाही प्राप्त होते म्हणून जो मनुष्य ज्ञानयोग आणि कर्मयोग हे फळाच्या दृष्टीने एकच आहेत असे पाहतो तोच खऱ्या अर्थाने पाहतो.

*सांख्यांस जे मिळे स्थान तें योग्यांस हि लाभतें*
*एक-रुप चि हे दोन्ही जो पाहे तो चि पाहतो ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत (1) सांख्य म्हणजे कर्मसंन्यासी पुरुष ज्या मोक्षरुपी स्थानाला पावतात तेच स्थान योगी म्हणजे कर्मयोगी ज्ञानी पुरुषदेखिल प्राप्त करुन घेतात. (2) यामुळे सांख्य आणि योगात अभेद मानणारा - एकत्व मानणारा हाच खऱ्या अर्थाने यथार्थ बघणारा आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तत् योगै: अपि गम्यते:** पूर्ण कर्मसंन्यासी ज्ञानी वा पूर्ण कर्मयोगी ज्ञानी या दोघांची आंतरिक दशा समान असते. दोघाचा अज्ञानभाव म्हणजे देहभाव नष्ट होतो, दोघाचा अहंकार परमात्मरुपात विलीन होऊन जातो. दोघे अकर्ता बनून जातात. निष्काम-निर्विकार बनून जातात. अनासक्त-अलिप्त होतात. यामुळे दोघाच्या स्थितीत तिळमात्र फरक उरत नाही. परमात्म स्वरुपाचे ज्ञान प्राप्त झाल्यामुळे दोघाना मोक्ष लाभतो. दोघात केवळ बाह्यत: अंतर आहे, आतून समानता आहे. गीता प्रवचनात पाचव्या अध्यायात विनोबा लिहितात-

“संन्यास आणि योगात एकरुपता ज्याला बघता आली त्यालाच खरे रहस्य उकलले आहे. एक न करता करतो, दुसरा करुनही काही करत नाही, खराखुरा संन्यासी, सदा समाधिरत असतो. अशा निर्विकार-संन्यासी पुरुषाला दहा दिवस तुमच्या-माझ्यात राहू द्या बघा तरी त्याच्यापासून कशी स्फूर्ती, प्रकाश अन् ऊर्जा लाभते ते! अनेक वर्षे कामाचा ढिगारा उपसूनही जे साध्य झाले नाही ते त्याच्या अवघ्या दर्शनमात्रेण - केवळ अस्तित्वाने संपन्न होईल. केवळ छायाचित्र बघून जर मनात पावित्र्य नांदते, मृत महापुरुषांची चित्रे जर भक्ती, प्रेम आणि पावित्र्य चित्तात उपजवतात-उत्पन्न करतात तर जीवंत संन्याश्याना बघून किती प्रेरणा प्राप्त होऊ शकेल नाही? संन्यासी आणि योगी दोघे लोकसंग्रह करतात. एकीकडे बाह्यत: कर्मत्याग दिसत असला तरी त्या कर्मत्यागात कर्म ठासून भरलेले आहे. त्यात अनंत स्फुर्ती आहे तरी त्या कर्मत्यागात कर्म ठासून भरलेले असते. ज्ञानी संन्यासी आणि ज्ञानी कर्मयोगी दोघे समान सिंहासनावरच आरुढ होणारे आहेत. नावे वेगवेगळी असतील पण अर्थ एकच आहे. एकाच तत्वाचे हे दोन पैलू वा दोन रुपे होत. वेगाने फिरणारे चक्र कसे स्थिर दिसते. असे वाटते की चक्र फिरतच नाही. हीच अवस्था संन्याश्याची असते. त्यांच्या शांततेने व स्थिरतेने अनंत शक्ती आणि अनंत प्रेरणा लाभते. महावीर, बुध्द, निवृत्तीनाथ अशा विभूती होत. संन्याश्याच्या तमाम उद्योग व उपक्रमाची धाव एका आसनावर येऊन स्थिर झाली तरी त्यांचे कर्म प्रचंड असते. सारांशरुपात सांगावयाचे झाल्यास संन्यासी आणि योगी दोघे एकच होत. दोघामध्ये काहीही-कुठलाही फरक नाही-नसतो. शब्द वेगवेगळे असतील अर्थ मात्र एकच एक दगड आणि पाषाण शब्द वेगळे अर्थ एकच, तसेच कर्मयोगी म्हणजे संन्यासी आणि संन्यासी म्हणजे कर्मयोगी होय.”

ज्ञानेश्वर माऊलीने लिहिले आहे- ''संन्यास आणि कर्मयोग दोन मार्ग आहेत पण अखेरीस दोन्ही एक बनून जातात. स्वयंपाक करायचा आहे आणि स्वयंपाक तयार झाला आहे, दोघामध्ये समान तृप्ती आहे. पश्चिमेकडून वहाणारी नदी असो वा पूर्वेकडून वहाणारी नदी असो, दोन्ही नद्या भिन्न दिशेकडून वहातात पण अखेरीस दोन्हीही समुद्रात जाऊन मिळतात आणि एकाकार होतात, तशाच प्रकारे ज्ञानयोग आणि कर्मयोग दोन्ही मार्ग भिन्न असतानाही एकाच ध्येयाच्या प्राप्तीची सूचना देतात. अर्थात् हे या योगांच्या आचरणकर्त्यांवर अवलंबून आहे. पक्षी एकदम उडून फळाला ग्रहण करतो पण माणसाला फळ एकदम कसे बरे प्राप्त होऊ शकते? त्याला तर एका फांदीवरुन दुसऱ्या फांदीवर चढतच ते प्राप्त होऊ शकते. तशाच प्रकारे विहंगम मार्गाने आचरणारे साधक कर्ममार्गाच्या आश्रयाने शास्त्रवर्णित विहित कर्माचे आचरण करुन काही अवधीत पूर्णता प्राप्त करतात.''

2) अशाप्रकारे सांख्य आणि योगाला जो एकरुपात बघतो त्याचेच बघणे सार्थक ठरते. दोघांच्या बाह्य स्थितीला बघून त्यात अंतर करणारे वा मानणारे अज्ञानी होत हा मुद्दा चौथ्या श्लोकातच आला आहे.

दोघे अगदी एक, एकसारखे आणि एकरुप असतानाही लोकांना सुयोग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी पूर्ण कर्मयोग्याचा कर्मयोग अधिक प्रशंसनीय आहे. सर्वसामान्य जनाच्या जीवनात गुंतागुंतीचे नाना प्रसंग उद्भवतात. प्रत्यक्ष जीवन जगताना प्रश्नांची सोडवणूक कशी करावी हे काही सर्वसामान्य माणसाच्या लक्षात येत नाही. कुठलीही चूक होऊ नये अशाप्रकारचे वर्तन हातून घडावे आणि उन्नतीचा मार्ग प्रशस्त व्हावा यासाठी बाह्य आचरणाचे आदर्श उदाहरण नित्य असायला हवे. आदर्श नमूना समाजापुढे नित्य असायला हवा. अशाप्रकारचे उदाहरण कर्मयोग्याच्या बाह्य कर्माचरणाच्या माध्यमातून समाजापुढे मांडले जात असते. अशा प्रकारे पूर्ण कर्मयोग्याच्या कर्मयोगाच्या माध्यमातून समाजातील अज्ञ जनांना अपार लाभ होतो. गांधीजी आणि विनोबांच्या कर्मयोगी जीवनाच्या माध्यमातून हे स्पष्ट व्हावे ! कर्मयोगी जीवनाची ही अपार मौज आहे.

: 6 :

***संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।***
***योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु महाबाहो:** पण हे अर्जुना
- **संन्यास:** संन्यास, अर्थात् मन, इंद्रिये आणि शरीर यांनी होणाऱ्या सर्व कर्मांच्या कर्तेपणाचा त्याग
- **अयोगत:** निष्काम कर्मयोगाशिवाय
- **आप्तुं दु:खं:** प्राप्त होणे कठीण आहे
- **योगयुक्त: मुनि:** कर्मयोग-युक्त मुनी
- **नचिरेण:** ताबडतोबच, शीघ्रच, लगेचच
- **ब्रह्म अधिगच्छति:** ब्रह्माला प्राप्त होतात, होऊन जातात

**अर्थ**

परंतु हे अर्जुना, कर्मयोगाशिवाय मन, इंद्रिये आणि शरीर यांच्याकडून होणाऱ्या सर्व कर्मांच्या बाबतीत कर्तेपणाचा त्याग होणे कठीण आहे आणि भगवत् स्वरुपाचे चिंतन करणारा कर्मयोगी परब्रह्म परमात्म्याला फार लवकरप्राप्त होतो.

***योगावांचूनि संन्यास कधीं साधे चि ना सुखें***
***संयमी योग जोडूनि ब्रह्म शीघ्र चि गांठतो ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत - (1) कर्मयोगाच्या आचरणाशिवाय संन्यास प्राप्ती अत्यंत अवघड आहे. (2) कर्मयोगी आणि ईश्वरचिंतन करणारा मुनी त्वरितच - अतिशीघ्र - ब्रह्म म्हणजे परमात्म्याची प्राप्ती करुन घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः** कर्मयोगाच्या आचरणाशिवाय कर्मसंन्यास आचरता येत नाही.

विनोबा म्हणतात- ''सर्व कर्मसंन्यास कसा मिळवता येईल? कर्म तर आजू-बाजूला, पुढे-मागे सर्वत्र व्याप्त आहे. अहो, बसणे ही सुध्दा क्रियाच आहे ना? 'बसणे 'हे क्रियापद आहे. सारखे बसून-बसूनही पाय दुखायला लागतील. बसून रहाण्यातही श्रम आहेतच. जिथे काही न करणेही कर्म सिध्द ठरते तिथे कर्मसंन्यास कसा बरे

संभवेल? योग्यता नसतानाही कर्माचा त्याग करु गेलो तर कर्म छातीवर चढून बसते अर्थात् मनात विषयाचे चिंतन सुरु होते. विषयचिंतन सुरु झाल्यावरही सुरु असतानाही जो माणूस कर्मे न करण्याचा आग्रह धरतो त्याला ते मानसिक विषक चिंतन संपूर्णपणे अध:पतीत करते, पटकून देते.''

मानसिक विषय चिंतन सुरु असतानाही बाह्य कर्मे न करण्याचा ज्यानी आग्रह धरला त्यानी स्वत:साठी दुराचार-अनाचार-दंभाचा मार्ग तयार केला असे मानायला हवे. याचे वर्णन तिसऱ्या अध्यायातील सहाव्या श्लोकात आले आहे. यामुळे गीता सांगते की कर्मयोगाच्या आचरणाअभावी कर्मसंन्यास पथावर अग्रेसर होण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील. ते दु:खदायक ठरतील. कर्मयोगाच्या दीर्घकालीन आचरणाशिवाय कर्मत्यागाचा अधिकार प्राप्त होणे दुरापास्त आहे. यामुळे माणसाला विनम्रतापूर्वक कर्ममार्गावर चालत रहाण्याचे प्रयत्न करायला हवेत. प्रयत्न करता-करता रजोगुण क्षीण होऊन सत्वगुणाचा उत्कर्ष झाल्यावर कर्मत्यागासाठी मनाची तयारी होऊ शकते. मन आतून प्रपंचापासून मुक्त झाल्यावर त्याच्या ठायी एक प्रकारची शक्ती जागते यामुळे तो काम, क्रोध वगैरे विकारापासून मुक्त होऊ शकतो. अशावेळी तो एकांतात बसून वा अरण्याच्या कंदरांमध्ये निवास करुन सुध्दा कर्मत्यागाच्या मार्गाने ध्यान वगैरे साधनेत सफल होतो. परमात्म स्वरुपाची त्याला ज्ञानप्राप्ती होते.

विनोबा म्हणतात- ''ज्ञानप्राप्तीपूर्वीची साधना आणि ज्ञानोत्तर स्थितीच्या मिलनातून साधनेचा पथ प्रशस्त होतो. पूर्णत: तयार होतो. शास्त्र आणि अनुभवाच्या आधारे त्याचे तीन प्रकार संभवतात-

1. साधकावस्थेत कर्मयोग आणि सिध्दावस्थेत कर्मयोग

2. साधकावस्थेत कर्मयोग आणि सिध्दावस्थेत कर्म-संन्यास

3. साधकावस्थेत कर्मसंन्यास आणि सिध्दावस्थेतही कर्मसंन्यासच.

आरंभिक दोन प्रकारात गीता फरक करत नाही. तिसऱ्या प्रकारात गीता एवढेच म्हणते की कर्मसंन्यास मार्ग खूप अवघड आहे. अवघड असला तरी अशक्य आहे असे काही गीतेचे म्हणणे नाही.''

2) **योगयुक्तो मुनिर्बह्म नचिरेणाधिगच्छति:** दुसरा मुद्दा असा आहे की कर्मयोगाचे आचरण सुयोग्य पध्दतीने केले गेले तर योगयुक्त मुनी भगवत् चिंतनात परायण होऊन परमात्मस्वरुपाला प्राप्त करुन घेतात. इथे हे चतुराईने सांगितले गेले आहे की कर्मयोगाच्या सम्यक् आचरणाने तो 'मुनी' बनतो. त्याचे चित्त प्रपंचापासून विरक्त होते. विरत होते. त्याची वृत्ती भगवत् चिंतनाकडे प्रवाहित व्हायला लागते. **'मननात् मुनि:'** ही शंकराचायांर्नी मुनीची केलेली व्याख्या आहे. जो नित्य भगवत् चिंतनात मग्न असतो तो मुनी. आयुर्वेदाचा नियम आहे की 'आहारात पथ्य पाळले तर औषधाची गरज नाही आणि आहारात पथ्य पाळले नाही तर औषधाचा काही उपयोग नाही.' गीतेने इथे खूप चातुर्यपूर्वक हेच सांगितले आहे की कर्मयोग आचरल्याशिवाय कर्मत्याग करता येत नाही आणि कर्मयोगाचे सुयोग्य आचरण करणाऱ्याला कर्मत्याग करायची गरज नाही.

इथे असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की चौथ्या अध्यायाच्या 38 व्या श्लोकात असे म्हटले आहे की, ज्ञान काही काळानंतर प्राप्त होते **'कालेन'** शंकराचार्यानी आपल्या भाष्यात 'कालेन' या शब्दासोबत विशेषण जोडून दिले आहे 'महता' **'महता कालेन'** म्हणजे दीर्घ काळानंतर **'नचिरेण'** म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त करुन घ्यायला विलंब नाही लागत. योगयुक्त झाल्यावर साधक खूप शीघ्र ब्रह्मज्ञान प्राप्त करुन घेऊ शकतो. अशाप्रकारे हे निवेदन परस्परविरुध्द वाटते. खरे तर पूर्व संदर्भ पूर्व प्रवाह - अन्वय बघून श्लोकाचा अर्थ करायला हवा. या श्लोकात कर्मयोग आणि कर्मसंन्यास यात तुलना आहे. योगसाधनेशिवाय संन्यास प्राप्ती अवघड आहे पण कर्मयोग साधता आला तर ब्रह्मप्राप्ती अविलंबे होईल. चौथ्या अध्यायात कुठल्याही मार्गाची तुलना नाही. तिथे वस्तुस्थितीचे निदर्शन करवले गेले आहे की योगयुक्त झाल्यावर दीर्घकाळाने ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते. कर्मयोग आणि कर्मसंन्यास यात तुलना करुन हे सांगितले गेले आहे की कर्मयोगाच्या साधनेशिवाय कर्मसंन्यास प्राप्त होणे खूप अवघड आहे. कर्मयोगाच्या साधनेतून ईश्वर प्राप्ती खूप लवकर होऊ शकते.

: 7 :

***योगयुक्तो विशुध्दात्मा विजितात्मा जितेन्द्रिय: ।***
***सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगयुक्त:** जे योगयुक्त आहेत
- **विशुध्दात्मा:** ज्यांची बुध्दी, चित्त विशुध्द आहे
- **विजितात्मा:** ज्यांनी मनावर विजय संपादित केलेला आहे
- **जितेन्द्रिय:** जे जितेंद्रिय आहेत
- **सर्वभूतात्मभूतात्मा:** ज्यांचा आत्मा सर्व भूतमात्रांचा आत्मा बनून गेला आहे, ज्याने सर्व भूतांशी ऐक्याचा अनुभव करुन घेतला आहे
- **कुर्वन् अपि न लिप्यते:** (तो) कर्म करत असूनही लिप्त होत नाही, गुंतून पडत नाही

**अर्थ**

ज्याचे मन स्वत:च्या ताब्यात आहे, जो इंद्रियनिग्रही आणि शुध्द अंत:करणाचा आहे, तसेच सर्व प्राण्यांचा आत्मरुप परमात्माच ज्याचा आत्मा आहे असा कर्मयोगी कर्मे करुनही अलिप्त रहातो.

***अंतरी धुतला योगी जिंकूनि मन इंद्रियें***
***झाला जीव चि भूतांचा करुनि हि अलिप्त तो ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) कर्मयोगी साधना करुन जो सिध्द झाला आणि या साधनेने ज्याची बुध्दी विशुध्द झाली, ज्याने मन जिंकून घेतले, जो जितेंद्रिय आहे, तमाम भूतमात्रांशी एकरुप झालेला असा पुरुष (2) कर्म (सत्कर्म) करुन सुध्दा लिप्त होत नाही, अकर्ता बनून रहातो.

**स्पष्टीकरण**

1) कर्मयोगाच्या साधनेने सिध्द होण्याचे चार परिणाम संभवतात- 1. बुध्दी विशुध्द होते 2. मनावर विजय मिळवता येतो 3. तमाम इंद्रिये ताब्यात होऊन जातात 4. तमाम भूतमात्रांशी एकात्मता - ऐक्य साधता येते. कर्मयोगाचे स्वरुप काय? कर्मयोगात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो? कर्मयोगात प्रामुख्याने चार गोष्टी येतात (1) बाहेरुन स्वधर्म - पालन (2) आतून चित्त विशुध्दीकारक नाना प्रकारची विकर्मे (3) कर्मफलत्याग आणि (4) ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे आचरणे. तसे तर विकर्मात फळत्याग आणि ईश्वरभक्तीचा समावेश आहे तरीसुध्दा फलत्यागाची काळी तर मोक्षावरही चालत असल्यामुळे त्याचे विशेष मूल्य आहे. ईश्वरभक्तीशिवाय अहंकार शून्यता जागत नाही आणि अहंकार शून्यतेशिवाय मोक्षप्राप्ती अशक्य. अहंकार क्षीण झाल्याशिवाय चित्तशुध्दी संभवत नाही, यामुळे ईश्वरभक्तीचेही स्वतंत्र मूल्य आहे. यामुळे योगयुक्त बनून अकर्ता बनू शकता येते. अशाप्रकारे चतुर्विध कर्मयोगाची पहिली परिणती म्हणजे बुध्दी विशुध्द होते. बुध्दी विशुध्द झाली की मन ताब्यात येते. मनावर ताबा मिळवता आला तर इंद्रियविजय निश्चित समजावा.

सृष्टीतील जड पदार्थ वा चेतन प्राण्यांना बघतांना आपली फक्त कार्यदृष्टी सक्रिय असते. त्याचे कारण तत्व म्हणजे त्या पदार्थात निहित तत्व म्हणजे कारणद्रव्याचे ज्ञान होत नाही पण ज्याने जड-चेतन पदार्थ व प्राणीमात्रांच्या मनाच्या तळाशी वसणाऱ्या परमात्मतत्वाला जाणून घेतले आहे त्याना जड-चेतन पदार्थांना बघून-बघितल्यावर परमात्म दृष्टी प्राप्त होते. जड-चेतन पदार्थाना बघत असताना ते परमात्म्याचे दर्शन करुन घेतात आणि त्याच परमात्मदृष्टीला मुख्य समजून त्यांचा सर्वाशी व्यवहार चालतो. हाच मुद्दा इथे सांगितला गेला आहे. सिध्द पुरुष तमाम प्राणीमात्रांच्या ठायी ऐक्याचा अनुभव करतो. त्यानुसार चालण्याची दृष्टी त्याला प्राप्त होते.

2) **कुर्वन्नपि न लिप्यते:** चार परिणामांनी युक्त आणि कर्मयोगसंपन्न पुरुष कर्मे आचरत असतानाही लिप्त होत नाही. जड चेतन पदार्थांमध्ये परमात्मस्वरुप न्याहाळण्याची आणि त्यानुसार चालण्याची दृष्टी जोवर येत नाही तोवर कर्मात अलिप्तता वा अनासक्ती जागणे संभवत नाही. कर्माचे अवलोकन करत असताना कारण दृष्टी लाभली की मग मनुष्य कार्यात लिप्त वा आसक्त न होता कारणरुप परमात्माच्या ठायी लिप्त होतो. परमात्म तत्वाची आसक्ती अत्यानंददायिनी आहे. ही परमात्म तत्वाची आसक्ती माणसाला प्रापंचिक बंधनांपासून अलिप्त ठेवते.

: 8 - 9 :

***नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्।***
***पश्यन् श्रृण्वन्स्पृशन् जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन् श्वसन्॥***
***प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।***
***इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पश्यन् श्रृण्वन् स्पृशन् जिघ्रन्:** बघणे, ऐकणे, स्पर्श करणे, गंध घेणे
- **अश्नन् गच्छन् स्वपन् श्वसन्:** खाणे, चालणे, झोपणे, श्वासोच्छवास घेणे
- **प्रलपन् विसृजन्:** बोलणे, (मल) विसर्जन करणे
- **गृह्णन्:** ग्रहण करणे
- **उन्मिषन् निमिषन् अपि:** डोळ्यांची उघडझाप करणे
- **इन्द्रियाणि इन्द्रियार्थेषु:** (वगैरे तमाम क्रिया करतांना) इंद्रिये आपापल्या विषयात
- **वर्तन्ते:** व्यवहार करताहेत
- **इति धारयन्:** असे जाणून
- **युक्त: तत्त्वविद्:** योगी तत्त्वज्ञान्याने
- **किंचित् न एव करोमि:** कुठलीही क्रिया मी अजिबात करत नाही
- **इति मन्येत्:** असे समजावे

**अर्थ**

सांख्ययोगी तत्त्ववेत्त्याने पाहात असता, ऐकत असता, स्पर्श करीत असता, वास घेत असता, भोजन करीत असता, चालत असता, झोपत असता, श्वासोच्छवास करीत असता, बोलत असता, टाकीत असता, घेत असता तसेच डोळ्याची उघडझाप करीत असताही सर्व इंद्रिये आपापल्या विषयात वावरत आहेत, असे समजून नि:संशय असे मानावे की, मी काहीच करत नाही.

***न कांहीं मी करीं ऐसें योगी तत्त्व-ज्ञ जाणुनी***
***देखे ऐके शिवे हुंगे खाय जाय निजे श्वसें।***
***बोले सोडी धरी किंवा पापणी हालवी जरी***
***इंद्रियें आपुल्या अर्थी वागती हेंचि पाहतो।***

विषय**:** आठ आणि नऊ या दोन श्लोकांचा एकत्रितपणे विचार करु या. या श्लोकात दोन गोष्टी आहेत. (1) इंद्रिये ज्या विविध क्रिया करतात त्यांची कर्ता इंद्रिये आहेत. (2) असे जाणून आत्मज्ञानी पुरुष इंद्रियांच्या कर्मांचा स्वत: कर्ता न बनता 'मी काहीही करत नाही' असा अनुभव घेतो.

**स्पष्टीकरण**

1) आठव्या आणि नवव्या श्लोकाच्या पूर्वार्ध्दात इंद्रियांची विविध कार्ये वर्णिली आहेत. इंद्रियांचे यथायोग्य महत्व कळावे म्हणून इथे प्रत्येक इंद्रियांचे कार्य वर्णिले आहे. दशेंद्रियांचे ज्या क्रमाने वर्णन केले गेले आहे तेही जाणून घेण्यासारखे आहे. महत्वाच्या दृष्टीने इंद्रियांचा क्रम वर्णिला गेला आहे. सर्वात आधी डोळे मग कान.

2) **इन्द्रियाणि इन्द्रियार्थेषु वर्तन्ते इति धारयन् युक्त: तत्त्वविद् किंचित् न एव करोमि इति मन्येत: तमाम** इंद्रियांचे व्यापार (कार्ये) त्या त्या इंद्रियांच्या माध्यमातून केले जाते - संपन्न होते. या क्रियाशी आत्मतत्वाचा कुठलाही संबंध नाही ही गोष्ट तत्ववेत्ता ज्ञानीपुरुष जाणतो. त्याच्या मनाच्या ठायी ही भावना वसते की इंद्रियांच्या क्रियांचा तो कर्ता नाही, त्याचे स्वरुप इंद्रियांहून भिन्न आहे. तो केवळ ज्ञाता, अकर्ता, अभोक्ता, साक्षीरुप आहे. या दोन श्लोकामधून तमाम इंद्रियाकरवी घडणाऱ्या क्रियांचे इतक्या तपशिलवारपणे वर्णन करण्याचे कारण हे आहे की तमाम क्रिया या शरीर व इंद्रियांच्या माध्यमातून होतात. त्यांच्याशी आत्म्याचा संबंध जोडणे महाअज्ञान, महाभ्रम, महाअसत्य होय. कुणी आपल्याला एखादे महागडे घड्याळ ठेवायला म्हणून दिले आणि आपण जर त्याला आपलेच मानू लागलो तर ते असत्य ठरेल. तसेच देह आणि इंद्रियांच्या कार्याना आपले मानणे-म्हणजे असत्य ठरेल. इंद्रियांच्या क्रियांना आपण आपल्या क्रिया समजतो आणि दु:खी होतो. कर्मे करणारी असतात इंद्रिये आणि दु:ख होते आपल्याला, हे का उचित आहे? खरे तर ज्याने कर्म केले त्याने दु:ख भोगावे असे व्हायला हवे. नेत्राने एखादी सुंदर वस्तु बघितली तर आनंद नेत्राला व्हायला हवा पण त्याचा आनंद त्याला न होता आपल्याला होतो. इथे असा प्रश्न उपस्थित केला जाऊ शकतो की इंद्रिये तर जड आहेत ना, त्यांच्या क्रियांची प्रतिक्रिया त्यांच्यावर कशी उठेल? कशी उमटेल? इंद्रियांना जिथे आपल्या क्रियांचेच ज्ञान नाही तिथे त्यांना सुख वा दु:खाचा अनुभव कसा बरे होईल? खरे आहे हे! इंद्रियांच्या क्रियांचे आपल्याला केवळ ज्ञानच व्हायला हवे. ज्ञानानंतर सुख वा

दु:खाचा अनुभव व्हायला नको. ज्ञान होणे वेगळे आणि सुख वा दु:खाचा अनुभव होणे वेगळे! आपण ज्ञानस्वरुपी आहोत, ज्ञाते आहोत यामुळे आपल्याला ज्ञान तर होईल पण सुख वा दु:ख तर व्हायला नको. जर होत असेल तर आपण इंद्रियांच्या कार्याचे ज्ञाते बनणे काही चुकीचे नाही, क्रियांचे कर्ते बनून सुखी वा दु:खी होणे मात्र चुकीचे आहे. जड असल्यामुळे इंद्रियांना आपल्या क्रियांचे ज्ञान नसते पण इंद्रियांच्या माध्यमातून क्रिया तर घडत असतातच. यामुळे कर्तेही स्वत: इंद्रियेच आहेत. या अध्यायाचा विषय आहे की संन्यास आणि योग आंतरिक रित्या एकच आहेत. संन्यास म्हणजे अकर्तेपणाची स्थिती अगदी स्पष्ट करुन सांगण्यासाठी या श्लोकात सांगितले गेले आहे की इंद्रियांच्या प्रत्येक क्रियेला जाणून घ्या. इंद्रिये या कार्यांच्या वा क्रियांच्या कर्ता आहेत-आपण नव्हे. आपण ज्ञाते, अकर्ते, अभोक्ते आहोत.

: 10 :

***ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति य: ।***
***लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: कर्माणि:** जो पुरुष कर्मांना
- **ब्रह्मणि आधाय:** ब्रह्माला म्हणजे परमात्म्याला अर्पण करुन
- **संगं त्यक्त्वा:** (फळाची) आसक्ती सोडून
- **करोति:** करतो
- **स:** तो पुरुष
- **अम्भसा पद्मपत्रं इव:** पाण्यात कमळाचे पान ज्याप्रमाणे अलिप्त रहाते तसाच
- **पापेन न लिप्यते:** पाप कर्मांना लिप्त होत नाही

**अर्थ**

जो पुरुष सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण करुन आणि आसक्ती सोडून कर्मे करतो, तो पुरुष पाण्यातील कमलपत्रा प्रमाणे पापाने लिप्त होत नाही.

***ब्रह्मीं ठेवूनियां कर्में संग सोडूनि जो करी***
***पापें न लिप्त तो होय पद्म-पत्र जसें जळें।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) जो पुरुष सत्कर्मे परमात्म्याला अर्पण करुन (2) आणि फलासक्तीचा त्याग करुन कर्मे करतो. (3) तो पाण्यात अलिप्त असणाऱ्या कमळपत्रामाणे (4) (तसाच) पाप कर्मापासून अलिप्त रहातो.

**स्पष्टीकरण**

1) **ब्रह्मण्याध्याय कर्माणि:** पहिल्या श्लोकात इंद्रियांची कर्मे व स्वभाव ही चर्चा आली आहे. आपण इंद्रियांच्या कार्यांचे कर्ते नसून स्वत:ला भ्रांतिवश कर्ते मानतो आणि सुख-दु:खाचा अनुभव घेतो. अकर्तेपणाचा अनुभव घेण्यासाठी पहिला उपाय म्हणजे सारी कर्मे ईश्वराला अर्पण करुन दिली जावीत.

शंकराचार्य लिहितात: **भृत्य: स्वाम्यर्थं इव तदर्थं करोमि** भृत्य म्हणजे नोकर आपल्या स्वामीसाठी-मालकासाठी ज्या प्रमाणे कर्मे करतो तसेच मी परमात्म्यासाठी कर्मे करतो.

हा दृष्टांत खूप सटीक आहे. नोकर स्वत:ला तुच्छ आणि आपल्या मालकाला श्रेष्ठ समजणार नसेल तर स्वामीला आपले जीवन अर्पण करु शकणार नाही. आपली आणि परमात्म्याची अशीच अवस्था आहे. आपले आयुष्य ईश्वराप्रती समर्पित करण्यासाठी हा किंकरभाव हवा. अर्थात् ईश्वराला समर्पित करायची कर्मे शुध्द असावीत. आपण देवळात जातो. देवपुजेसाठी स्वच्छ पाणी नेतो. उत्तम फुले नेतो. देवाच्या मूर्तीला अभिषेक करतो. देवपूजेची साधन-सामग्री उत्कृष्ट असावी अशी आपली भूमिका असते. ईश्वराप्रती कर्मरुपी फळ अर्पण करतानाही हाच नियम पाळला जायला हवा. कर्मे अतिशुध्द म्हणजे अतिसात्विक असावीत. कर्मे सुंदर बनवण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत.

2) **संगं त्यक्त्वा:** आसक्तीरहित बनून कर्मे करायला हवीत-आचरायला हवीत. तसे तर ममत्वबुध्दीने आणि कर्मफळाची आसक्ती मनात बाळगूनही सत्कर्मे ईश्वराला अर्पण करता येतात. बहुधा आपल्या तमाम क्रिया अहंप्रेरित आणि कर्मफळाच्या आसक्तीने भारित असतात. कर्म करायच्या प्रेरणा देणाऱ्या याच दोन बाबी आहेत. 'मी कर्मे करतो म्हणून त्याचे फळ मला मिळायला हवे.' अशी आसक्ती व्हायला लागते. मनात कर्मफळाचा आग्रह असो आणि कर्मफळ प्राप्तीसाठी प्रयत्नशील असो

हे सारे कमांच्र्या सफलतेसाठी आवश्यक आहे. कर्मे करत असताना त्याचा काही एक उद्देश असतोच असतो आणि त्या उद्देशाच्या सफलतेसाठीही आपले प्रयत्न असतात. आपली कामना असते. परिणाम नजरेपुढे ठेऊन जर कर्मे केली नाहीत तर कर्मे निष्फळ ठरतील पण फळाची आसक्ती त्यजून कर्मे आचरायचा अर्थ कर्मे निष्फळ करणे नव्हे. प्रयत्न केल्यावरही कर्मे सफल होत नसतील तर मग त्यांच्या ठायी आसक्ती उरायला नको. यामुळे ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे आचरण्याचा प्रयत्न करण्यात अहंभाव विलयाला जातो, असे गीतेचे म्हणणे आहे. अहंकार नसला की आसक्ती संपते आणि कर्म सफल होवो वा न होवो तरी चित्त शांत रहाते.

3) **अम्भसा पद्मपत्नं इव:** जळातल्या कमल पत्नाप्रमाणे अलिप्त राहून कर्मे आचरायला हवीत. फळाची आसक्ती संपली आणि अहंकार नष्ट झाला तर अलिप्ततेशिवाय दुसरे उरेलच काय?

4) **लिप्यते न स पापेन:** तो पापाने लिप्त होत नाही. इथे हा प्रश्न उपस्थित होतो की तो पापकर्मे आचरुनही तो लिप्त होत नाही वा पापकर्मे त्याच्या हातून घडत नाहीत काय? पापकर्मात पुण्यकर्मांचाही समावेश समजावा काय?

कर्मे परमात्मसमर्पित भावनेने आचरली जातात तेव्हा पापकर्मे घडण्याचे तर संभवतच नाही. यामुळे पापकर्मे आचरुन अलिप्त असतो हा अर्थ सुसंगत नाही. प्रकाशापुढे अंधकार जसा टिकू शकत नाही. पापकर्मे हे अज्ञानाचे आचरण होय. अज्ञानाचे कार्य वा परिणती होय आणि साधकदशेत जर पापकर्मे संभवत नाहीत तर सिध्दावस्थेत ती कशी बरे होऊ शकतील? साधक दशा प्रयत्नावस्था आहे यामुळे या दशेत काही चुका, काही नैतिक दोष आचरणात राहून जाऊ शकतात पण परिपूर्ण अशा सिध्ददशेत नैतिक दोष घडण्याची मूळी शक्यताच नाही. कमळाची पाने-जशी पाण्यात राहून अस्पृष्ट रहातात तद्वतच परमात्मशरण पुरुष पापकर्मांपासून अस्पृष्ट रहातो. पापकर्मांच्या ठायी पुण्यकमांर्चा समावेश होऊ शकतो की नाही? या प्रश्नाचे उत्तर 'होय, होऊ शकतो.' हे आहे. पुण्यकर्माशी संबंध असताना पुरुष अलिप्त रहातो आणि पापकर्माशी तर त्याचा संबंध येतच नाही.

: 11 :

*कायेन मनसा बुध्द्या केवलैरिन्द्रियैरपि ।*
*योगिन: कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वात्मशुध्दये ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगिन:** कर्मयोगी पुरुष
- **(केवलेन) कायेन:** केवळ शरीराने
- **(केवलेन) मनसा:** केवळ मनाने
- **(केवलया) बुध्द्या:** केवळ बुध्दीने
- केवलै: इन्द्रियै: अपि: केवळ इंद्रियांनीही
- **संगं त्यक्त्वा:** आसक्ती सोडून
- **आत्मशुध्दये:** आत्मशुध्दीसाठी
- **कर्म कुर्वन्ति:** कर्मे करतात

**अर्थ**

कर्मयोगी ममत्वबुध्दी सोडून केवळ इंद्रिये, मन, बुध्दी आणि शरीर यांच्या द्वारे आसक्ती सोडून अंत:करणाच्या शुध्दीसाठी कर्म करतात.

*देहा-मनानें बुध्दीनें इंदियांनीं हि केवळ*
*आत्म-शुध्द्यर्थ नि:संग योगी कर्म अनुष्ठिती ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत: (1) योगी पुरुष केवळ तन-मन-बुध्दी आणि इंद्रियांच्या आधारे (2) आसक्ती त्यजून (3) आत्मशुध्दीसाठी. (4) कर्मे करतो.

**स्पष्टीकरण**

1) **कायेन मनसा बुध्द्या केवलैरिन्द्रियैरपि:** योगीजनदेखिल आत्मशुध्दीसाठी म्हणजे चित्तशुध्दीसाठी सत्कर्मे करतात हे या श्लोकातून सांगितले गेले आहे. आरंभी सांगितले गेले आहे की केवळ देह-मन-बुध्दी आणि पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेंद्रिये अशा दहा इंद्रियांच्या माध्यमातून सत्कर्मे करतात पण इतरजनांचीही कर्मे करण्याची शैली तर हीच आणि अशीच आहे ना मग यात योगीजनांचे वैशिष्ट्य ते काय ? याचे उत्तर असे आहे की होय, सर्वच जन कर्मे अशीच आचरतात हे खरेच पण सर्वच लोक अकर्तेपणाचा अनुभव घेत कर्मे आचरत नाहीत. योगीजन मात्न अकर्तेपणाच्या भावनेने कर्मे आचरतात हे सांगण्यासाठी - ही विशेष बाब सांगण्यासाठी

तन-मन-बुध्दी-इंद्रिये यांच्यासोबत **'केवलै:'** हे विशेषण जोडून दिले आहे. तन-मन-बुध्दी वा इंद्रियसमूह यापैकी कुणीही अशी प्रेरणा देत नाही की आपण त्यांच्या कार्याशी आपलेपण - आपुलकी-सांधावी म्हणजे कर्तेपणाचा संबंध राखावा. तन-मन-बुध्दी-इंद्रियांच्या कार्यांना आपण आपले मानणे ही खरे तर त्यांच्यावर जबरदस्ती करणे होय. आपण स्वत: कोण आहोत? आपले स्वरुप काय? हे ज्ञात नसल्यामुळे देह व इंद्रियांना आपले स्वरुप जाणून त्यांच्या कार्याचे आरोपण स्वत:वर - आपल्यावर करुन घेतो. गीता म्हणते की योगीजनांना आपल्या स्वरुपाचा परिचय झालेला आहे, यामुळे ते देह वगैरे क्रियांशी आपला संबंध जोडत नाहीत.

2) **संगं त्यक्त्वा:** आसक्ती त्यजून कर्मे करुनही योगीजन जसे अकर्ते रहातात त्याचप्रमाणे ते फलासक्ती त्यजून कर्मे आचरतात. 'फलासक्तीत्याग' गीतेचा मूळमंत्र आहे. गीतेत ठायी-ठायी या मंत्राचे उच्चारण होताना दिसते. अकर्तेपणाची भूमिका प्राप्त झाल्यावर कर्मफळासक्ती उरायला नको. जर ती शिल्लक राहिली तर मग अकर्तेपणाची भूमिका प्राप्त करुन घेण्यात काही न्यून राहिले असावे असेच मानायला हवे.

3) योगी जन आत्मशुध्दयर्थ कर्मे आचरतात. ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर कर्मबंधने तर सुटूनच जातात पण प्रारब्ध कर्मामुळे जगावे लागत असल्यामुळे विकासाची प्रक्रिया सुरुच असते. देह विलयाला जाईपर्यंत ही प्रकिया अबाधित रहाते. ज्ञानप्राप्ती नंतर परमात्म स्वरुपाच्या अनुभवात वृध्दी होत राहील सूक्ष्मता वाढत राहील. यामुळे इथे असे सांगितले गेले आहे की आत्मशुध्दी वाढत रहावी, सुक्ष्मता नांदत जावी हे योगीजनांचे ध्येय असते.

4) अकर्तेपणाच्या भूमी आणि भूमिकेवर स्थिर होऊन, फलासक्तीचा त्याग करुन आत्मशुध्दी म्हणजे चित्तशुध्दीचे ध्येय नजरेपुढे राखून योगीजन कर्मे म्हणजे सत्कर्मे आचरत आयुष्य कंठतात. संत तुकाराम महाराज म्हणतात- **'जगाच्या कल्याणा। संतांच्या विभूती। देह कष्टविती। उपकारे।'** अर्थात् जगाच्या कल्याणासाठी संतांच्या विभूती असतात. परोपकाराच्या दृष्टीने ते आपल्या देहाने कष्ट उपसत रहातात. ज्ञानी पुरुषांच्या समोर चित्तशुध्दी आणि विश्वकल्याण याशिवाय का कुठले अन्य ध्येय असते ?

: 12 :

***युक्त: कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्रोति नैष्ठिकीम्।***
***अयुक्त: कामकारेण फले सक्तो निबध्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **युक्त:** योगी पुरुष
- **कर्मफलं त्यक्त्वा:** कर्मफळांची आसक्ती सोडून
- **नैष्ठिकीं शान्तिं आप्रोति:** भगवत् प्राप्तीरुपी निश्चळ शांततेला प्राप्त होतात, प्राप्त करतात
- **अयुक्त: कामकारेण:** अयोगी कामाने प्रेरित होऊन
- **फले सक्त: निबध्यते:** फळाच्या ठायी आसक्त होऊन बंधनात फसतो

**अर्थ**

कर्मयोगी कर्माच्या फळांचा त्याग करुन भगवत् प्राप्तीरुप शांततेला प्राप्त होतो आणि कामना असलेला पुरुष कामनांच्या प्रेरणेमुळे फळात आसक्त होऊन बध्द होतो.

***युक्त तो फळ सोडूनि शांति निश्चळ पावतो***
***अयुक्त स्वैर-वृत्तीनें फळीं आसक्त बांधिला।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) योगीजन कर्मफळाचा त्याग करतात. (2) निश्च्छल शांतता प्राप्त करुन घेतात. (3) ज्याचे मन चंचळ आहे ते कर्मफळात आसक्त रहातात (4) आणि म्हणून कर्मबंधनात गुंतून पडतात.

**स्पष्टीकरण**

1) **युक्त: कर्मफलं त्यक्त्वा:** युक्त म्हणजे योगीचे मन वगैरे इंद्रियांवर संपूर्ण नियंत्रण असते, त्यांचा अहंकार वगैरे भाव नष्ट झालेला असतो- असे योगीजन कर्मे आचरताना कर्मफळाची आसक्ती मनी धरत नाहीत. सर्पाचे उदाहरण घेऊ या. गारुडी सर्पाची विषाची पिशवी काढून फेकून देतो यामुळे रात्रंदिवस सर्पासमवेत राहूनही त्याला कुठलीही बाधा पोहोचत नाही. कुठलेही भय उरत नाही. सत्कर्मांचे असेच तर आहे. फळाची आसक्ती राखल्यामुळेच कर्मे बंधनकारक ठरतात, अहो, अगदी सत्कर्मेही बंधनकारक ठरतात. फलासक्ती न राखता

केलेली सत्कर्मे मोक्षमार्गाची साधने बनतात. गांधीजीनी अनासक्ती ही गीतेची किल्ली मानली आहे. शंकराचार्य म्हणतात: **मोक्षे अपि फले संगं त्यक्त्वा** मोक्षफळाची आसक्तीदेखिल दु:खाचे कारण ठरते.

2) **शान्तिं आप्नोति नैष्ठिकीम्:** फलत्यागामुळे निश्च्छल शांतता लाभते. फलत्यागाचा परिणाम निश्च्छल शांतताच आहे. अशाप्रकारे मोक्षरुपी फळाची आसक्ती सोडण्यापेक्षा सत्कर्माच्या फळाची आसक्ती सोडणे सोपे आहे. मोक्ष अंतिम अवस्था आहे. यामुळेच साधना करताना साधनेचे अंतिम फळ जे मोक्ष आहे ते लाभते वा नाही? मोक्ष फळ प्राप्त झाले नाही तर चित्त व्याकुळ होते. फलासक्तीच्या ठायी अहंभाव वसतो. - अहंकार असतो. मोक्षही 'मला' हवा. परमात्म तत्वाचा अनुभव 'मला' प्राप्त करुन घ्यायचा आहे म्हणजे हा 'मला' जो आहे ना तो मोक्षाच्या अनुभवासोबतही आहेच आहे. परमात्म्याचा अनुभवही मला हवा आहे. समाधीही मला प्राप्त करुन घ्यायची आहे. म्हणजे साधना करत असणारा 'मी' हजर रहातो. त्याचा क्षय होत नाही पण अहंकाराला संपूर्णपणे क्षीण करणे म्हणजे स्वत:ला शून्य बनवणे हाच तर मोक्ष! अहंकार क्षीण झाला म्हणजे राग-द्वेष, काम-क्रोध यासारखे विकारही नष्ट होऊन जातात. जिथे 'मी' संपला तिथे तमाम उपाधी संपतात.

अहंकार महाबलवान आहे, सर्वाहून बली आहे. मोक्ष प्राप्ती, आत्म-साक्षात्कार वा समाधीच्या सोबत चालणारा अहंकार-मी पणा कर्मफळाची आसक्ती असेपर्यतच वसतो मग उरत नाही. कर्मफलासक्ती त्यजून देण्याचा हा एक अद्भुत परिणाम. ईश्वरभक्ती प्राप्त करण्याच्या प्रयत्नातही हा अहंकार त्रास देतो. इतक्या काळापासून मी ईश्वरभक्तीचा प्रयत्न करत आहे तरी ती मला प्राप्त होत नाही हा विचार साधकाची व्यग्रता वाढवणारा आहे. भक्ती प्राप्तीचे ध्येय मनी बाळगणे तर अत्यंत गरजेचे आहे पण त्याची आसक्ती मात्र दु:खदायक ठरते. भक्ती प्राप्त होण्याचा काळ तर काही ठरलेला नाही. आपण साधना करतो यातही प्रयत्नांची कमी - अधिक तीव्रता असते. प्रयत्नातही सारखी समान तीव्रता असत नाही - शिथिलता येत रहाते. प्रयत्न करताना नाना विघ्ने-आक्षेप-अडथळे उभे रहातात. त्यावर आपला काही अधिकार नसतो. आपला अधिकार हमखासपणे प्रयत्नावर असतो. प्रयत्न करणे आपल्या हाती असते. प्रयत्नांवरही जर आपला अधिकार उरणार नाही तर मग त्याच्या अंतिम फळावर आपला अधिकार कसा बरे उरेल? फळ तर आपल्या हाती अजिबातच नाही. यामुळे 'फलासक्तीचा त्याग' हे मूलगामी तत्व गीता सातत्याने मांडत राहिली आहे. कर्मफलाचा त्याग जेवढ्या प्रमाणात साधता येईल तेवढी शांती प्राप्त करुन घेता येईल. फलत्याग-संपूर्णपणे साधता आला ना तर संपूर्णपणे शांततेचा लाभ करुन घेता येईल. अशाप्रकारे योगीजन कर्मफळाची आसक्ती त्यजून निश्च्छल शांतता -परम शांतता प्राप्त करुन घेतात.

3) **अयुक्त: कामकारेण फले सक्त:** जो अयोगी म्हणजे असंयमी, चंचल चित्ताचा-नित्य इंद्रियाधीन असतो त्याची कर्मफळाच्या ठायी आसक्ती असते. काम म्हणजे विविध प्रकारच्या इच्छानी प्रेरित होऊन तो जीवनातील तमाम क्रिया आचरतो-करतो. जिथे स्वेच्छेने प्रेरित जीवनयापन असते तिथे फलासक्ती असणारच असणार. इच्छा वा वासना अनंत आहे हा सर्वाचाच तर अनुभव आहे. वासना पूर्ण करता येत नाहीत. त्या अनंत आहेत. एकीतून दुसरी इच्छा उत्पन्न होते आणि तिची पूर्तता न झाल्यामुळे दु:ख उपजते. माणसाच्या ठायी अहंकार जेवढा प्रबळ तेवढ्याच इच्छा-वासना प्रबळ आणि तेवढेच दु:खही गहिरे. चंचळ चित्ताचा असंयमी माणूस कर्मफळात गुंतून पडतो. इच्छेचे प्राबल्य हेच फलासक्तीचे कारण होय.

4) **निबध्यते:** फलासक्तीमुळे असंयमी पुरुष निश्च्छळ-परम शांती प्राप्त करुन घेतो. या उलट असंयमी कर्मफळात गुंतून पडल्यामुळे शांतता गमावून बसतो आणि कर्मबंधनातच गुंतून पडतो. ज्ञानेश्वर माऊली म्हणते- "परमात्म तत्वाच्या अनुभवाने संपन्न आणि कर्मफळासक्तीचा द्वेष करणारा जो साधक आहे त्याच्या मनरुपी घरात शिरुन शांती स्वत:हूनच त्याला वरमाळा घालते पण कर्मफलाच्या आसक्तीतच ज्यांना आनंद लाभतो ते इच्छारुपी दोरखंडाने फलोपभोगरुपी खुंट्याला बांधून रहातात."

शंकराचार्य म्हणतात: **युक्त: ईश्वराय कर्माणि न मम फलाय इति एवं समाहित: सन् कर्मफलं त्यक्त्वा मोक्षाख्यां शान्तिं आप्नोति:** युक्त म्हणजे योगी पुरुषाची तमाम कर्मे ईश्वरार्पित भावनेने असतात. स्वत:ला फळ

मिळावे यासाठी नसतात अशी भावना मनी बाळगून शांतचित्ताने कर्मे आचरणारा कर्मफळाची आसक्ती सोडून देऊन मोक्षरुपी शांतीचा लाभ करुन घेतो.

पुढे शंकराचार्य असेही म्हणतात: **अयुक्त: असमाहित: कामकारेण मम फलाय इदं कर्म करोमि इति एवं फले सक्त: निबध्यते** काम म्हणजे इच्छेने प्रेरित होऊन मला फळ मिळावे यासाठी मी कर्मे करतो अशी फलासक्ती मनी धरुन बंधनात कोण फसतो? तो जो अयुक्त म्हणजे अयोगी वा अशांत असतो.

भावार्थ असा की युक्त म्हणजे योगी, संयमी, इंद्रियनिग्रही पुरुष कर्मफळाची आसक्ती त्यागतो म्हणून शाश्वत-चिरकालिक शांतीला पावतो. याउलट अयुक्त-अयोगी, असंयमी फलासक्ती मनी धरुन अशांततेला वरतो.

: 13 :

*सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ।*
*नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **वशी देही:** जितेंद्रिय, देहात रहाणारा, संयमी पुरुष
- **सर्वकर्माणि:** सर्व कर्मांना
- **मनसा संन्यस्य:** मनाने भगवंताला अर्पण करुन
- **नवद्वारे पुरे देही:** नऊ दारांनी युक्त शरीररुपी घरात
- **न कुर्वन्:** न करता
- **न एव कारयन्:** आणि दुसऱ्याकडून काहीही न करवून घेता
- **सुखं आस्ते:** सुखाने रहातो

### अर्थ

अंत:करण ज्याच्या ताब्यात आहे, असा सांख्ययोगाचे आचरण करणारा पुरुष कोणतेही कर्म करणारा किंवा करविणारा न होताच नऊ दरवाजांच्या शरीररुपी घरात सर्व कर्मांचा मनाने त्याग करुन आनंदाने सच्चिदानंदघन परमात्म्याच्या स्वरुपात स्थित राहतो.

*मनानें सगळी कर्में सोडुनी संयमी सुखें*
*नव-द्वार-पुरीं राहे करी ना करवी हि ना ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) जितेंद्रिय पुरुष सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करुन 'आपला कर्माच्या ठायी कुठलाही संबंध नाही' या विवेकाने आपल्या अकर्तेपणाचा अनुभव घेत (2) नऊ द्वारे असलेल्या देहरुपी नगरात काहीही न करता आणि दुसऱ्याकडूनही काहीही करवून न घेता (3) अखंड सुखात रहातो.

### स्पष्टीकरण

1) **वशी देही सर्वकर्माणि मनसा संन्यस्य:** ज्ञानवंत संन्यासी वा कर्मयोगी या दोघाची आंतरिक स्थिती एकच असल्याचा विचार पाचव्या श्लोकात आला आहे. ज्ञानी संन्यासी वा कर्मयोगी सिध्द पुरुषाच्या आंतरिक स्थितीचे वर्णन भगवंताने केले आहे. असा सिध्द पुरुष बाह्यत: तर कर्मे आचरताना दिसतो पण त्याने आपली तमाम कर्मे भगवंताला अर्पित केलेली असतात यामुळे त्या कर्माशी त्याचा कुठलाही संबंध उरत नसतो. अशाप्रकारे तो अकर्तेपणाचा अनुभव प्राप्त करुन घेतो. कर्मयोगी मार्गात भगवंताला अर्पण करुन कर्मे केली जातात. कर्माशी आपला कुठलाही अनुभव नाही असा अनुभव जर प्राप्त करुन घ्यायचा असेल तर जेवढी म्हणून काही सत्कर्मे आहेत ती सारीच्या सारी ईश्वराला अर्पण करायचा सराव करावा अशी शिफारस गीतेने ठायी-ठायी केली आहे कारण अकर्तेपणाची भूमिका प्राप्त करुन घेण्याचा हाच सुलभ उपाय आहे. 'मी देहापेक्षा भिन्न आहे' अशा प्रकारचा सराव विवेकपूर्वक करायचा उपायही गीतेच्या तेराव्या अध्यायात आहे. अर्थात हा विवेकपूर्ण सराव काही सोपा नाही. हा उपाय ज्ञानपंथासारखा **ज्ञानपंथ कृपान कै धारा** 'तलवारीची धार' आहे, यामुळे या अध्यायाच्या 10 व्या श्लोकात वर्णन आले आहे की जो - ईश्वरार्पण भावनेने सारी कर्मे करतो तो कमलपत्रासारखा अलिप्त रहातो.

'मनाने भगवंताला अर्पण करुन' **मनसा संन्यस्य** - असा जो प्रयोग गीतेने केला आहे त्याचा मी ज्ञानपर अर्थ न करता भक्तीपर अर्थ केला आहे असे बाळकोबा म्हणतात. सर्वसामान्यपणे याचा ज्ञानपर अर्थच ग्रहण केला जातो. ज्ञानपर म्हणजे संन्यासपर होय यामुळे या अध्यायाला 'संन्यास योग' असेही म्हटले जाते पण कर्मयोगाशिवाय संन्यास प्राप्ती अवघड असल्याची चर्चा या अध्यायाच्या 6 व्या श्लोकात आली आहे. कर्मयोगात प्रमुख उपाय भक्ती

तत्वच आहे. 10 व्या श्लोकात असे सुस्पष्ट निवेदन आले आहे की तमाम कर्मे ईश्वरार्पण वृत्तीने केल्यामुळे अलिप्त भाव जागतो. यामुळे **'मनसा संन्यस्य'** या पदबंधाचा अर्थ 'ईश्वरार्पण करुन' असा करायला काही हरकत नाही. स्वत:ला जर 'अकर्ता' बनवायचे असेल म्हणजे 'आपण तन-मन-बुध्दी-इंद्रियरुप आहोत' या मिथ्या भावनेला कर्तेपणाच्या खोट्या भावनेला - घालवायचे असेल तर देहात विराजमान असणाऱ्या परमात्म्याच्या शरणी जायला हवे.

आपण देहाला उत्पन्न केलेले नाही परिणामी आपण कर्ता बनू शकत नाही. ज्यावेळी ' परमात्मा देहात निवास करतो, तो चैतन्यस्वरुपी आहे, तेच आपले निजरुप आहे आणि तन-मन-बुध्दी-इंद्रिये यांच्या तमाम कार्य व्यापारांचा कर्ता आहे ' असे यथार्थपणे जाणून घेतले तर परमात्म्याला कर्ता बनवून आपण सहजच अकर्तेपण अनुभवू शकतो - अकर्ते बनू शकतो. एका देहात दोन कर्ते तर राहू शकत नाहीत यामुळे देह वगैरेचे कर्ते एकतर आपण स्वत: असू वा मग ईश्वर असेल. तमाम क्रिया ईश्वराच्या अस्तित्वामुळे घटित होतात यामुळे तन-मन-बुध्दी-इंद्रिये यांच्या विविध कार्यकलापाचा कर्ता ईश्वर असल्याचे कळून आल्यावर आपला कर्ताभाव म्हणजे कर्तेपणाचा भाव-सहजच गळून पडतो यासाठी खूप प्रयत्न नाही करावे लागत. परमात्म शरणता वा परमात्म भक्तीमुळे हे सहज शक्य होते. स्वयं अकर्ते बनायचा हा सोपा उपाय आहे.

2) **नवद्वारे पुरे देही:** हा देह नऊ द्वारांचे घर वा नगर आहे. या घरात **न एव कुर्वन्** स्वत: काहीही न करता आणि **न एव कारयन्** दुसऱ्याकडून काहीही करवून न घेता तो रहातो. एखाद्या नगरात शेकडो गोष्टी घडतात. शरीर अद्भुत यंत्र आहे. यात अगणित वाहिन्या आहेत. रक्तात अगणित किटाणू आहेत. पचनेंद्रिय सुयोग्य प्रकारे नियमित आपले कार्य करते. अशुध्द रक्त शुध्द करण्याची क्रिया अखंडपणे जारी आहे. आपण झोपतो-विश्रांती घेतो पण आंतरिक क्रियांना विश्रांतीची गरज नाही नसते. अशाप्रकारे मरेपर्यत देहांतगर्त कार्य अखंडपणे जारी रहाते. या शरीरात नऊ द्वारे आहेत - दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या, एक मुख, अशी सात आणि मूत्रद्वार व मलद्वार ही दोन अशी एकूण नऊ द्वारे होत. कठोपनिषदात **पुरमेकादशद्वारं** अकरा दारांचा उल्लेख आला आहे, मस्तकाच्या मध्यभागी ब्रह्म-रंध्राची कल्पना केली गेली आहे आणि पाठीच्या खालच्या भागात कुंडलिनी आहे. अशाप्रकारे अकरा द्वारे झालीत. कुंडिलिनी जागृत झाल्यावर ब्रह्मरंध्रात पोहोचते. त्यावेळी समाधी लागते अशी कल्पना आहे. हृदयालाही एक द्वार मानता येईल. पुर शब्दाचा अर्थ घर असाही आहे. अशा नऊ द्वारे असलेल्या शरीररुपी घरात वा नगरात ज्ञानीपुरुष अकर्ता बनून शांतीपूर्वक रहात असतो.

3) **सुखं आस्ते:** जिथे अकर्तेपणाचा अनुभव होत असेल तिथे शांततेऐवजी दुसरा कुठलाही अनुभव होऊ शकत नाही. या वचनावरील शंकराचार्यांचे भाष्य मोठे मार्मिक आहे. ते म्हणतात: **किं विशेषणेन, सर्वो हि देही संन्यासी असंन्यासी वा देहे एव आस्ते तत्र अनर्थकं विशेषणम् की** इथे नवद्वारे पुरे **'नऊ द्वारांचे देह'** असे का म्हटले आहे? संन्यासी असो वा नसो म्हणजे असंन्यासी का असेना तमाम जीव देहधारीच आहेत यामुळे 'देहात वसतात' हे विशेषण व्यर्थ वाटते. याचे उत्तर असे आहे: **तु य: अज्ञ: देही देहेन्द्रियसंघातमात्रात्मदर्शी स: सर्व: गेहे, भूमौ, आसने वा आसे इति मन्यते।** देह आणि इंद्रियांनाच आत्मतत्व मानणारे जे अज्ञानी जीव घरात वा आसनावर वा भूमीवर बसलेले आहेत असे मानतात. पुढे लिहितात: **नहि देहमात्रात्मदर्शिन: गेहे इव देहे आसे इति प्रत्यय: सम्भवति। देहादिसंघातव्यतिरिक्तात्मदर्शिनस्तु देहे आसे इति प्रत्यय: उपपद्यते। परकर्मणां च परस्मिन्नात्मनि अविद्यया अध्यारोपितानां विद्यया विवेकज्ञानेन मनसा संन्यास: उपपद्यते।** अर्थात् कारण की जे अज्ञानी आहेत देहालाच आत्मा समजतात. त्याना 'घराप्रमाणे देह रुपी घरात निवास करतो 'असा अनुभव कदापि घेता येऊ शकणार नाही पण देह वगैरे संघातापासून आत्मतत्व अगदी भिन्न आहे असे ज्यानी जाणून घेतले आहे त्याना' देहरुपी घरात मी निवास करतो' असा अनुभव घेता येऊ शकतो कारण की ते अज्ञानामुळे देहाहून भिन्न परमात्म्याच्या ठायी पर कर्माना विवेक ज्ञानाने, मनाने, अनुभवाने सोडू शकतात अर्थात् तमाम कर्मे ईश्वराप्रती समर्पित करुन अकर्तेपणाचा अनुभव घेऊ शकतात.

शंकराचायांर्नी घराचा दृष्टांत दिला आहे. आपण घरात रहातो पण घरापासून वेगळे रहातो हा अनुभव असतो. आसनावर बसलेले असूनही आपण आसनाहून भिन्न आहोत हा अनुभव घेतो सारेच असा अनुभव घेतात पण आपण देहरुपी घराहून भिन्नपणे रहातो - वेगळे रहातो असा अनुभव अज्ञानी जनाना होत नाही कारण ते देहरुपी

घरालाच निज स्वरुप मानतात - समजतात पण ज्यानी जाणून घेतले आहे ते देहरुपी घरात राहूनही स्वत:ला भिन्न वा वेगळे मानतात.

: 14 :

*न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभु: ।*
*न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रभु:** परमात्मा
- **लोकस्य कर्तृत्वं:** लोकांच्या कर्तेपणाला
- **न सृजति:** उत्पन्न करत नाही (त्याचप्रमाणे)
- **कर्माणि न (सृजति):** कर्मांना उत्पन्न करत नाही
- **कर्मफलसंयोगं:** कर्मफळाच्या संयोगालाही
- **न (सृजति):** (परमात्मा) उत्पन्न करत नाही
- **तु स्वभाव: प्रवर्तते:** पण स्वभाव अर्थात् परमात्म्याची मायाशक्ती आणि त्याच्या अधीन जीव वा जीवाची प्रकृती (तिघांना) उत्पन्न करते

**अर्थ**

परमेश्वर मनुष्याचे कर्तेपण, कर्म किंवा कर्मफळाशी संयोग उत्पन्न करीत नाही, तर प्रकृतीच खेळ करीत असते.

*न कर्तेपण लोकांचें न कर्में निर्मितो प्रभु*
*न कर्मीं फल-संयोग स्वभावें सर्व होतसे ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) जनाच्या कर्तेपणाला, कर्माला आणि फलोपभोगाला परमात्मा उत्पन्न करत नाही (2) आणि परमात्म्याची माया शक्ती उत्पन्न करते.

**स्पष्टीकरण**

1) **प्रभु: लोकस्य कर्तृत्वं, कर्माणि, कर्मफल-संयोगं न सृजति** जनांचे कर्तृत्व असो वा कर्मे असोत किंवा मग अगदी कर्मफळांचा संयोग का असेना, त्याना ईश्वर काही उत्पन्न करत नाही. मनुष्याच्या ठायी स्थूल देह, इंद्रिये, मन, बुध्दी हा संघात वा समूह आणि आत्मा वा जीवात्मा आहे. दृश्यमान जगतात पंचमहाभूतांचे नाना पदार्थ आहेतच.

पंचमहाभूते काही स्वतंत्र पदार्थ नाहीत. त्यांची उत्पत्तीही ईश्वरापासूनच झाली आहे. ईश्वर त्यांच्यामध्ये निहित आहे परिणामी तो पदार्थांच्या ठायीही आहे. पंचमहाभूतांच्या ठायी वा पदार्थमात्रात ईश्वर अव्यक्त रुपाने वसतो. मानवी देहसुध्दा पंचमहाभूतानीच बनला आहे, तरी सुध्दा मानवी देहात ईश्वरी चैतन्य म्हणजे ईश्वर प्रकट आणि पंचमहाभूतानी बनलेला देह असे दोन पदार्थ आहेत. ईश्वर अन्य पदार्थांच्या ठायी अप्रकट असतो म्हणजे प्रकट नसतो यामुळे एकच पदार्थ उरतो आणि हा पदार्थ म्हणजे पंचमहाभूते होय. मानवी देहातूनही प्राण निघून गेल्यावर म्हणजे ईश्वर अप्रकट वा गुप्त झाल्यावर त्यातही उरतात ती केवळ पंचहाभूते. सजीव देहात ईश्वर प्रकट असतो तर निर्जीव देहात अप्रकट असतो.

सजीव देहात दोन प्रकारच्या क्रिया सुरु असतात. एक तर या क्रिया आपल्या स्वाधीन नसतात याचा अर्थ असा की देहाच्या सोबत आपला कर्तेपणाचा संबंध नसतानाही दैहिक क्रिया-शरीराच्या क्रिया चालत रहातात. देहाशी कर्तेपणाचा संबंध राखा वा राखू नका, शरीराची पचनेंद्रिये, श्वासोच्छवासाची अविरत गती, फुफ्फुसाचे कार्य, हृदयाची स्पंदने, मूत्राशयाच्या क्रिया यासारख्या नानाविध क्रियावर आपला काही अधिकार चालत नाही. आपली इच्छा असो वा नसो या क्रिया अखंडपणे सुरु रहाणारच. या क्रियाना पाच-दहा मिनिटे आपण रोधू शकतो उदाहरणार्थ प्राणायामाद्वारे पाच-दहा मिनिटांपर्यंत श्वासोच्छवासावर नियंत्रण ठेवता येते पण पूर्णपणे नियंत्रण राखता येत नाही. इंद्रियांच्या वेगवेगळ्या घटितांचे आपण कर्ते बनू शकत नाहीत कारण की त्या क्रिया वा ती घटिते आपल्यावर अवलंबून नसतात. आतली ईश्वरी शक्ती अखंडपणे कार्यरत असते त्यामुळे या क्रिया वा घटिते घडतात. झोपून गेल्यावरही देहाच्या आंतरिक क्रिया सुरुच रहातात पण हाता-पायाचे चलनवलन करणे, हातून काही काम करणे, पायांनी चालणे, मुखाने बोलणे यासारख्या क्रियांमध्ये कर्तेपणाची आवश्यकता असते. देह, मन, बुध्दी आणि दशेंद्रियांशी **अहं** चा संबंध उरला नाही तर या क्रिया होऊ शकणार नाहीत. आपण ज्यावेळी अज्ञानी दशेत देह, मन, बुध्दी, यांच्या क्रियांचा कर्ता बनू गेलो तरच या क्रिया घटित होतात. आपण सुख-दु:खांचे भोक्तेही बनतो. यामुळे कर्तेपणाला संपवणे गरजेचे होऊन बसते. हे काही आपोआप होत नाही. यासाठी सारी कर्मे ईश्वराप्रती समर्पित करायची असतात. आपल्या तमाम क्रिया या परमात्म्याच्या प्रेरणेने व्हाव्यात असा प्रयत्न करायला हवा.

‘प्रभु, मी तुझ्या करातील वीणा’ हा भाव मनी जागावा. अशा प्रकारच्या नित्याच्या अनुसंधानाने - सरावाने आपण कर्तेपणाचा भाव संपवू शकतो. शरीराच्या ज्या क्रिया आपल्यावर अजिबात अवलंबून नाहीत त्यांचे कर्ते आपण नसतो. या क्रियांचा कर्ता ईश्वर म्हणजे ईश्वराची माया शक्ती आहे असे म्हणता येईल - असे म्हणता येऊ शकते पण शेष तमाम क्रियांचा कर्ता जीवाच्या अज्ञानी दशेत ईश्वर असतो असे आपण म्हणू शकत नाहीत. अज्ञानी दशेत तर जीव म्हणजे जीवाचा अहंकार, राग द्वेष युक्त जो स्वभाव वा प्रकृती आहे ती देह, मन, बुध्दी द्वारे निर्मित होणाऱ्या क्रियांचा कर्ता आहे असेच म्हणावे लागेल.

विनोबा ‘गीताई चिंतनिका’ मधून लिहितात की स्वभाव (म्हणजे निर्गुणात्मिका माया म्हणजे निर्गुण परमात्मा) ज्या मायेचे मूळ आहे म्हणजे जे चैतन्यस्वरुप परमात्म तत्वाहून भिन्न नाही अशा ईश्वरी मायेच्या अधीन आहे आणि जीव आपल्या कार्य संकल्पयुक्त स्वभावाच्या वशात आहे. विनोबांनी ‘स्वभाव‘ चे दोन अर्थ सांगितलेहेत. एक म्हणजे ईश्वराची माया शक्ती आणि दुसरा म्हणजे माया शक्तीच्या अधीन जीवाचा अहंकारयुक्त राग- द्वेष वगैरे स्वभाव. या श्लोकात गीतेने एक मुद्दा मांडला आहे की जनांच्या कर्तेपणाला वा कर्तेपणामुळे जीवाकडून जी कर्मे घटित होत रहातात ती काही परमात्मा उत्पन्न करत नाही. त्यांचा कर्ता आहे जीव म्हणजे जीवाची अहंकारयुक्त रागद्वेषाची जी प्रकृती म्हणजे जो स्वभाव आहे त्यातूनच या क्रिया आकाराला येतात पण देहांतर्गत अखंडपणे विनासायास घडणाऱ्या क्रियांचा कर्ता मायातत्व आहे, असे सांगता येईल. कर्ता, कर्म आणि कर्मापासून मिळणारे सुख-दु:खरुपी फळ या तिघांचा संबंध जीवाची प्रकृती वा स्वभावाशी आहे.

2) **स्वभावस्तु प्रवर्तते:** जीवाच्या कर्तेपणाला आणि कर्मांना जर ईश्वर उत्पन्न करत नसेल तर मग कोण उत्पन्न करतो? ईश्वराची माया वा स्वभाव! देह, मन, बुध्दी, इंद्रिये उत्पन्न होऊन बुध्दी आणि मनाच्या ठायी ‘मी देह आहे‘ असे आपल्या स्वरुपाच्या संदर्भातले उफराटे दर्शन सुरु होऊन जाते. जिथे असे उफराटे वा विपरीत दर्शन जागते तिथे ‘मी कर्माचा कर्ता आहे ‘असे वाटू लागते आणि आपण अकर्ते आहोत याचे विस्मरण होऊन आपले जे स्वरुप नाही त्याला आपण आपले स्वरुप मानून कर्ते बनतो. या संदर्भात भगवान अखेरीस सांगताहेत की मायेने शरीर, बुध्दी, मन, इंद्रिये उत्पन्न होऊन आपल्या स्वरुपाविषयीचे अज्ञान उत्पन्न करतात आणि जीवाचे कर्तेपण व कर्म सुरु होऊन जातात. जीवाच्या कर्तेपणाला वा कर्माला काही ईश्वर उत्पन्न करत नाही.

: 15 :

***नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभु: ।***
***अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तव: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विभु: कस्यचित् पापं:** सर्वव्यापी परमात्मा कुठल्याही जीवाचे पाप
- **न आदत्ते:** ग्रहण करत नाही
- **च सुकृतं एव न (आदत्ते):** आणि पुण्याचाही स्वीकार करत नाही
- **ज्ञानं अज्ञानेन आवृत्तं:** ज्ञान हे अज्ञानाने झाकलेले आहे
- **तेन जन्तव: मुह्यन्ति:** यामुळेच सारे जीव मोहात फसून जातात

**अर्थ**

सर्वव्यापी परमेश्वरही कोणाचेही पापकर्म वा पुण्यकर्म स्वत:कडे घेत नाही पण अज्ञानाने ज्ञान झाकलेले आहे त्यामुळे सर्व अज्ञानी लोक मोहित होतात.

***न घे पाप हि कोणाचें न वा पुण्य हि तो विभु***
***अज्ञानें झाकिलें ज्ञान त्यामुळें जीव मोहित ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) जीवमात्राने केलेल्या पाप व पुण्याची जबाबदारी ईश्वर घेत नाही. (2) अज्ञानामुळे परमात्मज्ञान झाकले गेले आहे. (3) यामुळेच जीव मोहग्रस्त होतो आणि पाप वा पुण्यकर्मे करत रहातो.

**स्पष्टीकरण**

1) **नादत्ते कस्यचित् पापं न च एव सुकृतं विभु:** पापपुण्यकर्माची जबाबदारी ईश्वराची नाही असे गीतेचे म्हणणे आहे याचे कारण असे की जीव स्वत:ला कर्ता मानतो त्या कर्तेपणामुळे पाप-पुण्ये घडत रहातात. यामुळे पाप-पुण्यांची जबाबदारी जीवाचीच आहे. त्याचा ईश्वराशी

संबंध नाही. खरे पाहू गेल्यास जीव देखिल परमात्मस्वरुपी आहे. तो कर्ता नाही पण परमात्मस्वरुपाचे ज्ञान नसल्यामुळे अकर्ता असतानाही आपल्यावर कर्तेपणाचा आरोप होत राहातो. स्वत: अकर्ता असतानाही त्यावर कर्तेपणाचा आरोप होत रहातो यामुळे उत्पन्न होणाऱ्या सुख-दु:खाला तो टाळू शकत नाही. स्वप्नातले व्यवहार सत्य भासत असल्यामुळे सुख-दु:खाचा अनुभव येतो पण जाग येताच त्या व्यवहारातला फोलपणा लक्षात येतो. कर्तेपणाचा आरोप यथार्थ नसल्याचे ध्यानात येताच अकर्तेपणाचे ज्ञानरुप अनुभवता येईल.

ईश्वर अकर्ता आहे म्हणून जीवाने केलेल्या पापपुण्याची जबाबदारी त्याची नाही. स्वत:ला जीव जेव्हा कर्ता समजतो तेव्हा तो इंद्रियाधीन होऊन जातो. इंद्रियाधीन पुरुष पापाचरणात प्रवृत्त होतो कारण की क्षणिक सुखाची चटक वा लालसा खूप वाढून जाते आणि तो त्या क्षणिक सुखावर मोहित होऊन सुख जिथुन कुठून मिळेल तिथून प्राप्त करायचा प्रयत्न करु लागतो. पापकर्मे करताना आरंभी तर आनंद वाढतो पण अखेरीस दु:ख भोगावे लागते. या उलट पुण्यकर्मे आचरणे सुरुवातीला कष्टप्रद वाटत असले तरी अंततोगत्वा सुख लाभते. अठराव्या अध्यायात तीन प्रकारच्या सुखांची चर्चा आली आहे. यात सात्विक सुख आरंभी विषोपम पण अंती अमृतासारखे मधुर अतिमधुर असते.

2) **अज्ञानेन आवृतं ज्ञानम्:** ईश्वरविषयक ज्ञान अज्ञानामुळे झाकले गेले आहे. परमात्मज्ञान अज्ञानामुळे झाकले जाते, ते काही नष्ट होत नाही. ईश्वरी ज्ञान शाश्वत वस्तु आहे. अज्ञान काही कुठली वस्तु नाही. प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार असतो ना अगदी तसाच ज्ञानाचा अभाव म्हणजे अज्ञान होय. परमात्म्याच्या अलौकिक अशा माया शक्तीमुळेच हे अज्ञान उपजते. जगाला सत्य मानणे सोडून दिले आणि देह, मन, बुध्दी, इंद्रियाना आत्मरुप मानणे सोडून दिले तर अज्ञान दूर होऊ शकते पण जगात व्याप्त आणि देहात स्थित परमात्मा या दोहोचा परिचय होऊन गेला ना तर हे संभवेल.

3) **तेन मुह्यन्ति जन्तवः** या अज्ञानामुळे सारे जीव म्हणजे प्राणीमात्र मोहित आहेत आणि मोहग्रस्त आहेत. आपण देह, मन, बुध्दी इंद्रियांवर मोहित होतो आणि जगतातील शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध या विषय वर्तुळाच्या मुळेही मोहित होतो. देह वगैरेना आणि जगातील तमाम पदार्थाना आपण सत्यरुप मानतो हेच मोहात पडायचे एकमात्र कारण आहे. देहाचे नश्वरत्व ज्ञात असून आणि जगातील सारे पदार्थ अनित्य आहेत हे समजूनसुध्दा मोह सुटत नाही हेच खरे तर आश्चर्य आहे. शंकराचार्य ब्रह्मसूत्रातून लिहितात:यावद्धि **न सत्यात्मकत्वप्रतिपत्तिः तावत् प्रमाण-प्रमेय-फललक्षणेषु विकारेषु अनृतत्वबुध्दिर्न कस्यचित् उत्पद्यते। विकारानेव तु अहं मम इति अविद्यया आत्मा आत्मीयेन भावेन सर्वो जन्तुः प्रतिपद्यते स्वाभाविकीं ब्रह्मात्मतां हित्वा।** अर्थात् "सर्वात आधी आत्मा एक आहे असा अनुभव यायला हवा. हा अनुभव जोवर येत नाही तोवर प्रमाण म्हणजे इंद्रिये, प्रमेय म्हणजे विषय, जगातील पदार्थ आणि फळे म्हणजे सुख-दु:खरुपी फळे ही या लक्षणांनी युक्त विकारांच्या बाबतीत कुणालाही जगत मिथ्या आहे अशी बुध्दी होत नाही म्हणजे ही इंद्रिये, विषय आणि दु:खांनी युक्त असे हे जगत् मिथ्या आहे असे वाटणार नाही. विकारांचाच तर प्रभाव असतो यामुळे देह म्हणजे मी, पुत्र-पशु सारे माझे अशा प्रकारे सारे प्राणीमात्र अज्ञानाधीन होतात. आपल्या सहज स्वाभाविक ब्रह्मस्वरुपाला त्यजून देतात. जीवात्मा बनतात. देह, मन, बुध्दी, इंद्रिये यांच्याशी ममत्वाचे संबंध जोडतात, आत्मीय नाते जोपासतात." शंकराचार्यांचे हे मत स्पष्ट आहे.

: 16 :

*ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः।*
*तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु येषाम्:** पण ज्यांचे
- **तत् आत्मनः** अज्ञानं: ते आत्मविषयक अज्ञान
- **ज्ञानेन नाशितं:** ज्ञानामुळे नष्ट होऊन गेले आहे
- **तेषां तत् ज्ञानं:** त्यांचे ते ज्ञान
- **आदित्यवत्:** सूर्याप्रमाणे
- **परं प्रकाशयति:** परमात्म्याला प्रकाशित करते

**अर्थ**

परंतु ज्यांचे ते अज्ञान परमात्म ज्ञानाने नाहीसे झाले आहे त्यांचे ते ज्ञान सूर्याप्रमाणे त्या सच्चिदानंदघन परमात्म्याला प्रकाशित करते.

*गेलें अज्ञान तें ज्यांचें आत्म-ज्ञानें तयां मग*
*पर-ब्रह्म दिसे स्वच्छ जणूं सूर्ये प्रकाशिलें।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) आत्मज्ञानाच्या प्रभावाने अज्ञान नष्ट होऊन जाते. 2) तेव्हा सूर्याप्रमाणे परमात्म्याला प्रकाशित करते.

**स्पष्टीकरण**

1) **तत् आत्मन:** अज्ञानं येषां ज्ञानेन नाशितं: परमात्मविषयक अज्ञान ज्ञानामुळे दूर होते. सर्वांना सृष्टीचे ज्ञान असते. अनेक शास्त्राचेही ज्ञान असते पण हे सारे विज्ञान म्हणजे विविध प्रकारचे ज्ञान आहे. मुंडकोपनिषदात याचे वर्णन ‘ अपरा विद्या ‘ या नावाने येते.

**तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेद: सामवेदोऽथर्ववेद: शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदो ज्योतिषमिति। अथ परा यया तदक्षरमधिगम्यते।** (1/1/5)

विनोबा म्हणतात की **चार वेद** म्हणजे यात व्रतांचे पालन, ईश्वराची उपासना, शास्त्रांचे अध्ययन, संत वचनांचा अभ्यास या सारख्या ज्ञान विषयांचा समावेश आहे. **शिक्षण** म्हणजे पाकशास्त्र, संडास सफाईशास्त्र, धान्य दळणे, पाणी भरणे, आरोग्यशास्त्र आणि अन्य शारीरिक व्यायाम, **कल्प** म्हणजे विणकाम, शेती, सुतारकाम, शिलाई वगैरे (औद्योगिक) **व्याकरण** म्हणजे संस्कृत, हिंदुस्तानी, स्वभाषा, परकी भाषा वगैरे (भाषिक) निरुक्त म्हणजे राजकारण, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास वगैरे (सामाजिक), **छंद** म्हणजे संगीत, चित्रकला वगैरे (कलात्मक) ज्योतिष आणि गणित, हिशेब-ठिशेब, भूगोल, आधिभौतिक विज्ञान वगैरे (व्यावहारिक) ज्ञान.”

अपरा **विद्या** म्हणजे भिन्न-भिन्न प्रकारची विविध व्यावहारिक विज्ञाने आणि **परा विद्या** म्हणजे अध्यात्म ज्ञान-ईश्वराचा परिचय करुन देणारे शास्त्र. आपले अधिकांश जीवन या विविध प्रकारच्या ज्ञानांचे संपादन करण्यात नष्ट होऊन जाते पण जीवनात जेव्हा या विविध प्रकारच्या ज्ञान प्राप्तीनंतर शांतता लाभत नाही, दु:ख अन् व्याकुळता उपजते तेव्हा माणूस या व्यूहातून बाहेर पडायला धडपडतो. शांतता मिळवण्यासाठी माणूस बाह्य साधने जोडतो पण ती सारी नश्वर, क्षणिक असतात. अखेरीस यातून अशांतताच मिळते मग तो अंतर्मुख होऊ लागतो आणि आपल्या आत खऱ्या शांतीचा स्रोत असल्याचे त्याच्या ध्यानी येते. यासाठी तो सत्संग, चिंतन-मननाचा आश्रय घेतो. जेव्हा आत्मस्वरुपाचे ज्ञान होते तेव्हा अज्ञान संपून जाते.

2) **तेषां आदित्यवत् तत् ज्ञानं परं प्रकाशयति:** ज्या ज्ञानामुळे अज्ञान दूर करता येते ते ज्ञान सूर्य-प्रकाशाप्रमाणे प्रकाशित असते. ज्ञानाच्या प्रकाशात परमात्मवस्तु स्पष्टत: दिसू लागते. कुठल्याही वस्तुचे दर्शन करायला एकतर बाह्य प्रकाश हवा आणि नेत्र असायला हवेत. साधनाच्या अभावी कुठल्याही वस्तुचे ज्ञान होऊ शकत नाही. आपल्यापाशी नेत्र म्हणजे वस्तुला ओळखण्याचे साधन असेल पण बाह्य प्रकाश नसेल तरी वस्तुचे ज्ञान होऊ शकणार नाही. शब्द ज्ञान मिळवण्यासाठी डोळे नकोत कान हवेत. आपण ऐकत असलेला आवाज कोणत्या वस्तुचा आहे हे जाणून घेण्यासाठी बाह्य प्रकाश गरजेचा आहे पण वस्तु न बघता आवाज केवळ ऐकायचाच असेल तर मग बाह्य प्रकाशाची गरज नाही पण परमतत्वाला जाणून घेण्यासाठी ती बाह्य साधने म्हणजे पंचज्ञानेंद्रिये अथवा बाह्य प्रकाश ही दोन्ही साधने व्यर्थ होत. तिथे तर मन हे एकमेव साधन उपयुक्त आहे. परमतत्वाला जाणून घेण्यासाठी एकाच साधनाची गरज आहे आणि ते आहे मन पण मनही जर विकारग्रस्त वा मलीन असले तर ते व्यर्थ आहे.

तसे पाहिले तर परमात्मा सृष्टीच्या अणु-अणुत व्याप्त आहे पण जागृत मनाच्या ठायीच तो प्रकट होतो. जिथे मनच नसेल वा मन जागृत नसून सुप्त असेल तिथे परमात्मा प्रकट होत नाही. पशु-पक्ष्यांसारखे नाना लहान-मोठे जीव जंतु असतात. त्यांच्या ठायी मन असल्यामुळे त्यात परमात्म शक्ती प्रकट होते. परमात्म्याचे ज्ञानशक्तीरुपी सामान्य स्वरुप सर्वाठायी प्रकट असले तरीही परमात्म्याचे जे विशेष स्वरुप आहे त्याच्या बाबतीत ज्ञान मिळत नाही कारण आपण देह, मन, इंद्रिय व्यापारांना आत्मस्वरुप मानून बसलो आहोत. एकदा का परमात्म्याच्या विशेष स्वरुपाचे ज्ञान झाले ना की सृष्टीचे अवलोकन भेदातीत दृष्टीने करता येते. सर्वत्र एकच परमात्म तत्व अद्वैत रुपात म्हणजे अभेद रुपात दिसू लागते. पशु- पक्ष्यांना काही ही अभेददृष्टी प्राप्त झालेली नाही. विकाररुपी मळ धुतला गेल्यावर मनरुपी दर्पण स्वच्छ झाल्यावर परमात्मस्वरुप दिसू लागते, म्हणजे परम तत्वाचा साक्षात्कार होतो. या श्लोकाच्या अखेरीस हाच मुद्दा आला आहे. सूर्यप्रकाशात जशी वस्तु दिसू लागते तसेच निर्विकार अशा ज्ञानप्रकाशात परमात्म्याच्या स्वरुपाला बघता येऊ शकते.

(परमात्मस्वरुपाचे ज्ञान झाल्यावर मोक्ष कसा प्राप्त करुन घेता येतो याची चर्चा पुढील श्लोकात करण्यात आली आहे.)

: 17 :

*तद्बुध्दयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः।*
*गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तद्बुध्दयः** ज्यांनी परमात्म्याच्या ठायी आपली बुध्दी अर्पण करुन दिली आहे
- **तदात्मानः** परमात्म्याच्या ठायीच ज्यांचे मन म्हणजे ध्यान लागते असे
- **तन्निष्ठाः** त्या सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठायीच ज्यांची निष्ठा आहे, जे ऐक्यभावनेने स्थित होऊन राहीले आहेत असे
- **तत्परायणाः** (भूतमात्रात स्थित) त्या परमात्म्याच्या ठायीच जे परायण झालेले आहेत असे
- **ज्ञाननिर्धूत कल्मषाः** परमात्म ज्ञानाने ज्यांचे सारे पाप धुतले गेले आहेत असे
- **अपुनरावृत्तिं गच्छन्तिः** असे पुरुष पुनर्जन्मरहित मोक्ष प्राप्त करुन घेतात

**अर्थ**

ज्यांचे मन व बुध्दी तद्रुप झालेली आहे आणि सच्चिदानंदघन परमात्म्यातच ज्यांचे चित्त ऐक्य झाले आहे, असे ईश्वरपरायण पुरुष ज्ञानाने पापरहित होऊन परम गतीला प्राप्त होतात.

***रंगले त्यांत ओतूनि बुध्दि निश्चय जीवन***
***पुन्हां येती न माघारे ज्ञानें पाप धुऊनियां।***

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) ज्यानी आपली बुध्दी परमात्म्याच्या ठायी अर्पण करुन दिली आहे. 2) जे अखंडपणे परमात्म तत्वाचेच ध्यान धरतात. 3) ज्यांची परमतत्वाच्या ठायीच निष्ठा आहे. 4) जे परमात्म्याच्या ठायीच परायण होऊन गेले आहेत म्हणजे भूतमात्राच्या ठायी स्थित परमात्म्याच्या सेवेत रत आहेत. 5) ज्याना उपर्युक्त साधनेने परमात्म ज्ञान प्राप्त होऊन गेले आहे आणि यामुळेच ज्यांचे विकार नष्ट झालेले आहेत. 6) असे सिध्दपुरुष पुनर्जन्मरहित अशा मोक्ष पदाला पावतात.

**स्पष्टीकरण**

परमात्म तत्वाचे ज्ञान ज्यांना प्राप्त झाले आहे अशांचे वर्णन या श्लोकात आले आहे. यामुळे या श्लोकात वर्णिलेल्या गोष्टी साधकासाठी प्रयत्नसाध्य आहेत असे मानता येईल. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाच्या लक्षणांच्या श्लोकापूर्वी शंकराचार्यांनी म्हटले आहे की सिध्दपुरुषांची लक्षणे साधकासाठी प्रयत्नसाध्य आहेत म्हणजे एकदा साधले की सारे सहज सोपे होऊन जाते. या नंतर मग सिध्द पुरुषांच्या लक्षणांची चर्चा आली आहे. गीता बुध्दीपासून या चर्चेला आरंभ करते.

1) तद्बुध्दयः परमात्म्याने सृष्टीत सर्वात आधी बुध्दीला उत्पन्न केले. दहाव्या अध्यायातल्या चौथ्या श्लोकावरील भाष्यात बुध्दीची व्याख्या करताना शंकराचार्य म्हणतात **बुध्दिः अंतःकरणस्य सूक्ष्माद्यर्थावबोधनसामर्थ्यं तद्वन्तं बुध्दिमान् इति हि वदन्ति।** अर्थात् सूक्ष्म-सूक्ष्मतर अशा अर्थाचे ज्ञान घडवणाऱ्या-ग्रहण करवून घेणाऱ्या अंतःकरणाच्या शक्तीला बुध्दी असे म्हणतात. ही शक्ती ज्याच्यापाशी आहे त्याला बुध्दीमान म्हणतात.

ही बुध्दी मानवाच्या ठायी असते. पशुपक्ष्यांच्या ठायी सूक्ष्म अर्थ ग्रहण करण्याची शक्ती नसते. चिंतन करणे, ग्रहण करणे, ज्ञान प्राप्त करणे, निश्चय करणे, सत्-असत् वा नीती-अनीतीतले अंतर पारखणे वा जाणणे बुध्दीचे कार्य होय. या बुध्दीबळामुळे परमात्मा एक आहे असे समजून घेता येते आणि आपल्या बुध्दीला संशयरहित बनवता येते पण परमात्मा सर्वत्र आहे. हे विश्व त्याचा आविष्कार आहे, त्याहून भिन्न नाही. हे विश्व परमात्म्याचा आभास आहे. जीव खरे तर परमात्मस्वरुपीच आहे. अशाप्रकारे गीतेत प्रतिपादन केलेले वेदान्ताचे सिध्दांत परिपूर्ण रीतीने पटून गेले तरीही मन आणि बुध्दी संपूर्णपणे शुध्द होत नाही, मन आणि इंद्रियावर परिपूर्णरित्या ताबा मिळवला जात नाही तोवर परमात्म तत्वाचा काही अनुभव येऊ शकत नाही. माणसाच्या ठायी पशुपक्ष्यांच्या तुलनेने बुध्दी अधिक आहे केवळ या कारणामुळे काही मनुष्यत्व सिध्द होत नाही. बुध्दीत शुध्दता उपजून देह, मन, बुध्दी, इंद्रिय समूह याहून आपले स्वरुप भिन्न असून

आपण परमात्मरुपी आहोत अशी तद्रुपता ईश्वराच्या ठायी व्हायला हवी.

2) **तदात्मान:** ज्यानी परमात्म्याच्या ठायीच आपल्या मनाला लीन करुन दिले आहे, ज्यांचे मन परमात्म्याच्या ध्यानातच लागलेले आहे, मनाला ह्राच अभ्यास जडला आहे याविषयाची प्रेम दाटून येण्याची स्थिती उत्पन्न झाली आहे तेच मोक्षाचे अधिकारी होत. निर्णय घेऊ शकणारी, सत्-असत् हे अंतर पारखू शकणारी, आत्म-अनात्म यात विवेक करणारी शक्ती बुध्दी असते. ही बुध्दी शुध्द व्हावी याचा अर्थ असा की सत्-असत् याचे स्वरुप जाणून घेण्यात उणीव राहू नये, चूक होऊ नये. देह आणि आत्मतत्व यातील नेमके अंतर ओळखता यावे आणि बुध्दीने नित्य परमात्मनिष्ठ असावे. यावरुनच बुध्दीची शुध्दता तपासून घेता येते. अभिमान, क्रोध वगैरे विकारांचे क्षीण होणे ही मनाची शुध्दी होय. विकार दूर झाल्यावर मनाची शुध्दी होते. बुध्दी आणि मन परमात्म्याच्या ठायी लीन झाले म्हणजे दु:ख सर्वथा संपून जाते. परमात्म्याच्या ठायीच निष्ठा वा भक्ती उत्पन्न होते.

3) **तन्निष्ठा:** अठराव्या अध्यायातील 55 व्या श्लोकात वर्णन येते की भक्तीमुळेच परमात्म्याचे समग्र आकलन होते. भक्तीचे वैशिष्ट्य हे आहे की ती साधना काळाप्रमाणे सिध्दावस्थेतही विद्यमान असते. बुध्दी आणि मन परमात्म्याच्या ठायी लीन व्हायला हवे.

4) **तत्परायणा:** मन आणि बुध्दी परमात्म तत्वात विलीन होणे म्हणजे परमात्मपरायण होणे म्हणजे व्यापक बनणे होय. या व्यापकतेमुळे सृष्टीतील तमाम पदार्थांमध्ये परमात्मभाव बघण्याची दृष्टी प्राप्त होणे होय. याचा सहज स्वाभाविक परिणाम असा होतो की मन सर्वभूत सेवापरायण बनते. परमात्मा परायण होणे याचा अर्थ सर्वभूतहित म्हणजे सेवारत असा लावला तर **'तदबुध्दय:'** आणि **'तदात्मान:'** या शब्दांची नेमकी उकल होते अन्यथा ती पुनरुक्ती वाटेल. यामुळे **'तद्बुध्दय:'** आणि **'तदात्मान:'** याचा परिणाम **'तन्निष्ठा:'** आणि मग **'तत्परायणा:'** असा वर्णिला गेला आहे. आत-बाहेरुन भक्ती म्हणजे तत्परायण म्हणजे सेवापरायण असा अर्थ लावणे क्रमश: सुसंगत ठरते.

या श्लोकावर टिपण लिहिताना विनोबा म्हणतात की कर्मयोग असो वा भक्तियोग, ध्यानयोग असो वा ज्ञानयोग यापैकी कुणाचीही कल्पना दृढ निश्चयाशिवाय करता येत नाही. कर्मयोगाचा निश्चय म्हणजे कर्तव्याचा निर्णय होय. भक्तीविषयक निश्चय म्हणजे श्रध्दा वा निष्ठा होय. ध्यानविषयक निश्चयाचा अर्थ धैर्य, अचांचल्य-निर्धार म्हणजे निग्रह. ज्ञानाच्या निश्चयाचा अर्थ नि:संशय अवस्था, संदेहरहित अवस्था होय.

विनोबांच्या या निवेदनाला पुढीलप्रमाणे लागू करता येईल. **'तदबुध्दय:'** म्हणजे ज्ञानाचा निश्चय --नि:संशयता, संदेहरहितता बुध्दी जेव्हा ईश्वराच्या ठायी लीन होते तेव्हा संशयरहित अवस्था उत्पन्न होते. **तदात्मान:** परम तत्वाच्या ठायी मन लीन होणे. परमात्म ध्यानावस्थेचा अभ्यास करत चित्ताची चंचलता वा अस्थिरता दूर करणे, धैर्य प्राप्त करणे हा झाला ध्यानविषयक निश्चय. **'तन्निष्ठा:'** म्हणजे परमात्म्याच्या ठायी निष्ठा, भक्ती, श्रध्दा ठेवणे - हा झाला भक्तीचा निश्चय. **'तत्परायणा:'** म्हणजे कर्मयोग परायणता म्हणजे कर्मयोगाचा निश्चय.

5) **ज्ञाननिर्धूतकल्मषा:** अशाप्रकारे उपरोक्त चार गोष्टी प्राप्त झाल्यात तर याचे फळ म्हणजे ज्ञानप्राप्ती होय. या ज्ञानामुळे म्हणजे परमात्मज्ञानामुळे अंतर्बाह्य मालिन्य दूर होते. कुठलाही विकार उरत नाही. अंतत: परिपूर्ण चित्तशुध्दीपर्यत आपण पोहोचतो. इथे साधनेचा अंतिम परिणाम परिपूर्ण चित्तशुध्दीच वर्णिली आहे.

6) **गच्छन्ति अपुनरावृत्तिं:** पूर्ण चित्तशुध्दीचा परिपाक अपुनरावृत्ती म्हणजे अपुनर्जन्मच असू शकतो. कर्मबंधन नष्ट झाल्यामुळे अहंकार म्हणजे जीवभाव परमात्म्याच्या ठायी विलीन होऊन जातो. मग उरते ते परमतत्व.

ब्रह्मसूत्र भाष्यात शंकराचार्य लिहितात: **गृहीते तु आत्मैकत्वे बंधमोक्षदिसर्वव्यवहारपरिसमाप्तिरेव स्यात्।** अर्थात् सर्वत्र एकमात्र परमात्म तत्वच व्याप्त आहे असा बोध झाला म्हणजे बंधन आणि मोक्ष यासारखे सारे व्यवहार संपून जातात म्हणजे जीव परमात्म्याच्या ठायी विलीन होऊन जातो. परमतत्वापासून विलग राहिल्यामुळे बंधनासारखे वाटत होते. परमतत्वाशी एकरुप झाल्यावर उरतो केवळ परमात्मा म्हणजे जीव मुक्त होतो, हाही अर्थ लावता येऊ शकतो. 'भेद सत्य नाही' अशी प्रतीती एकदा झाली की बंधन उरत नाही. जीवाचे नित्य मुक्तरुप अनुभवाला येते.

: 18 :

*विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।*
*शुनि चैव श्वपाके च पंडिता: समदर्शिन: ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे:** ज्ञान आणि विनययुक्त ब्राह्मणाच्या ठायी
- **गवि हस्तिनि:** गाय आणि हत्तीच्या ठायी
- **च शुनि-श्वपाके:** कुत्रा आणि चांडाळ यांच्या ठायी
- **पंडिता: समदर्शिन:** ज्ञानी जन समानरुपाने (ब्रह्माचे) दर्शन करतात

### अर्थ

ते ज्ञानी पुरुष विद्या आणि विनय यानी युक्त असलेला ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाळ या सर्वाना समदृष्टीने पाहातात.

*विद्या-विनय-संपन्न द्विज गाय तसा गज*
*श्वान चांडाळ हे सारे तत्त्व-ज्ञ सम पाहती।*

**विषय:** तसे तर या श्लोकातून एकच मुद्दा प्रतिपादित केला गेला आहे पण या एका मुद्यात चार गोष्टींचा समावेश आहे. (1) विद्या म्हणजे ज्ञानामुळे आणि विनय म्हणजे विनम्रतेमुळे जे युक्त आहेत असे पंडित वा ज्ञानीजन (2) गाय, हत्ती, कुत्रा यासारख्या राजसी मानल्या गेलेल्या पशुंमध्ये आणि (3) चांडाळ म्हणजे तमोगुणी आणि हीन मानल्या गेलेल्यामध्ये सुध्दा (4) पंडित म्हणजे ज्ञानीजन ब्रह्म म्हणजे परमात्म्याचे दर्शन करतात.

### स्पष्टीकरण

1) **विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे:** विद्या म्हणजे ज्ञान आणि विनय म्हणजे विनम्रता या गुणांनी संपन्न ब्राह्मणांच्या ठायी. श्लोकाच्या अंती वाक्य पूर्ण होत आहे. चेतन जगतात मानवी योनी आणि पशु-पक्षी, जीव जंतु वगैरे तिर्यक् योनी प्रामुख्याने आहेत. या श्लोकात जड सृष्टीचा उल्लेख नाही. चेतन सृष्टीमधल्या तमाम प्राणीमात्रामध्ये समान रुपाने व्याप्त परमात्म्याचे दर्शन ज्ञानी पुरुष करतात आणि तसा व्यवहार करतात. आधी मनुष्य योनीचा उल्लेख आहे, मध्ये पशु योनीचा आणि अखेरीस पुनश्च मनुष्य योनीचा उल्लेख आहे. सुरुवातीला विद्या म्हणजे ज्ञानसंपन्न ब्राह्मणाचा उल्लेख आहे.

ज्ञान या वृत्तीसोबत आत्मज्ञानाशिवाय समाजोपयोगी अन्य ज्ञान म्हणजे विज्ञान, विविध प्रकारची ज्ञाने समाविष्ट आहेत. सारेच ज्ञानी आत्मज्ञानी असतात असे नव्हे. सर्वांनी आत्मज्ञानी असावे असा आग्रहही धरता येत नाही. सदाचार संपन्न, पवित्र ब्राह्मण असावा अशी अपेक्षा केली जात होती. त्याला समाजोपयोगी विविध विषयांचे ज्ञान असावे अशी अपेक्षा अवश्य केली जात होती. त्यांच्या ठायी सात्विकतेचा उत्कर्ष हवा. त्यांच्या तमाम क्रिया समाजासाठी आदर्श असायला हव्यात. समाजातील सारी माणसे माणसाच्या नात्याने एकच आहेत. माणूस म्हणून अंतर नसतानाही शक्तीत अंतर पडतेच. सर्वांच्या ठायी असाधारण बुध्दी शक्ती तर काही आढळत नाही. अशाच प्रकारे शक्तीत अंतर असल्यामुळे श्रेष्ठ, सामान्य, कनिष्ठ यासारखे भेद स्वाभाविकपणेच होतात. उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अथवा सात्विक, राजस, तामस अशा प्रकारे तीन प्रकारचे भेद सहज उद्भवतात. यासाठी गीतेने तीन दृष्टांत दिलेत. तीन प्रकारच्या माणसांच्या वा पशुंच्या ठायी ज्ञानी पुरुष एका परमात्म्याचे दर्शन करतो आणि त्यानुसार व्यवहार करतो. यथार्थ ज्ञानाचे एक लक्षण विनम्रता होय.

2) **गवि हस्तिनि:** गाईच्या ठायी ही ज्ञानीपुरुष परमात्म्याचे दर्शन करतो. रजोगुणासाठी गाईचे उदाहरण दिले असे शंकराचार्य म्हणतात. पशु पक्ष्यांचा संबंध रजोगुणाशी आहे, पण पशु-पक्ष्यांच्या ठायीही सत्व, रज आणि तम असे भेद आढळतात. माणसाच्या तुलनेने गाईला रजोगुणी मानले तरी पशुंच्या समुदायात तर तिला सत्वगुणाचीच प्रतिनिधी मानले जायला हवे. माणसांच्याही ठायी सत्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी असे भेद आहेत तरी माणसाच्या ठायी परमात्मज्ञान प्राप्त करायची जी शक्ती आहे, ती पशु-पक्ष्यांमध्ये नाही. यामुळे गाय आणि हत्ती ही झाली रजोगुणाची उदाहरणे.

3) **शुनि चैव श्वपाके च:** कुत्र्याला तामसी मानले गेले आहे. गाईच्या तुलनेने कुत्रा तामसी आहे तरी ज्ञानी गाईप्रमाणेच कुत्र्याच्या ठायीही परमात्म्याचे दर्शन करतो.

आता उरला चांडाळ. चांडाळ हीही मनुष्यजातच आहे तरी त्याला पशु कोटीत राखणे अन्याय आहे. चांडाळ या शब्दाचा अर्थ जर अस्पृश्य असा असेल तर त्या वर्गाला दूर

लोटण्यात खूप अन्याय केला गेला आहे. अस्पृश्य सुध्दा माणूसच आहे. त्यांची पशु कोटीत गणना करणे उचित नव्हे. अस्पृश्यांमध्येही संत झाले आहेत. दुराचाऱ्याला चांडाळ वा अस्पृश्य मानणे ठीक आहे पण कुण्या एका समाजाला अस्पृश्य वा चांडाळ समजणे अन्यायकारक आहे. चांडाळ ही जात नसून वृत्ती मानली जायला हवी. चांडाळ म्हणजे तामसी पुरुष. ब्राह्मण दुराचारी बनला तर त्यालाही चांडाळ वा अस्पृश्य मानायला हवे.

4) **पंडिताः समदर्शिनः** ज्ञानी पुरुष समस्त जड-चेतन सृष्टीच्या ठायी परमात्म्याचे दर्शन करुन व्यवहार आचरतो. पंडित म्हणजे ज्ञानी होय. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकात 'पंडित' शब्द आला आहे. आजकाल पंडीत म्हणजे ज्ञानी नसून शास्त्री असा अर्थ केला जातो. प्राचीन काळी प्रपंचमुक्त ज्ञानी पुरुषालाच 'पंडित' असे म्हटले जायचे.

: 19 :

*इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः।*
*निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **येषां मनः** ज्यांचे मन
- **साम्ये स्थितंः** (सर्व भूतमात्रात परमात्म्याचे दर्शन करुन) सम अवस्थेत रहाते
- **तैः इह एवः** त्यांनी ईहलोकातच
- **सर्गः जितः** जगाला जिंकून घेतले आहे
- **हि ब्रह्म निर्दोषं समंः** कारण की ब्रह्म सर्व दोषांनी रहित आणि सम आहे
- **तस्मात् ते ब्रह्मणि स्थिताः** त्यामुळे ते पुरुष ब्रह्मात स्थित आहेत

### अर्थ

ज्यांचे मन सम भावात स्थिर झाले, त्यांनी या जन्मीच संपूर्ण संसार जिंकला आहे, कारण सच्चिदानंदघन परमात्मा निर्दोष आणि सम आहे म्हणून ते सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठायीच स्थिर असतात.

*इथें चि जिंकिला जन्म समत्वीं मन रोवुनी*
*निर्दोष सम जें ब्रह्म झाले तेथें चि ते स्थिर।*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) तमाम भूतमात्रांच्या ठायी परमात्म्याचे दर्शन करुन त्यानुसार व्यवहार करताना ज्या पुरुषाचे मन सम अवस्थेत असते. निर्विकार, अलिप्त वा अनासक्त असते (2) अशा पुरुषांनी प्रपंचावर विजय संपादन केला आहे असे मानले जायला हवे (3) कारण की ब्रह्मतत्व म्हणजे परमात्मतत्व सम म्हणजे निर्विकार आणि निर्दोष आहे. (4) त्यामुळे असे पुरुष ब्रह्म म्हणजे परमात्म्याच्या ठायी स्थित आहेत.

### स्पष्टीकरण

1) **येषां साम्ये स्थितं मनः** सृष्टीच्या तमाम जड-चेतन पदार्थांच्या ठायी समानपणे परमात्मा वसतो. अज्ञानी जनांच्या मते परमात्मा लुप्त असतो कारण की अज्ञानीजन सृष्टीच्या अनंत पदार्थांकडे केवळ कार्य दृष्टीनेच बघतात. कुणी घटाला बघून केवळ घटाच्या बाह्य आकारालाच बघत असून मूळ माती या तत्वाला बघत नसेल तर ते कार्यदर्शन काही यथार्थ दर्शन म्हणता-मानता येणार नाही. खरे तर आसक्ती केवळ ईश्वराच्या ठायीच असायला हवी. बाह्य जगातल्या कुठल्याही पदार्थात आसक्ती नसावी.

2) **तैः इह एव सर्गो जितः** या देहात असतानाच सर्ग म्हणजे प्रपंच वा जगाला जिंकून घेतले असे मानले जायला हवे. सारे प्राणीमात्र प्रपंच वा जगाच्या ठायी फसलेले - रुतलेले आहेत. जे घर, पत्नी, परिवार यांच्या आसक्तीत बध्द होत नाहीत असे सार्वजनिक सेवेच्या कामात आसक्त होतात. कुणी सार्वजनिक संस्थांच्या ठायी आसक्त होतात. परमेश्वराच्या स्वरुपाची ओळख न होऊ शकणे हेच आसक्तीचे एकमेव कारण होय. परमेश्वराच्या अलौकिक मायेमुळे देह वगैरे सारी सृष्टी आकाराला येते पण परमेश्वर स्वतःला जड सृष्टीत अव्यक्त रुपात ठेवतो. जीवात्म्याच्या ठायी प्रकट होतो. जीव चेतन स्वरुप असून चैतन्यतत्व एकच आहे पण आपल्याला हे कधीच अनुभवायला मिळत नाही की आपण देहाशी नव्हे तर परमतत्वाशी एकरुप आहोत पण ज्यांना परम तत्वाची ओळख होते ते प्रपंचात आसक्त न होता प्रपंचावर विजय मिळवतात.

3) **निर्दोषं हि समं ब्रह्म:** ब्रह्मतत्व सम आणि निर्दोष आहे. जिथे द्वैत म्हणजे दोन असा भाव असेल तिथे राग-द्वेष या सारखे विकार जन्माला येतात. विकारांमुळे दु:ख उपजते. दु:खाचे कारण द्वैत असून अद्वैतामुळे सुखाची प्राप्ती होते- अद्वैत हे सुख प्राप्तीचे निमित्त बनते. परमात्म्याच्या सम्मुख दुसरी कुठली वस्तु नसल्यामुळेच परमात्मा आनंदमय आहे. मातीचा घट जसा भास आहे ना तसेच जगत हे परमात्म्याच्या अलौकिक अशा माया शक्तीचा भास आहे. परमात्म तत्व जसे आनंदमय आहे तसे निर्दोष आहे. कुटुंब संस्था अद्वैताच्या अनुभवासाठीच आहे. सृष्टीचा अर्थच मूळी द्वैत होतो. जिथे सृष्टी तिथे नाना प्रकारचे भेद हे असणारच. भेदामुळे दु:ख उपजते त्यातूनच दोष संभवतात. यामुळेच अद्वैताच्या अनुभवासाठी कुटुंब व्यवस्था उभी ठाकली आहे. हवे तेवढे आश्रम काढा, सार्वजनिक संस्था उभारा पण कुटुंब संस्था एक अद्भुत संस्था आहे. विवाहापूर्वी पती-पत्नी एकमेकांना जाणत-ओळखत नसतात पण विवाहानंतर एकात्म होतात-अद्वैतरुप होतात. अधून-मधून मतभेदही होतात पण आंतरिक एकत्वात-समरसमेत काही फरक पडत नाही. दोघे आपल्याला एकरुप मानतात. मग लेकरांचा जन्म होतो. लेकरेही आपापसात अद्वैतबुध्दीने रहातात. मोठा भाऊ छोट्याला मारतो पण अद्वैत वसते. कुटुंबातल्या अद्वैताच्या पाठीमागे ममता असते. हा अद्वैताचा दोष झाला. ममताही द्वैताची भावना आहे. या द्वैत भावनेमुळे केवळ कुटुंबापुरताच अद्वैत भावाचा अनुभव येतो. कुटुंबाशिवायच्या इतरांच्या बाबतीत अद्वैताचा हा असा अनुभव येत नाही पण कुटुंबाच्या अद्वैतभावनेच्या ठायी असलेला ममतेचा दोष जर घालवून टाकता आला तर मग कुटुंबातला सीमित - मर्यादित - असा अद्वैतभाव सर्वाच्या बाबतीत व्यापक रुपात येऊ शकतो म्हणून अद्वैताच्या अनुभव जागरणासाठीच कुटुंब व्यवस्था जन्माला आली असे मानायला हवे. या विवेचनाचा मथितार्थ असा की चित्ताच्या ठायी जेवढी भेद बुध्दी दाटून येईल तेवढे अधिक दोष होतील आणि त्या प्रमाणात अधिक दु:खांचा अनुभवही येईल. यामुळे गीता म्हणते की ब्रह्मतत्व हे दोषरहीत आणि सम आहे कारण की ते भेदातीत आहे - भेदरहीत आहे.

4) **तस्मात् ब्रह्मणि ते स्थिता:** ज्ञानी पुरुष परमात्म्याच्या ठायीच स्थित असतो. आपण परमात्मतत्वाहून भिन्न नाही असा अनुभव ज्ञानी पुरुषाला होतो. परमशून्यावस्थेतप्रत पोहोचलेल्या ज्ञानी पुरुषाचा अहंभाव गळून पडलेला असतो. मुंडकोपनिषद म्हणते:

***यदा पश्य: पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् । तदा विद्वान् पुण्यपापे विधूय निरंजन: परमं साम्यमुपैति ॥*** *(3/1/3)*

अर्थात् "सुवर्णाप्रमाणे तेजस्वी रुपाच्या जगताचा कर्ता, ईश, प्रत्येक प्राणीमात्राच्या ठायी पुरुष रुपाने स्थित आणि सवांर्च्या उत्पत्तीचे कारण अशा परम तत्वाला जीव जेव्हा बघतो त्याक्षणी ज्ञानी बनतो. पुण्य-पाप भावनेला धुऊन म्हणजे अनासक्त भावनेने, निरंजन होऊन परम साम्यावस्थेला पोहोचतो - प्राप्त होतो."

: 20 :

***न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।***
***स्थिरबुध्दिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रियं प्राप्य:** प्रिय वस्तु प्राप्त झाल्यावर
- **न प्रहृष्येत्:** हर्षित व्हायला नको
- **च अप्रियं प्राप्य:** आणि अप्रिय वस्तु मिळाल्यावर
- **न उद्विजेत्:** उद्विग्न व्हायला नको
- **स्थिरबुध्दि:** (ज्या ज्ञानी पुरुषाची) बुध्दी स्थिर होऊन गेली आहे, स्थिर झाली आहे
- **असंमूढ:** जो मोहरहित होऊन गेला आहे, झाला आहे
- **ब्रह्मवित्:** असा ब्रह्मज्ञानी पुरुष (व्यक्ती)
- **ब्रह्मणि स्थित:** ब्रह्माच्या ठायी स्थित होऊन गेला आहे

**अर्थ**

जो पुरुष प्रिय वस्तु मिळाली असता आनंदित होत नाही आणि अप्रिय वस्तु प्राप्त झाली असता उद्विग्न होत नाही, तो स्थिर बुध्दी असलेला संशयरहित ब्रह्मवेत्ता पुरुष सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्याच्या ठायीच ऐक्यभावाने नित्य स्थित असतो.

***प्रिय-लाभें नको हर्ष नको उद्वेग अप्रियें***
***बुध्दि निश्चळ निर्मोह ब्रह्मीं ज्ञानी स्थिरावला ।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) प्रिय वस्तु वा अनुकूल परिस्थिती प्राप्त झाल्यावर जो हर्षित होत नाही. 2) अप्रिय वस्तु वा प्रतिकूल परिस्थिती प्राप्त झाल्यावर जो दु:खी होत नाही. 3) चंचळपणा दूर होऊन जो स्थिरपद - स्थिरबुध्दी - झालेला आहे आणि 4) मोह रहीत झाला आहे. 5) असा ब्रह्मज्ञानी ब्रह्मतत्वातच स्थित होऊन गेला आहे.

**स्पष्टीकरण**

गीतेत एकच विषय पुनरावर्तित केला गेला आहे. या श्लोकातील पहिल्या लक्षणाची चर्चा यापूर्वी दुसऱ्या अध्यायातल्या 55 व 56 व्या श्लोकातही केली गेली आहे पण दुसऱ्या अध्यायातल्या भाष्यात गीता एकच विचार पुनरावर्तित करत आहे. असे शंकराचार्यानी स्पष्टीकरण करुन दिले आहे. याचे कारण हेच आहे की परमेश्वराला सततची काळजी लागून राहिली आहे की परमात्म तत्व प्रापंचिक जनाना कसे कळावे? परमतत्वाचा त्याना अनुभव कसा व्हावा? आणि त्यांची प्रपंचासक्ती नष्ट व्हावी. परमात्मा अव्यक्त आहे. इंद्रियांच्या माध्यमातून काही परमतत्व जाणून घेता येत नाही. परमात्म्याच्या अनुभवाविना सुख-दु:ख-मोह हा अनुभव होत रहातो यामुळे पु**न:**पुन्हा एकच एक मुद्दा सांगावा लागतो- पुनरावर्तित करावा लागतो.

1) **न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य:** ज्ञानी पुरुषाचे पहिले लक्षण असे की प्रिय वस्तु वा अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली तरी ज्ञानी पुरुष आनंदित होत नाही. सर्वसामान्यपणे प्रत्येकाचे प्रयत्न दोन गोष्टींसाठी असतात एक तर प्रिय वस्तुची प्राप्ती व दुसरी अनुकूल परिस्थितीची रचना. याचे मुख्य कारण असे की देहालाच-देह वगैरे तत्वांनाच-आपले स्वरुप समजत असल्याकारणामुळे देह वगैरेला लाभणारा आराम आपल्यालाच लाभतो अशी भावना होऊन बसते. यामुळे देह आणि इंद्रियांना प्रिय वाटणारेच सुखद वाटू लागणे स्वाभाविक ठरते. गीतेच्या तेराव्या अध्यायात ज्ञानाचे लक्षण सांगताना **'जन्म-मृत्यु, जरा-व्याधि, दु:ख दोषानुदर्शनम्'** हे एक लक्षण येते. जन्म-मृत्यु, वृध्दत्व आणि रोग हे सारे दु:खदायी आहेत असे नित्य चिंतन करुन त्याचा तशा प्रकारे अनुभव घेणे. यामुळे देह वगैरेविषयीची ममता क्षीण होऊन जाते आणि प्रिय वस्तुच्या प्राप्तीची वासनाही संपून जाते प्रिय प्राप्त व्हावे अशी वासना जर मनातून दूर झाली तर मग प्रिय वस्तु वा अनुकूल परिस्थिती प्राप्त झाल्यावर बाह्य परिस्थितीमुळे काही आनंद मिळणार नाही. याउलट परमात्मा हेच आनंदाचे निधान-आनंदाचे स्थान बनेल. परमात्म्याशिवाय अन्य विषयामध्ये आनंदाचा प्रयत्न करीत राहिले ना तर निष्फळता येते - असफलता येते. विषयांच्या माध्यमातून तात्कालिक आनंद भले का मिळेना पण शाश्वत आनंदाची प्राप्ती नाही होऊ शकत. याचे कारण असे की विषय सत्यवस्तुरुप नाहीत. आज आनंददायी वाटणारा विषय काही काळानंतर तसा वाटणार नाही पण सत्य वस्तुच्या संदर्भात असे होत नाही. त्याच्या ठायी अखंड आनंदाचा अनुभव येतो - वसतो.

2) **न उद्विजेत् प्राप्य च अप्रियं:** ज्ञानी पुरुष प्रतिकूल परिस्थिती वा अप्रिय वस्तु प्राप्त झाली तरी खिन्न वा दु:खी होत नाहीत, सृष्टीच्या व आपल्या संबंधामुळे जसे सुख लाभते तसा दु:खाचाही अनुभव होतो आणि अखेरीस दु:खाचाच अनुभव अधिक होतो यामुळे जगाला दु:खमय मानले गेले आहे. तुकोबा म्हणतात **'सुख पहाता जवापाडे दु:ख पर्वताएवढे'** म्हणजे सुखाचा प्रदीर्घ अनुभव देखिल एखाद्या क्षणापुरताच मर्यादित असा वाटतो याउलट दु:खाचा क्षणभरचा अनुभव देखिल प्रदीर्घ काळपर्यंत सल बनून मनी वसतो. सुखाप्रमाणे दु:ख काही क्षणिक असत नाही. दु:ख दीर्घकाळपर्यत पुरते-उरते. लाख प्रयत्न करुनही आपण दु:खापासून वाचू शकत नाही. यामुळे सृष्टीच्या संबंधातल्या आपल्या सुख-दु:खांचा विचार केला तर सुख क्षणिक स्वरुपाचेच असते. त्या क्षणिक सुखापासून आणि दु:खापासून मुक्त होण्यासाठी माणसाचे सातत्याने प्रयत्न सुरु असतात हे अगदी स्वाभाविक आहे. ज्ञानी जनाला परमात्म्याच्या अनुभवामुळे शांतीलाभ होतो, यामुळे सृष्टीच्या पंच तन्मात्रा म्हणजे शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध यांच्या संबंधातून जे प्रिय-अप्रिय, अनुकूल-प्रतिकूल प्राप्त होते आणि हर्ष-विषादाचा जो अनुभव मिळतो त्यासंदर्भात ज्ञानी तटस्थ रहातो.

3) **स्थिरबुध्दि:** ज्ञानी माणसाची बुध्दी स्थिर असते. दुसऱ्या अध्यायात अशा पुरुषाला 'स्थितप्रज्ञ' म्हटले आहे. बुध्दी निर्णय घेणारी शक्ती आहे. सत्यवस्तु एकच आहे. अनेकत्वाचा भास काही सत्य नाही. ज्या बुध्दीच्या ठायी अनेकत्वाला सत्य मानायचा निर्णय होतो ती स्थिर

असू शकत नाही. अनेकत्वाला सत्य मानणारा असेल तर ती बुध्दी चंचल व अस्थिर रहाणार. एकत्वाला सत्य मानल्यावरच बुध्दी स्थिर राहील.

4) **असंमूढः** ज्ञानी मोहरहीत बनतो. देह वगैरेला आपण स्व-स्वरुप मानून बसतो परिणामी देह वगैरे विषयीची आसक्ती जागणे हा सहज परिणाम संभवतो. जिथे देह वगैरेबाबत आसक्ती जागली असेल तिथे माता-पिता, पत्नी-लेकरे, परिवार इत्यादींच्या संबंधात आसक्ती उपजणे स्वाभाविकच आहे. अशा प्रकारे स्व-देहासक्ती, स्वजनासक्ती उपजल्यावर संमोह उत्पन्न होईल. संमोह म्हणजे मूढता वा मूर्च्छा. आपल्या संपूर्ण जगताची व्याप्ती **'अहं'** म्हणजे **'मी'** आणि **'मम'** म्हणजे **'माझे'** या दोन शब्दात सामावलेली आहे. यांना नष्ट करणे अवघड म्हणजे जवळपास अशक्यच आहे. या दोघांमध्ये अतिप्रबळ **'अहं'** म्हणजे **'मी'** आहे. अहंपेक्षा ममतेला दूर सारणे थोडे सोपे आहे. ज्ञानदशा जागली की अहंता-ममता दोन्ही संपून जातात. यामुळे ज्ञानी पुरुषाच्या चित्तात संमोह म्हणजे मूढपणा वा मूर्च्छा उत्पन्न होत नाही.

5) **ब्रह्मवित् ब्रह्मणि स्थितः** उपर्युक्त लक्षणे ज्याच्या ठायी विद्यमान आहेत तो पुरुष ब्रह्मतत्वातच स्थित आहे, तो परमात्म तत्वाहून भिन्न असू शकत नाही. त्याने आपले अस्तित्व परमात्म्याच्या ठायी विलीन करुन दिले आहे. तो शून्य बनून गेला आहे. अस्तित्व केवळ परमात्म तत्वाचेच एक काय ते आहे व आपले मुळी अस्तित्वच नाही हे पटले, ध्यानात उतरले तेव्हाच शून्य बनायच्या अभ्यासाला सुरुवात होऊ शकते. हे ज्ञानपूर्वकच लक्षात यायला हवे, असेही काही नाही, हे श्रध्देच्या आधारेही पटू शकते. बुध्दीने परमतत्व पटले तर मग मनात त्याबाबत शंका जागायचे कारण उरत नाही पण श्रध्दा अति दृढ झाली तर शंका जागायचा प्रश्नच मुळी उद्भवत नाही. अशा प्रकारे ज्ञानी शून्यतेचा अनुभव घेत परमात्म्याच्या ठायी लीन रहातो.

: 21 :

*बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।*
*स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **बाह्यस्पर्शेषुः** शब्द, स्पर्श वगैरे बाह्य विषयात अर्थात् सांसारिक भोगात
- **असक्तात्माः** जे आसक्तीरहित आहेत (त्यांना)
- **आत्मनि यत् सुखंः** आपल्या अंत:करणात भगवत् ध्यान जनित आनंद आहे
- **(तत्) विन्दतिः** ते अनुभवायला मिळते
- **सः ब्रह्मयोगयुक्तात्माः** तो सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्मरुप योगात ऐक्य भावनेने स्थित झालेला पुरुष म्हणजे ब्रह्मयोगमुक्तात्मा
- **अक्षयं सुखं अश्नुतेः** अखंड सुखाचा अनुभव घेतो

### अर्थ

ज्याच्या अंत:करणाला बाहेरील विषयांची आसक्ती नसते, असा साधक आत्म्यात असलेल्या, ध्यानामुळे मिळणाऱ्या सात्विक आनंदाला प्राप्त होतो, त्यानंतर तो सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्याच्या ध्यानरुप योगात ऐक्यभावाने स्थित असलेला पुरुष अक्षय आनंदाचा अनुभव घेतो.

*विटला विषयीं जाणे अंतरी सुख काय तें*
*ब्रह्मीं मिसळला तेव्हां भोगी तें सुख अक्षय ।*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) बाह्य विषयांच्या ठायी जो अनासक्त आहे. (2) असा पुरुष परमात्मसुखाचा अनुभव घेतो (3) आणि मग ब्रह्मांडात व्याप्त परमात्म्याचा अनुभव घेत (4) अखंड सुखाचा-अखंड आनंदाचा अनुभव घेतो.

### स्पष्टीकरण

1) **बाह्यस्पर्शेषु असक्तात्माः** ज्ञानी शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध या पाच विषयाच्या बाबतीत अनासक्त असतो. जगताच्या ठायी अनंत विषय आहेत आणि त्यांच्या ठायी पंचविषय समाविष्ट आहेत. सृष्टीच्या तमाम पदार्थांना बघून ज्याला परमेश्वराचे स्मरण होते तो पंचविषयात आसक्त न होता परमात्म्याच्या ठायी अनुरक्त

होतो-आसक्त होतो. आसक्ती एक शक्ती आहे. या शक्तीचा उपयोग कसा व कुठे केला जावा हाच प्रश्न आहे. आपल्याला जगताचे स्वरुप परमात्मरुप असल्याचे ज्ञान नाही आणि आपण स्वत: परमात्मरुप असल्याचेही ठाऊक नाही यामुळे आपण जगतरुपी कार्याला सत्य मानून त्यात आसक्त बनून दु:खी होतो. या उलट परमात्म स्वरुपाची ओळख करुन घेऊन त्याठायी आसक्ती बाळगली तर आनंदाचा अनुभव होईल.

2) **विन्दंति आत्मनि यत् सुखम्:** विषयाना सत्यरुप मानत नसल्यामुळे ज्ञानी आत्मसुखाचा अनुभव प्राप्त करुन घेऊ शकतो. विषयांच्या पाठीमागे असलेल्या परमात्मतत्वाला जाणून घेतले असल्यामुळे ज्ञानवंताची आसक्ती ईशतत्वाच्या ठायी असते. परमात्म्याच्या ठायी केंद्रित होते. जगाला सत्यरुपी मानत असल्यामुळे अज्ञान्याची आसक्ती जगात असते. अशाप्रकारे ज्ञानी आणि अज्ञानी यांच्या आसक्तीचे विषय बदलून जातात पण आसक्ती एक नष्ट न होणारी शक्ती आहे. आत्मानुभवाचा आनंद ध्यानजन्य असल्यामुळे मनात उठणारे प्रत्यय, विचार, नामरुपात्मक आकृती वा कल्पनांना रोखण्याचा-हटवण्याचा ज्ञानी पुरुष प्रयत्न करतो. आत उत्पन्न होणाऱ्या काल्पनिक सृष्टी जगताला दूर लोटून परमात्म तत्वाचा अनुभव घेऊन सुख आणि आनंदाचा अनुभव प्राप्त करुन घेतो. अशा प्रकारे आत परमात्म्याचा अनुभव आला आणि तो टिकून राहिला तर आत्मदर्शनाची भूमिका प्राप्त झाल्यावर चैतन्ययुक्त प्राणिमात्राच्या ठायी परमात्म्याचे दर्शन होते. यानंतर मग जड पदार्थाच्या ठायी व्याप्त अशा परमतत्वाचेही दर्शन आपोआप होते. नामदेव कुत्र्याच्या पाठीमागे 'कोरडी पोळी खाऊ नकोस, तूप लावू दे' असे म्हणत म्हणूनच तुपाची वाटी घेऊन धावतो. आपल्या देहात व्याप्त परमतत्वाचे आकलन-दर्शन करुन घेण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. आतली सृष्टी हटवायला जर आपण समर्थ ठरलो तर आत्मानुभव होऊ शकतो. बाहेरची सृष्टी परमात्म्याच्या अधीन आहे आणि ती परमात्म्याच्या अलौकिक शक्तीरुपी माया तत्वाचा आभास आहे तिला दूर हटवणे काही सोपे नाही. शक्यही नाही. मनाची-मनातली-काल्पनिक सृष्टी नष्ट करणे आपल्याला शक्य आहे-सोपे आहे. ही सृष्टी नेहमी दु:ख उत्पन्न करणारी आहे. यामुळे ज्याला आंतरिक सृष्टी घालवण्यात यश मिळाले तो आत प्रकट होणाऱ्या परमात्मतत्वाचा अनुभव घेऊ शकतो.

3) **स: ब्रह्मयोगयुक्तात्मा:** ज्ञानी पुरुष ब्रह्मांडव्यापी-ब्रह्मांडात स्थित-परमात्म्याशी एकरुप होतो म्हणजे ब्रह्मांडात गुप्त रुपाने वसणाऱ्या परमतत्वाला बघू शकतो-नित्य अनुभव घेऊ शकतो. पिंड म्हणजे देहात स्थित परमात्मा प्रकट परमात्मा आहे त्याचा अनुभव आधी घेतला मग ब्रह्मांडात स्थित परमतत्वाचा अनुभव व्हायला लागतो. सृष्टीच्या कुठल्याही जड पदार्थाच्या ठायी त्याला परमात्मतत्वाचे दर्शन घडू लागते. वस्त्रात सूत दिसावे वा घटात मूळची माती हे तत्व दिसावे तसे जगत हे परमात्म्याचे कार्य असल्यामुळे त्यात सर्वत्र परमात्म्याचे दर्शन होऊ लागते. पाणी, वारा, अग्नी, सूर्य, चंद्र, अगणित तारे, पृथ्वी या तमाम पदार्थांना बघून मन आश्चर्यचकित होते. या अद्भुत वस्तुंना निर्माण करणाऱ्या परमात्म्याचे स्मरण होते.

4) **अक्षयं सुखं अश्नुते:** परमात्मदर्शनरुप ही भूमिका प्राप्त झाल्यावर अक्षय सुखाचा अनुभव व्हायला लागतो. आत्मदर्शनाच्या भूमिकेत केवळ सुखाचा आणि सुखाचाच उल्लेख असतो. परमात्म दर्शनाच्या भूमिकेत अखंड सुखाचा उल्लेख येतो. अशाप्रकारे आत्मदर्शनाच्या दोन भूमिका झाल्या. सांख्य, जैन आणि वैशेषिक तिघांच्या केवळ आत्मदर्शनरुप भूमिकाच आहेत त्यांना परमात्मदर्शन रुप भूमिका मान्य नाही. वेदान्त आणि गीतेचा सिध्दांत आहे की देहांतर्गत जे आत्मतत्व आहे तेच ब्रह्मांडांतर्गत परमात्म तत्व होय. सृष्टीच्या पाठीमागे परमेश्वर असल्याची वेद-गीतेची भूमिका जर आपण मान्य केली तर सृष्टीविषयी काम, क्रोध यासारख्या भावनाविकार निर्माण होण्याऐवजी परमात्म्याचे स्मरण होईल आणि विकारांना रोखता येईल. परमात्मस्मरणातून उपजणारा आत्मानंद वा उपजणारे आत्मसुख हे दोन तासांचे क्षणिक न रहाता अखंड स्वरुपाचे असते. यामुळे परमात्म दर्शनातून अखंड सुखलाभ होतो हे यथार्थ म्हणजे सत्य आहे. शंकराचार्य म्हणतात: **तस्मात् बाह्यविषयप्रीते: क्षणिकाया: इन्द्रियाणि निवर्तयेत् आत्मनि अक्षयसुखार्थी**

**इत्यर्थः**। अर्थात्  म्हणूनच आत्मसुखाची कांक्षा वा इच्छा बाळगणाऱ्या मुमुक्षुने बाह्य विषय सुखापासून इंद्रियांना परावृत्त वा निवृत्त करायला हवे.

: 22 :

*ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।*
*आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हिः** कारण की
- **ये संस्पर्शजा भोगाः** इंद्रियांच्या विषयांशी आलेल्या संबंधाने उपजणारे जे भोग आहेत
- **ते दुःखयोनयः** एवः ते दुःखालाच कारण आहेत
- **आद्यन्तवन्तः** (ते) आदि आणि अंतसहित आहेत
- **कौन्तेयः** हे कुंतीपुत्र अर्जुना (यामुळे, म्हणून)
- **बुधः तेषु न रमतेः** ज्ञानी लोक त्या विषयांमध्ये रमण करत नाहीत

**अर्थ**

जे हे इंद्रिय आणि विषय यांच्या संयोगाने उत्पन्न होणारे सारे भोग आहेत, ते जरी विषयी पुरुषाना सुखरुप वाटत असले तरी तेही दुःखालाच कारणीभूत ठरणारे आणि अनित्य आहेत म्हणून हे अर्जुना, बुध्दीमान, विवेकी लोक त्यात रमत नाहीत.

*विषयांतील जे भोग ते दुःखास चि कारण*
*येती जसे तसे जाती विवेकी न रमे तिथें।*

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) इंद्रियांचा विषयांशी संबंध येतो यातून उपजणारे भोग दुःखाची कारणे होत. (2) हे विषययोग अनित्य स्वरुपाचे असतात. (3) यामुळे ज्ञानी त्याच्या ठायी रममाण होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव तेः** इंद्रिय आणि विषयांचा संबंध दुःखाचे कारण म्हणजे दुःखदायी आहे. पंचज्ञानेंद्रियांचा पंचविषयांशी नित्याचाच संबंध येतो. संबंध आला म्हणजे अनुकूल वा प्रतिकूल भाव उपजणारच. अनुकूल भाव उपजला तर सुख पण प्रतिकूल भाव जागला तर दुःख होते. बरे आज सुखदायक वाटणारे वा प्रतीत होणारे विषय उद्याही वा नेहमीसाठी सुखदायक वाटतीलच असे नव्हे. हाच नियम दुःखदायी विषयांनाही लागू पडतो कारण सुख दुःखाचा जो अनुभव येतो तो त्या विषयाच्या कल्पनेशी संबध्द असतो आणि कल्पना सदा परिवर्तनशील असते. जे वैभवयुक्त जीवन कधीकाळी सुखद वाटत असते तेच वैराग्य जागल्यावर आनंददायक वाटत नाही. वैभवयुक्त जीवनाच्या संदर्भातली कल्पना बदलल्यामुळे असे घडते ही एक नवलाची बाब आहे. याचा अर्थ असा की बाह्य पदार्थांमध्ये सुख वा दुःखासारखे काही नसते मग असे जर असेल तर गीतेने या श्लोकात विषय हे दुःखाचे कारण आहेत असे का म्हणावे ?

दुःखाचा अनुभव मनाच्या ठायी होतो आणि विषयात सुख वा दुःख नसते असे असले तरी बाह्य विषयांमुळेच दुःख उपजते. बाह्य विषय अस्तित्वातच नसते तर मनात जीवसृष्टी उत्पन्नच झाली नसती. मनाच्या सृष्टीचा आधार बाहेरची ईश दृष्टीच आहे. आपण बाह्य पदार्थाना बघतो. बघताच बाह्य पदार्थांचे रुप व आकृती मनात प्रविष्ट होते. पदार्थांचे ज्ञान होऊन मनात अनुकूल-प्रतिकूल भाव जागतो. अशाप्रकारे मनात सृष्टी उत्पन्न होण्यासाठी बाह्य सृष्टी कारणीभूत ठरते. ही बाह्य सृष्टी काही प्रत्यक्षात दुःख देत नाही. दुःख तर मनात उपजलेल्या सृष्टीचेच असते. पदार्थांच्या ठायी सुख वा दुःख हा अनुभव असता तर ते पदार्थ कायमस्वरुपी तशाच गुणधर्माचे असते पण सुख दुःख मुळी बाह्य पदार्थांच्या ठायी नाहीच. पदार्थांच्या संदर्भात आपली जशी भूमिका असते त्यावरुन सुख वा दुःखाचा अनुभव येतो. दुःखाचे निमित्त बाह्य विषय बनतात.

3) **आद्यन्तवन्तः** हे विषय काही नित्य पदार्थ नाहीत. विषय नेहमी बदलत रहाणारे असतात. सृष्टीचा अर्थच मुळी परिवर्तन आहे. केवळ परमात्म तत्वच नित्य वा अपरिवर्तनीय स्वरुपाचे आहे. अनित्य पदार्थ इंद्रियांच्या माध्यमातून जाणले जातात तर नित्यपदार्थ हे इंद्रियांच्या आकलनाच्या पलिकडचे असतात. ते अव्यक्त असतात. सुख-शांती, आनंद नित्य उपलब्ध व्हावे असे सर्वानाच वाटते. गीता म्हणते की पंचविषय अनित्य आहेत, त्यांचा आदि आहे व अंतही आहे. त्यांच्याप्रती आसक्त झाल्यावर सुख, शांती, आनंदाचा नित्य अनुभव नाही लाभू शकत.

नित्यासाठी सुख, शांती, आनंद हवे असतील तर नित्य वस्तुंच्या मागे लागायला हवे, नित्य वस्तुंचा शोध घ्यायला हवा आणि नित्य वस्तु तर परमात्म तत्वच आहे, यामुळे आपल्या चित्तात परमात्मविषयक अनुराग उत्पन्न होवो, परमात्म्याप्रती आसक्ती उपजो असे उपाय आपल्याला शोधावे लागतील.

4) **कौन्तेय न तेषु रमते बुध:** बुध म्हणजे विवेकीजन. ज्ञानी पुरुष नश्वर आणि अनित्य विषयात रममाण होत नाहीत. नित्य अव्यक्त परमात्मा ज्ञानी पुरुषांच्या हाती लागला आहे. एकदा का नित्य-अपरिवर्तनीय अशा प्रभुला जाणून घेतले तर मग अनित्य, परिवर्तनीय अशा विषयांबाबतचे आकर्षण कुणाच्या बरे मनी जागेल?

या श्लोकाच्या भाष्यात शंकराचार्य म्हणतात:

**संसारे सुखस्य गन्धमात्रं अपि न अस्ति इति बुध्द्वा विषयमृगतृष्णिकाया इन्द्रियाणि निवर्तयेत्।**

अर्थात् जग वा प्रपंचात सुखाचा रंचमात्र भाग नाही असे समजून विषयरुपी मृगजळापासून इंद्रियाना निवृत्त करायला हवे. पुढे लिहितात :

***अत्यंतमूढानां एव विषयेषु रति:***
***दृश्यते यथा पशुप्रभृतीनाम्।***

अर्थात् अतिमूढ पुरुषांनाच पशुसारखी विषयासक्ती असते.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानोबा लिहितात की भूकेने पीडित व दरिद्री माणूस ज्याप्रमाणे कोंड्याची भाकरी खाऊन टाकतो तसेच आत्मस्वरुपाचा अनुभव ज्यानी घेतला नाही तेच या इंद्रियांच्या विषयात फसतात. व्याकुळ हरीण ज्याप्रमाणे मृगजळालाच जळ समजून घेते तसेच ज्याना आत्मरुपाचा अनुभव नाही त्याना विषय सुखनिधान-सुखरुप वाटतात. विषयाना सुख मानले जात असेल तर मग विद्युत प्रकाशात - विजेच्या उजेडात - आपले सारे व्यवहार का नाही उरकता येत? ढगांच्या सावलीतच जर आपण हवा, ऊन, पाऊस यांच्यापासून सुरक्षित राहू शकलो असतो तर मग मजबूत घरे का बांधली असती? मृगजळाला जळ मानणे जसा भ्रम आहे तसेच विषयांच्या ठायी सुखाची कल्पना करणेही भ्रमच आहे कारण त्यांच्या ठायी आरंभापासून तर अंतापर्यत केवळ दु:खच दु:ख आहे पण मूर्खजन हे न जाणता विषय सेवन केल्याविना जगू शकत नाहीत. विषयांच्या आंतरिक स्वरुपाशी परिचय करुन घेतला नसल्यामुळे ते बिचारे मोठ्या चवीने विषयसेवन करत रहातात पण हे विषय अत्यंत दु:खद असल्यामुळे चुकूनही या विषयांचा मार्ग पत्करु नये. विरक्तजन विषाप्रमणे विषयांचा त्याग करतात.

: 23 :

***शक्नोतीहैव य: सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात्।***
***कामक्रोधोद्भवं वेगं स युक्त: स सुखी नर:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: इह एव:** जो याच देहात
- **प्राक्शरीरविमोक्षणात्:** देह विसर्जित होण्यापूर्वी
- **कामक्रोधोद्भवं वेगं:** काम आणि क्रोध यांच्यामुळे उत्पन्न वेगाला
- **सोढुं शक्नोति:** जिंकायला, सहन करायला समर्थ होतो म्हणजे काम व क्रोध यांना ज्याने संपूर्णपणे जिंकून घेतले आहे
- **स: युक्त:** तो योगी आहे (आणि)
- **स: सुखी नर:** तो सुखी पुरुष आहे

**अर्थ**

जो साधक या मनुष्य देहात देह पडण्यापूर्वीच काम-क्रोधामुळे उत्पन्न होणारा आवेग सहन करण्यास समर्थ होतो, तोच योगी होय व तोच सुखी होय.

***प्रयत्नें मरणापूर्वीं ह्या देहीं जिरवूं शके***
***काम-क्रोधांतले वेग तो योगी तो खरा सुखी।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) याच देहात याच जन्मी मरणापूर्वी (2) जे जन काम-क्रोधामुळे उपजणाऱ्या प्रक्षोभरुपी वेगाना जिंकून घेण्यात यशस्वी होतात (3) ते जन योगी असतात, (4) तेच सुखी असतात.

**स्पष्टीकरण**

1) **य: इह एव प्राक्शरीरविमोक्षणात्।:** काम क्रोध वगैरे विकारावर याच जन्मी मृत्युपूर्वीच विजय संपादन करायला हवा. याच जन्मी हा विजय मिळवायचा आहे

असा संकल्प असेल तर प्रयत्न शिथिल होणार नाहीत पण हे काही सोपे नाही. दहाव्या अध्यायातील 45 व्या श्लोकात म्हटले आहे की अनेक जन्मांच्या साधनेनंतर माणूस मोक्ष प्राप्त करु शकतो. सातव्या अध्यायातील 19 व्या श्लोकात म्हटले आहे की अनेक जन्माच्या साधनेनंतर माणूस परमात्म्याला प्राप्त करतो. काम-क्रोध या सारख्या विकारांना जिंकणे काही एका जन्मात शक्य होणारे कार्य नाही. अनेक जन्माचे कार्य असेल तरी शिथिलता न येण्यासाठी साधकाच्या मनात हा संकल्प सातत्याने जागता हवा की जे काही संपादित करावयाचे आहे ते याच जन्मात प्राप्त करायला हवे.

2) **कामक्रोधोद्भवं वेगं सोढुं शक्नोति:** काम-क्रोधाच्या वेगाला जिंकण्यात जे यशस्वी होतात ते थोर. काम, क्रोध या सारख्या विकाराना जिंकणे महत्वाचे आहे कारण की विकारांच्या उपस्थितीमुळे चित्ताच्या ठायी शांततेचा अनुभव नाही घेता येत. ज्ञानोबा माऊली म्हणते "हे काम-क्रोध विकार ज्ञाननिधी वर बसले आहेत. हे विकार शांततेचा भंग करुन देतील आणि परमात्म ज्ञानाचा अनुभव होऊ देणार नाहीत." शंकराचार्य लिहितात :

**अयं च श्रेयोमार्गप्रतिपक्षी कष्टतमो दोष: सर्वानर्थप्राप्तिहेतु: दुर्निवार्य: च इति तत्परिहारे यत्नाधिक्यं कर्तव्यं इति आह भगवान्।**

अर्थात् काम, क्रोधरुपी हे दोष कल्याणमार्गाचे प्रतिपक्षी आहेत. हे दु:ख दायक दोष आहेत. यांचे निवारण करणे कर्मकठीण होय. हे तमाम अनार्थाचे मूळ आहे. पुढे लिहितात :

**मरणसीमाकरणं जीवत: अवश्यंभावी हि कामक्रोधोद्भवो वेग: अनन्तनिमित्तवान् हि स: इति, यावन्न मरणं तावन्न विश्रंभणीय: इत्यर्थ:।**

अर्थात् भगवंताने मृत्युपर्यंतची मर्यादा आखून दिली आहे कारण हयातीभर मानवाच्या ठायी काम, क्रोधांचे विकार उत्पन्न होतच असतात आणि ती उत्पन्न होण्याची अनेक निमित्ते म्हणजे अनेक कारणे असतात. मृत्यु येत नाही तोवर याचा काही भरोसा देता येत नाही.

काम संज्ञेची व्याख्या शंकराचार्य अशी करतात:

**काम: इन्द्रियगोचरप्राप्ते इष्टे विषये श्रूयमाणे स्मर्यमाणे वा अनुभूते सुखहेतौ या गर्धि:तृष्णा स: काम:।**

अर्थात् काम ज्यांचा अनुभव होऊन गेलेला आहे आणि जे सुखदायक आहेत असे इंद्रियांनी जागण्यायोग्य इष्ट विषय प्राप्त झाल्यावर वा त्यांच्या बाबत ऐकल्यावर वा त्यांचे स्मरण झाल्यावर त्याना प्राप्त करुन घेण्याची लालसा म्हणजे काम होय.

पुढे क्रोधाची व्याख्या करताना म्हणतात: क्रोध: **च आत्मन: प्रतिकूलेषु दु:खहेतुषु दृश्यमानेषु श्रूयमाणेषु स्मर्यमाणेषु वा यो द्वेष: स क्रोध:** अर्थात् तर क्रोध म्हणजे: प्रतिकूल वा दु:खदायक विषय बघून वा त्यासंबंधी ऐकून वा त्याचे स्मरण झाल्यावर त्याप्रती उपजणारा द्वेष होय.

3) **स: योगी:** योगी म्हणजे परमात्म्याशी संलग्न, एकरुप. परमात्म्याच्या सोबत आपण सारे सदैव एकरुपच असतो. परमात्म्याहुन कदापि भिन्न नसतो. देह वगैरेंहून नित्य भिन्न असतो. हे अज्ञानामुळे आपल्याला प्रतीत होत नाही. काम, क्रोध या सारख्या विकारांना जिंकल्यावर हे अज्ञान नष्ट होते. काम, क्रोध वगैरे विकार आणि अज्ञान यांच्यात परस्पर संबंध - अन्योन्य संबंध आहे म्हणजे दोघे एकमेकांचे निमित्त बनून जातात. आपण स्वत: परमात्मस्वरुप आहोत आणि देह वगैरेंपासून भिन्न आहोत हे न कळणे हेच अज्ञान होय. या अज्ञानामुळे काम, क्रोध या सारखे विकार उपजतात. काम, क्रोध वगैरे विकार जोवर नष्ट होत नाहीत तोवर अज्ञान दूर होत नाही. काम, क्रोध वगैरेंवर विजय संपादन केला तर अज्ञानावर विजय मिळवता येईल. ज्ञानी बनता येईल. अशाप्रकारे याच जन्मी जो या विकारावर विजय संपादन करतो त्याचे जीवित्व-त्याचे जगणे - धन्य मानता येईल.

4) **स: सुखी नर:** त्या योगी पुरुषाला सुखी म्हणता येईल. काम, क्रोध या सारखे विकार दु:खदायी असल्याचा सर्वांचाच अनुभव आहे पण या विकाराना कसे हटवता येईल हे मात्र कुणाला ज्ञात नाही. दीर्घकाळ सत्संगतीत राहिल्यानंतर या विकारावर विजय संपादन करण्याचा उपाय हस्तगत होतो आणि मग अपरंपार सुखलाभ होतो.

: 24 :

***योऽन्त:सुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव य: ।***
***स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य:** जो
- **अन्त:सुख:** आत सुख प्राप्त करणारा, घेणारा
- **अन्तराराम:** परमात्म्याच्या ठायीच आराम करणारा
- **य: अन्तर्ज्योति: एव:** आणि जो आतूनच म्हणजे परमात्म्यापासूनच प्रकाश मिळवणारा आहे
- **स: योगी:** तो योगी आहे
- **ब्रह्मभूत: सन्:** ब्रह्मरुप होऊन, परमात्म्याशी ऐक्य पाऊन
- **ब्रह्मनिर्वाणं:** ब्रह्मनिर्वाणाला, शांत ब्रह्माला
- **अधिगच्छन्ति:** प्राप्त करतो, मिळवतो

**अर्थ**

जो पुरुष अंतरात्म्यातच सुखी, आत्म्यातच रमणारा आणि आत्म्यातच ज्ञान मिळालेला असतो, तो सच्चिदानंदघन परब्रह्म परमात्म्यासह ऐक्यभावाला प्राप्त झालेला सांख्ययोगी शांत ब्रह्माला प्राप्त होतो.

***प्रकाश स्थिरता सौख्य अंतरीं लाभलीं जया***
***ब्रह्म होऊनि तो योगी ब्रह्म-निर्वाण मेळवी ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) परमात्म्याच्या ठायी डुंबून सुख मिळवणारा, (2) परमात्म्याच्या ठायीच विश्राम घेणारा, करणारा (3) परमात्म्यापासून प्रकाश मिळवणारा, (4) तो योगी परमात्मस्वरुप होऊन ब्रह्मनिर्वाण प्राप्त करतो.

**स्पष्टीकरण**

1) **य: अन्तसुख:** काम, क्रोधरुपी विकारांना जिंकणारा योगी खरा सुखी आहे. प्राणीमात्रांची प्रवृत्ती बाह्य साधने वा पदार्थांमधून सुख मिळवण्याची आहे. यातून सुख प्राप्ती काही होत नाही याचे एकमेव कारण असे की बाह्य पदार्थ वा साधने काही सत्यरुप नाहीत. नित्य परिवर्तित असणाऱ्या वस्तुंपासून-पदार्थांपासून लाभणारे सुख क्षणिक स्वरुपाचे असते, ते चिरकाळ टिकू शकत नाही पण जेव्हा बाह्य विषयांप्रती वैराग्य प्राप्त होऊन वृत्ती अंतर्मुखी होतात आणि सत्संगामुळे व महापुरुषांच्या संगतीमुळे आणि सद्ग्रंथांच्या स्वाध्यायामुळे, चिंतन व मननामुळे, सर्वांच्या आत वसणाऱ्या ईश्वराच्या ध्यानामुळे, त्याच्या भक्तीमुळे जे सुख उपजते जे बाह्य विषय वा साधनापासून लाभणाऱ्या सुखापेक्षा (वैराग्य, ध्यान, भक्ती आणि कर्मफळांच्या त्यागातून लाभणारे हे सुख) अनेक पटींनी श्रेष्ठ आहे, असे अनुभवायला मिळते. संत तुलसीदास म्हणतात :

***सुनु खगेस हरि भगति बिहाई । जे सुख चाहहिं आन***
***उपाई ॥ ते सठ महासिंधु बिनु तरनी ।***
***पैरि पार चाहहिं जड करनी ॥***

अर्थात् कागभुशुंडी गरुडाप्रती निवेदन करत आहे की हे गरुडा, हरीभक्तीचा त्याग करुन अन्य साधनापासून भक्ती मिळवण्याची कामना करणारे जन मूढ होत. जणू नावेशिवायच त्याना महासागर पार करायची इच्छा आहे. ती त्यांची करणी-त्यांचे वागणे-मूर्खपणाचे आहे.

यामुळे या श्लोकात निवेदन आले आहे की काम, क्रोध वगैरे विकारांवर ज्यांनी विजय संपादन केला आहे ते आत प्रकट असणाऱ्या परमात्म्याच्या ठायी डुंबून त्यातच सुखप्राप्त करुन घेतात.

2) **अंतराराम:** ज्ञानीजन आत प्रकट अशा परमात्म्याच्या ठायीच विश्राम प्राप्त करुन घेतात. बाह्य विषय वा साधनापासून सुख प्राप्त करुन घेण्याप्रमाणेच आरामाकडेही साधारणपणे माणसाची प्रवृत्ती असते.

विनोबा म्हणतात की 55 वा 60 व्या वर्षानंतर माणसाने अशा प्रकारच्या जबाबदाऱ्यामधून मुक्त व्हायला हवे. याचा हेतु असाच की आमरण जबाबदाऱ्या उरी-शिरी बाळगल्यामुळे नवा माणूस तयार करुन त्याला आपल्या अनुभवाचा लाभ करुन देणे काही शक्य होत नाही. जबाबदारीच्या पदावरुन निवृत्त व्हायचा अर्थ सेवेतून निवृत्त होणे नव्हे. जनसेवेचे कार्य आपल्या कुवतीप्रमाणे सुरु ठेवायला हवे पण आळशीपणामुळे माणूस सेवेपासूनच निवृत्त होतो-पराङ्मुख होतो. जबाबदारीच्या पदावरुन निवृत्त व्हायचा लाभ असा असतो की एक नवयुवक तयार होतो आणि वृध्दाच्या अनुभवाचा त्याला लाभ मिळतो. तसे व्यक्तिगत दृष्ट्या दुसराही एक लाभ असा आहे की वृध्दावस्थेत मरणाचे स्मरण असावे आणि परमात्म स्मरणात वाढ होऊन देह त्याग शक्य व्हावा.

अर्थात् शरीर वा इंद्रियाना विश्राम मिळावा अशी दृष्टी या विचारात नाही. मृत्युसमयी असह्य वेदना साहाव्या लागतात-झेलाव्या लागतात-त्यासमयी ईश्वर स्मरण असावे अशी जर आपली इच्छा असेल तर वृध्दापकाळी जीवनाला तपोमय - सेवामय बनवण्याच्या दिशेने प्रयत्न व्हायला हवेत. वृध्दावस्था आळस आणि आरामात घालवली तर मृत्युकाळातली वेदना झेलण्याचे सामर्थ्य उरणार नाही. तिसऱ्या अध्यायातल्या 16 व्या श्लोकात गीतेने सांगितले आहे की **अघायु: इंद्रियाराम: मोघं पार्थ स जीवति** तो आळशी - आरामप्रिय माणूस पापी मानावा. अशा इंद्रियासक्त म्हणजे इंद्रियामध्येच विश्राम करणाऱ्या पुरुषाचे जीणे व्यर्थ होय. हे सारे ध्यानी घेऊन ज्ञानी पुरुष इंद्रियाच्या अधीन न होता, इंद्रियाच्या ठायीच विश्राम न करता आत प्रकट असणाऱ्या परमात्म्याच्या ठायीच विश्राम करतो. बाहेरुन इंद्रियनिग्रह साधतो. देहाला प्रयत्नपूर्वक कष्ट देतो. परमात्म्याच्या ठायीच विश्रांती घेतो. यामुळे मोक्षाचा अधिकारी ठरतो.

3) **अन्तर्ज्योति: एव:** तो आतूनच प्रकाशाचा लाभ करुन घेतो. विनोबा म्हणतात "प्रकाश म्हणजे आत्मज्ञानाचा प्रकाश. आत्म्याच्या अकर्तेपणाचा बोध वा ज्ञान.'' देह, इंद्रिये, मन, बुध्दी या सर्वांपेक्षा मी सर्वथा भिन्न आहे. मी कुठल्याही क्रियेचा कर्ता नाही असा अनुभव हेच आत्मज्ञान होय. आत्मज्ञानाची ही व्याख्या माहित नसल्यामुळे चुकीच्या मार्गाने ज्ञान प्राप्त करण्याचे प्रयत्न केले जातात. कुणी समाधी मार्गाचा अवलंब करतो तर कुणी सगुणाची ध्यान धारणा करतो, कुणी निर्गुणाला भजतो तर कुणी नाना प्रकारच्या साधना मार्गांचा आश्रय घेतो. भिन्न-भिन्न संस्कारांमुळे साधक कुठल्या तरी एका मार्गाला महत्वाचे मानतो आणि त्यामागे धावतो. यातले काही साधले तर त्यालाच आत्मज्ञान मानून बसतो. साधारणपणे समाधी साधली की आत्मदर्शन वा आत्मज्ञान झाले असे मानण्याची प्रवृत्ती असते. सगुण परब्रह्याची उपासना करणाऱ्यांना आत काही प्रकाशाचे दर्शन वा ज्ञान झाले की त्यालाच ते आत्मज्ञान मानून बसतात. साधकाचे लक्ष्य आत्मज्ञान प्राप्तीचे असते आणि आत्मज्ञान लवकरात लवकर मिळावे अशीही इच्छा असते. यामुळेच अल्प-स्वल्प अनुभव प्राप्त होताच त्यालाच आत्मज्ञान मानण्याकडे मनाचे वळण असते. मनाचा कल असतो. यामुळे इथे विनोबांनी निरुपित केलेला अर्थ स्मरणात घेणे गरजेचे आहे. आपण स्वत: अकर्ते आहोत, कुठल्याही कर्माचे कर्ते नाहीहोत. सारी कर्मे परमात्म्याच्या अस्तित्वानेच प्रकटतात - संपन्न होतात. आपण स्वत: शून्य आहोत. देह वगैरेंपासून पूर्णपणे भिन्न आहोत. असा जर अनुभव लाभत असेल तर आत प्रकाश पाझरतो - आत्मज्ञानाची प्राप्ती झाली असे मानू शकतो.

4) **स: योगी ब्रह्मभूत: सन् ब्रह्मनिर्वाणं अधिगच्छति** तो योगी वा ज्ञानी-संन्यासी वा ज्ञानी-कर्मयोगी ब्रह्मस्वरुपी बनतो. ब्रह्मनिर्वाण वा मोक्षाला प्राप्त होतो. जो ज्ञानी आत परमात्म्यापासूनच सुख प्राप्त करुन घेतो. परमात्म्याच्या ठायीच विश्राम करतो. परमात्म्यापासूनच प्रकाश ग्रहण करतो तो ब्रह्मीभूत होतो म्हणजे परमात्मस्वरुपी बनून जातो. जो परमात्म स्वरुपातच लीन होऊन जातो तो ब्रह्मनिर्वाण म्हणजे मोक्ष प्राप्त करतो. दुसऱ्या अध्यायातल्या 72 व्या श्लोकात 'ब्रह्मनिर्वाण' शब्द आला आहे. याच अध्यायात 25 आणि 26 व्या श्लोकातही 'ब्रह्मनिर्वाण' शब्द आला आहे.

विनोबा 'ब्राह्मी स्थिती' आणि 'ब्रह्म निर्वाण' या दोन स्थितीत फरक मानतात. ज्या स्थितीला प्राप्त केल्यावर माणूस त्यापासून कदापि हटू शकत नाही त्या स्थितीला 'ब्राह्मी स्थिती' असे म्हणतात. तो कदापि काम, क्रोध वगैरे विकारांच्या अधीन होत नाही. या स्थितीत अहंकाराची वृत्ती जागू शकतच नाही. ब्राह्मी स्थिती प्राप्त झाल्यावरही शरीर प्रारब्धाधीन असल्यामुळे रहाते आणि देह वा शरीर असे तोवर कुठल्या ना कुठल्या प्रकारचा विकासाचा क्रम जारीच रहातो. यामुळे ब्राह्मी स्थितीच्या नंतरही देह सुटेपर्यत प्रवास जारी रहातो. शरीर त्यागानंतर ब्रह्मनिर्वाण म्हणजे मोक्षलाभ होतो. ब्राह्मी स्थिती अशी असते की जिथून खाली पडणे नसते - अध:पतन नसते आणि ब्रह्मनिर्वाण असे असते जिथून वर चढणे नसते. या श्लोकाच्या भाष्यात विनोबानी आणखी एक मुद्दा उपस्थित केला आहे की **अंतर्ज्योति** चे वर्णन या अध्यायातल्या 13 ते 17 श्लोकांपर्यत, **अंतराराम:** चे वर्णन 18 ते 20 श्लोकांपर्यत आणि **अंत:सुख** चे वर्णन 21 ते 23 व्या श्लोकापर्यत आले आहे.

: 25 :

*लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः।*
*छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **क्षीणकल्मषाः** ज्यांची पापे क्षीण होऊन गेलेली आहेत
- **छिन्न -द्वैधाः** ज्यांचे संशय नष्ट होऊन गेले आहेत
- **यतात्मानः** ज्यांनी इंद्रियांवर विजय संपादन केला आहे आणि भगवंताच्या ध्यानात ज्यांचे चित्त एकाग्र झाले आहे असे
- **सर्वभूतहिते रताः** जे सर्व भूतमात्रांच्या कल्याणात रत आहेत
- **ऋषयः** असे ऋषी म्हणजे ज्ञानवंत संन्यासी म्हणजे ब्रह्मवेत्ते पुरुष
- **ब्रह्मनिर्वाणं:** ब्रह्मनिर्वाण
- **लभन्ते:** प्राप्त करतात

**अर्थ**

ज्यांची सर्व पातके नष्ट झालेली आहेत, ज्यांचे सर्व संशय ज्ञानामुळे फिटले आहेत, जे प्राणीमात्रांच्या कल्याणात तत्पर आहेत आणि ज्यांचे जिंकलेले मन निश्चळपणे परमात्म्याच्या ठायी स्थिर असते, ते ब्रह्मवेत्ते शांत ब्रह्माला प्राप्त होतात.

*फिटले दोष शंका हि मुठींत धरिलें मन*
*पावले ब्रह्म-निर्वाण ज्ञानी विश्व-हितीं रत।*

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टी आहेत (1) ज्यांची पापे वगैरे दोष क्षीण झाले आहेत, (2) ज्यांचा संशय नष्ट झाला आहे, (3) ज्यांनी इंद्रिय विजय प्राप्त करुन घेतला आहे, (4) जे तमाम भूतमात्रांच्या कल्याणात रत आहेत, (5) असे ऋषी, म्हणजे ज्ञानी-संन्यासी (6) ब्रह्मनिर्वाण म्हणजे मोक्ष प्राप्त करतात.

**स्पष्टीकरण**

1) पहिले लक्षण आहे: **क्षीणकल्मषाः** मोक्षप्राप्तीत पापाचरण बाधक आहे. पापकर्मे आचरताना देहासक्ती आत्यंतिक स्वरुपात असते. 'भज गोविंदम्' स्तोत्रात शंकराचार्य म्हणतात:

*सुखतः क्रियते रामाभोगः पश्चाद्धन्त शरीरे रोगः।*
*यद्यपि लोके मरणं शरणं तदपि न मुंचति पापाचरणम्॥*

अर्थात् "स्त्रियांच्या समवेत आनंद भोग भोगतात पण नंतर शरीर रोगाने आक्रांत होते आणि सारे जण मरणाला शरण जातात तरी पण पापकर्मे सोडत नाहीत."

ज्ञानीसाठी पापकर्मांचा मार्ग बंद आहे. पुण्यकर्मे पापकर्मांना हटवण्यास समर्थ आहेत. हे सातव्या अध्यायातील 28 व्या श्लोकात येते : **येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।** या अध्यायातल्या या श्लोकात हे स्पष्टपणे सांगितले आहे की पुण्यकर्मानी पापकर्मे संपून जातात म्हणजे पुण्य कर्मे करीत रहाणे हा ज्ञानी जनाचा स्वभाव बनून गेल्यामुळे त्याना पापकर्मे आचरणे अशक्य बनून गेले आहे. हा अर्थ तर **'क्षीणकल्मषाः'** या वचनाचा आहेच मुख्य अर्थ असा आहे की ज्ञानी पुरुषाचा स्वभाव पुण्य कर्मे करण्याचा असल्यामुळे कधी अल्पसाही दोष हातून घडला तरी त्याला तो पापाचरणासारखा वाटेल. अल्प-स्वल्प प्रमाद देखिल ज्ञानी पुरुषासाठी पापरुपी ठरतील. अशा प्रकारे गीता म्हणते की ज्ञानी पुरुषाला स्थूल पातक करणे अशक्यप्राय आहे, पण त्याचे छोटे छोटे दोषही क्षीण होऊन गेले आहेत अर्थात् तो दोषांनी परिपूर्णरित्या मुक्त होऊन गेला आहे.

2) **छिन्नद्वैधाः** त्याचे संशय नष्ट झाले आहेत. चौथ्या अध्यायातील 41 व्या श्लोकात **ज्ञानसंच्छिन्नसंशयं** 'आत्मज्ञानामुळे ज्यांचे संशय छिन्न झाले आहेत' असा उल्लेख आला आहे. साधक दशेत-साधकावस्थेत शंका जागतच असतात. परमात्मा ब्रह्मांडात कशा प्रकारे वसतो? जीवात्म्याचे स्वरुप काय? जीवात्मा आणि परमात्मा यांचा परस्पर संबंध कसा? मोक्षाचे स्वरुप काय? बंध म्हणजे काय? अद्वैताचा अनुभव कशाला म्हणतात? परमात्मदर्शन वा आत्मदर्शनाचे स्वरुप कसे आहे? यासारखे नानाविध प्रश्न मनात उठतात. परमात्म स्वरुपाचा बोध झाला म्हणजे या तमाम शंकांचे समाधान होते - निरसन होते पण जोवर आत परमात्म तत्वाचा अनुभव होत नाही तोवर शंकांचे निराकरण होत नाही - शंका संपून जात नाहीत. शंकांचे निराकरण करण्यासाठी अनुभवी पुरुषाच्या निकट जाऊन बसायला हवे किंवा मग सद्ग्रंथांचा आश्रय घ्यायला हवा.

3) **यतात्मान:** स्थितप्रज्ञाच्या लक्षणामध्ये एक मुख्य लक्षण आहे इंद्रियनिग्रह. ज्ञानोबा दुसऱ्या अध्यायातील 14 व्या श्लोकावर भाष्य करताना म्हणतात- "आपले अंत:करण सर्वस्वी इंद्रियाच्या स्वाधीन होऊन गेले आहे. इंद्रिये आपापले विषय सेवन करतात यामुळे सुख-दु:ख मिळते. अंत:करण इंद्रियाधीन असते. यामुळे इंद्रियांच्या संगतीमुळे अंत:करणालाही सुख-दु:ख ग्रासते. इंद्रियांमुळे कधी सुख तर कधी दु:ख मिळेल. जेव्हा आपण इंद्रियांच्या स्वाधीन होऊन जातो तेव्हा शीत वा ऊष्ण यासारख्या द्वंद्वांचा अनुभव घेतो. सुख दु:ख भोगतो. इंद्रियाना विषयाशिवाय काहीच भावत नाही. हे विषय मृगजळाप्रमाणे आहेत, अशा प्रकारे विषय क्षणभंगुर असल्यामुळे यांचा त्याग कर आणि परत संग धरु नकोस."

4) **सर्वभूतहिते रता:** ज्ञानी हा सर्व भूतमात्राच्या कल्याणात रत असतो. हाच शब्द बाराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकात आला आहे. पाचवा अध्याय संन्यास योगाचा मानला जातो. संन्यासीलाही **सवभूतहिते रता:** सर्वभूतहितरत असण्याचा धर्म सुटत नाही. सर्वभूतहितरत असणे हा ज्ञानीचा स्वभावगत धर्म होय. तिसऱ्या अध्यायातील 20 व्या श्लोकात शब्द आला आहे 'लोकसंग्रह'. लोकसंग्रह ज्ञानी पुरुषाचा स्वभाव बनून जातो. शंकराचार्य म्हणतात- **'लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रह:'** लोकांना उन्मार्ग म्हणजे पतनाच्या प्रवृत्तीपासून निवारण करणे आणि लोककल्याणरत असणे या दोघाचा अर्थ एकच आहे. बाराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकात भक्ताचे लक्षण मानले गेले आहे. निर्गुण भक्त वा संन्यासी जगाची पर्वा करत नसतो अशी सर्वसाधारणपणे समजूत आहे पण गीतेने या अध्यायात संन्याश्याचे लक्षण सांगताना आणि बाराव्या अध्यायात निर्गुण भक्ताची चर्चा करत असताना **'सर्वभूतहिते रता:'** या लक्षणाची चर्चा केली आहे. संन्यासी असो वा योगी, निर्गुण भक्त असो वा सगुण भक्त त्याला लोककल्याणाच्या धर्माचे पालन अवश्यमेव करायला हवे, ही गीतेची शिकवण आहे. ज्ञानोबा म्हणतात - "दृष्टीसंपन्न व्यक्ती ज्याप्रमाणे अंधाला मार्ग दर्शवत मार्गक्रमण करते तसेच ज्ञानी अज्ञान्याला मार्ग दर्शवत पुढे चालत असतो." **'सर्वभूतहिते रता:'** या पदावर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात: **सर्वेषां भूतानां हिते आनुकूल्ये रता:।** सर्वभूताच्या हितासाठी म्हणजे अनुकूलतेसाठी जे रत असतात म्हणजे अहिंसक भावनेने वागतात ते सर्वभूताहितरत असतात. शंकराचार्यांनी **सर्वभूतहिते रता:** या वचनाचा अर्थ असा केला की समाजाच्या भूमिकेला ध्यानात घेऊन, अनुकूल बनून जे हळूहळू पुढे घेऊन जातात ते. इथे अनुकूल हा महत्वाचा शब्द आहे. प्रत्येकाची भूमिका आणि योग्यता ध्यानी घेऊन जेव्हा उन्नतीचा मार्ग दर्शवला जातो तेव्हा विनासायास प्रत्येकाच्या उन्नतीचा मार्ग सुकर होतो. प्रत्येकाच्या भूमिकेचे परीक्षण करुन त्याला अग्रेसर करायची भूमिका महापुरुषच बजाऊ शकतात. यामुळे शंकराचार्यानी इथे 'अनुकूल' हा योग्य शब्द घापरला आहे. ते अहिंसक असतात असे म्हणून 'अहिंसक' शब्दाचा उपयोग केला आहे. अहिंसा म्हणजे शून्यता. ज्ञानवंताच्या ठायी शून्यता पराकाष्ठेप्रत पोहोचलेली असावी.

5) **'ऋषय:'** ऋषी शब्द गीतेत दोनदा आला आहे. एक इथे आणि दुसरा दहाव्या अध्यायातील 13 व्या श्लोकात. 'महर्षी ' शब्द गीतेच्या दहाव्या अध्यायात 2, 6 आणि 35 व्या श्लोकात आला आहे. ऋषी शब्द उपनिषदात अनेकदा आला आहे. ऋषीच्या ठायी शून्यतेची पराकाष्ठा बघता येते. जळक्या दोरीच्या आकृतीसारखाच फक्त अहंकार दिसतो. अशाना ऋषी म्हणता येते. ज्यांच्या ठायी ज्ञानाची पराकाष्ठा, भक्तीची परमोत्कट अवस्था आणि परमावधीची अहंकारशून्यता दिसून येते त्यांच्यासाठी ऋषी शब्दाचा प्रयोग केला जातो.

6) **ब्रह्मनिर्वाणं लभन्ते:** चोविसाव्या श्लोकात **'ब्रह्मनिर्वाणं अधिगच्छति'** असा शब्द आला तर या श्लोकात **'ब्रह्मनिर्वाणं लभंते'** हा श्लोक आला. दोघाचा अर्थ एकच, मागच्या श्लोकातला एकवचनी प्रयोग इथे बहुवचनी आला आहे एवढेच. ऋषी ब्रह्मनिर्वाण पदाला पावतात म्हणजे मोक्षप्राप्ती करुन घेतात.

: 26 :

***कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।***
***अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **कामक्रोधवियुक्तानां:** जे काम, क्रोधाने रहित होऊन गेले आहेत
- **यतचेतसां:** ज्यांनी चित्ताला आपल्या अधीन करुन घेतले आहे
- **विदितात्मनां:** ज्यांनी परमात्म्याला ओळखून घेतले आहे
- **यतीनां:** अशा संन्यासी ज्ञानी लोकांसाठी
- **ब्रह्मनिर्वाणं:** मोक्ष
- **अभित: वर्तते:** चहुकडे असतो

### अर्थ

काम-क्रोध मावळलेले, मन जिंकलेले, परब्रह्म परमात्म्याचा साक्षात्कार करुन घेतलेले जे ज्ञानी पुरुष असतात, त्याना सर्व बाजुंनी शांत परब्रह्म परमात्माच परिपूर्ण असतो.

***काम-क्रोधांस जिंकूनि यत्नें चित्तास बांधिती***
***देखती ब्रह्म-निर्वाण आत्म-ज्ञानी चहूंकडे ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) जे काम, क्रोधरहित झालेले आहेत. (2) ज्यांनी आपल्या चित्तावर विजय संपादन केला आहे. (3) ज्यांनी परमात्म तत्वाचा अनुभव घेतला आहे. (4) असे संन्यासी चहुकडे मोक्षाचे दर्शन करतात.

### स्पष्टीकरण

1) **कामक्रोधवियुक्तानां:** 23 व्या श्लोकात वर्णन आले आहे की जो पुरुष याच देहात मृत्युपूर्वी काम, क्रोधजन्य विकाराच्या वेगावर विजय प्राप्त करण्यात यशस्वी झाला - सफल झाला तो योगी होय, तो सुखी समजावा. या श्लोकात हाच मुद्दा आला आहे. ज्ञानीजन काम, क्रोध रहित असतात. काम, क्रोधाच्या ठायी अहंकार, मद, मत्सर, ईर्ष्याभाव या सारख्या तमाम विकाराचा समावेश होतो. या विकारामुळेच बंधने उत्पन्न होतात, शांतीच्या अनुभवाला माणूस पारखा होतो. हे एकदा का ध्यानात आले की मग माणूस याबाबत विचार करेल, याना संपवण्याचे उपाय योजेल. गीतेने किल्ली सोपवून दिली आहे की अनासक्तीमुळे विकार क्षीण होऊ शकतात. अनासक्तीसाठी सर्वात आधी आग्रहाचा त्याग करायला हवा. स्वत:साठी आग्रह धरणे एकवेळ ठीक पण माणूस दुसऱ्यांसाठीही आग्रह धरतो. स्वत:ची तर सोडवणूक करुन घेतो. हरप्रकारचा अनाग्रह अनासक्तीसाठी मदतनीस ठरतो, उपयोगी ठरतो, उपकारक ठरतो.

2) **यतचेतसां:** चित्त संन्याश्याच्या अधीन असते. उभे जग चित्ताच्या अधीन आहे. यामुळे चंचळही आहे. आपल्याला स्थिरतेचा अनुभव घेता येत नाही. आपण एखादा निश्चय करतो पण त्यावर दृढ रहात नाही. चित्त अस्थिर असते. सागरावर सतत लाटा उसळत्या असतात तसे आपले चित्त अस्थिर असते. बाळपणी चित्ताची चंचळता अधिक असते. एका विषयावर चित्त अधिक काळपर्यत स्थिर रहात नाही. एकाग्र होत नाही. यामुळे चित्ताला वानराची उपमा दिली जाते. तसे पाहू गेल्यास सर्वच पशु-पक्षी कमालीचे चंचळ असतात कारण चित्ताच्या एकाग्रतेसाठी विवेकशक्ती लागते आणि पशुपक्ष्यांच्या ठायी या विवेकशक्तीचा अभाव असतो. केवळ माणसाच्या ठायीच विवेकशक्ती वसते. या शक्तीचा उपयोग करुन सत्संगतीत चित्ताला स्थिर व एकाग्र करण्याची पध्दत जाणून घेता येईल.

3) **विदितात्मनां:** संन्यासी परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करुन घेतात. आपल्या देहातच परमात्मतत्व वसते पण ते दिसत नाही यामुळे त्याचे आपल्याला ज्ञान होत नाही. दिसले असते तर ज्ञान झाले असते पण परमात्मा स्थूल नसल्यामुळे दिसू शकत नाही. दिसू लागेल तर ते विनाशी तत्व ठरेल कारण की स्थूल वस्तुचे दर्शन होऊ शकते आणि स्थूल वस्तु विनाशी असते पण परमात्मा सर्वच वस्तुंचा आधार आहे आणि म्हणून तो निरंतर विद्यमान आहे. हेच त्याचे स्वरुप आहे आणि यामुळेच ते सत् आहे. आपल्याला नित्य वा प्रत्यही ज्ञान होत असते. आपण अज्ञानालाही जाणतो. अशा प्रकारे परमेश्वराचे स्वरुप सत् आणि चित् आहे.

आपल्या समोर सदाकाळ भेद सृष्टी असते यामुळे आपल्याला दु:ख होते. परमात्म्याच्या समोर भेद नसतो - अभेद असतो म्हणून परमात्मा आनंदरुप आहे. अशाप्रकारे परमात्म तत्वाचे स्वरुप सत्, चित् आणि आनंदरुप आहे. हे तत्व आपल्या ठायी अखंडपणे विद्यमान आहे - विराजमान आहे. अशा प्रकारे जो सच्चिदानंद परमात्मा

आहे त्याला आपण जाणत नाहीत पण ज्ञानी पुरुषाने परमतत्वाला जाणून घेतलेले असते.

4) **यतीनां ब्रह्मनिर्वाणं अभित: वर्तते:** संन्याश्याला चौफेर ब्रह्मनिर्वाण दिसते-चहुकडे मोक्ष दिसतो. सारे जगत मोक्षमयच दिसते.

विनोबांनी सर्वत्र ब्रह्म बघणे आणि सर्वत्र ब्रह्मनिर्वाण म्हणजे मोक्ष बघणे यात फरक केला आहे. संपूर्ण जगताला ब्रह्मरुप बघणे - त्यात - जगात कार्यरुप जगतासोबत कारणरुप ब्रह्म्याचे दर्शन करणे होय आणि सर्वत्र ब्रह्मनिर्वाण बघणे म्हणजे या जगतालाच मोक्षरुप बघणे होय. दुसरी अनुभूतीची परम सीमा होय.

: 27-28 :

***स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो: ।***
***प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥***
***यतेन्द्रियमनोबुध्दिर्मुनिर्मोक्षपरायण: ।***
***विगतेच्छाभयक्रोधो य: सदा मुक्त एव स: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: मुनि:** जे मुनी
- **बाह्यान् स्पर्शान्:** बाह्य शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध वगैरे विषयांना
- **बहि: कृत्वा:** बाहेरच ठेऊन
- **च चक्षु:** आणि डोळे वगैरे इंद्रियांना
- **भ्रुवो: अन्तरे कृत्वा:** दोन्ही भुवयांच्या मध्यभागी राखून
- **नासाभ्यन्तरचारिणौ:** आणि नाकातून वहाणाऱ्या
- **प्राणापानौ:** प्राण आणि अपान वायुंना म्हणजे अंतर्बाह्य वृत्तींना
- **समौ कृत्वा:** समान करुन
- **यतेन्द्रियमनोबुध्दि:** ज्यांनी मन, बुध्दीवर विजय संपादन केला आहे
- **मोक्षपरायण:** जे मोक्षपरायण होऊन गेले आहेत
- **विगतेच्छाभयक्रोध:** ज्यांनी इच्छा, भय आणि क्रोध सोडून दिला आहे
- **स:** ते
- **सदा मुक्त: एव:** सदैव मुक्तच आहेत

**अर्थ**

बाहेरच्या विषय भोगांचे चिंतन न करता ते बाहेरच ठेऊन, दृष्टी भुवयांच्या मध्यभागी स्थिर करुन तसेच नाकातून वहाणाऱ्या प्राण व अपान वायुना समान करुन

ज्याने इंद्रिये, मन आणि बुध्दी यांच्यावर विजय संपादन केला आहे असा मोक्ष तत्पर मुनी (परमेश्वराच्या स्वरुपाचे निरंतर चिंतन करणारा) इच्छा, भय आणि क्रोध यानी रहित झाला की तो सदोदित मुक्तच असतो.

***विषयांचा बहिष्कार डोळा भ्रू-संगमीं स्थिर***
***करुनि नासिका-स्थानीं प्राणापान हि सारखे।***
***आवरी मुनि मोक्षार्थी इंद्रियें मन बुध्दि जो***
***सोडी इच्छा भय-क्रोध सर्वदा सुटला चि तो।***

**विषय:** या दोन्ही श्लोकांचा एकत्रितपणे विचार करु या. यात सात गोष्टी आहेत (1) जो मुनी-संन्यासी बाह्य शब्द-स्पर्श वगैरे विषयांपासून अलिप्त आहे. (2) चक्षु आणि इंद्रियाना भुवयांच्या मध्यभागी ठेवतो. (3) नाकात वहाणाऱ्या प्राण-अपान वायुंना समान राखतो म्हणजे आंतरिक वृत्ती विशुध्द करतो. (4) त्याने इंद्रिये, मन आणि बुध्दी यावर विजय संपादन केला आहे. (5) तो मोक्षपरायण आहे. (6) इच्छा, भय, क्रोधाचा त्याने त्याग केला आहे. (7) तो नित्य मुक्त आहे असे मानायला हवे.

**स्पष्टीकरण**

1) **य: मुनि: बाह्यान् स्पर्शान् बहि: कृत्वा:** ज्ञानी सन्यासी साठी 'मुनी' शब्द आला आहे. ज्ञानी मुनी पंचविषयांना आत चिकटू देत नाही. बाह्य विषयांशी आपला रात्रंदिन संबंध येतो - असतो. संबंध येताच हे मनात राग, द्वेष म्हणजे काम-क्रोध वगैरे विकारांना निर्माण करतात आणि सुख-दु:खाचा अनुभव घडवतात. यातच आपले उभे आयुष्य संपून जाते. यांच्या अधीन राहून काही शाश्वत सुखाचा उपयोग घेता येत नाही. यामुळे याच अध्यायाच्या 21 व्या श्लोकात गीता सांगते की बाह्य विषयाप्रती जो अनासक्त असतो तो शाश्वत सुखाचा अनुभव घेतो. 22 व्या श्लोकात सांगितले की हे विषय दु:खाला कारणीभूत ठरतात आणि विवेकीजन या विषयात रममाण होत नाहीत. हाच मुद्दा या श्लोकाच्या आरंभी आला आहे. बाह्य विषयापासून अलिप्त रहायचे असेल तर त्यांच्याशी खूप मर्यादित संबंध राखायला हवेत.

गीतेत अनेकदा 'मुनी' शब्द प्रयुक्त झाला आहे. **'मननात् मुनि:'** अशी मीमांसा शंकराचार्य करतात की जो सतत परमात्म स्वरुपाचे चिंतन-मनन करतो तो मुनी होय.

2) **चक्षु: भ्रुवो: अंतरे कृत्वा:** नेत्राला भुवयाच्या स्थानी राखून रहावे. शंकराचार्य म्हणतात की सम्यक् दर्शन म्हणजे आत्मदर्शन वा दृष्टीदर्शनाचे अंतरंग साधन आहे ध्यान योग! या ध्यानयोग साधनेचा सविस्तरपणे उल्लेख सहाव्या अध्यायात येतो. हे दोन श्लोक जणू त्या ध्यानयोग साधनेची प्रस्तावना आहे. इथे भुवयाच्या मध्यस्थानी नेत्र स्थिर करण्याचा मुद्दा आला आणि सहाव्या अध्यायातील 13 व्या श्लोकात नासिकेच्या अग्रभागी दृष्टी स्थिर करण्याची चर्चा आली आहे. याला अर्धोन्मीलित दृष्टी असेही म्हणतात. नासिकेच्या अग्रभागी दृष्टी स्थिर केल्यावर तर ध्यान साधता येणार नाही. यामुळे या वचनाचा शंकराचार्यांनी असा अर्थ केला की बाहेरुन दृष्टी हटवून आत एकाग्र करायला हवी. हा खरा अर्थ आहे. इथे भ्रुकुटी मध्यस्थानी दृष्टी स्थिर करायचा विषय आला आहे. याचा स्थूल अर्थ असाच होईल की आपली दृष्टी आतून भ्रुकुटीस्थानी केंद्रित करणे. भ्रुकुटीच्या मध्यस्थानी दृष्टी एकाग्र करण्याचा सराव करु जाता एका व्यक्तीला वेदना होऊ लागल्यात. उपचारासाठी हे गृहस्थ निसर्गोपचार केंद्रात आले. भ्रुकुटीच्या मध्यस्थानी दृष्टी स्थिर करण्याचा त्यांचा इतका सराव झाला होता की दृष्टी अन्यत्र वळवायचा त्यांचा प्रयत्न व्यर्थ जायचा. लाख प्रयत्न करुनही ते त्याना काही केल्या साधत नव्हते. म्हणून या वचनाचा स्थूल अर्थ करण्याऐवजी नेत्राला वा दृष्टीला आत ठेवायचा प्रयत्न करणे असा अर्थ करायला हवा. या वचनाचा व्यापक अर्थ असा की पाचही ज्ञानेंद्रियांना त्यांच्या - त्यांच्या विषयापासून हटवून अंतर्मुख करावे. यामुळे समाधान लाभू शकेल. विषयांना हटवणे - बाहेर ठेवणे - याचा अर्थ त्यांच्याशी गरजेपुरताच - आवश्यक तेवढाच - संबंध राखणे होय किंवा दुसऱ्या प्रकारे विषयांना बाहेर ठेवणे आणि इंद्रियांना विषयांपासून हटवून अंतर्मुख करणे. दोन्ही वचनांचा अर्थ एवढाच की विषयांशी अत्यंत मर्यादित स्वरुपाचा संबंध राखून अलिप्त रहावे.

3) **नासाभ्यन्तरचारिणौ प्राणापानौ समौ कृत्वा:** आत घेतलेल्या श्वासाला अपान आणि बाहेर सोडलेल्या श्वासाला प्राण वा उच्छवास म्हणतात. या श्वासोच्छवासाला सम करणे म्हणजे शांत करणे गरजेचे आहे. एकाग्रता साधली गेली म्हणजे श्वास - उच्छवास स्वाभाविकपणे हळु चालत राहतात म्हणजे सम वा शांत चालतात. चित्ताच्या चांचल्यात जर वेग आला ना तर श्वासोच्छवासावर त्याचा परिणाम होतो म्हणजे त्यांच्यातही वेग निर्माण होतो. चित्तात जेव्हा क्षोभ उत्पन्न होतात, काम, क्रोध वगैरे विकार उपजतात तेव्हा प्राण आणि अपान विषम चालतात, त्यांचा वेग वाढतो. धडधड व्हायला लागते. एखादा मोठा सर्प सर्रकन आपल्या जवळून जात असेल तर भय वाटते आणि नाडी थाडथाड उडू लागते. धडधडीचा वेग एवढा वाढतो की स्पष्टपणे ऐकताही येऊ शकतो. आतून जो स्थिर झाला, ज्याचे चित्त शांत-समधित झाले तो मोलाचा. जो हरिस्मरण करत रहातो त्याच्या प्राण - अपानाचा वेग शांत आणि समान असतो. संत तुलसीदासजी म्हणतात:

***सुमिरत हरिहिं साँस गति बाधी।***
***सहज बिमल मन लागि समाधी॥***

अर्थात् हरिचे स्मरण करताच श्वास व उच्छवासाचा वेग धीमा होऊ लागतो. शांत होऊ लागतो आणि मन सहजच अतिशुध्द बनते - यामुळे समाधी लागून जाते.

प्राण आणि अपान समान करायचा हा झाला स्थूल अर्थ. याचा सूक्ष्म अर्थ मनात उठणाऱ्या अंतर्बाह्य वृत्ती असा करता येईल. आपले चित्त कधी बहिर्मुखी असते तर कधी अंतर्मुखी असते. सर्व सामान्य जनांचे चित्त बहिमुर्खीच असते. एखादाच क्वचित् अंतर्मुखी असतो. आध्यात्मिक मार्गावर वाटचाल करणाऱ्यांचे चित्त अंतर्मुखी असते. दुसऱ्यांचे दोष आणि स्वत:च्या गुणांचे दर्शन करण्याचीच मनाची नित्याची गती असते. दुसऱ्यांच्या गुणांचे व स्वत:च्या अवगुणांचे दर्शन केले तर वृत्तींचे शोधन करता येते. हा वृत्ती शुध्द करायचा उपाय आहे. ब्रह्मांड आणि सृष्टी वा जगताबाबत विचार करणे ही झाली बहिर्मुखी वृत्ती. स्वत:बाबत - आपल्या उन्नतीबाबत विचार करणे ही झाली अंतर्मुखी वृत्ती.

4) **यतेन्द्रियमनोबुध्दि:** इंद्रिय, मन, बुध्दीवर ताबा मिळवायला हवा. इंद्रियाशी आपला नित्याचा संबंध असतो. पंचविषय आपल्याला फसवण्यासाठी टपून असतात. आपण त्यांच्या अधीन होऊन जातो. आपण जेवढे इंद्रियाधीन होतो तेवढे दु:खी होतो. इंद्रियांना आपण

जेवढे आपल्या अधीन राखू शकू तेवढे दु:ख टळून सुखाचा अनुभव घेता येईल. इंद्रियांचा विषयांशी संबंध येताच काम-क्रोध म्हणजे राग-द्वेषाच्या लाटा उसळू लागतात. प्रिय वा अनुकूल वस्तुबाबत राग म्हणजे प्रीत उत्पन्न होते. या राग वा अनुरागामुळे काम उपजतो. अप्रिय वा प्रतिकूल विषयांबाबत घृणा उपजते, क्रोध उसळतो. अशाप्रकारे मनात अनुकूल-प्रतिकूल राग-द्वेषाच्या लाटा उसळत रहातात. इंद्रियावर विजय प्राप्त केला असल्यामुळे ज्ञानी पुरुष मनात राग-द्वेष म्हणजे काम-क्रोधाच्या लाटा उत्पन्न होऊ देत नाही.

5) **मोक्षपरायण:** ज्ञानी जन मोक्ष परायण असतात किंवा मोक्ष परायण ज्ञानी जन असतात. प्रापंचिक जन प्रपंच परायण असतात. आपल्याला सतत प्रापंचिक गोष्टींचेच भान व ध्यान असते कारण आपल्या ठायी वसणाऱ्या एका अद्भुत वस्तुचे आपल्याला भान नाही. याचे भान गांधीजींना होते आणि ते परमात्म्याला साक्षी ठेऊन तमाम क्रिया करत राहिलेत. यामुळे ते मोक्षपरायण बनले.

6) **विगतेच्छाभयक्रोध:** गीता या गोष्टीवर सतत भर देत आहे की इच्छा, भय आणि क्रोधाचा त्याग करा. आपले संपूर्ण आयुष्य कुठल्यान् कुठल्या इच्छेच्या अधीन चालते. यात सदिच्छा बाळगून आधी असदिच्छेचा त्याग करावा लागतो. शुभाचा विचार करावा लागतो. मग हळू-हळू सदिच्छेवर काबू मिळवून अनासक्त म्हणजे इच्छारहित व्हायचे. देह असेपर्यत संपूर्णपणे इच्छारहित होणे काही शक्य नाही. यामुळे वैयक्तिक स्वार्थ नसलेली शुध्द इच्छा मनात बाळगावी. शुध्द इच्छा बंधनकारक ठरत नाही. तिची इच्छा बंधनकारक ठरते-आसक्ती बंधनकारक असते.

मृत्युचे भय सर्वात प्रबळ भय. मृत्युचे भय नसावे. मृत्युसमयीच्या असह्य वेदना सहन करण्यासाठी देहापासून विलग होण्याचा आणि नित्य हरिस्मरणाचा सराव हवा. हे ध्यानी घ्यायला हवे. सर्प वगैरेंचे भयही असते. सर्व भयांच्या मूळाशी जगण्याची तीव्र इच्छा सक्रिय असते. जीवनेच्छा क्षीण झाली की भय संपले. क्रोधाचा अनुभव तर सर्वांना आहेच. आपल्या इच्छेच्या अनुकूल कार्य न झाल्यावर क्रोध उपजतो. कित्येकांचा स्वभावच क्रोधी असतो - कित्येकांच्या स्वभावातच क्रोध असतो. ते बोलता - बोलता भडकून उठतात. भडकण्याच्या सवयीमुळे क्रोध उत्पन्न होतो. यामुळे अगदी बोलता-बोलता वा कुठल्याही परिस्थितीत उत्तेजित न व्हायची काळजी घेतली तर क्रोधवृत्तीचे शमन होऊ शकते.

7) **स: सदा मुक्त: एव:** ज्ञानी सदा मुक्त असतात. त्याना मोक्षाचाच अनुभव येतो. मोक्ष काही मिळवायची वस्तु नाही. तुकोबा म्हणतात - ‘नाही देवापाशी मुक्तीचे गाठोडे आणूनी वेगळे देईल जो!’ आपण सारे मुक्तच आहोत कारण ते आपले स्वरुपच आहे. परमात्मा मुक्त आहे म्हणून आपणही मुक्त आहोत पण या मुक्तीचा अनुभव आपल्याला येत नाही कारण की आपण अहंकार, राग, द्वेष यासारख्या विकारांच्या अधीन असतो आणि या विकारांमुळे मुक्तीचा अनुभव नाही घेता येत. हे कसे बरे होईल? स्थिर आणि शुध्द चित्ताच्या ठायीच तर आपल्याला आपल्या मुक्त स्वरुपाचा अनुभव येऊ शकतो. स्थिर आणि शुध्द जळातच प्रतिबिंब बघता येईल ना? हलत्या - डोलत्या व डहुळलेल्या मलीन जळात प्रतिबिंब दिसू शकणार नाही. तशाच प्रकारे स्थिर व शुध्द चित्तातच मोक्षाचा अनुभव घेता येईल.

: 29 :

*भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।*
*सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यज्ञतपसां भोक्तारं:** यज्ञ आणि तपाच्या भोक्त्यांना
- **सर्वलोकमहेश्वरम्:** सर्व लोकांचे महान ईश्वर
- **सर्वभूतानां सुहृदं:** सर्व भूतमात्रांचे निरपेक्ष उपकारक
- **मां ज्ञात्वा:** अशा मज परमेश्वराला जाणून ओळखून (मनुष्य)
- **शांतिं ऋच्छति:** शांती प्राप्त करतात

**अर्थ**

माझा भक्त मला सर्व यज्ञ आणि तपांचा भोक्ता, सर्व लोकांच्या ईश्वरांचाही ईश्वर, प्राणीमात्रांचा सुहृद अर्थात् स्वार्थरहित दयाळू आणि प्रेमी, असे तत्त्वत: समजून शांततेला प्राप्त होतो.

*भोक्ता यज्ञ-तपांचा मी सोयरा विश्व-चालक*
*जाणूनि ह्यापरी मातें शांतीस वरिला चि तो।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी सांगितल्या आहेत (1) यज्ञ आणि तपाचा अनुभव घेणारे (2) सर्व लोकांचे महान ईश्वर म्हणजे विश्वचालक (3) प्राणीमात्रांवर कुठल्याही अपेक्षेशिवाय प्रेम करणारे (4) अशा मज ईश्वराला जाणून म्हणजे परमेश्वराच्या शरणी येऊन (5) मनुष्य शांतता प्राप्त करतो.

**स्पष्टीकरण**

(या श्लोकात भगवंताने शांती मिळवण्याचा मार्ग सांगितला आहे. संपूर्ण गीता शांतीचा सरळ आणि सुगम उपाय परमेश्वर भक्ती मानते.)

1) **यज्ञतपसां भोक्तारं:** इथे यज्ञ आणि तपासोबत दानाचा समावेश आहे. यज्ञ, दान आणि तप ही ईश्वराला जाणण्याची बाह्य साधने होत. भक्ती हे अंतरंग साधन आहे. उपनिषदात वचन येते: **तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसा अनाशकेन्।** अर्थात् त्या ईश्वराला साधक जन ज्या मार्गांनी जाणण्याची इच्छा करतात त्यात श्रृती वचने म्हणजे उपनिषदांची वचने, यज्ञ, दान आणि तपाने म्हणजे शरीर, मन व बुध्दीचा नाश न करणाऱ्या तपाने जाणण्याची इच्छा करतात.

या श्रुती वचनात यज्ञ, दान आणि तपासोबत शास्त्र वचनांच्या अध्ययनाचा संकेत दिला गेला आहे. तपाच्या सोबत एक विशेषण जोडले आहे 'अनाशक' हे समजून घ्यावे लागेल. तप नेहमी व्यक्तीला क्षीण करते. तपाचा अर्थच मुळी स्वत:ला क्षीण करुन घेणे अशी खूणगाठ साधकाच्या मनी वसलेली असते. भगवान बुध्दानेही देहाला क्षीण करणारे तपाचरण केले होते. नंतर त्यांच्या लक्षात आले की देहाला क्षीण करणाऱ्या तपाचरणामुळे मनाची शक्ती घटते - मनाचे बळ क्षीण होते. अठराव्या अध्यायातल्या पाचव्या श्लोकात म्हटले आहे की यज्ञ, दान, तप या तिन्ही साधनांना आचरणात आणायला हवे कारण की हे ज्ञानवंतालाही पावन करतात म्हणजे ज्ञान प्राप्ती झाल्यावरही चित्ताची अधिक शुध्दी करणारे हे घटक आहेत. चित्त शुध्दीसाठी यज्ञ, दान आणि तपाची साधना करताना जर आपण स्वत:ला कर्ता वा भोक्ता मानले तर या तिन्ही साधनांच्या बळानेही बंधनमुक्तीचा सोहळा अनुभवता येणार नाही. याचे कारण असे की एखाद्या क्रियेचा कर्ता वा भोक्ता बनणे हेच मुळी बंधनकारी आहे.

यामुळे गीतेचे निवेदन आहे की यज्ञ-तपाचे भोक्ता म्हणजे अनुभव घेणारे तर प्रभुच आहेत कारण की मनात प्रभु वसलेले नसतील तर यज्ञ-तपाचा अनुभव कुणी घ्यावा? कसा घ्यावा? आपले अस्तित्व परमेश्वराहून भिन्न तर नाहीच. आपण परमेश्वराशी एकरुप आहोत यामुळे यज्ञ, दान, तपाचे कर्ता वा भोक्ता बनण्याऐवजी आपण ते भगवंताप्रतीच अर्पण करुन दिले म्हणजे सारे कर्तृत्व व भोक्तृत्व ईश्वरार्पणच केले तर मग देहबुध्दी उरणार नाही आणि अखंड शांती लाभेल. शांतीत बाधक तत्व आहे देह बुध्दी. यामुळे प्रभुलाच यज्ञ-तपाचा भोक्ता माना.

2) **सर्वलोकमहेश्वरं:** परमेश्वर सवांर्चेच ईश्वर आहेत. आपण जर हे सतत ध्यानी घेतले व ध्यानात ठेवले की तो आपली प्रत्येक क्रिया बघतो. आपल्या प्रत्येक क्रियेवर त्याची नजर आहे एवढेच नव्हे तर तो आपल्याला सत्‌ची प्रेरणा देतो तर आपला जीवभाव-देहभाव क्षीण होईल. चुकून कधी आपल्या हातून असत् कार्य घडले तर आतून प्रभुची प्रेरणा जागेल की तू हे असत् कार्य केले आहेस. ही प्रेरणा कधी-कधी एवढी जबरदस्त असते की माणूस ती जाहीरपणे सांगून टाकतो वा त्यासाठी प्रायश्चित्त घेतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील. कुणाचा खून केल्यावर ते घोषित केल्याशिवाय एखाद्याला झोपच येत नाही तो स्वत:ला पोलिसांच्या हवाली करुन देतो तेव्हा कुठे त्याला शांतता लाभते. अशाप्रकारे आपणास नित्य सत् कार्याची प्रेरणा देणारा आणि नियंत्रणात राखणारा परमेश्वर सर्वत्र तर आहेच तो आपल्या देहातही वसतो असे मानून वाटचाल केली तर अहंकार नष्ट होईल आणि परम तत्वाचा-परमेश्वराचा अनुभव येईल.

3) **सर्वभूतानां सुहृदं:** परमात्मा तमाम प्राणीमात्राचा निरपेक्ष असा उपकारकर्ता आहे पण यासाठी आपल्याकडून कुठल्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा ठेवत नाही. आपण कुणावर काही उपकार केले तर काही अपेक्षा बाळगतो. विरल पुरुषच निष्काम भावनेने कार्य करतात. परमात्मा सतत आपली सेवा करत असतो. आपण रात्री झोपून जातो तेव्हा आपल्याला तर देहाचे भानही नसते पण परमात्मा चोवीस तास शरीराला सुस्थितीत राखण्याचा

प्रयत्न करतो. त्याच्यामुळेच तर स्मरण-विस्मरण होते. एखादी गोष्ट आपण विसरुन जातो पण अचानक आठवण येते. रात्नंदिवस परमेश्वर निरपेक्ष भावनेने आपली सेवा करतो असे जर ध्यानी आले तर आपणही परमेश्वरासारखे निष्काम बनून जाऊ.

4) **मां ज्ञात्वा:** उपरोक्त प्रकारे ईश्वराला जाणून जे ईश्वरी स्वरुपाचे ज्ञान प्राप्त करुन घेतात त्याना शांतीलाभ होतो. परमेश्वरालाच भोक्ता समजून घेतल्यावर कर्तेपणा व भोक्तेपणा संपून जाईल. सर्वांवर प्रभुचेच नियंत्रण आहे, तोच सर्वाना सत्‌ची प्रेरणा देतो असे जाणून परमेश्वराच्या नियंत्रणात जो राहील. जो नित्य सत्‌कडे वळेल. जो आपला संपूर्ण व्यवहार सत्‌च्या अनुकूल राखून, सत्यमय राहू लागेल. परमेश्वरच सवांर्वर निरपेक्षपणे उपकार करतो हे मनावर बिंबवून घेऊन जो परमेश्वराप्रती विनम्र बनून जीवन घालवील तो ईश्वरी रुपाला जाणून घेईल. त्याला शांतीलाभ होईल.

5) **शांतिं ऋच्छति:** कुठल्या-न-कुठल्या प्रकारे का होईना पण प्रभुच्या शरणी जाणे हा महत्वाचा मुद्दा आहे. ईश्वर शरणभाव म्हणजे ईश्वर भक्तीचा विचार सबंध गीतेत वर्णिला आहे. काही अध्यायात तर केवळ भक्तीमार्गाचेच विवेचन आले आहे. प्रत्येक अध्यायातून भक्तीची आवश्यकता वर्णायला गीता व गीताकार विसरत नाहीत.

या अध्यायात योगीजनाचे स्वरुप कळते. योग आणि संन्यास समान असल्याचे कळते. तरीही या श्लोकातून भक्तीची चर्चा केल्याशिवाय गीतेला रहावत नाही कारण भक्ती हा ईश्वर प्राप्तीचा सुलभ आणि श्रेष्ठ उपाय आहे. भगवंताला शरण जाणे भगवंताची भक्ती करणे माणसाला सोपे आहे. एवढेच नव्हे तर भगवंत सर्वत्न आणि आपल्या देहात वसतो. परमात्म्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही वस्तुचे स्वतंत्न अस्तित्व नाही. मातीशिवाय ज्याप्रमाणे घटाचे अस्तित्व नाही तसेच संपूर्ण जगताच्या ठायी एक परमेश्वरच परमेश्वर आहे हे आधी समजून घेतले तर परमात्म्याला शरण जाणे वा परमात्म्याप्रती भक्तीभाव उपजणे सुलभ होऊन जाते.

• • • *पाचवा अध्याय संपूर्ण* • • •



सहावा अध्याय

# आत्म संयम योग

: 1 :

**श्री भगवान् उवाच**

*अनाश्रित: कर्मफलं कार्यं कर्म करोति य: ।*
*स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रिय: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कर्मफलं अनाश्रित:** कर्मफळाचा आश्रय न घेणारा
- **य:** जो (पुरुष)
- **कार्यं कर्म:** कर्तव्य कर्मे
- **करोति:** करतो
- **स: संन्यासी:** तो संन्यासी आहे
- **च योगी:** आणि योगी आहे
- **निरग्नि: न:** जो निरग्नी म्हणजे विकर्म करत नाही तो (योगी वा संन्यासी) नाही
- **च अक्रिय: न:** आणि जो कर्तव्य कर्मे करत नाही तो (योगी वा संन्यासी) नाही

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले जो पुरुष कर्मफळाचा आश्रय न घेता कर्तव्य कर्म करतो, तो संन्यासी व योगी होय आणि केवळ अग्नीचा त्याग करणारा संन्यासी नव्हे, तसेच केवळ क्रियांचा त्याग करणारा योगी नव्हे.

**श्री भगवान् म्हणाले**

***फळीं आश्रय सोडूनि करी कर्तव्य कर्म जो***
***तो संन्यासी तसा योगी न जो निर्यज्ञ निष्क्रिय ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) कर्मफळाचा आश्रय न घेणारा म्हणजे कर्मफळात अनासक्त पुरुष (2) प्रवाहपतीत कर्मे करतो. (3) तो संन्यासी आणि योगी आहे. (4) पण जो आंतरिक विकर्माची साधना करत नाही तो संन्यासी वा योगी नाही

**स्पष्टीकरण**

(या अध्यायाच्या आरंभी पाचव्या अध्यायाचाच विषय जारी आहे. पुढे 'ध्यान योग' हा विषय सुरु होईल. हा विषय नंतर निर्गुण उपासना वा पतंजलीच्या योग दर्शनात येतो.

विनोबा संन्यासाला वृत्ती प्रधान मानतात परिणामी संन्यासात वृत्ती शोधनाची अपेक्षा बाळगली जाते. कर्मयोग कर्मप्रधान असल्यामुळे यातून समाजसेवेची अपेक्षा केली जाते. कर्मयोगाचे सुयोग्य प्रकारे पालन केले गेले तर वृत्ती शोधन होऊन जाते. या उलट निरहंकारामुळे वृत्ती शोधन सुयोग्य प्रकारे होऊ शकते तर फार मोठी समाजसेवा मानली जाईल, कारण की त्यात समाज सेवेची प्रेरणा समाविष्ट आहे.)

1) **अनाश्रित: कर्मफलं: कर्मफळाचा** आश्रय न घेणारा म्हणजे कर्मफळाबाबत अनासक्त पुरुष प्रवाहपतीत कर्मे आचरतो तो योगी वा संन्यासी आहे पण आंतरिक विकर्माची साधना न करणारा योगी वा संन्यासी नाही. कर्म म्हणजे स्वधर्म. कर्मफळाबाबत आसक्ती जागली तर दु:ख उत्पन्न होते. कर्तव्य कर्म दु:खदायी नाही. कर्तव्य पालन वा स्वधर्म पालनात तर आपण कर्तव्यपालन करत असल्याचे समाधान लाभते पण फळाबाबत मोठी आतुरता असते, अपेक्षा असते, इच्छा असते. इच्छा, अपेक्षा वा आसक्ती या दु:खाचे मूळ आहेत. सामाजिक सेवा कार्यात तल्लीन असणाऱ्यांच्या मनातही जेव्हा कामना उत्पन्न होतात तेव्हा आसक्ती जागते. आसक्ती भयंकर. यामुळे माणूस चंचळ व अस्वस्थ होतो.

2) **य: कार्यं कर्म करोति:** स्वधर्माचे पालन करणे प्रवाहपतीत आहे म्हणजे यासाठी कुठे शोध नाही घ्यावा लागत. हे कर्म आपोआप ठरते. सहजपणे निश्चित होते. जीवन कर्तव्यमय असायला हवे. पालकांचे लेकरांबाबत काही कर्तव्य असते ते करायची दृष्टी असायला हवी. केवळ कर्तव्य दृष्टी असावी, मोह दृष्टी असू नये. समाजाच्या संदर्भातही प्रत्येकाची काही एक कर्तव्य बुध्दी-कर्तव्य दृष्टी असायला हवी. अठराव्या अध्यायात सात्विक, राजसी आणि तामसी त्यागाची जी लक्षणे वर्णिलेली आहेत त्यात सात्विक त्यागाची लक्षणे अशी आहेत - नियत म्हणजे स्वकर्तव्याला आवश्यक कर्तव्य मानून करणाऱ्याचा त्याग सात्विक त्याग ठरतो. त्याग करणे याचा अर्थ स्वकर्तव्याचाही त्याग करणे असे होत नाही कारण की कर्तव्य कर्म कदापि सुटत नसते. त्यागाचे विषय तर आसक्ती वगैरे विकार आहेत. कर्मत्यागातून नव्हे तर विकारत्यागातून मोक्षप्राप्ती होते.

3) **स: संन्यासी च योगी च:** अनासक्त भावनेने स्वधर्माचे पालन करणारा संन्यासी आणि योगी होय. फळाच्या आसक्तीचा आणि विकारांचा त्याग केल्यामुळे तो संन्यासी म्हणावा आणि काया-वाचा-मनाने स्वधर्माचे पालन करणारा, चित्ताला सम अवस्थेत राखणारा आणि स्थिर मनाचा असल्यामुळे योगी मानावा.

बाहेरुन कर्माचा त्याग करणे म्हणजे संन्यास असा अर्थ बहुधा केला जातो. हा अत्यंत चुकीचा अर्थ आहे. खरे तर जे आंतरिक विकारांना त्यागायचा प्रयत्न करत नाहीत ते विकारांना अधिक पुष्ट करतात. आंतरिक विकारांचा त्याग करणे म्हणजे संन्यास होय. या संन्यासाच्या ठायी सत्कर्म योग वा स्वकर्तव्य पालनाचा अंतर्भाव असायला हवा. बाहेरुन स्वधर्माचे पालन करत असून आतून चित्ताला सम व स्थिर राखणे याचे नाव योग. अशा प्रकारे जीवनात संन्यास आणि योग या दोघांचा सुमेळ घालायला हवा.

4) **न निरग्नि: न च अक्रिय:** चौथ्या अध्यायातल्या 25 ते 32 या श्लोकामधून चित्ताची शुध्दी करणाऱ्या नाना प्रकारच्या यज्ञांची चर्चा येते याना विकर्मरुपी यज्ञ असे म्हणतात. ही यज्ञकर्मे न करणारा वा स्वकर्तव्यरुपी क्रिया न करणारा संन्यासी वा योगी नव्हे. या श्लोकात 'अग्नी' हा शब्द आला आहे, अग्नीरहित म्हणजे यज्ञरहित होय. यज्ञाचे स्वरुप परिस्थितीनुरुप बदलते. स्वार्थ दृष्टी न ठेवता स्वधर्म वा स्वकर्तव्य पालनाला यज्ञ म्हणता येईल पण हा झाला बाह्य यज्ञ. यज्ञाच्या संदर्भात तिसऱ्या अध्यायातून

विस्तारपूर्वक चर्चा आली आहे. या अध्यायातली यज्ञ ही संकल्पना बाह्य नसून आंतरिक स्वरुपाची आहे. इथे तर विकर्मरुप यज्ञ अभिप्रेत आहे. चित्त शुध्दीच्या अभावी बाह्य स्वधर्माचा मोक्षाच्या दृष्टीने काहीही संबंध नाही. यामुळे चित्तशुध्दीकारक आंतरिक साधनेला यज्ञ म्हणणे अगदी सयुक्तिक आहे. अशा प्रकारे चित्तशुध्दीकारक नाना प्रकारची यज्ञे जो करत नाही तो ना संन्यासी ना योगी! तसेच जो बाह्य स्वधर्मरुप वा स्वकर्तव्यरुप कर्मे करत नाही तो देखिल संन्यासी वा योगी नव्हे. ना आत चित्तशुध्दीकारक कर्मे ना बाह्यत: स्वधर्मरुपी कर्मे याचा अर्थ 'ना अत्र ना परत्र' म्हणजे 'तेलही गेले आणि तूपही गेले' अशी अवस्था व्हायची. इहलोक नासला आणि परलोक फसला अशी गत व्हायची. दोहीकडून जो नागवला गेला त्याचे जीवन पतीत जाणावे. ही झाली नास्तिकतेची पराकाष्ठा. यामुळे जो आंतरिक चित्त शुध्दीकारक साधना करत नाही आणि बाह्य स्वधर्मानुष्ठान रुपी साधनाही करत नाही तो ना संन्यासी ना योगी!

: 2 :

***य: संन्यासमिति प्राहुर्योगं तं विध्दि पांडव।***
***न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **पांडव:** हे अर्जुना
- **यं संन्यासं:** ज्याला संन्यास
- **इति प्राहु:** असे म्हणतात
- **तं योगं विध्दि:** त्याला योग समजा
- **हि असंन्यस्तसंकल्प:** कारण की ज्याने संकल्पाचा त्याग केलेला नाही
- **कश्चन योगी न भवति:** असा कोणीही (पुरुष) योगी नसतो

### अर्थ

हे अर्जुना, ज्याला संन्यास असे म्हणतात, तोच योग आहे, असे तू समज कारण संकल्पांचा त्याग न करणारा कोणीही पुरुष योगी होत नाही.

***संन्यास म्हणती ज्यास योग तो जाण पांडवा***
***सोडिल्याविण संकल्प कोणी योगी न होतसे।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) ज्याला संन्यास असे म्हणतात तोच योग होय. (2) कारण की ज्याने संकल्पांचा त्याग केला नाही तो योगी नव्हे !

### स्पष्टीकरण

1) गीतेचे स्पष्ट मत आहे की संन्यास आणि योग एकच होत. हाच विषय पाचव्या अध्यायातल्या चौथ्या-पाचव्या श्लोकात आला आहे. संन्यास आणि योग वेगवेगळे आहेत असे अज्ञानी जनाना वाटते, ज्ञान्याला असे नाही वाटत. संन्यास असो वा योग या दोहोपैकी कुठल्याही एकाच्या ठायी जरी निष्ठा जागली ना तरी दोन्हीही साध्य होतात - साधता येतात. संन्यासामुळे जे स्थान लाभेल, मोक्षलाभ होईल तो योग्यालाही प्राप्त होईल यामुळे संन्यास आणि योगात अभेद बघणारा म्हणजे दोघाना एकच मानणारा खऱ्या अर्थाने ज्ञानी होय.

एक काळ असा होता की संन्यास हा योगापेक्षा श्रेष्ठ मानला जाई. चार आश्रमांमध्येही संन्यासाश्रमाला श्रेष्ठ मानले जायचे. आज आपल्यासमोर कर्मयोगाची विस्तृत विकसित व्याख्या आहे. संन्यासाचे यथार्थ स्वरुप आज आपल्यापुढे आहे. त्याकाळी या प्रकारची परिस्थिती नव्हती. गृहस्थाश्रमात रत असतानाही अलिप्तता, अनासक्ती, सगुण भक्ती, ईश्वर समर्पणभावनेचा अनुभव घेत रहाणे हाच कर्मयोग मानला जात होता. गृहस्थाश्रमाचा त्याग करावा लागायचा. वानप्रस्थाश्रमाच्या कर्माचाही त्याग करावा लागायचा. जंगलात एकाकी विचरण करावे लागायचे. उपदेश देत भ्रमण करावे लागायचे. याला संन्यास मानले जाई. आज परिस्थिती बदलली आहे. आज गृहस्थाश्रम सोडायची गरज नाही. ब्रह्मचर्य व्रताचे परिपूर्ण पालन करावे. केवळ कर्तव्य बुध्दी जागी ठेवावी हे गरजेचे आहे. अलिप्तता आवश्यक आहे. अनासक्तीची भावना आवश्यक आहे. ईश्वरसमर्पण बुध्दीचा अनुभव घेणे गरजेचे आहे. हे सारे साधता यायला हवे. हे करुन समाजसेवेचे ध्येय नजरेपुढे ठेऊन चालणाऱ्या जीवनाला आज आपण कर्मयोगी जीवन म्हणू शकतो. दुसरीकडे गृहस्थाश्रमाचा त्याग करुन वानप्रस्थाश्रमाचे पालन करणारा साधक आहे. तो ईश्वर भक्तीच्या पराकाष्ठेने संपूर्णपणे अनासक्त बुध्दीने समाजसेवेत तन्मयतापूर्वक संलग्न आहे. अशा जीवन साधकाला आपण संन्यासी म्हणू शकतो.

योग आणि संन्यास या दोन संज्ञांच्या व्याख्या विकसित केल्या गेल्यात. त्याना परिपूर्ण अर्थ दिला गेला. याकामी

गांधीजी व विनोबानी मोठे कार्य केले आहे. गांधीजींचे जीवन कर्मयोग्याचे तर विनोबांचे जीवन संन्याश्याचे उदाहरण असल्याचे सांगता येईल.

2) **असंन्यस्तसंकल्पः कश्चन योगी न भवतिः** आतून ज्याला संकल्पाचा त्याग करता येत नाही, तो योगी नाही बनू शकत. संकल्पाच्या त्यागाचा अर्थ मनात संकल्प न करणे असा होत नाही. कुठल्याही कार्याला सुयोग्य प्रकारे साधावयाचे असेल तर संकल्पाशिवाय ते होऊ शकत नाही. कार्यसिध्दीसाठी योजना आखण्यात, संकल्प करण्यात काही वावगे नाही. त्यात कुठले कर्मबंधन नाही. दोष वा कर्मबंधन आसक्तीच्या ठायी आहे. आपण एखादा शुभसंकल्प करतो तर मनात याबाबतीत आसक्ती उत्पन्न होते. याप्रकारे योजना वा संकल्प अमलात आणता आला नाही तर दु:ख उपजते. चित्त व्याकुळ होते. व्याकुळतेसोबत तडफड जारी होते. तगमग जारी होते. यातून निराशा उपजते. चित्त अस्वस्थ होते. स्थैर्य हरवून जाते. या तमाम गोष्टी शांतीच्या गळ्याला नख लावतात. कर्मबंधनाचा वेढा घट्ट होतो. शुभसंकल्प करताना वा शुभ योजना आखताना मनाशी एक दृढ निश्चय करायचा असतो. दृढनिश्चय असा करायचा की मी ईश्वर स्मरणपूर्वक प्रयत्न करीत राहीन. प्रयत्नांतीही योजना सफल झाली नाही वा संकल्प आकाराला आला नाही तर चित्त व्याकुळ होऊ देणार नाही. अशांत वा निराश होणार नाही. योजना वा संकल्प अमलात आला नाही तर ते ईश्वरार्पण करुन देईन. ईश्वरी इच्छा वा प्रेरणा नव्हती म्हणून आपली योजना वा संकल्प फळाला आला नाही, असे समजेन. शुभसंकल्प अमलात आणण्यासाठी दृढतापूर्वक प्रयत्नशील राहीन. प्रयत्नात कुठेही यात्किंचितही शिथिलता येऊ देणार नाही. अखंडपणे अखेरपर्यत प्रयत्नशील राहीन. फलप्राप्ती नाही झाली तर दुप्पट उत्साहाने काम करीन. अशाप्रकारे संकल्पाची उभारणी करुन जर अनासक्तीपूर्वक योजना आखली जात असेल तर ती बंधनकारक ठरणार नाही. ती मोक्षाला सहाय्यकारी ठरते. यामुळे गीतेचे निवेदन आहे की संकल्पाच्या आसक्तीचा त्याग केल्याशिवाय योगी बनता येत नाही. संकल्पाची आसक्ती सोडून देऊन साधना करणारे योगी आणि संन्यासी दोन्ही बनू शकतात.

: 3 :

*आरुरुक्षोमुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।*
*योगारुढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगं आरुरुक्षोः मुनेः** समत्वबुध्दीरुपी योगात आरुढ होणाऱ्या इच्छुक मुनीसाठी
- **कर्म कारणं उच्यतेः** कर्माला साधन (आधार) मानले आहे
- **तस्य एव योगारुढस्यः** त्या योगारुढ (मुनी)ला
- **शमः कारणं उच्यतेः** शम म्हणजे शांततेचा आधार आहे असे म्हटले आहे

**अर्थ**

योगावर आरुढ होण्याची इच्छा करणाऱ्या मननशील पुरुषाला योगाची प्राप्ती होण्यासाठी 'निष्काम कर्म करणे' हाच हेतु सांगितला आहे आणि योगारुढ झाल्यावर त्या योगारुढ पुरुषाचा जो सर्व संकल्पांचा अभाव असतो, तोच कल्याणाला कारण सांगितलाआहे.

***योगावरी चढूं जातां कर्म साधन बोलिलें***
***योगीं आरुढ तो होतां शम साधन बोलिलें।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) योगारुढ व्हायच्या इच्छुक मुनीला कर्मे ही साधनरुप आहेत. (2) योगारुढ झाल्यावर त्याचे साधन वा आधार शम ठरते.

**स्पष्टीकरण**

1) **योगं आरुरुक्षोः मुनेः क र्म कारणमुच्यतेः** ज्याला योगारुढ व्हायची इच्छा आहे त्याच्यासाठी कर्म साधन आहे. कर्मत्याग करुन म्हणजे अक्रिय बनून योग प्राप्त होत नाही. प्रपंचात जोवर माणसाला सुखाची बरसात दिसते तोवर योगप्राप्त करुन घेण्याची इच्छा जागणे अवघड. प्रपंचात राहताना दु:खांची माळ वाट्याला येते. एखादे महाभयंकर दु:ख येऊन भेटते मग कुठे प्रपंचात सुख नसल्याचा शोध लागतो मग व्यक्ती सत्संग शोधायला लागते. व्यक्तीच्या मनी मग योगसाधनेची इच्छा जागते.

प्राचीन काळी योगप्राप्तीचे दोन मार्ग सांगितले गेलेत. एक कर्मसंन्यास आणि दुसरा कर्मयोग. तसा संन्यासाकडे लोकांचा अधिक कल होता. पुढे मग अनुभव येत गेला. साधकावस्थेत कर्म म्हणजे स्वधर्म होय. पूर्वजन्मी साधना केलेल्या श्रेष्ठ संस्कारी विरळ अशा साधकांचा अपवाद वगळावा मग अन्य साधक कर्मत्याग केल्यावर पतीत झाल्याची उदाहरणे आढळतात. ही अवस्था 'तेलही गेले तूपही गेले हाती धुपाटणे आले' अशी असते. **'इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः'** अशी अवस्था जागते. प्रपंचात असताना धर्म आणि नीतीचे पालन करावे लागायचे. प्रपंचाचा त्याग केला आणि योगप्राप्तीसाठी सेवाकार्याचाही त्याग केला. यामुळे प्रपंच तर सुटलाच पण योगही साधला गेला नाही. निष्क्रिय बनल्यामुळे अनीतीची कामे घडली. प्रपंचात होते त्यापेक्षाही घसरावे लागले. हा दुष्परिणाम ध्यानी घेतला गेला. यामुळे गीतेत हे स्पष्टपणे बजावले आहे की सिध्दावस्थेत एकवेळ निष्क्रियता चालू शकेल पण साधकावस्थेत मात्र नाही. इथे तर कर्मसंन्यासाहून कर्मयोग श्रेष्ठ होय.

तिसऱ्या अध्यायात अर्जुनाने हाच प्रश्न विचारला होता. त्याच्या उत्तरादाखल साधकावस्थेत कर्म करणे किती आवश्यक आहे, याविषयी चर्चा केली गेली आहे. तिसऱ्या अध्यायात स्वधर्मरुप कर्माची चर्चा आली आहे. यात लोकसंग्रहरुप धर्माचा समावेश होतो. चौथ्या अध्यायातून चित्तशुध्दीकारक नाना प्रकारच्या आंतरिक विकर्माचे विवरण आले आहे. हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. यामुळे पाचव्या अध्यायातही अर्जुनाने पुनश्च हा प्रश्न उपस्थित केला आहे. याचे उत्तर गीतेने स्पष्टपणे दिले आहे. सिध्दावस्थेत कर्मयोग आणि कर्मसंन्यास एकरुप होऊन जातात. साधकावस्थेत मात्र कर्मसंन्यासाहून कर्मयोग श्रेष्ठ ठरतो. हाच मुद्दा या श्लोकात वेगळ्या पध्दतीने मांडला गेला आहे. वेगळ्या प्रकारे हाताळला गेला आहे. योगप्राप्त करुन घेणाऱ्यासाठी कर्म साधनरुप आहे. प्रपंचात असताना विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. त्यासोबतच लोकसंग्रहाचा विचार करायचा असतो. योगसाधनेचा व योग साधण्याचा प्रयत्न करायचा असतो. या कामी कर्म म्हणजे स्वधर्मरुप कर्म आणि आंतरिक चित्तशुध्दीकारक नाना प्रकारची विकर्मे, अशाप्रकारे आंतर्बाह्य दोन्ही प्रकारची कर्मे करुन योगसाधनेला आरंभ होतो. योगसाधनेचे हेच दोन आधार वा साधने होत.

3) **तस्य एव योगारुढस्य शमः कारणं उच्यते:** स्वधर्मरुपी कर्म आणि विकर्म या दोन साधनाचा आश्रय घेऊन योग साधना पूर्ण करणाऱ्या साधकांना शांतता लाभते.

साधनेच्या आरंभी स्वधर्मरुप कर्म आणि आंतरिक विकर्म यास दोघाचा आधार होता. योग साधनेच्या पूर्णत्वानंतर शांतता प्राप्त झाल्यावर परम शांततेचाच आधार उरतो. शांतता प्राप्त झाल्यावर स्वधर्मरुप कर्म वा विकर्माचा त्याग करावा असे काही नाही. अर्थात् तो आधार उरत नाही. साधकावस्थेत कर्म म्हणजे स्वधर्मरुपी कर्म आणि विकर्म यांचा आधार. सिध्दावस्थेच्या प्राप्तीनंतर मात्र कर्म आणि विकर्म कायम असतानाही त्याचा आधार परम शांतताच उरते. शांतता हेच निजरुप आहे. या स्वरुपाचा अनुभव झाल्यावर त्याच्या आधारेच तो जगतो. अकर्ता रहातो. स्वधर्मरुप कर्म आणि विकर्म यांची साधना करत असताना साधकावस्थेत कर्तेपणाची भावना काही मनातून निघून जात नाही. सिध्दावस्थेत परम शांतता म्हणजे अकर्तेपणाचा अनुभव पूर्ण होतो. शांतता लाभल्यावरही कर्तेपणाची भावना जर मनातून निघून गेली नाही तर ही काहीपरमशांततेची प्राप्ती म्हणता येणार नाही. पूर्ण शांततेच्या ठायी संपूर्ण अकर्तेपण सामावलेले आहे. कठोपनिषदात म्हटले आहे :

***यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेज्ज्ञानं आत्मनि ।***
***ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि ॥***
***(1/3 /13)***

अर्थात् - प्राज्ञ आणि विवेकी पुरुषाला वाणी म्हणजे समस्त इंद्रियांचा मनाच्या ठायी लय करुन घ्यायला हवा. याचा अर्थ सर्व इंद्रियांना मनाच्या अधीन करायला हवे. मनाचा लय ज्ञान स्वरुप बुध्दीच्या ठायी करायला हवा. याचा अर्थ असा की मन हे बुध्दीच्या अधीन असायला हवे. ज्ञानस्वरुप बुध्दीचा लय महान आत्मतत्वाच्या ठायी करायला हवा. याचा अर्थ असा की तो ब्रह्मांडात निहित व्यापक परमतत्वाच्या - परमात्म्याच्या - ठायी करायला हवा. याचा अर्थ असा की बुध्दीला व्यापकत्व अर्पायला हवे. त्या व्यापक बुध्दीचा लय शांत आत्म्याच्या ठायी

करायला हवा. उपनिषदाचा श्लोक एकेक लोकोत्तर अशा चार भूमिकांचे वर्णन करतो. अखेरची भूमिका शांत आत्मतत्वाची आत्म्याची आहे.

आधी इंद्रियनिग्रह मग मनोनिग्रह मग बुध्दीनिग्रह. श्लोकाच्या पूर्वार्धात या तीन भूमिका येतात. बाहेरुन स्वधर्मरुप कर्म आणि आतून विकर्म या झाल्या या तीन भूमिका. उत्तरार्ध्दात शम नामक अंतिम भूमिका येते. शम ज्याच्या हाती लागला तो योगारुढ झाला असे समजावे.

: 4 :

*यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते।*
*सर्वसंकल्पसंन्यासी योगारुढस्तदोच्यते॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **हि यदा:** पण जेव्हा (साधक)
- **इन्द्रियार्थेषु:** इंद्रियांच्या विषयी, इंद्रियांच्या बाबतीत, इंद्रियांच्या भोगात
- **न अनुषज्जते:** आसक्त होत नाहीत
- **कर्मसु:** आणि कर्मांमध्ये
- **न अनुषज्जते:** आसक्त होत नाहीत
- **सर्वसंकल्पसंन्यासी:** (आणि) जे सारे संकल्प सोडून देतात
- **तदा योगारुढ: उच्यते:** तेव्हा ते योगारुढ झाले असे (शास्त्रात) लिहिले आहे

### अर्थ

ज्यावेळी इंद्रियाच्या भोगात किंवा कर्मातही पुरुष आसक्त होत नाही, त्यावेळी सर्व संकल्पाचा त्याग करणाऱ्या पुरुषाला योगारुढ म्हटले जाते.

*कर्मांत जो अनासक्त विरक्त विषयीं असे*
*संकल्प सुटले तेव्हां तो योगारुढ बोलिला।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत (1) साधक वा मुमुक्षु इंद्रियाच्या विषयात जेव्हा आसक्त होत नाही. (2) स्वधर्मरुप कर्म, आंतरिक विकर्म आणि यज्ञ, दान, तप वगैरे साधनयुक्त कर्मांच्या ठायी अनासक्त असतो. (3) सर्वसंकल्पांचा त्याग करतो. (4) असा साधक योगारुढ झाला असे मानता येते. असा साधक सिध्द झाला असे मानायला हवे.

### स्पष्टीकरण

1) **यदा इन्द्रियार्थेषु न अनुषज्जते:** कामना वा आसक्तीने प्रेरित कर्माला काम्य कर्म असे म्हणतात. साधक वा मुमुक्षु इंद्रियांच्या विषयात म्हणजे काम्यकर्मात आसक्त होत नाही. जगात राहून अलिप्ततापूर्वक कर्मे करु शकतो. अलिप्ततेसाठी प्रपंचाचा त्याग करायची आवश्यकता नाही. याचा अर्थ असा की प्रपंचात राहून सुध्दा व्यक्ती निश्चयपूर्वक काम्य कर्मे न करता स्वधर्माचे पालन करु शकते. याकामी यशस्वी होऊ शकते. प्रपंच दोन प्रकारचा आहे. एक कौटुंबिक दुसरा सार्वजनिक. कौटुंबिक संस्थेत ममत्वामुळे काम्य कर्मे चालतात. सार्वजनिक म्हणजे संस्थात्मक जीवनातही चालतात. सार्वजनिक सेवाकार्यातही चालतात. यामुळे ज्याने काम्य कर्मांचा त्याग केला त्याने योगारुढ पुरुषाचे एक लक्षण प्राप्त करुन घेतले असे मानायला हवे.

2) **कर्मसु न अनुषज्जते:** प्रपंचात रहात असतानाही आध्यात्मिक जिज्ञासा उत्पन्न होऊ शकली. ब्रह्मचर्याचे पालन करुन इंद्रियनिग्रह साधता आला. काम्य कर्मांचा त्याग करता आला तर मग कुटुंबसंस्थेत राहून देखिल आध्यात्मिक साधना होऊ शकेल. बाहेरुन स्वधर्मरुप कर्तव्य कर्मे आचरावी. आंतरिक विकर्मे साधावीत. याचा अर्थ असा की चित्तशुध्दिकारक कर्मे आचरावीत. याचा अर्थ असा की भक्ती करावी. ध्यानधारणा साधावी. आत्मानात्मविवेक जोपासावा. वैराग्यभावना जागवावी. यासारखी कर्मे आचरता आली तर त्या आध्यात्मिक साधनेचे स्वरुप आकाराला येते. ही अंतर्बाह्य कर्मे आचरायचीत. आपण त्यात आसक्त व्हायचे नाही अन्यथा साधनेत अडथळा येईल. हे जाणून घ्यायला हवे. आध्यात्मिक साधनाकाळातही अनासक्ती ही हवीच हवी. परमात्म्याशिवाय अन्य कुठल्याही वस्तुत वा गोष्टीत आसक्ती जागली तर शांततेचा लाभ होऊ शकणार नाही. आपल्या साधनेतही अधिक उणेपणा जाणवतो. यामुळे याबाबत आसक्ती दाखवू नये. अनित्य वस्तुविषयी आसक्ती ठेवली तर दु:खाशिवाय कुठला बरे अनुभव वाट्याला येणार ? कितीही तीव्र स्वरुपाची साधना असली तरी चढ-उतार हा ठरलेलाच. चित्तावर त्याचा परिणाम होणे हे ठरलेलेच. यामुळे प्रयत्न तीव्रतापूर्वक असावेत. अनासक्ती आणि फळाच्या आकांक्षेचा त्याग असावा.

3) **सर्वसंकल्पसंन्यासी:** संकल्पाचा त्याग करायचा विषय दुसऱ्या श्लोकतही आला आहे. संकल्पाचा त्याग केल्याशिवाय योगी होता येत नाही. संकल्प त्याग म्हणजे अशुभ संकल्पांचा त्याग होय. अशुभ संकल्प कदापि मनी जागता कामा नयेत. शुभ कल्पना, शुभ योजना आणि परमात्म प्रेरणेने युक्त होऊन पूर्ण अनासक्त भाव बाळगायला हवा. पूर्ण तटस्थतापूर्वक वागायला हवे. अकर्ताभाव जोपासला जायला हवा.

वरील तीन लक्षणे ज्यांच्या ठायी दिसून आली ते योगारुढ झालेत, सिध्द पुरुष झालेत असे समजायला हवे. ज्ञानोबा म्हणतात: "साधकाच्या इंद्रियाच्या निवासस्थानी विषयाचे जाणे-येणे उरत नाही. तो आत्मज्ञानाच्या वास्तुत निवास करतो. सुख-दु:खाची आक्रमणे झेलत रहातो तरीही त्याचे मन परमात्म स्वरुपाविषयी विचलित होत नाही. विषय निकट वावरत असतानाही त्याला त्याचे रुप कळत नाही, त्याचे स्मरणही त्याला नसते. इंद्रिये कर्मरत असतानाही देहधारी असूनही तो असा विरक्त असतो. जाग्रतावस्थेतही परमात्म तत्वात विलीन असतो. त्यालाच योगारुढ पुरुष मानावे."

: 5 :

***उध्दरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।***
***आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आत्मना:** (आपण) स्वत:च
- **आत्मानं:** आपल्याला, स्वत:ला
- **उध्दरेत्:** (संसार सागरातून) निघायला हवे
- **आत्मानं:** आपल्याला (कधी)
- **न अवसादयेत्:** खाली पडू द्यायला नको, अध:पतीत होऊ द्यायला नको
- **हि आत्मा एव:** कारण की आपणच
- **आत्मन: बन्धु:** आपले बंधु आहोत
- **आत्मा एव:** आणि आपणच
- **आत्मन: रिपु:** आपले शत्रु आहोत

**अर्थ**

स्वत:च स्वत:चा संसार समुद्रातून उध्दार करुन घ्यावा आणि स्वत:ला अधोगतीला जाऊ देऊ नये कारण हा मनुष्य स्वत:च स्वत:चा मित्र आहे आणि स्वत:च स्वत:चा शत्रु आहे.

***उध्दरावा स्वयें आत्मा खचूं देऊं नये कधीं***
***आत्मा चि आपुला बंधु आत्मा चि रिपु आपुला ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत 1) आपण स्वत:च स्वत:ला प्रापंचिक बंधनापासून मुक्त करावे. 2) स्वत:ला अध:पतीत होऊ देऊ नये. 3) कारण की आपणच आपले मित्र 4) आणि आपणच आपले शत्रु आहोत.

**स्पष्टीकरण**

1) **आत्मना आत्मानं उध्दरेत्:** जीव पराधीन आहे की स्वाधीन? आपला उध्दार आपणास स्वत:च करायचा आहे. स्वातंत्र्य अल्पसे आहे असे कळले तर प्रयत्नातला वेग कमी होईल. शिथिलता जागेल. माणसाचा देह आणि मन, बुध्दी, इंद्रिये सारे सारे काही ईश्वरनिर्मित आहेत. जीव भाव देखिल ईश्वर निर्मितच आहे. परमेश्वराने जीवाला स्वातंत्र्यही बहाल केले आहे. हे स्वातंत्र्य खूप व्यापक आहे. जीव देह मन, बुध्दी आणि इंद्रिये यांच्यापासून स्वत:ला भिन्न समजू शकतो. स्वत:च्या भिन्नतेचा अनुभव घेऊ शकतो. परमात्म्याशी एकरुपतेचा अनुभव घेऊ शकतो. जीवाला स्वातंत्र्य मुळी नाहीच असे मानून बसलो तर मग शास्त्रातील विधिविधाने अजिबातच निरर्थक ठरतील. सत्य बोलावे. असत्याचरण करु नये. सर्वांशी प्रेमाने वागावे. कुणाचा द्वेष करु नये. कुणाची हिंसा करु नये. यासारखी समाजात रुढ अशी विधिविधाने निरर्थक नाही का ठरणार? आपण आपल्या प्रयत्नाच्या बळावर अमुक प्रकारचे कार्य संपादन करु शकतो हे निरर्थक नाही का सिध्द होणार? मग सारे मिथ्या सिध्द होईल ना? यामुळे जीवाला भगवंताने बरेचसे स्वातंत्र्य देऊन ठेवले आहे. जीव आणि शिव (परमात्मा) यांच्या संबंधाविषयीची चिकित्सा ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात येते. याची चर्चा दुसऱ्या अध्यायातील तिसऱ्या पादातून पुढीलप्रमाणे केली गेली आहे: **परायत्ते अपि कर्तृत्वे करोति एव**

**हि जीव:। कुर्वन्तं हि तं ईश्वर: कारयति।** अर्थात् "जीवाचे कर्तृत्व म्हणजे स्वातंत्र्य परमात्म्याच्या अधीन आहे तरीही जीवच सारे करतो कारण की परमात्मा जीवाच्या द्वारेच सारे करवून घेतो."

जीवाला अमर्यादित स्वातंत्र्य नसल्याचे रहस्य शंकराचार्यांनी चातुर्याने वर्णिले आहे. जीव मर्यादित आहे. मर्यादित स्वातंत्र्याचा धनी आहे. ईश्वराधीन आहे. करणारा जरी जीव असला तर करवणारा ईश्वर आहे. कर्ता जीव असला तरी करविता ईश्वर आहे. ईश्वराने आपल्या हाती लगाम ठेवला आहे. अर्थात् जीवाच्या हाती नाही ठेवला. पेरणे हे आपल्या अधीन आहे. पिकणे हरिकृपा आहे. बी रोवणे, आपल्या हाती आहे पण बीज अंकुरणे, वृक्ष विकसणे, पल्लव-पुष्प-शाखा विस्तारणे, वृक्ष बनणे, त्यात फळाचे बीज सामावणे या तमाम क्रिया ईश्वराधीन आहेत. हे सारे काही आपण नाही करु शकत. नीती वा धर्माचे आचरण करावे की अनीती वा अधर्माचे आचरण करावे हे जीव ठरवेल. हे सारे जीवाच्या अधीन आहे. या सर्वांचा कर्ता जीव आहे. जीवाला हे स्वातंत्र्य आहे. ईश्वराने जीवाला हे जे स्वातंत्र्य दिलेले आहे याच्याच आधारे गीता सांगत आहे. आपली उन्नती स्वत:च करायला हवी. आपण आपली उन्नती करायला स्वतंत्र आहोत. दुसऱ्याची मदत घेणे वेगळी गोष्ट आहे. कुणाची मदत घेणे वा न घेणे आपल्या स्वाधीन असा विषय आहे. कुणावर श्रध्दा ठेवणे वा न ठेवणे, कुणाच्या संगतीत रहाणे वा टाळणे हे सर्वस्वी आपल्या स्वाधीन आहे. यासाठी आपण स्वतंत्र आहोत. ईश्वराने जीवाला स्वातंत्र्य दिले आहे असे जाणून घेऊन आपली उन्नती, उत्कर्ष व विकासाच्या दिशेने प्रयत्न करायला हवेत.

2) **आत्मानं न अवसादयेत्:** स्वत:ला अध:पतीत होऊ देऊ नये. शास्त्रात विधि-निषेध चर्चा आहे. 'खरे बोलावे 'ही झाली विधि. 'खोटे बोलू नये ' हा आहे निषेध. अशाप्रकारे दुहेरी वर्णन करुन वस्तुची ओळख करुन दिली जाते. अहिंसा म्हणजे कुणाची हिंसा करु नये. हा झाला मर्यादित अर्थ. यातून अहिंसेचा संपूर्ण अर्थ स्पष्ट होत नाही. 'सर्वाभूती प्रेम करा' असा अर्थ घेतला ना तर 'हिंसा न करणे आणि प्रेम करणे' असा दोन्ही मिळून अहिंसा शब्दाचा अर्थ पूर्णत: प्रकट होईल. काय करावे आणि काय करु नये या उभय गोष्टी सांगितल्यावर अर्थ स्पष्टपणे ध्यानी येतो. गीतेतल्या या श्लोकात हे असेच आले आहे. आपल्याला स्वत:च आपली उन्नती करायला हवी हे विधायक अंग समजावले आहे. स्वत:ला पतीत होऊ देऊ नये हे निषेधपर अंगही समजावले आहे. हे उन्नतीचे निषेधक अंग आहे. तेही समजावून दिले आहे. अशा प्रकारे व्याख्या परिपूर्ण झाली. योगारुढ व्हायचे असेल, योगी बनायचे असेल तर अवनतीच्या मार्गाचा त्याग करावा लागेल. उन्नतीची वाट धरायला लागेल.

3) **आत्मा एव आत्मन: बंधु:** आपण स्वत:च आपले बंधु आहोत म्हणजे आपण काही निश्चय केला आणि अमलात आणायचे ठरवले तर आपल्या विरुध्द जात नाही अर्थात् आपणच आपले शत्रु न बनता बंधु वा मित्र बनतो. धर्म आणि नीतीचे पालन आणि भगवंताची ओळख आणि भगवंताचा अनुभव केवळ नर देहातच शक्य आहे. नर देहात जर आपण केवळ भोगांच्याच मागे लागलो तर तो काही नर देहाचा सदुपयोग होणार नाही. यामुळे नर देह मिळाल्यावर जर आपण उन्नतीचा मार्ग पत्करला तर आपण आपले मित्र ठरु. आपण आपले मित्र रहात नाही याकामी मुख्य अडथळा असा असतो बुध्दी आणि मनात संघर्ष जारी असतो. धर्म काय आणि अधर्म काय, नीती काय आणि अनीती काय, योग्य काय आणि अयोग्य काय याला पारखण्याची बुध्दी ईश्वराने आपल्याला दिलेली आहे पण जे बुध्दीला योग्य वाटते, स्वीकार्य वाटते त्यावर अमल करणारे आहे मन. आपण जर आपले मन बुध्दीच्या अधीनस्थ होऊन चालायला हवे असा अभ्यास केला असेल तर बुध्दीचा निश्चय अमलात येईल. म्हणजे आपण आपले मित्र बनू शकू. बुध्दीचा निश्चय अमलात आणण्याची आपण सवय लावली असल्यामुळे मन सदैव बुध्दीच्या अधीन राहील आणि मग आपण आपले बंधु बनूनच राहू शकू.

4) चौथी गोष्ट आहे **आत्मा एव आत्मन: रिपु:** आपण जसे आपले मित्र आहोत तसे आपण आपले शत्रुही बनू शकतो. मन जर बुध्दीच्या अधीन रहात असेल तर आपण आपले मित्र मन जर बुध्दीच्या अधीन नसेल तर मग आपण आपले शत्रु ठरु.

: 6 :

*बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जित: ।*
*अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **येन:** ज्याने
- **आत्मा एव:** शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दीलाच
- **आत्मना जित:** स्वत: जिंकून घेतले आहे
- **तस्य आत्मन: आत्मा:** त्या पुरुषाचा आत्मा
- **बंधु:** बंधु आहे
- **तु अनात्मन:** पण ज्यांनी शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दीला जिंकले नाही
- **आत्मा एव:** ते स्वत:ही आपल्याशी, आपल्यासोबत
- **शत्रुवत् शत्रुत्वे:** शत्रुप्रमाणे शत्रुता करण्यात
- **वर्तेत:** तत्पर आहेत

**अर्थ**

ज्या जीवात्म्याने मन आणि इंद्रियांसह शरीर जिंकले, त्या जीवात्म्याचा तर तो स्वत:च मित्र आहे आणि ज्याने मन व इंद्रियांसह शरीर जिंकले नाही, त्या जीवात्म्याशी तो स्वत:च शत्रुप्रमाणे शत्रुता करण्यात तत्पर आहे.

*जिंकूनि घेतला आत्मा बंधु तो होय आपुला*
*सोडिला तो जरी स्वैर शत्रुत्व करितो स्वयें ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीवर ज्यांनी विजय संपादन केला आहे ते आपले बंधु आहेत. (2) पण ज्यांनी शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीवर विजय मिळवला नाही ते आपले स्वत:चेच शत्रु होत.

**स्पष्टीकरण**

(वरील श्लोकात सांगितले आहे की आपणच आपले बंधु आहोत यामुळे स्वत:च आपल्याला उन्नत करायला हवे. आपण जर स्वत:ला अध:पतीत करत असलो तर आपण आपले शत्रु ठरु पण यातूनही मित्र आणि शत्रु यातील व्याख्या स्पष्ट झाली नाही यामुळे ती या श्लोकात स्पष्ट करुन सांगितली गेली आहे.)

1) **येन आत्मा एव आत्मना जित: तस्य आत्मन: आत्मा बंधु:** ज्यांनी शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीवर विजय संपादन केला आहे आणि त्यांच्या अधीन रहात नाही ते आपले बंधु आहेत आणि आपले मित्र आहेत, आपले कल्याण करताहेत. शरीर, इंद्रिये, मन, बुध्दी आपल्यासाठी लोह चुंबकासारखे आहेत. ते आपल्याला त्यांच्याकडे ओढून नेतात. हे बघण्यासारखे आहे, हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे की आपण स्वत: ज्ञानस्वरुपी, चैतन्यस्वरुपी, नित्य आणि अविनाशी आहोत. शरीर, इंद्रिये, मन, बुध्दी हे याहून उलट आहेत. त्याना दुसऱ्या कुठल्या पदार्थाचे ज्ञान होत नाही. आपण आहोत तर त्यांचे अस्तित्व आहे. आपण नसलो तर त्याना कवडीचीही किंमत नाही. मरण आले की देहाला जाळावे लागते. शरीराची, इंद्रियांची, मनाची, बुध्दीची या सर्वांची क्रिया आपल्यावर अवलंबून असते. आपण लोहचुंबकासारखे आहोत. लोहचुंबकामुळे लोखंडात गती उत्पन्न होते. वस्तुस्थिती असल्यावरही आपण आपल्याला ओळखत नाहीत. आपण स्वत: दीन बनून जातो आणि शरीर, इंद्रिये, मन, बुध्दी यांच्या आहारी जातो. आपण यांच्या मागे वेड्यासारखे धावतो. यामुळे भगवान या श्लोकात सांगताहेत की शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीवर आपण विजय संपादन केला तर संघर्ष टळतो. बुध्दीच्या ठायी अविवेक आहे तर संघर्ष जारी रहातो पण विवेक जागला तर संघर्ष टळू शकतो.

**कठोपनिषदात सांगितले गेले आहे:**

*यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसा सदा ।*
*तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वाइव सारथे: ॥* (1/3/6)

अर्थात् ज्याप्रमाणे चांगले अश्व सारथ्याच्या अधीन असतात तसे जो सारथी विवेकयुक्त आणि मनाने शांत आहे, निर्विकार, संयमयुक्त रहातो, सर्व इंद्रियांवर ज्याचा ताबा आहे. याचे फळ कठोपनिषदाच्या पुढील श्लोकात सांगितले आहे :

*यस्तु विज्ञानवान् भवति समनस्क: सदा शुचि: ।*
*स तु तत्पदमाप्नोति यस्माद् भूयो न जायते ॥* (1/3/8)

अर्थात् जो सारथी विवेकी आणि समनस्क आहे म्हणजे ज्याचे मन निर्विकार, संयमी, शुध्द असते तो

परमात्म पदाला प्राप्त करुन घेतो. ते असे पद आहे जिथून कुणीही परत येत नाही.

2) **तु अनात्मनः आत्मा शत्रुवत् शत्रुत्वे वर्तेत:** पण जे अनात्मा बनून गेले आहेत अर्थात् देह, इंद्रिये, मन आणि बुध्दीच्या अधीन होऊन गेले आहेत त्यांचा आत्मा त्यांच्याशी शत्रुसारखा वागतो. आपण चैतन्यस्वरुपी आत्मा असतानासुध्दा अनात्मा बनून जातो. 'अनात्मा' शब्द भगवंताने सांगितलेला आहे. एखादा सिंह असूनही जर स्वत:ला गाय वा शेळी समजत असेल तर सिंह असूनही त्याच्या सिंह असण्याचा काहीही उपयोग नाही. तसेच आपण चैतन्यस्वरुपी असूनही जर जड बनून गेलो तर आपण आपले शत्रु बनून जातो.

: 7 :

***जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।***
***शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **जितात्मनः** ज्याने इंद्रियांवर विजय संपादन केला आहे, ज्याने आपल्या आत्म्याला स्वाधीन केले आहे त्या पुरुषाच्या (ज्ञानात)
- **प्रशान्तस्य:** ज्यांच्या अंत:करणाच्या वृत्ती पूर्णपणे शांत अर्थात् विकाररहित असतात म्हणजे जे पूर्ण शांत असतात (अशा पुरुषांना)
- **शीतोष्णसुखदुःखेषु:** शीत, उष्ण आणि सुख-दु:खात
- **तथा मानापमानयोः** मान आणि अपमानात
- **परमात्मा समाहितः** परमात्म्याचेच दर्शन होते

### अर्थ

शीत, उष्ण आणि सुख-दु:ख इत्यादी तसेच मान-अपमान यामध्ये ज्यांच्या अंत:करणाची वृत्ती पूर्णपणे शांत असते अशा स्वाधीन आत्मा असलेल्या पुरुषांच्या ज्ञानात सच्चिदानदंघन परमात्मा उत्तम प्रकारे अधिष्ठित असतो म्हणजेच त्यांच्या ज्ञानात परमात्म्याशिवाय दुसरे काही नसतेच.

***जितात्मा शांत जो झाला देखे ब्रह्म चि एकलें***
***मानापमानीं शीतोष्णीं सुख-दु:खीं समावलें ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) ज्यांनी आपल्या इंद्रियांवर विजय संपादन केला आणि (2) इंद्रिये स्वाधीन झाल्यामुळे ज्यांनी संपूर्ण शांतता प्राप्त करुन घेतली आहे अशा पुरुषांना (3) शीत-उष्ण, सुख-दु:ख, मान-अपमान यांच्या ठायी परमात्माच दिसू लागतो.

### स्पष्टीकरण

1) **जितात्मनः** इंद्रिय विजय प्राप्त झाल्यावर सर्वत्र हरीदर्शन होणे ही योगारुढ अवस्थेची अंतिम स्थिती आहे. या अंतिम स्थितीला प्राप्त करुन घेण्यासाठी दोन बाबी साधल्या जायला हव्यात. एक तर तमाम इंद्रियांना परिपूर्णपणे ताब्यात घ्यायला हवे. दुसऱ्या अध्यायातल्या स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णन करतानाही इंद्रिय निग्रह या विषयाची चर्चा आली आहे. इंद्रियानिग्रह हे स्थितप्रज्ञाचे मुख्य लक्षण आहे.

2) **प्रशान्तस्य:** पूर्ण शांती प्राप्त करुन घेण्याचा मुख्य आधार इंद्रियावर ताबा मिळविणे आहे. आपण जेवढ्या प्रमाणात इंद्रियाना ताब्यात ठेवू शकू तेवढ्या प्रमाणात आपल्या आयुष्यात शांततेचा जागर होईल. शंकराचार्यांनी हा मोठा अद्भुत विचार मांडला आहे. शांतता बाहेरुन आणायचा विषय नाही. जमीनीत पाणी लपलेले असते. विहीर खणल्यावर जमीनीच्या अंतकरणात असलेले पाणी प्रकट होते. जे आत असेल तेच मिळेल. आडातच नसेल तर पोहरात कोठून येणार? अशाच प्रकारे आपण आता शांत स्वरुप नाहीहोत आणि इंद्रिय निग्रह साधण्यावरच शांती लाभेल असे काही नाही आहे. खरे पाहू गेल्यास आपण शांत स्वरुपच आहोत. अर्थात् हे आपल्याला माहित नाही. गाढ झोपेत शांततेचा अनुभव होतो. गाढ झोपेत इंद्रियांचा व्यापार शांत असतो. क्वचित् इंद्रियांचे काही व्यवहारही चालत नसतात आणि हो, स्वप्नात मनाचे व्यापार मात्र सुरुच असतात. तरी पण बाकीची इंद्रिये शांत असतात. मनाच्या व्यापारामुळेच तर स्वप्नात आपल्याला अशांततेचा अनुभव येतो. जागृत अवस्थेत असताना मनाच्या व्यापारा सोबतच इंद्रियांचा व्यापार सुरु असतो. व्यवहार सुरुच असतो. आपण त्यात फसून जातो. इंद्रिय व्यापार संपूर्णपणे ताब्यात नसतो. यामुळे आपण शांत स्वरुपाचे दिसत असतो खरे पण तरी आपल्याला शांततेचा अनुभव लाभत नाही पण ज्यांनी इंद्रियांवर संपूर्णपणे ताबा मिळवला आहे. त्यांना मात्र अखंड शांततेचा अनुभव संपूर्ण जीवनभर लाभतो.

3) **शीतोष्णसुख-दु:खेषु तथा मानापमानयो:** ज्यांनी इंद्रिय व्यापारांवर विजय मिळविला त्यांना पूर्ण शांतता लाभली. त्यांना शीत काय आणि उष्ण काय, मान काय आणि अपमान काय, सुख काय आणि दु:ख काय? सर्वत्र एकमेव ईश्वर तत्वाचेच दर्शन घडते. ज्याला आतून संपूर्णपणे शांततेचा अनुभव मिळाला त्याला परमात्म स्वरुपाचे ज्ञान झाले असे समजावे. इंद्रियांवर ताबा मिळवता आला नाही म्हणजे शांततेचा भंग होतो. विश्वात भेद बुध्दी बाळगली म्हणजे शांती भंग होते. एकीकडे इंद्रियांवर ताबा मिळविणे जसे आवश्यक आहे. तसेच जगातली विषमताही संपवावी लागणार आहे. आपण सगळ्यांहून वेगळे आणि सगळे आपल्याहून वेगळे असा वेगळेपणाचा अनुभव दिवस रात्र होतच असतो. आत्म स्वरुपाची ओळख पटली की मग विषमता संपून जाते. अभेद दृष्टीचा अनुभव यायला लागतो. तसे तर विषमतेचा अनुभव आपल्याला बाहेरुन नित्य येतच राहतो. कारण निसर्गात दिसणारे नाना प्रकारचे भेद काही आपण निमिर्लेले नाहीहेत. शरीराला तरी कुठे आपण निर्माण केले? यामुळे बाहेरुन आपण भेदांना म्हणजे वेगळेपणाला संपवू शकत नाही. ते संपवायची तशी गरज नाही पण मनात उद्भवणारी भेद दृष्टी मात्र राग, द्वेष, मान, अपमान या सारखी द्वंद्वे उभी करते. यामुळेच तर दु:खाचा अनुभव येतो.

काम, क्रोध यासारखे विकार काय? आणि मान, अपमान या सारख्या भावना काय? हे सारे मानसिक विकार आहेत, हे विकार काही केवळ देहजन्य त्रासामुळेच उत्पन्न होतात असे नव्हे. या विकारांचा देहाशी काही सरळ-सरळ संबंध नसतो. याउलट त्यांचा सरळ-सरळ संबंध मनाशी असतो, पण शीत आणि उष्ण हा संबंध देहाशी असतो. आतून परमात्म तत्वाचा अनुभव व्हायला लागला ना तर मग शीत-उष्ण हा अनुभव परमात्म्याचाच अनुभव आहे असे वाटायला लागते. अशी प्रतीती येते. तमाम अनुभवांच्या ठायी परमात्माच वसलेला दिसू लागतो. अशाच प्रकारे मान आणि अपमानाच्या ठायीही परमात्म दृष्टीच असते. अशा पुरुषाच्या मान-सन्मानप्रसंगीही परमेश्वराचीच आठवण रहाते. आतून तर अशा पुरुषाचा ईश्वराशीच संबंध असतो. अपमान झाला तरी स्मरण त्याच जगन्नियंत्याचे. मान असो वा अपमान असा पुरुष या दोन्ही स्तुती वा घटना-प्रसंगांकडे ईश्वर रुपातच बघतो. याचा अर्थ निंदा स्तुती वा मान-अपमानाची तीव्रता जाणवणारच नाही, असे नाही. या पुरुषाचे आत्मपरीक्षण तीव्र असल्यामुळे बाह्य दृष्टीने मान आणि अपमानाची नेमकी योग्य ती किंमत त्याला जोखता येईल. त्याची यथार्थता व अयथार्थता तो नेमकेपणाने समजू शकेल. ग्रहण करण्यायोग्य अंशाला वा भागाला ग्रहण करु शकेल. सन्मान प्रसंगी तर स्वत:ला अलिप्त ठेवेल पण अपमानाच्या नेमक्या कारणांचाही शोध घेईल, त्या बाबतीत विचार करील. आपली काही चूक झाल्याचे कळले तर त्याची जाणीव करुन घेईल. चूक मान्य करील. झाली चूक पुन्हा न करण्याकामी दक्ष राहील. परमात्म दृष्टी साधून असा पुरुष जगत आहे म्हणजे तो काही जड बनून गेला असे नव्हे. परमात्म दृष्टीने जगण्याचा अर्थ महाजागृतीत जगणे होय. अखंड अतंद्र अवस्थेचा अनुभव घेणे होय. अतिजागृत अवस्थेत कुणी अपमान केला तरी त्याला दु:ख होणार नाही पण परीक्षण करुन घेऊन आपली झाली चूक त्वरित सुधारुन घेईल. सन्मानाचा त्याच्या चित्तावर काही परिणाम होणार नाही. तशाच प्रकारे शीत-ऊष्णाच्या ठायी परमात्म तत्वाला बघायचा अर्थ शरीराच्या बाबतीत तो बेफिकीर राहिल असे नव्हे. शरीराला तो साधन मानून चालेल. थंडीत तो गरम वस्त्रे पांघरील आणि उन्हाळ्यात गार पाण्याचा उपयोग करुन घेईल. देहाला सेवेचे साधन मानेल. देहाची काळजी वाहील. सुख दु:ख मान-अपमान या तत्वात तमाम द्वंद्वांमध्ये म्हणजे भेदांच्या ठायी सदैव अभेद भावना जोपासेल. याचा अर्थ असा की परमात्मतत्वाचे दर्शन करील.

ज्ञानोबा लिहितात - "आपल्या अंत:करणावर विजय संपादन करुन आणि सर्व कामना निवल्यावर त्या व्यक्तीसाठी परमेश्वर त्या पार वा लांब रहात नसतो. सुवर्णातून अशुध्द धातू काढून घेतल्यावर ज्याप्रमाणे शुध्द सुवर्ण उरते तशाच प्रकारे अहंकार वगैरे संकल्प दूर झाले म्हणजे जीव स्वयं ब्रह्म स्वरुपी बनून जातो, घट फुटल्यावर घटातल्या आकाशाला बाहेरच्या आकाशाशी एकरुप होण्यासाठी जसे कुठे जावे लागत नाही तसेच ज्याचा मिथ्या देहाभिमान मूळापासून दूर झाला तो परमात्म्याशी एकरुप होतो. ज्याप्रमाणे ढगातून बरसणारी जलधारा सागराला कदापि त्रासदायक ठरत नाही तद्वतच शुभ वा अशुभ संयोग योगीजनासाठी उपद्रवकारी ठरत नाही."

: 8 :

***ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः।***
***युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ज्ञानविज्ञानतृप्तात्माः** आत्म्याच्या विषयात ज्ञान आणि विज्ञान यात जे तृप्त आहेत
- **कूटस्थः** जे अविचल आहेत, स्थिर आहेत
- **विजितेन्द्रियः** ज्यांनी इंद्रियांना जिंकून घेतले आहे
- **समलोष्टाश्मकांचनः** माती, दगड आणि सोने ज्यांना समान आहे
- **योगी युक्तः इति उच्यतेः** असे योगी युक्त म्हणजे ईश्वर परायण आहेत असे म्हटले जाते

**अर्थ**

ज्याचे अंत:करण ज्ञान-विज्ञानाने तृप्त झाले आहे, ज्याची स्थिती निर्विकार आहे, ज्याने इंद्रिये पूर्णपणे जिंकली आहेत आणि ज्याला माती, दगड आणि सोने समान आहे, तो योगी युक्त म्हणजे भगवंताला प्राप्त झालेला आहे असे म्हटले जाते.

***तोषला ज्ञान – विज्ञानें स्थिर जिंकूनि इंद्रियें***
***तो योगी सम जो देखे सोनें पाषाण मृत्तिका।***

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. (1) परमात्म ज्ञान प्राप्त करुन ज्यानी त्याचा अनुभव घेतला आहे. (2) जे अविचल आणि स्थिर आहेत. (3) ज्यानी आपल्या इंद्रियावर विजय संपादन केला आहे. (4) त्यांच्यासाठी दगड, माती, सोने सारे समान आहेत. (5) अशा योगी जनाना युक्त म्हणजे परमात्म परायण असे म्हणतात.

**स्पष्टीकरण**

1) **ज्ञानविज्ञानतृप्तात्माः** ज्ञान आणि विज्ञानाने तृप्त जन. याचा अर्थ जाणून घ्यायला हवा. ज्ञान व विज्ञान या संज्ञा जाणून घ्यायला हव्यात. शंकराचार्य म्हणतात:

***ज्ञानं शास्त्रोक्तपदार्थानां परिज्ञानं विज्ञानं तु शास्त्रतः***
***ज्ञातानां तथैव स्वानुभवकरणम्***

अर्थात् शास्त्रात वर्णित तमाम विषयाचे चौफेर ज्ञान संपादन करुन घेणे हे ज्ञान. शास्त्रीय विधानांचा शास्त्रानुसार अनुभव प्राप्त करुन घेणे हे विज्ञान होय.

ज्ञान नाना प्रकारचे असते. शाळा-महाविद्यालयांमधून नाना विषयांचे ज्ञान मिळते. त्याचे उद्दिष्ट पंडित बनण्याचे असते. विविध शास्त्र विषयाचे विद्वत्तापूर्ण ज्ञान प्राप्त करुन घेणे असते. जीवन सुखी बनवणे एवढेच असते. त्यात काही आत्मज्ञानाची दृष्टी नसते. सध्या आपण ज्या ज्ञान शब्दाचा विचार करतोहोत त्याचा संदर्भ परमात्मविषयक ज्ञानाशी आहे. परमात्म्याच्या ओळखीशी हा संदर्भ निगडित आहे. ज्यांच्या मनी परमात्मविषयक जाणून घेण्याची जिज्ञासा असते ते शास्त्रनिरुपित ज्ञानाला आधी समजून घेतात. घेतलेल्या ज्ञानाचा अनुभव घेतात.

तृप्तीचा अर्थ सांगताना शंकराचार्य लिहितातः **तृप्तः संजातालंप्रत्ययः।** ज्ञान आणि विज्ञान हवे. याचा अर्थ परमात्म्याचे ज्ञान हवे आणि परमात्मतत्वाचा अनुभवही हवा. दोघामुळे कमालीची शांतता मिळते आणि आनंदाचा लाभ होतो. यामुळे एक प्रकारचा **'अलं प्रत्यय'** मिळतो. सर्व प्रकारच्या चीजवस्तुंच्या संदर्भात' बस, एवढे पुरे, आता हे सारे नको. 'असा प्रत्यय येतो. तमाम ज्ञान संदर्भाच्या बाबतही असा अनुभव येतो. एक तृप्तीचा अनुभव येतो. अति मिष्टान्नाचे भोजन घेतल्यावर अशी तृप्ती लाभते.' आता पुरे बुवा' असा अनुभव येतो तसे काहीसे परमेश्वरी ज्ञान आणि अनुभवामुळे वस्तु व ज्ञानाचा-तथाकथित ज्ञानाचा एक प्रकारे वीट येतो. परमात्म्याचा अनुभव घेतल्यावर आकंठ तृप्ती लाभते. मग अन्य वस्तुंमध्ये कुठल्याही प्रकारचा रस उरत नाही.

2) **कूटस्थः** जो अविचल झाला. अगदी स्थिर झाला. परमतत्वाच्या अनुभवामुळे शांतता लाभली. आनंद मिळाला. तृप्ती प्राप्त झाली. त्याच्या मनाचे चांचल्य जाते. स्थिरता लाभते. चित्त स्थिरावते.

3) **विजितेन्द्रियः** इंद्रियावर काबू मिळवण्याची चर्चा खूपदा आली आहे. यापुढेही येत राहील. मनात चांचल्य असेल तर इंद्रियावर काबू नाही मिळवता येणार. मनाची अस्थिरता नाही दूर होणार. याप्रकारे दोघे एकमेकावर अवलंबित आहेत.

4) चौथी गोष्ट अशी की **समलोष्टाश्मकांचनः** मातीचे ढेकूळ, दगड आणि सोने सारखेच. माती आणि

दगडाला समान मानणे फार काही अवघड नाही. सोने तर मूल्यवान आहे ना? सुवर्णालाही माती आणि दगड मानणे काही सोपे नाही. रामकृष्ण परमहंस नेहमी म्हणत असत की ज्याने कंचन आणि कामिनीवर विजय संपादन केला त्याने जग जिंकले असे समजावे. खरे तर माणूस या दोघामध्ये गुंतून पडतो. यामुळे ही आसक्ती सोडायला हवी. आसक्तीचा त्याग केल्यावर पैश्याशी गरजे इतकाच संबंध उरतो. परमात्म विषयक आसक्ती जागल्यावर ही अशी अलिप्तता साधते. भक्ती प्राप्त झाल्यावर ही अशी अलिप्तता साधते.

5) **योगी युक्तः इति उच्यते:** तो योगी पुरुष 'युक्त' म्हणजे ईश्वर परायण होतो. ईश्वररुप होतो. असे समजावे. ईश्वरपरायण म्हणजे समबुध्दी. समबुध्दी म्हणजे पराकाष्ठेची साम्यबुध्दी. याप्रकारे 'युक्त' शब्दाचे दोन अर्थ संभवतात - एक ईश्वरपरायण होणे, ईश्वररुप होणे. दोन - साम्यावस्थेच्या पराकाष्ठेला पोहोचणे.

: 9 :

***सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु।***
***साधुष्वपि च पापेषु समबुध्दिर्विशिष्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सुहृत्:** प्रत्युपकाराची अपेक्षा न राखणारा, स्वार्थ रहितपणे सर्वांचे हित करणारा
- **मित्र:** स्नेही
- **अरि:** शत्रु
- **उदासीन:** तटस्थ
- **मध्यस्थ:** दोन्ही पक्षांचे कल्याण चाहणारा
- **द्वेष्य:** आपल्याला अप्रिय वाटणारा
- **बंधुषु:** बंधु-बांधव
- **साधुषु:** साधु जनात
- **अपि च पापेषु:** आणि पातकी जनांमध्ये
- **समबुध्दि:** जो समबुध्दी राखतो
- **विशिष्यते:** तो सर्व योगीजनांमध्ये श्रेष्ठ आहे

**अर्थ**

सुहृद (स्वार्थ रहितपणे सर्वांचे हित करणारा), मित्र, शत्रु, उदासीन (पक्षपात रहित), मध्यस्थ (दोन्ही बाजुंचे कल्याण चाहणारा), द्वेष करण्याजोगा, बांधव, सज्जन आणि पापी या सर्वांविषयी समान भाव ठेवणारा अत्यंत श्रेष्ठ आहे.

***शत्रु मित्र उदासीन मध्यस्थ परका सखा***
***असो साधु असो पापी सम पाहे विशेष तो।***

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली आहे की सर्वाच्या ठायी म्हणजे सर्वाशी वर्तन-व्यवहार करताना ज्या पुरुषाच्या हृदयात साम्यावस्थेची पराकाष्ठा दिसून येते तो योगीजनांमध्ये श्रेष्ठ मानावा.

**स्पष्टीकरण**

साम्यावस्थेची पराकाष्ठा म्हणजे काय? हा विषय थोडा अवघड आहे. यासाठी सर्वांच्या ठायी समबुध्दीने वागणारा योगीजनामध्ये श्रेष्ठ असतो असे विवेचन आले आहे. नुकतेच मागील श्लोकात आपण बघितले की दगड, माती आणि सुवर्ण यांच्या ठायी समबुध्दी बाळगणारा युक्त म्हणावा. याचा अर्थ तो ईश्वरपरायण असतो. साम्यावस्थेच्या पराकाष्ठेला पोहोचलेला योगी असतो. इथे साम्यावस्थेच्या पराकाष्ठेची व्यापकता दर्शवलेली आहे. नऊ प्रकारच्या पुरुषांचा उल्लेख करुन या सर्वापेक्षा समदृष्टी संपन्न योगीजनाला श्रेष्ठ मानले गेले आहे.

1) **सुहृत्:** कुणावर आपण उपकार केले असतील, कुणाची सेवा केली असेल तर त्याबद्दल त्यानेही आपल्यावर उपकार करावे वा सेवा करावी अशा प्रकारची अपेक्षा न राखणाऱ्याला सुहृद असे म्हणतात. आई - बाबा लेकराची सेवा करतात. ती काही सर्वथा निरपेक्ष आहे असे म्हणता येत नाही. त्या सेवेत काही ना काही अपेक्षा असते. म्हातारपणी आई - बाबांनी लेकरांकडून सेवेची अपेक्षा धरणे, उदरनिर्वाहाची आशा बाळगणे, चांगल्या व्यवहाराची आस धरणे हे स्वाभाविकच आहे. अशाप्रकारे मोबदल्याची अपेक्षा राखणाऱ्यांना काही सुहृद म्हणता येत नाही. कुठल्याही प्रकारे परोपकाराची अपेक्षा न राखता जो परोपकार करतो त्याला सुहृद म्हणता येईल.

2) **मित्र:** स्नेही, मित्र म्हणजे निष्कामभावनेने प्रेम करणारे. कुटुंबात नवरा-बायकोत, पुत्र-पित्यात, माय-लेकरात प्रेमभावना वसते. त्यांच्या ठायी राग-द्वेषाचाही संबंध असतो. आई किंवा बाबा मुलावर प्रेम करतात. मुलगा त्यांच्या मनासारखे वागत नाही तर त्यांना राग येतो.

नाराजी वाढते. मित्र मात्र परस्पर केवळ प्रेमाचीच भाषा जाणतात. प्रेम भावनेनेच वागतात. कुठल्याही प्रकारची अपेक्षा न राखता जो विशुध्द प्रेम करतो त्याला मित्र म्हणावे. सुहृद ही त्यापुढली पायरी.

3) **अरि:** अरी म्हणजे शत्रु. शत्रु म्हणजे नेहमी द्वेष करणारा. नुकसान करणारा.

4) **उदासीन:** उदासीन म्हणजे तटस्थ. कुणाचाही पक्ष न घेणारा. दोन पक्षात जेव्हा मतभेद होतात. तंटे-बखेडे उभे राहतात आणि समेट करायची वेळ येते तेव्हा तटस्थ व्यक्तीची नेमणूक केली जाते. न्यायाधीश तटस्थ असतो. तो कुणाचाही पक्ष घेत नाही. तराजूच्या पारड्यात कुठलीही वस्तु टाकली तर तराजू नेमके तोलुन देईल तसेच उदासीन तटस्थजन असतात.

5) **मध्यस्थ:** मध्यस्थ उभय पक्षांचे कल्याण चाहतो. मध्यस्थ कुठल्याही पक्षाचा नसतो. कुणालाही झुकते माप न देता दोघाच्या कल्याणाची काळजी वहाणाऱ्या पुरुषाला मध्यस्थ असे म्हणतात. उदासीनच्या पुढची पायरी मध्यस्थ.

6) **द्वेष्य:** द्वेष्य म्हणजे अप्रिय. प्रिय आणि अप्रिय जगात चालतच रहातात. वस्तुदेखिल प्रिय आणि अप्रिय असतात. एकाला प्रिय वाटणारी वस्तु वा गोष्ट दुसऱ्याला प्रिय वाटेलच असे नाही.

7) **बंधु:** बंधु म्हणजे नातलग, आप्तजन. यात काही नजिकचे असतात तर काही लांबचे असतात.

8) **साधु:** साधु म्हणजे सज्जन वा संत. अशा प्रकारे साधु शब्दाचे दोन अर्थ प्रचलित आहेत. साधु म्हणजे पुण्य कर्मे करणारा, धर्मनिष्ठ आणि सज्जन.

9) **पापेषु:** पापेषु म्हणजे पापी, पापकर्मी, मूढ.

असे सामान्यपणे नऊ प्रकारचे लोक असतात - सुहृद, मित्र, शत्रु, तटस्थ, मध्यस्थ, अप्रिय, नातलग, सज्जन आणि पापी. या सर्वांबाबत जो **समबुध्दि: विशिष्यते** म्हणजे समदृष्टी बाळगतो म्हणजे समान भावनेने वागतो तो योगी होय. तो श्रेष्ठ योगी होय. विनोबा म्हणतात की साधु आणि पापी या दोघांना समान मानून व्यवहार करणे ही समत्वाची पराकाष्ठा होय. साधुच्या ठायी संतभाव वसतो, पाप्याच्या ठायी पातक वसते. पापी पुरुषाला पापापासून वेगळे करायला हवे. पापाबद्दल तिटकारा असावा. पापाशी संपूर्णपणे असहकार करावा. पाप्याशी मात्र समभावनेने वागावे. समत्वाने वर्तावे. साधु आणि पापी जन आजारी पडले तर दोघाची सेवा - सुश्रुषा समभावनेने करायला हवी. अशी समता उपजायला हवी. अर्थात् अशी स्थिती प्राप्त करुन घेणे खूप कठिण आहे. हे सोपे नाही. यामुळे तर पापी-पातकी जनाशीही पुण्यवानाप्रमाणे समतेचा व्यवहार करणारे श्रेष्ठ जन होत. योगीजनांमध्येही श्रेष्ठ जन होत.

: 10 :

*योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थित: ।*
*एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगी:** योगी
- **रहसि स्थित:** एकांतात स्थित होऊन
- **एकाकी:** एकट्यानेच
- **यतचित्तात्मा:** चित्त आणि देह--इंद्रिये काबूत राखून
- **निराशी:** आशारहित
- **अपरिग्रह:** अपरिग्रही बनून
- **आत्मानं सततं युंजीत:** स्वत:ला सतत परमात्म्याशी जोडून ठेवावे

**अर्थ**

मन आणि इंद्रियासह शरीर ताब्यात ठेवणाऱ्या, निरीच्छ आणि संग्रह न करणाऱ्या योग्याने एकट्यानेच एकांतात बसून आत्म्याला नेहमी परमात्म्यात लावावे.

*साधकें चित्त बांधूनि इच्छा संग्रह सोडुनी*
*आत्म्यास नित्य जोडावें एकांती एकलेपणें।*

**विषय:** या श्लोकात सात गोष्टी आहेत (1) योगी म्हणजे साधक. योगी म्हणजे मुमुक्षु. ज्याच्या ठायी ध्यानाभ्यासाची इच्छा असते तो योगी. (2) त्याला ध्यानासाठी एकांतात काही काळ रहावे लागते. (3) तिथे एकट्यानेच रहावे लागेल. (4) चित्त, देह, इंद्रियांना काबूत घ्यावे लागते. (5) आशा, इच्छा, वासनारहित व्हावे लागते. (6) परिग्रहरहित रहावे लागते. (7) स्वत:ला नित्य परमात्मतत्वासाठी जोडून घ्यावे लागते.

**स्पष्टीकरण**

1) **योगी:** योग्याला ध्यानयोगाचा अभ्यास करावा लागतो. 'योगी' शब्द महत्वाचा आहे. वाटेल त्याला ईश्वराचे ध्यान नाही धरता येत. ध्यानासाठी पूर्वतयारी हवी. यासाठी 'योगी' शब्द आहे. ध्यानासाठी ब्रह्मचर्य आवश्यक आहे. याचा उल्लेख चौदाव्या श्लोकात येईल. पतंजलिच्या योगशास्त्रात ध्यानाची प्रक्रिया येते.

विनोबांच्या शब्दात ध्यान एक मानसिक विकर्म आहे. चित्तशुध्दीचे एक साधन आहे. भक्ती वगैरेमुळे चित्तशुध्दी साधते. चित्तशुध्दीच्या अनेक साधनापैकी एक साधन भक्ती होय. एक साधन ध्यानधारणा होय. ध्यान आसनमांडी ठोकून करायचे एक साधन आहे. भक्ती म्हणजे उपासना बसूनही करता येईल. भक्ती एवढी व्यापक आहे की उठता-बसता, खाता-पिता, हिरता-फिरता, सर्व कामे करत असतानाही करता येऊ शकेल. ध्यान डोळे मिटून एकांतात करायचे साधन आहे. योगीच ध्यान करु शकतात. यामुळे त्याला ध्यानयोगाचा जिज्ञासू व्हायला हवे.

2) **रहसि स्थित:** योग्याला एकांतात बसायला हवे. एकांत म्हणजे काही अरण्यात जाऊन रहाणे नाही. आठ तास ध्यान करायची ज्याची इच्छा आणि सामर्थ्य असेल त्याने जंगलात कुटी बांधून रहायला हवे. अर्धा तास वा एक तासभर ज्यांना ध्यान करायचे आहे त्यांनी एकांतवेळी ध्यान करायला हवे. एकांताची वेळ रात्री सर्वाच्या झोपेनंतर वा प्रात:काळी सारे झोपले असतील तेव्हा लाभू शकते. रात्री ध्यान केल्यावर झोपेची शक्यता असते. यामुळे पहाटे तीन वा चार वाजता उठून ध्यान करायला हवे.

3) **एकाकी:** एकटे असायला हवे. पहाटेच्या वेळी सारे झोपेत असतात. त्यासमयी आपण एकटेच असतो. एकटे असलो की एकाग्रता वाढते. दुसरा असला की त्याच्या असण्यामुळे त्याच्या अस्तित्वाचे भान जागते. परमेश्वराचे ध्यान करत असताना चित्तावर कुठल्याही प्रकारचा दबाव पडणार नाही, हे बघणे गरजेचे आहे. परम तत्व काही स्थूल नाही. या तत्वाचे चित्तात वसणे म्हणूनच सोपे नाही. चित्ताच्या ठायी जोवर स्थूल वस्तुबाबत आकर्षण असते तोवर चित्तात एकाग्रता साधणार नाही. चित्त परमात्म्याकडे आकृष्ट होणार नाही. चित्तात परमात्म्याबाबत आकर्षण राहील - जागेल - तेव्हाच ध्यानधारणा असू शकेल.

4) **यतचित्तात्मा:** देह आणि चित्ताला संयमात ठेवावे लागेल. इथे चित्त शब्दाचा अर्थ मन असून आत्मा शब्दाचा अर्थ देह वा काया आहे. देहासोबत इंद्रियेही आलीत. यामुळे देह, इंद्रिय समूह आणि चित्त यावर संयम जोवर साधता येत नाही तोवर ध्यानात विक्षेप जागेल - अडथळे येतील. चित्त हे देह आणि इंद्रियांकडे झुकेल. इंद्रियांच्या माध्यमातून विषयाकडे ओढले जाईल. विषयांशी संबंध टाळता यायला हवा. संयमपूर्वक वागायला हवे. अन्यथा विषयाधीन रहावे लागेल. जोवर विषयाधीनता असेल तोवर परमात्म्याचे ध्यान करता येणार नाही. देहालाही थोडे कष्ट झेलण्याची सवय लावायला हवी. यामुळे ध्यान धारणेसाठी - पूर्वतयारी म्हणून - देह आणि इंदियसमूहांचा निग्रह साधला जायला हवा. चित्तावर नियंत्रण तर ठेवावेच लागेल कारण की चित्ताच्याच माध्यमातून ध्यानधारणा करता येते.

5) **निराशी:** आशारहित व्हायला हवे. आकांक्षा फायद्याची खरी पण ती हानीकारकही असू शकते. आधी हानीकारक इच्छेचा त्याग करायची भूमिका घ्यायला हवी. त्यासाठी शुभेच्छा - शुभाकांक्षा यांचा अभ्यास करायला हवा. संत संगतीची नित्य आकांक्षा मनी बाळगायला हवी. गीता, ब्रह्मसूत्र यासारख्या शास्त्रांच्या स्वाध्यायाची भावना मनात वसायला हवी. यामुळे हानिकारक गोष्टी मनातून हद्दपार होतील. चांगल्या अपेक्षा, इच्छा, आकांक्षा यांच्यावरही टाच आणावी लागेल. यानाही मनातून घालवावे लागेल. चांगली इच्छा म्हणजे सत्संगती - संतसमागम यासारख्या इच्छेबाबतही जर आसक्ती जागली तर तीही दु:खदायी ठरु शकते. यामुळे जेव्हा चांगल्या इच्छेचीही आसक्ती गळून पडेल तेव्हा चित्त आशारहित - निराकांक्ष बनू शकेल. अशाप्रकारे ध्यानासाठी निराकांक्ष चित्ताचे धनी व्हावे लागेल.

6) **अपरिग्रह:** परिग्रहाचा अभाव असावा - अपरिग्रह जागावा. तसे तर देहविषयकही परिग्रह जागतो पण त्याचा का कुणी त्याग करु शकतो? पण जेव्हा देहासक्ती उत्पन्न होईल त्यावेळी देहभोगाच्या पूर्ततेसाठी वैभवाची इच्छा उत्पन्न होईल. परिग्रह वृत्ती उपजेल. परिग्रहातच जर सुखाची कल्पना करुन घेतली ना तर मग सुखासाठी परिग्रह वाढवण्याच्या दिशेने प्रयत्न चालत रहातील पण सुख बाह्य परिग्रहात नाही हे कळल्यावर मात्र परिग्रहाच्या त्यागातून

सुख लाभते. देहाप्रती जेव्हा अनासक्त भाव उत्पन्न होतो तेव्हा अपरिग्रहात सुखाचा अनुभव प्राप्त होतो. एका स्थानावर बसून ईश्वराचे ध्यान करावे लागते. परिग्रहामुळे चित्त एकाग्र होण्यात बाधा उपजते. अडचण निर्माण होते. यामुळे एकांत स्थळी जेव्हा ध्यानधारणा करायला बसत असू तिथे जर परिग्रह असेल तर चित्त एकाग्र होणार नाही. यामुळे जिथे ध्यान करणार असू तिथे कमीत कमी परिग्रह असावा. अरण्यात कुटी बांधून कुणी राहत असेल आणि तिथे नजिकच परिग्रह असेल तर चोरीची शक्यता असेल. परिग्रहाचे रक्षण हा काळजीचा मुद्दा असेल. यामुळे ध्यानात विक्षेप जागेल. यामुळे कमीत-कमी परिगह असावा असे ध्येय-असे लक्ष्य असायला हवे.

7) **आत्मानं सततं युंजीत:** स्वत:ला सतत परमात्म्याशी जोडायला हवे. आपले स्वरुप काय याविषयी जेव्हा आपण विचार करु लागतो तेव्हा आपले स्वरुप परमात्मा असून तो देहात वसतो या निर्णयावर आपण पोहोचतो. तसे तर परमात्म तत्व सर्वत्र व्याप्त आहे. जीवसृष्टीच्या ठायी परमात्मा प्रकट रुपात नांदतो. बाकी जड सृष्टीत अप्रकट रुपात नांदतो. परमात्म्याची ओळख करुन घेण्यासाठी भक्तीसारखे आंतरिक उपाय आहेत. काही बाह्य उपायही आहेत. ध्यान यापैकीच एक उपाय मानावा.

: 11-12 :

*शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मन: ।*
*नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥*
*तत्रैकाग्रं मन: कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रिय: ।*
*उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुध्दये ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **शुचौ देशे आत्मन:** पवित्र स्थानी आपल्यासाठी
- **आसनं न अत्युच्छ्रितं:** आसन खूप उंचावर नसावे
- **न अतिनीचं:** आसन खूप खालीही नसावे
- **चैलाजिन कुशोत्तरं:** ज्या आसनाखाली दर्भ पसरवलेले असतील, त्यावर हरिण वा वाघाचे कातडे पसरवलेले असेल आणि त्यावर एक धुतलेले वस्त्र असेल
- **स्थिरं प्रतिष्ठाप्य:** अशा आसनाची स्थिर अशी स्थापना करुन
- **तत्र आसने उपविश्य:** त्या आसनावर बसून
- **यतचित्तेन्द्रियक्रिय:** चित्त आणि इंद्रियांच्या व्यवहारांना ताब्यात राखून
- **मन: एकाग्रं कृत्वा:** मनाला एकाग्र करुन
- **आत्मविशुध्दये:** चित्तशुध्दीसाठी
- **योगं युंज्यात्:** ध्यानाची साधना करायला हवी

### अर्थ

शुध्द म्हणजे पवित्र जमीनीवर क्रमाने दर्भ, मृगाजीन आणि धुतलेले वस्त्र अंथरुन तयार केलेले, जे फार उंच नाही आणि फार सखल नाही, असे आपले आसन स्थिर मांडून त्या आसनावर बसून चित्त व इंद्रियाच्या क्रिया ताब्यात ठेऊन मन एकाग्र करुन अंत:करणाच्या शुध्दीसाठी योगाभ्यास करावा.

***पवित्र स्थान पाहूनि घालावें स्थिर आसन***
***दर्भ चर्म वरी वस्त्र न घ्यावें उंच नीच तें।***
***चित्तेंद्रियांचे व्यापार वारावे तेथ बैसुनी***
***आत्म-शुध्द्यर्थ जोडावा योग एकाग्र मानसें।***

**विषय:** या दोन श्लोकामध्ये पाच गोष्टी आल्या आहेत (1) ध्यानासाठी पवित्र स्थान असावे. (2) यासाठीचे स्थान उंच नसावे न खूप खाली असावे. त्यावर दर्भ पसरवावे वर व्याघ्रचर्म वा मृगचर्म घालावे. त्यावर एक मऊ सूत धुतलेले कापड अंथरावे. आसन स्थिर करावे. त्यावर बसावे. (3) चित्त आणि इंद्रियांच्या व्यापाराना ताब्यात ठेवावे. (4) मनाला एकाग्र करावे. (5) चित्त शुध्दीची दृष्टी राखावी. परमात्म्याचे ध्यान करायचा प्रयत्न करावा.

### स्पष्टीकरण

1) **शुचौ देशे:** स्थान पवित्र असावे. ज्ञानेश्वर महाराज ध्यानयोगी होते. त्यांनी समाधी अवस्थेचा अनुभव घेतला होता. या अवस्थेतच त्यानी देह त्याग केला. पवित्र स्थानविषयी ज्ञानोबा लिहितात की इथून आता हलूच नये असे वाटावे अशा स्थानाला पवित्र स्थान असे म्हणतात. तिथल्या दृश्यामुळे वैराग्य दुप्पट व्हावे. तिथे जर संतांचा वास झाला असेल तर संतोष लाभतो. धैर्याची मदत होते. अशा ठिकाणी पाखंडी व्यक्तीचे अंत:करणही तपाचरण करायला प्रवृत्त होईल. असे स्थान पवित्र असते. तिथे जनांचा पदरव नसतो. येणे-जाणे नसते. मोठमोठाले सघन

वृक्ष असतात. झरे वहातात. गलबला नसतो. पक्ष्यांचे विचरण नसते. तिथे कोकिळ कधी येऊन बसत असेल तर हरकत नसावी. मोरांचे वावरणेही चालू शकेल. तिथे शिवाचे देवालय वा मठ असला तर बरे. तिथे मन स्थिर होऊ शकेल वा नाही, हेही बघितले जायला हवे.

पण ज्याना कार्यरत असताना, सेवाकार्य बजावत असताना एखाद तास ध्यान करायची इच्छा आहे त्यानी आपल्या घरात एखादी एकांत जागा, कुठे ओटा-ओसरी वा मग घरापासून थोड्या अंतरावरची एखादी जागा वा स्थान अवश्य निवडावे. तिथे ध्यान करता येईल. स्थान पवित्र असेल तर मनाच्या एकाग्रतेसाठी तिथल्या पावित्र्याचा परिणाम होतो, लाभ होतो. स्थानासोबतही काही भावना संलग्न असतात. महात्मा गांधीजी रात्रंदिवस ज्या स्थानावर बसले असतील अशा स्थानावर बसलो तर महात्मा गांधीजींच्या स्मरणाने चित्तात पवित्र भाव जागेल आणि परमात्म्याच्या ध्यान धारणेसाठी ते उपयोगी ठरेल. संस्थेत ज्याठिकाणी रोज प्रार्थना होत असेल असे स्थानही ध्यानासाठी निवडता येईल. ते लाभदायक ठरेल.

2) **आत्मनः आसनं न अत्युच्छ्रितं न अतिनीचं चैलाजिनकुशोत्तरं स्थिरं प्रतिष्ठाप्यः** स्थान खूप ऊंच वा खूप खोलवर नसावे. अशा स्थानावर आसन असावे. या वचनाचे दोन अर्थ संभवतात. विनोबा म्हणतात की जिथे वारे वहात असेल ते स्थान ऊंच. टेकडीवर वारे खूप वहातात. खोलवर स्थानी जमिनीच्या ओलसरपणाचा स्पर्श असतो. घरातल्या एखाद्या स्थानावर बसून आपण ध्यान धारणा करायचा प्रयत्न केला तर मुंग्यांची भिती असेल. भूमीपासून ऊंच ठिकाणी आसन मांडले तर खाली गडबडण्याची भिती आहे. यामुळे स्थान ऊंच नसावे, खोलवरही नसावे. आसनासाठी असे स्थान एकदा निश्चित झाले तर आसनासाठी ते पसंत करावे आधी दर्भ पसरवावे. टोचू नये यासाठी कापसाचे जाडजूड आसनही मांडता येईल. यामुळे आधी दर्भाचे आसन सांगितले. त्यावर व्याघ्रांबर वा मृगचर्म अंथरावे. त्याकाळी घनदाट अरण्ये होती. अरण्यामुळे वाघ आणि हरणांची संख्या भरपूर होती. त्यांची शिकारही केली जायची. यामुळे त्यांचे चर्म सहजी उपलब्ध होते. आता अरण्ये विपुल प्रमाणावर नाहीत. जनसंख्याही वाढली आहे. यामुळे आता व्याघ्र वा मृगचर्म लाभणे खूप अवघड आहे. आज आपण सतरंजी अंथरावी. त्यावर मऊशार वस्त्र अंथरायला हवे. वस्त्र पांढरे असल्यास खूप चांगले. पांढऱ्या वस्त्राभोवती डास येत नाहीत. डासाना काळा रंग आवडतो.

3) चित्त आणि इंद्रियांच्या व्यापारांना रोखायला हवे. काबूत घ्यायला हवे. **यत् चित्तेन्द्रियक्रियः** ध्यानधारणेसाठी शरीर व इंद्रियांच्या कार्य-व्यापारांना रोखायला हवे. डोळे बंद. कानावर कुठला आवाज आला तरी न ऐकणे. गार वा गरम हवेचा स्पर्श झाला तरी न अनुभवणे, सुगंधाचा विचार न करणे अशा प्रकारे पंच ज्ञानेंद्रियांच्या व्यापारांना रोखण्याचा प्रयत्न करणे.

पतंजलिच्या योगसूत्रात याला प्रत्याहार म्हटले आहे. प्रत्याहाराचा अर्थ आहे: **स्वविषयासंप्रयोगे चित्त-स्वरुपानुकार इव इन्द्रियाणां प्रत्याहारः।** इंद्रियांचा आपापल्या विषयाशी असलेला संबंध सुटून गेल्यावर चित्ताच्या स्वरुपात इंद्रियाचे आपले निजस्वरुप विलीन होऊन जाते त्याला इंद्रियांचा प्रत्याहार म्हणतात.

विषय आजुबाजूला असताना इंद्रिये आपले बघणे, ऐकणे, स्पर्श करणे, हुंगणे यासारखे जे धर्म आहेत ते मनातच हरवून बसतात. इंद्रिये मनासारखी बनून जातात. प्रत्याहार साधला गेला तर प्राप्त होणाऱ्या फलप्राप्तीची चर्चा योगसूत्रात येते ती अशी आहे: **ततः परमा वश्यतेन्द्रियाणाम्।** प्रत्याहार सिध्द झाल्यावर इंद्रियाना परम म्हणजे अतिस्वाधीनता प्राप्त होऊन जाते. ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रियांच्या व्यापाराच्या सोबत-सोबतच चित्ताच्या व्यापारालाही रोखायला हवे.

4) **मनः एकाग्रं कृत्वाः** मनाला एकाग्र करायचा प्रयत्न करायला हवा. चित्तात प्रत्यही अनेक प्रकारचे विचार उठत रहातात. कुठला विचार केव्हा जागेल याचा काहीच नेम सांगता येत नाही. कुठल्या ना कुठल्या विचारासोबत आपण असतोच असतो. झोपेतही विचार येतच असतात. विचारात सुसूत्रता नसल्यामुळे विचार लाटांसारखे प्रवाही असतात. आध्यात्मिक चिंतनाला मात्र लाटा वा तरंग म्हणता येणार नाही. लाटांमध्ये चित्ताची एकाग्रता साधता येत नाही. एकानंतर दुसरा विचार, दुसऱ्यानंतर तिसरा अशा प्रकारे विस्कळित विचार मनात उठत असतात त्यांच्या ठायी सुसंगती नसते. त्याना लाटा म्हणता येईल. खळाळत्या-हलत्या पाण्याच्या प्रवाहात का आपण आपले प्रतिबिंब बघू शकतो? नाही ना! ते स्थिर पाण्यातच बघता

येते. तसेच मनरुपी जळात नाना विचाररुपी लाटांचे प्रवाह थांबतील तेव्हा आपले सत्यस्वरुप बघण्याची क्षमता-पात्रता मनी जागू शकेल पण चित्ताच्या लाटा थांबून चित्त अगदी एकाग्र बनणे जसे जरुरीचे आहे तसेच चित्ताचे निर्विकार बनणेही आवश्यक आहे. चित्त निर्विकार बनावे. काम-क्रोध निवारावा. मद-अहंकार रहित व्हावे. विशुध्द बनावे. हे सारे गरजेचे आहे. आपले निजस्वरुप बघता यावे. त्यात विलीन होता यावे. सततच्या सरावातून चित्त एकाग्र करता येऊ शकते. जोवर चित्त विशुध्द होत नाही तोवर ते पूर्णपणे एकाग्रही होऊ शकत नाही, होऊ शकणार नाही.

5) **आत्मविशुध्दये योगं युंज्यात्:** चित्ताला एकाग्र करुन चित्त शुध्दीसाठी योग म्हणजे ध्यानयोगाची साधना करायला हवी. हा अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला आहे. ध्यान-योगाच्या साधनेचे लक्ष्य चित्तशुध्दी असायला हवे. अनेकांचे चित्त एखाद्या कुठल्याशा विषयात एकाग्र होते. संगीतानुरागी जन सहजपणे आठ-दहा तास एकाग्रपणे संगीताचा अभ्यास करु शकतात. इतिहासप्रेमी लोक एकाग्रतेने उभे आयुष्य इतिहासाच्या अध्ययन-संशोधनार्थ व्यतीत करु शकतात. तरीही एकेकट्या विषयासाठी मन लाऊन समर्पित भावनेने आयुष्य झोकून देणाऱ्यांची संख्या अल्पस्वल्पच असते. एवढे झाल्यावरही काम, क्रोध वगैरे विकार जोवर क्षीण होत नाही तोवर चित्त किती का एकाग्र होईना तरी ते काम, क्रोध वगैरे विकारांच्या अधीन असतेच. केवळ चित्त एकाग्र झाले म्हणजे ते निर्विकार वा विशुध्द बनून जाते असे काही होत नाही. विशुध्द चित्त एकाग्र होऊनच जाते. विशुध्दतेच्या ठायी एकाग्रता सामावलेली आहे पण एकाग्रतेच्या ठायी विशुध्दी सामावलेली नसते. चित्तशुध्दी हा खरा महत्वाचा मुद्दा होय. चित्त शुध्द असले तर ध्यानाचा अभ्यास लवकर होऊ शकतो. याचा अर्थ असा की एकाग्रतेपेक्षा चित्ताची शुध्दता अधिक महत्वाची, अधिक अवघड आणि म्हणूनच अधिक मोलाची होय!

: 13-14 :

***समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिर: ।***
***संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥***
***प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थित: ।***
***मन: संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्पर: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कायशीरोग्रीवं:** काय (शरीराचा मध्यभाग) मस्तक आणि मान (तिघांना)
- **समं अचलं धारयन्:** सरळ, निश्चल धारण करुन
- **स्थिर:** स्थिर होऊन
- **स्वं नासिकाग्रं:** आपल्या नाकाच्या शेंड्याला म्हणजे अग्रभागाला
- संप्रेक्ष्**य:** बघत असता
- **च दिश: अनवलोकयन्:** आणि इतर दिशांकडे न बघता
- **प्रशान्तात्मा:** ज्याचे चित्त शांत आहे
- **विगतभी:** भयरहित होऊन
- **ब्रह्मचारिव्रते स्थित:** ब्रह्मचर्य व्रतात स्थित होऊन
- **मन: संयम्य:** मनाला संयमात राखून
- **मच्चित्त:** माझ्या ठायी चित्त लाऊन
- **युक्त:** समचित्त होऊन, सावध राहून
- **मत्पर:** माझ्यात परायण होऊन
- **आसीत:** माझे ध्यान करावे, धरावे

**अर्थ**

शरीर, डोके आणि मान सरळ रेषेत अचल ठेऊन स्थिर व्हावे. आपल्या नाकाच्या शेंड्यावर दृष्टी ठेऊन अन्य दिशाकडे न बघता

ब्रह्मचर्य व्रतात रहाणाऱ्या, निर्भय तसेच अत्यंत शांत अंत:करण असणाऱ्या सावध योग्याने मन आवरुन, चित्त माझ्या ठायी लाऊन माझ्या आश्रयाने रहावे.

***शरीर सम-रेखेत राखावें स्थिर निश्चळ***
***दृष्टि ठेवूनि नासाग्रीं न पहावें कुणीकडे ।***
***शांत निर्भय मच्चित्त ब्रह्मचर्य-व्रतीं स्थिर***
***मन रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण ।***

**विषय:** या दोन श्लोकामध्ये अकरा गोष्टींचा समावेश आहे 1) शरीराला स्थिर करावे. याचा अर्थ असा की मेरुदंड, मस्तक आणि मान तिघांना स्थिर करावे. 2) इंद्रियांना स्थिर करावे. 3) नाकाच्या अग्रभागी दृष्टी स्थिर ठेवावी. 4) इतर कुठल्याही दिशेकडे बघू नये. 5) अंत:करणातून शांत असावे. 6) निर्भय व्हावे. 7) ब्रह्मचर्य पालनात स्थिर व्हावे. 8) मनाला संयमित राखावे. 9) ईश्वराच्या ठायी चित्त एकाग्र करावे.

10) स्वस्थ, स्थिर आणि समचित बनावे. 11) ईश्वराच्या ठायी परायण व्हावे. ईश्वरालाच श्रेष्ठ मानून त्याचे ध्यान करावे.

**स्पष्टीकरण**

1) **कायशिरोग्रीवं समं अचलं धारयन्:** ध्यानासाठी एका आसनावर स्थिर होऊन बसायचे असते. आसनावर बसावे कसे? त्याची रीत गीता सांगत आहे. मेरुदंडातून सारे मज्जातंतू प्रवाहित होतात. मेरुदंड ताठ जर नसेल तर मज्जातंतुंना ऊर्ध्वमुखी व्हायला म्हणजे मस्तकाप्रत पोहोचायला अडथळा येतो. यामुळे एकाग्रतेत बाधा येते. विघ्न जागते. मज्जातंतुंचा प्रवाह न अडखळता योग्य प्रकारे प्रवाहित होत राहिला तर चांगल्या प्रकारे रक्ताचा संचार मस्तकापर्यत पोहोचू शकतो. रक्त संचार सुयोग्य प्रकारे राहिला तर मनाची एकाग्रता साधणे सोपे जाते. यामुळे मेरुदंड ताठ राखणे हा पहिला मुद्दा आहे मग मस्तक-मान ताठ ठेवावी. मस्तक झुकलेले असेल तर मान दुखेल, झोप येईल. मस्तक ताठ ठेवले तर चित्त एकाग्र करण्याकामी सहजच मदत लाभते. मस्तक ताठ असले तर स्नायु ताणलेले रहातात. यामुळे शिथिलता जागत नाही. मस्तक ताठ राहिले म्हणजे सहाजिकच मान ताठ राहील. तरीसुध्दा स्वतंत्रपणे मान ताठ ठेवायला गीतेने निर्देश दिला आहे. याचे कारण असे की मान ताठ राखण्याकडे लक्ष दिले तर मस्तक ताठ राखणे आपोआप शक्य होते. त्याकडे आणखी वेगळे लक्ष नाही द्यावे लागत. मेरुदंडासोबत मस्तक आणि मान ताठ ठेवण्यातून संपूर्ण शरीराला निश्च्छळ म्हणजे स्थिर राखायला सांगितले गेले आहे. देहात आंदोलने असतील, इंद्रिय व्यापार जारी असतील तर चित्ताच्या एकाग्रतेत विक्षेप जागतो.

2) **दुसरी गोष्ट आहे स्थिर:** इंद्रिय व्यापाराला स्थिर करणे आवश्यक आहे. इंद्रिय व्यापारांना आपल्या ताब्यात करुन म्हणजे कर्मेंद्रियांना निर्व्यापार करुन ज्ञानेंद्रियांच्या व्यापारांनाही निश्च्छळ करणे आवश्यक आहे. स्थिर करणे गरजेचे आहे. कान तर नेहमी खुलेच रहातात. आवाज येणारच. चित्त ते ऐकण्याच्या दिशेने धाव घेणारच. नेत्र सर्व इंद्रियामध्ये प्रबळ आहेत. नेत्राशिवायच्या अन्य तमाम इंद्रियांचा व्यापार शांत करायची सूचना दिली आहे.

3) **स्वं नासिकाग्रं संप्रेक्ष्य:** नाकाच्या अग्रभागी-नासिकाग्री - दृष्टी स्थिर राखायला हवी. असे का म्हटले आहे? ध्यानाच्या प्राथमिक अवस्थेत डोळे बंद केले की झोप येऊ लागते. संपूर्ण डोळे उघडले तर सृष्टीकडे लक्ष जाते. यामुळे अर्धोन्मीलित दृष्टी असावी. डोळे अर्धे बंद आणि अर्धे उघडे - खुले - असावेत. नासाग्री दृष्टी स्थिर केली की हे साधता येईल. ही प्राथमिक अवस्थेतील क्रिया झाली. ध्यान करताना झोप येत नाही असा एकदा का अनुभव आला ना की मग डोळे संपूर्णपणे बंद करता येतीन. नासाग्री ध्यान एकाग्र केले तर नजर इकडे - तिकडे धावणार नाही. डोळे अर्धे उघडे ठेवले तरीही सृष्टीकडे लक्ष जाईल. डोळे बंद केल्यावर भ्रुकुटीच्या मध्यभागी - भुवईच्या मध्यभागी - ध्यान करायची चर्चा पाचव्या श्लोकातही आली आहे. अर्थात् केवळ प्राथमिक अवस्थेत लक्षात ठेवण्यासाठी या स्थूल गोष्टींची चर्चा आली आहे असे मानले जायला हवे - असे मानायला हवे. या स्थूल गोष्टीना कायम करायचे नसते त्यातून फायद्याऐवजी तोटाच होण्याची शक्यता अधिक आहे. भ्रुकुटी मध्यभागी काय किंवा नासाग्री काय दृष्टी स्थिर ठेवल्यामुळे डोके दुखीचीच शक्यता अधिक आहे. यामुळे चित्त एकाग्र व्हावे आणि झोप येऊ नये यासाठी काही दिवस नासाग्री दृष्टी ठेवायचा अभ्यास करायला हवा - सराव ठेवायला हवा. हे काही सतत करायला नको. गीतेने तर केवळ दिशासंकेत केला आहे. निर्देश दिला आहे. यामुळे स्थूल-शाब्दिक अर्थ घेणे काही योग्य होणार नाही या वचनावर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात की आपल्या नासिकेच्या अग्रभागाला भल्या प्रकारे बघत म्हणजे नासिकाग्राला बघत. इथे नाकाच्या अग्रभागी दृष्टी एकाग्र करायची पध्दत सांगायचा हेतु नाही मग असे का बरे सांगितले असेल ? याचा हेतु दृष्टीला विषयापासून दूर हटवणे एवढाच आहे. अंत:करणाचे समाधान व्हावे म्हणजे चित्त एकाग्र व्हावे एवढ्यासाठीच हे सांगितले गेले आहे कारण जर नासाग्री दृष्टी राखायला आणि स्थिर राखायला सांगितले गेले असेल तर मग आत्म्याच्या ठायी मन स्थिर होणार नाही. आत्म्याच्या ठायी-परमात्म्याच्या ठायी-मन स्थिर करायला हवे असे सांगून सहाव्या अध्यायाच्या पंचविसाव्या श्लोकात परमात्म तत्वाच्याच ठायी मन स्थिर असावे असे गीतेचे निवेदन आहे. ते पुढे येईल. 'संप्रेक्ष्य' शब्द बघावा. नेत्राच्या दृष्टीची विषयपराड्मुखता विषयापासून परावृत्त होणे म्हणजे विषयाचा

सन्निपात-विषयापासून दृष्टी हटवणे-याला संप्रेक्ष्य असे म्हणतात.

4) **दिशः च अनवलोकयन्:** डोळे मिटून घेतल्यावरसुध्दा मनात बघायची इच्छा असते. कधी डोळे उघडून चहुकडे बघितल्यावर डोळे बंद होऊन जातील. तरीसुध्दा इंद्रियसमूह इतका बळकट-बलवान आहे की विषयांकडे जबर्दस्तीने ओढून नेतोच. यामुळे नासिकाग्री दृष्टी स्थिर करायचा विषय मागील श्लोकात आला आहे. शंकराचार्यांनी हा अर्थ स्पष्ट करताना सांगितले आहे की नासिकाग्री दृष्टी स्थिर ठेवायचा जो संकेत दिला गेला आहे ना त्यात 'जणू काही' हा शब्द सुटून गेला आहे असे समजून अर्थ करायला हवा. याचा अर्थ असा की नासिकाग्री दृष्टी स्थिर राखायचा मुद्दा महत्वाचा नसून विषयांपासून दृष्टी हटवण्याचा मुद्दा महत्वाचा आहे. गीता स्पष्ट शब्दात सांगते की चारही दिशेकडे बघायचे नाही. चौफेर दृष्टी न दवडता दृष्टी अंतर्मुख करायची आहे. याशिवाय परम तत्त्वाकडे ध्यान एकाग्र होणे संभवनीय नाही.

5) **प्रशान्तात्मा:** चित्त शांत राखायला हवे. गलबला नको. दिवसभर काही-ना-काही प्रसंग अन् कुठली-ना-कुठली घटना घडत असतेच. ध्यानाला आपण बसलो की त्या घटना व ते प्रसंग मनःचक्षुपुढे येणारच येणार. यामुळे चित्ताच्या ठायी राग-द्वेषाच्या लाटा उठतील, चित्त विक्षुब्ध होईल. व्याकुळ होईल यामुळे ध्यानाला एकांतात बसताना कृतनिश्चयी व्हायला हवे. मनात प्रसंग वा घटनांच्या लाटा उसळू देणार नाही, चित्ताला अस्थिर-अशांत होऊ देणार नाही असे ठरवायला हवे.

6) **विगतभी:** मनात कुठल्याही प्रकारचे भय उत्पन्न होऊ नये. भय जागू देऊ नये. भीती उभी राहू देऊ नये. एकांतात वा निर्जन स्थळी ध्यानधारणा करत असताना चोर-डाकूचे भय असते, वाघ-सिंह-सर्पाचे भय असते. वाईट विचार, कामवासना, विषय वासना मनी जागल्या तर काय? याचेही भय मनी असते. अशा वेळी मनाची अवस्था काय होईल? अशा वेळी वासनेने फणा काढला तर अधिक नुकसानदायक होईल. ध्यान धारणेचा समय नसेल तर कामविकार जागृत होत नाहीत कारण मन अन्य कामात वा सेवेच्या विचारात रत असलेले पण मनातून ज्यावेळी तमाम विकाराची हकालपट्टी करायचा प्रयत्न सुरु असतो तेव्हा काम विकार जागून बळावण्याची शक्यता वाढते. अर्थात् मनी असे भय जरुर बाळगावे कारण की या भयामुळे वासना विकाराची स्मृती जागी होऊन कामवासना वगैरे जागतात. यामुळे ध्यानधारणा करत असताना कुठल्याही विकाराने जागृत होऊन थकवू नये यासाठी प्रयत्न करायला हवेत.

7) **ब्रह्मचारिव्रते स्थितः** ब्रह्मचर्य व्रताचा अवलंब करावा, हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. ब्रह्मचर्य व्रत पालन हे सर्वात कठिण व्रत आहे. याचे काठिण्य केवळ गृहस्थालाच वाटते असे नसून ते संन्याशालाही वाटते. ब्रह्मचारीचा बाह्यतः स्त्री-संगाचा तर प्रश्न उद्भवत नाही पण सुप्त कामविकार सतावत असतात. या विकारावर विजय संपादन करण्यासाठी ब्रह्मचारी व्यक्तीलाही खूप प्रयत्न करावे लागतात. काम-विकारामुळे स्वप्नात वीर्याचे स्खलन होते. खरे तर वीर्याचा उपयोग मानसिक बळ वा निर्विकारता वाढवण्याकामी होतो-तसा तो व्हायला हवा पण मनात कामविकार दाटल्यामुळे वीर्याचा संग्रह होत नाही. वीर्य अधोगामी आहे. त्याला ऊर्ध्वगामी बनवायला हवे. संस्कृत भाषेत ब्रह्मचारीसाठी **'ऊर्ध्वरेतस्'** शब्दाचा प्रयोग होतो. दिव्यात जे तेलाचे स्थान व महत्व तेच देहात आणि जीवनात ब्रह्मचर्याचे आहे. जीवनाचा एका शब्दात सारांश सांगायचा झाल्यास तो 'ब्रह्मचर्य' या एकाच शब्दात सांगता येईल. ब्रह्मचर्याच्या ठायी तमाम इंद्रियाचा संयम येऊन जातो. तमाम इंद्रियाच्या संयमाशिवाय ब्रह्मचर्याचे पालन अशक्य आहे. स्वादेंद्रियाशी ब्रह्मचर्याचा निकटचा संबंध आहे. स्वादेंद्रियावर ताबा नसेल तर ब्रह्मचर्य-पालन अवघड आहे. गृहस्थाश्रमात ब्रह्मचर्य साधनेसाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. पत्नीच्या संदर्भातला पत्नीभाव संपून जावा लागतो. यासाठी मातृ भावना, भगिनी भावना, ईश्वर भावना आणि वैराग्य भावना या चार भावनांचा सराव करत या भावना उत्कर्षाप्रत पोहोचवाव्या लागतात. यामुळे गृहस्थजीवनात ब्रह्मचर्य पालन करणे सुगम, सुलभ होते. कामविकारावर विजय संपादन करण्यासाठी या चार भावनांचा आश्रय घेण्याशिवाय दुसरा कुठलाही उपाय नाही. यामुळे ज्याना ध्यान धारणेची साधना करायची आहे - परमात्म अनुभव प्राप्त करुन घ्यायचा आहे त्याना ब्रह्मचर्य पालनात साफल्य प्राप्त करुन घ्यायलाच हवे. दीर्घकाळापर्यत ब्रह्मचर्याचे पालन करुन ब्रह्मचर्याचे व्रत घ्यायला हवे. व्रत सेवन केल्यामुळे मनी शिथिलता जागत

नाही. यातून ब्रह्मचर्य पालनात खूप बळ लाभते. एकूणच ब्रह्मचर्याचे पालन ध्यानधारणेच्या अभ्यासाचा पाया आहे.

8) **मन: संयम्य:** मनाला संयमी बनवायला हवे. याचे दोन अर्थ आहेत. इच्छा-वासना-महत्वाकांक्षांचा त्याग करणे म्हणजे मनाला ताब्यात घेणे. दुसरा अर्थ म्हणजे मनात कल्लोळ करणाऱ्या नाना विकाराना रोखण्याचा अभ्यास करणे. मनातून इच्छा वगैरे विकार निघून गेलेत तर याकामी यश लाभू शकते. विचारांच्या तळाशी नाना प्रकारच्या इच्छा-वासना-महत्वाकांक्षा वसतात.

9) **मच्चित्त:** विचारांवर नियंत्रण आणायचे असेल आणि इच्छा-वासनांचा त्याग करायचा असेल तर ईश्वराच्या ठायी मन लावायचे प्रयत्न करायला हवेत. ईश्वराप्रती अनुराग, प्रेम, भक्तीभाव उपजला आणि विकसला तर चित्त त्वरित स्थिर होऊ शकते. भगवंताची रुपे दोन-सगुण-साकार व निर्गुण-निराकार. निर्गुण-निराकाराला आपल्या चित्ताकाशात स्थान देणे खूप अवघड. यामुळे राम-कृष्ण यासारख्या अवतारी देवतेची मूर्ती वा एखाद्या महात्म्याची छबी मनात स्थिर करावी. या स्मरणाने मनात प्रेम आणि भक्ती उत्पन्न होऊ शकते. सगुण मूर्ती मनात स्थापन करायची आवड नसेल तर ओम् या अक्षरात परमात्म्याची भावना करता येऊ शकते. तेही अनुकूल नसेल तर मूर्तीची कल्पना न करता निर्गुण-निराकार, शांतस्वरुपी भगवंताशी एकाकार होऊन विचार दूर करायचे प्रयत्न करायला हवेत. यासोबत नामजप सुरु करायला हवा. याप्रकारे दुहेरी प्रयत्न करण्यातून मनात परमात्मा स्थिर होतो.

10) **युक्त:** समचित्त व्हावे लागेल. गीता यासाठी 'युक्त' हा शब्द वापरते. युक्त शब्दाचे दोन अर्थ होत. एक म्हणजे निर्विकार भाव. दुसरा सर्वांशी समतेच्या व्यवहाराचा अभ्यास. यातून समचित्तता साधता येईल. शांत झाल्यावरच चित्ताची एकाग्रता साधता येईल आणि चित्ताच्या शांततेसाठी निर्विकार भाव जागणे आवश्यक आहे. इतरांशी वागताना व्यवहारात समता भावनेचा आग्रह असायला हवा. व्यवहारात काम-क्रोध वगैरे विकार दाटलेले असले तर जागृत काळात शांती कशी बरे नांदावी? ध्यान धारणा करायला बसले असता ते सारे विचार-विकार-घटना स्मरणात येतील. चित्त व्यवहारातच जर शांत राहिले नाही तर मग ध्यानधारणेत कसे स्थिरपद व्हावे ?

11) **मत्पर: आसीत:** मागे **मच्चित्त:** व्हायला सांगितले होते. आता **मत्परायण** व्हायला सांगताहेत. या दोघामधला फरक सांगताना शंकराचार्य म्हणताहेत: **भवति कश्चिद् रागी स्त्रीचित्तो न तु स्त्रियं एव परत्वेन गृह्णाति, किं तर्हि राजानं महादेवं वा अयं तु मच्चित्तो मत्पर: च।** अर्थात् एखाद्या पुरुषाचे स्त्रीच्या ठायी चित्त असते म्हणजे आसक्ती असते तरी तो त्या स्त्रीला श्रेष्ठ न समजता राजा वा महादेवाला श्रेष्ठ मानतो पण ध्यानयोगी पुरुष तर परमात्म्याच्या ठायी चित्त जोडतो म्हणजे ईश्वराठायीच चित्त रोवून तिथेच आसक्ती, प्रेम, अनुरागभाव राखतो. परमेश्वरालाच श्रेष्ठ मानतो.

शंकराचार्यांनी मोठ्या खुबीने हे सांगितले आहे की परमात्म्याच्या ठायी आपण आपले चित्त लावतो. त्यावरच प्रेम, अनुराग आणि आसक्ती राखतो. परमेश्वरालाच श्रेष्ठ समजतो. सर्वस्व जाणतो. अशाप्रकारे मच्चित्त आणि मत्परायण होऊन दोघाना साधून घेतले असे समजून घ्या. मत्परायण होऊन **आसीत** म्हणजे ध्यान करायचा अभ्यास करावा. ईश्वरपरायण बनून ध्यानधारणेचा अभ्यास करावा. ईश्वराच्या ठायी चित्त रोवून आणि ईश्वर परायण झाल्यावर चित्ताची चंचळता दूर होते. उत्तमरित्या ध्यानधारणा साधते.

: 15 :

*युंजन्नेवं महात्मानं योगी नियतमानस: ।*
*शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एवं आत्मानं:** अशा प्रकारे मनाला
- **सदा युंजन्:** निरंतर परमात्म्याशी जोडणारा
- **योगी:** योगी
- **नियतमानस:** मनाला जिंकून
- **निर्वाणपरमां:** परम मोक्षदायी
- **मत्संस्थां:** आणि माझ्या ठायी स्थित
- **शांतिं अधिगच्छति:** शांती प्राप्त करतो

**अर्थ**

मन ताब्यात ठेवलेला योगी अशा प्रकारे आत्म्याला नेहमी मज परमेश्वराच्या स्वरुपाच्या ठिकाणी लाऊन माझ्यात असणारी परमानंदाची पराकाष्ठा अशी शांतता मिळवतो.

***असें आत्म्यास जोडूनि योगी आवरिला मनें***
***मोक्षास भिडली शांति माझ्या ठाईं चि मेळवी।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) अशा प्रकारे मनाला परमेश्वराप्रत जोडण्यासाठी प्रयत्न करणारा योगी असो वा ध्यानाचा अभ्यास करणारा साधक असो. (2) तो आपल्या मनावर विजय संपादन करतो. (3) परमश्रेष्ठ मोक्षदायक ईश्वरात स्थित शांततेला प्राप्त करुन घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **एवं आत्मानं सदा युंजन् योगी:** ध्याता योगी आपल्या मनाला ईश्वराशी जोडण्याचा अभ्यास करतो. दहा ते चौदा हे पाच श्लोक महत्वाचे. यातून हे वर्णन येते की एका आसनावर बसून काही तास ध्यानधारणा करायचा अभ्यास असतो. तो मनाचे चांचल्य दूर करतो. हा अभ्यास एकाग्रतेसाठी आवश्यक आहे. बाह्य विषय व्यापारात चित्त गुंतून पडते. ते विषयविकारापासून मुक्त व्हावे लागते मग ते काही काळ तरी ईश्वराच्या आराधनेत रमते. हे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या ध्यान धारणेने परमात्म्याबद्दलची प्रीती जागते. या सरावामुळे भक्ती उपजते. ईश्वरविषयक आसक्ती उपजते. याचा अर्थ असा की प्रेम निर्माण होते. हे झाले ना तर मग जागृती काळातला सारा व्यवहार परमात्मदृष्टीने होऊ शकेल. अशांती उपजणार नाही. अनेकदा परस्पर भेद-व्यवहारातच आपला जागृतीचा कार्यकाळ व्यतीत होतो. असे असेल तर चित्ताच्या ठायी राग, द्वेष वगैरे परिणाम उत्पन्न होतील. अशांतता जागेल. यापासून बचावासाठी काही उपाय शोधावा लागेल. यासाठी काही काळ दैनंदिन ध्यानधारणा करायचा एक उपाय असू शकतो. यामुळे चित्ताला प्रापंचिक विचारांपासून बचाव करता येईल. ही एक युक्ती आहे. मनातल्या परमतत्वाशी एकरुप व्हावे लागते. हा अभ्यास ध्यानधारणा करताना होऊन जातो. यातूनच चित्ताला राग, द्वेषरहित राखण्याचे बळ लाभते.

2) **नियतमानस:** मनावर विजय संपादन करायला हवा. गीतेने शब्द वापरला आहे **'नियतमानस:'**. याचा अर्थ जाणून घ्यावा लागेल. नियतमानस साधक हा ध्यानधारणा करत असताना विविध भाव-भावनांवर विजय संपादन करतो. चित्ताच्या विकारावर विजय संपादन करतो. जागृत काळातल्या व्यवहारातही मनावर नियंत्रण ठेवतो. त्याला नियतमानस असे म्हणतात. ध्यानधारणाकाळात चित्तावर काबू रहातो खरा पण जागृत काळात मात्र तो रहात नाही. हा अनेकांचा अनुभव आहे. आपण विकारवश होऊन जातो.

विकार रहित होता येत नसेल तर मग अखंड शांतता कशी लाभेल? आणि आनंदाचा अनुभव तरी कसा बरे घेता येईल? हे अटळ सत्य आहे.

3) **निर्वाणपरमां मत्संस्थां शांतिं अधिगच्छति:** शांतता ईश्वराधीन आहे. परमश्रेष्ठ मोक्षदायिनी आहे. चित्तवृत्तीवर ज्याला संपूर्णपणे नियंत्रण साधता येते असा योगी अशी शांतता प्राप्त करु शकतो. गीतेने शांततेसाठी दोन विशेषणे वापरली आहेत. एक म्हणजे 'निर्वाण परमाम्' आणि दुसरे 'मत्संस्थात्'. निर्वाण आणि परमाम्. निर्वाण म्हणजे मोक्ष. दुसऱ्या अध्यायातल्या 72 व्या श्लोकात 'ब्रह्मनिर्वाण' असा शब्द आला आहे. तिथे स्थितप्रज्ञाची स्थिती ब्रह्मस्थिती म्हणून वर्णिली आहे. एकदा का ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली की ती अंतकाळापर्यंत टिकून रहाते. अंतकाळी निर्वाण वा मोक्ष प्राप्त होतो.

जिथून अवनती नाही-खाली अवतरण नाही ती ब्राह्मी स्थिती होय. जिथे पोहोचल्यावर आणखी कुठली उन्नतीची वाट नाही ते ब्रह्मनिर्वाण होय. याचा अर्थ असा की ब्राह्मी स्थिती प्राप्त झाल्यावरही ब्रह्मनिर्वाणापर्यंतचा प्रवास जारी रहातो. ब्रह्म निर्वाण म्हणजे गंतव्य. अखेरचा थांबा. ब्राह्मी स्थितीनंतरचा हा प्रवास फार मनोज्ञ आहे. याचा अर्थ असा की सूक्ष्म अहंकाराला क्षीण करायची प्रक्रिया आयुष्याच्या अंतापर्यंत अखंडपणे चालेल. पाचव्या अध्यायातील 26 व्या श्लोकातही 'ब्रह्मनिर्वाण' शब्द आला आहे. ब्रह्मनिर्वाण साधल्यावर सर्वत्र परमात्म्याचेच दर्शन होते. दुसऱ्या अध्यायातील 72 व्या श्लोकात सांगितलेले आहे की देह विसर्जित झाल्यावर ब्रह्मनिर्वाण स्थिती प्राप्त होते. पाचव्या अध्यायातील 26 व्या श्लोकात ब्रह्मनिर्वाण शब्द येतो. याचा अर्थ ब्राह्मीस्थिती असाच होतो. ब्राह्मीस्थितीत

सर्वत्र परमात्माच परमात्मा दिसतो. या श्लोकात निर्वाण हा शब्द आला आणि त्यासोबत **परमाम्** आणि **मत्संस्थाम्** अशी दोन विशेषणे आली आहेत. हा **निर्वाण** ध्यानानुभव आहे म्हणजे ध्यान करता-करता ध्यानाभ्यासी योगी परमात्म्याच्या ठायी इतका लीन होऊन जातो की **मत्संस्थाम्** आणि **निर्वाणपरमाम्** म्हणजे परम मोक्षदायी शांतीचा अनुभव आहे. अशा ध्यानाभ्यासी योग्याचा परिणाम त्याच्या व्यवहारावरही दिसून येतो. त्याचा व्यवहार निर्विकार असतो.

: 16 :

***नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः।***
***न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तुः** पण, परंतु
- **अत्यश्नतः** अधिक खाणाऱ्यांना
- **च एकान्तं अनश्नतः** आणि सर्वथा निराहारी रहाणाऱ्यांसाठी
- **योगः न अस्तिः** ध्यानयोग साधणे शक्य नाही
- **च अतिस्वप्नशीलस्यः** आणि खूप झोपणाऱ्यांसाठी
- **च अर्जुनः** आणि हे अर्जुना
- **जाग्रतः न एव योगः** अस्तिः खूप जागणाऱ्यांनाही ध्यान योग साधणे शक्य नाही

**अर्थ**

हे अर्जुना, हा योग फार खाणाऱ्याला, अजिबात न खाणाऱ्याला, फार झोपाळूला तसेच नेहमी जाग्रण करणाऱ्याला साध्य होत नाही.

***न योग फार खाऊनि किंवा खाणें चि सोडुनी***
***न फार झोंप घेऊनि किंवा जागत बैसुनी।***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत. (1) ध्यानाचा अभ्यास करायच्या काही अटी आहेत. अधिक प्रमाणावर भोजन घेणाऱ्याना ध्यानाचा अभ्यास करता येणे शक्य नाही. (2) अजिबात भोजन न करणाऱ्याना नाही. खूप अल्पस्वल्प भोजन करणाऱ्यांना शक्य नाही. (3) अतिनिद्रा घेणाऱ्यांना नाही. (4) अतिजागरण करणाऱ्याना नाही. खूपच कमी निद्रा घेणाऱ्यांनाही ध्यानयोगाचा अभ्यास करता येणे शक्य नाही.

**स्पष्टीकरण**

1) **अत्यश्नतः योगः न अस्तिः** गरजेपेक्षा अधिक खाणाऱ्याचा तमोगुण वाढतो. आळस, जाड्य असे दोष बळावतात. शरीराला निरोगी राखण्यासाठी आवश्यक तेवढा आहार घ्यायला हवा. गरजेपेक्षा अधिक आहार घेतला तर तब्येत बिघडेल. ध्यानात मन एकाग्र होणार नाही. चित्त निरोगी नसेल तर एकाग्र कसे बरे होईल? ध्यानाच्या अभ्यासासाठी एकांत हवा. अत्यंत जागृतीच्या वेळेची गरज आहे. त्याचप्रमाणे शरीर-स्वास्थ्याचीही गरज आहे. यामुळे योगशास्त्रात शरीर शुध्दीसाठी बस्ती एनिमाचा उपाय सांगितला गेला आहे. अती अन्नसेवनामुळे अपचन होईल. आरोग्य धड रहाणार नाही. जाड्य वाढले तर ध्यान करताना झोप सतावेल. गरजेपेक्षा अधिक वजन असलेल्यानाही देहाचे जडत्व घेरुन घेते. ते त्याना टाळता येत नाही. यामुळे ध्यानाचा अभ्यास करण्यापूर्वी वजन नियंत्रणात आणायला हवे. शरीर हलके-फुलके असावे. ध्यानाचा अभ्यास करणाऱ्याला संतुलित आणि मर्यादित भोजन घ्यायला हवे. त्याने खूप चावून-चावून खायला हवे.

2) **च एकान्त अनश्नतः योगः न अस्तिः** भोजन अजिबात सेवन केले नाही वा अत्यल्प प्रमाणात सेवन केले तर शरीरात अशक्तपणा वाढत राहील. शरीरात आवश्यक त्या तत्वाची उणीव भासली ना तर शरीर निरोगी कसे बरे राहील? शरीर दुबळे तर मग मनही दुबळे. ध्यानात मन लागत नाही. बुध्दाने हा प्रयोग केला होता. उपवास आणि अत्यत अल्प आहारामुळे त्यांची काया क्षीण झाली होती. यामुळे त्यांना ध्यानधारणा करणे अवघड होऊन बसले होते मग त्यांनी आपला विचार बदलला. उपनिषदात म्हटले आहेः **अन्नमयं हि सौम्य मनः।** हे शिष्या (सौम्या) हे मन अन्नमय आहे. उपनिषदाने मनाला अन्नमय मानले आहे. याचा अर्थ असा की मन अन्ननिर्मित आहे. अन्नामुळे मनाचे पोषण होते. उपनिषदात एका प्रयोगाचा उल्लेखही आला आहे. पंधरा दिवस उपवास करायला लावल्यावर विद्यार्थ्याला वेद कंठस्थ म्हणायला लावला तर त्याला धडपणे मंत्र पाठ नव्हते. आहाराच्या अभावी स्मृती मंदावते. एकाने प्रायश्चित घेण्याच्या विचाराने महिनाभर उपवास करायचे ठरवले. त्याना उपवास काळात

आध्यात्मिक साधना करायची होती. यापूर्वी त्यानी काही एक साधना केली होती. उपवास काळात ध्यानधारणा वगैरे करायची त्यांची इच्छा होती याकामी ते बाळकोबांचे साह्य चाहत होते. बाळकोबा त्याना रोज तासभर ब्रह्मसूत्र-शांकरभाष्य यासारख्या ग्रंथाचे वाचन ऐकवायचे. आठवडाभर त्यांची मनःस्थिती बरी राहिली नंतर मन कमकुवत होत गेले. साधनेतही मन लागेना. याचा अर्थ असा की ध्यानधारणेसाठी अति खाणे वर्ज्य, अल्प खाणे वर्ज्य तसेच अजिबात न खाणेही वर्ज्यच मानले जायला हवेय.

3) **च अतिस्वप्नशीलस्य योगः न अस्तिः** खूप झोपणाऱ्यांनाही ध्यान अशक्य आहे. खूप झोपेमुळे तमोगुण वाढतो. मन जागृत असेल तरच परमात्म्याच्या ठायी लागू शकेल. खूप झोप घेतल्यामुळे ध्यानधारणा करताना डुलकी लागते. याचे कारण स्पष्ट आहे. अति खाण्यामुळे अति झोप येते. झोपेचा खूप उपद्रव होऊ नये यासाठी अल्प आहार सोईचा. स्थूल काया असणाऱ्यांना अल्प आहारामुळेही अधिक झोप लागते. यामुळे ज्यांची काया स्थूल आहे अशानी आधी वजन कमी करायला हवे. परिमित भोजनाचा आस्वाद घेतला तर अधिक झोपेची आवश्यकता उरत नाही.

4) **च अर्जुन जाग्रतः न एव योगः अस्तिः** झोप अजिबात न घेता ध्यानासाठी संपूर्ण रात्रभर जागे रहाणे योग्य नव्हे. खूप कमी झोप घेतली तर ध्यान साधणार नाही. बाळकोबांचा अनुभव असा आहे की काही दिवस रात्रीतून पाच-सहा तास ध्यान धारणा केली तर तीही साधता येईल पण हा क्रम खूप दिवस लागू करता येत नाही कारण की अतिजाग्रणामुळे मन दुबळे होते. मन ध्यान धारणेत काही तल्लीन होऊ शकत नाही. यामुळे पूर्वरात्रीत यथायोग्य निद्रा घ्यायला हवी. उत्तररात्री 3 ते 6 या वेळात ध्यानधारणा चांगल्या प्रकारे करता येते. रात्री 8 ते 2 या दरम्यान जर झोप चांगली झाली असेल तर मग 2 वा 3 वाजेपासून सकाळी 5-6 वाजेपर्यत ध्यानधारणेला बसता येते. पूर्व रात्रीची निद्रा खूप गरजेची आहे. अनेक साधक दुपारी चार-पास तास विश्रांती म्हणजे झोप घेऊन रात्री जागतात. हाही क्रम योग्य नव्हे. याचे कारण असे की रात्रीच्या झोपेची बरोबरी दिवसाची झोप करु शकत नाही. रात्रीची गाढ झोप जेवढी आरोग्यप्रद आहे तेवढी उत्तररात्रीची नव्हे. यामुळे पूर्वरात्री दोन-तीन वाजेपर्यत झोप घेऊन नंतर ध्यानधारणा करणे हा चांगला नियम होय.

: 17 :

*युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।*
*युक्तस्वप्नाववोधस्य योगो भवति दुःखहा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **युक्ताहारविहारस्यः** आहार आणि विहारात जो परिमित आहे
- **कर्मसु युक्तचेष्टस्यः** कर्मात जो परिमित आहे
- **युक्तस्वप्नावबोधस्यः** झोपणे आणि जागणे ज्याचे परिमित आहे
- **योगः** (त्याच्या साठी) योग
- **दुःखहा भवतिः** दुःख घालवणारा आहे

**अर्थ**

दुःखांचा नाश करणारा योग यथायोग्य आहार-विहार करणाऱ्याला, कर्मामध्ये यथायोग्य व्यवहार करणाऱ्याला आणि झोप व जागृती ज्याची यथायोग्य आहे, त्यालाच साध्य होतो.

*निजणें जागणें खाणें फिरणें आणि कार्य हि*
*मोजूनि करितो त्यास योग हा दुःख-नाशन ।*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत (1) ध्यान योग हा दुःख निवृत्तीचे कारण आहे. यासाठी आहार-विहारात परिमित रहावे लागेल. मध्यम मार्गाने विचरण करावे लागेल. (2) कर्माच्या ठायी मध्यम दृष्टी राखावी लागेल. (3) झोप आणि जागृतीत संतुलन साधावे लागेल. (4) असे जे साधक असतात त्याना ध्यानयोग साधता येतो. तो दुःख दूर करण्याचे निमित्त कारण बनतो.

**स्पष्टीकरण**

1) **युक्ताहारविहारस्यः** आहार आणि विहारात जे परिमित आहेत म्हणजे यात कुठल्याही प्रकारे अतिशयता येऊ देत नाहीत. मध्यम दृष्टी राखतात. शरीर आणि मन दोघाचे स्वास्थ्य हे दोघाच्या संतुलनात आहे. योग म्हणे चित्ताची समता. ही समता प्राप्त करणे ही मोठी जीवन

साधना आहे. समता प्राप्तीचा एक उपाय ध्यान आहे. ध्यान कसे साधता येईल? ध्यान म्हणजे भगवत् स्वरुपी एकाग्रता. विनोबा गीता प्रवचनाच्या सहाव्या अध्यायात लिहितात की ध्यान योगात तीन बाबींचा समावेश आहे. (क) चित्ताची एकाग्रता (ख) जीवनाच्या तमाम क्रियामध्ये परिमितता (ग) जगाकडे बघायची साम्यदृष्टी, शुध्द दृष्टी आणि गुणदृष्टी. या तीन बाबी साधण्यासाठी अभ्यास आणि वैराग्याची आवश्यकता आहे. आहारात परिमितता हवी. संतुलन हवे. विहारातही परिमितता व संतुलन हवे. विहार म्हणजे आहारा शिवायच्या अन्य वैयक्तिक क्रिया. फिरणे, कपडे धुणे, स्नान करणे, कुणाशी गप्पा-टप्पा करणे, अध्ययन करणे, मनन-चिंतन करणे या तमाम वैयक्तिक स्वरुपाच्या क्रियामध्येही परिमितता-संतुलन हवे.

2) **युक्तचेष्टस्य कर्मसुः** कर्मामध्येही परिमितता हवी. दिवसभर आपण काही-ना-काही काम करत असतो. यामुळे आठ-दहा तास काम केल्यावर शरीर थकून जात असल्यामुळे ध्यानाभ्यासासाठी शरीरात स्फूर्ती कुठून उरणार? स्फूर्ती शिवाय ध्यान धारणेचा सराव कसा करणार? यामुळे सहा-आठ महिने वा वर्षभर चार-पाच तास काम करुन भागेल असे बघावे. अशी व्यवस्था करुन घ्यावी. यामुळे थकवा वाटणार नाही. ध्यानधारणा यथोचित प्रकारे सुयोग्य प्रमाणात होऊ शकेल. काम कुठल्याहीस्वरुपाचे असो. ती सार्वजनिक सेवा असो वा खासगी व्यापार-व्यवसाय, सरकारी नौकरी असो वा अध्यापन. काम करताना थकवा येणार नाही अशी सोय व व्यवस्था आपण करायला हवी. दिवसात काही-एक काम तर करावेच लागेल. कामामुळे थकवा जाणवू नये. हे महत्वाचे सूत्र असायला हवे. शरीर असंतुलित राहिले तर ध्यानधारणा कशी बरे व्हावी? यामुळे सहा-आठ महिने वा वर्षभरासाठी चार-पाच तास काम करुन कार्यभार साधला जाईल, अशी व्यवस्था करुन घ्यायला हवी. यामुळे थकवा न येता ध्यानाभ्यास सुयोग्य प्रकारे होऊ शकेल. आपण वैयक्तिक व्यापार करत असू वा सरकारी नोकरी, शिक्षक असू वा सार्वजनिक सेवेच्या क्षेत्रात असू आपण काम करताना थकता कामा नये. दिवसभरात काही एक काम तर करावेच लागेल. या कामामुळे थकवा येणार नाही या बाबतीत दक्षता बाळगावी लागेल. शरीराचे संतुलन साधता आले नाही तर ध्यान सुयोग्य प्रकारे नाही साधता येणार.

3) **युक्तस्वप्नावबोधस्यः** स्वप्न म्हणजे निद्रा. अवबोध म्हणजे जागृती. निद्रा आणि जागृती दोन्हीही परिमित असायला हव्यात. हा विषय नुकताच चर्चेत आला आहे. जिथे मन शरीराशी पूर्णत: संबध्द असते तिथे शरीराची पर्वा न करता मार्गक्रमण करावयाचे ठरवले तर मन एकाग्र नाही होणार. शरीराला स्वस्थ आणि निरोगी राखण्यासाठी निद्रा आणि जागृती या दोघामध्ये संतुलन असणे खूप गरजेचे आहे. मानवी शरीराची विशिष्ट प्रवृत्ती बनून जाते. त्यात बदल घडवून संतुलन साधावे लागेल. झोप अधिक येत असेल तर व्यायाम करावा लागेल. आहारात बदल करावा लागेल. यामुळे फरक पडू शकेल. अशाच प्रकारे झोप कमी यायचे कारण जर अल्प आहार असेल तर भोजनाचे प्रमाण वाढवून दिल्यामुळे पुरेशी झोप घेता येईल. चिंतेमुळेही झोप कमी होते. चिंताही नाना प्रकारच्या असतात. एक असते प्रापंचिक. जगातली अशांतता, पापाचरण, हिंसा बघूनही चिंता वाटते. आध्यात्मिक स्वरुपाचीही चिंता असते. इतक्या काळापासून आध्यात्मिक साधना जारी आहे, ध्यान वगैरे प्रयत्न जारी आहेत तरी काही फळ लाभत नाही, सुपरिणाम साधत नाही. हाही चिंतेचा विषय असतो. अशा प्रामुख्याने तीन प्रकारच्या चिंता होत. याचा प्रभाव आहार आणि निद्रेवर पडतो. काय वाटेल ते कारण असो ते शोधून त्याला दूर करायचे प्रयत्न व्हायला हवेत.

4) **योगो भवति दुःखहाः** वरील तीन बाबीवर लक्ष देऊन जे त्यानुसार चालतात त्यांच्यासाठी ध्यानाची साधना दु:ख घालवायला मदत करते. ध्यान साधनेचे अंतिम लक्ष्य दु:ख घालवणे आहे. माणसाचे स्वत:चे स्वरुप आनंद आहे. यामुळे त्याला जोवर आनंदलाभ होत नाही तोवर तो बेचैन रहातो. कुठल्याही साधनेच्या उपयोगातून तो आनंद प्राप्त करुन घेईल. तहानलेल्याला पाणी हवे. शुध्द पाणी लाभले नाही तर वाटेल त्या अशुध्द पाण्याने का होईना पण तो तहान भागवील. बालकापासून तर वृध्दापर्यंत सर्वांनाच आनंदलाभ हवा. सुख प्राप्त करुन घेण्याची माणसाची प्रवृत्ती असते. मिळेल ते सुख प्राप्त करुन घेण्याकडे प्रवृत्ती असते. ज्यावेळी चित्ताच्या ठायी आध्यात्मिक संस्कार गहिरे असतील आणि त्यांना पोषण

मिळत असेल तेव्हा अल्प आणि क्षणिक अशा प्रापंचिक सुखांपासून विरत होऊन वृत्ती आध्यात्मिक सुख प्राप्तीच्या दिशेने वळू शकते. ध्यान साधल्यावर सुखाचा अनुभव येऊ लागतो.

: 18 :

*यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते।*
*नि:स्पृह: सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदा विनियतं चित्तं:** जेव्हा विशेष प्रकारे नियंत्रित केलेले चित्त
- **आत्मनि एव:** आत्म्याच्या ठायीच
- **अवतिष्ठते:** स्थिर रहाते
- **सर्वकामेभ्य:** सर्व कामनांनी
- **नि:स्पृह:** जो स्पृहारहित होऊन जातो
- **तदा युक्त: इति उच्यते:** तेव्हा तो योगी परमात्म्याच्या ठायी एकरुप झाला असे म्हटले जाते

**अर्थ**

पूर्णपणे ताब्यात आणलेले चित्त जेव्हा परमात्म्यात पूर्णपणे स्थिर होते, तेव्हा सर्व भोगांची इच्छा नाहीशी झालेला पुरुष योगयुक्त म्हटला जातो.

*संपूर्ण नेमिलें चित्त आत्म-रुपी चि रंगला*
*निमाली वासना तेव्हां योगी तो युक्त बोलिला।*

**विषय:** ध्यानमग्न झाल्यावर साधल्या जाणाऱ्या स्थितीचे वर्णन या श्लोकात आले आहे. या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. (1) ज्याने चित्ताला विशेष पध्दतीने नियंत्रित केले आहे, (2) आत्मतत्वाच्या ठायीच स्थिर झाला आहे, (3) तमाम वासना जाळातून मुक्त झाला आहे (4) तो परमात्म्याशी एकरुप झालेला योगी मानावा.

**स्पष्टीकरण**

1) **यदा विनियतं चित्तम्:** ध्यानाच्या सरावामुळे चित्त एकाग्र होते. ध्यानाच्या सरावाची चर्चा दहाव्या श्लोकात आली आहे. हा सराव होण्यापूर्वी विचारांना रोखणे अशक्यप्राय वाटते. नित्य सरावामुळे पाच-दहा मिनिटे विचारांचे आगमन थांबून जाऊ शकते. हळूहळू हा सराव वाढवत जावा लागतो. मग तास, दोन तासही ध्यानमग्न असले तरी मनात कुठलाही विचार प्रवेश करु शकत नाही. चित्त एवढ्या मोठ्या प्रमाणावर ताब्यात येते की मग केवळ संकल्पमात्रेण विचार वा विकल्पाला रोखता येते. रोखायचा प्रयत्नसुध्दा करावा लागत नाही. केवळ संकल्पाने विचार आपोआप थांबतात.

2) **आत्मनि एव अवतिष्ठते:** चित्तावर परिपूर्णपणे ताबा मिळाला ना तर मग चित्त आपोआप परमात्म्याच्या ठायी एकाग्र वा लीन होऊन जाते. चित्तात जगतातला एकही विचार येता कामा नये. जोवर विचार चक्र भिरभिरत राहिल तोवर आत परमात्म्याचा स्पर्श होऊ शकणार नाही. परमात्मा निर्गुण, निराकार आहे. यामुळे जोवर मनात रुप वा आकार असेल तोवर मन परमतत्वाकडे वळू शकणार नाही. परमात्म्याचे एखादे रुप वा आकार असते तर ध्यान करणे सुगम झाले असते. यामुळे आरंभिक अवस्थेत ध्यानधारणेसाठी परमात्म्याच्या रुप-आकार, गुणांची कल्पना करुन सगुण मूर्तीच्या ध्यानाची शिफारस केली जाते पण अंतत: रुप-आकाराचे ध्यान सोडावे लागते. अर्थात् ते सहजीच सुटूनही जाते.

या श्लोकात निर्गुण-निराकार ध्यानाचे वर्णन आले आहे. चित्तातले सारे रुप-आकार-विचार गळून जातात तेव्हा आत एक अद्भुत वस्तु नांदते. उरते. मन त्यातच बुडून जाते. आत परमतत्वाच्या ठायी आनंद व शांतता वसते. चित्त ध्यानात जसजसे एकाग्र होत जाते तसतसे याचा स्पर्श होऊ लागतो. ध्यानात जसजशी सखोलता वाढत जाईल तसतसा आनंद वाढतो. शांतता विकसते. बाह्य विषयांपासून लाभणारा आनंद क्षणिक स्वरुपाचा असतो. सार्वजनिक सेवाकार्यात लाभणारा आनंद हा प्रापंचिक आनंदाच्या तुलनेने बराच उच्च स्वरुपाचा असतो. अर्थात् तो आनंदही अखंड स्वरुपाचा नसतो. जोवर मनाच्या ठायी भेदबुध्दी वसते तोवर अहंकार क्षीण होत नाही. जोवर अहंकार क्षीण होत नाही तोवर अखंड शांती-अखंड आनंदाचा अनुभव प्राप्त होणे दुरापास्त आहे.

अहंकार स्वत:हून क्षीण होत नसतो. ईश्वर भक्तीत अहंभाव गळून जातो. परमात्म भक्ती प्राप्त करुन घेण्यासाठी ध्यान धारणा हा एक उपाय आहे. यामुळे गीतेने ध्यानधारणेला मोलाचे मानले आहे. ध्यान साधले गेले म्हणजे ईश्वरी स्पर्श लाभून परमात्म तत्वाचा आनंदलाभ

होतो. जसजशी ध्यानात सखोलता साधता आली तसतसा आनंद वाढतो. परमात्मविषयक अनुराग म्हणजे प्रीत आणि भक्ती उत्पन्न होऊ लागेल. ध्यान धारणे प्रसंगी परमतत्वाचा अनुभव मनी जागणे, ध्यानाध्यासाच्या यशस्वितेचे लक्षण आहे. हा अभ्यास मग जागृतीच्या काळातही टिकून रहातो-रहावा तसे नाही झाले तर हा निद्राकाळाचा अनुभव ठरेल. झोपेत राग, द्वेष हे विकार नष्ट तर होत नाहीत पण शांत झाल्यासारखे वाटतात-भासतात. तसेच मग ध्यानावस्थेचे होईल. हे जागृतीतही साधले जावे. अहंकार वगैरे विकार नष्ट व्हावेत. हाच ध्यानाचा परिपाक आहे.

3) **निःस्पृहः सर्वकामेभ्यः** तमाम कामना म्हणजे वासनापासून मुक्त व्हावे लागेल. ध्यानावस्थेत परमात्म तत्वाच्या ठायी लीन होता येते. यामुळे आनंद आणि शांततेचा लाभ होतो. यामुळे तमाम कामनांमधून मुक्ती लाभायला हवी. ही खरे म्हणजे ध्यान सिध्द झाल्याचीही एक कसोटी मानता येईल. कसोटी मानली जायला हवी. वासना क्षीण करण्याचे सामर्थ्य जर ध्यान धारणेत नसेल तर ध्यान आध्यात्मिक दृष्ट्या अयशस्वी मानले जाईल. कामनामुळे अशांतता उद्भवते. शांततेसाठी ध्यान सरावाचा उपयोग होतो.

4) चौथी गोष्ट आहे: **युक्तः इति उच्यते तदा:** जो परम तत्वाशी एकरुप झाला - तादात्म्य पावला त्याला आपले स्वतंत्र अस्तित्व नसते. स्वतंत्र अस्तित्वाचा बोध उरत नाही. परमतत्वाशी एकरुप असणे-युक्त-असणे याचा अर्थ असा की स्वतःला शून्यवत् मानून नित्य केवळ परमात्म्याच्या अस्तित्वाचेच भान राखणे होय. नदी सागराला जाऊन मिळते त्यावेळी तिचे स्वतंत्र अस्तित्व उरत नाही. त्याच प्रकारे ध्यानावस्थेत परमात्म्याचा अनुभव झाला की जीवाचे स्वतंत्र अस्तित्व संपून जाते. हा शून्यवत् असण्याचा अनुभव जागृत काळातही असायला हवा. अशा शून्य स्थितीचा अनुभव हीच परमतत्वाशी युक्त अवस्था होय, एकरुप अवस्था होय.

: 19 :

***यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता।***
***योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा निवातस्थः दीपः** ज्याप्रमाणे वायुरहित ठिकाणी ठेवलेला दीपक
- **न इंगते:** हलत-डुलत नाही, अविचलित असतो
- **सा उपमा:** ती उपमा
- **आत्मनः योगं युंजतः** आत्म्याशी अनुसंधान राखणाऱ्या
- **योगिनः यतचित्तस्यः** ध्यानयोग्याच्या संयमी चित्तासाठी
- **स्मृताः** सांगितली गेली आहे

**अर्थ**

ज्या प्रमाणे वारा नसलेल्या ठिकाणी दिव्याची ज्योत हलत नाही, तीच उपमा परमात्म्याच्या ध्यानात मग्न झालेल्या योग्याला दिली गेली आहे.

***निर्वातीं ठेविला दीप तेवतो एकसारखा***
***तसें आत्मानुसंधानीं योग्याचें चित्त वर्णिती।***

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली आहे की ध्यान योगीच्या संयत वा निग्रही चित्तासाठी एक उपमा दिली गेली आहे. निस्पंद ठिकाणी म्हणजे वायुरहित ठिकाणी दीप कसा अकंप, स्थिर, निश्च्छल असतो. ध्यानमग्नावस्थेत चित्ताची अशी स्थिती झाल्यावर मन स्थिर होते. चित्त स्थिर होते. ही स्थिरता दीपाच्या ज्योतीप्रमाणे असते.

**स्पष्टीकरण**

अठराव्या श्लोकात ही चर्चा येते की ध्यान धारणा करताना ज्याचे चित्त परमतत्त्वाच्या ठायी लीन होऊन जाते त्याला 'युक्त' म्हणतात, म्हणजे परमात्म तत्वाशी संलग्न असा योगी असे त्याला म्हणता येते. या विधानाला स्पष्टता यावी यासाठी या श्लोकात दीपकाची उपमा दिली गेली आहे. दीपकाची ज्योत वाऱ्याने विझून जाते. ज्योती अखंड प्रज्वलित रहावी यासाठी वाऱ्यापासून वाचवावे

लागते. वारा थोडा असला तर ज्योत विझणार तर नाही पण थरथरेल मात्र अवश्य! इथे दिलेला दृष्टान्त निर्वात स्थळाचा निदर्शक आहे.

ध्यानकाळात गती वा चळवळीची कल्पनासुध्दा करता येत नाही. चळवळीत ध्यान कसे टिकावे? अखंड स्थिरतेतच समाधीचा अनुभव घेता येतो. ध्यानातून समाधीकडे जायचे असेल तर कमालीची स्थिरता हवी. वाऱ्याने दिव्याची ज्योत कंपित व्हावी त्याप्रमाणे नाना विचारानी ध्यान थरारते. निर्विकार स्थिती जागली की मन स्थिर होऊ लागते. जगताविषयी आकर्षण जर मनात जागले तर निर्विचारी अवस्था जागणे कठिण आहे. यामुळे ध्यानधारणेपूर्वी वैराग्याचा सराव करणे गरजेचे आहे. यासाठी निर्विकार अवस्था ही पहिली पायरी आहे. दुसरी पायरी मनाला ईश्वराच्या ठायी स्थिरता होऊ लागते. आत ईश्वराचे प्राकट्य झाले असा निर्णय बुध्दीने घेतला की त्यात चित्त गुंतवून टाकायचा विचार व भावना जागते. हा विचार जागला तर मनाची अकंप अवस्था जागायला मदत होते. निर्विचारावस्था जागली म्हणजे मन ईश्वराच्या ठायी संलग्न होतेच. अशा प्रसंगी ध्यान यशस्वी झाले असे म्हणता येईल. यासाठी दीपकाच्या ज्योतीची उपमा दिली जाते. ध्यानासाठी शंकराचार्यांनी आणखी एक उपमा योजिली आहे: **तैलधारावत् संततः अविच्छिन्नप्रत्ययो ध्यानम्।** अर्थात् तेलाच्या धारेसमान एकाच प्रत्ययाची धारा प्रवाहित करणे हे ध्यान आहे. शंकराचार्य म्हणतात: **उपासनं नाम समानप्रत्ययप्रवाहकरणम्** उपासनेचा अर्थ समान प्रत्यय म्हणजे एकाच प्रत्ययाचा प्रवाह प्रवाहित करणे होय.

योगसूत्रात पतंजली यांनी ध्यानाची व्याख्या केली आहे ते म्हणतात: तत्र प्रत्ययैकता ध्यानम्। अर्थात् आत्मा वा ईश्वराचे चिंतन करता-करता एकाच प्रत्ययाच्या ठायी तल्लीन होणे म्हणजे ध्यान होय.

या श्लोकात ध्यानयोगी पुरुषाच्या चित्ताच्या स्थिरतेचा विषय मांडला गेला आहे. यासाठी दीपज्योतीची उपमा योजिलेली आहे.

: 20 :

***यत्रोपरमते चित्तं निरुध्दं योगसेवया।***
***यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **यत्र:** ज्या ध्यानावस्थेत
- **योगसेवया निरुध्दं चित्तं:** ध्यान योगाच्या अभ्यासाने पूर्ण निर्विचार म्हणजे स्थिर झालेले चित्त
- **उपरमते:** उपराम पावते म्हणजे अत्यंत शांत होऊन जाते
- **च यत्र:** आणि ज्या ध्यानावस्थेत
- **आत्मना आत्मानं पश्यन्:** स्थिर आणि निर्विचार चित्ताने परमात्म्याला बघणारा योगी
- **आत्मनि तुष्यति:** परमात्म्यातच संतुष्ट रहातो

### अर्थ

योगाच्या अभ्यासाने नियमन केलेले चित्त ज्या स्थितीत शांत होते आणि ज्या स्थितीत परमात्म्याच्या ध्यानाने शुध्द झालेल्या सूक्ष्म बुध्दीने परमात्म्याचा साक्षात्कार होऊन सच्चिदानंदघन परमात्म्यातच संतुष्ट रहाते.

***निरोधें जेथ चित्ताचा सर्व संचार संपला***
***जेथ भेटूनि आत्म्यातें अंतरीं तोषला स्वये।***

**विषय: ध्यान** साधले गेल्यावर ते अधिक खोल होऊ लागते अशा वेळी चित्ताची काय स्थिती होते त्याचे वर्णन आले आहे. या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) ज्या ध्यानावस्थेत ध्यान योगाच्या अभ्यासाने चित्त विचार रहित निस्पंद आणि अति शांत होऊन जाते. 2) निर्विचार आणि अत्यंत स्थिर चित्ताने परमात्म्याला बघणारा योगी परमात्म्याच्या ठायी संतुष्ट रहातो.

### स्पष्टीकरण

1) **यत्र योगसेवया निरुध्दं चित्तं उपरमते** मांडुक्योपनिषदात ईश्वराचे स्वरुप **'शांतं शिवं अद्वैतम्'** असे वर्णिलेले आहे. शांत, शिव म्हणजे मंगलमय पवित्र आणि भेदरहित म्हणजे अद्वैतरुपी होय. हा अनुभव ध्यानाच्या गहन अवस्थेत प्रत्ययाला येतो. थोडेसे ध्यान साधता आले ना तरी सामान्यत: शांततेचा अनुभव घेता

येतो. ध्यानाच्या अशा प्राथमिक वा आरंभिक अवस्थेत अतिशांती वा आनंदाचा अनुभव नाही येत. सहज आणि सजग ध्यानावस्थेत आनंदलाभ होतो. आनंदाचा अनुभव लाभतो. ध्यानातून समाधी अवस्था जागली तर मग अधिक आनंद लाभतो. समाधीत आनंदाचा उत्कर्ष साधतो. पुढील तीन श्लोकांमधून या आत्मानंदाचे वर्णन येते. ध्यानावस्थेचा अनुभव जागृतकाळाच्या तमाम व्यवहारांमध्ये जर घेता आला नाही तर हा अनुभव मर्यादित स्वरुपाचा आहे असे समजावे. समाधी वा ध्यानावस्थेत लाभणारा आनंदानुभव अंतिम आहे असे मानून घेण्याची चूक अनेक साधक करतात. ध्यान वा समाधीच्या अनुभवांचा खरा कस जागृतावस्थेतच लागतो.

2) **च यत्र आत्मना आत्मानं पश्यन् आत्मनि तुष्यति:** ध्यानाच्या सखोल अवस्थेत **आत्मना** म्हणजे स्थिर आणि निर्विकार चित्ताने **आत्मानं पश्यन्** म्हणजे आत्मस्वरुपाची ओळख करुन घेऊन म्हणजे परम तत्वाचा अनुभव घेऊन साधक **आत्मनि तुष्यति** ईश्वराच्या ठायी संतुष्ट होतो. स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णन करताना दुसऱ्या अध्यायातल्या 55 व्या श्लोकात **आत्मनि एव आत्मना तुष्ट:** हा विचार आला आहे. परम तत्वाच्या ठायीच तो साधक संतुष्ट होतो. ज्ञानी पुरुषाचा परिचय करुन देताना तिसऱ्या अध्यायातील 17 व्या श्लोकात **आत्मरति, आत्मतृप्त** आणि **आत्मसंतुष्ट** अशा तीन विशेषणांची चर्चा आली आहे. आत्मसंतुष्ट अवस्था परमात्म अनुभवात प्राप्त होते. हा परमात्म अनुभव भक्तीतही प्राप्त होतो. ध्यानावस्थेत तर प्राप्त होतोच.

परमात्मतत्वाचा अनुभव प्राप्त करुन घेण्याचे प्रमुख तीन उपाय आहेत. ध्यान, ज्ञान आणि भक्ती. तेराव्या अध्यायातल्या 24 व्या श्लोकात या उपायांचे वर्णन आले आहे. या श्लोकात 'ध्यान' साठी 'ध्यान' ज्ञानासाठी 'सांख्य' आणि 'भक्ती' साठी 'कर्मयोग' शब्दाचा वापर केला गेला आहे. कर्मयोग म्हणजे बाहेरुन सेवा आणि आतून परमेश्वर शरणता म्हणजे परमात्म भक्ती होय. सेवा आणि भक्ती असल्यामुळे तिघामध्ये कर्मयोग श्रेष्ठ मार्ग मानला जातो. सुलभता हीच त्याची श्रेष्ठता आहे. तुलसीदासजी म्हणतात:

***गुरु कह्यो राम भजन नीको।***
***मोहि लागत राज डगरो सो॥***

अर्थात् गुरु नी निरुपित केले की रामाचे भजन म्हणजे रामभक्ती खूप सुंदर आहे, कारण की मला तर तोच राजमार्ग वाटतो. साधन मार्गातही भक्ती हाच राजमार्ग आहे कारण की बाहेरुन सेवा आणि आतून भक्तीचा योग झाल्यामुळे ते आचरण्यात खूप सोपे, सरळ आणि सुलभ होऊन जाते.

: 21 :

***सुखमात्यन्तिकं यत्तद्बुध्दिग्राह्यमतीन्द्रियम्।***
***वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वत:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत्र:** ध्यानावस्थेत
- **यत् आत्यन्तिकं:** अतिशय पराकाष्ठेचे
- **बुध्दिग्राह्यं:** बुध्दीने ग्रहण करण्यायोग्य
- **अतीन्द्रियं:** जे इंद्रियातीत आहे ते
- **सुखं:** जे सुख आहे (त्याला)
- **तत् वेत्ति:** तो जाणतो
- **च यत्र:** आणि ध्यानाच्या गहिऱ्या अवस्थेत
- **अयं स्थित:** हा ज्ञानी पुरुष परमात्म्याच्या ठायी स्थित झाल्यावर
- **तत्त्वत: न एव चलति:** परमात्म तत्त्वापासून च्युत होत नाही

**अर्थ**

इंद्रियातीत, केवळ शुध्द झालेल्या सूक्ष्म बुध्दीने ग्रहण करता येणारा जो अनंत आनंद आहे, तो ज्या अवस्थेत अनुभवाला येतो आणि ज्या अवस्थेत असलेला हा योगी परमात्म्याच्या स्वरुपापासून मुळीच विचलित होत नाही.

***भोगूनि इंद्रियातीत बुध्दि-गम्य महा-सुख***
***न ढळे चि कधीं जेथ तत्त्वापासूनि लेश हि।***

**विषय:** या श्लोकात मुख्यत: दोन गोष्टी आहेत (1) ज्या ध्यानाच्या सखोल अवस्थेत म्हणजे समाधीच्या अवस्थेत अतिशय पराकाष्ठेचे आणि बुध्दीने ग्रहण करण्यायोग्य पण इंद्रियातीत असे जे सुख आहे ते तो जाणतो आणि (2) त्या समाधी अवस्थेत परमात्म्याच्या ठायी स्थित झाल्यावर ज्ञानी त्यापासून कधीही हटत नाही.

**स्पष्टीकरण**

यापुढे 23 व्या श्लोकापर्यंत ध्यानाच्या सखोलतेचे म्हणजे समाधी अवस्थेचे वर्णन आले आहे.

1) गहिऱ्या ध्यानावस्थेत म्हणजे समाधीकाळात लाभणारे सुख तीन प्रकारचे असते. हे सुख आत्यंतिक पराकोटीचे असते. सुखाच्या नाना परी आहेत.

एक प्रापंचिक सुख. प्रापंचिकाना आत्यंतिक सुखाची तहान नसते असे नाही पण प्रपंचात का ते सुख लाभू शकते? प्रपंचात आत्यंतिक सुखलाभाची शक्यता नाही. पराकाष्ठेच्या सुख-प्राप्तीसाठी कायम स्वरुपी पदार्थ हवा. कायम न रहाणाऱ्या, नित्य बदलत्या वस्तु वा पदार्थापासून लाभणारे सुख शाश्वत कसे राहील? ते तर क्षणिकच असेल ना? आपले जग पंचविषयात्मक आहे. कुठलाही पदार्थ का असेना त्यात शब्द, स्पर्श, रस, गंध, रुप या पंच तन्मात्रा - हे पंचविषय असतातच. या पंचविषयाच्या ज्ञानासाठी पंच ज्ञानेंद्रिये आहेत. डोळ्याने रुपाचे, कानाने शब्दाचे, नाकाने गंधाचे, त्वचेने स्पर्शाचे आणि जिभेने रसाचे ज्ञान होते. लोकमान्य टिळक म्हणत असत की सहावे इंद्रिय असते तर जग आज जसे दिसते तसे दिसले नसते. सहाव्या इंद्रियामुळे कदाचित सहावा विषयही ध्यानात येऊ लागेल. पदार्थाचा संबंध वा संयोग अनुकूल असला तर सुख आणि प्रतिकूल असला तर दु:ख उद्भवते. अशा प्रकारे जीवनात सुख-दु:खाचा अनुभव नित्य घ्यावा लागतो. तसे तर अनित्य पदार्थांपासूनही सुख मिळते पण ते शाश्वत मात्र नसते. विषय काही अखंड सुख अर्पू शकत नाही. आतून अखंड सुखाची तहान जागते. अशा वेळी सत्संगतीच्या प्रभावाने विषयांबाबत वैराग्यभाव जागतो. उदासीनता जागते. माणूस अखंड सुखाच्या शोधात प्रयत्नशील होतो.

अखंड सुखाच्या प्राप्तीचा एक उपाय ध्यान वा समाधी आहे. सरावामुळे ध्यान सखोल झाले तर समाधीसुखाचा अनुभव घेता येतो. या श्लोकात समाधीचे म्हणजे समाधीच्या अनुभवाचे वर्णन आले आहे. समाधीसुख असामान्य प्रकारचे सुख आहे. जगातले कुठलेही सुख या सुखाची बरोबरी करु शकत नाही. हे सुख आत्यंतिक पराकाष्ठेचे असून अखंड असते. हे क्षणिक स्वरुपाचे नसते. विद्युल्लतेच्या झगमगाटासारखे असते पराकाष्ठेचे सुख. असे सुख पराकाष्ठेचे असले तरी त्याद्वारेही माणसाला समाधान लाभत नाही. सुख पराकाष्ठेचे का असेना पण ते अखंड स्वरुपाचे असावे. असे असेल तरच मग समाधान लाभू शकते. समाधीत ज्या पराकाष्ठेच्या सुखाचा अनुभव मिळतो तो बाह्य व्यवहारातही कायम राखण्यासाठी राग-द्वेषापासून मुक्त रहावे लागेल. यामुळेच समाधी अवस्थेचे सुख विशिष्ट अवस्थेचे सुख मानले जाते. विशिष्ट अवस्था म्हणजे समाधी अवस्था होय. नंतरच्या जागरण काळातही समाधी काळातल्या अनुभवाची आठवण राहील. विशिष्ट अशा समाधीकाळात अनुभवलेल्या पराकाष्ठेच्या आनंदाची आठवण इतकी गडद असते की जागृती अवस्थेतल्या आपल्या व्यवहारावरही त्याचा परिणाम दिसून येतो. समाधी एक प्रकारची लयावस्था आहे. जागृतावस्थेत लयवृत्तीच्या ऐवजी विवेकशक्ती जागृत राखायची गरज आहे. विवेक जागरणातूनच राग-द्वेष टळतील. राग, द्वेषाचा जनक अविवेकच आहे. समाधी काळात विवेकाची गरज नसते, समाधीचा एक फायदा असा असतो की विषयाच्या आकर्षणात फसायची शक्यता कमी होऊन जाते.

इथे समाधी सुखाच्या संदर्भात तीन प्रकारे वर्णन केले गेले आहे :

अ) समाधी अवस्थेत प्राप्त होणारे सुख पराकाष्ठेचे असते.

आ) समाधीतले सुख बुध्दीग्राह्य असते हा त्या सुखाचा दुसरा प्रकार होय. बुध्दीने अनुभवता येणारे सुख. समाधी सुखाचा अनुभव घडवणारे साधन बुध्दी आहे. ज्या बुध्दीच्या जोरावर आपण जागृत काळात व्यवहार करतो तीच बुध्दी समाधी सुख अनुभवू शकते. समाधी सुखाच्या प्राप्तीसाठी बुध्दीची शुध्दता गरजेची आहे. अशुध्द बुध्दीच्या सहाय्याने समाधी सुख प्राप्त होऊ शकत नाही. समाधी प्राप्त केल्यावरही जागृतावस्थेत राग, द्वेषाची शक्यता असते. सूक्ष्म राग, द्वेष क्षीण झाले नाहीत तरी समाधी प्राप्त होऊ शकते, कारण की समाधी एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा ज्ञाता लाभला तर मग प्रयत्नपूर्वक समाधी अवस्था प्राप्त करुन घेता येते. याबाबत तीव्रता असायला हवी. तीव्र जिज्ञासे शिवाय प्रयत्न करणे शक्य नाही.

इ) सुखाचा तिसरा प्रकार. सुख अतींद्रिय असते म्हणजे इंद्रियगम्य नसते. जे सुख इंद्रियगम्य असते तेही बुध्दीगम्यच असते पण बुध्दीचा संबंध सरळ सरळ विषयाशी येत नाही, येऊही शकत नाही. विषयाचे ज्ञान

मन आणि ज्ञानेंद्रियाच्या माध्यमातून होते. ज्ञानेंद्रियांच्या अभावी पदार्थाचे ज्ञान होणार नाही. ध्यान वा समाधीजन्य सुख इंद्रियगम्य नसते. त्याचा संबंध केवळ बुध्दी वा मनाशीच असतो. यामुळे ध्यान वा समाधीजन्य सुख बाह्य-इंद्रिय निरपेक्ष आणि विषय निरपेक्ष म्हणजे विषयांशी संबंध आल्याशिवाय होते. ते केवळ बुध्दीगम्यच असते.

2) **यत्र अयं स्थित: न एव चलति:** समाधी अवस्थेत सुखाची परिसीमा असते. मन त्यातून दूर होऊ इच्छित नाही. बाह्य सुखाचे स्वरुपच मूळात क्षणिक असते. त्याला वारंवार प्राप्त करुन घ्यावे लागते. समाधीसुख मात्र अखंड असते. मनाला तर अखंड सुखाची इच्छा असते यामुळे मन या समाधीसुखापासून क्षणभरही दूर होत नाही. अखंड सुखाचे स्थान समाधीतच स्थिरावलेले आहे. ज्ञानोबा लिहितात- “ध्यानयोगाच्या साधनेने जेव्हा इंद्रियांचा निरोध होतो तेव्हा चित्ताचे परमात्म्याशी मिलन होते. विषयांचा त्याग करुन चित्त जेव्हा अंतर्मुखी होते तेव्हा आत्म स्वरुपाचा परिचय करुन घेते. दर्शन करुन घेते मग चित्ताला आपणच परमात्मरुप असल्याचा बोध होतो. हा प्रत्यय आला की चित्त सुखाचे साम्राज्य भोगू लागते. परमात्म तत्वाशी एकरुप झाल्यामुळे चित्ताचे चित्तत्व नष्ट होऊन जाते. परमात्म तत्वाहून श्रेष्ठ तत्व अस्तित्वात नाही. या तत्वाला बाह्येंद्रियांच्या सहाय्याने जाणून घेता येत नाही. त्या परमात्म्याच्या ठायी चित्त स्थिर होते आणि ठायीच परमात्म सुखात तल्लीन होऊन वसते.

: 22 :

***यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं तत: ।***
***यस्मिन्स्थितो न दु:खेन गुरुणापि विचाल्यते ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **यं लब्ध्वा:** परमेश्वर प्राप्ती रुपी जो लाभ, जे समाधी सुख त्याला प्राप्त करुन घेतल्यावर
- **अपरं लाभं:** आणि दुसऱ्या कुठल्याही लाभाला
- **तत: अधिकं न मन्यते:** त्या समाधी सुखाहून अधिक मानत नाही
- **च यस्मिन् स्थित:** आणि ज्या समाधी सुखात स्थित झाल्यावर
- **गुरुणा अपि दु:खेन:** मोठ्या दु:खानेही (योगी)
- **न विचाल्यते:** विचलित होत नाही

### अर्थ

परमात्मरुपी जो लाभ झाल्यामुळे त्याहून अधिक दुसरा कोणताही लाभ तो मानीत नाही आणि परमात्मप्राप्तीरुप ज्या अवस्थेत असलेला योगी फार मोठ्या दु:खानेही विचलित होत नाही.

***जया लाभापुढें लाभ दुसरा तुच्छ लेखितो***
***न चळे जेथ राहूनि दु:ख-भारें हि दाटला ।***

**विषय:** या श्लोकात ध्यानाच्या गहन अवस्थेचे अर्थात् समाधीचे वर्णन आले आहे. यात दोन गोष्टी आल्या आहेत 1) या समाधी सुखाचा अनुभव प्राप्त केल्यावर अन्य काहीही श्रेष्ठ वाटत नाही आणि 2) समाधी सुखात स्थित योग्यावर संकटांचा डोंगर जरी कोसळला तरी तो विचलित होत नाही.

### स्पष्टीकरण

1) **यं लब्ध्वा अपरं लाभं तत: अधिकं न मन्यते:** ध्यानाच्या सखोल स्थितीचे म्हणजे समाधीचे वर्णन सुरु आहे. मागील श्लोकाच्या अनुषंगाने हे सांगत आहेत की समाधी सुखाचा अनुभव झाला म्हणजे बाह्य काय आणि आंतरिक काय सारीच सुखे तुच्छ वाटू लागतात. अर्थात् समाधी अवस्था असेपर्यतच या सुखाचा अनुभव घेता येईल. समाधीत असेपर्यतच या सुखाचा अनुभव घेता येईल. समाधीतून बाहेर पडले म्हणजे या सुखाची आठवण राहील असा अनुभव घेता येत नाही. चित्ताच्या ठायी प्रसन्नता नांदेल. इतके झाल्यावरही वस्तुस्थिती अशी असते की काम, क्रोध, अहंकार यासारखे विकार समाधीच्या अनुभवांमुळे क्षीण होत नाहीत. विकारांना क्षीण करायचे प्रयत्न जागृत काळात घडायला हवेत. यासाठी जागृतीत प्रयत्न करायला हवेत. या दृष्टीने विचार करु जाता ‘समाधी वा ध्यान ही स्थिती नसून वृत्ती आहे’ हे विनोबांचे वचन सार्थ आहे. समाधी स्थितीचा अनुभव दोन-चार-पाच-दहा दिवस घेता येईल, अखंडपणे नव्हे. वृत्ती काही स्थायी नसते, तीत आवागमन होत रहाते. समाधी स्थिती एक विशेष अवस्था आहे. निद्रा वा स्वप्नकाळातला अनुभव जाग्रतावस्थेत टिकतो का? तसेच यावर असा कुणी तर्क करेल की जाग्रतावस्थेतला अनुभवही निद्रा वा स्वप्नावस्थेत टिकत नाही. याचे उत्तर असे की जागृती

काळात इंद्रिय व्यापार जागृत असल्यामुळे त्याच विषयांशी संपर्क आल्यावर काही-ना-काही क्रिया किंवा व्यापार हा करावा लागेल पण गाढ निद्रेत क्रिया वा व्यापार तर घटित होणार नाही. तिथे तर साऱ्याचाच अभाव जाणवेल. काहीच नाही अशा नाहीपणाचा वा शून्यत्वाचा अनुभव निद्रावस्थेत येतो. यामुळे ही स्थितीच अशी आहे की विषय वा इंद्रियांचा ताप नसतो. यामुळे या स्थितीत काम, क्रोध, अभिमान उत्पन्न होण्याची शक्यताच नसते. निद्रावस्थेत काम, क्रोध वगैरे विकार सुप्त रहातात तरी क्षीण होत नाहीत. स्वप्न जगातील सारे कार्यव्यापार देखिल काल्पनिक असतात. जागरणाचेच परिणाम स्वप्नावस्थेत प्रकटतात. याचा अर्थ असा की निद्रा, स्वप्न, जागृती, समाधी, ध्यान या विविध अवस्थेत जागृतावस्थाच मुख्य मानली जाईल कारण की जागृतावस्थेतच इंद्रियांचा विषयांशी संबंध येतो आणि नाना विकार उद्भवतात. जागृतावस्थेतच विकारांचे पोषणही होते. मोक्षानुभवही जागृतावस्थेतच घेता येतो. यामुळे ध्यान वा समाधीकाळात जो पराकाष्ठेचा अनुभव लाभतो तो जागृतावस्थेत जेवढा टिकेल तेवढेच त्या अनुभवाचे मोल जाणावे कारण या अनुभवानेच विकार शांत होतील. या दृष्टीने विचार करु जाता जागृतावस्थेत ईश्वरी अनुसंधानाने अहंकार घालवता येईल. परमात्म तत्वाची उत्कट भक्ती प्राप्त होईल. निर्विकार बनल्यामुळे तमाम कार्यात शांतता आणि अनुभवाचा प्रत्यय येईल. ही उत्कटता समाधी सुखाच्या तुलनेने कमी भासली तरी अखंडतेमुळे आनंदावस्था कायम राहील. यामुळे मानसिक विकार नष्ट होऊ शकतील. विकार जोवर क्षीण होत नाही तोवर मोक्ष प्राप्तीची शक्यता नाही. यामुळेच जागृतावस्थेतल्या अनुभवाला स्थिती आणि समाधी अवस्थेला वृत्ती म्हटले आहे.

2) **यस्मिन् स्थित: गुरुणा अपि दु:खेन न विचाल्यते:** समाधी अवस्थेत आत्यंतिक दु:ख आल्यावरही योगी विचलित होत नाही. दु:खाचे प्रकार तीन - आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभैतिक. तसे पाहू गेल्यास सारी दु:खे जरी मानसिक स्वरुपाची असली तरी शारीरिक दु:खांना आधिभौतिक म्हणता येईल. बाह्य पदार्थांशी संबंध आल्यावर शरीराने भोगाव्या लागणाऱ्या दु:खाना अधिभौतिक म्हणावे. आजारपण, व्यापारातील नुकसान वा तोटा यासारखी दु:खे आधिभैतिक होत. अनावृष्टी, पीके नष्ट होणे, वीज कोसळणे, भूकंप या सारख्या दैवी प्रकोपांमुळे दु:ख उपजते. यात मानवी कर्माचा वा मानवी प्रयत्नाचा सरळ-सरळ काही संबंध नसतो. अशा आकस्मिक घटनांमुळे उपजणाऱ्या दु:खाना आधिदैविक दु:ख म्हणतात. ईश्वर दर्शन, ईश्वर दर्शनाची तीव्रतम आस मनी असतानाही ईश्वर दर्शन न होणे, आध्यात्मिक साधना सुयोग्य प्रकारे न होणे, वैराग्य भावना आणि आस मनात असतानाही वैराग्य प्राप्त न होणे, भक्ती प्राप्त न होणे यासारख्या दु:खाना आध्यात्मिक दु:खे म्हणता येईल. ही तिन्ही प्रकारची दु:खे समाधीकाळात स्पर्श करत नाहीत. या अवस्थेत हात-पाय छाटून टाकले वा जाळून टाकले तरी समाधीस्थ पुरुषाला कुठलेही भान नसते. या अवस्थेत मरणासारखी प्राणांतक वेदनाही अनुभवात येत नाही.

एक मुस्लिम साधु होता. युध्दभूमीवर त्याच्या पाठीत बाण घुसला. बाण काढू जाता त्याला अपार वेदना झाल्यामुळे बाण काढता आला नाही पण नमाज पढताना तो बाण उपसून काढला तरी त्याला मुळीच वेदना झाली नाही.

समाधी काही बेशुध्दीची स्थिती नाही. ती तर परमात्म्याच्या ठायी लीनतेची स्थिती आहे. विशिष्ट प्रकारे प्रखर साधना केल्यावर ही समाधी अवस्था प्राप्त होते.

: 23 :

***तं विद्याद् दु:खसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।***
***स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तं:** त्या (समाधीच्या स्थिती)ला
- **दु:खसंयोगवियोगं:** दु:खरुप संसाराच्या संयोगापासून रहित आहे, दु:खाचा कधी स्पर्श होत नाही
- **योगसंज्ञितं:** 'योग' अशी संज्ञा दिली आहे असे
- **विद्यात्:** समजायला हवे
- **स: योग:** तो योग
- **निश्चयेन:** निश्चयपूर्वक, ठामपणे
- **अनिर्विण्णचेतसा:** अखिन्न चित्ताने, आळस झाडून तत्पर चित्ताने
- **योक्तव्य:** साधायला हवा

### अर्थ

जो दु:खरुप संसाराच्या संयोगाने रहित आहे, तसेच ज्याचे नाव योग आहे, तो जाणला पाहिजे. तो योग न कंटाळता अर्थात् धैर्य व उत्साहयुक्त चित्ताने निश्चयाने केला पाहिजे.

*तयास म्हणती योग दु:खाचा जो वियोग चि*
*जोडावा निश्चयानें तो योग उत्साह राखुनी।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) ही समाधी अवस्था दु:खविहीन आहे. 2) या दु:खविरहीत समाधी अवस्थेला 'योग' म्हणतात. 3) हा समाधी योग निश्चयपूर्वक आणि 4) प्रसन्न चित्ताने साधायला हवा.

### स्पष्टीकरण

1) **तं दु:खसंयोगवियोगम्:** सदा दु:ख अनुभवायला मिळते म्हणून दु:ख टाळण्याचे नित्य प्रयत्न होतात. सुखप्राप्तीची साधना केली जाते. अर्थात् गीता तत्वज्ञानाच्या दृष्टीने सुख, शांती, आनंद हे प्राप्त करता येत नाही, कारण जीवात्मा स्वभावत:च सुखस्वरुप, शांतीस्वरुप आणि आनंदस्वरुप आहे. तरी जीवात्म्याला असा अनुभव होत नाही. याचे कारण असे की जीवात्म्याने अज्ञानामुळे देह, मन, बुध्दी, इंद्रिये यानाच आपले स्वरुप मानून घेतले आहे. आनंदस्वरुपी असल्यामुळे थोडेसे दु:खही सहन होत नाही. ज्या वस्तुंमुळे दु:खानुभव होतो त्या टाळल्या तर सुखानुभव होऊ शकतो. खरे पाहू गेल्यास देह, मन, बुध्दी वा जगतातील पदार्थ दु:खाची साधने नव्हेत. यातून जागणारा संबंधही दु:खदायक नाही. खरे तर या संदर्भात जी दृष्टी आहे त्यात केवळ बाह्य कार्य दृष्टीचा संदर्भ न राहू देता कारणदृष्टी जोपासता यायला हवी. यामुळे दु:खाचा अनुभव होणार नाही. प्रतिकूलतेतही अनुकूलता बघण्याचा अभ्यास झाला पाहिजे मग दु:खाचा कमी अनुभव येईल. तरी दु:खाचा जो काही थोडा-फार अनुभव येईल त्याला मात्र टाळता येणार नाही. प्रतिकूलतेतही लाभणाऱ्या सुखानुभवाची तीव्रता अधिक काळ टिकू शकणार नाही. अधिक प्रतिकूलतेत सुख टिकू शकणार नाही पण समाधी तर आत्यंतिक सुखाचा अनुभव आहे. यात लेशमात्र दु:ख नाही. अर्थात् जेवढा काळ समाधीवस्था टिकेल तेवढ्या काळापुरतेच ते टिकेल ही त्याची मर्यादा आहे.

2) ज्या स्थितीत दु:खाचा आत्यांतिक अभाव असतो तिथे सुखाचा योग असतो. यामुळे त्यासाठी - **योगसंज्ञितं विद्यात्** - योग हा शब्द प्रयुक्त होतो. समाधी अवस्थेत आपल्या मूळ स्थितीरुपी मोक्षाचा अनुभव घेता येतो. अर्थात् समाधी अवस्थेत असेपर्यंतच हा अनुभव घेता येईल, तरी मोक्षाच्या मूळ स्थितीचा अनुभव समाधीवस्थेत घेता येतो. समाधीस्थितीत सुखाचा अनुभव होतो एवढे म्हणून काही समाधीवस्थेचे संपूर्ण रुप कळणार नाही. यामुळेच असे सांगितले गेले की दु:खाचा आत्यंतिक अभाव म्हणजे प्रचंड सुखाचा अनुभव समाधी स्थितीत घेता येतो. 21 व्या श्लोकात ही चर्चा आली आहे. त्या स्थितीला काही नाव द्यायचे असेल तर ' आत्यंतिक सुखाचा योग ' असे नाव देता येईल. दु:खाचा वियोग म्हणजे सुखाचा योग होय. सुखाचा योग व दु:खाचा वियोग मिळून समाधीची व्याख्या पूर्ण होते.

3) **स: योग: निश्चयेन योक्तव्य:** या समाधी योगाचा अभ्यास निश्चयपूर्वक करावा लागेल. ध्यानाच्या गहिऱ्या अभ्यासातून समाधी प्राप्त होते आणि समाधीचा अनुभव घेता येतो. हा अनुभव निश्चयपूर्वक घ्यायचा प्रयत्न केला जायला हवा अशी शिफारस इथे केली गेली आहे. अर्थात् गीतेचे हे कथन काही सर्वानाच बंधनकारक आहे असे समजायला नको. सर्वाना समाधीवस्थेचा लाभ घेता येईल असेही नसते. ध्यानाचा अनुभव घेणे प्राय: साधकाना शक्य आहे पण समाधीचा अनुभव घेणे प्राय: सर्व साधकाना शक्य नाही, तरी देखिल जे ध्यानाच्या गहिऱ्या अवस्थेत पोहोचू शकतात त्यानी निश्चयपूर्वक समाधीची ही अवस्था प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

4) **स: योग: अनिर्विण्णचेतसा योक्तव्य:** समाधीच्या या स्थितीत खिन्नता नको-अखिन्न म्हणजे प्रसन्न मन हवे. याचे कारण असे की समाधी प्राप्त करुन घ्यायच्या प्रयत्नात निराश करणारे प्रसंग येणारच. निराशेमुळे शिथिलता येते. प्रयत्न केल्यावरही फळाची प्राप्ती होत नाही असे कळल्यावर प्रयत्नांचा वेग मंदावून जातो. 'फलासक्ती नको' हा गीतेचा अत्यंत महत्वाचा सिध्दांत आहे. आपली स्थिती नेहमीसाठी अखंड प्रयत्नांची असावी. हा सिध्दांत बुध्दीमान्य असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात उतरवणे अवघड आहे. यामुळे गीता पुन:पुन्हा प्रत्येक अध्यायात या गोष्टीची आठवण करुन देत आहे की भक्ती असो वा

ज्ञान, योग असो वा ध्यान किंवा अगदी वैराग्याची साधना करत असताना का असेना फलाची आशा सोडून द्यायचा मूलमंत्र कदापि विसरता कामा नये.

: 24-25 :

*संकल्पप्रभवान् कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषत: ।*
*मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्तत: ॥*
*शनै: शनैरुपरमेद् बुध्द्या धृतिगृहीतया ।*
*आत्मसंस्थं मन: कृत्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **संकल्पप्रभवान् कामान्:** संकल्पाने उत्पन्न होणाऱ्या कामनांना
- **अशेषत: त्यक्त्वा:** समूळ त्याग करुन
- **मनसा एव:** मनानेच
- **इन्द्रियग्रामं:** तमाम इंद्रियांना
- **समन्तत: विनियम्य:** सर्व प्रकारे संयत राखून
- **धृतिगृहीतया बुध्द्या:** धैर्ययुक्त बुध्दीने
- **शनै: शनै: उपरमेत्:** हळू हळू विकारांनी मुक्त होण्याचे प्रयत्न करायला हवेत
- **मन: आत्मसंस्थं कृत्वा:** मनाला आत्म्याच्या ठायी स्थित करुन
- **किंचित् अपि न चिंतयेत्:** कुठल्याही विषयाचे चिंतन करायला नको

**अर्थ**

संकल्पाने उत्पन्न होणाऱ्या सर्व कामना पूर्णपणे टाकून आणि मनानेच इंद्रिय समुदायाला सर्व बाजुंनी पूर्णतया आवरुन

क्रमाक्रमाने अभ्यास करीत उपरत व्हावे, तसेच धैर्ययुक्त बुध्दीने मनाला परमात्म्यात स्थिर करुन मनाला परमात्म्यात स्थिर करुन दुसऱ्या कशाचाही विचार करु नये.

*संकल्पीं उठिले सारे काम नि:शेष सोडुनी*
*इंद्रियें हीं मनानें चि ओढूनि विषयांतुनी ।*
*धरुनि धीर बुध्दीनें निवर्तावें हळूं हळूं*
*आत्म्यांत मन रोवूनि कांहीं चिंतूं नये स्वयें ।*

**विषय:** या दोन श्लोकांमध्ये सहा गोष्टी आल्या आहेत. 1) संकल्पजन्य कामनांचा 2) अशेषत: म्हणजे समूळ त्याग करावा लागेल. 3) मनाने तमाम इंद्रियांवर सर्व प्रकारे संयम साधावा लागेल. 4) धैर्यपूर्वक 5) हळू-हळू मनाला विषय-विकारांपासून मनातील विचारांपासूनही मुक्त करायचा प्रयत्न करावा लागेल. 6) मनाला आत्म्याच्या ठायी संलग्न करुन कुठल्याही विषयाचे चिंतन करायला नको.

**स्पष्टीकरण**

1) **संकल्पप्रभावान् कामान्:** संकल्पामुळे जागणाऱ्या तमाम कामनांचा त्याग करायला हवा. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ वर्णनात **प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्** असे सांगितले आहे. मनाच्या तमाम कामनांचा त्याग करायचा विषय येतो. कामना-वासना संकल्पामुळे उपजतात आणि विकसतात. संकल्प त्यागायचा विषय नसून संकल्पांने जागणाऱ्या कामनांचा त्याग करायचा विषय आहे. याच अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात असे सांगितले गेले आहे की जोवर संकल्पाचा त्याग केला जात नाही तोवर योगी बनता येणे शक्य नाही. चौथ्या श्लोकात म्हटले आहे की तमाम संकल्पांचा त्याग करणारा 'योगारुढ' जाणावा. शंकराचार्य म्हणतात:

*सर्वान् च कामान् सर्वाणि च कर्माणि संन्यसेत् इत्यर्थ: ।*
*संकल्पमूला हि सर्वे कामा: । 'संकल्पमूल:*
*कामो वै यज्ञा: संकल्पसम्भवा:' (मनु 2/3)*

*'काम जानामि ते मूलं संकल्पात् त्वं हि जायसे ।*
*न त्वां संकल्पयिष्यामि तेन मे न भविष्यसि ।'*
*(महाभारत शांतीपर्व 177/25)* ***इत्यादिस्मृते: ।***

अर्थात् 'तमाम संकल्पांचा संन्यास घेतला आहे' या वचनाचा अर्थ असा की तमाम कर्मे आणि तमाम कामनांचा त्याग केला आहे कारण कामनांचे मूळ आहेत संकल्प. कामना संकल्पमूलक असतात. तमाम यज्ञ संकल्पांमुळे निर्माण होतात. स्मृती वचनाच्या आधारे हे सांगता येते "हे काम, तुझ्या मूळाला मी जाणतो. तू संकल्पामुळे उत्पन्न होतोस. तुझ्या साठी मी संकल्पच करणार नाही, मग तू माझ्या मनात कसा बरे उपजशील ?"

इथे संकल्पाचाही संकल्प न करायची सूचना आहे. हे वचन मार्मिक आहे. याचा अर्थ साधकाने संकल्पाच्याही अधीन होऊ नये असा आहे पण शुभसंकल्पाचा तर त्याग होऊ शकणार नाही ना? देह असेपर्यत काही-ना-काही शुभकार्य करावे लागेलच आणि शुभ संकल्पाविना का शुभकार्य साधता येईल?

इथे एक प्रश्न उद्भवू शकतो की कुठलेही कार्य करण्यापूर्वी संकल्प करावा लागतो आणि शंकराचार्य तर संकल्पाचा त्याग करायला सुचवताहेत पण शुभ संकल्पाचा तर त्याग नाही होऊ शकत. जोवर शरीर आहे तोवर काही-न-काही तर शुभकार्य करावेच लागेल आणि शुभ कार्य तर शुभ संकल्पाशिवाय होऊ शकणार नाही.

नवव्या अध्यायातील 16 व्या श्लोकात आपल्या विभूतींचे वर्णन करताना **'अहं क्रतु:'** मी संकल्प आहे असा उल्लेख येतो. शंकराचार्य आणि लोकमान्य टिळक यांनी 'क्रतु:' चा अर्थ यज्ञ केला. यज्ञ म्हणजे श्रुतीत वर्णिलेला म्हणजे श्रौतयज्ञ होय. यज्ञारंभापूर्वी संकल्प करावा लागतो, यामुळे विनोबांनी 'क्रतु:' शब्दाचा अर्थ संकल्प केला. बाळकोबांनाही हाच अर्थ भावतो. संकल्प जर ईश्वराची विभूती असेल तर संकल्पाचा पूर्ण त्याग करणे शक्य नाही. यामुळे शुभसंकल्प करत रहायला हवेत, अट एवढीच की याचीही आसक्ती नको. शुभसंकल्पाच्या वश होता कामा नये. अशुभ संकल्पाचे तर मनात कधीही जागरण होऊ नये. कार्याच्या दृष्टीने संकल्प उठतील, उत्पन्न होतील पण आपण कदापि संकल्पाच्या अधीन होता कामा नये. संकल्पामुळे कामना वासना उत्पन्न होतात. आधी बीज, मग अंकुर, वृक्ष, शाखा हा जसा क्रम आहे तसाच संकल्प हे आसक्तीचे बीज असून कामना-वासना वृक्ष होत. यातून पुनश्च नव-नवे संकल्प उत्पन्न होतील. संकल्पामुळे कामना-वासना उपजतील. कामना-वासनेमुळे संकल्प. याप्रमाणे हे चक्र अविरत सुरु रहाते. शुभ संकल्पाची आसक्ती नसेल आणि आपण त्याच्या अधीन नसू तर वासना-कामना फोफावणार नाहीत.

(2)अशेषत: **त्यक्त्वा** संकल्पामुळे जागणाऱ्या कामनांचा पूर्णत: त्याग. इच्छेने वासनेचे रुप धारण करु नये अशी काळजी घ्यायला हवी. शुभ संकल्प जागला की शुभ कामना जागतील. साधक त्याच्या अधीन झाला नाही तर मोक्षाच्या दृष्टीने काही धोका नाही. यामुळे संकल्प वा कामनेसोबत आपण शुभ हा शब्द जोडून देतो. आपण जर शुभच्या अधीन झालो नाहीत तर कामना - वासना व संकल्पाचा नि:शेष त्याग झाला असे समजावे.

देह असेपर्यत तर शुभेच्छा व शुभकामनांचा सर्वस्वी त्याग करणे शक्य नाही, पण ध्यान करताना मात्र मनाच्या सरोवरावर कामना-वासनेची लाट उसळता कामा नये कारण की ध्यानावस्थेत तर तमाम वासना-विकाराना रोखायचा अभ्यास झाला पाहिजे पण जागृतावस्थेत मात्र सारे व्यवहार आचरताना शुभेच्छा आणि शुभसंकल्पांचा त्याग करता येणे शक्य नाही.

या चोविसाव्या श्लोकात भगवान सांगताहेत की समाधी प्राप्त करायचे प्रयत्न कसे केले जावेत आणि समाधी प्राप्त करण्यासाठी जागृतीत कसे रहायला हवे हे ज्ञात असायला हवे. जेव्हा ध्यानाभ्यासाठी बसतो तेव्हा काय करायला हवे हेही ज्ञात असले पाहिजे.

10 ते 17 या आठ श्लोकामधून ध्यानाच्या पूर्व तयारीसाठी आसन वगैरे विषयक चर्चा आली आहे. जागृतीतल्या आहार-विहाराविषयी मार्गदर्शन आले आहे. 18 ते 23 या सहा श्लोकामधून ध्यान साधल्यावरची स्थिती आणि समाधी प्राप्त झाल्यावरच्या स्थितीविषयी चर्चा आली आहे. 24 ते 28 या श्लोकामधून समाधी स्थिती प्राप्त करुन घेण्यासाठी काय-काय करायला हवे याची पुनश्च चर्चा आली आहे.

3) **मनसा एव इन्द्रियग्रामं समतंत: विनियम्य:** सर्व प्रकारे इंद्रिय समूहाला संयमात राखून ही चर्चा यापूर्वीही आली आहे. इथे प्रयुक्त 'मन' शब्दाचा अर्थ विनोबा 'मनन' असा घेतात. मन म्हणजे काही बाह्य आसन, प्राणायाम वगैरे साधना नव्हे. इंद्रियावर मनाने ताबा मिळवण्याचा अर्थ मनाने विषयवासनेची असारता वा नि:सारता मननपूर्वक जाणून घेतली तर मग इंद्रियांवर त्वरीत ताबा मिळवता येतो आणि तो टिकूनही राहतो. केवळ बाह्यत: केलेला इंद्रियविरोध शाश्वत स्वरुपाचा नसतो. चिंतन-मननाच्या मदतीने विषयाबाबतची वैराग्य भावना जागली तर जागृतावस्थेतही इंद्रियसमूह मनाच्या अधीन राहू शकेल आणि ध्यानात बसल्यावर मन सहजी एकाग्र होऊन जाईल.

4) **धृतिगृहीतया बुध्द्या:** ध्यानावस्थेत सर्व विकाराना हटवायचे आहे पण सारे विकार एकदम दूर होतील असे काही होणार नाही. ही अवस्था हळूहळू प्राप्त होऊ शकेल असे गीतेचे म्हणणे आहे पण हळूहळू शिथिलता येऊ लागते परिणामी बुध्दी सोबत धैर्याचे बळ असेल तर विचाराला दृढतेने मनातून घालवता

येते. बुध्दीच्या ठायी चिंतनशक्ती असली तरी नियमन शक्तीचा अभाव आहे. धैर्यशक्तीमुळे नियमन होते. धृती म्हणजे धैर्य हे सात्विक, राजसी, तामसी अशा तीन प्रकारचे असते. या तिन्ही प्रकारच्या धैर्य शक्तीची लक्षणे अठराव्या अध्यायातील 33 ते 35 या तीन श्लोकामधून वर्णिली आहेत. सात्विक धृतीच्या लक्षणाना जीवनात उतरवण्यासाठी धृती बळाचा उपयोग होऊ शकतो. धृती म्हणजे स्वत:ला खेचून ठेवण्याची शक्ती. या शक्तीच्या जागृतीसोबत बुध्दी-विवेक सदा टिकून रहातो. कधी आपला विवेक अत्यंत जागृत आणि बलवान असतो तर कधी बलहीन आणि निष्प्राण असतो आपण आपल्या धैर्य शक्तीला विकसित करत नसतो, हेच याचे कारण असते. धृती शक्तीची मदत विवेकाला झाली तर विवेक दुबळा ठरणार नाही. रोज वृध्दींगत होत राहील आणि एका स्थिर स्थितीचा आपल्याला अनुभव येईल. आपण प्राप्त करुन घेतलेल्या चांगल्या स्थितीत काही चढ-उतार येणार नाहीत. अठराव्या अध्यायातील 51 वा श्लोक म्हणतो- **बुध्द्या विशुध्दया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च** "विशुध्द बुध्दीने युक्त होतो. धैर्यपूर्वक मनावर काबू राखतो" असे ब्रह्मज्ञानीचे लक्षण आहे. यावरून धृतीचे मोल ध्यानी यावे. मन-बुध्दीत सामर्थ्य जागवणारी आणि कदापि शिथिलता येऊ न देणारी ही शक्ती आहे.

5) **शनैः शनैः उपरमेत्:** हळूहळू मनाला शांत करावे. हळूहळू मनातून विचारांना काढण्याचा प्रयत्न करावा. मनाच्या ठायी सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. नेमक्या कुठल्या गुणात वाढ करावी, हे आपल्यावर अवलंबून आहे. गीतेचे म्हणणे असे की सत्वगुणाचाच उत्कर्ष करायला हवा. तमोगुण वाढले तर आळस राहील आणि रजोगुणात वृध्दी झाली तर मन चंचल होईल. मन स्वस्थ-स्थिर राहील तर विचारांना रोखण्यात यश लाभेल. सत्वगुणाच्या उत्कर्षाने मन प्रसन्न रहाते पण सत्वगुणाची आसक्ती असली तर मन स्वस्थ कसे बरे राहील? सत्वगुण हळूहळू वाढवत जाऊन त्याची आसक्ती सोडून ध्यान धरतांना मनातील विचार-भावनांना त्यजून द्यायचे प्रयत्न करायला हवेत.

6) **मनः आत्मसंस्थं कृत्वा किंचित् अपि न चिंतयेत्:** मनाला आत्मा-परमात्म्याच्या ठायी एकाग्र करुन निर्विचार स्थिती जागायला हवी. विचारावर नियंत्रण मिळवण्याचा दुसरा उपाय मनाला परमात्म्याच्या ठायी एकाग्र करणे हा आहे. गाढ निद्रासमयी आपण ईश्वराच्या ठायीच एकरुप असतो, पण आपल्याला त्याचे भान नसते. रोज भगवंताशी एकरुप असण्याचा अनुभव तर आपण घेतच असतो. अर्थात् जागृत अवस्थेत या गोष्टीचे भान आपल्याला नसते. झोपेत आपण कुठे होतो? या गोष्टीचा आपण विचार देखिल करत नाही. निद्रावस्थेप्रमाणे ध्यानावस्थेतही आपण ईश्वराशी एकरुप असतो. यामुळे जागृतावस्थेत जर आपल्याला ईश्वरी अस्तित्वाचा अनुभव होत जाईल-स्मरण राहील तर मग ध्यान करत असताना परमात्म्याच्या ठायी मनाला स्थिर करणे अवघड जाणार नाही.

: 26 :

*यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।*
*ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यतः यतः** जिथून जिथून म्हणजे ज्या ज्या पंचविषयांपासून
- **मनः चंचलं:** मन राग-द्वेष वगैरेमुळे चंचल होऊन
- **अस्थिरं:** अस्थिर होऊन
- **निश्चरति:** परमात्म्यापासून लांब चालले जाते, प्रापंचिक विषयात भटकत रहाते
- **ततः ततः** तिथून तिथून म्हणजे शब्द वगैरे विषयांपासून
- **एतत् नियम्य:** मनाला हटवून
- **आत्मनि एव:** आत्म्यातच
- **वशं नयेत्:** ताब्यात ठेवायला हवे, एकाग्र करायला हवे

**अर्थ**

हे स्थिर न रहाणारे चंचळ मन ज्या ज्या शब्द वगैरे विषयांच्या निमित्ताने संसारात भटकत असते त्या त्या विषयांपासून त्याला आवरुन वारंवार परमात्म्यात स्थिर करावे.

*फुटेल जेथजेथूनि मन चंचळ अस्थिर*
*तेथतेथूनि बांधूनि लावावें आत्म-चिंतनीं ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) पंचविषय आणि राग-द्वेष वगैरे दोषांमुळे मन चंचळ आणि अस्थिर होऊन परमात्म्यापासून लांब होऊन जाते. (2) त्या त्या पंच विषयांपासून मनाला हटवून (3) आत्म्याच्या ठायी म्हणजे परमात्म्याच्या ठायीच एकाग्र करायला हवे.

**स्पष्टीकरण**

1) मन चंचळ आणि अस्थिर असते याचे मुख्य कारण - महत्वाचे कारण - बाह्य पंचविषय आहेत. पंचविषयांचे अस्तित्व नसेल तर मन अस्थिर व्हायचे काही कारणच उरणार नाही. पंचविषयांचा मूलाधर परमात्माच आहे. स्थूल आधार पंच महाभूते होत. सारे स्थूल पदार्थ पंच महाभूतांचीच निर्मिती होय. प्रत्येक पदार्थाच्या ठायी शब्द, स्पर्श, रस, रुप, गंध हे पाच गुण असतातच असतात. हे पाच गुण म्हणजे पंच विषय. याना जाणून घेण्याचे साधन पंच ज्ञानेंद्रिये होत. पदार्थाचे ज्ञान केवळ इंद्रियांमुळेच होत नाही. यासाठी मनाची आवश्यकता असते. मनाच्या ठायी चिंतन शक्ती वसते. हीच बुध्दी होय. या सर्वाच्या पाठीमागे स्वयं साक्षात् परमात्मा आत्म्याच्या रुपाने प्रकट असतो.

अर्थात् मनाला चंचळ करायला काही केवळ पंच विषयच कारणीभूत आहेत असे नाही. जोवर विषयांचे ज्ञान होत नाही तोवर मन अस्थिर होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. विषयांबाबत मनात वसणारा राग-द्वेष, प्रिय-अप्रिय असा जो परस्परविरोधी-द्वंद्वात्मक भाव आहे हेही एक कारण मनाच्या अस्थिरतेचे आहे. बाह्य पदार्थाबाबत मनाच्या ठायी दोन प्रकारच्या आसक्ती जागतात. एक म्हणजे - काही विषयांबाबतची प्रीत आणि काही विषयांबाबतची अप्रीत. ही परस्पर भावना प्रत्येकाच्या मनी उतरतेच. बाह्य विषयांची आसक्ती लोपली आणि या परस्पर विरोधी भावना विराम पावल्यात तर मन चंचल व्हायचे काही कारण नाही. अस्थिरतेची दोन कारणे झाली. एक म्हणजे बाह्य पंच विषयांचे अस्तित्व आणि दुसरे त्यांच्याबद्दल उपजणारा राग-द्वेष भाव. मुख्य कारण राग, द्वेष भाव. विषय उपस्थित झालेत पण राग, द्वेष भाव नसेल तर मन अस्थिर कसे होईल ? जगात पदार्थ तर असतीलच, त्यावर का आपला काबू राहील ? मनावर आपण ताबा मिळवू शकतो. मनाच्या शक्तीचा सदुपयोग केला तर मन स्थिर होऊ शकते.

2) **ततः ततः एतत् नियम्यः** पंच विषयांमुळे मन अस्थिर होते. त्यांच्यापासून मनाला दूर ठेवायचे प्रयत्न व्हायला हवेत. पंच विषयांचे जबर्दस्त आकर्षण लोप पावले तर मन स्थिर राहील. विषयांच्या आकर्षणाच्या परीघाबाहेर आपल्याला रहाता-जगता यावे यासाठीच तर सारी साधना आहे. गोस्वामी तुलसीदासांनी सत्संगतीचे महत्व गाईले आहे. ते म्हणतात की **प्रथम भगति संतन्ह कर संगा** संत समागमामुळे विषयांप्रती वैराग्यभाव जागतो. संत उपलब्ध नसतील जर जे आपल्याहून थोडे अग्रेसर आहेत अशांच्या सहवासासाठी प्रयत्नशील रहावे लागेल. गीता, ब्रह्मसूत्र, रामायण, ज्ञानेश्वरी यासारखे आध्यात्मिक ग्रंथ अध्ययनार्थ घेतले पाहिजेत. आध्यात्मिक ग्रंथांचा वेचक-निवडक-भाग पाठ करायला पाहिजे. संत वचनांचा मन-बुध्दीत जागर मांडता आला तर विषयांबाबतचे आकर्षण हळूहळू कमी व्हायला लागेल. सत्संगानंतर निरंतर सत्कर्मावर प्रीत करायला हवी. यामुळे चित्ताची एकाग्रता साधते. आनंदाचा अनुभव जागतो. विषयाकर्षण न्यून होते. या आकर्षणाच्या मूळाशी विषयानंद असतो. संत वचनात एकाग्रता आणि सत्कर्मात तल्लीन झाल्यामुळे जर आनंद लाभतो तर विषयांपासून लाभणारा आनंद क्षीण होत जाईल.

मन बालकासारखे हट्टी असते. बालकाच्या हट्टाचे कारण अविवेक असते. बालक जिद्दी बनते. विवेकी माता बालकाची समजूत घालते. मनाशी वागायची हीच पध्दत आहे. मनावर जोर जबर्दस्ती करुन भागत नाही. सूतात गाठ पडली तर काळजीपूर्वक उकलावी लागते अन्यथा सूत तुटू शकते. गाठ मजबूत व्हायला नको. गुंता वाढायला नको आणि सूतही तुटायला नको. अशी काळजी घ्यावी लागते. मनाचीही स्थिती अशीच असते. मनाला विवेकपूर्वक समजाऊन सांगावे लागते. विषय वासनांचा फोलपणा समजवावा लागतो. विषयांपासून परावृत्त करावे लागते. ही क्रिया हळूहळू करावी लागते. बागेला पाणी देताना मातीच्या वाफ्यातून पाणी सैरावैरा धावते. मध्येच पाणी वहायला लागते. थांबवावे लागते. बांध फुटून जातो. सांधावा लागतो. पाण्याला रोखावे लागते. मन असेच सैरावैरा धावू लागते. त्याला विवेकाने समजवावे लागते. विवेकाने क्रिया पालटावी लागते असे समर्थ रामदास म्हणतात.

3) मनाला विषय वासनांपासून परावृत्त करुन **आत्मनि एव वशं नयेत्** आत्मा म्हणजे परमात्म्याच्या

ठायी स्थिर करावे लगते. ताब्यात ठेवावे लागते. मनाला कुठे स्थिर करावे याचाही विवेक जपावा-सांभाळावा लागतो. या श्लोकाच्या अखेर हे सांगितले आहे की मनाला विवेकपूर्वक विषयांपासून परावृत्त करुन परमेश्वराच्या ठायी स्थिर करण्याच्या दिशेने प्रयत्न करायला हवेत. यच्चयावत सृष्टीत परमेश्वर व्याप्त आहे पण बाहेर परमात्म्याने विषयांचे - पंच महाभौतिक पदार्थाचे वस्त्र परिधान केलेले असल्यामुळे तो परमात्मा आपल्या दृष्टीस पडत नाही पण मनात तो प्रकट झालेला असतो. यामुळे प्रकट परमात्म्याच्या ठायी आपण आपले मन स्थिर करु शकतो. प्रकट परमात्म्याचे स्वरुप स्थूल आहे असे नव्हे. तो सत् चित् आनंद रुपाने मनात स्थिर आहे. विषयांपासून परावृत्त होऊन मन स्थिर झाले तर आत प्रकट झालेल्या परमात्म्याशी ते संलग्न होईल.

: 27 :

*प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।*
*उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रशान्तमनसं:** ज्यांचे मन अतिशय शांत आहे
- **योगिनं:** (अशा) योग्याला
- **शांतरजसं:** ज्याचा रजोगुण शांत झाला आहे अशा
- **ब्रह्मभूतं:** (अशा)ब्रह्ममय पुरुषाला
- **अकल्मषं:** अधर्म वगैरे मळरहित, दोष रहित
- **उत्तमं सुखं:** निरतिशय सुख
- **उपैति:** प्राप्त होते

**अर्थ**

कारण ज्याचे मन पूर्ण शांत आहे, जो पापरहित आहे आणि ज्याचा रजोगुण शांत झालेला आहे, अशा या सच्चिदानंदघन ब्रह्माशी ऐक्य पावलेल्या योग्याला उत्तम आनंद मिळतो.

*विकारांसह तें ज्याचें शमलें मन निर्मळ*
*झाला ब्रह्म चि तो योगी पावला सुख उत्तम ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) अत्यंत शांत मनाच्या योगीजनाला, 2) रजोगुण म्हणजे काम-क्रोध वगैरे विकार शांत झालेल्या ब्रह्मीभूत पुरुषाला, 3)अकल्मष म्हणजे अधर्मरहित, स्वच्छ, अत्युत्तम सुखे प्राप्त होतात.

**स्पष्टीकरण**

1) **प्रशान्तमनसं योगिनम्: शां**त मनाचा योगी ध्यानयोग साधनेत यश प्राप्त करुन घेतो. चित्ताला परमात्मतत्वाचा अनुभव येतो. स्वाभाविकपणेच मन शांत-तृप्त होऊन जाते. परमात्मा अखंड, शाश्वत असल्यामुळे परमात्म्याच्या अनुभवाद्वारे प्राप्त होणारी शांतीही अखंड स्वरुपाची असते. सत्संगतीत लाभणारी शांती श्रेष्ठ असली तरी अखंड स्वरुपाची नसते. त्यात वियोगाचे दुःख असतेच. वियोगाची वेदना असतेच. यामुळे सत्संगतीत रहाणाऱ्यांनाही स्वावलंबी बनायला हवे.

2) **शांतरजसं ब्रह्मभूतः** रजोगुण शांत झाल्यावर ब्रह्मभूत होता येते, ब्रह्मतत्वाच्या ठायी लीन होता येते. 'योगी' आणि 'ब्रह्मस्वरुप' असे दोन शब्द इथे वापरले गेलेत. चित्त आणि रजोगुण शांत करायचा विषय इथे आला आहे याचे कारण असे की आत्मतत्व आहे.

योगी आणि ब्रह्ममय पुरुषात थोडे अंतर करता येईल. ध्यानावस्थेत योगी चित्ताला शांत करतो. ध्यानसमयी चित्ताच्या ठायी विकार जागू देत नाही याचा अर्थ जागृतीतही विकार नष्ट झालेत असा काही करता येत नाही. जागृतावस्थेतील व्यवहारात विकार डोके वर काढतात. ध्यानसमयी ईश्वराधीन झाल्यामुळे - परमेश्वराच्या ठायी लीन झाल्यामुळे तेवढा काळ विकार शांत होतात पण जागृतावस्थेतही ज्याचे रजोगुण म्हणजे विकार शांत झालेत अशा योगी जनासाठी ब्रह्मस्वरुप हा शब्द आला आहे.

3) **अकल्मषं उत्तमं सुखं उपैति:** अधर्म आणि पापाचरणामुळे चित्ताच्या ठायी मळ उत्पन्न होतो. मलरहित अतिशय शुध्द आणि निरतिशय आनंद ब्रह्मस्वरुप योगीजनाना प्राप्त होतो. अशाप्रकारे सर्वाना शांती वा आनंदाचा अनुभव होतोच पण आपली शांतता वा आनंद विकारी अवस्थेतला असतो. निर्विकार स्थितीतल्या आनंदाची प्रतवारीच न्यारी! विषयांच्या द्वारे तात्कालिक सुख वा आनंदलाभ होतो पण शाश्वत स्वरुपाचे - चिरकालिक सुख वा आनंदलाभ होत नाही. चिरकालिक म्हणजे अखंड स्वरुपाचा आनंद तर परमात्म्याच्या ठायी

चित्त लीन झाल्यावर लाभेल. विश्वाप्रती परमात्मदृष्टीचा लाभ झाला तर जडचेतनाच्या ठायी परमात्मा व्याप्त असल्याचा बोध होतो. हा अनुभव आनंदलाभ करुन देईल. हा अनुभव आनंदाचा, तृप्तीचा ठरेल.

: 28 :

*युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।*
*सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एवं सदा आत्मानं युंजन्:** अशा प्रकारे सदैव स्वत:ला ध्यानात युक्त राखणारा
- **विगतकल्मषः** ज्याची पातके नष्ट झाली आहेत (असा)
- **योगी:** योगी
- **ब्रह्मसंस्पर्शम्:** ज्याचा ब्रह्माशी स्पर्श झाला आहे असा
- **अत्यन्तं सुखं :** निरतिशय सुख, अंतहीन सुख
- **सुखेन अश्नुते:** अनायासे प्राप्त करुन घेतो, अनुभव घेतो

**अर्थ**

तो निष्पाप योगी अशा प्रकारे सतत आत्म्याला परमात्म्याशी जोडून सहजपणे परब्रह्म परमात्म्याच्या प्राप्तीच्या अपार आनंदाचा अनुभव घेतो.

*आत्म्यास नित्य जोडूनि ह्यापरी दोष जाळुनी*
*सुखें चि भोगितो योगी ब्रह्मानंद अपार तो।*

**विषय:** या प्रकरणाचा हा अखेरचा श्लोक आहे. यात चार गोष्टी आहेत (1) अशा प्रकारे स्वत:ला नेहमी ध्यानात राखणारा (2) ज्याची पातके नष्ट झालेली आहेत असा योगी (3) ज्याचा ब्रह्माशी संस्पर्श झाला आहे (4) तो निरतिशय, अंतहीन सुखाला अनायासे प्राप्त करुन घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **पहिली** गोष्ट अशी आहे की एवं **सदा आत्मानं युंजन्:** स्वत:ला सदैव ध्यानात जोडून घेतलेला योगी. या अध्यायातल्या 10 ते 28 या श्लोकामधून ध्यानयोग साधनेचा उल्लेख आला आहे. या साधनेला अखंडपणे आचरणारा योगी निरतिशय सुख प्राप्त करतो. ध्यानाचा अभ्यास अखंडपणे चालायला हवा. थांबलेले-थबकलेले ध्यान ना दृढ होत ना त्यात सघनता येत. यामुळे ध्यान-धारणा नित्य सुरु असावी.

2) **विगतकल्मष:** ब्रह्मज्ञानासाठी पापाला प्रतिबंध घालणे गरजेचे आहे. जन्मजन्मांतरीची पाप कर्मे आणि त्यांचे संस्कार ब्रह्मज्ञान प्राप्तीत अडथळा ठरतात. या जन्मी पापकर्मे केली नसतील वा करत नसतील आणि पुण्यकर्माचेच संपादन करत असाल तरीही परमात्मविषयक ज्ञान प्राप्त होत नाही, याचे कारण पूर्वजन्मीची पातके होत. व्यक्ती पाप-पुण्य दोन्ही प्रकारची कर्मे करतो. दोघांची फळे भोगावी लागतात. ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीत पुण्यकर्मे सहायक असून पापकर्मे बाधक आहेत. साधकावस्थेत पूर्वजन्मी केलेल्या पापकर्माच्या संस्कारांमुळे अंतर पडते. पाप कर्माचे संस्कार क्षीण झाल्यावरच ब्रह्मसंस्पर्श होतो.

3) **ब्रह्मसंस्पर्श:** ब्रह्मतत्वाशी झालेला संस्पर्श ब्रह्मसंस्पर्श होय. पाचव्या अध्यायातील 22 व्या श्लोकात विषय स्पर्शाने उजपणारे दु:ख असते ही चर्चा आली आहे. इंद्रियांच्या विषयाच्या संबंधातून निर्माण लाभणारे सुख या उलट प्रकारचे आहे.

4) **अत्यंतं सुखं सुखेन अश्नुते:** ब्रह्मसंस्पर्शलाभ करणाऱ्याना निरतिशय, अखंड सुख सहजपणे उपलब्ध होते. हे सुख निरतिशय असते. सर्वश्रेष्ठ असते. अनायास लाभते.

खरे तर साधारणत: बाह्य विषय सुख सुलभ असल्याचे मानले जाते. ही सुखे क्षणभंगुर असतील तरी सुलभ वाटतात. ब्रह्मसुख सहजतेने लाभते. यासाठी दोन शर्तीचे पालन करावे लागते. एक म्हणजे ईश्वराशी एकरुप होण्यासाठी ध्यानाचा सराव करुन साफल्य मिळवावे. दुसरी अट अशी की कल्मष म्हणजे पापकर्माचे संस्कार क्षीण व्हायला हवेत. ध्यान योगाच्या अभ्यासातील साफल्य आणि पाप संस्कारांची क्षीणता या बाबी जर साधल्या गेल्यात तर ब्रह्म संस्पर्शाने साध्य होणारे सुख-निरतिशय सुख सहजी लाभते. परमात्म्याशी एकरुपतेच्या अनुभूतीसाठी या अध्यायात ध्यानाच्या अभ्यासाचा मुद्दा आला आहे. ध्यानाच्या साधनेमुळे आत्यंतिक सुखलाभ होतो. या एकरुपतेला ब्रह्मसंस्पर्श असे म्हणतात. या ब्रह्मसंस्पर्शरुपी अद्वैताला शंकराचार्यांचे गुरु आचार्य

गौडपाद यांच्या मांडुक्योपनिषदाच्या कारिकेत 'अस्पर्श योग' असे म्हटले गेले आहे.

*अस्पर्शयोगो वै ना सर्वसत्व सुखोहितः ।*
*अविवादो विरुध्दश्च देशितस्तं नमाम्यहम् ॥*

अर्थात् "तमाम जीवांना सुख देणारा, सर्वांचे परम कल्याण करणारा आणि ज्याच्या ठायी वाद विवादाची किंचिन्मात्रही शक्यता नाही, जो कुणाचा विरोध करत नाही त्याला 'अस्पर्श योग' असे म्हणतात. या शास्त्रात वर्णित उपदेशाला मी नमस्कार करतो."

यात विषयांचा स्पर्श नसल्यामुळे याला 'अस्पर्श योग' असे म्हणतात. यात केवळ ब्रह्मतत्वाचा स्पर्श म्हणून ब्रह्मस्पर्श वा ब्रह्मसंस्पर्श! हे अद्वैत दर्शन असल्यामुळे याच्या ठायी आत्यंतिक सुखाचा अनुभव साठवलेला आहे. हे परम मंगलमय, परम कल्याणकारी असे जीवनधन आहे. अद्वैतात सवांर्चाच समावेश असल्यामुळे कुणाशीही वादविवाद नसतो, कुणाचा विरोध नसतो. द्वैती आपापसात भांडणे करु शकतात पण अद्वैती भांडणे मिटवतात. द्वैताचा विरोध न करता अद्वैत द्वैताला मिथ्या सिध्द करते. यामुळे द्वैत अद्वैताला विरोध करु शकत नाही.

: 29 :

*सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।*
*ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगयुक्तात्मा:** जो योगयुक्त आहे, ज्याचा आत्मा सर्वव्यापी अनंत चेतनात ऐक्य पाऊन ती ऐक्य स्थिती नित्य राखणे हाच कोणी एक योग त्या योगाशी युक्त झाला (तसेच)
- **सर्वत्र समदर्शन:** आणि यामुळेच जो सर्वत्र हरीदर्शनच करतो
- **सर्वभूतस्थं आत्मानं:** (तो) सर्वभूतांमध्ये आत्म्याला
- **च आत्मनि भूतानि:** आणि आपल्या ठायी सर्व भूतांना
- **ईक्षते:** बघतो

**अर्थ**

ज्याचा आत्मा सर्वव्यापी अनंत चैतन्यात ऐक्य स्थितीरुप योगाने युक्त असून जो सर्वांना समभावाने पाहणारा आहे, असा योगी आत्मा सर्व प्राणीमात्रात स्थित व सर्व प्राणीमात्र आत्म्यात कल्पिलेले पाहतो.

*भूतांत भरला आत्मा भूतें आत्म्यांत राहिलीं*
*योगानें जोडिला देखे हें चि सर्वत्र दर्शन ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) योगयुक्त मनाचा साधक सर्वाच्या ठायी समदर्शन म्हणजे परमात्मदर्शनच करतो. 2) असा पुरुष सर्व भूतांच्या ठायी आत्म तत्वाला म्हणजे स्वत:ला बघतो. 3) स्वत: म्हणजे आत्म तत्वाच्या ठायी तमाम भूतमात्राना बघतो.

**स्पष्टीकरण**

ध्यानयोगाच्या गहिऱ्या अवस्थेत लागते समाधी. समाधी प्राप्त झाल्यावर जागृतावस्थेत देखिल कुठली स्थिति प्राप्त होते वा कुठली स्थिति प्राप्त व्हायला हवी याची चर्चा या व यापुढील श्लोकांमधून गीता करत आहे.

(1) **योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः** समाधीचा अनुभव प्राप्त झाला म्हणजे जागृतावस्थेत तीन प्रकारच्या अवस्था व्हायला हव्यात. एक ज्ञानावस्था. दुसरी भावावस्था. तिसरी क्रियावस्था. जागृतावस्थेतही चित्त परमात्म्याशी संलग्न राहील ही झाली ज्ञानावस्था. परमात्म्याशी अनुसंधान राखूनच तमाम घटना घटित होतील. **'सर्वत्र समदर्शनः'** यामुळे असे घडेल. सर्वत्र समदर्शन म्हणजे परमात्म दर्शन घडल्यामुळे तमाम क्रिया करताना परमात्मस्मरण राहील. ध्यानाच्या गहिऱ्या स्थितीत परमात्म्याचा स्पर्श होऊन जातो, परिणामी जागृतावस्थेत परमात्म स्पर्श होतो. यामुळे सर्वत्र (जागृतावस्थेत) सगळ्यांकडे बघायची परमात्मदृष्टी लाभायला हवी. असे जर घडले नाही तर समाधी अवस्थेत परमात्म्याचा जो स्पर्श लाभला तो निरर्थक ठरतो. तो लाभ घडला नाही असे होईल.

तसे तर समाधीवस्था एक सखोल लयावस्था आहे. निद्रावस्थेतही लय लागते, पण एक तर ही आपोआप लागते आणि खोल नसते. समाधीत लय सखोल. लय अशी घनदाट की देहाचा एखादा भाग छाटून टाकला तरी पत्ता लागत नाही. समाधी आत्यंतिक प्रयत्नांती लाभणारी

अवस्था आहे, निद्रा आणि समाधीत हे अंतर आहे. हा फरक आहे. तरी लयावस्था मात्र दोन्ही ठिकाणी सारखीच नांदते. हो, एक फरक मात्र आहे की निद्रावस्थेतून जागृतावस्थेत आल्यावर आधीपेक्षा काही अधिक फरक नसतो. फरक एवढा असतो की निद्रावस्थेपूर्वी देहात थकवा होता - मन - इंद्रियांची शिथिलता होती तशी निद्रावस्थेनंतर न रहाता देह-मन, इंद्रियांच्या ठायी स्फूर्ती जागते. ताजेपणाचा अनुभव येतो. समाधीनंतरच्या जागृतावस्थेत परमतत्वाशी अनुसंधान आणि जगाकडे बघण्याची परमात्मदृष्टी प्राप्त होऊ शकते. समाधी अवस्था ही ज्ञानावस्था आहे. यामुळे या श्लोकात ज्या ज्ञानावस्थेची चर्चा आली आहे ती काही समाधी प्राप्त झाल्यावर निश्चितपणे लाभतेच असे नव्हे. समाधीनंतर ताबडतोब ज्ञानावस्थेची चर्चा आल्यामुळे समाधीनंतर ज्ञानावस्था वा समाधीचा परिणाम ज्ञानावस्था असे वाटायची शक्यता आहे. यात फरक एवढाच की समाधीनंतर ज्ञानावस्था जागली तर चांगले. खरे तर समाधीचे लक्ष्यही ज्ञानावस्थेची प्राप्ती असायला हवे. समाधी अवस्थेमुळे ज्ञानावस्था, भावावस्था आणि क्रियावस्था साधल्या जायला हव्यात. असे झाले तर ते सहज - स्वाभाविक मानता येईल पण समाधीनंतर ज्ञानावस्था वगैरे तीन अवस्था प्राप्त होऊ शकतील वा प्राप्त होणारही नाहीत. यामुळे हे ज्ञानावस्थेचे प्रकरण स्वतंत्रपणे सुरु केले आहे असे मानायला हवे. समाधीच्या अंतर्गत हे प्रकरण नाही.

सर्वत्र परमात्मदर्शन - हरीदर्शन - घडल्यामुळे जागृतावस्थेतील क्रियांच्या समवेत परमात्म स्मरणाचे अनुसंधान राहू लागते म्हणजे क्रिया अखंड हरीस्मरण पूर्वक घडू लागतात.

ज्ञानावस्थेत आणि पुढील श्लोकात जे भावावस्थेचे वर्णन येईल त्या दोघात एवढे अंतर आहे की ज्ञानावस्थेत निर्गुण-निराकार, निरंग-निरवयव परमात्म्याचे अस्तित्व मानले जाते. सृष्टीच्या अन्य पदार्थांचे अस्तित्व मानले जात नाही. सागरात लाटा, बुडबुडे, फेस उसळतो. जळाच्या दृष्टीने बघू गेले तर या काही स्वतंत्र वस्तु नाहीत. जळालाच लाभलेली ही विविध नावे होत. जगाकडे बघायची ही झाली ज्ञानदृष्टी. केवळ कारण दृष्टीनेच जग न्याहाळणे आणि कारणाने निर्मित अशा कार्याकडे अजिबात लक्ष न देणे, कार्याला मुळीच मान्यता न देणे ही झाली ज्ञानावस्था. ज्ञानावस्थेतील सृष्टी निर्गुण ब्रह्म्याची सृष्टी असते. बाराव्या अध्यायात निर्गुण-सगुण भक्तीची चर्चा येते. निर्गुण भक्तीची भूमिका ज्ञानावस्थेची तर सगुण भक्तीची भूमिका भावावस्थेची असते. ज्ञानावस्थेच्या भूमिकेत जगताच्या भासमान अशा अस्तित्वालाही काही महत्व न दिल्यामुळे जगताप्रती आत्यंतिक वा कठोर अलिप्ततेचा अनुभव येऊ शकतो.

विनोबांच्या मते एकाच ज्ञान्याला तीन प्रकारच्या अवस्थांचा अनुभव येतो. तो ज्ञानावस्था, क्रियावस्था आणि भावावस्थेचा अनुभव घेत जगतो. ज्ञानावस्थेचा योगी, भावावस्थेचा योगी आणि क्रियावस्थेचा योगी अशा प्रकारे स्वतंत्रपणे पुरुषांची कल्पना करणे योग्य नव्हे.

2) **सर्वभूतस्य आत्मानम्:** तमाम भूतमात्रांच्या ठायी आत्मा वसतो. हे सारे ज्ञानी ज्ञानस्थितीत बघतो-अनुभवतो. ज्ञानावस्थेत जगताचे अस्तित्व लोप पावते, लुप्त होते.

ज्ञानावस्थेची क्रिया कमालीच्या तटस्थ भावनेने होते. त्यात प्रेम उसळताना दिसून येत नाही. काही शुष्कताच नजरेला पडते. ज्ञानीपुरुष क्रियेच्या ठायी सत्-असत् असा भेद करतो, पण त्या क्रियांमध्ये भाव वा आनंदाची उत्कटता प्रकट होत नाही. क्रियेत दक्षता, सावधपण, जागृती दिसून येते पण भावावस्थेत असताना क्रियेच्या ठायी जो भक्तीभावाचा उत्कर्ष दिसून येतो तो काही ज्ञानावस्थेत प्रकट होत नाही.

3) **सर्वभूतानि आत्मनि:** आत्मा म्हणजे परमात्म्याच्या ठायी तमाम प्राणीमात्र सामावलेले आहेत. भूतमात्रांचे स्वतंत्र असे अस्तित्व नाहीच. घट मातीतच सामावून राहतो. लाटा-बुडबुडे हे जळातच सामावलेले असतात. तसेच जगाचे काही स्वतंत्र अस्तित्व नाही. ज्ञानावस्थेत दुहेरी अनुभव लाभतो-परमात्म्याच्या ठायी प्राणीमात्राना बघणे आणि प्राणीमात्रांच्या ठायी परमात्म्याचे दर्शन करणे हे ज्ञानदर्शन या श्लोकात आले आहे.

: 30 :

***यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।***
***तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य:** तो ज्ञानी पुरुष
- **मां सर्वत्र पश्यति:** सगळ्या जगात मलाच (परमेश्वरालाच) बघतो

- **च सर्वं मयि पश्यति:** आणि संपूर्ण जगाला माझ्यात (परमेश्वरात) बघतो
- **तस्य अहं न प्रणश्यामि:** त्या ज्ञान्यासाठी मी कदापि नष्ट होत नाही
- **च स: मे न प्रणश्यति:** आणि तो माझ्यासाठी कदापि नष्ट होत नाही

**अर्थ**

जो पुरुष सर्व प्राण्यात सर्वांचा आत्मा असलेल्या मला वासुदेवालाच व्यापक असलेला पहातो आणि सर्व प्राण्याना मज वासुदेवात पहातो, त्याला मी अदृश्य असत नाही आणि मला तो अदृश्य असत नाही.

***मज सर्वात जो पाहे पाहे माझ्यांत सर्व हि***
***त्याचा मी आणि तो माझा एकमेकांस अक्षय।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) जो सर्वत्र हरीचेच दर्शन करतो, 2) आणि तमाम जगाला ईश्वरातच बघतो, 3) त्या ज्ञान्यासाठी हरी कदापि नष्ट होत नाही 4) आणि हरीसाठी तो ज्ञानी कदापि नष्ट होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **यो मां सर्वत्र पश्यति:** मागील श्लोकात ज्ञानावस्थेचे वर्णन आले. या आणि पुढील दोन श्लोकात क्रियावस्थेचे वर्णन आहे. ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानावस्थेत जगत्‌रुपी कार्याचे काही मोल नाही. यामुळे तो जगताला तटस्थ दृष्टीने बघतो. जगात पसरलेल्या दु:ख, दारिद्र्य, दैन्य, कलह या सारख्या दोषाना बघूनही त्याचे चित्त द्रवित होत नाही. त्याच्या लेखी ही सारी माया आहे. तरी सुध्दा तो अज्ञानी जनांच्या बाबतीतली आपली तमाम कर्तव्ये अखंडपणे करतो. ज्ञानावस्था आणि भावावस्था या मनाच्या अवस्था आहेत. क्रियावस्था बाह्य अवस्था आहे. ही अवस्था कर्म करताना प्रकट होते.

ज्ञानावस्था आणि भावावस्था यापैकी कुठली अवस्था अधिक काळ अनुभवात राहील हे ज्ञानी पुरुषाच्या स्वभाव, संस्कार, जीवनप्रवाह व बाह्य परिस्थितीवर अवलंबून असते. कुणा ज्ञानी पुरुषाच्या ठायी केवळ ज्ञानावस्था प्राधान्याने असते, इतर दोन अवस्था गौण स्वरुपात असतात. कुणाच्या ठायी भावावस्था प्रधान तर ज्ञानावस्था व क्रियावस्था गौण. कुणाच्या ठायी क्रियावस्था प्रधान तर अन्य दोन अवस्था गौण. कुणाच्या ठायी एकच अवस्था असते. कुणाच्या ठायी दोन प्रकट तर एक अप्रकट. तिन्ही अवस्था एकत्रित असल्या तरी तर-तम भाव असेलच. कुणाच्या ठायी तिन्ही अवस्था जवळपास समान रुपात आढळून येतील.

या श्लोकात भावावस्थेचे वर्णन आले आहे. हा साधक सर्वत्र, सर्व पदार्थांमध्ये परमात्म तत्वाचे दर्शन करतो. जडचेतन सृष्टीला बघून त्याच्या अंत:करणात तीव्रतेने ईश्वर भाव प्रकटतो परिणामी त्याची काया रोमांचित होते. नेत्राला अश्रुधार लागते. चित्त द्रवित होते. जनांचे दु:ख-दारिद्र्य बघून त्याचे हृदय वेदनाग्रस्त होईल. जनांचे दु:ख संपवायला तो कटिबध्द होईल. आपली सारी शक्ती वेचेल. त्याची भावावस्था वेगाने क्रियावस्थेत पालटेल. भावावस्था त्याला स्वस्थ नाही बसू देणार. त्याला क्रियाशीलतेत प्रवृत्त करील पण ज्ञानावस्थेमुळे आसक्ती कदापि उपजणार नाही. सर्वांना परमेश्वररुप बघितल्यामुळे चित्त अलिप्त राहू शकेल. चित्त भक्तीने भारले जाईल.

विनोबांच्या आयुष्यात तिन्ही अवस्थांचा समन्वय आढळतो. ज्ञानावस्था सहज साध्य आहे. बालपणापासून त्यांच्या ठायी ज्ञानावस्थेचा संस्कार प्रकटला. बालपणी अप्रकट असलेली भावावस्था पुढे प्रकट होऊ लागली. क्रियावस्था त्यांच्यासाठी सहज साध्य होती असे काही म्हणता यायचे नाही. गांधीजींच्या सहवासातून क्रियावस्था प्रकटली. विनोबांच्या आयुष्यात तिन्ही अवस्थांचा क्रम लावायचा असेल तर असे म्हणता येईल की त्यांच्यासाठी ज्ञानावस्था सहज (Instinctive) उपजत स्वरुपाची होती. या अवस्थेतून भावावस्था प्रकटली. गांधी सहवासातून त्यानी क्रियावस्थेला ग्रहण केले. गांधीजींच्या ठायी या तीन अवस्थांचा क्रम असा ठरवता येईल. आधी क्रियावस्था म्हणजे सेवा, नंतर ईश्वराचे भान जागल्यावर भावावस्था आणि अखेरीस ज्ञानावस्था.

2) **सर्वं च मयि पश्यति:** परमात्म्याच्या ठायी समस्त विश्व असल्याचा अनुभव यायला हवा. पहिला मुद्दा असा की ईश्वराला सबंध विश्वात-चराचरात बघतो, यामुळे आनंद वाढतो. घटाला बघितल्यावर पहिल्यांदा असे वाटते की घट मातीचा आहे. मातीने घडवलेला आहे मग घटात माती आहे, मातीशिवाय दुसरे कुठले तत्व नाही, हे वाटायला लागते. अशाप्रकारे जेव्हा सर्वत्र हरीदर्शन होते तेव्हा ईश्वराने सारे जगत व्याप्त आहे आणि सर्व चराचरात

ईश्वरच सामावेला आहे ही एकत्वाची दृष्टी प्राप्त होते - परमात्म दृष्टी प्राप्त होते. यामुळे चराचराला बघून - जर चेतनाला बघून मनात भावावस्थेचा महापुर येऊ लागतो. जगात उच्च-नीच असा भेदभाव, नीती-अनीती, हिंसा-क्रौर्य यासारखे दोष असतानाही अशा साधकाला सारे विश्व मंगलमय दिसू लागते. विश्वदर्शन होताच हरीचे स्मरण होऊन त्याच्या ठायी आनंदाचा लाभ होऊ लागतो. सृष्टी बघताच परमात्म्याने आपल्या अलौकिक शक्तीने केवढा अलौकिक भास सृष्टीच्या रुपात निर्माण केला आहे असा भाव मनी उपजून ईश्वराच्या अलौकिक शक्तीचे त्याला स्मरण होते. त्याचे अंत:करण उचंबळून येते. परमात्म्याप्रती उत्कट भाव जन्माला येतो. भावावस्थेचा क्रियावस्थेवरही परिणाम होतोच. भावावस्थेमुळे क्रियेत म्हणजे जगाच्या सेवाभावाच्या दिशेने प्रेम प्रकट होऊ लागते. ज्ञानावस्थेत क्रिया म्हणजे सेवा चालत रहाते तरी सेवेत प्रेम प्रकट होईलच असे काही म्हणता यायचे नाही. क्रिया म्हणजे सेवा करताना मनात तटस्थतेचा भाव नांदतो. अशा प्रकारे सर्वत्र हरीचे दर्शन घडते. ईश्वराने सारे विश्व निर्मिले आहे व संपूर्ण चराचरात हरी व्याप्त आहे हे परमात्म्याचे भावावस्थामूलक दर्शन आहे, हे सगुण साकार दर्शन आहे.

3) **तस्याहं न प्रणश्यामि:** असे साधक अखंड ईश्वरस्मरण करतात. परमात्मा सदैव समोर उभा ठाकलेला असल्यामुळे त्याचा कदापि वियोग होत नाही. गीतेच्या आठव्या अध्यायात **तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च** ‘माझे अखंड स्मरण करत रहावे’ असा संदेश आहे. या श्लोकात आलेली अखंड हरीस्मरणाची गोष्ट ज्ञान्याचे लक्षण आहे. साधकावस्था ज्ञानी पुरुषाच्या लक्षणाना प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य अशी अवस्था आहे. ज्ञानी पुरुष लक्षणे प्राप्त करुन घेण्यासाठी साधकावस्था उत्तम. या दृष्टीने विचार करु जाता साधक दशेत अखंड हरीचे स्मरण करायचा अभ्यास करायला हवा. साधक आणि सिध्द यात अंतर आहे. सिध्दीसाठी जे सहज-सोपे आहे त्यासाठी साधक दशेत प्रयत्न करावे लागतात. सहजता आली की सिध्ददशा पावता येते. ज्ञानी साठी अखंड हरीचे स्मरण सहज सोपे होते त्यासाठी प्रयत्न नाही करावे लागत. अज्ञानी दशेत जसे सलगपणे देहदशेचे - देह स्थितीचे - देहाचे अखंड स्मरण असते तसे ज्ञानावस्थेत ईश्वराचे अखंड स्मरण असते - अखंड भान असते.

4) **स: मे न प्रणश्यति:** ईश्वरही या ज्ञानी भक्ताला विसरत नाही. सातव्या अध्यायाच्या 18 व्या श्लोकात गीता सांगते की ज्ञानी तर माझे आत्मतत्व आहे. **‘ज्ञानी तु आत्मा एव मे मतम्।’** ज्ञानवंत आणि ईश्वराच्या ठायी भेद नाही. यामुळेच गीता सांगते की ज्ञानी माझ्यासाठी कदापि नाश पावत नाही म्हणजे मला त्याचे विस्मरण होत नाही. ज्ञानवंताला देह, मन, इंद्रियांचा व्यापार, बुध्दीचे वैभव हे सारेच असते खरे पण ईश्वरार्पण वृत्तीने हे सारे कार्यरत असतात. ईश्वर यांचा धनी. ज्ञानी पुरुष देह धारण करण्यासाठी नाममात्रच शिल्लक उरतो. ज्ञानवंत आपले अस्तित्व ईश्वराच्या ठायी विसर्जित करुन टाकतो. शून्यतेच्या पराकाष्ठेप्रत पोहोचतो. यामुळे सारी जबाबदारी ईश्वरावर येऊन पडते. ज्ञानवंताच्या जीवन नौकेचे कर्णधारपद ईश्वर पत्करतो. ज्ञानीच्या जीवनात संकट आले तर ईश्वर दूर करतो. ज्ञानीपुरुषाची अवस्था जळून गेलेल्या दोरीसारखी नि:शेष उरते.

अज्ञान्याच्या ठायी ईश्वराप्रती जीवन समर्पित करायची हिंमत नसते. अज्ञानी पुरुषाला आपले अस्तित्व टिकून रहावे याबाबत आसक्ती असते. भगवंताप्रती स्वत:ला समर्पित करुन देताना आनंद वाटायला हवा. आपले अस्तित्व कायम ठेवण्याची काळजी वहाणारे चिंतामुक्तीचे जीवन नाही जगू शकत. ईश्वराप्रती जे सर्वस्व वहातात त्यानाच दु:खमुक्तीचे जीवन जगणे शक्य होते. ईश्वर याच अर्थाने सच्चिदानंद स्वरुप आहे.

: 31 :

*सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थित:।*
*सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एकत्वं आस्थित: य:** जो एकत्वाच्या ठायी म्हणजे परमात्म्याच्या ठायी एकरुप झाला, स्थिर झाला
- **सर्वभूतस्थितं मां भजति:** तो सर्व भूतांमध्ये व्याप्त अशा मला भजतो
- **स: योगी:** तो योगी

- **सर्वथा वर्तमानः अपिः** सर्वथा सर्व प्रकारे प्राणीमात्रांच्या सेवेत रमला असतानाही
- **मयि वर्तते:** माझ्या ठायीच असतो

**अर्थ**

जो पुरुष ऐक्य भावनेला प्राप्त होऊन सर्व प्राणीमात्रात आत्मरुपाने असलेल्या मला सच्चिदानंदघन वासुदेवाला भजतो, तो योगी सर्व प्रकारचे व्यवहार करत असला, तरी त्याचे सर्व व्यवहार माझ्यातच होत असतात.

*स्थिर होऊनि एकत्वीं सर्व-भूतीं भजे मज*
*राहो कसा हि तो योगी माझ्यामध्यें चि राहतो।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) एकत्वाच्या ठायी म्हणजे परम तत्वाच्या ठायी जो स्थिर झाला (2) तो सर्व भूतमात्रात व्याप्त असलेल्या ईश्वराला भजतो. (3) हा योगी असतो. हा सर्वप्रकारे सेवाकार्यात निमग्न असूनही (4) ईश्वराच्या ठायीच समर्पित असतो.

**स्पष्टीकरण**

1) **एकत्वं आस्थितः यः** एकत्व याचा अर्थ परमतत्व. एकत्व म्हणजे अभेद. अद्वैत. आपण सारे देह, इंद्रियांच्या अधीन राहून द्वैतात-भेदात-वसतो. प्रत्येकाचा देह भिन्न-भिन्न असल्यामुळे द्वैत-भेद-राहीलच. बाह्यत: असलेल्या भेदाला संपवणे ईश्वराधीन आहे, आपल्या अधीन नाही. अर्थात् बाह्यतः द्वैत असतानाही आपण अंत:स्थ ऐक्य-अभेद-अद्वैताची निर्मिती करु शकतो. कुटुंब संस्थेत या एकत्वाचा-अभेद वृत्तीचा, अद्वैताचा थोडा-थोडा अनुभव आपण सारे घेतच असतो. पती-पत्नीचे आपसात ऐक्य असते. या ऐक्याचा लेकरांच्याही बाबतीत प्रत्यय येतो. यामुळे आई-वडील-पती-पत्नी-मुले-मुली यांना परस्परांचा वियोग सहन होत नाही. अर्थात् या ऐक्याच्या अनुभवापाठी काही परमात्म बुध्दी नसते, देहबुध्दीच वसते. केवळ शारीरिक आकर्षण. देहात्म बुध्दीमुळे जागते ममता आणि ती दु:खाचे मूळ आहे. कुटुंबात राहून सुध्दा जर एकत्वाच्या अनुभवापाठी देहात्मबुध्दी ऐवजी परमात्म बुध्दीचा विकास झाला तर कुटुंब संस्थेचा लाभ सर्वांना मिळू शकेल. अद्वैताच्या अनुभवासाठी-एकत्वाच्या अनुभवासाठी हा लाभ होईल. ममतेमुळे कुटुंबापुरतीच राहिलेली वृत्ती व्यापक बनू शकते.

2) **सर्वभूतस्थितं मां भजतिः** ईश्वर तमाम भूतमात्रांच्या ठायी म्हणजे प्राणीमात्रात व्याप्त आहे. ज्ञानी त्या सर्वत्र व्याप्त अशा ईश्वराला भजतो. प्राणीमात्राच्या ठायी व्याप्त ईश्वराची भक्ती करतो. याचा अर्थ थोडा समजून घ्यावा लागेल. याचा अर्थ असा की प्राणीमात्रांना बघून परमात्मभाव उपजावा. प्राणीमात्रांना बघून दया, प्रेम आणि करुणा भाव जागावा. यातून प्राणी-मात्रांच्या सेवेमुळे एकत्वाचा-अद्वैताचा अनुभव जागावा. कुटुंबात जागणाऱ्या अनुभवामुळे कुटुंबी जन आणि मित्र परिवाराप्रती प्रेमभाव प्रकट होतो. प्रेम आणि भक्तीच्या ठायी असे सामर्थ्य वसते की ते सेवेतून आविष्कृत झाल्याशिवाय राहूच शकत नाही. लेकराबाबत असलेले मातेचे प्रेम नाही का सेवेतून प्रकटत ? प्राणीमात्राला बघून परमात्म्याचे दर्शन होते. भक्ती भाव उपजतो. त्यावेळी ते दर्शन व्यापक झाल्यामुळे ममत्व वा दोष दृष्टी उरत नाही. हा भक्तीचा विचार प्राणीमात्रांच्या सेवाकार्यात बदलतो. सहज सेवा घडते. परमात्म दृष्टीचा विकास झाला की व्यापक भक्ती प्रेम उपजते. त्याद्वारे अखंड आनंदाचा अनुभव होऊ लागतो.

3) **सः योगी सर्वथा वर्तमानः अपिः** योगी सर्व प्रकारे प्राणीमात्रांच्या सेवाकार्यात तल्लीन होतो. सेवेशिवाय म्हणजे सेवा केल्याशिवाय तो जगूच शकत नाही. स्वत:साठी म्हणून काही करायला उरलेले नसते मग सेवा हेच एकमेव कार्य उरते. यामुळे तो योगी इतरांसाठी जगतो. बाह्यत: सेवेची रुपे भिन्न-भिन्न असतील. आंतरिक मात्र परमात्म दृष्टीचा विकास झालेला असतो यामुळे सेवाकार्यात अलिप्त भाव उरतो. अनासक्ती असते. अज्ञानी जनही सेवा करतील, नाही असे नाही पण त्यांच्या ठायी ममत्व असेल. त्यांच्या सेवेत परमात्मदृष्टी नसते. अलिप्तता नसते. अज्ञानी जनांची सेवा राग, द्वेषरहित असू शकत नाही. परमात्म दृष्टी जागली की सेवा करताना अलिप्तता साधता येते.

**'सर्वथा वर्तमानः अपि'** या वचनाचा विविध भाष्यकारांनी वेगवेगळा अर्थ केला आहे. बाळकोबांचा अर्थ वेगळा आहे. सर्वांनी जवळपास असा अर्थ केला आहे की वाटेल तसे वागूनही परमात्म दृष्टी संपन्न पुरुष लिप्त राहू शकतो. खरे पाहू गेल्यास ज्ञानीपुरुष 'वाटेल तसे वागू' शकत नाही. ज्ञानी पुरुष सत्याचे आचरण करतो. सत्कर्मे

करतो. ईश्वरी ज्ञान प्राप्त करुन घेतो. असा पुरुष वाटेल तसे कसा बरे वागू शकेल? तो सत्य आणि सत्कर्माची कास सोडू शकत नसतो. कदापि असत्याचरण न करणारा ज्ञानी. कदापि असत्कर्मे न आचरणारा ज्ञानी. त्याची स्तुती करताना असे कुणी अवश्य म्हणू शकेल की तो खोटे बोलो वा असत्याचरण करो वा वाटेल तसा का वागेना? तो अलिप्तच रहातो. अशा वचनाना स्तुतीपर वचने म्हणता येतील. या अशा वचनांचा शब्दश: अर्थ करणे योग्य नव्हे, शब्दश: अर्थ केला तर अनर्थ होईल 'ज्ञानी पुरुष व्यभिचारही करु शकतो. व्यभिचार करत असताना जर ज्ञानी अलिप्त राहिला तर त्याची अलिप्तता खरी मानली जाईल' असा अर्थ - असा अनाचारी - अनीतीप्रवर्तक अर्थ काहीनी केला आहे. यामुळे बुध्दीभेद होईल पण शंकराचार्यानी मात्र असा चुकीचा अर्थ नाही स्वीकारला. गांधीजीनी या चुकीच्या अर्थावर प्रहार केला असल्यामुळे **सर्वथा वर्तमान: अपि** याचा अर्थ असा होतो की सेवा कर्मे आचरतानाही तो अलिप्त असतो - म्हणजे परमात्म्याच्या ठायीच असतो. हेच वचन तेराव्या अध्यायातील 23 व्या श्लोकात आले आहे. तिथेही बाळकोबांनी वरीलप्रमाणेच अर्थ करायचा आग्रह धरला आहे.

4) **'स: योगी मयि वर्तते!':** असा ज्ञानी पुरुष सेवाकार्य करत असूनसुध्दा भगवंताच्या ठायी वर्तती. याचा अर्थ असा की सेवाकार्य करत असतानाही तो ईश्वराचे विस्मरण होऊ देत नाही. ईश्वराचे विस्मरण न होऊ देता सेवा घडली की अलिप्तता साधते. ईश्वराच्या अखंड स्मरणामुळे तो अकर्ता व अभोक्ता रहातो. सर्व जन अज्ञानावस्थेत कर्ते आणि भोक्ते असतात. कर्तेपणामुळे आणि भोक्तेपणामुळे आपल्याला सुख-दु:खाचा अनुभव होत रहातो. कर्ते-भोक्तेपणामुळे आपण प्रपंचात आसक्त असतो. अलिप्त राहू शकत नाही. अकर्ता आणि अभोक्ता होता आले तर अलिप्तता साधता येईल. अखंड ईश स्मरणाशिवाय हे शक्य नाही. आपले स्वरुप ईश्वर असल्यामुळे ईश स्मरण सहज व्हायला हवे. अखंड ईशस्मरण ही काही तरी विशेष गोष्ट आहे असे समजता कामा नये. चुकीच्या मार्गाने चालणारा कुणी कुणाच्या मार्गदर्शनाने योग्य मार्गाने चालू लागला तर त्याला अवश्य आनंद होईल पण हे काही विशेष नव्हे! अखंड ईशस्मरणापर्यत पोहोचणाऱ्या व्यक्तीला कुठल्याही विशेषतेचा अनुभव वाटायला नको. काही विशेष वाटत असेल तर मग हरी स्मरण सहजतेने झाले नाही असे जाणावे. ईशस्मरण श्वासोच्छवासासारखे - श्वसनासारखे - सहज - स्वाभाविक व्हायला हवे.

: 32 :

***आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।***
***सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मत: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन:** हे अर्जुना
- **य: सर्वत्र:** जो सर्व भूतमात्रांमध्ये
- **सुखं वा यदि वा दु:खं:** सुख असो वा दु:ख असो
- **आत्मौपम्येन:** आपल्या उपमेने, आपल्या सादृश्याने
- **समं पश्यति:** समान रुपाने बघतो
- **स: परम: योगी मत:** तो योगी तमाम योग्यांमध्ये श्रेष्ठ मानला गेला आहे

**अर्थ**

हे अर्जुना, जो योगी आपल्याप्रमाणे (ज्याप्रमाणे मनुष्य आपले मस्तक, हात, पाय आणि गुदद्वार यांच्या सोबत चातुर्वणासारखा व्यवहार करत असूनही त्यांच्या ठिकाणी आत्मभाव म्हणजे आपलेपणा एकसारखाच असल्यामुळे त्यांची सुख-दु:खेही समान पाहतो तीच दृष्टी सर्व भूतांविषयी ठेवणे हेच 'आपल्या सादृश्याने' पहाणे होय.) सर्व प्राणीमात्रांना समभावाने पाहतो, तसेच सर्वांमध्ये सुख किंवा दु:ख समदृष्टीने पाहतो, तो योगी अत्यंत श्रेष्ठ मानला गेला आहे.

***जो आत्मौपम्य-बुध्दीनें सर्वत्र सम पाहतो***
***जसें सुख तसें दु:ख तो योगी थोर मानिला।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) सर्व प्राणीमात्राना सुख-दु:खांचा अनुभव येतो. त्याविषयी स्वानुभवाचा विचार करुन (2) लोकांच्या सुख-दु:खांना समान रुपाने बघून तदनुसार व्यवहार करणारा (3) तमाम योगी जनांमध्ये श्रेष्ठ मानला गेला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यः सर्वत्र सुखं वा यदि वा दुःखं आत्मौपम्येनः** या श्लोकात ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानावस्थेचे वर्णन आहे. मुख्यत्वेकरुन भावावस्थेचे - त्याच्या क्रियावस्थेचा म्हणजे आचरणावर पडणाऱ्या प्रभावाचे वर्णन आले आहे. प्राणीमात्रांच्या ठायी सुख असो वा दुःख तो आत्मौपम्यबुध्दीने पहातो म्हणजे आपले उदाहरण मानून समान रुपाने पहातो. हा भाग थोडा समजून घ्यावा लागेल. ज्ञानी पुरुष ज्ञान प्राप्त करुन घेण्यापूर्वी अज्ञानी होता. अज्ञानावस्थेत जर त्याने परिश्रम करणाऱ्या शेतकरी-मजूराचे श्रमनिष्ठ जीवन पाहिले असेल. आवश्यक सोई-सुविधा न मिळाल्यामुळे होणाऱ्या त्यांच्या दयनीय अवस्थेला पाहिले असेल. तर त्याला श्रमिकांच्या दैन्य-दुःखांचा नेमका परिचय झालेला असतो. यामुळे त्याला दीन-दुबळ्या, गरीब शेतकरी-मजूर या वर्गाच्या वेदनांबाबत मोठी कणव दिसून येते. याचे मुख्य कारण ज्ञानवंतांचा अज्ञानावस्थेतील अनुभव आहे. आपल्या उदाहरणामुळे सर्वांना सुख भावते, दुःखानुभव नकोसे आहेत ही दृष्टी जागते. ज्ञानावस्था आणि भावावस्थेमुळे आत्मौपम्यदृष्टी जागते.

विनोबांनी निरुपित केले की आपल्याप्रमाणेच इतरांना म्हणजे सर्वांना सुखःदुःखाचा अनुभव होतो. आपल्याशी इतरांनी जसा व्यवहार करावा असे आपल्याला वाटते तसाच आपण इतरांशी व्यवहार करावा. या दोन गोष्टी मनाशी बाळगून सर्वांशी व्यवहार करणे याला म्हणतात आत्मौपम्य दृष्टी.

2) **समं पश्यतिः** तो प्राणीमात्रांशी समतेने व्यवहार करतो. समतामुक्त व्यवहार करतो. समान व्यवहार करायचा त्याचा स्वभाव बनून जातो. अज्ञानावस्थेत प्राणीमात्राशी समतेचा व्यवहार करायचा स्वभाव नसतो. कुटुंबात प्रेम व ममतेमुळे समतेचा व्यवहार होतो सर्वाशी मात्र असे नाही होऊ शकत. याउलट कुणा-कुणाच्या बाबतीत तर मनात द्वेषभावनाही असते. अशाप्रकारे अज्ञानकाळात परमात्म दृष्टी नसते म्हणजे व्यापक दृष्टी नसते. यामुळे आपला सारा व्यवहार संकुचित दृष्टीचाच असतो. परमात्मदृष्टी प्राप्त झाल्यावर मात्र ज्ञानी पुरुषाचा सारा व्यवहार प्रेम आणि समतायुक्त होतो. यामुळे ज्ञानी पुरुष हे समाजात समता स्थापन करण्याकामी अग्रेसर असतात.

समाज जीवनात ठायी-ठायी विषमता आहे. यामुळे समाजात सर्वांना सुख प्राप्ती होणे शक्य नाही. जोवर समाजात सर्वांना सुख लाभत नाही तोवर ज्ञानीजन तटस्थ वा निष्क्रिय राहू शकत नाही. समाजात आध्यात्मिक सौख्य लाभ व्हावा असे जरी आपण चाहत असलो तरी सर्वप्रथम आवश्यक त्या बाह्य सुखसुविधा समाजातल्या तमाम घटकाना उपलब्ध करुन देणे खूप गरजेचे आहे. समाजाला रोजच्या दोन वेळच्या भूकेची चिंता असेल तर या चिंतेमुळे आध्यात्मिक जागृती कदापि होऊ शकणार नाही. गरजेपेक्षा अधिक सुखोपभोगाकडे-चंगळवादाकडे समाज वळला तरी आध्यात्मिक जागरण होऊ शकणार नाही. आत्यंतिक चंगळवादी आणि कमालीचा दरिद्री-दळभद्री समाज अध्यात्माकडे आकृष्ट होऊ शकणार नाही. अतिभोग आणि अतिदारिद्य यात समाजाला संतुलन साधावे लागेल. यामुळे ज्ञानी पुरुष समाजात समता स्थापित व्हावी- दुःख-दारिद्य-वैषम्य दूर व्हावे यासाठी सतत झटत रहातात.

3) **सः योगी परमः मतः** परमात्म दृष्टी समोर ठेऊन जनकल्याणात रात्रंदिवस रत योगी परमश्रेष्ठ होत. जो अशाप्रकारे समाजातील दुःख, दारिद्य घालवून समता स्थापित करण्यासाठी आपल्या उदाहरणाने म्हणजे आपल्याला ज्या प्रकारे सुख भावते आणि दुःखाचा तिरस्कार वाटतो. म्हणजे सुखाची आवड आणि दुःखाचा तिरस्कार आणि ते टाळण्याची वृत्ती असते तशीच सर्वांची वृत्ती असते असे मानून परमात्म दृष्टी कायम ठेऊन जो जनकल्याणार्थ दिवसरात्र झटतो तोच योगी परमश्रेष्ठ होय.

याच अध्यायाच्या 47 व्या श्लोकात येते की ईश्वराठायी मन एकाग्र करुन भक्ती करणारा श्रेष्ठ योगी मानावा. इथे अंतरंगी भक्तीचे महत्व वर्णिले आहे. बाहेरुन सेवा. आतून भक्तीचा ओलावा. ही रीत. इथे परमेश्वर भक्ताच्या आचरणाचा परिणाम दर्शवला आहे. आचरणात निष्क्रियता जागली तर भक्ती निष्क्रिय झाली म्हणून समजा. आंतरिक भक्ती कशाप्रकारे सगुण-साकार होते ते इथे दर्शवले आहे.

: 33 :

**अर्जुन उवाच**

***योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन।***
***एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मधुसूदनः** हे मधुसूदना
- **यः अयं साम्येन योगः** हा जो साम्ययोग
- **त्वया प्रोक्तः** आपण सांगितला
- **एतस्य स्थिरां भवतिः** त्याच्या स्थिर स्थितीला प्राप्त करणे आणि स्थिर राखणे
- **चंचलत्वात्ः** मनाच्या चंचलतेमुळे, चंचलता असल्या कारणाने
- **न पश्यामिः** मी बघत नाही

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे मधुसूदना, जो हा समभावाचा योग तुम्ही सांगितलात, तो मन चंचळ असल्यामुळे नित्य स्थिर राहील, असे मला वाटत नाही.

**अर्जुन म्हणाला**

***तूं बोलिलास जो आतां साम्य-योग जनार्दना***
***न देखें स्थिरता त्याची ह्या चंचळ मनामुळें।***

**विषयः** या श्लोकात अर्जुनाचा एक प्रश्न आहे त्यात तीन गोष्टी आहेत (1) हा जो समतेचा योग म्हणजे ज्ञान वर्णिले आहे. योग म्हणजे साम्ययोग वर्णिला आहे. यात मनाची आणि आचरणाची समता या दोघांचा समावेश आहे (2) हे प्राप्त करणे व चिरकाळ टिकवणे (3) मनाच्या चंचल स्वभावामुळे त्याला अशक्यप्राय वाटत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यः अयं साम्येन योगः त्वया प्रोक्तः** समतेचा योग म्हणजे साम्ययोग. दुसऱ्या अध्यायातील 48 व्या श्लोकात योगाची **'समत्वं योग उच्यते!'** म्हणजे समत्व म्हणजे योग - अशी व्याख्या आली आहे.

विनोबा म्हणतात की तमाम प्राणीमात्रांच्या ठायी भगवद्भाव राखणे म्हणजे साम्ययोग- 'चित्ताची समता' एवढे सांगितल्यावर विनोबा - प्रणित उपरोक्त व्याख्येची पूर्ण कल्पना येत नाही. प्राणीमात्राच्या ठायी परमात्म्याचे दर्शन होणे - परमात्म दृष्टी राखणे - आणि त्यानुसार आचरण करणे - या दोन बाबी साम्ययोगाच्या ठायी समाविष्ट आहेत. विनोबा म्हणतात की सहाव्या अध्यायात वर्णिलेली ध्यान योगाची प्रक्रिया साम्ययोगाच्या सिध्दीसाठी आहे. या दृष्टीने विचार करु जाता या अध्यायातील 29 ते 32 या श्लोकात गीता सार आले आहे. 29 व्या श्लोकात ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानावस्थेची म्हणजे आत्मदर्शनाची भूमिका आहे. 30 व्या श्लोकात भावावस्था वा हरीदर्शनाची भूमिका असून 30 व 34 व्या श्लोकात क्रियावस्थेचे वर्णन आले आहे.

2) **अर्जुनाचे** म्हणणे असे की **एतस्य स्थिरां स्थितिंः** गीतेने निरुपित केलेला साम्ययोग प्राप्त करणे आणि टिकवून धरणे अवघड आहे. साम्ययोग प्राप्त करुन घेण्यासाठी या अध्यायात ध्यानयोग हे साधन व्यक्तवले आहे. दुसऱ्या अध्यायात सांख्ययोगाची चर्चा आली आहे. त्यात आत्म्याचे अमरत्व, देहाची नश्वरता, क्षुद्रता, क्षणभंगुरता आणि स्वधर्म पालनाची अनिवार्यता या तीन सिध्दांतांची चर्चा येते. तिसऱ्या अध्यायात कर्मयोग वर्णिला आहे. इच्छा म्हणजे कामावर विजय मिळवण्याची रीतही शिकवली आहे. चौथ्या अध्यायात चित्तशुध्दी करणाऱ्या नाना प्रकारच्या विकर्माची म्हणजे विविध प्रकारची आंतरिक साधना सांगितली गेली आहे. पाचव्या अध्यायात योग आणि संन्यास यातल्या एकरुपतेची चर्चा आली आहे. अशाप्रकारे पुढेही विविध प्रकारच्या साधना वर्णिल्या आहेत. या साधना बुध्दीग्राह्य असून बुध्दीने समजून घेता येण्याजोग्या आहेत पण जे बुध्दीग्राह्य आहे ते अमलात कसे आणावे हा प्रश्न आहे. ग्रहणाशी बुध्दीचा संबंध येतो. अर्थात् आध्यात्मिक जागरणाशिवाय बुध्दी आध्यात्मिक साधना कशी बरे स्वीकारु शकेल ? यामुळे आधी आध्यात्मिक जागरण म्हणजे जिज्ञासा उत्पन्न व्हायला हवी. दीर्घकाळ सत्संग, सत्कर्माचे आचरण, स्वधर्माचे पालन आणि सात्विक गुणांचा उत्कर्ष केल्यामुळे आध्यात्मिक वा आत्मा-परमात्म्याविषयक जिज्ञासा उत्पन्न होऊ शकते. जिज्ञासा उपजली की आध्यात्मिक साधना

सर्वप्रथम जाणून घ्यावी लागते, अंतर्भुत तत्वांचा विचार येतो. ब्रह्म, आत्मा, परमात्मा, माया, योग, वैराग्य, ध्यान, कर्मफळत्याग, भक्ती, संन्यास यांच्या स्वरुपाची चर्चा येते. बुध्दीने एकदम सारे ग्रहण होते, असे घडत नाही. विविध प्रकारच्या शंका उपजतात. त्या हळूहळू प्रयत्नपूर्वक दूर होतात.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायापासून मुख्यत: गीतेच्या उपदेशाला आरंभ होतो. अर्जुनाने या अध्यायात स्थितप्रज्ञाच्या लक्षणांच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. तिसऱ्या अध्यायाच्या आरंभी, अंती, चौथ्याच्या आरंभी, पाचव्याच्या आरंभी आणि आता सहाव्याच्या अखेरीस दोनदा प्रश्न विचारला आहे. अर्जुनाचा प्रश्न विचारायचा क्रम अठराव्या अध्यायापर्यंत असाच जारी आहे. अशा प्रकारे मनी शंका जागत रहातात. प्रश्न विचारावे लागतात. ज्ञानी अनुभवीजन प्रश्नांची उत्तरे देत रहातात. अशा तऱ्हेने आध्यात्मिक साधना व विषयाला जाणून घेण्यासाठी बुध्दीलाही काही काळ लागतो. अर्थात् बुध्दीने हा विषय जाणून घेणे काही अवघड नाही. बुध्दीने स्वीकारलेले ज्ञान, साधना प्रत्यक्ष आचरणात कसे आणायचे हाच महत्वाचा प्रश्न होय. ज्ञान जोवर आचरणात येत नाही तोवर बौध्दिक ज्ञानाचा विशेष उपयोग नसतो.

3) तिसरा मुद्दा अर्जुन जो मांडतो आहे तो आहे **चंचलत्वात्:** मनाची चंचलता हा एक अडसर आहे. यामुळे बुध्दीग्राह्य ज्ञान आचरणात येत नाही. ध्यान कसे धरावे? भक्ती कशी प्राप्त करुन घ्यावी? कर्मफळाचा त्याग म्हणजे काय? वैराग्याचे स्वरुप काय? यासारख्या तमाम बाबी जाणून घेतल्या तरी मनाच्या चंचल स्वभावामुळे आचरणात आणणे केवळ अवघडच नव्हे तर अशक्यप्राय वाटते.

: 34 :

***चंचलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।***
***तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्ण:** हे कृष्णा
- **हि मन: चंचलं:** कारण की हे मन चंचल आहे
- **प्रमाथि:** शरीर आणि इंद्रियांना व्याकुळ करणारे, क्षोभवणारे आहे
- **बलवत्:** अत्यंत बलवान आहे
- **दृढं:** आणि हट्टी आहे
- **अहं तस्य निग्रहं:** मी त्याच्या निग्रहाला
- **वायो:** इव: वाऱ्याप्रमाणे
- **सुदुष्करम्:** खूप अवघड, खूप कठीण
- **मन्ये:** समजतो

**अर्थ**

कारण हे श्रीकृष्णा, हे मन मोठे चंचळ, क्षोभवणारे, मोठे दृढ आणि बलवान आहे. त्यामुळे त्याला वश करणे मी वाऱ्याला अडवण्याप्रमाणेच अत्यंत कठीण समजतो.

***मन चंचळ हें कृष्णा हट्टी छळितसे बळें***
***धांवे वाऱ्यावरी त्याचा दिसे निग्रह दुष्कर ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) मन चंचल आहे. देह व इंद्रियाना व्याकुळे करणारे आहे. हट्टी आणि अत्यंत बळवान आहे. (2)अशा मनाचा निग्रह करणे हे कार्य वाऱ्यावर ताबा मिळवण्याइतके अवघड आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मन: चंचलं प्रमाथि बलवत् दृढम्:** आध्यात्मिक साधना आणि त्या विषयीचे ज्ञान बुध्दी तर ग्रहण करुन घेईल पण आचरणात आणणे तर मनाच्या स्वाधीन आहे ना? आचरणाशी मनाचा संबंध येतो. एकदा का ज्ञान ग्रहण झाले की बुध्दीची भूमिका संपली. बुध्दीचे कार्य संपले, पूर्ण झाले. एका अर्थी बघू गेले तर बुध्दीचे काम सोपे आहे. ज्ञानाला ग्रहण करुन, चिंतनपूर्वक निश्चय करणे हे झाले बुध्दीचे काम. बुध्दीचे काम एखाद्या न्यायाधिशाच्या कामासारखे आहे. वकीलांचा युक्तिवाद ऐकून तपशील जाणून घेत न्यायाधीश निकाल देतो. निकालाची अमलबजावणी करणे हे काही त्याचे काम नव्हे. तसेच शोक व मोह निवारणासाठी म्हणून गीतेने जी साधना वर्णन केली ती अर्जुनाला बुध्दीग्राह्य होती. तरी प्रत्यक्ष साधना करुन परम तत्वाचा अनुभव तर मनानेच होऊ शकणार होता. मन बुध्दीच्या अधीन रहायला काही तयार

नसते. या श्लोकात अर्जुनाने मनाच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. मनाचा स्वभाव चार प्रकारचा आहे.

(एक) **मन चंचल म्हणजे अस्थिर आहे.** 'बघू नको,' 'ऐकू नको' असे निर्बंध घातले तर मन बघितल्याशिवाय रहाणार नाही, ऐकल्याशिवाय रहाणार नाही. चांचल्य मनाचा स्वभावच आहे. हे थांबवायचे असेल तर मनाने इंद्रियांवर पहारा द्यावा लागेल. इंद्रियांचा पहारेकरी बनावे लागेल. इंद्रियांच्या योगाने विषयाचे ग्रहण होते. इंद्रियाना हे काम स्वतंत्रपणे नाही करता येत, त्याना आपले काम मनाच्या माध्यमातून करुन घ्यावे लागते. यामुळे मन विषयांमध्ये आसक्त होते. इंद्रियांना स्वतंत्र अस्तित्व नसते. इंद्रिये, मन, बुध्दी, शरीर यात मनच प्रमुख आहे. सुख-दु:ख, राग-द्वेष, प्रीत-अप्रीत, इच्छा-वासना, दया-क्रुरपणा, भय-निर्भयता हे सारे मनानेच करायचे आहे, बंधनही यातूनच येते. यामुळे अर्जुनाच्या मनात प्रश्न जागला. मन एकदा का बिघडले ना तर मग बुध्दी तीव्र असली तरी काही ग्रहण करु शकत नाही. मनाची अवस्था धड नसेल तर तीव्र बुध्दीचा काही उपयोग नाही. मनाला माकडाची उपमा दिली जाते. त्याची एकाग्रता फार काळ टिकत नाही. मनाचा वेग खूप अधिक असतो. देह क्षीण झाला तरी मन काही क्षीण होत नाही. मनाच्या या चंचलतेमुळे झोप बिघडते. या चंचलतेमुळेच एखाद्या विषयाचा अभ्यासही होऊ शकत नाही.

एकदा साधनेच्या विचाराने एका वर्षाची तयारी करुन एकांतासाठी बाळकोबा निघाले. (समर्थ रामदासांनी 'एकांत' शब्द 'ये कांत' असा लिहिला आहे.) ही 1928 सालची घटना आहे. विनोबानी रोखायचा प्रयत्न केला तरी बाळकोबा बधले नाहीत. वर्ध्याहून निघाले. मुंबईहून कर्जत स्टेशनवर उतरुन मायभूमी गागोदे कडे जायच्या इराद्याने मोटारीत बसले. गागोदे येथे एकांत स्थळी एक कुटीर उभारले होते. तिथे बाळकोबांना जायचे होते. मोटार निघायला तासाभराचा अवकाश होता. अर्धा तास मोटारीत बसून रहावे लागले आणि त्यांचा विचार बदलला. इथून आता परतायला हवे असा मनाचा निश्चय झाला. परतीच्या प्रवासात कर्जत स्टेशन गाठले आणि वर्ध्याला जाऊन पोहोचले. बाळकोबांच्या मनाचे हे असे कसे चंचल झाले? हा प्रश्न दस्तुरखुद्द त्यानाच पडला. चंचळता हा मानसिक दोष आहे.

2) दुसरा हा स्वभाव आहे **प्रमाथि**। मन प्रमाथी आहे. ते शरीर-इंद्रियाना व्याकुळ करणारे आहे. चांचल्यामुळे व्याकुळता उद्भवते. खरे तर चांचल्य व व्याकुळता परस्पर अवलंबित आहेत. एकामुळे दुसरा भाव जागतो. एखाद्या दुर्घटनेमुळे चित्त व्याकुळ बनते आणि मग चंचळ बनून जाते. यामुळे मन विवेकी भूमी आणि भूमिकेवर स्थिरावत नाही. चित्ताच्या ठायी व्याकुळ भाव उत्पन्न झाल्यामुळे शरीर आणि इंद्रियेही व्याकुळ होतात. चित्ताचा परिणाम शरीर आणि इंद्रियांवर जबरदस्त होतो. अर्जुनाची चंचल मनामुळे झालेली व्याकुळ अवस्था याचे उत्तम उदाहरण आहे. चित्ताच्या ठायी शोक जागला. मोह उत्पन्न झाला. चित्त व्याकुळ झाले. शरीर थरथरायला लागले. इंद्रियसमूह व्याकुळ बनला. आपापली कामे करायला त्यांनी नकार दिला. अर्जुन एकदम रथाच्या मागील बाजूला जाऊन बसूनच गेला.

3) **बलवत्:** मन बलवान आहे. शक्तीशाली आहे. चंचळपणा आणि व्याकुळता दूर झाल्या म्हणजे चित्ताची शक्ती प्रकट होते. चित्त बलवान आहे, ते काही दुबळे नाही पण चित्ताचे बळ हे अदृष्ट असते. लपलेले असते. बाळकोबानी या संदर्भात आपला स्वत:चा अनुभव नोंदवला आहे. आध्यात्मिक दृष्ट्या विचार करु जाता ते स्वत: जवळपास सात वर्षे अस्थिर होते. चित्ताच्या चंचळतेचा अनुभव घेत होते पण एक प्रसंग घडला. चित्ताची चंचळता दूर झाली. व्याकुळता संपली आणि चित्ताचे बळ प्रकट झाले. निश्चय शक्ती प्रकटली. सात वर्षांच्या प्रदीर्घ काळात बाळकोबांच्या शुभेच्छा कदापि पूर्ण झाल्या नाहीत. ते जे काही करु जात, त्यात नाना प्रकारची विघ्ने येत. त्यांच्या शुभेच्छेप्रमाणे काही घडेना. यामुळे ते बेचैन होते पण 1931 साल उजाडले. बाळकोबांचे वय त्या काळी बत्तीस वर्षाचे होते. या एका घटनेमुळे बाळकोबांची जीवनदृष्टी बदलली. शैली बदलली. एक अशी घटना घडली की त्यांनी मनोमन असे ठरवून टाकले की यापुढे आपल्या मनाने जीवनात काहीही करायचे नाही. ईश्वरेच्छेला प्रमाण मानायचे. ईश्वराची इच्छा म्हणजे संतांची इच्छा. ज्या संतावर श्रध्दा असेल त्यावर विश्वास ठेऊन त्याच्या इच्छेप्रमाणे-आज्ञेप्रमाणे वागायचा प्रयत्न करायचा. हा मंत्र त्यांना लाभला. या मंत्राच्या संकेताने - आदेशाने - आज्ञेने बाळकोबा तीन दशके जगले - वागले. यामुळे चित्ताची चंचळता आणि व्याकुळता दूर झाली. अशा प्रकारच्या चमत्काराचा अनुभव प्रत्येकाला येऊ शकतो अशी आपली धारणाही बाळकोबांनी या निमित्त व्यक्त केली आहे.

4) **दृढम्:** मनाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. मन हट्टी आहे. मनाच्या बलवान पण हट्टी असण्याच्या स्वभावाचे वर्णन अर्जुन गुणरुपाने न करता दोष रुपानेच करतो आहे. याचे कारण असे की अर्जुनाचे मन शोकाकुल आणि मोहग्रस्त आहे. यामुळे त्याला मनाचे हे गुणही दोषरुपीच वाटताहेत. चाकूचा सदुपयोग करावा की दुरुपयोग हा आपला प्रश्न आहे. मनाच्या या दोन गुणांचा सदुपयोग जर नाही केला गेला ना तर हे दोषरुपीच ठरतील. अर्जुनाच्या ठायी अपरंपार अशी निश्चय शक्ती आहे. त्याचे मन दुबळे नाही पण त्याने शोक आणि मोह यावर विजय प्राप्त केलेला नव्हता, यामुळेच त्याचे मन कमकुवत झाले आहे. योगेश्वराच्या उपदेशाच्या प्रभावाने त्याच्या मनातला शोक आणि मोह दूर झाला. त्याचे मन पूर्वीपेक्षा बळकट बनले. इथे दोष रुपाने का होईना पण अर्जुन मनाच्या गुणांचीच चर्चा करत आहे की मन बलवान आणि दृढ म्हणजे हट्टी आहे. एखाद्या विचाराला मनाने ग्रहण केले तर त्याला घट्टपणे धरुन ठेवेल, त्याला कदापि सोडणार नाही. चांगला विषय ग्रहण केला तरी सोडणार नाही, वाईट वस्तुत लुब्ध झाला तरी सुटणार नाही, सोडणार नाही. मनाच्या या गुणामुळे माणूस मोक्षाप्रत पोह्चू शकतो. समाधी अवस्थेला प्राप्त होऊ शकतो. यामुळे साधु-संतांनी संत संगतीचा-सत्संगतीचा महिमा गाईला. मनाची चांगल्यावर श्रध्दा जागावी, प्रेम उत्पन्न व्हावे आणि मनाने दृढतापूर्वक चांगल्याची कास धरावी.

5) अर्जुनाचे निवेदन असे की **अहं तस्य निग्रहं वायोः इव सुदुष्करं मन्ये: मनाला** वश करणे - ताब्यात ठेवणे वायुवर नियंत्रण करण्यासारखे अवघड आहे. वायुच्या ठायी प्रचंड शक्ती आहे. त्या गतीला रोखणे केवळ अशक्य! प्रचंड वाऱ्यामुळे-वादळामुळे- मोठमोठे वृक्ष धराशायी होतात. प्रचंड वायुवेग जहाजांना जलसमाधी देऊ शकतो. अशीच प्रचंड शक्ती, भयंकर गती आणि अपरंपार वेगाची शक्ती असल्यामुळै मनावर ताबा मिळवणे अवघड होऊन बसते. अशा बलशाली मनाला ताब्यात कसे ठेवायचे? हा प्रश्न अर्जुनासमोर उभा ठाकला आहे. याचे कारण असे की मनावर नियंत्रण मिळवल्याशिवाय आध्यात्मिक ध्यान-धारणा कशी साधता येईल? वैराग्याला कसे प्राप्त करुन घेता येईल? ईश्वरभक्ती वा साधना कशी करता येईल? हे अर्जुनाचे प्रश्न आहेत.

: 35 :

**श्री भगवान उवाच**

***असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।***
***अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे अर्जुना
- **मन: दुर्निग्रह:** मनावर निग्रह करणे, साधणे खूप कठीण आहे
- **चलं असंशयं:** मन हे नि:संशय अतिशय चंचळ आहे
- **तु कौन्तेय:** पण हे कुंती पुत्र, अर्जुना
- **अभ्यासेन च वैराग्येण:** अभ्यास म्हणजे आत्मस्थितीसाठी वारंवार प्रयत्न केल्याने आणि वैराग्याने
- **गृह्यते:** मनाचा निग्रह होतो, ते वश करता येते

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे महाबाहो, मन चंचळ आणि आवरण्यास कठीण आहे, यात शंका नाही पण हे कुंतीपुत्र अर्जुना, ते अभ्यासाने आणि वैराग्याने ताब्यात येते.

श्री भगवान म्हणाले

***अवश्य मन दु:साध्य म्हणतोस तसें चि तें***
***परी अभ्यास-वैराग्यें त्याचा निग्रह होतसे ।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना चार गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत (1) मनाचा निग्रह करणे खूप अवघड आहे. (2) मन चंचळ आहे हे निर्विवाद! (3) पण त्याचा निग्रह म्हणजे त्यावर ताबा मिळवणे अभ्यास आणि (4) वैराग्याने शक्य होऊ शकते

**स्पष्टीकरण**

1) **महाबाहो मन: दुर्निग्रहं:** मनावर नियंत्रण प्राप्त करणे सोपे नाही. मन लहान बालकासारखे आहे. बालकाची विवेकशक्ती विकसित नसते. मनावर विवेकाचे नियंत्रण नसते. वाढत्या वयासोबत विवेकशक्ती वाढत

असते पण विवेकशक्ती परिपूर्ण रित्या विकसित होत नाही. ज्ञानी पुरुषांच्या ठायीच विवेकशक्तीचे परिपूर्ण विकसन होते. विद्यमान शिक्षण विवेकशक्ती वृध्दींगत करण्याकामी मदतरुप नाही, याउलट बौध्दिक ज्ञानात वाढ करुन निग्रह शक्ती मंद करण्याकडे या शिक्षण-व्यवस्थेचा कल आहे. विवेकशक्ती जिथे दुबळी असेल तिथे मनावर ताबा मिळवण्याची शक्यता संपून जाते, यामुळे बालपणापासूनच विवेकशक्ती वृध्दींगत करायचे प्रयत्न करावे लागतील. सत्यपालनाचा अभ्यास करावा लागेल. यातून विवेकशक्तीला बळकटी मिळेल. बालपणापासूनच दोन सवयी लावायला हव्यात. सूक्ष्म सत्वाला ओळखता यायला हवे आणि त्या अनुसार सूक्ष्मतापूर्वक सत्याचे पालन करता यायला हवे. बौध्दिक ज्ञानाच्या प्राप्तीसाठी आपण खूप सतर्कता दाखवतो. सत्याचे स्थूल आणि सूक्ष्म पालन करण्याकामी यापेक्षा कितीतरी पटीने सतर्क रहायला हवे पण असे होऊ शकत नाही, कारण समाजाची रचना अशी आहे. शिक्षणाचा संदर्भ आज पदवी आणि पैश्यांभौवती केंद्रित झाला आहे.

2) मनाला वश करणे अवघड आहे. कारण की **मन: चलं:** मन चंचळ आहे. अस्थिर आहे. अस्थिरतेमुळे मनावर ताबा मिळवता येत नाही. परमात्म्याच्या प्रकट होण्याची एकच जागा आणि ते म्हणजे मन! अज्ञानावस्थेतही आत्म्याची ज्ञानस्वरुप दशा प्रकट होते, नाही असे नाही पण 'मी म्हणजे शरीर' , 'मी म्हणजे मन', 'मी म्हणजे इंद्रिये', 'मी म्हणजे बुध्दी' अशा स्वरुपात म्हणजे चुकीच्या पध्दतीने प्रकट होते. अग्नीचे स्वरुप समान असले तरी यज्ञ कुंडातला अग्नी पवित्र आणि स्मशानातला अपवित्र ठरतो. तशाच प्रकारे अज्ञानावस्थेत आत्म्याचे चैतन्यस्वरुपी दर्शन चुकीच्या मार्गाने प्रकटते. ज्ञानावस्थेत मात्र आत्मतत्वाची चैतन्यशक्ती सुयोग्य प्रकारे प्रकट होते. ज्ञानावस्था असो वा अज्ञानावस्था असो, दोन्ही स्थितीत चैतन्य प्रकट होण्याचे एकमेव साधन मन हेच आहे. मन मलिन असेल, चंचल असेल, राग, द्वेष वगैरे विकारांनी ग्रस्त असेल तर मग आत्म्याचे चैतन्यतत्व चुकीच्या मार्गानेच प्रकट होत राहील. दु:खाच्या अनुभवाला आपण कदापि टाळू शकत नाहीत पण चित्त शुध्द झाले, निर्विकार आणि निरहंकारी बनले, पवित्र आणि स्थिर बनले तर आत्मतत्व सुयोग्य प्रकारे प्रकट होऊ शकेल. दु:ख समाप्त होईल. अखंड आनंदाचा स्रोत प्रवाहित होईल. या दृष्टीने विचार केला असता मनाचे चांचल्य घालवणे किती आवश्यक आहे हे ध्यानी यावे. मन चंचळ आहे, हे खरे आणि त्याला स्थिर करायचे उपायही आहेत. उपाय दोन आहेत हे ही खरे.

3) **अभ्यासेन्:** पहिला उपाय आहे अभ्यास. अभ्यास म्हणजे वारंवार प्रयत्न करणे. अभ्यास म्हणजे अध्ययन नव्हे, सराव. चंचलता दूर करायची म्हणजे नेमके काय करायचे हे आधी समजून घ्यावे लागेल. मग ते अमलात आणायचा प्रयत्न करायला हवा. या सरावाला महत्व आहे. पतंजलीच्या योगसूत्रात वर्णन येते: **अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोध:** की चित्तवृत्तीवर ताबा मिळवण्याचे उपाय सांगताना अभ्यास आणि वैराग्य या दोन उपायांची चर्चा केली आहे. अभ्यासाची व्याख्या आहे. **तत्र स्थितौ यत्नोऽभ्यास: ।** अभ्यास आणि वैराग्य या उपायानी त्या चित्तवृत्तींचे निरोधन करता येते. यामुळे मनावर ताबा मिळवता येतो. चित्ताला काबूत आणणाऱ्या योगात स्थिर होण्यासाठी वारंवार प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास होय. आपल्या ध्येयपूर्तीसाठी वारंवार प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास होय. अभ्यास करताना फलासक्ती त्यागाच्या सिध्दांताला ध्यानात राखणे गरजेचे आहे. फळावर आसक्ती ठेवल्यामुळे मनाची शक्ती खर्ची पडते. ही शक्ती प्रयत्न करण्याकामी खर्ची पडायला हवी. फळ ईश्वरावर सोपवावे. निश्चिंत रहावे. संपूर्ण शक्ती प्रयत्नात एकवटली तर फळ तत्काळ मिळेल. हा अभ्यास कुठवर करावा, कशाप्रकारे करावा या विषयीचा सारा तपशील योगसूत्रकाराने वर्णन केला: **स तु दीर्घकालनैरंतर्यसत्कारासेवितो दृढभूमि** हा अभ्यास दीर्घकाळपर्यंत करावा. निरंतर सत्कारपूर्वक म्हणजे भक्तीपूर्वक करावा. श्रध्दापूर्वक परिपूर्ण रीतीने करावा. ईश्वरप्रदत सारी शक्ती लाऊन हे केले तर अभ्यास दृढ होईल. या सूत्रात अभ्यासासाठी चार गोष्टी वर्णिल्या गेल्या आहेत.

1) दीर्घकाळापर्यत म्हणजे आमरण प्रयत्न करायला हवेत. अशुभ संस्कारांमुळे संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न करुनही अनेकांची साधना पूर्णत्वाला पोहोचत नाही. यामुळे धैर्यपूर्वक आजीवन प्रयत्न करत रहायला हवेत.

2) निरंतर म्हणजे रोज - न थकता, न थबकता प्रयत्न करायला हवेत.

3) सत्कारपूर्वक म्हणजे प्रेम, श्रध्दा आणि भक्तीपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

4) परिपूर्ण रीतीने सेवन करणे म्हणजे संपूर्ण शक्ती अभ्यासातच लावायला हवी.

याप्रकारे प्रयत्न करत रहायला हवेत. अभ्यासात एकाग्रता आणि सावधानता बाळगायच्या बाबी आहेत. दिवसभरच्या कामात संपूर्णपणे सावधान असावे. तुकोबांचा पुरावा आहे 'तुका म्हणे सावधान हेचि देवाचे भजन! ' जिथे जागृती आणि सावधान दशा असेल तिथे विवेक जागतो. सावधपण आणि विवेक जिथे नांदतो तिथे एकाग्रता असायलाच हवी.

5) **वैराग्येण:** अभ्यासासोबत वैराग्य असणे महत्वाचे. वैराग्य म्हणजे सृष्टीमात्रातील तमाम पदार्थांबाबतची नि:स्सारता - आसक्ती. हेच मनाच्या चंचळतेचे प्रमुख कारण आहे. एकदा का पदार्थाच्या व्यर्थतेचा बोध मनाला झाला की त्यांच्या बाबतीतले आकर्षण उरणार नाही आणि मनाचा प्रवाह स्वभावत:च ईश्वरमार्गी होईल, ईश्वरोन्मुख होईल. योगसूत्रात वैराग्याची व्याख्या अशी केली गेली आहे: **दृष्टानुश्रविकविषयवितृष्णस्य वशीकारसंज्ञा वैराग्यम्** बघितलेल्या आणि ऐकलेल्या विषयांच्या संदर्भात ज्याची तृष्णा दूर झाली अशा पुरुषाला विषय आपल्या ताब्यात असल्याचा अनुभव येतो. यालाच वैराग्य म्हणतात.

या सूत्रातील वैराग्याची व्याख्या 'अपर' वैराग्याची आहे. 'पर वैराग्य' म्हणजे काय? विषयांसंबंधीच्या तृष्णा भावनेचे संपून जाणे आणि तृष्णा संपून गेल्यामुळे विषय आपल्या ताब्यात आहे असा अनुभव येणे. 'विषयात सार नाही' असे जोवर वाटत नाही तोवर तृष्णा संपून जाणे शक्य होत नाही. मुख्य मुद्दा असा आहे की विषयांच्या व्यर्थतेचा बोध जागायला हवा पण हा बोध वा अनुभव क्रमानुसारच होऊ शकतो. आधी रजोगुण आणि तमोगुणविषयक तृष्णा मिटली की विषय ताब्यात आहे असे वाटायला लागते. हे अपर वैराग्य असल्यामुळे यात संपूर्ण वैराग्याची व्याख्या येत नाही. रजोगुण व तमोगुणाची आसक्ती सुटते आणि विषयांच्या बाबतीत जे मर्यादित नियंत्रण येते, एवढी व्याख्या मिळते. ही मर्यादित स्वरुपाची आहे. इथे अपर वैराग्याच्या ठायी रजोगुण व तमोगुणाला वगळून सत्वगुणाचा उत्कर्ष करायला सांगितले आहे असे समजायला हवे. पर-वैराग्य या सूत्रात म्हटले आहे: **तत्परं पुरुषख्यातेर्गुणवैतृष्ण्यम् आत्मज्ञानामुळे** सत्वगुणाची आसक्ती न उरणे म्हणजे 'पर-वैराग्य' होय.

आत्मज्ञानामुळे सत्वगुणाची आसक्ती सुटून जाते. देह वगैरेपासून आत्मा भिन्न आहे असे जेव्हा अनुभवाला येते तेव्हा सत्वगुणाचा उत्कर्ष होत असतानाही त्याची आसक्ती आणि त्या विषयीचा अहंभाव दूर होतो - दूर होऊन जातो. तेच 'पर-वैराग्य' होय. अशा 'अपर' आणि 'पर' वैराग्यामुळे मनावर संपूर्ण ताबा मिळवता येतो.

: 36 :

***असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मति: ।***
***वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायत: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **असंयतात्मना:** ज्यांचे मन संयमित नाही ( असे )
- **योग: दुष्प्राप:** त्यांच्यासाठी योग प्राप्त करणे खूप अवघड आहे
- **इति मे मति:** असा माझा विचार आहे
- **तु वश्यात्मना:** पण ज्यांनी मनावर ताबा मिळवला आहे
- **यतता:** जे या कामी प्रयत्नशील आहेत त्यांना
- **उपायत:** अभ्यास आणि वैराग्य वगैरे उपायांनी
- **अवाप्तुं शक्य:** योग प्राप्त करुन घेणे शक्य आहे

**अर्थ**

ज्याने मनावर ताबा मिळवला नाही अशा पुरुषाला योग साधणे कठीण आहे आणि ज्याने मन ताब्यात ठेवले आहे अशा प्रयत्नशील माणसाला साधनेने तो प्राप्त होणे शक्य आहे असे माझे मत आहे.

***संयमाविण हा योग न साधे मानितों चि मी***
***परी संयमवंतास उपायें साध्य होतसे ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत (1) संयमित मन ज्याला राखता येत नाही (2) त्यासाठी योगप्राप्ती खूप अवघड आहे, असे माझे मत आहे. (3) पण ज्यानी मनावर ताबा मिळवला आणि यासाठी जे खूप प्रयत्नशील आहेत (4) त्याना अभ्यास, वैराग्य यासारख्या उपायानी योग प्राप्त करुन घेणे शक्य आहे.

**स्पष्टीकरण**

1) **असंयतात्मना:** मागील श्लोकाच्या अनुसंधानात इथे चर्चा आली आहे की आपल्या प्रत्येक क्रियेत संपूर्णपणे संयमाची दृष्टी असायला हवी. संयम पहिली पायरी आहे. संयमाशिवाय आध्यात्मिक साधनेला प्रारंभ होत नाही. गीतेत परम तत्वाची ओळख करुन देणाऱ्या अनेक तत्वांची चर्चा आली आहे. परमात्मा ओळखावा कसा याबाबत अनेक संकेत दिले आहेत. या अध्यायात ध्यानयोगाचे वर्णन येते. पुढे भक्ती वगैरे साधनांची चर्चा येईल. संयम साधता आला नाही ना तर अन्य तमाम साधने व्यर्थ होत. यामुळे दृष्टी कशी असावी? याचा संकेत गीता इथे देत आहे. जीवनात जेव्हा चहुअंगानी संयम विकसतो तेव्हा आध्यात्मिक जागृती येते. यानंतर परमात्म्याचा अनुभव प्राप्त करुन घेण्याची तीव्र जिज्ञासा उत्पन्न होते. जिज्ञासा मंद, मध्यम आणि तीव्र अशी तीन स्वरुपाची असते. जीवनात संयम आणि निग्रह जेवढ्या मोठ्या प्रमाणात असेल तेवढीच जिज्ञासा अधिक तीव्र होईल.

2) **योग: दुष्प्राप इति मे मति:** जीवनात संयम नसेल तर योग साधणे खूप अवघड होऊन बसेल असे गीतेचे मत आहे. जीवनात संयम आणि शुध्दी साधता आली तर व्यक्ती परमात्म-जिज्ञासापूर्वक योगसाधनेकडे वळेल आणि योग प्राप्ती करुन घेईल. संयमाचा आधार नसेल तर योगविषयक जिज्ञासा तीव्रतेने उत्पन्न होणार नाही. परमात्मज्ञानरुपी योग प्राप्त होणे अवघड होऊन बसेल.

3) **तु वश्यात्मना यतता:** ज्यांनी संयमाचा अभ्यास केला त्याना मनावर नियंत्रण राखता आले. काही साधक ध्यान-भक्ती वगैरेसाठी खूप धडपडतात, प्रयत्नशील रहातात. **'यतता'** म्हणजे प्रयत्नशील जीवन संयमी असेल पण प्रयत्न शिथील असतील तर योग साधता येत नाही. यामुळे जीवन संयमी अन् निग्रही असले तरी योग प्राप्तीसाठी आवश्यक तेवढे तीव्र प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. प्रयत्न करण्याकामीही आपण शिथील असतो. यामुळे संयमी जीवन असेल तरी फलासक्ती क्षीण होत नाही. फलात आसक्ती उरली नाही की मग प्रयत्नात तीव्रता येऊ शकते. यामुळे फलासक्तीचा त्याग म्हणजे वैराग्य भावनेला बळकटी आणण्याच्या दिशेने केलेले गेलेले प्रयत्न. हे करण्यासाठी संपूर्ण शक्ती वेचावी. यामुळे सुगमतेने योग साधता येतो.

4) **उपायत: अवाप्तुं शक्य:** वरील तमाम उपाय योग प्राप्तीसाठी आवश्यक आहेत. या उपायांमध्ये अभ्यास आणि वैराग्य तर आहेतच आहेत. यात आणखी एकउपाय जोडायला हवा. ईश्वर शरणभाव म्हणजे भक्तीभाव. खूप बलवान असूनही सुलभता ही भक्तीची विशेषता आहे. योगसूत्रात अभ्यास आणि वैराग्य याना स्थान आहे. ईश्वर प्रणिधान म्हणजे ईश्वरशरणभाव म्हणजे भक्तीला साधन म्हणून स्थान दिले आहे. सूत्र असे आहे- **'ईश्वरप्रणिधानाद्वा'** - ईश्वरशरणभाव म्हणजे भक्तीभावामुळे मनाच्या वृत्तींवर ताबा मिळवता येतो. अभ्यास आणि वैराग्यामुळे मनावर ताबा मिळवता येतो किंवा ईश्वरभक्तीमुळे ताबा मिळवता येतो. हा अर्थ श्री किशोरलालभाई मश्रुवाला यांनी केला आहे. विनोबांचे निवेदन असे की अभ्यास-वैराग्य किंवा भक्ती नव्हे तर अभ्यास - वैराग्य अधिक भक्तीभाव यामुळे मनावर ताबा मिळवता येईल. ताबा मिळवणे सोपे जाईल. गीतेत भक्तीभावालाच प्राधान्य दिले आहे. योगसूत्राच्या साधनपाद विचारात आरंभी क्रियायोगाची चर्चा येते. तिथे पहिले सूत्र आहे **'तप:स्वाध्यायेश्वर प्रणिधानानि क्रियायोग:'** तप म्हणजे कायिक. आत्मा वा ईश्वरासंबंधीचे अध्ययन म्हणजे वाचिक तप आणि भक्ती म्हणजे मानसिक तप. या तिघांना क्रियायोग असे म्हणतात.

: 37 :

**अर्जुन उवाच**

*अयति: श्रध्दयोपेतो योगाच्चलितमानस: ।*
*अप्राप्य योगसंसिध्दिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्ण अयति:** हे कृष्णा, योगसाधना करतांना ज्यांचे प्रयत्न शिथिल वा अपूर्ण राहिलेत
- **श्रध्दया उपेत:** पण योगाच्या साधनेत जे श्रध्देने युक्त आहेत असे
- **योगात् चलितमानस:** ज्यांचे मन योगाने विचलित होऊन गेले आहे यामुळे
- **योगसंसिध्दिं अप्राप्य:** योगाच्या फळाला प्राप्त न होता

- **कां गतिं गच्छतिः** असे योगभ्रष्ट पुरुष कोणत्या गतीला प्राप्त होईल?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे श्री कृष्णा जो योगावर श्रध्दा ठेवणारा आहे, परंतु संयमी नसल्यामुळे ज्याचे मन अंत:काळी योगापासून विचलित झाले असा साधक योगसिध्दीला म्हणजे भगवत् साक्षात्काराला प्राप्त न होता कोणत्या गतीला जातो? प्राप्त होतो?

**अर्जुन म्हणाला**

***श्रध्दा आहे नव्हे यत्न योगांतूनि चळूनि जो***
***मुकला योग-सिध्दीस जाय कोण्या गतीस तो ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) योगसाधना करताना काहींचे प्रयत्न अपूर्ण रहातात. 2) पण योगाच्या आराधनेतली श्रध्दा मात्र विचलित होत नाही 3) पण योगसाधने कामी प्रयत्न कमी पडतात किंवा मृत्युची वेदना सहन न झाल्यामुळे वा साधना काळातच मृत्यु आल्यामुळे त्याचे मन योगापासून ढळते-विचलित होते. 4) योगफळापासून साधक वंचित रहातो. योगभ्रष्ट ठरतो. अशा योगभ्रष्ट साधकाला कुठली गती प्राप्त होते? असा अर्जुनाचा प्रश्न आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अयतिः** अर्जुनाचा प्रश्न बहुअंगी आहे. तमाम शक्यता उलगडवून दाखवणारा आहे. ध्यान आदी साधण्यासाठी साधना तर केली पण प्रयत्न अपूरे राहिलेत. आध्यात्मिक साधना म्हणजे नेमके काय? हे आधी जाणून घ्यायला हवे मग आचरणाचे स्वरुप समजून घेणे सापे ठरेल. अर्थात् एखादी गोष्ट अमलात आणायची असेल तर त्याचा संबंध मनाशी असतो. मन नाना परस्पर विरुध्द संस्कारांचे भांडारघर आहे. त्या संस्कारांची गर्दी हटवणे, अनावश्यक संस्काराना क्षीण करणे ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. नाना जन्मी आपण अनेक भली-बुरी कर्मे केलेली आहेत. त्यांचे संस्कार मनावर सातत्याने होत रहातात. या संस्कारामुळे अभिमान, राग-द्वेष यासारखे दोष वेळोवेळी आपला प्रभाव दाखवतात. मनाच्या शक्तीचे खच्चीकरण करत रहातात. या सवांर्वर विजय मिळवणे एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. या कामी अनेक जन्मही खर्ची पडू शकतात. 45 व्या श्लोकात गीता सांगते **अनेक जन्मसंसिध्दः** अनेक जन्मांच्या साधनेनंतर साधक सिध्दावस्थेला पोहोचतो. सातव्या अध्यायातील 19 व्या श्लोकात **बहूनां जन्मनां अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते'** अनेक जन्मांच्या साधनेनंतर साधक ईश्वरपद प्राप्त करुन घेतो. ' हे निवेदन आहे. हे ध्यानी घेऊन अर्जुन प्रश्न विचारत आहे की साधनेचे स्वरुप समजून घेतले. त्या दिशेने प्रयत्नही सुरु केलेत पण प्रयत्न पूर्ण झाले नाहीत तर साधकाची दशा काय होईल?

2) **श्रध्दया उपेतः** दुसरा मुद्दा अर्जुनाने असा उपस्थित केला की प्रयत्न पूर्ण झाले नसतील पण त्याची श्रध्दा काही साधनामार्गात ऊणी पडली नाही-कमी झाली नाही. खरे तर प्रयत्न कमी पडले वा खंडित झाले तर मग श्रध्दा विचलित होऊ शकते, प्रयत्नातल्या उणिवेमुळे अनेक साधकांची श्रध्दा योगसाधनेच्या संदर्भात विचलित होऊन जाते याचे कारण असे की त्याचे लक्ष साधनेच्या फळाकडे असते. त्याने आपल्या मनाशी या फळाची काही-एक कल्पना केलेली असते, फळ मिळेल की मिळणार नाही याकडे त्याचे अखंड लक्ष असते. फळ मिळत नाही असे ध्यानात आले तर मनी निराशा जागते. साधकाचा उत्साह मावळतो. तो साधनेचे प्रयत्न सोडून द्यायच्या तयारीला लागतो. अर्थात् साधनेच्या आरंभकाळीच जर फलाशा त्यागाच्या सिध्दांताचे समुचित आकलन झाले असेल तर मग ना निराशा घेरणार ना साधनेतील प्रयत्न शिथील होणार. साधनेकामी चित्त-मन निरंतर लीन असेल. ईश्वराला साधकाकडून प्रयत्नांची अपेक्षा असते. फळ प्रयत्नांच्याच अधीन असते. यामुळे साधनेच्या संदर्भातील श्रध्दा विचलित न होवो, हेच बघायचे असते.

3) **योगात् चलितमानसः** पुढचा मुद्दा अर्जुन असा मांडतो की साधक स्थिर बुध्दीचा आहे तरीही चित्त योगापासून दूर झाले तर काय? मनी श्रध्दा असतानाही साधक योगापासून विचलित होऊ शकतो. याची तीन कारणे संभवतात. प्रयत्नांचा अपूरेपणा मनाला विचलित करायचे एक कारण. मृत्युची वेदना असह्य होणे हे दुसरे कारण. अनपेक्षित मरण हे तिसरे कारण. या तीन कारणांची चर्चा करुन विनोबा हे सारे समजाऊन सांगतात. साधनेत जर प्रयत्न कमी पडले तर ध्यान-भक्ती-वैराग्य यापासून

मन विचलित होते, स्थिर होत नाही. दुसरे कारण मरण. मरणाची घडी अत्यंत महत्वाची होय. आयुष्यभर मनावर नाना संस्कार घडतात. यातले बलवान संस्कार मृत्युसमयी आपले बळ दाखवतात. यामुळे मरण वेदनेला झेलू शकणारी-झेलण्यासाठी शक्ती मिळवू शकणारी - साधना हवी. असे नाही घडले तर मन योगापासून विचलित होते. तिसरे कारण अनपेक्षित मरण. मरणाचा आधार प्रारब्ध कर्मे आहेत. प्रारब्ध कर्मे संपलीत की मरण येते. अनपेक्षित मरणही चित्त विचलित करते.

4) अर्जुनाने अखेरीस विचारले आहे की (अ) योगसाधनेत प्रयत्न न्यून पडले वा अपूर्ण राहिलेत, (आ) तरी योगसाधनेत श्रध्दा क्षीण झाली नाही पण मृत्यु वा अनपेक्षित मृत्युसमयी तीव्र वेदनेला झेलण्याचे बळ मनाच्या ठायी उरले नाही या कारणामुळे वा (इ) ज्याचे मन योगसाधनेपासून विचलित झाले त्याचे काय? त्याला **योगसंसिध्दिं अप्राप्य:** योगसाधनेचे फळ लाभले नाही, त्याला ज्ञानावस्था, सिध्दावस्था वा मोक्षदशा प्राप्त झाली नाही आणि देह विलय झाला तर अशा योगभ्रष्ट साधकाला कुठली गती लाभते? थोडक्यात असे की योगसाधना पूर्णत्वाला न पोहोचताच जर साधकाला मरण आले तर फळ काय मिळेल? **कां गतिं कृष्ण गच्छति** त्याची गती काय होईल? हा प्रश्न उद्भवण्याचे कारण असे की योगसाधनेमुळे मोक्षलाभ होतो आणि मोक्ष मिळाल्यावर पुनरपि देह वा जन्म मिळत नाही. योगसाधना अपूर्ण राहिली तर मोक्षलाभ होणार नाही, परिणामी देह मिळेल - पुनर्जन्म मिळेल. प्रवास अपूर्ण राहिला. मुक्कामाप्रत पोहोचेपर्यत - मोक्षलाभ होईपर्यत साधना अविरत चालू रहायला हवी. अशा परिस्थितीत मृत्यु आल्यावर साधकाला आपल्या अर्ध्या-अपूर्ण साधनेचे फळ काय मिळेल? त्याला कसा आणि कोणता जन्म लाभेल, हा अर्जुनाचा प्रश्न आहे.

: 38 :

***कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।***
***अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मण: पथि ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे अर्जुना
- **उभयविभ्रष्ट:** योग साधना अपूर्ण राहिली आणि योगाचे फळ म्हणजे (मोक्ष) लाभले नाही तर, प्राप्ती पासून आणि प्रापंचिक भोगांपासून योगी दोन्ही दिशांनी भ्रष्ट झाला
- **अप्रतिष्ठ:** या कारणाने जो निराधार झाला
- **ब्रह्मण: पथि विमूढ:** ब्रह्म प्राप्तीच्या मार्गात जो विमूढ होऊन गेला, मोहित झाला
- **छिन्नाभ्रं इव:** छिन्नविच्छिन्न ढगांप्रमाणे
- **न नश्यति कच्चित्:** तो पुरुष नष्ट तर होत नाही ना?

**अर्थ**

हे महाबाहो, भगवत् प्राप्तीच्या मार्गात मोहित झालेला आणि आश्रयरहित असलेला पुरुष छिन्न-विच्छिन्न ढगांप्रमाणे दोन्हीकडून भ्रष्ट होऊन नाश तर पावणार नाही ना?

***काय तो उभय-भ्रष्ट ब्रह्म-मार्गी भुलूनियां***
***नाश पावे निराधार फुटलेल्या ढगापरी ।***

**विषय:** अर्जुनाने या श्लोकात आपल्या प्रश्नाला अधिक स्पष्ट केले आहे. या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत (1) एकीकडे योगसाधना अधूरी राहिली हा एक भाग आणि याचा परिणाम म्हणून योगाचे फळ असे मोक्ष धामही प्राप्त झाले नाही. अशाप्रकारे साधक दोन्ही बाजूने नागवला गेला - लुटला गेला - भ्रष्ट ठरला. (2) यामुळे निराधार बनला. दोन्ही आधारांचे किनारे-काठ सुटलेत. (3) साधक विमूढ बनला म्हणजे ब्रह्मप्राप्तीच्या मार्गावरुन च्युत झाला - विचलित झाला. (4) असा पुरुष का विखुरलेल्या ढगांसारखा नष्ट होतो? असे तर होत नाही ना? त्याची एथवरची साधना धुळीला तर जाऊन मिळत नाही ना? अर्जुनाचा प्रश्न स्पष्ट आहे.

**स्पष्टीकरण**

1) **उभयविभ्रष्ट: 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्ट:'** म्हणजे दोन्ही कडून विचलित असा या वचनाचा शब्दार्थ आहे. या वचनाचा खरा अर्थ काय ? सामान्यपणे असा अर्थ केला जातो की एकीकडे प्रपंच सोडला आणि दुसरीकडे साधनाही अधूरी राहिली यामुळे ज्याला मोक्ष मिळाला नाही, अशा पुरुषाची गती काय होते ? यावर विनोबांचे निवेदन असे की पूर्ण श्रध्दापूर्वक योगसाधनेला आरंभ केला पण परिस्थितीमुळे तीव्र गतीने योगसाधनेचा प्रयत्न संपन्न होऊ

न शकल्यामुळे मरण आले. यामुळे योगसाधनेत खंड पडला. अशाप्रकारे योगसाधनाही गेली आणि साधनेमुळे लाभणारे मोक्ष पदही गेले मग हाती काय उरले? दोन्ही गोष्टी गेल्या. घरही गेले आणि घाटही गेला. अर्जुनाच्या प्रश्नाची दिशा पुनर्जन्माशी संबंधित आहे. पुनर्जन्माविषयी जाणून घेण्याच्या दिशेने अर्जुनाने हा प्रश्न विचारला आहे. पुनर्जन्म नसतो हे एकदा का ध्यानी आले की मग माणूस प्रयत्न करणे सोडून देईल. याचे कारण असे की साधना या एकाच जन्मात पूर्ण होईल वा साधनेचे फळ एकाच जन्मात लाभू शकेल असे काही सांगता येत नाही. यामुळे आपले प्रयत्न सिध्दीला जाणार नाहीत आणि फळप्राप्तीही होणार नाही - दुसरा जन्म लाभणार नाही हे सारे माहित झाल्यावर कुणीही आध्यात्मिक साधनेच्या दिशेने प्रवृत्त होणार नाही तरीसुध्दा प्रत्येकाच्या मनात कळत-नकळत एक प्रकारची श्रध्दा वसत असते की या जन्मी आपण जे काही भले काम केले आहे - सत्कर्मे केली आहेत त्याचे फळ पुढच्या जन्मी मिळणारच आहेत. आपले प्रयत्न कदापि व्यर्थ ठरणार नाही. याच श्रध्देमुळे माणूस सत्कर्मे करायला प्रवृत्त होतो.

2) दुसरा प्रश्न अर्जुनाचा **अप्रतिष्ठः** अप्रतिष्ठ वा निराधार व्यक्तीसंबंधी आहे. ज्याची साधना पूर्ण झाली नाही व साधनेचे फळही मिळाले नाही त्याचे जीवन निराधार बनेल. आध्यात्मिक साधनेत प्रमुख आधार ईश्वराचाच असतो. जीवनात ईश्वराचाच आधार असेल अन्य आधार नसेल तर साधना अपूरी राहिली वा साधनेचे फळ प्राप्त झाले नाही तरी वाईट वाटत नाही वा पश्चात्ताप वाटत नाही किंवा आपण निराधार आहोत अशी भावनाही मनी जागत नाही. **तुलसीदास म्हणतातः आधार निराधार को, सेतु भवसागर को म्हणजे** निराधारासाठी सर्वात मोठा आधार म्हणजे परमात्म श्रध्दा होय. परमात्म श्रध्दा भवसागर तरण्यासाठी पुलासारखी आहे पण साधना काळात सर्वच अर्धे-मुर्धे रहाते परिणामी परमात्म्याविषयीची श्रध्दाही अपूर्ण रहाते. साधना अपूर्ण राहिली वा साधनेचे फळ प्राप्त झाले नाही तर निराधार वाटणे स्वाभाविक आहे.

3) अर्जुनाने आणखी एक मुद्दा उपस्थित केला आहे: **विमूढो ब्रह्मणः पथि ब्रह्ममार्ग** चुकला. भरकटला. ब्रह्ममार्गात श्रध्दा असूनही साधना अपूर्ण राहिल्यामुळे म्हणा किंवा साधनेचे फळ न मिळाल्यामुळे म्हणा **किंकर्तव्यविमूढ** अवस्था जागते. काय करावे आणि काय करु नये हे सुचत नाही. दुविधा जागली की चित्ताची व्याकुळता जागणे स्वाभाविक आहे. अस्वस्थता जागणे स्वाभाविक आहे. यामुळे साधना काळात फळाच्या आशेच्या त्यागाची भूमिका चित्तात परिपूर्णपणे ठसवून घ्यायला हवी.

4) अखेरीस अर्जुनाने मुख्य शंका उपस्थित केली: **छिन्नाभ्रं इव न नश्यति कच्चित्:** की ढगांचा समूह जसा छिन्न-विच्छिन्न होऊन जातो, विखुरतो तशी तर नाही ना या साधकाची अवस्था होत? साधना जर अपूर्ण राहिली- साधनेचे अपेक्षित फळ जर लाभले नाही तर या साधकाची साधना तर नष्ट नाही ना होणार? एथवरची साधना तर नाही ना धुळीस मिळणार? आकाशात ढगांची दाटी होते. आता गगन बरसेल असे वाटते. एकदम सोसाट्याचा वारा येतो. ढग पांगतात. विखुरतात. पावसाचा थेंबही बरसत नाही. यामुळे शेतकरी निराश होतो. चिंतित होतो. अशीच मनोदशा योगभ्रष्ट साधकाची होऊन जाते. ढगांचे उदाहरण द्यायचे एक कारण आहे. ढग येतच रहातात. ढग जमतात. ढग विखुरतात. पुनश्च ढग जमतच नाहीत असे काही होत नाही. ढगांचे आवागमन जारी असते. ढगांची ये-जा सुरु असते. ढगांचे एकत्रित येणे व विखुरणे ही प्रक्रिया कायम असते. पावसाची मौजच मुळी अशी की आता ऊन दिसते आणि क्षणभरात पाऊस पडतो. यामुळे शेतकऱ्याची निराशा तात्कालिक स्वरुपाची असते त्याचप्रमाणे योग साधनाही तात्कालिक, अपूर्ण राहिली असे वाटत राहिले तरी ढगांच्या जमण्याप्रमाणे पुनर्जन्म लाभतो. साधना पूर्ण होते. सुफळ सफळ होते.

: 39 :

*एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।*
*त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्णः** हे कृष्णा
- **मे एतत् संशयः** माझ्या या संशयाला
- **अशेषतः छेत्तुं:** संपूर्णपणे दूर करण्यासाठी, निरसन करण्यासाठी
- **अर्हसिः** तूच केवळ अधिकारी आहेस, योग्य आहेस

- **हिः** कारण की
- **अस्य संशयस्य छेत्ता:** या संशयाला नष्ट करणारा
- **त्वदन्य:** तुझ्याशिवाय दुसरा वा अन्य
- **न उपपद्यते:** दिसत नाही

**अर्थ**

हे श्रीकृष्णा, माझा हा संशय (एक) तुम्हीच पूर्णपणे दूर करु शकता कारण तुमच्या शिवाय दुसरा कोणी हा संशय दूर करणारा मिळण्याचा संभव नाही, शक्यता नाही.

***माझा संशय हा कृष्णा तूं चि फेडीं मुळांतुनी***
***फेडीलसा दुजा कोणी न दिसे चि तुझ्याविण ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत - (1) अर्जुनाचे निवदेन आहे की या संशयाला संपूर्णत: नष्ट करायची शक्ती (2) केवळ भगवंताची आहे. (3) हा संशय दूर करणारा अन्य कुणी अधिकारी नाही.

**स्पष्टीकरण**

1) **मे एतत् संशयं अशेषत: छेत्तुं:** आध्यात्मिक दृष्ट्या विचार करु जाता शंका पूर्णपणे दूर होणे आवश्यक आहे. शंका निर्मूल व्हायला हवी. साध्या सामान्य स्वरुपाच्या शंका लवकर दूर होतात. सूक्ष्म आणि गहन शंकांना दूर करणे-घालवणे-मात्र खूप कठिण असते. यामुळे आरंभीच अर्जुनाने निवेदन केलेले आहे की त्याच्या संशयांना संपूर्णपणे दूर करायला हवे.

2) **अर्हसि:** एकमेव योगेश्वरच अर्जुनाच्या शंकांना दूर करु शकतात. आयुष्यात कुणा पोहोचलेल्या पुरुषावर श्रध्दा जागणे मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात असा अनुभव काही येत नाही. ज्याची श्रध्दा एखाद्या आध्यात्मिक पुरुषावर दृढ होते त्याच्या आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग सुकर होतो. श्रेष्ठ सिध्दपुरुषाची भेट आणि त्यावर श्रध्दा जागणे हा एक दुर्लभ असा संयोग आहे. श्रेष्ठ कोटीतील व्यक्ती उपलब्ध झाली नाही आणि श्रेष्ठ कोटीतील साधक वा मुमुक्षु व्यक्तीची भेट झाली तरी लाभ होईल. अर्जुनासाठी तर सर्वात मोठी उपलब्धी होती की साक्षात् योगेश्वरांशीच त्याची भेट झाली. अर्थात् जोवर संपूर्णपणे आध्यात्मिक जागृतीचा अनुभव येत नाही तोवर कुण्या महात्म्याच्या सत्संगाचाही विशेष असा लाभ होत नाही. आध्यात्मिक जागृतावस्था शिखराला पोहोचली की साधक पुरुषाचा त्वरित लाभ होतो. याचे कारण असे की श्रध्दा तर आधीपासूनच असते. अर्जुनाची अशीच स्थिती आहे त्याला श्रीकृष्णाचा सत्संग दीर्घकाळपर्यंत लाभला. अर्थात् आध्यात्मिक जागृती अभावी याचा म्हणावा तेवढा लाभ त्याला घेता आला नाही. अर्जुनाच्या जीवनात विषम प्रसंग येताच म्हणजे विपरित प्रसंग येताच त्याचा उपयोग संपूर्णपणे होऊ शकला. यामुळे अर्जुनाचे म्हणणे आहे की त्याच्या त्या संशयाला केवळ योगेश्वरच दूर करु शकतात.

3) हा मुद्दा अर्जुन पुनश्च मांडत आहे. **अस्य संशयस्य छेत्ता त्वदन्य: न उपपद्यते:** संशय घालवायला योगेश्वराहून अधिक योग्य कुणी दुसरा नाही. इथे श्रध्देचाच प्रश्न आहे. अर्जुन श्रीकृष्णाशिवाय अन्य कुणाकडूनही संशय घालवू इच्छित नाही. यामुळे तो असे म्हणतो की श्रीकृष्णाशिवाय त्याचा संशय घालवणारा दुसरा कुणीही पृथ्वीतलावर नाही.

: 40 :

**श्री भगवान उवाच**

***पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।***
***न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ तस्य विनाश:** हे अर्जुना, त्या योगभ्रष्ट पुरुषाचा विनाश
- **इह एव न:** इहलोकी कदापि होत नाही
- **अमुत्र न विद्यते:** परलोकातही होत नाही
- **हि तात:** कारण की हे तात
- **कल्याणकृत् कश्चित्:** कल्याण करणारा, मोक्षाची साधना करणारा अन्य कुणीही पुरुष
- **दुर्गतिं न गच्छति:** दुर्गतीला पावत नाही, त्याला दुर्गती मिळत नाही

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे पार्था, त्या पुरुषाचा इहलोकातही नाश नाही आणि परलोकातही नाश नाही. कारण बाबा रे, आत्मोध्दारासाठी अर्थात् भगवत्

प्राप्तीसाठी कर्म करणारा कोणताही मनुष्य अधोगतीला जात नाही.

**श्री भगवान म्हणाले**

***न ह्या लोकीं न त्या लोकीं नाश तो पावतो कधीं***
***शुभकारी कुणी बापा दुर्गतीस न जातसे।***

**विषय:** अर्जुनाच्या प्रश्नाला या श्लोकात गीता उत्तर देते. या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) योगभ्रष्ट पुरुषाचा या लोकी कदापि विनाश होत नाही. परलोकातही विनाश होत नाही. (2) कारण की शुभ कार्य करणारा, मोक्षाचा साधक दुर्गती म्हणजे खराब वाईट गतीला प्राप्त होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) अर्जुनाच्या प्रश्नावर भगवंताने उत्तर दिले आहे की **तस्य विनाश: इह एव न अमुत्र न विद्यते** इथे गीतेने पुनर्जन्मासंबंधी जणू काही सहा श्लोकांचे एक प्रकरण लिहिले आहे. तशी तर पुनर्जन्मविषयक चर्चा आठव्या अध्यायातही येते. अर्थात् दोघात फरक आहे. या अध्यायात अर्जुनाने प्रश्न विचारला आहे. एका जन्मात कुणी साधना करतो. मृत्यु पावला तर त्याची साधना अधूरी रहाते का? ती नष्ट होते वा खंडित होते का? या प्रश्नाच्या उत्तरादाखल पुनर्जन्माच्या बाबतीत जेवढे काही समजाऊन सांगणे गरजेचे होते तेवढे समजाऊन सांगितले गेले आहे. आठव्या अध्यायात सांगितले आहे की अंत समयी मोक्षाच्या दृष्टीने काय स्थिती असायला हवी? आणि अंतकाळाचे महत्व काय आहे? मृत्युसमयी जी भावना मनात असेल त्यानुसार पुढचा जन्म लाभेल. यामुळे भगवंताचे अखंड स्मरण करत जीवन घालवण्याचे लक्ष्य असायला हवे. हे निरुपित केले गेले आहे. अखंड स्मरण असेल तरच अंतसमयी भगवंताचे स्मरण करत आपण देह त्याग करु शकतो. इथे अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर सहा श्लोकांच्या माध्यमातून दिले गेले आहे. सारांश असा की योगभ्रष्ट पुरुषाची साधना अनेक जन्मानंतर सफल होते.

इथे आधी सांगितले गेले आहे की योगसाधना अपूर्ण राहिली तरी तिचा नाश या जन्मी वा ईहलोकात होत नाही, असे होण्याची शक्यता नाही. पुण्यकर्मे उजेडासमान आहेत. पापकर्मे अंधारासमान आहेत. पुण्यकर्मे आत्म ज्ञानरुपी प्रकाश प्रकट करण्याकामी मदत करतात. पापकर्मे मात्र आत्म ज्ञानरुपी प्रकाशाला झाकोळून टाकतात. पापकर्माचा प्रभाव असतो. हा प्रभाव क्षणैक असतो. चिरकालिक नसतो. पापकर्मे आत्मज्ञानाच्या प्रकाशाला हव्या तितक्या जन्मांपर्यंत झाकोळून टाकू शकतात. या प्रकाशाला कायमस्वरुपी नष्ट मात्र करु शकत नाहीत कारण की पापकर्माची स्वत:ची अशी शक्ती नसते. पापकर्मे पुण्यकर्माच्या संस्कारांना झाकू शकतात. उत्कर्ष होऊ लागतो तेव्हा आध्यात्मिक साधना करायची जिज्ञासा जागली म्हणजे पुण्यकर्माचा उत्कर्ष झाला असे मानावे. यामुळे आध्यात्मिक साधनेचे संस्कारही पुण्यकर्माप्रमाणेच नष्ट होत नाही. साधनाकाळात बाधा वा अवरोध उत्पन्न झाला तरी योगसाधनेचे ते संस्कार संचित रहातात. बालपणीचे संस्कार इतके खोल असतात की अखरेपर्यंत त्याच्या प्राबल्याचा अनुभव येत रहातो. यामुळे बालपणी कुसंगती न घडो व सज्जन संगती लाभो हे गरजेचे आहे. यावरून एक बाब ध्यानात येते. आपण जर आयुष्यात योगाभ्यास केला असेल आणि त्यात जरी काही काळ खंड पडला असेल तरी योगाभ्यासाचे संस्कार मनात संचित असतात. त्यांचा नाश होत नाही. त्याना संधी मिळताच त्यांचे कार्य सुरु होईल. योग्य देश, काळ आणि अपेक्षित अनुकूलता लाभली तर त्यांचे कार्य सुरु होईल. यामुळे गीतेने आधी समजाऊन सांगिले की योगाचा अभ्यास असो वा ध्यानाचा वा मग भक्तीचा का अभ्यास असेना तो या जन्मी कदापि नष्ट होत नाही.

दुसरा मुद्दा असा मांडला आहे. योगाच्या वा ध्यानाच्या अभ्यासाचे संस्कार कमालीचे दृढमूल असतात. ते पुढच्या जन्मीही नष्ट होत नाहीत. आपण जी काही कर्मे करु त्यांचा संस्कार मनावर अमिट असतो. जो अभ्यास वगैरे करतो त्याचा ठसा दृढपणे उमटतो. त्याचा आपल्याला लाभ मिळतो. वाईट संस्कारांमुळे नुकसान होते. हानी होते. याप्रमाणे या जन्मातील साधनेचे संस्कार आपल्या मनावर संचित होतात. ते जसेच्या तसे पुढच्या जन्मीही सोबत जातात. या जन्मी आपण केलेले सत्कर्म वा असत्कर्म काहीही वाया जात नाही. व्यर्थ ठरत नाही.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील 40 व्या श्लोकात निष्काम कर्मयोगाचे एक वैशिष्ठ्य सांगितलेले आहे. या मार्गात आपण केलेले प्रयत्न कदापि नष्ट होत नाहीत. याचे

अल्पस्वल्प आचरणसुध्दा प्रापंचिक भयापासून वाचवते. प्रापंचिक बंधनांपासून वाचवते. पुढच्या जन्मीसुध्दा आध्यात्मिक साधनेचे हे संस्कार नष्ट होत नाहीत. कुठला का संस्कार असेना तो फलित होण्यासाठी तीन गोष्टींची अनुकूलता लागते. देश, काल आणि निमित्त. हे सारे अनुकूल असायला हवेत. ही अनुकूलता नसेल तर मग हे असेच पडून रहातात. ज्या संस्कारांना संधी लाभते ते आपले कार्य सुरु करुन देतात. योगाभ्यासाच्या संस्कारांना जेव्हा सुसंधी लाभेल तेव्हा अगदी पुढच्या जन्मीसुध्दा त्यांच्या कार्याला सुरुवात होते. तोवर हे संस्कार तसेच योग्य संधीची वाट बघत शांतपणे असतात.

2) **न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति:** शुभकार्य करणारा असो वा कल्याणकारी मार्गाचा पथिक असो, वा मग मोक्षमार्गीचा साधक का असेला, असा साधक कदापि दुर्गतीला प्राप्त होत नाही. अशा साधकाची दुर्दशा होत नाही. यात गीतेने दोन गोष्टी सांगितल्या आहेत. एक म्हणजे अखंडपणे शुभकार्ये करावीत आणि दुसरे म्हणजे शुभ कार्य करत राहिले तर वाईट जन्म लाभणार नाही. आपण जीवन कसे घालवतो. यावर सारे अवलंबून असते. आपली प्रतिज्ञा सदैव शुभ-कार्याची असावी. शुभ संकल्पाची असावी. जगत कल्याणाने प्रेरित असावी मग आपला जीवन प्रवाह मोक्षाच्या दिशेने वहाता राहील मग काळजी करायचे काही कारण उरणार नाही मग तर चांगलाच जन्म लाभेल. शास्त्रात दोन शब्दांचा उल्लेख येतो. 'ईहलोक' आणि 'परलोक'. या श्लोकाच्या आरंभी ईहलोकाचे वर्णन येते. ईहलोक म्हणजे वर्तमान जन्म. परलोक म्हणजे दुसरा जन्म प्राप्त होण्यापूर्वीची सुखमय स्थिती.

योगभ्रष्ट पुरुषाला कोणता जन्म लाभतो. हा विषय पुढील श्लोकात आला आहे.

: 41 :

*प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वती: समा: ।*
*शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगभ्रष्ट:** योगभ्रष्ट पुरुष
- **पुण्यकृतां लोकान् प्राप्य:** पुण्यवान लोकांची एक सुखमय स्थिती प्राप्त करुन
- शाश्वती: समा: **दीर्घकाळपर्यंत**
- **उषित्वा:** त्या सुखमय स्थितीत राहून
- **शुचीनां श्रीमतां गेहे:** पवित्र आणि साधनसंपन्न परिवारात, घरात
- **अभिजायते:** जन्म घेतात

**अर्थ**

योगभ्रष्ट पुरुष पुण्यवंताना मिळणाऱ्या लोकाना अर्थात् स्वर्ग वगैरे उत्तम लोकाना जाऊन तेथे पुष्कळ वर्षे राहून नंतर शुध्द आचरण असणाऱ्या श्रीमंतांच्या घरात जन्म घेतो.

*पुण्य-लोकांत राहूनि तो योग-भ्रष्ट संतत*
*शुचि साधनवंतांच्या घरीं जन्मास येतसे ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत (1) योगभ्रष्ट पुरुष पुण्यवंतांना लाभणाऱ्या सुखमय स्थितीला प्राप्त करुन घेतात. (2) त्या सुखमय स्थितीत दीर्घकाळ वास्तव्य करतात. (3) पुढील जन्मी पवित्र आणि साधनसंपन्न कुळात जन्म घेतात.

**स्पष्टीकरण**

1) **योगभ्रष्ट: पुण्यकृतां लोकान् प्राप्य** सुखमय स्थितीची प्राप्ती आणि पावन व साधनसंपन्न कुळात जन्म हा लाभ योगभ्रष्ट साधकाला होतो. मागील श्लोकात सांगितले आहे की योग-भ्रष्ट पुरुषाचा या लोकी वा परलोकी नाश होत नाही. पुण्यकर्मे आचरणाऱ्यांना सुखमय स्थितीचा परलोक लाभतो. योगभ्रष्ट पुरुषांनाही तोच लोक लाभतो. मागील शुभकार्याचा कदापि नाश होत नाही. शुभकार्य करणाऱ्यांची कदापि दुर्दशा होत नाही. आता या श्लोकात पुढली चर्चा आहे. योगभ्रष्ट पुरुषाची देहत्यागानंतर काय स्थिती होते त्याची चर्चा आहे. पुण्यकर्मे आचरणाऱ्यांना कुठला लोक लाभतो? शास्त्रकारांनी नरक, स्वर्ग आणि ब्रह्मलोक अशा तीन लोकांची चर्चा केली आहे. नरक म्हणजे दु:खमय लोक. स्वर्ग म्हणजे सुखमय लोक. ब्रह्मलोक म्हणजे स्वर्गलोकाहून श्रेष्ठ असा आनंदलोक. आनंदमय लोक. हे सारे अर्थ काही समाधानकारक आहे.

विनोबांनी लावलेला अर्थ समाधानकारक आहे. विनोबांच्या निवेदनाचा मथितार्थ असा. जीवनकाळात शरीर, इंद्रिये, बुध्दी आणि मन या सर्वांना झोपेत आराम मिळतो. प्राणाला मात्र आराम मिळत नाही. देहाचा मृत्यु झाला की मग कुठे प्राणाला आराम मिळतो. एक देह गळून पडला आणि दुसरा देह लाभला तोवरच प्राणाला आराम. प्राणाच्या आरामासाठी मृत्यु आवश्यक आहे. देहत्याग झाला की लिंग शरीर म्हणजे वासनात्मक शरीर सोबत घेऊन प्राण एका शरीराचा त्याग करुन दुसऱ्या शरीरात प्रविष्ट होतो. लिंग देहाच्या ठायी मन, बुध्दी, दहा इंद्रिये (पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये), पंच विषयांचे सूक्ष्म संस्कार म्हणजे पंच तन्मात्रा असे सारे सतरा घटक असतात. या सतरा तत्वांचा समावेश म्हणजे लिंग देह होय. यात प्राणाचाही समावेश होतो. याप्रमाणे सगळी मिळून अठरा तत्वे होतात पण मन व बुध्दीला स्वतंत्र न मानता एकच मानले जाते म्हणूनच यांचा समुच्चय म्हणजे लिंग देह होय. आता एक प्रश्न निर्माण होतो. प्राणाला जोवर आराम लाभत नाहीत तोवर म्हणजे दुसरा जन्म प्राप्त होईपर्यत या लिंग देहाचे स्थान कुठे असते ? कुठे असतो हा लिंगदेह या काळात? विनोबांचे निवेदन असे की प्राणाच्या आरामासाठी लिंगदेह आभाळात निवास करतो. मन सोबतीला असते. यामुळे जीवनात जशी कर्मे आचरलेली असतील त्यानुसारच विश्राम काळ असेल. ही दीर्घ निद्रावस्था असेल. या काळात बरी-वाईट स्वप्ने पडणे वा अजिबात स्वप्ने न पडणे असे कर्मावर अवलंबून असेल. जर सुख प्रदान करणारे वा आनंददायक स्वप्नदर्शन होत असेल तर ती दीर्घ सुखस्वप्नमय अवस्था म्हणजे स्वर्ग होय. जर वाईट वा दु:खदायक स्वप्नदर्शन होत असेल तर ती अवस्था दीर्घ दु:खमय स्वप्नयुक्त स्थिती म्हणजे नरक होय आणि जर नि:स्वप्न झोप लाभत असेल तर ती स्थिती म्हणजे ब्रह्मलोक होय. ब्रह्मलोकातून परत यायचे नसते अशी कल्पना आहे. साधना करता-करता सिध्दपुरुष मोक्षावस्थेप्रत पोहोचतो पण सिध्दी आड येते. सिध्दीसारख्या कारणामुळे थोडीशी वासना उरते. थोडासा अहंकार उरतो. जीवभाव उरला असेल तर जीवन्मुक्ती होऊ शकत नाही. ब्रह्मलोक ही उच्चप्रतीची स्थिती आहे. या स्थळी पोहोचल्यावर साधना करण्यासाठी पुनरपि ईहलोकी जन्म घ्यावा लागत नाही. थोडा अहंभाव उरतो. यामुळे ब्रह्मलोकी काही काळ निवास करावा लागतो. तिथून मुक्ती मिळते अशी कल्पना आहे. शास्त्रात या मुक्तीचे वर्णन 'क्रम मुक्ती' असे आहे. क्रम मुक्ती म्हणजे ब्रह्मलोकी जाऊन मुक्ती. याचा अर्थ असा की ज्याची साधना अपूर्ण राहिली त्याला काही काळपर्यत प्राणाला आराम मिळावा म्हणून विश्रांती घ्यावी लागते. निद्रेच्या स्थितीत रहावे लागते. या पुरुषाची आध्यात्मिक साधना ईहजन्मात सुरु असते तेव्हा सुस्वप्नांची स्थिती असते. याचा अर्थ असा की स्वर्गात म्हणजे पुण्यलोकात तो काही काळापर्यत निवास करतो. या अवस्थेत साधकाला किती वेळ रहावे लागते हा सवाल आहे.

2) गीतेचे निवेदन असे आहे की स्वर्गात तो दीर्घकाळ पर्यत निवास करतो. '**उषित्वा शाश्वती: समा:**' काही काळपर्यत 'असे न म्हणता दीर्घ काळपर्यत' असे का म्हटले असावे बरे? याचे उत्तर असे की या जन्मी त्या योगभ्रष्ट पुरुषाने ज्या तीव्रतेने साधना केली असेल तेवढा काळ त्याने विश्रांती घ्यायला हवी. साधनेत तीव्रता अधिक असेल तर मृत्यु पश्चात्‌चा विश्रांती काळ अधिक राहील अशी कल्पना करता येईल किंवा मग साधना काळात साधकाने एवढा आनंद प्राप्त करुन घेतला असेल की त्या स्थितीत मृत्युच्या पश्चातही विश्रांती काळातही दीर्घकाळपर्यत तो स्वाभाविकपणे राहील.

3) **शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते:** पवित्र आणि साधनसंपन्न कुळात योगभ्रष्ट जन्माला येतो. योगभ्रष्ट पुरुषाची साधना पुढील जन्मीदेखिल अखंडपणे सुरु असते. त्या साधनेची त्याला अनुकूलता असायला हवी. लाभ योगभ्रष्ट पुरुषाला सहजपणे लाभतो. बालपणापासूनच संस्कार सिंचनासाठी अनुकूल परिस्थिती लाभली तर प्रतिकूल परिस्थितीतही अन्य संस्कारांशी जी झुंज घ्यावी लागते आणि याकामी जो व्यर्थ शक्तीचा क्षय होतो त्यापासून सवत:ला वाचवता येणे त्याला शक्य होते. योगभ्रष्ट पुरुषाच्या चित्तातही शुभ संस्कारांप्रमाणेच अशुभ संस्कारही असतात. शुभ संस्कारांचे पोषण होत असताना अशुभ संस्कारांना सिंचन मिळू नये यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. यामुळेच मागील जन्मी अधूरी राहिलेली साधना या जन्मी निर्विघ्नरुपाने-निर्विघ्नपणे-पार पाडता येईल. योगसाधनेचे संस्कार जर इतके बळकट असतील तर योगभ्रष्ट साधकाला एवढी सूट-सवलत मिळू शकते.

दुसरे असे की बाह्य परिस्थितीची अनुकूलताही आवश्यक आहे. आर्थिक चणचण असेल तर ती सुधारण्यासाठी मदत करावी लागते. यामुळेही साधनेत बाधा येऊ शकते-येते. योगभ्रष्ट पुरुषाची पूर्वजन्मीची साधना बळकट असेल तर काही प्रश्न उद्भवत नाही. योगसाधना जेवढी प्रबळ असेल तेवढी बाह्य परिस्थितीच्या अनुकूलतेची आवश्यकता कमी भासेल पण योगसाधना बलवान नसली तर बाह्य परिस्थितीच्या अनुकूलतेची गरज भासेल यामुळे योगभ्रष्ट पुरुषालाही परिस्थितीची अनुकूलता सहज मिळेल. अर्थात् अत्यंत श्रीमंत कुळात जन्म लाभला तर साधनेत मंदता वा शिथिलता येण्याची शक्यता असते. वैभवसंपन्न जीवनाचे संस्कार योगसाधनेत विक्षेप आणू शकतात.

: 42 :

***अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।***
***एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अथवा:** किंवा योगभ्रष्ट पुरुष
- **धीमतां योगिनां एव कुले:** बुध्दीमान आणि विवेकी योगी जनांच्या कुळात
- **भवति:** जन्म घेतात
- **हि लोके:** कारण की लोकात
- **यत् ईदृशं जन्म:** अशा प्रकारे योग्यांमध्ये जन्म लाभणे
- **दुर्लभतरं:** अधिक दुर्लभ आहे

### अर्थ

किंवा वैराग्यशील पुरुष त्या लोकात न जाता ज्ञानी योग्यांच्याच कुळात जन्म घेतो पण या प्रकारचा जो हा जन्म आहे, तो या जगात, नि:संशय अत्यंत दुर्मिळ आहे.

***अथवा प्राज्ञ योग्यांच्या कुळीं चि मग जन्मतोअवश्य हा असा जन्म लोकीं अत्यंत दुर्लभ ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) किंवा मग बुध्दीमान वा विवेकसंपन्न योग्यांच्या कुळातच योगभ्रष्ट जन्माला येतो. (2) कारण की अशाप्रकारे योगी कुटुंबात जन्म मिळणे अधिक दुर्लभ गोष्ट आहे.

### स्पष्टीकरण

(1) **अथवा धीमतां योगिनां एव कुले भवति:** योगभ्रष्ट बुध्दीमान योग्यांच्या कुळात जन्म घेतो. 41 व्या श्लोकात 'पवित्र' आणि 'श्रीमंत' या दोन विशेषणांचा प्रयोग केला गेला आहे. या श्लोकात 'बुध्दीमान' आणि 'योगी' ही दोन विशेषणे अधिक जोडून दिली आहेत. मागील श्लोकाच्या 'श्रीमंत' ऐवजी इथे 'बुध्दीमान, विवेकी' या विशेषणाचा प्रयोग केला गेला आहे. मागील श्लोकात 'शुची म्हणजे पवित्र' हा शब्द होता त्याऐवजी इथे 'योगी' हा शब्द प्रयुक्त आहे. श्रीमंत हा बाह्य साधनानी-बाह्य अनुकूलतेने संपन्न असतो. या श्लोकात प्रयुक्त 'श्रीमतां' शब्द ही साधन संपदेला लक्षात ठेऊनच प्रयुक्त केला गेला आहे, हे ध्यानात घ्यायला हवे. बुध्दीच्या ठायी विवेक जागणे ही मोठी संपत्ती आहे. ही अनुकूलता आहे. विवेकी पुरुषाच्या कुळात जन्म लाभला तर बालपणापासूनच जीवनात विवेक जागरणाची सुरुवात होते. पुढील काळात साधना विकसते. आत्मानात्मविवेक प्राप्त होतो.

दुसरे विशेषण आहे 'योगी'. योगीजन हे पवित्रच असतात. पूर्वजन्मी काहींची योगसाधना क्षीण वा मंद रहाते. अशांना पवित्र व श्रीमंत कुळात जन्म लाभतो, असे अनुमान करता येते. साधनेचे बळ जर अधिक नसले तर या जन्मी बाह्य अनुकूलतेची आवश्यकता अधिक असणे स्वाभाविक आहे. अर्थात् काहींची साधना अत्यंत तीव्र गतिने पूर्वजन्मी संपन्न झाली असेल अशांना या जन्मी तीव्रतर साधनेसाठी वेगळी अनुकूलता लागेल. तीच दोन प्रकारची अनुकूलता या श्लोकातून वर्णिली आहे. ती अशी की बुध्दिवंत आणि योगी कुळात त्याला जन्म लाभतो.

2) दुसरी गोष्ट आहे: **लोके यत् इर्दशं जन्म दुर्लभतरं** असा जन्म लाभणे विशेष दुर्लभ आहे, हा झाला दुसरा मुद्दा. पवित्र आणि श्रीमंत कुळात जन्म लाभण्याऐवजी योगी आणि विवेकी कुळात जन्मलाभ होणे हे खचितच दुर्लभ आहे. ज्ञानोबांचे थोरले बंधु निवृत्तीनाथ हे अनुभवी पुरुष होते. त्यानीच ज्ञानोबांना आध्यात्मिक ज्ञान दिले. तेच सद्गुरुनाथ बनले. ज्ञानोबांचे आई-बाबाही ईश्वरभक्त होते. एका पावन कुळात ज्ञानोबांचा जन्म झाला होता. ज्ञानोबा

मोठे योगी होते. त्याना समाधीलाभ झाला होता. समाधी अवस्थेतच त्यांनी देह ठेवला.

काहींची साधना पूर्वजन्मी अत्यंत तीव्र असते. ते विवेकी आणि योगी पुरुषांच्या कुळात जन्म प्राप्त करतात. बाळपणीच त्याना वैराग्य लाभते. त्यांची साधना पूर्ण होते. ज्ञानोबा म्हणतात.- "सूर्योदयापूर्वी जसा प्रभातकाळीचा प्रकाश प्रकट होतो तसेच परिपक्व अवस्थेची वाटही न बघता आणि प्रौढावस्थारुपी गावात पोहोचण्याच्या पूर्वीच सर्वज्ञता त्यांच्या गळ्यात वरमाळा घालते. पूर्वजन्मीची परिपक्व बुध्दी या जन्मी प्राप्त होते यामुळे मनाच्या ठायी तमाम विद्या आपोआप प्रकट होतात. सारी शास्त्रे विनासायास आपोआप त्याच्या मुखातून प्रकट होऊ लागतात. अशा प्रकारचा जन्म त्याला लाभतो."

पूर्व जन्मी बुध्दी-संयोग प्राप्त होतो. तो पुढील जन्मी कशाप्रकारे प्रकट होतो हे पुढील श्लोकात आले आहे.

: 43 :

*तत्र तं बुध्दिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।*
*यतते च ततो भूयः संसिध्दौ कुरुनन्दन ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत्रः** तिथे म्हणजे पवित्र साधनसंपन्न विवेकी आणि योग्यांच्या कुळात प्राप्त जन्मकाळात
- **तं पौर्वदेहिकंः** पूर्वजन्मातल्या योगाभ्यासाने प्राप्त
- **बुध्दिसंयोगंः** बुध्दीच्या संयोगाला म्हणजे समत्व बुध्दीयोगाच्या संस्काराला (अनायासे)
- **लभतेः** प्राप्त करुन घेतात
- **च कुरुनन्दनः** आणि हे अर्जुना (ती)
- **संसिध्दौः** योगसिध्दी प्राप्त करुन घेण्यासाठी
- **ततः भूयः यततेः** पुनर्जन्मात केलेल्या योगाभ्यासापेक्षा पुढचा अभ्यास करायचा प्रयत्न करतात

**अर्थ**

तेथे त्या पहिल्या शरीरात संग्रह केलेल्या बुध्दी संयोगाला म्हणजे समत्व बुध्दीरुप योगाच्या संस्काराना अनायासे प्राप्त होतो आणि हे कुरुनंदना, त्यांच्या प्रभावाने तो पुन्हा परमात्मप्राप्तीरुप सिध्दीसाठी पूर्वीपेक्षा अधिक प्रयत्न करतो.

*तिथें तो पूर्व-जन्मींचा बुध्दि-संस्कार जोडुनी*
*मोक्षार्थ करितो यत्न पूर्वीं हूनि पुढें पुन्हां ।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) पूर्वजन्मी योगाभ्यास केला. बुध्दी संयोग झाला. संस्कारसंपन्न बुध्दीचा लाभ मिळाला. (2) मोक्ष प्राप्त करुन घेण्यासाठी मागील जन्मी केलेल्या योगाभ्यासाच्या पुढे प्रयत्न करता येतात.

**स्पष्टीकरण**

1) **तत्र तं पौर्वदेहिकं बुध्दिसंयोगं लभतेः** पवित्र-साधनसंपन्न कुळात जन्म लाभतो अथवा बुध्दीमान, विवेकी अन् योग्यांच्या कुळात जन्म प्राप्त होतो. पूर्वजन्मी योगाभ्यास केलेला असतो. त्याचे संस्कार बुध्दीच्या ठायी संकलित स्वरुपात असतात. त्या संस्कारानी संपन्न अशी बुध्दी असते. पुढच्या जन्मी ही बुध्दी लाभते.

जीवन एक प्रदीर्घ प्रवास आहे. कधी सुरु झाला हा प्रवास हे कुणाला ज्ञात नाही. तत्वज्ञानाच्या भाषेत बोलायचे तर अनादीकाळापासून आपला प्रवास जारी आहे. आपल्याला मोक्ष या गंतव्याप्रत पोहोचायचे आहे पण हा मुक्काम एकाच जन्मात साध्य करता येईल असे नाही. अनेक जन्मांच्या प्रवासानंतर मोक्ष या मुक्कामाप्रत पोहोचता येते. साधना करता-करता मध्येच मृत्यु गाठू शकतो. दुसरा जन्म श्रेष्ठ कुळात लाभतो. प्रवास पुनश्च सुरुच रहातो. मागील जन्मीची योगसंस्कार युक्त बुध्दी नव्या जन्मातही प्राप्त होते. या जन्मीही आपला एक अनुभव असतो. बाळपणी आपण एखादा श्लोक कंठस्थ करतो. काही काळानंतर त्याचे विस्मरण होते. चाळीसेक वर्षे लोटतात. अचानकपणे तो श्लोक आठवतो. अशी उदाहरणे आहेत. एखादे कुटुंब असते. भाऊ असतात. एखादा प्रपंचापासून विरक्त होतो. बाकीचे प्रपंचात रमतात. गुंतून पडतात. याचे कारण पूर्वजन्म आहे. मागील जन्मीच्या वैराग्य साधनेचे संस्कार या जन्मीही प्रकट होतात. त्या आधारे त्या व्यक्तीचा जीवनप्रवाह बनतो. कधी-कधी असेही होते. प्रपंच आणि वैराग्याचे संस्कार तुल्यबळ ठरतात. अशा परिस्थितीत प्रबळ संस्कार प्रकटतील. बाकी दबून रहातील. योग्य संधीची वाट बघतील. संधी मिळताच उसळून वर येतील.

2) **संसिध्दौ ततः भूयः यतते:** मागील जन्मी साधक योगाभ्यासाचे काही भांडवल मिळवतो. योग बुध्दी प्राप्त करुन घेतो. पुढील जन्मी ते भांडवल त्याला यथावत् मिळते. त्या संपदेसोबत साधक मोक्षमार्गीची वाट चालू लागतो. पुढील साधना सुरु ठेवतो मद्रासहून पुण्याला जायचे आहे. दहा-पंधरा मैल चालावे. एखाद्या गावी मुक्काम करावा. रात्री विश्रांती घ्यावी. सकाळ उजाडताच पुढे मार्गस्थ व्हावे. आपण बंधनरुपी गावाहून निघालो आहोत. मुक्तीरुपी गावापर्यंत पोहोचायचे आहे. या यात्रेत एक जन्म म्हणजे एक दिवस होय. दिवसा यात्रा आटोपते. आपण रात्री विश्रांती घेतो. मरण रात्रीसारखे आहे. मरण झोपेसारखे आहे. रात्रीची झोप झाली की सकाळी आपण जागे होतो. मोक्षरुपी मुक्कामी पोहोचण्यापूर्वी अनेक जन्मी यात्रा सुरु ठेवावी लागेल. कधीतरी मुक्कामी पोहोचूच. मागील जन्मीचे शुभ संस्कार या जन्मी कामी येतील. दुसऱ्या भल्या-बुऱ्या संस्कारांना दाबून टाकतील. योगाभ्यासाचे संस्कार प्रकट होतील. हे संस्कार चांगल्या प्रकारे विकसतील. योगाभ्यास जारी ठेवण्यासाठी योगभ्रष्ट पुरुष योग्य त्या कुळात जन्म ग्रहण करील. हे जन्मोजन्मीचे चालणे आहे. हा अखंड प्रवास आहे. मागील यात्रेचा अनुभव पुढील जन्मी भांडवल म्हणून रहाणार आहे. चांगला व शुभ संस्कार दबून रहाणार नाही. तो विकसित होईल.

: 44 :

***पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः।***
***जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि तेन् एव पूर्वाभ्यासेन्:** कारण की त्याच पूर्वाभ्यासाच्या बळावर
- **अवशः अपि सः ह्रियते:** विवश होऊन तो योगभ्रष्ट पुरुष योगाकडे आपोआप आकर्षित होतो, ओढला जातो
- **योगस्य जिज्ञासुः अपि:** योग जाणून घेण्याची इच्छा करणारे जिज्ञासु, साधकदेखिल
- **शब्द ब्रह्म अतिवर्तते:** शब्द ब्रह्माला म्हणजे वेदात सांगितलेल्या सकाम कर्मांच्या फळांना ओलांडून जातात

**अर्थ**

तो श्रीमंतांच्या घरात जन्म घेणारा योगभ्रष्ट पुरुष पराधीन असला तरी त्या पहिल्या जन्मीच्या अभ्यासामुळेच नि:शंकपणे भगवंताकडे आकर्षिला जातो. तसेच समबुध्दीरुप योगाचा जिज्ञासू देखिल वेदाने सांगितलेल्या सकाम कर्मांच्या फळाना ओलांडून जातो.

***पूर्वाभ्यास-बळानें तो खेंचला पर-तंत्र चि***
***जिज्ञासेनें हि योगाच्या जातो वेदांस लंघुनी।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) मागील जन्मी योगाभ्यासाची शक्ती लाभते. या जन्मी ती कामी येते. यामुळे साधक विवश होतो. योगमार्गाकडे आकृष्ट होतो. (2) योग जाणण्याची कामना करणारा जिज्ञासू असतो. साधक असतो. शब्द ब्रह्माला म्हणजे सकाम कर्माना लंघून जातो. याचा अर्थ असा की त्याला शब्द ब्रह्मतत्वाची गरज नसते. वेद वगैरेंच्या अध्ययनाची गरज नसते. याचा अर्थ असा की त्याला शब्द ब्रह्मतत्वाची गरज नसते. वेद वगैरे ग्रंथांच्या अध्ययनाची गरज नसते.

**स्पष्टीकरण**

1) विवश होतो याचा अर्थ लाचार होऊन तो योगमार्गाकडे वळतो असे नव्हे. विवश म्हणजे सहजपणे, काहीही विशेष प्रयत्न न करता. आपोआप या मार्गाकडे वळतो. आकृष्ट होतो. ओढला जातो. असा अर्थ आहे. मागील जन्मीचा अभ्यास सुरु ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागत नाहीत. मागील अनुभवच त्याच्याकडून योगमार्ग प्रशस्त करवुन घेतात. शंकराचार्य लिहितात : **न कृतं चेत् योगाभ्याससंस्कारात् बलवत्तरं अधर्मादिलक्षणं कर्म, तदा योगाभ्यासजनितेन संस्कारेण ह्रियते। अधर्मश्चेत् बलवत्तरः कृतः तेन योगजः अपि संस्कारः अभिभूयते एव। तत्क्षये तु योगजः संस्कारः स्वयमेव कार्यमारभते, न दीर्घकालस्थस्यापि विनाशस्तस्य अस्ति इत्यर्थः** - "योगाभ्यास असतो तसे अधर्मरुपी कर्मही असते. अधर्म मागील जन्मी केला नसेल तर योगाभ्यास होईल. योगाभ्यासाचे संस्कार असतील. हे संस्कार सोबत घेऊन

योगभ्रष्ट नवा जन्म घेईल. या बळाने तो योगमार्गाकडे आकृष्ट होईल पण पूर्वजन्मी योगाभ्यास क्षीण असेल. अधर्म कर्मे बळकट असतील तर योगाचे संस्कार पराभूत होतील पण जेव्हा अधर्मरुपी कर्माचे संस्कार क्षीण होतील तेव्हा योगजन्य संस्कार आपली वाटचाल करु लागतील. आपले कार्य आरंभ करतील. याचा भावार्थ असा की प्रदीर्घकाळापर्यंत जरी योगजन्य संस्काराना दडपून टाकू म्हटले तरी योगाभ्यासाद्वारा उत्पन्न संस्काराचा कदापि नाश होत नाही.''

शंकराचार्यानी मोठा सुरेख मुद्दा मांडला आहे. त्यांचे निवेदन असे आहे. योगाभ्यासामुळे मनात काही संस्कार साठतात. पूर्वजन्मी वा त्याच्याही पूर्वजन्मी अधर्मरुपी कर्मे केलेली नसतील तर या जन्मी योगाभ्यासाचे संस्कार असतील. या प्रभावाने योगभ्रष्ट पुरुष योगाभ्यासासाठी प्रवृत्त होऊ शकतो.

तुलसीदासजी म्हणतात: **सुमति कुमति सबके उर रहहीं।** अर्थात् प्रत्येकाच्या मनात सुमती व कुमती वसतात. या वृत्तींमुळे आपण धर्म वा अधर्म करतो. देह, इंद्रिये आणि विषय आपल्याला अधर्माकडे प्रेरित करतात. परमात्मा धर्ममार्गाकडे वळायला प्रेरित करतो. अशाच प्रकारे हा विषय जाणून घ्यावा. योगाभ्यासी पुरुष असतो. पूर्वजन्मी वा त्याच्याही पूर्वीच्या जन्मी त्याच्या हातून अधर्म कर्मे घडतात. अधर्माच्या या कर्माचे फळ भोगावे लागते. देश, काळ आणि निमित्त अधर्म कर्मासाठी अनुकूल आणि योगाभ्यासाच्या संस्कारांसाठी प्रतिकूल असतील तर मग अधर्म कर्माची फळे भोगावी लागतात पण आचार्याचे निवेदन असे आहे की योगाभ्यासाचे संस्कार दबून असतात, ते नष्ट होत नाहीत. अधर्म वगैरे कर्मफळांचे भोग सरले की योगाभ्यासाचे संस्कार आपली फळे प्रदान करु लागतात. याचे कारण असे की दीर्घकाळपर्यत दबून राहिले तरी योगाभ्यासाच्या संस्कारांचा नाश होत नाही. योगाभ्यासाचे संस्कार असतील. ज्ञानप्राप्ती झाली तर अधर्म वगैरे कर्मांचे संस्कार नष्ट होतील. ज्ञानप्राप्ती हा मध्यबिंदु मानावा. यापूर्वी योगाभ्यासाचे संस्कार खूप बळकट असतील तर अधर्म वगैरे संस्कार दबून रहातात. अधर्म वगैरे संस्कार खूप बलवान असतील तर योगाभ्यासाचे संस्कार दबून जातील.

अधर्म वगैरे पापकर्मे वाटेल तेवढ्या प्रदीर्घ काळापासून का चाल करुन येईनात पण आत्मज्ञान होताच नष्ट होतात. अंधार कसा प्रकाशाचा उदय होताच संपून जातो. योगाभ्यासाचा एक संस्कार असतो. त्याचा एक प्रभाव असतो. या प्रभावामुळे प्रत्येक जन्मी योगाभ्यास होत रहातो. यामुळे कधी-ना-कधी परमात्मज्ञान प्राप्त होते. यामुळे पापी कर्मांचे संस्कार नष्ट होतील. पापकर्मे हातून कितीही घडोत. आत्मज्ञान प्राप्तीला कितीही बाधा का न आणोत. तरीसुध्दा अशुभ कर्मे योगाभ्यासाच्या संस्काराना नष्ट करु शकत नाहीत. ज्ञानामुळे अज्ञान नष्ट होते. अज्ञान काही ज्ञानाला नष्ट करु शकत नाही.

योगाभ्यासी पुरुषाचे वैशिष्ट्य असते. त्याचा पूर्वजन्मी योगाभ्यास संपन्न झालेला असतो. यामुळे या जन्मी सुध्दा विनासायास तो योगाभ्यासाच्या दिशेने वळतो. त्याचा योगाभ्यास सहजपणे घडून येतो.

2) दुसरा मुद्दा महत्वाचा: **योगस्य जिज्ञासुः अपि शब्द-ब्रह्म अतिवर्तते** जिज्ञासू साधक योगाची इच्छा करतो. साधकही शब्द ब्रह्माला लंघून जातो. शब्द ब्रह्म म्हणजे काय? 'शब्दब्रह्म' या संकल्पनेचे दोन अर्थ संभवतात. एक सामान्य अर्थ. सामान्य अर्थ असा की सकाम कर्माप्रती वैराग्य भावना निर्माण होणे. सकाम कर्म म्हणजे प्रपंचाला पार करुन जाणे. लंघून जाणे. प्रपंचाबद्दल वैराग्य जागणे. केवळ योगविषयक जिज्ञासेने एवढे मोठे फळ लाभते हे काही पटत नाही. अशी कल्पना करणे काही उचित नाही. प्रपंचाला लंघून जाणे काही सामान्य घटना नाही. यासाठी कठोर साधना करणे गरजेचे आहे. यामुळे योग जिज्ञासेमुळे प्रपंच जिंकून घेता येतो असा शब्दिक अर्थ करणे उचित नव्हे. या शब्दाचा खरा अर्थ-विशेष अर्थ वेगळाच आहे. याचा अर्थ असा की एखादा साधक पूर्वजन्मी कठोर साधनाव्रत आचरतो. यामुळे पवित्र, साधन संपन्न कुळात जन्म घेतो किंवा मग विवेकसंपन्न योग्याच्या कुळात जन्म घेतो. या नव्या जन्मातही पूर्व जन्मीचे योगाभ्यासाचे संस्कार बलवत्तर असतात. ते त्याला लाभतात. यामुळे या जन्मी साधक सहजच योगाभ्यासाकडे वळतो. योग साधनेकडे प्रवृत्त होतो. रामकृष्ण परमहंस यांची हीच - अशीच स्थिती होती असे सांगता येईल. साधनाकाळात प्रा**यः** त्यांना देहाचे भान उरत नसे. पूर्वजन्मीच्या संस्कारांचे पाठबळ बलवत्तर होते त्यामुळे या जन्मी साधनेकडे वळायला

त्याना विशेष असे परिश्रम घ्यावेच लागते नाहीत. साधना आपोआप सुयोग्य प्रकारे चालत राहिली. एवढेच नव्हे पण त्याना समाधी योगाची दीक्षा देण्यासाठी सद्गुरुनाथ स्वत:च त्यांच्या प्रत येऊन पोहोचले ज्यांची अशी स्थिती झाली असते त्यांच्या बाबतीत असे म्हणता येईल की ते या जन्मी योग जिज्ञासेच्या बळावर प्रपंच पार करुन जाऊ शकतात. भवसागर लंघून जाऊ शकतात.

**'शब्द ब्रह्म अतिवर्तते'** म्हणजे 'शब्द ब्रह्माला लंघून जातो' याचा विनोबांनी वेगळा अर्थ केला आहे. शब्द ब्रह्म म्हणजे वेद विद्या. वेद विद्येला पार करुन जाणे म्हणजे या जन्मी आध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनाची आवश्यकता न उरणे. दुसऱ्या अध्यायातील 46 व्या श्लोकात म्हटले आहे की ज्याने योग आत्मसात केला त्याला ग्रंथांचे अध्ययन करायची आवश्यकता नाही. केवळ योगविषयक जिज्ञासेच्या मोबदल्यात एवढे मोठे फळ लाभू शकत नाही. यामुळे का आध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनाची आवश्यकता उरणार नाही? याउलट जो योगविषयक जिज्ञासू साधक आहे त्याला ज्ञानीपुरुषांच्या अनुभव वचनांची गरज वारंवार भासते पण या श्लोकाने तर वेदाध्ययनाची आवश्यकताच संपवून टाकली आहे. पूर्व जन्मी ज्याने चांगल्या प्रकारे योगाभ्यास साधला अशा योगभ्रष्ट योग्यासाठीचे हे विशेष कथन आहे. योगभ्रष्टापाशी पूर्वजन्मीच्या अध्ययनाचे विशेष बळ असते. योगविषयक जिज्ञासा तर केवळ निमित्त मात्र आहे. यामुळे त्याला अतिशीघ्र ज्ञानाची प्राप्ती होते. शब्द वा ग्रंथ ज्ञानाची गरज संपून जाते.

: 45 :

***प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुध्दकिल्बिष: ।***
***अनेकजन्मसंसिध्दस्ततो याति परां गतिम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु प्रयत्नात् यतमान:** आणि अधिकाधिक प्रयत्नांनी अभ्यास करणारा
- **योगी संशुध्दिकिल्बिष:** योगी पुरुष पाप कर्मांनी मुक्त होऊन
- **अनेकजन्मसंसिध्द:** अनेक जन्मांच्या साधनेने अंत:करणाची शुध्दी रुपी सिध्दी मिळवलेला
- **तत: परां गतिं याति:** त्या साधनाच्या प्रभावाने परम गतीला म्हणजे श्रेष्ठ गतीला

**अर्थ**

परंतु प्रयत्नपूर्वक अभ्यास करणारा योगी तर मागील अनेक जन्मांच्या संस्कारांच्या जोरावर याच जन्मात पूर्ण सिध्दी मिळवून सर्व पापांपासून मुक्त होऊन तत्काळ परमगतीला प्राप्त होतो.

***योगी तत्पर राहूनि दोष जाळित जाळित***
***अनेक जन्मीं संपूर्ण होउनी मोक्ष पावतो ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत (1) अधिकात अधिक प्रयत्नवान योगी (2) पाप कर्मांपासून अत्यंत शुध्द होऊन (3) अनेक जन्मांच्या साधनेने सिध्द होऊन (4) परम म्हणजे श्रेष्ठ गतीला प्राप्त होतो

**स्पष्टीकरण**

1) **प्रयत्नात् यतमान: योगी:** अधिकात अधिक प्रयत्नवान योगी. आता आत्यंतिक प्रयत्नशील योग्याची विकास यात्रा जाणून घेऊ या. योगाभ्यासाचे संस्कार इतके बळकट असतात की त्याची इच्छा असो वा नसो म्हणजे सहजपणे तो योगाभ्यासात प्रवृत्त होतो. योगाभ्यासाच्या दिशेला वळतो. मागील जन्मी ज्या विवक्षित भूमिकेवर तो होता त्याच्यापुढची भूमिका प्राप्त करण्यासाठी तो या जन्मी प्रयत्न करतो. प्रयत्नात शिथिलता असली तर प्रगती मंद गतीने होते. यामुळे इथे निवेदन आले आहे की तो जास्तीत जास्त प्रयत्न करतो. अधिक धडपड करतो.

पतंजलीच्या योगसूत्रात या संदर्भात विवेचन आले आहे. एक सूत्र आहे: **तीव्रसंयोगानामासन्न:** की तीव्र संवेग हवा म्हणजे परम व्याकुळता हवी. तीव्रता म्हणजे तीव्र जिज्ञासा होय. असे असेल तर साधना तत्काळ फलवती होते. मोक्षलाभ होतो. आधी तीव्र जिज्ञासा हवी. प्रयत्नशीलतेचा मूलाधार जिज्ञासाच आहे. जिज्ञासेच्या अभावी प्रयत्न नाही होऊ शकत. जिज्ञासा तीव्र असली तरी अनेक कारणांमुळे साधकाचे प्रयत्न मंद, सामान्य वा तीव्र होऊ शकतात. हा मुद्दा पुढील सूत्रात मांडला आहे. सूत्र असे आहे - **'मृदु मध्यादिमात्रत्वात् ततोऽपि विशेष: ।'** जिज्ञासा वा व्याकुळता तीव्र असली तरी फळ प्राप्तीत

अंतर पडू शकते कारण की प्रयत्नातही मृदु वा अल्प मात्रा, मध्यम मात्रा आणि अति मात्रा असे तीन प्रकार संभवतात.

या श्लोकात हे सांगितले गेले आहे की परिस्थिती कशी का असेना योगाभ्यासासाठी (पूर्व जन्मीचे पाठबळ असल्यामुळे ) तो साधक अधिकात अधिक प्रयत्न करतो.

2) दुसरा मुद्दा असा की योगाभ्यास केल्यामुळे पाप वगैरे दोष धुतले जातात. **'संशुध्दकिल्बिषः'** किल्बिष म्हणजे दोष वा पापकर्मे होत. ती शुध्द होतात. संपूर्ण आयुष्यक्रमात आपला निसर्गाशी - सृष्टीजगताशी रात्रंदिवस संबंध येतो. यात चुका होण्याची शक्यता असते. पंचज्ञानेंद्रियांचे पाच विषय असतात. यात कमालीचे वैविध्य असते. यामुळे यांच्या व्यवहारात कुठे चूक वा गफलत होईल याचा पत्ताही लागू शकत नाही. योगाचा अभ्यास करणाऱ्या पुरुषाला अत्यंत जागृत रहावे लागते. तरी सुध्दा अहंकार शून्य होणे गरजेचे आहे. जोवर साधक अहंकारशून्य होत नाही तोवर तो राग, द्वेष वगैरे द्वंद्वांपासून-दोषांपासून मुक्त होऊ शकत नाही. दोषमुक्तीची चावी अहंकारशून्यता आहे. अहंकार ज्या प्रमाणात शून्य होईल त्या प्रमाणात साधक दोषापासून मुक्त होऊ शकेल. अहंकार शून्य बनण्यासाठी अखंड परमात्मस्मरण हा उपाय आहे. परमात्म समर्पण म्हणजे परम तत्वाच्या ठायी लीन होणे होय. यामुळे योगाच्या अभ्यासाचे मुख्य सूत्र तर समर्पण भावनाच असायला हवी. वैराग्य-ध्यान यासारख्या साधना तीव्रतेने साधल्या असल्या तरी या साधनांची सिध्दी करुन घेत असताना अहंकार जागरणाची संपूर्ण शक्यता असते. यामुळे या तमाम साधनांमध्ये ईश्वर समर्पण हे श्रेष्ठ व सुलभ साधन मानले गेले आहे.

3) **अनेकजन्मसंसिध्दः** अनेक जन्मांच्या तप साधने नंतर योग साधना पूर्णत्वाला येते. साधनेत वाटेल तेवढी गती आणण्याचा प्रयत्न केला तरी परमात्मतत्व कमालीचे सूक्ष्म आहे. त्यामुळे या तत्वाशी एकरुप होणे खूप अवघड आहे. कबीराने परमात्म तत्वाला पुष्पाच्या सुगंधाहूनही पातळ म्हटले आहे. इथे भगवान एक प्रकारे आश्वासन देत आहेत. हळूहळू प्रगती साधत योगी अनेक जन्मात आपल्या इष्ट लक्ष्याप्रत पोहोचू शकतो. सातव्या अध्यायातील 19 व्या श्लोकात याच मुद्याची चर्चा आली आहे. अनेक जन्मांच्या साधनेनंतर 'सर्व प्रभुमय आहे' अशी बुध्दी योगी जनांना होते. एकदा फळाची आशा सोडून द्यायचा निर्णय घेतला की मग साधना फळाला केव्हा येईल हा विचार मनात कदापि जागणार नाही. यामुळे योग साधनेचे स्वरुप संपूर्णपणे जाणून घेणे आणि साधनेत तल्लीनता साधणे हेच साधकाचे लक्ष्य असायला हवे. हरीदर्शन वा साक्षात्कार आपल्या अखत्यारीतला-अधिकारातला विषय नाही. आपल्या अधीन असणाऱ्या बाबींमध्ये प्रमुख आहेत - परमात्म्याचे अखंड स्मरण करणे, सर्वांशी निरहंकारी वृत्तीने वागणे, राग, द्वेष वगैरे विकारांना प्रबळ होऊ न देणे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाची लक्षणे, बाराव्या अध्यायातील भक्ताची लक्षणे, तेराव्या अध्यायातील ज्ञान्याची लक्षणे, चौदाव्या अध्यायातील गुणातीत पुरुषाची लक्षणे, सोळाव्या अध्यायातील दैवी संपदेचे गुण प्राप्त करण्याचे ध्येय उराशी बाळगणे. या तमाम बाबी आपल्या अधीन आहेत. साधनेच्या दृष्टीने काही बाबी आपल्या ध्यानात येतात. त्याना पराकाष्ठेने अमलात आणण्याचा निश्चय करावा. असे साधले गेले ना तर मोक्षलाभ केव्हा होईल? मोक्ष प्राप्त करुन घ्यायला किती जन्म घालवावे लागतात? या व यासारखे प्रश्न मग गौण होऊन जातात.

4) **ततः परां गतिं यातिः** ज्ञान प्राप्त झाल्यावर परमगती म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेता येतो. मोक्ष याचा अर्थ 'मी' ची परमशून्यावस्था. 'मी' मध्ये खूप रस साठवलेला आहे. कुठलेही चांगले काम केले म्हणजे 'मी किती चांगले काम केले' हा विचार मनात येतो. चांगले काम संपन्न झाल्यावर 'हे ईश्वरकृपेने झाले' हा विचार मनात येत नाही. 'मी' च्या ठायी जेवढा आनंद लाभ होतो तेवढा ईश्वराच्या ठायी यायला लागेल तर शीघ्र खूप लवकर - 'अहं' च्या शून्यतेप्रत अनायासे पोहोचता येते. खूप खोलवर बुडी मारल्यावर पत्ता लागतो की आपण ईश्वर स्वरुप आहोत मग कुठल्याही प्रकारे अहंकाराला स्थान उरत नाही.

: 46 :

***तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।***
***कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तपस्विभ्यः** तपस्वी पुरुषाहून
- **योगी अधिकः** योगी अधिक म्हणजे श्रेष्ठ आहे
- **ज्ञानिभ्यः** अपिः ज्ञान्याहूनही
- **अधिकः मतः** अधिक (श्रेष्ठ) मानले गेले आहे
- **च कर्मिभ्यः** आणि कर्मरताहूनही म्हणजे सकाम कर्म करणाऱ्याहूनही
- **योगी अधिकः** योगी श्रेष्ठ आहे
- **अर्जुन तस्मात् योगी भवः** हे अर्जुना, यामुळे तू योगी बन

**अर्थ**

तपस्वी पुरुषाहून योगी श्रेष्ठ आहे. शास्त्रज्ञान्याहूनही तो श्रेष्ठ मानला गेला आहे आणि सकाम कर्मे करणाऱ्यांहूनही योगी श्रेष्ठ आहे, म्हणून हे अर्जुना, तू योगी हो.

***ज्ञानी तापस कर्मिष्ठ ह्या सर्वांहूनि आगळा***
***मानिला तो असे योगी योगी होईं म्हणूनि तूं।***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत (1) तपस्वी म्हणजे भावनाप्रधान साधक. या साधकाहून योगी श्रेष्ठ. (2) ज्ञानी म्हणजे बुध्दीप्रधान साधक. या साधकाहूनही योग्याची योग्यता अधिक. (3) कर्मरत म्हणजे कर्मप्रधान साधक. या साधकाहूनही योगी मोठा. (4) यामुळे हे अर्जुना, तू योगी बन !

**स्पष्टीकरण**

1) **तपस्विभ्यः अधिकः योगीः** ज्याने चित्ताची समता साधली तो योगी. ज्याने निर्विकारता साधली तो योगी. फळाच्या आशेच्या त्यागाची भावना ज्याच्या चित्तवृत्तीत मुरुन गेली तो योगी. असा योगी तपस्व्यांमध्ये श्रेष्ठ मानला जातो. श्रेष्ठ ठरतो. विनोबानी भावनाप्रधान साधक असा तपस्वी शब्दाचा अर्थ केला आहे. तसे पाहिले तर तपस्वी शब्दाचा सामान्य रुढ अर्थ 'हठाग्रही' मानला जातो. तपासोबत विवेकाची गरज भासते हे सर्व सामान्याना कळत नाही कारण की तपस्वी हे एकांगी, एककल्ली, आपल्याच धूनमध्ये असणारे असतात असे वाटते. विनोबानी जो अर्थ निरुपित केला आहे त्यात एकांगी तपाची कल्पना नसून तपाचा सर्वांगिण विचार आहे. यामुळे ते तपाला विवेकसमन्वित मानतात. तपात विवेक समाविष्ट मानतात. **'भावना-प्रधान साधक'** असा अर्थ करुन विनोबानी तपाचा अर्थ सुगम करुन दिला आहे. तपाबाबत समाजाच्या मनात असलेल्या एकांगी कल्पनेला नव्याने मांडले. त्यात सुधारणा केली. माणसाच्या स्वभावात मुख्यत्वेकरुन तीन वृत्तींचा समावेश होतो. भावना प्रधान, बुध्दी प्रधान आणि कर्म प्रधान. साधारण बुध्दीची माणसे भावना प्रधान असतात तर बुध्दिवंतांमध्ये भावनेचा अंश कमी आढळतो. दोन्ही तत्वांचा एकाच व्यक्तिमत्वाच्या ठायी संगम विरळ दिसतो. बुध्दीचे न्यून असलेली माणसे बहुधा कर्मप्रधान असतात. अधिक बुध्दीमान माणसे बहुधा निष्क्रियतेकडे झुकलेली दिसतात. अर्थात् काही कर्म प्रधान साधक बुध्दीमानही असतात किंवा काही बुध्दीमान साधक कर्मरतही असतात. भावना प्रधान साधकांचा ओढा तपाकडे असतो. बुध्दी प्रधान साधक ज्ञान साधनेकडे वळतात. स्थूल मानाने असे म्हणता येते की ज्यांच्या ठायी भावना व बुध्दी यांचे प्राबल्य नसते असे साधक कर्मरत असतात (पण हा काही सर्वसामान्य नियम नाही.) या तीन प्रकारच्या साधकांच्या संदर्भात गीतेच्या सातव्या अध्यायात आर्त, जिज्ञासु आणि अर्थार्थी या तीन प्रकारच्या भक्तांचा उल्लेख येतो असे विनोबांचे म्हणणे आहे. तीन भक्तांमध्ये ज्ञानी म्हणजे पूर्णज्ञानी श्रेष्ठ मानला जातो. तशाच प्रकारे तपस्वी, ज्ञाननिष्ठ आणि कर्मनिष्ठ साधकांपेक्षा योगी श्रेष्ठ आहे.

तपस्वीपेक्षा योगी श्रेष्ठ आहे, हे थोडे समजून घ्यावे लागेल. 'तपस्वी' आपल्या जीवनात तपालाच सर्वस्व मानतो. तप कायिक असते. यात देहदंडाची भावना प्रमुख असते. जैन धर्मात तपाला अनन्य महत्व आहे. देह जड असून आत्मतत्व चैतन्य स्वरुपी आहे. चैतन्य स्वरुपी आत्म तत्वाला आपल्या स्वरुपाचे विस्मरण होते. यामुळे तो देहात आसक्त असतो. आसक्ती दूर करण्यासाठी - घालवण्यासाठी - देहाला तप साधनेशी संलग्न करायला हवे. जैन धर्मात बारा प्रकारची तपे मानली गेली आहेत. सहा बाह्य आणि सहा आंतरिक तपे आहेत. या तपांच्या माध्यमातून कर्माची 'निर्जरा' होते.

एक आध्यात्मिक जिज्ञासू गृहस्थ होते. ते अत्यंत तपानुरागी होते. आत्मदर्शनासाठी तत्पर होते. त्यांनी आधी 25 दिवस, 40 दिवस, 55 दिवस अशा चढत्या क्रमाने पाण्याचे उपवास केलेत. 55 दिवसांच्या उपवासा दरम्यान त्यांचे मनावरचे नियंत्रण सैल झाले अनेक वर्षे ते विक्षिप्तपणे वेड्यासारखे वागत राहिलेत. एकांगी तपामुळे असा दुष्परिणाम होऊ शकतो. यामुळे दुसऱ्या अध्यायातील 59 व्या श्लोकात चर्चा आहे. विषयांचा परिपूर्णपणे त्याग करुन जे तपाचरण करतात ते काही काळ विषयांपासून निवृत्त होतात पण त्यांची विषयासक्ती सुटते असे नाही. ते विषयांपासून मुक्त होऊ शकत नाहीत. ही लालसा-आसक्ती आत्मदर्शनामुळे हटते. एकांगी तपाचरणामुळे फायद्यापेक्षा नुकसानच अधिक होते. अशा एकांगी तपस्व्यांपेक्षा योगी श्रेष्ठ असतो.

2) **योगी ज्ञानिभ्यः अपि अधिकः मतः** योगी हा ज्ञानवंताहूनही श्रेष्ठ असतो. अर्थात्च ज्ञानवंत शब्दाचा अर्थ 'पूर्ण ज्ञानी' नव्हे! विनोबांच्या मते ज्ञानी म्हणजे बुध्दी प्रधान साधक होय. भावना प्रधान साधक तपोनिष्ठ असतो. बुध्दी प्रधान साधक अध्ययन-चिंतन प्रधान असतो. त्याच्यासाठी अध्ययन-चिंतन हेच सारसर्वस्व असते. अर्थात् केवळ अध्ययन-चिंतनामुळे चित्ताचे तमोगुण, रजोगुण क्षीण होत नाही. तमोगुणाला क्षीण करण्यासाठी तप साधनेची योजना केलेली आहे. रजोगुण क्षीण करण्यासाठी कर्म म्हणजे सेवाकार्याची योजना केलेली आहे आणि या दोघांना अध्ययन, चिंतन व मनन यांची जोड हवी. मदत हवी. केवळ तप वा कर्म वा अध्ययन-चिंतन उपयोगाचे नाही. तिघांचा समन्वय साधला जायला हवा. यामुळे तिघांच्या ठायी वसणारे एकांगीपण दूर होईल. तिघांचा प्रत्येक साधकासाठी चांगल्यात चांगला उपयोग होऊ शकेल. या उपयोगाची धारा आध्यात्मिक असेल. तपात अध्ययन-चिंतन-मनन विरघळून मुरुन गेले तर तपापासून फायदा होईल. स्वाध्यायात तप विरघळून मुरुन जायला हवे तर अध्ययन-चिंतन-मननापासून फायदा होईल. असे अनेक साधक आहेत ज्यांना तत्वज्ञान ग्रंथांचे उच्च प्रतीचे ज्ञान आहे. तप आणि कर्म म्हणजे सेवेचे पाठबळ नसल्यामुळे ते केवळ शास्त्री आहेत. वेदशास्त्रसंपन्न आहेत. त्यांच्या आयुष्यात साधकधर्म वा मुमुक्षुभाव वसत असला तरी तो कमी होऊन जातो. उणा होऊन जातो. न्यून होऊन जातो. बुध्दिवंतांना शास्त्रज्ञानात रस असतो. ते त्यातच निमग्न असतात. कथा-प्रवचन करत फिरतात. भावुक जन अशा पोथीपंडितांवर श्रध्दा ठेवतात. मानसन्मान लाभल्यामुळे त्यांच्या आत्मजिज्ञासेचा वेग मंदावू लागतो. अखेरीस शब्दज्ञानी, शास्त्री-पंडितांमध्येच त्यांची गणना होते. ते मग साधक वा मुमुक्षु नाही बनू शकत. केवळ स्वाध्याय-अध्ययन-चिंतन-मनन याचा दुष्परिणाम होऊ शकतो. तो टाळण्यासाठी तप आणि सेवा एकाकार व्हायला हवी मग स्वाध्याय- अध्ययन-मनन-चिंतन लाभचे ठरेल. आध्यात्मिक दृष्ट्या प्रगती साधणे शक्य होईल. यामुळे केवळ एकांगी अध्ययनाच्या साधनेत रमणाऱ्या साधकापेक्षा योगी श्रेष्ठ होय.

3) **कर्मिभ्यः अधिकः योगीः** कर्मरत साधकापेक्षा योगी श्रेष्ठ होय. तपोनिष्ठ साधक असो वा अध्ययननिष्ठ साधक-दोघेही एकांगी ठरतात. यामुळे योगी त्यांच्याहून श्रेष्ठ मानला जातो. एखादा कर्मात रममाण होतो. फक्त सेवाकार्यात रमून जातो. त्याचीही साधना एकांगीच. त्याचाही काही उपयोग नाही. कर्म म्हणजे जनसेवेसोबत स्वाध्याय-अध्ययन असायला हवे. तप, ज्ञान आणि कर्म एकत्रित असावे. यातून साधना सर्वांग परिपूर्ण होईल, एकांगी रहाणार नाही. जीवनात त्याचा पुरेपुर फायदा पदरात पडेल. काही साधकांचे म्हणजे असे 'केवळ कर्माने म्हणजे सेवेने शुध्दी होऊ शकते, अन्य कुठल्याही तत्वाची आवश्यकता नाही.' पण हा झाला एकांगी विचार. पारमार्थिक कर्मे आचरल्यामुळे रजोगुण क्षीण होतो पण तमोगुण क्षीण करण्यासाठी तपसाधनाच हवी. आत्मा-अनात्मा विवेक आणि परमात्म दृष्टीने जगाकडे बघायची वृत्ती तप आणि कर्माशी संलग्न असावी, अन्यथा साधकाची अवस्था आंधळ्यासारखी होईल. आत्मा-अनात्मा विवेक आणि परमात्मदृष्टी साधनेत मार्गदर्शक ठरतात.

4) **तस्मात् योगी भवः** यामुळे 'हे अर्जुना, तू योगी बन!' याचा अर्थ असा की तू एकांगी बनू नकोस. तू तप, ज्ञान आणि कर्माचा यथायोग्य उपयोग करुन चित्ताची निर्विकारिता साध. तिघांचा समान उपयोग करणे केवळ अवघड आहे, असे होऊ शकत नाही. प्रत्येकाच्या दोषांकडे आणि उणिवांकडे बघून याचा उपयोग करुन घ्यायला हवा. ज्याच्या ठायी तमोगुणाचे प्राबल्य असेल त्याने तपाचा अधिक उपयोग करुन घ्यावा कारण त्याला तप अधिक फायदेशीर आहे. मोठ्या प्रमाणावर असुरांनी

केलेल्या तपसाधनेचे इथे स्मरण व्हावे. ज्याच्या ठायी रजोगुणाचे प्राबल्य अधिक आहे त्याला सेवेच्या कर्मामधून अधिक लाभ होईल. तमोगुण आळस वाढवतो म्हणून त्याचा उपयोग तप साधना. रजोगुण आसक्ती वाढवतो म्हणून त्याचा क्षय करण्यासाठी जनसेवा लाभदायक. स्वार्थाच्या ठायी तृष्णा-आसक्ती यासारखे दोष उद्भवतात. अर्थात् जनसेवेतही हे दोष बळावू शकतात. पारमार्थिक सेवाकार्य साधताना तृष्णा-आसक्तीची वाढ होऊ नये यासाठी ज्ञानाचा आश्रय घ्यायला हवा. ज्ञानाचा आश्रय घेऊन तपाचरण करावे. पारमार्थिक सेवा म्हणजे कर्मे आचरताना सत्वगुणाचा उत्कर्ष होतो. सत्वगुणाच्या उत्कर्षामुळेच अंततोगत्वा आत्म ज्ञान होते. अशाप्रकारे तप, कर्म आणि ज्ञान या तिन्ही तत्वांचा समन्वय करुन योगी बनायचा पाठ गीता देते.

: 47 :

*योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।*
*श्रध्दावान्भजते यो मां स मे युक्ततमो मत: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वेषां योगिनां अपि:** सर्व प्रकारच्या योगीजनांमध्येही
- **य: श्रध्दावान्:** जो श्रध्दावान आहे
- **मद्गतेन अंतरात्मना:** माझ्या ठायी स्थिर झालेल्या अंत:करणाने
- **मां भजते:** माझी भक्ती करतो
- **स: मे युक्ततम: मत:** तो योगी माझ्या दृष्टीने श्रेष्ठ होय

**अर्थ**

सर्व योग्यातही जो श्रध्दावान योगी माझ्या ठिकाणी अंतरात्म्याला स्थापन करुन मला अखंड भजतो, तो योगी मला सर्वात श्रेष्ठ वाटतो.

*सर्व योग्यांमध्ये योगी जीव माझ्यांत ठेवुनी*
*श्रध्देनें भजतो मातें तो थोर मज वाटतो ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) ध्यानयोगी असो वा ज्ञानयोगी, कर्मयोगी असो वा आत्मयोगी या सर्वामध्ये 2) श्रध्दापूर्वक ईश्वरभक्ती करणारा योगी 3) अतिश्रेष्ठ होय असे माझे मत आहे.

**स्पष्टीकरण**

1) हा श्लोक भक्ती महात्म्य सांगत आहे. गीतेच्या प्रत्येक अध्यायात भक्तीचा उल्लेख येतो. एक तर भक्ती सुलभ साधन आहे दुसरे म्हणजे भक्तीमुळे अहंकार गळतो. 'सर्वप्रकारच्या योग्यांमध्ये' असे जे या श्लोकाचे म्हणणे आहे यावर विनोबांचे निवेदन असे - या अध्यायातील मागील श्लोकात वर्णिलेले ज्ञाननिष्ठ, तपोनिष्ठ आणि कर्मनिष्ठ हे सातव्या अध्यायात वर्णित जिज्ञासु, आर्त आणि अर्थार्थी-यांच्यासारखेच क्रमाने आहेत. या सर्वामध्ये पूर्णज्ञानी श्रेष्ठ. तोच पूर्णयोगी आहे. अशाप्रकारे सर्वागपूर्ण आत्मज्ञानी योग्यांमध्ये भक्त योगी असतो तो भगवंताला विशेष प्रिय आहे. पूर्ण आत्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावरही भक्तीचा झरा वहाता रहावा. अशी हिंमत व प्रेरणा या श्लोकात आहे.''


या अध्यायात भक्तीचा कुठेही उल्लेख नाही. भक्तीचे महात्म्य वर्णन करण्यासाठी आणि गीतेत निरुपित भक्ती सूत्र अखंड राखण्यासाठी या श्लोकाची योजना आहे. तप, ज्ञान आणि कर्म या तिघांचा समन्वय केला तरी अहंकाराला संपूर्णपणे नष्ट करणे आणि अतिशून्य बनवणे शक्य नाही यासाठी भक्तीच हवी. यामुळे तप, ज्ञान, कर्म तिन्हीही तत्वे एकांगीपणे तर चालू शकत नाहीतच पण तिघांचा समन्वय केला तरी त्यात भक्ती मिसळल्याशिवाय पूर्ण आत्मज्ञान प्रकट होऊ शकत नाही.

2) **य: श्रध्दावान् मद्गतेन अंतरात्मना मां भजते:** जे श्रध्दावान होऊन आणि अंत:करणपूर्वक माझी भक्ती करतात. पुढील अध्यायात भक्तीचा विषय सुरु होणार आहे. त्याची प्रस्तावनारुप हा श्लोक मानायला हवा. पहिला मुद्दा असा की श्रध्दा असायला हवी. भगवंत आणि भक्ती या दोघांवरही श्रध्दा हवी. प्रभु जगात व्याप्त आहे ही श्रध्दा हवी. पूर्णता प्राप्त करुन घेण्यासाठी भक्ती आवश्यक वाटायला हवी. दुसरा मुद्दा असा की भगवंताच्या ठायीच मन तल्लीन रहायला हवे. भगवंताप्रती श्रध्दा दुर्लभ गोष्ट आहे. त्यातही ज्ञानसंपन्न श्रध्दा तर आणखीच अवघड. बरे, श्रध्दा असली तरी परमेश्वराच्या ठायी तल्लीन होणे तर फारच दुर्लभ. भगवंताप्रती प्रेम, अनुराग, भक्ती उत्पन्न होण्यासाठी काही गोष्टींची गरज आहे. ईश्वराचे स्मरण अखंड असावे. देह वगैरे क्रियांशी ईश्वराचा संबंध जोडणे या गोष्टी प्रमुख आहेत. अन्यथा

ईश्वराप्रती ज्ञानयुक्त श्रध्देसोबत गीतेने इथे 'माझ्या ठायी मनाला तल्लीन करुन भक्ती करतो' असे म्हटले आहे.

3) अखेरीस आपला अभिप्राय योगेश्वराने असा नोंदवला आहे **सः मे युक्ततमः मतः** अशाप्रकारे जो श्रध्देने आणि माझ्या ठायी मन तल्लीन ठेऊन भक्ती करतो तो तमाम योगीजनांमध्ये श्रेष्ठ होय. भक्तीच्या ठायी वसणाऱ्या दोन गुणामुळे भक्त आध्यात्मिक साधनेत श्रेष्ठ बनतो. एक तर भक्तीत काही प्राप्त करुन घ्यायचे नसते - काही मिळवायचे नसते. यात स्वत:ला हरवून-हरपून घ्यावे लागते, शून्य बनवावे लागते. आपल्याला हरवून टाकणे वा शून्य बनवणे हा काही प्राप्त करुन घ्यायचा विषय नाही. ध्यान-साधना वा समाधीत काही-ना-काही प्राप्त करायचे असते. यामुळे त्यात कष्ट होतात. नवीन प्राप्त करुन घेत असताना कष्ट तर घ्यावेच लागतात. यात मौज अशी की सुलभता हा भक्तीचा एक गुण आहे. बरे, अभिमान, काम, क्रोध या सारख्या विकारांना नष्ट करायचे सामर्थ्य अन्य कुठल्या साधनाच्या ठायी नाही. संतांचा अनुभव असा की योगभ्रष्ट साधक असू शकतो पण भक्तीभ्रष्ट कुणीही असू शकत नाही. तुकोबांनी अभंग लिहिला **'धन्य अर्जुनाची भक्ती त्याला साह्य हो श्रीपती, त्याचा सारथी भगवान, ध्वजस्तंभी हनुमान'** यापरता भक्तीचा महिमा काय वर्णावा?

• • • *सहावा अध्याय संपूर्ण कर्मयोग संपूर्ण* • • •



कर्मयोगाचा आरंभ करणे म्हणजे योगयुक्त बनून कर्मे करणे. कर्मे तर सारेच करतात. योगयुक्त बनून म्हणजे चित्तात समता वागवून ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करणारे विरळ. योगयुक्त होऊन कर्मे आचरलीत तर दु:खमुक्त होता येते. बंधनातून सुटका करुन घेता येते. मिथ्याचारी माणूस कर्मेंद्रियाना निष्क्रिय बनवतो. मनात विषयांचे चिंतन करतो. श्रेष्ठ आचारात कर्मेंद्रिये निष्क्रिय नसतात. कर्मयोग साधला जातो म्हणजे योगयुक्त कर्मे आचरली जातात. कर्मेंद्रियांवर अंकुश ठेवला जातो. विषय चिंतनाऐवजी परमात्म्याचे चिंतन केले जाते. विवेक राखला जातो. मन, बुध्दी आणि पंचेंद्रियांवर काबू मिळवला जातो. साधक नि:संग बनतो. बुध्दी परमेश्वराला अर्पण करतो. आपले जीवन व्यतीत करतो.

<u>जन्म तारीख - 11 जून 1900 - देहावसान 27 ऑगस्ट 1981</u>

# गीता तत्व बोध
## (भक्तियोग)

# अर्पण

माझी भक्तियोगिनी वत्सल माता अंबरीबाई
या मातेच्या यज्ञीय उपकारक स्मृतींना
श्रध्दापूर्वक, कृतकृत्य बुध्दीने भक्तियोगाची
ही ओंजळ कृतज्ञपणे समर्पित
विश्वास

गीतातत्व बोध (भक्तियोग)

## अनुक्रमणिका


| क्र | विषय | सूत्र पृष्ठ |
|---|---|---|
| 1 | भक्तियोगाचा महिमा : | 367 |
| 2 | अध्याय सातवा: ज्ञानविज्ञान योग | 369 |
| 3 | अध्याय आठवा: अक्षरब्रह्म योग | 417 |
| 4 | अध्याय नववा: राजविद्याराजगुह्य योग | 463 |
| 5 | अध्याय दहावा: विभूती योग | 518 |
| 6 | अध्याय अकरावा: विश्वरुपदर्शन योग | 567 |
| 7 | अध्याय बारावा: भक्तियोग | 627 |

# भक्तियोगाचा महिमा

श्री बाळकोबांच्या गीताभाष्याचा मधुर आनंद आपण मन:पूत लुटला. या परंपरेत आपण गीतेचा पहिला खंड 'कर्मयोग' अभ्यासला आहे. गांधीजींना आवडणाऱ्या आणि विनोबाजींना प्रिय अशा 'भक्तियोग' या दुसऱ्या खंडाचा अभ्यास आता मांडत आहोत.

भक्ती ही जीवनातली सर्वात मंगलमय गोष्ट आहे. पाण्यात थोडी भक्ती मिसळली की तीर्थ बनते. अन्नात मिसळली की प्रसाद बनतो. घरात भक्ती मिसळली की मंदिर बनते. माणसाच्या श्वास-प्रश्वासात भक्ती डोललीकी माणूस भक्त बनून जातो.

भक्त शब्दाची साधी सोपी व्याख्या आहे 'जो विभक्त नाही तो भक्त.' भक्तीच्या ठायी बुध्दीचा शहाणपणा चालत नाही. भक्त हा जसा नित्यमुक्त असतो तसाच नित्ययुक्तही असतो, असला पाहिजे. अखंड एकतान असलेली जीवन साधना भक्ताच्या जीवनाला एक वेगळा अर्थ देते.

भक्त म्हणजे विशिष्ट पोशाख असे नसते. भक्त म्हणजे कपाळावर उभे की आडवे गंध असे काही नसते. गळ्यात माळा वा टिळा असे काही नसते. कपाळावर टिळा चंदनाचा की केशराचा असा काही प्रश्न नाही. गळ्यात माळा रुद्राक्षाची की तुळशीची हा काही प्रश्न नाही. तुकोबानी भक्ताचे लक्षण मोठे सुरेखपणे मांडले आहे. ते म्हणतात 'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ त्याच्या गळा माळ असो नसो.' बाह्य ढोंगांवर एवढा प्रचंड प्रहार करुन तुकोबांनी आपल्याला भक्ताच्या अंतरंगाचा खरा परिचय करुन दिला आहे. भक्त हा बावळट, गोंधळ्या, भोंगळ नसतो. तो अखंड अतंद्र, सावधान, जागृत असतो. तो जसा जगाला फसवणार नाही तसे जगही त्याला फसवणार नाही. भक्ताचे जीवन हे प्रभु समर्पित असते यामुळेच तर कर्म, योग आणि ज्ञानाहूनही भक्ती श्रेष्ठ आहे. योगभ्रष्ट ही अवस्था आहे पण भक्तीभ्रष्ट ही अवस्था काही नाही. भक्तीत पतन नाही. ज्ञानात मात्र अहंकाराचा गळ्यात अडकवून घेतलेला ढोल आवळला जाण्याची भीती असते. ज्ञानी माणुस संभ्रमात जगतो तर भक्त हा सदा सर्वदा नि:संग असतो. या धरतीवर भक्ताची सत्ता फार मोठी आहे. 'अनंत राजे झाले गेले अंती मुखात माती, उरला केवळ राम राहिली त्याची दिगंत कीर्ती.' एकही भक्त कामचुकार नाही, आळशी तर नाहीच नाही. सारेच कर्मरत आहेत. संत नामदेवानी कपडे शिवले. संत गोरोबा काकांनी घट भाजले. संत कबीराने शेले विणले. संत सजन कसायाने मांस विकले. संत सावताने मळा फुलवला. संत जनाबाईनी शेणी काढली. संत चोखोबांनी अंतर्बाह्य शुध्दीचा नवा अध्याय लिहिला. हा कर्मयोग्यांचा मेळा आहे. आपल्या व्रतापासून मुळीच न ढळता-चळता ईश्वर भक्ती करणाऱ्याना भक्त म्हणावे. भक्त असा आतून उचंबळून आलेला असतो.

अर्जुनाची भक्ती थोर असे तुकोबा म्हणाले. ते म्हणाले 'धन्य अर्जुनाची भक्ती त्याला साह्य हो श्रीपती त्याचा सारथी भगवान ध्वजस्तंभी हनुमान' अर्जुन एवढा मोठा भक्त का बनला? त्याने भगवंताजवळ कधीही कुठलीही सवलत मागितली नाही. वनवास पत्करायला लागला पण कुरकुर नाही. अज्ञातवासात बुहन्नडा बनला. ज्याच्या धनुष्याच्या टणत्काराने शत्रु सैन्य मूर्च्छित होऊन पडावे, गगनमंडळ डळमळीत व्हावे, धरतीचे मानदंड कोसळून पडावे असा अर्जुन बायकांमध्ये नाच गाण्याच्या कामात रमला पण तक्रार केली नाही. जीवनाला अहोभाव समजून जगला म्हणून तो थोर भक्त ठरला. गीता श्रवणाचा अधिकारी बनला आणि हो विश्वरुप विराट दर्शनाचाही साक्षीदार बनू शकला.

आपल्या देशाला भक्तांची थोर परंपरा लाभली. राजसत्ता वा राजदंडाची मिजास न मानता भक्तांनी आपले कार्य केले. या पृथ्वीवर साधु-संतांच्या पालख्या जनसामान्यांच्या खांद्यांवर विराजल्या. आपले जीवन होमून देऊन स्वार्पण करणाऱ्या भक्तांची जय गाथा इथे दुमदुमली. भक्त हा जीवनाचा पूजक आणि जीवनाबाबत तक्रार न करणारा माणूस आहे. ज्यांना ज्याना ईशतत्त्वाचे

दर्शन घडले ते मान्यवर अशा प्रकारे अंतर्बाह्य सजून उठले. भक्ताला एक आकाशस्पर्शी सावली असते. त्या छायेखाली अखिल मानव जात विसावा घेऊ शकते.

आपण बाळकोबांच्या निमित्ताने या ग्रंथात गीतेच्या 'भक्तियोग' या खंडाचा अभ्यास करणार आहोत. आचार्य विनोबा म्हणतात की डोळ्यांनी हरिरुप पहावे. कानांनी हरिकथा ऐकावी. जिभेने हरिनामाचे उच्चारण करावे. पायांनी तीर्थयात्रा कराव्या. हातांनी जनसेवा घडावी. अशा प्रकारे जो आपल्या सर्व इंद्रियांनी देवाची सेवा करतो तो मोठा. तो आपल्या इंद्रियांनी परमेश्वराची पूजा करतो. इंद्रिये आपल्या भोगासाठी नाही वापरत. फुले कशी देवाला वाहायची असतात. तसा तो आपल्या इंद्रियांचा उपयोग करतो. फुलांच्या माळा का आपण आपल्याच गळ्यात घालायच्या असतात ? नाही ना ? तसेच आपल्या इंद्रियांचा उपयोग देवासाठी करावा. तो देवाचा होतो. भक्तियोगाचे हे नेमके मर्म आचार्य विनोबाजींनी अगदी सोप्या शब्दात मांडले आहे. बाळकोबानीभक्तीचा अर्थ विस्तार केला आहे.

**- प्राचार्य डॉ. विश्वास पाटील**

15 नोव्हेंबर 2020, विनोबा पुण्यतिथी



पहिला खंड - दुसरा भाग - भक्तियोग
सातवा अध्याय

# ज्ञान विज्ञान योग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

*मय्यासक्तमना: पार्थ योगं युंजन् मदाश्रय: ।*
*असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मयि आसक्तमना:** माझ्या ठिकाणी आपले मन अत्यंत प्रेमाने आसक्त करुन (आणि)
- **मदाश्रय:** आणि माझाच आश्रय घेऊन
- **योगं युंजन्:** आणि योगाच्या अभ्यासात लागलेला तू
- **मां:** अनेक गुणांनी युक्त अशा मला
- **यथा असंशयं समग्रं:** ज्या प्रकारे नि:संशय आणि गुणांनी युक्त व सर्वांच्या आत्मरुप अशा
- **ज्ञास्यसि:** जाणशील
- **तत् श्रुणु:** ते माझ्याकडून ऐक

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे पार्था, अनन्य प्रेमाने मन माझ्या ठिकाणी आसक्त करुन तसेच अनन्य भावाने माझा आश्रय घेऊन, योगयुक्त होऊन तू ज्यायोगे संपूर्ण विभूती, शक्ती, ऐश्वर्य वगैरे गुणांनी युक्त, सर्वांचा आत्मा असणाऱ्या मला नि:संशयपणे जाणशील, ते ऐक.

**श्री भगवान म्हणाले**

*प्रीतीनें आसरा माझा घेउनी योग साधित*
*जाणशील कसें ऐक समग्र मज निश्चित ।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत. (1) माझ्या ठिकाणी ज्याचे मन आसक्त झाले आहे. (2) माझाच आश्रय घेतला आहे. (3) आणि योगाच्या अभ्यासात लागलेला तू (4) ज्या प्रकारे नि:संशय (5) आणि पूर्णपणे जाणशील ते माझ्याकडून ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **मयि आसक्तमना:** ज्याचे मन माझ्या ठिकाणी आसक्त झाले. भगवत् तत्वाला जाणून घेण्याचा अधिकारी कोण आहे ? ब्रह्मसूत्र ग्रंथाचे आरंभिक सूत्र आहे- 'अथातो ब्रह्म जिज्ञासा' म्हणजे म्हणून आता ब्रह्म जिज्ञासा करायला हवी - आता म्हणजे केव्हा ? या प्रश्नाचे उत्तर आहे की आता म्हणजे साधन चतुष्टय प्राप्त झाल्यावर. चार प्रकारची साधने प्राप्त झाल्यावर. जोवर चार प्रकारची साधने नाहीत तोवर ब्रह्मतत्व जाणून घ्यायची इच्छा करायला नको. समजा इच्छा केलीच तर ती अखेरपर्यत टिकणार नाही. चार साधने पुढील प्रमाणे आहेत.

अ) **नित्य-अनित्य-वस्तु-विवेक:** नित्य आणि अनित्य वस्तु जाणायचा विवेक.

आ) **इह अमुत्र अर्थ-भोग-विराग:** इह आणि परलोकी विषयोपभोगापासून वैराग्य.

इ) **शम-दम आदि साधन-संपत्:** शम-दम वगैरे साधन संपदेची प्राप्ती. शम म्हणजे आंतरिक शांतता. दम म्हणजे बाह्य इंद्रियांचा निग्रह वा संयम. 'उपरति' म्हणजे तमाम वस्तुंच्या संदर्भात निस्सारता अनुभवायला आल्यामुळे उपजणारी अनासक्ती. 'तितिक्षा' म्हणजे सहिष्णुता. 'समाधान' म्हणजे वाटेल त्या परिस्थितीत अनुकूल बनून रहाण्याची वृत्ती. 'श्रध्दा' म्हणजे ईश्वराच्या बाबतीतली आस्तिक बुध्दी. ही सहा प्रकारची संपत्ती 'षट् साधन संपत्ती' आहे.

ई) **मुमुक्षुत्वं:** मुमुक्षुत्व म्हणजे मोक्ष प्राप्तीची तीव्र अभिलाषा.

वरील चार प्रकारची साधन संपदा असेल तर ब्रह्मतत्वाला जाणून घ्यायची तीव्र जिज्ञासा जागू शकते. ज्याचे मन ईश्वराच्या ठायी आसक्त झाले तो ईश्वराला जाणून घेऊ शकणाऱ्यामधला असू शकतो. सारे जन प्रपंचात आसक्त असतात. देहविषयक आसक्ती तर सर्वांच्याच ठायी वसते. देहाशी संबंधित जे कुठले नातलग, मित्र वगैरेअसतात त्या सर्वाबाबत आसक्ती असते. आसक्ती मनाची एक प्रचंड शक्ती आहे. बाह्य पदार्थांच्या आसक्तीमुळे जर सुख-समाधान-शांतता लाभली असती तर मग आसक्ती दोषरुप ठरली नसती पण विषयासक्त राहून कुणाला सुख, शांतता लाभल्याचे दिसून येत नाही. यामुळेच गीतेचे निवेदन आहे की विषयांच्या पाठीमागे वसणाऱ्या अद्भुत सत्तेचे ज्ञान झाल्यावर त्यात चित्त आसक्त बनले तर मग अखंड सुख-शांततेचा अनुभव होऊ शकतो. आसक्ती ईश्वराच्या ठायीच असावी. अन्य कुठल्याही विषयात वा वस्तुच्या ठायी आसक्ती नसावी असे गीता बजावून सांगत आहे. भगवंताशी आसक्ती साधली गेली तर कदापि दु:खाचा प्रसंग उद्भवणार नाही. प्रापंचिक आसक्तीमुळे आनंद लाभणार नाही. विषय विकार तर आगीसारखे आहेत. त्यांच्या स्पर्शामुळे दु:खच उपजेल.

2) **मदाश्रय:** भगवंताचा आश्रय घेणे गरजेचे आहे. आश्रय थोरा-मोठ्यांचाच घेतला जातो. ईश्वर श्रेष्ठ तत्व आहे. आपली पत्नी-पुत्र यांच्या ठायी सर्वाधिक आसक्ती असते म्हणजे काही आपण पुत्र व पत्नी यांना श्रेष्ठ मानतो असे नव्हे. आपण ज्ञानेश्वर, तुलसीदास, गांधीजी, विनोबा याना श्रेष्ठ मानतो पण त्यांच्या ठायी आपली आसक्ती असते असे काही नव्हे ! त्यांच्याबद्दल आपल्या मनी पूजनीय भाव वसतो पण त्यांच्या ठायी आपण आसक्त असू असे नव्हे ! आपल्या आसक्तीचे स्थान पुत्र-पत्नी आहेत. गीतेत तर साक्षात् योगेश्वराचेच निवेदन आहे. 'माझा आश्रय घ्या. माझ्या ठायी आसक्ती राखा. माझ्याच बाबतीत पूजनीय भाव राखा.'

3) **योगं युंजन्:** योग साधनेत दोन बाबी येतात - एक आंतरिक आणि दुसरी बाह्य. आंतरिक मध्ये फळाच्या आसक्तीचा त्याग, अनासक्ती, निष्कामता, निर्विकारता, शांतता, समता, वैराग्य यासारख्या विकर्मांचा समावेश होतो. बाह्यमध्ये स्वधर्माचे पालन येते. स्वधर्म साधण्यात कुटुंब सेवेला विरोध नाही. कुटुंबसेवा जनसेवेशी समांतर असावी, विरोधी नसावी. एखाद्याने योग साधना न करता भगवत् तत्वाशी आसक्ती जोडण्याचा प्रयत्न केला तर त्याला अधिक यश लाभणार नाही. याचे कारण असे की ईश तत्वाशी आसक्ती याचा अर्थ जगताबद्दल अनासक्ती ठरतो. ज्या प्रमाणात प्रपंचाची आसक्ती कमी होईल त्या प्रमाणात ईशचरणी रती वाढेल. आसक्ती-आकर्षण वाढेल. भगवंताच्या ठायी पूर्ण आसक्ती जागावी यासाठी 'योग साधना करत असताना' हे शब्द जोडले आहेत, कारण की योगसाधना करायचा अर्थ प्रापंचिक आसक्ती कमी करत रहाण्याचा सराव करणे. हे ज्या प्रमाणात साधले जाईल त्या प्रमाणात ईश्वराच्या ठायी आसक्ती बाळगण्याच्या सरावात साफल्य लाभेल.

4) **असंशयं:** नि:संशय वृत्तीने ईशतत्वाला जाणून घ्यावे लागेल. सृष्टीच्या ठायी परमतत्व कशा प्रकारे विलसित आहे या संदर्भात नि:संशय होणे-शंकारहित होणे साधे-सोपे नाही. यासाठी व्यापक चिंतन अपेक्षित आहे. आपले शिक्षण कमी असेल आणि विद्वान मार्गदर्शक लाभला नसेल तर शास्त्राध्ययनही खूप अवघड आहे. माणूस श्रध्देच्या जोरावर ईशतत्वाचा स्वीकार करतो. श्रध्दा दृढ होण्यासाठी ती आधी उत्कट असायला हवी. उत्कटतेशिवाय श्रध्दा दृढ टिकावी कशी ? ती विचलितही होऊ शकते यामुळे चौथ्या अध्यायातील 40 व्या श्लोकात चर्चा येते की जो श्रध्दा आणि ज्ञानरहित आहे अशा संशयात्म्याला नष्ट झालेलेच समजा. यामुळे शक्य होईल तोवर एखाद्या अनुभवसंपन्न पुरुषाच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रांचे अध्ययन करायचे प्रयत्न व्हायला हवेत. गीतेत वेदान्ताचे विवेचन आले आहे. गीतेवर श्रध्दा बाळगणाऱ्यांना वेदान्ताचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सर्वसामान्य जनांना तत्वज्ञानाच्या खोलवर जाण्याची काही गरज नाही पण जे साधक दशेत आहेत त्यांच्या मनी संशय राहू नये म्हणून योग्यरित्या अभ्यास करणे गरजेचे आहे. ब्रह्मसूत्र शांकरभाष्याचे वैशिष्ट्य असे आहे की ईश्वराच्या स्वरुप वगैरे विषयीच्या ज्या शंका आहेत त्या निर्मुल करणारा हा ग्रंथ आहे. परमात्म्याचे स्वरुप काय ? परमात्म तत्व विश्वात कसे ओतप्रोत आहे ? सृष्टी आणि जीवात्म्याशी ईश्वराचा संबंध कसा आहे? जीव ईश्वरापासून जन्माला येतो की नाही? जगत परमात्म्यापासून निर्मित होते याचा

अर्थ काय? बंधमोक्ष म्हणजे काय? पुनर्जन्माचे स्वरुप व रहस्य काय ? या व यासारख्या मूलभूत प्रश्नांविषयीच्या शंका घालवण्याचे कार्य हा ग्रंथ करतो.

5) **समग्रं मां यथा ज्ञास्यसि तत् श्रुणु:** ईश्वराच्या स्वरुपाविषयी मनी शंका रहायला नको. त्या स्वरुपाविषयी समग्र कल्पना परिपूर्णपणे यथार्थरित्या मनात स्थिर व्हायला हवी. ईश्वरविषयक तमाम शंका दूर झाल्यात तरी काही चुकीच्या धारणा वा संकल्पना तयार झाल्यात तर ते आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने योग्य नसते. यामुळे गीतेचे निवेदन आहे की ईश्वर ज्याप्रमाणे जगात रहातो त्याचे यथार्थ व पूर्ण ज्ञान प्राप्त करुन घ्यायला हवे. चुकीच्या संकल्पना दृढमूल झाल्यात तर ते आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने योग्य नसते. यामुळे गीतेचे निवेदन आहे की ईश्वर ज्याप्रमाणे जगात रहातो त्याचे यथार्थ व पूर्ण ज्ञान प्राप्त करुन घ्यायला हवे. चुकीच्या संकल्पना दृढमूल झाल्यात तर साधना मार्गात अडथळे उत्पन्न होण्याची शक्यता अधिक असते. मोक्षप्राप्ती असतेच पण त्याचे स्वरुप धडपणे ज्ञात नसते. आपल्या मुक्ततेचा अनुभव काही येत नाही. हा विचार मौलिक आणि वास्तव आहे. जीव ईश्वरापासून उत्पन्न झालेला नाही हा विचार देखिल वास्तव विचार आहे पण सर्वांचे असे मत आहे की ईश्वरापासून जीवात्मा उत्पन्न होतो. आता ही धारणा चुकीची असल्याचे सिध्द झाले तर ईश्वराचे खरे स्वरुप कळेल. यामुळे गीतेचे निवेदन असे आहे की ईश्वराच्या स्वरुपासंबंधी मनात शंका उरायला नको. ध्यानधारणेत वास्तव उतरायला हवे.

: 2 :

***ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषत:।***
***यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **अहं ते इदं:** मी तुला हे
- **सविज्ञानं ज्ञानं:** विज्ञानासोबत म्हणजे रहस्यासोबत परमेश्वराचे ज्ञान म्हणजे मी जगात कशा प्रकारे व्याप्त आहे ते विज्ञान
- **अशेषत: वक्ष्यामि:** मी पूर्णपणे सांगतो
- **यत् ज्ञात्वा:** जे जाणले असता
- **इह भूय: अन्यत् ज्ञातव्यं:** जगात आणखी काहीही जाणण्या योग्य
- **न अवशिष्यते:** शेष काही उरत नाही

**अर्थ**

मी तुला विज्ञानासह तत्वज्ञान संपूर्णपणे सांगेन, जे जाणले असता या जगात पुन्हा दुसरे काहीही जाणावयाचे शिल्लक रहात नाही.

***विज्ञानासह तें ज्ञान संपूर्ण तुज सांगतों***
***जें जाणूनि पुढें येथें जाणावेसें न राहतें।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आहे 1) विज्ञानासह ज्ञान म्हणजे परमेश्वर या सृष्टीत कशा प्रकारे ओतप्रोत आहे हे जाणणे. याचे नाव 'ज्ञान' होय. परमेश्वरापासून सारी सृष्टी कशा प्रकारे उत्पन्न झाली हे जाणून घेणे 'विज्ञान' होय. अशा प्रकारे ज्ञान आणि विज्ञान तुला पूर्णपणे सांगत आहे. 2) ज्ञान विज्ञान प्राप्त झाल्यावर मग जाणून घेण्यासारखे दुसरे काहीही शिल्लक रहात नाही.

**स्पष्टीकरण**

1) अहं ते इदं संविज्ञानं ज्ञानं अशेषत: वक्ष्यामि: मी तुला विज्ञानासोबत ज्ञानही पूर्णपणे सांगत आहे. इथे 'ज्ञान' आणि 'विज्ञान' या दोन शब्दांचा प्रयोग केला गेला आहे. ज्ञान आणि विज्ञान या शब्दांचे दोन अर्थ केले जातात. शंकराचार्य, गांधीजी आणि विनोबानी एक अर्थ केला आहे. लोकमान्य टिळकानी वेगळा अर्थ केला आहे. विनोबा म्हणतात" 1) ज्ञान म्हणजे परमात्म्याच्या संदर्भातले ज्ञान तथा जड आणि जीव या दोन प्रकारच्या प्रकृतीचे निराकरण करणाऱ्या प्रक्रिया म्हणजे विचारधारा किंवा उपाय. 2) विज्ञान म्हणजे बुध्दीत असलेले ज्ञान. प्रत्यक्ष अनुभवात उतरवण्याची प्रक्रिया, उपाय आणि त्यापासून उत्पन्न होणारे अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष अनुभव." विनोबांच्या कथनानुसार जड जगताच्या मुळाशी जड प्रकृती आणि चेतनयुकत जीव, दोघेही परमात्म्यापासून भिन्न नसल्यामुळे भासिक आहेत खरे नाहीहेत. केवळ एक परमात्माच सत्य आहे. हे प्रतीती ज्ञान होय. 3) या ज्ञानाचा अनुभव कसा केला जावा हे समजावून सांगणारा

मार्ग आणि 4) यातून उत्पन्न होणारा अपरोक्ष म्हणजे परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव. या गोष्टी ज्ञान आणि विज्ञान यात सामावलेल्या आहेत. ज्ञानात ही दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. परमेश्वर संपूर्ण जगात कसा व्याप्त आहे हे जाणून घेणे आणि या दोन प्रकृतींचे निराकरण करणे म्हणजे दोन्ही प्रकृती परमात्म्याहून भिन्न नाहीत हे जाणून घेणे. ज्ञान आणि विज्ञान या दोन संज्ञांच्या ठायी हा अर्थ सामावलेला आहे.

शंकराचार्य वा गांधीजींनी वेगळा अर्थ केला आहे. ज्ञान म्हणजे सर्व भूतमात्रांच्या ठायी एकच परमात्मा आहे हे जाणून घेणे आणि विज्ञान म्हणजे सर्व भूतमात्रांच्या ठायी एकच परमात्मा आहे याचा अनुभव घेणे. लोकमान्य टिळकांनी असा अर्थ केला - "प्राणीमात्राच्या ठायी परमात्मा कशा प्रकारे ओतप्रोत आहे हे जाणून घेणे म्हणजे ज्ञान होय. दुसऱ्या शब्दात असे की नानात्वाच्या ठायी म्हणजे अनेकत्वाच्या ठायी एकत्व, अभेदात भेद, अद्वैतात द्वैत कशा प्रकारे आहे हे जाणून घेणे म्हणजे 'विज्ञान' होय." लोकमान्य टिळकांनी लावलेला हा अर्थ सुगम आहे खरा पण विज्ञानाचा अनुभव हा जो अर्थ अध्यात्म शास्त्रात प्रचलित आहे त्याचा या अर्थात समावेश होत नाही. सातव्या अध्यायात भक्तीचे साधन वर्णिले आहे त्याचा समावेश विज्ञान शब्दात होत नाही. ज्ञान शब्दामुळे जीव आणि जड प्रकृती परमात्म्यामुळे कशी भासमान झाली आणि ती परमात्म्याहून कशी अभिन्न आहे हे जाणून घेण्याचा अर्थ उकलत नाही. या दृष्टीने लोकमान्यांनी प्रतिपादित केलेला अर्थ अपूर्ण वाटतो. विनोबांनी लावलेला अर्थच परिपूर्ण प्रतीत होतो.

यामुळे 1) प्राणीमात्रांच्या ठायी परमात्मा कशाप्रकारे व्याप्त आहे? हा विषय या अध्यायात आला आहे. याशिवाय 2) इथे आणखी काही बाबींची चर्चा आली आहे. परमात्म तत्वापासून जड आणि जीव म्हणजे चैतन्यमय किंवा परा आणि अपरा प्रकृती कशी जन्माला येते ? या उभय प्रकृती परमात्म्याहून भिन्न कशा नाहीत ? त्यांचे अस्तित्व स्वतंत्र कसे नाही ? या विषयांचीही चर्चा आली आहे. या दोन बाबींचा समावेश 'ज्ञान' या संज्ञेत होतो. यासोबत 'विज्ञान' येते. विज्ञानचा अर्थ असा की विश्वात परमात्मा ओतप्रोत आहे हे समजून तर घेतले-परमात्म-ज्ञान बुध्दीने प्राप्त तर करुन घेतले हे अनुभवात उतरायला हवे. हाही विषय या अध्यायात येतो. अनुभव प्राप्तीसाठी मुख्य आधार भक्तीतत्व आहे. त्या भक्तीसंबंधी ही चर्चा या अध्यायात येते. परमेश्वराचा अनुभव कसा करुन घेता येईल याची चर्चा येते, यासोबतच गीतेने हेही सांगून टाकले की हा ज्ञान-विज्ञान विषय परिपूर्णरित्या निवेदन करण्यात आला आहे.

2) **यत् ज्ञात्वा इह भूयः** अन्यत् ज्ञातव्यं न अवशिष्यते एकदा का ज्ञान आणि विज्ञानाला जाणून घेतले ना तर मग आणखी काय जाणून घ्यायला उरते ? परमात्म तत्वाचे अनुभवयुक्त ज्ञान प्राप्त करुन घेतल्यावर सारे काही जाणून घेतले अशी स्थिती होऊन जाते. हा मुद्दा उपनिषदातून इथे घेतला गेला आहे.

छांदोग्य उपनिषदात एक कथा येते. अरुण ऋषींनी आपल्या श्वेतकेतु नामक पुत्राला ब्रह्मचर्यपूर्वक एक तप म्हणजे बारा वर्षे गुरुच्या आश्रमात राहून ज्ञान मिळवण्याचा आदेश दिला. बारा वर्षे वयाचा श्वेतकेतु गुरुच्या आश्रमात दाखल झाला. त्याने बारा वर्षे चारही वेदांचा अभ्यास केला. या ज्ञानामुळे तो गर्वाने फुगून गेला. अविनयी बनला. आपल्या अविनयी पुत्राला भेटून अरुण ऋषी चिंताक्रांत झाला. पित्याने विचारले - 'वत्सा श्वेतकेतु! तू स्वत:ला मोठा ज्ञानी समजतोस. अविनयी झालास तू. तू का कधी गुरुला ईश्वरी रुपाविषयी प्रश्न केलास? काय जाणतोस तू त्या ईश्वरी सत्तेविषयी ? ईश्वरी रुपाला जाणून घेतल्यावर न ऐकलेले ऐकू येऊ लागते. मनन न केलेले मनन केले जाते - न जाणून घेतलेले जाणून घेता येते."

यावर श्वतकेतुने आपल्या पित्याला विचारले 'हे भगवान, त्या परमात्म्याचे स्वरुप कसे आहे ? '

पित्याने उत्तर दिले "हे सौम्या, मातीच्या एका ढेकळाला जाणून घेतल्यावर मातीच्या सर्व कार्यांचे ज्ञान होऊन जाते कारण की मातीचे जेवढे म्हणून कार्य आहे ते सारे मातीच्या वेगवेगळ्या आकारांची भिन्न-भिन्न नावे होत. सत्य वस्तु तर मातीच आहे. मातीची सर्व कार्ये मातीपासून भिन्न नसल्यामुळे मिथ्या आहेत, भास आहेत."

अशा प्रकारे उपनिषदाने समजाऊन सांगितले की एकदा कारणाचे ज्ञान झाले म्हणजे कार्याचे ज्ञान आपोआप होते. हीच गोष्ट या श्लोकाच्या दुसऱ्या चरणात आली आहे. एका परमेश्वराला (कारणाला) जाणून घेतले

म्हणजे तमाम विषय वा पदार्थांचें (कार्य) ज्ञान आपोआप होऊन जाते. याचे कारण असे की जगातले तमाम पदार्थ परमेश्वरानेच उत्पन्न केलेले आहेत म्हणजे परमेश्वरच सर्व पदार्थांचे कारण आहे. तमाम पदार्थ परमेश्वराचे कार्य आहे. कारणाचे ज्ञान झाले की कार्याचे ज्ञान आपोआप होते, घटाला बघितल्यावर मातीचे ज्ञान होऊन जाते. दागिन्याला बघितल्यावर सोन्याचे ज्ञान होऊन जाते. वस्त्राला बघितल्यावर त्याच्या मूळ कारणाचे ज्ञान होऊन जाते. तसे ज्ञान व्हायला हवे. हे कारण कमालीचे सूक्ष्म असल्यामुळे ते नेत्राने वा अन्य इंद्रियाने प्राप्त करुन घेणे शक्य नाही, हा भाग वेगळा. यामुळे जगातल्या पदार्थाच्या ज्ञानासोबत परमेश्वराचे ज्ञान सर्वांना होत नाही. ईश्वराच्या ज्ञानासाठी ज्ञान दृष्टी प्राप्त होणे गरजेचे आहे. ज्ञानदृष्टी विकसित करणे म्हणजे मनाचे ज्ञाननेत्र खुले करणे होय. ज्ञानचक्षु उघडले तर प्रत्येक पदार्थाच्या सोबत परमात्म्याचे दर्शन होईल. या ज्ञानानंतर प्रत्येक पदार्थाला स्वतंत्रपणे जाणून घ्यायची गरज उरणार नाही. एक परमेश्वराला जाणले की तमाम पदार्थांचे ज्ञान आपोआपच होऊन जाते. अर्थात् स्थूल रुपाने तमाम पदार्थाचे ज्ञान होते असा काही याचा अर्थ नाही. एकदा का ही खूणगाठ मनाशी पक्की बसली की तमाम पदार्थांचा निर्माता परमेश्वर आहे तर मग तमाम पदार्थांना स्वतंत्रपणे जाणून घ्यायची जिज्ञासा काही शिल्लक उरत नाही. अर्थात् हे ज्ञान असूनही ज्ञानी पुरुष जनसेवाकार्यात निमग्न असेल. यामुळे सेवेच्या दृष्टीने जर त्याला एखाद्या बाह्य विषयाच्या ज्ञानाची गरज भासली तर त्या विषयाचे ज्ञान तो कर्तव्यबुध्दीने संपादित करील.

: 3 :

*मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिध्दये।*
*यततामपि सिध्दानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **सहस्रेषु मनुष्याणां:** हजारो मनुष्यांपैकी
- **कश्चित् सिध्दये यतति:** कोणी एखादाच माणूस परमात्म ज्ञानासाठी (मोक्षासाठी) माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो
- **यततां अपि सिध्दानां:** असा यत्न करणाऱ्या सिध्द पुरुषांमध्ये सुध्दा
- **कश्चित् मां तत्त्वतः वेत्तिः** कुणी एखादाच माणूस माझ्या यथार्थ रुपाला जाणतो

**अर्थ**

हजारो मनुष्यात कोणी एखादाच माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो आणि त्या प्रयत्न करणाऱ्या योग्यांमध्येही एखादाच मत्परायण होऊन मला खऱ्या स्वरुपाने जाणतो.

***लक्षावधींत एखादा मोक्षार्थ झटतो कधीं***
***झटणाऱ्यांत एखादा तत्त्वतां जाणतो मज।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) हजारो मनुष्यांमध्ये कुणी एखादाच परमात्म ज्ञान वा मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्न करतो. 2) अशा सिध्द वा प्रयत्नशील साधकांपैकी कुणी एखादाच मला यथार्थपणे जाणतो.

**स्पष्टीकरण**

(1) सहस्रेषु मनुष्याणां कश्चित् सिध्दये यतति हजारो जनांपैकी एखादाच सिध्दी वा मोक्षप्राप्तीसाठी म्हणजे परमात्मविषयक ज्ञानासाठी प्रयत्नशील असतो. सिध्दी शब्दाचा अर्थ आहे मोक्ष. बंधन वा अज्ञान यातून मुक्ती म्हणजे मोक्ष. ही मोक्षप्राप्ती परमात्म ज्ञानामुळे होते. यामुळे सिध्दी प्राप्त करुन घेण्याचा अर्थ परमात्मविषयक ज्ञान प्राप्त करुन घेणे असाही होतो. परमात्मज्ञानाकडे सर्वजण वळत नाही, जिज्ञासाही बाळगत नाहीत, याचे कारण असे की विश्वातील सर्व पदार्थांसारखे परमात्मतत्व काही इंद्रियांनी बघता-ऐकता-भोगता येण्यासारखे नाही. या विश्वात डोळ्यांनी बघू शकता न येणारे असे पदार्थ आणि जीवजंतु विद्यमान आहेत. त्याना बघण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या उपकरणांचा प्रयोग केला जातो. अर्थात् परमेश्वराला जाणून घेण्यासाठी ही सूक्ष्म उपकरणेही निरुपयोगी ठरतात. ज्ञानचक्षु उघडल्यावरच हे दर्शन होऊ शकेल. परमेश्वर तमाम पदार्थांचा मूलाधार आहे. यामुळे परमेश्वर अत्यंत व्यापक आहे. गगनाहूनही अधिक व्यापक आणि पवनाहूनही अत्यंत सूक्ष्म आहे. कबीर म्हणतात की पुष्पाच्या सुगंधापेक्षाही पातळ असे ब्रह्मतत्व आहे. लक्षावधी लोकांपैकी एखादाच विरळ

विषयोपभोगांचा त्याग करुन परमात्मसुख प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्नशील असतो हेच तर त्याचे कारण आहे.

2) **यततां अपि सिध्दानां कश्चित मां तत्त्वत:** वेत्ति अनेक साधक वा मुमुक्षु प्रयत्न करतात यापैकी एखादाच परमेश्वराच्या वास्तविक रुपाला जाणू शकतो. इथे मुमुक्षु वा साधकासाठी ' सिध्द ' या शब्दाची योजना केली गेली आहे. शंकराचार्य म्हणतात : सिध्दा एव हि ते ये मोक्षाय यतन्ते । अर्थात् मोक्षासाठी प्रयत्न करणाऱ्या पुरुषाला सिध्द मानावे.

एवढ्याने हा मुद्दा काही स्पष्ट होत नाही, दुसऱ्या अध्यायातल्या स्थितप्रज्ञ वर्णनाच्या आरंभिक श्लोकात शंकराचार्यांनी सिध्द आणि साधक यातले अंतर स्पष्ट केले आहे.

सिध्द म्हणजे मुक्कामी पोहोचलेला पुरुष. साधक म्हणजे मुक्कामापासून थोड्याच अंतरावर लांब असलेला माणूस. साधक आणि सिध्द यातील अंतर शकराचार्यानी समजाऊन सांगितले आहे. सिध्दाची लक्षणे ज्याला सहजपणे साध्य करुन घेता आली तो सिध्द. लक्षणांना प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करणारा-सिध्द होण्याच्या मार्गावर असलेला तो साधक. यात प्रश्न काय तो काळाचाच आहे. यामुळे इथे 'साधक' साठी 'सिध्द' शब्दाची योजना केली गेलीय,'सिध्द' शब्द प्रयुक्त केला गेला.

: 4 :

***भूमिरापोऽनलो वायु: खं मनो बुध्दिरेव च।***
***अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **भूमि:** पृथ्वीचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे गंध
- **आप:** पाण्याचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे रस
- **अनल:** अग्नीचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे रुप
- **वायु:** हवेचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे स्पर्श
- **खं:** आकाशाचे सूक्ष्म तत्त्व म्हणजे शब्द
- **मन:** मन
- **बुध्दि:** बुध्दी
- **च अहंकार:** आणि अहंकार
- **इति एव इयं मे प्रकृति:** अशा प्रकारे ही माझी प्रकृती
- **अष्टधा भिन्ना:** आठ प्रकारची आहे

**अर्थ**

पृथ्वी, पाणी, अग्नी, वायु, आकाश, मन, बुध्दी आणि अहंकार अशी ही आठ प्रकारात विभागलेली माझी प्रकृती आहे. ही आठ प्रकारे विभाजित असलेली माझी प्रकृती .

***पृथ्वी आप तसें तेज वायु आकाश पांचवें***
***मन बुध्दि अहंकार अशी प्रकृती अष्ट-धा।***

**विषय:** या श्लोकात एकच मुद्दा आला आहे. परमात्म्याहून सृष्टी कशी उत्पन्न होते हे मागे 'विज्ञान' शब्दाचा अर्थ सांगताना स्पष्ट केले आहे, ते थोडक्यात सांगत आहेत.

**स्पष्टीकरण**

परमात्म्यापासून विश्व कसे आकाराला आले ? या विषयाची चर्चा या श्लोकात आली आहे. याचा उल्लेख यापूर्वी 'विज्ञान' संज्ञेने आला आहे.

पंचमहाभूतांच्या सूक्ष्म पंचतत्वांची चर्चा यापूर्वीच आली आहे. या श्लोकात स्थूल पृथ्वीतत्वापासून सुरुवात करुन त्याहून सूक्ष्म तत्त्वाला जळ तत्व म्हटले आहे. जळाहून सूक्ष्म अग्नी. अग्नीहून सूक्ष्म वायु. वायुपेक्षा सूक्ष्म आकाश. ही पंचमहाभूतांची प्रकृती झाली. प्रकृती सूक्ष्म वा अव्यक्त आहे. यामुळे पंचमहाभूतांचे नव्हे तर ही महाभूते ज्या सूक्ष्म द्रव्यांपासून बनलीत त्यांचे म्हणजे तन्मात्रांचे वर्णन केले गेले आहे. पृथ्वीचे सूक्ष्म तत्व आहे गंध. जळाचे तत्व रस. अग्नीचे तत्व रुप. वायुचे तत्व स्पर्श. आकाशाचे तत्व शब्द होय. या पाच सूक्ष्म तत्मात्रांना द्रव्य वा तत्व असे म्हटले जाते. या पाच सूक्ष्म द्रव्यांपासून पाच स्थूल पंच-महाभूते उत्पन्न होतात. स्थूल महाभूते उत्पन्न होण्यापूर्वी सूक्ष्म वा अव्यक्त रुपात असतात. या अवस्थेत त्यांना 'प्रकृती' असे म्हणतात. प्रकृती म्हणजे सूक्ष्म शक्ती. ही मूळ प्रकृती स्वतंत्र-स्वयंभू तत्व असल्याची सांख्यांची मान्यता आहे. गीतेच्या मते प्रकृती स्वयंभू-स्वतंत्र नसून परमेश्वराची अलौकिक शक्ती म्हणजे माया होय. ही प्रकृती. पुढे याच अध्यायात प्रकृतीला माया म्हटले आहे.

सांख्य तत्वज्ञानानुसार प्रकृतीच्या ठायी सत्व-रज-तम हे तीन गुण असतात. प्रकृती म्हणजे सत्व-रज-तम युक्त त्रिगुणात्मिका शक्ती. यातून या पंच सूक्ष्म द्रव्यांची उत्पत्ती होते. प्रकृतीच्या ठायी वसणाऱ्या त्रिगुणांमुळे पंच सूक्ष्म तत्व म्हणजे पंच तन्मात्रांचा आविर्भाव होतो अशी सांख्य मताची मांडणी आहे. या पंचतन्मात्रांच्या द्वारा पृथ्वी, आप म्हणजे जल, तेज, वायु आणि आकाश या पाच स्थूल महाभूतांची निर्मिती होते. या पंच महाभूतांमुळे जड सृष्टी दिसते. चेतन सृष्टीतल्या जीवांची शरीरे दिसतात. पशु-पक्षी, नाना प्रकारचे जीव-जंतु या सर्वांची शरीरे वेगवेगळ्या आकार-प्रकाराची असतात. शरीर पंचमहाभूतांनीच बनलेले आहे. शरीराची आधारभूत मूलतत्वे पंच तन्मात्राच आहेत. याला निरींद्रिय वा इंद्रियविहीन जग म्हणतात पण यात फरक एवढा आहे की झाड, दगड यासारखे जे पदार्थ दिसतात ते सारे इंद्रियविहीनच असतात. मनुष्य, पशु, पक्षी वगैरे जीवांच्या देहात इंद्रिये असतात. मानव वगैरे चेतन विश्वाच्या शरीरात म्हणजे देहात इंद्रिये असतात. मानव वगैरे चेतन विश्वाचे शरीर निरींद्रिय विश्वाचाच एक भाग असतो. मानव वगैरेंच्या देहातील इंद्रिये पंच तन्मात्रांनी निर्माण केलेली नाहीत. केवळ दगड वगैरे बाह्य जड सृष्टीतील तमाम पदार्थ आणि चेतन सृष्टीतली शरीरे उपर्युक्त पंचतत्वांनी वा पंच तन्मात्रांनी उत्पन्न झालेली आहेत.

मन: बुध्दि: अहंकार:। जड सृष्टीतील नाना पदार्थांची उत्पत्ती झाल्यानंतर चैतन्य सृष्टीतील मानव, पशु, पक्षी वगैरे स्थूल देहांची निर्मिती होते. त्यानंतर सृष्टीच्याआत सामावलेले मन, बुध्दी, अहंकार ही सूक्ष्म तत्वे आकाराला येतात. या सूक्ष्म इंद्रियांच्या माध्यमातूनच पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये उत्पन्न होतात. दगड, झाड यांच्या प्रमाणे जड असूनही देहात मन, बुध्दी, अहंकार ही तीन सूक्ष्म इंद्रिये निर्माण होतात. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रियांची उत्पत्ती त्यांच्या माध्यमातूनच होते. मन, बुध्दी आणि अहंकार यात पहिले स्थान बुध्दीला आहे. सर्वप्रथम बुध्दी तत्वाची निर्मिती झाली. वेदान्तात हीही चर्चा येते की सृष्टीनिर्मितीपूर्वी भगवंताने विचार केला. विचार करणे बुध्दीचे कार्य आहे. यामुळे वेदान्ताच्या दृष्टीनेही बुध्दी सर्वप्रथम उत्पन्न झाली. नीती-अनीती, धर्म-अधर्म, कार्य-अकार्य, योग्य-अयोग्य या गोष्टींचा निर्णय घेणारी शक्ती बुध्दी आहे. परमेश्वरासारख्या कमालीच्या सूक्ष्म तत्वांचे ग्रहणही बुध्दी शक्तीनेच होते.

बुध्दीनंतर मनाचे स्थान आहे. मन अनुभवगम्य अशी एक शक्ती आहे. मन उभयविध आहे. बुध्दी आणि इंद्रियांच्या मधली शक्ती मन आहे. मनाचा निश्चयात्मक भाग म्हणजे बुध्दी होय. बुध्दीच्या निर्णयाना अमलात आणण्याचे कार्य मन करते. यामुळे मन भावनात्मक आहे. भावनेशिवाय बुध्दीचा निर्णय अमलात येऊ शकत नाही. यामुळे बुध्दीने ज्याचा स्वीकार केला आहे त्याला योग्य प्रकारे अमलात आणण्यासाठी मन जर काम-क्रोध यासारख्या विकारांनी मुक्त असेल तर अडचण उद्भवणार नाही पण बुध्दीचा निर्णय अमलात आणण्यासाठी काम-क्रोध वगैरे विकार मोठा अडथळा निर्माण करतात. काम क्रोध वगैरे विकार ज्या प्रमाणात क्षीण होतील त्या प्रमाणात बुध्दीचा निर्णयअमलात अमलात आणता येईल. आणता येतो.

तिसरी शक्ती आहे अहंकाराची. देह आणि आत्मा दोघांचा काल्पनिक संबंध स्थापन करणारी शक्ती अहंकार होय ! देह जड असून जाणून घेण्याचा विषय आहे. आत्मतत्व ज्ञानस्वरुपी आहे. आत्मा सर्वांना जाणतो. अशा प्रकारे आत्मा आणि देह परस्पर विरोधी असूनही एकसारखे वाटतात. दोघे एकच आहेत असे समजून सारा व्यवहार चालतो. उदाहरणार्थ 'मी म्हणजे देह', 'मी म्हणजे मन', 'मी म्हणजे बुध्दी' असे वाटणे हाच अहंकार होय. हा अहंकार क्षीण झाला की देह आणि आत्म्याच्या भिन्नतेचा अनुभव होऊ शकतो.

अशा प्रकारे मन, बुध्दी, अहंकार ही तीन सूक्ष्म तत्वे आणि शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध या पंच तन्मात्रा असे मिळून आठ प्रकारची भिन्न अशी प्रकृती आहे. अष्टधा प्रकृति: भिन्ना: याचा अर्थ असा की प्रकृती आठ तत्वांनी युक्त अव्यक्त असते.

: 5 :

*अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विध्दि मे पराम् ।*
*जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इयं अपरा:** ही आठ प्रकारची अपरा म्हणजे माझी जड प्रकृती आहे
- **तु महाबाहो:** पण हे अर्जुना
- **इत: अन्यां:** या प्रकृतीहून दुसऱ्या
- **जीवभूतां:** जीवस्वरुप
- **मे प्रकृतिं:** माझ्या प्रकृतीला
- **परां विध्दि:** परा म्हणजे चेतन प्रकृती समज
- **यया इदं जगत् धार्यते:** जिच्या द्वारे हे (संपूर्ण) जगत धारण केले जाते

**अर्थ**

ही आठ प्रकारचे भेद असणारी माझी अपरा म्हणजे अचेतन प्रकृती आहे आणि हे महाबाहो, हिच्याहून दुसरी जिच्यायोगे संपूर्ण जगत धारण केले जाते, ती माझी जीवरुप परा म्हणजे सचेतन प्रकृती समज.

*ही झाली अपरा माझी दुसरी ती जाण परा*
*जीव-रुपें जिनें सारें जग हें धरिले असे ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) आधीच्या चौथ्या श्लोकात वर्णित अष्टधा प्रकृती अपरा म्हणजे निकृष्ट, कनिष्ठ प्रकृती आहे. 2) याहून भिन्न जीवस्वरुप, देहाला जाणणारी माझी प्रकृती आहे तिला परा म्हणजे श्रेष्ठ समज. 3) त्या 'परा-प्रकृतीने' हे संपूर्ण जगत धारण केले जाते.

**स्पष्टीकरण:**

1) **इयं अपरा:** चौथ्या श्लोकात आठ प्रकारच्या अव्यक्त प्रकृतीचे वर्णन आले आहे. अव्यक्त म्हणजे अपरा. अपरा म्हणजे कनिष्ठ वा निकृष्ट. तसे पाहू गेल्यास पृथ्वी, जल, अग्नी, वायु आणि आकाश ही पंच महाभूते आहेत. महान तत्वे आहेत. याचे कारण असे की या सूक्ष्म अव्यक्त तत्वांमधूनच स्थूल पंच महाभूते उत्पन्न झाली आहेत. अशा स्वभावत:च महान असलेल्या तत्वांना निकृष्ट वा कनिष्ठ कसे म्हणता येईल? बरे मन, बुध्दी, अहंकार यासारखी सूक्ष्म तत्वे देखिल कमी महत्वाची नाहीत. त्यांच्या मदती शिवाय तर व्यवहार चालूच शकणार नाही. यामुळे या दोन प्रकारच्या तत्वांना कनिष्ठ वा निकृष्ट म्हणून चालणार नाही असे वाटू शकते. याचे स्पष्टीकरण असे की ही सारी तत्वे महान तर अवश्य आहेत पण ही आहेत जड तत्वे. यांच्या ठायी चैतन्य नाही. हे कुठल्या वस्तुला जाणतच नाहीत. पंच सूक्ष्म तन्मात्रा असोत वा त्यांच्या ठायी उपजणारी स्थूल पंच महाभूते असोत वा मन, बुध्दी अहंकार का असेनात - ही सारी स्वत: जाणून घ्यायची अध्ययन सामग्री आहे. ज्ञेय विषय आहेत. आपण आरशाच्या मदती शिवाय आपला मुखडा न्याहाळू शकत नाहीत या दृष्टीने आरशाचे मोल आहे पण आरशाच्या जाणकाराचे मूल्य अनंत पट अधिक आहे. ही स्थिती विश्वातल्या जड पदार्थांची आहे. विश्वातल्या पदार्थांची रचना मोठी मोहक आणि चमत्कारिक आहे. हे सारे असले तरीही पदार्थाचे स्वरुप जड आहे. तसेच त्यांचा उपयोगही होतो, पण जड हे चैतन्यमयहून भिन्न आहेत. चैतन्याच्या दृष्टीने आपण या पदार्थाना वा त्यांच्या मूळ तत्वांना निकृष्ट वा कनिष्ट समजतो. यामुळेच या पंच सूक्ष्म तन्मात्रांनाआणि मन, बुध्दी, अहंकार याना प्रकृती म्हटले गेले आहे.

2) **हे महाबाहो इत:** अन्यां जीवभूतां मे प्रकृतिं परां बिध्दि भगवंत म्हणतात की हे अर्जुना! या कनिष्ठ वा निकृष्ट प्रकृतीहून भिन्न जीव स्वरुपी माझ्या प्रकृतीला परा म्हणजे श्रेष्ठ-उत्कृष्ट समज. ही जीव प्रकृती चैतन्य स्वरुपी-ज्ञान स्वरुपी आहे. आपण सारे स्वत:ला ज्ञाताच समजतो. सर्व पदार्थाचे सामान्य ज्ञान झाले असले तरी आपल्या स्वरुपाबाबत निवेदन करणे अवघड आहे. गीता म्हणते की ज्याला आपण जीव म्हणतो - त्याची जी प्रकृती आहे ती अष्टधा प्रकृतीहून उत्कृष्ट आहे.

इथे एक प्रश्न निर्माण होऊ शकतो. पंच तन्मात्रा अथवा मन-बुध्दी-अहंकार अथवा पंच स्थूल महाभूते जड असल्यामुळे त्याना प्रकृती म्हणणे सयुक्तिक आहे पण चैतन्य स्वरुपाला प्रकृती कसे बरे म्हणता येईल ? पंच तन्मात्रा अधिक अहंकार अशी सप्तधा प्रकृती सांख्यवादी मानतात. त्रिगुणात्मिका प्रकृतीतून ही तत्वे अव्यक्त रुपात उत्पन्न होतात. त्या त्रिगुणात्मिका प्रकृतीला स्वतंत्र मानले

आहे. गीतेत ज्या ‘जीव प्रकृती’ चे वर्णन आले आहे तिला प्रकृती न मानता स्वतंत्र पुरुष मानले आहे पण गीता वा वेदान्ताची अशी  मान्यता आहे की स्वतंत्र जड प्रकृती विश्वाला निर्माण करु शकत नाही. अनेक कारणानी पुरुषालाही स्वतंत्र मानता येत नाही. परमेश्वराच्या एका शक्तीचे नाव ‘प्रकृती’ वा ‘माया’ आहे. परमेश्वर अनंत शक्तींनी युक्त आहे. परमेश्वर आपल्या माया शक्तीच्या द्वारे विश्वाची निर्मिती करतो. त्या विश्वात अनेक देहही निर्माण करतो. परमात्म ज्ञान वा अनुभव प्राप्त करु न शकण्याची शक्यता असल्यामुळे मनुष्य देह सर्व देहात-प्राणिमात्रात श्रेष्ठ मानला जातो. परमात्माच त्या देहांमध्ये प्रविष्ट होतो आणि देहात प्रविष्ट परमात्म्यावर ‘मी म्हणजे देह!’, ‘मी म्हणजे मन’, ‘मी म्हणजे इंद्रिये ‘असा भास निर्माण करतो. एकीकडे जड विश्वाचा आणि दुसरीकडे चैतन्यमय जीवाचा भास निर्माण करुन विश्वाचे नाटक अनादी काळापासून सुरु आहे. अशा प्रकारे जीव देखिल परमेश्वराचीच श्रेष्ठ अशी प्रकृती आहे. या दोन प्रकृतींच्या आधारे हे संपूर्ण विश्व धारण केलेले आहे. प्रकृतीचे दोन अर्थ आहेत-शक्ती आणि स्वभाव.

3) **यया इदं जगत् धार्यते:** या दोन प्रकृतींनी हे संपूर्ण जगत् धारण केलेले आहे. प्रकृतीचे दोन अर्थ आहेत एक आहे शक्ती आणि दुसरा आहे स्वभाव. परमेश्वराच्या ठायी दोन शक्ती आहेत. एक चैतन्य शक्ती म्हणजे ज्ञान शक्ती. दुसरी माया शक्ती म्हणजे भास करवणारी-विश्व निर्माण करणारी. माया शक्तीला ‘सर्ग शक्ती’ असेही म्हणतात. सांख्य मतवादी ‘प्रकृती’ असे म्हणतात. ते या शक्तीला स्वतंत्र मानतात. गीता वा वेदान्त्यांच्या मते ही शक्ती परमेश्वराच्या अधीन आहे. चैतन्य शक्तीचे माया-शक्ती वर नियंत्रण असते. आपल्या ठायीही दोन शक्ती आहेत. ज्ञान शक्ती आणि क्रिया शक्ती. क्रिया शक्तीवर ज्ञान शक्तीचे नियंत्रण असते. परमेश्वराची ज्ञान शक्ती जीव रुपात मनुष्य, पशु, पक्षी वगैरे प्राण्यांच्या ठायी प्रकट झालेली आहे. जड जगतात परमेश्वराने आपली ज्ञान शक्ती गुप्त राखली आहे. तिथे सर्ग वा माया शक्तीच प्रकटली आहे. देहाच्या रुपाने माया आणि जीवाच्या रुपाने ज्ञान शक्ती. अशा प्रकारे पिंड-ब्रह्मांडयुक्त संपूर्ण विश्व परमात्माच्या दोन शक्ती धारण केलेले आहेत.

: 6 :

*एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय।*
*अहं कृत्स्नस्य  जगत: प्रभव: प्रलयस्तथा॥*

**अन्वय  आणि शब्दार्थ**

- **सर्वाणि भूतानि:** संपूर्ण भूत
- **एतोद्योनीनि:** या दोन्ही प्रकृतींपासूनच उत्पन्न झालेली आहेत
- **इति उपधारय:** असे समज
- **अहं कृत्स्नस्य जगत:** मी सर्व जगतांचा
- **प्रभव:** उत्पत्तीरुप आहे
- **तथा प्रलय:** आणि प्रलयरुप आहे

**अर्थ**

हेअर्जुना तू असे समज की सर्व भूतमात्र या दोन प्रकृतींपासून उत्पन्न झालेले आहेत आणि मी सर्व जगाची उत्पत्ती आणि प्रलय आहे अर्थात् सर्व जगाचे मूळ कारण आहे.

***ह्या दोहींपासुनी भूते सगळी जाण निर्मिली***
***साऱ्या जगास तद्-द्वारा मूळ मी आणि शेंवट।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) संपूर्ण भूते म्हणजे प्राणीमात्र वरील दोन प्रकृतींपासून उत्पन्न झालेले आहेत असे समज आणि 2) मी या संपूर्ण जगताची उत्पत्ती आणि प्रलय आहे.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वाणि भूतानि एतद्योनीनि:** संपूर्ण भूतमात्र म्हणजे प्राणीमात्र हे परा आणि अपरा या दोन प्रकृतींमुळे निर्माण झालेले आहेत असे माना. ईश्वर संपूर्ण विश्वाची उत्पत्ती आणि लय आहे.

चौथ्या आणि पाचव्या श्लोकातून वर्णिलेल्या दोन्ही प्रकृतींचा आविष्कार एका ईश्वरापासून झाला आहे असे मानावे. सांख्य जी जड प्रकृती मानतात ती भगवंताचीच अलौकिक शक्ती आहे. ती स्वतंत्र नाही. भगवंताच्या ठायी ज्ञान आणि माया या दोन शक्ती वसतात. यामुळे भगवंत दोन भूमिका स्वीकारुन प्रकट होतात. एक

म्हणजे जड सृष्टीच्या रुपाने आणि दुसरे चैतन्य स्वरुपी म्हणजे ज्ञान स्वरुपी जीवन स्वरुपी. जड आणि चेतन दोन स्वतंत्र विभाग असले तरी ती एकाच परमात्म्याची दोन रुपे होत. जड जगताच्या रुपाने अनंत पदार्थ वाटतात. जीवाचे चैतन्य स्वरुप असते. त्यातही अनंत भेद युक्त अनंत रुपे आढळतात. पशु, पक्षी आणि नाना लहान-मोठ्या जीव जंतुंमध्ये अगणित प्रकार-भेद आहेत. त्याच प्रकारे मनुष्याच्या ठायी देखिल स्त्री-पुरुष या सारखे प्रकार, बाल्यावस्था, पौगंडावस्था, युवावस्था, प्रौढावस्था, वृध्दावस्था यासारख्या नाना अवस्था आहेत. अशा प्रकारे एकच परमात्मा अनंत रुपांनी प्रकटतो.

2) **अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथाः** संपूर्ण जगाची उत्पती आणि प्रलय भगवंताच्या ठायीच होतो. तसे पाहू गेल्यास जगत अनादी आहे. जगाला जर आदी वा आरंभ आहे असे मानले तर मग त्याची उत्पत्ती शिस्तबध्दरित्या होत नाही असे मानावे लागेल. मग तर वाळूतून तेल मिळेल. पाण्यातून लोणी लाभेल पण असा काही कुणाचा अनुभव नाही. घट मातीनेच बनतो, कापड सुताचेच असते, कोयमधूनच आंबा प्रकटतो. याचा अर्थ असा की कारणाच्या ठायी कार्य आधीपासूनच विद्यमान असते. उत्पत्तीपूर्वी ते अप्रकट वा अव्यक्त रुपात असते. उत्पत्ती नंतर प्रकट वा व्यक्त होते. उत्पत्ती पूर्वी जर कारणाच्या ठायी कार्य विद्यमान नसेल तर त्याची उत्पत्ती होऊ शकणार नाही. यामुळेही जगत उत्पत्तीपूर्वी आपल्या कारणामुळे अव्यक्त रहाते. उत्पत्ती नंतर प्रकट होउन भगवंताच्या आधारे रहाते. प्रलय काळी परमात्म्याच्या ठायीच विलीन होऊन जाते. अशा प्रकारे अव्यक्तापासून व्यक्त आणि व्यक्तापासून पुनरपि अव्यक्त असा क्रम अनादी काळापासून सुरु आहे. यामुळेच ईश्वराप्रमाणे जगही अनादी आहे. तैत्तिरीय उपनिषदात हाच मुद्दा आलाय: यतो वा इमानि भूतानि जायंते। येन जातानि जीवन्ति। यत्प्रयन्त्यभि-संविशन्ति। (3/1) अर्थात् हे भूतमात्र परमात्म्यापासून उत्पन्न होतात. उत्पन्न झालेले सर्व जीव ईश्वराच्या सहाय्याने जीवंत रहातात. प्रलय काळी परमात्म्याच्या ठायी विलीन होतात. असे उपनिषदही म्हणते.

पुढील श्लोकातही याच मुद्याची चर्चा आली आहे.

: 7 :

*मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय।*
*मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धनंजयः** हे अर्जुना, धनंजया
- **मत्तः परतरंः** माझ्याशिवाय श्रेष्ठ
- **अन्यत् किंचित् न अस्तिः** दुसरे काही किंचिन्मात्रही नाही
- **सूत्रे मणिगणाः इवः** धाग्यात जसे मणी ओवावेत तसे
- **मयि इदं सर्वं प्रोतंः** माझ्या ठिकाणी हे जगत ओवले गेले आहे

**अर्थ**

हे धनंजया, माझ्याहून निराळे दुसरे कोणतेही परम कारण नाही. हे संपूर्ण जग दोऱ्यात मणी ओवावे तसे माझ्यात ओवलेले आहे.

*दुसरें तत्त्व नाहीं चि कांहीं माझ्या पलीकडे*
*ओंविलें सर्व माझ्यात जसे धाग्यामध्यें मणि।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जगात माझ्याहून श्रेष्ठ अशी दुसरी कुठलीही गोष्ट वा वस्तु नाही आणि 2) धाग्यात ज्या प्रमाणे अनेक मणी ओवले जातात त्या प्रमाणे माझ्या ठायी हे संपूर्ण जगत ओवलेले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मत्तः परतरं अन्यत् किंचित् न अस्तिः** जगात ईश्वराहून श्रेष्ठ अशी कुठलीही गोष्ट नाही. विश्वही एक कार्य आहे. त्याचे काही एक कारण तर असायला हवे. सांख्य तत्वचिंतकांनी जड प्रकृतीला विश्वाचे कारण मानले आणि पुरुषाला स्वतंत्र मानले. जड प्रकृती स्वतंत्रपणे एकट्याने विश्व निर्मिती करु शकत नाही. चैतन्याच्या आधारानेच जड प्रकृती विश्वाची निर्मिती करु शकते. माती काही स्वतंत्रपणे एकट्याच्या बळावर घटाची निर्मिती करु शकत नाही. कुंभकाराचा हात मातीचा घट साकारु शकतो. यामुळे विश्व निर्मितीचा जनक चैतन्यमय परमेश्वरालाच मानायला हवे. दुसरा मुद्दा असा की कार्य हे

कारणापासून भिन्न राहू शकत नाही आणि कार्यकारणाचा भास होत रहातो. यामुळे विश्वरुपी कार्य परमात्मरुपी कारणाहून भिन्न राहू शकत नाही. विश्वरुपी कार्य हे परमात्मरुपी कारणाचा भास आहे. भासमान रुप आहे. मातीचे भासमान रुप असल्यामुळे घट सत्य वस्तु नाही त्याचप्रमाणे विश्व परमात्म्याचे भासमान रुप आहे. यामुळे गीता या श्लोकात सांगत आहे की विश्वात परमात्म्याहून श्रेष्ठ असे दुसरे कुठलेही तत्व नाही, वस्तु नाही.

2) **मयि इदं सर्वं प्रोतं सूत्रे मणिगणा इव:** धाग्यात ओवलेल्या मण्यांप्रमाणे हे सारे विश्व ईश्वरात गुंफलेले आहे. माळेत ओवलेल्या विविध पुष्पांप्रमाणे या जगातील नाना पदार्थ एका परमात्म्याच्या धाग्यात ओवलेले आहे. माती एक असते. घट नाना असतात आणि हे विविध घट मातीशी एकरुप असतात. सुवर्ण एक असते. सोन्यापासून घडवलेले दागिने अगणित असतात. ते सारे सोन्याशी संलग्न असतात. गुंफलेले असतात. सागर एक असतो. मोठ्या लाटा, छोट्या लाटा, बुडबुडे, फेस विविध असतात. हे सारे समुद्राशी एकरुप असतात. त्याच प्रकारे परमात्मा एक असून विश्वाचे अगणित पदार्थ परमात्म्याची अनेक रुपे असतात.

: 8 :

***रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययो: ।***
***प्रणव: सर्ववेदेषु शब्द: खे पौरुषं नृषु ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **अहं अप्सु:** मी पाण्यातील रस आहे
- **रस: अस्मि:** मी रसाच्या रुपात आहे
- **शशिसूर्ययो:** चंद्र आणि सूर्यातील
- **प्रभा अस्मि:** प्रकाशाच्या रुपात मी आहे
- **सर्ववेदेषु:** सर्व वेदातील
- **प्रणव: अस्मि:** मी ओंकार आहे
- **खे शब्द: अस्मि:** आकाशात मी शब्दाच्या रुपात आहे
- **नृषु पौरुषं अस्मि:** मी पुरुषातील पुरुषार्थ आहे

**अर्थ**

हे अर्जुना, मी पाण्यातील रस आहे. चंद्र-सूर्यातील प्रकाश आहे. सर्व वेदातील ओंकार आहे. आकाशातील शब्द आणि पुरुषातील पुरुषत्व मी आहे.

***पाण्यांत रस मी झालों चंद्र-सूर्यीं प्रकाश मी***
***ओंकार वेदीं शब्द आकाशीं पुरुषीं पुरुषार्थ मी ।***

**विषय:** या श्लोकात पाच विभूतींचे वर्णन आले आहे. 1) पाण्यात रस 2) चंद्र आणि सूर्यात प्रकाश 3) चारी वेदात ओंकार 4) आकाशात शब्द आणि 5) मनुष्यांच्या ठायी पुरुषार्थ

**स्पष्टीकरण**

तसे पाहू गेल्यास ईश्वर तर सर्वांच्या ठायी विद्यमान आहे. तरी सुध्दा प्रत्येक मनुष्य प्रत्येक पदार्थात ईश्वराचे दर्शन करु शकत नाही. ज्ञानी पुरुषालाच प्रत्येक पदार्थात ईश्वराचे दर्शन घडते. याचे कारण असे की त्याला अभेद दृष्टी प्राप्त झाली आहे. एकत्वाची दृष्टी प्राप्त झाली आहे. सर्वांच्या ठायी काही एकत्वाची दृष्टी नांदत नसते, याउलट भेद दृष्टी वा अनेकत्वाची दृष्टी विद्यमान असते. भेद दृष्टी असणारे आणि म्हणून अनेकत्वाचा अनुभव घेणारे जन अज्ञानी होत. अज्ञानी जनांनाही ईश्वर-दर्शनाचा साक्षात्कार व्हावा-लाभ व्हावा या हेतुने गीतेने या श्लोकात पाच विभूतींचे वर्णन केले आहे.

1) **अहं अप्सु रस:** पहिली विभूती म्हणजे पाणी-जळ. माणसासाठी पाणी हे जीवन आहे. पाण्याच्या अभावी माणूस जगू शकत नाही. अन्नाशिवाय काही दिवस जगू शकतो पण पाण्याशिवाय नव्हे. पाण्याच्या अभावी अन्नधान्य उपजणार नाही. पाण्याच्या अभावी वृक्ष-वेली फुलू शकणार नाहीत. आपल्या शरीरातही मोठ्या प्रमाणात पाणी असते. रक्तातले पाण्याचे प्रमाण कमी व्हायला नको. पाण्याच्या अभावी अन्नाचे पचन होणार नाही. पाणी असे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याशी आपला रात्रंदिवस संबंध येतो. पाण्याला बघून ईश्वराचे स्मरण व्हायला हवे. पाण्यात ईश्वर कसा वसतो? हे गीतेने समजाऊन सांगितले आहे. गीता म्हणते की पाण्यात ईश्वर रस रुपाने नांदतो. तहान लागलेली असली म्हणजे पाणी कसे गोड लागते? उन्हाळ्यात गार पाणी मिळाले म्हणजे

कोण आनंद? यामुळे पाण्यासारख्या अद्भुत पदार्थाच्या ठायी परमात्मा रस रुपाने वसतो.

2) **शशिसूर्ययो: प्रभा अस्मि:** दुसरी विभूती आहे सूर्य आणि चंद्र. यांच्याशिवाय आपण जगूच शकत नाही. सूर्योदयाच्या समयी उगवत्या सूर्यनारायणाला बघताना नास्तिकाच्या मनातही आस्तिक भाव उत्पन्न होईल. आस्तिकाच्या मनी तर ईश्वर भाव तीव्रतेने उत्पन्न होईल. अश्रुधारा वाहू लागतील. वेदात सूर्योपासनेला खूप महत्व दिले गेलेय. उपनिषद अलिप्ततेसाठी सूर्याचा दृष्टांत देतात. कठोपनिषदात वर्णन येते :

***सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षु: न लिप्यते चाक्षुषैर्बाह्यदोषै: । एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा न लिप्यते लोकदु:खेन बाह्य: ॥*** (2/2/11)

अर्थात् सूर्य जनांचा डोळा आहे तरी लोकांच्या डोळ्यांच्या दोषांनी तो मुक्त आहे, दोषात कधी लिप्त होत नाही. त्याचप्रकारे सर्वांच्या ठायी वसणारा आहे. सर्व लोकांचा अंतरात्मा लोकांच्या दु:खांनी कधी दु:खी होत नाही, लिप्त होत नाही.

पृथ्वी सूर्याच्या आकर्षणाने बध्द आहे. सूर्याच्या अस्तित्वावर पृथ्वीचे अस्तित्व अवलंबून आहे. चंद्र कसा शीतल आहे ! सूर्याकडे आपण बघू नाही शकत आणि बघू म्हटले तर डोळे बिघडतील पण चंद्रम्याला आपण तास न् तास बघू शकतो. चंद्राची कला रोज बदलती असते. चंद्राचे रुप अद्भुत आहे. चंद्राला बघून चांद्रायणासारखी व्रते आचरली जातात. चंद्राचे अस्तित्व नसले तर औषधी वनस्पती नाही विकसणार! चंद्राला मनाचा देवता मानले जाते. सूर्याला डोळ्यांचा देवता मानले जाते. अशा प्रकारे सूर्य-चंद्रासारख्या अद्भुत पदार्थांच्या ठायी ईश्वर प्रकाशरुपाने प्रकटला आहे.

3) **सर्ववेदेषु प्रणव:** सर्व वेदांमध्ये प्रणव म्हणजे ओंकार ईश्वर आहे. वेदामधून उपनिषदांचा प्रादुर्भाव झाला आहे. वेदात एका ईश्वरालाच समस्त विश्वाचे मूळ कारण मानले गेले आहे. ईश्वर अव्यक्त, निराकार, रुपरहित, अमर्यादित, अनंत आणि इंद्रियांच्या पर (पलिकडे) आहे. आपणा सर्वाचे स्वरुप तेच आहे. त्या ईश्वराचे अखंड स्मरण राहू लागले तर अखंड शांतता आणि आनंदाचा अनुभव घेता येऊ शकतो. अशा परमेश्वराचे अखंड स्मरण कुठल्या नावाने करावे? वेदांनी ओम् हे अक्षर निश्चित केले आहे. त्या काळी सहस्रावधी जनांनी ओंकाराचा जप केला. कठोपनिषदात म्हटले आहे:

***सर्वे वेदा यत् पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति । यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् ॥*** (1/2/15)

अर्थात्: तमाम वेद ज्या पदाचे म्हणजे स्थानाचे वर्णन करतात. सर्व प्रकारची तपे ज्या पदाचे वर्णन करतात. या पदाची इच्छा धरणारे ब्रह्मचर्याचे पालन करतात. त्या पदाला म्हणजे स्थानाला थोडक्यात सांगता येईल. ते पद म्हणजे स्थान आहे ओम्.

पण ओंकाराचा जप थोडा अवघड आहे आणि त्याचे रुप निर्गुण आहे. यामुळे नंतर राम, कृष्ण, हरी यासारख्या नावांची चर्चा पुढे आली. या नावांचा सार्वत्रिक प्रचार-प्रसार झाला. गीता सांगते की तमाम वेदांमध्ये ईश्वर ओंकार रुपात आहे. ओम हे वेदांचे सार सर्वस्व आहे.

4) **खे शब्द: अस्मि:** आकाशात ईश्वर तत्व शब्द रुपाने वसते. आकाशाचे वर्णन काय करावे? कसे करावे? परमेश्वराची ओळख आकाशाचा गुण असलेल्या शब्द तत्वाने केली जाते. आकाश अत्यंत व्यापक आहे. अत्यंत अलिप्त आहे. अवघ्या ब्रह्मांडाला आपल्यात समाविष्ट करुन घेणारे आहे. कवेत कवटाळणारे आहे. परमेश्वराप्रमाणे आकाशही कमालीचे सूक्ष्म आहे. उपनिषद म्हणते: आत्मन: आकाश: संभूत: । परमात्म्याने सर्वप्रथम आकाशाची निर्मिती केली. आकाशानंतर वायु, वायु नंतर जळ, जळा नंतर अग्नी, अग्नी नंतर पृथ्वी असा निर्मितीचा क्रम आहे. हा पंचहाभूतांच्या उत्पत्तीचा क्रम आहे. आकाश नसेल तर ब्रह्मांड कुठे असेल? आकाशाशिवाय का आपले अस्तित्व असेल? आकाशाची योग्यता ब्रह्मतत्वाएवढी आहे. इतर महाभूतांप्रमाणे आकाशही उत्पन्न होते. आकाश अत्यंत व्यापक असले तरी वायु, जळ, अग्नी, पृथ्वी या पदार्थांहून भिन्न आहे. यामुळे आकाश उत्पन्न होते असे म्हटले गेले आहे. परमेश्वरासारखे आकाश काही अनादी नाही. अशा अद्भुत आकाशाच्या ठायी शब्द रुपाने भगवंत नांदतो. आकाशाचा गुण शब्द आहे. आकाश नसेल तर शब्द ऐकता येणार नाही.

5) **नृषु पौरुषं अस्मि:** माणसाच्या ठायी पुरुषार्थरुपाने परमात्मा नांदतो. पुरुषार्थ अनेक प्रकारचा असतो. निस्वार्थ भावनेने पुरुषार्थ साधता येतो. कुणाचेही नुकसान होऊ नये ही पुरुषार्थाची अट असते. हाच पुरुषार्थ खरा मानावा, सच्चा मानावा. कुणाला डाका टाकणे हाही पुरुषार्थ वाटेल पण हा परपीडक असल्यामुळे त्याज्य आहे. अणुबाँबचा शोधही मोठा पुरुषार्थ पण तो विनाशक असल्यामुळे त्याज्य मानावा. पुरुषार्थात व्यक्ती आणि समाजाचे हित सामावलेले असते. पुरुषार्थात कुणाच्याही नुकसानीची शक्यता नसते. या पुरुषार्थालाच पुरुषार्थ मानावे. सर्वांनी या पुरुषार्थाचे संपादन केले तर अवघ्या समस्या विलयाला जातील, लोप पावतील. शंकराचार्य ब्रह्मसूत्र भाष्यात लिहितात- ब्रह्मावगति: पुरुषार्थ: नि:शेषसंसारबीजाद्यविद् याद्यनर्थनिबर्हणात् अर्थात् ब्रह्मतत्वाचा अनुभव प्राप्त करणे हा पुरुषार्थ होय, याचे कारण असे की जगताचे बीज अविद्या वा अज्ञान हे अनर्थ कारण आहे. ब्रह्मतत्वाच्या अनुभवामुळे या अविद्या वा अज्ञान बीजाचा समूळ नाश होतो.”

थोर पुरुषार्थी जनही काम, क्रोध, अहंकार वगैरे विकाराना जोवर क्षीण करु शकणार नाही तोवर अन्य पुरुषार्थ अपूर्ण मानले जातील. विकारांवर विजय संपादन करणे परम म्हणजे श्रेष्ठ पुरुषार्थ आहे. हा श्रेष्ठ अनुभव परमेश्वराच्या अनुभवानेच प्राप्त होऊ शकतो. माणसांच्या ठायी नांदणारा हा पुरुषार्थ परमेश्वराचे रुप आहे - परमेश्वराची विभूती आहे.

: 9 :

***पुण्यो गंध: पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ।***
***जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च पृथिव्यां:** आणि पृथ्वीच्या ठायी
- **पुण्य: गंध:** पवित्र सुगंध आहे
- **च विभावसौ:** आणि अग्नीमधले
- **तेज: अस्मि:** तेज आहे
- **सर्वभूतेषु:** सर्व भूतमात्रांच्या ठायी
- **जीवनं अस्मि:** जीवन आहे
- **च तपस्विषु:** आणि तपस्वी जनांमध्ये
- **तप: अस्मि:** मी तप आहे

**अर्थ**

मी पृथ्वीतील पवित्र (पंच तन्मात्रांसाठी इथे पवित्र शब्द जोडला आहे.) गंध आणि अग्नीतील तेज आहे तसेच सर्व भूतांचे जीवन आहे आणि तपस्वी जनांमधील तप आहे.

***मी पुण्य-गंध पृथ्वीत असे अग्नीत उष्णता***
***प्राणि-मात्रांत आयुष्य तपो-वृध्दांत मी तप।***

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे 1) पृथ्वीत मी सुवास आहे. 2) मी अग्नीत तेज आहे. 3) सर्व भूतांच्या ठायी मी जीवन म्हणजे आयुष्य आहे. 4) मी तपस्वी जनांचे तप आहे

**स्पष्टीकरण**

1) **पृथिव्यां पुण्य: गंध: अस्मि:** पृथ्वीतला सुगंध, अग्नीतले तेज, प्राणिमात्रांचे आयुष्य आणि तपस्वी जनांचे तप या ईश्वराच्या विभूती होत.

धरणीच्या अंतरात वसणारा सुवास, सुगंध ईश्वराचे रुप आहे. सूर्य, जळ, चंद्र, आकाशाप्रमाणे धरणीही अद्भुत आहे. पृथ्वीची गती अखंड आहे. ती दर सेकंदाला वीस मैलांच्या गतीने फिरते आहे तरी तिचा आवाज येत नाही. ही केवढी अद्भुत गोष्ट आहे. या धरणीवर केवढे विराट सागर आहेत. असंख्य वृक्ष आहेत. कितीतरी मोठमोठे पर्वत आहेत. किती नद्या! भूगर्भात नाना खाणी. पेट्रोल, रॉकेल, कोळसा, सोने, अभ्रक, लोह, चांदी सारे या अद्भुत धरणीच्या उदरात दडलेले आहे. अशा विराटकाय धरणी तलावर परमेश्वर कुठे आहे? कुठल्या रुपात नांदतो? परमेश्वराचे उत्तर असे की या धरणीच्या सुवासाचा अनुभव जून महिन्यात पहिल्या पावसाच्या आगमनासोबत मृद्गंधाच्या रुपाने होतो.

2) **विभावसौ तेज: अस्मि:** अग्नीच्या ठायी तो तेजाच्या रुपाने वसतो. अग्नीचे दोन गुण - तेज आणि प्रकाश. प्रकाश काही स्वतंत्र पदार्थ नाही. तेजात प्रकाश अंतर्भूतच आहे. तेजाचे रुप प्रकाशमय असते. हा अग्नी केवढा अद्भुत आहे. ब्रह्मांडाच्या तमाम पदाथांर्च्या ठायी

व्याप्त आहे. रात्री कांबळात थोडे घर्षण होते आणि अग्नी दिसू लागतो. घर्षणाने अग्नी प्रकट होतो. अग्नीशिवाय जगणे अशक्य. अन्नाशिवाय आपण जगू शकत नाहीत. स्वयंपाक अग्नीमुळेच तयार होतो. अग्नीच्या साक्षीने विवाह संपन्न होतो. वानप्रस्थाश्रमात अग्निहोत्र विधी आहे. त्या समयी दोन अग्निकुंडे असतात. त्यात अहोरात्र अग्नी प्रज्वलित राखावा लागतो. अग्नीहोत्रीला अग्नीची अखंड उपासना करावी लागते. कठोपनिषदात एक दृष्टान्त दिला आहे.:

*अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टा रुपं रुपं प्रति रुपो बभूव।*
*एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रुपं रुपं प्रतिरुपो बहिश्च॥*
*(2/2/9)*

अर्थात्: अग्नी एक असतो. तो विविध पदार्थांमध्ये प्रवेश करतो. त्या त्या वस्तु वा पदार्थांच्या आकाराचा बनून जातो. तशाच प्रकारे आत्मा-अंतरात्मा विविध प्राणीमात्रांच्या ठायी वसतो. अंतरात्मा विविध देहात प्रवेश करतो. त्या त्या देहाच्या उपाधीनुसार होऊन जातो. तसा दिसू लागतो. तरीही आत्मा अलिप्तच असतो.

घटाचे आकाश घटाच्या आकाराचे बनून जाते. तरी ते घटापासून अलिप्त असते. बाहेरचे आकाश आणि घटाचे आकाश मात्र एकच असते. त्याचप्रकारे आत्मतत्व देहाच्या उपाधीसारखे असते. देहापासून अलिप्त असते. ब्रह्मांडात आत-बाहेर एकच एक असते. अशा प्रकारे परमेश्वर अग्नीच्या ठायी तेज आणि प्रकाशाच्या रुपाने प्रकट आहे.

3) **सर्वभूतेषु जीवनं अस्मि:** तमाम भूतमात्रांच्या ठायी म्हणजे प्राणीमात्रांच्या ठायी आयुष्य असते. ते भगवंताचे रुप आहे. देहात जोवर आत्मतत्व नांदते तोवर देह जीवंत असतो. आत्मतत्व देहात नसले वा अप्रकट असले तर देह जाळून वा पुरुन टाकावा लागतो. देहाचे सारे आयुष्य अशा प्रकारे ईश्वराच्या अस्तित्वावर अवलंबून असते. ही केवढी अद्भुत बाब आहे. आत्मतत्व देहात आहे तोवर शरीर सजीव रहाते. आत्मतत्वाच्या अभावी देहाची किंमत शून्य ठरते. देह असो वा मन, बुध्दी असो वा इंद्रिये देहात परमात्म तत्व नांदत असते तोवर या सर्वांच्या क्रिया प्रगट होत रहातात. बघणे, हुंगणे, खाणे, ऐकणे तमाम क्रिया चैतन्यस्वरुप परमात्म्यामुळेच संभवतात पण हे कुणाच्या लक्षात येत नाही. अहंकारामुळे आपणच कर्ता आहोत असे वाटते. हे केवढे अज्ञान आहे. यामुळे भगवंताचे निवेदन असे आहे की मी प्राणीमात्रांमधील आयुष्य आहे.

4) **तपस्विषु तप: अस्मि:** तपस्वी जनांमधील प्रकट होणारे जे तप आहे, ते ईश्वररुपी आहे. सतराव्या अध्यायात कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीन प्रकारच्या तपांचे वर्णन आले आहे. हे तप चित्तशुध्दीसाठी आचरले जाते. चित्तशुध्दीमुळे ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानामुळे मोक्षप्राप्ती हा साधनेचा क्रम आहे. यामुळे गीतेच्या अठराव्या अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे- "यज्ञ, दान आणि तपाचा कदापि त्याग करायला नको. ज्ञानी पुरुषांसाठीही ही तीन तत्वे पावक आहेत. पावक म्हणजे पावन करणारी. यांच्यामुळे चित्तशुध्दीत वाढ होते." देहाला क्षीण करणारे तप योग्य नव्हे. शरीर स्वस्थ राखणारे, आरोग्य अन् त्याग वाढवणारे तप साधनेत सहाय्यकारी ठरते. साधना यामुळे खूपच प्रखर होते. उपनिषदात तर असे वर्णन येते की सृष्टीची निर्मिती करण्यापूर्वी परमेश्वरानेही तप केले होते. याचा अर्थ तपाचा महिमा मोठा आहे. तप हे देहदंडन नाही. आत्ममंडन आहे.

: 10 :

*बीजं मां सर्वभूतानां विध्दि पार्थ सनातनम्।*
*बुध्दिर्बुध्दिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ मां:** हे अर्जुना
- **सर्वभूतानां:** सर्व भूतांचे
- **सनातनम् बीजं:** सनातन बीज म्हणजे कारण आहे
- **विध्दि:** (असे) समज
- **बुध्दिमतां बुध्दि:** बुध्दिवंतांची बुध्दी
- **अस्मि:** (ती) मी आहे
- **तेजस्विनां तेज:** तेजस्वी पुरुषांचे तेज म्हणजे प्रगल्भता
- **अहं अस्मि:** ती मी आहे

**अर्थ**

हे अर्जुना, तू संपूर्ण भूतांचे सनातन कारण मलाच समज. मी बुध्दिवंतांची बुध्दी आणि तेजस्व्यांचे तेज आहे.

***सर्व भूतांत जें बीज तें मी जाण सनातन***
***बुध्दिमंतांत मी बुध्दि तेजस्व्यांत हि तेज मी।***

विषय : या श्लोकात तीन विभूतींचे वर्णन आले आहे 1) सर्व भूतांचे मी सनातन बीज आहे. 2) बुध्दीमान म्हणजे विवेकी पुरुषांची मी बुध्दी म्हणजे विवेक शक्ती आहे. 3) तेजस्वी पुरुषांमधले तेज म्हणजे महत्ता, श्रेष्ठता, मोठेपणा, निपुणता दिसते ती मी आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मां सर्वभूतानां सनातनं बीजं विध्दि:** सर्व भूतमात्रांच्या ठायी विराजमान सनातन बीज ईश्वर आहे. बुध्दीमान म्हणजे विवेकसंपन्न पुरुषाच्या ठायीची बुध्दी म्हणजे विवेकशक्ती हे ईश्वराचे रुप आहे. तेज:पुंज पुरुषांच्या ठायीचे तेज, म्हणजे महात्म्य, श्रेष्ठत्व, मोठेपण, निपुणता ईश्वर आहे.

सर्व प्राणीमात्रांच्या ठायी सामावलेले असते एक सनातन बीज. हे ईश्वररुप आहे. जगत जर कार्य आहे तर त्याचे काही एक कारण हे असायला पाहिजे. बीजातून वृक्ष उत्पन्न होतो. याचा अर्थ असा की बीज कारण आणि वृक्ष कार्य आहे. त्याचप्रमाणे ईश्वर बीज आहे. विश्वरुपी सारा पसारा त्यामुळे आकाराला आला आहे. उत्पन्न झाला आहे. यामुळे परमात्मा सर्वांचे कारण आहे. विश्व कार्य आहे. कार्यरुप विश्वात अखंडपणे फेरफार होत असतात. उलाढाल सुरु असते. कुठलीही वस्तु सतत एकाच रुपात दिसत नाही. परमेश्वर मात्र अपरिवर्तनीय आहे. त्याच्या ठायी कुठलाही बदल कधीही होत नाही. परमात्मा अपरिवर्तनशील आहे. यामुळे परमात्म्याला सनातन बीज असे म्हटले जाते.

2) **बुध्दिमतां बुध्दि: अस्मि:** बुध्दीवंतांची बुध्दी म्हणजे विवेक हे ईश्वराचे रुप आहे. साधारणपणे जनलोकात बुध्दीवंताला विवेकी पुरुष नाही मानले जात. एखादा माणूस बुध्दीमान आहे असे जेव्हा आपण म्हणतो ना तेव्हा त्याची ज्ञान ग्रहणशक्ती तीव्र आहे असा भावार्थ आपल्या मनात असतो. अशी बुध्दीमान म्हणवणारी माणसे चारित्र्यशून्य, अनीतीमान व धर्मविहीनही असू शकतात. यामुळे या श्लोकाचे विवेचन करताना शंकराचार्य 'बुध्दीमतां' शब्दाचा अर्थ 'विवेकशक्तिमतां' असा करतात. बुध्दीचा अर्थ 'अंत:करणस्य विवेकशक्ति:' असा करतात. 'विवेकशक्तिमतां' याचा अर्थ ज्यांच्या ठायी विवेकशक्ती असते असे बुध्दजन. सत्-असत्, कार्य-अकार्य, नीती-अनीती, धर्म-अधर्म, योग्य-अयोग्य या संदर्भात अचूक विवेक करणारे बुधजन होत. विवेकानुसार मार्गक्रमण करणारे विवेक शक्ती संपन्न मानले जातील. विवेक शक्तीचा संबंध आचरणाशी आहे. बुध्दी मंद असू शकेल पण चित्त शुध्द असेल असे बुधजन. उच्च प्रतीचे आचरण असलेले महानुभाव. कमालीचे संयमी जन. वैराग्य संपन्न जन. परमात्म भक्तीयुक्त जन. बुध्दीमान जन ठरतात. विवेक संपन्न ठरतात, असे म्हणता येईल. अशा बुध्दीमान म्हणजे विवेकसंपन्न पुरुषाच्या ठायी बुध्दी असते. या बुध्दीला शंकराचार्य अंत:करणाची विवेकशक्ती मानतात-म्हणतात. ही बुध्दी वा विवेकशक्ती भगवंताचे रुप आहे. भगवंत विवेक-शक्तीच्या रुपाने प्रकट होतो, असे मानायला हवे.

3) **तेजस्विनां तेज: अहं अस्मि:** तेजस्वी पुरुष महान ठरतात. तेजस्वी पुरुषांच्या ठायी तेज वा महत्ता असते. ते ईश्वरी रुप होय. तेजस्वी पुरुष जर गृहस्थाश्रमी असेल तर तो ब्रह्मचर्यसंपन्न असायलाच हवा. ब्रह्मचर्य पालन केल्याशिवाय कुणाच्या ठायी तेज प्रकट होणार नाही. ब्रह्मचर्य पालनाशिवाय कुणी महान ठरु शकत नाही. गांधीजी सांगत असत की दीर्घकालीन ब्रह्मचर्यामुळे त्यांच्या ठायी शक्तीचे प्रकटीकरण दिसत होते. इथे 'तेजस्वी' शब्दाचा अर्थ 'ब्रह्मचारी' असा होतो. काया-वाचा-मनसा ब्रह्मचर्याचे सूक्ष्म पालन करणाऱ्या व्यक्तीच्या ठायी अव्यक्त शक्ती प्रकट होतात. असे पुरुष विवेकशक्तीसंपन्न ठरतात. अशा पुरुषांच्या ठायी महात्म्य प्रकट होते. परमेश्वराच्या नजिक पोहोचलेले असल्यामुळे साक्षात् परमेश्वरच त्यांच्या माध्यमातून आपले कार्य करवून घेतो. गांधीजींचे निवेदन असे होते की सागराचा थेंब सागरात असेपर्यंत समुद्राचा घटक असतो, साक्षात् समुद्र असतो. त्याला समुद्राची सत्ता लाभते. सागरापासून लांब जाताच थेंब सुकून जातो. अशाच प्रकारे जीव स्वत्व मिटवून - अहं संपवून स्वत:ला परमात्म्याशी एकरुप

करुन टाकतो. महान बनतो. महात्मा बनतो. जो स्वत:ला वाचवू बघतो स्वत्वाला वाचवू बघतो, अहंभाव संपवायला तयार नाही तो सदा अल्पच रहातो. महान बन् शकत नाही. महात्मा बनण्यासाठी अहंकाराचा लोप करावा लागतो.

:11:

***बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।***
***धर्माविरुध्दो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **च कामरागविवर्जितम्:** आसक्तीरहित आणि कामनारहित
- **बलं:** असे जे बळ म्हणजे सामर्थ्य आहे ते
- **बलवतां:** जे बलवानांचे असते
- **अहं अस्मि:** मी आहे
- **भरतर्षभ:** हे अर्जुना
- **भूतेषु:** प्राणीमात्रात
- **धर्माविरुध्द: काम:** धर्मानुकूल म्हणजे शास्त्रानुकूल काम
- **अहं अस्मि:** मी आहे

### अर्थ

हे भरतश्रेष्ठा मी बलवानांचे आसक्तीरहित आणि कामनारहित सामर्थ्य आहे आणि सर्व प्राण्यांमधील धर्माला अनुकूल अर्थात् शास्त्राला अनुकूल काम आहे.

***वैराग्य-युक्त निष्काम बळवंतांत मी बळ***
***राहे धरुनि धर्मास ती मी भूतांत वासना ।***

**विषय:** या श्लोकात दोन विभूतींची चर्चा आली आहे 1) जे काम आणि राग रहित बळ शक्तीसंपन्न पुरुषांच्या ठायी दिसून येते ते बळ मी आहे आणि 2) भूतांच्या ठायी म्हणजे प्राणीमात्रांमध्ये मी धर्माला अनुकूल म्हणजे अविरुध्द काम आहे.

### स्पष्टीकरण

1) बलवतां बलं अहं अस्मि: बलवंताच्या - शक्तीसंपन्न व्यक्तीच्या ठायी बळ दिसून येते. हे काम-राग-वर्जित बळ ईश्वराचे रुप होय. इथे ‘काम’ आणि ‘राग’ असे दोन शब्द आलेत. या शब्दांचा शंकराचार्यांनी अर्थ स्पष्ट केलाय. ते म्हणतात : काम: असन्निकृष्टेषु विषयेषु तृष्णा, राग: प्राप्तेषु विषयेषु रंजना अर्थात् प्राप्त नसणाऱ्या विषयांबाबतची तीव्र लालसा ‘काम’ होय. प्राप्त विषयांबाबतचे प्रेम वा आसक्ती म्हणजे ‘राग’ होय.

हा विषय अधिक खुलवत शंकराचार्य म्हणतात: ताभ्यां विवर्जितं देहादिधारणमात्रार्थं बलं अहं अस्मि, न तु यत् संसारिणां तृष्णारागकारणं । अर्थात् काम आणि राग वर्जित देह धारण करणे एवढाच ज्या बळाचा हेतु आहे ते बळ वा शक्ती ईश्वराचे रुप आहे पण गृहस्थ जनांच्या-प्रापंचिकांच्या-तृष्णेने व रागाने उपजणारे बळ ईश्वररुप नव्हे!

रावण आणि हनुमान दोघे बलशाली होते. दोघे शक्तीचे प्रतीक. प्रतिनिधी. रावणाचे बळ आसुरी होते. राक्षसी होते. सर्वविनाशकारी होते. हनुमंताचे बळ दैवी होते. सर्वोपकारक होते. सीतेचे अपहरण दशाननाने केले. त्याला कुठलाही क्षोभ झाला नाही. रावणाच्या ठायी हे अनैतिक बळ होते. ते का आपण प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करायचेत? आणि अशा प्रयत्नांमधून सर्वनाशाशिवाय का कुठले फळ लाभेल? आज युरोपातील तमाम राष्ट्रे रावणाचे आसुरी बळ वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत. भारतात मात्र हनुमंताच्या बळाची प्रतिष्ठा आहे. रामाच्या मंदिरात हनुमंताच्या मूर्तीला स्थान आहे. एवढेच नव्हे पण स्वतंत्रपणे हनुमंताची मंदिरे भारतभर ठायी-ठायी आहेत. हनुमंताच्या मंदिरात रामाच्या मूर्तीची गरज नाही. हनुमंताच्या मुर्तीशिवाय रामाचे मंदिर नाही. हनुमंताच्या बलोपासनेची आज परम आवश्यकता आहे. हनुमंतप्रेरित बलोपासना मानवता आहे हा भारताचा मंत्र आहे. यामुळे भारताने कधीही कुठल्याही परक्या राष्ट्रावर आक्रमण केले नाही. अहिंसा आपला परम धर्म बनला. श्रेष्ठ धर्म बनला. यामुळे भगवंताचे म्हणणे असे आहे की काम म्हणजे तृष्णा आणि राग म्हणजे आसक्तीरहित जे बळ आहे ते भगवंताचे स्वरुप आहे.

2) **धर्म अविरुध्द: भूतेषु काम:** अस्मिधर्माला अविरोधी म्हणजे विरोध न करणारे कामतत्व वा वासना भगवत्रुपी ठरतात. धर्माच्या विरुध्द नाना वासना असतात. त्याचप्रकारे धर्माला अविरोधी अशाही

वासना असतात. धर्माच्या विरोधी नसणाऱ्या वासना या ईश्वरस्वरुपी असतात. थोडक्यात म्हणजे शुभवासना किंवा शुभकामनांच्या माध्यमातून ईश्वररुप प्रकटते.

इथे 'काम' शब्द एकवचनात प्रयुक्त केला गेला आहे, ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. शब्द जर बहुवचनात प्रयुक्त असता तर 'अनेक शुभ वासना' असा अर्थ घेता आला असता पण 'काम' शब्दाचा एकवचनी प्रयोग आहे. यामुळे त्याचा विशिष्ट अर्थ घ्यावा लागेल. काम म्हणजे प्रजोत्पत्तीसाठी आवश्यक काम होय. ज्ञानेश्वरानी हाच अर्थ केला आहे. याचा अर्थ असा झाला की केवळ प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने होणारी कामना धर्मयुक्त होय. सुखासाठी, भोग-विलासासाठी होणारा स्त्री-पुरुष समागम धर्मयुक्त मानता येणार नाही. संतानविषयकही मर्यादा पाळली जायला हवी.

शंकराचार्यानी लावलेला आणखीही एक अर्थ आहे. ते म्हणतात: यथा देहधारणमात्राद्यर्थ: अशनपानादिविषय: काम:। अर्थात् केवळ देहधारणा आणि त्यासारख्या आणखी काही कार्य-योजना असतील त्या काम म्हणजे इच्छा हे माझे स्वरुप जाण, यात अन्न, पाणी यासारख्या बाबी येतात.

केवळ देह धारण करुन त्या माध्यमातून धर्माचरणाची इच्छा राखणे धर्मयुक्त असल्यामुळे भगवंत त्यात प्रकटले असे म्हणतात येते. देहधारणेसाठी अन्न-पाण्याची इच्छा राखावी लागेल. धर्माचरणाची इच्छा बाळगल्यावरच हे करणे शक्य होईल. देहधारणाही धर्माचरणासाठीच असायला हवी. ज्ञानी पुरुषांनाही देहधारणा करावी लागते आणि यामुळे लोकसेवेची कामे सहजी घडतात. लोकसेवेसाठी देखिल कार्ययोजना आधी आखावी लागते आणि ती इच्छा मनी धरावी लागते. ती शुध्द इच्छा भगवंताचेच स्वरुप असल्याचे जाणून घ्यावे लागते. विनोबाजीही हाच अर्थ लावतात. विनोबा म्हणतात- "देहाच्या आधाराने धर्माचरण होऊ शकते यामुळे देहधारणेची इच्छा धर्मानुकूल आहे, देहधारणही धर्ममार्गानेच व्हायला हवे."

आठव्या श्लोकात पाच, नवव्या श्लोकात चार, दहाव्या श्लोकात तीन आणि अकराव्या श्लोकात दोन अशा प्रकारे चार श्लोकांमधून एकूण चौदा विभूतींचे वर्णन आलेय.

: 12 :

***ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये।***
***मत्त एवेति तान् विध्दि न त्वहं तेषु ते मयि॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च ये सात्विका: भावा:** आणखी जे सत्वगुणापासून उत्पन्न होणारे
- **ये राजसा: च तामसा:** भावा: (आणि) रजोगुण आणि तमोगुणापासून उत्पन्न भाव आहेत
- **तान् मत्त: एव:** त्या सर्वांना तू माझ्यापासूनच उत्पन्न झालेले समज
- **इति विध्दि:** असे समज
- **तु अहं तेषु न:** पण (वास्तविक) मी त्यांच्यामध्ये नाही
- **ते मयि:** ते माझ्या अधीन आहेत

**अर्थ**

आणखीही जे सत्वगुण, रजोगुण आणि तमोगुणापासून उत्पन्न होणारे भाव आणि पदार्थ आहेत ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न होणारे आहेत असे तू समज परंतु वास्तविक पाहू जाता त्यांच्यात मी आणि माझ्यात ते नाहीत.

***माझ्यातूंनि तिन्ही झाले सात्त्विकादिक भाव ते***
***परी त्यांत न मी राहें ते चि माझ्यांत राहती।***

**विषय**

या श्लोकाने नव्या प्रकरणाची सुरुवात होत आहे. यात तीन गोष्टी आहेत. 1) सात्विक, राजसी आणि तामसी तीन भाव आहेत. 2) ते सारे ईश्वरापासून उपजलेले आहेत. 3) ईश्वराच्या अधीन हे भाव आहेत, ईश्वर त्यांच्या अधीन नाही.

**स्पष्टीकरण**

1) **ये सात्विका: राजसा: तामसा: भावा:** जगातल्या भाव वा पदार्थांना सात्विक, राजसी आणि तामसी या तीन वर्गांमध्ये वर्गीकृत करण्याचे काम कपिल महामुनींनी केले आहे. उच्च, मध्यम आणि कनिष्ठ असे तीन भेद

व्यवहारात नित्याचेच आढळतात. समस्त जड पदार्थ दगड, माती वगैरे तामसी पदार्थ निरींद्रीय वर्गात मोडतात. वृक्ष वगैरे पदार्थ ज्यांच्या ठायी चैतन्याचा काहीसा अधिक आविष्कार आढळतो त्यांचाही समावेश तामसी वा निरींद्रीय वर्गात होतो. सूर्य, चंद्र, आकाश, वायु, अग्नी, पाणी देखिल तामसी वा निरींद्रीय वर्गात येतात. ज्यांच्या ठायी इंद्रियांचे दर्शन होत नाही असे धरतीवरचे तमाम जड पदार्थ म्हणजे सारी निरींद्रीय सृष्टी तामसी म्हणजे निम्न कोटीची गणली जाते.

सेंद्रीय म्हणजे इंद्रिययुक्त जगात कीटक, पशु, पक्षी यासारखी जीवसृष्टी नांदते. त्यांच्या ठायी बुध्दी वा शक्तीचा अभाव आढळतो. त्यांची गणना मध्यम कोटीत वा राजसी वर्गात होते.

मनुष्याच्या ठायी बुध्दीशक्ती म्हणजे विवेकशक्ती नांदते. नीती-अनीती, धर्म-अधर्म या तत्त्वांची जाणीव असते. यामुळे माणसाची गणना सात्विक म्हणजे उत्तम श्रेणीत केली जाते. संपूर्ण ब्रह्मांडाचा विचार करुन हे श्रेणी विभाजन केले गेले. अर्थात् केवळ माणूस या संकल्पनेचेच वर्गीकरण करावयाचे असेल तर ते सुध्दा सात्विक, राजसी आणि तामसी अशाप्रकारे केले जाते. अशाच प्रकारे वृक्ष वर्गाचे वर्गीकरणही या तीन गटात करता येऊ शकते. पशुवर्गाचेही असे वर्गीकरण करणे शक्य आहे. गाय सात्विक, म्हैस राजसी आणि गाढव तामसी. हिंस्र पशुवर्गाचेही असे वर्गीकरण करता येऊ शकते. थोडक्यात म्हणजे या सृष्टी जगताचे तीन प्रकार होऊ शकतात.

2) **मत्तः एव इति तान् विध्दिः** सात्विक, राजसी आणि तामसी तमाम पदार्थ ईश्वरापासूनच जन्माला आले असे मानायला हवे. सांख्य तत्वचिंतकांची मान्यता आहे की त्रिगुणात्मीका जड प्रकृतीपासून जगाची निर्मिती झाली आहे. गीतेचे म्हणणे आहे की जड प्रकृती या विशाल जगताला निर्माण करु शकत नाही. घर बांधायचे असेल तर चेतनाची गरज भासते. विटा घडायच्या असतील, घट निर्मायचा असेल तर कुंभकाराची गरज भासते. कपडा विणायचा असेल तर विणकर हवा मग एवढ्या विशाल जगताची रचना-अकल्पनीय विश्वाची रचना-ज्ञानशक्ती विरहित अचेतन प्रकृती कशी काय बरे करु शकेल? अर्थात् ज्ञानस्वरुपी ईश्वरच या जगाचा निर्माता ठरतो. मुंडकोपनिषद म्हणते:

***यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च यथा***
***पृथिव्यामोषधयः सम्भवन्ति । यथा सतः पुरुषात्***
***केशलोमानि तथाऽक्षरात् सम्भवतीह विश्वम् ॥***
(1/1/7)

अर्थात् कोळी कसे घर तयार करतो? तसेच तर या धरतीवर औषधी वनस्पती आकाराला येते. कोळी आपल्या देहातूनच तंतू उपजवतो. त्याला धारण करुन घर बनवतो. माणसाला केस आणि नखे कशी लाभतात ? त्याचप्रकारे अविनाशी परमतत्वाने जगत उत्पन्न होते.

3) अहं तेषु न ते मयिः ईश्वर त्याच्या ठायी रहात नाही अर्थात् त्याच्या अधीन रहात नाही. मातीने तयार केलेला घट मातीच्याच अधीन रहातो. जे कार्य कारणामुळे घडते ते कार्य कारणाच्या अधीन असणे स्वाभाविक आहे. विश्वातील तमाम पदार्थ परमात्म्यापासून उत्पन्न होतात परिणामी सारे ब्रह्मांड ईश्वराधीन असते. परमात्मा काही ब्रह्मांडाच्या अधीन नाही याचे कारण असे की ब्रह्मांडातील तमाम पदार्थ जड असून परमात्मतत्व चैतन्यस्वरुपी आहे. चैतन्य जडाच्या अधीन नसून जड चैतन्याच्या अधीन असते. एक भले थोरले एंजिन पन्नास-साठ ताशी किलोमीटर्सच्या वेगाने धावते. अनेक प्रवाशाना व सामान-सुमानाला ओढून नेते. त्याचा साथी व निर्माता चैतन्यमय असतो. त्याला रोखणाराही चैतन्यमय असतो. तो चैतन्याच्या अधीन असतो.

: 13 :

***त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।***
***मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इदं जगत्:** हे सारे जगत
- **एभिः त्रिभिः गुणमयैः** भावैः सात्विक, राजस आणि तामस या तीन प्रकारच्या भावांनी अर्थात् राग द्वेष वगैरे विकारांनी आणि सर्व विषयांनी
- **मोहितं सत्:** मोहित होऊन राहीले आहे
- **एभ्यः परं अव्ययं मां:** या तिन्ही गुणांनी पलिकडे असणाऱ्या आणि अविनाशी परमात्म्याला
- **न अभिजानातिः** तात्त्विकपणे जाणत नाही

**अर्थ**

गुणांचे कार्य असणाऱ्या सात्विक, राजस आणि तामस या तिन्ही प्रकारच्या पदार्थांनी हे सारे जगत प्राणीसमुदाय मोहित झाले आहेत त्यामुळे या तिन्ही गुणांच्या पलिकडे असणाऱ्या अविनाशी अशा मला ते ओळखत नाही.

***ह्या गुणात्मक भावांनी विश्व मोहूनि टाकिलें***
***ज्यामुळें मी न जाणूं यें गुणातीत सनातन ।***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्यांची चर्चा आली आहे. 1) हे संपूर्ण जगत सत्व, रज आणि तम या तीन गुणानी मोहित, लुब्ध आणि आसक्त आहे. 2) या तीन गुणाच्या पार (पलिकडे) वसणाऱ्या श्रेष्ठ आणि अविनाशी अशा परम तत्वाला कुणी जाणत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **इदं जगत् एभि: त्रिभि: गुणमयै: भावै:** मोहितं सत् भगवंताने हे त्रिगुणात्मक जगत निर्माण केले आहे. त्याच्या ठायी तमाम प्राणी मोहित होऊन जातात. जगतातले सारे पदार्थ विनाशी आहेत पण या बोधाचा चित्तावर ठसा उमटत नाही. प्रभाव पडत नाही. ब्रह्मांडात दोनच पदार्थ आहेत. संपूर्ण त्रिगुणात्मक व्यक्त जगत आणि त्रिगुणात्मक जगताच्या पाठीमागचा अव्यक्त परमात्मा ईश्वर. जगत परमात्म्याचा भास आहे. घट मातीचा भास असावा, कापड सूताचा भास असावे, दागिना सोन्याचा भास असावा तसेच जगत परमात्म्याचा भास असल्यामुळे असत्य आहे तर परमात्मा सत्य आहे. असत्य वस्तुमुळे मोहित झाल्याने सत्याची ओळख होत नाही. जगत असत्यरुप असते. आपण ह्यात मोहीत होऊन जातो. यामुळे आनंदाचा अनुभव नाही घेता येत. मृगजळाने का कधी कुणाची तहान भागली ? तशाच प्रकारे जगत सत्य नसल्यामुळे त्याठायी माणूस मोहित होतो खरा, पण त्याला शांती, समाधान आणि आनंदाची प्राप्ती मात्र होत नाही. जगतातील या त्रिगुणात्मक पदार्थांपासून चित्त-मन हटले की मग वैराग्य उपजते. तुलसीदास आपल्या प्रासादिक वाणीत म्हणतात:

***ईश्वर अंस जीव अबिनासी ।***
***चेतन अमल सहज सुखरासी ॥ सो मायाबस भयउ***
***गोसाई । बँध्यो कीर मरकट की नाईं ॥***

अर्थात् जीव ईश्वराचा अंश आहे त्यामुळे अविनाशी, चैतन्यघन, निर्मळ आणि अखंड आनंदरुपी आहे पण जीव मायेच्या अधीन असल्यामुळे वानरा सारखा बध्द आहे. पुढे लिहितात :

***जड चेतनहिं ग्रंथि परि गई । जदपि मृषा छूटत***
***कठिनई ॥ तब ते जीव भयउ संसारी । छूट न ग्रंथि न***
***होइ सुखारी ॥ स्रुति पुरान बहु कहेउ उपाई । छूट न***
***अधिक अधिक अरुझाई ॥***

अर्थात् जड आणि चेतनाची गाठ पडली. ही गाठ मिथ्या असली तरी सोडवायला अवघड आहे. जेव्हापासून ही गाठ पडली ना तेव्हापासून जीव प्रापंचिक बनून गेला आहे. ही गाठ काही सुटत नाही आणि जीव काही सुखी होत नाही. श्रुती आणि पुराणातून यासाठी अनेक उपायांची चर्चा आली आहे पण ही गाठ सुटण्याऐवजी अधिकाधिक घट्ट होत चालली आहे.

***जीव हृदयँ तम मोह बिसेषी । ग्रंथि छूट किमि परइ न***
***देखी ॥ अस संजोग ईस जब करई । तबहुँ कदाचित सो***
***निरुअरई ॥***

अर्थात् जीवमात्राच्या हृदयात मोहरुपी अंध:कार विशेष रुपात आढळतो. यामुळे मोहांधकारामुळे त्याला ही गाठ दिसत नाही, गाठ जर दिसतच नाही तर ती उकलायचे कारणच काय? उपायच काय? परमेश्वराची कृपा झाली तर मात्र ही गाठ कदाचित उकलू शकेल.

तमाम जीव चैतन्यरुपी आहेत आणि जगतातील सारे पदार्थ जडस्वरुपी आहेत पण गाठ जड आणि चेतन यांचीच पडली आहे. खरे पाहू गेल्यास जड व चेतन यांची गाठ कदापि पडायला नको, पडू शकत नाही. यामुळे जड व चेतनाच्या या गाठीला मिथ्यारुपी मानायचे पण मिथ्यास्वरुपी असली तरी या गाठीला उकलणे-सोडवणे खूप अवघड होऊन बसले आहे. गाठ जेव्हापासून पडली तेव्हापासून आपण सारे प्रपंचात फसून गेलो आहोत. गाठ उकलली तर सुखी होऊ पण गाठ काही उकलत नाही आणि आपण काही सुखी होत नाही. या गाठीला उकलण्याचे खूप सारे उपाय वर्णिले आहेत पण उपाय करु जाता गाठ अधिक घट्ट (पक्की) होत जाते, अधिक मजबूत होत जाते. अशा परिस्थितीत जीवनात मोहरुपी अंधकार

अधिक गडदपणे दाटून येतो. या मोहांधकारामुळे या जड चेतनाच्या गाठीला आपण बघू शकत नाही. आपल्याला जर ही गाठ बघताच येत नाही. गाठ दिसूच शकत नाही तर गाठ उकलावी कशी ? गाठीची सोडवणूक करावी कशी ? अशा बिकट परिस्थितीत उपाय एकच आणि तो म्हणजे ईशकृपा. ईश्वरी कृपेमुळे ही गाठ उकलण्याची शक्यता आहे. ईशकृपेशिवाय या गाठीची सोडवणूक करणे अशक्य !

2) **एभ्य: परं अव्ययं मां न अभिजानाति:** त्रिगुणात्मक पदार्थावर जीव मोहित होतो परिणामी त्याला अविनाशी परमतत्वाचे ज्ञान होत नाही. आपण जेव्हा घटावर मोहित होतो तेव्हा माती मिथ्या ठरते. जेवढेही घट आहेत ते सारे मातीचेच आहेत त्यांच्या आकारात अंतर आहे एवढाच काय तो फरक, हा विवेक काही शिल्लक उरत नाही. सुवर्णाचे नाना अलंकार आकाराला येतात पण त्यातल्या सुंदर आकाराच्या अलंकारावर आपण मोहित होतो. खरे तर मोहित व्हायचेच असेल तर सुवर्णावर व्हायला हवे, अलंकारांवर नव्हे! भगवंताचे म्हणणे असे की पदार्थांवर मोहित झाल्यामुळे त्या पदार्थांच्या अंतरंगी वसणारे अविनाशी तत्व आणि पदार्थाच्या पार वसणारे जे ईश्वरतत्व आहे त्याचा परिचय होत नाही- होणार नाही. सारांश असा की परमेश्वराला जर जाणून घ्यावयाचे असेल तर पंचविषयांचा मोह त्यजायला हवा. संत तुलसीदास लिहितात :

***बिनु सतसंग न हरि कथा, तेहि बिनु मोह न भाग।***
***मोह गये बिनु राम पद, होइ न दृढ अनुराग॥***

अर्थात् सत्संगतीशिवाय हरिकथेवर प्रीत जडत नाही, विषयांची आसक्ती सुटत नाही. जोवर मोह गळून पडत नाही तोवर रामचरणी दृढ अनुराग उत्पन्न होऊ शकत नाही.

: 14 :

***दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।***
***मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- हि एषा मम: कारण की ही माझी
- दैवी गुणमयी माया: अति अद्भुत त्रिगुणमयी योगमाया
- दुरत्यया (अस्ति): ओलांडणे खूप कठीण आहे
- मां एव ये: मलाच जे पुरुष
- प्रपद्यन्ते: निरंतर भजतात, आश्रय घेतात
- ते एतां मायां: ते या मायेला
- तरन्ति: तरुन जातात म्हणजे संसाररुपी सागरातून तरुन जातात

**अर्थ**

कारण की ही अलौकिक अर्थात् अति अद्भुत त्रिगुणात्मक माझी माया पार करणे अवघड आहे परंतु जे केवळ मलाच भजतात ते या मायेला ओलांडून जातात म्हणजे संसार तरुन जातात.

***माझी ही त्रिगुणी दैवी माया न तरवे कुणा***
***कासेस लागले माझ्या ते चि जाती तरुनियां।***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्यांची चर्चा आली आहे. 1) भगवंताची माया शक्ती दिव्य म्हणजे अलौकिक आहे. या मायेला पार उतरणे-जिंकून घेणे खूप दुरापास्त आहे. 2) मायाशक्ती सत्व, रज आणि तम या गुणांनी युक्त आहे. जे परमतत्वाला शरण गेले आहेत आणि या तत्वालाच सर्वस्व मानून जगतात तेच या दुस्तर मायेला पार उतरु शकतात.

**स्पष्टीकरण**

1) **एषा मम दैवी गुणमयी माया दुरत्यया अस्ति:** भगवंताच्या अलौकिक अशा माया शक्तीचा थांग प्राप्त करुन घेणे कमालीचे कठिण आहे. परमात्म्याच्या दोन शक्ती आहेत चैतन्य शक्ती आणि सर्ग शक्ती. माया शक्तीच्या संदर्भात ब्रह्मसूत्र भाष्यात शंकराचार्यांनी सांगितले आहे:

*सर्वज्ञस्य ईश्वरस्य आत्मभूत: इव अविद्याकल्पितेन नामरुपे तत्त्वान्यत्वाभ्यां अनिर्वचनीये संसारप्रपंचबीजभूते सर्वज्ञस्य ईश्वरस्य माया प्रकृति: शक्ति: इति श्रुतिस्मृत्यो: अभिलप्येते।*

अर्थात् सर्वज्ञ ईश्वराशी जणू काही जे एकरुपच आहे, अज्ञानाने यथार्थ मानले गेलेले नाम रुप ज्यात बीजरुपात वसतात. 'परमात्म्याहून भिन्न आहे अथवा अभिन्न आहे' याचे वर्णन शब्दात करता न आल्यामुळे जे अनिर्वचनीय आहे. संसार रुपी प्रपंचासाठी जे बीजरुप आणि सर्वज्ञ ईश्वर आहे. त्याची ही माया किंवा प्रकृती किंवा शक्ती आहे. हे विवेचन श्रुती आणि स्मृतीत आलेले आहे.

ही माया शक्ती जणू काही सर्वज्ञ ईश्वराशी एकरुप आहे. हे नाम रुपात्मक जगत आहे. हे आरंभी मायेच्या ठायी अव्यक्त अशा बीजाच्या रुपात वसलेले आहे. माया परम तत्वाहून भिन्न आहे की अभिन्न हे शब्दांनी सांगता येणे अवघड आहे, याचे कारण असे की अज्ञानावस्थेत माया सत्यरुपिणी वाटते यामुळेच तर ईश्वराहून भिन्न वाटते. अज्ञानावस्थेत मायेचा प्रभाव सुरु असतो त्यामुळे ही माया जणु काही ईश्वराप्रमाणे एक स्वतंत्र वस्तु वाटते पण ज्ञानावस्थेत मात्र मायेचा प्रभाव काही चालत नाही तो आटून जातो. माया गायब होते. ज्ञानावस्थेत सारे काही परमात्ममय बनून जाते. सर्वत्र ईशतत्व नांदते. यामुळे परमतत्वाला मायेहून भिन्नही सांगता येत नाही. जगत आणि प्रपंचासाठी हे बीजभूत आहे. सर्वज्ञ ईश्वराच्या या अलौकिक शक्तीला माया, प्रकृती, शक्ती अशा विविध नावानी श्रुती आणि स्मृतीत वर्णिले आहे.

ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात मायेविषयी एके ठिकाणी निवेदन येते:

*अविद्यात्मिका हि बीजशक्ति: अव्यक्तशब्दनिर्देश्या परमेश्वराश्रया मायामयी महासुप्ति: यस्यां स्वरुपप्रतिबोधरहिता: शेरते संसारिण: जीवा:*

अर्थात् या जगताची वा प्रपंचाची बीजशक्ती अविद्यात्मक म्हणजे अज्ञानमूलक आहे. याचा निर्देश 'अव्यक्त' या शब्दाने केला गेला आहे. ही परमेश्वराच्या आश्रयाने रहाते. ही मायामय आहे. (माया म्हणजे जे नाही ते प्रकटवणे आणि आहे ते लपवणे होय) ही महानिद्रा आहे. परमात्मतत्वाचे स्वरुप न जाणणारे प्रापंचिक जीव या महानिद्रेत झोपी जातात.

तुलसीदास म्हणतात: हरि माया दुस्तर तरि न जाइ बिहँगेस।

अर्थात् हे पक्षीराज गरुडा, हरीची माया अतिदुस्तर म्हणजे पार करता येणे अशक्य आहे. या मायेला कुणी पार करु शकत नाही.

ते परत म्हणतात:

*ग्यानी भगत सिरोमनि त्रिभुवनपति कर जान।*
*ताहि मोह माया नर पावँर करहिं गुमान॥*

अर्थात् ज्ञानवंतामधील श्रेष्ठ वा भक्तामधला शिरोमणी का असेना हे सारे मायेपुढे हतप्रभ आहेत. मायेने याना हरवले, फसवले आहे तरी लोक अभिमान धारण करतात.

**तुलसीदास म्हणतात:**

*सिव बिरंचि कहुँ मोहइ, को है बपुरा आन।*
*अस जियँ जानि भजहिं मुनि, मायापति भगवान॥*

अर्थात् शंकर, ब्रह्मदेव सारख्या सर्वशक्तीमान देवतांनाही मायेने मोहित केले आहे मग सर्वसामान्य जनांची तर बातच काय? मायेचे हे सामर्थ्य-प्रबळपण-ध्यानी घेऊन समस्त मुनिगण मायापती ईश्वराची रात्रंदिवस भक्ती करतात.

2) ये मां एव प्रपद्यन्ते ते एतां माया तरन्ति - ईश्वराला शरण जाणारे मायेला पार करु शकतात. हा भक्तीचा अध्याय आहे. मायेला तरुन जाण्यासाठी एक साधा-सरळ तरीही परिणामकारक असा उपाय भक्ती आहे. गीतेतला 'माया' शब्द सर्वप्रथम या अध्यायात इथे भेटतो. तुलसीदास रामरायाचे परमभक्त होते. त्यांच्या रामायणातून एकमात्र भक्ती तत्वालाच परम श्रेष्ठ मानले गेले आहे. भक्तीच्या पुढे सारे काही तुच्छ आहे. गीतेनेही सुलभ उपाय म्हणून भक्ती तत्वालाच श्रेष्ठ मानलेय. भक्ती हा गीतेचा सारांश आहे. गीतेत परमेश्वर प्राप्तीच्या नानाविध साधनांची चर्चा आलीय. सर्वांमध्ये समन्वय साधण्याचा दृष्टीकोण आलाय. तरीसुध्दा भक्तीला सर्व साधनांमध्ये श्रेष्ठ मानले आहे. तुलसीदास म्हणतात :

*हरि मायाकृत दोष गुन, बिनु हरिभजन न जाहिं।*
*भजिय राम तजि काम सब, अस बिचारि मन मांहिं॥*

अर्थात् माया हरीची आहे. तिच्या ठायी गुण-दोष आहेत. हरीभजनाशिवाय दोष दूर होऊ शकणार नाहीत. यामुळे मनाच्या तमाम कामना त्यजून रामभजन करावे.

**पुढे तुलसीदास म्हणतात :**

*सुर नर मुनि कोउ नाहिं, जेहि न मोह माया प्रबल।*
*अस बिचारि मन माँहिं, भजिय महामायापतिहि॥*

अर्थात् सुर, नर, मुनी या सर्वांसाठीच माया प्रबळ ठरते. मनाच्या ठायी आहे. मायेचे प्राबल्य जाणून महामायापती ईश्वराची भक्ती करायला हवी.

पुढे लिहितात: भगतिहि सानुकूल रघुराया। तातें तेहि डरपति अति माया॥

अर्थात् भक्ती ही ईश्वराला अनुकूल म्हणजे प्रिय आहे. यामुळे माया नेहमी भक्तीला भिऊन असते.

एके ठिकाणी तुलसीदास लिहितात:

*राम भगति निरुपम निरुपाधी। बसइ जासु उर सदा अबाधी॥ तेहि बिलोकि माया सकुचाई। कहि न सकइ कछु निज प्रभुताई॥ अस बिचारि जे मुनि बिग्यानी। जाचहिं भगति सकल सुख खानी॥*

अर्थात् ज्यांच्या अंत:करणात निरुपमेय अशी-निरुपाधिक अशी-रामभक्ती अखंडपणे अबाधितपणे वसते त्याना बघून मायेला खूप संकोच होतो. अशा रामभक्तांवर मायेला आपले प्रभुत्व स्थापित करता येत नाही. असा विचार करुन जे विज्ञानयुक्त म्हणजे सुज्ञजन आहेत ते सर्वसुखांची खाण अशा भक्तीची याचना करतात, भक्तीला चाहतात.

**पुढे तुलसीदास लिहितात :**

*सबकर फल हरि भगति सुहाई। सो बिनु संत न काहूँ पाई॥ अस बिचारि जोइ कर सतसंगा। रामभगति तेहि सुलभ बिहंगा॥*

अर्थात् तमाम साधनेचा सारांश हरीभक्ती आहे पण ही भक्ती संत-संगतीशिवाय साधता येत नाही. असा विचार करुन जे जन संत संगती आचरतात, त्यांना सुलभपणे रामभक्ती लाधते.

: 15 :

*न मां दुष्कृतिनो मूढा: प्रपद्यन्ते नराधमा:।*
*माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिता:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दुष्कृतिन:** दुराचरणी, दुष्कर्म करणारे (असे)
- **मूढा:** अविवेकी, मूढ लोक
- **मायया अपहृतज्ञाना:** मायेच्या अधीन झाल्यामुळे ज्यांचे ज्ञान हरपले आहेत (असे)
- **आसुरं भावं आश्रिता:** आसुरी स्वभाव धारण केलेले
- **नराधमा:** असे जे मनुष्यांमध्ये नीच आहेत
- **मां न प्रपद्यन्ते:** मला भजत नाहीत, माझ्या शरणी येत नाहीत

**अर्थ**

मायेने ज्यांचे ज्ञान हिरावून घेतले आहे, असे आसुरी स्वभावाचे, मनुष्यात नीच असणारे, दुष्ट कर्मे करणारे मूर्ख लोक मला भजत नाहीत.

*हीन मूढ दुराचारी माझा आश्रय सोडिती*
*मायेनें भ्रांत होऊनि आसुरी भाव जोडिती।*

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट भगवंताने सांगितली आहे की दुराचरणी - अविवेकी जन कदापि मला शरण येत नाही. दुराचरणात गढून गेलेल्या पुरुषासाठी गीतेने पाच विशेषणे (खरे म्हणजे दुशेषणे) दिली आहेत. 1) दुष्कृतिन: अधम म्हणजे वाईट आचरण करणारे दुराचारी 2) मूढा: म्हणजे अविवेकी 3) नराधमा: म्हणजे नीच 4) मायया अपहृतज्ञाना: मायेच्या अधीन झाल्यामुळे ज्यांचे ज्ञान अपहृत झालेले म्हणजे ज्ञान नष्ट झाले आहे असे 5) आसुरं भावं आश्रिता: असुर भावाश्रित म्हणजे ज्यांनी आसुरी भावांचा आश्रय घेतला आहे असे. या पाच

अवगुणी जनांपाशी पाच प्रकारची दुर्गुण विपत्ती असते, असे जन कदापि ईश्वर शरणागती पत्करत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **दुष्कृती:** दुष्कृतीजन पापाचरणी असतात. ते पापकर्मात तल्लीन असतात. सोळाव्या श्लोकात भक्तीसाठी 'सुकृती' हा शब्द आला आहे. सुकृती जन म्हणजे पुण्यकर्म आचरणारे जन. पाप कर्मात लिप्त लोक परमेश्वराकडे वळू शकत नाहीत याचे कारण असे की पापकर्म आत्यंतिक आसक्तीभरले कार्य आहे. ज्यांच्या ठायी सामान्य देहासक्ती वसते ते पापभीरु असतात. ते पापाला भितात. ते ठरवून काही-योजून काही-पाप कर्मात-पापकर्म पंकात-फसत नसतात. नकळत वा कुसंगतीच्या दबावाने पापकर्माची प्रेरणा जागली तरी त्याना अखेरीस त्याचा अतिशय पश्चात्ताप वाटतो. पूर्वजन्मी चांगले-शुभ-संस्कार नसल्यामुळे बाळपणी जे कुमार्गगामी होतात ते पापकर्मपंकात बुडून जातात असे जन 'दुष्कृती' होत.

2) **मूढा:** मूढ म्हणजे अविवेकी. मूढपणा पशु-पक्ष्यांचे लक्षण आहे. त्यांच्या ठायी विवेक नसतो. त्यांच्या तमाम क्रिया अविवेक भरल्या असतात. नीती-अनिती, धर्म-अधर्म, कर्तव्य-अकर्तव्य, कार्य-अकार्य, योग्य-अयोग्य, सत्य-असत्याच्या निर्णयाची शक्ती-विवेक पशु-पक्ष्यांमध्ये नसतो. ही शक्ती केवळ मनुष्यमात्राच्या ठायी वसते. माणसाच्या ठायीसुध्दा बालपणी ही शक्ती अविकसित रुपात असते. वयासोबत ही शक्ती कमी-अधिक प्रमाणात वाढते. माता-पिता विवेकी असले तर त्यांच्या संततीवर विवेक शक्तीचा परिणाम आढळून येतो. सत्संगतीमुळे विवेक शक्ती वाढते. सूक्ष्म होत जाते. गांधीजींच्या प्रत्येक क्रियेत सूक्ष्म विवेक आढळतो. महापुरुषांच्या ठायी अत्यंत निर्मळ, सूक्ष्म अन् प्रतिभासंपन्न असा विवेक नांदतो. ज्यांच्या ठायी ही विवेक शक्ती जागृत वा विकसित नसते ते मूढजन होत. मूढता एक प्रकारची मूर्च्छावस्थाच आहे. अविवेकाच्या ठायी राग-द्वेष म्हणजे काम, क्रोध वगैरे विकार प्रबळ असतात असे जाणायला हवे !

3) **नराधमा:** नराधम म्हणजे माणसातले निकृष्ट लोक! यांच्या ठायी दुर्गुणच वस्तीला असतात. सद्गुणांमध्ये वृध्दी व्हावी यासाठी नरदेह लाभला आहे पण बालपणापासून ज्यांचे दुर्गुणांकडे आकर्षण असते ते दुर्गुणांचीच साथ-संगत करतात-मनाला जो रंग द्याल त्या रंगात रंगून जाणे हा मनाचा स्वभाव आहे. यामुळे बाळपणी कुसंगतीपासून वाचणे आवश्यक आहे. तुलसीदास लिहितात: को न कुसंगति पाइ नसाई। म्हणजे कुसंगतीत पडल्यावर कोण बरे नष्ट होत नाही? 'पापाचरण, अविवेक आणि दुर्गुण ज्यांच्या ठायी वसतात ते नराधम' म्हणवले जातात.

4) **मायया अपहृतज्ञाना:** काहींचे ज्ञान मायेने झाकले जाते. मायाधीन झाल्याने त्यांच्या ठायी अज्ञानच वसते. अज्ञान नष्ट करण्यासाठी मायेच्या स्वाधीन न होता मायेपासून अलिप्त असे आचरण असायला हवे पण नाना प्रकारच्या प्रलोभनांनी मोहित असे जन मायाजाळात फसून जातात.

5) **आसुरं भावं आश्रिता:** आसुरी भाव धारण करणारे म्हणजे संपत्तीचा आश्रय घेणारे. सोळाव्या अध्यायात आसुरी संपत्तीचे वर्णन येते. तुलसीदासांनी 'रामचरितमानस' या महाकाव्याच्या उत्तरकांडात याचे वर्णन केले आहे. आधी संतांचे गुणवर्णन आहे मग दुर्जनांचे वर्णन येते. या प्रदीर्घ वर्णनात एका दोह्यात ते लिहितात :

*पर द्रोही पर दार रत, पर धन पर अपबाद।*
*ते नर पाँवर पापमय, देह धरें मनुजात॥*

अर्थात् दुसऱ्यांशी सदैव द्रोह करणारे, व्यभिचारी, चोर, निंदक हे महानीच होत, याना मानवी रुपधारी राक्षस मानायला हवे.

**एके ठिकाणी ते लिहितात:**

*काम क्रोध मद लोभ रत, गृहासक्त दुखरुप।*
*ते किमि जानहिं रघुपतिहि, मूढ परे तम कूप॥*

अर्थात् काम, क्रोध, मद, लोभ वगैरे विकारांमध्ये लिप्त अशा दु:खदायक, घर-संतान वगैरेंच्या आसक्तीत गुंतलेले मूढजन परमेश्वराला कसे बरे जाणू शकतील?

अशा प्रकारे उपरोक्त पाच दोषांनी लिप्त जन कदापी ईश्वर शरणागती स्वीकारत नाही.

: 16 :

***चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।***
***आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुनः** हे अर्जुना
- **चतुर्विधाः सुकृतिनः जनाः** चार प्रकारचे पुण्यशील भक्त जन
- **मां भजन्तेः** मला भजतात, माझी भक्ती करतात
- **भरतर्षभः**हे भरतवंशी पुरुषात श्रेष्ठ (अशा)अर्जुना
- **आर्तः** संकटाचे निवारण व्हावे यासाठी व्याकुळ चित्ताने परमात्म्यासाठी (धावा करणारा)
- **जिज्ञासुः** मला यथार्थरुपाने जाणता यावे यासाठी भजणारा, भक्ती करणारा
- **अर्थार्थीः** विश्वकल्याणाची इच्छा बाळगून चिंता करत सेवारत (प्रापंचिक स्वार्थासाठी भजणारा)
- **च ज्ञानीः** आणि पूर्णज्ञानी, सिध्द पुरुष, निष्काम पुरुष

**अर्थ**

हे भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना, उत्तम कर्मे करणारे अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू आणि ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त मला भजतात, माझी भक्ती करतात.

***भक्त चौघे सदाचारी भजती मज अर्जुना***
***ज्ञानी तसे चि जिज्ञासु हितार्थी आणि विह्वल।***

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टींची चर्चा आली आहे त्या अशा आहेत. 1) पुढील सुकृती म्हणजे पुण्यासाठी चार प्रकारचे भक्त माझी भक्ती करतात म्हणजे मला शरण येतात. 2) पहिला भक्त आहे आर्त म्हणजे व्याकुळ. 3) जिज्ञासु म्हणजे परमात्म्याच्या प्राप्तीसाठी जिज्ञासु 4) अर्थार्थी म्हणजे निष्काम जनसेवेद्वारे परमात्म्याच्या प्राप्तीसाठी इच्छुक. 5) ज्ञानी म्हणजे साधना करुन परमात्म ज्ञानप्राप्त सिध्द पुरुष

**स्पष्टीकरण**

1) **चतुर्विधाः सुकृतिनः जनाः** मां भजन्ते चार प्रकारे पुण्याचरण करणारे जन ईश्वरभक्ती करतात. मागील श्लोकात दुष्कृती म्हणजे दुराचारी शब्द आला आहे. या श्लोकात सुकृती म्हणजे सदाचारी, पुण्याचरण करणारे हा शब्द आला आहे. या जगात पाप-पुण्य, नीती-अनीती, धर्म-अधर्म दोन्ही तत्वे आहेत. नीती, पुण्य आणि धर्माचा मार्ग ईश्वराकडे नेतो. अनीती, पाप आणि अधर्माचा मार्ग चित्ताची अशुध्दी वाढवतो आणि मायेच्या बंधनात जखडून टाकतो. अशा प्रकारे उन्नती आणि अवनती असे दोन मार्ग प्रचारात आहेत. कुठल्या मार्गाने चालावे- कुठली वाट स्वीकारावी- याबाबत प्रत्येक जण स्वतंत्र आहे. ही ज्याची-त्याची निवड आहे. कुमार्गगामी कदापि ईश्वर शरणी येत नाहीत. सन्मार्गगामी अखंडपणे सत्संगतीत रहातात, ते कधी-ना-कधी परमात्म जागरण झाल्यावर भगवंताच्या शरणी पोहोचू शकतात. परमात्म भक्ती करण्यापूर्वी आचरण शुध्द असायला हवे.

2) **आर्तः** भगवत् प्राप्तीसाठी जे आत्यंतिक व्याकुळ असतात त्याना आर्त भक्त असे म्हणतात. सत्कर्म आचरत असताना काम, क्रोध, अहंकार वगैरे विकार क्षीण होऊ लागतात त्यावेळी चित्ताच्या ठायी वैराग्य सूर्याचा उदय होऊ लागतो. वैराग्यामुळे चित्तवृत्ती अंतर्मुखी होऊ लागतात. चित्ताच्या ठायी एक अद्भुत वस्तु नांदते त्या वस्तुचे भान प्रत्येकाला नसते. सत्संगती आचरताना सत्कर्मे करणे, सद्गुणांचा विकास करणे असा जर स्वभाव बनून गेला ना तर मग मनाच्या ठायी जागृती उत्पन्न होते आणि या परमात्मरुपी अद्भुत वस्तुकडे मन आकृष्ट होते आणि मग भावनाप्रधान चित्तदशा असणाऱ्यांना परमात्म स्वरुपाची ओळख करुन घ्यायची-परमात्मस्वरुप जाणून घ्यायची व्याकुळता जागते. भावनाशील वृत्तीमुळे अशी व्याकुळता उत्पन्न होते. यामुळेच अशा भक्तांना 'आर्त' म्हटले जाते. आर्त भक्ताचे चित्त कोमल असते. परमात्मस्मरण होताच त्याच्या मनी भावना जागून अश्रु वाहू लागतात. आपत् समयी-संकटसमयी तो ईश्वराचीच आठवण करतो. बालकाचा आधार जशी आई असते त्याचप्रकारे त्याच्यासाठी एकमेव ईश्वराचाच आधार असतो. जगातली प्रत्येक हालचाल ईश्वरेच्छेनेच होते अशी त्याच्या मनी दृढ आस्था असते. काही दुर्घटना घडली तरी ईश्वरेच्छा म्हणून तिचा तो स्वीकार करतो. दीर्घकालीन आजार आला तर याशिवाय आपल्या हातून ईशस्मरण घडले नसते असे तो मानतो. आजारपणात मन बाह्य विषयांपासून दूर

होते आणि जगत् असार वाटू लागते. गीतेसारख्या आदि तत्वज्ञानाचा अभ्यास करण्याकामी रुची वाढते-आवड वाटते. नामस्मरण सपाटून सुरु होते. ध्यानवृत्ती जागते. आजार आला की आहार-विहारावर नियंत्रण आले. निसर्गोपचाराचे ज्ञान झाले. आजारातून मुक्त होण्याचा अनुभव जागला. अशा प्रकारे आजारपणातही ईश्वर मला शिकवू बघत आहे. आर्त भक्त आजारपणालाही ईश्वरी अनुग्रह मानतो. मनी अभिमान वाटू देत नाही. प्रत्येक क्रिया ईश्वरी प्रेरणेने नियंत्रित आहे असा अनुभव घेऊन जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. भगवंतासाठी वेडा झाल्यामुळे आर्तभक्ताचा अहंभाव ईश्वर टिकू देत नाही. तुलसीदासजी लिहितात :

***सुनहु रामकर सहज सुभाऊ। जन अभिमान न राखहिं काऊ॥ संसृति मूल सूलप्रद नाना। सकल सोकदायक अभिमाना॥***

अर्थात् हे गरुडा ऐक, रामरायाचा हा सहज-स्वाभाविक असा स्वभाव आहे की तो भक्ताचा अहंकार कदापि टिकू देत नाही. याचे कारण असे की अहंकार प्रपंचाचे मूळ आहे. ते दुःखप्रद आणि शोकाचे कारण आहे.

***ताते करहिं कृपानिधि दूरी।***
***सेवक पर ममता अति भूरी॥ जिमि सिसु तन ब्रन होइ गोसाईं। मातु चिराव कठिन की नाईं॥***

अर्थात् यामुळे कृपेचा सागर असा ईश्वर भगवंताचा अहंकार दूर करतो. याचे कारण असे की भक्तावर भगवंताची आत्यंतिक कृपा असते. बालकाच्या अंगावरील गळूला आई निर्दयपणे चिरा देते.

***जदपि प्रथम दुःख पावइ, रोवइ बाल अधीर।***
***व्याधि नास हित जननी गनति, न सो सिसु पीर॥***

अर्थात् यामुळे आरंभी तर बालक विव्हळते, अधीरपणे रडायला लागते पण बालकाचा आजार यामुळे दूर होईल या भावनेने बालकाला होणाऱ्या वेदनांकडे आई लक्ष देत नाही.

***तिमि रघुपति निज दास कर, हरहिं मान हित लागि।***
***तुलसिदास ऐसे प्रभुहिं, कस न भजसि भ्रम त्यागि ॥***

अर्थात् अशाच प्रकारे रघुपती भक्ताच्या हितासाठी त्याचा अभिमान हरतात. तुलसीदास म्हणतात की समस्त प्रकारच्या भ्रांतींचा त्याग करुन अशा ईश्वराची भक्ती का नाही करत ?

3) दुसरा भक्त आहे जिज्ञासू. हा भक्त व्याकुळ नसतो. बुध्दीद्वारे ईश्वराला जाणून घ्यायचा प्रयत्न करतो. हा भावुक नसतो. हा ईश्वराला श्रध्देने नव्हे तर बुध्दी म्हणजे तर्काच्या कसोटीवर पारखून ग्रहण करतो-स्वीकारतो. आर्त भक्ताला तत्वचिंतनाच्या अध्ययनाच्या बैठकीची गरज नसते पण जिज्ञासू भक्त तत्वज्ञानाचे अध्ययन करतो. ब्रह्मसूत्र-शांकरभाष्याचे अध्ययन करतो. याचे कारण असे की शंकराचार्यांनी तर्काधारे पिंड-ब्रह्मांडात परमात्मा वसतो हे सिध्द करायचा प्रयत्न केला. हे तर्क अनुभवी साधकांच्या वचनाच्या आधारे त्यांनी मांडले आहेत. बुध्दीच्या सोबतच श्रध्दा असायला हवी हा आग्रह त्यांच्या मनात असतो. कुठल्याही गोष्टीला केवळ श्रध्देच्या आधारे स्वीकारायला त्यांचे मन तयार नसते. ते प्रत्येक प्रश्नाला तत्वज्ञानाच्या बैठकीवर तोलून बघतात. दरेक वस्तुला जिज्ञासेने पारखण्याचे त्यांचे मन असते. त्यांचे चित्त प्रपंचातून हटल्यामुळे त्यांच्या चित्तात दृढ वैराग्य जागलेले असते पण परमेश्वराला जाणून घेण्यासाठी चित्तात व्याकुळता न उपजू देता त्यांच्या मनी जिज्ञासा दाटून वसलेली असते. अर्थात आर्त भक्तासारखी श्रध्दा काही त्यांचा जीवनाधार नसतो. बुध्दीशी श्रध्देचा आणि श्रध्देशी बुध्दीचा संयोग झाला तर बुध्दीला श्रध्देचे पाठबळ लाभते आणि श्रध्देला बुध्दी तत्वाचा लाभ होतो पण इथे ज्या भक्ताची चर्चा चालली आहे. ती सारे एकांगी आहे. एका भक्ताच्या ठायी एकच गुण दिसतो. आर्त भक्त भक्तीमार्गावर आणि जिज्ञासू भक्त ज्ञानमार्गावर चालतोय असे म्हणता येऊ शकेल. आर्त भक्ताचा आधार श्रध्दा असल्यामुळे त्याची वृत्ती भक्तिप्रधान असते. जिज्ञासू भक्ताची वृत्ती ज्ञानप्रधान असते. तुलसीदास म्हणतात :

***ग्यान पंथ कृपान कै धारा। परत खगेस होइ नहिं बारा॥***
***जो निर्बिघ्न पंथ निरबहई। सो कैवल्य परम पद लहई॥***

अर्थात् ज्ञानाचा पथ खड्गाच्या धारेसारखा तीक्ष्ण आहे. या धारेवर चालताना निसटून जायला कितीसा वेळ लागणार ? या मार्गावरुन निर्विघ्नपणे पार उतरता आले तर मोक्षलाभ अवश्य आहे.

***अति दुर्लभ कैवल्य परम पद। संत पुरान निगम आगम बद॥ राम भजत सोइ मुकुति गोसाईं। अनइच्छित आवइ बरिआईं॥***

अर्थात् मोक्षपद हे कमालीचे दुर्लभ आहे असे मत संतजन, पुराणे, वेद, श्रुती म्हणजे उपनिषदे या सर्वांचेच आहे पण राम भक्ताला ही मोक्षप्राप्ती इच्छा नसतानाही अनायासे लाभते. एकूणच भक्ती मार्ग साधा-सोपा तर ज्ञानमार्ग अवघड-कठिण आहे.

4) तिसरा भक्त अर्थार्थी जनकल्याणासाठी सेवारत असताना परमात्म प्राप्तीची इच्छा बाळगणारा भक्त. अर्थार्थी भक्ताला रात्रंदिवस जनकल्याणाची चिंता लागून राहिलेली असते. हा सेवापरायण भक्त जनसेवेच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती चाहतो. त्याला जनतेत जनार्दन दिसतो. तो जनसेवा हीच ईश्वरसेवा मानतो. भगवंताचे दर्शन तर अखेरीस भगवत् कृपेनेच होते. भगवत्कृपा कशी व्हावी हा मुख्य प्रश्न आहे. जनसेवापरायण भक्ताच्या चित्तात हा भाव ठामपणे वसलेला असतो की जनता जनार्दनाची निष्काम भावनेने सेवा घडली तर काम-क्रोध वगैरे विकार क्षीण होऊन जातील. यामुळे चित्तशुध्दी होईल आणि ईश्वराची कृपा संपादन करता येईल. भगवत्दर्शन होईल. यामुळे या भक्ताच्या मनात परमात्म दर्शन वा परमात्म ज्ञानविषयक ना व्याकुळ भाव असतो ना जिज्ञासा. त्याच्या मनी एकच एक इच्छा वसते की निष्काम भावनेने जनसेवा घडो. हनुमान अखंड सेवापरायण रहात असत. गांधीजी सुध्दा सेवापरायण भक्त होते. अंतरी ईश्वर शरणागत भाव आणि बाहेर जनसेवा हा गांधीजीचा जीवन मंत्र होता. अर्थार्थी भक्त सकाम सेवा नाही करत. सेवा करता-करता परमात्म ज्ञान प्राप्त करुन घेण्याच्या इच्छेमुळे तो सकाम राहू शकत नाही. सकामता आली की परमात्म ज्ञान नाही प्राप्त होऊ शकत. सकाम सेवा करणारे सेवापरायण असले तरी निष्काम नसल्यामुळे त्याना अर्थार्थी भक्त म्हणता येत नाही. निष्कामता अर्थार्थी भक्ताचे पहिले लक्षण होय. हाच कर्मयोगमार्ग आहे.

5) चौथा भक्त ज्ञानी. हा परिपूर्ण भक्त असतो. आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी हे तिन्ही भक्त एकांगी असून ज्ञानी हा परिपूर्ण भक्त होय. तिन्ही भक्तांचा संगम ज्ञानी भक्ताच्या ठायी होतो. अंतरंगात आर्ताची भक्ती म्हणजे परमात्म्याप्रती प्रेम वसते. जिज्ञासूची जिज्ञासा तर अर्थार्थीचा निष्काम कर्मयोग असतो. ज्ञानी भक्त या तिन्ही तत्वानी संपन्न असतो. ज्ञानी भक्ताच्या ठायी ज्ञान, कर्म, भक्ती या तिघांचा संगम नांदतो. अवतारी पुरुषांच्या ठायी प्राय: तिघांचा संगम असतो. श्रीकृष्ण सेवामूर्ती होते यामुळे कर्म तर त्यांच्या ठायी होतेच. ज्ञानी तर ते होतेच होते. गीतेच्या रुपात त्यांनी अर्जुनाला निमित्त करुन अमृत अर्पिले. ते भक्त होते. त्यांच्या ठायी पराकोटीची विनम्रता होती. प्रभु रामरायाच्या ठायीही हे तिन्ही सद्गुण होते. अर्थात् कुणाच्या ठायी ज्ञानवृत्ती प्रधान तर कुणाच्या ठायी भक्ती प्रधान तर कुणाच्या ठायी सेवावृत्ती म्हणजे कर्मप्रधान दिसून येते. गांधीजींच्या ठायी या तिन्ही गुणांचा सुमेळ होता. विनोबांच्या ठायीही या तिन्ही गोष्टी नांदल्यात. विनोबांची वृत्ती ज्ञानप्रधान होती. तिथे ज्ञानवृत्तीचा उत्कर्ष दिसतो. कुठल्या संत वा परमेश्वराचे नाव घेताच त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागे. संन्यासी असूनही शंकराचार्यांचे आचरण कर्मप्रधान आहे. त्यानी सोळा वर्षे अखंडपणे भारत दर्शन केले. ब्रह्मसूत्र भाष्यासारखा अद्भुत ग्रंथ लिहिला. त्यांच्या ठायी भक्तीही होती. त्यानी रचलेल्या भक्ती स्तोत्रांमधून त्यांच्या भक्तीचा पाझर दिसून येतो. वृत्तीने ते ज्ञानप्रधान होते. तुलसीदास भक्तीप्रधान होते. ज्ञानोबा योगी असल्यामुळे त्यांची वृत्ती ज्ञानप्रधान होती तरीसुध्दा महापुरुषांच्या ठायी या तीन गुणांचा संगम आढळतो. कुठली एखादी वृत्ती ठळकपणे प्रकट होऊ शकते पण दुसऱ्या दोन तत्वांचा काही अभाव नसतो.

: 17 :

***तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते। प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रिय:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तेषां:** या चार भक्तांपैकी
- **ज्ञानी नित्ययुक्त:** ज्ञानी, परमात्म्याशी एकरुप असतो

- **एकभक्ति: विशिष्यते:** अनन्य प्रेमभक्तीचा भक्त (सर्व भक्तांमध्ये) श्रेष्ठ होय
- **हि ज्ञानिन: अहं:** (कारण) मला तात्त्विकपणे जाणणाऱ्या ज्ञान्याला मी (परमात्मा)
- **अत्यर्थं प्रिय:** अत्यंत प्रिय आहे
- **च स: मम प्रिय:** आणि तो ज्ञानी भक्त मलाही प्रिय असतो

**अर्थ**

त्यापैकी नेहमी माझ्या ठायी ऐक्य भावाने स्थित असलेला अनन्य प्रेम-भक्ती असलेला ज्ञानी भक्त अति उत्तम होय कारण मला तत्त्वत: जाणणाऱ्या ज्ञानी माणसाला मी अत्यंत प्रिय आहे आणि तो ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे.

***ज्ञानी वरिष्ठ सर्वांत नित्य-युक्त अनन्य जो***
***अत्यंत गोड मी त्यास तो हि गोड तसा मज।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे 1) चार भक्तांपैकी ज्ञानी भक्त हा निरंतर परमात्म्याच्या ठायी एकरुप असतो, एकाग्र असतो. 2) ज्याची परमात्म्याच्या ठायीच भक्ती आहे, प्रेम आहे यामुळे 3) तो सर्व भक्तांमध्ये श्रेष्ठ आहे. 4) कारण की ज्ञानी पुरुषासाठी मी (म्हणजे परमात्मा) खूपच प्रिय आहे आणि तो ज्ञानी पुरुषही मला (ईश्वराला) खूप प्रिय आहे.

**स्पष्टीकरण**

1) या व यापुढील दोन श्लोकामधून ज्ञानी पुरुषाचे वर्णन येते. चौघांपैकी ज्ञानी भक्त भगवंताच्या ठायी एकरुप असतो. एकाग्र असतो. ज्ञानी भक्त परिपूर्ण होऊन गेला आहे. त्याने भगवंताचा अनुभव करुन घेतला असल्यामुळे त्याची ईश्वराच्या ठायी एकाग्रता झाली आहे. साधक दशेत भगवंताच्या ठायी चित्त सतत एकाग्र होत नाही, स्थिर होत नाही. परमात्म्याशी अनुसंधान राखायची आवश्यकता असते या कामी काही अंशी यश मिळते पण पूर्णांशाने नाही. बाह्य पदार्थांच्या बाबतीतले आकर्षण मनात सूक्ष्म रुपाने का होईना पण असते म्हणजे असतेच. स्थूल आकर्षण चित्तातून हटते खरे पण सूक्ष्म आकर्षणाला दूर करणे खूप कठिण जाते. यामुळे चोवीस तास म्हणजे रात्रंदिवस ईश्वराच्या ठायी चित्त एकाग्र करायचा प्रयत्न केला तरी साधकावस्थेत पूर्ण यश लाभत नाही. काही काळ यश लाभले तरी ते चिरकाळ टिकत नाही. ज्ञानी परमात्म्याच्या ठायी अखंड स्थिर असतो. त्याला परमात्म्याची ओळख झालेली असते. त्याला परमात्म्याचा आनंद अनुभवता येतो. आनंदाच्या ठायी त्याचे चित्त रमते. चित्त स्थिरावते. चित्ताचा हा स्वभाव आहे की ते आनंदाशिवाय अन्यत्र कुठेही स्थिरावत नाही. बालक प्रत्येक गोष्टीपासून आनंद मिळवायचा प्रयत्न करते. साधकावस्थेत असताना परमात्म दर्शनाचा आनंद मिळवण्याची धडपड सुरु असते पण या उपक्रमात जेवढे यश मिळते तेवढ्या प्रमाणातच त्या अवस्थेत आनंदलाभ असतो. तो अखंड नसतो. पूर्ण ज्ञानवंताच्या ठायी अशी उणीव नसते. तो सदा आनंदात असतो परिणामी रात्रंदिवस जनता जनार्दनाची सेवा करतानाही परमात्म्याच्या ठायी त्याच्या चित्तवृत्ती स्थिर रहातात.

2) दुसरे लक्षण गीता सांगत आहे.' एकभक्ति: विशिष्यते' परमात्म्याप्रती प्रीत भाव वसते. परमात्म्याशिवाय अन्य कुठल्याही विषय वा तत्वावर प्रेम नसते. परमात्म्याची ओळख जागली की त्याच्या प्रती अखंड स्थैर्यभाव मनी वसतो. अखंड स्थैर्यभाव जागला की परमात्म्याच्या ठायी आनंदबोध उपजतो. परमात्म्यापासूनच आनंद लाभ होत असल्यामुळे परमात्म्यावर प्रीत जडते. परमात्म्याच्या भक्तीचा भाव मनी दृढावतो. प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणात तुडूंब प्रेम भरले आहे. कुटुंब संस्थेत या प्रेमाच्या उत्कट भावनेचे दर्शन होते. हे सोपे नाही. ज्ञानवंताचे प्रेम व्यापक असते. सर्वत्र परमात्म दर्शनाची दृष्टी लाभली म्हणजे व्यापक प्रेम प्रकटू लागते. परमात्म्याप्रती प्रेम-भक्ती उपजण्याचा अर्थ असा की जगातल्या चराचर पदार्थांमध्ये परमेश्वराचे ज्ञान व भान. ज्ञानोबा म्हणतात की विश्वाचे आर्त त्यांच्या मनी प्रकाशते.

3) तिसरे लक्षण आहे: ज्ञानिन: अहं अत्यर्थं प्रिय: ज्ञानीसाठी भगवंत अत्यंत प्रिय आहे. ज्ञानी पुरुषाची समस्त प्रेमशक्ती ईश्वराच्या ठायी तल्लीन झालेली असते. ज्ञानवंतासाठी अत्यंत प्रिय वस्तु परमात्माच! सर्वांच्या संदर्भात मात्र असे सांगता येत नाही. कुटुंबसंस्थेतल्या प्रेमाचा उत्कर्ष खरे तर प्रेमाचे अत्यंत सीमित-मर्यादित

रुप होय. कुटुंबापर्यंत ज्यांचा प्रेमभाव मर्यादित स्वरुपाचा नसून सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचला तेही असे सांगायला तयार नाहीत की त्यांचे सर्वाधिक प्रेम ईश्वरावर आहे. खरे तर भगवंताच्या अस्तित्वाचे भान असणाऱ्यांनाही परमात्म्याची ओळख असते, असेही नाही. परमात्म्याचा परिचय प्राप्त झाल्यानंतरच त्याच्याबद्दल उत्कट प्रेम उत्पन्न होऊ शकते. ज्ञानी जन सेवारत असतात. जनतेच्या ठायी विविध भगवत् मूर्तींचे दर्शन करणे ही प्रेम भावना आहे. हे परमात्म्याप्रती प्रेम होय. ज्ञानवंतांच्या जनसेवेत अखंड परमात्मदृष्टी वसते. अहंकार विरघळून गेला असल्यामुळे आपल्या जनसेवाव्रताचेही भान त्याना उरलेले नसते. परमात्मा माझ्या माध्यमातून सेवा करवून घेत आहे वा साक्षात् परमात्माच जणू सेवा करत आहे असा ज्ञानवंताचा भाव असतो. परमात्म्यानेच हा देह दिला आहे. देहांतरी वसून ईश्वरच देह चालवत आहे. केवळ जनसेवा करणाऱ्या सेवकाला-जनसेवकाला मात्र या गोष्टीचे भान नसते. ज्ञानवंतांच्या दृष्टीने जनता काही स्वतंत्र-वेगळी वस्तु नाही. जनता म्हणजे परमात्मा! जनता म्हणजे जनार्दन ! मातीच्या घटात ज्याप्रमाणे मातीशिवाय अन्य काहीही नसते, मातीच्या विशिष्ट आकारालाच आपण घट म्हणतो. केवळ नाव दिल्यामुळे काही घट स्वतंत्र वा वेगळी वस्तु बनत नाही-ठरत नाही. तद्वत्च जनार्दनाचेच एक नाव जनता होय. दिसते जनता असतो मात्र जनार्दन. दिसतो घट असते मात्र मातीच ! ही परमात्मदृष्टी संगोपन करुन ज्ञानवंताचे आयुष्य चालते.

4) स: मम प्रिय: मला ज्ञानी भक्त अत्यंत आवडतो असे योगेश्वर म्हणतो. ज्ञानवंत वेगळा आणि ज्ञानी भक्त वेगळा. इथे ज्या परिपूर्ण ज्ञान्याची चर्चा सुरु आहे. तो ज्ञानी असतो आणि भक्तही असतो. भक्ती, ज्ञान आणि जनसेवा असा त्रिवेणी संगम असतो. हा ज्ञानी पुरुष परिपूर्ण असतो. असा परिपूर्ण ज्ञानी प्रभुला आवडणे स्वाभाविक असते.

जैन आणि सांख्य तत्वज्ञान ईश्वराला मानत नाही. याचा अर्थ असा की ब्रह्मांडाचा भास करवून देणारे ईश्वरतत्व असते अशी काही जैन आणि सांख्यवाद्यांची मान्यता नाही. ते आत्म तत्वाला मानतात. आत्मा देहापासून भिन्न आहे असे त्यांचे मत आहे - सिध्दांत आहे. या जडसृष्टीचा निर्माता ईश्वर आहे असेही ते मानीत नाही. जड प्रकृतीपासून सृष्टीची-जगाची-उत्पत्ती झाली असे सांख्यवादी मानतात. जगत उत्पन्न होते असे जैनमत मानत नाही - या मताचे म्हणणे असे की जगत षट्द्रव्यांची व्यवस्था आहे. जगत अनादी आहे. षट्द्रव्ये पुढीलप्रमाणे- जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काळ. परमात्म्यापासून जगताची उत्पत्ती होते असे गीतेचे मत आहे. जगत देहांतरी आत्मतत्वाच्या रुपात वसते. आत्मतत्व देह, मन वा इंद्रियांहून भिन्न आहे. देह वगैरेंपासून आत्मतत्वाचे वेगळेपण अनुभवणे आणि त्या अनुभवात स्थिरावणे जैन आणि सांख्यवाद्यांच्या मते ज्ञानावस्था होय. देह आणि आत्मा यांचे वेगळेपण गीता मानतेच पण याहीपुढे जाऊन काही सांगते. गीतेचे निवेदन असे की देह आणि आत्मा यांचे वेगळेपण अनुभवणे ही ज्ञानावस्था खरीच पण देहापासून पृथक् असे जे आत्मतत्व आहे तेच संपूर्ण ब्रह्मांडात व्याप्त असल्यामुळे ब्रह्मांडाप्रमाणेच आत्मतत्व पिंडात म्हणजे देहातही वसते याची जाण असणेही गरजेचे आहे. या स्थितीला म्हणजे हे ज्ञान प्राप्त झाल्यावरच्या स्थितीला गीता परिपूर्ण ज्ञानावस्था मानते. जैन आणि सांख्यवाद्यांनी जी ज्ञानावस्था मानली आहे तिच्या ठायी सेवा किंवा भक्तीची कल्पना नाही. या संदर्भात तुलसीदास म्हणतात :

*मोरे प्रौढ तनय सम ज्ञानी।*
*बालक सुत सम दास अमानी॥*
*जनहिं मोर बल निज बल ताहीं।*
*दुहुँ कहँ काम क्रोध रिपु आहीं॥*
*यह बिचारि पंडित मोहिं भजहीं।*
*पायेहु ज्ञान भगति नहिं तजहीं॥*

अर्थात् केवळ ज्ञानी पुरुष माझ्यासाठी थोरल्या मुलासारखा आहे पण अमानी भक्त धाकट्या लेकरासारखा आहे. ज्ञानी पुरुषापाशी आत्मबळ असते. 'मी आत्मा आहे.' अशा प्रकारे आत्मबळावर तो जगतो पण भक्तासाठी मात्र भगवंताचेच बळ असते. तो स्वबळावर जगत नसून केवळ ईश्वराच्या बळावरच जगतो. परत तुलसीदास सावध करत म्हणतात की ज्ञानी आणि भक्तांसाठी काम, क्रोधरुपी शत्रु सतत टपून बसलेले असतात यामुळे काम, क्रोध वगैरे विकार नेहमी परीक्षा घेण्यासाठी उपस्थित असतात असा

विचार करुन ज्ञानी पुरुष आत्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावर देखिल भक्तीला कधीच त्यजत नसतात - सोडत नसतात.

काम, क्रोध वगैरे विकार इतके सूक्ष्म आणि बळकट असतात की त्यांच्यावर विजय संपादन करण्यासाठी केवळ आत्मज्ञान पुरेसे नाही म्हणजे देह वगैरें पासून मी वेगळा आहे एवढे जाणून घेणे पुरेसे नाही तर या आत्मज्ञानासोबत परमात्म भक्तीचाही संयोग हवा. असे झाले तरच विकारांचा सूक्ष्म क्षय होईल आणि जीवनात परिपूर्ण अशी ज्ञानावस्था प्रकटेल. यामुळे केवळ ज्ञानी थोरला तर भक्त ज्ञानी धाकटा पुत्र असे तुलसीदास मानतात. ते म्हणतात:

***प्रौढ भये तेहि सुत पर माता।***
***प्रीति करहि नहिं पाछिलि बाता॥***

अर्थात् आई बालकावर जेवढे प्रेम करते तेवढे बालक मोठे झाल्यावर करते असे नव्हे! तुलसीदास म्हणतात की ज्ञानासोबत भक्ती असली तर ईश्वराला विशेष प्रिय असते. इथेही भगवंताचे हेच म्हणणे आहे की जो माझी भक्ती करतो तो माझा अत्यंत प्रिय आहे. देह वगैरे पासून आपण वेगळे आहोत हे ज्ञान असायला हवे. म्हणजे मी देह-मन वगैरेहून वेगळा आहे असा अनुभव यायला हवा. हा अनुभव जीवनाच्या प्रत्येक क्रियेत झळकायला हवा पण एवढ्यानेच परिपूर्ण ज्ञानाची प्राप्ती झाली असे मानायला नको. या ज्ञानासोबत ईश्वरभक्ती आणि जनसेवा कार्य दोन्ही व्हायला हवेत. भक्ती आहे पण ज्ञान आणि जनसेवा नाही, असे नाही चालणार. ज्ञान आहे पण भक्ती आणि सेवा नाही, असे नाही चालणार तसेच भक्ती सेवा आहे पण ज्ञान नाही, असेही नाही चालणार. ज्ञान-भक्ती-सेवा यांची सांगड घालता यायला हवी. या त्रिवेणी संगमालाच परिपूर्ण ज्ञानावस्था म्हणता येईल. अशा प्रकारे ज्ञान, भक्ती जनसेवा ज्यांच्या ठायी प्रकट होते ते धन्य होत! या प्रसंगीचे विवेचन आपल्याला एकाच वेळी त्रिआयामी स्वरुपाचे दर्शन घडवणारे असे आहे. या निमित्त जीवनाच्या परिपूर्ण अशा रुपाचे दर्शन गीतेने दर्शवले आहे. हे प्रत्यक्षपणे ज्याना आपल्या जीवनात साकार करता आले असे महापुरुष भगवंताचे लाडके ठरतात हे वेगळे सांगायला नको.

: 18 :

***उदारा: सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।***
***आस्थित: स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- सर्वे एते उदारा: हे चारी म्हणजे सर्वच उदार अर्थात श्रध्देसह माझ्या भजनी समय लावणारे आणि निष्काम असल्याने उत्तम होत
- तु ज्ञानी मे आत्मा एव मतं: पण ज्ञानी तर साक्षात् माझे स्वरुप माझे आत्मतत्त्व आहे असे मी मानतो
- हि स: युक्तात्मा: कारण तो ज्ञानी भक्त परमात्म्याच्या ठायीच एकरुप झाला आहे म्हणून
- मां एव उत्तमां गतिं आस्थित: माझ्याच उत्तम गतीला म्हणजे मोक्षाला प्राप्त झालेला आहे

**अर्थ**

हे सर्वच उदार आहेत पण ज्ञानी तर साक्षात् माझे स्वरुपच आहे, असे माझे मत आहे कारण तो माझ्या ठिकाणी मन-बुध्दी असणारा ज्ञानी भक्त अति उत्तम गतिस्वरुप अशा माझ्यामध्येच चांगल्या प्रकारे स्थित असतो.

***उदार हे जरी सारे ज्ञानी तो मी चि की स्वयें***
***जोडला स्थिर माझ्यांत गति अंतिम पाहुनी।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे (1) हे सारे भक्त (आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी) उदार आहेत म्हणजे निष्काम आहेत, सकाम नाहीहेत. (2) या चौघापैकी ज्ञानी भक्त तर माझा आत्मा आहे असे मी मानले आहे. (3) कारण की तो ज्ञानी भक्त परमात्म्याच्या ठायीच एकरुप झालेला आहे, लीन होऊन गेला आहे. (4) यामुळे तो माझ्याच उत्तम गतीला म्हणजे मोक्षाला प्राप्त झाला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वे एते उदारा:** आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, आणि ज्ञानी हे चारी भक्त उदार आहेत, कृपण नाहीत. कृपणाची व्याख्या करताना भगवंत म्हणतात कृपणा: फलहेतव: -- फळाची आशा राखणारे कृपण आहेत. आपण खरे म्हणजे

आत्मा असल्यामुळे खरे पाहू जाता धनसंपन्न आहोत. पण मन आणि शरीर यांच्या स्वाधीन होऊन कामना बाळगतो, इच्छा राखतो. वासनांमध्ये रमतो. यामुळे भिकारी आणि कृपण बनून जातो. या श्लोकात भगवंतांनी चारी भक्तांना उदार म्हटले आहे. निष्काम म्हटले आहे. सामान्यपणे चारी भक्तांना सकाम मानले जाते कारण की ते अपूर्ण भक्त आहेत. ज्ञानी भक्ताला निष्काम मानले गेले आहे. ही विचारधारा बरोबर नाही. सकाम भक्ताचे वर्णन याच अध्यायात 20 ते 23 या चार श्लोकांमधून केले गेले आहे. चारी भक्त एकांगी असतील कदाचित पण ते सकाम नसून निष्काम आहेत. चौघापैकी ज्ञानी भक्ताला ईश्वर आपले आत्मतत्व मानतो. याचे कारण असे की ज्ञानीभक्त भगवंताच्या ठायी विलीन झालेला असतो. तो एकरुप झालेला असतो. यामुळे तो ईश्वराच्या उत्तम गतीला म्हणजे मोक्षाला प्राप्त झालेला असतो.

आर्त म्हणजे भक्त हृदय. भगवंताची भक्ती करुन भक्तीमार्गाच्या द्वारे भगवत् प्राप्तीची इच्छा करणारा भक्त आर्त होय. भगवत् भक्ती आणि याद्वारे भगवत् प्राप्ती याशिवाय तिसरा कुठलाच हेतु वा प्रापंचिक - लौकिक कामना त्यांच्या मनी नसतात. यामुळे हा सकाम भक्त नसून निष्काम भक्त आहे. भक्ती साधताना प्रापंचिक वा लौकिक हेतुही राखता येतो. भक्तीमुळे जनांकडून मान-सन्मानाची प्राप्ती होऊ शकते यामुळे हाही हेतु कुणी मनी बाळगू शकतो. ईश्वरभक्तीमुळे प्रापंचिक परिस्थितीही सुधारु शकते. प्रापंचिक सुख प्राप्ति वा प्रापंचिक परिस्थिती चांगली व्हावी यासाठीही - या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठीही ईश्वरभक्ती करता येऊ शकते पण आर्त भक्ताच्या मनी प्रापंचिक कामना नसतात. त्याच्या मनी भगवत् प्राप्तीची भावना अवश्यमेव असते - वसते. ईश्वराशिवाय अन्य कुणापासूनच त्याला काहीही नको असते.

जिज्ञासू भक्त ज्ञानमार्गाने भगवंताला जाणून घेण्याची - ओळखण्याची इच्छा राखतो पण त्याच्या मनाच्या ठायी ज्ञानविषयक अन्य मान्यता जागत नसतात. परमात्म विषयक ज्ञानाशिवाय अन्य तमाम ज्ञानाला - ज्ञानशाखांना - तो तुच्छ मानतो. कर्तव्य बुध्दीने गरजेइतके ज्ञान तो जरुर प्राप्त करुन घेतो पण तिथे कामना वा वासना राखत नाही. परमात्म ज्ञानाशिवाय अन्य प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याकामी तो तटस्थ वा उदासीन असतो.

अर्थार्थी म्हणजे जनसेवापरायण भक्त देखिल परमात्म ज्ञानाला साधनरुप मानून जनसेवेचा आश्रय घेतो पण तो त्यातही आसक्त होत नाही कारण की जनसेवेत आसक्त बनला तर त्याला परमात्म्याविषयक ज्ञानाची प्राप्ती होऊ शकणार नाही. जनसेवेद्वारा परमात्मा प्राप्त करण्याचा दृष्टिकोण असल्यामुळे तो अर्थार्थी भक्त म्हणवला जातो पण परमात्म विषयक ज्ञान प्राप्त करायची दृष्टी न राखता केवळ जनसेवा करणाऱ्याला जनसेवारत कार्यकर्ता मानले जाईल. त्याची गणना भक्तात होणार नाही. हे तिन्ही भक्त असल्यामुळे हे सारे निष्काम भक्तच आहेत. ज्ञानी भक्त तर निष्काम आहेच आहे. चारी भक्तांना निष्काम असल्यामुळे उदार म्हटले गेले आहे.

2) **तु ज्ञानी मे आत्मा एव मतम्:** ज्ञानी भक्ताला तर ईश्वराने आपले आत्मतत्वच मानले आहे. हे ईश्वराचे मत आहे. खरे पाहू गेल्यास ज्ञानी पुरुष आणि परमात्मा यात भेद नाहीच. गंगा नदी जेव्हा सागराला जाऊन मिळते तेव्हा का तिचे स्वतंत्र अस्तित्व उरते? आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी हे तिन्ही भक्त ईश्वराशी अखंड अनुसंधानरत असतात पण त्यांच्यात व ईश्वरात भेद असतो. ते परमात्म्याशी इतके एकरुप नसतात की त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही शिल्लक राहू नये. ते आपापली स्वतंत्र व्यक्तिमत्वे राखून भक्ती करताहेत पण जो भक्त स्वत:ला भगवंताच्या ठायी विलीन करुन घेतो, तो ज्ञानी-पूर्ण ज्ञानी-भक्त होय. हा झाला परम पुरुषार्थ. आपण जसजसे आपल्या अहंकाराला क्षीण करत जातो तसतसे परमात्म्याच्या अधिक निकट पोहोचत जातो. संपूर्णपणे अहंकाराला क्षीण करणे म्हणजे परमात्मस्वरुप होऊन जाणे होय. अहंकार संपताच निसर्ग विषयक भेदभावदृष्टीही संपून जाते. अशा प्रकारे ज्ञानी भक्त भगवंताचे आत्मतत्वच बनून गेला असे गीतेचे निवेदन आहे. याचे कारण पुढे सांगितले आहे.

3) **हि सः युक्तात्मा:** कारण की ज्ञानी भक्त परमात्म तत्वात युक्त होऊन गेला, तल्लीन होऊन गेला आहे. या स्थितीचे वर्णन उपनिषदात असे येते :

यत्र हि द्वैतमिव भवति तत् इतर: इतरं पश्यति, जिघ्रति, श्रुणोति, विजानाति । यत्र तु अस्य सर्वं आत्मा एव अभूत् तत्केन कं पश्येत्, जिघ्रेत, श्रुणयात्, विजानीयात् ।

विज्ञातारं अरे केन विजानीयात् एतावत् अरे खलु अमृतत्वं इति।

अर्थात्: मनात भेद दृष्टी असली म्हणजे त्या काळापर्यंत एक माणूस दुसऱ्याकडे बघतो, हुंगतो, ऐकतो आणि दुसऱ्याला जाणून घेतो पण त्याची भेद दृष्टी विरुन-विरघळून गेली की मग सर्वत्र अभेदच अभेद. सारेच ईश्वरमय मग त्याने कुणाला कशाने बघावे? जो जाणणारा आहे त्याला कोण बरे जाणून घेईल? भेद आहे तोवर दुसरा. भेद संपला की सारेच आत्मवत. सारेच परमात्मवत!

हा उपदेश याज्ञवल्क्य ऋषींनी आपल्या पत्नीला-मैत्रेयीला केला आहे. आपण जेव्हा परमात्म्यापासून भिन्न असतो तेव्हा परमात्म्याला जाणून घ्यायचे असते, त्याचा अनुभव घ्यायचा असतो पण जेव्हा जाणून घेणारा जीवात्मा हा परमात्म्याहून भिन्न वा वेगळाच नसतो, तेव्हा कुणी कुणाला जाणून घ्यावे बरे ? कारण की मग ज्ञानस्वरुप परमात्माच शेष उरतो आणि परमात्म्यालाच बघण्या-ऐकण्याचे अद्वैताचे कार्य सुरु असते तिथे मग जाणून घ्यायची कुठलीही स्वतंत्र वस्तु उरत नसते.

4) **मां एव उत्तमां गतिं आस्थित:** भगवंताच्या उत्तम गतीला म्हणजे मोक्षाला भक्त प्राप्त करुन घेतो. मोक्ष ही अंतिम स्थिती होय. मोक्ष लाभला की काहीही मिळवण्यासारखे नसते. प्राप्त करुन घेण्यासारखे नसते. मोक्षावस्थेनंतर पुनरपि जन्म नसतो. जन्म मुक्ती हा मोक्षाचा एक अर्थ आहे. दु:खाची आत्यंतिक निवृत्ती हा दुसरा अर्थ आहे. जीवंत असताना दु:खाच्या आत्यंतिक अभावाचा अनुभव पूर्ण ज्ञानी पुरुषाला करता येतो. त्याचे जीवन आसक्ती रहित, बंधन रहित, विकार रहित, अहंकारशून्य असते. यामुळे त्याला पुनरपि जन्म नाही पण भगवत्कार्यासाठी जर त्याला परत यावे लागले पुनरपि जन्म घ्यावा लागला तर त्याचे तेवढे कर्म शेष राहिले असे मानायला हवे. भक्तासाठी तर अशी कल्पनाही केली गेली आहे की परमेश्वर आपले अवतार कार्य अशा ज्ञानी पुरुषांच्या द्वारे करवून घेत असतो पण यातही खरे काय हे सांगणे अवघड आहे. हा सारा अनुमानाचा विषय आहे तरी एवढे तत्व मात्र निश्चितपणाने सांगता येते की अद्वैतावस्थेचा अनुभव प्राप्त करुन घेतल्यावर जन्माचे बीज असे जे अज्ञान आहे ते नष्ट होते परिणामी पुनरपि जन्म घ्यावा लागत नाही.

:19:

*बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।*
*वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **बहूनां जन्मनां अन्ते:** पुष्कळ जन्माच्या अखेरच्या जन्मी
- **ज्ञानवान् वासुदेव:** सर्वं इति: तत्त्वज्ञान प्राप्त झालेला ज्ञानी सर्व काही वासुदेवच आहे असा अनुभव करतो, अर्थात् वासुदेवाशिवाय दुसरे काही नाही असे
- **मां प्रपद्यते:** मला भजत असतो, मला प्राप्त होतो
- **स: महात्मा सुदुर्लभ:** तो महात्मा अति दुर्लभ आहे

**अर्थ**

पुष्कळ जन्मांच्या शेवटच्या जन्मात तत्त्वज्ञान झालेला पुरुष 'सर्व काही वासुदेव'च आहे असे समजून मला भजतो, तो महात्मा अति दुर्मिळ आहे.

*अनेक जन्म घेऊनि पावला शरणागति*
*विश्व देखे वासुदेव संत तो बहु दुर्लभ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींचा विचार केला गेला आहे 1) अनेक जन्मांच्या नंतर अखेरच्या जन्मी ज्ञानी पुरुष मला प्राप्त करुन घेतो. 2) सारे काही वासुदेवमय म्हणजे भगवानमय आहे असा ज्ञानी पुरुषाला अनुभव येतो. 3) असा महात्मा अत्यंत दुर्लभ आहे.

**स्पष्टीकरण**

1) **बहूनां जन्मनां अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते:** अनेक जन्माच्या साधनेनंतर ज्ञानी पुरुष भगवंताला प्राप्त होतो. साधक वा मुमुक्षु जेव्हा साधनेला सुरुवात करतो तेव्हा या जन्मी म्हणजे एकाच जन्मात आपली संपूर्ण साधना सिध्दीला जावी-पूर्ण व्हावी हाच एकमेव विचार त्याच्या मनात असतो-वसतो आणि हे उचितही आहे कारण यामुळे साधना काहीशी तीव्र गतीने होऊ शकते-होते. अन्यथा साधनेत मंदता येऊ शकते. अर्थात याच जन्मी साधना सिध्दीला जावी असा आग्रह धरुन त्यानुसार तीव्रतेने प्रयत्न करुन सुध्दा जर साधना पूर्णत्वाला नाही आली तर

मनात अनासक्ती असायला हवी. अन्यथा दु:ख वाट्याला येते. साधनेत निष्काम भाव हवा. धनाचा अभिलाषी धन न मिळाल्यामुळे निराश होतो. साधकाचीही अशीच अवस्था असते. साधनेत निष्कामता नसली तर साधना सफल न झाल्यामुळे त्याची वाईट प्रतिक्रिया होऊ शकते म्हणून साधना निष्काम हवी. अशा वेळी साधना सफळ होवो वा निष्फळ तरी साधक स्थिर असतो पण साधना निष्काम नसली तर मग साधक पुनश्च प्रपंचात गुरफटू शकतो - पुनश्च प्रापंचिकबनू शकतो. यामुळे याच जन्मी साधना सिध्दीला जायला हवी असा संकल्प केल्यावरही मनात हा भाव स्थिर करुन घ्यायला हवा की या जन्मी साधना सिध्दीला नाही आली-सिध्दीप्रत नाही पोहोचली - फळाला नाही आली तरी बेहत्तर पुढच्या जन्मी मात्र साधना अवश्य फळाला येईल असा निश्चय मनी धारण करणे आवश्यक आहे. साधना फळाला येण्यासाठी किती का जन्म लागेतात तरी काही हरकत नाही अशी भावना असायला हवी. एकीकडे शिथिलता टाळायला हवी तसेच दुसरीकडे निराशाही टाळायला हवी. शिथिलता, मंदता, निराशा, अधीरता आणि निराशा टाळून शांततेने पण दृढतेने साधना अखंड चालायला हवी.

यामुळेच तर गीता सांगते की ज्ञानी पुरुषसुध्दा एकाच जन्मी भगवंताला प्राप्त करुन घेतो अशी काही स्थिति नसते. हाच मुद्दा सहाव्या अध्यायातील 45 व्या श्लोकात येऊन गेला आहे की योगसाधना करणारा पुरुष चित्ताची शुध्दी करुन घेतो आणि आपल्या साधनेतही खूप तत्पर म्हणजे प्रयत्नशील राहून नाना जन्माच्या साधनेनंतर आपली साधना पूर्ण करुन घेऊन मोक्ष प्राप्त करुन घेत असतो.

2) **वासुदेव:** सर्वं इति अनेक जन्म-जन्मांतरीच्या अथक साधनेनंतर साधकाला जेव्हा पूर्णज्ञानाची प्राप्ती होते तेव्हा त्या ज्ञानी पुरुषाला सारे विश्व विष्णुमय दिसते - सारे जगत् परमात्ममय वाटते. त्याला अभेदाचे ज्ञान होते. अशा अभेददर्शी ज्ञानी पुरुषाची लक्षणे तेराव्या अध्यायातल्या ज्ञानवंताच्या लक्षणात वाचता येतील. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे वाचू यात तिथे हे दर्शन घडते. चौदाव्या अध्यायातल्या ज्ञानवंताच्या लक्षणात हे सारे वाचता येईल. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे आली आहेत. बाराव्या अध्यायात भक्ताची लक्षणे आली आहेत. चौदावा अध्याय त्रिगुणातीत पुरुषाच्या लक्षणांची चर्चा करतो. सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे गुणवर्णन येईल. ही सारी ज्ञानी पुरुषाची लक्षणे होत. रामप्रभुचा निवास कुणा पुरुषाच्या ठायी वसेल हे निरुपण करताना तुलसीदासांची वाग्धारा प्रवाही होते. ते लिहितात :

***काम कोह मद मान न मोहा। लोभ न छोभ न राग न द्रोहा॥ जिन्हके कपट दंभ नहिं माया। तिन्हके हृदय बसहु रघुराया॥***

अर्थात् हे रघुनाथा, ज्यांच्या मनी काम, क्रोध, मद, मान, मोह, लोभ, क्षोभ, राग, द्रोह, कपट, दंभ, माया अजिबात नसते अशांच्या हृदय मंदिरी आपण निवास करावा.

***सबके प्रिय सबके हितकारी।***
***दुख-सुख सरिस प्रसंसा-गारी॥***
***कहहिं सत्य प्रिय बचन बिचारी।***
***जागत सोवत सरन तुम्हारी॥***
***तुम्हहिं छाँडि गति दूसरि नाहीं।***
***राम बसहु तिन्ह के मन माहीं॥***

अर्थात् जो सर्वांना आवडतो, सर्वांच्या कल्याणासाठी झटतो, ज्यांना सुख, दु:ख व स्तुती-निंदा समान वाटतात, जे सत्य, प्रिय आणि विवेकी वाणीचे उद्गाते आहेत, जागृती व सुषुप्तीतही आपले शरणागत आहेत, आपल्याशिवाय ज्यांना दुसरी गती वा दिशा नसते त्यांच्या मन मंदिरात आपण निवास करावा.

***जननी सम जानहिं पर-नारी।***
***धन पराव विषतैं विष भारी॥ जे हरषहिं पर संपति देखी। दुखित होहिं पर बिपति बिसेखी॥***
***जिन्हहिं राम तुम प्रान पियारे।***
***तिन्हके मन सुभसदन तुम्हारे॥***

अर्थात् जे पर नारीला मातेसमान मानतात, परधनाला विषाहूनही अधिक विषमय मानतात, इतरांच्या उत्कर्षाने हर्षभरित होतात, दुसऱ्यांच्या दु:खाने आत्यंतिक दु:खी होतात, हे रामराया, ज्यांना आपण प्राणाहूनही अधिक प्रिय आहात त्यांची मने आपल्या निवासासाठी शुभ देवालये आहेत.

*स्वामि सखा पितु मातु गुरु, जिनके सब तुम्ह तात।*
*मनमंदिर तिन्हके बसहु, सीय सहित दोउ भ्रात ॥*

अर्थात् ज्यांच्यासाठी स्वामी, सखा, माता, पिता, गुरु सारे काही आपणच आहात त्यांच्या मनरुपी मंदिरात आपण सीता-लक्ष्मणासहित निवास करावा.

*सरग नरक अपबर्ग समाना।*
*जहँ तहँ देख धरे धनु बाना ॥ करम बचन मन राउर*
*चेरा। राम करहुँ तेहिके उर डेरा ॥*

अर्थात् ज्यांच्या लेखी स्वर्ग काय अन् नरक काय सारखेच आहेत. ज्याना मोक्षाचीही पर्वा नाही. ते सर्वत्र आपलेच दर्शन करतात. जे काया-वाचा-मनाने आपलेच सेवक आहेत त्यांच्या मनी आपण वसावे.

*जाहि न चाहिय कबहुँ कछु, तुम्ह सन सहज सनेहु।*
*बसहु निरंतर तासु मन, सो राउर निज गेह ॥*

अर्थात् ज्याना कदापि कुठल्याही वस्तुची अपेक्षा नसते, आपल्या प्रती निष्काम प्रेमभावना वसते अशा पुरुषांच्या मनात आपण अखंड निवास करावा. तीच आपली खरी निवासस्थाने होत.

3) **सः महात्मा सुदुर्लभः** ज्यांच्यासाठी सारे काही परमात्ममय बनून गेले असे महात्मा जन खूप दुर्लभ होत. ज्याना सर्व परमात्ममय-परमात्मरुप दिसते, ज्यांची भेद दृष्टी मावळली त्यांच्यासाठी भगवंताने 'महात्मा' शब्द वापरलाय. असे महात्मा जन विरळ असतात. अहंकार सर्वथा संपवून जे परमात्म्याला शरण जातात, ईशचरणी शरणागती पत्करतात, त्यांच्यावर ईश्वराची कृपा होते. त्याना हरिमय होण्याची स्थिती प्राप्त होते. असे पुरुष व्यापक बनतात. अशी मंडळी दुर्लभ असते.

नाम माहात्म्य गाताना तुलसीदासांनी चारी भक्तांचे वर्णन केले आहे :

*राम भगत जग चारि प्रकारा।*
*सुकृती चारिउ अनघ उदारा ॥ चहूँ चतुर कहँ नाम*
*अधारा। ज्ञानी प्रभुहिं बिसेष पियारा ॥*
*चहुँ जुग चहुँ स्रुति नाम प्रभाऊ।*
*कलि बिसेष नहिं आन उपाऊ ॥*

अर्थात् जगात आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी अशा प्रकारचे चार भक्त आहेत. चारी पुण्यवान, निष्पाप व उदार असतात. या चारी चतुर भक्तांसाठी रामनामाचाच एकमेव आधार असतो. या चौघांपैकी ज्ञानी भक्त भगवंताला विशेष प्रिय असतो. चारी वेदात आणि चारी युगात नामाचा महिमा दुमदुमत आहे. या कळियुगात तर नामाचा महिमा विशेष आहे. नामाशिवाय दुसरा उपाय नाही.

: 20 :

*कामैस्तैस्तैर्हृतज्ञाना: प्रपद्यन्तेऽन्यदेवता:।*
*तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियता: स्वया ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तैः तैः कामैः** त्या त्या भोगांच्या कामनामुळे
- **हृतज्ञानाः** ज्यांचे विवेक ज्ञान हरण झाले आहेत असे
- **स्वया प्रकृत्या नियताः** आपल्या स्वभावाने प्रेरित झालेले
- **तं तं नियमं आस्थाय:** देवतांच्या त्या त्या नियमांचा आश्रय घेऊन
- **अन्य-देवताः प्रपद्यन्ते:** अन्य देवतांना भजतात अर्थात् त्यांना पूजतात

अर्थ त्या त्या भोगांच्या इच्छेने ज्यांचे ज्ञान हिरावून घेतले आहे असे लोक आपापल्या स्वभावाने प्रेरित होऊन निरनिराळे नियम पाळून इतर देवतांची पूजा करतात.

*भ्रमले कामना-ग्रस्त धुंडिती अन्य दैवतें*
*स्वभाव-वश होऊनि तो तो नियम पाळिती।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) त्या त्या पुत्र, पशु, स्वर्ग वगैरे कामनांनी ज्यांचे विवेक ज्ञान नष्ट झाले आहेत असे 2) आपल्या स्वभावाने प्रेरित होऊन 3) देवतांच्या त्या त्या नियमांचा आश्रय घेऊन 4) परमात्म्याला सोडून अन्य देवताना भजतात अर्थात् त्यांची पूजा करतात.

**स्पष्टीकरण**

1) **तैः तैः कामैः हृतज्ञानाः** जे जन परमात्म्याशिवाय भिन्न-भिन्न देवतांची पूजा-उपासना करतात त्यांच्याविषयीचे प्रकरण या श्लोकापासून सुरु होत आहे. परमात्मा एक असून ते ईश्वरतत्व अणु-रेणुत व्याप्त आहे या सत्याचे ज्ञान नसल्यामुळे भिन्न-भिन्न देवतांची उपासना केली जाते. याचे कारण गीता सांगते. पुत्र, पशु, स्वर्ग यासारख्या तत्वांच्या संदर्भात ज्यांच्या चित्ताकाशात कामना-वासना नांदतात आणि यामुळे ज्यांचे विवेकज्ञान नष्ट झाले आहे ते भिन्न-भिन्न देवतांच्या चरणी शरणागती पत्करतात.

प्रापंचिक जनांपुढे वेगवेगळ्या प्रकारच्या अडी-अडचणी असतात. यापासून सोडवणूक करुन घेण्यासाठी कित्येक देवतांची उपासना करतात. शंकर, पार्वती, विष्णु, काली माता, गणपती यासारख्या अनेक देवतांची उपासना समाजात रुढ आहे. या पूजेचा हेतु कामनापूर्ती हा असतो. शास्त्रात स्वर्ग-नरक अशी कल्पना आढळते. पुण्यवंताला स्वर्ग व पाप्याला नरक अशी मान्यता आहे. मनुष्याला पाप प्रवृत्तींपासून परावृत्त करण्याचे प्रयत्न शास्त्र करतात. पुण्यवंतांना इहलोकीही उत्तम जन्म लाभावा आणि पाप्यांनाही निकृष्ट जन्म लाभावा हे ध्यानात येऊ शकते. काही लोक स्वर्ग सुख कामनेसाठी देवतांची उपासना करतात. याचे कारण कामना-इच्छा-वासना. यामुळे विवेक नष्ट होतो. देवतांचे कुठलेही स्वतंत्र अस्तित्व तर नाहीच म्हणजे विवेकपूर्वक विचार केला तर हा मुद्दा अवश्य लक्षात येईल की या तमाम देवतांच्या ठायी तोच परमात्मा वसतो जो सर्वत्र समानपणे निवास करतो. विवेकामुळे दुसरे असे ध्यानात येते की मनात कामना राखल्यामुळे व्यक्ती आपल्या परमात्मशक्तीला संकुचित-मर्यादित करुन घेतो. यामुळे फळसुध्दा क्षणिक लाभते.

2) **दुसरी गोष्ट ही आहेः** स्वया प्रकृत्या नियताः आपल्या प्रकृतीने नियत म्हणजे वशीभूत होऊन. विवेक ज्ञान नष्ट झाले की व्यक्ती प्रकृती वा कामनायुक्त स्वभावाला वश होते. हा स्वाभाविक परिणाम आहे. जिथे विवेक शक्ती बलसंपन्न असते तिथे नाना प्रकारच्या कामना-वासना आपला प्रभाव दाखऊ शकत नाहीत. कामनांचे बळ वाढले म्हणजे विवेक शक्ती दुबळी होते. माणसाच्या ठायी मानसिक विकारांपेक्षा विवेक शक्ती अधिक प्रखर असते. पशु-पक्ष्यांमध्ये इच्छा-वासना वगैरे विकारच प्रबळ असतात.

3) **तं तं नियमं आस्थाय** त्या त्या देवतांच्या उपासनेचे, आराधनेचे जे नियम आहेत त्यांचा आश्रय घेऊन. देवतांच्या आराधनेचे अनेक उपाय असतात. नियमांचे पालन केल्यामुळे देवता संतुष्ट होऊन कामनांची पूर्तता करतील असे उपासकाला वाटते.

4) **अन्यदेवताः** प्रपद्यन्ते परमात्म वगळता अन्य देव-देवताना भजतात, कामना मनात न ठेवताही विविध देवतांची उपासना करता येऊ शकते. ती निष्काम असल्यामुळे केवळ देवतांपर्यंतच मर्यादित रहाते असे काही नाही. मनी निष्कामता जागताच देवतांच्या उपासनेत परमात्म्याची भावना यायला लागते. यामुळे ती भावना दिवसेंदिवस व्यापक बनत जाते पण मनात कामना जागली आणि तिच्या प्रेरणेने जर कुठल्या देवतेची उपासना घडली तर ती संकुचित-मर्यादित होऊन जाते. कामनायुक्त उपासना संकुचित तर कामनारहित उपासना व्यापक असा याचा थोडक्यात अर्थ! यामुळेच कामनायुक्त उपासना ही परमात्म्याला वगळूनअसते असे इथे म्हटले गेले आहे.

: 21 :

***यो यो यां यां तनुं भक्तः श्रध्दयार्चितुमिच्छति।***
***तस्य तस्याचलां श्रध्दां तामेव विदधाम्यहम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यः यः भक्तः** जो जो सकामी भक्त
- **यां यां तनुंः** ज्या ज्या देवतांच्या रुपाना
- **श्रध्दया अर्चितुंः** श्रध्देने पूजा करण्याची
- **इच्छतिः** इच्छा करतात
- **तस्य तस्यः** त्या त्या सकाम भक्तांची
- **तां एव श्रध्दांः** त्याच देवतेच्या ठिकाणी त्या श्रध्देला
- **अहं अचलांः** मी स्थिर
- **विदधामिः** करतो

**अर्थ**

जो जो सकाम भक्त ज्या ज्या देवता स्वरुपाचे श्रध्देने पूजन करु इच्छितो, त्या त्या भक्ताची त्याच देवतेवरील श्रध्दा मी दृढ करतो.

***श्रध्देनें ज्या स्वरुपास जे भजूं इच्छिती जसे***
***त्यांची ती चि तशी श्रध्दा स्थिर मी करितों स्वयें।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जे जे कामना राखणारे भक्त ज्या देवतांच्या स्वरुपी श्रध्दा राखून पूजा करायची इच्छा राखतात 2) त्या सकाम भक्तांच्या त्या श्रध्देला मी स्थिर करतो.

**स्पष्टीकरण**

1) **यः यः भक्तः** यां यां तनुं श्रध्दया अर्चितुं इच्छति कामनायुक्त भावनेने उपासना करणारे अगदीच टाकावू आहेत असे नव्हे! कामनाविरहित भक्ती निःसंशयपणे श्रेष्ठ आहेच. कामनायुक्त भक्ती करणाऱ्यांची कामना काही काळानंतर नष्ट होऊन ते निष्काम भक्त बनू शकतात आणि मग त्यांच्या भक्तीचा अभ्यास व्यापकपणे परमात्म भक्तीत उपयोगी ठरु शकतो. कामनेमुळे देवतेची उपासना घडली. कामना दूर होताच मनात देवतेऐवजी व्यापक स्वरुपाचा परमात्मा स्थिरावला आणि त्याची भक्ती वा उपासना सुरु झाली. यामुळे इथे भिन्न-भिन्न देवतांची उपासना करणाऱ्यांचा निषेध न करता 'भक्त' संबोधून थोडा गुणगौरवच केला आहे.

इथे 'श्रध्दा' शब्द आला. उपासना वा भक्तीच्या ठायी श्रध्दा खूप गरजेची आहे. विनोबानी गीता प्रवचनाच्या सातव्या अध्यायात एक दृष्टांत दिला. "एकदा मी रेल्वेने जात होतो. यमुनेच्या पुलावर गाडी आली. हृदय पुलकित होऊन जवळच्या एका माणसाने नदीत दिडकी टाकली. शेजारी एक चिकित्सक गृहस्थ बसले होते ते म्हणाले - 'आधीच देश दरिद्री. हे लोक असे पैसे व्यर्थ दवडतात.' मी त्याना म्हटले, 'तुम्ही त्या माणसाचा हेतु नाही ओळखला. ज्या भावनेने त्या दोन दिडक्या त्याने फेकल्या त्या भावनेची किंमत पैशाने करता येणार नाही. ते पैसे इतर सत्कार्यास दिले असते तर अधिक चांगले दान झाले असते. नदी म्हणजे ईश्वराची जणू करुणा वाहून राहिली आहे असे मनात येऊन त्या भाविकाच्या मनात काही भावना उत्पन्न होऊन त्याने त्याग केला, त्या भावनेला तुमच्या अर्थशास्त्रात काही स्थान आहे ? देशातील एक नदी पाहून त्याचे अंतःकरण द्रवले.' अशा प्रकारे काही कामनेने का होईना पण श्रध्देने ईश्वराला देवतारुप समजून कुणी जप जाप्य-आराधना करत असेल तर त्यालाही खूप किंमत आहे. विनोबा म्हणतात की देवळात नंदी असतो, कासवही असते. स्वतंत्रपणे विचार करु जाता त्यांची किंमत प्रत्यक्षातल्या बैल अथवा कासवाइतकी नाही पण ते देवळात भगवंताच्या मूर्तीपुढे उभे ठाकलेत, या कारणासाठी त्यांना भक्तीभावनेने नमस्कार केला जातो. यामुळे गीतेचे निवेदन आहे की जो-जो भक्त, ज्या ज्या देवतांची ज्या कुठल्या स्वरुपात का होईना पण भक्ती श्रध्देने करत असेल  त्या त्या भक्तांच्या त्या त्या विशिष्ट श्रध्देला मी स्थिर करतो.

2) **तस्य तस्य तां एव श्रध्दां अचलां विदधामिः** या वेगवेगळ्या देवता आणि त्यांची विविध रुपे आपणच तर तयार केलीत. विष्णुचे स्वरुप शांत व सौम्य. त्याविपरीत कालीमातेचे भयंकर. भयंकर स्वरुपाची असल्यामुळे कालीमाता फळा-फुलांनी संतुष्ट होत नाही. तिला संतुष्ट करण्यासाठी बोकडाचा बळी हवा. कलकत्ता येथे कालीमातेच्या देवळात बोकडांच्या रक्ताच्या नद्या वहाताना बघून गांधीजींच्या मनी घृणा उपजली. ते कालीमातेचे दर्शन घ्यायला गेलेच नाहीत. अर्थात् कालीमातेचा अपवाद वगळता अन्य देवी देवता सौम्यस्वरुपी असल्यामुळे त्यांची पूजाविधी सौम्य आहे ही आनंदाची बाब आहे. भगवंत कुणाच्याही श्रध्देला विचलित करत नाहीत, त्या श्रध्देला दृढ करतात. भगवंत जीवाच्या स्वातंत्र्यात ढवळाढवळ नाही करत, हस्तक्षेप नाही करत. भगवंताचा हा नियम तमाम प्राणीमात्रांबाबत समान आहे. कुणी एखाद्या ग्रंथावर श्रध्दा राखतो तर कुणी एखाद्या सद्गृहस्थावर श्रध्दा ठेवतो. याबाबतीत तुलसीदास म्हणतात :

***जेहि के जेहि पर सत्य सनेहू।***
***सो तेहि मिलहिं न कछु संदेहू॥***

अर्थात् ज्याचा ज्याच्यावर खराखुरा स्नेह आहे - असतो - श्रध्दा असते. ते प्राप्त होईलच याविषयी मनी संदेह नसावा.

: 22 :

*स तया श्रध्दया युक्तस्तस्याराधनमीहते ।*
*लभते च ततः कामान् मयैव विहितान् हि तान् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सः तया श्रध्दया युक्तः** तो देवतोपासक त्या श्रध्देने युक्त होऊन
- **तस्याः राधनं ईहतेः** त्या देवतेची आराधना करु लागतो
- **च ततः** आणि त्या आराधनेमुळे त्या देवतेपासून
- **मया एव हिः** माझ्याकडूनच
- **विहितान्ः** निर्मित, दिले गेलेल्या
- **तान् कामान्ः** त्या इच्छित कामनांना, भोगांना
- **लभतेः** प्राप्त करतो

**अर्थ**

तो त्या श्रध्देने युक्त होऊन त्या देवतेचे पूजन करतो आणि त्या देवतेकडून मीच ठरविलेले ते इच्छित भोग निश्चितपणे मिळवतो.

*त्या श्रध्देच्या बळानें ते त्या स्वरुपास पूंजिती*
*मग मागितले भोग पावती मीं चि निर्मिले ।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) देवतांचे ते उपासक श्रध्देने युक्त होऊन त्या देवतांची आराधना करतात 2) त्या देवतांच्या आराधनेने (आराधना करुन) मज द्वारे निर्मित कामनांना प्राप्त करतात

**स्पष्टीकरण**

या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. अ) परमेश्वराचा आश्रय त्यजून विविध देवतांचा आश्रय घेतला. ब) त्यांच्यावरील श्रध्देला भगवंताने दृढ केले. क) पुनश्च त्या देवतांच्या आराधनेत उपासक लीन झाले. या श्लोकाला 20 आणि एकविसाव्या श्लोकांच्या क्रमातच वाचायला हवे. या तीन श्लोकांमधून तीन मुद्दे आलेत. हा शास्त्रीय क्रम आहे. हाच क्रम व्यवहारातही आढळतो. देवोपासक श्रध्देने त्या देवतेची उपासना करतो.

1) **सः तया श्रध्दया युक्तः तस्याः राधनं ईहतेः** देवतांची आराधना वैराग्यवृध्दीसाठी नाही केली जात. विविध प्रकारच्या इच्छा, वासना आणि महत्वाकांक्षांच्या परिपूर्तीसाठी ईश्वराची शरणागती पत्करली जाते आणि आराधना केली जाते. ऐहिक सुखाच्या अधिकाधिक प्राप्तीसाठी, संपत्तीसाठी, हृष्टपुष्ट-धडधाकड देहासाठी, संकट ओढवू नये यासाठी देवतेची आराधना केली जाते. काहीही असो, ही आराधना सकाम असली तरी त्याचे फळ हे मिळतेच मिळते.

2) **मया एव हि विहितान् कामान् लभतेः** ईश्वरद्वारा निर्मित कामना आणि कामनांच्या फळांना आराधक प्राप्त करतो. देवतेच्या आराधनेचे फळ देवतामार्फत नाही लाभत. देवतांच्या भक्तांना तर असेच वाटते की कामनेचे फळ देवतेनेच दिले, पण भगवंताचे निवेदन असे आहे की देवतेच्या आराधनेने लाभलेल्या फळाचे दाते स्वतः भगवंतच आहेत. फलदाता भगवंतच आहेत. पुण्यकर्मे असोत वा पापकर्मे असोत फळ देणे ईश्वराच्याच हाती असते. आपण देवतेची उपासना केली तर फळसुध्दा देवतेनेच द्यायला हवे असे वाटू शकते किंवा उपासना, ध्यान, भक्ती हीही एका कर्माच्या रुपात मोडतात म्हणून कर्मामुळेच त्याचे सरळ-सरळ फळ लाभायला हवे पण कर्मे जड असून ती आचरताच नष्ट होऊन जातात. फळ कालांतराने लाभते. नष्ट झालेल्या कमांर्पासून वा कर्मांच्या अभावातून फळाची उत्पत्ती होणे संभवनीय नाही. अशा प्रकारे देवतेच्याही माध्यमातून सरळ फळ लाभत नसते कारण की देवता तर कल्पनेत वसतात. एका पाषाण खंडाला विशिष्ट आकार दिला, त्याला विष्णु हे नामाभिधान दिले. दुसऱ्या पाषाण खंडाला वेगळा आकार देऊन शंकर नाव दिले. तिसऱ्या पाषाण खंडाला विशेष आकार देऊन कालिकामाता म्हणून संबोधिले. नाव देऊन त्याप्रती विशेष भाव मनी राखून उपासना करतात पण ज्याने या संपूर्ण ब्रह्मांडाची रचना केली त्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही सत्ता अस्तित्वात नाही. यामुळे भगवंत म्हणतात की त्याची देवश्रध्दाही मीच दृढ करतो. त्या देवतेच्या आराधनेतून लाभणारे फळसुध्दा मीच देतो. ज्या कामनेच्या पूर्ततेसाठी मोठ्या तल्लीनतेने-एकाग्रतेने आराधना केली जाते ती मीच सिध्दीला नेतो - पूर्णत्वाला नेतो अशा प्रकारे देवता आणि भगवंत यातला भेद अधोरेखित केला गेला आहे.

:23:

*अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।*
*देवान् देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु तेषां अल्पमेधसाम्:** पण त्या मतीमंद (अल्पबुध्दी) पुरुषांचे
- **तत् फलं:** (मिळणारे) ते फळ
- **अन्तवत् भवति:** नाशवंत असते
- **देवयज:** देवतांचे पूजन करणारे, उपासना करणारे
- **देवान् यान्ति:**देवलोकाला (स्वर्गाला) प्राप्त होतात
- **मद्भक्ता:** मां अपि यान्ति: माझे भक्त (पाहिजे तसे भजोत शेवटी) मलाच प्राप्त होतात

**अर्थ**

पण त्या मंदबुध्दी लोकांचे ते फळ नाशवंत असते तसेच देवतांची पूजा करणारे देवतांना प्राप्त होतात आणि माझे भक्त मला कसेही भजोत अंती मलाच येऊन मिळतात.

*अल्प बुध्दीमुळें त्यांस मिळे फळ अशाश्वत*
*देवांचे भक्त देवांस माझे ते मज पावती।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) देवतांची भक्ती करणारे भक्त अल्पबुध्दी आहेत. त्याना देवतांच्या आराधनेने मिळणारे फळ विनाशी आहे. 2) देवतांची उपासना करणारे भक्त देवतांना प्राप्त होतात. 3) जे माझी भक्ती करतात ते मलाच प्राप्त होतात. त्याना मोक्षलाभ होतो.

**स्पष्टीकरण**

1) **तेषां अल्पमेधसां तत् फलं अन्तवत् भवति:** देवतांची उपासना करणारे भक्तजन अल्पमेधस म्हणजे अल्पबुध्दी म्हणजे विवेकशून्य आहेत. सर्वत्र व्याप्त परमतत्वाचे ज्याना आकलन नाही, ज्यांच्या ठायी विवेकशक्ती नाही, जे भावनांच्या वावटळीत वाहून जातात आणि परमात्म्याला सोडून अन्य देवतांच्या पाठीमागे धावतात अशा लोकांना अल्पफळ लाभते आणि कामनांची तृप्ती हेच मूळात अल्प फळ आहे, कारण ती का शाश्वत असते ? कामना तृप्तीचा एकमेव उपाय म्हणजे कामनांना घालवून देणे होय, कामनांना उडवून लावणे होय. एकेका कामनेची तृप्तता करत रहावे लागते आणि कामना अंतहीन आहेत. यामुळे या अध्यायाच्या आरंभी एक शब्द आला मय्यासक्तमना: पार्थ 'माझ्या ठायी ज्याचे मन आसक्त झालेय असा' परमात्म्याची आसक्ती दु:खद नसते. परमात्मा आनंद सागर असल्यामुळे परमात्म्याच्या आसक्तीत तृप्ती आणि आनंदाचा अनुभव असतो. परमात्म्याप्रती जेवढी अधिक आसक्ती असेल तेवढा आनंदलाभ होईल. कामनांची स्थिती या उलट आहे. कामनांच्या आसक्तीमुळे तात्कालिक तृप्तीचा अनुभव जरुर मिळतो पण शाश्वत आनंदाचा लाभ काही होऊ शकत नाही. पुत्र प्राप्तीसाठी देवतांची आराधना केली आणि पुत्र-प्राप्त झाला. यातून आनंद खचितच मिळाला पण पुत्र सुपुत्र असेल तर ना? कुपुत्र असेल तर कसला आला आनंद? आणि अल्पायुषी ठरला तर मग दु:खाचा डोंगरच कोसळेल. धनप्राप्तीसाठी देवतांची उपासना केली. धन प्राप्ती झाली. धन कायमस्वरुपी टिकून राहील असे कोण बरे सांगू शकतो? वाटेल तेवढे प्रयत्न केले, हवे तेवढे यश संपादन करता येईल तरी ते विनाशी-अनित्य असल्यामुळे शाश्वत फळ नाही लाभू शकणार! यामुळे गीतेचे निवेदन असे आहे की त्या अविवेकी देवतोपासकांना मिळणारे फळ अंतवान असेल म्हणजे शाश्वत-चिरकाळ टिकणारे नसेल.

2) **देवयज:** देवान् यान्ति देवतोपासकाना देवांची प्राप्ती होते म्हणजे स्वर्गप्राती होते. देवतांच्या आराधनेमुळे प्राप्त होणारे अल्पकालीन फळ दोन प्रकारचे लाभते - असते. एक तर हयातीत लाभणारे फळ आणि दुसरे देहत्यागानंतर प्राप्त होणारे फळ. हयातीत लाभणाऱ्या फळाचा अनुभव ऐहिक असतो. मृत्युनंतर लाभणाऱ्या फळाचे स्वरुप स्वर्गप्राप्ती असते. चर्मचक्षुंनी तर स्वर्गाचे दर्शन होणे कदापि शक्य नाही यामुळे या जन्मी स्वर्गाप्रती श्रध्दा जागणे केवळ असंभवनीय! देह सुटल्यावरच स्वर्ग प्राप्ती आणि स्वर्गातून या लोकी पुनरागमनाची कल्पना केली गेली आहे. स्वर्गात किती काळ रहावे लागेल याचा समय काही ठरलेला नाही. विनोबा म्हणतात की या काळात मन वगैरे तमाम इंद्रियांना आराम लाभतो. गाढ निद्रेत तमाम इंद्रियांचा व्यवहार थांबतो-थंडावतो-थबकतो,

यामुळे प्राणाला आराम मिळतो. देहत्याग झाल्यावर प्राणतत्व लिंगदेहासोबतच रहाते. देहत्यागानंतर लिंगदेह प्राणाच्या आरामासाठी काही काळपर्यंत देहधारण न करताच रहातो. प्राणाच्या विश्रांतीकाळी लिंगदेहाला मनाची सोबत असल्यामुळे मनाचे स्वप्न सुरु होते. मनात जोवर वासना असतात-वसतात तोवर मन निर्व्यापार-व्यापारशून्य नाही राहू शकत. हयातीत चांगली कर्मे केली असतील तर चांगली स्वप्ने पडू शकतात. अशा सुखद स्वप्नात जीवात्मा बराच काळ राहू शकतो. स्वर्गात सुख नांदते यामुळे सुखस्वप्नांची अवस्था जणू काही स्वर्गीय अवस्था असते. यामुळे या जन्मी कामनापूर्तीसाठी का असेना पण देवतोपासना मन:पूर्वक केली असेल तर देहत्यागानंतर स्वर्ग लाभतो म्हणजे त्याला प्रदीर्घ काळ सुखस्वप्ने उपभोगता येतात. पुनश्च तो या मर्त्यलोकी जन्माला येतो.

3) **मद्भक्ता:** मां अपि यान्ति: देवतांची भक्ती करणारे स्वर्गाला पोहोचतात पण माझी भक्ती करणारे मलाच प्राप्त होतात, मोक्ष प्राप्त करतात असे गीताकार योगेश्वराचे म्हणणे आहे. साक्षात् भगवद्भक्तीचे फलित मोक्ष आहे. मोक्ष लाभला म्हणजे पुनरपि जन्म नाही घ्यावा लागत. अर्थात् हे खूप साधे-सोपे नाही. तुलसीदास म्हणतात :

***भगति तात अनुपम सुख मूला।***
***मिलइ जो संत होहिं अनुकूला॥***

अर्थात् परमात्मभक्ती अनुपमेय आणि सुखाचे मूळ आहे. संत अनुकूल झाले म्हणजे ती भक्ती प्राप्त होऊ शकते. भक्तीसाठी सत्संगती हवी.

: 24 :

***अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुध्दय:।***
***परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अबुध्दय:** अविवेकी, बुध्दिहीन पुरुष
- **मम अव्ययं:** माझ्या अव्यय म्हणजे अविनाशी म्हणजे अक्षय
- **अनुत्तमं परं भावं:** उत्कृष्ट आणि अतिश्रेष्ठ भावाला
- **अजानन्त:** तत्त्वत: न जाणल्यामुळे अज्ञानी
- **अव्यक्तं मां:** मन आणि इंद्रिये यांच्या पलिकडील मज सच्चिदानंदघन अव्यक्त परमात्म्याला
- **व्यक्तिं आपन्नं:** व्यक्त
- **मन्यन्ते:** मानतात, समजतात

### अर्थ

मूढ लोक माझ्या सर्वश्रेष्ठ, अविनाशी अशा परम भावाला न जाणता मन-इंद्रियांच्या पलीकडे असणाऱ्या, सच्चिदानंदघन परमात्मरुप मला मनुष्याप्रमाणे जन्म घेऊन प्रगट झालेला मानतात.

***व्यक्त मी हें चि ते घेती बुध्दि-हीन न जाणुनी***
***अव्यक्त थोर जें रुप माझें अंतिम शाश्वत।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) अज्ञानी आणि अविवेकी जन ईश्वराच्या अव्यय, अक्षय, उत्कृष्ट आणि अत्युत्कृष्ट स्वरुपाला जाणत नाहीत. 2) याउलट अव्यक्त परमात्म्याला व्यक्त समजतात.

### स्पष्टीकरण

1) उपासक गण देवतांचीच उपासना करतात आणि ईश्वराची उपासना का नाही करत? गीतेने याची दोन कारणे दिलीत. एक म्हणजे उपासकाची स्थिती आणि दुसरे म्हणजे भगवंताचे स्वरुप. उपासकाच्या स्थितीचे वर्णन दोन विशेषणांनी केले गेले आहे. अविवेकी आणि अज्ञानी ही ती विशेषणे होत. देवतोपासकांमध्ये विवेक न्यून असतो. याच्या मूळाशी कामना वा वासना असते. चित्ताच्या ठायी अनेक इच्छा वसतात आणि त्यांचे प्राबल्यही असते. इच्छा हा मनाचा गुण आहे. विचार वा विवेक हा बुध्दीचा गुण होय. मानवी जीवनात मनाचेच प्राबल्य असते, बुध्दी प्राबल्य नसते. बुध्दीच्या ठायी दोन प्रकारच्या शक्ती नांदतात एक म्हणजे ज्ञान ग्रहण करण्याची शक्ती आणि दुसरी सत्य-असत्य, धर्म-अधर्म वगैरे पारखण्याची शक्ती. ज्ञान ग्रहण करण्याच्या शक्तीचेही उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असे तीन प्रकार संभवतात. अर्थात् ज्ञान ग्रहण करण्याच्या शक्तीपेक्षा विवेक शक्तीची योग्यता खूपच अधिक असते. माणसाची प्रवृत्ती ज्ञान ग्रहण करण्याची शक्ती वाढवण्याकडेच

असते. ज्ञानशक्ती म्हणजे विविध प्रकारे निसर्गाचे विज्ञान आत्मसात करण्याची शक्ती होय. केवळ ज्ञान ग्रहण करण्याची शक्ती वृध्दींगत करुन, विविध प्रकारचे ज्ञान-विज्ञान संपादन करुन-वाढवून-विवेक शक्ती वृध्दींगत करता येत नाही - नसते. डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक वगैरे जे बौध्दिक वर्गातले लोक आहेत त्यांच्यापाशी त्या-त्या विषयांचे खूप ज्ञान असू शकते पण त्यांच्या ठायी विवेक शक्ती वृध्दींगत झालेली असतेच असे नव्हे. मनावर नियंत्रण स्थापू शकण्याची क्षमता म्हणजे विवेक शक्ती होय. ज्ञानशक्ती वृध्दींगत करण्यासोबत विवेकशक्ती वृध्दींगत करण्याचे लक्ष्य वा ध्येय असेल तर विवेकशक्ती वाढू शकते. ज्ञानशक्ती वृध्दींगत केली तर धन आणि प्रतिष्ठा दोन्ही लाभू शकतात. यामुळे समाजाचे ध्येय केवळ ज्ञानशक्ती वृध्दींगत करण्याकडेच असते. यामुळे विवेक शक्तीचा विकास होऊ शकत नाही. यामुळे मनावर काबू उरत नाही. विवेक शक्ती सत्संगतीमुळेच वृध्दींगत होते. विवेक शक्तीचा अर्थ काही केवळ सत्य-असत्य, नीती-अनीती, धर्म-अधर्म, कार्य-अकार्य, योग्य-अयोग्य याचा निर्णय करणे नव्हे, याला जाणून घेणे नव्हे पण यानुसार मनाला वागता यावे-वर्तन-व्यवहार करता यावे. या प्रकारची नियंत्रण शक्तीही यात समाविष्ट आहे. अशा प्रकारची विवेक शक्ती जोवर जीवनात वृध्दींगत होत नाही तोवर जीवनाच्या क्रिया मनाच्या अनुसार चालतात. मन भावात्मक आहे. मनात भल्या-बुऱ्या भावनांचे तरंग उठत असतातच. प्रबळ इच्छे-वासनेनुसार जीवन सुरु असते. जीवनक्रम चालत रहातो. यामुळे भगवंताने विवेक शक्तीच्या न्यूनतेचा मुद्दा सर्वप्रथम मांडला. दुसरा मुद्दा परमात्म स्वरुप विषयक अज्ञानाचा आहे.

मम अव्यक्तं अनुत्तमं परं भावं अजानन्तः परमात्म स्वरुपाच्या तीन विशेषणांचा उल्लेख करुन गीता सांगते की भगवंताच्या अव्यक्त, उत्कृष्ट व अतिश्रेष्ठ भावाला म्हणजे स्वरुपाला न जाणणारे. पहिले विशेषण आहे अव्यक्त. हे सकल विश्व व्यक्त आहे. यात नजरेने बघता न येऊ शकणारे अतिसूक्ष्म पदार्थही आहेत पण ते इंद्रियाना गोचर म्हणजे बोध करता येऊ शकणारे आहेत. सूक्ष्मदर्शक यंत्राने बघता येऊ शकतात. अव्यक्त शब्दाचा अर्थ काही केवळ बघू न शकणे वा बघता न येणे एवढाच नव्हे तर इंद्रिय गोचर न होणे असाही आहे. परमात्मा दिसू लागेल किंवा कुठल्याही इंद्रियाने गोचर होऊ लागेल तर तो मग विनाशी ठरेल, त्याला अविनाशी कसे म्हणता येईल ? मग तो जगाची वस्तु बनून जाईल, तुमच्या-आमच्या-आपल्या सारखा होऊन जाईल मग तर परमात्म्याचे दुसरे कुठले तरी मूळ कारण - आदि कारण शोधावे लागेल पण अशी शक्यता नाही. तो तर अज, अव्यय, अविनाशी, निर्विकार, निरवयव, अनंत, अतिसूक्ष्म देखिल आहे म्हणून अव्यक्त म्हणजे इंद्रिय गोचर नसणारा. परमात्मा अनुभवगम्य शुध्द स्वरुपी आहे. मनाने त्याचा अनुभव घेता येऊ शकतो.

दुसरे विशेषण आहे 'अनुत्तम' म्हणजे अति उत्कृष्ट, ज्याहून दुसरे काहीही उत्तम नाही असे तत्त्व ! जगात अनेक पदार्थ उत्कृष्ट म्हणजे सुंदर आहेत. त्याना बघून मन प्रसन्न होते. या विशाल सृष्टीत अनंत प्रकारचे सौंदर्य विलसित आहे. आता परमेश्वराने निर्मिलेली ही सृष्टी जर इतकी सुंदर अन् रमणीय आहे तर या सृष्टीचा निर्माता परमात्मा किती सुंदर असेल याची कल्पनाच केलेली बरी !

तिसरे विशेषण आहे 'परं भावम्' म्हणजे अत्यंत श्रेष्ठ. अति सुंदर वस्तु प्रमाणे अति श्रेष्ठ वस्तुही जगात आढळते. सुंदर वस्तु श्रेष्ठ असेलच असे काही सांगता येत नाही. सॉक्रेटिस श्रेष्ठ होते पण सुंदर नव्हते. परमात्मा अति सुंदर तर आहेच आणि अति श्रेष्ठही आहे. अशा अव्यक्त-अति सुंदर-अति श्रेष्ठ रुपाला न जाणणारे.

2) अव्यक्तं मां व्यक्तिं आपन्नं मन्यन्ते: अव्यक्त म्हणजे अप्रकट असा जो 'मी' त्याला व्यक्त म्हणजे प्रकट झाला असे समजले जाते. परमात्मा अव्यक्त आहे. त्याचे स्वरुप व्यक्त आहे, ते भासिक-भासमान होणारे - आहे, यथार्थ नाही. परमात्मा आपले यथार्थ रुप गुप्त राखून भासमान स्वरुप दाखवत रहातो. जगात एक परमात्माच सर्वत्र व्याप्त आहे. परमात्म्याच्या ठायी अशी अलौकिक शक्ती आहे की तो एक असताना देखिल अनेक वस्तुंचा भास घडवतो. अनेक खोट्या वस्तुंच्या भासमान करण्यातून परमात्मा आपल्या अस्तित्वाचे भान करवतो ही केवढी अद्भुत गोष्ट आहे. परमात्म्याने जर दुसऱ्या वस्तुंचा भास करवून दिला नाही तर जगात परमात्म्याच्या अस्तित्वाचे ज्ञान कसे होईल? संपूर्ण जगत विनाशी आणि परिवर्तनशील आहे हे एक कार्य आहे. त्याचे कारण अविनाशी, अपरिवर्तनशील, निर्विकार आणि

निराकार असायलाच हवे. देवतांच्या भक्तांना परमेश्वराचे हे अविनाशी, अव्यक्त अद्भुत असे रुप बघता येत नाही म्हणजे ते त्या रुपाला जाणू शकत नाहीत. त्यांच्या बुध्दीत ते रुप उतरत नाहीत. यामुळे ते अनेक देवतांची कल्पना करतात कारण ते अव्यक्त परमात्म्याला प्रकट रुपात समजतात. यामुळे त्या देवतांच्या उपासने पाठीमागे नादावतात-वेडे होतात. परमात्म्याला विसरुन जातात. अर्थात् या उपासनेचे फळही त्याना अल्पच लाभते.

: 25 :

***नाहं प्रकाश: सर्वस्य योगमायासमावृत: ।***
***मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगमायासमावृत: अहं:** आपल्या योगमायेचे आवरण घेतल्यामुळे मी
- **सर्वस्य प्रकाश: न:** मी सर्वांना प्रत्यक्ष होत नाही, प्रकाशित होत नाही
- **अयं मूढ: लोक:** हे मूढ म्हणजे अज्ञानी जीव
- **अजं अव्ययं मां:** जन्मरहित, अव्यय म्हणजे अविनाशी परमात्मा अशा मला
- **न अभिजानाति:** (तत्त्वत:) जाणत नाहीत

**अर्थ**

आपल्या योगमायेने लपलेला मी सर्वांना प्रत्यक्ष दिसत नाही म्हणून हे अज्ञानी लोक जन्म नसलेल्या अविनाशी मला परमेश्वराला जाणत नाहीत. अर्थात् मी जन्मणारा - मरणारा आहे, असे समजतात.

***वेढिलों योग-मायेनें अंधार चि जगास मी***
***अजन्मा नित्य मी कैसा मूढ कोणी न ओळखे ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) आपल्या योगमायेने लपलेला मी सर्वांसाठी प्रकाशित होत नाही. 2) हे अज्ञानी जन मला जन्मरहित आणि अव्यय स्वरुपाचा असलेला जाणत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) योगमायासमावृत: अहं सर्वस्य प्रकाश: न  गीता म्हणते की आपल्या योगमायेने झाकलेला असल्यामुळे- आवृत्त असल्यामुळे -परमेश्वर सर्वांसाठी प्रकट होत नाही - प्रकाशित होत नाही. भगवंताची योगमायाही अलौकिक शक्ती आहे. या मायेने ईश्वर स्वत:ला झाकून घेऊन मिथ्या भास प्रकटवत रहातो. हे भगवंताचे नाटक आहे. भगवंताच्या ठायी ज्ञान आणि सर्गशक्तीची सदैव संपन्नता असते. परमात्म्याची ज्ञानशक्ती हे त्याचे स्वरुप होय. याला स्वरुपशक्ती असेही म्हणता येईल. परमात्म्याच्या ज्ञान शक्तीचा आपल्याला अनुभव येतच रहातो कारण आपल्याला सदैव तमाम वस्तुंचे ज्ञान होत रहाते. क्रोध जागला की त्याचे ज्ञान होते. क्रोध संपला की त्याचे ज्ञान होते. चित्त अशांत झाले म्हणजे त्याचे ज्ञान होते. मन-चित्त शांत झाले की त्याचे ज्ञान होते. अशा प्रकारे मनातल्या नाना भाव-विचारांना आपण जाणत असतो. तसेच बाहेरच्या जगात घटित होणाऱ्या नाना घटना, व्यापार, व्यवहार चाललेले असतात त्यांचेही ज्ञान होते. ही ज्ञान स्वरुपता कदापि नष्ट झाल्याचा अनुभव आपल्याला होत नाही. आपल्या अनुभवात येणारी ज्ञान स्वरुपता प्रभुचे अखंड व नित्यस्वरुप आहे. जगाचा भास करवून देण्याची परमात्म्याच्या ठायी असणारी प्रचंड शक्ती, हे त्याचे दुसरे रुप असून तेही अखंड आहे. ही जी परमात्म्याची दोन रुपे आहेत ती एकमेकापासून भिन्न नाहीत. परमात्म्याचे जे चैतन्य स्वरुप आहे त्याच्या ठायी जगाचा भास करवून देण्याची शक्ती आहे. परमात्म्याला जर आपले स्वरुप गुप्त ठेवायची इच्छा असेल तर तो दुसऱ्या रुपात प्रकट झाला तरच असे करणे शक्य आहे. हरिश्चंद्राचा अभिनय करत असतानाच नट स्वत:च्या रुपाला गुप्त ठेऊ शकतो. परमात्मा स्वयं जगात अस्तित्वमान आहे असा बोध करुन द्यायचा वा भान करुन द्यायचे असेल तर दुसऱ्या कुठल्यातरी वस्तुचा भास करवूनच असे करणे शक्य आहे. एक परमात्माच अखिल ब्रह्मांडात व्याप्त आहे-असेल-आणि दुसरी कुठलीही वस्तु अस्तित्वात नसावी-नसेल-नाही तर मग परमात्मा या तत्वाचे अस्तित्व आहे हे कुणाला माहित होऊ शकेल ? यामुळे परमात्म्याचे अस्तित्व आहे हे जाणून घ्यायचे असेल तरीही दुसऱ्या वस्तुचा (ज्याचे अस्तित्व खरे म्हणजे नसेल) भास करवून देणे हाच उपाय उरतो.

यामुळे परमात्म्याचे निवेदन असे आहे की मी आपल्या योगमायेने म्हणजे निरवयव-अवयवरहित, निर्गुण, निराकार, अमर्यादित, अव्यक्त असतानासुध्दा सावयव-अवययुक्त-सगुण, साकार, मर्यादित, व्यक्त वगैरेचा भास करु न शकण्याच्या शक्तीमुळे सर्वासाठी प्रकट नाही होऊ शकत.

2) **अयं मूढः लोकः** अजं अव्ययं मां न अभिजानाति मूढ लोक अव्यय म्हणजे क्षयरहित, अविनाशी अशा परमात्म रुपाला जाणू शकत नाही. परमात्म्याचे निर्गुण, निराकार, अव्यक्त रुपच सत्य आहे आणि जे व्यक्त, सगुण, साकार, विनाशी स्वरुप आहे ते काही खरे नव्हे हे ज्ञान मूढ लोकाना काही नाहीये. तुलसीदास म्हणतात:

*काम क्रोध मद लोभ रत, गृहासक्त दुखरुप ।*
*ते किमि जानिहि रघुपतिहि, मूढ परे तम कूप ॥*

अर्थात् काम, क्रोध, मद, लोभ वगैरे विकारांमध्ये रत असणारे रघुपतीला-परमात्म्याला कसे बरे जाणू शकतात-कारण की ते मूढ तमरुपी - अंध:काररुपी विहीरीत पडलेले आहेत.

दर्पण स्वच्छ नसेल तर आपले रुप दिसत नाही-बघता येत नाही. कार्यरुप जग आहे. परमात्मा कारणरुप आहे. कार्य आणि कारण भिन्न नाहीत. जग आणि परमात्मा वेगळे नाहीत. कार्याचे कारणाशिवाय स्वतंत्र अस्तित्व नसते मग कारणरुप परमतत्वाला विसरुन जावे आणि कार्यरुप जगात लुब्ध व्हावे - फसून जावे हे काही खरे नाही. यामुळे भगवंताचे जे निर्गुण, निराकार, अव्यय स्वरुप आहे ते जाणून घेता येऊ शकत नाही. अशा प्रकारे आपल्या योगमायेने आच्छादित असल्यामुळे सारे मूढ जन ईश्वराला ओळखू शकत नाहीत. यामुळेच तर लोक भिन्न-भिन्न देवतांची उपासना करत रहातात. देवता आणि परमात्मतत्व याची एक नवीन मांडणी या विवेचनाच्या माध्यमातून करताना दिसते. याचा एक विवेकसंमत अर्थ इथे निरुपित केला गेला आहे.

: 26 :

***वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।***
***भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुनः** हे अर्जुना
- **अहं समतीतानिः** मी आणि पूर्वी होऊन गेलेली
- **च वर्तमानानिः** आणि जे वर्तमानकाळी आहेत
- **च भविष्याणिः** आणि जे पुढे भविष्यकाळी होणारे
- **भूतानिः** अशा प्राणीमात्रांना
- **वेदः** जाणतो
- **तु मां कश्चन न वेदः** पण मला कुणीही (श्रध्दा भक्तीरहित पुरुष) जाणत नाही

**अर्थ**

हे अर्जुना, पूर्वी होऊन गेलेल्या, वर्तमान काळातील आणि पुढे भविष्यकाळात होणाऱ्या सर्व प्राण्याना मी जाणतो पण श्रध्दा-भक्ती नसलेला कुणीही मला जाणत नाही.

***झालीं जीं जीं हि होतील भूतें आहेत आज जीं***
***सगळीं जाणतों तीं मी मज कोणी न जाणती ।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जे भूतकाळात होऊन गेले, जे आज जिवंत आहेत आणि जे भविष्यात होणार आहेत अशा सर्व प्राण्याना मी जाणतो 2) पण मला कोणी जाणत नाही.

**स्पष्टीकरण**

1) अहं समतीतानि च वर्तमानानि च भविष्याणि भूतानि वेदः भूतकाळात होऊन गेलेल्या, वर्तमानकाळात जीवंत असणाऱ्या आणि भविष्यकाळात जन्माला येणाऱ्या तमाम प्राण्याना परमात्मा जाणतो पण त्या परमात्म्याला मात्र कुणी जाणत नाहीत. हा मोठा अद्भुत मुद्दा आहे. या विशाल जगाची रचना इतकी अद्भुत आहे की बुध्दी चक्रावून जाते. माणूस, पशु, कृमी-किटक एवढ्या प्रचंड संख्येने जन्माला येतात की आपण त्यांची गणनासुध्दा नाही करु शकत. पावसाच्या ऋतुत रात्री अगणित कीटक एकत्र येतात त्यांच्या ठायी विलक्षण अद्भुतता

वसते. हे सारे कुठून येतात आणि कुठे जातात ? आणि हे सारे अल्पजीवी असल्यामुळे यांचे ज्ञान संपादन करणे अशक्य असते. आजकाल शास्त्रज्ञ नवीन-नवीन शोध लावतात पण ते एखाद्या प्राण्याला उत्पन्न नाही करु शकत, चैतन्यमय देहाची निर्मिती करायला ते असमर्थ आहेत. इथे भगवंत काही सृष्टी-निर्मितीचा मुद्दा मांडत नाहीहेत. सृष्टी तर कुणी निर्माण करु शकत नाही पण जी सृष्टी निर्मित आहे तिचेही संपूर्ण ज्ञान मानवी आकलन शक्तीच्या पलीकडचे आहे. ज्ञान आणि आकलन तर दूरच राहो पण याची मोजदाद करायचीही क्षमता मानवी बुध्दीची नाही. या उलट भगवंताचे निवेदन असे की भूत, भविष्य, वर्तमानातील यच्ययावत प्राणीमात्रांचे त्याना ज्ञान आहे. असंख्य प्राण्यांची असंख्य कर्मे आहेत. या तमाम प्राणीमात्रांच्या कर्मानुसार त्याना फळे देणे, कर्मानुसार उच्च-मध्यम-कनिष्ठ कोटीत जन्माला घालणे हे सारे काही भगवंत करतो. संत तुलसीदास म्हणतात :

*असि सब भाँति अलौकिक करनी।*
*महिमा जासु जाइ नहिं बरनी॥*

अर्थात् भगवंताची ही करणी इतकी अलौकिक स्वरुपाची आहे की तिचे वर्णन नाही करता येत.

2) तु मां कश्चन न वेद: पण भगवंताला कुणी जाणत नाही हे सत्य आहे. भगवंत सर्वाना जाणतो. आपण भगवंताला जाणत नाहीत याचे काय बरे कारण असावे ? ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात याचे कारण असे सांगितले आहे : अपि च अविद्यादिमत: संसारिण:, शरीराद्यपेक्षया ज्ञानोत्पत्ति: स्यात्, न ज्ञानप्रतिबंधरहितस्य ईश्वरस्य। अर्थात् अज्ञानी प्रापंचिक जीवांना शरीर वगैरे साधने असल्यामुळे ज्ञान प्राप्त होते पण ज्ञानासाठी (कुठल्याही प्रकारच्या प्रतिबंध रहित ईश्वरासाठी) शरीर वगैरे साधनांची गरज नसते.

जीवमात्राला शरीर वगैरे साधनांच्या माध्यमातून पंचविषयांचेच ज्ञान होते. शरीर वगैरे साधनांच्या मदतीशिवाय जीवाला ज्ञान प्राप्त होत नाही. देहत्याग झाल्यावर जीवात्म्याला मनाची उपाधी लाभते. मनाशी संबंध आल्यामुळे ज्ञान प्राप्ती होते. अशा प्रकारे देह-मन वगैरे उपाधींमुळे जीवाला ज्ञान मिळते, तरी उपाधींमुळे स्वत: बद्दल मात्र अज्ञानही असते-अज्ञान घालवता आले तर काही प्रमाणात परमात्म्याची प्राप्ती होऊ शकते. यासाठी कुठलाही अडथळा नाही. परमेश्वर अखिल ब्रह्मांडाची उपाधी धारण करतो पण यापासून अलिप्त राहिल्यामुळे त्याच्या ज्ञानशक्तीत-आकलन बुध्दीत- कुठलाही अडथळा निर्माण न होता त्याला समस्त जगाचे ज्ञान प्राप्त होते. देहासक्तीच्या प्रतिबंधामुळे आपली ज्ञान शक्ती मर्यादित होऊन जाते. ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात उल्लेख येतो: न च तस्य ज्ञानप्रतिबंध: शक्तिप्रबंध: वा क्वचिदपि अस्ति। सर्वज्ञत्वात् सर्वशक्तिवात् च । अर्थात् त्या ईश्वरासाठी यत्किंचितही ज्ञान वा शक्तीच्या संदर्भातला प्रतिबंध संभवत नाही कारण की त्याच्या ठायी अखंड सर्वज्ञ शक्ती आणि ब्रह्मांड निर्माण करायची शक्ती असते.

परमात्म्याच्या ठायी सर्वज्ञ शक्ती अखंडपणे वसते त्यामुळे त्याच्या ज्ञान शक्तीवर कुठलाही प्रतिबंध नसतो. त्याच्यापाशी जी सर्ग शक्ती म्हणजे हवे ते निर्माण करण्याची जी शक्ती आहे तीही अखंड असते. या शक्तीच्या अभिव्यक्ती साठीही कुठलाही प्रतिबंध नसतो कारण की ईश्वर जगाच्या उपाधींनी युक्त असूनही अलिप्त असतो. यामुळे ज्ञान व सर्ग-सर्जनशक्ती दोन्हीही जशाच्या तशाच कायम रहातात. या संदर्भात ब्रह्मसूत्र शांकरभाष्यातून शंकराचार्यांनी सुस्पष्टपणे सांगितले आहे :यत्प्रसादात् हि योगिनां अपि अतीतानागतविषयं प्रत्यक्षं ज्ञानं इच्छन्ति योगशास्त्रविद: किमु वक्तव्यं तस्य नित्यसिध्दस्य ईश्वरस्य सृष्टिस्थितिसंहृतिविषयं नित्यज्ञानं भवति इति। अर्थात् योगशास्त्रवेत्त्यांची अशी मान्यता आहे की ईश्वराच्या प्रसादामुळे योगीजनांनाही भूत आणि भविष्यातील घटनांचे प्रत्यक्ष ज्ञान होते. असे आहे मग त्या नित्य सिध्द ईश्वराला तर सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती अणि लय याबाबतीत नित्य म्हणजे सदा न् कदा ज्ञान असतेच असते.

: 27 :

*इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।*
*सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप भारत:** हे भरतवंशी, परंतपा, म्हणजे शत्रुला ताप देणाऱ्या अर्जुना
- **सर्वभूतानि:** सर्व प्राणीमात्र
- **सर्गे इच्छाद्वेषसमुत्थेन:** उत्पत्तीच्या समयी इच्छा व द्वेष यांच्यापासून उत्पन्न झालेल्या
- **द्वंद्वमोहेन:** सुख दु:ख वगैरे द्वंद्व मोहाने
- **संमोहं यान्ति:** अति अज्ञतेला म्हणजे मूढतेला प्राप्त होत असतात

**अर्थ**

हे भरतवंशी अर्जुना, सृष्टीत इच्छा आणि द्वेष यामुळे उत्पन्न झालेल्या सुख-दु:खरुप द्वंद्वाच्या मोहाने सर्व प्राणी अत्यंत अज्ञानाला प्राप्त होतात.

*राग-द्वेषांमुळे चित्तीं जडला द्वंद्व-मोह जो*
*संसारीं सगळीं भूतें त्यानें मोहूनि टाकिली।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) इच्छा-द्वेष यामुळे उत्पन्न सुख-दु:ख वगैरे द्वंद्व (2) यामुळे प्राणीमात्र उत्पत्ती समयी मूढतेला प्राप्त होतात.

**स्पष्टीकरण**

1) **इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन:** इच्छा-द्वेष म्हणजे राग-द्वेषातून उत्पन्न होणारे सुखदु:ख वगैरे द्वंद्व म्हणजे द्वैत. जगात अद्वैताचा अनुभव येत नाही पण तमाम ज्ञानाच्या मूळाशी अद्वैतच वसते. भेदाचे अस्तित्व असेल तर मग भेद आणि अभेद अशा दोन वस्तुंचे अस्तित्व होऊन जाईल ना! भेदाच्या अभावी भेद कसा बरे उरेल? याचा अर्थ असा की एक तर भेद सत्य असेल किंवा अभेद तरी सत्य असेल. एक तर सत्य असेल किंवा असत्य तरी असेल. प्रकाश आणि अंधकार एका जागी नाही राहू शकत. याचा अर्थ असा की जेवढे म्हणून भेद दिसतात ते सारे परिवर्तनशील, क्षणिक आणि विनाशी आहेत. यावरुन जगातले तमाम पदार्थ जर विनाशी, क्षणिक आणि परिवर्तनशील असतील तर त्यांच्या मूळाशी अविनाशी, शाश्वत आणि अपरिवर्तनशील तत्वे नांदायला हवीत असे सहज अनुमान काढता येते.

विनाशी वस्तु कार्याच्या कोटीत मोडते. जिथे कार्य असेल ह्याचे काहीतरी कारण हे असेलच कारण की कारणात मात्र भेदाची कल्पना नाही करता येत. हे मूळ कारण अभेदच असायला हवे. हे अभेद वा अद्वैत वा ईश्वर हे एकच सत्य आहे. भेद-द्वंद्व वा द्वैत नसून ते सारे ईश्वराचे भास होत. या द्वंद्वामुळे म्हणजे भेदामुळे असंख्य पदार्थ दिसू लागतात. त्यांच्या ज्ञानासाठी मन आणि ज्ञानेंद्रिये आहेत. यामुळे विषयांचे ज्ञान होते आणि इच्छा द्वेष वा राग-द्वेष निर्माण होतात. अज्ञानामुळे इच्छा द्वेष वा राग द्वेष उद्भवतात. अज्ञान म्हणजे स्व-स्वरुपाविषयीचे अज्ञान होय. आपण देह, मन, बुध्दी आणि इंद्रियांच्या समूहाला आत्म स्वरुप समजतो यामुळे अहंकाराचा प्रवाह सुरु होतो-मग ममत्व व अहंकाराच्या नदीत राग-द्वेषाच्या लाटा उसळतात. यातून द्वंद्व-मोह उपजतो. द्वंद्व म्हणजे भेद वा द्वैत. आपल्या समोर उपस्थित असलेल्या सृष्टीच्या ठायी कमालीचा भेद दिसतो. या भेदाप्रती आपल्या मनी मोह जागतो. मोहाचे अनेक प्रकार आहेत. पारिवारिक मोह, मान-सन्मानाचा मोह वगैरे. शंकराचार्य लिहितात : तत्र यदा इच्छा-द्वेषौ सुखदु:खतध्देतुसंप्राप्त्या लब्धात्मकौ भवत: तदा तौ सर्वभूतानां प्रज्ञाया: स्ववशापादनद्वारेण परमार्थात्मतत्त्वविषय-ज्ञानोत्पत्तिप्रतिबंधकारणं मोहं जनयत:। अर्थात् सुख-दु:ख आणि त्यांचे निमित्त म्हणजे कारण उपस्थित झाल्यामुळे प्राणीमात्रांच्या ठायी इच्छा-द्वेष उपजतात. हे इच्छा-द्वेष तमाम प्राणीमात्रांना आपल्या बुध्दीच्या वश करतात. यामुळे मोह उपजतो. हा मोह परमार्थ प्राप्तीतला अडसर ठरतो. आत्मतत्वाच्या ज्ञानप्राप्तीतला प्रतिबंध ठरतो. मोहामुळे ज्ञान प्राप्ती होत नाही.

गोड खाल्यामुळे जर सुख लाभत असेल तर गोड खाण्याची इच्छा उत्पन्न होईल. यामुळे सुखाचे निमित्त कारण गोड पदार्थ झालेत. गोड पदार्थ न मिळाल्यामुळे दु:ख उपजले तर द्वेष उत्पन्न होईल. यामुळे एकच वस्तु वा पदार्थ सुख वा दु:खाला जन्म देतो आणि त्यामुळे इच्छा-द्वेष उत्पन्न होतात. प्राणीमात्रांची बुध्दी या इच्छा-द्वेषाला वश होते आणि मोह जागतो. हा मोह परमात्म ज्ञानासाठी बाधक ठरतो. थोडक्यात असे म्हणता येईल की

पंचविषयांशी आपला संबंध सुख-दु:खाचे निमित्त कारण बनतो. सुख दु:खामुळे इच्छा-द्वेष उपजतात. मोह परमात्म ज्ञानात अडसर आहे.

शंकराचार्य म्हणतात: नहि इच्छाद्वेष दोषवशीकृतचित्तस्य यथाभूतार्थविषयज्ञानं उत्पद्यते बहि: अपि किमु वक्तव्यं ताभ्यां आविष्टबुध्दे: संमूढस्य प्रत्यगात्मनि बहुप्रतिबंधे ज्ञानं न उत्पद्यते । अर्थात् --ज्यांचे चित्त इच्छा व द्वेषभावनेला वश झाले अशा पुरुषाना बाह्य विषयांचे ज्ञानसुध्दा यथार्थ रुपात होत नाही. ज्यांची बुध्दी इच्छा-द्वेषाने मोहित झाली असे पुरुष मूढ ठरतात. परमात्मविषयक ज्ञान प्राप्तीसाठी नाना प्रतिबंध आहेत. ईश्वर विषयक ज्ञान म्हणजे प्रत्यगात्मा मूढ पुरुषांना होऊ शकणार नाही.

2) **सर्वभूतानि सर्गेसंमोहं यान्ति:** इच्छा आणि द्वेषामुळे म्हणजे द्वंद्व व मोहामुळे प्राणीमात्र जन्माला येतात. इच्छा-द्वेषामुळे मोह उपजतो. हा मोह ईश्वर ज्ञानाला आवृत्त करतो, झाकून ठेवतो आणि आपला जन्म तर मोहयुक्तच असतो. यामुळे जीवनभर मोहरुपी बीजाचा वृक्ष वाढत रहातो. जीवनात अखंडपणे सत्संगती लाभली तर मोहाचा क्षय होतो. जोवर मोह आहे तोवर जीवन अविवेकी दशेतच व्यतीत होते.

: 28 :

***येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।***
***ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु:** पण, परंतु
- **येषां पुण्यकर्मणां जनानां:** निष्काम भावनेने श्रेष्ठकर्म (पुण्यकर्म) आचरणाऱ्या ज्यांचे
- **पापं अन्तगतं:** पाप नष्ट झाले आहे, क्षीण झाले आहे
- **ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता:** ते रागद्वेष वगैरे द्वंद्वमोहापासून मुक्त झालेले
- **दृढव्रता:** दृढ निश्चयी पुरुष
- **मां भजन्ते:** मला सर्व प्रकारे भजतात, माझी भक्ती करतात

**अर्थ**

परंतु निष्काम भावाने श्रेष्ठ कर्मांचे आचरण करणाऱ्या ज्या पुरुषांचे पाप नष्ट झाले आहे ते राग द्वेषाने उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वरुप मोहापासून मुक्त असलेले दृढनिश्चयी भक्त मला सर्व प्रकारे भजतात.

***ज्यांनी झिजविलें पाप पुण्य-कर्में करुनियां***
***ते द्वंद्व-मोह तोडूनि भजती मज निश्चयें।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे 1) पुण्य कर्म आचरणाऱ्या ज्या लोकांचे पाप क्षीण होऊन गेले आहेत 2) ते द्वंद्व मोहाने मुक्त 3) दृढव्रती निश्चयी माझे भजन करतात

**स्पष्टीकरण**

1) **येषां पुण्यकर्मणां जनानां पापं अंतगतं:** पुण्यवान जनांची पापे क्षीण होतात. सात्विक, राजसी व तामसी अशी कर्मे तीन प्रकारची असतात. राजसी आणि तामसी कर्मांच्या प्राबल्यामुळे पाप कर्मे करण्याकडे प्रवृत्ती राहील. पाप आत्मज्ञानविरोधी आहे. पाप म्हणजे असत्य, हिंसा, गृहस्थाश्रमात ब्रह्मचर्य व्रताचा अमर्यादित भंग. अधिकाधिक धन प्राप्त करुन घेऊन केवळ आपल्या एकट्यासाठी त्या धनाचा विनियोग करणे, संग्रह वृत्तीचे पोषण करणे यासारख्या बाबी. या आध्यात्मिक दृष्ट्या पातक गणल्या जातात. पुण्यकर्मात रत राहून या पापपंकातून मुक्त होता येते. राजसी व तामसी कर्मांचा त्याग करुन सात्विक कर्मांकडे कल झाला --तसा स्वभावच बनून गेला तर उत्तम स्थिती लाभते. तशी लाभायला हवी. मनात काम, क्रोध वगैरे विकारांचे ठाणे असेल तरीहीचित्तशुध्दी संभवत नाही. यामुळे बाहेर सात्विक कर्मांचे आचरण व आतून इच्छा, द्वेष, अहंकार या विकारांपासून मुक्ती असा प्रयत्न साधायला हवा. दोन्ही गोष्टी सोबत नांदायला हव्यात. सात्विक कर्मांचा अर्थ सात्विक आहार वगैरे. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाचे गुण, बाराव्या अध्यायातील भक्ताचे गुण, तेराव्या अध्यायातील ज्ञानवंताचे गुण, चौदाव्या अध्यायातील त्रिगुणातीताचे गुण, सोळाव्या अध्यायातील सात्विक गुण अंगी बाणवून घेण्याचा प्रयत्न करावा असे सतराव्या अध्यायात सांगितले गेले आहे. अशा प्रकारे जीवनाच्या प्रत्येक क्रियेत सत्वगुणाचा उत्कर्ष

साधायचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जीवनात आंतर्बाह्य सात्विकतेचा उत्कर्ष साधता आला तरच पाप क्षीण होण्याची शक्यता आहे.

2) **ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता:** पुण्यकर्मे साधली तर पाप क्षीण होते. पापकर्मे क्षीण झाली तर द्वंद्व-मोहातून मुक्त होता येते. इथे मोहापासून वाचण्याचा उपाय सांगितला गेला आहे. मोह घालवण्याचा उपाय सांगितला गेला आहे. द्वंद्व आणि मोह नाना प्रकारचे आहेत. कौटुंबिक मोहापायी कशी दुबळी अवस्था होऊन जाते हे अर्जुनाच्या उदाहरणावरुन ध्यानात यावे. पहिल्या अध्यायात वर्णिलेली अर्जुनाची अवस्था यावर झगझगीत प्रकाश झोत टाकते. सार्वजनिक सेवा कार्यासाठी  वाहून घेतल्यावर सुध्दा ही मोहावस्था सुटत नाही. हिची मिठी मजबूत असते. सार्वजनिक सेवा कार्य साधत असताना जेव्हा काहीसा अधिकार प्राप्त होतो तेव्हा हा मोह वा आसक्ती सारखे आपले बळ दाखवत रहातात. मोह चित्ताच्या ठायी व्याकुळता उत्पन्न करतो. द्वंद्व मोहाच्या जाळापासून वाचण्याचा एक उपाय आहे. जोवर निष्काम भावनेने केवळ कर्तव्यबुध्दीने जगण्याची दृष्टी प्राप्त होत नाही आणि जगताचे स्वरुप हे क्षणिक आणि विनाशी आहे हा मुद्दा चित्तात दृढपणे ठसत नाही तोवर हे साधता येत नाही. मोहापासून आपला बचाव करुन घेता येत नाही. पुण्य कर्मात रत झाल्यावर जेव्हा पाप कर्मे क्षीण होऊ लागतात आणि मन मोकळे होते तेव्हा कुठे वृत्तीचा प्रवाह अखंडपणे ईश्वराच्या दिशेने कार्यरत होतो. प्रभावीपणे वाहू लागतो.

(3) **दृढव्रता मां भजन्ते:** साधक दृढव्रती होऊन जेव्हा साधना करतात. अत्यंत निश्चयपूर्वक ईश्वर भजनरत होतात म्हणजे भक्ती करतात. हा मुद्दा समजून घेतला पाहिजे. परमार्थ तत्व म्हणजे ईश्वरतत्व वा ब्रह्मतत्व या ईश्वराचेच स्वरुप आहे. दृढव्रता: शब्दाचा अर्थ समजावून सांगताना शंकराचार्य म्हणतात: परमार्थतत्त्वं एवं एव न अन्यथा इति एवं निश्चितविज्ञाना: दृढव्रता: उच्यन्ते। अर्थात् परमार्थतत्त्व ज्याला ईश्वर, ब्रह्म असे म्हटले जाते ते याचेच स्वरुप आहे. ते तेच आहे. अन्य स्वरुपाचे नव्हे. अशा प्रकारे अन्य त्याचे स्वरुप नाही असे ठामपणे जाणणे म्हणजे दृढव्रती होणे होय असे शंकराचार्य म्हणतात. अशा प्रकारे ज्यांना निश्चय पूर्वक ज्ञान प्राप्ती झाली आहे आणि परमात्म स्वरुपाविषयी ज्यांच्या मनी मुळीच शंका उरली नाही अशा पुरुषाला दृढव्रती म्हणता येईल.

द्वंद्व, मोहात आबध्द म्हणजे फसलेला माणूस परमात्म्याच्या स्वरुपाबाबत नि:शंक कसा बरे होऊ शकेल? मोह हाच तर शंकांचा पिता आहे. श्रध्देने ईश्वरी तत्त्वाचा स्वीकार केला असेल तर त्याचे स्वतंत्र मूल्य आहे. तमाम शंकांचे जाळे फिटल्यावर चित्तवृत्ती नि:शंक बनून परमात्म तत्वाचा स्वीकार केला गेला असेल तर ज्ञानपूर्वक भक्ती उत्पन्न होते. भक्तीचे दोन प्रकार संभवतात. एक म्हणजे श्रध्दापूर्वक केली गेलेली भक्ती आणि दुसरी म्हणजे ज्ञानपूर्वक केली गेलेली भक्ती. परमात्म तत्त्वाविषयी ज्ञान प्राप्त होणे काही साधी-सुधी गोष्ट नाही पण मोहाचा संस्कार क्षीण होऊन जर मोह नष्ट झाला असेल तर मग परमात्म्याच्या स्वरुपाविषयी  ब्रह्मसूत्र यासारख्या ग्रंथाच्या माध्यमातून यथार्थ स्वरुपाची ज्ञान प्राप्ती होऊ शकेल असा एक अर्थ आहे. दृढव्रता या शब्दाचा दुसराही एक अर्थ करता येईल. सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या पंच महाव्रतांच्या पालनाकामी जो दृढव्रती आहे तो साधक. एक म्हणजे पापकर्मांना क्षीण करुन पुण्यकर्मात रत होणे, दुसरा मुद्दा म्हणजे पंच महाव्रतांच्या पालनात दृढ रहाणे आणि तिसरा मुद्दा म्हणजे द्वंद्व-मोहाना पार करुन जाणे या तीन बाबी सुयोग्य प्रकारे साधता आल्यात तर ईश्वराची अखंड भक्ती साधता येऊ शकते. भक्तीचा प्रवाह अखंडपणे जीवनात प्रवहमान होऊ शकतो. या संदर्भात गांधीजींचा 'मंगल प्रभात' हा ग्रंथ आणि बाळकोबा यांचा 'अभंग व्रत विवेचन' हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा आहे.

: 29 :

***जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये।***
***ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जरामरणमोक्षाय:** म्हातारपण आणि मरण यातून मुक्त होण्यासाठी
- **ये मां आश्रित्य यतन्ति:** जे माझा आश्रय घेऊन प्रयत्न करतात
- **ते तद् ब्रह्म विदुः** ते त्या ब्रह्माला जाणून घेतात

- **कृत्स्नं अध्यात्मं:** संपूर्ण अध्यात्माला
- **च अखिलं कर्म:** आणि सर्व कर्माला
- **विदु:** जाणतात

**अर्थ**

जे मला शरण येऊन वार्धक्य आणि मरण यापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात ते पुरुष, ते ब्रह्म, संपूर्ण अध्यात्म आणि संपूर्ण कर्म जाणतात.

***झटती आश्रयें माझ्या जरा-मृत्यु गिळावया***
***ते ब्रह्म जाणती पूर्ण तसें अध्यात्म कर्म हि।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे 1) जरा म्हणजे वार्धक्य आणि मरण यापासून सुटका प्राप्त करुन घेण्यासाठी जे माझ्या आश्रयाला येऊन प्रयत्न करतात. 2) ते ब्रह्माच्या स्वरुपाला म्हणजे निर्गुण ब्रह्माला चांगल्या प्रकारे जाणतात तसेच 3) संपूर्ण अध्यात्माला म्हणजे शरीरात निवास करणाऱ्या प्रत्यगात्म्याला आणि 4) सर्व कर्मांना म्हणजे ब्रह्माच्या सगुण, सक्रिय, निराकार रुपाला जाणतात.

**स्पष्टीकरण**

1) जरामरणमोक्षाय मां आश्रित्य ये यतन्ति: म्हातारपण आणि मरण यापासून वाचण्यासाठी साधक वा मुमुक्षु ईश्वराचा आश्रय मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतात. माणूस जन्माला येतो आणि हळूहळू बालपण, युवावस्था, प्रौढावस्था आणि वृध्दावस्थेचा अनुभव घेत एके दिवशी मरणाला वरतो. तशी तर गर्भावस्था हीही एक अवस्था आहे. या अवस्थेत अपार वेदना असतात असे शास्त्रकारांचे म्हणणे आहे. या तमाम अवस्थामधून मार्गक्रमण करत असताना कमी अधिक प्रमाणात दु:खाचा अनुभव प्रत्येकाला होतोच होतो ही गोष्ट मात्र खरी आहे. या अवस्थांचे परीक्षण करु जाता एक सत्य हाती लागते की या तमाम अवस्थांपैकी मरणावस्थेत होणारे दु:ख अपार असते, सर्वाधिक असते. खरे तर अन्य अवस्थांच्या तुलनेने म्हातारपणातले दु:ख खूप असते. या काळात देहात शिथिलता येते. देह रोगग्रस्त होऊन जातो. अनेकांकडून सेवाकार्य करवून घ्यावे लागते. स्मरणशक्ती मंदावते. काहीशी निष्क्रियता येते. मरण भय सतावत रहाते. यामुळे वृध्दत्व आणि मरण याच दोन अवस्थांचे वर्णन येथे केले गेले आहे. या अवस्थेत दु:ख व्हायचे मुख्य कारण म्हणजे देहबुध्दीच आहे. ही देह बुध्दी सोडण्याचा सर्वोत्तम उपाय ईश्वर भक्तीच आहे. याठिकाणी या गोष्टीचे पुन:स्मरण करुन दिले जात आहे की यापासून मुक्त होण्यासाठी साधक भक्तीकडे वळतात. तुलसीदासांनी भक्तीलाच मुख्य तत्व मानले आहे. ते म्हणतात :

***ब्यापहिं मानस रोग न भारी।***
***जिन्हके बल सब जीव दुखारी॥***
***राम भगति मनि उर बस जाके।***
***दुख लवलेस न सपनेहुँ ताके॥***

अर्थात् अति दुर्धर मानसिक आजारांच्या अधीन झाल्यामुळे जनलोक अपार दु:खी होतात. ज्यांच्या अंत:करणात राम भक्ती असते त्यांना अति दुर्धर मानसिक आजारही मुळीच दु:ख देत नाहीत. या भक्तीमुळे त्यांना स्वप्नातदेखिल यत्किंचितही दु:ख भोग भोगावे लागत नाहीत.

***सबकर मत खगनायक एहा।***
***करिय रामपद पंकज नेहा॥***
***स्रुति पुराण सब ग्रंथ कहाहीं।***
***रघुपति भगति बिना सुख नाहीं॥***

अर्थात् हे पक्षीराज गरुडा, तमाम ऋषी मुनींचे हेच मत आहे की रामचंद्रांच्या चरणारविंदी स्नेह जागायला हवाय. श्रुति आणि पुराणांच्या समवेत अन्यान्य ग्रंथांचेही हेच निवेदन आहे की रामाच्या भक्ती शिवाय कुणालाही खरे सुख प्राप्त होणार नाही.

***ऐसेहि बिनु हरि भजन खगेसा।***
***मिटइ न जीवन्ह केर कलेसा॥***

अर्थात् हे पक्षीराजा गरुडा, अशाप्रकारे हरिभजनाशिवाय जीवाचे क्लेश संपणार नाही.

2) ते तद् ब्रह्म विदु: भक्त निर्गुण ब्रह्म तत्त्वाला चांगल्या प्रकारे जाणून घेतात. मूळातच ब्रह्मतत्त्व हे निर्गुण, निराकार, निरवयव, अव्यक्त, अमर्यादित स्वरुपाचे असते.

त्याची खरी ओळख भक्तीमुळेच संभवते. भक्तीचा साधा अर्थ उत्कट प्रेम भाव होय.

3) कृत्स्नं अध्यात्मं विदुः भक्त समग्र अध्यात्म तत्त्वाला जाणून घेतात. अध्यात्म शब्दाचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे निर्गुण ब्रह्मतत्त्व हे शरीरात प्रत्यगात्म्याच्या रुपाने प्रकट झाले आहे. संपूर्ण ब्रह्मांडात निर्गुण ब्रह्म तत्त्व अप्रकट स्वरुपात वसले आहे पण नाना प्रकारच्या मनुष्य, पशु, पक्षी, जीव जंतु वगैरेंच्या देहात विलसणाऱ्या या तत्त्वाला जीवात्मा वा आत्मा वा प्रत्यगात्मा या रुपात प्रकट झालेले बघता येत असते. हा झाला अध्यात्म शब्दाचा एक अर्थ ! दुसरा अर्थ असा होतो की निर्गुण ब्रह्म हे अव्यक्त, निरवयव असताना सुध्दा सगुण रुपात प्रकटते. सगुण शब्दाचा अर्थ आकारवान वा व्यक्त वा अवयवांच्या द्वारा दिसू शकणारे तत्व असा घ्यायचा नाही. निर्गुण ब्रह्म तत्त्वात केवळ गुणाचाच आविर्भाव झाला म्हणजे जगत निर्माण करायचा संकल्प जागला. ब्रह्म तत्त्वाचे आरंभिक रुप हे निर्गुण असते. त्याला जगताचा भास निर्माण करावयाचा आहे. आधी संकल्प जागेल मग कुठे जगताचा भास करायची क्रिया संपन्न होईल. कुठल्याही कार्याच्या आरंभी संकल्प जागत असतो. संकल्पानंतरच आपण कार्यसिध्दीच्या दिशेने तत्पर होतो. निर्गुण ब्रह्म तत्त्वाच्या ठायी हा जो काही जगताचा आभास करायचा संकल्प जागला या संकल्पाला 'सगुण' तत्त्व म्हणता येईल. या सगुणाला अध्यात्म नावाने ओळखले जाते. ईश्वर देहात आकाराला येतो तो काही सगुण, साकार, सावयव रुपाने प्रकट होत नसतो. तो प्रकट होत असतो गुणांच्या रुपाने. त्याचे स्वरुप गुणयुक्त असते. देहात प्रकटणाऱ्या ईश्वरी तत्त्वाचे स्वरुप सत्, चित् आनंद या त्रिगुणांच्या माध्यमातूनच प्रकट होत असते पण सत्, चित् आनंद हे स्वरुप जरी देहात अनुभवाला येत असले तरी त्याचे स्वरुप हे निर्गुण, निराकार, निरवयव असेच असते. यामुळे असे म्हटले जाते की निर्गुण ब्रह्म तत्त्व हे संकल्पयुक्त बनले किंवा ते सत्, चित् आनंद या रुपात प्रकटले.

4) अखिलं कर्म विदुः निर्गुण ब्रह्म तत्त्व हे सगुण म्हणजे संकल्पयुक्त बनल्यावर क्रियाप्रवण म्हणजे गतिशील बनते. ब्रह्म तत्त्वाच्या ठायी सर्वप्रथम जगताचा आभास निर्माण करायचा संकल्प जागतो आणि मगच तर जगताचा आभास निर्माण करायची क्रिया जागते. आपल्याला सुध्दा लौकिक अर्थाने जेव्हा कुठले कार्य करायचे असते तेव्हा आधी संकल्प जागतो ना, मग कुठे आपण साक्षात् क्रियेला प्रवृत्त होतो आणि मग प्रत्यक्ष कार्याला आरंभ करतो. कुंभाराला घट तयार करायचा असेल तर तो आधी घट तयार करायचा संकल्प करतो, मग घट घडवण्यासाठी लागणारी साधने गोळा करु लागतो आणि मग कुठे घटाच्या प्रत्यक्षपणे निर्मितीला आरंभ करतो. परमात्म्याचा भक्त अशा प्रकारे संपूर्ण अध्यात्म तत्त्वाला आधी जाणून घेतो मुख्य म्हणजे ब्रह्म तत्त्वाच्या सगुण रुपाला जाणून घेतो म्हणजे संपूर्ण कर्माला कर्म व्यवस्थेला जाणून घेतो म्हणजे ब्रह्म तत्वाच्या ठायी उत्पन्न होणाऱ्या तमाम हालचालींना, क्रियाप्रवणतेला आणि गतिमान अवस्थेला पूर्णपणे जाणून घेतो. भक्त आणि भगवंत यांचा असा सुरेख अनुबंध गीता समजावून सांगते.

: 30 :

*साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।*
*प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये साधुभूताधिदैवं:** जे अधिभूत आणि अधिदैव म्हणजे जीवभाव या दोघांच्या सोबत
- **च साधियज्ञं:** आणि अधियज्ञासह
- **मां विदुः** मला जाणतात (अर्थात् ज्याप्रमाणे वाफ, ढग, पाणी आणि बर्फ ही सारी जळ स्वरुपी आहेत, तसेच अधिभूत आणि अधिदैव वगैरे सर्व काही वासुदेव स्वरुपीच आहेत असे जे जाणतात)
- **ते युक्तचेतसः** ते युक्त चित्ताचे भक्त
- **प्रयाणकाले अपि च:** अंतकाळी देखिल
- **मां विदुः** मला जाणून घेतात म्हणजे मला प्राप्त होतात

**अर्थ**

जे पुरुष अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ यासह (सर्वांच्या आत्मरुप अशा) मला अंतकाळीही जाणतात

ते युक्त चित्ताचे पुरुष मला जाणतात म्हणजे मला येऊन मिळतात.

*अधिभूताधिदैवांत अधियज्ञांत जे मज*
*देखती ते प्रयाणीं हि जाणती मज सावध।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे 1) जो साधीभूत म्हणजे ब्रह्माची साकारता 2) अधिदैव म्हणजे जीवभाव 3) साधियज्ञ म्हणजे चित्त शुध्द झाल्यानंतरच्या जीवाच्या शुध्द अवस्थेसोबत मला जे जाणून घेतात 4) ते शांत चित्त भक्त मरण समयीही मला जाणतात म्हणजे मला प्राप्त होतात.

**स्पष्टीकरण**

निर्गुण ब्रह्म ही मूळ अवस्था आहे. 'मूळारंभ आरंभ तो निर्गुणाचा' असा संकेत आहे. या मूळ निर्गुण ब्रह्म्याच्या ठायी जगताचा आभास करायचा संकल्प जागला. ही झाली ब्रह्म्याची दुसरी सगुणावस्था. मग त्याच्या ठायी जगताचा आभास निर्माण करण्यासाठी सक्रियता उपजली. ही झाली ब्रह्म्याची तिसरी अवस्था. या तीन अवस्थांचा उल्लेख मागील श्लोकात आला आहे.

1) **अधिभूत:** अधिभूत ही झाली ब्रह्म्याची चौथी अवस्था. अधिभूत अवस्था म्हणजे जगताची साकार अवस्था होय. पंचमहाभूतांमधील प्रकट अवस्था होय. निर्गुण ब्रह्म वा परमात्मा जगताच्या पंचमहाभूतात्मक पदार्थांच्या ठायी प्रकट होतो. उपरोक्त तीन अवस्थांमध्ये ईश्वराचे प्रकटीकरण हे निर्गुण रुपात असते. परमात्मा अव्यक्त, अप्रकट रुपात असतो. चौथ्या अवस्थेत मात्र अधिभूत म्हणजे ब्रह्म तत्त्वाची सगुण साकार अवस्था असते.

2) **अधिदैव:** अधिदैव ही ब्रह्म तत्त्वाची पाचवी अवस्था होय. अधिदैव म्हणजे देहाची अभिमानी देवता म्हणजे जीवात्मा. देह म्हणजे मनुष्य, पशु, पक्षी, अनंत प्रकारचे कीटक वगैरे नाना पंचमहाभूतांनी निर्मिलेले देह होत. हे देह भगवंताने निर्माण केलेत. त्यांच्या ठायी भगवंताने त्या त्या देहांचा अभिमान बाळगणारा एक एक जीवभाव उत्पन्न केला. ही परमात्म्याची किंवा ब्रह्म्याची पाचवी अवस्था होय. परमात्मा हाच जीवमात्राच्या रुपाने प्रकट झाला आहे. परमात्म्याशिवाय का जगात कुणा वस्तुमात्राचे अस्तित्व आहे ? जे काही ते सारे परमात्मरुपच तर आहे.

3) **साधियज्ञं मां विदुः** अधियज्ञ म्हणजे जीवात्म्याची शुध्द अवस्था होय. या अवस्थेच्या आधारेच भगवंताला जाणून घेता येते. ही अवस्था अध्यवसाय म्हणजे साधनेने प्राप्त होते. हीच तर परमात्म्याची अधियज्ञ अवस्था होय. ही सहावी अवस्था आहे. या अवस्थेत जीव शुध्द बनून परमात्म स्वरुप बनून जातो. जीवात्म्याचे स्वतंत्र अस्तित्व उरत नाही.

4) **ते युक्तचेतसः प्रयाणकाले अपि च मां विदुः** निर्विकार शांतचित्त असे भक्त अंतकाळी म्हणजे प्रयाणकाळी म्हणजे मृत्युच्या वेळी भगवंताला जाणून घेत असतात. प्रयाण काळ ही सर्वात महत्वाची अवस्था होय. हा देह त्यागाचा समय आहे. सारे काही सोडून जाण्याचा समय आहे. यामुळे आयुष्यभर आपले जे संस्कार बळकट झाले असतील तेच या समयी प्रकट होतात आणि आपले बळ दाखवतात. त्या बळकट संस्कारांच्या प्रमाणे पुढला जन्म ठरतो. यामुळे आपण जर आयुष्यभर ईश्वर स्मरण करुन काळ घालवला असेल आणि परमात्म स्मरण सपाटून केले असेल तर ईश्वर स्मरणाचा संस्कार बळकट ठरतो आणि अंत समयी देह त्याग करता येऊ शकतो.

या आणि मागल्या श्लोकाचा विचार करु जाता पुढील एकूण सात विषयांची चर्चा आली आहे. एक निर्गुण ब्रह्म, दोन अध्यात्म, तीन कर्म, चार अधिभूत, पाच अधिदैव, सहा अधियज्ञ आणि सात प्रयाण काळ. या विषयाच्या संदर्भात अर्जुनाने आठव्या अध्यायाच्या आरंभिक दोन श्लोकात प्रश्न उपस्थित केला. त्याला गीतेने उत्तर दिले आहे. या अध्यायाच्या 28 ते 30 या श्लोकात जे विषय आले आहेत त्याचा सारांश पुढील प्रकारे सांगता येईल.

अट्ठाविसाव्या श्लोकात चार विषय आले आहेत. एक निष्काम पुण्याचरण, दोन चित्तशुध्दी, तीन द्वंद्व आणि मोहाचे निरसन, चार दृढ भक्तीभाव म्हणजे ईश्वराची उत्कट भक्ती. एकोणतिसाव्या श्लोकात चार विषयांचा समावेश झाला आहे. एक निर्गुण ब्रह्म, दोन अध्यात्म म्हणजे निर्गुण ब्रह्म्याची सगुण अवस्था, तीन कर्म म्हणजे निर्गुण ब्रह्म्याची सक्रियावस्था, चार भक्तीपूर्वक योग साधना. तिसाव्या श्लोकात पाच अवस्थांचा उल्लेख आला. एक अधिभूत म्हणजे ब्रह्म्याची सगुण साकार

अवस्था, दोन अधिदैव म्हणजे परमात्म्याची जीवावस्था, तीन अधियज्ञ म्हणजे जीवाची शुध्दावस्था, चार अंतकाळी परमात्म्याचे स्मरण, पाच ईश्वर प्रवेश म्हणजे ईश्वराच्या ठायी विलीन होणे.

• • • *अध्याय सातवा संपूर्ण* • • •



### अध्याय - आठवा

## अक्षर ब्रह्म योग

: श्लोक क्रमांक 1 व 2 :

**अर्जुन उवाच**

***किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम।***
***अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते॥***
***अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन् मधुसूदन।***
***प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पुरुषोत्तमः** हे पुरुषोत्तमा
- **किं तद्ब्रह्मः** आपण ज्याचे वर्णन केले ते ब्रह्म काय आहे?
- **अध्यात्मं किंः** अध्यात्म कशाला म्हणतात?
- **कर्म किंः** कर्म कशाला म्हणतात?
- **च अधिभूतं किं प्रोक्तंः** आणि अधिभूत म्हणजे काय?
- **अधिदैवं किं उच्यतेः** अधिदैव कशाला म्हटले जाते?
- **मधुसूदनः** हे मधुसूदना
- **अत्र अधियज्ञः कः** येथे अधियज्ञ कोण आहे? (आणि तो)
- **अस्मिन् देहे कथंः** या देहात कशा प्रकारे आहे ?

- **प्रयाणकाले:** मरण समयी, अंतकाळी
- **नियतात्मभि:** संयमी पुरुषांकडून
- **कथं ज्ञेय: असि:** कशा प्रकारे जाणले जाता ?

### अर्थ

अर्जुन म्हणाला, हे पुरुषोत्तमा, ते ब्रह्म काय आहे? अध्यात्म काय आहे? कर्म काय आहे? अधिभूत शब्दाने काय सांगितले आहे? आणि अधिदैव कशाला म्हणतात?

हे मधुसूदना, येथे अधियज्ञ कोण आहे? आणि तो या शरीरात कसा आहे? तसेच अंतकाळी युक्त चित्ताचे संयमी पुरुष तुम्हाला कसे जाणतात?

### अर्जुन म्हणाला

*ब्रह्म तें बोलिलें काय काय अध्यात्म कर्म तें*
*अधि-भूत कसें सांग अधि-दैव हि तें तसें।*
*अधि-यज्ञ कसा कोण ह्या देहीं बोलिला असे*
*प्रयाणीं हि कसे योगी निग्रही तुज जाणती ॥*

### स्पष्टीकरण

या श्लोकात विचारल्या गेलेल्या अर्जुनाच्या सात प्रश्नांचा उल्लेख सातव्या अध्यायाच्या 29 व 30 व्या श्लोकात आला आहे. प्रश्न असे आहेत

ब्रह्म म्हणजे काय?, अध्यात्माचा काय अर्थ होतो?, कर्माचे स्वरुप कसे आहे?, अधिभूत म्हणजे काय?, अधिदैव म्हणजे काय? अधियज्ञ कुठला आणि देहात तो कशा प्रकारे असतो? प्रयाण काळी संयमी पुरुष ईश्वराचे रुप कसे समजून घेतो? आता या प्रश्नांना भगवंत उत्तर देताहेत.

: 3 :

### श्री भगवान् उवाच

*अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते।*
*भूतभावोद्भवकरो विसर्ग: कर्मसंज्ञित: ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **परमं अक्षरं ब्रह्म:** परम अक्षर म्हणजे अविनाशी ज्याचा कधीच नाश होत नाही असा सच्चिदानंदघन परमात्मा
- **स्वभाव: अध्यात्मं उच्यते:** स्वभावयुक्त बनला अर्थात् जीवात्मा बनला म्हणजे जगताचा भास उत्पन्न करायचा संकल्प ब्रह्मात उत्पन्न झाला त्याला अध्यात्म असे म्हणतात
- **भूतभावोद्भवकर: विसर्ग:** पंच महाभूतात्मक पदार्थ उत्पन्न करायची ब्रह्माच्या ठायी जी सक्रियता आहे (शास्त्रविहित यज्ञ दान आणि होम यांच्या निमित्ताने द्रव्य वगैरेंचा जो त्याग होतो तो )
- **कर्मसंज्ञित:** त्याला कर्म असे म्हणतात

### अर्थ

श्री भगवान म्हणाले परम अक्षर 'ब्रह्म' आहे आपले स्वरुप अर्थात् जीवात्मा 'अध्यात्म' नावाने सांगितला गेला आहे तसेच भूतांचे भाव उत्पन्न करणारा जो त्याग आहे तो 'कर्म' या नावाने संबोधिला जातो.

### श्री भगवान म्हणाले

*ब्रह्म अक्षर तें थोर अध्यात्म निज-भाव जो*
*भूत-सृष्टि घडे सारी तो जो व्यापार कर्म तें।*

### स्पष्टीकरण

या श्लोकात भगवंताने अर्जुनाच्या तीन प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. परम निरतिशय, अक्षर, अविनाशी असे ब्रह्याचे स्वरुप आहे. निर्गुण, निराकार, अविनाशी ब्रह्म स्वभावयुक्त बनते. ब्रह्म सगुण बनते म्हणजे त्याच्या ठायी जगताचा आभास निर्माण करायचा संकल्प जागतो हे झाले अध्यात्म. निर्गुण निराकार परब्रह्म सगुण जरी बनले तरी त्याच्या ठायी अजूनही निर्गुणता कायम आहे ते सगुण,

साकार बनलेले नाही. सगुण निर्गुण परब्रह्याच्या ठायी पंचमहाभूतात्मक पदार्थ निर्माण करायची जी सक्रियता आहे जी गतीप्रवणता आहे त्याला म्हणायचे कर्म.

1) अक्षरं ब्रह्म परमं: अर्जुनाने पहिला प्रश्न ब्रह्म्याच्या स्वरुपाविषयी विचारला आहे. ब्रह्म मूळात अविनाशी आहे. जगातले सारे पदार्थ विनाशी आहे पण ब्रह्म अविनाशी आहे. जगातले पदार्थ बदलत रहातात ब्रह्म अपरिवर्तित आहे. सारे पदार्थ बदलतात कारण ते कार्यरुप आहेत. कार्यात फरक पडतो आणि त्याचा विनाश करता येतो. घट हे मातीचे कार्य आहे. घट विनाशी आहे पण घटाचे कारण असलेली माती मात्र स्थिर आहे. तरीसुध्दा मातीला मूळ कारणरुप पदार्थ मानता येत नाही. मातीही कुणाचे तरी कार्य आहे. यामुळे मातीच्या ठायीही सूक्ष्म रुपात परिवर्तन होत रहाते. माती ज्या परमाणूंपासून बनली आहे ते परमाणू मातीच्या तुलनेने अधिक स्थिर आहेत. परमाणूसुध्दा मूळ कारणरुप पदार्थ नाहीहेत. तेही कार्य आहेत. परमाणूचे मूळ कारण ब्रह्म आहे. परमाणू विनाशी आहेत. परमाणूंच्या ठायीही परिवर्तन घडत असते पण ब्रह्म हे सर्वांचे आदिकारण आहे त्यात कुठलाही बदल होत नाही. यामुळे अन्य विनाशी वा परिवर्तनशील पदार्थांच्या ठायी आढळून येणारे गुणधर्म ब्रह्मरुपात न दिसता काही वेगळेच गुणधर्म आढळतात. जगताचे रुप सावयव, सगुण, साकार, व्यक्त, मर्यादित, विनाशी आणि स्थूल असे आहे तर ब्रह्मतत्त्व हे निर्गुण, निराकार, निरवयव, अव्यक्त, अमर्यादित, अविनाशी आणि अतिसूक्ष्म असे तत्त्व आहे.

ब्रह्मतत्त्वाचे दुसरे लक्षण आहे, दुसरे विशेषण आहे 'परमम्'. परमम् म्हणजे अतिश्रेष्ठ, निरतिशय, एकरस किंवा अखंड. ब्रह्मतत्त्वाशिवाय का दुसरा कुठला पदार्थ श्रेष्ठ असू शकेल बरे? उपनिषदात निर्गुण ब्रह्मतत्त्वाचे वर्णन ठायी ठायी येते. गीतेच्या तेराव्या अध्यायात तर आहेच पण अन्यत्रही ते आहे. उपनिषद म्हणते:

***एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि***
***सूर्याचन्द्रमसौ विधृतौ तिष्ठत: ।***

अर्थात् हे गार्गी, या अक्षररुपी ब्रह्मतत्त्वाच्या नियंत्रणात साक्षात् सूर्य आणि चंद्र असतात. ते धारण केले जातात आणि स्थिर रहातात. उपनिषदात पुनश्च एके ठिकाणी वर्णन येते: एतद्वै तदक्षरं गार्गि ब्राह्मणा: अभिवदन्ति अस्थूलमनणुमह्रस्वमदीर्घमलोहितमस्नेहमच्छायम- तमोऽवाय्व नाकाशमसंगमरसमगंधमचक्षुष्कमश्रोत्रमवाङ्.मनोऽतेजस्कमप्राणममुखममात्रमनन्तरमबाह्यम् ।

अर्थात् ते रुप असे आहे की जे साधकांच्या द्वारा अक्षर या नावाने ओळखले जाते. ते स्थूल स्वरुपी ब्रह्म नव्हे, ते अणूरुपही नव्हे, ते ह्रस्व वा संकुचित स्वरुपाचे नव्हे, ते लांबही नव्हे. ते रक्त रहित म्हणजे लाल रंगाशिवायचे आहे. स्नेह रहित म्हणजे स्निग्धते शिवायचे आहे. ते छाया रहित आहे. ते तम रहित, वायु रहित, आकाश रहित, आसक्ती रहित, रस रहित, गंध रहित, नेत्र रहित, वाणी रहित, मन रहित, तेज रहित, प्राण रहित, मुख रहित, मात्रा म्हणजे इंद्रिय रहित आहे. त्याच्या आत बाहेर काही नाही असे ते अक्षर ब्रह्म आहे.

इथे अक्षर ब्रह्म तत्त्वाचा उल्लेख आणि वर्णन तमाम वस्तुंच्या निषेध रुपात केलेले आहे. यामुळे या तमाम वस्तुंच्या आधी निषेध सूचक 'अ' हा प्रयोग येतो. जेवढे म्हणून काही पदार्थ आहेत ना त्या सर्वांचे आश्रयस्थान ब्रह्मतत्त्व आहे पण ब्रह्म्याच्या ठायी पदार्थांचे गुणधर्म मात्र नाहीहेत.

2) स्वभावो अध्यात्मसमुच्यते: स्वभाव म्हणजे काय? शंकराचार्यांनी अर्थ केला आहे की प्रत्येकाच्या देहांतरी वसणारे आत्मतत्त्व म्हणजे स्वभाव होय. विनोबांची मांडणी थोडी वेगळी आहे. त्यांचे म्हणणे असे की मूळात जे ब्रह्मतत्त्व निर्गुण, निराकार, अक्षर, निरवयव, भावातीत होते ते भावयुक्त, स्वभावयुक्त म्हणजे सगुण साकार बनले हेच अध्यात्म होय, हाच स्वभाव होय. गीता म्हणते की अध्यात्म म्हणजे स्वभाव. स्वभाव म्हणजे ब्रह्मतत्त्वाचा स्वभाव होय. ब्रह्मतत्त्वाचे मूळचे स्वरुप निर्गुण वा निराकार आहे. भावातीत आहे. जेव्हा सृष्टीचा आभास निर्माण करावयाचा असेल तेव्हा या निर्गुण ब्रह्म तत्त्वाच्या ठायी सगुणता निर्माण व्हायला हवी. सगुणता जर निर्माण झाली नाही तर मग सृष्टीचा भास काही निर्माण होऊ शकणार नाही. ब्रह्मतत्त्व हे निर्गुण निराकार रुपातच राहील. ब्रह्म तत्त्व निर्गुण वा निराकार आहे याचा अर्थ काही ते शून्य आहे असे नव्हे. निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या ठायी अपरंपार शक्ती आहे. ती शक्ती शून्य वा निराकार नाही, ती निष्क्रिय स्थितित नाही राहू शकत. निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या

ठायी जेव्हा हे जगत निर्माण करायची वेळ येते ना तेव्हा ती शक्ती क्रमश: प्रकट होत रहाते. यामुळे निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या ठायी सर्वप्रथम सगुणता निर्माण व्हायला हवी. ज्यामुळे स्थूल गुणांचा अनुभव येईल अशा प्रकारची सगुणता मात्र नको. सगुण म्हणजे जगताचा भास निर्माण करु शकण्याचा संकल्प होय. परमात्मा निर्गुण आहे पण ते शून्य रुपी नसल्यामुळे त्याच्या ठायी कमाल शक्ती वसते. त्या शक्तीमुळेच तर जगत निर्माण करु शकण्याचा संकल्प जागू शकतो. हेच तर ब्रह्मतत्त्वाच्या ठायी वसलेले सगुण रुप होय. संकल्प अव्यक्तरुपी असतो. कार्य रुपाने प्रकट झाल्यावरच संकल्पाचा शोध लागतो. जगतरुपी कार्य जेव्हा प्रकट होते तेव्हा या गोष्टीचा शोध लागतो की जगत निर्माणाच्या आधी संकल्प जागावा लागतो. जगतरुपी कार्य जेव्हा प्रकट होते तेव्हा या गोष्टीचा शोध लागतो की जगत निर्माणाच्या आधी संकल्प जागला होता. उपनिषदात म्हटले गेले आहे की परमात्म्याने संकल्प केला की प्रजा म्हणजे सृष्टी निर्माण व्हावी यासाठी आपण आता बहुरुपी बनू या. 'सोऽकामयत बहु स्यां प्रजायेय इति'। अर्थात् परमात्म्याने संकल्प केला की प्रजा म्हणजे सृष्टी उत्पन्न करण्यासाठी आता आम्ही बहुरुपी बनू.

3) भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः प्राणीमात्रांच्या देहाला, इंद्रियाना, जड पदार्थांना निर्माण करणाऱ्या विसर्ग म्हणजे व्यापाराला 'कर्म' असे म्हणतात. निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या ठायी जगत निर्माण करावयाचा संकल्प जागला आणि नंतर हालचाल आकाराला आली. घट तयार करायच्या आधी कुंभाराच्या मनी घट तयार करायचा संकल्प जागतो. नंतर मग तो घटाच्या निर्मितीसाठी आवश्यक ते चक्र, दंड, सूत यासारखी साधनं गोळा करतो. कुंभार हालचाल करायला लागतो. कामाला लागतो. संकल्पानंतर सक्रियता जागते. निर्गुण ब्रह्म संकल्पयुक्त बनले. सगुण बनले. हेच तर अध्यात्म होय. पुढे सगुण बनलेल्या ब्रह्मतत्त्वाच्या ठायी सक्रियता जागली. हालचाल निर्माण झाली. हे झाले कर्म. निर्गुण ब्रह्म सगुण सक्रिय बनल्यावर देखिल साकार नाही बनले. साकार बनण्याची चर्चा पुढील श्लोकात आलीय. उपनिषदात सांगितले गेले आहे: स तपो तप्यत स तपस्तप्त्वा इदमसृजत। अर्थात् ईश्वराने आधी तपाचरण केले. तपाचरणाने या सृष्टीची निर्मिती झाली. थोडक्यात असे की ईश्वराच्या मनात सृष्टी निर्मितीचा जो संकल्प जागला त्यानुसार सक्रिय भाव जागला.

: 4 :

*अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम्।*
*अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर॥*

**अन्वय आणि शब्दार्थ:**

- **क्षरः भावः** उत्पत्ती आणि विनाशी धर्माचे सर्व पदार्थ
- **अधिभूतं:** जे अधिभूत आहेत
- **च पुरुषः अधिदैवतं:** आणि शरीरात जो पुरुष आहे तो अधिदैवत आहे (हिरण्यमय पुरुष शास्त्रात ज्याला 'सूत्रात्मा', 'हिरण्यगर्भ', 'प्रजापती', 'ब्रह्मा' वगैरे नावांनी संबोधित केले गेले आहे. )
- **देहभृतां वरः** आणि हे देहधारण करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना
- **अत्र देहे अधियज्ञः** अहं एवः या देहात अधियज्ञ म्हणजे शुध्द जीव वासुदेव विष्णुरुपाने मी अधियज्ञ आहे

**अर्थ**

उत्पत्ती-विनाश असलेले सर्व पदार्थ 'अधिभूत' आहेत. हिरण्यमय पुरुष अधिदैव आहे आणि हे देहधाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना, या शरीरात मी वासुदेवच अंतर्यामी रुपात अधियज्ञ आहे.

*अधि-भूत विनाशी जें जीवत्व अधि-दैवत*
*अधि-यज्ञ असें मी चि ह्या देहीं यज्ञ-पूत जो।*

**विषय:** या श्लोकात तीन प्रश्नाची उत्तरे दिली आहेत. 1) जे विनाशी, क्षणिक, साकार पदार्थ दिसताहेत ते सारे अधिभूत होत. 2) प्रत्येक देहात जो पुरुष वा जीव आहे ते अधिदैवत आहे. 3) या देहात अधियज्ञ म्हणजे जीव जेव्हा शुध्द बनून जातो ते जीवात्म्याचे शुध्द रुप ईश्वराचे रुप होय.

**स्पष्टीकरण**

1) **अधिभूतं क्षर: भाव:** सृष्टीचे सारे पदार्थ विनाशी असल्यामुळे सीमित वा मर्यादित आहेत. अत्यंत व्यापक वाटणारे आकाशही विनाशी आहे. निर्गुण ब्रह्म नंतर सगुण साकार बनले. सक्रिय बनले नंतर अधिभूत म्हणजे साकार बनले. या साकार म्हणजे व्यक्त अवस्थेत संपूर्ण ब्रह्मांड निर्गुण परमात्म्याच्या ठायी दिसू लागले. ब्रह्मांडातील तमाम जड पदार्थ श्रेण्यांमधून विभागले गेले आहेत. दगड, माती यांच्यापेक्षा वृक्ष वगैरेंची श्रेणी भिन्न आहे. दगड वगैरेंच्या तुलनेने वनस्पती जगताच्या ठायी अधिक चैतन्य नांदते. तरीसुध्दा चैतन्य या पदार्थांमध्ये आपली ज्ञानस्वरुपता प्रकट नाही करत. ज्ञानस्वरुपता तर पशु, पक्षी, छोटे-मोठे अगणित जीव जंतु आणि मानवी देहात दिसतात. ज्ञानस्वरुपतेच्या ठायी सुख-दु:खांचा अनुभव जागतो. हीच जीवावस्था होय.

2) **पुरुष: अधिदैवतं:** प्रत्येक देहात पुरुष म्हणजे जीव आहे तेच तर अधिदैवत होय. साकार बनल्यावर ईश्वराने एकीकडे आकाश, वायु, दगड, वृक्ष यासारखी निरिंद्रिय सृष्टी आकाराला आणली. दुसरीकडे नाना प्रकारचे पशु-पक्षी, मनुष्य वगैरेंचे देह घडवले. त्यांच्या ठायी ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये बनवून मन घडवले आणि ईश्वर जीवरुपात प्रकट झाला. जोवर परमात्मा जीवरुपात प्रकट होत नाही तोवर जगाचा खेळ सुरु होत नाही. जीवरुपात ईश्वर प्रकट होताच हे नाटक सुरु होते. जीवाचा अभिनय साक्षात् ईश्वरच तर करत आहे. ईश्वराचे हे जीवरुपत्व अधिदैवत होय. जीव ईश्वराहून भिन्न नाही. यामुळे तो देवतारुपच आहे. देवतासारखाच आहे. देहाचा अभिमानी असल्यामुळे त्याला जीव म्हटले जाते. विविध देहात व्याप्त जीवाला नेहमी सुख-दु:खांचा अनुभव होत रहातो. बंधनांचाही अनुभव होतो. या जीवाला अधिदैवत असे म्हणतात.

3) **अत्र देहे अधियज्ञ:** अहं एव गीताकार म्हणतात की या देहात अधियज्ञ रुपाने मी वसतो. अधियज्ञ म्हणजे आध्यात्मिक साधना करुन शुध्द रुप झालेला जीव होय. खरे पाहू गेल्यास जीव शुध्दच असतो कारण तो ब्रह्मतत्त्वाहून भिन्न नसतो पण शुध्द असतानाही जर जीवाला आपल्या शुध्द स्वरुपाचे ज्ञान नसेल तर अज्ञानामुळे म्हणजे कल्पनेमुळे तो अशुध्द आहे असे वाटते. दोरीचे ज्ञान नसेल तर तिच्या ठायी सर्पाची भ्रांती होऊ शकते. तमाम जीव परमात्म स्वरुपी असल्यामुळे त्याना परमात्म स्वरुप प्राप्त करुन घ्यायचे असते असे नव्हे. परमात्मा जर भिन्न असता ना तर त्याला प्राप्त करुन घ्यायचा प्रश्न उरला असता. परमात्मा तर नित्य प्राप्तरुप आहे. त्याला वेगळा प्राप्त करुन घेण्याचे काही एक कारण नाही पण गंमत अशी आहे की परमात्मा आपले स्वरुप आहे याचा बोध जीवाला नाही. याचे ज्ञान जीवाला नाही. याचे कारण हे आहे की परमात्म्याच्या अलौकिक शक्तीने जो काया, इंद्रिये, मन वगैरे संघात निर्मिलेला आहे तो आपल्याहून भिन्न आहे. तरीसुध्दा आपल्या इतक्या नजिक आहे की त्यामुळे तो आपले रुपच वाटतो. ही भ्रांती आपल्याला दूर करायला हवी. ही भ्रांती घालवण्यासाठी साऱ्या साधनेचे प्रयोजन आहे. चित्ताची शुध्दता हीच तर जीवाची शुध्दता होय. जीव चित्ताशी आपली एकरुपता अनुभवतो यामुळेच चित्तशुध्दी म्हणजे जीवाची शुध्दी असा अर्थ केला जातो पण खरे पाहू गेल्यास जीवाची शुध्दी ही गोष्ट नसून चित्ताची शुध्दी हा मुद्दा आहे. साधनेच्या बळाने चित्तशुध्दी साधता येते. चित्ताच्या शुध्दीसोबतच स्वरुपाचे ज्ञान होते आणि भ्रांती दूर होते. याचा अर्थ असा की जीवाची मूळ अवस्था मूळ स्वरुपावस्था किंवा ज्ञानावस्था स्वयं परमात्मरुपच आहे, हे गीतेचे निवेदन आहे. या विशुध्द जीवावस्थेला 'अधियज्ञ' म्हटले गेले आहे. देहात वसताना जीवाला या शुध्दावस्थेचा अनुभव झाल्यावर मोक्ष प्राप्ती होते.

तिसऱ्या आणि चौथ्या श्लोकाच्या बाबतीत विनोबा लिहितात की ब्रह्म म्हणजे परमात्मा स्वत:च बंधमोक्षाचा खेळ करत आहे. मूळात ब्रह्म निर्गुण होते. तेच सगुण ब्रह्म म्हणजे शुध्द, मंगल, भावयुक्त अध्यात्म बनले. नंतर त्या ब्रह्मतत्त्वाच्या ठायी सक्रियता उत्पन्न झाली. हे सक्रिय कर्मरुपी ब्रह्म साकार बनले. याचे नाव अधिभूत होय. नंतर ब्रह्म विविध साकार देहात अहंभावपूर्वक दाखल झाले म्हणजे जीवरुपी बनले. स्वेच्छेनेच बध्द झाले. हे जीवरुपी ब्रह्मतत्व मुक्तीसाठी यज्ञ वगैरे साधना करुन शुध्द झाले. त्याचे नाव अधियज्ञ होय. जीव शुध्द असूनही देहाशी संलग्न असल्यामुळे निर्गुण अवस्थेला नाही प्राप्त होऊ शकत. यामुळे अंतकालीन साधना करुन देह त्याग झाल्यावर ते ब्रह्मतत्त्व स्वत:च स्वयंरुपी बनले. अधियज्ञ म्हणजे शुध्द जीव आणि ब्रह्मतत्त्व यांच्यात देह

त्यागाइतकाच अवधी शेष असतो. थोडक्यात असे सांगता येईल की निर्गुण, सगुण, सक्रिय, साकार, साहंकार, निरहंकार देहपात होताच मुक्त म्हणजे ब्रह्मरुप.

: 5 :

*अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।*
*य: प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशय: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च अंतकाले:** आणि मरण समयी
- **मां एव स्मरन्:** माझेच स्मरण करीत असता
- **कलेवरं मुक्त्वा:** शरीर सोडून
- **य: प्रयाति:** जो जातो
- **स: मद्भावं याति:** तो माझ्या स्वरुपाला साक्षात् प्राप्त होत असतो
- **अत्र संशय: न अस्ति:** यात काहीच संशय नाही

**अर्थ**

जो पुरुष अंतकाळीही माझेच स्मरण करीत शरीराचा त्याग करुन जातो, तो साक्षात् माझ्या स्वरुपाला प्राप्त होतो, यात मुळीच शंका नाही.

*अंत-काळीं हि माझें चि चित्तीं स्मरण राखुनी*
*देह सोडूनि गेला तो मिळे मज न संशय।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जो पुरुष अंतकाळीही माझेच स्मरण करीत शरीराचा त्याग करुन जातो. 2) तो साक्षात् माझ्या स्वरुपाला प्राप्त होतो, यात मुळीच शंका नाही.

**स्पष्टीकरण**

1) अंतकाले मां एव स्मरन् कलेवरं मुक्त्वा य: प्रयाति अंत काळी जो ईश्वर स्मरण करत-करत देह त्याग करतो तो ईश्वराला प्राप्त होतो. अर्जुनाने अखेरचा प्रश्न विचारला होता की मरण समयी कशा प्रकारे संयमी पुरुष ईश्वराला जाणून घेऊन देह त्याग करतात? या प्रश्नाचे उत्तर तीन श्लोकांमधून देण्यात येत आहे. या श्लोकाचे निवेदन आहे की अंत काळी जो ईश्वर स्मरण करत-करत देह त्याग करतो तो ईश्वराला प्राप्त होतो.

विनोबांनी गीता प्रवचनाच्या आठव्या अध्यायात हा विषय खूप चांगल्या प्रकारे समजावून सांगितला आहे. मानवी जीवन नाना संस्कारानी भारलेले असे आहे. आपण रोज ज्या क्रिया करतो त्यांचा हिशेब ठेवणे अशक्य आहे. खाणे-पिणे, उठणे-बसणे, चालणे-बोलणे, लिहिणे-वाचणे, हिरणे-फिरणे या सारख्या क्रिया तर स्थूल आहेत मग नाना प्रकारचे राग-द्वेष, मान-अपमान, सुख-दु:ख, विविध प्रकारची स्वप्ने या सारख्या मानसिक क्रियाही घडत असतात. आपण सारेच जण मानसिक आणि शारीरिक क्रिया करत असतो. त्याचे भले-बुरे संस्कार मनावर उठत असतात. अशा प्रकारे जीवनाचा अर्थ आहे विविध संस्कारांचा संचय. हे संस्कारही स्मरणरुपच असतात. बळकट संस्कारांची आठवण अधिक काळ असते. बालपणीच्या घटनांचे स्मरण फारसे नसते. बालपणी एखाद्या वस्तुबाबत एकाग्रता तत्काळ होते खरी पण ती तत्काळ विस्मरणातही जाते. बालक रडायला लागते आणि लगेचच हसूनही देते. बालपणीच्या आठवणीही रहात नाहीत. पूर्वजन्मीच्या तर नाहीच नाही. दिवसभर केलेल्या क्रियांचे स्मरण रहाते त्यापैकी बळकट संस्कारांचे स्मरण दिवसभर टिकते पण महिन्याभरानंतर विस्मरणात जाते. याचे कारण असे की त्याहूनही बळकट संस्कार मनात दृढमूल झालेले असतात. कमी बळकट संस्कारांच्या तुलनेने अधिक बळकट संस्कारांचे स्मरण मनाभोवती राहील. अशा प्रकारे स्मरण आणि विस्मरण सोबत-सोबत चालत असते. महत्वाचे संस्कार आठवतील आणि तुलनेने कमी महत्वाचे संस्कार विलुप्त होतील. महत्वाचे याचा अर्थ आपल्या दृष्टीने महत्वाचे होत. ते इतरांसाठी बिना महत्वाचे असू शकतील. ज्या वस्तुचे आकर्षण सर्वाधिक असेल त्यांचे स्मरण मनात अधिक दृढपणे राहील. त्या बळकट दृढ संस्कारांचेच स्मरण राहील. मनात गोळा झालेले बळकट संस्कार आणि त्यांचे स्मरण हीच तर आपल्या आयुष्याची कमाई होय. जीवनाची संपदा आहे. मरण समयी जर मन खाण्याकडे वळले तर आयुष्यभर आपण खाण्याचा संस्कार जोपासला हे उघड होते. मरण समयी पुत्राची आठवण तीव्रतेने झाली तर आपण आयुष्यभर ही संवेदना जोपासली असा याचा अर्थ होतो. कधी कधी सखोल संस्कारांचा शोध घेता येत नाही. ते विषम प्रसंगीच प्रकट होतात. मरण समय हा

अंतिम विषम प्रसंग आहे. त्या वेळी मनातले दृढ संस्कार आपली शक्ती दर्शवतात. विनोबांनी आपल्या आजीचे उदाहरण दिले आहे. विनोबा म्हणतात: "मी खूप वर्षांपूर्वी आजीला भेटायला म्हणून गेलो होतो. ती अगदी वृध्द झाली होती. ती सांगायला लागली की अलिकडे तिला काही आठवत नाही. तुपाचे भांडे घ्यायला म्हणून जाते आणि न घेताच परतते पण पन्नास वर्षांपूर्वीच्या दागिन्यांचे मात्र तिला सहज स्मरण होते. पाच मिनिटांपूर्वीचे आठवत नाही पण पन्नास वर्षांपूर्वीचे सारे आठवते. याचा अर्थ असा की पन्नास वर्षांपूर्वीचा संस्कार मनी बळकट होता कारण या दागिन्यांविषयी आजी अनेकांशी बोलली असेल. याचे सतत उच्चारण होत राहिले होते. जीवनात हा संस्कार बळकट बनला होता. दृढमूल झाला होता. मी मनातल्या मनात म्हणालो होतो की देवकृपा व्हावी आणि आजीला अंतिम समयी या दागिन्यांची आठवण काही होऊ नये."

गीता इथे म्हणते आहे की भक्त माझे स्मरण अंतिम समयी करतो. माझे स्मरण करत असतानाच देह त्याग करतो. या साऱ्या विवेचनावरुन आपल्या सहज ध्यानात येईल की आयुष्यात संस्कार महत्वाचा असतो आणि अंत समयी तोच कामी येतो. आयुष्यात काम करत असताना आतून जर ईश्वराचे नामस्मरण सपाट्याने सुरु असेल ना तर मग अंत समयी ईश्वराचे स्मरण जागण्याची शक्यता बळावते. मरण समयी देहाचा त्याग करुन आप्तेष्ट, मित्र, धन दौलत वगैरे सर्वांचा त्याग करुन जायची वेळ येते त्यावेळी या सर्वांना आठवत बसण्याचे काही एक कारण उरत नाही. खरे तर या समयी या सर्वांचे विस्मरण व्हावे हेच इष्ट होय. हेच वांछनीय होय कारण की या सर्वांचे स्मरण करण्यात काहीही हशील नाही. कुठलाही लाभ नाही. यामुळे अंतिम समयी या कुणाचेही स्मरण व्हायला नको. स्मरण दोनच वस्तुंचे व्हायला हवे. एक तर संत महात्म्यांचे वा मग साक्षात् ईश्वराचेच. ईश्वर अंत समयी आठवावा असे जर आपल्याला वाटत असेल ना तर मग आयुष्यभर ईश्वर स्मरण करायला हवे. हा संस्कार चित्तात दृढमूल व्हायला हवा. ईश्वर प्रेमाचा, ईश्वर भक्तीचा संस्कार जर दृढ नाही झाला ना तर मग मरण समयी ईश्वराचा संस्कार जागणे वा त्याचे स्मरण होणे केवळ दुरापास्त आहे. अगदी असंभव आहे. आयुष्यभर संतान आणि पत्नीचे स्मरण होत राहीले तर चालेल पण अंतिम समयी मात्र केवळ या सर्वांचे विस्मरण होणे गरजेचे आहे कारण की अंत समयीचे स्मरण आपल्या आयुष्याचे फलित आहे. यावरच पुढला जन्म अवलंबून आहे.

(2) स: मद्भावं याति अत्र संशय: न अस्ति - अंतिम काळी ईश्वर स्मरण केल्यावर कुठली गती प्राप्त होते याचा विचार गीतेने मांडला आहे. अंतकाळी जो ईश्वराचे स्मरण करतो तो देहत्यागानंतर ईश्वरालाच प्राप्त होतो. ईश्वराला प्राप्त होणे याचा अर्थ पुनर्जन्मापासून मुक्त होणे होय. तो मुक्त होतो, मोक्षाला पावतो. अंतकाळी ईश स्मरणाचे हे सर्वात मोठे फळ होय. माणुस आयुष्यभर बंधनातून मुक्त होण्यासाठी धडपड करतो. देह बंधनागार-- कारागार आहे पण ते मोक्षाचे साधनही आहे हे ध्यानात घ्यावे लागेल. देहाला बंधनाचे कारागार बनवायचे की मोक्षाचे साधन बनवायचे हे आपल्यावर अवलंबून आहे. आपण आयुष्यभर कसे चाललो बोललो, देहात आसक्त राहिलोत की अनासक्त बुध्दीने जगलो, ईश्वर स्मरण केले की विस्मरणात राहिलो या तमाम गोष्टींवर बंधन वा मोक्ष अवलंबूनआहे. अनासक्त भावनेने ईश्वर स्मरण करत देहत्याग करणारा साधक अंतकाळानंतर साक्षात् ईश्वरालाच जाऊन मिळतो याचा अर्थ त्याला पुनर्जन्म लाभत नाही. प्रपंचात यावे लागत नाही. त्याला मोक्ष लाभ होतो. यात कुठलाही संशय नाही.

: 6 :

*यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।*
*तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावित: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वा कौन्तेय:** आणि हे कौन्तेया
- **यं यं भावं अपि स्मरन्:** ज्या ज्या काही भावांचे स्मरण करीत
- **अंते कलेवरं त्यजति:** अंत समयी जो शरीराचा त्याग करतो
- **सदा तद्भावभावित:** सदैव त्या भावाचेच चिंतन करत असल्यामुळे त्याच रंगात रंगलेला असतो म्हणून
- **तं तं एव एति:** त्या त्या भावांना प्राप्त होतो

**अर्थ**

हे कुंतीपुत्र अर्जुना, हा मनुष्य अंतकाळी ज्या ज्या भावाचे स्मरण करीत शरीराचा त्याग करतो, त्याला त्याला तो जाऊन मिळतो. कारण तो नेहमी त्याच भावाचे चिंतन करीत असतो.

***जो जो आठवुनी भाव शेंवटी देह सोडितो***
***मिळे त्या त्या चि भावास सदा त्यांत चि रंगला।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) ज्या ज्या भावाचे स्मरण करीत अंत समयी जो शरीराचा त्याग करतो. 2) तो नेहमी त्याच भावाचे चिंतन करीत असतो.3) त्या भावाला तो जाऊन मिळतो.

**स्पष्टीकरण**

1) यं यं भावं अपि स्मरन् अंते कलेवरं त्यजति: ज्या ज्या भावाचे स्मरण करीत शरीराचा त्याग करतो. मागील श्लोकाच्या संदर्भात या श्लोकात पुनर्जन्माच्या सिध्दांताची मांडणी केली गेली आहे. अंतिम काळ ही आपल्या आयुष्यातील सर्वात महत्वाची वेळ आहे. या काळी मनात जो भाव उठेल तसाच पुनर्जन्म लाभेल. अंतिम काळ असा कसोटीचा काळ आहे. आयुष्यभर मरणाचे स्मरण असावे पण आपला सारा व्यवहार हा मरणाच्या स्मरणात नसून मरणाच्या विस्मरणातच होतो. मरणाचे अखंड स्मरण असेल ना तर मग आपल्या हातून काहीही अनुचित कर्मे घडणार नाहीत आणि आपण निरासक्त होऊ शकतो.

'गीता प्रवचनांमधून' एक उदाहरण येते. संत एकनाथांचे गुरु होते जनार्दन स्वामी. गुरुंच्या आदेशानुसार त्यांनी गृहस्थ धर्माचा अंगिकार केला. त्यांचा गृहस्थाश्रम आदर्श होता. शांती म्हणजे अक्रोधाबाबत त्यांची ख्याती होती. अशा सरळ स्वभावाचे साधु विरळ असतात. ते परम शांतमूर्ती होते. त्यांनी क्रोधावर विजय संपादन केला होता. त्या काळी अस्पृश्यता विचाराचे प्राबल्य होते पण एकनाथ महाराज आपल्या सोबत हरिजनाना भोजनाला बसवत असत. त्यांच्यापाशी एक जण आला आणि सांगू लागला की महाराज, आमचे जीवन आपल्या जीवनासारखे निष्पाप का बनू शकत नाही ? त्या व्यक्तीला बोध देण्याच्या उद्देशाने नाथांनी सांगितले की आपण आठ दिवसांनी मरणार आहात असे मानून वागा-बोला. हे एकून त्याला वाटले की एकनाथ महाराजांनी सांगितले आहे याचा अर्थ आपण खरोखरच आठ दिवसांनी मरणार आहोत. या विचाराने तो इतका पक्का घेरला गेला की त्याला दुसरे काहीही सुचेना. तो रात्रंदिवस फक्त मरणाचे स्मरण करत राहिला. यात तो आजारी पडला. सातव्या दिवशी नाथ महाराज त्याच्या भेटीसाठी पोहोचले आणि त्याला विचारले की या सात दिवसात त्याच्या मनी काम, क्रोध वगैरे विचार वा कुविचार कितीदा आलेत? तो हतबुध्द होऊन बोलला की वाईट करायला वा काम, क्रोध वगैरेंचे स्मरण करायला अवकाश होताच कुठे महाराज? रात्रं-दिवस एकच एक स्मरण होते आणि ते होते मरणाचे. नाथ महाराज म्हणाले की आता आले ना लक्षात की आपले जीवन निष्पाप कसे राहू शकेल? मरणाचे स्मरण असेल ना तर अविचार येईलच कुठून बरे? खरे तर पापाचा विचार करायला मन निश्चिंत हवे की नको?

पापापासून वाचण्यासाठी मरणाचे स्मरण करणे हा सर्वोत्तम उपाय आहे पण माणूस मरणाचे स्मरण टाळत असतो. मरण केव्हा येईल हे तर कुणालाही ज्ञात नसते. यामुळे ते सतत आपल्या समोर उभे ठाकले आहे असे समजून वागावे पण आपण मरणाच्या स्मरणालाच भित रहातो. कुणाच्या शवाला बघायला सुध्दा आपण तयार होत नाही. भीती वाटते आपल्याला. खरे तर शवाला बघून वैराग्य मनी फुलायला हवे पण उपजते भय. कुठल्या क्षणी काय होईल हे का कुणाला सांगता येईल बरे ? तरी एके दिवशी मरण अटळ आहे हे मात्र सारेच जाणतात. अर्थात् मरणाचे भय असे काही दाटून मनात असते की आपण मरणाला विस्मरणाच्या गुहेत ढकलून देत रहातो. कुणा मित्र वा पुत्राचे मरण झाले तर मग काही काळ आपल्या मनात वैराग्यभाव वस्तीला येतो पण तो काही टिकावू स्वरुपाचा नसतो. त्यावर विस्मरणाचा परदा टाकला जातो. अंतिम समयी ज्या विषयाच्या स्मरणासोबत माणूस देहत्याग करतो तसाच पुढील जन्म लाभतो हा नियम आहे.

2) सदा तद्भावभावित: माणूस आयुष्यभर ज्या भावनानंदात विहार करतो अंतसमयी तीच भावना जागते. अंतिम समयी जी भावना जागते त्यानुसारच पुढला जन्म लाभतो. यामुळे अंतिम समयी जो भाव आपल्या मनी वसावा अशी आपली अपेक्षा असते तोच भाव आपण आयुष्यभर जोपासायला हवा. याच भावाचा अभ्यास

व्हायला हवा. जीवनात कमालीचा संयम हवा. बाहेरुन स्वधर्माचे पालन आणि आतून विकर्म नांदला तर मग जीवन संयमी राहू शकते. सकाळपासून सायंकाळपर्यंतचा कार्यक्रम अगदी बंदिस्त हवा. जीवनात निग्रह शक्ती वाढीला लागण्याकामी प्रयत्नशील रहायला हवे. चौथ्या अध्यायात नाना प्रकारच्या विकर्मांची चर्चा आली आहे. त्यांना आत्मसात करण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. नदीसारखा आपल्या आयुष्याचा एक समांतर प्रवाह आणि प्रवास असायला हवा.

मनात नाना प्रकारचे विचार येत रहातात. सारे विचार चांगलेच असतात असे नव्हे तर काही वाईटही असतात. वाईट विचारांना थोपवण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजेत याचे कारण असे की जो संस्कार दृढ होईल त्याचाच प्रवाह मनात जारी राहील आणि मग जे संस्कार जीवनात दृढ होतील तेच अंतिम समयी जागृत होतील. महादेवाच्या पिंडीवर पाण्याचा एक-एक थेंब पडत रहातो. जलधारा असते ती. सबंध दिवसाचा विचार केला तर ते पाणी दोन-एक बादलीत सामावू शकेल इतके असते. कुणी असा विचार करील की मग एकदमच दोन बादल्या पाणी शिवपिंडीवर का ओतण्यात येऊ नये. नाही, असे नाही चालणार कारण तो भक्तीचा विचार नाही होणार. उपासनेचा अर्थ आहे की प्रतिक्षण ईश्वराचे स्मरण. असे स्मरण करण्यासाठी थेंब-थेंब पाणी पिंडीवर पडावे. या प्रत्येक थेंबासोबत ईश्वराचे स्मरण होईल. मग ते स्मरण दृढ होईल. जंगलात एकांतात बसून कुटी बांधून ईश्वर स्मरण करणे हे एकदम बादलीभर पाणी शिवपिंडीवर टाकण्यासारखे आहे. तसे नको. प्रत्येक कार्यात ईश्वरी स्मरण जागले तर मग हरी स्मरणाचा संस्कार दाटून येईल. तोच संस्कार अंतिम समयी जागृत होण्याची शक्यता वाढते.

3) तं तं एव एति: अंतिम समयी जी भावना वा वासना वा भाव मनात जागेल तोच प्राप्त होईल. ज्या विषयाचा अभ्यास झाला असेल, जो संस्कार दृढ झाला असेल तोच अंतिम समयी येऊन मनासमोर उभा ठाकेल. जो संस्कार उभा राहील त्यालाच व्यक्ती प्राप्त होईल. त्यानुसारच त्याला पुढला जन्म लाभेल. माणसाला सदोदित माणसाचाच जन्म लाभेल असे काही सांगता येत नाही. संपूर्ण आयुष्यात ज्या प्रकारची कर्मे केली असतील, ज्या कर्मांचा संस्कार मनावर दृढपणे ठसला असेल त्यानुसार जो संस्कार अंतिम समयी जागृत होईल त्यानुसारच पुढला जन्म लाभेल.

: 7:

*तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।*
*मय्यर्पितमनोबुध्दिर्मामेवैष्यस्यसंशयं ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- तस्मात् सर्वेषु कालेषु: यासाठी हे अर्जुना, तू सर्व काळी निरंतर
- मां अनुस्मर: माझे स्मरण कर
- च युध्य: आणि युध्दही कर
- मय्यर्पितमनोबुध्दि: माझ्या ठिकाणी अर्पण केलेल्या मन बुध्दीने युक्त झालेला (असा तू)
- मां एव एष्यसि: मलाच प्राप्त होशील
- असंशय: हे नि:संशय आहे, यात काहीही संशय नाही

**अर्थ**

म्हणून हे अर्जुना, तू सर्वकाळी निरंतर माझे स्मरण कर आणि युध्दही कर, अशा प्रकारे माझ्या ठिकाणी मन-बुध्दी अर्पण केल्यामुळे तू नि:संशय मलाच पावशील.

*म्हणूनि सगळा काळ मज आठव झुंज तूं*
*मन बुध्दि समर्पूनि मज नि:शंक पावसी।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे 1) प्रत्येक क्षणी माझे स्मरण कर 2) माझे स्मरण करीत असता आपले कर्तव्य पालन करीत रहा 3) माझ्या ठायी मन-बुध्दी अर्पित झाली आहे असा तू 4) मलाच प्राप्त करशील यात काहीही संशय नाही.

**स्पष्टीकरण**

1) **तस्मात् सर्वेषु कालेषु मां अनुस्मर:** प्रतिक्षणी ईश्वराचे स्मरण करत आयुष्य घालवावे. मागल्या श्लोकात आपण बघितले की ज्या ज्या भावांचे स्मरण करत आपण अंतिम समयी देहत्याग करु त्या भावाला अनुकूल असा आपल्याला पुढला जन्म लाभेल. संपूर्ण आयुष्यभर आपण जो संस्कार दृढमूल करुन घेतला तोच अंतिम समयी

ध्यानात येईल. अंतिम समयी जागृत होईल. आता या श्लोकात गीतेचे निवेदन आहे की ईश्वराचे अखंड स्मरण करत रहायला हवे. तसे तर संपूर्ण गीतेने भगवंताची भक्ती करणे आणि भगवंताला शरण जाणे हेच मोक्षाचे मुख्य साधन मानले आहे पण प्रतिक्षणी ईश्वराचे स्मरण असावे हा भाग याच श्लोकात वर्णिला गेला आहे. तास वा अर्धा तास वा तीन-चार तास पूजा उपासना करणारे खूप लोक भेटतील पण प्रतिक्षणी ईश्वराचे स्मरण ही मात्र अद्भुत गोष्ट आहे. कर्मे आचरत असताना म्हणजे स्वधर्माचे पालन करत असताना ईश्वराचे अखंड स्मरण करणे ही परम लाभाची गोष्ट आहे. ईश्वराचे प्रतिक्षणी स्मरण ही प्रतिक्षणी मिष्टान्न सेवनासारखी गोष्ट आहे. तुलसीदासजी म्हणतात: ते धन्य तुलसीदास आस बिहाई जे हरि-रंग रंगे। अर्थात् आशा, वासना आणि विकाराना त्यजून जे लोक हरी रंगात रंगून गेले आहेत ते धन्य होत. तुलसीदासजी स्वत: हरी रंगी रंगून गेले होते. परमात्मा ब्रह्मांडात व्याप्त आहे. ही गोष्ट त्यांच्या चित्तात खोलवर ठसून गेली होती याचे अनेक पुरावे त्यांच्या 'रामचरितमानस' या ग्रंथात पदोपदी आढळतात. ते म्हणतात :

***जे जनमे कलिकाल कराला।***
***करतब बायस बेष मराला॥***
***चलत कुपंथ बेद मग छाँडे।***
***कपट कलेवर कलिमल भाँडे॥***
***बंचक भगत कहाइ राम के।***
***किंकर कंचन कोह काम के॥***
***तिनमहँ प्रथम रेख जग मोरी।***
***धींग धरमध्वज धंधक धोरी॥***

अर्थात् ज्यांचा बाह्य वेश हंसाचा असून अंतरंग मात्र कावळ्याचे आहे अशा लोकांचा कलियुगात जन्म झाला. त्यांचा वेष हंसाचा असून करणी कावळ्याची आहे. वेदविहित मार्गांचा त्याग करुन ते कुमार्गावर चालणारे आहेत. ते कपटमूर्ती आहे. ते कळिमळाचे आगार आहेत. तरी ते स्वत:ला रामभक्त म्हणवतात. असे जे कपटी जन आहेत, जे काम, क्रोध आणि मोहाचे दास आहेत त्या जनांमध्ये मी अग्रणी आहे. बाहेरुन धर्मनिष्ठ अशा माझा धिक्कार असो.

ज्यांना ईश्वराचे भान झाले आहे ते आपला मोठेपणा न सांगता सदैव आपली अल्पताच वर्णत असतात. अल्पता बघत असताना ते सातत्याने ईश्वर रंगी रंगून जातात आणि स्वत: शून्य बनून जगतात. आपले हे अल्पपण ज्यांच्या ध्यानात येऊन जाते ते प्रतिक्षणी ईश्वररंगी रंगून गेल्याशिवाय रहात नाहीत. ते प्रतिक्षणी ईश्वर स्मरण करत रहातात.

2) **युध्य च:** गीतेची शिकवण आहे 'युध्द कर' म्हणजे 'स्वकर्तव्याचे पालन कर'. स्व कर्तव्याचे पालन करत रहा. ईश्वराचे प्रतिक्षणी स्मरण करत स्वधर्माचे पालन करणे हा आयुष्याचा सारांश आहे. आपल्या अगणित क्रियांच्या पाठीमागे नाना हेतु असतात तरी पण आपली दृष्टी स्वधर्म पालनाची असावी. यामुळे आपल्या प्रत्येक क्रियेत उच्च विचार आणि संयमाचा प्रभाव जाणवेल. आपण विवाह करावा की ब्रह्मचर्य पाळावे याचाही निर्णय कर्तव्य बुध्दीने केला तर मग संयमाच्या सुरक्षित मार्गावर आपण चालत जाऊ शकतो. प्रपंचात फसण्याचा प्रसंग उद्भवणार नाही. आपण ब्रह्मचर्य पाळावे वा प्रपंच साधावा या दोघांपैकी कुठल्या व्यवस्थेत आपले अधिक कल्याण आहे या बाबतीत विचार पूर्वक जो निर्णय आपण स्वीकारतो त्याला अमलात आणणे आपले परम पवित्र कर्तव्य आहे.

गृहस्थाश्रम एक पवित्र आश्रम आहे. साधु संतांची उत्पत्तीसुध्दा याच आश्रमातून झाली आहे. गृहस्थ जीवनात प्रेम, त्याग, सहिष्णुता, परोपकार यासारखे गुण विकसित होतात असे जाणून जर आपण गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला तर हा शब्द आश्रम या संज्ञेला पात्र ठरेल. विकाराने प्रेरित होऊन विवाह करणे हा काही गृहस्थाश्रमाचा मार्ग नव्हे! तो तर प्रपंच झाला. प्रपंच वेगळा आणि गृहस्थाश्रम वेगळा. गृहस्थाश्रमात संततीवर प्रतिबंध राहील. मर्यादा राहील. विषयासक्ती हे प्रपंचाचे रुप आहे तर विषय संयम हे गृहस्थाश्रमाचे स्वरुप होय. अशा प्रकारे गृहस्थाश्रम स्वीकारण्यात कर्तव्य दृष्टी प्रधान असते. जीवनाच्या तमाम क्रियांच्या मागे जर कर्तव्य भावना वसेल तर मग अनासक्ती आणि प्रपंचाबाबतचा वैराग्य भाव लगेचच उपजू शकेल. आतून जेवढी अनासक्ती आणि वैराग्य उपजेल त्या प्रमाणात ईश्वर स्मरणाची वृत्ती वाढती राहील.

3) **मय्यर्पितमनोबुध्दि:** ज्याने ईश्वराच्या ठायीच मन बुध्दी समर्पित करुन टाकली आहे असा भक्त श्रेष्ठ

होय. प्रत्येक क्षणी ईश्वर स्मरण करणे हा झाला एक मुद्दा. पुढचा मुद्दा अखंड ईश्वर स्मरणासोबत स्वधर्म पालनाचा म्हणजे कर्तव्य बुध्दीच्या पालनाचा येतो. या दोघांच्या नित्य अभ्यासातून जो तिसरा मुद्दा आकाराला येतो तो आहे ईश्वराप्रती मन-बुध्दी समर्पित करण्याचा. ही झाली अहंकाराची शून्यावस्था. अखंड ईश्वर स्मरण करत असताना मी अखंड ईश्वर स्मरण करत आहे. मी स्वधर्म पालन करत आहे अशा प्रकारचा अहंकार जागण्याची शक्यता असते. या दोन गोष्टी प्राप्त झाल्यात म्हणजे अहंभाव जाईल असे नसते. अहंभाव हळूहळू नष्ट होतो एकदम नव्हे. स्वधर्माचे पालन करत असताना ईश्वराचे अखंड स्मरण करायचा अभ्यास घडला तर मग अहंकार क्षीण होऊन मन आणि बुध्दी परमात्म्याप्रती अर्पण करता येऊ शकते. हे एकदा का प्राप्त झाले ना की मग मी काही करत आहे, मी अखंडपणे ईश्वराचे स्मरण करत आहे, मी स्वधर्माचे पालन करत आहे हे भानही नष्ट होऊन जाईल आणि साधक परमशून्यतेला वरेल.

4) मां एव एष्यसि न संशय: असे अखंड शून्यपण लाभले ना की मग साधक ईश्वराला प्राप्त होईल या बाबत काहीही संशय नसावा. ही मोक्षावस्था आहे. प्रपंचाच्या बंधनातून मुक्त होण्याची धडपड तर सारेच जण करतात. बंधनांपासून मुक्त होण्यासाठी इथे एका पाठोपाठ तीन गोष्टींची चर्चा आली आहे. एक म्हणजे अखंड नामस्मरण, दोन स्वकर्तव्य धर्माचे पालन आणि तिसरे म्हणजे मन आणि बुध्दी ईश्वराप्रती समर्पण म्हणजे सर्वस्वाचे समर्पण. समर्पणानंतर मोक्ष प्राप्ती. मोक्ष म्हणजे ईश्वरात संपूर्णपणे एकरुप होण्याची स्थिती होय. कठोपनिषदात येते:

*यथोदकं शुध्दे शुध्दमासिक्तं तादृगेव भवति ।*
*एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम ॥*
(2/1/15)

अर्थात् शुध्द जळात ओतलेले शुध्द जळ जसे त्यात एकरुप होऊन जाते तसेच हे गौतमा, ज्ञानवंतांचे आत्मतत्त्व हे ईश्वराच्या ठायी एकरुप होऊन जाते.

: 8 :

*अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।*
*परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अभ्यासयोगयुक्तेन्:** (हे अर्जुना, असा नियम आहे की) परमेश्वराच्या अभ्यासरुप योगाशी युक्त होऊन
- **न अन्यगामिना चेतसा:** आणि दुसऱ्या कुठल्याही विषयात न जाणाऱ्या चित्ताने
- **अनुचिन्तयन्:** निरंतर चिंतन करणारा पुरुष (भक्त)
- **पार्थ:** हे अर्जुना
- **परमं दिव्यं पुरुषं याति:** परम प्रकाशस्वरुप दिव्य पुरुषाला अर्थात् परमेश्वरालाच प्राप्त होतो

**अर्थ**

हे पार्था, असा नियम आहे की परमेश्वराच्या ध्यानाच्या अभ्यासरुपी योगाने युक्त, दुसरीकडे न जाणाऱ्या (विचलित न होणाऱ्या एकाग्र अशा) चित्ताने निरंतर चिंतन करणारा मनुष्य म्हणजे भक्त, परम प्रकाशस्वरुपी दिव्य पुरुषाला म्हणजे परमात्म्यालाच जाऊन मिळतो.

*अभ्यासीं चित्त जोडूनि योगी अन्य न लक्षुनी*
*पुरुषास महा दिव्य पावे संतत चिंतुनी ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) चित्ताला माझ्या ठायी एकाग्र करायच्या प्रयत्नाला अभ्यास असे म्हणतात. या अभ्यासरुपी योगाने म्हणजे उपायाने युक्त असा माझा भक्त 2) परमात्म्याशिवाय अन्यत्र कुठल्याही विषयात न जाऊ देणाऱ्या चित्ताने युक्त 3) परमात्म्याचे ध्यान करणारा भक्त दिव्य पुरुषाला प्राप्त होतो.

**स्पष्टीकरण**

1) **अभ्यासयोगयुक्तेन:** भगवंताच्या ठायी चित्त एकाग्र करण्याचे प्रयत्न म्हणजे अभ्यास होय. योग म्हणजे उपाय. शंकराचार्य म्हणतात: चित्तसमर्पणविषयभूते एकस्मिन् मयि तुल्यप्रत्ययावृत्तिलक्षण: विलक्षणप्रत्ययानन्तरित: अभ्यास:। अर्थात् चित्त समर्पित करण्याचा विषय

एकमात्र ईश्वरच आहे. त्या ईश्वराच्या ठायीच समान प्रत्यय भावाची आवृत्ती हे ज्याचे लक्षण आहे आणि ईश्वराच्या प्रत्ययाशिवाय दुसऱ्या कुठल्याही प्रत्ययाने जे प्रतिबंध रहित आहे त्याला अभ्यास असे म्हणावे.

चित्तवृत्तीचा सारा प्रवाह ईश्वराच्या दिशेने केंद्रीभूत व्हावा यासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे. आपण ज्ञान स्वरुपी असलो ना तरीही चित्ताची उपाधि आपला पाठलाग सोडत नाही. ती आपल्यासोबत निरंतर उपस्थितच असते, आपण त्या उपाधिने रंगलेले असतो. काच स्वच्छ असताना देखिल काचेसमोर तांबड्या रंगाचे फूल ठेवले तर ते तांबडे दिसते. चित्तात नाना भावतरंग उठत असतात. हे भावतरंग भले-बुरे दोन्ही प्रकारचे असतात. चित्तात कुण्या क्षणी कुठला भाव विद्यमान होईल हे काही कुणी सांगू शकत नाही. हो एवढे मात्र प्रत्येकाला सांगता येण्यासारखे आहे की चित्त हे कदापि निर्विचार वा भाव रहित असत नाही. चित्ताला निर्विचार करण्यासाठी त्या प्रकारचा अभ्यास करणे आवश्यक आहे. पतंजलिच्या योगशास्त्रात चित्त शुध्दीसाठीचा उपाय वर्णिला गेला आहे. गीतेचा सहावा अध्याय पतंजलिच्या योगशास्त्राचा आधार प्रस्तुत करतो. तो योगशास्त्रावर आधारित आहे. चित्ताला शुध्द आणि स्थिर करण्याचा एकमात्र उपाय भगवद्भक्ती जागणे हा आहे. ईश्वराविषयी परमप्रीती जागली ना तर मग सहजच चित्त स्थिर होऊन जाईल. मानवी चित्त हे प्रेमाने ओतप्रोत आहेच आहे. बालपणी हा प्रेमभाव आई-वडिल, बहिण-भाऊ असा मर्यादित स्वरुपाचा असतो. लग्नानंतर तो कुटुंबी जनापुरता मर्यादित स्वरुपाचा असतो. कुटुंबाची मर्यादा ओलांडली की प्रीत भाव जनसेवेप्रती समर्पित होतो मग हा प्रेमभाव अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी ठरतो. तरी सुध्दा अहंभाव, काम, क्रोध या सारख्या विकारामुळे जन सेवेत अर्पित झाल्यावरही प्रेमभाव जागत नाही आणि मनाला शांती लाभत नाही. यामुळे या विकारावर विजय संपादित करण्यासाठी, यांचे बळ क्षीण करण्यासाठी चित्ताच्या मागे असलेल्या ईश्वरी शक्तीची ओळख करुन घेणे गरजेचे आहे. यासाठी चित्तात वसणाऱ्या समग्र प्रेमशक्तीला ईश्वराप्रती समर्पित करता यायला हवे. चित्ताचा सारा प्रवाह ईश्वराच्या दिशेने वळवता यायला हवाय. यासाठी दोन उपाय सांगितले गेले आहेत एक आहे अभ्यास आणि दुसरा आहे वैराग्य.

पतंजलिने योगशास्त्रात निवेदन केले आहे की चित्तवृत्तींचे निरोधन अभ्यास आणि वैराग्य यांच्यामुळेच होऊ शकते. गीतेच्या सहाव्या अध्यातील अखेरच्या भागात चित्त स्थिर करण्यासाठी अर्जुनाने प्रश्न केला आहे. त्याला उत्तर देताना सांगितले गेले आहे : अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते । म्हणजे अभ्यास आणि वैराग्य या दोन कारणांमुळे चित्तवृत्तींचा निरोध साधला जातो. इथे हाच विचार प्रतिपादित केला गेला आहे.

2) **चेतसा नान्यगामिना:** ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुठल्याही वस्तुकडे चित्तवृत्ती न जाणे याला वैराग्य म्हणतात. वैराग्य जागले की या जगतातील यच्चयावत पदार्थ नि:सार वाटू लागतात आणि एकमात्र ईश्वरच काय तो सारवान, सर्वस्व आणि सत्यरुपी वाटू लागतो पण ईश्वर दिसत काही नाही. जी वस्तु कदापि दिसू शकत नाही तिला सत्य मानावे, तिच्याशी प्रीत जोडावी आणि जे प्रत्यक्ष दिसते त्या जगताला नि:सार मानावे, त्याप्रती अनासक्त भाव व्यक्त करावा, त्या प्रती वैराग्यभाव मनी जोडावा हे सोपे खचितच नाही. छोटे बाळ असले तर आईचे सारे लक्ष त्याच्याभोवतीच असते. भक्ताचीही अशीच अवस्था असते. त्याचे सारे प्रेम, सारे ध्यान एकमात्र ईश्वराप्रती केंद्रित असते. ईश्वराचा भक्त जनसेवेत रत असेल तरी असेच करील. कुटुंबात असला तर कुटुंबाची सेवा करील हे खरे पण त्याचे अंतरंग प्रेम, लक्ष्य आणि ध्यान हे ईश्वराप्रती समर्पित असेच असेल. तो कुटुंबाची सेवा देखिल ईश्वराची सेवा समजूनच करील. अशा व्यक्तिचे आचरण संयमी असेल. तो गृहस्थ असेल खरा पण ब्रह्मचर्याचे पालन करील. अशा प्रकारे ईश्वराच्या अखंड स्मरणामुळे त्याचे जीवन उच्च कोटीचे असेल.

3) **अनुचिन्तयन् परमं दिव्यं पुरुषं याति:** ईश्वराचे ध्यान करणारा वा चिंतन करणारा भक्त हा निरतिशय भव्य अशा ईश्वराला प्राप्त करुन घेतो. ईश्वरासाठी इथे दोन विशेषणांचा उपयोग केला गेला आहे. एक म्हणजे परम म्हणजे श्रेष्ठ आणि दुसरे विशेषण दिव्य. जगतात ईश्वरच एक काय तो अतिश्रेष्ठ आहे. निरुपम आहे. अद्वितीय आहे. दुसरे विशेषण आहे दिव्य. दिव्य म्हणजे अलौकिक, अद्भुत. धरती अतिशय वेगाने फिरत आहे पण

ती फिरत आहे असे आपल्याला वाटत नाही. ही मोठी अद्भुत गोष्ट आहे. सूर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे चाललाय असे आपल्याला वाटते खरे पण तो स्थिर आहे ही वस्तुस्थिती आहे. ही ईश्वराची दिव्यता आहे, अद्भुतता आहे. तुलसीदास म्हणतात:

*असि सब भाँति अलौकिक करनी।*
*महिमा जासु जाइ नहिं बरनी॥*

अर्थात् ईश्वराची अशी सर्वप्रकारे अलौकिक अशी करणी ईश्वराची असते. तिचे महात्म्य कुणाला बरे वर्णिता येईल?

महात्मा गांधीजींचे आचरण असे अद्भुत होते की जनता त्यांच्याकडे आकर्षित व्हायची. त्यांच्या प्रती लोकांच्या मनात प्रेम आणि सद्भावना जागायची. जिथे म्हणून कुठे आपल्याला दिव्यतेची प्रचिती येते तिथे तिथे आपण आकृष्ट होतो. आपल्या मनी प्रेम आणि भक्तिभाव जागतो. 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती' असे कवी श्री बा.भ. बोरकर म्हणतात तेही यामुळेच. अशा प्रकारे आपण दिव्य भव्य अशा अतिश्रेष्ठ अशा ईश्वराला प्राप्त करुन घेतो.

: 9 :

*कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः।*
*सर्वस्य धातारमचिन्त्यरुपमादित्यवर्णं तमसः परस्तात्॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **कविंः** कवी म्हणजे सर्वज्ञ
- **पुराणंः** अनादी काळापासून चालत आलेला
- **अनुशासितारंः** सर्व जगाचा नियंता (अंतर्यामी रुपाने सर्व प्राण्यांच्या शुभ व अशुभ कर्मानुसार शासन करणारा )
- **अणोः अणीयांसम्ः** अणूचाही गाभा म्हणजे सूक्ष्माहूनही अतिसूक्ष्म
- **सर्वस्य धातारंः** सर्वांचे धारण पोषण करणारा
- **अचिन्त्यरुपंः** ज्याचे स्वरुप चिंतनाच्या पलिकडे आहे
- **आदित्यवर्णंः** सूर्याप्रमाणे प्रकाशमान नित्य चेतन
- **तमसः परस्तात्ः** अज्ञान, मोह वगैरे हून (अविद्या) जो पलिकडे आहे
- **यः अनुस्मरेत्ः** अशा परमात्म्याचे जो ध्यान चिंतन करतो (तो त्या परमात्म्याला प्राप्त करुन घेतो)

### अर्थ

जो पुरुष सर्वज्ञ, अनादी, सर्वांचा नियामक, सूक्ष्माहूनही अतिसूक्ष्म, सर्वांचे भरण-पोषण करणारा, अतर्क्यस्वरुप, सूर्याप्रमाणे नेहमी चेतन प्रकाशरुप आणि अविद्येच्या अत्यंत पलिकडील अशा शुध्द सच्चिदानंदघन परमेश्वराचे स्मरण करतो.

*सर्वज्ञ कर्ता गुरु जो पुराण सूक्ष्माहुनी सूक्ष्म अचिंत्य-रुप*
*गिळूनि अंधार उजेडला जो तो चिंतुनीयां*
*प्रभु सूर्य-वर्ण।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) परमात्म्याच्या स्वरुपाचे वर्णन करत असताना आठ लक्षणे सांगितली आहेत 2) या लक्षणांनी युक्त परमात्म्याचे जो ध्यान, भक्ती करतो तो त्याला प्राप्त करतो.

### स्पष्टीकरण

1) **कविंः** कवी म्हणजे त्रिकालज्ञ किंवा सर्वज्ञ होय. ईशोपनिषदात म्हटले आहे : कविर्मनीषी परिभूः स्वयंभूः याथातथ्यतोऽर्थान् व्यवधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः। मनीषी म्हणजे मनाचा स्वामी, मनावर अधिराज्य गाजवणारा असतो. परिभूः म्हणजे विश्व प्रेमी असतो. स्वयंभूः म्हणजे आत्मनिष्ठ असतो. सत्यभाषी, दीर्घदृष्टी म्हणजे विशाल दृष्टीचा असतो.

हे पाच गुण ईश्वराचे आहेत. (अ) तो मनाचा स्वामी आहे यामुळे सारे जगत त्याच्या अधीन आहे. (आ ) विश्व प्रेमाने भरलेले आहे म्हणून तो दयाळू आहे. सर्वांवर प्रेम, कृपा, अनुग्रह आणि दया करणारा आहे. (इ) सतत आनंदमय आणि स्वस्वरुपी स्थिर असल्यामुळे तो आत्मनिष्ठ असतो. आत्मस्वरुपी स्थित असतो. (ई) सत्यमय असल्यामुळे तो सत्यभाषी असतो. सत्य हाच त्याचा स्वभाव असतो. (उ) तो त्रिकालदर्शी असतो. विशाल दृष्टीसंपन्न असतो. दीर्घदृष्टी युक्त असतो.

2) **पुराणम्:** ईश्वर अनादि असतो म्हणून नित्य असतो. त्याला ना आदि ना अंत. दुसऱ्या अध्यायाच्या विसाव्या श्लोकात आत्म्याच्या लक्षणांचे वर्णन करताना पुराण असा शब्द आला आहे. पुराण म्हणजे पुरातन. तमाम प्राणी जन्म मृत्युच्या अधीन आहेत यामुळे ते आदि आहेत आणि अंतवान आहेत.

3) **अनुशासितारं:** जगाचा पालनकर्ता म्हणजे अनुशासनकर्ता ईश्वर आहे. ईश्वराचे सारे जगावर नियंत्रण आहे. यामुळे त्याला जगाचा नियंता म्हणतात. कठोपनिषदात श्लोक आहे :

*भयादस्याग्निस्तपति भयात् तपति सूर्यः।*
*भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पंचमः॥*

अर्थात् ईश्वराच्या भयामुळे अग्नी जळतो, सूर्य तापतो, इंद्र आणि वायु आपापली नियत कामे करतात, मरण सुध्दा ईश्वराला भिऊन आपले काम करत असते.

या पाचांच्या ठायी अन्यांचा समावेश होऊन जातो. ही धरणीसुध्दा ईश्वराच्या आज्ञेत राहूनच वेगाने फिरत असते. अशा प्रकारे सारे पदार्थ ईश्वराच्या नियंत्रणात राहून आपापले कार्य सुयोग्य प्रकारे करत असतात.

4) **अणोः अणीयान्:** ईश्वर सूक्ष्माहूनही अतिसूक्ष्म आहे. तमाम पदार्थांमध्ये आकाश हे सर्वात सूक्ष्म आणि व्यापकही आहे पण ईश्वर हा आकाशाहूनही सूक्ष्म आणि व्यापक आहे. अतिसुक्ष्म असूनही ईश्वर हा देहाच्या ठायी सत्-चित्-आनंदरुपाने वसतो. प्रकट होतो यामुळेच तर त्याचे ज्ञान होते. कठोपनिषदात ईश्वराला अणु म्हटले गेले आहेः

***अणोरणीयान् महतो महीयानात्मास्य***
***जन्तोर्निहितो गुहायाम्। तमक्रतुः पश्यति***
***वीतशोको धातुप्रसादान् महिमानमात्मनः॥***
(1/2/20)

अर्थात् सूक्ष्माहूनही सूक्ष्म आणि महानाहूनही अतिमहान असा ईश्वर आहे. तो आत्मतत्त्वाच्या रुपाने प्राणीमात्रांच्या अंत:करणात निवास करतो. कामनाशून्य पुरुष मन, बुध्दी, इंद्रिये ही सारी प्रसन्न झाल्यावर आत्मतत्त्वाच्या महात्म्याचा अनुभव घेऊ शकतात आणि अशा प्रकारे असे पुरुष शोक मोहरहित होऊन जातात.

5) **सर्वस्य धातारं:** सर्वांना धारण करणारा, सर्वांवर नियंत्रण ठेवणारा, सर्वांना आपापल्या कर्मांच्या अनुसार फळ देणारा असा ईश्वर असतो. घटाला माती धारण करते. कापडाला सूत धारण करते. तशाच प्रकारे ईश्वर तमाम पदार्थांना धारण करणारा असा आहे. सर्वांना तो धारण करत असल्यामुळे सर्वांवर त्याचे नियंत्रण असते. ईश्वर सर्वांच्या कर्मांचे फळ देणारा आहे. कर्माचे फळ हे देश, काल, निमित्त या त्रयीच्या अनुकूलतेवर अवलंबित असते. ही अनुकूलता ईश्वराच्याच अधीन असते.

6) **अचिन्त्यरुपं:** ईश्वराचे स्वरुप चिंतनाच्या पलीकडचे आहे. अचिंत्य आहे. जी वस्तु इंद्रियांनी जाणून घेता येते अशा वस्तुचे चिंतन-मनन करता येते पण जी वस्तु इंद्रियांच्या पलीकडची आहे तिच्या बाबतीत मात्र चिंतन-मनन करता येत नाही. अशा वस्तुंचे चिंतन केवळ बुध्दीच्या आधारे करता येत नाही. ईश्वर निज स्वरुपी असल्यामुळे त्याला अनुभवता येते. त्याचा अनुभव घेता येतो. त्याचा अनुभव आपण घेऊ शकतो. ज्या ऋषी-मुनींनी आणि ज्या महात्म्यांनी या परमतत्त्वाचा अनुभव घेतला आहे आणि हा अनुभव शब्दातून प्रकट केला आहे त्यांच्या शब्दांचे चिंतन-मनन आपण करु शकतो. ऋषी-मुनींच्या अनुभवाशिवाय आपण स्वतंत्र रुपाने ईश्वराचे चिंतन-मनन नाही करु शकत. या धरतीवरील तमाम पदार्थांना सारे बघू शकतात पण काही सूक्ष्म पदार्थांना बघावयाचे असेल तर सूक्ष्म दर्शक यंत्राची गरज पडते. अर्थात् ईश्वराला अशा सूक्ष्म दर्शक यंत्राच्या माध्यमातूनही बघता येणे शक्य नाही. त्याला जाणून घ्यायचे एकच साधन आहे आणि ते म्हणजे चित्तशुध्दी. अशा प्रकारे ज्या महात्म्यांनी ईश्वराचा अनुभव घेतला आणि त्याच्या स्वरुपाला शब्दबध्द केले हा एक आधार होऊ शकतो. चित्तशुध्दीच्या अभावी ज्यांना ईश्वराचे दर्शन घेता येणे शक्य नाही पण ज्यांची तीव्र इच्छा आहे त्यांच्यासाठी अनुभवी महात्म्यांचे शब्दच आधाररुप आहेत. या शब्दांचेच चिंतन त्यांनी करायला हवेय. अशा प्रकारे ईश्वराचे स्वरुप अचिंत्य असतानासुध्दा अनुभवी महात्म्यांमुळे -अनुभवी जनांमुळे चिंतन योग्य होते.

7) **आदित्यवर्णम्:** ईश्वर सूर्यप्रकाशाप्रमाणे नित्य चैतन्यरुप प्रकाश स्वरुपी आहे. इथे सूर्य प्रकाशाचा दृष्टांत दिला गेला पण सूर्य जड आहे. इथे प्रकाश या शब्दाचा अर्थ चैतन्यरुप, ज्ञानरुप प्रकाश असा घ्यायचा आहे.

या चैतन्यरुप प्रकाशात सूर्याच्या प्रकाशाचे ज्ञान होते. कठोपनिषदात वर्णन येते:

*न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं*
*नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।*

*तमेव भान्तमनुभाति सर्वं*
*तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥*
*(2/2/15)*

अर्थात् ईश्वराला सूर्य प्रकाशित करु शकत नाही. चंद्र आणि तारकादळही त्याला प्रकाशमान करत नाहीत. विद्युल्लताही प्रकाशमान करत नाही. मग हा अग्नी कसा काय प्रकाशित करु शकेल बरे ? हे जे सारे प्रकाशमान दिसत आहे ना ते सारे एका ईश्वरामुळेच तर प्रकाशमान आहे. ईश्वर आपल्या ज्ञानरुपी प्रकाशाने प्रकट होतो यातूनच तर सूर्य वगैरे सारे प्रकाशमान होताहेत.

8) **तमसः परस्तात्:** ईश्वर अज्ञान वगैरे अंध:कारापासून मुक्त आहे. जीवात्मा अज्ञानाने घेरला गेला आहे. ईश्वर अज्ञानापासून मुक्त आहे. हाच तर ईश्वर आणि जीवात्मा यातील फरक आहे. देह वगैरे उपाधिंमुळे अज्ञानावस्था किंवा मोहावस्था ईश्वराच्या रुपाला झाकोळून टाकते ती ईश्वरी ज्ञान झाल्याशिवाय नष्ट होत नाही. ईश्वराच्या सोबत ही अज्ञानावस्था नाही. यामुळेच तर ईश्वर हा अज्ञान आणि मोहरुपी अंध:कारापासून मुक्त आहे. ईश्वराची ही झालीत आठ लक्षणे.

9) **उपरोक्त लक्षणांनी युक्त:** अशा ईश्वराचे ध्यान, भक्ती आणि चिंतन करणारा पुरुष ईश्वराला प्राप्त करुन घेतो. तशी तर ईश्वराची केवळ नऊच नव्हे तर अनंत लक्षणे सांगता येतील. त्या लक्षणांचे का वर्णन करता येईल? ईश्वरासारखी दुसरी अलौकिक शक्ती दुसरी नव्हेच असे जाणून ध्यान, भक्ती आणि चिंतन करणारा साधक विरळाच होय. तुलसीदासजी म्हणतात :

***कामिहि नारि पियारि जिमि,***
***लोभिहि प्रिय जिमि दाम । तिमि रघुनाथ निरंतर,***
***प्रिय लागहु मोहि राम ॥***

अर्थात् कामासक्ताला जशी नारी प्रिय असते, लोभ्याला जसे धन प्रिय असते तसेच मला सदैव रामचंद्र प्रिय वाटावेत. तुलसीदासांनी सर्वांसाठी प्रार्थना केली आहे की आपले संपूर्ण प्रेम ईश्वराप्रती समर्पित असावे.

:10 :

***प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।***
***भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्स***
***तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रयाणकाले:** अंतकाळी, मरण समयी
- **भक्त्या च योगबलेन:** भक्ती आणि योगाच्या बळाने
- **युक्तः** युक्त होऊन
- **भ्रुवो: मध्ये:** भुवयांच्या मध्यभागी
- **प्राणं सम्यक् आवेश्य:** प्राणाला चांगल्या प्रकारे स्थापन करुन
- **य: अचलेन मनसा:** जो निश्चळ मनाने, स्थिर मनाने
- **अनुस्मरेत्:** स्मरण करतो
- **स: तं परं दिव्यं पुरुषं:** त्या अतिदिव्य स्वरुप परम पुरुष परमात्म्याला
- **उपैति:** प्राप्त होतो

**अर्थ**

तो भक्तीयुक्त पुरुष अंतकाळीसुध्दा योगबलाने भुवयांच्या मध्यभागी प्राण चांगल्या प्रकारे स्थापन करुन मग निश्चळ मनाने स्मरण करीत त्या दिव्यरुप परम पुरुष परमात्म्यालाच प्राप्त होतो.

***प्रयाण-काळीं स्थिर चित्त राखे***
***प्रेमें तसा योग-बळें कसूनि***
***भ्रू-संगमीं प्राण जडूनि ठेवी***
***तेव्हां मिळे त्या पुरुषास दिव्य ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) मरणसमयी भक्ती आणि योगबळाने युक्त होऊन 2) भुवयांच्या मध्यभागी प्राणाला स्थापन करुन 3) जो स्थिर मनाने स्मरण करतो 4) तो परमात्म्याला प्राप्त होतो

**स्पष्टीकरण**

1) प्रयाणकाले भक्त्या योगबलेन युक्त: अंत समयी ईश्वराचे स्मरण करत कशाप्रकारे देहत्याग करायला हवा हे या श्लोकात वर्णिले गेले आहे. अंतिम काळ अत्यंत महत्वाचा काळ आहे. आयुष्यातील कमाईचा, आयुष्यातील साधनेच्या कसोटीचा हा काळ आहे. संपूर्ण आयुष्यभर आपण कुठल्या आंतरिक खोल आणि कुठल्या बाह्य वरवरच्या संस्कारांची जोपासना केली होती ते पारखण्याचा हा काळ आहे. या जगतातून मुक्त व्हायचे असेल तर अंतिम समयी ईश्वर स्मरण असावे. परमात्मविषयक प्रीत जागावी. तेव्हाच प्रापंचिक संस्कार दूर होतील. नष्ट होतील. यामुळे जीवनात दोन प्रकारचे बळ प्राप्त करुन घ्यायचे असते. एक भक्ती आणि दुसरे म्हणजे योग. भक्ती म्हणजे प्रेम आणि योग म्हणजे निग्रह. अहंकार बंधनरुप आहे. अहंकार दोन प्रकारचे असतात. एक असतो मनाचा काल्पनिक आणि दुसरा असतो देहाच्या अणुरेणूत व्याप्त अहंकार. अहंकाराला नष्ट करायला प्रयत्न करायला हवेत आणि त्यात यश लाभले ना तर अंतिम समयी साधक खरा सिध्द होऊ शकतो. प्रयाण काळी साधक खरा सिध्द व्हायला हवा. देह किंवा मन किंवा बुध्दी म्हणजे मी आहे हा संस्कार मनाभोवती घट्ट वेढा घालून असतो. हा अहंकार घालवण्यासाठी ईश्वर भक्ती हा सुलभ उपाय आहे आणि अणु रेणूत व्याप्त अहं भावाला घालवण्यासाठी योग म्हणजे मनोनिग्रह आणि इंद्रियनिग्रहाचा अभ्यास करता यायला हवा. हा अभ्यास आवश्यक आहे.

मरणावर ताबा मिळवण्याचे दोन मार्ग सांगितले गेले आहेत. माणसाच्या ठायी जगण्याची दुर्दम्य आकांक्षा वसते. शंभर वर्षे जगल्यावरही अजून जगता यावे असे त्याला वाटते. ही असाधारण वासना आहे. योगाचा म्हणजे निग्रहाचा म्हणजे वैराग्याचा अभ्यास असेल ना तरच अंतिम समयी होणाऱ्या प्रचंड शारीरिक वेदनांचा मुकाबला करता येऊ शकतो. त्याचा चित्तावर परिणाम होत नाही. यामुळे भक्ती, निग्रह आणि वैराग्य यांचा अभ्यास करायचे प्रयत्न साधायला हवेत. यामुळे या श्लोकात निवेदन आलेले आहे की अंतिम काळी, प्रयाण काळी माणूस भक्ती आणि योगयुक्त असायला हवा.

2) **भ्रुवो: मध्ये प्राणं सम्यक् आवेश्य:** दोन्ही भ्रुकुटी मध्यावर सुयोग्य प्रकारे प्राण स्थापित करुन मरण समयी ज्याना प्राणशक्ती एका स्थानावर केंद्रित करता येते त्याना परमेश्वराचे ध्यान सुगमतेने साधता येते. भ्रुकुटीच्या मध्यात याचा अर्थ काय ? डोळे मिटून मस्तकात म्हणजे जिथे आपल्याला मनाचा अनुभव घेता येतो त्या ठिकाणी ध्यान साधायचा प्रयत्न करणे होय. यामुळे वेदना होईल. एकाने अशा प्रकारे भ्रुकुटी मध्यात ध्यान एकाग्र करायचा प्रयत्न केला. त्यांना वेदना होऊ लागल्या आणि त्या वाढू लागल्यात. वेदना वाढल्यामुळे ते तिथून ध्यान हटवण्याचा प्रयत्न करु लागले. पण अशी सवय झाली होती की हे करताना त्याना कमालीचे अपयश लाभले. परिस्थिती बिघडू लागली होती. इथे भ्रुकुटीच्या मध्यभागी ध्यान केंद्रित करावे असे जरी सांगितले गेले आहे तरी याचा अर्थ समजून घ्यावा आणि शरीर व इंद्रियांमध्ये वसणाऱ्या प्राण शक्तीला मनावर केंद्रित करावे. उदाहरणार्थ मरण समयी जवळच्या आप्तेष्ट नातलगांना भेटण्याची, लेकरांना डोळाभर बघण्याची इच्छा मनी उपजते, त्यांच्याशी अखेरचे बोलून घेण्याची भावना मनी जागते. या तमाम इच्छा-आकांक्षांना रोखून इंद्रियांच्या तमाम व्यापार-व्यवहारांना आपल्या चित्तापासून हटवून घेऊन संपूर्ण शक्ती ईश्वर भक्तीत संलग्न करण्याचे प्रयत्न साधायला हवेत.

3) **य: अचलेन मनसा अनुस्मरेत्:** जो अचळ म्हणजे अत्यंत स्थिर मनाने ईश्वराचे स्मरण करतो तो साधक होय. भक्ती आणि योगाचे म्हणजे निग्रह आणि वैराग्याचे बळ जागायला हवे. दोन्ही प्रकारच्या बळाने युक्त होऊन मन आणि इंद्रियांच्या प्राणशक्तीला आत एका स्थानावर एकत्रित करुन अत्यंत स्थिर मनाने ईश्वराचे स्मरण करायला हवे. या ठिकाणी प्रयाण काळी कशी स्थिती असावी यावर प्रकाशझोत टाकला गेला आहे. अंतकाळी जागणाऱ्या शारीरिक वेदनांमध्ये चंचलता, अस्थिरता आणि बेचैनी जागते. मनाच्या या दुबळ्या अवस्थेला दूर करण्यासाठी दोन प्रकारच्या शक्तींचे अर्जन करायला हवे. एक म्हणजे ईश्वरभक्ती आणि दुसरी म्हणजे इंद्रिय निग्रह शक्ती. मन आणि इंद्रियाना जे काबूत ठेवण्याचा अखंड प्रयत्न करत असतात त्यांच्या ठायी निग्रह शक्ती प्रकटते. प्रेम आणि निग्रह शक्ती लोकांच्या ठायी असते खरी पण ती केवळ आपल्या कुटुंबीजनांपुरतीच मर्यादित स्वरुपाची

असते. ती जर व्यापक होऊन ईश्वराच्या ठायी संलग्न झाली तर तिचे रुपांतर भक्तीत होते. निग्रह शक्तीदेखिल कुटुंबीजनांपुरतीच मर्यादित रहाते. पैसे कमवण्यासाठी रात्नं-दिवस कठोर परिश्रम करणे हा सुध्दा एक प्रकारचा निग्रहच आहे पण त्याच्या ठायी ममता, कामना, क्रोध या सारख्या बंधनात टाकणाऱ्या विचारांवर लगाम लावण्याचा निग्रह नसतो. हे लक्ष्य नसते. यामुळे निर्विकार स्थिती नाही लाभू शकत पण प्रेमशक्ती आणि निग्रहशक्तीचा उपयोग ईश्वरभक्ती प्राप्त करुन घेण्यासाठी आणि निग्रह शक्तीचा उपयोग ईश्वर भक्ती आणि निर्विकार दशा प्राप्त करुन घेण्यासाठी करता आला ना तर मग अंतिम समयी या दोन्ही शक्तींचा उपयोग चित्ताची स्थिती एकाग्र करण्याकामी करता येऊ शकतो. यामुळे चित्तदशा सुयोग्य प्रकारे राहू शकते.

4) **स: तं परं दिव्यं पुरुषं उपैति:** अंतिम समयी मन जर ईश्वर भक्तीत तल्लीन होऊन निर्विकार राहू शकत असेल तर साधक अति दिव्य पुरुषाला म्हणजे ईश्वराला प्राप्त करुन घेऊ शकतो. त्याला मोक्ष लाभ होऊ शकतो. हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे. प्रापंचिक बंधनांपासून मुक्त होणे आहे. प्रापंचिक बंधनात कुठे आत्यंतिक सुखाचा अनुभव घेता येतो बरे? आत्म्याचे स्वरुप आनंदमय आहे, शांतिमय आहे. यामुळे जोवर माणसाला शांती आणि आनंदाचा अनुभव घेता येत नाही तोवर तो प्राप्त करुन घेण्यासाठी त्याची धडपड जारी असते. जीवनात प्राप्त केलेल्या आध्यात्मिक संपदेचा उपयोग अंतिम समयी करुन घेता आला तर त्याचा काही उपयोग आहे. यामुळे अंतिम समयी जर ईश्वर स्मरण करता आले आणि ईश्वर भक्ती साधत अखेरचा श्वास घेता आला तर मोक्ष लाभ होऊ शकतो.

: 11 :

***यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागा: ।***
***यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वेदविद:** वेद जाणणारे विद्वान
- **यत् अक्षरं वदन्ति:** ज्या सच्चिदानंदघन परमात्म्याला ओंकार नामाने वर्णितात
- **वीतरागा: यतय:** आसक्तीरहित यत्नशील महात्मा लोक म्हणजे वीतरागी यती
- **यत् विशन्ति:** ज्या ठायी प्रवेश करतात
- **यत् इच्छन्त:** ज्या परमपदाचे इच्छुक आहेत
- **ब्रह्मचर्यं चरन्ति:** ब्रह्मचर्याचे पालन करतात
- **तत् पदं ते:** ते परमपद तुला
- **संग्रहेण प्रवक्ष्ये:** थोडक्यात सांगतो

**अर्थ**

वेदवेत्ते विद्वान ज्या सच्चिदानंदघनरुप परम पदाला अविनाशी म्हणतात, आसक्ती नसलेले यत्नशील संन्यासी महात्मे ज्याच्यामध्ये प्रवेश करतात आणि ज्या परमपदाची इच्छा करणारे ब्रह्मचारी ब्रह्मचर्याचे आचरण करतात ते परमपद मी तुला थोडक्यात सांगतो.

***जें घोकिती अक्षर वेद-वेत्ते***
***विरक्त यत्नें मिळती जयास***
***जें ब्रह्मचर्ये पद इच्छिताती***
***तें सांगतों मी तुज तत्त्व-सार ।***

विषय: या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) वेदाचे ज्ञाते सत्पुरुष ज्या परमात्म्याच्या अक्षराला (पदाला) घोकतात 2) वीतराग, यती ज्या परमात्म्याच्या ठायी प्रविष्ट होतात 3) ज्या परमात्म्याला जाणून घेण्याची इच्छा राखत ब्रह्मचर्याचे पालन करतात 4) त्या परमात्म्याचे पद मी तुला थोडक्यात सांगत आहे

**स्पष्टीकरण**

1) **वेदविद: यत् अक्षरं वदन्ति:** वेदज्ञ लोक ईश्वराच्या अक्षराला म्हणजे पदाला स्मरण करत असतात. इथे ‘अक्षर’ शब्द आला आहे. अक्षर म्हणजे नष्ट न होणारे आणि दुसरा अर्थ म्हणजे परमात्मा. ईश्वराचे नाव म्हणजे ओम. दोन्ही अर्थ बरोबर आहेत. तेराव्या श्लोकात ओमचा उल्लेख असल्यामुळे ओम याचा अर्थ एकाक्षर ब्रह्म करणे अधिक योग्य होय. अर्थात् दोन्ही अर्थ योग्य आहेत.

आधी पहिल्या अर्थाची उकल करु या ! ब्रह्मांडात व्याप्त वस्तुला ‘ब्रह्म’ असे म्हटले जाते. बृहद शब्दापासून ब्रह्म शब्द बनला. ब्रह्मांडात व्याप्त वस्तु ही व्यापक असायला हवी. बृहद म्हणजे व्यापक होय. मुंडकोपनिषदात एक

श्लोक येतो त्या श्लोकाच्या आरंभीच बृहद शब्द आला आहे. या श्लोकात ब्रह्म तत्त्वाचे वर्णन आले आहे. उल्लेख असा:

*बृहच्च तद्दिव्यमचिन्त्यरुपं*
*सूक्ष्माच्च तत्सूक्ष्मतरं विभाति। दूरात् सुदूरे*
*तदिहान्तिके च पश्यत्स्विहैव निहितं गुहायाम्॥*
(3 /17)

अर्थात् ते ब्रह्म बृहद् स्वरुपी आहे. दिव्य म्हणजे चिंतनाच्या पलिकडचे आहे. ते ब्रह्म सूक्ष्म म्हणजे सूक्ष्माहूनही सूक्ष्म आहे. अशा प्रकारे ते ब्रह्म भासमान होत आहे आणि अति लांब आणि अत्यंत नजिक असे आहे या ब्रह्मतत्त्वाचा ज्याने अनुभव घेतला आहे त्या ब्रह्मज्ञानी पुरुषासाठी तर ते ब्रह्म त्याच्या हृदय वा बुध्दीरुपी गुहेत स्थित आहे.

अशाप्रकारे वेदांनी ब्रह्मतत्त्वाचा शोध हजारो वर्षांपूर्वी लावला. वेदवेत्ते म्हणजे वेदांची रचना करणारे ऋषी ज्या अक्षर म्हणजे अविनाशी ब्रह्मतत्त्वाचे वर्णन करतात, गुणगान करतात ते ब्रह्मतत्त्व, हा झाला एक अर्थ.

दुसरा अर्थ असा की ब्रह्मतत्त्वाचे एक नाव आहे ओम या ओंकारध्वनीचा जप ऋषी-मुनी करत असतात. वैदिक काळात राम वा कृष्ण ही नावे नव्हती कारण की त्यांचा अवतार झाला नव्हता यामुळे वैदिक साहित्यात वैदिक धर्मात ईश्वरासाठी ओमकार हाच शब्द प्रचलित होता. आजही निर्गुणोपासक ओमकाराचाच जप करतात. या अध्यायात गीता या ओंकाराबाबतच विवेचन करत आहे. ओम यात तीन अक्षरे आहेत अ उ म. या तीन अक्षरापासून ओम शब्दाची निर्मिती झाली आहे. ओम शब्दाच्या मस्तकावर अर्धचंद्राकार आहे. ती ओम अक्षराची अर्ध मात्रा होय. ईश्वराच्या सृष्टीत साधारणपणे तीन विभाग आहेत उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ. तीन गुण आहेत सत्त्व, रज आणि तम. तीन अवस्था आहेत जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती तसेच उत्पत्ती, स्थिती आणि लय. तीन लक्षणे आहेत उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा. तीन व्यक्त भूते आहेत पृथ्वी, जळ आणि अग्नी. याच प्रमाणे जपासाठी अशाच अक्षरांचा शोध घेतला गेला ज्यात तीन शब्द असतील. ओमकाराचा जप हा ईश्वरासाठीच केला जातो. यामुळे हा दुसरा अर्थही सटीक आहे.

2) **वीतरागाः यतयः यत् विशन्तिः** वीतरागी यती किंवा संन्यासी या श्रेष्ठ पदात प्रवेश करतात. या पदाचा अनुभव घेतात. इथे ईश्वरी स्वरुपात प्रविष्ट होण्यासाठी किंवा ईश्वरी स्वरुपाचा अनुभव घेण्यासाठी दोन विशेषणांचा उपयोग केला गेला आहे. वीतरागी आणि यती. शंकराचार्यांनी गीता भाष्यात एके ठिकाणी नमूद करुन ठेवले आहे:

***विरक्तस्य हि संसारात् भगवत्-तत्त्वज्ञाने***
***अधिकारः न अन्यस्य इति।***

अर्थात् प्रपंचापासून विरक्त झालेल्या पुरुषालाच ईश्वरी तत्त्व जाणून घेण्याचा अधिकार आहे, इतराना नाही. तुलसीदास म्हणतात:

***प्रथमहिं बिप्र-चरन अति प्रीती।***
***निज-निज धरम निरत स्रुति रीती॥ एहिकर फल पुनि***
***विषय बिरागा। तब मम धरम उपज अनुरागा॥***

अर्थात् यासाठी ब्राह्मणांच्या चरणी अति प्रीत हवी. प्राचीन काळी ब्राह्मण ज्ञानी होते यामुळे तुलसीदासांनी त्यांच्या बाबतीत आदर दर्शवला आहे. श्रुती विहित असावे म्हणजे धर्मनिरत असावे. यामुळे विषयांप्रती वैराग्य उपजेल आणि या वैराग्यानंतर धर्माप्रती अनुराग भाव जागेल. वीतराग याचा अर्थ ईश्वराप्रती अनुराग. दुसरे विशेषण आहे यती. यती म्हणजे संन्यासी होय. संन्यासी शब्दाचा अर्थ जाणून घ्यायला हवा. संन्यासी म्हणजे केवळ भटकणारा नव्हे ! प्राचीन काळी अधिकारी संन्यासी जन एके ठिकाणी तीन दिवसापेक्षा अधिक काळ न थांबता उपदेश करत विचरण करत असत. आपले सारे कर्तव्य पूर्ण करुन, परिपक्व अवस्था जागल्यावर सर्वसंग परित्याग करुन आसक्तीरहित दशेत विचरण करणे, अंतिम समयी ईश्वर स्मरण करत देह विलय करणे हाच खरा संन्यास होय. विकार आणि संकल्पांचा त्याग करणे संन्यासात येते. तुलसीदासजींच्या भाषेत ते धन्य तुलसीदास आस बिहाइ जे हरि-रंग रँगे। तुलसीदास ‘विनयपत्रिका’ मधून निरुपण करतात :

***जे लोलुप भये दास आस के ते सबहीं के चेरे।***
***प्रभु बिस्वास आस जीति जिन्ह, ते सेवक हरि केरे॥***

अर्थात् जे लोक विषय लोलूप आहेत ते आशेचे दास आहेत. सर्वांचे गुलाम आहेत पण ईश्वरावर श्रध्दा बाळगून भक्ती करत ज्यानी आशेवर विजय संपादित केला, ते हरीचे सेवक आहेत. हरीचे भक्तच खऱ्या अर्थाने संन्यासी होत.

3) यत् इच्छन्त: ब्रह्मचर्यं चरन्ति: ईश्वर प्राप्तीसाठी वा ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठी जे ब्रह्मचर्याचे पालन करतात ते श्रेष्ठ जन होत. असा विचार करुन जगणे अमौलिक होय. आध्यात्मिक दृष्ट्या विचार करु जाता ब्रह्मचर्य हा मूलभूत स्वरुपाचा विचार आहे. ब्रह्मचर्याच्या अभावी आध्यात्मिकता जागूच शकत नाही. नैष्ठिक ब्रह्मचारी खूपच कमी असतात. शंभरातले नव्व्याण्णव तर गृहस्थच असतात. गृहस्थ जीवन सृष्टीचा प्रवाह आहे. सृष्टीचे स्वरुप आहे. ज्ञानी, संत, ऋषी, महात्मा सारेच गृहस्थाश्रमामुळे लाभतात पण आजकाल ज्या प्रकारची जीवन सरणी सुरु आहे ते जीवन नसून, गृहस्थाश्रम नसून केवळ जगणे आहे जगणे. गृहस्थाश्रम वेगळा आणि केवळ जगणे निराळे होय. जगण्यात असंयम प्रामुख्याने आढळतो. गृहस्थाश्रम या शब्दातच आश्रम शब्द येत असल्यामुळे त्यात संयम हा प्रमुख भाव आहे. संयमाच्या आधारेच गृहस्थाश्रम टिकून आहे.

संयम म्हणजे तमाम इंद्रियांचा संयम होय. दोन गोष्टीतला संयम फारच अवघड वाटतो एक तर खाण्यातला संयम आणि दुसरा स्त्री समागमातला संयम. गांधीजी वारंवार सांगत असत की ब्रह्मचर्यामुळे त्यांची शक्ती वृध्दींगत झाली आहे. साबरमती आश्रमात गांधीजींनी आश्रम जीवनातला सर्वश्रेष्ठ प्रयोग केला. आश्रमनिवासींसाठी ब्रह्मचर्य अनिवार्य तत्त्व होते. आश्रमात प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या दांपत्याना देखिल गांधीजी ब्रह्मचर्याचे पालन करायला सांगत असत. आज भारतात वाढत्या लोकसंख्येसाठी ब्रह्मचर्य धर्म पालनाची नितांत आवश्यकता आहे. गीता आध्यात्मिक दृष्ट्या ब्रह्मचर्याचे महत्व समजावून सांगत आहे.

4) तत् पदं ते संग्रहेण प्रवक्ष्ये: ते परमात्म्याचे स्वरुप वा नाम वा पद संक्षेपात वर्णायचे असेल तर ते गीतेने सांगितले आहे. इथे पद शब्दाचेही दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे स्वरुप आणि दुसरे म्हणजे नाम. नाम वा स्वरुपाविषयीचे विस्तृत विवेचन पुढे तेराव्या श्लोकात येते.

: 12-13 :

***सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च।***
***मूर्ध्न्याधायात्मन: प्राणमास्थितो योगधारणाम्॥***
***ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्।***
***य: प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वद्वाराणि संयम्य:** इंद्रियांच्या सर्व द्वारांना आवरुन अर्थात् इंद्रियांना विषयांपासून रोधून धरुन आणि
- **च मन: हृदि निरुध्य:** आणि मनाला हृदयदेशी स्थिर करुन
- **आत्मन: प्राणं:** आपल्या प्राणाला
- **मूर्ध्नि आधाय:** मस्तकात स्थापन करुन
- **योगधारणां आस्थित:** योगधारणेत प्रवृत्त पुरुष
- **ओम् इति एकाक्षरं ब्रह्म:** ओम् या एक अक्षररुपी ब्रह्माचे
- **व्याहरन्:** उच्चारण करीत
- **मां अनुस्मरन्:** माझे स्मरण करणारा, चिंतन करणारा
- **य: देहं त्यजन्:** जो पुरुष शरीराला सोडून
- **प्रयाति:** प्रयाण करतो, जातो
- **स: परमां गतिं याति:** तो पुरुष परम गतीप्रत पावतो म्हणजे मोक्ष मिळवतो

**अर्थ**

सर्व इंद्रियांची द्वारे अडवून, मनाला हृदयाच्या ठायी स्थिर करुन, नंतर जिंकलेल्या मनाने प्राण मस्तकात स्थापन करुन, परमात्म्यासंबंधी योगधारणेत स्थिर होऊन जो पुरुष ओम् या एक अक्षररुप ब्रह्माचा उच्चार करीत आणि त्याचे अर्थस्वरुप निर्गुण ब्रह्म जो मी, त्याचे चिंतन करत देह टाकून जातो, तो परम गतीला प्राप्त होतो.

***लावूनि सगळीं द्वारें कोंडूनि मन अंतरीं***
***मस्तकीं प्राण राखूनि चढला धारणेवरी।***
***मुखें ओम ब्रह्म उच्चारी अंतरी मज आठवी***
***ह्यापरी देह ठेवूनि जाय थोर गतीस तो।***

**विषय:** बाराव्या श्लोकात चार आणि तेराव्या श्लोकात चार अशा प्रकारे एकूण आठ गोष्टींची चर्चा आली आहे.

बाराव्या श्लोकात चार गोष्टी येतात. 1) सर्व इंद्रियांची द्वारे बंद करुन म्हणजे संयमपूर्वक. 2) हृदयाच्या ठायी मनाचा निरोध करुन. 3) आपल्या प्राणाला मस्तकात स्थापित करुन. 4) योगधारणेत प्रवृत्त असलेला पुरुष म्हणजे साधक

तेराव्या श्लोकात चार गोष्टी येतात 1) एकाक्षरी ब्रह्माचे म्हणजे ओकाराचे उच्चारण करणारा 2) ईश्वराचे स्मरण करणारा 3) जो पुरुष देहत्याग करतो 4) तो परम गतीला म्हणजे मोक्षाला पावतो.

**स्पष्टीकरण**

1) सर्वद्वाराणि संयम्य: सर्व इंद्रियांची द्वारे बंद करुन यात (5:13) नवद्वारे पुरे देहि असे म्हटले आहे. देहाला नगराची उपमा दिली आणि त्यात नऊ द्वारे आहेत. दोन नेत्र, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख आणि लघवी व शौचाचे स्थान अशा प्रकारे नऊ द्वारे वर्णिलेली आहेत. कठोपनिषदात आणखी दोन म्हणजे एकूण अकरा द्वारांचा उल्लेख आला आहे. एक तर मस्तकातून ज्ञानी पुरुषाचे प्राणोत्क्रमण होते म्हणून मस्तकाचा मध्यभाग द्वार आहे. दुसरे द्वार आहे नाभी पीठाच्या अगदी तळाला. हे एक असे स्थान आहे जिथून कुंडलिनी जागृत होऊन मस्तकात प्रकट होते तेव्हा समाधी लाभते. यामुळे कुंडलिनीलाही एक द्वार मानले गेले. अंतकाळी चित्ताची दशा उच्च स्वरुपाची राहिली तर पुढचा जन्म चांगला लाभू शकतो. इथे योगी वा भक्ताच्या देहविलयाची चर्चा सुरु आहे. यामुळे अंतिम समयी तमाम इंद्रियांना संयमित ठेवायला हवे म्हणजे तमाम व्यापारांचा निरोध करायला हवा.

माणसाचा सारा देहव्यापार इंद्रियांच्या माध्यमातूनच प्रकट होत असतो. मन ही इंद्रियाधीनच असते. यामुळे इंद्रिय निग्रह हा स्थितप्रज्ञाचा सर्वात महत्वाचा गुण मानला गेला आहे. इंद्रिय निग्रह नसल्यामुळेच ईश्वर दर्शन होऊ शकत नाही ही चर्चा कठोपनिषदातूनही येते :

***पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभू स्तस्मात्पराङ्पश्यति***
***नान्तरात्मन्। कश्चित् धीर: प्रत्यगात्मानमैक्षत्***
***आवृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन्॥ (2 /1 / 1)***

अर्थात् स्वयंभू ईश्वराने इंद्रियांना बहिर्मुखी बनवले असल्यामुळे इंद्रिये नेहमीच बाह्य रुपाचेच दर्शन करतात कधीही आत्म दर्शन करत नाहीत. आतल्या ईश्वराचे दर्शन करत नाहीत. कुणी धैर्यवान विवेकी पुरुषच प्रयत्नपूर्वक इंद्रियाना विषयाच्या आकर्षणातून बाजूला घेऊन अमृतत्त्व म्हणजे मोक्षाची इच्छा बाळगून प्रत्यगात्म्याला म्हणजे परमेश्वराला बघू शकतो.

2) **मनो हृदि निरुध्य च:** मनाला आत म्हणजे हृदयातच रोधून जगावे लागते. मनाच्या चांचल्याविषयी गीतेने (6:35) मधून सांगितले आहे. मनाचा निग्रह साधणे सोपे नाही. मोठे अवघड काम आहे. निग्रह साधण्यासाठी अभ्यास आणि वैराग्याची गरज असते. वारंवार मनाला रोधण्याचे प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास होय. अभ्यासामुळे अंतिम समयी मनाला रोधण्याकामी मदत होऊ शकते. यश लाभू शकते. अंतिम समयी अभ्यासाशिवाय मनाला रोधणे दुरापास्त असते. त्या वेळी तर मनाचे चांचल्य अधिकच वाढते. नाना सुप्त वासना चाळवल्या जातात. यामुळे केवळ अभ्यास असेल तर आणि तरच अंतिम समयी विजय मिळू शकतो.

मनाच्या एकाग्रतेसाठी 'हृदय' शब्द आला. हृदय म्हणजे छाती. नेहमी हृदय शब्दाचा उच्चार होताच हात छातीशी जातो. खरे तर हृदय शब्दाचा अर्थ आहे मन वा चित्ताची खोली. खोलवर जाऊन चित्त वा मनाची एकाग्रता साधता येणे गरजेचे आहे. अशाप्रकारे मन जोवर अंतर्मुख बनत नाही तोवर देहगत संबंध सुटून ईश्वराशी संबंध जोडला जाऊ शकत नाही.

3) **आत्मन:** प्राणं मूर्ध्नि आधाय प्राणाला मस्तकात स्थापित करावे लागते. दहाव्या श्लोकात भ्रुकुटीच्या मध्यात प्राणाला स्थिर करायची चर्चा आली आहे. इथे प्राणाला मस्तकात स्थापित करायला सांगितले गेले आहे. वरवर बघू जाता या दोन विधानामध्ये विरोध जाणवतो खरा पण तसा तो नाही. गीतेने दोघापैकी कुणाही एकाला स्थिर करायला सांगितले आहे. देहाच्या प्राणशक्तीचा संबंध मनाच्या एकाग्रतेशी असतो. तुलसीदास म्हणतात:

***सुमिरत हरिहिं साँस गति बाँधी।***
***सहज बिमल मन लागि समाधी॥***

अर्थात् हरि स्मरण करु लागताच नारदाचे मन ईश्वरात इतके एकाग्र झाले की नारदाच्या श्वासाची गती मंदावली. शांत झाली. चित्ताच्या एकाग्रतेमुळे प्राणशक्ती

आपोआप शांत झाली. यामुळे योगशास्त्रात प्राणायामाचे महत्व प्रतिपादन केले गेले आहे. प्राणशक्तीला रोधण्याचा अभ्यास केला गेला तर मनाला एकाग्र करण्याकामी मदत लाभू शकते.

इथे प्राणशक्तीला मस्तकात अथवा भ्रुकुटी मध्यात स्थिर करायची चर्चा येते. उपनिषद आणि योगशास्त्रातूनही ही चर्चा येते की योग्याचा प्राण, ब्रह्मज्ञान्याचा प्राण हा देहत्याग करताना मस्तकातून बाहेर पडतो तर सामान्य माणसाचा प्राण हा देहाच्या अन्य भागातून बाहेर पडतो. प्राण मस्तकाच्या ज्या भागातून बाहेर पडतो त्या भागाला ब्रह्मरंध्र म्हटले जाते. ब्रह्मज्ञान्याची कुंडलिनी शक्ती जागृत होऊन ती ब्रह्मरंध्रापर्यंत पोहोचलेली असते. गुदद्वारानजिक कुंडलिनी पाठीच्या अखेरच्या अस्थीनजिक सुषुप्त अवस्थेत पडून असते. जागृत झाल्यावर ती थेट ब्रह्मरंध्रापर्यंत जाऊन पोहोचते. ब्रह्मरंध्र हे ज्ञानावस्थेचे स्थान आहे. ज्ञानावस्था कदापि नष्ट होत नाही. अशा प्रकारे समस्त प्राणशक्तीला मस्तकाच्या ब्रह्मरंध्रात एकाग्र करायला सांगितले गेले आहे.

4) **योगधारणां आस्थित:** पुरुष योगधारणेत प्रवृत्त असावा. योग शब्दाचा साधा अर्थ आहे बेरीज करणे. देहात तीन प्रकारच्या शक्ती असतात. एक म्हणजे इंद्रिय शक्ती, दुसरी मन:शक्ती आणि तिसरी आहे प्राण शक्ती. या तिघांना एकत्रित करुन ईश्वराशी जोडण्याची जी क्रिया किंवा प्रक्रिया आहे ती म्हणजे योग होय. यासाठी साधकाने प्रयत्नशील असावे. एक मार्ग आहे भक्तीचा आणि दुसरा मार्ग आहे योगाचा. भक्ती मार्ग सुगम, सोपा आहे तर योग मार्ग अवघड, कठिण आहे. भक्ती मार्गात प्रेम भाव प्रकटतो तर योग मार्गात निग्रह मोलाचा आहे. यातून तटस्थता जागते. कर्तव्य दृष्टीचा विकास होतो. आईच्या मनी आपल्या लेकराबाबत सहज प्रेम भाव वसतो. प्रेमामुळे ती सेवेला प्रवृत्त होते. प्रेम भाव आईकडून लेकराची सेवा सहजतेने घडवून आणतो पण दिराच्या दुर्दैवी मृत्युनंतर जेव्हा त्याच्या लेकराचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्या मातेवर येऊन पडते तेव्हा मात्र ती प्रेम भावाऐवजी कर्तव्य बुध्दीने सेवा करते. तसेच ईश्वराचे स्मरण प्रेमभावानेही करता येईल आणि उत्कट प्रेमाविना केवळ कठोर अशा कर्तव्य बुध्दीनेही करता येईल. कर्तव्यात उत्कटता जागली तर प्रेम विकसित होईल. प्रेम हा एक मार्ग, कर्तव्य हा दुसरा मार्ग. तेराव्या श्लोकातील विवेचन असे आहे :

5) **ओम् इति एकाक्षरं ब्रह्म व्याहरन्:** एकाक्षररुपी ब्रह्माचा म्हणजे ओंकारध्वनीचा उच्चार करणारा साधक असतो. अंतिम काळी वाणी मौनावते तेव्हा अंत:करणातच ईश्वराचे स्मरण हे ओंकार जपाच्या माध्यमातून करता येते. वाणीची सक्रियता असली तर वाणीने ओंकाराचा जप करता येतो पण वाणी मौनावली तरी हा जप अंत:करणात सुरु राहू शकतो. ओंकाराऐवजी राम वा कृष्ण नावाचाही जप करता येईल. जेव्हा राम वा कृ ष्ण यांचा अवतार झाला नव्हता तेव्हा साधक वा मुमुक्षु या ओंकार नामाचाच जप करत असत. राम आधी होऊन गेले गीताकाळात तर कृष्ण होते त्यामुळे रामाचे नाव घेता येईल. रामनाम प्रचलित होते. त्यापूर्वी मात्र ओंकारनाम होते.

आठव्या अध्यायात निर्गुण भक्तीचे वर्णन आले आहे. सगुण भक्तीचे वर्णन नऊ, दहा, अकरा आणि तेराव्या अध्यायात येते. राम नाम सगुण भक्ती आहे तर ओंकाराचा जप निर्गुण भक्तीत येतो. राम वा कृष्ण किंवा पार्वती वा अन्य देवी देवतांचे नामस्मरण करताना त्यांची चरित्रे समोर येऊन उभी ठाकतात. जप करताना त्यांच्या अलौकिक गुणांचे स्मरण होऊ शकते पण ओंकाराचा जप करताना कुठलीही गुणवैशिष्ट्ये समोर येऊन उभी ठाकत नाहीत. ते निर्गुण निराकार रुप आहे. यामुळे ओंकाराचा जप अवघड आहे. अवघड असल्यामुळेच सर्वसामान्य जनांमध्ये हा जप रुढ नाही. राम, कृष्ण, शंकर, पार्वती, हनुमान, लक्ष्मी यासारखी नावे जपायला सुगम आहेत. तसे अन्य नामांच्या तुलनेने उच्चारायला रामाचे नाव सोपे सुगम आहे. तुलसीदासानी तर रामायणभर रामाच्या सुगम नावाचाच जप केला आहे. त्यानी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे ब्रह्म राम तें नाम बड म्हणजे ब्रह्मरुप रामाहूनही रामनाम हे श्रेष्ठ होय. ते तर ब्रह्मासाठीही राम या नावाचाच उपयोग करतात.

ओम अक्षराचे आणखी एक वैशिष्ट्य असे की ते एकाक्षरी ब्रह्म आहे. ईश्वराचे दुसरे कुठलेच नाव एकाक्षरी नाही. ओम एकाक्षरी असले तरी त्यात तीन शब्द येतात अ उ आणि म. ओमचा एक अर्थ आहे होय म्हणजे अस्तित्व भाव. ईश्वर सत्यरुपी आहे. नश्वर असल्यामुळे जगासाठी आपण 'होय' असे नाही म्हणू शकत. जगताचा समावेश

'नाही' यातच करावा लागेल. नकारातच करावा लागेल. यामुळे ओम शब्दामुळे आपल्याला हा बोध होतो की ईश्वराचे अस्तित्व जगात आहे. अशा प्रकारे ओमकाराचा जप अंतिम काळी करावयाचा आहे.

(6) मां अनुस्मरन् - ओमकाराचा उच्चार करताना ईश्वराचे स्मरण होते. ईश्वर स्मरणासाठीच तर ओमकार जपाचा उपयोग केला जायचा. एकीकडे ओमकाराचा जप सुरु असेल आणि मनाची भटकंती सुरु असेल तर काही उपयोग नाही. मनाला ईश्वरसन्निधानी एकत्रित करण्याकामी ओंकार जपाचा उपयोग होतो. यामुळे ओमकार जपासोबत संकल्पपूर्वक स्वतंत्रपणे ईश्वर स्मरण साधावे असे सांगितले गेले आहे.

विनोबांनी या संदर्भात मोठी मार्मिक गोष्ट सांगितली आहे. ते म्हणतात की चित्ती राम, मुखी नाम आणि हाती काम. चित्ताच्या ठायी रामाचे स्मरण असावे. त्याच्या अनुसंधानामुळे मुखातून राम नाम स्रवत असावे. या दोघाच्या सोबतच हातून सत्कर्म होत रहावे.

7) **यः देहं त्यजन् प्रयातिः** कशाप्रकारे देह त्यजून जायला हवे ते इथे सांगितले गेले आहे. देहत्याग करुन तर सारेच जातात पण ते जबरदस्तीपूर्वक असते. लाचारीने असते. स्वाधीन भावनेने कुणीही देहत्याग करत नाही. देह त्यजावा लागतो म्हणून देहाचा त्याग करतात. देह त्यागाचा जर कधी प्रसंग येणार नसेल ना तर मग कुणीही देहत्यागाला उत्सुक नाही. असा प्रसंग आला तर सारेच आनंद साजरा करतील. देहाच्या मोहामुळेच तर जगण्याची अपार वासना वसते. प्रबळ लालसा असते. देहाची निर्मितीच मुळी अशा प्रकारे केली गेली ना की तो टिकूच शकत नाही. तमाम जड वा चेतन पदार्थांची आयुर्मर्यादा ही ठरलेलीच आहे. लहान लहान कृमी किटकांचे आयुष्य अल्पकाळ टिकते. जड सृष्टीतल्या वृक्ष वगैरेंचे आयुष्य मानवी आयुष्याच्या तुलनेने दीर्घकालीन असते. पर्वतांचे आयुष्य आधिक दीर्घ असते. सूर्य, चंद्र, पृथ्वी यांचे आयुष्य तर कल्पनातीत असे दीर्घ स्वरुपाचे असते. शास्त्रकारांनी धरणीचे आयुष्य चार हजार कोटी वर्ष सांगितले आहे. शास्त्रज्ञांचीही अशीच मान्यता आहे. त्यातली दोन हजार कोटी वर्षे संपून गेलीत अजून आता दोन हजार कोटी वर्षे शिल्लक आहेत. त्यानंतर येईल प्रलयकाळ. ब्रह्मदेवाचे निम्मे आयुष्य संपले आहे. अशा प्रकारे देहाला नश्वर जाणून ओमकाराचा उच्चार करत आणि ईश्वराचे स्मरण करत जो देहत्याग करतो त्याला लाभणाऱ्या गतीची चर्चा इथे केली गेली आहे.

8) **सः परमां गतिं यातिः** असा साधक परम गतीला प्राप्त होतो. मोक्षाला प्राप्त होतो. तो पुनर्जन्माच्या फेऱ्यात नाही पडत. लहान बालकाचे अज्ञान बघून तर प्रत्येकालाच असे वाटेल की जन्माला येणे म्हणजे अज्ञानावस्थेचेच कार्य होय. बाल्यावस्थेतल्या तमाम क्रिया जवळपास अविवेपूर्वकच चाललेल्या असतात. पुनर्जन्माचा विषय पंधराव्या-सोळाव्या श्लोकात आला. आपल्या शास्त्रकारांनी स्वर्गलोक, ब्रह्मलोक आणि नरक लोकाची कल्पना केली. ब्रह्मलोकातून परत यावे लागत नाही ही चर्चा ब्रह्मसूत्र शांकरभाष्यातून येते. याची चर्चा पंधरावा श्लोक करतो. चंद्रलोकाची कल्पना या अध्यायातील पंचविसाव्या श्लोकात येते. स्वर्गाचा उल्लेख नवव्या अध्यायातील वीस-एकविसाव्या श्लोकात येतो. नरकाचा उल्लेख सोळाव्या अध्यायातील सोळाव्या श्लोकात येतो. याचा उल्लेख त्याच अध्यायातील एकोणावीस आणि विसाव्या श्लोकात 'आसुरी योनी' या उल्लेखाने आला आहे. एकविसाव्या श्लोकातही नरकाचा उल्लेख येतो. अशा प्रकारे स्वर्ग, नरक, चंद्रलोक हे तीन लोक असे आहेत की जिथे गेल्यावर परतावे लागते पण परमगती अशी स्थिती आहे, मोक्षाची अशी स्थिती आहे जिथून जन्म घ्यावा लागत नाही.

: 14 :

*अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।*
*तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हे पार्थः** हे अर्जुना
- **यः अनन्यचेताः** जो पुरुष माझ्या ठिकाणी अनन्य चित्ताने स्थित होऊन
- **सततं नित्यशः** सदा सर्वदा निरंतर
- **मां स्मरतिः** माझे स्मरण करतो
- **तस्य नित्ययुक्तस्य योगिनः** त्या निरंतर माझ्या ठिकाणी युक्त झालेल्या योग्याला

- **अहं सुलभः** मी सुलभ आहे, सोपा आहे म्हणजे त्याला सहजच प्राप्त होतो

अर्थ हे अर्जुना, जो पुरुष माझ्या ठायी अनन्य चित्त होऊन नेहमी मज पुरुषोत्तमाचे स्मरण करतो, त्या नित्य माझ्याशी युक्त असलेल्या योग्याला मी सहज प्राप्त होणारा आहे.

*अनन्य-चित्त जो नित्य स्मरे मज निरंतर*
*सदा मिसळला योगी तो सुखें मज पावतो।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) जो पुरुष अनन्य चित्त होऊन 2) माझे नित्य आणि अखंड चिंतन करतो. 3) अशा योग्याला मी सहज प्राप्त होतो

**स्पष्टीकरण**

1) **यः अनन्यचेताः** या श्लोकात अनन्य शब्द आला आहे. पुढे तो नवव्या अध्यायातील बाविसाव्या श्लोकातही आला आहे. अनन्य चित्ताने रहाणाऱ्याला ईश्वराचा अनुभव होतो. अनन्य म्हणजे दुसरा नाही. अन्य नाही. ईश्वर अदृश्य आहे. यामुळे त्याच्या ठायी चित्त एकाग्र करणे अवघड आहे. विषय समोरच दिसतो यामुळे त्याच्यात मन लगेचच अनुरक्त होते. आसक्ती वाढली की वासना उत्पन्न होते. तुलसीदास लिहितात :

*मनतें सकल वासना भागी।*
*केवल रामचरन लय लागी॥*

अर्थात् काकभुशुंडींनी गरुडाला आपल्या अनेक जन्मांची कथा सांगायला सुरुवात केली होती. या प्रसंगी अंतिम जन्माची कथा सांगताना ते म्हणाले होते की त्यांच्या मनीच्या तमाम वासना निमाल्या होत्या. पळून गेल्या होत्या. त्यांना केवळ रामरायाचे चरणकमळच आठवत होते. त्या चरणयुगुलांचेच त्यांना केवळ ध्यान होते. विभीषण एके ठिकाणी म्हणतो:

*उर कछु प्रथम बासना रही।*
*प्रभुपद प्रीति सरित सो बही॥*

अर्थात् आधी मनाच्या ठायी काही वासना होती पण ईश्वराप्रती जेव्हा प्रेमभाव मनी जागला तेव्हा ईश्वर भक्तिरुपी गंगेत ती वासना वाहून गेली, नष्ट झाली. ईश्वराला सोडून जे विषयाचे अनुरागी आहेत ते जन विषयासक्त जन दुर्दैवी होत असे तुलसीदास म्हणतात :

*सुनहु उमा ते लोग अभागी।*
*हरि तजि होहिं बिषय-अनुरागी॥*

अर्थात् परमात्म्याला सोडून जे विषयानुरागी बनतात, विषयासक्त होतात ते दुर्दैवी आहेत.

*जातें बेगि द्रवउँ मैं भाई।*
*सो मम भगति भगत सुखदाई॥*

अर्थात् राम म्हणतात की, ज्यामुळे ते द्रवित होतात तो एकमात्र विषय भक्तीचाच आहे. ही भक्ती भक्तजनांसाठी खूपच सुखदायक आहे.

*बचन करम मन मोरि गति, भजन करहिं निःकाम।*
*तिन्हके हृदय-कमल महँ, करउँ सदा बिस्राम॥*

अर्थात् कायिक, वाचिक आणि मानसिक अनन्य गतीने जो ईश्वर भजन करतो, ईश्वर भक्ती करतो, निष्काम भावनेने हरीला भजतो त्याच्या हृदयरुपी कमळात राम नित्य विश्राम करतात.

*मम गुन गावत पुलक सरीरा।*
*गदगद गिरा नयन बह नीरा॥ काम आदि मद दंभ न*
*जाकें। तात निरंतर बस मैं ताकें॥*

अर्थात् ईश्वर गुणगान करताना ज्यांच्या देहाला कंप सुटतो, शरीरावर रोमांच जागतात, वाणी गद्गद् होते, नेत्रातुन अश्रु वाहू लागतात असे भक्त थोर होत. काम, दंभ, क्रोध, मद यासारखे विकार ज्यांचे नष्ट झाले आहेत अशा भक्तांच्या अधीन देव रहातो.

*सो अनन्य जाके असि मति न टरइ हनुमंत।*
*मैं सेवक सचराचर रुप स्वामि भगवंत॥*

अर्थात् रामरायाने हनुमंताला सांगितले आहे की स्थावर आणि जंगम सृष्टीला जो भगवत्स्वरुपी जाणतो आणि या निश्चयावर दृढ रहातो तो अनन्य भक्त होय.

ईश्वर ब्रह्मांडव्यापी आहे. भक्त त्या ईश्वराचा सेवक आहे. ईश्वर आपले स्वामी आहेत. हे ज्याचे दृढ मत आहे त्याचे चित्त अनन्य झाले आहे असे जाणावे.

2) **नित्यश:** सततं मां स्मरति ईश्वराचे नित्य आणि सतत स्मरण करणारा भक्त. शंकराचार्यांनी नित्य आणि सतत या शब्दांचे अर्थ दिलेत : सततं इति नैरन्तर्यं उच्यते। नित्यश: इति दीर्घकालत्वं उच्यते। षण्मासं संवत्सरं वा न, किं तर्हि? यावज्जीवं नैरंतर्येण मां स्मरति इत्यर्थ:। सतत म्हणजे निरंतर, अखंडपणे आणि नित्य म्हणजे दीर्घ काळापर्यंत. सहा महिने वा वर्षभर असे विवक्षित काळापुरते नव्हे तर अखंडपणे. म्हणजे किती काळ, किती दिवस पर्यंत? जीवन भर. निरंतर. सतत. प्रत्येक क्षणी ईश्वर स्मरण.

गांधीजींना प्रतिक्षणी ईश्वराचे स्मरण असायचे. एकदा त्यांना कुणी विचारले की तुम्हाला अखंड ईश्वर स्मरण असते याचा काय अर्थ ? उत्तरादाखल गांधीजींनी सांगितले होते "जागृतावस्थेतला असा एकही क्षण नसतो की ईश्वर माझ्या ठायी वर्तमान आहे आणि सारे बघत आहे या गोष्टीचे मला भान नसते." हे भान त्यांच्या बुध्दीला होते आणि ते अभ्यासपूर्वक होते. ईश्वर निष्ठेमुळे ब्रह्मचर्य विषयक निष्ठा उपजली. सत्य निष्ठेमुळे त्यांच्या ठायी कर्तव्य निष्ठा आणि परिश्रम निष्ठा जागली. तरीही त्यांच्या आयुष्यात मुख्य स्थान हे ईश्वर निष्ठेलाच होते. त्यांच्या आयुष्यात ईश्वर निष्ठा प्रधान होती. त्यांनी आपल्या स्वत:ला ईश्वर समर्पित करुन टाकलेले होते. ज्यांच्या ठायी अखंडपणे ईश्वर स्मरण वसते त्यांच्या मनी कर्तेपणाचा भाव तर वसतीला येणारच नाही ना! गांधीजींना अखंड ईश्वर स्मरणामुळे ही स्थिती लाभली होती. गीतेचे हेच म्हणणे आहे की ईश्वराचे स्मरण अखंड म्हणजे प्रतिक्षणी असावे. दुसरा मुद्दा असा की हे स्मरण आजीवन असावे. काही साधक आरंभी ईश्वराचे स्मरण सपाटून करतात आणि त्याचा त्यांना लाभही काही अंशी होतो. काही साधक समाधी अवस्थेपर्यंत पोहोचतात कारण की चित्ताचा हा धर्म आहे की त्याच्या ठायी जर गती निर्माण झाली तर मग कार्यसिध्दी होते पण अखेरपर्यंत ही तीव्र गती कायम टिकून राहत नाही. यामुळे तीव्र गतीच्या दरम्यान जो अनुभव झेलता आला तो गती मंदावल्यावरही होईलच असे काही सांगता येत नाही. गती शांत झाली आणि तो अनुभवही मंदावला असे होते. तरी सुध्दा तीव्र गतीच्या दरम्यान जो काही अनुभव प्राप्त झाला त्याचे मोल काहीच नाही असे कसे म्हणता येईल बरे ? एका दृष्टीने बघू जाता या अनुभवाचे मोल खूपच आहे कारण की साधना काळात प्राप्त झालेल्या अनुभवाची स्थिती कायम स्वरुपी टिकून राहू शकत नसली तरी त्या अनुभवाचा लाभ जीवन उन्नत करण्यासाठी आणि मनाच्या अधोगतीला रोखून धरण्यासाठी होतोच होतो पण जो अनुभव साधना काळात प्राप्त झाला त्याला अखेरपर्यंत टिकवून ठेवणे महत्वाचे आहे. सर्वश्रेष्ठ अशी गोष्ट आहे कारण की त्याच्यामुळेच तर मोक्षाच्या दृष्टीने जगतावर विजय प्राप्त करुन घेता येणार आहे. यामुळे सतत म्हणजे प्रत्येक क्षणी आणि नित्य म्हणजे आमरण किंवा आजीवन ईश्वर स्मरण होत रहायला हवे.

3) **तस्य नित्ययुक्तस्य योगिन:** अहं सुलभ: ईश्वराशी नित्य संलग्न असणाऱ्या योग्याला ईश्वर सुलभतेने प्राप्त होऊ शकतो. तुलसीदास लिहितात: सुगम पंथ मोहिं पावहिं प्रानी। अर्थात् भक्ती पंथ हा सुलभ आहे, राजमार्ग आहे.

ओंकाराचा जप करुन निर्गुण निराकार परब्रह्याची उपासना करण्यापेक्षा सगुण साकार परब्रह्याची उपासना करणे सुगम आहे. राम, कृष्ण, गोविंद ही नावे ओमकाराहून सोपी आहेत. तुलसीदास लिहितात :

***जिमि थल बिनु जल रहि न सकाई।***
***कोटि भाँति कोउ करइ उपाई॥***
***तथा मोक्ष सुख सुनु खगराई।***
***रहि न सकइ हरि भगति बिहाई॥***

अर्थात् कुणी कोटी उपाय योजिलेत तरीही पाणी आधाराशिवाय राहू शकत नाही त्याप्रमाणेच हे गरुडा, मोक्ष सुख देखिल ईश्वराच्या स्मरणाशिवाय राहू शकत नाही असे काकभुशुंडी यांनी गरुडाप्रत निवेदन केले. पुढे लिहितात :

***अस बिचारि हरि भक्त सयाने।***
***मुक्ति निरादर भक्ति लोभाने॥***
***भक्ति करत बिनु जतन प्रयासा।***
***संसृति मूल अबिद्या नासा॥***

अर्थात् हरी भक्तीशिवाय मोक्ष प्राप्ति होत नाही हे ध्यानी घेतल्यामुळे विवेकी हरी भक्त जो असतो तो

मोक्षाकडे लक्ष न देता भक्तीचा लोभ मनी धरतो कारण की भक्तीचा पथ इतका सोपा व सुगम आहे की अनायासेच अज्ञान घालवून टाकतो. तुलसीदासजी लिहितात :

***राम भजत सोइ युक्ति गोसाईं।***
***अनइच्छित आवइ बरिआई ॥***

अर्थात् रामाची भक्ती करत असताना हा मोक्ष लाभ इच्छा न करता देखिल अनायासेच जणु जबरदस्तीपूर्वक प्राप्त होतो.

: 15 :

***मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।***
***नाप्नुवन्ति महात्मानः संसिध्दिं परमां गताः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- परमां संसिध्दिं गताः परम सिध्दीला म्हणजे मोक्षाला प्राप्त झालेले
- महात्मानः महात्मा पुरुष
- मां उपेत्यः मला प्राप्त झाल्यावर
- अशाश्वतं दुःखालयंः अशाश्वत आणि दुःखाचे स्थान
- पुनर्जन्म न आप्नुवन्तिः पुनर्जन्माला प्राप्त होत नाहीत

**अर्थ**

परमसिध्दी मिळवलेले महात्मे एकदा मला प्राप्त झाल्यावर दुःखाचे आगर असलेल्या क्षणभंगुर पुनर्जन्माला जात नाहीत.

***पावले मोक्ष-सिध्दीस महात्मे मज भेटुनी***
***दुःखाचें घर तो जन्म न घेती चि अशाश्वत।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत 1) परमसिध्दी मिळवलेले महात्मे जन 2) एकदा मला प्राप्त झाल्यावर दुःखाचे आगर असलेल्या पुनर्जन्माला जात नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **परमां संसिध्दिं गताः महात्मानः** या श्लोकातून मोक्षासाठी 'परम' या विशेषणाचा प्रयोग केला गेला आहे. परम म्हणजे श्रेष्ठ होय. दुसरा शब्द आहे संसिध्दि म्हणजे मोक्ष. तिसरा शब्द आहे महात्मा पुरुष. हे तीन शब्द आहेत. काही लोक संसिध्दिचा अर्थ सिध्दी असाही करतात पण तो योग्य नव्हे. सिध्द पुरुषाच्या ठायी नेहमी सिध्दी दिसून येतीलच असे काही सांगता येत नाही. काही सिध्द पुरुषांच्या ठायी अवश्यमेव सिध्दी दिसतात नाही असे नाही पण हे तमाम सिध्द पुरुषांच्या बाबतीत मात्र सांगता येत नाही. पातंजल समाधी मार्गाने जे समाधीची साधना करतात त्यांच्या ठायी सिध्दी दिसतात, त्यांना सिध्दी प्राप्त होतात. सगुणोपासनेने ज्यांना ईश्वर भक्तीची उच्च स्थिती लाभली आहे अशा साधकांनाही सिध्दी प्राप्त होतात. ज्यांना सिध्दी प्राप्त होतात त्यांच्याकडे त्या सिध्दींमुळे सर्वसामान्य जन आकृष्ट होतात. या सिध्दींचा दुरुपयोगही होऊ शकतो. या सिध्दींचा उपयोग केल्यामुळे समाजाची शक्ती वाढत नसून घटते हे ध्यानी घ्यायला हवे. यामुळे पुरुषार्थ मंदावतो. क्षीण होतो.

आपण प्राप्त केलेल्या सिध्दींचा उपयोग करुन घेणारेही पुढे या मार्गात घसरुन पडतात. सिध्दींच्या उपयोगामुळे कीर्तीलाभ होतो. यामुळे लोकैषणा उत्पन्न होते. यामुळे माणसाचे मन सहजी ऐश्वर्याकडे वळते. संयम शक्ती घटते. हळूहळू अधःपतन होऊ लागते. महिलांचा संपर्क वाढला तर मग तिथेही निसटून पडण्याचे भय अधिक असते. अशा प्रकारे या सिध्दी मोक्ष मार्गावर बाधक ठरतात. या सिध्दींना आपण इंद्रजाल किंवा मायाजाल असेही म्हणू शकतो. जे जागृत महापुरुष असतात ते सिध्दी प्राप्त झाल्यावरसुध्दा आणि समाजाच्या कल्याणासाठी देखिल सिध्दींचा उपयोग करत नसतात. यांचा उपयोग करण्यात असणाऱ्या धोक्यापासून ते सावध असतात. या धोक्याची त्यांना पूर्ण कल्पना असते.

सिध्दींच्या बळामुळे कुणी सिध्द पुरुषाने कुणा रुग्णाला आजारापासून मुक्त केले पण ज्याला आजारमुक्त केले त्याचे तर बळ वाढले नाहीच ना ? त्या रुग्णाला आजारातून उठण्यासाठीचे उपाय सांगावेत, त्याची मानसिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करावेत, त्याला शांततेचे विचार वा उपदेश करावा तर तो रोग मुक्त होईल

आणि स्वावलंबी बनू शकेल. सिध्दींच्या उपयोगामुळे जर त्याला रोगमुक्त केले तर मग तो रोगमुक्त झाल्यावर कायमस्वरुपी निरोगी बनून जाईल असे तर मानता येत नाही ना? कारण रोगाचे पुनश्च आक्रमण होऊ नये याचे तर ज्ञान त्याला लाभले नाहीच नाही. यामुळे सिध्दी प्राप्त झाल्यावरसुध्दा त्यांचा उपयोग करणे कल्याणकारी नाही एवढे खरे.

ज्यांना सिध्दीलाभ झाला त्यांना ईश्वरी ज्ञानाची प्राप्ती झाली असेही तर म्हणता येत नाही कारण की ईश्वरी ज्ञानाचा संबंध अहंकार मुक्ती आणि देह भावनेला क्षीण करण्याशी संबध्द आहे. सर्वात अवघड काम तर अहंकाराला क्षीण करणे आहे. यामुळे संसिध्दी या शब्दाचा अर्थ सिध्दी असा न करता केवळ मोक्ष असा करणे योग्य आहे. सिध्द शब्दापासूनच संसिध्दी आणि सिध्दी या दोन्ही शब्दांचा जन्म झाला आहे. ईश्वरी अनुभव प्राप्त करुन घेणाऱ्या व्यक्तीला आपण सिध्द पुरुष म्हणू शकतो. तेच मोक्षप्राप्ती करुन घेऊ शकतात.

संसिध्दी या शब्दाच्या सोबत परम हे विशेषण येते. परम म्हणजे श्रेष्ठ. मोक्षाहून का अधिक आणखी काही श्रेष्ठ असू शकेल बरे? सिध्दींचा चमत्कार दाखवण्यासाठी जीवंत रहाणे आवश्यक आहे. देह धारण करावाच लागतो. यामुळे संसिध्दी ही सिध्दीहून श्रेष्ठ आहे. देहधारणेमुळे माणूस व्यापक बनू शकत नाही कारण की आंतरिक वृत्तीने कितीही व्यापक बनू बघितले ना तरीही देहधारणा व्यक्तीला मर्यादित स्वरुपातच बध्द करुन टाकते. यामुळे देहधारण केल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या शक्तीपेक्षा देह धारण न केल्यामुळे शक्तीचे अर्जन अनेक पटींनी अधिक होते. महात्मा गांधीजी नेहमी असे म्हणत असत "आता मी जेवढे काम करतो ना त्याहून कितीतरी पटींनी अधिक सेवाकार्य मी माझ्या मरणानंतर करणार आहे." जे साधक ईश्वराशी एकरुप झाले आहेत अशा महापुरुषांच्या ज्ञान शक्तीला देहाची बाधा नसल्यामुळे त्या ज्ञानाचा सर्वांना स्पर्श होऊ शकतो. देहधारण केल्यावर त्यांच्या निकटस्थ जनांना त्या महात्म्यांचा स्पर्श होऊ शकतो. यामुळे देह धारण करण्यापेक्षा देह मुक्त बनून मोक्ष स्थितीत स्थिरावणे अशा साधकाना श्रेष्ठ वाटते यात काहीही संशय नाही.

तिसरा शब्द आहे 'महात्मा'. या शब्दाचा गीतेत अनेकश: प्रयोग झालेला नाही. नवव्या अध्यायातील तेराव्या श्लोकात महात्मा हा शब्द आला आहे. देह बुध्दीचा ज्यांनी त्याग केला त्यांना महात्मा म्हणून संबोधिले जाते. आपण सारे अल्पात्मा आहोत कारण की आपल्या तमाम क्रिया या देह बुध्दीच्या सोबतच चालत रहातात. ज्यांची देह बुध्दी नष्ट झाली आहे त्यांना विदेह असे म्हणतात. जे विदेहावस्थेत जीवनातल्या तमाम क्रिया करतात त्यांना महात्मा म्हणता येते.

2) **मां उपेत्य अशाश्वतं दु:खालयं पुनर्जन्म न आप्नुवन्ति:** ईश्वराची प्राप्ती करुन घेऊन महात्मा जन अशाश्वत आणि दु:खाचे निवासस्थान अशा पुनर्जन्माला प्राप्त होत नाहीत. मोक्षाची व्याख्या दोन प्रकारे केली गेली आहे.. देह असतानाही दु:खापासून सर्वथा मुक्ती म्हणजे मोक्ष होय. हा अर्थ आता निरुपिला गेला आहे. दुसरा अर्थ आहे वर्तमान देहाचा त्याग झाल्यावर दुसरा देह प्राप्त न होणे. म्हणजे पुनर्जन्म प्राप्त न होणे. महात्मा जन देहात असतानाच मोक्षाचा अनुभव घेत म्हणजे दु:खमुक्तीचा अनुभव घेत अखंड शांततेचा अनुभव घेत प्रारब्ध कर्मे संपेपर्यंत देहात निवास करतात आणि देह सुटल्यावर पुनर्जन्माला पावत नाहीत. पुनर्जन्मासाठी दु:खालय आणि अशाश्वत अशी दोन विशेषणे जोडली आहेत. देह तर अखंड टिकणार नाही. देहात प्रतिक्षणी परिवर्तन होत राहील.

देहाचे सहा विकार मानले आहेत. 1) देह जन्माला येतो. 2) काही काळपर्यंत त्याचे अस्तित्व असते. 3) त्यात सतत परिवर्तन घडत असते. 4) आरंभी देहात वृध्दी होते. 5) वृध्दावस्थेत क्षीण होत जाण्याची प्रक्रिया सुरु होते. 6) अंतत: देह नष्ट होतो. हा जन्म तर दु:खदायक आहेच. गर्भात आल्यापासून मरणापर्यंत नाना प्रकारची दु:खे भोगावी लागतात. यामुळे पुनर्जन्माचे स्वरुप अशाश्वत आणि दु:खालय असे आहे. पुनर्जन्म अधिकच दु:खदायी आहे. पुनर्जन्म महात्म्यांना घ्यावा नाही लागत.

: 16 :

*आब्रह्मभुवनाल्लोका: पुनरावर्तिनोऽर्जुन।*
*मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन आब्रह्मभुवनात् लोका:** हे अर्जुना, ब्रह्मलोकापासून सर्व प्रकारचे लोक
- **पुनरावर्तिन:** पुनरावर्ती स्वभावाचे म्हणजे पुन:पुन्हा जन्म-मरणाच्या चक्रात टाकणारे आहेत (अर्थात् ज्यांची प्राप्ती झाली असता पुन: प्रपंचात यावे लागते असे आहेत )
- **तु कौन्तेय:** पण हे अर्जुना
- **मां उपेत्य:** मला प्राप्त झाल्यावर
- **पुनर्जन्म न विद्यते:** पुनर्जन्म होत नाही

**अर्थ**

हे अर्जुना, ब्रह्मलोकांपर्यंतचे सर्व लोक पुनरावर्ती आहेत परंतु हे अर्जुना, मला प्राप्त झाल्यावर पुनर्जन्म होत नाही कारण मी कालातीत आहे आणि हे सर्व ब्रह्म वगैरेंचे लोक कालाने मर्यादित असल्यामुळे अनित्य आहेत.

*ब्रह्मादि लोक ते सारे माघारे घालिती पुन्हां।*
*माझी भेट घडे तेव्हां जन्मणें मग खुंटलें॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या आहेत 1) ब्रह्मलोकांपर्यंतचे सारे लोक पुन्हापुन्हा जन्म-मरणाच्या चक्रात टाकणारे आहेत 2) पण मला प्राप्त झाल्यावर पुनर्जन्म होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) आब्रह्मभुवनात् लोका: पुनरावर्तिन: स्वर्गलोक असो वा नरकलोक, ब्रह्मलोक असो वा चंद्रलोक, भूलोक असो वा इंद्रलोक सारेच लोक अंततोगत्वा पुनर्जन्मात टाकणारेच आहेत. या लोकांना प्राप्त केल्यावरही पुनर्जन्मापासून मुक्तता नाही. या लोकांच्या चर्चेत ब्रह्मलोकाचीही गणना होते. या लोकाची गणना यात करावी की करु नये याबाबत एकमत नाही. या शब्दाचा अर्थ 'ब्रह्मलोकासोबत' आणि 'ब्रह्मलोकापर्यंत' अशा दोन्ही प्रकारे करता येतात. पहिला अर्थ गृहित मानला तर मग ब्रह्मलोक आणि अन्य लोक समान कोटीचे ठरतात. दुसरा अर्थ मानला तर मग हा लोक पुनर्जन्मात टाकणारा नाही असा अर्थ घ्यावा लागतो. हा लोक अन्य लोकांहून भिन्न आहे असा अर्थ घ्यावा लागतो. ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात ब्रह्मलोकाची चर्चा आली आहे. ब्रह्मलोकाचे काव्यात्म वर्णन यात वाचायला मिळते.

विनोबांनी स्वर्ग, नरक आणि ब्रह्मलोक या शब्दांचे विशेष अर्थ निरुपित केलेले आहेत. ते असे म्हणतात की जीवंत माणसाच्या तमाम इंद्रियांना गाढ निद्राप्रसंगी आराम मिळतो पण प्राणाला आराम मिळत नाही. तसे तर प्राण आराम घेऊही शकत नाही कारण जीवंत रहाण्याचा आधार प्राण आहे. प्राणवान असणे आहे. यामुळे देहाचा त्याग झाल्यावर प्राणाला आराम लाभावा यासाठी जीवात्मा एकदम दुसऱ्या देहाचा स्वीकार करत नाही. प्राणाच्या आरामासाठी जीवात्मा देहत्यागानंतर देहाशिवायच तमाम इंद्रियांच्या सोबत म्हणजे लिंगदेहासोबत दीर्घनिद्रेचा अनुभव घेतो. निद्रेत तीन प्रकारचे अनुभव येतात एक म्हणजे गाढ निद्रा, दुसरा सुस्वप्न आणि तिसरा म्हणजे दु:स्वप्न. उत्कट आध्यात्मिक साधना केली असेल तर मग नि:स्वप्न स्थिती जागते. या नि:स्वप्न स्थितिलाच ब्रह्मलोक म्हणतात कारण की गाढ निद्रेत कुठलेही स्वप्न नसल्यामुळे आनंदलाभ होतो आणि ब्रह्मलोकात तर परमानंदाचा लाभ होतो पण नि:स्वप्न स्थिती नसतानाही जर चांगल्या स्वप्नांचे दर्शन होत असेल तर मग सुखाचा अनुभव घेता येतो. देह अस्तित्वात असताना जर आपण चांगली कर्मे केली असतील, सत्संग साधला असेल तर मग चांगली स्वप्ने येतात, सुखदायक स्वप्ने येऊ शकतात. हा स्वर्गलोक होय पण जीवंत असताना जीवनात वाईट कर्मे केली असतील तर मग वाईट स्वप्नदर्शन होईल आणि दु:खानुभवाला सामोरे जावे लागेल. हाच तर नरक होय.

आता ब्रह्मलोकाची मूळ कल्पना थोडक्यात बघू या! जगाचे मूळ कारण आहे निर्गुण निराकार ब्रह्म. तेच स्व-स्वरुपी आहे. त्याची ओळख झाल्याशिवाय मोक्षलाभ होणे संभवणार नाही पण निर्गुण परब्रह्याची ओळख व्हावी कशी हा प्रश्न आहे. त्याच्या ओळखीचा साधा सोपा उपाय भक्ती हाच आहे पण निर्गुण ब्रह्याची उपासना अवघड असल्यामुळे उपासना वा भक्तीसाठी सगुण साकार रुपाचा आधार घेतला जातो तरी सुध्दा निर्गुण

ब्रह्याला जाणून घेतल्याशिवाय मोक्ष लाभ संभवत नाही. सगुणोपासनेने खूपच उच्चदशा प्राप्त होऊन जाते. या उच्च अवस्थेत काही सिध्दींचा लाभ होऊन जातो. यामुळे काही चमत्कार दाखवू शकण्याची शक्ती मिळते. या सिध्दींमुळे सूक्ष्म प्रकारची आसक्ती निर्माण होते. यामुळे सगुण भक्ताला अत्युच्च स्थिती प्राप्त झाल्यावरसुध्दा या सूक्ष्म आसक्तीमुळे निर्गुण परब्रह्याचे दर्शन होऊ शकत नाही पण त्याला इतकी उच्च स्थिती प्राप्त होते की सगुण भक्त पुनर्जन्मापासून मुक्त होऊन जातो. तेव्हा त्याला ब्रह्मलोकाची कल्पना येते. सगुणोपासक भक्त ब्रह्मलोकी जाऊन निर्गुण परब्रह्याची ओळख करुन घेतो मग त्याला मुक्ती लाभते. मग त्याला दुसरा देह धारण करावा लागत नाही.

पण दुसरा देह धारण करावा लागतो असे म्हटले तर मग एकच देह धारण करावा लागतो आणि मग मोक्ष लाभ होतो असे मानावे लागेल. एक देह धारण करावा लागतो असे म्हटले तर ब्रह्मलोकाच्या सोबत तमाम लोक देह धारण करण्याच्या फेऱ्यात टाकणारे आहेत असा अर्थ करता येतो आणि ब्रह्मलोकातच तो मोक्षाचा लाभ करुन घेतो असे म्हटले तर मग ब्रह्मलोकाशिवायचे तमाम लोक जन्म-मरणाच्या फेऱ्यात ढकलणारे आहेत असा अर्थ करावा लागेल. कुठलाही अर्थ घेता येईल.

2) **मां उपेत्य पुनर्जन्म न विद्यते:** ईश्वराला प्राप्त करुन घेतल्यावर मात्र पुनर्जन्म नसतो. याचा अर्थ असा की सगुण भक्तीचा उत्कर्ष झाल्यावर किंवा मग निर्गुण परब्रह्याचे ज्ञान झाल्यावर याच जन्मी मोक्ष लाभ होतो. या साधकाला ब्रह्मलोकापर्यंत जायची गरज उरत नाही. सगुण भक्तीच्या उत्कर्षासोबत साधकाच्या मनी सिध्दी प्राप्त झाल्यामुळे सूक्ष्म स्वरुपाचा अहंभाव आणि आसक्ती निर्माण होते ती जर निर्माण झाली नाहीतर मग तो या देहातच मुक्त होऊ शकतो, मोक्षाचा लाभ घेऊ शकतो. सिध्दी या मोक्ष मार्गात बाधक आहेत असे यामुळेच म्हटले जाते. सिध्दींचा उपयोग करताना आसक्ती निर्माण होतेच होते. तुलसीदास म्हणतात :

***रिध्दि सिध्दि प्रेरइ बहु भाई।***
***बुध्दिहिं लोभ दिखावहिं आई॥***

अर्थात् ऋध्दी सिध्दींना मायाच प्रेरित करुन पाठवते. या ऋध्दी-सिध्दी बुध्दीला लालचावतात.

यामुळे सगुण भक्तीतून ज्या सिध्दींचा लाभ होतो त्यांचा उपयोग न केला तर मग त्यांच्या प्रलोभनातून वाचता येते आणि मग साधकाला थेट ब्रह्मलोकापर्यंत जायची गरत उरत नाही. निर्गुण परब्रह्मतत्त्वाचा अनुभव प्राप्त होईल आणि पुनर्जन्म टळू शकेल.

: 17 :

***सहस्रयुगपर्यन्तमहर्यद् ब्रह्मणो विदु:।***
***रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जना:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ते अहोरात्रविद: जना:** दिवस रात्रीच्या स्वरुपाला जाणणारे
- **यत् ब्रह्मण: अह:** जो ब्रह्मदेवाचा दिवस आहे
- **सहस्रयुगपर्यन्तं:** हजार युगांपर्यंतचा
- **च रात्रिं:** आणि रात्र
- **युगसहस्रान्तां:** एक हजार युगांची असते
- **विदु:** असे जाणतात

**अर्थ**

ब्रह्मदेवाचा एक दिवस एक हजार चार युगांचा असून रात्रही एक हजार चार युगांची असते. जे योगी हे तत्त्वत: जाणतात ते काळाचे स्वरुप जाणणारे होत.

***होतसे ब्रह्म-देवाचा सहस्र-युग तों दिन***
***तेवढी चि तशी रात्र कालोपासक जाणती।***

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली आहे की दिवस आणि रात्र या काळाला जाणणारे म्हणजे काळगणनेचे विशेषज्ञ यांचे असे मत आहे की ब्रह्मदेवाचा जो दिवस आहे तो एक हजार युगांचा असतो आणि ब्रह्मदेवाची रात्रसुध्दा एक हजार युगांची असते.

**स्पष्टीकरण**

या श्लोकातून ब्रह्मांडाच्या वयाचे वर्णन आले आहे. कालगणनेच्या विशेषज्ञांनी सांगितले आहे की ब्रह्याचा

दिवस आणि रात्र एक-एक हजार युगांचे असतात. प्राचीन काळातल्या ज्योतिषशास्त्री, खगोलशास्त्री, काल गणनेत प्रवीण असलेल्या विद्वानांनी तत्कालीन उपलब्ध अल्प अशा साधनांच्या आधारे ब्रह्मांडाच्या आयुर्मानाविषयी विचार करुन ठेवला आहे. या संबंधी लोकमान्य टिळकांनी 'गीता रहस्य' ग्रंथाच्या एका प्रकरणातून स्पष्टीकरण दिलेय. सृष्टीची ज्या अर्थी उत्पत्ती झाली आहे त्या अर्थी तिचा विलयही निश्चित आहे. पुरेशा साधनांच्या अभावी तत्कालीन पंडितांनी सृष्टीच्या प्रलयकाळाच्या बाबतीत जो काही विचार करुन ठेवला आहे तो आजच्या अद्ययावत अशा विज्ञानवाद्यांच्या कालगणनेशी मिळता-जुळता असा आहे.

ते म्हणतात की मानव या धरतीवर रहातो. देवगण स्वर्गात निवास करतात. सृष्टीला उत्पन्न करायचे कार्य ब्रह्मदेव करतो. तो वर कुठेतरी अंतरिक्षात वा ब्रह्मलोकी रहातो. अशा प्रकारे पृथ्वी, स्वर्ग आणि ब्रह्मलोक असे तीन लोक झालेत. त्यापैकी पृथ्वी प्रत्यक्ष दिसते. स्वर्ग वा ब्रह्मलोक दिसत नाही. ही फक्त काल्पनिक सृष्टी आहे. शास्त्रकर्त्यांची अशी मान्यता आहे की उत्तरायण हा देवगणांचा दिवस असून दक्षिणायन ही त्यांची रात्र आहे. उत्तरायण म्हणजे सूर्याचे उत्तरेकडे प्रयाण करणे होय. डिसेंबरच्या अंतिम पर्वात सूर्य उत्तरेकडे जायला लागतो. हा क्रम जून अखेर सुरु असतो. डिसेंबरच्या अखेरीस दिवस सर्वात छोटे असतात आणि जूनच्या अखेरीस सर्वात मोठे असतात. जूनच्या अखेरीस दक्षिणायनाला आरंभ होतो. सूर्य दक्षिण दिशेकडे प्रस्थान करतो. दक्षिणेकडे जायचा हा क्रम डिसेंबर पर्यंत चालतो. डिसेंबरच्या अखेरपासून तर जूनच्या अखेरपर्यंत दिवस मोठे असतात आणि जूनच्या अखेरपासून डिसेंबरच्या अंतापर्यंत दिवस छोटे होऊ लागतात. उत्तरायण आणि दक्षिणायन यांना अयन असे म्हणतात. दोन अयने मिळून एक वर्ष होते. आपले एक वर्ष म्हणजे देवगणांचा एक दिवस आणि एक रात्र असते. आपली 360 वर्षे म्हणजे देवगणांचे 360 दिवस आणि रात्री म्हणजे एक वर्ष असते.

कृत, त्रेता, द्वापर आणि कली अशी चार युगे मानली जातात. कृतयुगाचा काळ चार हजार वर्षांचा, त्रेतायुगाचा काळ तीन हजार वर्षांचा, द्वापर युग हे दोन हजार वर्षांचे आणि कलीयुग हे एक हजार वर्षांचे अशाप्रकारे चारही युगांचा काळ हा दहा हजार वर्षांचा होतो. एका युगाच्या समापन आणि दुसऱ्या युगाच्या उदयकाळी काही वर्षे संधीकाळाची निघून जातात. कृत युगाच्या संधी काळाची चारशे वर्षे, त्रेता युगाच्या संधी काळाची तीनशे वर्षे, द्वापर युगाच्या संधीकाळाची दोनशे वर्षे तर कली काळाच्या संधी काळाची शंभर वर्षे मानली जातात. अशा प्रकारे चार युगांची दोन हजार वर्षे होतात. अशा प्रकारे चार युगांची दहा हजार वर्षे आणि संधी काळाची दोन हजार वर्षे असे मिळून एकूण हिशेब होतो बारा हजार वर्षांचा. हा काळ देवगणांचा झाला. या बारा हजार वर्षांमध्ये देवगणांचे एक युग होते. माणसांचे ते महायुग होय. देवगणांच्या एकाहत्तर युगांचे मिळून होते एक मन्वंतर. अशी एकूण चौदा मन्वंतरे आहेत. चार युगांचे पंधरा संधी काळ होत. हे पंधरा संधी काळ अधिक चौदा मन्वंतरे मिळून देवगणांची झालीत हजार युगे. देवगणांची हजार युगे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस. देवगणांची दुसरी एक हजार युगे म्हणजे ब्रह्मदेवाची रात्र होय. या हिशेबाने ब्रह्मदेवाच्या एका दिवसाचा काळ होतो मनुष्य लोकीची चारशे बत्तीस कोटी वर्षे. ब्रह्मदेवाचा एक दिवस जेव्हा सुरु होतो तेव्हा सृष्टीच्या उत्पत्तीला सुरुवात होते. ब्रह्मदेवाची रात्र सुरु झाली की मग सृष्टीचा प्रलय होतो. अजूनपर्यंत ब्रह्मदेवाचा अर्धा दिवस व्यतीत झाला आहे. अजून दोनशे सोळा कोटी वर्षांचा अवधी शेष आहे. शास्त्रज्ञांनी आधुनिक साधनांच्या माध्यमातून हे ठरवले आहे की दोनशे कोटी वर्षांनंतर सृष्टीचा प्रलय होणार आहे.

: 18 :

*अव्यक्तात् व्यक्तय: सर्वा: प्रभवन्त्यहरागमे।*
*रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहरागमे:** ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाल्यावर
- **अव्यक्तात्:** अव्यक्तातून म्हणजे ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरापासून
- **सर्वा: व्यक्तय:** सर्व स्थावर आणि जंगम सृष्टी
- **प्रभवन्ति:** उत्पन्न होते
- **रात्र्यागमे:** आणि ब्रह्मदेवाची रात्र सुरु होताच

- **तत्र एव अव्यक्तसंज्ञके:** त्या अव्यक्त नामक ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरात माया शक्तीत
- **प्रलीयन्ते:** लीन होऊन जातात, लय पावतात

**अर्थ**

सर्व चराचर भूत समुदाय ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या आरंभी अव्यक्तापासून म्हणजे ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरापासून उत्पन्न होतात आणि ब्रह्मदेवाच्या रात्रीच्या आरंभी त्या अव्यक्त नामक ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरात विलीन होतात.

***अव्यक्तापासुनी होती भूतें व्यक्त दिनोदयीं***
***रात्र होतां लया जाती सगळीं मग त्यांत चि।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे 1) ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाल्यावर अव्यक्तातून म्हणजे मायेतून स्थावर-जंगम सृष्टी आकाराला येते. उत्पन्न होते आणि 2) ब्रह्मदेवाची रात्र झाल्यावर त्याच अव्यक्त मायाशक्तीत संपूर्ण स्थावर-जंगम सृष्टी लीन पावते, लय होते.

**स्पष्टीकरण**

1) अहरागमे अव्यक्तात् सर्वा: व्यक्तय: प्रभवन्ति ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाला म्हणजे अव्यक्तापासून म्हणजे मायेपासून सर्व स्थावर आणि जंगम सृष्टीची उत्पत्ती होते. या श्लोकात शब्द आला 'अव्यक्त'. अव्यक्त म्हणजे काय ? शंकराचार्यांनी ब्रह्मदेवाच्या स्वप्नावस्थेला गाढ निद्रावस्था म्हटले आहे. ब्रह्मदेव जेव्हा झोपी जातात तेव्हा सृष्टीचा प्रलय होतो. ब्रह्मदेव जागले की मग त्यांचा दिवस सुरु होतो. तेव्हा परत सृष्टीची उत्पत्ती होते. अशा प्रकारे ब्रह्मदेवाच्या जागण्या-झोपण्याच्या सोबत सृष्टीच्या उत्पत्ती आणि प्रलयाचा क्रम जारी रहातो. ब्रह्मदेव या सृष्टीची उत्पत्ती करतात असे मानले तर मग शंकराचार्यांनी लावलेला अर्थ सुसंगत ठरतो पण सृष्टीच्या उत्पत्ती प्रलयाचा मुद्दा धडपणे कळावा यासाठी आपण ब्रह्मदेवाची कल्पना केली आहे. याचा अर्थ असा नाही होत की ब्रह्मदेव नावाची कुणी व्यक्ती आहे. निर्गुण, निराकार परब्रह्म तत्वाला जाणून घेणे, त्याचे आकलन करुन घेणे अत्यंत अवघड आहे. यामुळे निर्गुण निराकार ईश्वराच्या ठायी सगुण साकार ईश्वराची ब्रह्मदेवाची कल्पना केली गेली आहे. ही कल्पना अनेक प्रकारे करता येऊ शकते. ब्रह्मा, विष्णु आणि महेश ही कल्पनाही रुढ आहे. ब्रह्मदेव सृष्टीची उत्पत्ती करतो, विष्णु पालन करतो आणि महेश विनाश वा संहार करतो पण ही रुढ असलेली सामाजिक कल्पना गीतेत नाही. या वा याच्या मागील श्लोकात ब्रह्मदेव हा शब्द सुध्दा आला नाही पण रात्र आणि दिवस असे शब्द आल्यामुळे ब्रह्म या शब्दाचा अर्थ ब्रह्मदेव असा केला गेला आहे. या श्लोकात अव्यक्त शब्द प्रयुक्त आहे. याचा अर्थ गाढ निद्रावस्था वा स्वप्नावस्था असा न घेता ब्रह्म असा घेतला गेला. तिसऱ्या अध्यायातल्या पंधराव्या श्लोकात ब्रह्म शब्दाचा अर्थ प्रकृती असा केला गेला. चौदाव्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकातही हाच अर्थ केला गेला. प्रकृती शब्द हा सांख्यांनीही प्रयुक्त केला. ते जड प्रकृतीला सृष्टीचा कर्ता मानतात. गीतेत प्रयुक्त प्रकृतीचा अर्थ शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र भाष्यात वर्णिल्याप्रमाणे घेणे सोईचे आहे. शंकराचार्य म्हणतात :

अविद्यात्मिका हि बीजशक्ति: अव्यक्तशब्दनिर्देश्या, परमेश्वराश्रया, मायामयी, महासुप्ति:, यस्यां स्वरुपप्रतिबोधरहिता: शेरते संसारिणो जीवा:।

अर्थात् ही प्रकृती अविद्यात्मक आणि बीजभूत शक्ती आहे. याचा शास्त्र अव्यक्त या शब्दाने निर्देश करतात. या प्रकृतीचे स्वरुप आहे माया. जीव या मायेच्या अधीन होतो आणि अज्ञानाच्या निद्रेत रहातो.

आचार्यांनी इथे स्पष्ट करुन सांगितले आहे की गीतेने वर्णिलेली प्रकृती ही परमेश्वराच्या अधीन असणारी एक अलौकिक शक्ती आहे. ही परमेश्वराहून भिन्न नसून अभिन्न अशी आहे. परमेश्वरी प्रेरणेनुसार या अलौकिक दिव्य अशा मायाशक्तीच्या प्रभावाने सृष्टी उत्पन्न होते.

2) रात्र्यागमे तत्र एव अव्यक्तसंज्ञके प्रलीयन्ते: ब्रह्मदेवाची रात्र होताच ही स्थावर-जंगम सृष्टी अव्यक्त अशा मायाशक्तीच्या अधीन होते म्हणजे ब्रह्मदेवाची रात्र होताच सृष्टीचा प्रलय होतो. ब्रह्मदेवाच्या दिवसाचा सध्या मध्याह्न सुरु आहे. अंतिम काळी जो प्रलय होईल तो बीजयुक्त असल्यामुळे ब्रह्मदेवाची रात्र सरताच पुनश्च ही सृष्टी उत्पन्न होईल आणि अशा प्रकारे सृष्टीच्या उत्पत्ती आणि विनाशाचा खेळ सुरुच राहील. त्यात कुठलीही बाधा पोहोचणार नाही.

: 19 :

*भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते।*
*रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थः** हे अर्जुना
- **सः एव अयं भूतग्रामः** तोच हा भूत समुदाय
- **भूत्वा भूत्वा:** पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन
- **रात्र्यागमे:** रात्रीच्या सुरुवातीला
- **अवशः** पराधीन होऊन
- **प्रलीयते:** लय पावतो, लीन होतो
- **अहरागमे:** दिवसाच्या आरंभी
- **प्रभवति:** पुनश्च उत्पन्न होतो

**अर्थ**

हे पार्था, तोच हा भूत समुदाय पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन प्रकृतीच्या अधीन असल्यामुळे रात्रीच्या आरंभी विलीन होतो आणि दिवसाच्या आरंभी पुन्हा उत्पन्न होतो.

*तीं चि तीं चि पुन्हां भूतें त्यांचे कांहीं न चालतां*
*दिनांती मरती सारीं उदयीं जन्म पावती।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) तेच भूतग्राम म्हणजे भूत समुदाय पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन ब्रह्मदेवाची रात्र झाल्यावर लय पावतात आणि 2) ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाला म्हणजे आपण केलेल्या कर्मांच्या अधीन होऊन पुनश्च उत्पन्न होतात.

**स्पष्टीकरण**

1) **सः एव अयं भूतग्रामः** तेच हे भूतग्राम भूत्वा भूत्वा रात्र्यागमे अवशः प्रलीयते पुन्हा पुन्हा जन्माला येऊन ब्रह्मदेवाच्या रात्रीतून परतंत्र होऊन लीन होते. मागल्या श्लोकाचे विवेचनच इथे सांगितले गेले आहे. इथे सांगितले गेले आहे की सृष्टीची उत्पत्ती ही ईश्वराच्या मायाशक्तीने होते आणि या सृष्टीचा प्रलय देखिल या मायाशक्तीनेच होतो. माया शक्तीने उत्पन्न होणारी ही सृष्टी माया शक्तीतच लीन होते. हा क्रम सतत सुरु असतो. त्याच भूतांचा समुदाय पुन्हा पुन्हा उत्पन्न होतो याचा अर्थ असा की भूतसमुदाय नव्याने उत्पन्न होत नाही. नव्या भूतांचा समुदाय उत्पन्न होऊही शकत नाही. असे झाले तर मग सृष्टी ही निर्बीज उत्पन्न होईल असे मानावे लागेल. असे मानले तर हे मानावे लागेल की मुक्त पुरुष पुन्हा पुन्हा उत्पन्न होतील. एकदा का असे मान्य केले की मुक्त पुरुषांचे अज्ञान बीज नष्ट झाल्यावरही बिना बीजानेच सृष्टी निर्माण होऊ शकेल तर मग मुक्त पुरुषांचे अज्ञान बीज नष्ट होण्याला काही अर्थच उरणार नाही ना ? पण अर्थात्च असे होत नाही. सृष्टीचा तर हा नियम आहेच की कोयपासूनच आंबा जन्माला येईल. सृष्टीत जे अनंत पदार्थ आहेत त्या सर्वांची बीजे वेगवेगळी आहेत. याशिवाय अनंत पदार्थ उत्पन्न होऊ शकले नसते. यामुळे प्रलयकाळी माया शक्तीच्या अधीन होऊन विलयाला जाणारा भूतसमुदायच पुनश्च जन्माला येतो. मरण हे एक प्रकारच्या झोपेसारखे आहे. यात एक देह निमातो आणि दुसरा लाभतो.

एक मुद्दा असा की परतंत्र होऊन म्हणजे आपण केलेल्या कर्मांच्या अधीन होऊन प्राणी प्रलयकाळी लीन होतात. केलेल्या कर्मांचे अज्ञान बीज घेऊन प्रलय काळात लीन होण्याचा अर्थ असा की प्रलयकाळात व्यक्तीचे अज्ञान बीज नष्ट होत नाही. जेवढे म्हणून प्राणीमात्र वा जड या सृष्टीत आढळताहेत हे सारेच आपापल्या अज्ञान बीजासोबत मायेत लीन होतात असे मानले तर मुक्त जीव पुनश्च जन्माला येण्याची स्थिती जशी मान्य करावी लागेल तशीच अज्ञानी जीव मुक्त होतील असेही मानावे लागेल. अज्ञानी जीव मुक्त होतील असे म्हणणे काय किंवा मुक्त जीव पुनश्च जन्माला येतील हे मानणे काय दोन्हीही गोष्टी सारख्याच अतार्किक आहेत. यामुळे प्रलयकाळी अज्ञान बीज नष्ट न होता माया शक्तीत विलीन होतात आणि अव्यक्त रुपात विद्यमान असतात असे मानले जायला हवेय.

2) **अहरागमे प्रभवति:** दिवस म्हणजे ब्रह्मदेवाचा दिवस सुरु होताना पण ब्रह्मदेवाच्या रात्रीच्या वेळी ईश्वराच्या माया शक्तीच्या ठायी लीन होऊन गेलेला भूतमात्रांचा समूह अज्ञान बीज कायम असल्यामुळे पुनश्च जन्माला येतो. हे चक्र अनादी काळापासून सुरु आहे. जगत आणि जगदीश्वर दोन्हीही अनादी आहेत. माया म्हणजे बीज शक्ती होय. ईश्वर जर अनंत बीज शक्तीने रहित असला तर मग तो शक्तीशून्य असेल मग तो सृष्टीची निर्मिती कशी बरे करु शकेल? ईश्वर जर एकच आहे

आणि शक्तीचे बीजही जर एकच आहे तर मग ईश्वराला शक्तीयुक्त कसे बरे म्हणता येईल? ईश्वर एकच असून त्याच्याठायी अनंत शक्तीचे बीजही आहे असे मान्य केले तरच मग ईश्वराला अलौकिक शक्तीयुक्त मानता येईल ना? आपण एवढे मात्र ठामपणे सांगू शकतो की चांगल्या कर्मांची चांगली फळे मिळतात तर वाईट कर्मांची वाईट फळे मिळतात पण मग वेगवेगळ्या योनीत जन्म मिळायचे काय कारण? आपल्याला धडपणे पत्ता नाही, काही अनुमाने मात्र आपण अवश्य काढू शकतो. अर्थात् ही अनुमाने खरी असतीलच असे आपण सांगू शकणार नाही. हे सारे आपल्या बुध्दीच्या पलीकडचे आहे. एवढे मात्र निश्चित आहे की जोवर अज्ञान बीज आहे तोवर प्रलयकाळापर्यंत हे जन्म मरणाचे चक्र अव्याहतपणे सुरु रहाणार आहे. शाश्वत मोक्षाचा धनी कुणी बिरलाच असू शकेल. आपण एवढेच मागणे मागू या की दयाघना तू हवे तेवढे जन्म आम्हाला दे पण आमच्या जीवनात भक्तीचा मळा फुलू दे. ईश्वर स्मरण नित्य घडू दे. मग वाटेल तेवढे जन्म मिळेत ना का ! पण सृष्टीच्या उत्पत्ती आणि विलयाचे हे चक्र अखंडपणे सुरुच रहाणार आहे एवढे निश्चित.

: 20 :

*परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।*
*यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **तु तस्मात् अव्यक्तात्:** परंतु त्या अव्यक्ताहून
- **परः अन्यः अव्यक्तः** अतिपलीकडचा दुसरा अर्थात् विलक्षण अव्यक्त
- **सनातनः यः भावः** आणि जो सनातन भाव आहे
- **सः सर्वेषु भूतेषु नश्यत्सुः** जो सर्व भूतांचा नाश झाला तरी
- **न विनश्यतिः** नाश पावत नाही, नष्ट होत नाही

### अर्थ

त्या अव्यक्ताहून फार पलीकडचा दुसरा अर्थात् विलक्षण जो सनातन अव्यक्त भाव आहे, तो परम दिव्य पुरुष सर्व भूते नाहीशी झाली तरी नाहीसा होत नाही.

***अव्यक्त दुसरें तत्त्व त्या अव्यक्तापलीकडे***
***नाशतां सगळीं भूतें न नाशे जें सनातन ।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) त्या अव्यक्ताहून पलीकडे एक दुसरे अव्यक्त आणि सनातन भाव वा तत्त्व आहे. 2) ते सर्व भूतांचा विलय झाल्यावरही नष्ट होत नाही

### स्पष्टीकरण

1) त्या अव्यक्त तत्त्वाच्या पल्याड दुसरे एक अव्यक्त सनातन तत्त्व वा भाव आहे. इथे ‘अव्यक्त’ हा शब्द ईश्वरासाठी प्रयुक्त केला गेला आहे. हा शब्द सांख्य मतात प्रकृती आणि मायेसाठीही प्रयुक्त केला जातो. यामुळे हा अव्यक्त शब्द नेमका कुठे आणि कुठल्या संदर्भात प्रयुक्त झाला हे ध्यानी घ्यावे लागते. सांख्य मताच्या अव्यक्त अशा प्रकृती वा मायेच्याही पल्याड एक दुसरा अव्यक्त असा सनातन भाव, तत्त्व वा पदार्थ असाही एक अर्थ आहे.

2) **सः सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यतिः** सर्व भूते म्हणजे प्राणीमात्र नष्ट झाल्यावर किंवा तमाम जड-चेतन पदार्थ नष्ट झाल्यावरसुध्दा ते तत्त्व नष्ट होत नाही. ते सनातन अविनाशी तत्त्व आहे. सारेच्या सारे दृश्य पदार्थ विनाशधर्मी आहेत. त्यांचे आयुर्मान कमी-अधिक असू शकते. यामुळे मूळ कारण हे सर्वांचे कारण असायला हवे ही शर्त असायला हवी. हो, ते कुणाचे कार्य असू शकत नाही. या दोन गोष्टी ज्यावर लागू करता येतील त्याला जगताचे मूळ कारण किंवा कर्ता मानले जायला हवे. अर्थात्च ते मूळ कारण चेतन वा ज्ञानस्वरुपीच असायला हवे कारण की ज्ञानाशिवाय कुठलेही कार्य घडू शकणार नाही. साऱ्याच प्रवृत्ती ज्ञानाधीन असतात. मूळ कारणात ज्ञान शक्ती असेल पण क्रिया शक्ती नसेल तर काम चालू शकणार नाही. केवळ क्रिया शक्ती असेल आणि ज्ञान नसेल तरी काम होऊ शकणार नाही. यासाठी मूळ कारणाच्या ठायी ज्ञान आणि क्रिया या दोन्हीही शक्ती असायला हव्यात. हिंदीचे कवी श्री जयशंकर ‘प्रसाद’ आपल्या ‘कामायनी’ या महाकाव्यातून लिहितात ‘ज्ञान दूर कुछ क्रिया भिन्न हो इच्छा क्यों पूरी हो मन की?’ अविनाशी असल्यामुळे मूळ कारणाला सत् स्वरुपी असावे लागते. इंद्रियगम्य वस्तु या विनाशी असतात. मूळ कारण हे अविनाशी असते. यामुळे ते इंद्रियातीत असते. सांख्यांनी निरुपिलेली जड प्रकृती

मूळ कारणाच्या उपरोक्त शर्तींचे पालन करत नाही यामुळे तिला जगाचे मूळ कारण मानता येत नाही. गीता सांगते की सांख्यांच्या अव्यक्त प्रकृतीच्याही पल्याड जे अव्यक्त आणि सनातन आहे त्या मूळ पदार्थाला ब्रह्म वा ईश्वर म्हणून संबोधिले जाते. ते तमाम भूतमात्रांच्या नष्ट झाल्यावर सुध्दा नष्ट होत नाही. सांख्यांची प्रकृती अव्यक्त असली तरी त्यात सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचा समावेश असतो. यामुळे ती पूर्णपणे इंद्रियांना अगोचर अशी नाही. परिणामी पूर्णत: अव्यक्त नाही. अव्यक्त शब्दाचा अर्थ काही केवळ न दिसणारे तत्त्व एवढाच नाही. तसे म्हटले तर हवा आणि आकाश हे अव्यक्त आहेत, सूक्ष्म आहेत पण ते इंद्रियगोचर आणि जड आहेत. सांख्यांची प्रकृती ही अव्यक्त मानली तरी ती पूर्णपणे अव्यक्त नाही. ब्रह्म किंवा ईश्वर पूर्णपणे अव्यक्त म्हणजे निर्गुण, निराकार, इंद्रियातीत आहेत परिणामी ते अव्यक्ताहूनही अव्यक्त आहेत अशी भाषा यामुळेच इथे प्रयुक्त केली गेली आहे. ते अव्यक्त म्हणजे सनातन आहे.

: 21 :

*अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहु: परमां गतिम् ।*
*यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **(य:) अव्यक्त: अक्षर: इति उक्त:** अव्यक्त अक्षर असे म्हटले जाते
- **तं परमां गतिं आहु:** त्याच अक्षर नामक अव्यक्त भावाला परम गती असे म्हणतात
- **यं प्राप्य न निवर्तन्ते:** ज्या सनातन अव्यक्त भावाला प्राप्त करुन घेतल्यावर लोक उलट मागे परत येत नाही
- **तत् मम परमं धाम:** ते माझे परम धाम होय

**अर्थ**

त्याला 'अव्यक्त' अक्षर असे म्हणतात, त्यालाच श्रेष्ठ गती म्हणतात. ज्या सनातन अव्यक्त भावाला प्राप्त झाल्यावर मनुष्य परत येत नाही, ते माझे सर्वश्रेष्ठ स्थान होय.

*त्यास अक्षर हें नाम ती चि शेंवटची गति*
*माझें परम तें धाम जेथूनि परते चि ना ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) जो हा अव्यक्त आणि अक्षर भाव आहे. 2) त्याला परम वा श्रेष्ठ गती असे म्हणतात. 3) ज्या गतीला प्राप्त केल्यावर पुनश्च या जगात येत नाही. 4) ते माझे परम असे स्थान आहे.

**स्पष्टीकरण**

1) य: अव्यक्त: अक्षर: इति उक्त: जो हा अव्यक्त म्हणजे अक्षर भाव म्हणजे पदार्थ आहे. मागील श्लोकात अव्यक्ताहूनही अव्यक्त या संज्ञेचा प्रयोग केला गेला आहे. इथे अव्यक्त शब्दासोबत अक्षर हा शब्द जोडला आहे. अक्षर म्हणजे अविनाशी. सृष्टीचे तमाम पदार्थ विनाशी आहेत. पदार्थ एकदम नष्ट होत नाहीत. सारे पदार्थ आपापल्या कारणांमुळे उत्पन्न होतात. मग त्यांच्या ठायी परिवर्तन जागते. अखेर क्षीण होत-होत ते नष्ट होतात पण सांख्यांच्या प्रकृतीच्या पल्याड असे जे अव्यक्त तत्त्व आहे ते मात्र ब्रह्म वा ईश्वररुपी असल्यामुळे इतर पदार्थांसारखे विनाशी नाही. ते अव्यक्त म्हणजे इंद्रियातीत आणि अक्षर म्हणजे अविनाशी आहे.

2) तं परमां गतिं आहु: जिथून पुन्हा प्रपंचात परतावे लागेल ते काही अंतिम स्थान असू शकत नाही. इथे गती या शब्दाचा अर्थ स्थान असा आहे. शंकराचार्य लिहितात :

*पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि*
*जननी जठरे शयनम् । इह संसारे खलु दुस्तारे*
*कृपयाऽपारे पाहि मुरारे ।*

अर्थात् पुन्हा पुन्हा जन्म घेत रहावा, पुन्हा पुन्हा मरत रहावे, पुन्हा पुन्हा मातेच्या जठरात शयन करत रहावे, खरोखर हे जग दुस्तर आणि प्रपंच तर अपार आहे. हे मुरारी कृपा करुन मला या प्रपंचापासून वाचव.

यामुळे अव्यक्त आणि अक्षररुप असे जे ईश्वर रुप किंवा ब्रह्मतत्त्व आहे तीच अंतिम गती किंवा स्थान आहे.

3) **यं प्राप्य न निवर्तन्ते:** कशी आहे अंतिम गती किंवा स्थान? हे स्थान प्राप्त केल्यावर पुनश्च या जगात यावे लागणार नाही असे स्थान. जोवर देहासक्ती आहे तोवर पुन्हापुन्हा या जगात जन्म घेणे अटळ आहे कारण जन्म

मरणाचे बीज देहासक्ती आहे. देहासक्ती म्हणजे आत्म स्वरुपाबाबतचे अज्ञान होय. ब्रह्मांडातल्या तमाम जड-चेतन पदार्थांच्या मागे जन्म आणि मरणाचे चक्र भिरभिरते आहे. अनेक जन्मानंतर अखेर मनुष्य देह प्राप्त होतो. मनुष्य जन्मी जर सत्संगती लाभली तर आत्मस्वरुपाची ओळख होते. ती झाली तर जन्म मरणाच्या फेऱ्यातुन मुक्तता होऊ शकते. गीता म्हणते की ईश्वरच अंतिम गती वा स्थान आहे. ते प्राप्त करुन घेतल्यावर मग जन्म-मरणाची भीती उरत नाही. या दु:खमय जगतात पुनश्च यावे लागत नाही.

4) **तत् मम परमं धाम:** ईश्वर हे अंतिम धाम होय. तिथून परत यावे लागत नाही. शेष अन्यत्र कुठेही पोहोचले ना तरी प्रपंचाच्या चक्रातून सुटका ही नाहीच. आपण ईश्वराहून भिन्न असे आपले अस्तित्व मानतो. देह वगैरेशीच स्वत:ला एकरुप मानतो. यामुळे एका देहानंतर दुसरा आणि दुसऱ्यानंतर तिसरा देह लाभणे अगदीच स्वाभाविक नाही का ? देहासक्तीपासून मुक्त होऊन ईश्वराला जाणून घेतल्यावरच जन्म मरणाच्या फेऱ्यातुन सुटका होऊ शकेल.

: 22 :

*पुरुष: स पर: पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।*
*यस्यान्त:स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **यस्य अन्त:स्थानि भूतानि:** ज्या परमात्म्याच्या अंतर्गत सर्व भूते आहेत
- **येन इदं सर्वं ततं:** हे सर्व विश्व परिपूर्ण भरलेले आहे
- **स: पर: पुरुष:** तो सनातन अव्यक्त परम पुरुष
- **अनन्यया भक्त्या तु:** अनन्य भक्तीनेच
- **लभ्य:** प्राप्त होण्यायोग्य आहे

**अर्थ**

हे पार्था, ज्या परमात्म्याच्या ठिकाणी सर्व भूते आहेत आणि ज्या सच्चिदानंदघन परमात्म्याने हे सर्व जग व्यापले आहे तो सनातन अव्यक्त परम पुरुष अनन्य भक्तीनेच प्राप्त होणारा आहे.

*लाभे अनन्य-भक्तीनें पार्था पुरुष थोर तो*
*ज्यांत ही राहती भूतें ज्यानें विस्तारलें जग।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) ज्याच्या आत हे सारे प्राणीमात्र आहेत. 2) आणि जो संपूर्ण जगात व्याप्त आहे. 3) तो परम पुरुष आहे. 4) तो केवळ अनन्य भक्तीनेच प्राप्त होण्यायोग्य आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यस्य अन्त:स्थानि भूतानि:** ईश्वराच्या उदरात सारे जगत सामावलेले आहे. मातेच्या उदरात असलेला गर्भ दिसू शकत नाही. इथे मात्र उलट आहे. ईश्वराच्या उदरात सारे जगत सामावलेले आहे पण ईश्वर दिसत नाही.

2) **येन इदं सर्वं ततं:** ईश्वर सर्वत्र व्याप्त आहे. ईश्वराला आकाशाची उपमा दिली जाते कारण की आकाश सर्वत्र व्याप्त आहे. उपनिषदात आकाशाचा दृष्टांत दिला गेला आहे. ब्रह्मांडातल्या तमाम पदार्थांचे अस्तित्व आकाशावरच अवलंबून आहे. आकाशाचा धर्म आहे अवकाश प्रदान करणे. यामुळे ईश्वराने आधी आकाशाची निर्मिती केली असे उपनिषदाचे म्हणणे आहे. इतके व्यापक असतानाही आकाशाची उत्पत्ती झाल्यामुळे आकाशाचा आधारही ईश्वर आहे. अर्थात् आकाशातही सूक्ष्म रुपाने ईश्वर व्याप्त आहे. ईश्वर किती सूक्ष्म आणि अद्भुत आहे हे ध्यानी घ्यायला हवेय. कबीराने पुष्पाच्या सुगंधाहूनही ईश्वर पातळ असल्याचे निवेदन केले आहे. बाळकोबा म्हणतात की ज्या लेखणीने ते लिहिताहेत त्यातही ईश्वर आहे आणि ज्या कागदावर ते लिहिताहेत त्या कागदातही ईश्वर आहे. जे लिहिले जात आहे ते आणि ज्याच्यासाठी म्हणून लिहिले जात आहे तेही ईश्वररुपच आहे. तमाम पदार्थांच्या ठायी अगदी अणु-अणुत ईश्वर व्याप्त आहे असे जाणून घ्यायला हवे.

3) **ईश्वराचा परिचय करुन देताना गीता म्हणते स:** पर: पुरुष: म्हणजे जो ईश्वर अणु-अणुत व्याप्त आहे तो पर पुरुष म्हणजे अतिश्रेष्ठ असा पुरुष आहे. 'पुरुष' शब्दाची व्याख्या करताना शंकराचार्य म्हणतात: पुरि

शयनात् म्हणजे देहरुपी पुरीत वा घरात शांतपणे शयन करणाऱ्या ईश्वराला पुरुष म्हटले जाते. ईश्वर तमाम देहात प्रकट आहे, तरी सगळ्यांपेक्षा मानवी देहात अधिक तीव्रतेने प्रकट आहे. ईश्वर हा जीवात्म्याच्या वा पुरुषाच्या रुपाने मानवी देहात प्रकट आहे. मानवी ईश्वराची ओळख ज्या ऋषी-मुनींनी करुन घेतली त्यांनी ईश्वराचे वर्णन उपनिषदातून केले आहे. त्यांचा अनुभव हे सर्वश्रेष्ठ प्रमाण होय. जगातल्या तमाम वस्तु वा पदार्थ नाशिवंत आहेत पण देहस्थित ईश्वर-पुरुष मात्र अविनाशी आहे, नित्य आहे, अखंड आहे. ईश्वराचे ज्ञान स्वरुप सर्वश्रेष्ठ होय. आपल्याला मोठमोठ्या पदार्थांचे ज्ञान होते, मनात अनंत भावना जागतात, मस्तकात अनंत विचार उत्पन्न होतात या सर्वांचे ज्ञानही असते. ही ज्ञानस्वरुपता ईश्वराचे अति अद्भुत स्वरुप आहे. अशा श्रेष्ठ पुरुषाची भक्ती केल्याशिवाय माणूस राहूच शकत नाही. यामुळे या भक्तीचाच विचार गीतेने या श्लोकातून मांडला आहे.

4) अनन्यया भक्त्या तु लभ्य: ईश्वर अतिश्रेष्ठ आहे. त्याच्या प्राप्तीचा अतिशय सुलभ उपाय आहे भक्ती. तुलसीदासांनी रामायणात भक्तीचा विचार ठायी ठायी मांडला आहे. ते म्हणतात :

*मुधा भेद जद्यपि कृत माया।*
*बिनु हरि जाइ न कोटि उपाया॥*

अर्थात् मायेचे प्रकार खरे तर मिथ्या आहे पण कोट्यवधी उपाय केले तरी ते हरी भक्ती विना नष्ट व्हायचे नाहीत.

*राम भजन बिनु सुनहुँ खगेसा।*
*मिटहिं न जीवन्ह केर कलेसा ॥*

अर्थात् – काकभुशुंडी म्हणतात की हे गरुडा! हरी भक्ती विना जीवमात्राची दु:खे मिटू शकत नाहीत.

*अबिरत भगति बिसुध्द तव स्रुति पुरान जो गाव।*
*जेहि खोजत जोगीस मुनि प्रभु प्रसाद कोउ पाव॥*
*भगत कल्पतरु प्रनत हित, कृपासिंधु सुखधाम।*
*सोइ निज भगति मोहिं प्रभु देहु दया करि राम॥*

अर्थात् हे भक्तकल्पतरु, शरणागत हितैषी, कृपासिंधु, सुखधाम रामराया श्रुती पुराणांनी ज्याचे गान केले, परमयोगी मुनी ज्यासाठी अखंड प्रयत्नशील आहेत आणि ईश्वराच्या कृपेनेच एखाद्या विरळ अशा भक्ताला प्राप्त होऊ शकेल अशी आपली परम उज्ज्वल अखंड भक्ती कृपापूर्वक मला प्रदान करावी. ही प्रार्थना काकभुशुंडीने प्रभु रामरायाला केली आहे. आपली सर्वांची ईश्वराप्रती हीच प्रार्थना असायला हवी.

**पुढे तुलसीदासजी लिहितात:**

*कबहूँ काल न व्यापिहिं तोही।*
*सुमिरि स्वरुप निरंतर मोही॥*

अर्थात् जो निरंतर ईश्वराचे स्मरण करत राहील त्याला कुठल्याही प्रकारचे संकट कदापि सतावू शकणार नाही. जर तू निरंतर माझ्या स्वरुपाचे स्मरण करत रहाशील.

**पुन्हा लिहितात:**

*हरि मायाकृत दोष गुन, बिनु हरिभजन न जाहिं।*
*भजिय राम सब काम तजि, अस बिचारि मन माँहिं॥*

अर्थात् हरीच्या मायेमुळेच तर गुण दोष उत्पन्न झालेले आहेत, त्याच्या कृपेशिवाय वा त्याच्या भजनाशिवाय ते गुण दोष दूर करता येणार नाहीत यामुळे समस्त कामनांचा त्याग करुन रामभक्ती करावी.

पुढे लिहितात:

*अस बिचारि जे मुनि बिग्यानी।*
*जानहिं भगति सकल सुखखानी॥*

अर्थात् अशा प्रकारे विचार करुन जो विज्ञानवेत्ता किंवा विवेकी मुनी असतो तो सकलसुखनिधान ईश्वराच्याच भक्तीची याचना करतो.

: 23 :

***यत्र काले त्वानावृत्तिमावृत्तिं चैव योगिन: ।***
***प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु भरतर्षभ:** पण हे अर्जुना
- **योगिन:** योगी लोक
- **यत्र काले:** ज्या काळात (येथे काळ शब्दाचा अर्थ मार्ग समजला पाहिजे कारण पुढील श्लोकात भगवंतांनी याचे नाव 'सृति', 'गति' असे सांगितले आहे.)
- **प्रयाता:** शरीर त्याग झाल्यावर
- **अनावृत्तिं एव:** मोक्षालाच म्हणजे परत न येणाऱ्या गतीला
- **च आवृत्तिं:** आणि परत येण्याच्या गतीला म्हणजे पुनर्जन्माला
- **यान्ति:** प्राप्त होतात, पावतात
- **तं कालं:** त्या काळ म्हणजे मार्गाविषयी
- **वक्ष्यामि:** मी तुला सांगतो

**अर्थ**

हे अर्जुना, ज्या काळी शरीराचा त्याग करुन गेलेले योगी परत जन्माला न येणाऱ्या गतीला प्राप्त होतात आणि ज्या काळी गेलेले परत जन्माला येणाऱ्या गतीला प्राप्त होतात तो काळ अर्थात् दोन मार्ग मी सांगेन.

***कोण्या काळीं कसा देह ठेवुनी येथ साधक***
***संसारी पडतो किंवा पावतो सिध्दि ऐक तें ।***

**विषय:** या श्लोकात एकाच गोष्टीसाठी दोन मुद्यांची चर्चा आली आहे. ज्या काळात देह सुटल्यावर, 1) मोक्ष आणि 2) पुनर्जन्माला प्राप्त झाल्यावर व्यक्ती पोहोचतो त्या काळाबाबत मी तुला सांगत आहे.

**स्पष्टीकरण**

इथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की मोक्षदशा प्राप्त होण्यासाठीसुध्दा विशिष्ट काळाची आवश्यकता असते की काय? देह असतानाच जर मोक्षलाभ झाला तर मग देहाच्या विलयाच्या वेळी विशिष्ट काळाची गरज उरायला नकोय. मोक्षासाठी जर विशिष्ट काळाची गरज वाटत असेल तर मग मोक्ष निरपेक्ष न होता सापेक्ष ठरेल. वाटेल तेवढी साधना केली असली तरी आणि जीवंतपणे मोक्षाचा लाभ पदरात पाडून घेतला असला तरी देह विलयानंतर गीतावर्णित काल किंवा समय आला नसल्यामुळे मोक्षलाभ होऊ शकणार नाही. मोक्षाचे असे स्थूल काळावर अवलंबून असणे काही बुध्दीला पटत नाही.

विनोबांनी आपल्या 'गीता चिंतनिका' या ग्रंथातून या श्लोकावर चिंतन प्रस्तुत करताना तीन गोष्टी सांगितल्या आहेत. एक म्हणजे कुठल्या काळात म्हणजे कुठल्या परिस्थितीत, कुठल्या मनोदशेत आणि साधनेच्या कुठल्या अवस्थेत, दुसरे म्हणजे साधक कर्म, ध्यान वगैरे साधनांचे आचरण करणारा असा प्रयत्नशील साधक ज्याला अजून आत्मदर्शन घडलेले नाही, तिसरे म्हणजे मरण समयी चित्त विचलित होण्यामुळे प्रपंचात फसल्यावरही साधकाचा विनाश होत नाही. हे मागे सहाव्या अध्यायातील चाळिसाव्या श्लोकाच्या निमित्ताने सांगितले गेले आहे. या श्लोकात साधक शब्द नाही. विनोबांनी गीताईत साधक शब्द जोडलेला आहे. त्यानुसार साधक शब्दाचा अर्थ सांगितला आहे.

लोकमान्य टिळकांचे निवेदन वेगळे आहे. ते म्हणतात की वेदकाळात जेव्हा ऋषी-मुनी किंवा जनतेची वस्ती उत्तर ध्रुवानिकट होती तेव्हा सहा महिन्यांचा दिवस आणि सहा महिन्यांची रात्र होती. त्या काळी स्वाभाविकपणेच दिवसालाच मरण येणे हे अधिक चांगले मानले जात होते. या गोष्टीला ध्यानी घेऊनच वेद आणि उपनिषदात दिवसा म्हणजे सहा महिन्याच्या काळात सूर्यप्रकाश असताना म्हणजे उत्तरायण काळात मरण आणि सहा महिन्यात रात्रीतून म्हणजे दक्षिणायन काळात मरण असे दोन प्रकार मानले जात होते. दहा हजार वर्षांपूर्वी लोकवस्ती उत्तर ध्रुवापाशीच होती. तिथे बर्फ वृष्टी झाल्यावर सारा प्रदेश हिममय झाला आणि मग सहाजिकच वस्ती तिथून हटली. काही लोक युरोपात गेलेत तर काही आशिया खंडात आलेत असे टिळकांनी आपल्या 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' या ग्रंथात लिहिले आहे. नॉर्वे देशाच्या उत्तर भागात तीन-तीन महिन्यांचा दिवस आणि रात्र असते. वेदात सूर्योपासनेवर खूप भर दिला गेलाय. या उपासनेचे खूप मंत्र आहेत.

रात्रंदिवस सूर्यप्रकाशाचाच लाभ होणे हे एक अद्भुत दर्शन आहे. ज्यावेळी महिन्यांची रात्र असते त्यावेळी एकदम तर घनघोर रात्र होत नाही, पण रात्रंदिवसाच्या मध्यातला संध्याकाळ मात्र येतो. तो एक वा दोन महिन्यांपर्यंतचा तर असेलच. या संधिकाळाला ऊषा देवता म्हणून संबोधिले गेले. वेदात ऊषेच्या उपासनेचीही खूप वर्णने येतात. निष्कर्षत: असे सांगता येईल की देहत्यागासाठी रात्रीऐवजी दिवसाची वेळ अधिक श्रेष्ठ मानली गेली होती. महाभारतात भीष्माचार्यांच्या मरणसमयीही असे सांगितले गेले की ते इच्छामरणी असल्यामुळे बाणांच्या शय्येवर पडल्या-पडल्या मरणासाठी उत्तरायणाची वाट बघत राहिले होते.

अशा प्रकारे प्राचीन काळी मरण काळाला खूप महत्व प्राप्त झाले होते. गीतेतही हे निरुपण आले आहे. गीतेतही असे विवेचन येते की ज्याकाळी मोक्षलाभाची म्हणजे अनावृत्तीची स्थिती येते आणि ज्या काळात आवृत्तीची स्थिती येते त्या काळाचे वर्णन वेगवेगळे आहे. यात ध्यानी घेण्यासारखा मुद्दा हा आहे की पुढल्या श्लोकात या वेळेची चर्चा न करता काही वेगळेच निरुपण आले. याचा अर्थ असा की काळ म्हणजे समय असा अर्थ न घेता साधकाची मनोदशा असा अर्थ घ्यायला हवा. याचा अर्थ असा की कुठल्या मनोदशेत मरण आल्यावर मोक्षलाभ होऊ शकेल आणि कुठली मनोदशा असताना पुनश्च प्रपंचात यावे लागेल ? इथे अनावृत्ती या शब्दाचा अर्थ मोक्ष असा घेतला तो ब्रह्मलोक असाही घेता येईल. याचे कारण असे की सगुणोपासकाच्या मनात सिध्दी, चमत्कार यांच्या संदर्भात जे आकर्षण किंवा आसक्ती राहून जाते त्यामुळे त्याला या देहात असताना मोक्षलाभ होऊ शकणार नाही पण तो इतक्या उच्चदशेला पोहोचतो की त्याला मोक्षलाभ होणार नाही आणि त्याला दुसरा देह धारण करावा लागेल असे म्हणणेही योग्य नाही यामुळे ब्रह्मलोकाची कल्पना करावी लागते. ब्रह्मलोकी गेल्यावर सगुणोपासक मुक्त होतो. त्याला मोक्षलाभ होतो.

: 24 :

***अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्।***
***तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अग्निः** अग्नी
- **ज्योतिः** ज्योतिर्मय म्हणजे सूर्य
- **अहः** दिवस
- **षण्मासाः उत्तरायणम्ः** सहा महिन्यांचा उत्तरायण काळ
- **शुक्लः** शुक्ल पक्ष
- **तत्र प्रयाताः** उपर्युक्त देवतांच्या मार्गात मृत होऊन गेलेले
- **ब्रह्मविदः जनाः** ब्रह्मवेत्ते ब्रह्मज्ञानी (अर्थात् परमेश्वराची उपासना करुन त्याला परोक्ष भावाने जाणणारे)
- **ब्रह्म गच्छन्तिः** ब्रह्माला प्राप्त होतात

**अर्थ**

ज्या मार्गात ज्योतिर्मय अग्नीची अभिमानी देवता आहे, दिवसाची अभिमानी देवता आहे, शुक्ल पक्षाची अभिमानी देवता आहे आणि उत्तरायणाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे, त्या मार्गात मेल्यावर गेलेले ब्रह्मज्ञानी योगी वरील देवतांकडून क्रमाने नेले जाऊन ब्रह्माला प्राप्त होतात.

***अग्नीनें दिन शुक्लार्ध उत्तरायण जोडुनी***
***जाय तो गांठतो ब्रह्म शेंवटीं ब्रह्म जाणुनी।***

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टी आल्या आहेत 1) अग्नीदेवता अथवा वैराग्य 2) सूर्य देवता अथवा विवेक जागरण 3) दिवसाची देवता अथवा यज्ञ कर्मे, सेवा कार्ये करत असताना, आजारी न होता 4) शुक्ल पक्षाची देवता अर्थात् भक्ती वाढायची स्थिती 5) सहा महिन्यांची उत्तरायण देवता अथवा वासना रहितता 6) उपर्युक्त देवतांच्या मार्गाने देह त्याग केल्यावर सगुण वा निर्गुण ब्रह्मज्ञानी ब्रह्म ला प्राप्त होतात.

**स्पष्टीकरण**

प्रस्तुत श्लोकाचे दोन अर्थ संभवतात. एक बाळकोबांनी केलेला आणि दुसरा विनोबांनी मांडलेला. आधी पहिला अर्थ बघु या ! निर्गुण ब्रह्मज्ञानी आणि सगुण ब्रह्मज्ञानी असे ब्रह्मज्ञानी पुरुषाचे दोन प्रकार होत. सगुणोपासनेच्या आश्रयाने ज्यांनी ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेतला त्यांना सगुणोपासक ब्रह्मज्ञानी असे म्हणतात तर निर्गुणोपासनेच्या आधारे ज्यांनी ब्रह्मतत्त्वाचा अनुभव प्राप्त करुन घेतलाय त्यांना निर्गुणोपासक ब्रह्मज्ञानी असे म्हणता येईल. या दोघात विशेष अंतर नसले तरी काही अंशी अंतर आहे. निर्गुण ब्रह्म ही अखेरची पायरी आहे. सगुण बह्माच्या उपासनेने काही सिध्दी वा चमत्कार यांचा लाभ होऊ शकतो. यात सगुणोपासक आसक्त होऊन जातो. त्या सिध्दींची आसक्ती दूर करण्यासाठी निर्गुण ब्रह्मोपासनेचा स्पर्श होणे गरजेचे आहे. निर्गुण ब्रह्मोपासनेत अहंकार शून्यतेची पराकाष्ठा साधली जाते. अहंकार थोडाही शिल्लक असेल तर ती निर्गुण ब्रह्मोपासनेची स्थिती मानता येत नाही. सगुणोपासना सुलभ आहे. निर्गुणोपासना अवघड आहे.

विनोबांनी सगुणोपासना आणि निर्गुणोपासनेचे मार्मिक विवेचन गीता प्रवचनातील बाराव्या अध्यायाच्या विवेचनात केले आहे. तसे पाहू गेल्यास निर्गुणोपासनेच्या तुलनेने सगुणोपासनेत अहंकाराला शून्य बनवायचे सामर्थ्य अधिक आहे पण सगुणोपासनेमुळे चमत्कार आणि सिध्दी दाखवण्याची जी शक्ती प्राप्त होते ती सगुणोपासकाच्या चित्तात थोडासा मोह आणि अहंकार निर्मिण्यासाठी कारणीभूत ठरते. यामुळेच शास्त्रकारांनी हे मांडले आहे की सगुणोपासकाला देह असताना मोक्षाचा लाभ होत नाही पण सगुणोपासक एवढ्या उच्चदशेला पोहोचलेला असतो की त्याना मोक्षासाठी दुसरा जन्म घ्यावा लागेल असे म्हणणे दोषकारक ठरावे. यामुळे शास्त्राचा निर्णय असा आहे की जे सगुणोपासक सिध्दींच्या मोहजाळात थोडे मोहित होऊन जातात त्यांना निर्गुण ब्रह्मतत्त्वाचा अनुभव मिळवण्यासाठी काही काळ ब्रह्मलोकी रहावे लागते. ब्रह्मलोकी काही काळ राहिल्यामुळे सिध्दींचा मोह क्षीण झाला म्हणजे ब्रह्मलोकातच ते मुक्त होऊन जातात. त्यांना पुनश्च जन्म नाही घ्यावा लागत.

देहत्याग झाल्यावर सगुणोपासकाला ब्रह्मलोकी जाण्याचा मार्ग दाखवण्यासाठी देवता उपस्थित असतात. या श्लोकात त्या देवतांचे वर्णन आले आहे. आधी येतात अग्नीदेव. दाह संस्कारानिमित्त संबंध हा अग्नीदेवाचा येतो मग ज्योती म्हणजे सूर्याची किरणे आणि मग सूर्याभिमानी देवतांचा क्रम येतो नंतर येते दिवसाची देवता. मरणकाळासाठी दिवसाचा समय अधिक श्रेष्ठ मानला जातो यामुळे दिवसाची देवता ब्रह्मलोक मार्गात रहाते. नंतर शुक्लपक्ष येतो. शुक्लपक्षातले मरण उत्तम मानले जाते. नंतर उत्तरायणाच्या सहा महिन्यांचा उल्लेख येतो. या सहा महिन्यात आकाश निरभ्र असते. वर्षाकाळ संपलेला असतो. थंडीची सुरुवात झालेली असते. 23 डिसेंबर ते 22 वा 23 जूनपर्यंतचा काळ हा उत्तरायणाचा काळ मानला जातो. उत्तरायणाच्या सहा महिन्यातले मरण उत्तम मानले जाते. अशा प्रकारे सगुणोपासक ब्रह्मज्ञान्याला ब्रह्मलोकीचा मार्ग दाखवण्यासाठी अग्नी, सूर्य, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायण अशा पाच देवता कार्यरत असतात. ब्रह्मलोकी गेल्यावर तो मुक्त होतो हा एक अर्थ झाला. दुसरा विनोबा निरुपित अर्थ.

या श्लोकात येणाऱ्या सहा गोष्टींपैकी एकेकाचा अर्थ समजून घेऊ या !

1) अग्नि. मुद्दा अंतिम समयीचा सुरु असल्यामुळे या शब्दाचा स्थूल अर्थ काही आपण घेणार नाहीहोत. अग्नी म्हणजे वैराग्य ! देहत्यागाच्या समयी सारे काही सोडून जायचा प्रसंग येतो त्यामुळे वृत्तीत शिथिलता येण्याचा संभव असल्यामुळे ईश्वराचे सतत स्मरण असावे, देहाच्या वेदनेचा कुठलाही प्रभाव चित्तावर नसावा, जवळपासचे नातलग किंवा मित्र परिवारातले स्वजन यांचे स्मरण मनी नसावे, जुन्या काळच्या आठवणींनी ईश्वर स्मरणात बाधा वा विक्षेप न पडावा हे बघणे खूपच आवश्यक आहे. अखंड नामस्मरण टिकते वा नाही हे चित्ताच्या ठायी वसलेल्या वैराग्य भावनेवरच अवलंबून असते. यामुळे हयातीत जेवढी वैराग्यभावना मनी अनुभवाला येते तेवढी मृत्युसमयी असायला हवी. यासाठी मृत्युसमयी अखंड वैराग्यवृत्ती टिकवून ठेवावी लागते.

2) ज्योति: ज्योती म्हणजे सूर्यप्रकाश होय. सूर्यप्रकाश म्हणजे आत्मा व अनात्मा यातील भेदाचे ज्ञान. हा एक प्रकारचा प्रकाशच आहे. अंध:कार म्हणजे अज्ञान वा

अविद्या आणि प्रकाश म्हणजे ज्ञान वा विद्या होय. मृत्यु समयी आत्मनिष्ठ बुध्दीला जागृत ठेवणे म्हणजे सूर्यप्रकाश होय.

3) अह: म्हणजे दिवस. आत्मा आणि देहाचा विवेक हे बुध्दीचेच कार्य आहे. सूर्यप्रकाश दिवसा असतो यामुळे सूर्यप्रकाश आणि दिवस असे वेगवेगळे अर्थ न घेता सूर्यप्रकाश म्हणजेच दिवस असा अर्थ मानून दोघांचा अर्थ एकच मानला गेला. विनोबांनी सूर्यप्रकाशाचा अर्थ आत्मा आणि अनात्म्याचा विवेक जागृत ठेवणे असा मानून दिवस या शब्दाचा अर्थ सेवा असा केला. यज्ञकर्म करत मरणाला प्राप्त होणे. विनोबांनी अग्नी शब्दाचा अर्थ यज्ञ कर्म, सेवा कार्य असाच घेतला आहे. बाळकोबांनी अग्नीचा अर्थ वैराग्य भावना आणि दिवस शब्दाचा अर्थ सेवाकार्य वा यज्ञ कर्म असा केला आहे. ज्ञानवंत हा नेहमीच सेवामय असतो. ज्ञानी स्वत:ला देहापासून भिन्न मानतो. संयमी असतो. त्याचा निद्रेवर पूर्ण ताबा असतो. तो देहाला एक यंत्र वा सेवेचे साधन मानून उपयोग करुन घेतो. यासाठी देहाला निरोगी ठेवतो.

गांधीजी अठ्ठ्याहत्तर वर्षे जगले आणि उत्तम तब्येत राखून सतत सेवा करत राहिले. त्यांचा निद्रेवर आश्चर्यकारक वाटेल असा ताबा होता. दिल्लीचा एक प्रसंग आहे. एकदा पंधरा मिनिटांनंतर त्यांची कुणा युरोपियन माणसाशी भेट होणार होती. गांधीजी म्हणाले की पंधरा मिनिटे झोपून घेतो. लगेच त्यांना डाराडूर झोप आली. बरोबर पंधरा मिनिटांनी ते उठले. ठरलेल्या वेळेवर मुलाखत सुरु झाली. गांधीजींना त्यांच्या निद्रेवरील अधिकाराबाबत विचारले असता ते म्हणाले की ज्या दिवशी त्यांचा निद्रेवर ताबा उरणार नाही त्या दिवशी त्यांचा देह गळून पडेल. अशाप्रकारे त्यांनी एवढी काही निस्पृहता साधली होती की देहाला सेवेचे साधन मानून त्याला निरोगी राखून ते अखंडपणे सेवेचे कार्य करत राहिले. त्यांचे म्हणणे होते की ज्ञान्याचा देह हा निरोगी अवस्थेतच पक्क फळासारखा गळून पडायला हवा. रोगासोबत येणाऱ्या मरणाला ते अलिप्त भावनेचे न्यून मानत होते. अलिप्त आणि संयमी जनांनी देहाला सेवेचे साधन मानून जगायला हवे. त्यासाठी आवश्यक त्या नियमांचे पालन करायला हवे. देहाला आजन्म निरोगी ठेवून पक्क फळाप्रमाणे योग्य वेळी विनासायास आपोआप गळून पडू द्यायला हवे. दिवसा कामांना सुरुवात होते. पाखरेही सकाळ होताच आपली किलबिल सुरु करतात. आपले काम सुरु करतात. रात्र होताच ते निर्व्यापार होतात. यामुळे अह: शब्दाचा अर्थ आहे सेवाकार्य. कुणाकडून सेवा घेण्याऐवजी आपण आमरण सेवा करत आयुष्य जगावे हे लक्ष्य नित्य समोर असावे.

4) शुक्ल: शुक्ल पक्षाचा सूक्ष्म अर्थ विशुध्द भावना वा परमात्म भक्ती होय. चंद्रम्याला मनाची देवता मानले गेलेय. मनाची विशुध्द भावना म्हणजे ईश्वर भक्ती होय. देहाच्या क्षीणतेच्या सोबतच ईश्वर भक्तीत वृध्दी होत जायला हवीय, असे करता आले तर आपण देहापासून अलिप्त झालोत असे मानायला हरकत नाही. आपला देहाशी आता काहीही संबंध उरला नाही अशी अवस्था मृत्युसमयी जागावी. परीक्षेच्या वेळी जशी विद्यार्थ्याची कसोटी लागते तशीच मृत्युसमयी जीवनाची कसोटी लागते. मृत्युसमयी आपण देहापासून कितपत अलिप्त राहू शकलो हीच साधनेची कसोटी असते. बुध्दीच्या ठायी आत्मा-अनात्म्याबाबतच्या विवेकाचे आणि मनात ईश्वर भक्ती धारा वा विशुध्द भावनेचे जागरण असले की मृत्युवर विजय संपादित करता येतो.

5) षण्मासा उत्तरायणम्: उत्तरायणाच्या सहा महिन्यात मृत्यु यायला हवा. याचा सूक्ष्म अर्थ असा आहे की मनात वासना-विकाराचे ढग नसावेत, मनरुपी आकाश निरभ्र असावे. निर्विकार, अनासक्त अशा स्थितीत मृत्यु यावा हे मोक्षाच्या दृष्टीने सोईचे आहे. अर्थात् मनात निर्विकार भाव नसेल आणि वासना विकारांचे थैमान मनात नांदत असेल तर मग उत्तरायणात मृत्यु आला तरी मोक्षलाभ नाही होऊ शकणार हे निश्चित. मृत्युसमयी नाना वासना आणि आसक्तीचे विषय मनात उपजू शकतात. वासना दबून चालणार नाहीत त्या क्षीण व्हायला हव्यात. यामुळे गीता सांगते की मृत्युसमयी मनाच्या नभात वासना-विकारांचे ढग नसावेत, मन स्वच्छ असावे.

6) तत्र प्रयाता: ब्रह्मविद: जना: ब्रह्म गच्छन्ति उपरोक्त पाच गोष्टी असताना जर मृत्यु आला तर सगुण ब्रह्मज्ञानी वा निर्गुण ब्रह्मज्ञानी ब्रह्म तत्त्वाला प्राप्त होतो. याचा अर्थ असा की जीवनातही या पाच गोष्टींची आवश्यकता आहे. वैराग्य, आत्मानात्म विवेक, अखंड सेवाकार्य, ईश्वर भक्ती आणि वासनारहित अवस्था.

: 25 :

***धूमो रात्रिस्तथा कृष्ण: षण्मासा दक्षिणायनम् ।***
***तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धूम:** अंध:कार
- **रात्रि:** रात्र
- **तथा कृष्ण:** तसेच कृष्ण पक्ष
- **षण्मासा: दक्षिणायनं:** दक्षिणायनाचे सहा महिने
- **तत्र (प्रयात:) योगी:** अशा स्थितीत ज्या योग्याला मरण येते, तो
- **चान्द्रमसं ज्योति:** चंद्रलोकाच्या ज्योतीला प्राप्त होऊन (स्वर्गात आपल्या शुभ कर्मांचे फळ भोगून)
- **प्राप्य निवर्तते:** प्राप्त होऊन परत येतो

**अर्थ**

ज्या मार्गात धुराची अभिमानी देवता आहे, रात्रीची अभिमानी देवता आहे, कृष्णपक्षाची अभिमानी देवता आहे आणि दक्षिणायनाच्या सहा महिन्यांची अभिमानी देवता आहे, त्या मार्गात मेल्यावर गेलेला सकाम कर्म करणारा योगी वरील देवतांकडून नेला जातो. पुढे तो चंद्रतेजाला प्राप्त होऊन स्वर्गात आपल्या शुभकर्मांची फळे भोगून परत येतो.

***धूमानें रात्र कृष्णार्थ दक्षिणायन जोडुनी***
***जाय तो परते येथ चंद्र-लोकास पावुनी ।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत 1) धूम म्हणजे वैराग्याचा अभाव. 2) रात्र म्हणजे देह आणि आत्म्यातील अभेद. 3) कृष्णपक्ष म्हणजे परमात्म भक्तीचा अभाव. 4) दक्षिणायन म्हणजे आसक्तीच्या ढगांनी घेरले जाणे. 5) अशा स्थितीत मरणानंतर कर्मठ योगी चंद्रलोकाच्या ज्योतीतत्त्वाला म्हणजे प्रकाशमय स्थानाला प्राप्त होऊन जगात परत येतो

**स्पष्टीकरण**

मागील श्लोकातून ब्रह्मलोकीच्या स्थितीचे वर्णन आले आहे. या श्लोकातून त्याहून भिन्न स्थितीचे वर्णन केले गेले आहे. ज्या साधक, मुमुक्षु वा कर्मठ योग्याची सगुण ब्रह्मतत्त्वाची उपासना अधुरी राहून जाते आणि परिणामी कर्मफळात तृष्णा शिल्लक उरते अशाना चंद्रलोकी निवास करावा लागतो. चंद्रलोकात काही काळ निवास केल्यावर मग ते संसारचक्रात पुनरपि येतात असे शास्त्रकारांचे मत आहे. चंद्रलोकातही योगभ्रष्ट पुरुष काही आपोआप जात नसतो. या मार्गाचे जाणकार देवता त्याला या मार्गाप्रत नेत असतात. ब्रह्मलोकी नेणारे देवता पाच तर चंद्रलोकी नेणारे देवता चार होत. चंद्र प्रत्यक्षपणे प्रत्यक्ष दिसतो. स्वर्गलोक वा अंतरिक्षलोक तर प्रत्यक्षपणे दिसत नाहीत पण ही काही अशास्त्रीय मांडणी नाही कारण की साधनेच्या न्यूनाधिक उत्कटतेच्या अनुभवाधारेच या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत, या कल्पना प्रकटल्या आहेत. तात्पर्यार्थ हा की वेगवेगळ्या लोकांमध्ये जायचे जर टाळावयाचे असेल तर मग उत्कट साधना करायला हवी. यामुळे इथेच मर्त्यलोकात सदेह ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होईल आणि जन्म-मरणरुपी संसार चक्रातून सुटका होऊन मोक्षलाभ होऊ शकेल. अशा प्रकारे सगुणोपासक कर्मठ योगी आपल्या अधुऱ्या साधनेमुळे चार देवतांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रलोकी जातो आणि तिथून त्याला परतावे लागते. हा झाला एक अर्थ !आता दुसऱ्या अर्थाचा विचार करु या!

1) धूम: धूम म्हणजे धूर किंवा अंध:कार! अग्नीच्या अगदी विरोधातला हा अनुभव. मरणसमयी जर मनात वैराग्य भावनेचा अभावरुपी अंध:कार दाटून येत असेल तर मग अंतसमयी दु:खातिरेकाचा अनुभव येईलच ना ! अंध:कार म्हणजे आसक्ती, मोह वा अज्ञान होय. अशा वेळी मरणाचे भयही मनात दाटून येईल. नाना प्रकारचे मोहमय विकार आणि ममतेचे संकल्प जागतील आणि कुठल्याही प्रकारे शांततेचा अनुभव घेता येणार नाही.

2) रात्रि: रात्र. रात्र म्हणजे दिवसाच्या विपरित अनुभव होय. रात्र म्हणजे सूर्य आणि दिवसाचा अभाव. इथे केवळ रात्री शब्दाचा उपयोग केला गेला. या एका शब्दात पूर्व श्लोकात वर्णित दोन्ही रुपांचा अभाव आहे. मरण समयी देह आणि आत्मतत्त्व यात अंतराचा बोध न होणे आणि सेवा न करता उलटपक्षी सेवा घेत-घेत मरणाला सामोरे जाणे होते. आत्म-अनात्म तत्त्वाचा विवेक राखला गेला नसेल आणि सेवाकार्य न बजावताच मरण आले असेल तर मग मरणसमयी कमालीचे दु:ख अनुभवायला लागते. संसार चक्रात गुरफटून रहावे लागते. तसे पाहू गेल्यास

आत्म ज्ञानाचा बाह्य अशा शारीरिक रोगांशी संबंध न्यून असेल तरी पण मरणसमयी देह निरोगी ठेवून सेवा न घेता सेवा करत-करत मरणाला वरावे ही कल्पना साधक आणि मुमुक्षुंसाठी कल्याणकारी आहे. हे आत्मज्ञानाचे समर्थ लक्षण मानले जायला हवे. अशा उच्च कल्पनेमुळे साधनेत लाभ होतो. अर्थात् मरणसमयी देह रोगजर्जर झाल्यामुळे जर देहाला सेवा घ्यावी लागत असेल आणि साधकाला आत्म-अनात्म विवेकाचा अनुभव असेल, परमात्म भक्ती असेल, वासना मुक्ती नांदत असेल, वैराग्य भाव प्रबळ असेल तर सेवा घ्यावी लागण्याच्या एवढ्याशा कारणासाठी काही त्या साधकाच्या मोक्ष प्राप्तीत अडथळा येतो असे नाही.

3) कृष्ण: कृष्ण पक्षात चंद्रमा क्षय पावत असतो. अंधार वाढता असतो. अर्थात् मरणसमय नजिक येतो तसतशी ईश्वर भक्ती क्षीण होत जाते, मानसिक दुर्बळता वाढत जाते. आरंभी काही काळ स्थिती चांगली असते नाही असे नाही पण उत्तरोत्तर मरणाच्या वेदनेने मन दुबळे होऊ लागते आणि देहापासून विलग होण्याची शक्यता मावळत जात देहसंलग्नता वाढीस लागते. देहाशी एकरुपता वाढते. देहापासून वेगळेपणाचे भान जर जागले नाही आणि ईश्वर स्मरणाशिवायच जर मरण प्राप्त झाले तर मग मरणाची वेळ कृष्णपक्षाची होती असे जाणावे.

4) षण्मासा: दक्षिणायनम् दक्षिणायनाचे सहा महिने. 22 जून ते 23 डिसेंबरचा सहा महिन्यांचा काळ हा दक्षिणायनाचा काळ जाणावा. या काळात आकाश अभ्राच्छादित दिसते. चार महिने तर वर्षाकाळ असतो. उर्वरित काळात पाऊस तर नसतो पण अधुन मधून पाऊस पडत असल्यामुळे आकाश अभ्राच्छादित असते. मनावर आसक्तीचे अभ्र आच्छादित असणे हा दक्षिणायनाचा काळ होय.

संपूर्ण आयुष्यभर साधना केली असेल आणि मरणसमयी जर स्थिती चांगली नसेल तर पुनर्जन्म टळू शकत नाही. पुनर्जन्म टाळण्यासाठी मरण समयीची स्थिती ही उच्च हवीय, सिध्द दशा हवीय. या श्लोकात वर्णित अशी स्थिती राहिली म्हणजे जीवनात काही साधना घडली असेल तर लगेचच पुनर्जन्म मिळण्याऐवजी काही काळ चंद्रलोकी निवास करावा लागतो. ही चर्चा पुढल्या श्लोकातून मांडली गेली आहे.

5) तत्र (प्रयात:) योगी चांद्रमसं ज्योति: प्राप्य निवर्तते: उपरोक्त ज्या कर्मठ योग्याचा मृत्यु होतो तो चंद्रलोकी जाऊन जगात परततो. मागल्या श्लोकात ‘ब्रह्मज्ञानी’ शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. या श्लोकात शब्द आला ‘योगी’. इथे योगी शब्दाचा अर्थ कर्मठ योगी असा आहे. प्राचीन काळी यज्ञकर्मावर खूप भर दिला गेला होता. गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ जीवनात अग्निहोत्र वगैरे साधनेमुळे रोज अग्नीची उपासना म्हणजे यज्ञ करावा लागत होता. उजाडल्यापासून सूर्य अस्ताला जाईपर्यंत तपश्चर्येचे जीवन जगावे लागत होते.

वानप्रस्थ जीवनाचा अर्थ आहे ब्रह्मचर्याचे पालन. प्रापंचिक उपाधिंपासून मनाला वाचवून ईश्वराच्या ठायी लावण्याचे प्रयत्न करावे लागत होते. प्रपंचातून मन काढून घेण्याचा अर्थ आहे अनासक्ती आणि वैराग्याचा अभ्यास. अशा प्रकारे वानप्रस्थ जीवन एक प्रकारे योग्याचेच जीवन होते पण या वानप्रस्थ जीवनात नाना प्रकारचे यज्ञ करावे लागत असल्यामुळे या जीवनाला कर्मठ म्हटले आहे. कर्मठ योगी या शब्द प्रयोगामुळे दुहेरी अर्थ घटन होते. साधना अधुरी राहिल्यामुळे अशा योग्याला चंद्रलोकी निवास करावा लागतो. नंतर साधना पूर्ण झाल्यावर याच देहात वा ब्रह्मलोकी जाऊन तिथे मोक्षाचा अनुभव घेऊन असे पुरुष मुक्त होतात. गीता या ठिकाणी निवेदन करते आहे की चंद्रलोकी काही काळ राहून कर्मठ योग्याला धरणीवर यावे लागते.

: 26 :

*शुक्लकृष्णे गती ह्येते जगत: शाश्वते मते।*
*एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुन: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जगत: एते:** जगातील हे दोन प्रकारचे
- **शुक्लकृष्णे:** शुक्ल आणि कृष्ण म्हणजे देवयान आणि पितृयान म्हणजे प्रकाशमय आणि अंध:कारमय
- **गती:** (दोन) मार्ग
- **शाश्वते:** सनातन म्हणजे अनादी काळापासून चालत आलेले

- **मते:** मानले गेले आहेत (त्यापैकी)
- **एकया अनावृत्तिं:** एकाने मोक्षाला प्राप्त होतो
- **अन्यया पुन: आवर्तते:** दुसऱ्या मार्गाने गेलेला परत येतो अर्थात् जन्म मरणाला पावतो

**अर्थ**

कारण जगाचे हे दोन प्रकारचे शुक्ल आणि कृष्ण असे अर्थात् देवयान आणि पितृयान मार्ग सनातन मानले गेले आहेत. यातील ज्या मार्गाने गेले असता परत यावे लागत नाही, अशा मार्गाने गेलेला त्या परम गतीला प्राप्त होतो आणि दुसऱ्या मार्गाने गेलेला पुन्हा परत येतो म्हणजे जन्म मरणाला पावतो.

***उजेड आणि अंधार दोन्ही मार्ग अनादि हे***
***सुटका करितो एक एक फेऱ्यांत टाकितो।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे 1) जगात हे प्रकाशमय म्हणजे ज्ञानरुप आणि अंध:कारमय म्हणजे अज्ञानरुप असे दोन मार्ग अनादिकाळापासून चालत आलेले आहेत. 2) एकाने मोक्ष प्राप्ती होते. 3) दुसऱ्याने प्रपंचात परत यावे लागते.

**स्पष्टीकरण**

1) जगत: एते शुक्लकृष्णे गती शाश्वते मते: आधीच्या दोन श्लोकांमधून ज्या दोन मार्गांची चर्चा आली आहे ते मार्ग अनादिकाळापासून अप्रतिहतपणे सुरुच आहेत. या दोन मार्गांची दोन नावेही दिली गेली आहेत. एकाचे नाव शुक्ल दुसऱ्याचे नाव कृष्ण होय. पहिला ज्ञानमार्ग असून दुसरा अज्ञान मार्ग आहे.

ब्रह्मसूत्र शांकरभाष्यातून ब्रह्मलोकीचे वर्णन मोठ्या काव्यात्म शैलीत केले गेले आहे. याचे स्पष्टीकरण बाळकोबांनी आपल्या ब्रह्मसूत्र शांकरभाष्याच्या अनुवादातून केले आहे. सदर ग्रंथ परंधाम प्रकाशनाने छापला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे मांडता येईल. सगुणोपासक साधक वर्तमान देहातून मुक्त झाल्यावर दुसरा देह धारण न करता ब्रह्मलोकी जातो आणि तिथे निर्गुण ब्रह्मतत्त्वाची ओळख झाल्यावर मग संकल्परहित स्थितीचा अनुभव घेऊन मोक्षाला प्राप्त होतो. सगुणोपासनेने प्राप्त झालेल्या ऐश्वर्याच्या ठायी संकल्पाचे बळ असते. संकल्पाचे बळ जागते खरे पण यामुळे चित्ताच्या ठायी सहजपणे एक प्रकारची आसक्ती जागते परिणामी खूप उच्च स्थिती प्राप्त करुन घेतल्यावरसुध्दा निर्गुण ब्रह्मतत्त्वाचा अनुभव घेता येत नाही. निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या परिचयामुळेच ऐश्वर्याची आसक्ती मिटवता येते. सगुण ब्रह्मज्ञान्याची स्थिती इतकी उच्च असते की निर्गुण ब्रह्मतत्त्वाचा अनुभव घेण्यासाठी त्याला दुसरा देह धारण करावा लागेल अशी कल्पनासुध्दा आपण करु शकत नाही पण निर्गुण ब्रह्मतत्त्वाचा अनुभव घेतल्याशिवाय चमत्कार दाखवण्याचा संकल्प क्षीण होत नाही. ऐश्वर्याचे भान वा आसक्ती देखिल क्षीण होत नाही. एकूणच भेदद्दष्टी क्षीण होत नाही. भेद संपत नाही. यामुळेच या स्थितीला प्राप्त होण्यासाठी शास्त्रकारांनी ब्रह्मलोकीची कल्पना केली आहे. वर्तमान देह सुटल्यावर ब्रह्मलोकी गेल्यावर निर्गुण ब्रह्मतत्त्वाच्या ज्ञानामुळे संकल्प मावळतो आणि ऐश्वर्याचे भान वा आसक्ती देखिल क्षीण होते. द्वैत बुध्दी नष्ट होते. आपलेपणाचे भान उरत नाही. अशा स्थितीत सगुणोपासक ब्रह्मज्ञानी मोक्षलाभ करुन घेऊ शकतो.

पुढे आचार्यांनी ब्रह्मलोकाच्या मार्गाचे वर्णन केले आहे. देहत्याग केल्यावर ब्रह्मज्ञानी पुरुष ज्या मार्गाने ब्रह्मलोकी जायला निघतो त्या मार्गाला देवयान मार्ग, उत्तरायण मार्ग अथवा अर्चिरादि मार्ग म्हणून ओळखले जाते. मार्गाचा आरंभ नाडीपासून होतो. कठोपनिषद म्हणते :

***शतं चैका हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनि:सृतैका ।***
***तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विश्वङ्ङन्या***
***उत्क्रमणे भवन्ति॥ (2/3/16)***

अर्थात् हृदयापासून निघालेल्या एकशे एक नाड्यांपैकी एक नाडी ही मस्तकापासून निघाली आहे. या नाडीपासून वर गेल्यावर ब्रह्मलोकात पोहोचता येते. मस्तकातून निघालेल्या नाडीशिवायच्या शंभर नाड्यांच्या माध्यमातून जो देह सुटल्यावर मार्गक्रमण करतो तो वारंवार प्रपंचात येतो.

अशा प्रकारे ब्रह्मलोकाच्या मार्गाचा प्रारंभ हा नाडीपासून होतो. हृदयात एकशे एक नाड्या आहेत. त्यातली एक हृदयापासून निघून मस्तकात ब्रह्मरंध्रापर्यंत पोहोचते. सगुण ब्रह्मज्ञानी हा ब्रह्मरंध्राहून निघून देह सोडतो. सूर्य खूप उंचीवर आहे. त्याचे किरण धरेवर पसरतात. तो

ब्रह्मज्ञानी देह सुटल्यावर मस्तकाच्या नाडीतून निघून सूर्य किरणांच्या सहाय्याने वर वर जातो. तिसरा शब्द आहे अर्चि. अर्चि म्हणजे प्रकाश. प्रकाश म्हणजे दिवस आणि दिवस म्हणजे सूर्य होय. सूर्य देवता आपल्या किरणांसोबत सगुणोपासकाला ब्रह्मलोकी घेऊन जातो. कुठे आहे हा ब्रह्मलोक? आपण जिथे रहातो हा आहे भूलोक. त्याच्या वर आहे अंतरिक्षलोक, त्याच्या वर आहे द्युलोक आणि सर्वात वर आहे ब्रह्मलोक.

ब्रह्मलोक कसा आहे त्याचे वर्णन गीता करते. ब्रह्मलोकात 'अर' आणि 'ण्य' असे दोन सागर आहेत. या दोन्ही सागरात आहे अमृत जणू काही हे अमृताचेच सागर आहेत. तिथे 'ऐरंमदीय' नावाचे एक सरोवर आहे. हे सरोवर अन्नाने भरलेले आहे. ऐर म्हणजे अन्न आणि मदीय म्हणजे मद वा शक्ती उत्पन्न करणारा. तिथे सोमरसाचा वर्षाव करणारा एक वृक्ष असून त्याचे नाव अश्वत्थ आहे. सोमरसाच्या पानामुळे माणूस कधीही आजारी पडत नाही आणि पडला तरी लवकर बरा होतो. सोमरसामुळे कुंडलिनीही जागृत होते. या ब्रह्मलोकात 'अपराजिता' नावाची एक नगरी आहे. त्या नगरीत निवास करणाऱ्या सगुणब्रह्मोपासकाला षड्रिपु पराजित करु शकत नाहीत. अपराजिता नगरीत ईश्वर निर्मित एक सोन्याचे घर आहे. सोन्याचे घर म्हणजे अमूल्य वस्तु होय. अशा अमूल्य वस्तुच्या नित्य संपर्कामुळे सगुणब्रह्मोपासकाला ईश्वराच्या निर्गुण रुपाचे ज्ञान होते. सर्व संकल्पांपासून मुक्त झाल्यावर त्याला तिथेच मोक्षलाभ होतो. सगुणब्रह्मोपासक या ब्रह्मलोकाला प्राप्त झाल्यावर कर्म फळांचा उपयोग करुन चंद्रलोकाप्रमाणे ब्रह्मलोकातून मृत्युलोकी परत येत नाही.

2) एकया याति अनावृत्तिम्: एकाने म्हणजे ज्ञानमार्गामुळे मोक्ष लाभ होतो. पुनश्च प्रपंचात यावे लागत नाही. अंतिम समयी चित्ताच्या ठायी दृढ वैराग्य भावना असेल, आत्मानात्म विवेक जागलेला असेल, जनसेवेचे व्रत अखंड असेल, कुठल्याही प्रकारची आसक्ती उरली नसेल आणि अविरत ईश्वरभक्ती जारी असेल तर देह त्याग झाल्यावर मोक्षलाभ होतो.

3) अन्यया पुन: आवर्तते: दुसरा मार्ग अज्ञानाचा आहे. यात अंतसमयी वैराग्य भावना क्षीण होते, आत्मानात्म विवेक उरत नाही, ईश्वरभक्तीचा विचार क्षीण होऊन जातो, सेवा घ्यावी लागत असते याचा अर्थ असा की शारीरिक आणि आत्मिक शक्ती क्षीण होऊन आसक्ती जागते. अशा स्थितीत मोक्ष लाभ होऊ शकत नाही पण प्रयत्नशील साधकाला काही काळ चंद्रलोकी निवास करता येतो. चंद्रलोकात शारीरिक वा मानसिक वेदना भोगायला लागत नाहीत. स्वर्गलोक आणि चंद्रलोकात शास्त्रकारांनी थोडा भेद केला आहे. स्वर्गलोकात तर भोगच भोग भोगायला मिळतात. चंद्रलोकात तसे ते भोगता येत नाहीत मात्र मानसिक शांततेचा लाभ होतो. तिथे सुखाची अवस्था अवश्यमेव असते पण ते सुख मानसिकच असते. यात आध्यात्मिक विकासाचा अनुभव घेता येतो. चंद्रलोकात काहीशी आध्यात्मिक प्रगती होतेच पण चंद्रलोकात काही काळ राहून परतावे लागते. कर्मठ असल्यावर देखिल योगमार्गाचा साधक असल्यामुळे प्रत्येक जन्मी त्याची काही एक प्रगती होत जाते आणि अंतत: तो मोक्षाला पावतो. मुक्त होतो.

: 27 :

*नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन ।*
*तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **एते सृती:** या दोन्ही मार्गांना
- **जानन्: तत्वत:** जाणणारा
- **कश्चन योगी:** कोणीही योगी
- **न मुह्यति:** मोहित होत नाही (म्हणजे तो निष्काम भावनेनेच साधना करतो कामनांच्या म्हणजे फलेच्छांच्या जाळ्यात फसत नाही)
- **तस्मात् अर्जुन:** म्हणून हे अर्जुना (तू)
- **सर्वेषु कालेषु:** सर्व काळी
- **योगयुक्त:** समत्व बुध्दीरुपी योगाने युक्त
- **भव:** होऊन जा (अर्थात् माझ्या प्राप्तीसाठी निरंतर साधना करणारा हो.)

**अर्थ**

हे पार्था, अशा रीतीने या दोन मार्गाना तत्त्वत: जाणल्यावर कोणीही योगी मोह पावत नाही. म्हणून हे

अर्जुना, तू सर्व काळी समबुध्दीरुप योगाने युक्त होऊन अर्थात् नेहमी माझ्या प्राप्तीसाठी साधना करणारा हो.

***असे हे मार्ग जाणूनि योगी मोह न पावतो***
***म्हणूनि सर्वदा राहें योगानें जोडिला चि तूं ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे 1) या दोन मार्गाना जाणणारा योगी मोहित होत नाही 2) यामुळे हे अर्जुना, सर्वदा योगाने युक्त होऊन जा.

**स्पष्टीकरण**

1) एते सृती जानन् योगी न मुह्यति: या दोन मार्गांना जाणणारा योगी मोहित होत नाही याचा अर्थ काय समजावा? मोहित होत नाही याचा अर्थ असा की तो आसक्त होत नाही. शंकराचार्यांनी पाचव्या अध्यायाच्या दहाव्या श्लोकाच्या भाष्यात म्हटले आहे की मोक्षेऽपि फले संगं त्यक्त्वा । म्हणजे मोक्षफळाची आसक्तीदेखिल त्यजून केवळ मोक्षाच्या साधनेतच असायला हवे. मोक्षप्राप्ती हा अंतिम उद्देश्य आहे. साधक वा मुमुक्षुच्या नजरेसमोर हे ध्येय तर अवश्य असायला हवे पण मोक्षाचे फळ केव्हा मिळेल या बाबत चिंता किंवा आसक्ती मात्र नको. अहंकार शून्य बनायचे ध्येय असेल ना तर मग मोक्षाचा देखिल मोह होणार नाही. अहंला शून्य बनवायचे ध्येय असायला हवे. यात जेवढे यश मिळेल तेवढा मोक्षमार्ग सुलभ होत जाईल. मोक्षाचा अनुभव येत जाईल. अहंभाव कायम राखून जर कुणी मोक्षाराधना करत असेल किंवा समाधी प्राप्त करायचा प्रयत्न करत असेल तर आपण शून्य न बनता कायम उरतो. मोक्ष तर आपल्याच ठायी वसतो पण त्याचा अनुभव घेण्यात आपला अहंकार, काम, क्रोध हे विकार अडसर बनतात. या बाधांना हटवण्यासाठीच तर सारी साधना करायची असते.

यामुळे योगी पुरुष ब्रह्मलोक वा चंद्रलोकाच्या मार्गात अडकून पडत नाहीत. ब्रह्मलोकाच्या मार्गात आरंभी सगुणोपासना आहे. यात सिध्दींचा लाभ होतो. त्याबाबत मनात आसक्ती जागते. मोह उपजतो. या स्थितीमुळे साधक सिध्दींच्या जाळ्यात गुरफटून जातो. चंद्रलोकाचा मार्ग तर पुन:पुन्हा प्रपंचात येण्याचा मार्ग आहे. हे सारे योग्य पध्दतीने जाणत असल्यामुळे साधक या मार्गांपासून अलिप्त राहून योगी बनायचा प्रयत्न करतात.

2) तस्मात् सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन: गीता सांगते की या दोन्ही मार्गांचा परिचय झाला असल्यामुळे योगी जन यापैकी कुठल्याही मार्गात अडकून पडत नाहीत. यासाठी अर्जुनाने नित्य योगयुक्त रहावे हा गीतेचा उपदेश आहे. आपले जीवन ध्येय हे योगी बनायचेच असायला हवे असे गीतेचे म्हणणे आहे. योगी म्हणजे चित्तवान, फलाशेचा त्याग करणारा, फळ निरपेक्षभाव बाळगणारा, आत्मदर्शन वा हरी दर्शनाच्या साधनेत तन्मय झालेला साधक होय. यामुळे ज्याच्या चित्ताच्या ठायी ममता वा अहंभाव नसतो, षड्रिपु नसतात असा साधक.

मोक्षाच्या समस्त साधनांचा विचार करु जाता सर्वश्रेष्ठ असे साधन म्हणजे फळनिरपेक्ष अशा साधनेतली तन्मयता होय. याच्याच प्राप्तीसाठी गीतेने अर्जुनाचे निमित्त साधून सर्वांना उपदेश दिला आहे. अंतिम स्थिती ही परिपूर्ण अहंकारशून्य अशी दशा आहे. या दशेच्या प्राप्तीसाठी सर्वात उत्तम आणि सोपा उपाय आहे ईश्वरशरणागती आणि ईश्वरभक्ती. केंद्रस्थानी आहे भक्तीचा विचार. त्याच्या आसपास मग वैराग्य, फलासक्तीरहित कर्मयोग आहे, सत्वगुणांच्या उत्कर्षाची अवस्था आहे, दैवीगुणांच्या उत्कर्षाची स्थिती आहे, आत्मानात्म विवेकाची साधना आहे यातून परिपूर्ण शून्यावस्था साधता येईल. योगावस्था साधता येईल. याबाबतचे अधिक विवेचन पुढील श्लोकात येते.



*Sarvodaya Patra*

: 28 :

*वेदेषु यज्ञेषु तप:सु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् । अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा  योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगी इदं विदित्वा:** योगी पुरुष या रहस्याला तत्त्वत: जाणून
- **वेदेषु यज्ञेषु:** वेदाध्ययन आणि यज्ञाच्या अनुष्ठानात
- **तप:सु च दानेषु  एव:**  तप आणि दान वगैरे करण्यात
- **यत्पुण्यफलं प्रदिष्टम्:** जे काही पुण्यफळ सांगितले आहे
- **तत् सर्वं:** ते सारे
- **अत्येति:** उल्लंघन करुन जातो
- **च आद्यं परं स्थानं उपैति:** आणि मूळस्थान ब्रह्म वा सनातन परम पदाला पावतो

**अर्थ**

योगी पुरुष या रहस्याला तत्त्वत: जाणून, वेदांचे पठण, यज्ञ, तप, दान वगैरे करण्याचे जे पुण्यफळ सांगितलेले आहे, त्या सर्वांना नि:संशयपणे ओलांडून जातो आणि सनातन परम पदाला पोहोचतो.

***यज्ञांत दानांत तपांत तैसें जे बोलिलें अध्ययनांत पुण्य***
***तें लंघितो सर्व चि जाणुनी हें***
***योगी चढे आद्य पदास थोर ।***

**विषय:** या श्लोकात सात गोष्टींची चर्चा आली आहे 1) फळनिरपेक्ष मोक्षाची साधना करणारा योगी या पूर्वी सांगितलेल्या गोष्टी जाणून 2) वेदाध्ययनाचे पुण्यफळ 3) यज्ञाचे पुण्यफळ 4) तपाचे पुण्यफळ 5) दानाचे पुण्यफळ 6) या सर्वांना योगसाधनेने उल्लंघन करुन जातो. 7) आणि मूळकारण ब्रह्माला प्राप्त होतो

**स्पष्टीकरण**

1) या अध्यायाच्या आरंभी अर्जुनाने सात प्रश्न उपस्थित केले आहेत. ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ म्हणजे काय? आणि अंतिम समयी ईश्वराला कसे प्राप्त करुन घेता येईल असे हे सात प्रश्न आहेत. या प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे अशी आहेत की 1) निर्गुण, 2)  सगुण, 3) सक्रिय, 4) साकार, 5) साहंकार, 6)  निरहंकार आणि 7) देहपात होताच मोक्ष म्हणजे ब्रह्मरुपता. (विस्तृत विवरणासाठी याच अध्यायातील 3 ते 7 श्लोकांचे विवेचन बघावे.)

फळ निरपेक्ष प्रकारे मोक्षाची साधना करणारा योगी या तमाम गोष्टींची चांगल्या प्रकारे परिचित होऊन आत्मिक विकास साधून घेतो.

**2) वेदेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्:** वेदात म्हणजे वेदाच्या अध्ययनात पुण्यफळ वर्णिले आहे. ईश्वराला जाणून घेण्याचे विविध मार्ग निरुपित करुन अखेरीस सांगण्यात आले आहे की उपरोक्त सात प्रश्नांची उत्तरे जाणणारा म्हणजे अनुभवी पुरुष या सर्व साधनांना पार करतो म्हणजे लंघून जातो आणि फळांना जाणून घेतो. साधक ईश्वर भक्तिमुळे जेव्हा आपल्या शून्यतेचा परिचय करुन घेऊन शून्य अवस्थेचा अखंड अनुभव प्राप्त करतो तेव्हा वेदाध्ययनातून लाभणाऱ्या शून्यतेच्या फळाला प्राप्त करुन घेतो. वेदाच्या अध्ययनाचे मोल आहे. वेद याचा अर्थ काही केवळ वेद ग्रंथ नसून गीता, ब्रह्मसूत्र, ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत या सारखे धार्मिक ग्रंथ होत. ईश्वरी तत्त्वाला जाणून घेण्यासाठी अखंड अध्ययनाची नितांत आवश्यकता असते. उपनिषद म्हणते की 'स्वाध्यायान् मा प्रमद:' स्वाध्याय करण्यात चुकू नकोस. आरंभिक काळात बारा वर्षांपर्यंत गुरुगृही निवास केल्यावर स्नातकाला उपदेश करताना गुरु म्हणत असत की स्वाध्याय करण्यात चुकू नकोस. स्वाध्यायाभ्यसनं चेव वाङ्मयं तप उच्यते। (17/15) नित्य स्वाध्याय हे वाणीचे तप आहे.

**3) यज्ञेषु यत्फलं प्रदिष्टम्:** यज्ञ म्हणजे यज्ञरुपी कर्म म्हणजे संपूर्ण सृष्टीचे ज्यामुळे कल्याण होईल ते कर्म करण्याचे जे फळ वर्णिले आहे योगीजन त्यालाही उत्क्रांत करुन जातात. तुलसीदासजी लिहितात :

***परहित बस जिन्हके मन माहीं ।***
***तिन्हकहँ जग दुरलभ कछु नाहीं ॥***

अर्थात् 'जे दुसऱ्याच्या कल्याणात निरत असतात त्यांना या जगी दुर्लभ असे काहीही नाही.' यातून देहासक्ती क्षीण करण्याकामी खूप सहाय्य लाभते. चित्त ऊर्ध्वगामी होते. एकाग्रता वाढीस लागून ब्रह्मचर्य पालन सहज साधले

जाते. हे सारे चित्तवृत्तीचा प्रवाह ईश्वराकडे प्रवहमान झाल्यामुळे होते. तिसऱ्या अध्यायाच्या दहा ते सोळा या श्लोकांच्या चर्चेत यज्ञासंबंधीचे हे सारे विस्ताराने आले आहे. नित्य स्वाध्यायाप्रमाणेच नित्य यज्ञ कर्म देखिल आवश्यक आहे.

4) **तपःसु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्:** तपाचरणामुळे लाभणाऱ्या पुण्यफळालाही योगी जन उत्क्रांत करुन जातात. सतराव्या अध्यायात तीन प्रकारच्या तपांचे वर्णन आले आहे. उपनिषदाच्या अनुषंगानेच या श्लोकातून यज्ञ, दान, तप आणि स्वाध्याय यांचा उल्लेख आलाय. उपनिषद म्हणते :

***तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति***
***यज्ञेन दानेन तपसा अनाशकेन ।***

अर्थात् ब्राह्मण म्हणजे साधक वा मुमुक्षु ईश्वराला वेदाध्ययन आणि दान तथा देह आणि मनाला दुर्बळ, क्षीण न करणाऱ्या तपाचरणाच्या माध्यमातून जाणून घेण्याचा प्रयत्न करतो.

उपरोक्त वचनात तपाचरणासोबत 'अनाशक' असे एक विशेषण योजिले आहे. देह, मन आणि इंद्रिय व्यापार या तिघांना अतिक्षीण न करणारे तपाचरण हवे. सतराव्या अध्यायातल्या एकोणिसाव्या श्लोकात तामस तपाचरणाचा निषेध केला गेला. ज्या तपाचरणात दुराग्रह आहे, देह क्षीण होतो, मनाला क्लेश होतात आणि शांततेचा भंग होतो असे तप करायला नको. सतराव्या अध्यायातल्या सहाव्या श्लोकातही सांगितले की तना-मनाला क्लेशकारी असे तपाचरण अशास्त्रीय असून अविवेकी असल्यामुळे ते आसुरी तप जाणावे. तामसी आणि आसुरी तपाचरणाशिवायचे सतराव्या अध्यायातील चौदा ते सोळा या श्लोकांमधून वर्णित कायिक, वाचिक आणि मानसिक तपाचरण वर्णिले आहे ते आत्मोन्नतीसाठी उपयुक्त आहे.

5) **दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्:** दानाच्या ज्या पुण्यफळांचे वर्णन शास्त्रात येते त्या पुण्यफळालाही योगी उत्क्रांत करुन जातो. माणसाच्या ठायी मुळातच दानवृत्ती म्हणजे त्यागवृत्ती असते. खूप धन कमविणाऱ्यांमध्येही दानाची वृत्ती दिसुन येते. कित्येक धनवान लोकांना असे वाटते की दान केले नाही तर धन लाभ होणार नाही. 'पैसे देत रहाल तर पैसा मिळत राहील' ही म्हण प्रचलित आहे. कबीर म्हणतात:

***पानी बाढै नाव में, घर में बाढै दाम ।***
***दोनों हाथ उलीचिये, यही सयानो काम ॥***

अर्थात् नावेत पाणी वाढत गेले आणि घरात धन वाढत राहिले तर दोन्ही हातानी बाहेर टाका हेच शहाण्याचे काम आहे.

अतिथी सत्कार गृहस्थाचे पवित्र कर्तव्य आहे. एखादा अतिथी आला आणि गरीबापाशी काही खायला द्यायला नसेल तर तो उधार आणून सुध्दा अतिथीचा सत्कार करतो. अतिथी सत्काराचा संस्कार खूप खोलवर आपल्या मनात मुरला आहे. जनतेच्या ठायी त्यागवृत्तीचा खूप उत्कर्ष झाला पण अधिकांश श्रीमंत लोक आजकाल धन देऊन कीर्ती मिळवण्याच्या मागे आहेत. मंदिर, धर्मशाळा, विद्यालयात आपापल्या नावाचे बोर्ड लावतात.

भूदान चळवळी दरम्यान हा अद्भुत अनुभव आला की गरीब शेतकऱ्यांनीसुध्दा आपल्या थोड्याशा भूखंडातून भूदान केले. या दानवृत्तीचा अनुभव घेऊन विनोबांनी पुढे संपत्तीदान, श्रमदान, बुध्दीदान, सर्वोदय पात्र या सारख्या विविध दान प्रकारांची रुजूवात केली. प्रत्येक कुटुंबातून जनसेवेसाठी एका व्यक्तीचेही मागणे मागितले. बाळकोबा याला पुत्रदान म्हणतात. प्रत्येक कुटुंबातून एक पुत्र वा एक कन्या जर जनसेवेसाठी उपलब्ध होऊ शकले ना तर या देशाचे स्वरुप बदलू शकेल. हा दान महिमा अपार आहे. गुरु आपल्यापाशी असलेले सर्व ज्ञान जोवर आपल्या शिष्याला अपिर्त करत नाही तोवर त्याला शांततेचा लाभ होत नाही. अशा प्रकारे वेदाध्ययन, धार्मिक ग्रंथांचे अध्ययन, यज्ञ कर्म, तीन प्रकारचे तपाचरण आणि दान आध्यात्मिक उन्नतीसाठी या चौघांचीही आवश्यकता आहे.

6) **तत् सर्वम् अत्येतिः** धार्मिक ग्रंथांच्या अध्ययनातून यज्ञ कर्म म्हणजे सततच्या परोपकारातून तपाचरणातून आणि दानवृत्तीतून जे पुण्य प्राप्त होते या सर्व पुण्याला योगी पुरुष सहजी लंघून जातो. ही चारी साधने उन्नतीकामी खूपच उपयुक्त असली तरी यांच्या ठायी व्यक्तीला अहंकारशून्य बनवण्याचे सामर्थ्य नाही. यांच्या पाठीमागे न्यूनाधिक रुपात अहंकाराचे भान वसतेच. अहंकाराला शून्य करण्याचे मुख्य साधन ईश्वरभक्ती आहे. हरिप्रणम्य

भाव आहे. याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणारा योगी स्वत:ला शून्यवत बनवू शकतो. योग्याला हे फळ प्राप्त करुन घेता येते. अहंकाराच्या विलयाच्या फळात शेष सारी फळे अंतर्भूत आहेत.

7) **आद्यं परं स्थानं उपैति:** योगी शून्यता प्राप्त करुन श्रेष्ठ स्थानाला जाऊन मिळतो. ब्रह्मतत्त्वाला प्राप्त करुन घेण्यासाठी अहंकार शून्यता ही एकच अट आहे. संपूर्ण जगाचे मूळ कारण आहे ब्रह्मतत्त्व. तेच मूळाधार आहे. ते शाश्वत आहे. देहात ते ब्रह्मतत्त्व प्रकटते आणि त्यावर मीपणाचे किटण चढते हाच जीवभाव होय. हे जर क्षीण झाले, अहंकार जर विलयाला गेला, शून्यता जागली तर मग सर्पाची कल्पना टळून जसा ही दोरी आहे हा भाव मनी जागतो तसेच मग अहंकाराची कल्पना दूर होऊन खऱ्या ब्रह्मरुपाचा परिचय होतो, ईश्वराचे ज्ञान होते आणि मूळ स्थानाला प्राप्त करुन घेता येते. हे मूळ स्थान आधीपासून प्राप्त आहेच पण जोवर अहंकाराचा विलय होत नाही तोवर ज्ञान प्राप्ती न झाल्यामुळे मूळ स्थानाचा परिचय होत नाही. अहंकार दूर होताच मूळ स्थानाची ओळख होते. मूलाधाराचे ज्ञान होते.

योग्याचे लक्ष्य हे स्वत:ला अहंकार शून्य बनवण्याचे असल्यामुळे तो स्वाध्याय, तपाचरण, यज्ञ, दान या सारख्या साधना मार्गावर चालत असतानासुध्दा यापासून वेगळा होतो आणि ईश्वराशी एकत्वाचा अनुभव प्राप्त करुन घेतो.

• • • *अध्याय आठवा संपूर्ण* • • •



**अध्याय - नववा**

# राजविद्याराजगुह्ययोग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

*इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।*
*ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु इदं गुह्यतमं:** आता हे अतिगुह्य
- **विज्ञानसहितं ज्ञानं:** अनुभव युक्त परमात्म ज्ञान म्हणजे रहस्यासह ज्ञान
- **अनसूयवे ते:** दोष दृष्टी विरहीत अशा तुला
- **प्रवक्ष्यामि:** मी सांगत आहे.
- **यत ज्ञात्वा:** जे जाणल्याने
- **अशुभात् मोक्ष्यसे:** तू या अशुभ म्हणजे दु:खरुपी जगातून मुक्त होऊन जाशील

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले दोष दृष्टीरहित अशा तुला भक्ताला हे गोपनीय विज्ञानासहित ज्ञान परत नीटपणे सांगतो. ते जाणल्याने तू दु:खरुपी प्रपंच सागरातून मुक्त होशील.

**श्री भगवान म्हणाले**

***आतां गुपित हें थोर सांगतों निर्मळा तुज***
***विज्ञानें कसिलें ज्ञान अशुभांतूनि सोडवी।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) हे अतिशय गुह्य 2) अनुभव युक्त असे परमात्म ज्ञान 3) दोष दृष्टीरहित अशा तुला सांगतो. 4) हे जाणून तू या अशुभ प्रपंचापासून मुक्त होशील.

**स्पष्टीकरण**

1) इदं गुह्यतमं: ते ज्ञान कसे आहे? त्याचे स्वरुप कसे आहे ? या श्लोकात या मुद्यांची चर्चा आली आहे. परमात्म विषयक ज्ञान असाधारण स्वरुपाचे आहे. याच्या माध्यमातून लाभणारे फळही असाधारण असे आहे. ज्ञानाचे साधारण आणि असाधारण असे दोन प्रकार आहेत. साधारण फळ देणारे ज्ञान साधारण तर असाधारण फळ प्रदान करणारे ज्ञान असाधारण होय. ईश्वरविषयक ज्ञान दुर्गम आणि दुर्लभ स्वरुपाचे आहे. ईश्वर सत्यरुप असून त्याच्यासारखी दुसरी कुठलीही गोष्ट सत्य नसल्यामुळे ईश्वर असाधारण आहे. ईश्वर असाधारण, अद्वितीय आणि इंद्रियातीत असल्यामुळे त्याचे ज्ञान अतिगुप्त असणे स्वाभाविक आहे. इंद्रियगम्य वस्तु गुप्त राहू शकत नाही. ईश्वर इंद्रियगम्य नसून अनुभव गम्य आहे. ईश्वराच्या अनुभवासाठी मन आणि बुध्दी ही दोन साधने आहेत. जगातल्या पदार्थांना जाणून घेण्यासाठी ज्ञानेंद्रियांचा उपयोग होतो. मन उभयविध साधन आहे. इंद्रियांशी एकरुप झाल्यावर मनाला जगाचे ज्ञान होते. काम, क्रोध, अहंकार वगैरे विकारांपासून मुक्त होऊन मन जर अंतर्मुख बनले तर मग ईश्वर जाणून घेण्याचे साधन बनू शकते. मन जोवर निर्विकार बनत नाही तोवर ईश्वराच्या स्वरुपाला जाणून घेण्याचे ते साधन नाही बनू शकत. निर्विकार मन ईश्वराचा अनुभव घेऊ शकते. प्रयत्न करुनसुध्दा स्वत:ला निर्विकार बनवणे अवघड आहे. यामुळे सर्वांसाठी ईश्वर ज्ञान हे दुर्लभ म्हणजे गुप्त आहे. यामुळे गीतेचे म्हणणे असे आहे की हे ज्ञान केवळ गुप्तच नव्हे तर अतिगुप्त आहे.

2) विज्ञानसहितं ज्ञानम्: गीतेने या अनुभवगम्य ज्ञानाला खुले केले आहे. अनुभवाशिवायचे ज्ञान हे केवळ बौध्दिक स्वरुपाचे असते. बुध्दीच्या माध्यमातून ईश्वराला ग्रहण करता येते. ईश्वरविषयक कुठलीही शंका न उरता बुध्दी नि:शंक बनली तर मग एक कार्य पूर्ण होते. जोवर त्याचा अनुभव नाही तोवर यथार्थ स्वरुपाचे ज्ञान झाले असे नाही म्हणता येणार. गुळाच्या गोडीचा विषय बुध्दीला झाला म्हणजे ज्ञान पूर्ण झाले असे नाही म्हणता येत, खाऊन बघितल्याशिवाय गुळाचे खरे ज्ञान होणार नाही. अनुभवयुक्त ज्ञानच खरेखुरे ज्ञान आहे.

3) अनसूयवे ते प्रवक्ष्यामि: मनात दोषदृष्टी नसावी सदा गुणदर्शन करता यावे. ईश्वरविषयक ज्ञान हे असाधारण स्वरुपाचे असल्यामुळे गीतेच्या पंधराव्या अध्यायातल्या विसाव्या श्लोकात गीताशास्त्राला 'अतिगुह्य' या विशेषणाने संबोधले गेले आहे. हे अलौकिक ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी पात्रता हवी. भलत्याला हे प्राप्त नाही होऊ शकत. अर्जुन या ज्ञानासाठी पात्र होता. अर्जुन असूया रहित होता. केवळ या एका शब्दाने गीतेने अर्जुनाच्या योग्यतेचा परिचय करुन दिला आहे. असूयु म्हणजे दोष दृष्टी धारक. मत्सर ईर्ष्याभाव बाळगणारा. हाच शब्द तिसऱ्या अध्यायातल्या एकतिसाव्या श्लोकात प्रयुक्त झाला. हा श्लोक सांगतो की जे पुरुष श्रध्दासंपन्न असून ईर्ष्या-द्वेष मत्सर रहित, दोष दृष्टीरहित आहेत ते गीतेचा उपदेश आचरणात आणतात. कर्म बंधनातून मुक्त होतात पण याउलट स्वभाव धारण करणारे लोक गीतेच्या उपदेशाची अवहेलना करतात. असे अविवेकी पुरुष नष्ट होतात. अठराव्या अध्यायातील एकाहत्तराव्या श्लोकात म्हटले की गीतेचा हा कृष्णार्जुन संवाद जो निर्मत्सर, ईर्ष्या आणि दोषदृष्टि रहित भावनेने ऐकेल तो या अशुभ प्रपंचातून मुक्त होऊन शुभ गतीला प्राप्त होईल.

यावरुन हे ध्यानात येते की ईश्वर ज्ञान ग्रहण करण्यासाठी असूया रहित असणे आवश्यक आहे. असूया हा दोष सर्वसाधारण जनात आढळतो. चार चौघे एकत्र आले की लागलेच दुसऱ्याची टिंगल टवाळी करायला. याशिवाय जणू काही चर्चेत रस निर्माणच होणार नाही. ईश्वर सर्वत्र व्याप्त आहे. ईश्वराचे व्यापक रुपात दर्शन करुन घेण्याची इच्छा असेल तर मग या विश्वाबद्दल अशी दोषदृष्टी राखून कसे बरे चालेल ? तुलसीदासजी म्हणतात:

***जड चेतन गुन दोषमय बिस्व कीन्ह करतार।***
***संत हंस गुन गहहिं पय, परिहरि बारि बिकार॥***

अर्थात् ईश्वराने या विश्वाची रचना जड-चैतन्यमय आणि गुणदोषमय अशी केली. संत हंस पक्ष्याप्रमाणे गुणग्रहण करतात आणि दुर्गुणाला सोडून देतात.

**ते पुढे म्हणतात :**

***अस बिबेक जब देइ बिधाता।***
***तब तजि दोष गुनहिं मनु राता॥***

अर्थात् गुण ग्रहण करुन दोष टाळून देणे हे विवेकामुळे साधते. कुणाच्या दोषांची चर्चा करताना किंवा कुणाबद्दल मत्सर वा ईर्ष्याभाव मनी जोपासताना कुणाला तात्कालिक स्वरुपाचा आनंद कदाचित लाभू शकेल पण अंतत: शांतता वा समाधान नाही लाभू शकत. गुण चर्चा करत असताना मात्र खचितच आनंद आणि शांततेचा लाभ होईल. मनाची प्रसन्नता वाढीस लागेल. दुसऱ्यांच्या दोषांची चर्चा करताना आपल्याठायी सुध्दा कित्येक दोष आहेत याचा विवेक उरत नाही. कुणी आपल्या दोषांची चर्चा करत असेल तर ते आपल्याला आवडत नाही. खरे तर गुणचर्चा करण्यातच खरा आनंद आहे. हे श्रेयस्कर आहे. अर्जुन असुयारहित असल्यामुळे त्याला गीतेचे ज्ञान मिळाले. ही अर्जुनाची योग्यता आहे.

4) यत् ज्ञात्वा अशुभात् मोक्ष्यसे ईश्वरी ज्ञानाचा लाभ झाला तर मग जीव या अशुभ प्रपंचातून मुक्त होऊन जाईल. प्रपंचासाठी 'अशुभ' शब्दाचा प्रयोग गीतेने केलाय. खरे तर या प्रपंचाला मोक्षाचे साधन मानले जायला हवेय कारण की हे विश्व ईश्वराच्या अलौकिक सामर्थ्याचा सुंदर आविष्कार आहे. तरी सुध्दा आसक्ती, मोह, ईर्ष्या यासारख्या विकारांमुळे आपले सुंदर विश्व अशुभ म्हटले गेले. अशा प्रपंचापासून मुक्त व्हायचे असेल तर मग ईश्वर ज्ञान प्राप्त करुन घ्यायला हवे.

: 2 :

***राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्।***
***प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **राजविद्या:** हे ज्ञान सर्व विद्यांचा राजा आहे
- **राजगुह्यं:** सर्व गुह्यांचेही गुह्य
- **पवित्रं:** पावन, अतिशय पवित्र
- **इदं उत्तमं:** सर्व वस्तुंमध्ये उत्तम
- **प्रत्यक्षावगमं:** प्रत्यक्ष अनुभवास आलेले म्हणजे फळदायक
- **धर्म्यम्:** धर्म युक्त आहे
- **कर्तुं सुसुखं:** प्राप्त करायला फार सोपे
- **अव्ययं:** कदापि क्षीण न होणारे, अविनाशी स्वरुपाचे आहे

**अर्थ**

हे विज्ञानासहित ज्ञान सर्व विद्यांचा राजा आहे, सर्व गुप्त गोष्टींचा राजा आहे, अतिशय पवित्र आहे, अतिशय उत्तम, प्रत्यक्ष फलदायक, धर्मयुक्त, साधन करायला सोपे आणि अविनाशी स्वरुपाचे आहे

***राज-विद्या महा-गुह्य उत्तमोत्तम पावन***
***प्रत्यक्ष हें सुखें लाभे धर्म-सार सनातन।***

**विषय:** या श्लोकात आठ गोष्टी आहेत 1) हे परमात्म ज्ञान सर्व विद्यांमध्ये अतिशय श्रेष्ठ असे आहे 2) हे अतिशय गूढ आहे. 3) हे अतिशय पवित्र आहे. 4) हे तमाम वस्तुंमध्ये उत्तम आहे. 5) हे प्रत्यक्ष अनुभव घेता येण्यायोग्य आहे. 6) हे धर्मयुक्त आहे. 7) हे सुलभ आहे. 8) हे कदापि क्षीण न होणारे आहे, अविनाशी आहे.

**स्पष्टीकरण**

1) राजविद्या: हे परमात्म ज्ञान तमाम विद्यांमध्ये सर्वश्रेष्ठ असे आहे. हे अतिगूढ असे आहे. हे अतिशय पवित्र स्वरुपाचे आहे. हे तमाम वस्तुजातांमध्ये उत्तम स्वरुपाचे आहे. हे प्रत्यक्ष अनुभवगम्य असे आहे. हे धर्मयुक्त आहे. हे सुलभ आहे आणि हे कदापि क्षीण न होणारे आहे.

ही राजविद्या आहे याचा अर्थ असा की ही विद्या सर्व विद्यांची राज्ञी आहे. याहून श्रेष्ठ असे कुठलेही ज्ञान नाही. मुंडकोपनिषदात परमात्म ज्ञानासाठी 'परा विद्या' असा शब्द प्रयोग केला गेला. शेष साऱ्या विद्या या 'अपरा विद्या' होत.

ज्यामुळे परमात्म ज्ञान वा परमात्मविषयक अनुभव प्राप्त होतो त्या विद्येला श्रेष्ठ मानले जाते. अपरा म्हणजे

कनिष्ठ विद्या होय. यात सहा शास्त्रांचा समावेश होतो. याशिवाय तमाम भौतिक शास्त्रांचाही समावेश यात होतो. आज संपूर्ण समाज या भौतिक शास्त्रांच्या प्राप्तीसाठी धडपडत आहे. एखादाच कुणी विरळ माणूस परा विद्येचे अनुसंधान करताना दिसतो. पंचविषयांच्या संदर्भात वैराग्य जागले तर माणूस परमात्म्याच्या दिशेने वाटचाल करु लागतो. सत्संगतीशिवाय वैराग्यलाभ होत नाही. तुलसीदासजी म्हणतात :

***बिनु सतसंग न हरि-कथा, तेहि बिनु मोह न भाग।***
***मोह गए बिनु राम-पद, होइ न दृढ अनुराग॥***

अर्थात् सत्संगती शिवाय हरी कथेवर प्रीत जडत नाही आणि हरी कथेच्या अभावी मोह संपून जात नाही. जोवर मनी मोह असतो तोवर रामपदाप्रती दृढ अनुराग भाव मनी जागत नाही.

गीतेच्या दहाव्या अध्यायातील बत्तिसाव्या श्लोकात येते: अध्यात्मविद्या विद्यानाम् ब्रह्मविद्या म्हणजे अध्यात्मविद्या म्हणजे परमात्म ज्ञान हे तमाम विद्यांपेक्षा श्रेष्ठ आहे.

2) राजगुह्यं: हे परमात्म ज्ञान गुप्त वस्तुंचे राजेपद मिरवते याचा अर्थ असा की हे अतिगुप्त असे ज्ञान आहे. सागरात असणाऱ्या गुप्त मौक्तिकांना मिळवण्या प्रमाणे सागराचा तळ गाठल्याशिवाय ते हाती लागणार नाही. तशीच ही ब्रह्मविद्या आहे. दूधात पाणी मिसळल्यावर पाणी गुप्त होऊन जाते आणि आपण दुधापासून पाण्याला वेगळे नाही करु शकत ते काम केवळ राजहंसच एक तो काय करु जाणे. तशाच प्रकारे परमात्म तत्त्व हे तमाम वस्तुंच्या ठायी गुप्त रुपात वसते. बाहेरुन वस्तु दिसते पण ज्ञानी जन या तमाम वस्तुंच्या ठायी अव्यक्त रुपात गुप्त रुपात वसणाऱ्या एकरुप परमात्म तत्वाचे दर्शन करतात. देह वगैरेंच्या आसक्तीमुळे परमात्म तत्त्व हे आत म्हणजे शरीरात प्रकट असतानासुध्दा झाकलेले असते. काम, क्रोध, अहंकार या सारखे विकार परमात्म तत्त्वाला झाकून ठेवतात. तसे पाहू गेल्यास परमात्म तत्त्व ज्याप्रमाणे तमाम जड वस्तुंच्या ठायी गुप्त रुपात वसते तसे पिंडात म्हणजे देहात गुप्त नाही. तिथे तर ते ज्ञानरुपाने प्रकट आहेच पण आपण सारे देह वगैरेंच्या ठायी आसक्त असल्यामुळे विकाराधीन होऊन जातो आणि यामुळे देहात प्रकट रुपाने वसणारे परमात्म तत्त्व देहात प्रकट असूनही आपल्यासाठी गुप्त वाटू लागते.

या श्लोकात 'राजगुह्य' (अतिगुह्य ) असा शब्द प्रयोग झाला आहे. या शब्दाचा प्रयोग गीतेत अन्यत्रही करण्यात आलेला आहे. कठोपनिषदात एक श्लोक येतो :

***एष सर्वेषु भूतेषु गूढोत्मा न प्रकाशते।***
***दृश्यते त्वग्रय्या बुध्द्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः॥***
(1/3/12)

अर्थात् सर्व भूतमात्रांच्या ठायी गुप्त रुपाने वसणारे हे आत्म तत्त्व सर्वांसाठी प्रकट होत नाही पण सूक्ष्म म्हणजे शुध्द आणि तीक्ष्ण धारेच्या म्हणजे विवेकबुध्दीने विवेकी पुरुषाला त्याचे ज्ञान होते.

3) **पवित्रम्:** हे ज्ञान परम पवित्र स्वरुपाचे आहे. शंकराचार्य याचा अर्थ उकलून असा सांगतात : इदं उत्तमं सर्वेषां पावनानां शुध्दिकारण इदं ब्रह्मज्ञानं उत्कृष्टतमम्। अनेकजन्सहस्रसंचितं अपि धर्माधर्मादि समूलं कर्म क्षणमात्राद् भस्मीकरोति यत:, अत: तस्य किं पावनत्वं वक्तव्यम्।

अर्थात् तमाम पावन वस्तुंमध्ये हे ब्रह्मज्ञान अती उत्कृष्ट शुध्दीचे कारण आहे. हे एवढे पावन आहे की नाना जन्मजन्मांतरीच्या संचित धर्म आणि अधर्मरुप कर्मांना हे ब्रह्मज्ञान क्षणभरात भस्म करुन टाकते.

ज्या पुरुषाच्या ठायी हे ब्रह्मज्ञान प्रकटले त्याचे जगणे पूर्ण झाले असे समजावे.

4) इदं उत्तमम्: हे ब्रह्मज्ञान उत्तम आहे. सुखदायक वस्तुला उत्तम असे म्हटले जाते. उत्तम अर्थात् सदा न कदा सुखद होय. मंदिरातल्या सुरेख मूर्तीकडे बघितल्यावर नित्य सुखद वाटते. आनंद होतो. हिमालय असो वा समुद्र, गंगा असो वा नर्मदा सदा सुखद आहेत. सूर्योदय असो वा सूर्यास्त असो, चंद्रम्याचे दर्शन असो वा अमावस्येच्या रात्रीची आकाशगंगा असो. सारेच आनंददायक आहेत. छोट्या बालकाला बघणे आनंददायक आहे. तुलसीदासजी म्हणतात :

***जौं बालक कह तोतरि बाता ।***
***सुनहिं मुदित मन पितु अरु माता ॥***

अर्थात् बालकाचे बोबडे बोल माता-पिता कमालीच्या आनंदाने ऐकत असतात. वृक्ष लतांवरल्या अगणित फूलांना बघुन आनंद होतो. फळांचे दर्शन आनंददायक असते. उत्तम पीक बघुन आनंद होतो. अशा प्रकारे आनंददायक वस्तु या जगात खूप आहेत पण समजा मनात कुठल्या तरी कारणामुळे असंतोष उपजला, घरात भांडण झाले तर मग या तमाम आनंददायक वस्तु थोडाही आनंद देत नाहीत. या तमाम उत्तम वस्तु उत्तम न रहाता कनिष्ठ आणि फिक्या-फिक्या वाटू लागतात. आत जर आनंद असेल ना तर मग बाहेर आनंदाचा साक्षात्कार होऊ शकेल. खूप भूक लागली असेल तर मग कोरडी भाकरी सुध्दा गोड लागते. निष्कर्ष असा की मनात शांतता आणि आनंद भाव असेल तरच वस्तु उत्तम वाटेल. हे ब्रह्मज्ञान चित्ताच्या समस्त प्रकारच्या अज्ञानाला दूर लोटणारे आहे. अज्ञान हेच तर मुळात दु:खरुप आहे. अज्ञान नष्ट झाले की मग आनंद, सुख आणि शांततेचा अनुभव यायला लागतो. यामुळे हे सर्वोत्तम आहे. आत परमात्मविषयक ज्ञानाची धारा प्रवाहित झाली की मग सारे ब्रह्मांड परमात्ममय दिसू लागते.

5) प्रत्यक्षावगमं: पुढचा मुद्दा आहे की हे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवता येणारे असे आहे. परमात्म तत्त्व इंद्रियांच्या पल्याड वसते. यामुळे इंद्रियांचा विषयांशी संबंध आल्यावर आपल्याला जसा सुखाचा अनुभव येतो तसा हा अनुभव नाही. स्थूल वस्तुचा अनुभव तर आपोआप येतो. आपल्यासमोर सारी सृष्टी उभी ठाकली आहे. आपण डोळे उघडतो आणि आपल्याला रुपाचे ज्ञान होते. कान तर ऐकण्यासाठी सदैव तत्पर असतात. ज्ञान मिळवण्यासाठी इंद्रियांना प्रयत्न नाही करावे लागत कारण की समोर स्थूल विषय उभे ठाकलेले असतात. शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध नित्य उपस्थित असतात. यामुळे यांचे ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी कुठल्याही प्रकारचे श्रम घ्यावे लागत नाही. बाह्य विषयांचे ज्ञान सहजपणे प्राप्त होते पण परमात्म तत्त्वाचे ज्ञान बाह्य वस्तुंप्रमाणे सहजासहजी नाही प्राप्त होत कारण की मन वा बुध्दीरुपी इंद्रिय परमात्म तत्त्वाला ग्रहण करण्याच्या परिस्थितीत नसते. मन विकाररहित बनले की मग लगेचच परमात्म तत्त्वाचे दर्शन होऊ शकेल. परमात्म ज्ञान होऊ शकेल कारण की परमात्मा जसा अतिसुक्ष्म आहे तसाच तो सर्वांच्या निकटही आहे. आपण आणि परमात्मा यात भेद नाही, भिन्नता नाही. इंद्रिये, मन, बुध्दी, देह भिन्न असल्यामुळे लांब आहेत. परमात्म ज्ञान मिळवण्यासाठी दुसऱ्या जन्माची मुळी आवश्यकताच नाही. याच जन्मी हे ज्ञान संपादित करता येईल. यासाठी काम, क्रोध, अहंकार यासारख्या विकारांना दूर घालवण्याची गरज आहे आणि त्यांना दूर हटवायला हवे एवढेच तर करावयाचे आहे. या विकारांना जर आपण दूर घालवून देऊ शकलो तर परमात्म ज्ञान तत्क्षणी प्राप्त होऊ शकेल. यामुळे परमात्म ज्ञान हे 'याची देही याची डोळा' अनुभवता येण्याचा विषय आहे.

6) धर्म्यम्: हे ज्ञान धर्मयुक्त आहे. शंकराचार्य म्हणतात :

अनेकगुणवत: अपि धर्मविरुध्दत्वं दृष्टं न तथा आत्मज्ञानं धर्मविरोधि, किंतु धर्म्यं धर्मात् अनपेतम् ।

अर्थात् --अनेक गुणांनी युक्त पदार्थ ही कधी-कधी धर्मविरोधी दिसतात पण आत्मज्ञान हे धर्मयुक्त आहे धर्म विरोधी नाही. काही लोक अनेक गुणांनी संपन्न असतात पण त्यांचे आचरण धर्मयुक्त असते असे नाही. काही लोक असेही म्हणताना दिसतात की आम्ही काही धर्म वगैरे जाणत नाहीहोत पण आमची गुणांवर म्हणजे गुण प्राप्त करुन घेण्यावर श्रध्दा आहे.

धर्मात ईश्वरी श्रध्देला मोलाचे स्थान आहे. धर्माचा पायाच मुळी ईशश्रध्दा आहे. तमाम धर्म ईशश्रध्देवर उभारलेले आहेत यामुळे धर्मात भांडणाला मुळी स्थानच नाही. धर्माच्या नावाने चालणाऱ्या भांडणांच्या मूळाशी अज्ञान आणि अहंभाव असतो. यामुळे आपली भावना सर्वधर्म समभावाची असायला हवी. धर्मावर श्रध्दा नसणारे लोक नीती नियमांवर श्रध्दा बाळगून असतात. सद्गुणांच्या वृध्दीच्या मागे असतात पण ईश्वरावर श्रध्दा नसल्यामुळे ते काही धर्म पालनाचा आग्रह धरणारे नसतात. ते पुनर्जन्म मानत नाहीत. सत्य पालनामुळे जगाचे कल्याण होणार आहे असे जोवर दिसते तोवर ते सत्याचे पालन करतात. जनकल्याणाशी विरोधी असणाऱ्या सत्यपालनाचा मार्ग ते त्यजून देतात. हाच विचार ते अहिंसेच्याही संदर्भात करतात त्याच्या मूळाशी जन कल्याणाचा विचार प्रमुख असतो. जगाच्या कल्याणासाठी ते हिंसेचा उपयोग करायलाही कचरणार नाहीत. अशाप्रकारे सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य वगैरे जे सिध्दांत आहेत त्यांच्यावर नीतीमान नीती

निष्ठ माणसांची संपूर्ण श्रध्दा असेलच असे काही सांगता येत नाही. भौतिक नियम, व्यवस्था, गुण विकास वगैरेंवर संपूर्ण श्रध्दा बाळगत असतानाही ईश्वर आणि धर्माच्या सत्य, अहिंसा वगैरे सिध्दांतांवर श्रध्दा न बाळगणारे अनेक असतात. हे परमेश्वरी ज्ञान सर्वगुणसंपन्न असून धर्मयुक्तही आहे.

7) **सुसुखं कर्तुम्:** हे परमात्मविषयक ज्ञान प्राप्त करुन घेणे सुगम आहे. शंकराचार्य म्हणतात : एवं अपि स्यात् दु:संपाद्यं इति, अत आह सुसुखं कर्तुम् यथा रत्नविवेकविज्ञानम्। अर्थात् हे परमात्म ज्ञान धर्मयुक्त आहे असे मानल्यामुळे ते प्राप्त करुन घेणे का कठिण ठरेल? या प्रश्नाचे उत्तर देताना गीता म्हणते की रत्नाच्या परीक्षेसाठी थोड्या ज्ञानाची जशी आवश्यकता असते तसेच हे परमात्मज्ञान प्राप्त करुन घेणे सोपे आहे.

अठराव्या अध्यायाच्या पन्नासाव्या श्लोकाच्या भाष्यात शंकराचार्य असे म्हणतात : बाह्याकारभेदबुध्दिनिवृत्तिरेव आत्मस्वरुपावलंबने कारणम्। अर्थात् बाह्य आकाराची जी काही भेदबुध्दी मनात असते ती जर मिथ्या वाटली ना तर मग त्या बाह्य आकाराच्या विषयीची सत्यत्व बुध्दी निघून जाते आणि मग तोच बाह्य आकार परमात्म स्वरुपाचे ज्ञान बनायला कारणीभूत ठरु शकेल.

या छोट्या वचनात आचार्यांनी खूप खोल अर्थ साठवून ठेवला आहे. मनात तर सतत बाह्य आकारच वसून असतात ना? आपण त्या रुप आकारांना काही ना काही नाव देतो आणि मग त्या नाम-रुप आणि आकारांमध्ये अडकून पडतो. यामुळे आचार्यांचे म्हणणे असे आहे की बाह्य आकाराची जी काही बुध्दी आपल्या ठायी आहे म्हणजे या जगात आपल्याला जे काही भिन्न-भिन्न आकाराचे पदार्थ दिसतात ती आकार बुध्दी दूर व्हायला हवी. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की वेगवेगळ्या आकारांना सत्यरुप मानण्याची आपली जी काही बुध्दी आहे ना ती एकदा का मनातून दूर हटली तर मग बाह्य नाम-रुप-आकार सत्य नसून ते मिथ्या आहेत ही बुध्दी मनात उत्पन्न होईल. मनात असा विवेक जर जागृत झाला तर मग मन आत स्थित असलेल्या स्थिर अशा आत्मस्वरुपाचा आश्रय घेऊ शकेल. मनाला त्वरितच त्या स्वरुपाचा अनुभव घेता येईल. यासाठी अट एवढीच आहे की विविध बाह्य आकार काही सत्यरुप नाहीत ही धारणा मनात दृढ झाली पाहिजे.

8) अव्ययम्: हे परमात्मविषयक ज्ञान अव्यय म्हणजे अक्षीण स्वरुपाचे आहे. शंकराचार्य म्हणतात : तत्र अल्पायासानां कर्मणां सुखसंपाद्यानां अल्पफलत्वं दुष्कराणां च महाफलत्वं दृष्टं इति, इदं तु सुखसंपाद्यत्वात् फलक्षयात् व्येति इति प्राप्तम् , अत आह अव्ययम्। न अस्य फलत: कर्मवत् व्यय: अस्ति इति अव्ययम्। अत: श्रध्देयम् आत्मज्ञानम्। अर्थात् हे तर व्यवहारात सुध्दा सहजपणे ध्यानात येते की जी कर्मे सहज सोपी असतात ज्याना करण्यात कमी श्रम आणि कमी त्रास असतो. अशी कर्मे अल्पफळ देणारी ठरतात याउलट ज्या कर्मांसाठी अपार कष्ट उपसावे लागतात, जी कर्मे दुष्कर असतात त्यापासून लाभणारे फळ हे महान असते. कर्मफळाप्रमाणेच या ब्रह्म ज्ञानाचे फळ कदापि क्षीण होणारे नाही. यामुळे ब्रह्म ज्ञानाला अक्षीण म्हणजे अव्यय स्वरुपाचे म्हटले गेले आहे.

भोगल्यावर कर्मफळ क्षीण होते. आपण नाना प्रकारची कर्मे करतो. त्यांची भली बुरी फळे लाभतात आणि ती भोगल्यावर क्षीण होऊन जातात पण ब्रह्म ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर लाभणारे फळ हे कदापि नष्ट होणारे नसते कारण ब्रह्म हे अविनाशी आहे. यामुळेच परमात्मविषयक ज्ञान हे अव्यय म्हणजे अक्षीण आणि अखंड स्वरुपाचे आहे.

: 3 :

*अश्रद्दधाना: पुरुषा धर्मस्यास्य परंतप।*
*अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप:** हे अर्जुना
- **अस्य धर्मस्य अश्रद्दधाना:** या आत्मज्ञानरुप धर्मावर श्रध्दा न बाळगणारे
- **पुरुषा:** पुरुष
- **मां अप्राप्य:** मला प्राप्त न होता
- **मृत्युसंसारवर्त्मनि:** जन्म मरणरुपी संसार चक्रातच
- **निवर्तन्ते:** पुन्हा पुन्हा येत रहातात, भ्रमण करत रहातात

### अर्थ

हे परंतपा, उपरोक्त सांगितलेल्या धर्मावर श्रध्दा नसलेले पुरुष मला प्राप्त न होता मरणरुपी संसारचक्रात भ्रमण करत रहातात.

*लोक नस्तिक ह्या धर्म अश्रध्देनें न सेविती*
*मृत्युची धरिती वाट संसारी मज सोडुनी ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) या आत्मज्ञानरुपी धर्मावर श्रध्दा न बाळगणारे पुरुष 2) मला प्राप्त न होता 3) जन्म-मरणरुपी प्रपंच चक्रात भ्रमण करत रहातात.

### स्पष्टीकरण

1) **अस्य धर्मस्य अश्रद्दधानाः पुरुषाः** या आत्मज्ञानरुपी धर्मावर श्रध्दा नसणारे पुरुष ईश्वराला प्राप्त न होता वारंवार जन्म मरणाच्या फेऱ्यात सापडून पुन:पुन्हा येत जात रहातात. श्रध्दा अंध म्हणजे अज्ञानयुक्त नसावी. श्रध्देसोबत ज्ञान असणे आवश्यक आहे. स्वत:पाशी ज्ञान नसेल तर कुणा सत्पुरुषावर श्रध्दा असेल तरी चुकीच्या मार्गावर जाण्याचे भय उरत नाही.

विनोबाजी आपल्या 'स्थितप्रज्ञ दर्शन' ग्रंथातून सांगतात की शुध्द बुध्दी नेहमी अचूक आणि सत्य निर्णय देऊ शकते. यामुळे ज्या कुणा सत्पुरुषाची विशुध्द बुध्दी असेल त्यावर श्रध्दा राखावी. त्याशी आपले नाते जोडावे. यामुळे ती विशुध्द बुध्दी आपली स्वत:चीच आहे असे ममत्व जागले तर त्या बुध्दीचा आपणास उपयोग होतो. आपल्यापाशी असलेली बुध्दी विशुध्द नाही, निर्विकार नाही तरी आपण त्याशी संबंध जोडून आपल्या अशुध्द बुध्दीच्या भरवशावर जगण्याचा निर्णय घेतला ना तर मग आपणास कदापि सत्य निर्णयाचा लाभ होणार नाही आणि चुकीच्या निर्णयामुळे आपले नुकसानच होईल. आपण सदैव चुकीच्या मार्गावरच चालत राहू. सच्च्या मार्गावर चालायचे असेल तर आपल्याला सदैव विशुध्द बुध्दीच्या निर्णयासोबत चालावे लागेल. आपल्या कल्याणासाठी आपल्याला विशुध्द बुध्दीच्या आश्रयाने चालणे गरजेचे आहे. हा एकमेव उपाय शिल्लक आहे. विशुध्द बुध्दीयुक्त संत-सत्पुरुषांच्या संपर्कात राहिल्यामुळे आपलीही बुध्दी हळूहळू विशुध्द बनेल आणि निर्विकार होऊन स्वतंत्र आणि सच्चे निर्णय द्यायला लागेल. यामुळे गीतेत श्रध्देला खूप महत्व दिले गेलेय. चौथ्या अध्यायाच्या 39 व्या श्लोकात म्हटलेय श्रध्दावान लभते ज्ञानं --की श्रध्देमुळे परमात्म ज्ञानाची प्राप्ती होते. चाळिसाव्या श्लोकात म्हटलेय अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति अज्ञ असूनही जे श्रध्दा संपन्न नाहीत म्हणजे अश्रध्दावान आहेत त्या संशयात्म्यांचा विनाश झाला असे खुशाल समजावे. आपल्यापाशी ज्ञान असेल तर ते आपणास नेहमी सत्य मार्गावरच मार्गक्रमण करायला लावील हे निश्चित पण जर आपल्यापाशी ज्ञान नसेल तर मग आपण ज्ञानवंतांवर श्रध्दा ठेवायला हवीय. त्यांच्यावर श्रध्दा राखून आपण सत्य मार्गाचे वाटसरु होऊ शकतो. तुलसीदासजी म्हणतात :

*जे श्रध्दा संबल रहित, नहिं संतन्ह कर साथ । तिन्ह कहुँ*
*मानस अगम अति, जिन्हहिं न प्रिय रघुनाथ ॥*

अर्थात् जे पुरुष श्रध्देच्या आधाराशिवाय जगणारे आहेत आणि संत संगतीपासून रहित आहेत आणि ज्यांना रघुनाथ म्हणजे ईश्वर प्रिय नाहीये अशा लोकांसाठी हे मानस म्हणजे ही रामकथा दुर्गम स्वरुपाची आहे.

इथे शब्द आलाय 'अश्रध्दधाना:' आणि बाराव्या अध्यायाच्या विसाव्या श्लोकातही भक्ताची लक्षणे सांगताना अखेरीस शब्द आलाय 'श्रध्दाना:'. श्रध्दा मोठी शक्ती आहे. श्रध्दा म्हणजे ईश्वरी श्रध्देशी जेव्हा ज्ञानाचा संबंध जोडला जातो तेव्हा तर तो दुग्ध शर्करा योग बनून जातो. ईश्वरावर श्रध्दा आहे पण ज्ञान नाही आहे तरी चालण्यासारखे आहे पण ज्ञान आहे आणि श्रध्दा नाही तर मग नाही चालू शकणार. सारांश असा की श्रध्दा आणि ज्ञान दोघेही असायला हवेत. ज्ञान आणि ईश्वरी श्रध्दा यात अर्थात्च श्रध्दा श्रेष्ठ होय.

2) **मां अप्राप्य:** परमात्मविषयक ज्ञानाबाबतीत जर श्रध्दा नसेल तर मग त्या ज्ञानाला काही अर्थ नाही. परमेश्वराची प्राप्ती नाही होऊ शकणार. इंद्रियगम्य वस्तु जोवर सत्य वस्तु म्हणून प्रतीत होते तोवर या जगाच्या पाठीमागे कुठली तरी अदृश्य शक्ती आहे, अव्यक्त शक्ती आहे आणि त्या शक्तीचे स्वरुप जाणून घ्यायला हवेय अथवा ते प्राप्त करुन घ्यायला हवेय अशी बुध्दी वा जिज्ञासा वा इच्छा उत्पन्न होत नाही. आपली वृत्ती अंतर्मुख बनल्यावरच अशी जिज्ञासा वा इच्छा

उत्पन्न होईल आणि बाह्य साधनांपासून वा बाह्य वस्तुंपासून सुख मिळेल असा मोह आपल्या मनी उरणार नाही. खरे सुख आतच दडलेले असून त्याची अनुभूती ही परमात्मविषयक श्रध्देनेच होऊ शकते.

3) **मृत्युसंसारवर्त्मनि निवर्तन्ते:** ज्यांच्या मनात परमात्मज्ञान विषयक श्रध्दा नाही ते ईश्वराला प्राप्त न होता जन्म मृत्युरुपी संसार सागरात गटांगळ्या खात रहातात. शंकराचार्य म्हणतात : मत्प्राप्तौ न एव आशंका इति मत् प्राप्तिमार्गसाधनभेदभक्तिमात्रं अपि अप्राप्य इत्यर्थ: । अर्थात् ते ईश्वराला प्राप्त करु शकत नाही यात तर तर काही शंका नाहीच पण ईश्वर प्राप्तीचे जे काही वेगवेगळे मार्ग आहेत म्हणजे विविध साधनरुपी मार्ग आहेत त्यात अत्यंत सुलभ अशा भक्तीमार्गालाही ते प्राप्त करुन घेऊ शकत नाहीत.

ईश्वराच्या ज्ञानाप्रती जर श्रध्दा नसेल तर मग भक्ती सारख्या सुलभ साधनालाही गमवावे लागते परिणामी जन्ममृत्युरुपी संसार चक्रात फिरत रहावे लागते. संसाररुपी सागर तरण्यासाठी भक्तीरुपी नौका हे अत्यंत सुलभ साधन आहे. श्रध्देच्या अभावी ईश्वर प्राप्ती होणार नाही हे निश्चित आहे पण भक्तीचे साधन जर उपलब्ध नाही करुन घेता आले ना तर मग संसार चक्र अखंडपणे सुरुच राहील. बरे भक्तीसाठी काहीही कष्ट साधना करावी लागत नाही केवळ ईश्वरी ज्ञानाप्रती श्रध्दा राखायला हवी.

: 4 :

*मया ततमिदं सर्वं जगद्व्यक्तमूर्तिना ।*
*मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थित: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अव्यक्तमूर्तिना मया:** मज अव्यक्ताकडून म्हणजे सच्चिदानंद परमात्म्याकडून
- **इदं सर्वं जगत् ततं:** हे सारे जगत बर्फात पाणी असावे तसे व्याप्त आहे, परिपूर्ण आहे
- **सर्वभूतानि मत्स्थानि:** सर्व भूते माझ्या ठायी संकल्प रुपाने स्थित आहेत म्हणून
- **च अहं तेषु न अवस्थित:** पण मी त्या भूतांमध्ये स्थित नाही, रहात नाही

**अर्थ**

जसे पाण्याने बर्फ परिपूर्ण भरलेले असते तसे मी म्हणजे निराकार परमात्म्याने हे सर्व जग पूर्ण व्यापलेले आहे, तसेच सर्व भूते माझ्यामध्ये संकल्पाच्या आधारावर राहिलेली आहेत, पण वास्तविक मी त्यांच्यामध्ये राहिलेलो नाही.

*मीं चि अव्यक्त-रुपानें जग हें व्यापिलें असे*
*माझ्यांत राहती भूतें मी न भूतांत राहतों ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) मी अव्यक्त आहे माझ्यामुळे हे सारे जगत व्याप्त आहे 2) सर्व भूतें माझ्या ठायी आहेत 3) पण मी त्या भूतांमध्ये नाही.

1) **अव्यक्तमूर्तिना मया इदं सर्वं जगत् ततम्:** हे सारे जगत त्या अव्यक्त परमात्म्याने व्याप्त आहे. सारे प्राणीमात्र त्याच्या ठायी निवास करतात आणि ईश्वर त्या भूतांच्या ठायी विद्यमान असतो. ईश्वराने सारे जगत व्याप्त आहे आणि ईश्वर सर्व जगात व्याप्त आहे. यात तसे पाहू गेल्यास दोन गोष्टी सामावलेल्या आहेत. एक तर ईश्वराचे मूळ स्वरुप हे व्यक्त नाही आणि दुसरी गोष्ट अशी की ईश्वर तमाम पदार्थांमध्ये व्याप्त आहे. परमात्म्याचे मूळ स्वरुप हे अव्यक्त आहे ते दिसत नाही. अशा अनेक गोष्टीही जगात आहेत. आकाश आणि वायु अशी दोन उदाहरणे देता येतील. त्यांनाही आपण अव्यक्त असे म्हणू शकतो. तरी पण आकाश आणि वायु हे इंद्रिय गोचर आहेत. इंद्रियांच्या मदतीने आपण त्यांना जाणून घेऊ शकतो पण परमात्म्याच्या गुणांना मात्र आपण इंद्रियांच्या मदतीने जाणून घेऊ शकत नाहीत. परमात्मा अती व्यापक आहे. इतका व्यापक आहे की जिथे परमात्मा नसेल अशी एकही जागा सांगता येणार नाही. तरी ईश्वराची अलौकिकता ही आहे की तो आपल्या मूळ रुपात म्हणजे अस्सल स्वरुपात या जीव सृष्टीत व्यक्त रुपाने आढळतो. सर्वत्र अप्रकट म्हणजे गुप्त अव्यक्त तरी आपल्या मनात तो सत् चित् आनंदरुपात प्रकट आहे. मनात परमात्म्याचे सत् चित् आनंदरुप प्रकट होते. ईश्वराचे हे प्रकट रुप सारे काही जाणत नाहीत. सत्संगती वा शास्त्रज्ञानाने हे जाणता येऊ शकते. परमात्मा अव्यक्त असूनही तो मनात प्रकट असतो. विशुध्द मनात ईश्वराचा साक्षात्कार होतो. अनुभव घेता येतो. ईश्वर मनात जेवढा प्रकट आहे तेवढा जरी

आपण समजून घेतला ना तरी आपले कार्य सिध्द झाले असे समजावे. परमेश्वर सर्वत्र व्याप्त आहे आणि त्याला आपण मनात अनुभवू शकतो एवढे जाणणे देखिल पुरेसे आहे. हा परमात्म्याचा एक स्वभाव झाला. एक रुप झाले. दुसरा स्वभाव असा की हे सारे दिसणारे जगत जड स्वरुपी आहे. हा परमात्म्याचा आविष्कार आहे. याप्रकारे ईश्वराची दोन रुपे झालीत. ईश्वर सत्यरुपी म्हणजे सर्वत्र व्याप्त आहे आणि तरीसुध्दा तो जड जगतात गुप्त आहे आणि जीवरुपात प्रकट आहे.

2) **सर्वभूतानि मत्स्थानि:** तमाम भूतमात्रे ईश्वराच्या ठायी निवास करतात म्हणजे त्याच्या आधारेच जगत असतात. त्याच्या आधाराशिवाय प्राणीमात्रांचे जगणे केवळ अशक्य स्वरुपाचे आहे. ज्याच्या ठायी जी वस्तु ओतप्रोत भरलेली असते त्याच्याच आधारे तो जगत असतो. कारणामुळेच तर कार्य उद्भवते. कार्य हे कारणाहून भिन्न असू शकत नाही. एवढेच नव्हे तर कारण आणि कार्य यांचे स्वतंत्र अस्तित्व नसल्यामुळे कार्याच्या ठायी कारणाचा आभास निर्माण होतो. यामुळे कार्य नेहमीच कारणाच्या आश्रयाने म्हणजे कारणाच्या आधारेच असते. जगात चेतन आणि जड हे दोन प्रकार आहेत. जड जगत ज्या वस्तुपासून निर्माण झाले ती वस्तुही जड असायला हवी असा जैन आणि सांख्य तत्त्वज्ञानाचा तर्क आहे. वेदान्त आणि गीतेचे मानणे असे आहे की जगत जर कुठल्या तरी वस्तुमुळे जन्माला आले असेल तर मग सांख्य आणि जैन तत्त्वचिंतकांचे म्हणणे योग्य आहे पण जग जरी जडरुपी वाटत असेल तरी ते चैतन्याचा आभासमात्र आहे. दोरीपासून काही साप बनत नाही पण सर्प हा दोरीचा आभास आहे किंवा दोरीचा देखावा आहे. मृगजळ काही कुठलीही वस्तु नाही सूर्य किरणांचा वाळूशी संयोग होऊन पाण्याचा आभास होऊ लागतो. अगदी तसेच तर चैतन्यस्वरुपी परमेश्वराचा आभास जगत आहे. जीव उत्पन्न वस्तु नसून चैतन्यस्वरुपी परमेश्वराने स्वीकारलेले रुप आहे. स्वयं परमेश्वराने जीवाचे रुप धारण केले आहे. यामुळे गीता म्हणते की तमाम जड आणि चेतन पदार्थ ईश्वराच्या आश्रयाने किंवा त्याच्या आधाराने रहातात.

3) **अहं तेषु न अवस्थित:** तमाम जड चेतन पदार्थ ईश्वराच्या आधारे जगत असले तरीदेखिल परमेश्वर त्या पदार्थांच्या अधीन नसतो. आश्रयाने नसतो. परमेश्वराचे स्वतंत्र अस्तित्व असते. असत्य वस्तु ही सत्य वस्तुच्या आश्रयाने रहाते सत्य वस्तु मात्र असत्याच्या आधारे असू शकत नाही. ज्या वस्तुच्या आश्रयाने ब्रह्मांडातील तमाम पदार्थ अस्तित्वात येतात ते मूळ सत्य कारण रुपी तत्त्व ब्रह्म वा परमेश्वर आहे. तोच तमाम पदाथांर्चा आश्रय आहे. यामुळे त्याचे स्वतंत्र अस्तित्व आहे.

: 5 :

*न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्।*
*भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावन:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च मत्स्थानि भूतानि न:** पण खरे पाहू गेल्यास सर्व भूते माझ्या ठायी स्थित नाहीत
- **मे ऐश्वरं योगं पश्य:** हा माझा प्रभाव, योगमायेचा प्रभाव, ईश्वरीय योग बघ
- **भूतभृत्:** सर्व भूतांचे धारण आणि पोषण करणारा
- **च भूतस्थ: न:** एवढे झाल्यावरही मी भूतांमध्ये रहात नाही
- **मम आत्मा भूतभावन:** माझे स्वरुप सर्व भूतांना उत्पन्न करणारे म्हणजे भास उत्पन्न करणारे आहे

**अर्थ**

ती सर्व भूते माझ्या ठिकाणी राहिलेली नाहीत पण माझी ईश्वरी योगशक्ती पहा की भूताना उत्पन्न करणाराआणि त्यांचे धारण-पोषण करणारा असूनही माझा आत्मा वास्तविकपणे भूतांच्या ठिकाणी राहिलेला नाही.

*न वा भूतें हि माझ्यांत माझा हा दिव्य योग कीं*
*करितों धरितों भूतें परी त्यांत नसें कुठें।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) खरे पाहू जाता माझ्या ठायी भूत म्हणजे प्राणीजात नाहीत. 2) हा माझा ईश्वरीय योग बघ. 3) सर्व भूतांचा धारक-पोषक मीच आहे. 4) पण एवढे सारे असतानाही मी भूतांमध्ये रहात नाही. 5) माझे स्वरुप सर्व भूताना उत्पन्न करणारे आहे.

**स्पष्टीकरण**

1) **च मत्स्थानि भूतानि न:** खरे पाहू गेल्यास ईश्वराच्या ठायी भूतमात्र म्हणजे प्राणी नाहीत. हा ईश्वरी योग आहे. तमाम भूतमात्रांचे धारणकर्ते आणि पोषणकर्ते ईश्वरच आहेत आणि एवढे असतानासुध्दा ईश्वर या भूतमात्रांच्या ठायी वसत नाहीत. ईश्वराचे स्वरुप तमाम भूतमात्रांना उत्पन्न करणारे आहे. ईश्वराच्या ठायी भूतमात्र म्हणजे जड वा चैतन्यमय जगत नाही. मागील श्लोकात चर्चा आली आहे की संपूर्ण जड-चेतन जगत ईश्वराच्या ठायी वसलेले आहे ते कार्याच्या अपेक्षेने सांगितले गेले आहे. याचा अर्थ असा की ब्रह्मांडरुपी कार्य कारणरुप ईश्वराच्या अधीन असते. कार्य कारणाच्या आधारावर असतेच पण या श्लोकातील चर्चा मात्र कारणाच्या अपेक्षेने केली गेली आहे. याचा अर्थ असा की कारणाच्या अपेक्षेने कार्याचे अस्तित्त्व नाही. घट हा मातीला दिलेला आकार आणि रुप आहे. तसे पाहू गेल्यास आकार काही वस्तु नाही. मातीच्या अपेक्षेने पाहू जाता माती ही मातीच आहे तिथे घटाचे अस्तित्त्व नाही. अगदी अशाच प्रकारे कारण रुप ईश्वराच्या अपेक्षेने बघू जाता कारण रुप ईश्वराला वगळता ब्रह्मांडरुप कार्याचे काहीही अस्तित्त्व नाहीच. गौडपादाचार्य म्हणतात:

*कार्ये कारणता याता कारणे नहि कार्यता ।*
*कारणत्वं ततो गच्छेत् कार्याभावविचारता ॥*

अर्थात् कार्याच्या ठायी कारण वसते. कारणात कार्य नसते. यामुळे कार्याचे स्वतंत्र अस्तित्त्व नाही. हे जाणून जगाकडे बघायची कारणदृष्टीच असायला हवी म्हणजे ईश्वरीय दृष्टिकोणानेच जगाकडे बघायला हवे.

2) मे ऐश्वरं योगं पश्य: हा माझा ईश्वरी योग आहे असे गीता म्हणते. खरे तर मूळ कारणाच्या दृष्टीने विचार करु गेल्यास केवळ ईश्वररुप कारणाचेच अस्तित्व शेष उरते आणि कार्यरुप जगाचे अस्तित्व त्या कारणरुप ईश्वराशिवाय काहीही उरत नसते. यामुळे ही एक अपूर्व वस्तु आहे. यामुळे याला 'ईश्वरी योग' असे नाव आहे. जगतरुपी कार्याचे अस्तित्व आपण सारेच मानतो. यामुळे या अपेक्षेने कारणरुप ईश्वर आणि कार्यरुप जगत या दोघांचे अस्तित्व आपल्यासाठी असते पण कारणरुप ईश्वराच्या दृष्टिकोणातून बघू जाता ईश्वराशिवाय कार्यरुप जगताचे अस्तित्व उरत नाही यालाच ईश्वराचे 'योग ऐश्वर्य' म्हणतात.

3) **भूतभृत्:** ईश्वर तमाम भूतमात्रांना धारण करणारा आहे. यात दोन गोष्टींचा समावेश आहे. एक म्हणजे ईश्वर उत्पन्न करणारा आहे आणि दुसरे ईश्वरच ईश्वराच्या ठायी सर्वांना विलीन करुन घेणारा आहे. आपण सारे पिंड-ब्रह्मांडात्मक जगताचे अस्तित्व मान्य करतो तर मग त्याचे मूळ कारण ईश्वरालाच मानावे लागेल. घट घडवणारा चेतन कुंभार आहे. तो 'निमित्त कारण' आहे. मातीमुळे घट बनतो यामुळे माती हे झाले 'उपादान कारण'. इथे संपूर्ण जगताचे मूळ कारणरुपी ईश्वर उपादान कारण असून निमित्त कारणसुध्दा आहे. हा अद्वितीय ईश्वर जगाला निर्माण करतो आणि धारणही करतो. प्रलयकाळी आपल्या ठायी सामावूनही घेतो. तैत्तिरीय उपनिषद् म्हणते:

***यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति ।***
***यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्य । तद् ब्रह्मेति ।***
***(3 /1)***

अर्थात् ज्यातून हे सारे भूतमात्र (ब्रह्मदेवापासून तर थेट गवताच्या पात्यापर्यंतचे सारे चराचर जगत) उत्पन्न होतात ज्याच्या आधारे हे सारे स्थितीकाळात जीवंत रहातात, अस्तित्वात असतात आणि अंतकाळी ज्याच्या ठायी विलीन होऊन जातात ते ब्रह्मतत्त्व होय. त्या ब्रह्मतत्त्वाला जाणून घेण्याची इच्छा पाळावी. त्याचे ज्ञान प्राप्त करुन घ्यावे.

4) **च भूतस्थ:** न इतके असल्यावरदेखिल ईश्वर भूतमात्रांच्या ठायी वसत नाही. ईश्वर तमाम भूतमात्रांना जन्माला घालणारे आणि पोषण करणारे तत्त्व असले तरी ते तत्त्व त्यांच्या ठायी वसत नाही म्हणजे ते तत्त्व भूतमात्रांच्या आधारे असत नाही. यामुळे ईश्वर तत्त्व अलिप्त असते. जगातल्या स्थूल पदार्थांच्या ठायी जिथे-जिथे म्हणून कार्य कारण भावसंबंध दिसून येतो तिथे-तिथे कार्य कारणाच्या गुण दोषांनी ते युक्त असते असे म्हणायला वाव आहे. जगातील तमाम पदार्थ स्थूल असल्यामुळे त्यांच्या ठायी कार्याच्या गुणामुळे कारणाचे गुण दिसून येतात पण जगाचे मूळ कारण रुप परमात्म तत्त्व हे अतिसूक्ष्म असल्यामुळे कार्याचे गुणदोष त्याला लिंपित होण्याचा सुतराम अवसर नसतो. हे परमतत्त्व अतिसूक्ष्म तर असतेच शिवाय ते

संपूर्ण जगताचे मूळ कारण आहे. तरी त्यापासून जगत हे स्वतंत्रपणे उपजत नसल्यामुळे अर्थात् जगत हे केवळ ईश्वराचे भासमात्र अस्तित्व असल्यामुळेही त्याला गुण-दोषरुपांचे लेपन होत नाही. मूळ परमात्मतत्त्व हे अतिसूक्ष्म असल्यामुळे त्याच्या दिसण्याचा प्रश्नच उद्भवत नाही पण परमात्म्याचे भासमान रुप असलेले जगत मात्र दिसते कारण की ते स्थूल आहे. कारणरुप परमात्मा अतिसूक्ष्म असल्यामुळे तो दिसू शकत नाही. अशा प्रकारे जगत हे स्थूल असून ईश्वर हा सूक्ष्म आहे. असा जगत आणि जगदीश्वरांमधला स्थूल-सूक्ष्म भावसंबंध आहे. यामुळे जगताचे स्थूल गुणदोष ईश्वराला लिंपित होत नाहीत. अतिसूक्ष्म असल्यामुळे आकाशात जगतातील तमाम व्यक्ताव्यक्त पदार्थ असतात तरी आकाश सर्वथा अलिप्त असल्यामुळे अस्पृष्ट असते.

5) **ममात्मा भूतभावनः** ईश्वराचे स्वरुप तमाम भूतमात्रांना उपजविणारे उत्पन्न करणारे आहे. ईश्वर सर्व जगाचा उत्पत्तीकर्ता आणि पोषणकर्ता आहे. जगत हे स्वतंत्र अस्तित्व असलेले पदार्थ रुप नाही. हे सांगण्यासाठी इथे स्पष्टपणे हे सांगितले गेले आहे की ईश्वर तमाम भूतमात्रांचा भास घडवतो जसा दोरीच्या ठायी सर्पाचा भास घडतो. जगत हे परमात्म्याचा भास आहे ती काही ईश्वरद्वारा निर्मित स्वतंत्र वस्तु नाही. जगताच्या मूळ कारणरुप असलेल्या ईश्वराचा आपणास परिचय नसल्यामुळेच आपण जगताला सत्यरुप मानतो. कार्यरुप जगताचा मूळ कारणरुप परमात्माच आहे हे निश्चित.

: 6 :

***यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान्।***
***तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **यथा सर्वत्रगः** जसा सर्वत्र गमन करणारा म्हणजे जसे आकाशापासून उत्पन्न झालेला सर्वगामी
- **वायुः नित्यं:** वायु नेहमीच
- **आकाशस्थितः** आकाशात स्थित असतो
- **तथा:** त्या प्रमाणे, तसेच
- **सर्वाणि भूतानि:** सर्व प्राणी, भूते
- **मत्स्थानि:** माझ्या ठायी स्थित आहेत
- **इति उपधारयः** असे समज, असे जाण

### अर्थ

जसा आकाशापासून उत्पन्न होऊन सर्वत्र फिरणारा महान वायु नेहमी आकाशातच रहातो, त्याचप्रमाणे माझ्या संकल्पाने उत्पन्न झाल्यामुळे सर्व भूते माझ्यात रहातात, असे समज.

***आकाशांत महा-वायु सदा सर्वत्र राहतो***
***माझ्यांत सगळीं भूतें राहती जाण तूं तशीं।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) सर्वत्र गमन करणारा वायु ज्याप्रमाणे सदैव आकाशात स्थित रहातो 2) तसेच सर्व प्राणी माझ्यात स्थित आहेत असे जाण.

### स्पष्टीकरण

1) **यथा सर्वत्रगः वायुः नित्यं आकाशस्थितः** सर्वत्र गमन करणारा वायु ज्याप्रमाणे आकाशात स्थित असतो त्याप्रमाणे सारे प्राणीमात्र ईश्वराच्या ठायी स्थित असतात असे जाणावे. मागील दोन श्लोकांमधून केलेले निरुपण अधिक स्पष्ट व्हावे म्हणून वायुचा दृष्टांत दिलेला आहे. पृथ्वी, अग्नी, जळ, वायु, आकाश ही पंचमहाभूते होत. यात आकाश हे अत्यंत सूक्ष्म आणि व्यापक असे तत्त्व आहे. तसे तर वायूदेखिल सूक्ष्म आणि व्यापक तत्व म्हणता येईल पण ते आकाशाइतके नव्हे. अग्नी, जळ आणि पृथ्वी ही तिन्हीही तत्त्वे स्थूल होत. आकाशाचा गुण आहे शब्द. शब्दाचे ज्ञान आपणास कानामुळे होते. आकाश हे अतिसूक्ष्म आणि व्यापक असले तरी ते काही ईश्वराइतके व्यापक आणि सूक्ष्म नाही यामुळे ते स्थूल किंवा जड रुप ठरते. जड म्हणजे कुणाला न जाणणारा पण कुणाकडून जाणता येईल असा विषय होय. पंचमहाभूते आणि त्यापासून उत्पन्न पदार्थांना जाणणारे तत्त्व त्याहून व्यापक आणि सूक्ष्म असेल हे उघडच आहे. आकाशाहून व्यापक आणि सूक्ष्म असे ज्ञानस्वरुपी परमात्मतत्त्व आहे. ईश्वरामुळे जगताचा आपल्याला आभास होतो. त्यामुळेच जगताचे अस्तित्व आहे आणि प्रलय काळी जगत त्या ईश्वराच्या ठायीच विलीन होणार आहे हे समजावून सांगण्यासाठी या श्लोकात एक दृष्टांत दिला गेला आहे.

परमात्म्यानंतर केवळ आकाश हेच तत्त्व सूक्ष्म, श्रेष्ठ आणि व्यापक असल्यामुळे परमात्म्याचा दृष्टांत देण्यासाठी आकाश तत्त्वाचा विचार केला गेला आहे. आकाशात वायू असतो. पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारांगण वगैरे सारे आकाशाच्या आधारेच वसतात. आकाशाचे काम अवकाश प्रदान करणे आहे. ईश्वराने सर्वप्रथम आकाशाचीच निर्मिती केली. आकाशानंतर क्रमश: वायु, अग्नी, जळ, पृथ्वी या क्रमाने ब्रह्मांडातील सारे पदार्थ आकाराला आलेत. आकाशात सर्व पदार्थ वसत असतानाही इथे केवळ वायुचा दृष्टांत दिला याचे कारण असे की अन्य भूतमात्रांच्या तुलनेने वायू हा अधिक सूक्ष्म आणि व्यापक आहे.

2) **तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानि इति उपधारय:** तशाच प्रकारे माझ्या ठायी भूतमात्र विद्यमान आहेत असे जाणावे असे योगेश्वर सांगतात. आकाशात ज्याप्रमाणे वायु आहे तसेच ईश्वरात सर्व जगत आहे असे जाणावे.

विनोबाजी म्हणतात की आकाशात वायु दोन प्रकारे वसतो. एक म्हणजे निश्चल रुपाने आणि कधी चंचळ रुपाने वसतो. वायु जेव्हा वहात नाही तेव्हा तो आकाशात नाहीच असे वाटते पण वाहू लागतो तेव्हा त्या तत्त्वाचा बोध होतो. तशाच प्रकारे प्रलय काळात प्राणीमात्र ईश्वराच्या ठायी बीज रुपाने वसतात. त्यांच्या अस्तित्वाचा पत्ता लागत नाही. वृक्ष जेव्हा बीज रुपात वसतो तेव्हा त्याच्या अस्तित्वाचा शोध लागत नाही. बीजापासून जेव्हा वृक्ष रुपाने ते तत्त्व प्रकट होते तेव्हा त्याची नेमकी ओळख होते. परमात्म्याच्या ठायी जेव्हा जगत बीज रुपाने म्हणजे शक्ती रुपाने वसते तेव्हा केवळ परमात्म तत्त्वाचेच अस्तित्व जाणवते. या स्थितीत दुसरी कोणतीही वस्तु अस्तित्वात आहे असे वाटणे संभवनीयच नाही पण ईश्वर जेव्हा आपल्या अलौकिक माया शक्तीने हे जगत निर्मू लागतो, जगताला प्रकट करतो तेव्हा ईश्वर आणि त्याने निर्मिलेले जगत अशी दोन रुपे जणू त्याचीच ही दोन रुपे दिसायला लागतात. जगताचा भासच जर उत्पन्न नाही झाला तर मग ईश्वर आणि जगत अशी दोन रुपे तरी कशी दिसावीत? ईश्वराचे अस्तित्व तरी कसे मान्य व्हावे? जगाचे अस्तित्व हे दोन रुपात प्रकट होते एक म्हणजे जगत आणि दुसरे म्हणजे ईश्वर. ईश्वर हा जड आणि जीव दोन रुपात प्रकट होतो. ईश्वर जर केवळ जगत रुपात प्रकट होईल आणि जीवरुपात प्रकट होणार नाही तर मग त्याच्या अस्तित्वाचा शोध कदापि लागू शकणार नाही. ईश्वर जीवाच्या ठायी प्रकट होतो यामुळेच तर आपल्याला जगत आणि जगताच्या निर्माता अशा जगदीश्वराच्या परम सत्तेचेही ज्ञान होते. ईश्वर जर केवळ जीव रुपात प्रकट होईल आणि जगत रुपात प्रकट होणार नाही तरी आपणास जड जगताच्या अभावी ईश्वरी अस्तित्वाचे ज्ञान नाही होऊ शकणार. आपणास आपल्या अस्तित्वाचे तरी ज्ञान कसे बरे होईल? तुलसीदासजी म्हणतात:

***असि सब भाँति अलौकिक करनी।***
***महिमा जासु जाइ नहिं बरनी॥***

अर्थात् ईश्वराची अशी अलौकिक करणी आहे की त्याच्या महात्म्याचे वर्णन करणे आपल्याला शक्यच नाही.

विनोबाजींनी आणखी एक मार्मिक मुद्दा मांडला. ते म्हणतात की आकाश आणि वायुचा दृष्टांत देण्यामागे गीतेचा आणखी एक दृष्टिकोण असा आहे की आकाश आणि वायु ही तत्त्वे कार्यकारणसंबंधामुळे अभेदयुक्त आहेत. तशाच प्रकारे जगत आणि जगदीश्वर यांच्या ठायी सुध्दा कार्यकारणभावसंबंध असल्यामुळे अभेदत्व आहे. यात केवळ एकच अंतर आहे आणि ते असे आहे की आकाश आणि वायु ही दोन्हीही तत्त्वे स्थूल असून जगत आणि जगदीश्वर यापैकी जगदीश्वर हे तत्त्व सूक्ष्म आणि व्यापक आहे.

: 7 :

***सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्।***
***कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय कल्पक्षये:** हे अर्जुना, कल्पाचा क्षय झाल्यावर
- **सर्वभूतानि:** सारे प्राणीमात्र, सर्व भूते
- **मामिकां प्रकृतिं यान्ति:** माझ्या प्रकृतीला पावतात म्हणजे माझ्या प्रकृतीत लय पावतात
- **पुन: कल्पादौ:** पुनश्च कल्पाच्या आरंभी
- **अहं तानि विसृजामि:** मी त्यांना उत्पन्न करतो

**अर्थ**

हे अर्जुना, कल्पाच्या अखेरीस सर्व भूते माझ्या प्रकृतीत विलीन होतात आणि कल्पाच्या आरंभी त्याना मी पुन्हा उत्पन्न करतो.

*कल्पांतीं निजवीं भूतें मी माझ्या प्रकृतीमधें*
*कल्पारंभीं पुन्हां सारी मी चि जागवितों स्वयें।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) हे अर्जुना, कल्पाचा क्षय झाल्यावर प्राणीमात्र माझ्या प्रकृतीला प्राप्त होतात आणि 2) पुनश्च कल्पाचा आरंभ झाल्यावर मी सर्व भूताना उत्पन्न करतो.

**स्पष्टीकरण**

1) **कौन्तेय कल्पक्षये सर्वभूतानि मामिकां प्रकृतिं यान्ति:** कल्पाच्या क्षयाच्या प्रसंगी प्राणीमात्र ईश्वराच्या प्रकृतीला प्राप्त होतात आणि पुनश्च कल्पाच्या निर्मितीच्या प्रसंगी ईश्वर तमाम भूतमात्रांना जन्माला घालतो. मागील श्लोकातून जगत उत्पन्न झाल्यावर प्राणीमात्र स्थिती काळात ईश्वरी आश्रयामुळे कशा प्रकारे वसतो हा मुद्दा आकाश आणि वायुचा दृष्टांत देऊन सांगितला गेला आहे. या श्लोकातून जगताच्या स्थिती काळानंतर जेव्हा प्रलयकाळ येतो तेव्हा हे जगत कुणाच्या आश्रयाने वसते हे सांगितलेले आहे. इथे गीतेने 'कल्प' शब्दाचा प्रयोग केला. गीतेतील आठव्या अध्यायातील सतराव्या श्लोकात ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे एक हजार युगे आणि ब्रह्मदेवाची एक रात्र म्हणजे एक हजार युगे असे स्पष्टीकरण करुन असे सांगितले गेले की ब्रह्मदेवाच्या दिनारंभापासून जड-चेतन पदार्थ उत्पन्न होतात आणि बह्मदेवाच्या रात्रीच्यासोबत मग ते सारे प्रलय काळ आल्यामुळे ईश्वराच्या ठायी विलीन होतात. अशा प्रकारे या श्लोकातून ब्रह्मदेवाचा दिवस, रात्र आणि युग या संज्ञांचा प्रयोग करुन जगताच्या उत्पन्न होण्याचा आणि विलीन होण्याचा मुद्दा समजावून सांगण्यात आला आहे. ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे चारशे बत्तीस कोटी वर्षे. अशाप्रकारे या सृष्टीच्या निर्मितीला अदमासे दोनशे कोटी वर्षे लोटली आहेत.

या श्लोकातून गीता सांगते आहे की कल्पाच्या क्षयकाळी म्हणजे अंती म्हणजे चारशे बत्तीस कोटी वर्षे पूर्ण झाल्यावर जेव्हा या जगताचे आयुष्य पूर्ण होईल तेव्हा हे सारे ब्रह्मांड म्हणजे परमात्म्याची प्रकृती त्याच्या अलौकिक अशा माया शक्तीत विलीन होऊन जाईल. सृष्टीचे सारे बाह्य स्थूल स्वरुप नष्ट होऊन ते बीज रुपाने अस्तित्वमान राहील. जर ते बीज रुपानेही अस्तित्वात उरले नाही तर मग त्याची पुनर्निमिती नाही होऊ शकणार. परमात्मा ज्ञानरुपी म्हणजे सत् चित् आनंदरुपी आहे. त्याच्या ठायी वसणाऱ्या माया शक्तीला 'प्रकृती' या नावानेही ओळखले जाते. त्या माया शक्तीच्या ठायी सारे ब्रह्मांड बीज रुपाने वसते. ब्रह्मांडाचे अस्तित्व सुरुवातीला अव्यक्त रुपात असून नंतर ते व्यक्त रुपात प्रकट होते आणि अंतत: पुनश्च अव्यक्त रुपात रमते. हा सृष्टीचा क्रम आहे. तरीही सहाव्या श्लोकात जगताच्या स्थिती काळाची आरंभी चर्चा करण्याचे कारण असे की जगताचा हा स्थिती काळच आपल्या अनुभवाला येतो. जगताचा उत्त्पत्ती काळ आणि प्रलय काळ काही आपल्या अनुभवाला येत नाही. तो अनुभवायला येणे शक्य नाही. उत्त्पत्ती काळात तर आपण जन्मलो नव्हतो आणि प्रलय काळी आपल्या असण्याचा सुतराम संभव नाही. आपण नेहमीसाठी सृष्टीच्या स्थिती काळाशीच संबध्द असू शकतो. यामुळे आधी स्थिती काळाचे वर्णन आले. या श्लोकातून स्थिती काळानंतरच्या प्रलय काळाचे वर्णन करुन सारी सृष्टी ईश्वराच्या माया शक्तीच्या ठायी विलीन होऊन पुढे बीज रुपाने ईश्वराच्या ठायी वसते असे सांगितले गेले आहे.

2) **पुन: कल्पादौ अहं तानि विसृजामि:** कल्पाचा आरंभ झाला तर मग पुनश्च ईश्वर या सृष्टीला उत्पन्न करतो. प्रलयकाळानंतर उत्पत्ती काळ असतो. कल्पारंभी पुनश्च सृष्टीचा आरंभ होत असतानाच ब्रह्मांडातील तमाम जड चेतन पदार्थांना ईश्वर उत्पन्न करतो. प्रलय काळानंतर पुनश्च सृष्टीचा आरंभ होण्यादरम्यान किती काळ लोटतो हे मात्र काही सांगता येत नाही. हे सांगणे अवघड आहे.

: 8 :

*प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुन: पुन: ।*
*भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **स्वां प्रकृतिं अवष्टभ्य:** आपल्या प्रकृतीला ताब्यात करत म्हणजे आपल्या त्रिगुणात्मक मायेचा अंगिकार करुन
- **प्रकृते: वशात् अवशं:** प्रकृतीमुळे अधीन झालेले म्हणजे स्वभाववशतेमुळे परतंत्र झालेले
- **इमं कृत्स्नं भूतग्रामं:** या सर्व भूतांच्या समुदायाला
- **पुन: पुन: विसृजामि:** वारंवार (त्यांच्या कर्मानुसारे मी) निर्माण करतो

**अर्थ**

आपल्या मायेचा अंगिकार करुन प्रकृतीच्या ताब्यात असल्यामुळे पराधीन झालेल्या या सर्व भूत समुदायाला मी वारंवार त्यांच्या कर्मानुसार उत्पन्न करतो.

*हातीं प्रकृति घेऊनि जागवीं मी पुन्हां पुन्हां*
*भूतांचा संघ हा सारा प्रकृतीच्या अधीन जो ।*

विषय: या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) आपल्या प्रकृतीला ताब्यात राखून 2) प्रकृती म्हणजे माया शक्तीच्या अधीन सर्व भूत समुदायाला 3) पुन्हा पुन्हा उत्पन्न करतो.

**स्पष्टीकरण**

1) **प्रकृतिं स्वामवष्टभ्य:** ईश्वर आपल्या प्रकृतीवर नियंत्रण राखून माया शक्तीच्या अधीन असणाऱ्या तमाम भूत मात्रांना वारंवार उत्पन्न करतो. ईश्वर आपल्या प्रकृतीला म्हणजे माया शक्तीला स्वत:च्या अधीन ठेवतो. इथे एक प्रश्न निर्माण होतो की जगाची उत्पत्ती करणे, स्थिरपद ठेवणे आणि अंतत: विलीन करुन देणे या तीन गोष्टी अखेर मायेच्या अधीन आहेत की ईश्वराच्या स्वाधीन आहेत? तसे पाहिले तर काही अंशी ही सर्ग शक्ती म्हणजे पदार्थांना जन्माला घालण्याची शक्ती आपल्यासारख्या तमाम चैतन्ययुक्त जीवांच्या ठायी आहे पण ती सदा सर्वकाळ आपल्या अधीन राहीलच असे मात्र म्हणता येत नाही. आजकाल अण्वस्त्रे बनताहेत. आणविक शक्तीचा आपण सदुपयोग करतो की दुरुपयोग करतो हे काही आपल्या हाती नाही. आपल्या सर्वांची इच्छा तर आहेच की विनाशासाठी आण्विक शक्तीचा उपयोग होऊ नये. ईश्वराची अवस्था जर आपल्यासारखीच झाली ना तर मग या विश्वाचे नेमके कायच होईल हे काही सांगता येत नाही. आपल्या देहात ईश्वराचा वास आहे. तोच आपल्या देहाला सुव्यवस्थित राखण्याचे कार्य करतो. आपण अन्न सेवन करतो. ईश्वर ते पचवून त्याचे रुपांतरण रक्तात करतो. आपण या कामासाठी काय बरे करतो ? उत्तर आहे की काहीही करत नाहीत. ईश्वर अखंडपणे नियमानुसारच निश्चयपूर्वक चालतो असे आपल्या बाबतीत मात्र घडत नाही. याचे काय बरे कारण असावे ? याचे उत्तर गीता देते की पहिली गोष्ट अशी की माया शक्ती  ईश्वराच्या अधीन असते. दुसरी गोष्ट अशी की ईश्वराची ज्ञान शक्ती अकुंठित असते. त्यात अहंकार, काम, क्रोध यासारखी व्यवधाने नसतात. या दोन गोष्टींमुळे ईश्वराची निश्चय शक्ती ही कायम असते.

2) **प्रकृते:** वशात् अवशं इमं कृत्स्नं भूतग्रामम्: सारा भूत समुदाय हा प्रकृतीच्या म्हणजे माया शक्तीच्या अधीन आहे. मायेला वश आहे. माया ईश्वराने वश करुन घेतली आहे. आपण सारे मायेच्या अधीन आहोत. मायेत फसल्यामुळे आपल्याला दु:खाचा अनुभव येतो. तरी मायेचे आकर्षण इतके जबरदस्त असते की आपण मायेला सोडू शकत नाही. एखादा मुलगा व्यसनाधीन होतो, चुकीच्या मार्गाला लागतो, वाईट सवयींच्या अधीन होतो यामुळे आई कंटाळून जाते. थकून जाते. तात्कालिक रागामुळे कधी तर 'निघ माझ्या घरातून' असे सांगूनही टाकते पण जेव्हा मुलगा खरोखरच घर सोडून जायची तयारी करु लागतो तेव्हा आईला मोह घेरुन घेतो, तिच्या नेत्रात अश्रु साकळतात. तीच आई आपल्या मुलाला म्हणते 'बाबा रे, तू आता कुठे जाशील? घर सोडू नकोस. इथेच रहा. वर्तन सुधार.' मुलगा काही आपल्या वाईट गोष्टी सोडायला तयार नाही आणि आई काही मुलाचा त्याग करु शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे. आपल्या मुलाच्या वाईट वर्तनामुळे ती दु:खी कष्टी रहाते. तुलसीदासजी म्हणतात:

*अति प्रचण्ड रघुपति कै माया ।*
*जेहि न मोह अस को जग जाया ॥*

अर्थात् रघुपतीची माया अशी प्रचंड आहे. मायेवर ज्याचा जीव जडला नाही असा कुणी का उत्पन्न झाला आहे खरा?

आपल्याला परमात्म्याच्या अधीनही रहावे लागते. आपण ज्यावेळी असत्याचरण करतो ना तेव्हा आतून आवाज येतो की तुझे असे असत्याचरण योग्य नव्हे बरे! पण आपण मात्र नेहमी या आवाजाच्या अनुरोधाने वाटचाल करत नसतो. याचे कारण असे की आपण मायेच्या अधीन असतो. मायेच्या प्रेरणेने प्रेरित असे आपले वर्तन असते. एवढेच नव्हे पण मायेच्या इशाऱ्यावरच आपले वर्तन असते हे खरे आहे. तरीसुध्दा आतला ईश्वराचा आवाज किंवा संकेत एवढा बळकट असतो की तो सातत्याने इशारा देतच असतो आणि कधी तरी आपल्याला या गोष्टीचा पश्चात्ताप होतो की आपले काही तरी चुकत चालले आहे. ईश्वरी स्वरुपाचे आपल्याला ज्ञान होताच आपले अज्ञान दुर होईल आणि आपण मायेच्या अधीन न रहाता ईश्वराच्या अधीन राहू लागतो.

3) **तिसरी गोष्ट अशी आहे की पुन: पुन:** विसृजामि: ईश्वर या मायाधीन अशा भूत समुदायाला वारंवार निर्माण करत रहातो. याचा अर्थ असा की जो मायाधीन राहून जगत असतो ना त्याला वारंवार जन्म हा घ्यावाच लागतो. मायेच्या अधीन न रहाता जे ईश्वराधीन असे आयुष्य जगतात त्यानाच मोक्ष लाभ होतो. आपले जीवन दोन प्रेरणांच्या मध्ये आहे. यात आपला जीवन प्रवाह चाललेला असतो. आत असते ईश्वरी प्रेरणा ज्यामुळे आपण सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य-पालन या दिशेने वाटचाल करु लागतो. दुसरी प्रेरणा आपल्याला मायाधीन जीवन शैली शिकवते. यामुळे असत्य, हिंसाचार, विषयासक्ती आणि ममतेच्या दिशेने आपण वाटचाल करु लागतो. यामुळे आपल्या हातून कधी सत्कर्मे होतात तर कधी असत्कर्मे घडतात. अशुभ कर्मे घडतात. वाईट कामे घडतात. अशा प्रकारे आपण शुभाशुभ कर्मांचे आचरण करतो. यामुळे आपण कर्म बंधनातून मुक्त न होता जन्म मृत्युरुपी संसार चक्रात फिरत रहातो. फसून जातो.

: 9 :

***न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय।***
***उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धनंजय:** हे अर्जुना
- **तेषु कर्मसु असक्तं:** त्या कर्मात अनासक्त म्हणजे आसक्ती रहित
- **च उदासीनवत् आसीनं:** आणि उदासीन म्हणजे तटस्थाप्रमाणे रहाणाऱ्या, (ज्याची सर्व कार्ये कर्तृत्वाभिमानाला सोडून आपोआप म्हणजे केवळ सत्तामात्रेकरुन होतात त्याचे नाव 'उदासीनाप्रमाणे' असे आहे. )
- **मां:** मला, मज परमात्म्याला
- **तानि कर्माणि:** ती कर्मे
- **न निबध्नन्ति:** बंधनात टाकत नाहीत

**अर्थ**

हे अर्जुना, त्या कर्मात आसक्ती नसलेल्या आणि उदासीनाप्रमाणे असलेल्या मज परमात्म्याला ती कर्मे बंधनकारक होत नाहीत.

***परी हीं सगळीं कर्मे बांधूं न शकतीं मज***
***उदासीनापरी राहें अनासक्त म्हणूनियां।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) त्या कर्मात अनासक्त 2) उदासीनाप्रमाणे रहाणाऱ्या मला 3) ती कर्मे बंधनात टाकत नाहीत

**स्पष्टीकरण**

1) **तेषु कर्मसु असक्तम्:** ईश्वर या कर्मांबाबत उदासीन असतो आणि अनासक्त असतो परिणामी त्याला ही कर्मे काही बंधनात टाकत नाहीत. ईश्वर त्या कर्मांबाबत उदास आणि अनासक्त भाव बाळगतो. उत्पत्ती असो वा स्थिती किंवा मग प्रलय का असेना ईश्वर या तमाम कर्मांच्या बाबतीत अनासक्त असतो. कोळ्याने जाळे विणावे तसे जाळे तो विणतो पण कोळ्याप्रमाणे त्यात अडकून नाही रहात. आपण सारे जीव त्या कोळ्यासारखे आहोत. आपणही सृष्टी निर्माण करतो पण त्यापासून

अनासक्त नाही राहू शकत. आपण एखादे चांगले काम केले की लगेचच अहंकाराने फुगून जातो. आपण कोण आहोत याचा कधी आपण विचार करतो काय ? खरे तर आपले स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्त्वच मुळी नाही, अस्तित्त्व हे केवळ ईश्वराचेच असते. सारे काही ईश्वरच आहे पण आपण आपल्या अज्ञानामुळे ईश्वराच्या अस्तित्वाला ओळखत नाही. अज्ञानामुळेच आपल्या ठायी अहंकारासारखे अवगुण जन्माला येतात. यामुळे आपण अनासक्त नाही राहू शकत. ईश्वर विकाराधीन नसल्यामुळे तो अनासक्त राहू शकतो.

2) **च उदासीनवत् आसीनम्:** जो अनासक्त असतो तो आणि तोच अलिप्त आणि तटस्थ राहू शकतो. आपण सारे अनासक्त नसल्यामुळे अलिप्त वा तटस्थ राहू शकत नाहीत. आसक्ती जन्माला आली तिथे वृत्तीच्या ठायी तटस्थता कशी बरे आकाराला येईल? जिथे तटस्थता नसेल तिथे शांततेचा अनुभव कसा यावा? शांतिशिवाय सुख लाभणे कदापि शक्य नाही. संबंधांमुळे आसक्ती जागते आणि त्याचे कारण आहे ममता. अर्जुनाची अशी अवस्था झाली. तो ममतेने घेरला गेला आणि शांतता घालवून बसला. ममतेमुळे अर्जुन इतका काही व्याकुळ बनला की स्वत:ला सांभाळू शकला नाही. तमाम जीवमात्रांची अवस्था अशीच अर्जुनासारखी होते.

3) **मां तानि कर्माणि न निबध्नन्ति:** जगाच्या उत्पत्ती आणि प्रलयाची कर्मे ईश्वराला लिंपित करत नाहीत. ईश्वर अनासक्त आणि तटस्थ असल्यामुळे कर्मांच्या बंधनात फसत नाही. उत्पत्ती, स्थिती आणि लय या प्रसंगी उभ्या जगताला आपल्या ठायी सामावून घेणे काही साधी-सुधी गोष्ट नाही. चौथ्या अध्यायात या स्थितीचे वर्णन 'दिव्य कर्म'असे केले गेले आहे. एवढी अलौकिक कर्मे आचरुनसुध्दा ईश्वर लिप्त होत नाही हे वैशिष्ट्य आहे. या श्लोकाच्या माध्यमातून ईश्वर आपल्याला हा धडा देत आहे की सामान्य असो वा विशेष कुठलेही कर्म असेना का आपण त्याच्या ठायी अनासक्त भाव बाळगावा. बंधनात फसून जाऊ नये आणि परमात्म स्वरुपाचे ज्ञान संपादन करावे. जोवर आपण ईश्वराचे ज्ञान प्राप्त करुन घेत नाही तोवर आपण त्याच्या सारखी बंधनरहित अवस्था अनुभवू शकत नाही.

: 10 :

*मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।*
*हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मया अध्यक्षेण:** अधिष्ठाता अशा माझ्या सान्निध्याने म्हणजे माझ्या अध्यक्षतेमुळे
- **प्रकृतिः** प्रकृती म्हणजे माया
- **सचराचरं सूयते:** सर्व चराचर जगत निर्माण करते
- **कौन्तेय अनेन हेतुना:** हे अर्जुना या कारणामुळेच
- **जगत विपरिवर्तते:** हे जग आवागमन रुपी चक्रात फिरत आहे

**अर्थ**

हे अर्जुना, माझ्या अधिष्ठानामुळे प्रकृती चराचरासह सर्व जग निर्माण करते, याच कारणाने हे संसार चक्र फिरत आहे.

*साक्षी मी प्रकृति-द्वारा उभारीं सचराचर*
*त्यामुळें सर्व सृष्टीची ही घडामोड होतसे ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) माझ्या अध्यक्षतेमुळे माया स्थावर जंगम जगत उत्पन्न करते. 2) या कारणानेच जगाचे चक्र अविरत सुरु आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मया अध्यक्षेण प्रकृतिः सचराचरं सूयते:** ईश्वराच्या अध्यक्षतेखाली प्रकृती म्हणजे माया शक्ती स्थावर आणि जंगम सृष्टीला जन्माला घालते. यामुळेच हे जगाचे चक्र अविरतपणे सुरु आहे. माया शक्ती चराचर जगाला निर्माण करते. आठव्या श्लोकात चर्चा येते की ईश्वर तमाम भूतमात्रांना जन्माला घालतो. नवव्या श्लोकात म्हटले की ईश्वर उदासीन असतो त्यामुळे कुठलेही बंधन त्याला स्पर्श करु शकत नाही. वरवर बघू जाता ही दोन विधाने परस्पर विरोधी वाटतील पण या श्लोकात याचे स्पष्टीकरण आले आहे. लोहचुंबक काहीही न करता लोखंडाला प्रवृत्त करतो. ईश्वर चुंबकासारखा आहे. ईश्वर ज्ञानस्वरुपी आहे. तो केवळ ज्ञानस्वरुपी असेल आणि त्याच्या ठायी जर जगताला निर्माण करण्याची शक्ती नसेल

ना तर मग त्याची कुणीही भक्ती करणार नाही. प्रत्येक कार्यात ज्ञान आणि कर्म शक्तीचा समन्वय हवा. ईश्वराच्या ठायी या दोन्ही शक्ती आहेत. ईश्वराच्या क्रिया शक्तीला 'माया' असे म्हणतात. इथे माया शक्तीला 'प्रकृती' असे नाव दिले गेले आहे. ही प्रकृती ईश्वराच्या अध्यक्षतेखाली ईश्वराच्या ज्ञान स्वरुपाला म्हणजे चैतन्य स्वरुपाला झाकून ठेऊन ब्रह्मांडात जड वस्तुंचा भास करवते. जड याचा अर्थ चैतन्य विहीन नव्हे! जडाच्या ठायीही चैतन्य वसते पण ते अव्यक्त रुपात असते. हेच चैतन्य पशु-पक्षी-कीटक-जंतु वगैरे जीव सृष्टीत मात्र व्यक्तपणे दिसू शकते याचे कारण असे की जीव सृष्टीत म्हणजे पिंडात्मक देहात मन, इंद्रिये यासारखी ज्ञानाची साधने उपस्थित असतात. यामुळे मनात ज्ञानशक्ती उपजते आणि ती इंद्रियांच्या माध्यमातून प्रकट होते. जड सृष्टीच्या ठायी मन वा इंद्रिये नसतात परिणामी तिथे चैतन्य स्वरुपी ईश्वर विद्यमान असतानासुध्दा दिसत नाहीत. त्याचे दर्शन होत नाही. जीव सृष्टीत मन, बुध्दी आणि ज्ञानेंद्रिये असल्यामुळे ईश्वर जीव रुपात प्रकट असतो. तमाम पिंडात आणि ब्रह्मांडात एकाच चैतन्याचा वास असल्यामुळे ज्ञानस्वरुपी ईश्वर विद्यमान असतो. ईश्वर व्याप्त असतो. एका स्थानात तो दिसतो आणि दुसऱ्या स्थानात तो दिसत नसल्यामुळे त्याचे जड आणि चेतन असे दोन भाग होतात. अशा प्रकारे ईश्वराची प्रकृती शक्ती जड सृष्टीत ईश्वराला प्रकट करते यामुळे तिला 'माया' म्हटले जाते. जादुगार खऱ्या वस्तुला लपवून खोट्या वस्तुचा आभास घडवतो. ईश्वर देखिल एक फार मोठा, अलौकिक, अद्भुत असा जादुगार आहे. यामुळे ईश्वराला महा मायावी असे संबोधून त्याच्या ठायी व्याप्त शक्तीला आपण 'माया' असे संबोधतो.

2) **कौन्तेय अनेन हेतुना जगत् विपरिवर्तते:** ईश्वराच्या अध्यक्षतेखाली जगताचे चक्र सुरु आहे. ईश्वराच्या तमाम कृतींमध्ये अलौकिकतेचा वास असतो. या विश्वात एवढी विविधता आणि त्या विविधतेच्या ठायी अशी परिपूर्णता आढळते की आपण थक्क होऊन जातो. त्याचे वर्णन करणे केवळ अशक्य स्वरुपाचे आहे.

शंकराचार्य म्हणतात की जगातल्या तमाम प्रवृत्ती या ज्ञानाचा विषय बनण्यासाठीच असतात. याचा अर्थ असा की जगत हा ज्ञानाचा विषय आहे म्हणजे आपणास जगताचे ज्ञान होत रहाते. आपल्याला ज्या जगाचे ज्ञान होते ते आपल्या ज्ञानासाठी ज्ञेय ठरते. 'ज्ञान' आणि 'ज्ञेय' हे दोन्हीही शब्द सापेक्ष म्हणावे लागतील. ज्ञेयाच्या अपेक्षेने ज्ञान शब्द आहे आणि ज्ञानाच्या अपेक्षेने ज्ञेय शब्द आहे. जगताचे जर भासमान अस्तित्व नसेल तर मग ज्ञानाचा अनुभव होऊ शकणार नाही आणि ज्ञानशक्ती नसेल तर ज्ञेय म्हणजे विषयांच्या जगतातील तमाम पदार्थांच्या अस्तित्वाचे ज्ञान होऊ शकणार नाही. याचा अर्थ असा की ईश्वराच्या ठायी ज्ञान शक्ती आणि जगताची बीज शक्ती दोन्हीही आहेत. दोघांचे ज्ञान मला होत असल्यामुळे मी ज्ञाता आहे असाही अनुभव होत रहातो. आपल्याला ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या तिघांचे ज्ञान होत असते. ही तिन्ही रुपे ईश्वराची आहेत.

ईश्वर एक आहे मग ही सृष्टी तो का बरे निर्माण करतो? ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात म्हटले आहे की या सृष्टीचा भास करणे हा ईश्वराचा स्वभाव आहे. ईश्वराचा हा खेळ आहे. त्याची लीला आहे पण यातून काही आपले फार समाधान होत नाही. एवढे मात्र समजून घेता येते की ज्याला संगीताचे ज्ञान असेल तो गाईल्याशिवाय राहू शकत नाही. सहजपणे त्याच्या कंठातून मधुर संगीत स्रवायला लागते. आपण जो श्वासोच्छवास घेतो तीही सहज क्रिया आहे. अगदी अशाच प्रकारे ईश्वराच्या ठायी ज्ञान शक्ती आणि बीज शक्ती दोन्हीही अखंडपणे विद्यमान असल्यामुळे दोन्हीही शक्तींचा आविष्कार सहजपणे घडताना दिसतो. हा ईश्वराचा स्वभाव आहे असे समजणेच उचित होय !

: 11 :

*अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।*
*परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मम भूतमहेश्वरं:** सर्व भूतांमध्ये व्याप्त अशा मज महान ईश्वराच्या
- **परं भावं:** श्रेष्ठ भावाला
- **अजानन्त:** न जाणणारे
- **मूढा:** अविवेकी पुरुष
- **मानुषीं तनुं आश्रितं:** मनुष्याचे शरीर धारण केलेल्या

- **मां:** मनुष्य शरीराच्या आश्रयाने स्थित माझी
- **अवजानन्ति:** अवज्ञा करतात, मला तुच्छ लेखतात, समजतात

### अर्थ

माझ्या परम भावाला न जाणणारे मूर्ख लोक मनुष्य शरीर धारण करणाऱ्या मला सर्व भूतांच्या महान ईश्वराला तुच्छ समजतात. अर्थात् आपल्या योग मायेने जगाच्या उध्दारासाठी मनुष्य रुपात वावरणाऱ्या मला -- परमेश्वराला सामान्य मनुष्य समजतात.

***मज मानव-रुपांत तुच्छत्वें मूढ देखती***
***नेणुनि थोरलें रुप जें माझें विश्व-चालक।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) सर्व भूतांमध्ये व्याप्त मज महान ईश्वराच्या श्रेष्ठ स्वरुपाला न जाणणारे मूढ जन 2) मनुष्य शरीराच्या आश्रयाने स्थित अशा मला सामान्य मनुष्य समजतात माझी अवज्ञा करतात.

### स्पष्टीकरण

1) **मूढाः मम भूतमहेश्वरं परं भावं अजानन्तः** तमाम भूतमात्रांच्या ठायी विद्यमान अशा ईश्वराच्या श्रेष्ठ स्वरुपाला न ओळखणारे मूढ जन मानवी देहात आश्रयाला आलेल्या ईश्वराची अवज्ञा करतात. मूढ म्हणजे अविवेकी जन. ईश्वराची दोन रुपे होत. एक म्हणजे जगताच्या रुपात प्रकट झालेले रुप. हे रुप जगताच्या रुपात म्हणजे पंचमहाभूतात्मक जगतातील नाना प्रकारच्या पदार्थांच्या रुपात भासित होते. दुसरे रुप मानव, पशु-पक्षी वगैरे चैतन्य रुपांमधून म्हणजे सत् चित् आनंद रुपांमधून जगत रुपाने प्रकटलेल्या ईश्वराचे भासमान रुप असते. सत् चित् आनंद स्वरुपात ईश्वर प्रकट असतो. तेच त्याचे खरे स्वरुप आहे. माती कशी दोन रुपात आढळते एक असते निखळ माती आणि कधी ती घटाच्या रुपाने प्रकट होते. अगदी तसेच ईश्वर आणि जगत ही दोन रुपे होत. घटाचे रुप हे भासमान रुप आहे. कारणाची नेहमीच दोन रुपे असतात. एक असते कारण रुप आणि दुसरे असते कार्यरुप. कारणात कार्य सामावलेले असते. कारण शब्द कार्याच्या अपेक्षेने असतो आणि कार्य शब्द कारणाच्या अपेक्षेने असतो. कारणाशिवाय का कधी कार्य घडू शकेल बरे? मातीशिवाय घट बनू शकत आणि सूताशिवाय वस्त्र विणता येणार नाही. कार्याशिवाय कारण मात्र अस्तित्वात असू शकते. घट नसला तरी माती असू शकते आणि वस्त्र नसले तरी सूत असू शकते. याचे कारण असे की ‘कारण’ खरे असते. जगत कार्य असल्यामुळे ते ईश्वराचा भास आहे. ईश्वर सत्य असून जगत हे भासमान आहे. ईश्वराचे जे हे सत् चित् आनंदस्वरुप मानव आणि पशु-पक्षी वगैरेंमध्ये प्रकट रुपाने वसले आहे ते यथार्थ स्वरुप असल्यामुळे ईश्वराने त्याला ‘श्रेष्ठ स्वरुप’ असे म्हटले आहे. ईश्वराचे हे जे सर्व प्राणीमात्रांच्या ठायी प्रकटलेले श्रेष्ठ स्वरुप आहे त्याच्याशी काही आपली ओळख नाही. यामुळे गीता म्हणते की या श्रेष्ठ स्वरुपाला न ओळखू शकणारे मूढ जन होत. अविवेकी जन होत. अर्थात् या स्वरुपाला ओळखणारे ज्ञानी व विवेक म्हटले गेले पाहिजे.

2) **मानुषीं तनुं आश्रितं मां अवजानन्ति:** मूढ लोक मानवी देहात वसणाऱ्या ईश्वरी रुपाला न ओळखता त्याची अवज्ञा करतात. तिरस्कार वा द्वेष करतात याचा अर्थ समजून घ्यावा लागेल. प्रत्येकाला आतून सत्य वगैरेंकडे वाटचाल करायला लावण्याची प्रेरणा ईश्वर देत असतो पण तो त्याच्या विरोधात चालतो. मानवी देहाच्या आश्रयात असणे याचा साभिप्राय अर्थ जाणून घ्यावा लागेल. ईश्वर सर्व प्राणीमात्रांच्या ठायी अगदी मनुष्य-पशु-पक्षी वगैरेंच्या ठायी तर सत् चित् आनंदरुपात विद्यमान आहेच पण मानवी देहात मात्र त्याची सविशेष उपस्थिती आहे. मनुष्याला बुध्दी आहे आणि त्यामुळे मनुष्याला नीती काय आणि अनीती काय हे कळते, धर्म काय आणि अधर्म कोणता हे कळते, योग्य काय आणि अयोग्य काय हे कळते, कार्य काय आणि अकार्य काय हे कळते यासोबतच हेही कळते की देह हा आत्म्याहून भिन्न आहे. ब्रह्मांडाच्या ठायी ईश्वरी शक्ती विद्यमान आहे हेही ज्ञान मनुष्य देहात असणाऱ्या बुध्दीला आहे. ही बुध्दी पशु-पक्षी वगैरेंच्या ठायी नाही. अन्य जीवांमध्ये नाही. यामुळे ईश्वराचे सर्वश्रेष्ठ असे रुप मानवी देहात प्रकट झाले आहे असे म्हटले गेले आहे. ईश्वराला प्राप्त करुन घेण्याची शक्ती ईश्वरानेच मनुष्याला देऊन ठेवली आहे. त्या शक्तीचा उपयोग जर त्याने करुन घेतला नाही तर तो अयोग्य ठरेल आणि दुरुपयोग केला तर पशु-

पक्षी वगैरेंहून सुध्दा निकृष्ट सिध्द होईल. आपण मनुष्य असूनही परस्पर भांडतो. राष्ट्र परस्परांशी संघर्ष करतात. हे खरे तर ईश्वराने प्रदान केलेल्या शक्तीचा दुरुपयोग करणे आहे. ते थांबायला हवे.

: 12 :

***मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः।***
***राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **मोघाशाः** त्यांच्या सर्व आशा व्यर्थ होऊन जातात
- **मोघकर्माणः** त्यांचे सारे कर्मे निरर्थक सिध्द होतात
- **मोघज्ञानाः** त्यांचे सारे ज्ञानही निष्फळ ठरते
- **विचेतसः** ते विवेकशून्य होऊन जातात
- **चः** आणि ते
- **राक्षसीं आसुरीं:** राक्षसी आणि आसुरी
- **मोहिनीं प्रकृतिं एवः** मोह उत्पन्न करणाऱ्या प्रकृतीचाच म्हणजे मायेचाच
- **श्रिताः** आश्रय करुन राहतात

### अर्थ

ज्यांची आशा व्यर्थ, कर्मे निरर्थक आणि ज्ञान फुकट असे विक्षिप्त चित्त असलेले अज्ञानी लोक राक्षसी, आसुरी आणि मोहिनी प्रकृतीचाच आश्रय घेऊन रहातात.

***ते आशा-वाद मूढांचे कर्मे ज्ञानें हि तीं वृथा***
***संपत्ति जोडिली ज्यांनी आसुरी मोह-कारक।***

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) मागील श्लोकात ज्यांचे वर्णन केले गेले आहे त्यांच्या सर्व आशा व्यर्थ होऊन जातात, त्यांची सारी कर्मे नष्ट होऊन जातात आणि सारे ज्ञान निष्फळ ठरते. 2) ते विवेकशून्य होऊन जातात आणि 3) ते राक्षसी, आसुरी आणि मोह उत्पन्न करणाऱ्या प्रकृतीचाच म्हणजे मायेचाच आश्रय घेऊन रहातात.

### स्पष्टीकरण

1) **मोघाशा मोघकर्माणः मोघज्ञानाः** मागील श्लोकात सांगितले गेले आहे की मानवी देहात वसणाऱ्या ईश्वराची जे अवज्ञा करतात त्यांच्या तमाम आशा व्यर्थ ठरतात, त्यांची कर्मे लयाला जातात. त्यांचे ज्ञान निष्फळ ठरते. ते विवेकशून्य बनतात आणि राक्षसी, आसुरी आणि मोह उपजवणाऱ्या प्रकृती म्हणजे मायेच्याच आश्रयाने जगतात. मागील श्लोकात चर्चा आली आहे की सर्व भूतमात्रांमध्ये व्याप्त अशा ईश्वराच्या श्रेष्ठ स्वरुपाला न ओळखता मानवी देहात वसणाऱ्या ईश्वरी तत्त्वाची जे अवज्ञा करतात, तिरस्कार व द्वेष करतात अशा लोकांच्या संदर्भातच या श्लोकातून विवेचन येते. जे मानवाशी मानवासारखा व्यवहार न करता अहिंसा व प्रेमाचा व्यवहार न करता जगतात त्यांच्या आशा व्यर्थ ठरतात.

मानवाच्या ठायी इच्छा, क्रिया आणि ज्ञान शक्ती असतात असे विनोबांचे म्हणणे आहे. या शक्तींचा सदुपयोग वा दुरुपयोग करणे हे आपल्या हाती आहे. मानवी देहात असणाऱ्या विचार शक्तीच्या सदुपयोगाच्या आधारे न जगता कुणी जर त्याचा दुरुपयोग करत असेल तर त्याची इच्छा शक्ती, क्रिया शक्ती आणि ज्ञान शक्ती व्यर्थ होऊन जाते, निरर्थक होऊन जाते. आपले जीवन या तीन शक्तींच्या आधारे सुरु आहे. आपण या तीन शक्तींचा उपयोग करत असतो. आपल्या मनात नाना प्रकारच्या इच्छा निर्माण होतात ही काही वावगी गोष्ट नाही पण इच्छादेखिल दोन प्रकारच्या असतात. एक चांगली इच्छा, पवित्र इच्छा, ऊर्ध्वगामी इच्छा, कल्याणकारी इच्छा आणि दुसरी अमंगल इच्छा, अपवित्र इच्छा, अधोगतीला नेणारी इच्छा. शुभ इच्छा ग्रहण करण्यायोग्य असते. अशा प्रकारे क्रिया शक्तीसुध्दा दोन प्रकारची असते. आपण नेहमी क्रियाशील असतो, असायलाही हवे. कर्म हे सत् आणि असत् असे दोन प्रकारचे असते. सत्कर्म म्हणजे पवित्र कर्म होय. असे कर्म मानवाला उन्नतीप्रत नेते. मोक्षाप्रत नेते. समाजाचीही उन्नती घडवते. असत्कर्म हे अपवित्र कर्म असते. ते माणसाला अधोगतीला नेते, दु:खदायक असते. बंधनात अडकवते. समाजाचीही अवनती करणारे असल्यामुळे असे कर्म सर्वथा त्याज्य असते. ज्ञान शक्ती देखिल दोन प्रकारची असते. सत् ज्ञान शक्ती आणि असत् ज्ञान शक्ती. ईश्वराची ओळख करुन देण्यास मदतरुप असे

ज्ञान सत् ज्ञान असते. ईश्वरापासून विन्मुख करुन प्रपंचाची आसक्ती वाढवणारे ज्ञान असत् असते. गीतेने सात्विक, राजसी आणि तामसी ज्ञानाची चर्चा केली आहे. कर्मे ही सात्विक, राजसी आणि तामसी असतात. या तीन वर्गांच्या अखेरीस दोनच वर्ग उरतात राजसी आणि तामसी ज्ञान, कर्मे वा इच्छा. या दोघांची गणना असत् वर्गातच करायला हवीय. सात्विक ज्ञान, कर्म आणि इच्छेची गणना सत् मध्ये करायला हवीय. उपनिषदात निवेदन येते की मानवासमोर श्रेय आणि प्रेय अशा दोन गोष्टी असतात. श्रेय म्हणजे कल्याणप्रद आणि प्रेय म्हणजे प्रिय. कल्याणकारी हे नेहमीसाठी प्रिय असेलच असे काही सांगता येत नाही. या उलट हा नेहमीचा अनुभव आहे की जे कल्याणकारी आहे ते कष्टसाध्य असते. ते अप्रियही असते पण अप्रिय असुनही त्यात कल्याण आहे. विवेकी पुरुष कल्याणकारी जे असते त्यातच रमतो. त्यालाच अमलात आणतो. अविवेकी मात्र इंद्रियाधीन असतो. तो कल्याणकारीचा विचार न करता प्रियकर वस्तुचाच स्वीकार करतो.

2) **विचेतस:** या तिन्ही शक्तींचा सदुपयोग न करणारे अविवेकी बनून जातात. तीन शक्तींच्या सदुपयोगाचा अर्थ आहे सत् कडे आकृष्ट होणे. ईश्वर आत सत् चित् आनंद रुपात विद्यमान आहे. प्रकट आहे. आतून त्याची प्रेरणा सतत सत् कडेच वळलेली असते. आतली ही सत्वशील प्रेरणा जर नष्ट झाली ना तर मग मनुष्य सैतान बनून जाईल. मग सारे जीवन बाहेरच्या मायेच्याच अधीन बनून जाईल. ईश्वर दुर्जन आणि सज्जन दोघांच्या ठायी समानरुपाने प्रकट झालेला आहे. यामुळे कधीतरी दुर्जनाच्या मनातही आपल्या पापकर्मांबाबत पश्चात्तापाची भावना जागते. जेव्हा माणूस आतल्या सत्प्रेरणेच्या आधारे जगणे सोडून देतो तेव्हा अनर्थ उद्भवतो. अशा वेळी ईश्वर असे म्हणतो की इच्छा, क्रिया आणि ज्ञान शक्ती या तुझ्या ठायी हजर होत्या तरीसुध्दा जर तू त्यांचा सदुपयोग करुन नाही घेतलास तर आता माझ्या द्वारा प्रदत्त सत् असत् विवेक शक्तीही लोप पावेल, निष्फळ ठरेल.

शंकराचार्य म्हणतात की जोवर मनात विवेक शक्ती म्हणजे सत्-असत्, नीती-अनीती, कार्य-अकार्य किंवा धर्म-अधर्म पारखण्याची आणि त्यानुसार वर्तन करण्याची शक्ती असते तोवर मनुष्य हा मनुष्य असतो. या शक्ती नष्ट झाल्या की माणसातील माणूसपण लयाला जाते. पशु, पक्षी आणि माणसात हा फरक आहे. पशुपक्ष्यांच्या ठायी विवेक शक्तीचा अभाव असतो. विवेक शक्तीचा सदुपयोग करत असतानासुध्दा ईश्वराचा अनुभव घेऊन माणूस सर्व बंधनातून मुक्त होऊ शकतो.

3) **तिसरा मुद्दा आहे:** राक्षसीं आसुरीं मोहिनीं प्रकृतिं एव श्रिता: असे अविवेकी लोक राक्षसी, आसुरी आणि मोहिनी म्हणजे मोह उत्पन्न करणाऱ्या प्रकृतीचा म्हणजे मायेचा आश्रय घेतात. ईश्वर विन्मुख जन अविवेकी जन होत. गीता म्हणते की इच्छा, क्रिया आणि ज्ञान शक्ती या तिन्ही असतानाही त्यांचा सदुपयोग न करता अविवेकी बनायचे कारण मुळी हेच आहे की या लोकांचा स्वभाव हा राक्षसी, आसुरी आणि मोह उपजवणारा असतो. ईश्वराने इथे कडक शब्द योजिला आहे. ईशोपनिषदातही अशाच कडक शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. तिथे वर्णिले गेले आहे की 'आत्महन्' म्हणजे आत्मा वा ईश्वराच्या प्रेरणेने न चालणारे जन. असे लोक आसुरी योनीत जन्माला येतात. यामुळे संस्कार आसूरी बनतात. तुलसीदासजी म्हणतात :

***जे बिनु काज दाहिनेहु बाएँ। परहित हानि-लाभ जिन्ह केरें। उजरे हरष बिषाद बसेरें॥***

अर्थात् दुर्जनांचा स्वभावच मुळी असतो की ते सज्जनांशी नेहमीच वाकडे वर्तन करतात. इतरांचे कल्याण झाले की त्यांना आपली हानी वा अकल्याण झाल्यासारखे वाटते. इतरांच्या नुकसानीमुळे त्यांना आनंद होतो. कुणाच्या लाभामुळे ते व्यथित होतात. अशा प्रकारे दुर्जनांचा स्वभाव हा आसुरी असतो. त्यांची प्रकृती ही राक्षसी म्हणजे विनाशकारी असते. त्यांचे जगणे वागणे भयानक, मोहित करणारे म्हणजे अविवेकी बनवणारे असते.

: 13 :

***महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता: ।***
***भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु पार्थ:** पण हे अर्जुना
- **दैवीं प्रकृतिं आश्रिता:** दैवी प्रकृतीचा आश्रय घेतलेले

- **महात्मान:** महात्मा पुरुष
- **अव्ययं भूतादिं:** विनाशी, भूतांचे मूळ कारणस्वरुप
- **मां ज्ञात्वा:** मला जाणून
- **अनन्य -मनस:** अनन्य चित्त युक्त होऊन
- **भजन्ति:** निरंतर भजतात

**अर्थ**

पण हे कुंतीपुत्रा, दैवी प्रकृतीचा आश्रय घेतलेले महात्मे मला सर्व भूतांचे सनातन कारण आणि अविनाशी अक्षर स्वरुप जाणून अनन्य चित्ताने युक्त होऊन निरंतर भजतात.

***दैवी संपत्ति जोडूनि महात्मे भजती मज***
***अनन्य-भावें जाणूनि मी विश्वारंभ शाश्वत।***

विषय या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) दैवी प्रकृतीला आश्रित पुरुष 2) अविनाशी, भूतांच्या मूळ कारणस्वरुप ईश्वराला जाणून 3) अनन्य चित्ताने भजतात

**स्पष्टीकरण**

1) **दैवीं प्रकृतिं आश्रिता: महात्मान:** दैवी प्रकृतीच्या आश्रयाने जगणाऱ्यांना महात्मा जाणावे. गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी आणि आसुरी प्रवृत्तीच्या लोकांचे वर्णन येते. या अध्यायाच्या आरंभीच्या तीन श्लोकात दैवी प्रकृतीच्या लोकांचे वर्णन असून उरलेल्या श्लोकांमधून आसुरी प्रकृतीच्या लोकांचे वर्णन येते. सत्वगुणांचा उत्कर्ष म्हणजे दैवी आणि तमोगुणांचा उत्कर्ष म्हणजे आसुरी जन होत. हा अर्थ कदाचित अधिक योग्य ठरेल. गीता म्हणते की दैवी गुणसंपदेचा आश्रय घेणारे महात्मा होत. हा सत्वगुणांच्या उत्कर्षाचा सहज असा परिणाम आहे. सत्वगुणांच्या उत्कर्षासाठी प्रयत्न करावे लागतात. यामुळे स्वभाव दैवी बनतो. यामुळे त्याला सहजपणे ऊर्ध्वगामी करायला श्रम पडत नाहीत. प्रयत्न करावे लागत नाहीत. ईश्वरी ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी सत्वगुणांचा उत्कर्ष होणे गरजेचे आहे. यामुळे गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या पंचेचाळिसाव्या श्लोकात 'नित्यसत्त्वस्थ: भव' म्हणजे नेहमी सत्वगुणांच्या आश्रयाने रहा असा संदेश दिला आहे. सत्वगुणांच्या उत्कर्षांशिवाय चित्तशुध्दी नाही. चित्तशुध्दीशिवाय ज्ञान नाही आणि परमात्मविषयक ज्ञानाशिवाय मोक्षप्राप्ती नाही असा क्रम आहे. यामुळे सत्वगुणांचा उत्कर्ष साधून स्वभावाला दैवी बनवण्याचे प्रयत्न करायला हवेत.

2) **अव्ययं भूतादिं मां ज्ञात्वा:** ईश्वराचे रुप हे अविनाशी आहे. नित्य आहे. भूतमात्रांचे मूल कारण रुपी आहे. असे जाणून भक्त जन ईश्वराची भक्ती करतात. इथे हे सांगितले गेले आहे की दैवी स्वभावाचे सद्गुणी जन ईश्वर भक्ती कशी करतात.

ईश्वराची भक्ती दोन प्रकारे करता येते. एक तर ईश्वर आणि जीवात्मा यात भेद आहे असे समजून भक्ती करता येते. दुसरे ईश्वर आणि जीवात्मा यात भेद नाही असे समजून भक्ती करता येते. इथे अद्वैत भक्तीची चर्चा आली आहे. ईश्वर अव्यय म्हणजे अविनाशी म्हणजे नित्य असल्यामुळे तमाम भूतमात्रांचे कारणरुप आहेत. नित्य आणि अविनाशी वस्तुच मूळ कारण असू शकते. नाशवान वस्तु ही कार्याच्या प्रकारात मोडते. सारी कार्ये विनाशी असतात. कारण मात्र अविनाशी असते. मूळ कारण कुणाचेही कार्य नसते. सारी कार्ये त्याचीच असतात. अशा प्रकारे जे मूळ कारण असते ते नित्य म्हणजे अविनाशी असते. त्यालाच ईश्वर म्हणतात. याला ब्रह्मही म्हटले जाते. जीव हा परमात्मस्वरुपी आहे. जगतही परमात्मस्वरुपी आहे. जीव हा परमात्म्याहून काही वेगळा नाही, भिन्न नाही. एवढेच काय पण जीव हा अज्ञानावस्थेत सुध्दा ईश्वरापासून वेगळा नाही. अज्ञानामुळे केवळ हा वेगळेपणा भासतो. अशाच प्रकारे जगत हे सुध्दा ईश्वरापासून वेगळे नाही. ईश्वराचाच आविष्कार तर हे जड जगत आहे आणि हे अगणित जीवात्मे आहेत. भेद नाही अभेद हाच वास्तविक भाग आहे. वेगळेपण नाही हेच खरे आहे.

3) **अनन्यमनस:** भजन्ति: दैवी स्वभावाने युक्त महात्मा पुरुष जगताचे मूळ कारण ईश्वर आहे हे जाणून घेतो आणि अनन्यभावे त्याची भक्ती करतो. ईश्वराच्या अद्वैत भक्तीद्वारे मोक्ष प्राप्त करुन घेणे हा गीतेचा मुख्य उपदेश आहे. यासाठी गीतेत ठिकठिकाणी ईश्वर भक्ती विषयक विवेचन आले आहे. प्रेमाचा उत्कर्ष म्हणजे भक्ती होय. प्रेम सर्वांच्या ठायी वसते. प्रेम भावनेचा आरंभ हा आपल्या कुटुंबापासून होतो. प्रेमाच्या ठायी आसक्ती भावाची भेसळ असल्यामुळे हे प्रेम तत्त्व ईश्वराचे स्थान नाही घेऊ शकत. आसक्ती ईश्वर भक्तीतला अडथळा

आहे. यामुळे आपण ईश्वराप्रत पोहोचू शकत नाही. आसक्तीमुळे आपण ईश्वर भक्ती पासून वंचित रहातो. तुलसीदासजी म्हणतात :

***सो सुखु करमु धरमु जरि जाऊ। जहँ न राम-पद-पंकज भाऊ॥ जोगु कुजोगु ग्यानु अग्यानू। जहँ नहिं राम-पेम परधानू॥ तुम्ह बिनु दुखी सुखी तुम्ह तेहीं। तुम्ह जानहु जिय जो जेहि केहीं॥***

अर्थात् रामचरणाप्रती प्रीत जागत नसेल अशा सुख, धर्म आणि कर्मांना आग लागो. जिथे राम प्रेमाचा आश्रय नसेल तिथे योग ही कुयोग जाणावा आणि ज्ञान हेही अज्ञान जाणावे. ईश्वराशिवाय जीव दु:खी आणि ईश्वरामुळे सुखी अशी परिस्थिती आहे. हे रामा, आपण प्रत्येकाच्या अंत:करणातील भावना जर जाणताहाताच ना !

***ऐसेहि हरि बिनु भजन खगेसा। मिटइ न जीवन्ह केर कलेसा॥ हरि-सेवकहिं न ब्याप अविद्या। प्रभु-प्रेरित ब्यापइ तेहि विद्या॥***

अर्थात् काकभुशुंडी गरुडाप्रती निवेदन करतात की हे गरुडेश्वरा, हरी भक्ती शिवाय जीवाचे क्लेश कदापि संपणार नाहीत. दु:ख संपणार नाहीत. हरी भक्ताला अज्ञान वा अविद्या कदापि घेरु शकणार नाहीत. मोहित करु शकणार नाहीत. त्यांच्या ठायी ईश्वरी प्रेरणेमुळे सदा सर्वदा ज्ञानच व्याप्त राहील हे निश्चितपणे जाणावे.

अशा प्रकारे दैवी स्वभावाने युक्त महात्मा पुरुष हे ईश्वरचरणा प्रती अनन्य भक्ती भाव जोपासत असतात.

: 14 :

***सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रता:।***
***नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सततं:** हमेशा, नेहमी
- **मां कीर्तयन्त:** माझ्या नाम व गुणांचे कीर्तन करणारे
- **च यतन्त:** आणि इंद्रिय निग्रह करणारे
- **दृढव्रता:** व्रतांचे दृढतापूर्वक पालन करणारे
- **च मां:** आणि मला
- **नमस्यन्त:** (वारंवार) नमस्कार करणारे
- **भक्त्या नित्ययुक्ता:** भक्तीने नित्य संपन्न होऊन म्हणजे सदैव माझ्या ध्यानात निमग्न होऊन
- **उपासते:** उपासना करतात

**अर्थ**

ते दृढव्रती भक्त निरंतर माझ्या नामाचे व गुणांचे कीर्तन करत माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करत असतात तसेच वारंवार मला प्रणाम करत नेहमी माझ्या ध्यानात मग्न होऊन अनन्य प्रेमाने माझी उपासना करतात.

***अखंड कीर्तनें माझ्या यत्न-शील दृढ-व्रती***
***भक्तीनें मज वंदूनि भजती नित्य जोडिले।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) सदैव माझे कीर्तन करणारे 2) इंद्रिय निग्रह वगैरे साधनांद्वारे प्रयत्नशील 3) व्रतांचे दृढतापूर्वक पालन करणारे 4) मला नमस्कार करणारे 5) भक्तीने नित्ययुक्त म्हणजे संपन्न होऊन उपासना करतात.

**स्पष्टीकरण**

1) **सततं मां कीर्तयन्त:** रात्र-दिवस हरी कीर्तन करणाऱ्या दैवी प्रकृतीच्या महात्म्याचे वर्तन आणि आचरण भक्तीयुक्त असते. ते नेहमीसाठी ईश्वर संकीर्तन करत असतात. ज्या महात्म्यांना ईश्वर सर्वत्र व्याप्त असल्याचा बोध होतो ते जगताला परमात्म दृष्टीने बघत असतात. त्यांच्या समग्र क्रिया या परमात्म दृष्टीनेच घडतात. बाह्यत: ते सामाजिक कार्य करताना दिसत असले तरीही त्यांचे दैवी कार्य सुरु असते. महात्मा गांधीजी प्रत्यक्षपणे राजकारणात सक्रिय होते अन्य सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक जीवनाच्या विविध आघाड्यांवर महत्वाच्या भूमिका ते बजावत होते. अशा प्रकारे तमाम कार्यांमध्ये कार्य करत असतानासुध्दा त्यांचा दृष्टिकोण हा चित्तशुध्दीचाच होता. त्या काळी राजकारणातील मुत्सद्यांची अशी मान्यता होती की राजकारणात खोटे बोलायला काही हरकत नाही पण गांधीजींनी राजकारणात सत्याचा समावेश केला. तमाम कार्यांच्या माध्यमातून त्यांनी आत्मदर्शनाचा आणि ईश्वरानुभवाचा साक्षात्कार घडवून दिला.

2) **च यतन्तः** महात्मा पुरुष शम, दम, निग्रह या सारख्या साधनांच्या द्वारे प्रयत्नरत असतात. महात्म्यांच्या ठायी परमात्म दृष्टी असल्यामुळे ते शम, दम गुणांनी युक्त असतात. इंद्रिये त्यांच्या ताब्यात असतात. सर्वांच्या ठायी परमात्म दर्शन त्यांना घडले असल्यामुळे ते आतून विकार रहित असतात. त्यांना सर्वत्र शम म्हणजे शांततेचा अनुभव येत असतो. साधक दशेतसुध्दा शम म्हणजे शांतीरुपी महत्वाचा गुण संपादित करुन घ्यायचा असतो. चित्त निर्विकार आणि शांत बनले तरच ईश्वरी साधना सुयोग्य प्रकारे होऊ शकते. सिध्द दशेत तर शम हा साधकाचा स्वभावच बनून जातो.

3) **दृढव्रताः** महात्मा पुरुष यम, नियम आदि व्रतांचे पालन दृढतापूर्वक करत असतात. साधक दशेत यम, नियमांच्या पालनाशिवाय साधना होऊच शकत नाही. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या यमांच्या पालनासाठी नियमांची आवश्यकता असते. याचे स्पष्टीकरण गांधीजींच्या 'मंगल प्रभात' पुस्तकात आढळते. या यमांचे काहीसे स्पष्टीकरण यापूर्वी केलेले आहे. वेदांतींच्या मनात एक चुकीची कल्पना वसली आहे की साधक दशेत जशी यम नियमांच्या पालनाची आवश्यकता असते तशी काही ती सिध्द दशेत नसते कारण की सिध्द पुरुष हा सगळयांपेक्षा वेगळा असतो यामुळे तो नियमांच्या पलिकडे आहे पण या धारणेमुळे सिध्द पुरुष आपल्या अवस्थेपासून च्युत होऊ शकतात. यामुळे साधक दशा आणि सिध्द दशा यात एवढाच फरक आहे की साधक दशेत प्रयत्नपूर्वक साधना असते तर सिध्द दशेत ती सहज होऊन जाते. म्हणजे यम नियमांचे पालन करण्यासाठी साधक दशेत प्रयत्न करावे लागतात तसे सिध्द दशेत करावे लागत नसून हे प्रयत्न अनायासेच घडतात, सहजपणे घडतात. विनासायास घडतात एवढेच.

4) **मां नमस्यन्तः** महात्मा पुरुष ईश्वराची वंदना करणारे असतात. ईश्वराला नमस्कार करणारे असतात. ईश्वरी स्वरुपाचे ज्ञान प्राप्त झाल्यावर अशी अवस्था होते असे तुलसीदास म्हणतात. त्यांचे वचन आहे :

***सरगु नरकु अपबर्गु समाना। जहँ तहँ देख धरें धनु बाना॥ करम बचन मन राउर चेरा। राम करहु तेहिकें उर डेरा॥***

अर्थात् महापुरुषांसाठी स्वर्ग काय आणि नरक काय, मोक्ष काय सारेच समान असतात कारण की त्यांना सर्वत्र धनुर्धारी रामरायाचेच दर्शन होते. मन, वचन आणि कर्माने ते ईश्वराचेच शिष्य असतात. हे रामराया, आपण अशा महापुरुषांच्या ठायीच निवास करावा.

**पुढे लिहितातः**

***जे लोलुप भये दास आस के ते सबहीं के चेरे।***
***प्रभु-बिस्वास आस जीती जिन्हँ ते सेवक हरि केरे॥***

अर्थात् आशा, इच्छा आणि वासनेच्या अधीन बनलेले सारेच लोक सर्वांचेच दास बनून जगतात पण ज्यांनी परमात्म श्रध्देने आशा, इच्छा आणि वासना यांच्यावर विजय संपादन केला आहे असे लोक केवळ रामरायाचेच सेवक बनतात.

ईश्वराला नमस्कार करायचा अर्थ असा आहे की त्यापुढे झुकून जाणे, ईश्वरी प्रेरणेने प्रेरित होऊनच चालणे आणि ईश्वराच्या अधीन असणे.

5) **भक्त्या नित्ययुक्ता उपासतेः** जे महापुरुष भक्तीयुक्त बनून ईश्वराची उपासना करतात त्यांना भक्ती शिवाय दुसरा विषय नसतो. आतून भक्ती आणि बाहेरुन जनसेवा असा क्रम असतो. ज्ञानोबा लिहितात की हे भक्तहृदय महापुरुष आपले मोठेपण जाणतच नाहीत. समोरची सृष्टी योग्य आहे की अयोग्य याचा मुळी विचार न करता म्हणजे याला महत्व न देता केवळ मनुष्यमात्राला बघून त्याच्यापुढे माथा झुकवतात. नम्र बनून जातात. यासाठी ज्ञानोबा दृष्टांत देतात की ज्याप्रमाणे वरुन पडणारे पाणी खाली येतेच त्याप्रमाणेच भूतमात्रांना बघून विनम्र होणे त्यांचा स्वभावच बनून जातो. ज्याप्रमाणे फळभाराने झाड झुकून जाते तसेच ते प्राणीमात्राबाबत नम्र असतात. हे महात्मा पुरुष नित्य गर्वरहित असतात. अभिमानशून्य असतात. विनय हीच त्यांची संपत्ती असते. ही विनय संपत्ती ते जयजयकार करुन ईश्वराप्रती समर्पित करुन टाकतात. अशा प्रकारे सर्वांसमोर झुकणारे असल्यामुळे त्यांच्या मनात मान-अपमानाची कुठलीही भावना नसते. मान-अपमानाच्या भावनेला जणू काही त्यांनी गिळून टाकलेले असते. एकरुप होऊन हे महात्मा पुरुष ईश्वराची उपासना करतात, भक्ती करतात.

: 15 :

***ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते।***
***एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च अन्ये:** आणि दुसरे
- **ज्ञानयज्ञेन:** ज्ञान यज्ञाने
- **यजन्त:** माझी पूजा करतात
- **एकत्वेन:** एकत्वाने एकत्व भावाने अर्थात् जे आहे ते वासुदेवच आहे या भावनेने
- **पृथक्त्वेन:** पृथक्पणाने अर्थात् स्वामी - सेवक भावनेने
- **बहुधा:** (आणि) अनेक प्रकारांनी
- **विश्वतोमुखं मां:** विश्वरुपी अशा विराट स्वरुप परमात्मरुप अशा माझी
- **उपासते:** उपासना करतात

**अर्थ**

दुसरे काहीज्ञानयोगी मज निर्गुण-निराकार ब्रह्माची ज्ञान यज्ञाने अभेद भावाने पूजा करीत माझी उपासना करतात आणि दुसरे काही अनेक रुपांनी असलेल्या मज विराट स्वरुपी परमेश्वराची नाना प्रकारांनी उपासना करतात.

***दुसरे ज्ञान-यज्ञानें भजती व्यापका मज***
***ब्रह्म-भावें विवेकानें अविरोधें चि देखुनी।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) आणि दुसरे काही लोक ज्ञान यज्ञाने माझी पूजा करणारे 2) एकत्व म्हणजे ज्ञान दृष्टीने 3) पृथक् दृष्टीने म्हणजे सत् असत् ही भेद दृष्टी राखून 4) नाना प्रकारांनी भजतात

**स्पष्टीकरण**

1) **अन्ये ज्ञानयज्ञेन यजन्त:** ज्ञानमार्गी भक्त ज्ञानमार्गाद्वारे ईश्वराचे पूजन करतात. उपासना करतात. सिध्द पुरुषांचे तीन प्रकार होत. एक कर्म प्रधान, दोन भक्ती प्रधान आणि तीन ज्ञान प्रधान. तिघांचे परमात्म विषयक ज्ञान समान असते. तेराव्या श्लोकात सेवा प्रधान ज्ञानी पुरुषाचे, चौदाव्या श्लोकात भक्ती प्रधान ज्ञानवंताचे तर पंधराव्या श्लोकात ज्ञान प्रधान ज्ञानी पुरुषाचे वर्णन आले आहे. श्लोकाच्या आरंभी ही चर्चा आली की मागील श्लोकात ज्या महात्मा पुरुषांचे वर्णन आले आहे त्यांच्यापेक्षा हे ज्ञानमार्गी भक्त वेगळे आहेत. परमात्म ज्ञान हाच एक यज्ञ आहे. त्या ज्ञान यज्ञाने हे ज्ञानमार्गी भक्त ईश्वराची भक्ती, पूजा, उपासना तीन प्रकारे करत असतात.

2) **एकत्वेन:** या श्लोकात तीन शब्द आले आहेत. एकत्व, पृथक्त्व आणि बहुधा. यांचा मोठा मार्मिक अर्थ विनोबांनी सांगितला आहे. एकत्व म्हणजे ज्ञानावस्था, पृथक्त्व म्हणजे क्रियावस्था आणि बहुधा म्हणजे भावावस्था होय. पहिला प्रकार हा एकत्व म्हणजे ज्ञानावस्थेचा आहे. ज्ञानी पुरुषाला ईश्वराचे ज्ञान होते. ईश्वराचे ज्ञान म्हणजे एकत्वाचा बोध, अद्वैताचा बोध. या बोधात जगाच्या अस्तित्वाचा कुठलाही प्रश्न उरत नाही. कसलेही मूल्य उरत नाही. केवळ परमात्माच परमात्मा आहे. जगाचे स्वतंत्र रुपाने कुठलेही अस्तित्व उरत नाही. पाण्याच्या लाटा असतात. लाटांमध्ये पाणी असते. पाणी खाली-वर होऊ लागते. याला लाटा किंवा तरंग असे म्हणतात पण असे स्वतंत्र नाव दिल्यामुळे काही त्या लाटांचे स्वतंत्र अस्तित्व नसते. यामुळे काही लाट स्वतंत्र पदार्थ बनून जात नाही. ईश्वरी ज्ञानानंतर ज्ञान दृष्टीचे संपादन होते. ज्ञान दृष्टी याचा अर्थ मूल कारण दृष्टी होय. ईश्वर व सर्व जगताचे मूल कारण आहे ही दृष्टी. या मूळ कारणाची ओळख होताच कारण दृष्टीनेच जगाकडे बघितले जाते. या ज्ञान दृष्टीमुळे तमाम प्रकारचे भेद संपून जातात. ज्या अभेदामुळे हे सारे भेद अस्तित्वात आहेत, आपल्याला दिसतात ते अभेद किंवा अद्वैत केवळ सत्य आणि प्रत्यक्ष दिसणारे, उर्वरित सारे भेद असत्य किंवा भास किंवा मिथ्या हा अनुभव येऊ लागतो. ज्ञानावस्थेचा जन्म होतो. अद्वैत दृष्टी जागल्यावर अनासक्तीपूर्वक एकत्व भावनेने ईश्वराची उपासना केली जाते. ही ज्ञानी पुरुषाची ज्ञानावस्था होय.

3) **पृथक्त्वेन:** पृथक्त्वामुळे म्हणजे क्रियावस्थेमुळे. ज्ञानी पुरुषाची ही दुसरी अवस्था होय. प्रारब्ध कर्मे शेष उरल्यामुळे ज्ञानी पुरुषाला देह धारण करावा लागतो. सारे व्यवहार आचरावे लागतात. ज्ञानी पुरुषाला एकदा ईश्वरी ज्ञान प्राप्त झाल्यावर त्याचा कार्य-अकार्यविषयक विवेक

सत्-असत्‌विषयक विवेक सूक्ष्म बनतो, सत्यरुप बनतो. चित्त शुध्द झाल्याशिवाय ईश्वरी ज्ञान होत नाही. यामुळे ज्ञानी पुरुषाचे चित्त शुध्द झाल्यावरचे निर्णय हे नेहमी अचूक असतात. अशा आशयाचे एक संस्कृत वचन आहे. सतां हि सन्देहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्त:करणप्रवृत्तय: । अर्थात् कुठल्या वस्तुबाबत मनात शंका उपजली असता सत्पुरुषांनी किंवा ज्ञानी पुरुषांनी अंत:करणातील म्हणजे मनातील प्रेरणेला प्रमाण मानायला हवे

ज्ञानी पुरुषांचा निर्णय नेहमी सत्यरुप असल्यामुळे निर्णय घेताना त्यांना सुरक्षित वाटते. तुलसीदासजी म्हणतात  साधु अवग्या तुरत भवानी। कर कल्यान अखिल कै हानी ॥

अर्थात् 'शंकराने पार्वतीप्रती निवेदन केले की साधु संतांची अवज्ञा केल्यामुळे सर्व प्रकारच्या कल्याण मार्गाची हानी होते.' ज्ञानी पुरुषाची पहिली अवस्था अशी आहे की तो ज्ञानावस्थेत ब्रह्माशिवाय अन्य कुठल्याही वस्तुचे स्वतंत्र अस्तित्व मानत नाही. त्याच्यासाठी जगत हे मिथ्या असते. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' ही ज्ञानावस्था आहे. हा ज्ञानी पुरुष जेव्हा क्रियावस्थेत पदार्पण करतो म्हणजे सेवा कार्य करायला लागतो तेव्हा सत्-असत् यातील सूक्ष्म भेदासोबत व्यवहार करु लागतो. ज्ञानावस्थेत आतला भेदभाव गळून पडतो पण क्रियावस्थेत मात्र आतला भेद लक्षात घेऊन ज्ञानी पुरुष व्यवहार करतो. भेद असत्य आहे, क्षणिक आहे, भासमान होणारा आहे, परिवर्तनशील आहे हे सारे मानत असूनही भेदाची म्हणजे सत्-असत् भेदाची सूक्ष्मता ध्यानी घेऊन तो असा व्यवहार करतो की अज्ञानी माणसाला ज्ञानी पुरुषाचा व्यवहार आदर्शमय वाटू लागतो. अज्ञानी माणूस लोक व्यवहारात फसून जातो, ज्ञानी माणूस फसत नाही.

4) **बहुधा:** ज्ञानी पुरुषाची तिसरी अवस्था आहे 'बहुधा.' सारी  शुभ अशुभ सृष्टी ही ईश्वरमय आहे अशी दृष्टी विकसित करुन ज्ञानी जन विश्वरुप अशा ईश्वराला भजतात. त्याची उपासना करतात. ही ज्ञानी पुरुषाची तिसरी अवस्था होय. आत ज्ञानावस्था ही झाली पहिली अवस्था, बाहेर क्रियावस्था ही दुसरी अवस्था आणि भावावस्था ही तिसरी अवस्था होय. भावावस्थेत साधक संपूर्ण विश्वाला मंगलमय दृष्टीने बघतो. सृष्टी सत्य नसून मिथ्या आहे हे जाणत असतानासुध्दा सृष्टी हा ईश्वराचा अलौकिक आविष्कार आहे या भावनेने बघतो. यामुळे चित्ताच्या ठायी ईश्वरविषयक भाव जन्माला येतो आणि चित्त हर्षित होते. असा भाव ज्ञानावस्थेत उत्पन्न होत नाही. ज्ञानावस्थेत ब्रह्म म्हणजे परमात्म्याचा भाव अवश्यमेव असतो, नाही असे नाही पण तिथे भावावस्था नसते. ही भाव विहीन अवस्था असते. ज्ञानावस्थेत साधक ईश्वरात आतून बूडून गेलेला असतो. यामुळे परमात्मविषयक ध्यानामुळे त्याला अखंड शांततेचा अनुभव येतो. या अवस्थेत केवळ ईश्वराकडे लक्ष केंद्रित असल्यामुळे मनात जगाचे काहीही मूल्य उरलेले नसते पण भावावस्थेत मात्र मनात जगाच्या क्षणिक असण्याचे व मिथ्या असण्याचे ज्ञान असतानासुध्दा हे भान शिल्लक उरलेले असते की ब्रह्म वा परमात्म्याप्रमाणेच हे जगतही अलौकिक स्वरुपाचे आहे. यामुळे जगातील तमाम पदार्थांना बघून तो गद्गद होऊन जातो. ही भावावस्था मोठी आनंददायक असते. तशी तर ज्ञानावस्था देखिल आनंददायक असते पण भावावस्थेचा आनंद काही औरच असतो. आगळा वेगळा असतो. क्रियावस्थेत ज्ञानी पुरुष विवेकाच्या आधारे पाप-पुण्याला वेगळे करु शकतो, सज्जन-दुर्जन, नीती-अनीती, धर्म-अधर्म, श्रेष्ठ-कनिष्ठ यातील अंतराला सूक्ष्मतापूर्वक जाणून घेतो आणि तदनुसार आपल्या आचरणात सूक्ष्मता आणण्याचा यथाशक्य प्रयत्न करतो. ज्ञानी पुरुष ज्ञानावस्थेत असताना तमाम जगाला मिथ्यारुप मानून चालतो. भावावस्थेत तमाम जगाला मंगलदायक समजतो. क्रियावस्थेत म्हणजे आचरणाच्या अवस्थेत सत्-असत् हा भेद जाणून त्यानुसार कर्माला प्रवृत्त होतो. स्वत: कर्मप्रवृत्त होऊन इतराना आपल्या ज्ञानबळाने कर्मप्रवृत्त करणे हे ज्ञानवंताचे वैशिष्ट्य असते. ज्ञानावस्था आणि भावावस्थेच्या आधारेच ज्ञानवंताची क्रियावस्था आकाराला येते पण ज्ञानावस्था आणि भावावस्थेत अद्वैताचा अनुभव झाल्यावर क्रियावस्था वा व्यवहार अवस्था अनुभवताना त्याला वाटेल तसे वागायची परवानगी नाही. त्याने वाटेल तसे चालले तरी हरकत नाही असे मानणे उचित होणार नाही. ज्ञानी पुरुष हा अंतर्बाह्य विवेकाधारित जगत असतो. ईश्वराची ओळख न झाल्यामुळे अज्ञानी पुरुषाच्या ठायी अविवेकावस्था किंवा विकारावस्था जागते. निर्विकार झाल्यामुळे ज्ञानी पुरुषाचा आपल्या मनावर ताबा रहातो. यामुळे अखंड विवेकावस्था

जागते. ईश्वर जगताचा कर्ता आहे. जगत सत्य नसून ईश्वर सत्यरुप आहे. हे सारे तत्त्व सिध्दांत शुध्द विवेकामुळेच अनुभवायला येऊ शकतात. जिथे शुध्द विवेकावस्था असते तिथे आचरणातील शुध्दता असायलाच हवी. सत्-असत् यातील सूक्ष्म भेद जाणून घेऊन तदनुसार चालण्याची असाधारण प्रेरणा जर ज्ञानी पुरुषाच्या ठायी नसेल तर मग ती कुणाच्या ठायी जागेल? यामुळे एकाच ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानावस्था, क्रियावस्था आणि भावावस्था असतात हे या श्लोकात एकत्वेन, पृथकत्वेन, बहुधा या तीन शब्दांच्या माध्यमातून व्यक्त केले गेलेय. अशाप्रकारे ज्ञानीपुरुष आपल्या तीन अवस्थांमध्ये विश्वस्वरुप अशा ईश्वराला üभजतात.

: 16 :

*अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।*
*मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहंहुतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहंक्रतुः** मी क्रतु म्हणजे श्रौतकर्म म्हणजे संकल्प आहे अहं
- **अहं यज्ञः** मी पंचमहायज्ञ वगैरे स्मार्तकर्मे म्हणजे यज्ञ आहे
- **अहं स्वधाः** मी स्वधा म्हणजे पितरांच्या निमित्ताने दिले जाणारे अन्न आहे म्हणजे मी स्वावलंबन आहे
- **अहं औषधंः** मी औषध आहे म्हणजे सर्व वनस्पती आहे
- **अहं मन्त्रः** मी मंत्र आहे
- **अहं एव आज्यंः** मीच तूप आहे
- **अहं अग्निः** मी अग्नी आहे
- **अहं हुतम्ः** मी हवनरुपी क्रिया आहे

**अर्थ**

श्रोतयज्ञ मी आहे, स्मार्त यज्ञ मी आहे. पितृयज्ञ मी आहे. वनस्पती, अन्न आणि औषधी मी आहे. मंत्र मी आहे. तूप मी आहे. अग्नी मी आहे आणि हवनाची क्रियाही मीच आहे.

*मी चि संकल्प मी यज्ञ स्वावलंबन अन्न मी*
*मंत्र मी हव्य तें मी चि अग्नि मी मी चि अर्पण ।*

**विषयः** या श्लोकात आठ गोष्टींची चर्चा आली आहे 1) मी संकल्प आहे. 2) मी यज्ञ आहे. 3) मी स्वावलंबन आहे. 4) मी अन्न आहे. 5) मी मंत्र आहे. 6) मी तूप आहे. 7) मी अग्नी आहे. 8) मी हवन कर्म आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं क्रतुः** ईश्वर संकल्प आहे. कुठल्याही शुभ कार्यासाठी संकल्पाची आवश्यकता असते. संकल्पाच्या ठायी मोठी शक्ती असते. कुठलीही योजना वा कार्य संकल्पाशिवाय पूर्णपणे मूर्तरुपात आणता येत नाही. संकल्प करणाऱ्यांना ईश्वराची मदत अवश्य लाभते. संकल्पपूर्वक कार्य करत असताना शिथिलतेला मुळी अवकाशच नसतो. संकल्प हा नेहमीसाठी शुभ आणि कल्याणकारी असावा हे मात्र आवश्यक आहे. शुभ संकल्पामुळे कल्याण आणि परोपकाराच्या भावनेत वृध्दी होते. इतरांना जगण्याचा उत्साह लाभतो.

2) **अहं यज्ञः** मी (ईश्वर) यज्ञरुपी आहेत. यज्ञ म्हणजे परोपकारमय जीवन होय. तिसऱ्या अध्यायात यज्ञ विषयक संकल्पनेची विस्तारपूर्वक चर्चा आली आहे. आज यज्ञाच्या कल्पनेचा विस्तार करुन सांगणे गरजेचे आहे. मी यज्ञ आहे असे भगवंताचे वचन आहे.

3) **अहं स्वधाः** ईश्वर म्हणजे स्वावलंबन होय. शरीर श्रमानेच स्वावलंबन साधता येईल. शेतकरी आणि मजूर यांनाच खऱ्या अर्थाने स्वावलंबी म्हणता येईल. हे दोन वर्ग सोडले तर सारेच परावलंबी आहेत. कमीत कमी श्रम करुन अधिकात अधिक संपत्ती प्राप्त करण्याची लालसा ज्या समाजात निर्माण होते तिथे शरीर श्रमाची प्रतिष्ठा कमी होणे स्वाभाविकच असते. आज शेतकरी आणि मजूर शरीर श्रमावरच जगताहेत त्याना लाचारीने श्रम करावे लागताहेत. श्रम करण्यात कुणाला आपला गौरव होतो असे वाटत नाही. शरीर श्रमाला प्रतिष्ठा अर्पिण्यासाठी गांधीजींनी साबरमती आश्रमात सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली. त्यात आठ तास नित्य शरीर श्रम आवश्यक मानले. शरीर श्रम केल्याशिवाय अन्न ग्रहण करण्याचा कुणाला अधिकार नाही हा विचार गांधीजींनी आश्रमात

प्रसृत केला. रुढ केला. संन्यासी असला तरी त्याने शरीर श्रम केले पाहिजे. संन्यासी देखिल शरीर श्रमाशिवाय जगू शकत नाही हा विचार त्यांनी समाजात रुढ केला. एवढेच नव्हे पण शरीर श्रमाला आश्रमीय व्रतांमध्ये स्थान दिले. या विचारामुळेच तर विनोबाजींनी यातल्या ‘स्वधा’ शब्दाचा अर्थ स्वावलंबन असा केला. स्वावलंबन म्हणजे शरीर श्रमपूर्वक जगणे होय.

4) **अहं औषधं:** ईश्वर म्हणजे अन्न. जगण्यासाठी आवश्यक अशा गोष्टींमध्ये अन्न आणि वस्त्र आवश्यक आहेत. यामुळे गीतेने इथे ‘औषध’ शब्दाचा उपयोग केलाय. जीवनातल्या साऱ्या गरजा या शरीर श्रमानेच प्राप्त होतात, त्या अशा प्रकारेच पूर्ण करुन घेता येतील. यामुळे तमाम जीवनावश्यक आवश्यकतांचा समावेश गीतेने ‘औषध’ या शब्दात केला आहे.

5) **अहं मंत्र:** ईश्वर मंत्र आहे. यम, नियम यासारखी जी व्रते आहेत नियम आहेत ती यज्ञासाठी आवश्यक आहेत. ती यज्ञाची आवश्यक अंगे होत. ती सारी अंगे म्हणजे ईश्वर होय. संकल्प, यज्ञ, स्वावलंबन आणि औषध या चार बाह्य वस्तु झाल्यात. आता आतील चार गोष्टींची चर्चा करताहेत. यमनियमांचे पालन जीवनाचा मूलाधार आहे. यज्ञमय जीवन हे नियमानुसारच चालायला हवे. यम-नियमांचे पालन करणे काही केवळ मुमुक्षु जनांसाठीच आवश्यक नाही. यम-नियमांचे पालन प्रापंचिकांनाही आवश्यक आहे, गरजेचे आहे. तमाम मनुष्यांना ते गरजेचे आहे. याशिवाय माणसाचे जीवन निरर्थक होते हा विचार समाज मानसात पोहोचवला पाहिजे. जहाजात जर दिशादर्शक यंत्र नसेल तर जहाज भरकटून जाईल. तसेच आपल्या जीवनात जर कुठले उच्च ध्येय नसेल तर आपले जीवनही इच्छिलेल्या मुक्कामी पोहोचणार नाही. यामुळे संपूर्ण समाजासाठी सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह हे पाच यम आणि त्यांच्या पालनासाठी आवश्यक ते नियम असणे गरजेचे आहे. त्या व्रत नियमांचे पालन करत असताना प्रत्येक माणूस जगायचा प्रयत्न करेल तर वेगळे चित्र उभे राहील. त्याचा उत्कर्ष होईल. त्याला परम शांततेचा लाभ होईल.

6) **अहं एव आज्यं:** ईश्वरच घृत आहे, तूप आहे, आहुती आहे. फलासक्ती, ममतेचा त्याग वगैरे हवन करण्यायोग्य वस्तु ईश्वरच आहे. यज्ञात तूपाचे हवन केले जाते. तूप म्हणजे पवित्र वस्तु. कुठल्याही पवित्र आणि मूल्यवान वस्तुचा त्याग केला जायला हवा. यज्ञाचा मूळ अर्थ आहे त्याग आणि व्यापक अर्थ आहे परोपकारमय जीवन. परोपकारमय जीवन जगत असताना आपल्या स्वार्थाचा त्याग करावाच लागतो पण हा बाह्य त्याग झाला तरी खरा त्याग हा आतला असतो. यामुळे इथे गीता सांगते की या परोपकारमय जीवनरुपी यज्ञात फलासक्ती, वासना आणि ममतेचा त्याग करायला हवा. त्याची आहुती पडायला हवी. परोपकारमय जीवन चित्तशुध्दीकारक व्हावे यासाठी आतून अहंकाराचा त्याग, कीर्तीची लालसा, सत्तेची इच्छा आकांक्षा, काम, क्रोध वगैरे तमाम विकारांचा, मळांचा त्याग घडायला हवा. हे विकार जर मनात उत्पन्नच झाले नाहीत तर स्वार्थी जीवन आणि परोपकारमय जीवन यात फार फरक उरणार नाही.

7) **अहं अग्नि:** ईश्वर अग्निरुप आहे. परोपकारमय जीवनरुपी यज्ञासाठी निष्कामता वगैरेंप्रमाणेच वैराग्यरुप अग्नीचीही आवश्यकता आहे. यज्ञासाठी हवन म्हणून तूप हवे पण हवन अग्नीशिवाय कसे बरे होईल ? तशाच प्रकारे वैराग्याशिवाय परमात्म ज्ञानाची प्राप्ती होऊ शकणार नाही. परोपकारमय जीवनाचा अंतिम उद्देश्य मोक्ष वा परमात्म ज्ञान असायला हवा.

शंकराचार्य लिहितात: विरक्तस्य हि संसारात् भगवत्तत्त्वस्य अधिकार:, न अन्यस्य इति। अर्थात् जो संसारापासून विरक्त झाला केवळ त्यालाच ईश्वर स्वरुपाचे ज्ञान संपादित करण्याचा हक्क आहे, अन्यांना नाही.

वैराग्य हे मूळ तत्त्व होय. प्रपंच सत्यरुप नाही हे ज्ञान एकदा झाले की मग प्रपंचाबाबतीत वैराग्य उपजू शकते. प्रपंचाच्या संदर्भात वैराग्य उत्पन्न झाला की मग अहंकार आणि वासना यांचा त्याग करणे संभवते. इंद्रिय निग्रह देखिल वैराग्यामुळे सोपा होतो. वैराग्याचा अर्थ सारे काही सोडून देऊन जंगलात निघून जाणे नव्हे ! एकांतात जाणे नव्हे ! मनातच सारी प्रपंचासक्ती भरलेली असते. यामुळे आपले कर्तव्य सोडून न देता वैराग्याचा अभ्यास करायला हवा.

8) **अहं हुतम्:** ईश्वर हवन कर्म आहे. यज्ञाच्या समाप्तीनिमित्त सारे काही ईश्वराला अर्पित करावयाचे असते. ईश्वर शरण भाव, भक्ती भाव प्राप्त करावयाचा असतो. अनेकदा पारमार्थिक सेवा कार्य सुध्दा बंधनरुप

ठरते. 'अहं' हेच तर बंधन आहे. त्याचा त्याग केल्याशिवाय शांतता लाभणार नाही. अहंकाराला सोडण्यासाठी, त्याला क्षीण करण्यासाठी ईश्वर शरण्य भावाची परमावश्यकता आहे. काही चांगले काम केले की लगेच अहंकार पुष्ट होतो. आपली शक्ती दाखवतो. उत्तमातले उत्तम कार्य करुनसुध्दा 'हे कार्य मी केले नाही, हे ईश्वरी कृपेने संपन्न झाले' असे मानणे हा अपूर्व योग होय. हा योग गांधीजींनी साधला होता. आपण काही करतोहोत असे त्यांना कधीही वाटले नाही. ईश्वरच आपल्या माध्यमातून सारे काही करवून घेत आहे, अशी त्यांची विनम्र भूमिका असायची. देहात चैतन्य स्वरुपी म्हणजे ज्ञान स्वरुपी परमात्मा निवास करतो यामुळे आपल्या सर्व क्रिया घडतात. यामुळे क्रियामालाशी आपला संबंध न जोडता सारे काही ईश्वराशीच जोडले गेले पाहिजे. जोडता आले पाहिजे.

: 17 :

*पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ।*
*वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं अस्य जगतः** मी या सर्व जगाचा
- **पिता माता:** पिता व माता
- **धाता:** धारण व पोषण करणारा आणि कर्माचे फळ देणारा
- **पितामहः** आजोबा
- **वेद्यं:** जाणण्यायोग्य
- **पवित्रं ओंकार:** मी पवित्र ओंकार आहे
- **ऋक् साम यजु** एवः ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आहे

**अर्थ**

या जगाला धारण करणारा व कर्मफळ देणारा, आई-वडिल, आजोबा, जाणण्यायोग्य पवित्र ओंकार तसेच ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेदही मीच आहे.

***मी ह्या जगास आधार माय बाप वडील मी***
***मी तिन्ही वेद ओंकार जाणण्या योग्य पावन।***

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) मी या जगताचा माता-पिता आहे. 2) मी धारणकर्ता आहे. 3) मी पित्याचा पिता म्हणजे आजोबा आहे. 4) मी जाणण्यायोग्य वस्तु आहे. 5) मी पवित्र ओंकार आहे. 6) मी ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेदही मीच आहे. या श्लोकात आणि पुढील श्लोकांमधून जीवनाशी संबध्द नाते वगैरेंच्या संदर्भात भगवंत आपली व्यापकता दर्शवत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं अस्य जगतः** माता पिता: ईश्वर म्हणतात की ते या विश्वाचे म्हणजे साऱ्या सृष्टीचे माता-पिता आहेत. जीव सृष्टी  निर्माण करायला ज्याप्रमाणे दोन जीवांची गरज पडते तशी ईश्वरी सृष्टी निर्माण करताना लागत नाही. एकाकी असतानाही ईश्वराच्या ठायी ज्ञान शक्ती आणि सर्ग शक्ती म्हणजे जड-चेतन सृष्टीचा भास करवणारी अशी माया शक्ती अशा प्रकारच्या दोन शक्ती आहेत आणि या दोन शक्तींच्या बळावरच ते या संपूर्ण सृष्टीचे माता-पिता बनू शकतात.

2) **धाता:** ईश्वर धाता म्हणजे या सृष्टीला धारण करणारे आहेत. जो निर्माण करतो तो धारण करणारा असतो. ईश्वराच्या ठायी अशी जबरदस्त शक्ती आहे की सृष्टीत विनाश कार्य सुरु असतानासुध्दा पालन-पोषणाच्या कामातही कदापी उणीव भासत नाही.

3) **पितामहः** ईश्वर जगताचे पितामह म्हणजे आजोबा आहेत. पिता म्हणजे सर्वांचे मूळ होय. पिताच्या पित्याचा अंत नाही. आजोबा ही परंपरा अनंत काळापर्यंत पोहोचू शकते. तमाम आजोबांचे पिता साक्षात् ईश्वरच आहेत.

4) **वेद्यम्:** ईश्वर हीच जाणण्यायोग्य वस्तु आहे. तसे पाहू गेल्यास या सृष्टीत जाणून घेण्यासारख्या गोष्टी अक्षरशः अनंत आहेत पण ईश्वराचे म्हणणे असे की केवळ तेच एकमेव जाणून घेण्यायोग्य आहेत. या जगात जेवढ्या काही जाणून घेण्यायोग्य गोष्टी आहेत त्या सर्व स्थूल स्वरुपाच्या आहेत. इंद्रियानी जाणून घेता येण्यायोग्य असल्यामुळे त्यांचे स्वरुप क्षणिक असे आहे. क्षणिक असल्यामुळे या जाणून घेण्यायोग्य वस्तुंचे मोल शून्य आहे. या गोष्टींचे मोल केवळ व्यावहारिक स्वरुपाचे आहे. याचे कारण असे की या जगताचे पारमार्थिक अस्तित्व

मुळी नाहीच. पारमार्थिक अस्तित्व केवळ ईश्वराचेच आहे. उपनिषदकारांनी या बाह्य वस्तुंच्या ज्ञानाला 'अपरा विद्या' म्हणून संबोधिले आहे. अपरा विद्येच्या अंतर्गत इतिहास, भूगोल, ज्योति:शास्त्र यासारख्या व्यावहारिक ज्ञानांचा समावेश होतो. परमात्मा हाच एकमेव जाणण्यायोग्य असल्यामुळे परमात्म ज्ञानाला 'परा विद्या' म्हटले जाते.

5) **पवित्रं ओंकार:** ईश्वर हा प्रणव म्हणजे पवित्र ओंकार आहे. वैदिक काळात ईश्वराच्या नावासाठी केवळ ओमकाराचीच व्यवस्था होती. यात तीन अक्षरे आहेत अ, उ आणि म. या तीन अक्षरांमुळे ओम हा शब्द बनला. सृष्टीत तीन अवस्था आहेत. पंचमहाभूतांपैकी तीन भूते महत्वाची आहेत जळ, अग्नी आणि आकाश. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असे तीन प्रमुख काळ आहेत. प्रात:काळ, मध्याह्नकाळ आणि सायंकाळ असे तीन काळ दिवसभरात आहेत. बालपण, युवावस्था आणि वृध्दत्व अशा देहाच्या तीन अवस्था आहेत. उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असे तीन वर्ग आहेत. उत्पत्ती, स्थिती आणि लय अशा तीन अवस्था प्रत्येक पदार्थाच्या बाबतीत संभवतात. अशा प्रकारे तीन प्रकार या सृष्टीत आढळतात. यामुळे ईश्वराचे नाव देखिल तीन अक्षरांनी बनलेले आहे. ईश्वराचे स्वरुपसुध्दा सत्-चित् आणि आनंदरुप आहे. यामुळेही ईश्वराचे नाव तीन अक्षरांनी असणे सयुक्तिक आहे. ईश्वर अति पवित्र असल्यामुळे त्याचे नावही अति पवित्र असेल. ते तसे आहे. ओमकाराला प्रणव मानले जाते. आजपर्यंत अगणित मुमुक्षु जनांनी ओमकाराचा जप केला. ओमकार हे नाम निर्गुण निराकार परब्रह्याचा बोध करवून देणारे आहे तर राम, कृष्ण, हरी ही नावे सगुण साकार परब्रह्याचे बोध करवुन देतात असेही सांगता येईल.

6) **ऋक् साम यजु:** एव: ऋग्वेद, सामवेद आणि यजुर्वेद हे ईश्वररुपीच आहेत, यात अथर्ववेदाचाही समावेश अंतर्भूत समजावा. ज्ञानकांड आणि कर्मकांड असे वेदाचे दोन विभाग आहेत. कर्मकांडांतर्गत विविध यज्ञयाग वगेरे कर्तव्यांची चर्चा येते. ज्ञानकांडात ईश्वरी ज्ञानाची चर्चा येते. याला 'उत्तर मीमांसा' असेही नाव आहे. कर्मकांडाला 'पूर्व मीमांसा' या नावानेही ओळखले जाते. ज्ञानकांड किंवा उत्तर मीमांसा या विभागालाच आपण उपनिषदे म्हणतो. उपनिषदांचा सारांश आहे गीता. अशा प्रकारे वेद हे प्रमाण ग्रंथ मानले जातात. यामुळे मी वेद आहे असे ईश्वराचे निवेदन आहे.

: 18 :

***गतिर्भर्ता प्रभु: साक्षी निवास: शरणं सुहृत् ।***
***प्रभव: प्रलय: स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **गति:** मी सर्वांचे अंतिम स्थान आहे
- **भर्ता:** भरण पोषण करणारा म्हणजे कर्मफळदाता
- **प्रभु:** सर्वांचा स्वामी
- **साक्षी:** साक्षी म्हणजे शुभाशुभांना पहाणारा
- **निवास:** सर्वांचे आश्रयस्थान
- **शरणं:** शरण म्हणजे आश्रय घेण्यास योग्य असे स्थान
- **सुहृत्:** सुहृद म्हणजे इच्छा न करता हित चाहणारा, करणारा आहे
- **प्रभव:** जगताची उत्पत्ती करणारा
- **प्रलय:** जगताचा प्रलय करणारा
- **स्थानं:** जगताला धारण करणारा
- **निधानं:** जगताचे संग्रह स्थान (प्रलय काळात ज्या ठायी सर्व भूते लय पावतात त्याचे नाव 'निधान' असे आहे.)
- **अव्ययं बीजं:** अविनाशी म्हणजे अक्षीण होणारे बीज आहे

**अर्थ**

प्राप्त होण्याजोगे परमधाम, भरण-पोषण करणारा, सर्वांचा स्वामी, शुभाशुभ पहाणारा, सर्वांचे निवास स्थान, शरण जाण्यायोग्य, प्रत्युपकाराची इच्छा न बाळगता हित करणारा, सर्वांच्या उत्पत्ती-प्रलयाचे कारण, स्थितीला आधार, निधान आणि अविनाशी कारणही मीच आहे.

***साक्षी स्वामी सखा भर्ता निवास गति आसरा***
***करीं हरीं धरीं मी चि ठेवा मी बीज अक्षय ।***

**विषय:** या श्लोकात दहा गोष्टींची चर्चा आली आहे 1) मी सर्वांचे अंतिम स्थान आहे. 2) मी कर्मफळदाता आहे. 3) सर्वांचा स्वामी आहे. 4) सर्वांचा साक्षी आहे.

5) सर्वांचे आश्रय स्थान आहे. 6) सर्वांचे शरण स्थान आहे. 7) सर्वांवर उपकार करणारा आहे, सर्वांचा उपकार कर्ता आहे. 8) मी जगताला उत्पन्न करणारा, धारण पोषण करणारा आणि प्रलय करणारा आहे. 9) मी जगाचे संग्रह स्थान आहे. 10) मी अक्षीण असे बीज आहे.

**स्पष्टीकरण**

1) **गतिः** ईश्वर सर्वांचे अंतिम स्थान आहे. सोळाव्या श्लोकापासून आपल्या विभूतींचे वर्णन ईश्वराने केलेले आहे. ईश्वर जगताचे मूळ कारण आहे. यामुळे सर्वांचे अंतिम स्थानही ते ठरतात. आई बालकासाठी कसे अंतिम स्थान असते तसे. ईश्वराच्या मांडीवरच जीवाला शांतता लाभते.

2) **भर्ताः** ईश्वर कर्मांचा फळदाता आहे. कर्माचे फळ आहे सुख आणि दुःख. या कर्मांचा भोग हा देश, काल आणि परिस्थिती यावर अवलंबून असतो. निमित्तावर अवलंबून असतो. पूर्वजन्मी आपण काही भली-बुरी कर्मे केली असतील. चांगल्या कर्मांचे फळ सुख आणि वाईट कर्मांचे फळ दुःखरुप असते. हा नियम आहे पण ही दोन्ही फळे परस्परविरुध्द असल्यामुळे त्याना एकत्रपणे भोगता येत नाही. तसे शक्य नसते. ज्या कर्मांच्या फळांना भोगण्यासाठी देश, काल आणि निमित्त अनुकूल ठरतात ती फळे लाभणे सुरु होऊन जाते. उदाहरणार्थ मला कुणा महात्म्याचा सत्संग लाभ झाला तर मी आचरलेल्या शुभ कर्मांचे फळ भोगण्याचा अनुकूल समय मला लगेचच मिळून जातो. देश, काळ आणि निमित्त ईश्वराधीन गोष्टी आहेत. या संपूर्ण सृष्टीचा निर्माता ईश्वर असल्यामुळे अशा प्रकारे कर्मफळ प्रदाता देखिल तोच आहे.

3) **प्रभुः** ईश्वर सर्वांचा म्हणजे या सर्व सृष्टीचा स्वामी आहे. सारेच जड काय आणि चेतन काय ईश्वराच्या अधीन असल्यामुळे त्याच्याच स्वामीत्वाने साऱ्या सृष्टीचे संचालन होते.

4) **साक्षीः** ईश्वर सर्वांचा साक्षीभूत आहे. तमाम जीवांच्या ठायी ईश्वर साक्षीरुपाने विद्यमान असतो. साक्षी म्हणजे तटस्थ. आपल्या तमाम क्रिया त्याच्या साक्षीने सुरु असतात. कारखान्याचा मालक तटस्थ किंवा साक्षीभूत नसतो. आश्रमाचा संचालकसुध्दा तटस्थ किंवा साक्षीभूत नसतो पण ईश्वर मात्र सर्वांचा संचालक असुनही तटस्थ किंवा साक्षीभूत असतो. अनासक्त असतो. सर्वांनाच तो सत् तत्त्वाची प्रेरणा देतो. अर्थात असे करताना त्याला कुणाबाबतीत आसक्ती नसते. सत्प्रेरणा देणे त्याचा स्वभावच आहे. असत् प्रेरणा देणे हा ईश्वराच्या माया शक्तीचा परिणाम आहे. मायेचा स्वभाव आहे. दोघांच्या प्रेरणा अशा प्रकारे परस्पर विरुध्द आहेत. या दोन प्रेरणा अस्तित्वात असल्यामुळेच तर जगाचे अस्तित्व शक्य आहे आणि यामुळेच तर सत्प्रेरणेचे महत्वही आहे.

5) **निवासः** ईश्वर सर्वांचे आश्रय स्थान आहे. जड जगत हे परमेश्वराहून वेगळे नाही. जीव देखिल ईश्वराहून वेगळा नाही. पाण्यातल्या लाटा या कदापि पाण्यापासून वेगळ्या नसतात. यामुळे लाटांसाठी पाणी हे आश्रय स्थान असते. घटासाठी माती हे आश्रय स्थान असते. जी वस्तु ज्या वस्तु पासून जन्माला येते ती वस्तु त्या वस्तुचे आश्रय स्थान असते. जड सृष्टी ईश्वरापासून बनलेली असल्यामुळे, ती ईश्वराचा भास असल्यामुळे ईश्वर जड सृष्टीचे आश्रय स्थान आहेत. जीवही ईश्वराचाच भास आहे. यामुळे जीवाचे आश्रयस्थानही ईश्वरच आहे.

6) **शरणम्ः** ईश्वराच्या शरणी आलेल्या दुःखी, आर्त जीवांची दुःखे ईश्वरच दूर करतो. ईश्वरच सर्वांचे आश्रय स्थान असल्यामुळे ईश्वराच्या शरणातच खरे तर तमाम क्रिया घडायला हव्यात पण ईश्वराची माया शक्ती रुप असलेले हे जग एवढे आकर्षक आहे की आपण त्यातच फसून जातो. आपण सारे जगताच्याच अधीन बनून जगताच्याच शरणात आश्रय घेतो. तिथेच लीन रहातो. दुसरीकडे पिंड म्हणजे देहाच्या ठायी जीव रुपात आपण सारे व्यक्त होत असतो. तो जीव भाव देहाशी संलग्न असा जीव भाव असतो. यामुळे मी म्हणजे देह, इंद्रिये म्हणजे मी, बुध्दी हे माझेच रुप आणि मी म्हणजे मन असे मानून माणूस चालतो. त्यावर मग आपले एवढे उत्कट प्रेम जागते की आपण देहशरण बनून जगतो. अशा प्रकारे आपण जड जगत आणि अहंकार म्हणजे जीवभावाच्या शरणी राहतो. तसे पाहिले तर या दोन्ही प्रकारच्या शरणागती या आपल्यासाठी दुःखरुप बनून जातात मग कुठे आपण ईश्वराची शरणागती पत्करतो. खूप संकटात सापडल्यावर आपण ईश्वराला शरण जाण्याची भाषा बोलू लागतो. तेव्हा कुठे आपल्याला ईश्वराचे स्मरण होते. आपण ईश्वराच्या शरणागती गेलो किंवा नाही गेलो तरी ईश्वर आपल्याला सहाय्य करतोच. आपण जेव्हा ज्ञानपूर्वक ईश्वराला शरण

जातो तेव्हा ती शरणागती ईश्वररुप बनून जाते. ईश्वर अशा प्रकारची शरणागती आहे.

7) **सुहृत्:** ईश्वर प्रत्युपकाराची अपेक्षा न राखता उपकार करतो. आपण कुणावर उपकार केले तर अशी सहज अपेक्षा करतो की त्याने आपल्याला संकटाच्या वेळी मदतरुप व्हावे. खरे तर आपणही निष्काम भावनेने मदत करायला हवी. निरपेक्ष भावनेने मदत करायला हवी. ईश्वराचे म्हणणे असे की जो अशा प्रकारे निष्काम भावनेने मदत करतो त्याला माझेच रुप जाणावे. यामुळे अशा प्रकारे कुठल्याही प्रकारची कामना न करता उपकार करण्याची ईश्वराची भूमिका असते. असे उपकार करणारा पुरुष हा भगवंतच आहे.

8) **प्रभव: प्रलय: स्थानं:** जगताला निर्माण करणारा, धारण करणारा आणि प्रलय करणारा साक्षात ईश्वरच आहे. जगत हे दोन प्रकारचे आहे. जड रुप आणि चैतन्य रुप. जगाच्या मूळ कारणाच्या संदर्भात पुरेसे मतभेद आहेत. सांख्य आणि जैन, जड जगताचे कारण प्रकृती आणि पुद्गलाला मानतात. नैयायिक परमाणूला जड जगताचे कारण मानतात. सांख्य आणि जैन चेतनस्वरुपी आत्म तत्त्वाला जडापासून स्वतंत्र आणि स्वयंभू मानतात. वेदान्त मात्र साऱ्या जड चेतन जगताचे कारण ब्रह्म म्हणजे ईश्वराला मानते. ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात याचे विवेचन येते. चेतनस्वरुपी ईश्वर हे जगाचे मूळ कारण आहे. जगत हे सत्य नसून सत्यरुपी ईश्वराचा केवळ भास आहे. या सिध्दांतानुसार जगताला निर्माण करणारा ईश्वर असून ईश्वराशिवाय या जगताला निर्माण करणारे दुसरे तत्त्व नसल्यामुळे जगताचे संहार करणारेही दुसरे कुठले तत्त्व असू शकत नाही. यामुळे जगाला धारण करणारा ईश्वरच आहे. आधी उत्पत्ती आणि अखेरीस संहार हे दोन विकार प्रत्येक पदार्थाच्या ठायी दिसतात. यामुळे या दोन विकारांची आधी चर्चा करुन मग जगाच्या स्थिती काळाची चर्चा केली गेली. तसे उत्पत्ती, स्थिती आणि लय किंवा संहार हा सामान्यपणे क्रम आहे. या श्लोकात मात्र आधी उत्पत्ती आणि प्रलयाची चर्चा करुन मग स्थितीची चर्चा आली आहे. पदार्थाचे एक टोक आहे उत्पत्ती आणि दुसरे टोक आहे प्रलय किंवा संहार. यामुळे या दोघांची चर्चा आरंभी केली गेली आहे. उत्पत्ती आणि विनाशाच्या मध्ये पदार्थाची स्थिती असल्यामुळे त्यानंतर ठेवले गेले आहे.

9) **निधानम्:** जगताचे संग्रह स्थान ईश्वर आहे. एक एका परमाणुच्या ठायी ईश्वरच व्याप्त आहे. यामुळे ईश्वर हाच जगताचे संग्रह स्थान बनला. म्युजियम मध्ये उत्तमोत्तम वस्तु आदर्श रुपात ठेवल्या जातात. त्याला संग्रहालय म्हटले जाते. जगात सुंदर वस्तु पुष्कळ आहेत. या सुंदर वस्तुंचे आश्रय स्थान ईश्वर असल्यामुळे ईश्वर सर्वांग सुंदर आहे. यामुळे ईश्वर भक्त ईश्वराच्या मागे वेडावून गेलेले असतात.

10) **अव्ययं बीजं:** ईश्वर जगताचे कधीही क्षीण न होणारे बीज आहे. जगतातील बीजे क्षीण होऊन जातात. बीजातून वृक्ष बनतो तर मग बीज क्षीण होऊन जाते. नष्ट होऊन जाते. वृक्ष पुनश्च नव्या बीजाला जन्माला घालतो. अशा प्रकारे या सृष्टीत कुठलाहीपदार्थ किंवा कुठल्याही पदार्थाचे बीज कायम टिकू शकत नाही. पदार्थाची नष्ट होण्याची क्रिया अविरतपणे सुरुच असते. ईश्वर मात्र सर्व पदार्थांच्या बीज स्थानी आहेत आणि अन्य बीजांप्रमाणे हे ईश्वर बीज कदापि नष्ट होत नाही.

: 19 :

*तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च।*
*अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं तपामि:** मी सूर्यरुप बनून तपतो, ताप देतो
- **अहं वर्षं निगृह्णामि:** मी पर्जन्याला आकर्षित करतो
- **च उत्सृजामि:** आणि वृष्टी करतो
- **अर्जुन अहं अमृतं:** हे अर्जुना मीच अमृत म्हणजे मोक्ष आहे
- **च मृत्यु: एव:** आणि मरणही मीच आहे
- **च सत् च असत्:** आणि सत् व असत् ही मीच आहे

**अर्थ**

मीच सूर्याच्या रुपाने उष्णता देतो, पाणी आकर्षुन घेतो व त्याचा वर्षाव करतो, हे अर्जुना, मीच अमृत म्हणजे मोक्ष आणि मरणही आहे. मीच सत् व असत् ही आहे.

***तापतों सूर्य-रुपें मी सोडितों वृष्टि खेंचितों***
***मृत्यु मी आणि मी मोक्ष असें आणि नसें हि मी।***

**विषय:** या श्लोकात पाच विभूती दर्शविल्या आहेत 1) मी सूर्याच्या रुपात ताप देतो 2) मी वृष्टीला आकर्षुन घेतो आणि वृष्टीच्या रुपाने वर्षाव करतो. 3) मी मोक्ष आहे. 4) मी मरण आहे. 5) सत् आणि असत् ही मीच आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं तपामि:** मी (ईश्वर) सूर्याच्या रुपाने ताप देतो. सूर्याच्या रुपाने ईश्वर या विश्वाची अद्भुत प्रकारे सेवा बजावत आहेत. सूर्याशिवाय का कुणी जीवंत राहू शकेल? सूर्य किरणातील क्ष किरणे आरोग्यासाठी अतिशय लाभकारी आहेत. क्ष किरणे सकाळच्या कोवळ्या उन्हात असतात. यामुळे अस्थी मजबूत होतात. सूर्याचा महिमा अपरंपार आहे. आरोग्य आणि एकूणच जीवनाचा विचार करु जाता सूर्याचे महत्व सर्वश्रेष्ठ असे आहे. सूर्याचा ताप आणि प्रकाश जर उपलब्ध नाही होऊ शकला तर धरतीवरील जीवनच नष्ट होऊन जाईल. सूर्याचे अनंत उपकार असल्यामुळे सूर्याला भगवान मानले जाते.

2) **अहं वर्ष निगृह्णामि च उत्सृजामि:** ईश्वर पावसाला खेचून आणतो आणि वर्षाव करतो. सूर्याप्रमाणेच पाऊसही अद्भुत आहे. सूर्याशिवाय पाऊस नाही आणि पावसाशिवाय ना अन्न, ना पाणी, ना वृक्षराजी. पावसाशिवाय जीवनच नाही. पाणी म्हणजे जीवन. शेतकऱ्याचे जीवन तर पावसावरच अवलंबून असते. पाऊस शेतकऱ्यासाठी ईश्वर रुपच असतो. शेतकऱ्याची श्रध्दा पावसाच्या माध्यमातूनच ईश्वरावर बसते. पावसाच्या रुपाने जणू काही देवाच्या करुणेचा वर्षाव होत असतो. ईश्वरी कृपेचा वर्षाव होत असतो. शेतकऱ्याची ईशनिष्ठा बघून तर टॉल्स्टॉय वेडे पिसे झाले. म्हातारपणी हाती नागर धरुन त्यांनी शेतकऱ्याचे जीवन आचरायचे ठरवले होते. ईश्वर पाऊस पाडतो आणि वाटेल तेव्हा परत बोलावून घेतो.

3) **अमृतम्:** ईश्वर म्हणजे अमृत. ईश्वर म्हणजे मोक्ष. ब्रह्मसूत्र वेदान्त शास्त्रातील चौथे सूत्र आहे 'तत् तु समन्वयात्' यात मोठ्या विस्तृत प्रमाणात मोक्षाचे वर्णन आले आहे. मोक्ष संपादन करायची वस्तु नाही. मोक्ष तर प्रत्येकाला प्राप्त आहेच आहे. मोक्ष म्हणजे परमात्म स्वरुप होय. प्रत्येक जीव हा देह, मन, बुध्दी आणि इंद्रियांपासून सर्वथा भिन्न असला तरी सुध्दा ईश्वरापासून वेगळा नाही. कुठल्याही परिस्थितीत वेगळा नाही. अज्ञानावस्थेत देखिल जीव ईश्वराहून वेगळा नाही. अर्थात् अज्ञानामुळे आपण ईश्वरापासून वेगळे नाहीहोत याची त्याला कल्पना नसते हा भाग वेगळा. आपण ईश्वराशी एकरुप असल्याचा त्याला अनुभव नसतो. मोक्ष जर आधीपासून प्राप्त नसेल म्हणजे उपस्थित नसेल तर मग त्याची उत्पत्ती होते असे मानावे लागेल मग त्याचा अंतही होईल. ज्या वस्तुची उत्पत्ती होते त्या वस्तुचा अंतही होईलच होईल. असे मानल्यावर हे स्वीकारावे लागते की मोक्ष ही विनाशी वस्तु आहे. नष्ट होणारी वस्तु आहे. कायम टिकणारी वस्तु नाही. मोक्ष जर विनाशी असेल तर मग त्याच्या प्राप्तीसाठी कुणी का बरे धडपड करावी ? यामुळे मोक्ष सदैव प्राप्त वस्तुच आहे पण त्याचा अनुभव न येण्याचे मुख्य कारण मोक्ष स्वरुपी ईश्वराची ओळख न होणे हेच आहे. मोक्षरुपी परमात्मा हे आपलेच रुप आहे.

4) **मृत्युश्च:** ईश्वर मृत्युरुप आहे. मृत्यु सुध्दा एक अद्भुत वस्तु आहे. जीवंत आणि मृत देहात अंतर एवढेच असते की जीवंत देहात ज्ञानरुपता दिसून येते या उलट मृत देहात ज्ञानस्वरुपता नसते. मृत्युच्या काही काळापूर्वीच तर माणूस सर्वांशी बोलत असतो, सर्वांना ओळखत असतो पण मृत्यु येताच तो बोलणारा, ओळखणारा जीव कुठे निघून जातो हे काही कळत नाही. ही एक अद्भुत स्थिती आहे. असे अद्भुत वस्तुरुपी मरण हे ईश्वराचेच रुप होय हे मानावे लागेल. मरणाच्या पहिल्या क्षणी येणारी मरण वेदना असह्य असते. मरणानंतर मात्र दु:खाची असह्य वेदना संपूनच जाते.

5) **अहं सत् च असत्:** ईश्वर हेच सत् आणि असत् होय. सत् म्हणजे असणे, विद्यमान असणे होय. ईश्वर निरंतर विद्यमान आहे. ही विद्यमानता, हे असणे तमाम पदार्थांच्या संदर्भात दिसून येते. तमाम पदार्थ आहेत असे आपण म्हणतो. हे पाणी, ही धरणी, हा सूर्य असे आपण म्हणतो. धरणीपासून जळ वेगळे, जळाहून सूर्य वेगळा, सूर्याहून वायु वेगळा, वायुहून अग्नी वेगळा, सारे वेगवेगळे दिसत असतात. त्यांचे विद्यमान असणे कायम असते. प्रत्येक पदार्थाचा मी पणा किंवा विद्यमानता कायम असते. एखादे वेळी आपण असे म्हणतो की अमुक-अमुक पदार्थ नाही तेव्हा नकळतपणे आपण त्या पदार्थाचे अस्तित्त्व मान्यच करत असतो. आपणही मी आहे असे म्हणतो. देहात वाटेल तेवढे अंतर का असेना तरी पण आपल्या

मी पणात काहीही फरक नसतो. मरणापर्यंत हा मी पणा कायम असतो. मी नाही असे म्हणतानाही हा कोण नाही याचे उत्तर आपल्याला मी नाही असे द्यावे लागते. मी हेच उत्तर असते. तेव्हा असे उत्तर देत असतानाच आपण मी च्या अस्तित्वाला स्वीकारत असतो. यामुळे हा सत् म्हणजे अस्तित्व भाव किंवा विद्यमान असण्याचा भाव हेच ईश्वराचे खरे स्वरुप होय.

या सत् स्वरुपाचे आकलन होण्यासाठी आपल्याला असत् रुपाचे ज्ञान असायला हवे. असत् रुप म्हणजे नेमके काय? असत् रुप म्हणजे ज्याचे अस्तित्त्व नसते तरी जे भासमान होते ते रुप. सत् चे अस्तित्त्व देखिल पिंड-ब्रह्मांडात्मक असत् जगाच्या अनुभवामुळेच आपल्या अनुभवाला येते. येऊ शकते. अंधार जर दिसला नाही तर प्रकाशाचे अस्तित्व कसे बरे कळावे? अंधाराच्या अस्तित्वामुळेच तर आपल्याला प्रकाशाला प्रकाश म्हणता येते ना! प्रकाशाच्या अस्तित्वामुळेच तर आपण अंधाराशी परिचय करुन घेऊ शकतो. अंधार ही काही स्वतंत्र वस्तु नाही, भावात्मक वस्तु नाहीये. ती अभावात्मक वस्तु आहे. प्रकाश मात्र भावात्मक वस्तु आहे. अशाच प्रकारे सारेच असत् रुपी तमाम पदार्थांचे अस्तित्व सत् रुपी ईश्वराशिवाय शक्यच नाही. सत् स्वरुपी ईश्वरामुळेच असत् रुपी जगत दिसू शकते. मातीपासून बनलेला घट काही स्वतंत्र वस्तु नाही. मातीच्या मदतीने घट बनतो. घटाचा नाश करता येतो कारण घट असत् आहे पण माती मात्र सत् आहे. तिचे अस्तित्त्व नष्ट करता येत नाही. दोन वेगवेगळ्या वस्तु दिसत असल्या तरी दोन्ही वस्तु या दोन नसून एकच आहेत. तसेच असत् रुपी जगत हे सत् रुपी ईश्वराचे भासमान रुप होय. यामुळे सत् स्वरुपी ईश्वर आणि असत् रुपी जगत हे एकरुप असल्याचे सिध्द होते. ईश्वरच असल्याचे सिध्द होते.

: 20 :

***त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।***
***ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक-मश्नन्ति दिव्यान्दिवि***
***देवभोगान् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्रैविद्याः** वेदांचे अध्ययन करणारे म्हणजे तिन्ही वेदात विधान केलेली सकाम कर्मे आचरणारे
- **सोमपाः** सोम रसाचे पान करणारे
- **पूतपापाः** पापांपासून मुक्त झाल्यामुळे पवित्र झालेले पुरुष (हेच स्वर्ग प्राप्तीला प्रतिबंधक देव-ऋणरुप पापा पासून मुक्त होऊन पवित्र होणे समजले पाहिजे.)
- **मां यज्ञैः इष्ट्वाः** माझे यज्ञाद्वारे पूजन करुन
- **स्वर्गतिं प्रार्थयन्तेः** स्वर्गाची प्रार्थना करतात
- **ते पुण्यं सुरेन्द्रलोकंः** ते पवित्र अशा इंद्र लोकाला
- **आसाद्यः** प्राप्त करुन
- **दिविः** स्वर्गात
- **दिव्यान् देवभोगान्ः** दिव्य भोगांना म्हणजे स्वर्गातल्या देवांच्या दिव्य भोगांना
- **अश्नन्तिः** भोगतात, उपभोगतात

**अर्थ**

तिन्ही वेदात सांगितलेली सकाम कर्मे करणारे, सोम रस पिणारे, पाप मुक्त (येथे स्वर्गप्राप्तीला प्रतिबंधक असणाऱ्या देवऋणरुपी पापापासून मुक्त होणे, असे मानले आहे.) लोक माझी यज्ञानी पूजा करुन स्वर्ग प्राप्तीची इच्छा करतात, ते पुरुष आपल्या पुण्याईचे फळ असणाऱ्या स्वर्ग लोकाला जाऊन स्वर्गात देवांचे भोग भोगतात.

***वेदाभ्यासी सोम-पानें पुनीत***
***माझ्या यज्ञें इच्छिती स्वर्ग जोडूं***
***ते पुण्यानें जाउनी इंद्र-लोकीं***
***तेथींचे ते भोगिती दिव्य भोग।***

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) चारी वेदांचे अध्ययन करुन यज्ञ-याग वगैरे कर्मे आचरणारे पुरुष 2) सोम रसाचे पान करणारे 3) पाप मुक्त 4) यज्ञाद्वारे माझे पूजन करुन स्वर्ग प्राप्तीसाठी प्रार्थना करतात. 5) ते

पावन इन्द्र लोकाला प्राप्त होतात आणि स्वर्गात देवांच्या दिव्य भोगांचा उपभोग करतात.

**स्पष्टीकरण**

1) **त्रैविद्या:** या श्लोकात जरी तीन वेदांचाच उल्लेख आला असला तरी चौथा वेदही यात समाविष्ट आहे. चारी वेदांमधून विविध प्रकारच्या यज्ञ याग वगैरे कर्मांची चर्चा केली गेली. यातून आत्मज्ञानाचीही चर्चा आली आहे. आत्मज्ञानाच्या चर्चेशी संबध्द भागाला 'ज्ञानकांड' म्हणतात. हा विभाग 'उपनिषद' या नावानेही परिचित आहे. इथे ज्या लोकांची चर्चा आली ते कर्मकांडरत लोक आहेत. गृहस्थाश्रमी जनांसाठी वैदिक कर्मकांडांतर्गत ज्या यज्ञ याग वगैरे कर्मांच्या आवश्यकतेची चर्चा केली गेली त्या सर्व कर्मांचे श्रध्दापूर्वक सकाम बुध्दीने आचरण करणाऱ्या पुरुषांना 'कर्मकांडी' म्हटले जाते.

2) **सोमपा:** हे कर्मकांडी पुरुष सोम रसाचे पान करायचेत. सोम एक प्रकारची वनस्पती आहे. त्या विषयी आज कुणाला काही ज्ञान नाही. यज्ञ याग वगैरे कर्मांच्या लुप्त होण्याच्या सोबतच सोम रसपानही संपुष्टात आले आहे. कदाचित हिमालयात ही वनस्पती असावी असा कयास आहे. एका स्वामीजींनी ब्राझिलहून ही वनस्पती भारतात आणली होती. ब्राझिल येथे मोठाली अरण्ये आहेत. तिथे या सोम रसपानाचा प्रयोग आढळून येतो. ज्याला हा सोम रस पाजला गेला तो दिवसभर उच्च दशेत राहिला. त्याच्या मनाची स्थिती उच्च राहिली होती. त्याला नित्य हरी स्मरण होऊ लागले आणि अखेरीस तर त्याला समाधी सारख्या अवस्थेचा अनुभव येऊ लागला. दिवसभर अशा उच्च दशेच्या अनुभूतीमुळे त्याला आनंद वाटला. यावरुन असा अंदाज करता येतो की यज्ञाच्या पूर्णाहूतीनंतर सोम रसाचे पान करुन मनाच्या उच्च दशेचा अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठी कर्मकांडी पुरुष प्रयत्नशील असायचेत. विनोबाजींनी लिहिले आहे की या सोम वल्ली बाबत काही माहिती नाही पण सोम रस पानाचा अर्थ आपला आहार शुध्द राखणारे पुरुष जाणून घेऊ शकतात. सदैव शुध्द आहाराचे संयमपूर्वक सेवन आवश्यक आहे. आहार शुध्दीचा संबंध शारीरिक आरोग्य आणि मानसिक विकासासाठी आहे.

3) **पूतपापा:** पापापासून मुक्त, निष्पाप अशा पुरुषांना 'पूतपापा:' म्हटले जाते. यज्ञ याग वगैरे कर्मे चित्तशुध्दी घडवणारी पुण्यकार्य असतात. पुण्यकर्मात रत पुरुष पाप कर्मे करु शकत नाहीत. पाप कर्म अध:पतीत करतात. पुर्ण्य कर्मे उच्च दशेला पोहोचवतात. पाप कर्मे ही पुण्य कर्माच्या विरोधात असल्यामुळे पुण्य कर्मांचे आचरण करणाऱ्या पुरुषांच्या हातून पाप कर्मे होऊ शकत नाहीत अशी स्थिती असायला हवी पण समाजात काही चुकीच्या धारणाही बध्दमूल असतात."पुण्य कर्मासोबत अल्प-स्वल्प पापकर्मे केलेली चालतात, त्यात काही एवढा दोष नाही. पुण्य कर्मांनी थोडेसे पाप धुऊन निघते. यामुळे जोपर्यंत पुण्य कर्मांचे आचरण होत आहे तोवर अल्प पातक हातून घडले तर पुण्य कर्मात विशेष अशी काही बाधा येत नाही." अशी चुकीची धारणा समाजातल्या काही लोकांच्या मनात असते. यामुळे गीतेने इथे विशेषत्वाने हे सांगितले आहे की यज्ञ याग वगैरे पुण्य कर्मे आचरणारे लोक अगदी पाप मुक्त असतात.

4) **मां यज्ञै:** इष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ते यज्ञद्वारा ईश्वराची पूजा करुन स्वर्ग प्राप्तीची कामना करतात. स्वर्ग म्हणजे उच्च गती. जगात नेहमीसाठी दु:खाचाच अनुभव येतो. दु:खापासून मुक्तता मिळवून प्रत्येकालाच सुखाची लालसा असते. यासाठी प्रत्येकाची धडपड असते. गृहस्थाश्रमाचा अंगिकार करताना जशी सुखाची कामना असते तशीच अगदी सुखाची कामना ब्रह्मचर्याचे पालन करतानाही असते. त्यागातही सुख आहे. अर्थात् त्यातले सुख मिळवण्यासाठी आरंभी श्रम करावे लागतात. अंतिम अवस्थेत मात्र सुखलाभ अवश्य होतो. गृहस्थाश्रमात सुखांचा उपभोग घेताना तात्कालिक सुखाचा अनुभव मिळतो पण तो नंतर तो टिकू शकत नाही. यामुळे काही काळासाठी टिकणाऱ्या सुखांच्या प्राप्तीसाठी गृहस्थाश्रमात यज्ञ याग वगैरे कर्मे आचरावी लागतात, श्रम करावे लागतात. कष्ट उपसावे लागतात. याच्या आधारे इह जन्मानंतरच्या दुसऱ्या जन्मीचा देह प्राप्त होईपर्यंतच्या काळात भोग भोगत असताना दु:खाचा अनुभव न होता सुखाचा अनुभव होत रहाणे यालाच 'स्वर्ग' असे म्हणतात. यज्ञ याग वगैरेंच्या अनुष्ठानाने ईश्वराने संतुष्ट व्हावे, स्वर्गीय स्थिती म्हणजे सुखमय स्थिती प्राप्त व्हावी अशी प्रार्थना हे कर्मरत पुरुष करत रहातात.

5) **ते पुण्यं सुरेन्द्रलोकं आसाद्य** दिवि दिव्यान् देवभोगान् अश्नन्ति परिणामी ते पवित्र अशा इंद्र लोकाला प्राप्त होतात आणि स्वर्गात जाऊन देवतांच्या दिव्य भोगाना भोगतात. अशी कल्पना आहे की स्वर्गात देवता आणि देवराज इंद्राचा निवास असतो. स्वर्गात सुखच सुख असते. दु:खाचा लेशमात्र नसतो अशी धारणा आहे. इहलोकी म्हणजे या पृथ्वीवर जेव्हा आपण देह धारण करतो तेव्हा सुखासोबतच आपल्याला दु:खाचाही अनुभव येतो. यामुळेच तर सर्वथा दु:ख टाळण्याच्या कल्पनेतून स्वर्ग या कल्पनेचा उगम झाला. मोक्ष सुख अखंड असते. तिथून परतणे नसते. मोक्ष कर्मांवर अवलंबून नसून आत्म ज्ञानावर अवलंबून आहे. सत्कर्मांचे आचरण करत असताना निष्कामता, निविर्कारता प्राप्त होऊन जर ईश्वर स्वरुपाची ओळख झाली तर मग मोक्षाचा अनुभव घेता येऊ शकतो. अर्थात् ही फार मोठी गोष्ट झाली. स्वर्ग हा इहलोक आणि मोक्षाच्या मधली अवस्था आहे. स्वर्गाला 'पवित्र' आणि सुखाला 'दिव्य' असे म्हटले गेले. इहलोकातील यज्ञ याग वगैरे पुण्य कर्मांचे फळ स्वर्ग होय. पवित्र कर्मांमुळे लाभणारी गोष्ट पवित्रच असेल यामुळे स्वर्गालाही पवित्र म्हटले गेले. सुखाला अलौकिक म्हटले गेले कारण की इहलोकीचे सुख सुखदु:ख मिश्रित असते. स्वर्गीय सुख मात्र दु:खरहित असते म्हणून दु:खमिश्रित सुखाला लौकिक असे म्हटले जाते.

: 21 :

***ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं***
***क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।***
***एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **ते तं विशालं स्वर्गलोकं:** ते कर्मरत पुरुष त्या विशाल स्वर्ग लोकाला
- **भुक्त्वा:** भोगून
- **पुण्ये क्षीणे:** पुण्य कर्मे क्षीण झाल्यावर
- **मर्त्यलोकं:** मृत्यु लोकाला
- **विशन्ति:** प्राप्त होतात
- **एवं त्रयीधर्म:** अशा प्रकारे स्वर्गाचे साधनरुप तिन्ही वेदात सांगितलेल्या (वैदिक धर्माचा) सकाम कर्माला
- **अनुप्रपन्ना:** अनुसरण करणारे म्हणजे शरणी गेलेले
- **कामकामा:** फळाची आकांक्षा राखणारे म्हणजे इच्छा करणारे
- **गतागतं लभन्ते:** वारंवार आवागमन करत रहातात

### अर्थ

ते त्या विशाल स्वर्ग लोकाचा उपभोग घेऊन पुण्याई संपल्यावर मृत्यु लोकात येतात. अशा रीतीने स्वर्ग प्राप्तीचे साधन असणाऱ्या, तिन्ही वेदात सांगितलेल्या, सकाम कर्मांचे अनुष्ठान करुन भोगांची इच्छा करणारे पुरुष वारंवार ये-जा करीत असतात. अर्थात् पुण्याच्या जोरावर स्वर्गात जातात आणि पुण्य संपल्यावर मृत्यु लोकात येतात.

***त्या स्वर्गातें भोगुनी ते विशाळ क्षीणें पुण्यें***
***मृत्यु-लोकास येती, ऐसे निष्ठा ठेवुनी वेद-धर्मी,***
***येणें-जाणें जोडिती काम-मूढ ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) ते कर्मरत पुरुष त्या विशाल स्वर्ग लोकाचा उपभोग करुन 2) पुण्य कर्मे क्षीण झाल्यावर मृत्यु लोकाला पावतात. 3) अशा प्रकारे वैदिक धर्माचे अनुसरण करणारे फळाकांक्षा राखणारे, सकाम जन, आसक्त पुरुष आवागमन करत रहातात.

### स्पष्टीकरण

1) **ते तं विशालं स्वर्गलोकं भुक्त्वा:** स्वर्ग लोकासाठी इथे 'विशाल' या शब्दाची योजना केली गेली आहे. ते कर्मरत पुरुष त्या विशाल स्वर्गाचा उपभोग घेतात. स्वर्ग लोक आकाशात आहे आणि आकाश अत्यंत व्यापक आहे पण आकाशात ज्याप्रमाणे विविध वस्तु दिसतात तसा स्वर्ग काही दिसत नाही. श्रेष्ठ गतीच्या रुपाने स्वर्गाची कल्पना केली गेली. हे एक प्रलोभन नाही. पुण्यवंतांना इथेच म्हणजे या मृत्यु लोकातच चांगला जन्म लाभेल असे सांगण्यात पुण्य कर्मे करण्याचे आकर्षण जेवढे नसेल तेवढे हे सांगण्यात आहे की पुण्य कर्मांचे आचरण केल्यावर या मृत्यु लोकाहून भिन्न असे एक स्थान प्राप्त होईल. हे स्थान आपल्याला दिसत नाही. अशा प्रकारे पुण्य कर्मांविषयी

आकर्षण जागेल आणि समाज या दिशेकडे वळेल यासाठी इथे स्वर्गासाठी ‘विशाल’ हे विशेषणही जोडून दिले आहे. छोट्याशा जागेत सुखाची साधने कमी असतील या उलट विशाल स्थानात मात्र सुख-साधनांची रेलचेल असेल आणि मग स्वर्गात तर सुखच सुख असेल यामुळे स्वर्ग हा साधनसंपन्न असाच असायला हवाय.

2) **पुण्ये क्षीणे मर्त्यलोकं विशन्ति:** जीवाची पुण्य कर्मे क्षीण झाली म्हणजे जीव मृत्यु लोकात प्रवेश करतो. मृत्यु लोकाला प्राप्त होतो. प्रारब्ध कर्म क्षीण झाल्यावर ज्याप्रमाणे सध्याचे शरीर पडल्यावर दुसरा देह प्राप्त होतो तसेच स्वर्गातही फळांच्या उपभोगानंतर जेव्हा पुण्य कर्मे क्षीण झालीत की जीवाला मृत्यु लोकी परत यावे लागते. निष्काम भावनेने कर्मे आचरणाऱ्याला स्वर्गाचे फळ लाभत नाही. सकाम भावनेने आणि सुखाच्या लालसेने कर्मे आचरणाऱ्यालाच स्वर्गरुपी फळाची प्राप्ती होते. गीतेचे इथे हे निवेदन आहे की जीवाने फलासक्तीने वा सुखासक्तीने वाटेल तेवढी कर्मे आचरली असलीत तरीही त्याद्वारे त्याला स्थायी सुखाची प्राप्ती होऊ शकत नाही. स्थायी म्हणजे अखंड सुख होय. या अखंड फळाच्या प्राप्तीसाठी अहं भाव त्यजावा लागतो, सकामता विसरावी लागते, फलासक्तीचा त्याग करावा लागतो. अर्थात् एवढा त्याग करायची तयारी काही कर्मरत पुरुषाची नसते. तो काम्य कर्मे आचरण्यातच तल्लीन असतो. या काम्य कर्मांच्या आचरणातही काही तप, त्याग वगैरे करावे लागते आणि त्या तप आणि त्यागाचे फळ स्वर्ग प्राप्ती असे सांगून गीता सांगते की स्वर्गासारखे सर्वोच्च पद लाभल्यावर सुध्दा पुण्यकर्मे क्षीण झालीत म्हणजे मृत्युलोकी परतावे लागते.

3) **एवं त्रयीधर्मं अनुप्रपन्ना: कामकामा: गतागतं लभन्ते:** वैदिक धर्माचे आचरण करणारे आणि फलासक्ती राखणारे आसक्त जन आवागमन करत असतात. त्रयी धर्म म्हणजे वेदात वर्णिलेला यज्ञ याग वगैरे धर्म होय ! याचे अनुसरण करणारे पुरुष हे फलासक्ती असल्यामुळे आसक्त जन होत. असे आसक्त पुरुष स्वर्गात जातात आणि पुनश्च मृत्यु लोकात परत येतात. त्यांचे हे आवागमन सुरुच असते. ते जन्म-मरणाच्या फेऱ्यातुन कदापि मुक्त होत नसतात. गीतेच्या निरुपणाचा विषय मोक्ष आहे. यामुळे मोक्ष प्राप्तीसाठी सकाम कर्मे उपयोगी नसल्याचे गीता इथे सांगत आहे.

या संबंधी गीता भाष्याच्या प्रस्तावनेत शंकराचार्यांनी लिहिले आहे: स्वर्गादिकामार्थिन: अग्निहोत्रादिकामसाधनानुष्ठानाय आहिताग्ने: काम्ये एव अग्निहोत्रादौ प्रवृत्तस्य सामिकृते विनष्टे अपि कामे तद् एव अग्निहोत्रादि अनुतिष्ठत: अपि न तत् काम्यं अग्निहोत्रादि भवति। अर्थात् स्वर्ग वगैरेंच्या इच्छेने काही लोक अग्निहोत्र आदि साधनांचे अनुष्ठान करतात. असे लोक कामनायुक्त अग्निहोत्रात प्रवृत्त होतात. हे अनुष्ठान अर्धे झाले आणि या लोकांची आसक्ती जर नष्ट झाली तर मग त्या अग्निहोत्र वगैरे कर्मांचे अनुष्ठान करत असतानाही ते काम्य होणार नाही. निष्काम राहील.

इथे शंकराचार्यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला आहे. वैदिक यज्ञ याग असोत वा अग्निहोत्र वगैरे कर्मे असोत ही कर्मे काम्य कर्मे नाहीत म्हणजे ही कर्मे आसक्तीनेच होतात असे नाही. ही कर्मे अनासक्त बुध्दीने सुध्दा करता येऊ शकतात कारण की ही सात्त्विक कर्मे आहेत, पवित्र कर्मे आहेत. काही कर्मे राजसी असतात. अशी राजसी कर्मे अनासक्ती पूर्वक नाही करता येत. हिंसा, युध्द, काळा बाजार वगैरे कर्मे अनासक्त राहून करता येणारच नाही. सात्विक कर्मे मात्र जशी आसक्तीने करता येतात तशीच ती अनासक्तीने सुध्दा करता येतात. राजसी काय आणि तामसी काय ही दोन्ही कर्मे अटळपणे आसक्तीनेच करता येतात. अग्निहोत्र वगैरे वैदिक कर्मे ही पवित्र आणि सात्त्विक असतात. स्वर्गाच्या कामनेने जरी ही सुरु झालीत ना तरीही मध्येच (म्हणजे काही काळपर्यंत वासना राखून ही कर्मे केलीत तरीही कर्मे आचरताना जर नंतर कधीतरी) त्या कर्मांमधली आसक्ती सुटून गेली ना तर ती कर्मे कामनायुक्त नसल्यामुळे (म्हणजे कर्मे आचरत असताना निष्काम भाव उत्पन्न झाल्यामुळे) मोक्ष प्राप्तीचे साधन बनू शकतात. मोक्ष प्राप्तीसाठी त्या कर्मांचा त्याग करायची गरज नाही. गीतेचे निवेदन एवढेच आहे की कर्मे ही सात्विक असली पाहिजेत आणि मुख्य म्हणजे ती सदैव अनासक्तीपूर्वक आचरली गेली पाहिजेत असे झाले तर मग जन्म-मरणाचा फेरा चुकू शकतो. अग्निहोत्र कर्माचा अर्थ असा आहे की चोवीस तास अग्नी प्रज्वलित ठेवावा. यासाठी कुंडाची निर्मिती करावी लागते. याला ‘यज्ञकुंड’ म्हणतात. प्रतिदिनी अग्नीची उपासना करावी लागते. ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते. अग्निहोत्र हे व्रत

वानप्रस्थाश्रमातच घेता येते. अशा अग्निहोत्राच्या व्रती साधकाला ‘अग्निहोत्री’ म्हटले जाते.

: 22 :

*अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते।*
*तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनन्या: चिन्तयत:** ईश्वराशी एकरुप होऊन चिंतन करणारे
- **ये जना:** जे लोक म्हणजे भक्त जन
- **मां पर्युपासते:** माझी उपासना करतात म्हणजे निष्काम भावनेने भजतात
- **तेषां नित्याभियुक्तानां:** त्या नित्य ऐक्य भावनेने माझ्या ठिकाणी स्थित झालेल्या भक्तांचा
- **योगक्षेमं:** भगवंताच्या स्वरुपाची प्राप्ती होणे याचे नाव ‘योग’ आणि भगवंताच्या प्राप्तीसाठी केलेल्या साधनांचे रक्षण याचे नाव ‘क्षेम’ आहे.
- **अहं वहामि:** मी चालवतो, वहन करतो

**अर्थ**

जे अनन्य प्रेमी भक्त मज परमेश्वराला निरंतर चिंतन करीत निष्काम भावनेने भजतात, त्या माझे नित्य चिंतन करणाऱ्या (माणसांचा) भक्तांचा योगक्षेम मी स्वत: त्याना प्राप्त करुन देतो.

*अनन्य-भावें चिंतूनि भजती भक्त जे मज*
*सदा मिसळले त्यांचा मी योग-क्षेम चालवीं।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) ईश्वराशी एकरुप होऊन चिंतन करणारे जे पुरुष माझी उपासना करतात 2) त्यांचा योगक्षेम मी चालवतो.

**स्पष्टीकरण**

1) अनन्या: चिन्तयन्त: ये जना: मां पर्युपासते: या श्लोकातला ‘अनन्य’ हा शब्द महत्वाचा आहे. लहान बालक आईशी अनन्य असते. त्याला आई शिवाय दुसरा कुठलाही आधार नसतो. ईश्वराशिवाय अन्य कुणाचीही भक्ती न करणारा भक्त बालकासारखा अनन्य असतो.

संत तुलसीदासजींनी सांगितलेय:

*मोरे प्रौढ तनय सम ग्यानी। बालक सुत सम दास अमानी॥ जनहि मोर बल निज बल ताही। दुहु कहँ काम क्रोध रिपु आही॥ यह बिचारि पंडित मोहि भजहीं। पाएहुँ ग्यान भगति नहिं तजहीं॥*

अर्थात् ज्ञानी हा मोठा मुलगा होय. भक्त हा धाकटा मुलगा. भक्ताला देवाचाच आधार, देवाचेच बळ असते. ज्ञानवंताला आपले बळ असते म्हणजे तो आत्मज्ञानावर विसंबून असतो. तसे तर ज्ञानी असो वा भक्त दोघांच्या समोर काम, क्रोध यासारखे शत्रु उभे ठाकलेलेच असतात. यामुळे ज्ञानी देखिल ईश्वराची भक्ती करतात. आत्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावरसुध्दा ते भक्तीचा पदर सोडत नसतात.

काम, क्रोध यासारखे विकार आणि त्यांचे मूळ जो अहं भाव आहे त्याला क्षीण वा शून्य करण्याची शक्ती केवळ भक्तीच्याच ठायी आहे. मी देहापासून भिन्न आहे हे झाले आत्मज्ञान पण त्यातही भक्ती एवढी शक्ती नाही. अहंकार हा अत्यंत सूक्ष्म स्वरुपाचा असतो. गीतेच्या मते आत्मज्ञानाहून श्रेष्ठ अशी आत्मज्ञानानंतरची भक्ती होय. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वीची भक्ती ही आत्मज्ञानाचे साधन होय. आत्मानात्म विवेकही साधन होय. अर्थात् आत्मानात्म विवेकाच्या माध्यमातून आत्मज्ञानाची जी प्राप्ती होईल ती भक्तीयुक्त असेलच असे काही सांगता येत नाही. भक्तीने प्राप्त झालेल्या आत्मज्ञानाच्या ठायी मात्र हमखासपणे भक्ती नांदत असतेच असते. याच भक्तीचा उल्लेख तुलसीदासजींनी वरील मुद्यात केला आहे. आत्मज्ञानासोबत भक्ती असली तर सूक्ष्म अहंभाव नष्ट होऊन त्यासमवेत काम, क्रोध वगैरे विकारांचाही विनाश होतो हे भक्तीचे वैशिष्ट्य आहे.

इथे असा प्रश्न उत्पन्न होऊ शकतो की जर आत्मज्ञानाने अहंभावाचा विलय होणार नसेल, होत नसेल तर मग त्या आत्मज्ञानाचा उपयोग काय? किंवा मग त्याला आत्मज्ञान तरी का म्हणावे? याचे उत्तर शोधताना विनोबाजींनी ‘ब्राह्मी स्थिती’ आणि ‘ब्रह्म निर्वाण’ यातले जे अंतर सांगितले आहे ते ध्यानी घ्यावे. ब्राह्मी स्थिती म्हणजे आत्मज्ञान होय. हे आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर देह तर सुटत नाही,

प्रारब्ध कर्मेही कायम रहातात. तोवर ज्ञानवंतालाही जिवंत रहावे लागते. याचा अर्थ असा की आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर सुध्दा म्हणजे ब्राह्मी स्थिती प्राप्त झाल्यावर सुध्दा ब्रह्म निर्वाण प्राप्त होईपर्यंत आत्मज्ञानाचा विकास होत रहातो. आत्मज्ञानानंतर जर भक्ती उपजली तर मग सूक्ष्म अतिसूक्ष्म असा अहंभाव सहजच क्षीण होऊन जातो आणि देह विसर्जित होईपर्यंत अत्यंत वेगाने आत्मज्ञानाचा विकास होतो. यामुळे अठराव्या अध्यायातील एकावन्न, बावन्न आणि त्रेपन्न या श्लोकांमधून गीतेने ज्ञानाच्या पराकाष्ठेचे वर्णन करुन चोपन्नाव्या श्लोकात असे सांगितले आहे की ब्रह्मज्ञानी पुरुषाला परा भक्ती प्राप्त होते. पंचावन्नाव्या श्लोकात असे म्हटले आहे की परा भक्तीच्या आधारे ईश्वराचे परिपूर्ण ज्ञान वा अनुभव प्राप्त होतो. गीतेचे निवेदन असे आहे की आत्मज्ञानाच्या प्राप्तीनंतर परा भक्ती जागते मग जर आरंभीच आत्मज्ञानाच्या साधन रुपाने परा भक्ती जागली तर ती सहजच आत्मज्ञानाच्या नंतरही कायम राहील. त्यासाठी काही विशेष श्रम करावे लागणार नाहीत. अशा प्रकारे भक्ती साधकावस्थेत आणि सिध्दावस्थेत राहून परिपूर्ण अवस्था प्राप्त व्हायला मदत होईल. यामुळे इथे गीतेचे हे निवेदन आहे की बालक ज्याप्रमाणे आईसोबत अनन्य भावनेने रहातो तशाचे प्रकारे ईश्वराशी एकरुप राहून चिंतन करत ईश्वराची उपासना वा भक्ती केली जाते.

2) तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं अहं वहामि: नित्य ईश्वराचे चिंतन करणाऱ्या, ध्यान करणाऱ्या अशा भक्त जनांच्या योगक्षेमाची काळजी म्हणजे साधनांच्या संबंधातल्या त्यांच्या तमाम चिंतांचे ओझे ईश्वर वहातो. बालक आईवरच विसंबून रहातो आणि आईच बालकाची काळजी वहाते. अशाच प्रकारे खरे भक्त स्वत:ला शून्य बनवून घेऊन आपले संपूर्ण आयुष्य ईश्वराधीन राखतात. अशा भक्तांच्या योगक्षेमाची काळजी ईश्वर वहातो.

योग म्हणजे अप्राप्त वस्तु प्राप्त करुन घेणे आणि क्षेम म्हणजे प्राप्त वस्तुचे रक्षण करणे. अशा प्रकारे योगक्षेमचा अर्थ आजीविका प्राप्त करुन घेणे असा लावला जातो. विनोबांच्या मतानुसार योग म्हणजे प्राप्ती, म्हणजे ईश्वर दर्शन, साधना त्याची काळजी होय आणि क्षेम म्हणजे संरक्षण, कल्याण म्हणजे साधना करताना येणाऱ्या अडथळ्यांचे निवारण करणे होय. विनोबांनी केलेल्या या अर्थ मांडणीत बाह्य आजीविकेचा समावेश होऊन जातो. भक्त तर ईश्वरापुढे बालकासारखा बनून गेला. बालकाला कसलाही विचार करावा लागत नाही. सर्व विचार आईलाच करावा लागतो. आईच बाळाला आंघोळ घालते, जेवायला वाढते, दूध पाजते. सारे काही करते. बालक संपूर्णपणे आईच्या अधीन असते. अनन्य भक्ताचीही अशीच स्थिती असते. भक्त ज्याप्रमाणे साधनेत तल्लीन असतो तसेच बाह्य आजीविका किंवा बाह्य जनसेवेतही निश्चिंत असतो. त्याच्या आजीविकेची व्यवस्थासुध्दा ईश्वरच करतो. ईश्वर कुणाला तरी त्याच्या आजीविकेसाठी प्रेरित करतो. अशाच प्रकारे जनसेवेच्या क्षेत्रालाही ईश्वरच तयार करुन देतो. जनसेवेत येणाऱ्या अडी-अडचणी तोच सोडवतो. अडथळ्यांना तोच दूर करतो. जनसेवा करताना काही गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले ना तर ते तोच सोडवतो. अनन्य भक्ताच्या अवस्थेत जिथे अहंकारशून्यता जागते आणि जीवभाव क्षीण होऊ लागतो तिथे चिंता करण्यासारखे काहीही उरत नसते.

: 23 :

*येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रध्दयान्विता:।*
*तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये अन्यदेवताभक्ता: अपि:** जे दुसऱ्या देवतांचे भक्तही
- **श्रध्दया अन्विता:** श्रध्देने युक्त होऊन
- **यजन्ते:** (अन्य देवतांचे) पूजन करतात
- **ते अपि:** ते सुध्दा
- **मां एव:** माझेच पूजन करतात
- **अविधिपूर्वकं:** पण अविधिपूर्वक म्हणजे अज्ञानपूर्वक
- **यजन्ते:** (माझे) पूजन करतात

**अर्थ**

हे अर्जुना, जे सकाम भक्त श्रध्देने दुसऱ्या देवांची पूजा करतात, तेही माझीच पूजा करतात पण त्यांचे ते पूजन अज्ञानपूर्वक असते.

*श्रध्दा-पूर्वक जे कोणी यजिती अन्य दैवतें*
*यजिती ते हि मातें चि परी मार्गास सोडुनी।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जे इतर भक्तही श्रध्दायुक्त होऊन अन्य देवतांची उपासना करतात, पूजा करतात 2) तेही अविधिपूर्वक म्हणजे अज्ञानपूर्वक माझीच पूजा वा उपासना करतात.

**स्पष्टीकरण**

1) **ये अन्यदेवताभक्ता: अपि श्रध्दया अन्विता: यजन्ते:** अन्य देवतांचे भक्तही जर अनन्य भावनेने त्या त्या देवतांची पूजा श्रध्दायुक्त अंत:करणाने करत असतील ना तर ते ईश्वराला शरण जाऊन ईश्वराची अनन्य भावाने भक्ती करतात, असे भक्त विरळ असतात. वेगवेगळ्या देवतांची पूजा करण्यात बहुधा सारेच प्रवृत्त असतात कारण की संपूर्ण ब्रह्मांडात एकच ईश्वरी तत्त्व व्याप्त असून ते अव्यक्त असल्यामुळे त्याचे सुयोग्य पध्दतीने ग्रहण करणे अवघड जाते. भक्ती कशी करावी याचाही धडपणे बोध होत नसतो. यामुळे वेगवेगळ्या प्रकृतीनुसार वेगवेगळ्या देवतांची कल्पना केली गेली. मोठमोठाल्या मंदिरांची उभारणी केली गेली. या विविध देवता भक्तांचा उल्लेख चौथ्या अध्यायातील बाराव्या श्लोकात आला आहे. सातव्या अध्यायातील वीस ते सव्वीस श्लोकांमधून याच देवता भक्तांची चर्चा आली आहे. देवतांचे भक्त हे निष्काम नसतात बहुधा ते सकामच असतात. अर्थात् पूजा मात्र ते श्रध्देने आणि एकाग्रतापूर्वक करतात. एकाग्रतेमुळे सहजच प्रसन्नता लाभते. या एकाग्र अशा देवता भक्तीचा माणसाच्या जीवनावर देखिल काही प्रमाणात चांगला प्रभाव पडतो. वाईट सवयी सुटतात आणि संयम प्रकट होऊ लागतो. व्रत उपवास घडतात. गीतेने या भक्तीचाही गौरव केला आहे. गीता काही या भक्तीला त्याज्य मानत नाही.

2) **ते अपि मां एव अविधिपूर्वकं यजन्ते:** ते अन्य देवतांचे भक्त देखिल ईश्वराचीच पूजा करतात अर्थात्च त्यांची शैली ही अविधिपूर्वक म्हणजे अज्ञानपूर्वक असते. इथे गीतेने देवता भक्तीचा निषेध न करता गौरवच वाढवला आहे. काही लोक देवतांची भक्ती करत असूनसुध्दा हळूहळू प्रपंचापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करत असतात. आरंभी या देवता भक्तांच्या मनात कामना असते. ही कामना हळूहळू क्षीण होऊ लागली म्हणजे असे भक्त प्रपंचाच्या मोह पाशातून वेगळे होत जाऊ शकतात. देवता भक्तीचे चित्त-मनावर पडलेल्या संस्कारांमुळे माणूस परमात्म भक्तीकडे वळू शकतो. हे संस्कार या कामी मदतरुप ठरतात.

इथे देवता भक्तीचा गौरव करत असतानाच गीतेने त्यातील दोषांनाही अधोरेखित केले. काही लोक देवतांच्या द्वारे ईश्वराचीच भक्ती करतात कारण की अखेर तमाम ब्रह्मांडात ईश्वरच व्याप्त असल्यामुळे तमाम देवतांच्या ठायी ईश्वरच आहे. अर्थात् सर्व ब्रह्मांडात व्याप्त असलेल्या ईश्वराची भक्ती प्राप्त करुन घेण्यासाठी आपण या देवतांची तात्कालिक स्वरुपाची पूजा-उपासना करत आहोत आणि ही पूजा अंततोगत्वा ईश्वर भक्तीतच रुपांतरित होईल हा भाव मात्र काही त्यांच्या मनी नसतो. या भावनेने काही ते ईश्वराची भक्ती करत नसतात. याचा साधा अर्थ एवढाच आहे की ते खरा मार्ग त्यजून चुकीच्या मार्गाने चालत असतात. आरंभी ईश्वराची भक्ती करणे जड जात असेल तर प्रयत्नपूर्वक देवतांच्या भक्तीचा आश्रय घेऊन हळूहळू देवतांची भक्ती त्यजून व्यापक ईश्वराच्या शरणी जाणे शक्य होऊ शकते पण अखेरपर्यंत कुणी देवतांच्या भक्तीतच तल्लीन होऊन रहात असेल तर मग त्यांचा मार्ग काही खरा नाही असे समजायला हवे.

: 24 :

*अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च।*
*न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि अहं:** कारण की मी
- **सर्वयज्ञानां भोक्ता:** सर्व यज्ञांचा भोक्ता
- **च प्रभु: एव च:** आणि स्वामीही आहे
- **तु ते मां तत्त्वेन:** पण ते अन्य देवतांचे भक्त माझ्या या तत्त्वाला अधियज्ञ स्वरुपाला
- **न अभिजानन्ति:** जाणत नाहीत
- **अत: च्यवन्ति:** म्हणून ते योग्य मार्गापासून च्युत होतात म्हणजे पुनर्जन्म पावतात

**अर्थ**

कारण सर्व यज्ञांचा भोक्ता आणि स्वामीही मीच आहे पण ते मला परमेश्वराला तत्त्वत: जाणत नाहीत म्हणून पुनर्जन्म घेतात.

***भोक्ता मी सर्व यज्ञांचा फल-दाता हि मी चि तो***
***नेणती तत्त्व हें माझें म्हणूनि पडती चि ते।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) सर्व यज्ञांचा भोक्ता मी आहे. 2) आणि स्वामीही मीच आहे. 3) पण हे देवता-भक्त माझ्या या तत्त्वाला जाणत नाहीत. 4) यामुळे ते योग्य मार्गापासून च्युत होऊन जातात

**स्पष्टीकरण**

1) **हि अहं सर्वयज्ञानां भोक्ता:** 'कारण की' ईश्वर सर्व यज्ञांचा भोक्ता आहे. मागील श्लोकात सांगितले गेले आहे की अन्य देवतांचे भक्त हे अविधिपूर्वक का होईना पण ईश्वराचीच भक्ती करत असतात त्याचे कारण सांगण्यासाठी 'कारण की' असा शब्द प्रयोग केला गेला. पहिले कारण असे की ईश्वरच तमाम यज्ञांचा भोक्ता आहे. इथे तत्त्वज्ञानाचा महान मूलभूत विचार प्रतिपादित केला गेला आहे. आपल्याला असे वाटते की आपण करत असलेल्या यज्ञांचे भोक्ते आपणच आहोत पण हा विचार तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोणातून काही खरा नाही. इथे प्रयुक्त झालेल्या 'यज्ञ' शब्दाचा नेमका अर्थ जाणून घ्यावा लागेल. व्यापक अर्थ जाणून घ्यावा लागेल. यज्ञ अर्थात् जीवनातील तमाम क्रिया. आपण जीवन क्रियांचे स्वत:ला कर्ते मानतो म्हणून या तमाम क्रियांचे भोक्तेही मानायला लागतो. हा कर्ता-भोक्तेपणाचा भाव अज्ञानाचे बीज आहे. अकर्ता आणि अभोक्तेपणाच्या अनुभवात अज्ञान वसू शकत नाही. अकर्तेपणाचा आणि अभोक्तेपणाचा अनुभव घडवुन आणण्यासाठी ईश्वर जीवमात्राला हे भान करुन देऊ इच्छितो की तमाम यज्ञांचा म्हणजे जीवनातील तमाम क्रियांचा कर्ता मी आणि भोक्ताही मीच मी !

2) **च प्रभु: एव च:** आणि स्वामी म्हणजे फळ देणाराही मीच आहे. ईश्वर काही केवळ कर्ते आणि भोक्ते आहेच एवढेच नव्हे तर ते सुख-दु:खरुप फळ प्रदान करणारेही आहेत. देश, काल आणि निमित्त या तीन कारणांवर फळ अवलंबून असते. असे समजा की माझ्या मनाला एका आसनावर बसून ईश्वराचे ध्यान करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. माझे मन त्यासाठी तडफडत आहे. ध्यान एकांतातच होऊ शकते. एकांत स्थळ काही जवळ उपलब्ध नाही. यामुळे देश म्हणजे प्रदेश हा काही ध्यानासाठी अनुकूल उरला नाही. ध्यान रात्री लवकर जागून म्हणजे दोन किंवा तीन वाजता करावयाचे असेल पण व्यवसायामुळे रात्री लवकर झोप घेणे शक्य होत नाही. यामुळे पहाटे उठणे अशक्य होते. याचा अर्थ असा की काळ अनुकूल नाही. देश आणि काळ अनुकूल असला तरी मग ध्यान प्रक्रिया समजावून सांगणारा कुणी अनुभवी लाभला नाही तरी ध्यान करणे अवघड आहे. अशा प्रकारे ध्यानासाठी निमित्तही आवश्यक आहे. देश, काळ आणि निमित्ताची अनुकूलता प्राप्त करुन घेणे काही आपल्या हाती नाही हे परमेश्वराच्या अधीन आहे. यामुळे फळदाताही ईश्वरच आहे हे मनी ठसले तर मग नित्य हरी स्मरण करता येणे शक्य आहे.

3) **तु ते मां तत्त्वेन न अभिजानन्ति:** अर्थात् ते अन्य देवता भक्त ईश्वराच्या या तत्त्वाशी परिचित नाहीहेत. अन्य देवता भक्तांची चर्चा सुरु असल्यामुळे गीतेने त्यांना लक्ष्य केले आहे पण हा मुद्दा काही केवळ अन्य देवतांच्या भक्तांपुरताच मर्यादित स्वरुपाचा नसून सर्वांवर लागू होणारा आहे. ईश्वरच तमाम क्रियांचा कर्ता-भोक्ता आणि फळदाता आहे हे सत्य सारेच जाणत नाहीत. बुध्दीने हे लक्षात आले तरी अमलात आणता येत नाही. आपले कर्ते-भोक्तेपण इतके पक्के असते की त्याचा त्याग करताना आपल्याला असेच वाटायला लागते की जणू काही आपण आपल्या स्वत:लाच हरवून बसणार आहोत आणि खरेच आपल्या स्वत:ला हरवून बसताना कमालीची घालमेल होते. जीव घाबरु लागतो. याचे कारण असे की आपल्या तमाम क्रिया या 'मी कर्ता-भोक्ता आहे' या भावनेवरच आधारित असतात. त्याचा त्याग करायचा अर्थ मूळावरच घाव घालणे आहे. हे सारे सहन करणे अवघड आहे. अर्थात् सत्संगतीत वैराग्य उपजले तर वैराग्याच्या आधारे कर्ते-भोक्तेपण मिटवायला आपण सफल होऊ शकतो.

4) **अत: ते च्यवन्ति:** यामुळे ते खऱ्या मार्गापासून च्युत होतात. अन्य देवता भक्त हे देवतांचीच भक्ती करतात ईश्वराची भक्ती करत नसतात. याचे कारण सांगताना असे निरुपित केले गेले आहे की ईश्वरी स्वरुपाची ओळख

नसल्यामुळे ते अन्य देवतांच्या भक्तीच्या मागे वेड्यासारखे धाव घेतात. यामुळे एकीकडे निष्कामता उरत नाही आणि दुसरीकडे 'मी' पणाही क्षीण होत नाही. निष्कामता आणि अहंभाव क्षीण करणे या दोन गोष्टी जर हस्तगत करुन घेता आल्या ना तर मग अन्य देवतांच्या भक्तीच्या जाळ्यातून सहजच सुटका होऊ शकेल आणि माणसाची चित्तवृत्ती ईश्वर भक्तीच्या दिशेने वळेल. खरे तर निष्कामता आणि अहंभाव क्षीण होत जाण्याची प्रक्रिया ही दोन समांतर तत्त्वे होत. दोन समांतर मूल्ये होत. हे एकदा कळले की मग यातली मेख कळू शकेल.

: 25 :

*यान्ति देवव्रता देवान्पि तृन् यान्ति पितृव्रता: ।*
*भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **देवव्रता:** देवव्रती म्हणजे देवतांचे पूजन करणारे
- **देवान् यान्ति:** देवतांना प्राप्त होतात
- **पितृव्रता:** पितृनिष्ठ लोक म्हणजे पितरांचे पूजन करणारे
- **पितृन् यान्ति:** पितरांना प्राप्त होतात
- **भूतेज्या:** भूतप्रेत निष्ठ म्हणजे भूत प्रेतांची पूजा करणारे
- **भूतानि यान्ति:** भूत प्रेत वगैरेंना प्राप्त होतात
- **मद्याजिन:** माझे पूजन करणारे म्हणजे माझे भक्त
- **मां अपि:** मलाच
- **यान्ति:** प्राप्त होतात

**अर्थ**

देवांची पूजा करणारे देवांना मिळतात, पितरांची पूजा करणारे पितराना जाऊन मिळतात, भूत प्रेतांची पूजा करणारे भूताना जाऊन मिळतात आणि माझी पूजा करणारे भक्त मला येऊन मिळतात. त्यामुळे माझ्या भक्ताना पुनर्जन्म नाही.

*देवांचे भक्त देवांस पितरांचे तयांस चि*
*भूतांचे भक्त भूतांस माझे हि मज पावती ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) देवव्रती देवांना प्राप्त होतात. 2) पितृनिष्ठ पितराना प्राप्त होतात 3) भूत-प्रेतनिष्ठ भूत प्रेत वगैरेंना प्राप्त होतात 4) माझी पूजा करणारे मला प्राप्त होतात

**स्पष्टीकरण**

1) **देवव्रता: देवान् यान्ति:** देवव्रती देवतांना पावतात. चौथ्या अध्यायातील बाराव्या श्लोकात जी चर्चा निरुपित झाली आहे तोच मुद्दा इथे चर्चेला आला की जो ज्याप्रकारे ईश्वराला भजतो-पूजतो त्या प्रकारे तो ईश्वर त्याला फळ प्रदान करतो. सातव्या अध्यायातील एकवीस ते तेवीस श्लोकांमधून हेच तर सांगितले गेले आहे. या अध्यायाच्या तेविसाव्या श्लोकात सांगितले गेले की अन्य देवतांची भक्ती करणारे वस्तुत: ईश्वराचीच भक्ती करतात. अशा प्रकारे देवता भक्तीचा गौरव वाढवून सांगितले गेलेय की व्यापक ईश्वर तत्त्वाचा परिचय नसल्यामुळे अशा प्रकारे देवता भक्तीकडे लोक वळतात. या श्लोकात हे सांगितले आहे की नाना प्रकारच्या भक्तीचे फळ काय लाभते ? आधी सांगितले आहे की देवतांची भक्ती करणारे देवतांना प्राप्त होतात. देवतांच्या भक्तीचे फळ आहे उच्च गती. ज्या गतीत भौतिक सुख आणि मानसिक सुख उपभोगता येते त्याला उच्च गती असे म्हणतात. हा अनुभव ईहलोकीच घेता येतो कारण की इथेच तर वैभवाचा अनुभव घेता येतो आणि मानसिक सौख्य लुटता येते. कर्मनिष्ठ लोकाना स्वर्गाचे फळ लाभते. कर्मनिष्ठेत स्थूल कर्म सामावलेले आहे. देवतेची भक्ती हे मानसिक कर्म होय. सकाम स्थूल कर्मासोबत मानसिक भक्ती चालू शकते. सकाम कर्म काय आणि देवतांची भक्ती काय दोघांचाही हेतु सुख प्राप्तीच आहे. दोन्ही सुखांसाठी लोक लालचावलेले म्हणजे उत्कंठित असतात. कर्मनिष्ठ वा देवता भक्त दोघांनाही उच्च गती प्राप्त होते.

2) **पितृव्रता: पितृन् यान्ति:** ज्यांची श्रध्दा पितरांच्या ठायी म्हणजे पितरांच्या श्राध्द वगैरे क्रियाकर्मात निष्ठा असते असे पितरनिष्ठ लोक पितरांना प्राप्त होतात. काही लोकांची श्रध्दा ज्याप्रमाणे यज्ञयाग वगैरे कर्मात असते त्याप्रमाणे काही लोकांची श्रध्दा पितरांच्या श्राध्द वगैरे क्रियाकर्मात असते. नातलगांची आठवण अनेकांसाठी निष्ठेचा विषय असतो. पूर्वजांप्रती निष्ठेचे फळ मध्यम गती अर्पित करते.

3) **भूतेज्या: भूतानि यान्ति:** भूत-प्रेतनिष्ठ लोक भूत-प्रेत वगैरेंना प्राप्त होतात. भूत म्हणजे पिशाच्च. अनेक लोकांची भूत पिशाच्चांवर श्रध्दा असते. भूत प्रेत अनेकांना सतावतात. यामुळे लोक दु:खी असतात. या त्रासापासून वाचण्यासाठी ते भूत पिशाच्चांना प्रसन्न करुन घेण्यासाठी स्मशानात जाऊन उपासना करतात. पिशाच्च बहुधा स्मशान निवासी असतात आणि त्यांचा प्रेतांशी संबंध असतो. तसे पिशाच्च काही दिसत नाहीत पण प्रेतांशी संबध्द असल्यामुळे स्मशानात जाऊन प्रेतांची पूजा-अर्चा करुन पिशाच्च देवतांना प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. पिशाच्च प्रेताच्या उपासकांना गीतेच्या सतराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकात 'तामसा जना:' म्हणजे तामसी म्हटले आहे. प्रेतान भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जना: । विनोबाजींनी भूत-प्रेतांच्या उपासनेचा चांगला अर्थ प्रतिपादित केला आहे. संहार शक्ती अर्जित करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपासनेला प्रेतोपासना म्हणता येईल सध्या अण्वास्त्र वगैरेंची जी काही उपासना चालली आहे ती त्यांच्या मते प्रेतोपासना आहे. प्रेताच्या ठायी जसे चैतन्य नसते तसेच पंच महाभूतांच्या ठायीही चैतन्य नसते. भूतोपासना म्हणजे वशीकरण शक्तीची उपासना होय. पिशाच्च दुसऱ्यांच्या मनात प्रवेश करुन त्याला आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात.

ईश्वर अनंत शक्तीसंपन्न असल्यामुळे ब्रह्मांडातही अनंत शक्ती आहे. यातल्या कुठल्याशा एका शक्तीची उपासना करुन इष्ट फळ प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयत्नशील रहाता येते. लोकांच्या तीन प्रकारांची चर्चा करत कुठले लोक कुठल्या भिन्न-भिन्न शक्तींची उपासना करतात ते या श्लोकात सांगितले गेले आहे.

4) **मद्याजिन:** मां अपि यान्ति ईश्वराची पूजा वा भक्ती करणारे पुरुष ईश्वरालाच प्राप्त होतात. जो ज्या प्रकारची भक्ती करतो त्याला त्या प्रकारचे फळ लाभते हा नियम आहे. ईश्वराची जर निष्काम बुध्दीने भक्ती केली गेली तर ईश्वराचे ज्ञान प्राप्त होऊन ईश्वराच्या ठायीच विलय म्हणजे मोक्ष प्राप्ती होईल. अशा ईश्वर भक्तीमुळे अंतत: अद्वैताचा अनुभव प्राप्त करुन घेता येतो. उर्वरित तीन पूजांच्या माध्यमातून द्वैतापासून मुक्तता लाभत नाही. देवतांची पूजा काय किंवा पितरांचे पूजन काय मग पिशाच्चांचे पूजन का असेना या साऱ्या आसक्तीजन्य पूजा पध्दती आहेत. परिणामी यांच्या पूजनापासुन लाभणारे फळदेखिल अंतवानच असणार आहे.

अद्वैत भक्तीचे वर्णन ज्ञानोबा पुढील प्रमाणे करतात: या अद्वैत भक्तीचा महिमा असा की नेत्राने ईश्वराचेच दर्शन, वाणीने ईश्वराचेच गुण वर्णन, सर्वत्र ईश्वरालाच नमन करायचे. दान काय किंवा पुण्य काय जे जे काही करायचे ते ते सारे काही एका ईश्वरासाठीच करायचे असते. अद्वैत भक्त ईश्वरासाठीच अध्ययनरत असतात. अंतर्बाह्य ईश्वरामुळेच तृप्त असतात. ईश्वरासाठीच जगतात. आपण हरीभक्त आहोत या विचारासाठी देखिल ज्यांच्यापाशी अहंभाव उरत नाही असे अद्वैती भक्त असतात. अद्वैती भक्त ईश्वराच्या लोभात बुडालेले असतात. ईश्वराच्या कामनेनेच कामनायुक्त असतात. ईश्वर प्रेमाचेच भुकेले असतात. ईश्वराच्या मागे वेडा बनण्यात त्यांच्या मनी लौकिक भाव उरत नाही. या भक्तांची शास्त्रे एका ईश्वरालाच जाणून घेतात. त्यांचा जप निरंतर ईश्वर प्राप्तीसाठीच असतो. अशा प्रकारे अद्वैत बुध्दीने ईश्वराची भक्ती करणारे जे भक्त आहेत ते या जीवनातच ईश्वरात लीन झालेले असतात मग मृत्युनंतर ते ईश्वराशिवाय अन्यत्र कुठे बरे जाऊ शकतील? अशा प्रकारे ते पूर्णत: ईश्वराप्रती समर्पित आहेत. ते ईश्वराशी एकरुप बनून मोक्ष प्राप्त करुन घेतात. ईश्वर प्राप्तीचा दुसरा कुठलाही मार्ग नाही. ज्यांना असे वाटते की आपण त्या तत्त्वाला जाणून घेतले आहे, आपण त्याप्रत पोहोचून गेलो आहोत ते कुठेच पोहोचले नाहीत हे खुशाल जाणावे. यामुळेच जे आपला अहंभाव विसरतात, ज्ञानाच्या अहंभावाचा थोडाही लवलेश ज्यांच्या मनी उरलेला नसतो असे विनम्र जन ईश्वराच्या निकटवर्ती आहेत असे जाणावे.

: 26 :

***पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।***
***तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: मे:** जो (कोणी भक्त ) मला
- **पत्रं पुष्पं फलं तोयं:** पान, फुल, फळ, जळ
- **भक्त्या:** प्रेमाने, भक्तीने

- **प्रयच्छति:** अर्पण करतात
- **प्रयतात्मन:** त्या शुध्द बुध्दीच्या निष्काम प्रेमी भक्ताने
- **भक्त्युपहृतं:** भक्तीने, प्रेमाने अर्पण केलेले
- **तत्:** ते पत्र पुष्प वगैरे
- **अहं अश्नामि:** मी (सगुणरुपाने प्रकट होऊन मोठ्या प्रेमाने) खातो

### अर्थ

जो कोणी भक्त मला प्रेमाने पान, फूल, फळ वा जळ इत्यादी अर्पण करतो, त्या शुध्द बुध्दीच्या निष्काम प्रेमी भक्ताने प्रेमाने अर्पण केलेले ते पान, फूल, फळ किंवा जळ मी सगुण रुपाने प्रकट होऊन मोठ्या प्रीतीने खातो.

***पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज***
***तें त्या पवित्र भक्ताचें अर्पिलें खाय मी सुखें।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जो मला पान, फूल, फळ किंवा जळ भक्तीने अर्पण करतो 2) त्या शुध्द चित्ताच्या भक्ताने भक्तीने अर्पण केलेले ते पान, फूल वगैरे मी स्वीकार करतो.

### स्पष्टीकरण

1) **य: मे पत्रं पुष्पं फलं तोयं भक्त्या प्रयच्छति:** जे भक्त मला पत्र, पुष्प, फळ वा जळ अर्पण करतात ते किती प्रमाणात अर्पण करतात हा काही महत्वाचा विषय नाही. कशा भक्तीयुक्त अंत:करणाने अर्पित करतात हा मोलाचा भाग आहे. सेवा करत असताना जर मनात भाव नसेल आणि केव्हा एकदाची ही कटकट संपेल अशी भावना असेल तर मग त्या सेवा कार्याला काय बरे अर्थ? अशा सेवेचे तर मोलच घटून जाईल. त्याचे फळ कसे मिळेल? सेवेचे मूल्य हे भावनेवर अवलंबून असते. बाहेरच्या सेवाकार्याने अंत:करणात निष्कामता जागावी, निर्विकारता उपजावी असे व्हायला हवे. सेवेचे हेच तर फलित होय. सेवा करता-करता मनात अभिमान जागू नये, राग-द्वेष वाढू नयेत, हे जर वाढत असतील तर आपली सेवा काही लाभकारक ठरु शकणार नाही असे समजावे. राजसी वा तामसी कर्मे आचरायला नकोत. त्यांचा तर त्यागच करायला हवा. या उलट आपण जर सात्विक कर्मे आचरत असू आणि अहंभाव जागला तरी ती कर्मे सोडून द्यायला नकोत कारण की आपण जर सात्विक कर्मे सोडून दिलीत तर सारीच कर्मे सोडून देण्याचा मार्ग अवलंबवावा लागेल आणि सारीच कर्मे जर आपण सोडून दिलीत तर मग सात्विक कर्मेही सुटून जातील अशा अवस्थेत राग-द्वेष इत्यादी विकार कमी होण्याची शक्यता सुतराम उरणार नाही. यामुळे सात्विक कर्मे आचरत असताना म्हणजे परोपकार वा सेवा करत असताना जर अहंभाव जागला वा राग-द्वेष यासारखे भाव मनी जागले तर आपले कुठे चुकत आहे याचा आंतरिक शोध घ्यायला हवा. आपली चूक शोधुन काढायला हवी. या श्लोकात या चुकीचे कारण सांगताना गीता सांगते की सात्विक कर्मे आचरत असताना अहंभाव क्षीण करण्यासाठी आपण ईश्वर भक्तीची मदत घेत नाही हे ते कारण होय. ईश्वर भक्तीची मदत घेतली तर मग कर्म थोडके का असेना ते चित्तशुध्दीचे कारण बनू शकते. त्यामुळे चित्तशुध्दी घडून येऊ शकते.

या श्लोकात गीतेने पत्र, पुष्प, फळ आणि जळ या चार गोष्टींची चर्चा केली आहे. या पूजेच्या सुप्रसिध्द अशा वस्तु आहेत. मंदिरात आधी मूर्तीला स्नान घडवले जाते मग पत्र, पुष्प वगैरेंनी देवमूर्तीचा शृंगार केला जातो. गंध लावले जाते पण मनी जर भक्तीभाव नसेल हे तर सारे यांत्रिक पध्दतीने होते. पूजा करण्यासाठी पुजाऱ्याची नेमणूक केली जाते. पुजारी पोटार्थी असतो. तो पोटासाठी पूजा करतो. भक्तीभाव आरंभी जरी नसला तरी हळूहळू पूजा करता-करता भक्ती भाव जागू शकतो. पूजा करणारा किती तास पूजा करतो हा काही महत्वाचा भाग नाही. पूजा भक्ती भावनेने होते किंवा नाही हा खरा प्रश्न आहे. आपण जर जीवनातील तमाम क्रिया भक्ती भावनेने करत असू तर आपल्या जीवनाची दिशा बरोबर आहे असे समजून चालायला हरकत नाही. इथे गीतेचे निवेदन असे आहे की कर्म थोडे किंवा छोटे असो वा मोठे ते ईश्वर भक्तीने प्रेरित असेल तर ते सफल होईल.

याचा अर्थ असा मात्र नव्हे की कमी काम केले तरी आध्यात्मिक साधना पूर्ण होऊ शकेल. कमी काम केल्यामुळे तमोगुण वाढीला लागू शकतो. यामुळे आपल्याला कर्मे आचरण्यासाठी जे शरीर, इंद्रिये ईश्वराने दिलेली आहेत त्यांचा सुयोग्य प्रकारे उपयोग करायला हवा. दिवसभर आचरलेली सारीच कर्मे जर आपण ईश्वरार्पण

बुध्दीने आणि भक्ती भावनेने केलीत तर मग चित्त शुध्दी होईल, ईश्वराचा अनुभव जागेल आणि सहाजिकच मोक्ष प्राप्तीची दिशा उजळेल.

2) प्रयतान्मन: भक्त्युपहृतं तत् अहं अश्नामि त्या शुध्द चित्त असलेल्या भक्ताने अर्पित केलेले पत्र, पुष्प, फळ आणि जळ ईश्वर स्वीकारतो. यात शब्द आला आहे 'शुध्द चित्त'. ईश्वराला जे कुठले कर्म अर्पित करावयाचे असेल ते शुध्द चित्ताने अर्पित केले जायला हवे. चित्त शुध्दीचा अर्थ आहे विकारमुक्त दशा. ही भक्तीचे वैशिष्ट्य आहे की ती जर निष्कामतेच्या दिशेने वाटचाल करत असेल तर मग चित्त शुध्द व्हायला उशीर लागत नाही. भक्तीत जर सकामता मिसळली तर मग चित्त शुध्दीच्या कामी सहायता नाही लाभत. यामुळे भक्ती निष्काम असणे गरजेचे आहे.

या श्लोकात हे विशेषत्वाने सांगण्यात आले आहे की कर्म छोटे का असेना ते जर ईश्वरार्पण बुध्दीने केले गेले असेल तर ते ईश्वर स्वीकारतोच स्वीकारतो. म्हणजे ईश्वरार्पण करुन केलेले कर्म हे ईश्वर स्वीकारतो आणि यामुळेच तर ते कर्म सफळ होते. कर्माची सफळता अशा प्रकारे भावनेवर अवलंबून आहे. परमेश्वरार्पण भावनेने कर्म केले तर ते अहंकार भावनेला क्षीण करते हा मोठा लाभ होय. हे मोठे फळ होय. अहंकार गेला की मोक्षानुभव येतो. छोटीशी क्रिया जरी ईश्वराला भक्ती भावनेने अर्पण केली तरी मोक्षाचा म्हणजे आनंदाचा अनुभव येतो. विशुध्द भावनेने ईश्वरार्पण केलेली क्रिया ईश्वर स्वीकारतो. ही क्रिया अर्पण करताना साधक ईश्वराशी तेवढा काळ एकरुप होतो. यामुळे आनंद आणि शांततेचा अनुभव येतो. जीवनातल्या तमाम क्रिया अशा प्रकारे जर ईश्वरार्पण बुध्दीने आणि भक्ती भावनेने केल्या गेल्यात तर संपूर्ण आयुष्यच आनंदमय होऊन जाईल यात शंका नाही.

: 27 :

*यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।*
*यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **यत् करोषि:** तू जे काही कर्म करतोस
- **यत् अश्नासि:** ते काही खातोस
- **यत् जुहोषि:** जे काही हवन करतोस
- **यत् ददासि:** जे काही देतोस
- **यत् तपस्यसि:** जे काही तप करतोस म्हणजे जे काही स्वधर्माचरण करतोस
- **मदर्पणं कुरुष्व:** ते सारे मला अर्पण कर

**अर्थ**

हे अर्जुना, तू जे काही कर्म करतोस, जे खातोस, जे हवन करतोस, जे दान देतोस आणि जे तप करतोस, ते सारे मला अर्पण कर.

*जें खासी होमिसी देसी जें जें आचरिसी तप*
*जें काहीं करिसी कर्म तें करीं मज अर्पण ।*

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली गेली आहे की तू जी काही क्रिया करशील, भोजन करशील, यज्ञ करशील, दान देशील, तप करशील ते सारे मला अर्पण कर. म्हणजे समग्र जीवन मला अर्पण करुन जग.

**स्पष्टीकरण**

हा श्लोक सर्वांसाठी खुला आहे. अर्जुनाच्या निमित्ताने हा उपदेश सर्वांना केला गेला आहे. या श्लोकात पाच गोष्टींच्या माध्यमातून हा समर्पण विधी सांगितला गेला आहे. माणूस सबंध दिवसभर काही ना काही करतच असतो. त्याचा श्वासोच्छवास तर अखंड सुरुच असतो. गीतेचे निवेदन असे की तमाम इंद्रियांची तमाम कर्मे ईश्वराला समर्पित करुन टाकावीत. या क्रमात गीतेने जीभेला स्वतंत्र स्थान दिले आहे कारण की तिचे सामर्थ्य अपार आहे. जीभ एक प्रबळ इंद्रिय आहे. मग जीवनात दान, यज्ञ, तप जे काही आचरले जाईल ते ते सारे काही म्हणजे आपली तमाम कर्मे ईश्वराला अर्पण करावीत.

यज्ञ, दान आणि तपावर गीतेचा अधिक भर आहे. जीवन या तीन तत्त्वांवर उभारले जायला हवे. सर्व समाज उन्नत व्हावा असा गीतेचा दृष्टिकोण आहे. यज्ञ, दान आणि तप ही समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक अशी कर्मे होत. ही कर्मे साधक वा मुमुक्षु जनांसाठीही आवश्यक आहेत. या तीन कर्मांना सोडून साधना करणे श्रेयस्कर

नसल्याचे गीतेचे म्हणणे आहे. सृष्टी संस्था, समाज संस्था आणि शरीर संस्था या तीन संस्था होत. तिन्ही संस्थांसाठी यज्ञ, दान आणि तपाचरणयुक्त कर्मे साम्यावस्था साधणारी आहेत. सृष्टी संस्थेची सातत्याने झीज होत असते. त्याच्या पूर्तीसाठी आहे यज्ञ संस्था. आपण सृष्टी घाणेरडी करतो त्याचे शुध्दीकरण हे यज्ञ संस्थेचे महत्वाचे कार्य होय. तिसरे कार्य निर्माणाचे आहे. शेती पिकवणे, सूत कताई, वस्त्रोद्योग ही सारी निर्माण कार्ये होत. शेत नांगरणे, खत टाकणे यासारखी कार्ये झीज घालवण्यासाठी पूरक ठरतात आणि घाण हटवणे हे झाले शुध्दीकरण. समाज संस्थेच्या साम्यावस्थेसाठी आवश्यक आहे दान. आई, बाबा, गुरु जन यांचे आपल्यावर अनंत उपकार असतात. सेवा करुनच त्या उपकारांची फेड करता येते. आपण प्राप्त केलेली विद्या नि:स्वार्थ भावनेने दुसऱ्याला देणे हे कर्तव्यरुप ठरते. समाज सेवा करणे हे कर्तव्य आहे. समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी दान आवश्यक आहे. विनोबाजी म्हणतात की दान हा काही कुणावर केलेला उपकार नाही. आपल्यावर आधी झालेल्या कर्जातून मुक्त होणे आहे ते ! या भावनेने समाजाची सेवा करुन कर्ज चुकवता येते. संपत्तीचा देखिल स्वत:साठी उपयोग न करता दुसऱ्यांच्यासाठी करणे आपले कर्तव्य ठरते.

तिसरा मुद्दा तपाचा आहे. हे व्रत आहे. तप तीन प्रकारचे असते. कायिक, वाचिक आणि मानसिक तप. शरीर संस्था उत्तम रहावी यासाठी तपाची गरज आहे.

सातव्या अध्यायापासून भक्तीचे प्रकरण सुरु झाले आहे. सातव्या अध्यायात ईश्वर शरणतेची चर्चा येते. जीवात्म्याला जोवर जगात शांती लाभत नाही तोवर तो त्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. सत्संगतीत त्याच्या ध्यानात येते की आपण जोवर अहं भावाला तिलांजली देत नाही तोवर किती का देव-देव करेना वा कितीही ध्यान-धारणा वा जप-तप इत्यादी साधना करेना आपल्याला खरी शांतता लाभणारच नाही. अहंकार भावनेपासून मुक्त होणे हा खरा प्रश्न आहे. ध्यान वा जप-तप वगैरे साधनेमुळे अहं भाव विलयाला जात नाही. याउलट कधी कधी यामुळे वाढीस लागतो. यामुळे गीतेचा हा मूलमंत्र ध्यानी घ्यावा की ईश्वराला शरण गेल्याशिवाय अहं भाव लयाला जात नाही. यामुळे सातव्या अध्यायात प्रतिपादित ईश्वरशरणतेची मदत घ्यावी लागते. आठव्या अध्यायात सातत्ययोग म्हणजे ईश्वर शरणागतीनंतरचे ईश्वर स्मरण अखंड राहावे अशी सूचना दिली आहे. ही ईश्वर शरणतेनंतरची स्थिती आहे. ईश्वर शरणागती नंतरच तर ईश्वराच्या ठायी प्रेम भावना वाढीस लागेल, ईश्वरावर अखंड श्रध्दा जागल्यामुळे ईश्वर स्मरण अखंडपणे जारी राहील. ईश्वराचे स्मरण अखंडपणे जारी राहीले तर अहंभाव क्षीण होण्याची प्रक्रिया सुरु होईल मग जस जसे अहंकाराप्रती वैराग्य भाव जागू लागेल तसतशी ईश्वराप्रती समर्पणाची भावना जागेल. या नवव्या अध्यायात ईश्वर समर्पण भावनेची चर्चा आली आहे. ईश्वर शरणभाव, ईश्वर स्मरणातील सातत्य, ईश्वर समर्पण भाव असा हा क्रम गीतेने भक्ती मार्गासाठी ठरवलेला आहे.

: 28 :

***शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनै: ।***
***संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एवं:** अशा प्रकारे, या प्रमाणे
- **शुभाशुभफलै:** शुभ आणि अशुभ फळ प्रदान करणाऱ्या
- **कर्मबंधनै:** कर्मबंधनांपासून
- **मोक्ष्यसे:** तू मुक्त होऊन जाशील
- **संन्यासयोगयुक्तात्मा:** ज्याचे मन संन्यास आणि योगाने युक्त झाले आहे असा
- **विमुक्त:** अगदी मुक्त होऊन
- **मां उपैष्यसि:** मला प्राप्त होशील

**अर्थ**

अशा प्रकारे ज्यामध्ये सर्व कर्मे मला म्हणजे भगवंताला अर्पण होतात, अशा संन्यास योगाने युक्त असलेला तू शुभाशुभ फलरुप कर्मबंधनातून मुक्त होशील आणि मला येऊन मिळशील.

***अशानें तोडुनी सर्व कर्म-बंध शुभाशुभ***
***योग-संन्यास सांधूनि मिळसी मज मोकळा ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) अशा प्रकारे शुभ आणि अशुभ फळे देणाऱ्या कर्म बंधनातून तू मुक्त होऊन जाशील. 2) ज्याचे मन संन्यास आणि योगाने युक्त झाले आहे असा तू 3) अगदी मुक्त होऊन मला प्राप्त होशील.

**स्पष्टीकरण**

1) **एवं शुभाशुभफलै: कर्मबंधनै:** मोक्ष्यसे गीता म्हणते की अशा प्रकारे शुभ आणि अशुभ फळ प्रदान करणाऱ्या कर्मांपासून तू मुक्त होशील. कर्म बंधन जशी शुभ कर्मे देतो तशीच अशुभ कर्मेही प्रदान करतो. कर्माचे फळ हे मिळतेच मिळते. आपण जीवनात अगणित कर्मे करतो त्या कर्मांचे संस्कार होतातच. शुभ आणि अशुभ संस्कारांच्या अनुसार कर्मांची शुभ वा अशुभ फळे मिळतात. शुभ संस्काराचे फळ सुख तर अशुभ संस्काराचे फळ दु:ख असते. ही सृष्टी अनादी आहे. तिच्या सोबतचे जीव अनंत आहेत. त्यांची कर्मे अनादी आहेत. त्या अनंत जीवांच्या बंधन आणि मोक्षाचा खेळही अनंत काळापासून सुरु आहे. मागील श्लोकात सांगितले गेले आहे की आपण जर तमाम कर्मे ही ईश्वरार्पण बुध्दीने केलीत तर शुभाशुभ कर्मफळे देणाऱ्या कर्म बंधनापासून आपण मुक्त होऊ शकतो.

2) **संन्यासयोगयुक्तात्मा:** ईश्वराने अर्जुनाला सांगितले की तू संन्यास आणि योगयुक्त बन. विनोबाजी म्हणतात की संन्यास म्हणजे सांख्य निष्ठा आणि योग म्हणजे कर्मयोग निष्ठा होय. समर्पण योगात या दोन्हीही निष्ठांचा समावेश होतो. ईश्वर समर्पण भाव मनी जागला तर समत्व सहजी साध्य करता येतो. यामुळे योग आणि कर्तेपणाचा अहंकार नष्ट झाला की संन्यास साधता आला असे म्हणता येते. कर्माला आपण स्वत:पासून वेगळे करतो म्हणून संन्यास आणि कर्माला ईश्वराशी सांधून देतो म्हणून योग. अशाप्रकारे भावार्थ काय आणि अक्षरार्थ काय दोन्ही दृष्टीकोणातून योग आणि संन्यास यात अभेद सांगता येतो. दोघे एकमेकांशी जुळून जातात.

दुसऱ्या अध्यायात सांख्य निष्ठा आणि योग निष्ठेचा उल्लेख येतो. आज सर्वसंग परित्याग करुन अरण्य सेवन करणे वा हिमालयात जाऊन साधना करणे आणि सारे काही सोडून देणे असा संन्यास शब्दाचा चुकीचा अर्थ रुढ आहे. गीतेने या रुढ अर्थाला बदलून टाकलाय. विनोबाजींनी गीतेच्या अर्थाचे विश्लेषण संक्षेपात केले आहे. ते म्हणतात की संन्यास म्हणजे जीवमात्राच्या ठायी वसणारा कर्तृत्व वा कर्तेभोक्तेपणाचा जो अहंकार आहे त्याचा त्याग करणे, त्याला क्षीण करणे होय. योग म्हणजे तमाम क्रिया ईश्वरार्पण बुध्दीने करणे. अहंकाराला आपल्यापासून विलग केले म्हणजे त्याग केला आणि त्यागालाच तर संन्यास म्हणायचे. अर्थात् हा काही केवळ बाह्य त्याग नव्हे. तसाच योगाचा अर्थ स्वत:ला ईश्वराशी जोडणे होय.

3) **विमुक्त: मां उपैष्यसि:** अर्जुना, तू अशा प्रकारे योग आणि संन्यास युक्त होऊन तमाम बंधनांपासून मुक्त होशील आणि मुख्य म्हणजे ईश्वराला प्राप्त करुन घेशील असे गीतेचे म्हणणे आहे. योग आणि संन्यासाचा उपयोग करुन काय फळ लाभेल हे या श्लोकात सांगितले गेले आहे. संन्यास म्हणजे अहंकाराचा त्याग आणि योग म्हणजे ईश्वराशी स्वत:ला जोडणे होय. दोन्ही गोष्टी साधता आल्या तर मोक्ष लाभ होईल. आपण आहोत त्याच ठिकाणी मोक्ष लाभ होऊ शकेल.

ज्ञानोबा म्हणतात की गीतेचे निवेदन आहे की अग्नीत जाळून टाकलेले बीज पुनरपि उगवू शकत नाही तद्वतच ईश्वरार्पण कर्मे फलद ठरत नाहीत. कर्मे शेष राहिली तरच सुख-दु:खरुपी फळे तयार होतील आणि त्या फळांच्या उपभोगासाठी देह धारण करावा लागेल पण ज्याक्षणी कर्मे ईश्वरार्पण केली गेलीत त्याच क्षणी जन्म मरणाचा फेरा टळला. जन्म नष्ट झाला याचाच अर्थ असा की जन्मासोबत येणाऱ्या सुख-दु:खांचाही निरास झाला. यामुळे अर्जुना हा मंत्र मी तुला देत आहे असे ईश्वर म्हणतात. या उपदेशाला अमलात आणले ना तर मग देहरुपी कैदखान्यात रहावे लागणार नाही आणि दु:खरुपी सागरातही गटांगळ्या नाही खाव्या लागणार. ईश्वराच्या सुखरुपी स्वरुपाशी सहजच एकतानता साधता येईल. एकरुप होता येईल.

: 29 :

***समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रिय: ।***
***ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वभूतेषु:** सर्व भूतमात्रांच्या ठायी
- **अहं सम:** मी समानपणे म्हणजे सम भावनेने व्यापक आहे
- **मे द्वेष्य:** मला कोणीही अप्रिय नाही, कुणीही द्वेष करण्या सारखा नाही
- **प्रिय:** कोणी प्रिय नाही
- **तु ये मां:** पण जे मला
- **भक्त्या भजन्ति:** भक्ती भावाने प्रेमाने भजतात
- **ते मयि:** ते माझ्या ठायी
- **च अहं अपि तेषु:** आणि मी ही त्यांच्यात रहातो.

**अर्थ**

मी सर्व प्राणीमात्रात सम भावनेने व्यापून राहिलो आहे. मला ना कोणी अप्रिय ना प्रिय पण जे भक्त मला प्रेमाने भजतात, ते माझ्यात रहातात आणि मीही त्यांच्यात प्रत्यक्ष प्रकट असतो. उदाहरणार्थ अग्नी ज्या प्रमाणे सूक्ष्म रुपाने सर्वत्र व्यापक असूनही साधनांनी प्रकट केला म्हणजेच प्रकट होतो तसेच परमेश्वर सर्व जागी स्थित असूनही भक्तीने भजणाऱ्यांच्याच अंत:करणात प्रकट होतो.

***सम मी सर्व भूतांस प्रियाप्रिय नसे मज***
***परी प्रेम-बळें राहे भक्त माझ्यांत त्यांत मी ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) सर्व भूतमात्रांच्या ठायी मी समान रुपाने रहातो. 2) मी ना कुणाचा द्वेष करत ना कुणावर प्रीत. 3) पण जे मला भक्ती भावनेने भजतात ते माझ्यात एकरुप होतात आणि मी त्यांच्यात रहातो.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वभूतेषु अहं सम:** मी (ईश्वर) सर्व भूतमात्रांच्या ठायी म्हणजे प्राणीमात्रांच्या ठायी समानरुपाने वसतो. प्राणीमात्र म्हणजे पशु, पक्षी, अगणित लहान-मोठे कृमी-कीट वगैरे सारेच. हे सारे सत् तत्त्वाचा म्हणजे आत्मरुपाचा म्हणजे आपल्या अस्तित्वाचा अनुभव घेत असतात. ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात शंकराचार्य म्हणतात: सर्वो हि आत्माऽस्तित्वं प्रत्येति, न नाहमस्मि इति। यदि हि नात्माऽस्तित्वप्रसिध्दि: स्यात् सर्वो लोको नाहमस्मि इति प्रतीयात्। अर्थात् सर्वांनाच निश्चितपणे आत्म्याच्या अस्तित्वाचा अनुभव घेता येतो. आपण नाहीहोत असा काही अनुभव कुणाला येत नाही. आत्म्याचे अस्तित्व जर प्रसिध्द नसते तर मग मी नाही असा अनुभव सर्वांना आला असता पण तसे नाही.

आत्म्याचे अस्तित्व सिध्द करण्याचे हे सर्वात मोठे प्रमाण आहे. तमाम लोक आत्म्याच्या अस्तित्वाचाच अनुभव घेतात. ‘मी आहे’ हा याचा सर्वात दणकट पुरावा होय. मी आहे याचा अर्थ असा की माझे अस्तित्व आहे. तसे पाहू गेल्यास बालपणापासून तर मृत्युपर्यंत आपण नित्य इंद्रियांमधला बदल अनुभवतो. देहातला बदल, मनातला बदल, बुध्दीतला बदल अनुभवतो पण ‘मी आहे’ यात मात्र कुठलाही बदल कुणीही अनुभवला असे मात्र घडले नाही.अशा प्रकारे ‘मी’ म्हणजे देह वगैरेंच्या संघातामुळे भिन्न अशा ईश्वराचे अस्तित्व आपण हरक्षणी अनुभवत असतो. असे नसते तर मग ‘मी नाही’ असा अनुभव आला असता. अर्थात् ‘मी नाही’ असे म्हणत असतानाच कुठेतरी ‘मी आहे’ हा भाव अनुस्यूत आहे हे काही विसरता येत नाही. मी च्या अस्तित्वाप्रमाणेच चित् म्हणजे ज्ञानाचाही अनुभव येत रहातो, नित्य ज्ञान होत रहाते. अज्ञानाचेही ज्ञान असते. गाढ निद्रेसमयी आनंदाचा अनुभव येतो त्यावेळी जगाचे भान उरलेले नसते. अहंकार वगैरे विकार लुप्त झालेले असतात. अद्वैताचाच अनुभव येतो. परमात्मा हा आनंदरुप आहे. गाढ निद्रेत ईश्वराशी जीवात्म्याची एकरुपता साधली जाते यामुळे ईश्वराच्या आनंदाचा अनुभव येतो. या श्लोकात ईश्वर सर्व भूतमात्रांच्या ठायी आहे असे गीता सांगत आहे.

2) **मे द्वेष्य: न, प्रिय:** न ईश्वर कुणाचा ना द्वेष करत ना कुणावर प्रीत करत. त्याचा ना कुणी द्वेष करण्यायोग्य ना कुणी प्रीत करण्यायोग्य असतो. याबाबतीत शंका जागू शकते की ईश्वर कुणाचा द्वेष करत नाही हे एकवेळ मान्य करता येते पण कुणावर प्रीत करत नाही हे कसे मान्य करुन घ्यावे बरे? कारण की भगवंताला भक्त तर सर्वात प्रिय

असतो ना! याचे उत्तर शंकराचार्य असे देतात: अग्निवत् अहं दूरस्थानां यथा अग्नि: शीतं न अपनयति, समीपं उपसर्पतां अपनयति, तथा अहं भक्तान् अनुगृह्णामि, न इतरान्। अर्थात् अग्नी ज्याप्रमाणे दूरवर बसलेल्या माणसाला थंडी पासून वाचवू शकत नाही हा लाभ जवळच्याच माणसाला होतो तद्वतच ईश्वर भक्तावर अनुग्रह करतो. अभक्तावर ईश्वर अनुग्रह करत नाही.

ईश्वर अग्नी सारखा आहे. जो त्यापाशी पोहोचेल त्याचे शीत दूर होईल पण ज्याला थंडीची बाधा झाली नाही त्यावर अग्नीची कृपा झाली आणि जो लांब आहे त्यावर त्याची कृपा झाली नाही असे काही म्हणता येत नाही. अग्नी असा काही पक्षपात करत नाही. अग्नी स्वत:हून कुणाच्या जवळ जात असेल आणि कुणाला दूर लोटत असेल तर तो अग्नीचा पक्षपात ठरेल पण अग्नी तसे काही करत नाही.

ईश्वर अंतर्यामीच्या रुपाने सर्वांच्या ठायी समान रुपाने वसतो. सर्वांच्या ठायी समान रुपाने वसून सर्वांनाच सत्‌ची प्रेरणा प्रदान करतो. जे लोक ईश्वराच्या सत्प्रेरणेच्या आधारे चालतात, या कामी कदापि चुक करत नसतात ते सदैव ईश्वराच्या संन्निधानी वसतात. निकट रहातात. सदैव ईश्वराच्या निकट रहात असल्यामुळे त्याना ईश्वराच्या शांततेचा आणि निर्विकारतेचा अनुभव येतो. अखंड शांतता, निर्विकारता, अहंकार शून्यता याचा अनुभव येणे हीच ईश्वराची कृपा आणि अनुग्रह होय. जे लोक ईश्वराच्या सत्प्रेरणेच्या आधाराने न चालता विषयात लिप्त होऊन मायेच्या अधीन राहून चालतात ते ईश्वराच्या निकट पोहोचू शकत नाहीत. त्यांना ईश्वरी कृपेचा लाभ मिळत नाही. ईश्वरासाठी ना कुणी द्वेष करण्यायोग्य ना कुणी प्रीत करण्यायोग्य ! ईश्वर स्वत: प्रेममय असल्यामुळे जो त्याच्या निकट पोहोचेल त्याला त्या प्रेमाचा स्पर्श होईल मात्र जो लांब राहत असेल, माया जाळात गुरफटलेला असेल त्याला ईश्वर प्रेमाचा लाभ मिळणार नाही हा भावार्थ आहे.

3) **तु ये मां भक्त्या भजन्ति ते मयि च अहं तेषु:** जे लोक ईश्वराला भक्ती भावनेने भजतात ते ईश्वराच्या ठायी एकरुप असतात. शंकराचार्य म्हणतात : ये भजन्ति तु मां ईश्वरं भक्त्या मयि ते स्वभावत: एव, न मम रागनिमित्तं मयि वर्तन्ते। अर्थात् जे ईश्वराला भक्तीपूर्वक भजतात ते स्वाभाविकपणे ईश्वराच्या ठायी असतातच. ईश्वराच्या प्रीतीमुळे ते ईश्वराठायी वसतात असे मात्र नव्हे!

परत आचार्य लिहितात: तेषु च अपि अहं स्वभावत: एव वर्तते, न इतरेषु एतावता तेषु मम द्वेष: न। अर्थात् ज्ञ् त्यांच्याशी ही मी स्वाभाविकपणेच एकरुप असतो इतरांच्या ठायी नाही. यामुळे मला इतरांविषयी द्वेष बुंध्दी आहे वा असते असे मात्र नव्हे.

आपण ईश्वराशी किती एकरुप होऊन जगतो हा मुख्य प्रश्न आहे. ईश्वराशी एकरुप होऊन जगणे म्हणजे ईश्वराच्या अनुग्रहाला पात्र ठरणे होय. अज्ञानामुळे आपल्या ठायी राग-द्वेष वगैरे भाव असणे स्वाभाविक आहे पण ईश्वराच्या ठायी केवळ ज्ञान वसते त्यामुळे त्याच्या ठायी राग-द्वेष अशा भावनांची कल्पना करवत नाही.

: 30 :

*अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।*
*साधुरेव स मन्तव्य: सम्यग्व्यवसितो हि स: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अपि चेत् सुदुराचार:** जर कोणी अतिशय दुराचारी
- **अनन्यभाक्:** अनन्य भावाने माझा भक्त बनून
- **मां भजते:** मला निरंतर भजत असेल
- **स: साधु: एव मन्तव्य:** तर तो साधुच समजला पाहिजे
- **हि स: सम्यक् व्यवस्थित:** कारण की त्याने सदाचार संपन्न रहायचा निश्चय केला आहे.

**अर्थ**

जर एखादा अत्यंत दुर्वर्तनीसुध्दा अनन्य भावाने माझा भक्त होऊन मला भजेल, तर तो सज्जनच समजावा कारण तो यथार्थ निश्चयी असतो. अर्थात् त्याने ईश्वर भजनासारखे दुसरे काहीही नाही असा पूर्ण निश्चय केलेला असतो.

*असो मोठा दुराचारी भजे मज अनन्य जो*
*मानावा तो जसा साधु त्याचा सुंदर निश्चय।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे 1) जर कुणी दुराचार करणारा अनन्य भक्ती भावनेने माझी भक्ती करील तर 2) त्याला साधुच मानायला हवे

3) कारण की त्याने सदाचार संपन्न रहायचा निश्चय केलेला आहे.

**स्पष्टीकरण**

1) अपि चेत् सुदुराचार: अनन्यभाक् मां भजते: एखादा दुराचरणी जर अनन्य भावनेने ईश्वराला भजत असेल तर तो ईश्वराचा कृपापात्र बनू शकतो. मोठा दुराचरणी, पापी जर आपल्या दुराचरणाबाबत पश्चात्तापाने दग्ध होत असेल आणि ईश्वराची भक्ती करत असेल तर त्यावर ईश्वराची कृपा होऊ शकते. मायेपासून निघून त्याने ईश्वराप्रत पोहोचावे ही अट असेल. सबंध आयुष्य ज्याचे ईश्वरी प्रेरणेनेच व्यतीत झाले असेल आणि जो नित्य ईश्वराच्या निकट राहिला असेल त्यावर ईश्वराची कृपा होणे तर नि:संशय आहे. तो आधी कितीही पापाचरणी का असेना, दुराचरणी का असेना पण जिथे पापाचरणाचा त्याग केला असेल आणि ईश्वराकडे वळला असेल तिथे त्याच्या तमाम पापांचे क्षालन झाले असेल. पापाचरण सोडावे लागेल. सदाचरणी बनावे लागेल. ईश्वर भक्तीत रमावे लागेल या तीन प्रक्रिया आहेत. पापाचरणापासून मुक्ती. सदाचार संपन्न जीवन शैली आणि परमात्म भक्तीचा लळा. आपणा सर्वांनाच वाल्मिकीचे उदाहरण ठाऊक आहे. तुलसीदासजी लिहितात :

***जान आदिकवि नाम प्रतापू।***
***भयेउ सुध्द करि उलटा जापू॥***

अर्थात् आदी कवी म्हणजे वाल्मिकी. ईश्वराचे उलटे नाम जपले. राम म्हणण्याऐवजी मरा म्हटले. ईश्वराकडे वळताच ते परमज्ञानी बनले हा इतिहास आहे. लाखांमध्ये कुणी एखादाच असा ईश्वराकडे वळतो. यामुळे नेहमी दुराचरणापासून वाचायला हवेय. सदाचरणयुक्त रहाणे हा राजमार्ग आहे. सदाचरणसंपन्न असताना नेहमी सज्जनांची संगती धरावी, संतांच्या सहवासात रहायचा प्रयत्न करावा.

2) **स: साधु: एव मन्तव्य:** पापाचरणाचा त्याग करणारा साधु ठरतो. सदाचरणी बनतो. पापाबाबत पश्चात्ताप भाव जागला तर माणूस पापाचरणापासून परावृत्त होतो. पश्चात्तापानंतर चित्ताला व्याकुळता येऊन घेरते त्यावेळी माणूस ईश्वराचा आश्रय घेण्याचा प्रयत्न करतो. व्याकुळ चित्ताने ईश्वराची वारंवार प्रार्थना करतो. नित्याच्या प्रार्थनेने तो भक्त बनतो. ईश्वरानुरागी बनतो. ईश्वर भक्तीच्या पुढे त्याला अन्य तमाम गोष्टी तुच्छ वाटू लागतात. तो सदाचरणी बनून मग साधु-संत वा महात्मा बनतो.

3) **हि स: सम्यक् व्यवसित:** ज्या दुराचरणी पुरुषाने सदाचाराचा वसा घ्यावयाचे ठरवले आहे तो पुरुष धन्य होय. कुठल्याही गोष्टीसाठी निश्चय करणे गरजेचे आहे. त्याग करायचा कुणी निश्चय करेल ना तर पन्नास वर्षे जोपासलेले व्यसन सुध्दा त्याला क्षणभरात सोडता येईल. असा त्याग करणाऱ्यांची अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. चांगले कार्य देखिल निश्चय केल्याशिवाय अमलात आणता येत नाही. दुराचरणी पुरुषाच्या निश्चयाला दुहेरी धार असते एकतर यापुढे दुराचरण करणार नाही आणि दुसरे म्हणजे यापुढे ईश्वर भक्तीच्या आश्रयाने राहीन. यामुळे तो दुराचरणापासून मुक्त होऊ शकतो. प्रदीर्घ काळापासून असलेली पापाचरणाची सवय केवळ दृढ निश्चयाने दूर लोटता येईल असे नसते. यासाठी दुराचरणापासून मुक्त होण्याच्या संकल्पाच्या सोबतच सदाचरणाचा वसा घेऊन ईश्वर शरण भावाचा विकास करत ईश्वराप्रती अनुराग भक्ती भाव जोपासण्याचा संकल्पही असायला हवा, तरच माणूस दुराचरणापासून मुक्त होऊ शकतो.

: 31 :

***क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति।***
***कौन्तेय प्रति जानिहि न मे भक्त: प्रणश्यति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **क्षिप्रं धर्मात्मा भवति:** सदाचारी बनलेला भक्त लवकरच धर्मात्मा बनतो
- **शश्वत् शान्तिं:** अखंड परम शांती
- **निगच्छति:** प्राप्त करतो म्हणजे पावतो
- **कौन्तेय मे भक्त:** हे अर्जुना, तो माझा भक्त
- **न प्रणश्यति:** कदापि नाश पावत नाही
- **प्रति जानिहि:** असे तू निश्चयपूर्वक जाण

**अर्थ**

तो सदाचरणी पुरुष तत्काळ धर्मात्मा होतो आणि नेहमी टिकणाऱ्या परम शांतीला पावतो. हे अर्जुना, तू हे पक्के सत्य लक्षात ठेव की माझा भक्त नाश पावत नाही.

*शीघ्र तो होय धर्मात्मा शांति शाश्वत मेळवी*
*जाण निश्चित तूं माझा भक्त नाश न पावतो।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) दुराचरण सोडून जो भक्त बनतो तो तत्काळ धर्मात्मा बनतो. 2) तो अखंड शांततेला पावतो. 3) माझा भक्त कदापि नाश पावत नाही हे निश्चित समज.

**स्पष्टीकरण**

1) क्षिप्रं धर्मात्मा भवति: दुराचरणापासून मुक्त होऊन सदाचरणी बनलेला माणूस त्वरितच धर्मात्मा बनून जातो. हा श्लोक मागील श्लोकाच्या अनुसंधानात वाचायला हवा. यात भक्तीचे फळ वर्णिले आहे. सुलभता हा भक्तीचा फार मोठा गुण आहे. भक्ती मुक्कामी पोहोचवते हा झाला दुसरा मोठा गुण. याचे कारण असे की भक्तीत अहंकार पूर्ण रुपाने क्षीण होऊन जातो.

2) शश्वत् शान्तिं निगच्छति: त्या धर्मात्म्याला अखंड शांतता लाभते. ईश्वराशी सदा संलग्न असल्यामुळे अहं भाव जागत नाही परिणामी अशांतता जागत नाही. भक्तीसाठी प्रयत्न करणारा साधक ईश्वराची भक्ती साधत नाही या विचाराने व्याकुळही बनून जातो. यामुळे गीतेने फलाशात्यागाच्या सिध्दांताला केंद्रवर्ती मानले आहे. ध्यान असो वा भक्ती असो, योग असो वा वैराग्य असो जे काही प्राप्त करण्याचा प्रयत्न असो त्यात फलाशेचा त्याग ही सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे. अहंकाराचा त्याग करत असताना भक्ती वगैरे उपाय आहेत. यातून तटस्थता साधता येईल. केवळ प्रयत्न करण्यातून भगीरथ प्रयत्न करण्यातूनच जर आपली श्रध्दा असेल तर शांततेचा अखंड अनुभव घेता येईल. मुक्कामी पोहोचल्यावर महात्म्याला खचितच अखंड शांततेचा अनुभव येईल. त्या विलक्षण परिपूर्ण अशा शांततेचा नसला तरी फलाशेच्या त्यागामुळे शांततेच्या अनुभवात काही अडचण येईल असे नाही.

3) कौन्तेय मे भक्त: न प्रणश्यति प्रति जानिहि: माझा भक्त कदापि नष्ट होत नाही गीतेचे हे आश्वासन आहे. याचा अर्थ असा की भक्त कदापि भक्तीचा त्याग करत नाही परिणामी त्याचे पाऊल कदापि चुकणार नाही. पाऊल चुकणे म्हणजे विकाराच्या अधीन होणे. तुलसीदासजी लिहितात :

*खल कामादि निकट नहिं जाहीं।*
*बसइ भगति जाके उर मांहीं॥*
*गरल सुधा-सम अरि हित होई।*
*तेहि मनि बिनु सुख पाव न कोई॥*

अर्थात् ज्यांच्या अंत:करणात भक्तीचा निवास असतो त्यांच्या निकट काम वगैरे दुष्ट विकार फिरकत सुध्दा नाहीत. विष त्यांच्यासाठी अमृतरुप ठरते. शत्रु त्यांच्यासाठी कल्याणकर्ते ठरतात. भक्तीरुपी मणी प्राप्त केल्याशिवाय कुणाला सुखाची प्राप्ती नाही होऊ शकत. विष म्हणजे विषय विकार होत. विषम प्रसंगांनाही --- प्रतिकुल प्रसंगांनाही अनुकूल करुन घेत अमृतोपम करुन घेण्याची साधना भक्त करतो. शत्रुकडे मित्रवत बघण्याची दृष्टी विकसित केलेली असल्यामुळे तो मित्राप्रमाणे कल्याणकारी सिध्द होतो. भक्तीमुळे साधकाला या प्रकारची स्थिती अनुभवता येते.

: 32 :

*मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय:।*
*स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रा- स्तेऽपि यान्ति परां गतिम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि पार्थ:** कारण की हे अर्जुना
- **मां व्यपाश्रित्य:** मलाच शरण येऊन म्हणजे माझाच आश्रय घेऊन
- **स्त्रिय: वैश्या: तथा शूद्रा:** स्त्री, वैश्य आणि शूद्र वगैरे
- **ये पापयोनय: अपि स्यु:** आणि पापयोनींचे जे कुणी जीव असतील ते
- **ते अपि:** ते सुध्दा
- **परां गतिं यान्ति:** परम गतीला प्राप्त होतील

### अर्थ

हे अर्जुना, स्त्रिया, वैश्य, शूद्र तथा पाप योनी अर्थात् चांडाळ वगैरे कोणीही असो, ते सुध्दा मला शरण आले असता परम गतीलाच प्राप्त होतात.

*धरुनि आसरा माझा भोळे स्त्री-वैश्य-शूद्र हि*
*कीं पाप-योनि जे जीव ते हि मोक्षास पावती।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) माझा आश्रय ग्रहण करुन स्त्री, वैश्य, शूद्र आणि पाप योनीत जन्माला आलेले जीव सुध्दा 2) परम गतीला पावतात

### स्पष्टीकरण

1) **हि पार्थ मां व्यपाश्रित्य स्त्रिय:** वैश्या: तथा शूद्रा: ये पापयोनय: अपि स्यु: ते अपि: गीता सांगते की हे अर्जुना! माझा आश्रय घेऊन महिला, वैश्य तथा शूद्र आणि पाप योनीत जन्माला आलेले जीव मोक्ष मिळवू शकतात. प्राचीन काळी अशी कल्पना होती की मोक्षाचे अधिकारी केवळ ब्राह्मण हेच आहेत. या ज्ञातीतल्या महिलांना देखिल मोक्षाचा अधिकारी मानले जात नव्हते. याचे कारण असे की वैश्य, शूद्र आणि महिला या तिघांनाही वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता मग पाप योनीत जन्माला आलेल्यांच्या बाबतीत तर कायच बोलायचे? पाप योनीचा अर्थ अंत्यज असा होतो. विनोबाजी पशु योनीला पाप योनी म्हणतात. त्यांचे म्हणणे असे की पशु योनी मूढ असतानादेखिल त्यांना मोक्षलाभ होऊ शकणार नाही अशी कल्पना करणे योग्य नव्हे! पण त्या काळी पाप योनीचा अर्थ नीच जातीत जन्माला आलेले असा होता. बाळकोबांनी हाच अर्थ घेतला. प्राचीन काळी अशा प्रकारे या चार जाती मोक्षाच्या अधिकारी मानल्या जात नव्हत्या. अर्थात् गार्गी, मैत्रीयी यांच्या सारख्या ब्रह्मवादिनी महिलांचा उल्लेख आढळतो. तरी सुध्दा सर्वसाधारण कल्पना अशी होती की ब्राह्मणांशिवाय अन्य वर्गांना ज्ञान प्राप्ती होऊ शकणार नाही. ज्ञानाच्या अभावी मोक्ष कसा बरे मिळेल? वेदाध्ययनाद्वारे ईश्वर प्राप्ती करुन घेण्याचा अर्थ होता की ईश्वराची प्राप्ती केवळ ज्ञान मार्गानेच होऊ शकते. कर्मकांडी जन केवळ कर्मावरच भर देत होते. ते ज्ञानमार्गाला मान्यता देत नव्हते. प्रतिक्रिया स्वरुप केवळ ज्ञान मार्गालाच महत्व दिले गेले होते. यामुळे केवळ ज्ञानमार्गानेच मोक्षलाभ होऊ शकेल अशी मान्यता दृढमूल होती. श्रीकृष्णाने या एकांगी मान्यतेला निरस्त केले. संपूर्ण गीतेतून भक्ती विचाराला केंद्रस्थानी ठेवले आणि अन्यान्य साधनांचा समन्वय घडवून आणला. पातंजल योगात जे स्थान ध्यान आणि समाधीला आहे तेवढ्याच भागाला गीतेच्या सहाव्या अध्यायात स्थान देऊन त्याला भक्तीची जोड दिली. आरंभी कर्मकांडी जनांच्या मनात कर्मकांडविषयक जी चुकीची मान्यता होती ती दूर करुन यथार्थ कर्मयोगाला स्थान दिले. संन्यासाच्या चुकीच्या अर्थाला दुरुस्त करुन योग आणि संन्यास यातील समता अधोरेखित केली. दोघांमध्ये बाह्यत: दिसणाऱ्या विभेदाला स्पष्ट केले. तेराव्या अध्यायात सांख्याला स्थान देऊन देह आणि आत्मतत्त्व भिन्न आहेत हे समजावत तिथे भक्तीला सांधून दिले. चौदाव्या अध्यायात सांख्यांच्या तीन गुणांच्या विश्लेषणाला स्थान देऊन तिथे भक्तीला जोडून दिले. अशा प्रकारे श्रीकृष्णाने समन्वयाच्या दृष्टिकोणातून यथार्थ दूरदृष्टीचा परिचय करुन दिला. अतिसुलभ आणि श्रेष्ठ अशा भक्ती विचाराचे वर्णन केले. मोक्ष आणि ज्ञानाचा मुख्य उपाय भक्ती मानले. यामुळे सर्व वर्गांसाठी भक्ती आणि ज्ञान प्राप्त करुन घेणे सुलभ झाले. हे मोठे कार्य गीतेच्या माध्यमातून श्रीकृष्णाने केले.

2) **परां गतिं यान्ति:** हे सारे परम गतीला प्राप्त होतात म्हणजे मोक्षाला प्राप्त होतात. ईश्वराने अशा प्रकारे मोक्षाचे महाद्वार सर्वांसाठी खुले केले. पाप योनी म्हणजे नीच मानले गेलेले लोक चुकीच्या मान्यतांमुळेच नीच मानले गेले होते कारण की कुठलीही जात ही पूर्णपणे नीच असू शकत नाही. या उलट ब्राह्मण, वैश्य, शूद्र वा अन्य कुठलीही जात जर दुराचरण करत असेल, पापाचरण करत असेल तर त्या जातीला अवश्यमेव पाप योनी मानले जायला हवेय. गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाचे प्रचंड कार्य उभारुन या चुकीच्या मान्यतेचे निवारण करण्याचा प्रयत्न केला. गीतेने तर पाप योनीचा विशेष उल्लेख करुन पाप योनीसारखी कुठलीही स्वतंत्र योनी नसल्याचेच प्रतिपादन केले. पाप योनी असो वा शूद्र असो, वैश्य असो वा महिला असो कुणीही स्त्री-पुरुष सदाचरणी बनून जर दुराचरणाचा त्याग करणार असेल, भगवंताची भक्ती करणार असतील तर ते मोक्षाचे अधिकारी आहेत. शास्त्रकारांनी गजेंद्राचे उदाहरण देऊन पशु योनी सुध्दा

भक्तीच्या बळावर मोक्षाची अधिकारिणी होऊ शकते हे सिध्द् केलेय.

: 33 :

*किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा।*
*अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पुनः** तर मग
- **पुण्याः भक्ताः ब्राह्मणाः** पुण्यशील आणि भक्त ब्राह्मण जन
- **तथा भक्ताः** राजर्षयः राजर्षी भक्त लोक
- **किंः** त्यांच्या विषयी तर कायच सांगायला हवे ?
- **इमं अनित्यंः** या अनित्य म्हणजे क्षणभंगुर
- **असुखं लोकंः** आणि सुखरहित लोकांना
- **प्राप्यः** प्राप्त होऊन
- **मां भजस्वः** मला भजा म्हणजे माझेच भजन करा

**अर्थ**

मग पुण्यशील ब्राह्मण तथा राजर्षी भक्त लोक मला शरण येऊन परम गतीला प्राप्त होतात हे काय सांगावयास पाहिजे? म्हणून तू सुखरहित व नाशवंत या मनुष्य शरीराला प्राप्त होऊन नेहमी माझेच भजन कर.

*तेथें ब्रह्मर्षि राजर्षि ह्यांची गोष्ट कशास ती*
*भज तूं मज आलास लोकीं दुःख-द नश्वर।*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) पुण्याचरणी भक्त ब्राह्मण 2) भक्त राजर्षी म्हणजे क्षत्रियांबद्दल तर कायच बोलावे? 3) या अनित्य आणि सुखरहित लोकाला प्राप्त होऊन 4) मला भज.

**स्पष्टीकरण**

1) **पुनः पुण्याः भक्ताः ब्राह्मणाः** किम् मागील श्लोकाचे अनुसंधान पुढे चालवत या श्लोकात वर्णन येतेय की जर वेदाचे अनधिकारी मानले गेलेले पाप योनी जन मोक्षाचे अधिकारी मानले जात असतील तर मग पुण्यकर्म आचरण करणारे, सत्कर्म करणारे आणि परमात्म भक्ती करणारे भक्तहृदयी ब्राह्मण जन मोक्ष प्राप्त करुन घेतील यात आश्चर्य ते काय मानावे? तसे तर ब्राह्मण जन ज्ञानाचे अधिकारी मानले जात होतेच पण गीतेने या सोबत 'पुण्य' या विशेषणाला जोडले आहे हे ध्यानी घ्यावे लागेल. याचा अर्थ असा होतो की ब्राह्मण देखिल जर सदाचरणी वा पुण्यकर्मवान नसेल तर तो मोक्षाचा अधिकारी मानला जाणार नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे की गीता केवळ ब्राह्मण असण्याला महत्व देण्याऐवजी पुण्यशील वा सदाचरणी कर्माला अधिक महत्व देते. त्यागप्रधान असल्यामुळे ब्राह्मण जातीला महत्व प्राप्त झाले होते. ते आपल्या आचरणाला अतिशय विशुध्द राखण्याचा प्रयत्न करीत असत. पुण्यकर्म आणि सदाचरणाचा त्याग केल्यावर तर मग केवळ ब्राह्मण असण्याला काय बरे अर्थ? सदाचरणाच्या सोबतच हरी भक्ती असायला हवी. दोघांच्या सहकार्याने मोक्ष मिळेल. आत भक्तीचा केवळ विचार आहे मात्र बाह्यतः सदाचरण वा पुण्यकर्म नसेल तर मग मोक्ष लाभ होणार नाही. तसेच सदाचरण आहे पण भक्तीचा विचार नसेल तरी मोक्षाचा लाभ होणार नाही.

2) **तथा भक्ता राजर्षयः** किम् भक्त हृदयी राजर्षी देखिल मोक्षलाभ करु शकतात यात आश्चर्य ते काय? प्राचीन काळी राजे लोक मोठे सदाचरणी होते. ते सत्संगप्रेमी असून महापुरुषांच्या उपदेशांच्या अनुसार राज्याचा गाडा हाकत असत. या बाबतीत राजा जनकाचे उदाहरण प्रसिध्द आहे. ते ज्ञानी होते. त्यांनी याज्ञवल्क्य ऋषींपासून ज्ञान मिळवले होते. ज्ञानी असल्यामुळे ते अलिप्ततापूर्वक राज्यकारभार करत असत. ज्ञानी पुरुष निवृत्तीपरायण असतात. आधुनिक काळात रामदास स्वामींच्या सल्ल्याने राज्यकारभार करणारे छत्रपती शिवाजी राजे आहेत. अर्थात शिवाजी काही आत्मज्ञानी नव्हते. आजच्या काळातले गांधीजींचे उदाहरण आहे. राजनीतिज्ञ आणि सत्तासीन जन त्यांचा सल्ला विचारतात. राजा असूनदेखिल म्हणजे सर्वसत्तासंपन्न असून देखिल नम्र भावनेने महापुरुषांच्या सल्ल्याने राज्य कारभार चालवणे ही गोष्ट केवळ हिंदुस्तानातच दिसून येते. जगात अन्यत्र असे उदाहरण दिसून येत नाही. अशा प्रकारे जो राजा सदाचरणी बनून महापुरुषांच्या सल्ल्याने राज्य करतो तो परमात्म भक्तीच्या माध्यमातून मोक्षाचा अधिकारी ठरतो.

3) **इमं अनित्यं असुखं लोकं प्राप्य:** हा लोक अनित्य तर आहेच पण सुखरहितही आहे. येथवर जगासाठी 'असुखी' म्हणजे सुखरहित असे वर्णन कुठे आले नव्हते. अनित्य वस्तु शाश्वत सुख प्रदान करणारी असू शकत नाही हे स्पष्टच आहे. काही लोकांचे मत असे आहे की या जगात दु:ख कमी असून सुख अधिक आहे आपल्याला मात्र दु:खच अधिक आहे असे वाटते हा भास आहे. या मताला दिलेले हे उत्तर आहे. दु:खाला आपण जरी काल्पनिक मानले तरी ते असेपर्यंत तर खरेच असते. त्याचा अनुभव येतो तोवर तर ते खरेच असते. स्वप्न मिथ्या असल्यामुळे त्यात जरी दु:खाचा अनुभव आला तरी ते दु:ख खरे नव्हते असे तेव्हाच म्हणता येईल जेव्हा स्वप्नावस्था संपून जागृतावस्था आली असेल. जागृत झाल्यावर स्वप्न मिथ्या होते पण झोपेत तर ते खरेच असते. स्वप्नात दु:खाचा जो अनुभव येतो तो तेवढ्या वेळेपुरता तर खराच असतो, परिणामकारकच असतो. त्याला काल्पनिक कसे बरे म्हणणार ? यामुळे जागृत अवस्थेत अज्ञानामुळे येणारा दु:खाचा अनुभव हा अज्ञान असेपर्यंत तर कायम असतो आणि तो खरा वाटतो. खरा असतो. त्याला ना आपण टाळू शकत, ना त्याला काल्पनिक वा मिथ्या म्हणू शकत. आत्मज्ञानातही दु:खाचा अंत होतो. जोवर लोक अज्ञानावस्थेत असतात तोवर जगात सुखाच्या तुलनेने दु:खाचाच अनुभव अधिक असतो. यामुळे जगाला दु:खालय असे म्हटले आहे. दु:खमय असे म्हटले आहे. या जगात दु:खाचाच अधिक अनुभव आल्यामुळे आणि सुखाचा अनुभव नगण्य असल्यामुळे लोक ईश्वराच्या अनुभवाकडे वळतात. जगात राहून जो सुखलाभ झाला नाही तो ईश्वराच्या भक्तीतून मिळू शकेल या भावनेने जन लोक भक्तीकडे वळतात. यामुळे या जगासाठी असुखी जग असा शब्द प्रयोग केला गेला आहे.

3) **मां भजस्व:** ईश्वराला भजा, ईश्वराचे पूजन करा. दु:खमय जगात सुखाच्या अनुभूतीची सुतराम शक्यता नसल्यामुळे सुख मिळवायचे असेल तर केवळ ईश्वराची भक्ती हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा कुठलाही उपाय नाही. यामुळे गीता म्हणते की या जगाच्या खऱ्याखुऱ्या रुपाला जाणून घ्या, त्याचे असारत्व समजून घ्या आणि ईश्वराला शरण जा. ज्ञानोबा म्हणतात की शेकडो छिद्रे असलेल्या नौकेत आपण का निश्चिंत बसू शकतो ? जिथे शस्त्रांची बरसात होत असेल तिथे खुल्या छातीने का माणूस वावरु शकतो? जिथे दगडांचा वर्षाव होत असेल तिथे रक्षणाचे कुठलेही साधन माणूस आपल्या हाती का नाही घेणार? शरीर रोगाने पीडित बनून जर्जर व क्षीण बनले असेल तर तिथे माणूस उपायाविषयी कसा काय निश्चिंत राहू शकतो? चहुबाजूने आग उसळली असताना बाहेर पडण्याचा कुठलाही प्रयत्न न करता कुणी कसा काय स्थिर राहू शकतो? अशाच प्रकारे हे अर्जुना! यादु:ख आणि संकटांनी भारलेल्या मृत्युलोकी आल्यावर सुध्दा माणूस माझी भक्ती वा भजन न करता कसा बरे राहू शकतो? घर-दार आणि विषय-विलास यात अशी कुठली गोष्ट आहे की या बाबतीत निश्चिंतता बाळगून माणूस आनंदी आणि निश्चिंत राहू शकतो? माझी भक्ती न करता काय कुणी आपल्या यौवन आणि विद्येच्या बळावर सुख प्राप्तीची आशा बाळगू शकतो? विषय भोग तर वास्तविक पाहू जाता देहाच्या स्वस्थतेवरच अवलंबून असतात आणि माणसाचा देह तर सदा मृत्युमुखातच सापडलेला आहे. या मृत्युलोकी जन्म मरणाचा एक बाजार सुरु आहे. इथे प्रबळ दु:खरुपी माल सर्वत्र खुला पडला आहे. दु:खरुपी मालाच्या गाठोड्यांची सतत आवक आहे. माणूस या बाजारात येऊन ठेपला आहे. अशा अवस्थेत हे अर्जुना, सुखाचा व्यवहार कसा काय बरे चालू शकतो? राखेला फुंकर घालून का दिवा लावता येईल? मूर्ख जन या विषयांचे सेवन केल्याशिवाय रहाणार नाहीत. जन्म घेतल्यापासून माणसाला दिवसैदिवस काळाच्या अधिक अधीन व्हावे लागतेय. तरी सुध्दा लोक जन्मदिवसाचा उत्सव आनंदाने साजरा करतच असतात. आनंदाच्या पताका फडकवतच असतात. लोक तर मरण हा शब्द सुध्दा सहन करायला तयार नाहीहेत. कुणाचे निधन झाले तर दु:खावेगाने आक्रोश करतात पण लोक आपल्या मूर्खपणामुळे या गोष्टीचा कधी विचार देखिल करत नाहीत की आपले आयुष्य सुध्दा दिवसैदिवस क्षीण होत चालले आहे. बेडकाला साप गिळत असतो तरीसुध्दा बेडूक आपल्या तोंडात घट्टपणे माशीला पकडून ठेवतो. अगदी अशाच प्रकारे माणुस देखिल आपल्या वासना निरंतर वाढवतच असतो. हे अर्जुना, तू जन्म घेतला आहेसच तर आता लवकरात लवकर या जगातून बाहेर पड. चल,

या भक्तीमार्गाचा अवलंब कर. यामुळे तुला माझे अक्षय स्थान लाभेल. माझे स्वरुप लाभेल.

: 34 :

***मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।***
***मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मन्मना: भव:** केवळ मज सच्चिदानंदघन वासुदेव परमात्म्याचे ठिकाणीच अनन्य प्रेमाने नित्य निरंतर अचल मन ठेवणारा बन.
- **मद्भक्त: भव:** माझा भक्त बन म्हणजे मज परमेश्वरालाच श्रध्दायुक्त प्रेमासह निष्काम भावाने नाम, गुण व प्रभाव यांचे श्रवण, कीर्तन, मनन व पठण करीत निरंतर भजणारा हो
- **मद्याजी भव:** माझ्यासाठी यज्ञ करणारा बन म्हणजे मन, वाणी आणि शरीराच्या द्वारे सर्वस्व अर्पण करुन अतिशय श्रध्दा, भक्ती आणि प्रेम यांनी विह्वळ होऊन माझे पूजन करणारा हो
- **मां नमस्कुरु:** मला नमस्कार कर म्हणजे सर्वशक्तीमान विभूती, बळ, ऐश्वर्य, माधुर्य, गंभीरता, उदारता, वात्सल्य आणि सुहृदता वगैरे गुणांनी संपन्न सर्वांचा आश्रयरुप अशा मज वासुदेवाला नमस्कार कर.
- **एवं युक्त्वा:** अशा प्रकारे माझ्याशी एकरुप होऊन
- **मत्परायण:** मला शरण होऊन म्हणजे मला परायण होऊन
- **आत्मानं मां एव:** सर्वांचे आत्मरुप अशा मला
- **एष्यसि:** प्राप्त करुन घेशील

**अर्थ**

माझ्यात मन ठेव, माझा भक्त हो, माझी पूजा कर, मला नमस्कार कर. अशा प्रकारे आत्म्याला माझ्याशी जोडून मत्परायण होऊन तू मलाच पावशील.

***प्रेमानें ध्यास घेऊनि यजीं मज नमीं मज***
***असें जोडूनि आत्म्यास मिळसी मज मत्पर।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) माझ्या ठायी मन राख. 2) माझा भक्त बन. 3) माझ्यासाठी यज्ञ कर्ता बन. 4) मला नमस्कार कर. 5) अशा प्रकारे माझ्याशी एकरुप होऊन माझ्यात परायण होऊन 6) सर्वांचे आत्मे मलाच प्राप्त करुन घेशील.

**स्पष्टीकरण**

1) **मन्मना:** भव या श्लोकातून गीतेने भक्तीच भक्ती सांगितलेली आहे. माझ्या मनासारखा हो. या अध्यायाचे समापन भक्ती विचाराने केलेले आहे. गीतेचा मुख्य मंत्र भक्ती आहे. जीवनातील तमाम क्रिया ईश्वरार्पण बुध्दीने कराव्यात. ईश्वरविषयक प्रेम मनी असावे. याप्रकारे जगता येणे हा भक्तीचा विचार होय. गीतेच्या मते हा भक्तीचा अर्थ ! मन एक अद्भुत वस्तु आहे. तिच्या ठायी प्रचंड सामर्थ्य साठवलेले आहे. प्रचंड गती आहे. सहाव्या अध्यायाच्या समापनात अर्जुनाने हा प्रश्न उपस्थित केला आहे की मन चंचळ आणि हट्टी आहे त्याला स्थिर कसे करावे? याच्या उत्तरादाखल ईश्वराने सांगितले आहे की मन जरी चंचळ असले तरी त्याचा निरोध करता येऊ शकतो. अभ्यास आणि वैराग्य हे त्यासाठीचे दोन उपाय आहेत. मनाला ईश्वर भक्तीत तल्लीन करणे हा त्याला स्थिर करण्याचा सरळ उपाय आहे.

2) **मद्भक्त:** भव ईश्वराचा भक्त बन. आधी जर मन हरी चरणी विसावले तर मग ईश्वर भक्ती उत्पन्न होऊ शकते. जोवर मन लागत नाही तोवर कुठल्याही विषयावर प्रेम जागणार नाही, रस निर्माण होणार नाही. ईश्वर सूक्ष्म असल्यामुळे त्यात मन तल्लीन होणे सोपे नाही. विषय सुख अनित्य आहे, नि:सार आहे. असा बोध मनाला स्पष्टपणे झाला तरच मग ते विषयांपासून दूर होऊन ईश्वराकडे आकृष्ट होईल. मन जर एकदा ईश्वराच्या चरणी लागले तर हळूहळू ईश्वरावर प्रेम जागेल, भक्ती जागेल. तुलसीदासजी म्हणतात: मतिमंद तुलसीदास सो प्रभु मोहबस बिसराइयो। अर्थात् मोहवश बनल्यामुळे ईश्वराचे त्यांना विस्मरण झाले आहे. संत तुलसीदासजी परम भक्त होते. हे वचन त्यांच्यावर लागू होत नाही. ते इतर सर्वांवर लागू होते. ते पुढे लिहिता : ते धन्य तुलसीदास आस बिहाइ जे हरि रंग रँगे। म्हणजे जे हरीच्या रंगी रंगून गेलेत ते धन्य होत.

3) **मद्याजी भ:** ईश्वरासाठी ईश्वरानिमित्त यज्ञ करणारे बना. इथे ईश्वराने स्पष्ट शब्दात सांगून टाकले आहे की ईश्वर भक्ती करणारा कदापि निष्क्रिय नसतो. त्याचे जीवन यज्ञमय म्हणजे परोपकारमय म्हणजे सेवामय असते. जगात जोवर दु:खे आहेत तोवर दु:ख दूर करण्याचे प्रयत्न केल्याशिवाय भक्त जन राहू शकत नाहीत. तुलसीदासजींचे काकभुशुंडी म्हणतात: पर उपकार वचन मन काया। संत सहज सुभाव खगराया॥ म्हणजे हे गरुडा! देह, वाणी आणि मनाने परोपकाररत असणे हा संत जनांचा स्वभाव आहे. पुढे लिहितात: परहित नित सह बिपति बिसाला। म्हणजे इतरांचे कल्याण करण्यात संत इतके रत असतात की ते दुसऱ्यांसाठी नेहमीच अपार संकट झेलत असतात.

4) **मां नमस्कुरु:** मला (ईश्वराला) नमन करा. इथे गीतेने भक्ताचा जगाकडे बघण्याच्या दृष्टिकोण सांगितला आहे. आधी ईश्वराच्या ठायी मन अर्पिले मग जागली भक्ती. भक्तीचे आचरण करत असताना संपूर्ण आयुष्य सेवामय बनून गेले. यज्ञमय बनले मग सर्वत्र ईश्वर असे दर्शन झाले यामुळे विनम्र भावनेने सर्व जगाला अभिवादन केले. ईश्वराचे निवेदन असे की तू भक्त बनून मला प्रणाम कर. जी काही जड वा चेतन वस्तु तुला दिसेल ते माझे रुप जाण आणि नमन कर. तुलसीदासजी लिहितात :

***सरगु नरकु अपबरगु समाना।***<br>***जहँ तहँ देख धरें धनु-बाना॥***<br>***करम बचन मन राउर चेरा।***<br>***राम करहु तेहिं कें उर डेरा॥***

अर्थात् भक्तांसाठी स्वर्ग, नरक आणि मोक्ष समान असतात. यामुळे त्यांना सर्वत्र धनुष्य बाण धारण केलेले श्री रामचंद्र प्रभुचेच दर्शन होते. मन, वाणी आणि कर्म तिन्ही गोष्टींनी ते ईश्वराचे चेले आहेत. यामुळे भगवंताला निवास करण्यायोग्य अशी त्यांची अंत:करणे होत.

5) **एवं युक्त्वा मत्परायण:** अशा प्रकारे ईश्वराशी संलग्न बनून ईश्वर परायण बनून भक्त असतो. एकूण ईश्वराने निष्कर्ष रुपात असे निवेदन केले आहे की ईश्वराच्या ठायी मन लावणे, ईश्वराचा भक्त बनणे, ईश्वरासाठी यज्ञमय जीवनाचा अंगिकार करणे आणि सर्वत्र ईश्वराचेच दर्शन करुन प्रणत भावनेने रहाणे या चारही गोष्टींचा अंगिकार करुन ईश्वर परायण जीवन असावे. काही लोक जीवन परायण असतात. काही लोक सेवा परायण असतात पण जीवनाची आसक्ती सुटत नसते आणि जीवनासक्ती सुटल्यावर देखिल जोवर सेवेची आसक्ती सुटत नाही तोवर बाहेरील जग सोडून दिल्यावर सुध्दा परम शांततेचे दर्शन घडत नाही. यामुळे गीतेचे निवेदन असे आहे की मत्परायण बनून जीवन व्यतीत केले तर अहंकाराचा किल्ला उध्वस्त होईल. त्याचे फळ मोक्ष मिळेल.

6) **आत्मानं मां एव एष्यसि:** मी सर्वांचेच आत्मतत्त्व आहे. त्याला प्राप्त करुन घेता येईल. मत्परायण असण्याचे फळ असे लाभेल की अंतत: तू सर्वांच्या आत्मरुप अशा मला प्राप्त करुन घेशील. याचा अर्थ असा की तुझा अहं भाव ईश्वर चरणी विलीन होऊन जाईल. जीवाचे जीवन हे वेगळे उरणार नाही. सागरात जाऊन मिळाल्यावर का नदीचे जीवन स्वतंत्र उरते?

इथे एक विचार हा मांडला गेला आहे की ईश्वर केवळ ब्रह्मांडातच वसला आहे असे नसून तो तमाम प्राणीमात्रांच्या ठायीही आत्मरुपाने वसला आहे. लोकांची अशी सर्वसाधारणपणे समजूत आहे की ईश्वर हा ब्रह्मांडात स्थित असून तो सार्वभौम आहे, सर्वांवर त्याचे नियंत्रण आहे. ईश्वराच्या नावाचा उच्चार करताच सहज आपले बोट वर आकाशाकडे वळते. हाच ईश्वर सर्वांच्या अंत:करणात आत्मरुपाने वसतो या गोष्टीचे मात्र आपल्याला विस्मरण होते हे खरे आहे. यामुळे गीतेने या मुद्याकडे आपले लक्ष आकृष्ट करुन घेतले आहे की सर्वांच्या आत्म्याच्या ठायी तोच ईश्वर आत्म्याच्या रुपाने वसतो. त्या ईश्वराला परमात्मपरायण बनून आपण प्राप्त करुन घ्यावे. मग कुठे अहंकारापासून मुक्तता मिळून परम शांततेचा अनुभव आपल्याला लाभू शकेल.

• • • *अध्याय नववा संपूर्ण* • • •



अध्याय - दहावा

# विभूतीयोग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

***भूय एव महाबाहो श्रृणु परमं वच: ।***
***यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे अर्जुना
- **भूय: एव:** आणखीही
- **मे परमं वच:** माझे परम रहस्यमय आणि प्रभावयुक्त वचन
- **श्रृणु:** ऐक, श्रवण कर
- **यत् अहं:** जे वचन मी
- **प्रीयमाणाय ते:** (माझी वचने ऐकून) संतुष्ट होणाऱ्या अतिशय प्रेमी अशा तुला
- **हितकाम्यया वक्ष्यामि:** तुझ्या हिताच्या म्हणजे कल्याणाच्या दृष्टीने सांगत आहे

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे महाबाहो, आणखीही माझे परम रहस्यमय आणि प्रभावयुक्त म्हणणे ऐक. जे मी अतिशय प्रेमी अशा तुला तुझ्या हितासाठी सांगणार आहे.

**श्री भगवान म्हणाले**

***फिरुनि सांगतों ऐक वाक्य उत्तम मी तुज***
***राखसी श्रवणीं गोडी तुझें मी हित इच्छितों ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) हे अर्जुना, पुन्हा माझ्याकडून उत्तम वचने ऐक. 2) जी वचने संतुष्ट होणाऱ्या अशा तुला 3) तुझ्या हिताच्या दृष्टीने सांगत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **महाबाहो भूय: एव मे परमं वच:** श्रृणु: अर्जुनाला योगेश्वराने आणखी काही सुवचने सांगितली आहेत. दहावा अध्याय देखिल भक्तीप्रधान आहे. सात ते नऊ अध्यायातले विवेचन हे ईश्वर भक्तीच्या संदर्भातले आहे, तरी सुध्दा जे काही सांगायचे राहिले आहे ते या अध्यायात येते. या अध्यायातून भक्तीच्या नवीन उपायांचे वर्णन आले आहे. ईश्वर देहाच्या ठायी सत् चित् आनंद रुपात विद्यमान असल्यामुळे देहात मनाच्या स्थानी ईश्वराचा अनुभव घेता येऊ शकतो. ईश्वर मनातच तर प्रकट होईल. ईश्वर मनात प्रकट असला तरी सुध्दा तो दिसत नाही. मनात प्रकट असलेल्या ईश्वराचे दर्शन करुन घ्यावयाचे असेल तर भक्ती भाव किंवा प्रेम भाव निर्माण करावा लागेल. या अध्यायात ब्रह्मांडातील प्रमुख विभूतींचे वर्णन आले आहे. त्यांच्या स्मरणातून भक्तीभाव निर्माण करता येऊ शकेल.

2) **यत् अहं प्रीयमाणाय ते:** आपली वचने ऐकून अर्जुन संतुष्ट झालाय हे ईश्वराच्या ध्यानात आले आहे. ज्ञानी पुरुषांच्या वचनांच्या ठायी एवढे सामर्थ्य असते की वाट्टेल तेवढी व्याकुळता का असेना अंतत: ती नष्ट होऊन जाते. अर्जुनाच्या शोक आणि मोहाला दूर करण्यासाठी ईश्वराला अठरा अध्याय सांगावे लागलेत. योगेश्वराने सांगितले की त्याच्या उपदेशामुळे अर्जुन काहीसा संतुष्ट होत आहे असे त्यांच्या ध्यानी येत आहे.

3) **हितकाम्यया वक्ष्यामि:** योगेश्वराचे म्हणणे असे आहे की हे सारे त्यांनी अर्जुनाच्या हिताच्या कामनेने सांगितले आहे. अर्जुनाचा मोह अजून काही पुरतेपणी संपून गेलेला नाही हे ध्यानी घेऊन सुध्दा आपल्या निवेदनामुळे अर्जुनाला काहीसे संतुष्ट होत असताना बघून योगेश्वराने आपले म्हणणे वेगवेगळ्या शैलीत सांगायला

सुरुवात केली आहे. अर्जुनाला जो काही शोक आणि मोह झालेला होता त्यामुळे त्याचे अकल्याणच झाले. यामुळे कल्याणकारी सत्य सांगितले तर अर्जुनाचे अकल्याण होणे टळेल असे योगेश्वराचे मत आहे. त्यांच्या उपदेशाचा मुख्य हेतू हाच तर होता की अर्जुन संपूर्णपणे स्वस्थ बनावा. त्याने स्वधर्माचे पालन करावे. या दृष्टीने योगेश्वर या अध्यायात विवचन करताहेत.

: 2 :

*न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।*
*अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मे प्रभवं:** माझ्या प्रभावाला म्हणजे उत्पत्तीला म्हणजे विभूतीसहित लीलेने प्रकट होण्याला
- **सुरगणाः न विदुः** देवगण जाणत नाहीत
- **महर्षयः न:** आणि महर्षीजन देखिल जाणत नाहीत
- **हि अहं:** कारण की मी
- **देवानां च महर्षीणां:** देव आणि महान ऋषींचे
- **सर्वशः आदिः** सर्वांचे मूळ आहे म्हणजे सर्वांचे आदी कारण आहे

**अर्थ**

माझी उत्पत्ती अर्थात् लीलेने प्रकट होणे ना देव जाणत ना महर्षी जन जाणत, कारण की मी सर्व प्रकारे देवांचे व महर्षींचे आदी कारण आहे.

*न देव जाणती माझा प्रभाव न महर्षि हि*
*सर्वथा मी चि देवांचे महर्षींचें हि मूळ कीं ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) माझ्या प्रभावाला ब्रह्मदेव वगैरे मोठमोठे देव जाणत नाहीत. 2) महर्षीसुध्दा जाणत नाहीत. 3) कारण की मी देवता आणि महर्षींचे मूळ आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मे प्रभवं सुरगणाः न विदुः** ईश्वरी प्रभावाला ब्रह्मदेव वगैरे भलभले देवगण सुध्दा जाणत नाहीत. प्राचीन काळी स्वर्गात निवास करणाऱ्या देवगणांची कल्पना केली गेली होती. स्वर्ग, देवता यासारख्या कल्पना जरी आपण सोडून दिल्या तरी देव म्हणजे देवतुल्य मनुष्य असा अर्थ करता येईल. देवतुल्य म्हणजे अतिसात्विक, अतिशुध्द चित्ताचे धनी, निर्मळ प्रतिभासंपन्न पुरुष, उच्च कोटीचे पुरुष असा करता येईल. ते सुध्दा ईश्वरी प्रभावाला म्हणजे महिमेला जाणत नाहीत. ईश्वर इंद्रियांच्या पलिकडची वस्तु आहे. यामुळे तो आलेल्या अनुभवांच्या आधारे ओळखता येतो. अर्थात् अनुभवी पुरुष त्याचे वर्णन आणि महात्म्य वर्णन करुन सांगू शकत नाही. तुलसीदासजी म्हणतात :

*असि सब भाँति अलौकिक करनी ।*
*महिमा जासु जाइ नहिं बरनी ॥*

अर्थात् अशा प्रकारे ईश्वराचे सर्व प्रकारे अलौकिक कर्तृत्व आहे. त्याच्या महात्म्याचे वर्णन करुन सांगता येत नाही.

2) **महर्षयः न विदुः** ईश्वराच्या प्रभावाला महान ऋषी सुध्दा जाणून घेऊ शकत नाहीत. ईश्वराला एक तर भक्त जाणू शकतो वा ज्ञानी पुरुष. देवतुल्य मनुष्य म्हणजे भक्त हृदयी जन आणि ऋषी म्हणजे ज्ञानी जन. हे जाणून घेत असताना सुध्दा जगत एवढे अद्भुत, अतिव्यापक, आदि अंतरहित, अनंत असे आहे की ईश्वराच्या संपूर्ण प्रभावाला जाणून घेणे केवळ अशक्य आहे. शास्त्रज्ञांचे निवेदन आहे की आकाशात काही तारे इतक्या लांबवर आहेत की त्यांना धरती पर्यंत पोहोचायला तीस लाख वर्षे लागू शकतील. हे संपूर्ण जगतच अद्भुत असे आहे. ईश्वराच्या या अद्भुत महिमेला कुणीही जाणून घेऊ शकत नाही.

3) **हि अहं देवानां च महर्षीणां सर्वशः** आदिः ईश्वर देव आणि महर्षी जन या सर्वांचे सर्व प्रकारचे मूळ स्वरुप आहे. ईश्वर सर्व देव गण आणि महर्षी वृंद यांचे मूळ स्वरुप असल्यामुळे ते ईश्वरी प्रभावाला जाणून घेऊ शकत नाहीत. या सृष्टीतील सारेच जीव ईश्वराचाच भास आहेत. कार्य हे कारणाला कदापि जाणू शकत नाही कारण मात्र कार्याला जाणून घेऊ शकत असते. सारेच जीव चैतन्यमय आहेत पण त्यांचे ईश्वराहून वेगळे असे अस्तित्व नाही. यामुळे ते सारे ईश्वराचे भासरुपच आहेत. यामुळे हे सारे भास स्वरुपी चेतन्यमय जीव ईश्वराच्या समग्र प्रभाव शक्तीला जाणून घेऊ शकत नाहीत.

सृष्टीच्या ठायी कार्यकारण परंपरा दिसून येते. कार्याच्या ठायी नेहमीच इंद्रिय गोचरता असते. आकाश अत्यंत सूक्ष्म आहे पण जाणून घेता येऊ शकते यामुळे आकाश हे कार्य आहे. आकाश हे काही मूळ कारण नाही. आता प्रश्न असा निर्माण होतो की ईश्वर काय आणि आत्मतत्त्व काय हे दोन्हीही तर जाणून घेता येऊ शकतात मग त्यानाही आपण कार्य रुपी मानणार आहोत की काय ? याचे उत्तर असे की या दोन्ही तत्त्वांना जर आपण कार्यरुपी मानले तर मग यांचे काही एक कारण हे शोधावे लागणार आहे. आत्म तत्त्वाचे तर कुठलेच कारण सांगता येत नाही आणि ते तसे नाही. आत्म तत्त्व वा परमात्म तत्त्व हे सर्वांना जाणणारे आहे. ज्ञात्याला कोण बरे जाणून घेऊ शकेल ? आपण सारेच हा अनुभव घेत असतो की आपण सर्वांना जाणतो पण आपल्याला कोणी जाणत नाहीत. आपण जर आत्म्याला कारण मानले तर मग संपूर्ण जगताला निरात्मक म्हणजे कारण रहित मानावे लागेल पण जेव्हा आपण संपूर्ण बह्मांडरुपी कार्याला बघतो तेव्हा मग ते तर कार्य कारण रहित आहे असे म्हणता येत नाही ना! कारणाशिवाय कारण उत्पन्न होऊ शकत नाही हा तर अनुभवसिध्द भाग आहे. कारण ज्याप्रमाणे कारणात अंतर्भूत असेत त्याप्रमाणेच ईश्वररुपी कारण हे संपूर्ण बह्मांडरुपी अणु-अणुमध्ये व्याप्त आहे हे जाणून घ्यावे असे ईश्वराचे म्हणणे आहे.

: 3 :

***या मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्।***
***असंमूढः स  मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यः मांः** जो मला
- **अजं अनादिंः** जन्मरहित आणि अनादी म्हणजे कारण रहित (जे आदी रहित असून सर्वांचे कारण असेल तेच अनादी आहे.)
- **च लोकमहेश्वरम्ः** आणि सर्व लोकांचा ईश्वर, महेश्वर
- **वेत्तिः** तत्त्वतः जाणतो
- **सः मर्त्येषुः** तो माणसांमधील
- **असंमूढः** मोहरहित ज्ञानवान पुरुष
- **सर्वपापैः** आणि सर्व पापांपासून
- **प्रमुच्यतेः** मुक्त रहातो

**अर्थ**

जो मला वास्तविक जन्मरहित, अनादी आणि लोकांचा महान ईश्वर असे तत्त्वत : जाणतो, तो मनुष्यात ज्ञानी असणारा सर्व पापांपासून मुक्त होतो.

***ओळखे जो अजन्मा मी स्वयं-भू विश्व-चालक***
***निर्मोह तो मनुष्यांत सुटला पातकांतुनी।***

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) जे मला जन्म रहित आणि कारण रहित 2) आणि सर्व लोकांचा महेश्वर जाणतात 3) ते सर्व मर्त्यांमध्ये मोह रहित आणि 4) सर्व पापांपासून मुक्त रहातात.

**स्पष्टीकरण**

1) **यः मां अजं अनादिम्ः** जो ईश्वराला अनादी म्हणजे जन्मरहित आणि कारण रहित आणि सर्वांचा महेश्वर या रुपात जाणून घेतो तो तमाम मर्त्यजनांमध्ये मोह रहित आणि सर्व पाप कर्मांपासून मुक्त असा पुरुष जाणावा. ईश्वर केवळ जन्म रहित असाच नव्हे तर तो कारण रहितही आहे. कार्य इंद्रिय गोचर असल्यामुळे स्थूल आणि मर्यादित स्वरुपाचे असते पण तमाम पदार्थांचे मूळ असे जे ईश्वररुप आहे ते मात्र आदी रहित असायला हवेय. मूळ कारणाला जर आपण आदी म्हणजे उत्पन्न होणारा असा मानले तर मग त्याला अंतवान म्हणजे विनाशी मानावे लागेल. ईश्वर कारण रहित आहे. ईश्वराचे काही कारण आहे असे मानले तर तो कार्य स्वरुपी बनून जाईल. मूळ कारणाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे चार प्रकारे करता येते. एक, तो सर्वांचे कारण आहे. दोन, त्याचे कुठलेही कारण नाही. तीन, तो कुणाचे कार्य नाही. चार, सारी कार्ये त्याचीच आहेत.

2) **च लोकमहेश्वरम् वेत्तिः** ईश्वर सर्व लोकांचा नियंत्रक आहे. तमाम पदार्थ ईश्वरापासून उत्पन्न होतात. यामुळे तो सर्व पदार्थांचा नियंता आहे.

3) **सः मर्त्येषु असंमूढः** ईश्वर तमाम मर्त्य जनात म्हणजे मनुष्य मात्रात मोह रहित व विकार रहित स्वरुपाचा

आहे. ब्रह्मांडाच्या सकल पदार्थांप्रमाणेच माणूस सुध्दा मर्त्य म्हणजे विनाशी आहे. या तमाम सृष्टी जगताला आणि मानवी देहाला जर आपण मिथ्या वा विनाशी मानले तर मग कायमच वैराग्यभाव राहील. शंभर वर्षांनंतर काय होईल याचा सतत विचार करत रहावा. ज्ञानी पुरुषाच्या मनी सातत्याने वैराग्य भाव वसतीला असतो. यामुळे तो मोहात लुब्ध होत नाही.

4) **सर्वपापै: प्रमुच्यते:** ज्ञानी पुरुष तमाम स्वरुपाच्या पाप वा अनुचित कार्यांपासून मुक्त रहातो. सतत पुण्यकर्मे संपादन करण्याचाच ध्यास असेल आणि जीवनात याच गोष्टीचा अभ्यास असेल तर मग हातून कधीही अनुचित कर्मे होणार नाहीत. इथे 'पाप' या शब्दाचा अर्थ 'अनुचित कर्मे' असा घ्यावा. मनात जर अनुचित संकल्प असेल वा चित्तावर वश नसेल तर माणसाच्या हातून अनुचित कर्मे घडतात. चित्तावर वश नसेल तर मग चित्ताच्या ठायी सावधपण उरत नाही. ज्ञानी पुरुषाचे मुख्य लक्षण अखंड सावधानता आहे. तूकोबा म्हणतात की 'तुका म्हणे सावधान हेचि देवाचे भजन.' गांधीजी आपल्या प्रत्येक क्रियेच्या बाबतीत अखंड सावधान होते. त्यांच्या ठायी ही सावधानता अखंड अशा हरी स्मरणातून उद्भवली होती. आपल्या तमाम क्रिया ईश्वर बघत आहे अशी साक्षी भावना त्यांच्या ठायी विद्यमान होती. यामुळे त्यांची प्रत्येक क्रिया ही कमालीच्या सावधनतेने व्हायची. तुलसीदासजींनी उत्तरकांडातून मोहाविषयी लिहिले आहे :

***बिनु सतसंग न हरि कथा, तेहि बिनु मोह न भाग।***
***मोह गएँ बिनु रामपद, होइ न दृढ अनुराग॥***

अर्थात् सत्संगती शिवाय हरी कथा नाही आणि हरी कथेशिवाय मोह निवृत्ती नाही. मोह नष्ट झाल्याशिवाय ईश्वराप्रती दृढ अनुराग भाव निर्माण होत नाही.

: 4-5 :

***बुध्दिर्ज्ञानसंमोह: क्षमा सत्यं दम: शम:।***
***सुखं दु:खं भवोऽभावो भयं चाभयमेव च॥***
***अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयश:।***
***भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधा:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **बुध्दि:** बुध्दी म्हणजे निश्चय करण्याची शक्ती
- **ज्ञानम्:** आत्मा-परमात्मा विषयक ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान
- **असंमोह:** मोह रहित अवस्था म्हणजे मूढता रहित अवस्था
- **क्षमा:** क्षमा
- **सत्यं:** सत्य
- **दम:** इंद्रिय निग्रह
- **शम:** मनाची शांतता म्हणजे मनाचा निग्रह
- **सुखं:** सुख
- **दु:खं:** दु:ख
- **भव:** उत्पत्ती
- **अभाव:** नाश, प्रलय
- **भयं:** भीती
- **अभयं एव:** निर्भयता
- **अहिंसा:** कुणाला न दुखवणे
- **समता:** चित्ताची समता
- **तुष्टि:** संतोष
- **तप:** इंद्रिय संयमपूर्वक कष्ट सहन करणे म्हणजे स्व-धर्माच्या आचरणाने इंद्रिय वगैरेंना तापवून शुध्द करणे तप होय.
- **यश:** कीर्ती
- **अयश:** अपकीर्ती
- **भूतानां पृथग्विधा:** प्राण्यांचे नाना प्रकारचे भाव
- **मत्त: एव भवन्ति:** माझ्या पासूनच उत्पन्न होतात

**अर्थ**

निर्णय शक्ती, यथार्थ ज्ञान, असंमूढता, क्षमा, सत्य, इंद्रिय निग्रह, मनोनिग्रह, सुख-दु:ख, उत्पत्ती-प्रलय, भय-अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, कीर्ती-अपकीर्ती,असे हे प्राण्यांचे अनेक प्रकारचे भाव माझ्या पासूनच उत्पन्न होतात.

***बुध्दि निर्मोहता ज्ञान सत्यता शम निग्रह***
***जन्म नाश सुखें दु:खें लाभालाभ भयाभय।***
***तप दातृत्व संतोष अहिंसा समता क्षमा***
***माझ्या चि पासुनी भूतीं भाव हे वेगवेगळे।***

**विषय:** ईश्वरापासून उत्पन्न होणाऱ्या आणि प्रत्येकाच्या मनात उपजणाऱ्या विविध भावाचे चित्रण इथे आले आहे. चौथ्या श्लोकात एकूण तेरा आणि पाचव्या श्लोकात एकूण सात अशा एकूण वीस भावांचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **बुध्दि:** ईश्वराने सर्वप्रथम बुध्दीला उत्पन्न केले. शंकराचार्य आपल्या भाष्यात लिहितात: बुध्दि: अन्त:करणस्य सूक्ष्माद्यर्थावबोधनसामर्थ्यं तद्वन्तं बुध्दिवान् इति हि वदन्ति। अर्थात् बुध्दी म्हणजे अंत:करणाच्या सूक्ष्म वगैरे अर्थांना ग्रहण करण्याची शक्ती होय. ही शक्ती ज्याच्या ठायी असते त्याला बुध्दीमान म्हणावे.

माणसाला बाह्य विषयाचे ज्ञान होत असते. 'मी स्वत: आहे.' असेही ज्ञान होत असते. याच प्रकारे देह, मन, बुध्दी, इंद्रियांचेही ज्ञान होते. या ज्ञानाच्या शक्तीलाच बुध्दी म्हणतात. बुध्दी हा काही स्वतंत्र विषय नसून तो मनाचाच एक भाग आहे. सूक्ष्म अर्थ जाणून घेण्याची क्षमता काही सर्वांच्या ठायी नसते आणि सूक्ष्म अर्थ जाणून घेण्याची शक्ती काही सारे जण प्राप्तही करुन घेऊ शकत नसतात पण मनाच्या ठायी शुभ भावना विकसित करणे आणि अशुभ भावनांचा त्याग करणे, काम क्रोध वगैरे विकारांचा त्याग करणे हे मात्र प्रत्येक व्यक्तीला करता येणे शक्य आहे. बुध्दीमुळे ईश्वरी ज्ञान प्राप्त करुन घेणे सुध्दा शक्य आहे पण मुख्य विषय हा मनोविकारांवर विजय प्राप्त करुन घेणे हा आहे. मनोविकारांवर विजय प्राप्त करुन घेणारा साधक ईश्वरी ज्ञानाच्या अधिक नजिक पोहोचलेला असतो.

2) **ज्ञानं:** ज्ञानाची व्याख्या सांगताना शंकराचार्य म्हणतात: ज्ञानं आत्मादिपदार्थानां अवबोध:। अर्थात् --आत्म तत्त्व, माया तत्त्व, जीव वगैरे आवश्यक पदार्थांना साधनेच्या दृष्टीकोणातून जाणून घेणे किंवा ग्रहण करुन घेणे म्हणजे ज्ञान होय. ज्ञान ग्रहण करुन घेण्याची शक्ती बुध्दी होय. अन्य विषयांचे ज्ञान काही ज्ञान नव्हे. ज्ञानाचा अर्थ आहे निज स्वरुपाचे ज्ञान, ईश्वरी स्वरुपाचे ज्ञान, जीव आणि शिव यातील भेदाचे ज्ञान आणि मोक्ष स्वरुपाचे ज्ञान.

3) **असंमोह:** असंमोह या संज्ञेची व्याख्या करताना शंकराचार्य म्हणतात : प्रत्युपपन्नेषु बोध्दव्येषु विवेकपूर्विका प्रवृत्ति:। अर्थात् जाणून घेण्यासारखे अगणित विषय समोर असताना सुध्दा त्याना ग्रहण करण्यात विवेकपूर्वक प्रवृत्ती हवी. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ लक्षणांची चर्चा करताना 'क्रोधाद् भवति संमोह:' असे वर्णन येते. येथे संमोह म्हणजे मूढता होय. आचार्यांनी मात्र कार्याकार्यविषयक विवेक असा अर्थ केला. जोवर मोह असेल तोवर आपला निर्णय हा सत्याच्या निकट राहू शकत नाही. यामुळे प्रत्येक प्रसंगी आपणास जर सत्यनिर्णय हवा असेल तर आपल्या बुध्दीच्या ठायी कुठल्याही प्रकारचा मोह उत्पन्न होणार नाही याबाबत दक्ष रहावे लागेल.

4) **क्षमा:** शंकराचार्यांनी क्षमा शब्दाचा अर्थ सांगताना म्हटले आहे: क्षमा आक्रुष्टस्य ताडितस्य वा अविकृतचित्तता। अर्थात् कुणाची शिवी ऐकून वा ताडन झेलल्यावर सुध्दा मनात चित्तात विकार उत्पन्न न होणे म्हणजे क्षमा भाव होय. हे अर्थात्च सोपे नाही. ज्याचा देह भाव क्षीण झाला असेल, सृष्टीचे मिथ्यात्व ध्यानी असेल, संपूर्ण चराचराला ईश्वरी भावनेने बघायचा दृष्टिकोण विकसित झाला असेल त्याचेच चित्त हे क्षोभ रहित, क्रोध रहित आणि विकार रहित असू शकते. क्षोभ अजिबात नसणे म्हणजे क्षमा भाव होय. क्षोभ मनात आल्यावर त्याला मनातील विवेकाच्या आधारे हटवणे, क्षीण करणे हाच अक्रोध होय. मनात क्रोध उपजल्यावर सुध्दा त्याला प्रकट न करणे, दाबून टाकणे, क्षीण करणे, बाहेरुन त्याला खुराक न देणे, पोषण न लाभू देणे, बाहेर त्याचा स्फोट न होऊ देणे ही अक्रोधाची भूमिका आहे. ही अक्रोधाची भूमिका साधता आली तर मग क्षमा साधू शकते म्हणजे मनात विकार अजिबात उत्पन्न न होण्याची स्थिती जागू शकते. विकाररहित भूमिका साधता येऊ शकते.

5) **सत्यम्:** सत्याची व्याख्या सांगताना शंकराचार्य म्हणतात: सत्यं यथादृष्टस्य यथाश्रुतस्य चात्मानुभवस्य परबुध्दिसंक्रान्तये तथा एव उच्चार्यमाणा वाक् सत्यं उच्यते। अर्थात् आपण जसे बघितले, जसा अनुभव घेतला, जसे ऐकले, तसेच यथायोग्य प्रकारे दुसऱ्याला समजावून सांगण्यासाठी तशा प्रकारच्या भाषेचा वापर करणे होय. सामान्यत: असे बघितले जाते की कुणाची स्तुती, निंदा वा टिका करत असताना अतिशयोक्ती केली जाते. गुणवर्णन करताना अधिकचे काही सांगू नये वा यथातथ्य वर्णनच करावे असे काही ध्यानात राखले जात

नाही. कुणाचे दोष सांगता असताना असतील तेवढेच दोष सांगावे अधिकचे सांगू नयेत. हा अभ्यास बालपणापासून केला जाणे गरजेचे आहे.

6) **दम:** ज्ञानेंद्रियांचे, कर्मेंद्रियांचे दमन. शंकराचार्य म्हणतात: दम: बाह्येन्द्रियोपशम:। अर्थात् बाह्येंद्रियांचे दमन, बाह्य इंद्रियांना ताब्यात ठेवणे म्हणजे दम होय. कठोपनिषदात इंद्रियांना अश्वाची उपमा दिली गेली. देहाला रथ म्हटले गेले. त्या रथात इंद्रियरुपी अश्व जुंपले आहेत. आत्मा त्या रथाचा मालक असून तो मध्ये बसला आहे. रथ सारथ्याच्या हवाली केला गेला आहे. बुध्दी सारथी असून मन लगाम आहे. रथात सर्वात महत्वाचे स्थान घोड्यांचे आहे. घोड्यांना काबूत ठेवल्यावर रथ बरोबर चालतो. ज्ञानेंद्रिय विषयाचे ग्रहण करतात. विषयाच्या ग्रहणामुळे मनात त्यांच्या प्रती इच्छा जागते, वासना उपजून आसक्ती जागते. विषयांचे ग्रहणच झाले नाही तर मग इच्छा वा वासना उपजणारच नाही. समोर विषय उभा ठाकला की मग इच्छा जागी होते. स्थितप्रज्ञ विषयक श्लोकांमधून इंद्रियांच्या प्रबळतेचे उदाहरण येते. दुसऱ्या अध्यायातील साठाव्या श्लोकात इद्रियांना खूप बलवान असल्याचे सांगून एकसष्ठाव्या श्लोकात असे सांगितले गेले की इंद्रियांना काबूत ठेवायचे असेल तर एकीकडे त्यांना संयमात ठेवणे गरजेचे असून दुसरीकडे मनाला ईश्वर भक्तीकडे वळवावे लागेल.

7) **शम:** शम म्हणजे मनाची निर्विकारता. शंकराचार्य म्हणतात : शम: अन्त:करणस्य उपशम:। अर्थात् शम म्हणजे अंत:करणावर काबू मिळवणे होय. मनात राग-द्वेष निर्माण होऊ न देणे होय. बाह्य इंद्रियांवर काबू मिळवणे म्हणजे प्रत्येक इंद्रियाला संपूर्णपणे ताब्यात ठेवणे होय. अर्थात् मनावर काबू असेल तरच हा संयम साधता येऊ शकेल. यासाठी वैराग्याचा अभ्यास गरजेचा आहे. वैराग्यासोबत ईश्वर भक्तीचा अभ्यास झाला तर मग दोघांच्या सहाय्याने मनावर संपूर्ण काबू मिळवता येतो. सातव्या अध्यायातील पहिल्या श्लोकात वर्णन येते की ईश्वराच्या ठायी ज्याचे मन आसक्त झाले तसा तू बनून जा.

8) **सुखम् अनुकूल वेदनीयं सुखम्।** अर्थात् अनुकूल वेदनीय ते सुख ही सुखाची व्याख्या आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या दृष्टीने आपल्यासाठी अनुकूलता मिळवण्याचा प्रयत्न करते कारण की अनुकूलतेत सुख असते. सुखाच्या विरोधी वृत्ती आहे दु:ख. प्रतिकूल वेदनीय ते दु:ख. प्रतिकूलता कुणालाच नको कारण की प्रतिकूलतेत दु:खाचा अनुभव येतो. अनुकूलता आणि प्रतिकूलता हा तर निसर्गाचा स्वभावच आहे. सदा सर्वकाळ सारखेपणा काही असत नाही कारण की परिवर्तनशीलता हा निसर्गाचा स्वभाव आहे. निसर्गाचे स्वरुप आहे. अनुकूलता प्राप्त करुन घेणे काही दोष नाही पण प्रयत्न केल्यामुळे आपल्याला अनुकूलतेचा लाभ होईलच असे काही सांगता येत नाही. यामुळे अनुकूलतेच्या प्रयत्नांच्या सोबत प्रतिकूलतेचीही तयारी मनात ठेवायला हवी. अशी वृत्ती बाळगल्यामुळे सुख:दु:खात साम्यभावाचा अनुभव येऊ शकेल.

9) **दु:खम्:** जीवनात दु:खाचाच अनुभव अधिक येतो. तुकोबा म्हणतात 'सुख पहाता जवापाडे दु:ख पर्वताएवढे'. जीवनात प्रतिकूलताच अधिक दिसते. याचे कारण असे की अनुकूलतेच्या इच्छेला काही अंत नाही. विषयांच्या सोबत चालतानाचा हा आपला नेहमीचाच अनुभव आहे. यामुळे विषयांच्या पल्याड जे शाश्वत आहे त्याचा आश्रय घेतला जायला हवा.

10) **भव:** भव म्हणजे उद्भव किंवा जन्म होय. उत्पन्न न होणारा केवळ ईश्वरच आहे. प्रत्येक पदार्थाच्या सोबत सहा विकार असतात. यातला पहिला विकार आहे जन्म. वस्तु उत्पन्न झाल्याबरोबर जर नष्ट होणार असेल ना तर मग तिचे उत्पन्न होणेच निरर्थक ठरेल यामुळे जन्म घेतल्यानंतर वस्तु ही काही काळपर्यंत अस्तित्वात असायला हवी. वस्तु निर्माण झाली तर केव्हा ना केव्हा तरी ती नष्ट होणारच पण वस्तु एकदम नष्ट न होता हळूहळू नष्ट होते. काही काळ रहाते. नष्ट होईपर्यंत तिच्यात सारखे बदल होत रहातात. दुसरा विकार झाला अस्तित्वाचा आणि तिसरा विकार म्हणजे परिवर्तन होय. परिवर्तन दोन प्रकारचे असते. एक तर वस्तुत वृध्दी होते. आपले शरीर छोटे असते ते हळूहळू विकसित होते. वस्तुच्या ठायी होणारी ही वृध्दी चौथा विकार आहे. पाचवा विकार आहे क्षीण होणे. वृध्दावस्थेत शरीर क्षीण होत जाते. क्षीण होणे म्हणजे नष्ट होण्याच्या दिशेने सुरु झालेला प्रवास होय. देह क्षीण होत होत अंतत: नष्ट होऊन जातो.

11) **अभाव:** अभाव म्हणजे विनाश होय. हा सहावा विकार आहे. प्रत्येक पदार्थाचे आयुष्य भिन्न भिन्न स्वरुपाचे आहे. निमिष मात्रापासून तर थेट हजारो-लाखो वर्षांचे आयुर्मान असणारे जीव आणि पदार्थ या जगात आहेत. अर्थात् अखेरीस सर्वांनाच अंत हा आहेच.

12) **भयं:** भय नाना प्रकारचे असते. सर्प, व्याघ्र, सिंह वगैरे पशुंचे भय असते. माणसाच्या मनात चोरा चिलट्यांचे भय असते. कॅन्सर सारखा असाध्य आजार असतो त्यामुळे मनात मरणाचे भय असते. अशा प्रकारे मानवी मनात नाना प्रकारचे भय वसते पण अनैतिक कार्य करण्यास मात्र माणूस भीत नाही अर्थात् अनैतिक कार्य प्रकट होण्याचे भय असते. खरे तर अनैतिक कार्य करायचेच भय वाटायला हवे. तसे पाहिले तर भय अगदीच त्याज्य वस्तु आहे असे नाही म्हणता येत. ईश्वराचे भय तर कायमच बाळगायला हवे.

13) **अभयं एव:** अभय म्हणजे निर्भयता होय. देहासक्तीमुळे भय जागते. देहासक्ती जसजशी क्षीण होत जाईल तसतसे भय कमी होत जाते. निर्भयतेची भूमिका जागते. सोळाव्या अध्यायात दैवी पुरुषांचे गुण वर्णन करताना पहिला गुण निर्भयता मानला गेला. सत्याच्या सरावामुळे निर्भयता जागते. गांधीजींच्या ठायी पराकाष्ठेची निर्भयता होती. त्यांनी संपूर्ण देशाला निर्भयतेचा पाठ दिला. कारागराचे भय संपले होते. भगिनी वर्ग मोठ्या प्रमाणात कारावासात गेला होता. भयामुळे गुलामी जागते. निर्भय माणूस सदैव आपल्याला स्वतंत्र मानत असतो. अशी व्यक्ती सत्यनिष्ठ असते. असत्यासाठी भय उपजते. सत्याला कदापि कुठलेही भय भेडसावत नसते. निर्भयतेचा संबंध हा नीती-धर्माच्या पालनाशी संलग्न आहे. बालकांना धर्मनिष्ठ बनवायचे असेल तर त्यांच्या ठायी नीती आणि धर्म निष्ठेचा उदय व्हायला हवा.

: 5 :

14) **अहिंसा अहिंसा परमो धर्म:** अहिंसा परमो धर्म अहिंसा हा श्रेष्ठ धर्म आहे. अहिंसेशिवाय सत्याचे पालन करता येणे शक्य नाही. अहिंसेची व्यापक व्याख्या करु जाता त्यात चित्ताच्या समग्र निर्विकारितेचा समावेश होतो. केवळ राग न येणे म्हणजे काही अहिंसा नव्हे ! चित्ताच्या ठायी कामवासनेचा उद्भव होणे यामुळे देखिल अहिंसेचा भंग होतो. चित्ताचे उत्तेजित होणे ही तर हिंसाच होय. यासाठी चित्त सदैव क्षोभरहित असायला हवे. काम विकार उपजला म्हणजे चित्ताच्या ठायी क्षोभ जागणारच. चित्तात कामविकार असेपर्यंत कुठलेही कार्य सुयोग्य प्रकारे करता येऊ शकत नाही. कुठल्याही परिस्थितीत जर चित्ताच्या ठायी क्षोभ उपजला नाही तर अहिंसा साधली असे मानायला हरकत नाही. अशा अहिंसक व्यक्तीचा प्रभाव सभोवतालच्या वातावरणावर पडतोच पडतो. आपले खरे स्वरुप आहे शांती. आपण जर चित्ताला संपूर्णपणे शांत राखू शकलो तर मग आपण आपल्या स्वरुपाला स्थिर राखले असे म्हणता येईल. आपण मग नित्य स्वरुपाचा अनुभव घेत जगू शकतो. आत्मस्वरुपाचा बोध होणे हाच तर 'मोक्ष' होय.

15) **समता:** समता म्हणजे चित्ताची योगावस्था होय. ज्यावेळी चित्त संपूर्णपणे स्वस्थ आणि शांत असेल तेव्हाच ते सम वा योगयुक्त राहू शकते. चित्त जर निर्विकार असेल तर मग आपले शब्द आपोआपच मोजून-मापून असतात. निर्विकारतेमुळे शब्दांमध्ये संतुलन जागते. समतेत अहंकाराचा अभाव असल्यामुळे ईश्वरभाव वा ईश्वर शरणागतता जागते. समतेचा अर्थ केवळ चित्ताची तटस्थवृत्ती नाही. समतेचा अर्थ अलिप्तता तर आहेच पण त्यात ईश्वर समर्पणताही सामावलेली आहे. गीतेत या ईश्वर समर्पणरुपी समतेलाच स्थान आहे. समता काही जडता वा बेपर्वाईपणा नव्हे. उपेक्षा म्हणजे समता नव्हे. समतेच्या ठायी अति जागृती वसते.

16) **तुष्टि:** तुष्टी म्हणजे संतोष होय. शंकराचार्य म्हणतात : संतोष: पर्याप्तबुध्दि: लाभेषु। अर्थात् - जो काही लाभ होवो जे काही प्राप्त होवो ते पुरेसे वाटणे म्हणजे संतोष होय. आपण जे मिळवले आहे त्याबाबत जर मनात पुरेसेपण नसेल तर तो असंतोष होय. आपल्याला जे प्राप्त झाले आहे त्यापेक्षा अधिकचा हव्यास अनेकाना असतो. आपण कुठल्या वृत्तीचा अभ्यास करतो यावर सारे काही अवलंबून असते. यामुळे चित्ताच्या ठायी सतत शांतता लाभेल अशाच वृत्तींचा अभ्यास करायला हवा. धैर्य आणि संतोष हे दोन गुण साधता आले तर मग आपली आध्यात्मिक दृष्ट्या प्रगती झाली असे मानायला हवे.

17) **तप:** ईश्वराने या जगाला निर्माण केले तर आधी तपाचरण केले होते असे उपनिषद म्हणते : स तपोऽतप्यत।

स तपस्तप्त्वा इदं सर्वमसृजत। अर्थात्  त्याने तप केले. त्याने तप करुन हे सारे विश्व उत्पन्न केले. याचा अर्थ असा की कुठलीही गोष्ट तपाशिवाय उत्पन्न होत नाही. अनुभव ही या गोष्टीला दुजोरा देतो. कुठलीही गोष्ट तपाचरणाशिवाय निर्माण होऊ शकत नाही. आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीही कठोर तपाचरणाची गरज असते. आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी चित्तावर काबू मिळवणे आवश्यक असते. ही कठोर साधना होय. तप तीन प्रकारचे मानले गेले आहे. सात्विक, राजसी आणि तामसी.

18) **दानम्:** दानासाठी त्याग करावा लागतो. शंकराचार्य म्हणतात : दानं यथाशक्ति संविभाग: । अर्थात् आपल्यापाशी जे काही आहे ते आपल्या शक्तीनुसार गरजूंना देणे म्हणजे दान होय. दान तीन प्रकारचे आहे. सात्विक, राजसी आणि तामसी. विनोबांनी दानाचे विविध प्रकार सांगितले आहेत. शंकराचार्यांच्या उपरोक्त वचनाचा अर्थ विनोबांनी असा लावला की संपत्तीचे समान वाटप झाले पाहिजे. हा समाजवाद आहे. हा समाजवादी विचार आहे. केलेल्या कमाईवर सर्वांचा समान अधिकार असेल. एकाला अधिक आणि दुसऱ्याला कमी असे कसे चालेल बरे? शंकराचायांनी शब्द वापरला संविभाग. संविभाग म्हणजे समान रुपाने वाटप. धनवानाने संपत्तीचे मालक न बनता विश्वस्त बनावे. आपल्यासाठी संपत्तीचा विनियोग म्हणजे उपयोग त्यानेही संयमपूर्वक करायला हवा. शेष सारी संपत्ती समाजाची आहे असे मानायला हवे.

19) **यश:** शंकराचार्य म्हणतात: धर्मनिमित्ता कीर्ति:। अर्थात् धर्माच्या अनुष्ठानामुळे, धर्माच्या आचरणामुळे लाभणारी कीर्ती म्हणजे यश होय. आपण जर धर्माचे पालन उच्च दर्जाने केले तर मग समाज आपली प्रशंसा करतो. जनतेला भल्या-बुऱ्याची पारख चांगल्या प्रकारे असते. स्वत:च्या आचरणात एकवेळ सत्याचे पालन नसेल पण जिथे कुठे म्हणून सूक्ष्मातील सूक्ष्म असे जरी सत्याचरण दिसेल तिथे समाज माथा झुकवतो. अशा लोकांची प्रशंसा करतो. अशा प्रकारे धर्माच्या पालनामुळे कीर्ती लाभ होतो. हीच कीर्ती ग्रहण करण्यायोग्य असते. अर्थात् कीर्ती लाभावी यासाठी काही कुणी धर्माचरण करु नये. दुसऱ्या अध्यायातील एकतीस ते सदतीस श्लोकांमधून आलेल्या स्वधर्म प्रकरणात अर्जुनाला हेच सांगितले गेले की अन्यायाचा प्रतिकार करणे हेच स्वधर्मरुप कर्तव्य होय. हा धर्म सोडला तर कीर्ती नष्ट होऊन जाईल.

20) **अयश:** शंकराचार्य म्हणतात: अधर्मनिमित्ता अकीर्ति:। अर्थात् अधर्माचरणामुळे होणारी अपकीर्ती अयश होय. धन कमवणारे जर अप्रमाणिक असतील, कृपण असतील, भेसळ करणारे असतील, व्यसनाधीन असतील, धर्म आणि नीतीचे पालन  न करणारे असतील अशा जनांना टिकेला आणि जननिंदेला सामोरे जावे लागेल. अशा अपकीर्तीपेक्षा मरण चांगले. अशा अपयशापेक्षा मृत्यु भला.

21) **भूतानां पृथग्विधा:** भावा: मत्त: एव भवन्ति प्राणीमात्राच्या ठायी वसणारे नाना प्रकारचे भाव वा वृत्ती: प्राणीमात्राच्या ठायी वसणारे नाना प्रकारचे भाव वा वृत्ती ईश्वरामुळेच उत्पन्न झालेले आहेत. बुध्दी, ज्ञान, असंमोह हे भाव उठतील तर मनातही हे ईश्वरामुळे उत्पन्न होतात. चुंबकामुळे जसे लोखंडात चुंबकपण उपजते तसे ईश्वरामुळे हे भाव उपजतात. गोष्टी उपजतात आणि नष्ट होतात. इथे हा प्रश्न उपजतो की वस्तुचे निर्माण होणे आणि नष्ट होणे हा तर काही मनात उपजणारा भाव नाही. याचे उत्तर असे की मनातही विविध प्रकारच्या वृत्तींची उत्पत्ती आणि विनाश होतच असतो. मनात विविध प्रकारच्या वृत्ती उपजतात आणि नष्ट होतात.

: 6 :

***महर्षय: सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा।***
***मद्भावा मानसा जाता येषां लोक इमा: प्रजा:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पूर्वे सप्त महर्षय:** प्राचीन सात महर्षी
- **तथा चत्वार: मनव:** तसेच चार मनु
- **मद्भावा: मानसा: जाता:** माझ्या ठिकाणी भाव असलेले सारे माझ्या संकल्पाने उत्पन्न झालेले आहेत.
- **येषां लोके इमा: प्रजा:** त्यांची या लोकात प्रजा आहे.

**अर्थ**

सात महर्षी, त्यांच्याही पूर्वी असणारे चार सनकादिक तसेच स्वायंभुव वगैरे चौदा मनू हे माझ्या ठिकाणी भाव असलेले सारेच माझ्या संकल्पाने उत्पन्न झाले आहेत.या जगातील सर्व प्रजा त्यांचीच आहे.

***महर्षि सात पूर्वीचे चौघे मनु तसे चि ते***
***माझे संकल्पिले भाव ज्यांची लोकांत ही प्रजा।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या आहेत 1) आधी उत्पन्न झालेले सात महर्षी 2) आणि चार मनू 3) माझ्या मानसिक संकल्पाने उत्पन्न झालेले 4) ज्यांची या लोकात प्रजा आहे.

**स्पष्टीकरण**

1) **महर्षय:** सप्त पूर्वे मरीची, अंगिरा, पुलह, अत्रि, पुलस्त्य, क्रतु आणि वसिष्ठ या सात महर्षींपासून संपूर्ण प्रजा निर्माण झाली. मागील दोन श्लोकातून चर्चा आलीय की मनाच्या ठायी उपजणारे भाव हे ईश्वरामुळेच उत्पन्न होतात. आता संपूर्ण सृष्टीच्या प्रजेच्या निर्मितीचे रहस्य मांडले जाते. संध्या करताना बालपणी बाळकोबा म्हणत असत की कौशिक गोत्रोत्पन्नोऽहम्. म्हणजे मी कौशिक गोत्रात उत्पन्न झालेलो आहे. प्राचीन काळी गुरुगृही अध्ययनार्थ बालक बारा वर्षेपर्यंत ब्रह्मचर्यपूर्वक रहात असत. बारा वर्षांच्या पवित्र संस्कारानंतर मग गृहस्थाश्रमाचा स्वीकार करत असत. तो गृहस्थाश्रम अतिशय संयमी होता. अशा संयमी गृहस्थाश्रमातील प्रजा संस्कार संपन्न असावयाची. अशा प्रकारे सृष्टीचा आरंभ पवित्र आणि ज्ञानी अशा महर्षींपासून झाला असे गीतेचे म्हणणे आहे.

2) **तथा चत्वार: मनव:** अशा प्रकारे सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार असे चार मनू झालेत. हे सारे महर्षींप्रमाणेच पवित्र होते. वेदोक्त धर्म हा जसा प्रवृत्तीपर आहे तसाच तो निवृत्तीपरही आहे. सात महर्षी हे प्रवृत्ती धर्माचे आचार्य असून चार मनू हे निवृत्ती धर्माचे आचार्य होत. या बाबतीत शंकराचार्य म्हणतात: स भगवान् सृष्ट्वा इदं जगत् तस्य च स्थितिं चिकीर्षु: मरीच्यादीन् अग्रे सृष्ट्वा प्रजापतीन् प्रवृत्तिलक्षणं धर्मम् ग्राहयामास वेदोक्तम्। तत: अन्यान् च सनक-सनन्दनादीन् उत्पाद्य निवृत्तिलक्षणं धर्मम् ज्ञानवैराग्यलक्षणं ग्राहयामास। द्विविधो हि वेदोक्तो धर्म: प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षण: च। जगत: स्थितिकारणम्।

अर्थात् ईश्वराने या जगाची निर्मिती केली मग हे उत्तम प्रकारे रहावे यासाठी अगदी आरंभीच मरीची वगैरे प्रजापतींना जन्माला घातले. त्यांच्या मार्फत वेदोक्त प्रवृत्तीरुप धर्माचे ग्रहण करवले मग त्यांच्याहून भिन्न अशा चार मुनींना उत्पन्न करुन ज्ञान-वैराग्यरुपी निवृत्तीरुप धर्माचे ग्रहण त्यांच्या मार्फत करवले. अशा प्रकारे प्रवृत्तीरुप आणि निवृत्तीरुप दोन धर्मांच्या पालनानेच जगताची स्थिती म्हणजे स्थिरता राहू शकते.

माणसाच्या दोन वृत्ती असतात. एक असते प्रवृत्ती म्हणजे काम करत रहाण्याची वृत्ती आणि दुसरी कर्मापासून निवृत्त होण्याची वृत्ती. अशा प्रकारे कर्मसंपन्न आणि ज्ञानवैराग्य संपन्न जेवढे लोक जन्माला येतील तेवढीच जगाची स्थिती चांगली राहील. यामुळे ईश्वराने सात महर्षी हे प्रवृत्तीपरायण आणि चार मनू हे निवृत्तीपरायण बनवले.

3) **तिसरी गोष्ट ही आहे: मद्भावा:** मानसा: जाता: हे सारे ईश्वराच्या प्रेरणेमुळे जन्माला आले. ईश्वराने सृष्टी उत्पन्न करण्याचा संकल्प केला. या बाबतीत उपनिषदाचे म्हणणे असे आहे: स: अकामयत् बहुस्याम् प्रजायेय इति। अर्थात् ईश्वराने विचार केला की मी आता सृष्टीच्या विविध पदार्थांच्या रुपात बहुरुपी बनावे. तत् तेज: असृजत । मग त्याने अग्नीचे निर्माण केले. अशा प्रकारे आधी ईश्वराच्या मनी सृष्टी निर्माण करायचा संकल्प जागला. प्रेरणा जागली मग जडसृष्टीरुपी पंचमहाभूतांची निर्मिती झाली. त्यानंतर चेतन जगत म्हणजे जीव जगत उपजले. या जीव जगतात माणसाची उत्पत्ती कशी झाली हे सांगताना गीता म्हणते की हे सारे संकल्पमात्रेण उत्पन्न झाले.

4) **येषां लोके इमा: प्रजा:** गीतेने असे सांगितले आहे की या सात महर्षी आणि चार मनुंपासूनच सारी सृष्टी जन्माला आली आहे. ईश्वराच्या ठायी प्रचंड आणि अलौकिक अशी शक्ती आहे. त्या शक्तीमुळे हे जगत निर्माण करायची प्रेरणा लाभते. सात महर्षी आणि चार मनू हे मूळ पुरुष होत. यांनीच हे सारे निर्मिले असे ईश्वराचे म्हणणे आहे. आता या जगताच्या निर्मितीपूर्वी तर एक परमात्माच होता मग त्या एकापासून एवढे सारे कसे काय निर्माण झाले? हा प्रश्न तर उरतोच. चौदाव्या अध्यायातील तिसऱ्या आणि चौथ्या श्लोकात या प्रश्नाचे

उत्तर मिळते. ईश्वर एकटा आहे याचा अर्थ असा की तो शक्ती संपन्न आहे. त्याच्या ठायी ज्ञान शक्ती आणि क्रिया शक्ती म्हणजे माया शक्ती विद्यमान आहे. एकट्या ज्ञान शक्तीच्या बळावर या जगताची निर्मिती नाही करता येत आणि केवळ माया वा क्रिया शक्तीच्या बळावर देखिल या जगताची निर्मिती नाही करता येत. ज्ञान आणि क्रिया वा माया शक्ती या दोघांच्या सम्मीलनातूनच या जगताची निर्मिती होऊ शकते.

: 7 :

*एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वत: ।*
*सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशय: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: मम एतां विभूतिं:** जो पुरुष माझ्या या परमेश्वर्यरुप विभूतीला
- **च योगं:** आणि माझ्या योग शक्तीला
- **तत्त्वत: वेत्ति:** चांगल्या प्रकारे जाणतो म्हणजे तत्वत: जाणतो जे काही हे दृश्यमात्र जगत आहे ते सर्व ईश्वराची माया आहे आणि एक वासुदेव भगवानच सर्वत्र परिपूर्ण भरलेला आहे हे जाणणे हेच 'तत्त्वत:' जाणणे होय
- **स अविकम्पेन योगेन:** जो पुरुष निश्चळ ध्यानयोगाद्वारे
- **युज्यते:** ऐक्य साधनेने स्थित होतो म्हणजे संपन्न होतो
- **अत्र संशय: न:** यात काही संशय नाही

**अर्थ**

जो पुरुष माझ्या या परमेश्वर्यरुप विभूतीला आणि योग शक्तीला तत्त्वत: जाणतो, तो स्थिर भक्ती योगाने युक्त होतो यात मुळीच संशय नाही.

*हा योग-विस्तार माझा जो नीट ओळखे*
*त्यास निष्कंप तो योग लाभे ह्यांत न संशय ।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) जो माझ्या या विभूतीला 2) आणि माझ्या योगाने सम्यक् रुपाला जाणतो 3) तो निश्चितपणे योगाने संपन्न होतो. 4) यात संशय नाही.

**स्पष्टीकरण**

1) **य: मम एतां विभूतिं तत्त्वत: वेत्ति:** ईश्वराच्या या विभूतीला म्हणजे ब्रह्मांडातील प्रमुख पदार्थांना सम्यक्पणे जाणता आले पाहिजे. ईश्वराच्या प्रमुख विभूतींचे वर्णन यापूर्वी आलेले आहे आणि यानंतरही येणार आहे. हे वर्णन ईश्वराच्या भक्तीसाठी येते. ईश्वराची भक्ती का करायला हवी? एक ईश्वरच सत्य असून ब्रह्मांडातील शेष सारे पदार्थ सत्य नाहीत यासाठी ही भक्ती करायला हवी. ही सृष्टी मिथ्या आहे. मिथ्यत्वाचा अनुभव घेण्यासाठी खऱ्या वस्तुचे दर्शन व्हायला हवे पण मूळ कारण असा जो ईश्वर आहे तो इंद्रियगोचर नसल्यामुळे ज्या पदार्थांच्या ठायी तो विशेषत्वाने प्रकट आहे त्या विभूतींचे या अध्यायात वर्णन आले आहे. या विभूतींनाच ईश्वररुप मानून जर भक्ती करता आली तर मग ईश्वराचे दर्शन होणे शक्य आहे.

2) **च योगं तत्त्वत:** वेत्ति ईश्वराच्या योगाला म्हणजे अलौकिक सामर्थ्याला सम्यक् रु पाने जाणून घेता यायला हवे. ईश्वराचे सामर्थ्य दोन वस्तुंच्या माध्यमातून जाणवते एक म्हणजे ईश्वर अखंड ज्ञान स्वरुपी आहे आणि दुसरे म्हणजे ईश्वराच्या ठायी ब्रह्मांडाचा भास करवून देण्याची अलौकिक अशी शक्ती आहे. ईश्वर सदैव ज्ञान आणि क्रिया किंवा माया किंवा सर्जन शक्तीने युक्त आहे. यामुळे त्याच्या ठायी जड सृष्टी सोबतच चैतन्यमय जगताचाही भास होऊ शकतो. दोघांचा भास करवून देण्याची शक्ती हा झाला एक भाग आणि दुसरा भाग असा की ब्रह्मांडाचा भास करवून देणारा ईश्वर स्वत: मात्र त्या भासाच्या जाळात फसत नाही. ईश्वर ज्या प्रमाणे या जगताची निर्मिती करतो तसे आपणही आपापल्या परीने काही ना काही तरी निर्माण करतोच करतो. आपण विवाह करतो आणि संततीला जन्माला घालतो पण आपण त्यात फसून जातो आणि त्यातून बाहेर पडू शकत नाही. आपण ज्या जगाची निर्मिती करतो ते अतिशय छोटे असते. ईश्वराचे जग मात्र खूप अफाट आहे. एवढ्या प्रचंड जगताला निर्माण करुन देखिल ईश्वर त्यात फसत नाही आणि आपण मात्र छोट्याशा जगात फसून जातो. दोन शक्तींनी युक्त असूनही या शक्तींच्या जाळात न फसणे ही खरोखरच

ईश्वरासाठी फार मोठी गोष्ट आहे. या दोन वैशिष्ट्यांनाच इथे 'योग' ही संज्ञा दिली गेली आहे.

3) **सः अविकम्पेन योगेन युज्यते:** ईश्वर निश्च्छळ योगाने म्हणजे यथार्थ दर्शनरुप योगाने संपन्न असा आहे. जो ईश्वराच्या या दोन विशेषणांना जाणतो तो यथार्थ दर्शन रुप योगाला प्राप्त होतो. यथार्थ ज्ञानामुळेच दु:खाची आत्यंतिक निवृत्ती होणे शक्य असते. ज्या पदार्थांमध्ये ईश्वराचे स्वरुप विशेषत्वाने प्रकटले आहे त्या विभूतींची भक्ती करावी यामुळे त्याच्या यथार्थ स्वरुपाचे दर्शन होऊ शकते असे आधी सांगितले गेले आहे आणि मग सांगितले गेले की दोन शक्तींनी संपन्न असूनही ईश्वर कसा अलिप्त आहे हे जाणून घेता आले पाहिजे. ईश्वरी स्वरुपाचे ज्ञान प्राप्त करुन घेऊन आपण शून्य बनू शकतो वा अकर्त्याचे जीवन जगू शकतो. या स्थितीला ईश्वराची ओळख होणे सांगता येईल. अशा प्रकारे ईश्वराची ओळख झाली तर मग साधक कायमच या परिचयाने संपन्न असतो. एकदा का आपण ईश्वरी स्वरुपाची ओळख करुन घेतली ना तर मग ती कायम स्वरुपी रहाते. आपल्याला सतत कर्तेपणाचे भान असते यामुळेच तर आपण ईश्वराच्या स्वरुपाला ओळखू शकत नाहीत. एकदा का कर्तेपणाचे भान हरपले तर मग आपल्याला ईश्वराच्या स्वरुपाची ओळख होते आणि ती चिरकाल टिकणारी असते.

4) **अत्र संशयः नः** ईश्वराचे हे जे निवेदन आहे याबाबत कुठलाही संशय घेऊ नये कारण हे अनुभवी पुरुषांनी अनुभवलेले सत्य आहे. ईश्वराच्या या निवेदनाला अनुभवाचा आधार आहे. अनुभवाच्या आधारे प्रतिपादित केलेले सत्य हे यथार्थ असते. अनुभवाच्या आधारे लावलेले अनुमान हे प्रत्यक्ष ज्ञानाने अनुगृहीत स्वरुपाचे असते. अनुभव हा प्रत्यक्ष प्रमाणजन्य असतो. ऋषी-मुनी जनांनी ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि आपल्या जीवनात अलिप्तता जोपासली. अनुभवाच्या आधारे ईश्वर हे ज्ञान निरुपित करत असल्यामुळे हे यथार्थ ज्ञान होय. या बाबतीत संदेहाला जागा नाही. या संबंधी मनात शंका न धरता संपूर्ण श्रध्देने या परम ज्ञानाचा स्वीकार करावा.

: 8 :

***अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते।***
***इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं सर्वस्य प्रभवः** मी वासुदेवच सर्व जगताच्या उत्पत्तीचे कारण आहे म्हणजे मूळ कारण आहे
- **मत्तः सर्वं प्रवर्तते:** माझ्यामुळेच सर्व जगत कर्म करीत आहे
- **इति मत्वा:** असे तत्त्वत: जाणून
- **भावसमन्विता:** श्रध्दा आणि भक्तीने युक्त होऊन
- **बुधा:** ज्ञानवंत म्हणजे बुध्दीमान भक्त जन
- **मां भजन्ते:** मज परमेश्वरालाच निरंतर भजतात

**अर्थ**

मी वासुदेवच सर्व जगताच्या उत्पत्तीचे कारण आहे आणि माझ्यामुळेच सर्व जग क्रियाशील होत आहे, असे जाणून श्रध्दा आणि भक्तीने युक्त असलेले बुध्दीमान भक्त मज परमेश्वरालाच सतत भजतात.

***सर्वांचें मूळ माझ्यांत प्रेरणा मजपासुनी***
***हें ओळखूनि भक्तीनें जाणते भजती मज।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) मी सर्वांचे मूळ कारण आहे. 2) माझ्यामुळे सर्व जग क्रियाशील आहे. 3) असे समजून, जाणून 4) भक्तीने संपन्न होऊन ज्ञानी जन माझी भक्ती करतात.

**स्पष्टीकरण**

1) **अहं सर्वस्य प्रभवः** ईश्वर सर्व जगताचे मूळ कारण आहे. खरे तर हा मुद्दा गीतेने ठायी-ठायी प्रतिपादित केलेला आहे. या जगाचे जर मूळ कारण काही नसेल तर मग हे जग निराधार ठरेल पण तसे नाही कारण की कारणाशिवाय काही कार्य घडत नसते. दुधाशिवाय दही कसे बरे बनेल ? यामुळे हे जे अलौकिक स्वरुपाचे अफाट जगत आहे त्याचे वर्णन शब्दात करता येणे शक्य नाही त्याचे काही तरी कारण हे असलेच पाहिजे. हे संपूर्ण जग अद्भुत आहे त्यामुळे या जगाचे कारणही अद्भुत असायला हवे. माती शिवाय घट कसा बनेल ? कापसाशिवाय सूत

कसे बनेल? तिळाशिवाय तेल कसे बनेल? अशा प्रकारे सर्वत्रच कारणाशिवाय कार्य निष्पन्न न होण्याचा अनुभव येतो तसेच या जगताचे काही कारण नसेल हे शक्य नाही. जगताचे काही कारण असो वा नसो पण जगत हे ज्ञान संपन्न आणि शक्ती संपन्न आहे हे मात्र आपण या पूर्वीचे पाहिले आहे.

2) **मत्तः सर्वं प्रवर्तते:** ईश्वरापासून साऱ्या जगाची प्रवृत्ती आहे. ईश्वरच सर्व जगाचे मूळ कारण असल्यामुळे साऱ्या जगाची उत्पत्ती ही ईश्वरापासूनच होते हे वेगळे सांगायला नको. एक मुद्दा असाही ध्यानात घ्यायला हवा की ईश्वर केवळ कारणच नव्हे तर तो जगताचे उपादान आणि निमित्त कारणही आहे. कुठलीही वस्तु दोन कारणांनी बनते. केवळ मातीपासून घट बनत नाही त्यासाठी कुंभकारही हवा. केवळ कुंभकारामुळे घट बनत नाही त्यासाठी मातीही हवी. अशा प्रकारे माती झाली उपादान कारण आणि कुंभकार झाला निमित्त कारण. अर्थात् हा नियम काही ईश्वराला लागू होत नाही. परमात्मा वा ब्रह्मतत्त्वाला लागू होत नाही. हे सांगण्यासाठी ईश्वराने इथे सांगितले आहे की तोच साऱ्या जगताचे मूळ कारण आहे आणि ईश्वरापासूनच सारे जगत बनले आहे. जगातील तमाम पदार्थ बनले आहेत. इथे हा प्रश्न निर्माण होतो की जर ईश्वरापासूनच सारे जगत निर्माण होत असेल तर मग त्याच्या ठायी काही उरते की नाही ? याचे उत्तर असे की गुणविकासाच्या नियमानुसार आधी आकाशाची निर्मिती झाली कारण की आकाशाचा एक गुण आहे शब्द. तर आकाशापासून वायु निर्माण झाला. वायुच्या ठायी शब्द आणि स्पर्श हे दोन गुण आहेत. वायुपासून अग्नी उपजला. अग्नीच्या ठायी तीन गुण आहेत शब्द, स्पर्श आणि रुप. अग्नीपासून जळ उपजले. जळाच्या ठायी शब्द, रुप, स्पर्श आणि रस हे चार गुण आहेत. जळापासून पृथ्वी उपजली तिच्या ठायी शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध असे पाच गुण आहेत. या पंचमहाभूतांपासून जगातील तमाम पदार्थांची निर्मिती झाली.

3) **इति मत्वा:** ईश्वरच या जगाचे उपादान आणि निमित्त कारण आहे असे ओळखून चालावे. जगाच्या मूळ कारणाच्या संदर्भात आचार्यांमध्ये मतभेद आहेत. सांख्यांच्या मते जगाचे मूळ कारण जड प्रकृती आहे. आत्मतत्व हे चैतन्यरुपी आहे. त्यांच्या मते ज्ञान स्वरुपी आत्मा अनंत आहेत. वैशेषिक म्हणजे कणाद मुनी जगाचे मूळ कारण जड परमाणूला मानतात. परमाणु देखिल अगणित आहेत. त्यांच्या मते आत्मतत्त्व हे जड अचेतन आहे. जड मनाशी त्याचा संयोग झाल्यावर त्याच्या ठायी चैतन्य गुणाचा आविर्भाव होतो. जैन तत्त्वज्ञान या जगताला अनादी, अनंत मानते. जीव आणि अजीवाच्या संयोगातून जगताचे अस्तित्व आहे अशी त्यांची मान्यता आहे. सृष्टी ही षट्द्रव्यमयी आहे. ही षट्द्रव्ये जीव, धर्म, अधर्म, आकाश, काळ आणि पुद्गल अशी आहेत. धर्म हे द्रव्य थांबण्यात मदतरुप असून अधर्म हे द्रव्य चालण्यास मदत करते. तमाम जड पदार्थांना पुद्गल असे म्हणतात. एवढ्या विविध मतांचा गलबला असल्यामुळे विचारपूर्वकच मूळ कारणाच्या संदर्भात निर्णय घ्यायला हवा. वेदान्त म्हणजे गीतेचे निवेदन असे की जगाचे मूळ कारण ईश्वर आहे आणि ईश्वर प्रत्येकाच्या देहात आत्मतत्त्वाच्या रुपाने प्रकट असतो.

4) **भावसमन्विता: बुधा:** मां भजन्ते भक्तीभावना संपन्न ज्ञानीजन श्री हरीची पूजा करतात, भक्ती करतात. जगाचे मूळ कारण ईश्वर असून ईश्वर सर्व भूतमात्रांच्या ठायी आत्म तत्त्वाच्या रुपाने नांदतो हे कळल्यावर अहंकार गळून पडतो. अज्ञानावस्था असेपर्यंत असे ध्यानात येते की मी कर्ता आहे, भोक्ता आहे आणि मुख्य म्हणजे मी ईश्वराहून भिन्न आहे पण खरी ओळख झाल्यावर हे लक्षात येते की आपण ईश्वरापासून स्वत:ला अज्ञानामुळे स्वतंत्र मानतो तर मग या अज्ञानाला मिटवण्याचे प्रयत्न सुरु होतात. यासाठी ईश्वर भक्ती हाच एकमेव उपाय आहे. मनातली अहंकेंद्रित प्रेमशक्ती जेव्हा ईश्वराशी संलग्न होईल तेव्हाच अहंकार दूर होईल. स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा लोप होईल. आपल्या संपूर्ण प्रेमशक्तीला ईश्वराच्या ठायी केंद्रित करणे हीच तर भक्ती होय. असे भक्ती संपन्न ज्ञानी जन ईश्वराची भक्ती करतात. यात हे सांगितले गेले की साधकावस्थेत जी ईश्वर भक्ती अज्ञान घालवण्यासाठी केली जात होती ती सिध्दावस्था प्राप्त झाल्यावर सुध्दा कायम राहील. हाच मुद्दा गीतेच्या अठराव्या अध्यायातील पंचावन्नाव्या श्लोकात आला. ज्ञान प्राप्ती झाल्यावर सुध्दा भक्ती तत्त्व कायम रहाते आणि त्यामुळेच ईश्वराचे संपूर्ण दर्शन होऊन अहंकार नि:शेष होऊन जातो.

: 9 :

*मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।*
*कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मच्चित्ताः** माझ्या ठायीच ज्यांनी निरंतर आपले चित्त मन समर्पित केले आहेत असे
- **मद्गतप्राणाः** माझ्या ठायीच ज्यांनी आपले संपूर्ण प्राण समर्पित केले आहेत म्हणजे मज वासुदेवाकरिताच ज्यांनी आपले जीवित अर्पण केले आहे त्यांचे नाव मद्गतप्राणाः असे आहे.
- **परस्परं बोधयन्तः** हे माझे भक्त परस्परांना माझ्याच प्रभावाचा बोध करीत असतात
- **च मां नित्यं कथयन्तः** आणि नित्य माझेच कीर्तन करतात
- **च तुष्यन्ति च रमन्तिः** संतुष्ट असतात, रममाण असतात

**अर्थ**

निरंतर माझ्यात मन लावणारे आणि माझ्यातच प्राणांना अर्पण करणारे, माझे भक्त जन माझ्या भक्तीच्या चर्चेने परस्परात माझ्या प्रभावाचा बोध करीत तसेच गुण आणि प्रभावासह माझे कीर्तन करीत संतुष्ट होतात आणि मज वासुदेवातच नेहमी रममाण होत असतात.

*चित्तें प्राणें जसे मी चि एकमेकांस बोधिती*
*भरुनि कीर्तनें माझ्या ते आनंदांत खेळती ।*

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) माझ्या ठायीच ज्यांनी आपले चित्त अर्पण करुन दिले आहे. 2) माझ्याच ठायी ज्यानी सर्व इंद्रियांचे समर्पण केले आहे. 3) असे माझे भक्त परस्परात माझ्या प्रभावाचा बोध करीत 4) आणि माझे नित्य गुणसंकीर्तन करत असतात 5) अशा प्रकारे संतुष्ट आणि रममाण असतात.

**स्पष्टीकरण**

1) **मच्चिताः** ईश्वराच्या ठायी चित्त एकाग्र करायचा उपदेश गीतेने ठायी-ठायी केला आहे. ज्या भक्ताने ईश्वराच्या ठायीच आपले चित्त आणि मन एकाग्र केले आहे तो श्रेष्ठ होय. आधी चित्ताचा विचार केला गेला. आपला रात्रंदिवस मनाशी संबंध येतो. मनात बाह्य सृष्टी ही रुप आणि आकार या रुपात प्रकट होत असते. ही मानसिक सृष्टीच सुख-दुःख निर्माण करते. चित्तात अहं म्हणजे मी उत्पन्न होतो, तो केंद्रस्थानी असतो आणि आपल्याला नाचवत असतो. सूरदासांचे एक भजन आहे:

*अब मैं नाच्यौ बहुत गोपाल ।*
*काम क्रोध को पहिरी चोलना कंठ विषय की माल ॥*

अर्थात् हे देवा रे! मी खूप नाचलो. काम आणि क्रोधाचा चोळणा मी परिधान केला आणि माझ्या कंठात तर विषयाचीच माळ आहे. अशा प्रकारे आपला नाच अखंडपणे सुरुच असतो. आपण आपले मन जर ईश्वराला समर्पित करुन दिले ना तर मग हा नाच थांबू शकतो.

2) **मद्गतप्राणाः** ईश्वराच्या ठायीच भक्त जन आपल्या तमाम इंद्रियांना संलग्न करुन देतात. समर्पित करुन देतात. केंद्रित करुन देतात. इंद्रियांचा स्वभाव बाह्य विषयांचे ज्ञान संपादन करणे आहे. त्यांना ईश्वराप्रती समर्पित करुन टाकायचा अर्थ आहे विषयांना ईश्वररुपातच बघणे. इंद्रियांचे अस्तित्व हे ईश्वरासाठी आहे अशी भावना मनी असली पाहिजे. आपले संपूर्ण आयुष्य ईश्वरासाठी आहे अशी भावना असायला हवी. गांधीजींची अशी भावना होती. ते ईश्वरासाठीच जगत होते. जो आपले सार सर्वस्व ईश्वराला अर्पण करुन देतो त्याच्या माध्यमातून ईश्वर आपले कार्य करवून घेतो.

3) **परस्परं बोधयन्तः** भक्त एकमेकांना बोध देतात. ईश्वराप्रती सारे काही समर्पण करुन दिलेले भक्त जन जेव्हा एकत्र जमतात तेव्हा ते आपल्या अनुभवांचे परस्पर आदान प्रदान करतात. भक्ती ही निरभिमानतेमुळे जन्माला येते. जिथे भक्ती आहे तिथे नम्रता ही असावयाचीच. जिथे नम्रता असेल तिथे ज्ञानप्राप्तीसाठी मनाची द्वारं सताड उघडी होतात. यामुळे जिथे भक्त मंडळी एकत्रित होते तिथे आपसातल्या ज्ञानचर्चा आणि अनुभव कथन सुरु होते आणि त्यातून नव-नव्या अनुभवांचे ग्रहण केले जाते. या संबंधी तुलसीदासजी बालकांडाच्या आरंभी म्हणतात :

*भरद्वाज आश्रम अति पावन ।*
*परम रम्य मुनिवर मन-भावन ॥*

*तहाँ होइ मुनि-रिषय समाजा।*
*जाहिं जे मज्जहिं तीरथ राजा॥ मज्जहिं प्रात समेत*
*उछाहा। कहहिं परस्पर हरिगुन गाहा॥*

अर्थात् भरद्वाज मुनींचा आश्रम अत्यंत पवित्र असून तो परम रमणीय तर होताच पण तो श्रेष्ठ मुनी जनांच्याही मनाला मोहविणारा होता. स्नानाप्रीत्यर्थ तीर्थराजला जाणाऱ्या ऋषी-मुनींचे जणू काही तिथे संमेलनच भरत असे. प्रात:काळी स्नान आटोपून ते प्रसन्न मनाने श्री हरीच्या गुणांची चर्चा करत असत. पुढे तुलसीदासजी लिहितात:

*ब्रह्म-निरुपन धर्म-विधि, बरनहिं तत्त्व-बिभाग।*
*कहहिं भगति भगवंत कै संजुत ज्ञान बिराग॥*

अर्थात् त्यांच्या विवेचनाचा विषय हा धर्मविधी अर्थात् कर्मकांड, तत्त्वदर्शन म्हणजे उत्तरमीमांसा, उपनिषद, वेदान्त आणि भक्ती, ज्ञान, वैराग्य असतो.

4) **मां नित्यं कथयन्त:** ईश्वराच्या बाबतीत नित्य कीर्तन करत असणारे जन श्रेष्ठ होत. परमात्म्याचे गुणगान जेवढे म्हणून केले जाईल तेवढे कमीच ठरेल. ईश्वराशिवाय जगात दुसरी कुठलीही यथार्थ वस्तु नाही असे ज्यांच्या लक्षात आले आहे त्यांचे मन आश्चर्याने भारले जाते. ते पुन:पुन्हा श्री हरीचे स्मरण करतात. श्री हरीचे गुणगान गातात. हरीभक्त एकत्र जमले की ईश्वर कशा प्रकारे अवतार ग्रहण करतात या विषयीची त्यांची मधुर चर्चा रंगून जाते. नवव्या अध्यायातील चौदाव्या श्लोकात हाच मुद्दा चर्चेला आला आहे. सततं कीर्तयन्तो माम्। सततं अखंडपणे ईश्वराचे संकीर्तन करत असताना, मां नमस्यंत: त्याला नित्य नमस्कार करीत असताना, नित्ययुक्ता उपासते नित्य योगयुक्त बनून त्याची उपासना करीत रहातात. ईश्वरी ज्ञानासोबतच ईश्वरी प्रेम उपजते. ज्ञानासोबत प्रेम म्हणजे भक्ती होय. आपल्या लेकराला बघताच मातेच्या मनी 'हे माझे लेकरु' असे ज्ञान होऊन प्रेम एकदम शिगेला पोहोचते. ज्ञान आणि भक्ती सदा सोबत रहातात.

5) **तुष्यन्ति च रमन्ति:** अशी ईश्वराची अनुपमेय भक्ती चित्तात उत्पन्न झाल्यावर भक्त मग नित्य हरीच्या ठायी लीन रहातात. यामुळे ते सदा संतुष्ट असून आनंदात निमग्न असतात. तुलसीदासजी म्हणतात:

*राम भगति मनि उर बस जाके।*
*दुख लवलेस न सपनेहु ताके॥*

अर्थात् रामभक्ती रुपी मणी ज्यांच्या हृदयात आहे त्यांना स्वप्नात देखिल दु:खाचा अनुभव येत नाही. जगत मिथ्या असतानाही आपण जर जगाला सत्य मानून चालत राहिलो तर दु:खाशिवाय दुसरा अनुभव तो काय बरे यावा? याउलट जगत हे सत्य नाही असे समजून जर आपण चालत राहिलो तर मग त्याच्याशी संबंध आल्यावर दु:खाचा अनुभव नाही येत. जगताच्या मुळाशी जी सत्य वस्तु आहे ती आहे परमात्मा अशी ज्यांना ओळख होऊन गेली आहे आणि जे त्यात लीन झाले आहेत ते आनंदी रहातात.

: 10 :

*तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वक म्।*
*ददामि बुध्दियोगं तं येन मामुपयान्ति ते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सततयुक्तानां:** निरंतर माझ्या ध्यानात मग्न असलेल्यांना
- **प्रीतिपूर्वकं भजतां तेषां:** प्रेमपूर्वक मला भजणाऱ्या भक्तांना
- **तं बुध्दियोगं ददामि:** मी बुध्दी योग म्हणजे तत्त्वज्ञानरुपी योग देतो
- **येन ते मां उपयान्ति:** ज्याच्या योगाने ते मलाच येऊन मिळतात.

**अर्थ**

त्या नेहमी माझ्या ध्यान वगैरेमध्ये रममाण झालेल्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्ताना मी तो तत्त्वज्ञानरुपी योग देतो. ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात.

*असे जे रंगले नित्य भजती प्रीति-पूर्वक*
*त्यांस मी भेटवीं मातें देउनी बुध्दि-योग तो।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) ज्यानी आपल्या चित्ताला परमात्म्याच्या ठायी लीन केले आहे

2) जे भक्ती भावनेने माझी भक्ती करतात. 3) त्याना मी बुध्दीयोग प्रदान करतो. 4) त्यामुळे ते मला पावतात.

**स्पष्टीकरण**

1) **सततयुक्तानां:** ज्यांनी नित्य आपल्या चित्तात ईश्वर भावनेला स्थिर केलेले आहे असे सज्जन लोक धन्य होत. ईश्वराच्या ठायी चित्तवृत्ती एकाग्र करणे सोपे काम नाही. स्थूल वस्तुच्या ठायी चित्त एकदम रंगून जाते. मधुर संगीतात चित्त एकाग्र होते. हिमालयाचे दर्शन झाले म्हणजे नास्तिक सुध्दा क्षणभर तर अभिभूत होऊनच जातो. लहान बालकाला बघुन चित्त प्रफुल्लित होते. अशा प्रकारे इंद्रियगम्य विषयांच्या ठायी तल्लीन होणे काही अवघड कार्य नाही पण ईश्वराच्या ठायी चित्त एकाग्र होणे, आनंद लाभ होणे कठिण आहे. ज्यांना वैराग्यप्राप्ती झाली अशा साधकांना ईश्वराच्या ठायी तल्लीन होणे सोपे आहे.

2) **प्रीतिपूर्वकं भजतां तेषां:** प्रेमपूर्वक ईश्वराची भक्ती करणाऱ्या भक्त जनांना ही हाक आहे. ईश्वराच्या ठायी बुडून गेलेल्यांना, भक्ती रंगात रंगून गेलेल्यांना निष्काम भक्तीचा लाभ होतो. इथे सकाम भक्तजनांची चर्चा नाही. आईचे लेकरावर निष्काम प्रेम असते. खऱ्या भक्ताची अशीच स्थिती असते. भक्तीची पराकाष्ठा साधता आली म्हणजे तमाम इच्छा, लालसा आणि कामना शांत होऊन जातात. तुलसीदासजी म्हणतात :

***बचन करम मन मोरि गति, भजन करहिं निष्काम।***
***तिन्हके हृदय कमल महँ, करउँ सदा विश्राम॥***

अर्थात् काया, वाचा आणि मनाने अनन्य भावनेने जे जन ईश्वराची भक्ती करतात त्यांच्या हृदयकमळी ईश्वर निवास करतात. याचा अर्थ असा की ईश्वर निष्काम भक्तांच्याच अंत:करणात निवास करतात.

2) **तं बुध्दियोगं ददामि:** तो बुध्दी योग म्हणजे यथार्थ दर्शनरुप योग ईश्वरच प्रदान करतो. भक्ताची भूमिका केवळ भक्तीची असते. भक्ताला ईश्वर दर्शनाची चिंता नसते. ईश्वराची ओळख हाच भक्तीचा परिणाम असतो. ईश्वराची ओळख हा भक्ती मार्गातला मुक्काम होय. मुक्कामाची चिंता केल्याने कधीच मुक्कामी पोहोचता येत नसते. मार्गाची ओळख झाली आणि आपण मार्गस्थ झालो की आपोआप मुक्कामी पोहोचता येते. निष्काम भक्ताच्या अंत:करणात कुठल्याही प्रकारची इच्छा वा वासना नसते. फलाशेचा त्याग हा भक्ताचा पहिला आणि अंतिम सिध्दांत असतो. यामुळे प्रयत्नरत असूनसुध्दा भक्त मोक्षरुपी फळाच्या बाबतीत तटस्थ असतो. जसजशी भक्ती साधली जाते तसतसा जीवभाव क्षीण होत जातो. गळत जातो. यामुळे भक्त निश्चिंत असतात. योगक्षेमं वहाम्यहम् (9:22)

3) **येन ते मां उपयान्ति:** ज्यामुळे म्हणजे त्या यथार्थ दर्शनरुप योगामुळे ते मला प्राप्त करुन घेत असतात. ईश्वराचे यथार्थ दर्शन केव्हा बरे होऊ शकते? याचे उत्तर असे की भक्ती सुयोग्य प्रकारे साधली जाऊन जेव्हा जीवभाव गळून पडतो तेव्हा ईश्वराचे यथार्थ दर्शन होऊ शकते आणि मोक्षलाभ केव्हा होऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर असे की जेव्हा ईश्वराचे यथार्थ दर्शन आणि यथार्थ अनुभव लाभेल तेव्हा मोक्षलाभ होऊ शकतो. भक्ती कशी प्राप्त करुन घेता येईल याकडेच नित्य ध्यान लागले पाहिजे. भक्तीची उत्कटता हाच तर मोक्ष होय. भक्ती आणि वैराग्य या सारख्या साधनांद्वारे ज्ञान प्राप्ती आणि ज्ञानप्राप्तीनंतर मोक्ष हा वेदान्ताने निरुपलेला क्रम होय.

: 11 :

***तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तम:।***
***नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं तेषां अनुकम्पार्थं:** मी त्यांच्यावर दया करण्यासाठी म्हणजे अनुग्रह करण्यासाठी
- **आत्मभावस्थ:** त्यांच्या अंत:करणात ऐक्यभावाने स्थित असलेल्या
- **भास्वता ज्ञानदीपेन:** तेजस्वी म्हणजे प्रकाशमय ज्ञानरुपी म्हणजे तत्त्वज्ञानरुपी दीपकाद्वारे
- **अज्ञानजं तम:** अज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या अविवेकाला
- **नाशयामि:** नष्ट करतो

**अर्थ**

हे अर्जुना, त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांच्या अंत:करणात असलेला मी स्वत:च त्यांच्या अज्ञानाने

उत्पन्न झालेला अंधकार प्रकाशमय तत्त्वज्ञानरुपी दिव्याने घालवतो, नाहीसा करतो.

*करुनि करुणा त्यांची हृदयीं राहुनी स्वयें*
*तेजस्वी ज्ञान-दीपानें अज्ञान-तम घालवीं।*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत (1) मी त्या भक्तांवर कृपा करण्यासाठी (2) त्यांच्या अंत:करणात स्थित होऊन (3) तेजस्वी ज्ञानरुपी दिव्याने (4) अज्ञानाने उत्पन्न झालेल्या अंधाराला म्हणजे अविवेकाला नष्ट करतो.

**स्पष्टीकरण**

1) **अहं तेषां अनुकम्पार्थम्:** मी त्यांच्यावर कृपा करण्यासाठी उभा आहे. ईश्वराची भक्तांवर अनुकंपा, दया वा अनुग्रह असतो. तसे तर ईश्वर सर्वांवरच कृपा करतो. दया करतो. ईश्वर सर्वांच्याच अंत:करणात स्थित आहे. ईश्वर प्रत्येकालाच आतून सत्य, नीती आणि धर्माची प्रेरणा प्रदान करतो. ही ईश्वराची असीम कृपा आहे. या प्रेरणेसाठीच इथे अनुकंपा या शब्दाचा प्रयोग करण्यात आला आहे.

2) **आत्मभावस्थ:** ईश्वर त्या भक्तांच्या अंत:करणात स्थित असतो. भक्त ईश्वराच्या खूपच निकट वसतो. यामुळेच भक्ताच्या अंत:करणात ईश्वर स्थित असतो. स्थिर भावनेने वसतो. खूप लांब बसून काही कुणाचे प्रवचन धडपणे ऐकता येणार नाही. यासाठी थोडे जवळ बसावे लागते. भक्त ईश्वराच्या खूप निकट असल्यामुळे त्यांना सतत प्रेरणा मिळत असते.

3) **भास्वता ज्ञानदीपेन:** तेजस्वी ज्ञानरुपी दीपक असतो. भक्त जेव्हा ईश्वराच्या अधिक निकट वसण्याचा प्रयत्न नेहमी करत असतात तेव्हा ज्ञानरुपी दीपक प्रकट होऊ लागतो. प्रत्येकाच्या हृदयात ज्ञानरुपी दीपक तेजाळलेला असतो पण प्रत्येकाला काही त्यापासून प्रकाशाचा लाभ होत नसतो. याचे कारण असे की त्या ज्ञानरुपी दीपकाला अज्ञानरुपी काजळीने ग्रासलेले असते. भक्त प्रयत्नाची पराकाष्ठा करुन ही अज्ञानरुपी काजळी दूर करण्याचा खूपच प्रयत्न करतात यामुळे त्यांच्यावर ईश्वराची विशेष दया असते. यामुळे भक्ताच्या अंत:करणात ज्ञानरुपी प्रकाश प्रकट होऊ लागतो. कसा आहे हा ज्ञानरुपी प्रकाश? हा दीपक अतितेजस्वी असतो. तुलसीदासजी म्हणतात:

*राम-भगति चिंतामणि सुंदर।*
*बसइ गरुड जाके उर अंतर॥*
*परम प्रकाश रुप दिन राती।*
*नहिं कछु चहिय दिया घृत बाती॥*

अर्थात् ज्यांच्या अंत:करणात रामभक्तीरुपी सुंदर चिंतामणी वसतो तिथे अहोरात्र ज्ञानरुपी प्रकाश नांदतो. तिथे बाह्य दीपक, तूप वा वातीची काही गरज नसते.

4) **अज्ञानजं तम: नाशयामि:** ईश्वर अज्ञानामुळे निर्माण झालेल्या अंध:काराला दूर घालवतो. देह वगैरे संघातापासून आत्मतत्त्व आधीपासूनच वेगळे आहे, स्वतंत्र आहे. अज्ञान म्हणजे अविवेक होय. या अज्ञानामुळे त्याची ओळख होत नाही. विवेक जागला की देह आणि आत्मतत्त्व वेगळे असल्याचा अनुभव येऊ लागतो. शंकराचार्य ब्रह्मसूत्र भाष्यातून लिहितात की विवेकाविवेकमात्रेण एव आत्मन: अशरीरत्वं सशरीरत्वं च विवेकाने अशरीरत्त्व आणि अविवेकाने सशरीरत्वाचा अनुभव येतो. अविवेकावस्था ही काल्पनिक अवस्था आहे. चुकीच्या कल्पनेमुळे आपण शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीशी एकरुप होऊन जातो. विवेकाच्या अभ्यासातून ही चुकीची कल्पना घालवून दिली गेली तर देह वगैरे संघातापासून आत्म्याच्या भिन्नतेचा अनुभव घेता येऊ शकेल.

: 12 :

**अर्जुन उवाच**

*परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान्।*
*पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भवान् परं ब्रह्म:** आपण परब्रह्म आहात
- **परमं पवित्रं:** परम पवित्र आहात
- **परं धाम:** आपण श्रेष्ठ धाम आहात
- **अजं शाश्वतं पुरुषं:** आपण जन्मरहित नित्य पुरुष आहात

- **दिव्यं आदिदेवं विभुम्:** आपण दिव्य आहात, आदी देव म्हणजे सर्वप्रथम आणि व्यापक आहात

**अर्थ**

अर्जुन म्हणाला आपण परम ब्रह्म, परम धाम आणि परम पवित्र आहात कारण आपल्याला सर्व ऋषीगण सनातन, दिव्य पुरुष, तसेच देवांचाही आदी देव अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणतात.

**अर्जुन म्हणाला**

***पवित्र तूं पर-ब्रह्म थोर तें मोक्ष-धाम तूं***
***आत्मा नित्य अ-जन्मा तूं विभु देवादि दिव्य तूं।***

**विषय:** अर्जुनाने या श्लोकात भगवंताच्या नऊ स्वरुपांचे वर्णन केले आहे ते असे 1) तू परब्रह्म आहेस. 2) परम पवित्र आहेस. 3) परंधाम आहेस. 4) जन्मरहित आहेस. 5) नित्य आहेस. 6) पुरुष म्हणजे आत्मा आहेस. 7) दिव्य आहेस. 8) सर्वप्रथम आहेस. 9) व्यापक आहेस.

या अध्यायातील प्रथम तीन श्लोकात ईश्वराच्या स्वरुपाचे वर्णन आले आहे. चार ते सात अशा चार श्लोकांमधून ईश्वराच्या विभूतीचे वर्णन आले आहे आणि आठ ते अकरा अशा चार श्लोकांमधून भक्तीचे दर्शन घडवले गेले आहे. आता बारा ते पंधरा हे चार श्लोक अर्जुनाचे आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **परं ब्रह्म:** परमात्म्याला ब्रह्म म्हटले गेले कारण तो अतिव्यापक आहे. ब्रह्म शब्दाच्या मूळाशी धातु आहे बृहत्. बृहत् म्हणजे अतिव्यापक. बृहत् पासून शब्द बनलाय ब्रह्म. जो व्यापक असेल तो श्रेष्ठ असायलाच हवा. व्यापक वस्तु अलौकिक असते, अत्यंत शक्तीसंपन्न असते. कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं अशी तिची शक्ती असते. करणे, न करणे किंवा अन्य कुठल्याही प्रकारे करणे ही तिची शक्ती असते.

2) **परमं पवित्रम्:** ईश्वर परम पवित्र आहे. अतिसूक्ष्म आहे. यामुळे निर्विकार आहे. तो ज्ञानस्वरुपी आहे. त्याचे ज्ञान झाकून ठेवेल अशी कुठलीही शक्ती जगात नाही. जिथे अखंड ज्ञानस्वरुपता नांदते तिथे आवरण येऊच शकत नाही. आवरण स्थूल वस्तुचे असते. शंकराचार्य ब्रह्मसूत्र भाष्यात म्हणतात की नित्यशुध्दमुक्तस्वभाव: ईश्वर नित्य आहे, शुध्द आहे आणि म्हणूनच मुक्त स्वरुपी आहे.

3) **परंधाम:** ईश्वर श्रेष्ठ धाम म्हणजे मोक्षरुपी स्थान आहे. पवित्र वस्तुचे दर्शन झाले म्हणजे आनंद होतो. जिथे आनंद आहे तिथे मुक्ती आहे. दु:खाचा अनुभव माणसाला बध्द करुन ठेवतो. आनंदाच्या अनुभवापासून मुक्त होण्यासाठी कुणीही कधीही प्रयत्न करत नाही. ईश्वर ज्ञानस्वरुपी आहे. त्याच्या ठायी अज्ञान आणि तज्जन्य काम, क्रोध वगैरे विकार नसल्यामुळे तो अखंड शांत आणि आनंदस्वरुपी असल्यामुळेच तो मुक्तस्वरुपी आहे.

4) **अजं:** ईश्वर अजन्मा आहे. ज्याचा जन्म आहे त्याचा अंत हा आहेच आहे. ईश्वर जर अविनाशी, जन्मरहित नसला तर मग जगत शून्यरुप होऊन जाईल.

5) **शाश्वतम्:** ज्या वस्तुचा जन्म होतो आणि अंत होतो त्या वस्तुला अनित्य असे म्हणतात. वस्तुच्या ठायी परिवर्तन हे होत असते. परिवर्तनशीलतेची अंतिम परिणती ही नष्ट होण्यात असते. यामुळे वस्तुमात्र ही अनिश्चित, अनित्य आणि अशाश्वत असते पण ईश्वर मात्र निश्चित, नित्य आणि शाश्वत स्वरुपाचा असतो कारण की ईश्वराच्या ठायी कधीही कुठलाही फरक पडत नसतो.

6) **पुरुषम्:** ईश्वर पुरुष आहे म्हणजे मानवी देहात तो आत्मतत्त्वाच्या रुपाने नांदतो. आत्मा म्हणजेच परमात्मा होय. ईश्वर जड जगात गुप्त स्वरुपात असतो म्हणजे जड पदार्थांच्या ठायी ईश्वराची ज्ञानस्वरुपता प्रकट होत नसते. ईश्वर पिंडात म्हणजे देहात ज्ञानस्वरुपतेमुळे प्रकट होतो. यामुळे आपल्याला जड वस्तुंचे ज्ञान होते. ईश्वराची ज्ञानरुपता जर प्रकट होत नसेल तर आपल्याला कुठल्याही वस्तुचे ज्ञान होऊ शकणार नाही. पशु, पक्षी, किटक या सर्वच जीव सृष्टीत कमी अधिक प्रमाणात ज्ञानस्वरुपता ही प्रकट आहेच. या ज्ञानस्वरुपी ईश्वराला पुरुष म्हटले जाते. 'पुरि शयनात' अशी पुरुष शब्दाची व्याख्या शंकराचार्यांनी केली. पुरि म्हणजे पुरात म्हणजे देहरुपी घरात शयनात म्हणजे झोपलेला म्हणजे साक्षी रुपाने जो स्थित आहे म्हणजे तटस्थ आहे तो पुरुष होय. झोपलेल्या माणसाला सुख वा दु:खाचा परिचय नसतो त्याचप्रमाणे देहात वसणाऱ्या ईश्वरालाही हा परिचय नसतो. यामुळे अखंड

साक्षी भावनेने जागृत असूनसुध्दा ईश्वर झोपलेलाच असतो.

7) **दिव्यं:** ईश्वर दिव्य आहे. ईश्वरासारखी अलौकिक अशी दुसरी वस्तु नाही. ईश्वराचे वर्णन शब्दांच्या माध्यमातून करता येणे शक्य नाही. त्याचे वर्णन करताना शब्द कुंठित होऊन जातात. ईश्वराच्या अलौकिकतेमुळे भक्त भावाविष्ट होऊन जातात. त्यांना संपूर्ण विश्वात ईश्वराच्या अलौकिकतेचे आणि दिव्यतेचेच दर्शन होते.

8) **आदिदेवम्:** ईश्वराच्या आधी काहीही नाही. ईश्वर अजन्मा आहे. ईश्वर जर जन्म घेणारा असेल तर त्याच्यापूर्वी काहीतरी निर्माण झाले असले पाहिजे. ईश्वर म्हणजे सत्, अस्तित्व वा भाव होय. ‘ असते पण ‘ नित्य कायम असते. त्याच्यासाठी सदा न कदा वर्तमानकाळच असतो. जी वस्तु नित्य वर्तमानकाळातच वसते त्या वस्तुसाठी ना भूतकाळ असतो ना भविष्यकाळ असतो. ज्या वस्तुचा भूतकाळ नसतोच ती वस्तु सर्वप्रथम असते.

9) **विभुम्:** ईश्वर अतिव्यापक आहे. त्याचे अनुमान या जगतावरुन करता येण्यासारखे आहे. जगत कार्य असून ईश्वर हे कारण आहे. संत तुलसीदासजी म्हणतात:

***व्यापक एक ब्रह्म अविनाशी।***
***सत चेतन घन आनंद राशी॥***

अर्थात् ब्रह्म एक आहे, ते अतिव्यापक आणि अविनाशी आहे. ते चैतन्याने भारलेले असून आनंदस्वरुपी आहे. शंकराचार्य म्हणतात की ते विभवनशीलम् आहे अर्थात त्याचा स्वभाव व्यापक होण्याचा आहे. ते अनेक प्रकाराने प्रकट होते. ईश्वर अनेक रुपात प्रकट होतो. ईश्वर एक असूनही तो व्यापक आहे.

: 13 :

***आहुस्त्वामृषय: सर्वे देवर्षिर्नारदस्तथा।***
***असितो देवलो व्यास: स्वयं चैव ब्रवीषि मे॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वे ऋषय: त्वां आहु:** सर्व ऋषी मंडळी आपल्याला असेच म्हणतात
- **तथा देवर्षि: नारद:** देवर्षी नारद सुध्दा म्हणतात
- **असित: देवल: व्यास:** असित, देवल व्यास ऋषीही असेच म्हणतात
- **च स्वयं एव मेब्रवीषि:** आणि आपण स्वत:सुध्दा मला हेच सांगताहात

**अर्थ**

देवर्षी नारद, असित, देवल आणि महर्षी व्याससुध्दा तसेच सांगतात आणि आपणही मला तसेच सांगता.

***ऋषि एक-मुखें गाती तसे असित देवल***
***व्यास नारद देवर्षि तूं हि आपण सांगसी।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) सारे ऋषी-मुनी आपल्या अशाच स्वरुपाचे वर्णन करताहेत. 2) नारद, असित, देवल आणि व्यास ऋषीही असेच म्हणताहेत. 3) आणि आपणही स्वत: हेच सांगताहात.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वे ऋषय: त्वां आहु:** मागील श्लोकात ईश्वराच्या रुपाचे वर्णन आले आहे. तमाम ऋषी-मुनी तशाच प्रकारच्या ईश्वराचे वर्णन करताहेत. मागील श्लोकात ईश्वराच्या नऊ रुपांची चर्चा आली आहे. या श्लोकात या संदर्भात ऋषी-मुनींच्या मताचा हवाला देण्यात येत आहे. अनेक ऋषी होऊन गेलेत. शंकराचार्यांनी वसिष्ठ वगैरे असा उल्लेख केला. ब्रह्मसूत्राच्या तिसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या पादाच्या बत्तीसाव्या सूत्रात वसिष्ठ, भृगु आणि सनत् कुमार या ऋषींचा उल्लेख केला गेला. या तीन ऋषींना ब्रह्मदेवाचे मानस पुत्र मानले गेले. ब्रह्मदेव आद्य ऋषी होत. हे तीन ऋषी आद्य अशा ब्रह्मदेवाच्या नंतरचे होत. ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेतलेले महापुरुष म्हणजे ऋषी होत. ज्यांनी ईश्वरी तत्त्वाचा अनुभव घेतला असेल असेच ऋषी ईश्वराच्या यथार्थ स्वरुपाचे वर्णन करु शकतात. उपनिषदकर्ते ऋषीच तर होते. अनुभवाचे शब्द असल्यामुळे उपनिषद वचने प्रमाण मानली जातात. उपनिषद म्हणजे वेदांचा भाग होय. ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिताना शंकराचार्यांनी उपनिषदांना प्रमाण ग्रंथ मानले आहे. ईश्वराचा अनुभव अर्जुनाने घेतला नव्हता यामुळे ऋषी-मुनींचा आश्रय घेतला गेलाय.

2) **असितो देवलो व्यास: देवर्षि: नारद:** असित, देवल, व्यास आणि  नारद अशी चार नावे अर्जुनाने घेतली आहेत. या संदर्भात विनोबा लिहितात की हे चारही ऋषी भक्तियोगाचे आचार्य होत. हे क्रमश: कर्म, भक्ती, ज्ञान आणि मोक्षाचे प्रतिनिधी होते. असित कर्मप्रधान भक्त तर देवल भक्तीप्रधान, व्यास ज्ञानप्रधान तर नारद मोक्षप्रधान भक्त होते. या श्लोकाच्या आरंभी नारदांचा उल्लेख असून त्याना देवर्षी मानले गेले आहे. नारद स्वत: भक्त तर होतेच पण मोक्षप्रधान होते म्हणजे कुठल्याही प्रकारच्या बंधनात नव्हते. त्यांचा सर्वत्र मुक्त संचार होता. वायु पुराणात नारदांचा उल्लेख त्रिकालज्ञ असा आहे. नारद सत्यभाषी होते, तपस्वी होते. देवताहीत्यांना देवर्षी म्हणत असत. ते ब्रह्मचारी होते. त्यांनी समाधी दशा प्राप्त करुन घेतली होती. नित्याची भटकंती आणि उपदेश देणे नारदांचा स्वभाव होता. ते वीणाधारी होते. गात असत. भक्तीमार्गी असल्यामुळे ते भक्तीचा उपदेश देत असत. कश्यप मुनींची दोन लेकरे होती. एकाचे नाव वासर आणि दुसरा असित. दोघेही ब्रह्मचारी होते. असित ब्रह्मवादी तर होतेच पण भक्तही होते. नारदांइतकी प्रसिध्दी काही असित यांना लाभली नाही. देवल हे भक्तीप्रधान होते. ते आचार्य असितांचे चिरंजीव होत. यांच्या मातेचे नाव होते ऐकपर्णा. देवल यांनी शिवभक्तीच्या जोरावर सिध्दी प्राप्त करुन घेतली होती. हे ऋग्वेदाचे मंत्रद्रष्टे ऋषी होते. व्यास महर्षी खूपच प्रसिध्दीला आले. व्यासांचे पिता पराशर आणि माता सत्यवती. व्यासांनी अठरा पुराणे व महाभारत यासारख्या ग्रंथांची रचना केली. व्यासांनीच ब्रह्मसूत्राचीही रचना केली. जगावर त्यांचे अनंत उपकार आहेत. हे ज्ञानप्रधान भक्त होते. हे चारही आचार्य अर्जुनाप्रमाणेच ईश्वराविषयी आपले मत मांडताहेत.

3) **च स्वयं एव मे ब्रवीषि:** इथे अर्जुनाने साक्षात् ईश्वराचाच हवाला दिला आहे. हा दहावा अध्याय आहे. एथवरच्या अध्यायांमधून भगवान कृष्णाने ईश्वरी स्वरुपाचे जे काही वर्णन केले गेले ते ऐकूनच अर्जुनाने या अध्यायात हे वर्णन केले आहे.

: 14 :

***सर्वमेतद्दतं मन्ये यन्मां वदसि केशव।***
***न हि ते भगवन् व्यक्तिं विदुर्देवा न दानवा: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **केशव:** हे कृष्णा, केशवा
- **यत् मां वदसि:** आपण जे काही मला सांगताहात
- **एतत् सर्वं ऋतं मन्ये:** ते सारे मी सत्य मानतो
- **भगवन्:** हे भगवान कृष्णा
- **ते व्यक्तिं:** तुझ्या लीलामय उपाधिरहित रुपाला
- **देवा: न विदु:** देवसुध्दा जाणत नाहीत
- **दानवा: न विदु:** दानवसुध्दा जाणत नाहीत

**अर्थ**

हे केशवा आपण जे काही मला सांगताहात ते सर्व मी सत्य मानतो, हे भगवन आपल्या लीलामय स्वरुपाला ना दानव जाणत ना देव जाणत.

***मानितों  सत्य हें सारें स्वयें जें सांगसी मज***
***देव दानव कोणी हि तुझें रुप न जाणती।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) मला आपण जे काही सांगताहात ते सारे मी सत्य मानतो. 2) तुमच्या या उपाधिरहित स्वरुपाला देवता जाणत नाहीत. 3) दानवही जाणत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **केशव यत् मां वदसि एतत् सर्वं ऋतं मन्ये:** या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात भगवंताने सांगितले की ईश्वराच्या प्रभावाला ब्रह्मदेव आदि मोठमोठे देवही जाणत नाहीत, महान ऋषीदेखिल जाणत नाहीत. याचे कारण असे की ईश्वर तमाम देवता आणि ऋषी-मुनींचे मूळ कारणरुप आहेत, मूळ आहेत. हे ऐकून अर्जुन म्हणतो की माझी अशी मान्यता आहे की आपण हे जे काही निवेदन केले आहे ते अक्षरश: सत्य आहे.

या शिवाय अर्जुनाच्या या निवेदनात हाही अर्थ सामावला आहे की एथवरच्या नऊ अध्यायांमधून ईश्वराच्या स्वरुपाविषयी  सांगितले गेले की ते जाणून घेणे

सोपे नाही कारण की ते इंद्रियगम्य नसून अनुभवगम्य आहे. निर्विकार म्हणजे अतिनिर्मळ मनाने ईश्वराचा अनुभव घेता येऊ शकेल. गीतेचा हा मुद्दा आता अर्जुनाच्या गळी उतरला की ईश्वराचे मूळ स्वरुप अनुभवाशिवाय जाणून घेता येणार नाही.

2) **भगवन् ते व्यक्तिं देवा: न विदु:** अर्जुन म्हणतो की हे देवा, आपल्या उपाधिरहित स्वरुपाला देव म्हणजे देवतुल्य माणूस जाणून येऊ शकणार नाही. ईश्वराची दोन स्वरुपे होत. एक म्हणजे उपाधिरहित आणि दुसरे म्हणजे उपाधियुक्त. उपाधियुक्त रुप म्हणजे सगुण साकार रुप होय. जे जगत दृश्यमान आहे ते सारे ईश्वराचेच तर रुप आहे पण या जगताच्या रुपाने दिसणारे ईश्वराचे हे स्वरुप सत्य नसून भासमय आहे. ते स्थूल स्वरुपाचे आहे. भगवंताचे हे रुप रुपच आहे पण ते स्वरुप नाही. स्वरुप अपरिवर्तित असते ते कधीही बदलत नसते. भगवंताची अशा प्रकारे दोन रुपे होत. एक कदापि न बदलणारे आणि दुसरे प्रतिक्षणी बदलणारे. बदलणारे रुप म्हणजे रुप तर अपरिवर्तनीय रुप म्हणजे स्वरुप होय. भगवंताच्या खऱ्या स्वरुपाला सर्वसाधारण जाणत नाहीत हे तर खरेच आहे पण अर्जुनाचे म्हणणे तर असे आहे की देवतुल्य जनसुध्दा म्हणजे अगदी साधकसुध्दा ईश्वराच्या खऱ्या स्वरुपाला जाणत नाहीत. साधक दशेनंतरची सिध्द दशा प्राप्त झाल्यावर मग मात्र ते आपल्या अनुभवाने या स्वरुपाला जाणून घेऊ शकतात. अर्थात् साधक दशेत केवळ बुध्दीच्या सहाय्याने ईश्वराचे इंद्रियातीत स्वरुपच अवश्यमेव ग्रहण होऊ शकते.

3) **दानवा: न विदु:** दानव म्हणजे साधारण असे अज्ञ जन होत. ते या स्वरुपाला जाणून घेऊ शकत नाहीत. ईश्वराच्या इंद्रियातीत स्वरुपाला साधारण जन जाणून घेऊ शकत नाहीत याचे कारण असे की काही लोक प्रापंचिक काळज्यांनी ग्रस्त असतात तर काही लोक भोगासक्त असतात. त्यांच्या ठायी ईश्वराच्या स्वरुपाला जाणून घेण्याची इच्छाच उत्पन्न होत नाही. अशाप्रकारे साधारण जनांच्या मनी ईश्वरविषयक जिज्ञासा उत्पन्न होत नसल्यामुळे ईश्वराचे स्वरुप बुध्दीने जाणून घेणे शक्य होत नाही.

: 15 :

*स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम।*
*भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पुरुषोत्तम:** हे पुरुषोत्तमा
- **भूतभावन:** हे भूतांना उत्पन्न करणाऱ्या
- **भूतेश:** हे भूतांच्या ईश्वरा
- **देवदेव:** हे देवतांच्या देवा
- **जगत्पते:** हे जगत्पालका
- **त्वं स्वयं एव:** तू स्वत: सुध्दा
- **आत्मना आत्मानं वेत्थ:** स्वत:च स्वत:ला जाणतो

**अर्थ**

हे भूतांना उत्पन्न करणाऱ्या हे भूतांच्या ईश्वरा, हे देवांच्या देवा हे जगाच्या स्वामी, हे पुरुषोत्तमा, आपण स्वत:च आपल्याला जाणत आहात.

*जाणसी तें तुझें तूं चि प्रत्यक्ष पुरुषोत्तमा*
*देव-देवा जगन्नाथा भूतेशा भूत-भावना।*

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली गेली आहे. अर्जुनाने भगवंतासाठी इतकी विशेषणे एकसाथ अन्यत्र कुठेच प्रयुक्त केलेली नाहीहेत. या श्लोकात भगवंतासाठी पाच विशेषणे प्रयुक्त केली गेली आहेत आणि एकच गोष्ट सांगितली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **पुरुषोत्तम:** या श्लोकात अर्जुनाने भगवंतासाठी पाच-पाच विशेषणांचा प्रयोग केला आहे गोष्ट मात्र एकच सांगितली आहे. ईश्वर पुरुषोत्तम आहे. पुरुषांमध्ये श्रेष्ठ आहे. दोन लोक पुरुषांमध्ये श्रेष्ठ मानले जातात, एक ज्ञानी आणि दुसरा प्रत्यक्ष ईश्वर. ज्ञानी पुरुष देखिल ईश्वराची उपासना करत असल्यामुळे ईश्वर सर्वांहून श्रेष्ठ ठरतो. ईश्वराचे स्वरुप जाणून घेण्याच्या आधी ज्ञानी देखिल अज्ञानीच असतो.

2) **भूतभावन:** प्रापंचिक लोक अनेक वस्तु उत्पन्न करतात. जहाज काय आणि कारखाने काय, विमान काय

आणि विविध यंत्रे काय. सर्वसाधारण माणूस असे काही उत्पन्न करु शकत नाही. या विशेष वस्तुंच्या निर्मितीसाठी विशेष बुध्दी हवी, विशेष प्रकारचे सामर्थ्य हवे पण एवढे सामर्थ्यवान लोकही काही या जगाची निर्मिती नाही करु शकत. समाधी सारख्या उपायांनी काही सिध्दी मिळवून घेता येतात, नाही असे नाही पण याद्वारे भासमान वस्तुंची निर्मिती करता येऊ शकते. उदाहरणार्थ हनुमंताला काही सिध्दी प्राप्त होत्या. त्या सिध्दींच्या बळावर हनुमंत स्वत:ला कधी लहान तर कधी मोठा बनऊ शकत होते. कधी मानवी देह धारण करु शकत होते. या बळावरच तर ते सागर लंघून गेले होते तरी पण ते काही सागर निर्माण करु शकत नव्हते. हे सामर्थ्य केवळ ईश्वराचेच होय. ईश्वर हवे ते निर्माण करु शकतो.

3) **भूतेश:** भूतमात्रांवर नियंत्रण स्थापित करु शकणारा ईश्वर जगाला निर्माण करु शकतो आणि जगावर नियंत्रणहीराखू शकतो. माणसाची स्थिती काही नेहमीसाठी अशी राहू शकत नाही. ईश्वर या अद्भुत जगाला जसे निर्माण करु शकतो तसेच या जगावर नियंत्रणही स्थापित करु शकतो.

4) **देवदेव:** देव म्हणजे उच्च भूमिकासंपन्न माणूस. अशा माणसांमध्ये ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. इथे देव शब्दाचा अर्थ ज्ञानसंपन्न पुरुष असा मानला जायला हवा. ईश्वराची अखंडपणे ध्यान धारणा, उपासना, भक्ती करणाऱ्यांनाच सहज ज्ञानाची प्राप्ती होत असते. यामुळे ईश्वर ज्ञानी पुरुषांहूनही श्रेष्ठ असे महाज्ञानी आहेत.

5) **जगत्पते:** ईश्वर जगाला निर्माण करतो, नियंत्रणात ठेवतो आणि पालनही करतो. आपला देह, मन, इंद्रिये आणि बुध्दी ही ईश्वराधीन असतात. यावर ईश्वराचे नियंत्रण असते. आपले हृदय चोवीस तास कार्यरत असते. आपल्या देह वगैरेंचे पोषण ईश्वरच करतो.

6) **त्वं स्वयं एव आत्मना आत्मानं वेत्थ:** ईश्वराचे स्वरुप इंद्रियातीत आहे त्याला ईश्वरच जाणून घेऊ शकतो. सर्वसाधारण जनसुध्दा श्रध्देमुळे ईश्वर अस्तित्वात आहे एवढे तर अवश्यमेव जाणून घेऊ शकतात. ईश्वराच्या संबंधातली विशेष माहिति जाणकार ज्ञानी पुरुषांना असते. अर्थात् ज्ञानी पुरुषांना देखिल ईश्वराची संपूर्ण कल्पना नसते. ही देहधारी पुरुषाची मर्यादा आहे. सीमा आहे. देहाच्या विलयानंतर ज्ञानी पुरुष हा ईश्वराच्या ठायी विलीन होतो मग त्याचे स्वतंत्र अस्तित्व उरत नाही. देहाचा विलय होताच तो केवळ ईश्वररुपच उरतो. पूर्णज्ञान हे देहात सामावू शकत नाही. यामुळे ज्ञानी पुरुष ईश्वरात विलीन असतात तरीसुध्दा देहावस्थेत असताना त्यांच्या ईश्वरात विलीनीकरणाच्या प्रक्रियेत थोडी उणीव राहूनच जाते. तसे तर ईश्वराच्या स्वरुपाचे संपूर्ण ज्ञान केवळ ईश्वरालाच आहे.

: 16 :

*वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतय: ।*
*याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **याभि: विभूतिभि:** ज्या विभूतींनी
- **इमान् लोकान् व्याप्य:** या लोकांना व्यापून
- **तिष्ठसि:** आपण रहाता
- **ता: दिव्या: आत्मविभूतय:** त्या आपल्या दिव्य विभूतींना
- **अशेषेण वक्तुं अर्हसि:** संपूर्णपणे सांगण्यास आपणच योग्य आहात

**अर्थ**

म्हणून ज्या विभूतींच्या योगाने आपण या सर्व लोकाना व्यापून राहिला आहात त्या आपल्या दिव्य विभूती पूर्णपणे सांगायला आपणच समर्थ आहात.

*विभूति आपुल्या दिव्य मज नि:शेष सांग तूं*
*ज्यांनी हें विश्व तूं सारे राहिलास भरुनियां ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) ज्या विभूतींनी या लोकी व्याप्त होऊन रहाताहात 2) त्या आपल्या दिव्य विभूतींचे वर्णन करण्यास आपण स्वत:च समर्थ आहात.

**स्पष्टीकरण**

1) **याभि: विभूतिभि:** इमान् लोकान् व्याप्य तिष्ठसि तसे पाहू गेल्यास ईश्वर प्रत्येक वस्तुच्या ठायी सामावलेले तत्त्व आहे, व्याप्त तत्त्व आहे पण अर्जुनासमोर हा प्रश्न उभा ठाकला आहे की प्रत्येक वस्तुला बघून ईश्वराचे स्मरण

तर काही होत नाही. ईश्वर अणु-रेणूत व्याप्त असल्याचे या पूर्वीच्या तमाम अध्यायांमधून वर्णन आलेले आहे. यामुळे अर्जुनाच्या ध्यानात ईश्वराचे कथन तर आलेच आहे. प्रत्येक वस्तुमात्रात जर ईश्वर ओतप्रोत भरलेला असेल तर मग प्रत्येक वस्तु बघितली असता ईश्वराचे स्मरण व्हायला हवे. यासाठी काय बरे करावे? यासाठी उपाय असा आहे की सर्वप्रथम विशेष गुणांनी भारलेल्या वस्तुंचे दर्शन झाल्यावर ईश्वराचे स्मरण व्हावे. उदाहरणार्थ गंगा किंवा हिमालयाच्या दर्शनाने ईश्वराचे स्मरण व्हावे. बालकाला अक्षरांची ओळख करुन देताना आधी सोपे-सोपे शब्द शिकवले जातात मग जोडाक्षरांचा क्रम येतो. यामुळे अर्जुनाची देवाला अशी प्रार्थना आहे की देवाने आधी त्या विशेष विभूतींचे म्हणजे विशेष पदार्थांचे वर्णन करुन सांगावे ज्यांच्या ठायी त्यांचा निवास आहे. ज्यांच्या माध्यमातून अर्जुनाला ईश्वराचे रुप प्रकट होताना दिसेल.

2) **ता: दिव्या: आत्मविभूतय:** अशेषेण वक्तुं अर्हसि अर्जुन देवाला म्हणतो की आपण स्वत:च आपल्या दिव्य विभूतींचे वर्णन करुन सांगू शकाल. देवाच्या दिव्य विभूतींचे वर्णन देवाशिवाय दुसरे कोण बरे करु शकेल असे अर्जुनाचे निवेदन आहे.

इथे अर्जुनाने संपूर्णपणे म्हणजे संपूर्णत: या शब्दाचा प्रयोग केला आहे. याचा अर्थ शेष काहीही उरता कामा नये. केवळ विभूती या शब्दाचा प्रयोग न करता अर्जुन 'दिव्य' हे विशेषण जोडून आपले निवेदन करत आहे. दिव्य आणि शेष काहीही न उरु देता विभूतींची चर्चा करावयाची असेल तर अशा विशेष विभूतींची संख्या फार काही नसेल. मोजकीच असेल. एवढे असतानाही ईश्वराने जर सर्वांची चर्चा न करता काही विभूती शेष राहू दिल्यात तर मग भक्ती प्राप्त करुन घ्यायला तेवढी मदत कमी राहील. यामुळे अर्जुनाने दिव्य आणि नि:शेष या दोन विशेषणांचा प्रयोग केला. या दोन विशेषणांच्या मदतीने अर्जुन भक्तीची वेगळी मीमांसा मांडू इच्छित आहे.

: 17 :

***कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन्।***
***केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **योगिन्:** हे योगी, हे योगेश्वरा
- **त्वां सदा परिचिन्तयन् अहं:** आपले सदा चिंतन करणारा मी
- **त्वां कथं विद्याम्:** आपल्याला कशा प्रकारे जाणावे?
- **भगवन्:** हे भगवंता
- **च केषु केषु भावेषु:** आणि कोण कोणत्या भावांनी
- **मया चिन्त्य: असि:** मी आपले चिंतन करावे ?

**अर्थ**

हे योगेश्वरा, मी कशा प्रकारे नित्य चिंतन करीत आपल्याला जाणावे आणि हे भगवान आपण कोणकोणत्या भावात माझ्याकडून चिंतन करण्यास योग्य आहात?

***योगेश्वरा कसे जाणूं चिंतनीं चिंतनीं तुज***
***कोण्या कोण्या स्वरुपांत करावें ध्यान मी तुझें।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी विचारल्या आहेत 1) हे योगेश्वरा तुझे चिंतन करणारा मी तुला कशा प्रकारे जाणू? 2) हे भगवंता, आणि कोण कोणत्या भावात मी तुझे चिंतन करु ?

**स्पष्टीकरण**

1) **योगिन् त्वां:** सदा परिचिन्तयन् अहं त्वां कथं विद्याम् एथवरच्या अध्यायांमधून ईश्वराच्या स्वरुपाला जाणून घेण्यासाठी सुगम उपाय म्हणून भक्ती तत्त्वाची मांडणी केली गेली. तुलसीदासजींनीही भक्ती पंथाला सुगम म्हटले आहे. सुगम पंथ मोहि पावहिं प्रानी। नवव्या अध्यायाच्या आरंभी भक्तीला 'राजविद्या' म्हणून संबोधित केले गेले. भक्ती हा राजमार्ग आहे. राजमार्गावरुन निर्धोकपणे अगदी डोळे बंद करुन देखिल चालता येते. ईश्वराची भक्ती कुठल्या स्वरुपाच्या माध्यमातून केली जावी ? हा प्रश्न उपस्थित होण्याचे मुख्य कारण असे आहे की ईश्वराचे एक स्वरुप तर निर्गुण-निराकार आहे. अव्यक्त आहे. हे रुप तर ध्यान करण्यासाठी सुध्दा अवघड आहे. भक्तीसाठी तर पराकोटीचे अवघड आहे. दुसरे स्वरुप आहे सगुण-साकार रुप. हे ध्यान वा भक्तीसाठी सुगम आहे, सोपे आहे. याच स्वरुपाला भक्तीच्या माध्यमातून

कसे प्राप्त करुन घेता येईल? हा अर्जुनाचा प्रश्न आहे. ईश्वर समग्र ब्रह्मांडात व्याप्त असल्यामुळे अणु-अणुत व्याप्त असल्यामुळे ब्रह्मांडातल्या प्रत्येक पदार्थाला बघून ईश्वराप्रती प्रीत वा भक्ती निर्माण व्हायला हवी पण ही सहज साधणारी गोष्ट नाही. ही क्रमश: साधता येणारी गोष्ट आहे. अर्जुनाचे या बाबतीत निवेदन असे आहे की आतापर्यंत गीतेने ईश्वराचे स्मरण करायची चर्चा केली आहे हे त्याच्या ध्यानात येत आहे आणि त्यानुसार तो वर्तायला सुध्दा लागला. ईश्वराचे स्मरण करायचा प्रयत्नसुध्दा करु लागला पण उत्कट भक्तीची इच्छा मनी असते. यामुळे हा प्रश्न त्याच्या मनी जागला. ही भक्ती कुणा उपायांनी प्राप्त करुन घेता येईल हा प्रश्न यामुळेच अर्जुनाने उपस्थित केला आहे.

2) **भगवन् च केषु केषु भावेषु मया चिन्त्य:** असि अर्जुनाचे निवेदन असे की हे प्रभु! माझ्या योग्यतेनुसार या दिव्य विभूतींचे वर्णन केले जावे. यामुळे स्मरणमात्रेण ईश्वराची भक्ती उत्पन्न होऊ शकेल. खरे तर या दोन्ही प्रश्नांमध्ये मूलभूत अंतर नाही. एवढेच म्हणणे आहे की आधी तर मी आपले चिंतन करत रहायचो पण या चिंतनातून ईश्वराच्या दिव्य स्वरुपाचे दर्शन कसे व्हावे ? दुसरा प्रश्न असा आहे की ईश्वरी ज्ञानासाठी जगतातील तमाम पदार्थांना ईश्वररुप जाणणे आवश्यक आहे पण साऱ्या पदार्थांना ईश्वर रुपात तर बघता येत नाही यामुळे ईश्वराने निर्मित केलेल्या कुठल्या-कुठल्या पदार्थांमध्ये ईश्वराचा नेमका शोध घ्यावा जेणेकरुन ईश्वराच्या भक्तीचे ज्ञान व्हावे. आता अर्जुन साधक दशेला पोहोचला आहे. आता त्याची जिज्ञासा जागृत झाली. चौथ्या अध्यायातील चौतिसाव्या श्लोकात भगवंताने सांगून ठेवले आहे की ज्ञान प्राप्तीसाठी चित्ताच्या ठायी विनम्रता हवी आणि जिज्ञासापूर्वक प्रश्न विचारायला हवेत.

: 18 :

***विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन।***
***भूय: कथय तृप्तिर्हि श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दन:** हे जनार्दना
- **आत्मन: योगं:** आपल्या योग शक्तीला
- **च विभूतिं:** आणि आपल्या परम ऐश्वर्यरुपी विभूतींना
- **विस्तरेण:** विस्तारपूर्वक
- **भूय: कथय:** पुन्हा सांगा अर्थात् ऐकण्याची उत्कंठा तशीच कायम रहाते
- **हि अमृतं श्रृण्वत:** मे कारण की आपल्या अमृतमय वचनांना ऐकत असतांना माझी
- **तृप्ति: नास्ति:** तृप्ती होतच नाही

**अर्थ**

हे जनार्दना, आपली योगशक्ती आणि विभूती पुन्हाही विस्तारपूर्वक सांगा कारण आपली अमृतमय वचने ऐकत असता माझी तृप्ती होत नाही अर्थात् ऐकण्याची उत्कंठा अधिकच वाढत रहाते.

***त्या विभूति तसा योग आपुला तो सविस्तर***
***पुन्हां सांग नव्हे तृप्ति सेवितां वचनामृत।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) हे जनार्दना, आपला योग 2) आणि आपल्या विभूती पुनश्च सांगा 3) कारण की आपली अमृत वाणी ऐकून माझी 4) तृप्तीच होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **जनार्दन आत्मन: योगं कथय:** अर्जुनाने प्रार्थना केली की हे जनार्दना! मजप्रत तुमचा योग कथन करावा. इथे अर्जुनाने देवासाठी जनार्दन या शब्दाचा प्रयोग केला. शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात जनार्दन शब्दाचे दोन अर्थ केलेत. एक असुराणां देवप्रतिपक्षभूतानां जनानां नरकादिगमयितृत्वात् जनार्दन:। म्हणजे असुरांना किंवा दुर्जनांना जो नरक वगैरे गती प्रदान करतो तो जनार्दन होय.

दुसरा या अभ्युदयनि:श्रेयसप्रयोजनं सर्वै: जनै: याच्यते इति जनार्दन:। अर्थ असा की अभ्युदय म्हणजे बाह्य उत्कर्ष आणि नि:श्रेयस म्हणजे मोक्ष या दोन पुरुषार्थांसाठी सारे लोक याचना करतात यामुळे देवाला जनार्दन असे म्हणतात.

अर्जुनाने ईश्वराला पहिली प्रार्थना ही केली की ईश्वराने आपले योगैश्वर्य म्हणजे आपले अलौकिक सामर्थ्य दर्शवावे. दहाव्या अध्यायापर्यंत भगवंताने सातत्याने हे सांगितले की त्यांनी आपल्या अलौकिक शक्तीच्या बळाने या जगताची निर्मिती केली. अर्जुनाला असे वाटते की जर ईश्वर सांगताहेत तर विश्वास ठेवावा लागेल, श्रध्दा राखावी लागेल पण ईश्वराने प्रत्यक्षात दर्शन घडवले तर मग ईश्वराच्या कथनावर विश्वास ठेवणे सोपे जाईल. अर्जुनाच्या या प्रार्थनेला स्वीकार करुन ईश्वराने अकराव्या अध्यायात अर्जुनाला विश्वरुप दर्शन घडवले. या अध्यायाच्या आरंभी तर अर्जुनाने इच्छा प्रकट केली की त्याला ईश्वराने आपल्या प्रमुख विभुतींचे दर्शन घडवावे, म्हणजे जे श्रेष्ठ रुप ईश्वराचे प्रकट रुप आहे त्याचे दर्शन घडवावे, म्हणजे ज्यांच्या ठायी ईश्वराचे स्वरुप अधिक प्रमाणात प्रकटले आहे त्यांचे दर्शन घडवावे. या पदार्थांचे दर्शन करुन त्याच्या मनी त्यांच्या दर्शनमात्रेण अथवा त्यांच्या स्मरणमात्रेण भक्तीभाव प्रकट व्हावा. यामुळे गीतेने मुख्य-मुख्य विभूतींचे दर्शन घडवले. अकराव्या अध्यायाच्या सत्तेचाळिसाव्या श्लोकात 'आत्मयोगात्' या शब्दाचा प्रयोग केला गेला. या अठराव्या श्लोकातही 'आत्मन: योग:' या शब्दाचा प्रयोग केला गेलाय. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. अर्जुनाने भगवंताला दोन प्रार्थना केल्या आहेत. त्यातली पहिली आहे ईश्वराच्या विश्वरुप दर्शनासाठी केली गेलेली प्रार्थना पण विश्वरुप दर्शन म्हणजे ब्रह्मांडातील तमाम पदार्थांचे ईश्वरमय रुपात दर्शन घडणे काही सोपी गोष्ट नाही पण ब्रह्मांडातल्या ज्या प्रमुख विभूती आहेत ज्यांच्या ठायी ईश्वर विशेषत्वाने प्रकट झालेले आहेत त्यांच्या दर्शन वा स्मरणाने ईश्वर स्मरण होणे सुगम आहे. यामुळे पुढील श्लोकापासूनच अर्जुनाच्या दुसऱ्या प्रार्थनेनुसार प्रमुख विभूतींचे वर्णन करणे सुरु करुन दिले आहे. पुढे अकराव्या अध्यायात विश्वरुप दर्शन घडवून दिले आहे

2) **च विभूतिं विस्तरेण भूय:** कथय अर्जुनाची दुसरी प्रार्थना अशी आहे की आपण आपल्या दिव्य विभूतींचे वर्णन पुनरपि विस्तारपूर्वक करावे. याचे कारण असे की याच अध्यायाच्या चार ते सहा श्लोकांमधून काही विभूतींचे वर्णन केले गेले. नंतर आठव्या श्लोकात असे सांगितले आहे की ईश्वरापासूनच संपूर्ण जगताची निर्मिती झाली असे समजावे. पुढे असे सांगितले की माझ्याच ठायी संपूर्ण जगत उत्पन्न झाले आहे असे जाणून ज्ञानी जन माझीच भक्ती वा उपासना करतात. एवढे सांगून विभूतींच्या वर्णनाचा विषय पूर्ण केला. यामुळे इथे अर्जुनाने प्रार्थना केली की या विभूतींचे विस्तारपूर्वक वर्णन केले जावे. संपूर्ण ब्रह्मांडात जर ईश्वराचा साक्षात्कार करुन घ्यावयाचा असेल तर अधिकात अधिक विभूतींचे वर्णन व्हावे जेणेकरुन ईश्वराचे अधिक स्मरण होईल आणि भक्ती वाढेल.

3/4) **अमृतं श्रृण्वत:** मे तृप्ति: नास्ति आपली अमृत वाणी ऐकून माझी तृप्ती होत नाही. इथे अर्जुनाने भगवंताचा विशेष गौरव केला आहे. सच्च्या ज्ञानवंताच्या वाणीत माधुर्य नांदते.

गांधीजींनी श्रीमद्राजचंद्रजींच्या बाबतीत सांगितले होते की त्यांच्या कंठात असे काही माधुर्य होते की ऐकणाऱ्याची धणी पुरत नसे. श्रीमद्राजचंद्रजी हे वैराग्यसंपन्न, ज्ञानवान जैन-श्रावक होते. ते शतावधानीही होते. अर्जुन साधक होता यामुळे त्याच्या मनी ऐकून घ्यायची मोठी आतुरता होती, उत्कंठा होती.

: 19 :

**श्री भगवान् उवाच**

***हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतय: ।***
***प्राधान्यत: कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हन्त:** आता मी, ठीक आहे
- **ते दिव्या:** आत्मविभूतय: आता मी तुला माझ्या दिव्य विभूती
- **प्राधान्यत:** प्रामुख्याने मुख्य-मुख्य अशा
- **कथयिष्यामि:** सांगेन म्हणजे कथन करीन
- **हि कुरुश्रेष्ठ:** कारण की हे कुरुश्रेष्ठा
- **मे विस्तरस्य:** माझ्या विभूतींच्या विस्ताराचा
- **अन्त: न अस्ति:** अंत नाही

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे कुरुश्रेष्ठा, आता मी माझ्या ज्या दिव्य विभूती आहेत, त्या मुख्य मुख्य अशा तुला सांगेन कारण माझ्या विस्ताराला अंत नाही.

**श्री भगवान म्हणाले**

*बरें मी सांगतों दिव्य मुख्य मुख्य चि त्या तुज*
*माझ्या विभूति विस्तार न संपे चि कुठें कधीं।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) ठीक आहे मी तुला माझ्या विभूती दिव्य विभूती मुख्य मुख्य रुपाने सांगेन 2) कारण की माझ्या विभूतींच्या विस्ताराचा काही पार नाहीये.

**स्पष्टीकरण**

1) **हन्त ते दिव्याः आत्मविभूतयः प्राधान्यतः कथयिष्यामिः** ईश्वराने आपल्या प्रमुख दिव्य विभूती सांगायचे ठरवले आहे. आधी भगवंताने अर्जुनाला सांगितले की तुझे निवेदन मी स्वीकार करतो. ज्ञानी जन कमालीचे विनम्र असतात. श्रध्दासंपन्न माणसाचे वा जिज्ञासुचे समाधान व्हावे या दिशेने ते प्रश्नांना उत्तरे देतात. शंका समाधान करतात. पुढे भगवंताने सांगितले की ते ज्या विभूतींची चर्चा करणार आहेत त्या दिव्य म्हणजे अलौकिक असतील. त्यांच्या स्मरण वा दर्शनमात्रेण ईश्वराप्रती भक्तीभाव वृध्दीला लागेल. ज्या दिव्य विभूतींचे ईश्वर वर्णन करणार आहेत त्या त्यांच्याहून भिन्न नसणार, त्या ईश्वराच्याच असणार. त्या विभूतींनी ईश्वर ओतप्रोत आहेत.

2) **हि कुरुश्रेष्ठ मे विस्तरस्य अंतः न अस्तिः** हे कुरुश्रेष्ठ अर्जुना! माझ्या विभूतींच्या विस्ताराचा ना आदि आहे ना अंत. इथे भगवंताचा आशय असा आहे की ते आपल्या विभूतींचे वर्णन देखिल संक्षेपातच करणार आहेत. ते मर्यादित विभूतींचेच दर्शन घडवणार आहेत. प्रमुख विभूतींच्या वर्णनाला विसाव्या श्लोकापासून आरंभ होऊन त्याचे समापन अडतिसाव्या श्लोकापाशी होते. एकोणचाळिसाव्या श्लोकात पुनश्च वर्णन येते की ईश्वर तमाम भूतमात्रांचे बीजरुप आहेत. या 19 श्लोकांमधून विभूतींचे जे वर्णन आले त्यातून ईश्वरी विभूतींचा अंदाज येऊ शकतो.

: 20 :

*अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः।*
*अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **गुडाकेशः** हे निद्राविजयी अर्जुना
- **अहं सर्वभूताशयस्थितः आत्माः** मी सर्व भूतांच्या हृदयात असलेला सर्वांचा आत्मा आहे
- **अहं भूतानां आदिः** मी सर्व भूतांचे मूळ कारण आहे
- **च मध्यंः** आणि भूतांचा मध्य
- **च अंतः एवः** आणि भूतांचा अंतही मी आहे.

**अर्थः** हे अर्जुना, मी सर्व भूतांच्या हृदयात असलेला सर्वांचा आत्मा आहे. तसेच सर्व भूतांचा आदी, मध्य आणि अंतही मीच आहे.

*राहतों आत्म-रुपानें सर्वांच्या हृदयांत मी*
*भूत-मात्रास मी मूळ मध्य मी मी चि शेंवट।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) मी सर्व भूतांमध्ये स्थित आत्मा आहे. 2) आणि मी सर्व भूतांचा आदी, मध्य आणि अंत आहे.

**स्पष्टीकरण**

1) अहं सर्वभूताशयस्थितः आत्माः मी (ईश्वर) तमाम भूतमात्रांच्या अंतःकरणात विराजित आत्मतत्त्व आहे. आत्मा म्हणजे सत् चित् आनंदरुपात प्रकट परमात्मा होय. जीवमात्रांच्या ठायी मन आणि पंच ज्ञानेंद्रिये असतात. यांच्या माध्यमातून ईश्वराचे ज्ञान स्वरुप दिसू शकते. मनानेच ईश्वराचे ज्ञान स्वरुप अनुभवाला येते. जड किंवा अजीव पदार्थांच्या ठायी मन नसल्यामुळे ज्ञान स्वरुपतेचा बोध होऊ शकत नाही. ज्ञान स्वरुपता हेच आत्मतत्त्व आहे.

2) **अहं भूतानां आदिः च मध्यं च अंतः एवः** ईश्वर सर्व भूतमात्रांचे मूळ कारण आहे आणि भूतमात्रांचे आधार स्वरुप आहेत आणि भूतमात्रांचे विलय स्थान म्हणजे अंतिम स्थानही आहेत. आदी, अंत आणि मध्य सारेच ईश्वर आहे. जगताची उत्पत्ती, स्थिती आणि लय ईश्वरामुळेच संभवते.

: 21 :

*आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान्।*
*मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं आदित्यानां विष्णुः** मी अदितीच्या बारा पुत्रांपैकी विष्णु अर्थात् वामन अवतार आहे
- **ज्योतिषां अंशुमान् रविः** प्रकाशमान वस्तुंमध्ये किरण संपन्न असा सूर्य आहे
- **मरुतां मरीचिः अस्मि**: मरुद गणांमध्ये मरीची नामक वायु देवता
- **नक्षत्राणां अहं शशी:** नक्षत्र गणांमध्ये नक्षत्रांचा अधिपती मी चंद्रमा आहे

**अर्थ**

अदितीच्या बारा पुत्रांपैकी विष्णु मी आणि ज्योतींमध्ये किरणांनी युक्त सूर्य मी आहे. एकोणपन्नास वायुदेवतांचे तेज आणि नक्षत्रांचा अधिपती चंद्र मी आहे.

*आदित्यांत महा-विष्णु ज्योतिष्मंतांत सूर्य मी*
*मरीचि मुख्य वायूंत मी नक्षत्रांत चंद्रमा।*

**विषय:** या श्लोकात चार विभूती दर्शवल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) **अहं आदित्यानां विष्णुः** आदित्यांमध्ये मला तू विष्णु जाण. या अध्यायात वर्णिलेल्या तमाम विभूती या पौराणिक आहेत. पुराणात या विभूतींची चर्चा ऐतिहासिक रुपात येते. पुराणकारांनी बारा आदित्यांची कल्पना केलीय. या बारा आदित्यांचे पिता कश्यप होते. सर्वात धाकटे होते विष्णु. हे गुण संपन्न होते. शेष बारा आदित्यांची नावे अशी आहेत धाता, मित्र, वरुण, अर्यमा, इंद्र, अंश, भग, विवस्वान, पूषा, सविता, त्वष्टा आणि विष्णु.

विष्णु या विभूतीच्या संदर्भात विनोबाजींचे निवेदन असे आहे की हे बारा महिन्याचे बारा विष्णु आहेत. या विष्णुंचे रुप प्रखर आणि सौम्य असे आहे. थंडीत एक रुप, उन्हाळ्यात एक आणि वर्षा ऋतुत एक वेगळे रुप असते. विष्णुची रुपे अशा प्रकारे बदलत्या ऋतुमानानुसार सौम्य आणि तीव्र अशी बदलती जरी असली तरीदेखिल बारा महिन्यांची देवता विष्णु एकच आहे. विनोबाजी दुसरी अशी कल्पना प्रस्तुत करतात की गीता हा ग्रंथ वैष्णवांचा ग्रंथ मानला जात असल्यामुळे विष्णुला विभूती मानले गेले आहे.

2) **ज्योतिषां अंशुमान् रविः** प्रकाशमान वस्तुंमध्ये किरणयुक्त सूर्य ईश्वर आहे. सूर्याची जेवढी म्हणून प्रशंसा करावी तेवढी कमीच ठरेल. सूर्याशिवाय धरतीचे अस्तित्व उरणार नाही. सूर्यामुळे धरतीच्या ठायी उष्णता नांदते. सूर्याचा ताप कमी झाला तर प्राणी आणि वनस्पती यांचे जीवन धोक्यात येईल. ते जीवंत राहू शकणार नाहीत. यामुळेच भक्तीसाठी सूर्याचे प्रतीक मानले गेलेय. सूर्योदयासमयी सूर्यासमीप उभे ठाकण्यातून भक्तीभाव उत्पन्न होतो.

3) **मरुतां मरीचिः अस्मिः** मरुद्गणांमध्ये मरीचि म्हणजे वायुदेवता ईश्वर आहे. पुराणात एकोणपन्नास वरुणांचा उल्लेख येतो. कश्यप मुनी आणि दिती या वरुणांचे माता पिता होत. विनोबाजी म्हणतात की मरीचि हा जलवाचक शब्द आहे. पाऊस आणणाऱ्या वाऱ्याला मरीचि असे म्हणतात.

4) **नक्षत्राणां अहं शशी:** नक्षत्रांच्या ठायी म्हणजे आकाशात दिसणाऱ्या तारकदळात ईश्वर चंद्रमा आहे. ही आहे चौथी विभूती. चंद्रम्याचा प्रकाश शीतल असतो. चंद्राच्या प्रकाशापासून वनस्पतींचे पोषण होते. चंद्र धरतीच्या अगदी निकट आहे. एवढ्या निकट दुसरा कुठलाही तारा नाही.

: 22 :

*वेदानां समावेदोऽस्मि देवानामस्मि वासवः।*
*इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वेदानां सामवेदः अस्मिः** वेदांमध्ये मी सामवेद आहे
- **देवानां वासवः अस्मिः** देवांमध्ये मी इंद्र आहे
- **च इन्द्रियाणां मनः अस्मिः** इंद्रियांमध्ये मी मन आहे

- **भूतानां चेतना अस्मि:** भूत प्राण्यांमध्ये चेतनता अर्थात ज्ञान शक्ती मी आहे

**अर्थ**

वेदांत मी सामवेद आहे, देवात इंद्र आहे, इंद्रियांमध्ये मन आहे आणि भूत प्राण्यांमधील चेतना म्हणजे जीवन शक्ती मी आहे.

***मी साम-वेद वेदांत असें देवांत इंद्र मी***
***चेतना मी चि भूतांत मन तें इंद्रियांत मी ।***

**विषय:** या श्लोकात चार विभूती वर्णिल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) **वेदानां सामवेदः अस्मि:** वेदांमध्ये सामवेद ही ईश्वराची विभूती होय. वेद चार आहेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद. यापैकी ऋग्वेद हा ज्ञानप्रधान तर यजुर्वेद यज्ञप्रधान, सामवेद भक्तीप्रधान तर अथर्ववेद विधी-निषेधप्रधान आहे. तमाम साधनांमध्ये भक्ती हे सुलभ साधन आहे. सुलभता हीच श्रेष्ठता होय. सामवेद भक्तीप्रधान असल्यामुळे भगवंताने त्याचा उल्लेख आपली विभूती म्हणून केला. गीतेत भक्ती प्रधान असून सामवेद हाही भक्तीप्रधान आहे. यामुळे दोघांमध्ये साम्य आहे. सामवेदच गीता होय.

2) **देवानां वासवः अस्मि:** देवगणांमध्ये ईश्वर इंद्र आहे. इंद्र आहे देवांचा राजा. इंद्र म्हणजे इं अधिक द्र. इदं म्हणजे हे सारे जगत. द्र म्हणजे बघणारा. म्हणजे परमात्मस्वरुप बघणारा. देव म्हणजे साधक वा मुमुक्षु. साधक वा मुमुक्षु जनांमध्ये जे संपूर्ण जगाला ईश्वररुप बघतात ते सर्वश्रेष्ठ होत. ते सिध्द होत. अशा प्रकारे इंद्र म्हणजे सिध्द वा ज्ञानी पुरुष होय. सिध्द वा ज्ञानी ही ईश्वराची विभूती होय. ज्ञानी पुरुषाला बघून त्यांचे स्मरण करुन त्यांच्या सहवासात परमात्म्याचे स्मरण आणि परमात्म भावाचे जागरण होऊ शकते.

3) **च इन्द्रियाणां मनः** अस्मि  इंद्रियांच्या ठायी म्हणजे अकरा इंद्रियांमध्ये ईश्वर हे मन आहे. जगात ईश्वराच्या शक्तीचा जो काही आविष्कार दिसून येतो तो मनामुळे आहे. मन नसेल तर जगाचे ज्ञान होऊ शकणार नाही. या दृष्टीने विचार करु जाता मन अद्भुत शक्ती आहे. छांदोग्योपनिषदात मनाचे 'दिव्यं चक्षु' असे वर्णन येते. ईश्वरी सृष्टीचे दर्शन करुन प्रत्येकाच्या मनात वेगवेगळ्या प्रकारची सृष्टी निर्माण होते. प्रत्येकाची मानसिक सृष्टी हीच तर सुख-दु:खाचे कारण बनते. ईश्वरी दृष्टी काही सरळ-सरळ सुख वा दु:खाचे कारण नाही. ती दृष्टीच जर सुख-दु:खाचे कारण असती तर मग प्रत्येकालाच समानरुपाने सुख-दु:खाचा अनुभव झाला असता पण असे नाही. एकाला कारच्या प्रवासात आनंदलाभ होतो तर दुसऱ्याला कारचा राग येतो. एक ब्रह्मचर्याचे पालन करतो तर दुसरा गृहस्थाश्रमाचा स्वीकार करतो. मनच खरे तर बंधन आणि मोक्षाचे कारण आहे.

4) **भूतानां चेतना अस्मि:** भूतमात्राच्या ठायी म्हणजे प्राणीमात्रात मी चेतन्यस्वरुप आहे. जड पदार्थांच्या ठायी म्हणजे दगड आणि माती यासारख्या ठिकाणी चैतन्य दिसून येत नाही. जीव सृष्टीच्या ठायी चैतन्याचे दर्शन होते. लहानातल्या लहान किटकाला देखिल स्पर्शाचा अनुभव घेता येतो कारण तो सजीव आहे त्याच्या ठायी चैतन्य आहे पण जेव्हा त्या किटकातील चैतन्य लोप पावते तेव्हा तो शवरुप बनतो. ही चेतना अद्भुत आहे. जोवर चैतन्य आहे तोवर जीवाला ज्ञान बोध असतो. चैतन्य देहातून लुप्त होताच ज्ञान उरत नाही. यावरुन असे लक्षात येते की ज्ञानही चैतन्यावरच अवलंबून आहे. वृक्षाच्या ठायीही चैतन्य नांदते. ज्या शाखेतले चैतन्य संपून जाते ती शाखा वाळते, सुकून जाते.

: 23 :

***रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।***
***वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं रुद्राणां शंकरः अस्मि:** अकरा रुद्रांमध्ये मी शंकर आहे
- **यक्षरक्षसां वित्तेशः** यक्ष आणि राक्षस यांच्यामध्ये मी धनपती कुबेर आहे
- **च वसूनां पावकः अस्मि:** आणि आठ वसुंमध्ये अग्नी आहे

- **शिखरिणां अहं मेरुः** शिखर असणाऱ्या पर्वतांमध्ये मी सुमेरु पर्वत आहे

**अर्थ**

अकरा रुद्रांमध्ये मी शंकर आहे, यक्ष आणि राक्षसांमध्ये मी धनपती कुबेर आहे. मी आठ वसुंमधला अग्नी आहे आणि शिखरे असलेल्या पर्वतांमध्ये मी सुमेरु आहे.

*कुबेर यक्ष-रक्षांत मी रुद्रांत सदाशिव*
*वसूंत मी असें अग्नि असें उंचांत मेरु मी।*

**विषय:** या श्लोकात चार विभूती दर्शविल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अहं रुद्राणां शंकरः अस्मि:** विभूतींचे हे वर्णन पुराणांच्या आधारे आहे. रुद्रांमध्ये ईश्वर शंकर आहेत. अकरा रुद्र आहेत त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत हर, बहुरुप, त्र्यंबक, अपराजित, वृषाकपि, शंभु (शंकर ), कपर्दि, रैवत, मृगव्याध, शर्व आणि कपाली. यांच्यात शंकर प्रसिध्द आहेत. ते तपस्वी आहेत. त्यांची पत्नी पार्वती प्रसिध्द आहे. शंकर ईश्वराचे भक्तही आहेत. अर्थात् शंकर भक्तीपेक्षा तपाचरणासाठी प्रसिध्द आहेत.

2) **यक्षरक्षसां वित्तेशः** यक्ष-राक्षसांमध्ये कुबेर ईश्वर आहेत. यक्ष आणि रक्ष अशा दोन प्रकारच्या देवता आहेत. या दोन देवतांपैकी वित्तेश म्हणजे कुबेर हे धनाचे स्वामी होत. यक्ष आणि रक्ष हे कुबेराचे दोन सेवक. यक्ष धन प्राप्त करुन देणारे आणि रक्ष हे धनाचे रक्षण करणारे. धनाचे स्वामी कुबेर होत. कुबेर पुलस्त्य ऋषीचे पौत्र आणि विश्रवाचे पुत्र होत. त्यांच्या मातेचे नाव होते देववर्णिनी. कुबेराने प्रदीर्घ काळापर्यंत तप आचरले. या तपामुळे प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाने त्यांना धनाचे अध्यक्षपद बहाल केले आणि लोकपालाचा दर्जा प्रदान केला. याचा दुसरा अर्थ असा की कुबेर तपस्वी असल्यामुळे धनाचा विनियोग जनकल्याणासाठी व्हावा हा दृष्टिकोण समोर ठेऊन समाजाच्या धनाचे त्यांना विश्वस्त बनवण्यात आले. देशाच्या सर्व संपत्तीचा सदुपयोग व्हावा या कारणासाठी कुबेर यांना राष्ट्रातल्या सर्व धनाचे अध्यक्ष पद बहाल करण्यात आले, विश्वस्त बनवण्यात आले. सध्याचे श्रीमंत जन त्यागी आणि तपस्वी नसल्यामुळे ते प्राप्त धनाचा सदुपयोग करतीलच अशी काही शक्यता नसते. यामुळे त्यांना विश्वस्त पद बहाल करण्यात येत नाही. राष्ट्राच्या संपत्तीचा सदुपयोग करुन आपले जीवितकार्य संपन्न करणाऱ्या कुबेराला ईश्वराने विश्वस्त पद बहाल केले. स्वत:ची विभूती मानले. अशा प्रकारे धनाचे विश्वस्त जन नि:संशयपणे वंदनीय होत. खूप धन असतानाही जे आपल्या धनाचा उपयोग स्वत:च्याच भोगांसाठी न करता जन कल्याणासाठी करतात तेच कुबेर बनण्यायोग्य ठरतात.

3) **च वसुनां पावकः** अस्मि आठ वसुंमध्ये ईश्वर पावक म्हणजे अग्नीरुप आहे. पुराणात या आठ वसुंचे पुढीलप्रमाणे वर्णन येते धर, ध्रुव, सोम, अहस्, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास. यांच्यापैकी अनल म्हणजे पावक म्हणजे अग्नी राजा आहे. अग्नी देवतांप्रत हवी पोहोचवण्याचे कार्य करतो. यामुळे पावकाला भगवंताचे मुख असेही म्हटले जाते. यामुळे अग्नी ही विभूती ठरते. अग्नी पदार्थांना शिजवण्यासाठी आणि घाण शुध्द करण्यासाठी प्रसिध्द आहे. त्याच्या शिवाय माणूस या धरतीवर जिवंत राहू शकत नाही. जीवन व्यवहारात देखिल अग्नीचे प्राधान्य असल्यामुळे अग्नी ही एक विभूती आहे. अग्नीला बघून ईश्वराचे स्मरण आणि भान जागते.

4) **शिखरिणां अहं मेरुः** शिखर युक्त सात पर्वतांमध्ये ईश्वर मेरु पर्वत आहे. मेरु पर्वताचे वर्णन पुराणांतर्गत येते. तरी तो नेमका कुठे आहे या विषयी मात्र काही सांगता येत नाही. सात पर्वत नेमके कुठले हेही सांगता येत नाही. एवढे मात्र निश्चित की पर्वतांकडे बघून मुख्यत: त्यांच्या भव्यतेमुळे ईश्वराच्या विशालतेचे - भव्यतेचे परिमाण ध्यानी येते. ही भव्यता काही केवळ आकारमानापुरतीच मर्यादित अशी नाही ती अभिव्यक्ती आणि आचार व्यवस्थेशीही संबंधित आहे.

: 24 :

***पुरोधसां च मुख्यं मां विध्दि पार्थ बृहस्पतिम्।***
***सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पुरोधसां मां:** पुरोहितांमध्ये मुख्य अर्थात् देवांचा पुरोहित
- **मुख्यं बृहस्पतिं विध्दिः** मुख्य बृहस्पती मलाच जाण
- **सेनानीनां अहं स्कन्दः** सेनापतींमध्ये स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी मी आहे
- **अहं सरसां सागरः** अस्मि आणि जलाशयात मी सागर आहे

**अर्थ**

पुरोहितांमध्ये मुख्य बृहस्पती मला समज. हे पार्था, मी सेनापतींमधला स्कंद आणि जलाशयांमधला सागर आहे.

***पुरोहितांत तूं जाण मुख्य तो मी बृहस्पति***
***सेनानींत तसा स्कंद जल-राशींत सागर।***

**विषयः** या श्लोकात तीन विभूतींचे वर्णन करण्यात आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **पुरोधसां मां मुख्यं बृहस्पतिं विध्दिः** या श्लोकात तीन विभूतींची चर्चा आली आहे. पुरोहितांमध्ये बृहस्पतीला ईश्वर जाणावे. पुरोहित म्हणजे मार्गदर्शक. प्रत्येक कुटुंबाचे एक मार्गदर्शक असतात. सरकारचेही मार्गदर्शक असतात. अशा सल्लागार मार्गदर्शकांमध्ये प्राचीन काळी बृहस्पती हे एक नाव येते. हे नाव व्यवहारात प्रचलित आहे. विलक्षण बुध्दीसंपन्न व्यक्तीलाही आपण या नावाने संबोधित करतो. ' याची बुध्दी बृहस्पतीसारखी आहे ' असे म्हणतो. बृहस्पती हे इंद्राचे गुरु आणि महर्षी अंगिरा यांचे सुपुत्र होत. महाभारताच्या शांती आणि अनुशासन पर्वात यांच्या उपदेशांच्या कथा येतात.

2) **सेनानीनां अहं स्कन्दः** सेनापतींमध्ये स्कंदाच्या ठायी ईश्वर वसतो. स्कंदाचे दुसरे नाव कार्तिकेय असे आहे. देव आणि असुरांच्या संग्रामाचे वर्णन प्राचीन ग्रंथांमधून विपुल प्रमाणात आढळते. सैन्यदळाचे नेतृत्व सेनापती करतो. त्याच्या मार्गदर्शनाखाली सारी सेना कूच करत असते. गीतेच्या पहिल्या अध्यायात आरंभीच पांडव दळाचे सेनापती आणि कौरव दळाच्या सेनापतींची चर्चा येते. देवासुर संग्रामात विजय देवतांचाच होत असे. यामुळे प्रजा सुरक्षित असायची. अशा प्रकारे जो सेनापती देवतांच्या सैन्यदळाला विजयी करण्यासाठी प्रयत्नशील असेल त्याला विभूतीच मानायला हवे. स्कंद हे देवाधिदेव महादेवांचे सुपुत्र होत.

3) **अहं सरसां सागरः** अस्मि सरोवरांमध्ये सागर हे ईश्वराचे रुप आहे. धरतीवर जेवढे म्हणून जलस्रोत असतील त्यात सागर हा मोठा जलस्रोत असतो. पूर्व अफ्रिकेतील एक सरोवर छोट्या सागराएवढे मोठे आहे. ते मुळी सरोवर असल्यासारखे वाटतच नाही. अर्थात् अशा नाना लहान-मोठ्या सरोवरांपेक्षा मोठा असल्यामुळे सागरालाच ईश्वराची विभूती मानले आहे. सागर यात्रा करत असताना ईश्वराच्या दिव्य विभूतीचे स्मरण होते. अलौकिक शक्तीचे स्मरण होते. सागरात असंख्य लहान-मोठे जीव वास करतात. सागराचे सृष्टीवर अनंत उपकार आहेत. सागरामुळेच आपल्याला मीठ मिळते. मीठाशिवाय आपण जगूच शकणार नाही. अशा सागराला बघून वा स्मरण करुन कुणाला बरे ईश्वराचे स्मरण होणार नाही ? सागर दर्शनाने चैतन्य गौरांग प्रभु ईश्वर स्मरणाने इतके भारावून जात असत की त्यांना आपल्या देहाचे सुध्दा भान उरत नसायचे. अंततः ईश्वराच्या भेटीसाठी म्हणून ते सागरातच विलीन झालेत.

: 25 :

***महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम्।***
***यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महर्षीणां अहं भृगुः** मी महर्षींच्या मध्ये भृगु
- **गिरां अहं एकं अक्षरं अस्मिः** वचनांमध्ये एक अक्षर अर्थात् ओम आहे
- **यज्ञानां अहं जपयज्ञः** अस्मिः सर्व प्रकारच्या यज्ञांमध्ये जपयज्ञ मी आहे

- **स्थावराणां अहं हिमालय:** स्थिर पदार्थांमध्ये मी हिमालय आहे

**अर्थ**

मी महर्षींमध्ये भृगु आणि शब्दांमध्ये एक अक्षर अर्थात् ओंकार आहे. सर्व प्रकारच्या यज्ञांमध्ये जपयज्ञ आणि स्थिर रहाणाऱ्यांमध्ये हिमालय पर्वत मी आहे.

***मी एकाक्षर वाणींत महर्षींत असें भृगु***
***जप मी सर्व यज्ञांत मी स्थिरांत हिमालय।***

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं महर्षीणां भृगु:** महर्षींमध्ये भृगु हे ईश्वर होत. प्राचीनकाळी अनेक ऋषी-मुनी होऊन गेलेत. त्यांच्यात लहान-मोठा असा भेदभाव आपण नाही करु शकत कारण ते सारेच ज्ञानी होते. त्या सर्वांनाच ईश्वरी विभूती मानले जायला हवे. तरीसुध्दा या क्रमात भृगु यांचे नाव घेतले गेले. हे बह्मदेवाचे मानसपुत्र मानले जातात. हे वरुणाचे शिष्य होत. तैत्तिरीय उपनिषदात यांच्या नावे एक वल्ली म्हणजे एक अध्याय आहे. अगदी बालवयातच यांनी आपल्या गुरु वरुणाला ब्रह्म स्वरुपाचे ज्ञान प्राप्त करुन देण्याची इच्छा प्रकट केली होती. मग त्यांच्या पित्याने हे ज्ञान उपलब्ध करुन दिले होते. अशा प्रकारे उपनिषदातला एक संपूर्ण अध्याय यांच्या नावे असल्यामुळे भगवंतांनी सर्व ऋषी मंडळात विभूती म्हणून यांचे नाव घेतले आहे. याशिवाय एक वैशिष्ट्य असेही सांगता येते की प्राय: ऋषी मंडळी ही गृहस्थाश्रमी असत पण भृगु हे ब्रह्मचारी होते. यामुळे देखिल ईश्वराने स्वत:ची विभूती म्हणून यांच्या नावाचा उल्लेख केला.

2) **गिरां अहं एकं अक्षरं अस्मि:** वाणीच्या ठायी ईश्वर हे एकाक्षर ओंकार रुप आहेत. गीतेच्या आठव्या अध्यायातील तेराव्या श्लोकात ओंकाराचा उल्लेख येतो. अंतिम काळी ओंकाराचा उच्चार करुन म्हणजे ईश्वराचे स्मरण करुन देहत्याग करणाऱ्याला परमपद लाभते. गीतेच्या काळापर्यंत ओंकार हा मंत्र ईश्वराच्या नावाच्या रुपात प्रचलित होता. ओंकाराचा जप थोडा अवघड असल्यामुळे सध्या राम, कृष्ण ही नावे अधिक प्रचलित आहेत.

विनोबाजींच्या 'उपनिषदांचा अभ्यास' या ग्रंथातून ओंकाराच्या व्युत्पत्ती आणि अर्थाबाबतचे सविस्तपणे वर्णन आले आहे. हे नाव संन्यासी जनांमध्ये अधिक प्रचलित आहे. बहुधा ज्ञानमार्गी वा निर्गुणोपासक ओंकाराचाच जप करतात.

3) **यज्ञानां अहं जपयज्ञ:** अस्मि यज्ञांमध्ये ईश्वर जपयज्ञ रुप आहेत. तिसऱ्या अध्यायातल्या यज्ञ या प्रकरणातून यज्ञ या शब्दाचा अर्थ परार्थ सेवा, त्याग असा सांगितला गेला आहे. चौथ्या अध्यायात वर्णित अनेक यज्ञांच्या क्रमात स्वाध्यायाचाही उल्लेख येतो. द्रव्य यज्ञाप्रमाणेच तप यज्ञाचीही चर्चा आहेच. इंद्रिय निग्रह आणि मर्यादित स्वरुपात विषय-सेवन हेही यज्ञ मानले जातात. प्राणायामाला यज्ञ म्हटले जाते. इथे जप यज्ञाला विभूती मानले गेले आहे. भक्तीसाठी जपाची आत्यंतिक आवश्यकता आहे. याला नामस्मरण असे म्हणतात. अखंड नामस्मरणाला जप असे म्हणतात. नामजपासाठी माळेचा शोध लागला. माळेत मणी असतात. या नामजपाचे विस्तारपूर्वक वर्णन तुलसीदासांनी रामायणातून केले आहे. ते पठनीय आहे. नाम जपाच्या सोबतच मनात परमात्म स्मरणाचे संपूर्ण अनुसंधान राखले जायला हवेय.

4) **स्थावराणां हिमालय:** स्थिर पदार्थांमध्ये हिमालय ईश्वराची विभूती आहे. हिमालयाला ओळखत नाही असा हिंदुस्तानात कोण बरे असेल ? प्राचीन काळी साधनेच्या दृष्टीने हिमालयाला अपार महत्व होते. साधक आणि सिध्द जन मोठ्या प्रमाणावर हिमालयात वास करत असत. समाधी साधनेसाठी हिमालयासारखी दुसरी योग्य जागा नाही. शिव पार्वती तर हिमालयातच विचरण करत असतात. हिमालयाचे दर्शन एवढे अद्भुत आहे की एखाद्या नास्तिकाला सुध्दा आस्तिक बनवून टाकू शकते. आज सुध्दा साधक-साधिका हिमालयातच साधनेचा प्रयत्न करतात. हिमालय हे यात्रेचे स्थानही मानले जाते. बदरी, केदार, गंगोत्री ही तीर्थक्षेत्रे हिमालयातच आहेत. ही यात्रेची प्रमुख स्थाने होत. एवढा विशाल पर्वत साधक आणि मुमुक्षु जनांसाठी साधना करायला उपलब्ध असणे हे आपले थोर भाग्यच होय.

: 26 :

*अश्वत्थ: सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारद: ।*
*गन्धर्वाणां चित्ररथ: सिध्दानां कपिलो मुनि: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्ववृक्षाणां अश्वत्थ:** सर्व वृक्षात पिंपळाचा वृक्ष
- **च देवर्षीणां नारद:** आणि देवर्षींमध्ये नारद मुनी
- **गन्धर्वाणां चित्ररथ:** गंधर्वांमध्ये चित्ररथ
- **सिध्दानां कपिल: मुनि:** सिध्द पुरुषांमध्ये मी कपिल मुनी आहे

**अर्थ**

सर्व वृक्षांत पिंपळ आणि देवर्षींमध्ये नारद मुनी, गंधर्वांमध्ये चित्ररथ आणि सिध्दांमध्ये कपिल मुनी मी आहे.

*सर्व वृक्षांत अश्वत्थ मी देवर्षींत नारद*
*मी चित्ररथ गंधर्वी सिध्दीं कपिल मी मुनि ।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे

**स्पष्टीकरण**

1) **सर्ववृक्षाणां अश्वत्थ:** तमाम वृक्षांमध्ये ईश्वर अश्वत्थ वृक्ष आहे. अश्वत्थ म्हणजे पिंपळाचे झाड होय. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकात अश्वत्थाचा उल्लेख आला आहे. ब्रह्मांडाला अश्वत्थाची उपमा दिली गेली. अग्नी संस्कारासाठी पिंपळ उत्तम मानला जातो. यात खूप औषधी गुण आहेत. याची फळे, पाने, साल सारेच रोगनाशक आहेत. हे झाड मोठे आणि दीर्घजीवी असते. मुंडकोपनिषदात अश्वत्थ वृक्षाचे वर्णन येते.

*द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।*
*तयोरन्य: पिप्पलं स्वाद्वति अनश्नन् अन्यो*
*अभिचाकशीति* (3/1/1)

अर्थात्: दोन पक्षी एक जीवात्मा आणि दुसरा ईश्वर नित्य सोबत रहातात. दोघेही मित्र आहेत. दोघे एकाच वृक्षावर म्हणजे एकाच देहात निवास करतात. दोघांपैकी एक म्हणजे जीवात्मा हा पिंपळाच्या वृक्षावरील फळ चाखतो म्हणजे विषय सुखरुपी फळाचे सेवन करतो. दुसरा म्हणजे ईश्वर विषय भोगरुपी फळाचे आस्वादन न करता केवळ साक्षीरुपाने तटस्थ भावाने हे सारे बघतो.

2) **च देवर्षीणां नारद:** देवर्षींच्या ठायी मी नारद आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. नारदांनी समाधी तर प्राप्त करुन घेतली होती खरी पण अहंकारावर विजय काही त्यांना संपादित करता आला नव्हता. नारद ईश्वराचे भक्त होते पण भक्ताच्या ठायी अहं भावनेला स्थान नसते. ज्ञानी पुरुषाला ज्ञानाचे भान असते पण सच्च्या ज्ञानवंताला तर ज्ञानाचे सुध्दा भान उरत नसते. ज्ञानी पुरुषाचे मुख्य लक्षण निरहंकारिता आहे. नारदांच्या ठायी अहं भाव जागला होता. एका प्रसंगाच्या निमित्ताने ईश्वराने नारदांच्या मनातल्या अहंकाराला नेस्तनाबूत करुन टाकले होते. तेव्हापासून नारद निरहंकारी बनून हाती वीणा धारण करुन ईश्वर प्रशंसेची गीते गात-गात हिंडत असतात.

3) **गंधर्वाणां चित्ररथ:** गंधर्वांच्या ठायी मी चित्ररथ आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. पुराणकारांच्या मतानुसार गंधर्व ही विशिष्ट अशी देवयोनी आहे. गंधर्व स्वर्गात निवास करतात. हे अत्यंत रुपवान असतात. गंधर्वांचे अधिपती आहेत चित्ररथ. हे कश्यप मुनींचे पुत्र होत. हे दिव्य संगीतज्ज्ञ होते. यामुळेच ईश्वराने विभूती रुपात यांची निवड केली आहे. दिव्य संगीत याचा अर्थ परमात्म भाव निर्माण करणारे संगीत होय. चित्ररथ हे सुप्रसिध्द गायनाचार्य होते.

4) **सिध्दानां कपिलो मुनि:** सिध्द गणांमध्ये मी कपिल मुनी आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. कपिल मुनी महामुनी होते. ते जन्मत:च वैराग्य संपन्न होते. ते सांख्य शास्त्राचे जनक होत. अन्य तत्त्वचिंतनाच्या तुलनेने सांख्य शास्त्र हे वेदान्ताच्या अगदी नजिक असे शास्त्र आहे. सांख्यांच्या मते जगताचे मूळ कारण जड जगत आहे तर वेदान्त चैतन्याला जगत निर्मितीचे कारण मानतो. वेदान्त्यांप्रमाणेच जर सांख्यमताच्या आचार्यांनीही जगताचे मूळ कारण चैतन्यमय जगत मानले तर मग दोन्ही तत्त्व चिंतनात कुठलाही फरक उरणार नाही. अशा प्रकारे दोन्ही तत्त्वविचार हे समांतर आहेत. सांख्यमत वेदान्त्यांच्या अधिक नजिक आहे.

: 27 :

*उच्चै:श्रवसमश्वानां विध्दि माममृतोद्भवम् ।*
*ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अश्वानां:** घोड्यांमध्ये
- **अमृतोद्भवं उच्चै: श्रवसं:** अमृत मंथन समयी उत्पन्न झालेला उच्चै: श्रवा नामक घोडा
- **मां विध्दि:** मला समज
- **गजेन्द्राणां ऐरावतं:** श्रेष्ठ हत्तींमध्ये ऐरावत
- **नराणां नराधिप:** माणसांमध्ये मी राजा आहे

**अर्थ**

घोड्यांमध्ये अमृत मंथनात उत्पन्न झालेला उच्चै:श्रवा नावाचा घोडा, श्रेष्ठ हत्तींमध्ये ऐरावत नावाचा हत्ती आणि मनुष्यांमध्ये राजा मला समज.

*अश्वीं उच्चै:श्रवा जो मी निघालों अमृतांतुनी*
*ऐरावत गजेंद्रांत मी नरांत नराधिप ।*

**विषय:** या श्लोकात तीन विभूतींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अश्वानां अमृतोद्भवं उच्चै:श्रवसं मां विध्दि:** अश्वांमध्ये उच्चैश्रवा नामक अश्व मी आहे असे ईश्वराचे निवेदन आहे.

**उच्चै:** श्रवस म्हणजे मोठ्याने खिंकाळणारा अश्व होय. अमृत प्राप्तीसाठी जे सागर मंथन झाले त्यात एकूण चौदा रत्नांचा समावेश होता. यापैकी एक रत्न म्हणजे उच्चै:श्रवा होय. हा देवलोकी रहातो. हा अश्वांचा राजा असून हा अमर आहे. सारांश रुपाने असे म्हणता येते की अश्व हा माणसाला खूप उपयुक्त असा पशु आहे. अश्व हा अत्यंत चपळ आणि प्रामाणिक असा पशु आहे. गतीत कुणीही अश्वाची बरोबरी करु शकणार नाही. हा अश्व ईश्वर रुप आहे.

2) **ऐरावतं गजेन्द्राणाम्:** श्रेष्ठ हत्तींमध्ये मी ऐरावत आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. ऐरावत देखिल सागर मंथनातून प्रकटलेल्या चौदा रत्नांपैकी एक आहे. हे इंद्राचे वाहन आहे. हाही अमर आहे. तात्पर्य हा की हत्तीसारख्या अद्भुत प्राण्याला बघून ईश्वराचे स्मरण व्हायला हवेय. गजेंद्र मोक्षाची कथा सुप्रसिध्द आहे. गजेंद्राला मगराने जखडून ठेवले तेव्हा खोलवर बुडणाऱ्या हत्तीने ईश्वराचे स्मरण केले. ईश्वर त्वरित धावत आले आणि गजेंद्राचा मोक्ष झाला.

3) **नराणां नराधिपम्:** नरांमध्ये मी राजा आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. प्राचीन काळी राजा-महाराजांना खूप प्रतिष्ठा होती कारण ते धर्मनिष्ठ होते. राजांना संत-महात्माजन मार्गदर्शन करत असत. राजेलोक योगाभ्यास देखिल करत असत. अशा राजांना राजर्षी म्हणण्याची पध्दत होती. अत्यंत धर्मनिष्ठ राजाच प्रजेचे कल्याण करु शकतात. आजच्या काळात राजांची अशी उच्च भूमिका उरलेली नाही. आता तर भारतात राजे-महाराजे यांची सद्दी संपलेलीच आहे. ते सारे आता सर्वसामान्य जन बनून गेले आहेत. आधी मात्र राजाला देवतांचा अंश मानले जायचे.

: 28 :

*आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।*
*प्रजनश्चास्मि कन्दर्प: सर्पाणामस्मि वासुकि: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आयुधानां अहं वज्रं:** मी शस्त्रात वज्र
- **धेनूनां कामधुक् अहं अस्मि:** गायींमध्ये मी कामधेनु आहे
- **प्रजन: कन्दर्प: अस्मि:** प्रजोत्पत्तीचा हेतु म्हणजे कारण असा कामदेव मी आहे
- **सर्पाणां अहं वासुकि:** अस्मि: सर्पांमध्ये मी सर्पराज वासुकी आहे

**अर्थ**

मी शस्त्रांमध्ये वज्र आणि गाईंमध्ये कामधेनु आहे, शास्त्रोक्त पध्दतीने प्रजोत्पत्तीचे कारण म्हणजे हेतु कामदेव मी आहेआणि सर्पांमध्ये वासुकी मी आहे.

*मी काम-धेनु गाईंत आयुधीं वज्र मी असें*
*उत्पत्ति-हेतु मी काम मी सर्पोत्तम वासुकि।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **आयुधानां अहं वज्रम्:** आयुधांमध्ये मी वज्र आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. दधीची ऋषींच्या अस्थींपासून वज्राची निर्मिती केली गेली होती. विनोबांच्या मते दधीची यांच्या अस्थींपासून तयार झालेले हे वज्र तपश्चर्या, त्याग आणि अहिंसेचे उपलक्षण आहे. हे इंद्राचे शस्त्र आहे. ज्ञानोबा म्हणतात जैसे वज्र कवच लइजे। मग सकल शस्त्रांचा वर्षावो साहिजे। जैतेसी उरिजे। अचुंवितां। म्हणजे ज्याप्रमाणे वज्राचे कवच परिधान केल्यावर शस्त्रांच्या कसल्याही प्रकारच्या वर्षावापुढे आपण अबाधित स्वरुपात विजयश्रीचे वरण करु शकतो तशाच प्रकारे निष्काम बुध्दीयोगाच्या साधनेने ऐहिक सुखांचा तर कदापि नाश होणार नाही उलट आपल्याला मोक्ष प्राप्ती अवश्य होईल.

2) **धेनूनां कामधुक् अस्मि:** दूध देणाऱ्या गाईंपैकी मी कामधेनु आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. कामधेनु म्हणजे पुरेसे दूध देणारी गाय. आजकाल युरोपात गोपालन फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. तिथे खूप दूध देणाऱ्या गाई आहेत. हिंदुस्तानात आपण त्या दिशेने प्रयत्न करतोहोत. अधिकात अधिक दूध देणाऱ्या गाईंच्या ठायी ईश्वर प्रकटतो असे मानायला हवे.

3) **प्रजन: कन्दर्प:** अस्मि प्रजेला उत्पन्न करणारा काम मी आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. स्त्री-पुरुषांच्या संयोगातून प्रजा उत्पन्न होते. अर्थात् प्रजोत्पत्ती होईल एवढ्याच प्रमाणातल्या कामाला ईश्वराने आपली विभूती मानली आहे हे ध्यानी घ्यायला हवे. शेष कामवासना अर्थात्च त्याज्य मानली जायला हवी.

4) **सर्पाणां वासुकि:** अहं अस्मि सर्पांच्या ठायी मी वासुकी आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. ईश्वर तर सर्वत्र व्याप्त आहेत यामुळे ते सर्पांमध्येही विभूती रुपाने वसतात. सर्पांचा राजा वासुकी आहे. पुराणात येणारे वासुकीचे वर्णन मनुष्य रुपात येते. वासुकी कश्यप मुनींच्या पत्नी कद्रुच्या उदरी जन्मला आहे. तो परोपकारी आणि पराक्रमी होता. पृथ्वी धारण करणाऱ्या सात सर्पांपैकी एक सर्प वासुकीसुध्दा आहे.

: 29 :

*अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम्।*
*पितृणामर्यमा चास्मि यम: संयमतामहम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **नागानां अहं अनन्त: अस्मि:** मी नागांमध्ये शेष नाग आहे (सर्प आणि नाग या दोन प्रकारच्या सर्पांच्याच जाती आहेत.)
- **यादसां अहं वरुण:** जलचरांत मी त्यांचा अधिपती वरुण देव आहे
- **च पितृणां अर्यमा अस्मि:** पितरांमध्ये मी अर्यमा नावाचा पित्रेश्वर आहे
- **अहं संयमतां यम:** नियमन, नियंत्रण म्हणजे शासन करणाऱ्यांमध्ये मी यम आहे

**अर्थ**

मी नागांमध्ये शेषनाग आणि जलचरांचा अधिपती वरुणदेव मी आहे अणि पितरांमध्ये अर्यमा नामक पितर आणि शासन करणाऱ्यांमध्ये साक्षात् यमराज मी आहे.

*नागांत शेष मी थोर जळीं वरुण-देवता*
*पितरीं अर्यमा तो मी ओढणारांत मी यम।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **नागानां अहं अनन्त:** अस्मि नागांमध्ये मी अनंत नाग आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. सर्प आणि नाग यात अंतर आहे. नाग प्राय: कमी प्रमाणात दिसतात. सर्पाला फणा नसतो, नागाला असतो. नाग अत्यंत विषारी असतो. नागांपैकी अनंत नावाची एखादी श्रेष्ठ जात असली पाहिजे. विष्णु हे शेषशायी आहेत. विष्णु नागावर निद्राधीन आहेत. अहिंसेची मूर्ती अशा ईश्वराला नाग दंश करु शकत नाही. कालिया नागाचे मर्दनही श्रीकृष्णानेच केले होते. कालिया हा वासुकीचा भाऊ होता. तो हजार फणांनी युक्त असा होता. भगवंताचा बिछाना

बनून मग त्याने ईश्वराची अपार सेवा केली. सुख प्रदान केले. नाग पंचमीचा सण श्रावणात येतो. आपल्या ‘नाग पंचमी’ नामक लेखात विनोबांनी लिहिले आहे की साप पावसाळ्यात आपल्या घरी पाहुणा म्हणून येतो आणि आपण त्याला मारतो. अहिंसेची शिकवण देण्यासाठीच शास्त्रकारांनी नाग पंचमीच्या सणाची योजना केली आहे.

2) **यादसां अहं वरुण:** जल देवतांपैकी मी वरुण आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. इथे जल देवतेचा उल्लेख केला आहे. जळाविणा का आपले जीवन असू शकते बरे ? नद्या, जलाशये सागर सारे सारेच खूप आवश्यक आहे. या जलाशयांमध्ये नानाविध जीवजंतु रहातात. वायु देवता, अग्नी देवता, आकाश देवता तशीच तर जळ देवता असते. जळ देवतांपैकी वरुण ही भगवंताची विभूती आहे. वरुण हे कश्यप मुनी आणि अदितीचे पुत्र आहेत. ते जळ आणि जळचरांचे स्वामी आहेत. यांनी सीतेच्या शुध्दीचे समर्थन केले होते. विशाखयुप नामक स्थानी त्यांनी तपाचरण केले होते. सरस्वती नदीच्या यमुना तीर्थात त्यांनी राजसूय यज्ञाचे आयोजन केले होते. ते लोकपालही आहेत. पाऊस, तलाव, नद्या, सागर यातील तमाम जलचरांना बघून ईश्वराचे स्मरण झाले पाहिजे. परमात्मभाव मनी उपजला पाहिजे.

3) **पितृणां अर्यमा अस्मि:** पितरांपैकी मी अर्यमा आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. हिंदू जन पितरांचे श्राध्द करतात. छांदोग्योपनिषदात वर्णन येते स यदि पितृलोककामो भवति संकल्पादेव अस्य पितर: समुत्तिष्ठन्ति। अर्थात् सिध्द पुरुषाने जर आपल्या पितरांच्या भेटीची कामना केली तर ते केवळ संकल्पमात्रेण आपल्या पितरांची भेट घेऊ शकतात. पुराणात सात पितरांचा उल्लेख येतो तो असा कव्यवाह, अनल, सोम, यम, अर्यमा, अग्निष्वात्ता, आणि बर्हिर्षद. यात अर्यमा प्रमुख आहेत. आपल्या जीवनावर माता-पिता व आजी-आजोबा यांचे अनंत उपकार आहेत. त्यांच्या स्मरणासाठी एक दिवस ठरवला गेला आहे. पितरांना परमात्मस्वरुपी जाणून त्यांच्या गुणाचे स्मरण करायला हवेय.

4) **अहं संयमतां यम:** संयमन म्हणजे नियमन-नियंत्रण करणाऱ्यांपैकी मी यम आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. यमराज हेच सर्वांच्या देहांना शांत करतात. यम म्हणजे मृत्युची देवता होय. या जगातील तमाम गोष्टी यमराजांच्याच अधीन आहेत. यमराजांची सत्ता ही सर्वांवर निरंकुश आणि अबाधित अशी असते. मरण म्हणजे यमाचे नित्य स्मरण करणारा वैराग्य प्राप्त करुन घेऊ शकतो. मरण ही सुध्दा ईश्वराची एक विभूती आहे कारण की मरण जर नसेल तर मग जीवन आणि जगाचा विकास खुंटून जाईल. मरण तर एक वरदानरुपच आहे.

: 30 :

***प्रह्लादश्चास्मि दैत्यानां काल: कलयतामहम् ।***
***मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दैत्यानां प्रह्लाद: अस्मि:** मी दैत्यांमध्ये प्रह्लाद आहे
- **कलयतां अहं काल:** गणना करणाऱ्यांमध्ये मी काळ म्हणजे समय म्हणजे क्षण, घडी, दिवस, पक्ष, मास इत्यादिंकांमध्ये जो समय आहे तो मी आहे.
- **च मृगाणां अहं मृगेन्द्र:** मी पशुंमध्ये सिंह आहे
- **च पक्षिणां वैनतेय:** आणि पक्ष्यांमध्ये मी गरुड आहे

**अर्थ**

मी दैत्यांमध्ये प्रह्लाद आणि गणना करणाऱ्यांमध्ये समय आहे तसेच पशुंमध्ये सिंह आणि पक्ष्यांमध्ये गरुड आहे.

***असें दैत्यांत प्रह्लाद मोजणारांत काळ मी***
***श्वापदांत असें सिंह पक्ष्यांत खग-राज मी ।***

**विषय:** या श्लोकात चार विभूती वर्णिल्या आहेत

**स्पष्टीकरण**

1) **दैत्यानां प्रह्लाद:** अस्मि दैत्य म्हणजे राक्षस कुळात मी प्रह्लाद आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. प्रह्लाद हा एक थोर भक्त होऊन गेला आहे. तो हिरण्यकश्यपु या राक्षसाचा पुत्र असून धर्मनिष्ठ आणि सत्यनिष्ठ होता. त्याची श्रेष्ठ अशी भक्ती तर जगजाहीरच आहे. रामनामाचे स्मरण न टाळल्यामुळे त्याला खूप सतावले गेले होते. त्याचा

कडेलोट झाला होता. तो निश्चयी वीर होता आणि त्याने आपल्या चित्तात दृढ असा भक्तीभाव जोपासला होता. तो सत्याग्रही होता.

2) **कलयतां अहं काल:** मोजदाद करणाऱ्यांमध्ये मी काळ आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. कालचक्र अविरत फिरत असते. मला जोवर पुत्र प्राप्ती नव्हती तोवर हा विषय भविष्यकाळातला होता. पुत्र जन्मानंतर हा विषय वर्तमानकाळाचा झाला. काही काळ तो अस्तित्वात राहिला मग त्याला मरण आले अशा प्रकारे तो भूतकाळाचा विषय बनला. या जगातील तमाम पदार्थांवर अशा प्रकारे काळाचा अप्रतिहत प्रभाव असतो. अखंड सत्ता असते. काळाप्रमाणे गणना करणारे असे दुसरे कुठलेही तत्त्व नाही. काळ गणना करत असतो आणि अंततोगत्वा वस्तुला गिळून टाकत असतो. उद्याकाय होणार आहे हे महापुरुषांनाही ठाऊक नसते. आपण मरणाच्या स्वाधीन केव्हा होणार आहोत याचेसुध्दा ज्ञान त्याना नसते. कालची घटना आज घटेल असे नाही आणि आजची घटना उद्या घटेल असेही काही सांगता येत नाही. सारे काही ईश्वराधीन आहे. ईश्वराचे प्रकट रुप असलेल्या काळाच्या स्वाधीन आहे हे खरे. यामुळे काळ हे ईश्वराचे स्वरुप होय. काळाच्या स्मरणाने वैराग्यभाव बळावतो.

3) **च मृगाणां अहं मृगेन्द्र:** पशु जगतात मी सिंह आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. सिंहाला वनाचा राजा मानले जाते. तो सर्वात अधिक शक्तीशाली आणि मोठा असतो. सिंहाची गर्जना भयंकर असते. या गर्जनेमुळे संपूर्ण जंगल थरारुन उठते. सिंह सर्वात अधिक क्रुर आणि हिंसक असूनही त्याच्या ठायी प्रेमभाव वसतो. तो खूप समजूतदार असतो. घायाळ असताना किंवा आजारीपणाच्या काळात कुणी त्याच्यावर उपकार केले असतील तर तो कदापि विसरत नाही. उपचार करणाऱ्यावर तो प्रीत करतो. सिंहाच्या विभूतीचे सुंदर वर्णन विनोबाजींनी गीता प्रवचनातून केले आहे.

4) **च पक्षिणां वैनतेय:** मी पक्ष्यांमध्ये गरुड आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. गरुडाला पक्ष्यांचा राजा मानले जाते. तो अत्यंत वेगवान असतो. भगवान विष्णुचे वाहन आहे. रामायणातून गरुडाच्या संदेह निवारणाची कथा येते. काकभुशुंडींनी गरुडाचा संशय दूर हटवला होता.

: 31 :

*पवन: पवतामस्मि राम: शस्त्रभृतामहम् ।*
*झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पवतां पवन: अस्मि:** मी पवित्र करणाऱ्यांमध्ये वायु आहे
- **शस्त्रभूतां अहं राम:** शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये मी राम आहे
- **झषाणां मकर: अस्मि:** जलचर जीवांमध्ये मी मगर आहे
- **स्रोतसां अहं जाह्नवी:** मी नद्यांमध्ये भागीरथी गंगा आहे

**अर्थ**

मी पवित्र करणाऱ्यांमध्ये वायु आणि शस्त्रधाऱ्यांमध्ये श्रीराम आहे, तसेच माशांत मगर आणि नद्यात श्री भागीरथी गंगा आहे.

*वेगवंतांत मी वायु शस्त्र-वीरांत राम मी*
*मत्स्यांत मी असें नक्र नदी गंगा नद्यांत मी ।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आलेले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **पवतां पवन:** अस्मि पवित्र करणाऱ्यांमध्ये मी वायु आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. पंचमहाभुतांमध्ये पहिले तत्त्व आहे आकाश आणि दुसरे तत्त्व आहे वायु. वायुत शब्द आणि स्पर्श हे दोन गुण आहेत. वायुच्या ठायी गतीदेखिल आहे. वायु जेव्हा शांत स्थितीत असतो तेव्हा काही त्याच्या गतीचा परिचय होत नाही पण तो एकदा का वेगाने वाहू लागला की मग धरतीवरल्या कुठल्याही वस्तुला उडवून लावण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते. वेगवान वस्तुंमध्ये सर्वात अधिक वेगवान वायु वाटतो. यामुळे विनोबाजींनी असा अर्थ केला की वेगवान वस्तुंमध्ये ईश्वर वायु रुपात वसतो. शंकराचार्य आणि गांधीजींनी अर्थ केला की पवित्र करणाऱ्या वस्तुंमध्ये ईश्वर वायु रुपात वसतो. हवेमुळे वस्तुची शुध्दी होते. जिथे नित्य हवा खेळती असते तिथे जंतुंचा प्रादुर्भाव होत नाही. श्वासाद्वारे आपण जो प्राणवायु

आत घेतो त्यामुळे रक्त शुध्द होते. श्वासाशिवाय आपण क्षणभरही राहू शकत नाही. जोवर वायु म्हणजे प्राणतत्त्व आहे तोवर माणसाचे जीवन असते. पुष्पांचा सुगंध सर्वत्र पसरविण्याचे कार्य वायु करतो.

2) **शस्त्रभृतां अहं राम:** शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये मी राम आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. गांधीजींनी रामाचा अर्थ परशुराम असा केला. विनोबा, शंकराचार्य आणि ज्ञानोबांनी मात्र राम शब्दाचा अर्थ दाशरथी राम असा केला. परशुराम शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये अद्वितीय होतेच होते. पुराणात वर्णन येते की त्यांनी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती. शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये रामदेखिल अद्वितीय होतेच. वाल्मीकिने सांगितले आहे रामो द्वि: (शरान्) नाभिसन्धत्ते। अर्थात् राम दोनदा बाणाचा वापर करत नाही अर्थात् एकदाच रामाचा बाण लक्ष्यवेध करतो. रामाचा नेम अचूक होता. ईश्वराने शस्त्र धारकांमध्ये रामाला आपली विभूती मानून असे दर्शवले आहे की धर्म, नीती आणि पावित्र्याच्या रक्षणार्थ हिंसेचा आश्रय घेणे क्षम्य आहे.

3) **झषाणां मकर:** अस्मि जलचरांमध्ये मी मगर आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. मासे, कासव यासारख्या जलचरांमध्ये मगर सर्वात बलवान आहे. गजेंद्राचा पाय मगरानेच तर धरला होता. मगराशी कुठलाही जलचर झुंजू शकत नाही.

4) **स्रोतसां अहं जाह्नवी अस्मि:** तमाम सरितांमध्ये मी गंगा आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. हिंदुसाठी गंगा तीर्थरुपच आहे. गंगेचे नाव जाणत नाही असा हिंदुस्तानात कोण बरे असेल? गंगाजळाला तीर्थ मानले जाते. वैद्यक शास्त्रात तर गंगेचे महात्म्य औषधासारखे आहे. औषधं जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरि:।

गंगाजळाचे औषधासारखे सेवन केल्यावर व्यक्ती रोगमुक्त होऊ शकते. असाध्य आजारासाठी वैद्य लोक सांगतात की आता गंगाजळ हेच औषध मानावे. आता काही उपचार करुन उपयोग नाही आता वैद्यही काही करु शकणार नाही. आता गंगाजळाचाच उपयोग करावा. स्वत: ईश्वर हेच वैद्य आहेत. गंगाजळ प्राशन करुन अंत समयी श्वास संपवणारा पवित्र होऊन मरेल असे मानले जाते. हिंदुस्तानच्या समस्त नद्यांच्या तुलनेने गंगा ही मोठी नदी आहे. गंगाजळाचे वैशिष्ट्य असे आहे की दीर्घकाळ राखून ठेवल्यावर देखिल त्यात जंतुंचा प्रादुर्भाव होत नाही. हिमालय ते बंगालच्या महासागरापर्यंत गंगा लाखो एकर जमीनीला 'सुजलाम सुफलाम' करते. भक्तांना प्रेरित करत गंगेचा प्रवाह अखंडपणे प्रवाहित आहे. अस्थी विजर्सन गंगेत व्हावे असे श्रध्दाळु हिंदुजनांना वाटते.

: 32 :

*सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन।*
*अध्यात्मविद्या विद्यानां वाद: प्रवदतामहम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन:** हे अर्जुना
- **अहं सर्गाणां आदि: च अंत:** च मध्यं एव: मी सृष्टीचा आदी, मध्य आणि अंत म्हणजे उत्पत्ती, स्थिती आणि लयही आहे
- **विद्यानां अहं अध्यात्मविद्या:** मी सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या म्हणजे ब्रह्मविद्या आहे
- **प्रवदतां अहं वाद:** परस्परात विवाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केला गेलेला वाद. वाद या प्रकरणात वाद, जल्प आणि वितंडा यांचा समावेश होतो.

**अर्थ**

हे अर्जुन, सृष्टीचा आदी, अंत तथा मध्यही मीच आहे. मी विद्यातील ब्रह्मविद्या आणि परस्पर वाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केला जाणारा वाद आहे.

***सृष्टीचें मी असें मूळ मुख मी ओघ तो हि मी***
***विद्यांत आत्म-विद्या मी वक्त्यांचा तत्त्व-वाद मी।***

**विषय:** या श्लोकात तीन विभूतींची चर्चा आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन अहं सर्गाणां आदि: च अन्त:** च मध्यं एव मी या सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. 20 व्या श्लोकातही हेच सांगितले आहे. ब्रह्मांडाचे मूळ कारण परमात्मा आहे असे वेदान्त मानतो.

2) **विद्यानां अहं अध्यात्मविद्या:** मी विद्यांमध्ये अध्यात्म विद्या आहे. विद्या अनेक आहेत. मुंडकोपनिषदात परा आणि अपरा विद्या यांचा उल्लेख येतो. अपरा विद्येच्या अंतर्गत इतिहास, भूगोल, गणित, भूमिती, विज्ञान, संगीत, चित्रकला, पाकशास्त्र यासारख्या तमाम विद्यांचा समावेश होतो. अपरा म्हणजे कनिष्ठ. या विद्यांच्या प्राप्तीमुळे ऐहिक सुख, कीर्ती आणि प्रतिष्ठेचा लाभ होऊ शकतो. परा म्हणजे श्रेष्ठ विद्या, सर्वोत्तम विद्या या विद्येला गीतेने अध्यात्म विद्या असे नाव दिले आहे. ही विद्या उपरोक्त सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ आणि भिन्न अशी आहे. अध्यात्म विद्या म्हणजे आत्मा-परमात्मा या तत्त्वांचा प्रत्यक्ष अनुभव करवुन देणारी विद्या होय.

3) **प्रवदतां अहं वाद:** वाद, जल्प, वितंडा या तिघांमध्ये मी वाद आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. योग्यायोग्यतेचा विचार न करता केवळ स्व पक्षाचे मंडन करण्यासाठी आणि दुसऱ्याच्या पक्षाचे खंडन करण्यासाठी केल्या जाणाऱ्या वादाला जल्प असे म्हणतात. स्वमत पक्षाचे मंडन करण्याची चिंता न करता केवळ दुसऱ्याच्या मताच्या खंडनाचाच हेतु ज्यात प्रमुख असतो त्याला वितंडा म्हणतात. केवळ तत्त्व निर्णय करण्याच्या दृष्टीने पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष करुन जी तत्त्वचर्चा केली जाते तो वाद होय. जल्प आणि वितंडाच्या माध्यमातून काही आपण सत्याप्रत पोहोचू शकत नाहीत. स्वमत प्रतिष्ठापना आणि दुसऱ्याच्या मताचे खंडन एवढाच याचा हेतु असतो. सत्याच्या शोधाची प्रक्रिया ही वादातून संभवू शकते. यामुळे ईश्वराने इथे वादाला स्वत:ची विभूती मानले आहे.

: 33 :

***अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्व: सामासिकस्य च।***
***अहमेवाक्षय: कालो धाताऽहं विश्वतोमुख: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अक्षराणां अकार: अस्मि:** मी अक्षरांमध्ये अकार आहे
- **च सामासिकस्य द्वंद्व:** आणि समासांमध्ये द्वंद्व समास आहे
- **अक्षय: काल: अहं एव:** अक्षय काळ अर्थात् काळाचाही महाकाळ मीच आहे
- **अहं विश्वतोमुख: धाता अस्मि:** विराट स्वरुप सर्वांचे धारण आणि पोषण करणाराही मीच आहे

**अर्थ**

मी अक्षरातील अकार आणि समासांपैकी द्वंद्व आहे. अक्षय काळ म्हणजेच काळाचाही महाकाळ तसेच सर्व बाजूंनी तोंडे असलेला विराट स्वरुप सर्वांचे धारण-पोषण करणाराही मीच आहे.

***समासांत असे द्वंद्व अक्षरांत अकार मी***
***मी चि अक्षय तो काळ विश्व-कर्ता विराट् स्वयें।***

**विषय:** या श्लोकात चार विभूती दर्शविल्या आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अक्षराणां अकार: अस्मि:** अक्षरांमध्ये मी 'अ' कार आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. आपला सर्व व्यहार हा वाणीच्या माध्यमातून चालतो. भाषा म्हणजे शब्दांचा समूह होय. शब्दांमध्ये असतात अक्षरे. अक्षरांचा आरंभ 'अ' पासून होतो. 'अ' हा प्रथम स्वर आहे. त्याचे महत्व थोर आहे. ओम शब्दातही अ उ आणि म अशी अक्षरे येतात. ओम शब्दाचे पहिले अक्षरही 'अ' हेच आहे. व्यंजनात 'अ' मिळाल्यावरच त्याला पूर्णता येते. उपनिषदात देखिल ब्रह्मस्वरुप वर्णन करताना शब्दांच्या पुढे 'अ' जोडले आहे. उदाहरणार्थ अस्थूलम्, अनणु, अह्रस्वम्, अदीर्घम्, अनाकाशम्, अवायुम्, अरसम्, अगंधम्, अचक्षुष्कम्, अश्रोत्रम् वगैरे. अशा प्रकारे या जगतात जे काही स्थूल वा सूक्ष्म पदार्थ आहेत त्या सर्वांसोबत 'अ' हे अक्षर जोडल्यावर ते ब्रह्म स्वरुपी होऊन जाते. त्या माध्यमातून ब्रह्म स्वरुपाचे ज्ञान होते. ब्रह्म स्वरुपाचा परिचय हा 'नेति नेति' या शब्दांच्या माध्यमातूनही करवून दिला जातो. हे नाही आणि ते नाही असा 'नेति' चा अर्थ आहे. हे निषेधात्मक ब्रह्म वर्णन सुध्दा सर्व पदार्थांच्या सोबत 'अ' अक्षर जोडून व्यक्त केले जाते. अशा प्रकारे 'अ' हे महत्वाचे अक्षर आहे.

2) **च सामासिकस्य द्वंद्व:** समासांमध्ये मी द्वंद्व समास आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. व्याकरणात चार समास

आहेत. अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीहि आणि द्वंद्व. कर्मधारय आणि द्विगु या समासांचा अंतर्भाव तत्पुरुष समासात होतो. समास हा दोन शब्दांचा असतो. दोन शब्दांमधल्या पहिल्याचा अर्थ मुख्य आणि दुसऱ्याचा अर्थ गौण असेल तर तो अव्ययीभाव समास होय. दोन शब्दांमधल्या पहिल्याचा अर्थ गौण आणि दुसऱ्याचा मुख्य असेल तर तो तत्पुरुष समास होय. बहुव्रीहि समासात दोन शब्दांहून वेगळ्याच अशा तिसऱ्या पदार्थाला मुख्यत्व प्रदान केलेले असते. तिसऱ्या शब्दाला लक्ष्य करुनच ते दोन शब्द एकत्र आलेले असतात. द्वंद्व समासात मुख्य आणि गौण असा काही अर्थभेद नसतो. दोघांचे अर्थ मुख्यच असतात. अशा प्रकारच्या साम्यदृष्टीमुळे द्वंद्व समासाला विभूती मानले गेले आहे.

3) **अक्षयः कालः** अहं एव अक्षय काळ मी आहे असे ईश्वराचे निवेदन आहे. तिसाव्या श्लोकात येते की 'कलयतां अहं कालः' आणि इथेही पुनश्च तोच विचार आला असे वरवर बघू जाता वाटण्याची शक्यता आहे पण दोघांमध्ये अंतर आहे. तिसाव्या श्लोकातला काळ हा प्रतिक्षणी परिवर्तित स्वरुपाचा आहे. भविष्यकाळातला क्षण वर्तमानात येणारा आहे आणि लगेचच तो भूतकाळात जाणारा आहे. अशा प्रकारे सजीव देहधारी माणूस, पशु, पक्षी, जीवजंतु कालग्रसित आहेत. यामुळे तिसाव्या श्लोकात गणना करणाऱ्यांमध्ये मी काळ आहे असे म्हटले गेले आहे. इथे अक्षय काळाचे वर्णन आहे. ब्रह्माप्रमाणेच काळ देखिल अनादी आहे. हा जो मूळ काळ आहे हा कालात्मा या नावाने देखिल ओळखला जातो हा ब्रह्मतत्त्वाप्रमाणे अक्षय रुपी आहे. हा काळ विश्वाशी संबध्द आहे. हाच काळ जेव्हा पृथ्वीच्या पदार्थांशी प्रतिक्षणी संबंध साधून असतो तेव्हा त्याला गणना करणारा काळ असे संबोधले जाते. पदार्थांशी संबंध ठेवणाऱ्या काळाच्या प्रत्येक क्षणाची गणना सुरु आहे. संपूर्ण ब्रह्मांडाशी संबंध राखून असलेल्या काळाला संपूर्ण ब्रह्मांडाला एकाच वेळी संपवायचे आहे. ब्रह्मांडात प्रलय स्थापित करावयाचा आहे. अर्थात् हे दोन काळ काही परस्परविरोधी नाहीत हे परस्परपूरक आहेत. एकाच काळाची ही दोन रुपे होत.

4) **अहं विश्वतोमुखः** धाता अस्मि या वचनाचे शंकराचार्यांनी दोन अर्थ केलेत. एक म्हणजे मी सर्व जगताच्या कर्मांना फळे देणारा आहे. दुसरा असा की मी सर्वतोमुख धाता म्हणजे धारणकर्ता आहे. पहिला मुद्दा असा आहे की जगतातल्या प्राण्यांच्या द्वारे जी कर्मे केली जाताहेत त्यांची फळे देणारा मी आहे. कर्माच्या अनुसार ईश्वर प्रत्येकाला फळे देतो. कर्म करणे हे जीवाच्या अधीन आहे पण फळ मात्र ईश्वराधीन गोष्ट आहे. फळ हे देश, काळ, निमित्त याच्या अनुकुलतेवर अवलंबून असते. यावर कुणाची सत्ता नाही. दुसरा मुद्दा असा की ईश्वर सर्वतोमुखी आहे याचा अर्थ असा की ईश्वर सर्वत्र पसरलेला आहे. ईश्वर सर्व ब्रह्मांडात व्याप्त आहे यामुळे तो सर्वांना धारण करुन आहे. ईश्वराची सर्वव्याप्ती आणि त्यामुळे त्याची सर्वांना धारण करुन रहाण्याची क्षमता याचा अनन्य संयोग आहे हा विचार या श्लोकाच्या माध्यमातून व्यक्त केला गेला आहे.

: 34 :

***मृत्युः सर्वहरश्चाहं उद्भवश्च भविष्यताम् ।***
***कीर्तिः श्रीर्वाक् च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं सर्वहरः मृत्युः** मी सर्वांचे हरण करणारा म्हणजे नाश करणारा मृत्यु आहे
- **च भविष्यतां उद्भवः** पुढे होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण म्हणजे उत्पत्ती स्थान आहे
- **च नारीणां:** तसेच स्त्रियांमध्ये नारीच्या शक्तींच्या मध्ये
- **कीर्तिः** कीर्ती म्हणजे कीर्ती वगैरे या सात देवांच्या स्त्रिया आणि स्त्रीवाचक नावे असणारे गुणही प्रसिध्दच आहेत म्हणून दोन्ही प्रकारांनीही भगवंताच्या विभूतीच आहेत.
- **श्रीः** श्री
- **वाक्:** वाणी
- **स्मृतिः मेधा धृतिः क्षमाः** स्मृती, मेधा, धैर्य आणि क्षमा मी आहे

**अर्थ**

सर्वांचा नाश करणारा मृत्यु आणि उत्पन्न होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण मी आहे. तसेच स्त्रियांमध्ये कीर्ती, लक्ष्मी, वाणी, स्मृती, मेधा, धैर्य आणि क्षमा मी आहे.

*सर्व-नाशक मी मृत्यु होणारा जन्म मी असें*
*वाणी श्री कीर्ति नारींत क्षमा मेधा धृति स्मृति ।*

**विषय:** या श्लोकात नऊ विभूतींचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं सर्वहरः मृत्युः** आपण सर्वांचे हरण करणारे म्हणजे नाश करणारे मरण आहोत असे ईश्वराचे निवेदन आहे. मरणाचे नित्य स्मरण असेल तर वैराग्य उपजू शकते. तमाम वस्तु नाशवान आहेत. हे मात्र काही नित्य स्मरणात रहात नाही. आपण जगतातील पदार्थांमध्ये, देह आणि नातलगांमध्ये आसक्त असतो. राग, द्वेष यासारखे विकार उत्पन्न होतात.

2) **च भविष्यतां उद्भवः** निर्माण होणाऱ्या वस्तुंचे आपण उत्पत्ती स्थान असल्याचे ईश्वराचे निवेदन आहे. बालकाच्या जन्मासोबत माता-पिता आणि इतर साऱ्यांनाच आनंद होतो. बालकाला निर्माण करणारा तर ईश्वर आहे. मातेच्या उदरात नऊ मास निवास करणाऱ्या गर्भाचे निर्माते तर ईश्वरच आहेत. कबीरदासजी एका भजनातून सांगतात की झीनी झीनी बिनी चदरिया साईको सीयत दस मास लागे, ठोंक ठोंक कर बीनी चदरिया.

ही देहरुपी चादर खूप सूक्ष्म आहे. तलम आहे. खूप कोमल आहे. या चादरीला तयार करण्यात ईश्वराला दहा महिन्यांचा काळ लागला आहे. बालक जेव्हा जन्माला येतो तेव्हा मात्र आपल्याला काही ईश्वराचे स्मरण होत नाही. बालकाला बघून आपल्याला अवश्य आनंदाचा लाभ होतो. ईश्वराला बघून तशा प्रकारचा आनंद लाभ होतो असे काही होत नाही. यामुळे इथे भगवंताचे निवेदन आहे की ते सर्वांचे उत्पत्ती स्थान आहेत. त्यांच्यामुळेच सर्वांची उत्पत्ती होते. सर्वांची म्हणजे सर्व जड आणि चेतनवंतांची. या विभूतीचा अर्थ असा आहे की आपण निर्माता आहोत असा गर्व माणसाला होऊ नये. सारे काही ईश्वर करतो असा भाव मनी वसला पाहिजे.

3) **च नारीणां कीर्तिः** नारी शक्तीच्या ठायी आपण कीर्ती असल्याचे ईश्वराचे निवेदन आहे. चांगल्या कर्मांमुळे कीर्ती पसरते. एखाद्या व्यक्तीच्या ठायी जेव्हा आपण असाधारण गुण वा शक्तीचे दर्शन करतो तेव्हा त्याची प्रशंसा केली जाते. हे योग्यच आहे कारण यामुळे सत्कर्म करण्याची प्रेरणा मिळते. सत्कर्मात रत पुरुष सत्कर्मात स्थिर होतो. यामुळे ज्याच्या ठायी जो गुण आहे त्या गुणाची पारख करुन, त्याचा मान वाढवून त्याची प्रशंसा करणे खूप गरजेचे आहे. महापुरुषांच्या ठायी नाना गुणांचा उत्कर्ष झालेला असतो. ते तर नाना गुणांचे भांडारच असतात. त्यांच्या गुणांना प्रशंसेची सुध्दा गरज नसते. प्रत्येक व्यक्ती महापुरुषांची स्तुती करते. सर्वसाधारण वाटणाऱ्या साध्या-सुध्या माणसांच्या ठायी सुध्दा काही सद्गुणही नांदतात. त्या गुणांना महत्व देऊन सामान्य जनांची योग्यता वाढवणे हे महत्वाचे कार्य आहे. कीर्ती हा स्त्रीलिंगी शब्द आहे. स्त्रीलिंगी गुण वा पदार्थ अनेक असतात. स्त्रीलिंगी गुण वा पदार्थांमध्ये कीर्ती ईश्वर आहे असा एक अर्थ झाला. विनोबाजींनी वेगळा अर्थ केला. ते म्हणतात की नराच्या शक्तीच्या ठायी मी कीर्ती आहे. श्लोकात नारी शब्द आहे कारण या श्लोकात आलेले कीर्ती वगैरे सारे सात शब्द स्त्रीलिंगीच आहेत पण ‘ नराणां ‘ या शब्दाचा अर्थ विनोबाजींनी नर शक्तींच्या ठायी असा केला. कीर्ती आदि ज्या सात शक्तींची-- विभूतींची चर्चा या श्लोकात आली हे सारे गुण नराच्या ठायी निहित आहेत. या सप्तशक्तींचे निरुपण करणारी विनोबांची ‘ सप्त शक्तियाँ ‘ या नावाची हिंदी पुस्तिका सर्व सेवा संघ प्रकाशनाद्वारा प्रकाशित झालेली आहे. ती प्रत्येकासाठी पठनीय आहे.

4) **श्रीः** लक्ष्मी म्हणजे संपत्ती. संपत्ती म्हणजे रुपये, धन दौलत असा एक अर्थ होतो. संपत्तीचा खरा अर्थ अनेक गुण असा होतो. मानवाच्या ठायी अनेक गुण असतात. ज्या पुरुषाच्या ठायी अनेक गुण असतात त्यांना श्रीमान असे म्हटले जाते. ज्याने निराडंबर असे साधे जीवन अनुभवले असेल. जो वैभवरहित असे जीवन जगला असेल. पुरुषार्थाने धनार्जन केले असेल. त्याच्या संपत्तीला ईश्वराची विभूती मानता येऊ शकेल. अशा प्रकारे प्राप्त करुन घेतलेल्या धनाचा उपयोग तो वैयक्तिक स्वार्थांसाठी वा भोगांसाठी करत नाही. हा विनियोग तो निश्चितपणे जनहितार्थच करेल. यामुळे अशा प्रकारे प्राप्त करुन घेतलेल्या धनाची गणना ईश्वराची विभूती म्हणून करायला काही हरकत नाही.

5) **वाक्:** वाक् म्हणजे वाणी. माणसाला ज्ञान प्राप्ती ही वाणीपासूनच होते. पवित्र आणि ज्ञानसंपन्न वाणीमुळेच समाजाला ज्ञानाचा लाभ होतो. त्याची उन्नती होते.

महापुरुष अनुभव संपन्न असतात. त्यांची वाणी ग्रंथ रुपाने प्रकट होते. या ग्रंथापासून लाखो लोक प्रेरणा मिळवतात. विश्वात वेळोवेळी असे महात्मे वा संत होऊन गेले आहेत. त्यांच्या रचनांनी कोट्यवधी जनांना प्रेरणा मिळाली आहे. ज्ञानलाभ झाला आहे. ज्ञानमय वाणी ही भगवंताची विभूती आहे.

6) **स्मृति:** स्मृती म्हणजे स्मरण. हा अद्भुत गुण आहे. पतंजलीच्या योगसूत्रात स्मृतीची व्याख्या अशी आढळते: 'अनुभूतविषयासंप्रमोष: स्मृति:' म्हणजे ज्या विषयाचा आपण आधी अनुभव घेतला आहे त्या अनुभवाचे त्याच स्वरुपात पुन: स्मरण होणे म्हणजे स्मृती होय. सारा व्यवहार स्मृतीवरच अवलंबून आहे. आपण जर पदार्थांना विसरुन गेलो तर मग कुठलाही व्यवहार आपण करुच शकणार नाहीत. स्मृतीमुळेच ज्ञान कायम टिकते. त्यात वृध्दी होत असते. अखेरीस आपल्याला आत्मस्मृती आणि परमात्मस्मृती पर्यंत पोहोचावयाचे आहे. आपण जर आत्मा वा परमात्म तत्त्वाचा अनुभव घेतला असेल ना तर मग त्या अनुभवाच्या आधारे आपण आपल्या जीवनात परमात्म स्मृतीची अखंड धारा प्रवहमान राखू शकतो. हेच जीवनाचे ध्येय असायला हवे. हाच जीवनाचा सारांश असायला हवा. एक श्लोक आहे

*विपदो नैव विपद: संपदो नैव संपद: ।*
*विपद् विस्मरणं विष्णो संपन्नारायणस्मृति: ॥*

याचा अर्थ असा की विपदा ही विपदाच नव्हे आणि संपदा ही संपदाच नव्हे. विष्णुचे अखंड विस्मरण हीच विपदा होय. विष्णुचे अखंड स्मरण हीच संपदा होय.

7) **मेधा:** मेधा म्हणजे तीव्र ग्रहण शक्ती. स्मृती बुध्दीशी संबंधित आहे त्याचप्रमाणे मेधाचा संबंध देखिल बुध्दीशीच आहे. स्मृती प्रमाणेच सर्वांची मेधा सुध्दा समान नाही. ज्यांची बुध्दी तीव्र असते त्यांची स्मरणशक्ती आणि ग्रहणशक्ती तीव्र असते. परमेश्वराला ग्रहण करण्यासाठी आपली स्मरणशक्ती तीव्र असायला हवी. इथे एक प्रश्न उपस्थित होतो. ज्यांची बुध्दी तीव्र स्वरुपाची नाही अशांची ग्रहणशक्ती देखिल तशीच तीव्र नसणार ती मंदच असणार. मग असे लोक का ईश्वराप्रत नाही पोहोचू शकणार ? याचे उत्तर असे की बुध्दी मंद असू देत. त्या प्रमाणात ग्रहणशक्ती क्षीण असू देत. अहंकार, काम, क्रोध वगैरे विकार ज्यांना क्षीण करता येतात. त्यांचे चित्त शुध्द होते. अशांची शुध्द बुध्दी ईश्वराला ग्रहण करु शकते. चित्ताची शुध्दता हा आपल्या अधीन असणारा विषय आहे. बुध्दीची तीव्रता वाढवून त्याची ग्रहणशक्ती वाढवणे हा काही आपल्या अधिकारातला विषय नाही.

8) **धृति:** धृती म्हणजे धैर्य. ही मानसिक वृत्ती आहे. खूप बुध्दीमान असूनही जर चित्त धैर्यशाली नसेल तर परीक्षेच्या वेळी माणुस गडबडून जाऊ शकतो. आपण ईश्वरस्वरुप जाणून घेतले असले तरी ईश्वर स्मरण काही अखंड स्वरुपात उरत नाही. खूप प्रयत्न करुन देखिल याकामी यश लाभत नाही. याचे कारण असे आहे की आपल्या ठायी धैर्य आणि धारणा शक्तीचा अभाव असतो. आपण जे काही जाणून घेतले आहे ते तत्काळ आचरणात आणायला हवेय पण असा अभ्यास खूप थोड्या लोकांचा असतो. ज्यांना बुध्दीचे ज्ञान अमलात आणण्याचा अभ्यास असतो ना अशा लोकांची धैर्य वृत्ती विकसित झालेली असते. त्यांची धारणाशक्ती वाढलेली असते.

9) **क्षमा:** क्षमा या संज्ञेची शंकराचार्यांनी खूप मार्मिक व्याख्या केली आहे. मनात काम विकार उत्पन्न न होणे, क्रोध, लोभ, अहंकार वगैरे नाना विकार मनात न जागणे ही स्थिती प्राप्त करुन घ्यावी लागते. अभ्यासाशिवाय अशी स्थिती जागू शकत नाही. व्यापक अशा निर्विकार स्वभावामुळे मनात कदापि क्रोधाची स्थितीच जागू नये असे झाले तर मग क्रोध संपला आणि क्षमा भाव जागला असे म्हणता येईल. क्रोध वृत्ती उपजतच रहाते. अभ्यासाने विवेकाला दृढपणे बळकट करुन घेता येते. क्रोध कदापि जागूच नये अशी स्थिती साधता येते. यामुळे क्षमावृत्ती साधता येते. असे मानता येईल. क्रोध जागेल आणि मग त्याला शांत करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील असे असेल तर क्षमाभाव जागला असे काही म्हणता येणार नाही. क्रोध जागला तर आपण त्याला आतल्या आत जिरवून टाकतो. क्षीण करुन टाकतो. बाहेर प्रकट होऊ देत नाही. याला शंकराचार्य अक्रोध असे म्हणतात. अक्रोध आणि क्षमा यात शंकराचार्य असा फरक करतात. मनाच्या ठायी क्रोध उपजूच न देणे ही झाली क्षमा पण मनात क्रोध उपजल्यावर त्याला आतल्या आत शांत करुन घेणे ही झाली अक्रोधाची स्थिती.

: 35 :

*बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।*
*मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **तथा साम्नां बृहत्साम:** सामांमध्ये म्हणजे गायन करावयाच्या श्रुतींमध्ये बृहत्साम नावाचे श्रेष्ठ गीत मी आहे
- **अहं छन्दसां गायत्री:** छंदांमध्ये मी गायत्री छंद आहे
- **मासानां मार्गशीर्ष: अहं:** महिन्यांमध्ये मी मार्गशीर्ष महिना आहे
- **ऋतुनां कुसुमाकर:** ऋतुंमध्ये मी वसंत ऋतु आहे

### अर्थ

तसेच गायन करण्याजोग्या वेदांमध्ये मी बृहत्साम आणि छंदांमध्ये गायत्री छंद आहे. त्याचप्रमाणे महिन्यांतील मार्गशीर्ष आणि ऋतुंमधील वसंत आहे.

*सामांत मी बृहत्-साम गायत्री मंत्र-सार मी*
*मी मार्गशीर्ष मासांत ऋतूंत फुलला ऋतु ।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे.

### स्पष्टीकरण

1) **तथा साम्नां बृहत्साम:** सामवेदात विशेष अशी गीते गाईली गेली आहेत. ही गीते भक्तीपर आहेत. यातले बृहत्साम हे श्रेष्ठ गीत म्हणजे भगवंताची विभूती असे भगवंताचे निवेदन आहे. या अध्यायातील बाविसाव्या श्लोकात भगवंताने वेदानां सामवेदोऽस्मि स्वत:ला चार वेदांमध्ये मी सामवेद आहे असे म्हटले आहे. ब्रह्म हे साऱ्या जगाचे मूळ आहे. हा शब्द बृहत् या धातुपासून बनला आहे. त्या ब्रह्याला लक्षात घेऊनच इथे बृहत् हा शब्द बृहत्साम या शब्दात आला आहे. बृहत्साम या शब्दात बृहत् आणि साम असे दोन शब्द आले आहेत. साम म्हणजे समान रुपाने स्थित झालेले. ब्रह्मांडातील तमाम पदार्थांच्या ठायी ब्रह्म नांदते. हे ब्रह्मरुप समान प्रकारे नांदते. त्याने गाईलेले जे गीत आहे ते बृहत्साम होय. या गीतातून ब्रह्मांडातील तमाम पदार्थांच्या ठायी समान रुपाने नांदणाऱ्या ब्रह्मतत्त्वाची स्तुती गाईली गेली आहे.

2) **अहं छंदसां गायत्री:** आपण छंदांमध्ये म्हणजे वृत्तांमध्ये गायत्री आहोत असे भगवंताचे निवेदन आहे. वेदातल्या ऋचा या नाना वृत्तांमध्ये ग्रथीत केलेल्या आहेत. यात गायत्री नावाचे वृत्त खूपच प्रसिध्द आहे. रोज संध्येत बोलला जाणारा मंत्रसुध्दा गायत्री मंत्र म्हणवला जातो. हा गायत्री मंत्र सूर्योपासनेशी संबध्द आहे. गायत्री मंत्र असा आहे :-

*ओम भूर्भुव: स्व: तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।*
*धियो यो न: प्रचोदयात् ।*

अर्थात: हे ईश्वरा! तू पृथ्वीच्या रुपाने आहेस. तू अग्नीरुपाने आहेस. तू अंतरीक्ष आहेस म्हणजे तू अंतरीक्ष रुपाने आहेस. तू वायुरुपाने आहेस. तू स्वर्ग आहेस. तू सूर्याच्या रुपाने वसतोस. सूर्यदेवतारुपी त्या ईश्वराच्या त्या अतिश्रेष्ठ अशा रुपाचे आम्ही ध्यान करत आहोत. आमच्या बुध्दीला, कर्मांना, त्या सूर्यदेवतेरुपी ईश्वराने नित्य सन्मार्गावर चालण्याची प्रेरणा द्यावी.

3) **मासानां मार्गशीर्ष:** अहं महिन्यांमध्ये मी मार्गशीर्ष आहे असे भगवंताचे निवेदन आहे. गीतेच्या काळात कालगणनेचा आरंभ मार्गशीर्ष महिन्यापासून होत असे. आजकाल हा आरंभ चैत्रापासून होतो. इंग्रजी कालगणनेचा विचार करु जाता आता मार्गशीर्ष महिना नोव्हेंबरमध्ये येतो. मार्गशीर्षातल्या एकादशीला भगवंताने अर्जुनाला गीता सांगितली अशी धारणा आहे.

4) **ऋतुनां कुसुमाकर:** ऋतुंमध्ये आपण वसंत ऋतु असल्याचे भगवंताचे निवेदन आहे. महिने बारा. या बारा महिन्यांचे ऋतु असे आहेत. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर हे सहा ऋतु. मार्च-एप्रिल महिन्यात वसंत ऋतु येतो. या महिन्यात वृक्षांना नव पालवी विलसते. संपूर्ण वृक्ष सजून दिसतो. उन्हाळ्यातच तर आम्रवृक्ष बहरतो. विविध पुष्पेही वसंतातच उमलतात. कोकिळ पक्ष्याचे मधुर कूजनही याच काळात ऐकायला मिळते. मार्च महिन्यात ना थंडी ना ऊन. वसंतात नाना वृक्ष बहरतात. फुला-फळांनी समृध्द होतात. कडक ऊनही नसते. यामुळे वसंताला भगवंताची विभूती मानले गेले आहे. वसंताला ऋतुराज असे म्हटले जाते. हा मोठा लोभस ऋतु असतो.

: 36 :

*द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।*
*जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **छलयतां द्यूतं अस्मिः** फसविणाऱ्यांमध्ये मी द्यूत आहे
- **तेजस्विनां तेजः** प्रभावशाली म्हणजे तेजस्वी पुरुषांचे तेज मी आहे.
- **जयः अस्मिः** मी जेत्यांचा विजय आहे
- **व्यवसायः अस्मिः** व्यवसाय करणाऱ्यांचा म्हणजे निश्चय करणाऱ्यांचा निश्चय म्हणजे व्यवसाय मी आहे
- **सत्त्ववतां सत्त्वं अस्मिः** सात्विक पुरुषांचा सात्विक भाव आहे.

**अर्थ**

मी कपट करणाऱ्यांतील जुगार आणि प्रभावशाली पुरुषांचा प्रभाव आहे. मी जिंकणाऱ्यांचा विजय आहे. निश्चयी लोकांचा निश्चय आणि सात्विक पुरुषांचा सात्विक भाव आहे.

*द्यूत मी छळणारांचें तेजस्व्यांतील तेज मी*
*सत्व मी सात्विकांतील जय मी आणि निश्चय ।*

**विषयः** या श्लोकात पाच विभूतींची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **छलयतां द्यूतं अस्मिः** फसवणारे, ठग, जुगारी जनांमध्ये मी द्यूत आहे. जुगार आहे. विनोबाजी म्हणतात की द्यूत खेळून दुसऱ्याचे धन हरण करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांचा नाश द्यूत खेळण्याच्या वृत्तीमुळेच होतो. जुगार हे सर्वनाशाचे कारण आहे असे ध्यानी आले ना तर मग माणूस या वाटेपासून परावृत्त होईल. जुगार खेळणाऱ्यांनाच यातून होणाऱ्या सर्वनाशाचा नेमका शोध लागलेला असतो. चुकीच्या मार्गाने चालल्यावर काय नुकसान होऊ शकते याचा शोध चुकीच्या मार्गाने चालल्याशिवाय ध्यानात येत नाही. काय अकल्याण होते हे कळणार नाही. काही लोकांना ठोकर खाल्ल्याशिवाय अक्कल येत नाही. ज्ञान मिळत नाही. या गोष्टीमुळेच जुगाराला भगवंताने विभूती असे म्हटले आहे. जुगार या शब्दाचा अर्थ जर आपण कूटनीती असा घेतला तर मग कूटनीतिज्ञ लोकांची आपण कुटनीती असल्याचे भगवंताचे म्हणणे आहे असे सांगता येईल. सत्याच्या मार्गावर चालताना लागणारी ठोकर म्हणजे जुगार असे म्हणता येईल. जुगाराला ठोकर लागण्याचे निमित्त मानता येईल.

2) **तेजस्विनां तेजः** तेजस्वी पुरुषांमधले आपण तेज आहोत असे भगवंताचे निवेदन आहे. सातव्या अध्यायातील दहाव्या श्लोकातही याच विभूतीची चर्चा आली आहे. तेजस्वी पुरुष म्हणजे ब्रह्मचर्य युक्त, वैराग्य संपन्न पुरुष होय. असा तेजस्वी पुरुष भगवंताचा अनुभव घेऊ शकतो. यामुळे गीतेच्या आठव्या अध्यायातील अकराव्या श्लोकात यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरंति असे म्हटले गेले. याच प्रमाणे तेराव्या अध्यायातील आठव्या श्लोकातही इंद्रियार्थेषु वैराग्यम् असे निवेदन येते. अर्थात् ज्यांच्या अंत:करणात इंद्रियांच्या बाबतीत वैराग्य भाव जागला आहे असे तेजस्वी पुरुष. जो अस्खलितपणे ब्रह्मचर्याचे पालन करतो आणि वैराग्ययुक्त असतो त्याच्या देहात एक वेगळे तेज विलसलेले दिसते. त्याचे शरीर दीप्तिमंत असते.

3) **जयः** अस्मि विजय प्राप्त करणाऱ्यांचा आपण विजय असल्याचे भगवंताचे निवेदन आहे. काही लोक जे काही काम करायला घेतील त्यात त्यांना यश हे हमखास मिळतेच मिळते. ते त्या कामाला सफळ करतात म्हणजे करतातच करतात. गांधीजींनी पत्करलेल्या प्रत्येक कामाला यश लाभले. प्रत्येक काम त्यांनी परिपूर्णतेने केले. गांधीजींनी अनेक कामांची रुजुवात केली. त्यांनी एकही काम अधूरे सोडले नाही. तमाम कामात त्यांना यश लाभले. अशा प्रकारे विजय ही भगवंताची विभूती आहे.

4) **व्यवसायः अस्मिः** निश्चय करणाऱ्यांचा निश्चय आपण असल्याचे भगवंताचे निवेदन आहे. दृढ निश्चय शक्तीमुळेच यश लाभते. सफळता मिळते. निश्चय करणे हा मनाचा गुण आहे. ज्यांना मनावर विजय संपादन करता आला ते निश्चयी जन होत. त्यांच्या ठायी निश्चय शक्ती विकसित होते. निश्चय शक्तीत वृध्दी करण्यासाठी बाळपणापासूनच पध्दतशीरपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. असे झाले तर मग निश्चय शक्तीत हमखास

वृध्दी होऊ शकते. यामुळे पालकांनी बालपणापासूनच मुलांचे लाड कोड न करता निश्चय शक्ती वाढवण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु ठेवले तर मोठेपणी मुलांना या गुणाचा लाभ होऊ शकतो. शाळा-शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून देखिल या दिशेने प्रयत्न करायला हवेत. निश्चय शक्ती ही सफळतेची गुरु किल्ली आहे.

5) **सत्त्ववतां सत्त्वं अस्मि:** सात्विक जनांच्या ठायी आपण सत्त्वगुण आहोत असे भगवंताचे निवेदन आहे. सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. चौदाव्या अध्यायात या त्रिगुणांचे वर्णन येते. तीन गुणांमध्ये सर्वश्रेष्ठ असा गुण म्हणजे सत्त्वगुण होय. परमात्म ज्ञानासाठी सुध्दा सत्त्वगुणाची आवश्यकता आहे. काही लोकांच्या ठायी बालपणापासूनच सत्त्वगुणाचा उत्कर्ष झालेला आढळून येतो. काहींची प्रकृती रजोगुणी असते. काहींच्या ठायी प्रबळपणे तमोगुण दिसून येतो. त्यांना सत्त्वगुणाच्या उत्कर्षासाठी खूप परिश्रम करावे लागतात. साधारणपणे सत्त्वगुणी जन संख्येने कमी असतात. अखंड सुखासाठी सत्त्वगुणांची परमावश्यकता असते. यामुळे दुसऱ्या अध्यायातील पंधराव्या श्लोकात अर्जुनाला नित्यसत्वस्थ: भव असे सांगितले गेले. सात्त्विक आहार, विहार, वचन, निद्रा, गुण म्हणजे दैवी गुणांचा उत्कर्ष होय. यासाठी सात्त्विक कर्मे आचरायला हवीत. सद्ग्रंथांचा स्वाध्याय करायला हवा. वाचन करायला हवे. नित्य सात्विक वातावरणात रहाण्याची धडपड करायला हवी. या तमाम गोष्टींचा समावेश ‘नित्य सत्वस्थ’ या शब्दात येतो. असे सात्त्विकपण ही भगवंताची विभूती होय.

: 37 :

*वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजय: ।*
*मुनीनामप्यहं व्यास: कवीनामुशना कवि: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **वृष्णीनां वासुदेव: अस्मि:** वृष्णी कुळात मी वासुदेव आहे. (यादवांच्या वंशामध्ये वृष्णी नावाचेही एक कूळ होते)
- **पांडवानां धनंजय:** पांडवांमध्ये मी धनंजय अर्थात् तू आहे
- **मुनीनां अपि अहं व्यास:** मुनींमध्ये मी व्यास आहे
- **कवीनां उशना कवि:** कवींमध्ये मी उशना म्हणजे शुक्राचार्य कवी आहे

**अर्थ**

वृष्णिवंशीयांमध्ये वासुदेव अर्थात् मी स्वत: तुझा मित्र, पांडवांमध्ये धनंजय म्हणजे तू, मुनींमध्ये वेदव्यास आणि कवींमध्ये शुक्राचार्य कवीही मीच आहे.

*मी वासुदेव वृष्णींत पांडवांत धनंजय*
*मुनींत मुनि मी व्यास कवींत उशना कवि ।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **वृष्णीनां वासुदेव: अस्मि:** वृष्णी कुळात मी वासुदेव आहे असे भगवंताचे निवेदन आहे. इथे विभूतींची चर्चा करत असताना भगवंतांनी साक्षात् आपले स्वत:चेच नाव घेतले आहे. यामुळे ते अहंकारी आहेत असे वाटण्याची शक्यता आहे पण वस्तुस्थिती तशी नाही. यात विशेष या गोष्टीचे आहे की भगवंतांनी आपणा स्वत:स कृष्णापासून वेगळे राखले आहे. भगवंताचे वैशिष्ट्य असे की ते देहापासून इतक्या मोठ्या प्रमाणावर अलिप्त होते की ते स्वत: वेगळे राहून ‘कृष्ण’ नामक व्यक्तीचे परीक्षण करु शकत होते. अर्जुनाला उपदेश करणाऱ्या कृष्णाचे परीक्षण त्यांनी स्वत: वेगळे राहून करुन दाखवलेले आहे. परीक्षण केल्यावर हे ध्यानी आले की अर्जुनाला उपदेश देणारी कृष्ण नावाची ही कुणी साधारण अशी व्यक्ती नाही. दुसऱ्याचे परीक्षण करुन ज्याप्रमाणे आपण त्याच्या गुण-दोषांना यथार्थपणे सांगू शकतो तसेच भगवंताने स्वत:स कृष्णापासून वेगळे राखून कृष्णाच्या योग्यतेला सिध्द केले आहे. हे सत्यनिष्ठेचे महात्म्य आहे. सत्यनिष्ठ जीवन असलेली व्यक्ती स्वत:ला वेगळे राखून परीक्षण करु शकते. ईश्वराने आपणास साधन म्हणून निवडले आहे असे गांधीजी म्हणत असत. याचा अर्थ असा की ईश्वर आपल्यामार्फत जनसेवा करुन घेऊ इच्छित आहे असे त्यांचे निवेदन होते. यामुळे लोकांना वाटणारे महान कार्य आपल्या हातून घडत आहे असे त्यांचे निवेदन होते. हे अहंकार शून्यतेचे लक्षण आहे. कृष्णाच्या ठायी निरहंकारितेचा परमोत्कर्ष होता यामुळेच

ते स्वत:ला वेगळे राखून असे सांगू शकले होते की स्वत: कृष्ण देखिल भगवंताची विभूती आहे असे मानण्यात काहीही अडचण नाही.

2) **पांडवानां धनंजय:** पांडवांमध्ये मी अर्जुन आहे असे भगवंताचे निवेदन आहे. इथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की भगवंतांनी तर पांडवांमध्ये मी धर्मराज आहे असे सांगायला हवे होते. याचे कारण स्पष्ट आहे की धर्मराज हेच ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होते. खरे तर पांडवांमध्ये अर्जुनाला विभूती मानण्याचे मुख्य कारण असे आहे की अर्जुन हा जिज्ञासू होता. अर्जुनाच्या जिज्ञासू स्वभावामुळेच तर भगवंताला गीता सांगण्याची प्रेरणा लाभली. इथे जिज्ञासू या नात्याने भगवंतांनी अर्जुनाच्या नावाचा उल्लेख केला आहे. पाच पांडवांमध्ये अर्जुन हाच आदर्श जिज्ञासू ठरला आहे. कौरवांच्या सम्मुख युध्दासाठी सारेच पांडव तर उभे ठाकले होते पण कर्तव्यविषयक मोह अन्य कुणालाही झाला नाही. इतरांनाही मोह तर झाला असेलच असेल पण मोह दूर करण्याची जिज्ञासा मात्र एकट्या अर्जुनाच्याच मनी जागली होती. ती तशी सर्वांच्या मनी जागलेली दिसून येत नाही. लोक बहुधा मोहात आसक्त असतात. अर्जुनाला मोहापासून मुक्त होण्याची प्रेरणा लाभली हे त्याच्या बाबतीतले विशेष सांगता येईल.

'अर्जुन' हा शब्द 'ऋज्' या धातूपासून बनला. ऋज् पासून ' ऋजुता ' हा शब्द बनला. ऋजुता म्हणजे सरळपणा होय. अर्जुनाच्या ठायी सरळपणा होता. याशिवाय तो धनुर्विद्येत प्रवीण होता. अशा प्रकारची विशेषता अंगी असल्यामुळे इथे अर्जुनालाच भगवंताने विभूती मानले आहे.

3) **मुनीनां अपि अहं व्यास:** मुनीवर्गात मी व्यास मुनी आहे असे भगवंताचे निवेदन आहे. 'मननात् मुनि:' जो मननशील असतो त्याला मुनी असे म्हणतात. यामुळे स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना दुसऱ्या अध्यायाच्या छप्पन्नाव्या श्लोकात 'स्थितधी: मुनि: उच्यते' असे म्हटले आहे. स्थितप्रज्ञाला मुनी ही संज्ञा दिली गेली आहे. व्यास महामुनी होते कारण की तेच तर महाभारताचे रचनाकार होते. महाभारतात गीता येते. श्रीकृष्णार्जुन संवाद तर महामुनी व्यासांनीच लिहिला. ब्रह्मसूत्राची रचना सुध्दा व्यासांनीच केली. व्यास महामुनींना व्यास महर्षी असेही म्हटले जाते. अठरा पुराणांचे रचनाकार देखिल व्यासच आहेत. व्यास महामुनींचा उल्लेख दहाव्या अध्यायातील तेराव्या श्लोकातही आहे.

4) **कविनां उशना कवि:** कवींच्या परिवारात मी उशना कवी आहे असे भगवंताचे निवेदन आहे. शंकराचार्यांनी कवीसाठी 'क्रांतदर्शी' याशब्दाचा प्रयोग केला. क्रांतदर्शी म्हणजे सर्वज्ञ होय. 'कवी' शब्दाचा प्रयोग ईश्वरासाठी केला गेला. परमात्मा हा सर्वज्ञ आहे. ज्यांना ईश्वरीय तत्त्वाची ओळख झालेली आहे त्यांनाही सर्वज्ञ म्हटले जाते.

विनोबाजींनी 'उशना' या शब्दाचा अर्थ 'उश्' या धातूपासून घेतला आहे. याचा अर्थ प्रेम करणे असा होतो. यामुळे भक्ती वा प्रेमाची गीते गाणारा आदर्श कवी ठरतो.

: 38 :

*दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।*
*मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दमयतां दम: अस्मि:** दमन करणाऱ्यांचा दंड अर्थात् दमन करण्याची शक्ती मी आहे
- **जिगीषतां नीति: अस्मि:** मी विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीती आहे
- **च गुह्यानां एव मौनं अस्मि:** गुह्य म्हणजे गुप्त ठेवायच्या भावांमध्ये मी मौन आहे
- **ज्ञानवतां ज्ञानं अस्मि:** ज्ञानवंतांचे तत्त्वज्ञानही मीच आहे

**अर्थ**

दमन करणाऱ्यांचा दमन म्हणजे दंड करण्याची शक्ती मी आहे. विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीती मी आहे. गुह्य ठेवण्यासारख्या भावांचा रक्षक मौन आणि ज्ञानवंतांचे तत्त्वज्ञान मीच आहे.

*दंड मी दमवंतांचा विजयेच्छूंस धर्म मी*
*गूढांत मौन मी थोर ज्ञात्यांचें ज्ञान मी असें ।*

**विषय:** या श्लोकात चार विभूतींचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **दमयतां दमः** अस्मि या श्लोकातून चार विभूतींची चर्चा आली आहे. दमन करणाऱ्यांमध्ये मी दमन म्हणजे इंद्रिय दमन आहे. ईश्वरी ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी इंद्रियांवर विजय मिळवण्याची आवश्यकता आहे. पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये, मन आणि बुध्दी यावर जोवर ताबा प्राप्त होत नाही तोवर ईश्वरी अनुभवाचा लाभ होत नसतो. यामुळे साधक असो वा मुमुक्षु जन इंद्रियांवर ताबा मिळवण्यासाठी इंद्रिय दमनाचा आधार घेत असतात. त्यांना ताब्यात राखण्यासाठी प्रयत्नशील असतात. दमन म्हणजे संयम होय. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ लक्षणांची चर्चा करत असताना इंद्रिय निग्रहाला म्हणजेच संयमाला मुख्य लक्षण वर्णिले गेले आहे. एकसष्ठाव्या श्लोकात इंद्रियांना ताब्यात राखण्यासाठी दोन उपायांची चर्चा केली गेली. परमात्म भक्ती आणि इंद्रियांद्वारा विषयांचे संयमयुक्त सेवन हे ते दोन उपाय होत. विषयोपभोग आणि विषयांचा संपूर्ण त्याग या दोघांच्या मधली ही भूमिका आहे. पूर्ण भोग असो वा पूर्ण त्याग असो यामुळे इंद्रियांवर संयम साधता येणार नाही. संयमाच्या अभ्यासासोबतच जर ईश्वर भक्ती नसेल तर मग विषयांच्या प्रती असलेले आकर्षण संपूर्णपणे सुटू शकणार नाही. अशा प्रकारे दोन मार्गाने इंद्रियांना ताब्यात राखणाऱ्या साधकांच्या ठायी आढळून येणारे इंद्रिय दमन ही ईश्वराची विभूती मानली गेली आहे.

2) **जिगीषतां नीतिः** अस्मि विजय प्राप्त करुन घेणाऱ्यांमध्ये मी नीती आहे असे भगवंताचे निवेदन आहे. विजय म्हणजे सफळता होय. कर्मात लाभणारी सफळता ही नीतीमुळे म्हणजे धर्मामुळे जशी लाभत असते तशी ती अनीती म्हणजे अधर्मामुळे देखिल प्राप्त होऊ शकते. अनीतीच्या मार्गाने कर्मात लाभणारी सफळता ही अनीती वा अधर्मरुपी असल्यामुळे तिला ईश्वराची विभूती नाही मानता येणार. कर्मात सफळता प्राप्त करुन घेण्यासाठी अगदी आरंभापासून अंतापर्यंत नीती म्हणजे धर्मपालनाचा वसा अखंडपणे पाळावा लागतो. नीती म्हणजे धर्म हीच ईश्वराची विभूती होय.

3) **गुह्यानां मौनं अस्मिः** गुह्य म्हणजे गुप्त. गूढ वस्तुंच्या ठायी मी मौन आहे असे भगवंताचे निवेदन आहे. शंकराचार्यांनी 'संयत वाक्' म्हणजे वाणीच्या संयमाची चर्चा केली आहे. मौन शब्दाचा अर्थ अगदी मुकेपणा नाही बोलण्यातील संयम हाच त्याचा खरा अर्थ आहे. चिंतनशील व्यक्तीचा बोलण्यावर ताबा असतो. गांधीजींच्या ठायी वाणीतला असा संयम फार मोठ्या प्रमाणात आढळतो. ते अगदी मोजक्या शब्दात आपले निवेदन करीत असत. साधकासाठी वाणीच्या संयमाची खूप आवश्यकता असते. मनात ईश्वराशी अखंड अनुसंधान राखण्यासाठी वाणीच्या संयमाची नितांत आवश्यकता असते. हे झाले बाह्य संयमाबाबत. मौन या शब्दाचा आंतरिक अर्थ आहे ईश्वराचे मनन करणे. मनन करणारे सहज मौनी असतात. बाराव्या अध्यायातल्या एकोणिसाव्या श्लोकातही भक्तांच्या लक्षणांची चर्चा करत असताना भक्तासाठी 'मौनी' या शब्दाचा प्रयोग केलेला दिसतो. तशाच प्रकारे सतराव्या अध्यायातील तेराव्या श्लोकात मानसिक तपात मौनाचा समावेश केलेला आढळतो.

4) **ज्ञानवतां ज्ञानं अस्मिः** मी ज्ञानवंतांचे ज्ञान आहे असे भगवंताचे निवेदन आहे. ब्रह्मज्ञान्याच्या ठायी ब्रह्मज्ञान प्रकट झालेले असते. ते बघू जाता ज्ञान म्हणजे काय? ज्ञान नेमके कशाला म्हणतात? याचा धडपणे प्रत्यय येतो. ब्रह्मज्ञानामुळे ब्रह्मतत्त्वाचा परिचय होतो. ब्रह्मतत्त्वाचा अनुभव प्राप्त झाल्यावर ब्रह्मज्ञानी पुरुषाच्या आयुष्यात ज्ञानाची लक्षणे प्रकट होऊ लागतात. भक्ताची लक्षणे बाराव्या अध्यायातील तेरा ते वीस अशा आठ श्लोकांमधून वर्णिली गेली आहे. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णन करताना पंचावन्न ते बहात्तर अशा अठरा श्लोकांची रचना केली गेली. ज्ञानाची ही लक्षणे तेराव्या अध्यायातील सात ते अकरा या पाच श्लोकांमधून वर्णिली गेलेली आहेत. चौदाव्या अध्यायातील त्रिगुणातीत पुरुषाची लक्षणे वर्णन करताना बावीस ते सहवीस अशा पाच श्लोकांचा आधार घेतला गेला. सोळाव्या अध्यायात दैवी पुरुषाची लक्षणे सांगताना आरंभिक तीन श्लोकांचा आधार घेतला गेला. ही सारीच ज्ञानाची लक्षणे होत. 'ज्ञान' शब्दात या तमाम लक्षणांचा समावेश होतो. अशा प्रकारच्या लक्षणांमधून प्रकट होणारे ब्रह्मज्ञान हे ईश्वराची विभूती मानले गेले आहे.

: 39 :

*यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन।*
*न तदस्ति यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन च:** आणि हे अर्जुना
- **यत् अपि सर्वभूतानां बीजं:** जे सर्व भूतांच्या उत्पत्तीचे बीज म्हणजे कारण आहे
- **तत् अहं:** ते मी आहे
- **चराचरं भूतं:** चर किंवा अचर जे काही पदार्थ आहेत ते
- **मया विना स्यात्:** माझ्या खेरीज होऊ शकतील (असे मानले तर)
- **तत् न अस्ति:** त्यांचे अस्तित्व नाही

**अर्थ**

आणि हे अर्जुना, जे सर्व भूतांच्या उत्पत्तीचे कारण तेही मीच आहे कारण माझ्याशिवाय असेल असे चराचरातील एकही भूत नाही.

*तसें चि सर्व भूतांचें बीज जें तें हि जाण मी।*

विषय: या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) हे अर्जुना, जे काही सर्व भूतांचे बीज म्हणजे कारण आहे ते मी आहे. 2) चर अचर पदार्थांचे माझ्याशिवाय अस्तित्त्व नाहीये.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन च यत् अपि सर्वभूतानाम् बीजं तत् अहम्:** या श्लोकात विभूतींचा समारोप केला गेला. आतापर्यंत अनेक विभूतींची चर्चा झाली. आता या श्लोकातून सांगितले गेले आहे की ईश्वर भक्तीसाठी भगवंतांनी येथवर नाना विभूतींची चर्चा केली आहे पण या विभूतींच्या सोबत हे चराचर जे जगत आहे त्याचे बीज म्हणजे कारण स्वत: भगवानच आहे. हे सारे चराचर ब्रह्मांड यात हालचाल करणारे तमाम जीव, पशु, पक्षी, मनुष्य यांच्या सोबतच वृक्ष, दगड यासारखी जड सृष्टी भगवंतापासूनच उत्पन्न झालेली आहे. यामुळे ईश्वरच या तमाम जीव आणि जड पदार्थांचे बीज कारण म्हणजे मूळ कारण आहे. जीव जसे अगणित आहेत तसेच जड पदार्थही असंख्य आहेत. हे तमाम जीव जरी एकमेकांपासून भिन्न-भिन्न वाटत असले तरी देखिल ते ईश्वरापासून भिन्न नाहीत. तशाच प्रकारे हे जड पदार्थ देखिल एकमेकांपासून जरी भिन्न-भिन्न वाटत असले तरी देखिल ते ईश्वरापासून भिन्न नाहीत. पाण्यात निर्माण होणारे बुडबुडे असोत वा लाटा वा उसळता फेस का असेना हे जरी एकमेकांपासून वेगळे वाटत असले तरी देखिल ते पाण्यापासून काही भिन्न नाहीत. तशाच प्रकारे ईश्वरच मूळ कारण आहे. यामुळेच तमाम पदार्थांचे बीजरुपी ईश्वर आहेत.

2) **चराचरं भूतं मया बिना स्यात् तत् न अस्ति:** चर आणि अचर म्हणजे चेतन आणि जड यासारखे जेवढे म्हणून पदार्थ अस्तित्वात आहेत त्यांचे अस्तित्व एक ईश्वरामुळेच आहे. ईश्वराशिवाय त्यांचे अस्तित्व संभवतच नाही.

सृष्टीमात्रातल्या अनंत जड चेतन अशा पदार्थांचे अस्तित्व ईश्वराशिवाय मानताच येत नाही. याचा अर्थ असा की ईश्वर जो चैतन्यमय आहे तोच जगाचे मूळ कारण आहे. अन्य तत्त्वचिंतकांनी जगताची भिन्न-भिन्न कारणे मानली आहेत. ते ध्यानी घेऊन भगवंताने हा निर्देश दिलेला आहे.

: 40 :

*नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप।*
*एष तूद्देशत: प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप:** हे अर्जुना
- **मम दिव्यानां विभूतीनां:** माझ्या दिव्य विभूतींचा
- **अंत: न अस्ति:** काही अंतच नाही
- **तु एष: विभूते: विस्तर:** यामुळे तुला हा विभूती विस्तार
- **मया उद्देशत: प्रोक्त:** मी तुला एकदेशी अर्थात् संक्षेपाने सांगितला

**अर्थ**

हे परंतपा, माझ्या दिव्य विभूतींचा अंत नाही हा विस्तार तर तुझ्यासाठी मी थोडक्यात सांगितला आहे.

*माझ्याविण नसें कांहीं लेश-मात्र चराचरीं*
*माझ्या दिव्य विभूतींस नसे अंत कुठें चि तो*
*तरी विभूति-विस्तार हा मी थोड्यांत बोलिलों।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) माझ्या दिव्य म्हणजे अलोकिक अशा विभूतींना ना अंत ना पार. 2) यामुळे मी या विभूतींची संक्षेपाने चर्चा केली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **परंतप मम दिव्यानां विभूतीनां अंत: न अस्ति:** ईश्वराच्या दिव्य म्हणजे अलौकिक अशा विभूतींचा अंत नाही. जगत एवढे विशाल आहे की त्याचे जेवढे वर्णन करावे तेवढे कमीच ठरेल. भक्तीच्या दृष्टीने आपल्या विशेष अशा विभूतींची चर्चा भगवंताने या अध्यायाच्या माध्यमातून केली. जीव सृष्टी असेल वा जड जगत असेल हे एवढे विशाल आणि वैविध्यपूर्ण आहे की त्याच्या कुठल्याही एका शाखेचा वा विभागाचा वा एका प्रकाराचे वर्णन परिपूर्णतेने करता येणे केवळ अशक्य असे आहे. कुणा एका व्यक्तीच्या जीवनाचेही समग्र वर्णन कुणाला करता येत नाही. यामुळे विभूती अनंत असल्याचे इथे म्हटले गेले.

2) **तु एष: विभूते: विस्तर:** मया उद्देशत: प्रोक्त: यामुळेच आपण या विभूतींचे वर्णन थोडक्यात केले असे भगवंतांचे म्हणणे आहे. विभूतींचा कुठला अंत वा पार नसल्यामुळे भगवंत असे म्हणतात की संक्षेपात वीस ते एकोणचाळीस अशा वीस श्लोकांच्या माध्यमातून एकूण सत्त्याहत्तर विभूतींचे हे वर्णन करण्यात आलेले आहे. जेवढे म्हणून पदार्थ अस्तित्वात आहेत त्यांची निर्मिती ही भगवंतापासून झाली असल्यामुळे हे तमाम पदार्थ विभूती आहेत असे सांगता येते. तमाम पदार्थांचे दर्शन करुन ज्या महात्म्याला ईश्वराचे स्मरण होते त्याच्यासाठी या जगातील तमाम पदार्थ हे ईश्वर रुपच आहेत. ईश्वराच्या विभूतीच आहेत. अकराव्या अध्यायात भगवंताने या विश्वरुपाचे दर्शन अर्जुनाला घडवले आहे. यासाठी दिव्य दृष्टीचे दान केले आहे पण ज्यांच्याकडे दिव्य दृष्टी नाही ते या जगातल्या पदार्थांना कशा प्रकारे बघतात हा मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर या अध्यायात प्रमुख विभूतींचे वर्णन करुन दिले गेले. दुर्जन वा व्यसनी व्यक्तींच्या ठायी देखिल भगवंताचा वास असतो. सज्जनपणा आणि दुर्जनपणा दोन्ही विशिष्ट अशा गोष्टी आहेत. यामुळे आपण या दोघांनाही विभूती मानू शकतो. सर्वसाधारण माणसात दुर्जनपणा दिसून येत नाही. तसेच सज्जनपणा देखिल सर्वच माणसांच्या ठायी विशेषत्वाने दिसून येत नाही. सर्व साधारण माणसात ज्याप्रमाणे विशेषत्वाने सद्गुण दिसत नाहीत तद्वतच दुर्गुण देखिल विशेषत्वाने दिसत नाहीत. अशा प्रकारे सज्जन आणि दुर्जन माणसे सर्व साधारण माणसांहून वेगळी असतात.

दुर्जन म्हणजे व्यभिचारी, व्यसनी, जुगारी व्यक्तीला बघून किंवा त्याच्याशी व्यवहार करताना मनात ईश्वर भाव कदापि उत्पन्न होणार नाही. कारण की दुर्जनपणा, व्यसन, जुगार, व्यभिचार यासारख्या वाईट बाबी समाजाच्या उन्नतीसाठी हानिकारक आहेत. अशा बाबींना बघून वा स्मरण करुन पावित्र्य निर्माण होणार नाही हे निश्चित. यामुळे दुर्जनाला तर ईश्वरी विभूती मानता येत नाही. महात्मा पुरुषांच्या मनी मात्र दुर्जनांना बघून किंवा त्यांच्याशी व्यवहार करतानासुध्दा भगवंताचे स्मरण होऊ शकते. महात्मा पुरुष असा विचार करतो की हा दुर्जन माणूस ईश्वराच्या अलौकिक अशा मायेच्या अधीन असल्यामुळे असा व्यवहार करत आहे. तमाम पदार्थांना जो ईश्वररुप मानतो तो महात्मा दुर्जनांना बघुन देखिल त्याच्या मनात ईश्वराचे स्मरण जागेल आणि महात्म्यांच्या संगतीत मग दुर्जनाचाही हृदय पालट होईल. यामुळे सर्व साधारण माणसाच्या अंत:करणात ईश्वराच्या विशेष अशा विभूतींचा आविष्कारच परमात्म भाव मनी उपजवण्यासाठी समर्थ आहे.

: 41 :

*यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा।*
*तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् यत् विभूतिमत् सत्वं:** जे जे काही विभूतीयुक्त अर्थात् ऐश्वर्ययुक्त पदार्थ असतील
- **श्रीमत् वा ऊर्जितं:** ते बाह्य गुणांनी युक्त असोत वा ज्ञान, वैराग्य वगैरेंनी युक्त असोत

- **तत् तत् एव:** ते सारे
- **त्वं मम तेजोंऽशसंभवं विध्दि:** माझ्या ज्ञानरुपी प्रकाश किरणांनी अर्थात् माझ्या तेजाच्या अंशानेच उत्पन्न झाले आहेत असे जाण

**अर्थ**

जी जी ऐश्वर्ययुक्त, कांतीयुक्त आणि शक्तीयुक्त वस्तु आहे ती ती तू माझ्या तेजाच्या अंशाचीच अभिव्यक्ती समज.

***विभूति-युक्त जी वस्तु लक्ष्मीवंत उदात्त वा***
***माझ्या चि किरणांतूनि निघाली जाण ती असे।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) जे विभूती संपन्न पदार्थ आहेत. 2) ते बाह्य गुणांनी युक्त असोत वा आंतरिक ज्ञान, वैराग्य वगैरे गुणांनी संपन्न असोत 3) ते सारे माझ्या ज्ञानरुपी प्रकाश किरणांनी उत्पन्न झाले आहेत असे समज.

**स्पष्टीकरण**

1) **यत् यत् विभूतिमत् सत्वम्:** जे विभूती संपन्न आहेत ते बाह्य गुणांनी युक्त किंवा आंतरिक गुणांनी युक्त म्हणजे ज्ञान, वैराग्य यासारख्या गुणांनी संपन्न असतील ते सारे माझ्या ज्ञानरुपी प्रकाश किरणांनी उत्पन्न झाले आहेत असे जाणावे असे भगवंताचे निवेदन आहे. एकोणचाळिसाव्या श्लोकात आपण स्वत:च तमाम पदार्थमात्रांचे बीजरुप असल्याचे निवेदन आले आहे. जगातील तमाम पदार्थ ईश्वरापासून उत्पन्न झाले आहेत. इथे असे सांगितले आहे की विशेष रुपाने उत्पन्न झालेले तमाम पदार्थ माझ्यामुळेच उत्पन्न झाले आहेत असे जाणावे. इथे एक प्रश्न असा उत्पन्न होतो की जर तमाम पदार्थ ईश्वरामुळेच उत्पन्न होत असतील तर मग इथे कुठल्या विशेष पदार्थांचा उल्लेख आहे ? आणि याचा काय बरे अर्थ ? या श्लोकातून हे विशेषत्वाने निवेदन आले आहे की ईश्वराची विशेष विभूतीमान वस्तु दिसली तर तिच्यातून ईश्वरी प्रकटीकरणाचा अर्थ घ्यावा. तमाम सामान्य पदार्थ ईश्वरामुळेच उत्पन्न झालेले आहेत यात कुठलीहीशंका नाही पण सामान्य वस्तु बघून ईश्वराचे स्मरण होईल किंवा ईश्वरी भाव मनी स्थिरावेल असे होण्याची शक्यता नाही यामुळे हे सांगितले आहे. एखादी विशिष्ट वस्तु बघितल्यावर मात्र ईश्वराचे स्मरण होऊन ईश्वरी भाव मनी स्थिरावेल हे सहज घडू शकते. यामुळे सत्त्याहत्तर विभूतींची चर्चा करण्यात आली आहे पण या विभूतींचा खरोखर अंतच नाही. त्यांची ओळख कशी बरे करुन घ्यावी याची चर्चा या श्लोकातून करण्यात आली आहे. विशिष्ट रुपाने प्रकट झालेल्या पदार्थांना माझीच विभूती जाण हे स्पष्ट करुन सांगण्यासाठी दुसरा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

2) **श्रीमत् वा ऊर्जितं:** विभूती संपन्न पदार्थ बाह्य गुणांनी संपन्न असो वा ज्ञान वैराग्य वगैरे आंतरिक गुणांनी समृध्द असो तो पदार्थ ईश्वरापासूनच निर्मित झाला आहे असे समजावे. विभूती संपन्न वस्तु म्हणजे विशेष गुणांनी युक्त अशी वस्तु होय. ही वस्तु बाह्य गुणांनी संपन्न असू शकते तर आंतरिक गुणांनीही समृध्द असू शकते. सृष्टीत जड आणि चेतन दोन्हीही प्रकारचे पदार्थ आहेत. जड पदार्थांमध्ये सुध्दा काही पदार्थ बाह्य गुणांनी संपन्न आहेत. काही पदार्थ आंतरिक गुणांनी समृध्द असे आहेत.

3) **तत् तत् एव त्वं मम तेजोंऽशसंभवं विध्दि:** हिमालय पर्वताचे बाह्य वैभव खूप आहे पण तिथे जाणाऱ्यांना तिथल्या हालअपेष्टांची कल्पना येते. गंगेची शोभा तर अवर्णनीय अशीच आहे, तिथल्या जळाला पावित्र्यही आहे पण गंगेत बुडून जाण्याची भीतीही आहेच आहे. चेतन सृष्टीतही काही बाह्य गुणांनी संपन्न असतात तर काही आंतरिक गुणांनी समृध्द असतात. काही लोक बाहेरुन खूप व्यवस्थित असतात. काही लोक बाहेरुन सेवाभावी असतात. काही पुरुष आंतरिक गुणांनी समृध्द असतात. त्यांच्या ठायी बाह्य गुणांचा तसा अभाव दिसतो पण आंतरिक निर्विकारता, ज्ञान, वैराग्य भाव, सत्यनिष्ठा, अहिंसा, ब्रह्मचर्य यासारख्या गुणांनी ते समृध्द असतात. गुलाब पुष्प आंतरिक आणि बाह्य अशा प्रकारे दोन्ही गुणांनी संपन्न असते. एखादे पुष्प खूप मोहक असते पण त्यात सुगंधाचा पत्ताच नसतो. सुगंध नसल्यामुळे अशा पुष्पांचा उपयोग देवळात देवपूजेसाठीही करता येत नसतो. अशा प्रकारे जड व चेतन सृष्टीत काही बाह्य गुणांनी शोभित आहेत तर काही आंतरिक गुणांनी समृध्द आहेत. काहींच्या ठायी दोन्ही प्रकारची संपदा असते.

ते सारे पदार्थ ईश्वराच्या ज्ञानरुपी किरणांनी उत्पन्न झालेले आहेत असे जाणावे. जे पदार्थ बाह्य वा आंतरिक

गुणानी संपन्न आहेत किंवा दोन्ही प्रकारच्या गुण संपदेने युक्त आहेत त्यांचे स्वतंत्रपणे अस्तित्व नाही. या सर्वांना ईश्वराचा आधार आहे. याचा अर्थ असा की एखादी वस्तु बाह्य गुणांनी संपन्न असेल तर ती ईश्वरामुळेच तशी असते. त्या बाह्य गुणांच्या निमित्ताने ईश्वराचेच प्रकटीकरण झालेले असते. एखादी वस्तु आंतरिक गुणांनी समृध्द असेल तर ती ईश्वरामुळेच तशी असते. ते आंतरिक गुण ईश्वराचेच प्रकटीकरण असते. ईश्वर प्रकाशाने संपन्न असल्यामुळे इथे किरण या संज्ञेचा प्रयोग केला गेला आहे. ईश्वराशिवाय कुठल्याही गोष्टीचे अस्तित्व नाही. तरी देखिल ईश्वर आणि त्याची माया असे दोन भाग कल्पिले जातात. माया ही ईश्वराची अलोकिक अशी शक्ती आहे पण ईश्वर जिथे प्रकट होतो तिथे गुण प्रकट होताना दिसतात. जिथे अवगुणांचे प्रकटीकरण दिसते तिथे माया प्रकटली आहे असे समजावे. मायेच्या अधीन असलेल्या पुरुषाच्या ठायी अवगुण प्रकटतात. माणूस जेव्हा ईश्वराधीन असतो तेव्हा गुणांचे प्रकटीकरण होते.

: 42 :

*अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन।*
*विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- अथवा अर्जुन: किंवा हे अर्जुना
- बहुना एतेन ज्ञातेन: खूप प्रकारे तू विभूतींच्या संदर्भात जाणून घे
- तव किं: तरी सुध्दा याचा तुला काय लाभ? तुला काय प्रयोजन बरे?
- अहं इदं कृत्स्नं जगत्: कारण की हे मी सारे जगत (आपल्या योगमायेच्या)
- एकांशेन विष्टभ्य: एका अंशमात्रेण धारण करुन
- स्थित: अस्मि: स्थित आहे

**अर्थ**

किंवा हे अर्जुना, हे फार फार जाणण्याचे तुला काय प्रयोजन आहे? मी या संपूर्ण जगाला आपल्या योग शक्तीच्या केवळ एका अंशाने धारण करुन राहिलो आहे.

*अथवा काय हें फार जाणूनि करिशील तूं*
*एकांशें विश्व हें सारें व्यापूनि उरलों चि मी।*

**विषय:** या श्लोकात दोन मुद्दे आलेत. 1) हे अर्जुना, या विभूतींच्या संदर्भात सारे काळजीपूर्वक जाणून घे पण याचा तुला अखेर काय उपयोग? 2) कारण की हे सारे जगत आपल्या एका अंशाने धारण करुन मी स्थित आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अथवा अर्जुन बहुना एतेन ज्ञातेन तव किम्:** या निवेदनातून भगवंत अर्जुनाला काही टोमणा मारत नाहीत. ते अर्जुनाला सावध करत आहेत. एक अर्थ असा की अर्जुनाने जर असे समजून घेतले की या अध्यायात वर्णित ज्या विभूती आहेत तेवढ्याच ईश्वरी विभूती आहेत तर त्याची फसगत होईल. त्याला उगाच असे वाटेल की ईश्वर येऊन जाऊन एवढाच तर व्यापक आहे पण असा विचार करणे चुकीचे होईल. ते तसे नाही. दुसरा अर्थ असा की ज्या विभूतींची चर्चा झाली म्हणजे जे काही सामान्य पदार्थ वाटतात तेही ईश्वरापासून उत्पन्न झाल्यामुळे विभूतींच्या गणनेत येतील पण साधक दशेत सामान्य वस्तुंचे दर्शन घडल्यावर ईश्वराचे स्मरण होऊन ईश्वरी भावाचे प्रकटीकरण होणे अवघड आहे. विशिष्ट वस्तु बघितल्यावर ईश्वराचे स्मरण होणे स्वाभाविक आहे पण सामान्य वस्तुंच्या बाबतीत असे नाही संभवणार. यामुळे विशेष वस्तुंचे वर्णन हे विभूती रुपात केले गेले आहे पण ईश्वर हा विशेष वस्तुंच्याच ठायी वसतो तो सामान्य वस्तुंमध्ये नसतो असे मात्र अजिबात नाही.

2) **अहं इदं कृत्स्नं जगत् एकांशेन विष्टभ्य स्थित:** अस्मि याचे कारण असे की भगवंत हे सारे विश्व आपल्या एका अंशाने धारण करुन अवस्थित आहे. याचा अर्थ असा की तो जेवढा म्हणून दिसतो आहे त्यापेक्षा कितीतरी पटींनी व्यापक असा आहे. छांदोग्योपनिषदात या संदर्भात एक श्लोक पुढीलप्रमाणे आढळतो.

*तावानस्य महिमा, ततो ज्यायांश्च पुरुष:।*
*पादोऽस्य सर्वा भूतानि, त्रिपादस्यामृतं दिवि*

अर्थात् हे जेवढे म्हणून जगत दिसते आहे तेवढे ईश्वराची महिमा आहे. ऐश्वर्य आहे पण ईश्वर याहून अधिक

व्यापक स्वरुपाचा आहे. आपल्याला जेवढी म्हणून सृष्टी दिसते आहे ती म्हणजे ईश्वराचे एक पाऊल होय. म्हणजे ती अंशमात्र आहे. आकाशात वसणारे जे अमृत आहे ते म्हणजे ईश्वराचे जे अमर, अविनाशी असे स्वरुप आहे ते या परमेश्वराचे तिसरे पाऊल होय.

जगत जेवढे काही प्रकट आहे दिसत आहे, विज्ञानाच्या विविध उपकरणांच्या माध्यमातून जेवढे म्हणून दिसत आहे तो आहे ईश्वराचा एक अंश. जे आपल्याला दिसत नाही, जे आपण बघू शकत नाहीहोत ते तीन पटींनी अधिक आहे.

• • • *दहावा अध्याय संपूर्ण* • • •



### अध्याय - अकरा

## विश्वरुप दर्शन योग

: 1 :

**अर्जुन उवाच**

*मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।*
*यत्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥*

**अर्थ आणि अन्वय**

- **मदनुग्रहाय:** माझ्यावर अनुग्रह करण्यासाठी
- **परमं गुह्यं:** अत्यंत गूढ असे
- **अध्यात्मसंज्ञितम्:** अध्यात्म विषयक म्हणजे अध्यात्म नामक
- **यत् वच:** जे वचन म्हणजे उपदेश
- **त्वया उक्तं:** आपण सांगितलेले
- **तेन मम अयं मोह:** विगत: त्यामुळे माझा हा मोह शिथिल झाला आहे म्हणजे माझे अज्ञान नाहीसे झाले आहे.

**अर्थ**

अर्जुन म्हणाला, माझ्यावर कृपा करण्यासाठी आपण जो अत्यंत गुप्त अध्यात्म विषयक उपदेश मला केला आहे त्याने माझे हे अज्ञान नाहीसे झाले.

**अर्जुन म्हणाला**

***करुनि करुणा माझी बोलिलास रहस्य जें***
***त्या थोर आत्म-विद्येनें माझा हा मोह फेडिला।***

**विषय:** या श्लोकात चार बाबींची चर्चा आली आहे. 1) मजवर अनुग्रह करण्यासाठी 2) अतिगूढ 3) जी आध्यात्मिक वचने तुम्ही ऐकवलीत 4) त्यामुळे माझा मोह शिथील झाला.

**स्पष्टीकरण**

1) **मदनुग्रहाय:** मजवर अनुग्रह करण्यासाठी हा मुद्दा महत्वाचा आहे. संतांकडून ज्याला अध्यात्म ज्ञान प्राप्त करुन घ्यावयाचे असेल त्याची भूमिका कशी असावी? या संदर्भात चौथ्या अध्यायातील चौतिसाव्या श्लोकात तीन बाबी नमूद केल्या गेल्या आहेत. नम्रता, सेवा आणि जिज्ञासापूर्वक प्रश्न विचारावे ही ती भूमिका होय. पुढे एकोणचाळिसाव्या श्लोकात आणखी तीन बाबींची चर्चा आली. श्रध्दा, संयम आणि अखंड जागृती. याचा अर्थ असा की नम्रता, सेवा, जिज्ञासा, श्रध्दा, संयम आणि अखंड जागृती या सहा बाबी आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी हव्यात. अर्जुनाच्या ठायी या सहा बाबी असल्यामुळे त्यावर भगवंताची कृपा झाली. दोन ते अकरा अशा दहा अध्यायांमधून भगवंताने परमात्म ज्ञानविषयक आपल्या अनुभवयुक्त वाणीचे बोधामृत पाजले. प्रत्येक अध्यायातून अर्जुनाने जिज्ञासापूर्वक प्रश्न विचारलेहेत. या प्रश्नांची उत्तरे भगवंतांनी पुनरुक्ती दोषाची चिंता न करता विस्तारपूर्वक दिलीत. यातून अर्जुनाचे समाधान होत गेले. दहाव्या अध्यायातील विभूतींच्या वर्णनामुळे त्याचे अंत:करण भरुन आले. यामुळेच या अध्यायाच्या आरंभीच त्याच्या मुखाने कृतज्ञता वचन प्रकट झालेय. अर्जुन म्हणत आहे की आपण मजवर खूप मोठी कृपा केली..

2) **परमं गुह्यम्:** भगवंताने अर्जुनाला परमात्म स्वरुपविषयक जे ज्ञान निरुपित केलेय त्यासंबंधी अर्जुन अतिगूढ या विशेषणाचा प्रयोग करत आहे. हे तत्त्वचिंतन अतिसूक्ष्म आहे. हे सर्वांनाच काही जाणून घेता येऊ शकत नाही. स्वत: भगवंतांनी सुध्दा पंधराव्या अध्यायातील विसाव्या श्लोकात सांगितले की इति गुह्यतमं शास्त्रं इदं उक्तं मया। त्यांनी अर्जुनाप्रत हे अतिगूढ असे शास्त्र मांडले आहे. त्याच श्लोकात पुढे म्हटले की हे गूढ शास्त्र श्रवण करुन अर्जुन कृतकृत्य आणि कृतार्थ होत विशुध्द बुध्दीचा होईल. पुन्हा अठराव्या अध्यायातील त्रेसष्ठाव्या श्लोकात म्हटले की इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद् गुह्यतरं मया। त्यांनी अर्जुनाप्रत हे गूढाहूनही गूढ असे ज्ञान प्रतिपादित केले आहे..

3) **अध्यात्मसंज्ञितं यत् वच:** त्वया उक्तम् अर्जुनाचे म्हणणे असे आहे की भगवंतांनी त्याप्रत अध्यात्म वचने ऐकवलीत. भगवंताने अर्जुनाला एथवर जो काही उपदेश केला तो सारा आत्मा, परमात्मा आणि ब्रह्मविषयकच आहे. आत्मा, परमात्मा आणि ब्रह्मविषयक आणि याच्याशी संबध्द बाबींच्या विषयीचे जे काही ज्ञान आहे त्या ज्ञानाला किंवा त्या विद्येला 'अध्यात्म' असे म्हणतात. दहाव्या अध्यायातील बत्तिसाव्या श्लोकात म्हटले की अध्यात्मविद्या विद्यानाम्। तमाम विद्यांमध्ये सर्वश्रेष्ठ अशी विद्या अध्यात्म विद्या होय. याचे कारण असे की ही विद्या संसार बंधनातून मुक्त करणारी आहे. भक्ती, वैराग्य, अनासक्ती आदि उपायांची चर्चा करणारी आहे.

4) **तेन मम अयं मोह: विगत:** या विद्येच्या श्रवणामुळे अर्जुनाचा मोह शिथिल झाला. दहाव्या अध्यायापर्यंत भगवंतांनी जो काही उपदेश केला त्याचा परिणाम असा झाला की अर्जुनाच्या चित्तावर छाया करुन असलेला मोह शिथिल होत गेला. अर्जुनाच्या चित्तावर अधिराज्य गाजवणारा मोह एवढा काही प्रबळ होता की सबंध आयुष्यभर अर्जुनाने ज्या कर्तव्य बुध्दीचे पालन केले होते त्या कर्तव्य आणि स्वधर्माचा सुध्दा त्याग करायला तो तयार होऊन गेला होता. हा मोह घालविण्यासाठी भगवंताने दुसऱ्या अध्यायाच्या अकराव्या श्लोकापासून उपदेश द्यायला आरंभ केला. दहावा अध्याय ऐकल्यावर अर्जुन असे म्हणाला की ज्या मोहाला दूर करण्यासाठी आपण दहाव्या अध्यायापर्यंत अनमोल असा उपदेश देत होता तो मोह अखेर शिथिल होत आहे. इथे मम मोह: विगत: आपला मोह शिथिल होत असल्याचे अर्जुन म्हणत आहे. मोह: नष्ट: असे नाही म्हणत. अर्जुनाचा संपूर्ण मोह नाश तर अठराव्या अध्यायाच्या अखेरीस होतो. विनोबाजी म्हणतात की दहाव्या अध्यायापर्यंतच्या उपदेश वाणीमुळे मोह नाशनाची प्रभात उजाडली आणि अठराव्या अध्यायाच्या श्रवणाने मोहनाशाचा सूर्योदय

झाला. दहाव्या अध्यायापर्यंतचा उपदेश श्रवण करुन मोहाचा जोर ओसरला. आता मन थोडे सावध झाले.

: 2 :

*भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया।*
*त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कमलपत्राक्षः** हे कमल नेत्रा
- **भूतानां भवाप्ययौः** भूतांची उत्पत्ती आणि प्रलय आपल्याकडून होते
- **त्वत्तः विस्तरशः श्रुतौः** हे मी आपल्या मुखाने विस्तारपूर्वक ऐकले आहे
- **च अव्ययं माहात्म्यं अपिः** तसेच आपला अविनाशी प्रभाव म्हणजे अखंड महिमाही ऐकला

**अर्थ**

कारण हे कमलनेत्रा, मी आपल्याकडून प्राण्यांची उत्पत्ती आणि प्रलय विस्तारपूर्वक ऐकले आहेत तसेच आपला अविनाशी प्रभावही मी ऐकला आहे.

*उत्पत्ति-नाश भूतांचे ऐकिले मीं सविस्तर*
*कळला तुजपासूनि अभंग महिमा तुझा।*

**विषयः** या श्लोकातून दोन गोष्टी आल्या आहेत. 1) हे कमलनेत्रा, भूतांची उत्पत्ती अणि प्रलय आपल्याकडूनच होतो हे मी आपल्या मुखानेच विस्तारपूर्वक ऐकले आहे आणि 2) आपला अखंड महिमा आणि श्रेष्ठताही ऐकली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **कमलपत्राक्ष भूतानां भवाप्ययौ त्वत्तः विस्तरशः** श्रुतौः अर्जुन म्हणतो की हे कमलनयना, भूतमात्रांची उत्पत्ती आणि प्रलय आपणच घडवून आणता हे त्याने स्वतःच भगवंताच्या मुखाने विस्तारपूर्वक ऐकलेले आहे. अर्जुन भगवंताला कमलनयन असे म्हणत आहे. नेत्रात परमात्म्याचे दर्शन होते. उपनिषदात विवेचन येते य एषः अक्षिणि पुरुषो दृश्यते म्हणजे हा पुरुष म्हणजे परमात्मा नेत्रात दिसतो. ज्या महापुरुषाने ईश्वराला जाणून घेतलेय त्याचा परिचय देखिल नेत्रामुळेच होऊ शकतो. भगवान कृष्णाचे नेत्र कमळासारखे होते. याचा अर्थ असा की ते परमज्ञानी असल्यामुळे कमलपत्राप्रमाणे अलिप्त असे होते. अर्जुन म्हणतो की भूतमात्रांची उत्पत्ती आणि प्रलय आपण करता. हा मुद्दा स्वतः भगवंतानेच दहाव्या अध्यायातून वारंवार समजावून सांगितला आहे.

2) **च अव्ययं माहात्म्यं अपिः** आणि भगवंताचे अखंड महात्म्यही अर्जुनाने ऐकले आहे. परमात्म्याचे माहात्म्य, अतिश्रेष्ठता कदापि खंडित वा क्षीण होत नाही. हेच तर परमात्म्याच्या महात्म्याचे मोठेपण आहे, श्रेष्ठपण आहे. आपणही श्रेष्ठपणा प्राप्त करुन घेतो, नाही असे नाही पण तो कायम स्वरुपाचा नसतो. ज्ञानी पुरुषाचा परमात्मा विषयक जो अनुभव आहे ना, तो कदापि क्षीण होत नाही पण त्यापाशी असलेला जो देह आहे, बुध्दी, इंद्रिये यासारखी जी साधने आहेत ना, ती मात्र बदलत जातात. त्यांच्यात मात्र फरक पडत जातो. याचा अर्थ असा नाही की ज्ञानवंतांची बुध्दी देखिल वृध्दापकाळी क्षीण न होता अगदी कायम स्वरुपी तशीच राहील, असे नाही होत काही. वृध्दपणी त्यांचीही बुध्दी क्षीण होईल. मन, बुध्दी या सारखी साधने क्षीण होतीलच. या धरणीवर अनंत पदार्थ उत्पन्न होत असतात तरी देखिल पदार्थांना निर्माण करण्याची ईश्वरी शक्ती मात्र कदापि क्षीण होत नाही. भगवंताचे ज्ञान आणि त्याची क्षमता अखंड असते. यामुळेच त्याचा जगतरुपी आविष्कार हा स्थायी स्वरुपाचा असतो. परमात्म्याच्या या अलौकिकतेचे वर्णन दहाव्या अध्यायात पदोपदी आढळते. त्याचाच हवाला या श्लोकातून अर्जुनाने दिला आहे..

: 3 :

*एतमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर।*
*द्रष्टुमिच्छामि ते रुपमैश्वरं पुरुषोत्तम॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परमेश्वरः** हे परमेश्वरा
- **त्वं आत्मानं यथा आत्थः** आपण आपल्या विषयी जसे सांगताहात

- **एवं एतत्:** तसेच आहात
- **पुरुषोत्तम:** हे पुरुषोत्तमा
- **ते ऐश्वरं रुपं:** आपले ऐश्वर्य, शक्ती, बल, वीर्य आणि तेजयुक्त ईश्वरी रुप
- **द्रष्टुं इच्छामि:** रुप प्रत्यक्ष बघण्याची मला इच्छा आहे, मी बघू इच्छितो

**अर्थ**

हे परमेश्वरा आपण आपल्या विषयी जसे सांगत आहात, ते बरोबर तसेच आहे. हे पुरुषोत्तमा, आपले ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बळ, वीर्य आणि तेजयुक्त ईश्वरी रुप मला प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा आहे.

***तुझें तें ईश्वरी रुप मानितों सांगसी जसें***
***तें चि मी इच्छितों पाहूं प्रत्यक्ष पुरुषोत्तमा ।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी सांगितलेल्या आहेत 1) हे श्रेष्ठ ईश्वरा, आपण आपल्याविषयी जसे सांगत आहात तसेच आपले रुप आहे. 2) हे पुरुष श्रेष्ठा, आपले ते ईश्वरीय रुप मी पाहू इच्छितो.

**स्पष्टीकरण**

1) **परमेश्वर त्वं आत्मानं यथा आत्थ एवं एतत्:** हे श्रेष्ठ ईश्वरा, तू आपल्या रुपाचा जसा परिचय करुन दिला आहेस तसेच तुझे रुप आहे. याचा अर्थ असा की सारे जग तुझ्यापासूनच निर्माण झालेले आहे. तुझ्या आधारानेच ते अस्तित्वात असते. प्रलय काळातही तुझ्या ठायीच विलीन होऊन जाते. हे तू जे दहाव्या अध्यायात निरुपित केले होतेस ते आता माझ्या लक्षात आले आहे. त्या बाबतीत आता माझ्या मनी कुठलीही शंका उरलेली नाही. हा मुद्दा देवाने काही तर्काने मांडलेला नाही. ज्यांनी ईश्वराच्या स्वरुपाचा अनुभव घेतलेला आहे अशा लोकांच्या अनुभवावर हा मुद्दा आधारित आहे. वस्तुस्थितीला सिध्द करण्यासाठी काही देवाने तर्काची मदत घेतलेली नाही. श्रध्दापूर्वक हे स्वीकारावे असे सांगितलेले आहे. खुद्द ईश्वरच उपदेश देण्यासाठी उपलब्ध झालेत हे अर्जुनाचे भाग्य आहे. यामुळे अर्जुनाने श्रध्दापूर्वक सारा उपदेश ग्रहण केला त्याच्या मनी कुठलीही शंका उरली नाही.

2) **पुरुषोत्तम ते ऐश्वरं रुपं द्रष्टुं इच्छामि:** हे पुरुष श्रेष्ठा मी तुझे ईश्वरी रुप बघू इच्छितो. परमेश्वर सर्वांच्या मनात सत्, चित्, आनंद रुपाने विद्यमान आहे. त्याच्या दर्शनाची जिज्ञासा काही अर्जुनाने प्रकट केलेली नाही परंतु बाहेर ब्रह्मांडात सर्वत्र जे काही अंतर आणि जडत्व दिसत आहे त्याच्या तळाशीही एक परमात्म तत्त्व वसलेले आहे. त्याच्या दर्शनाची इच्छा अर्जुनाच्या मनात जागणे स्वाभाविक आहे. एखाद्या गोष्टीला बघितल्यावर आपल्या मनात सहजी दोन प्रकारच्या जिज्ञासा उत्पन्न होतात. एक तर याचा जनक कोण? आणि याच्या निर्मितीची प्रक्रिया काय? हा मानवी स्वभाव आहे. यामुळे नर रुपधारी अर्जुनाच्या मनी ब्रह्मांडात व्याप्त ईश्वराच्या दर्शनाची इच्छा उपजली.

: 4 :

***मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।***
***योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रभो:** हे प्रभो,
- **यदि मया तत् द्रष्टुं शक्यं:** मी ते आपले रुप पाहणे शक्य असेल.
- **इति मन्यसे:** असे जर आपल्याला वाटत असेल तर
- **तत् योगेश्वर:** तर हे योग्यांच्या ईश्वरा
- **त्वं मे आत्मानं:** आपण मला ते आपले
- **अव्ययं दर्शय:** अविनाशी स्वरुप दाखवा

**अर्थ**

हे प्रभो, (उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय करणारा तसेच अंतर्यामी रुपाने शास्ता असल्यामुळे भगवंताचे नाव प्रभू आहे.) जर मला आपलेते रुप पाहता येईल, असे आपणास वाटत असेल तर हे योगेश्वरा, त्या अविनाशी रुपाचे दर्शन मला घडवा.

***तूं जरी मानिसी शक्य मज तें रुप पाहणें***
***तरी योगेश्वरा देववा दाखवीं तें चि शाश्वत ।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत 1) हे प्रभो, जर मला आपलेते रुप पाहता येईल, असे आपणास वाटत असेल म्हणजे माझी तशी योग्यता आहे असे जर आपणास वाटत असेल 2) तर हे योगेश्वरा, त्या अविनाशी रुपाचे दर्शन मला घडवा.

**स्पष्टीकरण**

1) **प्रभो यदि मया तत् द्रष्टुं शक्यं इति मन्यसे:** हे ईश्वरा त्या स्वरुपाचे दर्शन करणे मला जर शक्य असेल असे आपल्याला वाटत असेल (तर पुढचे बोलतो.) इथे अर्जुनाच्या ठायी विनम्रता दिसून येते. अशी विनम्रता साधक वा मुमुक्षुच्या ठायी वसते. ब्रह्मांडात व्याप्त असलेल्या परमेश्वराच्या दर्शनाला (विश्वरुप दर्शन) असे म्हटले गेले आहे. अर्जुनाने स्वत:च ही इच्छा प्रकट केली आहे की त्याला हे दर्शन त्याच्या वर्तमान अज्ञानी स्थितीतच हवे आहे. दहा अध्यायांचे श्रवण करुन अर्जुन काही ज्ञानी बनला नाही. अर्जुनाला या गोष्टीचे भान होते की ज्ञानी बनल्यावर तर विश्वरुप दर्शन आपोआपच होऊन गेले असते. यामुळे विनम्र भावे अर्जुन म्हणतो की अज्ञानी दशा असताना देखिल माझ्या मनात विश्वरुप दर्शन करण्याची इच्छा उपजत आहे. यामुळे 'हे दर्शन करण्याची माझी योग्यता आहे असे जर आपल्याला वाटत असेल तर मला दर्शन घडवावे.' असे अर्जुन म्हणतो.

2) **तत् योगेश्वर त्वं मे आत्मानं अव्ययं दर्शय:** तर मग हे योगेश्वरा, मला आपले अविनाशी रुप दाखवा. सगुण आणि निर्गुण अशी ईश्वराची दोन रुपे होत. सगुणाचेही दोन प्रकार आहेत एक सगुण देहधारी म्हणजे मंदिरांमधून असलेल्या राम आणि कृष्ण यासारख्या देवतांच्या मूर्त्या. दुसरे सगुण रुप धरतीवरल्या विशिष्ट पदार्थांमध्ये दिसते. उदाहरणार्थ सूर्य, चंद्र, अग्नी, समुद्र, सरिता, हिमालय, विशिष्ट वृक्ष वगैरे. शास्त्रांमधून यांच्या उपासनेचे विविध प्रकार वर्णिलेले आहेत. दहाव्या अध्यायात भगवंताने सगुण देहधारी आणि सगुण-साकार विभूतींचे वर्णन केलेले आहे पण ईश्वर केवळ या सगुण देहधारी आणि सगुण-साकार विभूतींच्याच ठायी वसतो असे मात्र नव्हे. तो तर तमाम पदार्थमात्रात आहे. नांदतो. त्याचेच दर्शन करायची इच्छा अर्जुनाच्या मनात जागली आहे. सर्व पदार्थांच्या ठायी विद्यमान असलेला परमात्मा निर्गुण-निराकार रुपी आहे. अर्जुनाला सगुण देहधारी आणि सगुण-साकार परमात्म्याचे ज्ञान झालेले होते. यानंतर ब्रह्मांडात व्याप्त परमात्म्याच्या दर्शनाची इच्छा अर्जुनाच्या मनात जागणे स्वाभाविक आहे.

: 5 :

**श्री भगवान उवाच**

***पश्य मे पार्थ रुपाणि शतशोऽथ सहस्रश: ।***
***नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **मे नानाविधानि:** माझ्या नाना प्रकारच्या
- **दिव्यानि:** दिव्य
- **च नानावर्णाकृतीनि:** आणि नाना वर्णांनी आणि नाना आकारांनी युक्त
- **रुपाणि शतश:** अथ सहस्रश: शेकडो, हजारो प्रकारची रुपे
- **पश्य:** बघ

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले, हे पार्था, आता तू माझी शेकडो-हजारो नाना प्रकारची, नाना रंगांची आणि नाना आकारांची अलौकिक रुपे पहा.

**श्री भगवान म्हणाले**

***पहा दिव्य तशीं माझीं रुपें शत-सहस्र तूं***
***नाना प्रकार आकार वर्ण ज्यांत विचित्र चि।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) माझी नाना प्रकारची दिव्य 2) नाना वर्ण आणि आकारांनी युक्त 3) शेकडो-हजारो प्रकारची रुपे बघ.

**स्पष्टीकरण**

1) **पार्थ मे नानाविधानि दिव्यानि:** हे अर्जुना माझे विविध प्रकारचे दिव्य रुप बघ. भगवान आता अर्जुनाला विश्वरुप दर्शन घडवताहेत. या अध्यायात विश्वमय रुपाचे

मोठे काव्यात्म वर्णन येते. ईश्वर अखिल ब्रह्मांडात व्याप्त आहे. यामुळे दृष्टोत्पत्तीस येणारे सर्व पदार्थ दिव्य म्हणजे अलौकिक जाणायला हवेत पण प्रत्येक व्यक्तीला सामान्य पदार्थांच्या ठायी काही अलौकिक वा दिव्य तत्त्वाचे दर्शन घडत नाही. यामुळे सामान्य व विशेष असे पदार्थांचे दोन प्रकार झाले. अन्यथा सारेच पदार्थ विशिष्ट वाटायला हवेत. तमाम पदार्थांच्या ठायी पांच महाभूते विशिष्ट रुपात आणि सामान्य पदार्थात जे सामान्य रुपात वसलेले असतात असे काही नसते. सारे पदार्थ समान असतात तरी काही सामान्य व काही विशिष्ट किंवा उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ मानले जातात. पदार्थांच्या बाबतीत उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ वा सामान्य, विशिष्ट मानून व्यवहार करण्यात काहीदोष नाही. उलट असे मानूनच व्यवहार केला जायला हवा पण ज्ञानदृष्टी असे म्हणते की प्रत्येक पदार्थाला परमात्म दृष्टीने बघितले जायला हवे. या स्थितीचा अनुभव ज्ञानदृष्टी प्राप्त झाल्यावर येऊ शकतो. यामुळे भगवंत आधी असे निवेदन करत आहेत की नाना प्रकारचे पदार्थ दिसत असले तरी सारे परमात्म संपन्न असल्यामुळे दिव्य आहेत असे समजायला हवे.

2) **च नानावर्णाकृतीनि:** आणि पदार्थ नाना आकारांचे आणि विविध वर्णांचे. सारे पदार्थ पंचमहाभूतांनी उत्पन्न होतात तरीही सर्व पदार्थांचे सामान्य व विशिष्ट वा उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे भेद केले जातात. रुप आणि आकार यामुळे असे भेद केले जातात. रुप आणि आकारात फरक असल्यामुळे असे भेद होतात.

3) **रुपाणि शतश: अथ सहस्रश:** पश्य रुपाच्या ठायी नाना प्रकारचे रंग नांदतात. तसे पाहू गेल्यास निळा काय आणि पिवळा काय, काळा काय आणि पांढरा काय सारेच रंग रंगाच्या दृष्टीने समान आहेत. तरी आपण कधी पांढरा तर कधी काळा रंग चाहतो. हा आवडीतला फरक आहे. आकाराच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. स्त्री आणि पुरुषाच्या देहात काही विशेष फरक नसतो, रुप आणि आकाराचा फरक असतो पण आपण पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांच्या ठायी अधिक सौदर्यांची कल्पना करुन घेतली आहे आणि याच सौंदर्यावर पुरुष मोहित होतात. रुप आणि आकाराच्या आधारे सौंदर्यविषयक एक शास्त्रच विकसित केले गेले आहे. लोक कृत्रिमरित्याही सुंदर दिसायचा प्रयत्न करतात. पुरुष वर्गही सौंदर्याच्या मागे दिवाणा आहे. पुरुषही स्त्रियांप्रमाणेच केस वाढवून सौंदर्यात भर टाकायचा प्रयत्न करतात. ईश्वराने ही रुप आणि आकाराची सृष्टी निर्माण केली आहे. यातल्या काहीगोष्टी आपल्याला सुंदर तर काही सामान्य वाटतात. आता फुलांचेच उदारहण घेतले तर सारी फुले काही आपल्याला सारखीच वाटत नाहीत. काही खुप सुंदर तर काही सामान्य वाटतात. काही वनस्पती सुंदर तर काही वेड्यावाकड्या वाटतात पण त्या खूप गुणकारी असतात. काही सुगंधीही असतात. बाह्य जगात अशा प्रकारे आपल्याला ईश्वराचे स्मरण होऊ शकते. वस्तु सामान्य रुप वा आकाराच्या असोत वा विशिष्ट रुप वा आकाराच्या असोत साऱ्या ईश्वराचेच रुप आहेत असे मानून दर्शन करणे हा या अध्यायाचा विषय आहे.

: 6 :

***पश्यादित्यान् वसुन् रुद्रानश्विनौ मरुतस्तथा।***
***बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आदित्यान्:** आदित्यांना म्हणजे अदितिच्या बारा पुत्रांना
- **वसून् रुद्रान्:** आठ वसूंना आणि अकरा रुद्रांना
- **अश्विनौ तथा मरुत:** दोन्ही अश्विनी कुमारांना तथा एकोणपन्नास मरुद्गणांना
- **पश्य:** बघ
- **भारत अदृष्टपूर्वाणि:** हे अर्जुना, यापूर्वी न पाहिलेली
- **आश्चर्याणि पश्य:** आश्यर्यकारक रुपेही बघ

**अर्थ**

हे भरतवंशी अर्जुना, माझ्या मध्ये अदितीच्या बारा पुत्रांना, आठ वसूंना, अकरा रुद्रांना, दोन्ही अश्विनीकुमारांना आणि एकोणपन्नास मरुद्गणांना बघ तसेच आणखीही पुष्कळशी यापूर्वी न पाहिलेली आश्चर्यकारक रुपे पहा.

***वसु वायु पहा रुद्र तसे आदित्य अश्विनी***
***पहा अनेक आश्चर्यें कधी कोणीं न पाहिलीं।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) अदितीचे बारा पुत्र, आठ वसू, अकरा रुद्र, अश्विनीकुमार आणि मरुद्गण सर्वांना बघ. 2) हे अर्जुना, तसेच आणखीही पुष्कळशी यापूर्वी न पाहिलेली आश्चर्यकारक रुपे पहा.

### स्पष्टीकरण

1) **आदित्यान् वसून् रुद्रान् अश्विनौ तथा मरुत: पश्य:** बारा आदित्य, आठ वसु, अकरा रुद्र, दोन आश्विनीकुमार आणि एकोणपन्नास मरुतांना बघा. भविष्यपुराणात अंशुमान, अर्यमा, इंद्र, त्वष्टा, धाता, पर्जन्य, पूषा, भग, मित्र, वरुण, विवस्वान, विष्णु अशी बारा आदित्यांची नावे आहेत. भागवत पुराणात द्रोण, प्राण, ध्रुव, अर्क, अग्नी, दोष, वसु, विभावसु अशी आठ वसुंची नावे येतात. ऋग्वेदात रुद्राला मध्यम श्रेणीची देवता मानले जाते.

विनोबांनी याचा चांगला अर्थ केला. आदित्य म्हणजे डोळे. वसु म्हणजे वाणी. रुद्र म्हणजे मन. आश्विनी म्हणजे प्राण आणि अपान वायु. मरुत म्हणजे कान. अशाप्रकारे डोळे आणि कान दोन ज्ञानेंद्रिये, वाणी आणि प्राण ही दोन कर्मेंद्रिये आणि मन. आपल्या शरीरातल्या ज्या ज्ञानेंद्रियांचाआणि कर्मेंद्रियांचा आपल्याला अधिक अनुभव येतो त्यांचा व मनाचा इथे विचार केला गेला आहे. मनाच्या ठायी बुध्दीचा समावेश होऊन जातो. सारांश असा की परमात्म तत्व या तमाम चैतन्यमय जीवांच्या रुपाने विहरतो असे समजा. तमाम जीव स्वत: खेळतात. आपण कुणाचे पुत्र तर कुणाचे पिता. कुणाचे पती तर कुणाचे भाऊ. आपणच आपले मामा, काका, पत्नी, बहिण, आई अशी विविध रुपे धारण करतो. खरे तर आपण एकच एक असतो पण भिन्न-भिन्न संबंधांच्या अनुषंगाने त्या अनुसार व्यवहार करताना दिसतो. आपल्याला तसा व्यवहार करावा लागतो पण आपण जर आत्मस्वरुपाला--- आपल्या स्वरुपाला विसरुन असे व्यवहार करु लागलो तर आपल्या वाट्याला दु:ख येईल. याउलट आपण जर असे मानले की ईश्वरच आपल्या द्वारे विहार करत आहे तर आपण दु:खमुक्त होऊ शकतो. आपण सारे केवळ निमित्तमात्रच असतो. आहोत. ईश्वरच सारे काही करतो. हे सर्वांना कळावे यासाठी भगवान अर्जुनाच्या निमित्ताने विश्वरुपदर्शन घडवताहेत. यामुळे असे म्हणताहेत की शरीरात वसणारी सर्व ज्ञानेंद्रीये-कर्मेंद्रीये, मन वगैरे संघात आहेत ती सर्व माझ्यातून आहेत असे जाणा, म्हणजे त्या सर्वांचा व्यापार-व्यहार माझ्यामुळे चालत आहे असे जाणा.

2) **भारत अदृष्टपूर्वाणि आश्चर्याणि पश्य:** हे अर्जुना, तू एथवर कदापि न पाहिलेल्या आश्चर्यांना बघ. आपण जगाशी नित्य संबंधित असतो ना त्यामुळे त्या वस्तु आश्चर्यकारी आहेत हे आपण विसरुन जातो. एका छोट्याशा बीजाचा एक विराट वृक्ष बनतो यामुळे भगवान इथे असे म्हणताहेत की अनेक अद्भुत पदार्थांकडे या दृष्टीने बघ की ते सारे माझ्या ठायी सामावलेले आहेत आणि माझ्यामुळेच त्या सर्वांचे अस्तित्व आहे.

: 7 :

***इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम्।***
***मम देहे गुडाकेश यच्चान्यद् द्रष्टुमिच्छसि॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अद्य:** आज, आता
- **गुडाकेश:** हे निद्राविजयी अर्जुना
- **इह मम देहे:** या माझ्या शरीराच्या ठिकाणी
- **एकस्थं:** एकत्रित असलेले
- **सचराचरं कृत्स्नं जगत् पश्य:** चराचरासह सर्व जगत पहा
- च यत् अन्यत्: आणखीही जे काही
- द्रष्टुं इच्छसि: पहायची इच्छा असेल (ते ही बघून घे.)

### अर्थ

हे अर्जुना, आता या माझ्या शरीरात एकत्रित असलेले चराचरासह संपूर्ण जग पहा. तसेच इतरही जे काही तुला पाहण्याची इच्छा असेल, ते पहा.

***इथें आज पहा सारें विश्व तूं सचराचर***
***माझ्या देहांत एकत्र इच्छा-दर्शन हें तुज।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) हे अर्जुना, आता माझ्या या देहात एकाच स्थानावर सचराचर जगाला पहा. 2) अन्यही जे काही बघायची इच्छा असेल तेही पहा.

**स्पष्टीकरण**

1) **गुडाकेश अद्य इह मम देहे एकस्थं सचराचरं कृत्स्नं जगत् पश्य:** या माझ्या देहाच्या एकाच ठायी स्थावर आणि जंगम साऱ्या जगाला बघ. सिनेमाच्या एका छोट्या पडद्यावर सारे काही दिसणेही एक प्रकारचे विश्वरुप दर्शनच आहे. याच जड-चैतन्यमय विश्वरुपाचे दर्शन भगवंत आपल्या देहात, एका ठिकाणी, एका अवयवात अर्जुनाला घडवत आहेत.

2) **च यत् अन्यत् द्रष्टुं इच्छसि:** आणि इतरही तुला जर काही बघायचे असेल तर तेही तू बघू शकशील, तेही बघ. याचा अर्थ असा की जे दिसत नाही ते अव्यक्त जग होय. जेवढे दिसू शकते तेवढेच काही ब्रह्मांडाचे स्वरुप नाही. उपनिषदांचे तर निवेदन असे आहे की अव्यक्त जगत हे व्यक्त जगताच्या तिप्पट आहे. यामुळे भगवान असे म्हणताहेत की त्या अव्यक्त जगाचेही तुला दर्शन करुन घ्यायचे असेल तर ते तू करु शकतोस. ज्या परमात्म रुपाचा आदि ना अंत त्याच्या विराट रुपाचे वर्णन कसे करणार? शब्द तोकडे पडतात. परमात्म्याच्या अद्भुततेचे क्षणोक्षणी अनुभव होऊन आपली लघुता, तुच्छता, क्षुद्रता अनुभवायला यावी यासाठी भगवंत या अध्यायात विश्वरुप दर्शन घडवताहेत. विश्वरुप दर्शनाचा अर्थच आहे अहंशून्यता.

: 8 :

*न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा।*
*दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **न तु मां:** पण तू मला
- **अनेन एव स्वचक्षुषा:** आपल्या या प्राकृत नेत्रांनी
- **द्रष्टुं न शक्यसे:** पाहण्यास समर्थ नाहीस
- **ते दिव्यं चक्षुः ददामि:** यामुळे मी तुला दिव्य अर्थात् अलौकिक नेत्र देतो (ज्यामुळे)
- **मे ऐश्वरं योगं पश्य:** माझा ईश्वरीय योग म्हणजे माझा प्रभाव आणि योग सामर्थ्य पहा

**अर्थ**

पण मला तू या तुझ्या चर्मचक्षुंनी खात्रीने पाहू शकणार नाहीस म्हणून मी तुला दिव्य दृष्टी देतो. तिच्या साह्याने तू माझी ईश्वरी योग शक्ती पहा.

*परी तूं चर्म-चक्षूनें पाहूं न शकसी मज*
*घे दिव्य दृष्टि ही माझा ईश्वरी योग तूं पहा।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) पण तू मला आपल्या या नेत्रांनी पाहू शकणार नाहीस. 2) म्हणून मी तुला दिव्य चक्षु देतो. 3) ज्यामुळे तुला माझा ईश्वरी योग बघता येईल.

**स्पष्टीकरण**

1) **तु मां अनेन एव स्वचक्षुषा द्रष्टुं न शक्यसे:** पण ते दिव्य रुप तू तुझ्या या नेत्रांनी बघू शकणार नाहीस. भगवंताने अर्जुनाच्या इच्छेनुरुप विश्वरुप दर्शन घडवायला सुरुवात करुन दिली. विविध प्रकारे माझे दर्शन कर हे तीन श्लोकातून सांगितलेही आहे. भगवंताला वाटले की अर्जुनाला तर ज्ञानप्राप्ती झालेली नाही आणि तो तर विश्वरुप दर्शन करु इच्छित आहे पण चर्मचक्षुंनी तर त्याला विश्वरुप दर्शन करुन घेता येणार नाही. ईश्वर इंद्रियातीत आहे यामुळे इंद्रियांच्या मदतीने ईश्वराचे दर्शन करता येणे शक्य नाही. ज्ञानावस्थेत विश्वरुप दर्शन होऊ शकते पण अज्ञानावस्थेत चर्मचक्षुंच्या मदतीने विश्वरुप दर्शन करुन घेणे शक्य नाही.

2) **ते दिव्यं चक्षुः ददामि:** यामुळे मी दिव्य दृष्टी प्रदान करतो. चर्मचक्षु, ज्ञानचक्षु आणि दिव्य चक्षु असे तीन प्रकारचे चक्षु म्हणजे डोळे असतात. चर्मचक्षु तर मानव, पशु, पक्षी या सर्व चेतन प्राण्यांना असतात. परमात्म ज्ञान प्राप्त झाल्यावर ज्ञानचक्षु लाभतात. सर्व जीवमात्रांच्या ठायी ज्ञानदृष्टी असतेच पण जोवर अज्ञानाचे आवरण असते तोवर ज्ञानचक्षु बंद असतात. अज्ञानाचे आवरण दूर होताच ज्ञानचक्षु उघडतात पण अज्ञानावस्थेत असताना जर संपूर्ण जगाला परमात्ममय बघायचे असेल तर दिव्य

दृष्टीचा लाभ व्हायला हवा. साधकावर अनुग्रह करायला सिध्द पुरुष अशी दृष्टी प्रदान करु शकतात. भगवान श्रीकृष्ण ज्ञानी तर होतेच पण सिध्दही होते.

3) **मे ऐश्वरं योगं पश्य:** माझा ईश्वरी योग बघ. भगवान श्रीकृष्ण पोहोचलेले सत्पुरुष होते हे तर अर्जुन जाणूनच होता. ते सिध्द पुरुष असून चमत्कारिक योगसिध्दीही त्याना अवगत होत्या हेही तो जाणत असावा असे वाटते. यामुळेच त्याने ईश्वराला विनम्रभावे प्रार्थना केली की मला जर विश्वरुप दर्शन करण्यायोग्य मानत असाल तर मी विश्वरुप दर्शन करु इच्छितो. अर्जुनाच्या योग्यतेने भगवान प्रसन्न झालेत. दिव्य दृष्टी प्रदान केली. विश्वरुप दर्शन घडवले आणि असे म्हणताहेत की माझ्या ईश्वरी रुपाला बघ म्हणजे माझ्या योगसिध्दीबळाचे दर्शन कर. केवळ ज्ञानावस्थेतच होऊ शकणारे हे दर्शन योगसिध्दीच्या सामर्थ्यामुळे अज्ञानावस्थेतही घडू शकते.

: 9 :

**संजय उवाच**

*एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः।*
*दर्शयामास पार्थाय परमं रुपमैश्वरम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **राजन्:** हे धृतराष्ट्रा
- **एवम् उक्त्वा ततः** असे सांगून मग
- **महायोगेश्वरः हरिः** महायोगेश्वर श्रीकृष्णाने म्हणजे सर्व पापांचा नाश करणाऱ्या भगवंतांने
- **पार्थाय परमं ऐश्वरं रुपं:** अर्जुनाला श्रेष्ठ ऐश्वर्यवान दिव्य रुप
- **दर्शयामास:** दाखवले

**अर्थ**

संजय म्हणाला हे महाराज धृतराष्ट्रा, महायोगेश्वर आणि सर्व पापांचा नाश करणाऱ्या भगवंतांनी असे सांगून मग अर्जुनाला परम ऐश्वर्ययुक्त दिव्य स्वरुप दाखवले.

**संजय म्हणाला**

*महा-योगेश्वरें कृष्णें राया बोलूनि ह्यापरी*
*दाविलें तेथ पार्थास थोरलें रुप ईश्वरी।*

**विषय:** या श्लोकात संजयाने एकच गोष्ट सांगितली आहे.

**स्पष्टीकरण**

संजय धृतराष्ट्राला युध्दकथा सांगत आहे. चौदाव्या श्लोकापर्यंत संजय विश्वरुपाचे वर्णन करणार आहे. भगवंताने अर्जुनाला जे विश्वरुप दर्शन घडवले ते इतके अद्भुत आहे की संजयही अत्यधिक प्रभावित झाला. धृतराष्ट्राला त्या स्वरुपाचा यथोचित परिचय करुन देण्यासाठी त्याने सात श्लोकांमधून ते वर्णन केले. यात विश्वरुप दर्शनाला संजयने ‘श्रेष्ठ ईश्वराचे रुप’ म्हणून वर्णिले आणि भगवंताला म्हटले ‘महायोगेश्वर.’ संजय धृतराष्ट्राला सांगतो की श्रीकृष्ण महायोगेश्वर आहे. विश्वरुप दर्शन घडवण्याची त्याच्या ठायी शक्ती आहे. तो योग्यांमध्ये श्रेष्ठच मानला जाईल कारण की एथवर कुणाला विश्वरुपाचे दर्शन घडवून देणारा असा कुणी योगी सिध्द पुरुष उपजलाच नाही. श्रीकृष्ण अद्वितीय होते याविषयी शंकाच नको. कारण की ते केवळ योगीच नसून ज्ञानीही होते. दोन्ही शक्तींचा असा योग एका पुरुषाच्या ठायी प्राय: अशक्यच असतो. संजयने या विश्वरुप दर्शनाला ईश्वराचे सर्वश्रेष्ठ रुप म्हटले पण हे सगुण-साकार रुपच आहे. सगुणाहून निर्गुण श्रेष्ठ आहे पण सगुणरुप विश्वदर्शनाला सर्वश्रेष्ठ म्हटले आहे. सगुण रुपात ईश्वरभक्ती उत्पन्न होणार असेल तर निर्गुण स्वरुपाचे ज्ञान होऊ शकते.

: 10 :

*अनेक-वक्त्र-नयनमनेकाद्भुत-दर्शनम्।*
*अनेक-दिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

**अनेकवक्त्रनयनं:** अनेक मुखे आणि अनेक नेत्र असलेल्या

**अनेक-अद्भुत-दर्शनं:** अनेक प्रकारची अद्भुत दर्शने असलेल्या

**अनेक-दिव्याभरणं:** नाना प्रकारच्या भूषणांनी सजलेल्या

**दिव्यानेकोद्यतायुधम्:** निरनिराळ्या प्रकारची आयुधे म्हणजे साधन सामग्रीने युक्त म्हणजे दिव्य शस्त्रे उगारलेल्या विश्वरुप भगवंताने दाखवले

**अर्थ**

अनेक मुखे व नेत्र असलेल्या, अनेक आश्चर्यकारक दर्शने असलेल्या, पुष्कळशा दिव्य अलंकारांनी विभूषित आणि पुष्कळशी दिव्य शस्त्रे हातात घेतलेल्या

***बहु डोळे मुखें ज्यांत दर्शनें बहु अद्भुत***
***बहु दिव्य अलंकार सज्ज दिव्यायुधें बहु।***

**विषय:** या श्लोकात विश्वरुपाच्या चार गोष्टी वर्णिल्या आहेत. 1) अनेक मुख आणि अनेक नेत्र 2) अनेक अद्भुत दर्शने 3) अनेक दिव्य आभूषण आणि 4) अनेक दिव्य आयुधे म्हणजे साधन सामग्री

**स्पष्टीकरण**

1) अनेकवक्त्रनयनं: अनेक मुख आणि अनेक नेत्र. जगभरातल्या तमाम जीवांना मुख आणि नेत्र आहेत. सारा व्यवहार डोळ्यांच्या द्वारेच होतो. ज्ञानेंद्रियांमध्ये मुख्य डोळे आहेत. मुख नसेल तर बोलणे अवघड. ज्ञानेंद्रियांमध्ये मुख्य डोळे तर कर्मेंद्रियांमध्ये मुख्य वाणी. जीवसृष्टीत आढळणारे सर्व मुख आणि डोळे ईश्वराचीच बाह्य स्थूल रुपे होत. संपूर्ण ब्रह्मांडात ईश्वर आहे, संपूर्ण जगत त्याचे शरीर होय. भगवान अर्जुनाला दिव्य दृष्टी प्रदान करुन त्या देहातल्या अनंत मुख आणि नेत्रांचे दर्शन घडवताहेत.

2) अनेक-अद्भुत-दर्शनम्: ब्रह्मांडातील सर्व मुख आणि नेत्र ईश्वराच्या एकाच देहात दिसत असतील तर केवढे अद्भुत दृश्य असेल? अशी नाना अद्भुत दर्शने ईश्वराच्या एकाच देहात घडताहेत असे सांगितले गेले. ब्रह्मांडात आढळणाऱ्या वस्तुंच्या बाबतीत अधिक आणि कमी अद्भुत असे काही सांगता येत नाही. ब्रह्मांडातल्या तमाम वस्तु अद्भुत आहेत हा अनुभव अर्जुनाला करुन देण्यासाठीच भगवान अर्जुनाला विश्वरुप दर्शन घडवताहेत.

3) **अनेक-दिव्याभरणम्:** नाना दिव्य आभूषण आहेत. यातून ईश्वराचे सौंदर्य प्रकट केले गेले. निसर्गाचे सौंदर्य तर अद्भुत आहेच. ते बघून माणसाचे मन मुग्ध होते. पशु-पक्ष्यांच्या ठायीही सौंदर्य असते. पोपट, फुलपाखरे, मोर, रंगीबिरंगी चिमण्या सारेच सुंदरतेचे नमूने आहेत. वनस्पतींच्या दुनियेतही अपार सौंदर्य वसते. अलंकार परिधान केल्यावर शरीर सुंदर दिसते अशी समाजात साधारणपणे समजूत आहे, मान्यता--धारणा आहे. यामुळे बालकांचे सौंदर्य वाढवण्यासाठी चांगला पोशाख आणि हात, पाय, गळा यात दागिनेही घालतात. महिलांचीही हीच परिस्थिती आहे. सहज स्वाभाविक सौंदर्याने समाधान न वाटल्यामुळे दागिन्यांनी स्वत:ला नटवण्याचे प्रयत्न स्त्रिया करतात.

4) **दिव्यानेकोद्यतायुधम्:** अनेक आयुधे म्हणजे साधन संपदा. युध्दासाठी आयुधे तयार करावी लागतात. जहाज, रेल्वे, एंजिन वगैरे तयार करण्यासाठी किती साधनांची जुळवाजुळव करावी लागते. ही सारी आयुधे म्हणजे साधन संपदा होय. ही परमेश्वराचीच देणगी आहे. हे सारे ईश्वराचेच स्थूल आणि अद्भुत रुप आहे.

: 11 :

*दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम्।*
*सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दिव्यमाल्याम्बरधरं:** अनेक प्रकारच्या दिव्य माळा आणि दिव्य वस्त्रे धारण केलेले
- **दिव्यगंधानुलेपनम्:** दिव्य गंध चर्चिलेले म्हणजे लेप लावलेले
- **सर्वाश्चर्यमयं देवं:** सर्वांना आश्चर्य वाटावे असे देव आहेत
- **अनन्तं:** अनंत आहेत
- **विश्वतोमुखं:** ते विश्वव्यापक आहेत, सीमारहित विराटस्वरुपी आहेत
- **देवम् (अपश्यत्):** परमदेव परमेश्वराला अर्जुन पहाता झाला

**अर्थ**

दिव्य माळा आणि वस्त्रे धारण केलेल्या, तसेच दिव्य गंधाने विभूषित, सर्व प्रकारच्या आश्चर्यांनी युक्त, अनंतस्वरुप, सर्व बाजुंनी मुखे असलेल्या विराटस्वरुप परमदेव परमेश्वराला अर्जुनाने पाहिले.

*दिव्य वस्त्रें फुलें गंध लेउनि सर्वतोपरी*
*आश्चर्यें भरला देव विश्व-व्यापी अनंत तो ।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत. 1) दिव्य पुष्प आणि दिव्य वस्त्र धारण केले आहेत. 2) दिव्य गंधाचे लेपन केलेले आहे. 3) सर्वांना आश्चर्य वाटेल असा देव आहे. 4) अनंत आहे. 5) जो विश्वव्यापक आहे, असे विश्वरुप दाखवले.

**स्पष्टीकरण**

1) **दिव्यमाल्याम्बरधरं:** दिव्य पुष्प आणि दिव्य वस्त्रे धारण केलेली आहेत. तो ईश्वर दिव्य पुष्प आणि दिव्य वस्त्रांनी सुशोभित सुसज्जित आहे. पूजा करताना आपण ईश्वराला वस्त्रे नेसवतो, फुले वहातो आणि मग नमस्कार करतो. याचा आशय असा की सुगंधित पुष्पांनी आणि सुसज्जित वस्त्रांनी नटलेला हा निसर्ग परमात्मामय असल्याचे दर्शन आपल्याला घडावे आणि आपण स्वत:ही तसेच दिव्य, सुगंधित व स्वच्छ बनावे. परमेश्वराला जर आपण चांगल्या वस्त्रांनी भूषवले आणि सुगंधित पुष्पांनी नटवले तर ईश्वराप्रती आपला भक्तीभाव वाढीला लागेल.

2) **दिव्यगंधानुलेपनम्:** दिव्य गंधाचे लेपन केले गेले आहे. पूजन करताना देव मूर्तींना गंधाचे लेपन केले जाते. सुगंधित पुष्पे वृक्षावर विलसतात, वस्त्र कापसापासून बनते, गंधही चंदनाचा असतो, तोही वृक्षापासून लाभतो. वृक्षमात्राच्या ठायी ईश्वराचे स्मरण व्हायला हवे कारण वृक्ष आपल्यावर खूप उपकार करतात.

3) **सर्वाश्चर्यमयं देवम्:** सर्वांना आश्चर्य वाटावे असे ईश्वराचे स्वरुप आहे. हिमालय, गंगा वा समुद्र बघून आश्चर्य वाटते. या आश्चर्यकारक वस्तु बघून ईश्वराचे स्मरण व्हायला हवे.

4) **अनन्तं:** परमात्मा अनंत आहे. जी वस्तु जन्माला येते. तिचा अंत ठरलेला असतो पण परमात्मा जन्माला येत नाही परिणामी त्याला अंत नसतो. यामुळे परमात्मा अनादी आहे, अनंत आहे. सादी आणि सांत वस्तुदेखिल किती अद्भुत दिसतात. आपली शरीर रचना किती अद्भुत आहे. सादी म्हणजे आदी असलेले, सांत म्हणजे अंत असलेले शरीर जर इतके अद्भुत आहे तर मग अनादी अनंत चैतन्यस्वरुप परमात्मा केवढा अद्भुत असू शकतो.

5) **विश्वतोमुखम्:** ज्याचा आदी नाही, जो विश्वात्मक आहे असा परमात्मा व्यापक असायलाच हवा. तमाम पदार्थ सादी-सांत असल्यामुळे मर्यादित आहेत. आकाश अतिव्यापक असले तरी सादी आहे. व्यापक तर केवळ एकमेव परमात्माच आहे.

: 12 :

*दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।*
*यदि भा: सदृशी सा स्याद् भासस्तस्य महात्मन: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदि दिवि:** जर आकाशात
- **सूर्यसहस्रस्य भा:** सहस्रावधी सूर्यांचा प्रकाश
- **युगपत् उत्थिता भवेत्:** एकदम उदय झाला असता
- **सा तस्य महात्मन:** तर तो प्रकाश त्या विश्वरुप परमात्म्याच्या महात्म्याच्या
- **भास: सदृशी स्यात्:** या विश्वरुप दर्शनाच्या प्रकाशाची बरोबरी क्वचितच करील

**अर्थ**

आकाशात हजारो सूर्य एकदम उदित झाले असता जो प्रकाश पडेल तोही त्या विश्वरुप परमात्म्याच्या प्रकाशाइतका कदाचितच होईल म्हणजेच होणार नाही.

*प्रभा सहस्र-सूर्यांची नभीं एकवटे जरी*
*तरी त्या थोर देवाच्या प्रभेशीं न तुळे चि ती ।*

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली आहे की आकाशात हजारो सूर्यांचा प्रकाश एकाच वेळी प्रकटला तरी तोही महात्मा भगवान कृष्णाच्या विश्वरुप दर्शनाच्या प्रकाशासारखा कदाचितच असेल म्हणजे नसणार.

**स्पष्टीकरण**

इथे सूर्याचा दृष्टांत प्रकाशाच्या दृष्टीने दिला आहे. जे विश्वरुप दर्शन घडवले ते परमात्म्याच्या खूप मोठ्या प्रकाशरुपी आहे. यामुळे अर्जुनाला अज्ञानावस्थेतच परमात्म्याचे ज्ञान व दर्शन घडले. हजार सूर्यांसारखा तेजस्वी याचा अर्थ इतके तेज की ज्याचे वर्णन ना करता येत ना कुणी तुलना करु शकत.

: 13 :

*तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।*
*अपश्यद् देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तदा पांडवः** तेव्हा पांडुपुत्र अर्जुनाने
- **तत्र देवदेवस्य शरीरेः** त्या देवाधिदेव श्रीकृष्ण भगवंताच्या शरीरात
- **एकस्थंः** एकत्रित असलेले
- **कृत्स्नं जगत्ः** संपूर्ण जगाचे
- **अनेकधा प्रविभक्तंः** जे अनेक प्रकारे विभागलेले आहे
- **अपश्यत्ः** दर्शन केले

**अर्थ**

पांडुपुत्र अर्जुनाने त्या वेळी अनेक प्रकारात विभागलेले संपूर्ण जग देवाधिदेव भगवान श्रीकृष्णांच्या त्या शरीरात एकत्रित असलेले पाहिले.

***सारे जगांतले भेद तेव्हां कालवले जसे***
***देहांत देव-देवाच्या देखिले तेथ अर्जुनें ।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) तेव्हा अर्जुनाने देवाधिदेव श्रीकृष्णाच्या शरीरात एकाच वेळी 2) संपूर्ण जगाचे दर्शन केले हे जग नाना भेदांनी युक्त असे आहे.

**स्पष्टीकरण**

1) तदा पांडवः तत्र देवदेवस्य शरीरे एकस्थम् - अर्जुनाला हे विश्वरुप दर्शन कुठे घडले ते सांगताहेत. भगवंताच्या देहात एकत्रितपणेच हे सारे विश्व दर्शन घडले. या द्वारे संजय भगवंताच्या अलौकिकत्वाचे दर्शन घडवताहेत. भगवान सदेह असण्याची कल्पना केली जात आहे. खरे पाहू गेल्यास भगवान अशरीरी आहे. या अध्यायातल्या सातव्या श्लोकात भगवंताने सांगितले आहे की माझ्या देहाच्या ठायी या समस्त चर-अचर विश्वाचे दर्शन कर.

2) कृत्स्नं जगत् अनेकधा प्रविभक्तं अपश्यत्: नाना भेदांनी युक्त अशा जगताला त्याने बघितले. अर्जुनाने असे पाहिले की समस्त विश्व जणू काही परमेश्वराच्या देहाच्या एका अवयवात स्थित आहे पण हे विश्व कसे आहे? कसे आहे या विश्वाचे स्वरुप? हे नाना भेदांनी युक्त असे आहे. यात अनेक प्रकार आढळतात. मनुष्य, पशु, पक्षी, अगणित किटक ही सारी जीवसृष्टी. या जीवसृष्टीत अपार भेदाभेद आहेत. समान असतानाही दोन माणसे एकसारखी नाहीहेत. जड सृष्टीतही पावलोपावली वैविध्य आहे. एकतेत अनेकता आणि अनेकतेत ऐक्य आहे.

: 14 :

*ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।*
*प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ततः स धनंजयः** त्यानंतर तो अर्जुन
- **विस्मयाविष्टः** आश्चर्याने चकित होऊन
- **हृष्टरोमाः** रोमांचित होऊन
- **शिरसा देवं प्रणम्यः** मस्तक झुकवून श्रीकृष्ण भगवंताला प्रणाम करत
- **कृतांजलिः अभाषतः** हात जोडून बोलू लागला

**अर्थ**

त्यानंतर तो आश्चर्यचकित झालेला आणि अंगावर रोमांच फुललेला अर्जुन, प्रकाशमय विश्वरुप परमात्म्याला श्रध्दाभक्ती सहित मस्तकाने प्रणाम करुन हात जोडून बोलू लागला.

***मग विस्मित तो झाला अंगीं रोमांच दाटले प्रभूस हात जोडूनि बोलिला नत-मस्तक ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) त्यानंतर अर्जुन आश्चर्यचकित होऊन 2) रोमांचाने फुललेला असा 3) माथा झुकवून श्रीकृष्ण भगवंताला प्रणाम करुन हात जोडून असे बोलला.

**स्पष्टीकरण**

1) **ततः स धनंजयः विस्मयाविष्टः** विश्वरुप बघून अर्जुन विस्मित होऊन गेला. अर्जुनाला भगवंताने विश्वरुप दाखवले. चर्मचक्षुंनी तर अर्जून विश्वरुप बघू शकत नव्हता म्हणून देवाने त्याला दिव्य दृष्टी दिली. दिव्य दृष्टीने अर्जुन विश्वरुप बघू लागला. ते बघितल्यावर त्याची काय अवस्था झाली ते संजय धृतराष्ट्राला सांगत आहे. विश्वरुपाचे दर्शन होताच अर्जुन विस्मयचकित झाला. दुसऱ्या अध्यायातील एकोणतिसाव्या श्लोकात भगवंताने सांगितले आहे की या आत्मतत्त्वाकडे साधक, मुमुक्षुजन आश्चर्याच्या नजरेने बघतात. हे विश्वरुप दाखवून भगवंताने अर्जुनाला ही भावदृष्टी प्रदान केली आहे. ही भक्ताची दृष्टी आहे. ही मोठी आनंददायक आहे. या दृष्टीचा लाभ होताच विश्वातले तमाम पदार्थ बघत असताना भगवंताचे स्मरण होऊन मन आश्चर्यचकित होते. विश्वातले पदार्थ बघत असताना, त्यांच्याशी व्यवहार करत असताना साधक, मुमुक्षु जनांना सतत सहजतेने ईश्वर स्मरण होऊ लागते. ईश्वर स्मरणासाठी त्याला खूप श्रम नाही करावे लागत याचे कारण असे की प्रत्येक वस्तुच्या पाठीमागे ईश्वर असल्याचे दर्शन त्याला होत रहाते. या दर्शनामुळे राग, लोभ सहजपणाने क्षीण होऊन जातात. अहंकार सहजपणे गळून पडतो याचे कारण असे की परमात्म्याच्या अद्भुत रुपासमोर पावलोपावली त्याला आपली तुच्छता-लघुता दिसून येते. विश्वाला परमात्मदृष्टीने बघायची ही अद्भुत दृष्टी आहे.

2) **हृष्टरोमाः** अर्जुन रोमांचित झाला. वर अर्जुनाच्या मनाचे वर्णन आले आहे. आता अर्जुनाच्या शरीराच्या स्थितीचे वर्णन आले आहे. असे म्हणताहेत की शरीरावर रोमांच फुललेत. मनात आश्चर्य वाटले तर आनंद वाटतो. आनंदामुळे जसे नेत्रातून आसवे ओघळतात तसे शरीर पुलकितही होते. तुलसीदासांनी आपल्या ग्रंथातून नेत्राद्वारे आसवे ओघळणे आणि शरीर पुलकित होणे हे दोन परमात्म दर्शनाचे परिणाम वर्णिले आहेत. रामचंद्रांच्या पादस्पर्शाने अहल्या उठून उभी राहिली आणि हात जोडून नमस्कार करत सांगू लागली :

***परसत पद पावन लोक नसावन प्रगट भई तप पुंज सही। देखत रघुनायक जनसुखदायक सनमुख होइ कर जोरि रही॥ अति प्रेम अधीरा पुलक सरीरा मुख नहिं आवइ वचन कही। अतिसय बडभागी चरनन्हि लागी जुगल नयन जलधार बही॥***

अर्थात् शोक घालवणाऱ्या पवित्र चरणांचा स्पर्श होताच तप:पुंज अहल्या प्रकट झाली. जनसुखदायक रघुनायकाला बघून ती हात जोडून उभी राहिली. आत्यंतिक प्रेमामुळे अधीर अशा अहल्येचा देह पुलकित झाला. मुखातून शब्द प्रकट होईनासे झाले. अत्यंत थोर भाग्याची अहल्या रामचरणी लीन झाली आणि तिच्या दोन्ही नेत्रातून अश्रुधारा वहायला लागल्यात.

अशाच प्रकारे अरण्यकांडातला प्रसंग आहे. रामप्रभु लक्ष्मणाप्रती उपदेश करताहेत. भक्तीच्या साधनांचे वर्णन करताना म्हणताहेत :

***मम गुन गावत पुलक सरीरा। गदगद गिरा नयन बह नीरा॥ काम आदि मद दंभ न जाकें। तात निरंतर बस मैं ताकें॥***

अर्थात् माझे गुणगान करताना शरीर रोमांचित होते, वाणी गद्गद होते. नेत्रातून अश्रुधार वहायला लागते. काम, मद, दंभ वगैरे विकार नष्ट होऊन जातात. मी सदैव अशा भक्ताच्या ताब्यात असतो.

3) **शिरसा देवं प्रणम्य कृतांजलिः** अभाषत माथा लववून आणि भगवंताला हात जोडून नमस्कार करुन अर्जुन म्हणतो आहे. संपूर्ण ब्रह्मांड ईश्वराच्या ठायी आहे हे प्रत्यक्ष दर्शन करुन अर्जुनाच्या मनात प्रचंड भक्तीभाव उत्पन्न झाला आहे. यामुळे तो ईश्वरासमोर नतमस्तक झाला. भक्ताची सदैव अशीच स्थिती असते. तो प्रत्येक क्रिया करताना ईश्वरापुढे नतमस्तक होतो. प्रत्येक परमाणूत अणू रेणूत परमात्मा ओतप्रोत आहे. हे ज्ञान भक्ताला निरहंकारी व नम्र बनवते. एखाद्या संताच्या कृपेने आपल्यालाही जर परमेश्वराच्या व्यापकतेचे ज्ञान झाले तर त्याचे अखंड स्मरण होत राहील आणि मनातल्या दिव्य अलौकिक परमात्म्याप्रती भावजागरण होईल. मग आपणही अर्जुनाप्रमाणे भगवंतापुढे माथा लववून हात जोडून उभे राहू.

: 15 :

**अर्जुन उवाच**

*पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान्।*
*ब्रह्माणमीशं कमलासनस्थ*
*मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- देव तव देहेः हे भगवान आपल्या देहात
- सर्वान् देवान्: सर्व देवांना
- तथा भूतविशेषसंघान्: तथा भिन्न-भिन्न स्थावर-जंगम समूहांना
- कमलासनस्थं ब्रह्माणं ईशंः कमलासनावर विराजमान आणि सर्वांचे नियमन करणाऱ्या ब्रह्मदेवाला आणि महादेवाला
- सर्वान् ऋषीन्: सर्व ऋषींना
- दिव्यान् उरगान्: आणि दिव्य सर्पांनाही मी बघत आहे

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे देवा, मी आपल्या दिव्य देहात संपूर्ण देवाना तसेच अनेक भूतांच्या समुदायाना, कमळाच्या आसनावर विराजमान झालेल्या ब्रह्मदेवाला, शंकराला, सर्व ऋषींना तसेच दिव्य सर्पांना पहात आहे.

**अर्जुन म्हणाला**

*देखें प्रभो देव तुझ्या शरीरीं कोंदाटले सर्व चि भूत-संघ*
*पद्मासनीं ध्यान धरी विधाता ऋषींसवें खेळत*
*दिव्य सर्प।*

**विषयः** या श्लोकात अर्जुन पाच वस्तुंचे वर्णन विश्वरुपदर्शनात करताहेत. 1) सर्व देवांना 2) तथा भिन्न-भिन्न स्थावर जंगम-समूहाना 3) कमलासनावर विराजमान आणि सर्बाचे नियमन करणाऱ्या ब्रह्मदेवाला, शंकराला 4) सर्व ऋषींना 5) दिव्य सर्पांना

**स्पष्टीकरण**

1) **देव तव देहे सर्वान् देवान् पश्यामिः** हे भगवान, आपल्या देहात समस्त देवाना म्हणजे देवतुल्य माणसांना मी बघतो. विश्वरुप दर्शनाचे हे वर्णन शेहेचाळिसाव्या श्लोकापर्यंत चालणार आहे. या श्लोकापासून विश्वरुप दर्शनाचे वर्णन सुरु होते. विश्वरुप दर्शन करत असताना अर्जुनाच्या मनात परमात्म्याप्रती अत्यंत भक्तीभाव प्रकट झाला आहे आणि त्याचे सरस काव्यमय वर्णन या बत्तीस श्लोकांमधून आले आहे. सुरुवातीला अर्जुनाने सांगितले की हे प्रभु, आपल्या छोट्याशा देहात मला संपूर्ण विश्वाचे दर्शन होत आहे. यात सर्वप्रथम मी देवाना म्हणजे देवतुल्य माणसाना बघत आहे. सुरुवातीलाच अर्जुनाला परमात्म्याच्या देहात देवतुल्य माणसांचे दर्शन झाले. विश्वरुप दर्शनाचा शुभारंभ देवतुल्य माणसांच्या दर्शनाने झाला हे चांगले आहे. परमेश्वराचे सर्वाधिक प्रकटीकरण संत-महात्मा पुरुषांच्या ठायीच असते.

2) **तथा भूतविशेषसंघान्:** मी विविध स्थावर-जंगम समुहांचे दर्शन करत आहे. देवतुल्य माणसांच्या दर्शनानंतर ब्रह्मांडाचे दर्शन घडत आहे. ब्रह्मांडातील स्थावर म्हणजे जड व जंगम म्हणजे चैतन्यमय सृष्टीचे दर्शन घडले. एकाच भगवंताच्या देहात ब्रह्मांडाची ही सारी विविधता बघून अर्जुन हर्षभरित झाला.

3) **कमलासनस्थं ब्रह्माणं ईशं:** कमलासनावर विराजित सर्वांचे नियंत्रण करणाऱ्या ब्रह्मदेवाला मी बघत आहे. प्राचीनकाळी आपल्या पुराणकारांनी ब्रह्मा, विष्णु आणि महेश या देवतांची कल्पना केली. परमात्मा इतका अलौकिक आहे की त्याला जगाची निर्मिती करण्यासाठी काहीही प्रयत्न करावे लागले नाहीत. या कल्पनेमुळे तीन देवतांची कल्पना आकाराला आली. राजाला स्वत: काहीही करायला लागू नये. त्याच्या सेवकांनीच सारे काही करावे यातच राजाचे राजेपण आहे तसेच हे आहे. परमेश्वरासाठीही ही कल्पनाच तर आहे. यामुळे परमात्म्याच्या प्रेरणेने ब्रह्मदेव या सृष्टीला निर्माण करतात. सृष्टीचे पालन विष्णु आणि संहार शंकर करतात, अशी कल्पना आहे. इथे ब्रह्मांडाला उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाचा उल्लेख आहे. ब्रह्मदेव कमलासनावर विराजमान आहेत. याचा अर्थ असा की ते कमळाप्रमाणे निर्लिप्त आहेत कारण की त्यांचा आधार परमात्माच आहे. हे ब्रह्मदेव सर्वांचे नियमन करणारे आहेत. पदार्थाची निमिर्ती केल्यावर ते टिकून रहाण्यासाठी नियंत्रण ठेवावे लागते. ते विष्णुचे कार्य आहे पण पदार्थांच्या निर्मिती करण्यातही नियंत्रण राखणे गरजेचे आहे.

4) **च सर्वान् ऋषीन्:** अर्जुन समस्त ऋषीकुळालाही देवाच्या छोट्याशा देहाच्या ठायी बघत आहे. संपूर्ण समाजाला आध्यात्मिक मार्गदर्शन करणारे ऋषी म्हणवले जातात. उपनिषदांचे रचयिते ऋषी आहेत. ऋषी यथार्थपणे भविष्यद्रष्टे असतात. अशा ऋषींचे समाजावर अनंत उपकार आहेत.

5) **च दिव्यान् उरगान्:** अर्जुन दिव्य सर्पांना बघतो. भगवंताची शैय्या सर्पाची आहे. अशी कल्पना आहे की भगवंत शेष नागावर पहुडलेले आहेत. सर्पाची शैय्या ही झाली अहिंसेची पराकाष्ठा. सर्पासाठी इथे दिव्य असे विशेषण प्रयुक्त केले गेले आहे. भगवान ज्या सर्पावर पहुडलेले आहेत तो सर्प समान्य न रहाता असामान्य बनून जातो, यामुळे तो दिव्य आहे. या दिव्य सर्पाला कुणी मारणार नाही. सारे नमस्कार करतील. नागपंचमीचा उत्सव प्रचलित आहे. त्यादिवशी नागाची पूजा केली जाते.

: 16 :

*अनेक-बाहूदर-वक्त्र-नेत्रं पश्यामि त्वां*
*सर्वतोऽनन्तरुपम् । नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि*
*विश्वेश्वर विश्वरुप ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

**विश्वेवर विश्वरुप:** हे विश्वरुपा, विश्वाच्या मालका

**अनेकबाहुदरवक्त्रनेत्रं:** अनेक हात, पोटे, मुखे आणि नेत्रांनी युक्त

**सर्वत: अनंतरुपं:** चहुकडून म्हणजे सर्व बाजुंनी अनंत रुपांनी युक्त

**त्वां पश्यामि:** तुला मी बघत आहे

**तव आदिं मध्यं अंतं न पश्यामि:** तुझे आदी, मध्य आणि अंत मी बघू शकत नाही.

**अर्थ**

हे संपूर्ण विश्वाचे स्वामी, मी आपल्याला अनेक बाहू, पोटे, मुखे आणि डोळे असलेले तसेच सर्व बाजुंनी अनंत रुपे असलेले पाहत आहे. हे विश्वरुपा, मला आपला ना अंत दिसत, ना मध्य दिसत, ना आरंभ दिसत.

***लेऊनि डोळे मुख हात पोट जिथें तिथें तूं चि अनंत-मूर्ते***
***विश्वेश्वरा शेवट मध्य मूळ***
***तुझ्या न मी देखत विश्व-रुपीं ।***

विषय: या श्लोकात विश्वरुप दर्शनाशी संबंधित तीन बाबींची चर्चा आली आहे. 1) हे विश्वरुपा, विश्वाच्या मालका, मी तुला अनेक हात, पोटे, मुखे आणि नेत्रांनी युक्त असा बघतो आहे. 2) चहुकडून अनेक रुपांनी युक्त असे बघत आहे. 3) तुमची सुरुवात, मध्य व अंत दिसत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **विश्वेश्वर विश्वरुप अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं त्वां पश्यामि:** हे विश्वरुपी विश्वाच्या स्वामी ईश्वरा, तू अनेक हात, पोट, मुख आणि नेत्रयुक्त आहेस. प्रत्येकाच्या शरीरात अनेक अवयव असतात. त्यात ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रियेही असतात. इथे आधी कर्मेंद्रियातील हात आणि मुखाचा उल्लेख आला. अवयवात पोटाचा उल्लेख

आला कारण की यात जठर, यकृत, लहान आतडी-मोठी आतडी यासारखी अनेक पचन करणारी अंगे आहेत. ज्ञानेंद्रियांमधल्या नेत्राचा उल्लेख आला. थोडक्यात संपूर्ण शरीर घ्यायचे. ब्रह्मांडात विविध प्रकारचे देह दिसून येतात. त्या सर्वांच्या ठायी विराजित एका अद्वितीय परमात्म्याला आपण अज्ञानावस्थेमुळे बघू शकत नाही पण अर्जुन हे बघतोय की परमात्माच विविध देह धारण करुन बसला आहे. परमात्मा त्या अनंत देहांनी संपन्न आहे.

2) **सर्वत: अनन्तरुपं त्वां पश्यामि:** सगळीकडून अनंत रुपांनी मंडित अशा तुला मी बघत आहे. आधी काही अवयवांचे वर्णन केले पण आता म्हणतो की त्याच्या आदी-अंताला कुणी जाणू शकले नाही. परमात्म तत्त्व अणू-रेणूत व्याप्त आहे. त्याचा ना आरंभ ना अंत.

3) **तव आदिं मध्यं अंतं न पश्यामि:** आदी आणि अंताच्या दोन टोकाच्या मध्यभागाला मध्य असे म्हणतात. परमेश्वराचा ना आदी ना अंत. यामुळे त्याला मध्यही नाही. तुझे आदी, मध्य आणि अंत रुप काही बघू शकत नाही. संत तुलसीदासजी म्हणतात आदि अंत कोई जासु न पावा अर्थात् कुणाला परमात्म्याच्या आदी, मध्य आणि अंताचा थांग लागलेला नाही. परमात्मा अणु-परमाणूत व्याप्त आहे. त्याचा ना आरंभ ना अंत. आदी व अंत या दोन टोकांच्या मधल्या भागाला मध्य असे म्हणतात. परमात्म्याच्या ना आदी ना अंत मग त्याचा मध्य कसा बरे असेल?

: 17 :

***किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् । पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दी प्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **किरीटिनं:** ज्याच्या मस्तकावर किरीट आहे
- **गदिनं:** ज्याच्या हाती गदा आहे
- **चक्रिणं:** चक्र आहे
- **तेजोराशिं:** जो तेजाची राशी म्हणजे तेज:पुंज आहे
- **सर्वत: दीप्तिमन्तं:** सर्व बाजुंनी प्रकाशमान
- **दुर्निरीक्ष्यं समन्तात्:** कुठल्याही बाजूने ज्याच्याकडे बघू शकत नाही असा
- **दीप्तानलार्कद्युतिं:** प्रज्वलित अग्नी आणि सूर्याप्रमाणे कांतिमान
- **अप्रमेयं:** जो प्रमाणांहून पल्याड आहे
- **त्वां पश्यामि:** अशा तुला मी बघत आहे

**अर्थ**

मी आपल्याला मुकुट घातलेले, गदा व चक्र धारण केलेले, सर्व बाजुंनी प्रकाशमान तेजाचा पुंज असे, प्रज्वलित अग्नी आणि सूर्य यांच्या प्रमाणे तेज:पुंज, पाहण्यास अतिशय कठीण आणि सर्व दृष्टींनी अमर्याद असे पाहत आहे.

***प्रभो गदा-चक्र-किरीट-धारी प्रकाश सर्वत्र तुझा प्रचंड डोळे न पाहूं शकती अपार ज्यांतूनि हे पेटत अग्नि-सूर्य।***

**विषय:** या श्लोकात विश्वरुपाचे सात मुद्दे मांडलेहेत. 1) त्याच्या मस्तकी किरीट आहे. 2) हाती गदा व चक्र आहे. 3) तो तेजोराशी म्हणजे तेज:पुंज आहे. 4) चहुकडून प्रकाशमान आहे. 5) कुठल्याही कोणातून त्याच्याकडे बघवत नाही. 6) तो प्रज्वलित अग्नी आणि सूर्यासारखा कांतिमान आहे. 7) तो कुठल्याहीप्रमाण वा पुराव्याचा विषय नाही. अशा परमेश्वराला मी बघत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **किरीटिनम्:** त्याच्या मस्तकी किरीट आहे. श्रीकृष्णाच्या मस्तकावरही किरीट होता. हे वर्णन कृष्णाच्या वेषाचे आहे. वेशात विविधता असते. कृष्णाच्या काळात डोक्यावर मुकुट परिधान करायचा रिवाज होता. श्रीकृष्ण निसर्गप्रेमी पर्यावरणप्रेमी होते. ते सोन्याचा मुकुट नव्हे तर मोर पिसांचा मुकुट धारण करत असत. अर्जुन श्रीकृष्णाच्या बाह्य रुपाचे दर्शनही विश्वरुप दर्शनात करत आहे.

2) **गदिनं चक्रिणम्:** त्याच्या हाती गदा आणि चक्र आहे. श्रीकृष्णाच्या काळात गदा संरक्षणाचे साधन होते. अरण्य निवासींमध्ये धनुष्य बाण सुरक्षेचे साधन मानले जात होते. या धनुष्य बाणांच्या सहाय्याने अरण्य

निवासी शिकारही करु शकत होते. श्रीकृष्ण नगर निवासी असल्यामुळे त्यांच्या हाती गदा व चक्र होते.

3) **तेजोराशिं:** तेजोराशी म्हणजे तेज:पुंज. ज्ञानी पुरुषाच्या ठायी अनोखे तेज असते. श्रीकृष्ण ज्ञानी असल्यामुळे त्यांचे शरीर अत्यंत तेजस्वी होते. ज्ञानी पुरुषांच्या ठायी जगाबद्दल कमालीचे वैराग्य, अलिप्तता असते. ब्रह्मचर्य तर असतेच असेत. या सर्व कारणांमुळे ज्ञानी पुरुष इतके तेजसंपन्न असतात की त्यांच्या दर्शनमात्रेणच अज्ञानी साधक वा मुमुक्षुला खूप प्रेरणा लाभते.

4) **सर्वत: दीप्तिमन्तम्:** चहु बाजुंनी प्रकाशमान. यासोबत श्रीकृष्णाच्या बाह्य रुपाचे वर्णन पूर्ण झाले. आता संपूर्ण ब्रह्मांडात व्याप्त श्रीकृष्ण परमात्म्याचे वर्णन येते. अर्जुन वर्णन करतो की आपण चहुकडून प्रकाशमान आहात. प्रकाशित होताहात. पदार्थांचे ज्ञान आपल्याला इंद्रियामार्फत होते असे मानणे चुकीचे आहे. बाह्य पदार्थांच्या ज्ञानासाठी इंद्रिये तर हवीतच हवी पण इंद्रियांसोबत मनात परमात्म प्रकाश झळकला असेल तरच ज्ञान होऊ शकते. स्वप्नात इंद्रिये निद्रिस्त असतात तरी पदार्थांचे हुबेहुब यथातथ्य ज्ञान होत रहाते. याचे कारण असे की तिथे परमात्म्याचा प्रकाश प्रवहमान असतो.

5) **दुर्निरीक्ष्यं समन्तात्:** सर्व बाजुंनी ज्याच्याकडे बघता येणे शक्य नाही अशा तुला मी बघत आहे. इथे अर्जुन परमात्म्याची विशालता अनुभवतो. परमात्मा इतका विशाल आहे की तो नजरेत सामावतच नाही. सूर्याला कसे आपण बघू शकत नाही तसेच ईश्वराचे जग तेज:पुंज आहे. परमात्म्याच्या विश्वात आपण आश्चर्यचकित आहोत. परमात्मा ब्रह्मांडाचे कसे संचालन करतो याविषयी आपली मती गुंग होऊन जाते. परमात्मा अगदी अगम्य, तर्कातीत, कल्पनातीत आहे.

6) **दीप्तानलार्कद्युतिम्:** प्रज्वलित अग्नी आणि तळपत्या सूर्यासारखी त्याची कांती म्हणजे तेज म्हणजे सौंदर्य आहे, अशा तुमचे मी दर्शन करतो. परमेश्वराचे तेज म्हणजे सौंदर्य. हे अग्नी आणि सूर्यासारखे आहे. सूर्योदय वा सूर्यास्ताच्या वेळी सूर्याचे स्वरुप इतके सुंदर असते की त्याच्याकडे सतत बघत रहाण्याची इच्छा आपल्या मनात उत्पन्न होते. तसे पाहू गेल्यास ब्रह्मांडातील तमाम वस्तुंच्या ठायी सौंदर्य आहे. वृक्ष, दगड, माती, पाणी, हवा, आकाश परमात्म्याने निर्माण केलेल्या या सर्व वस्तु इतक्या अद्भुत आहेत की आपल्याला सौंदर्याचे भान येऊ शकते.

7) **अप्रमेयम्:** जो कुठल्याही प्रमाणांनी व्यक्त करता येत नाही म्हणजे तमाम इंद्रियांच्या पलिकडे असतो. वसतो त्या परमात्म्याचे मी दर्शन करतो. परमात्म्याला स्थूल इंद्रियांच्या द्वारे कधीही जाणून घेता येणार नाही. त्याला जाणून घेण्यासाठी एकच साधन आहे आणि ते म्हणजे मन. ब्रह्मांडात परमात्मा अव्यक्त आहे, त्याचे दर्शन मनालाही शक्य नाही पण प्रत्येक मनाच्या ठायी खोलवर आत परमात्मा सत्, चित् व आनंद रुपात व्यक्त असतो. त्याचे दर्शन म्हणजे अनुभूती मन करु शकते. तरी सुध्दा सामान्य मन आपल्या आत परमेश्वराचे अनुभव करुन घ्यायला समर्थ नाही. अहंकार, काम, क्रोध वगैरे विकारांपासून मुक्त अत्यंत स्थिर मनाने परम तत्त्वाचा अनुभव घेता येऊ शकतो. जळात प्रतिबिंब बघायचे असेल तर जळ जसे स्थिर आणि निर्मळ असायला हवे तसे मनाचेही आहे.

: 18 :

***त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।***
***त्वमव्यय: शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वं परमं अक्षरं:** आपणच परम अक्षर अर्थात् परब्रह्म परमात्मा आहात
- **वेदितव्यं:** ज्याचे ज्ञान करुन घ्यावे असे आपणच आहात म्हणजे मुमुक्षुंनी जाणून घ्यावे असे आपणच आहात
- **त्वं अस्य विश्वस्य:** आपण या विश्वाचे
- **परं निधानं:** श्रेष्ठ असे आश्रय आहात
- **त्वं अव्यय:** आपण अविनाशी आहात
- **शाश्वतधर्मगोप्ता:** अनादी अशा शाश्वत धर्माचे रक्षक आहात
- **त्वं सनातन: पुरुष:** आपण सनातन पुरुष आहात
- **मे मत:** असे माझे मत आहे

**अर्थ**

आपणच जाणण्याजोगे परब्रह्म परमात्मा आहात. आपणच या जगाचे परम आधार आहात. आपणच अनादी धर्माचे रक्षक आहात आणि आपणच अविनाशी सनातन पुरुष आहात, असे मला वाटते.

***तूं थोर तें अक्षर जाणण्याचें तुझा चि आधार जगास अंतीं, तूं राखिसी शाश्वत-धर्म नित्य, मी मानितों तूं परमात्म-तत्त्व।***

**विषय:** या श्लोकात सात गोष्टींची चर्चा आली आहे 1) तू परम अक्षर आहेस. 2) तू मुमुक्षु जनांद्वारे जाणण्यायोग्य आहेस. 3) तू या विश्वाचा परम आधार आहेस. 4) तू अक्षीण आहेस. 5) तू शाश्वत धर्माचा रक्षक आहेस. 6) तू सनातन पुरुष आहेस. 7) असे माझे मत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **त्वं परमं अक्षरम्:** आपण परम अक्षररुप आहात. परम अविनाशी आहात. विश्वरुपाचे दर्शन करताना अर्जुन भावाविष्ट झाला आहे. त्यामुळे या वर्णनात द्विरुक्ती आली आहे. दुसऱ्या अध्यायातल्या सतराव्या श्लोकात खुद्द भगवंतानी सांगितलेले आहे की हे संपूर्ण ब्रह्मांड ज्याच्यामुळे व्याप्त आहे तो परमात्मा अविनाशी आहे , असे तू जाण. त्या नित्य, अविनाशी परमात्म्याचा कुणीही नाश करु शकत नाही. इथे अविनाशी शब्दासोबत एक विशेषण आहे 'परम'. म्हणजे आपण अतिशय, संपूर्णपणे अविनाशी आहात. आपल्या अविनाशीपणात कुठलीही उणीव नाही.

2) **वेदितव्यम्:** आपण मुमुक्षु जनांच्या द्वारा जाणून घेता येण्यायोग्य आहोत. जाणून घेण्यासारखे आहात. परमात्मा संपूर्ण ब्रह्मांडात व्याप्त असला तरी त्याला सारे जाणून घेऊ शकत नाहीत. मुमुक्षु वा साधकच परमात्म्याला जाणून घेऊ शकतात. अर्थात् तेही काम, क्रोध, अहंकार, वगैरेंनी मुक्त आणि वैराग्य संपन्न असतील तरच हे शक्य आहे.

3) **अस्य विश्वस्य परं निधानम्:** आपण या विश्वाचे परम म्हणजे संपूर्ण आश्रयरुप आहात. कार्याचा आश्रय कारणच असते. घटाचा आश्रय माती, कापडाचा सूत, सूताचा कापूस अशा प्रकारे कारणामुळे कार्य उत्पन्न होत असल्यामुळे कार्याचा आश्रय कारणच असते. हे कार्यरुपी विश्व परमात्मरुपी कारणाने उत्पन्न होत असल्यामुळे या कार्यरुप विश्वाचे परमात्मरुप कारणच आश्रय असू शकते. इथे विश्वाचे मूळ कारण परमात्मा विश्वाचे उपादान आणि निमित्त कारणही आहेत. परमात्मा चेतन आहे. यामुळे अर्जुनाने आश्रय स्थानासोबत 'परं' शब्द जोडला आहे.

4) **त्वं अव्ययः** आपण अक्षीण आहात. दुसऱ्या अध्यायातल्या सतराव्या श्लोकात हे लक्षण आले आहे. विश्वाचे पदार्थ सतत परिवर्तनशील आहेत. ते निरंतर क्षीण होत-होत अखेरीस नष्ट होतात पण परमात्म्याच्या ठायी कदापि कुठलेही परिवर्तन होत नसल्यामुळे ते क्षीण होत नाही.

5) **शाश्वतधर्मगोप्ता:** शाश्वत धर्म म्हणजे सनातन धर्म होय. सत्य, अहिंसा वगैरे व्रते सनातन धर्म होत. सर्व व्रतांचा आधार सत्य आहे. सत्य शाश्वत आहे. सत्याची प्रेरणा देहगत नसून सत्स्वरुपी ईश्वराची आहे. सत्य पालनाने अनुपमेय आनंदाची प्राप्ती होते. असत्य आचरणाने संतोष मिळत नाही. असत्याची प्रेरणा मायेची प्रेरणा आहे. आतून सत् तत्वाची प्रेरणा आणि बाहेरुन मायेची प्रेरणा या दोन प्रेरणांच्या सोबत आपले जीवन चालते. यामुळे जीवन संघर्षमय असते. संघर्ष काळात सतत शाश्वत धर्माचे पालन करावे. ही प्रेरणा परमात्म्याची असते. यामुळे अर्जुन परमेश्वराला 'शाश्वत धर्मरक्षक' म्हणून संबोधित करत आहे.

6) **त्वं सनातनः पुरुषः** आपण सनातन पुरुष आहात. दुसऱ्या अध्यायाच्या चोविसाव्या श्लोकात 'सनातन' शब्द आला. सनातन म्हणजे शाश्वत. शाश्वत केवळ परमात्माच आहे. सर्वसाधारण व्यवहारातसुध्दा ज्या पुरुषाचे चित्त स्थिर असते, ज्याचे विचार सारखे-सारखे बदलत नाहीत, ज्याला सर्वत्र समान भाव साधला आहे त्या व्यक्तीची खूप प्रशंसा होते. त्या पुरुषाबद्दल मनात आदर्शभाव वसतो. अशा पुरुषाकडुन प्रेरणा लाभते. ज्याचा स्वभाव सत्याचरणी असतो त्याच्या जीवनात स्थैर्य दिसून येते. परमात्म्याच्या ठायी सनातन काळापासून परिपूर्ण स्थैर्य आहे. असे माझे मत आहे.

7) **मे मतम्:** विश्वरुप दर्शनामुळे आपले असे रुप माझ्या ध्यानात येत आहे. परमात्म विषयाच्या संदर्भात अर्जुनाने जे काही मागील अध्यायात ऐकले होते ते सारे त्याच्या बुध्दीला आकळले, पण प्रत्यक्ष दर्शनानंतर

स्वरुपासंबंधीच्या त्या तमाम गोष्टी अर्जुनाला हृदयगत झाल्यात असे त्याचे म्हणणे आहे.

: 19 :

*अनादिमध्यान्तमनन्तवीर्य मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।*
*पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं*
*स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनादिमध्यान्तं:** आदी, मध्य आणि अंत रहीत
- **अनन्तवीर्य:** अनंत वीर्यवान म्हणजे सामर्थ्य संपन्न
- **अनन्तबाहुं:** अनंत हात असलेला
- **शशिसूर्यनेत्रं:** सूर्य चंद्राचे डोळे असलेला
- **दीप्तहुताशवक्त्रं:** प्रदीप्त अग्नी हेच ज्याचे मुख आहे असा
- **स्वतेजसा इदं विश्वं:** आपल्या तेजाने या विश्वाला
- **तपन्तं:** तापविणाऱ्या
- **त्वां पश्यामि:** आपणास पहात आहे.

**अर्थ**

आपण आदी, मध्य आणि अंत नसलेले, अनंत सामर्थ्याने युक्त, अनंत बाहू असलेले, चंद्र व सूर्य हे ज्यांचे नेत्र आहेत, पेटलेल्या अग्नीसारखे ज्यांचे मुख आहे आणि आपल्या तेजाने या जगाला तापविणारे असे आहात असे मला दिसते.

***किती भुजा वीर्य किती पसारा डोळे कसे उज्ज्वल चंद्र-सूर्य, हा पेटला अग्नि तुझ्या मुखांत, तूं ताविसी सर्व चि आत्म-तेजें।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) तू आदी, मध्य आणि अंत रहित आहेस. 2) तू अनंतवीर्य आहेस. 3) अनंत हात आहेत. 4) चंद्र, सूर्य तुझे नेत्र आहेत. 5) प्रदीप्त अग्नीमुख आहे. 6) आपल्या तेजाने या विश्वाला तापविणाऱ्या तुला मी पहात आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अनादिमध्यान्तम्:** ईश्वराला ना आदी ना मध्य ना अंत. सोळाव्या श्लोकात हे लक्षण वेगळ्या शब्दात आले आहे. भावाविष्ट झाल्यामुळे अर्जुन परत तेच तेच सांगत आहे. भगवंतही आपला उपदेश वारंवार सांगायला संकोच करत नाहीहेत कारण विषय अवघड आहे.

2) **अनंतवीर्यम्:** त्याची शक्ती अनंत आहे, असीम आहे. इथे 'वीर्य' शब्दाचा प्रयोग केला गेला. आपण जेखातो त्याचे रक्त बनते आणि रक्तापासून वीर्य बनते. वीर्य खूप शक्तीशाली असते. वीर्य म्हणजे साऱ्या देहाचा अर्क. जे ब्रह्मचारी स्थिर वीर्य असतात त्यांच्या वीर्याचा उपयोग आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्यात होतो. गृहस्थाच्या वीर्याचा उपयोग प्रजोत्पत्तीसाठी होतो. परमात्मा सनातन काळापासून अखंड ब्रह्मचारी असल्यामुळे संपूर्ण विश्वाची निर्मिती करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी आहे. या परंपरेत अर्जुनाने इथे वीर्य शब्दाचा प्रयोग सर्जन शक्तीसाठी केला.

3) **अनन्तबाहुम्:** ईश्वराचे बाहु म्हणजे हात अनंत आहेत. ईश्वराचे शरीर आपल्या सारखे छोटे नाही. संपूर्ण ब्रह्मांडात असंख्य माणसे, पशु वगैरे आहेत. त्यांच्या देहाचे अवयव ईश्वराचेच अवयव आहेत. अशा प्रकारे ईश्वराला अनंत हात आहेत.

4) **शशिसूर्यनेत्रम्:** त्याचे डोळे चंद्र-सूर्यासारखे तेजस्वी आहेत वा चंद्र-सूर्य त्याचे डोळे आहेत. चंद्र-सूर्याच्या रुपात परमात्मा व्यक्त होत आहे. संपूर्ण ब्रह्मांड परमेश्वराचे शरीर आहे. या दृष्टीने अर्जुन वर्णन करत आहे. यामुळे चंद्र-सूर्याला ईश्वराचे नेत्र म्हटले गेले आहे. याचा अर्थ असा की ईश्वराचे नेत्र चंद्र-सूर्यासारखे तेजस्वी आहेत. ब्रह्मचारीचे वर्णन करताना तो अग्नी आहे असे म्हटले जाते. अग्निः अधीते अनुवाकम् म्हणजे अग्नी (ब्रह्मचारी) वेदांचे पठन करत आहे.

5) **दीप्तहुताशवक्त्रम्:** त्याचे मुख प्रदीप्त म्हणजे प्रज्वलित अग्नी आहे किंवा प्रज्वलित अग्नीसारखे त्याचे मुख आहे. सूर्य-चंद्राप्रमाणे अग्नीचेही खूप उपकार आहेत. आपण अग्नीशिवाय जगू शकत नाही. थंडीपासून रक्षण करण्यासाठी, अन्नासाठी अग्नी नितांत गरजेचा आहे. अग्नीशिवाय दैनंदिन कामे थांबतील. पारशी धर्मात तर अखंड अग्नी प्रज्वलित राखण्याची पध्दत आहे. अग्नी भगवंताचे मुख आहे. शरीराला जर मुख नसेल तर अन्न शरीरात पोहोचणार नाही. मुखाशिवाय बोलताही येणार

नाही. अग्नी अन्न पचवतो. मुखाद्वारे अन्न संपूर्ण देहात पोहोचते. यामुळे भगवंताच्या वाणीला अग्नीची उपमा दिली आहे. वाणी अग्नीप्रमाणे शुध्द, तेजस्वी असायला हवी.

6) **स्वतेजसा इदं विश्वं तपन्तं त्वां पश्यामि:** तू आपल्या तेजाने, प्रकाशाने या विश्वाला दीपवतो वा जगवतो. मी तुझे दर्शन करत आहे. परमात्मा स्वयंप्रकाशी आहे. तो अखिल विश्वाला प्रकाशित करतो. एकाच वेळी अखिल विश्वाला उत्पन्न करतो. त्याला उत्पन्न करणे, जिवंत राखणे आणि त्या विश्वाचे ज्ञान करवुन देणे या तिन्ही गोष्टी तो करतो. हे जर घडले नसते तर या विश्वात परमात्म्यासारखी अलौकिक वस्तु अस्तित्वात आहे या गोष्टीचे ज्ञान झाले नसते. परमेश्वराची अपरंपार कृपा आहे. तो विश्वाला उत्पन्न करतो. कोट्यवधी वर्षांपर्यंत जिवंत ठेवतो आणि त्याचे ज्ञान करवून देतो. प्रत्येकाला एकेक शरीर देतो. त्यात ज्ञानाची साधनरुप इंद्रिये देतो. यासोबतच आपण आनंद, सुखाचा उपयोग करु शकू अशा विश्वाची रचना करतो. परम आनंदस्वरुप मोक्षाचाही अनुभव आपल्याला घडवतो. या वेळी अर्जुन ईश्वराच्या अलौकिकतेचे दर्शन करतो.

: 20 :

***द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वा: । दृष्ट्वाऽद्भुतं रुपमुग्रं तवेदं, लोकत्रय प्रव्यथितं महात्मन् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि द्यावापृथिव्यो: इदं अन्तरं:** आकाश म्हणजे स्वर्ग आणि आकाश यातील हे अंतर
- **त्वया एकेन व्याप्तं:** आपल्या एकट्याने भरुन राहिले आहे
- **च सर्वा: दिश:** आणि सर्व दिशाही आपणाकडूनच व्याप्त आहेत
- **महात्मन्:** हे महात्म्या
- **तव इदं अद्भुतं उग्रं रुपं दृष्ट्वा:** आपल्या या अद्भुत उग्र म्हणजे भयंकर रुपाला बघून
- **लोकत्रयं प्रव्यथितं:** तिन्ही लोक व्यथित म्हणजे भयभीत होऊ लागले आहेत

**अर्थ**

हे महात्म्या, हे स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधील आकाश आणि सर्व दिशा फक्त आपण एकट्यानेच व्यापून टाकल्या आहेत. आपले हे अलौकिक आणि भयंकर रुप पाहून तिन्ही लोक अत्यंत भयभीत झाले आहेत.

***दाही दिशा विस्तृत अंतराळ व्यापूनि तुं एक चि राहिलासी, पाहूनि हें अद्भुत उग्र रुप, तिन्ही जगें व्याकुळलीं उदारा ।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) आकाश आणि पृथ्वीचे अंतर तुझ्याने म्हणजे एकाच परमात्म्याने व्याप्त आहे. 2) आणि तमाम दिशा तुझ्यानेच व्याप्त आहे. 3) हे महात्म्या तुझे हे उग्र रुप बघून 4) तिन्ही लोक भयभीत झाले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **हि द्यावापृथिव्यो: इदं अन्तरं त्वया एकेन व्याप्तम् :** धरणी आणि आकाशात केवढे प्रचंड अंतर आहे पण ते तुज एका परमात्म्यामुळे व्याप्त आहे. पृथ्वी अत्यंत विशाल आहे. आकाशही अद्भुत आणि व्यापक आहे. धरणी आणि आकाशातल्या अंतराचा थोडा विचार करु या. पृथ्वीचे एक टोक ( ते तर समजा ठरवताही येईल एकवेळ) पण आकाशाचे जर का एखादे टोक असेल (कसे शक्य आहे आकाशाचे टोक ?) तर या दोघांमध्ये प्रचंड आकाश वा अवकाश आहे. यात अनंत ज्योर्तीमंडळे फिरताहेत ती सारी कशाने व्याप्त आहेत? अर्जुन म्हणतो की या दोन टोकांच्या मधले आकाश-प्रचंड आकाश परमात्म्यानेच व्याप्त आहे. या वर्णनात काही नाविन्य नाही. हा मुद्दा मागील सर्व अध्यायांमधून भगवंताने मांडला आहे. तोच अर्जुन इथे आपल्या अनुभवांच्या आधारे मांडत आहे. जिथे भगवंताची दृष्टी ज्ञानावस्थेची आहे तिथे अर्जुनाची वाणी दिव्य दृष्टीच्या अधीन आहे.

2) **च सर्वा दिश:** तमाम दिशादेखिल तुमच्यानेच व्याप्त आहेत. सबंध आकाशात परमात्माच व्यापलेला

आहे यामुळे यात तर दिशांचा समावेश होऊनच जातो पण विश्वरुप दर्शन झाल्यामुळे अर्जुन भावमग्न बनून गेल्यामुळे असे भावमय वर्णन आहे. हे ऐकणारेही इतके तन्मय होऊन जातात की त्याना काही हे खटकत नाही. चारही दिशांमध्ये परमात्माच व्यापलेला आहे कारण की परमात्म्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही वस्तुचे स्वतंत्र अस्तित्व नाही. यामुळे जे काही आहे ते केवळ परमात्मरुप आहे. परमात्माच आहे हेच यथार्थ दर्शन होय. एकत्वाच्या अशा दर्शनानेच माणसाला परम शांती लाभते.

3) **महात्मन् तव इदं अद्भुतं उग्रं रुपं दृष्ट्वा:** हे महात्म्या, तुझे हे असे अद्भुत उग्र म्हणजे भयानक रुप बघून अर्जुन असे म्हणतो. अर्जुनाला भगवंताचे व्यापक असे सर्वव्यापक रुप भयंकर वाटते, ही मोठी अजब गोष्ट वाटते कारण की संपूर्ण ब्रह्मांडाच्या ठायी जर परमात्माच व्यापून राहिलेला असेल तर त्याने रचलेली सृष्टीही भयानक असती. भगवान जर अतिशय करुणामय, दयामय, आनंदमय, शांतस्वरुपी आहे. भगवंताने निर्मिलेली ही दुनिया भयानक स्वरुपाची नाही, हे खरे आहे. आपल्या अज्ञानामुळे त्याने निर्मिलेल्या सृष्टीची काही रुपे भयानक वाटतात. उदाहरणार्थ सर्पालाही भगवंताने निर्मिले आहे. आपले शरीरही ईश्वरानेच घडवले आहे पण अज्ञानामुळे चित्ताच्या ठायी या देहाची आसक्ती इतकी काही दृढमूल झाली की परमेश्वरानेच निर्मिलेला सर्प आपल्याला शत्रु वाटतो, त्याला बघून आपण भितो, तो आपणास काळ वाटतो. अशा प्रकारे वाघ-सिंह देखिल भयानक वाटतात. जगात पापाचरण सुरु आहे, हिंसा जारी आहे, यामुळेही जगाची परिस्थिति भयंकर वाटायला लागते.

4) **लोकत्रयं प्रव्यथितम्:** तिन्ही लोक म्हणजे ब्रह्मांड भयभीत झाले आहे. वरच्या संदर्भात हे वचन आले. हे सारे ब्रह्मांड परमेश्वराने रचलेले आहे आणि तोच त्यात ओतप्रोत सामावलेला आहे तरी अज्ञान दशेमुळे प्रत्येकाच्या चित्तात मनात देह वगैरें विषयी आसक्ती असल्यामुळे हे सारे जग भयानक म्हणजे दु:खदायी वाटते.

: 21 :

***अमी हि त्वां सुरसंघा विशन्ति केचिद् भीता: प्रांजलयो गृणन्ति । स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिध्दसंघा:, स्तुवन्ति त्वां स्तुतिभि: पुष्कलाभि: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अमी हि सुरसंघा:** हे सर्व देवांचे समूह
- **त्वां विशन्ति:** आपल्या मध्ये प्रवेश करताहेत
- **केचित भीता:** कित्येक भयभीत होऊन म्हणजे भयामुळे
- **प्रांजलय: गृणन्ति:** हात जोडून आपली स्तुती करताहेत
- **महर्षिसिध्दसंघा:** महर्षी आणि सिध्द पुरुषांचे समुदाय
- **स्वस्ति इति उक्त्वा:** जगाचे कल्याण असो असे म्हणत
- **त्वां पुष्कलाभि: स्तुतिभि: स्तुवन्ति:** अनेक उत्तमोत्तम स्तोत्रांनी म्हणजे स्तुती मंत्रांनी, श्लोकांनी आपली स्तुती करत आहेत

**अर्थ**

तेच देवांचे समुदाय आपल्यात शिरत आहेत आणि काही भयभीत होऊन हात जोडून आपल्या नावांचे आणि गुणांचे वर्णन करीत आहेत. तसेच महर्षी आणि सिध्दांचे समुदाय 'सर्वांचे कल्याण असो.' अशी मंगल आशा करुन उत्तमोत्तम स्तोत्रे म्हणून आपली स्तुती करीत आहेत.

***हे देव सारे रिघती तुझ्यांत, कोणी भयें प्रार्थित बध्द-<br>हस्त, मांगल्य-गीतें तुज सिध्द संत,<br>परोपरी आळविती समस्त ।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) हे सारे देवगण आपल्यात प्रवेश करताहेत. 2) आणि भयभीत होऊन हात जोडून आपली स्तुती करताहेत. 3) महर्षी आणि सिध्द पुरुषांचा समुदाय जगाचे कल्याण होवो असे सांगत अनेक प्रकारच्या स्तुती मंत्रांनी आणि श्लोकांनी आपले स्तवन करीत आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अमी हि सुरसंघा: त्वां विशन्ति:** हे समस्त देवगण आपल्या ठायी प्रवेश करत आहेत. मागील श्लोकात वर्णन

आले की अज्ञानामुळे प्रापंचिक जन आसक्त बनून दु:खी व भयभीत होतात. या श्लोकात हे सांगितले आहे की साधक, मुमुक्षु, सिध्द पुरुष आणि देवतुल्य सज्जन मंडळी कशा प्रकारे आपल्या शरणी आले आहेत, प्रार्थना आणि भक्ती करताहेत. आधी देवतांचा समूह. देव म्हणजे सज्जन. असे लोक देहासक्ती, स्वजनासक्ती आणि प्रपंचासक्ती क्षीण व्हावी म्हणून परमेश्वराला शरण जातात.

2) **केचित भीता: प्रांजलय: गृणन्ति:** भयभीत होऊन हात जोडून आपली स्तुती करतात, प्रार्थना करतात. सातव्या अध्यायातील सोळा ते एकोणावीस या चार श्लोकांमधून चार प्रकारच्या भक्तांचे वर्णन आले. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी. इथे आर्त भक्ताचे वर्णन आले. संकटात चित्त व्याकुळ होते, भयभीत होऊन जाते त्यावेळी माणूस परमेश्वराची प्रार्थना करतो, स्तुती करतो. साधनेसमयी काम विकार उत्पन्न झाला तर मन तत्क्षणी बेचैन होऊन जाईल. तो आतल्या आत भयभीत होऊन जाईल. काम विकारांवर विजय संपादन करायचा कुठलाही उपाय उरला नाही, असे जाणून पराभव मान्य करुन तो ईश्वराची प्रार्थना करायला लागेल. प्रपंचातल्या नाना प्रसंगात भयभीत होऊन संकटांपासून बचाव करण्यासाठी प्रार्थना करणे हे आर्त भक्ताचे लक्षण आहे.

3) **महर्षिसिध्दसंघा: स्वस्ति इति उक्त्वा त्वां पुष्कलाभि: स्तुतिभि: स्तुवन्ति:** महर्षी आणि सिध्द पुरुषांचे समुदाय 'जगाचे कल्याण होवो, साधक-मुमुक्षु जनांवर अनुग्रह होवो' अशा स्तुतीपर मंत्रांनी आणि श्लोकांनी आपले स्तवन करतात, भक्ती करतात. इथे परमेश्वराची ज्ञानपूर्वक भक्ती करणाऱ्या ज्ञानी- सिध्द पुरुषाचे वर्णन आहे. ज्ञानी पुरुषाला 'महर्षी' म्हटले गेले आहे. महान ऋषी म्हणजे महान ज्ञानी आणि सिध्द म्हणजे योगी होय. महाज्ञानी आणि सिध्दयोगी पुरुषांच्या समूहासाठी इथे 'संघ' शब्द आला आहे. म्हणजे महाज्ञानवंत आणि सिध्दयोगी पुरुष आपले स्तवन करतात, भक्ती करतात. असे महापुरुष स्वत:साठी तरी काही भक्ती करत नाहीत कारण त्याना तर भगवंताची भक्ती करुन तृप्तीचा अनुभव मिळाला. ज्ञानावस्था, सिध्दावस्था उच्च दशा असते. अशा अवस्थेत तर जगाचे कल्याण होवो, साधक-मुमुक्षु जनांवर ईश्वराचा अनुग्रह होवो केवळ एवढीच करुणा बुध्दी आणि आकांक्षा त्यांच्या मनात असते. 'पुष्कल' म्हणजे ज्ञानी पुरुष भक्ती करताना कधी थकत नाहीत, कधी कंटाळत नाहीत. संत तुलसीदास म्हणतात:

*मम गुन गावत पुलक सरीरा।*
*गदगद गिरा नयन बह नीरा॥*

अर्थात् माझे गुणगान करत असताना शरीरावर रोमांच येतात. गात्रे पुलकित होतात आणि नेत्रातून अश्रुधारा ओघळू लागतात.

: 22 :

***रुद्रादित्या वसवो ये च साध्या, विश्वेऽश्विनौ***
***मरुतश्चोष्मपाश्च। गंधर्व-यक्षाऽसुर - सिध्दसंघा***
***वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **रुद्रादित्या:** अकरा रुद्र आणि बारा आदित्य
- **वसव:** तसेच आठ वसु
- **च साध्या:** आणि साध्य म्हणजे देव
- **विश्वे:** विश्वदेव
- **अश्विनौ:** अश्विनीकुमार
- **मरुत: च:** मरुद्गण आणि
- **ऊष्मपा:** पितरांचा समुदाय
- **गंधर्वयक्षासुरसिध्दसंघा:** गंधर्व आणि यक्ष, असुर आणि सिध्दांचे संघ
- **सर्वे विस्मिता: एव:** हे सारे विस्मित होऊनच
- **त्वां वीक्षन्ते:** आपल्याकडे पहात आहेत

**अर्थ**

अकरा रुद्र, बारा आदित्य आणि आठ वसु, साध्यगण, विश्वेदेव, दोन आश्विनीकुमार, मरुद्गण आणि पितरांचे समुदाय तसेच गंधर्व, यक्ष, राक्षस आणि सिध्दांचे समुदाय आहेत ते सर्वच चकित होऊन आपल्याकडे पहात आहेत.

***आदित्य विश्वे वसु रुद्र साध्य, कुमार दोघे पितृ-देव वायु***
***गंधर्व दैत्यांसह यक्ष सिध्द, सारे कसे विस्मित पाहताती।***

**विषय:** या श्लोकात एकूण तेरा विशिष्टांचे वर्णन आहे. 1) अकरा रुद्र 2) बारा आदित्य 3) आठ वसु

4) बारा साध्यदेव 5) विश्वेदेव 6) अश्विनीकुमार 7) एकोणपन्नास मरुद्गण 8) पितर 9) गंधर्व 10) यक्ष 11) असुर 12) सिध्दसंघ 13) हे सारे विस्मित होऊन आपल्याकडे बघताहेत. हे सारे पौराणिक आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **रुद्रा:** रुद्र अकरा आहेत. दहाव्या अध्यायातील तेविसाव्या श्लोकात रुद्राणां शंकर: अस्मि मी रुद्रात शंकर आहे. अकरा रुद्रांची नावे पुराणात अशी आढळतात. हर, बहुरुप, त्र्यंबक, अपराजित, वृषाकपि, शंभु (शिव), कपर्दि, रैवत, मृगव्याध, शर्व, कपाली. या रुद्रांमध्ये विभूती शंकर आहेत कारण की शंकर सर्वांचे स्वामी आहेत. ब्रह्मा, विष्णु, महेश या तीन देवतांमध्ये शंकर मोठे तपस्वी, वैरागी आणि तेजस्वी देव मानले जातात. शंकर संहाराची देवताही आहे.

2) **आदित्या:** आदित्य बारा आहेत. या अध्यायातल्या सहाव्या श्लोकात बारा आदित्यांची यादी दिली आहे पण दहाव्या अध्यायातील एकविसाव्या श्लोकात धाता, मित्र, वरुण, अर्यमा, इंद्र, अंश, भग, विवस्वान्, पूषा, सविता, तुष्टा, विष्णु अशी नावे येतात.

3) **वसव:** वसु आठ आहेत. वसु म्हणजे अग्नी. दहाव्या अध्यायातील तेविसाव्या श्लोकात धर, ध्रुव, सोम, अहस्, अनिल, अनल, प्रत्यूष, प्रभास अशी नावे येतात.

4) **च साध्या:** साध्य देव बारा आहेत ते असे मन, अनुमंता, प्राण, नर, यान, चित्ति, हय, नय, हंस, नारायण, प्रभव, विभु. धर्माची पत्नी दक्ष कन्या साध्या. त्यांची ही उत्पत्ती आहे. चार युगांचे एकूण बारा हजार वर्ष मानले गेले आहेत. हे देवांचे वर्ष होत. यावरुन बारा देवांची कल्पना केली गेलीय.

5) **विश्वेदेवा:** विश्वेदेवाच्या संबंधात विनोबांनी सांगितले देवतागुण विशेष: शरीरात पंच महाभूते. अहंकार वगैरे तत्वांचा अंतर्भाव केल्यावर गीतेच्या तेराव्या अध्यायातील कल्पना त्याशीच जोडली गेली आहे. त्यानुसार विश्वशक्तीची गणना केली जाते, त्यावेळेला संघाताभिमानी देवता मानाव्या लागतात विनोबांच्या मते 'विश्वाभिमानी देवता' असा अर्थ करता येईल.

पुराणांमधून दहा विश्वदेवांचा उल्लेख येतो. क्रतु, दक्ष, श्रव, सत्य, काल, काम, धुनि, करुवान, प्रभावान, रोचमान्.

6) **अश्विनौ:** अश्विनीकुमार. दोन्ही अश्विनीकुमार नेहमी सोबत रहातात. हे देव वैद्य आहेत. सूर्य आणि संज्ञा त्यांचे पिता-माता आहेत. त्यानी दध्यड्. मुनींपासून ज्ञान प्राप्त करुन घेतले आहे. च्यवन मुनींची पत्नी सुकन्या. तिच्यावर शर्याती राजाची कन्या प्रसन्न झाली. तिने सुकन्येच्या वृध्द आणि अंध पतीला नेत्रज्योती आणि नवयौवन प्राप्त करवुन दिले होते. ही पौराणिक कथा आहे.

7) **मरुत:** मरुतगण एकोणपन्नास आहेत. यांचे वर्णन पुराणात येते. दहाव्या अध्यायातील एकविसाव्या श्लोकात येते. इथे मरीचि म्हणजे मरुद्गणांमध्ये मरुत म्हणजे मी वायुदेवता आहे. असे विभूतीपर वर्णन आहे.

8) **ऊष्मपा:** पितर. पितरचा उल्लेख दहाव्या अध्यायातील एकोणतिसाव्या श्लोकात आला आहे. पुराणात सात पितरांचा उल्लेख येतो. कव्यवाह, अनल, सोम, यम, अर्यमा, अग्निष्वात्ता, बर्हिषद. यात अर्यमा मुख्य आहे. विभूती वर्णनात हे येते. पितर हे ऊष्मपा म्हणजे गरम अन्न सेवन करतात.

9) **गंधर्वा:** गंधर्वाचा उल्लेख दहाव्या अध्यायातील सव्विसाव्या श्लोकात आला आहे. कश्यप मुनींच्या पत्नी मुनी, प्रज्ञा आणि अरिष्टा यांच्यापासून गंधर्वांची उत्पत्ती झाली. गंधर्व गायन आणि नृत्य कलेत निपुण मानले जातात.

10) **यक्षा:** यक्षचा उल्लेख दहाव्या अध्यायातील तेविसाव्या श्लोकात येतो. यक्ष आणि राक्षस असादोघांचा उल्लेख येतो. दोघे कुबेराचे सेवक होते. यक्ष धन उपार्जन करणारे होते तर कुबेर धनाचे स्वामी होते. कश्यप मुनींची पत्नी खासापासून यक्षांची उत्पत्ती झाली. हे भगवान शंकरांचेही गण होत.

11) **असुर-संघा:** असूर समूह. असूर म्हणजे देवांचे शत्रु होत. सोळाव्या अध्यायात असुरांचे वर्णन येईल. उपनिषदातही असुरांचा उल्लेख आहे. आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी प्रजापतींकडे ज्याप्रमाणे देवांचे प्रतिनिधी इंद्र गेले होते त्याप्रमाणे असुरांनीही आपल्या विरोचन नामक प्रतिनिधीला पाठवले होते. ही कथा उपनिषदात येते.

12) **सिध्द-संघा:** सिध्दांचा संघ. दहाव्या अध्यायातील सव्विसाव्या श्लोकात सिध्दांचा उल्लेख आहे. सिध्द म्हणजे पोहोचलेले, वैराग्यसंपन्न, ज्ञानसंपन्न पुरुष होत. अशा पुरुषांमध्ये कपिल महामुनी ईश्वराची विभूती आहेत. जगतात सिध्द पुरुषांची संख्या न्यून--कमी असते. जेवढे म्हणून सिध्द पुरुष असतील त्यांचा संघ.

13) **सर्वे विस्मिता:** एव त्वां वीक्षन्ते: हे सारे आश्चर्यचकित होऊन तुला बघताहेत. हे सारे रुद्र वगैरे परमात्म्याकडे विस्मित होऊन बघताहेत पण ज्यांची परमेश्वरावर श्रध्दा आहे ते तर अलौकितेचा अनुभव घेतच आहेत पण ज्यांच्या मनात श्रध्दा नाही त्यांच्याही मनात विचार येऊ शकतो की विश्वाचा जर कुणी निर्माता असेल तर तो अद्भुत असला पाहिजे. सारांश असा की ईश्वरापुढे सर्वांनाच झुकावे लागते.

: 23 :

***रुपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं, महाबाहो बहुबाहूरुपादम् ।***
***बहूदरं बहुद्रंष्ट्राकरालं, दृष्ट्वा लोका: प्रव्यथितास्तथाहम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे महाबाहो भगवान
- **ते रुपं महत्:** आपले रुप महान आहे
- **बहुवक्त्रनेत्रं:** अनेक मुखे आणि अनेक नेत्र असलेले
- **बहुबाहूरुपादं:** अनेक हात, मांड्या आणि पाय असलेले
- **बहूदरं:** खूप उदर असलेले
- **बहुद्रंष्ट्राकरालं दृष्ट्वा:** विक्राळ दाढांनी युक्त अशा रुपाला बघून
- **लोका: प्रव्यथिता:** लोक व्याकुळ झालेत
- **तथा अहं:** आणि मी सुध्दा व्यथित होऊन गेलो आहे

**अर्थ**

हे महाबाहो, आपले अनेक मुखे, अनेक नेत्र, अनेक हात, अनेक मांड्या व पाय असलेले, अनेक उदरांचे आणि अनेक दाढांमुळे अतिशय भयंकर असे महान रुप पाहून सर्व लोक व्याकुळ होत आहेत आणि मीही व्याकुळ होत आहे.

***अफाट हें रुप असंख्य डोळे, मुखें भुजा ऊरु असंख्य पाय, असंख्य पोटें विकराळ दाढा, ह्या दर्शनें व्याकुळ लोक मी हि ।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) हे भगवंता, हे आपले रुप महान आहे, विशाल आहे. 2) खूप मुखे आणि अनेक नेत्र 3) अनेक हात, मांड्या आणि अनेक पाय आहेत 4) अनेक उदर आहेत 5) विक्राळ दाढांनी युक्त असे हे आपले रुप बघून 6) लोक व्याकुळ झाले आहेत आणि मीसुध्दा व्याकुळ झालो आहे.

**स्पष्टीकरण**

1) **महाबाहो ते रुपं महत्:** हे भगवंता, तुझे रुप महान आहे. विशाल आहे. अर्जुन हे वर्णन भावनामय होऊन करत असल्यामुळे त्याच्या बोलण्यात द्विरुक्ती येत आहे. हाच मुद्दा याच अध्यायातल्या विसाव्या श्लोकात येऊन गेला आहे. तिथे म्हटले गेले आहे : त्वया एकेन द्यावापृथिव्यो: इदं अंतरं व्याप्तं तू एकट्यानेच आकाश आणि धरणी मधला अवकाश व्यापून घेतला आहेस. याचा अर्थ असा की जे काही दिसते आहे ते सारे तुझेच रुप आहे. परमात्मा एवढा अद्भुत आहे की एकाच वेळी अनेक रुपे धारण करु शकतो.

2) **बहुवक्त्रनेत्रं:** खूप मुखे आणि खूप नेत्र आहेत. या अध्यायातल्या सोळाव्या श्लोकात याचा उल्लेख आहे. असंख्य माणसे, अगणित पशु-पक्षी कुणीही स्वतंत्र तर नाहीतच. यामुळे मनुष्य आणि पशु-पक्षी वगैरेंच्या ठायी दिसून येणारी इतकी मुखे आणि इतके नेत्र सारी ईश्वरानेच धारण केलेली आहेत असे समजायला हवे.

3) बहुबाहूरुपादं: खूप हात, खूप मांड्या आणि खूप पाय. यातल्या बाहुंचा उल्लेख या अध्यायातील सोळाव्या श्लोकात आला. इथे मांड्या आणि पायांचा अधिक उल्लेख आला. या सृष्टीत विविध योनींचे जेवढे म्हणून काही जीव आहेत त्यांचे भिन्न-भिन्न अवयव देखिल ईश्वरानेच धारण केलेले आहेत.

4) **बहु उदरम्:** खूप उदर म्हणजे पोटे आहेत. शरीरातले सर्वच अवयव महत्वाचे असले तरी पोटात सारी पचनेंद्रिये असल्यामुळे पोटाचे विशेष महत्व आहे. पचन व्यवस्थेवरच संपूर्ण शरीराचे स्वास्थ्य अवलंबून असते.

5) **बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा:** अनेक अक्राळ-विक्राळ म्हणजे भयंकर दाढांनी युक्त ईश्वराला अर्जुनाने बघितले. वाघ-सिंह इत्यादि हिंस्त्र क्रूर प्राण्यांच्या दाढा खूप तीक्ष्ण आणि भयंकर असतात. यामुळेच ते कुणाला मारुन-फाडून खाऊ शकतात खाऊन टाकतात. या भयंकर दाढाही ईश्वरानेच निर्माण केलेल्या आहेत कारण की वाघ-सिंह इत्यादि हिंस्त्र पशुंची रुपेही ईश्वरानेच धारण केली आहेत.

6) **लोका: प्रव्यथिता:** तथा अहं लोक भयभीत झाले आहेत, व्याकुळ बनले आहेत, तसाच अर्जुनही भयभीत झाला आहे. या विश्वात सर्व प्रकारच्या भल्या-बुऱ्या प्रवृत्ती कार्यरत असतात. वाघ-सिंह जेव्हा एखाद्या पशुला मारुन-फाडून खात असतील तर ते दृश्य आपण बघू शकत नाही. कसाई पशुंना मारुन-फाडून आपला व्यवसाय चालवतो. ते दृश्य बघितले जाणार नाही. आपण रोज जे दूध पितो त्यात अनेक कृमी असतात. ते जर आपण सूक्ष्मदर्शक यंत्राखाली बघितले तर आपल्याला दूध पिणे अशक्य अवघड होऊन बसेल. पाण्यातही जंतु असतात अशा प्रकारे ईश्वराचे दुहेरी स्वरुप आहे. मांजर ईश्वराचे स्वरुप आहे. मुंगळाही ईश्वराचे स्वरुप आहे. मांजर उंदराला खाऊन टाकते. सर्प बेडकाला गिळंकृत करतो. दोन्ही ईश्वराचीच रुपे होत. जर दोघे ईश्वररुपी असतील तर एखादा दुसऱ्याचे भक्ष बनतो हे काही ध्यानात येत नाही. यामुळे अर्जुन म्हणतो की आपले हे विश्वरुप बघून जीव घाबरतो, व्याकुळ होतो सर्वांचा आणि माझाही. या विश्वरुपात नाना प्रकारच्या परस्पर विरुध्द प्रवृत्ती कार्यरत आहेत सुरु आहेत, परस्पर विरुध्द व्यवहार-व्यापार जारी आहेत.

: 24 :

*नभ:स्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।*
*दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा*
*धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विष्णो:** हे विष्णो, हे भगवंता
- **नभ:स्पृशं:** आकाशाला स्पर्श करणारे
- **दीप्तं:** देदीप्यमान
- **अनेकवर्णं:** अनेक रुपांनी युक्त
- **व्यात्ताननं:** पसरलेल्या अनेक मुखांचे
- **दीप्त विशालनेत्रं:** प्रकाशमान म्हणजे तेजस्वी आणि विशाल नेत्रांचे
- **त्वां दृष्ट्वा हि:** असे आपले स्वरुप बघूनच
- **प्रव्यथितान्तरात्मा:** माझे अंत:करण भयाने व्याकुळ होऊन मला
- **धृतिं च शमं न विन्दामि:** धैर्य आणि शांतता प्राप्त होत नाही

**अर्थ**

कारण हे विष्णो, आकाशाला जाऊन भिडलेल्या, तेजस्वी, अनेक रंगांनी युक्त, पसरलेली मुखे व तेजस्वी विशाल नेत्र यांनी युक्त अशा आपल्याला पाहून भयभीत अंत:करण झालेल्या माझे धैर्य आणि शांती नाहीशी झाली आहे.

*भेदूनि आकाश भरुनि रंगीं, फाडूनि डोळे*
*उघडूनि तोंडें, तूं पेटलासी बघ जीव माझा,*
*भ्याला न देखे शम आणि धीर ।*

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) हे भगवान कृष्णा, आकाशाला स्पर्श करणाऱ्या 2) प्रदीप्त 3) अनेक रंगांच्या 4) ज्यात पसरलेली अनेक मुखे आहेत 5) दीप्त आणि विशाल नेत्रांच्या 6) आपले स्वरुप बघून ज्याचे चित्त व्याकुळ झाले आहे असा मी धैर्य आणि शांती प्राप्त करुन घेऊ शकत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **विष्णो नभ:स्पृशं:** आकाशाला स्पर्श करणारा म्हणजे आकाशासारखा अतिशय व्यापक. इथे भयभीत झालेला अर्जुन परमेश्वराच्या स्वरुपाचे वर्णन परत थोड्याफार फरकाने त्याच शब्दात करत आहे. आपले स्वरुप गगनाला भिडणारे आहे म्हणजे गगनाइतके व्यापक आहे. आकाशही ईश्वरानेच निर्माण केलेले आहे.

कारण हे कार्याहून नेहमीच व्यापक असते या न्यायानुसार आकाश या कार्यापेक्षा कारणरुप ईश्वर अतिव्यापक आहे, हे सहजच लक्षात येऊ शकते.

2) **दीप्तं:** प्रदीप्त म्हणजे तेजाने युक्त, तेजस्वी. ईश्वर संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करणारा आहे तर तो स्वत: किती प्रकाशमान असेल हे लक्षात येऊ शकते.

3) **अनेकवर्णं:** त्याच्या ठायी अनेक रंग म्हणजे वर्ण आहेत. हेही ईश्वराचे स्वरुप आहे. प्रत्येक पदार्थाचे आपले रुप असते, भिन्न-भिन्न रंगही असतात. पदार्थ अनंत आहेत यामुळे पदार्थांच्या रंगांच्या वैविध्याला काही पार नाही. एका वृक्षाला नाना फांद्या, अनेक पाने असतात. त्या फांद्यांमध्ये पानांमध्ये रंगांचे इतके वैविध्य असते की मन आश्चर्याने भरुन येते.

4) **व्यात्ताननं:** तुझ्या स्वरुपाच्या ठायी अनेक मुखे विस्तारलेली आहेत. मागील श्लोकात नाना मुखांचा उल्लेख आहे. सोळाव्या श्लोकातही मुखाचा उल्लेख आला आहे. दोन्ही ठिकाणी अनेक मुखे असल्याचा उल्लेख येतो. इथे अनेक मुखे आहेत. एवढेच नव्हे तर ती विस्तारलेली म्हणजे फैलावली आहेत असेही म्हटले आहे. आपण संपूर्ण तोड उघडले तर भयानक दिसते. बरे, या उघड्या मुखात सारे लोक प्रवेश करत आहेत असे सत्ताविसाव्या श्लोकात वर्णन आले आहे. जन्म मरणाचे चक्र अखंडपणे भिरभिरत आहे. लोक पुत्र जन्माचा आनंद साजरा करतात पण मृत्युच्या वेळी शोक करतात. दु:खी होतात. अशाच प्रकारे ईश्वराचे जसे सौम्य रुप असते तसेच उग्र रुपही असते. या व यापुढील श्लोकात अर्जुनाने ईश्वराच्या उग्र स्वरुपाचे वर्णन केले आहे.

5) **दीप्तविशालनेत्रं:** भगवंताचे स्वरुप दीप्त म्हणजे तेजस्वी असून त्याचे नेत्र विशाल आहेत. मुख जसे पसरलेले आहे तसेच डोळेही उघडे आहेत. खूप उघडे डोळे बघणेही भितीदायक वाटते. कुणावर क्रोध करत असताना डोळे विस्फारित होतात आणि लाल-तांबडे होतात. यालाच डोळे फाडून बघणे असे म्हणतात. जगात जेव्हा अनिती पसरते तेव्हा ईश्वराचे डोळेही असेच तांबारतात आणि खूप खुले रहातात विस्फारित होतात. कौरव-पांडव यांचे युध्दही देवाला पसंत नव्हते. पुढे सत्ताविसाव्या श्लोकात वर्णन आले आहे की धृतराष्ट्राचे पुत्र इत्यादि सारे ईश्वराच्या मुखात सामावून समाप्त होत आहेत.

6) **त्वां दृष्ट्वा हि प्रव्यथितान्तरात्मा धृतिं च शमं च न विन्दामि:** हे ईश्वरा, तुमचे स्वरुप बघूनच माझे चित्त अत्यंत व्याकुळ बनले आहे. मला ना धैर्य धारण करता येत ना शांती लाभत.

विश्वरुपाचे दर्शन करत असताना भगवंताच्या उग्र स्वरुपाचे दर्शन होताच अर्जुन स्वत: आकुळ-व्याकुळ झाला. ते वर्णन अर्जुन या श्लोकात करत आहे. अर्जुनाने विश्वरुपाचे दर्शन केले. ते करताना भगवंताचे सौम्य स्वरुप बघून काही अर्जुन भयभीत झाला नाही पण भगवंताचे उग्र स्वरुप बघितल्यावर मात्र त्याची हिंमत खचून गेली. हे स्वाभाविकच होते. भगवंताचे हे दुहेरी म्हणजे सौम्य व उग्र स्वरुप काही ध्यानात येत नाही. जगात धर्म व नीतीचे पालन जर जारी असेल तर ते बघून बरे वाटते, समाधान वाटते. पापाचरण बघून असा विचार मनात हटकून डोकावतो की संपूर्ण ब्रह्मांडात जर परमेश्वरच व्यापून असेल तर मग हे पापाचरण का त्याच्या संमतीने जारी आहे ? हे बघून चित्त व्याकुळ होईल. द्विधा परिस्थिती निर्माण होईल. अर्जुनाची हीच अवस्था झाली आहे.

: 25 :

***दंष्ट्राकरालानि च ते मुखानि, दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।***
***दिशो न जाने न लभे च शर्म,***
***प्रसीद देवेश जगन्निवास ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ते दंष्ट्राकरालानि:** आपल्या विक्राळ दाढांनी युक्त
- **च कालानलसन्निभानि:** आणि प्रलयाग्नीसाख्या प्रज्वलित
- **मुखानि दृष्ट्वा एव:** मुखांना बघूनच
- **दिश: न जाने:** मला दिशा समजेनाशा झाल्या आहेत
- **च शर्म न लभे:** आणि सुखही लाभेनासे झाले आहे
- **देवेश:** हे देवेशा, हे देवाधिदेवा
- **जगन्निवास:** हे जगदाश्रया
- **प्रसीद:** मजवर प्रसन्न व्हा

**अर्थ**

दाढांमुळे भयानक आणि प्रलयकाळच्या अग्नीसारखी प्रज्वलित आपली मुखे बघून मला दिशा कळेनाशा झाल्या असून माझे सुखही हरपले आहे. म्हणून हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, आपण प्रसन्न व्हा.

*कराळ दाढा विकराळ तोंडें*
*कल्पांत-अग्नीसम देखतां चि*
*दिङ्.-मूढ झालों सुख तें पळालें*
*प्रसन्न हो कीं जग हें तुझें चि।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) आपल्या भयंकर दाढांनी युक्त 2) आणि प्रलयकालीन अग्नी सारख्या मुखाना बघूनच 3) मी दिशांचे ज्ञान हरपून बसलो आहे. 4) आणि मला सुखही मिळत नाही. 5) हे देवाधिदेवा, जगन्निवासा, जगदाधारा मजवर प्रसन्न व्हा.

**स्पष्टीकरण**

1) **ते दंष्ट्राकरालानि:** ईश्वराच्या तीक्ष्ण दाढांनी युक्त अशा उग्र मुखाला बघून अर्जुन भयभीत झाला. हे लक्षण तेविसाव्या श्लोकात आले आहे. विश्वरुप दर्शनात भगवंताचे स्वरुप एकच असून त्याला अनंत अवयव आहेत. अगणित मुखे आहेत. मुखात भयंकर तीक्ष्ण अशा दाढा आहेत. जिथे सातत्याने जन्म-मृत्यु सुरु असेल तिथे भगवंताचे स्वरुप सौम्य असू शकत नाही. मृत्युशी संबध्द स्वरुप भयंकरच मानले जाईल.

2) **च कालानलसन्निभानि:** भगवंताची मुखे प्रलयकालीन अग्नीसारखी प्रदीप्त आहेत. मुखांचेच वर्णन जारी आहे. इथे दुसरे विशेषण आले आहे. मुख प्रलयकालीन अग्नीसारखे आहे. याचा अर्थ असा की प्रलयकाळात संपूर्ण विश्वाचा संहार सुरु असावा असे दृश्य दिसते.

3) **दिश: न जाने:** मला दिशांचे भान उरलेले नाही. मला दिशा नेमक्या सुचत नाहीहेत. स्मशानातील दृश्य बघून लोक घाबरुन जातात. परमात्म्याची ही सृष्टी विलक्षण स्वरुपाची आहे. इथे रोज लाखो गाईंची कत्तल होते, असंख्य शेळ्या-बकऱ्या कसायाच्या घरी कापल्या जातात आणि लोक आनंदाने सेवन करतात. रात्र-दिवस मृत्युचे चक्र अविरतपणे भिरभिरत आहे, अनीती जारी आहे. अगणित जीव एकमेकांचे भक्षण करताहेत. ईश्वराच्या विश्वरुप दर्शनाच्या निमित्ताने अर्जुनाला हे दृश्य एक साथ बघायला मिळत आहे. यामुळे घाबरुन जाऊन तो म्हणत आहे की मला दिशांचे भान उरले नाही याचा अर्थ मला काहीही सुचत नाही.

4) **शर्म न लभे:** आणि मला सुखही वाटत नाही म्हणजे शांततेचा अनुभव मनाला होत नाही. मनाला शांतता वाटत नाही. चित्त भयभीत असेल तर शांतता वा सुखाचा अनुभव कसे बरे प्राप्त होऊ शकेल ? भगवंताच्या विश्वरुपाचे दर्शन करणे सुध्दा अर्जुनाला अवघड जात होते. मोठ्या उत्साहाने अर्जुनाने ईश्वरापुढे विश्वरुप दर्शनाची मागणी केली होती आणि देवानेही प्रसन्नतापूर्वक दिव्य दृष्टी प्रदान करुन विश्वरुप दर्शन घडवले, पण या दर्शनासाठी आवश्यक ती संपूर्ण योग्यता अंगी नसल्यामुळे अर्जुनाला हे विश्वरुप दर्शन काही पचू शकले नाही.

5) **देवेश जगन्निवास प्रसीद:** हे देवाधिदेवा, जगदाश्रया, मजवर प्रसन्न व्हा. संकटात सापडलेला माणूस ईश्वरापुढे नतमस्तक होतो. विश्वरुप दर्शनामुळे एक मोठा फायदा असा झाला की ईश्वराचे अलौकिक सामर्थ्य व्यक्त झालेले कळले. शास्त्रात या सामर्थ्याला कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम् असे म्हटले जाते, म्हणजे करणे, न करणे वा हवे तसे उलटही करणे हे सामर्थ्य माणसाच्या ठायी नसून ते ईश्वराचे वैशिष्ट्य आहे पण ईश्वराच्या या सामर्थ्याचे भान माणसाला नसते. विश्वरुप दर्शन घडल्यामुळे अर्जुनाला या वैशिष्ट्याचे भान आले आणि तो नतमस्तक झाला. ज्या साधक वा मुमुक्षुच्या लक्षात ईश्वराचे हे विलक्षण सामर्थ्य येते तो ईश्वरापुढे नतमस्तकच होऊन जातो. हात जोडून उभा असतो. त्याची अखंड प्रार्थना जारी असते 'हे ईश्वरा, मी सदा सर्वदा शून्य बनून रहावे'

: 26 - 27 :

*अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्रा:*
*सर्वे सहैवावनिपालसंघै:।*

*भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथाऽसौ*
*सहस्मदीयैरपि योधमुख्यैः ॥*

*वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति*
*दंष्ट्राकरालानि भयानकानि ।*
*केचिद्विलग्ना दशनान्तरेषु*
*संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमांगैः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अवनिपालसंघैः सह एवः** राजांच्या समुदायांसोबतच
- **अमी सर्वे धृतराष्ट्रस्य पुत्राः** हे सारे धृतराष्ट्राचे पुत्र कौरव आणि
- **भीष्मः च द्रोणः** पितामह भीष्म आणि आचार्य द्रोण
- **अस्मदीयैः** अपि योधमुख्यैः सहः आमच्यापैकीही जे मुख्य-मुख्य योध्दागण आहेत त्यांच्या सोबत
- **असौ सुतपुत्रः** हा सूतपुत्र कर्ण
- **त्वरमाणाः** खूप वेगाने
- **दंष्ट्राकरालानिः** भयंकर दाढांनी युक्त
- **ते भयानकानि वक्त्राणिः** आपल्या भयंकर मुखात
- **त्वां विशन्तिः** आपल्या ठायी प्रविष्ट होत आहेत
- **केचित्ः** त्यांच्यातील काही
- **चूर्णितैः उत्तमांगैः** छिन्नभिन्न झालेल्या मस्तकांनी
- **दशनान्तरेषु विलग्नाः** दातांच्या फटीत अडकलेले दिसत आहेत
- **संदृश्यन्तेः** दिसून येत आहेत

**अर्थ**

ते सर्व धृतराष्ट्राचे पुत्र राजसमुदायासह आपल्यात प्रवेश करीत आहेत आणि पितामह भीष्म, द्रोणाचार्य तसेच तो कर्ण आणि आमच्या बाजूचेही प्रमुख योध्दे यांच्यासह

सगळेच आपल्या दाढांमुळे भयंकर दिसणाऱ्या मुखात मोठ्या वेगाने धावत धावत घुसत आहेत आणि कित्येक छिन्नभिन्न झालेल्या मस्तकांनी दातांच्या फटीत अडकलेले दिसत आहेत.

*अहा कसे हे धृतराष्ट्र-पुत्र*
*घेऊनियां राज-समूह सारे*
*हे भीष्म हे द्रोण तसा चि कर्ण*
*हे आमुचे वीर हि मुख्य मुख्य ।*

*जाती त्वरेनें चि तुझ्या मुखांत*
*भयाण जी भ्यासुर ज्यांत दाढा*
*दांतांत कांही शिरलीं शिरें जीं*
*त्यांचें जसें पीठ चि पाहतों मी ।*

**विषयः** या श्लोकात मुख्यतः दोन गोष्टी आहेत 1) राजांच्या समुदायासोबत हे सारे धृतराष्ट्राचे पुत्र कौरव वगैरे भीष्माचार्य, द्रोणाचार्य आमच्या सैन्यदळातील मुख्य-मुख्य योध्दे आणि त्यांच्यासह सूत पुत्र कर्ण हे सारे प्रचंड वेगाने भयानक दाढांनी युक्त अशा आपल्या भयंकर मुखात प्रवेश करताहेत. 2) त्यांच्यातील काही छिन्नभिन्न झालेल्या मस्तकांनी आपल्या दातांच्या फटीत अडकलेले दिसत आहेत

**स्पष्टीकरण**

1) कौरव-पांडवांचे सैन्यदळ परस्पर झुंजायला कुरुक्षेत्राच्या रणांगणात उभे ठाकले आहे. युध्दाचा शंखनाद होण्यापूर्वीच ते सारेच्या सारे ईश्वराच्या त्या भयंकर मुखात प्रविष्ट होत आहे म्हणजे ईश्वरच त्या सर्वांना संपवत आहे असे भयंकर दृश्य अर्जुनाला दिसत आहे. पांडवांना अर्जुनाला असे वाटते की आम्ही युध्द करत आहोत आणि ते जिंकणार आहोत. कौरवांनाहीअसे वाटत असेल की आम्ही झुंजतोय आणि युध्दात विजय आमचाच होईल पण हा सारा खोटा भ्रम आहे. आपल्याला केवळ निमित्तमात्र बनवून ईश्वर जय-पराजय करणार आहे हे दर्शन विश्वरुप दर्शनाच्या निमित्ताने ईश्वराने अर्जुनाला घडवले आहे. कौरव-पांडव पक्षातले जे वीर योध्दे आहेत त्यांचे दर्शन अर्जुनाला होत आहे. कौरव पक्षात अनेक राजे युध्दासाठी एकत्र आले होते. यामुळे त्यांच्यासाठी 'संघ' शब्दाचा प्रयोग केला गेला. त्यानंतर धृतराष्ट्र पुत्र कौरवांचा उल्लेख आला मग कौरव-पांडवांचे गुरु भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांचा उल्लेख आला.

पांडव पक्षातील शूर वीरांचा स्वतंत्रपणे उल्लेख न करता आमच्यातील जे प्रमुख योध्दे आहेत ते असे म्हणून

मग कर्णाचा उल्लेख आला. कर्ण हा कुंतीचा पुत्र असून अधिरध नामक सूताने त्याचे पालन-पोषण केले होते. धनुर्विद्येत पारंगत बनून तो अर्जुनाचा प्रतिस्पर्धी बनून गेला होता. त्याची जन्मकथा सांगून भगवान श्रीकृष्ण आणि कुंतीने त्याला पांडवांच्या विरुध्द न लढण्याचा उपदेश केला पण त्याला तो भावला नाही. तो कौरवांच्या बाजूने लढला आणि अर्जुनाच्या हातून मारला गेला होता.

वीर योध्दे जनांचे वर्णन करुन मग सांगितले गेले आहे की हे सारे योध्दे प्रचंड वेगाने भयानक दाढांनी युक्त अशा आपल्या मुखात प्रवेश करत आहेत. यातुन गीतेचा मुख्य मुद्दा अर्जुनाच्या लक्षात आला. 'आपण सारे तर केवळ निमित्त मात्रच आहोत, सारे काही कर्ता-करविता तर तो भगवानच आहे.' हा गीतेचा मूल मंत्र आहे.

2) ईश्वराच्या मुखात कौरव-पांडव दळातील सारे योध्दे प्रवेश करत आहेत. ते कसे प्रवेश करताहेत हे सांगितले गेले आहे. ईश्वराचे मुख भयंकर असून त्याच्या दाढा सिंहाच्या दाढांसारख्या आहेत. त्यात प्रवेश करताच सर्वांची मस्तके भरडली जात आहेत. यातून हेच समजावले गेले आहे की आपण एवढा अभिमान धरतो, मोह करतो पण देह एवढा क्षुद्र आहे की क्षणभरात छिन्न-विछिन्न होऊन जातो त्यामुळे देहाचा अभिमान आणि मोह त्यजायला हवा. हा पाठ अर्जुनाला विश्वरुप दर्शनामुळे मिळाला.

: 28 :

*यथा नदीनां बहुवोऽम्बुवेगा:*
*समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।*
*तथा तवामी नरलोकवीरा*
*विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा नदीनाम्:** ज्याप्रमाणे नद्यांचे
- **बहव: अम्बुवेगा:** अनेक जल प्रवाह वेगाने
- **समुद्र एव अभिमुखा: द्रवन्ति:** समुद्राच्या दिशेनेच धाव घेतात अर्थात समुद्रातच जाऊन पडतात
- **तथा अमी नरलोकवीरा:** त्याचप्रमाणे नरवीरांचे हे समूहही
- **तव अभिज्वलन्ति वक्त्राणि:** आपल्या सर्व बाजुंनी प्रज्वलित मुखांमध्ये
- **विशन्ति:** प्रवेश करीत आहेत

**अर्थ**

ज्या प्रमाणे नद्यांचे पुष्कळसे जल प्रवाह स्वाभाविकपणे समुद्राच्या दिशेनेच धाव घेतात अर्थात् समुद्रातच प्रवेश करतात त्याच प्रमाणे ते मनुष्य लोकातील वीर आपल्या धडाडून पेटलेल्या मुखात प्रवेश करीत आहेत.

***जसे नद्यांचे सगळे प्रवाह***
***वेगें समुद्रांत चि धांव घेती***
***तसे तुझ्या हे जळत्या मुखांत***
***धांवूनि जाती नर-वीर सारे ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) नद्यांचे जल प्रवाह ज्याप्रमाणे सागराच्याच दिशेने वहातात 2) तसेच हे सारे मनुष्य लोकीचे वीर आपल्याच सर्व बाजुंनी धडाडून पेटलेल्या मुखात प्रवेश करीत आहेत.

**स्पष्टीकरण**

1) इथे नदी-सागराचा दृष्टांत दिला आहे. मुंडक उपनिषदात ज्ञानवंताच्या अद्वैत स्थितीला समजाऊन सांगताना नदी-सागराचा दृष्टांत दिला गेला आहे. उदाहरणार्थ:

*यथा नद्य: स्यंदमाना: समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरुपे*
*विहाय । तथा विद्वान नामरुपाद्विमुक्त: परात्परं*
*पुरुषमुपैति दिव्यम् ॥ (3:2:8)*

अर्थात् ज्याप्रमाणे वहाणाऱ्या नद्या आपले नामरुप विसरतात आणि स्वत:ला समुद्रात विलीन करुन देतात त्याप्रमाणे ज्ञानी पुरुष देह व सृष्टी वगैरेंच्या नाम रुपांची आसक्ती सोडून सर्वश्रेष्ठ अशा ईश्वराच्या ठायी विलीन होतो. नदी छोटी असो वा मोठी सर्वांचा प्रवाह समुद्राकडेच असतो.

2) तथा अमी नरलोकवीरा तव अभिज्वलंति वक्त्राणि विशन्ति: तशाच प्रकारे हे सारे शूर-वीर पुरुष चहुबाजुंनी जळत तुमच्या मुखात प्रवेश करत आहेत. वीर आणि पराक्रमी पुरुष नद्यांनी समुद्रात प्रवेश करावा त्याप्रमाणे ईश्वराच्या भयंकर कालरुपी मुखात प्रविष्ट होत आहेत. अर्जुनाला हे दर्शन होत आहे की वाटैल तेवढ्या वीर पुरुषाच्या शौर्याचे अस्तित्व जोवर मृत्यु येत नाही तोवरच आहे. विश्वरुप दर्शनामुळे अर्जुनाला हे स्पष्ट झाले की कौरव-पांडवांचे हे महान पराक्रमी वीर पुरुष ईश्वराच्या भयंकर काल मुखात प्रवेश घेत आहेत. याचा अर्थ ईश्वर त्याना समाप्त करत आहे. तसे बघू गेल्यास माणूस क्षण-प्रतिक्षण मरणाकडे अग्रेसर होत आहे. यामुळे इथे सार्वभौम सत्ताकेवळ ईश्वराचीच चालू शकते. हे सत्य अर्जुनाला विश्वरुप दर्शनानिमित्त प्रत्यक्ष दिसून आले. माणूस आपल्या स्व-कर्तव्याला वा स्व-धर्माला कदापि सोडू शकत नाही कारण की स्वकर्तव्य वा स्वधर्माचे पालन करण्या कामीही आपण केवळ निमित्तमात्र आहोत. प्रत्यक्ष कर्ता-करविता तर परमेश्वरच आहे. प्रत्येकाचा स्वधर्मही समान नसतो. जेवढे लोक तेवढे वैचित्र्य-- वैविध्य. या विविधतेतही एकता हीच आहे की सारे ईश्वराच्या प्रेरणेनेच चालतात. कर्ता-करविता ईश्वर असून करणारे जीव आहेत.

: 29 :

*यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा*
*विशन्ति नाशाय समृध्दवेगा: ।*
*तथैव नाशाय विशन्ति लोका-*
*स्तवापि वक्त्राणि समृध्दवेगा: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा पतंगा:** ज्याप्रमाणे पतंग (मोहवश होऊन)
- **समृध्दवेगा:** प्रचंड वेगाने
- **प्रदीप्तं ज्वलनम्:** प्रज्वलित अग्नीत
- **नाशाय विशन्ति:** आपल्या नाशासाठी प्रवेश करतात
- **तथा एव लोका: अपि:** तसेच हे सारे लोक देखील
- **समृध्दवेगा:** प्रचंड वेगाने
- **तव वक्त्राणि नाशाय विशन्ति:** स्वत:च्या नाशासाठी आपल्या मुखात प्रवेश करीत आहेत

**अर्थ**

पतंग जसे मोहाने मरुन जाण्यासाठी पेटलेल्या अग्नीत अतिशय वेगाने धावत शिरतात तसेच हे सर्व लोकही स्वत:च्या नाशासाठी प्रचंड वेगाने धावत आपल्या मुखात प्रवेश करीत आहेत.

***भरुनियां वेग जसे पतंग***
***घेती उड्या अग्नि-मुखीं मराया***
***तसे चि हे लोक तुझ्या मुखांत***
***घेती उड्या वेग-भरें मराया ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) पतंग ज्याप्रमाणे प्रचंड वेगाने प्रदीप्त अग्नीत आपल्या नाशासाठी प्रवेश करतात 2) तसेच हे सारे लोकही प्रचंड वेगाने आपल्या मुखात स्वनाशासाठी प्रचंड वेगाने प्रविष्ट होत आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **यथा पतंगा समृध्दवेगा प्रदीप्तं ज्वलनं नाशाय विशन्ति:** पतंग प्रचंड वेगाने आपल्या विनाशासाठी प्रदीप्त अग्नीत प्रवेश करतात. इथे पतंगाचे उदाहरण दिलेले आहे. मागील श्लोकात नदीचे उदाहरण आले आहे. दोन्ही उदाहरणे विनाशाची आहेत. स्वतंत्र अस्तित्व न नदीचे आहे न पतंगाचे. जोवर नदी सागरात विलीन होत नाही तोवर तिचे अस्तित्व असते. दीपकावर झडप घेण्यापूर्वीपर्यंत पतंग जिवंत असतो पण तो अखेर जळत्या दिव्याच्या ज्योतीत समाप्त होऊन जातो. पाऊस नसेल तर नदीचे अस्तित्व नाही आणि समुद्र नसेल तर पाऊस नाही. अशा प्रकारे स्वतंत्र अस्तित्व न नदीचे आहे ना पावसाचे. तसेच उत्पन्न होण्यापूर्वी पतंगचे अस्तित्व नसते. दीपकावर झडप घेण्यातूनही त्याचे अस्तित्व संपून जाते. सृष्टीचे सारे पदार्थ क्षणजीवी आहेत. शाश्वत तर केवळ ईश्वरच आहे.

2) **तथा एव लोका: अपि समृध्दवेगा: तव वक्त्राणि नाशाय विशन्ति:** तसेच हे सारे योध्दा लोकही कमालीच्या वेगाने आपल्या विनाशासाठी तुमच्या मुखात प्रवेश घेत आहेत. नदीच्या दृष्टांताने हे समजावून सांगितले आहे की

सज्जन माणसेही कशाप्रकारे अंतसमयी ईश्वराच्या मुखात प्रवेश करत आहेत म्हणजे माणसे किती का भक्ती वा धर्मनिष्ठ असेनात पण अखेरीस ती काळाच्या उदरात सामावून जातात. भगवान बुध्द, महावीर, शंकराचार्य, ज्ञानदेव महाराज, महात्मा गांधी किती श्रेष्ठ होते. सारे विश्ववंद्य होते पण अखेरीस तेही निघून गेलेत. त्यांची अलौकिक कार्ये, उपदेश आणि ग्रंथांमुळे त्यांची स्मृती टिकून आहे पण ईश्वर शाश्वत आहे. सज्जन कशा प्रकारे ईश्वराच्या ठायी विलीन होतात यासाठी नदी आणि सागराचे उदाहरण दिले तर पापी, दुराचारी, अधर्मनिष्ठ लोकांसाठी पतंग व दीपकाचे उदाहरण दिले. दुर्जन बेभान असतात. हयात असेपर्यंत पापाचरण करत रहातात पण मृत्यु येताच सारे सापडतात. पतंगात अक्कल नसल्यामुळे तो दीपकावर झडप घेऊन मरतो. दुराचारीही आपल्या हयातीतच आपला विनाश करत रहातात पण याचे त्याना भान नसते. सज्जन धर्मनिष्ठेने सर्वांची सेवा करत जीवन घालवतात. दुर्जन पतंगासारखे असतात. पतंग कुणाची सेवा न करताच दीपकावर झडप घालून मरुन जातो. पापाचारी, दुर्जन, अधर्म परायण, कामासक्त कुणाची सेवा न करताच मरतात. एवढेच नव्हे पण हयात असतानाही ते जगात दुर्गंधच पसरवतात. जगाचे अकल्याणच करतात पण सज्जन आपला सुगंध जगात दरवळतात आणि जीवन संपवतात.

: 30 :

*लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लो*
*कान्समग्रान् वदनैर्ज्वलद्भिः ।*
*तेजोभिरापूर्य जगत् समग्रं*
*भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विष्णोः** भगवान कृष्णा, हे विष्णो
- **समन्तात्:** चहुंकडून
- **समग्रान् लोकान्:** समग्र लोकांना
- **ज्वलद्भिः वदनैः** जळत्या मुखांनी म्हणजे ज्वाळा धडकणाऱ्या मुखांनी:
- **ग्रसमानः** ग्रसत असतांना
- **लेलिह्यसेः** चाटताहात, स्वाद घेताहात
- **तब उग्राः भासः** आपले ते उग्र म्हणजे भयानक रुप
- **समग्रं जगत् तेजोभिः** संपूर्ण जगताला आपल्या तेजाने
- **आपूर्य प्रतपन्तिः** परिपूर्ण भरुन ताप देत आहे.

**अर्थ**

आपण त्या सर्व लोकाना प्रज्वलित मुखांनी गिळत गिळत सर्व बाजुंनी वारंवार चाटत आहात. हे विष्णो, आपला प्रखर प्रकाश सर्व जगाला तेजाने पूर्ण भरुन तापवित आहे.

*समस्त लोकांस गिळूनि ओंठ*
*तूं चाटितोसी जळत्या जिभांनी*
*वेढूनि विश्वास समग्र तेजें*
*भाजे प्रभो उग्र तुझी प्रभा ही ।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) सर्व बाजुंनी सर्व लोकाना जळत्या मुखात सर्वांना ग्रसणाऱ्या विष्णुने त्यांचा स्वाद घेतला आहे 2) आपले हे भयानक स्वरुप संपूर्ण जगताला आपल्या तेजाने ग्रसून खूप ताप देत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **विष्णो समन्तात् समग्रान् लोकान् ज्वलद्भिः वदनैः ग्रसमानः लेलिह्यसेः** सर्व लोकांचा चहुकडून आपल्या जळत्या मुखात ग्रास करुन आपण त्याचा स्वाद घेताहात. अर्जुन सांगत आहे की हे ईश्वरा, आपण सर्व लोकांना उत्पन्न करता, नंतर मृत्युच्या मुखात टाकून त्याना संपवून टाकता आणि यातच आपण आनंद मानता स्वाद घेताहात म्हणजे याचा तुम्हाला मोठा आनंद होतो. मजा वाटते या सर्वाची. कुणी आत्मीय जन वारले तर सारे दु:खी होतात पण सर्वांना संपवून टाकण्यात ईश्वर अजिबात दु:खी होत नाही. कौरव-पांडवांचा संहार होईल या भावनेने अर्जुन युध्दापासून परावृत्त होऊ इच्छित होता पण ईश्वराच्या विश्वरुप दर्शनात त्याने हे दृश्य बघितले की कौरव-पांडवांचे वीर योध्दे ईश्वराच्या मुखात मरुन पडताहेत. ईश्वराचे अखेर हे कसे स्वरुप आहे ? हे काही अर्जुनाच्या लक्षात येत नाही. सर्व लोकाना ज्यामुळे दु:खद अनुभव

येईल त्यात देवाला दु:खाचा अनुभव येत नाही, एवढेच नव्हे पण त्यात देवाला आनंद वाटतो असे अर्जुनाला दिसत आहे.

2) **तव उग्रा: भास: समग्रं जगत् आपूर्य प्रतपन्ति:** हे ईश्वरा, आपले हे भयंकर रुप संपूर्ण जगाला आपल्या तेजाने ग्रासून प्रचंड ताप देत आहे. अर्जुन म्हणतो की सर्वांना समाप्त करुन टाकणारे आपले हे भयानक रुप आहे. ते काही केल्या माझ्या लक्षात येत नाही. ईश्वर दुष्ट प्राण्यांचा संहार करतो हे तर समजून घेता येते पण जगाचे कल्याण करणाऱ्या महात्मा पुरुषांनाही तो समाप्त करुन टाकतो ही समजून घेता येण्यासारखी बाब नाही. विचार करतो तर जगाचा काही उद्देश ध्यानात येत नाही. ईश्वर सर्वांना उत्पन्न करतो पण सर्वांना जगाच्या दु:खातच ढकलून देतो कारण की जगात कुणालाही दु:खाशिवाय दुसरा अनुभव येत नाही. यामुळे अर्जुन म्हणतो की हे आपले भयानक स्वरुप सर्वांना ताप देत आहे.

: 31 :

*आख्याहि मे को भवानुग्ररुपो*
*नमोऽस्तु ते देववर प्रसीद।*
*विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं*
*न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **उग्ररुप: भवान् क:** उग्ररुपधारी आपण कोण आहात?
- **मे आख्याहि:** हे मला सांगा
- **ते नम: अस्तु:** आपणाला नमस्कार असो
- **देववर प्रसीद:** हे देवश्रेष्ठा, मजवर प्रसन्न व्हा
- **भवन्तं आद्यं:** जगताच्या मूळ कारणरुप आपणास
- **विज्ञातुं इच्छामि:** तत्त्वाने जाणून घ्यावे अशी इच्छा मी करीत आहे
- **हि तव प्रवृत्तिं न प्रजानामि:** कारण की ही आपली प्रवृत्ती मला समजलेली नाही

**अर्थ**

मला सांगा की भयंकर रुप धारण करणारे आपण कोण आहात? हे देवश्रेष्ठा, आपणाला नमस्कार असो. आपण प्रसन्न व्हा. आदीपुरुष अशा आपणास मी विशेष रीतीने जाणू इच्छितो कारण आपली ही करणी मला कळत नाही.

***सांगा असां कोण तुम्ही भयाण***
***नमूं तुम्हां देव-वरा न कोपा***
***जाणावया उत्सुक आदि-देवा***
***ध्यानी न ये कीं करणी कशी ही।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) भयंकर रुप धारण करणारे आपण कोण आहात? हे समजावून सांगावे. 2) आपणास नमस्कार असो. 3) हे देवश्रेष्ठा, मजवर प्रसन्न व्हा. 4) जगताच्या मूळ कारणरुपा आपणास जाणून घ्यायची मला इच्छा आहे. 5) कारण की मी आपल्या या प्रवृत्तीला जाणून घेऊ शकत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **उग्ररुप: भवान् क: मे आख्यहि:** हे भयंकर उग्र रुप धारण केलेले आपण कोण आहात? हे मला समजावून सांगावे. साधकाला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावर विश्वाकडे बघण्याची परमात्म दृष्टी प्राप्त होते. तेव्हा जे विश्वरुप दर्शन होते ते कदापि भयानक वाटत नाही कारण की घटाला जर मातीच्या दृष्टीने बघाल तर स्वतंत्र पदार्थ न उरल्यामुळे घट योग्य वाटणार नाही. जेव्हा एखादी वस्तु योग्य खरी वाटते तेव्हा भय, दु:ख वा आनंद वाटतो. साक्षात् सिंह समोर येऊन उभा ठाकला तर भय वाटू लागते पण चित्रातल्या सिंहाला बघून कुणी भीत नाही भीत नसतो. अर्जुनाला घडलेले विश्वरुप दर्शन हे ज्ञान दर्शन नसल्यामुळे ते भयानक दृश्य बघून त्याला भय वाटत आहे. यामुळे तो देवाला विचारत आहे की हे भयानक रुप धारण केलेले आपण कोण आहात? हे मला समजावून सांगावे.

2) **ते नम: अस्तु:** हे ईश्वरा, आपणास नमस्कार असो. हा नमस्कार भक्तीपूर्ण नसून भयजन्य आहे. एखाद्या लूटमार करणाऱ्या डाकूला बघून आपण 'दया करा पण लुटू नका.' अशी प्रार्थना करतो तसा हा नमस्कार आहे. अर्जुनाच्या मनातही भय उपजले आहे म्हणून देवापुढे त्याचे हात जोडले गेले आहेत.

3) **देववर प्रसीदः** हे देवगणांमध्ये श्रेष्ठ देवाधिदेवा, मजवर प्रसन्न व्हावे, मजवर अनुग्रह करावा. भयामुळे अर्जुनाने देवाला हात जोडून नमस्कार केला आणि अशी प्रार्थना केली आहे की हे देवश्रेष्ठा, मजवर प्रसन्न व्हा, अनुग्रह करा. विश्वरुपाचे दर्शन घडल्यामुळे माझ्या मनात उत्पन्न झालेल्या भयाला घालवा. जंगलात एखादा वाघ किंवा सिंहाशी सामना झाला तर आपण भयभीत होऊन जातो आणि ईश्वराचे स्मरण करत प्रार्थना करतो 'हे ईश्वरा, मला या भीषण संकटापासून वाचवा.' भय उपजले असता ईश्वराशिवाय दुसरा कुणीच मदतनीस दिसत नाही. त्यावेळी कुणी कितीही समजावले, उपदेश दिला तरी तो उपयोगी पडत नाही, अशावेळी ईश्वरच त्या भयापासून आपल्याला मुक्त करतो. विश्वरुप दर्शन करताना अर्जुनाची अशीच स्थिती झाली आहे. यामुळे आता दुसरा कुठलाही उपाय न उरल्यामुळे अर्जुन ईश्वराला नमन करुन प्रार्थना करत आहे की मजवर अनुग्रह करावा, जेणेकरुन माझे भय दूर होईल.

4) **भवन्तं आद्यं विज्ञातं इच्छामिः** आपण विश्वाचे मूळ कारण असल्यामुळे मी आपणास जाणून घेण्याची इच्छा करत आहे. अर्जुनाला विश्वरुप दर्शन पचत नाही. ज्ञानी दर्शनाच्या अवस्थेत झालेले ज्ञानी अवस्थेत घडलेले विश्वरुप दर्शनच खरे असते, यथार्थ असते. अज्ञानावस्था कायम असताना जेव्हा विश्वरुप दर्शन केले जाते तेव्हा ते पचन नसते. यामुळे अर्जुनाच्या मनात ज्ञानाविषयी जिज्ञासा जागली आहे. आपण या विश्वाचे मूळ आदी कारण आहात यामुळे मी आपल्या मूळ स्वरुपाला जाणून घेऊ इच्छितो. यामुळे मला ज्ञानाचे दर्शन होईल असे अर्जुनाचे म्हणणे आहे. ज्ञानी अवस्थेनंतर जे विश्वरुप दर्शन होईल ते घडल्यावर कदापि भयभीत व्हायची वेळ येणार नाही. त्या वेळी संपूर्ण विश्व ब्रह्मांड हे ईश्वराहून अभिन्न असल्यामुळे सत्य वाटणार नाही. मनात या जगाविषयी मिथ्यात्व बुध्दी आणि परमात्म दृष्टी जागेल यामुळे ईश्वराद्वारा निर्मित या विश्वात भयोत्पादक नाना कार्ये व अनेक प्रवृत्ती दिसून आल्या तरी मन कदापि विचलित होणार नाही.

5) **हि तव प्रवृत्तिं न प्रजानामिः** याचे कारण असे आहे की हे ईश्वरा, मी आपल्या प्रवृत्ती वा स्वरुपाला समजून घेऊ शकत नाही. मातीला जाणून घेतले की त्यापासून तयार होणारे सर्व पदार्थ आपोआप जाणून घेतले जातात. या विश्वरुप दर्शनामुळे मनात भय उत्पन्न होत आहे याचा अर्थ असा आहे की जे दिसत आहे त्याचे खरे स्वरुप मला जाणून घेता येत नाही. विश्वाचे स्वरुपच असे आहे की त्यात कार्यरत परस्पर विरुध्द प्रवृत्तींना बघून कुणीही गोंधळात पडेल. जोवर ईश्वर स्वरुप विषयक अज्ञान राहील तोवर कमी-जास्त प्रमाणात न्यूनाधिक प्रमाणात हा गोंधळ राहीलच. ईश्वराचे स्वरुप लक्षात येताच सृष्टीचे खरे स्वरुप म्हणजे मिथ्यात्व लक्षात येऊन कुठलीही अडचण उरणार नाही.

: 32 :

**श्री भगवान उवाच**

*कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृध्दो*
*लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।*
*ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे*
*येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **लोकक्षयकृत् प्रवृध्दः कालः अस्मिः** मी लोकांचा क्षय करणारा वाढलेला म्हणजे बलवान काळ म्हणजे महाकाळ आहे
- **इह लोकान् समाहर्तुं प्रवृत्तः** या वेळी लोकांना नष्ट करण्यासाठी प्रवृत्त झालो आहे
- **प्रत्यनीकेषु ये योधाः** प्रतिपक्षियांच्या सैन्यदळात जे योध्दे आहेत म्हणजे दोन्ही सैन्य दळात झुंजणारे जे योध्दे आहेत
- **अवस्थिताः** उपस्थित आहेत
- **ते सर्वेः** ते सारे
- **त्वां ऋते अपिः** तुझ्याशिवायही
- **न भविष्यन्तिः** इथे हयात रहाणार नाहीत अर्थात् तू युध्द केले नाहीस तरी या सर्वांचा नाश होणारच

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले मी लोकांचा नाश करणारा, वाढलेला म्हणजे बलवान असा काळ आहे. यावेळी या लोकांच्या नाशासाठी मी प्रवृत्त झालो आहे म्हणून शत्रुपक्षातील सैन्यात जे योध्दे आहेत ते सारे तुझ्या

शिवायही ह्यात रहाणार नाहीहेत म्हणजेच तू युध्द केले नाहीस तरी या सर्वांचा नाश होणार आहे.

**श्री भगवान म्हणाले**

***मी काळ लोकांतक वाढलेला***
***भक्षावया सिध्द इथें जनांस***
***हे नष्ट होतील तुझ्या विना हि***
***झाले उभे जे उभयत्र वीर।***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) मी लोकांचा क्षय करणारा बलवान काळ आहे. 2) इथे लोकाना मारण्यासाठी प्रवृत्त झालो आहे. 3) प्रत्येक सैन्यदळात जे लढणारे योध्दे आहेत ते सारेच्या सारे तुझ्या शिवायही इथे जिवंत रहाणार नाहीहेत.

या अकराव्या अध्यायाच्या 15 ते 31 या श्लोकात अर्जुनाने विश्वरुप दर्शनासंबंधी जे काही सांगायचे होते ते सांगून टाकले आहे. आता भगवान श्लोकातून आपले निवेदन करताहेत. भगवंत इथे अर्जुनाला खरा बोध करताहेत.

**स्पष्टीकरण**

1) **लोकक्षयकृत् काल: प्रवृध्द: अस्मि:** मी इथे बलवान काळाच्या रुपात लोकांच्या क्षयासाठी प्रवृत्त झालो आहे. संत ज्ञानेश्वर नवव्या अध्यायाच्या अखेरीस सांगतात "बाळ जसजसे मोठे होऊ लागते तसतसे माता-पिता वगैरे अत्यानंदाने नाचू लागतात पण बाळ जसजसे वाढत जात आहे तसतशी त्याच्या आयुष्याची दोरी घटत चालली आहे याविषयी त्यांच्या मनात यत्किंचितही खेद होत नाही." पुढेहीज्ञानेश्वर महाराज अत्यंत उत्तम शैलीत सांगतात: "जन्म घेतल्याबरोबर माणसाला दिन प्रतिदिनी मृत्युच्या अधिक अधीन व्हायला लागते तरीही लोक आपला वाढदिवस खूप धूमधडाक्यात साजरा करतात आणि आनंदाचे झेंडे नाचवतात पताका फडकवतात. लोकांना 'मरण' हा शब्दही सहन होत नाही. एखाद्याच्या निधनाने लोक मोठमोठ्याने रडू लागतात पण ते लोक आपल्या मूर्खपणामुळे या गोष्टीचा कदापि विचार करत नाही की खुद्द आपलेही आयुष्य प्रतिदिनी क्षीण होत चालले आहे. सर्प बेडकाला गिळत असतो त्यावेळी बेडूक खाण्यासाठी माशीला आपल्या तोंडात घट्टपणे पकडून असतो. अगदी याच प्रकारे माणूस निरंतर आपल्या वासना वाढवत रहातो पण त्याला काय लाभ होऊ शकतो?"

2) **इह लोकान् समाहर्तुं प्रवृत्त:** इथे लोकांना मारण्यासाठी (मी) प्रवृत्त झालो आहे. आधी ईश्वराने आपले स्वरुप दाखवले. मी लोकांचा क्षय करणारा, संहार करणारा बळवान काळ आहे हे आधी सांगितले. आता त्या काळाचे कार्य सांगताहेत. काळाचे स्वरुप संहारकारी आहे तर त्याचे कार्य लोकाना संहार करण्याकामी प्रवृत्त करणेच असेल. ईश्वर म्हणत आहे की तो रात्रंदिवस संहार करण्याचे कार्य करत असतो. अर्थात् ईश्वर संहाराचेच कार्य करत असतो असा अर्थ घ्यायचा नाही. संहार कार्यासोबत वस्तुला उत्पन्न करण्याचे कार्यही नित्य चालत रहाते. वस्तुची उत्पत्तीच जर झाली नसती तर नाश कसा होऊ शकला असता ? यामुळे उत्पत्ती आणि संहार ही दोन्ही कार्ये अखंडपणे सुरुच आहेत. हे समजून घेऊन आपण देवाच्या शरणी जाऊन अनासक्त व्हायला हवे. उत्पत्ती आणि संहाराचे कार्य करणारा ईश्वरच आहे यामुळे आपल्याला केवळ कार्य करण्यातच तल्लीन न रहाता अलिप्त रहायला हवे.

3 ) **प्रत्यनीकेषु ये योधा: अवस्थिता:** ते सर्वे त्वां ऋते अपि न भविष्यन्ति दोन्ही सैन्यदळात लढणारे जे वीर योध्दा आहेत ते सारेच्या सारे कुणाच्या प्रयत्नांशिवायच इथे जिवंत रहाणार नाहीहेत, नष्ट होऊन जाणार आहेत. भगवान सांगताहेत की हे अर्जुना, तुझे सारे नातलगच युध्दासाठी समोर उभे ठाकले आहेत यामुळे तू लढू इच्छित नाहीस पण हे का कायमसाठी जिवंत राहू शकतील? तू मारल्या शिवायही हे सारे संपून जाणार आहेत. मी काळाच्या रुपात इथे उपस्थित आहे त्यामुळे इथे कुणीही कायमसाठी जिवंत राहू शकणार नाही. तू सुध्दा जिवंत राहू शकणार नाहीहेस. परमात्म्याशिवाय दुसरे काहीही शाश्वत नाही. शत्रुचा सामना करणे कर्तव्य आहे की नाही? हा एकच मुद्दा विचार करण्यासारखा आहे. कौरवांच्या अन्यायाचा सामना करणे, त्याचा प्रतिकार करणे जर कर्तव्य वा स्वधर्म नसेल तर ते अकार्य मानून करायला नको पण प्रतिकार करणे जर कर्तव्यरुप असेल तर केवळ आपले नातलग युध्दार्थ समोर उभे ठाकले आहेत म्हणून आपण कदापि स्वधर्माचा त्याग करु शकत नाही.

: 33 :

*तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व*
*जित्वा शत्रुन् भुंक्ष्व राज्यं समृध्दं ।*
*मयैवैते निहताः पूर्वमेव*
*निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात् त्वं उत्तिष्ठः** म्हणून तू उठून उभा रहा
- **यशः लभस्वः** यश संपादन कर
- **शत्रुन् जित्वाः** शत्रुंना जिंकून
- **समृध्दं राज्यं भुंक्ष्वः** धनधान्य संपन्न अशा समृध्द राज्याचा उपभोग घे
- **एते मया एवः** या सर्वांना मीच
- **पूर्वं निहताः** आधीपासून मारुन टाकले आहे
- **सव्यसाचिन्ः** हे सव्यसाची (सव्य म्हणजे डावा. अर्जुनाला डाव्या हातानेही बाण सोडण्याचा अभ्यास होता म्हणून त्याला 'सव्यसाची' असे नाव मिळाले होते.)
- **निमित्तमात्रं भवः** तू केवळ निमित्त मात्र बन.

**अर्थ**

म्हणूनच तू उठ, यश संपादन कर. शत्रुंना जिंकून धनधान्यसंपन्न राज्याचा उपभोग घे. हे सर्व शूरवीर आधीच माझ्याकडून मारले गेले आहेत. हे सव्यसाची तू फक्त निमित्तमात्र हो.

*म्हणूनि तूं उठ मिळीव कीर्ति*
*जिंकूनि निष्कंटक राज्य भोगीं*
*मीं मारिले हे सगळे चि आधीं*
*निमित्त हो केवळ सव्य-साची ।*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) तू उभा रहा, यश संपादन कर. 2) शत्रुला जिंकून समृध्द राज्याचा उपभोग घे. 3) य सर्वांना मी आधीच मारुन टाकलेले आहे. 4) हे सव्यसाची तू निमित्त मात्र बन.

**स्पष्टीकरण**

1) **तस्मात् त्वं उत्तिष्ठ यशः लभस्वः** शोक आणि मोहाने ग्रस्त होऊन अर्जुन रथात बसून राहिला होता 'मी झुंजणार नाही.' असे म्हणत होता या संदर्भात भगवान सांगताहेत "तू उठून उभा रहा. यश संपादन कर. मी विश्वरुपाचे दर्शन घडवून 'तू कोण बरे मारणारा, मारणारा तर मीच आहे, हे धडपणे समजून घे.'असे सांगून ठेवले आहे." माणसाच्या ठायी जोवर अहंकार असतो म्हणजे ईश्वरच सारे काही करवून घेत आहे अशी अनुभूती नसते तोवर शोक -- मोह इत्यादि विकार मनात उठत रहातात आणि आपले जीवन या विकारांनी प्रेरित होऊनच चालत रहाते. यामुळे भगवान सांगताहेत की कर्ता करविता मी आहे असे समजून केवळ कर्तव्य पालनाची दृष्टी राखून कीर्ती प्राप्त कर. कीर्ती शब्दही दुसऱ्या दुसऱ्या अध्यायाच्या 33 ते 36 व्या श्लोकांच्या संदर्भात आला आहे यामुळे भगवंतांनी उपदेश दिला की तू जर हे धर्मयुध्द म्हणजे स्वधर्मरुप कर्तव्य टाळलेस तर तुझी अपकीर्ती होईल, निंदाच होईल. दुसऱ्या अध्यायातल्या 37 व्या श्लोकातही अर्जुनाला हेच सांगितले आहे की उठून उभा रहा आणि स्वधर्मरुप कर्तव्याचा निश्चय कर ठरव.

2) **शत्रुन् जित्वा समृध्दं राज्यं भुंक्ष्वः** शत्रुवर विजय संपादन कर आणि समृध्द राज्याचा उपभोग घे. या सुखाचा शंखनाद राज्य प्राप्तीसाठीच झाला होता. पांडवांच्या बाजूने न्याय होता यामुळे अन्यायाचा प्रतिकार करणारे हे युध्द संपूर्णपणे धर्मरुप आहे. अर्जुनाच्या बाजूने न्याय होता म्हणून भगवान अर्जुनाचे सारथी बनले. भगवान ज्या बाजूने असतील ती बाजू सत्य असलीच पाहिजे मग सत्याचा पराभव कसा बरे होऊ शकेल?

3) **एते मया एवं पूर्वं निहताः** या सर्वांना म्हणजे या सर्व शत्रु पक्षातल्या कौरव वगैरेंना मी आधीपासूनच मारुन टाकले आहे. गांधीजी हेच म्हणत होते की आपण फक्त सत्य पालनाची चिंता करायला हवी. सत्याचे पालन करणाऱ्यांचा कदापि पराभव होत नाही. असत्याचरणी लोकांचा विजय होत आहे असे काही काळ जरी वाटत असले तरी अखेरीस त्यांचा पराभवच होईल. हिटलरच्या बाजूने सत्य नव्हते पण सुरुवातीला त्याचा विजय होत गेला पण अखेरीस मात्र त्याचा प्रचंड पराभव झाला. तसे सुरुवातीला जरी सत्याचा विजय होत असल्यासारखे वाटत नसले तरी सत्य पालनाची अंतिम परिणती

विजयातच होते. यामुळे भगवान अर्जुनाला सांगताहेत की अभिमानाचा त्याग केलास तर कौरवांना मारणारा तू नसून मी आहे हे लक्षात येईल.

4) **सव्यसाचिन् निमित्तमात्रं भव:** हे सव्यसाचिन् अर्जुना (अर्जुनाला डाव्या हातानेही बाण चालवता येत होते म्हणून त्याला सव्यसाचिन् असे म्हटले आहे.) तू केवळ निमित्त बन. भगवंताचे हे वचन खूप रुढ होऊन गेले आहे. या वचनाला अध्यात्म शास्त्रात खूप मोल आहे. या वचनात मोक्षाची चावी आहे. ही चावी गांधीजींच्या लक्षात येऊन गेली होती म्हणून त्यांनी स्वत:ला शून्य बनवून कार्य केले. स्वत:ला केवळ निमित्त मानून ईश्वरालाच सर्व कार्याचा कर्ता मानणे मोठी गोष्ट आहे.

: 34 :

***द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च***
***कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।***
***मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा***
***युध्यस्य जेतासि रणे सपत्नान् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **द्रोणं च भीष्मं:** द्रोणाचार्य आणि भीष्माचार्य
- **च जयद्रथं कर्णं तथा अन्यान् अपि:** आणि जयद्रथ, कर्ण आणि अन्य आणखी दुसरे वीर ही
- **मया हतान्:** माझ्याकडून मारले गेले आहेत
- **योधवीरान्:** या शूरवीर योध्दे मंडळींना
- **त्वं जहि:** तू मार
- **मा व्यथिष्ठा:** भिऊ नकोस, दु:खी होऊ नकोस
- **युध्यस्व:** तू युध्द कर
- **रणे सपत्नान् जेतासि:** तू नि:संशयपणे शत्रुला समरांगणात जिंकशील

**अर्थ**

द्रोणाचार्य आणि पितामह भीष्म तसेच जयद्रथ आणि कर्ण त्याचप्रमाणे माझ्याकडून मारल्या गेलेल्या इतरही पुष्कळ शूर वीर योध्दे मंडळींना तू मार. भिऊ नकोस. युध्दात खात्रीने तू शत्रुंना जिंकशील म्हणून युध्द कर.

***द्रोणास भीष्मास जयद्रथास***
***कर्णादि वीरांस रणांगणांत***
***मी मारिलेल्यांस फिरुनि मारीं***
***नि:शंक झुंजें जय तो तुझा चि ।***

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) द्रोणाचार्य, भीष्माचार्य, जयद्रथ, कर्ण आणि अन्य वीरांनाही 2) माझ्याद्वारे मारल्या गेलेल्या या वीरांना तू मार. 3) दु:खी होऊ नकोस, भिऊ नकोस. 4) तू युध्द कर. 5) युध्दात तू शत्रुला तू जिंकून घेशील.

**स्पष्टीकरण**

1) **द्रोणं च भीष्मं जयद्रथं कर्णं तथा अन्यान् अपि:** आधी जे युध्द करायला तयार झाले होते त्यांच्यातली काही प्रमुख नावे भगवान घेताहेत. द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कर्ण आणि जयद्रथ. या चौघांचे प्रत्यक्ष नाव घेतले आहे आणि शेष वीरांचा नामोल्लेख न करता फक्त उल्लेख केला आहे. पहिल्या अध्यायातील आठव्या श्लोकात या चौघांचा उल्लेख असून नवव्या श्लोकात अन्य वीरांचा उल्लेख आहे. द्रोणाचार्य कौरव-पांडव यांचे गुरु होते.

भीष्माचार्य राजा शांतनू यांचे चिरंजीव असून आजन्म ब्रह्मचारी होते. पित्याच्या आशीर्वादामुळे ते इच्छामरणी बनले होते. ते कौरवांच्या बाजूने दहा दिवस लढले. मग देहत्याग करण्यासाठी उत्तरायणाची वाट बघत जिवंत राहिलेत.

जयद्रथ सिंधू देशीचे राजे होते. ते वृध्दक्षत्रचे चिरंजीव असून धृतराष्ट्राच्या दु:शला नामक कन्येचे पती होते. त्याना अर्जुनाने युध्दात मारले होते.

कर्ण कुंतीला सूर्यापासून जन्माला आलेले पुत्र होते. ते मोठे दानशूर असून धनुर्विद्येत पारंगत होते. त्यानी कौरवांच्या बाजूने लढू नये म्हणून कुंती व कृष्णाने प्रयत्न केलेत पण त्यांनी ते न मानता कौरवांच्या बाजूने लढले आणि युध्दात अर्जुनाहातून मारले गेले.

2) **मया हतान् योधवीरान् त्वं जहि:** माझ्या द्वारा मारल्या गेलेल्या या वीर योध्देजनांना तू मार. मी या कौरवांना आधीच मारुन टाकले आहे, हे तुझ्या लक्षात येत नाही म्हणून मी तुला सांगतो असे भगवान सांगताहेत. तू जगताचा कर्ता नाहीहेस. जगताचा कर्ता परमात्मा आहे.

परमात्माच सर्वांचे भरण-पोषण करतो आणि संहारही तोच करतो. परमात्म्यानेच एकीकडे कौरवांचे रुप धारण केले आहे तर दुसरीकडे तोच पांडव बनून राहिला आहे आणि तोच स्वत: या युध्दाचे नाटक करतो. तू स्वत:ला जे काही मारणारा समजत आहेस ते चुकीचे आहे. तुला केवळ निमित्त बनायचे आहे. यातून अहंकार आणि मोह दूर सारला जाईल आणि केवळ कर्तव्य पालनाची दृष्टी उरेल. यामुळे तू स्वत:ला कौरवांना मारणारा न मानता परमात्म्यालाच या युध्दाचा कर्ता समज.

3) **मा व्यथिष्ठाः** दु:खी होऊ नकोस, भिऊ नकोस आणि चिंता करु नकोस. कर्तव्य-अकर्तव्याचा निर्णय अंतर्यामी प्रभुच्या प्रेरणेने करायचा एकदा का सराव झाला ना की मग अप्रिय असले तरी कर्तव्य-अकर्तव्य करताना दु:खाचा अनुभव येत नाही. ओझे वाटत नाही. चित्त चिंतामुक्त रहाते.

4) **युध्यस्वः** तू युध्द कर म्हणजे जे कर्तव्य मानले आहे ते करायला संकोच करु नकोस. युध्दाचा खरा अर्थ अन्यायाचा प्रतिकार करणे होय. हा प्रतिकार शस्त्राशिवायही होऊ शकतो. शस्त्राशिवाय अन्यायाच्या प्रतिकाराचा मार्ग गांधीजींनी दाखवूनच दिला आहे. शस्त्रयुध्दात दुसऱ्याचा प्राण घ्यायचा असतो तर अहिंसक युध्दात आपले बलिदान करायचे असते. दुसऱ्याला ठार मारण्यात त्याग नाही यामुळे हिंसक प्रतिकाराऐवजी अहिंसक प्रतिकार कित्येक पटींनी वाढतो.

5) **रणे सपत्नान् जेतासिः** युध्दात तू शत्रुला जिंकशील. एक महत्वाची गोष्ट अर्जुनाच्या लक्षात येत नाही की या युध्दाला भगवंताने अनुमती दिली आहे, आशीर्वाद दिले आहेत. ज्या कार्यात ईश्वराचे आशीर्वाद नसतात ते अकार्य मानून करायला नको. ज्या कार्यात देवाची परवानगी आहे त्यात यश ठरलेलेच आहे.

संत नामदेवांना संत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रेसाठी बोलावले असता ते म्हणाले की 'भगवंताची आज्ञा मिळवूनच यात्रेला येऊ शकतो.' संत नामदेव देवळात गेले, हात जोडून पांडुरंगापुढे उभे राहिलेत आणि देवाला यात्रेला निघण्यासाठी परवानगी विचारली. देवाने परवानगी दिली मग ते यात्रेला निघाले होते. हा बुध्दीचा नव्हे तर श्रध्देचा विषय आहे.

: 35 :

**संजय उवाच**

*एतच्छुत्वा वचनं केशवस्य*
*कृतांजलिर्वेपमानः किरीटी।*
*नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं*
*सगद्गदं भीतभीतः प्रणम्य॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **केशवस्य एतत् वचनं श्रुत्वाः** भगवान केशवाचे कृष्णाचे असे वचन ऐकून
- **कृतांजलिः** हात जोडून
- **वेपमानः** कापत-कापत, थरथरत
- **किरीटीः** मुकुटधारी अर्जुन
- **नमस्कृत्वाः** नमस्कार करत
- **भीतभीतः प्रणम्यः** भीत-भीत विनम्रभावे प्रणाम करुन
- **भूयः एवः** फिरुन ही
- **कृष्णं सगद्गदं आहः** गद्गद स्वरात कृष्णाप्रती बोलला

**अर्थ**

संजय म्हणाला श्रीकृष्णाचे हे बोलणे ऐकून किरिटी अर्जुनाने हात जोडून कापत कापत नमस्कार केला आणि फिरुनही अत्यंत भयभीत होऊन प्रणाम करुन भगवान कृष्णानांना सद्गदित होऊन तो म्हणाला.

**संजय म्हणाला**

*ऐकूनि हें अर्जुन कृष्ण-वाक्य*
*भ्याला जसा कांपत हात जोडी*
*कृष्णास वंदूनि पुनश्च बोले*
*लवूनियां तेथ गळा भरुनि।*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) केशवाच्या या वचनांना ऐकून हात जोडून कापत अर्जुनाने 2) नमस्कार करत, भीत-भीत विनम्रतेने प्रणाम केला आणि मग गद्गद होत कृष्णाला म्हणाला.

### स्पष्टीकरण

1) केशवस्य एतत् वचनं श्रुत्वा कृतांजलि: वेपमान: किरीटी: श्री कृष्णाने मागील तीन श्लोकात जे सांगितले होते ते ऐकून अर्जुनाची जी अवस्था झाली होती ती संजय या श्लोकातून राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. केशवाच्या या वचनांना ऐकून हात जोडत थरथर करणाऱ्या अर्जुनाने नमस्कार करत, भयभीत होऊन विनम्रभावे प्रणाम केलेत. अर्जुनाने सद्गदित होऊन विनम्रपणे कृष्णाला म्हटले. भगवंतापुढे अर्जुनाचे हात नमस्कारासाठी जुळले. कसे जुळले? थरथर करत जुळले. भगवंताचे म्हणणे ऐकून अर्जुनाच्या मनात भय संचरले. भगवंताच्या वचनांना ऐकून त्याच्या मनात हा भाव येऊ लागला की भगवंताच्या सहवासात माझे उभे आयुष्य व्यतीत झाले पण त्याना मी ओळखले नाही. मोहरुपी चिखलात रुतून राहिलो. हा विचार येताच त्याला भय वाटले. हे भय पश्चात्तापामुळे आले होते. पश्चात्ताप होणे स्वाभाविकच होते कारण की भगवंताचे जीवन इतके निरहंकारी होते की त्यांच्या सहवासात रहात असताना त्यांच्या गुण वैशिष्ट्यांचा परिचय होऊ नये. भगवान इतके विनम्र होते की त्यांनी अर्जुनाचे सारथ्य कर्म सहज स्वीकारुन घेतले होते. अर्जुन रथात आरामात बसला आहे आणि भगवान रथाबाहेर बसून घोडे हाकताहेत हे दृश्य बघून ज्याला कुणाला ईश्वराची ओळख होऊन जाईल तो विनम्र भावनेने प्रणत होऊ शकतो.

2) **नमस्कृत्वा भीतभीत: प्रणम्य भूय:** एव कृष्णं सगद्गदं आह: भयभीत होऊन चळचळा कापत हात जोडून अर्जुनाने भगवान कृष्णाला प्रणाम केला. प्रणामानंतर कमालीचा भयभीत होत विनम्र भावनेने माथा लववून सगद्गदित अंत:करणाने युक्त झाला आणि म्हणू लागला. हा सारा भक्तीचा आविर्भाव आहे. जो भगवंताचा महिमा जाणून घेईल तो त्वरित आपली क्षुद्रता समजून घेईल आणि भगवंतासमोर निरंतर प्रणत मुद्रेत राहील. शून्य बनला ही गोष्ट अर्जुनाच्या लक्षात आली त्यामुळे तो नतमस्तक झाला असे संजय धृतराष्ट्राला सांगत आहे.

: 36 :

### अर्जुन उवाच

*स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या*
*जगत् प्रहृष्यत्यनुरज्यते च ।*
*रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति*
*सर्वे नमस्यन्ति च सिध्दसंघा: ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **हृषीकेश:** हे इंद्रियांच्या स्वामी भगवान श्रीकृष्णा, हे अंतर्यामी
- **तव प्रकीर्त्या:** आपल्या नामाच्या व प्रभावाच्या कीर्तनाचा महिमा ऐकल्याने
- **जगत्:** संपूर्ण जगत
- **प्रहृष्यति:** अतिशय आनंदित होते
- **च अनुरज्यते:** आणि आपल्यावर अनुरक्तही होते, प्रेमही करते
- **स्थाने:** हे योग्यच आहे
- **रक्षांसि भीतानि:** राक्षस लोक भयभीत होऊन
- **दिश: द्रवन्ति:** दशदिशांकडे पळून जातात
- **सर्वे सिध्दसंघा:** आणि तमाम सिध्द गणांचे समुदाय
- **नमस्यन्ति:** नमस्कार करतात

### अर्थ

अर्जुन म्हणाला हे अंतर्यामी, आपले नाव, गुण आणि प्रभाव यांच्या वर्णनाने जग अतिशय आनंदित होते आणि आपल्यावर अतिशय प्रेम करु लागते तसेच भयभीत राक्षस गण दशदिशात पळून जात आहेत आणि सर्व सिध्द गणांचे समुदाय आपल्याला नमस्कार करत आहेत हे योग्यच आहे.

### अर्जुन म्हणाला

*जगीं तुझ्या युक्त चि कीर्तनानें*
*आनंद लोटे अनुराग दाटे*
*भ्याले कसे राक्षस धांव घेती*
*हे वंदिती सिध्द-समूह सारे ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) हे भगवान आपला महिमा ऐकून संपूर्ण जगत आनंदित होते आणि आपल्यावर प्रेम करते हे उचितच आहे. 2) राक्षस भयभीत होऊन दशदिशांकडे धावतात हेही उचितच आहे आणि 3) संपूर्ण सिध्दगणांचे समुदाय नमस्कार करतात हेही योग्यच आहे.

**स्पष्टीकरण**

1) **हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत् प्रहृष्यति च अनुरज्यते स्थाने:** श्रीकृष्णा! आपला महिमा ऐकून सारे जगत आनंदित होते आणि प्रेम करु लागते, हे योग्यच आहे. जगतातले तमाम प्राणीमात्र कुठल्या ना कुठल्या रुपात परमात्म्याकडे आकृष्ट होऊन जातात. जगात माणसाच्या अधीन असे खूप कमी आहे, हे कळल्यावर नास्तिक सुध्दा कधी-ना-कधी या श्रध्देकडे वळतो की जगात कुठली तरी अदृश्य शक्ती कार्यरत आहे. आधुनिक विज्ञानही आता असे मानू लागले आहे की कुठली तरी अदृश्य शक्ती अवश्यमेव आहे आणि ती जड नसून ज्ञानसंपन्न आहे. अधिकांश लोक श्रध्देनेच ईश्वराचे अस्तित्व मानतात. या श्रध्देचा आधार ज्ञानच असतो असे नाही पण श्रध्देने ईश्वराचे स्मरण होऊन ते हर्षभरित होऊन जातात. जेव्हा कुणी अधिकारी पुरुष ईश्वराच्या अलौकिकतेचे वर्णन करतो तेव्हा ऐकणारे आनंदित होतात आणि त्यांच्या मनात ईश्वराविषयी अनुराग भाव उत्पन्न होतो.

2) **रक्षांसि भीतानि दिश: द्रवन्ति:** राक्षस गण भयभीत होऊन दशदिशांमध्ये धाव घेत आहेत. ते वक्रमार्गाने विचरण करतात हे त्याचे कारण होय. कुणी एकटा माणूस जर जंगलातून वाटचाल करत असेल तर तो निर्भयतापूर्वक जाईल असे नव्हे. जंगलातून वाट चालताना जर तो एखाद्या हिंस्र श्वापदाला समोरुन जाताना बघेल तर पळायला लागेल. राक्षस म्हणजे दुराचरणी, पातकी. अशी माणसे निर्भय नसतात. निर्भयता पुण्याचरणाच्या ठायीच वसते. पुण्याचरण हा सरळ मार्ग आहे, राजमार्ग आहे. पापाचा मार्ग जंगलातून (काट्या-कुट्यातून) जाणारा आहे. सीतेचे हरण करुन रावण लंकेत घेऊन गेला पण सीतेच्या ठायी पतिव्रता धर्माचे इतके तेज होते की तिच्या मनाला कधीही भयाने स्पर्श केला नाही. ती अशोक वाटिकेत राहिली पण शोकरहित बनून राक्षसांमध्ये राहिली. आत्मज्ञानाच्या ठायी पूर्ण निर्भयता नांदते. अज्ञानावस्थेत भय असते. राक्षस महा अज्ञानात फसलेले असतात त्यामुळेअखेरीस त्यांचा विनाशच होतो. अर्जुन म्हणतोय की राक्षस भयभीत होऊन इतस्तत: पळत आहेत.

3) **च सर्वे सिध्दसंघा: नमस्यन्ति:** आणि सिध्द पुरुषांचे सारे समुदाय आपणास नमन करताहेत. शून्य बनून परमात्म्याचे स्मरण करणारे सिध्द पुरुष होत. हे महापुरुष सृष्टीचे दर्शन ईश्वर कृपेने करत रहातात. यामुळे ईश्वराच्या महिमेचे सदा गान करत रहातात. यामुळेच ते सदा ईश्वरासमोर नतमस्तक होऊन लीन भावनेने नमन करतात, तिथे भयाचा प्रश्नच उरत नाही.

: 37 :

***कस्माच्च ते न नमेरन् महात्मन्ग***
***रीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे।***
***अनन्त देवेश जगन्निवास***
***त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महात्मन्:** हे महात्मन् हे महात्मा
- **गरीयसे :** अतिशय श्रेष्ठ
- **ब्रह्मण:** अपि आदिकर्त्रे: ब्रह्मदेवाहूनही आदी कर्ता
- **ते कस्मात् न स्मरेन् :** आपणास ते सिध्दपुरूष का बरे नमन करणार नाहीत
- **च अनंत देवेश जगन्निवास:** आणि हे अनंता हे देवाधिदेवा, हे जगताच्या निवासस्थाना
- **यत् सत् असत् परं:** जे सत् व असत् च्या पलिकडचे आहे
- **अक्षरं :** असे अक्षर म्हणजे सच्चिदानदघन ब्रह्म
- **त्वं:** ते आहेस

अर्थ ---- हे महात्मन्, ब्रह्मदेवाचेही आदी कारण आणि सर्वात श्रेष्ठ अशा आपणाला हे नमस्कार का बरे करणार नाहीत ? कारण हे अनंता, हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, जे सत्, असत् आणि त्यापलिकडील अक्षर अर्थात् सच्चिदानंदघन ब्रह्म आहे ते आपणच आहात.

प्रभो न कां हे तुज वंदितील

कर्त्यास कर्ता गुरु तूं गुरुस
आधार तूं अक्षर तूं अनंता
आहेस नाहींस पलीकडे तूं ।

विषय ---- या श्लोकात दोन गोष्टी आहेत (1) हे महात्मन्, तू अतिश्रेष्ठ ब्रह्माचाही आदीकर्ता आहेस, म्हणून सिध्दपुरुषही तुला नमन केल्याशिवाय कसे बरे रहातील ? (2) हे अनंता, देवाधिदेवा, जगन्निवासा, हे जगदाधारा सत्-असत्हून पलिकडे असे तू अक्षर ब्रह्म आहेस.

स्पष्टीकरण -----

(1) महात्मन् गरीयसे ब्रह्मण: अपि आदिकर्त्रे ते कस्मात् न नमेरन् --- हे महात्मा आपण ब्रह्मदेवाहून आदी कर्ता आहात. आपण ब्रह्मदेवांनाही आरंभी जन्माला घातले आहे. आपणास सिध्द पुरुष का नमन करणार नाहीत ? अर्जुनाने भगवंताला 'महात्मा' या विशेषणाने संबोधित केले आहे. विश्वरुप दर्शनानंतर अर्जुनाला देवाची खरी ओळख झाली. यामुळे त्याने देवासाठी 'महात्मा' या विशेषणाचा प्रयोग केला आहे. मागील श्लोकाच्या संदर्भातच सांगितले गेले आहे की आपण एवढे श्रेष्ठ आहात की सृष्टी निर्मात्या ब्रह्मदेवालाहीआपणच निर्माण केले आहे. अशा प्रकारे ईश्वराची श्रेष्ठता ज्यांच्या लक्षात येऊन गेली आहे असे सिध्द पुरुष आपणास का नमन करणार नाहीत ? सिध्द पुरुषांना ईश्वराची ओळख असते त्यामुळे त्यांच्या चित्तात प्रतिक्षणी ईश्वराच्या अलौकिकतेचे ज्ञान असणे स्वाभाविक आहे.

(2) अनंत देवेश च जगन्निवास यत् सत् असत् परं अक्षरं त्वम् --- आणि हे अनंता, हे देवाधिदेवा, हे जगताच्या आश्रयरुप प्रभो, जे सत् आणि असत्च्या पालिकडचे आहे म्हणजे व्यक्त अव्यक्ताच्या पलिकडचे आहे असे अक्षर असे अक्षरब्रह्म हे देवा तू आहेस. देव कसा आहे ? अनंत आहे. तुलसीदासांच्या भाषेत 'आदि अंत कोऊ जासू न पावा' ज्याचा आदी आणि अंत कुणी समजून घेऊ शकले नाही असा आहे. ज्याचा आदी नाही आणि अंतही नाही त्याला अनंतच म्हणावे लागेल. पुढे अर्जुन म्हणतो की आपण देवाधिदेव आहात म्हणजे अतिश्रेष्ठ आहात कारण की देव माणसांपेक्षा श्रेष्ठ असतात आणि आपण देवाधिदेव म्हणजे अतिश्रेष्ठ आहात. पुढे अर्जुन असे म्हणतो की आपण जगताचे आश्रयरुप आहात, आश्रय स्थान आहात, निवास स्थान आहात. वस्तु ज्याच्यापासून बनते ते त्याचे आश्रय स्थान असते. घट मातीपासून बनतो म्हणून माती घटाचे आश्रय स्थान असते. या जगाचे उपादान कारण आणि निमित्तकारण ईश्वरी तत्त्व आहे. यामुळे तेच या जगाचे संपूर्णपणे निवास स्थान-- आश्रय स्थान आहेत. पुढे अर्जुन म्हणाला की आपण सत्हून वेगळे आहात म्हणजे जे व्यक्त आहे दिसते त्याहून वेगळे आहात आणि असत्हून वेगळे आहात म्हणजे जे अव्यक्त आहे जे दिसून येत नाही, जे स्थूल नसून सूक्ष्म आहे त्याहूनही वेगळे पलिकडचे म्हणजे अतिसूक्ष्म आहात. पंचमहाभूतांपैकी तीन महाभूते स्थूल असून दोन सूक्ष्म आहेत. आकाश आणि वायु सूक्ष्म असून अग्नी, जळ आणि पृथ्वी स्थूल आहेत. पुढे अर्जुन असे म्हणाला की आपण अक्षर आहात. अक्षर म्हणजे ज्याचा कदापि नाश होऊ शकत नाही, असे आपण अविनाशी आहात

: 38 :

*त्वमादिदेव: पुरुष: पुराण:*
*त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।*
*वेत्तासि वेद्यं च परं च धाम*
*त्वया ततं विश्वमनन्तरुप ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वं आदिदेव:** आपण आदी देव आहात
- **पुराण: पुरुष:** पुराण म्हणजे सनातन पुरुष आहात
- **त्वं अस्य विश्वस्य:** आपण या जगताचा
- **परं निधानं:** अतिश्रेष्ठ आधार आहात
- **त्वं वेत्ता च वेद्यं:** आपणच जाणणारे आणि जाणून घ्यायची वस्तु आहात
- **च परंधाम असि:** आणि मोक्षधाम आहात
- **अनंतरुप:** हे अनंतरुपा
- **त्वया विश्वं ततम्:** आपल्यानेच हे सर्व विश्व व्याप्त म्हणजे परिपूर्ण आहे

**अर्थ**

आपण आदी देव आणि सनातन पुरुष आहात, आपण या जगाचे परम आश्रय स्थान आहात. जग जाणणारेही आपणच आणि जाणून घेण्यायोग्यही आपणच आहात.

परम धामही आपणच आहात. हे अनंतरुपा, आपण हे सर्व विश्व व्यापले आहे.

***देवादि तूं तूं चि पुराण आत्मा***
***जगास ह्या अंतिम आसरा तूं***
***तूं जाणतोसी तुज मोक्ष-धामा***
***विस्तारिसी विश्व अनंत-रुपा।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) तू आदी देव आहेस. 2) तू पुराण पुरुष आहेस. 3) तू या विश्वाचा अतिश्रेष्ठ असा आधार आहेस. 4) तू जाणणारा आणि जाणून घेण्याची वस्तु आहेस. 5) तू मोक्षधाम आहेस. 6) हे अनंतरुपा, तू संपूर्ण विश्वाला व्याप्त केले आहेस.

**स्पष्टीकरण**

1) **त्वं आदिदेव:** आपण आद्यदेव आहात. इथे ईश्वराला 'देव' असे म्हटले आहे. ईश्वर आद्यदेव आहेत म्हणजे आरंभीचे 'देव' आहेत कारण की ईश्वरापासूनच सर्व जड चेतनाची निर्मिती उत्पत्ती झाली असल्यामुळे देव हे आद्यदेव आहेत. 'आद्य' शब्दाचा अर्थ 'उत्पन्न झाले उपजले' असा नाही कारण की ईश्वराची कशापासून उत्पत्ती झाली नाही. उत्पन्न होणाऱ्या पदार्थांपूर्वी ईश्वराचे अस्तित्व असल्यामुळे ईश्वर आदिम वा आदी आहेत. आद्य आहेत.

2) **पुराण: पुरुष:** आपण पुराण पुरुष म्हणजे कालातीत आहात. निर्माण झालेली प्रत्येक वस्तु काळाने मर्यादित--सीमित असल्यामुळे विनाशधर्मी असते. ईश्वर हा काळाने मर्यादित नसल्यामुळे अविनाशी आहे. यामुळे खूप प्राचीन आहे. आदी वा अंत नसल्यामुळे अनादिकाळापासून ईश्वराचे अस्तित्व आहे.

3) **त्वं अस्य विश्वस्य परं निधानम्:** आपण या विश्वाचे अतिश्रेष्ठ असे आधार आहात. जगत् हे कार्य कारणाने संपन्न आहे. कुठलाही पदार्थ कारणरहित नसतो अकारण नसतो पण सृष्टीतल्या तमाम पदार्थांचे मूळ कारण असल्यामुळे ईश्वर संपूर्ण जगताचे श्रेष्ठतम आधार आहेत.

4) **त्वं वेत्ता च वेद्यम्:** आपण जाणणारे आहात आणि जाणून घ्यायची वस्तु आहात. ईश्वर चेतनस्वरुप असल्यामुळे सर्वांचा ज्ञाता आहे आणि सोबतच ज्ञेयही आहे. ब्रह्मांडातील समस्त जड पदार्थ 'ज्ञेय' आहेत आणि या ज्ञेय पदार्थांचे स्वतंत्र अस्तित्व नसल्यामुळे त्यांचा मूलाधार ईश्वरच ज्ञेयरुप ब्रह्मांड आहे. ईश्वराने स्वत: जडरुप धारण करुन घेतले आहे. यामुळे तोच जाणून घ्यायचा विषयही बनून गेला आहे.

5) **च परंधाम असि:** आपण मोक्षधाम आहात. त्याला जाणून घेतल्यामुळे अज्ञानाची निवृत्ती होते, अज्ञान दूर होते म्हणून ईश्वर मोक्षाचे स्थान आहे. ईश्वराला जाणून घेतल्यामुळे अत्यंत दु:खदायक अज्ञानजन्य काम, क्रोध यासारखे विकार दूर होतात. संपूर्ण दु:ख मूळापासून दूर होते. हाच तर मोक्ष आहे. मोक्ष म्हणजे 1) अज्ञान दूर होणे 2) अहंकार, राग, क्रोध, द्वेष वगैरे विकार दूर होणे 3) जीवभावापासून निवृत्ती लाभणे. 4) दु:खांचा स्थूल विनाश होणे. जीवभावापासून निवृत्ती याचा अर्थ मी देह आहे मी देहरुपी आहे या भावनेची निवृत्ती होय.

6) **अनंतरुप त्वया विश्वं ततम्:** हे अनंतरुपा, आपण संपूर्ण विश्वाला व्याप्त केले आहे. ईश्वर आकाशाहूनही अतिव्यापक आहे तर तो अणु अणुच्या ठायी व्याप्त असेलच.

: 39 :

***वायुर्यमोऽग्निर्वरुण: शशांक:***
***प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।***
***नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्व:***
***पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वं वायु: यम:** आपणच वायु आहात, यमराज आहात
- **अग्नि: वरुण:** अग्नी आहात, वरुण आहात
- **प्रजापति:** प्रजापती आहात
- **च प्रपितामह:** आणि ब्रह्मदेवाचे पिता आहात
- **ते सहस्रकृत्व:** आपणाला सहस्रवार प्रणाम असोत
- **नम: नम: अस्तु:** नमस्कार, नमस्कार असो
- **च पुन: भूय: अपि:** आणि पुनश्च प्रणाम असो
- **ते नम: नम: अस्तु:** आपणास नमस्कार असो, नमस्कार असो

**अर्थ**

आपण वायु, यमराज, अग्नी, वरुण, चंद्र, प्रजेचे स्वामी ब्रह्मदेव आणि ब्रह्मदेवाचेही जनक आहात, आपल्याला हजारो वेळा नमस्कार असो, आपणास पुनश्च वारंवार नमस्कार असोत. नमस्कार असोत.

***तूं अग्नि तूं वायु समस्त देव***
***प्रजापते तूं चि पिता वडील***
***असो नमस्कार सहस्र वार***
***पुन्हां पुन्हां आणि पुन्हां पुन्हां हि।***

**विषय:** या श्लोकात सप्तविध वर्णन आहे 1) आपण वायु आहात. 2) आपण यमराज आहात. 3) आपण अग्नी आहात. 4) आपण वरुण आहात. 5) प्रजापती आहात. 6) ब्रह्मदेवाचे पिता आहात. 7) आपणास हजार वार नमस्कार, नमस्कार असोत आणि पुन्हा पुन्हा वारंवार नमस्कार असोत.

**स्पष्टीकरण**

1) **त्वं वायु:** आपण वायु आहात. ईश्वर संपूर्ण ब्रह्मांडात व्याप्त आहेत तर ते प्रत्येक पदार्थात असायलाच हवेत. मुख्य वस्तु घेऊन अर्जुन देवाची स्तुती करत आहे. विश्वरुप दर्शन झाल्यामुळे अर्जुन इतका काही भारावून गेला, प्रभावित होऊन गेला की भावनावश होऊन पुन्हा पुन्हा तेच वर्णन करतोय की आपण वायू आहात.

2) **त्वं यम:** आपण यमराज आहात. यम म्हणजे मृत्यु. मरण नसेल आणि लोक जिवंतच रहात असतील तर सृष्टीची काय अवस्था होईल ? सृष्टीचा गाडा चालूच शकणार नाही. जिथे जन्म आहे तिथे मरणही आहे. यामुळे नवीन लोकांना संधी मिळते. अशाप्रकारे सर्व जणांवर उपकार आहेत. जूने निघून जातात आणि नवे येतात. सृष्टी नित्य नवी रहाते. यमराज ईश्वराचेच रुप आहे.

3) **त्वं अग्नि:** आपण अग्नी आहात. अग्नीचे महत्व सर्वविदित आहे. अग्नीशिवाय जगणे अशक्य होऊन जाईल.

4) **त्वं वरुण:** आपण वरुण म्हणजे जलदेवता आहात. पाण्याशिवाय कुणीही जिवंत राहू शकणार नाही.

आपण प्रजापती म्हणजे ब्रह्मदेव आहात.

5) **त्वं प्रजापति:** आपण प्रजापती म्हणजे ब्रह्मदेव आहात.

6) **त्वं प्रपितामह:** आपण ब्रह्मदेवाचे पिता आहात. ब्रह्मदेवाला ईश्वराने निर्माण केले तर ते ब्रह्मदेवाचे पिताच आहेत. ईश्वराने ब्रह्मदेवाला संपूर्ण सृष्टीची रचना करायचे काम सोपवले आहे.

7) **ते सहस्रकृत्व: नम: अस्तु ते नम: अस्तु:** आपणास वारंवार नमस्कार असो. प्रणाम असो. भगवंताचे विश्वरुप दर्शन घडल्यामुळे अर्जुनाच्या मनात ईश्वराबद्दल प्रचंड भक्तीभाव उपजला. हा भाव त्याच्या अंत:करणात मावत नसल्यामुळे तो बाहेर प्रकट होऊ लागला. ज्याच्या लक्षात ईश्वराचे अलौकिकत्व योग्य प्रकारे पूर्णतेने येऊन जाते, स्थिरावते त्याची अशीच अवस्था होऊन जाते.

: 40 :

***नम: पुरस्तादथ पृष्ठतस्ते***
***नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।***
***अनन्तवीर्यमितविक्रमस्त्वं***
***सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्व:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ते पुरस्तात्:** आपणाला पुढून
- **अथ पृष्ठत: नम:** आणि मागूनही नमस्कार असो
- **सर्व:** हे सर्वात्मन्
- **सर्वत: एव ते:** सर्व बाजुंनीही सर्वत: व्याप्त अशा आपल्याला नमस्कार असो
- **नम: अस्तु:** नमस्कार असोत
- **अनंतवीर्यमित विक्रम:** अनंत पराक्रमशाली आणि सामर्थ्यशाली
- **त्वं:** आपण
- **सर्वं समाप्नोषि:** सर्व जगतात व्याप्त आहात म्हणजे आपण सारे जगत व्यापिले आहे
- **तत: सर्व: असि:** यामुळेच आपण सर्व काही आहात म्हणजे आपणच सर्वरुप आहात

**अर्थ**

हे अनंत सामर्थ्यशाली, आपणाला पुढून आणि मागूनही नमस्कार असो, हे सर्वात्मका आपल्याला सर्व बाजुंनीच नमस्कार असो कारण अनंत पराक्रमशाली अशा आपण सर्व जग व्यापले आहे म्हणून आपण सर्वरुप आहात.

*समोर मागें सगळीकडे चि*
*असो नमस्कार जिथें जिथें तूं*
*उत्साह सामर्थ्य तुझें अनंत*
*तूं सर्व कीं सर्व तुझ्या चि पोटीं।*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत 1) आपणास पुढून म्हणजे पूर्व दिशेकडून प्रणाम असो. 2) आपणास मागून म्हणजे पश्चिम दिशेकडून प्रणाम असो. 3) हे सर्व, सर्वत्र व्याप्त आपणास नमस्कार असो. 4) अनंत सामर्थ्यशाली आणि अमित पराक्रमी आपण साऱ्या जगाला व्यापून आहात. 5) यामुळे आपण सर्व काही आहात.

**स्पष्टीकरण**

1) **ते पुरस्तात् नम:** हे देवा, तुला पुढून नमस्कार असो. अर्जुनाची भावपूर्ण अवस्था इतकी तन्मय झाली की तो आता देवाला जितके नमस्कार करणे शक्य आहे, तितके करतो. आधी म्हणाला की पूर्व दिशेला नमस्कार असो. सर्वात आधी पूर्व दिशेला नमस्कार. सूर्यनारायण सर्वात आधी पूर्व दिशेला दर्शन देतात. सकाळी जेव्हा सूर्यनारायण दर्शन देण्यासाठी येतात तेव्हा त्याना सामोरे जात हात जोडून नमस्कार करायला हवेत कारण की ईश्वरच पूर्व दिशेला सूर्यनारायणाच्या रुपात प्रकट होत आहेत म्हणून पूर्व दिशा पवित्र होय.

2) **अथ पृष्ठत: नम:** आणि हे ईश्वरा, आपणास पाठीमागून नमस्कार असो. पाठीमागून म्हणजे पश्चिम दिशेला नमस्कार असो. सूर्यनारायण सायंकाळी पश्चिम दिशेला अस्ताला जातात संपूर्ण दिवसभर सेवाकार्य करुन ते सायंकाळी पश्चिम दिशेला विराजमान होतात. यामुळे पश्चिम दिशाही खूप पवित्र आहे. त्यावेळी म्हणजे सूर्यास्ताच्या वेळी सूर्यनारायणा समोर हात जोडून मनात त्यांनी केलेल्या सेवाभावनेबद्दल कृतज्ञतेचा भाव राखून त्याला भक्ती भावनेने प्रणाम करायला हवा. त्याना भक्ती भावनेने निरोप द्यायला हवा.

3) **सर्व सर्वत: एव ते नम: अस्तु:** हे सर्वा, म्हणजे सर्व काही सर्वत्र व्याप्त अशा आपणास नमस्कार असोत.

सर्व म्हणजे सारे काही आपणच आहात. केवळ पूर्व वा पश्चिम दिशेलाच आपण विराजमान आहात असे नाही, आपण तर सर्वत्र म्हणजे तमाम दिशांमध्ये सर्वस्थानी अवस्थित उपस्थित आहात. मुंडक उपनिषदात याच अर्थाचा एक श्लोक येतो:

*ब्रह्मैवेदममृतं पुरस्ताद् ब्रह्म पश्चात् ब्रह्म*
*दक्षिणतश्चोत्तरेण। अधश्चोर्ध्वं च प्रसृतं ब्रह्मैवेदं*
*विश्वमिदं वरिष्ठम्॥ (2/2/11)*

अर्थात् हे अमृत म्हणचे अमर ब्रह्मच पूर्वेला आहे, पश्चिम दिशेला, दक्षिण दिशेला, उत्तर दिशेला आहे आणि ते खाली-वर पसरलेले आहे. हे संपूर्ण जगत म्हणजे विश्व श्रेष्ठ ब्रह्मच म्हणजे श्रेष्ठ ब्रह्मस्वरुपीच आहे.

4) **अनंतवीर्यमितविक्रम:** त्वं सर्व समाप्रोषि ज्याचे सामर्थ्य अपरंपार असून उत्साह अनंत आहे. पराक्रम म्हणजे पुरुषार्थ अमित म्हणजे पुष्कळ आहे असे आपण हे ईश्वरा, संपूर्ण विश्वात व्याप्त आहात. ही अद्भुत सृष्टी पहिल्यावर ईश्वराचा उत्साह ध्यानी येतो. नित्य नवी सृष्टी उत्पन्न होत असते. दरवर्षी नवीन पिके येतात. यातून ईश्वराचे सामर्थ्य म्हणजे नित्य नवा उत्साह दिसून येतो. त्याचा पराक्रम म्हणजे पुरुषार्थही दिसून येतो. सूर्य अचल म्हणजे निश्चल असतानाही फिरत असल्याचा भास होतो. अत्यंत वेगाने फिरत असतानाही पृथ्वी स्थिर असल्यासारखी वाटते. अर्जुन हे सांगत आहे की असा अद्भुत परमात्मा संपूर्ण जगात व्याप्त आहे.

5) **तत: सर्व: असि:** यामुळे हे ईश्वरा, आपण सर्वकाही आहात. ईश्वराशिवाय दुसऱ्या कुठल्याही वस्तुचे स्वतंत्र अस्तित्व नाही. 'मी कोण आहे ?' याचा विचार केल्यावर माझे स्वरुप ईश्वरच असल्याचे ध्यानी येते. सिध्द होते. तेव्हा आपले स्वतंत्र अस्तित्वच उरत नाही. जगाचे स्वरुप काय आहे ? असा विचार करु जाता जगतहीएक कार्य असल्यामुळे त्याचे स्वतंत्र अस्तित्व नाही. अशाप्रकारे एक अद्वितीय परमात्माच सत्य वस्तु उरते. यामुळे सर्व काही

ईश्वर आहे, असे समजून ईश्वर शरण भावना मनी बाळगून शून्य बनून जीवन घालवणेच जीविताचे साफल्य आहे, जीवनाची यशस्विता आहे.

: 41-42 :

*सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं*
*हे कृष्ण हे यादव हे सखेति ।*
*अजानता महिमानं तवेदं*
*मया प्रमादात् प्रणयेन वापि ॥*

*यच्चावहासार्थमस्त्कृतोऽसि*
*विहारशय्यासनभोजनेषु ।*
*एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं*
*तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तव इदं महिमानं:** आपल्या या महिमेला वा महात्म्याला
- **अजानता मया:** न जाणता माझ्याकडून
- **प्रमादात्:** प्रमाद म्हणजे असावधानतेमुळे
- **अपि वा प्रणयेन:** अथवा प्रेमामुळे
- **सखा, इति मत्वा:** आपल्याला सखा समजून
- हे कृष्ण, हे यादव, हे सखा, इति: हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या असे
- **प्रसभं यत् उक्तं:** अनादराने मुद्दाम जे काही आपणास बोलले गेले असेल
- **यत् च अवहासार्थम्:** आणि जे काही उपहासाने वा गंमतीने
- **विहारशय्यासन भोजनेषु:** विहार करतांना, निजतांना, बसतांना वा भोजनाच्या प्रसंगी
- **अच्युत एक: अथवा:** हे अच्युता, एकटे असतांना किंवा
- **तत्समक्षं:** लोकांच्या समोर, मित्रांच्या समक्ष
- **असत्कृत: असि:** माझ्याकडून जे आपण अपमानित झाला आहात
- **तत् त्वां अप्रमेयं:** त्या सर्वांसाठी तुज अप्रमेय स्वरुपी म्हणजे अचिंत्य प्रभावी अशा
- **अहं क्षामये:** मी क्षमा मागत आहे.

**अर्थ**

आपला हा प्रभाव न जाणल्यामुळे, आपण माझे मित्र आहात असे मानून प्रेमाने वा चुकीने मी ‘हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या’ असे जे काही विचार न करता मुद्दाम म्हटले असेल

आणि हे अच्युता, माझ्याकडून विनोदासाठी फिरताना, बसताना, झोपताना आणि भोजन इत्यादी करताना आपणास एकांतात वा मित्रांच्या समोर जो अपमान झाला असेल त्या सर्व अपराधांची अचिन्त्य प्रभावशाली अशा आपणाकडे मी क्षमा मागत आहे.

*समान मानीं अविनीत-भावें*
*कृष्णा गड्या हांक अशी चि मारीं*
*न जाणता हा महिमा तुझा मी*
*प्रेमें प्रमादें बहु बोल बोलें ।*

*खेळें निजें स्वैर चि खात बैसें*
*चेष्टा करीं सर्व तुझ्या समोर*
*जनीं मनीं वा तुज तुच्छ लेखें*
*क्षमा करीं भान तुझें कुणास ।*

**विषय:** या दोन श्लोकांमध्ये नऊ गोष्टी आल्या आहेत 1) आपल्या या महिमेला न जाणणारा 2) प्रमादामुळे 3) अथवा प्रेमामुळे 4) सखा समजून 5) हे कृष्ण, हे यादवा, हे सख्या असे मी जे काही बोललो असेल, हाक मारली असेल 6) हे कृष्णा, विनोद करण्यासाठी 7) विहार करताना, झोपताना, आसनावर बसलो असताना, भोजन घेताना 8) एकटे असताना वा लोकांसमक्ष म्हणजे मित्रांसमक्ष अविनय केला गेला असेल 9) त्या साठी तुझी अप्रमेय प्रभुची मी क्षमा मागत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **तव इदं महिमानं अजानता मया:** अर्जुन म्हणतो की हे ईश्वरा, मी तुझ्या या महात्म्याला अपरिचित होतो. मी जाणत नव्हतो हे आपले महात्म्य. विश्वरुप दर्शनापूर्वी मला आपल्या या महात्म्याची कल्पना नव्हती. महात्म्य जाणत नसल्यामुळे श्री कृष्णाशी वागताना चुका झाल्यात,

उणिवा राहिल्यात हे सारे अर्जुनाला विश्वरुप दर्शनानंतर उमगले. याचेच वर्णन या दोन श्लोकांमधून केले गेले आहे. अतिपरिचयामुळे एखाद्याच्या योग्यतेचा परिचय होत नाही. ‘अतिपरिचयात् अवज्ञा’ ही म्हण प्रसिध्दच आहे.

2) **प्रमादात्:** प्रमाद म्हणजे बेसावधानपणा. या शब्दाचा संबंध पुढे येतो. पुढे शब्द येतो ‘प्रसभं यत् उक्तं’ म्हणजे अनादराने मी जर आपल्याला हाक मारली असेल, पुकारले असेल म्हणजे आपली योग्यता ध्यानी न आल्यामुळे बेसावधपणे आपल्याशी व्यवहार केला गेला असेल. बेसावधपणे केला गेलेला व्यवहार जसा विनयपूर्वक हवा तसा होत नाही हे तर उघडच आहे. उदाहरणार्थ गांधीजींच्या अतिनजिकच्या लोकांचा व्यवहार विनययुक्त असायचाच असे नाही. त्याना थकवणारे त्यांच्या निकट रहात होते.

3) **अपि वा प्रणयेन्:** किंवा प्रेमामुळे काही चुकले असेल. कृष्ण भगवंताशी घडलेल्या अविनयी व्यवहाराची कारणे अर्जुन सांगत आहे. यापूर्वी प्रमाद म्हणजे बेसावधपणा हे कारण सांगितले. आता दुसरे कारण सांगत आहे की प्रेमामुळे असे झाले असेल. याचा अर्थ असा की अर्जुनावर भगवंताचे खूप प्रेम होते. परस्पर प्रेमामुळे आदरभावही कमी होतो. अनादरही निर्माण होतो. आई आणि बालक यांच्यात परस्पर खूप प्रेम असते यामुळे मुलगा आईची योग्यता वा उपकारांचे विस्मरण करुन आईशी दांडगाईचा व्यवहारही करतो.

4) **सखा इति मत्वा:** अर्जुन म्हणतो की उपरोक्त कारणांमुळे मी तुम्हाला सखा समजत राहिलो. योग्यतेच्या समानतेमुळे बरोबरीचे मित्र बनून जातात पण अर्जुन व श्रीकृष्णाच्या ठायी समान योग्यता असणे तर दूरच राहो पण तरीसुध्दा उपरोक्त कारणांमुळे बरोबरीचा मित्र समजून मानून जो व्यवहार केला गेला ही चूक झाली असे अर्जुनाला आता वाटू लागले आहे.

5) **हे कृष्ण, हे यादव, हे सखा, इति प्रसभं उक्तं:** हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या अशाप्रकारे मी अनादरपूर्वक आपणास बोलावले असेल. एक तर असे की आपली योग्यता मोठेपणा लक्षात येत नाही त्याचमुळे मग बेसावधपणामुळे प्रेमामुळे मित्र मानून अविनयाने, अनादराने हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या अशाप्रकारे भगवंताला बोलावले गेले होते. हा अनादराचा व्यवहार झाला. अर्जुनाच्या उन्नतीच्या दृष्टीने असे करणे योग्य नव्हते. अर्जुनाचे हे म्हणणे लक्षात घेण्यासारखे आहे. अर्जुन कल्याणाच्या दृष्टीने विचार करत आहे. गुलाबाचे फूल खूप सुगंधित असते पण फुलाला हातात घेऊन जर चुरगाळून टाकले तर त्याचा सुगंध संपून जाईल. या उलट त्याला खूप काळजीपूर्वक हाती घेतले वा योग्य जागी ठेऊन दिले तर त्याचा सुगंध दरवळत रहातो. त्याचप्रकारे आपण जर महापुरुषांशी अतिविनयपूर्वक सावधानतेने अतिआदरपूर्वक संबंध राखण्याबाबत सतर्क राहिलो तर आपल्याला त्यांच्यापासून लाभ करुन घेता येईल. महापुरुषांविषयी जर विनय आणि आदरभाव नसला तर आपण कितीही काळ त्यांच्यासमवेत घालवला तरीही जो लाभ व्हायला हवा तो काही आपल्याला होणार नाही. महापुरुषांचे गुण आपल्या ठायी उतरणार नाहीत. यामुळे महापुरुषांशी संबंध आला तर आपले अहोभाग्य मानून मनात अत्यंत कृतज्ञतेचा भाव आणून त्यांच्या सत्संगतीचा फायदा घ्यायला हवा.

6) **अच्युत यत् अवहासार्थम्:** हे कृष्णा, विनोद केल्यामुळे चुक घडली असेल. या वाक्याचा संबंध ‘असत्कृत: असि’ या वचनाशी आहे. माणूस विनोद वा थट्टा करताना काही अविनयाचे बचन बोलतो आणि व्यवहारात त्याला क्षम्यही मानले जाते पण हास्य-विनोदाची थट्टेचीही काही मर्यादा असते. बरोबरीचे मित्र आपसात किंवा मालक नोकराशी वा गुरु शिष्याशी विनोद करत असेल तर ठीकाय पण शिष्य गुरुशी वा नोकर मालकाशी विनोद करु लागेल तर तो मर्यादेचा भंग ठरेल. अर्जुन आणि कृष्णाच्या योग्यतेत खूप अंतर होते पण ते अंतर अर्जुनाच्या लक्षात एथवर आले नव्हते. आता ते लक्षात आल्यामुळे त्याला जाणवत आहे.

7) **विहारशय्यासनभोजनेषु:** आपण केव्हा विनोद केला असेल त्याचे वर्णन अर्जुन करत आहे. चार क्रियांचा उल्लेख केला आहे. अर्जुन कृष्ण भगवंताच्या निकट सहवासात होता. कृष्णाच्या ठायी निरहंकारितेचा एवढा उत्कर्ष झाला होता की त्यांच्या सहवासात रहाणाऱ्या कुणाला त्यांच्या योग्यतेचे कुठले वैशिष्ट्य ध्यानात येऊच शकत नव्हते. हेच कृष्णाचे वैशिष्ट्य होते. हिरता-फिरता, झोपता, उठता-बसता, भोजन करता यासारख्या विविध

क्रियांमध्ये निकट सहवास घडतो आणि आपसात हास्य-विनोद, थट्टा-मस्करी चालत रहाते.

8) **एकः अथवा तत्समक्षं अस्त्कृतः** असि दोघांचा आपसात हास्य-विनोद चालत असेल तर ठीक पण चार-चौघांसमक्ष जर विनोद झाला, काही थट्टा-मस्करी झाली तर ज्याची थट्टा होते त्याला वाईट वाटू शकते. यामुळे लोकांसमोर कुणाची थट्टा-मस्करी करताना काळजी घ्यावी लागते.

9) **तत् त्वां अप्रमेयं अहं क्षामये:** यामुळे तुज अप्रमेयाची मी क्षमा मागतो. कृष्ण तर देहधारी होते तरी त्याना ज्ञानी समजून ईश्वराचे स्वरुप वर्णन करणारे हे विश्लेषण प्रयुक्त केले गेले आहे. ईश्वराचे खरे स्वरुप प्रमाणातीत म्हणजे तर्कातीत आहे. अशा तर्कातीत प्रमाणातीत इंद्रियातीत म्हणजे अलौकिक ईश्वराचा आविष्कार कृष्णाच्या ठायी झाला होता. विश्वरुप दर्शनामुळे अर्जुनाला याचा प्रत्यक्ष अनुभव आला होता. यामुळेच अर्जुन ईश्वरस्वरुप अशा कृष्णाची क्षमा मागत आहे.

: 43 :

*पितासि लोकस्य चराचरस्य*
*त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।*
*न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो*
*लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **त्वं अस्य चराचरस्य लोकस्यः** आपण या चराचर जगताचे
- **पिता च पूज्यः असिः** पिता आणि अत्यंत पूजनीय आहात
- **गरीयान् गुरुः** श्रेष्ठतम गुरु आहात
- **अप्रतीमप्रभावः** अतुलनीय प्रभावयुक्त आहात
- **लोकत्रये अपिः** तिन्ही लोकातही
- **त्वत्समः न अन्यः** अस्ति आपल्या समान दुसरा कोणीही नाही
- **अभ्यधिकः कृतः** आपल्याहून अधिक कुठून असेल बरे?

### अर्थ

आपण या चराचर जगताचे जनक आहात. तसेच सर्वश्रेष्ठ गुरु आणि अत्यंत पूजनीय आहात. हे अतुलनीय प्रभावी देवा, त्रैलोक्यात आपल्या बरोबरीचाही दुसरा कोणी नाही मग आपल्याहून श्रेष्ठ कसा असू शकेल?

***आहेस तूं बाप चराचरास***
***आहेस मोठी गुरु-देवता तूं***
***तुझी न जोडी तुज कोण मोडी***
***तिन्ही जगीं ह्या उपमा चि थोडी ।***

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी आहेत 1) आपण या चराचर जगाचे पिता आहात. 2) पूजनीय आहात. 3) खूप मोठे गुरु आहात. 4) अप्रतीम प्रभावशाली आहात. तिन्ही लोकात आपल्यासमान दुसरा कोणी नाही. 5) मग आपल्याहून श्रेष्ठ कसा काय कोणी असेल?

### स्पष्टीकरण

1) **त्वं अस्य चराचरस्य लोकस्य पिताः** आपण या चर आणि अचर म्हणजे स्थावर आणि जंगम जगताचे पिता आहात. चर म्हणजे जंगम अशी सारी जीवसृष्टी आणि अचर म्हणजे स्थावर अशी सबंध जीवसृष्टी. संपूर्ण जगताचे निर्माण ईश्वरानेच केले आहे. यामुळे ईश्वराला 'पिता' म्हणणे यथायोग्यच आहे. ईश्वर केवळ पिताच नव्हे तर माता-पिता दोन्ही आहे.

2) **च पूज्यः** आपण पूजनीय आहात. पिता पुत्रासाठी पूजनीय असतो. पिता पुत्राला लहानाचे मोठेही करतो. सदाचरणी नसणाऱ्या पित्याबद्दल पुत्राच्या मनात पूजनीय भाव नसतो. ईश्वर तर इतका विशुध्द, गुणांचे भांडाररुप आहे की या जगात कुणीच त्याची बरोबरी करु शकत नाही. यामुळे या जगात खरा पिता तर ईश्वराशिवाय दुसरा कुणीही नाही.

3) **गरीयान् गुरुः** पिता सदाचरणसंपन्न असला तरी अत्यंत पूजनीय असला तरी पुत्रासाठी गुरु नसतो. अर्थात् जर एखादा पिता गुरुपदाला लायक असेल आणि पुत्रासाठी प्रत्यक्ष गुरु बनला असेल तर पुत्राच्या मनात त्याच्या बाबतीत गुरुचा भाव अवश्य असू शकतो पण सामान्यपणे असे घडताना दिसत नाही. ईश्वर सर्वांच्या अंतर्यामी असतो. तोच सर्वांना सदाचरणाची धर्माचरणाची सत्याची प्रेरणा देतो. जे या प्रेरणेनुसार आचरण करतात त्यांच्या जीवनात ईश्वरी प्रेरणेने ईश्वर स्वरुप जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. साधक दशेत साधनारत असताना ईश्वरी अनुग्रहामुळे कृपेमुळे आत ईश्वर स्वरुपाचा अनुभव येतो. यामुळे खरे गुरु तर अंतर्यामी वसलेले ईश्वरच असतात. पोहोचलेले सिध्द पुरुष गुरु म्हणवले जातात पण ते स्वतंत्रपणे कुणाचे गुरु होऊ शकत नाही कारण की गुरुचा वाटेल तेवढा उपदेश ऐकूनही साधकाला ईश्वर स्वरुपाची ओळख होत नाही. ईश्वर स्वरुपाचा अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठी ईश्वराची कृपाच हवी. मुमुक्षुवर ईश्वराचा अनुग्रह व्हावा यासाठी गुरु निमित्तमात्र बनू शकतो, एवढेच असते.

4) **अप्रतिमप्रभाव लोकत्रये अपि त्वत्समः न अन्यः** अस्ति हे कृष्णा तू अप्रतिम प्रभावशाली आहेस. या त्रिलोकात आपल्या सारखा दुसरा कुणी नाही. मोठ्या भावपूर्ण शब्दात अर्जुन सांगतो की आपला सर्वव्यापी प्रभाव अप्रतीम आहे. याचे कारण असे की ईश्वर सत्याची-- धर्माची प्रेरणा देतो. संपूर्णपणे त्याच्या प्रेरणेनुसार नाही चालायचे असे ठरवले तरी त्याची कुणीही उपेक्षा करु शकत नाही. याचे कारण असे की मायेच्या प्रेरणेने कितीही चाललो तरी संपूर्ण समाधान काही कुणाला लाभत नाही. यामुळे अखेर सर्वांनाच न्यूनाधिकपणे ईश्वरी प्रेरणेनुसार चालावेच लागते ईश्वराचा हा मोठा प्रभाव असल्यामुळे अर्जुन सांगतो की या विश्वात आपल्यासारखा प्रभावशाली दुसरा कुणी नाही.

5) **अभ्यधिकः कुतः** मग आपल्याहून श्रेष्ठ दुसरा बरे कोण असू शकतो? ईश्वरासमान दुसरी कुठलीही वस्तु जगात नाहीच, ईश्वर अद्वितीय आहे. गीता म्हणजे वेदान्ताचा सिध्दांतच आहे की ईश्वर एकमेवाद्वितीयं आहे. ईश्वर एक आणि अद्वितीय आहे.

: 44 :

***तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं***
***प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।***
***पितेव पुत्रस्य सखेव सख्युः***
***प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात् कायं प्रणिधायः** यामुळे हे प्रभो, मी आपल्या देहाला आपल्या चरणांवर ठेऊन म्हणजे शिरसाष्टांग दंडवत (नमस्कार करुन)
- **प्रणम्यः** नमस्कार करुन
- **ईशं ईड्यं त्वां अहंः** ईश्वराला स्तुती करावयास योग्य अशा आपणास मी
- **प्रसादयेः** प्रसन्न करीत आहे, प्रसन्न होण्यासाठी प्रार्थना करीत आहे
- **पुत्रस्य पिता इवः** पुत्रासाठी पित्यासमान
- **सख्युः सखा इवः** मित्राचा अपराध मित्र सहन करुन घेतो
- **प्रियायाः प्रियः इवः** ज्या प्रमाणे पत्नीचा अपराध पती सहन करुन घेतो
- **त्वं सोढुं अर्हसिः** तसेच आपण माझे अपराध सहन करायला योग्य आहात म्हणून मला क्षमा करावे

**अर्थ**

म्हणूनच हे प्रभो मी आपल्या चरणांवर शरीराने लोटांगण घालून नमस्कार करुन स्तुत्य अशा आपण ईश्वराने प्रसन्न व्हावे म्हणून प्रार्थना करीत आहे. हे देवा, वडिल जसा पुत्राचे, मित्र जसे मित्राचे आणि पती जसे पत्नीचे अपराध सहन करतात तसेच आपणही माझे अपराध सहन करण्यास योग्य आहात मला क्षमा करावे.

***म्हणूनि लोटांगण घालितों मी***
***प्रसन्न होईं स्तवनीय-मूर्ते***
***क्षमा करीं बा मज लेंकरातें***
***सखा सख्यातें प्रिय तूं प्रियातें ।***

**विषयः** या श्लोकात अर्जुनाने तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) शरीराने भूमीला स्पर्श करुन नमस्कार करत

म्हणजे लोटांगण घालून नमस्कार करत 2) सर्वांच्या ईश्वरा आणि स्तुतीस पात्र अशा ईश्वरा तुला 3) पुत्रासाठी पित्याप्रमाणे, मित्रासाठी मित्राप्रमाणे, पत्नीसाठी पतीप्रमाणे आपण माझे अपराध सहन करावेत मला क्षमा करण्यायोग्य आहात मला आपण क्षमा करावी.

### स्पष्टीकरण

1) **तस्मात् कायं प्रणिधाय प्रणम्य:** अर्जुनाने शिरसाष्टांग दंडवत प्रणाम केला. शरीराने भूमीला स्पर्श करुन प्रणाम केला. विश्वरुप दर्शन घडल्यावर अर्जुनाच्या मनात एवढा प्रचंड भाव उत्पन्न झाला की तो आपला मनातला भाव अधिकाधिक उत्कटपणे व्यक्त करायचा प्रयत्न करतो. तो भूमीला स्पर्श करुन शिरसाष्टांग नमस्कार करत आहे. साधकावस्थेतही जेव्हा संपूर्ण विश्वात ईश्वर व्याप्त आहे अशी भावावस्था उत्पन्न होते. ती मोठी आनंददायक असते.

2) **अहं ईशं ईड्यं त्वां प्रसादये:** हे श्रीकृष्णा आपण सर्वांचे ईश्वर आहात आणि स्तुतीला पात्र आहात. मी आपणास प्रसन्न करतो म्हणजे आपण मजवर कृपा करावी, प्रसन्न व्हावे. ईश्वराची सार्वभौम सत्ता जगावर गाजती आहे. जागती आहे. ती बघून माणूस विनम्र होतो, झुकतो. त्याचा अहंभाव गळून पडतो. हे नम्रीभूत विनत अवस्थेचे वर्णन आहे. अर्जुन म्हणतोय की आपण सर्वांचे ईश्वर आहात. सर्वांवर नियंत्रण राखणारा आपल्याशिवाय जगात दुसरा कुणी नाही. कुटुंबात आई-वडिलांची सत्ता चालते. मुलगा मोठा झाला की मुलाची सत्ताही चालू लागते. सत्ता चालवण्यात कारभार करण्यात माणसाला मोठा आनंद वाटतो पण जेव्हा ईश्वराकडे वळण वळते तेव्हा ईश्वरासमोर आपण अगदी य:कश्चित् असल्याचा बोध होतो. या दर्शनामुळे आपण प्रत्येक क्रियेत ईश्वराचीच सत्ता अस्तित्व बघू लागतो. अनुभवायला लागतो. अर्जुन म्हणतो की आपण सर्वनियंता असल्यामुळे सर्वांच्या स्तुतीला पात्र आहात. अर्जुन असे म्हणतो की हे ईश्वरा, आपले महात्म्य आता माझ्या लक्षात आल्यामुळे मी आपणास प्रसन्न ठेवू इच्छितो म्हणजे आपण सदैव प्रसन्न असाल असे कार्य करु इच्छितो कारण की आपण जर प्रसन्न झाला नाहीत तर मी स्वतंत्रपणे काहीही करु शकणार नाही. ज्यांचा अभिमान क्षीण होऊ लागतो असे अनेक साधक बालकाप्रमाणे निराधार झाल्यासारखे वागतात. ते ईश्वराच्या आधाराशिवाय जगू शकत नाहीत. भक्ताला आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवताच येत नाही. ईश्वराची कृपा आपल्यावर सदोदित राहो या भावनेने भक्त ईश्वरी प्रेरणेनेच प्रत्येक कार्य करायचा प्रयत्न करतो.

3) **पुत्रस्य पिता इव, सख्यु: सखा इव, प्रियाया: प्रिय: इव, त्वं सोढुं अर्हसि:** पुत्रासाठी पिता, मित्रासाठी मित्र, पत्नीसाठी जसा पती असतो त्यांचे अपराध क्षमा करतो. तसेच आपण माझे अपराध क्षमा करावेत. अर्जुन ईश्वरासमोर संपूर्णपणे नतमस्तक होऊन आपल्या अपराधांविषयी क्षमा मागतो. यासाठी क्षमा करणाऱ्या पिता, मित्र व पतीचे उदाहरण दिलेले आहे.

: 45 :

*अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा*
*भयेन च प्रव्यथितं मनो मे।*
*तदेव मे दर्शय देवरुपं*
*प्रसीद देवेश जगन्निवास॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अदृष्टपूर्वं:** पूर्वी न पाहिलेले असे हे आपले आश्चर्यकारक रुप
- **रुपं दृष्ट्वा:** आपले विश्वरुप बघून
- **हृषित: अस्मि:** मी खूप हर्षित झालो आहे
- **च भयेन मे मन:** प्रव्यथितं: पण माझे मन भयाने अत्यंत व्याकुळही होत आहे
- **जगन्निवास:** हे जगदाधारा प्रभो
- **देवदेवेश:** हे देवा, हे देवाधिदेवा
- **प्रसीद:** प्रसन्न व्हा
- **तत् एव रुपं मे दर्शय:** हे देवा, मला त्या आपल्या पूर्वीच्या चतुर्भुज रुपाचेच दर्शन घडवा

### अर्थ

पूर्वी न पाहिलेले आपले हे आश्चर्यकारक रुप बघून मी आनंदित झालो आहे आणि माझे मन भयाने अतिशय व्याकुळही होत आहे म्हणून आपण मला ते चतुर्भुज विष्णूरुपच दाखवा. हे देवेशा, हे जगन्निवासा, प्रसन्न व्हा.

*अपूर्व पाहूनि अपार धालों*
*परी मनीं व्याकुळता न जाय*
*पुन्हां बघूं दे मज तें चि रुप*
*प्रसन्न होईं जगदीश्वरा तूं ।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) या पूर्वी कधी न पाहिलेले आपले विश्वरुप बघून मी खूप हर्षित झालो आहे. 2) पण माझे मन भयाने व्याकुळ झाले आहे. 3) हे जगताच्या निवासस्थाना ईश्वरा, हे देव, हे देवांच्या स्वामी, प्रसन्न व्हा, मजवर कृपा करा, आपले तेच चतुर्भुज रुप मला दाखवा.

**स्पष्टीकरण**

1) **अदृष्टपूर्वं रुपं दृष्ट्वा हृषित: अस्मि:** भगवंता, आपले हे रुप बघून मी खूप हर्षित झालो आहे. आपले हे असे रुप यापूर्वी न बघितलेले असे आहे. याठिकाणी अर्जुनाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) आपण ज्या विश्वरुपाचे दर्शन मला घडवले ते यापूर्वी मी कधीही बघितलेले नव्हते, कुणीही बघितलेले नव्हते. 2) या विश्वरुपाचे दर्शन करुन मला खूप आनंद झाला आहे. विश्वरुप दर्शनामुळे आपली अल्पता, क्षुद्रता लक्षात आली आणि ईश्वराप्रती अनुराग भाव वाढला.

2) **च भयेन मे मन: प्रव्यथितम्:** पण माझे मन मात्र भयाने व्याकुळ झाले आहे. इथे हा प्रश्न उद्भवतो की विश्वरुप दर्शनाने जर आत्यंतिक हर्ष झाला असेल तर मग भय कसे जागले? विश्वरुप दर्शन घडल्यावर हर्षित झाल्यावर सुध्दा अर्जुनाच्या लक्षात हा मुद्दा आला की विश्वरुप दर्शनाची योग्यता काही आपल्या ठायी नाही. आनंद अवश्य वाटला पण तो आनंद पचवणे अवघड होते. पूज्य गांधीजी वा विनोबांच्या आश्रमात (साबरमती वा पवनार) खूप लोक येतात, आश्रम बघून प्रसन्न होतात. 'आश्रम बघून खूप आनंद झाला ना, मग थांबा की इथे' असे जर सांगितले तर ते म्हणतील 'अहो, आश्रमीय जीवन बघून खूप प्रसन्नता वाटली पण आश्रमात राहू शकण्याइतकी योग्यता काही आमच्या ठायी नाही.' अर्जुनाची स्थिती हीच झाली आहे. यामुळे तो म्हणाला 'आपण विश्वरुप दर्शन घडवलेत हे तर मजवर खूप उपकार झालेत. त्या दर्शनाने मला अपरंपार आनंद झाला. आताही आनंद होतो. माझी क्षुद्रताही ध्यानात आली पण जोवर माझा अहंकार म्हणजे जीवभाव क्षीण झाला नाही तोवर हे विश्वरुप मी कायमसाठी बघू शकणार नाही. जेव्हा ज्ञान होईल तेव्हाच संपूर्ण विश्वाला ईश्वर दृष्टीने मी बघू शकेन. तेव्हा विश्वरुप दर्शन सहज शक्य होईल तोवर आपले हे पुरातन रुपच ठीक आहे.'

3) **जगन्निवास देवदेवेश प्रसीद तत् एव रुपं मे दर्शय:** हे जगदाधारा, जगन्निवासा, देवा, देवाधिदेवा, मजवर प्रसन्न व्हा. कृपापूर्वक आपले तेच पुरातन चतुर्भुज रुप दाखवा. संपूर्ण जगाचे आधार स्वरुप वा निवास स्थान ईश्वरच आहेत पण प्रपंचात आपले कुटुंब, आई-बाबा, लेकरे-बाळे, हे सारे आधार स्थान वाटतात. खरे पाहू गेल्यास ते खरे आधार स्थान वा निवास स्थान नाहीत. अखेर अर्जुन सांगतो की आता त्यावर कृपा करावी आणि तेच पुरातन रुप दाखवावे. हे विश्वरुप आवरुन घ्यावे. विश्वरुप दर्शन मिष्टान्नासारखे आहे. यामुळे अर्जुन देवाला प्रार्थना करतोय की आपले ते पुरातन रुपच मी बघू इच्छितो.

: 46 :

*किरीटिनं गदिनं चक्रहस्त-*
*मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।*
*तेनैव रुपेण चतुर्भुजेन*
*सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **किरीटिनं:** मुकुट धारण केलेले
- **गदिनं:** गदाधारी
- **चक्रहस्तं:** ज्याच्या हातात चक्र आहे असे
- **त्वां तथा एव:** आपणाला पहिल्यासारखे
- **अहं द्रष्टुं इच्छामि:** मी पाहू इच्छितो
- **सहस्रबाहो, विश्वमूर्ते:** हे विश्वस्वरुपा सहस्रबाहो आपण
- **तेन एव चतुर्भुजेन रुपेण भव:** त्याच आधीच्या चतुर्भुज रुपात प्रकट व्हा

**अर्थ**

मी पहिल्यासारखेच आपल्याला मुकुट धारण केलेले तसेच गदा आणि चक्र धारण केलेले पाहू इच्छितो म्हणून हे विश्वस्वरुपा, हे सहस्रबाहो आपण त्याच चतुर्भुज रुपाने प्रकट व्हा.

*घेई गदा चक्र किरीट घालीं*
*तसें चि पाहूं तुज इच्छितों मी*
*अनंत बाहूंस गिळूनि पोटीं*
*चहूं भुजांचा नट विश्व-मूर्ते ।*

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) किरीटधारी, गदाधारी, चक्रधारी अशा आपणास आधीसारखा मी बघू इच्छित आहे. 2) हे सहस्रबाहो, विश्वमूर्ते, आपण त्याच आधीच्या चतुर्भुज रुपात प्रकट व्हा.

**स्पष्टीकरण**

1) **किरीटिनं गदिनं चक्रहस्तं त्वां तथा एव अहं द्रष्टुं इच्छामि:** शंख, चक्र, गदा, पद्म, मुकुटधारी अशा आपणास मी आधीसारखा बघू इच्छितो. अर्जुनाचे चित्त भगवंताचे मूळ परिचित स्वरुप बघायला व्याकुळ झाले आहे. यामुळे जुन्या स्वरुपाचे वर्णन केले आहे. भगवंताच्या चतुर्भुज स्वरुपात भगवंताच्या मस्तकावर किरीट म्हणजे मुकूट असतो. हाती गदा, चक्र असतात. भगवंताच्या चतुर्भुज स्वरुपाचे वर्णन करुन अर्जुन प्रार्थना करत आहे की मी आपले तेच पुरातन रुप बघू इच्छितो. मला आता ते रुप दाखवा. कृपा करुन मला त्याच रुपाचे दर्शन घडवा.

2) **सहस्रबाहो विश्वमूर्ते तेन एव चतुर्भुजेन रुपेण भव:** आपले विश्वरुप तर हजारो हातांचे आहे आणि संपूर्ण विश्व आपले प्रकट स्वरुप आहे. आपल्या कृपेमुळे मला या विश्वरुप दर्शनाचा लाभ झाला. तसे सर्वांसमक्ष ब्रह्मांडात दिसून येणारी प्रत्येक वस्तु आपलेच प्रकट स्वरुप आहे पण अज्ञानावस्थेमुळे तर आम्हा सर्वांसाठी तर ते केवळ विश्वच असते. आम्ही विश्वाला परमात्म दृष्टीने बघू शकत नाहीत. भगवंताने अर्जुनाला कृपापूर्वक हे विश्वरुप दर्शन घडवले. यामुळे अर्जुनाला बोध व्हावा की संपूर्ण विश्व कसे ईश्वरमय आहे पण आता अर्जुन असे म्हणतो की हे देवाधिदेवा, हे विश्वरुप विसर्जित करुन पुरातन स्वरुपच दाखवा.

किरीट, गदा, चक्र यांचा विनोबांनी छान अर्थ केला. किरीट म्हणजे धर्म स्थापन. चक्र म्हणजे साधु जनांचे संरक्षण. गदा म्हणजे दुष्ट शक्तींचे दमन. अवतारी पुरुषाची ही त्रिविध अवतार कार्ये होत. श्रीकृष्ण भगवान अवतार होतेत्यामुळे जगातील दुष्टता दूर करण्यासाठी हाती गदा घेतली. साधु जनांच्या रक्षणासाठी हाती चक्र भिरभिरते ठेवले आणि धर्माच्या स्थापनेसाठी मस्तकावर मुकूट परिधान केला. हा झाला अवताराचा संकेत. उपासना-संकेताच्या दृष्टीने तिघांचा असा अर्थ होतो. 1) गदा म्हणजे विरक्ती वा वैराग्य. 2) चक्र म्हणजे भक्ती. 3) किरीट म्हणजे ज्ञान. या तिन्ही गोष्टी म्हणजे वैराग्य, भक्ती आणि ज्ञान साधकासाठी आवश्यक आहेत. भगवंताच्या या तीन रुपांच्या माध्यमातून साधकाला तीन प्रकारच्या प्रेरणा लाभतात.

: 47 :

**श्री भगवान उवाच**

*मया प्रसन्नेन तवार्जुनेदं*
*रुपं परं दर्शितमात्मयोगात् ।*
*तेजोमयं विश्वनन्तमाद्यं*
*यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन:** हे अर्जुना,
- **प्रसन्नेन मया:** प्रसन्न होऊन मी, म्हणजे मी अनुग्रहपूर्वक
- **आत्मयोगात्:** आपल्या योगसामर्थ्याने योगशक्तीच्या प्रभावाने
- **तव इदं मे:** मी तुला हे माझे
- **परं तेजोमयं:** श्रेष्ठ तेजोमय
- **अनन्तं आद्यम्:** अनंत म्हणजे सीमारहित आणि सर्वांचे आदी
- **विश्वरुपम्:** विश्वव्यापक विराट रुप
- **दर्शितम्:** दाखवले आहे

- **यत् त्वत् अन्येन:** ते तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणी
- **न दृष्टपूर्वम्:** पूर्वी कधी पाहिलेले नाही

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे अर्जुना, मी तुझ्यावर अनुग्रह करण्यासाठी आपल्या योगशक्तीच्या प्रभावाने हे माझे परम तेजोमय, सर्वांचे आदी, सीमा नसलेले विराट रुप तुला दाखवले. ते तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही यापूर्वी पाहिले नव्हते.

**श्री भगवान म्हणाले**

*प्रसन्न होऊनि रचूनि योग*
*हें दाविलें मीं तुज विश्व-रुप*
*अनंत तेजोमय आद्य थोर*
*जें पाहिलें आजवरी न कोणीं।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) प्रसन्न होऊन आपल्या योग सामर्थ्याने मी आपले श्रेष्ठ, तेजोमय, अनन्त आणि आरंभापासून चालत आलेले विश्वव्यापक रुप दाखवले. 2) या रुपाला तुझ्याशिवाय कधी कोणी पाहिलेले नाही.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन प्रसन्नेन मया आत्मयोगात् तव इदं मे परं तेजोमयं अनन्तं आद्यं विश्वरुपं दर्शितम्:** आपले पुरातन चतुर्भुज रुप दर्शविण्यापूर्वी भगवान अर्जुनाला आपल्या विश्वरुपाविषयी या श्लोकातून निवेदन करताहेत. 'हे अर्जुना, प्रसन्न होऊन आपल्या योगसामर्थ्याच्या बळाने मी तुला माझे श्रेष्ठ, तेजोमय, अनंत आणि आरंभापासून चालत आलेले विश्वव्यापक रुपाचे दर्शन घडवले.'

भगवंताने जे विश्वरुप दर्शन घडवले ते काही सहजपणे घडवले होते असे नव्हे. अर्जुनाशी त्यांचा आत्मीय संबंध होता. विश्वरुप दर्शनाची तीव्र जिज्ञासा अर्जुनाच्या मनात होती आणि विश्वरुप दर्शनामुळे अर्जुनाचा मोह घालवण्याकामी सहाय्य मिळणार असल्यामुळे घडवले. यामुळे सुरुवातीलाच भगवान अर्जुनाला सांगताहेत 'मी तुजवर प्रसन्न होऊन विश्वरुप दर्शन घडवले.' ईश्वराचे प्रसन्न होणे हा मोठाच अनुग्रह आहे.

दुसरा मुद्दा असा की भगवंताने जे विश्वरुप दर्शन घडवले ते आपल्या योग सामर्थ्याने घडवले. समाधी प्राप्त साधकांच्या ठायी देखिल योग सामर्थ्य आढळून येते पण भगवंतांनी अर्जुनाला जे विश्वरुप दर्शन घडवले तसे सामर्थ्य कुणा योगी पुरुषाच्या ठायीही बघण्यात येत नाही. भगवान श्री कृष्णाच्या ठायी एक विशेष सामर्थ्य होते. आता ते स्वत: विश्वरुपाच्या स्वरुपाचे वर्णन करुन सांगताहेत. ते म्हणताहेत की हे विश्वरुप दर्शन घडवणे सामान्य वा साधारण स्वरुपाचे काम नाही. हे तेजाने संपन्न म्हणजे प्रकाशमय आहे. या प्रकाशमय ईश्वराचे दर्शन आपल्याला होत नाही. आपल्याला जे विश्व दिसते ते काही विश्वरुप दर्शन नाही. ज्या ईश्वर प्रकाशामुळे आपल्याला विश्वाचे दर्शन होते ज्ञान होते त्या ज्ञानप्रकाशासोबत विश्वाचे दर्शन करणे म्हणजे विश्वरुप दर्शन होय. तो अनादी असल्यामुळे विश्वाचा आधाररुप ईश्वर अनंत आहे.

2) **यत् त्वत् अन्येन न दृष्टपूर्वं:** भगवंत म्हणाले 'हे विश्वरुप दर्शन तुझ्यापूर्वी कुणालाही घडलेले नाही. विश्वरुप दर्शन एवढे अलौकिक आहे की कुणाला ताबडतोबीने घडवण्यासारखे नाही. ईश्वराच्या अनुग्रहानेच ते घडू शकते.' श्री कृष्णाने आपल्या आयुष्यात हे कुणाला घडवले नाही. अर्जुनाशिवाय कुणाला आजवर हे दर्शन घडलेच नाही असे मानणे योग्य नव्हे. गुरु जर समर्थ आणि ज्ञानसंपन्न असेल आणि शिष्य जर योग्य असून त्याची विश्वरुप दर्शनाची इच्छा तीव्र असेल तर समर्थ गुरु आपल्या शिष्याला विश्वरुप दर्शन घडवू शकतो.

: 48 :

*न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै-*
*र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रै: ।*
*एवंरुप: शक्य अहं नृलोके*
*द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कुरुप्रवीर:** हे अर्जुना
- **नृलोके:** या मानव लोकी
- **त्वत् अन्येन:** तुझ्याखेरीज दुसऱ्या कुणाकडूनही

- **अहं एवंरुप: द्रष्टुं:** माझे अशा प्रकारचे विश्वरुपाचे दर्शन
- **वेदयज्ञाध्ययनै:** वेदांच्या आणि यज्ञांच्या अध्ययनाने
- **न शक्य:** शक्य नाही
- **दानै: न:** दान केल्याने शक्य नाही
- **क्रियाभि: उग्रै:** च तपोभि: न: अनेक क्रिया केल्याने वा उग्र तपाचरण केल्यानेही शक्य नाही

**अर्थ**

हे अर्जुना, मानव लोकात अशा प्रकारचा विश्वरुपधारी मी वेदांच्या आणि यज्ञांच्या अध्ययनाने, दानाने, वैदिक कर्मांनी आणि उग्र तपश्चर्यांनीही तुझ्याखेरीज दुसऱ्याकडून पाहिला जाणे शक्य नाही.

***घोकूनियां वेद करुनि कर्मे यजूनि वा उग्र तपें तपूनि***
***देऊनि दानें जगतीं न शक्य***
***तुझ्या विना दर्शन हें कुणास ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) हे अर्जुना, या मानव लोकी तुझ्याशिवाय अन्य कुणालाही माझे अशा प्रकारचे दर्शन होणे शक्य नाही. 2) वेदाध्ययनाने, यज्ञ याग केल्याने, दाने दिल्याने, अनेक कर्मे केल्याने आणि उग्र तपाचरण केल्यानेही शक्य नाही.

**स्पष्टीकरण**

1) **कुरुप्रवीर नृलोके त्वत् अन्येन अहं एवंरुप: द्रष्टुं ( न शक्य:):** हे अर्जुना, या मानवी लोकात तुझ्याशिवाय कुणाला हे दर्शन घडणे शक्य नाही. इथे असे वाटेल की अर्जुनासारखा पुरुष जगात जन्माला आलाच नाही, पण हा अर्थ योग्य नव्हे. भगवंताच्या अनुग्रहानेच म्हणजे कृपेनेच असे विश्वरुप दर्शन घडू शकते. वाटेल तेवढी साधना झाली असली तरी भगवंताचा अनुग्रह हा मुख्य विषय आहे. या अनुग्रहासाठी कुठल्या प्रकारची साधना हवी याची चर्चा या श्लोकात केली आहे. या श्लोकात संपूर्ण गीतेचे सार आहे. असे दर्शन घडण्यासाठी भक्ती हवी. भक्तीच्या बळावर भगवंताचा अनुगह होऊ शकतो. अर्जुनाच्या ठायी भक्तीची एवढी साधना नसतानाही त्याचा भगवंताशी जो आत्मीय संबंध होता तो लक्षात घेऊन भगवंताने हे अलौकिक दुर्लभ असे दर्शन त्याला घडवले. विश्वाची सारी सूत्रे भगवंताच्या हाती असल्यामुळे त्यांची कृपा कुणावरही, कोणत्याही क्षणी होऊ शकते. अर्थात् ईश्वर पक्षपाती नसतानासुध्दा त्याचा अनुग्रह त्याच्याच अधीन असतो.

2) **वेदयज्ञाध्ययनै: न शक्य:,** दानै: न, क्रियाभि: च उग्रै: तपोभि: न ही योग्यता वेद पठनाने, वा यज्ञयाग करुन. दान वगैरे नाना क्रिया करुन वा उग्र तपाचरणानेही प्राप्त करुन घेता येणे शक्य नाही.

भगवान इथे सांगताहेत की साधक वा मुमुक्षु कितीही एकांगी साधना करो, मुख्य साधना आहे भक्ती. जोवर भक्ती साधन होत नाही तोवर ईश्वराचे दर्शन शक्य नाही. याचा असा अर्थ होत नाही की वेदाध्ययन, स्वाध्याय वा दान वगैरे क्रिया वा नाना प्रकारची सत्कर्मे करायची काहीही गरज नाही. या सर्वांची संपूर्ण गरज असतानाही आत्मदर्शनासाठी या साधनांच्या सोबत भक्ती आवश्यक असेल कारण की साधकाला शून्य बनवण्याकामी भक्तीच साधनरुप असते, भक्तीच समर्थ आहे. साधनेशिवाय भक्ती साधता येणार नाही. यामुळे या चारही (वेदांचे अध्ययन, स्वाध्याय, यज्ञ आणि दान) साधनांची संपूर्ण आवश्यकता आहे.

सर्वप्रथम वेदाध्ययनाचा विचार केला गेला. वेद पठनही प्राथमिक अवस्थेत गरजेचे आहे. वेद संस्कृत भाषेत असून ती संस्कृत भाषा काहीशी अवघड आहे. प्राचीन काळी उच्चारणाला फार महत्व होते. आधी वेदपठन मग स्वाध्याय. स्वाध्यायात श्रवण, मनन, चिंतन तिन्ही समाविष्ट आहेत. स्वाध्यायात ज्ञानेश्वरी, तुलसी रामायण वगैरे ग्रंथांचाही समावेश आहे. सतराव्या अध्यायातील पंधराव्या श्लोकात स्वाध्यायाला 'वाणीचे तप' असे म्हटले गेले आहे. स्वाध्यायासोबत दान म्हणजे त्याग वृत्ती दर्शवली गेली आहे. स्वाध्याय दिवसभर तर काही करता येत नाही. यामुळै सकाळी स्वाध्याय करुन दिवसा त्यागवृत्तीने यज्ञ म्हणजे परोपकारात रत असायला हवे. यज्ञासोबत दान व दानासोबत यज्ञ व्हायला हवा. आपल्यापाशी जे काही ज्ञान, कला गुण वगैरे आहेत ते इतरांना देण्याची वृत्ती असाही दान शब्दाचा एक अर्थ आहे. दानात स्थूल दानाचाही समावेश होतो. ज्यांच्यापाशी अधिक पैसा आहे त्यानी ते परोपकारार्थ दान द्यावे. वेद,

स्वाध्याय, यज्ञ, दान यांच्यासोबत नाना प्रकारची सत्कर्मेही जीवनात घडत रहायला हवीत. यासोबत उग्र तपाचरणही सांगितले गेले आहे. उग्र तपाचरण म्हणजे मोक्षासाठी आवश्यक असे वैराग्यमय तपाचरण. तपाच्या मागे वैराग्याची भावना असायला हवी. वैराग्य विहीन तपाचरण देह दंडनच होय. मजूर खूप कष्ट उपसतात आणि किमान कमाईत उदरनिर्वाह करतात पण त्यांच्या कष्ट उपसण्याला काही तप म्हणता येत नाही कारण त्या कष्टाच्या पाठीमागे वैराग्य भावना नाही. वैराग्य वृत्तीत प्रपंचाची जगाची आसक्ती नसते. जिथे वेद, अध्ययन, यज्ञ, दान, सत्कर्म आणि तपासोबतच ईश्वर भक्ती असेल तिथे ईश्वरी कृपा व्हायलाच हवी आणि ईश्वरी कृपा झाली म्हणजे मुमुक्षुला विश्वरुप दर्शन घडूच शकते.

: 49 :

*मा ते व्यथा मा च विमूढभावो*
*दृष्ट्वा रुपं घोरमीदृङ्. ममेदम्।*
*व्यपेतभी: प्रीतमना: पुनस्त्वं*
*तदेव मे रुपमिदं प्रपश्य॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मम इदं ईदृक् घोरं रुपं:** माझे हे अशा प्रकारचे विक्राळ रुप
- **दृष्ट्वा ते व्यथा मा:** बघून तू व्याकूळ म्हणजे व्यथित होऊ नकोस
- **च विमूढभाव: मा:** आणि मूढासारखाही होऊ नकोस
- **त्वं पुन: व्यपेतभी:** तू पुनश्च निर्भय होऊन
- **प्रीतमना:** संतुष्ट चित्त होऊन
- **तत् एव मे इदं रुपं प्रपश्य:** तू तेच माझे हे शंख, चक्र, गदाधारी चतुर्भुज रुप पहा

**अर्थ**

माझे या प्रकारचे हे विक्राळ रुप बघून तू भयभीत होऊ नकोस, किंवा गोंधळून जाऊ नकोस. तू भिती सोडून प्रीतीयुक्त अंत:करणाने तेच माझे हे शंख-चक्र-गदा-पद्म असलेले चतुर्भुज रुप पुन्हा पहा.

*होऊं नको व्याकुळ मूढ-भावें*
*पाहूनि हें रुप भयाण माझें*
*प्रसन्न-चित्तें भय सोडुनी तूं*
*पहा पुन्हां तें प्रिय पूर्व-रुप।*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत 1) माझे विक्राळ रुप बघून व्याकुळ होऊ नकोस. 2) आणि गोंधळात पडू नकोस. 3) तू पुनश्च निर्भय होऊन आणि संतुष्ट चित्ताने माझे तेच पुरातन रुप बघ.

**स्पष्टीकरण**

1) **मम इदं ईदृक् घोरं रुपं दृष्ट्वा ते व्यथा मा:** माझे असे विक्राळ वा भयंकर विश्वरुप बघून व्याकुळ होऊ नकोस. अर्जुन अज्ञानावस्थेत असल्यामुळे त्याला हे रुप भयंकर वाटत होते. कुणी आत्मीय वारले तर लहान मुलांनी मृत देहाला बघू नये म्हणून काळजी घेतली जाते. मुले भयभीत होऊन जातात. बालकांच्या ठायी प्रेत बघू शकण्याची पात्रता नसते. मोठा झाल्यावर प्रेत बघू शकतात. काहीअडचण नाही अर्थात् काही मोठ्या वयाची माणसेही मृत शरीर बघून भिऊन जातात. तशाच प्रकारे जोवर अज्ञानावस्था असते तोवर सर्व भेदांना मिथ्या समजून मनुष्य संपूर्ण विश्व परमात्ममय रुपात बघू शकत नाही. या विषयीचे स्वास्थ्य प्राप्त करुन घेऊ शकत नाही कारण की सृष्टीत नाना प्रकारचे अनाचार चालताहेत, कत्तलखाने सुरु आहेत. हे सारे ईश्वराच्या आश्रयाने सुरु आहे चालले आहे तर हा विचार मनात जागेल की हा सारा वाईटपणा ईश्वर कसा काय चालू देत आहे सुरु ठेवत आहे. ईश्वर जर सर्वशक्तीमान आहे तर हा सारा अनाचार घालवण्याची शक्ती त्याच्या ठायी असलीच पाहिजे पण विश्वरुप समोर येऊन उभे ठाकल्यावर जर ईश्वराच्या उपस्थितीत साक्षीत हे सारे चालत आहे असे कळल्यावर बेचैनी उत्पन्न होईल आणि मग अशा विश्वरुप दर्शनाची कुणाला उत्सुकता उरणार नाही. असे वाटू लागेल की हे रुप नाही बघितले तर बरे, कारण की हे दृश्य भयंकर आहे. आपल्या असतानाही जर हे सारे अनाचार ईश्वर चालू देत असेल तर मग त्याच्या बाबतीतली श्रध्दा कमी होऊ लागेल. ईश्वरावर

आधीपासून श्रध्दा असेल आणि अशा प्रकारचे विश्वरुप ईश्वरी सहाय्याने सुरु आहे असे साक्षात् बघितल्यावर तर ईश्वराबद्दलचा श्रध्दाभाव कायमचा टिकून राहू शकत नाही. जोवर विश्वाकडे बघायची परमात्म दृष्टी प्राप्त होत नाही तोवर विश्वाला सत्य जाणून माणूस चिंता करील तर मग त्याचे चित्त व्याकुळ होणारच.

2) **च विमूढभाव:** मा मनात मूढभाव म्हणजे मूढता, गोंधळ उत्पन्न होऊ देऊ नकोस. आधी चित्ताच्या ठायी व्याकुळता उपजते मग माणूस गोंधळून जातो. मुंबई महाराष्ट्राला मिळत नाही म्हणून एका बंधुची झोपमोड होते. त्याना व्याकुळ वाटते. तसे मुंबई महाराष्ट्राला नाही मिळाली तर काय मोठेसे? ती हिंदुस्तानापासून तर वेगळी होत नाही ना? पण जोवर जगत सत्यरुप वाटते तोवर या मूढतेला टाळणे अशक्य आहे.

3) **त्वं पुन: अपि व्यपेतभी: प्रीतमना:** तत् एव मे इदं रुपं प्रपश्य तू पुन्हा निर्भयपणे संतुष्ट चित्त मनाने माझे पुरातन रुप बघ. भगवान सांगताहेत की विश्वरुप दर्शन होण्यापूर्वी तू जसा निर्भय, प्रसन्न चित्ताचा होतास तसा पुनश्च बनून जा. विश्वरुप दर्शन घडण्यापूर्वी अर्जुनाने बरेच काही ऐकलेले होते. दोन ते दहा या नऊ अध्यायांमध्ये जो उपदेश लाभला तो ग्रहण केल्यामुळे आपला शोक-मोह बऱ्याच प्रमाणात दूर झाल्याचे अर्जुनाने अकराव्या अध्यायाच्या पहिल्याच श्लोकात सांगितले आहे. यामुळे भगवान म्हणताहेत की हे अर्जुना, तुझ्या प्रार्थनेमुळेच मी तुला हे विश्वरुप दर्शन घडवले. आता तू माझे तेच पुरातन रुप बघू शकत असशील तर ते बघ असे बोलून भगवंताने आपले स्वरुप दाखवले.

जे जगाच्या काळजीत पडून जातात त्यांचे चित्त विचलित होते म्हणजे त्यांचे आत्मपरीक्षण कमी होते. स्वत: सूत कताई करत नसेल, आपल्या घरात खादी दाखल करु शकला नसेल तरी हिंदुस्तान केव्हा सूत कताई करु लागेल, लोक केव्हा खादी परिधान करु लागतील ? या चिंतेने माणूस बेचैन होऊन जातो. पर-परीक्षणाची अधिक सवय असणाऱ्यांची हीच परिस्थिती होते. सुधारणांची सुरुवात आपल्या स्वत:च्या घरापासून व्हायला पाहिजे ही गोष्ट लोक विसरुनच जातात. घरात यश मिळाले तर जवळच्यांना आपोआप प्रेरणा मिळते. अशा प्रकारे या सुधारणा वा बदल आपण ज्या कुटुंबात वा संस्थेत असतो तिथेच करायचे प्रयत्न व्हायला हवेत, हा या श्लोकाचा सारांश आहे.

: 50 :

**संजय उवाच**

*इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा*
*स्वकं रुपं दर्शयामास भूय: ।*
*आश्वासयामास च भीतमेनं*
*भूत्वा पुन: सौम्यवपुर्महात्मा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इति वासुदेव: अर्जुनं:** अशा प्रकारे भगवान वासुदेवाने अर्जुनाला
- **तथा उक्त्वा:** वरील प्रमाणे सांगितले
- **भूय: स्वकं रुपं दर्शयामास:** परत आपले तेच चतुर्भुज रुप दाखवले
- **च महात्मा:** आणि महात्मा भगवान कृष्णाने
- **पुन: सौम्यवपु: भूत्वा:** पुनश्च सौम्य रुप धरुन
- **भीतं एनं:** भयभीत झालेल्या, व्याकुळ चित्ताच्या त्या अर्जुनाला
- **आश्वासयामास:** आश्वासन दिले, धीर दिला

**अर्थ**

संजय म्हणाला, भगवान वासुदेवांनी अर्जुनाला असे सांगून पुनश्च तसलेच आपले चतुर्भुज रुप दाखवले आणि पुन्हा महात्म्या श्रीकृष्णाने सौम्य रुप धारण करुन भयभीत अर्जुनाला धीर दिला.

**संजय म्हणाला**

*बोलूनि ऐसें मग वासुदेवें*
*पार्थास तें दाखविलें स्वरुप*
*भ्याल्यास आश्वासन द्यावया तो*
*झाला पुन्हा सौम्य उदार देव ।*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) अशा प्रकारे वासुदेवाने अर्जुनाला वरीलप्रमाणे सांगून पुन्नश्च आपले पुरातन रुप दाखवले. 2) आणि महात्मा भगवान श्रीकृष्णाने पुनश्च सौम्य रुप धारण करुन व्याकुळ चित्त अर्जुनाला धीर दिला, आश्वासन दिले.

**स्पष्टीकरण**

1) **इति वासुदेव:** अर्जुनं तथा उक्त्वा भूय: स्वकं रुपं दर्शयामास असे आता संजय धृतराष्ट्राला सांगत आहे. अशाप्रकारे अर्जुनाप्रती वरीलप्रमाणे बोलणे झाल्यावर भगवान वासुदेवाने आपले तेच पुरातन चतुर्भुज रुप दाखवले.

मागील श्लोकाच्या अनुसंधानात संजय हे सांगत आहे. भगवंताने मागील श्लोकातील निवेदन करुन पुनश्च आपल्या त्याच पुरातन स्वरुपाचे दर्शन घडवले. साधक वा मुमुक्षुचा अधिकार, योग्यता आणि भूमिका बघून ज्ञानीजन चालतात. भगवंताने काही स्वेच्छेने अर्जुनाला विश्वरुप दर्शन घडवले नव्हते. ते अर्जुनाच्या भूमिकेला सुयोग्यपणे जाणत होते. अर्जुनानेच विश्वरुप दर्शन घडविण्याकामी प्रार्थना केली होती. भगवान त्या प्रार्थनेला टाळू शकले नाही. खरे म्हणजे विश्वरुप दर्शन काही अज्ञानावस्थेत घडायचा विषय नाही पण त्या दर्शनामुळे अर्जुनाला फायदाच झाला. विश्वरुप दर्शन घडल्यामुळे त्याच्या मनी आपल्या अल्पज्ञतेचे क्षुद्रतेचे दर्शन घडले पण या दर्शनाचा पैलू काही त्याला झेलता आला नाही. विश्वात चालणाऱ्या भयंकर घटनाही ईश्वराचेच स्वरुप आहे म्हणजे ईश्वराचाच खेळ आहे हा विचार काही त्याच्या मनावर ठसला नाही यामुळे त्याचे चित्त व्याकुळ झाले. अर्जुनाची व्याकुळता घालवण्यासाठी भगवंताने आपले विश्वरुप आवरुन पुरातन चतुर्भुज स्वरुप प्रकट केले. कुणी स्मशानात रहायला तयार होणार नाही. काही वेळ स्मशानात जाऊन प्रेतांना अग्नीसंस्कार केल्याचे बघणे निराळे आणि तिथे जाऊन रहाणे निराळे होय.

2) **च महात्मा पुन: सौम्यवपु:** भूत्वा भीतं एनं आश्वासयामास महात्मा भगवान श्री कृष्णाने पुनश्च आपले सौम्य रुप धारण करुन भयभीत व्याकुळ झालेल्या अर्जुनाला आश्वासन दिले आणि स्थिर शांत केले, त्याची व्याकुळता घालवली. या ठिकाणी संजयाने श्री कृष्णासाठी 'महात्मा' शब्दाचा प्रयोग केला. श्री कृष्ण महात्मा तर होतेच पण नुकतेच सांगितल्याप्रमाणे ते बाहेरुन म्हणजे बाह्यत: कधी महात्मा वाटत नव्हते, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचे बाह्य स्वरुप अगदी सामान्य होते. असे खूप कमी महात्मा पुरुषांच्या बाबतीत दिसते. महात्मा गांधी असे होते. तसे पाहू गेल्यास ज्याना ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्याचे यत्किंचितही भान उरत नाही म्हणजे ज्याना आपल्या शून्यतेचाच परिपूर्ण रीतीने अनुभव असतो त्याना आपल्या बाबतीत कुठली विशेषता वा वैशिष्ट्य न लागल्यामुळे त्यांचे रुप बाह्यत: सामान्यच रहाते. अर्थात् ज्याप्रमाणे अज्ञानी पुरुषाच्या व्यवहारात ज्याप्रमाणे अज्ञानाचा आविष्कार म्हणजे अज्ञानाची लक्षणे म्हणजे अहंकार, काम, क्रोध इत्यादी विकार दिसून येतात तसेच ज्ञानी पुरुषांच्या व्यवहारात बाह्य व्यवहारात ज्ञानाची लक्षणेच दिसून येतात. निर्विकारता दिसून येईल पण याशिवाय बाकी कुठलेही अलौकिक बाह्य आविष्कार दिसून येणार नाही अर्थात् दाढी वाढवणे, जटा राखणे, भगवी वस्त्रे परिधान करणे, लंगोटी लावणे, बोलण्यात विशिष्ट उच्च भूमिकेचा आविष्कार, आहार-विहारातील वैशिष्ट्ये इत्यादी रहाणार नाहीत.

: 51 :

**अर्जुन उवाच**

*दृष्ट्वेदं मानुषं रुपं तव सौम्यं जनार्दन।*
*इदानीमस्मि संवृत्त: सचेता: प्रकृतिं गत:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जनार्दन:** हे भगवान जनार्दना, श्रीकृष्णा
- **तव इदं मानुषं सौम्यं रुपं:** आपले हे अतिशय शांत मानव रुप
- **दृष्ट्वा इदानीं:** बघून आता मी
- **सचेता: प्रकृतिं गत:** शांतचित्त आणि पूर्णपणे भानाला प्राप्त
- **संवृत्त: अस्मि:** झालो आहे

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे जनार्दना, आपले हे अतिशय शांत सौम्य मनुष्य रुप पाहून आता माझे मन स्थिर झाले असून मी माझ्या मूळ स्थितीला प्राप्त झालो आहे.

**अर्जुन म्हणाला**

***पाहूनि हें तुझें सौम्य मानुषी रुप माधवा***
***झालों प्रसन्न मी आतां आलों भानावरी पुन्हां ।***

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत 1) हे भगवान आपले हे मानुषी सौम्य रुप बघून 2) आता मी प्रसन्न चित्त आणि पूर्णपणे भानावर आलो आहे.

**स्पष्टीकरण**

1) **जनार्दन तव इदं मानुषं सौम्यं रुपं दृष्ट्वा:** हे भगवान, आपले हे मानुषी सौम्य रुप बघितले. माणसाला कठोरपणा सहन होत नाही. सौम्यता बघून आनंद होतो. हा मानवी स्वभाव आहे. आत्मतत्व प्रेममय आहे. सौम्यता प्रेमाचे स्वरुप आहे. हा मुद्दा बालक आणि मातेच्या ठायी वसतो. तोडफोड करणारी प्रवृत्ती ज्या बालकांची असते त्याना आई कंटाळून जाते. आईला सौम्य स्वभावाची लेकरे आवडतात. सत्याचे दुसरे स्वरुप अहिंसा आहे. अहिंसा म्हणजे प्रेम, सौम्यता. सतराव्या अध्यायातील सोळाव्या श्लोकात आलेल्या मानसिक तपाच्या व्याख्येत येते 'मन:प्रसाद: सौम्यत्वं' मनाची सौम्यता, मनाची प्रसन्नता हे मानसिक तप होय. निर्विकारितेच्या ठायी सौम्यता प्रकट होते. भगवंताचे पुरातन स्वरुप बघून अर्जुन म्हणतोय की आपले सौम्य स्वरुप बघून चित्ताला खूप प्रसन्न वाटत आहे.

2) **इदानीं सचेता: प्रकृतिं गत: संवृत्त: अस्मि:** आता माझे चित्त प्रसन्न झाले आहे. मी संपूर्णपणे भानावर आलो. विश्वरुप दर्शन घडल्यामुळे ईश्वराची विशालता आणि आपली लघुता ध्यानात आली हा अर्जुनाला फार मोठा लाभ झाला पण विश्वरुपात त्याने भगवंताचे भयंकर स्वरुप पाहिले. जगभरातला अन्याय, अत्याचार, क्रुरता इत्यादी सर्व प्रकारच्या त्याज्य वस्तु बघून अर्जुन व्याकुळ बनला कारण की विश्वरुप दर्शन घडल्यावर जगत मिथ्या असल्याचा बोध त्याला नाही झाला. अज्ञानावस्थेत जगताच्या मिथ्यत्वाचे दर्शन घडू शकत नाही. यामुळे भगवंताने आपले विश्वरुप आवरुन घेऊन पुनरपि पुरातन सौम्य स्वरुप दाखवले तर अर्जुन एकदम स्वस्थ झाला. त्याचे चित्त स्थिर झाले.

: 52 :

**श्री भगवान उवाच**

***सुदुर्दर्शमिदं रुपं दृष्टवानसि यन्मम ।***
***देवा अप्यस्य रुपस्य नित्यं दर्शनकांक्षिण: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् मम रुपं:** माझे हे जे चतुर्भुज रुप
- **दृष्टवान् असि:** तु पाहिले आहेस
- **इदं सुदर्दर्शं अस्ति:** ते पहावयास मिळणे अति दुर्लभ आहे
- **देवा: अपि नित्यं:** देवताही नेहमी
- **अस्य रुपस्य:** या रुपाच्या
- **दर्शनकांक्षिण:** दर्शनाची आकांक्षा करीत असतात

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले माझे जे चतुर्भुज रुप तू पाहिलेस ते पहावयास मिळणे अतिशय दुर्लभ आहे. देवगणसुध्दा नेहमी या रुपाच्या दर्शनाची इच्छा करीत असतात.

**श्री भगवान म्हणाले**

***हें पाहिलेस तूं माझें अति दुर्लभ दर्शन***
***आशा चि राखूनी ज्याची झुरती नित्य देव हि ।***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) माझे जे विश्वरुप तू बघितले आहेस त्याचे दर्शन अतिदुर्लभ आहे. 2) देवगण सुध्दा नेहमी या रुपाच्या दर्शनाची आकांक्षा बाळगून असतात.

**स्पष्टीकरण**

1) **यत् मम रुपं दृष्टवान् असि इदं सुदुर्दर्शं अस्ति:** भगवान अर्जुनाला म्हणाले की तू माझ्या ज्या विश्वरुप दर्शनाचा लाभ घेतला तो अतिशय दुर्लभ आहे. विश्वरुप दर्शन हे ज्ञानावस्थेचे कार्य होय. अज्ञानावस्थेत भेद सत्य वाटायला लागते त्यामुळे आपण भेदासोबतच संलग्न

असतो. विश्वातले पदार्थ तर आपल्याला दिसतात पण त्यांच्यासोबत असणारा ईश्वर मात्र दिसत नाही. ईश्वर अतिसूक्ष्म असल्यामुळे पदार्थांच्या ज्ञानासोबत परमात्म्याचे ज्ञान होणे संभवत नाही. कठोपनिषदात ईश्वराविषयी म्हटले आहे.

***तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणं।***
***अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ***
***जहाति॥*** (1/2/12)

अर्थात् ब्रह्मांडात गुप्त असलेल्या त्या ईश्वराचे दर्शन होणे दुर्लभ आहे. तो मनरुपी गुहेत सत्, चित्, आनंद रुपाने वसतो. तो अत्यंत अवघड ठिकाणी म्हणजे इंद्रियांच्या पलिकडे रहातो. तो अनादी काळापासून चालत आलेला आहे. अशा ईश्वराला आध्यात्मिक साधनेच्या बळावर जाणून घेता येणे म्हणजे भक्ती, ध्यान, वैराग्य इत्यादी साधनांनी जाणून घेऊन विवेकसंपन्न पुरुष हर्ष-शोक, राग-द्वेष, सुख-दुःख इत्यादी समस्त विकारांचा त्याग करतो.

2) **देवा:** अपि अस्य रुपस्य नित्यं दर्शनकांक्षिण: देवतासुध्दा ईश्वराच्या या रुपाच्या दर्शनाची नित्य आकांक्षा बाळगतात. 'देव' शब्दाचा अर्थ देवतुल्य माणूस असा आहे. भगवंताने ईश्वर दर्शनासाठी काही अटी सांगितलेल्या आहेत. अशा साधकाला आपल्या आयुष्यात सत्वगुणांचा उत्कर्ष साधून घ्यावा लागतो. ईश्वर दर्शनाच्या साधनेत रत असावे लागते. यासाठी वैराग्य, भक्ती, ध्यान, जप, सत्संग, स्वाध्याय, सत्कर्म इत्यादींचा आश्रय घ्यावा लागतो. चित्त शुध्दीसाठी अखंडपणे जागृत रहावे लागते. असे साधक वा मुमुक्षुजनदेखिल ईश्वराचा हा अनुभव नित्य लाभावा यासाठी हे जीवनध्येय मानून जीवनाचे आचरण करतात.

: 53 :

***नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया।***
***शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यथा मां दृष्टवान् असि:** तू मला जसे पाहिले आहेस
- **एवंविध: अहं:** तशा प्रकारच्या चतुर्भुज रुपाचे दर्शन
- **वेदै: न द्रष्टुं शक्य:** वेदाध्ययनाने होणे शक्य नाही
- **तपसा न:** तपाने नाही
- **दानेन न:** दानाने नाही
- **च इज्यया न:** यज्ञाने संभव नाही

**अर्थ**

तू जसे मला पाहिलेस तशा माझ्या चतुर्भुज रुपाचे दर्शन वेदांनी, तपाने, दानाने आणि यज्ञानेही मिळणे शक्य नाही.

***यज्ञ-दान-तपें केलीं वेदाभ्यास हि साधिला***
***तरी दर्शन हें माझें न लाभे लाभलें तुज।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) तू ज्याप्रमाणे मला पाहिलेस म्हणजे माझ्या विश्वरुपाचे दर्शन केलेस ते वेदाध्ययनानेही शक्य नाही 2) तपाने शक्य नाही 3) दानाने शक्य नाही. 4) यज्ञाने शक्य नाही.

**स्पष्टीकरण**

1) **यथा मां दृष्टवान् असि एवंविध:** अहं वेदै: द्रष्टुं न शक्य: हे अर्जुना, तू ज्याप्रकारे माझ्या विश्वरुपाचे दर्शन केलेस त्या रुपाचे दर्शन वेदाध्ययनाने होणे शक्य नाही. मागील श्लोकात असे सांगितले आहे की विश्वरुपदर्शन अत्यंत दुर्लभ असून या विश्वरुप दर्शनासाठी देवही नित्य व्याकुळ असतात. या श्लोकात सांगितले गेले आहे की वेदाध्ययनानेही विश्वरुप दर्शन घडू शकत नाही. या दर्शनासाठीच्या प्रयत्नात अग्रक्रम वेदांच्या अध्ययनाला आहे. वेदाध्ययन खूप गरजेचे आहे. वेदाध्ययन म्हणजे वेदपठण नव्हे. वेदातल्या तत्वचिंतनाचा यथायोग्य अभ्यास व्हायला हवा. अध्ययनामुळे तत्वज्ञानाचे ग्रहण होते. विश्वरुप दर्शनामुळे ईश्वराचे स्वरुप नेमकेपणाने लक्षात येते. विश्वरुप दर्शन म्हणजे काय हे सुयोग्यपणे लक्षात यायला हवे. आत्मा आणि परमात्मा यांचा परस्पर संबंध काय? सृष्टी सत्य आहे की मिथ्या? मिथ्या म्हणजे काय ? तत्वज्ञानाचे हे सारे मुद्दे बरोबर लक्षात यायला हवेत

पण केवळ हे सारे लक्षात आले म्हणजे ईश्वराचे दर्शन होणे शक्य नाही. इथे वेदाध्ययनाचा निषेध केला गेला नसून त्या अध्ययनाची मर्यादा नेमकेपणाने अधोरेखित केली गेली आहे.

2) **तपसा न:** तपाचरणाने ईश्वराचे दर्शन होऊ शकत नाही. तीन प्रकारचे तप खूप गरजेचे आहे. तपाचरणाने रजोगुण व तमोगुण क्षीण होतात. या दोघांमुळे ज्ञान झाकले जाते. या दोघांना क्षीण करण्यासाठी तपाची योजना केली जाते. कित्येक साधकांना असे वाटते की तपाचरणाने सारे काही साधता येते. यामुळे ते उन्हात उभे रहाणे, हिवाळ्यात नग्न रहाणे, प्रदीर्घ उपवास करणे यासारखी नाना प्रकारची तपे आचरित असतात. नाना प्रकारे तपाचरण केल्यावरही आणि आत्मदर्शनासाठी विवेकी तपाचरणाची अत्यंत गरज असताना देखिल केवळ तपाचरण करुन हरी दर्शन होऊ शकणार नाही, हे पक्के आहे.

3) **दानेन न:** दान दिल्याने हे शक्य नाही. दान म्हणजे त्याग. त्यागवृत्तीचा उत्कर्ष झाला म्हणजे वैराग्य वृत्ती उत्पन्न होते. हरी दर्शनासाठी वैराग्य वृत्तीचा उत्कर्ष होणे फार गरजेचे आहे. वैराग्याच्या उत्कर्षाशिवाय हरी दर्शन होणे शक्य नाही. दानाचा अर्थ असाही आहे की आपल्यापाशी जी विद्या, संपत्ती वा साधनसामग्री असेल त्यातून अधिक वाटण्याची प्रवृत्ती.

4) **च इज्यया न:** आणि केवळ यज्ञ केल्यामुळे हरी दर्शन शक्य नाही. यज्ञ म्हणजे परोपकारार्थ सेवा होय. समाजात जेव्हा परोपकार वृत्ती, सेवा वृत्ती क्षीण होऊ लागते तेव्हा स्वार्थी वृत्ती वाढीस लागते आणि समाजाचे पतन होऊ लागते. समाजाच्या उत्कर्षासाठी परोपकार वृत्तीचा उत्कर्ष अत्यंत गरजेचा आहे. संत तुलसीदासांनी सांगितले आहे:

***परहित बस जिन्हके मन माँहीं।***
***तिन्हँ कहँ जग दुरलभ कछु नाहीं॥***

अर्थात् ज्यांच्या मनात परहित भावना वसते त्याना जगात दुर्लभ असे काहीच नसते. या अध्यायातल्या 48 व्या श्लोकात हीच गोष्ट सांगितली गेली आहे.

: 54 :

***भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।***
***ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप अर्जुन:** हे श्रेष्ठ तप आचरणाऱ्या अर्जुना किंवा शत्रुला ताप देणाऱ्या अर्जुना
- **अनन्यया भक्त्या:** आपल्या अनन्य भक्तीने
- **एवंविध: अहं:** अशा प्रकारे माझे म्हणजे चतुर्भुज रुपाचे माझे
- **तत्त्वेन ज्ञातुं: तत्त्वत:** म्हणजे खऱ्या रीतीने जाणणे
- **द्रष्टुं:** दर्शन करणे
- **च प्रवेष्टुं शक्य:** आणि परमात्म्याच्या ठायी प्रवेश करणे अर्थात् ऐक्य मानणे शक्य आहे

**अर्थ**

पण हे परंतप अर्जुना, अनन्य भक्तीने या प्रकारच्या चतुर्भुजधारी मला प्रत्यक्ष पाहणे, तत्त्वत: जाणणे तसेच माझ्यात प्रवेश करणे अर्थात् माझ्याशी एकरुप होणेही शक्य आहे.

***लाभें अनन्य-भक्तीनें माझें हें ज्ञान-दर्शन***
***दर्शनें होय माझ्यांत प्रवेश मग तत्त्वतां।***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) हे अर्जुना, या प्रकारे म्हणजे मज विश्वव्यापकाला 2) खऱ्या अर्थाने जाणणे 3) खऱ्या अर्थाने पाहणे, अनन्य भक्तीच्या द्वारे 4) आणि परमात्म्याच्या ठायी प्रवेश करणे शक्य आहे.

**स्पष्टीकरण**

1) **परंतप अर्जुन अनन्यया भक्त्या एवंविध:** अहं हे तेजस्वी अर्जुना, मी विश्वव्यापी आहे. इथे अर्जुनाला तेजस्वी म्हटले गेले आहे. अर्जुनाच्या ठायी क्षात्रतेज तर होतेच, ईश्वराच्या अखंड सत्संगामुळे आध्यात्मिक तेजही होते. दीर्घकाळपर्यंत सत्संगतीत राहिल्यामुळे आपोआप धार्मिक तेजही प्रकट होऊ लागते.

इथे भगवान हे सांगताहेत की विश्वरुप दर्शनानिमित्त ज्या व्यापक ईश्वराचे दर्शन घडवलेत, ते दर्शन अनन्य भक्तीच्या बळावरच करुन घेता येईल. मागील श्लोकात सांगितले होते की वेद, तप, दान, यज्ञ यांच्या साधनामार्लेण ईश्वराचा साक्षात्कार घडणे शक्य नाही. ईश्वराच्या साक्षात्कारासाठी वेदाध्ययन, तप, दान आणि यज्ञ वगैरेंच्या साधनेसोबत ईश्वराची अनन्य भक्ती असायला हवी. देहभाव क्षीण करण्याचे सामर्थ्य अनन्य भक्तीच्या ठायी आहे. भक्तीसोबतही अहंकार असू शकतो. मला भक्ती प्राप्त झाली, मी भक्ती साधली अशाप्रकारे भक्तीचे भान जागले म्हणजे अहंकार उत्पन्न झाला तर त्याला क्षीण करायचे प्रयत्न व्हायला हवेत. अहंकार अत्यंत सूक्ष्म असतो. स्थूल अहंकार क्षीण झाल्यावर म्हणजे जीवभाव क्षीण झाल्यावर अकर्तेपणाची भावना जागते. ती जागल्यावर अकर्तेपणाच्या भानाला जिंकणे शेष उरते. यावर विजय संपादित केल्यावर साधक अंतिम शिखरावर पोहोचला असे मानायला हवे. भक्तीच्या ठायी शून्य बनायचे सामर्थ्य असल्यामुळे भक्तीच्या भानाला क्षीण करणे सुगम होते यामुळे भक्ती हे साधन श्रेष्ठ आहे असे गीतेचे म्हणणे आहे पण या दृष्टीने बघू जाता भक्ती सुलभ साधनही आहे, हेच भक्तीचे वैशिष्ट्य आहे आणि यामुळेच भक्ती श्रेष्ठ आहे.

2) **तत्त्वेन ज्ञातुं शक्य:** ईश्वराला योग्य प्रकारे जाणणे शक्य आहे. भक्तीमुळे अहंकार गळून पडतो म्हणून भक्तीमुळे भगवंताचे दर्शन होऊ शकते. जाणून-समजून घेण्यातही फरक असतो. योग्य प्रकारे जाणणे याचा अर्थ असे जाणणे की ज्यात सूतराम भ्रांती नसेल. ज्ञान जेव्हा यथार्थ होऊन जाते तेव्हा ते परिपूर्ण वा सम्यक् म्हटले जाते.

3) **तत्त्वेन द्रष्टुम्:** ईश्वराचे योग्य प्रकारे दर्शन करुन घ्यावे लागते. आधी देवाचे स्वरुप ग्रहण केले जाते. त्याबाबतीत कुठल्याही प्रकारची शंका उरत नाही. विविध साधना केल्यावर ईश्वराचे स्वरुप ध्यानी येऊन गेले म्हणजे त्या साधकाला ईश्वराचा अनुभव येऊ लागतो. अर्थात् ईश्वराचा अनुभव प्राप्त होऊ लागणे काही सोपी गोष्ट नाही कारण की ईश्वराचे स्वरुप प्रत्येक जीवनाचे स्वरुप असते तरीदेखिल ते अतिसूक्ष्म असल्यामुळे त्याचा अनुभव प्राप्त करुन घेणे अवघड होऊन बसते पण ज्याला साधना करण्यातच आनंद वाटतो तो अनुभव मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतो तरीही तटस्थ अनासक्त राहू शकतो- रहातोच.

4) **च प्रवेष्टुं शक्य:** आणि ईश्वरात प्रवेश करणे, त्याच्या ठायी बुडून जाणे संभव आहे. ही तिसरी क्रिया आहे. तिन्ही क्रिया एकाच्या पाठीमागे दुसरी या क्रमाने घडतात. आधी ईश्वराचे स्वरुप जाणून घेणे म्हणजे योग्य प्रकारे ग्रहण होणे. नंतर ईश्वर स्वरुपाचा अनुभव आणि अखेरीस ईश्वराच्या ठायी विलीन होणे म्हणजे एकरुप होणे होय. स्वत:ला पूर्णपणे विलीन करुन टाकणे संपवून टाकणे होय. नदी ज्याप्रमाणे अखेरीस स्वत:ला सागरात पूर्णपणे विलीन करुन टाकते, आपले वेगळे अस्तित्व उरु देत नाही.

: 55 :

*मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्त: संगवर्जित: ।*
*निर्वैर: सर्वभूतेषु य: स मामेति पांडव ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पांडव:** हे अर्जुना
- **य:** जो पुरुष
- **मत्कर्मकृत्:** केवळ माझ्याच करिता सर्व काही माझेच समजून यज्ञ, दान आणि तप वगैरे संपूर्ण कर्तव्य कर्मांना करणारा
- **मत्परम:** माझ्या ठायी परायण म्हणजे मला परम आश्रय आणि परम गती मानून माझ्या प्राप्तीकरिता तत्पर असलेला
- **मद्भक्त:** माझा भक्त अर्थात् माझे नाम, गुण प्रभाव आणि रहस्य यांचे श्रवण, कीर्तन, मनन, ध्यान आणि पठन-पाठन यांचा प्रेमाने निष्काम भावनेने निरंतर अभ्यास करणारा
- **संगवर्जित:** आसक्ती रहित पत्नी-पुत्र धन वगैरे संपूर्ण प्रापंचिक पदार्थांमध्ये ममतारहित असलेला
- **सर्वभूतेषु निर्वैर:** सर्व भूतमात्रांच्या ठायी वैरभावरहित असतो.
- **स: मां एति:** तो मला प्राप्त होतो म्हणजे तो अनन्य भक्तीचा पुरुष मलाच येऊन मिळतो

**अर्थ**

हे अर्जुना, जो पुरुष केवळ माझ्याचसाठी सर्व कर्तव्यकर्मे करणारा, मलाच परम आश्रय मानणारा, माझा भक्त आसक्तीरहित असतो आणि सर्व प्राणीमात्रांविषयी वैरभाव (सर्वत्र समबुध्दी झाली म्हणजे त्या पुरुषाला स्वत:चा महान अपराध करणाऱ्यांविषयीही वैरभाव उत्पन्न होत नाही मग इतरांच्या संबंधी सांगण्याची आवश्यकताच काय उरली ?) वाळगत नाही, तो अनन्य भक्त मलाच प्राप्त होतो.

***माझ्या कर्मांत जो मग्न भक्तीनें भरला असे***
***जगीं नि:संग निर्वैर मिळे तो मज मत्पर।***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत 1) जो माझ्या साठी कर्मे करणारा आहे. 2) माझ्यात परायण आहे. 3) माझा भक्त आहे. 4) आसक्ती रहित आहे 5) सर्व प्राणीमात्रांविषयी जो निर्वैर आहे. 6) तो मला प्राप्त होतो.

**स्पष्टीकरण**

1) **पांडव य:** मत्कर्मकृत् अर्जुना, काही लोक माझ्यासाठीच कर्मे करण्यात लीन असतात. या श्लोकात जे निरुपण आले आहे ते यापूर्वीच्या अध्यायांमधून येऊन गेले आहे. तरीसुध्दा इथे समापन करायच्या दृष्टीने त्या तमाम बाबी सांगितल्या गेल्या आहेत. या श्लोकाच्या सुरुवातीला शंकराचार्यानी असे सांगितले आहे की 'अधुना सर्वस्य गीताशास्त्रस्य सारभूत: अर्थ: निश्रेयसार्थ:। अनुष्ठेयत्वेन समुच्चित्य उच्यते॥' म्हणजे हा श्लोक गीतेचा सारांश आहे, म्हणजे या श्लोकात भगवंताने जे काही सांगितले आहे ते सबंध गीतेत आहे, असे समजा. पहिली गोष्ट माझ्यासाठीच कर्म करणारा आहे. जगात सारेच कर्मात प्रवृत्त आहेत पण सर्व कर्मे ईश्वरासाठी करायचा हेतु नसतो. पूजापाठही सकाम भावनेने केला जातो. ईश्वराला स्मरुन कामे करणे वेगळे आणि ईश्वराच्यासाठीच कामे करणे वेगळे आहे. ईश्वरासाठी कर्मे करायचा अर्थ ईश्वरासाठीच जगणे श्वासोच्छवास घेणे होय. जगणे म्हणजे ईश्वराची अनुभूती घेणे असा ज्यांचा जीवनोद्देश्य



अध्याय - बारावा

# भक्ती योग

असतो त्यांचे जग संपून जाते. ते जगात पूर्ण अनासक्त असतात. जे केवळ ईश्वरासाठीच जगतात ते धन्य होत. श्रेष्ठतम होत. हाच मुद्दा भगवान इथे सांगताहेत की मलाच श्रेष्ठ समजून माझ्यासाठी कर्मे करा म्हणजे माझ्यासाठीच जगा.

2) **मत्परम:** माझ्या ठायी परायण म्हणजे मला श्रेष्ठ मानून माझा अनुभव घेतात माझी साधना करण्यात जो परायणआहे तो. इथे कर्म कसे असावे? याचे विवेचन आलेय. ते कर्म साधनासंपन्न साधनामय हवे. कर्म आचरताना साधनेची दृष्टी असावी अर्थात् चित्तशुध्दीची दृष्टी असावी लागते. कारण की चित्तशुध्दीशिवाय ईश्वराचा अनुभव होणे शक्य नाही.

सुरुवातीला म्हटले 'माझ्यासाठीच जगा. माझ्यासाठीच कर्मे करा.' आता सांगताहेत 'जे कर्म ईश्वरासाठी केले जात असेल ते समर्पणपूर्वक केले जावे हे ध्येय राखा. आपले कर्म चित्तशुध्दीसाठी असावे.' चित्त शुध्द करणे म्हणजे काम, क्रोध वगैरे विकारांपासून शून्य करणे. प्रत्येक क्रिया करताना ईश्वराचे स्मरण करणे आणि त्यासोबत चित्ताला निर्विकार बनवण्यासाठी म्हणजे अतिनिर्मळ बनवण्यासाठी प्रयत्न करणे.

3) **मद्भक्त:** सुरुवातीला म्हटले 'माझ्यासाठीच कर्मे करा.' मग म्हणाले 'चित्तशुध्दीचे ध्येय जोपासा, राखा.' आणि आता म्हणताहेत 'चित्तशुध्दीचा निर्विकार बनायचा उपाय आहे. ईश्वर भक्ती करा. भक्तीत रंगून जा.' भक्तीशिवाय जीवभाव नष्ट होणार नाही आणि जोवर जीवभाव आहे तोवर जगातून मुक्ती नाही म्हणजे जोवर आपण ईश्वरात हरवून जात नाहीत आणि शून्य बनत नाही, तोवर दु:ख-मुक्तीचा म्हणजे मोक्षाचा अनुभव मिळू शकणार नाही.

4) **संगवर्जित:** तू आसक्तीरहित हो. आपण जेव्हा ईश्वराचे निष्काम भक्त बनतो तेव्हा आसक्ती गळून पडते. मनात जर भक्ती उपजली नसली तर पारमार्थिक सेवा करतानाही मनात आसक्ती राहू शकते.

सातव्या अध्यायातल्या पहिल्या श्लोकात ईश्वराच्या ठायी आसक्ती राखायला सांगितले गेले आहे. आसक्ती एक शक्ती आहे. तिचा उपयोग कसा आणि कुठे करायचा हाच मुख्य मुद्दा आहे. आसक्तीचा उपयोग जर जगात वा पारमार्थिक सेवा कार्य करुन घेण्यात करुन घेण्यात केला तर बंधनकारक ठरतो. रात्रंदिवस पारमार्थिक कार्य करणे वेगळे आणि त्यात आसक्ती राखणे वेगळे होय. एक करायचे आणि दुसरे टाळायचे. तसे पारमार्थिक सेवा कार्य कदापि सोडता कामा नये ते करतच रहायला हवे पण त्याची आसक्ती टाळायला हवी. आसक्ती टाळण्यासाठी भगवंतांनी फलाशात्यागाचा अद्वितीय उपाय सांगितला आहे.

5) **सर्वभूतेषु निर्वैर:** सर्व भूतमात्रांप्रती निर्वैर भाव असावा म्हणजे सर्वांशी प्रेमभाव प्रेमव्यवहार असावा. कुणाच्याच बाबतीत द्वेषभावना नसावी. शंकराचार्य म्हणतात 'आत्मन: अत्यंत-अपकारप्रवृत्तेषु अपि सर्वभूतेषु शत्रुभावरहित:' आपले अत्यंत नुकसान करणारा, आपल्यावर अत्यंत अपकार करणारा असा जरी असला तरी त्याच्याही बाबतीत म्हणजे सर्वांच्याच बाबतीत जो शत्रुभाव रहित आहे असा साधक. जे जन आपल्याशी नित्य अनुकूल व्यवहार करतात त्यांच्या बद्दल प्रेमभाव राखणे, त्यांचा द्वेष वा तिरस्कार न करणे काही मोठी गोष्ट नाही. असे तर सारेच करतात पण जे द्वेष करतात, नुकसान करण्याकामी प्रवृत्त आहेत त्यांच्या विषयी मनात द्वेष भावना न राखणे महत्वाचा विषय आहे.

गांधीजी म्हणतात की माणसाविषयी कदापि द्वेषभाव बाळगायला नको पण जो आपले नुकसान करत आहे

त्याच्या वाईट कामांशी आपण असहकार करु शकतो त्याचा अहिंसक प्रतिकार करु शकतो. कुणी चोर आला तर त्याचा प्रतिकार करणे कर्तव्यरुप असते. आधी त्याची समजूत घालायचा प्रयत्न केला जावा मग अहिंसक प्रकारे त्याचा प्रतिकार करता येईल पण त्याबाबत द्वेषभाव बाळगण्याची गरज नाही. प्रतिकार करण्यात कर्तव्य भावना असावी. मनात कटूता नसावी. द्वेषात तिरस्कारात विष आहे आणि ते भयंकर आहे. राष्ट्रा-राष्ट्रात द्वेषभाव उत्पन्न होतो. कालचा मित्र आज शत्रु बनून जातो. त्याच्याशी भानगडी, लढाया होतात. ईर्ष्या, मत्सर, द्वेष या साऱ्या आसुरी वृत्ती आहेत. समाजाच्या ठायी दैवी गुणांचा विकास गरजेचा आहे. त्यातुनच समाजात ऐक्य नांदते आणि समाज ऊर्ध्वगामी बनतो. समाजात आसुरी गुण वाढू लागलेत तर समाजाचे पतन होऊ लागते. यामुळे ही द्वेषभावना मनातून काढून टाकणे सर्वांनाच कल्याणप्रद आहे. साधक वा मुमुक्षुंमध्येही आपसात ईर्ष्या सुरु होते. एकाच गुरुचे दहा शिष्य असतील तर ते आपसात भांडू लागतात. यामुळे हा निर्वैरतेचा गुण अत्यंत महत्वाचा गुण आहे.

6) **सः मां एतिः** तो साधक मला प्राप्त होतो. उपरोक्त पाच गोष्टी ज्यांच्यापाशी आहेत तेच ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्यात यशस्वी ठरतात. ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेणे दैवी गुणांवर आणि ईश्वर भक्तीवर अवलंबून आहे. ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेणे हे साधनेचे अंतिम उद्दिष्ट्य आहे. ईश्वर स्वरुपाचा पूर्ण अनुभव प्राप्त करुन घेणे मोक्ष होय.

• • • *अकरावा अध्याय संपूर्ण* • • •

: 1 :

***एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते।***
***ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एवं:** अशा प्रकारे
- **सततयुक्ता:** निरंतर आपल्या भजनात व ध्यानात रत असलेले म्हणजे सतत ईश्वराशी एकरुप असलेले
- **ये भक्ता:** जे अनन्यपे्रमी भक्त
- **त्वां पर्युपासते:** तुज सगुण रुप परमेश्वराची अतिश्रेष्ठ भावाने उपासना करतात
- **अपि च:** आणखीही
- **ये भक्ता:** जे भक्त
- **अव्यक्तं अक्षरं उपासते:** अव्यक्त, निर्गुण, अक्षर ब्रह्माची उपासना करतात
- **तेषां योगवित्तमाः** के: त्या दोघांमध्ये श्रेष्ठ म्हणजे अति उत्तम योगवेत्ते कोण आहे?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला जे अनन्यप्रेमी भक्तजन पूर्वी सांगितल्याप्रमाणे निरंतर आपल्या भजन-ध्यानात मग्न राहून आपणा सगुणरुप परमेश्वराची आणि दुसरे जे केवळ अविनाशी सच्चिदानंदघन निराकार ब्रह्माचीच अतिश्रेष्ठ भावाने उपासना करतात त्या दोन्ही प्रकारच्या भक्तांमध्ये अतिशय उत्तम योगवेत्ते कोण होत ?

**अर्जुन म्हणाला**

***असे मिसळले कोणी तुज भक्त उपासिती।***
***कोणी अक्षर अव्यक्त योगी ते थोर कोणते॥***

**विषय:** या श्लोकात अर्जुन प्रश्न विचारतो. यात तीन मुद्दे आलेले आहेत. 1) सतत ईश्वराशी एकरुप होऊन जे भक्त आपली उपासना करतात. 2) आणि जे भक्त अव्यक्त आणि अक्षर निर्गुण ब्रह्माची उपासना करतात. 3) या दोन प्रकारच्या भक्तांमध्ये कोण श्रेष्ठ आहे ?

**स्पष्टीकरण**

1) **एवं सततयुक्ताः ये भक्ताः त्वां पर्युपासतेः** अशा प्रकारे अखंड परमात्म्याशी एकरुप होऊन जे भक्त उपासना करतात. अर्जुनाचा प्रश्न सगुण आणि निर्गुण भक्तीच्या संदर्भातला आहे. सात ते बारा अशा एकूण सहा अध्यायांमध्ये दोन प्रकारच्या भक्तींचे वर्णन आले आहे. या संबंधी अर्जुनाने प्रश्न उपस्थित केला आहे. हे सहा अध्याय भक्तीचे मानले जातात. या सहापैकी सहा ते आठ हे तीन अध्याय निर्गुण भक्ती निरुपणाचे तर नऊ ते बारा हे चार अध्याय सगुण भक्तीविषयक चर्चेचे आहेत असे विनोबांनी विश्लेषण केले आहे. खरे तर ब्रह्म निर्गुण

आहे. मूळ ब्रह्माच्या ठायी जर सगुण- इंद्रियगम्य गुणांची कल्पना केली गेली मानली गेली. तर ते सगुण बनून विनाशी होऊन जाईल कारण की पदार्थांच्या ठायी इंद्रियांनी ज्ञान होणारे जे गुण आहेत ते सारे विनाशी आहेत, पण मूळ ब्रह्म विनाशी नाही. ब्रह्म जर विनाशी बनले तर या विनाशी परिवर्तनशील अशा जगताचे आधार कोण बनणार ? विनाशी जगताचा आधार अविनाशी, गुणरहित, विकार रहित, अवयवरहित असू शकतो. जी वस्तु इंद्रियातीत आहे, केवळ इंद्रियांच्या मदतीने ज्यांचे ज्ञान होऊ शकत नाही त्यात गुण वा विकार वा अवयवांची कल्पना नाही करु शकत. मूळ आधाररुप वस्तु ही निर्गुण, निराकार, निरवयव, व्यापक, अतिसूक्ष्म असली पाहिजे. यामुळे मूळ ब्रह्मतत्व हे निर्गुण-निराकार आहे हा निश्चयात्मक सिध्दांत मानावा लागतो पण या निर्गुण ब्रह्मतत्त्वाची शक्ती अलौकिक आहे. यामुळे जेव्हा अलौकिक व अनित्य जगताचा भास होणे सुरु होऊ लागते तेव्हा त्या अलौकिक शक्तीयुक्त ब्रह्माला जगताचा नियंता मानावे लागते. ते निर्गुण ब्रह्मतत्त्व जेव्हा सर्वांचा नियंता बनते तेव्हा त्याला 'ईश्वर' म्हटले जाते. ईश्वराशी ही कल्पनाही संलग्न आहेच की तो सर्वज्ञ आहे. सर्वगुण संपन्न आहे. अत्यंत दयावान आहे. तो भक्तांवर अनुग्रह करतो. संकटमोचन आहे वगैरे वगैरे. या तमाम कल्पना जगतसापेक्ष आहेत. जिथे जगत नाही तिथे निर्गुण ब्रह्मच शेष उरते पण मिथ्या असले तरी व त्याचे स्वतंत्र अस्तित्व नसतानाही जगताला अस्वीकार करता येत नाही आणि जेव्हा जगताचा अस्वीकार करतो तेव्हा सर्वगुण संपन्न ईश्वर म्हणजे सगुण ब्रह्माला मानावेच लागते. या सगुण ब्रह्माची म्हणजे ईश्वराची उपासना आपण सहज करु शकतो. निर्गुण बह्माची उपासना करणे सगुण ब्रह्माची उपासना करण्यापेक्षा अवघड आहे. नऊ ते अकरा अध्यायांमधून याच सगुण भक्तीचा उपदेश केला गेला आहे. नवव्या अध्यायात समर्पण येते. दहाव्या अध्यायात क्रमिकता म्हणजे ईश्वर मुख्य मुख्य पदार्थांच्या ठायी कसा व्याप्त आहे, ते सांगितले आहे. अकराव्या अध्यायात समग्रता म्हणजे तमाम पदार्थांच्या ठायी ईश्वर कसा आहे, हे सांगितले आहे. यापूर्वी सहाव्या अध्यायात योग साधनेची चर्चा करुन मूळ निर्गुण ब्रह्मतत्त्वाचा उल्लेख आहे. सातव्या अध्यायात त्याचेच ध्यान कसे केले जाते, त्याची शरणागती कशी पत्करावी हे सांगितले गेले आहे. अंतकाळी निर्गुण ब्रह्माचे ध्यान कसे केले जाते हे आठव्या अध्यायात आले आहे. सात ते नऊ या तीन अध्यायात सगुण ब्रह्माचा उल्लेख अजिबात नाही, असे नाही. याचे कारण असे की सगुण व निर्गुण ब्रह्मात खूप अंतर नाही. विनोबाजी सांगतात की स्थूल दृष्टीने सहा ते आठ या तीन अध्यायांमध्ये ध्यानयोग प्रधान उपासना आहे तर अध्याय नऊ ते अकरा या तीन अध्यायांमध्ये वर्णित अव्यक्त ध्यानमय उपासनेचे वळण अव्यक्ताच्या दिशेने गेलेले आहे. नऊ ते अकरा या अध्यायांमध्ये वर्णित प्रेममय उपासनेचे वळण व्यक्ताच्या दिशेने आहे. विनोबाजी हेही म्हणतात की पाचव्या अध्यायात वर्णित योग व संन्यास हीच बाराव्या अध्यायात वर्णित व्यक्त आणि अव्यक्त उपासना आहे.

2) **अपि च ये भक्ताः अव्यक्तं अक्षरं उपासते:** या शिवाय काही भक्त अव्यक्त आणि अक्षर म्हणजे निर्गुण ब्रह्माची उपासना करतात. निर्गुण ब्रह्मतत्त्वाची उपासना म्हणजे ज्ञानमार्गानुसार ईश्वराचे ध्यान होय. पतंजलीचा ध्यानमार्गही निर्गुण ब्रह्माची उपासना आहे. यात रुप, आकार असा काही संबंध येत नाही. ध्यान मार्गात तटस्थता आहे. सृष्टीचे काही महत्व नाही. मुख्य महत्व मातीचे आहे, घटाचे महत्व कमी आहे, कारण घट मातीहून वेगळा नाही. त्याचप्रमाणे मूळ निर्गुण ब्रह्म वा ईश्वरापासून जगत वेगळे नाही यामुळे निर्गुण ब्रह्माच्या दृष्टीने जगताचे काही महत्व वा मूल्य नाही. निर्गुण ब्रह्माच्या उपासकापाशी ब्रह्मचर्य व वैराग्याचा भक्कम आश्रय असायला हवा. ज्याच्या ठायी ब्रह्मचर्य आणि वैराग्याचे आत्यंतिक बळ आहे असे साधक भक्त निर्गुण ब्रह्माच्या उपासनेत तग धरु शकतात. सगुण ब्रह्माच्या उपासनतेतही ब्रह्मचर्य व वैराग्याचे बळ कमी हवे असे मात्र नाही पण निर्गुण ब्रह्मोपासकापेक्षा थोडे कमी असले तरी चालू शकेल अशी स्थिती आहे. अर्थात् सगुण ब्रह्माच्या उपासनेत प्रेमाचा उत्कर्ष असल्यामुळे ब्रह्मचर्य व वैराग्याची साधना सुलभ आहे. ही साधना परमात्म भक्तीच्या आधाराने भक्कम होईल. मोक्ष प्राप्तीसाठी जेवढे वैराग्य, जेवढी निर्विकारता, जशी अलिप्तता हवी तेवढी सगुण भक्तापाशी असतेच पण भक्तीच्या आधारे हे प्राप्त करुन घेणे काही अवघड नाही. याउलट निर्गुण ब्रह्मतत्वाची उपासना खड्गाच्या धारेवर चालण्यासारखे आहे. 'ज्ञानपंथ कृपान कै धारा' आहे. सगुण भक्तीधारा

राजमार्ग आहे. राजमार्गावर डोळे मिटून चालता येते पण जंगल, पर्वत प्रदेश असेल तर डोळे मिटून नाही चालता येत. निर्गुण उपासनेत जगताचे काही महत्व नसल्यामुळे मनाला जगतापासून हटवावे लागेल. यासोबतच ब्रह्माचे ध्यान सुगमपणे करता यावे यासाठी आवश्यक असे निर्गुण ब्रह्माच्या ठायी कुठले रुप, आकार, गुण नाही. यामुळे निर्गुण ध्यान अवघडच आहे पण सगुणोपासनेत जगत् विरहित ब्रह्माचे दर्शन करायचे नाहीये. जगताच्या सोबत ब्रह्माला बघायचे आहे. निर्गुण ब्रह्मोपासनेत जगत् टाळून जगत् रहित, वेगळ्या ब्रह्माच्या दर्शनाचे प्रयत्न करायचे आहेत. इथे सेवेलाही एवढे महत्व नाही. अरण्य, गुहा वा एकांत स्थळी रहाण्याकामी आवड आहे. अशाप्रकारे निर्गुणोपासना अवघड आहे.

3) **तेषां के योगवित्तमाः** या दोन प्रकारच्या भक्तांमध्ये श्रेष्ठ भक्त कोणता? जे श्रेष्ठ असेल त्याला ग्रहण करता येईल या भावनेने अर्जुन विचारत आहे. माणसाची सहज प्रवृत्ती श्रेष्ठ वस्तु ग्रहण करायची असते. दुकानावर जाईल तर सर्वोत्तम वस्तु खरेदी करण्याकडे माणसाचा कल असतो. विद्यार्थ्याला वाटते की आपण वर्गात सर्वप्रथम असावे. इथे अर्जुन मोक्ष प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने विचार करत आहे. यामुळे त्याच्या मनात स्वाभाविकपणेच हा विचार येत आहे की देवाने दोन प्रकारच्या भक्तांचे वर्णन केले आहे यापैकी श्रेष्ठ भक्त कोण आहे?

: 2 :

**श्री भगवान उवाच**

***मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।***
***श्रध्दया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये मयि मनः आवेश्यः** जो भक्त माझ्या ठायी मन स्थिर करुन
- **नित्ययुक्ताः** नित्य माझ्याशी संलग्न म्हणजे निरंतर माझ्या भजनात व ध्यानात रत असतो
- **परया श्रध्दया उपेताः** परम श्रध्दायुक्त होऊन
- **मां उपासतेः** मज सगुणरुप परमेश्वराची उपासना करतो
- **ते मे युक्ततमा मताः** तो भक्त श्रेष्ठ होत, असे माझे मत आहे.

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले माझ्या ठिकाणी मन एकाग्र करुन निरंतर माझ्या भजन-ध्यानात रत झालेले जे भक्तजन अतिशय श्रेष्ठ श्रध्देने युक्त होऊन मज सगुणरुप परमेश्वराला भजतात ते मला योग्यांमधील अति उत्तम योगी वाटतात.

**श्री भगवान म्हणाले**

***रोवूनि मन माझ्यांत भजती नित्य जोडिले।***
***श्रध्देनें भारले माझ्या ते योगी थोर मानितों॥***

**विषयः** या श्लोकात भगवंतांनी चार गोष्टी सांगितलेल्या आहेत. 1) जे भक्त माझ्या ठायी मन स्थिर करुन 2) नित्य माझ्याशी संलग्न आहेत. 3) परम श्रध्दायुक्त होऊन माझी उपासना करतात 4) ते भक्त सर्वात श्रेष्ठ आहेत असे माझे मत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर दिले जात आहे. ये मयि मनः** आवेश्य जे भक्त माझ्यात मन स्थिर करतात. ईश्वर दिसत नाही त्यामुळे त्याच्या ठायी मन लावणे सोपे नाही. कुठल्याही दिसणाऱ्या वस्तुत मन लावणे सोपे आहे. मनाला नेहमी आलंबनाची म्हणजे आधाराची गरज भासते आणि ते आलंबन किंवा आधार स्थूल असेल तरच त्यात मन लागू शकते. यामुळे भगवान इथे आपला उल्लेख करुन सांगताहेत की काही लोक माझ्या ठायी मन लावतात. मन एकाग्र करतात आणि माझी भक्ती करतात. माझ्या ठायी म्हणजे सगुण परमात्म्याच्या ठायी, सर्वगुण भांडार, अतिदयावान, सृष्टीला उत्पन्न करणाऱ्या सर्वनियंता अशा माझ्या प्रती.

(2-3) **नित्ययुक्ता:** परया श्रध्दया उपेता: मां उपासते नित्ययुक्त आणि परम श्रध्दायुक्त बनून जे माझी उपासना करतात. या वाक्यात 'नित्य' शब्द महत्वाचा आहे. 'नित्य' याचा अर्थ असा की जीवनाच्या तमाम क्रिया ईश्वराला अर्पण करणे होय. काही काळ ईश्वराच्या ठायी मन लावणे शक्य होऊन जाते. सारे देवळात जाऊन दर्शन करुन घेतात व काही लोक जप-पूजन वगैरे करतात. काही लोक घरातच स्नान करुन पूजा करतात, माळा जपतात. काही लोक काही काळ ध्यानधारणा करतात पण ते सारे तेवढ्या वेळेपुरतेच मर्यादित स्वरुपाचे असते. सर्व कामे करत असताना ईश्वराच्या ठायी मन एकाग्र करणे अखंड भक्ती करत जीवन जगणे सोपे नाही. ते परम भाग्याचे आहे. अशी अखंड भक्ती करणाऱ्यालाच गीता भक्त म्हणते. यातही अखंड भक्ती म्हणजे रात्रंदिवस ईश्वराशी अनुसंधान साधणे होय. चार-दोन महिन्यांसाठी असेल तर तेही शक्य होते पण इथे 'नित्य' शब्दाचा अर्थ आमरण असा आहे. अशा प्रकारे 'नित्य' या शब्दाचे दोन अर्थ आहेत: 1) 'नित्य' म्हणजे प्रत्येक क्रिया करताना 'मी करतो' ही भावना सोडून 'ईश्वरच करवुन घेतो आहे त्याच्यामुळेच सारे काही घटित होत आहे.' अशा भावनेने प्रत्येक क्रिया करणे होय. 2) आमरण भगवंताशी एकरुप असणे होय. इथे 'परम श्रध्दापूर्वक' ही जोडले आहे. भक्तीची पूर्णता श्रध्देत आहे. भक्ती श्रध्दापूर्वकच करायला हवी मगच ती परम आणि अखंड म्हणवली जाते.

4) **ते मे युक्ततमा मता:** ते भक्त सर्वश्रेष्ठ होत, असे माझे मत आहे. रात्रंदिवस चोवीस तास आणि आमरण जे ईश्वरभक्ती करतात ते सर्वश्रेष्ठ होत. याचे कारण असे की त्यांचा अहंकार क्षीण होऊन गेला आहे आणि बाहेर अखंड जनसेवा जारी आहे. पाचव्या अध्यायात भगवंताने सांगितले आहे की संन्यास आणि योग या दोहींची योग्यता जरी समान असली तरी योगात बाहेरुन प्रत्यक्ष सेवा जारी असते अज्ञानी लोकाना मार्गदर्शन मिळत रहाते म्हणून योग श्रेष्ठ आहे. इथेही तोच मुद्दा लागू होतो. जनसेवेत रत असल्यामुळे सगुणोपासक सर्वसामान्यांसाठी उदाहरण बनून जातो. भक्ती कशी करावी, आणि अलिप्ततापूर्वक जनसेवा कशी करावी, या दोन्ही गोष्टी सगुण भक्ताकडून शिकायला मिळत असल्यामुळे सगुण भक्त श्रेष्ठ आहे. दुसरा मुद्दा असा की सगुण भक्तीच्या ठायी अहंकार क्षीण करायचे जेवढे सामर्थ्य आहे तेवढे निर्गुण भक्तीत नाही कारण की रात्रंदिवस चालणाऱ्या जनसंपर्कामुळे क्रोध, काम, अहंकार जागण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी वा विकारांना उद्भवू न देणे महाजागरणाचे कार्य आहे. ही महाजागृती भक्ती आणि सेवा दोघांच्या आधारेच प्राप्त होऊ शकते. अशा प्रकारे हा महाजागृती संपन्न भक्त सर्व भक्तांपेक्षा श्रेष्ठ आहे.

*: 3-4 :*

*ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते।*
*सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥*
*संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुध्दय:।*
*ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु ये सर्वत्र समबुध्दय:** आणि जे सर्वांशी समबुध्दीने
- सर्वभूतहिते रता: सर्व भूतांच्या प्राणिमात्रांच्या कल्याणात रत आहेत
- **इंद्रियग्रामं संनियम्य:** इंद्रिय समूहाला आपल्या ताब्यात राखून
- **अनिर्देश्यं:** ज्याचा निर्देश करता येत नाही असे
- **अव्यक्तं:** जे अव्यक्त म्हणजे निराकार आहे
- **सर्वत्रगं:** जे सर्वत्र व्याप्त आहे
- **अचिंत्यं:** जे मन आणि बुध्दीच्या पलिकडचे आहे म्हणजे ज्याचे चिंतन करु शकत नाही असे
- **कूटस्थं:** सदैव एकरस रहाणारे म्हणजे जे अगदी स्थिर निर्विकार आहे
- अचलं: जे निश्चळ आहे
- **ध्रुवं अक्षरं:** अशा ध्रुव अक्षर ब्रह्माची म्हणजे अविनाशी सच्चिदानंदघन ब्रह्माची
- **पर्युपासते:** निरंतर ऐक्य भावनेने ध्यान करीत उपासना करतात
- **ते मां एव प्राप्नुवन्ति:** ते मलाच प्राप्त करतात, पावतात.

**अर्थ**

परंतु जे पुरुष इन्द्रिय समूहाला चांगल्या प्रकारे ताब्यात ठेऊन मन-बुध्दीच्या पलीकडे असणाऱ्या, सर्वव्यापी,

अवर्णनीय स्वरुप आणि नेहमी एकरुप असणाऱ्या नित्य, अचल, निराकार, अविनाशी सच्चिदानंदघन ब्रह्माची निरंतर ऐक्यभावनेने ध्यान करीत उपासना करतात, ते सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणात तत्पर आणि सर्वांच्या ठिकाणी समान भाव ठेवणारे योगी मलाच येऊन मिळतात.

*परी अचिंत्य अव्यक्त सर्व-व्यापी खुणेविण।*
*नित्य निश्चळ निर्लिप्त जे अक्षर उपासिती॥*
*रोधिती इंद्रियें पूर्ण सर्वत्र सम जाणुनी।*
*माझ्याकडे चि ते येती ज्ञानी विश्व-हितीं रत॥*

**विषय:** या दोन श्लोकांमधून एकूण बारा गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत 1) जे सर्वांशी समान बुध्दीने वर्तन करतात 2) जे सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणात रत आहेत 3) जे आपल्या इंद्रियांच्या समूहाला वश ठेवतात 4) ज्याचा निर्देश करता येत नाही 5) जे अव्यक्त आहे 6) जे सर्वत्र व्याप्त आहे 7) ज्याचे चिंतन करु शकत नाही 8) जे अगदी स्थिर, निर्विकार वा अलिप्त आहे 9) जे निश्चळ आहे 10) जे नित्य आहे 11) अशा अक्षर ब्रह्माचे उपासक 12) मलाच पावतात मलाच प्राप्त करुन घेतात.

**स्पष्टीकरण**

1) **तु ये सर्वत्र समबुध्दय:** सर्वांशी समान बुध्दीने वागतात. मागील श्लोकात ईश्वराच्या सगुण भक्ताला श्रेष्ठ मानले गेले आहे. यामुळे ज्ञानमार्गी निर्गुण उपासक कनिष्ठ असल्याचे वाटू शकते. यामुळे असे म्हटले आहे की ज्ञानमार्गी निर्गुण भक्त आणि कर्ममार्गी सगुण भक्त दोघेही अखेरीस ईश्वरालाच जाऊन मिळतात. दोघेही समानपणे मोक्ष प्राप्त करुन घेऊ शकतात पण ज्यात जनसेवा समाविष्ट आहे अशी सगुण भक्ती श्रेष्ठ आहे. सुलभ असणे हीच तिची श्रेष्ठता आहे. सगुण भक्तीची दोन श्रेष्ठ वैशिष्ट्ये आहेत एक म्हणजे परमात्म भक्ती सुलभतेने प्राप्त होते आणि दुसरे अहंकार सहजतेने सुलभतेने क्षीण होतो.

सगुण भक्तीच्या ठायी सकाम आणि निष्काम भक्ती असे दोन प्रकार आहेत. इथे ज्या सगुण भक्तीचे वर्णन आले आहे ती निष्काम भक्ती आहे. निष्काम भक्तीचीच तुलना निर्गुण उपासनेशी होऊ शकते. सकाम भक्तीशी निर्गुण भक्तीची तुलना नाही होऊ शकत. सकाम भक्तीचा दर्जा निकृष्ट आहे.

आता या दोन श्लोकांमध्ये निर्गुण उपासकाचे वर्णन आले आहे. आधी सांगताहेत की 'जो सर्वांशी समान दृष्टीने वागतो आणि समान भावनेने आचरण करतो' यात दोन गोष्टी आहेत एक तर समानतेने बघणे म्हणजे सर्वांच्या ठायी निर्गुण ब्रह्म समान रुपाने आहे त्या निर्गुण ब्रह्म दृष्टीने सर्वांना बघणे होय. दोन सर्वांशी समान आचरण करणे. निर्गुण उपासनेत प्रेमाच्या उत्कर्षाऐवजी तटस्थ दृष्टी असते यामुळे इथे 'समान' शब्दाचा प्रयोग झाला. समानतेचा अर्थ निर्विकारता असाही आहे.

2) **सर्वभूतहिते रता:** सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणात रत असतात. निर्गुण उपासक निर्गुण ब्रह्मात लीन असतो. तो चिंतनाच्या माध्यमातूनच जनसेवा करतो. जो कुणी त्याच्या संपर्कात येईल त्यांच्याशी त्याचा समानतेचा, निर्विकारतेचा व्यवहार असतो. 'निर्गुण ब्रह्मतत्वच संपूर्ण ब्रह्मांडात व्याप्त आहे. जगताचे अस्तित्वच नाही.' अशी दृढ बुध्दी झाल्यामुळे त्याचा सर्वांशी तटस्थतापूर्वक व्यवहारच असेल. त्याच्या ठायी प्रकट स्वरुपात प्रेमाचा उत्कर्ष दिसत नाही. तरीही त्याच्यात समानता, निर्विकारता असल्यामुळे मोक्षाच्या दृष्टीने काही उणीव येत नाही. निर्गुण ब्रह्मतत्वाचे ध्यान करत त्याचे विश्वकल्याणासाठी चिंतन चाललेच असते. आजही हिमालयात बसून कित्येक महात्मा गण निर्गुण ब्रह्माच्या ध्यानात लीन असून विश्वकल्याणाचे चिंतन करत असतील त्याची आपल्याला माहिती नाही. जंगलात जर गुलाबाचे पुष्प असेल तर ते दिसत नसले तरी त्याच्या सुगंधाचा दरवळ चहुबाजूच्या संपूर्ण वातावरणात पसरतो. तसेच हे महात्मा गण, हे मौन धारण करुन निर्गुण ब्रह्माच्या ठायी रत असतात. सुगंध सहजपणे संपूर्ण वातावरणात दरवळतो. त्यामुळे नकळत सर्वांना सदाचरणाची प्रेरणा लाभते. गांधीजी तर सगुणोपासनेत तल्लीन होते यामुळे योजना तयार करणे आखणे यासारख्या प्रचंड लोकसंग्रहात त्यांचे जीवन व्यतीत झाले. निर्गुण उपासक म्हणजे संन्यासमार्गी-- ज्ञानमार्गी निवृत्तीप्रधान पुरुष होय. योजना आखणे --स्थूल प्रकारचे सेवाकार्य करणे, इत्यादी प्रकारचा लोकसंग्रह करणे अशा पुरुषांना साधत नाही पण अंतर्यामी अलौकिक स्थितीचा अनुभव घडत असल्यामुळे काहीही न करताही त्यांच्यापासून सर्वांना मूळ

प्रेरणा लाभत असते. त्यांच्यामार्फत प्रेरणा लाभत आहे असे लक्षातसुध्दा येणार नाही पण प्रेरणेचा अनुभव येईल.

3) **इंद्रियग्रामं संनियम्य:** इंद्रिय समूहाला म्हणजे सर्व इंद्रियांना काबूत राखून. हे निर्गुण उपासक महात्मा जन आपल्या दहाही इंद्रियांवर योग्य प्रकारे ताबा मिळवतात. आज समाज जीवनात असा एक चुकीचा समज प्रचलित झाला आहे की संन्यासी हवे तसे वागू शकतो, त्याला काही दोष लागत नाही. गीतेच्या मते हा खोटा समज आहे कारण इथे भगवान निर्गुण उपासक म्हणजे संन्याशाचेच वर्णन करताना सांगताहेत की या ज्ञाननिष्ठ संन्याशाचे आपल्या तमाम इंद्रियांवर नियंत्रण असते, ताबा असतो. साधकावस्थेत जर इंद्रियनिग्रह अतिशय आवश्यक असेल तर सिध्दावस्थेत तो निरर्थक कसा काय होईल ? यावर विचार झाला पाहिजे. साधकावस्थेत इंद्रियनिग्रह प्रयत्नपूर्वक साधावा लागतो तर सिध्दावस्थेत तो सहज साधता येतो, हा मुद्दा वेगळा आहे.

4) **अनिर्देश्यम्:** इथून निर्गुण ब्रह्मतत्वाचे निरुपण सुरु झाले. निर्गुण ब्रह्म वर्णनासाठी आठ विशेषणे योजिली आहेत. पहिले विशेषण आहे अनिर्देश्यम् म्हणजे ज्याचा निर्दश करता येत नाही, शब्दांनी ज्याचे वर्णन करता येत नाही. ज्ञानेंद्रिये आणि मनाच्या सहाय्याने आपल्याला बाह्य सृष्टीतल्या पदार्थांचे ज्ञान होत असते पण आपल्याला ज्या पदार्थाचे ज्ञान होते ते सारे स्थूल पदार्थ असतात यामुळे आपण त्यांचे वर्णन शब्दांनी करु शकतो पण जी वस्तु म्हणजे ब्रह्म हे इंद्रियांच्या पलिकडचे आहे इंद्रियांच्या द्वारे आकलन करुन घेण्याच्या पलिकडचे आहे त्याचे वर्णन शब्दांनी कसे बरे करता येईल? यामुळे ब्रह्म अनिर्देश्य होऊन जाते.

5) **अव्यक्तम्:** ब्रह्म अव्यक्त आहे, ते दिसून येत नाही. दिसून न येणाऱ्या अनेक वस्तु आहेत. हवा दिसत नाही पण हवेचा अनुभव स्पर्शेंद्रियांनी होतो. ब्रह्म तसे नाही कारण की ते अतिसूक्ष्म आहे.

6) **सर्वत्रगम्:** ब्रह्म सर्वत्र व्याप्त आहे. जगाच्या तमाम वस्तु मर्यादित आहेत. आकाश अतिव्यापक आहे, तरी 'शब्द' त्याचा स्थूल गुण आहे. त्यामुळे आकाश निर्गुण ब्रह्मतत्वाइतके होऊ शकत नाही. आकाश मूळ वस्तु नाहीये. ज्यापासून आकाशाची निर्मिती झाली ते ब्रह्मतत्व अतिशय व्यापक असून आकाश वगैरे सर्व पदार्थांचा आधार आहे.

7) **अचिंत्यम्:** ज्याचे चिंतन करु शकत नाही असे तत्त्व. मन इतके सूक्ष्म आहे की देह जळून गेल्यावरही मन जळू शकत नाही. एक देहाला सोडून दुसऱ्या देहात प्रविष्ट होते. इतके सूक्ष्म असूनही मन ज्या वस्तुचे चिंतन करते ती वस्तु इंद्रियगम्यच असते. स्वत: मन सूक्ष्म असूनसुध्दा इंद्रियातीत वस्तुंचे चिंतन करु शकत नाही पण ब्रह्मतत्वाचे चिंतन करु शकत नसतानासुध्दा मन विकारशून्य म्हणजे अत्यंत शुध्द असेल तर ब्रह्मतत्वाच्या अनुभवाचे साधन बनू शकते. ज्यांनी ब्रह्मतत्वाचा अनुभव प्राप्त केला आहे अशा महात्मा पुरुषांच्या अनुभवाधारे असे सांगता येऊ शकते की मन ब्रह्माविषयी बुध्दीने तर्क करुन हे निश्चितपणे ठरवू शकते की ब्रह्म संपूर्ण ब्रह्मांडात अस्तित्वात आहे. तेच तत्व पिंडात म्हणजे देहात आहे. देहात ते आत्म्याच्या रुपाने वसते आत्मतत्व सत्-चित्-आनंदरुप आहे. तेच आपले स्वरुप आहे.

8) **कूटस्थम्:** ब्रह्म कूटस्थ म्हणजे निर्विकार आहे. शंकराचार्यांनी कूटस्थचा अर्थ असा केला: अविद्यादि अनेकसंसारबीजं अंतर्दोषवत् मायाऽव्याकृतादिशब्दवाच्यं 'मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्', 'मम माया दुरत्यया' इत्यादौ प्रसिध्दं यत् तत् कूटम् । माया ही प्रकृती आहे आणि मायावान हा महेश्वर आहे. मायेचे वर्णन अव्याकृत म्हणजे अव्यक्त वगैरे शब्दांनी केले जाते. मायेच्या स्वरुपात नाना प्रकारचे दोष आहेत. मायेच्या ठायी अज्ञान, असत्य इत्यादी अनेक संसारबीजे आहेत. माझ्या मायेला पार करणे फार कठीण आहे. हे श्रृती-स्मृती ग्रंथांमधूनही आले आहे. पुढे शंकराचार्य लिहितात : तस्मिन् कूटे तदध्यक्षतया स्थितं कूटस्थम्। त्या मायारुपी कूटात जे अधिष्ठाता रुपात वसलेले आहे त्याला कूटस्थ म्हणजे निर्विकार असे म्हणतात.

पुढे आचार्यांनी आणखी एक अर्थ करत असे म्हटले आहे: अथवा राशि: इव स्थित कूटस्थम्। अथवा राशीप्रमाणे निष्क्रिय, स्थिर कूटस्थ मानावे.

9) **अचलम्:** जे अचल म्हणजे स्थिर आहे. जे ब्रह्मतत्व सर्वत्र व्याप्त आहे त्याला हालचाल करायला

अवकाशच नाही. शंकराचार्य म्हणतात की कूटस्थ आहे म्हणजे ब्रह्मतत्व निष्क्रिय, निर्विकार, अलिप्त आहे म्हणून अचल म्हणजे स्थिर आहे. अशाप्रकारे अचल आणि कूटस्थ यांच्यामध्ये कार्य-कारण संबंध दर्शवला आहे.

10) **ध्रुवम्:** ते नित्य आहे. चिरंतन वस्तुला ध्रुव असे म्हणतात. ध्रुवतारा नित्य, अखंडपणे आपल्या स्थानावर असतो. तसेच ब्रह्मतत्व नित्य, अखंड आहे.

11) **अक्षरं पर्युपासते:** अशा अक्षर म्हणजे अविनाशी ब्रह्मतत्वाची उपासना करतात. अक्षर म्हणजे ज्याचा कदापि नाश होत नाही असे तत्व. जगातले तमाम पदार्थ विनाशी आहेत पण ब्रह्मतत्व अविनाशी आहे.

12) **ते माम् एव प्राप्नुवन्ति:** ते मलाच प्राप्त करुन घेतात. निर्गुण ब्रह्माची उपासना करणारे परमात्म्यालाच प्राप्त करुन घेतात. सगुण ब्रह्मोपासक आणि निर्गुण ब्रह्मोपासक दोघांच्या साधनेचे मार्ग वेगवेगळे असले तरी मुक्कामाची जागा एकच आहे. मुक्काम जर एकाच ठिकाणी असेल तर मार्गाची जी भिन्नता दिसते ती काही फार महत्वाची ठरत नाही. शास्त्रीय दृष्ट्या या मार्गाचे महत्व सुलभता आणि काठिण्य या रुपात अवश्य आहे. जे सुलभ सोपे असेल त्याचे अनुकरण सर्व लोक सहजतेने करतात. आपण कुठल्या मार्गाने जावे हे प्रत्येक व्यक्ती ठरवू शकते.

: 5 :

***क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।***
***अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- अव्यक्तासक्तचेतसां तेषां: ज्यांचे चित्त अव्यक्त ब्रह्याच्या ठायी आसक्त झाले आहे. त्यांच्यासाठी
- क्लेश: अधिकतर: अधिक क्लेश अर्थात् परिश्रम विशेष असतात
- हि देहवद्भि: कारण की देहाभिमानीसाठी
- अव्यक्ता गति: अव्यक्त ब्रह्याच्या ठायी मन लावणे
- दु:खं अवाप्यते: अवघड होते, कठीण होते, दु:खपूर्वक प्राप्त केले जाते.

**अर्थ**

सच्चिदानंदघन निराकार ब्रह्मात चित्त गुंतलेल्या त्या पुरुषांच्या साधनात कष्ट जास्त आहेत कारण देहाचा अभिमान असणाऱ्यांकडून अव्यक्त ब्रह्माची प्राप्ती कष्टानेच होत असते.

***अव्यक्तीं गोविती चित्त क्लेश त्यांस विशेष चि ।***
***देहवंतास अव्यक्तीं सुखें बोध घडे चि ना ॥***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्दे आले आहेत 1) एक म्हणजे अव्यक्त म्हणजे निर्गुण निराकार ब्रह्याच्या ठायी ज्यांचे चित्त आसक्त झाले आहे त्यांना अधिक क्लेश होतात. 2) कारण की देहासक्ताला अव्यक्त ब्रह्याच्या ठायी मन लावणे खूप अवघड आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अव्यक्तासक्तचेतसां तेषां क्लेश: अधिकतर:** अव्यक्त म्हणजे निर्गुण निराकार ब्रह्म. अशा ब्रह्मतत्वाच्या ठायी ज्याचे मन आसक्त झाले आहे असे साधक म्हणजे निर्गुणाच्या ठायी मन लाऊ इच्छिणारे जे साधक असतात त्याना अधिक क्लेश झेलावे लागतात. इथे 'आसक्त' शब्दाचा अर्थ निर्गुण ब्रह्मतत्वाच्या ठायी आसक्ती नाही. निर्गुण ब्रह्मातत्वाच्या ठायी जर आसक्ती जागली तर मग क्लेश वा कष्ट त्रास होण्याचा सुतराम संबंध नाही पण इथे आसक्ती शब्दाचा अर्थ निर्गुण ब्रह्मतत्वाकडे मनाचे वळण असा आहे. अशाच प्रकारे 'अधिक' शब्दाचा अर्थ सगुण ब्रह्मतत्वाच्या ठायी मन लावणे सोपे आहे, असे नव्हे. सगुण ईश्वराच्या ठायी मन लावणे अवघडच आहे पण सगुण ब्रह्माच्या तुलनेने निर्गुण ब्रह्मात मन लावणे तुलनेने अधिक अवघड आहे. निर्गुण ब्रह्माच्या ठायी मन लावणे मन एकाग्र करायची साधना करणे ही ज्ञानमार्गी व ध्यानमार्गी साधना आहे. बुध्दी आणि मन हे मनाचेच दोन भाग आहेत. बुध्दी विचारात्मक असून मन भावात्मक आहे. ज्यांची जीवनधारा विचारात्मकच असेल आणि ज्यांच्या जीवनात भावनेचा विकास घडलाच नसेल त्याना आध्यात्मिक जागृती वा जिज्ञासा जागल्यावर ते निर्गुण

ब्रह्मतत्वाच्या उपासनेकडे वळतात. नाना जन्मांच्या भल्या-बुऱ्या संस्कारांचा संचच मनात असतो. त्यांचे धुतले जाणे सोपी गोष्ट नाही. ते संस्कार मनात ठाण मांडून बसलेले असतात. यामुळे हे संस्कार निर्गुण ब्रह्माच्या ठायी ध्यान-धारणा करण्याकामी अडथळा निर्माण करतात परिणामी चित्त एकाग्र करणे अवघड होऊन बसते. निर्गुण ब्रह्माच्या उपासनेत जगताला संपवावे लागते. इथे तर जगत हा विषय टाळायचाच असतो. यामुळे हा सराव माणसाला आपसूकपणे कर्मत्यागाकडे वळवतो. पाचव्या अध्यायात भगवंताने सांगितले आहे की कर्माचा त्याग करणे अवघड आहे. साधकावस्थेत कर्मयोगच श्रेयस्कर असतो कारण की तो सुलभ आहे. तसेच इथेही निर्गुण अवघड असून सगुण सुलभ आहे असे सांगताहेत.

2) **हि देहवद्धिः अव्यक्ता गतिः दुःखं अवाप्यते:** कारण की देहधारी पुरुषासाठी अव्यक्त गती म्हणजे निर्गुण ब्रह्माच्या स्वरुपात मन लावणे अवघड ठरते का? देह धारण केल्यावर देहाच्या अभिमानाचे अस्तित्व स्वीकार करावे लागते. हे या प्रश्नाचे उत्तर आहे. देहाची आसक्ती वा देहाभिमान जर नसेल तर देहधारणाच होणार नाही. देहाभिमान गळून पडल्यावर अज्ञानरुपी बीज जळून भस्म होते. मग अज्ञान कार्यरुपी देवाचे निर्माण होणे -- उपजणे संभवतच नाही. यामुळे देहाच्या अस्तित्वाच्या सोबत अज्ञान मान्य करावे लागते आणि त्यातून निर्माण होणारी देहविषयक अहंभाव व देहाविषयक आसक्ती स्वीकार करावीच लागते. देह वगैरे संघाताचा अभिमान गळून पडणे खूप अवघड असते. जोवर तो गळून पडत नाही तोवर मोक्षाची प्राप्ती होणे शक्यच नाही. देह वगैरेविषयक अभिमान कसा गळून पडेल हा महत्वाचा प्रश्न आहे. संपूर्ण साधनेची मदार त्यावरच अवलंबून आहे. साधनेच्या संदर्भात कुठली सुलभ आणि कुठली प्रयत्नसाध्य किंवा कष्टसाध्य हा प्रश्न चिंतनीय आहे. जोवर मनात देहाभिमानाचा विचार ठाण मांडून बसला आहे तोवर निर्गुण अव्यक्त ब्रह्याच्या स्वरुपी तल्लीन होणे, त्याविषयी अनुराग जागणे अवघड आहे हा अनुभवसिध्द निष्कर्ष आहे. अभिमानामुळे सगुण ब्रह्याकडे विशेष आकर्षण असते यामुळे सगुण विषयांची आसक्ती दूर हटवावी लागते. यासाठी सगुण ईश्वराला शरण जावे लागते. त्याला समर्पित होऊन आयुष्याच्या तमाम क्रिया कराव्या लागतात. ईश्वर स्मरणाने मनी भक्तीभाव उत्पन्न करावा लागतो. या उपायाने ही साधना ग्रहण केल्यामुळे देहाभिमान गळून पडण्यात मोठे सहाय्य लाभते. हे कार्य सुलभ होते. या अध्यायातून भगवंताने भक्तीचा हा सुगम असा अद्वितीय मार्ग किंवा उपाय सांगितला आहे. संत तुलसीदासजी म्हणतात 'निर्गुण तें एहि भाँति बड, नाम प्रभाउ अपार' म्हणजे निर्गुण रुपापेक्षा भगवंताच्या नामाचा प्रभाव अपरंपार आहे. नाम तर सगुण साकार परमेश्वरच आहे.

: 6-7 :

***ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।***
***अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥***
***तेषामहं समुध्दर्ता मृत्युसंसारसागरात् ।***
***भवामि न चिरात् पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु पार्थः** आणि हे अर्जुना
- **मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्यः** सर्व कर्मे मला अर्पण करुन
- **मत्पराः** मलाच श्रेष्ठ समजून जे माझ्या ठायी परायण झाले आहेत
- **अनन्येनैव एव योगेनः** अनन्य भक्तीनेच
- **मां ध्यायन्तः** माझे ध्यान धरत
- **उपासतेः** माझी भक्ती करतात
- **मयि आवेशितचेतसां तेषाम्ः** ज्यांनी माझ्या ठायी चित्त विलीन करुन दिले आहे त्यांना
- **अहं न चिरात्ः** मी लगेचच
- **मृत्युसंसारसागरात्ः** मृत्युरुपी संसार सागरातून
- **समुध्दर्ता भवतिः** उध्दारक असतो.

**अर्थ**

परंतु जे मत्परायण भक्तजन सर्व कर्मे माझ्या ठिकाणी अर्पण करुन मज सगुणरुप परमेश्वराचीच अनन्य भक्तियोगाने निरंतर चिंतन करत उपासना करतात.

हे अर्जुना, त्या माझ्यात चित्त गुंतवलेल्या प्रेमी भक्तांचा मी तत्काळ मृत्युरुप संसारसागरातून उध्दार करणारा होतो.

*परी जे सगळीं कर्मे मज अर्पूनि मत्पर ।*
*अनन्य भक्ति-योगानें भजतीं चिंतुनि मज ॥*
*माझ्यांत रोविती चित्त त्यांस शीघ्र चि मी स्वयें ।*
*संसार-सागरांतूनि काढितों मृत्यु मारुनी ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) सर्व कर्मे मलाच अर्पण करुन मलाच श्रेष्ठ समजून जे माझ्या ठायीच परायण झाले आहेत. 2) अनन्य भक्तीभावनेनेच माझे ध्यान धरत भक्त माझी भक्ती करतात. 3) ज्यांनी माझ्या ठायी चित्त विलीन केले आहे त्या भक्तांना. 4) मी ताबडतोब मृत्युयुक्त प्रपंच सागरातून उध्दार करणारा होऊन जातो.

**स्पष्टीकरण**

1) **तु पार्थ मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्य मत्पराः** सर्व कर्मे मला अर्पर्ण करुन मलाच श्रेष्ठ समजून जे माझ्या ठायी परायण होऊन गेलेले आहेत. मागील श्लोकात असे सांगितले गेले आहे की निर्गुण ब्रह्मतत्त्वाची ध्यान धारणा करणाऱ्या निर्गुणोपासकालाअधिक क्लेश होतात. या दोन श्लोकांमधून असे सांगताहेत की सगुणोपासक सुलभतेने भवसागर पार करतात म्हणजे असे की मीच स्वत: त्याना भवसागर पार करवुन देतो. भवसागर पार करायचा असेल तर अशी अट आहे की मला सर्व कर्मे अर्पण करुन मला श्रेष्ठ मानून माझ्या ठायी परायण व्हावे. ईश्वराच्या ठायी परायण होण्याची काय गरज असा प्रश्न पडतो. मुद्दा असा आहे की विषयभोग भोगून शांतता लाभत नाही. तशी तात्पुरती शांतता जरी लाभत असली तरी प्रापंचिक विषयांच्या संबंधातून शाश्वत शांततेचा अनुभव येत नाही. याची दोन कारणे होत. 1) प्रापंचिक विषयांचे स्वरुप असते अनित्य आणि जीवाला हवी असते शांतता, देहापासून विलग झाल्यावरही तो स्वत:ला देह वगैरेशी एक मानतो आणि 2) आत्मस्वरुपाची ओळख नसल्यामुळे अज्ञानामुळे आपण स्वत: ईश्वरस्वरुपी असल्याचे ज्ञान त्याला होत नाही. या दोन कारणांमुळे माणसाला प्रपंचात अखंड शांतता अनुभवायला येत नाही. जीव स्वत:ला देह मानतो, देह अनित्य असल्यामुळे जीवही अनित्य होऊन जातो. स्वत:ला अनित्य मानल्यावर कदापि शांतता मिळूच शकत नाही. वस्तुत: परमात्मा नित्य असल्यामुळे जीव नित्य आहे. जीवाला जेव्हा आपल्या नित्यतेचे आणि आपल्या मुक्तीचे ज्ञान असेल तेव्हाच जीवाला नित्यतेचा, अखंडतेचा, मुक्ततेचा अनुभव येईल. हे ज्ञान प्राप्त करुन घ्यायचे असेल तर सर्व कर्मे ईश्वराप्रती समर्पित करावीत असे गीता सांगत आहे. क्रियेशी संबंध राखून आपण स्वत:ला कर्ता, भोक्ता समजत राहिलो तर देहरुपता शिल्लक उरेलच. ती संपू शकत नाही, शकणार नाही पण जर आपण क्रियेचा संबंध स्वत:शी न जोडता ईश्वराशी जोडायचा प्रयत्न करु, स्वत:च्या बाबतीत अकर्ता, अभोक्तेपणाचा म्हणजे अकर्ता, अभोक्तास्वरुपी ईश्वराचा अनुभव घेत राहू तर अखंड शांततेचा अनुभव घेऊ शकू.

'परायण' शब्दाचा अर्थ ईश्वराला श्रेष्ठ मानून त्याच्या ठायी लीन होणे आहे. आपण ज्या वस्तु वा व्यक्तीला श्रेष्ठ मानतो त्याविषयी प्रेम, भक्ती उत्पन्न होते आणि आपण त्याच्या ठायी लीन होऊन जातो म्हणजे वारंवार त्यालाच आठवत रहातो.

2) **अनन्येन एव योगेन मां ध्यायन्त:** उपासते भक्तीपूर्वक माझे ध्यान करत असताना भक्त माझी उपासना करतात. ईश्वराला भक्ती अतिशय प्रिय आहे पण ती अनन्य असायला हवी. ईश्वराशिवाय अन्य कुणाच्या भक्तीला वा प्रेमाला मान्यता नाही. अनन्यभक्तीपूर्वक ईश्वराची उपासना करणाऱ्यांना लाभणाऱ्या फळांची चर्चा पुढे केली गेली आहे.

3) **मयि आवेशितचेतसां तेषाम्:** व रचाच मुद्दा इथे वेगळ्या शब्दात मांडला गेला आहे. चित्ताचा एक मोठा गुण हा आहे की ते कुठल्याही वस्तुवर लवकर लुब्ध होते. जिथे आकर्षण असेल तिथे ते लुब्ध होईल. लहान लेकरांचे चित्त खेळातच रमून जाईल. मोठे झाल्यावर ते खेळात रमत नाही कारण की खेळातली ओढ व आकर्षण कमी होऊन जाते. अशाप्रकारे जर सत्संगतीमुळे आपले चित्त आध्यात्मिक विषयांकडे वळले तर हळूहळू ईश्वर भक्तीकडेही वळू शकते. चित्ताचा स्वभाव कुठेतरी चिकटण्याचा वा लुब्ध होण्याचा असतो. ईश्वराच्या ठायी चित्त एकाग्र करणे सोपे नसले तरी सत्संगतीत हीगोष्ट शक्य आहे.

4) **अहं न चिरात् मृत्युसंसारसागरात् समुध्दर्ता भवामि:** मी खूपच लवकर मृत्युरुपी भवसागरातून उध्दार करणारा तारणहार बनून जातो. इथे एक विशेष मुद्दा आला की भक्त वर वर्णन केल्याप्रमाणे माझी भक्ती

करतात, त्याना मी ताबडतोब मृत्युसंसारसागरातून पार करुन देतो. इथे 'ताबडतोब' हा शब्द विशेष आहे. निर्गुण व सगुणोपासकातला फरक समजावून सांगितला की दोघे अखेरीस ईश्वरालाच पावतात म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेतात पण सगुणोपासक भक्त भवसागर पार करुन खूप लवकर मला प्राप्त होतात. निर्गुणोपासक व सगुणोपासक दोघांना गीता समान मानते. सगुण उपासनेत 'सुलभता' हे वैशिष्ट्य आहे. अशाप्रकारे आपले वजन सगुण भक्तीच्या पारड्यात देवाने टाकले आहे. 'कर्मयोग आणि कर्मसंन्यासयोग दोघे एक आहेत' असे सांगून आपले वजन 'कर्मयोगाच्या' पारड्यात टाकले आहे. भगवंताने प्रपंचाला सागराची उपमा दिली आहे. 'भवसागर' असे म्हटले आहे. समुद्रात नेहमी लहान-मोठ्या लाटा उसळत असतात. तो नित्य गर्जना करुन क्षुब्ध असतो. त्याच्यात नित्य खळबळ माजलेली असते. जगातही असेच आहे. त्यात नेहमी काम, क्रोध वगैरे विकारांच्या लाटा उसळत असतात आणि सुख-दु:खामुळे तो नित्य प्रक्षुब्ध असतो. तशाच प्रकारे प्रपंचात विकाररुपी लाटांमुळे सुख-दु:खरुपी आवाज येत रहातात. अशा भवसागरातून सगुणोपासकाला निर्गुणोपासकापेक्षा मी लवकर मुक्त करुन देतो, असे भगवंताचे म्हणणे आहे.

: 8 :

***मय्येव मन आधत्स्व मयि बुध्दिं निवेशय ।***
***निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशय: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- मयि एव: माझ्यातच
- मन: आधत्स्व: मनाला स्थिर कर
- मयि बुध्दिं निवेशय: माझ्यात बुध्दी प्रविष्ट कर
- ऊर्ध्वं: इतके केल्यावर जगत असताना आणि जीवनानंतर
- मयि एव: माझ्यातच
- निवसिष्यसि: निवास करशील म्हणजे मलाच प्राप्त होशील
- न संशय: यात संशय नाही.

**अर्थ**

माझ्यातच मन ठेव, माझ्या ठिकाणीच बुध्दी स्थापन कर म्हणजे मग तू माझ्यातच राहशील यात मुळीच संशय नाही.

***मन माझ्यांत तू ठेव बुध्दि माझ्यांत राख तूं ।***
***म्हणजे मग नि:शंक मी चि होशील तूं स्वयें ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) माझ्याच ठायी मनाला स्थिर कर आणि बुध्दीला प्रविष्ट कर 2) इतके केल्यावर जीवन क्रम सुरु असताना आणि देहत्याग केल्यावरही माझ्याच ठायी नि:संशयपणे निवास करशील.

**स्पष्टीकरण**

1) **मयि एव मन:** आधत्स्व, मयि बुध्दिं निवेशय माझ्यातच मन लाव आणि माझ्या ठायी बुध्दी प्रविष्ट कर. मागील श्लोकात निर्गुण भक्तीपेक्षा सगुण भक्तीला सुलभ सांगितले गेले आहे. या श्लोकात त्याच मुद्याची चर्चाआहे. मागील श्लोकात सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करण्याची चर्चा आली आहे. इथे मन व बुध्दी समर्पित करायला सांगितले गेले आहे. मन आणि बुध्दी ईश्वरार्पण करण्याचा, ईश्वरात जोडून द्यायचा सराव झाला तर मग करायला काहीही उरत नाही. यातच मोक्षाची किल्ली आहे. मन आणि बुध्दीत 'अहं' म्हणजे 'मी' पणाचा अनुभव येतो. हा अनुभव अज्ञानामुळे उपजतो. ज्या ईश्वरावर या अहंपणाचा भाव येतो तो ईश्वर खरा असून हा अनुभव मिथ्या होय. यातून कधी समाधान लाभू शकणार नाही. मृगजळाने कदापि तहान भागू शकणार नाही. यामुळे या श्लोकात विवेचन येते की आपल्या मनाला ईश्वरार्पण कर, बुध्दीलाही त्या सत्यस्वरुपी ईश्वराच्या ठायी लाऊन दे. मन आणि बुध्दी ज्याची आहे त्याला समर्पित कर. संत तुलसीदासजी म्हणतात :

***बहु रोग वियोगन्हि लोग हये ।***
***भवदंघ्रि निरादर के फल ये ॥ भव सिंधु अगाध परे नर ते । पद-पंकज प्रेम न जे करते ॥***

अर्थात् अनेक चिंतांमुळे जे लोक नष्ट हतवीर्य होऊन जातात ते केवळ आपल्या चरणकमलांचा निरादर करण्याचे फलित आहे. ईश्वराच्या चरणकमलांच्या प्रती अनुराग न राखणारे या अगाध भवसागरात गटांगळ्या खातात. तुलसीदासजी पुढे लिहितात:

*अति दीन मलीन दुखी नितहीं। जिन्हके पद-पंकज प्रीति नहीं॥ अवलंब भवंत कथा जिन्हके। प्रिय संत अनंत सदा तिन्हके॥*

अर्थात् ईश्वराच्या चरणकमलारविंदी जे अनुराग राखत नाही ते मलीन, दरिद्री म्हणजे अज्ञानी आणि सदैव दु:खीच असतील पण ज्यांनी हरीकथेचा आश्रय घेतला आहे म्हणजे कथामृताचे श्रवण करतात त्याना अनंत परमात्मा व संत प्रिय असतात.

2) **अत ऊर्ध्वं मयि एव निवसिष्यसि न संशय:** एवढे केल्यावर या आयुष्यात आणि देहत्याग केल्यावरही माझ्यातच निवास करशील, याविषयी संदेह धरु नये. इथे अत ऊर्ध्वं शब्दाचा प्रयोग केला आहे. याचे दोन अर्थ संभवतात (1) ईश्वराच्या ठायी जर मन आणि बुध्दी ठेऊन जगशील तर या आयुष्यात आणि देहत्यागानंतरही माझ्याच ठायी निवास करशील म्हणजे मलाच पावशील. आणि 2) देह सुटल्यावर मोक्ष प्राप्त करशील. जोवर मी स्वत:चे ईश्वराशिवाय स्वतंत्र अस्तित्व मानतो. (अज्ञानी अवस्थेत सारेच लोक आपले ईश्वराहून स्वतंत्र अस्तित्व मानतात.) तोवर कर्तेपणाचा म्हणजे भोक्तेपणाचा अनुभव येतो आणि त्यामुळे सुख-दु:खांची भावना जागते म्हणजे मी बंधनात असल्यासारखे वाटते. तोपर्यंत त्यापासून सुटका प्राप्त करुन घेण्यासाठी म्हणजे बंधनमुक्ती वा मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्न जारी रहातील पण जर सत्संगती लाभली, शास्त्राध्ययन झाले वा कुणा अधिकारी पुरुषाने बोध दिला की तू कुठल्याही अवस्थेत ईश्वरापासून वेगळा नव्हता, नाहीहेस आणि वेगळा रहाणार नाहीस यामुळे ईश्वराच्या ठायी मन-बुध्दी लीन करण्याचा सराव कर, ईश्वर भक्ती प्राप्त करुन घे ते आपले काल्पनिक अस्तित्व संपवून मोक्षाचा अनुभव घेऊ शकतो. ईश्वर भक्तीत अहंशून्य बनल्यावर बंधनाची भावना शिल्लक रहात नाही मग मोक्षाचा अनुभव घेण्यासाठी स्वतंत्रपणे काही शिल्लक उरत नाही पण ईश्वराच्या ठायी मन मती लीन केल्यावर परम म्हणजे श्रेष्ठ भक्ती प्राप्त होते. अहंशून्यतेचा अनुभव येतो हाच मोक्ष होय. या श्लोकात हे सांगितले गेले आहे की अहंशुन्यतेचा अनुभव देह असल्यावर आणि देहत्याग केल्यावर प्रत्ययास येतो. पुढे सांगितले आहे की ईश्वराच्या ठायी मन अणि बुध्दी तल्लीन केल्यामुळे ईश्वराच्या ठायी निवास होईल म्हणजे मोक्ष प्राप्ती होईल यात काही शंका नाही. मोक्षाचा अनुभवही बंधनाच्या अनुभवामुळेच आहे, स्वतंत्रपणे मोक्षाचे अस्तित्व कुठे आहे? ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात म्हटले गेले आहे गृहीते तु आत्मैकत्वे बंधमोक्षादि सर्वव्यवहारपरिसमाप्ति: एव स्यात्। आत्मा एक आहे हे स्वीकार केल्यावर हा बंध आणि मोक्ष वगैरे सर्व व्यवहार समाप्त होऊन जातात.

: 9 :

*अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्।*
*अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अथ:** आता जर
- **मयि चित्तं:** माझ्या ठायी चित्ताला
- **स्थिरं समाधातुं:** स्थिर करणे
- **न शक्नोषि:** शक्य झाले नाही
- **तत: धनंजय:** तर हे अर्जुना
- **अभ्यास योगेन:** अभ्यासाच्या योगाने
- **मां आप्तुं इच्छ:** मला प्राप्त करायची इच्छा राख.

**अर्थ**

जर तू माझ्यात मन निश्चळ ठेवायला समर्थ नसशील तर हे अर्जुना, अभ्यास रुप योगाने (भगवंताच्या नामांचे आणि गुणांचे श्रवण-कीर्तन-मनन करणे आणि श्वासाद्वारे जप करणे तसेच भगवत्प्राप्तीविषयक शास्त्रांचे पठन-पाठन करणे इत्यादी क्रिया भगवत्प्राप्तीकरता वारंवार करणे याला अभ्यास असे म्हणतात. ) मला प्राप्त होण्याची इच्छा कर.

*जाईल जड माझ्यांत चित्तास करणें स्थिर।*
*तरी अभ्यास-योगानें इच्छुनि मज मेळवीं॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितलेल्या आहेत. 1) आता जर माझ्या ठायी मनाला स्थिर करणे शक्य नसेल. 2) हे अर्जुना, अभ्यास आणि योगाच्या बळाने मला प्राप्त करुन घेण्याची इच्छा बाळग.

### स्पष्टीकरण

1) **अथ मयि चित्तं स्थिरं समाधातुं न शक्नोषि:** आता माझ्या ठायी चित्त एकाग्र करणे शक्य नसेल. इथे 'चित्त' शब्दाचा अर्थ मन आहे. मन जेव्हा बाहेर धाव घेते तेव्हा त्याला 'चित्त' म्हणतात. जेव्हा आत असते तेव्हा 'अंत:करण' म्हणतात. मनाच्या ठायी बुध्दी समाविष्ट आहे. चंचळ चित्तात काम, क्रोध वगैरे विकार उत्पन्न होतात. ते माणसाला त्रस्त करुन दु:ख देतात. मनाला कसे स्थिर करावे हे जाणून घेण्यासाठी गीतेचा सहावा अध्याय महत्वाचा आहे. पतंजली मुनींचे 'योगशास्त्र' ही उपयोगी आहे. सहाव्या अध्यायात मनाला स्थिर करण्याचे दोन उपाय सांगितलेले आहेत -- अभ्यास आणि वैराग्य. गीतेत या शब्दांचे स्पष्टीकरण आले नसून ते योगशास्त्रात आले आहे. योगसूत्रकाराने आधी मनाच्या वृत्तींचे पोषण केले आहे. मनाच्या पाच वृत्तींची चर्चा करुन प्रत्येकीचा अर्थही सांगितला आहे. या विषयीचे स्पष्टीकरण श्री बाळकोबा यांच्या 'जीवन साधना' या ग्रंथात आलेले आहे.

2) **ततः धनंजय अभ्यासयोगेन मां आप्तुं इच्छ:** तेव्हा हे अर्जुना, अभ्यास योगामुळे म्हणजे वारंवार चित्ताला माझ्या ठायी स्थापित करण्याचा जो अभ्यास आहे त्या आधारे मला प्राप्त करुन घेण्याची इच्छा राख. अभ्यास आणि वैराग्य यांच्या जोरावर चित्त ईश्वराच्या ठायी स्थापित होऊ शकते.

योगसूत्रकारांनी वारंवार करायच्या प्रयत्नांना सराव करायच्या प्रयत्नांना अभ्यास म्हटले आहे. सतत, दीर्घकाळ भक्तीपूर्वक सराव केला तर तो दृढ होत जातो. ऐकलेल्या व बघितलेल्या विषयांबाबत तृष्णारहित पुरुषाला असा अनुभव येतो की विषय आपल्या ताब्यात आले आहेत, हा अनुभव 'वैराग्य' होय. आत्मज्ञानामुळे सत्वगुणविषयक आसक्ती नष्ट होऊन जाते याला 'पर वैराग्य' असे म्हणतात. योगसूत्रकारांनी वैराग्याचे 'पर वैराग्य' आणि 'अपर वैराग्य' असे दोन भाग केले आहेत. विषय आपल्या ताब्यात आहेत असे वाटणे म्हणजे 'अपर वैराग्य' होय. सत्वगुण आमरण सोबत असतात त्यामुळे त्यावर पूर्ण विजय संपादित केला जातो तेव्हा ते 'पर वैराग्य' होय. अभ्यास आणि वैराग्य याशिवाय दुसरा उपाय ईश्वर प्रणिधान म्हणजे ईश्वर शरणागत भाव आहे. अभ्यास वैराग्य आणि ईश्वर शरणागत भाव हे दोन्ही एकत्र आलेत तर पूर्ण उपाय होऊन जातो. या श्लोकात अभ्यास हा उपाय सांगितलेला आहे. पुढच्या श्लोकात ईश्वर शरणागत भाव हा उपाय वर्णिला आहे. आठव्या श्लोकात ईश्वर समर्पणभाव आला आहे. संपूर्ण ईश्वर समर्पण भाव प्राप्त करुन घ्यायचा उपाय या नवव्या श्लोकात आला आहे. या श्लोकात अभ्यासविषयक चर्चा आली आहे. अभ्यासात वैराग्य सामावलेले आहे. संपूर्ण समर्पण भाव जर शक्य नसेल तर वारंवार सराव केल्याने ते साधता येते.

: 10 :

*अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।*
*मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिध्दिमवाप्स्यसि ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अभ्यासे अपि:** अभ्यासासाठी सुध्दा
- **असमर्थ: असि:** जर तू असमर्थ आहेस
- **मत्कर्मपरम: भव:** तर केवळ माझ्यासाठी कर्मे आचरण कर
- **मदर्थम् अपि कर्माणि कुर्वन्:** माझ्यासाठीच कर्मे आचरणारा तू
- **सिध्दिं अवाप्स्यसि:** माझी प्राप्ती होणे ही सिध्दी प्राप्त करुन घेशील.

### अर्थ

जर तू वर सांगितलेल्या अभ्यासालाही असमर्थ असशील तर केवळ माझ्याकरता कर्म करायला परायण हो. (स्वार्थाचा त्याग करुन आणि परमेश्वरालाच आपला परम आश्रय आणि परम गती समजून निष्काम प्रेमभावनेने सती शिरोमणी पतिव्रता महिलेप्रमाणे मनाने, वाणीने आणि शरीराने म्हणजे मनसा, वचसा आणि कायेने परमेश्वराकरताच यज्ञ, दान आणि तप वगैरे संपूर्ण कर्तव्यकर्मे करणे यालाच 'भगवदर्थ कर्म करण्याला

परायण होणे' हे नाव आहे.) अशा रीतीने माझ्यासाठी कर्मे केल्यानेही माझी प्राप्ती होणे ही सिध्दी तू मिळवशील.

*अभ्यास हि नव्हे साध्य तरी मत्कर्म आचरीं।*
*मिळेल तुज ती सिध्दि मत्कर्म हि करुनियां॥*

**विषय:** या श्लोकात दोन मुद्देआले आहेत. 1) मागील श्लोकात वर्णिलेल्या अभ्यासाठी तू जर असमर्थ असशील तर माझ्यासाठी कर्म कर. माझ्यासाठी कर्म करणारा बन 2) माझ्यासाठी कर्म आचरणारा तू सिध्दी मिळवशील म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेशील.

**स्पष्टीकरण**

1) **अभ्यासे अपि असमर्थ: असि मत्कर्म परम: भव:** अभ्यास करायला तू असमर्थ असशील तर माझ्यासाठी कर्मे करत रहा. ईश्वराच्या ठायी चित्त आणि बुध्दी समर्पित करण्यासाठी भगवंत एका पाठीमागे एक उपाय सुचवताहेत. मागील श्लोकात अभ्यासाच्या संदर्भात सांगितले. नवव्या श्लोकात परिपूर्ण ईश्वर समर्पण सांगितले. ही काही छोटी-छोटी क्रिया असते पण ते आपल्या हातून होत आहे ते सारे काही 'मी' करतो या भावनेने न करता 'ईश्वरच' सारे करत आहे या भावनेने करावे. खरे पाहू गेल्यास 'मी' म्हणजे 'अहं' काही वेगळी स्वतंत्र वस्तु नाही. 'मी' चे जर काही स्वतंत्र अस्तित्व असते तर मग 'मी जातो', 'मी खातो', 'मी लिहितो', 'मी बोलतो' असे मानता आले असते पण हे मानण्यात देहरुपता येते. तमाम क्रियांचा संबंध देह आणि इंद्रियांशीच येतो. आपण स्वत: देह नसलो तरी क्रियांशी आपला संबंध मानला तर ते अज्ञानच मानले जाईल. देह, इंद्रिये यांचा सारा व्यापार याच कोटितला आहे. ते सारे जड आहेत. इंद्रिये काही कुणाला जाणत नाहीत पण त्या वस्तुंना जाणण्याची साधने असतात. याचा अर्थ असा झाला की जाणणारा मी ज्ञाता असून देह, इंद्रिये ही माझ्या जाणून घेण्याची विषयरुप आहेत पण आपण स्वत: कोण आहोत ? आपले स्वरुप काय आहे ? याचे ज्ञान नसल्यामुळे आपण देहरुपी, मनरुपी इंद्रियरुपी बनून जातो. ही देहरुपता घालवण्यासाठी भक्ती हा अगदी साधा-सुधा उपाय आहे. गीतेने भक्तीचा आश्रय घ्यायला सांगितले आहे. भक्तीच्या ठायी समर्पण बुध्दी आणि हरीशरणभाव म्हणजे प्रपत्ती दोघांचा समावेश झाला आहे. आधी हरीशरणभाव मग हरीसमर्पणभाव असा क्रम आहे कारण की एकाएकी समर्पण भाव जागत नाही. सातव्या अध्यायात ईश्वरशरण भावनेचा उल्लेख आला आहे. आठव्या अध्यायात ईश्वर शरण भावनेचे सातत्य वर्णन करुन नवव्या अध्यायात पूर्णत: ईश्वर समर्पण भाव वर्णिला आहे. भगवान इथे हेच सांगताहेत की ईश्वर समर्पण भावनेचा अभ्यास करण्यात जर यश लाभले नाही तर चिंता करण्याचे काही कारण नाही. ईश्वरी तत्वाला जर मनाने स्वीकार करुन घेतले असेल तर ईश्वराकडे वळण्यासाठी आपण क्रिया करतोहोत एवढी भावना मनात राखून जरी जीवनात प्रयत्नशील राहिलोत तरी हळूहळू अहंकार क्षीण होऊन ईश्वर समर्पणभावापर्यंत पोहोचू शकतो.

2) **मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिध्दिम् अवाप्स्यसि:** माझ्यासाठीच कर्मे आचरणारा तू सिध्दी म्हणजे मोक्षाची प्राप्ती करुन घेशील. समर्पण भाव जर साधता आला नाही तर केवळ माझ्यासाठी कर्मे करत आहे म्हणजे मी ईश्वराला शरण जाऊन कर्मे करतो, या भावनेने जर कर्मे आचरशील तरी समर्पणाप्रत पोहोचून मोक्ष प्राप्त होऊ शकतो. अहंकार एकदम क्षीण होत नाही, हळूहळूच होऊ शकतो. अहंकाराची प्रवृत्ती सर्व प्रवृत्तींमध्ये प्रबळ आहे. रागावल्यावर लहान मुलालाही वाईट वाटते. वाढत्या वयासोबत मानापमानाची भावनाही वाढीस लागते. यामुळे भगवान म्हणतात की एकदम जरी हरीशरणभाव साधता आला नाही तरी ईश्वरी भावना मनी बाळगून जरी आपण क्रिया करायला लागलोत, संकट समयी विशेष प्रार्थनापूर्वक ईश्वराचे सहाय्य मागू लागलो तरी अखेरीस ईश्वर शरणभाव जीवनात प्रविष्ट होईल आणि आपण मोक्षपद मिळवू शकतो.

: 11 :

*अथैदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रित:।*
*सर्वकर्मफलत्यागं तत: कुरु यतात्मवान्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अथ एतत् अपि:** जर एवढेही

- **कर्तुं अशक्त: असि:** करण्यास तू असमर्थ असशील तर
- **मद्योगं आश्रित:** माझ्या योगाचा आश्रय घेऊन
- **यतात्मवान्:** मन वगैरे तमाम इंद्रियांना ताब्यात घेऊन
- **सर्वकर्मफलत्यागं कुरु:** सर्व कर्मांच्या फळाचा माझ्या प्रीत्यर्थ त्याग कर.

**अर्थ**

जर माझ्या प्राप्तीरुप योगाचा आश्रय करुन वर सांगितलेले साधन करायलाही तू असमर्थ असशील, तर मन, बुध्दी इत्यादींवर विजय मिळवणारा होऊन सर्व कर्मांच्या फळांचा त्याग कर.

***न घडे हें असें कर्म योग माझ्यांत साधुनी।***
***तरी सर्व चि कर्मांचे प्रयत्नें फळ सोड तूं॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. 1) जर तू एवढेही करायला असमर्थ असशील तर 2) माझ्या योगमार्गाचा आश्रय घे 3) मन वगैरे सर्व इंद्रियांना ताब्यात घेऊन 4) सर्व प्रकारच्या कर्मांचा त्याग कर

**स्पष्टीकरण**

1) **अथ एतत् अपि कर्तुं अशक्त:** असि आता एवढेही करायला तू असमर्थ असशील. मागील श्लोकात सांगितले गेले आहे की ईश्वराप्रती संपूर्ण समर्पण करणे जर शक्य नसेल तर ईश्वरासाठीच कर्म करत रहा म्हणजे ईश्वरशरणागत भाव मनाशी बाळगून जीवन निर्वाह करत रहा. आता इथे असे सांगताहेत की मागील श्लोकात वर्णिल्याप्रमाणे पात्रता नसेल तर आणखी एक सुगम उपाय आहे आणि तो म्हणजे कर्मफळांचा त्याग कर कारण की ईश्वर शरणागत भाव ग्रहण करायलाही मनात श्रध्दा हवी. हासेवामार्ग नाही. ही साधारण गोष्ट नाही. ईश्वर आहे हे तर सर्वांना ज्ञात आहे आणि संकटसमयी सारे ईश्वराचे सहाय्यही घेतात. अशाप्रकारे सर्वसाधारण जनांमध्ये ईश्वरशरणभाव असूनही ईश्वराप्रती शरणागत भाव बाळगून जीवननिर्वाह करणे दुर्लभ आहे. ही बाब सर्वसाधारण जनांच्या आयुष्यात दिसून येत नाही. यामुळे भगवंताने पहिली गोष्ट अशी सांगितली आहे की ईश्वरासाठी जगणे जर शक्य नसेल तशी आपली योग्यता नसेल तर मग

2) **मद्योगं आश्रित:** माझ्या योगाचा आश्रय घे. म्हणजे चित्ताची निर्विकारता साधून घे. चित्ताची निर्विकारता वा समता प्राप्त करुन घेणे सोपे नाही, सुगम नाही पण यात ईश्वर श्रध्देचा संबंध येत नाही. अव्यक्त असल्यामुळे आधी तर ईश्वरावर श्रध्दा जागणेच अवघड आहे. तरीही ती इतकी उत्कट असली की तो ईश्वरासाठीच श्वास घेत आहे हे तर आणखीही अवघड आहे पण काम, क्रोध इत्यादी विकारांना बाह्य उपायांनी हटवता येईल, हटवणे साधता येईल अशी वस्तुही आहे. अर्थात् ईशश्रध्देविना विकारांचा संपूर्ण क्षय होणे जवळपास अशक्यच आहे, तरीही विकार आतून ढुसण्या मारताहेत, त्रास देताहेत असे लक्षात आल्यावर बाह्य उपायांनी त्याना काहीप्रमाणात दूर करता येऊ शकते. उदाहरणार्थ ज्याच्याशी आपला नित्याचा संबंध असतो आणि नेहमी क्रोधाचाच अनुभव येत असेल तर आपण त्या व्यक्तीशी संपर्क संबंध थोडा कमी करु शकतो. ज्या ज्या वेळेला संबंध येईल त्या त्या वेळेला मनात ठरवून निश्चयपूर्वक त्याच्याशी मृदु सौम्य भाषेत बोलून क्रोध विकार उत्पन्न न होण्याबाबत आपण दक्षता घेऊ शकतो. तसेच स्त्रियांच्या बाबतीतल्या संबंधांमुळे जर काम विकार उत्पन्न होत असेल तर काही काळ भगिनींशी संपर्क टाळू शकतो. ज्या ज्या वेळी भगिनींशी संबंध येईल त्या त्या वेळी मनात सजगता बाळगून विकारांना थांबवले जावे. सत्कर्मे आचरत सत्कर्मांसाठी प्रयत्न करायला हवेत. आपण उत्तम ग्रंथांच्या पठणाचा सराव करु शकतो. या सर्व उपायांनी निर्विकार होण्याकामी मदत लाभेल. अशा उपायांचा आश्रय घेताना ईश्वर श्रध्देचा संबंध येत नाही. नास्तिकालाही तर शांततेची गरज असतेच. काम, क्रोध वगैरे विकार शांततेत मोठा अडथळा उभारतात. हाही प्रत्यक्ष अनुभव आहे. यामुळे नास्तिकसुध्दा ईश्वर श्रध्देशिवाय विवेकाच्या बळावर समता-- निर्विकारतेचा सराव करु शकतो.

3) **यतात्मवान्:** मन वगैरे तमाम इंद्रियांचा संयम वा निग्रह. चित्ताला निर्विकार आणि काम, क्रोधरहित बनवायचे असेल तर दशेंद्रियांना ताब्यात राखणे गरजेचे आहे. बाहेरुन जर इंद्रियांना संयमात ठेऊ शकलो नाही तर आंतरिक निर्विकारता संपादित करणे, प्राप्त करुन

घेणे शक्य नाही. वृक्षाच्या फांद्या छाटत राहिलोत आणि पाणी देत राहिलोत तर फांद्या नष्ट होण्याऐवजी त्या पुनश्च विकसतील आणि वृक्ष हिरवागार दिसेल. बाहेरुन दहा इंद्रियांना संयमित न राखत चित्ताला निर्विकार बनवण्याच्या प्रयत्नात यश कसे लाभेल? काम विकारापासून पूर्णपणे मुक्त व्हायचे असेल तर आधी बाहेरुन नारी संगाचा त्याग करणे आवश्यक आहे. निर्विकारता प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वप्रथम दहा इंद्रियांना ताब्यात राखायचा सराव करणे आवश्यक आहे.

4) **सर्वकर्मफलत्यागं कुरुः** तमाम कर्मांच्या फलासक्तीचा त्याग करा. या श्लोकात कर्मफळत्यागाचा उपाय सांगितला गेला आहे. दुसऱ्या अध्यायातील सत्तेचाळिसाव्या श्लोकातही कर्मफळत्यागाचा मुद्दा आला आहे. गांधीजींनी 'अनासक्ती योग' ग्रंथाच्या प्रस्तावनेत कर्मफळत्यागाला गीतेची चावी म्हटले आहे. त्यांच्या ठायी कर्मफळत्याग मूर्तिमंत साक्षात्कृत झाला होता. भक्ती तर त्यांच्या ठायीच होतीच. बाहेरुन ते सेवारत होते. आत भक्ती, कर्मफलत्याग आणि निर्विकार भाव तिघांचा मेळ होता. भक्ती असो वा ध्यान, वैराग्य असो वा सेवा वा अध्यात्म तमाम आध्यात्मिक साधनांसाठी कर्मफलत्यागाचा सिध्दांत लागू करायचा आहे अशी त्यांची कल्पना आहे आणि ती यथार्थच आहे. आपल्या 'अनासक्ती योग' ग्रंथात गांधीजी लिहितात की गीतेचा मध्यबिंदु म्हणजे कर्मफलत्याग होय. त्याच्या आजूबाजूला भक्ती, ध्यान, योग, वैराग्य इत्यादी सारे उपाय आहेत. यामुळे भक्ती, ध्यान वगैरे सर्व उपायांना कर्मफलत्यागाच्या कसोटीवर पारखावे लागेल. भक्ती, ध्यान वगैरेत सूक्ष्म अहंकार राहू शकतो पण भक्तीशी कर्मफलत्यागाचा संबंध जोडला गेला तर परमशून्यतेचा प्रत्यय घेता येऊ शकतो. भक्तीच्या ठायी जर परिणामांची अपेक्षा वा आसक्ती शिल्लक उरत असेल तर त्याला काही परिपूर्ण समर्पण म्हणता येणार नाही. पूर्ण समर्पणात कर्मफलासक्तीचा त्याग अंतर्भूत असतोच. याचे कारण असे आहे की पूर्ण समर्पणाच्या ठायी परमशून्यता अभिप्रेत असतेच, समाविष्ट असतेच. परमशून्यतेचा अंतर्भाव असतोच अन्यथा ते पूर्ण समर्पण असूच शकत नाही. सारे काही ईश्वरच आहे, ईश्वररुपच आहे आणि समस्त क्रियाकलाप त्याच्यामुळेच होताहेत असा अनुभव जिथे असेल तिथे फलासक्ती असूच शकत नाही. संभवतच नाही. परिपूर्ण भक्ती म्हणजे परिपूर्ण समर्पणाच्या ठायी फलासक्तीची कल्पना करता येत नाही. अशाप्रकारे या श्लोकातून भगवंताने कर्मफलत्याग हा सुगम उपाय निरुपित केलाय. एकीकडे कर्मफलत्याग परिपूर्ण तर आहेच पण आरंभी म्हणजे प्राथमिक अवस्थेत सुगम उपायही आहे.

: 12 :

***श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।***
***ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि अभ्यासात्:** कारण की फलत्यागाच्या सरावाहून
- **ज्ञानं श्रेय:** फलत्यागाचे परोक्ष ज्ञान श्रेयस्कर आहे
- **ज्ञानात् ध्यानं विशिष्यते:** परोक्ष ज्ञानाहून परमेश्वराच्या स्वरुपाचे ध्यान म्हणजे फलत्यागाचे ध्यान विशेष आहे
- **ध्यानात् कर्मफलत्याग:** ध्यानापेक्षा सर्व कमांर्च्या फळांचा माझ्यासाठी त्याग करणे श्रेष्ठ आहे
- **त्यागात् अनंतरं शांति:** फलत्यागामुळे लागलीच शांती लाभते, प्राप्त होते.

अर्थ: मर्म न जाणता केलेल्या अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ होय. (श्रवणाने आणि शास्त्राध्ययनाने परमेश्वराच्या स्वरुपाचे जे अनुमान ज्ञान होते त्याला परोक्ष ज्ञान असे म्हणतात.) ज्ञानापेक्षा मज परमेश्वराच्या स्वरुपाचे ध्यान श्रेष्ठ आहे आणि ध्यानापेक्षाही सर्व कर्मांच्या फळांचा त्याग (केवळ भगवदर्थ कर्मे करणाऱ्या पुरुषाचे भगवंतावर प्रेम व श्रध्दा ही असतातच. तसेच त्याचे भगवत् चिंतनही चालू असते म्हणून ध्यानाहून 'कर्मफलत्याग' श्रेष्ठ म्हटला जातो.) श्रेष्ठ आहे कारण त्यागाने ताबडतोब परम शांती मिळते.

***प्रयत्नें लाभतें ज्ञान पुढें तन्मयता घडे ।***
***मग पूर्ण फल-त्याग शीघ्र जो शांति देतसे ॥***

विषय: या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) फलत्यागाच्या अभ्यासापेक्षा फलत्यागाचे ज्ञान होणे श्रेयस्कर आहे 2) फलत्यागाच्या ज्ञानाहून फलत्यागाचे

ध्यान श्रेष्ठ आहे 3) फलत्यागाच्या ध्यानापेक्षा पूर्णपणे साधता आली तर कर्मत्याग अजून श्रेष्ठ आहे 4) यातून लगेचच शांती लाभते प्राप्त होते.

**स्पष्टीकरण**

1) **हि अभ्यासात् ज्ञानं श्रेय:** कारण की फलत्यागाच्या अभ्यासाहून फलत्यागाचे ज्ञान उत्तम आहे. या श्लोकाविषयी विद्वानांमध्ये बरेच मतभेद आहेत. आता केलेला अर्थ विनोबांच्या मतानुसार आहे. मागील तीन श्लोकांनी या श्लोकाचे अनुसंधान राखले जाते पण मागील श्लोकाशी अनुसंधान जोडले तर अर्थ योग्यरित्या लावता येत नाही कारण की नवव्या श्लोकात 'अभ्यास' हा शब्द असल्यावरही दहाव्या श्लोकात 'ज्ञान' वा अकराव्या श्लोकात 'ध्यान ' असा अर्थ घेता यावा असा कुठलाही शब्द तिथे नाहीच. या श्लोकात अभ्यासापेक्षा ज्ञानाला व ज्ञानापेक्षा ध्यानाला श्रेष्ठ मानले गेले आहे आणि ध्यानापेक्षा कर्मफलत्यागाला मोठे मानले गेले आहे. या श्लोकात अभ्यास आणि कर्मफलत्यागाचा उल्लेख आहे पण मागील तीन श्लोकात ज्ञान व ध्यानाचा उल्लेख कुठेही नाही वा या बाराव्या अध्यायातील आतापर्यंतच्या कुठल्याही श्लोकात नसल्यामुळे मागील श्लोकाशी अनुसंधान करुन अर्थ लावता येत नाही. अकराव्या श्लोकात सर्वसुलभ उपाय म्हणून कर्मफलत्याग वर्णिला गेला आहे. त्या कर्मफलत्याग शब्दाशी अनुसंधान राखत विनोबाजींनी केलेला अर्थच सयुक्तिक वाटतो. गांधीजींनीही या श्लोकाचा अर्थ विनोबाजींनी केलेल्या अर्थानुसार केलेला नाही. विनोबाजींचे म्हणणे असे आहे की अकराव्या श्लोकात कर्मफलत्यागाचा सुलभ उपाय सांगितला गेला आहे त्या अनुसंधानात भगवंतांनी पहिली गोष्ट अशी सांगितली आहे की आपण फलत्यागाचा अभ्यास सुरु केला आणि त्यातून जर फलत्यागाचे ज्ञान वा आकलन झाले नाही तर तो फलत्यागाचा अभ्यास यशस्वी झाला असे काही नाही मानता येणार. फलत्यागाचे हे ज्ञान फलत्यागाच्या अभ्यासाहून श्रेष्ठ आहे.

2) **ज्ञानात् ध्यानं विशिष्यते:** फलत्यागाच्या ज्ञानाहून फलत्यागाचे ध्यान श्रेष्ठ आहे. आपल्याला एखाद्या विषयाचे ज्ञान झाले, आकलन झाले ग्रहण करता आले पण त्या ज्ञानाच्या ठायी आपण जर तन्मय होऊ शकलो नाही तर त्या ज्ञानाचा खूप कमी उपयोग होतो. संगीताचा अभ्यास करता-करता संगीताचे ज्ञान तर झाले पण संगीतात तन्मय जर होता आले नाही तर संगीताचा विशेष उपयोग नाही. तन्मयतेतच संपूर्ण शक्ती सामावलेली आहे. तन्मयतेमुळेच त्या विषयात आवड टिकून रहाते.

कित्येक लोक एखाद्या विषयाचे ज्ञान संपादित करुन येतात आणि त्यात तन्मयही होऊन जातात पण आपले हे ज्ञान दुसऱ्याला देण्याची प्रेरणा त्याना होत नाही. ते आपल्या ज्ञानाला वृध्दींगत करण्याचाच प्रयत्न करतात आणि याच्याच काळजीत असतात. ही मोठी उणीव आहे. आपण प्राप्त केलेले ज्ञान इतरांना देण्यात जर आनंद मिळत नसेल तर जीवनात परोपकारवृत्तीचा उत्कर्ष होऊ शकत नाही. जो नित्य धन मिळवण्याची आणि त्यात वाढ करत रहाण्याची काळजी वहातो त्याचे धन कमविणे व्यर्थ आणि समाजासाठी हानिकारक मानले गेले पाहिजे.

3) **ध्यानात् कर्मफलत्याग:** कर्मफलत्यागाचे ध्यान धरण्याऐवजी कर्मफलत्याग संपूर्णपणे साधता आला तर ते श्रेष्ठ होय. ज्ञानापेक्षा ध्यान साधता आले तर ते श्रेष्ठ होय. कर्मफलत्यागात तन्मय भाव जागला तर तो त्याग पूर्णपणे साधला जाईल आणि जीवनात कर्मफलत्याग सहजच होऊन जाईल पण हे ईश्वरभक्ती वा ईश्वरश्रध्देशिवाय शक्य नाही. कर्म करणारी प्रत्येक व्यक्ती परिणामाची अपेक्षा बाळगतेच. त्याची आसक्ती न राखण्यासाठी कर्मफलत्याग शब्दाचा प्रयोग केला जातो. कर्मफल प्राप्त करायच्या प्रयत्नात असताना मनात त्याविषयी आसक्ती न बाळगणे, त्याच्या परिणामांची अपेक्षा न राखणे, परिणामाविषयी तटस्थ वृत्ती राखणे हे सारे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत विवेकाने, ईश्वरश्रध्देशिवायही होऊ शकते पण ईश्वर श्रध्दा वा ईश्वर भक्तीशिवाय फलासक्ती म्हणजे त्यागाची परिपूर्णता साधता येणे म्हणजे संपूर्णपणे फलासक्ती साधता येणे मात्र अशक्य वाटते. होय, या प्रकारे काही प्रमाणात कर्मफलत्यागाचा अभ्यास साधता येऊ शकतो. त्यात तन्मयताही साधता येऊ शकते. अशा प्रकारे कर्मफलत्यागाच्या अभ्यास आणि तन्मयतेने काही अंशी कर्मफलासक्तीचा त्याग होऊ शकतो पण कर्मफलासक्तीचा संपूर्णपणे त्याग करायचा असेल म्हणजे पूर्णपणे अहंशून्य व्हायचे असेल, अहंला पूर्णपणे शून्य करायचे असेल तर ईश्वर भक्तीची कास धरावीच लागेल पण अशाप्रकारे फलत्यागाच्या अभ्यासातून फलत्यागाची

तन्मयता साधल्यावर भक्तीचा उदय होऊ शकतो. फलत्यागात तन्मयता साधता आली तर ईश्वरविषयक श्रध्दा वा भक्ती उत्पन्न होऊ शकते आणि भक्तीमुळे पूर्ण फलत्याग प्राप्त होऊ शकतो ही प्रक्रिया आहे.

या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की मागे तर भक्तीलाही कर्मफलत्यागाच्या कसोटीवर कसावे लागते असे म्हटले आहे आणि आता भक्तीशिवाय पूर्णफलत्याग संभवत नाही असे सांगितले गेले आहे. या दोन्ही विधानांमध्ये विरोध आहे. खरे पाहू गेल्यास भक्तीसुध्दा सकाम व निष्काम अशी दोन प्रकारची आहे. सकाम भक्तीला फलत्यागाचा सिध्दांत लागू पडतो म्हणजे सगुण भक्तीला फलत्यागाच्या कसोटीवर कसावे लागते पण निष्काम भक्तीला कर्मफलत्याग लागू होत नाही. भक्तीच्या सोबत 'निष्काम' शब्द आला की या शब्दामुळेच फलत्याग सूचित होतो.

4) **त्यागात् अनंतरं शांति:** पूर्णपणे फलत्याग साधला गेला तर त्यातून लगेचच शांतता प्राप्त होते. संपूर्ण आयुष्य ईश्वराला समर्पित करुन जेव्हा आपण क्रिया करतो तेव्हा त्यात निष्कामता, अहंकार, काम, क्रोध विकार रहितता येऊनच जाते. शून्य बनून ईश्वराच्या आधारेच आपण जर जगू लागलो तर चित्तात आसक्ती उरुच शकत नाही, कर्ता भोक्तापणा मिटवण्यातच सारा पुरुषार्थ आहे, खरा पुरुषार्थ आहे. क्रियेचे कर्म बनले रे बनले की फळाचे भोक्तेही बनलोच म्हणून समजा. जिथे कर्माचे फळ ईश्वराला अर्पण करुन चालायला लागलो की फलासक्ती राहूच शकत नाही. जिथे फलासक्ती उरली नाही तिथे पूर्ण शांततेशिवाय दुसरा कुठला बरे अनुभव येऊ शकतो ? थोडक्यात असे की अहंशून्यताच पूर्णफलत्याग आणि पूर्णफलत्याग हीच पूर्ण शांती होय. अहंशून्य बनण्यात कुणाला भक्तीची गरज वाटत नसेल तर भक्तीशिवायही ती व्यक्ती अहंशून्य बनायचा अभ्यास अवश्य करु शकते पण प्राचीन संतांचा अनुभव हेच सांगतो की भक्तीचा आश्रय घेतल्याशिवाय कर्मफळाची आसक्ती सोडायचा प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता खूप क्षीण असते.

: 13 :

***अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र: करुण एव च।***
***निर्ममो निरहंकार: समदु:खसुख: क्षमी॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- सर्वभूतानां अद्वेष्टा: तमाम भूतमात्रांबद्दल मनात द्वेषभावना नाही
- मैत्र: सर्वांशी स्वार्थरहित मैत्री आहे
- च करुण: एव: आणि अकारण करुणासंपन्न आहे
- निर्मम: ममतारहित आहे
- निरहंकार: अहंकाररहित आहे
- समदु:खसुख: सुख-दु:खाला समान समजणारा आहे
- क्षमी: क्षमावान आहे म्हणजे अपराध करणाऱ्यालाही अभय देणारा आहे.

**अर्थ**

जो कोणत्याही प्राण्याचा द्वेष न करणारा, स्वार्थरहित, सर्वांवर प्रेम करणारा, अकारण दया दाखवणारा, माझेपणा आणि मी पणा नसलेला, सुखात व दु:खात समभाव असलेला आणि क्षमावान म्हणजे अपराध करणाऱ्यालाही अभय देणारा असतो.

***कोणाचा न करी द्वेष दया मैत्री वसे मनीं।***
***मी माझें न म्हणे सोशी सुख-दु:खें क्षमा-बळें॥***

**विषय:** 1) या श्लोकापासून भक्ताच्या सकाम वर्णनाला सुरुवात होत आहे. इथे भक्ताची सात लक्षणे सांगितली गेली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वभूतानां अद्वेष्टा तमाम भूतमात्रांप्रती:** प्राणीमात्रांप्रती ज्याच्या मनी द्वेष नसतो. भेदाला सत्य मानल्यामुळे सदा द्वेष उद्भवतो. अभेद म्हणजे अद्वैतच तर सत्य वाटू लागले, निसर्गाच्या तमाम जड-चेतन पदार्थांच्या ठायी ईश्वरच व्याप्त आहे अशी परमात्मदृष्टी जर व्यवहारात राहिली तर मनात कुणाही प्राण्याबद्दल द्वेषभाव उरणार नाही. ममत्वामुळे कुटुंबात प्रेमभावनेचा मोठा उत्कर्ष असतो. यामुळे भाऊ-भाऊ, भाऊ-बहिण, पिता-पुत्र, पती-पत्नी यांच्या संबंधात साधारणपणे

द्वेषभाव नसतो पण व्यावहारिक संबंध कलुषित झाले तर द्वेष उद्भवतो. द्वेष उत्पन्न होण्याची अनेक कारणे असतात. अद्वैतभावनेशिवाय वा ईश्वरात्मक दृष्टीशिवाय द्वेषाची पाळेमूळे निखंदली जात नाहीत. परमात्म दृष्टीमुळेच द्वेष नष्ट होतो. संत तुलसीदासजी म्हणतात :

*उमा जे रामचरनरत, बिगत काम मद क्रोध।*
*निज प्रभुमय देखहिं जगत, केहिसन करहिं विरोध॥*

अर्थात् हे पार्वती, जे रामरायाच्या चरणी तल्लीन होऊन गेले आहेत, ज्यांचे मद, काम, क्रोध वगैरे विकार नष्ट झाले आहेत आणि जे जगतातल्या प्राणिमात्रांना प्रभुमय म्हणजे परमात्मामय स्वरुपात बघतात ते कुणाचा विरोध, कुणाचा द्वेष वा तिरस्कार करतील ?

2) **मैत्र:** जो सर्वांचा मित्र आहे, 'द्वेष करत नाही', हे निषेधात्मक लक्षण असून मैत्रभाव हे विधायक लक्षण आहे. द्वेष न करायचा अर्थच मैत्र भाव जोपासणे आहे. तुकाराम महाराज म्हणतात 'चित्त शुध्द तरी शत्रु मित्र होती' चित्त शुध्द झाल्यावर शत्रु मित्र होतात. गांधीजी अजातशत्रु होते. कुणी विरोधक त्यांच्या समोर जाऊन उभा रहायचा तर त्याचा विरोध आपोआप गळून पडायचा. आजकाल विभिन्न राष्ट्रांमध्ये युध्दाची तुतारी वाजते. जर प्रत्येक राष्ट्राच्या ठायी मित्रत्वाच्या भावनेचा विकास झाला तर कुणीच कुणाचा शत्रु नसणार मग युध्दाची वेळच येणार नाही. जगभरातील राष्ट्रांनी परस्पर मैत्र जोपासावे यासाठी गांधीजींनी खूप प्रयत्न केलेत. भक्ताचा तर स्वभावच मित्रत्वाचा असतो. त्याच्या मैत्री भावनेमुळे द्वेष कमी होण्याकामी खूप मदत होते.

3) **च करुण:** एव तो करुणेने दयेने भरलेला असतो. मैत्री निष्क्रिय नसते. मैत्रीचे रुपांतरण करुणेत, दयाभावनेत परिणत व्हायला हवे. भक्ताच्या ठायी ते दिसून येते. दुसऱ्यांची दु:खे वा त्रास बघून ज्यांचे चित्त खूप द्रवित होते ते धन्य होत. त्यांच्यापाशी करुणा असते. साम्यवादाचा जन्मही करुणेतूनच झाला तरी त्यातला महादोष असा आहे की तो हिंसेवर उभा ठाकला आहे. आज हिंदुस्तानात समतेची स्थापना झालेली नाही. करुणावृत्तीच्या विकासाच्या सोबतच करुणा स्थापित होण्याची शक्यता असते. भक्ताचे हृदय करुणेने भरले गेलेले असल्यामुळे त्यापासून समाजाला करुणेची प्रेरणा लाभते. विनोबाही करुणाप्रेरित होऊनच चौदा वर्षे भारतभर हिंडत राहिलेत.

4) **निर्मम:** जे ममतारहित आहेत. देहभावना नष्ट झाल्यावर ममत्व उरत नाही. दुसऱ्या अध्यायातील 71 व्या श्लोकात 'निर्मम:' चे लक्षण सांगितले गेले आहे. ममताच दु:खाला कारणीभूत आहे. ममतेची सुरुवात कुटुंबात होते. अनेकांची ममता म्हणजे आत्मीयता आपलेपणा कुटुंबापुरताच मर्यादित स्वरुपाचा असतो. लोकसेवेच्या दृष्टीने काही मंडळी कुटुंबाच्या कक्षेतून बाहेर पडतात पण मग त्यांची ममता संस्थेवर रहायला लागते. ते जर कुण्या संस्थेत असतील तर अन्य ज्या क्षेत्रात सेवाकार्य सुरु केले असेल तिथे व्हायला लागते. अशा प्रकारे अधिकांश लोकांच्या ठायी मर्यादित स्वरुपाची ममता आढळते, भक्तामध्ये ती नसते.

5) **निरहंकार:** जे निरहंकारी असतात. इथे समता नसण्याचे कारण सांगताहेत. अहंकार म्हणजे देहाशी जो आपलेपणा आहे  जी आत्मीयता आहे त्यामुळे ममता उत्पन्न होते. देहाशी असलेला आपलेपणाचा संबंध ('मी देह आहे' वगैरे अहंकार) जर निघून जाईल तर ममता निघून जाईल. देहाला साधनरुप मानून आणि त्याविषयी आपले कर्तव्य आहे असे समजून जर चालत राहिलो तर भक्ताच्या ठायी अहंकार आणि ममता उरुच शकणार नाही.

6) **समदु:खसुख:** जो सुख-दु:खात समबुध्दी राखतो. अहंकार आणि ममत्व निघून गेले तर तिथे सुख-दु:खात समानता येऊनच जाते. मी आहे म्हणून मला सुख हवे आणि दु:ख नको पण जिथे 'मी' पणा ईश्वरात विलीन करुन देतात तिथे परमात्मसुखाचा अखंड अनुभव लाभत असल्यामुळे बाह्य सुखाची इच्छा उरत नाही आणि परमात्म सुखात दु:खाचा कदापि अनुभव येण्याची शक्यता नसल्यामुळे स्वाभाविकरित्याच सुख-दु:खाविषयीचा समता भाव मनावर बिंबतो. बाह्य सुखाची इच्छा शमली, दु:ख टळले आणि उरले ते परमात्म सुख. हा भक्तीचा महिमा आहे.

7) **क्षमी:** जो क्षमावान आहे. सर्वांच्या बाबतीत क्षमाभाव दर्शवतो. एक संस्कृत वचन आहे. क्षमा वीरस्य भूषणम् क्षमा वीर पुरुषाचे भूषण आहे. क्षमेचा अर्थ समजावून सांगताना शंकराचार्य म्हणतात:

अन्तर्विक्रियानुपपत्तिः मनात कुठल्याही प्रकारचा विकार उत्पन्न न होणे म्हणजे क्षमा होय. मनात राग आला, दाबून ठेवला, मुखातून कठोर वचन नाही बोललोत ही झाली अक्रोधाची भूमिका. याला क्षमा नाही म्हणता येत. अंतरंगात क्रोध, काम इत्यादी विकारांची उत्पत्ती न होण्याची स्थिती क्षमा आहे. आरंभीची भूमिका अक्रोधाची झाली, दुसरी त्यानंतर क्षमेची भूमिका प्राप्त होते. अधिकांश लोकांना अक्रोध भूमिका प्राप्त करुन घेणेही अवघड जाते. विकारांच्या प्रचंड वेगाला थोपवून धरणे अवघड ठरते. मनात राग उपजला आणि ताबडतोब खून केला, अशा घटना घडत रहातात. क्रोधाच्या आवेशात रागाच्या भरात लोक अनुचित कामे करतात. अनुचित कामे त्यांच्या हातून घडून जातात पण रागाचा आवेग शमल्यावर मात्र पश्चात्ताप होतो. यामुळे विनोबाजी म्हणतात की मनात राग उसळून आल्यावर लगेचच कुठलीही बाह्य क्रिया न घडो मुखाने कठोर वचने बोलू नये, थप्पड लगावू नये वा काही उगारु नये. राग उसळल्यावर आपण कुठलीही बाह्य क्रिया करु नये, असा सराव करायला हवा. क्रोधाचा वेग ओसरल्यावरच जे काही करायचे असेल ते करावे.

खरे म्हणजे राग आला की विवेक उरत नाही. मनात जागृती शिल्लक राहत नाही. यामुळे क्रोधाच्या आवेगात बाह्य क्रिया घडूनच जातात. आपल्या हातून काही चूक झाली, गुन्हा घडला तर आपण स्वतःला क्षमा करतो. यामुळे आपल्याला क्षमा करायचा सराव नाही, असे काही नाही तरीसुध्दा दुसऱ्याकडून काही चूक घडली तर सहन होत नाही. आपल्या हातून एखादा मोठा गुन्हा घडला तरी आपण आपले स्वतःला क्षमा करतो पण इतरांची छोटीशी चूकही सहन करु शकत नाही. खरे तर आपली स्वतःची छोटीशी चूकही आपल्याला सहन व्हायला नको आणि दुसऱ्यांची मोठी चूकही सहन व्हायला हवी पण असे होत नाही. आपण जर या वृत्तीचा उत्कर्ष साधला तर क्षमा वृत्तीचा सराव होतो आणि क्षमा वृत्ती स्थिरावते.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानोबा लिहितात की ज्याप्रमाणे चैतन्याच्या ठायी आप-पर भाव नसतो त्याचप्रमाणे कुणाबद्दल द्वेषभावना नसते. पृथ्वी जशी हे जाणत नाही की उत्तम पुरुषाला धारण करावे आणि अधम पुरुषाला धारण करु नये तसेच देहधारी प्राण असा विचार कदापि करत नाहीत की राजाच्या देहात राहून देहाचा व्यापार करावा पण दरिद्री माणसाच्या देहाचा त्याग करावा त्याच प्रमाणे एकत्वाचा बोध झाल्यावर म्हणजे ज्ञान झाल्यावर सर्व प्राणिमात्रांशी त्याची मैत्री होते. करुणेची तर ती जननी आहे. 'मी-तू' पणाची भाषा तर तो जाणतच नाही. 'हे माझे' असे तर तो कधी म्हणतच नाही. सुख-दुःखालाही तो जाणत नाही. त्याच्या ठायी क्षमा पृथ्वीप्रमाणे विशाल रुपात वसते. संतोषाला त्याने मांडीवर बसवले आहे, दत्तक घेतले आहे.

: 14 :

***संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।***
***मय्यर्पितमनोबुध्दिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सततं संतुष्टः** सदा लाभ असो वा हानी संतुष्ट आहे
- **योगीः** ध्यान योगयुक्त योगी आहे
- **यतात्माः** मन वगैरे इंद्रियांसहित शरीरही ताब्यात आहे
- **दृढनिश्चयः** माझ्या ठिकाणी दृढनिश्चय ठेवणारा आहे
- **मय्यर्पितमनोबुध्दिः** मन, बुध्दीला माझ्याठायी अर्पित केले आहे
- **यः मद्भक्तः** असा जो माझा भक्त आहे
- **सः मे प्रियः** तो मला प्रिय आहे.

**अर्थ**

जो योगी नेहमी संतुष्ट असतो, ज्याने शरीर, मन आणि इंद्रिये ताब्यात ठेवलेली असतात ज्याची माझ्यावर दृढ श्रध्दा असते, तो मन व बुध्दी मलाच अर्पण केलेला माझा भक्त मला प्रिय आहे.

***सदा संतुष्ट जो योगी संयमी दृढ निश्चयी ।***
***अर्पी मज मनो-बुध्दि भक्त तो आवडे मज ॥***

**विषयः** या श्लोकात सतत संयमी योग्याचे वर्णन आले आहे. ईश्वराच्या ठायी मन-मती अर्पण करणारा भक्त ईश्वराचा आवडता आहे.

**स्पष्टीकरण**

1) **सततं संतुष्टः** नित्य संतुष्ट असतो. चौथ्या अध्यायातल्या 22 व्या श्लोकात ज्ञानी पुरुषाचेही हेच लक्षण सांगितले गेले आहे. तिथे 'यद्दच्छालाभसंतुष्ट :' हा शब्द आला आहे. आपले चित्त क्षणा-क्षणाला असंतुष्ट होऊन जात असते. जोवर जगत सत्य वाटते तोवर मनाची ही स्थिती न्यूनाधिक म्हणजे कमी-अधिक प्रमाणात अशीच राहील. आपण जगाकडे कुठल्या नजरेने बघतो यावर हे अवलंबून रहाणार आहे. विवेकाच्या आधारे काही अंशी आपण मन स्थिर राखू शकतो. यामुळे विवेक शक्ती वाढवायचे प्रयत्न करायला हवेत पण ईश्वरी श्रध्देशिवाय खरी स्थिरता येत नाही. विषम प्रसंगातच खरी कसोटी लागते. त्यावेळी मनाला स्वस्थ राखणे अवघड होऊन बसते. भगवद्भक्त ईश्वर स्मरण करत ईश्वराधीन होऊन जातो आणि विषम प्रसंगी मन:स्वास्थ्य टिकवून ठेवतो. ईश्वरी श्रध्दा वा भक्तीशिवाय पूर्ण संतोष लाभू शकत नाही.

2) **योगी:** योगी हा समचित्त, निर्विकारी असतो. सामान्यपणे योगी व भक्ताला वेगवेगळे मानले जाते. दोघांमध्ये अंतर मानले जाते. योगी भक्त असेलच असे नाही पण भक्ताने योगी असलेच पाहिजे. या 'योग' शब्दाचा अर्थ समजून घ्यायला हवा. हा योग पतंजलीच्या समाधी प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेतला योग नव्हे यामुळे हा योगी म्हणजे समाधीप्राप्त योगी नव्हे. गीतेत 'योग' शब्द चित्ताची समता वा निर्विकारता या अर्थानेच प्रयुक्त झाला आहे. दुसऱ्या अध्यायातील 48 व्या श्लोकात 'समत्वं योग उच्यते' निर्विकार भावनेत काम, क्रोध रहितता आणि फलासक्तीचा त्याग या दोन्ही बाबी समाविष्ट आहेत. काही अंशी विवेकपूर्वक निर्विकार बनण्याचा अभ्यास साधता आला तरी पूर्ण ईश्वर-भक्तीशिवाय संपूर्ण निर्विकार भाव प्राप्त करुन घेणे अशक्य आहे. विवेकाच्या अभ्यासामुळे व्यक्ती काही अंशी चित्ताची समता वा निर्विकार भाव प्राप्त करुन घेऊ शकते त्याच विवेकाच्या बळावर अखेरीस ईशश्रध्दाही उत्पन्न होऊ शकते. ईश्वर भक्तीविना पूर्ण निर्विकारता पूर्ण समतेची कल्पना करता येत नाही.

3) **यतात्मा** : मन वगैरे सर्व इंद्रिये ताब्यात आहेत. इथे 'आत्मा' शब्द इंद्रियांच्या अर्थाने प्रयुक्त केला गेला आहे. तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकात 'आत्मविनिग्रह:' शब्द आला. इथे 'आत्म' शब्दाचा अर्थ इंद्रिय असा आहे. साधारणपणे लोकांच्या मनात ही कल्पना ठाण मांडून बसली की भगवंताचा भक्त हवा तसा राहू शकतो. त्याला संयम पाळायचीही गरज नाही. भक्ताला काही दोष लागत नाहीत. जो भक्त नाही त्याने संयम पाळायला हवा, त्याला संयम पालनाची गरज आहे. भक्त तर मुक्त आहे पण ही कल्पना अगदी विसंगत आहे. ही कल्पना गीतेला मान्य नाही. गीतेच्या अनुसार भक्त सर्व इंद्रियांना वेसण घालतो, सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवतो. तो जसा योगी असतो तसाच पूर्ण इंद्रियनिग्रहीही असतो. तो संयमाशिवाय राहूच शकत नाही. इंद्रिय संयमाशिवाय भक्तीला काहीएक अर्थ उरत नाही.

4) **दृढनिश्चय:** जो दृढनिश्चयी असतो. सर्वसाधारण लोकात दृढनिश्चयाची उणीव असते. ईश्वराला साक्षी मानून आपण जर काही निश्चय केला तर तो कायम रहायला हवा. आपली एखाद्या संत वा सज्जनावर श्रध्दा असते त्याना साक्षी मानून आपण जर एखादा निश्चय केला तर तो चिरकाल टिकू शकतो. समाज, सज्जन, संत, महात्मा आणि परमात्मा याना मनात साक्षी राखून जर जीवन निर्वाह केला तर आपला निश्चय कायम, अटळ राहू शकण्याची अधिक शक्यता असते.

5) **मय्यर्पितमनोबुध्दि:** माझ्या ठायी मन बुध्दी अर्पण केली आहे. मन, बुध्दी यात सारी इंद्रिये सामावलेली आहेत. मन-बुध्दी आंतरिक इंद्रिय आहे तर. उरलेली दहा इंद्रिये बाह्य आहेत. सर्व ईश्वराला अर्पण करणे हे महद्भाग्य होय. नवव्या अध्यायात या समर्पणाची चर्चा आली आहे. समर्पण आले की अहंकार समाप्त झाला. गांधीजींना हे ईश्वर समर्पण मोठे वाटत होते. एका दृष्टीने विचार करु जाता हे सोपेही आहे म्हणा. याचे कारण असे की समर्पणात कुठल्याही वस्तु वा कर्माचा भार आपल्या शिरावर नसतो. शरीर इंद्रियांच्या ठायी जर चेतनस्वरुपी ईश्वर नसेल तर शरीर आणि इंद्रियांचा व्यापारच म्हणजे व्यवहारच होऊ शकणार नाही. सृष्टीचे संचलनही चेतनस्वरुपी ईश्वरच करत आहे. पिंड आणि ब्रह्मांडात चेतनस्वरुपी परमात्माच निवास करतो आणि त्याच्या बळावरच समस्त क्रिया, सारे व्यापार व्यवहार होत आहेत तर असे ज्ञान मनी राखून तदनुसार आचरण करणे, हे तर सत्यपालन झाले. आपण

जर असे करत नसू म्हणजे ईश्वराला सर्वार्पण करुन जर कर्मे आचरत नसू तर आपण असत्याचे पालन करतोहोत असेच जाणावे. गांधीजींच्या ठायी तीव्र सत्यनिष्ठा असल्यामुळे सत्यपालनाच्या दृष्टीने त्यानी परमेश्वरार्पण बुध्दीने व्यवहार करायचा जगायचा, वागायचा निश्चय केला आणि तदनुसार ते अखंडपणे चालत राहिलेत. भक्तसुध्दा सत्यनिष्ठ असल्यामुळे ईश्वरार्पण बुध्दीने सारे व्यवहार करणे, त्याचा सहज स्वभाव बनून जातो.

6) **यः मद्भक्तः स मे प्रियः** अशा लक्षणांनी सज्जित युक्त माझा भक्त मला प्रिय आहे. ईश्वरी प्रेरणेने मार्गक्रमण करणारा, ईश्वराला नेहमी प्रिय असतो कारण की तो ईश्वरी निकषांवर उत्तीर्ण झालेला असतो. ईश्वराने माया निर्माण करुन इतक्या सुंदर सृष्टीची रचना केली की तिचा सदा मोह उपजावा. एकीकडे सुंदर-सुंदर पदार्थ निर्मिलेत तर दुसरीकडे त्या पदार्थांचा भोग घेण्यासाठी शरीर, इंद्रिये वगैरे साधने तयार केलीत. दोघांमध्ये इतके जबरदस्त आकर्षण राखले की प्रत्येक व्यक्ती त्यात गुंतून पडावा, कधी मुक्त होऊ न शकावा पण ईश्वरही शरीरात प्रकट आहेत यामुळे त्यांच्या मायापाशातून बाहेर पडण्याची प्रेरणा सतत मिळत राहावी, अशी रचना आहे. हवा तेवढा विषय भोगला तरी संपूर्णपणे समाधान लाभत नाही याचे कारण असे की शरीरात परमात्मा वसला आहे. ते आपल्याला मायेच्या प्रभावातून बाहेर पडण्याची प्रेरणा देत रहातात पण आपण त्या प्रेरणेनुसार चालत नाहीत. सृष्टीचे तमाम पदार्थ सत्यरुप नाहीहेत. एकमेव ईश्वरच काय तो एकमात्र सत्य आहे. असत्य वस्तुने कुणाला समाधान लाभायची सुतराम शक्यता नाही. अखेर ईश्वराकडे वळायची प्रेरणा मिळून जाते. यामुळे ईश्वरी प्रेरणेच्या आधारे म्हणजे सत्याच्या प्रेरणेच्या आधारे जीवन निर्वाह करणारे जे भक्त असतील ते नि:संशयपणे परमात्मप्रिय असतीलच.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानोबांनी लिहिले आहे की पावसाळी पाण्याशिवायही समुद्र पूर्णपणे भरलेला असतो. त्याचप्रमाणे जो कुठल्याही बाह्य साधनांशिवाय संपूर्णपणे संतुष्ट असतो. जो आपल्या मनाला प्रतिज्ञापूर्वक काबूत राखतो आणि या स्वातंत्र्यामुळे त्याचे निश्चय सत्यरुप होऊन जातात. जीवात्मा आणि परमात्मा दोघेही ऐक्याच्या आसनावर विराजमान असतात. अशा प्रकारे ईश्वराशी एक होऊन ज्याने मन-बुध्दी अर्पण केली तोच भक्त आहे, तोच योगी आहे आणि तोच मुक्त आहे.

: 15 :

***यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।***
***हर्षामर्ष भयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यस्मात्:** ज्यामुळे, ज्याच्या पासून
- **लोक:** न उद्विजते: लोक कधी उद्विग्न होत नाहीत
- **च यः लोकात्:** आणि जो लोकांमुळे म्हणजे कोणत्याही जीवामुळे
- **न उद्विजते:** (जो ) उद्विग्न होत नाही
- **च य:** आणि जो भक्त
- **हर्षामर्षभयोद्वेगैः** मुक्तः हर्ष, क्रोध, भय आणि उद्वेगापासून मुक्त असतो
- **स: मे प्रिय:** तो माझा प्रिय आहे.

**अर्थ**

ज्याच्यापासून कोणत्याही प्राण्याला त्रास होत नाही तसेच ज्याला कोणत्याही प्राण्याचा उबग येत नाही, जो हर्ष, मत्सर, भय आणि उद्वेग इत्यादींपासून अलिप्त असतो, तो भक्त मला प्रिय आहे.

***जो न लोकांस कंटाळे ज्यास कंटाळती न ते ।***
***हर्ष शोक भय क्रोध नेणे तो आवडे मज ॥***

**विषय:** या श्लोकात भगवंताला प्रिय असणाऱ्या भक्ताचे वर्णन आले आहे. हा भक्त उद्विग्न होत नाही. या भक्ताला ना हर्ष ना क्रोध, ना भय ना उद्वेग. अशी याची अवस्था असते. याला ना लोक कंटाळत ना हा लोकांना कंटाळत. यात भक्ताची तीन लक्षणे सांगितलेली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **यस्मात् लोक:** न उद्विजते ज्या माझ्या भक्तांना कधीही लोक कंटाळत नाहीत, त्यांचा तिरस्कार करत नाहीत, कधी उद्विग्न होत नाहीत, उबगून जात नाहीत, ज्यांचा कधी कुणाला उबग येत नाही. भक्ताचे हे श्रेष्ठ लक्षण आहे. ही भक्ताची कसोटी आहे की त्याला कुणी

कधी कंटाळत नाही, कधी त्यांचा तिरस्कार करत नाहीत. याचे कारण दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे.

या श्लोकाच्या मराठी पद्यानुवादात गीताईत दुसरे लक्षण आधी घेतले आहे आणि पहिले लक्षण नंतर घेतले आहे. याचे कारण असे की या दोन्ही लक्षणात कार्याकारणभावसंबंध आहे. 'माझ्या भक्तांना लोक कंटाळत नाहीत' हा कार्यभाव आहे, हे कार्य आहे तर दुसरे लक्षण 'माझा भक्त कधी लोकांना कंटाळत नाही, तिरस्कार करत नाही' हा झाला कारणभाव, हे कारण आहे. आधी कारण येते मग कार्य येते. यामुळे विनोबाजींनी दुसरे लक्षण आधी घेतले. सर्वांप्रती ईश्वरभावनेने बघायची महान ( व्यापक ) दृष्टी असल्यामुळे भक्ताला कुणीही कंटाळणार नाही हे स्वाभाविकच आहे. जिथे द्वैत भाव असतो तिथेच भेदभावनेमुळे राग-द्वेष वगैरे भाव उत्पन्न होतात. आपण जर सृष्टीशी योग्य व्यवहार केला नाही तर सृष्टीने आपल्याशी योग्य व्यवहार का करावा ?

2) **च यः लोकात् न उद्विजतेः** आणि जो भक्त अन्य लोकांना इतर प्राण्यांना कंटाळत नाही. हे दुसरे लक्षण पहिल्या लक्षणाचे कारण आहे. 'आप भला तो जग भला' ही म्हण प्रसिध्दच आहे.

परमात्मदृष्टीसंपन्न असल्यामुळे भक्त जगताला सत्य मानत नाही, तो सर्वांशी परमात्मदृष्टीने म्हणजे अभेददृष्टीने व्यवहार करतो. या व्यवहाराचा परिणाम असा होतो की भक्ताला कधी कुणाप्रती राग, द्वेष वा तिरस्काराची भावना जागत नाही, परिणामी सर्व जनांच्या मनातही भक्ताबद्दल कधी तिरस्कार वा राग-द्वेष उत्पन्न होत नाही.

3) **हर्षामर्षभयोद्वेगैः मुक्तः सः मे प्रियः** हर्ष, क्रोध, भय आणि उद्वेगापासून मुक्त असलेला भक्त माझा आवडता आहे -- मला प्रिय आहे. हर्ष म्हणजे आनंद. प्रिय वस्तु प्राप्त झाली वा तिच्या सहवासात रहायला मिळाले की आनंद वाटतो पण आनंदाच्या अभावी अमर्ष म्हणजे क्रोध वृत्ती उपजते. त्यामुळे उद्वेग म्हणजे दुःख उत्पन्न होते. अनुकूलतेमुळे हर्ष म्हणजे आनंद होतो तर प्रतिकुलतेमुळे अमर्ष म्हणजे क्रोध म्हणजे दुःख आणि भय उपजते. दुसऱ्या अध्यायातील 56 व्या श्लोकात स्थितप्रज्ञ पुरुषासाठी 'वीतराग भय क्रोधः' हे आलेले लक्षण याच प्रकारचे आहे.

या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानोबा म्हणतात "समुद्राच्या गर्जनांचे भय सागरी प्राण्यांना कदापि वाटत नाही त्याचप्रमाणे समुद्रही जळचरांना कधी कंटाळत नाही. अगदी तशाच प्रकारे या उन्मत्त जगामुळे भक्ताला कधी खेद वाटत नाही आणि या भक्तामुळेही लोकांना कधी त्रास वा दुःख वाटत नाही. एवढेच नव्हे तर शरीर जसे आपल्या अवयवांना कंटाळत नाही त्याचप्रमाणे आत्मैक्य भावनेने तो कधी जीवात्म्यांना कंटाळत नाही. जगत त्याच्यासाठी आपले शरीरच बनून जाते. यामुळेच त्याच्या मनातून प्रिय-अप्रिय भाव नष्ट होऊन जातात. मनात द्वैत म्हणजे भेदभाव नसल्यामुळे हर्ष म्हणजे आनंद व अमर्ष म्हणजे शोक, दुःख दूर होऊन जातात." या लक्षणांनी युक्त भक्त ईश्श्वराला प्रिय असतो असे भगवान सांगत आहेत.

: 16 :

*अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।*
*सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनपेक्षः** जो अपेक्षारहित म्हणजे आकांक्षारहित आहे
- **शुचिः** जो अंतर्बाह्य शुध्द आहे
- **दक्षः** जो कार्यात दक्ष आहे, जागृत आणि चतुर आहे अर्थात् ज्या कामासाठी आला होता ते ते पूर्ण करुन चुकला आहे असा
- **उदासीनः** जो तटस्थ, पक्षपातरहित, अलिप्त आहे
- **गतव्यथः** जो सर्व व्यथांपासून म्हणजे दुःखांपासून मुक्त आहे
- **सर्वारंभपरित्यागीः** ज्याने सारे आरंभ सोडून दिले आहेत
- **यः मद्भक्तः सः मे प्रियः** असा माझा भक्त माझा आवडता आहे, मला प्रिय आहे.

**अर्थ**

ज्याला कशाची अपेक्षा नाही, जो अंतर्बाह्य शुध्द, चतुर, तटस्थ आणि दुःखमुक्त आहे. जो सर्व आरंभांचा त्यागी आहे (मन, वाणी आणि शरीर यांच्याद्वारे प्रारब्धाने

होणाऱ्या सर्व स्वाभाविक कर्मांच्या कर्तेपणाचा अभिमान सोडणारा) असा कर्तृत्वाचा अभिमान न बाळगणारा माझा भक्त मला प्रिय आहे.

***नेणे व्यथा उदासीन दक्ष निर्मळ नि:स्पृह ।***
***सोडी आरंभ जो सारे भक्त तो आवडे मज ॥***

**विषय:** या श्लोकात भगवंताने आपल्याला प्रिय असलेल्या भक्ताचे वर्णन केले आहे. यात ते म्हणतात की माझा भक्त कुठल्याही प्रकारची अपेक्षा मनात राखत नाही. या भक्ताचे हृदय शुध्द असते. याचे बाह्य रुपही शुध्द असते. हा भक्त जसा जागृत असतो तसाच तटस्थही असतो. हा अलिप्त असतो तसेच दक्षही असतो. हा सर्व व्यथांपासून मुक्त आहे. या भक्ताने सारे आरंभ सोडून दिलेले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अनपेक्ष:** जो कुणाकडून कुठली अपेक्षा बाळगत नाही. प्रत्येक जण आपल्या आणि दुसऱ्यांकडून काही-ना-काही अपेक्षा बाळगून असतो. स्वत:पासून जेवढ्या अपेक्षा राखतो त्यापैक्षा कैक पटींनी अधिक अपेक्षा तो दुसऱ्यांकडून राखतो. यामुळे दु:खही अधिक होते. दुसऱ्यांकडून अपेक्षा राखल्यावर त्या अपेक्षांची पूर्तता करणे काही आपल्या ताब्यात रहात नाही अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तर लगेचच त्यापासून दु:ख उद्भवते. त्याला आपण टाळू शकत नाही. येशु ख्रिस्त म्हणाले होते Blessed are they who expect nothing. अर्थात् जे कुठल्याही प्रकारची अपेक्षा बाळगत नाहीत ते धन्य होत. ज्ञानेश्वर महाराजही लिहितात की 'जयाच्या ठायीं पांडवा। अपेक्षे नाहीं रिगावा। सुखासि चढावा। जयाचें असणें॥' म्हणजे ज्याच्या ठायी अपेक्षा प्रवेशच करत नाही त्या पुरुषाचे सुख दिवसेंदिवस वाढत रहाते. अपेक्षा एक प्रकारचे भूतच आहे. हे भूत ज्याच्या पाठीमागे लागते त्याच्या दु:खाला कुठलाही पारावार उरत नाही. असे समजा की आपण स्वत:पासून वा कुणाकडून काही अपेक्षा राखतो आणि त्या अपेक्षा पूर्ण झाल्यात तरीही आपल्याला खूप आनंद व्हायला नको. त्या पूर्ण झाल्या नाहीत म्हणून आपल्याला दु:खही व्हायला नको म्हणजे अपेक्षा बाळगताना आपण सावधान राहिलो आणि अपेक्षांप्रती तटस्थ, अनासक्त राहिलोत तर ते दु:खदायी सिध्द होणार नाही.

2) **शुचि:** जो अंतर्बाह्य शुची म्हणजे शुध्द असतो. बाह्य स्वच्छतेचे भान आपल्या देशात खास करुन खेड्यांमध्ये खूप कमी आहे. वाटेल तिथे थुंकणे तर सर्वसामान्य गोष्ट आहे. खेड्यात जिकडे तिकडे मुख्य मार्गाच्या दुतर्फा लघवी आणि परसाकडेला जाणे काही विशेष नाही जणू. मल-मूत्राचे खत तयार करण्याची योजना करत असतील तर लघवी-संडासची योजनाही आखावी लागेल. शौचाला गेल्यावर मळावर माती लोटता यावी असे संडास बांधले जायला हवेत. शहरांमध्ये तर संडास आहेत पण खेड्यापाड्यात मात्र मुळीच सोय नाही. भक्त बाह्य स्वच्छतेची उपेक्षा करत नाही. भक्ताच्या ठायी योग्य-अयोग्य व्यवस्थेचा खूप सूक्ष्म विवेक असतो त्यामुळे विवेकाधीन होऊन तो बाह्य स्वच्छतेच्या नियमांचे यथायोग्य पालन करील. कित्येक लोकाना आपले कपडे पांढरे शुभ्र राखणे स्वच्छतेचा आदर्श पालन करणे वाटते. ही धारणा उचित नव्हे. बाहेरुन पांढरा न दिसताही कापड स्वच्छ असू शकते. काही लोक स्नान करताना काक स्नान करतात. घाई-घाईत पाणी शरीरावर ओतून स्नान आटोपतात हे काही स्नान नव्हे. शरीराला खरबरीत वस्त्राने घासून स्नान केल्यामुळे शरीर स्वच्छ होते. अशा प्रकारे भक्त बाह्य स्वच्छतेचे पालन करतो. त्याच प्रकारे आंतरिक स्वच्छता वा शुध्दी बाह्य स्वच्छतेहून खूप महत्वाची आहे. त्या अभावी बाह्य शुचितेला कुठलाही अर्थ नाही. यामुळे मनात निर्मळता असली तर त्यापासून मोक्ष मिळू शकतो. यामुळे आंतरिक शुध्दी संपादित करण्यासाठी परम पुरुषार्थ केला पाहिजे.

या लक्षणासाठी ज्ञानेश्वर महाराज मोठे मार्मिक उदाहरण देतात. ते म्हणतात की असे म्हटले जाते की काशीत जाऊन स्नान केले तर पातके धुतली जातात पण तिथे जाऊन मरावे लागते. असेही सांगितले जाते की हिमालयात गेल्यावरही पातके नष्ट होतात पण तिथे मरणाचे भय असते. गंगा नदी अत्यंत पवित्र मानली जाते पण तिथेही बुडून जायची भीती आहे पण भक्ताची मानसिक शुध्दी गंगा नदीप्रमाणे गहिरी असल्यावरही भक्ताच्या सहवासात बुडून जायचे भय नाही, मरणाचीही

भीती नसते. तिथे तर मरणाऐवजी मोक्षच प्राप्त होऊ शकतो.

भक्ताच्या ठायी इतकी आंतरिक शुध्दी असते की त्याच्या सहवासात येणाऱ्यांना त्याचा रंग लागल्याशिवाय रहात नाही.

3) **दक्ष:** कर्तव्य कर्मे करण्यात जागृत एवढेच नव्हे तर जीवनातल्या तमाम क्रियांबाबत जागरुक. दक्षता म्हणजे महाजागृती होय, महाजागरण होय. समाज जीवनात अशी कल्पना रुढ आहे की भक्त तर भगवद्भक्तीत बुडून गेलेला असतो. त्याला जिथे देहाची शुध्द नसते तिथे तो विविध क्रियांमध्ये दक्ष कसा काय राहू शकेल ? 'देहाते कोण सांभाळी?' अशी त्याची अवस्था असते मग कर्तव्य करण्याकामी दक्ष असण्याची तर बातच लांब. त्याला व्यवहारातलेही काही कळत नाही, तो तर केवळ भगवंताची भक्ती करणेच जाणतो. त्याला जर व्यवहारही कळायला लागला आणि तो दक्ष दिसू लागला तर लोक त्याला भक्त मानायला तयार होणार नाहीत. वस्तुत: हा चुकीचा समज आहे. ईश्वरासारख्या अतिसूक्ष्म तत्वाचे वस्तुचे ज्ञान होऊन जिथे भक्ती, प्रेम यासारखे गुण उत्पन्न झालेत तिथे व्यवहार करणे, व्यवहार ज्ञान असणे तर अगदी किरकोळ गोष्ट आहे पण लोकात आणि भक्तात एवढा फरक अवश्यमेव असतो की आसक्तीमुळे लोक राग-द्वेषयुक्त व्यवहार करत रहातात. यामुळे सुखी वा दु:खी होतात. त्यातच गुंतून पडतात पण भक्त अत्यंत जागृत असतो तो ईश्वराशी एकरुप होऊन त्याच्या प्रेरणामात्रेण चालत असल्यामुळे सात्विक व्यवहार राखतो अलिप्त रहातो. अलिप्ततापूर्वक व्यवहार कसा करावा हे भक्ताच्या व्यवहारावरुन ध्यानात येते. भक्ताकडून लोकाना शुध्द आणि अलिप्त व्यवहाराची नित्य प्रेरणा मिळत राहते. भक्त परमात्म भक्ती करण्यात दक्ष असतो म्हणजे जागृत असतो तसाच सात्विक व्यवहार आचरण्याबाबतही तो दक्ष, जागृत असतो. भक्तानेच व्यवहार केले नाहीत तर अलिप्त राहून परमात्मभक्तीयुक्त अंत:करणाने व्यवहार आणि कर्तव्यकर्मे कशी आचरावीत याचा वस्तुपाठ अज्ञानी जनांना कसा कळेल? अशा प्रकारे भक्ताची स्थिती दुहेरी असते.

4) **उदासीन:** उदासीन म्हणजे तटस्थ, अलिप्त होय. भक्त व्यवहारात दक्ष असतो या विधानाचा अर्थ भक्तदेखिल व्यवहारात सर्वसामान्य जनांप्रमाणे आसक्त असतो असा लावला जाण्याची शक्यता आहे. या शक्यतेचे निवारण करण्यासाठी दक्षनंतर लागलीच म्हटले उदासीन. शुध्द सात्विक व्यवहारात भक्त दक्ष असतो पण उदासीन म्हणजे तटस्थ, अलिप्त असतो. ज्ञानेश्वर महाराजांनी एके ठिकाणी लिहिले आहे:

***फळाचि हावे ऐसे कर्म करी आघवें।***
***मगन कीजेचि येणें भावे। उपेक्षी जो॥***

अर्थात् 'ज्ञानी भक्त जणु काही फलासक्ती मनात आहे अशा प्रकारे सर्व सात्विक कर्मे आचरत असतो पण कर्म केल्यावर मात्र जणू आपण काहीच केले नाही अशी भावना बाळगून मनात तटस्थ भाव जोपासतो.' चौदाव्या अध्यायात गुणातीत पुरुषाची लक्षणे वर्णिली आहेत. या अध्यायातल्या 23 व्या श्लोकात 'उदासीनवत् आसीन:' हे लक्षण सांगितले आहे. मग ते भक्त असोत वा त्रिगुणातीत, ज्ञानी असो वा स्थितप्रज्ञ चौघांच्या लक्षणात समानत्व नांदते कारण की चौघांना ईश्वराची ओळख, ईश्वराचा अनुभव येत असतो.

5) **गतव्यथ:** ज्याच्या तमाम व्यथा, दु:खे नष्ट होऊन गेल्या आहेत असा. भक्त शुध्द व्यवहार करतो, सात्विक कर्मे आचरतो. कर्तव्य कर्मांचे आचरण करताना दक्ष असतो आणि उदासीनही असतो. यामुळे तो दु:खमुक्त तर असतोच पण उदासीनही असतो. भक्ताच्या ठायी जर केवळ दक्षतेचाच गुण असला आणि तो जर उदासीन म्हणजे तटस्थ वा अलिप्त राहू शकला नाही तर तो कदापि दु:खमुक्त होऊ शकणार नाही. दक्ष असताना उदासीन आणि उदासीन असताना दक्ष म्हणजे दु:खमुक्त अशा प्रकारे ही तिन्ही लक्षणे परस्पर संबध्द आहेत. तिन्ही लक्षणे सोबत असतात. अज्ञानी लोक व्यवहारात खूप दक्ष असतात पण ते उदासीन नसतात. यामुळे त्याना दु:खमुक्तीचा अनुभव येत नाही.

या ठिकाणी असा एक प्रश्न उद्भवतो की उदासीन म्हणजे अलिप्त राहिल्यामुळेच जर दु:खमुक्त होता येत असेल तर व्यवहार करण्याची गरजच काय? केवळ उदासीन रहाणे पुरेसे नाही काय? कर्म निरपेक्ष उदासीनतेचे काही महत्व नाही काय ? याचे उत्तर हेच आहे की कर्मनिरपेक्ष सद्व्यवहार आणि निरपेक्ष उदासीनता

यात भ्रांती वा भ्रम उत्पन्न होण्याची खूप शक्यता आहे. आपण जेव्हा सद्‌व्यवहार करतो तेव्हा लोकांच्या संपर्कात येतो तेव्हा राग-द्वेष इत्यादी उद्भवतात आणि त्याना क्षीण करण्याचे आपले प्रयत्नही सुरु असतात. आपण एकांतात देवाची भक्ती करतो, ती साधली गेली तर अवश्य भक्ती होईल तरीही राग-द्वेष क्षीण झालेत असे काही सांगू शकत नाही कारण की एकांत सेवन करताना राग-द्वेष उपस्थित व्हायला संधीच मिळत नाही. थोड्या काळासाठी एकांत सेवन गरजेचे असू शकते पण अखंड एकांतात सत्कर्म निरपेक्ष व्यवहार, निरपेक्ष राहून भक्ती प्राप्त झाली आणि राग-द्वेष वगैरे भावांपासून मुक्त झालो हा चुकीचा विचार झाला. अहंकार वगैरे विकार आत्यंतिक क्षीण झाल्यावरच ईश्वराचा अनुभव येऊ शकतो आणि ईश्वरभक्ती साधू शकते. यामुळे साधक दशेत एकांत सेवन गरजेचे असले तरीही एकांत सेवनासोबत सत्कर्मे, सेवा, सद्‌व्यवहारही चालत राहिले पाहिजेत. दोघांचा आश्रय घेतल्याने साधनेत परिपूर्णता येते.

6) **सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः** ज्याने सर्व आरंभांचा त्याग केला आहे. या लक्षणांनी युक्त असा भक्त मला प्रिय आहे. ज्याने कर्माचा आरंभ करणे सोडून दिले आहे म्हणजे जो आपल्या वतीने कुठलाही आरंभ करत नाही. जो प्रवाहपतीत कर्मे आचरतो तो भक्त मला प्रिय आहे. गीतेचा प्रमुख सिध्दांत आहे 'फलत्याग' लत्यागाच्या सिध्दीसाठी सर्व प्रकारचा आरंभ सोडून द्यायला हवा. फलत्यागाच्या सिध्दांताला अमलात आणता यावे यासाठीच गीतेने प्रवाहपतीत कर्माची शिफारस केली आहे. आपण प्रवाहपतीत कर्मे आचरायचा प्रयत्न केला तर त्यात आपल्या इच्छेचा वा संकल्पाचा कुठलाही संबंध येत नाही. यामुळे ते कर्म अहंकाराला क्षीण करण्याकामी सहायक ठरते. ईश्वरप्रेरित प्रवाहपतीत कर्म सुरु केल्यावर ते कर्म परिपूर्ण रित्या व्हावे म्हणून संकल्प वगैरे करु शकतो पण सत्कर्मे आचरताना त्यांची निवड मात्र करता येत नाही. उदाहरणार्थ समाज माझ्याकडून विशिष्ट प्रकारची सेवा चाहतो. समाजाचे म्हणणे असे की आता तुला निधी संकलनासाठी निघायचे आहे पण मी म्हणेन की निधी गोळा करायचे काम मी करणार नाही, मला ते काम आवडत नाही. मला गोशाळेचे काम आवडते म्हणून मी तेच काम करीन. सत्कर्मे आचरताना आवड वा निवड सोडावी लागते, असे असतानाही जर मी आवडीच्या कामात गोडी बाळगीन आणि नावडते काम नाकारीन तर कर्मे आचरताना जी साम्यावस्था साधली जायला हवी, अनासक्ती उपजायला हवी ती होणार नाही. सत्कर्मे आचरताना आपण अमुक कर्माला आवडीचे मानले याचा अर्थ असा झाला की त्या कामाबद्दल आपल्या मनात आसक्ती राखली आणि कामांबद्दल तिरस्कार बाळगला. यामुळे असत् कर्मांचा त्याग करुन जेव्हा आपण सत्कर्मी रत व्हायचा प्रयत्न करु इच्छितो, सत्कर्मे आचरायचा निश्चय करतो त्यावेळी 'हे कर्म आवडीचे वा हे नावडीचे' असा भेदाभेद करु शकत नाही. भेदभाव करु शकत नाही.

: 17 :

***यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति।***
***शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यः न हृष्यतिः** जो कधी हर्षित होत नाही
- **न द्वेष्टिः** कोणाचाही द्वेष करत नाही
- **न शोचतिः** कशाचाही शोक करत नाही
- **न कांक्षतिः** कसलीच आकांक्षा बाळगत नाही
- **शुभाशुभपरित्यागीः** शुभ आणि अशुभ कर्मांचा त्याग करतो
- **यः भक्तिमानः** भक्तिवान आहे
- **सः मे प्रियः** तो माझा आवडता प्रिय आहे.

**अर्थ**

जो कधी हर्षयुक्त होत नाही, द्वेष करीत नाही, शोक करीत नाही, इच्छा करीत नाही, तसेच जो शुभ आणि अशुभ सर्व कर्मांचा त्याग करणारा आहे, तो भक्तीयुक्त पुरुष मला प्रिय आहे.

***न उल्लासे न संतापे न मागे न झुरे चि जो।***
***बरें वाईट सोडूनि भजे तो आवडे मज॥***

**विषयः** या श्लोकातूनही गीतेने भगवंताला प्रिय असलेल्या भक्ताची लक्षणे सांगितलेली आहेत. या भक्ताला ना हर्ष होत, ना याच्या मनात कुणाविषयी

द्वेष भावना जागत. याच्या मनात आकांक्षा नसतात यामुळे याला शोक उत्पन्न व्हायचे काही कारण नसते. हा अशुभ कर्मांचा त्याग करतो. हा शुभ कर्मांचाही त्याग करतो म्हणजे शुभ कर्मांमधली आसक्ती सोडून देतो. हा भक्तीमान आहे. हा देवाला आवडतो.

**स्पष्टीकरण**

1) **य: न हृष्यति न द्वेष्टि:** प्रिय वस्तु मिळाल्यावर जो हर्षित होत नाही आणि अप्रिय वस्तु लाभल्यावर द्वेष करत नाही. असेच लक्षण दुसऱ्या अध्यायातील 57 व्या श्लोकात आले आहे. 'शुभ अशुभ प्राप्त झाल्यावर जो समबुध्दी राखतो' प्रिय वस्तु मिळाली म्हणजे सहाजिकच स्वभावत:च मनात आनंदलहरी उत्पन्न होतात आणि अप्रिय वस्तु मिळाली म्हणजे स्वाभाविकपणेच तिरस्कार उपजतो. त्याला दूर लोटणे अवघड होऊन बसते. या गोष्टींपासून मन वर उठले तरच ही स्थिती येऊ शकेल. ही स्थिती ईश्वरभक्तीमुळे प्राप्त होऊ शकते कारण की त्यातून जो आनंद लाभ होतो त्या तुलनेने प्रिय वस्तु लाभल्याचा आनंद खूप कमी मोलाचा आहे. भक्ती आंतरिक वस्तु आहे तिचा संबंध बाह्य अनुकूलतेशी वा प्रतिकूलतेशी नाही. यामुळे भक्तीतून लाभणारा आनंद अखंड अनुभवाच्या स्वरुपाचा असतो. त्यात कदापि खंड पडत नाही. तो स्थायी स्वरुपाचा असतो. या उलट प्रिय वस्तुच्या प्राप्तीचा आनंद बाह्य वस्तुच्या अनुकूलतेवर अवलंबून असल्यामुळे स्थायी स्वरुपाचा असू राहू शकत नाही. जिथे संयोग आहे तिथे वियोगही आहेच आहे. आपल्या प्रिय वस्तुंमुळे आपण आनंद घ्यायला सुरुवात करतो न करतो तोच दु:खाच्या अनुभवासाठीही तयार रहावे लागेल कारण की प्रिय वस्तुचा वियोग झाल्यावर दु:ख होईलच. या द्वारे हे स्पष्ट होऊन जाते की अखंड आनंद वा शांतता मिळवायची असेल तर अनुकूल वस्तु प्राप्त झाल्यावर मिळणाऱ्या अनुभवावर तिलांजली सोडावी लागेल अन्यथा त्या अभावी उत्पन्न होणाऱ्या दु:खाला टाळता येणार नाही. यामुळे प्रिय वस्तु प्राप्त झाल्यावर ईश्वराचे भान जागले पाहिजे. प्रिय वस्तुचा वियोग झाल्यावर आणि अप्रिय वस्तु येऊन मिळाल्यावरही तिरस्काराऐवजी ईश्वराचेच स्मरण करुन शांततेचा अनुभव व्हायला हवा. ईश्वराचेच नाटक सुरु आहे हे एकदा ध्यानात आले ना तर मग भेदावर आधारित सुख-दु:खांना ईश्वराचे स्मरण करुन टाळू शकतो.

2) **न शोचति न कांक्षति:** प्रिय वस्तुचा वियोग झाल्यावर शोक करत नाही. अप्राप्त वस्तुची इच्छा करत नाही. प्रिय वस्तु प्राप्त झाल्यावर आनंद होतो आणि प्रिय वस्तुचा वियोग झाल्यावर शोक होतो. प्रिय वस्तुचा वियोग आणि अप्रिय वस्तुचा वियोग दोघांमध्ये अंतर आहे. मागील श्लोकात सांगितले गेले आहे की प्रिय वस्तु प्राप्त झाल्यावर भक्त हर्षित होत नाही आण अप्रिय वस्तु प्राप्त झाल्यावर द्वेष करत नाही. या श्लोकात सांगताहेत की प्रिय वस्तुचा वियोग झाल्यावर भक्त शोक करत नाही. जी वस्तु निघून गेल्यावर तिची कदापि आकांक्षा करत नाही. आपले धन नष्ट झाले तर आपल्याला दु:ख होते भक्त याद्वंद्वापासून मुक्त आहे.

3) **शुभाशुभपरित्यागी य: भक्तिमान् स: मे प्रिय:** शुभ-अशुभ कर्मांचा त्याग करणारा म्हणजे त्यांची आसक्ती सोडून देणारा भक्तीमान मला आवडतो. भक्त तमाम कर्मांचा त्याग करतो असे जर कुणी मानत असेल तर ते चुकीचे आहे. अशुभ कर्मांचा तर सहाजिकच त्याग करावा लागतो. अशुभ म्हणजे वाईट कर्मे होत. पाप कर्मे, तामसी-राजसी कर्मे वाईट कर्मे होत. वाईट कर्मांचे आचरण केल्यावर कदापि अनासक्ती वा अलिप्ततेचा अनुभव येणार नाही. ती सर्वथा सोडली पाहिजेत. त्यांचा समूळ त्याग केला पाहिजे पण आपण असत् कर्मांचा त्याग करुन जेव्हा सत्कर्मे सात्विक कर्मांचा स्वीकार केला आणि वैराग्य वगैरेची साधना करुन ईश्वर भक्ती प्राप्त करुन घेतली तर ते सत्कर्म कसे सुटू शकते ? कारण की भक्ती प्राप्त झाल्यावरही प्रारब्ध कर्माने देह शिल्लक उरतो माणूस जिवंत रहातो तर मग त्याची काही कर्मे तर असतीलच ना? तो भक्त स्वत:साठी नव्हे पण इतरांसाठी जिवंत असल्यामुळे त्याचे सेवाकार्य अखंड जारी असते. भक्त बनण्यापूर्वी सात्विक कर्मे, जन सेवा स्वाभाविक नसतात. भक्त बनल्यावर मात्र ती स्वाभाविक बनून जातात. यामुळे भक्त कदापि सात्विक कर्मे, जनसेवा आदी कामे सोडू शकत नाही पण अज्ञानी अवस्थेत असताना माणूस ज्याप्रकारे आसक्तीपूर्वक सत्कर्मे आचरतो तोच भक्त तीच कर्मे अनासक्तीपूर्वक करतो. यामुळे भगवंताने इथे संपूर्णपणे शुभ कर्मांचा त्याग करायला न सांगता शुभ

कर्मातली आसक्ती सोडायला आणि अशुभ कर्मांचा संपूर्णपणे त्याग करायला सांगितले आहे. हा या लक्षणाचा अर्थ आहे. मग अखेरीस भगवंत म्हणताहेत की असा भक्तीमान मला प्रिय आहे.

: 18 :

***समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः।***
***शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- शत्रौ च मित्रे समः शत्रु आणि मित्राशी जो समान व्यवहार करतो
- च मानापमानयोः समः आणि मान-अपमान ज्याच्यासाठी समान आहेत
- शीतोष्णसुखदुःखेषु समः शीत, ऊष्ण, सुख, दुःखात जो समान म्हणजे निर्विकार रहातो
- संगविवर्जितः जो कुठेच आसक्ती राखत नाही.

**अर्थ**

जो शत्रु-मित्र आणि मान-अपमान याविषयी समभाव बाळगतो तसेच थंडी-ऊन, सुख-दुःख इत्यादी द्वंद्वात ज्याची वृत्ती सारखीच असते ज्याला आसक्ती नसते.

***सम देखे सखे वैरी तसे मानापमान हि।***
***शीत उष्ण सुखें दुःखें करुनि सम मोकळा॥***

**विषयः** या श्लोकात आणखी काही लक्षणांची चर्चा आली आहे. भक्ताचा जगाशी व्यवहार सारखाच असतो. शत्रु असो वा मित्र असो, त्याला सारे सारखेच. याचे कारण असे की तो सर्वांच्या ठायी ईश्वराचे दर्शन करतो. त्याची भेदद्दृष्टी संपून गेलेली असते. त्याला मान व अपमान सारखेच वाटतात. सुख असो वा दुःख असो तो समान रहातो. निर्विकार रहातो. त्याच्या मनात कुठल्याही प्रकारची आसक्ती उरत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **समः शत्रौ च मित्रे च समः** जे मित्र असो वा शत्रु सर्वांशी समान व्यवहार करतात ते. गांधीजी समतेचे मोठे उपासक होते. मित्र आणि नातलगांशी समतेचा व्यवहार करण्यात काही मोठी गोष्ट नाही पण शत्रुशी समतेचा व्यवहार करणे मात्र अवघड आहे. गांधीजींचा एक कायमस्वरुपी पाठ असायचा की व्यक्ती आणि तिचे कार्य दोघांना वेगवेगळे पारखायला हवे. अकार्य करणाऱ्या व्यक्तीला आपण मान्यता देऊ नये. त्याच्याशी संपूर्णपणे असहकार करावा पण त्या व्यक्तीशी माणुसकीभरला व्यवहार करावा. त्याविषयी द्वेष भावना बाळगू नये वा त्याविषयी तिरस्काराची भावना मनात जागू देऊ नये. त्याला भोजनाची गरज असेल तर भोजन द्यावे. त्याच्याशी चर्चा करताना वा संबंध राखताना सज्जनपणाने वागावे. त्याच्याशी कमी संबंध ठेऊ शकतो. त्याला टाळू शकतो पण ज्या ज्या वेळी त्याच्याशी संबंध येईल त्या त्या वेळी प्रेमभरला व्यवहार करावा. तो जोवर अधर्म कार्य करत असेल तोवर त्याच्या सोबत काम करु नये. त्याची नोकरी सोडून द्यावी पण ज्या ज्या वेळी त्याच्याशी संबंध येईल ना त्या त्या वेळी प्रेमभरला व्यवहार करावा. अधर्म कार्याशी असहकार आणि तरीही प्रेमयुक्त व्यवहारामुळे त्याला असत् कार्याचा त्याग करायची प्रेरणा मिळू शकेल. त्या व्यक्तीचा जर द्वेष केला वा त्याची निंदा केली तर त्याला अकार्याचा त्याग करायची प्रेरणा लाभणार नाही.

2) **च मानापमानयोः समः** आणि मान आणि अपमानाला जो समान मानतो-समजतो. 'कुणी मान-सन्मान करत असेल तर चित्तावर त्याचा प्रभाव पडू देऊ नका आणि अपमान करत असेल तर त्याचाही परिणाम होऊ देऊ नका' हे सांगणे खूप सोपे आहे पण प्रत्यक्ष व्यवहारात आणणे खूप अवघड आहे. भक्ताच्या ठायी ईश्वरार्पण बुध्दी असल्यामुळे हे लक्षण भक्तीत दिसून येते. भक्त आपल्या सन्मानाला ईश्वराचाच सन्मान समजतो कारण की भक्त आपले अस्तित्व ईश्वराशी समांतर मानतो, अभिन्न मानतो. कुणी जर भक्ताचा अवमान केला तर भक्त आधी अपमानाचे कारण शोधून काढून आत्मपरीक्षण करतो आणि आपल्या कुठल्या आचरणात न्यूनता वा दोष असल्यामुळे अवमान झाला त्या दोषाला घालवण्याचा प्रयत्न करतो. कुणी आपला सन्मान केला तर आपल्याला आपले दोष-उणिवा-चुका शोधाव्या लागत नाहीत वा त्याबाबतीत विचार करावा लागत नाही . दोष परीक्षणासाठी आपल्याला संधी लाभत

नाही पण कुणी अवमान केला तर आपल्या कुणा दोषामुळे वा उणिवेमुळे अपमान केला असेल असे समजावे. त्याला आत्मपरीक्षणासाठी उपयुक्त संधी मानली तर अपमानाच्या प्रसंगी खेद होण्याऐवजी आनंद होऊ शकतो. आपल्यात असा एखादा दोष वा न्यून असेल आणि ते आपल्या लक्षात येत नसेल तर कुणी आपला अवमान केल्यावर तो दोष वा ते न्यून आपल्या लक्षात येऊ शकेल.

3) **शीतोष्णसुखदु:खेषु समः** शीत, उष्ण, सुख व दु:खात आपल्या वृत्तीला समान म्हणजे निर्विकार राखतो. दुसऱ्या अध्यायातील 14 व्या श्लोकात शीत, उष्ण यांचा उल्लेख आहे. तिथे असे सांगितले आहे की विषयांच्या संबंधांमुळे शीत, उष्ण असा अनुभव येतो. ते सुख आणि दु:खाचा अनुभव घडवून देतात. जोवर इंद्रिये आहेत तोवर इंद्रियांचा संबंध टाळू शकत नाही. केवळ गाढ निद्रा आणि समाधी अवस्थेत विषयांचा संबंध उरत नाही. स्वप्नातही विषयांचा संबंध नसतो. तरीही या अवस्थेत मन अर्ध जागृतावस्थेत असल्यामुळे मानसिक स्तरावर विषय सेवन सुरुच असते. जागृतावस्थेत इंद्रियांचा बाह्य विषयांशी संबंध येतो. यामुळे मानसिक स्तरावर विषय सेवन जारी असते आणि स्वप्नात तर इंद्रियांचा विषयांशी संबंध येत नसला तरी मानसिक विषय सेवन जारीच असते. एवढाच काय तो जागृतावस्था आणि स्वप्नावस्थेतला फरक होय पण जागृती असो वा स्वप्न दोन्ही अवस्थेत विषय सेवन समान आहे. जिथे विषयांचे सेवन आले तिथे सुख-दु:खाचा संबंध आलाच. स्वप्नात शीत, उष्ण असा प्रत्यक्ष अनुभव येत नाही. जागृतावस्थेत जागृती आणि इंद्रिये, शरीर आणि विषय यांचा प्रत्यक्ष संबंध आल्यामुळे शीत, उष्ण असा अनुभव येतो. सुख-दु:खाचा अनुभव जसा शीत, उष्णमुळे येतो तसा अन्य कारणांमुळेही येतो. म्हणजे शीत, उष्ण असा अनुभव आला नाही तरी येतो. दोन्ही प्रकारच्या अनुभवात म्हणजे थंडीच्या दिवसात अधिक थंडी असल्यावर आणि उन्हाळ्याच्या दिवसात कडक उन असल्यामुळे जे सुख-दु:खाचे प्रसंग येतात त्या प्रसंगी अन्य सुख-दु:खाच्या प्रसंगी भक्त सम म्हणजे निश्चळ व शांत असतो. याचा अर्थ त्याला शीत, उष्णचा अनुभव येत नाही असे नाही या उलट त्याला शीत, उष्ण नेमकेपणाने कळते. सुख आणि दु:खाच्या अन्य प्रसंगांचे ज्ञानही नित्य होत रहाते म्हणजे आई-बाबा, गुरु यांच्या निधनप्रसंगी शोक करायचा प्रसंग आहे हे जाणत असूनसुध्दा तो निश्चळ मनाने रहातो म्हणजे परिणामशून्य, दु:खरहित रहातो. याचे कारण असे की भक्ताचे मन ईश्वरात लीन असते. ईश्वराच्या अंतरंग प्रेरणेनेच जगाचा सारा व्यवहार सुरु आहे अशी त्याची दृढ श्रध्दा असते. यामुळे ईश्वर भक्तीमुळेच अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत त्याचे चित्त सम रहाते म्हणजे परिणामशून्य रहाते.

4) संगविवर्जित: तो भक्त सर्वत्र आसक्तीरहित असतो. दुसऱ्या अध्यायातील 57 व्या श्लोकात स्थितप्रज्ञाचे लक्षण आले आहे. भक्त तमाम प्रसंगात स्नेहवर्जित म्हणजे आसक्तीरहित असतो असे वर्णन आले आहे. स्नेह म्हणजे आसक्ती होय. भक्ताच्या ठायी प्रेमाचा उत्कर्ष नांदतो पण त्या प्रेमात आसक्तीचा भाव नसतो. प्रापंचिक लोकांच्या ठायीही खूप प्रेमभाव असतो पण आसक्तीमुळे तो सीमित मर्यादित असतो. सीमित प्रेम म्हणजेच आसक्ती होय.

: 19 :

*तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।*
*अनिकेत: स्थिरमतिर्भक्तिमान् मे प्रियो नर: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तुल्यनिंदास्तुति:** निंदा आणि स्तुतीला समान मानणारा
- **मौनी:** वाणीचा संयम पाळणारा, मननशील
- **येन केनचित् संतुष्टः** शरीरनिर्वाहाला जे काही मिळाले त्यात संतुष्ट रहाणारा
- **अनिकेत:** विशेष स्थानरहित म्हणजे स्थानात ममत्व न राखणारा
- **स्थिरमति:** स्थिर बुध्दीचा
- **भक्तिमान् नर:** असा भक्तीमान पुरुष
- **स: मे प्रिय:** तो मला प्रिय आहे तो माझा आवडता आहे.

**अर्थ**

ज्याला निंदा-स्तुती सारखीच वाटते, जो ईश स्वरुपाचे मनन करणारा असतो, जो काही मिळेल

त्यानेच शरीरनिर्वाह होण्याने नेहमी समाधानी असतो, निवासस्थानाविषयी ज्याला ममता किंवा आसक्ती नसते तो स्थिर बुध्दी असणारा भक्तीमान पुरुष मला प्रिय असतो.

*निंदा स्तुति न घे मौनी मिळे तें गोड मानितो ।*
*स्थिर-बुध्दि निराधार भक्त तो आवडे मज ॥*

**विषय:** या श्लोकात भक्ताची काही लक्षणे आली आहेत. भक्त हा समान व्यवहार करतो. त्याच्या मते निंदा वा स्तुती ही सारखीच असते. त्याचे भाषेवर नियंत्रण असते. तो वाणीचा संयम पाळतो. जे काही लाभले त्यात त्याला आनंद असतो. संतोष असतो. समाधान असते. त्याची बुध्दी स्थिर स्वरुपाची असते. तो भगवंताला आवडतो.

**स्पष्टीकरण**

1) **तुल्यनिंदास्तुति:** निंदा आणि स्तुतीला समान मानणारा. निंदा-स्तुतीचा माणसाच्या चित्तावर खूप प्रभाव पडतो. निंदा खूप नावडती आणि स्तुती आवडती वाटते. खरे तर याउलट व्हायला हवे पण तसे होत नाही. आत्मपरीक्षणाची संधी लाभत असल्यामुळे निंदा आवडायला हवी. आत्मपरीक्षण करताना आपल्या निदर्शनास आलेल्या दोषांचा सहर्ष स्वीकार करुन निंदेतला त्याज्य भाग वगळून दोष त्यागायचा प्रयत्न करायला हवा. अशाप्रकारे निंदा फायदेशीर ठरुन निंदेमुळे दु:खही होणार नाही. 'निंदक बाबा वीर हमारा' निंदकाला बंधू माना. स्तुती ऐकून आनंदित होण्याऐवजी आपली स्तुती का केली जात आहे याचा मनाशी विचार करायला हवा. खरे पाहू जाता आपल्या ठायी इतके दोष आहेत की आपण स्तुतीला मुळीच पात्र वा योग्य नाहीहोत. यामुळे आपले चित्त अधिक जागृत राहील आणि परीक्षण तीव्र होऊ शकेल. परिक्षण कदापि मंद रहाणार नाही. संत तुलसीदासजी लिहितात :

*निंदा अस्तुति उभय सम, ममता मम पद कंज ।*
*ते सज्जन मम प्रान प्रिय गुनमंदिर सुखपुंज ॥*

अर्थात् ज्याना निंदा आणि स्तुती समान वाटते आणि चरणकमळी ज्यांची ममता म्हणजे प्रेम वसते असे मला प्राणासमान प्रिय आहेत. ते सज्जन आहेत. गुणांचे सदन म्हणजे मंदिर आणि सुखाचे सागर आहेत.

2) **मौनी:** भक्त वाणीचा संयमाने उपयोग करतो. मौनाचा अर्थ अजिबात बोलूच नये असा नव्हे. भक्त जनसेवेत तन्मय असल्यामुळे तो अखंडपणे मौनाचे सेवन करु शकत नाही. कित्येक महात्मा एकांतवास करुन वा समाजात राहूनही अखंडपणे मौन पाळतात. गीतेने इथे ज्या भक्ताचे वर्णन केले आहे तो प्रवृत्तीप्रधान म्हणजे सेवाप्रधान आहे. सेवाकार्य करत असताना काही काळ मौन पाळणे योग्यही आहे. शंकराचार्यांनी लिहिले आहे. संयतवाक् म्हणजे वाणीचा संयम. आपल्या सर्वांना निरर्थक बोलत रहाण्याची एवढी सवय जडली आहे की वाणीचा संयम दुर्लभ होऊन गेला आहे. कित्येकाना अखंड मौन पालन साधता येते पण एकदा का बोलायला लागले की आवर घालणे अवघड जाते. कित्येक लोक 25-30-35 दिवसांचा उपवास निग्रहपूर्वक करु टाकतात पण पारणे सोडताना त्याना खायचा सुमार नसतो. मोठ्या म्हणवल्या जाणाऱ्या लोकांची ही परिस्थिती आहे. अनेक जण आपले म्हणणे वारंवार दुसऱ्यांदा सांगत रहातात. साभिप्राय असेल तर पुनरुच्चार ठीक पण अनेकांना कारण नसतानाही तेच ते परत-परत बोलायची सवय असते. वाणीच्या संयमाच्या दृष्टीने हे बरे नव्हे योग्य नव्हे. साधकावस्थेत वाणीचा संयम साधनेच्या दृष्टीने खूप गरजेचा आहे.

3) **येन केनचित् संतुष्ट:** जे काही मिळाले त्यात समाधानी माणूस केवळ अनुकूल परिस्थिती चाहतो. पावलोपावली प्रतिकूल परिस्थिती येतात आणि माणूस बेचैन, दु:खी होतो. खरे तर पहिल्या परिस्थितीत ईशकृपा मानून समाधान मानण्याची साधना करणे आणि वाटेल त्या परिस्थितीला अनुकूल करुन घेणे मोठी गोष्ट आहे. प्राप्त परिस्थितीचा शांततेने उत्तमात उत्तम उपयोग करुन घ्यावा. हे लक्ष्य गाठावे. यामुळे कुठल्याही परिस्थितीत समाधान लाभू शकते. चौथ्या अध्यायाच्या 22 व्या श्लोकात यदृच्छा लाभसंतुष्ट: या शब्दात हेच लक्षण आले आहे.

4) **अनिकेत:** ज्याचे आपले कुठले स्थान नाही असा. भक्ताचे आपले स्वत:चे तर कुठले कुटुंब नसते. कुटुंबीजन असले तरी तो काही त्यांचा बनून रहात नाही. ज्ञानेश्वर महाराज लिहितात :

हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर। 'हे विश्वच माझे घर आहे अशी ज्याची मती स्थिर झाली आहे.' गांधीजींनी आश्रमासारखी सार्वजनिक संस्था स्थापन केली होती. त्यात ते संस्थेचे नियम पालन करीत पण अस्पृश्यता निवारणाचा सिध्दांत मान्य नसल्यामुळे त्यांच्या सख्ख्या भगिनीला आश्रम सोडावा लागला होता. गांधीजी गृहस्थाश्रमी होते. त्याना चार मुले होती पण ती त्यांच्यापाशी रहात नसत एवढेच नव्हे तर गांधीजी काही केवळ आश्रमाचेच नव्हते. ते संपूर्ण भारताचे बनून आश्रमात रहात असत. भक्ताचे आपले स्वत:चे असे काही नसतेच मुळी. तो अत्यंत व्यापक असतो याचा अर्थ भक्त सदा संन्यासी बनून भटकत असतो असे नव्हे. आशय हा की तो कुठल्याही एकाच जागी आसक्त बनून रहात नाही.

5) **स्थिरमतिः** ज्याची बुध्दी ईश्वराच्या ठायी स्थिर झाली असा. गांधीजींची प्रत्येक क्रिया ईश्वराला साक्षी ठेऊन असायची. 'आपण काही करतोहोत' असे त्याना कदापि वाटले नाही. ईश्वर आपल्याकडून सारे काही करवुन घेत आहे हीच त्यांची सदा भावना असायची. त्यांच्या या भावनेत कधीच अंतर पडले नाही. परमात्म्याच्या ठायी बुध्दी स्थिर होण्याचे पहिले लक्षण अहंशून्यता आहे. अहं विलीन करुन देण्याची तयारी असते तोच ईश्वराच्या ठायी स्थिर होऊ शकतो. एकनाथ महाराजांनी लिहिले आहे :

***मज रिजोनिया शरण, जो वांछी मान सन्मान।***
***तो गुळातील पाषाण, केवळ जाण गुळदगडू॥***

अर्थात् 'माझ्या शरणी आल्यावर जो मान-सन्मानाची आशा राखतो तो बाहेरुन गुळासारखा जरी दिसत असला तरी खराखुरा गुळ नसतो. आतुन दगड असतो आणि वरुन गुळाचे लेपन असते.' ईश्वराच्या ठायी आपल्या बुध्दीला स्थिर करायचा अर्थच मुळी 'मी' पणा घालवणे आहे. 'मी' पणा ऊरु न देणे आहे. देहभाव संपवणे आहे. भक्तीचा मार्ग तसा सुलभ आहे पण अहंत्याग आवश्यक आहे. अहंकाराच्या त्यागामुळे ज्याला आनंद वाटेल तोच या मार्गावर चालू शकेल. यामुळे भगवान म्हणताहेत की भक्तीवान पुरुष मला प्रिय असतो.

: 20 :

***ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।***
***श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **तु ये श्रद्दधानाः मत्परमाः** पण जे श्रध्दावान असून माझ्याठायी परायण आहेत
- **भक्ताः** असे जे भक्त आहेत
- **इदं यथोक्तं धर्म्यामृतंः** हा उपरोक्त अमृतोसम जो धर्म आहे
- **पर्युपासतेः** त्याचे निष्काम भावनेने सेवन करतात
- **ते मे अतीव प्रियाः** ते मला खूप प्रिय आहेत.

### अर्थ

परंतु जे श्रध्दाळू (वेद, शास्त्र, महात्मे, गुरुजन व परमेश्वर यांच्या वचनांवर प्रत्यक्षाप्रमाणे विश्वास ठेवणे याचे नाव श्रध्दा होय.) पुरुष मत्परायण होऊन या वर सांगितलेल्या धर्ममय अमृताचे निष्काम प्रेमभावनेने सेवन करतात ते भक्त मला अतिशय प्रिय आहेत.

***जे धर्म-सार हें नित्य श्रध्देनें मी चि लक्षुनी।***
***सेविती ते तसे भक्त फार आवडती मज॥***

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) पण जे श्रध्दावान आणि माझ्या ठायी परायण असलेले भक्त आहेत. 2) ते एथवर सांगितलेल्या अमृतोपम धर्माचे सेवन करतात. 3) ते मला खूप प्रिय आहेत.

### स्पष्टीकरण

1) **तु ये श्रद्धानाः मत्परमाः भक्ताः** श्रध्दावान आणि माझ्याठायी परायण असे माझे भक्त. तेरा ते एकोणावीस श्लोकांमधून वर्णिलेली लक्षणे परिपूर्ण भक्ताची आहेत. भगवान प्रयत्नशील भक्तांना शिकवण देताहेत. या श्लोकात प्रयत्नशील भक्तांचे वर्णन आले आहे. प्रयत्नशील भक्तांचे पहिले लक्षण म्हणजे ते श्रध्दावान असतात. चौथ्या अध्यायातील 39व्या श्लोकात भगवंतांनी सांगितलेले आहे की श्रध्दावान् लभते ज्ञानम् ज्याच्याठायी ईश्वरविषयक श्रध्दा आहे तो ज्ञान प्राप्त करतो. त्यातही ज्ञानपूर्वक परमात्म तत्त्वाचा स्वीकार


करुन श्रध्दा जागणेअजून अवघड पण महत्वाची बाब आहे. केवळ श्रध्देनेही ईश्वराचे ग्रहण होऊ शकते पण ती श्रध्दा नि:शंक असायला हवी. कुणी ईश्वरी तत्वाविरुध्द तर्क केला आणि श्रध्दा डळमळीत झाली तर अशी दुबळी श्रध्दा काही कामाची नाही. यामुळे सुरक्षित उपाय तर केवळ हाच आहे की ज्यांची ईश्वरावर ज्ञानपूर्वक श्रध्दा उपजली आहे, त्यांच्याशी तार्किक विचारणा करुन परमात्म तत्वाचे बुध्दीपूर्वक ग्रहण करावे. बुध्दीने परमात्मत्व ग्रहण करुन घेतल्यावर काही प्रश्न तपासून घ्यावेत. ब्रह्मांडात जे तत्व आहे ते पिंडात म्हणजे देहात आहे की काही वेगळे आहे? ब्रह्मांडात व्याप्त तत्त्वच जर पिंडाच्या ठायी असेल तर जीवाचे स्वरुप काय? जीव ईश्वराहून भिन्न आहे की अभिन्न? मोक्षाचे स्वरुप काय? मायेचे स्वरुप काय? मोक्षाचा अनुभव मिळवण्यासाठी कुठल्या प्रकारची साधना करायला हवी? इत्यादी प्रश्न बुध्दीच्या निकषावर ग्रहण केले जावेत तपासून घेतले जावेत. या प्रश्नांच्या संदर्भात बुध्दी नि:शंक झाली तर ईश्वरावर असलेली श्रध्दा कदापि डगमगणार नाही. श्रध्दावानचा अर्थ झाला असा ईश्वरी श्रध्देने संपन्न पुरुष.

दुसरे लक्षण असे आहे की जो माझ्या वा ईश्वराच्या ठायी परायण आहे. ईश्वरावर जर ज्ञानपूर्वक श्रध्दा असली तर वृत्तीचा प्रवाह सहजपणे ईश्वराकडे वळतो. चित्त त्याच्या ठायीच एकाग्र होते. प्रेमशक्ती तर सर्वांच्या ठायी आहे पण ती ईश्वराशी संबध्द नाही. ईश्वराच्या ठायी प्रेममय तल्लीनता जागली तर ईश्वर परायणता साधते. प्रयत्नवान भक्तांमध्ये अशी परमात्म परायणता आढळते. ते भक्त उपरोक्त वर्णित अमृतोपम धर्माचे धर्माच्या सारांशाचे सेवन करतात.

2) **ते ये धर्म्यामृतं इदं यथोक्तं पर्युपासते:** 13 ते 19 या सात श्लोकांमधून भक्ताची एकूण 34 लक्षणे वर्णिली आहेत. त्याना इथे भगवंताने अमृतोपम धर्म असे म्हटले आहे. विनोबांनी या शब्दाचा अनुवाद 'धर्माचा सारांश' असा केला. ही 34 लक्षणे धर्म म्हणजे आध्यात्मिक साधनेचा सारांश आहे. ही भक्ताची लक्षणे होत. तेराव्या अध्यायात ज्ञानी पुरुषाची, चौदाव्या अध्यायात त्रिगुणातीत पुरुषाची तर सोळाव्या अध्यायात दैवी पुरुषाची लक्षणे वर्णिली आहेत. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची, पाचव्या अध्यायात संन्याशाची, चौथ्या अध्यायात कर्मयोग्याची, सहाव्या अध्यायात समाधीस्थ पुरुषाची तर अठराव्या अध्यायात सिध्द पुरुषाची लक्षणे वर्णिली आहेत. गीताकाराचा हा दृष्टीकोण आहे की प्रत्येक अध्यायात पोहोचलेल्या पुरुषाची काही-ना-काही लक्षणे वर्णिली आहेत. यामुळे साधक वा मुमुक्षु जनांसमोर कुठले गुण व लक्षणे आत्मसात करायची आहेत, हे सतत नजरेसमोर असावे. आपण आपल्या जीवनात सिध्द, ज्ञानी, भक्त पुरुषांच्या लक्षणांना आत्मसात करुन घेण्यासाठी आणि ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठी स्वत:ला योग्य बनवू शकतो.

3) **ते मे अतीव प्रिया:** असे प्रयत्नशील भक्त मला अत्यंत प्रिय आहेत. या ठिकाणी भगवंताने प्रयत्नशील भक्ताचा मोठाच गौरव केला आहे. याचे कारण असे की वरील सात श्लोकांमधून भक्ताची जी 34 लक्षणे वर्णिली आहेत त्यातील प्रत्येक श्लोकात फक्त एवढेच सांगितले आहे की 'ते भक्त मला प्रिय आहेत.' 'ते भक्त मला अत्यंत प्रिय आहेत' असे म्हणून 'अत्यंत' हे विशेषण जोडलेले नाही. खरे तर जे परिपूर्ण भक्त आहेत त्यांचा उल्लेख करताना 'ते भक्त मला अत्यंत प्रिय आहेत' असे म्हणून 'अत्यंत' हे विशेषण जोडायला हवे होते पण तसे न करता भगवंताने पूर्ण भक्ताच्या सोबत केवळ 'ते मला प्रिय आहेत' एवढेच म्हटले आणि प्रयत्नशील भक्तांच्या सोबत मात्र 'हे भक्त मला अत्यंत प्रिय आहेत' अशा प्रकारे 'अत्यंत' हे विशेषण जोडून त्यांचा विशेष गौरव केला आहे. याचे कारण असे की प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजेच फल-प्राप्ती होय. पूर्ण भक्ताची लक्षणे जीवनात प्रकट होणे वा सिध्दावस्था पूर्ण होणे प्रयत्नांच्या परकाष्ठेचेच फलित आहे. यामुळे गौरव तर प्रयत्नशीलतेचाच झाला पाहिजे कारण की प्रयत्नांची पराकाष्ठा साधणे हीच तर आश्चर्याची बाब आहे. प्रयत्नांच्या पराकाष्ठेचा गौरव झाला तर त्याच्या महत्वाकडे मन आकर्षित होईल आणि त्यावरच लक्ष केंद्रित होईल. साधक प्रयत्नाच्या फळाच्या बाबतीत निश्चिंत राहील, तटस्थ राहील. फलित तर प्रयत्नांच्या पराकाष्ठेचा परिणाम आहे. या विषयाचे महत्व आहे पण आपले त्यावर लक्ष एकाग्र होत नाही. केंद्रित होत नाही. प्रत्येकाचे लक्ष फळावरच असते प्रयत्नावर नसते. भगवंताने या श्लोकात हे सांगितले आहे की प्रयत्नाच्या पराकाष्ठेवरच चित्त केंद्रित करायला हवे.

• • • *बारावा अध्याय संपूर्ण भक्तियोग संपूर्ण* • • •



सगुण ईश्वराच्या ठायी मन लावणे अवघडच आहे पण सगुण ब्रह्माच्या तुलनेने निर्गुण ब्रह्मात मन लावणे तुलनेने अधिक अवघड आहे. निर्गुण ब्रह्माच्या ठायी मन लावणे मन एकाग्र करायची साधना करणे ही ज्ञानमार्गी व ध्यानमार्गी साधना आहे. बुध्दी आणि मन हे मनाचेच दोन भाग आहेत. बुध्दी विचारात्मक असून मन भावात्मक आहे. ज्यांची जीवनधारा विचारात्मकच असेल आणि ज्यांच्या जीवनात भावनेचा विकास घडलाच नसेल त्याना आध्यात्मिक जागृती वा जिज्ञासा जागल्यावर ते निर्गुण ब्रह्मतत्वाच्या उपासनेकडे वळतात.

<u>जन्म तारीख - 11 जून 1900 - देहावसान 27 ऑगस्ट 1981</u>

# गीता तत्व बोध
(ज्ञानयोग)

# अर्पण

आदिवासी संत सारस्वत 'अभंग रामायण' कार
श्रध्देय शंकर महाराज यांच्या पुण्यवान स्मृतींना
ज्ञानयोगाची ही कावड सविनय,
सादर, श्रध्दापूर्वक समर्पण
विश्वास

गीतातत्व बोध (ज्ञानयोग)

# अनुक्रमणिका


| क्र | विषय | सूत्र पृष्ठ |
|---|---|---|
| 1 | ज्ञानयोगाची महिमा : | 667 |
| 2 | अध्याय तेरावा : क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग | 669 |
| 3 | अध्याय चौदावा : गुणत्रयविभाग योग | 720 |
| 4 | अध्याय पंधरावा : पुरुषोत्तम योग | 756 |
| 5 | अध्याय सोळावा : दैवासुरसंपदविभाग योग | 784 |
| 6 | अध्याय सतरावा : श्रध्दात्रयविभाग योग | 817 |
| 7 | अध्याय अठरावा : मोक्षसंन्यास योग | 851 |

# ज्ञानयोगाचा महिमा

गीतेची त्रिवेणी आहे कर्म, भक्ती आणि ज्ञान. या तिन्ही तत्वांना योग संज्ञेशी संलग्न करुन गीतेने एक ऊर्ध्वमुखी संदर्भ दिला आहे. कर्मयोगाने गीतेची सुरुवात होते. मध्यभागी आहे भक्तियोग. समापनात ज्ञानयोग आहे. ज्ञान शब्द सर्वांना परिचित आहे. ज्ञान हे प्रकाशरुप आहे. ज्ञानाशिवाय दुसरे काहीही पवित्र नाही. ज्ञान माणसाला चैतन्य देते. ज्ञानाची धग माणसाच्या इंद्रियांमधून प्रकट होते. त्याचे नेत्र तेजस्वी बनतात. हात कार्यरत होतात. पावले गतीशील बनतात. मन मजबूत बनते. मनगट बळकट बनते. साराच आविष्कार तेजाळून उठतो. ज्ञानी माणूस अपरिहार्यपणे क्रियाशील असतो.

ज्ञानयोगाचा आवाका आकाशस्पर्शी आहे. ज्ञान आत्मज्ञान होते. या ज्ञानाचे एक टोक आत्मज्ञान आणि दुसरे टोक परमात्मज्ञान असे आहे. श्री शंकराचार्य म्हणतात श्रवणात् मननात् ध्यानात् तात्पर्येण निरंतरम्। बुध्देः सूक्ष्मत्वमायाति ततो वस्तूपलब्धये॥ अर्थात् तन्मयतेने सतत श्रवण, मनन, ध्यान धारणा केल्याने बुध्दी सूक्ष्म बनते आणि त्यामुळे आत्मा उपलब्ध होतो वस्तुची प्राप्ती होते.

आत्मतत्त्व आणि ईशतत्त्व दोन्ही एकाच तत्त्वाची, एकाच चैतन्य तत्वाची रुपे आहेत. आत्म हे अंशमात्र तर ईश्वर त्या चैतन्याची परिपूर्णता आहे पूर्ण रुप आहे तरी चैतन्य तर समग्रपणे एकच एक आहे. परा आणि अपरा अशा दोन प्रकारच्या प्रकृती आहेत. जड ही अपरा प्रकृती तर जीव वा चैतन्य ही परा प्रकृती होय. शास्त्रकार जडाला प्रकृती आणि चैतन्याला पुरुष म्हणून संबोधतात. गीतेत या जड आणि चैतन्याच्या अनुषंगाने तीन प्रकारच्या तत्त्वज्ञानांची मांडणी केली गेली आहे. सर्व जड, सर्व चेतन आणि जड व चेतन. ही तीन प्रकारची तत्वज्ञानाची भूमिका तीन वेगवेगळे दृष्टीकोण प्रस्तुत करते. या भूमिकांना गीतेने कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग या तत्वज्ञानांच्या रुपाने प्रतिपादित केले आहे. कर्मयोगात जड व चेतन. भक्तियोगात सारे जड. ज्ञानयोगात सारे चेतन अशी ही विभागणी आहे. व्यक्तीला या तिन्ही भूमिकांमध्ये रहावे लागते. गीता म्हणते सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते। अर्थात् आत्मज्ञानात सर्व कर्मांची परिसमाप्ती होते. यामुळे हा 'परम पुरुषार्थ' आहे.

ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी ज्ञानवंतांच्या चरणी जाऊन बसायचा सल्ला गीताकार देतात. ज्ञान प्राप्त करुन घ्यायची प्रक्रिया समजावून सांगतांना तद्विध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। अर्थात् विनम्रता, जिज्ञासा आणि सेवा ही रीत शिकवतात. विनोबांनी याचे मर्म उद्घाटित करत सांगितले की सेवा म्हणजे कर्मयोग साधना. नम्रता म्हणजे भक्तियोग साधना. जिज्ञासा म्हणजे ज्ञानयोग साधना. अशाप्रकारे आत्मज्ञानात कर्म-भक्ती-ज्ञान या तिन्ही तत्वांचा अंतर्भाव होतो.

गीतेच्या चौथ्या अध्यायात आत्मज्ञान विषयक स्पष्टीकरण करतांना गीताकार तीन परिणामांचा उल्लेख करतात. 1) मोहाचा नाश 2) पापाचा निस्तार 3) कर्माचा दाह. आत्मज्ञानप्राप्तीचा अर्थच मोहनाश आहे. भेदाभेद मानणे हा मोह. गीतेने ज्ञानाचे स्वरुप सांगतांना दोन दिशा सांगितल्या आहेत. 1) आपल्या ठायी सर्वच भूतमात्रांचे म्हणजे समष्टीचे दर्शन करणे. 2) समष्टीमय स्वत:ला ईश्वराच्या ठायी बघणे. ही ज्ञानाची दोन रुपे होत. आपल्या ठायी म्हणजे आपल्या देहाच्या ठायी नव्हे. देहाचा विस्तार ज्ञानाचा विस्तार नसून खरे तर मोहाचा विस्तार आहे. विनोबांची 'जय जगत' ही घोषणा खरे तर ज्ञान विस्ताराची खूण आहे. आत्मज्ञानी पुरुष समत्वबुध्दीने वागतो. समत्वबुध्दी हे आत्मज्ञानाचे पहिले पाऊल आहे. पहिले रुप आहे. विनोबा म्हणतात आपल्या ठायी सर्व भूतमात्र हे पहिले दर्शन आहे मग आपल्यासकट सर्व भूतमात्र ईश्वराच्या ठायी आहेत. हे बघणे हे दुसरे दर्शन होय.

आत्मज्ञानाचा परिणाम असा की पूर्वकृत पातकांचा विनाश आणि पुढे पापकर्मात प्रवृत्त न होणे होय. पुण्याने पूर्वकृत पापकर्मे नष्ट होत नाहीत. ती आत्मज्ञानाने नष्ट होतात. ज्ञानाचा परिणाम असा की कर्ममात्र नष्ट होतात.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा अर्थात् ज्ञानाग्नी सर्व प्रकारच्या कर्म काष्ठाला भस्मसात करतो. काहीही शिल्लक ऊरु देत नाही. अग्नी काष्ठापासून उत्पन्न होतो म्हणजे काष्ठांच्या घर्षणाने उत्पन्न होतो. काष्ठामार्फत पोषण मिळवतो आणि काष्ठालाच भस्म करतो. त्याचप्रमाणे ज्ञान कर्मापासून उत्पन्न होते आणि कर्मानेच ज्ञानाला पोषण लाभते. अंततोगत्वा ते ज्ञान कर्मालाच दग्ध करुन टाकते. शंकराचार्यांनी या स्थितीचा गौरव करताना म्हटले आहे की हे तर आपल्यासाठी भूषणावह आहे की आत्मज्ञान झाल्यावर सर्वकर्तव्यताहानिः ची अवस्था प्राप्त होते. माणूस कृतकृत्य होऊन जातो.

आत्मज्ञान म्हणजे वेदाची पराकाष्ठा होय. आत्मज्ञानाच्या प्राप्तीनंतर वेदाची आवश्यकता उरत नाही. यामुळे उपनिषद म्हणते अत्र पिता अपिता भवति । माता अमाता । देवा अदेवाः । वेदा अवेदाः ॥ अर्थात् व्यक्तीला ज्ञानप्राप्ती होऊन जेव्हा अपरोक्षानुभूती होते तेव्हा पिता, पिता उरत नाही, माता, माता रहात नाही, देव, देव म्हणून रहात नाहीत, वेद, वेद म्हणून रहात नाहीत. मुंडकोपनिषदाने एक सूत्र दिले आहे. क्रियावान् एषः ब्रह्मविदां वरिष्ठः म्हणजे आत्मज्ञानी जनांमध्येही क्रियावान क्रियाशील आत्मवेत्ता श्रेष्ठ होय. अर्थात् आत्मज्ञानाचाही कस उपनिषदाच्या क्रियेच्या कसोटीवर पारखला गेला आहे. क्रियेच्या कसोटीवर न उतरणारी आत्मविद्या वा आत्मज्ञान हे आत्मज्ञानच नव्हे. फळाच्या त्यागाची दृष्टी नसेल तर ज्ञानयोगाची कर्मयोगात परिणती होत नसेल तर तो आत्मज्ञानी ज्ञानयोगी अधूरा होय. भक्ती आहे पण ती जर ज्ञानविहीन आहे तर ती जड वा निष्क्रिय बनू शकते. केवळ ज्ञान आहे पण भक्तीरहित आहे तर ते शुष्क, रुक्ष आणि क्रियाविहीन होऊ शकते. यासोबत एखादी क्रियाशील व्यक्ती असेल पण ती जर भक्तीमान आणि ज्ञाननिष्ठ नसेल तर तिच्याठायी आसक्ती आणि अहंकार जागू शकतो. त्या क्रियाशीलतेत अपूर्णता येईल.

शंकराचार्य म्हणतात प्राक्कर्म प्रविलाप्यताम्। प्राक् म्हणजे पूर्वजन्मीची (कर्मे) प्राक् कर्म म्हणजे पूर्व जन्मातील कर्मे. प्रविलाप्यताम् म्हणजे संपवली जावीत. पूर्वजन्मीची कर्मे कशी संपवता येतील ? याचे उत्तर आहे चिति- बलात् म्हणजे आत्मज्ञानाच्या बळाने संपवता येतात. चिति म्हणजे ज्ञान, आत्मज्ञान. अनेकता पचवून घेता आली की एकता साधते. गीता म्हणते (अध्याय 6 श्लोक 29) सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि। भूतमात्राच्या ठायी आत्मतत्व आणि आत्मतत्त्वाच्या ठायी भूतमात्र. गीतेने अशा प्रकारचे व्यापक आत्मदर्शन मांडले आहे. सर्व भूते एकात सामावलेली म्हणजे अनेकत्वात एकत्वाची भूमिका आणि एकातच सारा विस्तार पसरलेला सामावलेला म्हणजे एकत्वात अनेकत्वाचा बोध अशी दुहेरी प्रक्रिया आहे.

श्रीमद्भागवतात ज्ञानीसाठी सुंदर उपमा वापरली आहे. यथा खं सविता अनिलः । खं म्हणजे आकाश. ढग आले. ढग गेले. पाऊस बरसला. ऊन कोसळले. आकाश त्याच्यापासून वेगळे आहे. संसक्त नाही. सूर्य सर्वांना प्रकाश देतो. प्रकाशात काय वाचायचे ? हे प्रकाशाचे काम नव्हे. गीता वाचा वा कविता वाचा. भागवत वाचा वा महाभारत वाचा. ही जबाबदारी प्रकाश घेत नाही. सूर्यनारायण काही घेत नाही. वाऱ्याचा स्वभाव बघा. वारा आज इथे तर उद्या तिथे. एकदा फुलांच्या ताटव्यावरुन तर दुसऱ्यांदा आणखी कुठे. वाराअनासक्त आहे. मुक्त आहे. निःसंग आहे. सर्वांच्या व्यवहारात मदत करतो. सर्वांहून अलिप्त रहातो. आकाश शून्य आहे. हे निरहंकारतेचे लक्षण होय. सूर्यात ज्ञानाची प्रखरता आहे. हवेत वाऱ्यात सेवेचे लक्षण आहे. ही सारी ज्ञानवंताची लक्षणे आहेत. ज्ञानी पुरुषावर कुठलाही विधी-निषेध लागू होत नाही. शंकराचार्य ज्ञान्याविषयी म्हणतात अनियोज्योऽहम् म्हणजे ज्ञानी नियोजनीय नाही. शास्त्र त्याचे नियोजन करु शकत नाही. ज्ञानी काही शास्त्रीय नियोजनाचा विषय होऊ शकत नाही. ज्ञानी पुरुषावर शास्त्राच्या आज्ञा कुंठित होऊन जातात. ज्ञाननिष्ठांवर शास्त्राज्ञेचा प्रभाव चालत नाही.

**- प्राचार्य डॉ. विश्वास पाटील**

15 नोव्हेंबर 2020, विनोबा पुण्यतिथी



## पहिला खंड - तिसरा भाग - ज्ञानयोग
## तेरावा अध्याय

# क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

***इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ।***
***एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौंतेयः** हे अर्जुना
- **इदं शरीरं:** या शरीराला
- **क्षेत्रं इति अभिधीयते:** क्षेत्र म्हटले जाते
- **यः एतत् वेत्तिः** जो याला जाणतो
- **त क्षेत्रज्ञः** त्याला क्षेत्रज्ञ
- **इति तद्विदः प्राहुः** असे तत्त्व जाणणारे ज्ञानी जन म्हणतात

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले हे अर्जुना, हे शरीर क्षेत्र (ज्याप्रमाणे शेतात पेरलेल्या बीजांचेच त्याला अनुरुप असे फळ योग्यवेळी प्रकट होते त्याच प्रमाणे यात पेरलेल्या कर्मांचे संस्काररुपी बीजांचे फळ यथाकाळी प्राप्त होते म्हणून याला क्षेत्र म्हणजे शेत असे नाव आहे.) या नावाने संबोधिले जाते आणि याला जो जाणतो त्याला त्याचे तत्व जाणणारे ज्ञानी लोक 'क्षेत्रज्ञ' असे म्हणतात.

**श्री भगवान म्हणाले**

***अर्जुना ह्या शरीरास म्हणती क्षेत्र जाणते ।***
***जाणे हें क्षेत्र जो त्यास क्षेत्र-ज्ञ म्हणती तसें ॥***

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) हे अर्जुना, या शरीराला - देहाला - क्षेत्र म्हटले जाते. 2) या क्षेत्राला जाणणाऱ्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. 3) असे ज्ञानीजनांचे मत आहे. या अध्यायात देह आणि आत्मा यातील भिन्नता दर्शवली गेली आहे.

**स्पष्टीकरण**

(1) **कौंतेय इदं शरीरं क्षेत्रं इति अभिधीयते:** हे अर्जुना, या शरीराला क्षेत्र असे म्हटले जाते. देहाला पिंड असेही म्हणतात. या अध्यायात शरीराची ओळख करुन दिली जात आहे. शरीर किती तत्वांनी बनले आहे याची ओळख या अध्यायातील 5 व 6 श्लोकांमधून भगवंत करुन देणार आहेत. इथे शरीराला 'क्षेत्र' असे म्हटले आहे. विनोबांनी याची दोन कारणे सांगितली आहेत 1) आत्मतत्वासाठी कार्य करायचे क्षेत्र हे शरीर आहे. आत्म्याला काहीही करायचे असेल तर देह धारण केल्याशिवाय ते करता येत नाही. क्षेत्र म्हणजे पंच महाभूतांनी बनलेले शरीर नव्हे. ते पंचमहाभूतांनी बनलेले इंद्रियांसह असलेले सजीव शरीर होय. शरीर, इंद्रिये वगैरे समूहांच्या द्वारे नाना लहान-मोठी कार्ये होत रहातात. ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून आपल्याला विविध प्रकारच्या पदार्थांचे ज्ञान होते. कर्मेंद्रियांच्या माध्यमातून आपण विविध प्रकारच्या क्रिया करतो. 2) दुसरा अर्थ आहे. क्षेत्र म्हणजे शेत. शेतात आपण बी पेरतो. अन्नाच्या रुपाने त्याचे फळ लाभते. तशाचप्रकारे हे शरीररुपी शेत आहे. देहरुपी शेतात आपण नाना कर्मांची बीजे रोवतो. त्याची सुख-दु:खरुपी फळे या देहातच भोगावी लागतात. यामुळे या देहाला शेताची उपमा दिली जाऊ शकते. 3) क्षेत्र शब्दाचा आणखी एक अर्थही घेता येऊ शकतो आणि तो आहे तीर्थक्षेत्र. भगवान स्वत: या देहात आत्म्याच्या रुपाने प्रकट झाले आहे, त्यामुळे हे शरीर तीर्थक्षेत्र आहे.

2) **यः एतत् वेत्ति तं क्षेत्रज्ञः** या क्षेत्राला जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. हे क्षेत्र, हे शरीर जड आहे यामुळे कुणाला जाणू शकत नाही पण त्याचे ज्ञान

आपणास असते. यामुळे जड देह कुणाच्या अभ्यासाचा विषय होऊ शकतो. याला जो जाणतो त्याला 'क्षेत्रज्ञ' असे म्हटले जाते. आत्म्याला साक्षी म्हटले जाते. हाच साक्षी ब्रह्मांडातदेखिल आहे, त्याला 'परमात्मा' म्हटले जाते. तोच परमात्मा जेव्हा पिंडात प्रकट होतो म्हणजे या देहात प्रकट होतो तेव्हा त्याला 'साक्षी आत्मा' असे म्हटले जाते. परमात्मा ब्रह्मांडात व्याप्त आहे. आपल्या अलौकिक शक्तीने तो सृष्टीच्या रुपात प्रकट आहे. ब्रह्मांडात ईश्वराने जडाची भूमिका स्वीकारली आहे. पिंडात म्हणजे या क्षेत्ररुपी देहात चैतन्यस्वरुपी जीवात्म्याची भूमिका तो बजावतो. अशाप्रकारे पिंड आणि ब्रह्मांड या दोन्ही ठिकाणी ईश्वराचाच अभिनय सुरु आहे. ब्रह्मांडात तो जडाचा भास करवत आहे तर पिंडात जीवात्म्याचा. अशा प्रकारे पिंडरुपी क्षेत्रात चैतन्यस्वरुपी, साक्षीस्वरुपी परमात्मा आणि त्याची जड देहरुपी भूमिका या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या श्लोकातून भगवंत याच दोन गोष्टींची ओळख करवून देत आहेत. या क्षेत्रापेक्षा त्याला जाणणारा वेगळा आहे. त्याला 'साक्षी' असे म्हणतात. जो या शरीरालाच आत्मा मानतो त्याला शरीराहून आत्मा वेगळा आहे याची ओळख नसते. तो अज्ञानी जीव आहे. त्याला इथे भगवंताने क्षेत्रज्ञ, साक्षी वा आत्मा म्हटले नाही, हा लक्षात घेण्यासारखा मुद्दा आहे. आपण जर देहरुपी नसतो. स्वत:ला क्षेत्रापासून वेगळे समजत असतो तर मग हे निश्चितपणे सांगितले गेले असते की आपण क्षेत्राला जाणणारे क्षेत्रज्ञ आहोत.

3) इति तद्विद: प्राहु: तत्वज्ञानी आणि आत्म्याचा अनुभव असलेले महापुरुष असतात. त्यांनी या क्षेत्राला जाणणाऱ्याला क्षेत्रज्ञ, साक्षी आत्मा म्हणून संबोधले आहे. भगवान म्हणतात 'मी सांगतोय असे नव्हे, अनुभवी पुरुषांनी हे सांगितलेले आहे. यामुळे या वचनावर श्रध्दा राख.' ज्यांनी आत्म्याचा अनुभव घेतला आहे ते असे म्हणतात की आत्मा वेगळा आहे. या अनुभवाच्या बळावरच त्या अनुभवी पुरुषांनी हा सिध्दांत ठरवला की या क्षेत्रापेक्षा भिन्न क्षेत्राला जो जाणतो तो साक्षी आत्मा ज्ञाता या क्षेत्रात रहातो. खरे म्हणजे भगवंत स्वत: ज्ञानी आहे तरीही अतिशय नम्र आहेत. 'देहाहून आत्मा वेगळा आहे' हे प्राचीन कालीन ऋषी - मुनी - ज्ञानीजन यांचा हवाला देऊन सांगितलेले आहे. भगवंत म्हणतात की या क्षेत्राला जाणणारा साक्षी आत्मा आहे असे अनुभवी लोकांचे मत आहे. ही भगवंताची विशेष नम्रता आहे.

तेराव्या अध्यायाच्या आरंभी शंकराचार्यांनी सुरेख प्रस्तावना लिहिली आहे. ते लिहितात की सातव्या अध्यायात ईश्वराच्या परा आणि अपरा या दोन प्रकृतींचा उल्लेख आला आहे. यात तीन गुणांनी युक्त अशी आठ प्रकारची प्रकृती आहे ती जगाचे निमित्त असल्यामुळे तिला 'अपरा' असे म्हटले जाते. दुसरी प्रकृती जीवरुप युक्त आहे. ती क्षेत्रज्ञस्वरुपी आहे. ईश्वरस्वरुपी असल्यामुळे तिला 'परा' प्रकृती असे म्हटले जाते. ईश्वर या दोन प्रकृतींनी युक्त आहे. तो जगाच्या उत्पत्ती, स्थिती आणि प्रलयाचे निमित्त बनतो. ही वस्तुस्थिती आहे. यामुळे त्याचे स्वरुप जे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ त्याचे निरुपण आले आहे. ज्याद्वारे त्या दोन प्रकृतींनी युक्त अशा ईश्वराचे स्वरुप निश्चित करण्यासाठी हा अध्याय सांगितला जात आहे. याशिवाय बाराव्या अध्यायाच्या तेराव्या श्लोकापासून समापनापर्यंत ज्ञानी संन्यासी भक्ताची निष्ठा सांगितली आणि त्याच्या आचरणाचेही वर्णन केले पण ते ज्ञानी भक्त कुठल्या तत्वज्ञानाने युक्त असतात आणि बाराव्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करतात, भगवंताचे प्रिय कसे होतात, हे निरुपण करण्यासाठी या अध्यायाची सुरुवात केली आहे.

: 2 :

*क्षेत्रज्ञं चापि मां विध्दि सर्वक्षेत्रेषु भारत।*
*क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च भारत:** आणि हे अर्जुना.
- **सर्वक्षेत्रेषु:** सर्व क्षेत्रांमध्ये
- **क्षेत्रज्ञं मां अपि विध्दि:** मीच क्षेत्रज्ञ अर्थात् जीवात्मा आहे, असे समज.
- **यत् क्षेत्रक्षेत्रयो: ज्ञानं:** क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचे अर्थात् विकारांसहित प्रकृती आणि पुरुष यांचे जे ज्ञान आहे.
- **तत् ज्ञानं मम मतं:** तेच ज्ञान आहे, असे माझे मत आहे.

**अर्थ**

हे अर्जुना, तू सर्व क्षेत्रांमध्ये क्षेत्रज्ञ अर्थात् जीवात्माही मलाच समज आणि क्षेत्र व क्षेत्रज्ञ अर्थात् विकारांसहित प्रकृती व पुरुष यांना जे तत्त्वत: जाणणे ते ज्ञान आहे, असे माझे मत आहे.

***क्षेत्र-ज्ञ मी चि तो जाण क्षेत्रांत सगळ्या वसें।***
***क्षेत्र - क्षेत्रज्ञ - भेदास जाणणें ज्ञान मी म्हणें॥***

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) हे अर्जुना, समस्त क्षेत्रांमध्ये क्षेत्रज्ञ मीच आहे, असे समज 2) क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या विषयाचे ज्ञानच 'ज्ञान' आहे.

**स्पष्टीकरण**

1) **च भारत सर्वक्षेत्रेषु क्षेत्रज्ञं मां अपि विध्दि:** सर्व क्षेत्रे म्हणजे संपूर्ण शरीर. क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा वा परमात्मा. इथे भगवान केवळ देह आणि आत्मा यातील भिन्नताच वर्णन करत नाहीत कारण की देह आणि आत्मा यातील भिन्नतेचे वर्णन तर सांख्य मतावलंबी आणि जैन मतावलंबी यांनीही मान्य केले आहे पण सांख्यमतवादी आणि जैन अनंत देहांप्रमाणे आत्माही वेगवेगळे अनंत मानतात. गीतेचे असे मत आहे की शरीर कितीही असोत तरीसुध्दा आत्मा एकच आहे. जड सृष्टीच्या पाठीमागे जो आत्मा वा परमात्मा आहे तोच जीवसृष्टीतही आहे. गीता वा वेदान्ताचा हा महत्वपूर्ण सिध्दांत आहे. एकाच परमात्म्याला सर्वत्र व्याप्त मानणारे रामानुज वगैरे आचार्य आहेत. तेही परमात्म्यापासूनच जीवाची उत्पत्ती मानतात पण वेदान्ताचे असे म्हणणे आहे की जीव ईश्वरापासून उत्पन्न झालेला नाही. गीतेचेही हेच मत आहे. एका ईश्वरानेच अगणित शरीर आणि जीवांचा भास उत्पन्न केला आहे. जड जगत ईश्वराचा 'जडाभास' आहे तर चैतन्यस्वरुपी असल्यामुळे जीव हा ईश्वराचा 'चिदाभास' आहे. ईश्वर ज्ञान स्वरुपी आहे त्यामुळे तो अगणित शरीरांमध्ये जीव म्हणजे चैतन्याच्या रुपात - ज्ञानस्वरुपात प्रकट असतो. ईश्वर ज्ञान स्वरुप तर आहेच शिवाय अलौकिक शक्तीसंपन्नही आहे. याच अलौकिक शक्तीला 'माया' म्हटले जाते. ईश्वर जर केवळ ज्ञानस्वरुप असता आणि त्याच्या ठायी अलौकिक शक्ती नसती तर केवळ ज्ञानशक्तीच्या बळावर तो जगताचा भास करवू शकला नसता. जीवाचाही आभास घडवू शकला नसता. केवळ ज्ञानस्वरुपता ही वस्तुशून्यतेच्या निकट मानली जाते पण ज्ञानशक्तीच्या ठायी सर्ग शक्ती असते. या शक्तीच्या ठायी जड आणि जीवाचा भास करवून देण्याची क्षमता असते. यामुळे ती सर्वांवर नियंत्रण राखू शकते. ही परमात्म ज्ञानशक्ती आहे. जिथे तिथे ईश्वराने आपल्या अलौकिक शक्तीच्या बळावर स्वत:ला झाकून ठेवलेले असते. अर्थात् आपल्या ज्ञानशक्तीला गुप्त राखलेले असते. जिथे जीवनाचा आविष्कार दिसून येतो - प्रकटीकरण झालेले असते तिथे ईश्वराने आपली ज्ञानशक्ती प्रकट केली आहे. आपली ज्ञानशक्ती प्रकट करणे वा गुप्त राखणे अलौकिक शक्तीचेच कार्य मानले जाईल. ज्ञानसंपन्न पण शक्तीरहित - शक्तीविहीन ईश्वर विश्वनिर्मितीच्या कामी कधी समर्थ ठरु शकत नाही. शक्तीविहीन ईश्वर विश्वाचे निमित्तकारण बनू शकत नाही मग विश्वाचे उपादान कारण बनणे तर लांबच राहो. कुंभार घटाचे निमित्तकारण आहे, उपादानकारण नव्हे. उपादानकारण माती आहे पण कोळी आपण विणलेल्या जाळ्याचे स्वत:च उपादान कारण आहे, उपादानकारण व निमित्तकारण दोन्ही असल्यामुळे ज्ञानस्वरुप असूनही अतिशय अद्भुत अशा शक्तीने संपन्न आहे. या अद्भुत शक्तीला 'माया' असे म्हणतात. या माया शक्तीने ईश्वर जड पदार्थ आणि सजीव जीवांचा भास करवत असतो.

2) **यत् क्षेत्र - क्षेत्रज्ञयो:** ज्ञानं तत् ज्ञानं मम मतम् क्षेत्रज्ञाचे ज्ञान देह आणि आत्मतत्वाच्या फरकाला समजून घेणे आहे आणि यालाच 'ज्ञान' म्हणतात, असे माझे मत आहे. ज्ञान दोन प्रकारचे असते एक वस्तुचे ज्ञान. हे बुध्दीने ग्रहण करता येते. बुध्दीने वस्तुचे ग्रहण होते आणि त्या वस्तुचे वा विषयाचे ज्ञान बुध्दीला होते. विद्वान किंवा शास्त्री - पंडितांना अनेक विषयांचे ज्ञान होते. दुसरे ज्ञान अधिक सखोल आहे. बुध्दीद्वारे आपल्याला वस्तुचे ज्ञान होते. वस्तुला ग्रहण करता येते. या प्राप्त झालेल्या ज्ञानाला बुध्दीपर्यंतच मर्यादित न राखता त्याला हृदयगत करणे - त्या ज्ञानाला आचरणात आणणे - त्या ज्ञानानुसार आचरण करणे हे ज्ञान सक्रिय ज्ञान होय. केवळ बौध्दिक ज्ञान हे निष्क्रिय ज्ञान होय. निष्क्रिय स्वरुपाचे असल्यामुळे बौध्दिक ज्ञान प्राप्त करुन घेणे सोपे आहे पण ज्ञान

आचरणात आणणे खूप अवघड असते. देह आणि आत्मा वेगवेगळे आहेत हे कळले - याचे ज्ञान झाले पण केवळ बुध्दीने म्हणजे बुध्दीच्या सहाय्याने हे जाणून घेतले तर तो अनुभव झाला - ते ज्ञान अनुभवात आले असे नाही मानता येणार. हरक्षणी जागृत राहून या ज्ञानाला अनुभवून घेतले तर अखेर या सरावामुळे या ज्ञानाचा अनुभव घेता येऊ शकतो. यामुळे याच अध्यायात पुढे 7 ते 11 या पाच श्लोकांमधून भगवंतांनी ज्ञानाची लक्षणे वर्णिली आहेत. जे आचरणात उतरते तेच ज्ञान होय. शेष सारे अज्ञान आहे.

'गीताई चिंतनिका' मधून या श्लोकावर भाष्य करताना विनोबा लिहितात --"जीवात्म्यासाठी शरीर हे क्षेत्र आहे. माणसाच्या कर्तव्याचे क्षेत्र त्याच्या देहाच्या अवती-भवती असते आणि देहाच्या आधारेच तो त्याचे पालन करतो. यातूनच स्वधर्मनिष्ठेचा सिध्दांत प्रकट होतो. या शरीर वगैरेला जाणणारा आत्मा याहून भिन्न केवळ साक्षीरुप असतो. तोच मी आहे अशी ओळख करुन घेणे आत्मज्ञानाचे प्राथमिक स्वरुप होय. अशाप्रकारे भिन्न-भिन्न क्षेत्रात वा देहात साक्षीरुपाने आत्मा वसतो. तो भिन्न नसून एकाच ईश्वराचा वेगवेगळ्या प्रकारचा आभास आहे, हे जाणून घेता यायला हवे. हे जाणून घेता येणे आत्मज्ञानाचे अंतिम रुप होय."

: 3 :

***तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ।***
***स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रृणु ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- तत् क्षेत्रं यत्: ते क्षेत्र काय आहे?
- च यादृक्: आणि कसे आहे?
- च यद्विकारि: आणि कोणकोणत्या विकारांनी युक्त आहे?
- यत: च यत्: आणि या विकारांचा क्रम कसा आहे?
- च य: स: आणि जो क्षेत्रज्ञ आत्मा आहे, त्याचे स्वरुप काय म्हणजे कसे आहे?
- च यत्प्रभाव: आणि त्याचा प्रभाव काय?
- तत् मे समासेन श्रृणु: ते तू माझ्याकडून संक्षिप्तपणे ऐक.

**अर्थ**

ते क्षेत्र जे आणि जसे आहे, तसेच ज्या विकारांनी युक्त आहे आणि ज्या कारणांपासून जे झाले आहे, तसेच तो क्षेत्रज्ञही जो आणि ज्या प्रेमभावाने युक्त आहेते सर्व थोडक्यात माझ्याकडून ऐक.

***क्षेत्र कोण कसें त्यांत विकार कुठले कसे ।***
***क्षेत्र-ज्ञ तो कसा कोण ऐक थोड्यांत सांगतों ॥***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ते क्षेत्र काय आहे? म्हणजे त्या क्षेत्राचे स्वरुप काय आहे? 2)आणि ते क्षेत्र कसे आहे म्हणजे त्याचे गुण कोणते आहेत? 3) ते क्षेत्र कुठल्या- कुठल्या गुणांनी युक्त आहे? 4) त्या क्षेत्रातल्या विकारांचा क्रम काय आहे ? 5) म्हणजे आत्म्याचे स्वरुप काय आहे ? 6) त्या क्षेत्रज्ञाचा प्रभाव काय आहे ? ते किती व्यापक आहे ? या बाबतीत तू माझ्याकडून ऐक. मागील श्लोकात क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ असा उल्लेख आला आहे. त्याचे स्वरुप सांगणारा हा प्रस्तावना स्वरुप श्लोक आहे. या श्लोकात काही क्षेत्र वा क्षेत्राचे स्वरुप सांगितलेले नाही. ती तर चर्चा पुढील श्लोकांमधून येणार आहे. या श्लोकात तर पुढे येणाऱ्या विषयांची केवळ प्रस्तावना केली आहे.

**स्पष्टीकरण**

1) तत् क्षेत्रं यत्: ते क्षेत्र काय आहे? म्हणजे त्या क्षेत्राचे स्वरुप काय आहे?

क्षेत्राच्या स्वरुपाच्या संदर्भात चार प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न आहे की क्षेत्राचे स्वरुप काय आहे? कुठलाही पदार्थ असो त्याचे एक विवक्षित स्वरुप असते. उदाहरणार्थ अग्नीचे स्वरुप उष्णता आणि उजेड (प्रकाश) आहे. पाण्याचे स्वरुप अग्नीहून भिन्न आहे. पदार्थ आपल्या स्वरुपापासून कदापि भिन्न नसतो. तर क्षेत्र वा शरीराचे स्वरुप काय? म्हणजे शरीर किती आणि कोणत्या तत्वांनी बनलेले आहे?

2) **च यादृक्:** ते क्षेत्र कसे आहे? म्हणजे त्या क्षेत्राचे गुण कुठले आहेत? स्वरुपानंतर जागतो गुणांचा प्रश्न.

उदाहरणार्थ एक काठी पंच महाभूतांपासून बनली आहे, हा झाला पहिला मुद्दा. त्या काठीत कोण-कोणते गुण आहेत, हा दुसरा मुद्दा झाला. काठीत शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे पाच गुण आहेत. तशाच प्रकारे हे क्षेत्र म्हणजे शरीर जे आहे, त्याचे कोणकोणते गुण आहेत ?

2) च यद्विकारि: आणि ते क्षेत्र कोण-कोणत्या विकारांनी युक्त आहे ? उदाहरणार्थ सृष्टीतला कुठलाही जड पदार्थ घ्या. त्यात सहा विकार दिसून येतात. 1) पदार्थाचे उत्पन्न होणे. 2) मग काही काळापर्यंत अस्तित्वात असणे. 3) त्यानंतर पदार्थांच्या ठायी परिवर्तनाची प्रक्रिया सुरु होणे. 4) हे परिवर्तन आरंभी वृध्दीचे असणे म्हणजे पदार्थ आधी वाढतो. 5) काही काळानंतर पदार्थांचे क्षीण होणे. 6) आणि मग नष्ट होणे. याचप्रकारे शरीरात कोण-कोणते विकार होतात? अथवा हे पदार्थ कार्य वा विकार कोण्या कारणाने उत्पन्न होतात? कारणापासून उत्पन्न होणाऱ्या वस्तुला कार्य वा विकार म्हटले जाते. तसेच शरीरही जणू एक पदार्थ आहे. हा पदार्थ कार्य वा विकार कुठल्या कारणांनी उत्पन्न झाला आणि कोणत्या विकारांनी युक्त आहे ?

3) यत: च यत्: आणि या क्षेत्रातील विकारांचा क्रम काय आहे ? कापड जर कार्य असेल तर ते सूतापासून बनते आणि सूतही कार्य आहे जे कापडापासून तयार होते अशाप्रकारे पदार्थांच्या ठायी कार्यकारण भाव शृंखला जारी असते. तसेच शरीर कुठल्या तत्वांनी बनले आहे? आणि त्याचा क्रम काय आहे? विकारांचा क्रम काय आहे? हा आहे चौथा प्रश्न.

4) च य: स: जो क्षेत्रज्ञ आहे. त्याचे स्वरुप कसे आहे ? शरीराच्या स्वरुपासंबंधी ज्याप्रमाणे प्रश्न विचारला तसाच त्याला जाणणाऱ्या क्षेत्रज्ञ आत्म्याच्या स्वरुपाच्या बाबतीतही प्रश्न विचारला आहे.

5) च यत्प्रभाव: आणि त्या क्षेत्रज्ञचा प्रभाव केवढा आहे म्हणजे क्षेत्रज्ञचे स्वरुप किती व्यापक आहे? एखाद्या वस्तुचा प्रभाव मर्यादित स्वरुपाचा असतो तर दुसरी वस्तु अधिक व्यापक स्वरुपाची असते. उदाहरणार्थ सर्व पदार्थ मर्यादित स्वरुपाचे आहेत. आकाश अत्यंत व्यापक स्वरुपाचे आहे. क्षेत्रज्ञ आत्मा अन्य पदार्थांप्रमाणे मर्यादित आहे की आकाशासारखा व्यापक स्वरुपाचा आहे, हा प्रश्न क्षेत्रज्ञाच्या संदर्भात उपस्थित होतो.

भगवान अखेरीस सांगतात की क्षेत्र-क्षेत्रज्ञाच्या संदर्भात ज्या गोष्टी उपस्थित झाल्या आहेत, त्या थोडक्यात सांगतो, ऐक.

: 4 :

***ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधै: पृथक् ।***
***ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितै: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ऋषिभि:** ऋषी - मुनींनी
- **बहुधा:** अनेक प्रकारांनी
- **गीतं:** गाईलेले
- **विविधै: छंदोभि:** निरनिराळ्या मंत्रांनी
- **पृथक् (गीतं):** वेगवेगळ्या प्रकारे विभागपूर्वक गाईले गेलेले
- **च:** आणि
- **हेतुमद्भि: विनिश्चितै:** तर्कबध्द आणि अत्यंत निश्चित
- **ब्रह्मसूत्रपदै: एव:** अशा ब्रह्मसूत्राच्या वचनांनीही (नाना प्रकारे गाईले गेले आहे.)

**अर्थ**

हे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचे तत्व ऋषींनी पुष्कळ प्रकारे सांगितले आहे आणि निरनिराळ्या वेदमंत्रांमधूनही विभागपूर्वक सांगितले गेले आहे तसेच पूर्णपणे निश्चय केलेल्या ठाम अशा ब्रह्मसूत्राच्या पदांनीही सांगितले गेले आहे.

***ऋषींनीं भिन्न मंत्रांत गाइलें हें परोपरी ।***
***वर्णिलें ब्रह्म-वाक्यांत सप्रमाण सुनिश्चित ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ऋषी- मुनींच्या द्वारे अनेक प्रकारे गाईले गेलेले, नाना प्रकारच्या मंत्रांनी वेगवेगळ्या रुपात गाईले गेलेले. 2) आणि तर्कबध्द व अत्यंत ठाम अशा ब्रह्मसूत्रांच्या वचनांद्वारेही नाना प्रकारे गाईले गेलेले आहे.

**स्पष्टीकरण -**

1) **ऋषिभि: बहुधा गीतं विविधै: छंदोभि:** पृथक् गीतम्  ऋ षी-मुनींनी अनेक प्रकारच्या मंत्रांनी विविध प्रकारे गाईले. मागील श्लोकात जे म्हटले की 'क्षेत्र-क्षेत्रज्ञ यांच्या संदर्भात सांगत आहे. त्याच संदर्भात हे निवेदन आहे. शरीर आणि शरीराला जाणणाऱ्या आत्मतत्वाची ओळख करुन देण्यासाठी मी कोणत्या आधाराने - प्रमाणाने - हे सांगत आहे असे सांगत त्या आधाराबद्दल भगवंत या श्लोकात सांगताहेत. भगवान कृष्ण इतके विनम्र आहेत की मी स्वतंत्रपणे काही सांगत आहे असे म्हणण्याऐवजी मी हे ऋषी - मुनींच्या मताधारे सांगत आहे असें विनयाने म्हणताहेत. खऱ्या ज्ञानवंताच्या ठायी सहज नम्रता नांदते. आधी असे सांगितले की ऋषी - मुनींनी नाना प्रकारे या क्षेत्र - क्षेत्रज्ञ स्वरुपाच्या संदर्भात वर्णन केले आहे. 'बहुधा गीतम्' म्हणजे निरनिराळ्या प्रकारे गाईले गेलेले आहे. गाईले गेले आहे म्हणजे पद्यात गाईले गेले आहे. उपनिषदाच्या मंत्रद्रष्ट्यांसाठी ऋषी शब्दाचा प्रयोग केला आहे. ज्याने ईश्वराचाअनुभव प्रत्यक्षपणे घेतला असे परमज्ञानी म्हणजे ऋषी होय. ऋषी-मुनींनी वेगवेगळ्या प्रकारे ईश्वराचे गुणगान केले आहे. क्षेत्र म्हणजे शरीराचा परिचय उपनिषदांमधून येतो पण तो खूप थोड्या ठिकाणी. सर्वच उपनिषदांमधून क्षेत्रज्ञ म्हणजे ईश्वराचेच गुणगान आढळते. उपनिषदाच्या ऋषींची शैली एकाच वस्तुला विविध प्रकारे वर्णन करुन सांगायची आहे. वस्तु एक असतानासुध्दा त्यासंबंधीचे वर्णन वाचताना कंटाळा कसा तो येतच नाही. पद्य असल्यामुळे गाताना आनंद होतो पण उपनिषदांमध्ये पद्यासोबत गद्यही आहे. ते गद्यात्मक वर्णन वाचतानाही आनंद होतो. अनुभवलेली वाणी कदापि नीरस असूच शकत नाही. प्रमुख उपनिषदांची संख्या 10 वा 13 मानली जाते. ईश, केन, कठ, मुंडक, मांडुक्य, प्रश्न, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक हे दहा आणि कौषीतकी, जाबाल आणि श्वेताश्वतर हे तीन मिळून तेरा उपनिषदे होतात. शंकराचार्य हे अलौकिक मेधावी आणि आत्मानुभव संपन्न होते तरीही आपल्या ब्रह्मसूत्र भाष्यात त्यांनी उपनिषदांच्या - म्हणजे - अनुभवी पुरुषांच्या आधारानेच तार्किक मांडणी केली आहे. सांख्य, जैन यासारख्या तत्वज्ञानाचे खंडन मात्र स्वतंत्रपणे केले आहे. शेष तमाम ग्रंथांमध्ये उपनिषदांच्या वचनांच्या आधाराशिवाय तर्क मांडणी त्यांनी कधी केली नाही. गीतेलाही हीच मर्यादा मान्य आहे. यामुळे भगवंत इथे असे सांगत आहेत की या अध्यायात वर्णित क्षेत्र - क्षेत्रज्ञ स्वरुपाविषयी उपनिषदातून खूप वर्णने आली आहेत आणि त्या वर्णनांच्या आधारेच या तेराव्या अध्यायात क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार मांडला जात आहे. हा विचार खूप प्रकारे गाईला गेलेला आहे असे म्हणून पुनश्च त्याचे स्पष्टीकरण करताना असे सांगितले गेले आहे की नाना प्रकारे, विविध मंत्रांनी, वेगवेगळ्या रुपात हे गाईले गेले आहे.

2) **हेतुमद्भि: विनिश्चितै:** ब्रह्मसूत्रपदै: (बहुधा गीतं) तर्कयुक्त आणि अत्यंत ठाम अशा ब्रह्मसूत्राच्या वचनांनींही हे नाना प्रकारे गाईले गेले आहे. इथे प्रश्न जागेल की या ठिकाणी 'ब्रह्मसूत्र' शब्दाचा अर्थ 'ब्रह्मसूत्र' हा ग्रंथ घ्यावा की ब्रह्मतत्वासंबंधी असलेली उपनिषदातील गद्यवचने घ्यावीत ? खरे तर दोन्ही अर्थ घेता येतील कारण की आधी उपनिषदांच्या पद्य - वचनांचा उल्लेख करुन नंतर मग उपनिषदातल्या गद्य वचनांचा उल्लेख 'ब्रह्मसूत्र' या पदाने केला गेला आहे. आधी उल्लेख आला की भिन्न - भिन्न मंत्रांनी हा उल्लेख उपनिषदातल्या पद्य श्लोकांचा निर्देश करतो आणि नंतर उपनिषदांच्या गद्य वचनातही सांगितले गेले आहे, असा अर्थ जर ग्रहण केला गेला तर तो उचितही आहे.

लोकमान्य टिळकांनी 'ब्रह्मसूत्र' शब्दाचा अर्थ 'ब्रह्मसूत्र ग्रंथ' असा केला. ब्रह्मसूत्रात गीतेचा उल्लेख 'स्मृती' असा आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. स्मृती शब्दाचा दोन ठिकाणी तर 'गीता' असाच अर्थ घ्यावा लागतो पण मग ब्रह्मसूत्र गीतेच्या आधीची रचना मानावी लागेल. अनेकांचे मत आहे की गीता 'ब्रह्मसूत्र' ग्रंथाच्या आधीची रचना आहे. गीतेत प्रयुक्त ब्रह्मसूत्र शब्दाचा अर्थ उपनिषदातील गद्य वचने असाच करावा लागेल पण लोकमान्य टिळकांचे असे म्हणणे आहे की 'ब्रह्मसूत्र' शब्दासोबत 'हेतुमद्भि:' शब्द आहे. या शब्दाचा अर्थ 'तर्कयुक्त, प्रमाणांनी युक्त' असा आहे. उपनिषदातल्या कुठल्या गद्य - वचनात तर तर्क केला गेला नाहीच परिणामी हा 'हेतुमद्भि:' शब्द निरर्थक ठरतो. उपनिषदात तर्क करायची पध्दत दिसत नाही. ब्रह्मसूत्रातच तर्काने उपनिषदातले सिध्दांत सिध्द करायचे प्रयत्न दिसून येतात. यामुळे 'हेतुमद्भि:' शब्द

'ब्रह्मसूत्र पदैः' शब्दासोबत आल्यामुळे ब्रह्मसूत्र पद शब्दाचा अर्थ 'ब्रह्मसूत्र ग्रंथ' असा लावणेच योग्य आहे.

लोकमान्य टिळकांच्या या म्हणण्यात तथ्य आहे, हे नि:संशय. 'ब्रह्मसूत्र पदैः' शब्दाचे दोन अर्थ संभवतात. ब्रह्मसूत्र ग्रंथात क्षेत्रज्ञ परमात्म उपनिषदातील वचनांच्या आधारेच तर्काद्वारे सिध्द केले गेले आहे. ही वस्तुस्थिती आहे. क्षेत्रज्ञाचाही उल्लेख आहे. ब्रह्मसूत्र ग्रंथात क्षेत्रज्ञ आत्मा वा परमात्म्याच्या संदर्भात जेवढा शोधपूर्ण विचार तर्काधारे केला गेला आहे तेवढा अन्यत्र क्वचित्‌च एखाद्या ग्रंथात केला गेला असेल. अशाप्रकारे या अध्यायातील क्षेत्र -क्षेत्रज्ञ विचाराचा आधार उपनिषदे आणि ब्रह्मसूत्र ग्रंथ आहेत. लोकमान्य टिळकांचे म्हणणे आहे की गीतेत 'ब्रह्मसूत्र' शब्दाचा उल्लेख येतो आणि ब्रह्मसूत्रात गीतेचा उल्लेख येतो, तर दोन्ही ग्रंथांचा कर्ता एकच व्यक्ती असायला हवी. यामुळे ज्या व्यास महामुनींनी गीता - ग्रंथाची रचना केली त्यानीच ब्रह्मसूत्र ग्रंथाचीही रचना केली आहे, असे मानायला हवे.

: 5 :

*महाभूतान्यहंकारो बुध्दिरव्यक्तमेव च।*
*इंद्रियाणि दशैकं च पंच चेन्द्रियगोचराः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाभूतानिः** पंच महाभूते
- **अहंकारः** अहंकार
- **बुध्दिः** बुध्दी
- **च अव्यक्तम् एवः** आणि अव्यक्त म्हणजे त्रिगुणात्मक माया
- **च दश एकं इन्द्रियाणिः** दहा इंद्रिये आणि एक मन
- **च पंच इन्द्रियगोचराः** पाच इंद्रियांचे विषय

**अर्थ**

पाच महाभूते (पंच महाभूतांचा सूक्ष्म भाव), अहंकार, बुध्दी आणि मूळ प्रकृती तसेच दहा इंद्रिये ( कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक ही ज्ञानेंद्रिये तसेच वाणी, हात, पाय, उपस्थ आणि गुद ही कर्मेंद्रिये होत) एक मन आणि पाच इंद्रियांचे विषय अर्थात् शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध.

***पंच भूतें अहंकार बुध्दि अव्यक्त मूळ जें।***
***इंद्रियें अकरा त्यांस खेचितें अर्थ - पंचक॥***

**विषयः** या श्लोकातून देहाचा परिचय करुन दिला गेला आहे. किती आणि कोणत्या तत्वांच्या माध्यमाने देह बनलेला आहे ते सांगितले गेले आहे. या श्लोकात 6 गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) पृथ्वी, जल, अग्नी, वायु, आकाश ही पाच महाभूते. 2) जीवाशी संबध्द अहंकार. 3) सत् - असत् विवेक शक्ती म्हणजे बुध्दी. 4) आणि अव्यक्त म्हणजे माया शक्ती. 5) दहा इंद्रिये आणि एक मन म्हणजे भावनाशक्ती. 6) पाच विषय - पाच तन्मात्रा - शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध.

**स्पष्टीकरण -**

1) **महाभूतानिः** पंच महाभूते म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी, वायु आणि आकाश. शरीर पंच महाभूतांचे बनलेले आहे. शरीर या सृष्टीचाच भाग आहे पण सृष्टीचे अन्य पदार्थ आणि शरीर यात अंतर आहे. सृष्टीचे सारे पदार्थ जड आहेत त्याप्रमाणे स्थूल शरीरही जड दिसते. तरीही देहात चैतन्यशाली आत्मतत्व आहे. त्याला सुख-दु:खाचा अनुभव होतो. सृष्टीतले जे फक्त जड पदार्थ आहेत त्यांच्यात जाणून घेणे वा सुख-दु:ख अनुभवणे हे धर्म दिसून येत नाही. ब्रह्माडांतल्या तमाम जड पदार्थांच्या ठायी पंचमहाभूते आणि शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे पाच विषय दिसून येतात. शरीरात ही पंचमहाभूते आणि पाच विषय तर आहेतच पण याशिवाय अहंकार, बुध्दी, मन आणि दहा इंद्रियेही आहेत.

2) **अहंकारः** शरीरात अहंकारही आहे. अहंकार अखंड प्रवाही वृत्ती आहे. निज स्वरुप ईश्वराची ओळख नसल्यामुळे 'देह, बुध्दी, मन, इंद्रियांचा संघातच माझे स्वरुप आहे.' असे वाटणे 'मूळ अज्ञान' आहे. या मूळ अज्ञान वा अविद्येमुळे अखंडपणे अहंकार वा अस्मितेचा प्रवाह वहाता असतो. अहंकाराच्या या अखंड प्रवहमान वृत्तीचा प्रत्येकाला अनुभव येतो. यामुळेच अखंड बंधन आणि सुख-दु:खाचा अनुभव होत रहातो. अर्थात् अहंकाराच्या प्रवाहाचा उद्गम अज्ञानातून होतो.

अज्ञानामुळेच हा प्रवाह वहाता रहातो. या अहंकारामुळे राग -द्वेष वगैरे विकार उत्पन्न होतात आणि या विकारांमुळे सुख-दु:ख होते. अशा प्रकारे सारे जीव बंधनात असतात. परमात्म स्वरुपाचा अनुभव आला, त्याची ओळख पटली म्हणजे मूळ अज्ञान नष्ट होईल आणि मग अहंकारही संपून जाईल. राग-द्वेष वगैरे विकार नष्ट होतील, बंधने खळाळून तुटतील. अहंकार घातक वृत्ती आहे. अहंकार वसतो मनात पण देहाच्या पातळीवर अभिमानाच्या रुपाने प्रकट होतो. निंदा वा स्तुतीमुळे दु:ख वा सुख अनुभवायला मिळणे अहंकार आहे. हा अहंकार शरीरात आढळतो, शरीराअभावी हा दिसून येत नाही. देह, विषय यासारखे पदार्थ ज्ञेय कोटीत येतात त्याचप्रमाणे अहंकार, बुध्दी वगैरे स्थूल पदार्थ नसल्यामुळे, प्रत्यक्ष दिसू शकत नसले तरी जाणले जातात. आपल्याला त्यांचे ज्ञान होते. आपल्याला अहंकाराचेही ज्ञान होते. म्हणजे या सूक्ष्म स्थितीसुध्दा ज्ञेय प्रकारात मोडत असल्यामुळे ज्ञेय म्हणजे शरीराच्या ठायी समाविष्ट आहेत.

3) **बुध्दि:** बुध्दी ही मनात वसणारी सूक्ष्म शक्ती आहे. या शक्तीच्या जोरावर सत् - असत् म्हणजे चांगले - वाईट, नीती - अनीती, धर्म - अधर्म, कार्य - अकार्य, योग्य - अयोग्य वगैरे तपासून बघता येते. बुध्दीमुळे वस्तुचे ग्रहण वा ज्ञान होते. बाह्य ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून पदार्थांच्या बाह्य ज्ञानाचा परिचय होतो पण केवळ ज्ञानेंद्रियांच्या मदतीने पदार्थांचे ज्ञान होत नाही. ज्ञानेंद्रियांशी संबध्द वस्तु आत असल्यावरच पदार्थांचे ज्ञान होते. डोळ्यांनी रुपाचे ज्ञान होते, कानांनी शब्दाचे ज्ञान होते पण रुप चांगले वा वाईट, ग्रहण करण्यायोग्य आहे वा नाही हा निश्चय - निर्णय - बाह्य ज्ञानेंद्रीयांमुळे करता येत नाही. तो बुध्दी या इंद्रियानेच होतो.

4) **च अव्यक्तं एव:** अव्यक्त म्हणजे मूळ प्रकृती, माया शक्ती होय. सृष्टीतले तमाम पदार्थ कार्य असून ते आपापल्या कारणांमुळे उत्पन्न झाले आहेत. अगदी तशाच प्रकारे शरीर, मन, इंद्रिये, अहंकार, बुध्दी वगैरेंचा जो संघात आहे ते कार्य आहे, यामुळेच त्याचे काही कारण असायला हवे. भगवंताने इथे शरीररुपी या संघाताचे कारण सांगितलेले आहे. हा सारा शरीररुपी संघात अव्यक्त म्हणजे ईश्वराच्या माया - शक्तीमुळे उत्पन्न झाला आहे यामुळे शरीररुपी संघाताचा आधार असलेल्या अव्यक्त माया शक्तीचा समावेश शरीरात करावा लागतो.

शरीराच्या संघाताची तत्वे सांख्यकारांनी गीतेप्रमाणेच मानली आहेत पण याच्या आधाररुपी प्रकृतीला मात्र स्वतंत्र तत्व मानले आहे. यासोबतच ते असेही मानतात की या शरीररुपी संघाताप्रमाणेच आधारस्वरुपी मूळ कारणरुप प्रकृतीही जडच आहे. जडापासून जडाची उत्पत्ती होऊ शकते असे त्यांचे मानणे आहे. चैतन्यस्वरुपी परमात्मा वा परमात्म्याच्या शक्तीपासून जड पदार्थ उत्पन्न होऊ शकत नाही. यामुळे जड सृष्टीचे मूळ कारण जड प्रकृतीच आहे. ते स्वतंत्र तत्व आहे परंतु वेदान्ताची अशी मान्यता आहे की प्रकृतीचे स्वतंत्र अस्तित्व नाही. ती एक शक्ती असून चैतन्यस्वरुपी ईश्वराच्या ठायी ईश्वराच्या आधाराने स्थित आहे. त्या शक्तीचे कार्य जगताचा भास करवणे आहे पण ती शक्ती जगताचा भास स्वतंत्रपणे करुन देऊ शकत नाही कारण की जगात व्यवस्था असल्याचे ध्यानी येते. केळ्यापासून केळेच बनते, आंबा नव्हे आणि आंब्यापासून आंबाच बनतो, केळे नव्हे. अशाप्रकारे संपूर्ण ब्रह्माडांत विशेष व्यवस्था आहे. घर तयार करायचे कार्य काही आपोआप होत नाही किंवा कुठली जड शक्ती घर तयार करु शकत नाही. घराच्या निर्मितीत चैतन्यशाली माणसाची गरज असते अशाच प्रकारे ईश्वराची अलौकिक माया अथवा प्रकृती चैतन्यस्वरुपी ईश्वराच्या अधीन असते आणि ईश्वरी प्रेरणेनुसार ब्रह्मांडातल्या सर्व पदार्थांची निर्मिती करते. ही मायाशक्ती शरीराचा आधार आहे. ती अव्यक्त म्हणजे दिसू न शकणारी असते.

5) **च दश एकं इंद्रियाणि:** आणि दहा इंद्रिये म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये अशी दहा इंद्रिये आणि एक मन अशी अकरा इंद्रिये आहेत. बाह्य ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रियांशिवाय आत एक आणखी मन नावाचे इंद्रिय आहे. ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये स्थूल असून त्यांचे अस्तित्व बाहेरुन दिसू शकते. तरी एवढे मात्र खरे की या दहा इंद्रियांची शक्ती शरीरातच असते. उदाहरणार्थ डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा बाहेर दिसते पण बघणे, ऐकणे, हुंगणे वगैरे शक्ती आत असतात. डोळे, कान, नाक वगैरे ठिकाणी ती शक्ती त्या त्या रुपात प्रकट होते. त्याचप्रमाणे कर्मेंद्रियांची शक्तीही त्या त्या स्थानी आतच असते. यामुळेच मृत्यु समयी शरीरात सर्व ज्ञानेंद्रिये वा कर्मेंद्रिये दिसत असतात

पण मृत शरीरातून निघून गेल्यामुळे ज्ञानेंद्रियांची बघणे, ऐकणे वगैरे कार्ये वा कर्मेंद्रियांची वस्तु उचलणे वगैरे कार्ये दिसून येत नाहीत. दुसरे शरीर धारण केल्यावर त्या सजीव शरीरात त्यांचे कार्य पुनश्च सुरु होऊन जाते.

मन अत्यंत सूक्ष्म आणि अद्भुत आहे. त्यातच समग्र सृष्टीचा अनुभव असतो. बाह्य सृष्टी जोवर मनात उभी रहात नाही तोवर तिचे ज्ञान आपणास होत नाही. आपले कुणाशी भांडण होऊन जाते. भांडण तर दहा - पाच मिनिटे वा काही काळ चालते नंतर मग ते भांडण बाहेर उरत नाही मग त्यापासून उत्पन्न होणारे दुःखही तेवढ्याच काळापुरते असायला हवे पण बाहेरुन भांडण समाप्त झाल्यावरही आत - आत इतक्या काही तीव्रतेने सुरु असते - चालत रहाते की त्यामुळे खूप त्रास होतो. झोपायच्या वेळीही आपण त्यापासून मुक्त होऊ शकत नाही. भांडण असते अर्ध्या तासाचे पण मनात चालते महिनो न् महिने. मनातच सुखाचा आणि दुःखाचा अनुभव येतो. तिथेच बंधनाचा अनुभव येतो आणि बंधनमुक्तीचा अनुभवही तिथेच येतो. मनात जिथे काम, क्रोध वगैरे विकारांचा अनुभव येतो तिथेच निर्विकारतेचा अनुभवही घेता येतो. बुध्दीही मनाचीच एक शक्ती आहे. मनापासून वेगळी अशी बुध्दी नावाची कुठली वस्तु नाही. सार-असाराचा विचार करुन बुध्दी विवेकपूर्वक वस्तुच्या बाबतीत निर्णय घेते. त्या निर्णयाला अमलात आणायचे काम मन करते. मन भावनात्मक आहे. वेळोवेळी मनात नाना शुभाशुभ भावना घटित होतात. बुध्दीद्वारे निर्णय घेतल्यावर त्याचे अमलात आणणे मनाच्या भावनेवर अवलंबित असते. मनातल्या निग्रह शक्तीच्या अभ्यासानुसार मनात भावना जागृत होतात. निश्चयाला अमलात आणणे - कृतीत आणणे - हे त्याच निग्रह शक्तीवर अवलंबून आहे.

6) **पंच चेंद्रियगोचरा:** पाच विषय शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध. सृष्टीच्या तमाम पदार्थात हे पाचही विषय आहेत. सृष्टीचाच एक भाग वा घटक असल्यामुळे शरीरातही हे पाच विषय असतात. शरीर रुपयुक्त आहे. आपण बोलतो तर शरीरातून प्रकट होणारा आवाज आपल्याला ऐकता येतो. आपण आपले रुपही बघतो. शरीराला वास यायला लागतो तर आपले शरीर स्वच्छ आहे की नाही याचे आपल्याला ज्ञान होते. शरीराच्या एखाद्या भागाला आपण चाटू लागलो तर शरीराच्या रसाचे ज्ञान होईल. स्पर्श करतो तर त्वचेच्या स्पर्शाचे ज्ञान होते. अशाप्रकारे पंच विषय ज्याप्रमाणे बाहेर ब्रह्मांडात आहेत, तसे शरीर वा पिंडातही आहेत.

: 6 :

***इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।***
***एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इच्छा:** इच्छा
- **द्वेष:** द्वेष
- **सुखं:** अनुकूल वेदना
- **दुःखं:** प्रतिकुल वेदना
- **संघात:** शरीर आणि सर्व इंद्रियांचा समुदाय
- **चेतना:** चेतना (व्यापार)
- **धृतिः** धृतीशाली
- **एतत् क्षेत्रं:** हे क्षेत्र
- **सविकारं:** विकारांसहित (आहे)
- **समासेन:** (हे) थोडक्यात
- **उदाहृतम्:** मी तुला सांगितले

**अर्थ**

तसेच इच्छा, द्वेष, सुख, दुःख, स्थूल देहाचा पिंड, चेतना (शरीर आणि अंत:करण यांची एक प्रकारची चेतनशक्ती) आणि धृती अशा प्रकारे विकारांसहित हे क्षेत्र थोडक्यात सांगितले गेले आहे.

***इच्छा द्वेष सुखें दुःखें धृति संघात चेतना ।***
***विकार-युक्त हें क्षेत्र थोड्यांत तुज बोलिलों ॥***

**विषय:** या श्लोकात शरीरासंबंधीच्या आठ गोष्टी सांगितल्या आहेत, त्या अशा 1) सुखाला निमित्त बनणाऱ्या पदार्थांचे ग्रहण करायची इच्छा. 2) प्रतिकुल पदार्थांबाबत द्वेष भावना. 3) सुख म्हणजे अनुकूल वेदना. 4) दुःख म्हणजे प्रतिकुल वेदना. 5) संघात म्हणजे शरीर आणि सर्व इंद्रियांचा समुदाय. 6) चेतना म्हणजे हालचाल. 7) एक दुसऱ्याशी चिकटून रहाण्याची शक्ती. 8) हे क्षेत्र

वा शरीर. याचे आपल्या विकारांसह असलेले रुप मी तुला थोडक्यात सांगितले.

शरीर कोणत्या तत्वांनी बनलेले आहे याचा ऊहापोह पाचव्या श्लोकात केला. हा विषय या सहाव्या श्लोकात पूर्ण करुन सांगितला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **इच्छा:** सुखासाठी जे जे पदार्थ निमित्त ठरतात त्यांना चाहणे म्हणजे इच्छा होय. ही वृत्ती प्राणीमात्राच्या ठायी आहे. कणाद मुनींनी इच्छा, द्वेष इत्यादींना आत्म्याचे धर्म मानले आहेत पण ते मनाचेही धर्म आहेत हे सांगण्यासाठी इथे क्षेत्रातच म्हणजे शरीरातच त्यांचा समावेश केला गेला आहे, असे विशेषत: सांगितले आहे कारण की धर्मक्षेत्र म्हणजे शरीराप्रमाणे ते जाणून घेण्यासारखे आहे म्हणजे कुणामुळे ते जाणले जातात. आत्मा ज्ञाता असून शेष सारे धर्म ज्ञेय आहेत. ज्ञेय कोटीचे धर्म ज्ञात्याचे धर्म असू शकत नाहीत. ना ज्ञाता कधी ज्ञेय बनू शकत, ना ज्ञेय कधी ज्ञाता बनू शकत कारण की ज्ञाता हा चैतन्यस्वरुपी - ज्ञानस्वरुपी असून सारे ज्ञेय पदार्थ अगदी इच्छा, द्वेषापासून तर थेट बाह्य पदार्थांपर्यत - सारे जड आहेत. जड पदार्थ आत्म्याला ओळखू शकत नाही पण आत्मा मात्र जड पदार्थांना ओळखतो. इच्छा अखेर शेवटी दु:खाचे कारण बनते. सुखाला निमित्त असणारे जे जे पदार्थ असतात ते ते सदा मिळत रहावेत अशी इच्छा होणे स्वाभाविक आहे कारण की तो मनाचा धर्म आहे. इच्छा त्याज्य आहे असे काही नाही. इच्छेचा स्वभाव वाढत जाण्याचा आहे आणि वाढत जाण्याला काही अंत नसल्यामुळे अखेरीस ती दु:खदायक सिध्द होते. यामुळे ती त्याज्य होऊन जाते पण त्याज्य म्हटल्यावर का सुटून जाते? इच्छेचा त्याग करायचा एक उपाय आहे. कदापि दु:ख न देणाऱ्या आणि ताब्यात रहाणाऱ्या वस्तुची इच्छा केली तर हे शक्य आहे. तुलसी रामायण वाचून आनंद वा सुखाचा लाभ होतो तर ती आपल्या ताब्यातील गोष्ट आहे आणि रामायण पठनाची इच्छा वाढली तरी ती दु:खदायक होणार नाही - पराधीन - पर स्वाधीन असलेले सुख खरे तर सुख नसून दु:खच आहे. यामुळेच तुलसीदासांनी लिहिले आहे. 'पराधीन सपनेहुं सुख नाहीं' परस्वाधीन माणसाला स्वप्नातही सुखाचा लाभ होऊ शकत नाही.

2) **द्वेष:** दु:खाला कारणीभूत होणाऱ्या प्रतिकुल पदार्थांबाबत तिरस्कार उत्पन्न होणे. अनुकूल पदार्थांमुळे जसे सुख लाभते तसेच प्रतिकुल पदार्थांमुळे दु:ख उपजते, त्या विषयी तिरस्कार उत्पन्न होतो याला द्वेष असे म्हणतात.

3) **सुखम्:** सुख म्हणजे अनुकूल वेदना वा अनुभव. सुख जसे शारीरिक असते तसे मानसिकही असते. त्याला बाह्य सुख आणि आंतरिक सुख असेही म्हणता येईल. शरीराशी संबंधित सुख बाह्य सुख होय. थंडीच्या दिवसात शेकोटीच्या नजिक बसले असता सुख वाटते. उत्तम भोजन केल्यावर सुखलाभ होतो. चांगला पाऊस झाला तर शेतकऱ्याला सुख वाटते. तब्येत नेहमी ठणठणीत असली तर सुखाचा अनुभव येतो. ही सारी सुखे शरीराशी संबध्द आहेत. कुणी आपली खूप प्रशंसा - स्तुती - केली तर आपल्याला सुख वाटते, हे झाले मानसिक सुख. मन चंचळ न होता एकाग्र राहिले तर सुख लाभते. काम, क्रोध वगैरे विकार उपजले नाहीत तर सुख वाटते. ईश्वराचे अखंड स्मरण राहू लागले, त्याचे स्मरण होताच नेत्रातून झरझर आसवं वाहू लागलीत तर सुखाचा लाभ होतो. आई - वडील, गुरुजन, भाऊ - बहीण यांची आठवण झाली तर त्यामुळे मनात प्रेम उपजते आणि सुखाचा अनुभव येतो. हे सारे मानसिक सुखाचे प्रक ार आहेत.

4) **दु:खम्:** दु:ख म्हणजे प्रतिकुल वेदना होय. अनुकूलतेमुळे जसे सुख वाटते तसे प्रतिकुलतेमुळे दु:ख वाटते. नेहमीच वांछित मनोकामना असेलच असे काही नाही. जसा अनुकूलतेचा अनुभव येतो तसा प्रतिकुलतेचा अनुभवही होतच रहाणार. पावलोपावली प्रतिकुलतेचा अनुभव येईल. सुखाप्रमाणेच दु:ख देखिल शारीरिक व मानसिक असतात. सुख - दु:खा संबंधीच्या अनुभवांची गणना करता येणार नाही. प्रतिकुलतेचा सामना करावाच लागतो.

5) **संघात:** संघात म्हणजे शरीर आणि सर्व इंद्रियांचा समुदाय. शरीर अनेक तत्वांचा समुदाय आहे. शरीर अनेक तत्वांनी बनते. जीवंत शरीर काही फक्त पंच महाभूतांचाच समुदाय नाही. पंच महाभूते, पाच विषय, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिय, मन, बुध्दी, अहंकार आणि जीवात्मा या सर्वांच्या एकत्र येण्यातून हे जीवंत शरीर साकारते.

6) **चेतना:** चेतना म्हणजे आत्मतत्व प्रकट झाल्यामुळे देहात दिसून येणारी हालचाल वा व्यापार होय. चैतन्य

वेगळे आणि चेतना वेगळी होय. चैतन्य म्हणजे ज्ञानस्वरुप आत्मा. चैतन्यस्वरुपी आत्मा ब्रह्मांडातला आहे पण तिथे प्रकट नाही त्यामुळे ब्रह्मांडातील सर्व पदार्थांच्या ठायी चैतन्यस्वरुपी आत्म्याच्या अस्तित्वामुळे प्रकट होणारा चेतना धर्म दिसून येत नाही पण तिथे सुख - दु:खाचा अनुभव देणारा जीवभाव प्रकट झाला आहे तिथे ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मन वगैरे इंद्रिये प्रकट होतात त्यांच्या सोबतच चेतनेचा हा धर्मही प्रकट होतो. आत्मा वा परमात्मा अनंत शक्तींनी युक्त आहेत त्यामुळे त्यांची अलौकिक शक्ती नाना रुपात प्रकट होत रहाते - आविष्कृत होत रहाते. इंद्रिये त्याचीच शक्ती आहेत. अंतरंग आणि बाह्य इंद्रिये - ज्ञानेंद्रिये वगैरे आणि चेतना हे सारे सजीव शरीरात ईश्वरी शक्तीच्या रुपानेच प्रकट आहेत. पशु, पक्षी, माणूस, किटक वगैरे असंख्य प्राणी या शक्तींनी युक्त आहेत. परमात्म्याच्या शक्तीची अलौकिकता हीच आहे की ती कदापि क्षीण होत नाही. अनादिकाळापासून जन्म - मरणाचे चक्र अखंडपणे सुरु आहे तरीही ईश्वराची शक्ती जशीच्या तशी उरली आहे. ‘चुंबकाच्या केवळ अस्तित्वामुळे लोखंडात हालचाल म्हणजे चेतना उत्पन्न होते.’ तशाच प्रकारे चैतन्यस्वरुपी आत्मा वा ईश्वराच्या अस्तित्वामुळेच देहात चेतना दिसून येते. चेतनारहित शरीर मृत होऊन जाते. शरीराची रचना अद्भुत आहे पण चेतना असेपर्यंतच त्याची किंमत आहे.

7) **धृति:** धृती म्हणजे शरीराच्या वेगवेगळया तत्वांना एकमेकांशी चिकटवून ठेवणारी शक्ती होय. ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मन, बुध्दी, अहंकार, प्राण ही सारी वेगवेगळी तत्वे आहेत. याना एकत्रित राखण्याचे कार्य या सर्वापेक्षा भिन्न अशा शक्तीनेच शक्य आहे. आपण हयात असेपर्यंत ज्या शक्तीमुळे ही सारी तत्वे सोबत रहातात - एकत्रित रहातात. त्याला धृती असे म्हणतात. ही काही स्वतंत्र शक्ती नाही. धृतीसुध्दा चैतन्यस्वरुपी आत्मतत्वाचीच शक्ती आहे. सजीव शरीरात ती प्रकट होऊन जाते. शरीरात जेवढी म्हणून काही तत्वे दिसतात ते सारे ईश्वरी शक्तीचेच प्रकटीकरण आहे. इथे ज्या धृतीचा उल्लेख आला आहे ती बाह्य शक्ती आहे. आपल्या अनुभवाला येणारी मानसिक धृती या स्थूल धृतीपेक्षा वेगळी आहे. चुंबक जसा लोखंडाला आकर्षुन घेतो तसे ही स्थूल शक्ती - स्थूल धृती शक्ती. शरीरातल्या सर्व स्थूल - सूक्ष्म तत्वांना एकत्रितपणे राखते. या धृती शक्तीचे एवढेच कार्य आहे. मानसिक धृती केवळ मनाशी स्थित मनाच्या अनेक वृत्तींमधली एक वृत्ती आहे. ज्या धृती वृत्तीचे कार्यही स्थूल धृती - शक्तीप्रमाणेच आहे. ती मन आणि इंद्रियांना विषम प्रसंगी आवरुन धरते म्हणजे निराश होऊ देत नाही, तंदुरुस्त रहाण्याकामी मदत करते, विषय प्रसंगांमध्ये मनाला दु:खात फसु देत नाही.

8) **एतत् क्षेत्रं समासेन उदाहृतम्:** हे क्षेत्र, म्हणजे शरीर मी तुला थोडक्यात सांगितले आहे. या शरीरातील तत्वांना सविस्तर समजावून सांगता येऊ शकते पण थोडक्यात समजावून सांगितले आहे कारण की गीतेचे मुख्य विषय आहेत - कर्मयोग, कर्मसंन्यास, भक्ती, ध्यान, वैराग्य, कर्मफळाचा त्याग, सात्विक, राजसी, तामसी भेद, गुणोत्कर्ष, ज्ञानी भक्त, त्रिगुणातीताची लक्षणे, दैवी गुण, साधनेसाठी सर्वांचा कसा उपयोग करुन घेता येईल? या सर्वांचे स्वरुप समजाऊन सांगणे आहे. या गोष्टींना समजाऊन सांगण्यासाठी जेवढा विस्तार केला गेला आहे, तेवढा विस्तार शरीरासारखी जी स्थूल आणि प्रत्यक्ष वस्तु आहे, मर्त्य वस्तु आहे. तिला समजाऊन सांगण्यासाठी न करता थोडक्यात समजाऊन सांगितले आहे.

: 7 :

*अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।*
*आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अमानित्वम्:** मान - सन्मानाची इच्छा न राखणे म्हणजे श्रेष्ठत्वाचा अभिमान न बाळगणे
- **अदंभित्वम्:** निष्कपटता
- **अहिंसा:** काया - वाचा - मनसा प्रेम करणे
- **क्षान्ति:** क्षमा - शीलता
- **आर्जवम्:** मनाची व वाणीची सरळता, सरळपणा
- **आचार्योपासनम्:** आचार्याची म्हणजे श्रध्दा-भक्तीसह गुरुसेवा
- **शौचं:** अंतर्बाह्य पावित्र्य
- **स्थैर्यम्:** अंत:करणाची स्थिरता
- **आत्मविनिग्रह:** शरीर आणि सर्व इंद्रियांचा निग्रह

### अर्थ

मोठेपणाचा अभिमान नसणे, ढोंग न करणे, कोणत्याही प्राण्याला कोणत्याही प्रकारे त्रास न देणे, क्षमा करणे, मन, वाणी इत्यादींबाबत सरळपणा, श्रध्दा-भक्तीसह गुरुंची सेवा, अंतर्बाह्य शुध्दी (सत्यतापूर्वक शुध्द व्यवहाराने द्रव्य मिळवणे ही झाली 'द्रव्यशुध्दी', त्या द्रव्याने मिळवलेल्या अन्नाने होणारी 'आहारशुध्दी' तसेच यथायोग्य वर्तणुकीने होणारी 'आचारशुध्दी' आणि जलमृत्तिकेने होणारी शरीराची शुध्दी ही 'बाह्यशुध्दी' म्हणतात आणि आसक्ती, द्वेष, कपट इत्यादी विकारांचा नाश होऊन अंत:करण स्वच्छ होणे याला 'अंत:शुध्दी' असे म्हणतात.) अंत:करणाची स्थिरता आणि मन व इंद्रियांसह शरीराचा निग्रह.

***नम्रता दंभ - शून्यत्व अहिंसा ऋजुता क्षमा।***
***पावित्र्य गुरु - शुश्रुषा स्थिरता आत्म- संयम॥***

**विषय:** या श्लोकात ज्ञानी पुरुषाची नऊ लक्षणे सांगितली गेली आहेत.

एक प्रश्न असा जागू शकतो - उद्भवू शकतो की इथे म्हणजे या प्रसंगी भगवंत अचानक ज्ञानी पुरुषाची लक्षणे सांगायला कसे प्रवृत्त झाले ? कारण मागील श्लोकात क्षेत्र म्हणजे शरीर वगैरे विषयी सांगितले होते. क्रमानुसार आत्मा शरीरात स्थित क्षेत्रज्ञ म्हणजे आत्म्याच्या स्वरुपाविषयी सांगायला हवे होते. त्याऐवजी ज्ञानाची लक्षणे कशी काय प्रतिपादित करताहेत?

प्रश्न योग्य आहे पण एकतर दुसऱ्या श्लोकात क्षेत्रज्ञ (आत्मा) चा थोडा परिचय करुन दिलाच आहे. क्षेत्रात वास करणारा क्षेत्रज्ञ आत्मा आणि ब्रह्मांडांच्या पाठीमागे स्थित व्याप्तही परमात्माच आहे यामुळे पिंड आणि ब्रह्मांडात वसणारे ईश्वरी तत्व एकच आहे हे जाणून घेणे थोडे अवघड आहे. त्यापेक्षा ज्ञानाची लक्षणे समजून घेणे सुबोध - सरळ - आहे. क्षेत्र म्हणजे शरीराचे स्वरुप जाणून घेणे सोपे आहे. पिंड ब्रह्मांडात एक परमात्मा वसतो. याचा अनुभव ज्ञानी पुरुषांनी घेतला आहे. त्या अनुभवी ज्ञानी पुरुषांची लक्षणे समजून घेणे सोपे आहे यामुळे त्या लक्षणांचा परिचय करुन देताहेत. हे योग्यच आहे. यानंतर ब्रह्मांडात व्याप्त ईश्वराला - ज्ञेयाला - समजाऊन सांगितले जाईल.

### स्पष्टीकरण

1) **अमानित्वम्:** सन्मान वा कीर्तीची यत्किंचित्‌ही इच्छा न उरणे अमानित्व होय. हे सर्व लक्षणात श्रेष्ठतम असे लक्षण आहे. एक वेळ समाधी सारखी उच्च स्थिती प्राप्त करुन घेणे सुलभ पण निरहंकारितेचा उत्कर्ष साधला जाणे दुर्लभ आहे. अमानित्वाचे स्वरुप समजाऊन सांगताना ज्ञानेश्वर महाराज असे लिहितात की ज्या महापुरुषाला मोठेपणाचे खूप ओझे वाटते, कुणाचा सामना करणे तर मुळी त्याना आवडतच नाही असा माणूस त्यात असलेल्या गुणांची प्रशंसा करणारा प्रसंग असो वा त्याच्याशी विशेष अशा योग्यतेचा संबंध जोडला जात असो तर कमालीचा भयभीत होतो. त्याची अवस्था व्याघ्राच्या तावडीत सापडलेल्या मृगासारखी होते. एखादा पोहोणारा भोवऱ्यात सापडल्यावर जसा कासावीस होतो - व्याकुळ होतो. तशी त्याची गत होते. अशा पुरुषाला सन्मान - प्रसंग मोठ्या संकटासारखा वाटतो. तो आपला मान - सन्मान म्हणजे पूज्यता आपल्या डोळ्यांनी बघू इच्छित नाही. त्याच्या मनात अशी इच्छा असते की आपल्या योग्यतेचे कुणाच्याही मनात स्मरणसुध्दा न उरो मग आदर - सत्काराचा प्रसंग तर लांबच राहिला. कुणी नमस्कार केला तर त्याला मरणप्राय यातना होतात. तो बृहस्पतीसारखा सर्वज्ञ असतो पण आपल्या विद्वत्तेचा - मोठेपणाचा - कुठे उल्लेख होऊ नये या भयाने तो अज्ञानी माणसाप्रमाणे लपून रहाण्याचा प्रयत्न करतो. जगाने आपला अवमान करावा, आपल्या आज्ञेची अवज्ञा करावी अशी त्याची इच्छा असते. त्याच्या मनात अशी तीव्र इच्छा असते की नातलगांनी आपल्याशी संबंध ठेऊ नये - राखू नये. त्याच्या रोमा - रोमातून विनम्र भाव प्रकट होतो. आपल्या चालण्यात तो दक्ष म्हणजे सावध असतो. आपल्या ठायी हीनभाव जागावा, लोकांनी आपल्याला हीन मानावे. - समजावे. आपण हीनतेनेच नटून असावे असे त्याला वाटते. त्याच्या मनाची अशी भावना असते की आपले अस्तित्व नष्ट होऊन जावे. आपले नाम - रुप संपून जावे. आपल्यामुळे कुणाच्याही मनात भय न जागो. असे मानणारा खरा अमानी आहे.

2) **अदंभित्वम्:** निष्कपट मनाचा. आत एक आणि बाहेर दुसरेच याचा अभाव असणारा. चांगले काम केले असेल तर त्याचा मान राखून दवंडी देत फिरु नये. आतल्या

स्थितीला लपवून बाहेर दुसऱ्याच स्थितीला प्रकट करणे दंभ होय. उदाहरणार्थ आपले चित्त कामविकाराने मुक्त झाले नसेल, निरंतर विकार ग्रस्त असेल तरी ते लपवुन बाहेर आपण निर्विकार आहोत असे दर्शवणे हा झाला दंभ. संन्यासी न बनताच बाह्यत: भगवे वस्त्र परिधान करुन स्वत:ला संन्यासी म्हणवणे झाला दंभ. आतली निम्न प्रकारची भूमिका प्रकट न करता आपण खूप भले असल्याचे प्रकट करणे हा झाला दंभ.

एक संन्यासी आश्रमात आले होते. त्यांचा पोशाख संन्याशाचा असल्यामुळे ते संयमी असतील असे आम्ही मानले. त्यांना मूळव्याधही होता. आश्रमात पेरु होते. संन्यासी येता - जाता वृक्षांवरले पेरु तोडून खात असत. त्यांनी खूप पेरु खाल्ले. यामुळे त्यांना रात्री वरचेवर - सारखे संडासला जावे लागले. सहा - सात वेळा जावे लागले. झोप आली नाही. थकवा वाटु लागला. आम्ही विचारले 'स्वामीजी काय झाले हो?' स्वामीजी यावर उत्तरले 'काही नाही. अधूनमधून असे होते म्हणूनच तर तुमच्या आश्रमात आलो. आता उपाय सांगा.' आम्ही म्हटले 'हा त्रास असेल तर दिवसभर उपवास करा. सारे काही ठीक होईल' पण स्वामीजींना का उपवास करणे शक्य होते? ते म्हणाले 'उपवास केला तर अधिकच गळून जाईन. यापेक्षा काही भात वगैरे साधे जेवण करु इच्छितो.' मग लक्षात आले की त्यांनी झाडावरुन तोडून - तोडून पेरु खाल्ले होते.

दंभ एक प्रकारचे असत्याचरणच होय. ज्ञानी पुरुषात दंभाचा अभाव दिसतो पण हा झाला लौकिक अर्थ. अशा प्रकारचा दंभ नसलेले अनेक लोक भेटतील पण दंभाचे हे लौकिक स्पष्टीकरण इथे उपयोगाचे नाही. शंकराचार्यांनी दंभाची मोठी मार्मिक व्याख्या केली आहे. स्वधर्मप्रकटीकरणं दंभित्वम्, तद्भावोऽदंभित्वम्। म्हणजे स्वधर्माचरण प्रक ट करणे दंभ असून त्याचा अभाव म्हणजे अदंभित्व होय. ही श्रेष्ठ आणि आध्यात्मिक व्याख्या झाली. अन्यत्र ते लिहितात. धर्मध्वजित्वम् - म्हणजे धर्माचा ध्वज फडकवणे दंभ होय. या व्याख्येनुसारच ज्ञानी पुरुषाच्या 'अदंभित्व' या लक्षणाचा विचार करायला हवा. काहीही चांगले कार्य केले असेल तर ते प्रकट करण्याचा विचार आपल्या मनी येत नाही. सांगायची वेळच आली असता सांगणे वेगळे पण त्याची लालसा मनी बाळगून कधी एकदाचे लोकांसमोर येऊन सांगतो अशी वाट बघत रहाणे वेगळे. या ठिकाणी एक प्रश्न असा उपस्थित होऊ शकतो की अमानित्वम् या गुणाची चर्चा करतानाही केलेल्या चांगल्या कामांची दवंडी देत फिरु नये असेच सांगितले गेले होते आणि आताही तेच. अशा प्रकारे दोन्ही अर्थ एकसारखेच झालेत. अमानित्वाच्या संदर्भात जे सांगितले गेले त्याला गौण लक्षण मानले जायला हवे. सारी लक्षणे एक-दुसऱ्याशी जुळलेली असतात त्यामुळे काही लक्षणांमध्ये थोडेफार साम्य तर असेलच. आपल्या गुणांना स्वत:हून घोषित न करणे हा झाला एक मुद्दा आणि आपले गुण घोषित व्हावेत, अशी इच्छा मनी न बाळगणे दुसरा मुद्दा आहे. या दोन्ही गोष्टी अदंभित्वम् मध्ये समाविष्ट आहेत. आपले गुण वा केलेली चांगली कामे प्रकट न करणे, व प्रकट होऊ नये अशी इच्छा बाळगून तदनुसार वर्तन करणे या दोन्ही गोष्टी मिळून अदंभित्वम् चा अर्थ पूर्ण होतो.

अदंभित्वम्च्या संदर्भात ज्ञानेश्वर महाराज एक सुंदर दृष्टांत देऊन समजावतात. हे अर्जुना, लोभी माणूस ज्याप्रमाणे प्राण गेल्यावरही आपल्या धनाचा पत्ता सांगत नाही त्याचप्रमाणे ज्याच्या ठायी दंभ नाही असा पुरुष प्राणावर बेतले तरी आपल्या पुण्यकर्मांना कदापि प्रकट करत नाही. नाठाळ गाय जशी आपला पान्हा चोरुन घेते किंवा श्रीमंत माणूस प्रवास करताना अरण्यात वा एकांत स्थळी पोहोचला असता आपली श्रीमंती प्रकट होऊ देत नाही. कुलीन स्त्री ज्याप्रमाणे आपले अवयव काळजीपूर्वक झाकून ठेवते. शेतकरी पेरलेल्या बीजाला ज्याप्रमाणे माती लोटून व्यवस्थितपणे झाकून ठेवतो. तसे आपण केलेले दान वा सत्कर्म तो व्यवस्थितपणे झाकून ठेवतो.

3) **अहिंसा:** काया - वाचा - मनाने कुणाला न दुखवता अत्यंत प्रेमाने व्यवहार करणे अहिंसा होय. अहिंसा आत्म्याचा स्वभाव आहे. तरीही देहाशी आपण स्वत:ला एकरुप समजून चालतो यामुळे आपल्या हातून कमी - अधिक प्रमाणात हिंसा घडतच रहाते. जिथे हिंसा तिथे देहासक्ती असते. देहासक्ती शिवाय हिंसा होत नाही. यामुळे देह, मन, इंद्रिये वगैरें विषयी आपण जेवढी आसक्ती कमी करत जाऊ जीवनात तेवढीच अहिंसा प्रकट होत जाईल. अहिंसेचे पालन करायचे असेल तर देहासक्ती क्षीण करत रहावे लागेल.

अशाप्रकारे प्रकट होणाऱ्या अहिंसेचे स्वरुप दुहेरी असेल. 1) काया, वाचा, मनाने, कुणाला न सतावणे. 2) आणि सर्वांवर आसक्तीविरहित अतिविशुध्द प्रेम करणे. अहिंसेच्या ठायी या दोघांचा समावेश आहे - असतो. 'कुणाला सताऊ नये.' एवढ्याने काही अहिंसा पूर्ण होत नाही कारण की कुणाला त्रास न देणे, वा न दुखवणे हा झाला अहिंसेचा नकारात्मक पैलु. अहिंसेचे विधायक रचनात्मक स्वरुप आहे. सर्वांवर विशुध्द प्रेम करणे. दोघे एकत्र केल्यावर अहिंसेची व्याख्या पूर्ण होते. 'मी कुणाला सतावत नाही', याचा अर्थ असा नाही होत की मी या दिशेने प्रयत्न करत आहे की सर्वांचे दु:ख कसे दूर व्हावे, सर्वांच्या अडचणी - त्रास कसे दूर होतील याचे चिंतन करत आहे. सर्वाप्रती करुणा, विशुध्द प्रेम अहिंसेचे मुख्य लक्षण आहे. यामुळे सर्वांचे दु:ख दूर करण्याचे प्रत्यक्षात प्रयत्न केले जातात. दु:ख दूर करण्याचे प्रत्यक्षात प्रयत्न केले जातात. कुणाला दु:ख न देणे वेगळे होय. कुटुंबात आई - वडील, भाऊ - बहीण, पिता - पुत्र वगैरे जवळच्या संबंधी जनांशी प्रेमाचा सक्रिय व्यवहार असतो पण ते प्रेम मर्यादित असल्यामुळे आसक्तीजन्य प्रेमाच्या व्यवहारात अहिंसेचा उत्कर्ष होत नाही. प्रेम ज्यावेळी एखाद्या चौकटीत - मर्यादित - कक्षेत थबकून रहाते त्यावेळी ते व्यापक अहिंसेचे स्वरुप धारण करु शकत नाही.

क्षान्ति: क्षान्ती म्हणजे मनात काम, क्रोध, अहंकार वगैरे विकार उपन्न न होणे, इतराना क्षमा करणे, क्षमाशील असणे होय. 12 व्या अध्यायातील 13 व्या श्लोकात क्षमेचे लक्षण आले आहे. शंकराचार्यांनी अक्रोध आणि क्षमा यातला फरक मोठ्या मार्मिक शैलीत समजाऊन सांगितला आहे. क्रोधात सर्व आंतरिक विकारांचा समावेश होतो. चित्ताच्या ठायी हे सारे विकार कमी - अधिक प्रमाणात वेळोवेळी संधी मिळताच प्रकट होत असतात. विकार उपजल्यावर विवेकपूर्वक त्याना हटवले गेले तर हळूहळू ते क्षीण होऊ शकतात पण विकार उपजल्यावर त्यांचा वेग इतका प्रबळ असतो की त्याच्या समोर विवेक दुबळा वाटायला लागतो. बहुधा विवेकाऐवजी विकारच बलवान ठरतो. अशाप्रकारे नेहमी आपलाच पराभव होत असतो. उदाहरणार्थ कुणाचा अपराध बघून आपल्या मनी क्रोध उपजतो. त्यावेळी आपल्याला भान नसते. आपण अपराध्यावर बरसतो- तुटून पडतो. त्याला बरे - वाईट शब्द ऐकवतो. काही लोक तर शिव्याही देऊ लागतात. नोकराची चूक झाली तर सामान्यपणे लोक शिव्याच देतात. क्रोध आला आणि त्याला दडपून ठेवण्याऐवजी आपण जर त्याला खुराक दिली. खाद्य पुरवले तर तो पुष्टच होणार. वाटेल तसे बोलण्याने क्रोध पुष्ट होतो. अविवेक वाढून विवेकाचे बळ क्षीण होते. ज्यावर रागावतो वा तुटून पडतो त्याचा राग वाढवायलाही आपण कारणीभूत बनतो. क्रोधाची प्रतिक्रिया दुसऱ्यावर होतेच होते. क्रोध वगैरे विकारांना वाढवून आपण सृष्टीचे भले करत नाही आणि यातून आपलेही हित साधले जात नाही. विकारांना क्षीण करण्यासाठीच मानवी देह लाभला आहे कारण की पशुही क्रोध वगैरे विकारांच्या अधीन होतात. वाणी वा कुठल्याही इंद्रियाद्वारे विकारांना पोषण मिळू न देणे हे विकारांना क्षीण करायच्या दिशेने उचलेले पहिले पाऊल होय. अर्थात विकार बाहेर प्रकट न व्हावेत. आतल्या आत त्याना दडपून आणि विवेकबळाने घालवण्याचे संपूर्ण प्रयत्न केले जावेत. अशा प्रकारे विकारांना बाहेरुन पोषण न मिळाल्यामुळे हळूहळू मनातही विकारांची निर्मिती क्षीण होऊ लागेल आणि क्रमश: विकार उत्पन्न न होण्याची स्थितीही येऊ शकेल. मनात विकार उत्पन्न न होण्याची जी निर्विकार स्थिती असते तिला 'क्षमा' असे म्हणतात. उत्पन्न विकारांना क्षीण करण्याच्या प्रयत्नांना 'अक्रोध' असे म्हणतात. क्षमा हा ज्ञानवंताचा गुण असुन अक्रोध हा दैवीगुण आहे. क्षमा श्रेष्ठ भूमिका आहे. क्रोध अज्ञानी भूमिका आहे. अशा प्रकारे क्रोध, अक्रोध आणि क्षमा या तीन भूमिका आहेत आणि या अनुक्रमे अज्ञान दशा, साधक दशा आणि सिध्द दशेशी संबध्द आहेत. अज्ञान दशेत माणूस आतून बाहेरुन विकारवश असतो. अक्रोध भूमिका म्हणजे साधक दशेत माणूस बाहेरुन क्रोध वगैरे विकारांना वश न होऊनही त्याना उत्पन्न होताच घालवून फेकण्यासाठी प्रयत्नशील असतो. सिध्द दशेत विकार उत्पन्नच होत नाहीत. अशी अवस्था जागते. हे समजून घेणे आवश्यक आहे.

5) आर्जवम्: ऋजुता म्हणजे सरळता. सर्वांशी सरळ व्यवहार. हा गुण सत्वनिष्ठेने प्रकट होतो. छोटा बालक सरळ असतो. ज्ञान प्राप्त करायाला इच्छुक साधक मुमुक्षुसाठी उपनिषदात सांगितले गेलेले आहे की - तस्मात् ब्राह्मण: पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत

- अर्थात् ब्राह्मण म्हणजे साधक वा मुमुक्षुला ज्ञान प्राप्त करुन घेऊन बालकासारखे रहायला हवे. बालकासारखे म्हणजे बालकाप्रमाणे कपट रहित आणि सरळ स्वभावाचे असणे होय. बालक स्वभावाने सत्यनिष्ठच असतो. जोवर सत्याचरण असते तोवर वक्रता उपजत नाही. सत्यनिष्ठ माणसाने वक्र होण्याचा विचार केला तरी त्याला तसे होता येत नाही आणि अखेरीस सरळ स्वभावाचाच विजय होतो. कुणी वाकडा व्यवहार करत असेल तर आपल्यालाही तसा व्यवहार करावेसे वाटते पण ज्याना सत्यनिष्ठेचा सराव आहे असे लोक वक्रतेला सहनच करु शकत नाहीत. ते वक्र माणसाशीही सरळच व्यवहार करतील. अशाप्रकारे सरळ व्यवहार करणाऱ्यांशी वक्रसुध्दा अखेर आपला वाकडा स्वभाव विसरुन सरळ व्यवहार करु लागतो.

6) **आचार्योपासनम्:** आचार्य म्हणजे आध्यात्मिक मार्गदर्शकाची उपासना, सेवा. जीवनात ज्यांच्या सहवासामुळे आध्यात्मिक दृष्ट्या अधिकात अधिक लाभ होतो त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवन चालत असते. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरांचे थोरले बंधु निवृत्तीनाथच त्यांचे गुरु होते. निवृत्तीनाथांनी त्याना ज्ञान दिले यामुळे त्यांच्याविषयी गुरुभाव उत्पन्न झाला. ज्ञान प्राप्तीपूर्वी जे पुरुष गुरु वा मार्गदर्शकाचे स्थान मिळवतात, ज्ञान प्राप्त झाल्यावर ते पूजनीय आणि वंदनीय असतात. त्यांच्याबाबतीत कृतज्ञ भाव मनी वसतो. त्यांचा सल्लाही घेतो. एवढेच नव्हे पण गुरुचे म्हणणे संपूर्णपणे मान्य नसले तरी गुरुच्या आज्ञेचे पालन करील. गुरु कदापि असत् कर्म करायची आज्ञा देणार नाहीत. ज्ञानेश्वरांनी गीतेवर जे भाष्य लिहिले ते काही स्व-प्रेरणेच्या बळावर नाही लिहिले. त्यांचे गुरु निवृत्तीनाथ यांनी त्यांना आज्ञा केली आणि ज्ञानेश्वरांनी एकाग्र होऊन हे अद्वितीय भाष्य लिहिले.

हिंदुस्तानात प्राचीन काळापासून ही गुरु - परंपरा चालत आली आहे. कुठल्याही चांगल्या वस्तुचा सदुपयोग होतो तसा दुरुपयोगही होतो. या गुरु - परंपरेचाही खूप दुरुपयोग झाला आहे. खऱ्या गुरुचे लक्षण हे आहे की तो स्वत:ला कुणाचा गुरु मानत नाही. आपल्या देशात गुरुसेवेच्या प्रतीकरुपात गुरु पौर्णिमा साजरी केली जाते.

सध्या गुरु-परंपरेत खूप विकृती भरली आहे. या विषयी समाज मनात विशेष आदरभाव उरलेला नाही. याबद्दल अनादरासारखी परिस्थिती आहे.

7) **शौचम्:** अंतर्बाह्य शुध्दी - चित्त शुध्दी आणि शारीरिक वाचिक शुध्दी मानसिक शुध्दी म्हणजे आंतरिक शुध्दी, बाह्य शुध्दीचा संबंध ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये आणि शरीराशी संबध्द आहे. कित्येक लोकांना असे वाटते की मुख्य शुध्दता ही मानसिक असते आणि तिचा बाह्य शुध्दतेशी काही संबंध नसतो पण हा चुकीचा विचार आहे. मानसिक शुध्दताही मुख्य आहे, त्याशिवाय बाह्य शुध्दतेला काही महत्व नाही, हे खरे आहे अर्थात् मानसिक शुध्दी नसली आणि इंद्रिये सत्कर्मरत असलीत, ब्रह्मचर्य वगैरे व्रताचे पालन होत असेल, वाणी शुध्द राखण्याचे प्रयत्न जारी असतील तर त्याचेही मोल आहे. मानसिक शुध्दीपेक्षा त्याचे मोल कमी आहे, एवढेच काय ते - मानसिक शुध्दतेत अहंकार, काम, क्रोध वगैरे विकारांचा अभाव, निष्कपटता, अदंभित्व, सरळपणा, वगैरे विशुध्द भाव समाविष्ट आहेत. बाह्य शुध्दतेत सत्कर्म, बाह्य इंद्रियांचा संयम, बघणे, ऐकणे, खाणे इत्यादी तमाम क्रिया संयमयुक्त आणि विशुध्द असाव्यात यालाही महत्व आहे. उदाहरणार्थ भोजन सात्विक असेल आणि ते परिमित प्रमाणात - मोजकेच - सेवन केले जात असेल तर ते झाले विशुध्द आहार सेवन. परिवार वा जनसेवेच्या क्षेत्रात अहंकाराचे प्राबल्य दिसून येते. कुटुंबात पित्याला असे वाटते की माझ्या सूचनेनुसारच सर्वांनी वागायला हवे. संस्थात्मक जीवनातही या अहंकाराच्या प्राबल्यामुळेच ईर्ष्या, संघर्ष वगैरे दोष उत्पन्न होतात आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कार्यहानी होते. कार्याएवजी अहंकारच मुख्य बनून जातो. आपण अहंकारप्रेरित होऊनच असा गोधळ करतोहोत आणि सेवेच्या ऐवजी असेवा वा कुसेवा आपल्या हातून घडत आहे, याचा माणसाला पत्ताही लागत नसतो. ही सारी मानसिक अशुध्दतेची लक्षणे आहेत. अंतर्बाह्य शुध्दी ज्ञानी पुरुषाचे लक्षण आहे.

8) स्थैर्यम्: स्थिरता, मोक्ष मार्गातला दृढ निश्चय, नि:शंकता. बाराव्या अध्यायातील 19 व्या श्लोकात भक्ताच्या लक्षणातही 'स्थिरमति:' हे लक्षण आले आहे. या श्लोकापासून भगवान आचरणात्मक ज्ञानाच्या लक्षणांचा परिचय करुन देत आहेत. ज्ञानी पुरुषाच्या ठायी प्रकट होणाऱ्या लक्षणांचा परिचय करुन दिला जात आहे. यातले एक लक्षण असे सांगितले गेले आहे की मोक्ष मार्गाच्या वाटचालीत म्हणजे मोक्षरुपी परम पुरुषार्थ प्राप्त

करुन घेण्यासाठी साधकाचा दृढ निश्चय हवा, स्थिरता हवी. शंकराचार्यांनी या लक्षणाचा मार्मिक अर्थ उकलुन सांगितला आहे - मोक्षमार्गे एव कृताध्यवसायत्वम् - म्हणजे मोक्षमार्गातच कृतनिश्चयी भाव वा दृढ निश्चय.

मोक्षमार्गात दृढ निश्चय असा स्थूल अर्थ जर घेतला गेला तर तो साधकाच्या दृष्टीने मानावा लागेल. सध्या सिध्द म्हणजे ज्ञानी पुरुषाच्या लक्षणाची चर्चा चालली आहे यामुळे उपर्युक्त वचनाचा अर्थ असा होईल की ज्ञानी पुरुषाचे लक्ष्य मोक्ष साधनेत स्थिरता वा तन्मयता आहे. मोक्ष तर ज्ञानाचे फळ आहे. ज्ञानीच्या मनात त्याविषयी आसक्ती नसते. त्याची तन्मयता तर मोक्षाच्या साधनांमध्ये नांदते. मोक्षाची साधने आहेत ज्ञान आणि ज्ञानाची साधने आहेत भक्ती, वैराग्य, निर्विकारता, निरहंकारता, निष्कामना वगैरे. मोक्ष मिळवायची वस्तु नाही. मोक्ष तर आधीपासूनच प्राप्त आहे. ज्ञान ती ओळख करुन देते. इथे ज्ञान शब्दाचा अर्थ आहे 'विविधतेत नांदणाऱ्या एकतेचे ज्ञान.' हे ज्ञान चित्त शुध्दीमुळे प्राप्त होते. मोक्षाची साधने आहेत चित्तशुध्दी व ज्ञान. ज्ञानी यात लीन असतो.

इथे एक प्रश्न उपस्थित होतो की जर ज्ञानवंताला चित्तशुध्दी आणि ज्ञानप्राप्तीनंतर मोक्षाचा अनुभव येत असेल तर तो मोक्षात तल्लीन रहात असेल, एकाग्र रहात असेल, असे सांगितले जायला हवे होते. या प्रश्नाचे उत्तर असे आहे की ज्ञानी पुरुष चित्त शुध्दीद्वारे ज्ञानाने मोक्षाचा अनुभव घेत असतो पण ज्ञान आणि चित्तशुध्दी संपादित केल्यावरही या दोघांचा उत्कर्ष होत रहातो. त्याला आपण ज्ञानी म्हणतो तो जनसेवा करत असताना आपल्या ठायी वसणाऱ्या अतिसूक्ष्म विकारांचे दर्शन करत असतो आणि त्या विकारांच्या प्रमाणात ज्ञानाची अपुर्णता जाणून घेऊन ज्ञानाच्या पूर्णतेच्या म्हणजे उत्कर्ष साधण्याच्या आणि निर्विकारता साधून घेण्याच्या प्रयत्नांना लागतो. तो मोक्षाचा अनुभव प्राप्त करत असल्यामुळे त्याला ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली आहे. ब्राह्मी स्थिती उपलब्ध झाल्यावरही प्रारब्ध कर्मे शिल्लक रहातात. त्यासाठी तो शरीर धारण करतो. यामुळे ब्राह्मी स्थितिनंतरही यात्रा सुरु रहाते. ब्राह्मी स्थिती आणि ब्राह्म निर्वाणावस्था यातला फरक विनोबांनी मोठया मार्मिक शैलीत समजावला आहे. ते म्हणतात की ब्राह्मी स्थिती म्हणजे जिथून कदापि पतन होत नाही अशी अलौकिक ज्ञानावस्था होय आणि 'ब्रह्म निर्वाण' म्हणजे जिथून आता पुढचा प्रवास उरला नाही - अशा मुक्कामी पोहोचणे होय.

9) **आत्मविनिग्रहः** शरीर आणि तमाम इंद्रियांचा निग्रह करणे, त्यांना संपूर्णपणे संयमात राखणे म्हणजे आत्मविनिग्रह होय. शंकराचार्यांनी याचा खूपच चांगला अर्थ सांगितल आहे - आत्मन: अपकारकस्य आत्मशब्दवाच्यस्य कार्यकरणसंघातस्य विनिग्रह: स्वभावेन सर्वत: प्रवृत्तस्य सन्मार्गे एव निरोध: । अर्थात् आत्म्याला अपमान करणाऱ्याचा निरोध 'आत्मा' शब्दाने व्यवहृत शरीर आणि इंद्रियांच्या संघाताचा निग्रह म्हणजे त्याला काबूत राखणे. शरीर आणि इंद्रियसमूह स्वभावत: स्वच्छंदतेच्या दिशेने प्रवृत्त असतात. त्यांना सन्मार्गातच रत राखणे आत्मविनिग्रह होय.

'आत्मविनिग्रह' या शब्दात दोन शब्द आहेत. 'आत्म' आणि 'विनिग्रह'. आत्मा म्हणजे जीवात्मा. पिंड म्हणजे नाना पशु- पक्षी, मनुष्य, किटक वगैरे अनंत शरीरात परमात्मा जीवात्म्याच्या रुपाने प्रकट असल्यामुळे त्यालाच 'आत्मा' व 'जीवात्मा' असे म्हणतात. जीवात्मा शब्दातही दोन शब्द आहेत 'जीव' आणि 'आत्मा'. शरीर, इंद्रिये, मन, बुध्दीशी एकरुप होऊन सुख-दु:खाचा भोक्ता बनत असल्यामुळे 'जीव' म्हणतात तर परमात्मा त्याचे स्वरुप असून ईश्वरापासून कदापि विलग होत नसल्यामुळे त्याला 'आत्मा' असे म्हटले जाते. जड ब्रह्मांडाच्या मागे असलेल्या ईश्वराला 'जड' म्हटले जाते आणि त्या जड ब्रह्मांडाच्या पाठीमागे तो लपलेला असून सर्व ब्रह्मांडात व्याप्त असल्यामुळे त्याला परम + आत्मा 'परमात्मा' असे म्हणतात. तोच ईश्वर शरीर आणि इंद्रियांना धारण करुन जीवात्म्याच्या रुपात असतो. 'आत्मा' शब्द परमात्मा या अर्थाने सुध्दा प्रयुक्त होतो. संस्कृत भाषेत 'आत्मा' शब्द शरीर, इंद्रिय, मन, बुध्दी या अर्थानेही प्रयुक्त होतो. इथे 'आत्मा' शब्द शरीर, इंद्रिय समूहासाठी प्रयुक्त करण्यात आला आहे. आचार्य म्हणतात की या शरीर - इंद्रिय समूहाचा स्वभाव परमेश्वराने असा बनवला आहे की बालपण, युवावस्था आणि प्रौढावस्थेतही हा स्वभव नाना रुपात कमी - अधिक प्रमाणात स्वच्छंदपणे विहार करु शकतो. सरावाद्वारे त्याचा निग्रह साधायला हवा.

: 8 :

*इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च।*
*जन्म - मृत्यु - जरा - व्याधि - दुःख - दोषानुदर्शनम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इंद्रियार्थेषु वैराग्यम्:** इह-पर लोक सर्व भोगात आसक्तीचा अभाव, इंद्रियांच्या बाबतीत वैराग्य.
- **च अनहंकार:** एव: आणि निरहंकारिता म्हणजे अहंकाराचाही अभाव
- **जन्म - मृत्यु - जरा - व्याधि - दुःख - दोषानुदर्शनम्:** जन्म, मृत्यु, वृध्दत्व आणि रोग यात केवढे दुःख आहे, याविषयी वारंवार विचार करणे, चिंतन करणे

**अर्थ**

इह-परलोकातील सर्व विषयांच्या उपभोगाविषयी आसक्ती नसणे आणि अहंकारही नसणे, जन्म-मरण-वृध्दत्व आणि रोग इत्यादींमध्ये दुःख व दोषांचा वारंवार विचार करणे

*निरहंकारता चित्तीं विषयांत विरक्तता।*
*जन्म - मृत्यु - जरा - रोग - दुःख - दोष विचारणा॥*

**विषय:** या श्लोकात ज्ञानाची तीन लक्षणे वर्णिली आहेत.

**स्पष्टीकरण -**

1) **इंद्रियार्थेषु वैराग्यम्:** वैराग्य मोक्षाचे प्रवेशद्वार आहे. मोक्षाच्या अनुभवासाठी असाधारण वैराग्याची गरज आहे. जगतातल्या पदार्था विषयी केवढ्या मिथ्यत्वाचा, निःसारतेचा अनुभव येतो यावर वैराग्याची तीव्रता अवलंबून आहे आणि जगतातल्या पदार्थामधल्या मिथ्यत्वाला - निःसारतेला जाणून घेणे एका गोष्टीवर अवलंबून आहे आणि ती गोष्ट म्हणजे जगताच्या पाठीमागे विद्यमान असलेले सत्यतत्व, दडून असलेले सत्यतत्व किती लक्षात आले, किती हृदयंगम झाले. यासाठी सत्संग हवा. सत्कर्म आणि स्वाध्यायाची साथ हवी. पिंड व ब्रह्मांडात व्याप्त सत्यतत्वरुप ईश्वराला ग्रहण करता यायला हवे. बुध्दिगम्य ईश्वराला हृदयंगम करुन घेता यायला हवे. ईश्वर जसजसा हृदयंगम होत जाईल तसतशी निःशंकता जागेल आणि तसतशी जगत् आणि देहाबाबतची निःसारता दृढ होऊ लागेल. अशाप्रकारे जगताचे मिथ्यात्व, निस्सारता दृढ झाली की मग मोक्षमार्गात अडथळा आणणारे काम, क्रोध यासारखे विकार क्षीण होऊ लागतात. जगताचे मिथ्यात्व आणि काम - क्रोध वगैरे विकारांची क्षीणता या दोघांच्या आधाराने वैराग्य उपजेल आणि त्याद्वारे मोक्षाचा अनुभव होऊ लागेल. मोक्ष म्हणजे परम शांततेचा सतत अनुभव. यातून दुःखाच्या आत्यंतिक अभावाचाही अनुभव येतो.

2) **च अनहंकार:** एव आणि निरहंकारतेचाच उत्कर्ष होणे. ज्ञानी पुरुषाच्या ठायी निरहंकारतेचाच उत्कर्ष दिसून येतो. अज्ञानी आणि ज्ञानी यांच्यात एकच फरक आहे. अज्ञानी सर्व क्रिया अज्ञानाने प्ररित होऊन करतो तर ज्ञानी सर्व क्रिया निरहंकारी होऊन करतो. जिथे देह वगैरेची आसक्ती आहे तिथे अहंकाराचे कार्य आहे असे समजावे. जिथे अनासक्ती उत्पन्न झाली तिथे अनहंकार वा निरहंकारतेचे कार्य सुरु होऊन जाते.

आत्मा आणि देह दोघे अगदी वेगळे आहेत. आत्मा चैतन्ययुक्त असून देह जड स्वरुपी आहे. आपण देहात रहातो पण देहात आपण देहापासून वेगळे आहोत असे आपल्याला कधीही वाटत नाही. आपण घरात रहातो तर आपण घरच आहोत, घरापासून वेगळे नाहीहोत असे आपल्याला वाटत नाही. सारेच लोक देहाला आत्मा आणि आत्मतत्वाला देह मानतात. अशा प्रकारे सारेच भ्रांतीत फसले आहेत. स्वत: वेडे असल्यामुळे वेड्याला वेडे म्हणु शकत नाहीत आणि म्हणत नाहीत पण एखादा ज्ञानी पुरुष देहाहून आत्म्याच्या वेगळेपणाचे दर्शन करुन घेतो तो या भ्रमातून मुक्त होऊन जातो.

अखेर हा भ्रम कुणी उत्पन्न केला? अज्ञानाने उत्पन्न झालेल्या अहंकारानेच हा भ्रम उत्पन्न केला आहे. अज्ञान म्हणजे आत्म्याच्या स्वरुपाविषयीचे अज्ञान होय. हे अज्ञान बीज आहे आणि अहंकार त्यापासून उगवलेले रोपटे आहे. यामुळे ज्याला हा भ्रम घालवायचा असेल त्याने आपल्या जीवनात अहंकार क्षीण करण्याचे संपूर्ण लक्ष्य - ध्येय बाळगायला हवे. याच्याशिवाय अहंकाराला क्षीण करता यायचे नाही. यामुळे गीतेने भक्तीचा महिमा गाईला आहे. सर्वांचे अहंकारावरच प्रेम असते. ईश्वराने प्राणीमात्राच्या ठायी प्रेमशक्ती राखली आहे. ही प्रेमशक्ती अहंकारावर

केंद्रित असते. हेच प्रेम शरीराऐवजी ईश्वरावर झाले तर 'मी देह वगैरे संघात आहे.' असे वाटण्याऐवजी 'मी देहापासून वेगळा आहे.' असा अनुभव यायला लागेल. 'मी देहापासून वेगळे असे आत्मतत्व आहे.' असा अनुभव ज्याला झाला त्याने अहंकारावर विजय संपादन करुन तो निरहंकारी बनला असे समजायला हवे. निरहंकारी असणे हा ज्ञानवंताचा सहज स्वभाव आहे.

3) **जन्म - मृत्यु - जरा - व्याधि - दुःख - दोषानुदर्शनम्:** जन्म, मृत्यु, म्हातारपण, रोग यात केवढे दुःख आहे, याचे चिंतन, दर्शन करत रहायला हवे. या श्लोकात पहिले लक्षण वैराग्य सांगितले आहे. त्याच्याशी या लक्षणाचा संबंध आहे. जिथे वैराग्य प्रकट होते तिथे जन्म, मृत्यु, म्हातारपण, रोग याविषयी चिंतन सहजपणे सुरु होते. मृत्यु वगैरे चार गोष्टी देहाशी संबंधित आहेत. साधारणपणे वैराग्य शब्दाचा अर्थ (जगातल्या तमाम पदार्थांविषयी वैराग्य) केला जातो पण त्या वैराग्यात देह वगैरेच्या बाबतीत वैराग्य सामावलेले आहे, हे समजून घेतले पाहिजे. देह वगैरे विषयक वैराग्य जागले नाही तर जगाविषयी वैराग्य जागायला कुठलाही अर्थ नाही. जगाविषयी अनासक्ती आणि देह वगैरेविषयक आसक्ती हा मेळ काही बसत नाही - बसू शकत नाही. यामुळे वैराग्य शब्दाचा जगाच्या तमाम पदार्थांविषयी आणि स्वत:चे शरीर, मन, बुध्दी वगैरेच्या बाबतीत वैराग्य असा दुहेरी अर्थ लावायला हवा. मनात जर हे वैराग्य जागले तर सहजच असा विचार उत्पन्न होईल की जन्म - मृत्यु - म्हातारपण वगैरे सहा विकारांनी युक्त असे हे शरीर दुःखाचे भांडार आहे. हे शरीर प्रतिक्षणी विकार आणि व्याधींनी ग्रस्त आहे - घेरले गेलेले आहे. त्याच्याशीच आपल्या तदनुरुप आसक्तीमूलक वृत्ती संलग्न आहेत. ज्यामुळे ती दुःखे अधिकच वाढतात. साधक आणि सिध्द दशेत चारही प्रकारच्या दुःखांचे स्पष्ट दर्शन होते यामुळे मनात दक्षतेने सहज चिंतन सुरु रहाते. साधक दशेच्या तुलनेने सिध्द दशेत हे दर्शन अधिक तीव्र आणि स्पष्ट होते म्हणून त्याचे भान अधिक असणे सहाजिकच असते. यामुळे भगवंतांनी याचा समावेश हा ज्ञानाच्या लक्षणात केला आहे. या चौघांचे जेवढे गडद दर्शन होईल तेवढ्याच उत्कटतेने वैराग्याचा अनुभव येईल-- घेता येईल. शंकराचार्य लिहितात - एवं जन्मादिषु दुःखदोषानुदर्शनात् देहेन्द्रियविषयभोगेषु वैराग्यं उपजायते । ततः प्रत्यगात्मनि प्रवृत्तिः करणानामात्मदर्शनाय । अशा प्रकारे जन्म वगैरेच्या ठायी दुःख वगैरे दोषांच्या दर्शनामुळे देह, इंद्रिये आणि विषय - भोगांविषयी वैराग्य उत्पन्न होते. वैराग्यानंतर स्थिती पालटते. इंद्रियांची प्रवृत्ती आत्मदर्शनाकडे वळते. यासाठी देहात प्रकट असलेल्या परमात्म्याकडे ती अभिमुख होऊ लागते.

वैराग्य जागण्यापूर्वी वृत्तींचा प्रवाह जगाकडे वळलेला असतो, प्रपंचात आसक्ती असते. जगाचा त्याग करुन जर सार्वजनिक सेवा कार्यात लागलो तर सार्वजनिक सेवेतही आसक्ती उरते पण शंकराचार्यांच्या निवेदनानुसार जर वैराग्य जागले तर आसक्ती कमी होते. इंद्रियांची प्रवृत्ती प्रागात्म्याकडे म्हणजे ईश्वराकडे वळू लागते. चित्त वृत्तींचा प्रवाह ईश्वराकडे होऊन जातो.

: 9 :

*असक्तिरनभिष्वंगः पुत्र-दार-गृहादिषु ।*
*नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **असक्तिः** सात्विक कर्मे आचरत असता अनासक्त
- **पुत्र - दार - गृहादिषुः** पुत्र - पत्नी - घर इत्यादीच्या ठायी
- **अनभिष्वंगः** अनासक्त
- **च इष्टानिष्टोपपत्तिषुः** आणि इष्ट - अनिष्ट घटित होण्यात
- **नित्यं समचित्तत्वंः** अखंडपणे चित्ताची समता कायम राखणे

**अर्थ**

पुत्र, पत्नी, घर आणि धन इत्यादींची आसक्ती नसणे आणि ममता नसणे तसेच आवडती आणि नावडती गोष्ट घडली असता नेहमीच चित्त समतोल ठेवणे.

*नि:संग-वृत्ति कर्मांत पुत्रादींत अलिप्तता।*
*प्रिय - अप्रिय लाभांत अखंड सम - चित्तता॥*

**विषय:** या श्लोकात ज्ञानाची तीन लक्षणे सांगितली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **असक्ति:** सात्विक कर्मे आचरत असताना ज्ञानी अनासक्त रहातो. मूळात शब्द आहे 'असक्ति:' त्याचा अर्थ केवळ 'अनासक्त' असा आहे पण विनोबांनी 'कर्मे आचरत असताना नि:संग वृत्ती म्हणजे अनासक्ती' असा अर्थ केला आहे. ज्ञानी निष्क्रिय असतो ही मान्यता काही बरोबर नाही. ज्ञानी म्हणजे परिपूर्ण पुरुष होय. ज्ञानाचे लक्षण जर निष्क्रियता मानले गेले, पूर्णपुरुष जर निष्क्रिय असला तर अज्ञानी जनांसमोर काय आदर्श उरेल? काय आदर्श ठेवायचा? ज्ञानी पुरुषाचे दिव्य आणि अत्यंत विशुध्द आचरण अज्ञानी जनांसाठी अनुकरणीय होऊन जाते. यामुळे भगवान ज्ञानाची लक्षणे सांगताहेत. काही लक्षणे बाह्य तर काही आंतरिक लक्षणे असतात. अज्ञानी जनांसाठी तर ज्ञानवंतांची बाह्य लक्षणेच विशेषत्वाने अनुकरणीय ठरतात. ज्ञानवंताने जर मौन धारण करुन बसून रहायचे ठरवले तर अज्ञानी जनांना विवेकी बोलण्याचा वस्तुपाठ कसा मिळावा? ज्ञानी एकांतात जाऊन बसेल तर सर्वांमध्ये राहून अलिप्ततापूर्वक राग-द्वेषरहित, अहंकार रहित राहून व्यवहार कसा साधता येतो याची कल्पना अज्ञानीजनांना कशी बरे यावी? यामुळे अर्जुनाने दुसऱ्या अध्यायाच्या स्थितप्रज्ञ लक्षणांच्या चर्चेनिमित्त असा प्रश्न विचारला होता की ज्ञानवंताचे उठणे - बोलणे वगैरे व्यवहार कसे असतात ? इथे ज्ञानी पुरुषाचे बाह्य लक्षण सांगितले गेले आहे की तो कर्मांचे आचरण करताना अनासक्त असतो. ज्ञानी पुरुषाच्या बाबतीत एक आणखी अशी कल्पना रुढ झाली आहे की तो हवे तसे वागू शकतो म्हणजे असत् कर्मेही आचरु शकतो आणि असत् कर्मांचे आचरण करत असतांनाही अलिप्त राहू शकतो. खोटारड्या वेदान्त्यांनी हा चुकीचा विचार प्रसारित केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की सत्कर्मे आचरतांना ज्ञानी पुरुषाचे अलिप्त रहाणे यात काही विशेष नाही कारण की सत्कर्मे आचरण्याचे बंधन त्याच्यावर येऊनच पडते. वाटेल तसे कर्म करायला म्हणजे कधी सत् तर कधी असत् अशा प्रकारे कर्मे आचरण्यात काही बंधन नाही. ज्यासाठी संपूर्ण स्वातंत्र्य आहे. ज्ञानी पुरुष पूर्णपणे स्वतंत्र आहे यामुळे तो सत्कर्मे करण्याच्या बंधनात राहू शकत नाही, असे भ्रांत लोकांचे म्हणणे आहे. यामुळे विनोबांनी लावलेला अर्थ यथार्थ आहे.

2) **पुत्र - दार - गृहादिषु - अनभिष्वंग:** पुत्र, पत्नी, घर वगैरेत म्हणजे घर, जमीन, मालकी इत्यादीच्या बाबतीत अनासक्त म्हणजे ममतारहित असतो. ज्ञानी पुरुषांचे दोन वर्ग आहेत. एक बालब्रह्मचारी, दुसरे गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ आणि संन्यास स्वीकारुन ज्ञानी बनलेले लोक. आजन्म ब्रह्मचारी परिपक्व दशेत संन्यासी बनून जातो. संन्यासात ज्ञानाची कल्पना आहे. हा संन्यास सरळ वानप्रस्थापासून घेता येतो किंवा मग गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ जीवनात साधना करुनही घेता येतो. आजन्म ब्रह्मचारी साधना करुन संन्यास घेतो आणि संन्यासामुळे त्याला ज्ञानाची परिपक्व दशा प्राप्त होते. गृहस्थ जीवनात असताना आध्यात्मिक साधना नाही केली जाऊ शकत. साधना करत असतांना अस्खलित ब्रह्मचर्याचे पालन करणे साधत असेल तरच ज्ञान - प्राप्तीची शक्यता आहे. गृहस्थ जीवनात ब्रह्मचर्याचे मर्यादित स्वरुपात पालन होते. अस्खलित ब्रह्मचर्याचे पालन वानप्रस्थाश्रमातच होऊ शकते. यामुळे गृहस्थासाठी आध्यात्मिक साधनेचा काळ वानप्रस्थाश्रम हाच मानला गेला आहे.

आजन्म ब्रह्मचारी व्यक्तीचा साधारणपणे नातलगांशी संबंध नसतो किंवा खूप कमी असतो पण गृहस्थ जीवनात मात्र असे नसते. संतानोत्पत्तीही गृहस्थाचा धर्म मानले गेले आहे, अर्थात् गृहस्थाश्रमात संतानोत्पतीची सीमाही येऊन जाते पण हवी तितकी लेकरे जन्माला घालणे तर काही 'गृहस्थाश्रम' म्हणता येणार नाही. गृहस्थाश्रमात 'आश्रम' शब्द खूप महत्वाचा आहे. हा मानवी देह विषयसुख भोगण्यासाठी नसून आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी आहे. गृहस्थाश्रम देखिल अत्यंत संयमयुक्त असायला हवा. यामुळे विनोबांनी गृहस्थाश्रमी व्यक्तींसाठी दोन लेकरांचा सांगितलेला आदर्श सर्वथा उचितच आहे. अशाप्रकारे जर अत्यंत संयमी गृहस्थाश्रम असेल तर त्यातून लवकर मुक्त होऊन वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करुन साधना होऊ शकते. तरीसुध्दा ज्यांनी गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थाश्रमात प्रवेश घेतला आहे, अशांसाठी पुत्र, पत्नी वगैरेंचा संबंध

अजिबात सुटून जाणे काही शक्य नाही. एवढेच नव्हे पण वानप्रस्थाश्रमात ज्ञान - साधना पूर्ण झाल्यावर संन्यास स्वीकारल्यावरही पत्नी वगैरेंशी थोडा का होईना पण संबंध हा राहू शकतो. पत्नी, पुत्र वगैरे जर सल्ला मागतील तर त्यांना तो सल्लाही दिला जाऊ शकतो. कधी विशिष्ट प्रसंगी, खूप गरज भासली असता जर त्या ज्ञानी पुरुषाला बोलावले गेले आणि सहजतेने येणे त्याला शक्य असेल तर तो संन्यासी - ज्ञानी घरीही येऊ शकतो पण साधारणपणे संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर घर वगैरेंशी संपूर्णपणे संबंध सुटून जातो, अशीच कल्पना वा परंपरा आहे. माता - पिता, पत्नी, पुत्र वगैरेच्या अंतिम क्षणी म्हणजे मरणकाळीसुध्दा तो ज्यांच्याजवळ गरज असेल तर जाऊ शकतो. अशाप्रकारे पुत्र, पत्नी वगैरेंशी कमीत - कमी संबंध राखून तो आतून संपूर्णपणे अनासक्त राहील.

3) **च इष्टानिष्टोपपत्तिषु नित्यं समचित्तत्वम्:** आणि इष्ट-अनिष्ट प्राप्त झाल्यावर म्हणजे अनुकुलता-प्रतिकुलता प्राप्त झाल्यावर चित्ताची समता साधून रहाणे. दुसऱ्या अध्यायातल्या 48 व्या श्लोकात योगाची व्याख्या करताना भगवंताने सांगितले आहे - समत्वं योग उच्यते. अर्थात चित्ताची समता हाच योग होय. कुठल्याही अवस्थेत चित्ताची समता ढळू न देणे, चित्ताला निर्विकार ठेवणे गीतेचा मुख्य उपदेश आहे. यामुळे भगवान हा विचार पुन:पुन्हा सांगताहेत. चित्ताची निर्विकारता प्राप्त होण्यासाठीच भक्ती वगैरे साधनांची चर्चा केली गेली आहे. जिथे चित्त अहंकार वगैरेंपासून मुक्त होते तिथे कर्ता - भोक्तेपणा संपून जातो आणि अकर्ता अभोक्तेपणाचा अनुभव येऊ लागतो. यालाच आत्मानुभव असे म्हणतात.

अकर्तेपणाचा - अभोक्तेपणाचा जो अनुभव आहे. त्याचा अर्थ अहंकार शुन्यतेचा अनुभव आहे. ज्ञानवंताचा अहंकार इतका शून्य होऊन जातो की तो शून्यतेचाच अनुभव घेऊ लागतो. हाच समतेचा अनुभव होय. शून्यता वा समतेच्या अनुभवात व्याकुळता आणि जडता - दोघांचा अभाव असतो. साधक दशेत कधी - कधी व्याकुळता वा जडतेचा अनुभव येतो. जडता म्हणजे तमोगुण आणि व्याकुळता हा रजोगुण होय. तमोगुण आणि रजोगुण या दोघांना टाळून केवळ सत्वगुणाचा उत्कर्ष व्हावा यासाठीच गीतेचा आदेश आहे.

दुसऱ्या अध्यायाच्या 45 व्या श्लोकात आरंभीच अर्जुनाला नित्यसत्वस्थ: भव असे सांगून टाकले आहे. हे लक्षात ठेवायला हवे की साधनेतील प्रत्येक क्रिया ही तमोगुण आणि रजोगुणाचा त्याग करुन सत्वगुणाच्या उत्कर्षासोबत चालत रहावी कारण की चौदाव्या अध्यायातील 17 व्या श्लोकात सत्वात् संजायते ज्ञानम् म्हटले गेले आहे, म्हणजे सत्वगुणाच्या उत्कर्षानेच आत्मज्ञान प्राप्त होऊ शकते. राजसी आणि तामसी कर्मे आचरत असतानाच नेहमी अहंकार, काम, क्रोध वगैरे विकारांची प्रबळता अनुभवायला येते - मिळते. सात्विक कर्मांचे आचरण करताना सत्वगुणाचा जसजसा उत्कर्ष होत जातो तसतसे विकारांचे बळ क्षीण होत जाते. अशाप्रकारे जिथे व्याकुळता आणि जडतेचा अभाव होऊ लागतो, तिथे चित्ताच्या ठायी समता स्थिर होऊन जाते.

समतेचा अर्थ भावशून्यता नाही. समता एक भावात्मक स्थिती आहे. समतेच्या ठायी भक्तीचा उत्कर्ष होतो. अन्य सात्विक भावांचाही उत्कर्ष दिसून येतो. समतेच्या ठायी असत् भाव उठतच नाहीत. समतेत करुणा आणि परोपकार वृत्तीचा उत्कर्ष होतो. संत तुलसीदास म्हणतात -

*पर उपकार बचन मन काया।*
*संत सुभाव सहज खगराया॥*

अर्थात् - काकभुशुंडी गरुडाला सांगताहेत की हे खगराया म्हणजे पक्ष्यांच्या राजा, काया - वाचा - मनसा दुसऱ्यावर उपकार करणे हा संतांचा सहज स्वभाव आहे. मनसा - वाचा - कर्मणा परोपकार करत रहाणे हा संतांचा सहज स्वभाव असतो. ज्यावेळी क्षमावृत्ती, सहनशीलता, दक्षता, कोमलता, सरळता वगैरे सात्विक भावांचा उत्कट उत्कर्ष दिसून येईल. त्यावेळी समता प्राप्त झाली असे समजायला हवे.

समतेच्या ठायी शुभ भावना नष्ट न होता त्यांचा उत्कर्ष होतो असे जे आता सांगितले आहे त्याचा अर्थ ज्ञानी या शुभ - सात्विक भावांच्या अधीन होऊन जातो असा मात्र नाही. हे सारे उत्कट, विशुध्द भाव ज्ञानवंताच्या पूर्णपणे अधीन असतात. जर ते पूर्ण ज्ञानीच्या अधीन राहिले नाहीत तर त्याची समता नष्ट होऊन जाईल. तरीही ज्ञानावस्थेत जर विशुध्द भाव प्रकट होत नसतील तर मग कुठल्या अवस्थेत प्रकट होतील? अज्ञानावस्थेत

तर ते अज्ञानामुळे प्रकट होऊ शकत नाहीत. ज्ञानावस्था जड अवस्था नसल्यामुळे त्यात सारे विशुध्द भाव समता कायम राखून उत्कटतापूर्वक प्रकट होतीलच. ज्ञानी पुरुष त्या भावांवर विवेकपूर्वक नियंत्रण राखतो यामुळे तो कुठल्याही परिस्थितीत आपली अलिप्तता म्हणजे समता अबाधित राखू शकतो.

: 10 :

*मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी।*
*विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **च मयि अनन्य योगेन:** आणि अनन्य योगाने माझ्या ठायी
- **अव्याभिचारिणी भक्तिः** जो अव्यभिचारिणी भक्ती राखतो
- **विविक्तदेशसेवित्वं:** जो एकांत पवित्र स्थळी रहाणे पसंत करतो
- **जनसंसदि अरतिः** सामान्य, असंस्कारी, अविनयी लोकात रहाणे ज्याला आवडत नाही

### अर्थ

मज परमेश्वरामध्ये अनन्य योगाने अव्यभिचारिणी भक्ती (केवळ एका सर्वशक्तीमान परमेश्वराला आपला स्वामी मानून स्वार्थ व अभिमान सोडून श्रध्दायुक्त भावनेने आणि परम प्रेमाने भगवंताचे नित्य चिंतन करणे, ही अव्यभिचारिणी भक्ती होय.) तसेच एकांतात शुध्द ठिकाणी राहण्याचा स्वभाव आणि विषयासक्त मनुष्यांच्या सहवासाची आवड नसणे.

***माझ्या ठाईं अनन्यत्वें भक्ति निष्काम निश्चळ।***
***एकांताविषयीं प्रीति जन - संगांत नावड॥***

**विषय:** या श्लोकात आणखी तीन लक्षणे सांगितली आहेत. 1) जो माझ्याठायी अनन्ययोगपूर्वक अव्याभिचारिणी भक्ती राखतो. 2) त्याला एकांत आवडतो. 3) सर्वसामान्य लोकांपासून तो लांब रहातो.

### स्पष्टीकरण

1) **मयि अनन्य योगेन अव्यभिचारिणी भक्तिः** माझ्याठायी जो अनन्य भावनेने युक्त होऊन भक्ती करतो. अनन्य योग म्हणजे काय ? माझ्यापेक्षा कुठलीही श्रेष्ठ वस्तु नाही आणि माझ्याहून स्वतंत्र अशा वेगळ्या वस्तुचे अस्तित्व नाही. अशी भावना राखणे होय म्हणजे जो ईश्वराहून अन्य कुणालाही श्रेष्ठ मानत नाही आणि ईश्वराहून वेगळ्या अशा कुठल्याही वस्तुचे स्वतंत्र अस्तित्व मानत नाही तो अनन्ययोगाने भक्ती करतो.

या श्लोकात ज्ञानाच्या ज्या लक्षणांचा उल्लेख केला आहे, त्यात भक्तीही आहे. ही श्रेष्ठ दर्जाची म्हणजे अद्वैत वा निर्गुण भक्ती होय. साधकावस्थेत भेदभरली भक्ती असू शकेल पण ज्ञानावस्थेत वा सिध्दावस्थेत अद्वैत भक्तीच होऊ शकते. या अद्वैत भक्तीची चर्चा 18 व्या अध्यायातील पंचावन्नाव्या श्लोकात आहे. अद्वैत भक्तीचे स्वरुप समजाऊन सांगण्यासाठी इथे भगवंताने दोन विशेषणांचा प्रयोग केला आहे - अनन्य योग आणि अव्यभिचरिणी यातून या भक्तीचे स्वरुप स्पष्ट होते. अनन्ययोग म्हणजे जगात परमेश्वराखेरीज दुसरे काहीही श्रेष्ठ नाही, केवळ एकमात्र परमात्माच श्रेष्ठ आहे. ही भक्ती या भावनेने युक्त असते. जगात अनेक श्रेष्ठ वस्तु आहेत पण त्यांच्यापेक्षाही परमेश्वर श्रेष्ठ आहे. असे सांगायचे कारण हे की जगात ज्या काही म्हणून श्रेष्ठ वस्तु आहेत त्यांचा आधार परमात्मा आहे. परमात्म्याच्या आधाराशिवाय त्या श्रेष्ठ वस्तु अस्तित्वात येऊ शकत नाहीत आणि टिकूही शकत नाही. परमात्म्याद्वारेच त्या श्रेष्ठ वस्तुंची उत्पत्ती होते. वस्तु उत्पन्न झाल्यावर ईश्वरी आधारानेच त्या अस्तित्वात येतात आणि नष्ट व्हायची वेळ आली तर त्या परमात्म्याच्या ठायीच विलीनही होतात.

इथे एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो की सर्व वस्तुंपेक्षा परमात्म वस्तुच श्रेष्ठ आहे असे मानण्याचा आधार काय? याचे उत्तर असे आहे की जगतातले तमाम पदार्थ परमात्म्यापेक्षा वेगळे नाहीहेत. कुठल्याही पदार्थांचे स्वतंत्र अस्तित्व असते तर तो पदार्थ ईश्वरापेक्षा श्रेष्ठ होऊन गेला असता पण जगातील सारे पदार्थ कार्य आहेत आणि कार्य हे कुठल्यातरी कारणामुळे उत्पन्न होते. कार्यापेक्षा कारण श्रेष्ठ असते. जगात हे परमात्म्याचे कार्य असल्यामुळे जगताहून परमात्मा श्रेष्ठ आहे. भगवंताने हा मुद्दा सांगताना इथे

भक्तीसोबत अव्याभिचरिणी शब्द जोडला आहे. अनन्य म्हणजे दुसरा नाही - परमात्म्याशिवाय इतर कुठलीही गोष्ट श्रेष्ठ नाही. अशी भावना मनी बाळगणे आणि अव्यभिचरिणी म्हणजे परमेश्वरापेक्षा दुसरी कुठलीही वेगळी वस्तु जगात अस्तित्वात नाही अशी भावना मनात बाळगणे. अशा प्रकारे या अद्वैत भक्तीच्या सोबत दोन प्रकारच्या भावना असतात, असे भगवान इथे सांगताहेत.

2) **विविक्तदेशसेवित्वम्:** ज्ञानी पुरुषाला यथाशक्य एकांतात रहायला आवडते - भावते. एकांत म्हणजे निर्जन प्रदेश, जंगल वगैरे नाही. याचा अर्थ असा की लोकांमध्ये रहात असताना सुध्दा थोडीशी वेगळी जागा - स्वतंत्र स्थान - रहायला मिळाले तर ज्ञानवंताला अधिक आवडते. याचा अर्थ लोकांना भिऊन ज्ञानी माणूस एकांताची जागा पसंत करतो असे नव्हे. ज्ञानी पुरुष प्रत्येक व्यक्तीला ईश्वररुपात बघत असल्यामुळे कुणाला भ्यायचा प्रश्नच उद्भवत नाही. ज्ञानी असाधारपणे योग्य असतो. तो लोकांमध्ये येऊन राहिला तर लोकाना आपल्या स्वाभाविक स्थितीत कृत्रिमता येण्याची वा ओझे वाटण्याची शक्यता असते. साधक दशेत लोकांपासून थोडे स्वतंत्र वेगळे रहाणे - साधनेच्या दृष्टीने गरजेचे असते. यातून साधक दशेचा बचाव होतो. अशा प्रकारे साधक आणि सिध्द दोघांचे एकांत सेवन - एकांतात रहाणे - स्वाभाविक आहे.

इथे शंकराचार्य एकांत स्थानी रहाण्याविषयी सांगताहेत - विविक्तेषु हि देशेषु यत: चित्तं प्रसीदति तत् आत्मादिभावना विविक्ते उपजायते - अर्थात् एकांत स्थानी चित्त प्रसन्न रहात असल्यामुळे आत्मा - परमात्मा वगैरेच्या संदर्भात पवित्र भाव उत्पन्न होतात.

एकांतात एकाग्रता वाढते - एकाग्रता वाढताच ईश्वरविषयक भाव मनात उत्पन्न होतात किंवा सृष्टीचे मिथ्यात्व लक्षात येऊन वैराग्य भावना प्रकट होऊ लागते किंवा आत्मा देहाहून वेगळा असल्याचा अनुभव यायला लागतो. साधकाला एकांत स्थळाचा असा अनुभव येत असल्यामुळे एकांत स्थळाचे महत्व आहे.

3) **जनसंसदि अरति:** साधारण असंस्कारी, अविनयी लोकांमध्ये रहाणे ज्याला आवडत नाही. ज्ञानी वा साधक नेहमी सज्जनांमध्येच रहातो, हा ज्ञानीचा स्वभाव आहे. ज्ञानवंताचा स्वभाव परमात्म ज्ञानच आहे, यामुळे साधकावस्थेत त्याला सज्जनांमध्येच रहावे लागते, कारण की सज्जनांच्या संगतीतच साधना घडू शकते. साधना करता करता साधक जेव्हा सिध्द म्हणजे ज्ञानी बनून जातो तेव्हा सज्जनांमध्ये निवास करणे हा त्याचा स्वभावच बनून जातो. ज्ञानी पुरुष आपल्या ज्ञानी स्वभावाला कसे सोडील? जो कधीही बदलत नाही तो स्वभाव, हा स्वभाव शब्दाचा अर्थच आहे. ज्ञानी पुरुष सदैव सज्जनांमध्येच निवास करील, दुर्जनांमध्ये नव्हे. सज्जनांमध्येच राहील पण थोडा वेगळा असे आत्ताच सांगितले आणि आता इथे सांगताहेत की दुर्जन वा जे साधारण अविनयी, अविवेकी जन असतात त्यांच्यामध्ये तो रहाणार नाही. एवढेच लक्षात ठेवायचे आहे की सज्जनांचा सहवास टाळायचा नाही केवळ दुर्जनांचा वा साधारण जनांचा सहवास टाळायचा आहे.

: 11 :

*अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम् ।*
*एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- अध्यात्मज्ञाननित्यत्वं: आत्मज्ञानात नित्य तल्लीनता
- तत्वज्ञानार्थदर्शनम्: तत्वज्ञानाचा अर्थ जो परमेश्वर त्याला सर्वत्र पहाणे म्हणजे आत्मज्ञानाचे फळ अशा मोक्षाला अनुभवणे
- एतज्ज्ञानं इति प्रोक्तं: हेच ज्ञान आहे.
- यत् अत: अन्यथा (तत्) अज्ञानं: या विपरीत जे आहे ते अज्ञान होय.

**अर्थ**

अध्यात्मज्ञानात (ज्या ज्ञानाने आत्मा कोण आणि अनात्मा कोण हे कळते ते अध्यात्म ज्ञान होय.) नित्य स्थिती आणि तत्त्वज्ञानाचा अर्थ जो परमात्मा त्यालाच पाहणे हे सर्व ज्ञान होय (या अध्यायात श्लोक 7 पासून येथपर्यंत जी साधने सांगितली आहेत ती सर्व तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीला कारण असल्यामुळे त्याना ज्ञान असे म्हटले आहे.) आणि या उलट जे असेल ते अज्ञान (वर सांगितलेल्या ज्ञानाच्या उलट जो मान, दंभ, हिंसा वगैरे आहेत, ती अज्ञानाच्या

वाढीला कारण असल्यामुळे त्याना अज्ञान असे म्हटले आहे.) होय, असे म्हटले आहे.

*आत्म-ज्ञानीं स्थिर श्रध्दा तत्त्वतां ज्ञेय-दर्शन ।*
*हें ज्ञान बोलिलें सारें अज्ञान विपरीत जें ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1)आत्मज्ञानात म्हणजे ईश्वरी ज्ञानात अखंड तल्लीन भाव. 2) परमात्म ज्ञानाचे फलित आहे मोक्ष, त्याचे दर्शन वा अनुभव. 3) इथे ज्ञान आहे आणि 4) त्याच्या विपरीत अज्ञान आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अध्यात्मज्ञाननित्यत्वं:** आत्मज्ञानाचा अर्थ ईश्वरी ज्ञानात अखंड तल्लीन भाव असा आहे. इथे 'अध्यात्मज्ञान' शब्दाचा वापर केला गेला आहे. 'अध्यात्म' म्हणजे आत्मविषयक. यामुळे 'अध्यात्मज्ञान' म्हणजे 'आत्मज्ञान' होय. शरीरात परमात्मा सत् - चित् स्वरुपात प्रकट आहे. या परमात्म्यासाठी वेदान्तात 'आत्मा' शब्द प्रयुक्त केला जातो. आत्मज्ञान म्हणजे शरीरात प्रकट असलेल्या परमात्म्याचा अनुभव होय. वैराग्य उपजले की हा अनुभव येतो. काम, क्रोध वगैरे विकार क्षीण होऊन देह वगैरे संघातापासून पूर्णपणे वेगळेपणाचा अनुभव येतो याला 'आत्मज्ञान' असे म्हणतात.

2) **तत्वज्ञानार्थदर्शनम्:** परमात्म - ज्ञानाचे फलित मोक्षाचे दर्शन, अनुभव. अंतरतम परमात्माच ब्रह्मांडातील समस्त पदार्थांमध्ये व्याप्त असल्याची दृष्टी प्राप्त होते, असा अनुभव मिळणे हेच परमात्म - ज्ञान होय. आत्मज्ञान म्हणजे देहस्थित परमात्म्याचा अनुभव. सांख्य आणि जैन तत्वज्ञानात माणूस, पशु, पक्षी वगैरेत चैतन्य स्वरुपी आत्मतत्त्व मानले आहे पण ते ब्रह्मांडाच्या पाठीमागे चैतन्यस्वरुपी परमात्म्याला न मानता जड तत्त्वाला मानतात. सांख्य 'प्रकृती' ला तर जैन 'पुद्गल' ला मानतात. वैशेषिक तत्वचिंतकही 'परमाणु' तत्व मानतात. या तत्वज्ञान्यांची भाषा व भूमिका आत्मज्ञानाची आहे. वेदान्तात आत्मज्ञान आणि परमात्मज्ञान अशा दोन भूमिका आढळतात. आत्मज्ञानाने शांततेचा अनुभव येतो पण विनोबांच्या भाषेत आत्मज्ञानाचा अर्थ 'परमात्म रुपी पदार्थांचा रस चाखणे' असा आहे. परमात्म ज्ञानाचा अर्थ आहे, परमात्मरुपी पदार्थाचे पोटभर भोजन करणे.

3) **एतत् ज्ञानं इति प्रोक्तम्:** हेच ज्ञान होय. 7 ते 11 या पाच श्लोकात व्यक्तवलेली सारी लक्षणे ज्ञानाची आहेत. ज्ञानाचा अनुभव आत होतो. या पाच श्लोकात सांगितलेली त्याची ही लक्षणे बाहेर प्रकट होतात. आतील अनुभवात्मक ज्ञान जेव्हा बाहेर या लक्षणांच्या रुपाने प्रकट होते त्यावेळा ज्ञान प्राप्त झाले असे मानले जाते. आत्मज्ञानाची प्राप्ती झाली वा नाही हेही या लक्षणांवरुनच तपासता येते. लक्षणे प्रकट झाल्याशिवाय कुणा पुरुषाला आत्मज्ञानी मानणे उचित नव्हे. साधक दशेत ज्ञानाची काही लक्षणे झळकतील पण सारी लक्षणे पूर्णपणे दिसणार नाही. सिध्द दशेत म्हणजे ज्ञान दशेत ही सारी लक्षणे संपूर्णपणे प्रकट झालेली दिसतील.

4) **अज्ञानं यत् अत: अन्यथा:** याच्या उलट ते अज्ञान होय. 7 ते 11 या पाच श्लोकात ज्ञानाची जी लक्षणे सांगितली आहेत, ते 'ज्ञान' होय. ज्ञानाची ही व्याख्या लक्षात येण्यासारखी आहे पण एवढे सांगून भगवंताला समाधान वाटले नाही. ज्ञानाच्या स्पष्टीकरणात यत्किंचितही अस्पष्टता राहू नये म्हणून सांगितले की ज्ञानाच्या या लक्षणाहून जी वेगळी वा विपरीत लक्षणे आहेत त्याला 'अज्ञान' असे म्हणतात. बहुधा लोक निरक्षरतेला अज्ञान मानतात. कुणी बी.ए., एम्.ए., शास्त्री असला तर त्याच्याजवळ ज्ञान आहे असे मानले जाते. इथे भगवंत अज्ञानाची अगदी वेगळी व्याख्या करताहेत. ज्ञानाची जी लक्षणे वर्णिलीत त्यांच्या विपरित म्हणजे मानित्व, दंभित्व, हिंसा, अक्षमा, अऋजुता ही अज्ञानाची लक्षणे मानायला हवीत. बौध्दिक ज्ञान हे ज्ञान नव्हे. ते जेव्हा प्रत्यक्ष आचरणात उतरते आणि वर सांगितलेल्या ज्ञानाच्या लक्षणांच्या रुपाने प्रकट होते, तेव्हा त्याला 'ज्ञान' म्हटले जाते.

: 12 :

*ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।*
*अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- यत् ज्ञेयं: जे ज्ञेय म्हणजे जाणण्यास योग्य आहे
- तत् प्रवक्ष्यामि: ते मी सांगतो
- यत् ज्ञात्वा: ज्याला जाणून घेतल्यावर
- अमृतं अनुते: अमरत्व प्राप्त होते म्हणजे परमानंद प्राप्त होतो
- अनादिमत्: ज्याचा आदी नाही असे
- परं ब्रह्म: असे ते श्रेष्ठ ब्रह्म आहे
- तत् न सत्: ज्या ब्रह्माला न सत् म्हणत
- न असत् उच्यते: ना असत

**अर्थ**

जे जाणण्याजोगे आहे आणि जे जाणल्यामुळे मनुष्याला परमानंद मिळतो, ते चांगल्या प्रकारे सांगतो, ते अनादी परम ब्रह्म सत् ही म्हणता येत नाही आणि असत् ही म्हणता येत नाही.

*ज्ञेय तें सांगतों ज्याच्या ज्ञानानें अमृतत्व चि ।*
*अनादि जें पर -ब्रह्म आहे नाहीं न बोलवे ॥*

**विषय:** या श्लोकात चार विषय आले आहेत. 1) जे ज्ञेय आहे, ज्याचे मी वर्णन करीत आहे. 2) याला जाणून घेतल्यावर माणसाला अमरत्वाची प्राप्ती होईल. 3) ज्याचा आदी म्हणजे आरंभ नाही असे ते श्रेष्ठ ब्रह्म आहे. 4) ज्या ब्रह्माला ना सत् म्हणत ना असत्.

**स्पष्टीकरण**

1) **यत् ज्ञेयं तत् प्रवक्ष्यामि:** जे ज्ञेय आहे, त्याचे मी वर्णन करतो. या अध्यायाच्या आरंभी भगवंताने सांगितले की या शरीराला 'क्षेत्र' आणि याला जाणणाऱ्याला 'क्षेत्रज्ञ' असे म्हणतात. पुढे त्यांनी सांगितले की मनुष्य, पशु, पक्षी इत्यादी सर्व शरीरात म्हणजे क्षेत्रात जो क्षेत्रज्ञ आहे, तो मी म्हणजे परमात्मा आहे. मग शरीर कोणत्या तत्त्वांनी बनले आहे ते सांगितले आणि मग ज्याला आत्मज्ञान वा परमात्म ज्ञान झाले आहे त्याची लक्षणे सविस्तर सांगितली. शरीराची ओळख, शरीरात वास्तव्याला असलेल्या प्रकट परमेश्वराची ओळख आणि आत्मज्ञानी पुरुषाची लक्षणे या तीन बाबी सांगितल्या. आता चौथा मुद्दा मांडताहेत. ब्रह्मांडात व्याप्त अशा अव्यक्त परमात्म्यासाठी इथे 'ज्ञेय' शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. शरीर वा ब्रह्मांडातील पदार्थांना जाणणाऱ्याला 'ज्ञाता' म्हणतात तर बाह्य पदार्थांना 'विषय' असे म्हणतात. ज्या मूळ कारणाचे आपणास ज्ञान होत नाही, शास्त्रीय भाषेत त्याला जाणून घेण्यायोग्य वस्तु वा 'ज्ञेय' असे म्हटले जाते. आता 12 च्या पुढील सात श्लोकांमधून भगवंत ज्ञेयाची ओळख करुन देताहेत. पिंड - ब्रह्मांडातील सारे पदार्थ ज्या मूळ कारणापासून बनले त्याला ज्ञेय असे म्हणतात.

2) **यत् ज्ञात्वा अमृतं अश्नुते:** ज्याला जाणून घेतल्यावर मानव अमरत्व म्हणजे मोक्षाला प्राप्त होतो. पिंड-ब्रह्मांडात व्याप्त मूळ कारणाची ओळख पटल्यावर माणूस दु:खमुक्त होतो. जन्म मुक्तीला प्राप्त करुन घेतो. शरीर आणि जगत दोघे कुठल्यातरी कारणाची कार्ये आहेत. कार्य विनाशी तर कारण अविनाशी असते. कार्य स्थूल तर कारण सूक्ष्म असते. आपला संबंध रात्र - दिवस जगत्रुपी कार्याशी येतो. कार्य विनाशी असल्यामुळे त्यापासून अखंड सुखाचा अनुभव येतो. यामुळे माणसाच्या ठायी जगाच्या मूळ कारणाला जाणून घ्यायची जिज्ञासा असते. मूळ कारण अविनाशी असते. त्याची ओळख पटल्यावर माणूस दु:खापासून मुक्त होतो. अहंकार, काम, क्रोध वगैरे तमाम विकारांपासून मुक्त झाल्याचा ज्याला अनुभव येतो परिणामी त्याला जन्म मरणापासूनही मुक्ती लाभते. हाच मोक्ष होय.

3) **अनादिमत् परं ब्रह्म:** ज्या मूळ कारणाचा आदी नाही त्याला श्रेष्ठ 'ब्रह्म' म्हणतात. आता भगवंत जगाच्या मूळ कारणाची ओळख करुन देताहेत. मूळ कारण अजन्मा आहे. संत तुलसीदास म्हणतात-आदि अंत कोउ जासु न पावा म्हणजे त्याची सुरुवात आणि अखेर कुणीच जाणू शकले नाही. भगवान इथे आपल्या मुळ कारणाला 'परब्रह्म' असे म्हणताहेत. ब्रह्म म्हणजे अत्यंत व्यापक. या ब्रह्मापासून सुरुवातीला आकाश उत्पन्न झाले. भगवंताने ब्रह्माला 'पर' म्हटले, पर म्हणजे श्रेष्ठ.

4) **तत् न सत् न असत् उच्यते:** ज्या ब्रह्माला ना सत् म्हणता येत ना असत्. मूळ कारणाचे वर्णन शब्दात नाही

करता येत. यामुळे त्याला निर्गुण, निराकार, अव्यक्त, शब्दांच्या पलिकडले असे म्हटले जाते. उपनिषदात मूळ कारण निर्गुण ब्रह्माचे पुढीलप्रमाणे वर्णन येते - अस्थूलम्, अनणु, अह्रस्वम्, अदीर्घम्, अलोहितम्, अस्नेहम्, अच्छायम्, अतम:, अवायु:, अनाकाशम्, अरसम्, अगंधम्, अचक्षुष्कम्, अश्रोत्रम्, अवाक्, अमन:, अतेजस्कम्, अप्राणम्, अमुखम्, अमात्रम्, अनंतरम्, अबाह्यम्. जेवढ्या स्थूल व सूक्ष्म वस्तु आहेत त्या सर्व मूळ कारण ब्रह्माच्या ठायी नाहीहेत. प्रत्येक वस्तुच्या सोबत 'अ' विशेषण लाऊन ज्याला ब्रह्म म्हटले गेले आहे. या श्रृतीवचनाचा अर्थ असा आहे.

"ते ब्रह्म स्थूल नाही, अणु नाही, ना लहान, ना मोठे, लाल नाही, ते स्नेहरहित, छायारहित, तमरहित, वायुरहित, आकाश रहित, रसरहित, गंधरहित, नेत्ररहित, कर्णरहित, वाणीरहित, मनरहित, तेजरहित, प्राणरहित, मुखरहित, विषयरहित, अनंतर आणि अबाह्य आहे."

यामुळे भगवंताने सांगितले की ते ना सत् ना असत्. सत् शब्दही जगताच्या अपेक्षेने आहे. मुळ कारण तर जगत् रहित असल्यामुळे जगतातला कुठलाही शब्द मूळ कारणावर लागू होऊ शकत नाही. सत्च्या अपेक्षेने असत् शब्दाचा जन्म झाला आहे. सत् नसेल तर असत्ही नसेल. अशा प्रकारे जगातला कुठलाही शब्द मूळ कारणावर लागू पडत नाही पण ब्रह्माची ओळख वा परिचय तरी कसा व्हावा ? ब्रह्माची ओळख शब्दाद्वारेच करवून देऊ शकतो. ओळखीसाठी ब्रह्माचे वर्णन 'अलौकिक' या शब्दाने केले जाते. याला 'सगुण' ब्रह्माचे वर्णन म्हणतात. निर्गुण ब्रह्माचे वर्णन केले तर ते सगुण ब्रह्म होते. या सगुण ब्रह्मालाच 'ईश्वर' म्हटले जाते. निर्गुणाची भक्ती शब्दांच्याच माध्यमातून करता येते यामुळे त्याला सर्वज्ञ, सर्वशक्तीमान, जगताला उत्पन्न करणारा, जगताचे नियंत्रण करणारा, जगतात प्रलय करणारा, कर्मफळ देणारा, संकटसमयी मदत करणारा, अत्यंत दयाळू, सर्व गुणांचा भांडार, मोक्षप्रदाता, दु:खहर्ता वगैरे म्हणतात. या श्लोकात फक्त निर्गुण ब्रह्माचेच वर्णन आहे.

: 13 :

***सर्वत: पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।***
***सर्वत: श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- तत्: ते निर्गुण ब्रह्म
- सर्वत: पाणिपादं: सर्व बाजुंनी हात - पाय असलेले
- सर्वत: अक्षिशिरोमुखम्: सर्व बाजुंनी नेत्र, मस्तक आणि मुखे असलेले आहे
- सर्वत: श्रुतिमत्: सर्व बाजुंनी कान असलेले आहे
- लोके सर्वम् आवृत्य: विश्वात सर्वांना व्यापून
- तिष्ठति: रहात आहे

**अर्थ**

ते सर्व बाजुंनी हात-पाय असलेले, सर्व बाजुंनी नेत्र, मस्तक आणि मुखे असलेले, तसेच सर्व बाजुंनी कान असलेले आहे कारण ते विश्वात सर्वांना व्यापून राहिले आहे (आकाश ज्याप्रमाणे वायू, अग्नी, जळ आणि धरणीचे कारण असल्यामुळे त्याना व्यापून राहिलेले आहे, तसाच परमात्माही सर्वांचे कारण असल्यामुळे सर्व चराचर जगाला व्यापून राहिला आहे.)

***सर्वत्र दिसती ज्यास हात पाय शिरें मुखें ।***
***कान डोळे हि सर्वत्र सर्व झांकुनि जें उरे ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी वर्णिल्या गेल्याहेत. 1) ते ज्ञेय (निर्गुण ब्रह्म) सर्व बाजुंनी हात, पाय, नेत्र, मस्तक, मुख आणि कान असलेले आहे. 2) ते प्राणी समूहात व्याप्त आहे.

**स्पष्टीकरण**

भगवंत या श्लोकातून निर्गुण ब्रह्माची ओळख सगुण ब्रह्माच्या रुपाने करुन देत आहेत. संत तुलसीदासांनी म्हटले आहे.-

***अगुनहिं सगुनहिं नहिं कछु भेदा ।***
***उभय हरहिं भव - संभव खेदा ॥***

अर्थात् निर्गुण आणि सगुण यात काही भेदाभेद नाही. दोघे भवातून उत्पन्न होणाऱ्या खेदाला दूर सारतात.

निर्गुण आणि सगुण ब्रह्मात खरे पाहू जाता कुठलाही भेद नाही. दोघांची उपासना प्रपंचातील दु:खांना हरते. ज्याप्रमाणे संन्यास मार्गाच्या तुलनेने कर्मयोगमार्ग सरळ आहे त्याचप्रमाणे निर्गुण ब्रह्माच्या तुलनेने सगुण ब्रह्माचे ग्रहण करणे सुगम आहे.

1) **तत् सर्वत: पाणिपादं सर्वत:** अक्षिशिरोमुखं, सर्वत: श्रुतिमत्: तसे बघू गेले तर हे संपूर्ण विश्व निर्गुण ब्रह्मतत्त्वाचाच विस्तार आहे. मातीचा घट तयार केला. हा घट मातीचाच आविष्कार आहे. घटात मातीशिवाय दुसऱ्या कुठल्या वस्तुचे अस्तित्व नाही. जगत्रुपी कार्यात ब्रह्मरुप वा परमात्मरुप कारणाशिवाय दुसऱ्या कुठल्या वस्तुचे अस्तित्वच नाही. दिसतो घट पण खरे म्हणजे आहे माती. तशाचप्रकारे बघण्यात जगत् वा विश्व असले तरी वास्तवात आहे ब्रह्म. शरीरात हात, पाय, डोळे, डोके, मुख, कान आहेत आणि अन्य इंद्रियेही आहेत. ज्ञानेंद्रीये आणि कर्मेंद्रीये मिळून सारी दहा आहेत. भगवंताने या दहांपैकी पाच इंद्रियांची चर्चा केली आहे. ज्ञानेंद्रीयांमधल्या डोळे आणि कानाची तर कर्मेंद्रीयांमधल्या हात, पाय आणि मुख या तीन इंद्रीयांची, शरीरातून डोके घेतले अशाप्रकारे शरीर, ज्ञानेंद्रीये आणि कर्मेंद्रीये मिळून सहांची चर्चा केली आहे. सृष्टीतील समस्त प्राण्यांना परमेश्वरानेच उत्पन्न केले आहे. शरीर आणि इंद्रियांना परमेश्वरानेच उत्पन्न केले आहे. शरीराचा, जीवाचा, ब्रह्मांडातल्या तमाम पदार्थांचा आभास परमात्माच करवून देत आहे. परमात्म्याशिवाय स्वतंत्र कुण्या दुसऱ्या वस्तुचे अस्तित्व नाही. तमाम प्राणीमात्रांच्या ठायी दिसून येणारे हात - पाय परमात्माच आहेत. तोच सगळीकडून डोळे, डोके, मुखाच्या रुपाने दिसतो आहे. तोच सर्वत्र कानाच्या रुपात दिसतो. निर्गुण ब्रह्मच सगुण बनून अभिनय करतो.

2) **लोके सर्वम् आवृत्य तिष्ठति:** प्राणीमात्रात, प्राणीसमूहात सर्वांना व्याप्त करुन रहातो. जड - चेतन सर्व पदार्थांच्या ठायी ते निर्गुण ब्रह्म ओतप्रोत आहे. यामुळे दुसऱ्या कुठल्या वस्तुच्या अस्तित्वाला जागाच नाही. जीवसृष्टीत परमात्मा सत् - चित् - आनंद स्वरुपात प्रकट आहे तर जड सृष्टीत तो अव्यक्त आहे. परमात्मा प्रकट असो वा अव्यक्त असो, ब्रह्मांडातल्या जड - चेतन समग्र सृष्टीत तोच आहे.

: 14 :

***सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।***
***असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वेंद्रियगुणाभासं:** सर्व इंद्रिये आणि त्यांच्या धर्मांचा भास करवणारे ब्रह्म
- **सर्वेंद्रियविवर्जितम्:** सर्व इंद्रियांनी रहित आहे
- **असक्तं:** ते अनासक्त आहे
- **च सर्वभृत एव:** आणि सर्वांना धारण-पोषण करणारे आहे
- **निर्गुणं:** ते निर्गुण म्हणजे गुणातीत आहे
- **च गुणभोक्तृ:** तरीही सत्व, रज, तम वगैरे गुणांना धारण करणारे म्हणजे भोग घेणारे आहे

**अर्थ**

ते सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहेत परंतु वास्तविक सर्व इंद्रियांनी रहित आहे. ते आसक्तीरहित असूनही सर्वांचे धारण-पोषण करणारे आणि निर्गुण असूनही गुणांचा भोग घेणारे आहेत.

***असूनि इंद्रियातीत त्यांचे व्यापार भासवी ।***
***न स्पर्शतां धरी सर्व गुण भोगूनि निर्गुण ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) सर्व इंद्रिये आणि ज्यांच्या धर्माचा भास करवणारे ब्रह्म सर्व इंद्रियांहुन रहित आहे. 2) ते अनासक्त आहे तरी सर्वाना धारण करणारे आहे. 3) ते निर्गुण आहे तरी सत्व - रज - तम या गुणांना धारण करणारे आहे.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात ब्रह्माच्या सगुण - निर्गुण अशा दोन्ही रुपांचे वर्णन केले गेले आहे.

1) सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम्: सर्व इंद्रिये आणि त्यांच्या धर्माचा भास करवणारे ब्रह्म सर्व इंद्रियांहून रहित आहे. पाच ज्ञानेंद्रीये, पाच कर्मेंद्रीये, मन आणि बुध्दीचा भास निर्गुण ब्रह्मच करवून देते. जड शरीराचा भासही तेच करवून देते, पण त्याची चर्चा इथे केली गेलेली नाही. भास करवून देत असला तरी परमात्मा इंद्रियातीत

आहे जसे लोहचुंबक आणि लोखंड, लोखंडापासून लोहचुंबक वेगळे रहात असले तरी लोखंडात उत्पन्न होणारी हालचाल लोहचुंबकामुळे होते. अशाच प्रकारे शरीराच्या तमाम हालचाली आणि इंद्रियांचा संपुर्ण व्यापार परमात्म्याच्या अस्तित्वानेच होत असतो.

2) असक्तं सर्वभृत् च एव: ते ब्रह्म पूर्ण अनासक्त असले तरी सर्वांना धारण करणारे आहे. ब्रह्म अनासक्त आहे कारण की विश्वाचा भास करवून देत असतानाही ते विश्वात लिप्त होत नाही पण लोक असा अनुभव घेत नाही. आपण जमीन विकत घेतो, घर बांधतो, लेकरे जन्माला घालतो, कारखाना उभारतो. या सर्व गोष्टी आपण जन्माला घालतो - उत्पन्न करतो, पण यापासून अलिप्त वा अनासक्त रहात नाहीत. यामुळे दु:खी होतो. परमेश्वराचे वैशिष्ट्य वा अलौकिकता हीच आहे की तो सर्व पदार्थांना उत्पन्न करतो, शरीरालाही उत्पन्न करतो आणि सर्व पदार्थांना धारणही करतो. तरीही तो त्यांच्यापासून अलिप्त, अनासक्त रहातो. परमेश्वर स्वत: निर्गुण आहे. तो सगुणाला जन्माला घालून धारण करतो आणि अगदी अनासक्त रहातो.

3) निर्गुणं गुणभोक्तृ च: परमात्मा निर्गुण आहे. आपल्याला ज्या गुणांचा अनुभव येतो. त्यापेक्षा तो लांब आहे, म्हणुन निर्गुण आहे. आपल्या इंद्रियांच्या बळावर आपल्याला ज्या गुणांचा अनुभव येतो त्याचा भास अवश्य परमात्मा करवतो यामुळे त्याला गुणांचे आश्रयस्थान म्हणता येईल. मातीमुळे घटाचा भास होतो म्हणून घटाचे आश्रयस्थान मातीच आहे. तरीही घटाचे आकार वगैरे धर्म मातीत आहे, असे सांगू शकत नाही. आकार आणि धर्म आपल्या अपेक्षेने आहेत, मातीच्या अपेक्षेने तर मातीच आहे. घटाचा उपयोग करतो म्हणून घट स्वतंत्र पदार्थ आहे, पण मातीच्या दृष्टीने विचार केला तर मात्र घटासारखी कुठलीही स्वतंत्र वस्तु अस्तित्वातच नाही. इथे भगवंताने ही भाषा उपयोगात आणली आहे - व्यवहारात आणली आहे. मी सत्व, रज, तम या गुणांचा धारक वा भास करवणारा परमात्मा स्वत: निर्गुण आहे. मृगजळाचे आश्रय असते सूर्यकिरण आणि वालुकामय प्रदेश पण त्याचा कुठलाही धर्म सूर्य किरण वा वाळूच्या ठायी दिसून येत नाही. सत्व, रज, तम हे तिन्ही गुण विश्वात अवश्य दिसून येतात पण ते गुण आणि ज्या गुणांनी युक्त विश्व हे सत्य नसल्यामुळे ते धर्म ब्रह्माच्या ठायी आहेत, असे नाही सांगू शकत. संत तुलसीदासांनी निर्गुण ब्रह्माचे असे वर्णन केले आहे.-

*बिनु पद चलै सुनै बिनु काना।*
*कर बिनु कर्म करै विधि नाना॥*

*आनन-रहित सकल रस भोगी।*
*बिनु बानी बकता बड जोगी॥ तन बिनु परस नयन बिनु*
*देखा। ग्रइह घ्रान बिनु बास असेसा॥*
*असि सब भाँति अलौकिक करनी।*
*महिमा जासु जाइ नहिं बरनी॥*

म्हणजे ते निर्गुण ब्रह्म पायांशिवाय चालते, कानांशिवाय ऐकते, हात नसताना विविध प्रकारची कार्ये करते, मुख नसताना तमाम रसांचा आस्वाद घेते, वाणी नसताना पारंगत वक्ता, मोठा योगी आहे, देहाशिवाय ते ब्रह्म तत्त्व स्पर्श करु शकते आणि नेत्रांशिवाय बघू शकते, नाक नसताना सुगंधाचे ग्रहण करु शकते, असे सर्व प्रकारे अलौकिक कर्तृत्व आहे. त्या निर्गुण ब्रह्माचा महिमा वर्णन करुन सांगता येण्यासारखा नाही.

: 15 :

*बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।*
*सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भूतानां बहि: च अन्त:** ते ब्रह्म तत्त्व सर्व प्राणीमात्रांच्या आत - बाहेर आहे
- **च अचरं चरं एव:** आणि तेच चर व अचर आहे
- **सूक्ष्मत्वात् तत् अविज्ञेयं:** ते ब्रह्म सूक्ष्म असल्यामुळे इतर पदार्थांप्रमाणे त्याचे ज्ञान होत नाही
- **च तत् दूरस्थं:** आणि अज्ञानी जनांसाठी ते खूप लांब आहे
- **च अन्तिके:** आणि ज्ञानी पुरुषांसाठी खूप जवळ आहे

**अर्थ**

ते चराचर सर्व प्राणीमात्रांच्या आत आणि बाहेर परिपूर्ण भरलेले आहे तसेच चर आणि अचरही तेच आहे आणि ते सूक्ष्म असल्यामुळे कळण्याजोगे नाही (ज्याप्रमाणे सूर्यकिरणात असलेले प्राणी सूक्ष्म असल्यामुळे साधारण मनुष्यांना कळत नाही, त्याच प्रमाणे सर्वव्यापी परमात्माही सूक्ष्म असल्यामुळे साधारण मनुष्याना कळत नाही.), तसेच अतिशय जवळ (तो परमात्मा सर्वत्र परिपूर्ण आणि सर्वांचा आत्मा असल्यामुळे अत्यंत जवळ आहे.) आणि लांबही (श्रध्दारहित अज्ञानी पुरुषांना कळत नसल्यामुळे तो फार लांब आहे.) असलेले तेच आहे.

*जें एक आंत - बाहेर जें एक चि चराचर ।*
*असूनि जवळीं दूर सूक्ष्मत्वें नेणवे चि जें ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ते ब्रह्मतत्व तमाम प्राण्यांच्या आत - बाहेर आहे. 2) अचर आणि चर सारे काही तेच आहे. 3) अतिसूक्ष्म असल्यामुळे इतर पदार्थांसारखे त्याचे प्रत्यक्ष ज्ञान होत नाही. 4) ते ब्रह्म अज्ञानी जनांसाठी खूप लांब तर ज्ञानी जनांसाठी अतिनिकट आहे.

**स्पष्टीकरण**

1) **भूतानां बहिः च अंतः** सर्व प्राणीमात्रांच्या ठायी ते ब्रह्म तत्व बाहेरही आहे आणि आतही आहे. ब्रह्म एक असतानासुध्दा आपल्या अलौकिक शक्तीमुळे जेव्हा विश्वाचा भास घडवून आणते तेव्हा आत - बाहेर अशा भाषेचा प्रयोग केला जातो. केवळ ब्रह्माच्या अपेक्षेने आत - बाहेर अशी भाषा प्रयुक्त केली जाऊ शकत नाही. आत - बाहेर ही भाषा जगाच्या अपेक्षेनेच आहे. देहात मन, बुध्दी आहे त्याच्याही निकट परमात्मा आहे. जगाच्या अपेक्षेनेच प्रकट - अप्रकट असा फरक दिसतो. शरीरात मन - बुध्दीच्या ठायी ते ब्रह्म सत् - चित्, ज्ञानस्वरुपात प्रकट झाले आहे. ते आपल्याला ज्ञात्याच्या रुपाने अनुभवायला मिळते. नंतर शरीर, इंद्रियांशी आपण एकरुप होऊन आपण स्वत:ला कर्ता आणि सुख - दु:खांचा भोक्ता मानतो. मन - बुध्दीत परमात्मा प्रकट झाला आहे तो संपूर्ण देहात व्याप्त आहे यामुळे सबंध देहाला सुख - दु:खाचा अनुभव होतो. परमात्मा व्यापक असल्यामुळे तो जसा संपूर्ण देहात आत आहे, तसाच शरीराबाहेरही - देहाबाहेरही आहे पण बाहेर तो गुप्त स्वरुपात आहे.

2) **अचरं चरं एव:** तो परमात्मा अचर आणि चर दोघांच्या ठायी आहे. आधी सांगितले की शरीराच्या आत आणि बाहेरही तो आहे. या मुद्याला स्पष्ट करण्यासाठी भगवंत म्हणताहेत की केवळ शरीरात आणि शरीराच्या बाहेरही तो आहे याचा अर्थ असा की जेवढेही म्हणुन काही चर म्हणजे जीव दिसताहेत, माणूस ते अगदी छोट्यातल्या छोट्या जंतूपर्यंत, त्या सर्व जीव - जंतुंमध्ये हेच ब्रह्म आहे. एवढेच नव्हे पण स्थिर दिसून येणारे जे जड पदार्थ आहेत - ज्यांच्यासाठी अचर शब्द प्रस्तुत केला जातो, हेही सारे तोच परमात्मा आहे.

3) **सूक्ष्मत्वात् तत् अविज्ञेयम्:** ते ब्रह्म अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे लक्षात येत नाही. भगवंताने आधी सांगितले की ते ब्रह्म देहाच्या आत आहे आणि देहाच्या बाहेरही आहे. या मुद्याला स्पष्ट करण्यासाठी पुन्हा सांगितले की जेवढे म्हणुन जीव आणि जड पदार्थ दिसतात त्यांच्या ठायीही तेच ब्रह्म वसते. आता प्रश्न असा निर्माण होतो की ते ब्रह्म तत्व जर शरीरात, शरीराबाहेर आणि समस्त जड - चेतन सृष्टीत असेल तर मग सर्वांना त्याचे ज्ञान का होत नाही ? अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे त्याचे ज्ञान सर्वांना होत नाही. इंद्रियगम्य वस्तु सूक्ष्म असली तरी तिचे ज्ञान होते. आकाशात अगणित तारे आहेत ते सारे आपल्या डोळ्यांनी बघू शकत नाही पण दुर्बिणीने बघता येतात पण जी गोष्ट इंद्रियांनी जाणून घेण्यासारखी नसते ती अतिसूक्ष्म अशा बाह्य साधनांनीही जाणून घेता येत नाही. परमात्मा तमाम वस्तुंना जाणून घेऊ शकतो म्हणजे तो आपल्याला जाणून घेऊ शकतो पण आपण त्याला ओळखत नसतो. तरीसुध्दा आपल्यापाशी परमेश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्याचे साधन आहे आणि ते म्हणजे चित्त होय पण ते चित्त जोवर काम, क्रोध, अहंकार वगैरे विकारांनी युक्त असते तोवर ब्रह्म तत्वाचा अनुभव नाही होऊ शकत. ब्रह्म तत्वाला जाणून घेण्याचे साधन निर्मळ चित्त आहे.

4) **तत् दूरस्थं च तत् अन्तिके:** ते ब्रह्म अज्ञानीजनांसाठी अत्यंत लांब तर ज्ञानीजनांसाठी खूप जवळ आहे. परमात्मा सर्व जीवमात्राच्या ठायी समान रुपाने प्रकट असूनसुध्दा मलीन चित्त असल्यामुळे त्याचे ज्ञान होत

नाही. ज्याचे चित्त निर्मळ असते अशा ज्ञानवंताच्या ते निकट असते. आरशावर धूळ साचली असेल तर त्यात प्रतिबिंब धडपणे दिसत नाही. अगदी तसेच मन निर्मळ झाल्यावर ज्ञानवंताला आत्म्याचा अनुभव होतो. यामुळे ज्ञानी माणसासाठी ईश्वर खूप नजिक आहे. हाच मुद्दा उपनिषदात येतो.

*तदेजति तन्नेजति तद् दूरे तद्वंतिके। तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यत :॥ (ईशावास्योपनिषद 5)*

तो परमात्मा उपाधीमुळे जाणु शकतो, चंचळ आहे पण वस्तुत: तो हालत नाही. तो चंचळ नाही. घटाच्या गमन करण्यासोबत घटाचे आकाश गमन करते असे वाटते पण आकाश कधी गमन करत नाही. परमात्मा अज्ञानीसाठी लांबवर आहे. ज्ञानवंतासाठी जवळ विहरतो.

: 16:

*अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।*
*भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च तत् भूतेषु अविभक्तम्:** आणि तो परमात्मा सर्व भूतमात्रात विभागरहित एकरुप असा आकाशासारखा परिपूर्ण भरलेला असून अविभक्त आहे
- **च विभक्तं इव स्थितम्:** तो ज्ञेय भूतमात्रात विभक्तासारखाही आहे
- **तत् ज्ञेयं भूतभर्तृ:** आणि तो परमात्मा विष्णु रुपाने तमाम भूतांचे धारण-पोषण करणारा आहे
- **ग्रसिष्णु:** (प्रलयकाळात) रुद्र रुपाने सर्व भूतांचा संहार करणारा आहे.
- **च प्रभविष्णु:** (आणि सृष्टीच्या उत्पत्तीसमयी) भूतांना उत्पन्न करणारा आहे.

**अर्थ**

तो परमात्मा विभागरहित एकरुप असा आकाशासारखा परिपूर्ण असूनही चराचर संपूर्ण भूतांमध्ये वेगवेगळा असल्यासारखा भासत आहे (जसे महाकाश विभागरहित असूनही घटात वेगवेगळे असल्यासारखे वाटते तसेच परमात्मा सर्व भूतांत एकरुप असूनही वेगवेगळा असल्यासारखा भासतो.) तसाच तो जाणण्याजोगा परमात्मा विष्णुरुपाने भूतांचे भरण-पोषण करणारा, रुद्ररुपाने संहार करणारा आणि ब्रह्मदेव रुपाने सर्वांना उत्पन्न करणारा आहे.

*भूत-मात्रीं न भेदूनि राहिलें भेदिल्यापरी।*
*भूतांस जन्म दे पाळी गिळी जें शेंवटीं स्वयें॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) तो ज्ञेय परमात्मा सर्व भूतमात्रांच्या ठायी अविभक्त म्हणजे अभिन्न राहिला आहे पण सर्व भूतमात्रात तो विभक्तासारखाही आहे. 2) तो ज्ञेय परमात्मा सर्व भूतांना धारण करणारा आहे, सर्व भूतांचे पोषण करणारा आहे. प्रलयकाळी सर्व भूतांचा संहारक आहे आणि सृष्टीच्या उत्पत्तीसमयी सर्व भूतांना उत्पन्न करणारा आहे.

**स्पष्टीकरण**

1) **तत् भूतेषु अविभक्तं च विभक्तं इव स्थितम्:** तो ज्ञेय परमात्मा सर्व भूतमात्रात अविभक्त म्हणजे अभिन्न आहे; तरीही सर्व भूतमात्रात विभक्त म्हणजे भिन्नासारखा आहे. अभिनेता कधी कुठली भूमिका करतो तर कधी कुठली भूमिका करतो तर कधी कुठली. तशाच प्रकारे परमात्मा एक आहे, सर्व भूतमात्रात अविभक्त म्हणजे अभिन्न आहे. शरीरे वेगवेगळे असतील. शरीर अगणित आहेत पण अगणित शरीरात परमात्मा अविभक्त--अभिन्न - एकच आहे. शरीरे वेगवेगळी असल्यामुळे तो भिन्न वा विभक्त वा वेगवेगळा दिसतो. देहाशी जोडला गेला असल्यामुळे ज्या शरीर धारण करणाऱ्या प्रत्येक जीवाला स्वतंत्रपणे सुख - दु:ख भोगावे लागते. जीवाला जेव्हा असे ज्ञान होते की आपण देहस्वरु पी नसून, ज्ञानस्वरुपी परमात्म्याशी अगदी एकरुप आहोत, तेव्हा त्याला एकत्वाचे ज्ञान होते आणि संपूर्ण ब्रह्मांडात एकमात्र - केवळ परमात्माच परमात्मा दिसू लागतो.

2) **तत् ज्ञेयं भूतभर्तृ ग्रसिष्णु च प्रभविष्णु:** तो ज्ञेय परमात्मा सर्व भूतांना धारण करणारा, त्यांचे पोषण करणारा आहे आणि सृष्टीच्या उत्पत्तीसमयी सर्व भूतमात्रांना उत्पन्न करणारा आहे. पिंड म्हणजे शरीर व ब्रह्मांड म्हणजे जगत्

वा विश्व. शरीर आणि विश्वातले सारे पदार्थ क्षणिक वा विनाशी असल्यामुळे वास्तव नसून केवळ भासच आहेत पण जेव्हा शरीर आणि विश्वाचा भास होतो तेव्हा त्या भासाचा कुणीतरी कर्ता असायला हवा. तो ज्ञानस्वरुप आणि सर्वशक्तीमान असला पाहिजे. परमात्म्याच्या ठायी या दोन्ही शक्ती असल्यामुळे तो संपूर्ण ब्रह्मांडाचा भास करवतो. स्वत: अतिसूक्ष्म असल्यामुळे त्याचे ज्ञान सर्वांना नाही होऊ शकत. यामुळे तो 'ज्ञेय' आहे.

: 17 :

***ज्योतिषाममि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते।***
***ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत् ज्योतिषां अपि ज्योतिः** तो (ज्ञेय परमात्मा) प्रकाशमय वस्तुंनाही प्रकाशमय - प्रकाशित करणारा आहे
- **तमसः परंः** तो अज्ञानाच्या म्हणजे मायेच्याही पलिकडे आहे
- **ज्ञानंः** तो ज्ञानस्वरुपी म्हणजे बोधस्वरुपी आहे
- **ज्ञेयंः** तो ज्ञेय म्हणजे जाणण्यायोग्य आहे
- **ज्ञानगम्यंः** तो ज्ञानगम्य म्हणजे तत्त्वज्ञानाने प्राप्त होणारा आहे
- **सर्वस्य हृदि विष्ठितम्ः** तो सर्वांच्या अंत:करणात निवास करतो.

**अर्थ**

ते परब्रह्म ज्योतीची ज्योत आणि मायेच्या अत्यंत पलीकडचे आहे. तो परमात्मा ज्ञानस्वरुप, जाणण्यास योग्य आणि तत्त्वज्ञानाने प्राप्त होण्याजोगा आहे. तसेच सर्वांच्या हृदयात विशेषरुपाने राहिलेला आहे.

***जें अंधारास अंधार तेजाचें तेज बोलिलें।***
***ज्ञानाचें ज्ञान तें ज्ञेय सर्वांच्या हृदयीं वसे॥***

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टी आल्या आहेत. 1) तो (ज्ञेय परमात्मा) सूर्य, अग्नी वगैरे महान प्रकाशमान वस्तुंनाही प्रकाशित करणारा आहे. 2) तो अज्ञानाच्या पलिकडे आहे. 3) तो ज्ञानस्वरुपी आहे. 4) तो ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यायोग्य आहे. 5) तो ज्ञानगम्य आहे. 6) तो सर्वांच्या अंत:करणात निवास करतो.

**स्पष्टीकरण**

1) **तत् ज्योतिषां अपि ज्योतिः** तो (ज्ञेय परमात्मा) सूर्य, अग्नी इत्यादी महान प्रकाशमय वस्तुंनाही प्रकाशित करणारा आहे. आपल्याला विश्वातल्या पदार्थांचे आणि आपल्या शरीर वगैरेचे जे ज्ञान होते ते प्रकाशाशिवाय नाही होऊ शकत. सूर्य, दीपक वा अग्नीच्या प्रकाशात पदार्थांचे ज्ञान होते. या सूर्य, चंद्र, अग्नी, वीज वगैरे प्रकाश देणाऱ्या वस्तुंना प्रकाशित करणारा ज्ञेय परमात्माच आहे. भगवंताने 15 व्या अध्यातल्या बाराव्या श्लोकात स्पष्टपणे सांगितले आहे की सूर्याच्या ठायी जे तेज दिसून येते, ते संपूर्ण जगाला प्रकाशित करते आणि चंद्र व अग्नीच्या ठायी जे तेज असते ते माझे असते असे जाण.

2 ) **तमसः परं उच्यतेः** तो ज्ञेय परमात्मा अज्ञानाच्या पलिकडे आहे. ज्याप्रमाणे अंध:काराचे कुठलेही अस्तित्व नसते त्याप्रमाणे अज्ञानही कुठली वस्तु नाही. ज्ञानाचा अभाव म्हणजे 'अज्ञान' होय. प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार होय. सामान्यपणे पदार्थांच्या ज्ञानाला 'ज्ञान' आणि अज्ञानाला 'अज्ञान' म्हणतात पण इथे ज्ञान आणि अज्ञानाची व्याख्या वेगळी आहे. प्रत्येकाच्या मनात एक भ्रांत म्हणजे चुकीची - धारणा असते मी देह, मन, इंद्रिये हे माझे स्वरुप आहे. या भ्रांत धारणेमुळे कुठेही आपल्या स्वरुपाचे भान ज्ञान होत नाही, याला भगवान इथे 'अज्ञान' म्हणताहेत. हे अज्ञान म्हणजे स्वरुपाच्या ज्ञानाचा अभाव प्रत्येकाला अनुभवात येतो पण ज्ञेयरुपी ईश्वराने जगताची उपाधी धारण केली नसल्यामुळे त्याला अज्ञानाच्या पलिकडले असल्याचे म्हटले जाते.

3) **ज्ञानम्ः** तो ज्ञेय परमात्मा ज्ञान स्वरुपी आहे. ज्ञानस्वरुपी म्हणजे अमानित्व वगैरे ज्ञानाच्या लक्षणांनी जाणून घेता येणारा, अनुभवता येणारा आहे. ते ज्ञान ज्ञेयरुपी परमेश्वराचे स्वरुप आहे. परमात्मा ज्ञानस्वरुपी आहे, त्याची ओळख कशी व्हावी? ज्ञानाच्या लक्षणांना जीवनात आत्मसात केल्यावर परमेश्वर स्वरुपाचे ज्ञान होऊ शकते. यामुळे अमानित्व वगैरे ज्ञानाच्या लक्षणांनाच 'ज्ञान' म्हटले गेले आहे. हे जे ज्ञान आहे तेच ज्ञेय परमात्म्याचे

स्वरुप आहे, हे स्वरुप ज्ञानाच्या लक्षणांना आत्मसात केल्यावर अनुभवता येते.

4) **ज्ञेयम्:** तो परमात्मा ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यायोग्य आहे. जगात जाणून घेण्या योग्य अनेक वस्तु आहेत, असे मानले जाते. आपण अशाच जाणून घेण्यायोग्य वस्तुंच्या पाठीमागे असतो पण त्याना जाणून घेतल्यावर अखेरीस समाधान वा शांतता काही वाटत नाही. यामुळे ज्या ज्ञानामुळे आपल्याला अखंड, शांती, आनंद आणि समाधान प्राप्त होऊ शकतो ती ज्ञेय वस्तु अलौकिक असा परमात्माच आहे.

5 ) **ज्ञानगम्यम्:** अमानित्व वगैरे ज्ञानाच्या लक्षणांनी तो ज्ञेय परमात्मा जाणून घेण्यायोग्य आहे ज्यांच्यापासून त्याचे ज्ञान होऊ शकते. ज्ञान, ज्ञानगम्य आणि ज्ञेय तिन्ही एकच वस्तु होत. आत ज्ञान उपस्थित असते पण जीवाच्या अज्ञानामुळे ते झाकलेले असते. यामुळे अमानित्व वगैरे लक्षणांमुळे अज्ञानाला हटवून त्याला जाणता येते. अमानित्व वगैरे लक्षणांनी ज्ञान जाणण्यायोग्य असते म्हणून त्याला ज्ञानगम्य म्हटले जाते आणि जाणण्यायोग्य असल्यामुळे ते 'ज्ञेय' ही म्हटले जाते.

तिघांमध्ये इतका फरक अवश्य आहे की जीवाच्या ठायी परमात्मा ज्ञानरुपाने प्रकट असतो. यामुळे शरीरात जे प्रतीत होते ते ज्ञान असते. अशाप्रकारे पिंडात दिसून येणारे हे ज्ञान ब्रह्मांडात दिसत नाही, अनुभवता येत नाही म्हणजे समस्त जड पदार्थांच्या ठायी ज्ञानस्वरुपता दिसून येत नाही यामुळे त्याला 'ज्ञेय' म्हणतात. याच ज्ञेयाचे पिंडात प्रकटीकरण 'ज्ञान' मानले जाते. अमानित्व वगैरे लक्षणांनी जाणून घेऊ शकतो यामुळे हेच 'ज्ञान' आणि 'ज्ञेय' ज्ञानगम्य होऊन जाते. एकूण परमात्माच पिंडात ज्ञान स्वरुपी असतो. ब्रह्मांडात ज्ञेयस्वरुपी आणि ज्ञानलक्षणांनी ज्ञानगम्य वा जाणण्यायोग्य आहे.

6) **हृदि सर्वस्य विष्ठितम्:** प्राणीमात्रांच्या अंत:करणात विशिष्ट रुपात प्रकट आहे. यामुळे भगवंत म्हणताहेत की तो विशिष्ट रुपाने जीवमात्राच्या ठायी दिसून येतो. तोच परमात्मा ब्रह्मांडात अव्यक्त आहे.

: 18 :

***इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।***
***मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इति क्षेत्रम्:** अशा प्रकारे क्षेत्र
- **ज्ञानं:** ज्ञान
- **च तथा ज्ञेयं:** आणि तसेच ज्ञेय म्हणजे जाणण्यायोग्य परमात्म्याचे स्वरुप
- **समासतः उक्तं:** थोडक्यात सांगितले आहे
- **मद्भक्तः एतत् विज्ञाय:** माझा भक्त या तिघाना जाणल्यावर
- **मद्भावाय उपपद्यते:** माझ्या भावाला म्हणजे स्वरुपाला प्राप्त करुन घेतो

**अर्थ**

अशा प्रकारे क्षेत्र तसेच ज्ञान आणि जाणण्यायोग्य परमात्म्याचे स्वरुप थोडक्यात सांगितले. माझाभक्त हे तत्त्वत: जाणून माझ्या स्वरुपाला प्राप्त होतो.

***संक्षेपें वर्णिलें क्षेत्र ज्ञान ज्ञेय तसें चि हें।***
***जाणूनि भक्त जें माझा माझें सायुज्य मेळवी ॥***

**विषय:** या श्लोकात दोन विषय आले आहेत. 1) अशा प्रकारे क्षेत्र म्हणजे शरीर, ज्ञानाची लक्षणे आणि ज्ञेय म्हणून जाणून घेण्यायोग्य वस्तु या तिघांविषयी मी थोडक्यात माहिती दिली. 2) या तिघांना जाणून माझा भक्त माझा भाव वा स्वरुपाला प्राप्त करतो.

**स्पष्टीकरण**

1) **इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं उक्तं समासतः** अशाप्रकारे क्षेत्र म्हणजे शरीर, ज्ञान म्हणजे अमानित्व वगैरे लक्षणरुपी आणि ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यायोग्य वस्तु या तिघांबद्दल मी थोडक्यात सांगितले. शरीरात परमात्मा प्रकट असल्यामुळे जीवाला ज्ञानस्वरुपतेचा अनुभव येतो. प्रत्येकाला वाटते की 'मी अमुक अमुक आहे, मला संपूर्ण सृष्टीच्या जड पदार्थांचे, शरीराचेही ज्ञान झाले, शरीरात सुख - दु:खाचाही अनुभव येतो.' यामुळे सृष्टीचे पदार्थ आणि शरीर जड असतानाही दोघांमध्ये

फरक आहे. थोडीशी जखम झाली की दु:ख होते. अशा प्रकारे बाह्य (जड) पदार्थ आणि शरीरात अंतर आहे.

शरीर कोणत्या तत्वांनी बनले आहे ही गोष्ट या अध्यायातल्या 5 व्या आणि 6 व्या श्लोकात आहे. नंतर ज्ञानाची लक्षणे सांगितलीत. 7 ते 11 श्लोकांमधून परमात्म ज्ञानाची लक्षणे वर्णिलीत. पुढे ब्रह्मांडात असलेल्या ज्ञेयस्वरुपी परमात्म्याची ओळख 12 ते 17 या सहा श्लोकांमधून करवली. ईश्वराची ज्ञान स्वरुपता गुप्त असल्यामुळे ब्रह्मांडात व्याप्त ईश्वराला 'ज्ञेय' म्हटले गेले आहे. पिंडात असलेल्या ईश्वराची ज्ञानस्वरुपता अज्ञानाने झाकली गेली असल्यामुळे ती सर्वांसाठी अप्रकटच रहाते. यामुळे ही ज्ञानस्वरुपताही ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यायोग्य होऊन जाते पण ईश्वर शरीरात प्रकट असल्यामुळे त्याच्या अनुभवाने जर आपण अज्ञान घालवू शकलो आणि शरीरात जर त्या ज्ञानस्वरुपी ईश्वराचा अनुभव घेऊ लागू तर तोच परमात्मा ब्रह्मांडाच्या प्रत्येक पदार्थात असल्याचाही अनुभव मिळवून घेता येऊ शकतो.

2) **मद्भक्त:** एतत् विज्ञाय मद्भावाय उपपद्यते माझा भक्त या तिघांना म्हणजे शरीर, ज्ञान आणि ज्ञेयाला जाणून माझ्या रुपाला प्राप्त करुन घेऊ शकतो. परमात्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी भगवंत पुनश्च भक्तीचा सुलभ उपाय सांगताहेत. माझा भक्त या तिघांना म्हणजे शरीर, ज्ञानाची लक्षणे आणि ब्रह्मांडात स्थित ज्ञेय परमेश्वराला जाणून घेतले तर माझ्या स्वरुपाचा त्याला परिचय होऊ शकतो आणि त्या रुपाला तो प्राप्त करुन घेऊ शकतो. तिघांना जाणून घेण्याचा अर्थ आहे की तिघे परमात्मस्वरुपी आहेत. हे जाणून घेतल्यावर अद्वैताचा अनुभव होऊ शकतो.

या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य असे म्हणतात

अस्मिन् सम्यग् दर्शने क: अधिक्रियते इति उच्यते। मयि सर्वज्ञे ईश्वरे परमगुरौ वासुदेवे समर्पितसर्वात्मभाव: यत् पश्यति, श्रृणोति, स्पृशति, वा सर्वमेव भगवान् वासुदेव: इति एवंग्रहाविष्टबुध्दि: मद्भक्त:। स: एतत् यथोक्तं सम्यग्दर्शनं विज्ञाय मद्भावाय परमात्मभावाय उपपद्यते मोक्षं गच्छति।

अर्थात् - या सम्यग्दर्शनासाठी अधिकारी कोण याची चर्चा भगवंत करताहेत. मी सर्वज्ञ ईश्वर, परमगुरु असून माझे नाव वासुदेव आहे. अशा मज परमात्म्याच्या ठायी ज्याने आपले भाव अर्पण करुन दिले आहेत अर्थात् जे काही आपण बघतो, ऐकतो, स्पर्श करतो ते सारे काही मी भगवान वासुदेवच आहे अशाप्रकारे ज्याच्या बुध्दीने सारे व्यवहार करायचे ठरवले आहे तो माझा भक्त आहे. तो भक्त आता सांगितलेल्या सम्यक् दर्शनाला जाणून घेतो आणि माझ्या परमात्मस्वरुपाला म्हणजे मोक्ष प्राप्तीला जाणून घेतो.

**संत तुलसीदास म्हणतात**

***भगति तात अनुपम सुखमूला।***
***मिलइ जो संत होहिं अनुकूला॥***

अर्थात् अनुपम सुखाचे मूळ अशी भक्ती संत अनुकूल झाले तर प्राप्त होईल.

: 19 :

***प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि।***
***विकारांश्च गुणांश्चैव विध्दि प्रकृतिसंभवान्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रकृतिं च पुरुषं एव:** प्रकृती म्हणजे माझी त्रिगुणमयी माया आणि जीवात्मा म्हणजे क्षेत्रज्ञ पुरुष
- **उभौ अपि:** दोघांना
- **अनादी विध्दि:** अनादी समज
- **विकारान् च गुणान् एव:** प्रीती, द्वेष वगैरे विकार आणि गुणांना म्हणजे त्रिगुणात्मक समस्त पदार्थांना
- **प्रकृति संभवान् विध्दि:** प्रकृतीने उत्पन्न जाण

**अर्थ**

प्रकृती आणि पुरुष हे दोघेही अनादी आहेत, असे तू समज आणि राग, द्वेष वगैरे विकार तसेच त्रिगुणात्मक सर्व पदार्थही प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आहेत असे समज.

***प्रकृती- पुरुषाची ही जोडी जाण अनादि तूं।***
***प्रकृतीपासूनी होती विकार गुण सर्व हि॥***

**विषय:** या श्लोकातून दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) असे समज की प्रकृती आणि पुरुष दोघेही अनादी आहेत. 2) विकारांना म्हणजे कार्यांना आणि सत्व - रज - तम या तीन गुणांनाही प्रकृतीनेच उत्पन्न केले असे समजा.

**स्पष्टीकरण-**

1) **प्रकृतिं च पुरुषं एव उभौ अपि अनादी विध्दि:** प्रकृती आणि पुरुष दोघांनाही अनादी समज. गीता समन्वय दृष्टी प्रधान असा ग्रंथ आहे. योगदर्शनाच्या ध्यानसमाधीचे वर्णन सहाव्या अध्यायात येते. ध्यान वा समाधीला गीतेने अखेरची स्थिती मानली नाही. आत्मज्ञानाच्या साधनरुपात ध्यानाचा अधिकात अधिक उपयोग होतो. यामुळे सहाव्या अध्यायात याची शिफारस केली गेली. ध्यान करता - करता एखाद्या पुरुषाला समाधी अवस्था प्राप्त होऊ शकेल यामुळे सहाव्या अध्यायात त्याचेही वर्णन आले आहे. अशाप्रकारे या अध्यायात सांख्यप्रतिपादित प्रकृती - पुरुष विवेकाचा उल्लेख या श्लोकापासून सुरु होत आहे. या श्लोकात सांख्य दर्शन परंपरेतले पुरुष आणि प्रकृती हे दोन शब्द आलेत. गीता प्रकृतीला 'ईश्वराची माया' आणि पुरुषाला 'आत्मा' मानते. सांख्य प्रकृतीला स्वतंत्र मानतात. वेदान्त मायाशक्तीला स्वतंत्र मानत नाही. सांख्य मत प्रकृतीला जड मानत असल्यामुळे प्रकृती स्वतंत्रपणे जड जगताला उत्पन्न करते. 'ब्रह्मसूत्र'च्या दुसऱ्या प्रकरणातल्या आरंभिक दहा सूत्रात या सिध्दांताचे खंडन आढळते. प्रकृती जड असून पुरुष चेतन. सांख्य दर्शनातील या दोन शब्दांना घेऊन या श्लोकात असे सांगितले आहे की दोघे अनादी, स्वयंभू आणि स्वतंत्र आहेत. ही सांख्य दर्शनाची व्याख्या होय. वेदान्ताच्या व्याख्येनुसार प्रकृती ही चेतन स्वरुपी परमात्म्याची माया शक्तीच आहे. माया शक्ती ईश्वरातच असून तिचे स्वतंत्र अस्तित्व नाही. सांख्य ज्याला 'पुरुष' म्हणतो, वेदान्त त्याला 'आत्मा' म्हणतो. शरीरात, चित्तात परमात्मा प्रकटला आहे. प्रकट परमात्म्याला आत्मा म्हणतात. परमात्मा शरीरात प्रकट होऊन आत्मा म्हणजे जीवात्म्याचा अभिनय करतो. यामुळे भगवंतांनी सातव्या अध्यायात जीवात्म्याला परा प्रकृती म्हणजे श्रेष्ठ प्रकृती असे म्हटले आहे. पाच महाभूते, मन, बुध्दी, अहंकार, इंद्रिये वगैरे जड तत्वांना अपरा म्हणजे निकृष्ट दर्जाची प्रकृती म्हटले आहे. परा प्रकृती म्हणजे जीव प्रकृती आणि अपरा प्रकृती म्हणजे माया - या दोघांच्या रुपात परमात्माच प्रकट होतो. जीवाच्या रुपातही परमात्माच प्रकट झाला आहे आणि जगताच्या रुपानेही परमात्माच प्रकट आहें. सांख्यांप्रमाणे वेदांनी प्रकृती - पुरुषाला दोन स्वतंत्र तत्वे न मानता ईश्वराचीच दोन रुपे मानली आहेत.

2) **विकारान् च गुणान् एव प्रकृतिसंभवान् विध्दि:** प्रकृती वा ईश्वराच्या मायेने विकार म्हणजे पिंड - ब्रह्मांडातील तमाम कार्ये आणि सत्व - रज - तम या गुणांनाही प्रकृती म्हणजे ईश्वराच्या मायेनेच उत्पन्न केले आहे असे समजा. 'विकार' आणि 'गुण' हे दोन शब्दही सांख्य दर्शनाशी संबंधित आहेत. मातीचा घट हा विकार आहे. सर्व पदार्थ प्रकृतीपासून उत्पन्न झाले म्हणून विकार आहे. विकार म्हणजे कार्य प्रकृती म्हणजे मूळ कारण. कारणातूनच कार्य बनते. सांख्य दर्शनाची मान्यता आहे की सर्व पदार्थ प्रकृतीरुपी कारणापासुनच बनले आहेत. वेदान्ताचे मानणे असे आहे की प्रकृती म्हणजे माया ही चेतनस्वरुपी ईश्वराची शक्ती आहे. ईश्वराच्या चेतन शक्तीच्या नेतृत्वाखाली ही शक्ती जगतातल्या सर्व पदार्थांना निर्माण करते. 'तीन गुण' हा शब्दही सांख्यांचा आहे. तीन गुण म्हणजे सत्व, रज, तम पदार्थांचे उत्कृष्ट, मध्यम, निकृष्ट असे तीन वर्ग आहेत. सत्वगुण, रजोगुण आणि तमोगुण क्रमश: तीन वर्गात येतात. हे तीन गुण प्रकृतीच्या ठायी असतात. प्रकृती जड असून त्रिगुणात्मक आहे. सांख्यांचे मत असे आहे की प्रकृतीच्या ठायी जर तीन गुण नसतील तर प्रकृती असंख्य पदार्थांना उत्पन्न करु शकणार नाही. वेदान्ताच्या दृष्टीने माया शक्ती आणि तिच्या ठायी असलेले तीन गुण परमेश्वराच्या अधीन आहेत यामुळे परमेश्वराच्या आधारावरच माया शक्ती जगताच्या पदार्थांसाठी कारण आहे.

: 20 :

*कार्यकारणकर्तृत्वे हेतु: प्रकृतिरुच्यते।*
*पुरुष: सुखदु:खानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कार्यकारणकर्तृत्वे:** कार्य, कारण आणि त्याच्या कार्यासाठी

- **प्रकृतिः हेतुः उच्यते:** प्रकृती कारण आहे
- **सुखदुःखानां भोक्तृत्वे:** सुख आणि दु:खाच्या उपभोगासाठी
- **पुरुषः हेतुः उच्यते:** पुरुष म्हणजे जीवात्मा कारण आहे

**अर्थ**

कार्य (आकाश, वायु, अग्नी, जळ आणि पृथ्वी तसेच शब्द, स्पर्श, रुप, रस आणि गंध याना कार्य असे म्हणतात) आणि करण (पृथ्वी, अहंकार आणि मन तसेच कान, त्वचा, जीभ, नेत्र आणि नाक तसेच वाणी, हात, पाय, उपस्थ आणि गुद या तेरा अवयवाना करण असे म्हणतात) यांच्या उत्पत्तीचे कारण प्रकृती म्हणवली जाते आणि जीवात्मा सुख - दु:खांच्या भोगण्याला कारण म्हटले जाते.

***देहेंद्रियांचे कर्तृत्व बोलिलें प्रकृतीकडे।***
***दुःखासुखाचें भोक्तृत्व बोलिलें पुरुषाकडे॥***

**विषय:** या श्लोकात दोन विषयांची चर्चा आली आहे. 1) कार्य म्हणजे शरीर, करण म्हणजे सर्व इंद्रिये, ज्यांच्या कर्तृत्व वा कार्याचे कारण प्रकृती आहे. 2) सुख आणि दु:खाच्या उपभोगासाठी पुरुष म्हणजे आत्मा कारण आहे.

**स्पष्टीकरण**

1) **कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिः उच्यते:** कार्य म्हणजे शरीर, करण म्हणजे सर्व इंद्रिये. ज्यांच्या कर्तृत्वासाठी प्रकृती म्हणजे ईश्वराची माया शक्ती कारणरुप आहे. वरच्या श्लोकात सांगितले गेले आहे की जगातले सारे पदार्थ प्रकृती म्हणजे माया शक्तीमुळे उत्पन्न होतात. इथे असा प्रश्न उपस्थित होतो की शरीर आणि सर्व इंद्रियांची कार्ये कुणाच्या आधारे चालतात? या कार्यांचे कारण काय? भगवान म्हणतात 'हे सारे व्यापार - कार्यप्रणाली ईश्वराच्या माया - शक्तीच्या बळावर किंवा सांख्यमत संमत प्रकृतीच्या बळावर चालतात.' भगवान इथे ही गोष्ट अशासाठी सांगतात की एक गोष्ट आमच्या ध्यानी यावी. आपल्याला असे जे वाटते की शरीर आणि इंद्रियांची जी काय कामे चालली आहेत त्याचे कर्ता आपण आहोत हे चुकीचे आहे आणि ही चूक आपण सारेच करतोहोत. आपल्याला असे वाटते की मन आणि बुध्दीची कामेही आपणच करतोहोत. आपली बुध्दी चांगली आहे असे आपल्याला वाटते. आपले मन चंचळ वा स्थिर आहे असे जे आपल्याला वाटते आणि सर्व इंद्रियांच्या कार्यांशी जो आपला कर्तेपणाचा संबंध जोडतो ते अज्ञान आहे वा आपला भ्रम आहे. इंद्रियांच्या कार्यांशी आपण आपला संबंध जोडू शकत नाही. इंद्रियांच्या या सर्व कार्याचा वा व्यापाराचा संबंध थेट परमेश्वराच्या माया शक्तीशी आहे किंवा असे मानायला हवे की परमेश्वराची माया शक्ती परमेश्वराहून भिन्न नसल्यामुळे या कार्यांचा वा व्यापारांचा संबंध सरळ - सरळ ईश्वराशी आहे. शरीर आणि इंद्रियांच्या मार्फत जी काही कार्ये घडताहेत ज्यांचे कर्ता आपण नसून ईश्वर वा ईश्वराची माया शक्ती आहे असे भगवंत सांगताहेत.

2) **पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुः उच्यते:** सुख आणि दु:खाच्या भोगासाठी म्हणजे उपभोगासाठी पुरुष वा क्षेत्रज्ञ आत्मा कारण आहे. ईश्वराच्या प्रकृती वा माया शक्तीमुळे शरीर आणि इंद्रियांची सर्व कार्ये चालत असली तरीही त्यांच्या उपभोगासाठी प्रकृती वा ईश्वरी माया शक्ती कारणरुप नाही. शरीर आणि इंद्रियांचे कर्ता बनल्यावरच आपल्याला सुख दु:खाचा अनुभव येतो. शरीर आणि इंद्रिये जड आहेत. त्यांचा आणि त्यांच्या कार्याचा आपल्याला नित्य परिचय होत असतो, ज्ञान होत असते यामुळे आपण सुख-दु:खरहित केवळ ज्ञाते आहोत. शरीर आणि इंद्रियांपासून भिन्न असल्यामुळे सुख-दु:खाचे भोक्ते नाहीहोत. खऱ्या अर्थाने सुख-दु:खाचे भोक्ते नसतानाही आणि केवळ ज्ञाते असलो तरी शरीर इंद्रियांशी काल्पनिक संबंध मानून आपण त्याचे कर्ते व सुख-दु:खाचे भोक्तेही बनतो. सुख-दु:खासाठी पुरुष म्हणजे आत्मा कारणीभूत असल्याचे भगवंत सांगताहेत.

: 21 :

***पुरुष प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।***
***कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि पुरुषः प्रकृतिस्थः** कारण की पुरुष म्हणजे आत्मा प्रकृती ठायी स्थित होऊन
- **प्रकृतिजान् गुणान् भुंक्ते:** प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या त्रिगुणात्मक पदार्थांना भोगतो
- **सदसद्योनिजन्मसु:** उच्च वा निम्न कोटीचा - प्रकारचा जन्म मिळवण्यासाठी.
- **अस्य गुणसंगः कारणं:** या पुरुषाची गुणासक्तीच याचे कारण आहे.

**अर्थ**

प्रकृतीत (प्रकृती शब्दाचा अर्थ गीता अध्याय 7 श्लोक 14 मध्ये संगितलेली भगवंताची त्रिगुणमयी माया समजावी) राहिलेलाच पुरुष प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या त्रिगुणात्मक पदार्थांना भोगतो आणि या गुणांची संगतीच या जीवात्म्याला चांगल्या-वाईट योनीत जन्म मिळण्याला कारण आहे. (सत्वगुणांच्या संगाने देवयोनीत, रजोगुणाच्या संगाने मनुष्य योनीत आणि तमोगुणाच्या संगाने पशु-पक्षी वगैरे नीच योनीत जन्म होतो.)

***बांधिला प्रकृतीनें तो तिचे ते गुण भोगितो ।***
***गुण- संगामुळें ह्यास घेणें जन्म शुभाशुभ ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) पुरुष म्हणजे आत्मा प्रकृती स्थानी स्थित होऊन प्रकृतीच्या तीन गुणांना म्हणजे सुख - दु:ख आणि मोहरुपी कार्यांना भोगतो आणि 2) उच्च वा निम्न योनीत जन्म मिळवण्यासाठी या तीन गुणांप्रती असलेली आसक्तीच कारणीभूत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **पुरुषः** प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् पुरुष प्रकृतीच्या स्थायी स्थित होऊन मायेला वश होऊन प्रकृतीच्या तीन गुणांना म्हणजे सुख, दु:ख आणि मोहरुपी कार्याचा उपभोग घेतो. वरच्या श्लोकात सांगितले आहे की सुख - दु:खाचे कारण पुरुष आहे. या श्लोकात हे सांगितले आहे की पुरुष सुख - दु:खाचे कारण का बनतो? भगवंत सांगताहेत की पुरुष वा आत्मा, प्रकृती म्हणजे मायेच्या अधीन बनून जीवन जगतो. मायेने एका बाजूला जगतातील बाह्य पदार्थ बनवले तर दुसरीकडे शरीर आणि इंद्रिये घडवलीत. दोघांमध्ये इतके आकर्षण राखले की आपण त्यांच्यावर मोहित व्हावे. मनात परमात्मा प्रकट झाला असुन तेच निज - स्वरुप आहे पण ते प्रत्यक्षात दिसत नसल्यामुळे त्या निजस्वरुपाचे आपल्याला विशेष आकर्षण वाटत नाही. मायेचे स्वरुप जगत आणि शरीराच्या रुपाने प्रत्यक्ष दिसते त्यामुळे त्याचे परिपूर्ण आकर्षण असते. सारे पदार्थ क्षणिक आणि विनाशी आहेत. शरीरही विनाशी आहे हे कळत असतानासुध्दा एवढी तीव्र आसक्ती असते की आपण त्यातून मुक्त होऊ शकत नाही. यामुळे भगवान सांगताहेत की लोक प्रकृतीच्या तीन गुणांना, कार्यांना वा फळांना भोगत रहाताहेत.

तीन गुणांचे कार्य सुख, दु:ख आणि मोह आहे. सात्विक गुणांचे कार्य सुख आहे. सात्विक कर्मे आचरल्यामुळे सुख - आनंदच अनुभवायला मिळते. याचा प्रत्येक व्यक्तीला अनुभव आहे पण सात्विक गुणात आसक्त होऊन गेल्यावर दु:खाचा अनुभव येतो - दु:ख अनुभवायला मिळते. संत तुलसीदासजी म्हणतात - संत मिलन सम सुख कछु नाही. म्हणजे सत्संगतीसारखे दुसरे कुठलेही सुख नाही पण संत वियोगामुळे दु:ख होऊ लागते. संत पुरुषाच्या सहवासाचा लाभ घेणे वेगळे आणि त्यात आसक्त होणे वेगळे होय. संत सहवासात आपल्या आध्यात्मिक उत्कर्षाचेच ध्येय असायला हवे. कर्तव्य मानून भक्ती भावनेने त्यांची सेवा करायला हवी; तरीही सेवाकार्यात आसक्ती धरु नये. यामुळे भरताची भक्ती म्हणजे वियोग - भक्तीला श्रेष्ठ मानले गेले आहे. संत भक्ती ग्राह्य पण त्याची आसक्ती मात्र त्याज्य आहे. रजोगुण दु:ख उत्पन्न करतो कारण की तो हालचाल उत्पन्न करतो. राजसी कामे केल्याने लोभ वाढतो. लोभ दु:खदायक आहे. सामान्यपणे लोक राजसी कर्मेच करतात. यामुळे जगात दु:खाचा अधिक अनुभव येतो. तमोगुण मूढता उत्पन्न करतो. मूढता म्हणजे मोह. मोहामुळे व्याकुळता येते. मूढतेने अविवेक उपजतो. तमोगुणामुळे जाड्य - जडता उत्पन्न होते. यामुळे चित्त

जड होऊ लागते - दुसऱ्याचे दु:ख बघून चित्तावर कुठलाही प्रभाव वा परिणाम न होणे तमोगुण आहे. ज्ञानी पुरुष समचित्त असतो याचा अर्थ त्याच्यावर कुठलाही परिणाम होत नाही वा तो परिणामशून्य असतो, असे नव्हे. ज्ञानवंत संवेदनशील असतो. इतरांचे दु:ख बघून त्याच्या चित्तात अपार करुणा उत्पन्न होते. ज्ञानवंताचे चित्त कदापि जड होत नाही.

2) **कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु:** या तीन गुणांच्या आसक्तीमुळे उच्च वा निम्न योनीत जन्म लाभतो. सत्वगुणाच्या आसक्तीने आयुष्य घालवले तर त्या गुणाच्या आसक्तीमुळे चांगल्या कुळात जन्म मिळेल. रजोगुणाच्या आसक्तीने आयुष्य घालवले तर मध्यम जन्म आणि तमोगुणाच्या आसक्तीने आयुष्य घालवले तर मूढ योनीत जन्म मिळेल.

(चौदाव्या अध्यायात तीन गुण आणि त्यांच्या तीन कार्यांचे सविस्तर वर्णन आहे.)

: 22 :

*उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वर: ।*
*परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् पुरुष: पर: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **उपद्रष्टा:** (तो परमात्म्याच्या जवळ राहून सर्व क्रियांचा) साक्षी
- **अनुमन्ता:** यथार्थ संमती देणारा असल्यामुळे अनुमोदन देणारा
- **भर्ता:** मदत करणारा म्हणजे सर्वांना धारण करणारा
- **भोक्ता:** फळ भोगणारा
- **महेश्वर:** ब्रह्मादीकांचाही स्वामी म्हणून महान ईश्वरच सारे काही करणारा
- **परमात्मा इति च अपि उक्त:** ज्याला परमात्मा म्हणुन वर्णिले गेले आहे
- **अस्मिन् देहे:** या देहात
- **पर: पुरुष:** तो श्रेष्ठ पुरुष आत्म्याच्या रुपात असतो

**अर्थ**

या देहात असलेला आत्मा वास्तविक परमात्माच आहे. तोच साक्षी असल्यामुळे उपद्रष्टा आणि खरी संमती देणारा असल्याने अनुमन्ता, सर्वांचे भरण-पोषण करणारा म्हणून भर्ता, जीवरुपाने भोक्ता, ब्रह्मदेव वगैरेंचाही स्वामी असल्यामुळे महेश्वर आणि शुध्द सच्चिदानंदघन असल्यामुळे परमात्मा म्हटला जातो.

*सर्व -साक्षी अनु-ज्ञाता भर्ता भोक्ता महेश्वर ।*
*म्हणती परमात्मा हि देहीं पुरुष तो पर ॥*

**विषय:** या श्लोकात सात गोष्टी आल्या आहेत. 1) परमात्मा जवळ राहून सर्व क्रियांचा साक्षी आहे. 2) अनुमोदनकर्ता आहे. 3) हर प्रकारे मदतनीस आहे. 4) फळाचा भोक्ता आहे. 5) महान ईश्वरच सारे काही करणारा आहे. 6) ज्यासाठी श्रुतीत परमात्मा हे विशेषण प्रयुक्त आहे. 7) तो श्रेष्ठ पुरुष मानवी देहात आत्म्याच्या रुपाने आहे.

**स्पष्टीकरण**

1) **उपद्रष्टा:** तो परमात्मा जवळ राहून सर्व क्रियांचा साक्षी आहे. या श्लोकात परमात्म्याची ओळख करुन देताहेत. पूज्य विनोबांनी 'गीता प्रवचने' ग्रंथात या श्लोकाचा मोठाच मार्मिक अर्थ केला आहे. जीव जोवर नैतिक भूमिकेवर येत नाही, तोवर परमात्मा साक्षीच्या रुपाने रहातो, म्हणजे जीवाचा खेळ बघत रहातो. परमात्म्याने जीवाला स्वातंत्र्य देऊन ठेवले आहे. परमात्मा आत साक्षी रुपाने - ज्ञात्याच्या रुपाने प्रकट आहे, तिथे जीवाला सतत सत्‌ची प्रेरणा लाभत असते. या सोबत बाह्य विषयांशी इंद्रियांचा संबंध येतो. त्याकडूनही एक प्रेरणा मिळते. आत परमात्मा सत्‌कडे वळण्याची प्रेरणा देतो तर बाहेरुन माया विषयांच्या उपभोगांकडे वळायची प्रेरणा देते. माणसाचे जीवन या दोन प्रेरणांच्या मध्ये तरंगत असते. माणसाचे जीवन बहुधा मायेच्या विषयोपभोगांच्या प्रेरणेच्या अधीनच होऊन जाते. जोवर माणसाचे जीवन विषयोपभोगांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन कार्यरत असते तोवर परमात्म प्रेरणेने जीवन कंठण्याची आणि जीवनवाट चालण्याची ना इच्छा होत ना त्या दिशेने प्रयत्न होत. ज्यामुळे माणूस नैतिक भूमिकेवर आरुढ आहे असे काही

मानले जात नाही. या भूमिकेत ईश्वर केवळ साक्षी रहातो म्हणजे माणसाचे विषयोपभोगमय जीवन तटस्थतापूर्वक बघतो. या दोनपैकी कुठल्या प्रेरणेने जीवनाची वाटचाल करावी याविषयीचे संपूर्ण स्वातंत्र्य भगवंताने सर्वांना देऊन ठेवले आहे पण विषयोपभोगात पूर्ण आनंद काही मिळू शकत नाही, चित्त त्यापासून लांब जाऊ लागते तेव्हा माणूस आतल्या ईश्वराच्या प्रेरणेनुसार वाटचाल करायला तयार होतो.

2) **अनुमन्ता:** अनुमोदन देणारा म्हणजे नैतिक आचरणाला परवानगी देणारा. जोवर जीव विषयोपभोगांकडे झुकलेला असतो तोवर परमात्मा केवळ साक्षी म्हणजे बघणारा असतो पण जेव्हा माणूस प्रपंचाची आसक्ती दूर सारुन संयमाकडे वळतो, कमी स्वच्छंदी होतो, योग्यायोग्याचा सतत विचार करतो, योग्य तो करण्याकडे प्रवृत्त होतो, संधी मिळताच आपला स्वार्थ सोडून सहर्ष त्याग करायला प्रवृत्त होतो. सद्गुणांचा विकास करण्यासाठी झटतो गृहस्थ असून ब्रह्मचर्य पालनाचा प्रयत्न करतो. त्याला आता विषयोपभोगात रस वाटत नाही. थोडक्यात म्हणजे मनात विद्यमान ईश्वरी प्रेरणेनुसारच वाटचाल करायची असे ज्याने ठरवले आणि ज्याने सतत सत्याच्या दिशेनेच वाटचाल करायचे ठरवले मायेच्या प्रेरणेने न चालण्याची ज्याची वृत्ती बनून गेली अशा पुरुषाला परमात्मा अनुमोदन देतो.

3) **भर्ता:** संकटसमयी हर प्रकारे मदत करणारा. नैतिक भूमिकेवर स्थापित झाल्यावर संकटे येतात, अडचणींचा काळ येतो अशा प्रसंगी जीव परमेश्वराची करुणा भाकतो, प्रार्थना करतो. त्यावेळी परमात्मा भर्ता रुपात मदत करतो. द्रौपदीची कथा हेच सांगते. भगवान तर पशुंनाही मदत करतो. गजेंद्रमोक्ष कथा तर प्रसिध्दच आहे. हारे को हरिनाम. सूरदासजी म्हणतात,

***हम भक्तन के भक्त हमारे। अर्जुन सुनो प्रतिज्ञा मोरी,***
***यह व्रत टरन न टारे, जहँ जहँ भीर परी भक्तन पै,***
***तहँ तहँ जाइ छुडाये ॥***

अर्थात् - हे अर्जुना, माझी प्रतिज्ञा ऐक, मी भक्तांचा आणि भक्त माझे. हे माझे व्रत असून कुठल्याही परिस्थितीत हे व्रत टळणार नाही. तिथे - तिथे जाऊन मी माझ्या भक्तांना संकटमुक्त करीन.

4) **भोक्ता:** ज्याना ही तिसरी भूमिका प्राप्त झाली ते ईश्वराच्या शरणीच रहातात. असे लोक ईश्वराची मदत मिळवण्यात तत्पर असतात असा नित्य तत्पर भक्त जनांना ईश्वरी मदत मिळत रहाते. असा अनुभव येत रहातो. ज्यांचा अहंकार गळून जाऊन ते भक्त बनतात. ते क्रियेचे कर्ते बनत नाहीत, समस्त ईश्वरार्पण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. एवढेच नव्हे तर आपले अस्तित्व स्वतंत्रपणे न राखण्याच्या वृत्तीमुळे ईश्वरच त्यांच्या समस्त क्रियांचा भोक्ता बनून जातो. विनोबांनी कर्माच्या तीन स्थिती वर्णिल्या आहेत. 1) कर्म करण्यापूर्वी संकल्प करतात. 2) त्या संकल्पानुसार कर्म करतात. 3) नंतर कर्मानुसार फळ मिळते पण कर्माच्या या चौथ्या म्हणजे भोक्ता स्थितीत तर भक्त स्वत: न उरल्यामुळे परमात्माच संकल्प करतो, तोच कर्म आचरतो आणि कर्माचे फळ भोगतो. ही अहंकार शून्यतेची पराकाष्ठा आहे.

5) **महेश्वर:** भक्त महेश्वर बनतो म्हणजे शून्य बनल्यामुळे परमात्माच बनतो. भक्ताचे शरीर त्याचे स्वत:चे नसते. शरीर, मन, इंद्रिये सारे काही ईश्वरच बनून जातात. आता तो भक्त 'महात्मा' बनून जातो. या महात्मा पुरुषाचे सारेच ऐकतात. ज्याचे मार्गदर्शन मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

6) **परमात्मा इति च अपि उक्त:** ज्याच्यासाठी श्रुतीने 'परमात्मा' हे विशेषण प्रयुक्त केले आहे त्याला इथे 'महेश्वर' म्हटले गेले आहे. हा आधी 'साक्षी' रुपात रहातो. जीव नैतिक भूमिकेवर आल्यावर त्याच्या नैतिक कार्यांना अनुमोदन देणारा 'अनुमंता' बनतो नंतर संकटसमयी मदत करणारा 'भर्ता' बनून जातो त्यानंतर सर्व कार्य करणारा 'भोक्ता' बनून जातो आणि अखेरीस 'महेश्वर' म्हणजे महात्मा बनतो. त्यालाच वेदान्तात 'परमात्मा' म्हटले आहे. जो आरंभी साक्षी होता तोच अखेरीस महात्मा म्हणजे परमात्मा बनून गेला.

7) **अस्मिन् देहे पर: पुरुष:** या देहात तो श्रेष्ठ पुरुष 'बुध्दीच्या पलिकडे आत्मरुपात' आहे. भगवंताने 10 व्या अध्यायाच्या 20 व्या श्लोकात सांगितले आहे की -अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित: 'सर्व भूतांच्या अंत:करणात आत्मरुपाने आहे.' हीच गोष्ट इथे 'पुरुष' या शब्दाद्वारे सांगितली गेली आहे. पुरुष हा शब्द सांख्यांचा आहे. कसा आहे हा पुरुष? हा पुरुष 'पर' म्हणजे 'श्रेष्ठ'

आहे. अद्वितीय आहे. ब्रह्मांडातले तमाम पदार्थ जड आहेत. ते सारे अद्भुत आहेत पण त्यांच्यापेक्षाही वरचढ रुपात जीव सृष्टीत म्हणजे भिन्न - भिन्न पशु - पक्षी वगैरेंच्या शरीरात तो ज्ञानरुपाने वसतो आणि नर देहात त्याचे अतिश्रेष्ठ स्वरुप दिसून येते कारण की नरदेहातच त्याची ओळख होऊ शकते. यामुळे परमात्मा नरदेहातच सर्वाधिक रुपात प्रकटला आहे. ज्याला ओळखायचे साधन अशी बुध्दी मानवी देहातच विकसित रुपात आढळते. तो 'पुरुष' या बुध्दीच्या पलिकडे वसतो. तिसऱ्या अध्यायातल्या 42 व्या श्लोकात त्याला 'आत्मा' असे नाव दिले गेले आहे. यो बुध्देः परतस्तु सः 'तो बुध्दीच्या पलिकडचा आहे.' म्हणजे बुध्दीने जाणून घेता येण्यासारखा नाहीए. 'तो' म्हणजे 'आत्मा'.

: 23:

*य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह।*
*सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यः एवं:** जो मनुष्य अशाप्रकारे
- **पुरुषं:** पुरुषाला म्हणजे आत्म्याला
- **च गुणैः सह प्रकृतिं:** आणि तीन गुणांच्या सोबत प्रकृतीला
- **वेत्तिः तत्त्वतः** जाणतो
- **सः** तो
- **सर्वथा वर्तमानः अपिः** कशाही प्रकारे वागत असला तरीही
- **भूयः न अभिजायतेः** पुनः कदापि देह धारण करत नाही म्हणजे त्याचा पुनर्जन्म होत नाही

**अर्थ**

अशा रीतीने पुरुषाला आणि गुणांसहित प्रकृतीला जो मनुष्य तत्त्वतः जाणतो (दिसणारे सर्व जग मायेचे कार्य असल्यामुळे क्षणभंगुर नाशिवंत अचेतन आणि अनित्य आहे. तसेच जीवात्मा नित्य, चेतन, निर्विकार, अविनाशी तसेच शुध्द बोध स्वरुप सच्चिदानंदघन परमात्म्याचाच सनातन अंश आहे, असे समजून सर्व मायिक पदार्थांचा संग सर्वथा सोडून परमपुरुष परमात्म्याचे ठिकाणी ऐक्यभावाने नेहमी स्थित रहातो, याचेच नाव त्याना तत्त्वतः जाणून घेणे आहे. ) तो सर्व प्रकारे कर्तव्य कर्मे करीत असला तरी पुन्हा जन्माला येत नाही.

*पुरुषाचे असें रुप प्रकृतीचें गुणात्मक।*
*जाणे कसा हि तो राहो न पुन्हां जन्म पावतो॥*

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) जो अशाप्रकारे आत्मतत्त्वाला आणि तीन गुणांसोबत प्रकृतीला जाणतो. 2) तो पुरुष कसाही वागत असला तरीही 3) पुन्हा तो कदापि देह धारण करत नाही, तो मुक्त होऊन जातो.

**स्पष्टीकरण**

1) **यः एवं पुरुषं च गुणैः सह प्रकृतिं वेत्तिः** जो मनुष्य अशा प्रकारे आत्मा आणि तीन गुणांच्या सोबत प्रकृतीला जाणतो म्हणजे क्रमाने आत्मा आणि प्रकृती यांच्या वेगळेपणाचा अनुभव घेतो. मागील श्लोकांमधून देह आणि आत्म्याचे पृथ्थकरण केले गेले आहे, 19 व्या श्लोकात दोघांमधले अंतर समजावून सांगायला सुरुवात केली आहे या विषयाचा या श्लोकात एका प्रकारे उपसंहार केला गेला आहे. प्रत्येक शरीरात प्रकट असणाऱ्या पुरुषाला 'आत्मा' म्हटले गेले आहे. या आत्म्यावरच जीवात्म्याचा भास उत्पन्न झाला आहे, यामुळे सुख - दुःखाचा अनुभव येत रहातो. जर जीवात्म्याचा भास उत्पन्न झाला नाही तर सुख - दुःखाचा अनुभव येत नाही केवळ आत्मतत्त्वच देहात प्रकट झाले असेल तर आपल्याला देह वा जगताचे ज्ञान होत राहील पण सुख - दुःखाचा अनुभव नाही येणार. सुख-दुःखाच्या अनुभवासाठी देहाशी संबंध असण्याची कल्पना उभी रहायला हवी म्हणजे ज्ञातेपणासोबत 'मी देह आहे, मन आहे, इंद्रिये आहे, बुध्दी आहे.' अशाप्रकारचे आरोपण जेव्हा ज्ञात्यावर होते तेव्हा आपल्याला सुख-दुःखाचा अनुभव येतो. आत्मा आणि माया निर्मित देहात जमीन - अस्माना इतके अंतर आहे. मागील श्लोकात वर्णिल्याप्रमाणे ज्यानी आत्म्याचे स्वरुप चांगल्या प्रकारे जाणून घेतले आणि त्या सोबत प्रकृती म्हणजे मायेच्या तीन गुणांनाही जाणून घेतले म्हणजे दोघांमधले अंतर ओळखून त्यानुसार जो वर्तन करतो - अनुभव करतो.

दुसऱ्या शब्दात जो पुरुष आत्मानुभव घेत असतांना आत्मस्वरुपी तल्लीन रहातो आणि मायेद्वारे निर्मित पदार्थ म्हणजे देह, इंद्रिये वगैरे संघातात आसक्त होत नाही तो. त्याचे स्वरुप द्विविध असते. ते पुढे वर्णिले आहे.)

2) **सः सर्वथा वर्तमानः** अपि आणि तो पुरुष म्हणजे आत्मा आणि मायेच्या घडवलेल्या पदार्थ आणि देहाचा संघात यात भेद करणारा पुरुष, भेदाचा अनुभव घेणारा पुरुष कशाही प्रकारे वागत असला तरीही याचा अर्थ 'वाटेल तसे आचरण' म्हणजे स्वैराचार असा कदापि होत नाही. असा चुकीचा अर्थ केल्यामुळे अनेक संन्याश्यांचे पतन झाले आहे. हे वचन सहाव्या अध्यायातल्या 31 व्या श्लोकात येते. त्या श्लोकाचा आणि या श्लोकाचा उत्तरार्ध समान आहे. या विधानाचा खरा अर्थ असा आहे की जो आत्मतत्वाच्या स्वरुपाचा अनुभव घेतो आणि जगातले बाह्य पदार्थ आणि देह वगैरेच्या ठायी आसक्त होत नाही, जो अगदी अलिप्त असतो, ज्याचे आचरण इतके शुध्द असते की असा पुरुष 'हवे तसे आचरण' करुच शकणार नाही. याचे कारण असे की जोवर आत्म्याचा अनुभव येत नाही आणि संपूर्णपणे अनासक्ती उपजत नाही तोवर वाटेल तसे वागणे शक्य आहे. यामुळे अज्ञानी पुरुषासाठी शास्त्र हे विधी - निषेध ठरवते आणि त्यानुसार आचरण करणारा पुरुष वाटेल तसे आचरण करण्यापासून वाचतो. आपल्या बोलण्यात असत्य असते. असत्य व्यवहार कदापि होऊ नये यासाठी सत्य बोलायला हवे. असत्य कदापि बोलायला नको असा विधी आणि निषेधाचा भाग शास्त्र आपल्यासाठी ठरवते आणि त्यामुळे आपण शास्त्राधारे वर्तावे - शास्त्राच्या आधारे वर्तन करावे आणि पतनापासून वाचावे पण ज्या ज्ञानी पुरुषाचा सत्याचरण हा स्वभावच बनून गेला त्याच्यासाठी कुठल्याही परिस्थितीत विधी - निषेधाची गरज नाही. क्रोध आला तर शास्त्र नियम सांगेल की कुणावर क्रोध करायला नको, क्रोधामुळे शांती भंग होते पण ज्या ज्ञानवंतासाठी क्रोध उत्पन्न होणे शक्यच नाही ज्या ज्ञानवंताला क्रोध काय तो येतच नाही ज्याच्यासाठी शास्त्राच्या नियमाची गरजच काय ? म्हणजे तो शास्त्र नियमांना पार ओलांडून गेला आहे. म्हणजे त्याच्यासाठी शास्त्राचे नियम अगदी सहज बनून गेले आहेत, असा त्या वचनाचा भावार्थ आहे.

3) **सः भूयः न अभिजायते:** तो ज्ञानी परत कधी जन्माला येत नाही, देहधारण करत नाही. जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो. अज्ञानी पुरुष वारंवार देह धारण करतो कारण की देहाच्या आसक्तीमुळे त्याला देहाची गरज असते. वस्तुच्या बाबतीत आपल्या मनात प्रेम उत्पन्न होते, आसक्ती निर्माण होते तेव्हाच आपण त्या वस्तुच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो. तशाच प्रकारे जोवर आपल्या मनात देहाविषयी प्रेम असेल, आसक्ती असेल तोवर देह धारण करणे काही सुटणार नाही, अनेक जन्म घेत राहू. ज्ञानवंताला देहविषयक प्रेम, मोह वा आसक्ती उरत नाही त्यामुळे तो पुनश्च देह धारण करत नाही. देह धारण न करण्याचा अर्थ आहे मुक्त होऊन जाणे. ज्ञानी जसा अज्ञानापासून मुक्त होतो तसाच देह धारण करण्यापासूनही मुक्त होऊन जातो. त्याला अज्ञान मुक्ती आणि देह मुक्ती दोन्ही प्रकारची मुक्ती मिळते.

: 24 :

*ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।*
*अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **केचित्:** काही साधक
- **ध्यानेन:** ध्यानाने
- **आत्मानम्:** आत्म्याला म्हणजे परमात्म्याला
- **आत्मना आत्मनि:** शुध्द झालेल्या सूक्ष्म बुध्दीने आपल्या हृदयात म्हणजे आपल्याठायी
- **पश्यन्ति:** बघून घेतात
- **अन्ये:** अन्य साधक
- **सांख्येन योगेन:** सांख्य योगाने (पश्यन्ति बघून घेतात)
- **च अपरे:** आणि इतर काही साधक
- **कर्मयोगेन:** निष्काम कर्मयोगाने
- **पश्यन्ति:** बघून घेतात

**अर्थ**

त्या परमात्म्याला काही जण शुध्द झालेल्या सूक्ष्म बुध्दीने ध्यानाच्या योगाने हृदयात पहातात. दुसरे

काहीजण ज्ञानयोगाच्या द्वारे आणि इतर कितीतरी लोक कर्मयोगाच्या द्वारे पाहतात म्हणजेच प्राप्त करतात.

*ध्यानानें पाहती कोणी स्वयें आत्म्यास अंतरीं।*
*सांख्य - योगें तसें कोणी कर्म - योगें हि आणिक॥*

**विषय:** या श्लोकात ईश्वर प्राप्तीचे तीन मार्ग वा साधने सांगितली आहेत. 1) जो अशाप्रकारे आत्मा व तीन गुणांसह प्रकृतीला जाणतो. 2) तो पुरुष कशाही प्रकारचे आचरण करत असेल तरीही 3) तो पुनश्च कदापि देह धारण करत नाही, तो मुक्त होऊन जातो.

**स्पष्टीकरण**

1) **केचित् ध्यानेन आत्मानं आत्मना आत्मनि पश्यन्ति:** काही साधक ध्यान योगाच्या सरावाने आत्मतत्वाला म्हणजे परमात्म्याला स्वत: आपल्या ठायी बघून घेतात. भगवंत इथे आत्मतत्वाला ओळखण्याचे तीन मार्ग सांगताहेत. ही तीन साधने वा मार्ग परस्परपूरक आहेत. या साधनांपैकी जो साधक आपल्या वृत्तीनुसार सर्वाधिक उपयोग करुन घेईल त्याला त्या मार्गाचा पथिक मानले जाईल म्हणजे जो साधक 'ध्यानाचा' अधिक उपयोग करत असेल त्याला 'ध्यानमार्गी' साधक मानले जाईल. जो आत्मानात्मविवेकी असेल म्हणजे देह आणि आत्म्याचे वेगळेपण जाणुन घेईल - त्या विचाराचा अभ्यास करील त्याला 'ज्ञानमार्गी' साधक मानले जाईल आणि जो कर्मयोगाचा म्हणजे मुख्यत्वेकरुन सारी कर्मे ईश्वरार्पण बुध्दीने करायचा सराव करेल तो 'कर्मयोगी' साधक मानला जाईल. परमात्म्याला ओळखून घेण्याची ध्यान, ज्ञान आणि ईश्वरार्पण कर्म ही तीन प्रमुख साधने आहेत. यांचा उल्लेख भगवंत या श्लोकात करताहेत. आधी ध्यान साधनाची चर्चा करताहेत. ध्यान म्हणजे परमेश्वराला आपल्या ठायी बघणे होय. इथे आत्मा शब्द 'परमात्म्यासाठी' प्रयुक्त झाला आहे. 'आत्मानम्' म्हणजे परमात्म्याला, 'आत्मना' म्हणजे स्वत:च. आपण परमात्म्याहून कुठल्याही परिस्थितीत भिन्न नाहीहोत पण अज्ञानामुळे स्वत:ला भिन्न वा वेगळे मानतो. आपण स्वत:च 'आत्मानि' म्हणजे आपल्यात म्हणजे आपल्या स्वरुपात, कल्पनेने जीव बनले आहेत पण आपले खरे - वास्तविक स्वरुप तर परमात्माच आहे. यामुळे आपण आपल्यात म्हणजे आपल्या स्वरुपात आत्मतत्वाला वा परमात्मतत्वाला ध्यानाच्या सरावाने ओळखून घेतो. सहाव्या अध्यायातील 11 ते 23 या 13 श्लोकांमध्ये विवेचन येते.

'ध्यान' चा अर्थ शंकराचार्य असा करतात - ध्यानं नाम शब्दादिभ्यो विषयेभ्य: श्रोत्रादीनि करणानि मनसि उपसंहृत्य मन: च प्रत्यक् चेतयितरि एकाग्रतया यत् चिन्तनं तद् ध्यानम्। तथा 'ध्यायतीव बक:', 'ध्यायतीव पृथिवी', 'ध्यायन्तीव पर्वता:' इति उपमोपादानात् तैलधारावत् सन्तत: अविच्छिन्नप्रत्ययो ध्यानम्। अर्थात् - शब्द वगैरे पंच विषयांनी, कान आदी पंच ज्ञानेंद्रियांना मनात विलीन करुन - इंद्रियांना आपल्या विषयांपासून हटवून मनाच्या ठायी त्यांचा लय करुन, मनाला आत्म्यात एकाग्र करत परमात्म चिन्तन करणे ध्यान होय. शास्त्राने ध्यानासाठी पुढील उदाहरणे दिली आहेत. 'बगळा जणू ध्यान करत आहे. पृथ्वी जणू ध्यान करत आहे. पर्वत जणू ध्यान करत आहेत.' तेलाची धार जशी अखंडपणे वहाती असते तसे सतत, अखंडितपणे मनात परमात्म्याचाच प्रत्यय येणे याचे नाव ध्यान होय.

नित्य प्रात:काळी ध्यानाचा सराव केल्याने फायदा होतो. एका आसनावर स्थिरतापूर्वक बसून सर्व विचारांना दूर लोटून परमात्म्याचे अखंड स्मरण करणे हा ध्यानाचा सराव होय. आपण जर सर्व विचारांना मनातून घालवून द्यायला यशस्वी झालो तर आत परमात्म्याचा स्पर्श होऊ शकतो. ध्यानात परमात्म्याचा अनुभव झाल्यावर त्याला टिकवून राखण्याचा सराव करणे आवश्यक आहे. सर्व व्यवहार करत असतांना अनुभवाची ती स्थिती टिकून रहायला हवी.

2) **अन्ये सांख्येन योगेन (पश्यन्ति):** काही इतर साधक सांख्ययोग म्हणजे ज्ञानयोगाने, ज्ञान साधनेने, आत्मानात्म - विवेक साधनेने ईश्वराचा अनुभव करुन घेतात. ज्ञान साधनेचा सराव असा करता येतो - 'मी इंद्रिये, शरीर, मन आणि बुध्दीने सर्वथा भिन्न, साक्षी, ज्ञाता आणि मुक्त आहे.' अशाप्रकारे वारंवार चिन्तन करुन ज्ञान साधनेचा सराव करता येतो - देह वगैरेची आसक्ती सोडणे जेवढे अवघड असते तेवढे काही बाह्य पदार्थांची आसक्ती सोडणे अवघड नसते. अशाप्रकारे आपण देह वगैरे संघातापासून पूर्णपणे वेगळे आहोत हे बुध्दीने ग्रहण

करुन तसा सराव करण्यात यशस्वी ठरलो तर आत प्रकट असलेल्या ईश्वराचा अनुभव घेता येऊ शकतो - होऊ शकतो.

3) **च अपरे कर्मयोगेन (पश्यन्ति):** आणि दुसरे साधक कर्मयोगाची साधना करत ईश्वराला जाणून घेतात. कर्म करत असताना जनसेवा अथवा कर्तव्य मानून परिवार सेवा करत परमात्मा शरण होऊन आपली संपूर्ण सेवा - जनसेवा वा परिवार सेवा परमात्म्याला अर्पण करणे हा झाला कर्मयोगाचा अर्थ. नि:स्वार्थ बुध्दीने केलेली जनसेवा ईश्वराला अर्पण होऊन जाते. तसेच कर्तव्य मानून नि:स्वार्थ बुध्दीने केलेली परिवाराची सेवाही ईश्वरार्पण होऊ शकते. यात ईश्वराला जीवनाच्या सर्व क्रिया अर्पण करुन जगण्याचा सराव आहे. काही साधक असा सराव करण्यात तल्लीन असतात. ईश्वर शरण बुध्दी वाढवून आणि जीवनातल्या समस्त क्रिया ईश्वरार्पण केल्यामुळे जसजसा अहंकार क्षीण होऊ लागतो तसतसे आपण ईश्वराच्या अधिकाधिक जवळ पोहोचत जातो आणि तेव्हा ईश्वराचा अनुभव येऊ शकतो.

परमात्म्याला ओळखायची ही तीन साधने आहेत. एकच साधक तिन्ही साधने वा मार्गांचा सराव करु शकतो. एवढेच नव्हे तर गीतेचे तर असे सांगणे आहे की या तिन्ही साधनांचा उपयोग आपल्या कुवतीनुसार करायला हवा आणि यासोबत ईश्वरार्पण बुध्दीने समस्त क्रिया करायचा सरावही करायला हवा. तिन्ही मिळून साधना पूर्ण होईल. अर्थात् कुणाची वृत्ती ध्यानाच्या सरावाकडे अधिक राहील. कुणाची ज्ञानाच्या सरावाकडे म्हणजे आत्मानात्म - विवेकाच्या सरावाकडे तर कुणाची ईश्वरार्पण बुध्दीने जीवनातल्या तमाम क्रिया करण्याच्या सरावाकडे राहील. यामुळे त्या त्या प्रधान वृत्ती अनुसार ध्यानयोगी, ज्ञानयोगी वा कर्मयोगी अशी तीन विशेषणे त्या प्रधान वृत्तीच्या साधकांसाठी उपयुक्त मानली जातील.

: 25:

***अन्ये त्वेवमजनानंत: श्रुत्वान्येभ्य उपासते***
***तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणा:***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु एवं:** पण अशा प्रकारे
- **अजानन्त:** ईश्वराला न जाणणारे
- **अन्ये:** दुसरे साधक
- **अन्येभ्य: श्रुत्वा:** अधिकारी पुरुषांकडून श्रवण करुन
- **उपासते:** उपासना करतात
- **ते श्रुतिपरायणा: अपि:** असे श्रवण परायण साधकही
- **मृत्युं अतितरन्ति एव च:** मृत्युयुक्त संसाराला पोहून निश्चितपणे पार उतरतात

**अर्थ**

परंतु या खेरीज इतर अर्थात् मंदबुध्दीचे पुरुष आहेत, ते अशाप्रकारे न जाणणारेअसतात. ते दुसऱ्यांकडून म्हणजेच तत्त्वज्ञानी पुरुषांकडून ऐकूनच तदनुसार उपासना करतात आणि ते ऐकलेले प्रमाण मानणारे पुरुषसुध्दा मृत्युरुप संसार सागर खात्रीने तरुन जातात.

***स्वयें नेणूनियां कोणी थोरांपासूनि ऐकिती।***
***तरती ते हि मृत्युस श्रध्देनें वर्तुनी तसें॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) पण अशाप्रकारे ईश्वराला न जाणणारे दुसरे साधक अधिकारी पुरुषांमार्फत ईश्वर स्वरुपाचे ईश्वर स्वरुप विषयक श्रवण करुन श्रध्देने चालतात - श्रध्दापूर्वक चालतात. 2) असे श्रवण परायण साधकसुध्दा हा मृत्युयुक्त संसार सागर तरुन जातात.

**स्पष्टीकरण**

1) **तु एवं अजानन्त: अन्ये अन्येभ्य:** श्रुत्वा उपासते वरील श्लोकात ईश्वराच्या स्वरुपाच्या ओळखीसाठी ध्यान, ज्ञान आणि भक्ती म्हणजे भक्तीयुक्त सेवा ही तीन साधने समजावलीत. आता काही वेगळ्या लोकांविषयीची चर्चा सुरु आहे. काहींना ईश्वराचा अनुभव घ्यायची

इच्छा असते, जिज्ञासा असते, पण या तीन साधनांच्या आश्रयाने वाटचाल करायचे बळ नसते त्यांचा विषय आहे. काही लोक ध्यान म्हणजे काय हे जाणत नाहीत किंवा ध्यानधारणा करु शकत नाहीत किंवा देह आणि आत्मा यांना वेगवेगळे कसे समजावे वा त्यांचा सराव कसा करावा हे जाणत नाही अथवा ईश्वरार्पण बुध्दीने जीवनाच्या क्रिया करणे ज्यांना अवगत नाही वा हे जाणून घेतल्यावरही ते तदनुसार वाटचाल नाही करु शकत, असे काही साधक वा मुमुक्षुजनही जगात आहेत. त्यांना ईश्वराची ओळख कशी करुन घेता येईल ते या श्लोकात सांगितले गेले आहे. भगवंत म्हणताहेत की या उपर्युक्त तीन साधन मार्गांपैकी एकाही मार्गाचे अनुकरण - अनुसरण करता येत नसेल पण कुणा अधिकारी म्हणजे पोहोचलेल्या सत्पुरुषावर श्रध्दा असेल तरीही ईश्वराची ओळख होऊ शकते. श्रध्देच्या बळावर डोळे मिटूनही लक्ष्य गाठता येऊ शकते. कुणाची ईश्वरावर श्रध्दा नसेल पण कुणा अधिकारी - पोहचलेल्या पुरुषावर आत्यंतिक म्हणजे कमालीची श्रध्दा असेल तर त्याच्यामार्फत ईश्वरविषयक श्रवण करुन त्याच्या लक्षात हळूहळू सारे काही येऊ शकते आणि तदनुसार आचरण करुन तो भवसागर तरुन जाऊ शकतो. कुणी स्वत: विवेकी नसल्यामुळे ध्यान, ज्ञान, भक्तीरुपी साधनांना नेमकेपणाने जाणत नसेल पण अधिकारी पुरुषावर श्रध्दा असल्यावर त्याच्या मनात या संपूर्ण विषयाचा बोध होऊन जातो आणि त्यानुसार आचरण करण्याचा तो प्रयत्नही करतो. बुध्दी बळकट नसेल पण श्रध्दा जर बलवान असली तर ईश्वर ज्ञानाचे साधन बनू शकते. शबरी, अजामिळ, अहल्या इत्यादी सारे श्रध्दाळू होते, यामुळे भवसागर तरु शकले.

2) **ते श्रुतिपरायणाः अपि मृत्युं अतितरन्ति एव च**: असे श्रवणपरायण साधक वा मुमुक्षुही मृत्युयुक्त भवसागर पार करतात वा ओलांडू शकतात. जो केवळ श्रध्दाळू आहे आणि कुणा सिध्द पुरुषावर संपूर्ण श्रध्दाभाव राखून ज्यांच्या सत्संगतीत राहून ज्ञान प्राप्त करुन घेतो आणि त्यानुसार आचरण करतो याचे त्यांना जे फळ मिळते त्याची चर्चा भगवंत इथे करताहेत. ते मोक्षाचे अधिकारी होतात म्हणजे जन्म - मृत्युरुपी भवसागरातून मुक्त होतात. आपल्याला पुणे शहराकडे जायचा रस्ता माहीत नसेल तर कुणाला विचारुन आपण चालायला लागलो तर पुणे गाठू शकतो. श्रध्दा अशी महान वस्तु आहे की तिच्या बळावर आपण भवसागर पार करु शकतो.

: 26 :

***यावत् संजायते किंचित् सत्त्वं स्थावरजंगमं।***
***क्षेत्र क्षेत्रज्ञसंयोगात् तद्विध्दि भरतर्षभ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतर्षभः** हे भरतश्रेष्ठ अर्जुना
- **यावत् किंचित्:** जो काहीही
- **स्थावरजंगमं:** स्थावर आणि जंगम म्हणजे स्थिर आणि चर पदार्थ
- **सत्त्वम्:** पदार्थ आहेत
- **तत्:** ते सर्व
- **क्षेत्र क्षेत्रज्ञसंयोगात्:** शरीर म्हणजे प्रकृती आणि आत्म्याच्या संयोगाने (उत्पन्न होतात)
- **विध्दि:** असे समज

**अर्थ**

हे अर्जुना, जेवढे म्हणून स्थावर-जंगम प्राणी उत्पन्न होतात, ते सर्व क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाच्या संयोगानेच उत्पन्न होतात असे समज.

***उत्पन्न होतसे लोकीं जें जें स्थावर - जंगम।***
***क्षेत्र - क्षेत्रज्ञ - संयोगें घडिलें जाण सर्व तें॥***

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली गेली आहे की हे अर्जुना, जे काही स्थावर - जंगम पदार्थ आहेत ते सारे शरीर म्हणजे प्रकृती आणि आत्मा या दोघांच्या संयोगातून उत्पन्न झाले आहे असे समज.

**स्पष्टीकरण**

या श्लोकाचा अर्थ दोन प्रकारे करता येऊ शकतो. सुरुवातीला 'स्थावर - जंगम' पदार्थांचा उल्लेख आहे. जगात दोन विभाग आहेत. एक म्हणजे जड सृष्टी आणि दुसरी जीव सृष्टी. जीव सृष्टीचे परत दोन विभाग आहेत. बाह्य शरीर आणि त्यात स्थित जीवात्मा. बाह्य शरीर जड असते आणि या जड शरीरामध्ये जीव नांदतो. तिथे जीव असतो तिथे मन वगैरे इंद्रियेही असतात. इंद्रियांच्या द्वारेच जगाचे ज्ञान होते आणि मग व्यवहारात सुख - दु:खाचा अनुभव होतो. बाह्य जड पदार्थ आणि शरीर वगैरे जड पदार्थांची उत्पती जड प्रकृतीनेच संभवते - होते - असे

सांख्य तत्वज्ञानाचे मत आहे पण वेदान्ताची मान्यता मात्र वेगळी आहे. जड प्रकृतीच्या मागे चैतन्य असेल तरच पदार्थाची उत्पत्ती वा भास होऊ शकतो. भगवंत इथे सांगताहेत की ज्यावेळी ईश्वराच्या माया - शक्तीशी चैतन्यमय ईश्वराचा संयोग होतो तेव्हा जड - चैतन्य पदार्थ उत्पन्न होतात.

या श्लोकात 'क्षेत्र - क्षेत्रज्ञ - संयोग' शब्द आला आहे. क्षेत्र म्हणजे शरीर. क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा - परमात्मा. शरीराचा अर्थ आहे ज्या मूळ प्रकृतीपासून शरीर बनले ती प्रकृती. क्षेत्रज्ञ म्हणजे परमात्मा. परमात्मा आणि प्रकृती भिन्न नसून एक आहेत. आत्मा आणि शरीर अशा दोन वस्तु दिसतात. या क्रमात ज्यापासून शरीर बनले ती मूळ प्रकृती वा माया आणि ही प्रकृती ज्या परमात्म्याशी एकरुप आहे तो परमात्मा अशी भाषा वापरली जाते. दोघांच्या संयोगातून म्हणजे या शक्तींच्या सहाय्याने जगातील सारे स्थावर - जंगम पदार्थ उत्पन्न होतात. परमात्मा केवळ ज्ञानशक्तीने वा चैतन्यशक्तीने संपन्न असेल तर जगातले पदार्थ उत्पन्न होऊ शकत नाहीत. अशाच प्रकारे परमात्म्याच्या ठायी ज्ञानशक्तीऐवजी केवळ प्रकृती शक्ती वा माया शक्तीच असली तरीही जगतातले पदार्थ उत्पन्न होऊ शकत नाहीत. अशा प्रकारे ज्ञान शक्तीसोबत जगाला उत्पन्न करणारी प्रकृतीशक्तीही असायला हवी. ईश्वराच्या ठायी या दोन्ही शक्तींचा संयोग असल्यामुळे विश्व निर्माण होते. ज्ञानशक्ती माया शक्तीवर नियंत्रण राखते आणि अशा प्रकारे दोन शक्तींच्या संयोगाने विश्वातले अनंत स्थावर-जंगम पदार्थ उत्पन्न होत असतात. ते सर्व पदार्थ खरे नसल्यामुळे त्यांच्यासाठी उत्पती ऐवजी 'भास' शब्दाचा प्रयोग केला जातो.

या मूळ अर्थावरुन दुसरा एक अर्थ असा निघतो की क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यात जी भिन्नता आहे ती लक्षात न आल्यामुळे देहाचा आत्म्यावर आणि आत्म्याचा देहावर - असा एक - दुसऱ्यावर जो अखंड अभ्यास चालला आहे तोच देह आणि आत्म्याचा संयोग होय. प्रत्यक्षात देह जड असून आत्मतत्व चेतन किंवा ज्ञानस्वरुप आहे. दोघे म्हणजे जड - चेतनाचा प्रत्यक्ष संयोग तर कदापि होऊ शकत नाही तरीही काल्पनिक संयोग वा संबंध होऊ शकतो. अशा काल्पनिक संयोगातूनच सारे पदार्थ उत्पन्न होतात आणि आपला संपूर्ण व्यवहार अज्ञानाच्या आधारावर चालू शकत असतो. अज्ञानामुळे या व्यवहारामुळेच आपल्याला सुख - दु:खाचा अनुभवही येत रहातो - होत राहातो. याचा सारांश एवढाच की देह आणि आत्मतत्व या दोघांना वेगळे करुन बघण्याची ज्ञानदृष्टी असायला हवी दुसऱ्यांकडे बघण्यात आणि त्यांच्याशी व्यवहार करताना हीच ज्ञानदृष्टी असायला हवी.

: 27 :

***समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।***
***विनश्यत्स्वविनश्यंतम्  य: पश्यति स पश्यति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: विनश्यत्सु:** जो पुरुष विनाश योग्य म्हणजे नाशिवंत
- **सर्वेषु भुतेषु:** सर्व चराचर भूतमात्रांच्या ठायी
- **समं तिष्ठन्तं:** समरुपाने विराजमान
- **अविनश्यन्तं:** अविनाशी
- **परमेश्वरं पश्यति:** परमेश्वराला बघतो
- **स: पश्यति:** तोच (खरे) बघतो

**अर्थ**

जो पुरुष नाशिवंत सर्व चराचर भूतात परमेश्वर हा अविनाशी आणि सर्वत्र समभावाने स्थित असलेला पाहतो, तोच खरे पाहतो.

***समान सर्व भूतांत राहिला परमेश्वर ।***
***अनाशी नाशवंतांत जो पाहे तो चि पाहतो ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) जो पुरुष नष्ट होण्यायोग्य सर्व भूतमात्रांच्या ठायी समानरुपात विद्यमान अशा ईश्वराला बघतो. 2) तोच बघत असतो.

**स्पष्टीकरण**

1) **य: विनश्यत्सु सर्वभूतेषु समं तिष्ठन्तं अविनश्यन्तं परमेश्वरं पश्यति:** जो पुरुष नष्ट होण्यायोग्य समस्त

भूतमात्रांच्या ठायी म्हणजे स्थावर-जंगम सृष्टीत समानपणे अविनाशी ईश्वराला बघतो म्हणजे अशी दृष्टी राखून व्यवहार करतो. सृष्टी स्थावर - जंगम पदार्थांनी युक्त आहे. सृष्टीत दिसून येणारे सारे पदार्थ नष्ट होण्यायोग्य आहेत. ते सतत क्षीण होत चालले आहेत. होय, हे खरे आहे की कुणाची विनाश क्रिया धीमी असेल तर कुणाची वेगवान असेल पण विनाश होण्यापासून कुठलाही पदार्थ मुक्त नाही. विनाशी पदार्थाला कुणा अविनाशी पदार्थाचा आधार लागतोच. विनाशी पदार्थाला 'कार्य' तर अविनाशी पदार्थाला 'मूळ कारण' असे म्हणतात. तमाम विनाशी पदार्थांचे मूळ कारण अविनाशी आहे. या अविनाशी ईश्वराच्या सहाय्याने सर्व अविनाशी स्थावर - जंगम पदार्थांचे अस्तित्व टिकून असते पण या विनाशी पदार्थाच्या ठायी अविनाशी ईश्वर नांदतो, हे ज्ञान अज्ञजनांना नसते. ज्ञानी जन अविनाशी ईश्वराला बघतात. तो 'सर्वाठायी ईश्वर आहे' असे समजून व्यवहार करतो. सर्वत्र ईश्वर असल्याची प्रतीती आली - अनुभव आला तर मग चित्त निर्विकार बनते आणि त्यामुळे अखंडपणे शांततेचा अनुभव येतो. सर्व ठायी ईश्वर दर्शन करता येणे अद्वैत दर्शन आहे.

2) **यः पश्यति:** जो सर्वत्र ईश्वराला बघून तदनुसार वर्तन - व्यवहार करतो तोच बघतो. त्याला सत्य दृष्टी लाभली. सृष्टीतले तमाम पदार्थ ईश्वरनिर्मित असल्याचा अनुभव आला, तर पदार्थांना बघून ईश्वराचे स्मरण होऊन मनात ईश्वर भाव उत्पन्न होऊन मोठ्या आनंदाचा अनुभव येईल. या दृष्टीने सर्वांशी जो व्यवहार होईल तो श्रेष्ठ कोटीचा असेल. त्याचा व्यवहार राग - द्वेष रहित, ममत्वरहित असेल. अशा राग -द्वेष रहित दृष्टीमुळे इतरांचा राग -द्वेषही क्षीण होतो.

: 28 :

***समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।***
***न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** कारण की
- **समवस्थितं:** सर्वांच्या ठायी समान रुपाने म्हणजे समभावाने स्थित
- **ईश्वरम्:** ईश्वराला
- **समं पश्यन्:** समान रुपाने बघणारा
- **आत्मना आत्मानं:** स्वत:च स्वत:ची
- **न हिनस्ति:** हिंसा करत नाही म्हणजे नाश करुन घेत नाही
- **ततः** (आणि) त्यापासून
- **परां गतिं याति:** परम म्हणजे श्रेष्ठ गती प्राप्त करतो

**अर्थ**

कारण जो पुरुष सर्वांमध्ये समरुपाने असलेल्या परमेश्वराला समान पाहून आपणच आपला नाश करुन घेत नाही, त्यामुळे तो परम गतीला जातो, पावतो.

***जो पाहे प्रभु सर्वत्र भरला सम तो स्वयें।***
***आत्म्याची न करी हिंसा, गति उत्तम मेळवी ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) सर्वांच्या ठायी समान रुपाने वसलेल्या ईश्वराला समान रुपाने बघणारा स्वत: काही आपली हिंसा करत नाही. 2) त्यामुळेच (तो) परम म्हणजे श्रेष्ठ गती प्राप्त करुन घेतो. सर्वांच्या ठायी ईश्वराला काय फळ मिळते ते या श्लोकात सांगितले गेले आहे.

**स्पष्टीकरण -**

1) **हि समवस्थितम् ईश्वरं समं पश्यन् आत्मना आत्मानं न हिनस्ति:** सर्वांच्या ठायी समान रुपाने विद्यमान - स्थित - ईश्वराला समान रुपाने बघणारा माणूस स्वत: काही आपली हिंसा करत नाही.

परमेश्वर सर्वांच्या ठायी समानरुपाने स्थित आहे त्यामुळे त्याला बघणारा ज्ञानी सर्वांमध्ये समानपणे ईश्वराचे दर्शन करतो. याचे दोन परिणाम होतात. एक तर तो स्वत: आपली हिंसा करत नाही. आपली हिंसा दोन प्रकारे होते असे शंकराचार्य म्हणतात -

सर्वो हि अज्ञ: अत्यंतप्रसिध्दं साक्षाद् अपरोक्षाद् आत्मानं तिरस्कृत्य अनात्मानं आत्मत्वेन परिगृह्यतं अपि धर्माधर्मौ कृत्वा उपात्तं आत्मानं हत्वा अन्यं नवं आत्मानं उपादत्ते, एवं तं च हत्वा अन्यं, एवं तं अपि हत्वा अन्यं इति एवं उपात्तं उपात्तं आत्मानं हन्ति इति सर्व: अज्ञ: आत्महा। तु य: पर्मार्थात्मा असौ अपि अविद्यया सर्वदा हत: इव

विद्यमान फलाभावात् इति सर्वे अविद्वांस: आत्महन: एव। तु य: इतर: यथोक्तात्मदर्शी स: उभयथा अपि आत्मना आत्मानं न हिनस्ति।

अर्थात् - सारे अज्ञानीजन, अतिप्रसिध्द, साक्षात् अनुभवाला येणाऱ्या, आत्म्याला विसरुन देह वगैरेंना आत्मा समजून, धर्म आणि अधर्मयुक्त कर्मे आचरुन, देहरुप धारण केलेल्या आत्म्याला मारुन दुसऱ्या नव्या देहरुपी आत्म्याला धारण करतात. ज्याला नष्ट करुन पुनश्च नव्याला धारण करतात मग त्या दुसऱ्या देहरुपी आत्म्यालाही नष्ट करुन नव्या देहरुपी आत्मतत्वाला धारण करतात. अशा प्रकारे पुन:पुन्हा धारण करुन देहरुपी आत्म्यांना नष्ट करत रहातात. अशाप्रकारे सर्व अज्ञानीजन आत्म्याचे हनन करणारे आहेत पण वास्तवात जो देहाहून भिन्न असा आत्मा आहे तो ही अज्ञानामुळे सदैव नष्ट झाल्यासारखाच आहे कारण की त्या खऱ्या आत्म्याच्या अस्तित्वाचे जे फळ आहे ते काही अनुभवता येत नाही - फळ आहे प्रपंचाचा अभाव आणि अखंड आनंदाचा अनुभव. हे सारे अज्ञानीजन आत्मघातकी म्हणजे आत्मतत्वाची हिंसा करणारे आहेत पण जे वर निर्दिष्ट केलेले आत्मदर्शी पुरुष आहेत ते दोन्ही प्रकारे (देहाला आत्मा मानून आत्म्याचा नाश करणे आणि जे खरे आत्मतत्व आहे ते समजून न घेतल्यामुळे त्याचे ज्ञान प्राप्त करुन न घेतल्यामुळे त्याचा उपयोग न होणे) स्वत: आपली हिंसा करत नाही.

2) **तत: परां गतिं याति:** ज्यामुळेच म्हणजे वरील प्रकारे दोन प्रकारची हिंसा न करण्यातून श्रेष्ठ गतीला म्हणजे मोक्षाला पावतो. पिंड - ब्रह्मांडात एक ईश्वरच व्याप्त आहे असा अनुभव - अशी प्रतीती हाच मोक्ष होय. मोक्ष म्हणजे मुक्तता म्हणजे बंधनाचा अभाव. बंधन काल्पनिक वस्तु आहे, खऱ्या वस्तुचे दर्शन होताच बंधन खळाळून तुटते. अशाप्रकारे ईश्वराची ओळख झाल्यामुळे वरील दोन प्रकारच्या हिंसेने मुक्त होऊन ज्ञानी माणूस मोक्ष प्राप्त करतो.

: 29 :

***प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वश:।***
***य: पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कर्मणि:** सर्व कर्मे
- **सर्वश:** सर्व प्रकारे
- **प्रकृत्या एव च:** प्रकृतीनेच - निसर्गत:च
- **क्रियमाणानि:** केले जातात
- **य: पश्यति:** असे जो बघतो
- **तथा आत्मानं अकर्तारं:** आणि आत्म्याला अकर्ता समजतो
- **स: पश्यति:** तोच बघतो

**अर्थ**

आणि जो पुरुष सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीकडून केली जाणारी आहेत, असे पाहतो आणि आत्मा अकर्ता आहे, असे पाहतो, तोच खरे पाहतो.

***प्रकृतीच्या चि तंत्रानें कर्मे होतात सर्व हि।***
***आत्मा तो न करी कांही हें पाहे तो चि पाहतो॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) सारी कामे सर्व प्रकारे प्रकृतीनेच केली जातात, असे जो बघतो आणि 2)आत्म्याला अकर्ता समजतो. 3) तोच बघतो.

**स्पष्टीकरण**

1) **कर्माणि सर्वश: प्रकृत्या एव च क्रियमाणानि य: पश्यति:** सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीद्वारेच केली जात आहेत असे जो बघतो. शरीर, वाणी, मन आणि बुध्दीने जी जी म्हणून कर्मे केली जातात ती ती सर्व माया शक्तीद्वारेच केली जातात. जे काही 'मी करतो' असे त्या सर्वांशी आपण कर्तेपणाचा जो संबंध जोडतो, सारी कर्मे मी करतो असे जे आपण म्हणतो ते सारे अज्ञानाचे कार्य आहे, असे इथे भगवंत सांगताहेत. हाच मुद्दा पाचव्या अध्यायातल्या 8 व्या आणि 9 व्या श्लोकात आला आहे. त्या दोन श्लोकांमध्ये अनेक क्रियांचा उल्लेख आला आहे आणि मग असे सांगितले गेले आहे की या सर्व क्रिया

इंद्रिये करतात असा विवेक योगी करतो. दहाव्या श्लोकात म्हटले गेले आहे की तो योगी ब्रह्म म्हणजे ईश्वराला तमाम क्रिया अनासक्त भावाने अर्पण करतो यामुळे त्यावर कर्माचे लेपन होत नाही कर्मे आचरत असतानाही तो मुक्त असतो. अशाप्रकारे आपण आचरत असलेली सर्व कर्मे जो प्रकृती वा मायेची कार्ये मानतो, असे जो बघतो म्हणजे जीवन जगत असतो.

2) **तथा आत्मानं अकर्तारं (पश्यति):** तसेच आत्म्याला अकर्ता समजतो. अर्थात् एक असा विवेक राखायला हवा की जीवनातल्या सर्व क्रिया शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दीने म्हणजे प्रकृती वा मायेने संपन्न होतात. दुसरा विवेक हा राखायला हवा की आत्मा अकर्ता आहे म्हणजे तो शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दीच्या क्रियांचा कर्ता नाही. आपण केवळ ज्ञाते आहोत - कर्ते वा भोक्ते नाहीत. शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दीने ज्या काही क्रिया घडतात त्या सर्वांचे आपल्याला ज्ञान होत रहाते. मनात उठणाऱ्या विकारांचे ज्ञान होते. मन निर्विकार बनले तर त्याचेही ज्ञान होते. आपण नित्य ज्ञातेच असतो. ज्ञातेपणाच्या भूमिकेवरुन कधीही टळत - हटत नाही. इथे असे सांगितले गेले आहे की स्वत:ला अकर्ता मानून मनात विवेक जागवत जीवनातल्या सर्व क्रिया करायच्या आहेत.

3) **सः पश्यति:** (जो असे करतो) तो पुरुष बघतो म्हणजे तो पुरुष खऱ्या अर्थाने जीवन जगतो. पुरुष शरीर, इंद्रिये, मन आणि बुध्दी यांच्या संघाताने होणाऱ्या तमाम क्रियांच्या बाबतीत स्वत:ला कर्ता न मानता प्रकृती म्हणजे ईश्वरी मायेला कर्ता मानून जगतो तोच खरोखर जगतो, स्वाधीन बनून जगतो. अज्ञानी लोक मरत नाहीत म्हणून जगतात, (जगल्यासारखे वाटतात) कारण की ते स्वाधीन नसतात. अज्ञानी जीव मनाच्या स्वाधीन असतात पण जे मनाच्या अधीन न होता म्हणजे स्वत:ला कर्ता न मानून ज्ञाता म्हणून जगतात तेच खऱ्या अर्थाने जगतात. तेच संसार सागर - भवसागर पार करतात आणि मोक्ष पावतात.

: 30 :

*यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।*
*तत् एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदा भूतपृथग्भावम्:** ज्यावेळी भूतमात्रांची विविधता, वेगवेगळे भाव - भिन्नता म्हणजे वेगवेगळे प्राणी
- **एकस्थं अनुपश्यति:** एका परमात्म्यातच स्थित बघतो
- **च ततः एवः** आणि त्या एका ईश्वरानेच
- **विस्तारं पश्यति:** भूतमात्रांचा विस्तार बघतो
- **तदा ब्रह्म संपद्यते:** तेव्हा साधक ब्रह्मतत्वाला प्राप्त करुन घेतो

**अर्थ**

ज्या क्षणी हा पुरुष भूतांचे निरनिराळे भाव एका परमात्म्याच्या ठायीच असलेले आणि त्या परमात्म्यापासूनच सर्व भूतांचा विस्तार आहे असे पाहतो, त्याच क्षणी तो सच्चिदानंदघन ब्रह्माला प्राप्त होतो.

*एकत्वीं जोडिलें पाहे भूतांचें वेगळेपण ।*
*त्यामधूनि चि विस्तार तेव्हां ब्रह्मत्व लाभलें ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) सर्व भूतमात्रांची भिन्नता एका ईश्वरात स्थित आहे, असे दिसते आणि 2) त्यापासूनच भूतांचा विस्तार झालाय असे दिसते. 3) तेव्हा साधक ब्रह्मत्वाला प्राप्त करतो.

**स्पष्टीकरण**

1) **यदा भूतपृथग्भावं एकस्थं अनुपश्यति:** ज्यावेळी साधक भूतांची भिन्नता एकाच ईश्वरात स्थित असलेली बघतो. मागील श्लोकात आत्मदर्शनाची चर्चा आली. या श्लोकात परमात्मदर्शनाची चर्चा आली आहे. आत्मदर्शन म्हणजे आत्म्याला देहाहून भिन्न मानणे. हा अनुभव आला म्हणजे असत् कर्म हातून घडणार नाही. नित्य सत्कर्मेच होतील. आत्मदर्शनाची ही भूमिका सांख्य आणि जैन तत्वज्ञानातही आहे. या श्लोकात आत्मदर्शनाच्या पुढील परमात्मर्शनाची भूमिका वर्णिली आहे.

विनोबाजी म्हणतात की आत्मदर्शन म्हणजे पदार्थाला चाखणे होय. लाडूची चव बघायला फक्त चाखून बघणे पुरेसे आहे पण तेवढ्याने पोट काही भरत नाही. पोट भरण्यासाठी संपूर्ण भोजन घ्यावे लागते. परमात्म दर्शन म्हणजे पोटभर भोजन होय. वेदान्तात आत्मदर्शन आणि परमात्मदर्शन या दोन भूमिका आहेत. सांख्य आणि जैन तत्वज्ञानात केवळ आत्मदर्शनाचीच भूमिका आहे. ते ईश्वराला मानत नाहीत. सांख्यांचे मत आहे की संपूर्ण जगत जड प्रकृतीने बनले आहे. संपूर्ण जगत जीव आणि पुद्गल परमाणुंनी भरलेले असल्याचे जैन मानतात. वेदान्ताच्या अनुसार सारे जग ईश्वरानेच बनले आहे. जगत जड दिसत असले तरी खरे पाहू जाता ते चैतन्यशाली ईश्वराचा भास आहे अशी वेदान्ताची मान्यता आहे. या सिध्दांतानुसार भगवंत पहिली गोष्ट अशी सांगताहेत की जगात जेवढे म्हणुन प्राणी दिसतात ते ईश्वराच्या ठायी स्थित आहेत, ते सारे ईश्वराच्या आधारेच आहेत असे तो बघतो आणि त्यानुसार जीवन घालवतो. चैतन्यशाली ईश्वरामुळे जसा जड पदार्थांचा भास होतो तसाच त्यामुळे जीवाचा भासही उत्पन्न होतो. अशा प्रकारे जड - चेतन सारे पदार्थ ईश्वरापासूनच उत्पन्न होतात आणि ईश्वराच्या आधारानेच उभे ठाकतात. प्रलयकाळी हे सर्व पदार्थ ईश्वराच्या ठायीच लीन होतात, असे तो बघतो ही पहिली गोष्ट भगवंताने सांगितलीय.

2) **ततः एव विस्तारं पश्यति:** भूतमात्राचा विस्तार म्हणजे भिन्न - भिन्न अगणित उत्पन्न झालेले सर्व प्राणी हे ईश्वरापासूनच उत्पन्न झाले असे जे मानतात. याचे विवेचन वर झाले आहे. त्याच ईश्वरापासून सारे प्राणी उत्पन्न होतात. ब्रह्मांडाचा हा जो विस्तार दिसतो तो त्या ईश्वराचाच विस्तार आहे. ज्याप्रमाणे बीजाचा वृक्ष बनतो आणि सूतापासून वस्त्र त्याप्रमाणे चैतन्यस्वरुपी आणि प्रकृती या मायासंपन्न ईश्वरानेच संपूर्ण विश्व उत्पन्न झाले आहे. कोळी जसा आपल्या पोटातून तंतू काढून घर बनवतो - जाळे विणतो - पृथ्वीतून वृक्ष उत्पन्न होतात, मानवी शरीरातून जशी नखे आणि केस उत्पन्न होतात, तसेच ईश्वरी शक्तीने -त्याच्या संकल्पमात्रेणच संपूर्ण ब्रह्मांड उत्पन्न झाले आहे. जो पुरुष असे पाहतो म्हणजे जाणून घेतो आणि तदनुसार आचरण करतो तो परमात्म दृष्टीनेच सारे व्यवहार करतो.

3) **तदा ब्रह्म संपद्यते:** त्यावेळेला तो ब्रह्म असतो म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेतो. ज्यावेळेला संपूर्ण व्यवहार ईश्वर दृष्टीनेच केला जातो त्यावेळेला त्याला ज्ञानवंताची स्थिती असे म्हणतात. आपला संपूर्ण व्यवहार भेद दृष्टीवर आधारित असतो - तसा चालतो. अज्ञानी अवस्था असली की भेद दृष्टीचाच व्यवहार चालेल. ज्ञानवस्था आली की अभेदावस्थेचा व्यवहार जारी होतो. ज्ञानावस्था प्राप्त झाल्यावर ही स्थिती आमरण कायम राहिल्यामुळे ज्ञानी पुरुषाचे समस्त व्यवहार अभेद दृष्टीने - अद्वैत दृष्टीने चालतात आणि त्यातून अखेरीस त्याना मोक्ष प्राप्त होतो.

: 31 :

*अनादित्वान्निर्गुणत्वात् परमात्मायमव्ययः ।*
*शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयं परमात्मा:** हा ईश्वर
- **अनादित्वात्:** अनादी असल्यामुळे
- **निर्गुणत्वात्:** निर्गुण म्हणजे गुणातीत असल्यामुळे
- **अव्यय:** अव्यय म्हणजे अविनाशी आहे
- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **शरीरस्थ: अपि:** शरीरात स्थित असूनसुध्दा
- **न करोति न लिप्यते:** परमात्मा ना काही करत ना लिप्त होत

**अर्थ**

हे अर्जुना, हा अविनाशी परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे शरीरात रहात असूनही वास्तविक तो काही करीत नाही आणि लिप्तही होत नाही.

*परमात्मा न वेंचे चि कीं निर्गुण अनादि हा ।*
*राहे देहीं परी कांही न करी न मळे चि तो ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे अव्यय आहे. 2) हे अर्जुना, शरीरात स्थित असलेला हा परमात्मा ना काही करत ना लिप्त होत.

### स्पष्टीकरण

1) **अयं परमात्मा अनादित्वात् निर्गुणत्वात् अव्ययः** हा ईश्वर अनादी आणि निर्गुण असल्यामुळे अव्यय आहे. सर्व पदार्थ क्षीण होतात कारण ते निर्माण होतात. पदार्थांच्या ठायी सहा प्रकारचे विकार असतात - जायते, अस्ति, विपरिणमते, वर्धते, अपक्षीयते, नश्यति । जायते म्हणजे उत्पन्न होते. अस्ति म्हणजे पदार्थांचे अस्तित्वात असणे. विपरिणमते म्हणजे पदार्थांच्या ठायी परिर्वतन होणे, वर्धते म्हणजे पदार्थांत वृध्दी होणे. अपक्षीयते म्हणजे नंतर क्षीण होणे. नश्यति म्हणजे अखेरीस नष्ट होणे पण उत्पन्न होत नसल्यामुहे ईश्वर हा अनादी आहे यामुळे अव्यय आहे.

ईश्वर निर्गुण आहे म्हणजे जो गुण पदार्थांच्या ठायी दिसून येतो तो ईश्वरात नसतो कारण की इंद्रियांनी ओळखल्या जाणाऱ्या पदार्थांमध्येच गुण वसतात. ईश्वर इंद्रियांनी जाणून घ्यायचा विषय नाही. आपल्या अनुभवाला येणाऱ्या गुणांची ईश्वराठायी कल्पना नाही करता येत. आपण ज्यांना जाणू शकत नाही असे अलौकिक गुणच ईश्वराठायी असू शकतात. ईश्वराच्या ठायी अलौकिक शक्ती आहे कारण की हे जग त्यानेच उत्पन्न केले आहे पण निर्गुणाचा अर्थ असा आहे की आपल्याला ज्या इंद्रियजन्य गुणांचा अनुभव येतो ते त्याच्या ठायी नसतात.

2) **शरीरस्थः** अपि न करोति न लिप्यते ईश्वर शरीरात स्थित आहे तरीही काही करत नाही आणि कुठे लिप्तही होत नाही. त्याला कर्मफळ चिकटत नाही. शरीरात प्रकट असल्यामुळे ईश्वराला शरीरस्थ असे म्हटले जाते. सृष्टीतल्या सर्व जड पदार्थांमध्ये ईश्वर व्याप्त असूनही दिसून येत नाही पण पशु, पक्षी, मानव वगैरे अगणित जीव - शरीरात ज्ञानस्वरुपाने ईश्वर दिसून येतो तरीही तो अकर्ता आणि अभोक्ता आहे. ईश्वर शरीरात केवळ ज्ञात्याच्या रुपातच स्थित आहे. जे जीव आहेत ते सारे ईश्वराहून कुठल्याही प्रकारे वेगळे नसतानाही कल्पनेने वेगळे बनून कर्माचे कर्ते बनतात. यामुळे ते कर्म फळाचे भोक्तेही बनून जातात. ईश्वराप्रमाणे आपण ज्ञाता बनून नाही राहू शकत. 'आपण कर्माचे कर्ते आहोत' ही कल्पना मनात जागतच असते. आपण देहालाच आपले स्वरुप समजून जगतो. यामुळे देह, मन, इंद्रिये यांच्या कर्माचे कर्ते बनतो. यामुळेच आपल्याला कर्मफळही भोगावे लागते पण ईश्वर हा कर्माचा कर्ता नसल्यामुळे कर्माने लिप्तही होत नाही.

: 32 :

***यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते।***
***सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **यथा सर्वगतं आकाशंः** जसे आकाश सर्वत्र व्याप्त असूनही
- **सौक्ष्म्यात्ः** अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे
- **न उपलिप्यतेः** लिप्त होत नाही
- **तथा देहे सर्वत्रः** तसेच देहात सर्वत्र
- **अवस्थितः आत्माः** व्याप्त म्हणजे भरुन राहिलेला आत्मा (परमात्मा).
- **न उपलिप्यतेः** लिप्त होत नाही

### अर्थ

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्याकारणाने लिप्त होत नाही त्याचप्रमाणे देहात सर्वत्र व्यापून असलेला आत्मानिर्गुण असल्यामुळे देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही.

***सर्व व्यापूनि आकाश सूक्ष्मत्वें न मळे जसें।***
***सर्वत्र भरला देहीं आत्मा तो न मळे तसा॥***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1)ज्याप्रमाणे सर्वत्र पसरलेले आकाश अतिसूक्ष्म असल्यामुळे कुठल्याही वस्तुने लिप्त होत नाही. 2) तसेच देहात व्याप्त आत्मा (परमात्मा) कशानेच लिप्त होत नाही.

परमात्मा देहात कशाप्रकारे व्याप्त आहे हे समजून घेण्यासाठी या श्लोकात आकाशाची उपमा दिली गेली आहे.

### स्पष्टीकरण

1) **यथा सर्वगतं आकाशं सौक्ष्म्यात् न उपलिप्यतेः** जसे सर्वत्र पसरलेले आकाश अतिसूक्ष्म असल्यामुळे

कुठल्याही वस्तुने लिप्त होत नाही. आकाशाची दोन वैशिष्ट्ये आहेत. एक तर आकाश अत्यंत व्यापक आहे आणि दुसरे ते अतिसूक्ष्म आहे. इतका सूक्ष्म पदार्थ जगात दुसरा नाही.

यावरच ब्रह्मसूत्र शांकरभाष्यात प्रश्न उपस्थित केला गेला आहे की ज्याप्रमाणे व्यापक आणि सूक्ष्म असल्यामुळे ईश्वर उत्पन्न होत नाही असे मानले जाते तसेच आकाशही सूक्ष्म आणि व्यापक आहे म्हणून तेही उत्पन्न होत नाही असे का मानले जाऊ नये? याचे शंकराचार्यांनी असे उत्तर दिले आहे की आकाश अन्य सर्व पदार्थांहून भिन्न - वेगळे आहे. सारे पदार्थ एकमेकांपासून भिन्न दिसून येतात यामुळे ते मर्यादित ठरतात. वाटेल तेवढा व्यापक का पदार्थ असेना जोवर तो दुसऱ्या पदार्थापासून वेगळा रहातो तोवर तो मर्यादितच मानला जाईल. उदाहरणार्थ हवा व्यापक आहे, सूर्य, चंद्र, पृथ्वी वगैरेही खूप व्यापक आहेत, तरीही एक दुसऱ्यापासून वेगळे असल्यामुळेच ते उत्पन्न झाले आहेत. एकमेकाहून वेगळा असेल आणि तरी उत्पन्न झाला नसेल असा पदार्थ नाही. हाच नियम आकाशालाही लागू पडतो. यामुळे अत्यंत व्यापक आणि अत्यंत सूक्ष्म असूनही आकाश उत्पन्न झाले आहे, असे सिध्द होते.

इथेच मग प्रश्न उपस्थित केला गेला आहे की आत्माही सर्व पदार्थांपेक्षा भिन्न आहे यामुळे तोही उत्पन्न झाला आहे. असे मानावे लागेल. याचे आचार्यांनी उत्तर दिले आहे की सर्व पदार्थांप्रमाणे आत्माही उत्पन्न झाला आहे असे मानले तर सर्व पदार्थ निराधार सिध्द होतील. सर्व पदार्थ कुणातरी मूळ कारणाने उत्पन्न झाले आहेत असे मानावे लागेल. मूळ कारण उत्पन्न झाले आहे, असे मानावे लागेल पण मूळ कारण उत्पन्न होते असे नाही मानू शकत. मूळ कारणाला जर उत्पन्न होणारे मानले तर सर्व पदार्थ कशापासून उत्पन्न झाले ? हे नाही सांगता येणार. कुठल्या तरी वस्तुपासून निर्माण झाले आहेत असे तर मानावेच लागणार. हे सारे पदार्थ ज्यापासून उत्पन्न झालेत त्यालाच 'मूळ कारण' म्हणतात आणि ते मूळ कारण आकाश वगैरे पदार्थात व्याप्त आहे, असे मानावे लागते. आकाश वाटेल तेवढे व्यापक आणि सूक्ष्म असो पण ते इतर पदार्थांना जाणत नाही. आकाशाला कुठल्याही पदार्थांचे ज्ञान नसते पण आपण आकाशाला जाणतो म्हणजे तो कुणाच्या जाणून घेण्याचा विषय आहे. जसे इतर सारे पदार्थ जाणून घेतले जातात तसेच आकाशही जाणले जाते. यामुळे आकाश अन्य सर्व पदार्थांप्रमाणे उत्पन्न झालेला पदार्थ आहे, हे सिध्द आहे. केवळ आत्मा म्हणजे परमात्माच ज्ञान कोटीत आहे. ज्ञाता आणि ज्ञेय हे दोनच वर्ग आहेत. ज्ञाता एकमात्र 'परमात्मा' आहे. ज्ञेय पदार्थ अनंत आहेत. ज्ञाता अनुत्पन्न आहे. निर्माण होणारे पदार्थ अनित्य असतात. अशाप्रकारे आकाश उत्पन्न होण्यायोग्य पदार्थ असूनही अत्यंत व्यापक आणि अतिसूक्ष्म असल्यामुळे परमात्म्याची अलिप्तता दर्शवण्यासाठी त्याचे उदाहरण दिले गेले आहे.

2) **तथा देहे सर्वत्र अवस्थित: आत्मा न उपलिप्यते:** आकाशाप्रमाणे देहाच्या अणु-अणुत व्याप्त आत्मा कशानेच लिप्त होत नाही. देहाच्या अणु-अणुत व्याप्त ईश्वरामुळेच जीवंत देहाचे अस्तित्व टिकले आहे. परमात्मा ज्या देहापासून स्वत:ला हटवून घेतो वा गुप्त करुन टाकतो त्या देहात चैतन्य न उरल्यामुळे त्याला दहन करुन टाकावे लागते. जोवर परमात्मा स्वत:ला देहात प्रकट राखतो तोवर देहाला किती जपावे लागेल? किती सांभाळ करावा लागतो? देहातून चैतन्याचे निघून जाताच किंमत शून्य होऊन जाते. अशा देहात परमात्मा आकाशासारखा अणु - अणुत व्यात असून आकाशारखा अलिप्त आहे. तो देहधर्मानी लिप्त होत नाही. आपण देहात रहातो पण देहाशी ममतेचा संबंध राखतो यामुळे देहधर्माने लिप्त होऊन जातो. आपल्यावर देहाचा परिणाम होत रहातो पण ईश्वर अलिप्त असतो यामुळे त्यावर देहधर्माचा परिणाम होत नाही. ईश्वरानेच देह निर्माण केला आहे यामुळे देहाशी ईश्वराचा संबंध ममतेचा असायला हवा. आपण तर देहालाही उत्पन्न केले नाही परिणामी आपला देहाशी ममतेचा संबंध उरायला नको पण दिसते उलटेच. ज्या ईश्वराने देह वगैरे संघात उत्पन्न केला आहे. त्याच्या ठायी वसून त्याला सजीव ठेवले आहे, रात्र-दिवस जागृत राहून देहाच्या साऱ्या क्रिया सुयोग्य रुपाने चालवत असतो, तो त्या देहाचा यत्किंचितही अभिमान बाळगत नाही आणि आपण मात्र अभिमान बाळगतो, ही केवढी विचित्र गोष्ट आहे.

: 33 :

*यथा प्रकाशयत्येक: कृत्स्नं लोकमिमं रवि: ।*
*क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **यथा एक:** रवि: जसा एकच सूर्य
- **इमं कृत्स्नं लोकं:** या संपूर्ण सृष्टीला म्हणजे ब्रह्मांडाला
- **प्रकाशयति:** प्रकाशित करतो
- **तथा क्षेत्री:** तसेच क्षेत्री म्हणजे आत्मा
- **कृत्स्नं क्षेत्रं प्रकाशयति:** संपूर्ण क्षेत्राला (शरीर वगैरे सर्व पिंडात्मक संघाला) प्रकाशित करतो

**अर्थ**

हे अर्जुना, ज्याप्रमाणे एकच सूर्य या संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे एकच आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो.

*एकला चि जसा सूर्य उजळी भुवन - त्रय ।*
*तसा क्षेत्रज्ञ तो क्षेत्र संपूर्ण उजळीतसे ॥*

**विषय:** या श्लोकात दोन विषयांची चर्चा आली आहे. 1) ज्याप्रमाणे एक सूर्य या सृष्टीला प्रकाशित करतो तसेच 2) क्षेत्री म्हणजे आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करत असतो.

**स्पष्टीकरण**

1) यथा एक: रवि: इमं कृतस्नं लोकं प्रकाशयति: ज्याप्रमाणे एकटा सूर्य या समस्त सृष्टीला प्रकाशमान करतो. परमात्मा कशा प्रकारे शरीर वगैरे संघाताला कशा प्रकारे प्रकाशित करतो हे समजाऊन सांगण्यासाठी इथे सूर्याचे उदाहरण दिले आहे. ब्रह्मसूत्र - शांकरभाष्यात (अध्याय 3 पद 3 सूत्र 32) श्री शंकराचार्यांनी सूर्याची चर्चा पुढीलप्रमाणे केली आहे. ते म्हणतात -

यथा असौ भगवान् सविता सहस्त्रयुगपर्यंतं जगत: अधिकारं चरित्वा तदवसाने उदयास्तमयवर्जितं कैवल्यम् अनुभवति। अथ तत: ऊर्ध्वंम् उदेत्य न एव उदेता, न अस्तम्, एकल: एव मध्ये स्थाता ॥

अर्थात् 'ज्याप्रकारे हा भगवान सूर्य युगांपर्यत युगानुयुगे - जगाची सेवा सोपवून दिलेल्या जागेवर राहून करत असताना, सेवेची अवधी संपल्यावर उदय आणि अंत रहित कैवल्याचा अनुभव घेतो.' एका उपनिषदातल्या वचनाचा अर्थ असा आहे - सेवेचा काळ संपल्यावर वर म्हणजे ईश्वराशी एकरुप होऊन तो पुनश्च उदित होत नाही, त्याचा अस्तही होत नाही. तो एकटाच आपल्या स्वरुपी म्हणजे ईश्वराच्या ठायी स्थिर रहातो.

प्रलयकाळी सूर्य एकटा परमात्म्याशी एकरुप होतो, असे सांगून सूर्य ज्ञानी पुरुषासारखी महान विभूती असल्याचे उपनिषदाचे ऋषी सांगताहेत. प्रलयकाळानंतर भगवंताच्या इच्छेने सूर्य पुनरपि आपले कार्य सुरु करतो.

2) **तथा क्षेत्री कृत्स्नं क्षेत्रं प्रकाशयति:** तशाच प्रकारे म्हणजे सूर्यासारखे क्षेत्री म्हणजे आत्मा संपूर्ण क्षेत्राला म्हणजे शरीर वगैरे सर्व पिंडात्मक संघाताला प्रकाशित करतो. सूर्य आपल्या प्रकाशाने संपन्न आहे. प्रकाशच त्याचे स्वरुप आहे. यामुळे तो ब्रह्मांडाला प्रकाशमान करतो. तशाच प्रकारे परमात्मा ज्ञानस्वरुपी आहे, ज्ञानरुपी प्रकाशाने परमात्मा अखंड संपन्न आहे यामुळे क्षेत्राला म्हणजे शरीर वगैरे संघाताला प्रकाशित करतो म्हणजे शरीर वगैरे संघाताचे आपल्याला सदैव ज्ञान होत रहाते. अज्ञानाचेही आपल्याला ज्ञान होत रहाते.

: 34 :

*क्षेत्रक्षेत्रज्ञयोरैवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।*
*भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये एवं:** जो अशा प्रकारे
- **क्षेत्रक्षेत्रज्ञयो:** क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ दोघांच्या
- **अंतरं:** अंतराला म्हणजे भेदाला
- **च भूतप्रकृतिमोक्षं:** आणि पंचमहाभूतांच्या प्रकृतीने परमात्म्याच्या अलिप्तपणाला म्हणजे प्रकृती आणि तिच्या विकारांपासून सुटण्याच्या उपायाला

- **ज्ञानचक्षुषा विदुः** ज्ञान चक्षुंनी बघतो म्हणजे तत्त्वत: जाणतोा
- **ते परं यान्तिः** तो महात्मा परमात्म तत्वाला प्राप्त करुन घेतो

**अर्थ**

अशाप्रकारे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यातील भेद तसेच कार्यासह प्रकृतीपासून मुक्त होण्याचा मार्ग ज्ञानदृष्टीने जे पुरुष तत्त्वत: जाणतात ते महात्मे परम ब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात.

***पाहती ज्ञान - दृष्टीनें क्षेत्र - क्षेत्रज्ञ भेद हा।***
***भूत - प्रकृति लंघूनि ते ब्रह्म - पद पावती ॥***

विषय: या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) जो पुरुष अशा प्रकारे क्षेत्र म्हणजे शरीर आणि क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा - या दोघांच्या अंतराला 2) आणि पंचमहाभूतांच्या प्रकृतीने ईश्वराच्या अलिप्तपणाला 3) ज्ञानचक्षुंनी बघतात 4) ते महात्माजन ईश्वर तत्वाला प्राप्त करुन घेतात.

**स्पष्टीकरण -**

1) **ये एवं क्षेत्र क्षेत्रक्षेत्रज्ञयो: अंतरं ज्ञानचक्षुषा विदुः** अशाप्रकारे जो पुरुष क्षेत्र आणि क्षेत्रज्ञमधील अंतराला ज्ञानचक्षुने जाणतो. क्षेत्र म्हणजे शरीर आणि क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा दोघांमधल्या अंतराला महात्मे जाणतात. अज्ञान दशेत दोघांना एक मानून आम्हा सर्व लोकांचे व्यवहार सुरु आहेत. दोघांमधल्या भिन्नतेला पारखून केला जाणारा व्यवहार 'ज्ञानावस्था' मानला जातो. शरीर आणि आत्म्याच्या ठायी जी अतिशय भिन्नता आहे, तिला बुध्दीने आणि तर्कांने ग्रहण केले तर त्याचा अभ्यास - सराव होऊ शकतो आणि त्याचा अनुभवही घेता येऊ शकतो. ब्रह्मसूत्राच्या तिसऱ्या अध्यायातील तिसऱ्या पदाच्या 54 व्या सूत्रात शंकराचार्यांनी दोघांमधल्या अंतराला तर्काने चांगल्या प्रकारे समजाऊन सांगितले आहे. आचार्यांनी सांगितले आहे की प्रेताच्या ठायी देहाचे रुप वगैरे सर्व धर्म असतात पण आत्म्याचा चैतन्य धर्म दिसत नाही. यावरुन देह आणि आत्मा भिन्न असल्याचे सिध्द होते. त्याचप्रकारे आपल्याला देहाचे ज्ञान होते यावरुनही देह आणि आत्मा भिन्न असल्याचे सिध्द होते.

2) **च भूतप्रकृतिमोक्षं:** आणि पंचमहाभूतात्मक प्रकृतीने परमात्म्याच्या अलिप्तपणाला 'ज्ञानचक्षुषा विदु:' ज्ञाननेत्रांनी म्हणजे विवेकरुपी प्रकाशाने बघतो. देहापासून आत्म्याच्या भिन्नतेला बघणे हा झाला एक मुद्दा. याला आत्मदर्शन असे म्हणतात. त्याच्यासोबत दुसरा मुद्दा असा की बाह्य जगतात जे नाना पदार्थ आहेत ते माया शक्तीचे आविष्कार आहेत आणि तो सर्व भास असल्यामुळे म्हणजे खरी वस्तु नसल्यामुळे आणि ईश्वरच सत्य वस्तु असल्यामुळे ती ब्रह्मांडाच्या भासापासून अगदी अलिप्त आहे असे लक्षात येणे. जशी घटात माती असते. घट बघताच मातीचे दर्शन होते त्याच प्रकारे ज्ञानवंताला बाह्य ब्रह्मांडाचे वा सृष्टीचे दर्शन होताच ईश्वराचेच दर्शन होते. हेच परमात्म दर्शन होय. आत्मदर्शन आणि परमात्म दर्शन दोन्ही मिळून ज्ञानी पुरुषाची पूर्ण स्थिती आकाराला येते.

3) **ज्ञानचक्षुषा विदुः** ज्ञान चक्षुंनी म्हणजे विवेकरुपी प्रकाशाने जाणून घेतो म्हणजे बघतो. महात्मा म्हणजे ज्ञानवंत देहाहून आत्म्याला भिन्न मानतो - अनुभव घेतो आणि परमात्मा आपल्या मायेने संपूर्ण आणि पिंडाची रचना करुनही अलिप्त रहातो असे बघतो पण हे आत्मदर्शन आणि परमात्मदर्शन ज्ञानी पुरुषाला होते ते कशापासून होते? हा विषय भगवंत आता सांगताहेत. हे उभयविध दर्शन ज्ञानी पुरुषाला ज्ञानचक्षुंनी होते. देह आणि आत्मा स्वतंत्र न वाटणे आणि ब्रह्मांडातले समस्त पदार्थ परमात्मायुक्त न वाटणे हा अविवेकाचा भाग आहे पण जेव्हा भक्ती, वैराग्य वगैरे साधनांनी अविवेकरुपी अंध:कार घालवला जातो त्यावेळी विवेकरुपी प्रकाश पसरतो त्यालाच इथे ज्ञानचक्षु म्हटले आहे. 10 व्या अध्यायातील अकराव्या श्लोकात भगवंताने हीच गोष्ट सांगितली आहे की जे परमात्म्याला अनन्य भावनेने भजतात त्यांच्यावर करुणा करुन मी ज्ञानरुपी प्रकाशाने त्यांचा अज्ञानरुपी अंध:कार घालवतो. चर्मचक्षु सर्वांना असतात. भगवंताने अर्जुनाला दिव्यचक्षु प्रदान करुन विश्वरुप दर्शन करवले. ज्ञानी महात्म्यांना ईश्वर ज्ञानचक्षु प्रदान करतात.

4) **ते परं यान्तिः** ते महात्मे ज्ञानीजन ज्ञानचक्षुद्वारा परमात्म तत्वाला प्राप्त करुन घेतात. आकाशात अनंत

तारे असतात पण ते सारे काही डोळ्यांना दिसत नाहीत पण दुर्बिणीच्या मदतीने दिसू शकतात. तशाच प्रकारे ज्ञानीजनांना ज्ञानचक्षुमुळे परमात्मा वस्तु प्राप्त होते. परमात्म वस्तुत काहीही फरक नाही. ती वस्तु ज्ञानी व अज्ञानी दोघांच्याही जवळच आहे पण दिसणे आणि न दिसणे हा फरक ज्ञान आणि अज्ञानामुळे आहे.

● ● ● *अध्याय तेरावा संपूर्ण* ● ● ●



## अध्याय - चौदावा

# गुणत्रयविभागयोग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

*परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्।*
*यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिध्दिमितो गताः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भूयः** पुनश्च
- **ज्ञानानां उत्तमं परं ज्ञानंः** सर्व ज्ञान्यांमध्ये उत्तम व श्रेष्ठ ज्ञान
- **प्रवक्ष्यामिः** मी तुला सांगत आहे
- **यत् ज्ञात्वाः** ज्याला जाणून
- **सर्वे मुनयः** सर्व मुनी
- **इतः** शरीर त्यागानंतर म्हणजे या देहातून मुक्त झाल्यानंतर
- **परां सिध्दिं गताः** परम सिध्दीला प्राप्त झाले आहेत

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले की ज्ञानातीलही अति उत्तम ते परम ज्ञान मी तुला पुन्हा सांगतो की जे जाणल्याने सर्व मुनी जन या संसारातून मुक्त होऊन परम सिध्दी पावले आहेत.

**श्री भगवान म्हणाले**

***सर्व ज्ञानांमधें थोर ज्ञान तें सांगतों पुन्हां ।***
***जें जाणूनि इथें मोक्ष पावले सगळे मुनि ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) सर्व ज्ञानांमध्ये उत्तम आणि श्रेष्ठ ज्ञान तुला पुनश्च सांगत आहे. 2) हे ज्ञान जाणून सारे मुनी जन वा सिध्द जन देह त्यागल्यावर श्रेष्ठ सिध्दीला प्राप्त झाले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **भूयः ज्ञानानां उत्तमं परं ज्ञानं प्रवक्ष्यामिः** सर्व ज्ञानांमध्ये उत्तम आणि श्रेष्ठ ज्ञान मी पुनश्च सांगत आहे. 'सर्व ज्ञानांमध्ये' असा अनेकवचनी शब्द वापरला आहे. 7 व्या अध्यायातल्या दुसऱ्या श्लोकात असे सांगितले की 'मी विज्ञानासोबत तुला ज्ञान सांगत आहे. 'इथे ज्ञानानां उत्तमं ज्ञानं असे म्हटले आहे. सातव्या अध्यायातल्या दुसऱ्या श्लोकात आलेल्या 'विज्ञान' या शब्दाचे दोन अर्थ आहेत. 1) अनुभवासोबत ज्ञान आणि 2) विविध प्रकारचे ज्ञान. अर्थात् एका परमात्म्यापासून ही विविध सृष्टी कशाप्रकारे उत्पन्न झाली हे जाणून घेणे विज्ञान होय. पिंड -ब्रह्मांडात एकच परमात्मा कशा प्रकारे व्याप्त आहे, हे जाणून घेणे ज्ञान होय. एका परमात्म्यापासून विविध प्रकारची सृष्टी कशी उत्पन्न झाली या जाणण्यात सृष्टीतले विविध प्रकारचे ज्ञान आणि अनुभव येऊन जाते. यामुळे सर्व ज्ञानांमध्ये म्हणजे सृष्टीत जेवढे काही जाणून घेण्यायोग्य झाले आहे, त्या सर्वांमध्ये परमात्म ज्ञान उत्तम आहे, म्हणून ते श्रेष्ठ आहे कारण की ते जाणून घेतल्यावर माणसाला खरी व शाश्वत शांतता लाभते. परमात्म ज्ञानातूनच दु:ख मुक्तीचा अनुभव येतो. बाकी सारे ज्ञान बाह्य उत्कर्षाच्या उपयोगाला येतात. ज्या ज्ञानांमुळे कीर्ती आणि ऐहिक सुखलाभही होतो पण त्याद्वारे प्रापंचिक दु:खमुक्तीचा अनुभव लाभणे शक्य नाही. एक अशिक्षित माणूस प्रापंचिक आहे, दुसरा विद्वानही प्रापंचिक आहे. दोघांना प्रापंचिक आसक्ती समान आहे पण अशिक्षिताच्या ठायी जर ईश्वर विषयक भक्ती उपजली आणि त्यामुळे त्याची जर पत्नी -मुलांबाळांबद्दलची मोह - ममता क्षीण झाली तर तो प्रापंचिक दु:खांपासून मुक्त होऊ शकतो पण विद्वान माणूस जरी नाना भाषा आणि विविध विषयांचा जाणकार असला तरी जर ईश्वर भक्ती आणि वैराग्य उपजले नाही तर तो प्रापंचिक दु:खांपासून मुक्त होऊ शकत नाही. यासाठी सर्व पिंड-ब्रह्मांडात व्याप्त ईश्वराचे ज्ञान विश्वातल्या सर्व प्रकारच्या ज्ञानांमध्ये अति उत्तम आणि अति श्रेष्ठ आहे, हे नि:संदेह सांगता येईल.

इथे हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की 'मी पुनश्च सांगत आहे.' असे भगवंत का म्हणतात? या अध्यायात सांगितलेले परमात्म ज्ञान अन्यत्र सांगितलेल्या परमात्म - ज्ञानापेक्षा वेगळे तर नाही पण अन्य अध्यायांमध्ये सत्व, रज, तम या गुणांची विशेष चर्चा नाही. यांचे विश्लेषण करुन सत्वगुणाचा उत्कर्ष झाल्यामुळे ज्ञान म्हणजे गुणातीत अवस्था प्राप्त हे सुध्दा स्पष्टपणे सांगितलेले नाही. या अध्यायात हा मुद्दा सविस्तरपणे सांगितला गेला आहे.

2) **यत् ज्ञात्वा सर्वे मुनयः इतः परां सिध्दिं गताः** ज्या ज्ञानाला जाणून घेतल्यावर सर्व मुनीजन देहत्यागानंतर परम सिध्दीला प्राप्त झाले आहेत. सत्वगुणाच्या उत्कर्षामुळे ज्ञान म्हणजे गुणातीत अवस्था प्राप्त होते. म्हणजे या ज्ञानाचे फलित काय ? ते सांगितले गेले आहे. आधीच्या आणि तेराव्या अध्यायात ते ज्ञान सांगितले गेले - जे परमात्म ज्ञान सांगितले गेले तेच ज्ञान म्हणजे 'त्रिगुणातीत अवस्था' या अध्यायात सांगताहेत. यामुळे गुणातीत पुरुषालाही ज्ञानाचे मोक्ष हे फळ प्राप्त होते. इथे गुणातीत पुरुषासाठी 'मुनी' या शब्दाचा प्रयोग करण्यात आला आहे. दुसऱ्या अध्यायातील 56 व्या श्लोकात 'स्थितप्रज्ञ' लक्षणे सांगताना स्थितधीः मुनिः उच्यते असे आले आहे. 5 व्या अध्यायातल्या 28 व्या श्लोकात 'मुनी' शब्द आहे. 6 व्या अध्यायातल्या तिसऱ्या श्लोकातही 'मुनी' शब्द आहे. अशा प्रकारे हे लक्षात येते की जुन्या काळापासून पुरुषासाठी मुनी शब्दाचा प्रयोग करायची परिपाटी होती.

ज्ञान खरे म्हणजे प्राप्त करुन घ्यायचा विषय नाही, ज्ञान तर आधीपासूनच प्राप्त आहे. आत्मा अज्ञानस्वरुपी नसून नित्यज्ञानस्वरुपी आहे आणि आपण आत्माच आहोत. यामुळे सर्व जीव खरे पाहू गेल्यास ज्ञानस्वरुपीच आहेत. 'मी शरीर आहे.' या चुकीच्या कल्पनेमुळे अज्ञानाचा अनुभव येतो. चुकीची कल्पना दूर होताच ज्ञानाचा अनुभव येतो - ज्ञान अनुभवायला मिळते. चुकीची कल्पना दूर

करण्यासाठीच संपूर्ण साधना आहे. देह असतानाच ब्राह्मी स्थितीचा अनुभव येतो. ब्राह्मी स्थिती म्हणजे ज्ञान स्थिती होय पण दुसऱ्या अध्यायातल्या 72 व्या श्लोकात ब्राह्मी स्थितीनंतर 'ब्रह्म निर्वाण' हा उल्लेख आला आहे. ब्रह्म निर्वाण म्हणजे मोक्ष. तो तर शरीर त्यागानंतर मिळतो. हीच गोष्ट इथे 'इत:' शब्दाने सांगितली गेली आहे. इत: म्हणजे हा देह सुटल्यावर. 'परम सिध्दी' म्हणजे मोक्षाला प्राप्त करतो. सिध्दी शब्द मोक्षाच्या अर्थाने आला आहे. 7 व्या अध्यायातल्या तिसऱ्या श्लोकातही सिध्दी शब्द मोक्षाच्या अर्थाने आला आहे. इथे सिध्दी शब्दासोबत परां शब्द जोडला आहे. 'परां सिध्दि' म्हणजे परम अर्थात् श्रेष्ठ सिध्दी. मोक्ष अंतिम स्थिती आहे यामुळे ती श्रेष्ठ आहे. आतापर्यंत अनेक ज्ञानी होऊन गेले यामुळे 'सर्वे मुनय:' असे म्हटले. ज्ञानीमुनी देह त्यागानंतर मुक्त होऊन जातात. मुनी म्हणजे मनशील. ज्ञानी अखंडपणे चितनशील असतो. यामुळे ज्ञानवंताला मुनी म्हटले गेले आहे.

: 2 :

***इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागता: ।***
***सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इदं ज्ञानम्:** या ज्ञानाचा
- **उपाश्रित्य:** आश्रय घेऊन
- **मम साधर्म्यम्:** माझ्या साधर्म्याला
- **आगता:** प्राप्त ज्ञानी पुरुष
- **सर्गे अपि:** सृष्टीच्या परत उत्पन्न होण्याच्या वेळी सुध्दा
- **न उपजायन्ते:** उत्पन्न होत नाहीत
- **च प्रलये न व्यथंति:** प्रलय काळात दु:खी होत नाहीत

**अर्थ**

हे ज्ञान धारण करुन माझ्या स्वरुपाला प्राप्त झालेले पुरुष सृष्टीच्या आरंभी पुन्हा जन्माला येत नाहीत आणि प्रलयकाळीही व्याकुळ होत नाही.

***ह्या ज्ञानाच्या बळानें ते झाले माझ्या चि सारखे ।***
***जगें येवोत जावोत ते अभंग जसे तसे ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टीची चर्चा आली आहे. 1) या ज्ञानाचा आश्रय घेऊन माझ्या साधर्म्याला प्राप्त झालेले ज्ञानी पुरुष. 2) सृष्टीच्या पुनश्च निर्माण होण्याच्या काळातही परत जन्माला येत नाहीत आणि प्रलयकाळी दु:खी होत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **इदं ज्ञानं उपाश्रित्य मम साधर्म्यम् आगता:** या ज्ञानाचा आश्रय घेऊन माझ्या साधर्म्याला प्राप्त होतात म्हणजे हे ज्ञानी पुरुष माझ्या सोबत एकरुपतेला प्राप्त होतात. साधर्म्य शब्दाचे दोन अर्थ आहेत. परमात्म ज्ञान प्राप्त झाल्यावर ज्ञानावस्थेत ईश्वराशी एकरुप झाल्यामुळे जीवात्म्याचा ईश्वराच्या ठायी संपूर्णपणे लय होऊन जातो किंवा मग ईश्वराशी एकरुपतेचा अनुभव घेत स्वतंत्र अस्तित्व टिकून रहाते. नदी जेव्हा सागराला जाऊन मिळते तेव्हा तिचे सागराहून वेगळे अस्तित्व उरत नाही. तशाच प्रकारे जीवात्मा अज्ञानावस्थेत ईश्वरापासून स्वत:ला वेगळा - भिन्न समजून प्रपंचात आसक्त जीवन जगतो पण अज्ञानावस्थेतून बाहेर पडल्यावर जेव्हा जीवाला ज्ञानावस्था प्राप्त होऊन जाते तेव्हा त्याचे अस्तित्व परमात्म्याहून भिन्न वा वेगळे उरत नाही. ज्ञानावस्थेत जीवाला परमात्म्याहून वेगळा रहात नाही, हा सिध्दांत वेदान्ताने ठरवला आहे.

इथे आणखी एक प्रश्न उद्भवू शकतो की ज्ञानी पुरुषांनी पुन्हा जन्म घेतल्याची उदाहरणे उपनिषदात आढळतात. त्यांची नावेही दिली आहेत. याचा अर्थ असा की ईश्वराशी एकरुप झाल्यावरही ज्ञानवंतांचे स्वतंत्र अस्तित्व असते. याचे उत्तर असे की अकर्ता असल्यामुळे ईश्वर देह धारण करतो असे म्हणणे योग्य नाही पण परमात्मा वेळोवेळी अवतार ग्रहण करतो मग दोघांची संगती कशी लावायची? याचे समाधान करताना हे खात्रीपूर्वक सांगितले गेले आहे की भगवान ज्ञानी पुरुषांना या जगात आपले कार्य करण्यासाठी पाठवून देतो. ज्ञानवंताचे आपले स्वत:चे असे काही कार्य असत नाही कारण की अज्ञानावस्थेत तर अभिमान असल्यामुळे स्वतंत्र रुपाने जीवन प्रपंचासाक्त रहाते पण ज्ञान प्राप्त झाल्यावर अभिमान उरत नाही त्यामुळे स्वतंत्र अस्तित्व आणि स्वतंत्र कार्य नसतानाही

ईश्वरी आज्ञापालनाचे कार्य शेष उरते. परमात्म्याच्या आज्ञेने म्हणजे प्रेरणेने देहमुक्त झाल्यावरही ज्ञानी पुरुष ईश्वराचे जगत् कल्याणाचे कार्य करण्यासाठी पुनरपि देह धारण करतात हे मानायला काही हरकत नाही.

पण यातून हे काही सिध्द होत नाही की ज्ञानी पुरुषाचे ज्ञानी अवस्थेतही ईश्वराहून भिन्न अस्तित्व कायम टिकून असते. ब्रह्मसूत्र भाष्याच्या तिसऱ्या अध्यायातील तिसऱ्या पादातल्या 32 व्या सूत्रात शंकराचार्यांनी या विषयाची चर्चा केली आहे. ज्ञानावस्थेत परमात्म्याशी एकरुप राहून सुध्दा ज्ञानी जीव आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखू शकतो असे रामानुजाचार्यांचे मानणे आहे. शंकराचार्यांचे असे मानणे आहे की जीव परमात्म्याहून कुठल्याही अवस्थेत म्हणजे अगदी अज्ञानावस्थेतसुध्दा स्वरुपत: भिन्न नाही त्यामुळे त्याचे स्वतंत्र अस्तित्व नसते. अज्ञान नष्ट झाल्यावर जीवाचे स्वतंत्र अस्तित्व समाप्त होऊन जाते.

2) **सर्गे अपि न उपजायन्ते च प्रलये न व्यथन्ति:** सृष्टीच्या पुनश्च उत्पन्न होण्यासमयीही जन्माला येत नाही आणि प्रलयकाळात दु:खी होत नाहीत. ज्ञानी ईश्वराशी इतके एकरुप झालेले असतात की प्रलयकाळानंतर जेव्हा सृष्टी नव्याने उत्पन्न होते तेव्हा त्यांचा जन्म होत नाही आणि प्रलयकाळीसुध्दा ते दु:खी होत नाहीत. जीव जेव्हा अज्ञानावस्थेत असतो तेव्हा अज्ञान वा भ्रांतीमुळे जीवाचे स्वतंत्र अस्तित्व कायम असते यामुळे तो स्वाभाविकपणेच जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकलेला असतो यामुळे प्रलयकाळानंतरही सृष्टीच्या उत्पत्ती समयी अज्ञान बीजामुळे जीव परत जन्माला येतो - या अज्ञानामुळे प्रलयकाळी जीवाला दु:ख होते. भेदावस्था - फरकाची अवस्था - ही स्वप्नासारखी काल्पनिक असते. अभेदावस्था - साम्यावस्था हीच खरी अवस्था आहे. यामुळे ज्ञानावस्थेत अभेदावस्थेचा - अद्वैतावस्थेचा अनुभव येतो. अभेद किंवा अद्वैत अवस्थेत जीव उत्पन्न होऊ शकत नाही. आणि त्यामुळेच त्याला प्रलयकाळी दु:ख होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

: 3 :

***मम योनिर्महद्ब्रह्म तास्मिन्गर्भं दधाम्यहम् ।***
***संभव: सर्वभूतानां ततो भवति भारत ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मम योनि:** माझी योनी
- **महत् ब्रह्म:** महान ब्रह्म आहे
- **तस्मिन्:** त्यात
- **अहं गर्भम् दधामि:** मी गर्भ म्हणजे चेतनरुपी बी रोवतो
- **भारत:** हे अर्जुना
- **सर्वभूतानाम्:** सर्व भूतांची
- **तत:** त्या महान प्रकृती पासून म्हणजे जड व चेतन यांच्या संयोगाने
- **संभव: भवति:** उत्पत्ती होते

**अर्थ**

हे अर्जुना, माझी महत् ब्रह्मरुप मूळ प्रकृती संपूर्ण भूतांची योनी म्हणजे गर्भ धारणा करण्याचे स्थान आहे आणि मी त्या योनीच्या ठिकाणी चेतन-समुदायरुप गर्भाची स्थापना करतो. त्या जड-चेतनाच्या संयोगाने सर्व भूतांची उत्पत्ती होते.

***माझें प्रकृति हें क्षेत्र तिथें मी बीज पेरितों ।***
***त्यांतूनि सर्व भूतांची उत्पत्ति मग होतसे ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) माझी योनी म्हणजे प्रकृती वा माया शक्ती महान ब्रह्म म्हणजे अत्यंत व्यापक आहे. 2) त्या महान प्रकृती वा मायेच्या ठायी मी गर्भ म्हणजे बीज रोवतो. 3) सर्व भूतमात्रांची उत्पत्ती त्या महान प्रकृतीपासून होते.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात जड - चेतन सृष्टीच्या उत्पत्तीचे मर्म सांगीतले आहे. विषय मांडणीची शैली लोकभाषेची आहे.

1) **मम योनि: महत् ब्रह्म:** माझी योनी म्हणजे प्रकृती म्हणजे माया शक्ती महान ब्रह्म आहे, अत्यंत व्यापक आहे. स्त्री-पुरुष समागमातून सृष्टी उत्पन्न होते हे लोकप्रसिध्द

सत्य आहे. इथे असे सांगितले गेले आहे की जणू ब्रह्माचा माया शक्तीशी विवाह झाला आहे. ब्रह्म म्हणजे ईश्वराची सृष्टी उत्पन्न करायाची महान शक्ती होय. या शक्तीला 'प्रकृती' वा 'माया' म्हटले जाते. ईश्वराच्या दोन शक्ती आहेत - ज्ञानशक्ती आणि सृष्टी उत्पन्न करणारी शक्ती. याचे वर्णन यापूर्वी अनेकदा झाले आहे. ज्ञानशक्ती जणु पुरुष आणि सर्ग शक्ती म्हणजे सृष्टी उत्पन्न करणारी शक्ती प्रकृती वा माया. केवळ ज्ञान वा सर्ग शक्तीने काही सृष्टी उत्पन्न होत नाही. दोघांच्या संयोगातूनच सृष्टी उत्पन्न होते.

2) **तस्मिन् अहं गर्भम् दधामि:** त्या महान प्रकृती म्हणजे माया शक्तीच्या ठायी मी सृष्टीचा गर्भ वा बीज रोवतो. प्रकृती वा माया शक्ती महान आहे कारण की हे जगत जर एवढे महान आहे तर त्याला निर्माण करणारी शक्तीही महान असायला हवी. एका छोट्या बीजातून महान वृक्ष उत्पन्न होतो. सृष्टीच्या ठायी जड सृष्टीच केवळ नाही. जड सृष्टी माया शक्तीने निर्माण होते. जीवाचे शरीरही माया शक्तीनेच उत्पन्न झाले आहे पण जीव चेतन आहे त्यामुळे चेतन ईश्वरावर ईश्वर स्वरुपाच्या अज्ञानामुळे चेतन जीवाचा भास निर्माण होतो. माया शक्तीच्या ठायी सर्वांचे बीज अव्यक्त रुपात विद्यमान असते. हे अव्यक्त बीज जेव्हा प्रकट होते तेव्हा त्याला 'सृष्टी' असे म्हणतात. त्या प्रकारे सृष्टीच्या उत्पत्ती समयी ईश्वर आपल्या माया शक्तीच्या ठायी सृष्टी उत्पन्न करायचे संकल्प बीज रोवतो आणि त्या संकल्प शक्तीरुपी बीजानेच सृष्टी उत्पन्न होते. जड सृष्टी निर्माण करायचे संकल्प बीज ज्याप्रमाणे ईश्वराच्या ठायी असते त्याचप्रमाणे जीवाचा भास करवणारे संकल्प बीजही त्याच्यापाशी असते. पिंड-ब्रह्मांडात्मक सृष्टी उत्पन्न होताच प्रत्येकाच्या शरीरात जे मन असते तिथे अज्ञान बीज रोवले जाते. हे दोन प्रकारचे बीज परमात्मा आपल्या माया शक्तीत रोवतो.

3) **सर्वभूतानां ततः संभवः भवति:** संपूर्ण भूतमात्रांची म्हणजे या जड-चेतन सृष्टीची उत्पत्ती त्या महान प्रकृती शक्तीने - मायेने होते. बीज जसे सुरुवातीला अव्यक्त असते. नंतर वृक्षाच्या रुपात व्यक्त म्हणजे प्रकट होते त्याचप्रमाणे ईश्वराच्या माया शक्तीशी संबंधित जड-चेतन सृष्टीचे बीज आधी अव्यक्त म्हणजे अप्रकट असते नंतर प्रकट होऊन जाते. बीज म्हणजे ईश्वराचा जड सृष्टी उत्पन्न करायचा संकल्प होय. ईश्वराच्या चैतन्य वा ज्ञान शक्तीने हा संकल्प उत्पन्न होतो, सृष्टी उत्पन्न करण्याचा संकल्प बीज मायेच्या ठायी रोवले जाते. सृष्टी उत्पन्न करायचा ईश्वराचा संकल्पच 'बीज' आहे. संकल्पाचा संबंध ईश्वराच्या ज्ञान शक्तीशी आहे. ते रोवले जाते माया शक्तीत. यातुनच साऱ्या जड-चेतन सृष्टीचा भास निर्माण होतो.

: 4 :

*सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः ।*
*तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **सर्वयोनिषु:** सर्व योनींमध्ये
- **याः मूर्तयः** ज्या काही बाह्य मूर्त्या म्हणजे शरीरे
- **संभवन्ति:** उत्पन्न होतात
- **तासाम्:** त्या सर्वांची
- **महत् ब्रह्म:** माझी महान प्रकृती म्हणजे त्रिगुणात्मक माया
- **योनिः** योनी (कारण) आहे म्हणजे गर्भ धारण करणारी माता आहे
- **अहं बीजप्रदः पिता:** मी त्या माया-शक्तीत बीज रोवणारा पिता आहे.

**अर्थ**

हे अर्जुना, नाना प्रकारच्या सर्व जातीत जितके शरीरधारी प्राणी उत्पन्न होतात, त्या सर्वांचा गर्भ धारण करणारी माता प्रकृती आहे आणि बीज स्थापन करणारा मी पिता आहे.

*सर्व योनींमधें मूर्ति जितुक्या जन्म पावती ।*
*माता प्रकृति ही त्यांस पिता मी बीज पेरिता ॥*

**विषय:** या श्लोकात मागील श्लोकाचीच गोष्ट पुनश्च सांगितली आहे.

**स्पष्टीकरण**

यामुळे एकच गोष्ट सांगितली गेली आहे, असे सांगता येईल. सर्व योनींमध्ये ज्या बाह्य मूर्त्या प्रकट होतात त्याचे

कारण ईश्वराची महान प्रकृती वा माया आहे. त्या माया शक्तीच्या ठायी बीज रोवणारा पिता परमात्मा आहे.

हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की एका ईश्वराने संपुर्ण विविधताभरले विश्व कसे काय निर्माण होऊ शकते? सांख्य आणि जैनमताने जगाचे कारण जड मानले आहे. आत्मा असंख्य असल्यामुळे त्याना जड तत्वाहून स्वतंत्र मानले आहे. यामुळे दोन्ही तत्वज्ञान समजून घ्यायला सोपे आहेत पण गीता जड सृष्टीचे मूळ कारण चेतन - ईश्वर मानते तेच चेतन ईश्वर जीवरुपात प्रकट आहे. चेतन ईश्वर जडाचा अभिनय करतो आणि चेतन जीवाचाही अभिनय करतो. हा सिध्दांत समजून घ्यायला खूप अवघड आहे. यामुळे भगवंत प्रापंचिक भाषेत समजाऊन सांगण्याचा प्रयत्न करताहेत. एकच परमात्मा आहे, हे सत्य आहे पण त्या एका ईश्वराच्या ठायी दोन शक्ती आहेत यामुळे या दोन शक्तींच्या आधारे ईश्वर एक असतानाही विविधताभरले जग उत्पन्न करु शकतो. अर्थात् या दोन शक्ती स्वतंत्र नाहीत आणि ना या शक्तींचा अविष्कार असलेले हे जगत सत्य आहे. भगवंत या श्लोकात हे सांगू इच्छिताहेत की या जगात जेवढ्या म्हणून काही योनी आहेत त्या स्थावर असोत वा जंगम जेवढे म्हणुन काही बाह्यरुप प्रकट झालेले बघण्यात येतात त्या सर्वांसाठी कारण आहे ईश्वराची माया शक्ती. त्यापासूनच जगातले सारे पदार्थ उत्पन्न होतात आणि त्या शक्तीच्या ठायी मी (ज्ञानस्वरुपी ईश्वर) बीज रोवतो म्हणजे जगत् उत्पन्न करायचा जो संकल्प आहे ते ज्ञानशक्तीने उत्पन्न झालेले मूळ बीज आहे. संकल्पाचा संबंध ईश्वराच्या चेतन म्हणजे ज्ञान शक्तीशी जोडावा लागेल कारण की जड पदार्थांच्या ठायी संकल्प असत नाही. यामुळे संकल्प बीजाचा संबंध ईश्वराच्या ज्ञानशक्तीशीच जोडू शकतो. उपनिषदात म्हटले आहे - स: अकामयत बहुस्यां प्रजायेय इति । अर्थात् ईश्वराने आता आपण बहुरुप व्हावे असा संकल्प केला म्हणजे सृष्टीचे अनेक पदार्थ उत्पन्न करु असा संकल्प केला.

अशा प्रकारे ईश्वराच्या ज्ञान-शक्तीच्या आधाराने संकल्प बीज उत्पन्न होते आणि ते माया शक्तीच्या ठायी रोवले जाते. त्या माया शक्तीनेच जगातील सर्व पदार्थ उत्पन्न होतात. यामुळे भगवंत अखेरीस म्हणतात की सर्व बाह्य पदार्थाच्या उत्पत्तीचे कारण माझी माया शक्ती आहे. मी तिच्या ठायी संकल्परुपी बीज रोवणारा पिता आहे.

: 5 :

*सत्वं रजस्तम इति गुणा: प्रकृतिसंभवा: ।*
*निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे अर्जुना
- **सत्वं रज: तम:** सत्व, रज, तमोगुण
- **इति प्रकृतिसंभवा:** गुणा: असे हे या प्रकृतीपासून उत्पन्न झालेले गुण
- **देहे अव्ययं देहिन:** देहातल्या अव्यय म्हणजे अविनाशी जीवात्म्याला
- **निबध्नन्ति:** बध्द करतात म्हणजे शरीरात जखडून ठेवतात

**अर्थ**

हे अर्जुना, सत्वगुण, रजोगुण आणि तमोगुण हे प्रकृतीपासून उत्पन्न झालेले तिन्ही गुण अविनाशी जीवात्म्याला शरीरात बांधून ठेवतात.

*प्रकृतीपासुनी होती गुण सत्व-रजस्-तम ।*
*ते निर्विकार आत्म्यास जणू देहांत जुंपिती ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टीची चर्चा आली आहे. 1) सत्व, रज, तम हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत. 2) हे तिन्ही गुण देहात अव्यय अशा द्विधारी जीवात्म्याला बध्द करतात.

**स्पष्टीकरण**

1) **सत्वं रज: तम: इति प्रकृतिसंभवा: गुणा:** सत्व, रज, तम हे तीन गुण प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत. 'गुण' शब्द सांख्य तत्वज्ञानातली पारिभाषिक संज्ञा आहे. सांख्य संपूर्ण ब्रह्मांडाचे मूळ कारण जड प्रकृती मानतात आणि त्यात स्वभावत:च तीन गुण मानतात. गीतेने ही परिभाषा मान्य केली आहे पण सांख्य तत्वज्ञानी प्रकृतीला स्वतंत्र मानतात. वेदान्त प्रकृतीला ईश्वराची एक शक्ती

मानतो. त्यालाच माया शक्ती म्हटले गेले आहे. प्रकृतीच्या ठायी जर तीन गुण नसतील तर एकटी प्रकृती जगताची निर्मिती करु शकत नाही, असेही सांख्यांचे मानणे आहे कारण की एका वस्तुपासुन अनेक पदार्थ निर्माण होऊ शकत नाही. वस्तुच्या निर्मितीसाठी अनेक वस्तुंचा संयोग होणे गरजेचे असते. केवळ मातीने काही घट बनत नाही. काठी, चाक, पाणी वगैरेंशी संयोग झाल्यावरच घट बनतो आणि ही सर्व साधने - उपकरणे सोबत असल्यावरही जर चेतन कुंभार नसेल तरी घट बनणार नाही. याच आधारावर वेदान्ताने केवळ जड प्रकृतीने जगाची निर्मिती होते हा सिध्दांत मान्य केला नाही. चेतनच्या आधारानेच प्रकृतीच्या तीन गुणांच्या मिश्रणातून नाना पदार्थ उत्पन्न होऊ शकतात. प्रकृती स्वतंत्र शक्ती नसून चेतनची एक शक्ती असल्यामुळे त्याच्या ठायी तीन गुण आहेत. यामुळे हे तीन गुण प्रकृती वा माया - शक्तीने उत्पन्न केले आहेत, असे सांगता येऊ शकते.

2) **देहे अव्ययं देहिनं निबध्नन्ति:** हे तीन गुण देहाच्या ठायी अव्यय देहधारी जीवात्म्याला बध्द करतात. देह आणि जीवात्मा दोघे भिन्न असतानाही भिन्न म्हणजे वेगवेगळे नाही वाटत. याचे कारण असे की प्रकृतीचे तीन गुण चित्तात भ्रम उत्पन्न करतात. दोरात भ्रांतीमुळे सापाचा भास होतो त्याचप्रमाणे जीवात्मा परमात्म्याशी एकरुप असूनही आणि देह वगैरे संघाताहून वेगळा असतानाही 'मी ईश्वराशी एकरुप आहे', 'मी देह वगैरे संघातापासून वेगळा आहे.' असे न वाटणे ही भ्रांती आहे. ही भ्रांती चित्तात या तीन गुणांच्या संबंधातून उत्पन्न होते आणि जीवात्म्याला बंधनाचा अनुभव करवते. हे तीन गुण जीवात्म्याला कशा प्रकारे बंधनात टाकतात, हे भगवंताने या अध्यायात सविस्तर सांगितले आहे. हे तीन गुण चित्तात भ्रम वा भ्रांती उत्पन्न करतात आणि सुख-दु:खाचा अनुभव करवतात. या तीन गुणांच्या संबंधातून मुक्त होऊन आपण त्रिगुणातीत कसे बनू शकतो, तेही या अध्यायात सांगितले जात आहे. जीवात्मा कदापि क्षीण होत नाही कारण की तो मूळात स्वभावत:च ईश्वराशी एकरुप आहे. ज्ञातेपणा त्याचे नित्य स्वरुप आहे. जीवाला अनुभवात येणारे इतर सारे स्वरुप काल्पनिक असतात आणि ते नित्य परिवर्तित असतात. पित्यासमोर पुत्र, पुत्रासमोर पिता, पत्नीसमोर पती ही सारी स्वरुपे काल्पनिक आहेत. ज्ञातेपणा हेच वास्तविक - यथार्थ स्वरुप आहे. याची ओळख नसल्यामुळे तीन गुण आपल्याला बंधनात टाकतात. आपण तीन गुणांचा संबंध सोडू शकत नाही.

: 6 :

***तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशकमनामयम् ।***
***सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तत्र सत्वं निर्मलत्वात्:** या तीन गुणांमध्ये सत्वगुण हा प्रकाशदायक म्हणजे निर्मळ असल्यामुळे
- **प्रकाशकं:** प्रकाशक, प्रकाश देणारा
- **अनामयं:** सुख आणि स्वास्थ्यप्रद म्हणजे निर्विकार आहे
- **अनघ:** हे निष्पाप अर्जुना
- **सुखसंगेन:** सुखाच्या आसक्तीने
- **च ज्ञानसंगेन:** आणि ज्ञानाची आसक्ती म्हणजे ज्ञानाच्या अभिमानाने
- **बध्नाति:** बंधनात टाकतो

**अर्थ**

हे निष्पाप अर्जुना, त्या तीन गुणांमधील सत्वगुण, निर्मळ असल्यामुळे प्रकाश उत्पन्न करणारा आणि विकाररहित आहे. तो सुखासंबंधीच्या आणि ज्ञानासंबंधीच्या अभिमानाने बांधतो.

***त्यांत निर्मळ ते सत्व ज्ञान आरोग्य वाढवी ।***
***मी सुखी आणि मी ज्ञानी शृंखला ही चि लेववी ॥***

**विषय:** या श्लोकात दोन मुद्दे आहेत. 1) या तीन गुणांमध्ये सत्वगुण निर्मळ असल्यामुळे प्रकाशदायक म्हणजे प्रकाश देणारा, दु:ख, रोग, उपद्रव न करणारा अर्थात सुख आणि स्वास्थ्य उत्पन्न करणारा आहे. 2) हे निष्पाप अर्जुना, हा सत्वगुण सुख आणि ज्ञानाची आसक्ती उत्पन्न करतो आणि जीवात्म्याला बंधनात टाकतो.

**स्पष्टीकरण**

1) **तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशकं अनामयम्:** या तीन गुणांपैकी सत्वगुण निर्मळ असल्यामुळे प्रकाशदायक आहे. दु:ख, रोग वगैरे उद्भवू न देणारा म्हणजे स्वास्थ्य आणि सुख देणारा आहे. इथे सत्वगुणाचे चार परिणाम वर्णिले आहेत. पहिला असा की सत्वगुण निर्मळ आहे म्हणजे सत्वगुणाशी संबंध राखले असता चित्त निर्मळ होते. बंधनाचे कारण चित्त आहे. मोक्षाचेही कारण चित्तच आहे. सत्वगुणाचा उत्कर्ष करत रजोगुण आणि तमोगुणाला क्षीण करत राहिले तर चित्ताच्या शुध्दतेचा वा निर्विकारतेचा अनुभव येईल. चित्त निर्मळ करण्यासाठी सदैव सात्विक कर्मे करत रहावीत, सात्विक ग्रंथांचे पठण करावे, सात्विक सज्जनांच्या सत्संगात रहायचा प्रयत्न करावा, श्रध्देय व्यक्तींना साक्षी ठेऊन जगायचा प्रयत्न करावा, सात्विक आहार घ्यावा, ब्रह्मचर्याचे अधिकाधिक पालन करावे आणि कुठल्याही परिस्थितीत सात्विकतेचा त्याग न करण्यासाठी कटीबध्द व्हावे.

दुसरा उपाय असा की चित्तात ईश्वराचा प्रकाश म्हणजे ज्ञान प्राप्त होणे. ईश्वर आत्मा वा सत् - चित् - आनंदरुपाने प्रकट आहे. सत्वगुणाच्या उत्कर्षाने विकारांचा परदा दूर होतो आणि त्यामुळे चित्तात सत् - चित् - आनंद स्वरुप ज्ञानाचा अनुभव होऊ लागतो. सत्वगुणाच्या उत्कर्षाचा हा सहज परिणाम आहे.

तिसरा उपाय असा की आतील विकारांनी माणसाला प्रपंचात होणारे दु:ख टळून सुखानुभव येऊ लागतो. विकार दु:खद अनुभव देतात. विकार हटताच सुखानुभव होतो.

चौथा उपाय हा आहे की सत्वगुणाचा उत्कर्ष झाल्यावर स्वास्थ्य सहजपणेच उत्तम रहाते. सत्वगुणाने संयमाचा अभ्यास होतो. सात्विक आहार सेवनाचा अभ्यास वाढतो - सराव वाढतो - आणि सात्विक आहाराचे संयमपूर्वक ग्रहण झाले तर मग रोग होण्याची शक्यता उरत नाही.

2) **सुखसंगेन च ज्ञानसंगेन बध्नाति:** सत्वगुण सुख आणि ज्ञानाची आसक्ती उत्पन्न करतात आणि जीवात्म्याला बंधनात टाकतात. इथे हा प्रश्न उद्भवतो की भगवंताने आधी सत्वगुणाचा परिणाम चित्त शुध्दी सांगितला मग चित्तात ज्ञान आणि सुख होण्याचा मुद्दा मांडला आणि आता सांगताहेत की सत्वगुण सुख आणि ज्ञानाचीही आसक्ती निर्माण करतात आणि माणसाला बंधनात टाकतात. हा मुद्दा परस्पर विरुध्द वाटु शकतो याचे स्पष्टीकरण असे आहे की सत्वगुणाच्या उत्कर्षाने चित्त शुध्दी, सुख, ज्ञान आणि स्वास्थ्य असे चार परिणाम होतात हे खरे आहे पण अहंकार जर क्षीण झाला नाही तर ‘मी सुखी आहे’, ‘मी ज्ञानी आहे’, ‘मी निरोगी आहे’, ‘मी निर्विकार आहे’ अशा भावना सुख आणि ज्ञानाची आसक्ती उत्पन्न करतील. सत्वगुणाचा उत्कर्ष झाला तर सुख, ज्ञान, निर्मळता, स्वास्थ्य अवश्य लाभतील पण या वस्तुंची आसक्ती उपजली तर मात्र बंधन चिरकाळ टिकेल. बंधन घालवायची शक्ती सत्वगुणाच्या ठायी नाही. यासाठी मनात अखंडपणे नांदणाऱ्या अहंवृत्तीला वा मीपणाला घालवणे आवयश्क आहे. आपण हवा तेवढा सत्वगुणाचा उत्कर्ष साधू या पण त्यासोबत अहंकार क्षीण करायची कलाही साधू या. अतिसूक्ष्म असल्यामुळे अहंकारवृत्ती घालवणे सोपे नाही. निरहंकारतेचा उत्कर्ष जरी साधला गेला तरी निरहंकारतेचा अहंकार उत्पन्न होतो. तो तर निरंहकारता सहज बनल्यावरच नष्ट होऊ शकतो. तेव्हा मग सुख वा ज्ञानाची आसक्ती उरत नाही.

: 7 :

*रजो रागात्मकं विध्दि तृष्णासंगसमुद्भवम् ।*
*तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसंगेन देहिनम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय:** हे अर्जुना
- **रज: रागात्मकं विध्दि:** रजोगुण वासनारुप आहे, असे जाण
- **तृष्णा संगमसमुद्भवम्:** (मी) तृष्णा म्हणजे कामना आणि आसक्ती यापासून उत्पन्न झालेला आहे
- **तत् कर्मसंगेन:** तो रजोगुण कर्मांच्या आणि त्यांच्या फळांच्या आसक्तीने
- **देहिनं निबध्नाति:** जीवात्म्याला बध्द करतो

**अर्थ**

हे अर्जुना, कामरुप रजोगुण इच्छा आणि आसक्ती यांच्यापासुन उत्पन्न झालेला आहे, असे समज. तो या

जीवात्म्याला कर्माच्या आणि त्यांच्या फळांच्या संबंधाने बांधतो.

*रज तें वासना-रुप तृष्णा आसक्ति वाढवी।*
*आत्म्यास कर्म - संगानें टाकितें जखडूनि तें॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) रजोगुण वासनारुप आहे असे समजा 2) (त्यामुळे) मी तृष्णा आणि आसक्ती उत्पन्न करणारा आहे. 3) कर्माच्या आसक्तीने देहधारी जीवाला बध्द करतो. या श्लोकात रजोगुणाचे स्वरुप वर्णिले आहे.

**स्पष्टीकरण -**

1) **रज: रागात्मकं विध्दि:** रजोगुण वासनारुप आहे असे समजा रजोगुण आत्मज्ञानाला उत्पन्न करतो. देह आणि विषयांशी प्रीत वाढली तर ती प्रीत वासनेचे रुप धारण करते. यामुळे रजोगुण वासनारुपी आहे. ज्या वस्तुविषयी प्रेम उत्पन्न झालेले नसेल त्याविषयी वासना उत्पन्न होणार नाही. वासना म्हणजे विशेष संस्कार होय. आधी मनात पदार्थाविषयी आकर्षण उत्पन्न होते. प्रत्येक पदार्थाबद्दल आकर्षण उपजेल असे काही घडत नाही. वेगवेगळ्या लोकांच्या आकर्षणाचे विषय भिन्न-भिन्न असतात. आकर्षण उत्पन्न झाल्यावर काही विशिष्ट पदार्थांशी आपण संबंध राखु लागतो. उदाहरणार्थ अनेक बंधु-भगिनी एका वर्गात शिकतात. कुणा बंधुच्या मनात कुणा भगिनीविषयी आकर्षण उत्पन्न होते. नंतर दोघे जवळ येतात आणि दोघांचा संबंध वाढतो. संबंधामुळे प्रेम उपजते व ते वाढु लागते मग दोघांच्या ठायी वासना उत्पन्न होते. रजोगुण वासनारुप असल्यामुळे वासनाच उपजवतो. पदार्थाचे आकर्षण, आकर्षणातून प्रेम, प्रेमातून वासना, रजोगुणाची क्रमश: ही तीन कार्ये होत.

2) **तृष्णासंगसमुद्भवम्:** रजोगुण वासना उत्पन्न करतो आणि पदार्थाविषयीची तृष्णा व आसक्ती उत्पन्न करतो. शंकराचार्यानी तृष्णेचा अर्थ सांगितला - अप्राप्ताभिलाष: म्हणजे अप्राप्त वस्तुची अभिलाषा म्हणजे तीव्र इच्छा, कासाविशी, व्याकुळता. जोवर वस्तु ताब्यात नाही तोवर चित्त स्वस्थ रहात नाही. वस्तु मिळवण्यासाठी चित्त व्याकुळ असते. वस्तु एकदा मिळाली की तिची आसक्ती जागते. संग शब्दाचा अर्थ शंकराचार्य सांगतात प्राप्ति विषये मनस: प्रीतिलक्षण: संश्लेष: अर्थात् प्राप्त वस्तुविषयी प्रीती ज्याचे लक्षण आहे, असे प्रेमयुक्त आकर्षण. आसक्तीमुळे पदार्थाचा वियोग सहन होत नाही. विवाहानंतर पती-पत्नीच्या ठायी प्रेमवृध्दी झाल्यामुळे आसक्ती उत्पन्न होते. दोघांना एकमेकांचा वियोग सहन होत नाही. आईच्या मनात पुत्राविषयी इतके प्रेम असते की ती आसक्ती बनते. आसक्तीमुळे पुत्राचा वियोग सहन करता येत नाही. प्रेम दु:खदायक नसून आसक्ती दु:खदायक आहे. प्रेम असो पण आसक्ती न उपजण्याकडे लक्ष दिले तर दु:खाऐवजी सुख अनुभवायला मिळेल.

2) **तत् कर्मसंगेन देहिनं निबध्नाति:** तो रजोगुण कर्माच्या आसक्तीमुळे देहधारी जीवात्म्याला बंधनात टाकून देतो. रजोगुण पदार्थविषयक प्रेम उत्पन्न करुन आसक्तीपूर्वक पदार्थ प्राप्त करण्याकडे प्रवृत्त करतो. वस्तु मिळवण्यासाठी नाना प्रकारच्या उद्योगात पडावे लागते. विवाह झाला की जीवन विषयक जबाबदारी - प्रापंचिक गोष्टी - सुरु होऊन जातात. लेकरं - बाळं होतात. पैसा मिळवावा लागतो आणि मिळवलेला पैसा नाना कर्मे करुन मिळतो. असत्याचरणही करावे लागते. त्या कर्माची आसक्ती होऊन बसते. एखादा पुरुष - एखादी व्यक्ती - सार्वजनिक सेवा कार्याला वाहून घेते तरीही ही आसक्ती असतानासुध्दा लोकसेवेसाठी नाना प्रकारची कार्ये करण्यात मन आसक्त होते आणि त्यामुळे सार्वजनिक सेवाकार्य करत असतानाही ती व्यक्ती कायम दु:खमुक्त राहू शकत नाही. दु:खापासून मुक्त होण्यासाठी तृष्णा, आसक्ती आणि वासना या तिघांचा त्याग करणे गरजेचे आहे.

: 8 :

*तमस्त्वज्ञानजं विध्दि मोहनं सर्वदेहिनाम्।*
*प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु तम: अज्ञानजं विध्दि:** पण तमोगुण अज्ञानामुळे जन्माला आला आहे, असे समज
- **सर्वदेहिनां मोहनम्:** हा तमोगुण सर्व देहधारण करणाऱ्यांना मोहात टाकतो

- **भारत तत्:** हे भारत - हे अर्जुना, हा तमोगुण
- **प्रमादालस्यनिद्राभि:** प्रमाद, आळस आणि झोप या तिघांनी
- **निबध्नाति:** बांधून ठेवतो

**अर्थ**

हे अर्जुना, सर्व देहाभिमानी पुरुषांना मोह पाडणारा तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न झालेला आहे, असे समज. तो या जीवात्म्याला प्रमाद (इंद्रियांच्या आणि अंत:करणाच्या अर्थशून्य क्रिया म्हणजे प्रमाद होय.), आळस (कर्तव्य कर्माकडे दुर्लक्ष करुन निरुद्योगी रहावेसे वाटणे म्हणजे आळस होय.) आणि निद्रा यांनी बांधतो.

*गुंगवी तम सर्वांस अज्ञान चि विरुढलें।*
*झोंप आळस दुर्लक्ष ह्यांनी घेरुनि बांधितें॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) तमोगुण अज्ञानामुळे उत्पन्न झाला, असे समज. 2) हा तमोगुण तमाम देहधारींना मोहात टाकणारा आहे. 3) प्रमाद, आळस आणि झोप या माध्यमातून तमोगुण बंधनात अडकवतो.

**स्पष्टीकरण**

1) **तु तम: अज्ञानजं विध्दि:** पण तमोगुणाची उत्पत्ती अज्ञानामुळे होते, हे जाणून घे. अज्ञान म्हणजे मूळ अविद्या. ज्ञान हे सत्वगुणाच्या उत्कर्षामुळे जन्माला येते. सत्वगुण ज्ञानाला झाकून ठेवत नाही. आसक्ती वा अहंकार असेल तर सत्वगुण ज्ञानाला झाकू शकतो पण सत्वगुण उत्कर्षाप्रत पोहोचला, तो सहज स्वाभाविक झाला तर मग ज्ञानाचे आवरण हटून जाते - दूर होते. सत्व, रज व तम हे तीन गुण आहेत यात सत्वगुण एकीकडे तर रज व तम हे दोन एकीकडे असे स्वरुप असते. सत्वगुण ज्ञानाच्या निकट आहेत, रजोगुण ज्ञानापासून लांब आहे आणि तमोगुण तर खूप लांबवर आहे.

तमोगुण आणि रजोगुण अज्ञानाला टिकवून ठेवायला मदत करतात. ज्ञानावर तमोगुणाचे आवरण अति गाढ स्वरुपाचे असते. ज्या मानाने रजोगुणाचे आवरण शिथिल असते. सत्वगुणाच्या तुलनेने रजोगुणाचे आवरण गाढ असते. तमोगुणाचे आवरण प्रगाढ असल्यामुळे ते मूळ अविद्या वा अज्ञानातून उत्पन्न झाले असे या श्लोकात भगवंतांनी सांगितले आहे. देह आणि आत्मा एकमेकांपासून भिन्न असतानाही ज्ञानाच्या अभावी दोघे एक आहेत, अशी कल्पना उत्पन्न झाली. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की ईश्वर स्वरुपाविषयीच्या अज्ञानामुळे ही 'मी' पणाची कल्पना उत्पन्न झाली. या अज्ञानामुळे तमोगुण उपजला असे भगवंत सांगताहेत. इथे एक प्रश्न असा उपस्थित होतो की तमोगुण आणि रजोगुण जर एका वर्गातील आहेत तर तमोगुणाप्रमाणेच रजोगुणही अज्ञानामुळे उत्पन्न होतो, असे का नाही सांगितले? तमोगुण ज्ञानाला संपूर्णपणे झाकून ठेवतो कारण की तो अज्ञानामुळे उत्पन्न झालेला आहे. रजोगुण ज्ञानाला संपूर्णपणे झाकत नाही, यामुळे त्याची उत्पत्ती अज्ञानामुळे झाली असे म्हटलेले नाही. दोन्ही ज्ञानाला झाकून ठेवणारे आहेत यामुळे दोघांना एका वर्गात टाकले गेले आहे पण तमोगुण ज्ञानाला पूर्णपणे झाकून टाकतो यामुळे तो रजोगुणापेक्षा थोडा वेगळा वाटतो. या कारणामुळे दोघांची लक्षणे थोडी वेगवेगळी होऊन जातात.

2) **सर्वदेहिनां मोहनं:** हा तमोगुण तमाम देहधारी जीवांना मोहात टाकतो. पूर्णपणे ज्ञानाला झाकून ठेवणारा असल्यामुळे तमोगुणाला मोहात फसविणारा असे म्हटले गेले आहे. मोह म्हणजे मूढता. मूढता म्हणजे घनघोर अज्ञान, गहन - खोल आसक्ती. मुलगा मद्यपान करतो, व्यभिचारी आहे, धन वाया घालवतो, चारित्र्यहीन-दुराचारी आहे, हे सारे कळत असतानासुध्दा आईच्या मनात पुत्राविषयी जर जबरदस्त मोह असेल तर आई मुलाला घरातून घालवून देणार नाही. मोहात विवेक नसतो. मद्यपी वा दुराचारी व्यक्ती संपूर्णपणे मोहग्रस्त असते. मूढतेमुळे ती या वाईट व्यसनांना टाकू - टाळू शकत नाही आणि त्यांना बळी पडते. आई सत्चरित्रवान असते तरीपण पुत्रमोह इतका बलाढ्य असतो की ती मूढता घालवू शकत नाही. अशाप्रकारे तमोगुण मोह, मूढता वा अविवेक उपजवणारा असल्यामुळे ज्ञानाला झाकून टाकण्यात पूर्ण मदतनीस वा समर्थ आहे.

3) **तत् प्रमादालस्यनिद्राभि: निबध्नाति:** प्रमाद, आळस आणि झोप या तिघांच्या प्रभावाने तमोगुण बंधनात अडकवतो. रजोगुण प्रवृत्तीत प्रवृत्त करतो. तमोगुण प्रवृत्तीपासून दूर ठेवतो. सत्वगुण सात्विक

प्रवृत्तीच्या ठायी स्थिर करतो. रजोगुण चंचळ आहे. अस्थिर ठेवतो. सत्वगुणाच्या ठायी मनाला स्थिर करण्याची शक्ती आहे. तमोगुण जडता उपजवतो - जड पदार्थांच्या ठायी जडता दिसते तशी स्थिरता तमोगुणात आढळते पण तमोगुणातील स्थिरता निष्क्रियता आहे, ती प्रमाद, आळस आणि झोपेशी संबध्द आहे. सत्व गुणात प्रवृत्तीचा अभाव नाही. तमोगुणात प्रवृत्तीचा अभाव आहे. सत्वगुणात स्थिरता असल्यामुळे स्थिरता नसते, ती आभासी स्थिरता असते, खरी नसते. यामुळे तमोगुणी पुरुष प्रमाद, आळस आणि झोपेत पडून असतो. प्रमाद संकल्पनेची व्याख्या शंकराचार्यांनी अशी केली आहे - प्राप्तकर्तव्यापकरणं अर्थात् प्राप्त कर्तव्य न करणे म्हणजे प्रमाद होय. प्रमादी पुरुष इतका काही जड स्वरुपाचा असतो की अंगीकृत कर्तव्य हातून घडले नाही तरी त्याला दु:ख होत नाही. सार्वजनिक सेवा करणाऱ्या चांगल्या सेवकांमध्येही प्रमाद आढळून येतो. स्वीकृत कर्तव्य दक्षतेने करणे, त्याचा कदापि त्याग न करणे, त्यात उणीव न पडु देणे, काही चूक झालीच तर मान्य करुन पश्चात्ताप करणे ही सात्विक पुरुषाची लक्षणे होत. तमोगुणी पुरुषाचे आचरण याच्या अगदी विपरीत असते. तमोगुणात आसक्त पुरुषावर विश्वास नाही ठेवता येत. त्याला कर्तव्य-अकर्तव्याचे भान नसते कारण की तो आळसातच आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतो. काम करावेच लागणार असेल तर तो लाचार होऊन जबरदस्तीपूर्वक काम करतो. काम केले नाही तर खायला मिळणार नाही असा विचार करुन तो मन मारुनच काम करतो पण काहीही काम न करता वा कमी परिश्रम करुन जर खायला मिळत असेल तर तो खूप आनंदी होतो. तो टाळाटाळ करण्याचाही प्रयत्न करतो. सात्विक पुरुषाला थोडाही प्रमाद सहन होत नाही. आळस मुळी त्याच्या ठायी नसतोच. तो झोप सुध्दा कमीत कमी घेतो. तमोगुणी पुरुष अधिकाधिक झोप घ्यायचा प्रयत्न करुन कमीत कमी काम करतो. सत्वगुणी पुरुष स्थिर बुध्दीने अधिकाधिक सत्कर्म करायचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे सत्वगुण एक टोक आहे तर तमोगुण अगदी दुसरे टोक आहे. यामुळे तमोगुण ज्ञानाला झाकून ठेवणारे मजबूत आवरण आहे.

: 9 :

*सत्वं सुखे संजयति रज: कर्मणि भारत।*
*ज्ञानमावृत्य तु तम: प्रमादे संजयत्युत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **सत्वं सुखे संजयति:** सत्वगुण सुखात आसक्त करतो, नियुक्त करतो
- **रज: कर्माणि:** रजोगुण कर्मात आसक्ती उत्पन्न करतो, कर्मात प्रवृत्ती करतो
- **तु तम:** ज्ञानं आवृत्य: पण तमोगुण ज्ञानाला झाकत असताना
- **प्रमादे संजयति:** प्रमादात आसक्त करतो, प्रमाद करण्यात प्रवृत्त करतो

**अर्थ**

हे अर्जुना, सत्वगुण सुखाला, रजोगुण कर्मांना आणि तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमाद करण्याला ही प्रवृत्त करतो.

*सुखांत घालितें सत्व रज कर्मांत घालितें।*
*ज्ञान झांकूनि संपूर्ण दुर्लक्षीं घालितें तम ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) सत्वगुण सुखात आसक्त करतो. 2) रजोगुण कर्मात आसक्त करतो. 3) पण तमोगुण ज्ञानाला झाकून टाकत प्रमादात आसक्त करतो.

**स्पष्टीकरण**

1) **सत्त्वं सुखे संजयति:** सत्वगुण सुखात आसक्त करतो. सत्वगुण ज्ञान उत्पन्न करणारा महान गुण आहे. ज्ञान प्राप्त झाल्यावरही सत्वगुणाशी असलेला संबंध सुटत नाही. रजोगुण आणि तमोगुण क्षीण होऊन जातात. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी सत्वगुण सुखात आसक्त करतो असे भगवंत सांगताहेत. विनोबाजी म्हणतात की अध्ययन, ध्यान, चिंतन यामुळे जे सुख लाभते त्यात सत्वगुणामुळे आसक्ती उत्पन्न होते. परमेश्वराचे ध्यान, चिंतन वा त्यांच्या विषयी अध्ययनाकडे प्रवृत्ती जागणे सत्वगुणाच्या उत्कर्षाचा परिणाम आहे. जोवर ध्यान वगैरे साधले जात नाही तोवर आनंदाचा अनुभव येत नाही. ध्यान साधायला

लागले, तास-न्-तास ईश्वर स्मरण-चिंतन व्हायला लागले, अध्ययनात गोडी वाटायला लागली, तरच त्याठायी आसक्ती उत्पन्न होते.

सहाव्या श्लोकात सांगितले गेले आहे की सत्वगुणाच्या उत्कर्षाचे चार परिणाम होतात - चित्त शुध्दी, ज्ञान, सुख आणि स्वास्थ्य पण अहंकार जर क्षीण झाला नाही तर मात्र या चौघांविषयी आसक्ती उत्पन्न करवून सत्वगुण माणसाला जखडून ठेवतो - बांधून ठेवतो. तोच मुद्दा इथे परत सांगितला गेला आहे. सत्वगुण ज्ञान उत्पन्न करणारा असल्यामुळे त्याचा उत्कर्ष होण्यातून सुखाचा अनुभव होणे स्वाभाविक आहे. संतांच्या सहवासात आणि सात्विक ग्रंथांच्या वाचनामुळे आनंदलाभ होतो. सात्विक कर्मे, जनसेवेसारखी कामे करण्यामुळे आनंद मिळतो. बोलणे - संवाद - सत्विक असला तर आनंदाचा अनुभव होतो. जीवनातल्या तमाम क्रिया सात्विक होऊ लागल्यात तर आनंदानुभूती होते पण सत्वगुणाच्या उत्कर्षासोबत जर अहंकार क्षीण झाला नाही तर सत्वगुणाची आसक्ती काही सुटत नाही.

3) **रज: कर्मणि संजयति:** रजोगुण कर्मात आसक्ती उत्पन्न करतो. रजोगुणाचा अर्थच प्रपंच आहे. प्रपंचात नाना प्रकारची कर्मे करावी लागतात. रजोगुण कर्मात प्रवृत्त करतो आणि आसक्ती उत्पन्न करतो. तो ज्ञानाला झाकून ठेवणारा असल्यामुळे दु:ख उत्पन्न करण्याकामीच मदत करतो. सुखासाठी प्रयत्न करत असतानाही रजोगुणाच्या उत्कर्षामुळे सुखाचा अनुभव खूप कमी येतो. रजोगुण विकार उत्पन्न करतो. विकारवश झाल्यावर सुखाचा अनुभव प्राप्त करुन घेणे शक्यच नाही. सातव्या श्लोकात सांगितले गेले आहे की रजोगुण कर्माच्या आसक्तीने देहधारी जीवात्म्याला जखडून ठेवतो. हाच मुद्दा या श्लोकातून सांगताहेत. नाना प्रकारच्या कर्मामध्ये प्रवृत्त करत आसक्ती उत्पन्न करणे रजोगुणाचा मुख्य धर्म आहे. रजोगुणाच्या ठायी अहंकार तर असतोच. सत्वगुण आणि रजोगुणात अंतर असे की सत्वगुणाच्या उत्कर्षासोबत आपण ठरवले तर निरहंकारतेचा उत्कर्षही साधू शकतो. रजोगुणाच्या उत्कर्षात निरहंकारतेचा उत्कर्ष होत नाही. जोवर आपला रजोगुणाशी संबंध आहे तोवर अहंकार घालवण्यात यशस्वी होता येत नाही. अहंकार घालवायचा असेल तर रजोगुण आणि तमोगुण या दोघांशी संबंध विच्छेद करणे आवश्यक आहे. केवळ सत्वगुणाशी संबंध राखून, त्याचा उत्कर्ष करण्यातूनच अहंकार घालवता येऊ शकतो. जीवनात जोवर रजोगुण आणि तमोगुण प्रबळ असतील तोवर ना अहंकार दूर करता येणार ना आसक्ती.

3) **तम:** ज्ञानं आवृत्य प्रमादे संजयति तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमादाच्या ठायी आसक्ती उत्पन्न करतो. तमोगुण ज्ञानाला झाकून ठेवतो. याचा अर्थ रजोगुण ज्ञानाला झाकून टाकत नाही असा नाही. तमोगुणाचे आवरण तुलनेने खूप मजबूत असते यामुळे त्याविषयी असे सांगितले गेले आहे की ते ज्ञानाला झाकून ठेवते. झाकून प्रमादाप्रती आसक्ती जागवते. भगवंत प्रत्येक गुणाचे विशेष महत्व - वैशिष्ट्य सांगत आहेत. सत्वगुणी पुरुषाच्या हातून काही प्रमाद घडला तर ते तमोगुणाचेच कार्य मानले जाईल. त्याच्या हातूनही प्रमाद घडेल-घडतो पण फरक असा आहे की तमोगुणी पुरुषाच्या ठायी तमोगुणाचे आधिक्य असल्यामुळे त्याचे संपूर्ण जीवन प्रमाद भरले असते.

: 10 :

***रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत।***
***रज: सत्त्वं तमश्चैव तम: सत्त्वं रजस्तथा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **सत्त्वं:** सत्वगुण
- **रज: च तम:** रजोगुण आणि तमोगुणाला
- **रज:** रजोगुण
- **सत्त्वं च तम:** सत्वगुण आणि तमोगुणाला
- **तथा तम:** तसेच तमोगुण
- **सत्त्वं च रज:** सत्वगुण आणि रजोगुणाला
- **अभिभूय भवति:** पराभूत करत वाटचाल करतो

**अर्थ**

आणि हे अर्जुना, रजोगुण आणि तमोगुण याना दडपून सत्त्वगुण वाढतो. सत्त्वगुण आणि तमोगुणाला दडपून रजोगुण वाढतो तसेच सत्त्वगुण व रजोगुणाला दडपून तमोगुण वाढतो.

*अन्य दोघांस जिंकूनि तिसरें करितें बळ।*
*असें चढे कधीं सत्त्व कधीं रज कधीं तम॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) रजोगुण आणि तमोगुणाला पराभूत करत सत्वगुण वाटचाल करतो. 2) सत्वगुण आणि तमोगुणाला पराभूत करत रजोगुण वाटचाल करतो आणि 3) सत्वगुण व रजोगुणाला पराभूत करत तमोगुणाची वाटचाल सुरु असते.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात सत्वगुण, रजोगुण आणि तमोगुणाचा उत्कर्ष कशा प्रकारे होतो हे सांगितले गेले आहे. मानवी प्रकृतीच्या म्हणजे स्वभावाच्या तिन्ही गुण आहेत. तीन गुण समान रुपात कुणाच्या ठायी आढळत नाहीत. कुठला तरी एक मुख्य आणि अन्य दोन गुण गौण स्वरुपात असतात. सत्वगुणी पुरुषाच्या ठायी सत्वगुणाचा उत्कर्ष दिसतो आणि अन्य दोन म्हणजे रजोगुण व तमोगुण दुर्बळ असतात - क्षीण असतात. त्याचप्रकारे रजोगुणी पुरुषाच्या ठायी रजोगुणाचा उत्कर्ष दिसून येतो त्याच्या तुलनेने सत्वगुण व तमोगुण दुबळे असतील. तमोगुणी पुरुषाच्या ठायी तमोगुण बलवान दिसतील तर सत्वगुण व रजोगुण दुबळे दिसतील. ज्या पुरुषात ज्या गुणाचे प्राबल्य दिसून येईल त्याला त्या गुणानुसार नाव दिले जाते. उदाहरणार्थ सत्वगुणाच्या प्राबल्याने सत्वगुणी, रजोगुणाच्या प्राबल्याने रजोगुणी तर तमोगुणाच्या प्राबल्याने तमोगुणी पुरुष म्हणवला जातो पण कुणाही मनुष्यात कुण्या एखाद्या गुणाचे प्राबल्य असले तरी उर्वरित दोन गुणांचा एकदम अभाव नसतो.

1) **भारत सत्त्वं रज: च तम: अभिभूय भवति:** रजोगुण आणि तमोगुणाला पराभूत करुन सत्वगुण अग्रेसर होतो.

इथे आधी असे सांगितले गेले आहे की जर सत्वगुणात वाढ करायची असेल, त्याला प्रबळ करायचे असेल तर रजोगुण आणि तमोगुणाला क्षीण करावे लागेल. सत्वगुणाशी नेहमी सहकार्य करायचा प्रयत्न करुन रजोगुण व तमोगुणाशी असहकार्य करायचे प्रयत्न केलेत तरच सत्वगुणाचे प्राबल्य वाढून रजोगुण व तमोगुण क्षीण होतील. मागील जन्मी आपण ज्या गुणाला प्राधान्य दिले असेल त्यानुसार या जन्मी गुणोत्कर्ष होईल. मागील जन्मी जर सत्वगुणाचे प्राबल्य केले असेल तर या जन्मीही सात्विक कुळात जन्म लाभ होईल आणि त्यामुळे सत्वगुण अधिक प्रबळ करण्याकामी सहाय्य लाभेल. सत्वगुणाच्या प्राबल्यातूनच ज्ञान म्हणजे आत्मज्ञान वा परमात्मज्ञान प्राप्त होऊ शकेल हे मागील श्लोकात बघितले.

2) **रज: सत्वं च तम: अभिभूय भवति:** सत्वगुण व तमोगुणाला पराभूत करुन - करत - रजोगुण अग्रेसर होतो. हे तिन्ही गुण प्रकृतीचे म्हणजे ईश्वरी मायेचे आहेत. प्रत्येक गुणाला आपण प्रबळ व्हावे असे वाटते. यामुळे सत्वगुणाचे प्राबल्य करुन झाल्यावरही आपण निश्चिंत बनून रहाता कामा नये. रजोगुण आणि तमोगुण आपल्यासाठी अनुकूल संधी लाभण्याची वाट बघतच रहातात. संधी मिळताच आपले सामर्थ्य दाखवू लागतात. एखाद्या व्यक्तीच्या ठायी सत्वगुणाचे प्राबल्य वाढले, त्याला वैराग्य प्राप्त झाले तरीही कुसंधी येताच त्याचा पाय घसरला अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. सामान्यपणे सत्वगुणी म्हणजे सत्वगुणप्रधान आणि तमोगुणी म्हणजे तमोगुणप्रधान लोकच अधिक दिसून येतात. रजोगुणी पुरुषात रजोगुणाचे प्राबल्य असून सत्व आणि तम गौण असतात पण रजोगुणी पुरुषाच्याही ठायी रजोगुण प्रधान असतानाही कधी तमोगुण तर कधी सत्वगुणाची वाढ झालेली दिसून येते. सत्संग लाभला तर सत्वगुणाकडे वळतो आणि कुसंगतीमुळे तमोगुणाकडे कल वाढतो - प्रवृत्ती - वृत्ती वळते.

3 ) **तथा तम: सत्वं च रज: अभिभूय भवति:** तसेच तमोगुण हा सत्वगुण व रजोगुणाला पराभूत करत पुढे वाटचाल करतो. सत्वगुण, रजोगुण वा तमोगुण काही का असेना त्याचे प्राबल्य मुख्यत्वेकरुन पूर्वजन्मीच्या संस्कारांवरच अवलंबून असते. अर्थात् या जन्मी आई-वडिलांच्या संस्कारांवर आणि बालपण, युवावस्था आणि प्रौढ वयात लाभणाऱ्या संगतीवर अवलंबून असते पण याहूनही पूर्वजन्मीच्या सात्विक, राजसी वा तामसी संस्कारांवर सर्वाधिक अवलंबून असते. तमोगुणाचे प्राबल्य ज्यांच्या ठायी आढळते त्या पुरुषाची लक्षणे 16 व्या अध्यायात विस्तारपूर्वक वर्णन केली आहेत. 16 व्या अध्यायाच्या आरंभिक तीन श्लोकात दैवी पुरुषाचे दैवीगुण वर्णिले गेले आहेत. दैवी पुरुष म्हणजे ज्यांच्या

ठायी सत्वगुणांचे प्राबल्य झाले आहे, असे पुरुष होय. समाजात रजोगुणी पुरुषांची संख्या अधिक असल्यामुळे त्यांचे गुण गीतेत विशेषत्वाने वर्णिलेले नाहीत पण या आणि 18 व्या अध्यायात सत्व, रज, तम या तीन गुणांची लक्षणे चांगल्या प्रकारे सांगितली गेली आहेत. उदाहरणार्थ सत्वगुणी पुरुष रजोगुणी वा तमोगुणी बनू शकतो, तसेच रजोगुणी पुरुष सत्वगुणी वा तमोगुणी बनू शकतो आणि तमोगुणी सत्वगुणी वा रजोगुणी बनू शकतो. या श्लोकात हाच मुद्दा सांगितला गेला आहे की माणसाच्या ठायी तीन गुण असतात आणि या तीन गुणांपैकी ज्या गुणाचे प्राबल्य झाले तसेच जीवन मार्गक्रमण करते.

: 11 :

*सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते ।*
*ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृध्दं सत्त्वमित्युत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदा अस्मिन् देहे:** जेव्हा या देहात
- **सर्वद्वारेषु:** सर्व द्वारांमध्ये म्हणजे अंत:करणात व इंद्रियात
- **प्रकाश: ज्ञानं उपजायते:** प्रकाश म्हणजे चैतन्य आणि ज्ञान उत्पन्न होते
- **तदा सत्त्वं उत विवृध्दं:** तेव्हा सत्त्वगुणाचेच प्राबल्य वाढते
- **इति विद्यात्:** असे मानायला - जाणायला हवे

**अर्थ**

ज्यावेळी या देहात तसेच अंत:करणात व इंद्रियात चैतन्य आणि विवेकशक्ती उत्पन्न होते, त्यावेळी असे समजावे की सत्त्वगुण वाढला आहे.

*प्रज्ञेचा इंद्रिय -द्वारा प्रकाश सगळीकडे ।*
*देहात पसरे तेव्हां जाणावें सत्व वाढलें ॥*

**विषय:** या श्लोकात एकच गोष्ट सांगितली गेली आहे की या देहात ज्यावेळी सर्व द्वारात प्रकाश आणि ज्ञान उत्पन्न होते त्यावेळी सत्वगुणच वाढला असे समजायला हवे.

**स्पष्टीकरण**

सत्वगुणाचा अत्युत्कर्ष झाल्यावर माणसाच्या जीवनात मुख्यत: काय प्रकट होते ते या श्लोकातून भगवंत सांगताहेत. या देहात म्हणजे पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, मन आणि बुध्दी या बारा ठिकाणी प्रकाश म्हणजे ज्ञानच ज्ञान प्रकट होऊ लागते तेव्हा सत्वगुणाचा आत्यांतिक उत्कर्ष झाला, असे मानायला हवे. ज्ञान म्हणजे अद्वैत ज्ञान. अज्ञान म्हणजे भेद ज्ञान किंवा भेद दृष्टी. जोवर जीवनातील सर्व व्यवहारात, सर्व क्रियांमध्ये भेदाचा अनुभव येतो, भेद दृष्टी राखून व्यवहार केला जातो, तोवर अज्ञान कायम आहे, ते काही नष्ट झाले नाही, असे मानायला हवे. ज्यावेळी व्यवहारातल्या सर्व क्रियांमध्ये, सर्व प्रसंगांमध्ये अद्वैताचा अनुभव यायला लागेल, संपूर्ण व्यवहार अद्वैत दृष्टीने सहजपणे चालला आहे, असे अनुभवायला येईल तेव्हा ज्ञान प्राप्त झाले असे मानायला हवे. अद्वैत दृष्टी एक स्थिती आहे. या स्थितीत अहंचे शून्य बनून जाते, त्याचा ईश्वरात विलय होऊन जातो. अहंकाराच्या अस्तित्वामुळे भेद दृष्टी शिल्लक रहाते. अहंकाराच्या विलयासोबत अभेद दृष्टी जागते. या श्लोकाचे विवेचन करताना ज्ञानेश्वर माऊली लिहिते -

वसंत ऋतुत ज्याप्रमाणे कमलपुष्पांचा सुगंध स्वत: कमळात सामावला न जाता सर्वत्र फाकतो तसेच त्या माणसाचे ज्ञान आत सामावू न शकल्यामुळे बाहेर प्रकट होऊ लागते. सर्व इंद्रियांच्या अंगणात विवेकबुध्दी जागृत उभी ठाकलेली असते त्यामुळे हाता-पायांना ज्ञानाचे अद्भुत डोळे लाभतात -दृष्टी लाभते. राजहंसाची चोच ज्याप्रमाणे नीर - क्षीर विवेक करते, त्याप्रमाणे योग्य - अयोग्य, पाप - पुण्य वगैरेची पारख करुन विवेकी इंद्रिये त्याचा निर्णय करतात. इंद्रिय निग्रह तर जणू काही त्याचा सेवकच बनून जातो. जे ऐकण्यायोग्य नसते ते त्याचे कान आपोआपच टाळून देतात. जी वस्तु बघण्यायोग्य नाही त्याची दृष्टी स्वत:च त्याचा बहिष्कार करुन टाकते आणि जी गोष्ट सांगण्यायोग्य नाही ती चर्चा करायला त्याची जीभ कदापि प्रवृत्त होत नाही. दीपक ज्योतीपुढे ज्याप्रमाणे अंध:कार पळून जातो त्याचप्रकारे निषिध्द कर्मेही इंद्रियांसमोर उभी रहात नाही त्वरित पळून जातात, ज्या प्रमाणे पावसाळ्यात एखादी मोठी नदी पूराने फुगून जाते

तशाप्रकारे त्याची बुध्दीही सर्व शास्त्रांमध्ये पूर्ण संचार करु लागते. पौर्णिमेच्या रात्री ज्याप्रमाणे चंद्रम्याची प्रभा अत्यंत तीव्रतेने आकाशभर पसरते त्याचप्रकारे त्याची वृत्तीही ज्ञानाच्या प्रांतात खूप स्वतंत्रपूर्वक विहार करते. वासनावृत्ती ईश्वराच्या ठायी स्थिर होऊन जाते आणि मन विषयोपभोगांपासून विरक्त होऊन जाते. तात्पर्य असे की सत्वगुणांची जेव्हा वृध्दी होते तेव्हा माणसाच्या ठायी ही तमाम लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतात. त्या शुध्द सत्वामुळे ज्ञानात विलक्षण वृध्दी होते आणि बुध्दी विवेकरुपी सागरात तरंगू लागते. अद्वैत दृष्टीमुळे विवेक निर्मळ रहातो. द्वैताला सत्य मानल्यामुळे साऱ्या व्यवहारात द्वैत दृष्टीचे असणे स्वाभाविक ठरते. द्वैत दृष्टीमुळे सत् - असत् यातला फरक ओळखण्याची बुध्दीची शक्ती अधू - मंद होऊन जाते. अद्वैत दृष्टीमुळे ही शक्ती शुध्द रुपात प्रकट होते. बुध्दी अनावश्यक ज्ञानाला ग्रहण करत नाही. ती आवश्यक ज्ञानाला सहजपणे ग्रहण करुन घेते. मन भावनात्मक आहे. द्वैत दृष्टीच्या प्रभावामुळे मनात नाना अशुध्द भाव वा विकार उठत रहातात. अद्वैत दृष्टी लाभल्यावर मनात शुध्द भावच उठतात, विकार जागत नाही. ईश्वर - स्मरणाने मनात ईश्वरभाव उत्पन्न होतो. ज्ञानेंद्रियांमध्ये सर्वात प्रबळ नेत्र आहेत. जेव्हा नेत्रात अद्वैत दृष्टी जागते तेव्हा दर्शनात विशुध्दता रहाते. अशाच प्रकारे जेव्हा सर्व इंद्रियांच्या ठायी ईश्वरदृष्टी नांदते तेव्हा सत्वगुणाचाच आत्यंतिक उत्कर्ष झाला असे मानायला हवे. सत्वगुणाच्या आत्यंतिक उत्कर्षातच ईश्वरी ज्ञान प्राप्त होते.

: 12 :

*लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।*
*रजस्येतानि जायन्ते विवृध्दे भरतर्षभ ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतर्षभः** हे अर्जुना
- **रजसि विवृध्दे:** रजोगुण वाढल्यावर
- **लोभः प्रवृत्तिः** लोभ आणि प्रवृत्ती म्हणजे प्रापंचिक कर्मे
- **कर्मणां आरम्भः** अनेक कर्मांचा म्हणजे सर्व प्रकारच्या आरंभ
- **अशमः** अशांती म्हणजे मनाची चंचलता
- **स्पृहा:** विषयोपभोगांची लालसा
- **एतानि जायन्ते:** हे सारे उत्पन्न होतात

**अर्थ**

हे अर्जुना, रजोगुण वाढल्यावर लोभ, प्रवृत्ती, स्वार्थाने प्रेरित होऊन फळाच्या इच्छेने कर्मांचा आरंभ, अशांतता आणि विषयभोगांची लालसा ही सर्व उत्पन्न होतात.

*प्रवृत्ति लालसा लोभ कर्मारंभ अशांतता ।*
*हीं देहीं उठती तेव्हां जाणावें रज वाढलें ॥*

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत की रजोगुण वाढल्यावर 1) लोभ. 2) प्रवृत्ती. 3) अनेक कर्मांचा आरंभ 4) अशांतता. 5) लालसा वा भोगांची तीव्र इच्छा हे सारे उत्पन्न होतात.

रजोगुण वाढल्यावर - प्रबळ झाल्यावर - कोणते गुण प्रकट होतात? ते या श्लोकात सांगितले गेले आहे. रजोगुण व तमोगुण ज्ञानाला झाकणारे असल्यामुळे दोन्ही अज्ञानाला वाढवणारे आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **रजसि विवृध्दे लोभः** रजोगुण वाढल्यावर लोभ निर्माण होतो. लोभही अनेक प्रकारचा असतो. जगात सर्वसामान्यपणे धनलोभच आढळून येतो कारण की धन - प्राप्ती झाल्यावर त्याच्या आधारे विषयोपभोग उत्कटपणे भोगता येतो. यामुळे पहिले लक्ष्य वा उद्दिष्ट धन मिळवणे, धनाची नेहमी वाढ होणे हे असते. धन वाढले की आनंद होतो, घटले की दु:ख होते. घटताच दु:ख होते. कीर्तीचा लोभ असतो. अनेकांच्या मनात विश्व-भ्रमणाचा लोभ असतो. अनेक भाषा शिकायचा लोभ असतो.

2) **प्रवृत्तिः** प्रवृत्ती म्हणजे अनेक प्रकारची कर्मे करण्याची प्रवृत्ती होय. रजोगुण वृध्दीचे हे दुसरे लक्षण आहे. धनाचा लोभ झाल्यावर सहाजिकच धन मिळवण्यासाठी नाना उपद्व्याप करावे लागतात. कीर्तीसाठीही नाना प्रवृत्ती अंगिकारल्या जातात. या प्रकारे रजोगुण वृध्दीचा दुसरा परिणाम असा होतो की अनेक

अनावश्यक कर्मे करण्याकडे माणसाची प्रवृत्ती होते - माणसाचा कल होतो.

3) **कर्मणाम् आरंभः** कर्माचा आरंभ. जेव्हा कर्मे आचरायची प्रवृत्ती होईल तेव्हा अनायासेच बाहेरुन अनेक प्रकारची कर्मे आचरली जातील, त्यांचा आरंभ होईल. लोभ आणि प्रवृत्ती या मनाच्या वृत्ती आहेत. लोभ उत्पन्न झाल्यावर त्यानुसार मनात वृत्ती म्हणजे अनेक कर्मे करायची प्रवृत्ती जागृत होईल. या दोन वृत्तींमुळे माणूस प्रत्यक्षात अनेक निरर्थक कर्मे आचरायला सुरुवात करुन देतो. लोभ वृत्ती असल्यावर अशा प्रकारची कर्मे करण्यापासून तो स्वत:ला वाचवू शकत नाही.

4) **अशमः** अशांतता. नाना प्रकारच्या निष्प्रयोजन कामे करण्यातून अशांतता उपजते. धनाच्या लोभामुळे तर अशांततेचा हमखास अनुभव येतो. ज्यांच्याजवळ आधीपासून धन आहे त्यांच्या मनातून लोभ निघून जायला हवा पण ज्यांच्यापाशी धन आहे त्यांनाही लोभ घेरुन घेतो. लक्षाधीशांना कोटींचा लोभ असतो. धनलोभ सुखाच्या प्राप्तीसाठीच असतो पण सुखाऐवजी अशांतता म्हणजे दु:खच पदरी पडते. यामुळे एवढे ठरलेले आहे - निश्चित आहे की जोवर वृत्तीच्या ठायी रजोगुणाचे प्राबल्य असेल तोवर माणूस अशांततेपासून वाचू शकत नाही.

5) **स्पृहा एतानि जायन्तेः** स्पृहा म्हणजे लालसा, भोगांविषयीची तीव्र इच्छा हे सारे उत्पन्न होतात. लोभाच्या परिणाम स्वरुपी माणूस नाना अनावश्यक कर्मे आचरण्यात प्रवृत्त होतो आणि परिणामी अशांतता अनुभवायला मिळते. तसाच लोभाचा दुसरा परिणाम स्पृहा आहे म्हणजे भोगांविषयीची लालसा आहे. भोग नाना प्रकारचे असतात. भोग लालसेमुळेच समाजात कमीत कमी काम करण्याची प्रवृत्ती जागते. भोगलालसेत अधिकाधिक सुखसोयी आणि आराम प्राप्त करण्याची इच्छा असते. यामुळे माणूस ते सारे मिळवायच्या मागे लागतो. रजोगुणाचा स्वभाव चंचळ आहे. रजोगुण वाढले की चित्त हमेशा चंचळ बनते. चित्ताच्या चंचळतेमुळे लोभ, अशांतता, भोग - लालसा वगैरे वृत्ती जागणे अगदीच स्वाभाविक आहे.

: 13 :

*अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च।*
*तमस्येतानि जायन्ते विवृध्दे भरतर्षभ॥*

कुठे 'भरतर्षभ' ऐवजी 'कुरुनंदन' असा पाठही आहे.

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतर्षभ (किंवा कुरुनंदन):** हे अर्जुना
- **तमसि विवृध्दे:** तमोगुण वाढल्यावर
- **अप्रकाश:** अविवेक
- **अप्रवृत्तिः** प्रवृत्तीचा अभाव म्हणजे कर्तव्यकर्मे न करण्याकडे प्रवृत्ती
- **प्रमादः** प्रमाद वा जडता वा व्यर्थ चेष्टा
- **मोहः एव चः** आणि निद्रा वगैरे अंत:करणाला मोहित करणाऱ्या वृत्ती
- **एतानि जायन्तेः** हे सारे उत्पन्न होतात

**अर्थ**

हे अर्जुना, तमोगुण वाढल्यावर अंत:करण आणि इंद्रिये यांत अंधार, कर्तव्यकर्मात प्रवृत्ती नसणे, व्यर्थ हालचाली आणि झोप इत्यादी अंत:करणाला मोहित करणाऱ्या वृत्ती, या सर्व उत्पन्न होतात.

*अंधार मोह दुर्लक्ष अप्रवृत्ती चहूंकडे।*
*देहांत माजलीं तेव्हां जाणावें तम वाढलें॥*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) तमोगुण वाढल्यावर अविवेक. 2) प्रवृत्तीचा अभाव. 3) प्रमाद. 4) मोह उत्पन्न होतात.

**स्पष्टीकरण**

1) **भरतर्षभ तमसि विवृध्दे अप्रकाशः** तमोगुण वाढल्यावर अविवेक, अज्ञान उत्पन्न होते. सत्वगुणाचे प्राबल्य झाले तर सर्व इंद्रियांमध्ये ज्ञान प्रकट होते. रजोगुणाच्या प्राबल्यामुळे लोभ, प्रवृत्ती म्हणजे नाना अनावश्यक निरर्थक कर्मे आणि त्यामुळे उपजणाऱ्या अशांतता आणि भोग - लालसा उत्पन्न होते.

या श्लोकात तमोगुणाच्या प्राबल्याचे चार परिणाम सांगितले आहेत. 1) अप्रकाश म्हणजे अविवेक. ज्ञानरुपी प्रकाश आत सदैव उपस्थित आहे पण अविवेकामुळे त्या प्रकाशाचा आपल्याला अनुभव घेता येत नाही. अविवेक

म्हणजे तमोगुणाची वृध्दी होय. सत्वगुणाचा उत्कर्ष प्रकाश म्हणजे विवेक. सत्वगुणाच्या प्राबल्यामुळे अज्ञानाचे आवरण दूर हटून आतल्या ज्ञानाचा अनुभव येतो. तमोगुणाची वृध्दी झाल्यावर ज्ञानरुपी प्रकाश झाकला जातो. ज्या पुरुषाच्या ठायी तमोगुणाचे प्राबल्य असते त्याच्या आचरणात अविवेक आढळतो. सज्जनाचेही जर अविवेकी आचरण असेल तर तेवढ्या प्रमाणात त्याच्या हातून तमोगुणाचे कार्य घडत आहे असे समजावे. अविवेक म्हणजे अज्ञान. सामान्यपणे विवेकी पुरुषाच्या हातून अविवेकी कामे घडत नाहीत पण प्रसंग पडला तर विवेकी पुरुषातही कधी-कधी अविवेक प्रकटतो. त्यामुळे त्या प्रमाणात विवेकी पुरुषाच्या ठायी अज्ञान मानायला हवे. तमोगुणी पुरुषाच्या ठायी तमोगुण वाढलेले दिसतात. त्याच्या आचरणात अविवेक आढळतो. त्याचे बोलणे बेताल असते. त्याचे सारे आचरण विसंगत असते. सत्य वस्तुचे ग्रहण न केले गेल्यामुळे त्याचे निर्णयही चुकीचे ठरतात. हे झाले एक लक्षण.

2) **अप्रवृत्ति:** कर्मे आचरण्याकडे त्याची प्रवृत्ती वळत नाही. - त्याचा कल रहात नाही. रजोगुण नाना प्रकारच्या प्रवृत्तींमध्ये टाकतो -ढकलतो. तमोगुण प्रवृत्तीपासून दूर करतो. कधी काही प्रवृत्ती करावीच लागली तर जबरदस्तीपूर्वक करतो पण संधी सापडताच लगेच ती प्रवृत्ती सोडून देतो. याचा अर्थ असा की रजोगुणाच्या ठायी प्रवृत्ती दिसून येते तर तमोगुणात अभाव दिसतो. यामुळे रजोगुणापेक्षा अप्रवृत्ती हे तमोगुणाचे लक्षण आहे. संन्यासी जनांमध्येही तमोगुण आढळतो. अर्थात खऱ्या संन्याश्यांमध्ये करुणा वृत्तीचे प्राबल्य असल्यामुळे त्यांच्या ठायी ही अप्रवृत्ती म्हणजे सेवा कार्यापासून निवृत्ती आढळून येत नाही. प्रपंचातल्या कटकटींना कंटाळून काही लोक संन्यासी बनून जातात, खरे तर ते अप्रवृत्तीकडे वळतात किंवा जे पुरुषार्थशून्य असतात म्हणजे ज्यांच्या ठायी काम, क्रोध वगैरे विकार उत्पन्न होतात त्याना घालवण्यासाठी त्यांचा अनेकांशी संबंध येतो त्यावेळी हे काम, क्रोध वगैरे विकार प्रकट होऊ लागतात. त्यावेळी या विकारांना क्षीण करायचा कुठला उपाय नसल्यामुळे जे हरतात - हतवीर्य होऊन बसतात ते सेवाकार्याचा त्याग करुन निष्क्रिय बनून जातात. अशा निष्क्रिय अवस्थेतच ते स्वत:ला धन्य मानतात आणि केवळ निवृत्तीमुळे काम - क्रोध वगैरे विकार क्षीण होऊन गेले, अशी भ्रांत कल्पना करुन घेतात. अशा लोकांना तमोगुणाच्या अधीन झालेले मानायला हवे. अशा निष्क्रिय संन्याश्यांना ज्ञान प्राप्त होण्याची शक्यता नाही. सत् - प्रवृत्तीचा त्याग केल्यावर लाभणारी शांतता ही निष्क्रिय असते. ती खरी शांतता नव्हे. खरी शांतता तर विकार क्षीण झाल्यावरच अनुभवता येते.

3) **प्रमाद:** प्रमाद. तमोगुणाच्या वृध्दीचे तिसरे लक्षण आहे प्रमाद. अप्रवृत्ती जागली तर प्रमाद म्हणजे दुर्लक्षच उद्भवतो. निवृत्तीमुळे हलगर्जीपणा जागायची शक्यता असते. मन आतून तर निवृत्त झालेले नसते. जोवर मन आतून निवृत्त होत नाही तोवर बाह्य निवृत्तीला काही अर्थ नसतो. बाहेरुन निवृत्त होण्यात दुर्लक्ष - आळसच येतो.

4) **मोह एव एतानि जायन्ते:** मोह वा मूढताच उत्पन्न होते. तमोगुणाच्या वृध्दीचे चौथे लक्षण मोह आहे. निष्क्रियतेमुळे प्रमाद घडतो आणि प्रमाद घडला की मोह वा अविवेक जागतो. चित्तात अजागृती उपजणे हा मोह वा मूढतेचा परिणाम आहे. चित्त प्रवृत्तीशील असते तरच त्याग जागृती येऊ शकते. चित्ताला जागृत राखण्याकामी सत्प्रवृत्ती खूप मदत करते. यामुळे सत्प्रवृत्तीचे खूप महत्व आहे. चित्ताची उन्मनी अवस्था जागते म्हणजे खूप श्रेष्ठ अवस्था जागते. या अवस्थेत चित्त सहजच अखंड जागृत असते. या अवस्थेत जर प्रवृत्ती कमी झाली तर चालु शकेल. यामुळे मूढता वा अजागृतीची वेळ येणार नाही पण जोवर अशी श्रेष्ठ दशा प्राप्त होत नाही तोवर सत्प्रवृत्तीचा त्याग करायलास नको.

रजोगुणी आणि तमोगुणी पुरुषांचे वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज लिहितात. रजोगुणाचे जेव्हा प्राबल्य वाढते तेव्हा तो इंद्रियांना विषयोपभोग करण्यासाठी अगदी मोकळे सोडून देतो. परस्त्रीला कामूक दृष्टीने बघणे त्याला निषिध्द वा नीतीविरुध्द वाटत नाही. शेळी जशी अनिर्बंधपणे चरायला मोकळी असते तसे तो आपल्या इंद्रियांना अनिर्बंधपणे चहुकडे चरु देतो. त्याची विषय लालसा पराकोटीला जाऊन पोहोचते. जी वस्तु लाख प्रयत्न करुनही त्याच्या हाती गवसत नाही केवळ तीच वस्तु वाचू शकते. त्याच्यासमोर जे काही भलेबुरे काम येते त्याकडे त्याची प्रवृत्ती झाल्याशिवाय रहात नाही. कधी - कधी त्याला असा एखादा अचाट छंद जडतो की एखादा प्रासाद उभारावा वा मंदीर बनवावे, महानगरे उभारावीत

वा सरोवरे बांधावीत, नानाविध महावनांची रचना करावी वा अश्वमेघ यज्ञ करावा. आता तमोगुणाची लक्षणे ऐका. मन अमावस्येच्या रात्रीच्या आकाशासारखे होऊन जाते. तिथे ना सूर्य असतो ना चंद्रमा. मन तमोमय - अंधकार भरले होऊन जाते. अमावस्येच्या रात्रीसारखे मन शून्य, चैतन्यहीन आणि उदास होऊन जाते. या अवस्थेत मनात विचाराला अजिबात अवकाश उरत नसतो. अविचाराचा उद्दाम प्रबळ असा वेग सबंध देहाला आतून - बाहेरुन व्यापून टाकतो. मदिरा प्राशन न करताच झिंगायला लागतो. सन्निपात नसतानाही बरळायला लागतो. हृदयी प्रेम नसता भुलतो. वेड्यासारखा मोहाक्रांत होतो. अशाप्रकारे तो सदैव मादक मोहाने आक्रांत असतो.

: 14 :

*सदा सत्त्वे प्रवृध्दे तु प्रलयं याति देहभृत् ।*
*तदोत्तमविदां लोकानमलान् प्रतिपद्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु यदा:** पण जेव्हा
- **सत्त्वे प्रवृध्दे:** सत्वगुणाची वृध्दी झाल्यावर
- **देहभृत्:** देहधारी जीव
- **प्रलयं याति:** मरुन जातो
- **तदा उत्तमविदां:** तेव्हा योग्यांच्या
- **अमलान लोकान्:** विशुध्द कुळात
- **प्रतिपद्यते:** जन्म घेतो

**अर्थ**

जेव्हा हा माणूस सत्त्वगुण वाढले असताना मरण पावतो तेव्हा तो उत्तम कर्मे करणाऱ्यांच्या निर्मळ दिव्य स्वर्ग वगैरे लोकात जातो.

*वाढलें असतां सत्व जाय जो देह सोडुनी ।*
*जन्मतो शुभ लोकांत तो ज्ञात्यांच्या समागमीं ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) सत्वगुणांची वृध्दी झाल्यावर जेव्हा देहधारी जीव निधन पावतो तेव्हा. 2) योग्यांच्या विशुध्द कुळात जन्म घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **तु यदा सत्त्वे प्रवृध्दे देहभृत् प्रलयं याति:** सत्वगुणांच्या उत्कर्षाच्या अवस्थेत जेव्हा देहधारी निधन पावतो. सत्वगुणाचे प्राबल्य वाढले तरच ज्ञान प्राप्त होते पण आत्मज्ञान एका जन्मातच प्राप्त होईल असे काही सांगता येत नाही. या श्लोकात असे सांगताहेत की सत्वगुणाच्या प्राबल्यानंतर जेव्हा शरीर धरणीवर पडते - मरण येते - तेव्हा त्याला पुढचा जन्म सत्पुरुषांच्या, योग्यांच्या कुळात लाभतो. यासोबत भगवंत असेही सांगताहेत की संपूर्ण जीवनात सत्वगुणाचे प्राबल्य वाढले असले तरीही देहाचा त्याग होईपर्यंत ते अबाधित रहायला हवे कारण की अंतकाळाच्या भावनेवरच पुढचा जन्म अवलंबून असतो. सहाव्या अध्यायातल्या अखेरच्या श्लोकात पुनर्जन्मविषयक चर्चा आहे. जीवनाचे पूर्वार्ध्द आणि उत्तरार्ध्द असे दोन भाग करु म्हटले तर पूर्वार्ध्दापेक्षा उत्तरार्ध्द महत्वाचा ठरतो. जीवनाच्या उत्तरार्ध्द काळानुसारच भावना अंतिम काळी प्रकट होईल. यामुळेच असे सांगितले आहे की पूर्वार्ध्दात सत्वगुणाचे प्राबल्य झाल्यावर ते अंतकाळापर्यंत टिकून रहायला हवे.

यामुळे शास्त्रकारांनी वानप्रस्थ आणि संन्याशाश्रमाला उत्तरार्ध्दात स्थान दिले आहे. पूर्वार्ध्दात गृहस्थाश्रम असला तरी जीवनाच्या उत्तरार्ध्दात तो असायला नको. उत्तरार्ध्दात गृहस्थाश्रमातून निवृत्त होऊनच जायला हवे. मानव देह लाभल्यावरही जर अशी दृष्टी नसेल तर मग माणूस आणि पशु - पक्षी वगैरेंच्या जीवनात काही फरक उरणार नाही. मानवी देहाचे वैशिष्ट्यच भवसागरातून मुक्त होणे आहे. यामुळे सत्वगुणाचे प्राबल्य जर जीवनाच्या पूर्वार्ध्दात सुरु होणार असेल तर ते अंतिम क्षणापर्यंत टिकावे, असे सांगण्यात आले आहे. काही लोकांच्या ठायी जीवनातल्या पूर्वार्ध्दात वैराग्य वगैरेवर भर असतो पण तो अंतकाळापर्यंत टिकत नाही.

2) **तदा उत्तमविदां अमलान् लोकान् प्रतिपद्यते:** तेव्हा योगी जनांच्या विशुध्द लोकात म्हणजे श्रेष्ठ कुळात तो जन्म घेतो. इथे 'विशुध्द लोक' शब्दाचा वापर केला गेला आहे. विशुध्द लोकाचा अर्थ स्वर्ग वगैरे लोक असाही केला जाऊ शकतो पण देवलोक असा अर्थ करण्याऐवजी देवतुल्य योगी जनांच्या कुळात जन्म होतो असा अर्थ सुयोग्य आहे - समुचित आहे. भक्ती - वैराग्य

वगैरे साधना केली असेल आणि त्याचा प्रभाव संस्कार - अंतकाळापर्यंत टिकून रहावा आणि अंतकाळाच्या विषम समयी वैराग्य, भक्ती वगैरेचा संस्कार जागृत असला तरच त्याला चांगला जन्म मिळू शकतो. अंतसमयी देह रोगग्रस्तही होऊन जातो. असह्य वेदना असतानाही मनी वैराग्य, हरी स्मरण वगैरे भावना असल्या तर पुढील जन्म योगी जनांच्या कुळात लाभतो.

: 15 :

***रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते।***
***तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **रजसि प्रलयं गत्वा:** रजोगुणाच्या प्राबल्यात जर निधन झाले
- **कर्मसंगिषु जायते:** तर कर्माची आसक्ती असणाऱ्या कुळात जन्म होतो
- **तथा तमसि प्रलीन:** त्याचप्रमाणे तमोगुणाच्या प्राबल्यकाळात निधन झाल्यावर
- **मूढ योनिषु जायते:** मूढ योन्यांमध्ये जन्म होतो

**अर्थ**

रजोगुण वाढला असता मरण पावल्यास कर्माची आसक्ती असणाऱ्या मनुष्यात जन्मतो तसेच तमोगुण वाढला असता मेलेली व्यक्ती किटक, पशु इत्यादी मूढ म्हणजे विवेकशून्य जातीत जन्मतो.

***रजांत लीन झाला तो कर्मासक्तांत जन्मतो।***
***तमीं बुडूनी गेला तो मूढ - योनींत जन्मतो॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) रजोगुणाच्या प्राबल्यकाळी जर निधन झाले तर कर्मात आसक्त अशा रजोगुणी कुळात जन्म होतो. 2) तमोगुणाच्या प्राबल्यकाळात निधन झाल्यावर मूढ योन्यांमध्ये म्हणजे पशु, पक्षी वगैरे योन्यांमध्ये वा तमोगुणी कुळात जन्म घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **रजसि कर्मसंगिषु जायते प्रलयं गत्वा:** रजोगुणाच्या प्राबल्यकाळात जर निधन झाले तर रजोगुणी कुळात जन्म होतो. जीवनाच्या पूर्वार्धकाळात जरी सत्वगुणाचे प्राबल्य असले पण उत्तरार्धात तर रजोगुणाचे प्राबल्य वाढले तरी त्यानुसारच पुढील जन्म होतो. रजोगुणाच्या प्राबल्यामुळे रजोगुणी कुळात जन्म लाभल्यावरही या जन्मी जीवनाच्या पूर्वार्धकाळात जर सत्वगुणाचे प्राबल्य वाढले तर त्याचा लाभ पुढच्या जन्मी थोडा तरी लाभेल. रजोगुणी पुरुषाच्या सहवासात बालपणी रहायचा प्रसंग आल्यावरही त्याचे सात्विक संस्कार काही अंशी बचाव करतील पण जर या जन्मी उत्तराध्र्दात रजोगुणाच्या प्राबल्य काळात निधन झाले तर त्यामुळे पुढील जन्मी रजोगुणी आई - वडिलांचा सहवास लाभणे अटळ आहे. रजोगुणप्रधान कर्मांमुळे पुढील जन्मी त्याचे फळ अटळपणे - अपरिहार्यपणे - भोगावे लागेल. रजोगुणप्रधान कुळात जन्म लाभल्यामुळे त्याच्या जीवन - विकासात बाधा येईल म्हणजे दु:खाचा अधिक अनुभव घ्यावा लागेल. सत्वगुणप्रधान कुळात जन्म झाल्यामुळे लहानपणी सुखच अनुभवायला मिळेल कारण की सत्वगुणाच्या प्राबल्यामुळे सुख प्राप्तीच होईल.

अशाप्रकारे भगवंत सांगताहेत की रजोगुणाच्या प्राबल्यकाळात निधन झाल्यावर कर्मासक्त पुरुषाच्या कुळात जन्म होईल. रजोगुण कर्मात आसक्ती उत्पन्न करतो. नाना निरर्थक कर्मात प्रवृत्त करतो यामुळे भगवंताने 'रजोगुणप्रधान' कुळात जन्म घेतो असे न सांगता रजोगुणाच्या परिणामाने कर्मासक्तीच्या अनुसंधानात असे सांगितले आहे की 'कर्मासक्त पुरुषाघरी' तो जन्म घेतो.

2) **तथा तमसि प्रलीन: मूढयोनिषु जायते:** त्याचप्रकारे तमोगुणाच्या प्राबल्य काळात निधन झाल्यावर मूढ योनीत जन्म होतो. ही मूढ योनी तमोगुण प्रधान असते यामुळे पशु, पक्षी वगैरेंच्या कुळात वा तमोगुणप्रधान कुळात जन्म घेतो. जीवनाच्या पूर्वाध्र्द काळात सत्वगुणाचे प्राबल्य असले तरी पुढे वाईट संगतीची शक्यता असते, ही गोष्ट काही दृष्टांतांनी स्पष्ट होते. जीवनाच्या उत्तराध्र्द काळात जर वाईट संगती लाभली आणि त्यातच आनंद वाटु लागला तर निधनापर्यंत त्या कुसंगतीचाच प्रवाह वहाता रहातो - प्रवाहित रहातो. तमोगुणाच्या प्राबल्य काळात निधन झाल्यावर एक जन्म पशु-पक्ष्यांचा लाभणे स्वाभाविक आहे. यानंतर दुसरा जन्म माणसाचा मिळू

शकतो पण हे सारे पूर्वजन्मीच्या संस्कारांवरच अवलंबून असेल पण जर कुणी पूर्वजन्मी पूर्वार्ध्द काळात चांगली कर्मे आचरली असतील तर त्याच्या परिणामी त्याला चांगल्या कुळात जन्म लाभू शकतो. चांगल्या कुळात जन्म लाभणे सत्कर्मांचीच परिणती आहे पण चांगल्या कुळात जन्म लाभल्यावरसुध्दा पूर्वजन्मीच्या तामसी कर्मांचे फळ या चांगल्या जन्मीही अवश्यमेव भोगावे लागते.

: 16 :

*कर्मण: सुकृतस्याहु: सात्विकं निर्मलं फलम् ।*
*रजसस्तु फलं दु:खमज्ञानं तमस: फलम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सुकृतस्य कर्मण:** पुण्य कर्मांची म्हणजे सात्विक कर्मांची
- **सात्विकं निर्मल फलं:** सात्विक म्हणजे सुख, ज्ञान, वैराग्य वगैरे विशुध्द फळे (मिळतात)
- **आहु:** असे ज्ञानीजन म्हणतात
- **तु रजस: फलं दु:खं:** पण रजोगुणाची फळे दु:ख आहेत
- **तमस: फल: अज्ञानं:** तमोगुणाचे फळ अज्ञान आहे

**अर्थ**

सात्विक म्हणजे श्रेष्ठ कर्माचे सात्विक अर्थात् सुख, ज्ञान आणि वैराग्य इत्यादी निर्मळ फळ सांगितलेले आहे. राजस कर्मांचे फळ दु:ख तसेच तामस कर्मांचे फळ अज्ञान सांगितले आहे.

*फळ सात्विक कर्माचें पुण्य निर्मळ बोलिलें।*
*रजाचें फळ तें दु:ख तमाचें ज्ञान-शून्यता ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) ज्ञानी पुरुषांनी असे सांगितले आहे की चांगल्या कर्माचे, पुण्य कर्मांचे फळ उच्च प्रतीचे विशुध्द असते. 2) पण रजोगुणाचे फळ दु:ख प्राप्ती होय आणि 3) तमोगुणाचे फळ अज्ञान आहे.

या श्लोकात भगवंतांनी सात्विक, राजसी, तामसी कर्म फळांची चर्चा केली आहे. भगवंताने सृष्टी उत्पन्न करुन नियमाधीन राखली आहे. अगणित माणसे उत्पन्न झालीत, पुढेही होतील. पशु, पक्षी, किटक ंची तर गणनाच नाही. सर्वांच्या कर्माचे फळ देणारा भगवंतच आहे.

**स्पष्टीकरण**

1) **सुकृतस्य कर्मण: सात्विकं निर्मलं फलं आहु:** चांगल्या कर्माचे, पुण्य कर्माचे सात्विक म्हणजे श्रेष्ठ प्रतीचे विशुध्द फळ मिळते. भगवंत म्हणतात की सात्विक म्हणजे पुण्यकर्माचे फळ श्रेष्ठ प्रतीचे विशुध्द फळच असेल कारण की सात्विक कर्मे स्वत: - स्वयमेव - पवित्र आणि श्रेष्ठ प्रतीची असतात. सत्वगुणाच्या प्राबल्यामुळेच ईश्वरी ज्ञान प्राप्त होते. ज्यांच्या मनात हा दृढ निश्चय झाला की जीवनातले प्रत्येक कर्म सात्विक असेल आणि जीवनभर आपण सात्विक कर्माचाच उत्कर्ष साधू त्याना भगवंत इथे आश्वासन देत आहेत की त्यांनी आचरलेल्या सात्विक कर्माचे त्याना सात्विक म्हणजे श्रेष्ठ व पवित्र फळ मिळेल. सात्विक कर्मामुळे एकीकडे सुख तर दुसरीकडे पुढील जन्म सात्विक वा योगीजनांच्या कुळात लाभेल. अशाप्रकारे सात्विक कर्मामुळे दोन प्रकारची फळे लाभतील. यासाठी प्रमाण देत - पुरावा सादर करत असे म्हटले आहे की ही गोष्ट शिष्ट जनांनी, ज्ञानी पुरुषांनी स्वानुभवाने सांगितली आहे.

2) **तु रजस: दु:खं फलम्:** पण रजोगुणाचे फलित - फळ दु:ख प्राप्ती आहे. हा सर्वाचा अनुभव आहे. रजोगुणावर संपूर्ण जगत् उभे ठाकले आहे. सत्वगुणी आणि तमोगुणी पुरुष संख्येने खूप कमी असतात. अधिकांश लोक रजोगुणप्रधानच असतात. जीवनात सुख अधिक आहे की दु:ख हा प्रश्न चर्चेला एक विषय असावा म्हणून उपस्थित केला जातो. उतरादाखल हेच सांगितले जाते की जीवनात दु:ख अधिक आहे. रजोगुणप्रधान असल्यामुळे जगात दु:ख अधिक असल्याचे सिध्द होऊन जाते. जगात रजोगुणाचेच प्राबल्य अधिक दिसून येते. विषयोपभोगानेच सुख मिळवायची प्रत्येकाची धडपड प्रत्येकाची प्रवृत्ती हीच याचे प्रमुख कारण होय. यामुळे हे अंतिम ध्येय ठरले आहे आणि हे प्राप्त करुन घेण्यासाठी जेवढे म्हणून काही प्रयत्न करावे लागतील, जेवढे श्रम घ्यावे लागतील त्यासाठी माणूस अजिबात

पर्वा करत नाही. यासाठीच दु:ख सहावे लागते. तसे पाहू गेल्यास सात्विक कर्मे सुखदायक असतात तरीही त्यांचे आचरण करताना मनात जर आसक्ती आणि अभिमान असला तर दु:खानुभव आल्याशिवाय रहात नाही. यामुळे सात्विक कर्मे सुखदायक असल्यामुळे ज्यातून आसक्ती वा अभिमान जागू नये एवढी काळजी घेतली तर दु:ख टाळता येऊ शकते पण रजोगुणाच्या बाबतीत मात्र असे सांगता येत नाही. रजोगुण दु:ख उत्पन्न करणारेच आहेत. रजोगुणाची आसक्ती सोडणे सुध्दा शक्य नाही. आसक्तीमुळेच ते दु:खदायक आहेत.

3) **तमस: फलं अज्ञानम्:** तमोगुणाचे फळ अज्ञान आहे. आठव्या श्लोकात सांगितले होते - तम: अज्ञानजं विध्दि - तमोगुण अज्ञानामुळे उत्पन्न होतो, असे जाणा. इथे सांगताहेत की तमोगुणाचे फळ अज्ञान आहे. वरील दोन्ही विधाने परस्पर विरुध्द असल्यासारखी वाटतात पण तसे नाही. बीजापासून वृक्ष आणि वृक्षापासून बीज असा जो संबंध आहे - असतो तोच संबंध अज्ञान आणि तमोगुण यात आहे. अज्ञानातून तमोगुण आणि तमोगुणातून अज्ञान अशाप्रकारे दोघांमध्ये कार्य-कारण संबंध आहे. गहन अज्ञानात तमोगुणाची वाढ होते व तमोगुणाच्या वाढीत अज्ञान पोसले जाते. देह वगैरे बाबत जिथे गहन - खोल - गहिरी - अशी आसक्ती आहे तिथे गहिरे अज्ञान आहे, असे समजून घ्यायला हवे. गहन अज्ञानामुळे वृत्ती तमोगुणाकडे वेगाने धाव घ्यायला लागते. तमोगुणाच्या वाढीसोबत ज्ञानाला झाकून ठेवणारे अज्ञान अधिक गडद होत जाते - गहिरे होत जाते - दाट होत जाते.

: 17 :

*सत्वात् - संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।*
*प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सत्त्वात् ज्ञानं संजायते:** सत्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते
- **च रजस: लोभ एव:** आणि रजोगुणाने नि:संशयपणे लोभच उत्पन्न होतो
- **तमस: प्रमादमोहौ:** तमोगुणाने प्रमाद आणि मोह उत्पन्न होतात
- **च अज्ञानं एव भवत:** आणि अज्ञानच उत्पन्न होते.

**अर्थ**

सत्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते, रजोगुणापासून नि:संशयपणे लोभ आणि तमोगुणापासून प्रमाद आणि मोह उत्पन्न होतात आणि अज्ञानही होते.

*सत्वांतूनि निघे ज्ञान निघे लोभ रजांतुनी।*
*अज्ञान मोह दुर्लक्ष निघती हीं तमांतुनी॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) सत्वगुणाने ज्ञान म्हणजे आत्मज्ञान प्राप्त होते. 2) रजोगुणाने लोभ उत्पन्न होतो. 3) तमोगुणाने प्रमाद, मोह आणि अज्ञान उत्पन्न होतात.

या श्लोकात ज्या तीन बाबींचा उल्लेख आला आहे तो अकरा ते तेरा या तीन श्लोकात वर्णित केलेला आहे. या श्लोकात त्याचाच पुनरुच्चार करुन या विषयाचा समारोप केला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **सत्वात् संजायते ज्ञानम्:** सत्वगुणाच्या प्राबल्यामुळे ज्ञान प्राप्ती होते. सत्वगुणाच्या उत्कर्षाकडेच लक्ष वेधले तर आत्मज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. सत्वगुणाचे प्राबल्य झाले की पहिला परिणाम म्हणजे चित्ताची शुध्दी होते. चित्त शुध्द, निर्विकार राहिले म्हणजेच शांतीचा अनुभव येतो. चित्ताच्या ठायी विकार उत्पन्न झाले तर ते चित्ताला अशांत करुन टाकतात. विकारांचे शमन झाल्यावर शांतता अनुभवायला येते. यामुळे सत्वगुणाच्या उत्कर्षाने ज्ञान प्राप्त होते याचा अर्थ चित्ताला शुध्द आणि निर्विकार बनवणे आहे.

2) **रजस: लोभ:** एव रजोगुणाच्या प्राबल्याने लोभच उत्पन्न होतो. लोभ म्हणजे बाह्य विषयांचा लोभ होय. आत्मज्ञानाचा लोभ त्याज्य नाही. आत्मज्ञानाच्या लोभामुळे माणूस सत्वगुणातच रहातो. बाह्य विषयांप्रती जेव्हा लोभ उत्पन्न होतो तेव्हा अखेरीस तो दु:खदायक असल्यामुळे त्याज्य होऊन जातो. लोभही एक शक्ती आहे. शक्तीचा

सदुपयोग करायचा की दुरुपयोग हे आपण ठरवू शकतो. यामुळे लोभ जर ईश्वराबद्दल उत्पन्न होणार असेल, तर तो त्याज्य नाही. ईश्वर प्राप्तीच्या साधनेत लोभ उत्पन्न होणार असेल तर तो त्याज्य नाही. अर्थात् ईश्वर - प्राप्तीच्या संदर्भात वा त्याविषयक साधनेच्या संदर्भातही जर फलाशा राहिली तर ती त्याज्य आहे. लोभामुळे फलाशा - फलासक्ती - जागते यामुळे लोभ नसावा. लोभ असेल आणि तो जर फलाशाविरहित वा फलासक्ती विरहित आत्मज्ञानाचा लोभ असेल तर तो मात्र ग्राह्य आहे पण बाह्य विषयांबाबत जागणारी लोभ वृत्ती रजोगुणाचे कार्य असल्यामुळे ती उन्नतीप्रद नाही.

3) **तमसः प्रमादमोहौ च अज्ञानं एव भवतः** तमोगुणाचा उत्कर्ष झाला - प्राबल्य वाढले तर प्रमाद, मोह आणि अज्ञानच वाढीला लागतील - त्यांचेच पोषण होईल. तमोगुण ज्ञानाला अगदी संपूर्णपणे झाकून टाकतो. त्याच्या वाढीमुळे तीन दुष्परिणाम प्रकट होतात. प्रमाद म्हणजे शिथिलता, दुर्लक्ष, हलगर्जीपणा, जडत्व हा पहिला परिणाम होय. कुणाला काही वचन दिले असेल तर त्याचे पालन करायचे लक्ष वा आग्रह सत्वगुणाच्या उत्कर्षात असते. तमोगुणी पुरुष वचन भंगाची अजिबात तमा बाळगत नाही. पर्वा करत नाही. तमोगुण ज्ञानाला झाकून टाकतो. यामुळे तमोगुणाचे प्राबल्य वाढले तर ईश्वरी प्रेरणा प्राप्त होत नाही. प्रेरणा मायेचीच मिळते आणि तमोगुणी पुरुष त्यानुसारच वाटचाल करतो. नीती - अनीती वा धर्म - अधर्माचा विचार तमोगुणी पुरुष विशेषत्वाने करत नाही याचे कारण असे की त्याची सद्-असद् विवेकबुध्दी जड बनून जाते.

दुसरा परिणाम असा होतो की मोह उत्पन्न होतो. जिथे सद्-असद् विवेक बुध्दी जागृत असते तिथे विवेकी भूमिका नांदते. जिथे ही बुध्दी मंदावते तिथे मूढपणा उत्पन्न होतो. मोह म्हणजे दृढ देहासक्ती होय. रजोगुणी पुरुषाच्या ठायीही मोह असतो पण तमोगुणी पुरुषा इतका काही नसतो. अविवेकामुळे तमोगुणी पुरुषाला काही समजाऊन सांगणे अशक्य होऊन बसते. तो आपल्या चुकीच्या मान्यता आणि मते बदलायला तयार नसतो. त्याची विषयासक्ती इतकी काही वाढून जाते की तो ती रोखू शकत नाही. हे मोहामुळे म्हणजे मूढतेने घडते.

तिसरा परिणाम आहे अज्ञान. अज्ञान म्हणजे ईश्वराविषयीचे अज्ञान. हे अज्ञान तर रजोगुणी पुरुषाच्या ठायीही असते पण रजोगुणी पुरुष ईश्वराबद्दल अश्रध्द नसतो. तमोगुणी पुरुषाच्या ठायी ईश्वरविषयक श्रध्दा नसते, तो नास्तिक असतो. तो ना धर्माची पर्वा करत ना नीती मानत. हे सर्व खरे तर अज्ञानाचे स्वरुप आहे. तेराव्या अध्यायातील सात ते दहा या चार श्लोकांमध्ये ज्ञानाची लक्षणे वर्णिली आहेत. अकराव्या श्लोकात म्हटले आहे - अज्ञानं यदतोऽन्यथा म्हणजे वर वर्णित ज्ञान लक्षणांच्या विपरीत दिसून येणाऱ्या लक्षणांना अज्ञान समजा. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, शांति, ऋजुता, आचार्यांची सेवा, पावित्र्य, स्थिरता, इंद्रिय - निग्रह, वैराग्य, निरहंकारिता, जन्म - मृत्यु - वृध्दत्व - व्याधी वगैरेत दुःखरुपी दोषदर्शन, अनासक्ती, पत्नी - पुत्र वगैरे बाबतीत ममतेचा अभव, चित्ताची अखंड समता, ईष्ट-अनिष्ट असले तरी अनन्य ईश्वर भक्ती, एकांत सेवनाची आवड, सामान्य जनांच्या सहवासात रहाण्याविषयी नावड, अध्यात्म - ज्ञानात मान्यता, मोक्षाप्रती अभिरुची - ही ज्ञानाची लक्षणे आहेत आणि याविरुध्द लक्षणे म्हणजे मानित्व, दंभित्व, हिंसा, वक्रता, अक्षमा, अपावित्र्य, अस्थिरता, पुत्र वगैरेविषयक मोह वगैरे अज्ञानाची लक्षणे होत.

: 18 :

***ऊर्ध्वम् गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।***
***जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सत्त्वस्थाः** सत्वगुणात स्थित पुरुष
- **ऊर्ध्वम् गच्छन्तिः** स्वर्ग वगैरे श्रेष्ठ स्थितीला प्राप्त होतात
- **राजसाः** रजोगुणात स्थित पुरुष
- **मध्ये तिष्ठन्तिः** मध्यम स्थितीला म्हणजे मध्यभागी म्हणजे मनुष्य लोकीच रहातात
- **जघन्यगुणवृत्तिस्थाः** तमोगुणाचे प्राबल्यरुप निद्रा, प्रमाद आणि आळस या निकृष्ट गुणात स्थित
- **तामसाः** तामसी पुरुष

- **अध: गच्छन्ति:** पतनाला जातात म्हणजे कीटक, पशु वगैरे हलक्या योनीत जातात

**अर्थ**

सत्वगुणात असलेले पुरुष स्वर्ग वगैरे उच्च लोकाना जातात. रजोगुणात असलेले पुरुष मध्यलोकात म्हणजे मनुष्यलोकातच रहातात आणि तमोगुणाचे कार्य असलेल्या निद्रा, प्रमाद आणि आळस इत्यादीत रत असलेले तामसी पुरुष अधोगतीला म्हणजे कीटक, पशु इत्यादी हलक्या योनीत तसेच नरकात जातात.

***सत्त्व-स्थ चढती उंच मध्यें राजस राहती।***
***हीन - वृत्तींत वागूनि जाती तामस खालती॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) सत्वगुणात स्थित पुरुष श्रेष्ठ स्थितीला प्राप्त करतात. 2) रजोगुणात स्थित पुरुष मध्यम स्थिती प्राप्त करतात. 3) निकृष्ट म्हणजे तमोगुणात स्थित तामसी पुरुष निकृष्ट मनोभूमिकेला पावतात.

या श्लोकातून सत्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी पुरुषांना या जन्मी कुठली मानसिक स्थिती, मनोभूमिका आणि बाह्य स्थिती प्राप्त होते, हे निरुपण करताहेत.

**स्पष्टीकरण**

1) **सत्त्वस्था: ऊर्ध्वम् गच्छन्ति:** सत्वगुणाचे प्राबल्य असले तर पुरुष मानसिक आणि बाह्य उच्च स्थितीला प्राप्त होतो. सत्वगुणाचा उत्कर्ष साधणाऱ्यांना आंतर्बाह्य उच्च दशा प्राप्त होते. आत्मज्ञान प्राप्त होते. केवळ मानसिक दशा श्रेष्ठ असेल आणि त्याचा बाह्य जीवनावर काहीही परिणाम होणार नाही असे काही संभवणार नाही. इथे भगवंत असे सांगताहेत की सत्वगुणाचा उत्कर्ष झाल्यावर आतली जेवढी उच्च दशा असते तेवढेच श्रेष्ठ आचरण, श्रेष्ठ दर्जाचे जीवन सत्वगुणी पुरुषाचे असते. त्याच्या ज्ञानाचा प्रभाव आणि परिणाम जीवनातच समस्त क्रियांवर पडतो. अशा पुरुषाला या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकात 'त्रिगुणातीत' असे म्हटले आहे. सत्वगुणाचा उत्कर्ष साधला गेल्यावर सत्वगुणी पुरुषाचे आचरण श्रेष्ठ दर्जाचे असते. सत्वगुणाचा उत्कर्ष काही केवळ मनाच्याच ठायी होतो असे नव्हे, त्याचा परिणाम - प्रभाव हा आचरणावरही पडतोच. त्याच्या वागण्या - बोलण्यात, खाण्या - पिण्यात त्याच्या सर्वच क्रियांमध्ये सात्विकता व्यक्त होते. अशा सत्वगुणी पुरुषाच्या सहवासात काही काळ जरी घालवला तरी एक प्रकारचा सात्विक आनंद अनुभवायला मिळतो.

लोक सात्विक विभूतींकडे आकृष्ट होतात. सत्वप्रधान सत्पुरुषांचा सुगंध सर्वत्र पसरलेला असतो. गुलाब पुष्पाच्या सुगंधासारखा तो दरवळत असतो. अशा पुरुषांच्या सहवासात मन:शांती मिळवून घेण्याचा उपाय ज्ञान होऊ शकतो.

2) **राजसा: मध्ये तिष्ठन्ति:** रजोगुणी पुरुष मध्यम दर्जाला प्राप्त करतो म्हणजे सामान्य मानसिक आणि बाह्य स्थितीला उपलब्ध होतो. उत्तम मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन स्थिती असतात. आपण जर रजोगुणाचा उत्कर्ष व्हावा यासाठीच प्रयत्नशील राहिलो तर त्यामुळे श्रेष्ठ दर्जा प्राप्त न होता मध्यम दर्जा प्राप्त होईल आणि त्यानुसार घडणारे आचरणही मध्यम दर्जाचेच असेल. ते काही सर्वांसाठी अनुकरणीय, प्रेरक - प्रेरणादायी, उदाहरण स्वरुप आणि शांती मिळवायला प्रेरणा देणारे असणार नाही. अधिकांश लोक मध्यम दर्जाचेच असतात. ते प्रापंचिक पाशात जखडलेले असतात. सत्वगुणी पुरुष परोपकारी, सेवारत असतो. रजोगुणी पुरुष प्रपंचरत असतो. आपल्या प्रपंचाची छोटीशी कक्षाच - मर्यादाच - त्याची दुनिया असते, तो दुसऱ्या जगाला जाणत नसतो.

3) **जघन्यगुणवृत्तिस्था: तामसा: अध:** गच्छन्ति निकृष्ट म्हणजे तमोगुणात स्थित पुरुष निकृष्ट - नीच दशेची मनोभूमिका मिळवतो - प्राप्त करुन घेतो. तमोगुणातच जर वाढ होत राहिली तर आपण अधोगतीचा मार्ग धरला आहे, असे समजावे. सत्वगुण आणि तमोगुण ही दोन टोके कमालीची विरुध्द आहे. सत्वगुणी पुरुष जसे संख्येने कमी आढळतात तसेच तमोगुणीही संख्येने कमी असतात. जगात या दोघांची संख्या नेहमी कमीच असते. अधिकांश लोक रजोगुणीच असतात. रजोगुणी व तमोगुणी पुरुषांच्या हातून कदापि सात्विक कार्य होणारच नाही, असे नाही. रजोगुणी पुरुषाच्या हातून सात्विक कार्य काही अंशी अधिक होण्याची शक्यता असते पण तमोगुणी पुरुषाच्या ठायी आसुरी वृत्ती विकसते.

: 19 :

*नान्यं गुणेभ्य: कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।*
*गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यदा द्रष्टा:** द्दष्टा जेव्हा
- **गुणेभ्य:** अन्यं कर्तारं न पश्यति: तिन्ही गुणांखेरीज अन्य कुणालाही कर्ता बघत नाही म्हणजे गुणच गुणात वावरत आहेत असे पाहतो
- **च गुणेभ्य: परं वेत्ति:** आणि तिन्ही गुणांच्या पलिकडे जे सच्चिदानंदघन असे तत्व आहे, त्याला तत्त्वत: जाणून घेतो
- **स: मद्भावं अधिगच्छति:** तो ज्ञानी माझ्या स्वरुपाला प्राप्त होतो

**अर्थ**

ज्यावेळी द्रष्टा तिन्ही गुणांशिवाय दुसरा कोणीही कर्ता नाही, असे पाहतो आणि तिन्ही गुणांच्या अत्यंत पलीकडे असणाऱ्या सच्चिदानंदघन परमात्म्याला म्हणजे मला तत्त्वत: जाणतो, त्यावेळी तो माझ्या स्वरुपाला प्राप्त होतो.

***गुणांविण नसे कर्ता आत्मा तो त्यांपलीकडे ।***
***देखणा ओळखे हें जो होय माझें चि रुप तो ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) द्रष्टा जेव्हा तीन गुणांच्या व्यतिरिक्त अन्य दुसरा कर्ता जाणत - मानत नाही. 2) तीन गुणांच्या पलिकडे वसणाऱ्या आत्म्याला - ईश्वराला ओळखून घेतो. 3) तो ज्ञानी ईश्वर स्वरुपाला प्राप्त होतो.

या श्लोकात त्रिगुणातीताचे वर्णन आलेय. ईश्वर स्वरुप प्राप्त करुन घेण्यासाठी काय करायला हवे की ज्यामुळे ज्ञान प्राप्ती होईल, स्वरुपस्थितीचा लाभ होईल. स्वरुप स्थितीचा अनुभव करुन घेता येईल.

**स्पष्टीकरण**

1) **यदा द्रष्टा गुणेभ्य: अन्यं कर्तारं न पश्यति:** जेव्हा द्रष्टा म्हणजे विवेकी, ज्ञानी पुरुष, तीन गुणांशिवाय अन्य दुसरा कर्ता आहे असे मानत नाही. द्रष्टा जीवात्मा तीन गुणांपेक्षा वेगळा आहे, त्याच्या पलिकडे आहे यामुळे ज्याने या परिस्थितीला ओळखून घेतले असा पुरुष सारे कर्तृत्व तीन गुणांचेच मानतो आणि आपण अकर्तृत्ववान आहोत असे समजून जीवन - निर्वाह करतो अशा पुरुषाला विवेकी वा ज्ञानी असे म्हणतात. अज्ञानावस्थेत जीवात्मा स्वत:ला कर्ता मानून व्यवहार करतो. ज्ञानावस्थेत मात्र तो स्वत:ला अकर्ता मानून व्यवहार करतो. व्यवहार दोघे करतील पण दोघांची आंतरिक स्थिती वेगवेगळी असेल. एक अलिप्त असेल तर दुसरा लिप्त असेल. एक निर्विकारी असेल तर दुसरा विकारी. आपण आपला संबंध क्रियांशी जोडतो त्यामुळे दु:खी होतो. हा संबंधही आपण कल्पनेनेच मानतो. द्रष्टा जीवात्मा इंद्रियातीत असून देह वगैरे तीन गुणांनी युक्त वस्तु आणि इंद्रियगोचर आहे. इंद्रियातीत वस्तुचा संबंध इंद्रियगम्य वस्तुशी असूच शकत नाही. यामुळे ज्ञानी पुरुष असे बघतो की संपूर्ण कर्तृत्व हे तीन गुणांचे म्हणजे त्रिगुणयुक्त देह वगैरे संघाताचे आहे.

2) **च गुणेभ्य: परं वेत्ति:** आणि तीन गुणांच्या पल्याड असलेल्या आत्म्याला जाणून घेतो. एक दिशा अशी आहे की तीन गुण म्हणजे शरीर, इंद्रिये वगैरेंच्या संघातापेक्षा वेगळा कुणी कर्ता आहे, दुसरी दिशा वा द्दष्टी अशी आहे की त्रिगुणातीत असे जे आत्मतत्व आहे ना, म्हणजे परमात्मतत्व आहे ना, त्याला ओळखून घेतो. वस्तु स्वरुपापेक्षा वेगळी नसते. अग्नीचा धर्म प्रकाश आणि उष्णता आहे. त्यापासून अग्नी वेगळा करता येत नाही तसेच आपले स्वरुप ईश्वरच आहे त्यामुळे आपल्या ईश्वर स्वरुपाची ओळख झाल्यावर आपले कर्तृत्व उरत नाही. आपण केवळ द्रष्टे - ज्ञाते मात्र उरतो.

3) **स: मदभावं अधिगच्छति:** तो ज्ञानी - विवेकी पुरुष माझ्या स्वरुपाला प्राप्त करुन घेतो. ईश्वर स्वरुपाची ओळख झाल्यावर त्या स्वरुपात लीन होऊन जायचीच स्थिती शिल्लक उरते. नदी जेव्हा सागराला मिळते तेव्हा समुद्रात आपले अस्तित्व विलीन करुन देते. हीच मोक्षाची अवस्था होय.

विनोबाजींनी या श्लोकाचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सत्वगुणाशी संबध्द श्लोक अनुक्रमे 6, 10, 11, 14, 16, 17, 18, 19 यांचे थोडक्यात मार्मिक समालोचन केले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे. 1) श्लोक 6 वा- सत्वगुणाच्या प्राबल्याने चित्त आणि देहाची मलीनता

घालवावी. ज्ञान आणि स्वास्थ्य वाढवायला हवे. 2) श्लोक 10 वा- तीन गुण चंचळ असल्यामुळे एक - दुसऱ्याला मागे ढकलून स्वत:चे प्रभुत्व स्थापित करण्यासाठी प्रयत्नशील असतात. यामुळे अखंड सावध रहायला हवे. 3) श्लोक 11 वा- सत्वगुणाचा दिवसेंदिवस उत्कर्ष साधत असा प्रयत्न करायला हवा की तो सत्वगुण सर्व इंद्रियांशी एकरुप व्हावा. 4) श्लोक 14 वा - सत्वगुणाचा उत्कर्ष साधावा, तो देह विलय होईपर्यंत टिकवून ठेवावा, यासाठी ज्ञानी पुरुषाचा सत्संग हवा. 5) श्लोक 16 वा - कर्माशिवाय आपण जगू शकत नाही यामुळे कर्माचा संबंध सतत सत्वगुणाशी जोडत रहायला हवा, म्हणजे सत्वगुणालाही प्रकृतीचा विकार मानून सत्वगुणाशी संबंध राखत प्रकृतीपासून अलिप्त रहायला शिकायला हवे. 6) श्लोक 17 वा - सात्विक कर्मे आचरताना त्यातून आत्मज्ञान उत्पन्न होते की नाही याकडे लक्ष द्यायला हवे. 7) श्लोक 18 वा - वृत्तीला अखंडपणे उच्च स्तरावर स्थापित करायला हवे. वृत्ती निम्न स्तरावर रहाणार नाही याकडे लक्ष असावे. 8) श्लोक 19 वा - सत्वगुणाच्या उत्कर्षाच्या पल्याड आत्मस्वरुप आहे, त्याची ओळख करुन घ्यायला हवी.

: 20 :

*गुणानेतानतीत्य त्रीन् देही देहसमुद्भवान् ।*
*जन्ममृत्युजरादु:खैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **देही:** देहधारी जीवात्मा म्हणजे पुरुष
- **देहसमुद्भवान्:** स्थूल देहाच्या उत्पत्तीसाठी कारणीभूत ठरणाऱ्या
- **एतान् त्रीन् गुणान्:** या तीन्ही गुणांना
- **अतीत्य:** ओलांडून
- **जन्ममृत्युजरादु:खै:** जन्म, मरण, जरा म्हणजे वृध्दत्व, आणि सर्व दु:खांपासून
- **विमुक्त:** मुक्त होऊन
- **अमृतं अश्नुते:** अमृत म्हणजे मोक्षाचा म्हणजे परमानंदाचा उपभोग घेतो

**अर्थ**

हा पुरुष शरीराच्या (बुध्दी, अहंकार, मन, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पंच महाभूत, पाच इंद्रियांचे विषय अशा तेवीस तत्त्वांचे पिंडरुप हे स्थूल शरीर प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या तीन गुणांचेच कार्य आहे म्हणून या तीन गुणाना शरीराच्या उत्पत्तीचे कारण मानले आहे.) उत्पत्तीला कारण असलेल्या या तिन्ही गुणाना उल्लंघून जन्म, मृत्यु, वार्धक्य आणि सर्व प्रकारच्या दु:खांपासून मुक्त होऊन परमानंदाला प्राप्त होतो.

***देह - कारण हे तीन गुण जाय तरुनि जो ।***
***जन्म - मृत्यु - जरा दु:खीं सोडिला मोक्ष गांठतो ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) देहाच्या उत्पत्तीला निमित्त बनणाऱ्या या तीन गुणांना देहधारी जीवात्मा ओलांडून. 2) जन्म, मृत्यु, वृध्दत्व आणि नाना दु:खांपासून मुक्त होऊन. 3) अमृत म्हणजे मोक्ष प्राप्त करतो.

मागील श्लोकाचे अनुसंधान कायम राखत या श्लोकात त्रिगुणातीत म्हणजे ज्ञानी पुरुषाची स्थिती सांगताहेत.

**स्पष्टीकरण**

1) **देही देहसमुद्भवान् एतान् त्रीन् गुणान् अतीत्य:** देहाच्या उत्पत्तीला हे तीन गुण निमित्त बनतात. देहधारी जीवात्मा या तीन गुणांना ओलांडतो. तीन गुण प्रकृतीच्या ठायी वा ईश्वराच्या अलौकिक माया - शक्तीत असतात. इथे सांख्यांची परिभाषा प्रयुक्त केली गेली आहे. सांख्य पंडितांची अशी मान्यता आहे की प्रकृतीच्या ठायी जर हे त्रिगुण नसतील तर नाना प्रकारचे वेगवेगळे पदार्थ आणि भिन्न - भिन्न देह उत्पन्न होऊ शकणार नाही. या मताला वेदान्त मताने मान्य केले आहे. परमेश्वराच्या अधीन माया - शक्ती असते, सांख्य तिला 'प्रकृति' असे म्हणतात. माया शक्तीच्या ठायी हे तीन गुण बीज रुपात वा शक्तीच्या रुपात वसतात. जगत् निर्माण होण्याच्या प्रसंगी या तीन गुणांच्या मिश्रणाने ब्रह्मांडातील तमाम पदार्थ उत्पन्न होऊ लागतात. अर्थात् शरीरही या तीन गुणांच्या मिश्रणानेच उत्पन्न होते. मागील श्लोकात सांगितले आहे की या त्रिगुणांशिवाय कर्माचा कुणी कर्ता नाही. या तीन गुणांपेक्षा आत्मतत्व भिन्न आहे असे बघणारा - समजणारा ईश्वरी स्वरुपाला प्राप्त

करुन घेतो. इथे हाच मुद्दा वेगळ्या शब्दात मांडला गेला आहे. त्रिगुणांना ओलांडून जात आहे. त्रिगुणांना ओलांडून जाणे-पार करणे आणि त्रिगुणांहून स्वत:ला वेगळे करुन बघणे दोन्ही गोष्टी समानच आहेत. सत्वगुणाच्या प्राबल्यानंतरची ही स्थिती आहे. त्रिगुणांनाच कर्ता मानणे आणि स्वत:ला त्रिगुणातीत मानणे, हे अनुभवायला नाही येऊ शकत, हा निश्चयात्मक सिध्दांत मानावा. यामुळे या अध्यायात भगवंतांनी आधी त्रिगुणांचे विश्लेषण करुन त्यांची लक्षणे सांगितली आहेत हे सांगितले आहे की सत्वगुणाच्या प्राबल्यानेच ज्ञान वा आत्मज्ञानाची उपलब्धी होते. त्याचप्रमाणे देहाच्या प्राबल्यानंतर जीवात्मा ओलांडून जातो, असे सांगितले आहे. (या त्रिगुणांना जो ओलांडून गेला म्हणजे जो त्रिगुणातीत आहे त्याची काय लक्षणे आहेत असा प्रश्न अजुन पुढच्या श्लोकात विचारणार आहे आणि त्याच्या या प्रश्नाचे उत्तर भगवंत या अध्यायातल्या अखेरच्या सहा श्लोकांमधून देणार आहेत.)

2) **जन्ममृत्युजरादु:खै: विमुक्त:** जन्म - मरण - वृध्दत्व वा पंगुत्व आणि नाना प्रकारच्या दु:खांपासून मुक्त होऊन, द्रष्टा जीवात्मा जेव्हा सत्वगुणाच्या प्राबल्यानंतर त्रिगुणातीत होतो म्हणजे देह, इंद्रिये, मन, बुध्दी यांच्यापासून त्रिगुणातीत होतो म्हणजे तेव्हा तो जन्मापासून मुक्त होऊ शकतो. जन्माच्या सोबतच शरीर आले, शरीरासोबतच म्हातारपण आणि मरण आले. देहासोबतच नाना प्रकारची दु:खे अनुभवायला येतातच. स्वरुप दर्शन झाल्यावर जीवात्मा या सर्वापासून मुक्त होतो - मुक्त होऊन जातो.

3) **अमृतं अश्नुते:** मोक्षाला प्राप्त होतो. खरे पाहू गेल्यास मोक्ष काही प्राप्त करुन घ्यायचा विषय नाही. तो आधीपासूनच प्राप्त आहे. जीवात्मा ईश्वराहून वेगळा नाही आणि ईश्वर नित्य मुक्त आहे यामुळे जीवात्मा देखिल मुक्तच आहे पण देह, मन, बुध्दी, इंद्रियांच्या सोबत या नित्य मुक्त अशा अवस्थेवर एक काल्पनिक स्वरुप उभे ठाकले आहे. या काल्पनिक स्वरुपामुळे बंधनाची कल्पना उभी ठाकते आणि तीच दु:खाला कारणीभूत आहे. पाण्यावर ज्याप्रमाणे लहान-मोठ्या लाटा उसळत असतात त्याचप्रमाणे मुक्त अवस्थारुपी या पाण्यावर 'मी बाबा आहे - पिता आहे', 'काका आहे', 'मामा आहे', 'प्रोफेसर आहे,' 'व्यवस्थापक आहे'. 'संचालक आहे'. अशा प्रकारच्या नाना लहान - मोठ्या लाटा उसळत असतात. या श्लोकात हे सांगत आहेत की या त्रिगुणांमुळे देहाची उत्पत्ती होते आणि त्रिगुणातीत जीवात्मा जन्म - मरण - वृध्दत्व आणि नाना प्रकारच्या दु:खांनी मुक्त होऊन अमृत वा मोक्षाला संपादित करतो - मिळवतो. जीवाभावाची कल्पना निवृत्त होताच अनादिकाळापासून चालत आलेल्या मुक्त अवस्थेचा अनुभव येतो. मोक्ष काही नवी अवस्था नाही. बालपणी आपण जसे होतो तसेच आता असून मृत्युपर्यंत असेच राहू हे आपण अनुभवतोहोत. एवढेच नव्हे तर देह सोडून जर आम्हीच जाणार असू तर आम्हाला कुणी जखडून ठेवले आहे ? आम्ही नित्यमुक्त आहोत. बंधनाच्या कल्पनेपासून मुक्त व्हायचे आहे, बस.

: 21 :

**अर्जुन उवाच**

***कैर्लिंगैस्त्रीन् गुणानेतानतीतो भवति प्रभो।***
***किमाचार: कथं चैतांस्त्रीन् गुणानतिवर्तते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रभो:** हे भगवंता
- **एतान् त्रीन् गुणान् अतीत:** या त्रिगुणांच्या पल्याड असणारा त्रिगुणातीत पुरुष
- **कै: लिंगै:** कोण कोणत्या लक्षणांनी
- **भवति:** ओळखला जातो ?
- **किं आचार:** त्याचे आचरण कसे असते ?
- **च एतान् त्रीन् गुणान्:** आणि या तिन्ही गुणांना तो
- **कथं अतिवर्तते:** कसा ओलांडून जातो ?

**अर्थ**

अर्जुन म्हणाला, या तिन्ही गुणांच्या पलीकडे गेलेला पुरुष कोणकोणत्या लक्षणांनी युक्त असतो? आणि त्याचे आचरण कशाप्रकारचे असते? तसेच हे प्रभो, मनुष्य कोणत्या उपायांनी या तीन गुणांच्या पलीकडे जातो ?

**अर्जुन म्हणाला -**

***त्रिगुणातीत जो देवा त्याचें लक्षण काय तें।***
***वागणूक कशी त्याची कसा तो गुण निस्तरे॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) त्रिगुणातीत पुरुष कसा ओळखला जावा? 2) त्रिगुणातीत पुरुषाचे आचरण कसे असते? 3) या तीन गुणांना पुरुष कसे ओलांडतो?

**स्पष्टीकरण**

1) **प्रभो एतान् त्रीन् गुणान् अतीत: कैर्लिंगै:** भवति हे भगवान या तीन गुणांच्या पल्याड वसणाऱ्या त्रिगुणातीत पुरुषाची लक्षण कोणती ? एखादा असे म्हणत असेल की मी त्रिगुणातीत अवस्थेचा अनुभव घेत आहे, तर त्यावर विश्वास कसा ठेवावा? स्वत:ला ज्ञानी समजणारे व म्हणवणारे ढोंगी साधू वा वेदान्ती खूप आहेत. यामुळे ज्ञानी वा त्रिगुणातीत पुरुषाची ओळख त्याच्या ठायी वसणाऱ्या लक्षणांनीच करुन घेणे शक्य आहे, इष्ट आहे. यामुळे अर्जुनाचा प्रश्न अगदी स्वाभाविक आहे की त्रिगुणातीत ज्ञानी पुरुषाला ओळखण्याची लक्षणे कोणती? ज्ञानी पुरुषांची लक्षणे काय ?

2) **किं आचार:** (त्रिगुणातीत पुरुषाचे) आचरण कसे असते? लक्षणे नेहमी आचरणातूनच प्रकट होतात. तेराव्या अध्यायात ज्ञानाची लक्षणे सांगितली आहेत. त्यात आरंभी अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षांती म्हणजे क्षमा, ऋजुता म्हणजे सरळपणा वगैरे जी लक्षणे वर्णिली आहेत ती सारी जेव्हा आचरणात प्रकट होतील तेव्हाच त्याना ज्ञानाचे लक्षण म्हटले जाईल पण अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, सरळपणा हे सारे गुण वा लक्षणे ज्या ज्या वेळेला मनात प्रकट होतील त्या त्या वेळेला आचरणातही प्रकट होतील. लक्षण म्हणजे मानसिक लक्षण होय. ज्ञान वा त्रिगुणातीत अवस्था आधी मनात प्रकट होईल. मनातच अज्ञान असते. ते जेव्हा आत प्रकट होणाऱ्या ज्ञानामुळे अभिमान हटून निरभिमानता प्रकट होते. आत जीवदया आणि करुणेचे भाव प्रकट होतात - प्रकट होऊ लागतात. अज्ञानावस्थेत काम, क्रोध वगैरे अनेक छोटे - मोठे, स्थूल - सूक्ष्म विकार उत्पन्न होतात ते ज्ञानावस्थेत नष्ट होऊन जातात आणि निर्विकारता प्रकट होते. यानंतरच मनातील सारी लक्षणे आचरणात प्रकट होतात. अज्ञानावस्थेत मनातला राग वाणीतून प्रकट होतो. कधी हाता - पाया - द्वारेही प्रकट होतो. ज्ञानावस्था वा त्रिगुणातीत अवस्थेत राग येणारच नाही, ज्ञानी पुरुषाच्या मुखातून प्रत्येक क्षणी, कुठल्याही परिस्थितीत मृदु वचन वा क्रोधरहित वचनच प्रकट होतील.

3) **एतान् त्रीन् गुणान् कथं अतिवर्तते:** या तीन गुणांना पुरुष कसे ओलांडतो ? त्रिगुणातीत कसा होतो ? हा प्रश्न साधक वा मुमुक्षु जनांना विचारला गेला आहे. तीन गुणांना ओलांडल्यावरच त्रिगुणातीत अवस्था प्राप्त होऊ शकते यामुळे त्रिगुणातीत अवस्था कशी काय प्राप्त होऊ शकते हा प्रश्न सहाजिकच उपस्थित होतो. साधक आणि सिध्द अवस्थेत फरक आहे. साधक दशेत सिध्द पुरुषाची लक्षणे संपादित करण्यासाठी प्रयत्न केले जातात अर्थात् ही लक्षणे प्रयत्न वा सरावाने संपादित करता येतात. सिध्द अवस्थेत ही लक्षणे सहज - स्वाभाविक होऊन जातात. अनायासे विना प्रयत्नाने ती प्रकट होतात. साधक दशेत प्रयत्न, सरावाची गरज असते. सिध्द दशेत प्रयत्न समाप्त होऊन जातात त्यामुळे त्रिगुणातीत अवस्था कशी प्राप्त होते हा प्रश्न साधक वा मुमुक्षुच्या दृष्टिकोणातून महत्वाचा असल्यामुळे अर्जुनाने विचारला आहे.

: 22 :

**श्री भगवान उवाच**

*प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव।*
*न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पांडव:** हे अर्जुना, जो पुरुष
- **प्रकाशं:** सत्वगुणाचा कार्यरुप प्रकाश
- **प्रवृत्तिम्:** रजोगुणाचे कार्यरुप प्रवृत्ती
- **च मोहं एव:** आणि तमोगुणाचे कार्यरुप मोह
- **संप्रवृत्तानि:** (प्रतिकुल तथा निकृष्ट बाह्य परिस्थिती) प्राप्त झाल्यावर
- **न द्वेष्टि:** द्वेष करत नाही वा विषाद मानत नाही
- **निवृत्तानि:** निवृत्त झाल्यावर
- **न कांक्षति:** त्याची आकांक्षा राखत - ठेवत नाही

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले, हे अर्जुना जो पुरुष सत्वगुणाचे कार्यरुप प्रकाश (अंत:करण आणि इंद्रियांदिकांमध्ये

आळस नाहीसा होऊन जे एक प्रकारचे चैतन्य येते त्याचे नाव 'प्रकाश' आहे.) रजोगुणाचे कार्यरुप प्रवृत्ती आणि तमोगुणाचे कार्यरुप मोहही ( निद्रा आणि आळस इत्यादी वाढल्यामुळे अंत:करण आणि इंद्रियातील चेतनाशक्तीचा लय होण्याला येथे 'मोह' असे समजावे.) प्राप्त झाली असता त्याचा विषाद मानत नाही आणि प्राप्त झाली नाही तरी त्यांची इच्छा करत नाही (जो पुरुष एका सच्चिदानंदघन परमात्म्याचे ठायी ऐक्यभावनेने नेहमी स्थित होऊन या त्रिगुणात्मक मायेच्या संसारापासून पूर्णपणे पलीकडे गेला अशा गुणातीत पुरुषाच्या अभिमानरहित अंत:करणात तिन्ही गुणांचे कार्यरु प प्रकाश, प्रवृत्ती आणि मोह वगैरे वृत्ती उत्पन्न झाल्या अथवा न झाल्या तरी कधीही इच्छा, द्वेष वगैरे विकार उद्भवत नाहीत, हेच त्याचे गुणातीत असल्याचे प्रधान लक्षण आहे.)

**श्री भगवान म्हणाले -**

*प्रकाश मोह उद्योग गुण कार्ये निसर्गतां ।*
*पावतां न करी खेद न धरी आस लोपतां ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) हे अर्जुना, प्रकाश म्हणजे सात्विक, श्रेष्ठ, पूर्ण अनुकूल बाह्य परिस्थिती प्राप्त झाल्यावर वा प्राप्त होऊन निघून गेल्यावर त्याविषयी आकांक्षा राखत नाही. 2) प्रवृत्ती म्हणजे रजोगुणात्मक मध्यम, थोडी अनुकूल, थोडी प्रतिकूल अशी बाह्य परिस्थिती आणि मोह म्हणजे तमोगुणात्मक, नीच, अतिनिकृष्ट, प्रतिकूल अशी बाह्य परिस्थिती प्राप्त झाल्यावर ज्याचा द्वेष करत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **प्रकाशं निवृत्तानि न कांक्षति:** प्रकाश म्हणजे सात्विक, उच्च, श्रेष्ठ, पूर्ण अनुकूल बाह्य परिस्थिती प्राप्त झाल्यावर वा प्राप्त होऊन निघून गेल्यावर ज्याच्या प्राप्तीची इच्छा राखत नाही. अर्जुनाने एकूण तीन प्रश्न विचारले आहेत. यातल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर या आणि पुढील श्लोकात दिले गेले आहे. अर्जुनाचा पहिला प्रश्न आहे की गुणातीत पुरुषाची लक्षणे कोणती म्हणजे त्याची आंतरिक स्थिती कशी रहाते ? आधी उत्तरादाखल सांगताहेत की अनुकूल अशी बाह्य परिस्थिती प्राप्त झाली नाही वा प्राप्त होऊन निघून गेल्यावरही गुणातीत पुरुषाची मन:स्थिती सम म्हणजे तटस्थ रहाते. सत्व, रज आणि तम प्रधान असे तीन प्रकारचे पुरुष असतात. हे तिन्ही प्रकारचे पुरुष स्वत:साठी सदैव अनुकूल परिस्थिती पाहतात. एक वर्ग आहे सात्विक पुरुषांचा तर दुसऱ्या वर्गात राजसी आणि तामसी पुरुष येतात. सात्विक पुरुष नेहमी स्वत:ला उन्नत करणारी परिस्थिती चाहतो. त्याला सदा सत्संगतीत रहाणेच भावते - आवडते. तो ज्याप्रमाणे स्वत:साठी सात्विक परिस्थितीची कांक्षा करतो तसेच जगातही सात्विकतेचा उत्कर्ष होवो, असे चाहतो. त्यावर बाह्य अनुकूल परिस्थितीचा परिणाम होतो - प्रभाव पडतो. त्याचे चित्त परिणामशील असते.

त्रिगुणातीत पुरुषाची आंतरिक स्थिती बाह्य परिस्थितीवर अवलंबून रहात नाही. तो अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली तर हर्षित होत नाही. त्रिगुणातीत पुरुष दोष घालवायचे प्रयत्न करणार नाही, असे नाही पण दोष घालवत असताना जी परिस्थिती असेल त्यात तो संतुष्ट असेल. जगात सात्विकतेच्या वाढीची कल्पना करेल आणि त्या दिशेने प्रयत्नशीलही राहील पण प्रयत्नांना अनुकूलता लाभली नाही तरीही तो आपली शांती ढळू देणार नाही - कदापि विचलित होणार नाही.

2) **प्रवृत्तिं च मोहं एव संप्रवृत्तानि न द्वेष्टि:** प्रवृत्ती म्हणजे रजोगुणात्मक मध्यम परिस्थिती असो म्हणजे काहीशी अनुकूल - काहीशी प्रतिकूल अशी बाह्य परिस्थिती आणि मोह म्हणजे तमोगुणात्मक अतिनिकृष्ट अशी प्रतिकूल परिस्थिती प्राप्त झाल्यावर द्वेष करत नाही. आपल्याला सदा न् कदा अनुकूल परिस्थितीच लाभेल असे तर काही सांगू शकत नाही. जगत् ईश्वराधीन असल्यामुळे परिस्थितीवर आपला ताबा नाही. जन्म - मरण काही आपल्या हाती नाही. पाऊस, थंडी, ऊन, वारा काही आपल्या स्वाधीन नाही. मनावरही आपले संपूर्ण नियंत्रण नसल्यामुळे आपण इच्छेप्रमाणे वागू शकत नाही. तरी आपल्या अधीन असे आहे की आपण चित्ताची स्थिती संतुलित आणि स्वस्थ राखू शकतो-यासाठी ईश्वराची भक्ती करावी, वैराग्याची साधना करावी, फळत्यागाचा सराव करावा. त्रिगुणातीत पुरुष कुठल्याही अवस्थेत - परिस्थितीत-आपली निर्विकारता, समता आणि शांतता ढळू देत नाही. कधी बाह्य परिस्थिती मध्यम दर्जाची म्हणजे काही प्रतिकूल तर काही अनुकूल असते. कधी

अत्यंत प्रतिकूल अशा निकृष्ट परिस्थितीचाही सामना करावा लागतो. संत तुकारामांनी लिहिले आहे. - जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण। म्हणजे मोठ्या वा खूप यातना झेलाव्या - सहाव्या - लागतात. महापुरुषांच्या अवती-भोवती नाना प्रकारचे लोक गोळा होतात. जवळच्या लोकांमध्ये आपसात भांडणेही चालतात, संघर्ष चालतो, ती भांडणे कमी करणे, सोडवणे, संपवणे हे एक फार मोठे कार्य महापुरुषांना पार पाडावे लागते. महात्मा गांधीजींपाशी एकांत असा मुळी नव्हताच. ते नेहमी लोकांच्या गराड्यातच रहात असत. सततच्या मुलाखती सुरु असत. हिंदुस्तानचे नाना प्रश्न सोडवावे लागत. त्यांच्या आश्रमातही नेहमी प्रश्न उभे रहात. सकाळपासून सायंकाळपर्यंत काही समस्या नसेल असे काही कधी घडले नाही. सारे लोक सर्व प्रकारचे प्रश्न घेऊन त्यांच्याकडे येत असत. सामान्य माणूस तर त्रस्तच होऊन जाईल. त्रिगुणातीत पुरुषाची अशी अलौकिक स्थिती असते की वाटेल त्या परिस्थितीतही तो आपली स्थिती टिकवून ठेवतो. सामान्य माणसाचे चित्त परिणामशील असल्यामुळे बाह्य अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीचा चित्तावर नेहमी परिणाम हा होतोच. त्रिगुणातीत पुरुषाचे चित्त सदैव अपरिणामशील असते.

: 23 :

*उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते।*
*गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेंगते॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **उदासीनवत् आसीन: य:** उदासीनासारखा केवळ साक्षीरुपाने रहाणारा त्रिगुणातीत पुरुष
- **गुणै: न विचाल्यते:** तीन गुणांनी विचलित होत नाही
- **गुणा: वर्तन्त:** गुण आपापल्या कार्यात व्यवहाररत असतात म्हणजे कार्यरत असतात
- **इति एव य:** अवतिष्ठति: असे जाणून-समजून जो आपल्या स्वरुपी म्हणजे आत्मस्वरुपी सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठायी ऐक्य भावनेने स्थिर रहातो
- **न इंगते:** (तो) आपल्या स्वरुपापासून-आत्मस्वरुपापासून - ढळत नाही - विचलित होत नाही

### अर्थ

जो साक्षीरुप राहून गुणांद्वारे विचलित केला जाऊ शकत नाही आणि गुणच गुणात वावरत (त्रिगुणात्मक मायेपासून उत्पन्न झालेल्या अंत:करणासह इंद्रियांचे आपापल्या विषयात वावरणे हेच 'गुणांचे गुणात वावरणे आहे' होय.) आहेत, असे समजून जो सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठायी एकरुप होऊन राहतो व त्या स्थितीपासून कधी ढळत नाही.

***राहे जसा उदासीन गुणांनी जो न चाळवे।***
***त्यांचा चि खेळ जाणूनि न डोले लेश - मात्र हि॥***

**विषय:** या श्लोकात चार लक्षणे सांगितली आहेत. 1) उदासीनासारखा रहाणारा त्रिगुणातीत पुरुष. 2) आत्म स्थितीपासून चळत - ढळत नाही. 3) गुण म्हणजे शरीर आणि इंद्रियांच्या आकारात प्रकट गुण आपापल्या विषयात व्यवहार करतात. 4) असे समजून जो आपल्या स्वरुपात स्थिर रहातो - आत्मस्वरुपी स्थिर रहातो.

### स्पष्टीकरण

1) **उदासीनवत् आसीन: य:** उदासीनसारखा रहाणारा त्रिगुणातीत पुरुष. 'उदासीन' शब्दाचा रुढ अर्थ आहे - सर्व व्यवहारांपासून वेगळा रहाणारा जो सात्विक कर्मांचे आचरणही करत नाही, लोकांपासून लांब रहातो, जो जनसेवा करत नाही असा निष्क्रिय - निवृत्ती परायण. गीतेला हा अर्थ मान्य नाही. उदासीन म्हणजे 'उद् - आसीन:' वर रहाणारा, उच्च पदावर रहाणारा, म्हणजे सत्कर्मे आचरत, जनसेवा करत - सर्वांपासून अलिप्त. निष्क्रिय अलिप्ततेचा काही अर्थ नाही - काही मोल नाही कारण की लिप्त व्हायच्या स्थितीत जो लिप्त होत नाही त्याला अलिप्त असे म्हणतात. विकार उत्पन्न व्हायच्या स्थितीतही जो निर्विकार असतो त्याला निर्विकार म्हणु शकतो. अलिप्ततेचा काही सत्कर्माशी विरोध नाही. अलिप्ततेचा विरोध तर असत् कर्मांशी आहे. राजसी

आणि तामसी कर्मांशी विरोध आहे. उदासीनचा अर्थ सारे काही सोडून देऊन काहीही न करता अलिप्त रहाणे असा नाही होऊ शकत. गुणातीत पुरुष जनसेवेच्या कार्यात तल्लीन असताना अलिप्त, निर्विकार, तटस्थ रहातो. इथे उदासीन शब्दाचा खरा अर्थ जाणून घ्यायला हवा.

2) **गुणैः न विचाल्यते:** गुणातीत पुरुष तीन गुणांनी विचलित होत नाही. तो अखंडपणे आत्मस्थितीत तल्लीन - तन्मय असतो. तिसऱ्या अध्यायातील 28 व्या श्लोकात हाच मुद्दा आला आहे. गुण शब्दाचा अर्थ जसा तीन गुण आहे तसेच विषयही आहे. एकुण अर्थ असा होतो. त्रिगुणात्मक प्रपंच. या त्रिगुणात्मक प्रपंचात सदा काही - ना - काही घटना घडतच असतात. सृष्टी निरंतर परिवर्तनशील असल्यामुळे सृष्टीचे स्वरुप कदापि स्थिर रहात नाही. सृष्टीची स्थिती स्थिर नसल्यामुळे तिला सत्यपदार्थ नाही म्हणता येत. अशा प्रकारे सृष्टी मिथ्या असल्यामुळे आणि गुणातीत पुरुषाच्या चित्तात वैराग्य नांदत असल्यामुळे जगात वाटेल तेवढी उलथा-पालथ झाली तरी गुणातीत पुरुष अविचलित रहातो. आत्मस्थितीचा अनुभव लाभल्यामुळे तो त्या स्थितीत नित्य स्थिर असतो.

3) **गुणा वर्तन्ते:** गुण म्हणजे शरीर आणि इंद्रियांच्या आकारात प्रकट गुण आपापल्या कार्यात, आपापल्या विषयात व्यवहार करत रहातात. गुण शब्दाचा अर्थ जसा विषय आहे, तसाच इंद्रियही आहे. तिसऱ्या अध्यायातील 28 व्या श्लोकात हाच अर्थ घेतला गेला आहे. तिथली शब्द - योजना आहे. गुणा गुणेषु वर्तन्ते. पहिल्या गुण शब्दाचा अर्थ इंद्रिय असून दुसऱ्यांदा प्रयुक्त गुण शब्दाचा अर्थ विषय आहे. या श्लोकात असे म्हटले गेले आहे की इंद्रिये आपापल्या विषयात व्यवहार करतात - रमतात, असे जाणून ज्ञानी पुरुष त्यांच्या ठायी आसक्त होत नाही. इथेही हीच गोष्ट सांगितली गेली आहे. इंद्रियांच्या या कार्यांना स्वत:पासून वेगळे समजून गुणातीत पुरुष त्याच्याशी आपला संबंध जोडत नाही. संबंध जोडल्यामुळे इंद्रियांच्या कार्यात कुठलाही फरक पडत नाही उलट संबंध जोडल्यामुळे दु:ख वाट्याला येते. डोळे खराब झाले तर 'माझे डोळे खराब झाले' असा संबंध जोडल्यावर दु:ख हे होणारच. यामुळे देहाला साधन मानून चालणाऱ्याला दु:खानुभव येणार नाही. त्याचे कार्य व्यवस्थितपणे सुरु राहील.

4) **इति यः** अवतिष्ठति न इंगते - असे समजून जो आत्मस्वरुपी स्थिर रहातो - विचलित होत नाही. दुसऱ्या आणि या चौथ्या लक्षणात काही विशेष फरक नाही. विषयांना विषयरुपात न बघता ईश्वर स्वरुपात जर पाहिले तर ते चित्तावर आपला स्वतंत्र परिणाम करु शकत नाहीत - प्रभाव टाकू शकत नाहीत. हे अद्वैत - ज्ञानाचे फलित आहे. अद्वैत ज्ञानाचे वैशिष्ट्य हेच आहे की द्वैत समोर उभे ठाकले असतानाही मुळीच त्रास होत नाही. ज्ञानी म्हणजे त्रिगुणातीत पुरुषाला जगत् सत्यरुपी वाटत नसल्यामुळे तो दु:खमुक्त राहू शकतो आणि आत्मस्वरुपापासून कदापि विचलित होत नाही.

: 24 :

***समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ।***
***तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **समदु:खसुख:** जो सुख - दु:खात सम रहातो
- **स्वस्थ:** जो आत्मस्वरुपी निरंतर स्थित रहातो
- **समलोष्टाश्मकांचन:** ज्याच्यासाठी मातीचे ढेकूळ - दगड आणि सोने सारखेच आहे
- **तुल्यप्रियाप्रिय:** ज्याच्यासाठी प्रिय आणि अप्रिय समान आहेत.
- **धीर:** जो विवेकी आहे
- **तुल्यनिंदात्मसंस्तुति:** ज्याला निंदा आणि आत्मस्तुती समान आहे

**अर्थ**

जो पुरुष निरंतर आत्मभावात राहून सुख-दु:ख समान मानतो, माती, दगड, सोने याना सारखेच मानतो, ज्याला आवडती न आवडती गोष्ट सारखीच वाटते जो ज्ञानी आहे आणि स्वत:ची निंदा व स्तुती ज्याला समान वाटतात.

***आत्मत्वें सम जो पाहे सोनें पाषाण मृत्तिका ।***
***धैर्यवंत सुखें दुःखें स्तुति - निंदा प्रियाप्रिय ॥***

**विषय:** या श्लोकात गुणातीत पुरुषाची सहा लक्षणे वर्णिली आहेत. 1) जो सुख - दुःखात सम रहातो. 2) जो आत्मस्थित आहे. 3) ज्यांच्यासाठी मातीचे ढेकूळ आणि सोने समान आहे. 4) ज्यांच्यासाठी प्रिय - अप्रिय समान आहे. 5) जो विवेकी आहे. 6) ज्यांच्यासाठी निंदा आणि आत्मस्तुती समान आहे.

**स्पष्टीकरण**

1) **समदुःखसुखः** जो सुख - दुःखात सम असतो. म्हणजे जो अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीत चित्ताची समानता राखतो. सामान्य माणसाला अनुकूल परिस्थितीत सुख वाटते - सुखाचा अनुभव येतो. सर्वांचेच सर्व प्रयत्न अनुकूल परिस्थितीच्या प्राप्तीसाठीच असतात. कुणालाच प्रतिकूल परिस्थिती नको कारण की प्रतिकूल परिस्थिती दुःखदायक असते आणि दुःख कुणाला नको. बाह्य परिस्थितीची अपेक्षा न राखता सुख प्राप्त करुन घ्यायची पध्दत लोकांच्या लक्षात येत नाही. सदा अनुकूल परिस्थिती प्राप्त होणे - लाभणे- आपल्या अधीन नाही. बरे, याशिवाय असेही आहे की जी परिस्थिती एखाद्याला अनुकूल असेल ती दुसऱ्याला प्रतिकूलसुध्दा असू शकेल. यामुळे परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल दोघांमध्ये सुखाचा अनुभव मिळावा हा विचार पत्करायला हवा. कुठल्याही परिस्थितीत सुखानुभव प्राप्त करुन घेण्याचा सराव करत राहिलो तर प्रतिकूल परिस्थितीतही शांतता लाभू शकेल. हा सराव करायला ईश्वर - भक्ती लागते, आत्मानात्मविवेक जागावा लागतो, विवेक - वैराग्य वगैरे प्रकारची साधना करावी लागते. तो पुरुष त्रिगुणातीत होतो. तो बाह्य परिस्थिती सुखाची असो वा दुःखाची सदा अविचलित रहातो. आपण अनुकूल परिस्थितीत म्हणजे सुखाच्या परिस्थितीत आपल्याला दुःखाचा अनुभव येतो. त्रिगुणातीत पुरुष अनुकूल परिस्थितीत सुखाचा अनुभव घेत नाही, म्हणून प्रतिकूल परिस्थितीतही त्याला दुःखाचा अनुभव येत नाही. त्रिगुणातीत पुरुष सुख - दुःखात समता राखतो.

2) **स्वस्थः** 'स्व' मध्ये स्थित रहातो. आत्मस्थित रहाणे. स्वस्थ शब्दात पहिले अक्षर 'स्व' असुन दुसरे 'स्थ' आहे. अर्थात् स्वरुपात स्थित रहाणे. स्वरुपात म्हणजे सत् - चित् आनंदस्वरुपी ईश्वराच्या ठायी त्रिगुणातीत पुरुष लीन रहातो. या आत्मस्वरुपाचे ज्ञान नसल्यामुळे अज्ञानी लोक देह, इंद्रिये वगैरे संघातातच लीन रहातात आणि देहासाठी बाह्य परिस्थिती अनुकूल असली तरच सुख प्राप्त होऊ शकते. यामुळे प्रत्येकाला अनुकूल परिस्थितीची कामना असते. अनुकुल परिस्थिती नसली तर दुःख उत्पन्न होते. त्रिगुणातीत पुरुष आत्मस्थ असल्यामुळे प्रतिकूल परिस्थिती आली तरी दुःखी होत नाही.

3) **समलोष्टाश्मकांचनः** ज्याच्यासाठी मातीचे ढेकूळ आणि सुवर्ण दोघे समान आहे. खरे पाहू गेल्यास दोघेही पृथ्वीचेच पदार्थ आहेत. यांचा उपयोग अवश्य वेगवेगळा आहे. इथे दोघांना एक मानायचा अर्थ असा आहे की दोघांच्या बाबतीत अनासक्त भाव वा तटस्थ वृत्ती. त्रिगुणातीत पुरुष अनासक्त असतो. दोन्ही पदार्थ विनाशी आहेत. विनाशी पदार्थांबाबत आसक्ती राखली तर दुःखाशिवाय पदरी काही पडणार नाही. दोन्ही पदार्थांमध्ये सर्व बाह्य विनाशी पदार्थांचा समावेश होतो. रामकृष्ण परमहंसांच्या बाबतीत एक कथा प्रसिध्द आहे. या दोन्ही पदार्थांविषयी मनात मुळीच आसक्ती वा आकर्षण शिल्लक राहू नये यासाठी ते नदीकाठी जात. 'पैसा आणि माती, दगड समान आहेत, त्यांच्यात काही फरक नाही' असे सांगून नदीच्या पात्रात टाकून देत असत. ते अशाप्रकारे साम्यावस्थेचा सराव करीत होते.

4) **तुल्यप्रियः अप्रियः** ज्याला प्रिय आणि अप्रिय समान आहेत. प्रत्येकाच्या मनी आवड - निवड असते. इंद्रियांचे जेवढे म्हणून विषय आहेत त्यांच्याविषयी प्रत्येकाला मनात प्रिय - अप्रिय भाव असतो. कुणाला संगीत खूप आवडते तर कुणाला चित्रकलेत आवड असते. प्रत्येकाची आवड भिन्न - भिन्न असते पण त्रिगुणातीत पुरुष तटस्थ असतो. याचे कारण असे की त्याच्या मनात ईश्वर - स्वरुपाविषयी आवड निर्माण झालेली असते. ईश्वर - स्वरुपाविषयी जेव्हा आवड उत्पन्न होते तेव्हा इतर विषयात आवड निवड उरत नाही.

5) **धीरः** त्रिगुणातीत पुरुष धीर म्हणजे बुध्दीमान - विवेकी असतो. धी म्हणजे बुध्दी. तो धीमान म्हणजे बुध्दीमान असतो. बुध्दी तर सर्वांच्याच ठायी असते पण विवेक बुध्दी मात्र सर्वांपाशी नसते. ज्याला ईश्वरी - स्वरुपाचा अनुभव आला, ज्याची बुध्दी शुध्द असलीच पाहिजे कारण की बुध्दी शुध्द झाल्याशिवाय कुणाला ईश्वरी

स्वरुपाचा लाभ नाही होऊ शकत. शुध्द बुध्दीच्या ठायी विवेक नांदतो. अशुध्द बुध्दी असली की माणूस अविवेकी बनतो. विवेकाच्या ठायी निर्विकारता वसते. अविवेक जिथे असतो, तिथे विकार असतात. दुसऱ्या अध्यायातील 5 व्या श्लोकात 'धीर' शब्द आला आहे. तुलसीदासजी म्हणतात - धीर भगति पथ परम प्रवीना- म्हणजे धीर भक्तीचा पथ म्हणजे मार्ग अतिप्रवीण आहे. उपनिषदातही ठायी - ठायी 'धीर' शब्द आला आहे. साधारणत: लोकांमध्ये 'धीर' शब्दाचा 'धैर्यवान' हा अर्थ प्रसिध्द - प्रचलित आहे. गीता - उपनिषदात 'धीर' शब्दाचा अर्थ आहे - विवेकी पुरुष - अशा पुरुषाच्या बुध्दीत निश्चय, धैर्य असायला हवे पण ज्या पुरुषाच्या ठायी धैर्य दिसून येत नाही, तो विवेकी असेलच असे काही सांगता येत नाही. म्हणजे विवेक शब्द व्यापक आहे. विवेकात धैर्य सामावले आहे पण धैर्यात विवेक असेलच असे मात्र नाही.

6) **तुल्यनिंदात्मसंस्तुति:** ज्याच्यासाठी निंदा आणि आत्मस्तुती समान आहे असा. निंदा आणि स्तुतीचा मानवी चित्तावर अधिकात अधिक प्रभाव पडतो. माणूस पापाचरण करतो पण पापाचरण जोवर लपलेले असते तोवर कुणाला माहित नसते पण पाप जेव्हा प्रकट होते तेव्हा लोक त्याची निंदा करु लागतात. त्याची प्रतिष्ठा घटून जाते. माणूस निंदा नाही झेलू शकत - सहन करु नाही शकत. निंदा ऐकून माणसाची एकाग्रता भंग पावते. स्वस्थता भंगते - जगणे अवघड होऊन जाते. सज्जनाकडूनही जर चूक झाली आणि ती खुली झाली - जाहीर झाली तर तो ते सहन नाही करु शकत.

अनेक लोक समाजात प्रशंसा व्हावी, या उद्देशाने सत्कर्मे करायला प्रवृत्त होतात. तसेच कीर्तीच्या प्रलोभनानेही माणूस सत्कार्यात स्थिर होतो. निंदा - स्तुतीचा परिणाम चित्ताच्या पटलावर होत असल्याचा समाजालाही काही फायदा होतो - निंदा - स्तुतीची पर्वा न करण्यातून जीवनात जडता जागण्याची शक्यता असते. निंदा -स्तुतीचा चित्तावर खूप प्रभाव होण्याचाही फायदा नसतो. खरे म्हणजे लक्षात ठेवण्यासारखे असे आहे की कुणी आपली निंदा करत असेल तर तीव्रतेने आत्मपरीक्षण करायला हवे आणि काही दोष आढळून आलेत तर ते घालवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत कारण की आपले दोष सदा आपल्या लक्षात येतातच असे नव्हे म्हणुन 'निंदक बाबा वीर हमारा' - वीर म्हणजे बंधु-भाऊ. 'निंदकाचे घर असावे शेजारी.' कुणी स्तुती करत असेल तर काही विचार करायची गरज नाही कारण की चांगले गुण वा चांगल्या कार्याची प्रशंसा होणे स्वाभाविक आहे. आपली स्तुती ऐकून मनाला समाधान होणे स्वाभाविक आहे पण स्तुतीने अहंकार मात्र उपजायला नको. अहंकारात नेहमीच धोका आहे. तुलसीदासजी लिहितात -

***निंदा अस्तुति उभय सम, ममता मम पद कंज।***
***ते सज्जन मम प्रानप्रिय, गुनमंदिर सुख पुंज॥***

अर्थात् - ज्यांच्यासाठी निंदा - स्तुती समान झाली. ज्यांच्या मनात ईश्वराप्रती प्रेम आहे असे सज्जन वा संत मला प्राणांहूनही प्रिय आहेत. ते गुणमंदीर म्हणजे गुणांचे भंडार आहेत. सुखाचे पुंज म्हणजे सुखराशी आहेत. ते आनंदमय आहेत.

: 25 :

***मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयो:।***
***सर्वारंभपरित्यागी गुणातीत: स उच्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मानापमानयो: तुल्य:** ज्याला मान आणि अपमान समान आहेत
- **मित्रारिपक्षयो: तुल्य:** ज्याला मित्र आणि शत्रु समान आहेत.
- **सर्वारंभपरित्यागी:** सर्व आरंभांचा म्हणजे कर्मात कर्तेपणाचा त्याग करतो
- **स: गुणातीत: उच्यते:** अशा पुरुषाला गुणातीत असे म्हणतात

**अर्थ**

जो मान आणि अपमान सारखेच मानतो, ज्याची मित्र अणि शत्रु या दोघांविषयी समान वृत्ती असते, तसेच सर्व कार्यात ज्याला 'मी करणारा' असा अभिमान नसतो त्याला गुणातीत असे म्हणतात.

*मानापमान जो नेणे नेणे जो शत्रु - मित्र हि।*
*आरंभ सोडिले ज्यानें तो गुणातीत बोलिला॥*

**विषय:** या श्लोकात गुणातीत पुरुषाच्या तीन लक्षणांचा उल्लेख आहे. 1) ज्याला मान आणि अपमान समान आहे. 2) मित्र आणि शत्रु समान आहेत. 3) ज्याने आपल्या इच्छेनेच आरंभांचा म्हणजे कर्तेपणाचा त्याग केला आहे. तो पुरुष गुणातीत आहे.

**स्पष्टीकरण -**

1) मानापमानयो: तुल्य: ज्याच्यासाठी मान आणि अपमान समान आहे. माणसाच्या चित्तात मान आणि अपमानाची भावना खूप प्रबळ असते. अशा लोकांच्या जीवनात दु:खाचे नाना प्रसंग येतात. सर्वांना मानच हवा असतो याचे कारण अहंकार आहे. अहंकाराचे प्रकट रुप मान - सन्मानाची इच्छा असते. यामुळे 13 व्या अध्यायात ज्ञानाची लक्षणे वर्णन करताना पहिले लक्षण अमानित्व सांगितले गेले आहे.. आठव्या श्लोकात लक्षण वर्णिले आहे. निरहंकारता, अहंकार आणि मानापमानाची भावना जोवर क्षीण होत नाही तोवर शांतता लाभणे शक्य नाही. मान - सन्मान लाभावा या आशेने एखादा पुरुष जर सत्कर्मे करण्यात, गुणांचा म्हणजे सद्गुणांचा विकास करण्याकामी प्रवृत्त होत असेल तर ही अभिनंदनीय - प्रशंसनीय बाब आहे. सत्कर्मांच्या ठायी प्रवृत्त होण्यासाठी वा गुणोत्कर्षासाठी मान - सन्मानाच्या भावनेचा उपयोग प्रारंभिक अवस्थेत अवश्य होऊ शकतो. सन्मान लाभावा, स्तुतीगान ऐकायला मिळावे यासाठी सत्कर्मांच्या ठायी वा गुणोत्कर्षात प्रवृत्त होणे एक वेगळी गोष्ट आहे पण जर कुणी सन्मान केला नाही, वा चांगल्या गुणांची कदर केली नाही वा सत्कर्मांची कुणी प्रशंसा केली नाही तर दु:खी होणे ही वेगळी गोष्ट आहे. सत्कर्म आणि गुणोत्कर्षासाठी प्रवृत्त होण्यासाठी, स्थिर रहाण्यासाठी मान - सन्मानाची इच्छा गरजेची असू शकते. ती दु:खद न होता सुखद आहे पण गुणांची कदर व्हावी वा सन्मान होत रहावा अशी इच्छा मात्र दु:खदायक आहे. आणखी एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा आहे की कुणी जर कुणाला कनिष्ठ समजून त्याच्याशी दुर्व्यवहार करत असेल तर ते सहन करायला नको, माणसाला हीन वा कनिष्ठ समजून दुर्व्यवहार करायचा अर्थ मानवतेचा - मनुष्य जातीचा अवमान आहे. कुणाबद्दल द्वेष जाणून जर त्याचा अपमान केला जात असेल तर तिथे विवेकपूर्वक सर्व परिस्थितीचा अभ्यास करुन - तोलून - मापून निर्णय घ्यावा लागतो. पती पत्नीचा वा पत्नी पतिचा अपमान करत असेल तर ते विवेकपूर्वक सहन करायला हवे. खरे पाहू गेल्यास नवरा - बायकोत एवढे प्रेम, आदर आणि ऐक्य असले पाहिजे की एकमेकांचा अपमान करायचा प्रसंगच यायला नकोय. संत तुलसीदासजी लिहितात सबहिं मानप्रद आपु अमानी - अर्थात सर्वांना त्यांच्या - त्यांच्या योग्यतेनुसार मान देतो, पण स्वत: अमानी रहातो म्हणजे मनात कदापि मान - सन्मानाची भावना राखत नाही.

2) **मित्रारिपक्षयो: तुल्य:** ज्याला मित्र आणि शत्रु समान आहेत, सहाव्या अध्यायातील नवव्या श्लोकात म्हटले आहे की जो शत्रु - मित्र, आपला - परका, साधू - पापी यांच्याबाबतीत तटस्थ असतो - यांच्यात जो समत्व बघतो - यांच्याशी समान भावनेने व्यवहार करतो, तो विशेष होय. एवढी समता, निर्विकारता ज्याच्या चित्तात उत्पन्न होते तो श्रेष्ठ योगी होय. सर्वसामान्य लोकांच्या मनात राग - द्वेष भावना असल्यामुळे मित्रावर प्रेम आणि शत्रुबद्दल द्वेष वा तिरस्कार उत्पन्न होतो. त्रिगुणातीत पुरुषाचा राग - द्वेष क्षीण झाल्यामुळे त्याच्या मनात दोघांविषयी समानभाव नांदतो. अर्थात सज्जनाबद्दल विशेष भाव मनात उत्पन्न होणे आणि दुर्जनाबद्दल विशेष प्रेम न उपजणे असे होऊ शकते. विशेष भाव, विशेष प्रेम उत्पन्न न होणे वेगळे आणि द्वेष जागणे वेगळे होय. दुर्जन वा शत्रुच्या बाबतीत विशेष प्रेम नसेल आणि द्वेष भावही नसेल तरीही सामान्य प्रेम असू शकते. त्रिगुणातीत पुरुषाच्या चित्तात सर्वाप्रती ईश्वरभाव उपजलेला असतो त्यामुळे शत्रु वा दुर्जनाच्या बाबतीतही तोच - तसाच- ईश्वरभाव उत्पन्न होईल. दुर्जन वा शत्रुच्या ठायी राग - द्वेषाची विशेष स्थिती असल्यामुळे त्याचे मन मलीन होऊन गेल्यामुळे त्याच्यातील ईश्वर झाकलेला असतो. म्हणजे दुर्जन वा शत्रु विशेषत्वाने मायेच्या अधीन असतात त्यामुळे त्यांच्याविषयी जर सामान्य प्रेम असेल आणि सज्जन वा मित्राविषयी जर विशेष प्रेम असेल तर त्रिगुणातीत पुरुषाच्या समतेत वा निर्विकारतेत काही फरक पडत नाही. चित्ताची समता वा निर्विकारता हेच त्रिगुणातीत पुरुषाचे खरे लक्षण होय.

3) **सर्वारंभपरित्यागी गुणातीत: स:** उच्यते त्रिगुणातीत पुरुष स्वत:च्या इच्छेने कर्माचा आरंभ न करणारा म्हणजे भिन्न - भिन्न कामांना स्थापित न करणारा आहे, तो परमात्मप्रेरित कर्मे करतो. अशा पुरुषाला गुणातीत म्हणतात.

या ठिकाणी हे सांगताहेत की कर्मे आचरताना त्रिगुणातीत पुरुषाची दृष्टी कशी - कशी असते. साधारण व्यक्तीच्या मनात नाना प्रकारच्या इच्छा, महत्वाकांक्षा, वासना असतात. त्या त्याला प्रेरित करतात. तो नाना प्रकारच्या भल्या - बुऱ्या, सामान्य कर्मात अडकून असतो. नाना आडंबरांमध्ये प्रवृत्त होतो आणि यामुळेच माणसाच्या हातून राजसी - तामसी कर्मेही घडत असतात. सात्विक कर्मांचे आचरण करणारे पुरुषदेखिल सात्विक कामात प्रवृत्त असतात. त्यांची सात्विक कर्मे - ते आचरत असलेली सात्विक कर्मे - ईश्वर - प्रेरितच असतात असे काही सांगता येत नाही. जो ईश्वरापुढे विनत आहे, ज्याने आपल्या अहंकाराला विलीन करुन टाकले आहे असा कुणी विरल पुरुषच ईश्वर प्रेरित सात्विक कर्मे आचरतो. गांधीजी आपल्या इच्छेने कुठले काम करत नसायचेत. त्यांची सर्व कर्मे प्रवाहपतीत म्हणजे ईश्वरपे्ररितच असायचीत.

(पुढील दोन श्लोकातून अर्जुनाच्या तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे - अर्जुनाने एकूण तीन प्रश्न विचारले होते. 1) त्रिगुणातीत पुरुषाची लक्षणे काय? 2) त्रिगुणातीत पुरुषाचे आचरण कसे असते? 3) या तीन गुणांना तो कशाप्रकारे ओलांडून जातो? यापैकी दोन प्रश्नांचे उत्तर 22 ते 25 व्या श्लोकापर्यंत दिले गेले आहे. पुढच्या श्लोकात तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे.)

: 26 :

*मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।*
*स गुणान् समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **च य: मां:** आणि जे मला
- **अव्यभिचारेण भक्तियोगेन्:** अनन्य भक्तियोगाने
- **सेवते:** निरंतर भजतात
- **स: एतान् गुणान्:** ते या तिन्ही गुणांना
- **समतीत्य:** पूर्णपणे ओलांडून
- **ब्रह्मभूयाय कल्पते:** ब्रह्मस्वरुपाचा अनुभव घ्यायला म्हणजे सच्चिदानंदघन ब्रह्मात ऐक्य पावण्याला योग्य - पात्र - ठरतात

### अर्थ

आणि जो पुरुष अव्यभिचारी भक्तियोगाने (केवळ एक सर्वशक्तीमान परमेश्वर वासुदेव भगवंतालाच आपला स्वामी मानून, स्वार्थ आणि अभिमान सोडून श्रध्दाभक्तीयुक्त परम प्रेमाने निरंतर चिंतन करणे यालाच अव्यभिचारी भक्तियोग असे म्हणतात.) मला निरंतर भजतो, तोसुध्दा या तिन्ही गुणाना पूर्णपणे उल्लंघून सच्चिदानंदघन परमात्म्याला म्हणजे बह्माला प्राप्त होण्यास योग्य ठरतो.

***जो एकनिष्ठ भक्तीनें अखंड मज सेवितो ।***
***तो ह्या गुणांस लंघूनि शके ब्रह्मत्व आकळूं ॥***

विषय: या श्लोकात दोन लक्षणे सांगितली गेली आहेत. 1) जो पुरुष मला अनन्य भक्तियोगाने भजतो. 2) तो या तिन्ही गुणांना ओलांडून ब्रह्मस्वरुपाचा अनुभव घ्यायला समर्थ होऊन जातो.

### स्पष्टीकरण

1) **च य: मां अव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते:** जो पुरुष मज ईश्वराला अनन्य, एकनिष्ठ अशा भक्तियोगाने भजतो. या अध्यायातही भक्तीशी असलेले अनुसंधान परिपूर्ण आहे. अनेक महापुरुषांच्या अनुभवांमुळे गीतेत हे प्रतिपादित केले गेले आहे की ब्रह्मस्वरुपाचा अनुभव घेण्यासाठी भक्ती हा सुगम उपाय आहे. अर्थात भक्तीत स्वत:ला विलीन करुन घ्यावे लागते. ब्रह्मस्वरुपाचा अनुभव प्राप्त करुन घेण्याचा अर्थ स्वत:ला ईश्वराच्या ठायी विलीन करुन घेणे आहे. व्यवहारातही आपल्याला हा अनुभव येतो की एखाद्या वस्तुला प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात पण आपल्या जवळची वस्तु हरवण्यासाठी मात्र काही प्रयत्न करावे लागत नाही उदाहरणार्थ एखादा श्लोक मुखोद्गत करायचा असेल तर खूप मेहनत घ्यावी लागते. विस्मरणासाठी काही प्रयत्न करावे लागत नाही. त्याचप्रमाणे ब्रह्म - प्राप्तीसाठी खूप प्रयत्न करावे लागतात पण ब्रह्म वा

परमात्मा तर आधीपासून प्राप्त आहे. ईश्वर प्राप्त करुन घेण्यात केवळ अहंकार आणि अहंकारामुळे निर्माण होणाऱ्या विविध विकारांचाच अडथळा असतो यामुळे भक्ती सुलभ - सोपी आहे. भक्तीमुळे अहंकार गळून पडतो कारण भक्तीचा अर्थच स्वत:ला ईश्वरात विलीन करणे वा हरवून टाकणे असा आहे. संत तुलसीदासजी म्हणतात -

*गुनागार संसार दुःखरहित बिगत संदेह।*
*तजि मम चरन सरोज प्रिय जिन कहुँ देह न गेह॥*

अर्थात् जो गुणांचे आगार म्हणजे भांडार आहे. प्रपंचातल्या दु:खांनी रहित आहे आणि ज्यांच्या शंका व संदेह दूर झाले आहेत आणि माझ्या चरण - कमळांशिवाय ज्यांना ना देह प्रिय आहे ना गेह म्हणजे घरदार.

ज्यांना अहंकाराबद्दल वैराग्य उत्पन्न झाले आहे, अरुची झाली आहे, जे विरत आहेत तेच ईश्वरासमोर झुकतात - प्रणत होतात. त्रिगुणातीत पुरुषाचे संपूर्ण प्रेम स्वत:वर नसून ईश्वरावरच असते आणि तेही साधारण स्वरुपाचे नसून अनन्य, एकनिष्ठ प्रकारचे असते. यामुळे भगवंत सांगताहेत की ज्याला त्रिगुणातीत बनायचे आहे, त्याला एकनिष्ठ भक्ती करता यायला हवी.

2) **सः एतान् गुणान् समतीत्य ब्रह्मभूयाय कल्पते:** तो या तीन गुणांना ओलांडून ब्रह्मस्वरुपाचा अनुभव घेण्याकामी समर्थ होऊन जातो. अशाप्रकारे जो ईश्वराची एकनिष्ठ भक्ती करतो तो या तीन गुणांपासून अलिप्त होतो. तीन गुणांपासून अलिप्त होणे याचा अर्थ सत्वगुणाचा उत्कर्ष साधत अलिप्त होणे होय. या दोघांना क्षीण करुन सत्वगुणाचा उत्कर्ष केल्यावरच ईश्वराची एकनिष्ठ भक्ती होऊ शकते. हे लक्षात राखायला हवे आणि जेव्हा या तीन गुणांहून म्हणजे सत्वगुणाच्या उत्कर्षात सत्वगुणापासून अतीत होऊन जातो तेव्हा तो मोक्ष प्राप्त करण्यासाठी योग्य ठरतो. अहंशून्यता म्हणजे मोक्ष होय. अहंशून्यता ईश्वराच्या एकनिष्ठ भक्तीतूनच प्राप्त होऊ शकते.

: 27 :

*ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च।*
*शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि:** कारण की
- **अव्ययस्य अमृतस्य:** अक्षय, अविनाशी, अव्यय, मोक्षस्वरुपी
- **च शाश्वतस्य धर्मस्य:** आणि शाश्वत धर्मस्वरुपी
- **च ऐकान्तिकस्य सुखस्य:** आणि आत्यंतिक म्हणजे अखंड एकरस सुखस्वरुपी
- **ब्रह्मण:** ब्रह्मतत्त्वासाठी
- **अहं प्रतिष्ठा:** मी आधार म्हणजे आश्रय आहे

**अर्थ**

कारण त्या अविनाशी परब्रह्माचा, अमृताचा, नित्य धर्माचा आणि अखंड एकरस आनंदाचा आश्रय मी आहे.

*ब्रह्मास मी चि आधार अवीट अमृतास मी।*
*मी चि शाश्वत धर्मास आत्यंतिक सुखास मी॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी सांगितलेल्या आहेत. 1) अक्षय अमृत म्हणजे अक्षय मोक्षस्वरुपी. 2) आणि शाश्वत म्हणजे सत्य, अहिंसा वगैरे धर्मस्वरुपी, आणि 3) आत्यंतिक सुखस्वरुपी ब्रह्मासाठी. 4) मी आधार आहे.

**स्पष्टीकरण**

1) **हि अव्ययस्य अमृतस्य:** अक्षय आणि अमृतस्वरुपी म्हणजे मोक्षस्वरुपी. इथे ब्रह्मज्ञानाच्या स्वरुपाचे वर्णन केले जात आहे. ब्रह्मज्ञान अक्षयस्वरुपी आहे, त्याचा क्षय होत नाही. भौतिक ज्ञान क्षीण होत जाते. परीक्षा झाली की विद्यार्थी शिकलेल्या ज्ञानाला विसरुन जातो. म्हातारपणी स्मृती क्षीण वा मंद होऊन जाते पण ब्रह्मज्ञान प्राप्त झाले की ते क्षीण होत नाही. कारण की ब्रह्म आपले निजस्वरुप आहे. आपल्याला त्याची ओळख नाहीये. एकदा परिचय झाला म्हणजे झाला, तो कदापि नष्ट होत नाही.

ब्रह्मज्ञानाचे फलित मोक्ष आहे. ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाल्यावर अज्ञान, दु:ख आणि जन्मापासून माणूस मुक्त

होतो. स्वरुपाविषयीचे अज्ञान, अज्ञानामुळे दु:ख आणि त्यातून जन्म - मरणाच्या रहाट - गाडग्याचे सातत्य हे अज्ञानाचे त्रिविध स्वरुप होय. स्वरुप ज्ञान झाले म्हणजे हा त्रिविध दु:खानुभव दूर होतो आणि अज्ञान, दु:ख आणि जन्म मरणातून मुक्ततेचे त्रिविध फळ लाभते.

2) **च शाश्वतस्य धर्मस्य:** आणि ज्याचे स्वरुप शाश्वतता आहे. अशा सत्य, अहिंसा वगैरे धर्मस्वरुपी. नुकतेच ब्रह्मज्ञानाचे आंतरिक स्वरुप वर्णिले आहे. आता ब्रह्मज्ञानाचे बाह्य परिणाम सत्य, अहिंसा वगैरेचे पालन सांगताहेत. सत्य, अहिंसा वगैरे महाव्रते शाश्वत असून त्याच्या आचरणात सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह ही पाच महाव्रते आणि त्याच्याशी संबध्द अन्य नीती - नियम असायलाच हवे कारण की ब्रह्मज्ञानाच्या तो बाह्य आचरणांवर होणारा परिणाम आहे. ब्रह्मज्ञान आत उत्पन्न होईल म्हणजे अनुभवातून प्राप्त होईल. सत्य, अहिंसा इत्यादी व्रतांविषयीचे स्पष्टीकरण मागे नुकतेच करुन दिले आहे. यामुळे इथे ती पुनरावृत्ती टाळली जातेय.

3) **च ऐकान्तिकस्य सुखस्य:** आणि आत्यंतिक सुखस्वरुपी. ब्रह्मज्ञान आंतरिक सुखस्वरुपी आहे. अज्ञानामुळे दु:खाचा अनुभव येतो. अज्ञान हटल्यावर दु:खापासून मुक्त होण्याचा अनुभव येतो. दुसऱ्या अध्यायातील 55 व्या श्लोकात आत्मनि एव आत्मना तुष्ट: असे सांगितलेले आहे. ईश्वराच्या ठायीच संतुष्ट होतो, म्हणजे स्वत: ईश्वराठायी लीन होऊन ईश्वराचाच आनंद होतो. ईश्वर आनंदस्वरुपी आहे. विषयही आपल्याला आनंद देतात पण ते मर्यादित प्रमाणात सुख देतात आणि दु:खही देतात. ईश्वरापासून लाभणाऱ्या आनंदाचे स्वरुप असे नाही. ईश्वराशी एकरुप होताच निखळ आनंदाचाच अनुभव येईल. ईश्वर इंद्रियातीत असल्यामुळे दुसरी कुठली दु:खद वस्तु शिल्लकच उरत नाही. इंद्रियगम्य विषयाबाबत आपण आणि विषय असा भेद उत्पन्न होतो. ईश्वराबाबतीत असा भेद उरत नाही. यामुळे जेव्हा आपल्याला ईश्वराचा अनुभव येतो तेव्हा 'आपण' शिल्लक न उरल्यामुळे केवळ ईश्वरविषयक आनंदच उरतो इतर कुठलाही अनुभव तिथे शिल्लक उरत नाही. हाच मुद्दा 6 व्या अध्यायातील 21 व्या श्लोकात आला आहे. तिथे 'आत्यंतिक सुख' हा शब्द प्रयुक्त झाला आहे. इथे शब्द आला 'एकांतिक सुख'. दोघांचा अर्थ एकच आहे.

4) **अहं प्रतिष्ठा:** मी आधार आहे म्हणजे माझी कृपा आणि भक्ती ब्रह्मप्राप्तीचा आधार आहे, म्हणजे उपाय आहे. ईश्वरानुभव प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य आधार ईश्वर कृपा आणि ईश्वर भक्ती आहे. 18 व्या अध्यायातल्या 55 व्या श्लोकात म्हटले आहे. भक्त्या मामभिजानाति आणि याच अध्यायातील 62 व्या श्लोकात म्हटले आहे तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत. विनोबाजी म्हणतात की 26 वा श्लोक भक्तीपर असून त्याच्या स्पष्टीकरणासाठी हा 27 वा श्लोक आहे. संत तुलसीदासजी म्हणतात -

***हरिमायाकृत दोष गुन, बिनु हरिभजन न जाई।***

म्हणजे सारे दोष हरीच्या मायेमुळे निर्मित झालेले असून ईश्वर भजनाशिवाय ते घालवता येणार नाहीत मग हरी कृपेच्या अनुसंधानात म्हणतात -

***सौदासी रघुबर के समुझै मिथ्या सौपि।***
***छूट न रामकृपा बिनु नाथ कहउँ पद रोपि॥***

रामकृपेशिवाय प्रपंचातुन मुक्त होता येत नाही. ते पुढे म्हणतात -

***जिमि थाल बिनु जल रहि न सकाई ।***
***कोटि भाँति कोउ करहिं उपाई। तथा मोक्ष सुख सुनु***
***खगराई। रहि न सकइ हरि भक्ति बिहाई॥***
***अस बिचारि हरि भगत सयाने। मुक्ति निरादर भगति***
***लोभाने। भगति करत बिनु यतन प्रयासा।***
***संसृतिमूल अबिद्या नासा॥***

अर्थात् जमीनी शिवाय जळ राहू शकत नाही (कोट्यवधी उपाय केले तरी) तशाप्रकारे हे पक्षीश्रेष्ठा, गरुडा! मोक्षसुख हरी भक्तीशिवाय लाभत नाही. हा विचार करुन हुशार हरीभक्त मोक्षाचा निरादर करुन भक्तीला वरतात. विनासायास भक्ती करुन ते अविद्येचा नाश करतात.

• • • *अध्याय चौदावा संपूर्ण* • • •



अध्याय - पंधरावा

# पुरुषोत्तम योग

: 1 :

**श्री भगवान उवाच**

*ऊर्ध्वमूलमध:शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्।*
*छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ऊर्ध्वमूलं:** ज्याचे मूळ वर आहे अशा आदिपुरुष परमेश्वररुपी मूळ असलेल्या
- **अध:शाखं:** ज्याच्या ब्रह्मारुप प्रमुख शाखा म्हणजे डहाळ्या खाली पसरलेल्या आहेत
- **अव्ययं:** जो नित्य - शाश्वत, अविनाशी आहे
- **अश्वत्थं:** त्या अश्वत्थ म्हणजे संसाररुपी पिंपळाच्या वृक्षाला
- **प्राहु:** असे म्हणतात
- **यस्य पर्णानि:** ज्याची पाने
- **छंदांसि:** वेद आहेत
- **य: तं वेद:** जो पुरुष त्या प्रपंचरुपी वृक्षाला जाणतो
- **स: वेदवित्:** त्याला वेदवेत्ता म्हणजे वेदांचे तात्पर्य जाणणारा जाण - समज

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले आदिपुरुष परमेश्वररुपी मूळ असलेल्या (आदिपुरुष भगवान नारायण वासुदेवच नित्य, अनंत आणि सर्वांचा आधार असल्याने व सर्वांच्या वर नित्य धामात सगुणरुपाने निवास करत असल्यामुळे ‘ऊर्ध्व’ नावाने त्यांचा उल्लेख केला आहे आणि तो मायाधीश सर्वशक्तीमान परमेश्वरच या संसाररुपी वृक्षाचे कारण आहे, म्हणून या संसार वृक्षाला ‘ऊर्ध्वमूल’ वृक्ष असे म्हणतात) ब्रह्मदेवरुप प्रमुख फांदी असलेल्या (त्या आदिपुरुष परमेश्वरापासून उत्पन्न होणारा असल्याने तसेच नित्यधामाच्या खालच्या भागात म्हणजे ब्रह्मलोकात निवास करत असल्यामुळे हिरण्यगर्भ ब्रह्मदेवाला परमेश्वराहून अध: (कनिष्ठ ) म्हटले आहे आणि तोच या संसाराचा विस्तार करणारा असल्याने त्या संसार वृक्षाची मुख्य शाखा आहे म्हणून या संसारवृक्षाला ‘अध:शाखा’ असणारा वृक्ष असे म्हणतात.) ज्या संसाररुप पिंपळ वृक्षाला अविनाशी (या वृक्षाचे मूळ कारण अविनाशी आहे तसेच अनादी कालापासून याची परंपरा चालू आहे म्हणून याला ‘अविनाशी’ असे म्हणतात.) म्हणतात तसेच वेद ही ज्याची पाने (या वृक्षाच्या शाखारुपी ब्रह्मदेवापासून प्रगट होणारे व यज्ञ वगैरे कर्मांच्या द्वारे या संसार वृक्षाचे रक्षण आणि वृध्दी करणारे तसेच त्याची शोभा वाढवणारे वेद असल्यामुळे त्यांना ‘पाने’ असे म्हटले आहे.) म्हटली आहेत, त्या संसाररुपी वृक्षाला जो पुरुष मूळासहित तत्वत: जाणतो तो वेदांचे तात्पर्य जाणणारा (भगवंताच्या योगमायेपासून उत्पन्न झालेला हा संसार क्षणभंगुर, नाशिवंत आणि दु:खरुपी आहे, याचे चिंतन सोडून केवळ परमेश्वराचेच नित्य, निरंतर अनन्य प्रेमाने चिंतन करणे, हेच ‘वेदांचे तात्पर्य जाणणे’ होय.)आहे.

**श्री भगवान म्हणाले**

***खालीं शाखा वरी मूळ नित्य अश्वत्थ बोलिला।***
***ज्याच्या पानांमधें वेद जाणे तो वेद जाणतो॥***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे. 1) जगत्रुपी वृक्षाचे श्रेष्ठ मूळ ब्रह्म आहे. 2) ज्या वृक्षाच्या डहाळ्या खाली पसरलेल्या आहेत. 3) जो नित्य म्हणजे अनादी काळापासून चालत आलेला आहे. 4) ज्याला

अश्वत्थ म्हणजे क्षणोक्षणी परिवर्तनशील मानले गेले आहे. 5) ज्या संसार - जगत् वृक्षाची पाने वेद म्हणजे ज्ञान आहे आणि 6) जो या जगत् - वृक्षाला जाणून घेतो तो वेदवेत्ता आहे म्हणजे वेदाच्या रहस्यांचा ज्ञाता आहे.

या श्लोकात संपूर्ण विश्वाला वृक्षाची उपमा दिली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **ऊर्ध्वमूलम्:** अत्युत्कृष्ट ब्रह्म आहे ते विश्वरुपी वृक्षाचे मूळ आहे. हा विश्वरुपी वृक्ष कसा उत्पन्न झाला ? याचे मूळ अतिउत्कृष्ट ब्रह्म म्हणजे परमात्मा आहे. या वृक्षाचे मूळ ऊर्ध्व म्हणजे वर म्हणजे इंद्रियातीत आहे. मूळ कारण इंद्रियातीत असायलाच हवे. इंद्रियगम्य वस्तु तर कार्यकोटीत येते. हा विश्वरुपी वृक्ष इंद्रियगम्य आहे, म्हणून त्याला 'कार्य' असे म्हणतात. कार्य मर्यादित स्वरुपाचे असल्यामुळे विनाशी, उत्पन्न आणि नष्ट होण्यायोग्य आहे. यामुळे ते अनित्य स्वरुपी आहे. मूळ कारण सर्वाहून वेगळे आहे. ते इंद्रियातीत आणि असीम आहे. ते अविनाशी असल्यामुळे उत्पन्न होणे आणि नष्ट होण्यायोग्य नाही, यामुळे नित्य आहे. विश्वाचे मूळ कारण जड नाही. जड प्रकृती नाही. जड वस्तुपासून अन्य कुठली रचना प्रकट होऊ शकत नाही. परमात्मारुपी चैतन्यसंपन्न बीजापासूनच या विश्वरुपी महान वृक्षाची निर्मिती झाली आहे.

इथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की जडापासून जड जगत् तर उत्पन्न होऊ शकते पण चैतन्यापासून जड जगत कसे बरे उत्पन्न होऊ शकेल? चैतन्यमय ब्रह्माला विश्वाचे निमित्त कारण मानू शकतो पण चैतन्यमय असल्यामुळे ब्रह्माला अनित्य जगताचे उपादान कारण कसे मानू शकतो? मातीचा घट बनतो. घट जड आहे आणि मातीही जड आहे यामुळे घट (कार्य) आणि माती (कारण) यांच्यात कार्यकारण संबंध तयार होतो पण घट घडवणारा कुंभकार ज्ञानस्वरुपी असल्यामुळे निमित्त कारण बनू शकतो. यामुळे ब्रह्म विश्वाचे बीज म्हणजे उपादान कारण बनू शकत नाही. ही शंका योग्य आहे पण जगत् सत्य नसल्यामुळे चैतन्य ब्रह्मामुळे जड विश्वाचा भास उत्पन्न होतो. खऱ्या ब्रह्मापासून खरे जड जगत उत्पन्न होऊ शकत नाही कारण ब्रह्म चैतन्यमय असून विश्व जड आहे. यामुळे दोघात कार्यकारणभाव नाही पण सत्य चैतन्यस्वरुपी ब्रह्मापासून मिथ्या जगत् उत्पन्न होऊ शकते. दोरीत सर्पाचा भास होऊ शकतो. दोरीच्या ठायी खरा सर्प निर्माण होऊ शकत नाही. मिथ्या सर्पाचा भास निर्माण होण्यात काही अडचण नाही.

2) **अध:शाखम्:** ज्या विश्वरुपी वृक्षाच्या डहाळ्या खाली पसरलेल्या आहेत. डहाळ्या म्हणजे पंच महाभूते. मूळ कारण ब्रह्म. ज्यातून आधी आकाश निर्माण झाले मग वायु, अग्नी, पाणी, पृथ्वी उत्पन्न झाले. या पंच महाभूतांपासून नाना पदार्थ उत्पन्न होऊ लागले. शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध हे पंच विषय उत्पन्न झाले. शरीर बनले. ज्यात मन, बुध्दी, अहंकार उत्पन्न झाले. पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये उत्पन्न झालीत. अशा प्रकारे वृक्षाच्या डहाळ्या पसरत गेल्या - पसरत राहिल्यात.

3) **अव्ययम्:** हा विश्वरुपी वृक्ष नित्य - अखंड आहे. अनादीकाळापासून चालत आलेला आहे. कुठल्या न् कुठल्या रुपात हा वृक्ष अखंड आहे. हे जगत अनादी आहे. प्रलयकाळीही बीजरुपात आपल्या मूळ कारणासह म्हणजे शक्तीच्या रुपात असतो. तो उत्पत्तीकाळी प्रकट होतो. ब्रह्माचे स्वरुप जसे अनादी आहे तसे शक्ती रुपात जगतही अनादी स्वरुपी आहे. उत्पत्ती काळ आणि प्रलय काळ असे अखंड चक्र रहाट गाडग्यासारखे सुरुच असते. हे जगत निरंतर परिवर्तनशील आहे. याचे स्वरुप सतत बदलते आहे. तरीही याचे अखंडत्व कायम आहे. यामुळे जगताला 'परिणामी नित्य' असे म्हणतात. ब्रह्म 'कूटस्थ नित्य' आहे म्हणजे त्याच्या ठायी काहीही - कुठलेही परिवर्तन - बदल होत नाही.

4) **अश्वत्थं प्राहुः** शास्त्रांनी जगत् वृक्षाला क्षणोक्षणी बदलणारे, एका स्थितीत न रहाणारे मानले आहे. अश्वत्थ म्हणजे उद्यापर्यंतही न टिकणारे. 'श्व' म्हणजे उद्या, 'त्थ' - टिकणारा, 'अ' - नाही. म्हणजे ज्याचे आज जे स्वरुप आहे ते उद्या म्हणजे दुसऱ्या दिवसापर्यंत टिकून राहू शकत नाही. अखंड बदल हे सृष्टीचे स्वरुप आहे. सृष्टी कार्य आहे, त्यामुळे ती नित्य परिवर्तनशील असेल. घट कार्य आहे यामुळे ज्यात बदल होत रहातो. काही काळानंतर घट फुटून जातो. कापड कार्य आहे. तेही काही काळानंतर फाटून जाते - नष्ट होऊन जाते. पदार्थांच्या ठायी क्षीण होत रहाण्याची क्रिया सतत सुरु असते. कार्य परिवर्तनशील आहे पण त्याचे कारण स्थिर असते. माती स्थिर रहाते.

अशा प्रकारे नित्य परिवर्तनशील असल्यामुळे सृष्टीरुपी वृक्षाला 'अश्वत्थ' म्हटले आहे.

5) **यस्य पर्णानि छंदांसि:** या विश्वरुपी वृक्षाची पाने वेद म्हणजे ज्ञान आहे म्हणजे प्रत्येक पान (पदार्थ) ईश्वर युक्त आहे. विनोबाजींचे म्हणणे असे आहे की इथे वेद शब्दाचा अर्थ वेद - स्थूल वेद नामक पोथी नाही. शंकराचार्यांनी वेद शब्दाचा अर्थ चार वेद असा केला. ज्यांचे निवेदन असे की पाने वृक्षाचे रक्षण करतात. त्यांच्यामुळे वृक्षाचे पोषण होते. जग चांगल्या प्रकारे म्हणजे सुखाने चालावे यासाठी विधी - निषेध, धर्म - अधर्माचे निरुपण करुन नीतीच्या मार्गाने जगण्यासाठी वेद मदत करतात. यामुळे पाने जसे वृक्षाचा आधार आहेत - असतात तसेच वेद म्हणजे धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, अध्यात्मशास्त्र विश्वरुपी वृक्षाचा मोठा आधार आहे. विनोबांनी लावलेला अर्थ मूळाशी संबध्द आहे म्हणजे त्यांनी विश्व - वृक्षाचा आधार - वृक्षाचे मूळ - ईश्वर मानले आहे. तेच परमात्मरुपी मूळ सर्व विश्वरुपी वृक्षात व्याप्त आहे. जशी बीजात वसणारी शक्ती वृक्षाचे पोषण करते त्याचप्रमाणे विश्वरुपी कार्य मूळ कारण ईश्वराने व्याप्त आहे आणि त्यापासूनच त्याला पोषण लाभते. कार्यात कारण ओतप्रोत आहे. कार्य कारणाहून कदापि भिन्न नसते. विश्वातल्या प्रत्येक पदार्थात ईश्वर व्याप्त आहे यामुळे ईश्वराच्या आधारे विश्वाचा संपूर्ण व्यवहार सुरु आहे.

6) **य: तं वेद स: वेदवित्:** जो अशाप्रकारे विश्व वृक्षाला जाणतो त्याला वेदवेत्ता मानायला हवे. इथे भगवंताने विश्व - वृक्षाचे जसे वर्णन केले आहे तसेच हुबेहुब ज्याने या विश्वाला ओळखून घेतले त्याला ज्ञानीच मानायला हवे. जगाची अनित्यता आणि त्याला आधारभूत ईश्वराला जाणून घेतल्यावर शेष काहीही जाणून घ्यायला उरत नाही. आपण अज्ञानीपणात अनित्य सृष्टीला सत्य समजतो आणि नित्य मानतो आपले सारे व्यवहार करतो. आपण जर अनित्य, परिवर्तनशील वा असत् वस्तुला सत् मानून चालत असू - कारभार करत असू - तर दु:खाचा अनुभव आल्याशिवाय कसा राहील? दोरीला सर्प समजून चालू तर भ्रमाशिवाय काय बरे मिळेल? दोरीला दोरी मानून चाललो तर कुठलीही भीती नाही. त्याचप्रकारे सृष्टी असत् आहे हे समजून आपला व्यवहार चालायला हवा. या जगात ईश्वरच सत्य आहे यामुळे ईश्वराचे स्मरण करुन तो सर्वाठायी व्याप्त आहे असे समजून अभेद दृष्टीने - अद्वैत दृष्टीने व्यवहार करत रहावा. वस्तुची खरी ओळख होणे हेच तर 'ज्ञान' होय.

: 2 :

***अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा***
***गुणप्रवृध्दा विषय प्रवाला: ।***
***अधश्च मूलान्यनुसन्ततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्य शाखा:** त्या विश्ववृक्षाच्या डहाळ्या
- **अध: च ऊर्ध्वं:** खाली आणि वर सर्वत्र
- **प्रसृता:** पसरलेल्या आहेत
- **गुणप्रवृध्दा:** तिन्ही गुणांच्या पाण्याने पुष्ट आहेत
- **विषयप्रवाला:** विषय भोगरुपी कोमल पाने - अंकुर - आहेत
- **मनुष्य - लोके:** मानवी लोकात
- **कर्मानुबंधीनि:** कर्म - बंधनांना पक्के करायला
- **मूलानि:** अहंता, ममता आणि वासनारुपी मूळ
- **अध:** च: खाली सुध्दा
- **अनुसन्ततानि:** नव्या - नव्या रुपात सर्व लोकात व्यापून राहिलेले आहेत, पसरलेले आहेत

**अर्थ**

त्या संसार वृक्षाच्या तिन्ही गुणरुपी पाण्याने पुष्ट झालेल्या, तसेच विषयभोगरुपी (शब्द, स्पर्श, रुप, रस अणि गंध हे पाचही विषय स्थूल देह आणि इंद्रिये याहून सूक्ष्म असल्यामुळे त्याना शाखांच्या अंकुरांच्या रुपात वर्णन केले आहे.) अंकुरांच्या, देव, मनुष्य आणि पशु पक्षी वगैरे योनीरुपी फांद्या, (मुख्य शाखारुपी ब्रह्मदेवापासून सर्व लोकांसह देव, मनुष्य आणि पशु, पक्षी वगैरे योनींची उत्पत्ती आणि विस्तार झाला आहे म्हणून त्यांचे येथे फांद्यांच्या रुपात वर्णन केले गेले आहे.) खाली व वर सर्वत्र पसरल्या आहेत. तसेच मनुष्ययोनीत (अहंता, ममता आणि वासनारुपी मूळे केवळ मनुष्य योनीत कर्मानुसार बांधणारी आहेत असे म्हणण्याचे कारण हे आहे की इतर सर्व योनीत केवळ पूर्वकृत कर्मांची फळे भोगण्याचाच

अधिकार आहे पण मनुष्य योनीत नवीन कर्मे करण्याचाही अधिकार आहे.) कर्मानुसार बांधणारी अहंता, ममता आणि वासनारुपी मूळेही खाली आणि वर सर्वत्र सर्व लोकात व्यापून राहिलेली आहेत.

***वरी हि शाखा फुटल्या तयास***
***हीं भोग - पानें गुण - पुष्ट जेथें।***
***खालीं हि मूळें निघती नवीन***
***दृढावलीं कर्म - बळें नृ - लोकीं॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. 1) या विश्वरुपी वृक्षाच्या शाखा खाली - वर पसरलेल्या आहेत. 2) तीन गुणांनी पुष्ट आहे. 3) विषय कोमल पाने आहेत. 4) मनुष्य लोकात कर्मबंधनाला दृढ करणारी वासनारुपी मूळे खालीही नवनव्या रुपात पसरलेली आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **तस्य शाखा: अध: च ऊर्ध्वं प्रसृता:** विश्वरुपी वृक्षाच्या डहाळ्या खाली - वर पसरल्या आहेत. या वृक्षाचे मूळ ब्रह्म आहे, असे पहिल्या श्लोकात म्हटले आहे आणि या विश्वरुपी वृक्षाच्या शाखा खाली पसरल्या आहेत, ही दुसरी गोष्ट सांगितली आहे. या दुसऱ्या गोष्टीच्या संदर्भात या श्लोकात म्हणताहेत की या विश्वरुपी वृक्षाच्या शाखा खाली आणि वरही पसरल्या आहेत म्हणजे हे ब्रह्मांड मनुष्यलोकापर्यंतच मर्यादित नाही वरही पृथ्वीसारखी, चंद्रलोकासारखी काही अनेक ठिकाणे आहेत तिथे माणसासारखे प्राणी रहातात. अशा प्रकारे ब्रह्मापासून खाली जसे या मनुष्य लोकाची निर्मिती झाली आहे तसेच वरही अनेक लोक उत्पन्न झाले आहेत.

2) **गुणप्रवृध्दा:** तीन गुणांनी पुष्ट आहेत, ज्यांच्यापासून या वृक्षाला पोषण मिळते. तीन गुणांशिवाय जगाची सुरुवातच होऊ शकणार नाही. तीन गुणांपासून तीन वर्ग उत्पन्न झालेत - काही सत्वप्रधान, काही रज:प्रधान तर काही तम:प्रधान. या तीन गुणांचे मिश्रण अनेक - अनंत प्रकारचे आहे. तीन प्रकारच्या योनी आहेत. मनुष्य, पशु आणि पक्षी. सत्वगुणाचे फळ मनुष्ययोनी आहे. पशु योनीत गाय वगैरेंना सत्वगुणप्रधान मानले गेले आहे. पक्ष्यांमध्ये नाना प्रकारचे कीटकही आहेत. पोपट सात्विक आणि कावळा तामसी मानला गेला आहे. अशा प्रकारे जगत् त्रिगुणांनी युक्त सुरु आहे.

3) **विषयप्रवाला:** डहाळ्यांची कोवळी पाने, अंकुर विषय आहेत. बीजातून अंकुर उत्पन्न होतो आणि मग कोमल पाने उत्पन्न होतात. पाने वृक्षाचे संरक्षण करतात. अंकुर उत्पन्न नाही झालेत तर मग वृक्षाचा विकास होणार नाही, पानेही असणार नाहीत. विषय नसेल तर जगाची सुरुवात होणार नाही. त्रिगुणांशिवाय ज्याप्रमाणे जगाची सुरुवात होऊ शकणार नाही, त्याचप्रमाणे विषयाशिवायही जग उभे राहू शकत नाही. विषयांमध्ये इंद्रियांचाही समावेश आहे कारण की इंद्रिये विषय भोगायची साधने आहेत. केवळ विषय असतील आणि इंद्रिये नसतील तर चालणार नाही. तसेच इंद्रिये आहेत पण विषय नाहीहेत तरीही चालणार नाही. तीन गुण, विषय आणि इंद्रिये असतील तरच जग सुरु होईल.

4) **मनुष्यलोके कर्मानुबंधीनि मूलानि अध: अनुसंततानि:** मानवी योनीत, मानवी देहात - कर्मबंधनांना दृढ करणारी वासनारुपी मूळे, नाना बीज, खाली सुध्दा नव-नव्या रुपात पसरलेल्या आहेत. तीन गुण असतील, विषय असतील, इंद्रिये असतील, मन असेल पण मनात भिन्न - भिन्न वासना नसतील तरीही जगाचे नाटक चालणार नाही. जेवढी माणसे आहेत, तेवढी मने आहेत आणि तेवढ्याच वासना आहेत. मनुष्य देहात वा मानवी योनीत बंधनाची भावना आहे कारण की माणसाच्या ठायीच विचार करण्याची शक्ती आहे आणि वैराग्य जागल्यावर बंधनातून मुक्त व्हायची भावना उपजते. मनात नाना प्रकारच्या इच्छा - वासना उत्पन्न होतात आणि त्या तृप्त होऊ शकत नसल्यामुळे दु:ख होते. माणूस वासनेवर नियंत्रण राखू शकत नाही आणि वासना दु:ख द्यायला लागते. अशा प्रकारे माणूस वासनेमुळे त्रस्त होऊन जातो. त्याला मानवी देहाचे बंधन वाटू लागते. शरीर कारावासासारखे वाटू लागते. अशा प्रकारे विविध प्रकारच्या वासना कर्म - बंधनाला दृढ करतात. वासनेने प्रेरित होऊनच अज्ञानी जीव सात्विक, राजस वा तामस कर्मे आचरतात. नाना प्रकारच्या वासना या वृक्षाची मूळे आहेत, बीजे आहेत आणि ती मूळे वा बीजे खाली जगात पसरलेली आहेत. ब्रह्मरुपी वा ईश्वररुपी मूळ वर आहे. तिथून जगाचा भास सुरु होतो. वृक्षाच्या शाखा खाली

पसरलेल्या असतात. तीन गुणांनी विश्वरुपी वृक्षाला नित्य पोषण लाभत असते. विषय शाखांची कोमल पाने, अंकुर आहेत. वासनारुपी मूळे वा बीजे खाली चौफेर पसरलेले आहेत. ते माणसाला कर्मबंधनात जखडून ठेवतात.

: 3 :

*न रुपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा।*
*अश्वत्थमेनं सुविरुढमूल*
*मसंगशस्त्रेण दृढेन छित्वा॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इह अस्य रुपं:** या विश्वाचे म्हणजे संसार वृक्षाचे स्वरुप
- **तथा न उपलभ्यते:** जसे वर्णन केले गेले आहे, तसे नाही
- **च आदि: न:** आणि या विश्वाचा आदी नाही
- **च संप्रतिष्ठा न:** आणि याची दृढ स्थिती सत्य नाही
- **न अंत:** याची अखेर नाही
- **सुविरुढमूलं:** याची पाळेमूळे खोलवर पोहचलेली आहेत
- **एनं अश्वत्थं:** या संसाररुपी अश्वत्थ वृक्षाचे
- **दृढेन असंगशस्त्रेण छित्वा:** दृढ अशा असंग म्हणजे वैराग्यरुपी शस्त्राने छेदन करायला हवे

**अर्थ**

या संसार वृक्षाचे स्वरुप जसे सांगितलेले आहे तसे विचारांती दिसत नाही (ज्याप्रमाणे झोपेतून जागे झाल्यावर स्वप्नातील संसार सापडत नाही, त्याप्रमाणे या संसाराचे शास्त्रात जसे वर्णन आहे, तो जसा दिसतो व ऐकण्यात येतो, तसा तो तत्त्वज्ञान झाल्यावर उपलब्ध होत नाही.) कारण याचा आदी नाही (याचा 'आदी' नाही असे सांगण्याचे कारण असे की याची परंपरा केव्हापासून चालत आलेली आहे याचा पत्ता लागत नाही.) 'अंत' नाही (याचा 'अंत' नाही सांगायचे कारण असे की याची परंपरा पुढे किती काळ चालू राहील याचा काही पत्ता लागत नाही.) तसेच त्याची उत्तम प्रकारे स्थिरताही नाही (याची उत्तम प्रकारे स्थिरताही नाही असे म्हणण्याचे कारण असे की हा वास्तवात क्षणभंगुर आणि नाशिवंत आहे.) म्हणून या अहंता, ममता आणि वासनारुपी अतिशय घट्ट पाळे-मुळे असलेल्या संसाररुपी अश्वत्थ वृक्षाला बळकट वैराग्यरुप (ब्रह्मलोकापर्यंतचे सारे भोग क्षणिक व नाश पावणारे आहेत असे समजून या सांसारिक सर्व विषयोपभोगामध्ये सत्ता, सुख, प्रीती आणि सौंदर्य न भासणेच 'बळकट वैराग्यरुप शस्त्र' आहे.) शस्त्राने कापून (स्थावर-जंगम रुप अखिल संसाराविषयीच्या चिंतनाच्या तसेच अनादी काळापासून अज्ञानाच्या द्वारे दृढ झालेली अहंता, ममता आणि वासनारुपी मूळांचा त्याग करणे हेच संसार वृक्षाचे अवान्तर मुळांसह कापणे होय.)

*ह्याचें तसें रुप दिसे न येथें*
*भासे न शेंडा बुडखा न खांदा।*
*घेऊनि वैराग्य अभंग शस्त्र*
*तोडूनियां हा दृढ - मूल वृक्ष॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी वर्णिल्या आहेत. 1) मागील दोन श्लोकात जसे वर्णिले आहे तसे काही या जगाचे स्वरुप नाही. 2) जगाचा ना आदी, ना स्थिती, ना अंत. 3) या विश्वाची पाळे - मूळे खूप खोलवर गेलेली आहेत अशा या अश्वत्थ विश्व वृक्षाचे. 4) दृढ अनासक्तीरुपी शस्त्राने छेदन करावे.

**स्पष्टीकरण**

1) **इह अस्य रुपं तथा न उपलभ्यते:** मागील दोन श्लोकांमधून या जगाचे वर्णन केले गेले आहे पण ते काही त्याचे खरे स्वरुप नाही. मागील दोन श्लोकात जगाला वृक्ष म्हटले गेले आहे. त्यावरुन असे वाटु शकते की जगाचे खरे अस्तित्व आहे यामुळे भगवंत बोध देताहेत की जगाचे खरे अस्तित्व सांगणारे ते वर्णन नाही. सत्य तर एक ब्रह्म म्हणजे ईश्वरच आहे. जगत् कारण रुपात म्हणजे ब्रह्मरुपात खरे आहे. कार्यरुपात काही सत्य नाही.

2) **न च आदि: न च संप्रतिष्ठा न अंत:** आणि या विश्वाचा ना आदी, ना मध्य, ना अंत. मृगजळाचा का आदी वा अंत असतो वा त्याची का स्थिती असते ? ते एक भासमात्र असते. त्याचप्रमाणे ब्रह्म वा ईश्वराच्या आधारे सारे ब्रह्मांड दिसते. ब्रह्म वा ईश्वराचा कुठला आदी वा अंत नाही. त्यामुळे त्याच्या आधारे भासित - भासमान जगत् सुध्दा आदी - अंतरहित आहे. हे जगत् कुठल्या - ना

कुठल्या रुपात अस्तित्वात असतेच पण त्याची एकच एक स्थिती नाही. प्रलयकाळातही जगत् बीजरुपात ब्रह्माच्या ठायी कायम असते. उत्पत्तीकाळात ते प्रकट होऊन जाते. सूर्य आणि वाळू कणांमुळे मृगजळाचा भास होतो त्याचप्रमाणे ब्रह्म वा ईश्वराच्या अस्तित्वात जगत भासित होत रहाते. या कारणामुळेच जगताचा आदी - अंत नाही. केव्हा झाली जगाची सुरुवात? या प्रश्नाचे उत्तर हेच असू शकते की जगत अनादी आहे कारण जर जगाची सुरुवात वा आरंभ मानला तर असा प्रश्न निर्माण होईल की जग उत्पन्न होण्यापूर्वी काय होते? यासारखे अनेक प्रश्न उठतील. यामुळे जगताची पूर्वावस्था म्हणजे बीजावस्था - ही अव्यक्त अवस्थाच मानावी लागते. ईश्वर जसा अनादी आहे तसेच ईश्वरात निहित जगतही अनादी आहे. त्याचे प्रकट होणे आणि अप्रकट होणे म्हणजे जगाची उत्पत्ती आणि प्रलय अखंडपणे चालत रहातात. जगत ईश्वराच्या ठायी आधी अव्यक्त असते, मधे व्यक्त होते आणि नंतर पुनश्च अव्यक्त होऊन जाते. अनादीकाळापासून हा खेळ सुरु आहे.

3) **सुविरुढमूलं एनं अश्वत्थम्:** या विश्वाची पाळे-मूळे खूप खोलवर गेलेली दिसताहेत. असे अश्वत्थ वृक्षरुपी हे जगत् विलक्षण आहे. हे क्षणिक आहे, नित्य परिवर्तनशील आहे. उद्यापर्यंतही याचे एक रुप टिकून रहाणारे नाही, तरीही हे इतके सत्य वाटते की आश्चर्य वाटावे, हे विलक्षण आहे. आता कुणी मृगजळाला सत्य मानत असेल तर आश्चर्यच वाटायला हवे. असत्य वस्तुला सत्य समजून - मानून जर व्यवहार करु तर दु:खाशिवाय दुसरा कुठला बरे अनुभव येईल. यामुळे भगवंत सांगताहेत की हे विश्व क्षणिक असले तरी याची पाळे-मूळे खोलवर गेलेली आहेत. क्षणिक प्रपंचाची आसक्तीही दृढ असते. खोलवर पसरलेली पाळेमूळे खूप दृढ आणि मजबूत असतात. तशी या जगाची आसक्ती खूप खोलवर म्हणजे पक्की, मजबूत दिसून येते. एनं अश्वत्थम् - या अश्वत्थ वृक्षाला. हे विश्वरुपी वृक्ष अश्वत्थ म्हणजे सतत बदलणारे आहे तरीही त्याला छाटून टाकणे सोपे नाही म्हणजे त्याची आसक्ती सोडणे अवघड आहे. यामुळे यासाठी काय करायला हवे ?

4) **दृढेन असंगशस्त्रेण छित्वा:** दृढ म्हणजे मजबूत असंग म्हणजे अनासक्तीरुपी शस्त्राने छेदन करुन. हा विश्ववृक्ष अश्वत्थ म्हणजे क्षणिक आहे तरीही याची पाळे-मूळे खूप खोलवर पसरलेली असल्यामुळे मजबूत आहेत म्हणजे त्याची आसक्ती प्रत्येकाच्या मनात दृढपणे स्थिरावली आहेत असा अनुभव येतो. यामुळे या मजबूत आसक्तीला नष्ट करायचा उपाय सांगताहेत. हा उपाय आहे अनासक्ती. वृक्षाचे छेदन करायला शस्त्राची गरज आहे आणि या जगताला वृक्षाची उपमा दिली आहे. यामुळे या जगताची आसक्ती मनात दृढमूल झाली आहे. त्याला असंग म्हणजे अनासक्ती रुपी शस्त्राने छाटून टाकू शकता येते.

शंकराचार्य आपल्या भाष्यात लिहितात- असंगशस्त्रेण असंग: पुत्रवित्तलोकैषणादिभ्यो व्युत्थानं तेन असंगशस्त्रेण दृढेन परमात्माभिमुख्यनिश्चयदृढीकृतेन पुन: पुनर्विवेकाभ्यासाश्मनिशितेन असंगशस्त्रेण छित्वा संसारवृक्षं सबीजं उध्दृत्य - अर्थात् अनासक्तीच्या शस्त्राने. असंग म्हणजे पुत्र - वित्त - लोकैषणा म्हणजे सर्व प्रकारच्या वासनांपासून विरक्त होऊन जाणे - हेच अनासक्तीरुपी शस्त्र आहे - या शस्त्राला सतत विवेकरुपी अभ्यासाच्या शाणेवर धार लाऊन सज्ज करावे. ईश्वराभिमुख व्हायचा दृढ निश्चय करायचा. असंगशस्त्र - अनासक्तीचे शस्त्र असे सिध्द करता येते.

पुत्र, धन आणि कीर्तीची लालसा मोठी आसक्ती आहे. याचा त्याग करणे हे अनासक्तीचे पहिले लक्षण होय पण ही अनासक्ती मनात दृढ असायला हवी, निसटून जाता कामा नये यासाठी ईश्वराभिमुख असणे फार गरजेचे आहे. हाती शस्त्र घेतले तर सज्ज रहावे लागते, शस्त्र हातून गळून पडता कामा नये. शस्त्रावर मजबूत पकड असायला हवी. त्याचप्रमाणे अनासक्तीचा भाव मनातून पुसला जाता कामा नये यासाठी ईश्वराभिमुख असण्याची गरज आहे. अन्यथा मनात पुत्र - धन - कीर्ती विषयक एषणा जागेल आणि अनासक्त भाव दृढ होऊ शकणार नाही. शस्त्रावर जशी मजबूत पकड असणे गरजेचे असते तसेच शस्त्र तीक्ष्ण आणि धारदारही असले तरच वृक्षाचे छेदन करता येईल. या विश्व वृक्षाचे छेदन करायचे असेल तर आधी अनासक्तीरुपी शस्त्र हाती घ्यावे लागेल मग ईश्वराभिमुख वृत्तीला जागवावे लागेल. शस्त्रावर पकड मजबूत करावी लागेल मग परत - परत विवेकाच्या अभ्यासरुप शाणेवर - दगडावर घासून या शस्त्राला तीक्ष्ण, धारदार करावे लागेल. विवेक तीन प्रकारचा असतो - आत्मनात्मविवेक,

नित्यानित्यवस्तुविवेक, सारासार विवेक. या असंग शस्त्राला - अनासक्ती - शस्त्राला तीक्ष्ण करण्यासाठी - धारदार बनवण्यासाठी काय करावे? यासाठी सत्याचे ग्रहण करणे, असत्याचा त्याग करणे, नित्य वस्तुचे ग्रहण करणे, अनित्य वस्तुचा त्याग करणे, सारवान तत्वाला अमलात आणणे, नि:सार असेल - नि:सत्व असेल त्याचा त्याग करणे. हा अभ्यास आयुष्यभर करत रहावा लागेल.

: 4 :

*ततः पदं तत् परिमार्गितव्यं*
*यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः।*
*तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये, यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ततः** त्यानंतर
- **यस्मिन् गताः** जिथे गेल्यावर
- **भूयः न निवर्तन्तिः पुनः** या जगात परत यावे लागत नाही
- **तत् पदं परिमार्गितव्यंः** ज्या स्थानाचा शोध लावायला हवा
- **यतः पुराणी प्रवृत्तिः** प्रसृताः जिथून ही अनादी म्हणजे पुरातन संसारवृक्षाची प्रवृत्ती पसरलेली आहे
- **तं एव च आद्यं पुरुषं:** त्या आद्य पुरुषाला
- **प्रपद्ये:** मी शरण आहे
- **इति परिमर्गितव्यंः** या भावनेने ईश्वराचा शोध घ्यायला हवा

**अर्थ**

त्यानंतर त्या परमपदरुप परमेश्वराला चांगल्या प्रकारे शोधले पाहिजे. जेथे गेलेले पुरुष संसारात परत येत नाहीत आणि ज्या परमेश्वरापासून या प्राचीन संसारवृक्षाची प्रवृत्तीपरंपरा विस्तार पावलेली आहे, त्या आदी पुरुष नारायणाला मी शरण आहे, अशा दृढ निश्चयाने त्या परमेश्वराचे मनन आणि निदिध्यासन केले पाहिजे.

*घ्यावा पुढें शोध तया*
*पदाचा जेथूनि मागें फिरणें नसे चि।*
*द्यावी बुडी त्या परमात्म - तत्वीं*
*प्रवृत्ति जेथे स्फुरली अनादि॥*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) त्यानंतर म्हणजे अनासक्तीच्या अभ्यासामुळे प्रपंचाची आसक्ती संपवून अशा स्थितीचा अनुभव घेता येतो की परत जगात परतून यावे लागत नाही. पुनर्जन्म मिळत नाही. त्या अनुभवाचा शोध घ्यायला हवा. 2) ही अनादी प्रवृत्ती जिथून पसरली आहे, त्या आद्य पुरुषाला मी शरण आहे अशा शरणागत भावनेने त्या ईश्वराचा शोध घ्यायला हवा.

**स्पष्टीकरण** -

1) **ततः यस्मिन् गताः भूयः न निवर्तन्ति तत् पदं परिमार्गितव्यम्ः** त्यानंतर अनासक्तीचा अभ्यास करावा. प्रपंचातली आसक्ती घालवावी. जी लाभल्यावर या जगातले आवागमन थांबेल अशा स्थितीचा शोध घ्यावा. मागील श्लोकात सांगितले की प्रपंचाबद्दलच्या अनासक्तीचा अभ्यास करत रहायला हवा. या श्लोकात परमात्मपद कसे प्राप्त करुन घ्यावे ? हे सांगितले आहे. जोवर प्रपंचात मन आसक्त आहे तोवर मार्ग तर प्रपंचाचाच असेल पण वैराग्य जागत असेल आणि वृत्ती ईश्वराभिमुख होऊन प्रपंचाविषयी अनासक्ती उत्पन्न होत असेल तर आपण ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर वाटचाल करत आहोत असे समजावे, प्रपंच दु:खमय असल्यामुळे अखेरीस त्यापासून दूर हटावेच लागते. प्रपंच दु:खमय असून ईश्वर आनंदमय आहे. ईश्वरच असे एकमेव स्थान आहे जे प्राप्त झाल्यावर आपण प्रपंचापासून दूर हटू शकतो. प्रपंच आणि परमात्मा या दोन गोष्टी एकमेकांपासून अगदी वेगळ्या आहेत. हा आजवरचा अनुभव आहे की प्रपंचातून कुणालाही सुख लाभलेले नाही. यामुळे अगदी नाईलाज म्हणून का होईना पण सुखप्राप्तीच्या शोधासाठीही ईश्वराचा शोध घेण्याशिवाय गत्यंतर नाही. यामुळे ईश्वर स्वरुप प्राप्त करुन घेण्याची तीव्र जिज्ञासा जागते हा मुख्य विषय आहे.

2) **यतः पुराणी प्रवृत्तिः** प्रसृता तं एव च आद्यं पुरुषं प्रपद्ये इति परिमार्गितव्यम् ही अनादी प्रवृत्ती आद्य पुरुषापासून प्रवृत्त झाली आहे. तो आद्य पुरुष आधीपासून

विद्यमान परमात्मा आहे. मी त्या परमात्म्याला शरण आहे या भावनेने ईश्वराचा शोध घ्यायला हवा. प्रपंचातून निवृत्त होण्यासाठी ईश्वरस्वरुप प्राप्त करुन घ्यायच्या दृष्टीने शोध घ्यायला हवा. इथे मुख्यत्वेकरुन ईश्वर प्राप्तीचा मार्ग सांगितला गेला आहे. गीतेने ईश्वर प्राप्तीचा उपाय भक्ती सांगितला आहे. उपाय वा साधन उपयोगात घ्यायला सुगम असावे आणि अमोघ परिणामकारक असावे, उत्तम असावे, श्रेष्ठ असावे. भक्तीच्या ठायी सुलभता आणि श्रेष्ठता हे दोन्ही गुण आहेत.

चौदाव्या अध्यायातील अखेरच्या श्लोकात गुणातीत पुरुषाची लक्षणे वर्णिली आहेत. 26 व्या श्लोकात भक्तीरुपी उपायाचे वर्णन आले आहे. भक्ती करायची असेल तर अहंकार सोडावा लागतो. मजूरी करुन शंभर रुपये मिळवायचे असतील तर खूप मेहनत करावी लागेल पण शंभर रुपये कुणाला द्यायचे असतील वा गंगार्पण करायचे असतील तर काही कष्ट घ्यावे लागत नाही. आपले सर्वाधिक प्रेम 'अहं' वर आहे - असते. ती वस्तु ईश्वराला अर्पण करुन देणे काही अवघड नाही. ईश्वर आपल्याला प्राप्त नसेल आणि तो जर मिळवायचा असेल तर खूप प्रयत्न करावे लागतील. ईश्वर रात्रं - दिवस चोवीस तास आपल्या निकट असतो, आमरण आपल्या सोबत असावा, आत्मस्वरुपाइतका जवळ असावा, अभिन्न असावा असे वाटते ना, तर मग त्याच्या प्राप्तीसाठीच्या आड येणारा कोणताही अडथळा पार करावा लागेल. अडथळा दूर करण्यात काही कष्ट - त्रास नाहीत. एकदा का अहंकार नष्ट झाला ना तर मग त्याच्या सभोवती घुमणारे काम, क्रोध वगैरे विकार आपोआप संपून जातात. ईश्वर भक्तीद्वारे अहंकार नष्ट करणे सोपे आहे. यामुळे भगवंत सांगताहेत की ज्या ईश्वराच्या बळावर हे जग - विश्व अनादीकाळापासून उभे ठाकले आहे, त्याला मी शरण आहे, तोच माझ्याकडून सर्व कामे करवून घेतो. माझ्या जीवनाचा लगाम त्याच्या हाती आहे. या भक्ती - भावनेने जर ईश्वर स्वरुपाचा शोध घेतला गेला तर ईश्वरस्वरुपाचा अनुभव प्राप्त होऊ शकतो.

उपनिषदाने या विश्वाला - ब्रह्मांडाला वृक्षाची उपमा देऊन समजाऊन सांगितले आहे-ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थ: सनातन: । तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते । तस्मिन् लोका: श्रिता: सर्वे तदुनात्येति कश्चन् । एतद्वै तत् - (कठोपनिषद 2/3/1)

अर्थात् - ज्या ब्रह्मांडरुपी वृक्षाचे मूळ खूप उंच अर्थात् अतिश्रेष्ठ आहे. त्याच्या शाखा निकृष्ट म्हणजे अधोमुखी म्हणजे खाली झुकलेल्या आहेत. ब्रह्मांडरुपी या वृक्षाचे नाव 'अश्वत्थ' असून तो सनातन आहे. या वृक्षाची पाळेमुळे वर आहेत, ती अतिशुध्द आहे. तो ब्रह्म आहे. त्यालाच 'अमृत' म्हणतात. ते मोक्षस्वरुपी असल्यामुळे अमर आहे. त्या ब्रह्माच्या आधारे सारे आश्रित आहेत. त्या ब्रह्माचे उल्लंघन कुणी करत नाही. नचिकेताने ज्या ब्रह्म स्वरुपाबाबत मृत्युला प्रश्न विचारला होता, हे तेच तर ब्रह्म आहे.

: 5 :

*निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या*
*विनिवृत्तकामा: । द्वंद्वैर्विमुक्ता: सुखदु:खसंज्ञै*
*र्गच्छन्त्यमूढा: पदमव्ययं तत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **निर्मानमोहा:** ज्याच्या चित्तातून मान आणि मोह निघून गेले आहेत
- **जितसंगदोषा:** ज्याने आसक्तीरुपी दोषावर विजय प्राप्त करुन घेतला आहे
- **अध्यात्मनित्या:** जे अखंड ईश्वरस्वरुपी लीन आहेत
- **विनिवृत्तकामा:** ज्यांच्या इच्छा - वासना मूळासकट संपून गेल्या आहेत
- **सुखदु:ख संज्ञै:** द्वंद्वै: सुख - दु:खरुपी द्वंद्वांनी
- **विमुक्ता:** मुक्त होऊन गेले आहेत
- **अमूढा:** विवेकी अज्ञानरहित आहेत
- **तत् अव्ययं पदं गच्छन्ति:** ते नित्य अविनाशी पदाला प्राप्त करतात

**अर्थ**

ज्यांचे मान व मोह नष्ट झाले, ज्यांनी आसक्तीरुप दोष जिंकला, ज्यांची परमात्म्याच्या स्वरुपात नित्य स्थिती असते आणि ज्यांच्या कामना पूर्णपणे नष्ट झाल्या आहेत, ते सुख-दु:ख नावाच्या द्वंद्वापासून मुक्त झालेले ज्ञानीजन त्या अविनाशी परमपदाला पोहोचतात.

***जे मान - मोहांसह संग दोष***
***जाळूनि निर्वासन आत्म - निष्ठ।***
***द्वंद्वें न घेती सुख - दुःख - मूळ***
***ते प्राज्ञ त्या नित्य - पदीं प्रविष्ट॥***

**विषय:** या श्लोकात ज्ञान प्राप्त झाल्यावर प्रकट होणाऱ्या सात लक्षणांची चर्चा केली गेली आहे. 1) ज्यांच्या चित्तातून मान आणि मोह दूर होऊन गेलेला असतो. 2) ते आसक्तीरुपी दोषापासून मुक्त झालेले असतात. 3) नित्य परमात्म स्वरुपी लीन असतात. 4) त्यांच्या इच्छा - वासना संपून गेलेल्या असतात. 5) ते सुख-दुःखरुपी द्वंद्वापासून मुक्त असतात. 6) अमूढ म्हणजे विवेकी असतात. 7) ते अविनाशी पदाला म्हणजे ईश्वर स्वरुपाला प्राप्त करतात.

**स्पष्टीकरण**

1) **निर्मानमोहा:** ज्यांच्या चित्तातून मान आणि मोह दूर झाले आहेत. साधक आणि सिध्द वा दोघांच्या लक्षणात काही फरक नसतो. सिध्द पुरुषाच्या ठायी जी लक्षणे सहज रुपात प्रकट असतात, ती साधक दशेत प्रयत्नपूर्वक प्राप्त केली जाऊ शकतात. प्रयत्नपूर्वक जी लक्षणे प्राप्त केली जातात ती सिध्द दशा प्राप्त झाल्यावर सहज होऊन जातात म्हणजे त्यासाठी प्रयत्न करायची गरज उरत नाही. या श्लोकात वर्णिलेली लक्षणे काही नवीन नाहीत, यापूर्वी मागील अध्यायांमधून ती ठायी - ठायी आलेली आहेतच.

ज्ञानी पुरुषाच्या ठायी सन्मानाची भावना नसते कारण की अहंकार क्षीण होऊन जातो. जोवर अहंकार क्षीण होत नाही, तोवर सन्मानाची भावना असते. आपल्याला सर्वांनी मान द्यावा, आदरभावेनेने बघावे, आपल्या गुणांची प्रशंसा करावी, आपल्या सल्ल्यानुसार चालावे ही भावना रहाते. जोवर अहंभाव गळून जात नाही, देहभावना क्षीण होत नाही, तोवर मोहही सुटत नाही. मोह नाना प्रकारचा असतो. पुत्र आणि धनाचा मोह तर प्रसिध्दच आहे. विद्या मोह आणि सेवेचा मोहही असतो. तेराव्या अध्यायात ज्ञानाच्या लक्षणांची चर्चा करत असताना 7 व्या श्लोकाच्या सुरुवातीलाच अमानित्व या लक्षणाची चर्चा आली असून 8 व्या श्लोकात मोहरहितता म्हणजे वैराग्याचे लक्षण आले आहे.

2) **जितसंगदोषा:** जो आसक्तीरुपी दोषापासून मुक्त आहे. मन कुठल्या - ना - कुठल्या स्थूल विषयाला चिकटू पहाते. चिकटल्याशिवाय त्याला आनंद मिळत नाही. मनाचा हा धर्म आहे, यापासून त्याला वेगळे नाही करता येत. स्थूल पदार्थांमध्ये, विषयांच्या ठायी चिकटल्याने संपूर्ण सुखाचा अनुभव येत नाही. यामुळे मनाला ईश्वराशी चिकटवण्याची सवय लावायला हवी, यामुळे अखंड, नित्यसुखाचा लाभ होत राहील.

3) **अध्यात्मनित्या:** जो अखंडपणे ईश्वरस्वरुपी तल्लीन असतो. मनाला जर ईश्वरस्वरुपी चिकटून रहायची सवय लागली तर ते ईश्वर स्वरुपाला सोडत नाही. मन सवयीनुसार घडवता येते. यामुळे सत्संगतीचा महिमा गाईला गेला आहे. सात्विक व्यवहारासोबत चित्तात ईश्वर - चिंतन सुरु राहिले तर हा मोठा सत्संग आहे, अशा मानसिक सत्संगामुळे चित्तात ईश्वराविषयी अनुराग उत्पन्न होतो.

4) **विनिवृत्तकामा:** ज्यांच्या इच्छा - वासना संपून गेल्या आहेत. अज्ञानावस्थेत विविध प्रकारच्या इच्छा, वासना, महत्वाकांक्षा असतात. सर्वच इच्छा त्याज्य असतात, असे नव्हे. काही शुभ इच्छा उन्नतीकारक असतात. साधकावस्थेत शुभ इच्छांचा त्याग नाही करावा लागत. इथे ज्ञानावस्थेचे वर्णन सुरु आहे. या अवस्थेत शुभ इच्छा सुध्दा जागत नाहीत. सार्वजनिक सेवा वगैरे शुभकार्ये सहजपणे सुरु रहातात. अशी कल्पना केली गेली की ज्ञानावस्थेत बिना संकल्पानेही कार्ये संपन्न होतात. म्हणजे साभिप्राय कुठला संकल्प करावा लागत नाही, तो सहज संकल्प असतो. संकल्पासाठी काही प्रयत्न करावे लागत नाही, असा याचा खरा अर्थ होय.

5) **सुखदुःखसंज्ञैः द्वंद्वैः विमुक्ता:** जो सुखदुःखरुपी द्वंद्वापासून, द्वैतापासून म्हणजे भेदभावापासून मुक्त आहे. इच्छा वा वासनेमुळे सुख-दुःख उत्पन्न होतात. इच्छा - वासना तृप्त झाल्या तर सुखाचा अनुभव येतो आणि त्या अतृप्त राहिल्यात तर दुःखाचा अनुभव येतो. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञ लक्षणांची चर्चा आली आहे. त्यात 55 व्या श्लोकात पहिले लक्षण कामनात्याग आले आहे. ज्ञानावस्थेत अद्वैताचाच अनुभव येतो. यामुळे ही अवस्था सुख - दुःखातीत असते.

6) **अमूढा:** अमूढ विवेकी - अज्ञानरहित व्यक्ती. अज्ञानावस्था म्हणजे अविवेकावस्था. ज्ञानावस्था म्हणजे विवेकावस्था. अविवेकामुळे आसक्ती उपजते. विवेकाने अनासक्तीचा अनुभव येतो. दोन्ही गोष्टी परस्पर विरुध्द आहेत. बाल्यावस्थेत अधिक अविवेक असतो. सत् - असत् चे ज्ञान वा ग्रहण होणे हा एक विषय आणि त्यानुसार आचरण करणे वेगळे होय. बाल्यावस्थेत सत् - असत्चे ग्रहण वा ज्ञान अगदी कमी असते. वाढत्या वयासोबत सत् काय आणि असत् काय याचे ज्ञान वाढत जाते पण ते आचरणात आणण्याची शक्ती वाढते असे होत नाही. यामुळे सत् - असत् विषयक विवेक वाढल्यावरही ते आचरणात आणण्याची शक्ती जोवर वाढत नाही, तोवर खरी विवेकावस्था येत नाही. खरी विवेकावस्था जागली म्हणजे आचरणात सत्चे ग्रहण आणि असत्चा त्याग दिसून येईल. धुम्रपान करणे, चहापान करणे चांगले नाही हे कळत असतानाही आचरणात येत नाही. बुध्दीने सत् - असत्चे ग्रहण वा ज्ञान होणे वेगळे आणि ते आचरणात आणणे वेगळे. आचरणशून्य अवस्था अविवेकावस्था आहे. ज्ञानावस्थेत बुध्दीद्वारे ग्रहण केलेले लागलीच अमलात येते. म्हणून ज्ञानावस्था ही अमूढावस्था म्हणजे विवेकावस्था आहे.

6) **तत् अव्ययं पदं गच्छन्ति:** ते ज्ञानी त्या नित्य अविनाशी पदाला म्हणजे ईश्वर स्वरुपाला प्राप्त करुन घेतात. ज्ञानावस्थेनंतर मोक्षावस्था लाभते. आधी निजस्वरुपाचे ज्ञान होते मग त्या स्वरुपात स्थित होण्याची अवस्था म्हणजे अखंड स्वरुप स्थितीत रहाण्याची अवस्था लाभते. ज्ञान होताच या मोक्ष स्थितीचा लाभ होतो. आधी ईश्वर ज्ञान होणे आणि मग अखंड त्या स्थितीत स्थित रहाणे या दोन भिन्न अवस्था नाहीत. दोन्ही एकाच प्रकारच्या अवस्था आहेत.

: 6 :

***न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावक: ।***
***यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम् ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **सूर्य: तत् न भासयते:** त्या स्वयंप्रकाशमय परम पदाला सूर्य प्रकाशित करत नाही
- **शशांक:** न: चंद्रही नाही
- **पावक:** न: अग्नीही नाही
- **यत् गत्वा:** जिथे गेल्यावर - पोहोचल्यावर
- **न निवर्तन्ते:** परत संसारात येत नाहीत
- **तत् मम परमं धाम:** ते माझे परम, श्रेष्ठ धाम आहे

### अर्थ

ज्या परम पदाला पोहोचल्यावर माणसे फिरुन या संसारात येत नाहीत त्या स्वयंप्रकाशी परम पदाला सूर्य प्रकाशित करु शकत नाही ना चंद्रमा ना अग्नी तेच माझे परम धाम आहे.

***न त्यास उजळी सूर्य कायसे अग्नि - चंद्र हे ।***
***जेथ गेला न परते माझें अंतिम धाम तें ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) त्या परब्रह्म तत्त्वाला सूर्य, चंद्र वा अग्नीही प्रकाशित करत नाहीत. 2) ज्या ईश्वराला प्राप्त करुन घेतल्यावर जन्म - मरणाच्या रहाट - गाडग्यात परत यावे लागत नाही, ते माझे श्रेष्ठ म्हणजे परम स्थान म्हणजे धाम आहे.

### स्पष्टीकरण

1) **सूर्य: तत् न भासयते, शशांक: न, पावक:** न ज्या परब्रह्म तत्वाला सूर्य, चंद्र वा अग्नी यापैकी कुणीही प्रकाशित करत नाही. मागील श्लोकाच्या अनुषंगानेच इथे परमात्म स्वरुप कसे आहे? ते सांगताहेत. ईश्वर चैतन्यस्वरुपी असून हे विश्व जड वस्तुरुप आहे. जड वस्तु कदापि कुठल्या चैतन्यशाली वस्तुला प्रकाशित करु शकत नाही पण जो ज्ञानस्वरुपी चैतन्यवान आत्मा आहे त्याद्वारे सर्व वस्तुंचे ज्ञान होते. माणसाचे शरीर मृत झाल्यावर ज्ञानस्वरुपी आत्माच गुप्त होऊन जातो. मन जोवर देहात निवास करते तोवर त्याच्या माध्यमातून चैतन्यस्वरुपी

आत्मतत्व देहात प्रकट असते. मन जेव्हा एक देह सोडून दुसऱ्या देहात निघून जाते तेव्हा दुसऱ्या देहात चैतन्यस्वरुपी आत्मतत्व प्रकट होते. जीवंत देहातही निद्रावस्थेत मन निर्व्यापार स्थितीत असते यामुळे चैतन्यस्वरुपी आत्मतत्व अप्रकटवत् रहाते. निद्रित व्यक्तीला काही ज्ञान नसते. स्वप्नात ज्ञान होत रहाते पण गाढ निद्रेत ज्ञान नसते पण मन जागृत होताच आपले स्वत:चे आणि बाह्य जगताचे ज्ञान सुरु होऊन जाते. अशा प्रकारे चैतन्यस्वरुपी म्हणजे ज्ञानस्वरुपी आत्मतत्व पिंडात म्हणजे देहात जोवर वसते, प्रकट असते तोवर ब्रह्मांडाचे ज्ञान होते. अशाप्रकारे ज्ञानस्वरुपी आत्मतत्व सर्व पदार्थांना प्रकाशित करते पण कुठलाही बाह्य पदार्थ ज्ञानस्वरुपी आत्मतत्वाला प्रकाशित करु शकत नाही, ते त्याचे सामर्थ्य नाही.

इथे सूर्य, चंद्र आणि अग्नी अशी तीन उदाहरणे दिली आहेत. तिन्ही इतर वस्तुंना प्रकाशित करतात पण कुठल्याही पदार्थाचे ज्ञान करवून देऊ शकत नाही. ज्ञान तर आत्मतत्वानेच लाभते. सूर्य, चंद्र, अग्नी तिन्ही अद्भुत पदार्थ असले तरी त्यांच्या माध्यमातून कुठल्या वस्तुचे सरळ - सरळ ज्ञान होऊ शकत नाही आणि या तिघांनाही आपले स्वत:चे ज्ञान होत नाही. आत्म्याला स्वत:चे ज्ञान असते आणि अन्य वस्तुंचेही ज्ञान असते यामुळे आत्मतत्वच सर्व वस्तुंना प्रकाशित करण्यासाठी समर्थ आहे.

2) **यत् गत्वा न निवर्तन्ते तत् मम परमं धाम:** ज्या ईश्वराला प्राप्त करुन घेतल्यावर जीवन - मरणाच्या रहाट - गाडग्यात परतावे लागत नाही, ते माझे श्रेष्ठ स्थान आहे. परमात्म ज्ञान झाल्यावर माणूस प्रपंचाच्या बंधनातून मुक्त होतो. परत प्रपंचात परतावे लागत नाही. चैतन्यस्वरुपी परमात्म्याच्या अस्तित्वानेच आपल्याला जड पदार्थांचे ज्ञान होते. ईश्वर वा मोक्ष परमश्रेष्ठ आहे. प्रपंचाचे कनिष्ठ स्थान आहे. जोवर श्रेष्ठ वस्तु उपलब्ध होत नाही तोवर कनिष्ठ वस्तुची पकड सुटत नाही. हाच मुद्दा उपनिषदातून आला आहे.

***न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्नि: । तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ (कठोपनिषद 2/2/15)***

अर्थात् - ज्या परमात्म्याला सूर्य प्रकाशित करत नाही, चंद्र, तारे प्रकाशित करु शकत नाही, विद्युत प्रकाशित करु शकत नाही त्याला अग्नी कसे प्रकाशित करणार ? विश्वातील सारे पदार्थ ईश्वराच्या प्रकाशातच प्रकाशित होतात.

चैतन्यशाली नसेल तर जड पदार्थांचा अनुभव येऊ शकत नाही. चैतन्यरुपी प्रकाशातच जड पदार्थांचा अनुभव येतो. जड पदार्थांना प्रकाशित करणारा, अस्तित्वात आणणारा चैतन्यस्वरुपी ईश्वरच आहे आणि हा ईश्वर स्वयंभू प्रकाशमय - प्रकाशवान असल्यामुळे त्याला प्रकाशित करण्यासाठी अन्य कुठल्या वस्तुची गरज नाही.

: 7 :

***ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन: ।
मन: षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **जीवलोके:** या जीवलोकात म्हणजे या देहात
- **जीवभूत:** जीव स्वरुपी म्हणजे हा जीवात्मा
- **मम एव सनातन:** माझाच सनातन
- **अंश:** अंश आहे
- **प्रकृतिस्थानि:** प्रकृतीच्या म्हणजे निर्गुणमयी मायेच्या ठायी स्थित
- **मन:षष्ठानि इन्द्रियाणि:** मनासमवेत पाच इंद्रियांना
- **कर्षति:** जो जीवात्मा आकर्षून घेतो

**अर्थ**

या देहात हा सनातन जीवात्मा माझाच अंश आहे. (ज्याप्रमाणे महाकाश विभागरहित असूनही निरनिराळ्या घटात वेगवेगळे असल्यासारखे दिसते, त्याचप्रमाणे सर्व भूतांच्या ठिकाणी एकरुपाने स्थित असूनही परमात्मा पृथक् पृथक् असल्यासारखा दिसतो म्हणून देहात वसलेल्या जीवात्म्याला भगवंतांनी आपला 'सनातन अंश' म्हटले आहे.) आणि तोच प्रकृतीत स्थित मनाला आणि पाचही इंद्रियांना आकर्षित करतो.

***माझा चि अंश संसारीं झाला जीव सनातन ।
पंचेंद्रियें मनोयुक्त प्रकृतींतूनि खेंचितो ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) या जीवलोकात प्रसिध्द जो जीवस्वरुप आहे तो माझाच सनातन अंश आहे. 2) प्रकृतीच्या ठायी स्थित मनासमवेत पाच इंद्रियांना हा जीवात्मा आकर्षित करुन घेतो.

**स्पष्टीकरण**

1) **जीवलोके जीवभूत: मम एव सनातन: अंश:** या जीवलोकात म्हणजे जगात कर्ता - भोक्ता म्हणुन प्रसिध्द असणारा जीवस्वरुपी माझाच सनातन अंश आहे. 7 व्या अध्यायातील 5 व्या श्लोकात जीवाला 'परा प्रकृती' असे म्हटले आहे. 13 व्या अध्यायातील पहिल्या श्लोकात जीवाला 'क्षेत्रज्ञ' म्हटले आहे. सातव्या अध्यायात 'अपरा प्रकृती'च्या ठायी तमाम जड पदार्थांचा समावेश आहे. 'परा प्रकृती'च्या ठायी माणूस, पशु - पक्षी, अगणित लहान - मोठ्या किटकांचा - जंतुंचा समावेश आहे. या श्लोकात जीवाला 'परा प्रकृती' न म्हणता 'माझा अंश' सांगितले आहे.

विनोबाजींचे निवेदन असे आहे की सातव्या अध्यायात ईश्वर - शरणता सांगितली आहे, यामुळे जीवाला 'परा प्रकृती' म्हणजे 'जड वस्तु' म्हटले आहे. जड सृष्टीला 'अपरा प्रकृती' म्हटले आहे, जीवसृष्टी चैतन्यमय असल्यामुळे भिन्न ठरते आणि श्रेष्ठही. तरीही तिला 'प्रकृती' म्हणजे 'जड' म्हणायचे कारण असे आहे की सातव्या अध्यायात जीवाला ईश्वराच्या शरणी जाऊन भक्त बनायला सांगितले आहे. ईश्वराच्या शरणी लागायचा अर्थ त्याच्यासमोर जड वस्तुसारखे बनणे. ईश्वरासमोर जर जडवत शून्य बनणार नाही तर भगवंताचे खरे भक्त बनू शकणार नाही.

इथे जीवासाठी 'माझा सनातन अंश' हा शब्द प्रयुक्त झाला आहे. या श्लोकात मध्येच जीव विषयक चर्चा कशी काय सुरु झाली याचा खुलासा करताना शंकराचार्य म्हणतात की मागील श्लोकात ईश्वराच्या स्थानाला प्राप्त झाल्यावर पुन्हा फिरुन या जगात यावे लागत नाही, असे म्हटले आहे. इथे प्रश्न असा निर्माण होतो की हे निवेदन अनुभवाच्या विरुध्द आहे कारण की कुठल्याही स्थानावर आपण पोहोचतो तर तिथून परतही येतो, असा अनुभव आहे. पोहोचायचा अर्थच परतणे आहे. या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी इथे सांगण्यात आले आहे की जीव ईश्वरापासून विभक्त नाही. अज्ञानावस्थेतही जीव ईश्वरापासून वेगळा नाही. यामुळे जीव ईश्वर स्थानाला प्राप्त होतो म्हणजे ओळखून घेतो मग ईश्वराशी कायमस्वरुपी एकरुप बनून रहातो. अज्ञानवस्थेतही जीव ईश्वराशी एकरुप असतानासुध्दा त्याला ईश्वर स्वरुपाची ओळख नसते यामुळे देह, मन, बुध्दी, इंद्रिये हे एवढेच आपले स्वरुप त्याला वाटते, ही खोटी कल्पना आहे पण तो या खोट्या कल्पनेलाच वश होऊन तो स्वत:ला ईश्वरापासून जणू भिन्न मानतो, असे सांगितले आहे. जीवाला ईश्वर स्वरुपाचे ज्ञान होते आणि ही भ्रांत कल्पना विरुन जाते मग जीव ईश्वर स्थानाला म्हणजे ईश्वर रुपाला प्राप्त होतो. जीव ईश्वराचा भास असल्यामुळे तो ईश्वरापासून संपूर्णपणे भिन्न नाही आणि अभिन्नही नाही. दोरीत सर्पाचा भास होतो. यामुळे भासमान होणारा सर्प जर दोरीहून वेगळा मानला तरी तो दोरीशिवायही भासमान होत नाही, हे खरे आहे. यामुळे दोरीशिवाय त्याचे अस्तित्व उरत नाही. भासमान होणारा सर्प प्रत्यक्ष दोरी तर नाही. याचे कारण असे की तो जर प्रत्यक्ष दोरी असता तर तो जो दोरीहून भिन्न भासला होता तसा झाला नसता. यामुळे तो सर्प प्रत्यक्ष दोरी नाही म्हणून दोरीहून थोडा वेगळा आहे. दोरीहून स्वतंत्र असे त्याचे अस्तित्व नाही म्हणून तो दोरीहून वेगळाही नाही. यामुळे दोरीच्या ठायी भासमान होणारा सर्प हा दोरीहून भिन्नही नाही आणि अभिन्नही नाही, असे सांगितले जाते. त्याचप्रमाणे जीव ईश्वराचा भास असल्यामुळे तो ईश्वराहून भिन्नही नाही आणि अभिन्नही नाही कारण की अज्ञानावस्थेत जीव कल्पनेने ईश्वरापासून वेगळ्या सारखा होऊन जातो. अज्ञानावस्थेत असाच सर्प दोरीहून वेगळा असल्यासारखा वाटतो पण खरे तर ईश्वराहून वेगळे स्वतंत्र अस्तित्व नसल्यामुळे जीव ईश्वरापासून अभिन्न वाटतो. ही अभिन्नता ज्ञानावस्थेत अनुभवायला मिळते. सूर्याचे प्रतिबिंब सूर्याहून भिन्न नाही पण प्रतिबिंब सूर्य नसल्यामुळे सूर्याहून अभिन्नही नाही. यामुळे जीव ईश्वराचा अंश आहे, असे इथे सांगितले गेले आहे.

2) **प्रकृतिस्थानि मन:षष्ठानि इन्द्रियाणि कर्षति:** प्रकृती वा माया शक्तीच्या ठायी स्थित असणाऱ्या मनासह इंद्रियांना जीवात्मा आकर्षून घेतो. जीव कशा प्रकारे देह धारण करतो, याची इथे चर्चा आहे. पुढील श्लोकात याबाबतीत संपूर्ण विवरण केले जाईल. भगवंताच्या

अलौकिक शक्तीला 'प्रकृती' वा 'माया' असे म्हटले जाते. याच माया शक्तीत वा प्रकृतीच्या ठायी संपूर्ण जगत बीजरुपाने दडले आहे. शरीर, इंद्रिये आणि मन देखिल या माया शक्तीत दडून बसले आहेत. जीव देह धारण करतो तर माया शक्तीच्या ठायी वसणाऱ्या इंद्रियांना आकृष्ट करुन घेतो. पाच ज्ञानेंद्रिये आणि मन अशा सहा इंद्रियांना आकृष्ट करुन घेतो. पाच ज्ञानेंद्रियांमध्ये पाच कर्मेंद्रियांचा समावेश आहे आणि मनात बुध्दीचा समावेश आहे. यामुळे पंच कर्मेंद्रियांचा आणि बुध्दीचा इथे स्वतंत्रपणे उल्लेख केला गेला नाही.

: 8 :

*शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।*
*गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् च अपि:** आणि ज्यावेळी
- **ईश्वर:** ईश्वर म्हणजे ईश्वरस्वरुपी जीव म्हणजे देह वगैरेंचा स्वामी
- **उत्क्रामति:** देह त्याग करुन निघून जातो
- **यत् शरीरं अवाप्नोति:** आणि जेव्हा देह धारण करतो
- **एतानि गृहीत्वा:** त्यावेळी मनासोबत इंद्रियांना घेऊन
- **वायु: आशयात् गंधान् इव:** हवा ज्याप्रमाणे पुष्प वगैरेंचा गंध घेऊन वहातो, त्याचप्रमाणे
- **संयाति:** जीव देह सोडून निघून जातो

**अर्थ**

वारा पुष्पातून गंध घेऊन स्वत:सोबत नेतो तसाच देह वगैरेंचा स्वामी जीवात्मासुध्दा ज्या शरीराचा त्याग करतो, त्या शरीरातून मनासहित इंद्रिये बरोबर घेऊन नवीन मिळणाऱ्या देहात जातो.

***पुष्पादिकांतुनी वारा गंध खेंचूनि घेतसे ।***
***तशी घेऊनि हीं सर्व देह सोडी धरी प्रभु ॥***

**विषय:** या श्लोकात एकच मुद्दा चर्चिला गेला आहे. ईश्वर म्हणजे देहाचा स्वामी ईश्वर एक देह सोडून दुसरा देह धारण करतो त्यावेळी ज्याप्रमाणे वायुने पुष्प वगैरेंचा सुगंध घेऊन निघून जावे त्याप्रमाणे तो मनासहित इंद्रियांच्या देहाला सोडून निघून जातो.

**स्पष्टीकरण**

मागील श्लोकात माया शक्तीच्या ठायी स्थित मनासहित इंद्रियांना आकृष्ट करुन घेण्याविषयी सांगितले आहे. त्याच संदर्भात इथे निवेदन आले आहे की ईश्वर स्वरुपी जीव कशाप्रकारे देह सोडून जातो. इथे जीवासाठी 'ईश्वर' शब्द प्रयुक्त केला आहे. जीव ईश्वरच आहे. ईश्वरच जीवाचा अभिनय करतो यामुळे इथे भगवंताने जीवाला ईश्वर म्हटले आहे. जीव चैतन्यस्वरुपी असल्यामुळे ईश्वराच्या मायेच्या ठायी विद्यमान इंद्रियांना आकर्षून घेतो. इंद्रियांना आकृष्ट करुन तो काय करतो, हे सांगितले गेले आहे. या सर्व इंद्रियांमध्ये 'लिंग' देहाचा समावेश आहे. जीव जेव्हा देह त्याग करुन निघून जातो तेव्हा त्याच्या समवेत लिंग देहही असतो. लिंग देहाच्या ठायी बुध्दी, मन, अहंकार, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच तन्मात्रा म्हणजे पाच सूक्ष्म विषय अशाप्रकारे एकूण अठरा तत्वे असतात पण मनाच्या ठायी बुध्दीचा समावेश असल्यामुळे एकूण सतरा तत्वांचाच लिंग देह असतो. ईश्वर म्हणजे नियंत्रण करणारे तत्व. देहात वसून देहावर - देहातल्या क्रियांवर नियंत्रण राखणारे तत्व 'ईश्वरच' आहे. तोच जीवाला सत्‌ची प्रेरणा देतो. जीव देहाचा स्वामीच आहे. जोवर तो अज्ञानावस्थेत रहातो तोवर शरीर, देह वगैरेंच्या समूहाचा स्वामी रहात नाही, देह वगैरेंच्या अधीनच असतो. ज्ञानावस्थेत जीव शरीर वगैरेंचा स्वामी जरुर बनून जातो पण शरीररुपी न रहाता ईश्वररुपी रहातो. यामुळे ज्ञानावस्थेत ईश्वरच देहाचा स्वामी असतो. अशा प्रकारे ज्ञानावस्थेत ईश्वररुप असतानासुध्दा प्रारब्ध भोगेपर्यंत त्याच्या ठायी थोडा जीवभाव शिल्लक उरल्यामुळे अज्ञानावस्थेत जीव देह वगैरे समूहाचा स्वामी आहे, असे म्हणता येईल. अशाप्रकारे तो एक देह सोडून दुसऱ्या देहात निघून जातो. मग दुसरा देह तिसरा देह धारण करतो. अशा रहाट - गाडग्यात देह धारण करणे

आणि सोडणे सुरुच रहाते. जीव सर्वदा या लिंग देहाला लगटून असतो. लिंगदेहासोबत असतो.

इथे प्रकृतीच्या ठायी विद्यमान लिंग देहाला तो जीव कशा प्रकारे आकृष्ट करुन घेतो ते एक दृष्टांत देऊन समजाऊन सांगितले आहे. वायु ज्याप्रमाणे पुष्प वगैरेंचा सुगंध घेऊन वहात रहातो त्याप्रमाणे जीव देहाचा त्याग करुन लिंग देहाला सोबत घेऊन चालू लागतो. आपण नाना प्रकारची कर्मे करतो तर त्यांचे संस्कार आपल्या मनावर होत रहातात. हे भले - बुरे संस्कारच आयुष्याची खरी कमाई आहे. लिंग देह सतरा (वा अठरा) तत्वांचे आहे पण जीव या संस्कारांपासून मुक्त रहातो. सर्व इंद्रिये क्रियाशील - सक्रिय - असतात. क्रिया म्हणजे संस्कार. क्रिया घडल्यावर क्रिया शेष उरत नाही पण क्रियेच्या मनावर पडलेले संस्कार संग्रहीत होतात. हे संस्कार फुलांसारखे सुगंधित असतात. देहत्याग करताना जीव संस्काररुपी पुष्प गंधाला सोबत घेऊन चालू लागतो आणि या संस्कारांच्या सोबत दुसरा देह ग्रहण करतो. त्याचे जीवन संस्कारांप्रमाणे सुरु होते.

: 9 :

*श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च।*
*अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयं:** हा जीव
- **श्रोत्रं:** कान
- **चक्षुः** डोळे
- **स्पर्शनं:** त्वचा
- **रसनं:** रसना, जीभ
- **घ्राणं एव च:** आणि नाक
- **मन: च अधिष्ठाय:** मनाचा आश्रय घेऊन म्हणजे या सर्वांच्या सहाय्याने
- **विषयान् उपसेवते:** विषयांचे सेवन करतो

**अर्थ**

हा जीवात्मा कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि मन यांच्या आश्रयानेच विषयांचा उपभोग घेतो.

*श्रोत्र जिह्वा त्वचा चक्षु घ्राण आणिक तें मन।*
*ह्या सर्वांस अधिष्ठूनि ते ते विषय सेवितो॥*

**विषय:** या श्लोकात दोन विषयांची चर्चा आहे. 1) हा जीव कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि मन या सर्वांचा अधिष्ठाता म्हणजे भोक्ता बनून 2) विषयांचे सेवन करतो.

**स्पष्टीकरण**

1) **अयं श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं रसनं घ्राणं एव च मन: अधिष्ठाय:** ज्ञानाची बाह्य साधनरुप आहेत पाच ज्ञानेंद्रिये. आंतरिक साधन आहे मन. दोघे बाह्य विषयांची ज्ञानसाधने आहेत. विषय ज्ञानानंतर विषयांचे सेवन सुरु होते. सुरुवातीला एकेका ज्ञानेंद्रियाची चर्चा केली गेली आहे. कान ऐकायचे साधन आहेत. डोळ्यांनी रुपाचे ज्ञान होते. त्वचेने स्पर्श - ज्ञान होते. जीभेने सर्व प्रकारच्या रसांचे ज्ञान होते. नाकाने गंधज्ञान लाभते. ही पाच ज्ञानेंद्रिये होत पण मन नसेल तर या ज्ञानेंद्रियांच्या द्वारे बाह्य विषयांचे ज्ञान होणार नाही. मन आहे, ज्ञानेंद्रियेही आहेत पण जर ज्ञाता जीवात्मा नसेल तरीही ज्ञान होऊ शकणार नाही कारण की मन आणि ज्ञानेंद्रिये केवळ साधन आहेत. मन वा ज्ञानेंद्रियांना विषयांचे ज्ञान होत नाही. मन ज्ञाता नसून ज्ञाता जीव आत रहातो. मन झोपी जाईल, त्याला विश्रांतीची गरज असते पण ज्ञाता - जीवात्मा अखंड ज्ञानस्वरुप जागृत असतो. तो आधी या सहा इंद्रियांचा अधिष्ठाता म्हणजे भोक्ता बनतो. जीवात्मा केवळ ज्ञातेपणाच्या भूमिकेत स्थिर नसतो. ज्ञाता तर रात्रंदिवस चोवीस तास आहे पण विषयांचे ज्ञान झाल्यावर विषयांचा भोक्ता बनतो.

2) **विषयान् उपसेवते:** ज्ञाता जीवात्मा भोक्ता बनून विषयांचे सेवन करतो. भोक्ता बनल्याशिवाय विषयांचे सेवन होऊ शकत नाही. ज्ञाता - जीवात्म्याच्या तीन भूमिका अशा आहेत - आधी ज्ञाता, मग भोक्ता आणि नंतर विषयांचे सेवनकर्ता. विषयांच्या सेवनानंतर विषयात फसून जाणे चौथी भूमिका आहे. विषयांच्या सेवनाचा अर्थ विषयांची आसक्ती आहे. ज्ञानावस्थेत विषयांचे ग्रहण होते. विषयांचे ज्ञान आणि कर्तव्य दृष्टीने पंचविषयांचे ग्रहण

अवश्य होईल. ज्ञानावस्थेत पंच विषयांच्या ज्ञानाला काही विरोध नाही. तसेच पंच विषयांचे ग्रहणही ज्ञानावस्थेत कर्तव्य बुध्दीने होते पण तो पंचविषयांमध्ये फसणार नाही म्हणजे मनाच्या ठायी पंचविषयांची आसक्ती उत्पन्न होणार नाही. अज्ञानावस्थेत पंचविषयांमध्ये फसण्याचाच अनुभव येतो.

: 10 :

*उत्क्रामन्तं स्थितं वाऽपि भुंजानं वा गुणान्वितम्।*
*विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **उत्क्रामन्तं:** शरीर सोडून बाहेर पडणाऱ्या
- **अपि वा स्थितं:** अथवा देहात विद्यमान असणाऱ्या
- **भुंजानं:** पंचविषयांना भोगणाऱ्या
- **वा गुणान्वितं:** अथवा त्रिगुणांनी युक्त अशा जीवात्म्याला
- **विमूढाः** मूढ म्हणजे अज्ञानी जन
- **न अनुपश्यन्ति:** बघत वा जाणत नाहीत
- **ज्ञानचक्षुषः पश्यन्ति:** ज्ञान दृष्टीसंपन्न बघतात म्हणजे तत्त्वतः जाणतात

**अर्थ**

देह सोडून जात असताना वा देहात रहात असताना किंवा विषयांचा भोग घेत असता किंवा तीन गुणांनी युक्त असताही (त्या आत्मस्वरुपाला) अज्ञानी लोक ओळखत नाहीत. केवळ ज्ञानरुप दृष्टी असलेले विवेकी ज्ञानीच तत्त्वतः जाणतात.

***सोडितो धरितो देह भोगितो गुण - युक्त हा।***
***परी न पाहती मूढ ज्ञानी डोळस पाहती॥***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) शब्द वगैरे पंचविषयांचा भोक्ता वा त्रिगुणांनी युक्त जीवात्मा शरीराचा त्याग करतो वा शरीरात विद्यमान असतो, त्याच्या मूळ स्वरुपाला मूढ जन बघत नाहीत. 2) ज्ञानदृष्टी प्राप्त झालेले ज्ञानीजन जीवात्म्याच्या त्या मूळ स्वरुपाला बघतात.

**स्पष्टीकरण**

1) **उत्क्रामन्तं अपि वा स्थितं भुंजानं वा गुणान्वितं विमूढाः** न अनुपश्यन्ति पंच विषयांचे भोक्ते देहाबाहेर पडतात वा देहात विद्यमान असतात त्या त्रिगुणाने युक्त जीवात्म्याच्या मूळ स्वरुपाला मूढजन बघू शकत नाहीत.

इथे सर्वप्रथम जीवात्म्याच्या प्रापंचिक रुपाची ओळख करुन दिली आहे. या जीवात्म्याच्या मूळ स्वरुपाला अज्ञानी जन ओळखत नाही. अशाप्रकारे अज्ञानावस्थेत देह धारण करणे आणि देह त्याग केल्यावर दुसऱ्या देहात प्रविष्ट होणे हे झाले जीवात्म्याचे एक स्वरुप. देहात विद्यमान असताना पंच विषयांचा उपभोग घेणे हे झाले दुसरे स्वरुप. जीवात्म्याचे त्रिगुणयुक्त असणे हे झाले तिसरे स्वरुप. सत्व, रज आणि तम हे तीन गुण अनुभवायला येतात. यातल्या एका गुणाचे प्राधान्य असून इतर दोन गुण गौण असतात. अशाप्रकारे जीवात्मा सदैव तीन गुणांच्या सोबत असतो. जीवात्म्याच्या या मूळ स्वरुपाला मूढजन म्हणजे अज्ञानी जन ओळखत नाहीत. ओळखू शकण्याचे साधन आहे चित्त वा मन. ते तर अज्ञानी जनांपाशीही असते पण बहिर्मुखी असते. चित्त अंतर्मुख झाले की ईश्वर स्वरुपाची ओळख होते.

2) **ज्ञानचक्षुषः** पश्यन्ति ज्ञानीजनांपाशी असतात ज्ञान चक्षु, यांच्या मदतीने ते जीवात्म्याच्या मूळ स्वरुपाला - ईश्वराला बघतात. 'मी म्हणजे देह' असे वाटणे एक कल्पनाच तर आहे कारण की आपण जर देह असू तर देहाचे ज्ञान कसे बरे होईल? याचा अर्थ असा की आपण देह, मन व इंद्रियांपेक्षा वेगळे आहोत. एका वस्तुला आपण जाणतो म्हणजे आपण त्या वस्तुपासून वेगळे आहोत आणि ज्ञानस्वरुपी आहोत. एक वस्तु दुसऱ्या वस्तुपेक्षा वेगळी असू शकते पण एक वस्तु दुसऱ्या वस्तुला ओळखू शकत नाही कारण की सर्व वस्तु जड आहेत. ज्ञानासाठी एक पदार्थ दुसऱ्या पदार्थापेक्षा वेगळा असायला हवा आणि त्याचे ज्ञानस्वरुपी असणे आवश्यक आहे. आपण ज्याप्रमाणे देह, मन, इंद्रियांपेक्षा वेगळे आहोत, तसेच देह, मन, इंद्रियेही आपल्यापासून वेगळी आहेत पण आपण ज्ञानस्वरुपी असल्यामुळे ते आपल्याला जाणत नाहीत. देह वगैरेपेक्षा जे वेगळेपण असते त्याला ज्ञानीजन ज्ञानरुपी नेत्रांनी बघतात.

: 11 :

*यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।*
*यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यतन्तः योगिनः** यत्नवान योगीजनसुध्दा
- **एनं आत्मनि:** याला स्वत:त म्हणजे हृदयात
- **अवस्थितं पश्यन्ति:** विद्यमान बघतात
- **यतन्तः अपि:** प्रयत्न करणारे सुध्दा
- **अकृतात्मान:** जे असंस्कारी म्हणजे ज्यानी आपले अंत:करण शुध्द केले नाही असे
- **अचेतस:** जे अविवेकी आहेत (ते )
- **एनं न पश्यन्ति:** या (ईश्वराला म्हणजे आत्म्याला) नाही बघू शकत, जाणत नाहीत

**अर्थ**

योगीजनही आपल्या हृदयात असलेल्या या आत्म्याला प्रयत्नानेच तत्त्वत: जाणतात पण ज्यांनी आपले अंत:करण शुध्द केले नाही असे अज्ञानी लोक प्रयत्न करुनही या आत्मस्वरुपाला जाणत नाहीत.

*योगी यत्न - बळें ह्यास पाहती हृदयीं स्थित ।*
*चित्त - हीन अशुध्दात्मे प्रयत्नें हि न पाहती ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) प्रयत्नशील - प्रयत्नवान योगीजन या ईश्वराला आपल्या मन - बुध्दीत स्थित - विद्यमान मानतात. 2) पण प्रयत्न करण्यांमध्येही जे असंस्कारी वा अविवेकी असतात ते त्याचे दर्शन करु शकत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **यतन्तः योगिनः** एनं आत्मनि अवस्थितं पश्यन्ति प्रयत्न करणारे योगीजन याला म्हणजे ईश्वराला आपल्यात - आपल्या मन - बुध्दीत विद्यमान पहातात. मागील श्लोकात सांगितले गेले आहे की जीवात्म्याच्या मूळ स्वरुपाला विवेकी - ज्ञानी पुरुष बघतात, मूढ - अविवेकी बघू शकत नाहीत. या श्लोकात सांगताहेत की प्रयत्न करणारे योगीजन ईश्वराला ओळखून घेतात पण कुठे? आपल्या ठायी, बुध्दीच्या ठायी बघून घेतात. हे ओळखण्याचे स्थान सांगितले. ईश्वर तर ब्रह्मांडात व्याप्त -सामावलेला आहे पण तो मन वा बुध्दीतच प्रकट आहे. यामुळे ईश्वराचा अनुभव प्रथम तिथेच होतो. मनातच अनुभव येतो. आपल्या सर्वांना 'आपण आहोत'. हाच अनुभव येतो. 'आपण नाहीहोत'. असा अनुभव येत नाही तर मग 'आपण कोण आहोत?' आपण सत् - चित् - आनंद म्हणजे ईश्वर स्वरुपी आहोत. हे लक्षात आल्यावर सुध्दा आपण 'ईश्वररुप' असल्याचा अनुभव कुणाला येत नाही. भगवंत म्हणताहेत की प्रयत्न करणाऱ्या योगीजनांनाही तसा अनुभव मनाशी येऊ शकतो. इथे 'योगी' शब्द प्रयुक्त केला गेला आहे. ईश्वर स्वरुपाला ओळखण्यासाठी भक्ती, ध्यान, कर्म - फळत्याग वगैरे जे मार्ग आहेत त्यांचा स्वीकार करणारे, त्या मार्गांवर वाटचाल करण्याची पराकाष्ठा करणारे जे पुरुष असतात त्यांच्यासाठी 'योगी' या शब्दाचा प्रयोग केला गेला आहे, असे मानायला हवे. प्रयत्न तीव्र असतील तर ईश्वराला मनात बघता येते. त्याला बुध्दीत विद्यमान असलेले बघता येते. खरे पाहू गेल्यास ईश्वरच देहात अखंडपणे निवास करत आहे. त्याचे जर आपल्याला दर्शन घडले तर आपण स्वत: दूर होऊ आणि देहरुपी देवळात विराजित आहे असा अनुभव घेत जीवनातल्या तमाम क्रिया करत राहू. ईश्वरालाच देहरुपी देवळाचा मालक समजून जगायचा प्रयत्न करणे खूप भाग्याचे मानले जायला हवे. योगीजन आपल्या बुध्दीत स्थित ईश्वराला बघून घेतात यामुळे ते त्याप्रकारे जगायचा प्रयत्न करतात आणि या प्रयत्नात यशस्वीही होतात कारण की त्यांनी स्वत:ला संपवून टाकलेले असते.

2) **यतन्तः अपि अकृतात्मानः अचेतसः एनं न पश्यन्ति:** प्रयत्न करणारे काही असंस्कारी लोक असतात म्हणजे तप, भक्ती, वैराग्य वगैरेमुळे शुध्द झालेले नसतात. ते ईश्वराचे दर्शन करु शकत नाहीत आणि अविवेकी जनही ईश्वराचा अनुभव घेऊ शकत नाहीत. प्रयत्न करण्यांमध्येही काही इतके संस्कारी नसतात आणि यामुळेच तप, वैराग्य, भक्ती वगैरेंशी संबध्द साधना योग्य प्रकारे करु शकत नाहीत आणि ज्यांच्या चित्तात आत्मनात्म - विवेक, सत् - असत् - विवेक शिल्लक रहात नाही ते ईश्वराचे दर्शन आपल्या मनात करु शकत नाहीत. या जन्मी पूर्वजन्मीचे संस्कार कामी येतात आणि या जन्मीचे संस्कार पुढच्या जन्मी उपयोगी ठरतात. अशाप्रकारे हे चक्र सुरुच असते.

सत्संग लाभला तर प्रयत्नांची शिथिलता काही अंशी संपवता येते.

: 12 :

*यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्।*
*यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विध्दि मामकम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् आदित्यगतं तेज:** सूर्याच्या ठायी स्थित जे तेज
- **अखिलं जगत्:** संपूर्ण जगाला
- **भासयते:** प्रकाशित करते
- **यत् चन्द्रमसि:** जे तेज चंद्राच्या ठायी आहे
- **च यत् अग्नौ:** आणि जे तेज अग्नीत आहे
- **तत् तेज:** ते तेज
- **मामकम् विध्दि:** माझे आहे, असे जाण - समज

**अर्थ**

सूर्यामध्ये राहून जे तेज सर्व जगाला प्रकाशित करते, जे तेज चंद्रात आहे आणि जे अग्नीत आहे ते माझेच तेज आहे असे तू समज, जाण.

***सूर्यांत जळतें तेज जें विश्व उजळीतसे।***
***तसें चंद्रांत अग्नींत जाण माझें चि तेज तें॥***

**विषय:** या श्लोकात एकच मुद्दा सांगितला गेला आहे की सूर्याच्या ठायी विद्यमान असलेले जे तेज संपूर्ण जगाला प्रकाशित करते, जे तेज चंद्र आणि अग्नीच्या ठायी आहे ते तेज माझे आहे असे जाण.

**स्पष्टीकरण**

यात व पुढील श्लोकात भगवंताच्या विभूतींचे वर्णन आले आहे. गीतेच्या सातव्या अध्यायातील 8 ते 11 श्लोकांमध्ये भगवंताच्या विभूतींचे वर्णन आले आहे. तिथे आठव्या श्लोकात सूर्य आणि चंद्राची चर्चा आली आहे. नवव्या अध्यायातही 16 ते 19 श्लोकांपर्यंत विभूतींचे वर्णन आले आहे. तिथे 19 व्या श्लोकात सूर्याची चर्चा येते. आदर्श कर्मयोगी म्हणून चौथ्या अध्यायातील पहिल्या श्लोकात सूर्याचे वर्णन आले आहे. सूर्याला ज्ञानीही म्हटले गेले आहे. वेदात उल्लेख येतो - अथ तत: ऊर्ध्व उदेत्य न एव उदेता न अस्तमेता एकला एव मध्ये स्थाता - अर्थात् भगवंताने जोपर्यंत सूर्याला तापण्याचा अधिकार सोपवला आहे, तो पूर्ण झाल्यावर वर गेल्यावर नंतर त्याचा उदय होत नाही, त्याचा अस्तही होत नाही. तो एकटा मुक्त स्थितीत रहातो.

सूर्य ज्ञानी आहे. तो भगवंताच्या आदेशाने जगाची सेवा करतो. शंकराचार्य म्हणतात की सूर्य प्रदीर्घ काळ जगाची सेवा करतो. प्रलयसमयी सेवेच्या अधिकारातून मुक्त होऊन कैवल्य म्हणजे मोक्षाचा अनुभव घेतो. अशाप्रकारे सूर्य ज्ञानी आहे, त्याला जगाची सेवा करायला भगवंताने पाठवले आहे. सूर्यनारायणाच्या संदर्भात ही सुंदर आणि श्रेष्ठ कल्पना आहे.

दुसरी विभूती चंद्रमा आहे. चंद्र हा सूर्याप्रमाणे जगाच्या सेवेसाठी उपस्थित होतो अशी काही परिस्थिती नाही. त्याची वाढ होते, क्षय होतो आणि रात्रीच्या काळात जगाच्या सेवेसाठी हजर रहातो. लोक जेव्हा झोपी गेलेले असतात, त्यावेळी चंद्र प्रकाश देण्याची मूळ सेवा करतो, तसे पाहू गेल्यास त्याचा उजेड स्वत:चा नसून तो सूर्याचा प्रकाश असतो. असे म्हणतात की चंद्र प्रकाशामुळे अनेक वनस्पतींना पोषण लाभते. सूर्याप्रमाणे चंद्राचा प्रकाश प्रखर नसतो. चंद्राचा प्रकाश शीतल - सौम्य असतो. चंद्राकडे आपण बघू शकतो, सूर्याकडे नव्हे, सूर्य महाज्ञानी आहे तर चंद्र महाभक्त. ज्ञानी प्रखर असतो तर भक्त सौम्य. चंद्र जलमय असल्यामुळे त्याच्या माध्यमातून वनस्पतींचे पोषण होते, असे म्हटले जाते.

तिसरी विभूती आहे अग्नी. अग्नी तर रात्रंदिवस आपली सेवा करतो. सूर्य फक्त दिवसा तर चंद्र रात्रीच सेवा करतो पण अग्नी सदा सेवेसाठी हजर असतो. थंडीच्या दिवसात रात्री वा दिवसा अग्नी प्रज्वलित करुनच थंडीपासून बचाव करुन घ्यावा लागतो. अग्नी वस्तुला शुध्द करतो. भट्टीत टाकल्याबरोबर सोने शुध्द होऊन जाते म्हणून अग्नीला 'पावक' असे म्हणतात. सूर्य, चंद्र, अग्नी या तीन महान तत्वांमध्ये जे तेज प्रकट होते, ते तेज मी आहे, असे भगवंत सांगताहेत.

: 13 :

***गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा।***
***पुष्णामि चौषधी: सर्वा: सोमो भूत्वा रसात्मक: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च गां आविश्य:** आणि पृथ्वीत प्रवेश करत असताना
- **अहं ओजसा:** मी तेज म्हणजे आकर्षण शक्तीच्या जोरावर
- **भूतानि धारयामि:** सर्व भूतांना - प्राणीमात्रांना - धारण करतो
- **च रसात्मक: सोम:** भूत्वा: आणि तसेच रसमय म्हणजे अमृतमय चंद्र बनून
- **सर्वा: औषधी: पुष्णामि:** सर्व वनस्पती जगाचे पोषण करतो

**अर्थ**

आणि मीच पृथ्वीत शिरुन आपल्या शक्तीने सर्व भूतांना धारण करतो आणि रसरुप म्हणजे अमृतमय चंद्र बनून सर्व वनस्पतींचे पोषण करतो.

***आकर्षण - बळें भूतें धरा - रुपें धरीतसें।***
***वनस्पतींस मी सोम पोषितों भरिला रसें ॥***

**विषय:** या श्लोकात दोन विभूतींची चर्चा आली आहे. 1) पृथ्वीच्या ठायी प्रवेश करुन मी तेज म्हणजे आकर्षण - शक्तीने सर्व भूतमात्रांना धारण करतो. 2) रसरुप चंद्र बनून सर्व वनस्पती जगताचे पोषण करतो.

**स्पष्टीकरण**

1) **च गां आविश्य अहं ओजसा भूतानि धारयामि:** पृथ्वीच्या ठायी प्रवेश करुन तेज म्हणजे आकर्षण - शक्तीच्या बळावर स्वसामर्थ्याने सर्व भूते म्हणजे प्राणीमात्रांना धारण करतो. सातव्या अध्यायातील 9 व्या श्लोकात पृथ्वीचे उदाहरण देऊन सांगितले गेले आहे की पुण्य: गंध: पृथिव्याम् - पृथ्वीच्या ठायी जो सुवास आहे तो मी आहे. इथे पृथ्वीच्या संदर्भात सांगितले गेले आहे की मी पृथ्वीच्या ठायी प्रवेश करतो, मग पृथ्वीत आकर्षण शक्ती उत्पन्न होते. त्या अद्भुत आकर्षण शक्तीमुळे पृथ्वी फिरत रहाते. पृथ्वी दोन प्रकारे फिरत आहे. 1) स्वत:भोवती आणि 2) सूर्याभोवती. सूर्याच्या ठायी असणारी आकर्षण शक्तीही ईश्वराचीच आहे. त्या आकर्षण शक्तीमुळे पृथ्वी आकाशात अधांतरी आहे. पृथ्वीतली ही आकर्षण शक्ती ईश्वराची - ईश्वरामुळे - आहे. पृथ्वीवरील सर्व भूतांना - प्राणीमात्रांना पृथ्वीत विद्यमान असलेली ईश्वरी आकर्षण शक्ती धारण करुन आहे. ही आकर्षण शक्ती पृथ्वीला स्थिर ठेवते. यामुळेच प्राणीमात्र तिजवर न पडता, न कोसळता स्थिरतापूर्वक सर्व व्यवहार करु शकतात. पृथ्वी इतक्या प्रचंड वेगाने फिरत आहे की त्यावरील सारे प्राणी पडून न जाता आकर्षण शक्तीमुळे पडत नाहीत. पृथ्वीच्या उत्पत्तीला दोनशे कोटी वर्षे झालीत तेव्हापासून ती अखंडपणे फिरत आहे. पृथ्वीप्रमाणे अगणित खंड आकाशात फिरताहेत. या अद्भुत व्यवस्थेला ना अंत ना पार. यामुळे तुलसीदासांनी ईश्वराविषयी सांगितले आहे.

***असि सब भाँति अलौकिक करनी।***
***महिमा जासु जाइ नहिं बरनी ॥***

अर्थात् -अशाप्रकारे ईश्वराची करणी सर्व प्रकारे अलौकिक आहे. त्याचे महात्म्य वर्णन करुन सांगता येण्यासारखी नाही.

2) **च रसात्मक: सोम:** भूत्वा सर्वा: औषधी: पुष्णामि आणि तसेच रसरुप, रसमय चंद्र बनून सर्व वनस्पतींचे पोषण करतो. मागील श्लोकात म्हटले आहे की चंद्रात जे तेज वसते, ते मीच आहे. इथे चंद्राचाच दृष्टांत देऊन सांगताहेत की मी चंद्राच्या रुपात प्रकट होऊन सर्व वनस्पतींचे पोषण करतो. सर्व वनस्पतींचे पोषण करणारा असल्यामुळे चंद्राला ‘रसमय’ म्हटले गेले आहे. जो इतराना आनंदित करतो तो स्वत: आनंदमय असायलाच हवा. चंद्र रसमय - रसभरित नसेल तर वनस्पतींना रस देऊ शकत नाही. यामुळे चंद्र रसमय म्हणजे अमृतमय आहे, असे इथे सांगितले गेले आहे.

: 14 :

***अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः।***
***प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं प्राणिनाम्:** मी सर्व प्राण्यांच्या
- **देहं आश्रितः** देहाचा आश्रय घेऊन स्थित असलेला
- **वैश्वानरः भूत्वा:** वैश्वानर म्हणजे जठराग्नी बनून
- **प्राणापानसमायुक्तः** प्राण आणि अपानाने युक्त होऊन
- **चतुर्विधं अन्नंः** चार प्रकारचे अन्न
- **पचामिः** पचन करतो

**अर्थ**

मीच सर्व प्राण्यांच्या देहात रहाणारा, प्राण व अपान यांनी संयुक्त वैश्वानर अग्नीरुप होऊन चार ( भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य असे चार प्रकारचे अन्न यात पोळी-भाकरी वगैरे चावून खायचे ते भक्ष्य पदार्थ, दुध इत्यादी पिण्याचे ते भोज्य पदार्थ, चटणी वगैरे चाटायचे ते लेह्य पदार्थ आणि ऊस वगैरे असे चोखायचे ते चोष्य पदार्थ.) प्रकारचे अन्न पचवतो.

***मी वैश्वानर - रुपानें प्राणि - देहांत राहुनी।***
***अन्नें तीं पचवीं चारी प्राणापानांस फुंकुनी॥***

**विषयः** या श्लोकात एकाच विभूतीची चर्चा आली आहे पण या विभुतीच्या ठायी तीन गोष्टी आहेत. 1) मी प्राण्यांच्या देहांचा आश्रय घेतो आणि वैश्वानर म्हणजे जठराग्नी होऊन. 2) प्राण आणि अपानाने युक्त होऊन. 3) चार प्रकारचे अन्न पचवतो.

**स्पष्टीकरण**

1) **अहं प्राणिनां देहं आश्रितः वैश्वानरः** भूत्वा मी प्राण्यांच्या देहाचा आश्रय घेऊन वैश्वानर म्हणजे जठराग्नी बनतो. तसा तर अग्नी सर्वत्र आहे. सर्वच पदार्थांच्या ठायी अग्नी तत्व आहे. दोन पदार्थांच्या घर्षणातून अग्नी प्रकट होतो. देहात अग्नी आहे, त्यामुळे अन्न पचते. त्याला 'वैश्वानर' अग्नी म्हटले गेले आहे. ईश्वर सर्वत्र समानपणे प्रकट झालेला नाही. तो कुठे गुप्त आहे, तर कुठे सामान्य वा विशिष्ट रुपात आहे. अन्न सर्वप्रथम जठरात जाते. तिथे त्याच्यावर प्रथम पचनाची क्रिया सुरु होते. यामुळे या जठरात राहून अन्न पचविणाऱ्या अग्नीला जाठर - अग्नी असे म्हणतात. त्यालाच इथे 'वैश्वानर' म्हटले गेले आहे.

2) **प्राणापानसमायुक्तः** भगवंत म्हणतात की मी जठर - अग्नीच्या रुपात प्रकट होऊन प्राण आणि अपानाशी युक्त होतो - संलग्न होतो. प्राण म्हणजे बाहेर टाकायचा वायु आणि अपान म्हणजे आत घ्यायचा श्वास. प्राण आणि अपानाशी भगवंत युक्त होतात - संलग्न होतात. आपल्या देहात जी घाण उत्पन्न होते, दूषित हवा उपजते, ती आपण प्रत्येक श्वासासोबत म्हणजे प्राणवायु सोबत बाहेर काढतो आणि अपान वायुद्वारे शुध्द हवा आत घेतो अशाप्रकारे प्राण आणि अपान वायुद्वारे आपण घाणेरडी - दूषित हवा बाहेर काढून शुध्द वायु आत घेतो जोवर आपण जिवंत असतो तोवर ही क्रिया अखंडपणे सुरु रहाते. प्राण आणि अपानही ईश्वराचेच एक रुप आहे.

3) **चतुर्विधं अन्नं पचामिः** चार प्रकारचे अन्न पचवतो. 1) भोज्य - पोळी वगैरे चावून खायचे पदार्थ. 2) भक्ष्य - प्रवाही पदार्थ, वरण, दूध, ताक वगैरे 3) चोष्य - चोखून खाता येण्यासारखे पदार्थ. - ऊस, आंबा वगैरे. 4) लेह्य -चाटण्यासारखे पदार्थ - मध वगैरे. भगवंत प्रत्येकाच्या देहात राहून पचवण्याची क्रिया रात्रंदिवस अखेरच्या क्षणापर्यंत करतो.

: 15 :

***सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टा***
***मत्तः समृतिर्ज्ञानमपोहनं च।***
***वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो***
***वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहं सर्वस्य हृदिः** मी सर्व प्राण्यांच्या हृदयात
- **संनिविष्टः** अंतर्यामी रुपाने प्रविष्ट झालेलो आहे म्हणजे स्थित आहे
- **मत्तः स्मृतिः** माझ्यामुळेच स्मरण म्हणजे स्मृती
- **ज्ञानं च अपोहनंः** ज्ञान आणि विस्मरण उत्पन्न होतात

- **सर्वैः वेदैः अहं एव वेद्यः** सर्व वेदांमध्ये मीच जाणून घेण्यायोग्य आहे
- **वेदान्तकृत्:** वेदरहस्यकर्ता
- **च वेदवित् अहम् एवः** आणि वेदज्ञता म्हणजे वेदाना जाणणाराही मीच आहे

**अर्थ**

मीच सर्व प्राण्यांच्या हृदयात अंतर्यामी होऊन राहिलो आहे, माझ्यापासून स्मृती, ज्ञान आणि अपोहन (विचारांनी बुध्दीत असणारे संशय-विपर्यय इत्यादी दोष घालविणे म्हणजे अपोहन होय.) ही होतात. सर्व वेदांकडून मीच जाणण्यास योग्य (परमेश्वराला जाणणे, हे सर्व वेदांचे तात्पर्य आहे म्हणून सर्व वेदांच्या द्वारे जाणण्यास योग्य एक परमेश्वरच आहे.) आहे तसेच वेदान्ताचा कर्ता आणि वेदाना जाणणाराही मीच आहे.

***सर्वांतरीं मी करितों निवास***
***देतों स्मृति ज्ञान विवेक सर्वां।***
***समग्र वेदांस हि मी चि वेद्य***
***वेद-ज्ञ मी वेद-रहस्य-कर्ता॥***

**विषय:** या श्लोकात पाच विभूतींची चर्चा आहे. 1) मी सर्वांच्या हृदयात प्रविष्ट आहे. 2) माझ्यामुळेच स्मरण, ज्ञान आणि विस्मरण वा विवेक उत्पन्न होतात. 3) सर्व वेदांमध्ये मीच जाणून घेण्यायोग्य आहे. 4) वेदरहस्यकर्ता आणि 5) वेद - ज्ञाता मीच आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहं सर्वस्य हृदि संनिविष्टः** मी सर्वाच्या हृदयात प्रविष्ट आहे. तसे पाहू गेल्यास ईश्वर तर सर्वच पदार्थामध्ये विराजमान आहेत पण त्यांचे मुख्य स्थान जीवसृष्टी आहे. जिथे जीवसृष्टी आहे तिथे मन आहे. मन म्हणजे मनाची गहराई - खोली, हृदयात देव सत् - चित् - आनंद रुपात विराजमान आहे. तिथेच ते प्रकट आहेत. भगवंत जड पदार्थाच्या ठायीही निवास करतात पण ज्ञानस्वरुपी चेतन जीवतत्व प्रक ट दिसतात. ज्ञानस्वरुपी असल्यामुळेच जीवाला सुख - दु:खाचा अनुभव येतो.

2) **मत्तः स्मृतिः** ज्ञानं च अपोहनम् माझ्या ठायीच स्मरण, ज्ञान आणि अपोहन म्हणजे विस्मृती वा विवेक उत्पन्न होतात. स्मृती वा स्मरण जड पदार्थामध्ये नसते. सत् - चित् - आनंदस्वरुप जीवातच स्मरण बघण्यात येते. जिथे स्मरण आहे, तिथे ज्ञान दिसून येते. जिथे स्मरण आहे, ज्ञान आहे, तिथे विवेक दिसून येतो. जिथे स्मृती आहे, तिथे विस्मरणही आहे.

इथे प्रश्न उपस्थित होऊ शकतो की ‘अपोहन’ शब्दाचा अर्थ विस्मरण झाला, तर विस्मरण कशी काय भगवंताची विभूती असू शकते? त्याचा अर्थ जर ‘विवेक’ मानला तर विवेकाला भगवंताची विभूती मानू शकतो पण विचार करु जाता लक्षात येते की आपण विस्मृतीशिवाय जगू शकत नाही. आपण रोज इतक्या क्रिया करतो की त्या जर सर्व लक्षात राहिल्यात तर आपल्याला शांततेचा अनुभव येणार नाही. लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी लक्षात राखल्या पाहिजेत, विस्मरणात टाकण्यासारख्या विसरुन जायला पाहिजेत, तरच स्मरणशक्ती कायम राहू शकेल. स्मरण शक्तीवर अधिक ताण पडला तर योग्य ते स्मरण ठेवायच्या शक्तीवरही ताण पडून ती कमकुवत होऊ लागते. आवश्यक सत्कर्मांचे स्मरण रहायला हवे, जर सत्कर्मात शिथिलता यायला लागली तर चित्त शुध्दी कमी होईल. चित्त शुध्दीद्वारेच आत्मज्ञान होऊ शकते. चित्तशुध्दी हेच परमात्म - ज्ञानाचे साधन आहे. यामुळे निरर्थक घटना वा वस्तुंचे विस्मरण आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने खूप गरजेचे आहे. भूतकाळ तर विस्मरणासाठीच आहे. भूतकाळात ज्या चुका घडल्या वा जे पापाचरण झाले ते पुढे होऊ नये असा मनी दृढ निश्चय असायला हवा. या निश्चयात मंदता वा न्यूनता यायला नको. निश्चय कायम - ठाम - राहील एवढे लक्ष देऊन भूतकाळ विसरायला हवा. वर्तमानकाळात भूतकाळातून लाभ करुन घेणे आणि भूतकाळाला विसरुन जाणे ही क्रिया चालत राहिली तर योग्य अर्थात काही चुकीचे आचरण घडले असेल तर मनाला पश्चाताप अवश्य वाटला पाहिजे. पश्चाताप वाटला नाही तर चुकीचे आचरण पुनरपि घडण्याची शक्यता असते पण परत परत येऊन मन:स्वास्थ्य न बिघडो. अशाप्रकारे ‘अपोहन’ शब्दाचा अर्थ जसा ‘विवेक’ आहे, तसा ‘विस्मृती’ ही घेता येऊ शकतो. इथे ‘स्मृती’ चा अर्थ ‘आत्मस्मृती’ घ्यायचा आहे. आत्मस्मृतीमुळे आत्मज्ञान प्राप्त होईल आणि आत्मज्ञानामुळे ‘विवेकी’ भूमिका प्राप्त होईल. मार्गदर्शक तर शुध्दविवेकच आहे.

3) **सर्वैः वेदैः अहं एव वेद्यः** सर्व वेदांपेक्षा मीच जाणण्यायोग्य आहे. म्हणजे वेद हे माझेच स्वरुप आहे. ज्या वेदांमुळे ईश्वराचे ज्ञान होते ते वेद म्हणजे मी आहे म्हणजे माझी विभूती आहे. वेदात दोन भाग आहेत. कर्मकांड आणि ज्ञानकांड. कर्मकांडाला 'पूर्व मीमांसा' ज्ञानकांडाला 'उत्तर मीमांसा' असेही म्हटले जाते. कर्मकांडात यज्ञ, याग, वगैरे सर्व प्रकारची कर्मे आणि विधि - विधान येते. ज्ञानकांडात ईश्वर ज्ञानाचे स्वरुप वर्णिले आहे. ज्ञानकांड वा उत्तरमीमांसेला 'उपनिषद' म्हटले जाते. उपनिषद भगवंताची विभूती आहे. गीता आहे उपनिषदांचे सार.

4) **वेदान्तकृत्:** वेद - रहस्य - कर्ता म्हणजे गीतेची रचना करणारे वेद व्यास अवतारी पुरुष. वेद व्यास मोठे ज्ञानी पुरुष होते. ब्रह्मसूत्राची रचना वेद व्यास ऋषींनी केली असे लोकमान्य टिळकांचे मत आहे पण विनोबा या मताशी सहमत नाहीत. गीतेची रचना महामुनी वेद-व्यासांनी केली याबाबत कुणाचे दुमत नाही. आजपर्यंत होऊन गेलेले सर्वच ज्ञानी पुरुष ईश्वराच्या विभूतीच होत्या. तसे तर सर्व प्राणीमात्रात भगवंत प्रकट आहेत पण ज्ञानी पुरुषाच्या ठायी ते विशेषत्वाने प्रकट असल्यामुळे ज्ञानी पुरुषाला भगवंताची विभूती मानले जाते.

5) **वेदवित् अहं एवः** आणि मी वेदज्ञ आहे. वेदाला जाणणारे भगवंत आहेत याचा अर्थ पूर्णज्ञान मी आहे. पूर्णज्ञान या देहात सामावू शकत नाही. जोवर प्रारब्ध कर्म शेष उरते तोवर ज्ञानवंताला देह धारण करावा लागतो. देह धारण करण्यात थोडा अहंकार शिल्लक उरतोच. तो अहंकार मृतप्राय असतो आणि केवळ देह धारण करण्यासाठीच असल्यामुळे तो काही ज्ञानविरोधी असत नाही. पूर्णज्ञानाला जर शंभर टक्के मानले तर देह धारण केल्यावर प्राप्त होणारे ज्ञान नव्वद टक्के असते, असे मानायला हवे पण भगवंत पूर्णज्ञानी असल्यामुळे मी वेदज्ञ आहे असे म्हणताहेत.

: 16 :

***द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।***
***क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **लोके:** या लोकात म्हणजे सृष्टीत
- **क्षरः च अक्षरः** क्षर आणि अक्षर म्हणजे नाशिवंत आणि अविनाशी
- **इमौ द्वौ पुरुषौ:** असे हे दोन पुरुष
- **सर्वाणि भूतानि क्षरः** सारी भूते क्षर म्हणजे नाशिवंत आहेत
- **च कूटस्थः अक्षरः** आणि कूटस्थ अक्षरे आहेत जीवात्म्याला अविनाशी अक्षरे
- **उच्यते:** असे म्हटले जाते

**अर्थ**

या विश्वात विनाशी आणि अविनाशीही असे दोन प्रकारचे (गीतेच्या सातव्या अध्यायातल्या चौथ्या आणि पाचव्या श्लोकात परा अणि अपरा प्रकृती असे म्हटले आहे. तसेच तेराव्या अध्यायातल्या पहिल्या श्लोकात ज्याला क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ म्हटले आहे, त्यानाच या ठिकाणी क्षर आणि अक्षर या नावाने वर्णिले आहे.) पुरुष आहेत. त्यामध्ये सर्व भूतमात्रांची शरीरे हा नाशवान आणि जीवात्मा अविनाशी म्हटला जातो.

***लोकीं पुरुष ते दोन क्षर आणिक अक्षर।***
***क्षर सर्व चि हीं भूतें स्थिर अक्षर बोलिला॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) या लोकात क्षर आणि अक्षर असे दोन पुरुष आहेत. 2) सारी भूते म्हणजे संपूर्ण सृष्टी क्षर आहे आणि कूटस्थ म्हणजे जीवात्मा अक्षर आहे. 3) असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **लोके क्षरः च अक्षरः इमौ द्वौ पुरुषौ:** या लोकात 'क्षर' आणि 'अक्षर दोन पुरुष आहेत. सातव्या अध्यायातील चौथ्या - पाचव्या श्लोकातून 'परा' प्रकृती आणि 'अपरा' प्रकृतीच्या विषयी समजावले आहे. तोच मुद्दा इथे 'क्षर', 'अक्षर' नावाने समजाऊन सांगितला आहे.

इथे 'अपरा' प्रकृतीला 'क्षर' आणि 'परा' प्रकृतीला 'अक्षर' असे संबोधले गेले आहे. इथे क्षर - अक्षर या दोघांना 'पुरुष' म्हटले आहे. तेराव्या अध्यायातील पाचव्या - सहाव्या श्लोकात त्याला 'क्षेत्र' म्हटले आहे तोच इथे 'क्षर पुरुष' आहे तर 'क्षेत्रज्ञ' वा जीवात्मा हाच अक्षर पुरुष आहे. क्षराच्या ठायी सबंध ब्रह्मांडासोबत शरीरही समाविष्ट आहे.

2) **सर्वाणि भूतानि क्षरः कूटस्थः अक्षरः** सर्व भूतमात्र म्हणजे पिंड - ब्रह्मांडात्मक अखिल सृष्टी 'क्षर' असून जे कूटस्थ आहे म्हणजे ज्याच्या ठायी काहीही फरक पडत नाही, तो जीवात्मा 'अक्षर' आहे. इथे क्षर आणि अक्षराचा अर्थ तपशिलवारपणे समजाऊन सांगितला आहे. क्षर म्हणजे अपरा प्रकृती. यात पृथ्वी, जल, अग्नी, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांचा समावेश आहे. पंचमहाभूतांपासूनच सृष्टीचे सर्व पदार्थ बनले आहेत. ते सारे विनाशी, परिवर्तनशील आहेत. पदार्थांमध्ये वृध्दी आणि क्षयाची क्रिया चालत असते. या विनाशी पदार्थांच्या आधाररुप वस्तु प्रकृती आहे. ही प्रकृती स्थिर आणि अत्यंत सूक्ष्म आहे. प्रकृती स्वतंत्र नसून ती परमेश्वराच्या आश्रयात असते. परमेश्वर ज्ञानस्वरुपी आहे. याच ज्ञानस्वरुपतेत सर्ग शक्ती असते, या शक्तीला वेदान्तात 'माया' म्हटले गेले आहे. याच ज्ञानस्वरुपतेच्या ठायी जीवाभास उत्पन्न करायची शक्ती आहे. प्रकृतीचा भास रुपी जे पिंड - ब्रह्मांडात्मक जगत् आहे ते 'क्षर' म्हणजे 'विनाशी' आहे. प्रकृती अविनाशी आहे. प्रकृती ईश्वराशी एकरुप आहे. प्रकृती शक्ती आहे.

या श्लोकात कूटस्थ शब्द निसर्गवाचक आहे. ही पिंड - ब्रह्मांडात्मक सृष्टी अनादी काळापासून चालत आलेली आहे. यामुळे सृष्टी 'क्षर' म्हणजे विनाशी असूनही 'अक्षर' म्हटली जाते. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक यांनी हाच अर्थ मानला आहे. विनोबांनी अक्षरचा अर्थ 'परा' प्रकृती, 'जीव' केला. यासोबत 'स्थिर साम्यावस्था' असाही अर्थ केला. आम्ही कूटस्थ अक्षरचा अर्थ परा प्रकृती म्हणजे जीवच केला. याचे स्पष्टीकरण पुढील श्लोकात देऊ. क्षर व अक्षर म्हणजे विनाशी सृष्टी आणि अविनाशी जीवात्मा या दोघांसाठी 'पुरुष' शब्दाचा प्रयोग झाला आहे.

इथे असा एक प्रश्न उद्भवू शकतो की जीवात्म्यासाठी केला गेलेला 'पुरुष' हा प्रयोग ध्यानात घेता येईल असा आहे कारण की जीव चेतन आहे पण पिंड - ब्रह्मांडात्मक जी क्षर म्हणजे विनाशी सृष्टी आहे ज्याच्यासाठी 'पुरुष' शब्द कसा बरे प्रयुक्त करता येईल? याचे उत्तर असे की पिंड - ब्रह्मांडात्मक सृष्टी काही स्वतंत्र वस्तु नाही. संपूर्ण सृष्टी जड दिसत असली तरीही चैतन्याच्या आधारे विद्यमान आहे. संपूर्ण सृष्टी चैतन्यरुपी ईश्वराचा भासच आहे. चेतन ईश्वराच्या आधारे स्थित असल्यामुळे त्या सृष्टीसाठी 'पुरुष' शब्दाचा प्रयोग करणे उचितच आहे.

3) **उच्यते:** असे सांगितले जाते. या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकात 'शास्त्र' हा शब्द आला आहे. सोळाव्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकातही 'शास्त्र'चा उल्लेख करुन सांगितले आहे की 'कर्तव्य काय अन् अकर्तव्य काय, याच्या निर्णयासाठी शास्त्रालाच प्रमाण मानायला हवे'. शास्त्र म्हणजे ऋषी - मुनींचे अनुभव. ज्या ऋषी - मुनींनी इंद्रियातीत परमेश्वराचा अनुभव घेतला आणि आपल्या अनुभवानुसार जी वचने त्यांच्या मुखातून प्रकट झाली, ती वचने प्रमाण होत. त्या वचनांनाच 'शास्त्र' म्हटले जाते. गीताही एक शास्त्र आहे. प्रत्येक अध्यायाचे समापन करताना 'इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु' हे वचन येते. याचा अर्थ असा आहे की गीता - शास्त्र स्वतंत्र नसून उपनिषदांचे सार आहे. यामुळे इथे भगवंतांनी शास्त्राचा हवाला दिला आहे.

: 17 :

***उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।***
***यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु उत्तमः पुरुषः** पण उत्तम पुरुष
- **अन्यः** (पूर्वोक्त दोन पुरुषांहून) वेगळाच आहे
- **परमात्मा इति उदाहृतः** त्याला 'परमात्मा' म्हटले आहे
- **यः अव्ययः ईश्वरः** जो अव्यय म्हणजे अविनाशी ईश्वर आहे
- **लोकत्रयं आविश्य:** तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करुन
- **बिभर्ति:** सर्वांचे धारण-पोषण करतो

### अर्थ

पण या दोन्हीपेक्षा उत्तम पुरुष तर निराळाच आहे जो तिन्ही लोकात प्रवेश करुन सर्वांचे धारण-पोषण करतो. या प्रमाणे तो अविनाशी परमेश्वर आणि परमात्मा असा म्हटला जातो.

*म्हणती परमात्मा तो तिजा पुरुष उत्तम।*
*विश्व - पोषक विश्वात्मा जो विश्वेश्वर अव्यय॥*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. 1) पण उत्तम पुरुष हा पूर्वीक्त म्हणजे क्षर व अक्षर पुरुषांहून वेगळा आहे. 2) वेदान्तात त्याला परमात्मा म्हटले आहे. 3) जो अव्यय ईश्वर आहे. 4) तिन्ही लोकात प्रवेश करुन त्याला धारण करतो.

### स्पष्टीकरण

1) **तु उत्तमः पुरुषः अन्यः** पण उत्तम पुरुष वेगळा आहे. मागील श्लोकात ज्या क्षर आणि अक्षर पुरुषाची ओळख करवून दिली आहे ना त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ व भिन्न आहे. भिन्न म्हणजे पूर्ण भिन्न नव्हे. समुद्रात लाटा, बुडबुडे, फेस तरंग असतो. हे सारे समुद्राच्या पाण्यापेक्षा वेगळे नसतात. आपापसात मात्र वेगवेगळे असतात. यामुळे एकमेकांपासून वेगळे असल्याचे म्हणता येते पण पाण्यापासून मात्र वेगळे नसतात. सगळ्या वस्तु पाण्याहून भिन्न असून सुध्दा पाणी काही लाटा, फेस वा बुडबुडे नाही. यामुळे पाणी त्यांच्यापेक्षा वेगळे वाटते. हे सापेक्ष वर्णन आहे. व्यवहार आणि परमार्थाच्या दृष्टीने भिन्नता आणि अभिन्नता आहे. यामुळे इथे भगवंतांनी सांगितले आहे की परमात्मा क्षर आणि अक्षर वस्तुंहून अभिन्न असतानासुध्दा सर्वांचा आधार असल्यामुळे जणू भिन्न आहे. जीव अक्षर असूनसुध्दा ईश्वराशी एकरुप नाही राहू शकत कारण की देह वगैरेशी आपल्या एकरुपतेच्या कल्पनेमुळे ईश्वराहून भिन्न सारखा होऊन जातो. तशाच प्रकारे क्षर म्हणजे सारी सृष्टी विनाशी, परिवर्तनशील आहे आणि ईश्वर नित्य आहे, अशाप्रकारे परमात्मा वेगळा आहे. परमात्मा या दोघांपेक्षा 'उत्तम पुरुष' म्हणवला जातो.

2) **परमात्मा इति उदाहृतः** याला वेदान्त शास्त्रात परमात्मा म्हटले आहे. पिंडात जो जीवात्मा आहे, तो परमात्माच आहे पण 'परमात्मा' जेव्हा चैतन्य स्वरुपात देहात प्रकटतो तेव्हा देहात जीवात्म्याचा भास होऊ लागतो. यामुळे शरीरात विद्यमान ईश्वराला आत्मा म्हटले जाते. आकाश अत्यंत व्यापक आहे पण घटाचे आकाश छोटे वाटते आणि त्याला घटाकाश असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे पिंडातील ईश्वराला आत्मा म्हटले जाते आणि ब्रह्मांडात विद्यमान चैतन्याला परमात्मा वा ईश्वर म्हटले जाते. परमात्मा म्हणजे संपूर्ण जड जगताच्या मागे लपून असलेले अद्वितीय तत्व. संपूर्ण जगतावर नियंत्रण ठेवणाऱ्या या तत्वाला 'ईश्वर' म्हणतात. जीवात्मा शरीर वगैरे उपाधींच्या अधीन होऊन जातो. परमात्मा मात्र जगताच्या उपाधींच्या अधीन होत नाही यामुळे तो जगावर नियंत्रण करु शकतो. जगाचा स्वामीही बनू शकतो. जीव शरीररुपी उपाधींच्या अधीन झाल्यामुळे त्याचा शरीरावर ताबा रहात नाही.

3) **यः अव्ययः ईश्वरः** जो अव्यय म्हणजे अविनाशी ईश्वर आहे. नुकतेच वर ज्याला परमात्मा म्हटले त्याला इथे ईश्वर म्हटले गेले आहे. तो अव्यय आहे म्हणजे कदापि क्षीण होत नाही कारण की तो अतिसूक्ष्म आहे, निर्गुण - निराकार आहे.

4) **लोकत्रयं आविश्य बिभर्तिः** त्रैलोक्यात म्हणजे तिन्ही लोकात प्रवेश करत ज्याला धारण करतो. इथे ईश्वराचे कार्य वर्णिले आहे. माता - पिता ज्याप्रमाणे लेकरांबाबत धर्म पाळतात, तो टाळू शकत नाही त्याचप्रमाणे ईश्वर जगाला निर्माण करतो, जीवाचा भास उत्पन्न करतो, तेव्हा जगताचे पालन - पोषण करणे त्याचा स्वाभाविक धर्म ठरतो. शेतकरी शेतात ज्वारीचा दाणा पेरतो पण नंतर पोषणाच्या साऱ्या क्रिया परमेश्वरच करतो आणि एका दाण्याचे हजार दाणे देतो. यातूनच सारा समाज जिवंत रहातो. परमात्मा सर्वत्र व्याप्त असल्यामुळे प्रत्येक वस्तुच्या आत राहून रात्रंदिवस पोषण - क्रिया करत रहातो. शरीराच्या अणू - अणूतही तो व्याप्त आहे -सामावलेला आहे - यामुळे शरीराच्या प्रत्येक भागाला, अणु - अणुला पोषण पुरवत असतो. शरीरात ईश्वरी शक्ती अद्भुत रित्या आपले कार्य करते. शरीरात काहीही विकार उद्भवला की त्याला सुधारण्यासाठी नारायणी शक्ती कार्य करत असते.

: 18 :

*यस्मात् क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तम: ।*
*अतोऽस्मि लोके वेदे च प्रथित: पुरुषोत्तम: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यस्मात्:** कारण
- **अहं क्षरं अतीत:** मी क्षराहून म्हणजे नाशवान जड वगैरे क्षेत्रापासून तर सर्वथा अतीत आहे
- **च अक्षरात् अपि उत्तम:** आणि अक्षर म्हणजे अविनाशी जीवात्म्याहून उत्तम आहे
- **अत: अहं लोके च वेदे:** यामुळे लोकात आणि वेदातही
- **पुरुषोत्तम: प्रथित: अस्मि:** मी पुरुषोत्तम या नावाने प्रसिध्द आहे

**अर्थ**

कारण मी नाशवान जडवर्ग-क्षेत्रापासून तर पूर्णपणे पलीकडचा आहे आणि अविनाशी जीवात्म्यापेक्षाही उत्तम आहे म्हणून लोकात आणि वेदातही पुरुषोत्तम या नावाने प्रसिध्द आहे.

*मी क्षरा - अक्षराहूनि वेगळा आणि उत्तम ।*
*वेद लोक म्हणे मातें म्हणूनि पुरुषोत्तम ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) मी क्षराहून अतीत - क्षराच्या पलिकडे आहे. 2) आणि अक्षर जीवात्म्याहून उत्तम - श्रेष्ठ आहे. 3) यामुळे लोकात आणि वेदात मी पुरुषोत्तम या नावाने प्रसिध्द आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यस्मात् अहं क्षरं अतीत:** मी क्षर म्हणजे विनाशी पदार्थांच्या पलिकडे - अतीत आहे. भगवंत आपली ओळख करुन देताहेत. सांगताहेत की मी ब्रह्मांडातल्या जड पदार्थांच्या पलीकडे आहे, अतीत आहे. जड पदार्थांमध्ये व्याप्त असूनही परमात्मा त्या पदार्थापासून अलिप्त आहेत. परमात्मा जर मायेपासून अलिप्त राहिले नाहीत तर मायेचा भास कसा करवून देतील ? ईश्वर ज्याचा भास करवून देत आहे ते क्षणिक असल्यामुळे भास करवून देणारा परमात्मा क्षणिक होऊ शकत नाही. यामुळे परमात्मा अलिप्त राहून क्षर म्हणजे नाशिवंत पिंड - ब्रह्मांडात्मक जगताचा भास करवत आहे.

2) **च अक्षरात् उत्तम:** अक्षर जीवात्म्याहून उत्तम, श्रेष्ठ आहे. अक्षर जीवात्म्यापासून अलिप्त असे नाही सांगितले कारण की अक्षर जीवात्मा विनाशी नाही. जगातले सारे पदार्थ विनाशी असल्यामुळे परमात्मा त्यांच्या पलिकडे आहे. तो जीवात्म्याशी संबध्द आहे. ब्रह्मांडातील सारे पदार्थ जड आहेत. परमात्मा जसा चैतन्यस्वरुपी म्हणजे ज्ञानस्वरुपी आहे तसाच अक्षर जीवात्मा चैतन्यस्वरुपी म्हणजे ज्ञानस्वरुपी आहे. परमात्मा आणि जीवात्म्यात साम्य असले तरी काही फरकही आहे. यांच्यात जर काहीही फरक नसता तर जीवात्म्याहून परमात्मा श्रेष्ठ आहे, उत्तम आहे - असे भगवंत म्हणाले नसते. दोघांमध्ये फरक असा आहे की परमात्मा देहात रहात असूनही देहाधीन नाही कारण देहरुपी उपाधीमुळे ईश्वराची ज्ञानस्वरुपता झाकली जात नाही. जीवात्मा ज्ञानस्वरुपी असला तरी देह वगैरे उपाधीमुळे त्याला आपल्या ज्ञानस्वरुपतेचे विस्मरण होते. हेच विस्मरण ज्ञानस्वरुपतेला झाकून टाकते. अज्ञानामुळे ज्ञान झाकले गेले तर जीवात्म्याला ज्ञानस्वरुपतेचा अनुभव येत नाही. परमात्म्याला आपल्या ज्ञानस्वरुपतेचा निरंतर अनुभव असतो. हा फरक जीवात्मा आणि परमात्म्यात आहे.

3) **अत: अहं लोके च वेदे पुरुषोत्तम: प्रथित: अस्मि:** यामुळे लोक आणि वेदात मी पुरुषोत्तम रुपाने प्रसिध्द आहे. जीव आणि परमात्मा एक आहेत पण जीव अज्ञानामुळे शरीर वगैरे उपाधींमध्ये आसक्त होऊन मर्यादित, संकुचित बनून जातो पण परमात्मा भिन्न - भिन्न शरीरांच्या आणि ब्रह्मांडाच्या उपाधींमध्ये आसक्त नसल्यामुळे अर्मादित, अलिप्त असतो. यामुळेच लोकात आणि वेदात म्हणजे वेदान्त शास्त्रात, परमात्मा 'पुरुषोत्तम' या नावाने ओळखला जातो. जीवात्म्याहून परमात्मा उत्तम आहे, श्रेष्ठ आहे, हे सांगून त्या 'उत्तम पुरुष' शब्दाचे रुपांतर 'पुरुषोत्तम' असे केले. उत्तम पुरुष म्हणजे पुरुषोत्तम.

विनोबांनी 'गीता प्रवचना' त सांगितले आहे की या अध्यायात वेदान्तातील मुख्य गोष्ट सांगितली आहे. पंधराव्या अध्यायाच्या प्रवचनात विनोबांनी खूप चांगला विचार मांडला आहे. परमात्मा, हा उत्तम पुरुष म्हणजे

पुरुषोत्तम असल्यामुळे 'सेव्य' आहे आणि जीवात्मा कनिष्ठ असल्यामुळे ईश्वराचा सेवक आहे. सेव्य परमात्मा आणि सेवक जीवात्मा. ही क्षर म्हणजे सतत बदलणारी सृष्टी ईश्वराची सेवा - पूजा करायचे द्रव्य आहे. याचा अर्थ असा की सृष्टीतले भगवंताने निर्माण केलेले सारे पदार्थ जीवांच्या भोगासाठी निर्माण केले नसून ईश्वराच्या पूजेसाठी बनवले आहेत. केवळ फुलेच काही पूजाद्रव्य नाही, सृष्टीतले सारे पदार्थ ईश्वराच्या पूजेसाठी आहेत. देह आणि इंद्रियेसुध्दा ईश्वराच्या पूजेसाठी आहेत. शरीराकडून घडणारी सारी सत्कर्मे ही ईश्वरालाच अर्पण करायची आहेत. तेही पूजाद्रव्य आहे. अशा प्रकारे आपण स्वत: ईश्वराचे सेवक भक्त आहोत. ईश्वराची भक्ती करणे, त्याना जीवनातील सर्व क्रिया अर्पण करुन जगणे, हाच आपला धर्म आणि आपले कर्तव्य आहे. इथे हा सवाल उपस्थित होऊ शकतो की क्षर म्हणजे सृष्टी विनाशी आहे तरी त्यासोबत पुरुष शब्द का जोडला गेला ? याचे उत्तर असे की क्षर सृष्टी स्वतंत्र वस्तु नसून त्याच्या पाठीमागेही ईश्वरच आहे. यामुळे सृष्टी बाह्यत: जरी नाशवान वाटत असली तरी ज्या ईश्वराच्या आश्रयाने भासित होत आहे, तो परमात्मा नाशवान नाही. जीवात्मा तर ईश्वराचे प्रकट स्वरुप आहे, त्यामुळे त्याला 'अक्षर पुरुष' म्हटलेच आहे. परमात्मा उत्तम पुरुष आहे. अशा प्रकारे क्षर पुरुष, अक्षर पुरुष आणि उत्तम पुरुष असे तीन पुरुष झालेत. क्षर पुरुष म्हणजे नित्य बदलणारी सृष्टी. अक्षर पुरुष सेवक, भक्त. उत्तम पुरुष सेव्य, उपासक. भक्तीपूर्वक साधना केली गेली तर परमात्म्याचा अनुभव सुलभतेने होऊ शकतो.

इथे आणखी एक गोष्ट सांगितली आहे की परमात्मा हा शास्त्रात म्हणजे वेदान्त शास्त्रात पुरुषोत्तम नावाने प्रसिध्द आहे. लोकात तर प्रसिध्द आहेच, वेदान्त शास्त्रातही आहे. परमात्म्याच्या उपासनेसाठी सगुण ब्रह्म तत्वाची कल्पना केली गेली आहे. त्याला शास्त्रात 'पुरुषोत्तम' नाव दिले गेले आहे.

: 19 :

*यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।*
*स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत:** हे अर्जुना
- **य: असंमूढ:** जो मोहरहित म्हणजे ज्ञानी पुरुष
- **एवं:** अशा प्रकारे याप्रमाणे तत्त्वत:
- **पुरुषोत्तमं मां:** मला पुरुषोत्तमाला
- **जानाति:** जाणतो, समजतो
- **स सर्वविद्:** तो सर्वज्ञ पुरुष
- **मां सर्वभावेन भजति:** मज वासुदेव परमेश्वराला सर्व प्रकारे भजतो

**अर्थ**

हे भारता म्हणजे अर्जुना, जो ज्ञानी पुरुष मला अशाप्रकारे तत्त्वत: पुरुषोत्तम म्हणून जाणतो, तो सर्वज्ञ पुरुष सर्व रीतीने नेहमी मला वासुदेव परमेश्वरालाच भजतो.

*मोह सारुनि जो दूर जाणे मी पुरुषोत्तम ।*
*सर्वज्ञ तो सर्व - भावें सर्व रुपीं भजे मज ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) जो मोहरहित पुरुष अशा प्रकारे मला पुरुषोत्तमाला जाणतो. 2) तो सर्वज्ञ आणि महाज्ञानी पुरुष होय. तो सर्वत्र माझा भाव राखतो म्हणजे सर्वत्र मी आहे, असे समजून भक्तीभावनेने सर्व काही मला अर्पण करुन भजतो.

**स्पष्टीकरण**

1) **भारत य: असंमूढ: एवं पुरुषोत्तमं मां जानाति:** जो निर्मोही पुरुष मागील दोन श्लोकात वर्णन केल्यानुसार मला भजतो, मला पुरुषोत्तमाला जाणतो. मागील श्लोकांमधून पुरुषोत्तमाचे स्वरुप वर्णिले आहे. या श्लोकात सांगताहेत की या पुरुषोत्तमाला जाणून घ्यायचे असेल, याचे ज्ञान प्राप्त करुन घ्यायचे असेल तर मोह घालवावा लागेल. मोह विवेकाला कसा झाकून टाकतो हे पहिल्या अध्यायात सांगितले आहे. संपूर्ण प्रपंच आणि जग शोक, मोहावर उभे ठाकले आहे. शोक, मोहाचे कारण ममत्व आहे. कुणी

प्रपंचात असो वा संस्थेत चित्ताच्या ठायी जोवर देहरुपता असते तोवर चित्त मोह - ममता शून्य होत नाही. अखेर अठराव्या अध्यायातल्या 73 व्या श्लोकात अर्जुनाने सांगितले की आपल्या कृपेने माझा मोह नष्ट झाला आहे.

2) **सः सर्वविद् मां सर्वभावेन भजतिः** तो सर्वज्ञ वा महाज्ञानी पुरुष असतो. तो सर्वत्र ईश्वरभाव बाळगतो. सर्वत्र ईश्वरच आहे असा भक्तीभाव राखतो, सारे काही ईश्वराला अर्पण करुन देवाला भजतो. या श्लोकात ज्ञान प्राप्त झाल्यावर भक्ती सांगितली आहे. गीतेत असे ठिकठिकाणी आले आहे की ज्ञानप्राप्तीचे अतिसुलभ साधन भक्ती आहे पण ज्ञान प्राप्त झाल्यावर परिपूर्ण अद्वैत भक्ती प्रकट होते असेही निरुपण आहे. हा गीतेचा विशेष विचार आहे. विनोबांच्या मते वेदान्तच भक्ती आहे. पंधराव्या अध्यायाच्या प्रवचनात विनोबा म्हणतात की जिथे ज्ञान आहे तिथे प्रेम म्हणजे भक्ती आहेच. परमेश्वराचे ज्ञान आणि परमेश्वराची भक्ती - प्रेम या दोन निराळ्या गोष्टी नाहीत. कारले कडू असते. ते कडू असते हे ज्ञान प्रेम उत्पन्न करणार नाही. साखरेचे ज्ञान प्रेम उत्पन्न करते. जीभेला साखरेचा स्पर्श होताच तोंडाला पाणी सुटते म्हणजे स्नेह - प्रेम उत्पन्न होते. खूप आनंद होतो. परमेश्वराचे ज्ञान आणि परमेश्वराचे प्रेम दोन वेगळ्या गोष्टी नाहीत. दोन्ही एकरुप आहेत. परमेश्वराचे ज्ञान होताच प्रेमभाव म्हणजे भक्तीभाव उत्पन्न होतो. आत भक्ती उत्पन्न झाली तर करुणा जागते. बाह्य आचरण बदलते. दुःखी जनांची, उपेक्षित लोकांची, दीन - दुबळे, गरीब, मजूर - शेतकरी श्रमणाऱ्यांची सेवाही प्रकटते. अशा प्रकारे परमेश्वराचे स्वरुप ज्ञान झाले म्हणजे भक्ती, प्रेम आणि सेवा तिन्ही प्रकटल्याशिवाय रहात नाही.

गीता एक परिपूर्ण ग्रंथ आहे. ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, सेवामार्ग अशा प्रकारे तीन मार्गांची कल्पना गीतेने नाही मांडली. तिन्ही एकरुप म्हणजे समरुप आहेत. तिन्ही जीवनात परिपूर्णरित्या प्रकट व्हायला हवेत. गीता एकांगी जीवनाला आदर्श जीवन मानत नाही. ज्ञान, भक्ती, सेवा तिन्ही परिपूर्णतेने जीवनात प्रकट व्हाव्यात हा गीतेचा आदर्श आहे. केवळ ज्ञानात शुष्कता आहे. यामुळेच एकच ज्ञानी पुरुषाच्या तीन अवस्था प्रकट होतात. असा खूप छान विचार विनोबांनी मांडला. ज्ञानावस्थेत केवळ परमात्माच आहे, जगत जणू नाहीच नाही. ज्ञानावस्थेचा हा विचार वैराग्याच्या उंच शिखरावर पोहोचवतो. वैराग्य हे ज्ञानाचे अभेद्य लक्षण आहे. एकमात्र परमात्माच परमात्मा केवळ आहे, जगत नाहीच ही एक भूमिका आहे. ही निर्गुण भूमिका आहे. जगत् परमात्म स्वरुप आहे ही भाव भूमिका - भक्तीची भूमिका आहे. यात जगताचा निषेध केला नाही. जगत् सत्य नाही, भासरुपच आहे पण परमात्म्याचा भास आहे यामुळे जगत् सुंदर आहे. जिथे भाव भूमिका - भक्ती भूमिका आली तिथे सेवा आपोआपच येऊन जाते.

: 20 :

*इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयाऽनघ।*
*एतद्बुद्ध्वा बुद्धिमान् स्यात् कृतकृत्यश्च भारत॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनघ भारतः** निष्पाप अर्जुना
- **इति इदं गुह्यतमं शास्त्रंः** अशा प्रकारे हे अतिगूढ म्हणजे अत्यंत रहस्यपूर्ण शास्त्र
- **मया उक्तंः** मी सांगितले
- **एतत् बुद्ध्वाः** याचे तत्त्वज्ञान तत्त्वतः जाणून, समजून घेतल्याने
- **बुध्दिमान च कृतकृत्यः** माणूस बुध्दीमान आणि कृतकृत्य
- **स्यात्ः** होऊन जातो

**अर्थ**

हे निष्पाप अर्जुना, असे हे अतिरहस्ययुक्त गुप्त शास्त्र मी तुला सांगितले आहे, याचे तत्त्वतः ज्ञान करुन घेतल्याने मनुष्य ज्ञानवान आणि कृतार्थ होतो.

*अत्यंत गूढ हें शास्त्र निर्मळा तुज बोलिलों।*
*हें जाणे तो बुध्दिमंत होईल कृत-कृत्य चि॥*

**विषयः** या श्लोकात चार गोष्टी येतात. 1) हे निष्पाप अर्जुना. 2) अशाप्रकारे अत्यंत गूढ, सूक्ष्म सारभूत शास्त्र मी सांगितले. 3) याला समजून घेऊन माणूस बुध्दिमंत. 4) आणि कृतकृत्य होऊन जातो.

**स्पष्टीकरण**

1) इथे अर्जुनाला आधी निष्पाप म्हणजे पापरहित म्हटले आहे. हे साभिप्राय आहे याला काही अर्थ आहे. गीतेच्या तत्वज्ञानाला भगवंतांनी या श्लोकात 'शास्त्र' ही संज्ञा दिली. हे शास्त्र वाचायचा अधिकार कुणाला? ते इथे सांगितले आहे. ज्याचे जीवन पापरहित म्हणजे विशुध्द आहे तोच या शास्त्र पठणाचा अधिकारी आहे. संत तुलसीदासांनी म्हटले आहे.

*राम कथा के ते अधिकारी ।*
*जिन्हके सत - संगति अति प्यारी ॥*

अर्थात् ज्याना सत्संग अतिशय प्रिय आहे, ते रामकथेचे अधिकारी जन होत.

अर्जुनाच्या जीवनात मोह अवश्य आला होता पण त्याचे जीवन पवित्र होते. यामुळे मोह जागताच परमात्मविषयक जिज्ञासा उपजली. जीवन पवित्र असेल तर कठिण प्रसंगी, विपरित प्रसंग आल्यावर वैराग्य उत्पन्न होते आणि प्रपंचविषयक आसक्ती सोडायची आणि ईश्वराला जाणून घ्यायची जिज्ञासा जागते. अर्जुनाची स्थिती अशाप्रकारची असल्यामुळे भगवंताने त्याला पात्र मानून परमात्म स्वरुपाचे ज्ञान करवण्याचा प्रयत्न केला.

2) **इति इदं गुह्यतमं शास्त्रं मया उक्तम्:** अशा प्रकारे अत्यंत गूढ, सूक्ष्म, सर्व शास्त्रांचे सारभूत शास्त्र मी (तुला) सांगितले. इथे गीतेला 'शास्त्र' म्हटले आहे. हे सामान्य शास्त्र नाही. हे अतिगुह्य म्हणजे गूढ शास्त्र आहे कारण की या शास्त्राचा विषय अत्यंत सूक्ष्म आहे. ब्रह्मांडात व्याप्त परमात्मा वा पिंडात निहित परमात्मा काही इंद्रिय गोचर नाही. याशिवाय परमात्म्याचे मूळ स्वरुप निर्गुण असल्यामुळे त्याचे ज्ञान कसे प्राप्त होईल, हे सहजपणे लक्षात येत नाही. निर्गुण परमात्मा कशाप्रकारे सगुण साकार होऊन जातो, त्याची भक्ती कशी करावी, मोक्षाचे स्वरुप काय? कर्मयोग, कर्मसंन्यास, ध्यानयोग, आत्मानात्म - विवेक, माया, अविद्या या सर्वांचे वास्तविक - यथार्थ - स्वरुप काय आहे? याबाबतीतही सहजतेने स्पष्टता काही होत नाही. यामुळे हे गीताशास्त्र अत्यंत गूढ आहे.

शंकराचार्यांनी आरंभी उपोद्घातात असे म्हटले आहे की हे गीता शास्त्र सर्व वेदांचे सारभूत शास्त्र आहे पण समजून घ्यायला अवघड आहे. अर्जुनानेही मध्ये - मध्ये अशा प्रकारचे प्रश्न विचारले आहेत की भगवंताने समजाऊन सांगितल्यावरही त्याच्या लक्षात नेमकेपणाने आले नाही, असे वाटते.

हे गीताशास्त्र वेदांचा सारांश आहे. वेदात तर अद्वैताचीच स्थापना केली आहे, गीतेत द्वैत आहे की अद्वैत असाही प्रश्न उपस्थित केला गेला. मध्वाचार्यांनी गीतेचे रहस्य 'द्वैत'च वर्णिले आहे म्हणजे जीव ईश्वरापासून उत्पन्न होतो, जगत्ही ईश्वरापासून निर्माण होते आणि दोघे ईश्वरापासून भिन्न आहेत. रामानुजाचार्यांनी गीतेत 'विशिष्टाद्वैत' असल्याचे प्रतिपादन केले. वल्लभाचार्यांनी आपल्या गीताभाष्यात 'शुध्दाद्वैत' सांगितले. शंकराचार्यांनी 'केवलाद्वैत' मांडले. हे चारही आचार्य प्रभावशाली होते. यातून असे लक्षात येते की गीता सुलभ प्रकारची रचना असताना आणि सुगम भाषेत असतानाही खूप मतभेद आहेत म्हणजे गीतेचे तत्वज्ञान सुलभ नाही.

शंकराचार्यांच्या मतानुसार 1) संपूर्ण विश्वात एक परमात्मा व्याप्त आहे. जगत् मिथ्या आहे. 2) जीवात्मा मूलत: ईश्वरापासून भिन्न नाही केवळ अज्ञानाच्या कल्पनेमुळे जीवात्मा भिन्न वाटतो. 3) ईश्वर आणि जगत्, ईश्वर आणि जीवात्मा दोघे एक आहेत. त्यांच्या ठायी अजिबात अंतर नाही, हा अनुभव म्हणजे मोक्ष होय.

रामानुजाचार्यांचे मानणे आहे की एकाच ईश्वराची दोन प्रकारची शरीरे आहेत एक जीव चित् दुसरे जगत अचित् आणि ईश्वर त्याशी युक्त - संलग्न आहे. जीव वा जगत् मिथ्या नाहीत पण जीव अज्ञानाच्या अधीन असल्यामुळे त्याला दु:ख होते. ईश्वर भक्तीने त्याला ज्ञान प्राप्त झाल्यावर मोक्ष प्राप्त होऊ शकतो.

मध्वाचार्यांच्या मतानुसार जीव, जगत व ईश्वर तिन्ही भिन्न आहेत. नदी सागराहून भिन्न आहे पण ती सागरात विलीन होऊन जाते तसाच जीव ईश्वराहून भिन्न असतानाही ईश्वर भक्तीमुळे ईश्वराशी एकरुप होऊन मोक्ष प्राप्त करु शकतो.

जीव ब्रह्म म्हणजे ईश्वराच्या ठिणग्या आहेत असे मत वल्लभाचार्यांचे आहे. जीव जेव्हा शुध्द होतो. तेव्हा त्याचे

ईश्वराशी ऐक्य होऊन जाते. माया एक शक्ती आहे. माया ईश्वराहून भिन्न आहे. मूळात ईश्वराची शक्ती असूनही माया ईश्वराहून भिन्न आहे.

या चारी आचार्यांच्या चिंतनात तत्वज्ञान विषयक अशी मतांतरे आहेत. यामुळे सर्वांनी आपापल्या चिंतनानुसार अर्थ शोधला - सार निवडले. याशिवाय गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय ज्ञान की भक्ती याबाबतही मतभेद आहेत. अशाप्रक ारे गीतेचे तत्वज्ञान गहन आहे. एवढे असतानाही गीता हिंदुस्तानात सर्वमान्य ग्रंथ आहे आणि या ग्रंथावर सर्वांचीच भक्ती आहे.

3) **एतत् बुद्ध्वा बुध्दिमान्:** हे जाणून माणूस बुध्दिमंत होतो. गीता शास्त्राचे सहस्य जाणून घेतल्यावर माणूस बुध्दीमान होतो म्हणजे त्याची बुध्दी शुध्द होऊन जाते. बुध्दी शुध्द असेल तरच ज्ञान लाभते. आजकाल नाना विषयात ज्याची बुध्दी खूप चालते त्याला बुध्दीमान मानले जाते. प्रत्येक विषय आणि शास्त्राचे ग्रहण ज्याच्या बुध्दीला चांगल्या प्रकारे होते तो 'बुध्दीमान' मानला जातो. प्राचीन काळी ज्याची बुध्दी अतिशय निर्विकार असायची त्याला बुध्दीमान मानले जात असे.

4) **च कृतकृत्यः स्यात्:** कृतकृत्य होऊन जातो. आत्मज्ञान अखेरचा मुक्काम आहे. तो गाठल्यावर मग काही मिळवणे शिल्लक रहात नाही. या स्थितीत तृप्ती समाधानच वाटते. चित्तात ज्यावेळी संपूर्ण स्वास्थ्य, संपूर्ण समाधान नसते, त्यावेळी अधूरेपणा वाटतो. अशावेळी पूर्ण संतोष, पूर्ण समाधान, पूर्ण शांती मिळवायची धडपड असते पण आत जेव्हा ईश्वराचा अनुभव येऊ लागतो त्यावेळी पूर्णतेचा अनुभव येतो. तिथे प्रयत्न पूर्ण होतो म्हणजे वृत्तीत शिथिलता येत नाही. ती स्थिती सहजच स्थिरावते., कायम टिकून रहाते. प्रारब्ध कर्मे असेपर्यंत देहधारण करावे लागतात, तोवर अहंकार वगैरे विकार उत्पन्न होण्याची संपूर्ण शक्यता असते. यामुळे परिपूर्णतेचा अनुभव प्राप्त केल्यावरही आपण पूर्णता प्राप्त करुन घेतली असे तो कधी मानत नाही. यामुळे पूर्णता प्राप्त होण्याचा अनुभव घेत - मिळवत - अखंड जागृती सहजीच कायम राहील. यामुळे वृत्तीत लाटा उत्पन्न न होता वृत्ती पूर्णपणे स्थिर राहील. शंकराचार्यांनी आपल्या गीताभाष्यात कृतकृत्य शब्दाचा खूप छान अर्थ केला आहे विशिष्टजन्मप्रसूतेन ब्राह्मणेन यत् कर्तव्यं तत् सर्वं भगवत्तत्त्वे विदिते कृतं भवेद् इत्यर्थः। अन्यथा कस्यचित् कर्तव्यं न परिसमाप्यते इति अभिप्रायः।

अर्थात् भगवत् स्वरुप जाणून घेतले म्हणजे विशेष संस्कारसंपन्न कुळात जन्मलेल्या ब्राह्मणाला जी कर्तव्ये करावी लागतात ती केल्यासारखे होते. अन्य कुठल्याही प्रकारे कुणाचेही कर्तव्य पूर्ण होत नाही.

परमात्मस्वरुपाची ओळख झाल्यावर काहीही कर्तव्य करण्यासारखी स्थिती उरत नाही. अर्थात् स्वतः साठी काहीही करायला उरत नाही पण ज्ञानी पुरुषासाठी लोकसेवेचे कार्य आचरणे शेष उरते. त्यावर ही विशेष जबाबदारी असते यातून तो मुक्त होऊ शकत नाही. आजीवन लोकसेवेचे कार्य अखंडपणे सुरुच असते. ब्राह्मणाचे विशेष कर्तव्य मानले गेले होते ईश्वरी ज्ञान प्राप्त करणे. ईश्वर स्वरुपाची ओळख झाली म्हणजे ते कर्तव्य पूर्ण होऊन जाते असे इथे आचार्य सांगताहेत. यासोबत हेही सांगताहेत ही ईश्वरी स्वरुपाचा अनुभव प्राप्त करुन घेतल्याशिवाय कुणाचेही कर्तव्य समाप्त होत नाहीत, परिपूर्ण होत नाहीत, मानवी देहाचे अंतिम लक्ष्य ईश्वर ज्ञान प्राप्त करुन घेणे हेच आहे.

विनोबांचे निवेदन आहे की इथे गीता स्वतःच सांगत आहे की मी हे तुला अत्यंत गूढ असे शास्त्र सांगितले आहे, याचा अर्थ असा की इथे गीताशास्त्र संपून जाते. सोळावा अध्याय परिशिष्ट आहे. सतरावा अध्यायही परिशिष्ट असून अठरावा अध्याय उपसंहार आहे.

• • • *अध्याय पंधरावा संपूर्ण* • • •



## अध्याय - सोळावा

# दैवासुरसंपद् विभागयोग

(या अध्यायात दैवी गुण आणि आसुरी वृत्तींचे वर्णन आहे. आरंभिक तीन श्लोक दैवी संपत्तीच्या गुणांचे वर्णन करताहेत. प्रत्येकाने आपल्या जीवनात या गुणांच्या विकासासाठी आत्मानुभव होऊ शकेल.)

: 1 :

**श्रीभगवान् उवाच**

*अभयं सत्वसंशुध्दिर्ज्ञानयोगव्यवस्थिति: ।*
*दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अभयं:** निर्भयता
- **सत्त्वसंशुध्दि:** उत्तम प्रकारे अंत:करणाची म्हणजे चित्ताची शुध्दता म्हणजे स्वच्छता
- **ज्ञानयोगव्यवस्थिति:** ज्ञान व योगविषयक निष्ठा म्हणजे तत्त्वज्ञानाकरता ध्यानयोगात निरंतर दृढ स्थिती
- **दानं:** सात्विक दान
- **च दम:** आणि दम म्हणजे इंद्रियांचे दमन
- **च यज्ञ:** आणि यज्ञ म्हणजे भगवत्पूजन आणि अग्निहोत्र वगैरे उत्तम कर्मांचे आचरण
- **स्वाध्याय:** स्वाध्याय म्हणजे वेदशास्त्रांचे पठन-पाठनपूर्वक भगवंताचे नाव व गुणांचे संकीर्तन
- **तप:** तप म्हणजे स्वधर्माचे पालन करण्यासाठी कष्ट सोसणे
- **आर्जवम्:** शरीर व इंद्रिये यांसह अंत:करणाची सरळता

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले भयाचा पूर्ण अभाव, अंत:करणाची पूर्ण निर्मळता, तत्त्वज्ञानाकरता ध्यानयोगात निरंतन दृढ स्थिती ( तत्त्वत: परमात्मस्वरुप जाणण्यासाठी परमात्मस्वरुपात एकरुप होऊन ध्यानाची अखंड गाढ स्थिती असणे म्हणजेच ज्ञानयोगव्यवस्थिती होय.) आणि सात्विक दान, इंद्रियांचे दमन, भगवान, देवता आणि गुरुजनांची पूजा, तसेच अग्निहोत्र इत्यादी उत्तम कर्मांचे आचरण, त्याचप्रमाणे वेदशास्त्रांचे पठन-पाठन, भगवंताच्या नामांचे व गुणांचे कीर्तन, स्वधर्माचे पालन करण्यासाठी कष्ट उपसणे, सोसणे आणि शरीर व इंद्रियांसह अंत:करणाची सरळता.

**श्री भगवान म्हणाले**

*निर्भयत्व मन:शुध्दि योग - ज्ञानीं सुनिश्चय ।*
*यज्ञ निग्रह दातृत्व स्वाध्याय ऋजुता तप ॥*

**विषय:** या श्लोकात दैवी संपत्तिच्या नऊ गुणांचे वर्णन आलेले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अभयं:** निर्भयता. कुणाला भिऊ नये असा सामान्यपणे निर्भयता शब्दाचा अर्थ लावला जातो. विनोबांनी या शब्दाचा अर्थ निरुपित केला आहे की कुणाला भिऊ नये हा अर्थ तर निर्भयता शब्दात सामावलेला आहेच पण जो कुणाला भीत नाही तो इतराना भिववतो सुध्दा, यामुळे कुणाला भयभीत करु नये म्हणजे त्याला निर्भय बनवणे. स्वत: निर्भय बनणे आणि समोरच्याला निर्भय बनवणे, आपल्या सारखेच सारे निर्भय बनोत असा प्रयत्न करावा. कुणाला भिऊ नये याचा अर्थ अविनयी बनावे - उध्दट बनावे असा नाही होत. आजकालच्या युवकांनी ही खूणगाठ मनी धरायला हवी की कुणाच्या स्वाधीन न होणे

- स्वच्छंदी बनणे - ही काही निर्भयता नव्हे. त्यासोबत नम्रताही हवीच. नम्रता वा अहिंसेच्या अभावी सत्यपालन करणे शक्य नाही आणि सत्यपालनाशिवाय निर्भयता नाही, यामुळे कुणाच्या चित्तात कदापि भय उपजणार नाही. आध्यात्मिक साधनेतही निर्भयता गरजेची आहे. मनात उत्पन्न विकारांना रोखण्यासाठी ध्यानाचा अभ्यास साधक करतो पण मनात काम-विकार उफाळून येतात. अशा समयी विकाराना हटविण्यात तात्कालिक थोडे यश लाभले नाही आणि भय उपजले तर काम - विकारावर विजय संपादन करणे अवघड होऊन बसते. यामुळे साधना करताना मनात जो काही अडथळा निर्माण होतो, त्याला भ्यायला नको. धैर्यपूर्वक निर्भयतेने सतत अडथळा हटवण्याचा प्रयत्न करायला हवा. मनी हा विश्वास राखायला हवा की अखेर विजय लाभेल.

2) **सत्वसंशुध्दिः** चित्ताची शुध्दता. सर्वांशी कपटरहित शुध्द व्यवहार. शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र भाष्यात सिध्दांत प्रतिपादित केला आहे की चित्ताच्या शुध्दतेशिवाय ईश्वर ज्ञान लाभत नाही. गीता भाष्याच्या आरंभीही हाच सिध्दांत आहे. विविध प्रकारच्या साधनांचे लक्ष्य चित्ताची शुध्दता असायला हवे. वाटेल तेवढी साधना केली तरी काही त्यामुळे ईश्वर ज्ञान प्राप्त होत नाही, त्या साधनांमुळे निर्विकारता जागते, चित्त शुध्दी साधते. निरहंकारी भावनेने फलाशेचा त्याग करुन साधना व्हायला हवी. साधनेत जर निष्काम भाव नसला तर चित्त - शुध्दी शक्य नाही. चित्त शुध्दीशिवाय ईश्वरी ज्ञान होणे शक्य नाही. याचा अर्थ असा की आपले ध्येय चित्ताला शुध्द करायचे असायला हवे वा पूर्ण निर्विकारता साधायला हवी.

3) **ज्ञानयोगव्यवस्थितिः** ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. योग म्हणजे ज्ञानप्राप्तीचा उपाय, म्हणजे चित्ताची समता, निर्विकारता, ध्यान वगैरे विविध साधना. ज्ञान आणि योग या दोघांविषयी निष्ठा बाळगायला हवी.

ज्ञान आणि योग चा अर्थ शंकराचार्य सांगतात ज्ञानं शास्त्रत: आचार्यत: च आत्मादिपदार्थानाम् अवगम: - अर्थात् ज्ञान म्हणजे शास्त्र, आणि आत्मा वगैरे पदार्थांचे आचार्यांपासून ज्ञान. योग विषयी लिहितात - अवगतानां इन्द्रियाद्युपसंहारेण एकाग्रतया स्वात्मसंवेद्यतापादनं योग: अर्थात् आत्मा, ब्रह्म, वैराग्य, ध्यान इत्यादीविषयक ज्ञान प्राप्त करुन इंद्रिये व तत्संबध्द सर्व वस्तुंना ताब्यात घेऊन, मनाला इंद्रियनिग्रह वगैरे साधनांमध्ये एकाग्र करत असताना ईश्वराचा स्वत: अनुभव घेणे योग होय. (अनुभव प्राप्त करुन घेणे)

ही व्याख्या महत्वाची आहे. ब्रह्म, ईश्वर, आत्मा वगैरें विषयक ज्ञान मिळवणे एवढे कठिण नाही कारण की ते बुध्दीचे विषय आहेत पण या बौध्दिक ज्ञानाला अमलात आणणे, आत्मसात करणे अवघड विषय असून तेच मुख्य कार्य आहे. दोघांविषयी मनात निष्ठा असायला हवी. ईश्वर, ब्रह्म यांच्या संदर्भात जर योग्य प्रकारे ज्ञान संपादित केले नसेल तर अमलात काय आणि कसे आणावे ? हे लक्षात येऊ शकणार नाही. यामुळे आधी या तमाम आध्यात्मिक विषयांचे ज्ञान योग्य प्रकारे संपादित करुन घ्यावे लागेल. निष्ठा म्हणजे अखंडपणे प्रयत्न जारी राखणे होय. प्रयत्न करत असताना जेव्हा योग्य प्रकारे समजत नाही - लक्षात येत नाही - त्यावेळी निराशा येऊ लागते. निराशा येऊ नये यासाठी आचार्यांनी इथे 'निष्ठा' शब्दाचा प्रयोग केला आहे. या सर्व गोष्टींना जाणून घेतल्यानंतर आपण जेव्हा अमलात आणण्याचे प्रयत्न करतो तेव्हा येणाऱ्या अडी - अडचणींचा सामना करत परत निराशा वाव्याला येते पण निराश - नाऊमेद न होता, आपण साधनेत अविरत प्रयत्नरत असावे, यासाठी योग शब्दासाठी 'निष्ठा' शब्द प्रयुक्त केला आहे.

4) **दानम्:** समाजाला अर्पण करायची, दानाची वृत्ती, उदा :- संपत्ती दान, ज्ञान-दान, श्रम-दान वगैरे. ज्या समाजात दान-वृत्ती क्षीण होऊन जाते, तो समाज टिकाव धरुन राहू शकत नाही. त्या समाजाचे उत्थान होऊ शकत नाही. दान वृत्ती घटण्याचा अर्थ स्वार्थ वृध्दी वाढणे होय. स्वार्थी वृत्तीने कुणाचे कल्याण होत नाही. विनोबांनी भूदान, ग्रामदान, संपत्ती दान, श्रमदान, ज्ञानदान वगैरे अनेक प्रकार सुरु करुन दान वृत्तीला वाढवण्यासाठी प्रयत्न केलेत. दानाचा अर्थ शंकराचार्य सांगतात - दानं अन्नादीनां यथाशक्ति संविभाग: अर्थात् --अन्न वगैरे जीवनोपयोगी वस्तुंचे समाजात समान वितरण.

5) **दम:** इंद्रियांचे दमन, इंद्रियांचा निग्रह - इंद्रियांवर ताबा मिळवण्यासाठी विवेकाचा सराव गरजेचा आहे. आपले प्रत्येक काम विवेकाधारित असेल असा निश्चय करावा लागेल. चित्ताच्या ठायी विकार उत्पन्न होतात. त्यांच्या अधीन होऊन कार्य करु नये. विवेक आणि

विवेक यात नेहमी संघर्षाची ठिणगी उडत रहाते. विवेक कल्याणाची वाट दाखवतो. विकार बाह्य सुख-दु:ख बघतो. विवेकाच्या मार्गदर्शनाने वाटचाल केल्याने कल्याण होईल असे मानून इंद्रियांना विवेकाधीन राखण्याचा सराव करायला हवा.

6) **यज्ञ:** परोपकारार्थ जनसेवा. यात शरीर आत्म्याचाही अंतर्भाव आहे. शरीर श्रम टाळण्याकडे सर्वसामान्यपणे कल असतो. गांधीजी आणि विनोबांनी शरीर श्रमाला खूप महत्व दिले आहे. प्राचीन काळी ऋषी-मुनी स्वत:ला शरीर श्रमापासून मुक्त मानत असायचेत. या कल्पनेत गांधीजींनी बदल घडवून आणला. संन्याश्यांच्या जीवनात परोपकारार्थ सेवा आणि शरीरश्रम या दोन गोष्टी विशेषत: असायलाच हव्यात. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातल्या 10 ते 16 या सात श्लोकांमधून यज्ञाचे विवेचन आले आहे.

7) **स्वाध्याय:** सद्ग्रंथांचा अभ्यास, जप, ध्यान वगैरे. स्वाध्यायात दोन्ही गोष्टींचा समावेश होतो. शाळा - महाविद्यांलयांमध्ये शिक्षण काही स्वाध्याय नाही. विद्यार्थी खूप मन:पूर्वक रात्रंदिवस अभ्यास करतात पण तो अभ्यास परमात्म ज्ञानाशी संबध्द नसल्यामुळे काही स्वाध्याय म्हणवला जात नाही. ईश्वर ज्ञानाची तीव्र जिज्ञासा असल्यावरच तसा अभ्यास होऊ शकतो पण स्वाध्यायाचा अर्थ केवळ अभ्यास नाही. अभ्यास तर शास्त्री आणि पंडितही करतात. अभ्यासात केवळ माहिती संकलनाची दृष्टी असायला नको. ईश्वर ज्ञान मिळवण्यासाठी ध्यान, भक्ती, वैराग्य इत्यादींच्या साधनेचे ध्येय असावे आणि ती साधाना स्वाध्यायासोबत जारी असली तर तोच स्वाध्याय म्हणवला जातो. स्वाध्यायाचा एक अर्थ स्व - अध्ययन, आत्म - अध्ययनही आहे.

8) **तप:** कायिक, वाचिक, मानसिक तप. तपाने तमोगुणाला क्षीण करायला मदत लाभते. देहभाव क्षीण करण्यासाठी तप अनिवार्य आहे. तपात एकांगीपणा येणार नाही याबाबत दक्षता घ्यायला हवी. इंद्रियांवर ताबा मिळवण्यासाठी एकीकडे तप आणि दुसरीकडे संयम अशा दोघांची गरज आहे. तप आणि संयम परस्परपूरक आहेत. निग्रह शब्दात तप आणि संयम दोघांचा समावेश होतो. तपावर संयमाचे नियंत्रण नसेल तर तप केवळ शरीर - क्लेश उरेल. संयमरहित तप भोगाकडे वळू शकेल. यामुळे तपाचे वळण संयमाकडे आणि संयमाची दिशा तपाकडे असली पाहिजे. आपण संयमपूर्वक लाडू खाऊ शकतो म्हणून लाडू खाण्यात काही हरकत नाही, असे संयम सांगू लागेल पण तप सूचना देईल की संयमपूर्वक लाडू खाऊ शकतो पण शरीरासाठी लाडू अनावश्यक असल्यामुळे लाडू खायची गरज नाही. यामुळे साधक वा मुमुक्षु जनांसाठी लाडू त्याज्य आहेत असे मानायला हवे. अशाप्रकारे तप आणि संयम याना भाऊ - भाऊ मानून वाटचाल केली तर संतुलन राहील.

9) **आर्जवम्:** चित्ताची सरळता. हा फार महत्वाचा मुद्दा आहे. सरळता हा सत्याकडून आलेला गुण वा धर्म आहे. अर्जुन शब्द ऋजु धातुपासुन बनला आहे. ऋजु या धातुपासून ऋजुता म्हणजे सरळपणा हा शब्द तयार झाला. अर्जुन नावाप्रमाणे सरळ होता. सरळतेमुळे ईश्वराच्या वास्तविक स्वरुपाचे ग्रहण त्वरित होऊन जाते.

: 2 :

***अहिंसा सत्यमक्रोधस्त्याग: शांतिरपैशुनम् ।***
***दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहिंसा:** अहिंसा म्हणजे काया, वाचा आणि मनाने कुणालाही दु:ख न देणे
- **सत्यम्:** सत्य म्हणजे यथार्थ व प्रिय भाषण
- **अक्रोध:** आपला अपकार करणाऱ्यावरही क्रोध न करणे
- **त्याग:** कर्माचे ठायी कर्तेपणाच्या अभिमानाचा त्याग
- **शांति:** शांती म्हणजे अंत:करणाची उपरामता म्हणजे चित्ताची चंचळता नसणे
- **अपैशुनम्:** कुणाचीही निंदा वगैरे न करणे
- **भूतेषु दया:** सर्वांवर दया
- **अलोलुप्त्वं:** अलुब्धता म्हणजे इंद्रियांचा विषयांशी संयोग झाला तरीही आसक्त न होणे
- मार्दवं: मृदुता.
- **ह्री:** अकार्याची शरम म्हणजे लोकविरुध्द व शास्त्रविरुध्द आचरण करण्याची लाज
- **अचापलम्:** स्थिरता म्हणजे व्यर्थ चेष्टांचा अभाव

**अर्थ**

काया, वाचा आणि मनाने कोणालाही कोणत्याही प्रकारे दु:ख न देणे, यथार्थ व प्रिय भाषण, (अंत:करणाने व इंद्रियांनी जसे निश्चित केले असेल ते जसेच्या तसे प्रिय शब्दांनी सांगणे याचे नाव 'सत्य भाषण' होय.) आपल्यावर अपकार करणाऱ्यावरही न रागावणे, कर्मांच्या ठिकाणी कर्तेपणाच्या अभिमानाचा त्याग, अंत:करणात चंचळता नसणे, कोणाचीही निंदा वगैरे न करणे, सर्व प्राणीमात्रांच्या ठायी निर्हेतुक दया भावना, इंद्रियांचा विषयांशी संयोग झाला तरी त्यांच्याविषयी आसक्ती न वाटणे, कोमलता, लोकविरुध्द व शास्त्रविरुध्द आचरण करण्याची लज्जा, निरर्थक हालचाली न करणे.

*अहिंसा शांति अक्रोध त्याग सौजन्य सत्यता।*
*अ-लुब्धता, दया भूतीं मर्यादा स्थैर्य मार्दव॥*

**विषय:** या श्लोकात दैवी संपत्तीच्या अकरा गुणांचे वर्णन आले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अहिंसा:** अहिंसा म्हणजे कुणाची हिंसा न करणे, कटु वचन न बोलणे, सर्वांवर प्रेम करणे. सत्यपालनासाठी अहिंसा गरजेची आहे. अहिंसेच्या पालनाशिवाय सत्याचे पालन सर्वथा असंभव आहे, असे गांधीजी म्हणत असत. जी वस्तु आपल्या आचरणात असेल त्यातूनच मार्ग काढायचा उपाय सापडतो. गांधीजींच्या आचरणात अहिंसा नसती तर सत्याग्रहाचा शोध लागला नसता. जैन धर्मात अहिंसेचा फार उत्कर्ष झाला. ते अहिंसेला परम म्हणजे श्रेष्ठ धर्म मानतात.

अहिंसेविषयी ज्ञानेश्वर महाराज लिहितात - जगाला सुखी करण्यासाठी कायिक, वाचिक आणि मानसिक व्यवहार अहिंसा आहे. मोगऱ्याची कळी खूप छोटी असूनही कोमल असते. (मूळ ज्ञानेश्वरीची ओवी आहे - आतां तीख होऊनी मवाळ l जैसे जातीचे मुकुळ । मुकुळ या शब्दाचा अर्थ जाईचे फुल असा होतो, मोगऱ्याचे फुल नव्हे.) किंवा चंद्राचा प्रकाश तेजस्वी असूनही कोमल व शीतल असतो त्याचप्रमाणे बोल सूक्ष्म व तेजस्वी असतानाही कोमल व शीतल असायला हवेत. पाणी मऊपणामुळे बुबुळास लागले तरी व्यथा करत नाही एऱ्हवी तेच पाणी पर्वताचे कडे फोडत असते. तसेच जे परजवलेल्या लोखंडी तीक्ष्ण शस्त्राप्रमाणे असूनही कानाला मधुरातिमधुर वाटते - संशय निवृत्ती करते. तात्पर्य हे की जे मधुर आणि प्रिय असूनही कुणाला फसवत नाही आणि सत्य असूनही कुणाला वाईट वाटत नाही.

2) **सत्यम्:** सत्य म्हणजे यथार्थ भाषण. जे सत्य वाटते, त्याचे आचरण. जैन तत्वज्ञानात आधी अहिंसा मग सत्य असा क्रम आहे. हाच क्रम गीतेतही आहे. हे साभिप्राय नसून सहज आहे. गांधीजी सत्याला प्रथम स्थान देतात तेही बरोबर आहे. खरे बोलावे, खोटे बोलू नये, हा नियम सारे जाणतात पण गांधीजींनी सत्य शब्दाची एक विशेष व्याख्या केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की जे आपल्याला सत्य वाटेल ते त्वरित अमलात आणणे, आचरणात आणणे. आपल्या सर्वांची अशी स्थिती आहे की आपण सारे एखादी गोष्ट आपल्यासाठी श्रेयस्कर वा कल्याणकारी समजतो पण त्यानुसार आचरण करु शकत नाही. आपल्याला भावलेल्या सत्यपथावर वाटचाल करायची मनात तीव्र इच्छा असली तरी तदनुसार आचरण करत नाही, करु शकत नाही कारण की जाणून - समजून घेणे वेगळे आणि अमलात आणणे वेगळे होय. जाणून घेण्याचा संबंध बुध्दीशी आहे. बुध्दी सत्याला जाणते पण आचरणात आणण्याचा संबंध मनाशी आहे. मनातच निग्रह - शक्तीचा अभाव असल्यामुळे आपण जाणून घेतलेल्या सत्याला आचरणात आणू शकत नाही. अशा प्रकारे बुध्दी व मनात अंतर पडते.

3) **अक्रोध:** क्रोध करु नये अथवा मनात उत्पन्न झालेल्या क्रोधाला शांत करणे. शंकराचार्यांनी अक्रोध आणि शांती यात फरक केलेला आहे. अक्रोध म्हणजे मनात उत्पन्न झालेल्या क्रोधाला आतल्या आत दाबून टाकणे, क्षीण करणे. कुणावर राग आला तर माणूस जो अक्रोधाचा अभ्यास करतो - सराव करतो - त्याला राग आल्यावरही काहीही कठोर वा उलटसुलट बडबड न करता मनात उसळलेल्या क्रोधाला दाबून ठेऊन मौन पाळायला हवे. बोलणे अनिवार्य असेल तर सौम्य शब्दांचा वापर करायला हवा. शांती वा क्षमेच्या प्रसंगी तर मनात क्रोध उत्पन्नच होत नाही. अक्रोधाची भूमिका साधली गेली तरच क्षमा वा शांती म्हणजे क्रोध उत्पन्नच न होण्याची भूमिका साधली जाऊ शकते.

4) **त्याग:** बाह्यत: अपरिग्रह आणि आतून त्याग वृत्तीचे आचरण. बाह्य परिग्रहाचा त्याग हा काही त्याग नाही. खरे म्हणजे अंतरंगी त्यागवृत्ती नसली तर बाह्यत: त्यागाला काही महत्व नाही. तो तर देखावा वा सोंग ठरेल. आत त्यागवृत्ती असेल तर बाहेर आपोआप त्याग साधला जाईल. त्यातून आनंद मिळेल. अंतरंगी भोगण्याची वृत्ती एकदा का क्षीण झाली तर अधिक परिग्रह करुन सुख मिळवायचा प्रयत्न केलाच जाणार नाही. खरा मुद्दा तर असा आहे की परिग्रहामुळे सुख लाभत असेल तर सर्वांनाच त्यापासून सुखलाभ व्हायला हवा पण असे घडताना दिसत नाही. परिग्रह जसजसा वाढतो तसतशी तृष्णा वाढते आणि त्यामुळे दु:खच वाढते. खरे सुख तर अपरिग्रह वा त्यागातच आहे. अपरिग्रही साधकच सुखाचा अनुभव घेऊ शकतो.

5) **शांति:** मानसिक शांतता - निर्विकारता. विकार उत्पन्न झाल्यावर मन प्रक्षुब्ध होऊन जाते. त्यामुळे अशांतता उत्पन्न होते. विकार उत्पन्नच झाले नाहीत तर अशांततेचे कुठले कारण न उरल्यामुळे चित्त नेहमी स्वस्थ राहू शकते कारण की चित्ताच्या मागे आत्मा असून तो शांतीस्वरुप आहे. चित्ताच्या पुढे शरीर, इंद्रिये हे विषय आहेत. त्यांच्या संपर्कामुळे काम, क्रोध, अहंकार वगैरे विकार उपजतात आणि चित्त उत्तेजित होऊन जाते मग शांततेचा अनुभव कसा व्हावा ? यामुळे मनाला विकारांच्या आकर्षणापासून वाचवायला हवे, तसा सराव करायला हवा.

6) **अपैशुनम्:** कुणाची गुप्त गोष्ट प्रकट न करणे, दोष दृष्टी न राखणे, परनिंदेपासून वाचणे. दोन व्यक्ती एकत्र आल्या म्हणजे जगाची टीका करणे सुरु होते. यात सर्वांनाच रस वाटतो. वर्णनातही अतिशयोक्ती येऊन जाते. तिखट - मीठ लाऊन गप्पा घडतात. यात मौज अशी की आपले दोष काही कुणी सांगत नाही जणू काही ते चर्चा करणारे सारे निर्दोष, गुणसंपन्नच आहेत. जो स्वत: गुणसंपन्न आणि दोषरहित असतो त्याला दुसऱ्यांचे दोष प्रकट करायला करायला कदापि आनंद वाटत नसतो. तो सदा आत्मनिरीक्षण करत असतो. तो आपले दोष घालवण्यावरच लक्ष देऊन असतो. त्यांच्या ठायी दुसऱ्यांचे दोष बघायची वृत्ती नसते.

7) **भूतेषु दया:** दुसऱ्यांवर दया म्हणजे दु:ख घालवण्याची तीव्र इच्छा आणि प्रयत्न. ज्यांची दृष्टी आत्मौपम्य असते ते इतरांच्या दु:खाला सहन करु शकत नाही. त्याना स्वत:ला दु:ख सहन करता येत नाही तसेच इतरही दु:ख सहन करु शकत नसतील असे समजून ते दु:खनिवारणाच्या प्रयत्नात लागतात. केवळ आपले दु:ख निवारण करण्यात कुठला आला पुरुषार्थ ? जगात ज्याना सुख लाभत नाही असे खूप जण आहेत. त्यांच्यापाशी सुखाची बाह्य साधने नसतात. ज्याना सुख कसे प्राप्त होते हे ते जाणतही नसतात. ज्याना सुख - प्राप्तीचे काही ज्ञान आहे म्हणजे आत्मा - परमात्म्याविषयी ज्ञान आहे, ज्यांच्या ठायी वैराग्य वगैरे अनेक गुणांचा खजिना आहे ते इतराना सुखाचा मार्ग दाखवु शकतात. (वस्त्र, प्रावरणे, अन्नोदक -) खाणे-पिणे, कपडा-लत्ता वगैरे बाह्य साधनांच्या अभावी सुध्दा अनेक लोक दु:खी, त्रस्त असतात. मजूरी करायची इच्छा असूनही त्याना मजूरी मिळत नाही. ज्यांच्या मनी प्राणिमात्रांविषयी दयाभाव वसतो असे लोक त्यांच्यासाठी ही साधने उपलब्ध करुन देण्यासाठी सहाय्य करतात.

8) **अलोलुप्त्वम्:** पंचविषयांप्रती अनासक्ती. पंच विषयांशी रात्रंदिवस संबंध येतो. त्यांचा उपयोग होण्यासाठी आपल्यापाशी कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये आणि मन आहे. या साधनांच्या द्वारे लोक पंचविषयांचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतात आणि त्यात आसक्त होतात पण यामुळे दु:खाचा अनुभव पदरी पडतो. मग त्यापासून कसे वाचावे ? विषयांप्रती अनासक्त कसे बनावे? हा प्रश्न उत्पन्न होतो. सत्संग लाभला तर त्यातून अनासक्तीचा काही उपाय लक्षात येऊ शकतो. अनासक्तीमुळे दु:खे दूर होतात, हा अनुभव यायला लागतो.

9) **मार्दवम्:** मृदुता, नम्रता. कठोर वृत्तीचा अभाव. कोमल वृत्तीमुळे नेहमी शांतीचा अनुभव येतो. हा स्वभावाचाही विषय आहे. कुणी कठोर स्वभावाचा असतो तर कुणी कोमल. एखाद्याच्या ठायी दोन्ही गोष्टी वसतात. ज्ञानी पुरुषाच्या स्वभावाचे वज्रादपि कठोराणि मृदुनि कुसुम ादपि - असे वर्णन केले जाते. ज्ञानी पुरुषावर जनतेला मार्गदर्शन करायची मोठी जबाबदारी असते. यामुळे ज्ञानी पुरुषाच्या ठायी दोन्ही वृत्ती आवश्यक असतात. तो दोन्ही वृत्तींचा उपयोग करतो. विशेष असे की ज्ञानवंतच वृत्तींना वश होत नाही. दोन्ही वृत्ती त्याच्या अधीन असतात. तरी ज्ञानी पुरुषाची प्रमुख वृत्ती तर मृदुताच असते. तो सदैव या वृत्तीचा उपयोग करतो. कोमलता व नम्रतेमुळे इतरांबद्दल

आनंद निर्माण होतो. अभिमान गळून जातो. मानसिक शांतता लाभते.

10) **ह्रीः** अकार्याविषयी लज्जाभाव. अत्यंत मर्यादायुक्त आचरण. काही लोक आपली मर्यादा पाळत नाहीत. आपल्या योग्यतेला कमी समजून वागण्यात सुरक्षितता आहे. आपण सामाजिक प्राणी आहोत. व्यक्तीच्या चित्तावर समाजाचा परिणाम होतो. धाडसी लोकांवर समाजाचा प्रभाव खूप कमी पडतो. यामुळे त्यांचे वागणे मर्यादायुक्त नसते. यात एक असा मुद्दा समाविष्ट आहे की जर अनीतीचे काम करायची वृत्ती जागते आणि तीव्र इच्छा उत्पन्न होते तर समाज मर्यादेची भीती फार उपयोगी ठरते. 'मी अनीतीचे कार्य करीन आणि ते जाहीर झाले तर माझी सारी प्रतिष्ठा धुळीला मिळेल' अशा प्रकारच्या सात्विक भीतीपोटी माणूस अकार्य करण्यापासून वाचतो.

11) **अचापलम्:** चंचळतेचा अभाव. इंद्रियांच्या व्यवहारात - व्यापारात स्थिरता. सामान्यपणे मन चंचळच असते. मनाला स्थिर करण्यासाठी दीर्घकालीन प्रयत्न करावे लागतात. यामुळे इंद्रियांच्या व्यवहारातही चंचळतेचा अभाव येऊ लागतो. नस्ती उठाठेव करायची प्रवृत्ती कमी होते. अनेक लोकांच्या ठायी आपले क्षेत्र व मर्यादेपेक्षा अधिक कार्य करायची प्रवृत्ती असते. एक काम हाती घेतले तर त्यातच चित्त एकाग्र व्हायला हवे. कार्याच्या सफलतेसाठी - सिध्दीसाठी - त्यातच दीर्घकाळापर्यंत तल्लीन असायला हवे पण अनेकांची वृत्ती इतकी चंचळ असते की हातातले कार्य सोडून दुसरे काम हाती घ्यायची इच्छा होऊन जाते. अशा प्रकारे कुठल्याही कार्याला पूर्ण करण्यात वृत्ती एकाग्र रहात नाही. भिन्न - भिन्न प्रकारची कार्ये करण्याची इच्छा जागणे मानसिक चंचलतेचे लक्षण आहे. ही चंचळता घालवून स्थिरता प्राप्त करायला हवीय.

: 3 :

***तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता।***
***भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तेजः** तेजस्विता
- **क्षमाः** क्षमा
- **धृतिः** धैर्य
- **शौचम्:** अंतर्बाह्य शुध्दता
- **अद्रोहः** अविरोध वृत्ती म्हणजे कुणाशीही शत्रुत्व न करणे
- **न अतिमानिताः** आपण श्रेष्ठ आहोत अशा अभिमानाचा अभाव
- **भारतः** हे अर्जुना
- **दैवीम् संपदंः** दैवी संपत्तीला
- **अभिजातस्यः** प्राप्त झालेल्या पुरुषाच्या ठायी ही लक्षणे
- **भवन्तिः** असतात

**अर्थ**

तेज, (जिच्या प्रभावाने विषयासक्त आणि अधम प्रकृतीचे मनुष्य सुध्दा बहुधा अन्यायाचरण सोडून श्रेष्ठ माणसांच्या सांगण्यानुसार चांगली कर्मे करु लागतात, त्या श्रेष्ठ माणसांच्या शक्तीला 'तेज' असे म्हणतात.) क्षमा, धैर्य, बाह्य शुध्दी, कुणाविषयीही शत्रुत्व न वाटणे आणि स्वत:विषयी मोठेपणाचा अभिमान नसणे ही सर्व हे अर्जुना, दैवी संपत्ती घेऊन जन्मलेल्या माणसाची लक्षणे आहेत.

***पवित्रता क्षमा तेज धैर्य अद्रोह नम्रता ।***
***हे त्याचे गुण जो आला दैवी संपत्ति घेउनी ॥***

**विषयः** या श्लोकात दैवी संपत्तीच्या सहा गुणांची चर्चा झाली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **तेजः** तेजस्विता, बुध्दीची प्रगल्भता हा ब्रह्मचर्य पालनाचा सहज परिणाम आहे. ब्रह्मचारीच्या ठायी तेजस्विता असते. तेव्हाच वैराग्य वृत्ती वाढते. वैराग्य वृत्तीमुळे तेजस्विता अधिक वाढते. ब्रह्मचर्य, वैराग्य आणि आत्मतत्वाची देहापासून भिन्नता असल्याची श्रध्दा जागल्यामुळे बुध्दी प्रगल्भ होते. बुध्दीचा उथळपणा दूर होऊन जातो. बुध्दीच्या ठायी खोलवर विचार करण्याची योग्यता प्राप्त होते. निर्णय शक्ती जागते. अशी बुध्दी ईश्वराभिमुख असते.

2) **क्षमा:** क्षमेच्या ठायी अक्षुब्ध चित्त, अपराध्याविषयी उदार वृत्ती आणि त्याची चूक सुधारायचे प्रयत्न या तिघांचा समावेश असतो. इतरांच्या लहान सान चुका बघूनही चित्त क्षुब्ध होते पण आपल्या हातून मोठी चूक जरी झाली तरीही माणूस स्वत:ला क्षमा करतो. स्वत:साठी माणूस क्षमेचा उपयोग करतो, दुसऱ्यासाठी क्षमावृत्ती दर्शवू शकत नाही. आपण स्वत:विषयी जो क्षमाभाव बाळगतो तो इतरांसाठी व्यक्त करायला हवा. स्वत:ला क्षमा करुन काही माणसाचा विकास होणार नाही - स्वत:त सुधारणा होणार नाही. स्वत:ला तर क्षमा करायलाच नको. इतराना क्षमा केल्यावरच स्वत: सुधारायची शक्यता आहे. यातून आपला गुण विकास होईल. दुसरा मुद्दा असा की गुन्हेगाराबाबत औदार्यपूर्ण व्यवहार करायला हवा यामुळे तो स्वत:ला सुधारायचा प्रयत्न करु शकेल. मानवी स्वभावाला ओळखून इतरांशी उदारतेने वागण्यातून अपराध वृत्ती कमी होते. तिसरा मुद्दा असा की आपण चूक सुधारण्याकामी मदतनीस बनावे. क्षमेत कारुण्यभाव असायला हवा. गुन्हेगाराबाबत करुणाभाव असेल तर तो सुधारु शकेल.

3) **धृति:** धैर्य - एखादा विपरीत प्रसंग आला, संकट कोसळले तर परिस्थितीचा सामना करायची निश्चयात्मक वृत्ती असायला हवी. ज्याला प्रसंगावधान राखणे असे म्हणतात त्याच्या मूळाशी धैर्यवृत्तीच आहे. विपरीत प्रसंग आल्यावर माणूस धैर्य आणि संतुलन हरवून बसतो. काही उपायही सुचत नाही. खरे तर विपरीत प्रसंगातच विवेकाची अधिक गरज असते. अशा समयी धैर्यशाली पुरुष विवेकपूर्वक त्या परिस्थितीतून कौशल्याने वाट शोधतात. परिस्थिती कायम अनुकूल नसते त्यावर कुणाचे नियंत्रण नसते. त्यामुळे परिस्थिती कशीही का बिकट असेना, त्यातून धैर्य न गमावता वाट शोधण्याचाच विचार करायला हवा. या अभ्यासामुळे धैर्यवृत्तीचा विकास होतो. ईश्वर विषयक श्रध्देमुळे धैर्यवृत्तीच्या विकासात सहाय्य लाभते.

4) **शौचम्:** कायिक, वाचिक, मानसिक पावित्र्य. अंतर्बाह्य शुध्दता. ईश्वर कमालीचा विशुध्द आहे. त्याचा अनुभव घेण्यासाठी चित्ताला विशुध्द करणे गरजेचे आहे. चित्ताच्या अशुध्दतेमुळेच आपण ईश्वरापासून वेगळे आहोत असे वाटते मानसिक शुध्दतेने आत्मस्वरुपाची ओळख होऊन जाते. चित्तशुध्दीसाठी वाचा शुध्दीही आवयश्क आहे. वाणीनेच सारे व्यवहार चालतात. यासोबतच देहशुध्दीचेही महत्व आहे. अशुध्द, अस्वच्छ शरीराला सहन करत राहिलो तर वाचिक व मानसिक अशुध्दतेलाही सहन करत रहायची वृत्ती बळावेल. यामुळे तिन्ही प्रकारच्या शुध्दतेकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. देहातच प्रभुचा निवास आहे. यामुळे शरीर पवित्र, शुची आणि शुध्द रहायला हवे. त्याला मंगलधाम समजायला हवे.

5) **अद्रोह:** स्पर्धारहित जीवन आणि अविरोधी वृत्ती. ईर्ष्येमुळे आपण इतरांशी आपली तुलना करत असतो. यातूनच स्पर्धेची वृत्ती बळावते. सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या ठायी ही वृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येते. कुटुंबातही या वृत्तीचे दर्शन होते. द्रोह म्हणजे ईर्ष्या, मत्सर, तिरस्कार या वृत्तींची गणना दुर्गुणात केली जाते. तुलसीदासजी म्हणतात.

***करहिं मोहबस द्रोह परावा।***
***संतसंग हरि-कथा न भावा॥***

अर्थात् मोहाला बळी पडून इतरांचा द्रोह करतात - संतसंगती आणि हरी कथा भावत नाही. ईर्ष्या व व द्रोहाला बळी पडून व्यक्ती आपली शक्ती क्षीण करते आणि ध्येयापासून दूर होते.

6) **नातिमानिता:** अतिमान म्हणजे सन्मान प्राप्तीची वृत्ती नसणे. अभिमानाची भावना जवळपास सर्वांच्याच ठायी असते. दुसऱ्याचा सत्कार बघून आणि आपला न होताना बघून मनावर मोठा आघात होतो. खरे तर याच्या उलट घडायला हवे पण तसे होत नाही आपला सत्कार झाला तर संकोच व्हायला हवा. मनात हा विचार यायला हवा की सत्कारामुळे अहंकाराला बळकटी मिळते. यामुळे आपण ईश्वराच्या निकट नाही पोहोचू शकत. ईश्वराच्या निकट पोहोचायला तर शून्य बनायला हवे. जो स्वत:ला हर प्रकारे शुन्य बनवायचे ध्येय बाळगणार नाही, तो बंधनमुक्त होऊ शकणार नाही. स्वत:ला शून्य बनवण्यात ज्याला आनंद वाटतो तोच भवसागर पार होऊ शकतो.

अखेरीस सांगतात - भारत दैवीं संपदं अभिजातस्य भवन्ति - हे अर्जुना, देवी संपत्तीयुक्त पुरुषात हे गुण असतात. (पुढील श्लोकात आसुरी वृत्ती वा विकारांचे वर्णन केले जात आहे.)

: 4 :

***दंभो दर्पोऽतिमानश्च क्रोध: पारुष्यमेव च ।***
***अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥***
***काही ठिकाणी पुढील पाठभेद आढळतो.***
***दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोध : पारुष्यमेव च ।***
***अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदामासुरीम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दंभ:** दंभ म्हणजे पाखंड
- **दर्प:** दर्प म्हणजे घमेंड
- **अतिमान:** अती सन्मानाची आकांक्षा
- **क्रोध:** क्रोध
- **पारुष्यम् एव:** कठोर वचनांची सवय
- **च अज्ञानं:** आणि अविवेक (हे अवगुण - दुर्गुण)
- **पार्थ आसुरीं संपदं अभिजातस्य:** अर्जुना, आसुरी संपत्ती प्राप्त पुरुषात असतात

**अर्थ**

हे पार्था, ढोंग, पाखंड, घमेंड, अभिमान, राग, कठोरपणा आणि अज्ञान ही सर्व आसुरी संपत्ती घेऊन जन्मलेल्या पुरुषाची लक्षणे आहेत.

***दंभ मीपण अज्ञान क्रोध दर्प कठोरता ।***
***लाभती गुण हे त्यास ज्याची संपत्ति आसुरी ॥***

**विषय:** या श्लोकात आसुरी संपत्तीचे सहा दुर्गुण वर्णिले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **दंभ:** दिखाऊ आचरण. दंभी माणसात सत्य आणि सरळपणाचा अभाव असतो. दंभी पुरुष धोकेबाज असतो. तो आतून काही असतो, बाहेरुन काही दाखवतो. अशा लोकांशी व्यवहार करताना फसगत होण्याची शक्यता असते. अशी व्यक्ती सिध्दांतनिष्ठ नसते. शंकराचार्यांनी सांगितले आहे धर्मध्वजित्वम् - म्हणजे दंभी व्यक्ती स्वत:ला मोठा धर्मनिष्ठ असल्याचे भासवते. साधना वा धर्माचरण करताना त्याचे भान ठेऊन, डांगोरा पिटते. पुण्यकार्य केले तर त्याची जाहीर वाच्यता करायची मनात तीव्र इच्छा बाळगते. संधी मिळताच आपण केलेले चांगले कार्य जाहीर करत राहते. कित्येक साधकाना अशी सवय असते. या सवयीला आचार्यांनी दंभ मानले आहे. धर्माचरणावर श्रध्दा नसतानाही बाहेरुन धर्माचरणाचा देखावा करणे हा झाला दंभ शब्दाचा रुढ अर्थ.

2) **दर्प:** अधिकारामुळे उपजलेली घमंडी अवस्था. अधिकार प्राप्त झाला म्हणजे अनेक लोक मदोन्मत होऊन जातात. त्यांच्या हाताखालचे कर्मचारी त्यांना भिऊन असतात. असे लोक बहुधा असहिष्णु असतात. ते इतरांच्या चुकांना कदापि क्षमा करत नाही - नसतात.

3 ) **अतिमान:** सन्मान मिळावा - सत्कार व्हावा अशी इच्छा. असे लोक मान - सन्मान न मिळाल्यावर खूप दु:खी होऊन जातात. त्यांचे प्रत्येक कार्य कीर्ती मिळवण्यासाठी असते. ते मोठ्यात मोठे सत्कार्य करतील पण सर्वांनी त्याना ओळखावे, मोठे मानावे, प्रशंसा करावी अशी त्यांच्या मनात तीव्र इच्छा असते. समाजातल्या मार्गदर्शक, समर्थ, चारित्र्यसंपन्न पुरुषाच्या ठायी अभिमानाची ही वृत्ती बहुधा असते. मोठेपणा लाभला नाही तर ते खूप निराश होतात, कार्याला बिघडवूही शकतात.

4) **क्रोध:** क्रोधात कामाचा अंतर्भाव असून कामात क्रोधाचा आहे. मूळ वृत्ती काम म्हणजे इच्छा आहे. ही अपूर्ण राहिली की क्रोधवृत्ती उत्पन्न होते. कामाचे प्रकट रुप म्हणजे क्रोध होय. प्रत्येकाच्या ठायी कमी - अधिक प्रमाणात काम आणि क्रोधवृत्ती असते. आत्मज्ञानी पुरुषात काम आणि क्रोध या दोन्ही वृत्ती क्षीण होऊन जातात. काम - क्रोध इत्यादी विकार अज्ञानाचे लक्षण होय. भांडणे, लढाया, संघर्ष या सर्वांच्या मूळाशी याच दोन वृत्ती आहेत. प्रकट असल्यामुळे केवळ क्रोधाचाच उल्लेख आला आहे. लोकांना किरकोळ गोष्टींचा राग येतो. लहान मुलांनाही राग येतो. ज्याच्या ठायी सात्विक गुणांचा उत्कर्ष झालेला असतो त्याला राग कमी येतो. क्रोधामुळे आपली व समोरच्याचीही शांतता तर भंग होतेच विवेकही नष्ट होऊन जातो.

5) **पारुष्यम्:** कठोर वा कटु वचन बोलायची सवय. अनेक लोकांना मृदु वचने बोलता येतच नाहीत. संत तुलसीदासांनी संतांच्या गुणांची चर्चा करताना लिहिले आहे.

*सम दम नियम नीति नहिं डोलहिं।*
*परुष वचन कबहुँ नहिं बोलहिं॥*

अर्थात् - शम, दम, नियम आणि नीतीचे पालन करतात. कदापि कटु वचने बोलत नाहीत. ज्ञानीजन चित्ताला उद्वेलित करत नाहीत. इतरांच्या कल्याणासाठीही साभिप्राय कदापि कठोर वचनांचा आश्रय घेत नाहीत. जेव्हा कुणाच्या ठायी अजागृती म्हणजे निद्रा दिसते आणि सौम्य शब्दांनीही काही फरक पडत नाही तेव्हा त्याला जागृत करण्यासाठी कठोर शब्दांचा प्रयोग करावा लागतो. याचा अंतर्भाव दुर्गुणात होत नाही. वज्रादपि कठोराणि मृदुनि कुसुमादपि - असा संतांचा बाणा असतो. प्रसंगी ते वज्राहून कठोर होतात, अन्यथा फुलाहून मृदु असतात.

6) **च अज्ञानम्:** अज्ञान म्हणजे अविवेकी व्यवहाराची सवय. देह, मन, बुध्दी, इंद्रिये - सारे काही मी आहे असा बोध - प्रतीती - अज्ञान आहे. हाच अविवेक आहे. अविवेकानेच विकार उद्भवतात. विवेकाधारे सतत वर्तणूक करणाऱ्या व्यक्तीचे अज्ञान हळूहळू कमी होत जाते. देहापासून भिन्नतेचे ज्ञान होणे हाच विवेक आहे. ही भिन्नता जोवर ध्यानात येत नाही तोवर मनात एवढा निश्चय दृढ असावा की आपल्या व्यवहार वा आचरणात कदापि अविवेकाने वा विकारवश होऊन कुठलेही कार्य करणार नाही तर विवेक जागू शकतो.

सहा दुर्गुणांची चर्चा करुन आता अखेरीस सांगताहेत की 'पार्थ आसुरीं संपदं अभिजातस्य' हे अर्जुना, आसुरी संपत्तीयुक्त पुरुषाच्या ठायी वरील दुर्गुण आढळतात. तसे तर दैवी संपत्तीयुक्त पुरुषाच्या ठायीही काही दुर्गुण आढळतात आणि आसुरी संपत्तीयुक्त पुरुषाच्या ठायीही काही सद्गुण आढळतात पण ज्याच्या ठायी दैवी गुण अधिक प्रमाणात आढळतात त्याला दैवी संपत्तीयुक्त आणि अधिक दुर्गुणयुक्त व्यक्तीला आसुरी संपत्तीयुक्त मानायला हवे.

: 5 :

*दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।*
*मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दैवी संपत् विमोक्षाय:** दैवी संपदा भवसागर पार करण्यासाठी - प्रपंचातून मुक्त होण्यासाठी आहे
- **आसुरी निबन्धाय मता:** (आणि) आसुरी संपत्ती बंधनासाठी असल्याचे मानले गेले आहे
- **पांडव मा शुच:** हे अर्जुना, शोक करु नकोस (कारण की)
- **दैवी संपदं अभिजातः असि:** तू दैवी संपत्तीयुक्त बनून जन्माला आला आहेस

**अर्थ**

दैवी संपदा मुक्तीदायक आणि आसुरी संपदा बंधनकारक मानली आहे म्हणून हे अर्जुना, तू शोक करु नकोस कारण तू दैवी संपदा घेऊन जन्माला आला आहेस.

*सुटका करिते दैवी आसुरी बंध घालिते।*
*भिऊं नको चि आलास दैवी संपत्ति जोडुनी॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) दैवी संपत्ती भवसागरातून मुक्त होण्यासाठी आहे. 2) आसुरी संपत्ती बंधनकारक आहे आणि 3) हे अर्जुना, तू शोक करु नकोस. तू दैवी संपत्तीयुक्त असा जन्माला आला आहेस.

**स्पष्टीकरण**

1) **दैवी संपत् विमोक्षाय:** दैवी संपत्ती भवसागरातून मुक्त होण्यासाठी आहे. मोक्षाची जिज्ञासा असणाऱ्याने, प्रापंचिक बंधनातून सुटका करुन घेण्याची तीव्र इच्छा असणाऱ्याने दैवी गुणांचा आश्रय घेणे गरजेचे आहे कारण की चित्तशुध्दीशिवाय ईश्वरी ज्ञान होत नाही आणि ईश्वरी ज्ञानाच्या अभावी भवसागरातून पार उतरता येत नाही, हा शास्त्रीय सिध्दांत आहे. चित्त शुध्दीसाठी सात्विक म्हणजे दैवी गुणांचा उत्कर्ष आवश्यक आहे.

आरंभीच्या तीन श्लोकात दैवी संपत्तीच्या सतरा गुणांचे वर्णन येते. यात आणखीही गुणांची वृध्दी करता

येऊ शकते. हे गुण तर नमूना म्हणून सांगितले गेले आहेत. आपण जिथे आहोत तिथे राहून स्व-कर्तव्यांचे पूर्णपणे पालन करताना स्वत:च्या ठायी या गुणांचा विकास करु शकतो. या गुणांचा विकास करुन घेत असताना कुठले स्थान बदलायची वा कर्तव्ये त्यागायची गरज नाही. गुण प्राप्त करुन घ्यायचे आहेत, गुणविकास साधून घ्यायचा आहे असा निश्चय मनात असायला हवा. प्रयत्न केले असता प्रत्येक पुरुषाच्या ठायी या गुणांचा विकास साधून घेता येऊ शकतो. हे दैवी गुण जसजसे जीवनात प्रकट होत जातात तसतशी चित्तशुध्दी होत रहाते. चित्त शांत - निर्विकार बनते. ईश्वरी ज्ञान संपादित करण्याची योग्यता - पात्रता वाढते. मोक्षाच्या नजिक पोहोचून जाता येते.

2) **आसुरी निबन्धाय मता:** प्रपंचातल्या बंधनात अडकून पडण्यासाठी आसुरी संपत्ती असते, अशी मान्यता आहे म्हणजे शास्त्रकारांचे निवेदन आहे. ज्यांना प्रपंचात गोडी वाटते असे मग विषयोपभोगाद्वारे लाभणाऱ्या आनंदात तल्लीन असतात. ही तमोगुणाकडे जायची वाट आहे. तमोगुणी वृत्तीत दुर्गुण फोफावतात. तमोगुणी प्रकृतीच्या पुरुषाच्या ठायी रजोगुणांचे प्राबल्य असते पण सत्वगुण क्षीण स्थितीत विद्यमान असतात. रजोगुणी पुरुषाच्या प्रकृतीच्या ठायी तमोगुण कमी प्रमाणात असतात पण सत्वगुणही नांदतात. सत्वगुणी पुरुषाच्या ठायी तमोगुण क्षीण स्थितीत असतात. काही अंशी रजोगुणही असतात पण तेही हळूहळू क्षीण होत जातात. संसार बंधनातून (भवसागरातून) सोडवणूक करण्यासाठी सत्वगुणांचा उत्कर्ष सहाय्यभूत ठरतो. प्रापंचिक बंधनात सत्वगुणांचा उत्कर्ष सहाय्यभूत ठरतो. प्रापंचिक बंधनात जखडून ठेवण्याकामी तमोगुणाचा उत्कर्ष मदतरुप असतो.

3) **पांडव मा शुच: दैवीं संपदं अभिजात:** असि हे अर्जुना, तू शोक करु नकोस, भिऊ नकोस कारण की तू दैवी संपत्ती घेऊनच जन्माला आला आहेस, दैवी संपत्तीने युक्त अशा कुळात जन्माला आहेस. इथे भगवान अर्जुनाला आश्वासन देत आहेत. अर्जुनाचा जन्म पांडव कुळात म्हणजे संस्कारसंपन्न परिवारात झाला होता. संस्कारी परिवारात दैवी गुणांचाच विकास होतो. माता - पित्यांचे संस्कार बालकाच्या मनावर खोलवर परिणाम करतात - प्रभाव टाकतात. गांधीजींची आई धर्मनिष्ठ होती, वडीलही तसेच होते. विनोबाजींचे आई - वडील खूप संस्कारी होते. मुलांना याचा फायदा झाला. अर्जुनाला भगवंत सांगताहेत की जर तू चांगल्या कुळात जन्म घेतला आहेस आणि तेच संस्कार तुला लाभले आहेत तर घाबरायची गरज नाही. तू अगदी निर्भय रहा. निर्भयतापूर्वक स्वत:च्या ठायी मोक्ष प्राप्तीसाठी आवश्यक अशा दैवी संपत्तीचे गुण विकसित करायचे ध्येय बाळग. त्या दिशेने अखंड प्रयत्नशील रहा.

: 6 :

*द्वो भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च।*
*दैवो विस्तरश: प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रृणु॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अस्मिन् लोके:** या लोकात, या लोकी
- **दैव: च आसुर: एव:** दैवी आणि आसुरी हेच
- **द्वौ भूतसर्गौ:** भूतसृष्टीचे दोन वर्ग आहेत म्हणजे दोन प्रकारचे भूतांचे स्वभाव आहेत
- **दैव: विस्तरश: प्रोक्त:** दैवांच्या स्वभावाविषयी तपशीलवारपणे सांगितले गेले आहे
- **पार्थ मे आसुरं श्रृणु:** हे पार्थ, आता माझ्याद्वारे आसुरी विषयी ऐक

**अर्थ**

हे अर्जुना, या जगात मनुष्य समुदाय दोनच प्रकारचे आहेत. एक दैवी प्रकृतीचे आणि दुसरे आसुरी प्रकृतीचे. त्यापैकी दैवी प्रकृतीचे विस्तारपूर्वक सांगितले. आता तू आसुरी प्रकृतीच्या मनुष्य समुदायाबद्दलही माझ्याकडून सविस्तर ऐक.

*भूत-सृष्टि जगीं दोन दैवी आणिक आसुरी।*
*विस्तारें वर्णिली दैवी आसुरी ऐक सांगतों॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) भूतसृष्टीचे म्हणजे माणसांचे दैवी आणि आसुरी असे दोन वर्ग आहेत. 2) एथवर दैवी पुरुष आणि गुणांच्या विषयी विस्तारपूर्वक सांगितले गेले आहे. 3) हे पार्थ, आता माझ्याद्वारे आसुरी पुरुषांच्या आणि गुणांच्या विषयी ऐक.

**स्पष्टीकरण -**

1) **अस्मिन् लोके दैवः च आसुरः एव द्वौ भूतसर्गौः** इहलोकात माणसांचे दैवी आणि आसुरी हेच दोन वर्ग आहेत. इथे भगवंताने दोनच वर्ग सांगितने आहे. तसे पाहू गेल्यास जगात त्रिगुणयुक्त माणसांचे तीन वर्ग आहेत. 1) सात्विक 2) राजसी आणि 3) तामसी. तरीसुध्दा इथे भगवंतांनी दोनच वर्गांचा कसा उल्लेख केला हा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर असे की रजोगुण आणि तमोगुणाचा अंतर्भाव एकाच वर्गात करुन त्याला आसुरी म्हटले आहे. सत्वगुणाला एक करुन त्याला दैवी म्हटले आहे. एक वर्ग मोक्षदायक तर दुसरा प्रपंचात गुरुटलेला असे दोन वर्ग होतात.

2) **दैवः विस्तरशः प्रोक्तः** दैवी पुरुष आणि दैवी गुणांविषयी एथवर सविस्तर सांगितले. यापूर्वीच्या पंधरा अध्यायांमधून ठिकठिकाणी दैवी पुरुषांचे आणि दैवी गुणांचे सविस्तर वर्णन आले आहे.

(या विषयीचा तपशील तळटीपेत असा आला आहे - दुसऱ्या अध्यायात दैवी पुरुषाची (स्थितप्रज्ञाची) लक्षणे वर्णिलेली आहेत. तिसऱ्या अध्यायात श्रेष्ठ पुरुषाचे आचरण वर्णिले आहे. तिसऱ्या अध्यायात श्रेष्ठ पुरुषाचे आचरण वर्णिले आहे. श्रेष्ठ पुरुष जर कर्मे आचरणार नाहीत तर लोक त्यांचे अनुकरण करतील असे म्हणत आपले स्वत:चे उदाहरण दिले आहे. सतरा व अठराव्या श्लोकात आत्मज्ञानी पुरुषाची चर्चा आहे. तत्वज्ञानी त्रिगुणातीत असतो - त्रिगुणांपासून अलिप्त असतो हे 28 व्या श्लोकात सांगितले आहे. 33 व्या श्लोकात ज्ञानी पुरुषाच्या स्वभावाचे वर्णन आले आहे. चौथ्या अध्यायातील 18 ते 23 श्लोकात दैवी पुरुषाचे वर्णन आले आहे. पाचव्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात संन्याशाचे वर्णन आहे. 7 ते 26 अशा 20 श्लोकांमधून योगी आणि संन्याशाचे वर्णन आहे. सहाव्या अध्यायातील 7 ते 9 या तीन श्लोकांमधून योग्याचे वर्णन आले आहे. 18 ते 23 अशा 6 श्लोकांमधून समाधी स्थितीचे वर्णन आहे. 27 ते 32 अशा 6 श्लोकांधून ब्रह्मनिष्ठाचे वर्णन येते. सातव्या अध्यायातील 16 व्या श्लोकात चार प्रकारच्या भक्तांचे वर्णन आहे, 17, 18, 19 या तीन श्लोकात ज्ञानी भक्ताचे वर्णन, तर 28 व्या श्लोकात द्वंद्व - मोह - विनिर्मुक्त अशा पुरुषाचे वर्णन आहे. आठव्या अध्यायातील 10 ते 13 या चार श्लोकांमधून योगीजनांद्वारे मृत्युसमयी ईश्वर - स्मरण करत देहत्याग करायचे वर्णन आहे. 14 - 15 व्या श्लोकात योग्याच्या पुनर्जन्म न घेण्याचे वर्णन आहे तर 24 व्या श्लोकात योगी पुरुषाच्या मृत्युसमयीच्या स्थितीचे वर्णन आहे. नवव्या अध्यायातील 13 ते 15 या तीन श्लोकांधून महात्मा पुरुषांचे वर्णन आहे. 30 आणि 31 व्या श्लोकात धर्मात्म्याचे वर्णन आहे. दहाव्या अध्यायातील 9 व 10 व्या श्लोकात भक्ताचे वर्णन आहे. अकराव्या अध्यायातील 55 व्या श्लोकात परम भक्ताचे वर्णन आहे, हा गीतेचा सारभूत श्लोक आहे. बाराव्या अध्यायातील 13 ते 19 या सात श्लोकांमधून भक्ताची लक्षणे आली आहेत. तेराव्या अध्यायातील 7 ते 11 या पाच श्लोकांमधून ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानाच्या लक्षणांचे वर्णन आहे. 27 व 28 व्या श्लोकात परमात्मदर्शी पुरुषाचे वर्णन येते. चौदाव्या अध्यायातील 19, 20 या दोन आणि 22 ते 26 या पाच अशा एकूण सात श्लोकांमधून त्रिगुणातीत पुरुषाचे वर्णन आले आहे. पंधराव्या अध्यायातील 5, 11, 19 या तीन श्लोकांमधून ज्ञानी, योग्याच्या स्थितीचे वर्णन आहे. अशा प्रकारे पंधराव्या अध्यायापर्यंत ज्ञानी, योगी, भक्त, संन्यासी, स्थितप्रज्ञाचे वर्णन आले आहे. सोळाव्या अध्यायातील आरंभिक तीन श्लोकांधून दैवी संपत्तीच्या गुणांचे वर्णन येते. अशाप्रकारे दैवी सत्पुरुष आणि त्यांच्या गुण व लक्षणांचे सविस्तर वर्णन आले आहे.)

3) **पार्थ मे आसुरं श्रृणुः** हे पार्थ, माझ्याद्वारे आता आसुरी पुरुष आणि गुणांविषयी ऐक. आसुरी प्रकृतीचे पुरुष आणि त्यांच्या ठायी विद्यमान दुर्गुणांविषयी एथवर विशेष रुपाने काही सांगितले गेले नव्हते.

इथे प्रश्न उपस्थित होऊ शकतो की दैवी पुरुषांच्या गुणांच्या विषयी जे काही सांगितले गेले आहे ते तर ग्रहण करण्यायोग्य होते पण आसुरी संपत्ती वा दुर्गुणांना ऐकायचा काय फायदा? हा तर एक प्रकारचा कुसंगच झाला ना? याचे उत्तर असे आहे की त्याग करण्यालायक दुर्गुण एकदा लक्षात आले म्हणजे दुर्गुणांना गुण समजायची चूक होणार नाही. यामुळे गुणांसोबत दुर्गुणांना जाणून घेणेही गरजेचे आहे. तुलसीदासजी म्हणतात की संग्रह त्याग न बिनु पहिचाने अर्थात जाणून - पारखून घेतल्याशिवाय संग्रह वा त्याग करता येत नाही.

: 7 :

*प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः।*
*न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आसुराः जनाः** आसुरी स्वभावाचे लोक
- **प्रवृत्तिं च निवृत्तिं:** प्रवृत्ती - निवृत्ती म्हणजे कर्तव्य कर्मात प्रवृत्त होणे किंवा अकर्तव्य कार्यापासून निवृत्त होणे
- **न विदुः** जाणत नाही
- **च न शौचं:** आणि न शुचितेला
- **च न आचारः** अपि आणि न श्रेष्ठ आचारालाही जाणत नाहीत
- **तेषु सत्यं न विद्यते:** त्यात सत्य नसते

**अर्थ**

आसुरी स्वभावाचे लोक प्रवृत्ती आणि निवृत्ती दोन्हीही जाणत नाहीत त्यामुळे त्यांच्या ठिकाणी अंतर्बाह्य शुध्दी असत नाही. उत्तम आचरण असत नाही आणि सत्य भाषणही असत नाही.

*कृत्याकृत्य कसें काय नेणती आसुरी जन।*
*न स्वच्छता न आचार जाणती ते न सत्य हि॥*

**विषय:** या श्लोकात आसुरी प्रकृतीच्या पुरुषाचे चार दुर्गुण वर्णिले आहेत. 1) आसुरी प्रकृतीचे लोक प्रवृत्ती आणि निवृत्तीला जाणत नाहीत. 2) पावित्र्य, शुचितेला जाणत नाहीत. 3) सदाचारही जाणत नाहीत. 4) त्यांच्या ठायी सत्य नसते.

**स्पष्टीकरण**

1) **आसुराः जनाः प्रवृत्तिं च निवृत्तिं न विदुः** आसुरी प्रवृत्तीचे लोक प्रवृत्ती आणि निवृत्तीला जाणत नाही. यात दोन गोष्टींचा समावेश आहे. 1) यांच्या ठायी विवेक नसतो. विवेक नसल्यामुळे ओळखण्याची पारखण्याची शक्ती कमी असते. माणूस नेहमी कुठे प्रवृत्त असतो तर कुठे निवृत्त असतो. यालाच विधीनिषेध असे म्हणतात. सत्य बोलायला हवे हे विधी (रुप) आहे. वाईट बोलायला नको, कुणाची हिंसा करायला नको. हे निषेध (रुप) आहे. असे अनेक विधीनिषेध आहेत. विधीनिषेधांचे सुयोग्य ज्ञान असायला हवे. कुठले कार्य ठीक आहे आणि कुठले ठीक नाही, हे पारखायची शक्ती हवी, ही झाली एक गोष्ट. 2) ज्याला योग्य मानतो त्याला त्वरित आचरणात आणायची शक्ती असायला हवी. आपण ज्याला अकार्य मानतो त्यापासून हटायची प्रेरणा असली पाहिजे. एखाद्या गोष्टीचे ज्ञान होणे निराळे आणि ती प्रत्यक्ष आचरणात आणणे वेगळे. दोन्ही गोष्टी असतील तरच आपण योग्य मार्गावर राहू शकतो. आसुरी प्रकृतीच्या पुरुषाच्या ठायी या दोन्ही गोष्टी नसतात.

2) **च न शौचम्:** शुध्दता, पावित्र्य कशाला म्हणतात याविषयी ते जाणत नाहीत. कायिक, वाचिक, मानसिक तीन प्रकारची शुचिता असते. कायिक शुध्दी म्हणजे देहाला स्नान वगैरेने शुध्द राखणे होय, हा झाला स्थूल अर्थ, हे अवघड नाही पण अनेकांना शरीर शुध्दीचेही ज्ञान नसते. शरीराच्या स्वच्छता विषयक नियमांचे ज्ञान तर खूपच कमी लोकांना असते पण मुख्य गोष्ट तर ही आहे की पर स्त्रीशी संबंध न राखला जावा. आसुरी वृत्तीच्या लोकांना धर्माधर्माचे भान उरत नाही यामुळे स्व - स्त्री असतानाही पर स्त्रीशी मलीन संबंध राखण्यात मुळीच लाज वाटत नाही. वाचिक शुध्दतेचा अर्थ केवळ वाणीचा - बोलण्याचा विवेक नाही. चित्तशुध्दीसाठी सत् साहित्याचे वाचन करायला हवे. आसुरी वृत्तीच्या लोकांमध्ये सत् - साहित्यविषयक गोडी नसते. मानसिक शुध्दता म्हणजे विकारांपासून मुक्ती होय. ज्यांच्या आसुरी वृत्तींत वाढ झाली आहे अशाना मानसिक विकार - मुक्तीचा अनुभव कदापि येत नाही. त्यांचे चित्त अनेक प्रकारच्या विकारांनी भरलेले असते. अशा प्रकारे तीन प्रकारच्या शुध्दतेचे भान आसुरी वृत्तीच्या लोकाना असत नाही.

3) **च न आचारः** अपि आणि ते शुध्द - अशुध्द आचारही जाणत नाहीत. आसुरी वृत्तीच्या लोकांना शुध्द - अशुध्द आचाराबाबत ज्ञान नसते असे नव्हे पण ज्ञानाधारे चालण्याची त्यांची वृत्ती नसते. ज्ञान प्राप्त करायचा उद्देश्यच मुळी ज्ञानाला आचरणात आणायचा असला पाहिजे.

4) **तेषु सत्यं न विद्यते:** त्यांच्या ठायी सत्य नसते. इथे स्थूल सत्याचा विषय आहे. स्थूल सत्य व्यवहाराचा सराव देखिल आसुरी वृत्ती असणाऱ्या पुरुषांमध्ये आढळून

येत नाही. याचा अर्थ असा समजायला नको की आसुरी वृत्तीच्या पुरुषांची काही स्वतंत्र जमात असते वा त्यांना लक्षात घेऊनच हे सांगितले गेले आहे. सात्विक वृत्तीच्या पुरुषांच्या ठायीही काही प्रमाणात आसुरी वृत्ती असू शकते. सत्व, रज, तम हे तीन गुण प्रत्येकाच्या ठायी असतात. तमप्रधान पुरुषांच्या ठायी आसुरी वृत्तीचे प्रमाण अधिक आढळते. रजोगुण - प्रधान पुरुषांच्या ठायी कधी - कधी (अधून - मधून) आसुरी वृत्ती प्रकट होते. उदाहरणार्थ मी कुणाच्या भेटीसाठी त्यांच्या घरी पोहोचलो. ते मला भेटू इच्छित नाहीत पण नकार द्यायची हिंमतही नाही, म्हणून नोकराकरवी आपण घरात नसल्याचे कळवून देतात. हे गृहस्थ भले असतानाही त्यांच्या मनात खोटे बोलायची वृत्ती जागली. खोटे बोलणे भल्या माणसाचे लक्षण मानले जात नाही. असत्य आचरण जर आसुरी वृत्ती असेल तर मग सज्जन - सात्विक पुरुषांच्या ठायी आढळणाऱ्या असत्याचरणाला क्षम्य कसे मानता येईल? यामुळे असत्याचरण आसुरी वृत्ती असून अध:पतीत करणारी - सर्वनाशकारी भयानक वृत्ती आहे.

: 8 :

*असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।*
*अपरस्परसंभूतं किमन्यत् कामहैतुकम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **जगत् असत्यं:** जगत सत्यरहित आहे
- **अप्रतिष्ठं:** निराधार म्हणजे आश्रयरहित आहे
- **अनीश्वरं:** निरीश्वर म्हणजे ईश्वराखेरीज आहे
- **अपरस्परसंभूतं:** कामविकाराने प्रेरित स्त्री - पुरुषांमुळे आपोआप उत्पन्न झाले आहे
- **किं अन्यत्:** याशिवाय आणखी कुठले कारण आहे?
- **कामहैतुकं:** मूळ कारण कामच आहे म्हणजे केवळ विषयोपभोगासाठीच
- **ते आहु:** असे ते आसुरी वृत्तीचे म्हणतात

### अर्थ

ते आसुरी स्वभावाचे लोक असे सांगतात की हे जग आधाररहित म्हणजे आश्रयरहित, सर्वथा खोटे आणि ईश्वराशिवाय आपोआप केवळ स्त्री-पुरुषांच्या संयोगातून उत्पन्न झाले आहे म्हणूनच केवळ 'काम' हेच त्याचे कारण आहे, त्याशिवाय दुसरे काय कारण आहे ?

*म्हणती लटिकें विश्व निराधार निरीश्वर ।*
*काम - मूलक हें सारें कोठलें सह - कार्य तें ॥*

**विषय:** आसुरी वृत्तीच्या लोकांच्या पाच गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) जगत् असत्य असून त्यात सत्याचरण नाही. 2) जगत् निराधार आहे. 3) जगत् निरीश्वर आहे. 4) काम - विकारांनी प्रेरित स्त्री - पुरुषांनी उत्पन्न केलेले आहे. 5) याशिवाय आणखी काय कारण आहे ? जगाचे मूळ कारण कामच आहे.

या श्लोकात आसुरी वृत्तीच्या लोकांची विचारधारा वर्णिली गेली आहे.

### स्पष्टीकरण

1) **जगत् असत्यम्:** जगत असत्य आहे म्हणजे जगात सत्याचरण नाही. आसुरी वृत्तीचे लोक बघतात की जगात सत्याधारे तर कुणी चालत नाही. सत्याचे गुणगान वाटेल तेवढे केले जाते पण प्रत्यक्ष व्यवहारात तर लोक असत्याचाच आश्रय घेताहेत. जगात जर सत्याचा आधार असेल तर असत्य खूप कमी दिसायला हवे पण लहानापासून थोरापर्यंत लोक असत्य बोलण्यात अडखळत नाहीत. संकोच करत नाहीत. व्यापारी, वकील, बॅरिस्टर तर असे मानूनच चालताहेत की सत्याच्या आधारे त्यांचे काम भागणार नाही पण हा विचार चुकीचा आहे. गांधीजींनी सत्याच्या आधारेच वकीली केली होती.

2) **अप्रतिष्ठम्:** जगत धर्माच्या आधारावर नसून ते निराधार आहे. आसुरी लोकांचे दुसरे आकलन आहे की जगताला धर्माचाही आधार नाही कारण की लोक सत्याप्रमाणे धर्माचीही पर्वा करत नाही. धर्म म्हणजे नीतीचे नियम. समाज व्यवस्थितपणे चालावा म्हणून हे आवश्यक आहेत पण समाजात याच्या विपरीत बघायला मिळते. धर्म म्हणतो की अधिक संपत्ती नको. यामुळे लोकसंख्या वाढीचा स्फोट होईल आणि खायला अन्न मिळणे अवघड होऊन बसेल. यामुळे दु:खात वाढ होईल. यामुळे संतान विषयक मर्यादा ध्यानी घेऊन विषय सेवन करायला हवे. विषय सेवन भोग उपभोगासाठी नसून संतानोत्पत्तीसाठीच

आहे पण या मर्यादेचे पालन कुणी करत नाही यामुळे आपल्या देशात सर्वाना अन्न मिळत नाही. धर्म म्हणतो की संपत्ती गोळा करु नका, धनोपार्जनाच्या मागे लागू नका पण समाजात धर्माचा हा कायदाही कुणी पाळायला तयार नाही. सर्व लोकांची प्रवृत्ती अधिक धन मिळवायची आहे.

3) अनीश्वरम्: जगत् निरीश्वर आहे म्हणजे जगाचा कुणी नियंता नाही. ईश्वर जर असेल तर तो समर्थ असूनही जगात असत्य, पापाचरण आणि अन्याय का चालु देतो? ईश्वर तटस्थ राहून जगाचा तमाशा बघत असेल तर असा ईश्वर काय कामाचा? अशा ईश्वराचे असणे अन् नसणे सारखेच. त्याच्याशिवाय जगाचा सारा व्यवहार आपोआप चालत आहे. हे प्रत्यक्षपणे दिसून येत आहे. आपण आंब्याचे झाड लावतो तर त्यावर आपोआप आंबे लागतात. सूर्य नियमितपणे सकाळी आपल्या सेवेस्तव हजर असतो. पावसाळ्यात नियमितपणे पाऊस येतो. यामुळे जगाच्या व्यवहारासाठी ईश्वराची काही विशेष गरज दिसत नाही.

4) **अपरस्परसंभूतं:** काम विकारांनी प्रेरित स्त्री - पुरुषांच्या संयोगातून हे जगत उत्पन्न झाले आहे. यात चेतन आणि जड अशी दोन तत्वे दिसतात. जड सृष्टी आपोआप उत्पन्न होते. चेतन सृष्टीत स्त्री, पुरुष असे दोन वर्ग दिसतात. स्त्री - पुरुष - संयोगातून चेतन सृष्टी उत्पन्न होते. ईश्वर कुणाला उत्पन्न करतो असे काही दिसून येत नाही. अशा प्रकारे सृष्टीचा प्रवाह काम - प्रेरित आहे असा आसुरी वृत्तीच्या लोकांचा विचार आहे.

5) **किं अन्यत् कामहैतुकं ते आहुः** याशिवाय आणखी अन्य काय कारण असू शकते ? आसुरी वृत्तीचे लोक असे मानतात की जगाचे मूळ कारण कामच आहे. आसुरी वृत्तीचे लोक नास्तिक असतात. ते फक्त प्रत्यक्षालाच प्रमाण मानतात. ते शास्त्राला प्रमाण मानत नाहीत. प्रत्यक्षात सारा व्यवहार काम प्रेरितच दिसून येतो. यामुळे प्रत्यक्षाच्या आधारावर ते असा सिध्दांत मांडतात - प्रस्थापित करतात की जगाचे मूळ कारण कामाशिवाय दुसरे असू शकत नाही.

: 9 :

***एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुध्दय: ।***
***प्रभवन्त्युग्रकर्माण: क्षयाय जगतोऽहिता: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एतां दृष्टिं अवष्टभ्य:** या मिथ्या दृष्टीचा म्हणजे ज्ञानाचा आश्रय - आधार - घेऊन
- **नष्टात्मान:** जे नष्टात्मे आहेत
- **अल्पबुध्दय:** जे अल्पबुध्दी आहेत
- **अहिता:** (जगाचे) अकल्याण करणारे
- **उग्रकर्माण:** क्रुर कर्मे आचरणारे
- **जगत: क्षयाय:** जगाला नष्ट करण्यासाठी
- **प्रभवन्ति:** उत्पन्न होतात, जन्माला येतात

**अर्थ**

या खोट्या ज्ञानाचा अवलंब करुन ज्यांचा स्वभाव भ्रष्ट झाला आहे आणि ज्यांची बुध्दी मंद आहे असे सर्वांवर अपकार करणारे क्रुरकर्मा केवळ जगाच्या नाशाला समर्थ ठरतात.

***स्वीकारुनि अशी दृष्टि नष्टात्मे ज्ञान - हीन ते ।***
***जगताच्या क्षयासाठीं निघाले रिपु हिंसक ॥***

विषय: या श्लोकात सहा विषयांची चर्चा आली आहे. 1) मिथ्या दृष्टीचा आश्रय घेऊन. 2) नष्टात्मे म्हणजे आत्म - विमुख आणि देहाभिमुख झालेले. 3) अल्पबुध्दी. 4) जगाचे अकल्याण करणारे. 5) क्रूर कर्मे आचरणारे आहेत. 6) (ते) जगाला संपवण्यासाठी जन्माला आलेले आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **एतां दृष्टिं अवष्टभ्य:** असत्य दृष्टीचा आश्रय वा आधार घेऊन. आधीच्या श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे ते सत्य, धर्म वा ईश्वराला मानत नाहीत - संपूर्ण जगाला काममूलक मानतात - अशी मिथ्या दृष्टी घेऊन - बाळगून

2) **नष्टात्मान:** ज्यांचा स्वभाव नष्ट झाला म्हणजे जे देहाभिमुख आणि आत्मविन्मुख झाले आहेत. माणूस स्वत:ला देहस्वरुपी मानूनच सारे व्यवहार करतो; तरीही लोक ईश्वर, धर्म आणि नीतीला मानतात. आपल्या सर्व

क्रिया देहबुध्दीने प्रेरित असतानाही देहबुध्दी वाढवण्याकडे आपले ज्ञानपूर्वक प्रयत्न नसतात. नकळत आपला व्यवहार देह बुध्दीने प्रेरित होऊन चाललेला असतो पण आसुरी वृत्तीचे लोक धर्म वा सत्याला मानत नाहीत. देहालाच सर्वस्व मानून चालत असल्यामुळे ते आत्माभिमुख होत नाहीत. धर्म वा नीतीचे पालन करणारे लोक आत्मनिष्ठ असतात असे नाही. आत्मनिष्ठा वेगळीच वस्तु आहे. धर्मनिष्ठ पुरुष देहात आसक्त असूनही देहासक्तीला दोष रुप मानतो. यामुळे कधी - ना - कधी या आसक्तीतून बाहेर पडण्याची त्याच्या बाबतीत शक्यता असते. आसुरी वृत्तीधारी पुरुष देहासक्तीलाच मुख्य मानतात. ते त्यातून बाहेर पडायचा प्रयत्न कदापि करत नाहीत. अशाप्रकारे सामान्य अज्ञानी पुरुष आणि आसुरी वृत्तीधारी पुरुषाच्या वृत्तीत फरक आहे.

3) **अल्पबुध्दय:** जे अल्पबुध्दीयुक्त म्हणजे संकुचित दृष्टीचे आहेत. आसुरी वृत्तीधारी लोक देहालाच सर्वस्व मानतात यामुळे त्यांची दृष्टी सदा संकुचित असते. कुठल्याही प्रश्नावर ते व्यापक दृष्टीने विचार करु शकत नाही. आत्मा वा परमात्मा यावर श्रध्दा असली तर दृष्टी व्यापक होऊ शकते कारण की आत्मा वा परमात्मा दोन्ही व्यापक तत्वे आहेत. आसुरी लोकांची दृष्टी संकुचित म्हणजे देहापर्यंतच मर्यादित स्वरुपाची असते. यामुळे ते अल्पबुध्दी म्हणवले गेले. आपल्या बुध्दीच्या जोरावर ते समाजात संघर्षच वाढवतात.

4) **अहिता:** जगाचे अकल्याण करणारे. आपल्या संकुचित दृष्टीमुळे आसुरी वृत्तीचे लोक जगाचे अहितच - अकल्याण - करतात. संकुचित दृष्टीमुळे ईर्ष्या वाढते. संत तुलसीदासजी लिहितात - करहिं मोहबस द्रोह परावा अर्थात् मोहाला बळी पडून परक्याशी द्रोह करतात.

5) **उग्रकर्माण:** क्रुर कर्मे आचरणारे. ज्यात कुणाचे कल्याण होणार नाही अशा कर्मांना क्रुर कर्मे असे म्हणतात. एवढेच नव्हे पण सर्वासाठी अहितकारी कर्मे करण्यातच आसुरी वृत्तीधारी लोक मग्न असतात. मनुष्याच्या ठायी दैवी आणि आसुरी दोन्ही वृत्ती नांदतात. कुठली वृत्ती विकसित करायची हे माणसावर अवलंबून आहे. बालपणी सत्संग न लाभता कुसंगती मिळाली तर आसुरी वृत्ती बळावते. इतरांच्या कल्याणात आनंद मानणे दैवी वृत्तीचे लक्षण आहे. दुष्टांचे वर्णन करताना संत तुलसीदासजी लिहितात -

***जब काहू के देखहिं विपती।***
***सुखी भये मानहुँ जग - नृपती॥***

अर्थात् - एखाद्याला विपत्तीत पडलेले बघून विश्वाचे राज्य प्राप्त झाले की काय असा आसुरी वृत्तीच्या लोकाना आनंद होतो.

6) **जगत: क्षयाय प्रभवन्ति:** जगाचा क्षय करण्यासाठी म्हणजे जगाला नष्ट करण्यासाठी ते जन्माला आले आहेत. आसुरी वृत्तीच्या लोकांचा थोडक्यात समारोप केला आहे. जगाला नष्ट करण्यासाठीच ते जगतात. जीवनाचे ध्येय स्व - पर - कल्याण असायला हवे पण असुरांच्या जीवंत असण्याचा उद्देश इतरांचे अहित करायचा असल्यामुळे त्यांचे स्वत:चे हितही साधले जात नाही. इतरांचे म्हणजे सर्वाचे हित यातच आपले हित सामावलेले आहे हा सिध्दांत ज्यांच्या जीवनात व्याप्त झाला ते धन्य होत. त्यांचे जीवन यशस्वी होय. असुरांची काही एक स्वतंत्र जमात नसल्यामुळे प्रत्येकाने आपल्या ठायी दुर्गुण आहेत की नाहीत याचे परीक्षण करुन बघायला हवे आणि दुर्गुण असतील तर ते घालवण्याकामी प्रयत्न करायला होत. संत तुलसीदासजी म्हणतात -

***परहित सरिस धरमु नहिं भाई।***
***परपीडा सम नहिं अधमाई॥***
***नरसरीर धरि जे परपीरा***
***करहिं ते सहहिं महा भव -भीरा॥***

अर्थात् - इतरांचे कल्याण करण्यासारखा कुठला श्रेष्ठ धर्म नाही आणि इतराना दु:ख देण्यासारखा कुठले पाप नाही, अधमता नाही. मानव देह लाभल्यावरही जे लोक इतराना दु:ख देतात, त्याना जगात महान दु:ख भोगावे लागते.

: 10 :

*काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विता: ।*
*मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान् प्रवर्तन्तेऽशुचिव्रता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **दुष्पूरं कामं आश्रित्य:** ज्यांची तृप्ती होणे शक्य नाही अशा कामनांचा आश्रय घेऊन
- **दम्भमानमदान्विता:** दंभ, मान आणि मदाने युक्त
- **मोहात् असद्ग्राहान् गृहीत्वा:** अविवेकपूर्वक खोट्या धारणांना ग्रहण करुन म्हणजे मिथ्या सिध्दांतांचे ग्रहण करुन
- **अशुचिव्रता: प्रवर्तन्ते:** अपवित्र व्रतांनी युक्त म्हणजे भ्रष्टाचारयुक्त व्यवहार करतात

**अर्थ**

ते दंभ, मान आणि मदाने युक्त असलेले पुरुष कोणत्याही प्रकारे पूर्ण न होणाऱ्या कामनांचा आश्रय घेऊन अज्ञानाने खोटे सिध्दांत स्वीकारुन भ्रष्ट आचरण करीत जगात वावरत असतात.

*काम दुर्भर सेवूनि मानी दांभिक माजले ।*
*दुराग्रह - बळें मूढ करिती पाप निश्चयें ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ज्यांची तृप्ती होऊ शकणार नाही अशा म्हणजे दुष्पूर कामनांचा आश्रय घेऊन. 2) दंभ, मान आणि मदाने युक्त. 3) अविवेकाने असत् धारणांना ग्रहण करुन. 4) अपवित्र व्रतांनी युक्त व्यवहार करतात.

**स्पष्टीकरण**

1) **दुष्पूरं कामं आश्रित्य:** ज्या कामनांची तृप्ती होणे शक्य नाही अशा कामनांचा आश्रय घेऊन. जगात कामना वा वासना अनंत आहेत. एक कामना पूर्ण होते न होते, तोवर दुसरी कामना समोर उभी ठाकते. इंद्रियांचे विषय खूप लोभसवाणे असतात त्यात माणूस बुडून जातो. या कामनांमध्ये आसुरी वृत्तीचे लोक डुंबलेले असतात.

2) **दंभमानमदान्विता:** दंभ, मान आणि मद वगैरे विकारांनी युक्त. आत एक आणि बाहेर दुसरे याला म्हणतात दंभ. दंभी ठक असतो. त्यावर विश्वास नाही ठेवता येत. दंभाचा आधार असत्याचरण आहे. मानी व्यक्ती सन्मानासाठी भुकेला असतो. आसुरी वृत्तीचे लोक श्रीमंत असू शकतात. श्रीमंत जन दुराग्रही असले तरी लोक त्यांचा आदर देतात. मद म्हणजे गर्व. अभिमान तर सर्वांच्या ठायी कमी - अधिक प्रमाणात असतोच. प्रबळ अहंकार म्हणजे मद होय. दंभ, मान आणि मद हे तीन प्रबळ विकार आसुरी लोकांमध्ये असतात.

3) **मोहात् असद्ग्राहान् गृहीत्वा:** अविवेकाने चुकीच्या धारणांना ग्रहण करुन. आसुरी पुरुषांच्या ठायी विवेक नसतो. आसुरी वृत्तीमुळे सत्यस्वरुपी आत्म्याची प्रेरणा लाभत नाही. यामुळे अविवेक उपजतो आणि तो सत्यस्वरुपी आत्म्याला  झाकोळून टाकतो. यामुळे आसुरी वृत्तीच्या पुरुषाच्या ठायी चुकीच्या कल्पना आणि चुकीच्या धारणाच नांदतात. तो प्रत्येक गोष्टीला चुकीच्या पध्दतीनेच बघतो.

4) **अशुचिव्रता: प्रवर्तन्ते:** अपवित्र व्रतात प्रवृत्त होतात. धर्मनिष्ठ पुरुषांच्या व्रतात आणि आसुरी वृत्तीच्या माणसांच्या व्रतात खूप फरक असतो. सात्विक, सरळ व्यक्तीचे व्रत समाजासाठी कल्याणकारक असते आणि आसुरी वृत्ती धारण करणाऱ्यांचे व्रत समाजाला अध:पतीत करते. त्याच्यासाठी दुराचरण हेच व्रत आहे. प्रत्येकाच्या हातून चुकीचे काम कधी ना कधी होतेच पण आसुरी वृत्तीधारी चुकीचे काम ठरवून - काहीशा हट्टाने करतो.

: 11 :

*चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिता: ।*
*कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिता: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च अपरिमेयां:** आणि अनंत, अपरिमित
- **प्रलयान्तां चिन्तां:** आमरण न सुटणाऱ्या चिंतांचा
- **उपाश्रिता:** आश्रय घेऊन रहातात
- **कामोपभोगपरमा:** जे विषय भोगांना भोगण्यात लीन आहेत
- **एतावत् इति निश्चिता:** (ते) यालाच श्रेष्ठ पुरुषार्थ मानतात

**अर्थ**

तसेच ते आमरणांत असंख्य चिंतांचे ओझे घेतलेले विषयोपभोग भोगण्यात मग्न असलेले 'हाच काय तो आनंद आहे' असे मानणारे असतात.

*अपार धरिती चिंता जी मेल्या हि सरे चि ना।*
*गढले काम - भोगांत जणूं सर्वस्व मानुनी ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) आणि अगणित - अपरिमित (अनंत). 2) न सुटणाऱ्या चिंतांचा आमरण आश्रय घेऊन रहातात. 3) जे विषयभोग भोगण्यात लीन असतात. 4) विषयोपभोगालाच परम म्हणजे श्रेष्ठ पुरुषार्थ मानतात.

**स्पष्टीकरण**

1) **अपरिमेयां:** अपरिमित, असीम, आसुरी वृत्तीचे लोक अगणित चिंतांनी घेरले गेलेले असतात. लहान बालक निश्चिंत असते कारण की त्याला आईचा आधार असतो. गुरुच्या आधारावंर शिष्य निश्चिंत असतो पण साधु-संतांवर, धर्म-नीतीवर, ईश्वरावर श्रध्दा न बाळगणारा माणूस वरकरणी जरी धनसंपन्न आणि सुखी वाटत असला तरी चिंतामुक्त नसतो. चिंता नाना प्रकारच्या असतात. प्रापंचिक काळजी, लोकसेवा करताना उद्भवणाऱ्या चिंता, आध्यात्मिक साधना करताना निर्माण होणाऱ्या चिंता, अशा प्रकारे मुख्यत: तीन प्रकारच्या चिंता असतात. प्रापंचिक काळजी केवळ लेकरा - बाळांशी संबंधित असते. प्रपंचाची मर्यादित कक्षा ओलांडून सेवाकार्यरत अशा लोकसेवकांनाही जनहिताची काळजी असते आणि आध्यात्मिक साधना करतांना भक्ती, ध्यान, वैराग्य कसे लाभेल ? ईश्वर साक्षात्कार कसा होईल ? रोज प्रगतीचा आलेख कसा उंचावेल याचीही काळजी लागून असते. आसुरी वृत्तीचे पुरुष तर प्रापंचिक काळजीसोबत धनप्राप्ती वगैरे चिंतेतच फसलेले असतात. ईर्ष्या, मत्सर, द्वेषापोटी इतरांचे नुकसान होऊन आपला फायदा कसा होईल ? ही अशुभवृत्ती त्यांच्या ठायी असते. अशाप्रकारे ते नाना प्रकारच्या अपरिमित, अगणित चिंतांमध्ये बुडालेले असतात.

2) **प्रलयान्तां चिन्तां उपाश्रिता:** न सुटणाऱ्या चिंतांचा आश्रय घेऊन आमरण असतात. आधी सांगितले की चिंता अपरिमित - अगणित असतात. आता सांगताहेत की चिंता आमरण टिकून असतात. एक दिवस मरावे लागणार आहे, हे सर्वांना ठाऊक आहे. मृत्युनंतर दुसरे शरीर धारण करावे लागेल. त्यावेळी पूर्व जन्माशी संबध्द कुठलीही वस्तु आपल्या सोबत जाणार नाही, हे ठाऊक असतानाही आमरण चिंता वहात जगणे अज्ञानाचे लक्षण होय. अज्ञान जेवढे खोल तेवढी काळजीही खोल. मृत्यु अगदी नजिक येऊन ठेपला आहे तरी मनात मुलगा - मुलगी वा कुटुंबीजनांची काळजी भेडसावत असते. अशाप्रकारे आसुरी वृत्तीच्या लोकांचे जीवन चिंताग्रस्त असते.

3) **कामोपभोगपरमा:** विषयांच्या उपभोगात बुडालेले असतात. इथे काम शब्दाचा अर्थ कामविकार न मानून शंकराचार्यांनी शब्द वगैरे पाच विषय मानले आहेत कारण की दहाव्या श्लोकात कामविकारांची चर्चा आली आहे. पाच विषयात गढून जाणेही अज्ञानाचे लक्षण आहे. पाच विषयांचा संयमपूर्वक उपयोग करणे वेगळे आणि त्यांच्या उपभोगात गढून जाणे वेगळे होय. विषयांच्या उपभोगामुळे अंतत: दु:खच अनुभवायला मिळते. आसुरी वृत्ती बळावल्यावर चित्त बेशुध्द होऊन जाते. दारुड्याला जसे भान उरत नाही तसेच धर्म, नीती आणि सत्याचे भान न उरल्यामुहे बेशुध्द अवस्था होते.

4) **एतावत् इति निश्चिता:** (ते ) विषयोपभोगालाच श्रेष्ठ पुरुषार्थ मानतात. तीन स्थिती झाल्यात 1) आपल्या उन्नतीची दृष्टी राखून विषय सेवन करणे - म्हणजे संयमपूर्वक पंच विषयांचे सेवन करणे. 2) विषयात गढून जाणे. 3) आणि विषयांनाच श्रेष्ठ पुरुषार्थ मानणे. विषयोपभोगाला श्रेष्ठ पुरुषार्थ मानणे ही अध:पतनाची - कोसळण्याची - पराकाष्ठा आहे. विषयांमध्ये गढून गेला असतांना जो त्याला श्रेष्ठ पुरुषार्थ मानत नाही तो कधी - ना - कधी विषयोपभोगांपासून मुक्तही होऊ शकतो पण याला पुरुषार्थ मानणारा पुरुष यातून बाहेर पडू शकत नाही - कदापि पडू शकत नाही. त्याच्या उन्नतीचा पथ अवरुध्द होऊन जातो. यामुळे विषयोपभोगाला पुरुषार्थ मानणे भयंकर आहे. यामुळे याला आसुरी वृत्ती म्हटले जाते, ही भयानक आणि सर्वनाशी वृत्ती आहे. सात्विक गुणीजनांनाही आसुरी वृत्तीपासून सावध रहायला हवे. पाच - दहा मिनिटांसाठी जरी आसुरी वृत्ती जागृत झाली

आणि त्या समयी देश, काल, निमित्त - परिस्थिती - अनुकूल झाली तर सात्विक जनही अयोग्य कार्य करुन बसतात.

: 12 :

*आशापाशशतैर्बध्दा: कामक्रोधपरायणा: । ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आशापाशशतै: बध्दा:** जे शेकडो आशापाशात बध्द आहेत
- **कामक्रोधपरायणा:** जे काम - क्रोधात म्हणजे विषय भोगात परायण आहेत
- **कामभोगार्थम्:** विषयोपभोगांच्या पूर्तीसाठी
- **अन्यायेन:** अन्यायपूर्वक
- **अर्थसंचयान् ईहन्ते:** धन वगैरे पुष्कळशा पदार्थांचा संचय करु इच्छितात

**अर्थ**

शेकडो आशांच्या पाशानी आबध्द ते मनुष्य काम-क्रोधात बुडून जाऊन विषयभोगांसाठी अन्यायाने धन वगैरे पदार्थांचा संग्रह करण्याचा प्रयत्न करत असतात.

*आशेचे लेईले फांस काम - क्रोधांत तत्पर ।*
*भोगासाठीं अधर्मानें इच्छिती धन - संचय ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) जे शेकडो आशांच्या पाशात आबध्द आहेत. 2) काम - क्रोधात परायण आहेत. 3) ते पंचविषयांच्या उपभोगासाठी अन्यायाने धनसंचय करतात.

**स्पष्टीकरण**

1) **आशापाशशतै: बध्दा:** जे शेकडो आशांच्या जाळ्यात गुरफटलेले आहेत. मागील श्लोकात सांगितले आहे की आसुरी वृत्तीचे लोक अगणित चिंतांमध्ये गुंतून आहेत. इथे असे सांगताहेत की अनेक आशांमध्ये गुरफटलेले असतात. इथे पाश शब्दाचा प्रयोग केलेला आहे. आशा काही अनुचित वृत्ती नाही, उलट ती तर संग्रहणीय वृत्ती आहे. निराश न होता सदैव आशावादी - आशान्वित असणे हा तर दैवी संपत्तीचा गुण आहे पण शेकडो आशांच्या जाळ्यात गुरफटून असणे - त्यात आसक्त असणे दु:खदायक आहे. यातही इतरांच्या हिताची आशा राखणे, धैर्य धारण करणे एक वेगळी गोष्ट आहे पण अनेक कुटिल आशा बाळगणे चुकीचे आहे. लोकांच्या अकल्याणाची आशा धरणे चुकीचे आहे. लोकांच्या यशस्वी होण्याची आशा बाळगणे वेगळी गोष्ट आहे. इतरांच्या अहिताचा विचार करणे, नुकसान व्हावा यासाठी नाना योजना आखणे आणि त्यांच्या यशस्वितेची आशा मनात धरणे आसुरी वृत्ती आहे, भयंकर आहे. आशा आणि चिंतेच्या संदर्भात विनोबांनी एक उदाहरण दिले आहे. लेकरु आजारी जरी पडले तरी आईला लेकराच्या मरणाची काळजी वाटते. डॉक्टर जेव्हा सांगून टाकतात की लेकरु आता वाचणार नाही तरी आईला आशा वाटते की काही अघटित होणार नाही कदाचित लेकरु वाचेल. अशाप्रकारे आसक्तीमुळे चिंता आणि आशा दोन्ही दिशांनी माणूस त्रस्त होतो.

2) **कामक्रोधपरायणा:** जे काम आणि क्रोधात गुरफटलेले आहेत. काम - क्रोध परायण आहेत. काम - क्रोधाच्या सोबत लोभालाही जोडता येऊ शकते. याच अध्यायाच्या 21 व्या श्लोकात या तिघांना नरकाची द्वारे म्हटले आहे. काम वा क्रोध जेव्हा उपजतात तेव्हा मन क्षुब्ध होऊन जाते, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. भगवान म्हणताहेत की काम आणि क्रोधात परायण आसुरी वृत्तीधारी लोक भयंकर आहेत. काम शब्दाचा व्यापक अर्थ इच्छा घेतला तरी हे दिसून येते की इच्छा तृप्त व्हाव्यात यासाठी माणूस नाना प्रकारे प्रयत्न करतो. इच्छेचा स्वभावधर्मच आहे की ती माणसाला आपल्या तृप्तीच्या प्रयत्नात प्रवृत्त करते.

कामना तृप्त झाली नाही तर क्रोध उपजतो. क्रोधामुळे माणूस वेडापीसा होतो. क्रोधाच्या भरीस पडून हवे तसे बकतो, आवेशात खूनही करु शकतो. क्रोध म्हणजे आतली ऊष्णता वा उत्तेजना. अशाप्रकारे काम, क्रोध आणि लोभ या तीन मुख्य वृत्ती जेव्हा जागृत होतात अविवेकी पुरुष त्यांच्या अधीन होतो. विवेकी पुरुष अत्यंत जागृत असल्यामुळे कमालीचा सावधान असतो. तो या

तीन वृत्तींची उत्पत्ती होताच त्याना विवेकाने हटवतो पण आसुरी वृत्तीधारी व्यक्ती मात्र या वृत्तीच्या वशात रहाते.

3) **कामभोगार्थम् अन्यायेन अर्थसंचयान् ईहन्ते:** पाच विषयांच्या उपभोगासाठी अन्यायपूर्वक, अधर्माने वा वाटेल त्या मार्गाने धन संग्रह करायची इच्छा बाळगून पैसा जोडतो.

पाच विषयांचा उपभोग करणे हेच ज्यावेळी जीवनाचे ध्येय ठरते तेव्हा ते मिळवण्यासाठी माणूस प्रयत्न करेलच करेल. धर्मपालन करत पाच विषयांचा उपभोग करता येऊ शकतो आणि अधर्मानेही विषयोपभोग केला जाऊ शकतो. धर्मपालन करुन केलेला विषयांचा उपभोग संयमपूर्ण असेल पण अधर्ममार्गाचा उपभोग अमर्यादित स्वरुपाचा असेल. अमर्यादित भोग भोगण्याची तीव्र लालसा मनात धारण केलेले लोक वाटेल त्या प्रकारचा अवलंब करतात. धनाशिवाय भोग भोगणे अवघड आहे. यामुळे माणूस धन कमवण्याचे प्रयत्न करतो. आसुरी मार्ग अधर्म - असत्याचा मार्ग असल्यामुळे वाटेल त्या प्रकारे पैसा जोडणे त्यांना स्वाभाविकच वाटते. ते नीती वगैरेची पर्वा करत नाहीत.

*: 13 :*

***इदमद्य मया लब्धमिदं प्राप्स्ये मनोरथम् ।***
***इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अद्य मया इदं लब्धं:** आज मी हे प्राप्त केले आहे
- **इदं मनोरथं प्राप्स्ये:** हे मनोरथ पूर्ण करीन म्हणजे मला मिळणार आहेत
- **इदं अस्ति:** एवढे तर आहेच
- **ते इदं अपि धनं:** आणि हेही धन
- **पुन: भविष्यति:** आणि भविष्यात प्राप्त होईल

**अर्थ**

ते विचार करतात की मी आज हे मिळविले आहे आणि आता मी हा मनोरथ पूर्ण करीन. माझ्याजवळ हे इतके द्रव्य आहे आणि पुन्हासुध्दा हे मला मिळेल.

***हें आज लाभलें आतां तो जोडीन मनोरथ ।***
***हें आहे तें हि होईल माझें चि सगळें धन ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) आज मी हे संपादित म्हणजे प्राप्त केले आहे. 2) पुढे हे मनोरथ प्राप्त करीन. 3) इतके तर मजपाशी आहेच आणखी इतर धन ही (प्राप्त करीन.)

**स्पष्टीकरण**

1) **अद्य मया इदं लब्धं:** आज मी हे शेत, घर, गाई वगैरे मिळवले आहे.

आसुरी वृत्तीधारी लोकांच्या ठायी लोभवृत्ती फार मोठ्या प्रमाणात असते. यामुळे ते हर प्रकारे आपली मालकी - संपत्ती वाढवण्याच्या प्रयत्नात लागलेले असतात. संपत्ती रोज - रोज वाढत राहो हाच एकमेव विचार त्यांच्या चित्तात वसतो. श्रीमंत लोक इतरांना कर्ज देतात आणि अधिकाधिक व्याज मिळवायचा प्रयत्न करतात. लोकांच्या अडी - अडचणींचा जास्तीत जास्त फायदा उठवतात. एखादा लाचार माणूस जर कर्जफेड करु शकत नसेल तर शेत - बैल वगैरे ताब्यात घेऊन घेतात. अशा प्रकारे आपली संपत्ती कशी वाढेल या चिंतनात आयुष्य घालवतात.

2) **इदं मनोरथं प्राप्स्ये:** हा मनोरथ मी सिध्दीस नेईन. असे लोक भविष्यात अधिकात अधिक धन प्राप्त करायचे मनसूबे रचतात. हे मनसूबे इतरांना ठगण्यासाठी असतात. अशा प्रकारे ठगल्यामुळे जर समोरची व्यक्ती निर्धन झाली तर सहृदय माणसाच्या मनावर आघात होतो, खूप दु:ख होते पण आसुरी वृत्तीधारी व्यक्तीमधला दया भाव, दया वृत्ती नष्ट होऊन गेल्यामुळे इतरांना ठगून, लुटून आपली संपत्ती वाढवण्यात अशा लोकाना मुळीच त्रास होत नाही.

3) **इदं अस्ति मे इदं अपि धनं पुन: भविष्यति:** हे धन तर माझ्यापाशी आहेच आणि हे धनही उद्या मला मिळेल, माझेच होऊन जाईल.

धनामुळेच भोग प्राप्त होतात या समजुतीमुळे धन वाढवण्याची लालसा मनात बाळगणे हे तर लक्षात घेण्यासारखे आहे पण मुख्य मुद्दा हा धर्म - अधर्माचा आहे. धर्माने धन संपादित करावे की अधर्माने मिळवावे? सर्वांनीच अधर्माने धन मिळवण्याचे प्रयत्न केलेत तर धर्माचे काय अस्तित्व उरेल? यामुळे धर्माचा त्याग न करता

धन मिळवणे म्हणजे स्वत: साठी, आपल्या परिवारासाठी आवश्यक धन इतरांना न लुटता प्राप्त करुन घेतले तर समाज व्यवस्था डगमगत नाही पण धर्माचा त्याग करुन धन मिळवण्यात समाजाचे नुकसान आहे. यामुळे ज्यात समाजाचे अहित वा अकल्याण आहे, ते त्याज्यच मानायला हवे. आसुरी वृत्ती फोफावली की लोभवृत्ती वाढते. लोभाला पापाचा बाप मानले गेले आहे. हे जे माझ्यापाशी जे धन गोळा झाले आहे ते तर माझे आहेच पण मी अधिक धन मिळवीन अशी लालसा आसुरी पुरुषाच्या ठायी असते. तुलसीदासजी म्हणतात. लोभई ओढन लोभई डासन - म्हणजे त्यांचे लोभच अंथरुण आणि पांघरुण असते. साक्षात् नरकसुध्दा या दुष्टांचा द्वेष करते.

: 14 :

*असौ मया हत: शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।*
*ईश्वरोऽहमहं भोगी सिध्दोऽहं बलवान् सुखी ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मया असौ शत्रु: हत:** मी या शत्रुला मारले आहे
- **अपरान् अपि हनिष्ये:** इतर शत्रुंनाही मारीन
- **अहं ईश्वर:** मी ईश्वर आहे
- **अहं भोगी:** मी भोगी म्हणजे ऐश्वर्य भोगणारा आहे
- **अहं सिध्द:** मी सिध्द म्हणजे सर्व सिध्दींनी युक्त आहे
- **बलवान्:** मी बलवान आहे
- **सुखी:** आणि सुखी आहे

**अर्थ**

या शत्रुला मी मारले आणि त्या दुसऱ्या शत्रुनाही मी मारीन. मी ईश्वर आहे, ऐश्वर्य भोगणारा आहे. मी सर्व सिध्दींनी युक्त आहे आणि बलवान तसाच सुखी आहे.

*मीं मारिला चि तो शत्रु मारीन दुसरे हि जे ।*
*मी स्वामी आणि मी भोक्ता सुखी मी सिध्द मी बळी ॥*

**विषय:** या श्लोकात आसुरी वृत्तीच्या स्वभावाच्या सहा गोष्टी वर्णिल्या आहेत. 1) मी या शत्रुला मारले आहे, दुसऱ्या शत्रुनाही मारीन. 2) मी ईश्वर आहे. 3) मी भोगी आहे. 4) मी सिध्द आहे. 5) मी बलवान आहे. 6) मी सुखी आहे.

**स्पष्टीकरण**

1) **मया असौ शत्रु: हत: अपरान् अपि हनिष्ये:** मी या शत्रुला मारले आहे, दुसऱ्या शत्रुलाही मारीन. आसुरी वृत्तीच्या ठायी मदही वाढलेला असतो. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, ईर्ष्या वगैरे विकार खूप वाढलेले असतात. मद वाढल्यामुळे सत्तेची - प्रभुत्वाची वृत्ती वाढीस लागते. अशा परिस्थितीत इतर बलवान सहन होत नाहीत, त्यांच्याबाबत स्पर्धा निर्माण होते. कुटुंबात प्रेमाचा उत्कर्ष नांदतो तिथे बहुधा कुटुंब प्रमुखाच्या मनी मद न जागताही सर्वावर आपले प्रभुत्व चालवू बघतो. अशा प्रकारे मद नसतानाही देहाचा अहंकार कुटुंबातही प्रभुत्वाची भावना उत्पन्न करतो तर मग ज्यांच्या ठायी मद वृत्तीचा उत्कर्ष झाला आहे - मद वृत्ती बळावली आहे - असे जर सर्वांवर प्रभुत्व गाजवायची भावना बाळगत असतील तर त्यात आश्चर्य ते काय ?

2) **अहं ईश्वर:** मी ईश्वर आहे. असुरांची ईश्वरावर श्रध्दा नसते. त्यांच्या ठायी स्वत: विषयीच प्रभुत्वाची भावना वाढीस लागते. राष्ट्रात जिथे लोकशाही संपून एकाच्याच हाती राष्ट्राची सारी सत्ता एकवटते, तिथे मदामुळे अशी भावना उत्पन्न होते. तो इतरांचा सल्लाही मानत नाही. एकाच्या हाती सारी सत्ता एकवटणे नुकसानकारक आहे. सात्विकता असेल तर प्रभुत्वाची भावना फोफावत नाही पण तेवढी योग्यता नसेल तर 'माझ्यासारखी योग्यता अन्य कुणाचीच नाही, मीच खरा मार्गदर्शक आहे, माझ्यामुळेच साऱ्या राष्ट्राचे उत्थान होईल'. या विचाराने त्याचे सारे कार्य चालते. अशा स्थितीत त्याच्या समोर प्रतिस्पर्धी उभे ठाकतात आणि त्याला पदच्युत करण्याची संधी शोधली जाते. आसुरी वृत्तीचा उत्कर्ष झाला की संपत्तीप्रमाणे सत्ताही आपल्या हाती असावी, ही भावना फोफावते.

3) **अहं भोगी:** मी भोगी आहे. वैभव - संपन्न आहे. आपल्या वैभवाचे भान असणे आसुरी वृत्तीचे लक्षण आहे. संपत्ती, कर्तृत्व, ज्ञान, बळ, अधिकार वगैरे नाना प्रकारचे वैभव असते. कुणापाशी काही तर कुणापाशी काही वेगळे वैभव. आसुरी वृत्तीमुळे वैभवाचा अहंकार फोफावतो.

4) **अहं सिध्दः** मी सिध्द आहे. कुणा व्यक्तीच्या ठायी विशेष कर्तृत्व प्रकट होऊ लागते वा असामान्य अशी विद्वत्ता वा गुण प्रकट होताना दिसू लागतात त्यावेळी सहाजिकपणेच मनात हा विचार द्दढ होऊ लागतो की मी वाटेल ते करु शकतो, काहीही करायचे सामर्थ्य माझ्या ठायी आहे. आत्मविश्वास असणे ही चांगली गोष्ट आहे पण त्याबाबत अभिमान बाळगणे मात्र आसुरी वृत्तीचे लक्षण आहे.

5) **बलवान:** मी बलसंपन्न आहे शक्तीमान आहे. इथे बलवान म्हणजे बाह्य बळ, सत्ता. संत तुलसीदासजींनी लिहिले आहे.

*बड अधिकार दच्छ जब पावा।*
*अति अभिमान ह्रदय तहँ आवा॥*
*नहिं कोऊ अस जनमा जग माहीं।*
*प्रभुता पाइ जाहि मद नाही॥*

अर्थात् - प्रभुता - अधिकार प्राप्त झाल्यावर मद निर्माण झाला नसेल असा कुणी माणूस नाही. अधिकार प्राप्त झाल्यावर वाटते की - वाटु लागते की - माझ्यासारखा जगात दुसरा कुणी बलवान नाही.

6) **सुखी:** मी सुखी आहे. सुखसंपन्न आहे. साधनांची विपुलता झाली की सुखाचा अनुभव यायला लागतो. प्रभुत्वामुळे सारे लोक त्याच्या अधीन रहातात. जेव्हा सर्व त्याचे ऐकू लागतात तेव्हा त्याला सुख लाभते. सारे त्याला सन्मान देतात त्यामुळे सुख उत्पन्न होते. शेतकरी - शेतमजूराची कुणी स्तुती करत नाही. खरे तर मजूराची प्रशंसा व्हायला हवी कारण की मजूर शेतात राबले नाहीत तर सर्वाना खायला अन्न मिळणार नाही पण जगात ज्याच्यापाशी विद्वत्ता आहे, पैसा आहे, त्यांची स्तुती होते. अशाप्रकारे सर्व प्रकारची अनुकूलता असल्यामुळे सुखानुभव होऊ लागतो आणि यामुळे मी खूप सुखी आहे, जगात माझ्यासारखा सुखी कुणी नाही, असे वाटायला लागते पण हे सुख बाह्य अनुकूलतेमुळे अनुभवता येते. ही अनुकूलता नसेल तर सुखानुभव होणार नाही, अर्थात हे काही खरे सुख नाही.

: 15 :

*आढयोऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सद्दशो मया।*
*यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिता:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आढ्य:** मी सर्व साधनसंपन्न धनिक आहे
- **अभिजनवान् अस्मि:** मी कुलीन - खानदानी - थोर कुळात जन्माला आलेलो आहे
- **मया सद्दश: क:** अन्य: अस्ति: माझ्यासारखा दुसरा कोण आहे?
- **यक्ष्ये दास्यामि:** मी यज्ञ करतो, दान करतो
- **मोदिष्ये:** मी आनंद आहे
- **इति अज्ञानविमोहिता:** अशा प्रकारे अज्ञानाने मोहित आहे

**अर्थ**

मी मोठा धनिक आणि मोठ्या कुळात जन्माला आलेलो आहे, माझ्यासारखा दुसरा कोण आहे ? मी यज्ञ करीन, दाने देईन, मजेत राहीन. अशा प्रकारे अज्ञानाने मोहित झालेले आहेत.

*कुलीन मी चि संपन्न माझी जोडी कुठें असे।*
*यज्ञ - दान - विलासी मी जल्पती अज्ञ मोहित॥*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टींची चर्चा आली आहे. 1) मी सर्वसाधनसंपन्न आहे. 2) मी कुलीन - खानदानी आहे. 3) माझ्यासारखा दुसरा जगात कोण आहे? 4) मी यज्ञ करतो, दान देतो, आनंदी आहे. 5) अशा प्रकारे अज्ञानाने मोहित आहे.

**स्पष्टीकरण**

1) **आढ्य:** मी सर्वसाधनसंपन्न आहे. साधन संपन्न असणे वेगळे आणि त्याचा अहंकार बाळगणे वेगळे. एखाद्याला इतकी अनुकूलता साधते की तो साधनसंपन्न बनून जातो मग त्याचे भान होते - जाण येते. हे भयंकर आहे. हा अहंकार माणसाला अध:पतीत करतो. हा भाव सज्जन व्यक्तीच्या ठायीही जरी जागला तरी तिच्यातही तेवढ्या अंशी दुर्जनभाव आहे, असे समजायला हवे.

2) **अभिजनवान् अस्मि:** मी कुलीन आहे, माझा जन्म उच्च कुळात झाला आहे. सहज जशी साधनसंपन्नता असते तसाच उच्च कुळातही कुणाचा जन्म झालेला असतो. उच्च कुळात जन्म लाभणे हे पूर्वजन्मीच्या चांगल्या कर्माचेच फळ आहे. हे नि:संशय पण यात व्यक्तीचा स्वत:चा तर काही पुरुषार्थ नसतो. सत्संगामुळेही पुण्य कर्माकडे वृत्ती वसते. सत्संग आपल्या अधिकारातला विषय नसल्यामुळे उच्च कुळात जन्म लाभणे जरी पूर्वजन्मीच्या पुण्यकर्माचे फळ असले तरी त्याचा अभिमान बाळगणे उचित नाही.

3) **मया सदृश: क:** अन्य: अस्ति माझ्यासारखा जगात दुसरा कोण आहे? ज्याच्या ठायी आसुरी वृत्ती फोफावते त्याचा अहंकार इतका वाढतो की माझ्यासारखा दुसरा कुणी जगात नाही, असे तो समजू लागतो. आपल्या योग्यतेचा खरा परिचय तर आपल्या परिचयात आलेले लोकच देऊ शकतात. माणूस स्वत:बद्दल काही खरे मत देऊ शकत नाही, कारण की त्याला आपले दोष कमीच दिसतात आणि तो नेहमी स्वत:चा बचावच करत रहातो.

4) **यक्ष्ये दास्यामि मोदिष्ये:** मी यज्ञ करतो, दान करतो, आनंदी आहे. आसुरी वृत्तीप्रधान लोकांचे सर्व आचरण अभिमानयुक्त असले तरी काहीसे प्रशंसनीयही असते. उदाहरणार्थ यज्ञ करणे, दान करणे. अशी काही कामे चांगली असली तरी जो अहंकार बाळगतो ज्याचा निषेध केला गेला आहे. चांगल्यातले चांगले कार्यही जर अहंकारप्रेरित असले तर हीन दर्जाचे बनून जाते. चांगले दूधही आंबटपणामुळे नासून जाते. यज्ञ आणि दान केल्याने आनंद वाटतो, त्या आनंदाचेही भान जागते. 'मी केवढा आनंदी आहे.' यात विलासितेचा भाव आहे. म्हणजे यज्ञ, दान करणे हेही विलासतेचेच अंग आहे. यज्ञ, दान करण्यात जर त्यागाची भावना असेल आणि त्यातून आनंद लाभणार असेल तर तो सात्विक आनंद मानला जाईल पण इथे यज्ञ आणि दान करण्यात विलासितेचा भाव असल्यामुळे त्याद्वारे उत्पन्न होणारा आनंद विलासितेचा आनंद आहे. कर्म करण्यात जसा भाव असेल तसेच त्याचे मूल्य असेल.

5) **इति अज्ञानविमोहिता:** अशाप्रकारे अज्ञानाने मोहित असतात, मोहात गुरफटून जातात. आसुरी वृत्ती अज्ञानामुळेच वाढते. यामुळे भगवान म्हणताहेत की आसुरी वृत्तीच्या लोकांचे आचरण असे असते की ते कदापि अज्ञान कमी करण्याकामी मदतरुप ठरणार नसते. ते अज्ञान वाढवतेच. उत्तमातले उत्तम कर्म आचरायचे, उत्तमातले उत्तम गुण वाढवण्याचे ध्येय असेल तर त्याने अज्ञान कमी व्हायला मदत मिळते पण याउलट विचार असेल आणि जीवन घालवले जात असेल तर ते अज्ञान वाढवण्यातच मदत करेल. यामुळे ज्याने अज्ञान दूर करायचे ध्येय बाळगले असेल त्याला दैवी वृत्तीच्याच अधीन रहायला हवे, आसुरी वृत्तीच्या अधीन रहायला नको.

: 16 :

***अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृता: ।***
***प्रसक्ता: कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनेकचित्त विभ्रान्ता:** अनेक प्रकारे भ्रमित चित्त झालेले
- **मोहजालसमावृता:** मोहरुपी जाळ्यात गुरफटून रहातात
- **कामभोगेषु प्रसक्ता:** विषयांच्या उपभोगात अत्यंत आसक्त आहेत
- **अशुचौ नरके पतन्ति:** महा अपवित्र अशा नरकात पडतात

**अर्थ**

अनेक प्रकारांनी भ्रांत चित्त झालेले, मोहाच्या जाळ्यात अडकलेले आणि विषयभोगात अत्यंत आसक्त असे आसुरी लोक महा अपवित्र अशा नरकांमध्ये पडतात.

***भ्रमले चित्त भेदूनि मोह - जालांत गुंतले ।***
***पडती विषयासक्त नरकांत अमंगळ ॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत. 1) जे नाना प्रकारच्या कल्पनांनी भ्रांतचित्त होऊन गेले आहेत.

2) जे मोहरुपी जाळ्यात पूर्णत: गुरफटून गेले आहेत. 3) जे विषयोपभोगात आकंठ बुडालेले आहेत. 4) ते अपवित्र नरकात पडतात.

**स्पष्टीकरण**

1) **अनेकचित्तविभ्रान्ता:** ज्यांचे चित्त अनेक प्रकारे भ्रमित होऊन गेले आहे. मनात जेव्हा कामना उसळतात, म्हणजे जेव्हा स्वार्थप्रेरित अनेक मनसूबे, अनेक योजना चित्तात जोर करतात तेव्हा चित्त भ्रमित होऊन जाते कारण की स्वार्थप्रेरित योजनांना प्रत्यक्ष अमलात आणणे सोपे नाही. यात मुख्य ध्येय तर पैसा कमावणेच आहे. उदाहरणार्थ एखादा कारखाना उभारायची कल्पना जर मनात उद्भवली तर असा कारखाना उभारणे वा मिल उभी करणे सोपी गोष्ट नाही. त्यात सुरुवातीलाच मोठे भांडवल गुंतवावे लागते. त्याला कौशल्याने चालवावे लागते अन्यथा त्यात तोटा होऊ लागतो. यामुळे तो चिंतेचा विषय बनून जातो. असे लोक शांततेने भोजन करु शकत नाहीत. त्यांना सुखाची झोपही येत नाही.

2) **मोहजालसमावृता:** जे मोहरुपी जाळ्यात पूर्णत: गुरफटलेले असतात. शरीरविषयक मोह, कुटुंबीजनांविषयी मोह तर प्रत्येक पुरुषाच्या चित्तात असतोच. पुण्यवान कर्मे करणाऱ्यांबाबत कर्मे क्षीण होण्याची शक्यता असते. पाप कर्मे करण्यांबाबत पाप कर्मे क्षीण होण्याची शक्यता नसून ती वाढतच रहातात. यामुळे ते सदैव मोहजाळात गुरफटून असतात असे भगवान सांगताहेत. संत तुलसीदासजी म्हणतात

*करहिं मोहबस द्रोह परावा।*
*संतसंग हरिकथा न भावा॥*

अर्थात् - मोहाने अभिभूत होऊन परक्याचा द्रोह करतात. त्यांना ना सत्संगती भावत ना हरीकथा गोड वाटत. मोह म्हणजे स्वार्थाची पराकाष्ठा होय. जिथे स्वार्थाची पराकाष्ठा असेल तिथे माझे - तुझे हा फरक कायम असणारच. यात दुसऱ्यांचा उत्कर्ष सहन न होऊन द्रोह वृत्ती जागी होते - होऊन जाते.

3) **कामभोगेषु प्रसक्ता:** जे विषयोपभोगात पूर्णत: तल्लीन आहेत. 10 व्या श्लोकात भगवंताने सांगितले आहे की काममाश्रित्य दुष्पूरं - ज्याची कदापि तृप्ती होणे शक्य नाही अशा काम वासनेचा आश्रय - आधार - घेऊन. मग 11 व्या श्लोकात म्हटले कामोपभोगपरमा: पाच विषयांच्या उपभोगातच जे रत आहेत - तल्लीन आहेत.

इथेही हीच गोष्ट सांगितली आहे. पंचविषय इतके काही आकर्षक आहेत की सारे लोक त्यांच्याकडे आकृष्ट होतात. नेत्रांना रुपाचे आकर्षण होऊन जाते अशाप्रकारे प्रत्येक इंद्रियांच्या विषयात लोक तल्लीन होऊन जातात. हे आसुरी वृत्तीचे लक्षण आहे.

4) **अशुचौ नरके पतन्ति:** ते अपवित्र, अमंगळ अशा नरकात जाऊन पडतात. नरक म्हणजे अगदी निम्न प्रकारचे जीवन. 'करावे तसे भरावे' ,'जसे कर्म तसे फळ' हा दृढ सिध्दांत आहे. असुरांचे आचरण इतक्या हीन दर्जाचे असते की मरणानंतर निम्न दर्जाचे जीवन लाभणे स्वाभाविक आहे. हीन दर्जाच्या जन्मात प्रतिकूल परिस्थितींशी सामना करावा लागतो. बाह्य सुखे कमीत कमी मिळतात. घरादाराचा पत्ता नसतो. लेकरे वाढू लागली म्हणजे त्यांच्या संगोपनाची काळजी सतावते. अशाप्रकारे दु:खच दु:ख भोगावे लागते. अत्यंत गरीबीत जसे सुख लाभत नाही तसे अत्यंत श्रीमंतीतही सुख लाभत नाही. यामुळे खूप गरीबी नसावी आणि खूप श्रीमंतीही नसावी म्हणजे काही अंशी सुख लाभण्याची शक्यता असते.

: 17 :

*आत्मसंभाविता: स्तब्धा धनमानमदान्विता:।*
*यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ते आत्मसंभाविता:** ते (असुर) आपल्या गुणांची प्रशंसा करतात
- **स्तब्धा:** अभिमानी
- **धनमानमदान्विता:** धन, मानाने मदांध
- **दंभेन:** दंभपूर्वक
- **अविधिपूर्वकं:** अशास्त्रीय
- **नामयज्ञै:** नाममात्र यज्ञाद्वारे
- **यजन्ते:** यजन करतात

### अर्थ

ते स्वत:लाच श्रेष्ठ मानणारे घमेंडखोर लोक धन आणि मान यांच्या मदाने उन्मत्त होऊन केवळ नावाच्या यज्ञांनी पाखंडीपणाने शास्त्रविधीहीन यज्ञ करतात.

*स्वयं - पूजित गर्विष्ठ धनें मानें मदांध ते।*
*नांवाचे करिती यज्ञ दंभानें अव्यवस्थित॥*

**विषय:** या श्लोकात चार विषयांची चर्चा आली आहे. 1) ते (असुर) आपल्या गुणांची स्वत: प्रशंसा करतात. 2) अभिमानी, उध्दट स्वभावाने. 3) धन - मानाने मदांध. 4) दंभपूर्वक - अशास्त्रीय, नावापुरता यज्ञ करुन जीवनचर्या घालवतात.

### स्पष्टीकरण

1) **ते आत्मसंभाविता:** ते असुर आपल्या गुणांची स्वत:च प्रशंसा करतात, आत्मप्रशंसा करतात.

आपल्या गुणांची प्रशंसा करणे सामान्य विषय आहे पण आपल्या गुणांचे तर भान असावे पण दोषांचे अजिबात भान न राखणे ही तर आसुरी वृत्ती आहे. हा दोष सर्वत्र आढळतो. हे आसुरी वृत्तीचे लक्षण आहे असे मानायला कुणी तयार नाही होणार. प्रत्येकाचे आत्मपरीक्षण इतके तीव्र नसते पण आपल्या गुण - दोषांचे तीव्र परीक्षण असायला हवे. यामुळे गुण - दोषांचे यथायोग्य दर्शन घडेल. आपल्या गुण - दोषांचे यथायोग्य दर्शन खूप कमी लोकांना असते. अधिकांश लोक तर आपल्या गुणांना वाढवून आणि दोषांना कमी करुन बघतात. काही लोक आपले दोषच प्रामुख्याने बघतात. काहींना आपल्या गुणांचेच भान असून दोषांचे भान नसते. काही लोकांना आपल्या दोषांचेच भान असून गुणांचे भान नसते, असेच लोक आपल्या दोषांना घालवून गुणवृध्दी करण्याकामी समर्थ ठरतात.

2) **स्तब्धा:** अभिमानी, गर्विष्ठ, अनम्र - उध्दट भाव वाला. ज्याना सदैव आपल्या गुणांचेच भान असते अशा लोकांचा अहंकार वाढत रहातो. सम्राट अकबराच्या काळात बनारसीदास नामक एक कवी होऊन गेले. त्यांनी आपल्या 'नाटकसमयसार' नामक ग्रंथात आठ प्रकारचा अहंकार वर्णिला आहे.

*जाति, लाभ, कुल, रुप, तप, बल, विद्या, अधिकार।*
*इनको गर्व न कीजिए, ये मद अष्ट प्रकार॥*

अर्थात् - जात, लाभ, कुळ, रुप, तपाचरण, बल, विद्या आणि अधिकार म्हणजे हे आठ अहंकार आहेत, याविषयी अभिमान बाळगू नये.

अभिमान कुणाच्या ठायी कमी असतो तर कुणाच्या ठायी अधिक असतो. जिथे मोठ्या प्रमाणात अहंकार दिसून येत असेल तिथे आसुरी वृत्ती फोफावत चालली आहे असे समजावे. जिथे अहंकार वाढतो तिथे विनम्रता कशी काय राहू शकते ? यामुळे हे गर्विष्ठ अभिमानी लोक अनम्र म्हणजे उध्दट स्वभावाचे असतात, असे सांगितले आहे.

3) **धनमानमदान्विता:** धन - मानाने मदांध असतात. माणसाचा खराखुरा विकास अत्यंत गरीबी वा अत्यंत श्रीमंतीत होत नाही. सामान्य माणसाच्या विकासासाठी मध्यम स्थिती अनुकूल असते. मध्यम वर्गातल्या माणसापाशी खूप संपत्ती नसल्यामुळे मान - सन्मानाची शक्यता खूप क्षीण असते. ज्यांच्यापाशी खूप संपत्ती असते त्याना खूप मान - सन्मान लाभतो. यामुळे अहंकार खूप वाढतो तो मदांध होऊन जातो.

4) **दंभेन अविधिपूर्वकं नामयज्ञै:** यजन्ते अव्यवस्थित, केवळ नाममात्र असा यज्ञ करुन यजन करतात. काही श्रीमंत लोक यशासाठी प्रवृत्त होतात. यज्ञ धार्मिक भावनेनेही केला जातो आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी वा दिखाऊपणासाठीही केला जातो. काही श्रीमंत लोक पारंपारिक धार्मिक भावनेने यज्ञ करतात. यात केवळ धार्मिकता असते, दुसरे काही कारण नसते. काही लोक धार्मिक भावनेसोबत मान - सन्मानाची इच्छाही बाळगतात. काही लोक धार्मिक भावना न राखता केवळ प्रतिष्ठा व मान - सन्मानासाठी यज्ञ करतात. अशा प्रकारे यज्ञ करणाऱ्यांचे तीन गट झालेत 1) केवळ धार्मिक भावनेने यज्ञ करणारे. 2) धर्मभावनेच्या सोबत मान - सन्मान - प्रतिष्ठा लाभावी म्हणून यज्ञ करणारे. 3) धर्म भावना न राखता केवळ मानसन्मान - प्रतिष्ठा चाहण्यासाठी यज्ञ करणारे. या तिसऱ्या गटाच्या दृष्टीने सांगताहेत की स्वतंत्रपणे यज्ञात श्रध्दा नसतांना मान प्रतिष्ठा लाभावी म्हणून दंभपूर्वक यज्ञ करतात. तेही अव्यवस्थितपणे म्हणजे अशास्त्रीय

पध्दतीने करतात म्हणून त्या यज्ञासाठी 'नावापुरता यज्ञ' - नाममात्र यज्ञ - असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. समाजात यज्ञाची प्रतिष्ठा असल्यामुळे इथे यज्ञाचे उदाहरण दिले गेलेय. ते यज्ञाशिवाय जे काही कार्य करतील त्यात केवळ बाह्य देखावाच राहील. मान - सन्मान, प्रतिष्ठेचाच विचार राहील. ही आसुरी वृत्ती आहे कारण की ही वृत्ती समाजहितकारक नाही - समाजाचे कल्याण करणारी नाही.

: 18 :

*अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिता: ।*
*मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयका: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहंकारं बलं दर्पं:** अहंकार, बळ, दर्प म्हणजे घमेंड
- **कामं च क्रोधं संश्रिता:** आणि काम - क्रोध वगैरेला परायण झालेले म्हणजे आश्रय घेणारे
- **आत्मपरदेहेषु:** आपल्या आणि दुसऱ्याच्या देहात (स्थित)
- **मां प्रद्विषन्त:** माझा द्वेष करणारे
- **अभ्यसूयका:** गुणी जनांचा तिरस्कार करणारे परनिंदक लोक

**अर्थ**

ते अहंकार, बळ, घमेंड, कामना आणि क्रोध वगैरेंच्या आहारी गेलेले आणि दुसऱ्यांची निंदा करणारे पुरुष आपल्या व इतरांच्या शरीरात असलेल्या मज अंतर्यामीचा द्वेष करणारे असतात.

*अहंकारें बळें दर्पें काम - क्रोधें भरुनियां ।*
*माझा स्व - पर - देहांत करिती द्वेष मत्सरी ॥*

**विषय:** या श्लोकात तीन विषय आहेत. 1) अहंकार, बळ, दर्प, काम आणि क्रोधाचा आश्रय घेणारे. 2) आपल्या आणि दुसऱ्याच्या देहात विद्यमान असणाऱ्या माझा द्वेष करणारे. 3) गुणीजनांचा तिरस्कार करतात.

**स्पष्टीकरण**

1) अहंकारं बलं दर्पं कामं च क्रोधं संश्रिता: अहंकार, बळ, दर्प, काम आणि क्रोधाचा आश्रय घेणारे बहुधा लोक या पाच विकारांनी ग्रस्त असतात. याचा प्रभाव सर्वावर समान नसतो. कुठे विकार अधिक तर कुठे कमी. असुरांचे हे वैशिष्ट्य आहे की त्यांच्या ठायी पाच विकार सामान्य प्रमाणात नसून कमी - अधिक विशेष प्रमाणात असतात. यामुळे त्याना 'आसुरी' म्हटले जाते.

पाच विकारातला पहिला विकार अहंकार आहे. अहंकार मूळ वृत्ती आहे म्हणजे त्यापासून देहधारणा होते. अहंकार नसेल तर देहधारणा न होऊन मोक्षच लाभेल. 'देह वगैरे सारा संघात मी आहे.' हे याचे स्वरुप, लक्षण आहे. अहंकारामुळेच देह वगैरे आणि आपल्या नातलगांमध्ये आसक्ती असते. अशा विशेष आसक्तीला 'आसुरी' म्हटले जाते.

दुसरा विकार बळ आहे. बळ अनेक प्रकारचे असते. शारीरिक बळ, धनाचे बळ, गुणांचे बळ, कर्तृत्वशक्तीचे बळ. इथे धनबळाबाबतच बोलले जात आहे. यात सत्ताबळही समाविष्ट आहे. आसुरी वृत्तीच्या उत्कर्षात सत्तेचा दुरुपयोग अधिक प्रमाणात होतो.

तिसरा विकार दर्प आहे. दर्प म्हणजे विशेष अभिमान. अहंकारामुळे आसक्ती उपजते आणि आसक्ती दु:खाला जन्म देते. विशेष अहंकार उत्पन्न झाला - होऊन गेला - तर दु:ख अधिक होईलच. अभिमान वाढला म्हणजे चित्तात अस्वस्थता जागते, कारण की अभिमान वाढला म्हणजे अन्य विकारही वाढतात आणि मग शांततेचा अनुभव येणे शक्य नाही.

चौथा विकार आहे काम. सर्वच प्राणीमात्रांच्या ठायी काम विकार प्रबळ असतो. त्याच्या मूळाशी प्रजोत्पत्तीची प्रेरणा आहे. ही नसेल तर सृष्टी चालणार नाही. सृष्टी चालावी अशी ईश्वराची इच्छा आहे. स्त्री आणि पुरुषाचे शरीर पंचमहाभूतांनीच बनले आहे. या दृष्टीने दोघांमध्ये काही फरक नाही पण प्रजोत्पत्तीच्या दृष्टीने दोघांमध्ये लिंग विषयक भेद आहे पण काम विकाराचे अधिक्य दोष रुप आहे. कामांध बनणे ही 'आसुरी वृत्ती' आहे.

पाचवा विकार क्रोध आहे. क्रोधही सर्व प्राणीमात्रांच्या ठायी असतो. क्रोधाच्या मूळात वीरवृत्ती आहे. क्रोधात

भिन्नी व्यक्तीही खून करायला प्रवृत्त होऊन जाते. आपल्यावर ताबा उरत नसल्यामुळे क्रोध दोषरुप आहे. क्रोध जागल्यावर आपली शांती तर नष्ट होऊनच जाते पण दुसऱ्याची शांतताही भंग पावते. क्रोधात दुसऱ्याची क्रोध वृत्ती जागृत झाली तर दोघे आपसात भांडायला प्रवृत्त होतील. अशा प्रकारे जिथे क्रोध उत्पन्न होणेच दोषरुप आहे तिथे अतिशय क्रोध तर आसुरी वृत्तीच आहे. पाच विकारांची प्रबळता आसूरी वृत्तीचे लक्षण आहे.

2) **आत्मपरदेहेषु मां प्रद्विषन्तः** मी व्यक्तीच्या आणि इतर सर्वांच्या देहात विद्यमान असतो तरीही माझा द्वेष करणारे. भगवंत सर्वांच्या ठायी समान रुपात आहे. ते सत्य आणि धर्माच्या पथावर चालण्याची प्रेरणा देत रहातात. जे ईश्वराच्या प्रेरणेनुसार अजिबात न चालता केवळ मायेच्या अधीन होऊनच जीवनाच्या समस्त क्रिया करतात ते ईश्वराचा द्वेष करतात असे मानायला हवे. नवव्या अध्यायातील अकरा आणि बाराव्या श्लोकात भगवंतांनी सांगितले आहे की मानव देहात ईश्वर प्रखरपणे प्रकट झाला असल्यामुळे माणूस माणसाचा द्वेष करत असेल तर तो ईश्वराचाच द्वेष करणे आहे. त्यांचे कर्म व्यर्थ, त्यांच्या आशा निरर्थक, त्यांचे ज्ञान टाकाऊ, ते आसुरी प्रकृती वा राक्षसी प्रकृतीच्या आश्रयाने रहातात, मोहात पडतात. प्रत्येक जीवाच्या ठायी ईश्वर आहे. पशु - पक्ष्यांच्या ठायीही आहे पण केवळ मानवी देहातच ईश्वराला ओळखण्याची शक्ती आहे. यामुळे पशु - पक्षी काम, क्रोध, द्वेष वगैरे वृत्तींचा त्याग करु शकत नाहीत. ईश्वरी प्रेरणेनुसार वाटचाल करायचे ठरवून माणूस या वृत्तींचा त्याग करु शकतो. मनुष्य देह लाभल्यावरही जर आपण या विकारांच्या अधीन होऊन गेलो तर ईश्वराचाच तो अवमान आहे, तो साक्षात् ईश्वराशीच द्रोह करणे आहे.

3) **अभ्यसूयका:** गुणवान लोकांचा तिरस्कार करणारे असतात. ईर्ष्यावृत्ती वाढल्यामुळे इतरांचे गुण बघताच दाह उत्पन्न होतो. संत तुलसीदासजी म्हणतात -

***खलन्ह हृदय अति ताप बिसेखी।***
***जरहिं सदा पर संपति देखी॥ जहँ कहूँ निंदा सुनहिं***
***पराई। हरषहिं मनहु परी निधि पाई॥***

अर्थात् खल म्हणजे दुष्ट, आसुरी वृत्तीच्या लोकांच्या ठायी खूप संताप असतो. त्यांचे मन सदा अशांत, प्रक्षुब्ध असते. यामुळे इतरांचा उत्कर्ष अन् संपत्ती बघताच त्यांच्या मनाचा भडका उडतो. जिथे कुठे दुसऱ्याची निंदा ऐकली म्हणजे संपत्ती मिळाल्याचा त्याना आनंद होतो. तुलसीदासजी दुसऱ्या स्थानी लिहितात -

***काहू कै जो सुनहिं बडाई। सवास लेइं***
***जनु जुडी आयी॥ जब काहू के देखहिं विपती***
***सुखी भये मानहुँ जगनृपती॥***

अर्थात् - कुणाची स्तुती ऐकली की थंडी वाजून ताप आल्यावर जसा श्वास वेगाने चालू लागतो तशी यांच्या चित्ताची परिस्थिती होऊन जाते. कुणाला संकटाने घेरले गेलेले बघितले तर त्यांना राज्यपदाची प्राप्ती झाल्यासारखे सुख होते.

: 19 :

***तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्।***
***क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तान् द्विषतः** क्रूरान्: माझा द्वेष करणाऱ्या त्या क्रूर पुरुषांना
- **अशुभान् नराधमान्:** अपावन म्हणजे पापाचरण करणाऱ्या नराधमांना
- **संसारेषु आसुरीयोनिषु एवः** जगात आसुरी योनीतच
- **अहं:** मी
- **अजस्त्रं:** नित्य, वारंवार
- **क्षिपामि:** टाकत असतो

**अर्थ**

त्या द्वेष करणाऱ्या, पापी, क्रूर कर्मे करणाऱ्या नराधमांना मी संसारात वारंवार आसुरी योनीतच टाकतो.

***द्वेषी क्रूर असे पापी संसारीं हीन जे जन।***
***त्यांस मी टाकितों नित्य तशा योनींत आसुरी॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) माझा द्वेष करणाऱ्या त्या क्रूर पुरुषांना. 2) अपावन नराधमांना. 3) जगात आसुरी योनीतच टाकत असतो.

**स्पष्टीकरण -**

1) **तान् द्विषतः क्रूरान्:** माझा द्वेष करणाऱ्या त्या क्रूर पुरुषांना. या श्लोकात असुरांना मिळणाऱ्या अशुभ कर्माच्या फळांची चर्चा आली आहे. आसुरी वृत्तीचे लोक ईश्वराचा द्वेष करतात. या श्लोकाचे स्पष्टीकरण करताना विनोबाजींनी असूर पाच प्रकारे द्वेष करतात असे सांगितले आहे. 1) आत्म द्वेष 2) पर द्वेष 3) समाज द्वेष 4) सज्जन द्वेष 5) ईश्वर द्वेष.

पहिला द्वेष आहे आत्म द्वेष. ईश्वर देहात आत्म्याच्या रुपाने - सत्, चित्त, आनंद रुपात विद्यमान असतो. आत्म्याची प्रेरणा सदा सत्याकडेच असते. आसूरी वृत्तीचे लोक आत्म - प्रेरणेने न चालणारे असतात. यामुळे ते आत्म्याचा द्वेष करतात.

दुसरा द्वेष पर द्वेष आहे. ते दुसऱ्यांचा द्वेष करणारे म्हणजे दुसऱ्यांचे नुकसान होवो, अकल्याण होवो, अहित होवो असे चिंतन करतात आणि तदनुसार इतरांशी व्यवहार करतात.

तिसरा द्वेष समाज द्वेष आहे. संपूर्ण समाजाचे अहित चाहणारे. यात प्रामुख्याने राष्ट्रा - राष्ट्रात आढळून येणाऱ्या द्वेष भावनेचा विचार करुनच पर द्वेष आणि समाज द्वेष यांना वेगवेगळे मानले आहे. आपापसातील द्वेष भावना पर द्वेष तर राष्ट्रांमधला द्वेष समाज द्वेष होय.

चौथा द्वेष सज्जन द्वेष आहे. लोकांना सज्जन आवडतात, त्यांची प्रशंसा करतात. सज्जनांना समाजात विशेष प्रतिष्ठा असते. यामुळे असुरांच्या मनी सज्जनांबदल द्वेष भावना उत्पन्न होते.

पाचवा द्वेष ईश्वर द्वेष आहे. ईश्वर द्वेष म्हणजे ईश्वराच्या अस्तित्वाला न मानणे. जगात आढळणाऱ्या ईश्वरी कायद्यांची अवगणना करणे. ईश्वराची नियमितता, दयाळुता, सहिष्णुता, अखंडता, व्यापकता, अलौकिकता वगैरे गुणांशी द्वेष करणारे म्हणजे त्यानुसार वर्तन न करणारे, भगवंत म्हणतात की अशा पाच प्रकारे द्वेष करणारे क्रूर म्हणजे अगदी भावनाशून्य पुरुष आहेत.

2) **अशुभान् नराधमान्:** अपवित्र नराधमांना अशा प्रकारे इथे असुरांसाठी खूप कडक शब्द वापरला आहे. ईश्वराच्या मुखातून जर कठोर शब्द प्रकट होत असेल तर त्याचा असूर लोकांवर परिणाम होईल आणि त्यांना आपल्या कुकर्मांबाबत पश्चातापही होईल. आयुष्यभर नीच कर्मे आचरत असल्यामुळे असूरांना 'अधम' म्हटले गेले आहे.

3 ) **संसारेषु आसुरीयोनिषु एव अहं अजस्त्रं क्षिपामि:** मी त्याना सतत आसुरी योनीत म्हणजे अतिनिकृष्ट जातीतच टाकतो. द्वेष करणाऱ्या असुरांना, अपावन नराधमांना कुठल्या योनीत जन्म लाभेल ? कर्माचा नियम असा आहे की जो जसे कर्म करेल तसे फळ मिळेल. कर्माचे फळ तत्काळ नाही मिळत. त्याला भोगण्यासाठीच जन्म मिळतो. जन्म - जन्मांतरीच्या पाप - पुण्य कर्मांचा संग्रह संस्कार रुपाने असतो. ज्या कर्मासाठी देश - काल - परिस्थिती - निमित्त अनुकूल असेल त्याचे फळ भोगणे सुरु होते. पूर्वजन्मीचे फळ या जन्मी भोगती आणि या जन्मी केलेल्या कर्माचे फळ पुढील जन्मी भोगावे लागते. पूर्वजन्मी आपण चांगली कर्मे केली असतील तर या जन्मी चांगले आई - वडील लाभतात. आर्थिक स्थिती चांगली राहील. तब्येत चांगली असेल पण एवढी अनुकूलता लाभल्यावरही जर या जन्मी आपण वाईट कर्मे, पाप कर्मे आचरु लागू तर पुढील जन्मी त्यांचे फळ भोगावे लागेल. इथे हाच मुद्दा सांगितला जात आहे की अशाप्रकारे पाप कर्मे आचरणाऱ्या नराधमांना ईश्वर त्यांनी केलेल्या वाईट कर्माचे फळ भोगण्यासाठी आसूरी म्हणजे नीच योनीत सदा म्हणजे दीर्घकाळापर्यंत राखतो.

: 20 :

***आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।***
***मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय मूढा:** हे अर्जुना, ते मूढजन
- **जन्मनि जन्मनि:** नाना जन्मांपर्यत म्हणजे जन्मोजन्मी

- **आसुरी योनिं आपन्ना:** आसुरी योनीतच जन्म पावतात
- **मां अप्राप्य एव:** मला प्राप्त न होता
- **ततः अधमां गतिं यान्ति:** त्याहूनही अधिक अधम गतीत जन्म घेत रहातात

**अर्थ**

हे अर्जुना, ते मूढ मला प्राप्त न होता जन्मोजन्मी आसुरी योनीतच जन्मतात (अशा लोकांविषयी भगवंत पश्चात्ताप करतात की यांना मनुष्य जन्म देऊन स्वत:च्या उध्दारासाठी सुवर्णसंधी दिली असतांनाही यांनी ती फुकट घालवली.) उलट त्याहूनही अती नीच गतीला प्राप्त होतात. अर्थात् घोर नरकात पडतात.

***जोडुनि आसुरी योनि जन्मजन्मांतरी मग।***
***मातें न मिळतां जाती उत्तरोतर खालती॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) ते मूढ जन अनेक जन्मांपर्यत आसुरी योनीलाच प्राप्त करत रहातात. 2) मला प्राप्त न होता. 3) अधम अती अधम गती प्राप्त करतात.

**स्पष्टीकरण**

1) **कौन्तेय मूढा जन्मनि जन्मनि आसुरीं योनिं आपन्ना:** हे अर्जुना, ते मूढ जन अनेक जन्मांपर्यंत आसुरी योनीच प्राप्त करतात. आसुरी वृत्तीधारी लोक जर सदैव पाप कर्मे करण्यातच रत रहातील तर त्यांना आपल्या कर्मानुसार अनेक जन्मापर्यत आसुरी वा नीच योनीतच जन्म घ्यावा लागेल, हे स्पष्ट आहे. मग आसुरी कर्मे करणाऱ्यांना का कधी मुक्ती मिळण्याची कुठली शक्यता नाही? शक्यता जरुर आहे. कर्म करण्यात जर आपणास आनंद वाटत असेल तर ते कर्म करताना दीर्घ काळ आनंद लाभेल. तशाच प्रकारे पाप कर्मे करण्यात आसुरी जनांना आनंद अनुभवायला मिळत असल्यामुळे ते दीर्घकाळपर्यत तीच कर्मे आचरत रहातील, हे स्वाभाविक आहे पण अशा प्रकारे वाईट कर्माचे आचरण करत असताना जर कुणा खऱ्या महात्म्याचा दीर्घकाळ सत्संग लाभला तर ते पापकर्मापासून दूर होऊ शकतात म्हणजे त्यांना पापकर्माविषयी विरक्ती वा द्वेष उपजू शकतो. सत्संगतीचा एवढा प्रभाव पडतो की आयुष्यात बदल होऊन जाईल पण जोवर असा सत्संग लाभत नाही, तोवर ते दीर्घ काळपर्यत नीच योन्यांमध्ये जन्म घेत रहातील.

2) **मां अप्राप्य एव:** मला प्राप्त न होऊन म्हणजे माझी भक्ती प्राप्त न झाल्यामुळे, मूळात तर हेच सांगितले गेले आहे की अशा पाप करणाऱ्यांना माझी ओळख होण्याची शक्यता नाही. हे तर स्पष्टच आहे की जोवर व्यक्ती पापकर्मात तल्लीन राहील तोवर ईश्वराची ओळख होण्याची शक्यता नसते पण पाप कर्मे आचरणाऱ्यांना काय ईश्वर ओळखीचा मार्ग सदा न् कदासाठी बंद झाला? 'मला प्राप्त न होता' याचा अर्थ विनोबांनी 'माझी भक्ती प्राप्त न झाल्यामुळे' असा घेतला आहे. यामुळे आसुरी व्यक्तीसाठी पश्चात्ताप झाल्यावर ईश्वर - दर्शनाकडे वळायची शक्यता उरते. अन्यथा आसुरी पुरुष कायमसाठी आसुरी योनीतच भटकत राहील पण आसुरी व्यक्तीतही ईश्वर विद्यमान असल्यामुळे तीही कधी - ना - कधी ईश्वराकडे चालूच शकते, मार्गक्रमण करुच शकते. यामुळे भगवान सांगताहेत की आसुरी व्यक्ती जोवर पाप कर्मरत असते तोवर तिला माझी भक्ती प्राप्त होणार नाही. पण जेव्हा ती पापकर्मे सोडायला प्रवृत्त होईल, तेव्हा ईश्वर शरणी येईल आणि तिला ईश्वर भक्ती साधल्यामुळे तिचा उध्दार होईल. हीच गोष्ट नवव्या अध्यायातल्या 30 व 31 व्या श्लोकात सांगितली गेली आहे.

3) **ततः** अधमां गतिं यान्ति त्याहूनही अधिक अधम गतीला प्राप्त होतात. जोवर पाप कर्मे होत रहातात तोवर त्या कर्माचे फळ भोगण्यासाठी नीच योनीत जन्म घ्यावाच लागतो. नीच योनीत जन्म घेतल्यावर तिथेही तशीच कर्मे घडत रहातात म्हणून अध:पतनाचे अनेक जन्म घ्यावे लागतात पण पाप कर्मे सुटतील तर अध:पतीत योनीत जन्म घ्यायचा हा क्रम चुकेल आणि पश्चात्ताप वाटला तरच पाप कर्मे सुटतील. कुठलेही काम करतांना अनेक प्रकारच्या चुका होतात हा प्रत्येकाचा अनुभव आहे पण जोवर त्या चुका आपल्या लक्षात येत नाहीत आणि त्यासाठी मनाला संपूर्ण पश्चात्ताप होत नाही तोवर चुकांपासून आपली सोडवणूक होत नाही पश्चात्ताप होताच त्यापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करण्यासाठी आपण प्रवृत्त होऊ.

: 21 :

*त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मन: ।*
*काम: क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **काम: क्रोध: तथा लोभ:** काम, क्रोध आणि लोभ
- **इदं त्रिविधं नरकस्य द्वारं:** ही तीन नरकाची द्वारे आहेत
- **आत्मन: नाशनं:** ही आत्मविनाशकारी आहेत म्हणजे अधोगतीला नेणारी आहेत
- **तस्मात् एतत्त्रयं त्यजेत्:** म्हणून या तिघांचा त्याग करायला हवा

**अर्थ**

काम, क्रोध आणि लोभ ही तीन प्रकारची नरकाची द्वारे आत्म्याचा नाश करणारी आहेत अर्थात् त्याला अधोगतीला नेणारी आहेत म्हणूनच या तिघांचा त्याग करावा.

*काम क्रोध तसा लोभ आत्म - नाशास कारण ।*
*तीन हीं नरक - द्वारें टाळावीं चि म्हणूनियां ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) काम, क्रोध आणि लोभ हे नरकाप्रत नेणारे तीन मार्ग होत. 2) हे मार्ग आत्मविनाशकारी आहेत. 3) यामुळे हे तिन्ही त्याज्य आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **काम: क्रोध: तथा लोभ: इदं त्रिविधं नरकस्य द्वारम्:** काम, क्रोध आणि लोभ ही तीन नरकाची द्वारे आहेत.

असुरांच्या वर्णनाचा समारोप करणारा हा श्लोक आहे. भगवान म्हणतात की एथवर असूरांच्या केलेल्या वर्णनावरुन हे लक्षात आले असेल की आसुरी लक्षणांच्या मूळाशी हे तीन प्रबळ विकार आहेत - काम, क्रोध आणि लोभ. या तिन्ही विकारांच्या माध्यमातून आसूरी लक्षण प्रकट होतात. यामुळे हे तीन विकार नरकात म्हणजे अगदी अधोगतीला नेणारे आहेत. काम, क्रोध आणि लोभ हे तीन विकार माणसाच्या ठायी कमी - अधिक प्रमाणात असतातच. यांना फोफावण्याची संधी अजिबात मिळू नये, हे बघणे आवश्यक आहे आणि इथेच सावध रहायला हवे.

एक सिध्द समजले जाणारे पुरुष एका शहराजवळील एका टेकडीवर एकांतात राहून ध्यान - धारणेत लीन रहात होते. रोज शहरात भिक्षा मागून उदरनिर्वाह करायचेत. एक भगिनी त्यांना खूप भक्तीभावपूर्वक भिक्षा द्यायची. शहरात प्लेगचा प्रकोप झाला आणि या भगिनीचे पती - मुलगा - मुलगी सारेच नातलग वारले. आता ती घरात एकटी राहून गेली. तिच्या मनी वैराग्य उपजले. तिने त्या भिक्षाचारी सिध्द पुरुषाला विनवले. कृपा करुन आपल्या सोबत निवास करु द्यायची विनंती केली. 'मी एकटीच राहून गेले. आपल्या सत्संगतीत माझे जीवन सफल होऊन जाईल.' असे विनवले. आधी तर सिध्दपुरुष काही तयार झाले नाहीत पण खूप प्रार्थना केल्यावर राजी झाले. त्या भगिनी सिध्द पुरुषासोबत राहू लागल्यात. सिध्दपुरुष सावध न राहिल्यामुळे एके दिवशी त्यांचे अध:पतन झाले. यावरुन लक्षात येते की काम विकार किती खोलवर लपून - दडून - बसलेला असतो. संधी मिळत नाही तोवर तो तसाच पडून असतो पण संधी सापडताच आपले रुप प्रकट करतो आणि साधना करणारा साधकही त्याला वश होतो.

एक सिध्दी प्राप्त केलेला सत्पुरुष होता. त्याने पातंजली समाधी प्राप्त करुन घेतली होती. त्यांना चमत्काराची सिध्दी प्राप्त होती. चमत्कार करणारे सिध्द पुरुष असल्याने त्यांच्याभोवताली जवळपास रहाणारी जमात गोळा झाली होती. एके दिवशी हे सिध्दी प्राप्त पुरुष शीर्षासन करत होते. या दरम्यान कुणीतरी काही विचारायला आले. प्रश्न ऐकताच त्या सिध्दी प्राप्त पुरुषाला इतका राग आला की ते बेशुध्द पडले. शुध्दीवर आल्यावर त्यांना तापाने घेरले. ताप चांगला दीड महिन्यांर्पत टिकला. त्यांची चमत्कार दाखवण्याची शक्ती नष्ट होऊन गेली. क्रोध विकाराच्या वश होण्याचा हा परिणाम होता. त्यांना खूप पश्चात्ताप झाला पण चमत्कार करण्याची ती शक्ती गेली ती गेलीच. त्यानंतर ते काम विकारवश झाल्यामुळे तर आणखीही अध:पतीत झाले. समाधी स्थितीला पोहोचल्यावरही काम, क्रोध यासारखे विकार नष्ट होत नाही, हे या उदाहरणावरुन स्पष्ट आहे.

व्यापारी वर्गाला तर हा नित्याचाच अनुभव येतो - असे बघा की सुरुवातीला मनात संकल्प असतो की पन्नास हजार कमवले की संतुष्ट राहू. अधिक धावाधाव नाही करायची, जास्त कमाई नको पण पन्नास हजार मिळाले की हा संकल्प भंग पावतो आणि लालसा वाढते. एक लाख मिळाल्यावर कमवणे थांबवू या पण तो संकल्पही टिकत नाही आणि आयुष्यभर कमवण्याचा हा क्रम सुरुच रहातो.

वीस हजार रुपये गाठीशी घेऊन एक व्यापारी व्यापारासाठी मुंबईला पोहोचले. आपल्या एका घनिष्ट मित्राकडे ते पाच - सहा दिवस थांबले. पोहोचताच हे वीस हजार रुपये मित्राकडे सुपुर्द करुन ते म्हणाले ‘ ही रकम आपल्याकडे सुरक्षित ठेवा. पाच - सहा दिवसांनी हे पैसे घेऊन मी व्यापार करीन. यावरच मला गुजराण करायची आहे.’ आता त्या मित्राच्या मनात लोभ जागला. त्याने ही रक्कम आपल्या व्यापारात वापरली पाच - सहा दिवस लोटलेत. व्यापाऱ्याने मित्रापाशी रकमेची मागणी केली तर ‘तो पैसा तर मी माझ्या व्यापारात वापरला. आता तो परत नाही करता येणार.’ हे ऐकताच व्यापारी चकितच झाला. कुठल्याही प्रकारची लिखापढी झाली नसल्यामुळे कोर्ट केसही करु शकत नव्हता. त्या मित्राने अखेरपर्यंत वीस हजार परत केलेच नाहीत. फार कटकटीनंतर सहा हजार रुपये फक्त परत केलेत, चौदा हजार रुपये तर गिळंकृत केले. लोभवृत्तीच्या अधीन झाल्यामुळे कसे अध:पतन होते या उदाहरणावरुन स्पष्ट होते. यामुळे भगवंत आधी या श्लोकात सांगताहेत की काम, क्रोध आणि लोभ वगैरे सारे विकार नरकात नेतात. पतीत करतात.

2) **आत्मन: नाशनम्:** हे विकार आत्म्याचा नाश करणारे आहेत. काम, क्रोध वगैरे विकारांच्या अधीन झाल्यावर आपण आत्म्याकडे वळू शकणार नाही म्हणजे आत्मस्वरुपाचे ज्ञान प्राप्त करुन घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होणार नाही. जोवर या विकारांचे अस्तित्व मनात असेल तोवर आपल्याला शांतता लाभणार नाही. आत्म्याच्या प्रेरणेनुसार चालायचे ठरवल्यावरच शांतता लाभू शकते. अशा प्रकारे काम, क्रोध, लोभ विकार प्रगती पथावरील अडथळे आहेत.

3) **तस्मात् एतत्त्रयं त्यजेत्:** यामुळे या तिघांचा त्याग करायला हवा. ज्याला रात्रंदिवस आपल्या आणि समाजाच्या हिताची चिंता आहे. त्याने हे तिन्ही विकार त्यागायलाच हवेत. आपण वाघ, सिंह, सर्प यांच्यापासून जसे सावध रहातो तसेच हे विकार आत्म्याचा फडशा पाडणारे म्हणजे सर्वनाश करणारे आहेत, असे समजून यांचा संबंध सोडून द्यायला हवा.

: 22 :

*एतैर्विमुक्त: कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नर: ।*
*आचरत्यात्मन: श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **कौन्तेय एतै: त्रिभि:** हे अर्जुना, या तीन
- **तमोद्वारै: विमुक्त:** नर: तमोगुणांच्या द्वारांपासून मुक्त झालेला पुरुष
- **आत्मन: श्रेय:** आत्मकल्याणाचे
- **आचरति:** आचरण करतो
- **तत: परां गतिं याति:** या माध्यमातूनच तो आत्मगती प्राप्त करतो म्हणजे मला येऊन मिळतो

### अर्थ

हे अर्जुना, या तिन्ही नरकाच्या दारांपासून मुक्त झालेला (अर्थात् काम, क्रोध आणि लोभ वगैरे विकारांपासून मुक्त झालेला) पुरुष आपल्या कल्याणाचे आचरण करतो. (आपल्या उध्दारासाठी ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे आचरण करणे, हेच आपल्या ‘कल्याणाचे आचरण’ आहे.) त्याने तो परम गती मिळवतो. अर्थात् मला येऊन मिळतो.

*तमाचीं हीं तिन्ही द्वारें टाळूनि सुटला मग ।*
*कल्याण - मार्ग सेवूनि पावे उत्तम तो गति ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) हे अर्जुना, या तीन तमोगुणांच्या दारांपासून मुक्त पुरुष. 2) आत्मकल्याणाचे आत्महिताचे आचरण करतो. 3) यातूनच तो परमगती प्राप्त करतो.

### स्पष्टीकरण

1) **कौन्तेय एतै: त्रिभि: तमोद्वारै: विमुक्त: नर:** या तीन तमोगुणांच्या दारांपासून मुक्त पुरुष. काम, क्रोध

आणि लोभ ही तमोगुणाची तीन दारे आहेत. तमोगुणात बुडून जायचे असेल, प्रवेश करायचा असेल तर काम, क्रोध, लोभाशी संबंध ठेऊ शकता. या तीन विकारांपासून मुक्त असलेला पुरुष काय करतो याचे वर्णन इथे भगवान करत आहेत.

2) **आत्मन: श्रेय: आचरति:** आत्महिताचे आचरण करतो. काम, क्रोध, लोभ या विकारांपासून जो मुक्त झाला तो आत्मकल्याणातच रत असतो. या विकारांच्या अधीन झाल्यामुळे मनात आसक्ती असते. शरीर वगैरेची, नातलगांची आसक्ती वाटते आणि त्यामुळेच काम, क्रोध, लोभ वगैरे विकार उत्पन्न होतात. आसक्ती कमी होण्याऐवजी वाढते. विवाहानंतर पती - पत्नी सोबत राहू लागतात. दोघांच्या ठायी परस्पर आकर्षण, आसक्ती असते. प्रेम तर असतेच पण जवळ आल्यामुळे एकमेकांचे दोष दिसून येतात. यामुळे क्रोध उत्पन्न होतो. दोघांनी जर परस्पर गुण दृष्टी राखली तर आपसातला आदर वाढेल. रागात वृध्दी नाही होणार, आनंद कायम राहील. दोघांचा परस्पर पवित्र भाव असला तर काम विकारही उसळी मारणार नाही. अशा प्रकारे काम - क्रोधापासून जर वृत्ती मोकळी राहू लागली तर वृत्तीचा प्रवाह आत्म्याच्या दिशेने वहाता राहील आणि दोघांचे ध्येय नेहमी आत्मकल्याणाचेच असेल.

3 ) **तत: परां गतिं याति:** त्यातूनच तो मोक्षाला म्हणजे श्रेष्ठ गतीला प्राप्त करेल. काम, क्रोध वगैरे विकारांच्या अधीन न होण्याचा सराव झाला तर वृत्ती आत्मकल्याणात रत राहील आणि त्यातूनच तो हळूहळू मोक्ष प्राप्तीची वाट धरेल. काम, क्रोध वगैरे विकारांपासून मुक्त होणे आणि आत्मकल्याणात प्रवृत्त होणे यांचा आपसात संबंध आहे. दोघे एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. दोन्ही हातात हात घालून चालायला हवेत. एकीकडे विकार मुक्तीच्या दिशेने प्रयत्न करणे आणि दुसरीकडे कल्याण कर्मे आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे दोघे हातात हात घालून चालतील तर यश लाभेल. अमका आधी आणि तमका नंतर असा क्रम नाही चालणार. दोघांसाठी सोबत प्रयत्न व्हायला हवेत. म्हणजे एकीकडून विकार घटू लागतील आणि दुसरीकडे आत्मकल्याणाचे आचरण वृध्दींगत होईल. जसजसे आत्मकल्याणाच्या वाटेवर वाटचाल करु तसतसे आतील विकार क्षीण होऊ लागतील. दोघे सोबत असल्यावर कार्य होईल म्हणजे मोक्ष प्राप्त करुन घेण्यात यश लाभेल.

: 23 :

***य: शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारत: ।***
***न स सिध्दिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: शास्त्रविधिं उत्सृज्य:** जो पुरुष शास्त्रविहित विधि - निषेधांचा त्याग करुन
- **कामकारत:** वर्तते: स्वच्छंद भावनेने वागतो
- **स: सिध्दिं न अवाप्नोति:** त्याला सिध्दी मिळत नाही
- **न सुखं:** ना सुख
- **न परां गतिं:** ना श्रेष्ठ गती प्राप्त करुन घेता येत

**अर्थ**

जो मनुष्य शास्त्राचे नियम सोडून स्वत:च्या मनाला वाटेल तसे वागतो, त्याला सिध्दी मिळत नाही परम गती मिळत नाही आणि सुखही लाभत नाही.

***जो शास्त्र - मार्ग सोडूनि करितो स्वैर वर्तन ।***
***न सिध्दि लाभते त्यास न वा सुख न सद् - गति ॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) जो पुरुष शास्त्र - विहित विधी - निषेधांचा त्याग करुन स्वच्छंदी जीवन जगतो. 2) तो सिध्दी प्राप्त करत नाही. 3) सुख प्राप्त करत नाही. 4) परमगती प्राप्त करत नाही.

**स्पष्टीकरण -**

1) **य: शास्त्रविधिं उत्सृज्य कामकारत:** वर्तते जो पुरुष शास्त्रविहित विधी - निषेधांचा त्याग करुन स्वच्छंद भावनेने वागतो. माणसाची सामान्य वृत्ती इंद्रियाधीन होऊन चालण्याची असते. संयमाकडे स्वभावत: मन वळत नाही. शिशु हवे तसे वागतो, त्याच्या क्रिया वाटेल तशा असतात. याचे कारण बालकावस्थेत चित्ताच्या ठायी विवेकाचा अभाव आहे. विवेकाचे क्रियेवर नियंत्रण असते. बालकाच्या बुध्दीचा विकास झालेला नसतो. वाढत्या वयासोबत विवेक शक्ती जागृत होत जाते पण

विवेकशक्तीचा संपूर्ण विकास ज्ञानावस्थेतच होतो. बालपणी संयमाचे मुळीच भान नसते. वाढत्या वयाबरोबर संयमाचे भान जागते पण त्याचा पूर्ण विकास होत नाही. यामुळे वाढत्या वयासोबतही संयमाच्या अभावी असंयमी प्रवृत्ती कमी होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी कमी अधिक प्रमाणात स्वच्छंद वागायची प्रवृत्ती असते. या स्वच्छंदी, असंयमी वृत्तीवर काबू मिळवण्यासाठीच महापुरुषांनी जनकल्याण साधले जावे या हेतुने शास्त्रांची रचना केली आहे. शास्त्र हे विधी - निषेध दर्शक असतात. सत्य बोलावे ही विधी. हिंसा करु नये, खोटे बोलू नये हा झाला निषेध. संयम पाळण्यासाठी विधी - निषेधाची गरज असते. विधी - निषेधांचे सुयोग्यपणे पालन करणाऱ्यांची विवेकशक्ती जागृत असते.

काही लोकांचा विचार आहे की हे विधी - निषेधच प्रगती थोपवतात. यामुळे चित्ताचा विकास थांबतो. चित्त विधी - निषेधांचा गुलाम होऊन बसते. या लोकांची अशी मान्यता आहे की या विधी - निषेधामुळेच राष्ट्राचे नुकसान झाले आहे. यामुळे धर्मावर विश्वास ठेऊ नका. गुरुलाही मानू नका. गुरुच्या अधीन झाल्यावर प्रगती होऊ शकत नाही. हा विचार समाजाला उन्नती पथावर नेणारा नाही. धर्माला योग्य प्रकारे जाणून न घेतल्यामुळे धर्मानुयायी लोकांनी आणि धर्म प्रचारकांनी समाजाचे नुकसान केले आहे पण हा काही धर्माचा दोष नव्हे. धर्म तर व्यक्तीला उन्नती पथावर नेण्यासाठी आहे. सत्यपालन करा, हिंसा करु नका, प्रपंचातच रममाण होऊ नका, असा उपदेश धर्मशास्त्र करते. अशा बहुमूल्य उपदेशाने तर समाजाचे कल्याणच होईल. गुरु म्हणजे मोक्षमार्गीचे योग्य मार्गदर्शक. खऱ्या मार्गदर्शकापासून नुकसान कसे होईल? गुरु बनून जर योग्य मार्गदर्शन नाही केले तर गुरुचा दोष आहे. गुरु जर केवळ नामधारीच असेल तर त्याच्या कडून मार्गदर्शन कदापि घ्यायला नको. यामुळे भगवंत म्हणताहेत की धर्मशास्त्राला न मानता स्वच्छंद वृत्तीने जगणारे कदापि योग प्राप्त करुन घेऊ शकत नाही.

2) **सः सिध्दिं न अवाप्नोतिः** तो पुरुष सिध्दी म्हणजे योग प्राप्त करु शकत नाही. स्वच्छंदी वृत्तीत मन आणि इंद्रियांवर ताबा रहात नाही. इंद्रिय संयमाने मनावर अंकुश रहातो. स्वच्छंदी पुरुष योगी बनू शकत नाही, त्याला योग कदापि प्राप्त होणार नाही.

3) **न सुखम्ः** स्वच्छंदी पुरुषाला सुख प्राप्त होऊ शकत नाही. पुरुष स्वच्छंदी का बनतो? स्वच्छंदी बनल्यावर सुख लाभेल असे त्याला वाटते. समजा कुणाला कारावासात जावे लागले. कारावासात बंधने येतात. तिथे नियंत्रणच नियंत्रण असते मग त्याला वाटते की कधी एकदाचा यातून सुटेन, तो बिचारा एक - एक दिवस मोजू लागतो. या अनुभवावरुन काहींनी असा निष्कर्ष काढला की आपल्यावर कुठलेही नियंत्रण, अंकुश नसले तर खूप सुख लाभेल पण अनुभवांती हा विचार भ्रांत असल्याचे सिध्द झाले आहे. कारावासात दुसऱ्याचे नियंत्रण असते. माणसाला शिक्षा वाटावी असे तिथले कायदे असतात. कारावासात जर दबाव नसेल तर लोक गुन्हेगारीकडे अधिक प्रमाणात प्रवृत्त होतील. यामुळे आपण कारावासाचे उदाहरण नाही घेऊ शकत. आत्मनियंत्रण नसेल तर सुख मिळू शकत नाही. आपल्यावर दुसऱ्याचे नियंत्रण असेल तर सुख लाभणार नाही या म्हणण्यात जरुर अर्थ आहे पण आत्मनियंत्रण राखले तर इंद्रियांवर ताबा राहिल्यामुळे सुखच लाभेल. दुसऱ्यांचे नियंत्रणही जर आपण स्वच्छेने पत्करले तर दुःख अनुभवायला मिळणार नाही.

4) **न परां गतिम्ः** स्वच्छंदी व्यक्ती परम गती म्हणजे मोक्ष लाभ करुन घेऊ शकत नाही. स्वच्छंदी पुरुषाला जिथे योग प्राप्ती होत नाही तर मग मोक्ष लाभ कसा बरे होऊ शकेल ? देहाची, इंद्रियांची आसक्ती पूर्णपणे सुटणे हाच मोक्ष आहे. जोवर देहाची, इंद्रियांची आसक्ती असेल तोवर आत्मस्वरुप लक्षात येण्याची शक्यता नाही.

: 24 :

***तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।***
***ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात् कार्याकार्य व्यवस्थितौः** यामुळे कार्य आणि अकार्याबाबतीत निश्चयासाठी
- **ते शास्त्रं प्रमाणंः** तुझ्यासाठी शास्त्र प्रमाण आहे
- **शास्त्रविधानोक्तं ज्ञात्वाः** शास्त्रीय विधानाला समजून

- **इह कर्म कर्तुंम् अर्हसि:** इथे तू सुयोग्य प्रकारे कर्म आचारु शकशील

**अर्थ**

म्हणून तुला कर्तव्य आणि अकर्तव्य यांची व्यवस्था लावण्यात शास्त्रच प्रमाण आहे असे जाणून तू शास्त्रविधीने नेमलेले कर्मच करणे योग्य आहे.

*म्हणूनि आदरीं शास्त्र कार्याकार्य कळावया।*
*शास्त्राचें वाक्य जाणूनि इथें तूं कर्म आचरीं॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) कार्य आणि अकार्यासंबंधी निश्चयासाठी. 2) तुझ्यासाठी शास्त्र प्रमाण आहे. 3) शास्त्रातल्या वाक्याला - विधानाला - योग्य प्रकारे जाणून तू सुयोग्य काम करु शकशील.

**स्पष्टीकरण -**

1) **तस्मात् कार्याकार्यव्यवस्थितौ:** यामुळे कार्य आणि अकार्याच्या बाबतीत निश्चित भूमिका ठरवण्यासाठी पावलोपावली प्रश्न उपस्थित होत राहतील. चौथ्या अध्यायातल्या चौदावा श्लोकात सांगितले गेले आहे की कर्म आणि अकर्म याच्या निश्चित रुपाविषयी ज्ञानी आणि विवेकी पुरुषांच्या मनातही प्रश्न उभा शकतो. तिथे अकर्म म्हणजे मोक्ष. कर्म म्हणजे काय? निष्काम कर्म आचरताना जी अकर्म दशा प्राप्त होते म्हणजे मोक्षानुभव येतो, त्याचे स्वरुप काय आहे? याविषयी विवेकी पुरुषही पूर्ण निश्चयाप्रत पोहोचू शकत नाही. चौथ्या अध्यायात जो प्रश्न उपस्थित केला आहे आणि इथे जो प्रश्न उपस्थित आहे, या दोघांमध्ये एवढे साम्य आहे विवेकी असो वा सामान्य व्यक्ती असो, दोघांच्या मनात संदेह उत्पन्न होतो. खरे तर माणसाच्या मनात हीच इच्छा नांदते की सत्य मार्गावर चालावे. यामुळे प्रश्न सामान्य कर्तव्याकर्तव्याचा असो वा मोक्षविषयक, त्याची सोडवणूक कशी करावी हे सुयोग्यपणे ज्ञात असायला हवे. यासाठी काय साधन आहे याचा ऊहापोह पुढे करताहेत.

2) **ते शास्त्रं प्रमाणम्:** तुझ्यासाठी शास्त्र प्रमाण आहे. शास्त्र म्हणजे अनुभवी पुरुषांचे वचन. ज्यांनी धर्माधर्माचे स्वरुप जाणून घेतले त्यांनाच त्याची पारख असू शकते. शुध्द सोने कशाला म्हणतात, हे सोनाराला ठाऊक असायला हवे. अशाच प्रकारे धर्माच्या ज्ञानाचा आधार धर्माचरणावर अवलंबून आहे. सत्याचे ज्ञान सत्याचरणानेच होईल. जेव्हा खरे बोलायला सुरुवात करु, जीवनात कदापि असत्याचरण करणार नाही अशी स्थिती येईल तेव्हाच सत्याचे ज्ञान झाले असे म्हणता येईल. यामुळे शंकराचार्यानी ब्रह्मसूत्र भाष्यात प्रतिपादन केले आहे की धर्माचे ज्ञान असणे काही खरे नाही, धर्माच्या आचरणातच खरे ज्ञान दडले आहे. यामुळे आपण तेच नियम प्रमाणभूत मानतो जे महात्म्यांनी सांगितलेले आहे. हे महात्माजन धर्माच्या स्थूल आणि सूक्ष्म आचरणात अखंड निमग्न असतात. या नियमांना शास्त्र असे म्हणतात. महापुरुषच शास्त्राची रचना करतात. धर्म आचरणात आणला तरच धर्माचा खराखुरा अनुभव घेता येतो. असे अनुभवी पुरुषच शास्त्र रचना करतात. भगवान श्रीकृष्ण असेच महात्मा होते. त्यांनीच गीता शास्त्राची रचना केली आहे. यामुळे कृष्ण भगवान रचित शास्त्र कार्य - अकार्याच्या निर्णयासाठी प्रमाण होऊ शकते. त्यानी असे म्हटलेलेही आहे. 'हे अत्यंत गूढ शास्त्र मी तुझ्यासाठी रचले आहे- सांगितले आहे, याला सुयोग्यप्रकारे जाणून घेतल्यावर तू कृतकृत्य होऊन जाशील.' (15-20)

3) **शास्त्रविधानोक्तं ज्ञात्वा इह कर्म कर्तृम् अर्हसि:** शास्त्रातील विधाने सुयोग्यपणे जाणून घेतल्यावर तू कर्मे आचरायला योग्य ठरशील. शास्त्राला सुयोग्यपणे जाणून घ्यायला हवे तरच कर्तव्य काय आणि अकर्तव्य काय याचा निर्णय घेता येईल. हा निर्णय विवेकयुक्त असेल. अर्थात् शास्त्र जाणून घेण्यात जर चूक झाली तर कार्याकार्य निर्णय करायची शक्ती लाभणार नाही. यामुळे शास्त्राध्ययन खूप गरजेचे आहे. शास्त्र अनेक असतात आणि त्यात परस्पर विरुध्द गोष्टीही - विधानेही - असतात. यामुळे नाना शास्त्रांच्या अध्ययनाच्या भरीस न पडता परिपूर्ण अशा एकमेव शास्त्राला जाणून घेतले तर बुध्दीभेद होणार नाही. यामुळेच भगवंताने गीता गान केले. भगवंतांनी दुसऱ्या अध्यायातील 53 व्या श्लोकात अर्जुनाला टोमणाही मारला आहे की शास्त्रातल्या अनेक उलट - सुलट गोष्टी ऐकल्यामुळे तुझी बुध्दी भ्रमीत झाली आहे.

गीता उपनिषदांचा सारांश आहे. यामुळे गीतेचा सुयोग्य अभ्यास केल्यावर त्यातले तत्वचिंतन योग्य प्रकारे

जाणून घेतले असता कर्तव्याकर्तव्याचा बोध होऊ शकतो. गीतेचा अभ्यास करताना जर जीव, ईश्वर, ब्रह्म, माया, मोक्षाबाबत शंका असतील आणि धडपणे उलगडा होत नसेल तर शंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रावरील भाष्य वाचणे आवश्यक आहे. तसे गीता, उपनिषद आणि ब्रह्मसूत्र हे तीन प्रमाणग्रंथ आहेत. उपनिषद समजायला सोपे नाहीत. ब्रह्मसूत्रही अवघड आहे पण उपनिषद आणि ब्रह्मसूत्राचा सारांश एकचित करुन त्याचा अभ्यास केला तर अडचण येणार नाही. या तीन ग्रंथांमध्ये गीता सुबोध आहे. गीता सुयोग्यपणे जाणून घेतली तर कार्याकार्याचा निर्णय करण्यात अडचण येणार नाही. (ब्रह्मसूत्रातल्या सूत्रांची अशी निवड करुन बाळकोबांनी अर्थासह तीन खंडात कार्य केले आहे. विनोबाजींनी अष्टादशी शीर्षकाने उपनिषदांचा असा सारांश केला आहे. दोन्ही ग्रंथ ग्राम सेवा मंडळ, पवनार येथून प्रकाशित झाले आहेत.)

• • • *अध्याय सोळावा संपूर्ण* • • •



अध्याय - सतरावा

# श्रध्दात्रय विभाग योग

: 1 :

**अर्जुन उवाच**

***ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रध्दयान्विता: ।***
***तेषां निष्ठा तु का कृष्णं सत्वमाहो रजस्तम: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृष्ण तु ये:** हे कृष्णा, पण जे
- **शास्त्रविधिं उत्सृज्य:** शास्त्र विधींचा त्याग करुन
- **श्रध्दया अन्विता:** यजन्ते: स्वतंत्र श्रध्देने युक्त होऊन देवादिकांची उपासना करतात
- **तेषां निष्ठा का:** त्यांची निष्ठा कुठल्या श्रेणीची - दर्जाची मानली जाईल?
- **सत्वं आहो रज:** त्याला सात्विक मानाल की राजसी?
- **तम:** की तामसी (मानाल ?)

**अर्थ**

अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, जी माणसे शास्त्रविधीला सोडून श्रध्देने युक्त होऊन देवादिकांचे पूजन करतात त्यांची मग स्थिती कोणती? सात्विक, राजस की तामस?

**अर्जुन म्हणाला**

***जे शास्त्र - मार्ग सोडूनि श्रध्दा - पूर्वक पूजिती।***
***त्यांची सात्विक ती निष्ठा किंवा राजस तामस ॥***

**विषय:** हा अर्जुनाचा प्रश्न आहे. अर्जुनाने दोन प्रश्न विचारले आहेत. 1) हे श्रीकृष्णा, जे पुरु ष शास्त्र - विधींचा त्याग करुन स्वतंत्र श्रध्दायुक्त भावनेने उपासना करतात. 2) त्यांची निष्ठा सात्विक, राजसी वा तामसी यापैकी कुठल्या श्रेणीत मानली जाईल. हा मार्मिक प्रश्न सोळाव्या अध्यायातील अखेरच्या दोन श्लोकांच्या संदर्भात विचारला गेला आहे.

**स्पष्टीकरण**

1 ) **कृष्ण तु ये शास्त्रविधिं उत्सृज्य श्रध्दया अन्विता: यजन्ते:** जे पुरुष शास्त्र विधींचा त्याग करुन म्हणजे शास्त्रावर श्रध्दा न बाळगता स्वतंत्र श्रध्दापूर्वक उपासना करतात. सोळाव्या अध्यायातील तेविसाव्या श्लोकात भगवंतांनी सांगितले आहे की जे शास्त्राचा त्याग करुन स्वच्छंद भावनेने जीवन व्यवहार करतात त्यांना योग प्राप्त करुन घेता येत नाही, त्यांना ना सुख लाभत ना मोक्ष. सोळाव्या अध्यायातील चोविसाव्या श्लोकात सांगितले आहे की तुला म्हणजे मनुष्य मात्राला कार्य - अकार्याविषयी निर्णय घ्यायचा असेल तर शास्त्रालाच प्रमाणभूत मानले पाहिजे. शास्त्र समजून घेऊन कर्तव्य काय आणि अकर्तव्य काय याबाबत निर्णय घेऊनच कर्म करणे श्रेयस्कर आहे. यामुळे चुक कमी होण्याची शक्यता आहे. शास्त्राचा त्याग करुन जीवन निर्वाह करताना चूक व्हायची शक्यता राहून जाते. सर्व सामान्य जनांसाठी हाच सुवर्णमध्य - सुवर्ण नियम मानायला हवा पण या कथनामुळेच अर्जुनाच्या मनात प्रश्न उद्भवला. काही लोक असेही असू शकतील जे स्वच्छंदीपणे जगणारे तर नाहीत पण त्यांची शास्त्रावर श्रध्दाही नसते. हे लोक शास्त्रावर श्रध्दा बाळगत नाहीत, मनमानी करत नाही पण स्वतंत्रपणे श्रध्दाभाव बाळगून जीवन निर्वाह करतात. वेगळ्या शब्दात असे की ज्यांची धर्मावर श्रध्दा नसली तरी नीतीवर पूर्ण श्रध्दा आहे या श्रध्देला कुठल्या दर्जाची श्रध्दा मानाल ? हा झाला एक अर्थ. दुसरा अर्थ जो इथे मुख्यत्वेकरुन प्रस्तुत आहे तो असा की जे लोक शास्त्रीय पध्दतीने उपासना न करता स्वतंत्र श्रध्दापूर्वक करतात. ज्यांची उपासनेवर श्रध्दा आहे, ते उपासना करतील पण ज्यांची स्वतंत्र श्रध्दा असेल ते उपासनेच्या ठायी प्रवृत्त होतील पण त्यांची स्वतंत्र शैली असेल. सूर्योपासना शास्त्रीय विधीपूर्वक करणे वेगळे आणि स्वतंत्र शैलीत करणे वेगळे. उपासना स्वतंत्र प्रकारेही होऊ शकते. देवळात जाऊन उपासना करणे, घरी उपासना करणे हा झाला एक प्रकार. या प्रकारात राम, कृष्ण वा शंकराची मूर्ती प्रतीक रुपाने उपासनेत घेतली जाऊ शकते पण चरख्यावर सूतकताई करणे ही सुध्दा उपासना होऊ शकते. चरखा उपासनेचे प्रतीक म्हणून घेता येऊ शकतो. अशा प्रकारे विविध प्रकारच्या उपासना असू शकतात. समाजसेवाही उपासनाच आहे. उपासनेत ईश्वराची भावश्रध्दा प्रमुख आहे मग प्रतीक कुठलेही असो वा कुठल्याही प्रकारे उपासना केली जावो. उपासनेत जर परमेश्वराची भावना नसली तर त्याला काही उपासना म्हणता येणार नाही.

2) **तेषां निष्ठा का सत्वं आहो रज: तम:** त्यांची निष्ठा कुठल्या दर्जाची मानली जाईल? त्या निष्ठेला सात्विक म्हणाल राजसी म्हणाल की तामसी म्हणाल ? अर्जुनाचा पहिला प्रश्न असा होता की स्वतंत्रपूर्वक पण श्रध्देने जे जीवननिर्वाह करतात म्हणजे धर्मशास्त्रानुसार नव्हे तर जे नीतीशास्त्रानुसार चालतात उदाहरणार्थ पंडित जवाहरलाल नेहरु. त्यांची काही धर्मशास्त्रावर श्रध्दा होती असे सांगता येत नाही पण ते नीती नियमांचे अवश्य पालन करत. त्यांच्या ठायी सत्यनिष्ठा होती. पत्नीचे निधन झाल्यावर त्यानी दुसरा विवाह केला नाही. मर्यादापूर्वक जीवन घालवले. अद्भुत प्रकारे जनतेची सेवा केली. अशा पुरुषांची गणना कुठल्या वर्गात कराल? सात्विक, राजसी की तामसी? हा एक प्रश्न झाला. दुसरा प्रश्न असा की जे लोक धर्मशास्त्राच्या नियमानुसार उपासना करत नाहीत पण आपल्या स्वतंत्र श्रध्देने करतात, त्यांची श्रध्दा कोणत्या प्रकारात मोडेल - सात्विक, राजसी की तामसी ? सत्व म्हणजे उच्च स्थिती, रज म्हणजे मध्यम स्थिती आणि तम म्हणजे निम्न स्थिती. अशा प्रकारे पदार्थांमध्ये तीन प्रकार दिसून येत असल्यामुळे त्यांचा स्वीकार सहजपणे होतो. चौदाव्या अध्यायात या तीन गुणांची सविस्तरपणे चर्चा आली आहे. इथे अर्जुन प्रश्न विचारत आहे की

कुठल्या वर्गात म्हणजे सत्व, रज, तम या तीन वर्गापैकी कुठल्या वर्गात त्यांची गणना केली जावी ?

: 2 :

**श्री भगवान् उवाच**

*त्रिविधा भवति श्रध्दा देहिनां सा स्वभावजा।*
*सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रृणु ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **देहिनाम्:** देहधारी जीवांची
- **सात्विकी, राजसी च तामसी एव:** सात्विक, राजस आणि तामसही
- **इति त्रिविधा श्रध्दा भवति:** अशा प्रकारे तिन्ही प्रकारच्या श्रध्दा असतात
- **सा स्वभावजा:** ती जन्मजात असते
- **तां श्रृणु:** त्याविषयी ऐक

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले – मनुष्यांची ती शास्त्रीय संस्कार नसलेली, केवळ स्ववभावत:च उत्पन्न झालेली ( अनंत जन्मी केलेल्या कर्मांच्या संचित संस्कारांनी उत्पन्न झालेली श्रध्दा 'स्वभावजा' श्रध्दा म्हटली जाते.) श्रध्दा सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारचीच असते. ती तू माझ्याकडून ऐक.

**श्री भगवान म्हणाले**

*तिन्ही प्रकारची श्रध्दा स्वभावें जीव मेळवी।*
*ऐक सात्त्विक ती होय तशी राजस तामस ॥*

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी उत्तरादाखल दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) देहधारी जीवांची सात्त्विक, राजस, तामस म्हणजे उच्च, मध्यम, कनिष्ठ या तीन प्रकारच्या श्रध्दा असतात. 2) या तीन प्रकारच्या श्रध्दा जन्मजात असतात, त्याविषयी ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **देहिनां सात्त्विकी राजसी च तामसी एव इति त्रिविधा श्रध्दा भवति:** देहधारी जीवांच्या सात्त्विक, राजस आणि तामस अशा तीन प्रकारच्या श्रध्दा असतात. मागील श्लोकात विचारल्या गेलेल्या प्रश्नाचे उत्तर या श्लोकात दिले जात आहे. भगवंत म्हणतात की अशाप्रकारे स्वतंत्र श्रध्देने जीवन निर्वाह करत असो वा उपासना करत असो, त्याचे तीन प्रकार आहेत. एक सात्त्विक, दुसरा राजस आणि तिसरा तामस म्हणजे कनिष्ठ. एका टोकाला सात्त्विक तर दुसऱ्या टोकाला तामस. दोघे एकमेकांच्या अगदी विरुध्द आहेत. राजस मध्ये काही अंश सात्त्विक असेल तर काही तामस. तसे पाहू गेल्यास प्रत्येकात तिघांचे मिश्रण असते पण जो गुण मुख्य असेल तोच मानला जाईल. सत्वगुणाच्या उत्कर्षात सत्वाचा उत्कर्ष असतो, रज कमी आणि तम त्याहूनही कमी असतो. रजोगुणाच्या उत्कर्षात रजाचा उत्कर्ष असतो सत्व कमी आणि तम त्याहूनही कमी. तमोगुणाच्या उत्कर्षात तमोगुण सर्वाधिक त्याहून कमी रजोगुण आणि त्याहूनही कमी सत्वगुण असतो.

2) **सा स्वभावजा तां श्रुणु:** ही तीन प्रकारची श्रध्दा स्वभावत: म्हणजे जन्मजात असते. त्याविषयी ऐक.

तीन प्रकारची जी श्रध्दा आहे ती सर्वांना जन्मत:च प्राप्त झालेली आहे. श्रध्दा प्रयत्नपूर्वक काही उत्पन्न होत नाही. ज्या पुरुषावर कुणा एकाची श्रध्दा असते त्यावर सर्वांची श्रध्दा असत नाही. ज्याच्यावर आपली श्रध्दा असते तिचे कारणही आपण स्पष्टपणे सांगू शकत नाहीत. ग्रंथाचेही तसेच आहे. तरीही श्रध्देचा संबंध कुण्या वस्तुवर असायलाच हवा. त्याचा संबंध पूर्वजन्मीच्या संस्कारांशी असतो. त्याच्या आधारे आपण वर्तमान देह धारण करतो. या जन्मीसुध्दा आपण बरी वाईट कर्मे आचरत असतो. त्यानुसार आपल्याला हेही अनुभवायला मिळते की एकावरची श्रध्दा कमी होऊन कुणा दुसऱ्यावर श्रध्दा उपजते. वैष्णव कुळात जन्म लाभला असेल तर बालपणी तर आपण विष्णुचीच पूजा करत असू पण नंतर आपल्या विचारात बदल झाला तर एखाद्या दुसऱ्या देवावर श्रध्दा (वाढेल) जागेल. विष्णुचे उपासक शंकराचे उपासक बनू शकतात आणि शंकराचे उपासक विष्णुचे उपासक बनू शकतात वा शंकर व विष्णु दोघांचेही उपासक बनू शकतात. कधी उपासनेची श्रध्दाही डळमळीत होऊ

लागते. अशाप्रकारे एखादी विशिष्ट श्रध्दा घेऊन जन्माला आल्यावरही त्या श्रध्देत फरक पडू शकतो. तरीही कसा का फरक पडेना पण श्रध्दा तर कुणावर बसतेच. जीवनात काही - ना काही तर श्रध्दा असेलच आणि ती जन्मत: असेल मग पुढे अनुभवांती त्यात फरक का पडेना !

मग भगवान सांगतात की मी तुला याबाबत समजाऊन सांगतो, ते ऐक.

: 3 :

***सत्त्वानुरुपा सर्वस्य श्रध्दा भवति भारत।***
***श्रध्दामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रध्द: स एव स: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हे भारत:** हे अर्जुना
- **सत्त्वानुरुपा:** सत्व म्हणजे अंत:करणानुसार
- **सर्वस्य श्रध्दा भवति:** सर्वांची श्रध्दा असते
- **अयं पुरुष: श्रध्दामय:** हा पुरुष श्रध्दामय आहे
- **य: यच्छ्रध्द:** ज्याची जशी श्रध्दा असेल म्हणजे जो ज्या श्रध्देने युक्त असेल
- **स: एव स:** तसाच तो होतो

**अर्थ**

हे भारता म्हणजे अर्जुना, सर्व माणसांची श्रध्दा त्यांच्या अंत:करणानुरुप असते. म्हणून जो पुरुष ज्या श्रध्देने युक्त आहे तो स्वत:ही तोच आहे (अर्थात् त्या श्रध्देनुसार त्याचे स्वरुप असते.)

***जसा स्वभाव तो ज्याचा श्रध्दा त्याची तशी असे।***
***श्रध्देचा घडिला जीव जशी श्रध्दा तसा चि तो ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आहे. 1) सत्व म्हणजे अंत:करण - यावर अनेक जन्मांचे जे संस्कार झाले आहेत, त्या अनुरुपच सर्वांची श्रध्दा होते. 2) हा पुरुष श्रध्दामय आहे. 3) ज्याची जशी श्रध्दा असते, तसाच तो होतो - बनतो.

**स्पष्टीकरण**

1) **सत्त्वानुरुपा सर्वस्य श्रध्दा भवति:** सत्व म्हणजे अंत:करण वा नाना जन्मांच्या संस्कारामुळे प्रत्येकाचा स्वभाव बनतो - घडतो. त्यानुसार सर्वांची श्रध्दा असते. सत्व म्हणजे चित्तावर - मनावर - नाना जन्मांचे भले - बुरे संस्कार पडले आहेत. त्या मनासोबतच जीव एक देहाचा त्याग करुन दुसरा देह धारण करतो. श्रध्दा संस्काराने घडते आणि संस्काराने स्वभाव बनतो. प्रत्येकाच्या ठायी वेगवेगळ्या प्रकारची श्रध्दा दिसून येते. याचे कारण असे सांगितले गेले की पूर्वजन्मीच्या कर्मांचे संस्कार एकत्रित येतात - साठवले जातात त्यानुसारच जीवन प्रवाह चालतो. जीवन प्रवाह श्रध्देशी संबध्द आहे. कोणत्या परिवारात जन्म होतो याशीही ही श्रध्दा संबध्द असते. आई - बाबा जैन असतील तर जैन विचारांवर श्रध्दा असेल. वैष्णव असतील तर विष्णुवर श्रध्दा असेल. बालपणीचे संस्कार खूप प्रखर असतात. वडिल वेदान्ताचे आचार्य असतील तर मुलगा प्राय: वेदान्तीच बनेल. याला अपवाद तर असतातच पण सामान्यपणे परंपरा हीच आहे की बालपणी जसे संस्कार लाभतात, त्यानुसारच श्रध्दा असते.

2) **अयं पुरुष: श्रध्दामय:** हा पुरुष श्रध्दामय आहे. बालपणी आईवर संपूर्ण श्रध्दा असते म्हणून बालक आईकडून शिक्षण मिळवतो. बालकास तर काही ज्ञान नसते. तो पाण्याला 'हे पाणी आहे' असे समजत नाही. त्याला खायच्या गोष्टींबाबत ज्ञान नसते. तो माती खातो तर त्याच्याकडे आईला लक्ष द्यावे लागते. आगीला स्पर्श करतो तर हात पोळल्यावर रडतो. अशा प्रकारे बालक श्रध्देच्या आधारे आईकडून प्रत्येक विषयाचे ज्ञान ग्रहण करतो. आईवर पूर्ण श्रध्दा असल्यामुळे ती जे म्हणेल त्याला सत्य मानून बालक ते ग्रहण करतो. आई त्याच्यासाठी प्रमाण आहे. वयासोबत ज्ञान वाढते. शाळेत शिकायला जातो, तिथेही ज्या शिक्षकावर श्रध्दा बसेल त्याच्या म्हणण्याला प्रमाण मानेल मग जीवनात कुणा संताची भेट झाली त्यावर श्रध्दा बसली तर त्यानुसार आचरण करील. अशा प्रकारे प्रत्येकाचे जीवन श्रध्देच्या आधारावर चालते. आपण कुठल्याही विषयाबाबत आपल्या बुध्दीवरच विश्वास ठेऊन निर्णय घेतो आणि त्यावर श्रध्दा राखून त्यानुसार चालतो. यामुळे भगवान म्हणताहेत की हा पुरुष श्रध्दामय आहे.

3) **यः यच्छ्रध्दः सः एव सः** ज्याची जशी श्रध्दा असते, तसाच तो बनतो. प्रत्येक माणूस श्रध्दासंपन्न असल्यामुळे त्याची ज्यावर श्रध्दा बसते तसाच तो बनेल. ही वस्तुस्थिती ज्याच्या लक्षात येऊन जाते तो भलत्या कुणावर श्रध्दा ठेवणार नाही पण श्रध्देचा हा नियम ज्याना योग्य प्रकारे माहीत नाही ते भलत्या कुणावर श्रध्दा ठेऊन आपले नुकसान करुन घेतील. स्वर्णिम नियम असा आहे की ज्याच्यावर श्रध्दा ठेवायची असेल त्याच्या संपर्कात राहून पूर्ण आचरण बघून घ्यायला हवे. उच्च विचार प्रतिपादित करणारे खूप भेटतील, उत्तम व्याख्यान देणे, चांगले लेख लिहिणे हा बुध्दीचा विषय आहे. असे लेखक, व्याख्याते, प्रवचनकार खूप भेटू शकतात पण ज्यांनी आपल्या विचारांना आपल्या जीवनात साकार केले आहे, असे लोक कमीच असतात. समाजात बौध्दिक ज्ञानी अधिकच असतात. यामुळे केवळ बौध्दिक ज्ञानींवर श्रध्दा ठेवण्यात धोका आहे, हे जाणून ज्यांचे आचरण दिव्य असेल, जे अनुभव संपन्न असतील त्यांच्यावरच श्रध्दा राखणे योग्य आहे. अर्थात् कुणा अनुभवी एकावर जर कुणाची श्रध्दा बसेल तर त्या महापुरुषावर दुसऱ्या माणसाचीही श्रध्दा बसेल असे काही नाही. वेगवेगळ्या संतांवर वेग-वेगळ्या पुरुषांची श्रध्दा असावी यात काही नुकसान नाही - वावगे नाही. वाटेल त्या ग्रंथावर श्रध्दा ठेवल्याने कल्याण नाही होणार. श्रध्देत सावधपण असणे गरजेचे आहे.

: 4 :

***यजन्ते सात्त्विका देवान् यक्षरक्षांसि राजसाः ।***
***प्रेतान् भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सात्त्विकाः** सात्विक जन
- **देवान् यजन्तेः** देवांची उपासना करतात
- **राजसाः** राजस पुरुष
- **यक्षरक्षांसि (यजन्ते):** यक्ष आणि राक्षसांची (उपासना करतात)
- **अन्ये तामसाः जनाः** इतर तामसी लोक
- **प्रेतान् च भूतगणान् यजन्तेः** भूत - प्रेतांची उपासना करतात

**अर्थ**

सात्विक माणसे देवांची पूजा करतात. राजस माणसे यक्ष-राक्षसांची पूजा करतात तसेच जी इतर तामस माणसे असतात ती प्रेत व भूतगणांची पूजा करतात.

***सत्त्व-स्थ पूजिती देव यक्ष - राक्षस राजस ।***
***प्रेतें आणि भूतें - खेतें पूजिती लोक तामस ॥***

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) सात्विक पुरुष देवांची पूजा करतात. 2) राजसी पुरुष यक्ष - राक्षसांची पूजा करतात आणि 3) तामसी जन भूत - प्रेतांची उपासना करतात.

**स्पष्टीकरण**

1) **सात्त्विकाः देवान् यजन्तेः** सात्विक प्रकृतीचे पुरुष देवांची उपासना करतात. मागील दोन श्लोकांमध्ये सांगितले आहे की शास्त्रावर श्रध्दा न राखता जे स्वतंत्र श्रध्देच्या आधारे चालतात आणि उपासना करतात, त्यांची श्रध्दा सात्विक, राजस, तामस असून ती जन्मजात असते. या पूर्वीच्या श्लोकात याचे कारण सांगतांना हा पुरुष श्रध्दामयच आहे असे सांगितले. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी काही - ना - काही श्रध्देचा भाग असतोच. या श्लोकात सात्विक, राजस, तामस लोक प्रत्यक्षात कुणाची उपासना करतात आणि त्यांचे जीवन कसे असते, ते सांगताहेत.

सात्विक पुरुष देवांची उपासना करतात. देव अनेक आहेत - विष्णु - शंकर, काली माता, गणपती वगैरे. देवांच्या उपासनेचे काही नियम असतात. त्यानुसार उपासनेचा क्रम चालत असतो. सात्विक जन नीती व धर्माच्या अधारेच चालतात त्यामुळे त्यांचे जीवन असा उपासनांच्या अधीन होऊन उन्नत बनते. मूर्तीच्या उपासनेप्रमाणेच सूर्य, जळ देवता, पर्जन्य देवता, वगैरेंचीही उपासना केली जाते.

2) **राजसाः यक्षरक्षांसि यजन्तेः** राजस प्रकृतीचे लोक यक्ष म्हणजे कुबेराचे सेवक आणि राक्षसांची उपासना करतात. प्राचीनकाळी कशी उपासना चालायची हे यक्ष आणि राक्षस शब्दाने काही स्पष्ट होत नाही. आजच्या काळाच्या अनुसारच या उपासनांचा अर्थ लावणे उचित होईल. यक्षाचा अर्थ आहे कुबेर सेवक. कुबेर म्हणजे धनवान. धनवानाचे सेवक संपत्तीची उपासना करण्यात रत असतात. सात्विक लोक निष्काम भावनेने देवांची

उपासना करतात. राजस लोकांमध्ये फळाची वासना असते. सात्विक लोक स्वार्थरत नसतात, राजस स्वार्थातच रत असतात. धनाच्या मागे लागणे स्वार्थबुध्दीचे लक्षण होय. केवळ कुटुंबाचा जीवननिर्वाह करण्यासाठी धन संपादन करणे वेगळे आणि वाटेल त्या रीतीने धन मिळवणे वा अपार संपत्ती संचित करणे वेगळे होय. काही लोक अतुल संपत्ती प्राप्त करण्यासाठी ही उपासना करतात. ते विलासीही असतात. त्याना त्यातच आनंद लाभतो. राजसी लोक आपल्या राष्ट्राच्या उन्नतीचा विचार करत इतर राष्ट्रांना गुलाम बनऊ इच्छितात त्यासाठी हिंसेचा आश्रय घ्यावा लागतो. यामुळे अधिकाधिक सैनिकी बळ वाढवतात. ही राक्षसांची उपासना होय. राक्षस हिंसक असतात त्यामुळे राक्षसांच्या उपासनेचा अर्थ हिंसेची उपासना आहे.

3 ) **अन्ये तामसा: जना: प्रेतान् च भूतगणान् यजन्ते:** इतर तामसी वृत्तीचे लोक भूत-प्रेतांची उपासना करतात. काही लोक स्मशानात जाऊन प्रेताची उपासना करतात. या उपासनेच्या द्वारे कुणाला वश करण्याची लालसा असते. ही हिप्नॉटिझम सारखी वशीकरण विद्या आहे. दुसरी उपासना भूतगणांची आहे. भूत योनीची उपासना म्हणजे आपल्याला भोग भोगायचे असतील तर त्याच्या शरीराच्या लिंग-देहावर ताबा मिळवून ते भोग भोगायचे. ही गोष्ट जीवंतपणी नाही होऊ शकत. याचा एक अर्थ झाला की देह त्यागल्यावर दुसऱ्याच्या देहात प्रवेश करुन भोग भोगायचे. दुसरा अर्थ आहे की जीवंतपणीच दुसऱ्याला वश करुन त्याच्या भोगांच्या साधनांचा उपयोग घेणे. जे लोक आपल्या प्रयत्नाने भोग भोगायचे साधन प्राप्त करु शकत नाही ते अन्य भोग साधन संपन्न लोकाना आपल्या वशात करतात आणि भोग - साधनांचा उपयोग करत रहातात. यात ज्या व्यक्तीला ते आपल्या वशात करुन घेतात, त्यांच्या महिलांसोबतचा भोग संबंधही यात येतो. विशिष्ट उपासनेच्या द्वारे या मर्यादेपर्यंत वशीकरण विद्या प्राप्त होऊ शकते.

: 5 - 6 :

***अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जना: ।***
***दम्भाहंकारसंयुक्ता: कामरागबलान्विता: ॥***
***कर्शयन्त: शरीरस्थं भूतग्राममचेतस: ।***
***मां चैवान्त:शरीरस्थं तान् विद्ध्यासुरनिश्चयान् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ये जना: दंभाहंकारसंयुक्ता:** जे लोक दंभ आणि अहंकाराने युक्त आहे
- **कामरागबलान्विता:** भोग, ऐश्वर्य, वासना आणि बळाने युक्त आहेत
- **अचेतस:** असे अविवेकी पुरुष
- **शरीरस्थं भूतग्रामं:** शरीराच्या इंद्रिय समुदायाला
- **च अंत:शरीरस्थं मां एव:** आणि शरीरात प्रकट ईश्वरालाच
- **कर्शयन्त:** कृश करणारे
- **अशास्त्रविहितं:** शास्त्र विपरीत
- **घोरं तप:** घोर तप
- **तप्यन्ते:** करतात
- **तान् असुरनिश्चयान् विध्दि:** त्यांना असुर स्वभावाचे जाण

**अर्थ**

जी माणसे शास्त्रविधी सोडून केवळ मनाच्या कल्पनेप्रमाणे घोर तप करतात तसेच दंभ, अहंकार, कामना, आसक्ती आणि बळाचा अभिमान यांनी युक्त असतात.

जे शरीराच्या रुपात असलेल्या भूतसमुदायाला (शरीर, मन, इंद्रिये या रुपात असलेल्या आकाश वगैरे पाच भूतांना) आणि अंत:करणात रहाणाऱ्या मलाही कृश करणारे (शास्त्रविरुध्द उपासना वगैरेंनी घोर तपाने शरीर सुकवणे अर्थात् भगवंताचा अंशस्वरुप जो जीवात्मा त्याला क्लेश देणे, हे भूतसमुदायाला आणि अंतर्यामी परमात्म्याला कृश करणे आहे.) असतात, ते अज्ञानी लोक आसुरी स्वभावाचे आहेत असे तू जाण.

***शास्त्रें निषेधिलें घोर दंभें आचरिती तप ।***
***अभिमानास पेटूनि काम - रागें बळावले ॥***

*देह – धातूंस शोषूनि मज आत्म्यास पीडिती।*
*विवेक - हीन जे त्यांची निष्ठा ती जाण आसुरी॥*

**विषय:** या दोन श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) दंभ, अहंकार, भोग - ऐश्वर्य, तथा यांची वासना - सत्तेचे बळ या सर्वांनी युक्त असे जे अविवेकी पुरुष आहेत. 2) इंद्रियांच्या समूहाला आणि देहात विद्यमान मज ईश्वरालाच कृश करणारे. 3) शास्त्र - प्रतिकूल घोर म्हणजे भयंकर - भयानक - दु:ख देणारे तप करतात. 4) त्याना असुर स्वभावाचे जाण.

**स्पष्टीकरण**

1) **ये जना: दंभाहंकारसंयुक्ता: कामरागबलान्विता: अचेतस:** दंभ आणि अहंकार, काम म्हणजे भोग, ऐश्वर्य, राग म्हणजे भोग आणि ऐश्वर्याची वासना, बळ म्हणजे सत्तेने युक्त, असे अविवेकी पुरुष. जे यक्ष, राक्षस, प्रेत वगैरेंची उपासना करतात ते दंभी आणि अहंकारी असतात. अहंकाराच्या अभावी दंभाचे अस्तित्वच उरत नाही. अहंकार तर कमी - अधिक प्रमाणात सर्वांच्या ठायी असतो पण दंभी लोकांमध्ये तो अधिक असतो. त्यांच्या ठायी बाहेरुन अहंकार दिसून येत नाही पण मनात त्या अहंकाराचेच बळ नांदत असते. त्यांच्या ठायी भोग - ऐश्वर्याची वासना नित्य कायम असते आणि सत्तामदही असतो. दंभ आणि अहंकाराचा आधार भोग आणि ऐश्वर्याची वासना आहे. स्वत: साठी भोग भोगणे, ऐश्वर्यसंपन्न जीवन जगणे यांच्या आयुष्याचे मुख्य ध्येय असते. ज्यांच्या ठायी भोग आणि ऐश्वर्याची आसक्ती असते ते त्याला प्राप्त करण्यासाठी हव्या त्या साधनांचा उपयोग करतात. भोग आणि ऐश्वर्याचा उपभोग करण्यासाठी ते ताकदीचाही उपयोग करतात. शेतात, कारखान्यात मजूर काम करतात. त्यांच्या बळावर शेती फुलते, कारखाने चालतात पण शेतकरी वा कारखान्याचे मालक कारखानदार मजुरांना कमीत कमी मेहनताना देतात. मजूर आपल्याच कुटुंबातील सदस्य आहेत अशी व्यापक भावना मालकांमध्ये नसते. इथे भगवंताने यांना ‘अविवेकी’ पुरुष म्हटले आहे.

2) **शरीरस्थं भूतग्रामं च अंत:शरीरस्थं मां एव कर्शयन्त:** शरीराच्या इंद्रिय समूहाला वा देहात विद्यमान प्रकट अशा ईश्वरालाच कृश वा क्षीण करणारे. इंद्रियांचा उपयोग भोग भोगण्यासाठीच करताना इंद्रिये क्षीण होऊ लागतात. इंद्रियांचा उपयोग आत्मकल्याण वा जन - कल्याणासाठी जर केला गेला तर यातून त्यांचे बळ वाढते कारण की इंद्रियांचा अशाप्रकारे उपयोग केल्यावर खरा आनंद लाभतो त्यामुळे त्यांचे बळ दिवसेंदिवस वाढते आणि हाच त्यांचा खरा उपयोग आहे. शारीरिक वा कौटुंबिक उपभोगासाठीच इंद्रियांचा उपयोग करणे त्यांचा दुरुपयोग आहे. दुरुपयोगामुळे वस्तु लवकर नष्ट होऊन जाते. देहात ईश्वर विद्यमान आहे. जड वस्तुच्या तुलनेने सजीव शरीर मोलाचे आहे. शरीरात विद्यमान ईश्वरामुळे अहर्निश सत्याची प्रेरणा लाभते. आपण जर त्यानुसार आचरण केले नाही तर भगवान क्षीण बनतो. मायेच्या प्रेरणेने भोगी बनाल तर माया पुष्ट होईल.

3) **अशास्त्रविहितं घोरं तप: तप्यन्ते:** शास्त्रविरुध्द घोर म्हणजे भयंकर आणि इतरांना त्रास देणारे तप करतात. इथे स्वार्थरत जीवनासाठी तप शब्दाचा प्रयोग झाला आहे पण हे तप अशास्त्रविहित आहे. रात्रंदिवस भोगांसाठी का असेना पण मनी काळजी वाहून हे खरे - खोटे कार्य करीत रहातात यामुळे तप शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. एक कारखानदार रात्रंदिवस कारखान्याची काळजी वहाणार नाही, तर त्याला अपेक्षित नफा होणार नाही. काही लोक आपले खरे - खोटे म्हणणे सिध्द करण्यासाठी उपवास करतात, धरणे देतात, उपवासाला बसतात. हे देखिल तपच आहे पण हे तप स्वार्थ साधण्यासाठी असल्यामुळे अशास्त्रीय आहे. यामुळे हे घोर (भयंकर) तप असून आसुरी आहे.

4) **तान् असुरनिश्चयान् विध्दि:** त्या पुरुषांना असुर निश्चयवाले म्हणजे स्वभाववाले जाण - समज. आपल्या आणि जगाच्या कल्याणासाठी - हितांसाठी - असलेले आचरण दैवी निश्चय असते पण ज्यात ना आपले वैयक्तिक हित साधले जात असेल ना जगाचे - अशा आचरणाला खात्रीपूर्वक आसुरीच मानले जाईल. मानवी देहाचे वैशिष्ट्य हेच आहे की तो पशुपेक्षा अनेक पटीने श्रेष्ठ होऊ शकतो. ज्याने हे वैशिष्ट्य गमावले तो कुठल्याही कामाचा उरत नाही - रहात नाही. यामुळे त्याचे जीवन व्यर्थ समजायला हवे. आसुरी निश्चय म्हणजे निरर्थक, भाररुप जीवन होय. आत्मकल्याण आणि जगत् कल्याणाचा पंथ धरण्याऐवजी आपले आणि

दुसऱ्याचे अकल्याण करण्यातच ज्याचे जीवन घालवले जात असेल त्याचा इथे निषेध केला गेला आहे.

: 7 :

*आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रिय: ।*
*यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं श्रृणु ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु सर्वस्य आहार: अपि:** तसेच सर्वांचा आहारही
- **त्रिविध: प्रिय: भवति:** तीन प्रकारे प्रिय होतो
- **यज्ञ: तप: तथा दानं:** यज्ञ, तप आणि दानही (तीन प्रकारचे असतात)
- **तेषां इमम् भेदं श्रृणु:** त्यांच्या या प्रकारांना ऐक

**अर्थ**

भोजनही सर्वांना आपापल्या प्रकृतीप्रमाणे तीन प्रकारचे प्रिय असते आणि तसेच यज्ञ, तप आणि दानही तीन प्रकारचे आहेत त्यांचे हे निरनिराळे भेद तू माझ्याकडून ऐक.

*आहारांत हि सर्वांच्या तीन भेद यथा - रुचि ।*
*तसे यज्ञीं तपीं दानीं सांगतों भेद ऐक ते ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) सर्वांचा आहारही तीन प्रकारचा असतो. 2) यज्ञ, तप आणि दानही तीन प्रकारचे असतात. त्यांच्या प्रकारांना ऐक.

(अर्जुनाने आधी श्रध्देच्या संदर्भात जो प्रश्न केला होता एथवर त्याचे उत्तर दिले गेले. जीवनात जेवढे महत्व श्रध्देला आहे तेवढेच आहार, यज्ञ आणि तपाला आहे. यामुळेच या श्लोकातून आहार, यज्ञ, तप आणि दानाच्या सात्विक, राजस आणि तामस अशा प्रकारच्या तीन प्रकारांचे वर्णन सुरु करताहेत. हा श्लोक प्रस्तावना रुप आहे. पुढील श्लोकात सात्विक आहाराचे वर्णन आले आहे.)

**स्पष्टीकरण**

1) **तू सर्वस्य आहार: अपि त्रिविध: प्रिय:** भवति तसेच सर्वांना आहारही तीन प्रकारचे प्रिय आहेत. आहार सात्विक, राजसी, तामसी असतो. याचा अर्थ हा की तीन प्रकारच्या लोकाना तीन प्रकारचा आहार प्रिय असतो.

2) **यज्ञ: तप: तथा दानं त्रिविध: भवति तेषां इमं भेदं श्रृणु:** यज्ञ, तप आणि दानही तीन प्रकारचे असतात. त्या विविध प्रकाराना ऐक. सृष्टी त्रिगुणात्मक असल्यामुळे सर्व पदार्थांचे तीन प्रकार होतात. यामुळे यज्ञ, दान आणि तपाचेही तीन भेद होणे स्वाभाविक आहे. या तीन प्रकारांना जाणून घेतल्यावर कुणाचे ग्रहण करावे व कुणाचा त्याग करावा हे लक्षात येऊन जाते. आपण रोज आहार करतो पण कोणत्या आहाराने तन - मनाला लाभ होणार आहे हे माहित नसले तर फायद्याऐवजी नुकसान होईल. त्याचप्रकारे यज्ञ, दान आणि तपही करत राहू पण त्यात विचार दोष वा चुकीच्या धारणेमुळे खरे यज्ञ, दान व तप करु शकणार नाही म्हणून ज्या वस्तुंचे मोल अधिकात अधिक असेल त्यांच्या बाबतीत आपल्याला आधीपासून योग्य ते दर्शन व्हायला हवे. यामुळे त्याचा आपल्यासाठी आणि इतरांसाठीही चांगल्यात चांगला फायदा करुन घेता येईल.

: 8 :

*आयु: - सत्व - बलारोग्य - सुख - प्रीति - विवर्धना: ।*
*रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **आयु: - सत्व - बलारोग्य - सुख - प्रीति - विवर्धना:** आयुष्य, सत्व म्हणजे बुध्दी, बळ, आरोग्य, सुख आणि प्रेम वाढविणारा
- **रस्या: स्निग्धा: स्थिरा:** रसयुक्त, स्निग्ध आणि स्थिर
- **हृद्या:** पचन होऊन आत्मसात होणाारा
- **आहारा: सात्त्विकप्रिया:** आहार सात्विक पुरुषांना आवडतो

**अर्थ**

आयुष्य, बुध्दी, बळ, आरोग्य, सुख आणि प्रीती वाढवणारे, रसयुक्त, स्निग्ध, स्थिर रहाणारे (ज्या अन्नाचे सत्व शरीरात दीर्घकाळ टिकते, त्याला ‘स्थिर रहाणारे’

म्हणतात.) स्वभावत: मनाला प्रिय वाटणारे असे भोजनाचे पदार्थ सात्विक पुरुषांना प्रिय असतात.

***सत्व प्रीति सुख स्वास्थ्य आयुष्य बळ वाढवी।***
***रसाळ मधुर स्निग्ध स्थिर आहार सात्त्विक ॥***

**विषय:** या श्लोकात आहारविषयक दहा बाबी सांगितल्या आहेत. 1) आयुष्यवर्धक. 2) सत्ववर्धक. 3) स्वास्थ्यप्रद. 4) सुख आणि 5) प्रेम वाढवणारा. 6) रसयुक्त 7) स्निग्ध 8) पाचक 9) आत्मसात होऊन जीवनशक्ती वाढवणारा 10) असा आहार सात्विक पुरुषांना आवडतो.

**स्पष्टीकरण**

1) **आयु:** आहार आयुष्यवर्धक असायला हवा. भगवंताने हे शरीर उत्पन्न केले आहे, याची आयुष्य मर्यादा विविध रुपाची दिसते. दीर्घ आयुष्य केवळ आहारावरच अवलंबून नसून आणखी अनेक गोष्टींवर अवलंबून असते. तरीही आयुष्यासाठी आहार मुख्य विषय आहे.

2) **सत्त्वबल:** आहार सत्व म्हणजे अंत:करणाची शक्ती वाढवणारा असावा. त्यामुळे दिवसेंदिवस मनोबल वाढेल. वाढायला हवे केवळ शारीरिक बळ वाढते राहिले आणि मनाचे नाही वाढले तर शरीर बळाचे वाढणे निरर्थक आहे कारण की सुख, दु:ख, बंध, मोक्ष वगैरेचा आधार मनच आहे. शरीर तर मन शुध्द करायचे साधन आहे. जोवर मन शुध्द होत नाही तोवर शांतता लाभायची शक्ती नाही आणि शांतता नसली तर शारीरिक बळ व्यर्थ होय. यामुळे मनाच्या शुध्दतेत वृध्दी होईल असा आहार असावा. खूप गरिष्ठ भोजन असले तर मनात जडता व विकार उपजतील. अधिक प्रमाणात आहार सेवन केल्यावरही विकार उत्पन्न होतात.

3) **आरोग्य:** आहार स्वास्थ्यप्रद असावा. स्वास्थ्य हेच शरीराचे बळ होय. स्वास्थ्याशिवाय मनोबळही वाढणार नाही. स्वास्थ्य उत्तम राखण्यासाठी आहार शास्त्राला सुयोग्य प्रकारे समजून घ्यायला हवे. शरीरासाठी कोणत्या गोष्टींची किती प्रमाणात गरज आहे हे योग्य प्रकारे जाणून घेण्यासाठी आहार शास्त्राचा अभ्यास गरजेचा आहे. या विषयावरचे ग्रंथ वाचायला हवेत.

4) **सुख:** आहार सुखवर्धक असायला हवा. याचा अर्थ तात्कालिक सुख वाढवणारा असे नव्हे. झणझणीत तिखट खाल्ले तर तात्कालिक सुख मिळू शकते. खातांना आनंद होईल पण नंतर पोट जड होईल व ते सुख संपून जाईल. सुख टिकून रहावे असा आहार करायला हवा. आहार स्वादिष्ट तर असावाच पण चटकदार नसावा. गुळ, साखर, मसाले, तेल, तूप या पदार्थांचा योग्य त्या प्रमाणात वापर केला तर आहार स्वादिष्ट होईल. शरीराला त्रासदायक नसल्यामुळे त्यापासून मिळणारे सुख हितकर असेल.

5) **प्रीतिविवर्धना:** आहार प्रेम वाढवणारा असायला पाहिजे. जे लोक चटकमटक - चटपटीत वस्तुंचे सेवन करतात त्यांच्या स्वभावातही राजसीपणा येऊन जातो. तसा आहार विकारवर्धक असतो. स्वभावात चिडचिड येते. काम विकारही वाढतो. विकार वाढल्यामुळे सर्वांशी विशुध्द प्रेमाचा व्यवहार होऊ शकत नाही यासाठी प्रेमाचा उत्कर्ष होईल असा आहार असला पाहिजे.

6) **रस्या:** आहार रसयुक्त म्हणजे जीवनसत्व (व्हिटॅमीन्स युक्त) युक्त असायला हवा. जीवनसत्वांच्या माहितीसाठी आहार - विषयक ग्रंथ वाचायला हवेत. या दृष्टीने निसर्गोपचार विषयक साहित्य उपयोगी आहे.

7) **स्निग्धा:** स्निग्ध म्हणजे तेल - तूप - लोणी युक्त. आहारात स्नेह खूप आवश्यक आहे. शरीरात कॅल्शियम आत्मसात करुन घेण्यासाठी तेल, तूप, लोण्याची खूप गरज आहे. तेलापेक्षा तूप वा लोणी खूप लाभदायक आहेत. आतड्यांच्या आतली त्वचा, शरीराची अंतरत्वचा तेल, तूप, लोण्यामुळे निरोगी रहाते. या अभावी शरीराची बाहेरची त्वचा रुक्ष होऊन जाईल, सुकून जाईल. त्वचेत घाव होण्याची शक्यता असते. आपण जे अन्न सेवन करतो ते सारे जेव्हा आत जाते तेव्हा त्याचा अंतरत्वचेशी संबंध येतो. खाण्यात आंबट - चिंबट असते, काही पदार्थ तिखटही असतात. या तीव्र पदार्थांमुळे आतल्या त्वचेला नुकसान न होवो, घाव न पोहोचो हे बघणे गरजेचे आहे. जेवणात चर्बीचा भाग असला तर आतली त्वचा मऊ राहील आणि चांगल्या अवस्थेत राहील. आपल्या भोजनात अन्नच महत्वाचे असते. आतल्या त्वचेत घाव न होवो यासाठी भोजनात काही अंशी स्नेह असणे गरजेचे आहे. पचनासाठीही स्नेह गरजेचा आहे.

8) **स्थिरा:** स्थिर म्हणजे पचायला सोपे. आहारात दोन गुण असायला हवेत एक तर सारी पोषक तत्वे असली पाहिजेत आणि पचायला हलके असले पाहिजे. खूप गरम दूधही जड होते. कच्ची पोळी, न शिजलेल्या डाळी - भाज्या सहजतेने पचू शकत नाहीत. खूप कच्चे पदार्थ जसे पचायला अवघड तसे अन्न खूप शिजलेलेही नसावे. खूप शिजलेल्या अन्नातले सत्व कमी होऊन जाते आणि सुयोग्य पध्दतीने अन्नाचे पचन होत नाही. यामुळे पचनशक्ती दुबळी होते. यामुळे हे लक्षात घेतले पाहिजे की कच्चे वा खूप शिजलेले अन्न पाचनशक्तीला कमकुवत करणारा आहार आहे.

9) **हृद्या:** आहार पचून जाऊन शरीरात आत्मसात होणारा म्हणजे शरीराची जीवनशक्ती वाढवणारा असावा. आहार पचायला सोपा तर असावाच पण शरीरात आत्मसात होऊन जीवनशक्ती वाढवणाराही असावा. दूध पुष्टीकारक आणि पचायला हलके असते. दूधामुळे ज्याना गॅसची तक्रार असेल त्यानी दही घ्यावे. दही गोड असायला हवे. आंबट दही जड असते. अन्न पचवायची ज्यांची चांगली शक्ती आहे ते अन्नामुळे पोषण प्राप्त करु शकतात. ते दूध वा दह्याचे सेवन कमी करु शकतात कारण की ज्यांना पोळी पचवायची शक्ती असते ते डाळीही पचवू शकतात. वरण, पोळी, तेल, भाजी, थोडे ताक एवढा आहार श्रमिक मजूराला मिळाला तर ते शरीराची ताकद टिकवून राखू शकतात. मध्यम वर्गियांसाठी दूधा--तूपाची अधिक गरज आहे कारण ते शरीरश्रम कमी आणि बौध्दिक श्रमच अधिक करतात. त्यांची पचनशक्ती बळकट नसते. यामुळे कसा आहार घ्यावा हे ठरवण्यापूर्वी पचनशक्तीचा विचार आधी व्हायला हवा. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की आहार पोषक आणि पाचक असावा.

10) **आहारा: सात्विकप्रिया:** असा आहार सात्विक पुरुषाना प्रिय असतो. ज्यांची प्रकृती सात्विक असून जे सतत सात्विक कर्मातच संलग्न आहेत, ते सात्विक जन होत. ते नित्य सत् वाचन, सत्संग करत असतात. सात्विक क्रिया करणे ज्यांचा स्वभाव बनून गेला आहे अशा लोकांना उपरोक्त आहार भावतो. यात अपवादही असू शकतात. म्हणजे सर्व प्रकारे सत्वनिष्ठ असूनही त्याना राजसी वा तामसी आहारही प्रिय असू शकतो. सामान्यपणे ज्यांची वृत्ती सात्विक असते त्यांना सात्विक आहारच प्रिय असतो.

: 9 :

**कट्वम्ल - लवणात्युष्ण - तीक्ष्ण - रुक्ष - विदाहिन: ।**
**आहारा राजसस्येष्टा दु:ख - शोकामयप्रदा: ॥**

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कटु अम्ल:** कडू आणि आंबट
- **लवण अत्युष्ण:** खारट आणि खूप गरम
- **तीक्ष्ण रुक्ष:** झणझणीत तिखट आणि रुक्ष
- **विदाहिन:** शरीरात आग उत्पन्न करणारे (पदार्थ )
- **दु:ख - शोकामयप्रदा:** दु:ख, शोक आणि रोग उत्पन्न करतात
- **आहारा: राजसस्य इष्टा:** असा आहार राजसी लोकांना भावतो

**अर्थ**

कडू, आंबट, खारट, फार गरम, तिखट, कोरडे, जळजळणारे आणि दु:ख, काळजी व रोग उत्पन्न करणारे भोजनाचे पदार्थ राजस माणसांना आवडतात.

***खारे रुक्ष कडू तीख अम्ल अत्युष्ण दाहक ।***
***दु:ख - शोक -द आहार रोग - वर्धक राजस ॥***

**विषय:** या श्लोकात राजसी आहारा विषयी दहा गोष्टी सांगितल्या आहेत जे पदार्थ. 1) कडू 2) आंबट 3) खारट 4) खूप गरम 5) तिखट 6) रुक्ष म्हणजे नीरस 7) शरीरात दाह उत्पन्न करणारे 8) दु:ख आणि शोक उत्पन्न करणारे 9) रोग उत्पन्न करणारे 10) असे आहारातील पदार्थ राजसी लोकाना आवडतात.

**स्पष्टीकरण**

1) **कटु:** निंब आणि कारले कडू असते. अशा मूळात कडू असलेले पदार्थ राजसी लोकांना आवडत नाही पण सहज वस्तुंना चटपटीत बनवून खायची त्यांना सवय असते. राजसी स्वभावाच्या लोकांचे ध्येय आरोग्य नसून स्वादिष्ट व चटपटीत पदार्थ खाण्याकडे एकाग्र असते.

2) **अम्ल:** राजस स्वभावाच्या लोकांना आंबट गोष्टी खूप आवडतात. शंकराचार्य लिहितात की इथे जेवढी म्हणून विशेषणे दिली आहेत त्यांच्या सोबत अती हा शब्द जोडायला हवा म्हणजे खूप कडू, खूप आंबट पदार्थ असे

हवे. काही पदार्थ आंबट नसतात त्यात चिंच वगैरे घालून आंबट बनवतात. चवदार बनवतात, कच्ची आंबट फळेही ते गोडीने खातात. आंबट फळे वगैरे त्यांना आवडतात. खूप आंबट पदार्थ खाणे हिताचे नसते. गळा खराब होतो. पोटात अम्लता वाढते. त्याचा आरोग्यावर विपरित परिणाम होतो पण आरोग्याची तमा न बाळगता राजसी लोक आंबट पदार्थ खात रहातात.

3) **लवण:** ज्याना खारट पदार्थ खूप आवडतात. वरण, भाजीत जेवढे मीठ घातले जाते तेवढे त्यांना पुरेसे वाटत नाही, ते वरुन मीठ घेतात. दूधातसुध्दा मीठ घालून पितात. अधिक मीठ खाल्ले तर चर्म रोग होतात. सबंध शरीराला खाज सुटते, काही विशिष्ट भागात खाज सुटून पू यायला लागतो हे सारे रोग मीठाच्या अतिसेवनाने होतात.

4) **अत्युष्ण:** राजसी लोकांना खूप गरम पदार्थ खायला आवडतात. उदाहरणार्थ ते खूप गरम दूध पितात. आजकाल तर - सध्या तर दिवसभर गरम चहा -कॉफी घ्यायचा रिवाज - पध्दत पडली आहे. थंडीच्या दिवसात दूधाचे सामान्यपणे गरम असणे गरजेचे आहे पण खूप गरम करायला नको. उन्हाळ्याच्या दिवसात तर गरम दूधाला गार करुन प्यायल्यावरच लवकर पचते पण राजसी लोकांना कुठलाही ऋतु असो दूध गरमच प्यायला आवडते. याचप्रमाणे वरण, भात, भाजी, पोळीही ताजे आणि गरमच आवडते. खूप गरम खायची सवय आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे. त्यांची पचनशक्ती मंदावते.

5) **तीक्ष्ण:** त्यांना तिखट पदार्थच खायला आवडतात. म्हणजे साधारणपणे मूळात तिखट नसले तर ते तिखट मिसळून खातात. काही लोक तर मिरचीसारखी तिखट गोष्ट नसेल तर जेवण घेऊ शकत नाही. लसूण, कांदाही तिखट असतो. ते या वस्तुंचा उपयोग प्रत्येक पदार्थासोबत करतात. सूंठ, आलेही खूप तिखट असते. काही मसालेही तिखट असतात त्यामुळे अधिक मसाले मिसळल्यावरच त्यांना स्वाद मिळतो. अशा प्रकारे राजसी लोक तिखट पदार्थांचे गुलाम बनून जातात.

6) **रुक्ष:** रसहीन, कोरडेठाक, रुक्ष पदार्थच यांना आवडतात. पोळीत पाण्याचा अंश अधिक असतो पण त्यांना कमी पाणी वापरुन केलेली गुजराती शैलीची भाकरी भावते. पोळीपेक्षा खाकरा अधिक चवदार असतो. भाजीत पाणी असले तर कमी स्वादिष्ट लागते पण कोरडी भाजी अधिक चवदार लागते. बटाटे उकडून घेण्याऐवजी जर भाजून घेतले तर अधिक चविष्ट लागतात. अशाप्रकारे पापडही खूप कोरडा असल्यामुळे आवडतो. फळे वाळवली जातात, भाज्याही वाळवून घेतल्या जातात.

7) **विदाहिन:** जे पदार्थ पोटात दाह उत्पन्न करतात. अतिखारट, अतिकडू, खूप गरम, खूप आंबट, खूप तिखट ,खूप कोरडे, खूप गरम पदार्थ सेवन करताना तात्पुरते समाधान जरी होत असले तरी ते सारे पदार्थ जेव्हा पोटात पोहचतात, तेव्हा दाह होतो - बेचैनी वाढते. हे सारे तिखट पदार्थ जठराला खूप उत्तेजित करतात. जठरात गॅस उत्पन्न होतो, वारंवार ढेकरी येतात. पोटात दुखू लागते. लघवीत आग व्हायला लागते. अशाप्रकारे शरीरात आजार उत्पन्न करुन चित्ताच्या आरोग्याला संपवून दु:ख, शोक आणि चिंता उत्पन्न करतात. जोवर आरोग्य चांगले असते तोवर या तीव्र पदार्थांचा वाईट परिणाम लक्षात येत नाही पण जेव्हा तब्येत बिघडते तेव्हा लक्षात येते पण सवय झाल्यामुळे वरील तीव्र पदार्थांचे खाणे सोडलेही जात नाही. मग औषधांचा आश्रय घेतला जातो. मग परत उपवास वगैरे करुन आणि संयमित रुपाने संतुलित आहाराचे सेवन करुन रोगमुक्त झाल्यावर राजसी पुरुषांची तीव्र पदार्थ खायची सवय सुटते.

8-9) **दु:ख-शोकामयप्रदा:** राजसी लोकांना प्रिय उपरोक्त आहार दु:ख, शोक आणि रोग उत्पन्न करतो कारण की खूप खारट, खूप तिखट, खूप कडू, खूप गरमागरम पदार्थ खाल्ल्याने तात्कालिक समाधान जरी वाटले तरी हे सारे पदार्थ जेव्हा पोटात पोहोचून जातात त्यावेळी दाह होतो आणि बेचैनी जागते. हे सारे पदार्थ जठराला इतके उद्दिप्त करतात की जठरात गॅस उत्पन्न होऊ लागतो, वारंवार ढेकरी येतात, पोटात वेदना होऊ लागते. लिव्हर, जठर आणि इतर भागातही सूज येते. लघवीत जळजळ होऊ लागते. अशा प्रकारे शरीरात रोग उत्पन्न करुन चित्ताचे स्वास्थ्य संपून जाते. दु:ख, शोक आणि चिंता उपजते. तब्येत जोवर चांगली असते तोवर वरील पदार्थांचे दुष्परिणाम काही लागलीच लक्षात येत नाहीत पण तब्येत ढासळताच हे सारे लक्षात येते. माणूस सवयीचा गुलाम असल्यामुळे वरील तीव्र पदार्थ तो सोडूही शकत नाही मग औषधांचा आश्रय घेतला जातो. उपवास

वगैरेंच्या उपायांनी आणि संतुलित आहाराच्या प्रयोगांनी रोगमुक्त होऊन मग कुठे राजसी पुरुषाची तीव्र पदार्थ खायची सवय सुटते.

10) **आहारा:** राजसस्य इष्टा: अशा प्रकारचा आहार राजसी लोकांना आवडतो. असा आहार ज्यांना भावतो ते राजसी प्रकृतीचे पुरुष होत.

: 10 :

***यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत्।***
***उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यातयामं:** गार, थंड, अर्धवट शिजलेले
- **गतरसं:** ज्यात रस उरलेला नसतो - चोथा
- **पूति:** ज्यात दुर्गंध यायला लागली असे पदार्थ
- **पर्युषितं:** शिळे
- **च यत् उच्छिष्टं:** आणि जे उष्टे असेल
- **च अमेध्यं:** आणि जे यज्ञाला योग्य नसेल म्हणजे अपवित्र असेल
- **भोजनं तामसप्रियम्:** असे भोजन तामसी जनांना आवडते

**अर्थ**

जे भोजन कच्चे, रस नसलेले, दुर्गंध येणारे, शिळे आणि उष्टे असते तसेच जे अपवित्रही असते ते भोजन तामसी लोकांना आवडते.

***रस- हीन निवालेलें शिळें दुर्गंध - युक्त जें।***
***निषिध्द आणि उष्टें हि तामस - प्रिय भोजन॥***

**विषय:** या श्लोकात तामस आहाराविषयक सात गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) निवलेले गार अन्न. 2) रसहीन, शुष्क 3) दुर्गंधयुक्त 4) शिळे-पाके 5) उष्टे 6) यज्ञाला अयोग्य - निषिध्द 7) असे भोजन तामसी लोकांना आवडते.

**स्पष्टीकरण**

1) **यातयामम्:** जो आहार गार - निवलेला वा अर्धा कच्चा वा अर्धा शिजलेला असतो तो. अनेक लोकांना जसे खूप गरम खायला आवडते तसे अनेकांना गार खायची सवय असते म्हणजे गार खाण्यातच त्यांना स्वाद येतो. खूप गार पदार्थ सेवन केल्यामुळेही पचन शक्ती मंदावते आणि दात खराब होतात. बर्फाचे पाणी पिऊन वा आईसक्रिम खाऊनही दात खराब होतात.

2) **गतरसम्:** ज्यात रस उरला नसेल, पोषक तत्व नष्ट होऊन गेले असेल असे चोथा - उरलेले अन्न. शरीरासाठी जीवनसत्वांची अत्यंत आवश्यकता असते. याशिवाय अन्य पोषक तत्वांचीही गरज असते. ही पोषक तत्वे ज्या पदार्थांमध्ये असतात ते पदार्थ शिळे झाले की ही पोषक तत्वे कमी होऊन जातात, नष्ट होतात. अशा प्रकारे आहारात खूप सावधपणाची गरज आहे. ताज्या भाज्यांमधून शरीराला आवश्यक क्षार मिळतात पण खूप दिवसांची भाजी असेल आणि उकळून उपयोगात घेणार असू तर पुरेसे क्षार उरत नाही.

3) **पूति:** दुर्गंधयुक्त म्हणजे ज्यातून नैसर्गिक सुवास निघून गेला असेल असे अन्न. उदाहरणार्थ कच्च्या वस्तु खूप दिवसापर्यंत राखून ठेवल्यात तर त्यांचा नैसर्गिक सुगंध निघून जातो. तसेच पक्व वस्तुही जर खूप दिवसांपर्यंत राखून ठेवल्यात तर त्यांचाही नैसर्गिक सुवास निघून जातो आणि पदार्थ सडू लागतो पण कित्येकांना असे सडलेले पदार्थ खायला आवडतात. खूप दिवसांपर्यंत पोळी राखून ठेवली तर दुर्गंध यायला लागतो. ती खाल्ल्यामुळे आरोग्याला हानी पोहोचते अशी सवय असणारे लोक तामसी वृत्तीचे आहेत असे मानले पाहिजे.

4) **पर्युषितम्:** खूप दिवसांपासून राखून ठेवलेले, शिळे झालेले अन्न. वरील गोष्टीत आणि यात काही अंशाचा फरक आहे, अधिक अंतर नाही. दोन दिवस, चार दिवस आणि आठ दिवसांची शिळी पोळी खाण्यात फरक तर असेलच ना. तिन्ही प्रकारचे लोक दिसून येतात. सवय बहुधा सुटत नाही. कुणाला एका दिवसाची शिळी पोळी, कुणाला दोन दिवसांची, कुणाला चार दिवसांची तर कुणाला आठ दिवसांची शिळी पोळी खायला आवडत असेल तर हा सवयीचा परिणाम आहे. अशा चुकीच्या सवयींपासून सावध रहायला हवे.

5) **उच्छिष्टम्:** उष्टे अन्न. एकाच पानात पती - पत्नी वा माय - लेकराचे जेवण करणे वाईट सवय आहे. आपण जशी सवय लाऊन घेऊ त्यात आपल्याला रस वाटु लागेल.

एका पानात जेवणे लोकांना प्रेमाची खूण वाटते पण हा चुकीचा विचार होय. आहार शास्त्राच्या दृष्टीने तर हे हानीप्रदच - नुकसानकारक आहे.

6) **च अमेध्यम्:** आणि जे यज्ञाला योग्य नसेल, निषिध्द असेल असे म्हणजे मास, मासे, मदिरा. याचा प्रचार आणि प्रचलन पश्चिमेत अधिक आहे. मास, मासे व मदिरा सेवन करणाऱ्यांची वृत्ती सात्विक नसते. एका खेड्यातील मुलगा शेती - मजूरी करायचा, मास - मासे खात नव्हता. त्यावेळी त्याचा चेहरा सात्विक वाटायचा. तो सैन्यात भरती झाला. मांस - मासे खाऊ लागला. अधूनमधून मद्यही प्यायचा. तीन वर्षांनंतर त्याचा चेहरा एकदम बदलला. चेहरा राजस तामस वाटू लागला.

प्राचीन काळी यज्ञाला खूप महत्व असल्यामुळे इथे यज्ञाचा उल्लेख केला आहे. यज्ञकार्य खूप पवित्र मानले जायचे. मांस, मासे, मदिरा सेवन करणारे यज्ञाला योग्य मानले जात नव्हते.

7) **भोजनं तामसप्रियम्:** अशा प्रकारचे भोजन तामसी लोकांना आवडते. इथे भगवंताने भोजनाचे तीन प्रकार वर्णिले आहेत. तामसी आहाराप्रती ज्यांची आवड आहे त्यांना आहाराच्या संदर्भात तामसी म्हटले आहे. याचा अर्थ असा नाही की ज्याचा तामसी आहार असतो ते सर्वथा तामसी प्रकृतीचेच असतात. सामान्यत: एवढे जरुर सांगता येईल की तामसी लोकांनाच हा आहार आवडतो.

: 11 :

***अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते।***
***यष्टव्यमेवेति मन: समाधाय स सात्त्विक:॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अफलाकांक्षिभि:** फळाची आसक्ती रहित
- **य: विधिदृष्ट: यज्ञ:** जो शास्त्रसंमत यज्ञ
- **यष्टव्यं इति:** कर्तव्य भावनेने
- **मन: समाधाय:** आणि मनाचे समाधान करत
- **इज्यते:** केला जातो
- **स: सात्विक:** तो यज्ञ सात्विक असतो

**अर्थ**

जो शास्त्र विधीने नेमून दिलेला यज्ञ करणे कर्तव्य आहे, असे मनाचे समाधान करुन फळाची इच्छा न बाळगणाऱ्या पुरुषाकडून केला जातो तो सात्विक यज्ञ होय.

***फलाभिलाष सोडूनि कर्तव्य चि म्हणूनियां।***
***विधीनें मन लावूनि होय तो यज्ञ सात्विक॥***

**विषय:** या श्लोकात सात्विक यज्ञाविषयी चार गोष्टी सांगितल्या आहेत. 1) फलासक्तीरहित पुरुषांद्वारे 2) जो शास्त्रसंमत यज्ञ 3) कर्तव्य समजून आणि 4) मनाचे समाधान राखत केला जातो तो यज्ञ सात्विक होय.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात सात्विक यज्ञाची लक्षणे वर्णिली आहेत. आपण तिसऱ्या अध्यायात हे पाहिले आहे की बदलत्या काळानुसार यज्ञ या संज्ञेचा अर्थ बदलता आहे. यज्ञाचा मूळ अर्थ आहे परोपकार, समाजकल्याणकारी कार्य. गांधीजींच्या मतानुसार रोज किमान अर्धा तास नियमितपणे सूत कताई आजच्या काळातला यज्ञ आहे.

1) **अफलाकांक्षिभि:** फलाकांक्षा रहित, परोपकारी, जगाच्या हिताचे - कल्याणाचे - कार्य करणाऱ्याने फळाची आशा धरु नये, हे सात्विक यज्ञाचे पहिले लक्षण होय. कर्माचे फळ मिळावे यासाठी माणूस कर्म करण्यात उत्साहाने प्रेरित होतो. कर्माचे एक बाह्य परिणाम असते. आपण जनकल्याणाचे एखादे कार्य हाती घेतले तर ते आपल्या कल्पनेनुसार बरोबर सुरु आहे की नाही हे आपण सतत बघत असतो. असे सिंहावलोकन गरजेचे आहे. यामुळे कार्य सुयोग्य रुपात होते आणि कार्यात प्रगती होते.

कर्माचे दुसरे फलित - परिणाम आहे आंतरिक सुख वा दु:ख. आपण जे जगत् कल्याणकारी कार्य करायचे ठरवले आहे ते सुयोग्य रुपात होत असेल तर आनंद वाटतो, सुख लाभते पण कुठल्याही कारणाने ते यशस्वी होत नसेल तर वाईट वाटते, दु:ख होते. कर्माच्या यशस्वितेनंतर जर कुणी कदर केली नाही, प्रशंसा केली नाही तर दु:ख होते. त्याच्या अयशस्वितेवर कुणी निंदा करु लागला तर दु:ख होते पण कर्मात आपली संपूर्ण शक्ती झोकून दिल्यावरही जो तटस्थ रहातो तो दु:खाला टाळू शकतो कारण की

कर्माच्या सफलतेचा आधार कर्म करणारा कर्ताच असतो असे नाही. अनेक वस्तुंच्या योगाने वा संयोगाने सफलता लाभते. हे काही पूर्णपणे आपल्या स्वाधीन नाही. यामुळे कर्ममुळाची आसक्ती सोडणे हा पहिला विषय आहे.

2) **यः विधिदृष्टः यज्ञः** जो शास्त्रसंमत यज्ञ आहे. ईश्वराचा अनुभव प्राप्त केलेले पुरुष म्हणजे शास्त्र होय. अशा पुरुषांनी काळाच्या परिवर्तित इयत्तेनुसार यज्ञ ठरविलेला असतो, यज्ञविधी नक्की केलेल्या असतात त्याना प्रमाण मानून यज्ञ करणे (गरजेचे असते) असे न करता जर प्रत्येक व्यक्ती जनकल्याण कार्यात मनमानी करु लागली तर सगळीकडे अव्यवस्था नांदेल. कुठलेही संगठित वा व्यवस्थित स्वरुपाचे कार्य होणार नाही. यामुळे प्रत्येक काळातील महापुरुष यज्ञाचे स्वरुप आणि त्याचे नियम - विधी वगैरे ठरवतात. त्यानुसार सर्वांनी वाटचाल करायला हवी, हा सुवर्णनियम आहे.

3) **यष्टव्यं इतिः** कर्तव्य मानून. कर्तव्य बुध्दीने, कर्तव्य भावनेने यज्ञ संपन्न करायचे ध्येय राखले पाहिजे. जीवनातील तमाम क्रिया कर्तव्य भावनेने करायची ध्येय दृष्टी असली तरच माणसाला खरी शांतता लाभेल. गांधीजींनी सांगितले आहे की जोवर कर्माच्या बाबतीत आवडी - निवडीचा भाग असेल तोपर्यंत ना निष्काम कर्मभाव साधेल ना कर्तव्यदृष्टी जागेल. यामुळे ते म्हणतात की ज्या सात्विक कार्याविषयी समाज मनात तिटकारा असेल तेच कार्य आपल्याला लाभावे उदा. संडास सफाईचे काम. यामुळे कर्म करण्याप्रती तिटकारा उत्पन्न व्हायची शक्यता असते, यामुळे हे काम मिळाले तर आनंद होईल, अशी वृत्ती राखावी. जे सात्विक कर्म न शोधता अनायासे लाभेल ते करायचे ध्येय बाळगणे हा निष्काम व्हायचा - बनायचा खरा उपाय आहे. आपण आपल्या इच्छेने कुठलेही कर्म स्वीकारलेले नसते म्हणून अशा कर्माविषयीच कर्तव्य दृष्टी असू शकते. कर्तव्य दृष्टीने वैराग्य वाढीस लागते. निष्कामता तर येईलच, निरहंकारताही साधेल.

4) **मनः समाधाय इज्यते सः सात्विकः** मानसिक समाधान राखून केला गेलेला यज्ञ सात्विक होय. निष्काम भावनेने, महापुरुषांच्या कथनानुसार कर्तव्य भावनेने केल्या जाणाऱ्या यज्ञामुळे मानसिक समाधान लाभेलच तरीसुध्दा मानसिक संबंधासाठी भगवंत स्वतंत्रपणे सांगत आहेत की यज्ञकार्य करतांना संपूर्ण शांतता राखली जायला हवी कारण की मानसिक समाधान मुख्यत्वेकरुन आतील निर्विकारतेवर अवलंबून असते म्हणजे कर्तव्य कर्मे पार पाडतांना जर अहंकार, काम, क्रोध वगैरे उत्पन्न व्हायला लागतील तर मनाचे समाधान अवघड होऊन जाईल. यामुळे मानसिक समाधानासाठी आंतरिक विकर्म म्हणजे भक्ती, ध्यान, वैराग्य, निर्विकारता वगैरे आंतरिक साधने गरजेची आहेत.

: 12 :

*अभिसन्धाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ।*
*इज्यते भरत श्रेष्ठ तं यज्ञं विध्दि राजसम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतश्रेष्ठः** हे भरतश्रेष्ठ अर्जुना
- **तु फलं अभिसन्धायः** पण फलाकांक्षा राखून
- **च दंभार्थम् अपि एवः** आणि दंभासाठीच
- **यत् इज्यतेः** जो केला जातो
- **तं यज्ञं राजसं विध्दिः** त्या यज्ञाला राजस मान

**अर्थ**

परंतु हे अर्जुना, केवळ देखाव्यासाठी किंवा फळही नजरेसमोर ठेवून जो यज्ञ केला जातो, तो यज्ञ तू राजस समज.

*फळाचे अनुसंधान राखुनी दंभ - पूर्वक ।*
*लोकांत यजिला जाय जाण तो यज्ञ राजस ॥*

**विषयः** या श्लोकात यज्ञाची दोन लक्षणे सांगितलेली आहेत. 1) हे अर्जुना, फळासक्ती राखून. 2) आणि दंभासाठीच (दंभाच्या पोषणासाठीच) जो यज्ञ केला जातो, त्या यज्ञाला राजसी यज्ञ समज.

**स्पष्टीकरण**

1) **भरत श्रेष्ठ तु फलं अभिसन्धायः** जो यज्ञ फळासक्ती राखून केला जातो. मागील श्लोकात सात्विक यज्ञाची लक्षणे सांगताना पहिले लक्षण फळाविषयीची अनासक्ती सांगितले होते. इथे त्या उलट राजस यज्ञाचे लक्षण सांगितले गेले आहे. सात्विक यज्ञात फळाची

अनासक्ती असते तर राजस यज्ञात आसक्ती असते. राजस पुरुष फळासक्तीशिवाय कर्मे आचरतच नाहीत. कर्तव्य कर्मे आचरत असता त्याचे फळ लाभेल आणि फळ प्राप्ती झाल्यावरच आनंद लाभेल. फल निरपेक्ष कर्मे करण्यात आनंदाचा अनुभव लाभत नाही. बागेत रात्रं - दिवस खपून संत्र्यांची बाग लावतात. संत्री खायला मिळावी, एवढेच नव्हे पण संत्री विकून काही आवकही व्हावी, हा हेतु संत्री लावण्यात आणि रात्रंदिवस बागेची सेवा करण्यामागे असतो. यासोबतच बाजारात आपल्या संत्रीची प्रशंसा व्हावी, अशी कीर्तीची आकांक्षाही असते. सर्वसाधारण लोक असा दुहेरी उद्देश नजरेसमोर राखूनच तमाम कार्ये करतात. कर्मफळ प्राप्त व्हावे असा हेतु मनात बाळगणे काही दोष नाही पण हा मूळ हेतु मनी धरुन त्याला प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत जर फलासक्ती राखली तर इष्टफळ प्राप्त झाले नाही तर दुःख हे होणारच. दुःख टाळायचा एकच उपाय आहे तटस्थ भाव वा ईश्वरार्पण बुध्दी. अन्यथा इष्ट परिणाम वा इष्ट फळ न लाभल्यावर शांती कायम टिकवून राखता येणार नाही हे निश्चितच समजावे. याचे कारण असे की गोष्टी निसर्ग, परिस्थिती वगैरेंवर अवलंबून असतात.

2) **च दंभार्थ अपि एव यत् इज्यते तं यज्ञं राजसं विध्दि:** आणि दंभासाठीच आत श्रध्दा नसतानाही केवळ देखावा म्हणून केला जाणारा यज्ञ राजस होय. राजस यज्ञाचे दुसरे लक्षण असे की तो केवळ दंभपूर्वक केला जातो. देखाव्यासाठी म्हणजे केवळ प्रशंसा मिळावी म्हणून. सार्वजनिक संस्थांमध्येही जी कार्याप्रती स्वतंत्र श्रध्दा असायला हवी ती बहुधा सर्वांच्या ठायी नसते काही लोक कीर्तीच्या लालसेने कार्य करतात तर काही लोक उदरनिर्वाहासाठी करतात. अशा लोकांचे कार्य राजस मानले जाईल.

: 13 :

***विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम् ।***
***श्रध्दाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विधिहीनं:** जे विधीहीन म्हणजे शास्त्र विधीला सोडून आहे
- **असृष्टान्नं:** ज्यापासून काही उत्पादन होणार नसेल किंवा अन्नदान रहित
- **मंत्रहीनं:** मंत्ररहित असेल
- **अदक्षिणं:** ज्यात काही दक्षिणा नसेल
- **श्रध्दाविरहितं:** जे श्रध्दाविहीन असेल
- **यज्ञं तामसं परिचक्षते:** अशा यज्ञाला तामसी म्हणतात

**अर्थ**

शास्त्राला सोडून, अन्नदान न करता, मंत्रांशिवाय, दक्षिणा न देता व श्रध्दा न ठेवता केल्या जाणाऱ्या यज्ञाला तामस यज्ञ म्हणतात.

***नसे विधि नसे मंत्र अन्नोत्पत्ति नसे जिथें ।***
***नसे श्रध्दा नसे त्याग बोलिला यज्ञ तामस ॥***

**विषय:** या श्लोकात तामस यज्ञाची पांच लक्षणे सांगितली आहेत. 1) ज्या यज्ञात विधी नसेल. 2) ज्यात काही उत्पादन होत नसेल. 3) ज्यात मंत्र म्हणजे काही उत्तम विचार नसतील. 4) ज्यात दक्षिणा म्हणजे स्वार्थत्याग नसेल. 5) ज्यात श्रध्दा नसेल. अशा यज्ञाला तामस यज्ञ म्हणतात.

**स्पष्टीकरण -**

1) **विधिह्रीनम्:** ज्यात विधी नसेल म्हणजे जे शास्त्रसंमत नसेल. तामसी वृत्तीच्या पुरुषाच्या ठायी शास्त्र श्रध्दा नसते. आजकाल शास्त्राच्या विरोधात एक विचारधारा सुरु आहे. असे म्हणतात की शास्त्रामुळे स्वातंत्र्य बाधित होते पण शास्त्र म्हणजे अनुभवी पुरुषांची वचने. अनुभवी महापुरुषांच्या वचनांच्या प्रकाशात वाटचाल केल्याने कुणाचा विकास थांबत नाही. मला इंग्लंडला जायचे असेल आणि मी जर इंग्लंडला जाऊन

आलेल्या लोकांच्या अनुभवांना प्रमाण मानून वाटचाल केली तर इंग्लंडला जाताना त्रास होणार नाही. अशाप्रकारे प्रत्येक व्यक्ती अनुभवी पुरुषांच्या विचारांचा फायदा घेते. आपण व्यवहारात ज्या सिध्दांताचा लाभ घेतो तोच नियम अध्यात्मशास्त्रावरही लागू होतो. धर्म - अधर्माचे सुयोग्य प्रकारे ज्यांना ज्ञान असते तेच यज्ञाचे स्वरुप ठरवू शकतात. यामुळे त्यांचे म्हणणे न ऐकता - मानता - आपण आपल्याच पध्दतीने चालु लागलो तर यज्ञ काही बरोबर होऊ शकणार नाही. एखाद्या सात्विक पुरुषाच्या ठायी जर तामसी वृत्ती उपजली तरी तो विवेकाने चालेल असे काही म्हणू शकत नाही. तामस वृत्ती म्हणजे अविवेक वृत्ती होय. अशा लोकांचे यज्ञकार्य विस्कळीत होईल. अनुभवी जनांच्या सल्ल्यानुसार यज्ञ न करता मनमानी केली तर यज्ञ निकृष्ट प्रकारचा होईल.

2) **असृष्टान्नम्:** ज्यापासून काही उत्पादन वा निर्माण होणार नसेल. यज्ञ केला आणि त्यापासून निर्माण झाले नाही, उत्पादन झाले नाही तर समाजाला त्याचा काय फायदा ? यज्ञात तूप जाळून, समिधेची आहुती देऊन लोकांचे कल्याण होत नाही. विनोबाजींनी 'गीता प्रवचने' मधून सतराव्या अध्यायात यज्ञ, तप, दाना विषयी खूप सटीक विश्लेषण केले आहे. ते म्हणतात की आपण तीन संस्था सोबत घेऊन जन्माला येतो. 1) शरीर संस्था 2) सृष्टी संस्था आणि 3) समाज संस्था. यापैकी सृष्टीसाठी यज्ञ, शरीर संस्थेसाठी तप आणि समाज संस्थेसाठी दान. आपला जसा शरीराशी संबंध आहे तसाच सृष्टीशीही आहे. आपण सृष्टीचा सतत उपयोग करतो यामुळे सृष्टीची झीज होते. त्याच्या पूर्ततेसाठी आपण मशागत करतो, खते देतो. यामुळे ती स्वच्छ रहाते पण सृष्टीचा उपयोग करुन आपण तिला घाणेरडी करतो. संडास - लघवी केल्यामुळे सृष्टी घाणेरडी होऊन जाते. आपण पाणीही खराब करतो. जिकडे तिकडे केर - कचरा टाकून सृष्टीला घाणेरडी करतो. हे योग्य नाही. आपण सृष्टी स्वच्छ राखायला हवी. लघवी केल्यावर माती लोटायला हवी. म्हणजे स्वच्छ करायला हवे. आपण रोज कपडे वापरतो तर सूत कातायला हवे. कापूस उत्पादन करणे, अन्न पिकवणे ही सारी निर्मितीची कार्ये होत. - निर्माण कार्ये होत. आपण सृष्टीच्या पदार्थांचा उपयोग करतो यामुळे ते पदार्थ उत्पन्न करणे आपला धर्म आहे. हा काही कुणावर उपकार नाही, ही ऋणमुक्ती आहे. ऋण तर आधीच घेऊन ठेवले आहे.

3) **मंत्रहीनम्:** ज्यात एखादा उच्च विचार, उच्च हेतु नसेल, कुठल्या सिध्दांताचा आधार नसेल. यज्ञ करण्यात जर विश्वकल्याणाचा हेतु असेल तर तो उच्च - श्रेष्ठ मानला जाईल. तामस यज्ञाच्या ठायी असा कुठला उच्च हेतु नसतो. केवळ स्वार्थ सिध्दी हाच एकमेव हेतु. व्यापारी दुकान सुरु करतो तर अत्यंत प्रामाणिकपणे व्यापार करतो पण यात आपल्या दुकानाची पत वाढवणे, प्रतिष्ठा उंचावणे एवढा एकमात्र हेतु असतो. सत्य आणि प्रामाणिकपणाच्या आधारे प्रतिष्ठा लाभते. हा सत्याचा महिमा आहे पण एकदा का दुकानाची प्रतिष्ठा स्थापित झाली की मग व्यापारी पैसा कमवण्यासाठी कुशलतेने बेईमानी सुरु करुन देतो. खरेदी करणाऱ्यांना पत्ता लागणार नाही अशा खुबीने तो बेईमानी सुरु करुन देतो. खरेदी करणाऱ्यांना मुळी पत्ताच लागणार नाही या कौशल्याने वस्तुंमध्ये भेसळ करतो. स्वार्थपूर्तीसाठीच यज्ञ केला जात असेल तर तो तामस यज्ञच म्हणवला जाईल.

4) **अदक्षिणम्:** ज्यात दक्षिणा, काही स्वार्थत्याग नसेल, म्हणजे स्वामित्वाचा त्याग नसेल. यज्ञात स्वार्थ लोलुपता असली तर स्वामित्वाचा - मालकीचा त्याग असणे शक्यच नाही. कर्माच्या पाठीमागे जी स्वामित्वाची भावना असते वा अभिमान असतो तोच बंधनकारक आहे. यज्ञकार्यात तर हा अभिमान अधिकच असतो कारण की बाहेरुन तर यज्ञकर्म एक विशेष कर्म आहे. विशेष कर्मात अधिक अभिमान असणे स्वाभाविक आहे. असे लोक जेव्हा यज्ञ करतात तेव्हा अगदी दवंडी पिटून सर्वांना कळवतात. कुठल्याही स्वरुपाचा यज्ञ असो, तो लोकांना कळावा, लोकांनी त्याविषयी जाणून घ्यावे, ही अभिलाषा - महत्वाकांक्षा त्यांच्या मनी वसते.

5) **श्रध्दाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते:** ज्यात श्रध्दा नसेल, जिथे केवळ देखावा असतो आणि जो यज्ञ केवळ बाह्य प्रतिष्ठेसाठी केला जातो, त्याविषयी श्रध्दा संभवत नाही. चौथ्या अध्यायातील 39 व्या श्लोकात श्रध्देचे महत्व सांगितले आहे. श्रध्देच्या आधारे माणूस आत्मज्ञान प्राप्त करु शकतो. कार्याला सफळ करायला श्रध्दा समर्थ असते. बुध्दीच्या पुढला अमूल्य वृत्तीचा टप्पा म्हणजे श्रध्दा होय. या अध्यायाच्या आरंभीच अर्जुनाने श्रध्देविषयी विचारणा

केलेली आहे. शास्त्र न मानणाऱ्याच्या ठायीही श्रध्दा असते. तामस यज्ञात श्रध्देच्या अभावाचा अर्थ एवढाच असतो की त्यात पारमार्थिक श्रध्दा नसते. स्वार्थमूलक श्रध्दा तर त्यात असतेच. हेच तामस वृत्तीचे लक्षण आहे.

: 14 :

*देव -द्विज - गुरु - प्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।*
*ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **देव - द्विज - गुरु - प्राज्ञपूजनं:** देव, ब्राह्मण, गुरु, प्राज्ञ म्हणजे ज्ञानीजन या सर्वांची सेवा करणे
- **शौचं:** स्वच्छता म्हणजे पवित्रता
- **आर्जवं:** सरळपणा
- **ब्रह्मचर्यम्:** ब्रह्मचर्य
- **च अहिंसा:** आणि अहिंसा
- **शारीरं तप: उच्यते:** या लक्षणांना शारीरिक तप म्हटले जाते

**अर्थ**

देव, ब्राह्मण, गुरु (येथे गुरु शब्दाने आई, वडील, आचार्य आणि वृध्द तसेच आपल्याहून कोणत्याही बाबतीत श्रेष्ठ असणारे असे सर्वच समजावेत.) आणि ज्ञानी यांची पूजा करणे, पावित्र्य, सरळपणा, ब्रह्मचर्य आणि अहिंसा हे शारीरिक तप म्हटले जाते.

*गुरु - देवादिकीं पूजा स्वच्छता वीर्य - संग्रह ।*
*अहिंसा ऋजुता अंगीं देहाचें तप बोलिलें ॥*

विषय: या श्लोकात पाच गोष्टी आहेत. 1) देव, द्विज म्हणजे ब्राह्मण, गुरु, प्राज्ञ या सर्वांची सेवा करणे. 2) शरीर आणि कपडे स्वच्छ ठेवणे. 3) सरळपणा. 4) ब्रह्मचर्याचे पालन. 5) हिंसेचा अभाव - या लक्षणाना 'शारीरिक तप' म्हटले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **देव-द्विज-गुरु-प्राज्ञपूजनम्:** देव म्हणजे देवतुल्य मनुष्य, द्विज म्हणजे ज्ञानसंपन्न ब्राह्मण, गुरु म्हणजे आध्यात्मिक मार्गदर्शक, प्राज्ञ म्हणजे विवेकसंपन्न चारित्र्यवान पुरुष, या सर्वांची सेवा करावी. कायिक, वाचिक आणि मानसिक तीन प्रकारचे तप असते. कायिक तपाचे पहिले लक्षण आहे अधिकारी पुरुषांची सेवा करणे. अधिकारी पुरुष चार प्रकारचे असतात. 1) देव यांच्यासाठी दैवी संपदेचे गुण असतात. अशा देवतुल्य माणसांची सेवा करण्यात सत्संग लाभ होतो आणि सेवा कशी करावी याचा वस्तुपाठ मिळतो. शिक्षण लाभते. 2) द्विज -ज्ञानसंपन्न ब्राह्मण. प्राचीन काळी ब्राह्मण ज्ञानसंपन्न असायचेत. ब्राह्मण कुळात जन्म झालेली व्यक्तीच ब्राह्मण नव्हे तर जी ज्ञानसंपन्न आहे ती व्यक्ती ब्राह्मण होय. 3) गुरु -आध्यात्मिक मार्गदर्शक. शिष्याने गुरुला संपूर्णपणे समर्पित व्हावे यासाठी गुरुच्या ठायी तशी विशेष योग्यता असायला हवी. गुरुच्या ठायी जर इतकी योग्यता नसेल तर त्यांना मार्गदर्शक समजून - मानून आपल्या उन्नतीत उपयोगी करुन घेणेच योग्य होय. 4) प्राज्ञ - विवेक संपन्न चारित्र्यवान पुरुष. विवेकी चारित्र्यसंपन्न पुरुषाची योग्यता सामान्य जनांपासून खूप अधिक असते. असे पुरुष प्रापंचिक वाटत असले तरी त्यांचा प्रपंच उच्च दर्जाचा असतो. यातले काही तर साधक वा मुमुक्षु दशेतही असतात. देवतुल्य पुरुषात दैवी गुणांचा विकास विशेष रुपाने दिसून येतो तर प्राज्ञ पुरुषात शास्त्राध्ययन, इतरांना समजाऊन सांगण्याची शक्ती विशेष रुपात असते हा दोघांमध्ये फरक असतो. या चार प्रकारच्या उच्च कोटीच्या लोकांच्या सहवासात राहिल्यामुळे फायदा होत असल्यामुळे यांची पूजा म्हणजे सेवा करायला हवी. हे कायिक तपाचे पहिले लक्षण आहे.

2) **शौचम्-शरीर-वस्त्र:** वगैरे स्वच्छ राखणे, आजूबाजूचे क्षेत्र स्वच्छ राखणे. शरीर ईश्वराच्या ओळखीसाठी आहे. ईश्वरानुभवासाठी अंत:करण शुध्द असायला हवे. शरीराला मलीन ठेवायची जर का सवय लागली तर मग मनाचे मलीन असणेही खटकणार नाही. शरीर शास्त्राच्या दृष्टीनेही शरीराची स्वच्छता पहिली अट आहे. स्नान करतेवेळी टॉवेलने घासून - पुसून घेतले तर मळ निघून जातो. कपडे पांढरे असण्याऐवजी स्वच्छ असावे. आजूबाजूचा परिसर स्वच्छ नसला तर डास - मच्छर वगैरे उत्पन्न होतील आणि तब्येत बिघडेल. आजार बोकाळेल. खरे म्हणजे सर्व प्रकारच्या बाह्य स्वच्छतेची

काळजी घेणे व निगा राखणे आणि यासाठी प्रयत्न करणे तपच होय.

3) **आर्जवम्:** व्यवहारातील सरळता - निश्छलता. हे सत्याचे बाह्य रुप आहे. ज्यांचा सत्यव्यवहाराबाबत आग्रह असतो त्यांच्यासाठी हा गुण असायलाच हवा. गांधीजींच्या ठायी हा गुण होता. त्यांची सत्याराधना उत्कट होती. सरळ स्वभावाने व्यवहार सुयोग्य प्रकारे सुरळीत चालतो. सरळमार्गी व्यक्ती आपले दोष लपवून ठेवत नाही. तसेच ते आपले गुण वाढवून प्रकटही करत नाही.

4) **ब्रह्मचर्यम्:** वीर्य संग्रह म्हणजे शारीरिक ब्रह्मचार्याचे पालन होय. यासाठी मानसिक निर्विकारतेची गरज आहे. या यात्रेची पहिली पायरी बाह्य ब्रह्मचर्याचे पालनच आहे. एका गृहस्थाच्या मनी आपल्या पत्नीचे प्रती उत्पन्न होणाऱ्या काम - विकारापासून मुक्त व्हायची इच्छा उत्पन्न झाली. आता जोवर तो बाह्य रुपाने स्त्री संग सोडायचा निश्चय करत नाही तोवर आंतरिक विकाराला क्षीण करायची संधीच लाभणार नाही. मनात विकार जागला आणि स्त्री - समागम केला तर विकाराला पोषणच मिळेल. यामुळे ज्याच्या मनी कामविकार हा मुळापासूनच उखडला जावा अशी तीव्र इच्छा असेल त्याने बाह्य स्तरावर ब्रह्मचर्याचे पालन करायला सुरुवात करुन टाकायला हवीय. ज्यांचा विवाह झालेला नाही आणि विवाह करायचा ज्यांचा विचार नाही अशा ब्रह्मचर्याच्या उपासकाच्या मनात विकार उत्पन्न होणार नाही, असे नाही सांगता येत. आता मनात विकार उत्पन्न झाले तर काय करावे ? त्याने लग्न करावे का ? लग्न केल्यामुळे तर विकार पुष्ट होतील. यामुळे त्याला बाह्यत: आपला विचार बदलायची गरज नाही. आतून निर्विकारता लाभावी यासाठी तो उपाय शोधत राहील. अखेर यश लाभेलच. आता असे बघा की ज्याचा कामविकार अनियंत्रित होऊन जातो, त्याने लग्न करणेच उचित.

5) **च अहिंसा:** आणि बाह्यत: कुणाला ताडन करु नये. बाह्य आचरणात हिंसेचा अभाव. शारीरं तप उच्यते या लक्षणांना शारीरिक तप म्हटले जाते. अहिंसा देखिल मुख्यत: आंतरिक लक्षण आहे. मनात हिंसा म्हणजे क्रोधाचा अभाव असावा. क्रोध आला नाही तर हिंसा व्हायची शक्यता नाही पण इथेही ब्रह्मचर्याचाच नियम लागू आहे. मनात क्रोध जागल्यावर त्याला क्षीण करायचे असेल तर त्याला बाहेरुन पोषण मिळू नये ही काळजी घेणे गरजेचे आहे. कुणावर राग आलाच आणि त्याला बाहेरुन मारायला लागलात. अपशब्द - कठोर शब्द वा शिव्या देऊ लागलात तर क्रोध शमण्याऐवजी वाढतच राहील. यामुळे क्रोध वगैरे विकार उत्पन्न झाल्यावर बाहेरुन कुणाला ताडन न करण्याचा निश्चय केला तर क्रोध क्षीण होईल. वरील पाच लक्षणाना 'शारीरिक तप' म्हटले जाते.

: 15 :

*अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।*
*स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् वाक्यं:** जे वचन
- **अनुद्वेगकरं:** दुसऱ्याला उद्वेग न करणारे असावे
- **सत्यं:** सत्य असावे
- **च प्रियहितं:** प्रिय आणि हितकारी असावे
- **च स्वाध्यायाभ्यसनं एव:** आणि नित्य स्वाध्यायाचा म्हणजे वेदशास्त्रांचे अध्ययन तसेच परमेश्वराच्या नाम जपाचा नि:संदेह अभ्यास असावा
- **वाङ्मयं तप: उच्यते:** त्याला वाणीचे तप म्हणतात

**अर्थ**

जे दुसऱ्याला न बोचणारे, प्रिय, हितकारक आणि यथार्थ (मन आणि इंद्रियांनी जसा अनुभव घेतला असेल तसेच बरोबर सांगणे म्हणजे यथार्थ भाषण होय.) भाषण असते ते, तसेच वेदशास्त्रांचे पठन आणि परमेश्वराच्या नाम जपाचा अभ्यास हेच वाणीचे तप म्हटले जाते.

*हितार्थ बोलणें सत्य प्रेमानें न खुपेलसें ।*
*स्वाध्याय करणें नित्य वाणींचे तप बोलिलें ॥*

**विषय:** या श्लोकात वाचिक तपाची पाच लक्षणे वर्णिली आहेत. 1) दुसऱ्याला न बोचणारी, दु:ख न देणारी वचने असावीत. 2) वचने सत्य असावीत. 3) प्रिय असावीत. 4) कल्याणकारी - कल्याणप्रद - असावीत. 5) स्वाध्यायाचा अखंड प्रयत्न - सराव हे वाणीचे तप आहे.

**स्पष्टीकरण -**

1) **यत् वाक्यं अनुद्वेगकरम्:** जे वचन दुसऱ्याला दुखवणारे वा बोचणारे नसावे. सारा व्यवहार वाणीच्या आधारेच तर चालतो. वाणीत कठोरता असेल तर स्वत:चे चित्त उत्तेजित होईल आणि दुसऱ्याचे चित्त क्षुब्ध होईल. दुसऱ्याची चूक जेव्हा सहन होत नाही तेव्हा चित्त प्रक्षुब्ध होऊन जाते आणि मुखातून कडु - कठोर वचने बाहेर पडतात. माणूस स्वत:च्या चुकीवर तेवढा चिडत नाही जेव्हा दुसऱ्याच्या चुकीवर लगेच चिडतो. एवढेच नव्हे पण आपल्या हातून मोठी चूक झाली तरी आपण फक्त बेचैन होतो पण स्वत:वर ना चिडत ना राग करत. खरे म्हणजे आपली थोडीही चूक जर सहन झाली नाही तर ती हळूहळू कमी होत जाईल आणि आपण चुकीपासून मुक्त होऊ शकू. यामुळे दुसऱ्याच्या चुकीबाबत क्षमावृत्ती राखावी. चित्ताला प्रक्षुब्ध होऊ देऊ नये. खूप खूबीने त्याची चूक लक्षात आणून द्यावी जेणेकरुन त्याच्या चित्तावर आघात न होता त्याच्या चूका, उणिवा दिन - प्रतिदिन कमी होत जातील. चित्ताला निर्विकार करण्यासाठी असा सराव आवश्यक आहे.

2) **सत्यम्:** वचन सत्य असावे. दुसऱ्याला बोचणारे नसावे. कधी दुसऱ्याला खूश करण्यासाठी खोटे बोलायची इच्छा होऊन जाते. प्रियजनांमध्ये असा व्यवहार चाललेला असतो. प्रतिष्ठा कमी होण्याचा प्रसंग आला म्हणजेही माणूस खोटे बोलू लागतो. अशा प्रकारे खोटे बोलायचे अनेक प्रसंग येतात पण सत्य बोलणे हे निरपेक्ष असायला हवे. म्हणजे कुठलाही प्रसंग असो, सत्य कथनाचा आग्रह आणि हिंमत असायला हवी. समाजात सत्याची प्रतिष्ठा असल्याचे सारेच जाणतात तरी प्रिय जनांना खूश करण्यासाठी, म्हणजे कुणाला वाईट वाटू नये म्हणून वा आपल्या स्वार्थासाठी लोक सत्य सोडायला तयार होऊन जातात म्हणून वाणीच्या तपात सत्याचा समावेश आहे.

3) **प्रियं:** कर्णमधुर असावे - कानाला गोड लागावे. प्रेमयुक्त असावे. इथे हे सांगताहेत की वचन कुणाला बोचू नये, एवढेच पुरेसे नसून ते प्रेमयुक्तही असायला हवे. कुणाला न बोचण्याचाच विचार केला तर प्रेमाचा उत्कर्ष ना आपल्या ठायी ना दुसऱ्याच्या ठायी होईल. यामुळे वचन सत्याने काठोकाठ भरलेले असावे. सत्यवचन दुधासारखे आहे पण दुधात साखर वा गूळ मिसळले तर दुधाच्या गुणात वाढ होईल. ते लवकर पचेल, सुपाच्य होईल. ते लवकर पचेल आणि अधिक पोषण करणारे ठरेल. कुणाला बोचणारे वचन मुखाने बोलणे म्हणजे दूधात पाणी मिसळले नाही पण एवढेच पुरेसे नाही. साखर, गूळ वा मध मिसळले तर दूध श्रेष्ठ बनून जाईल.

4) **हितम्:** मुखाने प्रकट झालेले वचन सत्य आणि प्रिय तर असावेच पण कल्याणप्रदही असावे. कुणी एखादी चूक केली वा नैतिक चूक केली असेल तर त्याला वाईट वाटू नये, अप्रिय वाटू नये म्हणून सत्याची कास सोडून देणे योग्य नव्हे कारण की असे करण्यात त्या व्यक्तीचे हित वा कल्याण नाही. यामुळे वाणी प्रेममय असायला हवी. यासोबतच समोरच्याचे कल्याण होवो ही भावनाही सतत असायला हवी.

5) **च स्वाध्यायाभ्यसनं एव वाङ्मयं तपः उच्यते:** आणि अखंडपणे स्वाध्यायाचा सराव हे वाणीचे तप आहे. जोवर काम - क्रोध वगैरे विकार क्षीण होत नाही तोवर मोक्ष सुखाचा अनुभव लाभणार नाही. यामुहे मोक्ष - प्राप्तीसाठी कमालीची निर्विकारता असणे गरजेचे आहे. यात अखंड स्वाध्याय म्हणजे आध्यात्मिक ग्रंथांचे अध्ययन खूप सहायक आहे. स्वाध्याय म्हणजे मनाचे स्नान. आपल्याला देह, मन , इंद्रिये वगैरे साधने लाभली आहेत. आपल्या समोर ब्रह्मांड उभे ठाकले आहे. आपला ब्रह्मांडाशी सततचा संबंध येत रहातो. ब्रह्मांडात जीव आणि जड पदार्थ या दोघांचा समावेश आहे. यांच्याशी आपला संबंध असतो. यामुळे आपल्या चित्तात नेहमी राग - द्वेष वगैरे विकार उत्पन्न होतात आणि दु:ख उत्पन्न करतात. यांच्यापासून मुक्त होण्यासाठी काही युक्त्या लक्षात यायला हव्यात. धार्मिक ग्रंथ, ब्रह्मसूत्र, गीता वगैरे तत्वज्ञानाच्या ग्रंथांचा अखंड अभ्यास सुरु राहिला तर या विकारांपासून मुक्त होण्याची चावी हाती लागू शकते. या दृष्टीने स्वाध्यायाचे खूप महत्व आहे. हे वाणीचे तप आहे.

: 16 :

*मन: प्रसाद: सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रह: ।*
*भावसंशुध्दिरित्येतत् तपो मानसमुच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मन: प्रसाद:** मनाची प्रसन्नता
- **सौम्यत्वं:** सौम्यता म्हणजे शांत स्वभाव
- **मौनम्:** आत्मचिंतन म्हणजे भगवच्चिंतन करण्याचा स्वभाव
- **आत्मविनिग्रह:** इंद्रियांचा, मनाचा निग्रह म्हणजे संयम
- **भावसंशुध्दि:** चित्ताची म्हणजे अंत:करणाची पवित्रता म्हणजे विशुध्द भावना
- **इति एतत् तप मानसं उच्यते:** अशा तपाला 'मानसिक' तप म्हणतात

**अर्थ**

मनाची प्रसन्नता, शांत भाव, भगवच्चिंतन करण्याचा स्वभाव, मनाचा निग्रह आणि अंत:करणातील भावांची पूर्ण पवित्रता हे मनाचे तप मानले जाते.

*प्रसन्न - वृत्ति सौम्यत्व आत्म -चिंतन संयम ।*
*भावना राखणें शुध्द मनाचें तप बोलिलें ॥*

विषय: या श्लोकात मानसिक तपाची पाच लक्षणे सांगितली आहेत. 1) मनाची प्रसन्नता. 2) सौम्यता. 3) आत्मचिंतन. 4) इंद्रिय संयम. 5) चित्ताची विशुध्द भावना. या पाच लक्षणांनी युक्त तपाला 'मानसिक' तप असे म्हणतात.

**स्पष्टीकरण**

1) **मन:प्रसाद:** मनाची प्रसन्नता, निर्विकारता. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णिली आहेत त्यात 64 व्या श्लोकात सांगितले आहे की राग - द्वेष क्षीण झाले तर इंद्रियांवर काबू मिळवता येतो. यामुळे प्रसन्नता अनुभवता येते. मग याच अध्यायातल्या पुढच्याच 65 व्या श्लोकात सांगितले आहे की चित्तात प्रसन्नतेचा अनुभव वाटायला लागला की सर्व दु:खांचा अंत होतो आणि मग प्रसन्नतेचा अनुभव येतो यामुळे बुध्दी ईश्वराच्या ठायी स्थिर होऊ शकते. याचा अर्थ असा की चित्ताची प्रसन्नता मिळवण्यासाठी आतून राग - द्वेषावर ताबा मिळवणे आणि सर्व इंद्रियांवर ताबा मिळवणे आवश्यक आहे. यासाठी मनाची निर्विकारता प्राप्त करुन घेण्यासाठी आणि त्यासोबत इंद्रियांवर विजय मिळवण्यासाठीही सतत प्रयत्न करायला हवेत.

2) **सौम्यत्वम्:** सौम्यता, मृदुता, अहिंसा, प्रेमाचा उत्कर्ष. परमात्मा जसा सत्यस्वरुपी आहे तसाच प्रेमस्वरुपी आहे. ईश्वराचे प्रेमस्वरुप आपल्या वाणीतून प्रकटायलाच हवे. ईश्वराने आपले प्रेम नारी जातीत राखलेले आहे. यामुळेच बालकाला आईपासून हे प्रेम अखंडपणे मिळत असते. आईचे बालकाविषयीचे प्रेम सुतराम कमी होत नाही. बालक मोठा झाला तरी आईचे प्रेम कायम रहाते. अशा प्रकारे आपल्याला आईकडून जे प्रेम लाभते ते सर्वाबद्दलच्या आपल्या व्यवहारातून प्रकट व्हायला हवे. यामुळे दुसऱ्याचा गुन्हा झाला तरी त्याच्यावर राग न करता प्रेमाने समजवायचा आपला धर्म आहे. व्यवहारात जर प्रेम प्रकट करायचे असेल तर ते आधी मनात उत्पन्न व्हायला हवे. यामुळे प्रेम म्हणजे सौम्य वृत्ती हे मानसिक तप आहे.

3) **मौनम्:** आत्मचिंतन, ईश्वर चिंतन, मौनाचा अंतर्भाव वाणीच्या तपात केला नाही कारण की त्याचा अर्थ अगदी चूप रहाणे नाही. शंकराचार्यांनी 'मौन' शब्दाचा अर्थ 'संयत् वाक्' केला आहे. संयमपूर्वक बोलणे हे वाचिक मौनाचे लक्षण आहे. मनात जर आत्मचिंतन वा ईश्वरचिंतन नसेल तर बाहेरुन बोलायची इच्छा होईलच. यामुळे मनात आत्मचिंतन वा ईश्वरचिंतन असेल तरच वाणीत संयम साधला जाईल. विनोबांनी 'मौन' शब्दाचा अर्थ आत्मचिंतन वा ईश्वरचिंतन असा केला आहे. ज्याचे आयुष्य सतत कर्मयोगमय असेल त्याच्या वाणीत संयम असेलच. मौन साधणे त्याचा स्वभावच बनून जातो.

4) **आत्मविनिग्रह:** सर्व इंद्रियांवरला संयम. तेराव्या अध्यायातल्या 7 व्या श्लोकात 'आत्मविनिग्रह:' हा शब्द येतो. सर्व इंद्रिये वशात असणे ज्ञानाचे लक्षण आहे. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ लक्षणातही सर्व इंद्रियांवर ताबा असणे त्याचे मुख्य लक्षण सांगितलेले आहे. इंद्रियांवर ताबा मिळवण्यासाठी आधी मनावर ताबा मिळवायला हवा. यामुळे सर्व इंद्रियांवर ताबा मिळवण्याची गणना मानसिक तपात करण्यात आली आहे. इंद्रिये आपल्याला

विषयांकडे ओढतात. पतंग जसा दिव्याच्या ज्योतीवर झडप घेऊन खाक होतो, तसाच माणूस विषयाधीन होऊन दु:खी होतो. अखेरीस सर्वांना इंद्रिय - संयमाकडे यावेच लागते.

5) **भावसंशुध्दि:** इति एतत् तप: मानसं उच्यते भावना विशुध्द राखणे, गुण दृष्टी वाढवणे, दोष दृष्टी क्षीण करणे. चित्त भावनामय आहे. यामुळे चित्तात अशुध्द भावना वाढू नये याची काळजी घ्यायला हवी. सवय आणि सराव यानुसार मन घडते. यामुळे चित्तात विशुध्द भावनांच्या उत्कर्षासोबत दोष दृष्टी न राखता गुण दृष्टीचाच विकास करायला हवा. ईश्वर गुणांचा भांडार आहे. त्याच्या ठायी अजिबात दोष नाही. आपण ईश्वराहून भिन्न नाहीहोत. यामुळे ईश्वराचे गुण आपल्या ठायी प्रकट होण्याचा सराव करायला हवा. गुण दृष्टीचा विकास झाल्यावर मनात विशुध्द भावनाच उत्पन्न होईल. मन कलुषित नाही होणार.

कुणा स्त्रीला बघितल्यावर आईची आठवण केली तर मन पवित्र भावनांनी भरुन जाईल पण कामविकार उत्पन्न झाला तर मन अशुध्द भावनेने युक्त होईल. यामुळे मनात कुठली भावना वाढवली जावी, हे आपल्या आधीन आहे.

मानसिक तपासंबंधी पाच लक्षणे वर्णिली गेली आहेत. याबाबत विनोबांनी असे विश्लेषण केले आहे. 1) दु:खाचा अनुभव न घडणारी प्रसन्नवृत्ती. 2) हीन वृत्तींचा विरोध करणारी सौम्यवृत्ती. 3) अखंड कर्मरत राहून आत्मचिंतन. 4) भोग प्रवाहाला संपवणारा वा आत्मसात करणारा संयम. 5) व्यवहारात गुण दोषांचे यथायोग्य परीक्षण करुन गुणदोष वर्जित शुध्द भावना.

: 17 :

***श्रध्दया परया तप्तं तपस्तत् त्रिविधं नरैः ।***
***अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अफलाकांक्षिभि:** फळाची आकांक्षा त्यागणारे
- **युक्तै: नरै:** सम, निर्विकारी पुरुषांच्या द्वारे म्हणजे निष्काम योगी पुरुषांच्या द्वारे
- **परया श्रध्दया:** परम श्रध्देने
- **तप्तं:** (जे) तप केले जाते
- **तत् त्रिविधं तप:** ते तीन प्रकारचे
- **सात्विकं परिचक्षते:** सात्विक तप म्हटले जाते

**अर्थ**

फळाची इच्छा न करणाऱ्या योगी पुरुषांकडून अत्यंत श्रध्देने केलेल्या वर सांगितलेल्या तिन्ही प्रकारच्या तपाला सात्विक तप असे म्हणतात.

***तिहेरी तप तें सारें श्रध्दा उत्कट जोडुनी ।***
***समत्वें फळ सोडूनि घडलें जाण सात्त्विक ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) फळाविषयी अनाकांक्षा. 2) सम, निर्विकार चित्ताच्या पुरुषांद्वारे. 3) परम श्रध्देने जे तप केले जाते ते तीन प्रकारचे सात्विक तप आहे.

मागील तीन श्लोकात वर्णित कायिक, वाचिक, मानसिक तप सात्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकारचे असतात. या श्लोकात यापैकी सात्विक तपाची चर्चा आली आहे.

**स्पष्टीकरण**

1) **अफलाकांक्षिभि:** फलाकांक्षेचे त्यागी. तप आचरतांना फळाची आकांक्षा वा आसक्ती असायला नको. चित्त शुध्दीद्वारे आत्मज्ञानरुपी फळ कधी लाभेल, याविषयी अपेक्षाही ठेवायला नको. कर्म करतांना फळाच्या आसक्तीचा त्याग करण्याविषयी गीतेने पावलोपावली सांगितले आहे तीच गोष्ट तपावरही लागू होते कारण की तपाचरण करतांना फलाकांक्षा जागली तर दु:ख होईल. यामुळे अखंड शांतीसाठी फळाची आसक्ती त्यागायला हवी. आत्मज्ञान कसे प्राप्त होईल याची काळजी वहाण्याऐवजी त्याला संपादित करण्यासाठी जे तप सुरु केले होते ते दिवसेंदिवस कसे वाढेल या प्रयत्नातच लागले पाहिजे. प्रयत्नांच्या पराकाष्ठेचा परिणाम हीच फलप्राप्ती होय. आपली संपूर्ण श्रध्दा जर प्रयत्नातच असेल तर आपण त्यातच तल्लीन व निश्चिंत असावे. तप कमी होत असल्यामुळे आत्मज्ञान संपादित करण्यात आडकाठी येत आहे असे वाटत असेल तर अशांत न होता उत्साहपूर्वक प्रयत्न वाढवण्याच्या दिशेने वाटचाल करावी. ज्याचा प्रयत्नांवरच पूर्ण विश्वास आहे तो कदापि निराश होणार

नाही. आपले चुकते ते इथेच की आपण परिणामाच्या प्राप्तीवरच सारे लक्ष केंद्रित करतो. खरे पाहू जाता सारे लक्ष प्रयत्नांवरच केंद्रित रहायला हवे. प्रयत्नात शिथिलता यायला नको.

2) **युक्तैः नरैः** ज्यांचे चित्त, सम व निर्विकार आहे असे पुरुष. चित्ताची समता, निर्विकारता सात्विक तपाचे दुसरे लक्षण आहे. दुसऱ्या अध्यायातील 48 व्या श्लोकात चित्ताची समता, निर्विकारतेलाच योग म्हटले आहे. निराग्रही भावनेने जे सत्य वाटते ते समोरच्याशी योग्य प्रकारे मांडल्यावर आपली वृत्ती तटस्थ राखायला हवी. हा विचार मनात जागृत राखायला हवा की दुसऱ्याच्या कथन वा अभिप्रायातही सत्य असु शकते. यामुळे चित्त प्रक्षुब्ध होणार नाही. यासोबतच सृष्टीचे मिथ्यात्व ध्यानी आले तर चित्त निर्विकार राहील. जगात आपल्याला कायमचा मुक्काम ठोकून तर रहायचे नाही ना. वयाची 60-70 वर्षे भराभर निघून जातात (बघता-बघता) वाटेल तेवढा आग्रह का असेना आपणच अखेर देह सोडून निघून जातो आणि दुसरा देह धारण करतो. मग आपल्यासाठी सारी सृष्टी नवीन असते. सारे प्रश्न नवीन असतात. आई, बाबा, नातलग, संबंधी जन, मित्र - सारे नवीन असतात. असा विचार जर सतत जागृत असला तर चित्त सम, निर्विकार राहू शकते. तीन प्रकारचे तप शांतचित्ताने अखंडरुपाने - अखंडपणे चालत राहील.

3) **परया श्रध्दया तप्तं तत् त्रिविधं तपः सात्त्विकं परिचक्षतेः** परम श्रध्देने केले जाणारे तप तीन प्रकारचे कायिक, वाचिक, मानसिक तप सात्विक म्हटले जाते. आपण जे काही तप वा कर्म करत असू त्यात श्रध्दा मुख्य आहे. या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकात असे सांगितले गेले आहे की बिना श्रध्देने केलेले यज्ञ, दान, तप असत्च ठरेल. अशा असत् यज्ञ, दान, तपाचे फळ ना या जन्मी लाभत ना येणाऱ्या जन्मात लाभत. प्रत्येक मनुष्याच्या ठायी श्रध्दा असते हे या अध्यायातील तिसऱ्या श्लोकात सांगितले गेले आहे. श्रध्देसोबत ज्ञान आणि विवेक असायला हवे. तप म्हणजे काय ? तप कसे करायला हवे ? हे सारे आधी विवेकपूर्वक ठरवले पाहिजे आणि श्रध्दापूर्वक करायला हवे. अन्यथा नाना प्रकारच्या शंका उत्पन्न होतील. मनात वृत्ती उठत असतात. विचारपूर्वक ठरवलेल्या कार्याबाबतही शंका उत्पन्न होत रहातात. यामुळे विवेकपूर्वक जे काही तप कराल त्यावर श्रध्दा राखून कार्य करत रहाल तर ते योग्य प्रकारे पूर्ण होईल. अंगीकृत कार्यात जर अपूर्णता असेल तर पूर्णता आणायचा प्रयत्न करायला हवा. जे न्यून असेल ते घालवणे आपला धर्म आहे पण आपण आचरत असलेल्या तपाबाबतच हे चुकीचे आहे, अशी शंका जागून ते त्याग करण्यासाठी जर आपण तयार होऊ तर कुठलेही कार्य धडपणे होऊ शकणार नाही. यासाठीच श्रध्देची आवश्यकता आहे. विवेकपूर्वक एखादी गोष्ट ठरवल्यावर त्याचे यथायोग्य पालन करणे हे श्रध्देच्या आधारेच शक्य आहे. अशाप्रकारे दृढ निश्चयाला दृढ करणारी श्रध्दाच आहे. श्रध्दा असली म्हणजे चंचळता - अस्थिरता कमी होते. अशाप्रकारे श्रध्दा महत्वाची - मोलाची आहे. इथे श्रध्देसोबत 'परम' विशेषण जोडले आहे. तप करायचे असेल तर सामान्य श्रध्दा उपयोगाची नाही कारण की तप कष्ट साध्य आहे. अधिक कष्ट पडले, त्रास झाला तर श्रध्दा डगमगू शकते. यामुळे तपाचरण करताना श्रध्दा, श्रध्देची पराकाष्ठा, उत्कट श्रध्दा असायला हवी. अशा तपाला सात्विक तप म्हणतात.

: 18 :

***सत्कार - मान - पूजार्थम् तपो दंभेन चैव यत् ।***
***क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् तपः** जे तप
- **सत्कार - मान पूजार्थम्:** सत्कार, आदर आणि प्रतिष्ठा - पूजेसाठी
- **च दंभेन्:** आणि दंभाने म्हणजे पाखंडीपणाने
- **क्रियतेः** केले जाते
- **तत् इह राजसंः** त्याला इथे राजस
- **चलं अध्रुवम्:** चंचळ आणि अनित्य म्हणजे अनिश्चित आणि क्षणिक फळ देणारे
- **प्रोक्तंः** सांगितले जाते

**अर्थ**

जे तप सत्कार, मान व पूजा होण्यासाठी तसेच काही स्वार्थासाठीही स्वभावाप्रमाणे किंवा पाखंडीपणाने केले

जाते, ते अनिश्चित (ज्याचे फळ मिळेल की नाही या विषयी शंका असते त्याला अनिश्चित फळ देणारे तप म्हणतात.) तसेच क्षणिक  फळ देणारे तप येथे राजस म्हटले आहे.

***सत्कारादिक इच्छूनि केलें जें दंभ राखुनी।***
***तें चंचळ इथें जाण तप राजस अस्थिर॥***

**विषय:** या श्लोकात राजस तपाची चार लक्षणे सांगितली गेली आहेत. 1) लोकांनी साधु, तपस्वी म्हणावे अशा सन्मानाच्या इच्छेने. 2) सर्वांनी आदर-सत्कार करावा या हेतुने. 3) आणि पूजा म्हणजे सेवा-चाकरी करत रहावी या तृष्णेने. 4) आणि दंभपूर्वक जे केले जाते ते राजस तप चंचळ आणि अनित्य म्हटले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **सत्कार:** सात्विक तपात निरहंकारितेचा उत्कर्ष वर्णिला आहे. राजस तपात अहंकाराचे प्राबल्य असते. प्रपंचात फसलेले लोक आपल्याला भोगी मानतात पण काही लोक प्रपंचात राहून तपाचरण करतात तर काही प्रपंचाचा त्याग करुन तपात तल्लीन होतात. तरीही दोघांच्या ठायी ही लालसा कायम असते की आपण जेव्हा एवढे तप करत आहोत तर आपली प्रशंसा व्हायला हवी. लोकांनी साधु महात्मा मानावे ही इच्छा काही ते मनातून काढू शकत नाहीत. एवढेच नव्हे पण तपाचरण करतांना नित्य प्रशंसा होत रहावी हाच मनात उद्देश असतो. काही साधू हिमालयात लंगोटी परिधान करुन बर्फात रहातात. यामुळे शरीराच्या सहिष्णुतेची प्रशंसा होईलच पण लोकांनी खूप तपाचरण करताहेत एवढेच म्हटल्यावर काही राजस - तपस्वींना समाधान वाटत नाही. हा तपस्वी केवढा मोठा महात्मा आहे, साधू आहे, असे लोकांनी म्हणावे ही मुख्य लालसा मनी वसते. याच्या मुळाशी देहासक्ती असते, असतो देहाभिमान.

2) **मान:** लोकांकडून आदर - सत्कार प्राप्त करुन घ्यायची लालसा. हे लक्षण पहिल्या लक्षणाशी संबध्द आहे. मनात जेव्हा साधू महात्मा म्हणवले जायची तृष्णा उत्पन्न होईल तेव्हा आदर - मान लाभावा ही इच्छा प्रबळ झाल्याशिवाय कशी राहील ? अशी इच्छा बहुधा सर्वांच्या ठायी दिसून येते पण ज्यांच्यात काही विशेष शक्तीचा आविष्कार असतो, त्यांच्या ठायी ही तीव्र होऊन जाते. उदाहरणार्थ एखाद्याला शास्त्रांचे ज्ञान लाभले तर त्याला त्याचे भान असेलच. नाना शास्त्रांचे ज्ञान प्राप्त झाले असेल तर (हा विचार प्रबळपणे जागृत होईल माझ्यासारखा शास्त्रज्ञाता अन्य कुणी नाही ) एखादा मल्ल असतो. त्याचे शारीरिक बळ अपार असते. त्याला कुस्तीत कुणी चीत करु शकत नसतो. तेव्हा त्याच्या मनी सहजपणे हा अभिमानाचा भाव जागृत होतो की माझ्यासारखा कुशल मल्ल मीच आहे आणि मला तुल्यबळ असा दुसरा कुणीही असू शकत नाही. मोटार चालक, सायकल स्वार, पोहोणारा, स्वयंपाकी सर्वांच्या ठायी असा अभिमान जागतो. कुठली का शक्ती असेना, त्याच्या सोबत अभिमान येतोच येतो.

3) **पूजार्थम्:** पूजा करावी अशी मनात तृष्णा बाळगणे. पूजा म्हणजे प्रत्यक्षात चरण प्रक्षालन करुन पूजा, सेवा-चाकरी करावी असा भाव. एखादी व्यक्ती तपाचरण करते आणि लोक प्रशंसा करु लागतात. काही लोक आकृष्ट होऊन त्या तप करणाऱ्या भोवती जमू लागतात. भक्ती भावनेने सन्मान करतात. त्यावेळी मनात महत्वाकांक्षा जागृत होते. लोकांनी आपले पूजन करावे, सेवा करावी अशी भावना जागते. आपले चरण प्रक्षालन करुन ते उदक तीर्थासारखे सेवन करावे अशी भावना जागते. अशाप्रकारे त्या व्यक्तीला आपण महंत, महातपस्वी, ज्ञानवंत असल्याचे भान होऊ लागते. अशी वृत्ती जागते. ती व्यक्ती त्या वृत्तीला वश होऊन जाते. काही तपसाधकाना समाधीद्वारे काही चमत्कार करण्याची शक्ती प्राप्त होऊन जाते. तेव्हा लोक खूप प्रभावित होतात, भूलतात. सेवा चाकरी करायला लागतात. एवढेच नव्हे तर त्या तपस्व्याचे चरणोदक तीर्थ मानून प्राशन करतात. त्याच्या स्नानाचे घाणेरडे पाणीही तीर्थासारखे पवित्र मानतात, प्राशन करु लागतात असे करुन स्वत:ला धन्य मानतात.

4) **च दंभेन क्रियते तत् इह राजसं चलं अध्रुवं प्रोक्तम्:** आणि दंभासाठी म्हणजे बाह्य देखाव्यासाठी भपक्यासाठी  जे तपाचरण केले जाते त्याला राजस, चंचल आणि अनित्य मानले आहे. तप तर आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी  केले गेले पाहिजे. यासाठी चित्त निर्विकार असणे गरजेचे आहे. त्याशिवाय आत्मज्ञान शक्य नाही. चित्त शुध्दीसाठी कायिक, वाचिक आणि मानसिक

तपाचरण गरजेचे आहे. राजस तपाच्या ठायी चित्त शुध्दीची भावना नसते. राजस तप म्हणजे तपाचा बाह्य देखावा - भपका. जिथे तपाची भावनाच नसेल तिथे तप स्थिर कसे असू शकेल? यामुळे म्हटले आहे की ते तप केवळ देखावा - पोकळ भपकाच - असल्यामुळे चंचल असते, स्थिर नसते. त्यात केवळ बाह्य उद्देश असल्यामुळे त्यात फरक पडत असतो.

: 19 :

*मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तप: ।*
*परस्योत्सादनार्थम् वा तत्तामसमुदाहृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् तप:** जे तप
- **मूढग्राहेण:** दुराग्रह - प्रेरित म्हणजे मूर्खपणाच्या हट्टाने युक्त
- **आत्मन: पीडया:** मन, वाणी आणि देहाला पीडा देऊन म्हणजे क्लेशकारी
- **वा परस्य उत्सादनार्थम्:** अथवा दुसऱ्याचे अनिष्ट करण्यासाठी वा दुसऱ्याला त्रास देण्यासाठी
- **क्रियते:** केले जाते
- **तत् तामसं उदाहृतम्:** त्याला तामस तप असे म्हणतात

**अर्थ**

जे तप मूर्खतापूर्वक हट्टाने, मन, वाणी आणि शरीराला कष्ट देऊन किंवा दुसऱ्यांचे अनिष्ट करण्यासाठी केले जाते ते तप तामस तप होय.

*दुराग्रहें चि जें होय अंतरात्म्यास पीडुनी ।*
*किंवा जें पर - घातार्थ जाण तामस तें तप ॥*

**विषय:** या श्लोकात तामस तपाची तीन लक्षणे निदिष्ट केली आहेत. 1) जे तप अविवेकाने भरलेले, दुराग्रह प्रेरित. 2) क्लेशकारक. 3) अथवा दुसऱ्याला त्रासदायक आहे त्याला तामस तप असे म्हणतात.

**स्पष्टीकरण** -

1) **यत् तप: मूढग्राहेण:** जे तप अविवेकी आणि दुराग्रह - प्रेरित असते. ज्यात सत्वगुणाचे प्राबल्य असते तिथे विवेकाची पराकाष्ठा असते. रजोगुणाचे प्राबल्य झाले तर विवेक आणि अविवेक दोघांचे मिश्रण असते. तमोगुणाचे प्राबल्य असले तर परिपूर्ण अविवेक असतो. तमोगुणी पुरुषाच्या विचारांची दिशा - विचार करण्याचे धोरण - नेहमी चुकीचेच असते. माणूस वाटेल तेवढा शिक्षित असो, विद्वान, शास्त्री, पंडीत वा लेखक असो पण त्याच्या जीवनात जर तमोगुणाचेच प्राबल्य असले तर त्याच्या कार्यात अविवेक आणि दुराग्रह असेल. त्याच्या विचारधारेत संतुलन नसणार. हिटलरने जर्मनीला उभे केले पण त्याच्या ठायी दुराग्रह खचून भरला होता. दुराग्रहामुळे अखेर तो जर्मन आणि संपूर्ण जनतेच्या नाशाला कारण बनला. कुठल्याही संस्थेचे वा राष्ट्राचे उदाहरण घ्या. तिथला नेता बघा. त्याच्या ठायी जर सत्वगुणाचे प्राबल्य नसेल आणि अन्य ताकदी - शक्ती - कितीही अधिक वा बलवान का असेना पण त्या संस्थेला वा राष्ट्राला तो नेता योग्य मार्गावर नेऊ शकत नाही. यामुळे गांधीजी नेहमी म्हणत असत की राजकारणाला धर्माचा आधार असायला हवा. राजकारणातले हुशार आणि राष्ट्राचा लगाम हाती असलेल्या नेत्यांच्या ठायी जर सत्वगुणाचे प्राबल्य नसेल तर राष्ट्राचे कल्याण करण्यात त्यांना यश लाभणार नाही. हेच लोक समाजाचे मार्गदर्शक नेते असतात. यामुळे गांधीजींचे हे कथन अगदी सत्य आहे की राजकीय पुरुष धर्मनिष्ठ, नीतीनिष्ठ आणि सत्वगुणसंपन्न असावेत तरच ते एखाद्या पक्षाचे - संस्थेचे वा राष्ट्राचे कल्याण करु शकतात. अन्यथा त्यांच्याकडून योग्य मार्गदर्शन लाभायची शक्यता नसते.

2) **आत्मन: पीडया:** स्वत:ला त्रास करुन घेणारे वा क्लेश करुन घेणारे. एखाद्या वस्तुसाठी ज्या ज्या वेळी दुराग्रह सुरु होतो तर मग सारेच गणित चुकायला लागते. साऱ्याच क्रिया चुकीच्या होऊ लागतात. सारा देश एक आहे तरीसुध्दा आपल्या प्रांताला इतरांपेक्षा वेगळा मानून अमूक एक क्षेत्र आपल्या प्रांतात असायला हवे आणि ते तसे करुन मिळवण्यासाठी उपवास वा सत्याग्रह लोक सुरु करुन देतात. अशा उपोषणाला सत्याग्रह म्हणणेही योग्य नव्हे कारण की या मागणीत तर सत्याचा आग्रह नाहीच. हा केवळ

अविवेकमूलक दुराग्रहच आहे. याचे परिणाम ? परस्पर द्वेष वाढतो. असे उपोषण केल्याने आत्मपीडा होते. शरीर क्षीण होते. मनावरचे नियंत्रण संपून जाते मनावर नियंत्रण उरत नाही. यामुळे जे स्वास्थ्य, जी शांतता असायला हवी ते राहू शकत नाही. खरे पाहू गेल्यास अशा दुराग्रही लोकांच्या ठायी उपोषण करायची योग्यता नसते. गांधीजी सत्याग्रह रुपात कधी उपोषण करत असत तर त्यातले लक्ष्य आत्मशुध्दी आणि उद्देश चित्तशुध्दी असायचे.

3) **वा परस्य उत्सादनार्थम् क्रियते तत् तामसं उदाहृतम्:** किंवा दुसऱ्यांना त्रास देणारे - दुसऱ्यांसाठी घातक ठरणारे असे तप तामस तप होय, पगारवाढ मिळवण्यासाठी संप वा काम बंद करुन विद्रोह करतात, लुटमार, मारपीट, जाळपोळ वगैरेद्वारे जनतेच्या वा सरकारच्या संपत्तीचे नुकसान करतात. दुसऱ्यांवर दबाव टाकून त्रस्त करायची ही पध्दत त्रास देण्यासाठीच आहे. यात स्वत: काही सहन करायचा विषय उरत नाही. पगार मिळत नाही, कुटुंब अडचणीत सापडते, हे एक प्रकारचे तपच आहे. समाज स्वाथ्याच्या दृष्टीने हे तप नि:संदेह हानीकारक आहे. तपाचा मुख्य उद्देश कायिक, वाचिक आणि मानसिक शुध्दी असायला हवा. हा उद्देश केवळ सात्विक तपाच्या माध्यमातून साध्य करुन घेता येऊ शकतो. यामुळे सात्विक तपच ग्राह्य आहे. राजस आणि तामस तपांचा उल्लेख तर त्यांचा त्याग करण्यासाठी केला गेला आहे.

: 20 :

*दातव्यमिति यद्दानं दयितेऽनुपकारिणे।*
*देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् दानं दातव्यम् इति:** जे दान धर्मभावनेने
- **अनुपकारिणे:** कुठल्याही उपकाराची अपेक्षा न बाळगता
- **देशे च काले च पात्रे:** देश, काळ, पात्र बघून
- **दीयते:** दिले जाते
- **तत् दानं सात्विकं स्मृतम्:** त्या दानाला सात्विक दान म्हटले जाते

**अर्थ**

'दान देणेच कर्तव्य आहे' या भावनेने जे दान देश, काळ (ज्या देशी किंवा काळी ज्या वस्तूचा तुटवडा असेल ती वस्तू पुरवून जनसेवा करण्यास तो देश व तोच काळ योग्य समजला जातो.) आणि पात्र (भुकेलेले, अनाथ, दु:खी, रोगी, असमर्थ व भिकारी इत्यादी अन्न, वस्त्र आणि औषधी यापैकी जी वस्तू ज्याच्याजवळ नसेल, ती वस्तू त्याला पुरवून सेवा करण्याकरता ते पात्र समजले जातात आणि श्रेष्ठ आचरणाचे विद्वान, ब्राह्मण धन वगैरे सर्व पदार्थांनी सेवा करण्यास योग्य म्हणजे पात्र समजले जातात.) मिळाले असता उपकार न करणाऱ्याला दिले जाते ते दान सात्विक दान म्हटले गेले आहे.

***देशीं काळीं तसें पात्रीं उपकार न इच्छितां।***
***धर्म - भावें चि जें देणें जाण तें दान सात्विक ॥***

**विषय:** या श्लोकात सात्विक दानाविषयी तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) जे दान धर्म भावनेने. 2) उपकाराची अपेक्षा न धरता. 3) देश, काळ, पात्र यांच्या औचित्याचा विचार करुन दिले जाते ते सात्विक दान होय.

**स्पष्टीकरण**

1) **यत् दानं दातव्यम् इति:** धर्म भावनेने केले जाणारे दान. सामान्यपणे दान शब्दाचा अर्थ उपकार मानला जातो. विनोबांनी आता दानाचे अनेक प्रकार प्रचलित केले आहेत. उदाहरणार्थ भूदान, गुप्तदान, संपत्तीदान, कूपदान, श्रमदान, बुध्दीदान वगैरे. दानाचा मूळ अर्थ आहे परस्पर सहाय्य. सहाय्य नाना प्रकारे केले जाऊ शकते. माझ्याजवळ अमूक वस्तु आहे आणि दुसऱ्याला त्याची गरज आहे तर मी वस्तु त्याला देऊन टाकणे दान म्हणवले जाईल. मी डॉक्टर असेन तर रोग्यांची सेवा करेन, शिक्षक असेन तर विद्यार्थ्यांना शिकवीन. इंजिनियर असेल तर घर, तलाव, पूल वगैरे बनवून देईन. याला उपकार म्हणजे दानच समजायला हवे पण इथे दान शब्द विशिष्ट अर्थात्च प्रयुक्त झाला आहे. धन, घर, जमीन वगैरे जी संपत्ती आपल्यापाशी असेल ती जेव्हा दुसऱ्याला दिली जाते ते दान म्हणवले जाते. अशा प्रकारे दानात कशी भावना असायला हवी हे भगवंत या ठिकाणी सांगताहेत कारण

की भावना भेदामुळेच सात्विक, राजस वा तामस असे भेद होतात. धनविषयक तृष्णा क्षीण होत असल्यामुळे दान दिल्याने आपले स्वत:चेच कल्याण होते. प्रापंचिक वृत्ती क्षीण होते, भोगवृत्ती वाढत नाही. यामुळे दान करण्यात आपण कुणावर उपकार करत आहोत ही भावना मनी न जागता दान एक आवश्यक असे पवित्र कर्तव्य आहे, अशी कर्तव्य भावना मनात जागयला हवी.

2) **अनुपकारिणे:** ज्याला दान दिले आहे त्याच्याकडून उपकाराची कुठलीही अपेक्षा मनी न राखता. दान ज्याला दिले त्याकडून काही मोबदल्याची अपेक्षा राखली तर ते निरपेक्ष दान ठरत नाही. फळाची यत्किंचितही आशा राखता कामा नये. निष्काम दान हेच सात्विक दान असते. दान व्यापार - सौदा - नाही. जो काहीही मोबदला देऊ शकणार नाही, त्याला दान करायला हवे, असे शंकराचार्याचे मत आहे. याचा अर्थ असा की संपूर्णपणे असमर्थ, अत्यंत दरिद्री, अभावग्रस्त असेल त्यालाच दान द्यायला हवे.

3) **देशे च काले च पात्रे:** देश, काल, पात्र म्हणजे योग्य देश, समुचित काळ आणि योग्य पात्र बघून. एखाद्या व्यक्ती वा संस्थेच्या बाबतीत तीन कसोट्या लावायला हव्यात. आधी देश म्हणजे भूमी वा प्रदेशाबाबत विचार व्हायला हवा. प्राचीन काळी दान केवळ तीर्थक्षेत्रीच करायला हवे अशी कल्पना होती. लोक अजूनही तीर्थ क्षेत्रावरील स्थळे वा धर्मशाळेसाठी दान देतात. संस्थांनाही दान दिले जाते. शिक्षण संस्थांना दान देण्याची प्रवृत्ती अधिक आहे कारण की शिक्षण संस्थांना दिलेले दान हे ज्ञानदान असल्याचे मानले जाते.

दुसरा मुद्दा काळाशी संबंधित आहे. प्राचीन काळी सूर्यग्रहण वा चंद्रग्रहणाच्या समयी काही दान देण्याची मान्यता रुढ होती. अजूनही पुराण संस्कारशील लोक असे करतात पण वर्तमानकालीन विचार - प्रवाहात काळानुसार दानाची प्रवृत्ती आहे. चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी आपल्या देशात सर्वांनी दान करायला सुरुवात केली. श्रीमंतांनीही चांगल्या रकमा दानात दिल्यात. दान समयानुसार केले जायला हवे. ही परंपरा चालत आली आहे.

तिसरा मुद्दा पात्र आहे. जे दान दिले जाते ते योग्य व्यक्ती, वा योग्य संस्थेला सत्कार्यासाठी दिले गेले पाहिजे. चारित्र्यहीन व्यक्ती वा निष्क्रिय संस्थेला दान दिले तर सदुपयोग होण्याऐवजी दानाचा दुरुपयोग होतो. हिंदुस्तानात साधूच्या नावाने भिक्षा मागणारे उदंड आहेत. त्याना भिक्षा वाढणे अधर्मच मानला जायला हवा.

: 21 :

*यत्तु प्रत्युपकारार्थम् फलमुद्दिश्य वा पुन: ।*
*दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु यत्:** पण जे दान
- **प्रत्युपकारार्थम्:** उपकाराची अपेक्षा राखून
- **वा पुन: फलं उद्दिश्य:** अथवा फलासक्ती राखून
- **च परिक्लिष्टं दीयते:** आणि मनात क्लेशाची भावना बाळगून केले जाते
- **तत् राजसं दानं स्मृतम्:** त्याला राजस दान असे म्हणतात

**अर्थ**

पण जे दान क्लेशपूर्वक (सध्या जसे फंड देणे वा आकडे घालणे इत्यादी प्रसंगी धन दिले जाते.) प्रत्युपकाराच्या हेतूने (त्या मोबदल्यात आपले सांसारिक काम साधण्याच्या आशेने केले जाते.) किंवा फळ नजरेसमोर ठेऊन (मान, प्रशंसा, प्रतिष्ठा व स्वर्ग वगैरेची प्राप्ती व्हावी किंवा रोग परिहार व्हावा या हेतूने ) दिले जाते ते राजस दान म्हटले जाते.

***उपकार अपेक्षूनि अथवा फळ वांछुनी ।***
***क्लेश - पूर्वक जें देणें जाण तें दान राजस ॥***

**विषय:** या श्लोकात राजस दानाची तीन लक्षणे वर्णिली आहेत. 1) जे दान उपकाराची भावना बाळगून. 2) वा फलासक्ती मनी राखून. 3) आणि मनी क्लेशाची भावना राखून दिले जाते. त्या दानाला राजस दान असे म्हणतात.

**स्पष्टीकरण**

1) **तु यत् प्रत्युपकारार्थम्:** उपकाराच्या मोबदल्याची अपेक्षा बाळगून. सात्विक दान निरपेक्ष भावनेने केले

जाते. राजस दान अपेक्षा मनी बाळगून केले जाते. एक प्रकारे हा सौदाच आहे. व्यापारी आपसात असाच सौदा करतात. अपेक्षा राखून केले गेलेले दान निम्न दर्जाचे आहे. काही लोक दान करतात त्याना आपल्या नावाची अपेक्षा असते. संस्थेच्या विश्वस्त मंडळात आपले नाव असावे असे त्यांना वाटते, संस्थेचे संचालन आपल्या हाती रहावे, अशी त्यांची इच्छाही असते. आपल्या मुलाला वा नातेवाईकाच्या मुलाला त्या संस्थेत विनामूल्य आसन मिळावे, निवासासाठी भाड्याने घर मिळावे, घरासाठी जागा मिळावी. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या आकांक्षा दात्याच्या मनात असतात. गुरु विद्यार्थ्यांने आपली सेवा करावी अशी अपेक्षा राखतात.

2) **वा पुनः फलं उद्दिश्यः** अथवा फळाची आसक्ती राखून. इथे अथवा शब्द आला आहे. याचा अर्थ असा की कुठलाही मोबदला मिळेल अशी अपेक्षा न राखता समजावा किंवा फलासक्ती राखून असा अर्थ समजावा म्हणजे पहिले लक्षण माना वा दुसरे लक्षण दोघे एकच एक. दोघांमध्ये खूप फरक नाही असा याचा अर्थ. हे योग्यही आहे कारण की मोबदल्याची अपेक्षा राखणे ही फळाची इच्छाच आहे. या दोन्ही लक्षणांमध्ये समानता असली तर असा फरक करता येऊ शकतो की दुसरे लक्षण पहिल्या लक्षणाच्या तुलनेने व्यापक आहे म्हणजे दान केल्यावर मृत्युनंतर स्वर्ग लाभावा वा बाह्य सुखांचा लाभ व्हावा अशी फळविषयक वासना असो वा पुढच्या जन्मीसुध्दा श्रीमंत कुळात जन्म लाभावा म्हणजे विनासायास वैभव मिळावे. चित्तशुध्दीचा हेतूही असू शकेल पण हे सात्विक दानाचे लक्षण मानले जाईल. राजस दानातली फलविषयक तृष्णा बाह्य वैभवाने मिळणाऱ्या सुखाचीच असेल.

3) **च परिक्लिष्टं दीयते तत् राजसं दानं स्मृतम्ः** मनी क्लेशाची भावना बाळगून दिले जाणारे दान राजस दान म्हटले जाते. कधी कधी जबरदस्तीपूर्वक लाचारीने दान द्यावे लागते. बाह्य दबाव येतात, कुणी आपल्याला कंजूस म्हणू नये वा प्रतिष्ठा कमी होऊ नये म्हणूनही दान द्यायला लागते. यामुळे वर्गणी गोळा करताना सर्वात श्रीमंत व्यक्तीकडून सुरुवात केली जाते. त्याने लिहिलेल्या आकड्याकडे बघून मग सारे आपापले आकडे लिहितात. जबरदस्तीने लाचारीने दिले गेलेले दान सात्विक नसते. राजस दानात याची गणना केली जाते. व्यापारी वर्गात दान करायची सवय होऊन गेल्यामुळे लहान - सान व्यापारीही काही - ना - काही दान करत असतो. कुणी मागायला आला तर काही - ना - काही देतातच. अन्य वर्गात असे घडताना दिसत नाही. मासिक वेतन वीस - पंचवीस हजार रुपये असेल अशा नोकरदार माणसाकडे दान मागायला गेले तर आमच्याकडे कसे आलात? अहो, व्यापाऱ्याकडे जा - असेच ते म्हणतील. हीच सवय वकील, डॉक्टर, प्रोफेसर वगैरे नोकरी करणाऱ्यामध्येही दिसून येते.

: 22 :

*अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते।*
*असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् दानं अदेश काले:** जे दान अयोग्य देश - काळात
- **च अपात्रेभ्यः** आणि अपात्राला
- **असत्कृतं:** अनादरपूर्वक
- **अवज्ञातं:** अवज्ञापूर्वक म्हणजे तिरस्कारपूर्वक
- **दीयते तत् तामसं उदाहृतम्:** दिले जाते, त्या दानाला तामस दान म्हटले जाते

**अर्थ**

जे दान सत्काराशिवाय किंवा तिरस्कारपूर्वक अयोग्य ठिकाणी, अयोग्य काळी आणि कुपात्री (मद्य मांस आदी भक्षण करणाऱ्या तसेच चोरी वगैरे अधम काम करणाऱ्यांना ) दिले जाते ते तामस दान होय.

***करुनि भावना तुच्छ देशादिक न पाहतां।***
***अनादरें चि जें देणें जाण तें दान तामस ॥***

**विषय:** या श्लोकात तामस दानाची तीन लक्षणे वर्णिली आहेत. 1) जे दान अदेश काळी. 2) अपात्राला. 3) अनादराने वा अवज्ञापूर्वक दिले जाते ते दान तामस दान होय.

**स्पष्टीकरण**

1) **यत् दानं अदेशकाले:** जे दान अयोग्य प्रदेशात, अयोग्य स्थानी, अयोग्य कालखंडात, अयोग्य वेळी दिले

जाते. सात्विक दानाच्या विपरीत काही लोक विचार न करता दान करतात. या कामी नीती - अनीती वा धर्म - अधर्माचा विचार खूप कमी करतात. दान जर विवेकपूर्वक केले नाही, तर अविवेकाने केलेले दान तामसच मानले जाईल.

दुसरा मुद्दा काळ आहे. काळाचा विचार न करता दिले जाणारे दान तामस होय. शेती करपून गेल्यावर पावसाचा काय बरे उपयोग ?

2) **अपात्रेभ्य:** आणि जे दान पात्राची पर्वा न करता म्हणजे पात्राची योग्यता न बघता एखाद्या व्यक्तीला वा संस्थेला दिले जाते. सात्विक दानात देश, काळ आणि पात्र या तिघांचा विचार केला जातो. तिघांबाबत विवेक पाळला जातो. तामस दानाच्या ठायी विवेक नसतो ज्याला दान द्यायचे आहे त्याची आधी पात्रता बघायला म्हणजे तपासायला पाहिजे. हा नियम संस्थेवरही लागू पडतो पण हे न बघता आपण कुणाला दानाच्या रुपात मदत करणार असू तर समाजाचे कल्याण होणार नाही. समाजाचे कल्याण नेहमी नीती आणि धर्माच्या आधारेच होईल. समाजाचे अकल्याण करणाऱ्या व्यक्ती वा संस्थेला कदापि दान द्यायला नको. प्राचीन काळी मंदिरांविषयी खूप श्रध्दा होती. यामुळे मंदिराच्या महंताला काही त्रास होऊ नये या उद्देशाने मंदिराच्या नावावर दान दिले जायचे. मंदिराच्या पुजाऱ्याला दक्षिणाही मिळायची पण आता या प्रथेचा सदुपयोग होताना दिसत नाही. महंत आणि पुजारी भोगी बनायला लागलेहेत. त्यांचे चारित्र्य पतीत व्हायला लागले. यामुळे दान दिल्यानंतर कुणाचे अध:पतन न होवो हे बघणेही गरजेचे आहे.

3) **अस्तत्कृतं अवज्ञातं दीयते तत् तामसं उदाहृतम्:** अनादर आणि अवज्ञापूर्वक दिले गेलेले दान तामस दान म्हटले जाते.

: 23 :

***ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविध: स्मृत: ।***
***ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिता: पुरा ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ॐ तत् सत्:** ॐ तत् सत्
- **इति ब्रह्मण: निर्देश:** असा सच्चिदानंद ब्रह्माचा नामनिर्देश
- **त्रिविध: स्मृत:** तीन प्रकारे सांगितला गेला आहे
- **तेन:** याच्या अनुसार
- **पुरा ब्राह्मणा:** प्राचीन काळी ब्राह्मण
- **च वेदा:** आणि वेद शास्त्र
- **यज्ञा:** यज्ञ वगैरेंमध्ये
- **विहिता:** निर्माण केले आहेत म्हणजे प्रवृत्त झाले आहेत

**अर्थ**

ॐ तत् सत् अशी तीन प्रकारची सच्चिदानंदघन ब्रह्माची नावे सांगितली आहेत. त्यांपासून सृष्टीच्या आरंभी ब्राह्मण, वेद आणि यज्ञ वगैरे रचले गेले आहेत.

***ॐ तत् - सत् ह्यापरी ब्रह्म तिहेरी स्मरलें असे ।***
***त्यांतूनि निर्मिले पूर्वी वेद यज्ञ उपासक ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ॐ म्हणजे ईश्वराला अर्पण करुन, तत् म्हणजे निष्काम भावनेने, सत् म्हणजे सत्कर्मे केली पाहिजे. हा ब्रह्माचा निर्देश आहे. 2) या निर्देशानुसार प्राचीनकाळी ब्राह्मण म्हणजे साधक आणि वेद म्हणजे चारी वेद - शास्त्र, यज्ञ, दान, तप प्रवृत्त झालेत.

**स्पष्टीकरण**

1) **ॐ तत् सत् इति ब्रह्मण: निर्देश: त्रिविध: स्मृत:** ईश्वरार्पण करुन निष्काम भावनेने, फलाशा त्यागपूर्वक सत्कर्मे करायला हवीत हा ब्रह्म वा ईश्वराचा त्रिविध निर्देश आहे. आठव्या अध्यायातील तेराव्या श्लोकात म्हटले गेले आहे की ॐ उच्चारण करत चित्तात माझे स्मरण करत देहत्याग करणाऱ्या साधकाला उत्तम गती लाभते. या श्लोकात सांगितले आहे की आपल्या हयातीत सत्कर्मे ॐ म्हणजे ईश्वराप्रत अर्पण करायला हवीत. हयातीत जर आपण ईश्वरस्मरण करत असू (प्रत्येक क्रिया करतांना) तरच आपल्याला मृत्युसमयी ईश्वराचे स्मरण होईल. आजकाल ॐ हे रुढ नाम नाही. आधी ॐ हे रुढ नाम होते. आजकाल लोकात राम, कृष्ण, गोविंद, वासुदेव वगैरे नावे

रुढ आहेत. ॐ निर्गुण नाम असून राम, कृष्ण वगैरे सगुण नामे आहेत.

तत् म्हणजे फलाशेचा त्याग करुन अनासक्तीपूर्वक. कर्म जसे ईश्वरार्पण बुध्दीने करायला हवे तसेच ते अनासक्तीपूर्वक, निष्काम भावनेने, फलाशा त्यागपूर्वक व्हायला हवे. इथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की एकदा 'ईश्वरार्पण बुध्दीने कर्म करायला हवे' असे सांगितल्यावर परत 'फलाशा त्यागपूर्वक वा अनासक्तीपूर्वक' असे सांगायची काय गरज होती ? कारण की ईश्वरार्पण बुध्दीने कर्म करायचा अर्थच अनासक्तीपूर्वक कर्म करणे असा होतो. तरी असा फरक करायचे कारण हे आहे की ईश्वरार्पण बुध्दीने कर्म केल्यावरही माणूस मनात अशी अभिलाषा वा आसक्ती बाळगू शकतो की मी जर ईश्वरार्पण बुध्दीने कर्म आचारत आहे, एवढ्या पवित्र भावनेने कर्म करत आहे, तर मला ईश्वरामार्फतच या कर्माचे अपेक्षित फळ मिळायला हवे. अशाप्रकारे ईश्वराशी सौदा करु शकतो. यामुळे म्हटले आहे की अहंकार संपवण्यासाठी ईश्वराचे अखंड स्मरण करायला हवे. फलासक्ती असेल तर अहंकार टिकूनच राहील. अहंकार घालवण्यासाठीच सारी कर्मे व्हायला हवीत. ईश्वराचे स्मरण झाले तर ईश्वरच सर्व कर्ता - करविता आहे, मी ईश्वराहून भिन्न नाही. सर्वत्र ईश्वरच ईश्वर आहे अशा भावनेच्या सातत्याने अहंकार क्षीण होतो यामुळे फळप्राप्तीलाही ईश्वराधीन मानून वृत्तीत तटस्थता, निष्कामता, अनासक्ती असायला हवी.

तिसरा मुद्दा आहे सत्. सत् म्हणजे सत्कर्म वा चांगले कर्म. गीतेचा हाच संदेश आहे की राजस आणि तामस कर्मे अजिबात न होता सात्विक कर्मेच होत रहावीत. सात्विक कर्मे आसक्तीने वा अनासक्तीपूर्वक अशी उभयविध केली जाऊ शकतात. राजस आणि तामस कर्माच्या आसक्तीपासून सुटका लाभावी यासाठी सात्विक कर्मे जरी आसक्तीने केलीत तरी चालतील पण राजस वा तामस कर्माच्या वाटेला कदापि जाऊ नका. असे सांगावे लागेल पण सात्विक कर्मे आचरताना अहंकारामुळे दु:ख होते, मग अहंकार वगैरे विकार आणि अहंकारामुळे उपजणारी आसक्ती सोडायची गरज निर्माण होते. मग सांगावे लागते की अहंकार सोडून, निरासक्त भावनेने कर्मे केलीत तरच दु:खमुक्तीचा अनुभव मिळू शकेल. अशा प्रकारे शास्त्राचे कथन आहे की ईश्वराची प्रेरणा आणि संदेश असा आहे की ईश्वरार्पण बुध्दीने, निष्काम भावनेने, फलाशा त्यागपूर्वक सात्विक कर्मे नित्य करत रहा, आचरत रहा.

2) **तेन पुरा ब्राह्मणा: च वेदा: यज्ञा: विहिता:** या निर्देशानुसार प्राचीनकाळी ब्राह्मण म्हणजे साधक, आणि वेद म्हणजे चार वेद वगैरे शास्त्रे - यज्ञ, दान आणि तपाचरणाला प्रवृत्त झालेत. इथे हवाला प्राचीन काळाचा दिला गेला आहे. एथवर ब्राह्मणांनी म्हणजे साधकांनी या शास्त्राज्ञेचे पालन केले आहे म्हणजे ईश्वरार्पण बुध्दीने निष्कामभावनेने सत्कर्मे करुन मोक्ष प्राप्ती संपादित केली आहे. वेद जवळपास आठ - दहा हजार वर्षापूर्वीचे मानले जातात. वेदसुध्दा शास्त्राच्या उपर्यक्त आज्ञेनुसार चालताहेत याचा अर्थ वेदांच्या आधीही शास्त्रे होती. वेद पूर्व शास्त्र आज उपलब्ध नाहीत पण भगवंताच्या या कथनानुसार वेदांच्या पूर्वी शास्त्रे होती, हे सिध्द झाले. वेदासोबत मनुस्मृती वगैरे ग्रंथही या विचाराला समर्थन देताहेत. याच विचाराच्या आधारे यज्ञकार्यही संपन्न होतात. यज्ञ या संज्ञेत यज्ञ, दान, तप या तिघांचा समावेश होतो. यज्ञ, दान, तपही जर ईश्वरार्पण बुध्दीने झाले तर मोक्षाचा अनुभव लाभू शकतो. यामुळे हा अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेला संदेश आहे आणि त्याचे सुयोग्य पालन सारे करत आले आहे.

: 24 :

***तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञ - दान - तप: क्रिया: ।***
***प्रवर्तन्ते विधानोक्ता: सततं ब्रह्मवादिनाम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तस्मात् ॐ इति उदाहृत्य:** त्यामुळे ॐ चा उच्चार करत
- **ब्रह्मवादिनाम्:** ब्रह्मवाद्यांनी म्हणजे वेदांचे कथन करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या शास्त्र विधीद्वारे
- **विधानोक्ता:** शास्त्रानुसार
- **यज्ञ - दान - तप:** क्रिया: यज्ञ, दान, तप वगैरे क्रिया
- **सततं प्रवर्तन्ते:** सतत होत रहाताहेत

**अर्थ**

म्हणून वेदमंत्रांचा उच्चार करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या शास्त्राने सांगतलेल्या यज्ञ, दान व तपरुप क्रियांचा नेहमी ॐ या परमात्म्याच्या नावाचा उच्चार करुनच आरंभ होत असतो.

*म्हणूनि आधीं ॐ - कार उच्चारुनि उपासक।*
*यज्ञ - दान - तपें उक्त निरंतर अनुष्ठिती॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आहे. 1) ॐ काराचे उच्चारण करीत ब्रह्मवाद्यांद्वारे. 2) शास्त्रानुसार. 3) यज्ञ, दान, तप वगैरे क्रिया सतत होताहेत.

**स्पष्टीकरण**

1) **तस्मात् ॐ इति उदाहृत्य ब्रह्मवादिनाम्:** यामुळे ॐ काराचे उच्चारण करत म्हणजे ईश्वर स्मरण करत, ब्रह्मवादी म्हणजे ईश्वर श्रध्दाळू साधकांद्वारे वा उपासकांद्वारे. यामुळे शब्दाचा संदर्भ मागील श्लोकाशी आहे. मागील श्लोकात सांगितले आहे की ॐ म्हणजे ईश्वरार्पण करुन तत् म्हणजे निष्काम भावनेने. फलाशात्यागपूर्वक सत् कर्मे करायला हवीत. शास्त्राच्या या निर्देशानुसार प्राचीन काळी ब्राह्मण म्हणजे साधक, मुमुक्षुंनी आचरण केलेले आहे. अशा प्रकारे या विचारासाठी शास्त्र आणि मुमुक्षु जनांचा आधार असल्यामुळे ॐ काराचे म्हणजे ईश्वराचे स्मरण करत सत्कर्मे आचरायला हवीत. ईश्वर स्मरण केले नाही तर परिणामी कदापि दु:ख मुक्त होता येणार नाही कारण की दु:ख नेहमी देहभावनेमुळे, देहासक्तीमुळे जन्माला येते. अहंभावनेला म्हणजे देहासक्तीला क्षीण करायचे असेल तर अखंड ईश्वर स्मरणाशिवाय ते शक्य नाही. त्यामुळे या श्लोकात सांगितले आहे की शास्त्रानुसार ज्याप्रमाणे प्राचीन काळी मुमुक्षु जनांनी ईश्वराचे अखंड स्मरण करत आयुष्य घालवले, तसेच आजही मुमुक्षु ईश्वराचे अखंड स्मरण करत जीवन घालवताहेत.

2) **विधानोक्ता:** शास्त्रात वर्णिल्यानुसार मागील श्लोकातही शास्त्राचा हवाला दिला आहे. शास्त्र म्हणजे पूर्वानुभव. पूर्ववर्ती मुमुक्षु जनांच्या अनुभवानुसार मुमुक्षुंनी ते अनुभव शब्दबध्द केलेत, यातून पुढील मुमुक्षांना प्रकाश मिळाला. हेच शास्त्र होय. गीतासुध्दा अनुभव शास्त्र आहे. गीतेने गांधीजींना प्रेरणा लाभली. अखंड ईश्वर स्मरणाबाबत जेव्हा गांधीजींना विचारले गेले असता ते म्हणाले ‘जागृती काळातला असा एकही क्षण नाही जेव्हा मला हे भान नसेल की ईश्वर माझ्या ठायी आहे आणि तो सारे बघत आहे. हे भान बुध्दीला आहे आणि सततच्या सरावामुळे असे घडले आहे. ‘ ते असे सदैव मानत असत की ‘मी काहीच करत नाही. ईश्वरच सारे काही करवून घेत आहे.’ ते स्वत: शून्य बनून गेले होते. अखंडपणे ईश्वर स्मरण करत या शून्यतेप्रत पोहोचणे हाच मोक्ष होय.

3) **यज्ञ - दान - तप: क्रिया:** सततं प्रवर्तन्ते यज्ञ, दान, तप वगैरे क्रिया सतत होत रहात आहेत. या संदर्भात विनोबांचे विचार मननीय आहेत. शरीर, समाज आणि सृष्टी या तीन संस्थांच्या सोबत माणूस जन्माला आला आहे, यामुळे या तीन संस्थांमध्ये कायम झीज होते, अशुध्दताही होते. ती झीज व अशुध्दभाव दूर करण्यासाठी - घालवण्यासाठी - यज्ञ, दान, तप हा त्रिविध कार्यक्रम आहे. यज्ञामुळे सृष्टीच्या, दानाने समाजाच्या आणि तपाने शारीरिक झीज भरुन निघते आणि अशुध्दता घालवली जाते.

: 25 :

*तदित्यनभिसंधाय फलं यज्ञ - तप: - क्रिया:।*
*दानक्रियाश्च विविधा: क्रियन्ते मोक्षकांक्षिभि:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मोक्षकांक्षिभि:** मोक्षाची इच्छा राखणाऱ्यांपासून
- **तत् इति:** (ईश्वराचे स्मरण) करत
- **फलं अनभिसंधाय:** फलासक्ती न राखता
- **विविधा:** विविध प्रकारच्या
- **यज्ञ - तप: - क्रिया:** यज्ञ, तप वगैरे क्रिया
- **च दानक्रिया:** आणि दान वगैरे क्रिया
- **क्रियन्ते:** केल्या जातात

**अर्थ**

‘तत्’ या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या परमात्म्याचेच हे सर्व आहे. या भावनेने फळाची इच्छा न करता नाना

प्रकारच्या यज्ञ, तप व ज्ञानरुप क्रिया कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषांकडून केल्या जातात.

***तत् - कार - स्मरणें सर्व तोडूनि फल वासना।***
***नाना यज्ञ तपें दानें करिती मोक्ष लक्षुनी॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आहे. 1) मोक्षाभिलाषी साधकांच्या द्वारे तत् म्हणजे ईश्वर स्मरण पूर्वक, फलासक्तीरहित. 2) विविध प्रकारच्या यज्ञ, दान, तप वगैरे क्रिया केल्या जातात.

**स्पष्टीकरण**

1) **मोक्षकांक्षिभि:** तत् इति फलं अनभिसंधाय मोक्षाभिलाषी साधकांच्या द्वारे तत् म्हणजे ईश्वर स्मरण पूर्वक, फलासक्ती न राखता. मागील श्लोकात ॐ तत् सत् यातील ॐ शब्दाचा अर्थ सांगितला. या श्लोकात तत् चा अर्थ सांगताहेत. तत् म्हणजे तो अद्वितीय परमात्मा. ॐ चा अर्थही परमात्माच आहे. ॐ हा सगुण परमात्मा तर तत् हा निर्गुण परमात्मा होय. कर्म म्हणजे सत्कर्म करताना ॐ चे म्हणजे परमेश्वराचे स्मरण केले. ईश्वराचे स्मरण करत सर्व क्रिया करायचे प्रयत्न केलेत पण ईश्वर स्मरण पूर्वक कर्म करतानाही फळाची आसक्ती शिल्लक रहातेच. 'मला कर्माचे इष्ट फळ लाभावे आणि ते ईश्वराकडूनच लाभावे, यासाठी मी ईश्वराचे स्मरण करत ईश्वर भक्ती करत आहे.' अशाप्रकारे सकाम भक्ती होऊ शकते. या श्लोकात सांगताहेत की कर्म करतांना ईश्वराचे सतत स्मरण असावे याचा अर्थ असा तर होत नाहीना की फलप्राप्तीची आसक्ती मनात असावी. ईश्वर स्मरणाचा अर्थच मुळी कर्माच्या ठायी निष्काम बुध्दी असणे आहे. याला स्पष्ट करण्यासाठी तत् चा अर्थ सांगताहेत, ईश्वर - स्मरण म्हणजे फलाशा त्यागपूर्वक ईश्वर स्मरण होय. तत् म्हणजे फलासक्तीचा त्याग.

2) **विविधा: यज्ञ-तप:-क्रिया:** च दानक्रिया: क्रियन्ते विविध प्रकारच्या यज्ञ, तप वगैरे क्रिया आणि दान वगैरे क्रिया केल्या जातात. ईश्वरार्पण करणे, ईश्वर स्मरण, ईश्वर भक्ती वा निष्कामता, फलाशेचा त्याग, निर्विकारता या साऱ्या मानसिक क्रिया आहेत. यांचे स्थान मन आहे पण कर्म केल्याशिवाय या साऱ्या योग्यता प्राप्त होऊ शकत नाहीत. ते कर्मही सात्विक असायला हवे. राजस वा तामस कर्मे आचरुन ईश्वरभक्ती वा निष्कामता, निर्विकारता प्राप्त करता येणार नाही. यामुळे सांगताहेत की यज्ञ, तप आणि दानाच्या क्रिया ईश्वरार्पण भावनेने करुन आणि निष्काम भावनेने फलासक्तीचा त्याग करुन मोक्षाकांक्षी मुमुक्षु साधक करतात. प्रपंच वा कुटुंबात राहून यज्ञ, दान, तप वगैरे क्रिया केल्या जाऊ शकतात. एवढेच नव्हे पण सारेच काही कुटुंबाचा त्याग करु शकत नाही. माणूस कुटुंबात राहूनही ब्रह्मचर्याचे पालन करु शकतो. यज्ञ, दान, तप वगैरे कर्मे करु शकतात आणि करायला हवीत.

गांधीजींनी कुटुंबात राहूनच ब्रह्मचर्य वगैरे विषयक साधना सुरु केली होती. नंतर या साधनेत सर्वांना सामील करुन घेण्याच्या दृष्टीने दक्षिण आफ्रिकेत आणि तिथून परतल्यावर भारतात साबरमती आणि सेवाग्राम आश्रमाची स्थापना केली.

: 26 :

***सद्भावे साधुभावे च सदित्येतत् प्रयुज्यते।***
***प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्द: पार्थ युज्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ सद्भावे:** हे अर्जुन, सद्भावासाठी
- **च साधुभावे:** आणि साधुतेसाठी म्हणजे श्रेष्ठ भावासाठी
- **सत् इति एतत् प्रयुज्यते:** सत् शब्द प्रयुक्त केला जातो.
- **तथा प्रशस्ते कर्मणि:** तथा प्रशस्त म्हणजे उत्तम कर्मासाठी
- **सच्छब्द: युज्यते:** सत् शब्द प्रयुक्त केला जातो

**अर्थ**

सत् या परमात्म्याच्या नावाचा सत्य भावात आणि श्रेष्ठ भावात प्रयोग केला जातो तसेच हे पार्था, उत्तम कर्मातही सत् शब्द योजला जातो.

***सत् - कार - स्मरणें लाभे सत्यता आणि साधुता।***
***तशी सुंदरता कर्मी सत् - कारें बोलिली असे॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) हे अर्जुना, सद्भाव आणि 2) साधुतेसाठी सत् शब्द प्रयुक्त केला जातो. 3) प्रशस्त कर्मासाठी सत् शब्द प्रयुक्त केला जात आहे.

**स्पष्टीकरण**

1) **पार्थ सद्भावे सत् इति एतत् प्रयुज्यते:** हे अर्जुना, सद्भावासाठी सत् शब्द प्रयुक्त केला जात आहे. मागील श्लोकात तत् शब्दाचा अर्थ सांगितला. या श्लोकात सत् शब्दाचा अर्थ सांगताहेत. सारे जण सतत काही - ना - काही कामे करतच रहातात. तिसऱ्या अध्यायातील पाचव्या श्लोकात सांगितले आहे की कुणीही मनुष्य एकही क्षण सुध्दा कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही. अशा स्थितीत कर्म कसे असावे, याचा विचार करायची जबाबदारी आपल्यावर येते कारण की कर्मामुळे चित्तावर संस्कार होतात. ज्या संस्कारानुसार आपण कर्मे आचरतो. कर्माने संस्कार आणि संस्काराने कर्मे असे कर्म चक्र सुरु असते. यामुळे इथे भगवंत सांगताहेत की कर्म सत्यमय असले पाहिजे. कुठलेही कर्म असो, सत्याला सोडून घडायला नको. सत्याच्या कसोटीवर पारखून कर्म करावे लागेल. ज्या कर्मात सत्य नसेल ते कर्म आचरण करणार नाही असा निश्चय करायला हवा. गांधीजींचे संपूर्ण जीवन सत्याच्या आधारावर उभे होते. 'सत्याचा त्याग करुन मी काहीही करणार नाही.' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. सत्य आणि असत्याची पारख तर अगदी सर्वसामान्य माणसालाही असते पण आपल्याला ज्ञात नसेल तर सत्याचा आग्रह धरुन जीवन जगणाऱ्या पुरुषांना विचारावे. असे केले तर सत्याची निवड करताना चूक होण्याची शक्यता नसते.

2) **च साधुभावे:** आणि साधुभाव म्हणजे साधुतेसाठी सत् शब्दाचा प्रयोग केला जातो. म्हणजे कर्म सत्यमय असावे आणि मंगल म्हणजे पवित्रही असायला हवे. अशा कर्मासाठी सत् शब्द प्रयुक्त करता येतो असे नसेल तर कर्मात सत्यता उरणार नाही. सत्याच्या ठायी पावित्र्याचा समावेश असतो. तरीही सत् शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट करुन सांगण्यासाठी स्वतंत्रपणे त्याची चर्चा करताहेत. माणूस प्रापंचिक जीव आहे. सारेच काही ब्रह्मचारी होऊ शकत नाही लोक बहुधा विवाहबध्द होऊन जातात पण कुणी व्यक्ती विवाह केल्यावर जीवनात जेवढा सत्याचा आग्रह बाळगतो तेवढा संयम पालनाचा आग्रह धरत नाही. संयमाचा आग्रह न धरणे सत्याचा भंग करणे आहे पण हा मुद्दा काही आपल्या लक्षात येत नाही आणि लक्षात जरी आला तरीही संयमाचे पालन कठीण आहे. म्हणजे व्यक्ती जीवनाच्या इतर बाबतीत जेवढा सत्याग्रही - सत्याचा आग्रही असतो - तेवढा विषयोपभोगांच्या संयमाविषयी काही आग्रही रहात नाही. यामुळे सर्वच बाबतीत सत्य आणि पावित्र्याचा आग्रह राखत त्याचा सराव करायचे लक्ष्य साधायला हवे. काम - क्रोधाला वश झाल्यावर पावित्र्य टिकू शकत नाही. यामुळे सत्य पालनासोबत पावित्र्याचाही आग्रह धरायला हवा.

3) **प्रशस्ते कर्मणि सच्छब्द:** युज्यते प्रशस्त म्हणजे सुंदर आणि श्रेष्ठ कर्मासाठी सत् शब्दाचा प्रयोग केला जातो. कर्म सत्य, मंगल, पवित्र असायला हवे, सुंदरही असायला हवे. हा महत्वाचा मुद्दा आहे. या तिन्ही गोष्टी गांधीजींच्या ठायी विद्यमान होत्या. त्यांचा आग्रह असायचा की काम चांगले केले नाही म्हणजे कर्मात सौंदर्याचा विचार केला नाही तर ते कर्म निरर्थक ठरेल. कर्म सत्य असेल, पवित्रही असेल पण ते करताना बेफिकीरपणा असला, चांगल्या प्रकारे, परिपूर्णरित्या कर्म संपादित करायचा आग्रह धरला नाही तर त्याचे तेवढे मूल्य उरत नाही. काही लोक सात्विक कर्मातही मुख्य आणि गौण असा फरक करतात. मुख्य कर्म काळजीपूर्वक करतात पण गौण कर्माला चांगले करण्याचा विचार करत नाही. काही लोक आपल्या स्वार्थी कार्यात खूप दक्षता बाळगतात पण पारमार्थिक कार्यात बेपर्वाई करतात. गीतेचे म्हणणे आहे की कर्म लहान असो वा मोठे, मुख्य असो की गौण - सारीच कर्मे व्यवस्थितपणे आणि सुंदर प्रकारे करायला हवीत मगच ती सत् कर्मे मानली जातील.

: 27 :

***यज्ञे तपसि दाने च स्थिति: सदिति चोच्यते।***
***कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च यज्ञे तपसि च दाने:**आणि यज्ञ, तप आणि दानात
- **स्थिति:** तत्पर असावे

- **सत् इति उच्यते:** त्याला सत् म्हटले जाते
- **च तदर्थीयं कर्म:** आणि त्या परमात्म्यासाठी म्हणून केलेले कर्मही
- **'सत्' इति एव अभिधीयते:** सत् च म्हटले जाते

**अर्थ**

तसेच यज्ञ, तप व दान यांमध्ये जी स्थिती (आस्तिक बुध्दी) असते, तिलाही सत् असे म्हणतात आणि त्या परमात्म्यासाठी केलेले कर्म निश्चयाने सत् असे म्हटले जाते.

***यज्ञ - दान - तपें किंवा कर्मे जीं त्यांस साधक।***
***वागणें ह्यापरी त्यांत सत् - कार - फळ बोलिलें॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) यज्ञ, दान आणि तप या कर्मात तत्पर असणे याला सत् म्हणतात. 2) आणि या तीन कर्मांसाठी आवश्यक कर्मालाच सत् म्हटले जाते.

यज्ञ, दान, तपाची विशेष चर्चा करायचे कारण हेच आहे की हे तिन्ही खूप श्रेष्ठ दर्जाचे आहेत. असे मानले जाते की हे कसेही केले तरी चालेल. ही चुकीची विचारसरणी आहे या मताच्या निवारणार्थ या श्लोकात सांगत आहेत की यज्ञ, दान, तप यासारखी श्रेष्ठ दर्जाची कर्मेही मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणेच करायला हवीत.

**स्पष्टीकरण**

1) **च यज्ञे तपसि च दाने स्थिति:** सत् इति उच्यते आणि यज्ञ, दान व तपाबाबत दक्ष, तत्पर असणे सत् मानले जाते. आधीच्या श्लोकात सांगितले आहे की कर्म सत्य, पवित्र असेल आणि सुंदरतापूर्वक केले गेले तर ते सत् म्हटले जाते. या श्लोकात सांगितले आहे की हा नियम यज्ञ, दान आणि तप या तिघांवर लागू पडतो म्हणजे हे सत्य असोत, पवित्र भावनेने केले जावोत आणि सुंदरही असोत. अशा कर्मांनाच सत् म्हटले जाते. स्वत: श्रेष्ठ दर्जाचे असून जर ही कर्मे योग्य प्रकारे केली गेली नाहीत तर त्यांची श्रेष्ठता कशी टिकून राहील ? ते निकृष्टच मानले जातील. तिन्ही कर्माचे श्रेष्ठत्व अबाधित राखण्यासाठी ते खूप चांगल्या प्रकारे केले गेले पाहिजेत.

2) **च तदर्थीयं कर्म सत् इति एव अभिधीयते:** आणि यज्ञ, दान, तपासाठी आवश्यक कर्मालाही सत् च म्हटले जाते. यज्ञ, तप, दान या तिघांच्या सहाय्यक इतर लहान - मोठ्या कर्मांनाही सत् दर्जाचेच मानले जाते. उदाहरणार्थ यज्ञ म्हणजे जनसेवा. जनसेवा अखंडपणे करत रहाण्यासाठी ते कार्य कशा प्रकारचे आहे हे आधी बघितले जावे लागते. खादी कार्य वा गावा - गावात फिरुन भूदानाचा प्रचार करायचा असेल तर शरीर धष्टपुष्ट असायला हवे. शरीर धष्टपुष्ट नसेल तर ही दोन्ही कार्ये होऊ शकणार नाहीत. शरीर सुदृढ राखण्यासाठी ज्या सोयी आवश्यक असतील, ज्या प्रकारचा आहार हवा असेल तेही करावे लागेल. गरीबांना जेवण मिळत नाही, असा विचार करुन मिळेल त्या आहारावर धकवून घ्यायचा विचार केला तर शरीर दीर्घकाळापर्यंत सेवेसाठी योग्य राहू शकणार नाही. रात्री कमी झोप घेतल्यामुळे आरोग्य ठीक राहू शकत नाही. शरीरबळ आणि मनोबळ टिकवून ठेवण्यासाठी ब्रह्मचर्याचे पालन करावे लागेल. गृहस्थ सेवकासाठी ब्रह्मचर्य पालन अवघड असले तरीही ग्रामीण जनांच्या सेवेसाठी शरीर सुदृढ राखावे लागेल. ते ब्रह्मचर्याशिवाय शक्य होऊ शकणार नाही. सतत भटकंती करुन सेवाकार्य करायची जबाबदारी आल्यावर शरीराला सुदृढ आणि निरोगी राखणे खूप सोपे नसल्यामुळे विशेष काळजी घ्यावी लागेल. एका स्थानावर स्थिर राहून सेवा करणाऱ्या सेवेकऱ्यापुढे आरोग्य संपादनाचा विषय काही अवघड नसतो. ज्यांच्या वाट्याला बौध्दिक सेवा कार्य आले असेल त्याना कमी झोप मिळाली तरी भागेल पण त्याना रोज काही ना काही व्यायाम अवश्य करावा लागेल. शारीरिक श्रम करुन सेवा कार्याची ज्यांच्यावर जबाबदारी आली असेल, त्याना अधिक झोपेची गरज भासेल. बौध्दिक श्रम करणाऱ्यांच्या आहारात डाळी नसल्या वा कमी प्रमाणात असल्या तरी चालण्यासारखे आहे पण शरीरश्रम करणाऱ्या सेवकांचे डाळींशिवाय नाही भागणार. प्रार्थनेत भजने गायची जबाबदारी आली असेल तर संगीताचा अभ्यास करावा लागेल. अशा प्रकारे सेवा करण्यासाठी आवश्यक ती इतर कामेही करावी लागतील. ही सारी सेवेचीच अंगे आहेत. या आवश्यक कर्मांना यज्ञ, तप, दान वगैरेंपासून वेगळे नाही करता येणार. यज्ञ, तप, दानाप्रमाणेच या कर्माची गणनासुध्दा सत् कर्मातच होईल.

: 28 :

*अश्रध्दया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।*
*असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ:** हे अर्जुना
- **अश्रध्दया:** अश्रध्देने
- **यत् हुतं:** जे हवन केले जाते
- **दत्तं:** जे दान
- **च तप: तप्तं:** आणि जे तप कष्ट सोसून केले जाते
- **कृतं:** कर्म केलेले असते
- **तत् असत् इति उच्यते:** त्याला असत् म्हटले जाते
- **तत् न प्रेत्य:** ते ना परलोकात उपयोगी ठरत
- **च नो इह:** आणि ना ईहलोकी (उपयोगी ठरत.)

**अर्थ**

हे अर्जुना, श्रध्देशिवाय केलेले हवन, दिलेले दान, केलेले तप आणि जे काही केलेले शुभ कार्य असेल हे सारे असत् मानले जाते. त्यामुळे ते ना या लोकात उपयुक्त ठरत ना परलोकात उपयोगी असत.

*यज्ञ दानें तपें कर्मे अश्रध्देनें अनुष्ठिलीं ।*
*बोलिलीं सर्व तीं मिथ्या दोन्ही लोकांत निष्फळ ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) अश्रध्देने केलेल्या यज्ञ, दान आणि तपाला. 2) असत् म्हटले जाते. 3) ते ना परलोकात. 4) ना ईहलोकात उपयोगी ठरत म्हणजे त्याचे इष्ट फळ लाभत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **अश्रध्दया यत् हुतं दत्तं च तप: तप्तं कृतम्:** बिना श्रध्देनेच जे यज्ञ, दान, तप केले जाते. खरे तर प्रत्येक व्यक्ती काही ना काही अंशी श्रध्दायुक्त असते तरीही अश्रध्देने जर यज्ञ, तप, दान केले गेले तर त्याचे फळ ना इहलोकी लाभत ना परलोकी असे भगवंतांनी का सांगितले? इथे अश्रध्दा शब्दाचा अर्थ समजून घ्यावा लागेल. शास्त्रावर श्रध्दा न राखता मनमानी करणारे लोक अश्रध्द होत. यज्ञ, दान आणि तप अश्रध्देने म्हणजे अशास्त्रीय प्रकारे होत असतील आणि स्वच्छंदपणे आचरत असतील तर अशा अश्रध्दायुक्त अशास्त्रीय यज्ञ, तप, दानाचा काहीही लाभ नाही.

2) **तत् असत् इति उच्यते:** म्हणून त्याला असत् म्हटले जाते. यज्ञ, दान, तप पवित्र असल्यामुळे त्याना सत् म्हटले जाते अर्थात तिघांना दक्षतापूर्वक म्हणजे शास्त्रीय प्रकारे संपन्न केले तरच त्यांना सत् म्हणता येईल. अन्यथा त्यांना सत् म्हणणे चुकीचेच ठरेल. या श्लोकात हेच सांगितले गेले की यज्ञ, दान, तप जर अशास्त्रीय पध्दतीने केले गेले तर त्यांना सत् न म्हणता असत् च म्हटले जाईल. याच अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे की अशास्त्रीय पध्दतीने आणि दंभ, अहंकार, राग, द्वेष या विकारांसोबत जर घोर तप केले जाईल आणि या तपाचरणात देह क्षीण होईल तरीही या तपाला आसुरी तप म्हटले जाईल म्हणजे यज्ञ, दान, तप तिघे हवे त्या पध्दतीने करण्यात कुठलाही लाभ नाही.

3) **तत् न प्रेत्य:** ते मृत्युनंतर म्हणजे परलोकी म्हणजे पुढच्या जन्मी उपयोगी ठरणार नाही म्हणजे त्याचे इष्ट फळ मिळणार नाही. मनुष्य या जन्मी जी कर्मे करतो त्याचे फळ पुढील जन्मी मिळते. या जन्मी आपण जे कर्म भोग भोगतो ते मागील जन्मीच्या कर्माचे फलित असते. मागील अनेक जन्मात आपण अनेक प्रकारची भली-बुरी कर्मे केलेली असतात. त्या प्रभावानेच दुसरा जन्म लाभतो. देह धारणेनंतर ज्या संस्कारांसाठी देश, काल, निमित्त अनुकूल ठरतील त्या कर्मांच्या फळांना भोगावे लागेल. अशाप्रकारे कर्मफळांना भोगायचे चक्र सुरुच असते. भगवान म्हणतात की जी कर्मे शास्त्रीयरित्या, संयमपूर्वक, योग्य प्रकारे केली जाणार नाहीत ती कर्मे सात्विक दर्जाची असतानाही त्यांचे इष्ट फळ न लाभता अनिष्ट फळ भोगावे लागेल. कर्म निष्फळ जात नाही एकदा आत्मज्ञान प्राप्त झाले की मग कुठलेही कर्माचे फळ भोगायला उरत नाही पण जोवर आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाही तोवर मात्र कर्मफळभोगाचे चक्र चालतच रहाते.

4) **च नो इह:** आणि इहलोकात म्हणजे सध्याच्या जन्मातही - आयुष्यातही ते कामी येणार नाही म्हणजे त्याचा काही उपयोग होणार नाही. उत्तम कर्म नसेल, योग्य प्रकारे केले गेले नसेल तर ते कर्म कितीही चांगले का असेना, त्याचा ना स्वत:साठी काही उपयोग ना इतरांसाठी काही फायदा. उदाहरणार्थ. स्वयंपाक चांगला झाला नाही

तर त्याचा काही उपयोग नाही, स्वयंपाकाचे कर्म निष्फळ ठरते. हा नियम प्रत्येक कामावर लागू होतो. कुठलेही कर्म चांगल्या प्रकारे केले गेले नाही तर त्याचा ना आपल्या स्वत:ला उपयोग ना इतर लोकांना. एका माणसाला चांगले कर्म करायची प्रेरणा मिळते आणि दुसऱ्याला मिळत नाही, याचे कारण पूर्वजन्मीचे संस्कार असतात. यामुळे आपण जर गेल्या जन्मी चांगली कामे केली असतील तर त्या कर्माचे संस्कार होतात. या संस्कारांसाठी या जन्मी देश, काल, निमित्त अनुकूल असावे अशी जी आपली कामना असेल तर नित्य सत्संगात रहायला हवे. पूर्वजन्मीच्या भल्या - बुऱ्या कर्मांच्या संस्कारांचा संचय मनात असतो. एक देह सोडतांना जीवात्मा मनाच्या संस्कारांच्या सोबत दुसरा देह धारण करतो. या संस्कारांच्या अनुसार कामे होतात. संस्कारांना देश, काल, निमित्त म्हणजे परिस्थितीची जशी अनुकूलता लाभेल, तसा कर्म फलोपभोग चालत राहील. यामुळे सतत याच गोष्टीची काळजी वहायला हवी की चांगल्या कर्माच्या संस्कारानेच पोषण होत राहो. आपल्या हातून सत्कर्मे घडोत. यामुळे दु:खाचा अनुभव टळो. वाईट कर्माच्या संस्कारांचे पोषण झाले नाही तर वाईट कर्मे हातून घडणार नाही. सत्संगतीत राहिल्यामुळे नेहमी सत्कर्मेच हातून घडतील. आपण कायमसाठी दु:खांपासून स्वत:ला वाचवू शकू.

• • • *अध्याय सतरावा संपूर्ण* • • •



अध्याय - अठरावा

# मोक्षसंन्यास योग

: 1 :

**अर्जुन उवाच**

*संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।*
*त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे कृष्णा
- **संन्यासस्य तत्त्वं:** संन्यासाचे रहस्य
- **वेदितुं इच्छामि:** मी जाणू इच्छितो
- **च हृषीकेश:** आणि हे (इंद्रियांच्या स्वामी अंतर्यामी अशा (भगवंता)
- **केशिनिषूदन:** केशी नामक दैत्याच्या संहारकर्त्या
- **त्यागस्य पृथक्:** त्यागाचे रहस्य स्वतंत्रपणे जाणू इच्छित आहे.

**अर्थ**

अर्जुन म्हणाला हे महाबाहो, हे अंतर्यामी, हे वासुदेवा, मी संन्यास आणि त्याग यांचे तत्व वेगवेगळे जाणू इच्छितो.

**अर्जुन म्हणाला**

*संन्यासाचें कसें तत्त्व त्यागाचें हि कसें असे ।*
*मी जाणूं इच्छितों कृष्णा सांगावें वेगवेगळें ॥*

**विषय:** या श्लोकात अर्जुनाने दोन प्रश्न विचारलेले आहेत. 1) हे कृष्णा, संन्यासाचे रहस्य जाणू इच्छितो. 2) त्यागाचे रहस्य जाणू इच्छितो. (पहिल्या अध्यायात सांगितले गेले आहे की अर्जुनाला स्वजनांचा मोह कसा झाला ? मोहामुळे स्वधर्म सोडून तो त्यागाची - संन्यासाची भाषा बोलू लागला होता. अर्जुनाला हा मोह घालवण्यासाठी भगवंताने उपदेश द्यायला सुरुवात केली होती. अर्जुन अधून - मधून प्रश्न विचारत राहिला, योगेश्वर उत्तरे देत राहिले. चौथ्या अध्यायातील 34 व्या श्लोकात गीतेने सांगितले की सेवारत असून विनम्र भावनेने जर ज्ञानी माणसाला प्रश्न विचारले गेलेत तर ज्ञानी उपदेश करु शकतात. यामुळे या अखेरच्या अध्यायातही अर्जुनाने एक प्रश्न विचारला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **महाबाहो संन्यासस्य तत्त्वं वेदितुं इच्छामि:** संन्यासाचे रहस्य जाणू इच्छित आहे. संन्यास म्हणजे काय? हा प्रश्न स्वाभाविक आहे कारण की संन्यास शब्दाला जन - मनात रुढ झालेला अर्थ आहे. सर्वस्वाचा त्याग करुन जंगलात निघून जावे वा भगवी वस्त्रे परिधान करुन गावोगावी भ्रमण करणे. याना लोक संन्यासी असल्याचे मानूनही घेतात. यामुळे संन्यास संकल्पनेचा खरा अर्थ आणि स्वरुप जाणून घेणे गरजेचे आहे.

2) **च हृषीकेश केशिनिषूदन त्यागस्य पृथक् वेदितुं इच्छामि:** आणि त्याग या संकल्पनेचे रहस्यही स्वतंत्रपणे जाणून घ्यायची इच्छा आहे. हा दुसरा प्रश्नही महत्वाचा आहे कारण समाजात त्याग शब्दाचा अर्थही जगाचा - प्रपंचाचा - त्याग असा मानला जातो. हा पुरुष महान त्यागी आहे म्हणजे याने जगाचा, प्रपंचाचा त्याग केला आहे. असे मानले जाते. कपडे भगवे रंगवून घ्यावे लागतात, संन्यासी अधिक दिवस एके ठिकाणी थांबू शकत नाही - वगैरे, वगैरे. ज्याच्यासाठी काही विशेष नियम असतात. त्यागीसाठी असे काही स्थूल नियम नसतात. तरीही प्रपंचाचा त्याग ही गोष्ट त्यागी आणि संन्यासीसाठी समान आहे. यामुळे त्यागाच्या स्वरुपालाही जाणून घ्यायला हवे. खरा अर्थ लक्षात आल्यावर संन्यास वा त्याग विषयक आचरण योग्य प्रकारे घडू शकते. अध्यात्म मार्गातल्या साधकाला आध्यात्मिक शब्दांचा - संज्ञांचा - खरा-खरा अर्थ जाणून घेणे फार आवश्यक आहे. ब्रह्म, ईश्वर, माया, अविद्या, संयम, इंद्रिय निग्रह वगैरे अनेक शब्द आहेत की ज्यांच्या अर्थाविषयी मतभेदही आढळतात. यामुळे या शब्दांचा योग्य अर्थ जाणून घेणेच श्रेयस्कर आहे.

त्याग आणि संन्यास दोन्ही शब्द महत्वाचे आहे म्हणून अर्जुनाने या दोन्ही शब्दांचा अर्थ स्वतंत्रपणे जाणून घेण्याची इच्छा व्यक्तवली आहे. भगवान श्रीकृष्णासाठी इथे अर्जुनाने दोन नावांचा प्रयोग करुन हाक मारली आहे. हृषीकेश आणि केशिनिषूदन - ही ती दोन नावे होत. पहिल्या अध्यायात हृषीकेश शब्दाचा अर्थ सांगितला आहे. केशिनिषूदन म्हणजे केशी नावाच्या दैत्याचा संहारक. यावर असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की कृष्ण भगवान ज्ञानी असून - असल्यामुळे - हिंसा कशी काय करु शकतात ? खरे म्हणजे असा स्थूल अर्थ करुन - समजून भागणार नाही. प्रत्येकाच्या मनात कौरव - पांडव म्हणजे आसुरी आणि दैवी दोन्ही वृत्ती नांदतात. त्यात अखंड युध्द सुरु असते. केशी दैत्य आसुरी वृत्तींचा प्रतिनिधी होता. कृष्णाने आसुरी वृत्तीवर पूर्णपणे ताबा मिळवला असल्यामुळे केशी म्हणजे आसुरी वृत्तीचा नाश करणाऱ्या कृष्णा - हा आहे केशिनिषूदनचा अर्थ !

: 2 :

**श्री भगवान् उवाच**

***काम्यानां कर्मणां न्यासं संन्यास कवयो विदु: ।***
***सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणा: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कवय:** ज्ञानी विवेकी पुरुष
- **काम्यानां कर्मणां न्यासं:** काम्य कर्मांच्या त्यागाला
- **संन्यासं विदु:** संन्यास म्हणतात
- **सर्वकर्मफलत्यागं:** सर्व कर्मांच्या फळांच्या त्यागाला
- **विचक्षणा:** विवेकी म्हणजे विचार कुशल पुरुष
- **त्यागं प्राहु:** त्याग असे म्हणतात

**अर्थ**

श्री भगवान म्हणाले, कित्येक पंडित काम्य कर्मांच्या (स्त्री, पुत्र, धन इत्यादी प्रिय वस्तुंची प्राप्ती होण्याकरता

तसेच रोग, संकट वगैरेंचे निवारण होण्याकरता जी यज्ञ, दान, तप आणि उपासना वगैरे कर्मे केली जातात त्याना ‘काम्य कर्मे’ असे म्हणतात) त्यागाला ‘संन्यास’ मानतात, तर दुसरे काही विचारकुशल लोक सर्व कर्मांच्या त्यागाला (ईश्वराची भक्ती, देवदेवतांचे पूजन, माता-पिता वगैरे गुरुजनांची सेवा, यज्ञ, दान, तप, तसेच वर्णाश्रमानुसार उदरनिर्वाहाने गृहस्थांचा निर्वाह याप्रमाणे शरीरासंबंधी खान-पान वगैरे जी काही कर्तव्यकर्मे आहेत त्या सर्वांचे ठिकाणी इहलौकिक व पारलौकिक अशा सर्व कामनांचा त्याग करणे, यालाच सर्व कर्मांच्या ‘फलांचा त्याग’ असे म्हणतात.) ‘त्याग’ म्हणतात.

**श्री भगवान म्हणाले,**

*सोडणें काम्य कर्मे तो ज्ञाते संन्यास जाणती ।*
*फळ सर्व चि कर्मांचें सोडणें त्याग बोलती ॥*

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. 1) ज्ञानी - विवेकी पुरुष काम्य कर्मांच्या त्यागाला ‘संन्यास’ असे म्हणतात. 2) सर्व कर्मांच्या फलत्यागाला विचक्षण म्हणजे विवेकी पुरुष ‘त्याग’ असे म्हणतात.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात पहिल्या श्लोकात अर्जुनाने विचारलेल्या दोन प्रश्नांना उत्तर देत आहेत. हा क्रम पुढील श्लोकांमधूनही जारी आहे. अर्जुनाने ज्या क्रमाने प्रश्न विचारला आहे त्याच क्रमाने भगवंत उत्तर देताहेत.

1) अर्जुनाचा पहिला प्रश्न होता की संन्यास शब्दाचा अर्थ काय? संन्यास म्हणजे काय? लोकांच्या मनात संन्यास शब्दाचा प्रचलित अर्थ असा आहे की सर्वस्वाचा त्याग करुन जंगलात भटकणे वा गावोगावी फिरत रहाणे, भगवी वस्त्रे परिधान करणे, कमंडलू वगैरे बाळगणे वगैरे वगैरे. भगवंतांनी हा अर्थ टाकून दिला आहे. संन्यास आणि त्याग याविषयीचा अभिप्राय 4 ते 17 अशा चौदा श्लोकांमधून सविस्तरपणे मांडला आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या श्लोकातून अन्यांचा म्हणजे ज्ञानी - अनुभवी पुरुषांचा अभिप्राय सांगितला आहे. या विषयी अनुभवी पुरुषांच्या मनात मतभिन्नता आहे यामुळेच भगवंतांनी आपला अभिप्राय अगदी सविस्तरपणे निवेदित केला. या श्लोकातून संन्यास विषयक काही ज्ञानी - विवेकी पुरुषांचा अभिप्राय सांगितला आहे की काम्य कर्मांच्या त्यागाला संन्यास असे म्हणता मीमांसक वा कर्मकांडी जनांनी कर्मांचे चार प्रकार मानले आहेत. 1) नित्य. 2) नैमित्तिक. 3) काम्य आणि 4) निषिध्द. नित्य आणि नैमित्तिक कर्मे सत्कर्मे असल्यामुळे करणीय - करण्यायोग्य आहेत. कामनेशिवाय होऊच न शकणारी कर्मे काम्य असतात. जी कर्मे करण्यायोग्य नसतात ती निषिध्द कर्मे होत. जगात साधारण लोकांचे वळण नेहमी निषिध्द कर्मे टाळण्याकडेच असते तरी सुध्दा सत्संगतीच्या अभावे काही निषिध्द कर्मे होत रहातात. व्यभिचार, मदिरापान, चोरी वगैरे निषिध्द कर्मे होत. निषिध्द कर्मे करणारे अधिक लोक नसतात. समाजात काम्य कर्मे करणारे अधिक असतात. काम्य कर्मे करत असताना मनातल्या कामना, तृष्णा वगैरे विकार सुटत नाहीत. मनाचे विकार जोवर सुटत नाहीत, क्षीण होत नाहीत तोवर व्यक्तीला अखंड शांततेचा अनुभव प्राप्त होणे शक्य नाही आणि शांतता लाभावी यासाठीच तर ती अखंड प्रयत्नशील असते. यामुळे काम्य कर्मांचा पूर्णत: त्याग संन्यास आहे, असे काही ज्ञानी पुरुषांचे म्हणणे आहे.

2) **सर्वकर्मफलत्यागं विचक्षणा: त्यागं प्राहु:** सर्व कर्मांच्या म्हणजे सर्व सत्कर्मांच्या फळांच्या त्यागाला विवेकी जन त्याग असे म्हणतात. सर्व कर्मांच्या फळांचा त्याग म्हणजे अनासक्ती. आपण सकाळपासून संध्याकाळ पर्यंत अनेक कामे करतो. आपण जर सत्कर्मे आचरत आहोत तर त्याचे शुभ फळ प्राप्त होणारच आहे. यामुळे कर्म आचरत असताना फळासाठी मनात तगमग राखणे, ‘केव्हा मिळेल फळ ?’ या काळजीत पडणे याला अविवेकच म्हटले जाईल. कर्म करत रहाणे एवढेच आपल्या हाती आहे. फळ तर कर्म केल्यावरच मिळणार आहे. कर्म करत असतांना फळाचा अनुभव येत नाही. नंतर येणाऱ्या अनुभवाविषयी चिंता करणे - काळजी करणे - तर आपला मूर्खपणाच ठरेल. आपल्याला जर समग्रपणे फळ हवे असेल तर आपले प्रयत्न परिपूर्ण असायला हवेत. आपण स्वयंपाक करत असू तर आपल्याला पाक-कलेचे संपूर्ण ज्ञान असायला हवे. यासोबत स्वयंपाक करतांना अपेक्षित अशी शारीरिक क्षमताही असायला हवी. दोन्ही गोष्टी

असतील पण आळस वाटत असेल तर चविष्ट स्वयंपाक करायची इच्छा असूनही तसे करता येणार नाही. याचा अर्थ असा की आपल्याला जर संपूर्णपणे फलप्राप्ती हवी असेल तर हाती घेतलेले - पत्करलेले कर्म परिपूर्ण करायचे लक्ष्य राखावे लागेल. आपले प्रयत्न परिपूर्ण असल्यामुळे त्याचे पूर्ण फळ लाभेल याविषयी मनी विश्वास बाळगायला हवा. फळासंबंधी म्हणजे फळप्राप्ती होईल याविषयी पूर्णपणे निश्चिंत रहायला हवे. फळाच्या चिंतेमुळेच माणूस दु:खी होतो. यामुळे सत्कर्मे आचरत असताना निश्चिंततापूर्वक फळ प्राप्तीसंबंधी अनासक्त असायला त्याग असे म्हणता येईल, असा काही ज्ञानी लोकांचा अभिप्राय आहे.

: 3 :

*त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिण: ।*
*यज्ञ - दान - तप: - कर्म न त्याज्यमिति चापरे ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **एके मनीषिण:** काही ज्ञानी
- **दोषवत् कर्म त्याज्यं:** सदोष कर्मांचा त्याग करायला हवा
- **इति प्राहु:** असे म्हणतात
- **च अपरे:** आणि दुसरे - इतर
- **यज्ञ - दान - तप:** कर्म: यज्ञ, दान, तप ही कर्मे
- **न त्याज्यं इति प्राहु:** त्याग करण्यायोग्य नाहीत, असे म्हणतात

**अर्थ**

कित्येक विद्वान असे म्हणतात की सर्व कर्मे दोषयुक्त आहेत म्हणून ती टाकणे योग्य होय आणि दुसरे काही पंडित असे म्हणतात की यज्ञ, दान आणि तपरुपी कर्मे टाकणे योग्य नाही.

***दोष - रुप चि हीं कर्मे सोडावीं म्हणती कुणी ।***
***न सोडावीं चि म्हणती यज्ञ - दान - तपें कुणी ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) सदोष कर्माचा त्याग करायला हवा वा कर्मच सदोष मानून सर्व कर्माचा त्याग करायला हवा, असे काही ज्ञानी लोक म्हणतात. 2) यज्ञ, दान, तप ही तीन कर्मे त्याग करण्यायोग्य नाहीत, ती कदापि सोडायला नकोत असे काही ज्ञानी लोकांचे म्हणणे आहे.

**स्पष्टीकरण**

1) **एके मनीषिण: दोषवत् कर्म त्याज्यं इति प्राहु:** सदोष कर्माचा त्याग करायला हवा वा कर्मच सदोष मानून सर्व कर्मांचाच त्याग करायला हवा असे काही ज्ञानी पुरुषांचे मत आहे. आधी सांगितले की जी सदोष कर्मे आहेत म्हणजे काम्य आणि निषिध्द आहेत त्यांचा त्याग करायला हवा असे काही ज्ञानी पुरुष मानतात. याचे कारण असे की आसक्तीशिवाय कर्मे केलीच जाऊ शकत नाहीत आणि कर्मे जर अनासक्तीपूर्वक नाही करता आलीत तर कदापि शांतता लाभू शकणार नाही. आसक्ती ही दु:खदच आहे. यामुळे जी सदोष कर्मे आहेत म्हणजे निषिध्द राजसी आणि तामसी कर्मे आहेत ती कदापि करायला नकोत. त्यांचा त्याग करणेच श्रेयस्कर आहे पण काही ज्ञानीजनांचा अभिप्राय मात्र असा की एकूणच कर्मे दोषरुप आहे, कर्म करणेच सदोष आहे यामुळे केवळ राजसी आणि तामसी कर्मांचाच त्याग करायला हवा असे नाही. सात्विक कर्मेही आसक्तीपूर्वक होऊ शकतात आणि आसक्ती जर दु:खद असेल तर त्या कर्मांना करणेही उचित नव्हे. (असे मानले जाते सात्विक कर्मे अनासक्तीपूर्वक केली जातात ) पण सात्विक कर्मे करत असतांनाही जोवर पूर्णपणे आत्मज्ञान होत नाही तोवर कुणाचीच आसक्ती पूर्णपणे सुटू शकत नाही. यामुळे साधकावस्थेत सात्विक कर्मे आचरण्यातही धोका असल्यामुळे सात्विक, राजस, तामस सर्व कर्मांचा त्याग करणेच श्रेयस्कर होय. अशा प्रकारे ज्ञानी पुरुषांची दोन मते झाली.

2) **च अपरे यज्ञ - दान - तप:** कर्म न त्याज्यं इति प्राहु: यज्ञ, दान आणि तप ही कर्मे त्याज्य नाहीत, असे दुसऱ्या ज्ञानवंतांचे म्हणणे आहे. यज्ञ, दान आणि तप ही कर्मे चित्ताची शुध्दी करणारी असल्यामुळे यांचा त्याग कदापि करता कामा नये असे काही ज्ञानी लोकांचे म्हणणे आहे. चित्तशुध्दी झाल्याशिवाय ज्ञान लाभणे शक्य नाही. तिसऱ्या अध्यायातील चौथ्या आणि पाचव्या श्लोकात सांगितले आहे की केवळ कर्म सोडून कुणी निष्काम बनून जात नाही आणि कर्म केल्याशिवाय तर कुणी एक क्षणभरही राहू शकत नाही. सहाव्या श्लोकात सांगितले

आहे की सत् कर्म सोडून जर कुणी निष्क्रिय बनू इच्छित असेल तो निष्क्रिय बनण्याऐवजी विषयभोगी बनेल कारण की निष्क्रिय बनल्यावर मनाला काहीही काम न उरल्यामुळे त्याची विषयांकडे धाव होईल. मन अनाचारी, दुराचारी बनू लागेल. यामुळे कर्मत्याग प्रयोग कदापि यशस्वी होणार नाही. कर्म सोडायचा प्रयत्न करणारे प्रगती करु शकत नाहीत, हा अनुभव आहे. त्यांची प्रगती थांबून जाते. एवढेच नव्हे पण पूर्वजन्मीच्या मनात गोळा झालेल्या असत् कर्माचे जे असत् संस्कार आहेत त्यांना या निष्क्रियतेमुळे वाव मिळू लागेल. निष्क्रियता जागली की मग देश, काल आणि परिस्थिती अनुकूल झाली म्हणजे त्या असत् संस्कारांचाच फलोपभोग सुरु होतो. सुकर्म करण्यात रत असलोत तर मनात विद्यमान चांगल्या संस्कारांचेच पोषण होईल आणि तेच पुष्ट होत रहातील कारण की सत्कर्मी रत राहिल्यामुळे त्याच संस्कारांना देश, काळ आणि परिस्थितीची अनुकूलता लाभेल आणि वाईट संस्कारांना पोषण न मिळाल्यामुळे ते क्षीण होत जातील. नित्य सत्कर्मी रत असण्याचा हा फार मोठा फायदा आहे.

: 4 :

*निश्चयं श्रृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ॥*
*त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविध: संप्रकीर्तित: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतसत्तम:** हे भरतश्रेष्ठ अर्जुना
- **तत्र त्यागे:** त्या त्यागासंबंधी
- **मे निश्चयं श्रृणु:** माझा ठाम अभिप्राय म्हणजे निर्णय ऐक
- **पुरुषव्याघ्र:** हे पुरुषव्याघ्रा, अर्जुना
- **त्याग: हि त्रिविध: संप्रकीर्तित:** त्यागही सात्विक, राजस आणि तामस असा तीन प्रकारचा वर्णिला गेला आहे

**अर्थ**

हे पुरुषश्रेष्ठ अर्जुना, संन्यास आणि त्याग या दोहोंपैकी प्रथम त्यागाच्या बाबतीत माझा निर्णय ऐक कारण त्याग सात्विक, राजस आणि तामस या भेदांमुळे तीन प्रकारचा सांगितला गेला आहे.

*तरी ह्याविषयीं ऐक माझा निश्चित निर्णय ।*
*त्याग जो म्हणती तो हि तिहेरी भेदला असे ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. 1) हे भरतश्रेष्ठ अर्जुना, त्या त्यागाच्या संदर्भात माझा ठाम असा निश्चय ऐक. 2) हे पुरुषसिंह अर्जुना, त्याग तीन प्रकारचा वर्णिला गेला आहे.

या श्लोकापासून बाराव्या श्लोकापर्यत म्हणजे पुढील नऊ श्लोकांमधून भगवंताने त्याग आणि संन्यास या संबंधी आपला ठाम असा निश्चय सांगितला आहे. आधी सांगताहेत :- मी मागील दोन श्लोकांमधून विभिन्न ज्ञानी पुरुषांची मते - अभिप्राय - सांगितली. आता या बाबतीत माझा ठाम निश्चय काय आहे, ते ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **भरतसत्तम तत्र त्यागे मे निश्चयं श्रृणु:** हे अर्जुना, त्या त्यागाच्या संदर्भातील माझा ठाम अभिप्राय ऐक. निश्चित वा ठाम मत म्हणजे अनुभवयुक्त निश्चित अभिप्राय. ठाम अभिप्रायाचा दुसरा अर्थ आहे अनुभवाधारित ठाम असल्यामुळे कुठल्याही परिस्थितीत न बदलणारा अभिप्राय. भगवान अनुभवी असल्यामुळे असे सांगताहेत. बौध्दिक निर्णय बदलू शकतो. अनुभव युक्त निर्णय बदलत नाही.

2) **पुरुषव्याघ्र त्याग: हि त्रिविध: संप्रकीर्तित:** हे अर्जुना, अनुभवी पुरुषांनी त्यागाचेही तीन प्रकार वर्णिले आहेत. सात्विक, राजस आणि तामस त्याग. अर्जुनाला पुरुष श्रेष्ठ व्याघ्र आणि भरतश्रेष्ठ म्हटले आहे. अर्जुन भरत कुळात तर श्रेष्ठ होताच आणि वाघासारखा निर्भय, पराक्रमीही होता.

: 5 :

*यज्ञ - दान - तप: - कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।*
*यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यज्ञ - दान - तप: - कर्म:** यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे

- **न त्याज्यं:** त्याज्य नाहीत
- **तत् कार्यम् एव:** ती करायलाच हवीत
- **यज्ञ: दानं च तप:** यज्ञ, दान आणि तप तिन्ही
- **मनीषिणां पावनानि एव:** साधक आणि सिध्द दोघांसाठी पावन करणारीच आहेत

**अर्थ**

यज्ञ, दान आणि तप रुप कर्म टाकणे योग्य नाही. उलट ते अवश्य केले पाहिजे, कारण यज्ञ, दान व तप ही तीनही कर्मे बुध्दीमान (फळांचा आणि आसक्तीचा त्याग करुन केवळ भगवदर्थ कर्मे करत असतो तोच बुध्दीमान होय.) माणसांना पवित्र करणारी आहेत.

***यज्ञ - दान - तपें नित्य करणीय अवश्यक।***
***न सोडावीं चि तीं होती ज्ञानवंतास पावक॥***

**विषय:** या श्लोकात भगवंतांनी दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे त्याज्य नाहीत ती करायलाच हवीत. 2) यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे साधक आणि सिध्द या दोघांसाठी पावकच आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **यज्ञ - दान - तप:** कर्म न त्याज्यं तत् कार्यम् एव यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे त्याज्य नाहीत. तिन्ही कर्मे आचरायला हवीत. सर्व कर्माचा त्याग करायला हवा असे म्हणणारे सुध्दा शौच, मुख - मार्जन, स्नान, भोजन वगैरे नित्य शारीरिक कर्मे करण्यात दोष मानत नाही हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे पण यज्ञ, दान, तप यासारख्या सर्वकल्याणकारी - सर्व मंगलकारी कर्माचाही त्याग ज्ञानी व्यक्तीने करावा असे प्रतिपादन करतात. हे काय ज्ञानाचे लक्षण झाले ? यामुळे भगवंत दृढतापूर्वक या ठिकाणी म्हणताहेत की यज्ञ, दान आणि तप ही तीन कर्मे एवढ्या श्रेष्ठ दर्जाची आहेत की त्यांचा कुणीही कोणत्याही परिस्थितीत त्याग करता कामा नये.

2) **यज्ञ: दानं च तप:** मनीषिणां पावनानि एव -यज्ञ, दान आणि तप तिन्ही कर्मे साधक आणि सिध्द या दोघांसाठी पावक म्हणजे चित्त शुध्दिकारक आहेत. तिन्ही कर्मांचे स्वरुप असे आहे की ते साधक आणि सिध्द - दोघांना पावन करणारे, दोघांची चित्ते शुध्द करणारे आहेत. ज्ञानवंताचे चित्त शुध्द असते तरीही त्याला प्रारब्धाधीन असल्यामुळे देह धारण करावे लागतात तोवर त्याच्या चित्त शुध्दीचा प्रश्न उरतोच. चित्तशुध्दीची सूक्ष्मता दिवसेंदिवस वाढतच राहील. ज्या ज्ञान्याला असे वाटले की आपली चित्तशुध्दी - परिपूर्णपणे झाली त्याला ज्ञान झाले असे काही म्हणता येणार नाही. ज्याला ज्ञानाचे भान उरले नाही तो खरा ज्ञानवंत होय. ज्ञान आहे पण ज्ञानाचे भान नाही अशी त्याची अलौकिक स्थिती असते. खरा ज्ञानी हा नित्य विकासशील असतो. विकास म्हणजे चित्ताचा विकास, चित्ताची शुध्दी होय. आत्म्याचा विकास वा शुध्दतेचा तर काही प्रश्नच नाही कारण की आत्मा शुध्दच असतो. ज्ञानी जन कमालीचे विनम्र असतात. यामुळे भगवान सांगताहेत की यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे ज्ञानी व्यक्तीला पावन करतात.

: 6 :

***एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च।***
***कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु पार्थ:** परंतु हे अर्जुना
- **एतानि कर्माणि अपि:** ही यज्ञ, दान, तपरुपी कर्मेही
- **संगं च फलानि त्यक्त्वा:** आसक्ती आणि फळाचा त्याग करुन
- **कर्तव्यानि:** करायला हवीत
- **इति मे निश्चितं उत्तमं मतं:** असे माझे निश्चित आणि उत्तम असे मत आहे

**अर्थ**

म्हणून हे पार्था, ही यज्ञ, दान आणि तप रुपी कर्मे तसेच इतरही सर्व कर्तव्य कर्मे आसक्ती आणि फळांचा त्याग करुन अवश्य केली पाहिजेत असे माझे निश्चित असे उत्तम मत आहे.

***परी हीं पुण्य - कर्में हि ममत्व फळ सोडुनी।***
***करणें योग्य हा माझा जाण उत्तम निर्णय॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) पण ही कर्मेसुध्दा आसक्ती आणि फळत्याग करुन आचरायला हवीत. 2) असे माझे निश्चित आणि उत्तम मत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **तु पार्थ एतानि कर्माणि अपि संगं च फलानि त्यक्त्वा कर्तव्यानि:** पण हे अर्जुना, ही कर्मेसुध्दा आसक्ती आणि कर्तेपणाचा भाव आणि फळ प्राप्तीची आसक्ती सोडून करायला हवीत. भगवान या ठिकाणी म्हणताहेत की यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे अवश्य चित्तशुध्दीकारक आहेत पण दोन गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. ही तिन्ही कर्मे कर्तेपणाच्या भावनेने केली जाऊ नयेत. आपण सारे अकर्ता आहोत, सारे कर्तृत्व एकट्या ईश्वराचेच काय ते आहे. या भावनेने कर्म करायला हवे. याशिवाय कर्माचे अमुक एक फळ मिळायला हवे, असा आग्रह धरु नये. कर्तेपणा आणि फळाची आसक्ती या दोन्ही गोष्टी बंधनकारक आहेत. यज्ञ, दान आणि तप ही तिन्ही कर्मे सात्विक असल्यामुळे अत्यंत पावनकारी आहेत, यात शंका नाही पण ही कर्मे ही जर कर्तेपणाची भावना बाळगून आणि फलासक्ती मनी धरुन केली जाणार असतील तर बंधनकारक ठरतील.

प्रत्येकाच्या मनात कर्तेपणाची भावना असते. या भावनेवर विजय संपादन करणे सोपे नसते. कर्म जर कर्तेपणाच्या भावनेने केले जात असेल तर त्याचे इष्ट फळ मिळावे, अशी आग्रही भावनाही मनात असते. आग्रह बंधनकारी वा वाईट नाही आग्रह असणे आवश्यक आहे. फळाच्या आग्रहामुळेच कर्म चांगले होते अन्यथा त्यात शिथिलता येऊ लागते पण आग्रह जेव्हा आसक्ती बनतो - दुराग्रह बनतो तेव्हा मग ते कर्म बंधनकारक होते आणि चित्त शुध्दीत सहायक ठरत नाही कारण की इच्छित - अपेक्षित परिणाम न मिळाले तर निराशा येते आणि त्याचे दोन परिणाम होऊ शकतात. एक तर कर्मात शिथिलता येते, उत्साह रहात नाही वा ते कर्म सोडूनच द्यायला आपण तयार होतो. दोन्ही परिणाम अनिष्टकारी आहेत. खरे तर इच्छित फळ लाभणार नाही असे कळल्यावर कर्मात शिथिलता न येता कर्म करण्यात अधिक उत्साह वाटायला हवा.

आपण कुठे जायला निघालो असू आणि जेवढा पल्ला गाठायचा ठरवले असेल तेवढा गाठता येणार नाही असे वाटायला लागत असेल तर त्याचे कारण शोधून ते हटवण्याचे प्रयत्न करायला हवेत. यात निराश व्हायचे काही कारणच नाही. समजा की मधेच एखादे कारण उद्भवेल आणि आपण ते दूर करु शकणार नाही, आपला निरुपाय होईल अशी शक्यता जागेल तरीही याविषयी निराश - नाउमेद व्हायचे काही कारण नाही. उदाहरणार्थ वाट चालताना आपण पडलो आणि जखम झाली तर आपण निर्धारित वेळेवर गंतव्य गाठू शकणार नाही आणि दैनंदिन चालायची गतीही मंदावून जाईल. अशा प्रकारे कर्तेपणाची भावना मिटवणे, फलासक्तीचा त्याग करणे आणि उत्साहाने कर्म करत रहाणे या तीन गोष्टी सत्कर्माचे आचरण करतांना अखंडपणे लक्षात ठेवायला हव्यात.

2) **इति मे निश्चितं उत्तमं मतम्:** हे माझे निश्चित आणि उत्तम मत आहे. भगवंताने स्वानुभवावर आधारित असे सत्य मांडले आहे. हे माझे ठाम मत आहे, एवढेच नव्हे तर हे माझे सर्वश्रेष्ठ मत - अभिप्राय आहे. हाच एकमेव अभिप्राय सर्वश्रेष्ठ असल्यामुळे हाच ग्रहण करायला हवा, दुसरा अभिप्राय ग्रहण करु शकत नाही, असा या कथनाचा अभिप्राय आहे.

: 7 :

*नियतस्य तु संन्यास: कर्मणो नोपपद्यते।*
*मोहात्तस्य परित्यागस्तामस: परिकीर्तित:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु नियतस्य कर्मण:** पण नियत म्हणजे प्रवाह पतीत कर्मांचा
- **संन्यास: न उपपद्यते:** त्याग होऊच शकत नाही म्हणजे तो करणे योग्यच नव्हे
- **तस्य मोहात् परित्याग:** जर मोहवश त्यांचा त्याग केला गेला
- **तामस: परिकीर्तित:** तर तो तामस त्याग म्हटला गेला आहे

**अर्थ**

(निषिध्द आणि काम्य कर्मांचा तर स्वरुपत: त्याग करणे योग्यच आहे.) पण नियत कर्मांचा स्वरुपत: त्याग योग्य नाही म्हणून मोहाने त्याचा त्याग करणे 'तामस त्याग' म्हटला जातो.

*नेमिलें कार्य जें त्याचा संन्यास न जुळे चि तो।*
*केला तसा जरीं मोहें त्याग तामस बोलिला ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) पण प्रवाहपतीत कर्माचा त्याग होऊच शकत नाही. 2) जर मोहवश तो त्याग केला तर तो तामस त्याग म्हटला जाईल.

**स्पष्टीकरण**

1) **तु नियतस्य कर्मण: संन्यास: न उपपद्यते:** पण प्रवाहपतीत कर्माचा त्याग होऊच शकत नाही. गीतेचा हा महत्वाचा सिध्दांत आहे. संपूर्ण ब्रह्मांडात परमात्माच व्याप्त आहे. ब्रह्मांडात त्यानेच जडाची भूमिका बजावली असून पिंडात जीवात्म्याचाही अभिनय केला आहे. यामुळे प्रवाहपतीत कर्मांचा अर्थ ईश्वरप्रेरित कर्म असा होतो. साधक आणि मुमुक्षुला गीतेचा हा सिध्दांत सदैव लक्षात ठेवायला पाहिजे. अहंकाराचा त्याग करुन जीवभावाचा क्षय झाल्याशिवाय परमात्म ज्ञान होणे शक्य नाही. यामुळे अहंकार क्षीण करण्यासाठी परमात्मप्रेरित कर्मे करायचेच ध्येय - लक्ष्य - मुमुक्षुने बाळगले पाहिजे. तो सात्विकच असायला हवा. राजस वा तामस कर्मे कदापि ईश्वरप्रेरित असू शकत नाहीत. यामुळे अत्यंत सात्विक अशी प्रवाहपतीत म्हणजेच ईश्वरप्रेरित कर्मे करणे परमात्म ज्ञानाच्या प्राप्तीच्या दृष्टीनेही आवश्यक आहेत. त्याचा त्याग कदापि होऊ शकत नाही.

2) **तस्य मोहात् परित्याग: तामस: परिकीर्तित:** त्या प्रवाहपतीत कर्माचा त्याग जर मोहवश केला गेला तो तामस त्याग होय. अनुभवी पुरुषांनी त्याला तामस त्याग असे म्हटले आहे. प्रवाहपतीत कर्मे कदापि सोडायला नकोत हा गीतेचा सिध्दांत आहे. भगवान म्हणताहेत की प्रवाहपतीत कर्मांचा त्याग तामस म्हणजे अविवेकी त्याग ठरेल. ईश्वर प्रेरित कर्मांचा त्याग केल्यामुळे अहंकार क्षीण होण्याऐवजी वाढेल. न करण्यायोग्य कर्मात प्रवृत्त करणारा अहंकारच असतो. न करण्यायोग्य कर्म म्हणजे अनुचित वा तामस कर्म होय. लगाम असेल तर घोडा ताब्यात रहातो, सरळ चालतो. ईश्वरप्रेरित कर्मात आपल्या आवडी - निवडीचा प्रश्न नसतो. अशी कर्मे आचरतांना स्वत:वर सहजच नियंत्रण असते. नियंत्रण राखायचे काम विवेक करतो. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ लक्षण वर्णनात 63 व्या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्यांनी 'संमोह' शब्दाचा अर्थ कार्याकार्यविषय: अविवेक: असा केलेला आहे. कार्य आणि अकार्य म्हणजे काय करावे आणि काय करु नये. याबाबत विवेक न उरणे म्हणजे अविवेकाचे प्राबल्य असणे संमोह आहे. पुढे आचार्य म्हणतात की जोवर माणसाच्या ठायी कार्य आणि अकार्य निश्चित करायचा विवेक असतो तोवर त्याला मनुष्य म्हणू शकता येते. अहंकार बलवान झाला की विवेक नष्ट होऊन जातो. यामुळे जीवनात विवेकाचे प्राबल्य हवे असेल तर अहंकाराला क्षीण करण्याकामी सतर्क असायला हवे. जिथे विवेक बलवान असेल तिथे मोह उत्पन्न होत नाही. यामुळे ईश्वर प्रेरित कर्माचा त्याग असूच शकत नाही. अहंकाराचे बळ वाढले की विवेक क्षीण झाला म्हणून समजा. विवेक क्षीण झाल्यामुळे अविवेक वाढला तर ईश्वरप्रेरित कर्माचा त्याग होऊन जाईल. या त्यागाला मोहामुळे म्हणजे अविवेकामुळे केला गेलेला त्याग मानला जाईल.

: 8 :

*दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात् त्यजेत्।*
*स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् कर्म:** जे कर्म
- **कायक्लेशभयात्:** शारीरिक कष्टाच्या भीतीने
- **दु:खं इति एव:** दु:खदायक समजून
- **त्यजेत्:** त्याग केले जाते
- **राजसं त्यागं कृत्वा:** ते राजस त्याग होय
- **त्यागफलं स: एव न लभेत्:** त्या त्यागाचे फळ प्राप्त होत नाही म्हणजे लाभत नाही

**अर्थ**

जे काही कर्म आहे ते दु:खरुपच आहे असे समजून जर कोणी शारीरिक त्रासाच्या भीतीने कर्तव्य कर्मे सोडून

देईल तर त्याला असा राजस त्याग करुन त्यागाचे फळ कोणत्याही प्रकारे मिळत नाही.

*कष्टामुळें चि जें कर्म सोडणें आंग राखुनी।*
*त्याग राजस तो वांझ न देखे आपुलें फळ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा करण्यात आली आहे. 1) शरीराला त्रास होईल या भयाने ज्या कर्माचा त्याग केला जातो तो राजस त्याग होय. 2) त्या त्यागाचे फळ प्राप्त होत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **यत् कर्म कायक्लेशभयात् दु:खं इति एव त्यजेत्:** जे कर्म देहाला कष्ट होतील या भयाने दु:खदायक मानून त्याग केली जातात. पाचव्या श्लोकात सांगितले आहे की यज्ञ, दान, तप या तीन कर्मांचा त्याग करायला नको. मागील श्लोकात असे सांगितले की या कर्मांचा वा कुठल्याही कर्मांचा त्याग मोहवश होऊन केला जात असेल तर तो तामस त्याग म्हटला जाईल. इथे सांगताहेत की यज्ञ, दान, तप या कर्मांचा वा कुठल्याही कर्मांचा त्याग शरीराला त्रास होईल या भयामुळे केला जात असेल तर तो राजस त्याग म्हटला जाईल. त्यागाचे खरे फळ सात्विक त्यागातच लाभते. राजस वा तामस त्यागात देहासक्ती आहे. देहासक्ती सोडल्याशिवाय त्यागाचे फळ मिळणे शक्य नाही. गांधीजींनी देहासक्तीच्या त्यागावरच सत्याग्रहाचे शास्त्र ठरवले आहे - निर्धारित केले आहे. देहासक्तीमुळेच हिंदुस्तानची जनता दीर्घ काळापर्यत गुलाम राहिली. देहासक्ती सोडल्याशिवाय त्याग होऊच शकत नाही. गांधीजींच्या तपश्चर्येमुळे संपूर्ण राष्ट्राला देहासक्तीचा त्याग करायची प्रेरणा लाभली. देह दंडाची - शारीरिक त्रासांची पर्वा न करता लोक कारावासात जायला तयार झाले, यातना झेलायला सिध्द झालेत.

2) **राजसं त्यागं कृत्वा त्यागफलं स: एव न लभेत्:** तो त्याग राजस असतो. देहासक्तीमुळेच सत्कर्मे वा प्राप्त कर्तव्ये सोडायला माणूस प्रवृत्त होतो यामुळे त्याला खऱ्या त्यागाचे फळ प्राप्त होत नाही. खऱ्या त्यागाचे फळ देहासक्ती, अहंकार, काम-क्रोध वगैरे विकारांचे क्षीण होणे. यातून ईश्वराचा अनुभव प्राप्त होईल. पुढे मोक्षाचा लाभ होईल. मानवी देह आणि पशु देहात हा फार मोठा फरक आहे की पशु देहात ईश्वराचा अनुभव काही प्राप्त होत नाही. आसक्ती राखून देहकष्टाला भिऊन सत्कर्माचा त्याग करायला नको.

: 9 :

*कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन।*
*संगं त्यक्त्वा फलं चैव स त्याग: सात्विको मत:॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् नियतं कर्म:** शास्त्रविधीने नियत केलेले कर्म
- **कार्यम् इति एव:** कर्तव्य समजूनच
- **संगं च फलं त्यक्त्वा एव:** आसक्ती आणि फळ सोडूनच
- **क्रियते स: त्याग:** केला जाणारा त्याग
- **सात्त्विक: मत:** सात्विक मानला जातो

**अर्थ**

हे अर्जुना, जे शास्त्रविहीत कर्म करणे कर्तव्य आहे या भावनेने आसक्ती आणि फळांचा त्याग करुन केले जाते तोच सात्विक त्याग मानला गेला आहे.

*करणें नेमिलें कर्म कर्तव्य चि म्हणूनियां।*
*ममत्व फळ सोडूनि त्याग तो मान्य सात्त्विक॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) जे नियत कर्म. 2) कर्तव्य समजूनच. 3) आसक्ती आणि फळाचा त्याग करुनच केले जाते. 4) त्या त्यागाला सात्विक मानले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **यत् नियतं कर्म:** जे नियत कर्म म्हणजे प्रवाहपतीत कर्म म्हणजे ईश्वरप्रेरित कर्म. या श्लोकात सात्विक त्यागाचे स्पष्टीकरण आहे. सात्विक त्यागात सात्विक कर्माचा त्याग करायचा नसतो. पुढे अकराव्या श्लोकात म्हटले आहे की देहधारी पुरुष कर्माचा सर्वथा त्याग करुच शकत नाही. तिसऱ्या अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे की कर्म आचरल्याशिवाय माणूस एक क्षणभरसुध्दा राहू शकत नाही. यामुळे आपण जी

काही कर्मे करणार असू ती सात्विक असायला हवीत कारण की परमात्म ज्ञानाच्या प्राप्तीसाठी सात्विक कर्मेच सहाय्यभूत असतात पण सात्विक कर्मे जर अहंकारप्रेरित असली तर मात्र बंधनकारक ठरतात. यामुळे सात्विक कर्मसुध्दा प्रवाहपतीत म्हणजे ईश्वरप्रेरित असायला हवे. आपण आपल्या इच्छेनुसार कर्मे ठरवू नयेत. आपण समाजात रहातो. समाजाचा लगाम ईश्वराच्या हाती आहे. प्रत्येक व्यक्तीला ईश्वराने अपेक्षित स्वातंत्र्य प्रदान केले आहे. त्या स्वातंत्र्याचा उपयोग ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे आचरुन झाला पाहिजे. एकदा का माणसाने ठरवले की आपल्याला स्वत:च्या इच्छेने वाटचाल करायची नाही तर मग त्याला अधिक विचार नाही करावा लागत. त्याचा जीवन प्रवाह स्वयमेव - आपोआप अग्रेसर होत जातो. तो आपली काळजी वहाणे सोडून देतो. त्याची काळजी देव घेतो. छोट्या बालकाची चिंता आई नाही का वहात ?

2) **कार्यम् इति एव:** कर्तव्य समजूनच, कर्तव्यबुध्दीनेच. गांधीजींची सर्व कामे कर्तव्यदृष्टीनेच - कर्तव्य भावनेनेच होत होती. जिथे निष्कामता, अनासक्ती, कर्मफळत्यागाचा सिध्दांत जीवनात आत्मसात करुन घेता येत असेल तिथे तमाम क्रियांमध्ये कर्तव्य भावनेशिवाय दुसऱ्या कोणत्या भावनेचा विकास होऊ शकतो? जिथे कर्तव्य भावना आहे तिथे दु:खाचा अनुभव होणार नाही.

3) **संगं च फलं त्यक्त्वा एव:** आसक्ती सोडून म्हणजे देहासक्ती आणि फलासक्ती सोडूनच. कर्तव्य भावनेसोबत देहासक्ती, कुटुंबासक्ती आणि फलासक्तीचा त्याग करायला भगवंताने सांगितले आहे. कुटुंबात रहात असतानाही कर्तव्य भावना विकसित होऊ शकते. कुटुंबाचा त्याग करायची गरज नाही.

विनोबांनी गीता प्रवचनात ही विशेष गोष्ट सांगितली आहे की जी व्यक्ती जिथे आहे तिथे म्हणजे ज्या परिस्थितीत उभी आहे तिथे राहून ती अनासक्ती पूर्वक कर्तव्य भावनेने जीवन घालवू शकते. तिला सारे काही सोडून द्यायची गरज नाही. अन्यथा अनासक्तीचा सिध्दांत सार्वत्रिक होऊ शकणार नाही. काही लोकच मर्यादित प्रमाणात जर अनासक्तीचा सराव करु शकत असतील तर मग सर्वासाठी मोक्षाचा मार्ग खुला राहू शकणार नाही. म्हणजे यावरुन असे स्पष्ट होते की अनासक्तीचा अभ्यास - सराव - कुणीही करु शकतो. फलासक्ती सोडूनच असा मूळात 'च' शब्द आहे. 'च' शब्दाने ही गोष्ट ध्यानात येते की - येऊन जाते की - आसक्ती आणि फलाशेच्या त्यागाशिवाय जो त्याग केला जाईल, तो सात्विक त्याग मानला जाणार नाही.

4) **स: त्याग: सात्त्विक: मत:** हा त्याग सात्विक त्याग मानला जातो. सात्विक त्यागात तीन गोष्टींचा अंतर्भाव असतो. 1) आपण जी काही कर्मे करु ती सात्विक असावीत आणि ईश्वर प्रेरित असावीत. 2) त्या कर्मात कर्तव्य दृष्टीच असावी. 3) आणि ती कर्मे देहासक्ती आणि फलासक्ती सोडूनच केली जावीत. शास्त्रकारांचे असे मानणे आहे की या तीन अटींचे पालन झाल्यावरच तो सात्विक त्याग ठरेल. सात्विक त्यागाचे हे वैशिष्ट्य आहे की त्यासाठी बाहेरुन काही वेगळा त्याग करायची गरज नसते. बहुधा बाह्य त्यागालाच त्याग मानले जाते पण गीतेचे निवेदन आहे की प्रवाह पतीत म्हणजे ईश्वर प्रेरित कर्माचा त्याग जर मोहाने केला गेला तर तो तामस त्याग ठरेल. शरीराला त्रास होईल, कष्ट पडतील या भयाने जर कर्माचा त्याग केला गेला तर तो राजस त्याग ठरेल पण ईश्वरप्रेरित कर्मे जर कर्तव्यबुध्दीने अनासक्तीपूर्वक केली गेलीत तर तो सात्विक त्याग असेल. इथे ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की बाहेरुन त्याग करायला काही इथे सांगितलेले नाही.

: 10 :

*न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।*
*त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशय: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अकुशलं कर्म न द्वेष्टि:** जो अकल्याणकारी कर्माचा द्वेष करत नाही
- **कुशले न अनुषज्जते:** आणि कल्याणकारी कर्मात जो आसक्त होत नाही
- **त्यागी:** तो त्यागी आहे
- **सत्त्वसमाविष्ट:** तो सत्वगुणांनी युक्त आहे
- **मेधावी:** मेधावी म्हणजे ज्ञानी आहे
- **छिन्नसंशय:** संशयरहित आहे

### अर्थ

जो मनुष्य कुशल नसलेल्या कर्मांचा द्वेष करत नाही आणि कुशल कर्मात आसक्त होत नाही तो शुध्द सत्वगुणी पुरुष संशयरहित ज्ञानी आणि खरा त्यागी होय.

*कर्मीं शुभाशुभीं जेव्हां राग - द्वेष न राखतो।*
*सत्त्वांत मुरला त्यागी ज्ञानें छेदूनि संशय ॥*

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे. 1) व्यक्ती आणि समाजाच्या उन्नतीत अकल्याणकारी कर्माचा जो द्वेष करत नाही. 2) जो कल्याणकारी कर्मात आसक्त होत नाही. 3) तो त्यागी आहे. 4) सत्वगुणाच्या प्राबल्याने - उत्कर्षाने - युक्त आहे. 5) मेधावी आहे. 6) ज्याचा संशय संपला आहे - जो छिन्नसंशयी आहे. या श्लोकात त्यागी पुरुषाची व्याख्या आणि त्याची लक्षणे वर्णिली आहेत.

### स्पष्टीकरण

1) **अकुशलं कर्म न द्वेष्टि:** जो अकल्याणकारी म्हणजे हानीकारक कर्माबाबत द्वेष करत नाही. जगात सात्विक, राजस आणि तामस कर्मे आचरणारे अनेक लोक आहेत. यातले राजस आणि तामस कर्मे आचरणारे लोक समाजाच्या अध:पतनालाच अवनतीलाच कारणीभूत ठरतात - निमित्त बनतात, अशा लोकांच्या अवनतीपरक कर्मांना जो कदापि अनुमोदन देत नाही आणि द्वेषही करत नाही. तो असे समजतो की ईश्वराने निर्मिलेल्या त्रिगुणात्मक सृष्टीचे हेच स्वरुप आहे. यामुळे तो स्वत: सत्वगुणाचे आत्यंतिक प्राबल्य करतो - उत्कर्ष करतो. शांतता समाधान हारपू देत नाही.

2) **कुशले न अनुषज्जते:** तो स्वत: तर कुशल कर्माचे आचरण करील. कुशल कर्मे जीवनभर करील पण त्यात आसक्त होणार नाही, या कुशल कमांर्नी व्यक्ती आणि समाजाची उन्नती होईल, कल्याण होईल. अलिप्तता एकदा का साधता आली तर मुक्ततेचा अनुभव होईल. तिसऱ्या अध्यायातील तेविसाव्या श्लोकात भगवंताने सांगितले आहे. मी अतंद्रित होऊन कर्मे करतो. तीच स्थिती या पुरुषाची असेल. प्रापंचिक लोकही अतंद्रित होऊनच कर्मे आचरतात पण त्यांना अलिप्ततापूर्वक कर्मे करणे साधत नाही. या पुरुषाला ही अलिप्तता साधली आहे. यामुळे त्याला त्यागी म्हटले आहे.

3) **स: त्यागी:** तो त्यागी आहे. समाजात त्यागी आणि भोगी हे दोन शब्द रुढ आहेत. प्रपंचासक्त पुरुषाला भोगी तर प्रपंचापासून अलिप्त पुरुषाला त्यागी म्हणतात पण अशा व्यक्तीला प्रपंचाचा त्याग केल्याशिवाय लोक पूर्ण त्यागी म्हणायला तयार होत नाहीत. प्रपंचात राहूनही जो अलिप्त - नि:संग - असतो त्याच्या अलिप्ततेची छाप पडूनच जाते. यामुळे अशा पुरुषाकडे समाज आदरभावनेनेही बघतो पण जोवर तो प्रपंचात आहे, तोवर त्याला पूर्ण त्यागी नाही मानले जात. यात मुळीच तथ्य नाही असे काही नाही कारण की हा प्रश्न लोकांच्या समोर उपस्थित होतोच की असा पुरुष प्रपंच सोडून समाजसेवेच्या कार्यात का लागत नाही? त्या पुरुषाची तेवढी दुर्बलता मानली जाईल. गीतेची त्यागी शब्दाची व्याख्या अशी आहे की जो आतून अलिप्त झाला तो त्यागी होय.

4) **सत्त्वसमाविष्ट:** सत्वगुणाच्या प्राबल्यात उत्कर्षात तो रंगून गेला आहे. या पुरुषाला त्यागी म्हणून लागलीच असे सांगितले गेले आहे की हा पुरुष सत्वगुणांनी रंगलेला आहे. आजवर त्यागी व्यक्तीच्या संदर्भात समाजात अशी कल्पना रुढ होती की मुक्त - बंधनहीन असल्यामुळे तो कशातही रंगू शकत नाही - रंगला जाऊ शकत नाही. आतून हा ईश्वररंगी अवश्य रंगून गेला आहे पण तो बाहेरच्या कुठल्या रंगात रंगू शकत नाही. गीतेने या कल्पनेला बदलून टाकले आहे. गीतेचे म्हणणे असे आहे की तो सत्वगुणाच्या प्राबल्यात रंगून गेला आहे. जेवढी काही सात्विकता आहे तिचे प्राबल्य घडवून आणत हा त्यात तल्लीन होऊन गेला आहे. तो कल्याणकारी सात्विक कर्मे करत राहील. दया, क्षमा, करुणा, वात्सल्य, प्रेम वगैरे गुणांचा उत्कर्ष करील. अलिप्त असल्यामुळे उपर्युक्त सत्वगुणांचा उत्कर्ष करण्यात त्याला काही बंधनासारखे वाटणार नाही.

5) **मेधावी:** जिच्या बुध्दीने ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेतला आहे अशी व्यक्ती मेधावी असते. जो सत्वगुणांचा उत्कर्ष करण्यात रत असा त्यागी पुरुष असतो त्याला जर ईश्वराचा अनुभव प्राप्त झाला नसेल तर त्याच्या त्यागाला काही खरा त्याग म्हणता येणार नाही. ज्याला ईश्वराचा अनुभव आला असेल तोच आमरण

त्यागी म्हणजे अलिप्त राहू शकतो. यामुळे मूलभूत मुद्दा आहे ईश्वरानुभव. गीतेचा मध्यबिंदूही ईश्वरानुभवाची प्राप्ती संपादित करणे हाच आहे. हे अंतिम साध्य आहे. हे प्राप्त होताच पूर्णत्व प्रकट होऊ लागते. तोवर गुणोत्कर्ष साधल्यावर वा त्याग भावनेचा विकास झाल्यावरही पूर्णत्वाचा अनुभव येऊ शकणार नाही.

6) **छिन्नसंशय:** ज्याचे सारे संशय फिटले, साऱ्या शंका निमाल्या, सर्व संदेहांची पूर्ण निवृत्ती झाली. ईश्वरानुभवानंतर सारे संशय, सारे संदेह मिटणे, शंकांपासून निवृत्त होणे हे त्या अनुभवाचे फलित होय. साधकावस्थेत शंका कायम असतात. जीव, ईश्वर, मोक्ष, सगुण, निर्गुण, ध्यान, वैराग्य, भक्ती वगैरे अनेक शब्दांची चर्चा शास्त्रांमधून येते. त्याचा खरा अर्थ ध्यानी न आल्यामुळे गोंधळ कायम रहातो. गुंता सुटत नाही. साधकाच्या या स्थितीचा विचार करुन भगवान शंकराचार्यांनी 'ब्रह्मसूत्र भाष्यात' अनेक शंका उपस्थित करुन त्यांचे समाधान केले आहे. ग्रंथाच्या पूर्व पक्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात शंका उपस्थित केल्या आहेत की त्या साऱ्या क्वचित्‌च कुणा साधकाच्या मनात उपस्थित होतील. यामुळे साधकाच्या शंका निरसनासाठी संदेह निवृत्तीसाठी - हा ग्रंथ खूप मदतनीस आहे. या श्लोकात सिध्द पुरुषाचे वर्णन आले आहे. सिध्द पुरुषाच्या मनात शंका राहूच शकत नाहीत.

: 11 :

*न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषत: ।*
*यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **हि देहभृता:** कारण की देहधारी पूरूषाने
- **कर्माणि अशेषत:** कर्माचा पूर्णपणे - पूर्ण रुपाने
- **त्यक्तुं न शक्यं:** त्याग करणे शक्य नाही
- **तु य: कर्मफलत्यागी:** पण जो कर्मफळांचा त्यागी आहे
- **स: त्यागी इति अभिधीयते:** तो त्यागी म्हणवला जातो

**अर्थ**

कारण की शरीरधारी कोणत्याही माणसाकडून पूर्णपणे कर्मांचा त्याग केला जाणे शक्य नाही म्हणून जो कर्मफळांचा त्यागी आहे तोच त्यागी आहे असे म्हटले जाते.

***अशक्य देहवंतास सर्वथा कर्म सोडणें।***
***म्हणूनि जो फल - त्यागी तो त्यागी बोलिला असे ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत. (1) देहधारी पुरुषाला संपूर्णपणे कर्मांचा त्याग करणे शक्य नाही. (2) पण कर्मफळांचा जो त्यागी आहे त्याला त्यागी म्हटले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **हि देहभृता कर्माणि अशेषत:** त्यक्तुं न शक्यम् कारण की देहधारी पुरुषाला सर्वथा, संपूर्णपणे कर्माचा त्याग करणे शक्य नाही. मागील श्लोकाच्या अनुसंधानात 'कारण की' हा शब्द आला आहे. मागील श्लोकात सांगितले आहे की सत्कर्मे आचरतांना जो आसक्त होत नाही तोच त्यागी आहे. त्याचे कारण या श्लोकात सांगितले आहे. त्यागी पुरुष देखिल सत्कर्मांचा त्याग करत नाही कारण की जिवंत शरीर म्हणजे सतत सक्रिय - क्रियाशील शरीर होय. तिसऱ्या अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे की एका क्षणभरासाठीही माणूस क्रिया न करता राहू शकत नाही. इथे सांगताहेत की देहधारी पुरुष कर्मांचा सर्वथा त्याग करु शकत नाही - या दोन्ही विधानांचा अर्थ एकच आहे. आपण कर्म केल्याशिवाय राहू शकत नाहीत वा कर्माचा त्याग करु शकत नाही तर मग सत्कर्माचा त्याग का करावा ? हा प्रश्न भगवान इथे उपस्थित करताहेत. समजा आपण सत्कर्मे - सेवा कार्य - सोडून दिले तरी शौच-मुखमार्जन, स्नान, भोजन, श्वासोच्छवास, शयन म्हणजे झोप वगैरे गोष्टींचा तर त्याग करु शकत नाहीत. हे जर करावेच लागते, निष्क्रिय राहू शकत नाही तर मग ज्ञानी माणसाचा विवेक म्हणतो की लोकसेवा कार्य आचरत असताना लोकांना उन्नती पथावर नेणे - त्यांचे अभ्युत्थान घडवणे - तुमचा धर्म आहे. यास्तव लोकसेवा करत रहा. सिध्द जन तर आदर्श पुरुष आहेत. यामुळे क्रिया प्रत्यक्षत: आदर्श रुपात कशी केली

जाऊ शकते याचे उदाहरण सिध्द पुरुषाने जगापुढे मांडावे अशी आकांक्षा सर्वांच्याच मनात रहाते. सिध्द पुरुष ज्ञानी असतात. ज्ञान त्यांच्या आचरणातच प्रकटते. यामुळे सिध्द पुरुष सवांर्च्या संपर्कात राहून राग - द्वेषरहित, निर्विकार, निरहंकारी राहून क्रियेचे उदाहरण घालून देऊ शकतो. राग - द्वेष तर सर्वांच्या संपर्कात आल्यावरच जागृत व्हायची शक्यता असते. यामुळे ज्ञानी पुरुष स्वत:च्या मोक्षाच्या दृष्टीनेही जनसंपर्कात राहून निरंतर निर्विकारता आणि निरहंकारितेचा अनुभव घेऊ शकतो.

2) **तु य: कर्मफलत्यागी स: त्यागी इति अभिधीयते:** पण जे कर्मफल त्यागी आहेत म्हणजे ज्यांनी फलासक्तीचा त्याग केला आहे ते पुरुष त्यागी असल्याचे मानले जाते. कर्माचा त्याग न करता ज्याने कर्मासक्तीचा त्याग केला आहे, तोच त्यागी पुरुष आहे. कर्माचा त्याग करायची गरज नाही. एवढेच नव्हे पण कर्म सोडून भागणार नाही - चालणार नाही. जोवर फलासक्ती सुटली नाही तोवर काहीही सुटलेले नाही. कर्मे सोडल्यावरही त्यांची आसक्ती राहू शकते. आसक्तीचा संबंध पिंड - ब्रह्मांडाशी आहे. पिंड म्हणजे शरीर आणि ब्रह्मांडातले पाच भौतिक जर सत्य वाटत असतील तर आसक्ती उरेलच - राहीलच. यामुळे आसक्ती सोडण्यासाठी पिंड - ब्रह्मांडाविषयी ही प्रतीति - हा बोध - आवश्यक आहे की ते ईश्वरस्वरुपी आहेत म्हणजे ईश्वराचेच वेगवेगळे भाग आहेत. खरे पाहू गेल्यास त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाही. जोवर अशी प्रतीति होणार नाही तोवर त्यांच्या बाबतीतही कुणाचीही आसक्ती सुटणार नाही. यामुळे खरा त्याग तर मनात वसणाऱ्या आसक्तीचा करायला हवा. अशाप्रकारे आसक्तीचा त्याग करणाराच खऱ्या अर्थाने त्यागी म्हणवला जाईल. बाह्यत: कर्मत्याग करणाऱ्याला त्यागी मानायला नको.

: 12 :

*अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मण: फलम् ।*
*भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **अनिष्टं:** दु:खद
- **इष्टं:** सुखद
- **च मिश्रं:** आणि सुख - दु:ख मिश्रित
- **त्रिविधं:** अशा तीन प्रकारचे
- **कर्मण: फलं:** कर्मफल असते
- **अत्यागिनां भवति:** (जे) अत्यागीला म्हणजे सकामी पुरुषाला प्राप्त होते
- **तु संन्यासिनां क्वचित् न:** पण संन्याश्याला भोगावे लागत नाही

### अर्थ

कर्मफळांचा त्याग न करणाऱ्या पुरुषांना कर्माचे बरे, वाईट आणि मिश्रित असे तीन प्रकारचे फळ मेल्यानंतर जरुर मिळते पण कर्मफळांचा त्याग करणाऱ्या पुरुषांना कर्माचे फळ कदापि मिळत नाही.

*तिहेरी फळ कर्माचें बरें वाईट मिश्रित ।*
*त्याग - हीनास तें लाभे संन्यासी मुक्त त्यांतुनी ॥*

**विषय:** या श्लोकातून तीन गोष्टींची चर्चा आली आहे. 1) कर्मफळाचे तीन प्रकार आहेत - दु:खद, सुखद आणि सुख - दु:ख मिश्रित. 2) ते अत्यागीला भोगावे लागतात. 3) त्यागी संन्याश्याला कर्मफळे भोगावी लागत नाहीत.

### स्पष्टीकरण

1) **अनिष्टं इष्टं च मिश्रं त्रिविधं कर्मण:** फलम् दु:खदायी, सुखदायी आणि सुख-दु:ख मिश्रित अशी तीन प्रकारची कर्मफळे असतात. आपण कर्म करतो म्हणजे कर्माच्या फळाची प्राप्ती होणे स्वाभाविकच आहे. चौदाव्या अध्यायातील नवव्या श्लोकात म्हटले आहे सत्त्वं सुखे संजयति - सत्वगुण सुखासक्ती उत्पन्न करतो कारण की सत्वगुणाचे फळ सुख आहे. पुढे बाराव्या श्लोकात अशम: - रजोगुणाचे फळ अशांती म्हणजे दु:ख वर्णिलेले आहे आणि तेराव्या श्लोकात प्रमादो मोह एव च - तमोगुणाचे फळ आळस आणि मोह आहे. अशा प्रकारे जीवनात तीन गुणांचे प्राबल्य केल्यास - उत्कर्ष केल्यास - तीन प्रकारचे परिणाम अनुभवायला मिळतात आणि तीन प्रकारच्या कर्मांच्या अनुसार देह सुटल्यावर पुढील जन्मसुध्दा त्याच प्रकारे सात्विक, राजस, तामस योनीमध्ये लाभतो.

2) **अत्यागिनां भवति:** ही तीन प्रकारची फळे अत्यागीला म्हणजे फलासक्तीचा त्याग न करणाऱ्याला

लाभल्यावरही जर प्रपंचात गुरफटून राहिला तर मानवी देह आणि पशु - पक्ष्यांच्या देहातला फरक काही लक्षात आला नाही - घेतला गेला नाही, असे मानावे लागेल. मानवी देहात असतानाच भवसागर पार करता येऊ शकतो. यामुळे मनुष्य देहाच्या प्राप्तीनंतरही आसक्त होत राहिला तर व्यक्तीला तीन प्रकारची फळे भोगावीच लागतात.

3) **तु संन्यासिनां क्वचित् नः** पण ही त्रिविध फळे संन्याश्यांना भोगावी लागत नाहीत. ज्यांनी अहंकार, काम, क्रोध वगैरे विकारांचा त्याग केला त्यांना ही फळे भोगावी लागत नाही. मोक्ष प्राप्त झाल्यावर पुनरपि जन्म घ्यावा लागत नाही. मोक्षाचा अर्थ आहे अज्ञान मुक्ती, जन्म मुक्ती, विकार मुक्ती, दुःख मुक्ती. अशाप्रकारे मोक्ष चतुर्विध आहे. चार प्रकारचा आहे. तीन प्रकारची फळे भोगावी लागत नाही. नदी जेव्हा सागराला जाऊन मिळते तेव्हा समुद्रच उरतो - नदी विरुन जाते - विराम पावते. नदीचे अस्तित्व संपून जाते. तशाचप्रकारे मोक्षाच्या अवस्थेत एक परमात्माच परमात्मा उरतो - असतो. जीवाचे अस्तित्व संपून जाते.

: 13 :

***पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे।***
***सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिध्दये सर्वकर्मणाम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **महाबाहो:** हे महापराक्रमी अर्जुना
- **सर्वकर्मणां सिध्दये:** सर्व कर्मांच्या सिध्दीसाठी
- **एतानि पंचकारणानिः** ही पाच कारणे
- **सांख्ये कृतान्ते प्रोक्तानिः** सांख्यशास्त्रात वा वेदान्त शास्त्रात सांगितलेली आहेत
- **मे निबोध:** ती कारणे माझ्याकडून ऐक

**अर्थ**

हे महाबाहो, सर्व कर्मांच्या सिध्दींची ही पाच कारणे, कर्मांचा शेवट करण्याचा उपाय सांगणाऱ्या सांख्यशास्त्रात सांगितली गेली आहेत. ती तू माझ्याकडून नीट समजून घे.

***ऐक तूं मजपासूनि ज्ञात्यांचा कर्म - निर्णय।***
***परभारें चि हें कर्म करिती पांच कारणें॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) सर्व कर्मांच्या सिध्दीसाठी ही पाच कारणे. 2) सांख्यशास्त्र वा वेदान्तशास्त्रात सांगितलेली आहेत. 3) ती माझ्याकडून ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **महाबाहो सर्वकर्मणां सिध्दये एतानि पंचकारणानिः** हे पराक्रमी अर्जुना, सर्व कर्मांच्या सिध्दीसाठी ही पाच कारणे. आपण अहोरात्र अनेक लहान - मोठी कामे करतो. त्यासाठी कुठल्या साधनांची गरज असते, हे आतापर्यंत गीतेत कुठेही आलेले नाही. हा मुद्दा पुढील श्लोकात स्पष्टपणे आला आहे. हा श्लोक पुढच्या श्लोकाची प्रस्तावनारुप आहे.

2) **सांख्ये कृतान्ते प्रोक्तानिः** सांख्यशास्त्र वा वेदान्तशास्त्र या दोन्ही शास्त्रात सांगितलेले आहे.

कृतान्त म्हणजे सिध्दांत. सांख्य शब्दाचा काय अर्थ घ्यावा, हा प्रश्न आहे. लोकमान्य टिळकांनी अर्थ घेतला 'सांख्यशास्त्र', विनोबांनी 'कर्मासंबधी ज्ञानी पुरुषांचा निर्णय' असा अर्थ घेतला. शंकराचार्यांनी अर्थ घेतला 'वेदान्त'. गीतेत वेदान्ताचेच निरुपण असल्यामुळे वेदान्त हा अर्थ घेऊच शकतो. विनोबांनी 'ज्ञानी पुरुषांचा निर्णय' असा अर्थ घेतला. हा अर्थ कुण्या विशिष्ट शास्त्राशी संबध्द नाही यामुळे हा अधिक व्यापक अर्थ आहे. हा अर्थ घेतला तर सांख्यशास्त्र वा वेदान्तशास्त्र असा अर्थ तर होऊच शकतो यामुळे आम्ही हाच अर्थ घेतला आहे. कर्मसिध्दीसाठी ज्या पाच साधनांची गरज असते ती अनुभवसिध्द आहेत तरीही गीतेने शास्त्रांचा हवाला दिला आहे - पुरावा दिला आहे. शास्त्र म्हणजे अनुभवी पुरुषांची वचने. वेदान्तशास्त्र हा सांख्यशास्त्र असा जर अर्थ घेतला तर विशिष्ट शास्त्राचे अनुसंधान असा अर्थ होईल. (अर्थ मर्यादित होऊन जाईल) विशिष्ट शास्त्र ऐवजी जर शास्त्र शब्द घेतला तर तो सर्वसंमत - सर्वमान्य होईल. तरीही आम्ही सांख्य वा वेदान्त शास्त्र अर्थच घेतला आहे.

3) **मे निबोध:** ते माझ्याद्वारे ऐक. म्हणजे पुढील श्लोकात मी त्या पाच कारणांची - साधनांची चर्चा करणार आहे, ती ऐक.

: 14 :

*अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्।*
*विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अधिष्ठानं:** स्थान वा शरीर
- **तथा कर्ता:** तसाच जीव, कर्ता
- **च पृथग्विधं करणं:** आणि नाना प्रकारची साधने - डोळे, कान, हात-पाय वगैरे इंद्रिये
- **च विविधा: पृथक् चेष्टा:** आणि विविध वेगवेगळे व्यापार - क्रिया
- **च अत्र दैव एव पंचमम्:** आणि या सर्वासोबत ईश्वरी कृपाच पाचवे साधन आहे

**अर्थ**

कर्म पूर्ण होण्यासाठी अधिष्ठान (ज्याच्या आश्रयाने कर्मे केली जातात त्याला अधिष्ठान असे म्हणतात), कर्ता, निरनिराळ्या प्रकारची करणे ( ज्या ज्या इंद्रियांच्या व साधनांच्या द्वारे कर्मे केली जातात त्याना करण असे म्हणतात.), अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या क्रिया आणि तसेच पाचवे कारण दैव (पूर्वी केलेल्या शुभाशुभ कर्मांच्या संस्कारांचे नाव दैव असे आहे.) आहे.

*अधिष्ठान अहंकार तशीं विविध साधनें।*
*वेगळाल्या क्रिया नाना दैव तें येथ पांचवें॥*

**विषय:** या श्लोकात कर्मसिध्दीसाठी आवश्यक अशा पाच साधनांना स्पष्ट करुन सांगताहेत.

**स्पष्टीकरण**

1) **अधिष्ठानम्:** कुठलेही कर्म करायचे असेल तर पहिले साधन आहे स्थान. उदाहरणार्थ शेताशिवाय शेती होऊ शकणार नाही. यासोबत शरीरही हवे. शेत आहे पण शरीर नसेल तर शेती होऊ शकणार नाही यामुळे पहिले साधन आहे शरीर.

2) **तथा कर्ता:** कर्ता - करणारा. शेत आहे, शरीरही आहे पण शेतात शरीराने काम करणारा हवा, त्याला जीव म्हणतात. ईश्वर शरीर तयार करतो - देव देह देतो. तो शरीराला उत्पन्न करतो. शरीरात स्वत: निवास करतो. शरीराला सजीव राखणाराही तोच आहे पण शरीर आणि इंद्रियांचा उपयोग करणारा जीव या शरीरात देवाने उपस्थित केला आहे. अज्ञानामुळे हा जीवात्मा शरीराशी आपला एकरुपतेचा संबंध मानतो. मीच शरीर आहे असे त्याला वाटते. यामुळे तो कर्ता, भोक्ता बनतो. म्हणजे शरीर, मन, इंद्रियांकडून घडणाऱ्या घटनांचा तो कर्ता बनतो. यासोबत सुख - दु:खाचा भोक्ताही बनतो. तसे पाहू गेल्यास तो जीव फक्त ज्ञाता आहे. ज्ञातेपणा हेच त्याचे खरे स्वरुप आहे. यथार्थ स्वरुप - आहे. कर्तेपणा वा भोक्तेपणा काही त्याचे मूळ स्वरुप नाही.

3) **च पृथग्विधं करणम्:** आणि नाना प्रकारची साधने डोळे, कान, हात, पाय वगैरे इंद्रिये होत आहे, शेतकरी आहे तो कर्ता आहे पण शेती करण्यासाठी नांगर, बियाणे, बैल, खत, वगैरे उपकरणे - साधने - नसतील आणि त्यासोबत डोळे, कान वगैरे ज्ञानेंद्रिये आणि हात, पाय अशी कर्मेंद्रिये नसतील तरी शेती होऊ शकणार नाही. यामुळे उपर्युक्त दोन्ही प्रकारची साधने गरजेची आहेत.

4) **च विविधा: पृथक् चेष्टा:** आणि नाना प्रकारचे वेगवेगळे व्यापार - क्रिया. शेत आहे, शेतकरी आहे. डोळे, कान, हात, पाय, नांगर, बियाणे, खत, बैल वगैरे उपकरणे आहेत पण या उपकरणांचा उपयोगच जर तो करत नसेल म्हणजे शेतकरी निष्क्रिय राहिला तर सर्व साधने असुनसुध्दा सर्व काम थांबून जाईल, काही उत्पादन होणार नाही. यामुळे या सर्व उपकरणांचा वापर करुन शेतकऱ्याला शेतात आठ - दहा तास अखंडपणे काम करत रहायला हवे.

5) **च अत्र दैवं एव पंचमम्:** आणि या सर्वाच्या सोबत ईश्वर कृपाच पाचवे साधन आहे. शेत आहे, सारी उपयुक्त उपकरणे आहेत, शेतकरी मशागतीला तयार आहे, आठ - दहा तास शेतात राबत आहे पण वेळेवर पाऊसच आला नाही तर पिकाचे काहीही उत्पादन मिळणार नाही. या सर्व साधनांमध्ये अत्यंत महत्वाचे जर कुठले साधन असेल तर ते पाचवे साधन ईश्वर कृपा हेच आहे. संपूर्ण ब्रह्मांडाचा उत्पन्न कर्ता ईश्वर आहे. तोच पालनकर्ता आहे आणि तोच संहार कर्ताही आहे. यामुळे हे लक्षात राखायला हवे की सर्व लगाम ईश्वराच्याच हाती आहे. गरजेपेक्षा अधिक पाऊस झाला तरी पिके वाहून जातील. पिकांवर टोळधाडी

आल्यात, किड पडली तर पिके नष्ट होऊन जातात. यामुळे आपण ईश्वरकृपेसाठी पात्र ठरावे ही भावना मनी राखून अत्यंत विनयाने आपली कर्तव्य कर्मे करत रहायला हवीत.

: 15:

*शरीरवाङ्मनोभिर्यत कर्म प्रारभते नरः ।*
*न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **नरः** मनुष्य
- **वाक् - मनोभिः** शरीर, वाणी आणि मनाने - काया - वाचा - मनसा
- **यत् कर्म प्रारभते:** जे काही कर्म करतो
- **न्याय्यं वा विपरीतं:** ते धर्मयुक्त, नीतीयुक्त वा अधर्मयुक्त, अनीतीयुक्त
- **तस्य एते पंचहेतवः** त्यांचे हे पाच हेतु वा कारणे आहेत

**अर्थ**

मनुष्य मन, वाणी आणि शरीराने शास्त्राला अनुसरुन वा त्याविरुध्द जे कोणतेही कर्म करतो त्याची ही पाचही कारणे असतात.

*काया - वाचा - मनें जें जें मनुष्य करितो जगीं ।*
*धर्माचें वा अधर्माचें त्याची हीं पांच कारणें ॥*

**विषय:** या श्लोकात एकाच विषयाची चर्चा आली आहे. मनुष्य शरीर, वाणी, मनाने अनेक कर्मे करतो. ती धर्मयुक्त असोत वा अधर्मयुक्त, नीतीयुक्त असोत वा अनीतीयुक्त असोत त्याना अमलात आणण्यासाठी उपर्युक्त पाच साधने आहेत.

**स्पष्टीकरण**

मनुष्य या शब्दात आबालवृध्द स्त्री - पुरुष सर्वांचा समावेश आहे. सर्व कर्मे शरीर, वाणी आणि मनाने संपन्न होतात. शरीरात इंद्रियांचा समावेश आहे. आपण बघणे, ऐकणे, हुंगणे, खाणे, बोलणे वगैरे नाना क्रिया सतत करत रहातो. कधी योग्य पध्दतीने बोलतो तर कधी बोलत नाही. कधी सृष्टीकडे निर्विकार दृष्टीने बघू तर कधी विकार भरल्या नजरेने बघू. आपण खाण्यायोग्य - सेवन करण्यायोग्य पदार्थाचे सेवन करतो पण कधी सेवन न करण्यायोग्य वस्तुही खाऊन टाकतो. अशाप्रकारे सर्व कर्मे आपण कधी उचित म्हणजे योग्य प्रकारे वा अनुचित म्हणजे अयोग्य प्रकारे - अशा दोन्ही पध्दतींनी करत रहातो. पाच साधने आहेत. या पाच साधनांपैकी 'दैव' या साधनाचा संबंध केवळ परमेश्वराशी आहे. 'कर्ता' या शब्दाचा संबंध केवळ पिंडात म्हणजे देहात वसणाऱ्या जीवाशी आहे. 'अधिष्ठान' आणि 'करण' म्हणजे साधनाचा संबंध पिंड आणि ब्रह्मांड या दोघांशी आहे कारण की अधिष्ठान शब्दाचा अर्थ जसा क्षेत्र वा शेत आहे तसाच शरीर वा देहही आहे. करण शब्दाचा एक अर्थ नांगर, बियाणे, खते आहे तसाच इंद्रियेंही आहे. तसेच 'पृथक् चेष्टा' या संज्ञेचा अर्थ जीवाचे शरीराच्या माध्यमातून - शरीराद्वारे कार्यव्यापार करणे हा करु शकतो. अशाच प्रकारे बैल वगैरेंचा व्यापार - व्यवहार - असाही अर्थ करु शकतो.

: 16 :

*तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।*
*पश्यत्यकृतबुध्दित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु तत्र एवं सति:** पण असे झाल्यावर
- **यः अकृत बुध्दित्वात्:** विशुध्द संस्कार जर न झाल्यामुळे
- **आत्मानं केवलं:** केवळ आपल्यालाच स्वत:लाच
- **कर्तारं पश्यति:** कार्याचा कर्ता मानतो
- **सः दुर्मतिः** तो अज्ञानी
- **न पश्यति:** यथार्थ दर्शन करत नाही

**अर्थ**

पण असे असूनही जो मनुष्य अशुध्द बुध्दीमुळे (सत्संग आणि शास्त्राच्या अभ्यासाने तसेच भगवंतासाठी कर्म आणि उपासना करण्यामुळे बुध्दी शुध्द होते म्हणून जो वरील साधनांनी रहित आहे त्याची बुध्दी अशुध्द आहे असे समजावे.) कर्मे पूर्ण होण्यामध्ये केवळ आणि

शुध्दस्वरुप आत्म्याला कर्ता समजतो तो मलिन बुध्दीचा अज्ञानी खरे काय ते जाणत नाही.

*तेथ जो शुध्द आत्म्यास कर्ता मानूनि बैसला।*
*संस्कार - हीन तो मूढ तत्त्व नेणे चि दुर्मति॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) पण कर्मसिध्दीची पाच कारणे असतानाही. 2) जे संस्कारहीन असल्यामुळे. 3) स्वत:लाच कर्माचा कर्ता मानतात. 4) ते दुर्मती म्हणजे अज्ञानी यथार्थ दर्शन करत नाहीत.

**स्पष्टीकरण**

1) **तु तत्र एवं सति:** पण असे असतानाही म्हणजे कर्म सिध्दीची पाच कारणे असूनही इथे वस्तुस्थिती सांगितली आहे की कुठलेही कर्म सफलता पूर्वक करण्यासाठी चौदाव्या श्लोकात वर्णित पाच कारणांची नितांत गरज आहे.

2) **य: अकृतबुध्दित्वात्:** जो पुरुष शास्त्र आणि आचार्यांचा उपदेश प्राप्त न झाल्यामुळे - संस्कारहीन असल्यामुळे - आपण सारे संस्कारहीन अंश जीव आहोत. बालपणीच ज्यांना शास्त्र आणि आचार्यांचा उपदेश लाभला असेल असे भाग्यवंत खूप विरळ असतात. सध्याच्या काळात भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या समाजासाठी तर हा खूपच विरळ - दुर्लभ आहे.

3) **आत्मानं केवलं कर्तारं पश्यति:** केवळ स्वत: आपणासच कर्माचा कर्ता समजतो. विशुध्द संस्कार नसल्यामुळे कर्तृत्वाचा अहंकार जागणे स्वाभाविकच आहे. अनेक पुरुषांच्या ठायी अफाट कर्तृत्वशक्ती असते. जे काम हाती घेतले त्यात यश ठरलेलेच असते. अशा पुरुषांच्या ठायी कर्तृत्वाचे भान असते. खरे पाहू गेल्यास कर्तृत्वाचा संबंध ईश्वराशी जोडायला हवा कारण की शरीर, मन, बुध्दी ईश्वरानेच निर्मित केली आहे आणि संपूर्ण ब्रह्मांडही म्हणजे ब्रह्मांडातले सर्व पदार्थही ईश्वरानेच उत्पन्न केले आहेत. देहसुध्दा ईश्वरामुळेच जिवंत रहातो. शरीराची सारी किंमत चैतन्यामुळेच आहे. तत्वज्ञानाचा हा मोलाचा विचार न जाणल्यामुळे किंवा जाणूनही देहविषयक आसक्तीमुळे कर्तृत्वाच्या भानावर विजय संपादन करणे खूप अवघड होऊन बसते. ईश्वराचे अखंड स्मरण असले तरच कर्तृत्वाचे भान नष्ट होऊ शकते.

4) **स: दुर्मति: न पश्यति:** तो दुर्मती म्हणजे अज्ञानी जीव जसे बघायला हवे तसे बघू शकत नाही, म्हणजे त्याला यथार्थ ज्ञान - वास्तव ज्ञान - होत नाही. योग्य ते दर्शन होत नाही. स्वत:लाच कर्ता मानणारा दुर्मती म्हणजे अज्ञानी आहे. व्यक्तीचे स्वतंत्र स्थानच नसते ही वस्तुस्थिती आहे. ईश्वरापासून कुणी वेगळा वा स्वतंत्र नाही. आपल्या शून्यतेचा अनुभव घेणारा आपली शून्यता बघू शकणारा भवसागर पार करु शकतो.

गांधीजींच्या जीवनात या शून्यतेचे दर्शन घडते. आपण स्वत: काही करीत आहोत असे त्याना कदापि वाटले नव्हते. त्यांची भूमिका भक्ताची होती. भक्त सदैव आपल्या शून्यतेचाच अनुभव घेतो. नेहमी आपल्या तुच्छतेलाच बघत असतो. सारे लगाम ईश्वराहाती आहेत हे तो ओळखून घेतो. यामुळेच ईश्वराच्या ठायीच तल्लीन रहातो.

: 17 :

*यस्य नाहंकृतो भावो बुध्दिर्यस्य न लिप्यते।*
*हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यस्य अहंकृत: भाव: न:** ज्याच्या ठायी 'मी कर्ता आहे' असा अहंकाराचा भाव वसत नसतो
- **यस्य बुध्दि: न लिप्यते:** ज्याची बुध्दी सांसारिक पदार्थात आणि संपूर्ण कर्मात लिप्त होत नाही
- **स: इमान् लोकान् हत्वा अपि:** तो सर्व लोकांचे हनन करत असूनही
- **न हन्ति:** हनन करत नाही
- **न निबध्यते:** पापाच्या बंधनात अडकत नाही, फसत नाही

**अर्थ**

ज्या माणसाच्या अंत:करणात 'मी कर्ता आहे' असा भाव नसतो, तसेच ज्याची बुध्दी प्रापांचिक पदार्थात आणि कर्मात लिप्त होत नाही तो माणूस या सर्व लोकांना मारुनही वास्तविक तो मारत नाही आणि त्याला पापही लागत नाही. (ज्या प्रमाणे अग्नी, वायु आणि पाणी यांच्या

योगाने प्रारब्धवशात एखाद्या प्राण्याची हिंसा झालेली दिसुन येते, तरी ती वास्तविक हिंसा नव्हे, त्याप्रमाणे ज्या माणसाच्या देहाच्या ठिकाणी अभिमान नसतो व केवळ लोकहितार्थ नि:स्वार्थीपणाने ज्याच्या सर्व क्रिया चाललेल्या असतात त्या पुरुषाच्या शरीराने अथवा इंद्रियाने कदाचित् एखाद्या मनुष्याची हिंसा झालेली लोकांना दिसली तरी ती वास्तविक हिंसा नव्हे कारण आसक्ती, स्वार्थ आणि अहंकार हे त्याच्याजवळ नसल्याने कोणा प्राण्याची हिंसा होऊच शकत नाही. तसेच कर्तृत्वाचा अहंकार न बाळगता केलेले कर्म वास्तविक अकर्मच आहे म्हणून तो पुरुष पापाने बांधला जात नाही. )

***नसे ज्यास अहंभाव नसे बुध्दींत लिप्तता।***
***मारी विश्व जरी सारें न मारी चि न बांधिला॥***

**विषय:** या श्लोकात एकूण पाच गोष्टी आल्या आहेत. 1) ज्याच्या चित्तात अभिमानाचा भाव नसतो. 2) ज्याची बुध्दी कर्म आचरताना नित्य अलिप्त - अनासक्त रहाते. 3) ती बुध्दी हनन करत असतानाही म्हणजे सर्व प्रकारच्या जनांच्या संपर्कात राहून सुध्दा. 4) तो हनन करत नाही म्हणजे त्याच्या चित्तात राग, द्वेष उत्पन्न होत नाही यामुळे. 5) तो बंधनात न फसता सदैव मुक्तच असतो.

**स्पष्टीकरण**

1) **यस्य अहंकृत:** भाव: न ज्याच्या चित्ताच्या ठायी ना अभिमान भाव असतो ना कर्तृत्वाचे भान. मागील श्लोकात सांगितले आहे की अज्ञानी जीवाच्या ठायी कर्तृत्वाचे भान सतत वसते. या श्लोकात ज्ञानी पुरुषाच्या स्थितीचे वर्णन करताहेत. ज्ञानी पुरुषाच्या चित्ताच्या ठायी ईश्वराचे अखंड स्मरण नांदते यामुळे क्रिया करत असतानाही 'मी क्रिया करत आहे' अशा प्रकारचा विचार अजिबात नसतो.

पाचव्या अध्यायातील आठव्या व नवव्या श्लोकात भगवंतांनी ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रियांना वेगवेगळे मानून सांगितले आहे की या क्रियांशी माझा सुतराम संबंध नाही, मी अकर्ता - आत्मस्वरुप आहे. याच अध्यायातील सतराव्या श्लोकात म्हटले आहे की अज्ञानी लोकांना हा अनुभव असतो की मी घरात रहात असूनही घरापासून वेगळा आहे. 'घर म्हणजेच मी' असे काही कुणी समजत नाही. तशाचप्रकारे ज्ञानी पुरुषाला हा अनुभव असतो की 'मी देहरुप घरात वेगळा रहातो, देहाशी माझा कुठलाही संबंध नाही. देह ईश्वराची कृती आहे, ईश्वर त्याला जिवंत राखतो आणि त्यात वसणाऱ्या प्राणाला खेचून मृत बनवतो.' तमाम क्रियांचा संबंध ईश्वराशी जोडून तो शून्यतेचा अनुभव घेत जगत असतो. याच अध्यायातील 26 व्या श्लोकात सात्विक कर्त्याच्या लक्षणांमध्ये एक लक्षण निरहंकारताही आहे. ही निरहंकारता ज्ञानवंताचे प्रमुख लक्षण आहे. याकडे लक्ष देऊन साधकाला निरहंकारितेच्या प्राबल्याचे लक्ष्य पाळायला हवे - ध्येय मानायला हवे.

2) **यस्य बुध्दि: न लिप्यते:** आणि अहंभाव नसल्यामुळे ज्यांची बुध्दी कर्में आचरत असतांनाही सदैव अलिप्त - अनासक्त असते. चित्ताच्या ठायी जर अहंकाराचा लेश उरला नसेल तर अलिप्ततेचाच अनुभव येईल. आपण जर देहापासून वेगळे म्हणजे शून्य बनून रहात असू तर गुंतून पडण्यासाठी - लिप्त होण्यासाठी - कुठलाही विषय उरत नाही. आपण स्वत:ला मानतो मी अमका आहे म्हणजे कुटुंबात मी वडिल, काका, भाऊ आहे, तर कुटुंबाची आसक्ती राहील. संस्थेत कार्यरत असतांना मी व्यवस्थापक, संचालक आहे असे वाटत राहिले तर ममत्व उत्पन्न होऊन आसक्ती असेल. सार्वजनिक कार्य करताना मी प्रमुख कार्यकर्ता आहे, सर्वांना मार्गदर्शन करण्याची माझी जबाबदारी आहे असे वाटत राहिले तर त्या कार्याची आसक्ती वाटेल. जिथे 'मी' पणा आणि आसक्ती असेल तिथे चित्त लिप्त राहील. ज्ञानी पुरुषाच्या ठायी अहंभाव नसल्यामुळे आसक्ती नाही आणि आसक्ती नसल्यामुळे चित्त अलिप्तच रहाते. चित्ताची लिप्तताच दु:खाचे कारण बनते.

3) **स: इमान् लोकान् हत्वा अपि:** तो सर्व लोकांचे हनन करुन सुध्दा - हनन करत असतांनासुध्दा - म्हणजे सदैव सर्व प्रकारच्या लोकांच्या संपर्कात रहात असूनही. इथे 'सर्व लोकांचे हनन करुन सुध्दा' या वाक्यांशाचा खरा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. याचा शब्दार्थ ग्रहण केला तर अनर्थच होऊन जाईल. ज्ञानी पुरुष अज्ञान्याप्रमाणे हिंसा करण्यात प्रवृत्त होऊन जाईल तर त्याचे महात्म्य शून्यच होऊन जाईल. ज्ञानवंताची प्रत्येक क्रिया सर्वांसाठी आदर्शरुप असायला हवी. जेणेकरुन अज्ञानी जन त्याचे अनुकरण करु शकतील. त्यापासून सदैव नवी प्रेरणा घेऊ

शकतील. यामुळे या वाक्यांशाचा शाब्दिक स्थूल अर्थ न घेता ज्ञानी पुरुषासाठीही आपण जर असे म्हणू लागलो की हा पुरुष खोटे बोलेल तरीही याला पातक लागणार नाही तर त्या पुरुषाच्या सत्याचरणाचा गौरवच केला असे मानले जाईल. यासोबतच आपण हेही लक्षात ठेवायला हवे की हे वाक्य भगवंताने विशिष्ट अशा पुरुषासाठी काढले आहेत. जो पुरुष कदापि वाचा मनसा - काया हिंसा करत नाही जो विकारमुक्त असतो अशी ज्या पुरुषाची असामान्य स्थिती आहे त्याच्यासाठी वरील वचन ईश्वराने प्रयुक्त केले आहे. याचा दुसरा व्यापक अर्थ असा आहे की ज्ञानी पुरुषाचा संबंध सर्व प्रकारच्या लोकांशी म्हणजे अगदी दुर्जनांशीही येतो. तर अशा सर्व वर्गातल्या, सज्जन - दुर्जन लोकांच्या संपर्कात राहूनही तो राग - द्वेषरहित, निर्विकार रहातो हे सांगणे भगवंताला अभिप्रेत आहे - अभीष्ट आहे. हाच मुद्दा पुढे सांगताहेत.

4) **न हन्तिः** तो हनन करत नाही म्हणजे त्याच्या चित्तात राग - द्वेष उत्पन्न होत नाही. अज्ञानी सज्जनांच्या संपर्कात रहात असला तरी प्रसंग उद्भवताच त्यांचे राग - द्वेष उभे ठाकतात - दुर्जनांच्या संपर्कात यायचा प्रसंग आला तर मग ते राग - द्वेषावर नियंत्रण राखूच शकत नाही. ज्ञानी पुरुषाच्या चित्तात सृष्टीबाबत मिथ्याभाव जागलेला असतो. सृष्टीतले नाना प्रकारचे जड - चेतन पदार्थ ईश्वराचीच वेगवेगळी रुपे आहेत अशी सत्यदृष्टी - यथार्थ दृष्टी त्यांना प्राप्त झालेली असते. यामुळे स्वभावतःच त्यांच्या चित्तात राग - द्वेष वगैरे विकार उत्पन्न होऊ शकत नाही. राग द्वेष उत्पन्न न झाल्यामुळे ज्ञानवंताचा व्यवहार सर्वांशीच पूर्ण अहिंसामय असतो.

5) **न निबध्यतेः** आणि राग द्वेष उभे न राहिल्यामुळे म्हणजे त्यांच्या अभावी तो बंधनात न फसता, मुक्तच रहातो. राग द्वेष उत्पन्न झाल्यावरच चित्त अस्थिर होते. ती स्थिती बंधनकारक असते. ज्ञानी पुरुषाच्या चित्तात कुठल्याही प्रकारे उकळी येतच नाही, भाव ऊतू जातच नाहीत, यामुळे त्याची स्वस्थता - स्थिरता - अखंड कायम रहाते, तो आतून बंधनरहितता अर्थात् मुक्ततेचा अनुभव घेतो.

: 18 :

***ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना।***
***करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ज्ञानंः** ज्ञान
- **ज्ञेयंः** जाणून घेण्यायोग्य
- **परिज्ञाताः** ज्ञाता, जीवात्मा
- **त्रिविधा कर्मचोदनाः** हे तीन कर्मांचे प्रेरक आहेत म्हणजे या तिन्हींच्या संयोगाने कर्मात प्रवृत्त होण्याची इच्छा उत्पन्न होत असते
- **करणंः** कर्मासाठी आवश्यक साधन
- **कर्मः** क्रिया, कर्ता - करणारा
- **कर्ताः** कर्ता म्हणजे करणारा
- **इति त्रिविधः कर्मसंग्रहः** हे तिन्ही कर्माचे संग्रह आहेत म्हणजे या तिन्हींच्या संयोगाने कर्म घडते

**अर्थ**

ज्ञाता (जाणणारा तो ज्ञाता), ज्ञान (ज्याच्या द्वारे जाणले जाते ते ज्ञान) आणि ज्ञेय (जी वस्तु जाणली जाते ती वस्तु ज्ञेय होय) या तीन प्रकारच्या कर्माच्या प्रेरणा आहेत आणि कर्ता (कर्म करणारा तो कर्ता) करण (ज्या साधनांनी कर्म केले जाते ते करण होय) तसेच क्रिया (करणे म्हणजे क्रिया) हे तीन प्रकारचे कर्म संग्रह आहेत म्हणजे या तिन्हींच्या संयोगाने कर्मात प्रवृत्त होण्याची इच्छा उत्पन्न होत असते.

***ज्ञाता ज्ञेय तसे ज्ञान तिहेरी कर्म - बीज हें।***
***क्रिया करण कर्तृत्व कर्मांगें तीन त्यांतुनी॥***

**विषयः** या श्लोकात आठ गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ज्ञान - म्हणजे जी गोष्ट अमलात आणायची आहे त्याचे आवश्यक ज्ञान. 2) ज्ञेय - अमलात आणली जाणारी गोष्ट. 3) परिज्ञाता - अमलात आणणारा - ज्ञाता, आत्मा, जीवात्मा. 4) कर्मचोदना - ही तीन प्रकारची कर्मप्रेरणा आहे. 5) करण म्हणजे आवश्यक साधन. 6) कर्म करणे म्हणजे क्रिया. 7) कर्ता म्हणजे क्रिया करणारा. 8) हा झाला तीन प्रकारचा कर्मसंग्रह.

**स्पष्टीकरण**

1) **ज्ञानम्:** जी गोष्ट अमलात आणायची आहे वा करायची आहे त्याविषयीचे आवश्यक ज्ञान. या श्लोकात कर्मचोदना म्हणजे मानसिक ज्ञानविधी आणि कर्मसंग्रह म्हणजे प्रत्यक्ष कर्मविधी सांगितलेली आहे. कुठलीही गोष्ट करायची असेल, अमलात आणायची असेल तर आधी मानसिक क्रिया होते. आपल्याला सूत कातायचे आहे असा मानसिक निश्चय केल्यावरही कताईच्या ज्ञानाअभावी प्रत्यक्ष सूत कताई शक्य नाही. ज्ञान मनात असते.

2) **ज्ञेयम्:** ज्ञेय म्हणजे जी गोष्ट आपल्याला तयार करायची आहे, अमलात आणायची आहे ती गोष्ट. सूत कताईचे  ज्ञान प्राप्त केले मग मनात सूत कताईचा निश्चय करावा लागेल. हे ज्ञेय होय. आपल्याला जे ध्येय प्राप्त करायचे आहे त्याचे ज्ञान व ते प्राप्त करायचे आहे असा निश्चय करुन त्याला वारंवार मनात आणणे ज्ञेय.

3) **परिज्ञाता:** जे ज्ञान प्राप्त करायचे आहे आणि जो ज्ञेयाचा निश्चय करतो - ठरवतो - तो परिज्ञाता म्हणजे जाणणारा, 'जीव' आहे. या तिन्ही गोष्टी मनात असतात म्हणून

4) **त्रिविधा कर्मचोदना:** अशा प्रकारे ही तीन प्रकारची कर्म चोदना म्हणजे कर्म प्रेरणा आहे. म्हणजे कुठलीही गोष्ट अमलात आणायची असेल, कुठलीही गोष्ट करायची असेल तर उपर्युक्त तीन गोष्टी आवश्यक आहेत. ही मानसिक ज्ञानविधी आहे - ही कर्म करण्यापूर्वी आवश्यक आहे. या मानसिक ज्ञानविधीसाठी गीतेत 'कर्मचोदना' हा पारिभाषिक शब्द प्रयुक्त झाला आहे.

5) **करणम्:** म्हणजे साधन. प्रत्यक्ष कसली निर्मिती करायची असेल तर आवश्यक साधन हवे. सूतकताईचे ज्ञान आपण संपादित केले, आपल्याला रोज सूत कताई करायची आहे हे ज्ञेय सदा समोर बाळगले आणि आपण सूतकताईचे ज्ञान राखणारे ज्ञाता जीव आहोतच पण प्रत्यक्षात सूत कताई करण्यासाठी चरखा, टकळी, पेळू वगैरे साधने आवश्यक आहेत.

6) **कर्म:**  प्रत्यक्ष वस्तु तयार करायची क्रिया. चरखा वगैरे सर्व साधने एकत्रित केलीत पण प्रत्यक्षात सूतकताई सुरुच केली नाही तर सूत तयार होणार नाही आणि चरखा वगैरे साधने व्यर्थ होऊन जातील. यामुळे साधने गोळा केल्यावर प्रत्यक्ष क्रिया करायची असते.

7) **कर्ता:** वस्तु बनवणारा कर्ता. सूतकताईचे ज्ञान आपण संपादित करुन घेतले म्हणजे सूतकताईचे आपण ज्ञाते बनून गेलो पण कर्ता बनू तेव्हाच सूतकताईचे कर्म सुरु होईल. कर्ता बनून, साधने गोळा करुन प्रत्यक्ष सूत कताईचे कर्म करु तेव्हा कर्मसंग्रह शब्द प्रयुक्त करु शकतो. हाच मुद्दा पुढे मांडताहेत.

8) **इति त्रिविध: कर्मसंग्रह:** अशाप्रकारे तीन प्रकारचा हा कर्मसंग्रह म्हणजे प्रत्यक्ष करणे, त्याला अमलात आणायची ही कर्मविधी झाली. कर्मचोदना म्हणजे मानसिक ज्ञान क्रिया. कर्मसंग्रह म्हणजे प्रत्यक्ष शारीरिक क्रिया. मानसिक ज्ञान क्रिया तीन प्रकारची सांगण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कर्म करायची क्रियाही तीन प्रकारची वर्णिली आहे. 1) कातणारा ज्ञाता. 2) कताईचे ज्ञान. 3) कताई करायचे ध्येय वा लक्ष्य म्हणजे ज्ञेय. ही मानसिक ज्ञान - त्रिपुटी आहे. सूतकताईचा जो ज्ञाता आहे तो 1) तोच कर्ता बनतो. 2) तोच करण म्हणजे साधने गोळा करतो. 3) आणि तोच सूतकताईचे काम करतो ही आहे  कर्म -त्रिपुटी.

: 19 :

*ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदत: ।*
*प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **गुणसंख्याने:** तीन गुणांची गणना करणाऱ्या सांख्यशास्त्रात
- **ज्ञानं च कर्म च कर्ता:** ज्ञान, कर्म आणि कर्त्याच्या संदर्भात, संबंधात
- **गुणभेदत:** तीन गुणांच्या भेदाने
- **त्रिधा एव:** तीनच प्रकारांनी
- **यथावत् प्रोच्यते:** ज्याप्रकारे सांगितले आहे
- **तानि अपि श्रृणु:** त्यांनाही तू माझ्याकडून ऐक

**अर्थ**

गुणांची संख्या करणाऱ्या शास्त्रात ज्ञान, कर्म आणि कर्ता हे गुणांच्या भेदाने तीन-तीन प्रकारचेच सांगितले आहेत. तेही तू माझ्याकडून नीट ऐक.

***ज्ञाना - कर्मांत कर्त्यांत त्रिगुणीं तीन भेद जे ।***
***रचिले ते कसे ऐक गुण - तत्वज्ञ वर्णिती ॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत. 1) तीन गुणांची गणना करणाऱ्या सांख्यशास्त्रात. 2) ज्ञान, कर्म आणि कर्त्याच्या संबंधात. 3) तीन गुणांच्या प्रकारांनी ज्याप्रकारे तीन - तीन प्रकार सांगितले आहेत. 4) त्यांनाच तू माझ्यामार्फत ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **गुणसंख्याने:** तीन गुण आणि पंचवीस तत्वांची गणना करणाऱ्या शास्त्रात. इथे कपिल महामुनींच्या सांख्यशास्त्राचा आधार घेतला गेला आहे. गीतेची दृष्टी समन्वयकारी आहे. कुठल्या शास्त्र वा कुण्या विचाराचा निषेध न करता योग्य विचाराला अंगिकारण्याची विशाल दृष्टी म्हणजे समन्वय होय. सांख्यशास्त्रात सृष्टीला त्रिगुणात्मिका प्रकृतीचे कार्य मानले गेले आहे. या विषयाला तेराव्या अध्यायात मांडून चौदाव्या अध्यायात तीन गुणांचे विश्लेषण करुन त्यांच्या कार्याच्या संदर्भात सविस्तरपणे समजाऊन सांगितले आहे. सांख्यशास्त्रानुसार पंचवीस तत्वे पुढीलप्रमाणे आहेत 1) पुरुष - ज्याला वेदान्तात 'आत्मा' म्हटले आहे. 2) प्रकृती - ही सत्व, रज आणि तम या तीन गुणांनी संपन्न आहे. यातून महान म्हणजे बुध्दी, अहंकार आणि पाच सूक्ष्म तन्मात्रा (शब्द, रुप, रस, गंध आणि स्पर्श) मिळून सात विकार उत्पन्न होतात, मग मन, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि पाच महाभूते असे सारे मिळून सोळा विकार उत्पन्न होतात. अशा प्रकारे पुरुष, प्रकृती आणि प्रकृतीने उत्पन्न केलेले तेवीस विकार मिळून पंचवीस तत्वे आहेत.

2) **ज्ञानं च कर्म च कर्ता:** ज्ञान, कर्म आणि कर्त्याच्या संबंधात. सांख्यशास्त्रात पंचवीस तत्वांप्रमाणे ज्ञान, कर्म आणि कर्ता, भोक्त्याच्या बाबतीतही विवेचन आले आहे. सृष्टीच्या उत्पत्तीचे रहस्य समजावले आहे. हे समजावून सांगितले आहे की सृष्टी आणि देह वगैरेची आसक्ती पुरुषाच्या मनात उत्पन्न होऊन तो कशा प्रकारे कर्ता बनून जातो. कर्ता बनून सात्विक, राजस, तामस कर्मे कशाप्रकारे करतो, हे सांगितले आहे. यातून मुक्त होण्यासाठी ज्ञान कशाप्रकारे प्राप्त होऊ शकते, हेही समजावले आहे.

3) **गुणभेदत:** त्रिधा एव यथावत् प्रोच्यते तीन गुणांचे प्रकार - सात्विक, राजस, तामस असे तीन प्रकारे सांगितले गेले आहेत. सत्व, रज, तम हे तीन गुण परस्परांहून भिन्न आहेत. तिघांची कार्ये भिन्न आहेत. तिघांचे स्वरुप भिन्न आहे. गीतेच्या चौदाव्या अध्यायात त्यांचे स्वरुप, कार्य, गती, फळांचे सविस्तरपणे वर्णन येते पण तिथे असे म्हटले गेले आहे की सत्वगुणांच्या प्राबल्याने उत्कर्षाने - ज्ञान प्राप्त होते. तरीही असे सांगितले नाही की सात्विक ज्ञान, राजस ज्ञान, तामस ज्ञान म्हणजे काय आणि त्यांची लक्षणे काय आहेत? तसेच कर्म आणि कर्त्याच्या संदर्भातही सात्विक, राजस, तामस अशा प्रकारे तीन प्रकारांचे वर्णन नसल्यामुळे इथे सांख्यशास्त्राच्या अनुसार ज्ञान, कर्ता आणि कर्मांच्या बाबतीत तीन प्रकारचे स्वरुप वर्णन करताहेत.

4) **तानि अपि श्रृणु:** ते तू माझ्याकडून ऐक. सांख्यशास्त्रात ज्या प्रकारे ज्ञान, कर्म, कर्त्याचे सात्विक, राजस आणि तामस या भेदानुसार तीन प्रकारचे वर्णन आहे, तसेच मी समजाऊन सांगेन. त्यापेक्षा भिन्न स्वतंत्रपणे काहीही सांगणार नाही. या कथनाद्वारे भगवंताच्या विनम्रतेच्या पराकाष्ठेचे दर्शन होऊन जाते. ज्ञानी पुरुषाच्या ठायी निरहंकारितेचे प्राबल्य जागल्यामुळे विनम्रतेचे दर्शन होणे स्वाभाविक आहे.

: 20 :

***सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।***
***अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विध्दि सात्त्विकम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विभक्तेषु सर्वभूतेषु:** भिन्न - भिन्न सर्व भूतमात्रांच्या ठायी
- **येन एकं अविभक्तं अव्ययं भावं:** ज्यामुळे एका, अभिन्न अविनाशी भावाला
- **ईक्षते:** बघतो

- **तत् ज्ञानं सात्त्विकं विध्दि:** त्या ज्ञानाला सात्विक माना

**अर्थ**

ज्या ज्ञानामुळे माणूस 'निरनिराळ्या सर्व भूतांमध्ये एक अविनाशी परमात्मभाव विभागरहित समभावाने भरुन राहिला आहे' असे पाहतो, ते ज्ञान तू सात्विक आहे असे समज.

***भूत - मात्रांत जें पाहे भाव एक सनातन ।***
***अभिन्न भेदलेल्यांत जाण तें ज्ञान सात्त्विक ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) भिन्न-भिन्न भूतमात्रांच्या ठायी. 2) ज्यातून एका अभिन्न, अविनाशी भावाला बघतात. 3) ते ज्ञान सात्विक ज्ञान जाणावे.

**स्पष्टीकरण -**

1) **विभक्तेषु सर्वभूतेषु:** भिन्न- भिन्न सर्व भूतमात्रांच्या ठायी म्हणजे मनुष्य, पशु, पक्षी वगैरे चैतन्यमय आणि अचेतन पदार्थांच्या ठायी भगवान एका अद्भुत विशाल सृष्टीची चर्चा करताहेत. सृष्टी कशी आहे? एक वस्तु दुसऱ्या वस्तुपेक्षा भिन्न दिसते. एकाच माता - पित्याच्या लेकरांमध्येही काही साम्य दिसत नाही. पशु, पक्षी वगैरे अगणित चैतन्यसंपन्न जीवांच्या ठायी कमालीचे अंतर दिसते. एकाचा दुसऱ्याशी मेळ करता तो नाहीच तशाच प्रकारे असंख्य जड पदार्थामध्येही भिन्नता आहे.

2) **येन एकं अविभक्तं अव्ययं भावं ईक्षते:** ज्या ज्ञानाने एक, अभिन्न, अविनाशी भाव वा परमात्म वस्तुला बघतो. ब्रह्मांडातले पदार्थ जर एक दुसऱ्याला सत्य मानतील तर ते यथार्थ ज्ञान म्हणता येणार नाही कारण की त्यांच्यातील भिन्नता काही खरी नाही. पदार्थ परिवर्तनशील आहेत. ज्या पदार्थात मुळीच परिवर्तन होत नाही त्याला 'सत्य' मानू शकतो. सतत परिवर्तनशील पदार्थ सत्य नाहीत. अशाप्रकारे पिंड - ब्रह्मांडात्मक संपूर्ण जगत् भासमात्र आहे. ज्याच्या आधारे हा भास होतो तो परमात्मा मात्र परिवर्तनशील नाही. तो नित्य, चेतनस्वरुपी, अपरिवर्तनशील आहे. ज्याला ईश्वराचे दर्शन घडले म्हणजे अनुभव मिळाला तो ब्रह्मांडाला ईश्वर दृष्टीनेच बघतो. यामुळे त्याचे चित्त राग - द्वेषरहित, निर्विकार राहील. साधक दशेतही ईश्वर दृष्टीने सारे व्यवहार करायचे ध्येय बाळगले तर चित्त निर्विकार राहील. शांततेचा अनुभव लाभेल.

3) **तत् ज्ञानं सात्त्विकं विध्दि:** त्या ज्ञानाला सात्विक ज्ञान समजावे. दृश्यमान पिंड - ब्रह्मांडात्मक जगाला सत्य मानणे काही यथार्थ ज्ञान नाही. ईश्वरच सत्य आहे हे ज्ञान आचरण सर्व व्यवहारातून टिकून राहिले तर ते ज्ञान खरे आहे असे मानावे. यालाच 'सात्विक ज्ञान' असे म्हणतात.

: 21 :

***पृथक्त्वेन तु तज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान् ।***
***वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विध्दि राजसम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु सर्वेषु भूतेषु:** पण सर्व भूतांमध्ये
- **यत् ज्ञानं:** जे ज्ञान
- **पृथग्विधान् नानाभावान्:** अनंत पदार्थांना
- **पृथक्त्वेन वेत्ति:** भिन्न रुपांनी जाणते
- **तत् ज्ञानं राजसं विध्दि:** ते राजस ज्ञान समज

**अर्थ**

परंतु ज्या ज्ञानाने मनुष्य सर्व भूतांमध्ये भिन्न-भिन्न प्रकारांचे अनेक भाव वेगवेगळे जाणतो ते ज्ञान तू राजस समज.

***भेद - बुध्दीस पोषूनि सर्व भूतांत पाहतें ।***
***वेगळे वेगळे भाव जाण तें ज्ञान राजस ॥***

**विषय:** या श्लोकात मागील श्लोकाप्रमाणेच तीन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) पण सर्व भूतांच्या ठायी. 2) जे ज्ञान - भिन्न - भिन्न, अनंत पदार्थांना भिन्न रुपाने जाणते. 3) त्या ज्ञानाला 'राजस' समजावे.

**स्पष्टीकरण**

1) **तु सर्वेषु भूतेष:** पण तमाम भूतमात्रांच्या ठायी म्हणजे जड - चेतन समस्त पदार्थांमध्ये विसाव्या

श्लोकातही हा शब्द प्रयुक्त केला आहे. तिथे या संबंधीचे विवेचन केले गेले आहे.

2) **यत् ज्ञानं पृथग्विधान नानाभावान् पृथक्त्वेन वेत्ति:** जे ज्ञान भिन्न - भिन्न, अनंत पदार्थांना भिन्न रुपात जाणते. सात्विक ज्ञान प्राप्त झाले म्हणजे जगताला सत्य मानून व्यवहार करायची मिथ्या दृष्टी दूर होऊन जाते आणि सत्य दृष्टी प्राप्त होते पण राजस ज्ञानात जगाला बघायची मिथ्या दृष्टी कायम रहाते. या मिथ्या दृष्टीला हटवण्याचे सामर्थ्य राजस ज्ञानाच्या ठायी नाही. सगळी प्रजा राजस ज्ञानातच फसली आहे. यामुळे व्यवहारात दु:खाचाच अनुभव येतो. जगत्रुपी कार्य ईश्वररुपी कारणाहून भिन्न नाही पण जगाला ईश्वर दृष्टीने न बघता जगाच्या भिन्नतेला सत्य मानणे राजस ज्ञान आहे.

3) **तत् ज्ञानं राजसं विध्दि:** त्या ज्ञानाला राजस समजावे. जगत जसे दिसून येते - दिसते - त्याच रुपात ते सत्य आहे असे समजणे - मानणे - ही चुकीची दृष्टी आहे. यामुळे अशा ज्ञानाला 'राजस' ज्ञान म्हटले जाते - गेले आहे.

: 22 :

*यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहैतुकम् ।*
*अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु एकस्मिन् कार्ये:** पण एका कार्यातच
- **यत् ज्ञानं:** जे ज्ञान
- **कृत्स्नवत् सक्तं:** सर्व काही आहे, असे समजून - मानून आसक्त होतो
- **च अहैतुकम्:** आणि जे तर्कशून्य म्हणजे युक्तीहीन
- **अतत्त्वार्थवत्:** सिध्दांतहीन
- **अल्पम्:** संकुचित, अव्यापक, तुच्छ आहे
- **तत् तामसं उदाहृतम्:** ते ज्ञान तामस म्हणवले जाते

**अर्थ**

परंतु जे ज्ञान एका कार्यरुपी शरीरातच पूर्णासारखे आसक्त असते, तसेच जे युक्तिशून्य, तात्विक अर्थाने रहित आणि तुच्छ असते ते तामस म्हटले गेले आहे.

*एका देहांत सर्वस्व मानुनी गुंतलें वृथा ।*
*भावार्थ - हीन जें क्षुद्र जाण तें ज्ञान तामस ॥*

**विषय:** या श्लोकात तामस ज्ञानाची पाच लक्षणे वर्णिली आहेत. 1) पण एक कार्य म्हणजे आपल्या एका देहात आणि एका कुटुंबातच सारे काही आहे असे मानून जे ज्ञान त्यातच आसक्ती उत्पन्न करते. 2) आणि जे तर्कशून्य, प्रमाणरहित आणि काल्पनिक आहे. 3) सिध्दांतहीन. 4) संकुचित अत्यंत मर्यादित - सीमित आहे. 5) ते ज्ञान 'तामस' ज्ञान म्हटले जाते.

**स्पष्टीकरण**

1) **तु एकस्मिन् कार्ये यत् ज्ञानं कृत्स्नवत् सक्तम्:** पण जो एका कार्यात म्हणजे आपल्या एका शरीर आणि आपल्या एका कुटुंबातच जे ज्ञान सारे काही आहे असे मानून त्यातच आसक्ती उत्पन्न करतो. शरीराविषयीची आसक्ती बहुधा सर्वांच्या ठायी असते. ज्यांना ही आसक्ती असल्याचे खटकते ते यापासून मुक्त होण्याचा वा किमान कमी तरी करण्याचा प्रयत्न करतात पण अशीही मंडळी असते ज्यांना देहासक्ती ही खटकणारी बाबच वाटत नाही. इथे आसक्तीप्रिय जनांचे वर्णन आहे. हे देहाला सर्वस्व मानून नित्य भोगात मग्न असतात. जे देहाला भोगाचे साधन मानतात, त्यांची कक्षा कुटुंबापुरतीच मर्यादित स्वरुपाची असते कारण की कुटुंबाशी संबंध राखण्यामागेही दृष्टी ही भोगाचीच असते. पत्नी भोगांना तृप्त करते यामुळे पत्नी प्रिय असते पण काही कारणास्तव जर भोग भोगू न शकण्याची परिस्थिति उत्पन्न झाली तर ती निष्ठा, ते प्रेम उरत नाही. असा पुरुष अन्य महिलांशी संबंध राखायला प्रवृत्त होतो अर्थात् जीवनात भोगप्रधान दृष्टी मुख्य असल्यावर नीती, निष्ठा वा धर्मनिष्ठेचे काही मूल्य उरत नाही. यामुळे सांगतात की भोगालाच सर्वस्व मानून जे ज्ञान देह आणि कुटुंबातच आसक्ती जागवून त्यातच माणसाला बुडवून ठेवते ते तामस ज्ञान होय.

2) **च अहैतुकम्:** आणि जे ज्ञान, तर्कशून्य, प्रमाणरहित, काल्पनिक आहे. जे ज्ञान केवळ देह आणि कुटुंबाच्या आसक्तीत बुडवून ठेवते. त्यासाठी तर्काचा कुठलाही आधार नाही. नीती - अनीती, धर्म - अधर्म, योग्य - अयोग्य याबाबत ज्यांच्या मनात अखंडपणे विचार असतो आणि या दिशेने जो अखंड चिंतनशील असतो

त्याचे ज्ञान तर्कयुक्त असते. माणूस जर चिंतनशील असला तर त्याच्या हे सहजपणे ध्यानात येऊ शकते की मनुष्य देह भोग भोगण्यासाठी लाभलेला नाही. ज्ञान नित्य तर्कशुध्द असायला हवे. तर्काचा आधार नसला तर ज्ञान अप्रमाण असल्याचे सिध्द होईल. ज्या ज्ञानाला तर्काचा आधार वा अधिष्ठान नसेल ते काल्पनिक वा मिथ्याच असेल.

3) **अतत्त्वार्थवत्:** सिध्दांतहीन, नि:सार, वरवरचा, उथळ. ज्या ज्ञानाला तर्काचा आधार नसेल ते सिध्दांतशून्यच असेल. तर्काच्या आधारेच सिध्दांताचा निर्णय होतो - निश्चय होतो. ब्रह्मसूत्र भाष्य सांगतांना शंकराचार्यांनी श्रुती अनुकूल तर्कसंगत आध्यात्मिक सिध्दांत निश्चित केले आहेत. ब्रह्मांडाचे मूळतत्व इंद्रियातीत आहे. यामुळे त्याच्या स्वरुपाविषयी केवळ तर्कांचा आधार देऊन भागत नाही. यामुळे श्रुतीचा आधार घ्यावा लागतो. काही ज्ञानी महात्मा पुरुषांनी इंद्रियातीत अशा परमात्म्याचा अनुभव घेतला आहे. त्यांच्या अनुभवावर आधारीत तर्क केला तर योग्य त्या निर्णयाप्रत पोहोचता येते. इंद्रियगम्य वस्तुच्या बाबतीतही आपण प्रत्यक्ष जीवनात आलेल्या अनुभवांच्या आधारेच तर्क करतो पण इंद्रियगम्य वस्तुविषयीचा प्रत्येकाचा अनुभव वेगवेगळा असतो, त्यामुळे तर्काच्या बाबतीतही भिन्नता राहू शकते.

4) **अल्पम्:** संकुचित, अत्यंत मर्यादित. केवळ देहाशीच संबध्द असल्यामुळे हे ज्ञान काही व्यापक होऊ शकत नाही. ते कमालीचे मर्यादित, संकुचित असते. अत्यंत मर्यादित स्वरुपाचे असल्यामुळे या ज्ञानात सत्यांश कमीच असतो. जे ज्ञान सत्याधारित नसेल ते अप्रमाण असल्यामुळे त्यात सत्य अल्पच राहील. सत्याधारित ज्ञानाच्या प्रकाशातच योग्य मार्गदर्शन लाभणे शक्य आहे. यामुळे चिंतनाचा आधार शरीर न मानता आत्मा मानायला हवे. आत्मतत्वच सत्य आहे. देहाच्या आधारे जे चिंतन असेल ते भ्रांतीमूलक असल्यामुळे कल्याणकारी असू शकत नाही.

5) **तत् तामसं उदाहृतम्:** त्या ज्ञानाला तामस म्हणतात. तामस म्हणजे अवनत करणारा, अधोगामी, जीवनाला नष्ट करणारे ज्ञान होय. तामस ज्ञान माणसाला भ्रांत करते - भ्रमित राखते. यामुळे या ज्ञानामुळे जीवन अखेरीस नष्टच होते हे काही माणसाच्या लक्षात येत नाही. यामुळे तमोगुणापासून वाचायला हवे.

: 23 :

***नियतं संगरहितमरागद्वेषत: कृतम् ।***
***अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् नियतं कर्म:** जे प्रवाहपतीत कर्म
- **अफलप्रेप्सुना:** फळाची आसक्ती न बाळगणाऱ्यांपासून
- **अरागद्वेषत:** राग, द्वेष रहित
- **संगरहितं:** आसक्ती न राखता म्हणजे कर्तेपणाचा अभिमान सोडून
- **कृतं:** केले जाते
- **तत् सात्त्विकं उच्यते:** ते कर्म सात्विक म्हटले जाते

**अर्थ**

जे कर्म प्रवाहपतीत म्हणजे शास्त्रविधीने नेमून दिलेले असून कर्तेपणाचा अभिमान न बाळगता फळाची इच्छा न करणाऱ्या माणसाने राग-द्वेष सोडून केलेले असते ते सात्विक म्हटले जाते.

***नेमिलें जें न गुंतूनि राग - द्वेष न राखतां ।***
***केलें निष्काम - वृत्तीनें कर्म तें होय सात्त्विक ॥***

**विषय:** या श्लोकात सात्विक कर्माविषयी पाच गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) जे प्रवाहपतीत कर्म, 2) फलाकांक्षा न राखणाऱ्यांपासून. 3) राग - द्वेषरहित. 4) कुठल्याही वस्तुची आसक्ती न राखता केले जाते. 5) ते सात्विक कर्म होय.

**स्पष्टीकरण**

1) नियतं कर्म: कर्म प्रवाहपतीत, ईश्वरप्रेरित असावे. कर्म सात्विक असायला हवे याकडे सारखे लक्ष पुरवले जायला हवे. सात्विक कर्मे आचरुन अहंकाराला क्षीण करायचे आहे, शून्यतेचा अनुभव घ्यायचा आहे, यामुळे सात्विक कर्मात आवड - निवड असायचा प्रश्नच नाही. सात्विक कर्माच्या बाबतीत हे मला आवडणारे आहे आणि हे नावडणारे आहे - प्रिय आहे आणि अप्रिय आहे. म्हणजे मी सफाईचे काम वा सार्वजनिक कामासाठी वर्गणी गोळा करायचे काम वा स्वयंपाकाचे काम कदापि करणार नाही,

मला कार्यालयात बसून लेखनकाम वा हिशोबनीसाचे काम वा प्रचारकाचे काम मिळणार असेल तरच करीन. अशा प्रकारच्या आवडीमुळे अहंकार वा जीवभाव क्षीण होण्याऐवजी पुष्ट होतो.

2) **अफलप्रेप्सुना:** फळाची आसक्ती न राखणाऱ्यांपासून, एकदा का अहंकार क्षीण करण्याचे ध्येय मनापुढे असले तर सहजच फलासक्ती सुटून जाते. मी देहरुप नाही हे लक्षात आल्यावर मला फळ हवे हा विचार मनातून निघून जाईल कारण की मी देहरुप नाही याचा अर्थ मी आत्मस्वरुप आहे, परमात्मस्वरुप आहे, परमात्म्याहून वेगळा नाही. म्हणजे माझे स्वतंत्र अस्तित्व नाही उरले. मग फलाकांक्षा कशी राहील? तृष्णा कशी उरेल? वासना कशी शिल्लक राहील? मी जर ईश्वररुप झालो तर फळाची इच्छा उरणारच नाही. ईश्वराला का कुठे फळाची इच्छा असते ? यामुळे फलासक्ती सोडायचा अर्थ आहे अहंकार संपून जाणे. जीवभाव लयाला जाणे.

3) **अरागद्वेषत:** राग - द्वेष रहित, काम, क्रोध वगैरे विकारांपासून मुक्त. अहंकार रहित चित्तात काम - क्रोध वगैरे विकारही उरत नाही. अहंकाराला क्षीण करण्यासाठी आपण भगीरथ प्रयत्न करतो त्याचप्रमाणे राग - द्वेष क्षीण करायचेही प्रयत्न अखंड जारी राखायला हवेत, याचा विसर पडता कामा नये. दोन्ही प्रयत्न हातात हात घालून चालत रहायला हवेत. व्यवहारात जर इच्छेनुसार कामे घडली नाहीत तर द्वेष म्हणजे क्रोध विकार उत्पन्न होतो. पंचविषय सेवनाची इच्छा कायम असते. इच्छा तृप्त झाली तर लोभवृत्ती जागृत होते आणि लोभाची तृप्ती झाली नाही तर क्रोध वृत्ती जागृत होते.

4) **संगरहितं यत् कृतम्:** कुठल्याही प्रकारची आसक्ती न राखता जे केले जाते. आसक्ती सत्याप्रती असायला हवी. मिथ्या वस्तुबाबत आसक्ती असेल तर चित्ताला शांततेचा अनुभव कसा व्हावा? मृगजळाने का तहान भागेल? त्याचप्रकारे जगत् सत्य नसून मिथ्या आहे - अशी प्रतीती आल्यावरही आपण जर जगाची आसक्ती सोडायला तयार नसू, प्रयत्नशील रहाणार नसू तर अशांततेचाच अनुभव येईल. यामुळे असे प्रयत्न करायला हवेत की सत्य ईश्वराची आसक्ती असावी आणि जगत्, नातलग, पंचविषयांची आसक्ती न राहो.

5) **तत् सात्त्विकं उच्यते:** ते कर्म सात्विक आहे. सात्विक कर्मे आसक्तीपूर्वक आणि अनासक्तीपूर्वक करता येतात. पण इथे असे सांगताहेत की जे कर्म राग -द्वेष रहित होऊन, फळासक्ती आणि अहंकार न बाळगता केले जाते तेच सात्विक होय. माणसाला विकासाठायी, उन्नतीकामी, ऊर्ध्वारोहणाकामी सहायक होणारे कर्म सात्विक असल्यामुळे दुसऱ्या अध्यायातील 45 व्या श्लोकात भगवंताने अर्जुनाला नित्यसत्वस्थ: होण्यासाठी सांगितले आहे.

: 24 :

***यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुन: ।***
***क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **तु यत् कर्म:** पण जे कर्म
- **कामेप्सुना:** फळासक्ती राखणाऱ्यांपासून
- **वा पुन: साहंकारेण:** आणि परत अहंकार युक्त होऊन
- **बहुलायासं क्रियते:** खूप प्रयत्नपूर्वक केले जाते
- **तत् राजसं उदाहृतम्:** ते राजस आहे

**अर्थ**

परंतु जे कर्म अतिशय परिश्रमपूर्वक तसेच भोगांची इच्छा करणाऱ्या किंवा अहंकार बाळगणाऱ्या माणसाकडून केले जाते ते राजस म्हटले गेले आहे.

***धरुनि कामना चित्तीं जें अहंकार - पूर्वक ।***
***केलें महा खटाटोपें कर्म तें होय राजस ॥***

**विषय:** या श्लोकात राजस कर्माविषयी चार गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) पण जे कर्म फलासक्तीपूर्वक. 2) अहंकारयुक्त होऊन. 3) खूप प्रयत्नपूर्वक केले जाते. 4) ते राजस कर्म होय.

**स्पष्टीकरण**

1) **तु यत् कर्म कामेप्सुना:** पण कर्मफळाची आसक्ती राखून - कर्म करताना आपली दृष्टी फलप्राप्तीची असते.

कर्माशी फळ संलग्न असते. कर्माचे फळ दोन प्रकारे लाभते. 1) बाह्य आणि 2) आंतरिक. शेतात धान्य पेरले तर त्याचे फळ अनेक पटींनी मिळेल हे झाले बाह्य फळ. सुख वा दु:खाचा अनुभव हे झाले आंतरिक फळ. पेरणी केल्यावर चांगला पाऊस झाला. उत्तम पीक आले. तर आनंद होईल, सुख लाभेल पण पाऊस झाला नाही तर हाती काहीही लागणार नाही. पाऊस कमी झाला तर कमी पीक येईल. सारीच शेती वाया गेली तर खूप दु:ख होईल. अशा प्रकारे बाह्य फळ प्राप्तीवर आंतरिक सुख होईल. अशा प्रकारे बाह्य फळ प्राप्तीवर आंतरिक सुख - दु:खाचा अनुभव अवलंबून असतो.

2) **वा पुन: साहंकारेण:** आणि परत अहंकारयुक्त होऊन. माणूस ज्याप्रमाणे फलासक्ती बाळगून कर्म करतो त्याचप्रमाणे अहंकार बाळगूनही करतो. फळ इतराला लाभो अशी फलासक्ती असू शकते. सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या ठायी सामुदायिक फळाची आसक्ती असते पण अशा फलासक्तीतही मी करत आहे हा अहंकार कायम असतोच. मी सत्कर्म करत आहे वा रात्रंदिवस जेवढे काम करतो तेवढे कदाचितच कुणी करत असेल. अशा प्रकारे मनी भाव वसतो. चैतन्याशिवाय हे शरीर जिवंत राहू शकत नाही, हा विचार मात्र कधी मनात येत नाही. यामुळे खरे तर प्रत्येक सत्कर्माचा संबंध ईश्वराशी जोडायला हवा. ईश्वराला विसरुन काम केल्याने अहंकार संपू शकत नाही.

3) **बहुलायासं क्रियते:**खूप आयास म्हणजे खूप प्रयत्नांनी. फलासक्ती आणि अहंकारपूर्वक तर कामे करतोच. कर्म करायची सर्वांची पध्दतही बहुधा सव्यापसव्य करणारी असते. अधीरता जागल्यावर मन अशांत होऊन जाते. यामुळे कर्मात अधूरेपणा रहातो. सुयोग्य प्रकारे काम करण्यासाठी मन स्वस्थ, स्थिर असले पाहिजे.

4) **तत् राजसं उदाहृतम्:** ते कर्म राजस म्हटले जाते. उपर्युक्त तीन लक्षणांनी युक्त कर्म राजस होय. अधिकांश लोक राजस कर्मेच आचरतात. सात्विक आणि तामस कर्मे करणारे कमीच असतात. चंचळता हे रजोगुणाचे, स्थिरता हे सत्वगुणाचे आणि जडता हे तमोगुणाचे लक्षण होय.

: 25 :

*अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।*
*मोहादारभ्यते कर्म यत् तत् तामसमुच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अनुबंधं:** परिणाम
- **क्षयं:** हानी
- **हिंसां:** हिंसा
- **च पौरुषम्:** आणि सामर्ध्य
- **अनपेक्ष्य:** (या विषयी) विचार न करता
- **मोहात्:** मोहवश, केवळ अज्ञानाने
- **यत् कर्म आरभ्यते:** जे कर्म आरंभ केले जाते.
- **तत् तामसं उच्यते:** ते तामस कर्म म्हटले जाते

**अर्थ**

जे कर्म परिणाम, हानी, हिंसा आणि सामर्थ्य यांचा विचार न करता केवळ अज्ञानाने केले जाते ते तामस होते.

*विनाश वेंच निष्पत्ति सामर्थ्य हि न पाहतां ।*
*आरंभिलें चि जें मोहें कर्म तें होय तामस ॥*

**विषय:** या श्लोकात तामस कर्माविषयी सहा गोष्टींची चर्चा आली आहे. 1) फलनिष्पती आणि परिणाम. 2) शक्तीचा, धनाचा क्षय. 3) आपली आणि समाजाची हिंसा. 4) आणि आपल्या सामर्थ्याविषयी - पुरुषार्थ वगैरेविषयी विचार न करता. 5) मोहाधीन होऊन जे कर्म केले जाते. 6) त्या कर्माला तामस कर्म म्हणतात.

**स्पष्टीकरण**

1) **अनुबंधम्:** फलनिष्पती आणि पुढे - मागे समाजावर होणारा परिणाम. या श्लोकात तामस कर्माची लक्षणे वर्णिली आहेत. तामस कर्म अधोगामी आहेत. त्यामुळे अवनतीच होईल. यामुळे राजस आणि तामस कर्माची फळे त्यागायचीच गोष्ट सांगितलेली आहे. कर्म करण्यापूर्वी याचे काय फळ मिळेल याचा विचार करणे गरजेचे आहे. अन्यथा विचार न करताच कर्म केल्यावर भरपूर त्रास, नुकसान आणि दु:खाचा सामना करावा लागेल. यामुळे खूप विचारपूर्वकच कर्म करायचा सराव करावा लागेल. आपल्या वाईट सवयींमुळे लेकरे,

कुटुंबीजन, आजूबाजूचा समाज यावर केवढा परिणाम होईल याविषयी जर मी अजिबात विचार करत नसेन तर समाजाचे अकल्याण साधायचे, अवनती करायचे मी निमित्त बनेन. तामसी स्वभावाच्या - प्रकृतीच्या - माणसाची भूमिका विवेकसंपन्न नसल्यामुळे तो फळ आणि समाजाच्या कल्याण - अकल्याणाविषयी - भल्या - बुऱ्याविषयी विचार न करताच कर्मे करतो - कर्मे करत असतो.

2) **क्षयम्:** शारीरिक शक्ती आणि धनाचा अपव्यय म्हणजे क्षय - हानी. तामसी व्यक्ती आपल्या शक्तीचा म्हणजे शारीरिक क्षमतेचाही विचार करत नाही. जनसेवा करणाऱ्या लोकसेवकांमध्येही कधी - कधी ही तामस वृत्ती जागते. अती उत्साहाच्या भरात मानसिक संतुलन रहात नाही. अशा प्रकारे आपल्या शारीरिक शक्तीचा अपव्यय आणि धनाची बर्बादी दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अखेरीस पश्चात्ताप करावा लागतो. चांगले जाणते व्यापारी देखिल अविवेक जागला म्हणजे कुवतीबाहेरचे नाना प्रकारचे व्यापार करुन सगळा पैसा घालवून बसतात. या सर्वांमुळे मनावर वाईट परिणाम होतो आणि शरीरही अनारोग्यमय होते.

3) **हिंसाम्:** आपली आणि समाजाची होणारी हिंसा, म्हणजे हानी अकल्याण. वर क्षय शब्द आला आहे आणि इथे हिंसा शब्द. क्षय अर्थात् आपल्या शक्ती आणि धनाचा विनाश. हिंसा म्हणजे शक्ती आणि धनाच्या विनाशामुळे व्यक्ती आणि समाजाचे होणारे अकल्याण. प्रत्येक व्यक्ती समाजरुपी देहाचे अंग आहे. कुठलीही व्यक्ती समाजापासून वेगळी नाही. यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या आचरणाचा संपूर्ण समाजावर काही - ना - काही चांगला - वाईट - भला - बुरा परिणाम होतच असतो. व्यक्तीवर चांगली क्रिया करण्याची केवढी जबाबदारी आहे, हे यावरुन लक्षात यावे. व्यक्ती जर नीती आणि धर्माचे पालन न करता स्वच्छंदपणे व्यवहार करत असेल तर ती समाजाच्या अकल्याण वा अधोगतीचे कारण बनते.

4) **च पौरुषं अनपेक्ष्य:** आणि आपल्या सामर्थ्य पुरुषार्थाविषयी योग्य प्रकारे विचार न करता क्षय म्हणजे शक्ती वा धनाचा अपव्यय. इथे पुरुषार्थ शब्द आला आहे. शक्ती म्हणजे बाह्य - शारीरिक शक्ती या अर्थाने मुख्यत्वेकरुन प्रयुक्त होतो आणि पुरुषार्थ शब्द मानसिक, बौध्दिक शक्तीच्या अर्थाने प्रयुक्त आहे. शारीरिक कुवतीचा विचार न करता कार्य करणे जसे अविवेकपूर्ण मानले जाईल तसेच मानसिक व बौध्दिक क्षमतेचा विचार न करता कर्म करणेही अविवेकीच मानले जाईल. शंकराचार्य असाधारण बुध्दीसंपन्न असल्यामुळे कमी वयातच महान कार्य करु शकले. ते केवळ असमान्य बुध्दीसंपन्नच नव्हते तर त्यांचा इंद्रिये आणि मनावर संपूर्ण ताबा होता. पुरुषार्थ म्हणजे केवळ शारीरिकच नव्हे पण मानसिक आणि बौध्दिक सामर्थ्य. त्याचा विचार न करता जे लोक कार्य करु जातात, असा अर्थ इथे अभिप्रेत आहे.

5) **मोहात् यत् कर्म आरभ्यते:** मोहाधीन होऊन जे कर्म आरंभ केले जाते. मोह काही केवळ नातलगांपुरताच मर्यादित स्वरुपाचा नसतो. कुटुंबाशी संबंधित असलेल्या लोकांचा मोह पारिवारिक सदस्यांपुरताच मर्यादित स्वरुपाचा असतो. सार्वजनिक सेवाकार्यात संलग्न लोकांच्याही ठायी अधिक कार्य करायच्या संकल्पाऐवजी आसक्तीच अधिक असते. ही कार्यासक्ती मोह उत्पन्न करते. मोहाचा अर्थ हरप्रकारे कार्य व्यापक व्हावे असा आग्रह - असा मिथ्या आग्रह. आग्रहाने वशीभूत झाल्यावर माणूस हर प्रकारे कार्य करण्याकडे प्रवृत्त होतो.

6) **तत् तामसं उच्यते:** ते तामस म्हटले जाते. उपर्युक्त लक्षणांनी युक्त कर्म उन्नतीकारक नसून अवनतीपरच - अवनतीकारकच ठरतात. अविवेक उत्पन्न करणे तमोगुणाचे वैशिष्ट्य आहे.

: 26 :

*मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।*
*सिद्‌ध्यासिद्‌ध्योनिर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मुक्तसंग:** जो आसक्तीने संपूर्णपणे मुक्त आहे
- **अनहंवादी:** निरंहकारी आहे
- **धृत्युत्साहसमन्वित:** धैर्य आणि उत्साहाने समन्वित आहे
- **सिद्‌धसिद्‌ध्यो: निर्विकार:** कर्म सफळ होवो वा निष्फळ, दोघांबाबतीत तटस्थ आहे
- **कर्ता सात्त्विक: उच्यते:** तो सात्विक कर्ता होय

### अर्थ

जो कर्ता आसक्ती न बाळगणारा, ‘मी माझे’ न म्हणणारा, धैर्य व उत्साहाने युक्त, ‘कार्य सिध्द होवो वा न होवो’ त्याविषयी हर्षशोक वगैरे विकारांनी रहित असलेला आहे तो सात्विक म्हणवला जातो.

***नि:संग निरहंकार उत्साही धैर्य - मंडित ।***
***फळो जळो चळे ना तो कर्ता सात्त्विक बोलिला ॥***

**विषय:** या श्लोकात सात्विक कर्माची चार लक्षणे वर्णिली आहेत. 1) जो आसक्तीपासून सर्वथा मुक्त आहे. 2) निरहंकारी आहे. 3) धैर्य आणि उत्साहसंपन्न आहे. 4)कर्म सफळ होवो वा असफळ - दोघात तटस्थ आहे. 5) तो सात्विक कर्ता होय.

(मागील तीन श्लोकात सात्विक, राजस, तामस कर्माची लक्षणे वर्णिली आहेत. आता तीन श्लोकांमधून सात्विक, राजस, तामस कर्त्याची लक्षणे वर्णिली आहेत.)

### स्पष्टीकरण

1) **मुक्तसंग:** ज्याची आसक्ती संपूर्णपणे मिटून गेली आहे. सात्विक कर्त्याच्या ठायी पिंड आणि ब्रह्मांड या दोघांविषयी अनासक्ती असते जोवर जगत सत्य वाटते तोवर अनासक्त होणे शक्य नाही. जगत् मिथ्या वाटू लागल्यावरच आसक्ती संपू शकते. जगत् मिथ्या वाटायचा अर्थ परमात्मतत्वाची ओळख होय.

2) **अनहंवादी:** निरहंकारी झाला आहे. अज्ञानामुळे अहंकार उपजतो. अज्ञानाव्यतिरिक्त अहंकाराचा दुसरा कुठलाच आधार नाही. अहंकारामुळेच दु:खाचा अनुभव येतो - दु:ख अनुभवायला लागते. यामुळे दु:खमुक्त होण्याचा एकमात्र उपाय निरंहकारी बनणे आहे.

3) **धृत्युत्साहसमन्वित:** जो धैर्य आणि उत्साहाने संपन्न आहे. सामान्यपणे माणसाच्या ठायी अहंकारामुळेच काही चांगले करण्याचा - करुन दाखवण्याचा - उत्साह असतो. अहंकार नसला तर व्यक्ती निरुत्साही - हतोत्साही होऊन जाते पण निरहंकारितेच्या प्राबल्यामुळे उत्साह राहू शकत नाही ही धारणा मात्र काही खरी नाही - योग्य नाही - उचित नाही. याउलट निरहंकारतेच्या प्राबल्यामुळे उत्साह दुप्पट होतो कारण की चित्तात अहंकार असेपर्यंत कार्याच्या साफल्य - असाफल्यावरच उत्साह अवलंबून असतो. कार्य यशस्वी होत आहे, असा अनुभव येतो तोवरच उत्साह टिकून रहातो. कार्य यशस्वी होत नसेल तर उत्साह शिथिल पडून जातो. निरुत्साह जागल्यामुळे हातचे कार्य सोडून द्यावे अशी इच्छा मनात निर्माण होते पण निरहंकारता जागली की फलासक्ती उरत नाही. त्यामुळे कार्य करण्यात उत्साहच उत्साह वाटतो. फलासक्तीमुळे व्यक्ती धैर्य हरवून बसते. ती मग साफल्यासाठी व्यग्र असते पण अहंकार नसला तर फलासक्ती उरणार नाही. धैर्य आणि अतिउत्साह टिकून राहील.

4) **सिद्ध्यसिद्ध्यो:** निर्विकार: कर्म सफल होवो वा निष्फळ, दोघांविषयी निर्विकार असतो. याच अध्यायातील चौदाव्या श्लोकात म्हटले आहे की कर्माच्या साफल्यासाठी पाच कारणांची आवश्यकता असते. आपल्या इच्छेप्रमाणे इष्टफळाची प्राप्ती होत नाही. नाना वस्तुंच्या वा परिस्थितींच्या अनुकलतेमुळे कर्म सफळ होते. आपल्या कर्म फळाचा आग्रह धरणे तर अज्ञानच आहे. विवेकी पुरुष नेहमी कर्मफळाविषयी अनासक्त रहातो.

5) **कर्ता सात्त्विक:** उच्यते अशी स्थिती बाळगणाऱ्याला सात्विक कर्ता असे म्हणतात. उपर्युक्त चार लक्षणे ज्याच्या जीवनात दिसून येतील त्याना सात्विक कर्ता म्हणावे. सात्विक कर्ताच ईश्वरी अनुभवाचा अधिकारी ठरतो - बनतो. हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे.

: 27 :

***रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचि: ।***
***हर्षशोकान्वित: कर्ता राजस: परिकीर्तित: ॥***

### अन्वय आणि शब्दार्थ

- **रागी कर्मफलप्रेप्सु:** विषयासक्त आणि कर्मफलासक्त
- **लुब्ध:** लोभी, कृपण
- **हिंसात्मक:** हिंसक, सतावणारा
- **अशुचि:** अशुध्दाचरणी
- **हर्षशोकान्वित:** हर्ष, शोकात फसणारा
- **कर्ता राजस: परिकीर्तित:** असा कर्ता राजस कर्ता होय

**अर्थ**

जो कर्ता आसक्ती असलेला, कर्मांच्या फळांची इच्छा बाळगणारा, लोभी, इतराना पीडा करण्याचा स्वभाव असलेला, अशुध्द आचरणाचा आणि हर्ष शोकांनी युक्त असतो तो राजस म्हटला जातो.

***फल - कामुक आसक्त लोभी अस्वच्छ हिंसक।***
***मारिला हर्ष - शोकें तो कर्ता राजस बोलिला॥***

**विषय:** या श्लोकात सात गोष्टी आल्या आहेत. 1) विषयासक्त. 2) कर्मासक्त. 3) लोभी. 4) लोकांना सतावणारा. 5) अशुध्द आचरणवाला. 6) हर्ष, शोक वगैरे विकारात फसणारा. 7) राजस कर्ता होय.

**स्पष्टीकरण**

1) **रागी:** विषयासक्त. जोवर विषय सत्य वाटतात तोवर त्यांच्या ठायी आसक्ती कायम असते. त्यातुन सुटका होणे अवघड आहे. ज्ञानेश्वर माऊली म्हणते -हे विषय तरी कैसे, रोहिणीचे जल जैसे अर्थात् हे विषय कसे तर हे मृगजळासारखे आहेत. विषयांना खरे मानून त्यात आसक्त झालो तर सुरुवातीला थोडे सुख मिळाले तरी अखेर दु:खाचाच अनुभव येतो - दु:खच अनुभवाला येते.

2) **कर्मफलप्रेप्सु:** कर्मफळात आसक्त म्हणजे आतुर, मुग्ध. आपण कर्मफळाप्रती आसक्त असतो. कर्मफळाच्या आशेमुळे कर्म आचरण्याकामी उत्साह असतो. कर्मफळाच्या आशेमुळे कर्म आचारण्याकामी उत्साह टिकून असतो. इच्छित फळ मिळणार नाही असे कळल्यावर उत्साह कमी होऊ लागतो. कर्माचा त्याग करायलाही तयार होऊन जातो.

3) **लुब्ध:** लोभी, कृपण, द्रव्याच्या लालसेत लुब्ध. राजस प्रकृतीची व्यक्ती द्रव्यलोभात पडतेच. अन्न - वस्त्र - निवारा वगैरेसाठी आवश्यक द्रव्य प्राप्त करणे कर्तव्यच आहे पण गरजेपेक्षा अधिक गोळा करणे तर - अधिक गोळा करायचा प्रयत्न करणे तर लोभी वृत्ती आहे. लोभी वृत्ती जागली की उदारता - औदार्य नष्ट होऊन जाते. कृपण वृत्ती फोफावते.

4) **हिंसात्मक:** दुसऱ्याला त्रास देण्याची प्रवृत्ती. लोभी वृत्तीमुळे जशी कृपणता उपजते, तशीच हिंसा वृत्तीही - हिंसक वृत्तीही - वाढते. औदार्यातून अहिंसेचे प्राबल्य वाढते. कृपण व्यक्तीचा स्वभाव चिडखोर बनतो. चिडखोरपणामुळे हिंसक वृत्ती उत्पन्न होते. वाटेल तसे शब्द मुखातून निघू लागतात. मनावर ताबा उरत नाही. कुणी दान मागायला आले तर त्याला वाटते की हे संकट कुठून आले?

5) **अशुचि:** मनसा - वाचा - कर्मणा अशुध्द आचरण करणारा. राजस मनुष्य मनाचा गुलाम असतो. यामुळे त्याच्या ठायी शारीरिक शुध्दताही नसते. राजस पुरुष सत्य व्यवहार करत नाही. मनावर ताबा नसल्यामुळे विकार वाढत जातात. नाना विकार मनाला मलीन करतात.

6) **हर्षशोकान्वित:** हर्ष, शोक, सुख, दु:ख यात फसणारा. विकारांना हटवण्याचा जो प्रयत्न करत नाही त्याला विकारांनी उद्भवणाऱ्या सुख दु:खाचा अनुभव घ्यावा लागतो. विकारांचा स्वभावच सुख - दु:ख उत्पन्न करणे असल्यामुळे ते अटळ आहे. परम शांतता ज्याला हवी असेल त्याला विकारांना क्षीण करावेच लागेल. पतंग ज्योतीवर घिरट्या घालतो आणि जळून मरतो. त्याचप्रमाणे विकारांमुळे दु:खाचा अनुभव येतो आणि सुखापेक्षा दु:खाचाच अनुभव अधिक येतो. तरीही तो विकारांना सोडू शकत नाही यामुळे विकारांच्या फेऱ्यातच जीवन घालवतो.

7) **कर्ता राजस: परिकीर्तित:** वरील सहा लक्षणे ज्या व्यक्तीच्या ठायी असतील तिला शास्त्र राजस कर्ता म्हणतात.

: 28 :

***अयुक्त: प्राकृत: स्तब्ध: शठो नैष्कृतिकोऽलस:।***
***विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अयुक्त:** स्वच्छंद, विक्षेपयुक्त चित्ताचा
- **प्राकृत:** संस्कारशून्य, अशिक्षित
- **स्तब्ध:** अनम्र, घमेंडखोर
- **शठ:** कपटी, धूर्त
- **नैष्कृतिक:** इतरांचे नुकसान करणारा
- **अलस:** आळशी

- **विषादी:** निराशावादी, नेहमी शोकग्रस्त
- **च दीर्घसूत्री:** आणि दीर्घसूत्री
- **कर्ता तामस: उच्यते:** तामस कर्ता मानला जातो

**अर्थ**

जो कर्ता अयुक्त, अशिक्षित, घमेंडखोर, धूर्त, दुसऱ्यांची जीवन-वृत्ती नाहीशी करणारा, शोक करणारा, आळशी आणि दीर्घसूत्री (जो थोड्या वेळात होण्यासारखे कामही 'नंतर करु' म्हणून दीर्घकाळपर्यंत पूर्ण करीत नाही तो दीर्घसूत्री होय. ) असतो तो तामस म्हटला जातो.

***स्वच्छंदी क्षुद्र गर्विष्ठ घातकी शठ आळशी।***
***दीर्घ - सूत्री सदा खिन्न कर्ता तामस बोलिला॥***

**विषय:** या श्लोकात नऊ गोष्टी सांगितल्या आहेत. 1) स्वच्छंद. 2) संस्कारहीन. 3) अनम्र, घमेंडखोर. (4) कपटी, ठग. (5) दुसऱ्याचे नुकसान करणारा. 6)आळशी. 7) निराशावादी. 8) आणि दीर्घसूत्री - विलंब लावणारा. 9) या लक्षणांनी युक्त तामस कर्ता होय.

**स्पष्टीकरण**

1) **अयुक्त:** स्वच्छंदी, मनमौजी. माणसाला स्वत:वर कुणाचे नियंत्रण आवडत नाही पण तो मात्र सर्वावर नियंत्रण लादु इच्छितो. आपल्यावर दुर्जनाचे नियंत्रण नसावे अशी इच्छा योग्यच आहे. स्वच्छंदी वर्तन म्हणजे इंद्रियाधीन होऊन जगणे होय.

2) **प्राकृत:** संस्कारशून्य, संकुचित वृत्ती. मनमानी करणारा संकुचित आणि संस्कारहीनच असेल - राहील. संस्कार संपन्न माता - पिता लेकरांवर सुयोग्य नियंत्रण राखतात. यातून त्यांच्या ठायी संयमाच्या संस्कारांची वृध्दी होते. ते सत्संगतीत राहू लागतात - तशी त्यांना सवय लागते. धार्मिक साहित्य, संत साहित्याचे वाचन करतात. या सवांर्च्या अभावी वृत्ती संकुचित आणि संस्कारहीन होते.

3) **स्तब्ध:** अनम्र, घमेंडखोर. जिथे मनमानी करायची सवय लागते, वृत्ती संकुचित आणि संस्कारहीन बनते तिथे नम्रता रहात नाही. अशी व्यक्ती अनम्र, घमेंडखोरच बनते. जिथे विवेक असेल तिथे विनम्रतेचे दर्शन होते. अविवेकाने गर्व वाढतो.

4) **शठ:** कपटी, ठग. दुर्जनांचे वर्णन करताना संत तुलसीदास म्हणतात -

***काम क्रोध मद लोभ परायन।***
***निर्दय कपटी कुटिल मलायन॥***

म्हणजे काम, क्रोध, मद परायण, लोभी, निर्दय, कपटी, कुटिल मनाचा. एका वेगळ्या प्रसंगी लिहिले -

विप्रदोह सुरद्रोह विसेषा दंभ कपट जिय धरे सुवेषा म्हणजे विशेषत: ब्राह्मण - पंडित जन, देवतांचा द्रोह करतात. पोशाख तर चांगला वापरतात पण अंत:करणात दंभ आणि कपटाचे पोषण करतात.

एक महापुरुष होते. त्यांचा एक पुत्र कुमार्गगामी होता. त्याने कुणाकडून दोन हजार रुपयांचे कर्ज मिळवले. कर्जाची परतफेड करायची काळजी होती. यामुळे आपल्या वडिलांना जाऊन भेटला. म्हणू लागला " माझ्या मनात वैराग्य उत्पन्न झाले आहे. एथवर वाईट चालीने वागलो - कुमार्गगामी राहिलो - त्याविषयी मनात पश्चात्ताप होत आहे. आपल्या सहवासातच आता उरलेले आयुष्य गाळावे - घालवावे - असा मी निश्चय केला आहे पण माझ्यावर दोन हजार रुपयांचे कर्ज झाले आहे. ते फेडून दिले तर मी लगेच आपल्या सहवासात राहू शकेन." वडिलांनी त्यावर विश्वास ठेवला. त्याचे कर्ज फेडून दिले. कर्जाची परतफेड होताच मुलगा जो पळाला तो फिरुन काही पित्याला तोंड दाखवले नाही. हा झाला कपटी व्यक्तीचा नमूना.

5) **नैष्कृतिक:** दुसऱ्यांचे नुकसान करणारा. संत तुलसीदास लिहितात -

***परहित सरस धरम नहिं भाई परपीडा***
***सम नहिं अधमाई। नर सरीर धरि जे परपीरा करहिं ते***
***सहहिं महा भवपीरा॥***

म्हणजे दुसऱ्यांचे कल्याण करण्यासारखा कुठला धर्म नाही आणि परपीडा करण्यासारखे पाप नाही. मानवी देह धारण करुन जे दुसऱ्याना पीडा देतात त्याना महादु:ख भोगावे लागते.

6) **अलस:** आळशी. तमोगुणाचे मुख्य लक्षण आहे आळस. शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात 'अलस:' चा मोठा मार्मिक अर्थ सांगितला आहे. - कर्तव्येषु अपि

अप्रवृत्तिशील: - म्हणजे जे कर्तव्य आहे त्यातही प्रवृत्त न होणे हाच ज्याचा स्वभाव बनून गेला आहे असा. सहाव्या अध्यायातील पहिल्या श्लोकात सांगितले आहे की कर्म फलासक्ती सोडून कर्तव्यकर्मे आचरणारा संन्यासी आहे आणि तोच योगी होय. जो क्रियाशून्य आहे तो न संन्यासी आहे ना योगी.

7) **विषादी:** सदा दु:खी. निराशावादी. माणूस सुखासाठीच आळशी बनून जातो पण आळसामुळे तात्पुरते सुख वाटेल तरी मागाहून दु:ख होते कारण की ऐहिक वा भौतिक सुखासाठी देखिल काही कार्य तर करावेच लागेल. तरीसुध्दा हाती घेतलेले कार्य जर आपण यशस्वीरित्या केले नाही, आळसाच्या अधीन होऊन यथातथा केले तर यश न मिळाल्यामुळे सुखाचा अनुभव घेता येणार नाही. सुख हवे असेल तर उत्तमात उत्तम म्हणजे सर्वोत्तम कार्य करायचे प्रयत्न करायला हवेत. आपण सुयोग्य प्रयत्न करत नाहीत परिणामी कार्यात यश लाभत नाही. निराशा पदरी पडते म्हणजे आपण निराशावादी बनून जातो.

8) **च दीर्घसूत्री:** एका दिवसात संपवण्यायोग्य कामासाठी महिना घालवणारा. अनेक लोकांची कार्यपध्दती मंद, शिथिल असते. यामुळे वृत्ती शिथिल होते आणि मग ही सवय बनून जाते. विनोबा म्हणतात की वेगवान आणि सुंदर कर्म असले, तरच त्याला कर्म म्हणता येईल. काम सुंदर आहे पण खूप मंद गतीने असेल तर नाही चालणार. वेगाने भराभर केले पण कामात सुंदरता नसेल म्हणजे वाटेल तसे उरकले तरी नाही चालणार. उदाहरणार्थ आपण कातायला बसलो आणि वेगाने कातले पण सूत सारखे नसेल, योग्य नसेल तर त्याला काही कताई म्हणता येणार नाही. तसेच आपण समान सूत कातले पण गती मंद असेल तरी आपल्याला सूतकताई साधली असे काही म्हणता यायचे नाही.

9) **कर्ता तामस:** उच्यते उपरोक्त आठ गुणांनी युक्त कर्त्याला तामस कर्ता असे म्हणतात.

: 29 :

***बुध्देर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं श्रृणु।***
***प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **धनंजय बुध्दे:** हे अर्जुना, बुध्दीचे
- **च एव धृते:** आणि तसेच धृतीचे म्हणजे धारणा शक्तीचे
- **गुणत:** गुणांच्या अनुसार होणारे
- **त्रिविधं भेदं:** तीन प्रकारचे भेद
- **अशेषेण:** पूर्णत: म्हणजे पूर्ण रुपाने
- **पृथक्त्वेन:** वेगवेगळ्या रुपांनी
- **प्रोच्यमानं श्रृणु:** सांगत आहे, ते ऐक

**अर्थ**

हे धनंजया, आता बुध्दीचे आणि धृतीचेही गुणांनुसार तीन प्रकारचे भेद माझ्याकडून पूर्णपणे विभागपूर्वक सांगितले जात आहेत ते तू ऐक.

***बुध्दीचे भेद जे तीन धृतीचे हि तसे चि जे।***
***गुणानुसार ते सारे सांगतों वेगवेगळे॥***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टी आहेत. 1) हे अर्जुना, बुध्दीचे. 2) आणि धृतीचे. 3) सत्व, रज, तम या गुणानुसार तीन प्रकारचे भेद. 4) पूर्णत: 5) वेगवेगळ्या रुपात. 6) सांगतो, ते ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **बुध्दे:** बुध्दीचे. बुध्दी ज्ञानाचे साधन आहे. त्याद्वारेच आपल्याला स्थूल आणि सूक्ष्म ज्ञान होते. आपण ज्ञाते आहोत पण आपल्यापाशी जर ज्ञानाचे साधन नसेल तर स्थूल सुक्ष्म ज्ञान होऊ शकणार नाही.

2) **च एव धृते:** धृती म्हणजे धारणाशक्ती. ज्ञान प्राप्ती झाल्यावर तदनुसार चालण्यासाठी जर धृती म्हणजे निग्रहशक्ती नसेल तर ज्ञान - शक्तीचा काहीही उपयोग होणार नाही. ही निग्रह शक्ती मनात असते.

3) **गुणत: त्रिविधं भेदं:** सत्व, रज, तम या तीन गुणानुसार तीन प्रकार. बुध्दी आणि धृतीचेही सत्व, रज,

तम यानुसार तीन प्रकार दिसून येतात. या तीन गुणांच्या अनुसार तीन प्रकार दिसून येतात. या तीन गुणांच्या अनुसार सर्व वस्तुंमध्ये तीन - तीन प्रकार दिसतात. हे लक्षात आल्यावर काय ग्रहण करायचे आणि कशाचा त्याग करायचा हे योग्य प्रकारे लक्षात येऊ शकते.

4) **अशेषेण:** काहीही शिल्लक न राखता - पूर्णपणे - पूर्ण रुपाने. म्हणजे माझ्या कथनात अधूरेपणा असणार नाही. मी जे काही सांगेन ते सर्वप्रकारे पूर्ण असेल.

5) **पृथक्त्वेन:** वेगवेगळ्या रुपात. बुध्दी आणि धृतीच्या बाबतीतल्या ज्या तीन प्रकारांचे वर्णन करीन ते सोबत वा मिळते - जुळते नसणार. एकेका गुणाचे वेगवेगळे बुध्दी आणि धृतीचे लक्षण सांगेन.

6) **प्रोच्यमानं श्रृणु:** मी जे सांगतो, ते ऐक. ऐकण्यात - श्रवण करण्यात अर्जुनाची आतुरता वाढावी यासाठी भगवान म्हणताहेत की मी जे काही सांगतो ते लक्ष देऊन ऐक - लक्षपूर्वक ऐक. कथा वा गोष्ट ऐकतांना आपोआप एकाग्रता साधली जाते. पण तात्विक विषय ऐकतांना - तत्वज्ञानाचा विषय ऐकतांना - सहज एकाग्रता साधली जात नाही. तुलसीदासजी म्हणतात -

***नवधा भगति कहहुँ तोहि पाई।***
***सावधान सुनु धरु मन माहीं॥***

म्हणजे तुला नवविधा भक्ती सांगत आहे. तू मन लाऊन सावधानतेने हे ऐक.

: 30 :

***प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।***
***बंधं मोक्षं च या वेत्ति बुध्दि: सा पार्थ सात्त्विकी॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रवृत्तिं च निवृत्तिं:** कर्म आणि अकर्म
- **च कार्याकार्ये:** आणि कार्य तथा अकार्य
- **भयाभये:** भय आणि अभय
- **च बंधं मोक्षं:** आणि बंध तथा मोक्षाला
- **या बुध्दि: वेत्ति:** जी बुध्दी तत्वत: जाणते
- **पार्थ सा सात्त्विकी बुध्दि:** हे अर्जुना, ती सात्विक बुध्दी होय

**अर्थ**

हे पार्था, जी बुध्दी प्रवृत्तीमार्ग (गृहस्थाश्रमात राहूनही कर्मांचे फळ व आसक्ती सोडून भगवदर्पणबुध्दीने केवळ लोकशिक्षणासवाठी राजा जनकाप्रमाणे वागणे हा प्रवृत्तीमार्ग होय.) व निवृत्तीमार्ग (देहाभिमान सोडून केवळ सच्चिदानंदघन परमात्म्यात ऐक्यभावाने राहिलेल्या श्री शुकदेव आणि सनकादिकांप्रमाणे संसारापासून विरक्त होऊन वागणे हा निवृत्तीमार्ग होय.), कर्तव्य व अकर्तव्य, भय आणि अभय, तसेच बंधन आणि मोक्ष यथार्थपणे जाणते ती सात्त्विक बुध्दी होय.

***अकर्तव्यें बंध - भय कर्तव्यें मोक्ष निर्भय।***
***जाणे सोडूं धरुं त्यांस बुध्दि सात्त्विक ओळख॥***

**विषय:** या श्लोकात दहा गोष्टींची चर्चा आहे. 1) कर्म. 2) अकर्म. 3) कार्य. 4) अकार्य. 5) भय. 6) अभय. 7) बंध. 8) मोक्ष. 9) याना बुध्दी जाणते. 10) हे अर्जुना, तिला सात्विक बुध्दी म्हणतात.

**स्पष्टीकरण**

1) **प्रवृत्तिम्:** कर्म प्रवृत्ती म्हणजे क्रियामात्र - प्रवृत्ती हा शब्द गीतेत कित्येक ठिकाणी आला आहे. सोळाव्या अध्यायातील सातव्या श्लोकात म्हटले आहे की असुर वृत्तीच्या लोकांच्या प्रवृत्ती आणि निवृत्तीची ओळख होत नाही. चौथ्या अध्यायातील सोळाव्या श्लोकात म्हटले आहे की कर्म आणि अकर्मा विषयी विद्वान लोकही धडपणे जाणत नाहीत. तिसऱ्या अध्यायातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे की माणूस कर्म केल्याशिवाय क्षणभरही राहू शकत नाही. जे कर्म अलिप्तापूर्वक केले जाते ते खरे कर्म होय. तसे पाहू गेल्यास पशु - पक्षी वगैरे प्राणीमात्र अखंडपणे कर्मे करत रहातात पण ते कर्म काही कर्म नाही. अनासक्तीपूर्वक जे केले जाते तेच खरे कर्म होय. 'मी देह नाही.' या भावनेने केले गेलेले कर्मच खरे कर्म होय. यालाच प्रवृत्ती म्हटले जाते.

2) **च निवृत्तिम्:** निवृत्तीचा अर्थ काहीही कर्म न करणे असा नाही कारण की श्वासोच्छवासही तर कर्मच आहे. निवृत्ती म्हणजे अलिप्तावस्था, आत्मावस्था, देह वगैरे संघातापासून भिन्नतेची प्रतीती होय. ही अनुभवाची स्थितीच श्रेष्ठ कर्म आहे.

3) **च कार्य:** यथार्थ - वास्तव ज्ञान झाले असेल तरच करण्यायोग्य कार्य होत राहील. यात खूप सावधान असण्याची गरज आहे. यात तमाम इंद्रियांशी संबंध येतो. डोळ्यांनी बघण्यायोग्य वस्तुच बघावी. कानांनी ऐकण्यायोग्य विषयच ऐकावा. जिभेने खाण्यायोग्य पदार्थच खावे. कार्य म्हणजे करण्यायोग्य कर्तव्य होय. जीवन कर्तव्यमय असावे. कर्तव्य समजून बोलावे, खावे, लिहावे, वाचावे, ऐकावे. मनसा, वाचा, कर्मणा सर्व क्रिया कर्तव्य मानूनच केल्या जाव्यात.

4) **अकार्य:** अकार्य. असा दृढ निश्चय केला पाहिजे की न करण्यायोग्य क्रिया कदापि करणार नाही. इंद्रिये खूप प्रबळ आहेत. एका दृष्टीने बघू जाता जीभ सर्वात बलवान इंद्रिय आहे कारण की खायला बसलो तर जीभ ताब्यात रहातच नाही. जास्तही खाऊन घेतो. कान आणि डोळ्यांचीही अशीच अवस्था आहे.

5) **भय:** भय अनेक प्रकारचे असते. जंगलात वाघ, सिंह वगैरे हिंस्त्र पशुंचा सामना करणारे आदिवासी लोक इंग्रजांचे बोलावणे येताच भयभीत होऊन जात. कारावासात जायला भीत. दुसरीकडे इंग्रजांना वा जेलला न भिणारे लोक वाघ, सिंह, सर्प वगैरेंना खूप भीत होते. कित्येक लोक काम - विकाराला भितात. काही लोक व्याख्यान द्यायला घाबरतात. अशाप्रकारे हजारो भयस्थाने आहेत पण अकार्याची भीती, असत् कार्याविषयी भय वाटले तर भय वृत्तीचा योग्य उपयोग झाला असे समजायला हवे. तुलसीदासांचे समकालीन आध्यात्मिक संत होते कवी बनारसीदास. त्यानी सात प्रकारच्या भयांचे वर्णन केले आहे -

***इह भव - भय, परलोक - भय, मरन - वेदना जात ।***
***अनरक्षा अनुगुप्त - भय, अकस्मात - भय सात ॥***

अर्थात् 1) इह भव - भय म्हणजे परिग्रह वगैरेच्या वियोगाचे भय. 2) परलोक - भय म्हणजे वाईट गती प्राप्त होण्याचे भय. 3) मरण - भय म्हणजे प्राणांच्या वियोगाचे भय. 4) वेदना - भय म्हणजे रोग - आजारी व्हायचे भय. 5) अनरक्षा - भय म्हणजे असुरक्षिततेचे भय. 6) अनुगुप्त - भय म्हणजे चोरा चिलटांचे भय आणि 7) अकस्मात - भय म्हणजे पूर, भूकंप, विपत्ती यासारख्या नैसर्गिक विपत्तींचे भय.

6) **अभये:** निर्भयता. सोळाव्या अध्यायात वर्णिलेल्या दैवी गुणात प्रथम गुण आहे अभय. सत्कार्यात निर्भयता असायला हवी. गांधीजींनी निर्भयता शिकवली आहे. इंग्रजांना सारे भ्यायचे. इंग्रजांनी भारताला दीडशे वर्षे गुलामगिरीत खितपत ठेवले. इंग्रजांच्या या जुलूमाच्या प्रतिकाराची अहिंसक रीत गांधीजींनी सांगितली. निर्भयतेचा पाठ शिकवला. निर्भयतेच्या संदर्भात विनोबांनी एक मौलिक विचार मांडला आहे. निर्भयतेचा अर्थ आहे आपण निर्भय असावे पण आपल्यामुळे जर दुसरा भयभीत होत असेल तर आपण काही निर्भय नव्हेत. जो स्वत: निर्भय असेल तोच दुसऱ्याला निर्भय बनवतो. निर्भयतेत नम्रतेचा अभाव नाही. खरा निर्भय माणूस विनम्र असतो. जो नम्र नसतो तो दुसऱ्याच्या मनात भय उत्पन्न करतो.

7) **बंधम्:** बंध म्हणजे काय? त्याचे स्वरुप काय? याची योग्य ती ओळख व्हायला हवी. आपण देह, मन वगैरे साधनांनाच आपले स्वरुप मानून बसलो आहोत आणि त्यातच आसक्त होऊन जातो. आसक्तीमुळे काम, क्रोध वगैरे विकार उत्पन्न होतात आणि विकारांमुळे दु:खाचा अनुभव येतो. दु:ख सहन होत नाही. दु:खापासून सुटका करुन घेण्यासाठी माणूस सदैव प्रयत्न करत असतो पण त्याला यश मिळत नाही. आपण आसक्ती, दु:ख, विकार यापासून मुक्त होऊ इच्छितो पण जेव्हा आपण मुक्त होऊ शकत नाही असे अनुभवायला येते तेव्हा बंधन स्वाभाविकच वाटते.

8) **मोक्षम्:** मोक्षाची ओळख असणे गरजेचे आहे. बंधनमुक्तीचा अनुभव हीच मोक्ष स्थिती होय. ज्यावेळी देहासक्ती उरणार नाही. स्वजनासक्ती अजिबात वाटणार नाही. काम - क्रोध वगैरे विकार क्षीण होऊन जातील, अहंकार उरणार नाही. याचा अर्थ असा की आपण शून्य आहोत, देह वगैरेच्या सर्व क्रिया या ईश्वरामुळेच होताहेत, या अनुभूतीला मोक्षावस्था असे म्हणतात. खरे पाहू गेल्यास बंधन काल्पनिक आहे कारण की आपण देहापासून वेगळे असतानाही वा स्वयं आत्मा असतानाही अज्ञानजन्य मिथ्या कल्पनेमुळे स्वत:ला देहाशी एकरुप मानतो. देह वगैरेशी असलेला काल्पनिक संबंध सोडून दिला तर बंधनमुक्तीचा म्हणजे मोक्षाचा अनुभव होईल.

मोक्ष म्हणजे आत्म स्वरुपाचे ज्ञान. कवी बनारसीदास म्हणतात -

*अनुभव चिंतामणि रतन, अनुभव है रसकूप।*
*अनुभौ मारग मोखकौ, अनुभव मोक्ष स्वरुप ॥*

अर्थात् अनुभव चिंतामणी (इच्छा पूर्ण करणारे रत्न आहे, अनुभव रसाची विहीर - रसाची खाण आहे, अनुभव हा मोक्षाचा मार्ग आहे, एवढेच नव्हे पण अनुभव साक्षात् मोक्ष स्वरुप आहे.

9) **या बुध्दि:** वेत्ति जी बुध्दी सुयोग्य प्रकारे जाणते. उपरोक्त आठ वस्तुंना योग्य प्रकारे जाणून घेणे महत्वाचे आहे. यासाठी सत्संगती, शास्त्राभ्यास, चिंतन - मनन आवश्यक आहे. या गोष्टींना जर काळजीपूर्वक जाणून घेतले नाही तर अमलात आणण्यात त्रुटी राहील. बरे या गोष्टींना जाणून घेतल्यावरही जर आपण आपल्या जीवनाची घडी यानुसार नाही आखून घेतली तर आपले बौध्दिक ज्ञान व्यर्थच म्हटले गेले पाहिजे.

10) **पार्थ सा सात्त्विकी बुध्दि:** अर्जुना, ती सात्विक बुध्दी होय. उपरोक्त आठ गोष्टींना जी बुध्दी जाणून घेते - योग्य प्रकारे जाणते - आणि तदनुसार या गोष्टी अमलात आणते ती सात्विक म्हणजे ऊर्ध्वगामी बुध्दी होय. ही बुध्दी ईश्वराचा अनुभव घडवून द्यायला समर्थ आहे.

: 31 :

*यथा धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च।*
*अयथावत् प्रजानाति बुध्दि: सा पार्थ राजसी ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यया:** जी बुध्दी
- **धर्मंम् च अधर्मंम्:** धर्म आणि अधर्माला
- **कार्यम् च अकार्यम् एव:** कार्य आणि अकार्याला
- **अयथावत् प्रजानाति:** योग्य प्रकारे - यथार्थ रुपात जाणत नाही
- **पार्थ सा बुध्दि:** राजसी: हे अर्जुना, ती राजस बुध्दी होय

**अर्थ**

हे अर्जुना, मनुष्य ज्या बुध्दीमुळे धर्म आणि अधर्म, तसेच कर्तव्य आणि अकर्तव्य यथायोग्य रीतीने जाणत नाही, ती बुध्दी राजसी होय.

*कार्याकार्य कसें काय काय धर्म अधर्म तो।*
*जी जाणूं न शके चोख बुध्दि राजस ओळख ॥*

**विषय:** या श्लोकात राजस बुध्दीची लक्षणे वर्णिली आहेत. 1) धर्म. 2) अधर्म. 3) कार्य. 4) अकार्य. 5) योग्य 6) प्रकारे जाणत नाही. 7) ती राजस बुध्दी होय.

**स्पष्टीकरण**

1) **धर्मम्:** धर्म. मागील श्लोकात धर्माची चर्चा नाही. धर्मात नीती समाविष्ट असते. धर्म पुलासारखा असतो. भवसागर पार करण्यासाठी धर्मरुपी पुलाचा आश्रय घेणे गरजेचे आहे. यामुळे धर्माच्या नेमक्या स्वरुपाचेही आकलन असायला हवे. धर्माचरणाचा जेवढा म्हणून आग्रह धरला जाईल तेवढी समाज व्यवस्था चांगली राहील. संघर्ष कमी होईल. आर्थिक समता नांदेल पण राजस बुध्दीला धर्माची समुचित ओळख नसते.

2) **अधर्मम्:** अधर्म. धर्माप्रमाणेच अधर्माचेही ज्ञान असायला हवे पण राजस बुध्दीला अधर्माची ओळख नसते. काय ग्रहण करायला हवे - स्वीकारायला हवे या सोबतच काय स्वीकारायला नको - काय त्यागायला हवे हे ज्ञात नसेल तर न करण्यायोग्य कामेही केली जातात. यामुळे धर्मासोबत अधर्माची माहितीही असायला हवी. प्रत्येक क्रिया धर्मयुक्त असावी. गांधीजींचे आचरण धर्मयुक्त होते. गांधीजींनी समाजाच्या रुढ वा जड मान्यताना बदलून टाकण्याकामी खूप मदत केली.

3) **कार्यम्:** कार्य. कार्य म्हणजे करण्यायोग्य क्रिया. जीवनात अत्यंत सावधानीपूर्वक ज्याला मार्गक्रमण करायचे आहे त्याला हे बघावे लागते की प्रत्येक क्रिया योग्य म्हणजे कर्तव्यस्वरुप आहे की नाही ? क्रिया धर्मरुप आहे हे सिध्द व्हायला हवे. आपण दिवसभरात सतत खाणे, पिणे, बोलणे, लिहिणे, चालणे, बसणे, विचार करणे, झोपणे वगैरे अनेक क्रिया करत रहातो. त्यात आपली क्रिया योग्य आहे हेच बघत रहायला हवे.

4) **च अकार्यम्:** अकार्य. लोक न करण्यायोग्य कामेही करत रहातात. न करण्यायोग्य क्रियांच्या बाबतीत माहिती असली तर अनावश्यक, हानीकारक क्रियांपासून वाचू शकतो.

5) **अयथावत् प्रजानाति:** अयथार्थ रुपाबाबत जाणतो म्हणजे यथार्थ म्हणजे योग्य वा वास्तव रुपाबाबत जाणत नाही. कार्य - अकार्य, धर्म - अधर्म, नीती - अनीती याविषयीची योग्य ती ओळख राजस बुध्दीला नसते. यासाठी शास्त्राध्ययन आणि सत्संग खूप गरजेचा आहे. अनुभवी पुरुषांच्या सत्संगतीत राहिल्यावर धर्म - अधर्म, कार्य - अकार्य जाणून घेण्याची दृष्टी लाभते. सत्संगतीत सहजपणे म्हणजे अनायासेच शास्त्राध्ययन होऊन जाते.

6) **पार्थ सा बुध्दि: राससी:** हे अर्जुना, ती राजस बुध्दी होय. जी बुध्दी धर्म - अधर्म, कार्य - अकार्य योग्य प्रकारे ओळखू शकत नाही. योग्य तो निर्णय घेऊ शकत नाही ती राजस बुध्दी होय. अशी बुध्दी ईश्वराचा अनुभव करुन द्यायला आणि प्रपंचाची बंधने छाटून टाकायला समर्थ नसते.

: 32 :

*अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता।*
*सर्वार्थान् विपरीतांश्च बुध्दि: सा पार्थ तामसी॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **या बुध्दि: तमसा आवृता:** ती बुध्दी तमोगुणाने झाकलेली आहे
- **अधर्मंम् धर्मम् इति मन्यते:** अधर्मालाच धर्म मानते
- **च सर्वार्थान् विपरीतान् मन्यते:** आणि सर्व वस्तुंना विपरीत दृष्टीने बघते
- **सा तामसी बुध्दि:** ती तामस बुध्दी होय

### अर्थ

हे अर्जुना, तमोगुणाने व्यापलेली जी बुध्दी अधर्मालाही 'हा धर्म आहे' असे मानते, तसेच याच रीतीने इतर सर्व पदार्थांनाही विपरीत मानते, ती बुध्दी तामसी होय.

*धर्म मानी अधर्मास अंधारें भरली असे।*
*अर्थ जी उलटा देखे बुध्दि तामस ओळख॥*

**विषय:** या श्लोकात तामस बुध्दीच्या संदर्भात चार गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) जी बुध्दी तमोगुणाने झाकली गेली आहे. 2) अधर्मालाच धर्म मानते. 3) सर्व गोष्टींना विपरीत दृष्टीने बघते. 4) ती तामस बुध्दी होय.

### स्पष्टीकरण

1) **या बुध्दि:** तमसा आवृता - जी बुध्दी तमोगुण म्हणजे अविवेकाने झाकली गेलेली आहे. बुध्दीची दोन कामे आहेत. 1) जाणणे आणि 2) निर्णय घेणे. जीवनात नाना प्रकारची कामे करावी लागतात, अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्यांना सोडवण्याकामी जर बुध्दी विपरीत निर्णय देऊ लागेल तर हा तिचा दुरुपयोगच झाला म्हणायचा. यथार्थ - योग्य - निर्णय देणारी - घेणारी सात्विक बुध्दी होय. जी बुध्दी सदैव यथार्थ - योग्य निर्णय देत - घेत नाही ती राजस बुध्दी आणि जी बुध्दी विपरीत - उलटा निर्णय देते - घेते ती तामस बुध्दी होय. अशा तामस बुध्दीच्या ठायी अविवेक येऊनच जातो. बुध्दी तर्काच्या आधारे निर्णय देते - घेते. सत्संगतीत योग्य तर्क करायचा सराव होऊन जातो - अभ्यास होऊन जातो. यामुळे बुध्दी विवेकयुक्त रहाते. संत तुलसीदासजी म्हणतात - बितु सत्संग विवेक न होई अर्थात सत्संगतीशिवाय विवेक जागत नाही.

2) **अधर्मम् धर्मम् इति मन्यते:** अधर्मालाच धर्म मानते. धर्माच्या आधाराशिवाय उन्नत जीवन जगता येणे शक्य नाही जीवन उन्नत नसेल तर खरे सुख लाभणार नाही. यामुळे धर्माचरणात दिवसेंदिवस सूक्ष्मता यायला हवी. धर्म आणि नीती यांच्या पालनात जेवढी सूक्ष्मता जागेल तेवढी सुखात वृध्दी होईल. धर्माची ओळख जर चुकीच्या पध्दतीने झाली म्हणजे अधर्माला धर्म समजून तसे आचरण करु लागलो तर उन्नती होण्याऐवजी अधोगती अवनती - होईल.

3) **च सर्वार्थान विपरीतान् मन्यते:** आणि सर्व वस्तुंना विपरीत दृष्टीने बघते म्हणजे कुठल्याही प्रश्नाचा उलटाच - विपरीतच - निर्णय घेते - देते. प्राचीन काळी राजा - महाराजांसमोर जटिल प्रश्न उपस्थित होत असत. ते स्वत: या प्रश्नांची उकल करु शकत नसत. अशावेळी संत -

महात्म्यांच्या चरणी बसून मार्गदर्शन मिळवत. शिवाजी महाराज नेहमी रामदास स्वामींपाशी जायचे. जिथे संत महात्मे उपलब्ध नसतील तिथे चार सज्जनांना एकत्र करुन त्यांच्या निर्णयाला मान्य करायची परिपाटी श्रेष्ठ असते.

4) **सा तामसी बुध्दिः** ती तामस बुध्दी होय. ज्या बुध्दीत अविवेक आहे. या अविवेकामुळे जी बुध्दी योग्य निर्णय घेऊ - देऊ शकत नाही. अधर्माला धर्म मानू लागते आणि सदा चुकीचा वा उलटा निर्णय देते - घेते ती तामस बुध्दी होय. हे समजून घ्यायला हवे की ती माणसाला अधोगतीला नेणारी बुध्दी आहे.

: 33 :

***धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः ।***
***योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ अव्यभिचारिण्याः** हे अर्जुना, परमात्म्यात स्थिर - ईश्वरात स्थिर
- **योगेनः** फलाशा त्याग आणि समतायुक्त म्हणजे ध्यानयोगाद्वारे
- **यया धृत्याः** ज्या धृतीने म्हणजे धारणेने
- **मनःप्राणेन्द्रियक्रियाः** मन, प्राण आणि सर्व इंद्रियांच्या क्रिया
- **धारयतेः** धारण केल्या जातात
- **सा सात्त्विकी धृतिः** ती सात्विक धृती म्हणजे धारणा होय

**अर्थ**

हे पार्था, ज्या अव्यभिचारिणी धारणाशक्तीने (भगवद्विषयाशिवाय अन्य सांसारिक विषयाना धारण करणे, हा व्यभिचार दोष आहे, तो दोष ज्या धारणेत नाही ती अव्यभिचारिणी धारणा होय.) मनुष्य ध्यानयोगाने मन, प्राण व इंद्रिये यांच्या क्रिया ( मन, प्राण व इंद्रिये यांना भगवत्प्राप्ती करुन घेण्यासाठी भजन, ध्यान व निष्काम कर्मात लावणे, हे त्यांच्या क्रिया 'धारण' करणे आहे.) धारण करीत असतो ती धारणा सात्विक होय.

***जी इंद्रिये मन प्राण ह्यांचे व्यापार चालवी।***
***समत्वें स्थिर राहूनि धृति सात्त्विक जाण ती॥***

**विषयः** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत. 1) हे अर्जुना, परमात्म्याच्या - ईश्वराच्या - ठायी स्थिर. 2) फलाशा त्याग आणि समतेने युक्त. 3) ज्या धृतीने 4) मन, प्राण आणि सर्व इंद्रियांच्या क्रिया धारण केल्या जातात. 5) ती धृती सात्विक होय.

**स्पष्टीकरण**

1) **पार्थ अव्यभिचारिण्याः** या श्लोकात सात्विक धृतीची लक्षणे सांगितली जाताहेत. वृत्तीचा संबंध मनाशी आहे. मनाच्या अनेक वृत्तींपैकी ही एक महत्वाची वृत्ती आहे. धृती म्हणजे मनाची निग्रहशक्ती. मनाची ही निग्रह शक्ती परमात्म्याशिवाय अन्य कुणाशी संबंध न राखणारी, परमात्म्याच्या ठायी स्थिर असायला हवी. निग्रह शक्तीचा जसा सदुपयोग होऊ शकतो तसाच दुरुपयोगही. या शक्तीचा चांगल्यात चांगला उपयोग मोक्षदायी असू शकतो. हेच या श्लोकात सांगितले आहे.

निग्रह शक्तीचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी करु इच्छित असाल तर देहापासून विलग राहून ईश्वराठायी लीन व्हायचा अभ्यास करणे गरजेचे आहे. निग्रह शक्तीद्वारे परमात्म्याशी सततचा संबंध राखता येऊ शकतो. विवेक शक्तीच्या मार्गदर्शनाखाली निग्रह शक्तीचा उपयोग ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्याकामी होऊ शकतो. विवेक शक्तीने मार्गदर्शन लाभते तर निग्रह शक्तीने ते अमलात येते.

2) **योगेनः** फलाशा त्याग आणि समतेने युक्त. धृती जशी ईश्वराशी संबंध राखणारी असायला हवी तशीच ती फलाशा त्यागरुप समता अर्थात् योगयुक्तही असायला हवी.

3) **यया धृत्याः** ज्या धृतीने. ईश्वरार्पण बुध्दीने सर्व कर्मे करावीत आणि फलासक्ती त्याग तथा निर्विकारता ही धृतीची दोन विशेषणे होत. सोळाव्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकाच्या भाष्यात शंकराचार्यांनी धृतीची व्याख्या केली आहे. धृती दैवी संपत्तीच्या गुणांपैकी एक गुण होय. शंकराचार्य म्हणतात 'देह, इंद्रिये जेव्हा थकून जातात तेव्हा त्यांच्याठायी उत्साह उत्पन्न करणारी मनात निहित वृत्ती धृती होय.'

4) **मनः प्राणेन्द्रियक्रियाः** धारयते मन, प्राण आणि सर्व इंद्रियांच्या क्रिया धारण केल्या जातात, आचरणात आणल्या जातात. मन, इंद्रिये आणि प्राणाच्या सहाय्याने आपण ज्या काही क्रिया करतो त्या ईश्वरार्पण बुध्दीने, फलाशा त्याग आणि निर्विकारतायुक्त धृतीने केल्या जायला हव्यात. बुध्दीच्या सहाय्याने ज्ञान तर प्राप्त करुन घेतले जाते पण तदनुसार आचरण घडत नाही कारण आपली धृती म्हणजे निश्चय वृत्ती कमकुवत - कमजोर - असते. जाणून घेणे सोपे पण त्याला आचरणात आणणेच कठीण आहे. ज्याला जाणून घेतले त्याला अमलात आणणेच महत्वाचे आहे.

5) **सा सात्त्विकी धृतिः** त्याला सात्विक धृती असे म्हणतात. सात्विक धृतीचा उपयोग मोक्षप्राप्तीसाठी केला जातो.

: 34 :

***यया तु धर्मकामार्थन् धृत्या धारयतेऽर्जुन ।***
***प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन यया धृत्याः** हे अर्जुना, ज्या धृतीने
- **धर्मकामार्थान् धारयतेः** धर्म, अर्थ, कामाचे धारण केले जाते
- **तु प्रसंगेनः** पण धर्म, काम, अर्थाच्या प्राप्तीच्या वेळी अती आसक्तीमुळे
- **फलाकांक्षीः** जी माणसाला फलाकांक्षी बनऊन टाकते
- **पार्थः** अर्जुना
- **सा राजसी धृतिः** ती राजसी धृती आहे

**अर्थ**

परंतु हे कुंतीपुत्र अर्जुना, फळाची इच्छा असलेला मनुष्य अती आसक्तीमुळे ज्या धारणा शक्तीने धर्म, अर्थ, काम यांना धारण करतो ती धारणा राजसी होय.

***धर्मार्थकाम सारे चि चालवी सोय पाहुनी ।***
***बुडवी जी फलाशेंत धृति राजस जाण ती ॥***

**विषयः** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आहे. 1) ज्या धृतीने धर्म, अर्थ, कामाचे धारण केले जाते. 2) पण धर्म, काम, अर्थ प्राप्तीच्या समयी जी माणसाला फलाकांक्षी बनवून टाकते. 3) ती राजसी धृती होय.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन यया धृत्या धर्मकामार्थान् धारयतेः** ज्या धृतीने धर्म, काम अर्थाचे धारण केले जाते म्हणजे आचरण केले जाते - करवले जाते. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहे. मोक्ष अंतिम पुरुषार्थ आहे. धर्म पहिला पुरुषार्थ आहे. बहुधा लोक मोक्ष या पुरुषार्थाप्रत एका जन्मात नाही पोहोचू शकत. मोक्ष पुरुषार्थ प्राप्त करवून देणारी धृती सात्विक असते. केवळ धर्म, काम, अर्थ या पुरुषार्थाची आचरण करवणारी धृती राजसी असते.

उन्नतीची पहिली पायरी धर्माचरण आहे. धर्मानेच कामाची तृप्ती आणि अर्थ प्राप्ती करायला हवी. ईश्वराने केवळ संतानोत्पत्तीसाठीच काम शक्ती उत्पन्न केली आहे. हीच धर्मदृष्टी आहे. अर्थप्राप्तीसुध्दा धर्मसंमत व्हायला हवी. राजसी धृती व्यक्तीकडून धर्माचरण करवते. तामसी धृती तर अधर्माचरणच करवते पण राजसी धृती नेहमीसाठी धर्माचरणच करवेल, असे मात्र काही नाही. परिस्थिती अनुकूल असेल तरच धर्माचरण करवेल अन्यथा अधर्माचरणातही प्रवृत्त करते. धर्माचरणपूर्वक अर्थप्राप्तीचे सामान्य ध्येय असते पण प्रतिकूल परिस्थितीत अधर्माचरणपूर्वकही अर्थप्राप्ती करायला राजसी धृती प्रवृत्त करते. राजसी धृती कामाधीन - कामाच्या अधीन - झाली तर अधिक संतनोत्पत्तीसाठी प्रेरित करते. सात्विक धृतीमुळे चित्तावर संपूर्णपणे ताबा राहू शकतो पण राजसी धृतीने सामान्य ताबा रहातो, तामसी धृतीने तर मनावर अजिबात ताबा रहात नाही. राजसी धृतीचा संबंध केवळ धर्म, अर्थ, कामाशी असल्यामुळे ती मोक्षाकडे वळत नाही.

2) **तु प्रसंगेन फलाकांक्षीः** पण धर्म, काम, अर्थ - प्राप्तीच्या समयी जी धृती व्यक्तीला फलासक्तीत बुडवून देते. राजसी धृती व्यक्तीला धर्माचे आचरण करायला जरुर लावते पण धर्माचरणाच्या आधारेच अर्थार्जनाला प्रवृत्त करील असे मात्र सांगता येत नाही. धर्माचरणाद्वारे अर्थप्राप्ती आणि काम तृप्ती करायचे ध्येय असते. काम आणि अर्थासंबंधी मनात प्रचंड आसक्ती असते यामुळे

अडचण निर्माण होत असल्याचे लक्षात आले तर राजस धृती धर्माचरणाचा त्याग करते.

3) **सा राजसी धृति:** ती राजसी धृती आहे. उपर्युक्त दोन लक्षणांनी संपन्न धृती ही राजसी म्हणवली जाते. राजसी धृती मोक्ष प्राप्त करुन देण्याकामी - मोक्ष संपादन करण्याकामी - समर्थ नाही.

: 35 :

***यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च।***
***न विमुंचति दुर्मेधा धृति: सा पार्थ तामसी॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यया स्वप्नं भयं शोकं:** ज्यामुळे स्वप्न, भय, शोक म्हणजे चिंता
- **विषादं च मदं एव:** विषाद आणि मदही म्हणजे दु:ख अणि उन्मत्तताही
- **न विमुंचति:** मनुष्य सोडू शकत नाही म्हणजे धारण करुन रहातो
- **दुर्मेधा:** जे अविवेकपूर्ण म्हणजे दुष्ट बुध्दीचे आहे
- **सा धृति: पार्थ तामसी:** हे अर्जुना, ती धृती तामसी आहे

**अर्थ**

हे पार्था, दुष्ट बुध्दीचा मनुष्य ज्या धारणाशक्तीमुळे झोप, भय, काळजी, दु:ख आणि उन्मत्तपणाही सोडत नाही अर्थात् धारण करुन रहातो, ती धारणा तामसी होय.

***निद्रा भय न जी सोडी शोक खेद तसा मद।***
***घाली झांपड बुध्दीस धृति तामस जाण ती॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आहे. 1) ज्या धृतीमुळे व्यक्ती स्वप्न, भय, शोक, विषाद आणि मदाला सोडू शकत नाही. 2) जी धृती अविवेकपूर्ण आहे. 3) तिला तामसी धृती मानायला हवे.

**स्पष्टीकरण**

1) **यया स्वप्नं भयं शोकं विषादं च मदं एव न विमुंचति:** ज्या धृतीमुळे व्यक्ती स्वप्न, भय, शोक, विषाद आणि मदाला सोडू शकत नाही. इथे पाच विकारांची चर्चा आली आहे. यात आणखी विकारांचा समावेश आहे. झोपेच्या दरम्यान स्वप्नाचा अनुभव प्रत्येकाला येतो. खूप कमी लोकांना नि:स्वप्न झोप लागते. वासनेमुळे स्वप्ने पडतात. दिवसा पंच विषयांशी नित्य संबंध येतो. यामुळे काही विषयांबाबत आकर्षण वाटते तर काही विषयांबाबत तिटकारा जागतो. माणूस, पशु, पक्षी यांच्याशी जो संबंध येतो त्यातही भावना, अनुकूल - प्रतिकूल विचार मनात जोपासले जातात. जागृत काळातले हे सारे संस्कार रोज वेगवेगळ्या रुपात झोपेत प्रकट होत रहातात, याना स्वप्न असे म्हणतात. पूर्वरात्री काही तास गाढ झोप लागते पण उत्तर रात्रीच्या झोपेत वेगवेगळी स्वप्ने येत रहातात.

आपल्या मनात नाना प्रकारचे भय असते. सर्वात मोठे भय मृत्युचे असते. देहविषयक आसक्तीमुळे ते जन्माला येते. देह सोडता क्षणीची वेदना झेलणे अवघड असते. चोर, सर्प, वाघ, सिंह, अस्वल यांचे भय तर आहेच आहे. प्रतिष्ठेचे भयही कमी नसते.

ममतेमुळे शोक उपजतो. ही ममता कुटुंबात पोसली जाते. नातलगांच्या वियोगप्रसंगी शोक उपजतो. मुलीच्या लग्नात आई खूप आनंदाने सहभागी होते. लग्न पार पडते. कन्या सासरी जायला लागते. आई घळघळा रडायला लागते. नातलगांच्या मृत्युसमयी तर काही लोक इतके शोकाकुल होतात की महिनोन् महिने स्वत:ला शोकमुक्त करु शकत नाही. त्यांचे कामातही चित्त लागत नाही. शरीर कृश व्हायला लागते. अर्जुनालाही शोकाने पुरते घेरुन घेतले होते.

शोकामुळे विषाद उत्पन्न होतो. विषाद म्हणजे खिन्नता - उदासीनता. ही दु:खद स्थिती आहे. विषाद उत्पन्न व्हायची अनेक कारणे आहेत. आपल्या इच्छेविरुध्द किंचितही काही घडले म्हणजे लागलीच मनात विषाद उत्पन्न होतो आणि दु:ख होते. अनेकांना क्रोध येतो पण अनेकांना क्रोध येण्याऐवजी विषाद होतो. ज्यांची क्रोधप्रधान वृत्ती असते त्यांना अनुचित कार्य वा आपल्या विरोधात काहीही कार्य घडले तर विषाद जागतो. क्रोध असो वा विषाद दोघे दु:खदायी आहेत.

ज्यांच्या ठायी कमालीचा अहंभाव वसतो त्यांच्यात मदवृत्ती उत्पन्न होते. धन संचित झाल्यावर मद होतो. विद्वांनामध्ये विद्वत्तेचा मद आढळून येतो. कुठलाही गुण

अधिक प्रमाणात प्रकट झाल्यावर त्याचे भान जागून त्याविषयी मद म्हणजे गर्व होऊ लागतो. काही असाधारण कार्य हातून घडल्यावर त्याविषयी मद वृत्ती उत्पन्न होण्याची शक्यता असते. रावणाला आपल्या बळा विषयी मद उत्पन्न झाला होता. सज्जनांनाही मद घेरुन घेतो यामुळे हमेशा त्याच्यापासून वाचायचे प्रयत्न करत रहायला हवेत.

2) **दुर्मेधा:** जी धृती अविवेकपूर्ण आहे. धृती म्हणजे मनाची निश्चय वृत्ती होय. या निश्चयवृत्तीचा वाटेल तसा उपयोग करणे अविवेकपूर्णच मानले जाईल. लोक चहा, विडी, पान, तंबाकू वगैरे विषयी व्यसनी बनतात - आहारी जातात. याच्या पाठीमागे अविवेक असतो. चहा वगैरेची सवय चांगली नाही असे बुध्दी बजावत असते पण मन मानत नाही. मनात निश्चय वृत्ती असते. अविवेकामुळे मन व्यसनी बनून जाते. असा निश्चय चुकीचा आहे, जीवनाला नष्ट करणारा आहे.

3) **सा धृतिः पार्थ तामसी:** हे अर्जुना, ती धृती तामसी होय. तामसी म्हणजे अध:पतीत करवणारी, जीवन उध्वस्त करणारी धृती. ईश्वराने मनात निश्चय वृत्ती राखली आहे तिचा सदुपयोग करणे सात्विक धृती होय. कधी सदुपयोग तर कधी दुरुपयोग राजसी धृती तर सदासर्वदा दुरुपयोग करणे तामसी धृती होय. अशा प्रकारे धृतीच्या तीन स्वरुपांचे वर्णन झाले.

: 36 - 37 :

*सुखं त्विदानीं त्रिविधं श्रृणु मे भरतर्षभ।*
*अभ्यासाद्रमते यत्र दु:खान्तम् च निगच्छति॥*
*यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।*
*तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुध्दिप्रसादजम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भरतर्षभ:** हे, भरतश्रेष्ठ अर्जुना
- **तु इंदानीं त्रिविधं सुखं:** पण आता हे तीन प्रकारचे सुख
- **मे श्रृणु:** माझ्याकडून ऐक
- **यत्र अभ्यासात्:** ज्या सुखात अभ्यासामुळे
- **रमते च दु:खान्तं निगच्छति:** रममाण होतो अर्थात् दु:खाचा अंत येतो
- **यत् सुखं अग्रे विषं इव:** जे सुख सुरुवातीला विषासारखे
- **परिणामे अमृतोपमम्:** पण अखेरीस अमृतासारखे असते
- **तत् सुखं आत्मबुध्दिप्रसादजम्:** जे सुख आत्मनिष्ठ बुध्दीच्या प्रसन्नतेने म्हणजे भगवद्विषयक बुध्दीच्या प्रसादाने उत्पन्न होते
- **सात्त्विकं प्रोक्तं:** त्याला सात्विक सुख असे म्हणतात

**अर्थ**

हे भरतश्रेष्ठा, आता तीन प्रकारचे सुखही तू माझ्याकडून ऐक. ज्या सुखात साधक भजन, ध्यान आणि सेवा इत्यादींच्या अभ्यासाने रमतो आणि ज्यामुळे त्याचे दु:ख नाहीसे होते.

जे आरंभी जरी विषासारखे वाटले, तरी परिणामी अमृतासारखे असते, ते परमात्मविषयक बुध्दीच्या प्रसादाने उत्पन्न होणारे सुख सात्विक म्हटले गेले आहे.

*तिन्ही प्रकारचें आतां सांगतों सुख ऐक तें ।*
*अभ्यासें गोड जें होय दु:खाचा अंत दाखवी ॥*
*जे कडू विख आरंभी अंती अमृत - तुल्य चि ।*
*आत्म्यांत शुध्द बुध्दीस लाभलें सुख सात्त्विक ॥*

**विषय:** या दोन श्लोकात पाच गोष्टींची चर्चा आली आहे. 1) आता माझ्याकडून तीन प्रकारच्या सुखांविषयी ऐक. 2) ज्या सुखात अभ्यासात रमण होतो आणि दु:खाचा अंत येऊन ठेपतो. 3) जे सुख सुरुवातीला विषासमान पण अखेरीस अमृताच्या समान असते. 4) ते आत्मनिष्ठ बुध्दीने होणाऱ्या प्रसन्नतेने उत्पन्न होते. 5) त्याला सात्विक सुख असे म्हणतात.

36 आणि 37 व्या श्लोकाचे सोबत विश्लेषण केले आहे. याचे कारण असे की 36 व्या श्लोकाच्या उत्तरार्धाचा संबंध 37 व्या श्लोकाशी आहे. खरे पाहू गेल्यास 36 वा श्लोक एकाच ओळीचा आहे (यामुळे विनोबांनी गीताईत 36 वा श्लोक एकाच ओवीत देऊन 37 व्या श्लोक तीन ओळींचा केला आहे. 36 व्या श्लोकाच्या पहिल्या चरणात सांगितले आहे की सुखाचे प्रकार तीन -सात्विक, राजस आणि तामस.)

**स्पष्टीकरण**

1) **तु इदानीं त्रिविधं सुखं मे श्रृणु:** आता हे तीन प्रकारचे सुख मी सांगतो ते तू ऐक.

2) **यत्र अभ्यासात् रमते च दु:खान्तं निगच्छति:** ज्या सुखात अभ्यासाने रमण होता येते - रममाण होता येते आणि दु:खाचा अंत होऊन जातो. हे सात्विक सुख होय. लोकाना असे वाटते की राजस आणि तामस सुखाने दु:ख दूर होते यामुळे यातच अडकून पडतात पण ही दु:खनिवृत्ती तात्कालिक वा आभासी असते. सात्विक सुख आले म्हणजे कायम स्वरुपी दु:खनिवृत्ती होऊन जाते. सात्विक सुखात रत असण्याचा अभ्यास आवश्यक आहे, अन्यथा ते टिकू शकत नाही. सत्कर्म वा सत्संग वा सद्ग्रंथांचे पठण थोडा काळ केले गेले तर तो काही अभ्यास नव्हे. अभ्यास म्हणजे एकाच वस्तुला वारंवार करत रहाणे. यामुळे आपल्याला आनंद देणाऱ्या अनुभवाला टिकवून ठेवण्यासाठी वारंवार अभ्यास करणे गरजेचे आहे. राजस वा तामस सुख अल्पजीवी - तात्कालिक स्वरुपाचे असते त्यातून दु:ख निवृत्तीचा अनुभव घेता येत नाही. यामुळे दु:खाची आत्यंतिक निवृत्ती - संपूर्णपणे निवृत्ती होऊन अखंड आनंद म्हणजे मोक्षदायी आनंद प्राप्त करायचाच अभ्यास व्हायला हवा. चित्त निर्विकार बनले तरच या आनंदाची प्राप्ती होऊ शकेल. चित्तावर ताबा मिळवण्यासाठी गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या अखेरीस - समापनात - अभ्यास आणि वैराग्य विषयक विवेचन आले आहे.

3) **यत् सुखं अग्रे विषं इव:** जे सुख आरंभी विषासमान त्रासदायक ठरते ते परिणामी अमृतोपम - अखेरीस अमृता समान सुख देते. ही सात्विक सुखाची महत्वाची व्याख्या आहे. स्पष्टीकरण आहे. असे विवेचन गीतेत अन्यत्र कुठे नाही. इथे व्याख्येची दोन स्वरुपे वर्णिली आहेत. पहिले स्वरुप असे आहे की सुख आरंभी त्रासदायक - कष्टप्रद - म्हणजे तप करवणारे असते. सर्वसामान्य लोकानाही हा अनुभव असतो. व्यापारी सुरुवातीला खूप दीर्घकाळपर्यत त्रास झेलतात - कष्ट उपसतात मग त्यांना एवढी कमाई होऊन जाते की मग त्यांना कष्ट उपसावे लागत नाहीत आणि अखेरीस सुखाचा अनुभव येतो. एखादी संस्था उभारायची असेल तर सुरुवातीला खूप परिश्रम घ्यावे लागतात मग निश्चिंतता येते - आराम मिळतो. आध्यात्मिक ग्रंथांच्या अभ्यासात सुरुवातीला मोठा त्रास होतो. जेव्हा त्याचे (रहस्य) स्वरुप कळायला लागते तेव्हा आनंद मिळू लागतो. संगीताचा अभ्यास सुरु केला तर कंठातून सात स्वर योग्यप्रकारे प्रकटच होत नाही. हाच मुद्दा अन्य विषयांच्या बाबतीतही सांगता येईल. ध्यान करायला बसतो पण चित्त एकाग्र होऊ शकत नाही. उपाय शोधले जातात. निराशाही येते. अशा प्रकारे साधक साधनेत निराश होऊन जातो. अभ्यास मग तो वैराग्याचा असो वा भक्तीचा अभ्यास, अकर्तेपणाचा असो वा सर्वक्रिया ईश्वरार्पण करायचा असो आरंभी त्रासदायक वाटतो. नंतर, साधनेच्या समापनाच्या वेळी यातून अमृतोपम सौख्याची प्राप्ती होते.

4) **तत् सुखं आत्मबुध्दिप्रसादजम्:** आत्मनिष्ठ बुध्दीत होणाऱ्या प्रसन्नतेमुळे ते सुख उत्पन्न होते. ऐहिक सुखे मिळवण्यासाठीही सुरुवातीला कष्ट झेलावे लागतात आणि अंती सुखाचा लाभ होतो पण ते सुख आत्यंतिक वा शाश्वत स्वरुपाचे नसते. ऐहिक सुखदेखिल अनेक प्रकारचे असते. एक प्रकारचे सुख असे असते की आरंभी कष्ट नाही उपसावे लागत आणि प्राप्त होऊन जाते. पैसा मिळवायला, आजीविका - उपजीविका - व्यवसाय मिळवायला सुरुवातीला खूप त्रास झेलावा लागतो पण धन प्राप्त झाल्यानंतर सुखाच्या ऐहिक साधनांची खरेदी करतांना - जुळवाजुळव करतांना - खूप त्रास नाही घ्यावे लागत पण सारी ऐहिक सुखे अल्पकालिक आणि क्षणिक असतात. यामुळे इथे सांगताहेत की बुध्दी आत्मा म्हणजे परमात्म्याच्या ठायी एकनिष्ठ वा तल्लीन झाली तर त्याद्वारे लाभणारे सुख आरंभी कष्टप्रद असले तरी अखेरीस अमृतासमान शाश्वत आणि चिरकाळ टिकणारे असेल. जोवर चित्त निर्विकार होत नाही तोवर बुध्दी आत्मा वा परमात्माच्या ठायी विलीन होऊ शकत नाही आणि चित्ताला निर्विकार करण्यासाठी वर्षोन्वर्षे उत्कट आध्यात्मिक साधना करावी लागते.

5) **सात्त्विकं प्रोक्तम्:** याला सात्विक सुख म्हणतात. हे सुख 1) सुरुवातीला कष्टप्रद असले तरी 2) पण परिणामी अमृतोपम सुखदायक आणि. 3) बुध्दी ईश्वराच्या ठायी एकरुप झाल्यामुळे उत्पन्न होणारे असल्यामुळे दु:खाची आत्यंतिक निवृत्ती करणारे अशा प्रकारे सात्विक सुखाची तीन लक्षणे सांगितली गेली आहेत.

: 38 :

*विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।*
*परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् सुखं:** जे सुख
- **विषयेन्द्रियसंयोगात्:** विषय आणि इंद्रियांच्या संयोगामुळे उत्पन्न होते
- **अग्रे अमृतोपमम्:** ते सुरुवातीला अमृतासारखे वाटते (पण)
- **परिणामे विषं इव:** परिणामी विषासमान असते
- **तत् सुखं राजसं स्मृतम्:** त्या सुखाला शास्त्रात राजस म्हटले आहे

**अर्थ**

जे सुख विषय आणि इंद्रियांच्या संयोगाने उत्पन्न होते ते प्रथम भोगतांना अमृतासारखे वाटत असले तरी परिणामी विषासारखे असते म्हणून ते सुख राजस म्हटले गेले आहे.

*आरंभीं गोडसें वाटे अंतीं मारक जें विख ।*
*भासे विषय - संयोगे इंद्रियां सुख राजस ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा झाली आहे. 1) जे सुख विषय आणि इंद्रियांच्या संयोगातून उत्पन्न होते. 2) सुरुवातीला अमृतासारखे वाटते. 3) आणि क्षणिक असल्यामुळे अखेरीस विषासमान होते. 4) त्या सुखाला शास्त्रात राजस म्हटले आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यत् सुखं विषयेन्द्रिय संयोगात्:** जे सुख विषय आणि इंद्रियांच्या संयोगातून उत्पन्न होते. या श्लोकात राजस सुखाचे वर्णन आले आहे. इंद्रियांच्या विषयांशी येणाऱ्या नित्याच्या संबंधांमुळे जे सुख मिळते, ते सतत मिळत रहावे, या विचारामुळे ज्या सुखाला प्राप्त करण्याचा प्रयत्न माणूस सतत करतो. पाच ज्ञानेंद्रियांपासून अधिक सुखाची प्राप्ती होते. कर्मेंद्रियांमध्ये सुखाचे मुख्य साधन उपस्थ म्हणजे जननेंद्रिय मानले जाते. संपूर्ण जग त्या इंद्रियाने प्राप्त होणाऱ्या क्षणिक सुखावर खूप मोहित असते. कर्मेंद्रियांपैकी वाणी आणि ज्ञानेंद्रियांपैकी डोळे यांच्या माध्यमातून अधिक सुख प्राप्त होते. एका दृष्टीने बघू जाता माणूस ज्ञानेंद्रियांपैकी जीभेवर अधिक मोहित असतो. चांगली दृश्ये बघितल्याने सुख मिळते पण भोजन केल्याने जे सुख लाभते ते या नेत्रसुखापेक्षा कैक पट अधिक आहे. कानानेही सुख मिळते पण संगीताच्या जाणकारांनाच - दर्दीनांच श्रवणसुखाचा आनंद मिळतो. चित्रकलेच्या रसिकांना नेत्र सुख अधिक लाभते पण या इंद्रियांचा विषयांशी संबंध आल्यावर लाभणाऱ्या आनंदाला खरा आनंद म्हणू शकत नाही कारण तो आनंद क्षणिक स्वरुपाचा असतो. दीर्घकाळापर्यंत टिकून रहाणारा आनंद खरा व सुख खरे सुख होय. क्षणिक सुख वा आनंदाची गणना राजस सुखात केली गेली आहे.

2) **अग्रे अमृतोपमम्:** आरंभी अमृतासारखे वाटणारे म्हणजे गोड, खूप मधुर. सात्विक सुख अखेरीस अमृतासमान असते आणि राजस सुख आरंभी अमृतासम असते. आरंभी अमृतोपम असूनही जर शाश्वत असेल तर राजस सुखामागे धावण्यात काही अडचण नाही पण राजस सुखे विषयांच्या संयोगातून उत्पन्न होत असल्यामुळे क्षणिक असतात. यामुळे ती सुखे सदोष आहेत. या सुखांच्या पाठीमागे धावल्यामुळे अखेरीस नुकसानच झेलावे लागते. साध्या भोजनाऐवजी मिष्टान्नात अधिक सुख वाटत असल्यामुळे काहीसे अधिकच खाल्ले जाते पण यामुळे अपचन होते आणि अखेरीस पश्चाताप करावा लागतो.

3) **परिणामे विषमिव:** अखेरीस विषासमान दुःखदायक असते. मागील लक्षणाशी संबध्द असल्यामुळे दोघे मिळून एक लक्षण होऊन जाते. आरंभीचे सुख अखेरपर्यंत टिकून रहावे अशीच व्यक्तीची कामना असते एवढेच नव्हे तर त्या सुखात दिवसेंदिवस वृध्दी होत राहो अशीही कामना असते पण अशी इच्छा असूनसुध्दा माणूस त्याप्रमाणे वागायला काही तयार होत नाही. यामुळे त्याला स्थायी सुखाची प्राप्ती काही होत नाही. सुख टिकून असावे असे वाटत असेल तर आरंभी कष्ट उपसायची तपाचरण करायची तयारी असली पाहिजे. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्यासाठी एक वर्षभर एकाग्रतेने अभ्यास करावा लागतो. परीक्षा जवळ आली म्हणजे अधिक वेगाने अभ्यास करावा लागतो. समर्थ रामदास स्वामी लिहितात

- आधी कष्ट मग फळ । कष्टच नाही ते निष्फळ ॥ म्हणजे आधी श्रम कराल तर फळ मिळेल. श्रमच केले नाहीत तर अखेरीस फळ मिळणार नाही, म्हणजे कर्म निष्फळ होईल. जे आधी आरामाने विषयसुख उपभोगू इच्छितात त्यांच्या पदरी अखेर दु:खरुपी विषय येते - पडते.

4) **तत् सुखं राजसं स्मृतम्:** शास्त्रात त्या सुखाला राजस म्हटले गेले आहे. इथे राजस सुखाची तीन लक्षणे वर्णिली आहेत. शास्त्राचा संकेत स्मृत या शब्दाने व्यक्त केला गेला आहे.

: 39 :

*यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मन: ।*
*निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत् अग्रे च अनुबन्धे:** जे सुख आरंभी आणि अखेरीस
- **आत्मन: मोहनं:** आत्म्याला मूर्च्छित करणारे
- **च निद्रालस्यप्रमादोत्थं:** आणि निद्रा, आळस आणि बेसावधपणामुळे उत्पन्न होते
- **तत् सुखं तामसं उदाहृतम्:** त्या सुखाला तामस सुख म्हटले जाते

**अर्थ**

जे सुख भोगकाळी आणि अखेरीसही म्हणजे परिणामीही आत्म्याला मोह पाडणारे असते ते झोप, आळस आणि प्रमादापासून उत्पन्न झालेले सुख तामस म्हटले गेले आहे.

*निद्रा आळस दुर्लक्ष ह्यांनी आत्म्यास घेरुनी ।*
*आरंभीं परिणामीं हि गुंगवी सुख तामस ॥*

**विषय:** या श्लोकात तामस सुखाची तीन लक्षणे आहेत. 1) जे सुख आरंभी आणि अखेरीस आत्म्याला मूर्च्छित करणारे, 2) परमात्म ज्ञानापासून विमुख करणारे व 3) निद्रा, आळस आणि बेसाधपणामुळे उत्पन्न होते. 4) ते तामस सुख होय.

**स्पष्टीकरण**

1) **यत् अग्रे च अनुबन्धे आत्मन: मोहनम्:** जे सुख आरंभी आणि अखेरीस आत्म्याला बेशुध्द - मूर्च्छित - करणारे, परमात्म ज्ञानाने विमुख करणारे आहे. तामस सुखाचे वैशिष्ट्य हे आहे की ते सुरुवातीपासून अखेरपर्यंत आत्म्याला मूर्च्छित राखते, यामुळे आपल्याला परमात्म ज्ञानापासून वंचित राखते, परमात्म ज्ञानाची जिज्ञासा मनी जागू देत नाही. आरंभापासून अखेरपर्यंत आपण विषय सुखात डुंबत रहावे त्यातून बाहेर पडायची प्रेरणा आपल्याला कदापि न लाभो. याला इथे 'मूर्च्छा' म्हटले आहे. मूर्च्छित व्यक्ती इतकी बेशुध्द असते की तिला काही भान उरत नाही. या मूर्च्छेमुळे आत्म्यावर - ज्ञानावर - सघन आवरण झाकले जाते. याचा परिणाम असा होतो की सुख प्राप्त करण्यात नीती - अनीतीचा विचार मनाला स्पर्श करत नाही, संपूर्णपणे देहाला वश होऊन देहसुखालाच कर्तव्य मानून जीवन घालवावे म्हणून व्यक्ती जर तामसी सुखात लीन होऊन गेली तर परमात्म ज्ञानाची पिपासा उत्पन्न होण्यात मोठी अडचण निर्माण होईल, हे ध्यानी घेतले पाहिजे. हा अडथळा - ही अडचण - कायमस्वरुपी असते. यामुळे कुठल्याही व्यसनात फसायला नको. व्यसने वेगवेगळ्या प्रकारची असतात. आपण जर सावध म्हणजे जागृत राहिलो नाही तर कुठल्याही व्यसनात जखडले जाण्याची शक्यता असते. आजकाल समाजासमोर आध्यात्मिक सुखाऐवजी आधिभौतिक सुखे प्राप्त करायचे लक्ष्य वा ध्येय असल्यामुळे लोक अगदी बघता - बघता व्यवसनाधीन होऊन जातात.

2) **च निद्रालस्यप्रमादोत्थं:** आणि हे निद्रा, आळस आणि बेसाधपणामुळे उत्पन्न होते. कर्तव्य भावनेने झोप घेतली तर ती काही सुखाचे साधन बनणार नाही. ईश्वरी अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठी शरीर एक साधन आहे. जागृत अवस्थेत आपण शरीराचा उपयोग करुन घेतो. शरीराची झीज होते. त्याच्या पूर्तीसाठी शरीराला विश्रांती देणे कर्तव्यरुप आहे. झीज भरुन काढण्यासाठी आपण निद्रा घेत आहोत अशी भावना राखली तर निद्रेमुळे उत्पन्न होणारे सुख गौण होऊन जाईल पण जे लोक तमोगुणाने ग्रसित असतात ते निद्रेद्वारे सुख मिळवण्याचा प्रयत्न करणारे असल्यामुळे ते अधिकाधिक झोप घ्यायचा प्रयत्न करतात. तसेच आळसानेही सुख प्राप्त करुन घ्यायचा

प्रयत्न करतात. कामात शिथिलता - मंदता - ही आळसाची निशाणी होय पण तमोगुणी लोक आळसाच्या अधीन होऊन कार्य न करण्यात आनंद मानतात.

प्रमाद म्हणजे अदक्षता. हलगर्जीपणाचा समावेशही प्रमादात होतो. काही लोक अदक्षतेने, हलगर्जीपणाने कार्य करण्यात स्वत:ला यशस्वी मानतात. त्यात आनंद मानतात. चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी दक्षतेची गरज असते. जागृती शिवाय दक्षता येऊ शकत नाही. जे तमोगुणाच्या अधीन होऊन कार्य करतात त्यांच्या कार्यात सदैव जडत्व म्हणजे बेसावधपणा असतो. त्यांना विस्मरण कधी खटकणारच नाही. ते म्हणतील की आम्ही स्मरणाचे गुलाम नाहीहोत. कधी स्मरण असेल तर कधी विस्मरण. या स्थितीत ते आनंद घेतात. सदैव दक्ष असावे, जागृत असावे, याचा अर्थ असा झाला की आपण दक्षतेचे आणि जागृतीचे गुलाम होऊन गेलोत - अधीन होऊन गेलोत. आपण स्वतंत्र असल्यामुळे आपल्या कार्यात प्रमाद होणे स्वाभाविक आहे. अशा प्रकारे प्रमादात आनंद मानणे तामसी सुख होय.

3) **तत् सुखं तामसं उदाहृतम्:** त्या सुखाला तामस म्हटले गेले आहे. उपरोक्त लक्षणे असलेले सुख तामस म्हणजे निम्न दर्जाचे, समाजाला अध:पतीत करणारे, अकल्याणकारी आहे असे समजून त्याचा त्यागच करायला हवा.

: 40 :

*न तदस्ति पृथिव्यां वा दिवी देवेषु वा पुन: ।*
*सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभि: स्यात्त्रिभिर्गुणै: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **प्रकृतिजै:** प्रकृतीपासून उत्पन्न
- **एभि: त्रिभि: गुणै:** या तीन गुणांनी
- **यत् मुक्तं स्यात् तत् सत्वं:** जो मुक्त असेल असा एकही पदार्थ वा प्राणी
- **पृथिव्यां वा पुन: दिवि देवेषु वा:** पृथ्वीत वा स्वर्गात वा देवांमध्येही
- **न अस्ति:** नाही

**अर्थ**

या प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांनी रहित असेल असा पृथ्वीवर, आकाशात किंवा देवात तसेच यांच्याशिवाय इतरत्र कुठेही असा कोणताच प्राणी वा पदार्थ नाही.

*इथें पृथ्वीवरी किवा स्वर्गीं देवादिकांत हि ।*
*कांही कुठें नसे मुक्त प्रकृतीच्या गुणांतुनी ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) प्रकृतीने उत्पन्न या तीन गुणांनी मुक्त एकही पदार्थ. 2) पृथ्वीत वा स्वर्गातल्या देवांमध्येही नाही.

**स्पष्टीकरण**

1) **प्रकृतिजै: एभि: त्रिभि: गुणै: यत् मुक्तं स्यात् तत् सत्त्वम्:** प्रकृतीने उत्पन्न अशा या तीन गुणांनी युक्त असा एकही पदार्थ. या अध्यायातल्या 19 ते 39 या एकवीस श्लोकांमध्ये ज्ञान, कर्म, कर्ता, बुध्दी, धृती सुखाशी संबंधित तीन गुणांच्या अनुसार तीन - तीन प्रकारांचे वर्णन लक्षणांसहित केले गेले आहे. सतराव्या अध्यायात आहार, यज्ञ, तप याविषयी तीन गुणांच्या अनुसार तीन प्रकारांचे वर्णन आले आहे. तोच न्याय सर्व वस्तुंवर लागू होतो हे या श्लोकात सांगताहेत. एकोणिसाव्या श्लोकात सांख्यशास्त्राची चर्चा आहे. कपिल महामुनी यानी केलेल्या सत्व, रज, तम या त्रिगुणांच्या विश्लेषणाला गीतेने स्वीकारले आहे. यामुळे इथे म्हटले गेले आहे की ब्रह्मांडातील समस्त पदार्थ तीन गुणांनी युक्त आहेत.

2) **पृथिव्यां वा पुन: दिवि देवेषु वा न अस्ति:** पृथ्वी वा स्वर्गातील देवतांमध्ये सुध्दा नाही. सारे पदार्थ त्रिगुणांनी युक्त आहेत. त्याशिवाय कुठलाच पदार्थ नाही. हे सारे पदार्थ कुठे आहेत ? याचे उत्तर दिले आहे की पृथ्वी आणि स्वर्गातील देवतांमध्ये आहेत. दोघांची चर्चा करुन संपूर्ण ब्रह्मांडाची चर्चा केली आहे. स्वर्गातल्या देवांचा अर्थ आहे देव ज्या स्वर्गात रहातात तो स्वर्ग. त्याचेही उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे प्रकार असतात. ब्रह्मांडाचा अर्थच कमी - अधिकपणा आहे आणि यातून कुठलीही गोष्ट सुटलेली नाही. हे कमी - अधिकपण तीन प्रकारचे आहे असे सांख्यमतवाद्यांनी निश्चित केले आहे आणि हा सिध्दांत खरा आहे.

: 41 :

*ब्राह्मण- क्षत्रिय - विशां शूद्राणां च परंतप ।*
*कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणै: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **परंतप ब्राह्मण- क्षत्रियं - विशां:** हे अर्जुना, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य
- **च शूद्राणां कर्माणि:** आणि शुद्रांची कर्मे
- **स्वभावप्रभवै: गुणै:** आपापल्या स्वभाव आणि गुणांच्या अनुसार
- **प्रविभक्तानि:** वेगवेगळ्या प्रकारची आहेत

**अर्थ**

हे परंतपा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची कर्मे स्वभावत: उत्पन्न झालेल्या गुणांमुळे निरनिराळी केली गेली आहेत.

*ब्राह्मणादिक वर्णांचीं कर्में तीं तीं विभागिलीं ।*
*स्वभाव - सिध्द जे ज्याचे गुण त्यांस धरुनियां ॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चारी वर्णांची कर्मे. 2) आपापल्या स्वभाव गुणानुसार वेगवेगळी आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **परंतप ब्राह्मण - क्षत्रिय - विशां च शूद्राणां कर्माणि:** हे अर्जुना, ब्राह्मण , क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णाची कर्मे. चौथ्या अध्यायातील तेराव्या श्लोकात याचे स्पष्टीकरण आले आहे. चार वर्ण आणि चार आश्रमांचा शोध भारतात लागला. व्यवस्था इथे लावली गेली. सामाजिक रचना आणि उत्कर्षाकामी या व्यवस्थेने सहाय्य केले. आधी चारी वर्णात उच्चनीच भाव - भेदभाव - नव्हता. ही योजना क्षत्रिय समाजरक्षणाचे, वैश्य व्यवसायाद्वारे जीवनोपयोगी वस्तुंच्या पूर्तीचे व शूद्र उत्पादनाचे कार्य करत होते.

2) **स्वभावप्रभवै: गुणै: प्रविभक्तानि:** आपल्याला स्वभावगत गुणांच्या अनुसार वेगवेगळ्या प्रकारे रचलेले आहेत. स्वभाव म्हणजे प्रकृती. अनेक जन्मात केलेल्या भल्या - बुऱ्या - चांगल्या - वाईट कर्मानुसार प्रकृती बनते. प्रकृती वा स्वभाव म्हणजे अनेक जन्मात केलेल्या - जन्मोजन्मी केलेल्या - भल्या - बुऱ्या कर्माच्या संस्कारांचा संग्रह. या संस्कारानुसार सद्गुण दुर्गुण प्रकट होतात. कायिक, वाचिक, मानसिक कर्मे होतात. यामुळेच इथे असे सांगितले आहे की चार वर्णांची कर्मे त्यांच्याठायी स्थित गुणानुसार ठरतात - निश्चित होतात.

: 42 :

*शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।*
*ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **शम:** शांती म्हणजे अंत:करणाचा निग्रह
- **दम:** इंद्रिय - दमन
- **तप:** तप, धर्माकरिता कष्ट सहन करणे
- **शौचं:** अंतर्बाह्य शुध्दी
- **क्षांति:** क्षमावृत्ती
- **च आर्जवम् एव:** आणि मन, इंद्रिये आणि शरीराचा सरळपणा
- **ज्ञानं:** ज्ञान
- **विज्ञानम्:** परमात्म्याचा अनुभव
- **आस्तिक्यं:** शास्त्र आणि संतांवर श्रध्दा
- **ब्रह्मकर्म स्वभावजम्:** ही ब्राह्मणांची स्वभावजन्य कर्मे म्हणजे गुण होत

**अर्थ**

अंत:करणाचा निग्रह, इंद्रियांवर ताबा ठेवणे, धर्मासाठी कष्ट सहन करणे, अंतर्बाह्य शुध्द रहाणे, दुसऱ्यांच्या अपराधांना क्षमा करणे, मन, इंद्रिये व शरीर सरळ राखणे, वेद, शास्त्र, ईश्वर व परलोक इत्यादींवर विश्वास ठेवणे, वेद-शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन करणे आणि परमात्मतत्वाचा अनुभव घेणे ही सर्वच्या सर्व ब्राह्मणांची स्वाभाविक कर्मे आहेत.

*शांति क्षमा तप श्रध्दा ज्ञान विज्ञान निग्रह।*
*ऋजुता आणि पावित्र्य ब्रह्म - कर्म स्वभावतां॥*

**विषय:** या श्लोकात ब्राह्मणांचे नऊ गुण वर्णिले आहेत. 1) शांती. 2) इंद्रियांवर संपूर्ण ताबा. 3) तप. 4) आंतर्बाह्य शुध्दी. 5) क्षमा वृत्ती. 6) सरळपणा. 7) आत्मा - परमात्माविषयक ज्ञान. 8) परमात्म्याचा अनुभव करुन घ्यायचे प्रयत्न. 9) शास्त्र आणि संतांबद्दल श्रध्दा. 10) ही ब्राह्मणांची स्वभावजन्य कर्मे आहेत -गुण आहेत.

**स्पष्टीकरण**

1) **शम:** शांती. कुठल्याही परिस्थितीत चित्ताची निर्विकारता. जोवर कुणी अनुकूल, प्रिय चर्चा करतो तोवर व्यक्ती शांत असते. प्रतिकूल वातावरणात क्षुब्ध होऊन शांतता गमावून बसते. शांतीशी सुख संलग्न आहे. दुसऱ्या अध्यायातील 66 व्या श्लोकात अशान्तस्य कुत: सुखम् असे म्हटले गेले आहे. अशांत व्यक्तीला सुख कुठून प्राप्त होईल ? कसे प्राप्त होईल ? प्रतिकूलतेत चित्त प्रक्षुब्ध होते यामुळे दु:खाचा अनुभव येतो. यामुळे कुठल्याही परिस्थितीत म्हणजे प्रतिकूल अवस्थेत चित्त शांत म्हणजे निर्विकार आणि अक्षुब्ध रहायला हवे. हा ब्राह्मणाचा पहिला गुण होय.

2) **दम:** ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रियांवर संपूर्ण नियंत्रण. आपण सदा इंद्रियांच्या अधीन असतो. आत्म्याची प्रेरणा सदा सत्य आणि संयमाकडे वळलेली असते तर इंद्रियांची प्रेरणा सदैव भौतिक सुखांसाठी - सुखांच्या प्राप्तीसाठी - लोक असत्याचरणातही प्रवृत्त होतात पण जर असा निश्चय झाला असेल की कुठल्याही परिस्थितीत आत्म्याच्या प्रेरणेच्या विरोधात इंद्रियाधीन होऊन चालणार नाही तर इंद्रियांवर ताबा राहू शकेल आणि तरच शांती व सुखाचा अनुभव येईल. हा झाला ब्राह्मणाचा दुसरा गुण.

3) **तप:** कायिक, वाचिक आणि मानसिक तप. सतराव्या अध्यायातील चौदा ते सोळा या तीन श्लोकांमध्ये कायिक, वाचिक, मानसिक तपाचे वर्णन आले आहे. या श्लोकांचे यथास्थानी सविस्तर वर्णन केले गेले आहे. इंद्रियांवर ताबा मिळवण्यासाठी तीन प्रकारच्या तपांची आवश्यकता असते. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की तपात एकांगीपणा यायला नको. एक टोक भोग तर दुसरे टोक तप आहे. भोग आणि त्याग या तपाच्या मध्ये संयम आहे. संयम म्हणजे तमोमय जीवन हा तिसरा गुण.

4) **शौचम्:** पवित्रता, आंतर्बाह्य शुध्दी. सोळाव्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकात आलेय शौचं. पतंजली महामुनींच्या 'योगसूत्र'च्या साधनपादाच्या चाळिसाव्या सूत्रात शौचात् स्वांगजुगुप्सा परैरसंसर्ग: - म्हटले अर्थात् आंतर्बाह्य शुध्दीने आपल्या शरीरातील अंगांविषयी घृणा उत्पन्न होईल आणि त्यामुळेच दुसऱ्याला स्पर्श करायची इच्छा उरणार नाही. ही आंतर्बाह्य शुध्दी ब्रह्मचर्याच्या कायिक, वाचिक, मानसिक पालन करण्याकामी खूप मदतरुप ठरेल. शरीराला स्वच्छ ठेवले तर त्याचे खरे स्वरुप प्रकट होते. हे सतत मलीन होत रहात असते. एक दिवसही स्नान केले नाही तर शरीरातून दुर्गंध यायला लागतो. मनही विकारांमुळे मलीन होत रहात असते. यामुळे आंतर्बाह्य शुध्दीकडे लक्ष दिले तर एरवी अवघड वाटणारे ब्रह्मचर्य-पालन सुलभ होऊन जाते. हा चौथा गुण.

5) **क्षांति:** दुसऱ्यांबद्दल क्षमावृत्ती. तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकात ज्ञानाची लक्षणे वर्णिली गेली आहेत. सातव्या श्लोकातले चौथे लक्षण आहे क्षमावृत्ती. तिथे स्पष्टीकरण दिले आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वत:च्या दोषांना क्षमा करते पण तसेच दोष इतरांच्या ठायी दिसून आले तर मात्र त्या चुकांना वा दोषांना क्षमा करायला तयार होत नाहीत. खरे तर आपल्या चुकांना वा दोषांना आपण क्षमा करायला नको -सहन करायला नको. स्वत:ला नेहमी खड्ग धारेवर चालवावे. इतरांच्या दोषांना वा अपराधांना क्षमा करायचा विचार ठेवला तर धैर्य राखून सदैव वाट शोधत रहायचा सराव होईल. अधीरता, चिडचिड, प्रक्षोभ या वृत्ती न उसळता शांत रहातील आणि क्षीण होत जातील.

6) **च आर्जवं एव:** व्यवहारात सरळपणा. तेराव्या अध्यायातील सातव्या श्लोकात ज्ञानाच्या लक्षणांची चर्चा करतांना सरळपणाचा उल्लेख आला आहे. या लक्षणात 'एव' हा विशेष शब्द आहे जिथे ज्ञान आहे तिथे विनम्रता आहे आणि जिथे नम्रता आहे तिथे सरळता असलीच पाहिजे. जिथे सरळता दिसत नसेल तिथे विनम्रता नाही असे समाजायला हवे.

नवधा भक्तीत नववी भक्ती अशी आहे. नवम सरल सबसन छलहीना। तुलसीदासजींनी सांगितले आहे की

जिथे निष्कपट सरळता आहे ती नववी भक्ती होय. जिथे सत्यनिष्ठा असते तिथे सरळपणा असतो.

7) **ज्ञानम्:** आत्मा-परमात्माविषयक ज्ञान. ज्ञानाचे साधन आहे बुध्दी. बुध्दीच्या ठायी जेव्हा आत्मा - परमात्माविषयक अज्ञान असते आणि ज्या विषयी जाणून घ्यायची इच्छा असते तेव्हा माणूस सत्संगतीच्या आधारे वा स्वतंत्रपणे शास्त्राध्ययन करुन ज्ञान मिळवायचे प्रयत्न करतो पण इंद्रियातीत आत्मा वा परमात्माविषयक ज्ञान संपादन करतांना - प्राप्त करतांना खूप शंका येतात. ज्यांचे सुयोग्य समाधान झाले तरच ज्ञानप्राप्ती होऊ शकते.

8) **विज्ञानम्:** परमात्म्याचा अनुभव प्राप्त करायचे प्रयत्न. आत्मा - परमात्माविषयक ज्ञान प्राप्त झाल्यावर व्यक्ती साधनेत प्रवृत्त होऊन अनुभव प्राप्त करु शकते. साधनेत प्रवृत्त व्हायचे प्रमुख कारण जिज्ञासाच आहे. कित्येक लोक आत्मा - परमात्मा आणि त्याशी संबध्द तत्वज्ञानाचा योग्य पध्दतीने अभ्यास करुन घेतात पण ते तिथेच थबकतात - थांबतात. ते शास्त्र ज्ञानातच समाधान मानतात - समाधानी रहातात. यामुळे असे शास्त्रज्ञानी केवळ पंडीत म्हणवले जातात पण हे शास्त्रज्ञान झाल्यावर ज्यांना अनुभव प्राप्त करुन घ्यायची तीव्र जिज्ञासा असते असे लोक साधनेत प्रवृत्त होतात आणि प्रदीर्घ साधनेनंतर ईश्वराचा अनुभव प्राप्त करुन घेण्यात यशस्वी होतात. साधक दशेतच खूप काळ निघून जातो. साधकांमधला कुणी एखादाच सिध्दावस्थेला प्राप्त होतो आणि तेव्हा कुठे ईश्वरानुभव लाभतो.

9) **आस्तिक्यम्:** शास्त्र आणि संतांवर श्रध्दा. हे लक्षण महत्वाचे आणि पायाभूत आहे. अनुभव संपन्न प्रज्ञावानच शास्त्ररचना करतात. अशा अनुभवी पुरुषांच्या सहवासात रहायची प्रेरणा सर्वांनाच होते, असे नाही त्याचप्रमाणे शास्त्र म्हणजे आध्यात्मिक शास्त्रांचा अभ्यास करायची प्रेरणाही खूप कमी लोकांना लाभते. संतांच्या सहवासात रहायची प्रेरणा सदैव कायम रहावी आणि त्यासोबत शास्त्र अध्ययना बाबत जिज्ञासा जागावी या दोन्ही गोष्टी खूप मोलाच्या आहेत. याशिवाय परमात्म ज्ञान प्राप्त करायची प्रेरणा लाभणे अवघड आहे.

10) **ब्रह्मकर्म स्वभावजम्:** ब्राह्मणांचे हे स्वभावजन्य कर्म म्हणजे गुण आहेत. उपरोक्त नऊ गुण ब्राह्मणांचे स्वभावगत गुण आहेत. पूर्वजन्मी केलेल्या सत्कर्माच्या आणि सद्गुणांच्या विकासामुळे जे संचित संस्कार या जन्मी प्रकट होतात त्यातूनच प्रकृती वा स्वभाव बनतो. त्या स्वभावामुळे सध्याच्या जन्मात गुण विकासाला अनुकूलता लाभते. या नऊ गुणांनी संपन्न असे ब्राह्मण समाजाचे मार्गदर्शक बनतात. उपरोक्त नऊ गुण ज्यांच्या ठायी नसतील त्यांना ब्राह्मण म्हणता येऊ शकत नाही.

: 43 :

***शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युध्दे चाप्यपलायमनम् ।***
***दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **शौर्यम्:** शूरता
- **तेज:** तेजस्विता
- **धृति:** धैर्य
- **दाक्ष्यं:** दक्षता, चतुरता
- **च युध्दे अपि अपलायनम्:** युध्दभूमीवरुन पळ न काढणे
- **दानं:** उदारवृत्ती
- **च ईश्वरभाव:** नियंत्रणाची क्षमता, स्वामीभाव
- **स्वभावजं क्षात्रं कर्म:** हे क्षत्रियाचे स्वाभाविक गुण होत

**अर्थ**

शौर्य, तेज, धैर्य, चातुर्य, युध्दातून पलायन न करणे, दान देणे आणि स्वामीभाव (नि:स्वार्थ भावनेने सर्वांच्या हितावर दृष्टी ठेऊन शास्त्राज्ञेनुसार राज्य-शासन चालवून प्रेमळपणे पुत्रवत् प्रजेचे पालन करण्याचा भाव) ही सर्वच्या सर्वच क्षत्रियाची स्वाभाविक कर्मे आहेत.

***शौर्य धैर्य प्रजा - रक्षा युध्दीं हि अ - पलायन ।***
***दातृत्व दक्षता तेज क्षात्र - कर्म स्वभावतां ॥***

विषय: या श्लोकात क्षत्रियाच्या सात गुणांची चर्चा आली आहे. 1) शूरता वा वीरता. 2) तेजस्विता. 3) धैर्यवृत्ती. 4) प्रत्येक कार्यात दक्षता, जागृती. 5) अपलायनवृत्ती. 6) उदारवृत्ती आणि. 7) नियंत्रणाचे सामर्थ्य. 8) हे क्षत्रियांचे स्वाभाविक गुण होत.

**स्पष्टीकरण**

1) **शौर्यम्:** प्रजेच्या रक्षणासाठी क्षत्रिय वर्ग बनला. शूर आणि वीरच समाजाचे रक्षक होऊ शकतात. जनता स्वत: आपले रक्षण करु शकत नाही. यामुळे ज्यांच्या ठायी वीर वृत्ती लक्षात आली ते क्षत्रिय वर्गात दाखल झालेत. पित्याच्या ठायी जर वीरवृत्तीचा विकास झाला असेल तर वीरतेचा हा संस्कार संततीच्या ठायीही प्रकटतो. अशाप्रकारे शौर्य वंश परंपरागत वृत्ती बनून जाते.

2) **तेज:** तेजस्विता. ब्रह्मचर्यामुळे उत्पन्न होणारे बळ वा तेज. वीर वृत्ती असतानाही जर ब्रह्मचर्य पालनात दुबळेपणा - कच्चेपणा - राहिला तर शरीरात, तेज, बळ, सामर्थ्य राहू शकत नाही. शारीरिक बळाच्या अभावी शत्रुशी सामना होऊ शकणार नाही. क्षत्रिय गृहस्थ असतो पण ब्रह्मचर्य पालनात अग्रेसर यामुळे त्याच्या वीरवृत्तीला अनुकूल असे बळ त्याच्यासाठी असते - असावे यासाठी ब्रह्मचर्य हवे.

3) **धृति:** धैर्यवृत्ती. कुठल्याही बिकट प्रसंगी वाट शोधायचे वा समस्या सोडवण्याचे धैर्य. समाजात अधिकांश लोक असे असतात की प्रतिकूल परिस्थिती येताच त्यांचे धैर्य खचून जाते पण काही लोक मात्र मार्गर् काढतात, समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतात आणि अंतत: यशस्वी होतात.

गांधीजी, विनोबाजींच्या ठायी धैर्यगुणाचा मोठा उत्कर्ष झालेला आहे - प्राबल्य आहे. ही वृत्ती ज्याच्या ठायी दिसून येत असेल ज्याच्यात क्षत्रिय गुणांचा विकास झाला असे मानायला हवे. महापुरुष तर धैर्यवान असतातच.

4) **दाक्ष्यम्:** प्रत्येक कार्यात दक्षता, जागृती, दक्षतेचा हा गुण पाश्चात्य राष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. राष्ट्राच्या उन्नतीसाठी आणि राष्ट्राला बलवान बनवण्यासाठी ते या गुणाला आवश्यक मानतात. त्यांच्या कुटुंबात, शाळेत, प्रार्थनागृहात सर्वत्र या विषयी शिक्षण दिले जाते. आपल्याकडे या विषयी अपार शिथिलता दिसून येते. आपल्या कुटुंबात, संस्थांमध्ये, सार्वजनिक कार्यात आणि कार्यक्रमात, प्रार्थनास्थळी या दक्षतेचा अभाव आहे. आपली निश्चय शक्ती शिथिल होऊन गेली आहे. आपल्याला ठरलेल्या वेळी कामे करायची सवय नाही. जिथे जबरदस्तीने - नाइलाजाने वेळेवर कामे करावी लागतात तिथे व्यवस्थित कामे करायचे प्रयत्न करतो पण याला स्वेच्छेने ग्रहण केलेला गुण नाही म्हणता यायचा.

5) **च युध्दे अपि अपलायनम्:** आणि बलवान शत्रुशी सामना करतानाही पळ न काढणे, परावृत्त न होणे. या वचनाला उध्द्दत करत गांधीजींनी एका साधकाला लिहिले की मनात काम विकार येईल तर त्याला हटवायचे प्रयत्न करत रहावे पण प्रयत्न केल्यावरही विकार जर हटत नसतील तर निराश होऊ नये. क्षत्रियाचा धर्म वा लक्षण जिंकणे वा हरणे नाही. केवळ काम विकारच नव्हे पण प्रसंगविशेषी वेळोवेळी - नाना विकार उठतात आणि इतके वरचढ होतात - प्रबळ होतात - की त्याना हटवताना माणूस हरुन जातो, निराश होतो. निराश झाला की प्रयत्नात शैथिल्य येते. अशाप्रकारे फायद्याऐवजी तोटाच होतो. गांधीजींनी या वचनाचा हा जो मार्मिक अर्थ सांगितला आहे तो स्मरणीय आहे.

पण समाजरक्षक क्षत्रिय वर्गालाही हे वचन स्मरणात ठेवायला हवे. अन्यथा त्यांचे क्षत्रियत्व सिध्द होणार नाही. शत्रुची अधिक शक्ती बघून जर क्षत्रिय वर्ग हताश होऊन गेला तर तो भित्रा सिध्द होईल. शत्रु कितीही बलसंपन्न का असेना त्याच्याशी झुंजताना धारातीर्थी देह ठेवणेच त्याचे कर्तव्य आहे.

6) **दानम्:** उदारवृत्ती. शत्रुवर विजस संपादित केल्यावरही त्याच्याशी तडजोड करताना लोभ वृत्तीच्या अधीन न होता उदार वृत्ती दर्शवावी. शत्रुवर विजय संपादित केल्यावर कस लागतो. ज्यावेळी विजयोन्माद असतो. शत्रुवर कठोर शर्ती लादायचा मोह होतो. त्याचा प्रदेश हडप करुन घेण्याची लोभवृत्ती उत्पन्न होते. पराभूत झाल्यावर शत्रु लाचार बनून जातो. विजेत्याच्या अटी मान्य करण्याशिवाय त्याच्यापुढे दुसरा उपाय नसतो - पर्याय नसतो. त्यासमयी उदारवृत्ती जागली आणि शत्रुची मानहानी न करता त्याच्याशी तडजोड करायचे प्रयत्न केलेत तर दान म्हणजे उदार वृत्ती अंगिकारली, असे सिध्द होईल. समाजात लोभवृत्ती वाढीला लागेल. प्रत्येकजण आपापसात एकमेकांची लूटमार करत धन गोळा करायच्या प्रयत्नाला लागतील. अशावेळी समाजात साम्यावस्थेची स्थापना करणे हेही क्षत्रियवर्गाचे कर्तव्य मानले जाईल.

7) **च ईश्वरभाव:** आणि हाती सत्ता आल्यावर सर्वांवर कौशल्याने नियंत्रण राखायचे सामर्थ्य, प्रजापालनाची शक्ती. क्षत्रीय समाज रक्षक वर्ग असतो यामुळे त्यांच्यापैकीच कुणाच्या हाती समाज व्यवस्थेच्या संचालनाची जबाबदारी येते. ज्या समर्थ व्यक्तीच्या हाती राज्यतंत्र चालवायची सत्ता, अधिकार येतो - त्याच्या ठायी अहिंसक पध्दतीने कौशल्याने, समाधानकारकपणे राज्यशकट हाकण्याची क्षमता असली पाहिजे. राज्यतंत्र सुव्यवस्थितरित्या चालवणे एक कार्य आहे त्याचप्रमाणे समाजाचे पालन करणे, समाजातील सर्व घटकांना समान वाट्याने पोषण मिळावे, अन्न- वस्त्र निवाऱ्याची सुयोग्य व्यवस्था लावणे, हे सुध्दा कर्तव्य आहे. प्रजेचा निम्नस्तर उपाशी मरु नये असे राज्यतंत्र सुव्यवस्थित असले पाहिजे. निम्नस्तरीय जनांना जर गरजेपेक्षा अधिक श्रम करावे लागत असतील तर ही गोष्ट राज्यतंत्राची उणीव आहे. बुध्दीजीवी आणि श्रमजीवी या दोन गटात तर समाजजीवन दुभागले जात असेल तर ती राज्यतंत्राची मोठी उणीव वा कमकुवतपणा मानायला हवा.

8) **स्वभावजं क्षात्रं कर्म:** हे स्वाभाविक म्हणजे पूर्वजन्मीच्या - जन्मजन्मांतरीच्या - संस्कारानुसार क्षत्रियांची कर्मे वा गुण आहेत.

: 44 :

***कृषि - गौरक्ष्य - वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।***
***पारिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कृषि - गौरक्ष्य - वाणिज्यं:** कृषी म्हणजे शेती, गोपालन आणि वाणिज्य - व्यापार
- **स्वभावजं वैश्यकर्म:** वैश्यांची स्वाभाविक कर्मे आहेत
- **परिचर्यात्मकं कर्म:** श्रमाद्वारे समाजाची सेवा
- **शूद्रस्य अपि स्वभावजं:** शूद्राचे स्वाभाविक कर्म आहे

**अर्थ**

शेती, गोपालन आणि क्रयविक्रयरुप सत्य व्यवहार (वस्तुंच्या क्रय-विक्रय वेळी म्हणजे खरेदी-विक्रीच्या वेळी तोल, माप आणि मोजणे इत्यादींमध्ये जास्त घेणे किंवा कमी देणे, त्याचप्रमाणे वस्तु बदलून देणे किंवा भेसळ करणे नफा किंवा दलाली ठरल्यावर त्याहून अधिक घेणे किंवा कमी देणे, खोटेपणा म्हणजे लबाडी, कपट, चोरी, जबरदस्ती अथवा अन्य प्रकारे दुसऱ्याचा हक्क हिरावून घेणे इत्यादी दोषांनी रहित जो खरेपणाने पवित्र वस्तुंचा व्यापार योग्य तोच 'सत्य व्यवहार' होय.) ही वैश्यांची स्वाभाविक कर्मे होत. तसेच सर्व वर्णांची सेवा करणे हे शूद्राचेही स्वाभाविक कर्म आहे.

***शेती व्यापार गो - रक्षा वैश्य कर्म स्वभावतां ।***
***करणें पडिली सेवा शूद्र - कर्म स्वभावतां ॥***

**विषय:** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे. यात वैश्यांची तीन कर्मे असून शूद्राचे एक कर्म आहे. 1) समाजाच्या अन्न - वस्त्र वगैरे गरजांच्या पूर्तीसाठी शेती करणे. 2) गोपालन करणे. 3) आणि सेवाभावपूर्वक व्यापाराद्वारे समाजासाठी आवश्यक वस्तुंची पूर्ती करणे. 4) ही स्वभावप्राप्त वैश्य कर्मे आहेत तथा. 5) मजूरी, श्रम करुन समाजाची सेवा. 6) शूद्राचे स्वभावप्राप्त कर्म आहे.

या श्लोकात वैश्य आणि शूद्रांची कर्मे सांगितली आहेत, गुण नव्हेत, हे ध्यानी घेतले पाहिजे. याचा अर्थ असा झाला की मागील दोन श्लोकातून ब्राह्मण आणि क्षत्रियांचे जे गुण सांगितलेले आहेत - ते सर्वांना हस्तगत करायचे आहेत - प्राप्त करायचे आहेत आणि या श्लोकात वैश्य व शूद्रांची जी कर्मे वर्णिली आहेत ती सर्वाना आचरणात आणायची आहेत. ब्राह्मण असो वा क्षत्रीय. सारे मानव आहेत. यामुळे शेतीत काही तास काम केलेच पाहिजे वा काही तास श्रमही करायलाच हवेत. असे केले तरच शेतकरी आणि मजूर ब्राह्मणाकडून ज्ञान संपादित करु शकतात - प्राप्त करु शकतात - आणि समाजरक्षणाचा पाठही शिकू शकतात - सामाजिक संतुलनासाठी प्राचीन काळी चातुर्वर्ण्य व्यवस्था सुरु झाली. सर्वांना विकासाची समान संधी लाभावी, हे या व्यवस्थेचे ध्येय - लक्ष्य होते.

**स्पष्टीकरण**

1) **कृषि:** वैश्याचे पहिले कर्म कृषी आहे. शेतीद्वारे समाजासाठी अन्न, कापूस वगैरे आवश्यक वस्तु उत्पन्न करणे समाजाच्या संतुलनासाठी शेती हा मुख्य उद्योग - कर्म - आहे. याचा विकास व्हावा. उत्पादन वाढते असावे, अशी व्यवस्था असली पाहिजे.

2) **गौरक्ष्य:** वैश्याचे दुसरे कर्म गोपालन आहे. बैलाशिवाय शेती नाही आणि गाईशिवाय बैल नाहीत. यामुळे गोसेवा शेतकरी आणि वैश्यांकरता शेतीच्या इतकीच महत्वाची - मोलाची - बाब आहे. तो या विषयाची उपेक्षा नाही करु शकत पण दूधासाठी म्हैस पालन आणि बैलासाठी जर गोपालन केले जाईल तर गाय उपेक्षित राहील तिचा वंश खराब होईल. बैलांची निर्मिती हीन दर्जाची होईल. शेतीचा दर्जा खालावेल. गाईचे दूधही मिळणार नाही. प्राचीन काळाशी तुलना करता आज गोसेवेच्या दृष्टीने बघू जाता शेतकऱ्याची अवस्था चांगली नाही.

3) **च वाणिज्यम्:** वैश्याचे तिसरे कर्म आहे वाणिज्य वा व्यापार. सेवाभावाने व्यापाराद्वारे समाजोपयोगी वस्तुंची आपूर्ती करणे - नेआण करणे.

प्राचीनकाळी वाणिज्य कार्य वैश्यालाच केवळ सोपवलेले होते असे गीतेच्या या वचनावरुन लक्षात येते. आजच्या समाजजीवनात शेती आणि गोपालन ही दोनच कर्मे शेतकऱ्याची मानली जातात. व्यापारी शेतकरी वर्गापेक्षा वेगळा गणला जातो. त्याना 'वैश्य' म्हटले जाते. आधी आपला देश खेड्यातच वसत होता म्हणून कदाचित अशाप्रकारे दोन वर्ग झाले असावेत. लोकसंख्या खूप कमी होती. वाढत्या लोकसंख्येसोबत शहरे वसत गेलीत. शहरांची संख्या वाढू लागली, लोकसंख्यावाढ झाली. यामुळे व्यापारी वर्गाची गरज निर्माण झाली आणि कित्येक वर्ग प्रकटले. वकील, बॅरिस्टर, न्यायाधीश, डॉक्टर वगैरे वर्ग शहरांशी संबध्द आहेत. आजकाल बहुधा सर्व वर्गाचे ध्येय - मग ते ग्रामीणजन असोत वा शहरी नागरिक - सेवा करायच्या ऐवजी पैसा कमवणेच आहे. हे समाजाच्या अध:पतनाचे लक्षण आहे. खरे तर पारस्पारिक सेवाभावनेतून समाज उन्नत होत जातो.

4) **वैश्य - कर्म स्वभावजम्:** हे स्वभावप्राप्त वैश्यकर्म आहे. स्वभावप्राप्त म्हणजे स्वाभाविक.

**5) परिचर्यात्मकं कर्म:** मजूरी करुन समाजसेवा करणे. हे चौथ्या वर्गाचे कर्म आहे. मजूर वर्ग शेतकऱ्याला मदत करतो. मजुरांच्या मदतीशिवाय शेतकरी सर्व ऋतुंमध्ये शेतीची कामे करण्यात यशस्वी होणार नाही. सर्व वर्गाच्या जीवनात मजूरीला स्थान आहेच. मजूर म्हणजे सेवक वर्ग होय. गंभीर आजारासमयी वा ऑपरेशनसमयी दवाखान्यात भरती व्हायला लागते. तिथे डॉक्टरांपेक्षा सेवक वर्गाची संख्या अधिक असते. कैकपटींनी हे सेवक प्रशिक्षित असतात. संस्कारी घरातले नोकर - चाकर घरच्या सदस्यांसारखेच होऊन जातात. हे सेवकगण ज्या आत्मीयतेने व दक्षतेने, जीव लाऊन सेवा करतात, तेवढे श्रम तर कुटुंबीजनही करु शकत नाहीत.

6) **शूद्रस्यापि स्वभावजम्:** हे शूद्राचे स्वभावप्राप्त कर्म आहे.

: 45 :

***स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिध्दिं लभते नर: ।***
***स्वकर्मनिरत: सिध्दिं यथा विन्दति तच्छृणु ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **स्वे स्वे कर्मणि:** आपापल्या स्वधर्मरुपी कर्मात
- **अभिरत: नर:** तल्लीन पुरुष
- **संसिध्दिं लभते:** सिध्दी प्राप्त करतो
- **स्वकर्मनिरत:** स्वकर्मी निरत असणाऱ्याला
- **यथासिध्दिं विन्दति:** ज्याप्रकारे सिध्दी प्राप्त होते
- **तत् श्रृणु:** ते माझ्याकडून ऐक

**अर्थ**

आपापल्या स्वाभाविक कर्मात तत्पर असलेल्या मनुष्यास भगवत् प्राप्तीरुप परम सिध्दीचा लाभ होतो. आपल्या स्वाभाविक कर्मात रत असलेला मनुष्य ज्या रीतीने कर्म करुन परम सिध्दीला प्राप्त होतो ती रीत तू ऐक.

***आपुल्या आपुल्या कर्मी दक्ष तो मोक्ष मेळवी ।***
***ऐक लाभे कसा मोक्ष स्व - कर्मी लक्ष लावुनी ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत. 1) आपापल्या स्वधर्मरुप कर्मात तल्लीन पुरुष. 2) निष्काम सिध्दी प्राप्त करतो. 3) स्वकर्मात लीन अशा पुरुषाला ज्याप्रकारे निष्कामनारुपी सिध्दी प्राप्त होते ते माझ्याद्वारे ऐक.

**स्पष्टीकरण**

1) **स्वे स्वे कर्मणि अभिरत: नर:** आपापल्या स्वधर्मरुपी कर्मात तल्लीन पुरुष, स्वधर्म म्हणजे प्रवाहपतीत सत्कर्म, सात्विक कर्म, ईश्वरप्रेरीत कर्म. ज्याला केवळ निर्विकार होण्यासाठी, अहंकारशून्य बनवण्यासाठीच कर्म करायचे आहे त्याच्यासाठी स्वयंप्रेरित कर्म असू नये. स्वयंप्रेरित कर्म आचरल्याने अहंशून्य बनायची शक्यता नाही. यामुळे तो ईश्वरप्रेरित कर्म करायचेच प्रयत्न करतो. ईश्वर उभ्या जगाचा संचालक आहे. तो सज्जन समूहाला वा महात्मा पुरुषांना प्रेरणा देतो. साधकही तदनुसार प्रयत्न करतो. आधी चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या अनुसार प्राप्त कर्मे करणे स्वधर्म होता पण सामाजिक व्यवस्थेत बदल होत असतो याप्रमाणे स्वकर्तव्यही बदलते. स्वधर्मरुप कर्म निश्चित करायचा जर आग्रह नसेल तर तो आपोआप ठरतो - निश्चित होऊन जातो. त्यासाठी खूप विचार करायची गरज नसते. इथे अभिरत: - म्हणजे खूप तल्लीन रहायचा उल्लेख केला आहे म्हणजे स्वधर्मरुप कर्तव्य ईश्वरप्रेरित असल्यामुळे एवढा आनंद होतो की तो त्यात तल्लीन होऊन जातो.

2) **संसिध्दिं लभते:** नैष्कर्म्य सिध्दी प्राप्त करतो. यासाठी स्वधर्मरुपी कर्मात अत्यंत तल्लीन व्हायला हवे ही पहिली गोष्ट सांगितली जर ईश्वर प्रेरित प्रवाहपतीत स्वधर्मरुपी कर्म तल्लीनतेने, दक्षतेने कराल तर निष्कामतारुपी सिध्दी लाभेलच असे नाही. त्यासाठी आणखी एक गोष्ट संपादित करावी लागेल - मिळवावी लागेल. ती पुढच्या श्लोकात सांगितली जाणार आहे. ती आंतरिक आहे. इथे सुरुवातीला बाह्य वस्तु सांगताहेत. बाह्य आणि आंतरिक मिळून नैष्कर्म्यसिध्दी प्राप्त होते. जो स्वधर्मरुपी कर्मात तल्लीन असतो तो त्यात अत्यंत दक्ष असेल, अत्यंत कौशल्याने कर्म करील कारण की तो कर्म करण्याबाबत कमालीचा जागरुक असेल.

3) **स्वकर्मनिरत:** यथा सिध्दिं विन्दति तत् श्रृणु स्वधर्मरुप कर्तव्यात तल्लीन पुरुषाला निष्कामतारुप सिध्दी कशी प्राप्त होते ते माझ्याकडून ऐक. निष्कामतेचा संबंध मनाशी आहे. तरीही जर बाहेरुन सत्कर्म केले जाणार नसेल तर मन:पूर्वक निष्कामतेचा अभ्यास होऊ शकत नाही. यामुळे निष्कामतेच्या अभ्यासासाठी सत्कर्म बाहेरुन होत रहाणे गरजेचे आहे. बाहेरुन सत्कर्म मनमानीचेही असू शकते - जबर्दस्तीपूर्वकही असू शकते - बळजबरीचेही असू शकते. यामुळे गीतेचे म्हणणे असे आहे की सत्कर्म स्वधर्मरुप असले पाहिजे. स्वतंत्रपणे हवे तसे सत्कर्म निवडता येत नाही. निवडीची शक्यता नाही. निवडीने अहंकार वाढतो. असत्कर्माचा म्हणजे राजस - तामस कर्माचा स्वरुपत: त्याग आधीच करुन घेतला गेला आहे. यामुळे इथे आवड - निवड संपली. जे काही सत्कर्म केले जाते ते प्रवाहपतीत स्वधर्मरुप कर्म परमात्म्याद्वारेच ठरवले जाते - निश्चित केले जाते.

: 46 :

***यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।***
***स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानव: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत: भूतानां प्रवृत्ति:** ज्या परमात्म्याच्या द्वारे प्राणीमात्रांना प्रेरणा लाभते
- **येन इदं सर्वं ततं:** ज्याने हे संपूर्ण जगत म्हणजे ब्रह्मांड व्याप्त आहे
- **तं स्वकर्मणा अभ्यर्च्य:** त्या परमात्म्याला आपले स्वधर्मरुप कर्म अर्पण करुन
- **मानव: सिध्दिं विन्दति:** माणूस निष्काम सिध्दी म्हणजे परम सिध्दी प्राप्त करतो

**अर्थ**

ज्या परमेश्वरापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे आणि ज्याने हे सर्व जग व्यापलेआहे (ज्याप्रमाणे बर्फ पाण्याने व्यापलेले असते, त्याप्रमाणे सच्चिदानंदघन परमात्म्याने सर्व जग व्यापलेले आहे.) त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांनी पूजा करुन (ज्या प्रमाणे

पतिव्रता स्त्री पतीलाच सर्वस्व मानून त्याचेच चिंतन करत त्याच्या आज्ञेप्रमाणे त्याच्या करताच काया-वाचा-मनाने कामे करीत असते त्याप्रमाणे परमेश्वरालाच सर्वस्व मानून त्याचे चिंतन करीत त्याच्या आज्ञेनुसार मनाने, वाणीने व देहाने त्याच्या करताच स्वाभाविक कर्तव्यकर्मांचे आचरण करणे हेच 'कर्माद्वारे परमेश्वराचे पूजन' करणे होय.) मनुष्य परम सिध्दी मिळवतो.

*जो प्रेरी भूत - मात्रास ज्याचा विस्तार विश्व हें।*
*स्व - कर्म - कुसुमीं त्यास पूजितां मोक्ष लाभतो ॥*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत. 1) ज्यापासून प्राणीमात्राला आंतरिक - आतून - प्रेरणा लाभते. 2) प्रवृत्तीमात्र ज्या चेतन ईश्वराने होते. 3) ज्याद्वारे हे समस्त ब्रह्मांड व्याप्त आहे. 4) त्या परमात्म्याला आपले स्वधर्मरुप कर्म अर्पण करुन. 5) मनुष्य निष्कामतारुप सिध्दी प्राप्त करतो.

**स्पष्टीकरण**

1) **यतः भूतानाम् प्रवृत्तिः** ज्या परमात्म्यापासून प्राणीमात्रांना आंतरिक प्रेरणा लाभते. प्रत्येक प्राणीमात्राच्या ठायी परमात्मा नांदतो. जो प्रत्येकाला सत्याची प्रेरणा प्रदान करतो. हे स्वाभाविकच आहे. परमात्म्याने ब्रह्मांड उत्पन्न करुन पंचविषय उत्पन्न केले आहेत. स्वत: ब्रह्मांडात गुप्त रुपाने वास करतो. यामुळे बाहेरुन पंचविषय प्रत्येकाच्या इंद्रियांना आपल्याकडे आकर्षित करत असतात. अशा प्रकारे आत प्रकट असलेल्या परमात्म्या मार्फत सत्याची प्रेरणा लाभते आणि बाहेरुन विषयभोगांची प्रेरणा आपल्याकडे आकृष्ट करते अशा दोन प्रेरणांच्या मध्ये आपले जीवन उभे आहे. आपण कुणाच्या प्रेरणेने चालावे याविषयी आपल्याला स्वातंत्र्य लाभलेले आहे. त्याचा उपयोग जर आपण ईश्वराच्या प्रेरणेने वाटचाल करण्यात आपले जीवन घालवले तर जीवन उन्नत होईल पण विषयांच्या प्रेरणेने चालत राहीलो तर अध:पतन होईल - अवनती होईल.

2 ) **पिंड आणि ब्रह्मांडाची प्रवृत्तीही परमात्मा:** ईश्वरी प्रेरणेनेच चालते म्हणजे परमात्मा त्या शरीरातून अप्रकट झाला. परमात्मा जोवर देहात प्रकट असतो प्राण, मन वगैरे सूक्ष्म देह, स्थूल देहाला सोडून जात नाहीत - त्याग करत नाही. अशाप्रकारे चेतनेमुळेच शरीर गती पावते. प्राण निघून गेल्यावर शरीर प्रेत होऊन जाते हा सर्वांचाच अनुभव आहे.

3) **येन इदं सर्वम् ततम्:** ज्या परमात्म्याने हे संपूर्ण ब्रह्मांड व्याप्त आहे. ज्याप्रमाणे पिंडातल्या शरीर वगैरे संघातात परमात्मा प्रकट असल्यामुळे प्राणीमात्राला परमेश्वराकडून प्रेरणा मिळते. जीवमात्राची प्रवृत्तीसुध्दा चेतन परमात्म्यानेच होते तसेच सबंध ब्रह्मांडातही तोच चेतन परमात्मा व्याप्त आहे. ब्रह्मांडात सतत प्रवृत्ती सुरु असते. पृथ्वी कधी - ना - कधी तर नष्ट होणार आहे. तिच्या क्षीण होण्याची प्रवृत्ती नित्य सुरु आहे.

4) **तं स्वकर्मणा अभ्यर्च्य:** त्या परमात्म्याला आपले स्वधर्मरुपी कर्म अर्पण करुन. पिंड - ब्रह्मांडात चेतन परमात्माच व्याप्त आहे आणि त्याच्या व्यतिरिक्त जीव वा ब्रह्मांडाचे स्वतंत्र अस्तित्व नाही. पिंड ब्रह्मांडातल्या सर्व प्रवृत्ती परमात्म्यानेच घटित होतात. अशा परिस्थितीत जीव जर प्रत्येक कर्मांशी आपला संबंध जोडून कर्मबंधनात अडकून पडला तर ते अज्ञानच म्हटले जाईल. अज्ञानाच्या प्रभावामुळेच मनात काम, क्रोध वगैरे उत्पन्न होऊन दु:ख होते. यामुळे या कर्मापासून विकारांपासून, अज्ञानापासून, कर्म बंधनापासून सुटका करुन घ्यायची असेल तर इथे त्याची किल्ली - उपाय सांगितली गेली आहे. सर्व कर्मे अर्थात् सत्कर्मे आणि देहाच्या तमाम क्रिया ईश्वराला अर्पण केल्या पाहिजेत. आपला संबंध कर्माशी जोडू नये. आपण ईश्वराने निर्माण केलेल्या देह, मन, इंद्रियांपासून सर्वथा भिन्न आहोत आणि ईश्वराहून सर्वथा अभिन्न आहोत म्हणजे आपण स्वत: कर्मांचे कर्ता नसून अकर्ता आहोत. अशाप्रकारे जीवनातल्या समस्त क्रिया ईश्वरार्पण करुन केल्या जाव्यात. इथे 'स्वकर्म' शब्द प्रयुक्त आहे. स्वकर्म म्हणजे स्वधर्मरुप, प्रवाहपतीत कर्म. आपली इच्छा न राखता ईश्वरी इच्छेनेच कर्म करायचे आहे तर जे कर्म ईश्वराच्या प्रेरणेने आपोआप समोर येते ते निरंहकारपूर्वक करत रहायला हवे. असे केल्याने मिळणाऱ्या फळाची आता चर्चा करत आहेत.

5) **मानवः सिध्दिं विन्दति:** मनुष्य निष्कामतारुप सिध्दी प्राप्त करतो. निष्काम सिध्दी प्राप्त करायची किल्ली वर सांगितली आहे. मंदिरात जाऊन आपण देवाला फूल वहातो पण ती तर थोड्या काळाची विशिष्ट क्रिया आहे.

जीवनातल्या तमाम लहानमोठ्या क्रिया पुष्पेच होत. ती क्रियारुप फुले ईश्वरार्पण भावनेने वहात राहिलोत तर संकटातून सुखरुपपणे पार पडू.

: 47 :

*श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मोत्स्वनुष्ठितात् ।*
*स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **स्वनुष्ठितात् परधर्मात्:** चांगल्या प्रकारे अनुष्ठान केलेल्या परधर्माहून
- **विगुण: स्वधर्म:** श्रेयान्: वैगुण्ययुक्त स्वधर्माचे पालन अधिक कल्याणप्रद आहे
- **स्वभावनियतं कर्म कुर्वन्:** ईश्वर प्रेरित स्वधर्मरुप कर्म करणाऱ्याला
- **किल्बिषं न आप्नोति:** पाप लागत नाही

**अर्थ**

उत्तम प्रकारे आचरलेल्या दुसऱ्याच्या धर्मापेक्षा वैगुण्य असलेलाही आपला धर्म श्रेष्ठ आहे कारण स्वभावाने नेमून दिलेले स्वधर्मरुप कर्म करणाऱ्या माणसाला पाप लागत नाही.

*उणा हि आपुला धर्म पर - धर्माहुनी बरा ।*
*स्वभावें नेमिलें कर्म करी तो दोष जाळितो ॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. 1) चांगल्या प्रकारे अनुष्ठान केलेल्या परधर्माशिवाय-ऐवजी-वैगुण्ययुक्त स्वधर्माचे पालन अधिक कल्याणप्रद आहे. 2) ईश्वर प्रेरित कर्म करणाऱ्याला. 3) पातक वा दोष लागत नाही.

**स्पष्टीकरण**

1) **स्वनुष्ठितात् परधर्मात् विगुण: स्वधर्म:** श्रेयान् चांगल्याप्रकारे परधर्माचे अनुष्ठान करण्याऐवजी. या श्लोकातला पहिला चरण आणि तिसऱ्या अध्यायातल्या 35 व्या श्लोकाचा पहिला चरण सारखाच आहे. याविषयी येथे स्पष्टीकरण केले जात आहे.

प्रत्येक मनुष्याची कर्मे जीवनाच्या प्रवाहानुसारच ठरतात. तो त्या कर्माचा त्याग करु शकत नाही. कुणाच्या जीवनात त्रास अधिक तर कुणाच्या जीवनात कमी असतो. अनुकूलता - प्रतिकूलताही समान नसून वेगवेगळ्या प्रकारची असते. एकेकट्याच्या जीवनातही अनुकूलता प्रतिकूलता न्यूनाधिक असते. यामुळे कुणाच्या जीवनाचे अनुकरण करता येत नाही. असे करणे कल्याणप्रदही नाही. बाह्य सुख प्राप्त करण्यासाठी आपल्या स्वधर्मरुपी कर्माचा त्याग करुन दुसऱ्याच्या धर्माला अमलात आणणे सुगम आहे असे समजून मी जर माझी स्वधर्मरुप कर्मे सोडून दिलीत आणि दुसऱ्याचा धर्म अमलात आणणे सुगम आहे असे समजून मी जर माझ्या स्वधर्मरुपी कर्माचा त्याग केला तर मी धर्मपालनापासून विमुख होईन.

मी आश्रमात रहातो. माझ्या वाट्याला आठ तास शरीरश्रमाचे काम आहे. त्यात भरपूर परिश्रम होऊन जाते. दुसरीकडे कार्यालयात बसून करायचे काम तेवढे अवघड नाही कारण की तिथे बसून कुणी पत्र - व्यवहाराचे काम बघतो तर कुणी हिशेब - ठिशेब तपासतो. हे बघून माझ्या मनात असा विचार यावा की कार्यालयाचे सोपे काम मला मिळाले तर किती छान होईल. या संदर्भात गीतेचे निवेदन असे आहे की स्वधर्मात काही वैगुण्य दिसत असेल आणि परक्याच्या धर्मात वैगुण्य दिसत नसेल, तो धर्म जर सर्वार्थाने परिपूर्ण वाटत असेल आणि आपला स्वधर्म अपूर्ण वाटत असेल तरीही विगुण वाटणा-या स्वधर्माचे पालन करण्यातच खरा विकास सामावलेला आहे. प्रत्येकाचा विकास वा कल्याण स्वधर्मपालनानेच होतो हा गीतेचा महत्वाचा अटळ सिध्दांत आहे.

2) **स्वभावनियतं कर्म कुर्वन्:** म्हणजे ईश्वरप्रेरित, सहजप्राप्त कर्म आचरणाऱ्याला. स्वधर्म संज्ञेची चर्चा नुकतीच आपण केली. त्याचा स्पष्ट अर्थ स्वभाव नियत शब्दाने व्यक्तवत आहेत. स्वधर्मरुप कर्म म्हणजे स्वभाव नियत कर्म होय. आपल्या पूर्वजन्मीचे संस्कार या जन्मी प्रकट होतात. यानुसार वर्तमान जीवनप्रवाह चालत रहातो. या प्रवाहात आपल्या वाट्याला जी कर्मे सहजपणे येतात ती ईश्वर प्रेरित स्वभाव नियत कर्मे आपल्यासाठी स्वधर्म आहेत.

3) **किल्बिषं न आप्नोति:** पाप म्हणजे दोष लागत नाही. प्रवाहपतीत - ईश्वरप्रेरित कर्मे जर आपण करु

लागलो तर पाप म्हणजे दोष लागत नाही. भगवंताने ही नम्र भाषा प्रयुक्त केली आहे. ईश्वरप्रेरित वा सहजप्राप्त कर्मे आचरली तर दोषाची शक्यता तर नाहीच पण यामुळे अहंकार क्षीण होतो आणि या माध्यमातून विकार क्षीण करण्याकामी सहाय्य मिळते. निष्कामतापूर्वक सिध्दीच्या सोबत मोक्ष लाभ होतो. यामुळे विनोबाजींनी या श्लोकाचा अनुवाद 'दोष दग्ध करुन टाकतो' असा केला आहे. म्हणजे स्वभावप्राप्त कर्म ईश्वर प्रेरित असल्यामुळे ती आपल्यात विद्यमान दोषांना जाळून टाकण्यात सहाय्यक ठरतात.

: 48 :

***सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।***
***सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौंतेय सहजं कर्म:** हे अर्जुना, ईश्वरप्रेरित सहज कर्मे
- **सदोषं अपि न त्यजेत्:** दोषपूर्ण असली तरी त्यांचा त्याग करायला नको
- **धूमेन अग्नि: इव:** अग्नी ज्याप्रमाणे धूराने व्याप्त असतो
- **सर्वारंभा:** हि: तशीच तमाम शुभ कर्मेही कोणत्या ना कोणत्या तरी
- **दोषेण आवृता:** दोषाने युक्त असतात

**अर्थ**

म्हणूनच हे कुंतीपुत्रा, सदोष असले तरीही स्वाभाविक कर्मे सोडून देऊ नये कारण धूराने जसा अग्नी तशी सर्व कर्मे कोणत्या ना कोणत्या दोषाने युक्त असतात.

***सहज - प्राप्त तें कर्म न सोडावें सदोष हि ।***
***दोष सर्व चि कर्मांत राहे अग्नींत धूर तो ॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) ईश्वर प्रेरित सहज कर्माचा ते सदोष म्हणजे निकृष्ट दर्जाचे असले तरीही त्याग करायला नको. 2)अग्नी ज्याप्रमाणे धूराने व्याप्त असतो त्याप्रमाणेच सर्व प्रकारची शुभ कर्मेही सदोष असतात.

**स्पष्टीकरण**

1) **कौन्तेय सहजं कर्म सदोषं अपि न त्यजेत्:** हे अर्जुना, ईश्वर प्रेरित सहज कर्मे सदोष असली तरी त्याज्य नाहीहेत. ईश्वर प्रेरित कर्मे म्हणजे प्रवाहपतीत कर्मे. ईश्वर प्रेरित कर्मे सात्विक असतात पण सात्विक कर्मेसुध्दा रजोगुण तथा तमोगुणाने मिश्रित तर असतातच. प्रत्येक पदार्थ वा कर्म तीन गुणांनी युक्त असते पण कुण्या कर्मात सत्वगुण प्रधान असतो तर कुण्या कर्मात रजोगुण तर कुण्या कर्मात तमोगुण प्रधान असतो. यामुळे कुठलेही कर्म कुण्या एकाच गुणाने परिपूर्ण असत नाही. त्यात काही अपूर्णता - त्रुटी तर राहीलच. सदोष या शब्दाद्वारे इथे भगवंतांनी हीच गोष्ट सांगितली आहे. आपल्यासाठी जे स्वभाव प्राप्त कर्म ईश्वरप्रेरित असले आणि ते जरी दुसऱ्याच्या स्वभावप्राप्त ईश्वर प्रेरित कर्मापेक्षा अपूर्ण असले तरी ते आपल्यासाठी कल्याणप्रद असते कारण की ते वर्तमान भूमिकेच्या अनुसार असते यामुळे त्याचा त्याग केला जाऊ शकत नाही. सार्वजनिक संस्थांमध्ये वा सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्येही ही उणीव दिसून येते की ते आपली योग्यता स्वत:च ठरवतात आणि त्यानुसार आपल्याला अमुक एक प्रकारचेच काम मिळावे असा आग्रह धरतात. एखाद्याच्या ठायी जर व्यवस्थापक बनायची योग्यता असेल आणि त्याला ते काम नाही मिळाले तर तो माणूस ती संस्था वा ते सेवाकार्य सोडायला तयार होऊन जातो. माणूस स्वत:च काही आपली योग्यता यथायोग्यपणे ठरवू शकत नाही. बहुधा प्रत्येकाचे वळण आपली योग्यता अधिक समजण्याकडे असतो. आपली खरी - यथार्थ - योग्यता पारखणारे कमीच असतात. यामुळे भगवान इथे म्हणताहेत की स्वत: आपल्या आवडीने कुठले कर्म करायचे हे न ठरवता आपण जिथे रहातो, तिथल्या सज्जन समूहात निवास करणाऱ्या परमात्म्याच्या इच्छेने जे कर्म निश्चित होते, त्या कर्माला कल्याणप्रद मानून सोडायला नको.

2) **धूमेन अग्नि: इव सर्वारंभा: हि दोषेण आवृता:** अग्नी धुराने व्याप्त असतो त्याचप्रमाणे शुभ कर्मसुध्दा दोषांनी युक्त असते. इथे सदोष या शब्दाचे स्पष्टीकरण धुराचा दृष्टान्त देऊन केलेले आहे. अग्नी कितीही का प्रज्वलित असेना त्यासोबत धूर हा असतोच. त्याचप्रमाणे सात्विक कर्मातही रजोगुण वा तमोगुणाचा न्यूनाधिक अंश

असतोच. ज्याप्रमाणे सोने कितीही शुध्द केले तरी त्याठायी थोडा अशुध्दपणा राहूनच जातो पण तो नगण्य असतो. त्याचप्रमाणे ईश्वरप्रेरित स्वभाव प्राप्त सहज कर्मात जो थोडा दोष दिसून येतो, तो नगण्यच मानायला हवा. सहज कर्म आचरतांना निष्कामतेचा जो अभ्यास करायचा आहे, त्यात हा दोष काही बाधा निर्माण करत नाही.

: 49 :

***असक्तबुध्दिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।***
***नैष्कर्म्यसिध्दिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वत्र असक्तबुध्दिः** जिची बुध्दी सर्वत्र अनासक्त बनून गेली आहे
- **जितात्मा:** इंद्रिये आणि मनावर जिला पूर्ण ताबा मिळवता आला ती व्यक्ती
- **विगतस्पृहः** आणि जी इच्छा आणि विकारांनी मुक्त झाली आहे
- **संन्यासेन्:** अशा व्यक्तीला संन्यास साध्य झाल्यामुळे
- **परमां नैष्कर्म्यसिध्दिं:** निष्कामतारुप सिध्दीची पराकाष्ठा
- **अधिगच्छति:** प्राप्त होते

**अर्थ**

सर्वत्र असक्तबुध्दी असलेली, नि:स्पृह आणि अंत:करण जिंकलेली व्यक्ती सांख्ययोगाने त्या श्रेष्ठ नैष्कर्म्य सिध्दीला प्राप्त होते.

***राखे कुठें न आसक्ति जिंकूनि मन नि:स्पृह ।***
***तो नैष्कर्म्य महा - सिध्दि पावे संन्यास साधुनी ॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टींची चर्चा आली आहे. 1) ज्याची बुध्दी सर्वत्र अनासक्त झाली आहे. 2) ज्याला मन आणि इंद्रियांवर संपूर्ण ताबा मिळवता आला आहे आणि. 3) जो इच्छा वगैरे विकारांपासून मुक्त झालेला आहे. 4) अशा पुरुषाला खरा संन्यास साधता आल्यामुळे निष्कामतारुप परमसिध्दी प्राप्त होते.

**स्पष्टीकरण -**

1) **सर्वत्र असक्तबुध्दिः** ज्याची बुध्दी सर्वत्र अनासक्त बनली आहे. या श्लोकात सांगितले आहे की निष्कामतेची पराकाष्ठा केव्हा प्राप्त होते ? त्याची लक्षणे काय ? 46 व्या श्लोकात सांगितले होते की स्वभावप्राप्त कर्मे ईश्वराला अर्पण केल्यामुळे नैष्कर्म्य सिध्दी प्राप्त होते. इथे भगवंत सांगताहेत की ईश्वरार्पण बुध्दीचा अभ्यास परिपूर्ण होऊन गेल्यावर निष्कामतारुपी परम सिध्दी प्राप्त होते. निष्कामतारुप सिध्दी आणि त्याची पराकाष्ठा या दोन गोष्टी आहेत. ज्यावेळेला ईश्वरार्पण बुध्दीने सहजप्राप्त कर्मे आचरण्याचा अनुभव होऊन जाईल तेव्हा बुध्दीत अनासक्ती जागते. जोवर ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे आचरण्याचा अभ्यास केला जात नाही तोवर आपण स्वत:ला अकर्ता आत्मा, शून्य, आहोत असा अनुभव नाही घेऊ शकत. जोवर असा अनुभव येणार नाही तोवर सर्व कर्मे आचरत असताना आणि त्या प्रसंगी अनासक्तीचा भाव जागणे शक्य नाही. अशा प्रकारे ईश्वरार्पण बुध्दीने सहज प्राप्त कर्मे आचरत असताना अभ्यासाने निष्कामतेची पराकाष्ठा साधता येऊ शकते. जीवनातली प्रत्येक क्रिया करत असताना, प्रत्येक प्रसंगी, सर्व ठिकाणी निष्कामतेचा अभ्यास करायचे ध्येय बाळगायला हवे. यामुळे अनासक्त रहायची शक्ती प्राप्त होते.

2) **जितात्मा:** इंद्रियांवर आणि मनावर ज्याने संपूर्ण विजय मिळवला आहे असा. अनासक्ती सहज झाली तर चित्त आणि इंद्रियांवर ताबा मिळवता येतो. जोवर ही सृष्टी - जगत - सत्य वाटते आणि 'देह, मन, वगैरे मी आहे' हा क्रम सुरु असतो तोवर आपण इंद्रिये आणि मनाच्या स्वाधीन असतो. यामुळे सदैव साधकाला दोन प्रकारचा अभ्यास करावा लागतो. सृष्टीच्या मूळाशी वसलेले ईश्वर तत्व हेच सत्य आहे आणि सृष्टी परमात्म्याचे नाटक असल्यामुळे सत्य नाही यामुळे सृष्टीकडे परमात्म दृष्टी बाळगून बघायचा अभ्यास करणे आणि दुसरीकडे देह, मन वगैरेंचे संचालनही परमात्मा करतो म्हणून त्या परमात्म्याला अर्पण करत 'मी ना कर्ता ना भोक्ता, मी आहे केवळ ज्ञाता' हा अभ्यास करणे. अशा प्रकारे दोन प्रकारचा अभ्यास दीर्घकाळ केल्यामुळे इंद्रियांवर ताबा मिळणे साधता येते.

3) **विगतस्पृहः** याच कारणामुळे जो इच्छा वगैरे सर्व विकारांपासून मुक्त होऊन गेला. अनासक्तीने इंद्रियांवर विजय प्राप्ती आणि इंद्रियांवर विजय संपादित करुन इच्छा वगैरे सर्व विकारांपासून मुक्तता - हा क्रम आहे. देह, इंद्रिये वगैरेंना आपले समजणे अज्ञान आहे. या अज्ञानामुळेच इच्छा, ईर्ष्या, काम, क्रोध, महत्वाकांक्षा वगैरे विकार जागतात आणि त्रास देतात. यामुळेच चित्तात सुख - दु:खाच्या लाटा उत्पन्न करतात. या विकारांनी अधीन असलेल्या व्यक्तीला नेहमी बंधनाचा अनुभव येतो. म्हणून या विकारांपासून मुक्त होण्यासाठी व्यक्ती आपली भूमिका आणि कुवतीनुसार प्रयत्न करतो. यासाठी सत्संग आणि शास्त्राध्ययन आवश्यक आहे. हे लक्षण दुसऱ्या अध्यायातील 56 व्या श्लोकात आले आहे.

4) **संन्यासेन परमां नैष्कर्म्यसिध्दिं अधिगच्छतिः** अशी व्यक्ती खरा संन्यास साधला गेल्यामुळे निष्कामतारुप सिध्दीच्या पराकाष्ठेप्रत पोहोचते. उपरोक्त तीन लक्षणांनी युक्त व्यक्तीलाच खरा संन्यास साधता येतो. या अध्यायातील पहिल्या श्लोकात अर्जुनाने संन्यास आणि त्याग याविषयी प्रश्न विचारला आहे. दुसऱ्या श्लोकात समर्पक उत्तर दिले गेले आहे. काम्य कर्मांचा त्याग म्हणजे राजस आणि तामस कर्मांचा स्वरुपत: त्याग करणे म्हणजे संन्यास तर सात्विक कर्मे आचरत असतांना फलासक्ती सोडणे म्हणजे त्याग होय. परंपरेने संन्यास शब्दाचा अर्थ होता बाहेरुन कर्माचा त्याग म्हणजे सात्विक कर्माचाही त्याग करायला हवा पण आता सांगितलेली व्याख्या याहून वेगळी आहे. सहाव्या अध्यायातील चौथ्या श्लोकात 'सर्व -संकल्प - संन्यासी' असे म्हटले आहे. अशुभ संकल्प, काम, क्रोध वगैरे मलीन विचार आणि विकारांचा आसक्तीचा त्याग करणेच संन्यास आहे. यातूनच नैष्कर्म्य सिध्दीची पराकाष्ठा साधता येते. निष्कामतेच्या अभ्यासाची सुरुवात ईश्वरार्पण बुध्दीने - स्वभावप्राप्त कर्म करण्यातून झाली आणि त्याची पराकाष्ठा वरील तीन लक्षणांनी झाली. अशा प्रकारे पूर्ण निष्कामतारुप सिध्दीत पाच गोष्टींचा समावेश आहे. एक बाह्य आणि चार आंतरिक. स्वभावप्राप्त कर्म सतत करत रहाणे ही झाली बाह्य गोष्ट. आंतरिक चार गोष्टी आहेत. 1) ईश्वरार्पण बुध्दी. 2) सर्वत्र अनासक्ती. 3) सर्व इंद्रियांवर संपूर्ण नियंत्रण आणि 4) विकार मुक्ती.

: 50 :

***सिध्दिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽऽप्रोति निबोध मे।***
***समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय सिध्दिं प्राप्तः** हे अर्जुना, निष्कामतारुप म्हणजे अंत:करणाची शुध्दीरुप सिध्दी प्राप्त असलेल्याला
- **यथा ब्रह्म आप्नोतिः** जशी ब्रह्माची प्राप्ती होते
- **तथा मे समासेन एवः** ती माझ्याकडून थोडक्यात का होईना (पण)
- **निबोधः** योग्य प्रकारे जाणून घे
- **या ज्ञानस्य परा निष्ठाः** ही तत्वज्ञानाची पराकाष्ठा आहे

**अर्थ**

हे कुंतीपुत्रा, जी ज्ञानयोगाची अंतिम स्थिती आहे, त्या नैष्कर्म्यसिध्दीला ज्या रीतीने प्राप्त होऊन मनुष्य ब्रह्माला प्राप्त होतो, ती रीत थोडक्यात तू माझ्याकडून समजून घे.

***सिध्दीस लाभला ब्रह्म गांठी कोण्यापरी मग।***
***ज्ञानाची थोर ती निष्ठा ऐक थोड्यांत सांगतों॥***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आहेत. 1) निष्कामतारुप सिध्दीच्या पराकाष्ठेला पोहचलेल्या पुरुषाला जशी ब्रह्माची प्राप्ती होते ते माझ्याकडून थोडक्यात का होईना पण यथार्थ रुपाने जाण. 2) ही ज्ञानाची पराकाष्ठा होय.

हा श्लोक पुढील श्लोकांच्या प्रस्तावनारुप आहे. 49 व्या श्लोकापर्यंत चार श्लोकात निष्कामतारुप सिध्दीची पराकाष्ठा कशी प्राप्त होऊ शकते याचा क्रम सांगितला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **कौन्तेय सिध्दिं प्राप्तः** यथा ब्रह्म आप्नोति तथा मे समासेन एव निबोध नैष्कर्म्य सिध्दीप्राप्त पुरुषाला ज्या प्रकारे ब्रह्मतत्वाची प्राप्ती होते ते माझ्याकडून संक्षेपाने का होईना पण योग्य - यथार्थ - रुपाने जाणून घे. ब्रह्मानुभव

प्राप्त करुन घ्यायचा असेल तर निष्कामतारुप सिध्दींच्या पराकाष्ठेप्रत पोहोचावे लागेल एवढे मात्र निश्चित. ब्रह्मानुभव घेण्यासाठी सामान्य निष्कामता साधून भागणार नाही, हे स्पष्ट आहे. या विषयी आतापर्यंत अनेक अध्यायांमधून विवेचन आलेले आहे पण पुढील श्लोकांमध्ये या विषयी थोडक्यात पण क्रमाने विवेचन केले जात आहे. असे विवेचन चांगल्या प्रकारे लक्षात येऊ शकते.

गीतेचा हा अखेरचा अध्याय आहे. यात पूर्णाहूती होईल म्हणून मी जे थोडक्यात सांगेन, ते तू योग्य प्रकारे जाण, ग्रहण कर. योग्य प्रकारे विषय ग्रहण केला गेला तर त्याचा अनुभव प्राप्त करणे अवघड जात नाही. विषय जर चुकीच्या पध्दतीने मनात ठसला तर अनुभव प्राप्त करण्यात नाना अडचणी येतात. हा आध्यात्मिक विषय सूक्ष्म आहे. यामुळे ही सूक्ष्मता सदैव लक्षात रहायला हवी. यामुळे या अखेरच्या अध्यायात भगवान अर्जुनाला सावध करत आहेत.

2) **या ज्ञानस्य परा निष्ठा:** ही ब्राह्मी स्थिती ज्ञानाची पराकाष्ठा आहे. ब्रह्मानुभवाला दुसऱ्या अध्यायातील 72 व्या श्लोकात 'ब्राह्मी स्थिती' असे म्हटले आहे. इथे 'ब्राह्मी स्थिती'ला 'ज्ञानाची पराकाष्ठा' म्हटले आहे. या स्थितीत संपूर्ण विश्व वासुदेवमय होऊन जाते. सातव्या अध्यायातील 19 व्या श्लोकात 'सारे जगत वासुदेवमय दिसते' अशा लक्षणाद्वारे हा विषय समजाऊन सांगितला आहे. ही पराभक्ती होय. या बाबतीत या अध्यायातील 54 - 55 व्या श्लोकात सांगताहेत. ज्ञानाची पराकाष्ठा साधली तर पराभक्ती प्राप्त होते.

: 51 :

*बुद्ध्या विशुध्दया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।*
*शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विशुध्दया बुद्ध्या युक्त:** शुध्द, निर्मळ बुध्दीयुक्त
- **च धृत्या आत्मानं नियम्य:** आणि ज्याने धैर्यपूर्वक सर्व इंद्रियांचे नियमन केले आहे म्हणजे सात्विक धारणेने अंत:करणाला वश करुन घेतले आहे
- **शब्दादीन् विषयान् - त्यक्त्वा:** शब्द वगैरे विषयांचा त्याग करुन
- **च रागद्वेषौ व्युदस्य:** आणि ज्याने राग द्वेषाचा त्याग केला आहे

**अर्थ**

शुध्द बुध्दी धारण करुन धैर्याने मनाचे नियमन करुन शब्द वगैरे विषय टाकून देऊन राग आणि लोभ यांचा त्याग करुन

*बुध्दी सात्त्विक जोडूनि धृतीचा दोर खेंचुनी ।*
*शब्दादि - स्पर्श टाळूनि राग - द्वेषांस जिंकुनी ॥*

**विषय:** या श्लोकात ज्ञान्याच्या पराकाष्ठेमुळे प्रकट होणारी चार लक्षणे सांगितली आहेत. 1) जो अत्यंत शुध्द निर्मळ बुध्दीने युक्त आहे. 2) आणि ज्याने धैर्यपूर्वक सर्व इंद्रियांचे नियमन केले आहे. 3) शब्द वगैरे पंचविषयांपासून स्वत:ला ज्याने अलिप्त राखले आहे. 4) आणि ज्याने राग - द्वेषाचा त्याग केला आहे.

**स्पष्टीकरण -**

1) **विशुध्दया बुद्ध्या युक्त:** जो अत्यंत निर्मळ शुध्द बुध्दी युक्त आहे. ईश्वराचा अनुभव बुध्दी वा चित्त विशुध्द म्हणजे निर्मळ झाल्याशिवाय होऊ शकत नाही, यामुळे हे लक्षण ईश्वराच्या अनुभवात सहज प्रकट होते. शुध्द बुध्दीमुळे ब्रह्मज्ञान्याचा व्यवहार स्थूल आणि सूक्ष्म दोन्ही प्रकारे चालतो. त्यात स्थूल आणि सूक्ष्म दोन्ही प्रकारे सत्य - अहिंसा प्रकट होते.

गांधीजींच्या आचरणात या दोन्ही गोष्टी सूक्ष्मपणे व्यक्त झाल्या होत्या. त्यांनी पंच महाव्रतांवर अनुभवसंपन्न मौलिक विचार प्रकटही केले आहेत. त्यानी आश्रमवासियांना या व्रतांचे पालन करायला लावले. यामुळे सर्व जनतेला या व्रतांविषयी काहीशी कल्पना आली. (या विषयावर गांधीजींनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव 'मंगल प्रभात' आहे. विनोबाजींनी 'अभंग व्रते' या शीर्षकाने मराठीतून काव्यानुवाद केला आहे. या दोन्ही ग्रंथांचा आधार घेऊन बाळकोबांनी हिंदी भाषेत 'अभंग व्रत विवेचन' हा ग्रंथ लिहिला आहे.) ब्रह्मज्ञान प्राप्तीसाठी

या व्रतांची नितान्त आवश्यकता आहे. या व्रतांच्या पालनामुळे बुध्दी विशुध्द होण्याकामी खूप सहाय्य मिळते.

2) **च धृत्या आत्मानं नियम्य:** आणि धैर्यपूर्वक म्हणजे निग्रह शक्तीच्या बळावर ज्यांनी सर्व इंद्रियांना नियंत्रणात राखले आहे. बुध्दी शुध्द असल्यामुळे इंद्रियांवर ताबा मिळवताच येतो. ब्रह्मज्ञानी पुरुषाचे मुख्य लक्षण इंद्रिय निग्रह आहे. स्थितप्रज्ञ लक्षणांची चर्चा करताना इंद्रिय निग्रहाला मुख्य लक्षण सांगितले गेले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या बुध्दीत ज्ञान शक्ती आणि मनात निग्रह शक्ती अशा दोन प्रकारच्या शक्ती आहेत. कुठल्याही विषयाचे ज्ञान बुध्दीद्वारे प्राप्त करुन घेता येते. चिंतन - मनन करता येते. ते काही फार अवघड नाही, पण अमलात आणणे खूप कठीण आहे. हे निग्रह शक्तीचे कार्य होय. ब्रह्मज्ञान्याची कुठलीही क्रिया घ्या, इंद्रिय - संयम दिसून येईल. त्याचा चित्तावर संपूर्णपणे ताबा असतो तो मन व इंद्रियांना कदापि वश होत नाही.

3) **शब्दादीन् विषयान् त्यक्त्वा:** शब्द वगैरे पाच विषयांच्या संदर्भात ज्याने स्वत:ला अलिप्त राखले आहे. इथे मूळात शब्द आला आहे, शब्द वगैरे विषयांचा 'त्याग' पण शब्द वगैरे पंच विषयांचा त्याग कुणी करु शकत नाही. यामुळे इथे त्याचा अर्थ शब्द वगैरे विषयी 'अलिप्तता' घेतला आहे. ज्ञानी असो वा अज्ञानी जोवर देह आहे तोवर शब्द वगैरे विषयांचा त्याग कसा काय करता येऊ शकतो ? अज्ञानी पुरुष विषयात लिप्त असतो त्यामुळे तो विषय टाळण्याचे अवश्य प्रयत्न करील पण ज्ञानी पुरुष तर विषयात लिप्त व्हायचे काही कारण नाही यामुळे यांचा त्याग करायची गरज नाही. त्याचा इंद्रियांवर परिपूर्ण ताबा असतो. त्यामुळे विषय इंद्रियांवर कधी आक्रमण नाही करु शकत. त्याच्या मनी विषयांचे आकर्षण उरलेले नसतेच मुळी. ज्ञानाला विरोध करणाऱ्या असत् विषयांचा सहजच त्याग होईल. ते त्याला कदापि स्पर्श करणार नाही. सद्विषयांशी संबंध राखताना तो लिप्त होत नाही यामुळे सद्विषयांशी संबंध राखण्यात त्याला भय वा संकोच नसतो. ज्ञानी पुरुषाचे जगणे काही स्वत:साठी नसते. तो तर लोक कल्याणासाठीच जगतो.

4) **च रागद्वेषौ व्युदस्य:** आणि ज्याने राग - द्वेषाचा त्याग केला आहे. शब्द वगैरे विषयांचा त्याग करण्याऐवजी शब्द वगैरे विषयांशी संबध्द राग, द्वेष वगैरे विकारांचा त्याग करणे मुख्य विषय आहे - महत्वाचे आहे. दु:खदायक तर राग, द्वेष वगैरे विकार आहेत. तेच आत्मज्ञानाला झाकून ठेवतात. यामुळेच परमात्म स्वरुपाचा अनुभव येत नाही. ब्रह्मज्ञानी पुरुषाने साधना करतांना या विकारांना हटवले आहे यामुळे त्याला परमात्मस्वरुपाचा अनुभव प्राप्त होतो. या विकारांना हटवणेच साधनेचे ध्येय असायला हवे.

: 52 :

*विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।*
*ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **विविक्तसेवी:** एकांतप्रिय आणि शुध्द देशात रहाणारा
- **लघ्वाशी:** हलके आणि अल्प आहार सेवन करणारा
- **यतवाक्कायमानस:** वाणी, शरीर आणि मन ज्याच्या ताब्यात आहेत
- **नित्यं ध्यानयोगपर:** जो नित्य ध्यानयोगात परायण आहे
- **वैराग्यं समुपाश्रित:** ज्याने दृढ वैराग्याचा आश्रय घेतला आहे

**अर्थ**

एकांत सेवन करुन राहिले, मिताहार ठेवला, कायेचा, वाचेचा व मनाचा निग्रह केला, निरंतर ध्यानयोगामध्ये निमग्न राहून वैराग्याचा अंगिकार केला.

***चित्त वाचा तनु नेमी एकांती अल्प सेवुनी।***
***गढला ध्यान - योगांत दृढ वैराग्य लेउनी॥***

विषय: या श्लोकात ब्रह्मज्ञानी पुरुषाची आणखी पाच लक्षणे वर्णिली आहेत. 1) एकांतप्रिय. 2) पचनाला सोपे पण पौष्टिक आहार सेवन करणारा. 3) ज्याच्या ताब्यात वाणी, शरीर आणि मन आहे. 4) जो सदा परमेश्वराच्या ध्यानात परायण असतो. 5) ज्याने वैराग्याचा आश्रय घेतला आहे.

**स्पष्टी**

1) **विविक्तसेवी:** एकांतप्रिय हे लक्षण तेराव्या अध्यायातील दहाव्या श्लोकात ज्ञानाची लक्षणे सांगताना आले आहे. एकांतवासाच्या वृत्तीत लोकांबद्दल तिटकाऱ्याचा भाव नाही. जिथे सर्व ईश्वरमय दिसून येत असेल तिथे तिटकारा शक्यच नाही. एकांतात चित्ताची एकाग्रता सहज साधली जाते. समुदायात राहिल्यामुळे ब्रह्मज्ञानी पुरुष एकाग्र होऊ शकत नाही असे काही नाही पण एकांत आणि लोकांताची तुलना करु जाता लोकांतापेक्षा एकांतात चित्त एकाग्र करणे अनुकूल असणे स्वाभाविकच आहे. साधकावस्थेत तर काही काळासाठी एकांत आवश्यकच आहे पण सिध्दावस्थेत एकांत आवश्यक नसला तरी सहजपणे जर वृत्तीचे वळण एकांताकडे असले तर ती ब्रह्मज्ञान्याची अपूर्णता मानायचे काही कारण नाही. ब्रह्मज्ञानी दोन प्रकारचे असतात 1) प्रवृत्तीप्रधान 2) निवृत्तीप्रधान. दोघे लोकसंग्रहकारक सेवा कार्य करतात. एकाची प्रवृत्ती निवृत्तीप्रधान तर दुसऱ्याची प्रवृत्तीप्रधान असते. ही गोष्ट बालपणीच्या स्वभावगत धर्माशी संबध्द आहे. बालपणी विनोबांची वृत्ती वैराग्यप्रधान राहिली. आश्रमात गांधीजींच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या ठायी प्रवृत्ती संचारली. गांधीजींशी संपर्क झाला नसता तर विनोबा तहहयात निवृतीप्रधानच राहिले असते. भूदान वगैरेचे प्रचंड कार्य त्यांच्या हातून झाले नसते. गांधीजींचा स्वभाव बालपणापासून प्रवृत्तीप्रधान होता. विनोबांच्या स्वभावात तहहयातही सहज निवृत्ती राहिली. त्यांचे वळण सहजच एकांत सेवनाकडे राहिले.

2) **लघ्वाशी:** पचनाला सोपे पण पौष्टिक आहाराचे सेवन करणारा. ब्रह्मज्ञानी मिष्टान्नप्रेमी नसतो. तो शरीराला साधन समजतो. हे साधन निरोगी आणि बलवान रहावे यासाठी मिष्टान्नाची गरज नाही. ते जड असते आणि आरोग्याला हानिकारक आहे. तो तिखट - मिरची - मसाल्यांचे सेवनही करत नाही कारण की आरोग्यासाठी या गोष्टीही उपयोगाच्या नाही होत. ब्रह्मज्ञानी पुरुष अधिक आहार तर कधीच नाही घेत. सहाव्या अध्यायातील 16 व 17 व्या श्लोकात योगी पुरुषाच्या संतुलित आणि मिताहाराचे विवेचन आले आहे.

3) **यतवाक् - काय - मानस:** वाणी, शरीर आणि मन ज्याच्या स्वाधीन आहे - मागील श्लोकात ब्रह्मज्ञानी पुरुषाचे वर्णन आले आहे की ज्याने धैर्यशक्तीच्या बळावर म्हणजे निग्रह शक्तीद्वारे सर्व इंद्रियांना ताब्यात राखले आहे. या श्लोकातही हेच लक्षण सांगितले आहे. फरक एवढाच की तिथे म्हणजे मागील श्लोकात शरीर वा इंद्रियांचा प्रत्यक्ष उल्लेख नाही. इथे वाणीचाही उल्लेख आहे. वाणीनेच सर्व व्यवहार चालत असल्यामुळे वाणी महत्वाचे इंद्रिय आहे. ब्रह्मज्ञान्याचा वाणीवर संपूर्ण अधिकार असतो. तो आवश्यक तेवढेच बोलतो. प्रवाहात वाहून जात नाही. त्याचा शरीरावरही ताबा असतो. तो शक्ती अनुसारच शरीराकडून सेवा घेतो - काम करवतो. मनावर तर संपूर्ण नियंत्रण असतेच. इच्छेशिवाय कुठलाही विचार मनात येता कामा नये. सामान्य लोकांच्या मनात आपल्या इच्छेविरुध्द विचारही घोंगावत रहातात - येतात पण ब्रह्मज्ञान्याचा आपल्या मनावर एवढा जबरदस्त ताबा असतो की इच्छेशिवाय एकही विचार त्याच्या मनात प्रवेश करत नाही - येत नाही.

4) **नित्यं ध्यानयोगपर:** जो नित्य ध्यान परायण आहे. या वचनाचा अर्थ काही असा नाही की एका स्थानावर स्थिर होऊन निष्क्रिय बनून ईश्वराच्या ध्यानात तल्लीन होणे. लोकसंग्रहात्मक सेवाकार्य करत असताना आतून शून्य बनून अकर्तेपणा अनुभवत 'जड-चेतन सारे पदार्थ परमात्ममय आहेत' असा अनुभव नित्य घेणे म्हणजेच परमात्म्याच्या ध्यानात तल्लीन होणे होय. आपण जगताला सत्य दृष्टीने बघतो सत्य समजतो -यामुळे जगतातल्या पदार्थांच्या ध्यानातच आपण तल्लीन होतो. आपले मन सदान् कदा त्यातच गुंतून असते. ब्रह्मज्ञान्याच्या नजरेत जगत् मिथ्या आहे. त्याची दृष्टी परमात्ममय असते. यामुळे तो जगात गुंतून पडत नाही. अडकून रहात नाही.

5) **वैराग्यं समुपाश्रित:** ज्याने वैराग्याचा आश्रय घेतला आहे. जगत् मिथ्या असण्याचे ज्ञान झाल्यावर वैराग्य जागते. तेराव्या अध्यायातील आठव्या श्लोकात ज्ञानी पुरुषांच्या लक्षणांची चर्चा करतांना इन्द्रियार्थेषु वैराग्यम् - इंद्रियांच्या पंच विषयांप्रती वैराग्य जागणे सांगितलेले आहे. वैराग्य म्हणजे सर्वस्वाचा त्याग करुन वनात गमन करणे नव्हे. आपण जिथे रहातो तिथे आपल्या स्वधर्माचे चांगल्या प्रकारे पालन करुन सर्वांविषयी वैराग्यभाव बाळगणेच याचा अर्थ आहे. मातृ - पितृ सेवा तर स्वधर्म असेल तर ती सेवा वैराग्यात बाधक

नाही पण मोहामुळे स्वधर्म नसतांनादेखिल त्याला स्वधर्म मानून घराची सीमा ओलांडायला तयार नसतील तर ते बाधक होऊ शकते. ब्रह्मज्ञान्याचे आत्मपरीक्षण सूक्ष्म स्वरुपाचे असल्यामुळे त्याच्यासाठी असे होणे शक्य नाही. साधक दशेतही आत्मपरीक्षण तीव्र असायला हवे. आपण आपल्याला फसवू नये - ठगू नये. वैराग्याचा बाह्य संबंध कमीत कमी असून मुख्य संबंध मनाशी आहे पण सध्या समाजात वैराग्याविषयी अशी परंपरा रुढ होऊन बसली आहे की जो बाह्यत: सर्वस्व त्याग करुन निष्क्रिय बनून विचरण करतो तो वैराग्यवान - वैराग्यसंपन्न आहे पण हे चुकीचे आहे. बाह्यत: वैराग्ययुक्त दिसणारा आतून भोगीही असू शकतो.

: 53 :

*अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।*
*विमुच्य निर्मम: शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहंकारं:** कर्तेपणाची भावना
- **बलं:** शरीर बळ
- **दर्पं:** अधर्माचरण वृत्ती, घमेंड
- **कामं:** इच्छा - वासना
- **क्रोधं:** क्रोध
- **परिग्रहं:** संग्रह
- **विमुच्य:** (या सर्वांना) सोडून
- **निर्मम:** ममतारहित
- **शांत:** शांत रहाणारा
- **ब्रह्मभूयाय कल्पते:** ब्रह्मरुपी स्थान प्राप्त करण्यात समर्थ होतो

**अर्थ**

अहंकार, बळ, गर्व, काम, क्रोध व परिग्रह टाकून देतो, व ममता टाकून देऊन जो शांत होतो, तोच ब्रह्मतत्त्वाला योग्य होतो.

***बळ दर्प अहंकार काम क्रोध परिग्रह ।***
***ममत्वासह सोडूनि शांतीनें ब्रह्म आकळी ॥***

**विषय:** या श्लोकात ब्रह्मज्ञान्याच्या संदर्भात दहा गोष्टी सांगितल्या गेलेल्या आहेत. 1) देह वगैरे संघात मी आहे, हा कर्तेपणाचा अहंकार. 2) रजोगुणाने उत्पन्न आणि हिंसेत प्रवृत्त करणारे शरीर बळ. 3) एखादे चांगले कार्य केल्यानंतर त्यातून उत्पन्न होणाऱ्या हर्षातिशोकाने अधर्माचरणाची प्रवृत्ती. 4) इच्छा, वासना. 5) इच्छा तृप्त न झाल्यामुळे वा इच्छेविरुध्द काही घडले तर उत्पन्न क्रोध. 6) अनावश्यक वस्तुंच्या संग्रहाची वृत्ती. 7) या सर्व विकारांचा त्याग करत असताना. 8) ममतारहित बनून. 9) प्रत्येक परिस्थितीत शांत रहाणारा पुरुष. 10) ब्रह्मरुपी स्थान प्राप्त करुन घ्यायला समर्थ होतो.

**स्पष्टीकरण**

1) **अहंकारम्:** अहंकार. तेराव्या अध्यायातील पाचव्या श्लोकात अहंकाराची चर्चा आली आहे. जोवर अहंकार आहे तोवर एका देहाचा त्याग केल्यावर दुसरा देह मिळतो, असे चक्र सुरु रहाते. अहंकाराचे कारण अज्ञान आहे आणि या अज्ञानामुळेच ईश्वराची ओळख होत नाही. अज्ञानामुळेच लहान - मोठी क्रिया करत असतांना मनात कर्तेपणाची भावना असते आणि त्यामुळे आपण सुख - दु:खरुपी कर्मफळे भोगत रहातो. ब्रह्मज्ञानी पुरुषाच्या ठायी हा अहंकार नसतो.

2) **बलम्:** बळ, शक्ती. रजोगुणाने उत्पन्न होणारे आणि हिंसेला प्रवृत्त करणारे शरीर बळ. सातव्या अध्यायातील अकराव्या श्लोकात सांगितले आहे की ‘मी काम विवर्जित बळ’ आहे. इथे बळ या शब्दाचा अर्थ रजोगुणी बळ आहे. रजोगुणाने उत्पन्न झालेले बळ, काम, क्रोध वगैरे विकारांनी युक्त असते. ते राक्षसी बळ होय. रावणाचे बळ रजोगुणी होते. रामचंद्रांचे बळ सात्विक होते. सात्विक बळाचा विजय झाला. रजोगुणी बळ परस्परात संघर्ष माजवतो. संघर्षातून युध्दे उभी ठाकतात. रजोगुणी बळ समाज कल्याणासाठी विघातक स्वरुपाचे आहे. यामुळे ब्रह्मनिष्ठ पुरुषाच्या ठायी हे बळ नसते.

3) **दर्पम्:** एखादे चांगले कार्य हातून घडले तर हर्षातिरेकामुळे जागलेली अधर्माचरणाची प्रवृत्ती. आपल्या हातून एखादे चांगले कार्य संपन्न झाले, कार्य यशस्वीपणे पार पडले तर मनाला हर्ष होतोच. त्याची प्रशंसा झाली तर मनाला उत्साह वाटतोच. यामुळे कधी - कधी वृत्ती

बिघडायला लागते. हर्षातिरेक एक प्रकारचा उन्मादच आहे, हा माणसाच्या पतनाला कारणीभूत ठरतो. चांगल्या कामाचे समाधान होणे काही वाईट नाही पण त्यातून हर्षातिरेक होऊ नये. चांगले कार्य ईश्वरार्पण करायचा सराव झाला तर हर्षातिरेकाची शक्यता उरत नाही.

4) **कामम्:** नाना इच्छा, वासना वा महत्वाकांक्षा. माणसाच्या मनात सदैव इच्छा, वासना उत्पन्न होत रहातात. यांच्या अधीन होऊनच माणूस भोगांमध्ये लिप्त रहातो. यामुळे दु:खी झाल्यावर माणूस यातून सुटका करुन घ्यायचा प्रयत्न करतो. संत तुलसीदासजी म्हणतात - काम अछत सुख सपनेहुँ नाहीं. अर्थात् मनात जोवर काम म्हणजे इच्छा असतात तोवर स्वप्नातही सुखलाभ होऊ शकत नाही. पुढे ते लिहितात-राम भजन बिनु मिटहिं कि कामा अर्थात् रामभक्तीशिवाय इच्छा संपू शकत नाही. (इच्छा शमू शकत नाही असे काही तुलसीदासजी लिहित नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.)

5) **क्रोधम्:** इच्छा तृप्त न झाल्यावर वा इच्छेविरुध्द काही घडल्यावर उत्पन्न होणारा क्रोध. मनात जोवर इच्छा कायम आहे तोवर मनात क्रोधही असतोच कारण की इच्छेविरुध्द कुणाचे आचरण असले वा कुणी आपल्या इच्छेनुकूल उत्तर दिले नाही तर लगेच क्रोध उत्पन्न होतो. क्रोधामुळे द्वेष उत्पन्न व्हायला लागतो. प्रसंग आणि स्वभावानुसार क्रोधही कमी - अधिक होत रहातो. कुणाचा शांत स्वभाव असतो तर कुणाचा स्वभाव क्रोधी असतो. क्रोधी माणसाला तर थोडेही निमित्त जागले की क्रोध प्रकट होतो पण शांत स्वभावी माणसात किरकोळ कारणाने क्रोध उत्पन्न होत नाही. ब्रह्मज्ञानी पुरुषाने क्रोधावर विजय संपादन केला असल्यामुळे विशेष प्रसंगीही क्रोध प्रकट होत नाही.

6) **परिग्रहम्:** वस्तुंचा संग्रह करण्याची वृत्ती. सध्याच्या काळात भौतिक सुखालाच प्राधान्य प्राप्त झाले आहे. सुख मिळवण्यासाठी परिग्रह वाढवला जातो. अधिक परिग्रहासाठी हवी संपत्ती. अधिक संपत्ती प्रामणिकपणे संपादित करता येत नाही. यामुळे संपत्ती मिळवण्याचे प्रयत्न चालत रहातात. प्राचीन काळी अपरिग्रहाला प्रतिष्ठा होती. साधेपणात, कमी परिग्रह करुन, कमी खर्चात उदरनिर्वाह चालवणे गौरवाचा विषय होता. सध्या समाजात अशी स्थिती उरली नाही. अपरिग्रह साधु - संतांपुरताच मर्यादित आहे. आता तर त्यांच्या ठायीही अपरिग्रह उरलेले नाही पण ब्रह्मज्ञानी परिग्रह करत नाही.

7) **विमुच्य:** या सर्व विकारांचा त्याग करुन. उपरोक्त सहा विकारांची चर्चा करुन सांगताहेत की ब्रह्मज्ञानी अहंकार, बळ, दर्प, काम, क्रोध, परिग्रह या सहा विकारांचा त्यागी असतो.

8) **निर्मम:** ममतारहित बनून. 'मी देह आहे' ही दृष्टी ब्रह्मज्ञान्याची संपून जाते. त्याच्या ठायी ममता उरतच नाही. 'अहं' आणि 'मम' म्हणजे 'मी' आणि 'माझे' या भावना - चुकीच्या धारणा - घालवण्यासाठीच गीतेची रचना झाली आहे. पहिल्या अध्यायात ममतेशी संबध्दच प्रसंग उपस्थित केला आहे. संत तुलसीदासजीनी म्हटले आहे - गृह कारज नाना जंजाला। ते अति दुर्गम सैल बिसाला। अर्थात् रामकथा सुंदर सरोवर आहे. तिथवर पोहोचण्यासाठी काही अडथळे आहेत त्यात घरकामे - प्रापंचिक जबाबदाऱ्या विविध अडचणी - अडथळ्यांसारख्या म्हणजे जंजाळासारख्या आहेत त्या जणु काही अनुल्लंघ्य अशा विशाल पर्वतरांगा आहेत. त्या कशा दुस्तर !

9) **शांत:** वाटेल त्या परिस्थितीत शांत रहाणारा. ब्रह्मज्ञानी जर सर्वांपासून निवृत्त असला तर त्याच्या शांततेचा - शांतीचा काही कस लागत नाही पण तो जर गांधीजींसारखा प्रवृत्तीमय असेल म्हणजे लोककल्याण हितरत असून कामात गुंतलेला असेल तर त्याच्या शांतीची कसोटी लागते. त्याला जर खरोखरच आपल्या आत ईश्वराचा अनुभव आला असेल तर वाटेल त्या परिस्थितीत तो क्रोध वगैरे विकारांच्या अधीन होणार नाही पूर्णपणे शांत राहील. आपले स्वरुप शांती असल्याचे ब्रह्मज्ञानी जाणतो. त्याला हरवून तो स्वरुप म्हणजे ईश्वराचा अनुभव कसा बरे घेऊ शकेल? उपनिषदांनी मुमुक्षुसाठी शम, दम वगैरे साधन संपत्तीची चर्चा केली आहे त्यात पहिले स्थान शम म्हणजे 'शांतीला' आहे. साधकावस्थेत जर साधन म्हणून शांती आवश्यक आहे तर सिध्दावस्थेत शांती सहज लक्षण बनून जाण्यात काय सांगणे लागावे? म्हणजे याचा प्रश्नच काय उद्भवतो ?

10) **ब्रह्मभूयाय कल्पते:** ब्रह्मरुपी स्थान प्राप्त करण्यात म्हणजे ब्रह्मानुभव प्राप्त करण्याकामी समर्थ होतो. या तीन श्लोकांमध्ये वर्णित ब्रह्मज्ञानी पुरुषाची आठ

लक्षणे ज्यांच्या ठायी आढळून येतात. ते ब्रह्माचा अनुभव मिळवू शकतात. साधकावस्थेत ही लक्षणे संपादित करुन घेण्याचा - प्राप्त करुन घेण्याचा - प्रयत्न केल्यावरही सर्व साधकांना ही लक्षणे एकाच जन्मात प्राप्त होतील - संपादित करता येतील - असे नाही कारण की पूर्वजन्मीच्या पापकर्मांना भोगण्यासाठी देश, काल, परिस्थिती लाभली तरी साधनेत प्रतिबंध उभे रहातील - अडथळे येतील आणि ते घालवण्यात खूप वेळ निघून जाईल. साधक दशेत प्रयत्न तीव्र असल्यावरही या प्रकारचे अडथळे झालेत तर ज्ञान प्राप्त होण्यात सहाजिकच विलंब लागू शकतो.

: 54 :

*ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति।*
*सम: सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **ब्रह्मभूत:** ब्रह्मानुभव प्राप्त म्हणजे सच्चिदानंदघन परमात्म्याशी एकरुप झालेला
- **प्रसन्नात्मा:** प्रसन्नात्मा, प्रसन्न चित्ताचा पुरुष
- **न शोचति न कांक्षाति:** न कधी शोक करत, ना आकांक्षा
- **सर्वेषु भूतेषु सम:** सर्व भूतमात्रांसमवेत समतापूर्वक चालतो
- **मत्परां भक्तिं लभते:** (यासाठी) माझी अत्यंत श्रेष्ठ - परम श्रेष्ठ - भक्ती त्याला प्राप्त होते

**अर्थ**

मग तो सच्चिदानंदघन ब्रह्मांत तद्रूप झालेला प्रसन्न चित्ताचा योगी कशाबद्दलही शोक करीत नाही आणि कशाचीही इच्छा करीत नाही. असा सर्व प्राण्यांच्या ठिकाणी समभाव बाळगणारा योगी माझ्या पराभक्तीला (तत्वज्ञानाची जी पराकाष्ठा आहे तसेच जी प्राप्त झाली असता आणखी काही जाणणे बाकी रहात नाही तीच येथे पराभक्ती होय. ही ज्ञानाची परा निष्ठा, परम नैष्कर्म्यसिध्दी आणि परासिध्दी इत्यादी नावांनी सांगितली गेली आहे.) प्राप्त होतो.

***ब्रह्म झाला प्रसन्नत्वें न करी शोक कामना।***
***पावे माझी परा भक्ति देखे सर्वत्र साम्य जी॥***

**विषय:** या श्लोकात ब्रह्मज्ञानीची आणखी चार लक्षणे वर्णिली आहेत. 1) ब्रह्मानुभवप्राप्त प्रसन्नात्मा. 2) कधी ना शोक करत, ना कधी कुठली आकांक्षा मनी धरत. 3) सर्व भूतमात्रांप्रती त्याचे समतापूर्वक वागणे असते. 4) त्याला माझी परम श्रेष्ठ अशी भक्ती प्राप्त होते.

**स्पष्टीकरण**

1) **ब्रह्मभूत:** प्रसन्नात्मा ब्रह्माचा अनुभव प्राप्त करुन घेणारा पुरुष प्रसन्न असतो. पहिले लक्षण आहे प्रसन्नता. याचा उल्लेख दुसऱ्या अध्यायातील चौसष्ठाव्या श्लोकात आला आहे. पुढे याच अध्यायातील पासष्ठाव्या श्लोकात येते की प्रसन्नतेचे फलित आहे बुध्दीची स्थिरता - इथे या प्रसन्नतेलाच ब्रह्मज्ञानी पुरुषाचे लक्षण सांगितले आहे. परमात्म्याचे स्वरुप सत् - चित् - आनंद आहे. ब्रह्मज्ञान्याला याचा अनुभव परमात्मस्वरुपाचा अनुभव आल्यावर होतो. आनंदाच्या या अनुभवामुळे आमरण वाटेल त्या परिस्थितीत अखंड प्रसन्नतेचा अनुभव कायम टिकून रहातो. मृत्युच्या विषम प्रसंगी म्हणजे त्या काळी वाटेल तेवढी शारीरिक वेदना झेलायला लागली तरी त्याची प्रसन्नता खंडित होत नाही. आनंदाची अनुभूती तात्कालिक म्हणजे प्रासंगिक असते. त्यातून अखंड टिकणारी स्थिती प्रसन्नता होय.

2) **न शोचति न कांक्षति:** तो ना शोक करत आणि ना आकांक्षा - इच्छा राखत. जेव्हा अखंड प्रसन्नता अनुभवायला मिळते, तेव्हा त्याचा सहज परिणाम काय असतो त्याविषयी सांगताहेत. त्याच्या मनी कदापि शोक जागत नाही कारण मनात कुठल्या वस्तुची इच्छा वा आकांक्षा उरत नाही. मनात जर काही इच्छा वा आकांक्षा असली तर तिच्याविरुध्द काही घटना घडली तर दु:ख होणे स्वाभाविकच आहे. मनात शुभ संकल्प असावा पण त्याविषयी आसक्ती उरु नये.

3) **सर्वेषु भूतेषु सम:** सर्व भूतमात्रांशी तो समतेचा व्यवहार करतो. सर्व प्राणीमात्रांच्या ठायी एक परमात्माच वसतो. यामुळे तो सर्व प्राणीमात्रांकडे परमात्मदृष्टीनेच बघतो. राजापासून तर थेट रंकापर्यंत सर्वांशीच त्याचा

व्यवहार असा असतो की सर्वांना वाटेल की आपल्याशी चांगला व्यवहार केला जात आहे. बहुधा लोक मजूर वा हमालाशी वेगळ्या भाषेत बोलतात आणि कुण्या मोठ्याा व्यक्तीशी वेगळ्या पध्दतीने व्यवहार करतात. सामान्य आणि ब्रह्मज्ञानी पुरुषात ह्याच फरक असतो. सामान्य माणसाचा सर्वांशी समान व्यवहार नसतो मात्र ब्रह्मज्ञान्याचा व्यवहार समानतेचा असतो.

4) **मत्परां भक्तिं लभते:** यामुळे त्याला माझी परम श्रेष्ठ अशी भक्ती प्राप्त होते. सर्वांप्रती परमात्मदृष्टी असल्यामुळे ब्रह्मज्ञानीच्या चित्तात परमात्म्याविषयी परम भक्ती उत्पन्न होते. साधक दशेत भक्तीचा आश्रय गरजेचा आहे पण साधक दशेत भक्तीत अपूर्णता असते. सिध्दावस्थेत भक्तीची पूर्णावस्था अनुभवता येते कारण की सिध्दावस्थेत भक्ती पूर्णपणे साधली गेलेली असते.

ज्ञानेश्वर महाराजांनी नवव्या अध्यायातील अखेरच्या श्लोकाच्या भाष्यात म्हटले आहे की नेत्रांनी तो मला म्हणजे परमात्म्यालाच बघतो. कानानेही तो परमात्म्यालाच ऐकतो, समस्त इंद्रियांनी तो ईश्वराचाच अनुभव घेतो. ही चतुर्थ भक्ती होय. या चौथ्या भक्तीत समस्त जगत परमात्ममय म्हणजे वासुदेवमयच दिसते.

: 55 :

*भक्त्या मामभिजानाति यावन्यश्चास्मि तत्त्वतः ।*
*ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ॥*

### अन्वय आणि शब्दार्थ

- **यावान् च य: अस्मि:** ब्रह्मांडात ज्या प्रकारे मी आहे
- **मां:** मला
- **तत्त्वत:** भक्त्या अभिजानाति: यथार्थरुपेण श्रेष्ठ भक्तीने जाणतो
- **तत: मां तत्त्वत:** ज्ञात्वा: अशा प्रकारे मला यथार्थ रुपाने जाणून
- **तदनन्तरं विशते:** नंतर म्हणजे त्याच वेळी माझ्या ठायी प्रविष्ट होतो

### अर्थ

त्या पराभक्तीच्या योगाने तो मज परमात्म्याला 'मी जो आणि जसा आहे', अगदी बरोबर तसाच तत्वत: जाणतो तसेच त्या भक्तीने मला तत्वत: जाणून त्याचवेळी माझ्यात प्रविष्ट होतो.

***भक्तीनें तत्त्वतां जाणे कोण मी केवढा असें ।***
***ह्यापरी मज जाणूनि माझ्यांत मिसळे मग ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत. 1) ब्रह्मांडात ज्याप्रकारे मी आहे, माझ्या स्वरुपाला यथार्थपणे भक्तीने जाणतो. 2) अशाप्रकारे मला यथार्थ रुपाने जाणून. 3) नंतर माझ्या ठायी प्रविष्ट होतो, शून्य बनून मोक्षलाभ करुन घेतो.

### स्पष्टीकरण

1) यावान् अस्मि च य: अस्मि मां तत्त्वत: भक्त्या अभिजानाति: परमात्मा ब्रह्मांडात अणु-अणुमध्ये व्याप्त आहे पण तो कुण्या रुपात आहे हे सर्वांना ठाऊक नाही, हे विशेष. ब्रह्मांड जड तत्वाने निर्माण झाले आहे वा चेतन तत्वाने याविषयी मोठमोठ्यातत्वचिंतकांमध्ये मतभेद आहेत. सांख्य, नैयायिक, जैन, बौध्द, वेदान्ती वगैरे अनेक तत्वज्ञानांनी आपापली मते मांडली आहेत स्थापित केली आहेत. या संबंधी शंका फिटल्यावर एका निश्चित निर्णयावर पोहोचल्यावर त्याचा अनुभव कसा प्राप्त करता येईल हा प्रश्न उपस्थित होतो.

अनुभव प्राप्तीचे उपाय लक्षात आल्यावर आणि साधना करत संपूर्ण आयुष्य घालवल्यावर सुध्दा अनुभव मिळेलच असे काही सांगता येत नाही. शरीरात परमात्मा कोणत्या रुपात विद्यमान आहे, हे जाणून घेण्यातच काळ लोटून जातो. पिंड आणि ब्रह्मांडात जर एकच परमात्मा आहे तर दोघांचा परस्पर संबंध कसा आहे ? जीवात्मा आणि परमात्मा भिन्न आहेत की अभिन्न ? इत्यादी प्रश्न सोडवण्यातच खूप काळ निघून जातो. गीतेच्या मते अनुभव मिळवण्याचे सर्वात सुलभ साधन भक्ती आहे. ध्यान, वैराग्य, अनासक्ती, फलाशा त्याग, स्वाध्याय, जप, सत्संग, सत्कर्म वगैरे साधनांचा उपयोग करत असतांनाही भक्तीचा जर आश्रय घेतला गेला नाही तर उर्वरित साऱ्या क्रिया करुन देखिल ईश्वराचा परिपूर्ण अनुभव

मिळवणे शक्य नाही कारण की अहंकाराला संपूर्णपणे विरघळवण्याचे सामर्थ्य केवळ भक्तीच्या ठायी आहे. अनुभव जोवर संपूर्णपणे विरघळून जात नाही तोवर पूर्ण अनुभव प्राप्त होऊ शकत नाही. पूर्ण अनुभवाची कसोटी आहे शून्यतेचा अनुभव. याचा उपाय आहे भक्ती. अधिकांश ज्ञानी महात्म्यांनी भक्तीलाच मान्यता दिली आहे. शंकराचार्य प्रखर ज्ञानी होते पण अखेरीस त्यांनी 'भज गोविंदम्' या काव्यात आणि अविनयमपनय विष्णो या ओळीत भक्तीचाच पुरस्कार केला आहे. इथे तत्त्वत: हा शब्द आला आहे. तत्वत: म्हणजे यथार्थ रुपाने ईश्वराला जाणणे. ते भक्तीने जाणून घेता येईल आणि भक्ती ज्ञान प्राप्त करुन घेतल्यावर लाभते म्हणजे भक्ती ज्ञानाशी संबध्द आहे. ज्ञानावस्थेत भक्तीला ज्ञानापासून वेगळे नाही करता येत. मागील श्लोकात सांगितले आहे की ब्रह्मज्ञान प्राप्त पुरुषाला प्रसन्नता प्राप्त होऊन शोकरहित, आकांक्षारहित झाल्यावर सर्व भूतमात्रांशी समानतेचा व्यवहार करत असताना माझी परम श्रेष्ठ भक्ती प्राप्त होते आणि या श्लोकात म्हटले आहे की त्या परमश्रेष्ठ भक्तीच्याद्वारे पिंड - ब्रह्मांडस्थित परमात्म्याला यथार्थपणे जाणता येते.

2) **तत: मां तत्त्वत:** ज्ञात्वा अशा प्रकारे मला यथार्थ रुपाने अनुभव करत असताना. पिंड - ब्रह्मांडस्थित परमात्म्याला भक्तीद्वारे यथार्थपणे जाणून घेतल्यावर त्या स्थितीत दीर्घकाळपर्यंत रहाणे महत्वाचे आहे. ज्ञानावस्था क्षणिक वा तात्कालिक स्वरुपाची नाही. पातंजल समाधी तात्कालिक वा अल्पकालीन अवस्था आहे.

समाधी ही 'वृत्ती' आहे तर ब्रह्मज्ञानावस्था ही 'स्थिती' आहे. अशा प्रकारे वृत्ती आणि स्थितीत खूप अंतर आहे. गीतेत ठिकठिकाणी ज्ञानाची लक्षणे प्रतिपादित केली आहेत. ती सारी लक्षणे आयुष्यभर जीवनातल्या प्रत्येक क्रियेत सहजपणे दिसून आलीत तर ब्रह्मज्ञान पूर्ण झाले आहे, असे समजले पाहिजे.

3) **तदनंतरं विशते:** नंतर म्हणजे त्याच वेळी माझ्याठायी प्रविष्ट होतात म्हणजे शून्य बनल्याने मोक्ष प्राप्त होतो. दीर्घकाळापर्यंत ज्ञानावस्थेच्या अनुभवाने शून्यतेची पराकाष्ठा गाठता येते आणि मोक्ष प्राप्ती होते. ज्ञानामुळेच सदैव वस्तुची ओळख होते. भक्तीचे हे वैशिष्ट्य आहे की ती साधकावस्था आणि सिध्दावस्था अशा दोन्हीही अवस्थेत असते. ज्ञानसंपन्न संन्यासी भक्तीयुक्तही असेल अशी मान्यता काही समाजमनात रुढ नाही. साधकावस्थेत भक्तीचे अस्तित्व सारेच मानतात पण सिध्दावस्थेत मात्र ज्ञानाचीच कल्पना केली गेली आहे. गीता या कल्पनेत फरक करते. विनोबाजींनी गीता प्रवचनांच्या माध्यमातून या विषयाची खूप चांगली मांडणी केली आहे. ज्ञान प्राप्तीनंतर भक्ती प्रकट व्हायलाच हवी. ते शुष्क ज्ञानाची कल्पनाच करु शकत नाहीत. संत तुलसीदासजी म्हणतात

***जिमि थल बिनु जल रहि न सकाहीं।***
***कोटि भाँति कोउ करहिं उपाई॥***
***तथा मोक्ष सुख सुनु खगराई।***
***रहि न सकहिं हरि भगति बिहाई॥***

अर्थात् ज्याप्रमाणे जागेशिवाय म्हणजे स्थळाशिवाय जळ राहू शकत नाही तसेच हरी भक्तीशिवाय मोक्ष सुखाचा अनुभव येऊ शकत नाही. जी ज्ञानोत्तर भक्ती आहे ती शून्यतेच्या पराकाष्ठेच्या रुपात प्रकट होते त्यामुळेच मोक्ष प्राप्ती होते.

: 56 :

***सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रय:।***
***मतप्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वकर्माणि:** सर्व स्वधर्मरुपी कर्मे
- **सदा कुर्वाण: अपि:** नित्य करत असतांनाही
- **मद्व्यापश्रय:** माझा आश्रय ग्रहण केल्यावर
- **मत्प्रसादात्:** माझ्या अनुग्रहाने, कृपेने
- **शाश्वतं अव्ययं पदं अवाप्नोति:** शाश्वत आणि अव्यय पदाला प्राप्त होतात.

**अर्थ**

माझ्या आश्रयाने रहाणाराकर्मयोगी सर्व कामे नेहमी करत असला तरी माझ्या कृपेने तो अविनाशी परम पदाला प्राप्त होतो.

***करुनि ही सदा कर्मे सगळीं मज सेवुनी।***
***पावे माझ्या कृपेनें तो अवीट पद शाश्वत॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) सर्व स्वधर्मरुप कर्मे सदैव करत असतानाही 2) माझा आश्रय घेतल्यावर 3) माझी कृपा झाल्यामुळे 4) शाश्वत आणि अव्यय पदाला प्राप्त होतात.

**स्पष्टीकरण**

1) **सर्वकर्माणि सदा कुर्वाण: अपि:** सर्व स्वधर्मरुपी कर्मे सदैव करत असतानाही या श्लोकात 'सर्व' आणि 'सदा' हे दोन महत्वाचे शब्द आहेत. आयुष्यात जी काही स्वधर्मरुपी आणि ईश्वरप्रेरित कर्मे असतात ती कदापि टाळता कामा नये. काही स्वधर्मरुपी कर्मे आचरलीत आणि काही सोडून दिलीत असे करु शकत नाहीत. कर्मे ही स्वधर्मरुपी आणि ईश्वरप्रेरित आहेत असे जर का एकदा ठरले तर मग ती छोटी असोत वा मोठी सारीच करायला हवीत. ती कर्मेही काही दिवस केलीत आणि मध्येच सोडून दिलीत असेही करता कामा नये. ती सारी कर्मे आचरायला हवीत. सूतकताई असो वा प्रार्थना वा मग स्वच्छतेचे काम का असेना जे काही आपण कर्तव्यरुप मानले ते अखंडपणे होत रहायला हवे.

गांधीजींनी ज्या दिवशी देहत्याग केला त्या दिवशीही त्यांनी सूत कताई केली होती. प्रार्थनेसाठी निघाले असता एका व्यक्तीने गोळीबार केला आणि रामाचे नाव उच्चारत ते कोसळले. रामनाम घेऊन जणू काही त्या दिवसाच्या प्रार्थनेचे समापन झाले. प्रार्थनेत ईश्वराचे स्मरण करायचे असते ते त्यांनी केले आणि देह विसर्जित केला.

2) **मद्व्यापाश्रय:** माझा आश्रय घेतल्यावर. स्वधर्मरुपी कर्मे कशा प्रकारे, कुठल्या भावनेने आचरायला हवीत ते इथे सांगताहेत. कुठलेही स्वधर्मरुपी कर्म असेना का ते परमात्मसमर्पण भावनेने केले तरच ते सफळ आणि पूर्ण मानले जाईल अन्यथा बाह्यत: परिपूर्ण वाटल्यावरही वास्तविकपणे ते परिपूर्ण मानले जाणार नाही. आपण कर्ते-भोक्ते बनलो तर आपल्याला बंधनाचा अनुभव येईल आणि बंधन आले तर सुख-दु:ख भोगावे लागेल. हे कर्तेपण-भोक्तेपण संपवावे लागेल. आपण केवळ अकर्ते आणि अभोक्ते आहोत असा अनुभव घ्यायचा असेल तर प्रत्येक क्रियेचा संबंध चैतन्याशी जोडावा लागेल. चैतन्य म्हणजे चैतन्यरुपी ईश्वर होय. आपल्या तमाम क्रिया ईश्वराप्रती समर्पित कराव्या लागतील. साधकावस्थेत हा अभ्यास करावा लागेल. कर्मांचे आचरण करत असतांना एकसाथ अकर्ता-अभोक्तेपणाच्या अनुभवाच्या सोबत ईश्वरार्पण बुध्दीचा अनुभव व्हायला हवा. असे घडले तरच जीवन साफल्याची खूण सांगता येईल.

3) **मत्प्रसादात्:** माझ्या प्रसादाने माझ्या कृपेने - माझ्या अनुग्रहाने. आपण जर तमाम कर्मे ईश्वरार्पण बुध्दीने करतो तर ही ईश्वरी कृपा वा अनुग्रह मानावा. अग्नीच्या निकट पोहोचलो तर ऊब मिळू शकते पण अग्नीपासून लांब असलो तर आपल्या शरीरातली थंडी दूर होणार नाही. त्याचप्रमाणे ईश्वराच्या निकट पोहोचल्यावर त्याची कृपा होऊ शकते. आपल्या घरातही असाच अनुभव येतो. निष्ठापूर्वक माता-पित्यांचे आज्ञापालन करतांना माता-पिता पुत्रावर प्रसन्न असतात. त्यांच्या कृपेचा वर्षाव पुत्रावर होत असतो.

संत तुलसीदासजी म्हणतात 'रामकृपा नासहिं सब रोगा।' आपण सारे काम, क्रोध वगैरे रोगांनी ग्रस्त पीडित असतो. ते ईश्वरी कृपेने नष्ट होऊ शकतात. आपाण प्रयत्नशील नसलो तर ईशकृपा होणार नाही. तुलसीदासजी अन्यत्र लिहितात

*बिनु विश्वास भगति नहीं, तेइ बिनु द्रवहिं न राम।*
*राम-कृपा बिनु सपनेहुँ, जीव न लहै बिश्राम॥*

ईश्वरावर जाज्वल्यमान श्रध्दा नसेल तर भक्तीची प्राप्ती होऊ शकणार नाही आणि भक्तीशिवाय ईश्वर द्रवित होणार नाही. ईश्वरी कृपेशिवाय शांततेचा लाभही मिळू शकणार नाही. हाच मुद्दा पुढील श्लोकात येतो.

4) **शाश्वतं अव्ययं पदं अवाप्नोति:** शाश्वत आणि अव्यय अशा पदाला म्हणजे माझ्या स्वरुपाला प्राप्त करुन घेतो. ईश्वरार्पण बुध्दीने स्वधर्मरुप कर्मे साधली तर ईश्वरी कृपेने मोक्षाचा लाभ होतो म्हणजे स्व-स्वरुपाची आत्मस्वरुपाची ओळख होते. एकदा का मोक्षलाभ झाला म्हणजे आत्मस्वरुचाचा परिचय झाला की मग ही ओळख कदापी ना नष्ट होत, ना क्षीण होत. हेच मोक्षाचे स्वरुप आहे. अहंकार क्षीण वा शून्य झाल्यावरच स्वरुपाची ओळख होते. अशाच प्रकारे भक्तीच्या प्रभावाने अहंकार लयाला जातो.

: 57 :

*चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।*
*बुध्दियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥*

**अव्यय आणि शब्दार्थ**

- **चेतसा सर्वकर्माणि:** मनाने स्वधर्मरुपी सर्व कर्मे
- **मयि संन्यस्य:** मला अर्पण कर.
- **मत्परः** माझ्याठायी परायण होऊन
- **बुध्दियोगं:** समत्व बुध्दीचा
- **उपाश्रित्य:** आश्रय घेऊन
- **मच्चित:** माझ्याठायी लीन कर
- **सततं भव:** सदैव जग

**अर्थ**

सर्व कर्मे माझ्याठायी अर्पण करुन (गीतेच्या नवव्या अध्यायाच्या 27 व्या श्लोकात याची रीत सांगितली आहे.) तसेच समबुध्दीरुप योगाचा अवलंब करुन मत्परायण आणि निरंतर माझ्या ठिकाणी चित्त असलेला हो.

*मज तत्पर--वृत्तीनें सर्व कर्मे समर्पुनी।*
*समत्व न ढळूं देतां चित्त माझ्यांत ठेव तूं ॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) स्वधर्मरुपी सर्व कर्मे मला अर्पण कर 2) माझ्याठायी परायण हो 3) समत्व बुध्दीचा आश्रय घेऊन 4) चित्ताला माझ्याठायी लय करुन सतत जग.

**स्पष्टीकरण**

या श्लोकात जीवन जगण्याची चतु:सूत्री सांगितलेली आहे.

1) **चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य:** स्वधर्मरुपी सर्व कर्मे मन:पूर्वक मला अर्पण कर. आपले कुठलेही कर्म अहंकार-प्रेरित नसावे. याची काळजी घ्यायला हवी की ते सदैव ईश्वर प्रेरित असावे. सदैव ईश्वराला साक्षी मानून केले तर ते कर्म स्वधर्मरुपी स्वकर्तव्यरुपीच होईल. त्यात आवडी-निवडीचा प्रश्नच उद्भवणार नाही. आपण सदैव प्रिय कर्माचीच निवड करायच्या बाजूने असतो. आपली कर्मांची निवड सदैव प्रिय कर्मांचीच असते. हा चुकीचा दृष्टिकोण आहे यामुळे प्रियला वशीभूत होऊन स्वधर्मरुपी कर्मे ठरवली जाऊ नयेत. अशा प्रकारे ईश्वरप्रेरित-प्रवाहपतीत-स्वधर्मरुपी कर्मे अखंडपणे ईश्वरार्पण बुध्दीने करणे हा महत्वाचा विषय आहे. चित्त शुध्दीशिवाय ज्ञानाची प्राप्ती होऊ शकत नाही. ज्ञानप्राप्तीसाठी स्वधर्मरुपी कर्मांचे आचरण करायचे आहे ही कर्मे ईश्वरार्पण बुध्दीने झाली पाहिजेत. यामुळे अहंकार आणि त्यामुळे उद्भवणारे काम, क्रोध वगैरे विकार क्षीण होतील आणि चित्ताची शुध्दी अनुभवता येईल. याविषयी 'गीताई चिंतनिका' तून विनोबाजी लिहितात की चार गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. 1) कर्म हे स्वधर्मरुपी असावे 2) कर्म समाजसेवेचे असावे. 3) कर्म शुध्दीच्या दृष्टीने केले जावे. 4) ते कर्म ईश्वराला अर्पण केले जावे.

(2) **मत्परः** माझ्या ठायी परायण होऊन लीन होऊन. स्वधर्मरुपी कर्मे ईश्वराला अर्पण करुन करायला सांगितले आहे पण आता सांगताहेत की केवळ एवढेच पुरेसे नाही. ईश्वराला कर्मे अर्पित करत असताना ईश्वराच्या ठायी तल्लीन होऊन जाणे परम श्रेयस्कर आहे. आपल्याला कर्माचा कर्ता बनतांना जसा आनंद होतो ना तसाच आनंद ईश्वराला कर्मे अर्पण करत असतांना झाला पाहीजे. एखादे चांगले काम आपल्या हातून घडले, खूप परिश्रम केले तर आपल्या मनात स्वाभाविकपणेच हा भाव उठतो की आपण किती चांगले काम केले. इतरांपुढे आपल्या चांगल्या कामांची बढाईही मारतो पण अशाप्रकारे स्वत:ला कर्माचे कर्ता मानून त्या कर्तेपणात आनंद मानत राहीलो तर बंधन कायम राहील. तो आनंद टिकू शकणार नाही कारण स्वत:ला कर्ता मानणे हेच तर बंधन आहे. कर्तेपणा मिटवण्यासाठी संपवण्यासाठीच तर सारी साधना आहे. ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे करण्याचा हेतुही कर्तृत्व संपवण्याचाच मिटवण्याचाच भाग आहे. यामुळे ईश्वरार्पण बुध्दीचा अभ्यास एवढ्या मर्यादेपर्यंत विकसित व्हावा की कर्मे ईश्वरार्पण केल्याशिवाय चैन वाटू नये. यातच आपल्याला आनंदानुभव लाभायला हवा. यालाच इथे 'माझ्याठायी परायण होणे', 'तल्लीन होणे' असे म्हटले आहे.

3) **बुध्दियोगं उपाश्रित्य:** समत्वबुध्दीचा निर्विकारतेचा परमात्मदृष्टीचा आश्रय घेऊन. कर्मात ईश्वरार्पण बुध्दी बाळगून आपण आनंद मिळवत राहीलो

तर त्या प्रमाणात आपण ईश्वराच्या ठायी लीन होऊन जातो. ही गोष्ट देहाच्या अपेक्षेने झाली. आता ब्रह्मांडाच्या अपेक्षेने सांगताहेत. ब्रह्मांड म्हणजे सृष्टी आणि समाजाशी आपला निरंतर संबंध येतो. समाजाशी चालणाऱ्या नित्य व्यवहारात आपण कशी दृष्टी राखायला हवी ते इथे सांगताहेत. यासाठी शून्य बनण्याशिवाय दुसरा कुठलाही उपाय नाही. हे अनुभवाधारित सत्य वचन आहे. या श्लोकात अशा प्रकारे जीवनाला यशस्वी बनवण्याची चतु:सूत्री वर्णिली आहे.

: 58 :

*मच्चित: सर्वदुर्गाणि मत्प्रसादात् तरिष्यसि।*
*अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनङ्.क्ष्यसि॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मच्चित:** माझ्याठायी चित्ताला लीन केल्यामुळे
- **मत्प्रसादात्:** माझ्या कृपेने-अनुग्रहाने
- **सर्वदुर्गाणि:** तमाम संकट-आपत्त्या-विपदा
- **तरिष्यसि:** दूर करु शकशील
- **अथ चेत् अहंकारात्:** पण जर अहंकारामुळे तू
- **त्वं न श्रोष्यसि:** तू माझे म्हणणे ऐकणार नाहीस
- **विनङ्.क्ष्यसि:** (तर) तुझा विनाश होईल.

**अर्थ**

वर सांगितल्याप्रमाणे माझ्या ठायी चित्त ठेवल्याने तू माझ्या कृपेने सर्व संकटातून सहजच पार होशील आणि जर अहंकारामुळे माझे सांगणे ऐकणार नाहीस तर नष्ट होशील अर्थात् परमार्थाला मुकशील.

*मग सर्व भयें माझ्या कृपेनें तरशील तूं।*
*मीपणें हें न मानूनि पावशील विनाश चि॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) माझ्या ठायी चित्ताला लीन करुन दिल्यामुळे अहंशून्य बनून माझ्या कृपेद्वारे 2) तू सर्व संकटांना दूर करु शकशील. 3) पण अहंकारवश होऊन जर माझे म्हणणे ऐकले नाही तर तुझा विनाश होईल.

1)मच्चित: मत्प्रसादात्: माझ्या ठायी चित्ताला विलीन करुन दिल्यामुळे अहंशून्य बनून माझ्या कृपेद्वारे ईश्वराची आपल्यावर अखंड कृपा असावी असे वाटत असेल तर अहंकारशून्य व्हायची तयारी बाळगायला हवी. परमात्म प्रेरणेच्या बळावर कर्मे आचरत रहावीत. आपल्या अहंकाराला तुच्छ मानून ईश्वराची शरणागती पत्करली तर सारी जबाबदारी ईश्वरावर येऊन पडत असल्यामुळे त्याची अखंड कृपा कायम राहील.

2) **सर्वदुर्गाणि तरिष्यसि:** सारी संकटे घालवू शकेल. ईश्वर शरणागती पत्करल्यावर कुठलेही संकट येणार नाही. चुकून जर संकट येऊन उभे ठाकलेच तर मनाला असे वाटेल की हे संकट ईश्वराने माझ्या भल्यासाठी कल्याणासाठीच पाठवले आहे. अशाप्रकारे ईश्वराचे स्मरण करत संकटापासून मुक्त व्हायचे प्रयत्न करील. तो पराभूत होणार नाही. ईश्वरशरणागती पत्करल्यावर पराभूत होण्यासारखा विषय असूच शकत नाही. तो प्रतिकूल परिस्थितीलाही अनुकूल करुन घेतो. याचा अर्थ असा की तो परीक्षण करील. हे परीक्षण कमालीचे सूक्ष्म असेल. आपल्या काही चुकांमुळे हे संकट ओढवले असेल तर तो आपली चूक मान्य करील. चूक घालवायचे प्रयत्न करील पण कुठलीहीचूक नसतांना जरी संकट उद्भवले तरीही पराभूत होणार नाही. याचे कारण असे की त्याने कायमसाठी - सदा न् कदासाठी शरणागती पत्करली आहे. यामुळे तो अंतर्मनातून ईश्वराला विचारील, प्रेरणा मिळवील. अडचणी दूर करुन मार्ग शोधेल. परिस्थितीवर मात करायचा प्रयत्न करील. या कामी अन्य भक्तांचे अनुभव बोलके आहेत. ते अनुभव असे सुचवतात की अत्यंत बिकट परिस्थितीत ईश्वर कुणाला मदतीला पाठवतो. अशी मदत उभी करतो की पर्वतप्राय संकटे चुटकीसरशी दूर होतात. जगात सर्वसाधारण जनांनाही असे अनुभव येतात. ईश्वराची शरणागती पत्करल्यामुळे संकट हे संकट वाटतच नाही हा एक भाग झाला आणि बाहेरुन विघ्न टळणे हा खूप वेगळा भाग झाला. विघ्न हे विघ्नच न वाटल्यामुळे अंतरंगी शांती लाभते. विघ्न टळल्यामुळे शांततेत वृध्दी होते. अहंकार क्षीण करुन ईश्वराच्या आधारेच जगण्यात दुहेरी लाभ असतो.

3) **अथ चेत् अहंकारात् त्वं न श्रोष्यसि विनङ्.क्ष्यसि:** पण अहंकारवश होऊन जर तू माझे म्हणणे ऐकले नाहीस माझ्या उपदेशाची अवज्ञा केलीस तर तुझे अकल्याण होईल. इथे कठोर भाषेचा वापर केला गेला

आहे असे वाटते पण याची काही कारणे आहेत. एक, वस्तुस्थिती म्हणजे सत्य परिस्थितीचे दर्शन घडवायचे आहे. दोन, अर्जुनाला जागे करायचे आहे. तीन, गीता आता समापनाच्या दिशेने वाटचाल करत आहे. या सर्व कारणांमुळे थोड्या कठोर भाषेचा प्रयोग करणे आवश्यक होते. या द्वारे या सत्य वस्तुचे दर्शन करवले जात आहे की ईश्वर आपले स्वरुप आहे आणि आपण ईश्वराहून भिन्न नाहीहोत. यामुळे आपण जर कुठल्या प्रकारचा हट्टाग्रह वा दुराग्रह राखला तर तसे करणे अज्ञानाचे निदर्शक ठरेल. भगवंत हे अज्ञान घालवू इच्छितात. भगवंत अर्जुनाला हे सांगताहेत की तू ईश्वरापासून विलग नाहीहेस तरीसुध्दा स्वत:ला वेगळे समजत आहेस. 'मी युध्द करणार नाही'असे सांगतोहेस. याचा अर्थ असा की निश्चित केलेल्या कर्तव्यापासून पराड्.मुख होऊन तू बसून गेला आहेस. कर्तव्यच्युतीचा निर्णयही नातलगांविषयीचा मोह वा ममत्वामुळे घेतलास. हे ममत्व वा अहंकार हेच दु:खाचे मूळ आहे. यामुळे या भयावह अहंकाराला वश होऊन जर तू माझ्या उपदेशाचा अव्हेर केलास, त्यानुसार जीवनक्रम आखला नाहीस तर तुझे जीवन नष्ट होऊन जाईल. तू अहंकारवश होऊन स्वधर्मापासून च्युत होशील यात तुझे अकल्याण आहे. हे निश्चित. जीवनाची सूले प्रभुच्या हाती सोपवणे एवढेच तुझे कर्तव्य आहे. स्वत:ला ईश्वराहून भिन्न मानून कुण्या वस्तुविषयी विचार करणे वा निर्णय घेणे मिथ्याच ठरेल. कारण की ईश्वरापासून स्वतंत्र व्हायचा अर्थच आपले स्वत:चे वेगळे काल्पनिक रुप स्थापित करणे होय. आपण स्वत: जेव्हा असत् बनतो तेव्हा आपले स्वतंत्र चिंतन, निर्णय, ईश्वरी प्रेरणेने ईश्वराला साक्षी मानून ईश्वरी आज्ञेनेच व्हायला हवे. अन्यथा अहंकार क्षीण होणार नाही. अज्ञान घालवलजा जाऊ शकणार नाही आणि मोक्षप्राप्ती होऊ शकणार नाही.

: 59 :

*यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।*
*मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अहंकारं आश्रित्य:** अहंकाराने प्रेरित होऊन
- **न योत्स्ये इति मन्यते:** 'मी लढणार नाही' असे जे तू बोलत आहेस.
- **ते एष: व्यवसाय:** मिथ्या हा निश्चय निर्णय मिथ्या आहे
- **प्रकृति:** तुझा स्वभाव वा प्रकृती
- **त्वां नियोक्ष्यति:** तुला (स्वधर्मात) प्रवृत्त करील

**अर्थ**

तू अहंकार धरुन 'मी युध्द करणार नाही' असे मानतोस तो तुझा निश्चय व्यर्थ आहे कारण तुझा स्वभाव तुला जबरदस्तीने युध्द करायला लावील.

*म्हणसी मी न झुंजें चि हें जें मीपण घेउनी।*
*तो निश्चय तुझा व्यर्थ स्वभाव करवील चि॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) अहंकाराने प्रेरित होऊन तू जो 'मी युध्द करणार नाही' असे सांगतोहेस 2)हे तुझे मानणे-म्हणणे मिथ्या आहे. ते टिकणारे नाही. 3) तुझी प्रकृती तुला स्वधर्मात प्रवृत्त करील.

**स्पष्टीकरण**

1) **अहंकारं आश्रित्य न योत्स्ये इति यत् मन्यते:** तू अहंकार प्रेरित आहेस त्यामुळे 'मी युध्द करणार नाही' असे म्हणतोहेस. या श्लोकात भगवंतानी कठोर शब्द वापरले आहेत. ते टोमणा मारुन अर्जुनाला जागृत करताहेत. अन्यायाचा प्रतिकार करायचा अर्जुनाचा निश्चय ठरलेला आहे. तो कौरवांसमोर युध्द करण्यासाठी उभा ठाकला आहे पण त्याच्या मनात स्वजनांविषयी मोह जागला आहे. यामुळे त्याने स्वधर्माचाच त्याग केला आहे. मोहवश होऊन कुणी जर स्वधर्माचाच त्याग केला तर धर्मपालनासारखे या जगात काय उरेल? यामुळे कुठल्याही कारणाने स्व-कर्तव्याचे पालन करता येणार नाही. इथे 'युध्द' या शब्दाचा प्रयोग केला गेला आहे. या संदर्भात शंकराचार्यांचे विवेचन महत्वाचे आहे. दुसऱ्या अध्यायातील अठराव्या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात की इथे 'युध्द कर' या आदेशाचा अर्थ समजून धेतला पाहीजे. 'युध्द कर' हा काही युध्द करण्याविषयीचा आदेश नाही. भगवंतांनी युध्द करायला प्रवृत्त केलेले नाही याचे कारण असे की

अर्जुन तर आधीपासून युध्द सज्ज आहेच, युध्द प्रवृत्त आहेच. त्याला काही भगवंताने युध्द प्रवृत्त केलेले नाही. गंमत अशी आहे की अर्जुन शोक-मोहाच्या अधीन झाला आहे. यामुळे युध्द म्हणजे स्व-कर्तव्य टाळू बघत आहे. यामुळे त्याच्या कर्तव्य-पूर्तीच्या आड येणाऱ्या शोक-मोहापासून अर्जुनाला परावृत्त करायचा प्रयत्न भगवंत करताहेत. भगवंताचा अर्जुनाला या कारणासाठी उपदेश आहे.

2) **ते एष: व्यवसाय:** मिथ्या तुझी ही मान्यता मिथ्या आहे. अहंकार प्रेरित होऊन आपण जे जे म्हणून काही करु ते ते सत्य नसेल. अहंकार घालवावा लागेल. केवळ सत्य स्वरुपी ईश्वराच्या प्रेरणेनेच निर्णय घ्यायची सवय लाऊन घ्यावी लागेल यामुळे आपले निर्णय सदेव सत्याच्या बाजूनेच रहातील. तेच अखेरपर्यंत टिकून रहातील. याचे कारण असे की सत्याच्या ठायी बळ असते. अहंकार प्रेरित निर्णय सत्य नसल्यामुळे त्यांना सतत बदलावे लागेल. अहंकाराच्या प्रेरणेमुळे चित्त सदैव चंचळ होते. यामुळे असे निश्चय टिकून रहात नाहीत. अर्जुनाच्या न झुंजण्याच्या निर्णयामागे स्वजन-मोह होता. यामुळे तो निर्णय खरा नव्हता. यापूर्वी अर्जुनाने प्रतिकार करायचा केलेला प्रयत्न आणि घेतलेला निर्णय बरोबर होता कारण की तो अहंकार निरपेक्ष निर्णय होता. यामुळे भगवंत सांगताहेत की हे अर्जुना, तू सत्य निर्णयाचा त्याग करायला तयार झालास पण तुझा हा निर्णय सत्य नसल्यामुळे टिकाऊ नाही.

3) **प्रकृति:** त्वां नियोक्ष्यति तुझा स्वभाव तुला अन्यायाच्या विरोधात झुंजायला प्रवृत्त करील. प्रत्येक व्यक्तीचा विशिष्ट स्वभाव असतो. प्रत्येकाच्या स्वभावाची विशिष्ट बैठक असते. बऱ्या-वाईट कर्मांच्या संस्कारांमुळे व्यक्तीचा स्वभाव विशिष्ट बनतो. संस्कारांच्या प्रभावानुसारच आपण जन्म घेतो. यामुळे आपल्या स्वभावानुरुपच आपला स्वधर्म ठरतो. कर्तव्याची दिशा ठरते. सुताराच्या घरी जन्माला आलो तर बालपणी आपल्याला तेच संस्कार लाभतील. वाढत्या वयाच्या सोबत सुतारीची ही कला सहज प्राप्त असल्यामुळे आपण ती सोडू शकत नाही. संगीतशास्त्रीचा पुत्र बालपणीच ऐकून-ऐकून संगीत शिकू लागतो. बघता-बघता संगीतज्ज्ञ बनून जातो. त्याचे तेच स्वभावप्राप्त कर्म आहे. ज्या आई-बाबांच्या उदरी आपण जन्माला येतो त्यांच्या इच्छेनुसारच जीवनाची दिशा ठरते. अर्जुनाचा जन्म क्षत्रिय कुळात झाला होता यामुळे क्षात्र कर्म म्हणजे समाजरक्षण आणि अन्याय प्रतिकाराचे काम तो आयुष्यभर करत आला होता. तो त्याचा स्वभावप्राप्त सहज धर्म होता. हा धर्म त्याच्या रक्तकणात सामावलेला होता. अशाप्रकारे आयुष्यात वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सहज कर्माला ईश्वरप्रेरित मानून केले जाते. ते टाळता येत नाही. अर्थात् स्वधर्मरुपी कर्म सदैव सत्कर्म हे अत्यंत सात्विकच असायला हवे. आपली अवनती करणारे, समाजाचे अकल्याण करणारे, अवनती अकल्याणाला कारणीभूत ठरणारे कर्म कदापि सहज कर्म असू शकत नाही. हे सूत्र सदैव ध्यानात राखायला हवे.

: 60 :

*स्वभावजेन कौन्तेय निबध्द: स्वेन कर्मणा।*
*कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **कौन्तेय स्वभावजेन:** हे अर्जुना, स्वभाव प्राप्त
- **स्वेन कर्मणा निबध्द:** तू स्वत:च्या कर्मांना बांधील आहेस
- **मोहात् यत् कर्तुं न इच्छसि:** मोहवश होऊन जर तू ती करु इच्छित नसशील
- **तत् अवश:** अपि: तर विवश होऊन सुध्दा
- **करिष्यसि:** करायला प्रवृत्त होशील

**अर्थ**

हे कुंतीपुत्रा, जे कर्म तू मोहाने करु इच्छित नाहीस तेही आपल्या पूर्वकृत कर्माने बध्द असल्यामुळे पराधीन होऊन करशील.

*स्वभाव सिध्द कर्मानें आपुल्या बांधिलास तू।*
*जें टाळूं पाहसी मोहें अवश्य करिशील तें॥*

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) हे अर्जुना, स्वाभाविक अशा स्वकर्मानी तू बांधील आहेस 2) तरीही तू मोहवश बनून ती करु चाहत नाहीहेस 3) तर पराधीन होऊन करायला तू प्रवृत्त होशील.

**स्पष्टीकरण**

1) **कौन्तेय स्वभावजेन स्वेन कर्मणा निबध्द:** हे अर्जुना, आपल्या स्वाभाविक अशा कर्मांनी तू बांधला गेलेला आहेस. प्रत्येक जण आपापल्या स्वाभाविक कर्मांनी बांधला गेलेला आहे. तो त्यांचा काही त्याग करु शकत नाही. पूर्व जन्मातल्या कर्म संस्कारांनी हा वर्तमान स्वभाव बनलेला असतो. यामुळे भिन्न-भिन्न संस्कारांच्या प्रभावाने माणसाचा जो एक ठराविक स्वभाव बनून जातो त्यानुसार त्याचा स्वधर्म ठरतो. स्वधर्माच्या संदर्भात काही कधी विचार करावा लागत नाही. ज्याविषयी विचार करावा लागेल वा ज्याचे स्वरुप ठरवावे लागेल तो काही स्वधर्म असू शकत नाही. ते स्व-कर्तव्य असू शकत नाही.

2) **मोहात् यत् कर्तुं न इच्छसि:** तरीही मोहवश होऊन स्वाभाविक कर्म करु इच्छित नाहीस. सारे लोक मोहात फसलेले आहेत. मोहग्रस्त आहेत. त्यामुळे स्वाभाविक कर्मांचे आचरण करण्याऐवजी ते मोहप्रेरित होऊन प्रिय कर्मे करु इच्छितात. मोहग्रस्त व्यक्ती सदैव आपला स्वार्थ बघूनच वाटचाल करते. मोह व्यक्तीच्या वृत्तीला संकुचित बनवतो. संकुचित वृत्तीमुळे विचार करायचे क्षेत्रही मर्यादित होऊन जाते. यामुळे आपले आणि समाजाचे कल्याण साधता येईल अशा स्वधर्माचे आचरण तो करु शकत नाही.

ज्ञानी पुरुषाचे वर्णन करताना तुलसीदासजी म्हणतात मोह दरिद्र निकट नहिं आवा। म्हणजे ज्ञानी पुरुषाला मोहरुपी दारिद्र्य स्पर्श करु शकत नाही. अखेरीस मोह दु:खाला कारणीभूत ठरते. मोहापासून वाचण्यासाठीही स्वधर्म-पालनाचा आग्रह जोपासायला हवा. यामुळे जीवनात तमाम क्रिया केवळ कर्तव्य बुध्दीने आचरायची दृष्टी प्राप्त होऊ शकेल.

2) **तत् अवश:** अपि करिष्यसि तर मग ती स्वाभाविक कर्मे तू पराधीन होऊनही करायला प्रवृत्त होशील. ती केल्याशिवाय तुला रहावणारच नाही कारण की तुझा स्वभाव तुला ती सहज प्राप्त कर्मे करायला भाग पाडील. त्याशिवाय तुला शांतता अनुभवता येणार नाही. स्वाभाविक कर्मात कुठले कर्म केले जावे याची जबाबदारी स्वत:वर येत नाही. ते आधीपासूनच प्राप्त आहे. यामुळे त्याविषयी कुणाला विचार करावा लागत नाही - लागणार नाही. यात आपल्यापाशी आलेले कर्म हे सत्कर्म आहे की नाही आणि ते आपण चांगल्या प्रकारे करत आहोत की नाही एवढेच काय ते आपल्या हाती असते. तेच आपण बघायचे असते. ते कर्म ईश्वरार्पण बुध्दीने केले जात आहे की नाही-स्वाभाविक कर्म आपल्या कुवतीबाहेरचे नसते. आपली शक्ती आणि संस्कारांच्या अनुसारच ते ठरत असते. क्षात्र कर्म अर्जुनाचे स्वाभाविक कर्म-सहज कर्म होते. त्याच्या पालनात कुठली अडचण नव्हती. पूर आला असला तरी प्रवाहासोबत पोहायला काही त्रास होत नाही. प्रवाहाविरुध्द पोहण्यात बुडून जायचे भय असते. स्वाभाविक कर्माचे आचरण प्रवाहासोबत पोहण्यासारखे आहे. अहंकाररहित असल्यामुळे त्यात निरहंकारतेचा उत्कर्ष होतो. यातून ईश्वरार्पण बुध्दीच्या उत्कर्षात भरपूर मदत मिळते. ईश्वर प्रेरित कर्मे आचरताना ईश्वरी सहाय्यही लाभते. आपण त्याचे कृपापात्र बनतो. अर्जुनाच्या समोर तर साक्षात् भगवंत उभे ठाकले होते त्यामुळे त्याला तर विचार करायचे काहीही कारण नव्हते. तो अहंकारप्रेरित होऊनच विचार करत होता. भगवंत त्याला टोमणा मारुन जागे करताहेत.

: 61 :

*ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।*
*भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **अर्जुन ईश्वर: सर्वभूतानाम्:** हे अर्जुना, ईश्वर तमाम भूतमात्रांच्या
- **हृद्देशे तिष्ठति:** हृदय प्रदेशात राहून
- **मायया:** आपल्या मायाशक्तीने
- **सर्वभूतानि यन्त्रारुढानि भ्रामयन्:** तमाम भूतमात्रांना जणू काही यंत्रावर स्थापित करुन फिरवतो

**अर्थ**

हे अर्जुना, अंतर्यामी परमेश्वर आपल्या मायाशक्तीने शरीररुपी यंत्रावर आरुढ झालेल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या कर्मानुसार फिरवत सर्व प्राण्यांच्या हृदयात राहिला आहे.

*राहिला सर्व भूतांच्या हृदयीं परमेश्वर।*
*मायेनें चाळवी त्यांस जणूं यंत्रांत घालुनी॥*

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) ईश्वर सर्व भूतमात्रांच्या हृदय प्रदेशी निवास करतो. 2) आपल्या मायेने सर्व भूतमात्रांना जणू काही यंत्रावर स्थापित करुन घुमवतो-फिरवतो.

**स्पष्टीकरण**

1) **अर्जुन: ईश्वर:** सर्वभूतानां हृदये तिष्ठति: हे अर्जुना, ईश्वर तमाम भूतमात्रांच्या हृदय प्रदेशात अर्थात् मनात खोलवर निवास करतो.

इथे 'हृदय' हा शब्द आला आहे. याचा अर्थ आहे खोल मनात. परमेश्वर देहाच्या म्हणजे मनाच्या खोलवर विद्यमान आहे. यामुळे परमात्म दर्शनासाठी मनाच्या तळापर्यंत पोहोचावे लागते. अहंकार, काम, क्रोध वगैरे विकार असेपर्यंत खोलवर मनापर्यंत कोणीच पोहोचू शकत नाही. यामुळे हे विकार नष्ट करावे लागतात. हे सोपे काम नाही कारण की या विकारांचे अतिस्थूल रुप जसे असते तसे सूक्ष्म आणि सूक्ष्मातिसूक्ष्म रुपही असते. या तमाम रुपांना नष्ट करण्यासाठीची साधना गीता आणि आध्यात्मिक शास्त्रांमधून केलेली आहे. भक्ती, ध्यान, वैराग्य, नामस्मरण, सत्संग, स्वाध्याय, सत्कर्म, एकांत सेवन, सद्गुणांचा उत्कर्ष वगैरे विविध प्रकारच्या साधना प्रदीर्घकाळ केल्यावरच तमाम स्थूल व सूक्ष्म विकार नष्ट होऊ शकतात आणि तेव्हाच मनात खोलवर विद्यमान परमतत्त्वाचा साक्षात्कार होऊ शकतो. अनुभव येऊ शकतो.

2) **मायया सर्वभूतानि यंत्रारुढानि भ्रामयन्:** आपल्या मायेने सर्व भूतमात्रांना जणू काही यंत्रावर चढवून फिरवत रहातो. प्राणीमात्रांकडून सर्व प्रकारची कामे करवुन घेऊन या विषयांचा लगाम स्वत:च्या हातातच राखतो.

हा महत्वाचा मुद्दा आहे. हे लक्षात ठेवले आणि त्यानुकूल आचरण केले तर ईश्वरानुभवाचा लाभ शीघ्र होऊ शकतो. परमात्मा आपल्या इच्छेनुसार अर्थात् प्राणीमात्रांच्या भल्या-बुऱ्या कर्मानुसार सर्व कामे करवतो. त्याने सर्व नियंत्रण स्वत:च्या ताब्यात राखले आहे. प्राणीमात्रांच्या आयुष्याचा सूत्रधार परमात्माच आहे. हा महत्वाचा मुद्दा आपल्या काही ध्यानात येत नाही. ईश्वरावर श्रध्दा तर सामान्यपणे सर्वांचीच असते पण आपल्या जीवनाचा लगाम ईश्वराच्या हाती सोपवण्याची हिंमत मात्र सारे करत नाहीत. साधक वा मुमुक्षूने अनिवार्यपणे आपले संपूर्ण आयुष्य ईश्वराला सोपवून दिले पाहीजे.

आपली प्रत्येक क्रिया ईश्वराधीन बनून करणे यात गांधीजींचे मोठेपण आहे. आपण काही करत आहोत असे कधी त्यांच्या मनात येत नाही. ईश्वर आपल्या माध्यमातून सारे काही करवुन घेत आहे अशी उत्कट भावना त्यांच्या मनी सदैव विद्यमान असल्यामुळे ते निश्चिंत होते. याविषयी त्यांच्या मनात कधीही शिथिलता जागली नाही. कर्माचे यश मानवी प्रयत्नाधीन नाही. देश, काल, निमित्ताची अनुकूलता आणि मानवी प्रयत्न मिळून कर्म यशस्वी होते. आापण संकल्प करतो पण त्यानुसार कर्म घडून सदैव कर्तव्यपूर्ती होतेच असे नाही, असा काही आपला अनुभव नाही. कुठे जायचा कार्यक्रम पूर्वनियोजित असेल तरीही मध्येच अशी एखादी घटना घडते की सारा कार्यक्रम जिथल्या तिथेच थबकून जातो. यामुळे हे सदैव लक्षात ठेवायला हवे की परमेश्वराविषयी सदैव प्रणत भावनेने रहाण्यातच कल्याण आहे. परमेश्वरानेच अलौकिक जगाची निर्मिती केली. अगणित अद्भुत देह साकार केलेत. पशु-पक्ष्यांपासून असंख्य कीट-पतंग वगैरे सृष्टी उत्पन्न केली आहे.

: 62 :

*तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।*
*तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भारत तं एव:** हे अर्जुना, या परमेश्वराला
- **सर्वभावेन शरणं गच्छ:** अत्यंत भक्तीभावनेने शरण जा
- **तत्प्रसादात्:** त्याच्याच प्रसादाने, कृपेने
- **परां शांतिं:** परम शांतता, श्रेष्ठ अशी शांतता
- **च शाश्वतं स्थानं प्राप्स्यसि:** आणि शाश्वत स्थान प्राप्त करशील

**अर्थ**

हे भारता, तू सर्व प्रकारे त्या परमेश्वरालाच शरण (लज्जा, भय, मान, मोठेपणा आणि आसक्ती ही सर्व सोडून अर्थात् सांसरिक अहंता आणि ममता यांचा त्याग करुन केवळ एका परमात्म्यालाच आपला परम आश्रय, परम गती आणि सर्वस्व समजणे, तसेच अनन्य भावनेने अतिशय श्रध्दाभक्तीयुक्त अंत:करणाने प्रेमाने निरंतर भगवंताचे नाम, गुण, प्रभाव आणि स्वरुप यांचे चिंतन करत रहाणे, तसेच भगवंताचे भजन, स्मरण चालू ठेऊनच त्यांच्या आज्ञेप्रमाणे कर्तव्य कर्मांचे नि:स्वार्थ भावाने केवळ त्याच्या प्रीत्यर्थ आचरण करणे म्हणजेच 'सर्व प्रकारे परमात्म्यालाच शरण जाणे' होय.) जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तुला परम शांतता आणि सनातन परम धाम मिळेल.

***त्यातें चि सर्वभावें तूं जाईं शरण पावसी।***
***त्याच्या कृपा-बळें थोर शांतीचें स्थान शाश्वत॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) त्या परमेश्वराला सर्वभावेन म्हणजे आत्यंतिक भक्तीभावाने शरण जा. 2) त्याच्याच प्रसाद वा अनुग्रहाने परम शांतता आणि शाश्वत स्थान प्राप्त करशील.

**स्पष्टीकरण**

1) **भारत तं एव सर्वभावेन शरणं गच्छ:** हे अर्जुना, त्या परमेश्वराला सर्वभावेण म्हणजे आत्यंतिक भक्ती भावनेने शरण जा. 'सर्वभावेन' म्हणजे मुळीच आपलेपण न बाळगणे. आपलेपण हरपो या भावनेने आनंद व्हायला हवा. प्रत्येक व्यक्ती आपलेपण जपायचा प्रयत्न करते. ज्याला आपलेपण विसरण्यात स्वत:ला शून्य बनवून घेण्यात आनंद वाटू लागेल तो पार झाला असे मानायला हवे. तुलसीदासजी म्हणतात.

***सोहमस्मि इति वृत्ति अखंडा।***
***दीपशीखा सोइ परम प्रचण्डा॥***

अर्थात् ते तत्व मी आहे, म्हणजे प्रचंड शून्य आहे. अशी अखंड वृत्ती बाळगणे ही दिव्याची प्रचंड ज्योती आहे प्रकाश आहे. आपण जर शून्य बनलो नाही तर अंधार आणि शून्य बनून गेलो तर प्रचंड प्रकाश. विद्युत दिवा असेल आणि त्याला जर वस्त्राने झाकून ठेवले तर प्रकाश लाभणार नाही. आत परमात्म्याचा अखंड प्रकाश प्रवहमान आहे पण त्यावर जर अहंकाराचे आवरण पडले तर आपला व्यवहार सुखरुप चालणार नाही. दु:खाचा अनुभव होत राहील. तुलसीदासजी म्हणतात.

***राम भगति मनि उर बस जाके।***
***दुख लवलेस न सपनेहुँ ताके॥***

अर्थात् रामभक्तीरुपी मणी ज्याच्या चित्तात सदैव असतो त्याला यत्किंचित्ही दु:ख होत नाही.

2) **तत्प्रसादात् परां शांतिं च शाश्वतं स्थानं प्राप्स्यसि:** त्या परमात्म्याच्या कृपा प्रसादाने अनुग्रहाने परम शांतता लाभेल आणि शाश्वत स्थानाला म्हणजे ईशरुपी स्थानाला प्राप्त करशील. आपलेपण हरपो आणि स्वत:ला शून्य करायची सिध्दता जागो असे घडले तर आपण सहज स्वाभाविकपणे परमेश्वराच्या निकट पोहोचू शकतो आणि परमात्म्याच्या अनुग्रहाने परम शांतता प्राप्त होऊ शकेल.

या सर्व विषयाचे विवेचन यापूर्वी झाले आहे पण हा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे भगवंत परत सांगताहेत. तुलसीदासजी म्हणतात राम-कृपा नासहिं सब रोगा। अर्थात् रामाच्या कृपेने सारे रोग नष्ट होतात म्हणजे काम, क्रोध वगैरे विकार मिटतात. रामकृपा बिनु सपनेहुँ जीव न लहै बिश्राम। अर्थात् रामकृपेशिवाय जीवाला स्वप्नातही शांतता लाभणार नाही.

भगवंत सांगताहेत की जीवनात प्रत्येक क्षणी जर शांतता अनुभवायला यायला लागली तर अखेरीस परमात्म्याचा पूर्ण अनुभव प्राप्त होऊ शकेल म्हणजे मोक्ष प्राप्ती होईल. या श्लोकात भगवंताने अशा चार पायऱ्यांचा उल्लेख केला आहे 1) भक्ती भावनेने परमेश्वराला तमाम कर्मे अर्पण करुन अकर्तेपणाचा अनुभव घ्यावा. 2) हे साधल्यावर ईश्वराचे कृपापात्र बनू. 3) ईशकृपा वा अनुग्रह झाल्यावर दरक्षणी परम शांततेचा अनुभव होत राहील. 4) नंतर परमात्म्याचा पूर्ण अनुभव म्हणजे मोक्षप्राप्ती होईल.

: 63 :

*इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया।*
*विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इति मया ते:** अशाप्रकारे मी तुला
- **गुह्यात गुह्यतरं ज्ञानं:** गुह्याहून गुह्य अतिगुह्य असे ज्ञान
- **आख्यातं:** सांगितले आहे.
- **एतेत अशेषेण विमृश्य:** याविषयी यथार्थपणे विचार करुन
- **यथा इच्छसि:** जे योग्य वाटेल
- **तथा कुरु:** ते कर

**अर्थ**

अशाप्रकारे हे गोपनीयहूनही गोपनीय ज्ञान मी तुला सांगितले. आता तू या रहस्यमय ज्ञानाचा संपूर्णपणे चांगला विचार करुन मग जसे तुला आवडेल तसेच कर.

*असें गूढाहूनी गूढ बोलिलो ज्ञान मी तुज।*
*ध्यानीं घेऊनि तें सारें स्वेच्छेनें योग्य तें करीं॥*

**विषय:** या श्लोकाच्या माध्यमातून भगवंत एक प्रकारे गीतेचा समारोप करत आहेत. या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) अशाप्रकारे मी तुला गोपनीयाहूनही गोपनीय ज्ञान 2) सविस्तरपणे समजावले 3) याविषयी चांगला विचार करुन 4) जे आवडेल तेच कर.

**स्पष्टीकरण**

1)इति मया ते गुह्यात् गुह्यतरं ज्ञानम्: गोपनीयाहूनही गोपनीय. गुप्त ज्ञान म्हणजे अनुभवयुक्त गहिरे ज्ञान. भगवंताने अर्जुनाला जो उपदेश केला आहे त्याचे स्वरुप सांगताहेत. मी तुला आजवर जो उपदेश केला तो गुह्याहुन गुह्य म्हणजे अत्यंत गूढ आहे. हे अनुभवयुक्त आहे आणि सखोल आहे. अतिसूक्ष्म असल्यामुळे हे समजावून घ्यायला सोपे नाही. हे ज्ञान आत्मा-परमात्म्याशी संबध्द असल्यामुळे सूक्ष्म आणि सखोल आहे. यामुळे हे ज्ञान सर्वांना न होऊ शकणे स्वाभाविकच आहे. ईश्वर विषयक ज्ञान प्राप्त करण्यासाठी आधी जिज्ञासा हवी. मनात शंका असतील तर सत्संगामुळे दूर होतात. सारा विषय लक्षात आल्यावर एकेकाशी संबंधित साधना सुरु होते. तेव्हा मग अडचणी येऊ लागतात. ध्यान, भक्ती, वैराग्य यांचे स्वरुप सूक्ष्म असल्यामुळे यांची साधना दीर्घकाळ करावी लागते. खूप वेळ जातो. यामुळे हे ज्ञान अतिगोपनीय म्हणजे अतिसूक्ष्म अनुभवयुक्त आहे असे भगवंत सांगताहेत.

2) **आख्यातं:** अत्यंत विस्तारपूर्वक. वेगवेगळ्या प्रकारे समजावून सांगितले आहे. समजून घ्यायला सुगम नसल्यामुळेही भगवंतांनी अत्यंत विस्तारपूर्वक आणि अनेक प्रकारे अठरा अध्यायांमधून सुगम भाषा आणि सुलभ शैलीत समजावून सांगितले आहे. अर्जुनाच्या निमित्ताने सर्व जनतेवर हे असीम उपकार आहेत. हजारो वर्षांपासून या गीतारुपी अमृतवाणीने लक्षावधी साधकांना वेळोवेळी विशेष प्रकारचे मार्गदर्शन लाभले आहे. गीता उपनिषदांचा सारांश आहे. शंकराचार्यांनी उपोद्घातात लिहिले आहे 'तदिदं गीताशास्त्रं समस्तवेदार्थसारसंग्रहभूतम्' हे गीताशास्त्र समस्त वेदांचा सारांश आहे. या गीताशास्त्रावर येथवर अनेकांनी भाष्यग्रंथ लिहिले आहेत. गीतेत एकच मुद्दा अनंकदा येतो पण पुनरावृत्ती झाली आहे असे मात्र गीता वाचणाऱ्याला वाटतच नाही. गीता संवाद शैलीतला ग्रंथ आहे तरीही याची विवेचन पध्दती शास्त्रीय स्वरुपाची आहे. प्रत्येक अध्यायाचे आपले स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. तमाम तत्वज्ञानांच्या ग्राह्य तत्वांचे गीतेत संकलन केले गेले आहे. यामुळे एक प्रकारे गीता हा समन्वयमूलक ग्रंथ आहे.

3) **एतद् अशेषेण विमृश्य:** यविषयी भल्याप्रकारे विचार करुन. अर्जुनाला येथे योग्य प्रकारे विचार करायला सांगितले आहे. याचे कारण असे की अर्जुन भावनेत बुडून जाऊन कार्य करत होता. बुध्दी विचारात्मक आहे आणि मनात भल्या-बुऱ्या प्रकारच्या नाना भावना असतात. बुध्दी जर विवेकाधीन असेल आणि मन उचित भावनांच्या अधीन असेल तरच जीवन ऊर्ध्वगामी बनते. विविध प्रकारे ज्ञानोपदेश करुन भगवंत अर्जुनाच्या मनात विवेक जागृत करु चाहताहेत. यामुळे अर्जुनाला विवेकपूर्वक सत्य निर्णय घेता येईल अशी भगवंताची भूमिका आहे. महापुरुष आपले निवेदन तटस्थपणे मांडतात. ते आपल्या म्हणण्याविषयी आग्रही नसतात. जेवढे म्हणून समजावून सांगणे शक्य होते तेवढे भगवंताने केले आहे, आता निर्णय अर्जुनावरच सोपवला आहे.

4) **यथा इच्छसि तथा कुरु:** जे इच्छित वा जे उचित वा योग्य वाटेल ते कर. अखेरचा अंतिम निर्णय अर्जुनावर सोपवून दिला. त्याला जितके समजावून सांगणे शक्य होते तितके समजावून सांगितले. ज्ञानी पुरुषाचे हेच वैशिष्ठ्य असते की तो तटस्थ असतो. तो निरंतर तटस्थपणेच जनसेवा करतो. अर्जुनाला समजावून सांगणे हा जनसेवेचाच एक भाग होता. हे जनसेवेतच अंतर्भूत होते. एवढे समजावून सांगितल्यावर अर्जुनाचा मोह दूर होऊन तो उचित निर्णयाप्रत पोहोचेल याविषयी भगवंताला विश्वास होता.

या वचनाचा अर्थ सांगतांना विनोबांनी चातुर्याने एक शब्द आपल्यातर्फे जोडुन या अर्थाला स्पष्टता दिली आहे. ते म्हणतात 'स्वेच्छेने जे उचित वाटेल ते कर' मूळात तर 'जशी इच्छा असेल तसे कर' आहे. विनोबाजींनी स्पष्ट केले की निर्णय आपल्या इच्छेने अवश्य करा पण तो निर्णय योग्य असायला हवा. आपण विनोबांच्या अर्थानुसारच 'योग्य निर्णय' असा अर्थ केला आहे. निर्णय कुठलाही असो पण तो स्वत:साठी आणि समाजासाठी उन्नतीकारक म्हणजेच धर्मयुक्त असला पाहीजे. निर्णय घेण्याकामी जर आपली बुध्दी असमर्थ असेल तर ज्यांची बुध्दी समर्थ आहे आणि ज्या सत्पुरुषावर श्रध्दा असेल त्यांच्या सल्ल्यानुसार निर्णय घ्यावा निर्णय घेतला जायला हवा. कुणाला ज्यावेळी निर्णयाविषयी स्वातंत्र्य दिले जाते त्यावेळी त्या इच्छा स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये हे बघितले जाणे खूप गरजेचे आहे. इच्छा स्वातंत्र्य म्हणजे स्वच्छंदतापूर्वक निर्णय घेणे नव्हे.

: 64 :

***सर्वगुह्यतमं भूय: श्रृणु मे परमं वच: ।***
***इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **भूय: मे सर्वगुह्यतमं:** परत माझ्याकडून अत्यंत सूक्ष्म
- **परमं वच: श्रृणु:** असे श्रेष्ठ वचन ऐक
- **मे दृढं इष्ट: असि:** मला तू खूप प्रिय आहेस
- **इति तत: ते हितं:** यामुळेच तुझ्या कल्याणासाठी
- **वक्ष्यामि:** सांगतोय

**अर्थ**

सर्व गोपनीयाहून अतिशय गोपनीय असे माझे परम गुह्ययुक्त रहस्यभरले वचन तू पुन्हा ऐक. तू माझा अत्यंत आवडता आहेस म्हणून हे परम हितकारक वचन मी तुला सांगणार आहे.

***सर्व गूढातलें गूढ पुन्हां उत्तम वाक्य हें।***
***हितार्थ सांगतों ऐक फार आवडसी मज ॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आहेत 1) परत माझ्याकडून अत्यंत सूक्ष्म, श्रेष्ठ वचन, सूत्र, सिध्दांत जीवन मंत्र ऐक. 2) मला तू अत्यंत प्रिय आहेस. 3) यामुळे तुझ्या कल्याणार्थ मी हे सांगत आहे.

1) **भूय: ते सर्वगुह्यतमं परमं वच:** श्रृणु परत माझ्याकडून अत्यंत सूक्ष्म, गहन, महत्वाचे असे श्रेष्ठ वचन सूत्र, सिध्दांत. जीवनमंत्र ऐक. अर्जुनावर निर्णय सोपवून दिला. निर्णय घेणे अर्जुनाला सोईचे व्हावे आणि निर्णय योग्य व्हावा यासाठी परत काही समजाऊन सांगायची प्रेरणा भगवंताला झाली. मागील एका श्लोकात एका अर्थाने आपल्या उपदेशाचा समारोप करुन झाल्यावरसुध्दा भगवंत परत मंत्रतुल्य वचन पुढील दोन श्लोकांमधून सांगताहेत. इथे आधी 'गुह्यतम' शब्द प्रयुक्त केला आहे. मागील श्लोकातही हा शब्द आहे. ईश्वरी ज्ञान सहजा सहजी प्राप्त होत नाही. यामुळे त्याला 'गूढ' म्हटले आहे. हे दुर्लभ आहे. सातव्या अध्यायातील एकोणिसाव्या श्लोकात म्हटले आहे की अनेक जन्मांच्या साधने उपरांत साधक मला प्राप्त करतो. सहाव्या अध्यायातील पंचेचाळीसाव्या श्लोकातही हा मुद्दा आला आहे की अनेक जन्मानंतर माझे ज्ञान प्राप्त होते. हे ज्ञान अत्यंत दुर्लभ असल्यामुळे भगवान पुनश्च सांगायला प्रवृत्त झालेत.

2) **मे दृढं इष्ट:** असि मला तू खूपच प्रिय आहेस. भगवान श्रीकृष्णाच्या ठायी निरहंकारितेची म्हणजे शून्यतेची पराकाष्ठा होती. यामुळे त्यांच्या ठायी गुणग्राहकतेचा एवढा विकास झाला होता की अर्जुनाच्या ठायी निहित गुणांनी ते हर्षित होऊन जात. यामुळेच त्यांचे अर्जुनावर प्रेम होते. तसे तर भगवंतांचे सर्वांवरच प्रेम होते पण अर्जुन अतिशय निकट असल्यामुळे त्यावर

विशेष प्रेम होते. संतांचे वर्णन करताना तुलसीदासजी म्हणतात.

*निज गुन स्रवन सुनत सकुचाहीं।*
*परगुन सुनत अधिक हरषाहीं॥*

अर्थात् संतांचे हे लक्षण आहे की कुणी त्यांची प्रशंसा केली तर ते संकोचून जातात पण दुसऱ्यांचें गुण ऐकून वा प्रशंसा ऐकून खूप हर्षित होतात. मला पुनश्च मंत्रतुल्य वचने ऐकवण्याची प्रेरणा का होते आहे हे सांगतांना याचे एक कारण तू मला खूप प्रिय आहेस असे भगवंत म्हणताहेत.

2) **इति ततः** ते हितं वक्ष्यामि याचमुळे तुझ्या कल्याणासाठी समजावुन सांगत आहे. आपले ज्याच्यावर विशेष प्रेम असते त्याच्या कल्याणाची आकांक्षा आपल्या मनात असते. अर्थात् भगवंताचे प्रेम काही प्रापंचिक नव्हते ते विशुध्द होते, दिव्य होते. प्रापंचिक प्रेमात आपल्या नजिकच्या संगी-साथीदारांचा स्वार्थ साधला जावा हीच कामना असते. इथे 'कल्याण' हा शब्द प्रयुक्त झाला आहे. भगवंताच्या मनात हाच विचार राहिला आहे की अर्जुनाचा मोह, ममता, अहंकार दूर होऊन त्याला परमात्म ज्ञान प्राप्त व्हावे. यामुळे अर्जुन परत-परत प्रश्न विचारत राहिला पण भगवान ना हरले ना थकले. 'कितीदा मी तुला तेच तेच सांगत आहे पण तुझ्या लक्षात कसे येत नाही ?' असे काही भगवंताने विचारले नाही. ज्ञानवंत खूप धैर्यशाली असतात.

: 65 :

*मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।*
*मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **मन्मना: भव:** चित्त सदैव माझ्याठायीच रत असावे
- **मद्भक्त: भव:** माझाच भक्त बन
- **मद्याजी भव:** माझ्यासाठीच यज्ञ करणाऱ्यांना
- **मां नमस्कुरु:** मला नमस्कार कर
- **ते सत्यं प्रतिजाने:** मी तुला सत्यप्रतिज्ञापूर्वक सांगत आहे की
- **मां एव एष्यसि:** तू मलाच प्राप्त करशील, होशील
- **मे प्रिय: असि:** तु माझा आवडता आहेस

**अर्थ**

हे अर्जुना, तू माझ्याठायी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर. मला नमस्कार कर. असे केले असता तू मलाच येऊन मिळशील. हे मी तुला सत्यप्रतिज्ञापूर्वक सांगत आहे कारण तू माझा अत्यंत आवडता आहेस.

*प्रेमानें ध्यास घेऊनि यजीं मज नमीं मज।*
*प्रिय तूं मिळसी मातें प्रतिज्ञा जाण सत्य ही॥*

**विषय:** या श्लोकात पाच गोष्टी आल्या आहेत. 1) माझ्याच ठायी सदेव चित्त लीन असावे. 2) माझाच भक्त बन. 3) मला अर्पण करुनच यज्ञ म्हणजे जनसेवा कर. 4) सर्वत्र मी म्हणजे परमात्माच आहे, असे मानून सर्वांप्रती परमात्म दृष्टी राखून नम्र भावनेने रहा. 5) मी तुला सत्य प्रतिज्ञापूर्वक वचन उच्चारतो आहे असे तू मलाच प्राप्त होशील.

**स्पष्टीकरण**

1) **मन्मना:** भव माझ्याच ठायी चित्त सदैव लीन असेल असे बनून जा. साधक मुमुक्षुने आपल्या चित्ताला सदैव ईश्वरचरणी लीन करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. अन्यथा अहंकार संपवायला मदत नाही मिळणार. यामुळे काम, क्रोध वगैरे विकारही नष्ट होणार नाहीत. जोवर विकार हटत नाहीत तोवर अखंड शांततेचा अनुभव लाभणार नाही. अहंकार मुक्ततेच्या सोबत विकार नष्ट झाले तर अखंड शांततेचा अनुभव लाभू शकतो. अहंकार आणि विकारांपासून मुक्त होण्यासोबत अखंड शांततेचा लाभ होतो हाच मोक्ष आहे पण इथे ध्यान-भूमिका वर्णिली आहे. मन परमात्म्याच्या ठायी लीन होऊन गेले तर भक्तीची भूमिका प्राप्त होते. माझ्या ठायी मनाला लीन करुन घेणे ही ध्यान भूमिका आहे. येथून अहंकार क्षीण व्हायला सुरुवात झाली असे मानायला हरकत नाही. परमात्म्याच्या ध्यानात लीन व्हायचा उद्देश अहंकार क्षीण करायचा असला पाहीजे. हा उद्देश जर नसेल तर ध्यान, भक्ती वा ईश्वर शरणभाव जरी बाळगला तरीर अहंकार वाढू शकतो. आपल्याला ध्यान वा भक्ती किती उत्तम

साधली इतरांना तर हे जमले नाही अशी इतरांशी तुलना करुन आपण आपला अहंकार कमी करण्याऐवजी वाढवू शकतो. यामुळे ध्यान वा भक्ती वा ईश्वरशरणभाव साधना करताना अहंकार क्षीण करायचे लक्ष्य बाळगायला हवे. या साधना करताना जर अहंकार क्षीण होत आहे असा भाव जागत असेल तर साधना यथायोग्य चालली आहे असे आपण म्हणू शकतो.

या श्लोकाचा प्रथमार्ध जसाचा तसा नवव्या अध्यायातील अखेरच्या श्लोकात आला आहे.

2) **मद्भक्तः** भव माझाच भक्त बन. माझीच भक्ती प्राप्त कर. परमात्म्याच्या ठायी चित्त विलीन करायची पहिली ध्यान भूमिका आहे. ती साधली की भक्तीची दुसरी भूमिका प्राप्त होते. भक्ती म्हणजे परमात्म्याविषयी प्रेम, अनुराग. प्रत्येक जीवात प्रेम सहजच विद्यमान असते. या प्रेमाचा उपयोग बाह्य विषयासक्तीत होतो. यामुळे परमात्म्याविषयी प्रेम शिल्लक उरत नाही. बाह्य विषयांवद्दलचे प्रेम म्हणजे प्रपंचाविषयीचे आसक्तीजन्य प्रेम संपायला हवे. मग प्रपंचाविषयी अनासक्ती भाव निर्माण होईल. जेव्हा विषयांबद्दलचा अनुराग भाव संपून जाईल तेव्हा परमात्म्याविषयक प्रेम वा अनुराग उत्पन्न होऊ शकेल. प्रत्येकाच्या मनात बाह्य विषयांचे खूप अधिक आकर्षण असते. यातून मुक्त होऊन परमात्म्याच्या ठायी विलीन होणे अवघड असते. हाच अनुभव साधक दशेतही येतो. यामुळे ईश्वर भक्ती उत्पन्न करण्यासाठी - होण्यासाठी वैराग्य साधना आवश्यक आहे. म्हणजे विषयांप्रती प्रपंचाविषयी-वैराग्य उत्पन्न होण्याच्या दिशेने प्रयत्नशील असायला हवे. मनाला ईश्वराच्या ठायी लीन करायचा सराव आणि त्यासोबत वैराग्याची साधना करत असताना भक्ती उत्पन्न होऊ शकेल. संत तुलसीदासजी म्हणतात.

***भगति करत बिनु जतन प्रयासा।***
***संसृति मूल अविद्या नासा॥***

अर्थात् ईश्वराची भक्ती जर साधता आली तर प्रयत्न न करताच प्रपंचाचे मूळ अज्ञान वा अविद्या संपून जाईल.

3) **मद्याजी भव:** मला अर्पण करुनच. यज्ञ म्हणजे परमात्म कार्य तर ईश्वराला अर्पण न करताही होऊ शकते. प्रपंचासक्ती क्षीण करण्यासाठी साधनेची सुरुवात ही पारमार्थिक सेवाकार्य आरंभ केल्यानेच होते. निष्कामता, भक्ती वैराग्य वगैरे आंतरिक स्वरुपाची साधना आहे. ती आत जिज्ञासा वा जागृती उत्पन्न झाल्यावरच सुरु होऊ शकते पण पारमार्थिक जनसेवेचे कार्य करत असतांनाही जोवर अहंकार क्षीण होत नाही तोवर पारमार्थिक जनसेवेची आसक्तीही क्षीण होत नाही. आसक्ती जोवर सुटत नाही तोवर पारमार्थिक कार्य करत असतांनाही दु:खानुभव थांबणार नाही. यामुळे पारमार्थिक कार्यही ईश्वराला अर्पण करुनच करायला हवे. ईश्वर भक्ती प्राप्त झाल्यावर ईश्वरार्पण बुध्दीने कर्मे केल्यास सहजता साधली जाते. भक्ती हवी. भक्तीशिवाय सारे व्यर्थ. भक्तीशिवाय तमाम क्रिया सहजपणे ईश्वरार्पण होऊ शकत नाहीत. ईश्वरशरणभाव ही सुरुवातीची पायरी आहे. त्याचप्रमाणे भक्तीनंतर ती भक्तीचा परिपाक आहे. भक्तीचे ते फलितही आहे. एकदा भक्ती साधली की मग तमाम क्रिया सहजपणे ईश्वरार्पण करुनच होऊ शकतात. याचा अर्थ असा झाला की साधकावस्थेत भक्ती साधना म्हणून असते आणि सिध्दावस्थेत ती सहज बनून जाते. सहज लक्षण बनून जाते. भक्तीच्या ठायी निष्क्रियता नाही. संपूर्ण ब्रह्मांडात घट-घटात ईश्वर विद्यमान आहे ही दृष्टी एकदा का लाभली प्राप्त झाली की मग भक्ती दीन, दरिद्री, दु:खी जनांच्या सेवेत प्रवृत्त करील. यामुळे इथे शब्द आला आहे मद्याजी.

4) मां नमस्कुरु: सर्वत्र मी म्हणजे परमात्माच आहे असे समजून सर्वांविषयी परमात्मदृष्टी बाळगून नम्र भावनेने रहा. तुलसीदासजी लिहितात.

***जड चेतन जग जीव जत, सकल राममय जानि।***
***बंदौ सबके पद कमल, सदा जोरि जुग पानि॥***

अर्थात् ब्रह्मांडातले समस्त जड आणि चेतन पदार्थ परमात्मामय आहेत असे मानून सकलांच्या चरणकमळी दोन्ही हात जोडून वंदन करतो. तुकोबा म्हणतात सकलांच्या पायी माझे दंडवत

ज्याला खरी भक्ती प्राप्त होते तो सर्वांपुढे विनम्रच असतो. त्याच्या सर्व व्यवहारात विनम्रता नांदते. ज्ञानोबा लिहितात नेत्रांनी तो परमात्माच बघत आहे. कानांनी तो परमात्माच ऐकत आहे. मनात परमात्म्याचीच स्तुती करतो. स्तवने गातो. वाणीने ईश्वराचेच गुणगान करतो.

सर्वत्र ईश्वरालाच नमन करतो. ईश्वराच्या निमित्ताने दान वा पुण्ये करत आहे. भगवान म्हणतात की हे अध्ययनही माझ्यासाठी म्हणजे माझा अनुभव प्राप्त करुन घेण्यासाठीच करत आहे. माझेच आंतर्बाह्य दर्शन करुन आनंदित होत आहे. संपूर्ण आयुष्य माझ्यासाठीच घालवत आहे.

5) **ते सत्यं प्रतिजाने मां एव एष्यसि:** मी सत्य प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे म्हणजे खात्रीपूर्वक सांगत आहे की तू मलाच पावशील म्हणजे प्राप्त होशील. तुला मोक्षलाभ होईल. इथे भगवंत अर्जुनाला प्रतिज्ञापूर्वक म्हणजे खात्रीपूर्वक सांगत आहेत की उपर्युक्त ज्या चार गोष्टी मी तुला सांगितल्या आहेत त्या जर प्राप्त करुन घेशील तर निश्चितच मला पावशील म्हणजे माझा अनुभव मिळवण्याकामी विलंब लागणार नाही. माझा अनुभव प्राप्त झाल्यावर लगेचच मोक्षानुभव प्राप्त होईल. दु:खाची आत्यंतिक निवृत्ती होईल. जीवनात शांततेची धारा अखंडपणे प्रवाहित राहील.

65 आणि 66 या दोन श्लोकांमधून गीतेचा समारोप केला जात आहे. यामुळे थोडक्यात गीतेचा सारांश या दोन श्लोकांमधून आला आहे. उपरोक्त चार गोष्टी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रत्येकाला सतत प्रयत्न करायला हवेत. सर्वप्रथम मनात ईश्वराचे ध्यान धारण करायला सांगितले आहे. त्यातून ईश्वराप्रती प्रेम उचंबळून येईल ही झाली भक्ती. तिसरा मुद्दा हा की ईश्वराची भक्ती ईश्वराचे ध्यान करुन घेत असतांना लोकसेवेचा यज्ञ होत रहायला हवा. हा यज्ञ संपन्न करत असतांना ब्रह्मांडाकडे ईश्वर दृष्टीने बघायचा प्रयत्न करायला हवा. सर्वांसमोर नतमस्तक होऊन विनम्रभावे जनांशी व्यवहार करायला हवा. अशा प्रकारे चारी गोष्टी सर्वांसाठी साधना करताना आवश्यक आहेत. या श्लोकात या निमित्ताने जणू काही गीतेचा सारांश सर्वांसमोर मांडून भगवंतांनी उत्तम मार्गदर्शन केले आहे.

: 66 :

***सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।***
***अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच: ॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **सर्वधर्मान् परित्यज्य:** सर्व धर्मांना सोडून
- **मां एकं शरणं व्रज:** माझ्या एकट्याच्याच शरणी ये
- **अहं त्वा सर्वपापेभ्य:** मी तुला सर्व पापांपासून
- **मोक्षयिष्यामि:** मुक्त करीन
- **मा शुच:** तू शोक करु नकोस

**अर्थ**

सर्व धर्म म्हणजे सर्व कर्तव्यकर्मे मला अर्पण करुन ते केवळ सर्वशक्तीमान, सर्वाधार अशा मला परमेश्वरालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून सोडवीन. तू शोक करु नकोस.

***सगळे धर्म सोडूनि एका शरण ये मज।***
***जाळीन सर्व मी पापें तुझीं शोक करुं नको ॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) जेवढे म्हणून काही स्वधर्म आहेत त्या सर्वांचा त्याग करुन म्हणजे आसक्ती सोडून 2) माझ्या एकाच्याच शरणी ये, परमात्म्याचेच शरण ग्रहण कर 3) मी तुला तमाम बंधनांपासून म्हणजे पातकांपासून मुक्त करुन देईल. 4) तू शोक करु नकोस.

**स्पष्टीकरण**

1) सर्वधर्मान् परित्यज्य: समस्त स्वधर्म म्हणजे स्वकर्तव्यांचा त्याग करुन म्हणजे सारे काही करत असतांनाही आसक्ती सोडून देऊन म्हणजे कर्तेपणाच्या भावनेचा अहंकार सोडून. इथे शब्द आला आहे ‘स्वधर्माचा त्याग करुन’ भगवान तमाम धर्मांचा म्हणजे तमाम कर्तव्यांचा त्याग करायला सांगत आहेत. सारे निवृत्तीपरायण हाच अर्थ करतात पण इथे संपूर्ण गीतेचा सारांश वर्णिला गेला आहे. यामुळे गीतेच्या सिध्दांताच्या विरुध्द अर्थ करता येणार नाही. गीतेचा सिध्दांत असा आहे की स्वधर्म वा स्वकर्तव्याचा कदापि त्याग करता कामा नये. त्याचा त्याग करु शकत नाहीत. ज्ञानप्राप्तीसाठी

बहिरंग साधनेत स्वधर्मरुप स्वकर्तव्यांचा समावेश आहे. साधनेला इथूनच आरंभ होतो. या अध्यायातील 56 आणि 57 या दोन श्लोकांमधून स्वधर्मरुप कर्तव्ये आचरायला सांगितली आहेत. अर्थात् स्वधर्मरुप कर्तव्यपालनासोबत ईश्वर भक्ती म्हणजे ईश्वरशरणभाव असायला हवा. बाह्य साधनेत कर्तव्य पालनासोबत सत्संग, स्वाध्याय, सद्गुणांचा विकास, यज्ञ, दान, तप वगैरे कर्मे या सर्वांचा अंतर्भाव आहे. आंतरिक साधनेत भक्ती, ध्यान, ईश्वरशरणता, आत्मानात्मविवेक, शम, दम, उपरती, तितिक्षा, समाधान, श्रध्दा या साधनांचा समावेश आहे. बहिरंग आणि अंतरंग उभय साधनांचे फळ मिळून परमात्मज्ञान होते. यामुळे 'सर्व धर्मांचा त्याग करुन' याचा अर्थ वा स्वधर्म-कर्तव्यांचा त्याग नसून सर्व कर्तव्यरुप कर्मे, अहंकार आणि आसक्तीचा त्याग आहे.

2) **मां एकं शरणं व्रजः** माझ्या एकाच्याच शरणी ये. आधी बहिरंग वस्तु करायला सांगितले मग अंतरंग वस्तु सांगताहेत. हे अतिशय महत्वाचे आहे. आरंभी स्वधर्मरुप कर्तव्यांचे पालन करत असतांना त्यातली आसक्ती सोडायला सांगितले आहे पण आसक्ती सोडायची कशी ? त्याचा उपाय आहे ईश्वरशरणता. माझ्या शरणी आल्याशिवाय अहंकारशून्य होता येणार नाही. अहंकार शून्यतेशिवाय कर्तेपणा -- भोक्तेपणाची भावना नष्ट होणार नाही. याशिवाय कर्मफळत्याग वा स्वधर्मरुपी कर्माची आसक्ती नष्ट होणे शक्य नाही. यामुळे अहंकार-शून्य बनण्यासाठी ईश्वरशरणता हवी. ईश्वरभक्ती हवी. साऱ्या क्रिया केवळ परमेश्वराला अर्पित करुन रहाणे हाच सर्वश्रेष्ठ आंतरिक उपाय आहे. गीतेचा हाच सारांश वा संक्षेप आहे. प्रत्येक अध्यायात ठायीठायी या मुख्य उपायाकडे लक्ष वेधले गेले आहे. 'मां एकं' शब्दाचा अर्थ आहे. 'माझ्याशिवाय अन्य कुणाच्याही शरणी जाऊ नकोस.' केवळ 'ईश्वरालाच समर्पित हो.' तुलसीदासजी म्हणतात.

*अस बिचारि हरिभगत सयाने ।*
*मुक्ति निरादर भक्ति लोभाने ॥*

अर्थात् हरीभक्तीशिवाय मोक्ष म्हणजे आत्यंतिक सुखाची प्राप्ती होणार नाही. हे जाणून घेऊन विवेकी पुरुष मुक्तीचा निरादर करुन म्हणजे मुक्तीविषयी इच्छा न दर्शवता न बाळगता भक्तीचाच लोभ धरतात म्हणजे भक्तीत रत असतात कारण की जर भक्ती साधली गेली तर विना प्रयासानेच जगाच्या मूळाचा म्हणजे अज्ञानाचा नाश होईल.

3)**अहं त्वा सर्वपापेभ्यः** मोक्षयिष्यामि मी तुला त्या तमाम पातकांपासून म्हणजे बंधनांपासून मुक्त राखीन. स्वधर्मरुपी स्वकर्तव्यांचे पालन करत आपण जर ईश्वर शरणागती पत्करुन शून्य बनलोत तर पापकर्म म्हणजे अज्ञान आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या आसक्तीजन्य बंधनांपासून ईश्वर आपल्याला मुक्त राखील. स्वधर्मरुप स्वकर्तव्यांचे पालन करत आपण जर ईश्वर शरणागती पत्करुन शून्यत्व पत्करले तर पापकर्मे म्हणजे अज्ञान आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या आसक्तीजन्य बंधनांपासून ईश्वर आपणास मुक्त ठेवील. अकरणीय म्हणजे न करण्यायोग्य कार्ये आपल्या हातून कदापि होणार नाहीत. आपण ईश्वरशरणागत भाव पत्करला तर आपली सारी जबाबदारी ईश्वराची झाली. तेव्हा आपण आत विद्यमान म्हणजे अवस्थित ईश्वराला साक्षी राखून विनम्र भावनेने अत्यंत सुरक्षित रहातो पण देहासक्ती एवढी सूक्ष्म आणि प्रबळ असते की आपण अहंकार सोडायला तयारच होत नाही. यामुळे भक्तीसारखा अगदी साधा-सोपा उपायही आपल्याला अवघड वाटतो. आपण अहंकाराचा त्याग केला तर ईश्वर असे म्हणतात की माझ्या हाती जीवनाचा लगाम आल्यावर माझी प्रेरणा पापकर्मांकडे नसल्यामुळे तुझ्या हातून पापकर्मे घडायची शक्यताच उरणार नाही आणि न करण्यायोग्य कर्मे तुझ्या हातून घडणारच नाहीत. जीवन सदैव मोक्षाभिमुख असेल.

4) **मा शुचः** तू शोक करु नकोस. माझी शरणागती पत्करुन शून्य बनून तू निश्चिंत होऊन जा. पहिल्या अध्यायात आपण पाहिले की अर्जुनाची स्थिती दयनीय केविलवाणी झाली आहे. त्या संदर्भात सांगताहेत की ईश्वर आत विद्यमान आहे हे न कळून आल्यामुळे शोक आणि मोह जागला आहे. साधारण माणसाला या गोष्टीचे भानच नाही की परमात्मा चोवीस तास अगदी आपल्या नजिक आहे. त्याचेच आपल्या शरीरावर, मनावर, इंद्रियांवर, बुध्दीवर नियंत्रण आहे. या सर्वांचे तोच संचालन करत आहे. जिथे आपले अस्तित्वच परमेश्वराच्या अस्तित्वावर अवलंबून आहे तिथे आपण जर ईश्वराला विस्मरुन जीवन

जगायचा प्रयत्न केला तर आपणास शोक-मोह वगैरे घेरुन घेतील आणि दु:खात बुडवतील. तुलसीदासजी हनुमंताच्या मुखाने सांगताहेत --

*जानत हूँ अस स्वामि बिसारी।*
*फिरहिं ते काहे न होइ दुखारी॥*

अर्थात् परमात्मा दयाळू आहे, कृपाळू आहे. आपला रक्षणकर्ता रक्षक आहे. त्याचे अहर्निश आपल्या वागण्या-बोलण्यावर लक्ष आहे. हे जाणत असतानाही जर आपण ईश्वराला विसरुन चालत राहीलोत तर जीव दु:खी होणार नाही तर काय होईल?

गीतेच्या समारोपाच्या या अंतिम श्लोकात भगवंतांनी एकापाठोपाठ एक अशी चार महत्वाची वचने सांगितली आहेत. एका अर्थाने इथे गीता पूर्ण झाली असे सांगता येईल. पुढील श्लोकांमधून गीतेची फलश्रुती वर्णिली आहे.

: 67 :

*इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।*
*न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इदं ते:** हा उपदेश म्हणजे हे ज्ञान
- **अतपस्काय न वाच्यं:** अतपस्व्याला सांगू नकोस
- **न अभक्ताय कदाचन:** जो माझा भक्त नसेल त्याला कदापी सांगू नकोस
- **न अशुश्रूषवे:** आणि ज्याला ऐकायची इच्छा नसेल जिज्ञासा नसेल
- **च य: मां अभ्यसूयति न:** आणि जो माझा द्वेष-मत्सर करत असेल त्यालाही सांगू नकोस

**अर्थ**

हा गीतारुप रहस्यमय उपदेश कधीही तप न करणाऱ्या माणसाला सांगू नये. तसेच भक्तीहीन (वेद, शास्त्र, परमेश्वर, महात्मे व गुरुजन यांच्या ठिकाणी श्रध्दा, प्रेम आणि पूज्यभाव असणे ही 'भक्ती' होय. या शिवाय असणाऱ्याला भक्तीहीन असे म्हणतात) माणसाला आणि ऐकण्याची इच्छा नसणाऱ्यालाही सांगू नये. त्याचप्रमाणे माझ्यामध्ये दोष पाहणाऱ्याला तर कधीही सांगू नये.

*न कथीं हे कधीं त्यास तपो-हीन अभक्त जो।*
*श्रवणेच्छा नसे ज्यास माझा मत्सर जो करी॥*

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आहेत 1) माझा हा उपदेश अतपस्व्याला सांगू नकोस. 2) जो माझा भक्त नसेल त्याला सांगू नकोस. 3) ज्याला ऐकायची इच्छा, जिज्ञासा नसेल त्याला सांगू नकोस आणि 4) माझा जो तिरस्कार करणार असेल त्यालाही सांगू नकोस.

इथून पुढे पाच श्लोकांपर्यंत म्हणजे 71 व्या श्लोकापर्यंत गीतेची फलश्रुती वर्णिली आहे म्हणजे हे सांगितले आहे की गीतेचा उपदेश कुणाप्रती सांगायचा आहे आणि कुणाला सांगायचा नाही.

**स्पष्टीकरण**

1) **इदं ते अतपस्काय न वाच्यम्:** तुम्ही म्हणजे अधिकारी पुरुष. अर्जुन अधिकारी पुरुष होता त्यामुळेच भगवंताने त्याला उपदेश केला. गीतेचा उपदेश वाटेल ती व्यक्ती करु शकत नाही. ज्याचे आचरण गीतेच्या उपदेशानुसार असेल, जी व्यक्ती परमेश्वराच्या निकट पोहोचलेली असेल तीच व्यक्ती गीतेचा खरा उपदेश करु शकते. जो साधकावस्थेत असेल आणि गीतेच्या उपदेशानुसार साधना करत असेल तोही गीतेचा उपदेश सर्वसाधारण जिज्ञासु व्यक्तीसाठी करु शकतो. गीतेचा उपदेश करणारा अधिकारी पुरुष असायला हवा त्याप्रमाणेच गीतेचा उपदेश ऐकणाराही काही योग्यतेचा असायला हवा. या निर्देशात काहीशी संकुचितता असल्याचे वाटते. की अरे, यात तर संकुचितता आहे. आजकाल हा विचारही होऊ शकतो की जी प्रापंचिक व्यक्ती तपोहीन असेल पण गीतोपदेश श्रवण करुन जीवनात काही परिवर्तन करायची आकांक्षा बाळगून असेल तिलाही गीता ऐकायची अधिकारी व्यक्ती मानु शकतो. गीतेचा उपदेशक केवळ प्रापंचिक वा पंडीत--शास्त्री असेल त्यापासून काही विशेष लाभ वा फायदा नाही पण गीतेच्या उपदेशाला आचरणात आणायचा प्रयत्न करणारी साधक वा मुमुक्षु व्यक्ती जर उपदेश करत असेल तर प्रापंचिक जनांनाही लाभ होऊ शकतो, अशी

व्यापक दृष्टी वाळगता येते. पण इथे भगवान सांगताहेत की ज्याला उपदेश करायचा तो जर तीन प्रकारचे तप आचरणारा नसेल ( सतराव्या अध्यायात वर्णिलेल्या ) तर त्याला उपदेश करण्यात येऊ नये. तपोहीन वा अतपस्वी गीतोपदेश ऐकायला अधिकारी नाही.

2) **न अभक्ताय कदाचन:** जो भक्त नसेल म्हणजे ईश्वराचा श्रध्दाळू नसेल त्याला कदापि सांगू नये. ईश्वर भक्ताला गीतेच्या उपदेशाची गरजच भासणार नाही. यामुळे भक्तीचा अर्थ मर्यादित स्वरुपाचा मानायला हवा. इथे भक्ती शब्दाचा अर्थ ‘ईश्वर श्रध्दा’ असा आहे. जनतेत ईशश्रध्दा आहे. शेतकऱ्याचा संबंध निसर्ग, सृष्टीशी सततचा येतो. पावसाचा संबंध ईश्श्वराशीच आहे. यामुळे ईश्वरावरच शेतकऱ्याची श्रध्दा असते. शहरनिवासी जनांमध्ये ही श्रध्दा न्यून स्वरुपात दिसते. ईश्वरावर साधारण स्वरुपाची श्रध्दा असली तरीही गीतोपदेशाने लाभ होऊ शकतो.

गीतेत एवढी विविधता, सरळता, मौलिकता, प्रासादिकता आहे की कुणाची श्रध्दा नसली तरी गीतेचो उपदेश ऐकून त्याची ईश्वरावर श्रध्दा जागू शकते.

3) **च अशुश्रूषवे न:** ज्याची ऐकायची इच्छा नसेल, जिज्ञासा नसेल त्याला सांगू नये. जो तपस्वी नसेल वा ज्याची ईश्वरावर श्रध्दा नसेल त्याला गीता ऐकवण्याचा लाभ असा होईल की ऐकल्यावर तो तपाचरणात प्रवृत्त होईल वा त्याची देवावर श्रध्दा जागेल पण ज्यांची ऐकायची इच्छाच नसेल त्याला गीतेचा उपदेश करु शकतो? यामुळे ज्यांची ऐकायची इच्छा नाही त्याना मुळीच ऐकावयाला नको म्हणजे त्याच्यासाठी गीतेचा उपदेश निरर्थक आहे.

इथे एक असा प्रश्न उद्भवू शकतो की ज्यांना ऐकायची इच्छा नाही त्यांच्याठायी ऐकायची इच्छा उत्पन्न करता येईल की नाही ? या प्रश्नाचे सकारात्मक उत्तर द्यावे लागेल. याचे उत्तर ‘हो’ असे द्यावे लागेल पण हे केवळ अधिकारी पुरुषामार्फतच होऊ शकते. अशी व्यक्ती परमेश्वराचा अनुभव प्राप्त केलेली असावी. अशा व्यक्तीच्या नजिक पोहोचताच तीपासून काही उपदेश घ्यायची प्रेरणा जागावी असे आकर्षण असेल.

4) **च य: मां अभ्यसूयति न:** आणि जो माझा म्हणजे परमात्म्याचा तिरस्कार करणारा असेल म्हणजे अगदी नास्तिक असेल त्याला सांगायला नको. जगात अशीही माणसे असतात जी परमेश्वराचा मूळापासून इन्कार करतात. ते म्हणतात की परमात्मा सारखी कुठलीही वस्तु जगात खरोखरच अस्तित्वात नाही. ती जर तशी असती तर जगात एवढे पापाचरण, एवढा अन्याय त्याने का सुरु राहू दिला असता ? आज एकीकडे अत्यंत गरीब, कठोर श्रम करणारे श्रमिक आहेत आणि त्याना पुरेसे जेवणसुध्दा मिळत नाही आणि दुसरीकडे इतके आणि असे श्रीमंत आहेत की जे अधिक काम तर काय पण अजिबात श्रम न करता इतका पैसा मिळवताहेत आणि कमालीचे वैभव संपन्न आणि सुखमय जीवन जगताहेत. अखेर एवढा अन्याय आणि अशा प्रकारची विषमता परमात्मा जगात का बरे जारी राहू देत आहे ? एवढेच नव्हे ही मंडळी अशा देवाच्या विरोधातही ठाम आहेत. अशा अगदी नास्तिक, ईश्वराचा द्वेष करणाऱ्या लोकांना गीतेचा उपदेश करणे व्यर्थच आहे कारण की ते हा उपदेश ऐकून ते अधिकच चिडून जातील. गीतेच्या उपदेशाचा त्यांच्यावर विपरीत परिणाम होईल. मागे आपण बघितले की अत्यंत अनुभवी भक्तीमान पुरुषांच्या सान्निध्यात गेल्यावर त्यांचा एवढा प्रभाव पडतो की ऐकायची इच्छा नसेल तरीही ऐकावेसे वाटते. हाच तर्क इथेही लागू पडू शकतो. ईश्वराला पक्षपाती, क्रूर मानणाऱ्या ईश्वर द्वेषी पुरुषांच्या ठायीही महात्मा पुरुषांच्या सान्निध्यामुळे परीवर्तन जागणे शक्य आहे. पण असे अनुभवी महात्मा अनुभवी जन अत्यंत विरळ आहेत. संत तुलसीदासजींनी लिहिले आहे.

***सठ सुधरहिं सतसंगति पाई। अर्थात् शठ लोक संत संगतीच्या संगे सुधारु शकतात.***

: 68 :

***य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।***
***भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **य: इमं परमं गुह्यं:** हा जो परम गूढ असा उपदेश
- **मद्भक्तेषु अभिधास्यति:** माझ्या भक्तांना विवेचन करुन ऐकवील
- **मयि परां भक्तिं कृत्वा:** (अशी) माझी परम भक्ती करुन

- **असंशयं मां एव एष्यति:** नि:संशयपणे मलाच प्राप्त होईल

**अर्थ**

जो पुरुष माझ्या ठिकाणी परम प्रेम ठेऊन हे परम रहस्ययुक्त गीताशास्त्र माझ्या भक्तांना ऐकवील तो मलाच प्राप्त होईल यात मुळीच शंका नाही.

***सांगेल गुज हें थोर माझ्या भक्त गणांत जो।***
***तो त्या परम भक्तीनें मिळेल मज निश्चित॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टींची चर्चा आली आहे 1) जो पुरुष हा गूढ म्हणजे सूक्ष्म उपदेश माझ्या भक्तांना विवेचन करुन ऐकवील 2) तो त्या कर्माने माझी परम भक्ती प्राप्त करुन 3) नि:संशयपणे मलाच प्राप्त होईल.

**स्पष्टीकरण**

1) **य:** इमं परमं गुह्यं मद्भक्तेषु अभिधास्यति जी व्यक्ती गीतेत निरुपित हा गूढ म्हणजे सूक्ष्म उपदेश माझ्या भक्ताला ऐकवील. गीतेचा उपदेश सर्वांसाठी आहे, विशिष्ट लोकांसाठीचा नाही यामुळे वरील वचन सांप्रदायिक असल्यासारखे वाटेल पण याचा खरा अर्थ हा आहे की ज्यांची ईश्वरावर आधीपासूनचीच श्रध्दा आहे त्यांना गीतोपदेश ऐकल्यावर अधिक लाभ होईल पण याचा अर्थ काही असा नाही की ज्यांची ईश्वरावर श्रध्दा नाही त्यांना गीतोपदेश करता येणार नाही. गीतेच्या उपदेशात एवढे सामर्थ्य आहे की ईश्वरावर श्रध्दा न बाळगणारी व्यक्तीही श्रध्दासंपन्न होऊ शकेल. यामुळे गीतोपदेश सकलजनांसाठी आहे. हे सिध्द होते. गीता सांप्रदायिक ग्रंथ नाही. यात सर्व तत्त्वचिंतकांच्या - सर्व दार्शनिकांच्या विचारांचा समन्वय करायचा प्रयत्न केला गेला आहे. मुख्य प्रश्न गीतेवर विवेचन ऐकवणाऱ्याच्या योग्यतेचा आहे. ऐकणाऱ्याची जेवढी अधिक योग्यता असेल त्याचा तेवढाच अधिक लाभ होईल. तरीही ऐकणाऱ्यात किमान एवढी तरी योग्यता असावी की त्याची ऐकायची इच्छा असावी. ब्रह्मसूत्र विषयक भाष्यात शंकराचार्य लिहिताता दृष्टार्थाम् हि विद्या अर्थिनम् अधिकरोति श्रवणादिषु ब्रह्मविद्या म्हणजे ब्रह्मज्ञान हा विषय प्रत्यक्ष अनुभवाची वस्तु असल्यामुळे ज्याला अनुभव घ्यायची इच्छा असेल तो श्रवणाचा अधिकारी होऊन जातो. गीतेचा उपदेश सरळ असला तरी गहन आणि गूढ आहे. सूक्ष्म आहे एवढे मात्र खरे. ज्याला श्रवणाची इच्छा आहे त्याला पुरेसे एकाग्र रहायला हवे. अन्यथा तो उपदेश लक्षात घेणार नाही.

2) **मयि परां भक्तिं कृत्वा:** यामुळे माझा उपदेश करणाऱ्याला जो महत्वाचा सत्संग लाभला त्यातूनच माझी परम भक्ती प्राप्त करुन. हा मोठा मार्मिक मुद्दा आहे. जो अधिकारी पुरुष गीतेचा उपदेश करील त्यालाच ईश्वराची परमभक्ती प्राप्त होईल. हा मोठा लाभ होय. भक्तीमुळे प्रापंचिक मोह, देह वगैरे विषयक आसक्ती नष्ट होऊन जाते तरीही इथे तर परम भक्ती म्हणजे उत्कट प्रेमाचा मुद्दा चर्चेला आला आहे. गीतेचा उपदेश करणे म्हणजे परमेश्वराचे गुणगान करणे होय. यामुळे परमात्म प्रेमाचा संस्कार इतका बळकट होतो की त्यासमोर आसक्तीचा संस्कार टिकूच शकत नाही. ऐकणाऱ्यांपेक्षा शिकवणाऱ्यांचा अधिक लाभ होतो कारण की शिकवणाऱ्याला अधिक चिंतन करावे लागते. चिंतनामुळे सूक्ष्म विचार सुचतात आणि विषय अधिक स्पष्ट होतो. यामुळे उपदेशकर्त्याला नेहमी असे वाटत असते की उपदेश करायची ही संधी आहे आणि ही संधी ईश्वराची कृपाच होय. अनुग्रहच होय.

3) **असंशय: मां एव एष्यति:** तो नि:संशयपणे मलाच प्राप्त होतो म्हणजे त्याला परमेश्वराच्याच अनुभवाची प्राप्ती होते. भक्तीचा परिणाम अनुभव मिळवणे आहे. अनुभव प्राप्ती आहे. तुलसीदासजी म्हणतात.

***तथा मोक्ष सुख सुनु खगराई।***
***रहहिं स सकइ हरिभगति बिहाई॥***

अर्थात् हे पक्षीराज गरुडा ऐक, हरीभक्तीशिवाय मोक्षसुखाची प्राप्ती होऊ शकत नाही.

: 69 :

***न च तस्मान् मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तम:।***
***भविता न च मे तस्मादन्य: प्रियतरो भूवि॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च मनुष्येषु:** आणि माणसांमध्ये

- **तस्मात् ये प्रियकृत्तमः** त्याहून अधिक माझे हितचिंतन करणारा
- **कश्चित् न अस्तिः** अन्य कुणी नाही
- **च तस्मात् मे प्रियतरः** आणि त्याहून मला प्रियतर म्हणजे अधिक प्रिय
- **अन्यः** कश्चित् भुवि न अस्तिः दुसरा कुणी या विश्वात नाही
- **न भविताः** असूही शकत नाही

**अर्थ**

माझे अत्यंत प्रिय कार्य करणारा त्याच्याहून अधिक मनुष्यात कोणीही नाही. तसेच त्याच्याहून अधिक मला प्रिय दुसरा कोणी भविष्यकाळात होणारही नाही.

*कोणी अधिक त्याहूनि माझें प्रिय करी चि ना।*
*जगीं आवडता कोणी न होय मज त्याहूनी॥*

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) माणसात त्याहून अधिक माझे हित करणारा दुसरा कोणीही नाही. 2) आणि त्याहून अधिक मला प्रिय या जगात दुसरा कोणीही नाही.

**स्पष्टीकरण**

1) **च मनुष्येषु तस्मात् मे प्रियकृत्तमः कश्चित् न अस्तिः** आणि माणसात त्यापेक्षा अधिक कुणी माझे हित करणारा नाही. हा श्लोक मागील श्लोकाच्या अनुसंधानात आहे. उपदेश करणाऱ्या भक्त पुरुषाहून अधिक माझ्यासाठी अन्य कुणीही नाही. अज्ञानात फसून गेलेल्या अज्ञ आणि प्रपंचासक्त जनांची सोडवणूक करणे हे ईश्वराचे अवतारकार्य आहे. त्यांच्या या कार्यात सहाय्य करणारा सर्वोत्कृष्ट कार्य करणारा आहे कारण की प्रापंचिक जनांना सुखाचा लाभ होत नाही. सर्वांना पावलोपावली दुःखाचाच अनुभव येतो. या प्रापंचिक दुःखातून तत्काळ मुक्त होण्याची आकांक्षा सर्वांच्याय मनात असते पण खरा मार्गदर्शक लाभत नाही, यामुळे भगवान म्हणतात की मी ज्या कार्यासाठी जीवंत आहे त्या कार्याला गीतोपदेशाद्वारे संपन्न करणारा सर्वोत्तम कार्य करतो.

विनोबाजी 1932 साली धुळे येथे कारागारात होते. तिथे सर्व साथीदारांच्या आग्रहामुळे दर रविवारी गीतेवर तासभर प्रवचन करत असत. तिथे साने गुरुजीही होते. ते प्रवचन लिहून काढत असत. ती प्रवचने पुढे ग्रंथ रुपाने प्रकाशित झालीत. हा ग्रंथ वाचून लोकांना खूप लाभ झाला. भारतातील सर्वच आणि युरोपातील काही भाषांमधून या ग्रंथाचा अनुवाद झाला. भगवंताचे उपर्युक्त वचन विनोबाजी आणि त्यांच्या 'गीता प्रवचनांना' पूर्णपणे लागू होते.

2) **च तस्मात् ते प्रियतरः अन्यः कश्चित् भुवि न अस्ति, न भविताः** आणि त्याहून अधिक माझ्यासाठी प्रिय असा या जगात कुणी नाही आणि कुणी नसणार. अशाप्रकारे गीतेचा संदेश जी कुणी व्यक्ती संपूर्ण जनतेत प्रसारित करायचा प्रयत्न करीत आहे ती या जगात निःसंशयपणे सर्वांहून महान आहे. श्रेष्ठ आहे. जगात पावलोपावली जिथे ठेच लागते तिथे या महापुरुषांच्या वचनामृतांनी अडी-अडचणीत, प्रतिकूल परिस्थितीत कशा प्रकारे मार्ग काढावा याचे दिग्दर्शन होते. या दुःखमय प्रपंचापासून अलिप्त राहून कुठलाही संघर्ष न करता आमरण जीवन घालवण्याच्या विचारांची चावी जेव्हा गीता- ब्रह्मसूत्र ग्रंथांच्या माध्यमातून त्या उपदेशाद्वारे हाती लागते तेव्हा समाधान लाभते. यामुळे गीतेच्या तत्त्वज्ञानाचे उपदेशक म्हणजे उपदेशकर्ते जे महात्मा पुरुष आहेत त्यांचे या जगावर महान उपकार आहेत. ते उपकारक आहेत.

: 70 :

*अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।*
*ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च यः आवयोः** आणि जो आम्हा दोघांमधे झालेल्या
- **इमं धर्म्यं संवादं अध्येष्यतेः** या धर्मरुपी संवादाचे अध्ययन करतो
- **तेन ज्ञानयज्ञेनः** त्याने ज्ञानयज्ञाने, ज्ञानयज्ञपूर्वक
- **अहं इष्टः स्याम्ः** माझे पूजन केले
- **इति मे मतिः** असे मी मानतो.

**अर्थ**

जो पुरुष आम्हा दोघांच्या धर्ममय संवादरुप या गीताशास्त्राचे अध्ययन करील, त्याच्याकडूनही मी ज्ञानयज्ञाने पूजित होईन असे माझे मत आहे.

***ह्या धर्मरुप संवाद जो अभ्यासील आमुचा।***
***मी मानीं मज तो पूजी ज्ञान-यज्ञ करुनियां॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) जे पुरुष आम्हा दोघांत घडलेल्या या धर्मरुप संवादाचा आध्यात्मिक संवादाचा यथार्थपणे योग्यरुपाने अध्ययन करुन आचरणात आणतो. 2) त्याने ज्ञान-यज्ञाने माझे पूजन केले असे मी समजतो.

**स्पष्टीकरण**

1) **च य: आवयो: इमं धर्म्यं संवादं अध्येष्यते:** आणि जो कुणी आम्हा दोघांमध्ये झालेल्या या आध्यात्मिक संवादाचा यथार्थ अभ्यास करुन आचरणात आणतो. मनात ज्यावेळी आध्यात्मिक साधनेची जिज्ञासा तीव्रतेने उत्पन्न होते त्याचवेळेला माणूस या गीता ग्रंथाच्या अध्ययनात प्रवृत्त होतो. तशी तर गीता साधी-सरळ-सोपी आहे पण त्याचा गूढार्थ साधनेच्या दृष्टीने ध्यानी येणे सोपे नाही. या ग्रंथावर अनेक भाष्ये लिहिली गेली आहेत. प्रकाशितही झालेली आहेत पण अनेक वर्षे सखोलपणे चिंतन करुन जिज्ञासू साधकांसाठी लिहिले गेलेले ग्रंथ कमीच आहेत. एथवर जी काही भाष्ये वा टीकाग्रंथ प्रकाशित झाले आहेत त्यात शंकराचार्य आणि ज्ञानेश्वरांच्या भाष्यांसोबत विनोबांचे गीताई चिंतनिका आणि गीता प्रवचने श्रेष्ठ ग्रंथ आहेत. अशा प्रकारे गीतेवर चिंतन-मनन करुन त्यानुसार ध्यान, भक्ती, वैराग्य, फलत्याग, आत्मानात्मविवेक, जनसेवा वगैरे साधना करुन चिंतन, मनन, अध्ययन, आचरणात आणायचा जे आमरण प्रयत्न करतात त्यांच्या विषयी इथे खूपच गौरवोद्गार भगवंत व्यक्त करत आहेत.

2) **तेन ज्ञानयज्ञेन अहं इष्ट: स्याम् इति मे मति:** त्यांनी ज्ञानयज्ञाने म्हणजे यथार्थपणे अध्ययन-मननाद्वारे आपल्या आचरणात आणायच्या ज्ञानयज्ञाने ते माझे पूजन करतात, माझी भक्ती वा आराधना करतात असे मी मानीन. या गोष्टीला भगवान केवढे महत्व देताहेत याला किती मौल्यवान मानत आहेत हे यावरुन स्पष्ट व्हावे. अर्थात् हे वचन सर्वांवर लागू होते असे मानायला नको. अगदी प्राथमिक स्थितीतील साधकासाठी हे वचन नाही कारण इथे 'ज्ञानयुक्त' शब्द प्रयुक्त केला गेला आहे. हे वचन उच्च, श्रेष्ठ दर्जाच्या साधकांना उद्देशून सांगितले गेले आहे. हे वचन शास्त्री, पंडितांवरही लागू होत नाही. जनतेला आपल्या वाणीने मंत्रमुग्ध करुन टाकणारे अत्यंत प्रभावी अनेक वक्ते असतात, शास्त्री-पंडित असतात. त्यांच्या प्रवचनांनी लोकांना अतिशय लाभही होतो पण भगवंत इथे जे काही सांगताहेत ते अशा प्रभावशाली आणि आपल्या प्रवचनांनी जनतेला मंत्रमुग्ध करणाऱ्यांसाठी नाही.

: 71 :

***श्रध्दावाननसूयश्च श्रुणुयादपि यो नर:।***
***सोऽपि मुक्त: शुभाँल्लोकान् प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **श्रध्दावान् य अनसूय:** श्रध्दाळू आणि कुणाचा द्वेष न करणारा
- **य नर: अपि श्रुणुयात्:** जो पुरुष ध्यानपूर्वक ऐकील
- **स: अपि मुक्त:** तोही मुक्त होईल
- **पुण्यकर्मणाम्:** पुण्यकर्मे आचरणाऱ्यांप्रमाणे
- **शुभान् लोकान् प्राप्नुयात्:** शुभ लोक प्राप्त करुन घेईल.

**अर्थ**

जो मनुष्य श्रध्दायुक्त होऊन दोषदृष्टी न राखता या गीताशास्त्राचे श्रवण करील तोही पापांपासून मुक्त होऊन पुण्यकर्म आचरणाऱ्यांच्या श्रेष्ठ लोकाला प्राप्त होईल.

***हें ऐकेल हि जो कोणी श्रध्देनें द्वेष सोडुनि।***
***पावेल कर्म-पूतांची तो हि निर्वेध सद्-गति॥***

विषय: या श्लोकात दोन विषयांची चर्चा आली आहे 1) श्रध्दाळू आणि कुणाचा द्वेष न करणारा पुरुष जर ध्यानपूर्वक या गीताज्ञानाचे म्हणजे गीता उपदेशाचे श्रवण करील 2) तर तोही पापाचरणात प्रवृत्त न झाल्यामुळे

पुण्यकर्मांचे आचरण करणाऱ्यांप्रमाणे शुभ लोक म्हणजे शुभ जन्म प्राप्त करील.

1) **श्रध्दावान् च अनसूयः यः नरः अपि श्रृणुयात्:** श्रध्दासंपन्न आणि कुणाचा द्वेष, तिरस्कार, निंदा न करणारा पुरुष. मागील श्लोकात वर्णन येते की गीतोपदेशक कसा असायला पाहिजे? या श्लोकात गीतोपदेश ऐकणारा श्रोता कसा असावा? हे सांगताहेत. त्याची परमेश्वरावर श्रध्दा असली पाहिजे. तो सदाचारी असायलाच हवा. तो परोपकारी, सेवाभावी, स्वार्थत्यागी असला पाहिजे. असे नसेल तर मग त्याच्या परमात्मश्रध्देला काहीही अर्थ उरणार नाही. आस्तिक आणि नास्तिक दोघांच्या आचरणात फरक हा असणारच आहे. नास्तिक पुरुष नीतीच्या बंधनात राहीलच असे नाही सांगता येणार. तो व्यसनाधीनही असू शकतो. आस्तिक पुरुष व्यसनाधीन असू शकत नाही. तो नीतीविषयक नियमांचे दृढपणे पालन करील. ईश्वरावर श्रध्दा असल्यामुळे तो पापभीरु असतो. व्यापारी असो वा वकील तो अगदी साधेपणाने रहातो. अधिक अतिरिक्त धनाचा उपयोग परोपकारासाठी सेवार्थ करील. लोकांकडे गुणदृष्टीने बघेल. कधी कुणाचा तिरस्कार, द्वेष, निंदा करणार नाही. उपर्युक्त दोन गुणांनी संपन्न पुरुष गीतोपदेशाचे श्रवण करील पण कशा प्रकारे श्रवण करील? अगदी लक्षपूर्वक ऐकेल. केवळ ऐकणे आणि लक्षपूर्वक ऐकणे यात खूप फरक आहे. केवळ ऐकण्याने गीतेचा उपदेश यथार्थपणे ग्रहण होऊ शकत नाही. ध्यानपूर्वक श्रवण केल्यावरच तो उपदेश योग्य प्रकारे ग्रहण होऊ शकतो कारण की गीतेचा उपदेश ऐकून विसरण्यासाठी म्हणजे सोडून देण्यासाठी नाही. लक्षपूर्वक ऐकल्यावरच त्यावर चिंतन-मनन होऊ शकते.

2) **सः अपि मुक्तः** पुण्यकर्मणां शुभान् लोकान् प्राप्नुयात् यामुळे म्हणून तो पुरुष पापाचरणात प्रवृत्त न झाल्याने पुण्यकर्मे सत्कर्मांचे आचरण करणाऱ्यांप्रमाणे शुभलोकाला म्हणजे शुभ जन्माला प्राप्त होईल. गीतेच्या उपदेशात एवढे सामर्थ्य आहे की यामुळे व्यक्तीला पापकर्मातून मुक्त होण्यासाठी सहाय्य लाभेल आणि पुण्यकर्मात प्रवृत्त होऊन जीवनाला प्रगतीपथावर अग्रेसर राखील परिणामी त्याला पुढला जन्म चांगला लाभेल. एक पुरुष ज्ञानपूर्वक गीतेचे चिंतन-मनन करतो पण आचरणात आणण्यात स्वत:ला असमर्थ मानतो. दुसरा माणूस चिंतन-मननाच्या क्षमतेने युक्त नाही पण आचरणात आणायची त्याची क्षमता आहे तर हा दुसऱ्या क्रमांकावरचा माणूस पहिल्याहून अधिक प्रगतीपथावर आहे. अर्थात् पहिल्या पुरुषाला पुढचा जन्म चांगलाच लाभेल असे खात्रीने काही सांगता येत नाही पण आचरणात आणायची क्षमता बाळगणाऱ्या व्यक्तीला पुढचा जन्म आतापेक्षा अवश्यमेव उत्तम लाभू शकतो. आचरणात आणणे हे चिंतन-मनन करण्यापेक्षा अधिक मोलाचे आहे.

: 72 :

***कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा।***
***कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **पार्थ कच्चित् एतत्:** हे अर्जुना, काय मी सांगितलेले
- **त्वया एकाग्रेण चेतसा:** तू एकाग्र चित्ताने
- **श्रुतम्:** ऐकलेस?
- **धनंजय कच्चित् ते:** हे अर्जुना, काय तुझा
- **अज्ञानसंमोहः प्रनष्टः** अज्ञानजन्य मोह दूर झाला?

**अर्थ**

हे पार्था, हे गीताशास्त्र तू एकाग्र चित्ताने ऐकलेस का? आणि हे धनंजया, तुझा अज्ञानातून उत्पन्न झालेला मोह नाहीसा झाला का?

***तूं हे एकाग्र चित्तानें अर्जुना ऐकलेंस कीं।***
***अज्ञान-रुप तो मोह गेला संपूर्ण कीं तुझा।***

**विषयः** या श्लोकात दोन गोष्टी आल्या आहेत 1) माझा हा उपदेश तू एकाग्र चित्ताने ऐकलास का? 2) आणि हे धनंजया, तुझा अज्ञानजन्य मोह नष्ट झाला का?

**स्पष्टीकरण**

1) **पार्थ कच्चित् एतत् त्वया एकाग्रेण चेतसा श्रुतम्:** अर्जुना, मी सांगितलेला उपदेश तू एकाग्र चित्ताने ऐकलास का? भगवंताचा हा अखेरचा श्लोक आहे. यानंतर भगवंताचे वचन नाही. 'भगवान उवाच' नाही. उपदेश

करणारा जर अनुभवसंपन्न पुरुष असेल तर ऐकतांना चित्त सहजतेने एकाग्र होऊन जाते म्हणजे ऐकणाऱ्याच्या एकाग्रतेचा मुख्य आधार वक्ता किती योग्य आहे यावर अवलंबून आहे. इथे तर स्वत: खुद्द भगवंतच उपदेश करताहेत त्यामुळे अर्जुनाला तो उपदेश एकाग्र चित्ताने ऐकायचाच होता याबाबत काहीही शंका नाही. संदेह नाही. अर्थात् श्रोत्याच्या ठायी जर तीव्र जिज्ञासा नसेल तर वक्ता अनुभवसंपन्न पुरुष असला तरी श्रोत्याकडून एकाग्रतेची अपेक्षा करता येत नाही पण इथे तर अर्जुन स्वत: अत्यंत विव्हळ होऊन शोकमग्न होऊन गेला होता. यामुळे शोक-मोहापासून निवृत्त व्हायची जिज्ञासा त्याच्या मनी कमालीची तीव्र होती. यामुळे हा गीतोपदेश श्रवण करतांना तो सहजपणे एकाग्र होता यामुळे हे लक्षात ठेवले पाहीजे की गीतोपदेश श्रवण करतांना अर्जुनासारखी एकाग्रता आवश्यक आहे तरच त्याच्याद्वारे अज्ञान आणि त्यातून उत्पन्न होणारा मोह वा विकारांची मुक्ती शक्य आहे.

2) **धनंजय कच्चित् ते अज्ञानसंमोह: प्रनष्ट:** हे अर्जुना, तुझा अज्ञानजन्य मोह नष्ट झाला का ? अर्जुनाच्या मनात शोक-मोह कशा प्रकारे उत्पन्न झाला या विषयी विस्तृत वर्णन पहिल्या अध्यायात आले आहे. त्याच शोक-मोहाच्या निवृत्तीसाठी भगवंतांनी अठरा अध्यायांमधून विविध प्रकारे उपदेश केला आहे. हा फलश्रुतीपर अखेरचा श्लोक आहे. यात भगवंत विचारताहेत कीतुझ्या ज्या शोक-मोहाला घालवण्यासाठी मी प्रयत्न केला तो दूर झाला की नाही?

भगवंताने हा गीतोपदेश स्वतंत्रपणे केला नाही कारण खरे अध्यात्मसंपन्न पुरुष स्वत:हून काही आध्यात्मिक उपदेश करायला प्रवृत्त होत नाहीत. जिज्ञासू, मुमुक्ष, साधक जेव्हा ज्ञानीजवळ पोहोचतात, आपल्या अडी-अडचणी मांडतात आणि या अडचणीतून मुक्त होण्याचा मार्ग सुचवण्याविषयी प्रार्थना करतात तेव्हा ज्ञानी पुरुष उपदेश करायला प्रवृत्त होतात. अन्यथा ते ईश्वरात तल्लीन होऊन अत्यंत निरहंकारी वृत्तीने, विनम्रभावनेने जनसेवा करत रहातात. व्याकुळ चित्ताने अर्जुनाने भगवंतापाशी उपदेश करायची प्रार्थना केली तेव्हा ईश्वराने गीतेचा हा अमृतमय उपदेश दिला. उपदेश पूर्ण झाल्यावर भगवंत अगदी स्वाभाविकपणे अर्जुनाला विचारताहेत की तू ज्या समाधानासाठी मजप्रत आला होतास आणि मला प्रार्थना केली होती तो तुझा शोक-मोह माझा उपदेश श्रवण करुन दूर झाला की नाही? या पुढील श्लोकात अर्जुन भगवंताच्या या प्रश्नाला उत्तर देत आहे.

: 73 :

**अर्जुन उवाच**

***नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।***
***स्थितोऽसि गतसन्देहः करिष्ये वचनं तव॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **त्वत्प्रसादात् अच्युत:** हे अच्युता, तुझ्या कृपाप्रसादाने
- **मोह: नष्ट:** मोह दूर झाला
- **मया स्मृति: लब्धा:** मला आत्मस्मृती प्राप्त झाली
- **गतसंदेह: स्थित: अस्मि:** तमाम शंका निमाल्या, माझे मन स्थिर झाले
- **तव वचनं करिष्ये:** तुझ्या उपदेशानुसार मी आता वर्तन करीन, मार्गक्रमण करीन

**अर्थ**

अर्जुन म्हणाला, हे अच्युता, आपल्या कृपेने माझा मोह नाहीसा झाला आणि मला स्मृती प्राप्त झाली आता मी संशयरहित होऊन राहिलो आहे म्हणून मी आपल्या आज्ञेचे पालन करीन.

**अर्जुन म्हणाला,**

***मोह मेला चि तो देवा कृपेनें स्मृति लाभली।***
***झालों मी नि:शंक मी आतां करीन म्हणसी तसें॥***

**विषय:** या श्लोकात चार गोष्टी आल्या आहेत 1) आपल्या कृपाप्रसादाने हे भगवंता माझा शोक-मोह दूर झाला. 2) मला आत्मस्मृती-आत्मभान प्राप्त झाले आहे. 3) साऱ्या शंका निमाल्यामुळे मन अगदी स्थिर होऊन गेले आहे. 4) मी आपल्या आदेशानुसार आचरण करीन.

**स्पष्टीकरण**

1) **त्वत्प्रसादात् अच्युत मोहः नष्टः** हे अच्युता, तुझ्या कृपाप्रसादाने माझा शोक-मोह दूर झाला. अर्जुन सांगत आहे की हे भगवंता, आपल्या उपदेशाने मला चार गोष्टी प्राप्त झाल्यात. पहिली गोष्ट माझ्या मनात प्रापंचिक नातलगांच्या निमित्ताने शोक-मोह उत्पन्न झाला होता. यामुळे चित्त इतके व्याकूळ झाले होते की मला काहीही सुचत नव्हते. मी निश्चित केलेल्या कर्तव्याचाही त्याग करायला सिध्द झालो होतो. ते सारे दूर झाले. संतांचा उपदेश आणि ईश्वरी कृपा या दोन गोष्टींनीच मोह घालवला जाऊ शकतो. केवळ संतांच्या उपदेशाने हे काम संपन्न होत नाही. तुलसीदासजी लिहितात रामकृपा नासहिं सब रोगा। ईश्वरी कृपेने काम, क्रोध, मोह, लोभ वगैरे विकाररुपी समस्त रोग दूर होऊन जातात. परमात्मा मनाच्या गहराईत नित्य विद्यमान आहे. शोक-मोह वगैरे विकार मनातच उद्भवतात म्हणून या विकारांना घालवायच्या प्रयत्नांच्या सोबत हरी कृपा असायला हवी आणि हरी कृपेसाठी हवी भक्ती, हवी ईश्वर शरणागत भावना.

2) **मया स्मृतिः** लब्धा मला आत्मस्मृती जागली. आत्मभान जागले. देह बुध्दीमुळे शोक-मोह उत्पन्न होतात. 'मी कोण आहे?' याचे ज्ञान नसल्यामुळे देहबुध्दी उत्पन्न होते. भगवंताचा उपदेश श्रवण करुन 'मी देह नसून आत्मा आहे.' अशी आत्मस्मृती झाली असे अर्जुन म्हणत आहे. आध्यात्मिक उपदेशाद्वारे अखेरीस आत्मस्मृतीच लाभायला हवी, आत्मभान जागल्यावरच ही देह बुध्दी म्हणजे ममत्वबुध्दी नष्ट होते. सारे काही ईश्वरच करवुन घेतो ही भावना आणि हे भान जागृत होऊ लागते. आपले तुच्छपण, आपली लघुता, आपली अल्पता ध्यानी येते. यामळे प्रत्येक क्षणी क्रिया करत असतांना ईश्वराचे स्मरण असायला हवे. यातून नित्य शांती राहील.

3) **गतसंदेहः स्थितः** अस्मि साऱ्या शंका निमाल्या. मन अगदी स्थिर, प्रसन्न, शांत झाले. भगवंताच्या उपदेशामुळे तिसरा लाभ हा झाला की समस्त शंका निमाल्या. आध्यात्मिक चिंतन केल्याने अनेक शंका उत्पन्न होतात. एक शंका दूर झाली की दुसरी जागते. यामुळे चित्त बेचैन राहू लागते. स्वकर्तव्यात तल्लीन होणे मोठे अवघड होऊन बसते. अशावेळी अनुभवी पुरुषांचा सत्संगही सुलभ नसतो. यामुळे कुठल्याही प्रकारे मनाला स्वस्थता लाभत नाही. अर्जुनासाठीही भगवंताला केवढे प्रयत्न करावे लागलेत. तसे पाहू जाता गीतेचा दुसरा अध्याय चित्ताच्या समाधानासाठी पुरेसा मानला जाईल पण अर्जुनाच्या मनात एका पाठोपाठ एक प्रश्न उपस्थित होतच राहीलेत. भगवंतांनी त्या सर्व प्रश्नांची उत्तरे धैर्यपूर्वक दिलीत. यामुळे अर्जुनाचे मन पूर्णपणे नि:शंक बनले.

4) **तव वचनं करिष्ये:** मी तुझ्या उपदेशानुसार चालीन. याचा अर्थ असा की स्वधर्मरुप कर्तव्ये निष्काम भावनेने करीन. निश्चित ठरवलेले कर्तव्य अर्जुन मोहवश होऊन सोडायला तयार होऊन गेला होता. भगवंताने त्याचा मोह घालवला. मोहाचे पटल दूर होताच तो कर्तव्य करायला तयार झाला. गीतेच्या उपदेशाचा मुख्य उद्देश सफल झाला.

तसा तर गीतेचा उपदेश 66 व्या श्लोकासोबतच पूर्ण झाला, समाप्त झाला पण त्याची फलश्रुती सांगणे शेष होते. ती 67 ते 71 या पाच श्लोकांमधून सांगितली गेली आहे. 72 व्या श्लोकात भगवंतांनी अर्जुनाला सरळ-सरळ विचारुनच घेतले की तुझा मोह गेला की नाही ? या प्रश्नाचे उत्तर देताना अर्जुनाने चार गोष्टी सांगितल्यात. 1) आपल्या कृपेने मोह दूर झाला 2) आत्मभान जागले, आत्मस्मृती आली. 3) साऱ्या शंका निमाल्या. 4) आता मी सदैव स्वधर्मरुप कर्तव्ये करत राहीन. याचा अर्थ असा की गीतोपदेशाद्वारे या चार गोष्टी सर्वांना प्राप्त होऊ शकतात. उपलब्ध होऊ शकतात.

: 74 :

**संजय उवाच**

***इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः।***
***संवादमिमश्रौषद्भुतं रोमहर्षणम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **इति अहं:** अशा प्रकारे मी
- **महात्मनः** वासुदेवस्य: महात्मा वासुदेवाचा
- **च पार्थस्य:** आणि अर्जुनाचा
- **इमं अद्भुतं:** हा अद्भुत
- **रोमहर्षणम्:** रोमांचकारक

* **संवाद अश्रौषम्:** संवाद ऐकला

**अर्थ**

संजय म्हणाला, अशा प्रकारे मी महात्मा श्री वासुदेव आणि अर्जुन यांचा हा अद्भुत रहस्यमय रोमांचकारक संवाद ऐकला.

**संजय म्हणाला**

***असा कृष्णार्जुनांचा हा झाला संवाद अद्भुत।***
***थोरांचा ऐकिला तो मीं नाचवी रोम रोम जो॥***

**विषय:** या श्लोकात संजयाने एकच गोष्ट सांगितली आहे की,

**स्पष्टीकरण**

इति अहं महात्मन: वासुदेवस्य च पार्थस्य इमं अद्भुतं रोमहर्षणम् संवादं अश्रौषम् अशा प्रकारे मी महात्मा वासुदेव आणि अर्जुनात घडलेला हा रोमांचकारक संवाद ऐकला. संजयाने भगवंतासाठी 'महात्मा' हे विशेषण प्रयुक्त केले आहे. ते कमालीचे निरहंकारी आणि अतिविनयी पुरुष होते. ज्ञानवंत तर होतेच. ज्ञानवंताच्या ठायी शून्यतेच्या परकाष्ठेप्रत पोहोचलेले पुरुष विरळ असतात. ते अशा ज्ञानवंतांपैकी एक होते. अशा महात्मा पुरुषाचा सत्संग लाभला ही गोष्ट अर्जुनाच परम भाग्याची होती. अर्जुन दृढ निश्चयी आणि जिज्ञासू होता. ज्याच्या ठायी जिज्ञासा आणि दृढ निश्चय असतो तो शिष्य बनण्याच्या योग्यतेचा असतो. अशा गुरु-शिष्यांचा संवाद ऐकायला लाभणे हे संजयाचे महान भाग्य होते. संजय दिव्य दृष्टीसंपन्न होता. यामुळे हा संवाद त्याला धृतराष्ट्राच्या निकट बसल्या-बसल्याच ऐकता आला. धृतराष्ट्र आंधळा होता त्यानाही घरबसल्या हे ऐकायचा लाभ मिळाला. हे धृतराष्ट्राचेही महद्भाग्य मानायला हवे.

भगवान आणि अर्जुन यांचा संवाद कसा होता याचे वर्णन संजय करत आहे. हा संवाद अद्भुत होता. अतिशय आश्चर्यकारक होता. अनुभवी पुरुषांच्या वाणीत मोठे सामर्थ्य असते. त्यांचे वचन अतिशय हृदयस्पर्शी असते. त्या वचनांमध्ये विचारात परिवर्तन घडवून आणायचे विलक्षण सामर्थ्य होते हे विशेष होय. दुसरे असे की हा संवाद रोमांचकारक म्हणजे अत्यंत आनंद उत्पन्न करणारा, अतिशय शांतीदायक, दु:खनिवारक आणि अज्ञान घालवून जीवनात परिवर्तन आणणारा होता. या संवादाने हजारो वर्षांपासून कित्येकांना प्रपंच मुक्तीचा मार्ग दर्शवला आहे.

: 75 :

***व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम्।***
***योगं योगेश्वरात्कृष्णात् साक्षात्कथयत: स्वयम्॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

* **व्यासप्रसादात्:** व्यासांच्या अनुग्रहाने, कृपेने
* **अहं एतत् परं गुह्यं योगं:** मी हा अतिशय श्रेष्ठ आणि गुह्य योग
* **योगेश्वरात् कृष्णात्:** योगेश्वर कृष्णामार्फत
* **स्वयं साक्षात् कथयत:** स्वत: सांगत असतांना
* **श्रुतवान्:** ऐकला आहे.

**अर्थ**

श्री व्यासांच्या कृपेने दिव्य दृष्टी मिळवून मी हा परम गोपनीय योग अर्जुनाला सांगत असतांना स्वत: योगेश्वर भगवान श्रीकृष्णांकडून प्रत्यक्ष ऐकला आहे.

***व्यास-देवें कृपा केली थोर योग-रहस्य हें।***
***मीं योगेश्वर कृष्णाच्या मुखें प्रत्यक्ष ऐकिलें॥***

**विषय:** या श्लोकात तीन गोष्टी आल्या आहेत 1) महर्षी व्यासांच्या अनुग्रहाने म्हणजे कृपेने 2) मी हा अत्यंत श्रेष्ठ आणि गुह्य योग 3) अर्जुनाला सांगताना साक्षात् योगेश्वर श्रीकृष्णांच्या मुखाने ऐकला आहे.

**स्पष्टीकरण**

1) **व्यासप्रसादात्:** व्यासांच्या अनुग्रहाने. परमात्म ज्ञानाचे श्रवण ही दुर्लभ गोष्ट आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या 29व्या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात हा विषय आला आहे. परमात्मज्ञानविषयक चर्चा वा प्रवचन सुरु आहे पण सर्वांनाच स्वतंत्रपणे ऐकायची प्रेरणा होतेच, होईलच असे काही सांगता येत नाही. असे काही घडत नाही. एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीने आपले लक्ष आकृष्ट केले तर आपण

वेळ काढूनही श्रवणाला निघून जातो आणि आयुष्यात क्रांतीकारक बदल घडून येतो. तसेच या ठिकाणी संजय सांगत आहे की व्यास महर्षींनी माझ्यासारख्या सामान्य माणसावर एवढा अनुग्रह करावा, असा अनुग्रह बरसला की भगवंताचा आणि अर्जुनाचा हा संवाद मी ऐकू शकलो.

2) **अहं एतत् परं गुह्यम् योगम्:** मी हा अतिशय श्रेष्ठ आणि गुह्य योग म्हणजे परमात्मविषयक ज्ञान. भगवान आणि अर्जुन यांच्यातला संवाद कसा होता ? तो कुण्या विषयावरचा होता ? संजय म्हणतो -- तो संवाद अतिशय श्रेष्ठ होता. गुह्य होता म्हणजे सखोल परमात्म्याविषयक आध्यात्मिक ज्ञानविषयक होता. संवादाचा विषय होता -- परमात्म्याचा अनुभव प्राप्त करुन कशा प्रकारे शोक, मोह, अज्ञान, अहंकाराला म्हणजे अज्ञानाला घालवावे.

3) **योगेश्वरात् कृष्णात् स्वयं साक्षात् कथयतः** श्रुतवान् स्वयं श्रीकृष्ण अर्जुनाला सांगताहेत ते ऐकले. महर्षी व्यासजींची कृपा झाली यामुळे श्रीकृष्ण भगवान जो उपदेश अर्जुनाला देत होते तो साक्षात् त्यांच्या मुखाने श्रवण करायची प्रेरणा मला लाभली आणि मला त्याचा अनुभव लाभला. भगवंताच्या मुखानेच उपदेश ऐकायला मिळाला. याहून अधिक श्रेष्ठ वस्तु अन्य काय असू शकते?

महाभारतात कथा येते. धृतराष्ट्र आंधळे होते. संजय त्यांना भगवंताचा हा उपदेश ऐकवत होता. हा उपदेश अर्जुनाला दिला जात होता. महर्षी व्यासजींच्या कृपेने संजयाला दिव्यदृष्टी लाभली होती त्यामुळे धृतराष्ट्राच्या शेजारी बसल्या-बसल्याच तो रणांगणावरील साऱ्या व्यूहरचना बघू शकत होता. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष भगवंताचा उपदेशही ऐकू शकत होता. (या म्हणण्यावर सारे लोक श्रध्दा ठेवतीलच असे नाही.)

: 76 :

***राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिमद्भुतम्।***
***केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहूर्मुहूः॥***

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **राजन्:** हे धृतराष्ट्रा
- **केशवार्जुनयोः** श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यामधला
- **च पुण्यम् अद्भुतम् इमं संवादम्:** आणि चित्ताला अतिशय पवित्र करणाऱ्या अतिशय अद्भुत अशा या संवादाला
- **संस्मृत्य संस्मृत्य:** पुन्हा पुन्हा आठवून
- **मुहूर्मुहूः** परत परत
- **हृष्यामि:** मी हर्षित होत आहे

**अर्थ**

महाराज धृतराष्ट्रा, भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुनाचा हा रहस्यमय, कल्याणकारक आणि अद्भुत संवाद पुन्हा पुन्हा आठवून मी वारंवार आनंदित होत आहे.

***हा कृष्णार्जुन-- संवाद राया अद्भुत पावन।***
***अठवूनि मनीं फार हर्षतों हर्षतों चि मी॥***

**विषय:** या श्लोकात दोन गोष्टी आहेत 1) हे धृतराष्ट्रा, भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुनात झालेल्या आणि चित्ताला पावन करणाऱ्या या अत्यंत अद्भुत संवादाला 2) परत परत आठवत आहे आणि मी वारंवार हर्षित होत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **राजन् केशवार्जुनयोः च पुण्यम् अद्भुतं इमं संवादम्:** हे धृतराष्ट्रा,भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुनात झालेल्या आणि चित्ताला पावन करणाऱ्या. अत्यंत अद्भुत अशा या संवादाला. भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यात जो संवाद झाला, त्या संबंधीचा आपला अभिप्राय संजय धृतराष्ट्राला सांगत आहे. हा संवाद चित्ताला अत्यंत पावन करणारा होता. चित्तशुध्दी, चित्ताची निर्विकारता, साधना हेच प्रत्यक्ष जीवनध्येय आहे. गीतेचा हाच संदेश आहे. गीता समन्वय ग्रंथही आहे. यामुळेही त्या ग्रंथाचे पावित्र्य वाढले आहे कारण की सांख्य दर्शन, योग दर्शनाच्या आवश्यक तत्त्वांना गीतेत योग्य त्या प्रकारे स्थान दिले गेले आहे. वैष्णव आणि भगवंताच्या भक्तीतत्त्वाला प्रधान स्थान दिले गेले आहे. गीतेत तात्त्विक चर्चा कमी आहे. चित्तशुध्दीसाठी यज्ञ, दान, तप, स्वाध्याय, ध्यान, जप, भक्ती, कर्मफलत्याग वगैरे ज्या विविध साधना मुमुक्षु जनांसाठी मुख्यत्वेकरुन करायच्या असतात त्यांचीच चर्चा अधिक आहे. यामुळेच संजय म्हणताहेत की हा संवाद पुण्यप्रद आहे. अद्भुत आहे. अलौकिक आहे.

2) **संस्मृत्य संस्मृत्य मुहूमुर्हू: हृष्यामि:** ज्या ज्या वेळेला हा संवाद आठवतो त्या त्या वेळी खूप हर्षित होतो. खूप आनंदी होतो. या संवादाचे एक वैशिष्ट्य आहे की हा सरळ, सोप्या भाषेत आहे. तात्त्विक, आध्यात्मिक, शास्त्रीय चर्चा करणारा इतक्या सरळ भाषेतला दुसरा ग्रंथ नाही. ब्रह्मसूत्र एक अद्वितीय ग्रंथ आहे पण तो गीतेसारखा सुबोध नाही. उपनिषदेही सुगम नाहीत. विद्यारण्य स्वामींचा 'पंचदशी' ग्रंथही सुगम नाही पण गीता अत्यंत सरळ, सुबोध असल्यामुळे लगेच लक्षात येतो. यामुळे संजय म्हणत आहे की त्या संवादाला मी ज्या ज्या वेळेला पुन्हा पुन्हा आठवतो त्या त्या वेळी केवळ त्याच्या स्मरणमात्रेणच आठवणीनेच मला अवर्णनीय हर्ष आनंद होतो. ग्रंथ सुबोध आणि प्रासादिक असेल तर वाचतांना खूप आनंद होतो. भगवंताची वाणी प्रासादिक होती. ज्यांच्या ठायी अनहंकार असतो म्हणजे शून्यतेची पराकाष्ठा नांदते त्यांची वाणी सरळ आणि मधुर असते. तुकोबा म्हणतात अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ त्याच्या गळा माळ असो नसो. गांधीजीच्या बाबतीत हाच अनुभव यायचा. त्यांची वाणीही मधुर व सुगम होती. ते शुध्द प्रेममय होते. भक्त हृदय होते. कृष्ण भगवंतांच्या मनी मोठेपणाचा कुठलाही विचार नव्हता. ज्यांची ज्ञानावस्था सरळ होऊन जाते त्यांना त्याचे भानही उरत नाही. ज्यांच्या साठी ज्ञानविषयक ज्ञानाचे थोडेही भान असते त्यांचे ज्ञान सहज नसते. आपल्याला श्वासोच्छवासाचे का कधी भान असते, नसते ना ? कारण की ते सहज आहे. सहज वस्तुचे ना भान असते वा ना भार असतो. अशी सहजावस्था साधलेले ज्ञानवंत विरळ असतात. ज्ञान प्राप्त झाल्यावरही जे तीव्र आत्मपरीक्षण करत असतात त्यांना ज्ञानाच्या अपूर्णतेचे भान सदैव असते. ते सतत ज्ञानवृध्दीसाठी प्रयत्नरत असतात. ब्रह्मसूत्राच्या एका सूत्राच्या भाष्यात शंकराचार्य सांगतात की शास्त्राने ज्ञान्यासाठी मौनाची पध्दती अवलंबायला सांगितले आहे. हा विषय त्यांनी अगदी सविस्तरपणे प्रतिपादित केला आहे. ज्ञान प्राप्त झाल्यावर देह असेपर्यंत म्हणजे हयात असेपर्यंत सृष्टीशी असलेल्या संबंधाविषयी ज्ञानी अतिशय जागृत असतो तरीही प्रारब्ध कर्मांच्या फलोपभोगासाठी ज्ञानवंताचे शरीर जीवंत असल्यामुळे त्याच्याकडून कधी सूक्ष्मशी चूक घडण्याची शक्यता आहे. ज्ञानाचे सूक्ष्म भान जागणे ज्ञानी असल्याचे सूक्ष्म भान जागणे-याविषयीची शक्यता मानू शकतो. यामुळे ज्ञान प्राप्त झाल्यावरही यात्रा सुरु असते असे म्हणून ज्ञान अधिकाधिक सूक्ष्म व्हावे, मरणाच्या क्षणापर्यंत ज्ञानाचा उत्कर्ष होत रहावा, ही भावना मनात जागृत राहून त्या दिशेने प्रयत्नशील असणे इष्ट आहे. ज्ञानी पुरुषासाठी मृत्युच्या वेळेचे विशिष्ट महत्व आहे. त्यावेळी त्याच्या ज्ञानाचा कस लागतो. यामुळे अखेरपर्यंत कर्मरत असावे. प्रयत्नरत असावे. ज्ञानरत असावे. श्रीकृष्ण भगवान स्वत:ला शून्य मानत होते म्हणून त्यांच्या मुखातून गीतामृत स्रवले. या अमृताचे पान अनेकांनी केले. यामुळे केवळ संजयच नव्हे तर सर्वांसाठी हा संवाद हर्ष म्हणजे आनंद, शांतता प्रदान करणारा आहे, यात शंकाच नाही.

: 77 :

*तच्च संस्मृत्य संस्मृत्य रुपमत्यद्भुतं हरे: ।*
*विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुन: पुन: ॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **च राजन्:** आणि हे धृतराष्ट्रा
- **तत् अत्यद्भुतं:** त्या अतिशय अद्भुत
- **हरे: रुपं संस्मृत्य संस्मृत्य:** श्री हरीच्या विश्वरुपाचे वारंवार स्मरण करत असतांना
- **मे महान विस्मय:** मला खूपच विस्मय होत आहे
- **च अहं पुन: पुन: हृष्यामि:** आणि मला वारंवार आनंद हर्ष होत आहे.

**अर्थ**

हे राजन् श्रीहरीचे (ज्याचे स्मरण केल्याने पापांचा नाश होतो, त्याचे नाव हरी) ते अत्यंत अलौकिक रुपही वरचेवर आठवून माझ्या मनाला खूप आश्चर्य वाटत आहे आणि मी वारंवार आनंदित होत आहे आणि हर्षपुलकित होत आहे.

***स्मरुनि बहु तें रुप हरीचें अति अद्भुत ।***
***राया विस्मित होऊनि नाचतों नाचतों चि मी ॥***

**विषय:** या अखेरच्या श्लोकात संजयाने दोन गोष्टी सांगितल्या आहेत. 1) त्या अतिशय अद्भुत श्री हरीच्या

विश्वरुपाचे पुन्हा पुन्हा स्मरण करतांना मला खूपच विस्मय होत आहे. 2) आणि मला वारंवार आनंद, हर्ष होत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **च राजन् तत् अत्यद्भुतं हरेः रुपं संस्मृत्य संस्मृत्य मे महान् विस्मयः** आणि हे धृतराष्ट्रा, ते अतिशय अद्भुत, आश्चर्यकारक श्री हरीचे विश्वरुप (अकराव्या अध्यायात वर्णित). त्या विश्वरुपाचे वारंवार स्मरण करुन मला खूपच विस्मय होत आहे.

मागील श्लोकात संजयाने सोंगितलेले आहे की भगवंत आणि अर्जुन या दोघांमध्ये जो संवाद झाला त्या संवादाला ज्या ज्या वेळी आठवतो तेव्हा तेव्हा मी आनंदित होतो. या श्लोकात सांगितले आहे की अकराव्या अध्यायात अर्जुनाच्या मनात विश्वरुप दर्शनाची इच्छा जागली तेव्हा भगवंताने त्याला दिव्य दृष्टी प्रदान करुन विश्वरुपाचे दर्शन घडवले. ते मलाही व्यासांच्या दिव्य कृपेने दिव्य दृष्टी लाभल्यामुळे घडले. त्या दर्शनाने अर्जुन तृप्त झाला. त्याच अनुसंधानात संजय सांगत आहे की भगवंताचे जे विश्वरुप दर्शन अर्जुनाला घडवले ते व्यासदेवांच्या कृपाप्रसादाने दिव्यदृष्टी लाभली असल्यामुळे मलाही घडले. यामुळे माझीही अर्जुनासारखीच अवस्था होऊन गेली. आता त्या विश्वरुपाचे जेव्हा मी मनात स्मृती जागवून दर्शन घेतो तेव्हा मी अपार आश्चर्यचकित होतो. भगवंताचे हे विश्वरुप अतिशय आश्चर्यकारक आहे.

2) **च अहं पुनः पुनः** हृष्यामि आणि मला पुन्हा पुन्हा आनंद लाभतो. तृप्ती मिळते. विश्वरुपदर्शन अल्पकाळासाठी अतिशय आनंददायक असते. संजयही हेच सांगत आहे की जेव्हा मी त्या विश्वरुप दर्शनाचे स्मरण करतो तर मला खूप आनंद होतो. हे दर्शन दीर्घकाळ अनुभवता येणारे वा लाभणारे नसते वा यातून लाभणारा स्मरणाचा आनंदही काही दीर्घकाळ टिकणारा नसला तरीही व्यक्तीच्या जीवनाला उन्नती पथावर नेण्यासाठी खूप मदत करणारा ठरतो यात काहीही शंका नाही. यामुळे अशा अनुभवाचे वा त्याच्या स्मरणाचे मोल काही कमी नाही. संजय-अर्जुन यांचे महद्भाग्य होते की त्यांना भगवान श्री कृष्णासारखे महापुरुष उपलब्ध झालेत. अर्जुनावर भगवंताचा आणि संजयावर महात्मा व्यासांचा अनुग्रह झाला.

: 78 :

*यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।*
*तत्र श्रीविर्जयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम्॥*

**अन्वय आणि शब्दार्थ**

- **यत्र योगेश्वरः कृष्णः** जिथे योगेश्वर कृष्ण
- **यत्र धनुर्धरः पार्थः** जिथे धनुर्धर अर्जुन असेल
- **तत्र श्रीः** तिथे श्री म्हणजे वैभव
- **विजयः** यश वा सफळता
- **भूतिः** सद्गुणांचा विकास वा उत्कर्ष
- **ध्रुवा नीतिः** अविचल निष्ठा (या वस्तुही असायला हव्यात)
- **इति मम् मतिः** असे माझे मत आहे

**अर्थ**

जेथे योगेश्वर भगवान श्रीकृष्ण आहेत आणि गांडीव धनुष्य धारण करणारा अर्जुन आहे तेथेच श्री, विजय, विभूती आणि अचल नीती आहे, असे माझे मत आहे.

*योगेश्वर जिथें कृष्ण जिथें पार्थ धनुर्धर।*
*तिथें मी पाहतों नित्य धर्म श्री जय वैभव ॥*

**विषयः** या श्लोकात सहा गोष्टींची चर्चा आली आहे 1) जिथे योगेश्वर भगवंतासारखे अधिकारी असतील 2) जिथे प्रयत्नवान पराक्रमी अर्जुनासारखा श्रेष्ठ साधक असेल 3) तिथे श्री म्हणजे शम, दम वगैरे प्रकारची चतुर्विध संपत्ती 4) आध्यात्मिक साधनेत साफल्य 5) सद्गुणांचा विकास 6) अविचल निष्ठा. या गोष्टी असतात असे माझे मत आहे.

**स्पष्टीकरण**

1) **यत्र योगेश्वरः कृष्णः** जिथे योगनिष्णात, महान अनुभवसंपन्न, भगवान श्रीकृष्णासारखे अधिकारी, गुरु असतील. प्रपंच बंधनापासून मुक्त व्हायची इच्छा असेल, तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली असेल तर कुणाचे मार्गदर्शन घ्यायलाच हवे. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्रपणे शास्त्राध्ययन करु शकत नाही आणि शास्त्रांचे आकलनही सहजपणे होऊ शकत नाही. यामुळे कुणा अनुभवी सत्पुरुषाचे मार्गदर्शन मिळाले तर साधनेत सहारा मिळू शकतो.

(4/34) यात भगवान अर्जुनाला सांगत आहेत की अनुभवी ज्ञानी पुरुषांजवळ जाऊन त्यांची सेवा करुन जिज्ञासेने प्रश्न विचारत रहाल तर यथासमय ज्ञान लाभेल. माझ्याकडून तुला ज्ञान लाभेल असे काही भगवंतांनी सांगितले नाही. भगवंतांची निरहंकारता हे प्रमाण आहे. इथे संजय स्वतंत्रपणे विचार मांडत आहे की जिथे भगवान श्रीकृष्णासारखे अनुभवी, योगविद्येत पारंगत ज्ञानी लाभतात तिथे आपली साधना यशस्वी होते.

2) **यत्र धनुर्धरः पार्थः** जिथे पराक्रमी म्हणजे प्रयत्नशील अर्जुनासारखा श्रेष्ठ साधक असेल केवळ अनुभवी पुरुष मिळून कार्यभाग साधला जात नाही. साधक वा मुमुक्षु कसा असावा हे आता सांगत आहेत. तो भगीरथ प्रयत्न करणारा असला पाहीजे. प्रयत्नात शिथिलता असेल तर अनुभवी पुरुष मार्गदर्शक लाभूनही साधना यशस्वी होणार नाही. आध्यात्मिक ज्ञान अनुभवी पुरुषाकडून प्राप्त होऊ शकते. त्यात विशेष अडचण नाही पण ग्रहण केलेल्या ज्ञानाला अमलात आणणे अवघड आहे. परिस्थितीमुळे त्यात कित्येक बाधा उपस्थित होतात. पूर्वजन्मीच्या पापकर्मांना भोगतांना जर देश, काळ, निमित्त वा अनुकूलता साधना करतांना उपस्थित झाली तर साधनेत बाधा उत्पन्न होते यामुळे यातही हरीकृपेवर अवलंबून रहावे लागते. अर्जुनाच्या ठायी पुरुषार्थाचे बळ होते आणि भगवान श्रीकृष्णाबद्दल अनुपम श्रध्दा होती. यामुळे उपदेश प्राप्त झाल्यावर श्रध्दा आणि पुरुषार्थाच्या बळावर अमलात शिथिलता वा मंदता येण्याची शक्यता नव्हती. यामुळेच संजयाने अर्जुनाचा उल्लेख केला आहे.

3) **तत्र श्रीः** म्हणजे शम, दम वगैरे सहा प्रकारची साधन संपत्ती. जिथे मार्गदर्शक अनुभवी आणि साधकही प्रयत्नशील आहे तिथे 1) शम, दम, तितिक्षा, समाधान, श्रध्दा हे आंतरिक गुण आणि 2) मुमुक्षुत्व म्हणजे मोक्षाची इच्छा 3) इहलौकिक आणि पारलौकिक सुख-उपभोगाप्रती वैराग्य व 4) नित्यानित्य विवेक ही चार साधन संपदा साधक-मुमुक्षुपाशी असेलच.

4) **विजयः** आध्यात्मिक साधनेत यशस्विता. शम, दम वगैरे साधन संपत्ती ज्याला प्राप्त झाली त्याला साधनेत साफल्य लाभायलाच हवे. अर्थात् मार्गदर्शक अनुभवी असले पाहिजेत आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारा साधक अत्यंत प्रयत्नशील असायला हवा तर मग सफलता मिळायला उशीर लागणार नाही. अनुभवी गुरु लाभल्यावर आणि साधना उत्कट असल्यावरही एकाच जन्मात साधना यशस्वी होईल असे काही सांगता येत नाही. याच जन्मात यश लाभावे प्रयत्न तर असेच असायला हवेत. तरीही उपर्युक्त कारणांमुळे सफलता लाभली नाही तरी धैर्य गमावून बसायला नको. परमात्म्याची उत्कट भक्ती प्राप्त झाली तर सफलतेचे लक्ष्य न बाळगता भक्तीत लीन रहायचेच लक्ष्य असावे. भक्ती प्राप्त झाल्यावर साधनेत पूर्णता वगैरे विषयक, पूर्ण साफल्य वगैरे विषयक पूर्ण तटस्थ भाव असतो.

5) **भूतिः** सद्गुणांचा उत्कर्ष वा विकास. साधकाचे लक्ष सद्गुण विकासाकडे तेवढे नसते जेवढे भक्ती वगैरे अन्य साधनांकडे असते. भक्ती, ध्यान, वैराग्य यांच्या इतकेच मूल्य सद्गुण विकासाचेही आहे, हे लक्षात ठेवले पाहीजे. गीतेत सद्गुण विकासाला आवश्यक तेवढे महत्व दिले गेले आहे. सोळाव्या अध्यायातील आरंभिक तीन श्लोकात दैवी संपत्ती म्हणजे सद्गुणांचेच वर्णन आले आहे. बाराव्या अध्यायात भक्ताची लक्षणे, तेराव्या अध्यायात ज्ञानी पुरुषाची लक्षणे, चौदाव्या अध्यायात गुणतीताची लक्षणे प्रतिपादित आहेत. त्यातही गुणवर्णन आले आहे. असे सांगू शकतो. ज्ञानी पुरुषाच्या ठायी दिसून येणारी लक्षणे म्हणजे सद्गुण साधकाला अभ्यासपूर्वक म्हणजे प्रयत्नपूर्वक साध्य आत्मसात करावी लागतात. यामुळे त्यांचे मोल आहे. परमात्मानुभव प्राप्त करुन घेण्यासाठी समुच्चय रुपाने साधना केली जाते. साधना एकांगी रहायला नको. साधना अनेकआयामी, अनेकरुपी, बहुरुपी, बहुअंगांनी संपन्न असेल तर अनुभव प्राप्त होऊ शकतो. अर्थात् साधनेत बहुविधता असल्यावरही संस्कार, वृत्ती, भावना, बुध्दीशक्ती, जीवनप्रवाहानुसार एखादे साधन मुख्य असू शकते. साधनेत सद्गुण विकासाकडे संपूर्ण लक्ष असावे.

6) **ध्रुवा नीतिः** इति मम मतिः अविचल, जाज्वल्यमान, प्रखर नीतीनिष्ठा या बाबीही असायला हव्यात असा माझा अभिप्राय आहे. प्राचीनकाळापासून एक चुकीचा मतप्रवाह वा धारणा चालत आली आहे की त्रिगुणातीत, ज्ञानी, सिध्द, स्थितप्रज्ञ पुरुष हवे तसे वागू शकतो. त्याच्यासाठी नीतीनियमांचे बंधन नाही कारण की तो मुक्त आहे. तो दुराचार करेल, तो व्यसनी असेल, व्यभिचार करेल तरी चालेल. साधकावस्थेत नीतीनियमांची


गरज असते. सिध्दावस्थेत मूळीच नसते. खरे पाहू गेल्यास गीता, शंकराचार्य, ज्ञानोबा, गांधीजी, विनोबाजी वगैरे महापुरुषांना हे मत मान्य नाही. एवढेच नव्हे पण या मताविषयी त्यांचा कसून विरोध आहे. अनुभवी सिध्दपुरुषाचे संपूर्ण आचरण एवढे उच्च, आदर्श असते की ते आबालवृध्द स्त्री-पुरुषांसाठी अनुकरणीय असायला हवे. यात अपवाद असू शकत नाही. तुलसीदासजी असे म्हणतात.

***नीति-निपुन जिन्हँ कहँ जग लीका।***
***घर तुम्हार तिन्हँकर मन नीका॥***

अर्थात् नीती म्हणजे नैतिक आचरणात तो निपुण आहे अशी ज्याची ख्याती आहे त्यांच्या ठायी हे रामराया, आपण निवास करावा. ते आपल्या निवासार्थ चांगले निवासस्थान आहे.


भगवंतांनी आपला हा निश्चित अभिप्राय गीतेत व्यक्त केला आहे.

• • • *अठरा अध्याय संपूर्ण इथे गीता ग्रंथ पूर्ण झाला* • • •



प्रत्येक मनुष्याची कर्मे जीवनाच्या प्रवाहानुसारच ठरतात. तो त्या कर्माचा त्याग करु शकत नाही. कुणाच्या जीवनात त्रास अधिक तर कुणाच्या जीवनात कमी असतो. अनुकूलता - प्रतिकूलताही समान नसून वेगवेगळ्या प्रकारची असते. एकेकट्याच्या जीवनातही अनुकूलता प्रतिकूलता न्यूनाधिक असते. यामुळे कुणाच्या जीवनाचे अनुकरण करता येत नाही. असे करणे कल्याणप्रदही नाही. मी जर माझ्या स्वधर्मरुपी कर्माचा त्याग केला तर मी धर्मपालनापासून विमुख होईन.

जन्म तारीख - 11 जून 1900 - देहावसान 27 ऑगस्ट 1981




गानयोगी बाळकोबा भावे




बाळकोबा यांचे आजोबा व आजी




गागोदे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील श्री बाळकोबा भावे यांचे राहते घर




*डावीकडून शिवाजीराव भावे, विनोबा भावे व बाळकोबा भावे (तीन भावे बंधु)*




बाळकोबा भावे




कर्मवीर बाळकोबा भावे



बाळकोबा भावे आपले धाकटे बंधू श्री शिवाजीराव भावे यांच्या समवेत



बडोदा येथील घर



श्रीगणेशायनमः ॐनमःसिद्धं
अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ
ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः
क ख ग घ ङ च छ ज झ
ञ ट ठ ड ढ ण त थ द
ध न प फ ब भ म य र
ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ
१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ ०
न. शं. भावे. बडोदें.

*बाराखडीचा तक्ता*





कर्मवीर बाळकोबा भावे



उरळी कांचन येथील बाळकोबा यांच्या कुटीच्या प्रांगणात लेखक प्राचार्य डॉ. विश्वास पाटील

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-०१



डावीकडून शिवाजीराव भावे, आचार्य विनोबा भावे व बाळकोबा भावे (तीन भावे बंधू )

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.